DAMAGE BOOK

UNIVERSAL
LIBRARY

OU_176586

UNIVERSAL
LIBRARY

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग पहिला

अ-ऐ

आधीं यास्क निरुक्तवृत्ति रचिती ज्या बोलती वैदिक ।
झाले शाश्वतमेदिनीअमरही त्या मागुतीं लौकिक ॥
निर्मीं नंतर हेमचंद्र सुमती कोशाप्रति प्राकृत ।
आतां मंडळ हें रची नव महाराष्ट्रीय-कोशाप्रत ॥

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४९५ शनिवार, पुणें २
मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४९५ शनिवार, पुणें २.

किंमत १० रुपये

इ. सन १९३२] पुणें [शा. शक १८५४

संपादकमंडळ.

श्री. **यशवंत रामकृष्ण दाते,** बी. ए. एल्एल्. बी. (प्रमुख)

श्री. **चिंतामण गणेश कर्वे,** बी. ए.

श्री. **आबा चांदोरकर,**

श्री. **चिंतामण शंकर दातार.**

प्रमुख शाखा–साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ (वऱ्हाडी बोली); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ (गोमंतकी);
वाङ्मयचर्चामंडळ (कर्नाटकी. बेळगांव); शारदोपासकमंडळ (कोंकणी.
मालवण); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ (कुडाळी. पेडणें); पुणें
.भाषाशास्त्रमंडळ (व्युत्पत्ति); शारदाश्रम (महानुभावी.
यवतमाळ); हेटकरी भंडारीमंडळ (दादर);
साहित्यसेवामंडळ (कऱ्हाड). इ. इ.

संपादकीय निवेदन

अनंतपारं किल शब्दशास्त्रम् ।

बारा वर्षे चाललेला महाराष्ट्रीय ज्ञानकोश पुरा होत आला असतां त्याच्या संपादकवर्गानें ज्ञानकोशासारखेंच संघशक्तीनें पार पडणारें दुसरें एखादें बिकट परंतु अत्यंत आवश्यक काम अंगावर घ्यावें अशाबद्दल ज्या खासगी आणि जाहीर सूचना आल्या त्यांपैकीं श्री. सरदार मेहेंदळे, प्रो. पोतदार, श्री. द. वि. आपटे प्रभृति मंडळीनीं केसरींतून प्रसिद्ध केलेली (२३-११-१९२६) बृहत्कोशाची सूचना महत्त्वाची होती. ती सूचना ज्ञानकोशमंडळाला पटून त्या संस्थेनें हें शब्दकोशाचें कार्य केलें असतें तर ती संस्था अखंड टिकून जास्त स्पृहणीय व अनुकरणीय होती व तें आम्हाला इष्टच होतें. पण त्या मंडळामार्फत हें बृहत्कोशाचें अत्यावश्यक कार्य होत नाहीं असें पाहून प्रस्तुत शब्दकोशाच्या संपादकवर्गानें ता. १ एप्रिल १९२८ पासून स्वतंत्रपणें आणि उघड रीतीनें या कार्यास आपणाला वाहून घेतलें.

शब्दकोशरचनेला थोडा आरंभ यापूर्वीच म्हणजे शके १८४९ च्या दसऱ्यापासून झाला होता. त्या शुभदिनीं ज्ञानदेवींतील ' ॐ नमो जी आद्या । ' या पहिल्या ओंवीतील पहिला शब्द पहिल्या शब्दपत्रावर उतरण्यांत आला व अशा रीतीनें या कार्याचें पुण्याहवाचन झालें. १९२८ सालच्या उत्तरार्धांत रीतसर कंपनीची उभारणी करून प्रत्यक्ष संपादन आणि प्रचार कार्याला जोरानें आणि जोमानें सुरवात झाली. ग्रांथिक, प्रांतिक, पारिभाषिक व धंदेवाईक शब्द जमा करण्यासाठीं संपादकवर्गानें कसकसे प्रयत्न केले याची समग्र माहिती. वेळोवेळीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आलेलीच आहे व शेवटच्या खंडांत ती थोडक्यांत नमूदहि करण्यांत येईल. सुमारें पंचवीस संस्था व दीडशें व्यक्ती यांचा विशेष हातभार शब्दसंग्रहाच्या अवघड कामाला लागल्यामुळेंच इतक्या लवकर हा प्रथमखंड प्रसिद्ध होत आहे.

भाषेंतील एकूणएक सर्व शब्दांची प्रथम सूची तयार करवून नंतर एकेक शब्दाची व्याकरण, अर्थ, अवतरण, व्युत्पत्ति, प्रचार इ० दृष्टींनीं माहिती गोळा करावयाची व नंतरच प्रकाशनास आरंभ व्हावयाचा, अशी आधुनिक कोशशास्त्रीय पद्धत संपादकांना पूर्ण अवगत आहे. पण आपल्या महाराष्ट्रांतील थोड्याशा अर्धशिक्षित पांढरपेशा जनतेच्या सांपत्तिक बळावर अवलंबून वरील तऱ्हेच्या सर्वांगपरिपूर्ण पण २५ वर्षांपेक्षांहि अधिक काल लागणाऱ्या प्राथमिक प्रयत्नाला हात घालणें अशक्य होतें. बरें, या दीर्घकालाच्या प्राथमिक अवस्थेनंतर प्रकाशनसंस्काराची दुसरी पंचवीस वर्षांची पायरी चढणें तर त्यापेक्षांहि अवघड होतें; असें अव्याहत दोन पिढ्या काम चालून हा संपूर्ण शब्दकोश बाहेर पडणार तोंच तिसऱ्या पिढीला तो अपुरा वाटणार ! तेव्हां, आपल्यामध्यें भाषाशास्त्रज्ञ विद्वानांचा असणारा तुटवडा व जे थोडे असतील त्यांची सहकारिता लाभण्याची अशक्यता, चांगल्या सुशिक्षितांमध्येंहि अशा मराठी-मराठी बृहत्कोशाच्या उपयुक्ततेसंबंधीं असलेली साशंकवृत्ति, बहुसंख्याक साक्षर जनतेची धार्मिक किंवा ललितवाङ्मयाकडेच विशेष आढळून येणारी प्रवृत्ति, व सरकार, विद्यापीठें, संस्थानिक आणि धनिक यांच्या ठिकाणीं लागेल तितका पैसा खर्चे करून अशीं राष्ट्रोपयोगी कामें घडवून आणण्याच्या सुबुद्धीच्या जागृतीचा प्रस्तुतकालीं अभाव. अशा बिकट परिस्थितींत शक्य तितक्या थोड्या अवधींत शक्य तितकी मेहनत आणि मदत घेऊन व आधुनिक शास्त्रीय पद्धतीचा यावत्शक्य अवलंब करून तयार केलेला कोश लोकांपुढें ठेवणें हेंच इतिकर्तव्य ठरविणें आम्हांस भाग होतें व तेंच आम्ही प्रस्तुत करीत आहों. एका पिढीला जरी हा कोश पुरला तरी बावगें नाहीं. या कोशाच्या उणीवा पुढल्या पिढीनें भरून काढून नवीन सुधारलेली आवृत्ति प्रसिद्ध करावी. शिवाय केव्हांहि, कितीहि प्रयत्न केला तरी सर्वेशःपूर्ण असा कोश होणें अशक्य. मराठी भाषा झपाटयानें दररोज वाढत व बदलत आहे. अनेक समाज, उद्योग, विद्या, शास्त्रें आणि संस्कृति यांची सारखी घालमेल चालली आहे. तेव्हां अंतर्बाह्य परिस्थिति लक्षांत घेऊन पाहतां यापेक्षां अधिक पूर्ण कोश तयार होणें आज शक्य नाहीं हें दिसून येईल. असो.

वर या कोशाच्या मानीव अपुरेपणाचें समर्थन केलें असलें तरी याच्या सिद्धीला सर्व तात्त्विक आणि शास्त्रीय साधनांचा उपयोग केलेला दिसून येईल. जुनी शास्त्री पद्धत व नवी शास्त्रीय पद्धत यांचा मेळ बसवून याची रचना केली आहे. हा कोश रचण्यासाठीं काय काय गोष्टी केल्या याचें सविस्तर विवेचन शेवटच्या खंडांतील प्रस्तावनेंत येईलच. मराठी भाषा व वाङ्मयाला यामुळें काय महत्त्व येणार आहे याची कल्पना खऱ्या विद्वानांना येईलच. यांतील उणीवांची तीव्र जाणीव इतरांपेक्षां संपादकांना अधिक आहे व अनुकूल परिस्थिति लाभल्यास त्या पूर्ण भरून काढण्यासहि ते समर्थ आहेत. यापेक्षां अधिक प्रस्तावाची जरूरी नाहीं.

या कोशाच्या संपादनाला अनेकांचें कमीअधिक प्रमाणानें मोठें साहाय्य झालें आहे व ग्रंथ संपूर्ण होईपर्यंत अधिक व्हावयाचेंहि आहे. त्यांचे नांवनिशीवार कृतज्ञतापूर्वक आभार मानण्याचें स्थल शेवटचा खंड असल्यानें येथें त्या सर्वांचे एकत्र मोघम आभार मानीत आहों. याबद्दल कोणाचा रोष किंवा गैरसमज होणार नाहीं अशी आशा आहे.

शेवटीं, केवळ कल्पनावस्थेंतच कोश असतांना त्याचें विशेष महत्त्व पटून ज्यांनीं त्यासाठीं दहा हजार रुपये देण्याची तरतूद केली व हा खंड ज्यांच्या या मदतीमुळेंच इतक्या लवकर प्रसिध्द होत आहे त्या श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांचा आभारपूर्वक उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. हा कोश त्यांनाच अर्पण होणें योग्य होतें व तसा योगहि आलेला आहे.

आतां यापुढचे पांच खंड सर्व साहाय्यकांच्या मदतीनें, दर सहा महिन्यानीं एक एक असे बाहेर पडतील अशी आशा आहे.

यशवंत रामकृष्ण दाते

रचनापरिचय

अक्षरानुक्रम—कोशांतील शब्दाक्षरानुक्रम कसा ठेवावा, यासंबंधीं पूर्वीचे कोश काढून व कांहीं विद्वानांशीं विचार-विनिमय करून एक प्रश्नपत्रिका काढून ती अनेक विद्वान् आणि भाषाकोविद यांकडे पाठविण्यांत आली होती. त्यांच्याकडून आलेल्या सूचनांचा जाहीर विचार केल्यानंतरच पुढील पद्धति अवलंबिण्यांत आली.

कोशांतील शब्दांचा आद्याक्षरानुक्रम मराठी वर्णमालेप्रमाणेंच ठेवण्यांत आला आहे. म्हणजे **अं, क्ष** व **ज्ञ** यांना स्वतंत्र स्थानें दिलीं आहेत. शब्दांतील सानुस्वार अक्षरापुढें व्यंजन असल्यास ते शब्द अनुक्रम लावतांना अनुस्वार नाहीं असें समजून लावले आहेत. परसवर्णाप्रमाणें अनुक्रम धरला नाहीं. उदा० **इंगळा, इंगा** हे शब्द 'इग'नें आरंभ होणाऱ्या शब्दांतच घेतले आहेत 'इश्व'च्या पुढें लावले नाहींत. या क्रमामध्यें सानुनासिक व निरनुनासिक शब्द जवळ जवळ आल्यास बहुधां प्रथम निरनुनासिक शब्द घेऊन नंतर सानुनासिक घेण्यांत आला आहे. उदा० **उचट, उंचट**. विसर्गाच्या बाबतींतहि विसर्ग नाहीं असें धरून शब्दानुक्रम लाविला आहे. उदा० **उषः-काल-पान** नंतर **उषा** शब्द घेतला आहे. **ॐ. ऑ** हीं अक्षरें **अ, आ** सारखींच धरलेलीं आहेत. संस्कृत तत्सम शब्द संस्कृत रूपाप्रमाणें दिले आहेत. उदा० **आह्लाद**, यांत ह प्रथम आहे. **अरि, आपत्ति** येथें अंत्यस्वर ह्रस्व आहे.

शब्दाचीं अनेक रूपें—एका शब्दाचीं दोन किंवा अधिक रूपें जेव्हां असतील तेव्हां शब्दाचा जेवढा भाग या सर्व रूपांना सामान्य आहे तेवढा ठेवून त्यापुढें वैकल्पिक भाग दिले आहेत. उदा० **अफिमी-म्यां** (अफिमी, अफिम्या), **अप्रयोजक-जिक, उडवणें-घिणें**. केव्हां केव्हां वैकल्पिक अक्षर कंसांत दाखविलें आहे. उदा० **अपक(ख)रा**.

पोटांतील शब्द—सामासिक शब्दांतील उत्तरपदें, तसेंच वाक्प्रचारांत शब्दांना लागणारीं क्रियापदें हीं मूळ शब्दाबद्दल पोकळ टिंब (०) देऊन पुढें लिहिलीं आहेत. उदा. **अमृत** शब्दाच्या पोटांत **०फळ, ०महाल** इ० उत्तरपदें व **आंकडा** शब्दामध्यें **०वळणें, ०मोडणें** हीं क्रियापदें दिलीं आहेत. ज्या ठिकाणीं मूळ शब्दाला दुसरा शब्द लागतांना सामान्यरूप किंवा बदल होतो त्या ठिकाणीं जेथून बदल होतो तें रूप – देऊन लिहिलें आहे. उदा० **ईश्वर** शब्दाच्या पोटांत '**–राचा लाल**' (ईश्वराचा लाल), **अनागोंदीच्या** पोटांत '**–चा राजा.**' असें लिहिलें आहे. असे शब्द किंवा वाक्प्रचार या प्रकारें लिहिण्यानें कळण्यास कठिण पडतील असें जेथें वाटलें तेथें ते संबंध लिहिले आहेत.


हवाले—जेथें शब्द दोन तीन प्रकारांनीं उच्चारिले जातात तेथें साधारणतः एकाच शब्दाचें विवरण केलें असून बाकींच्या पुढें त्या शब्दाचा हवाला दिला आहे. उदा० **अनस्ता-अनास्था** पहा. **अ** आणि **आ** यांनीं आरंभ होणारे शब्द क्वचित एकाच ठिकाणीं पण बहुधां असे एकमेकांचे हवाले देऊन लिहिले आहेत. साधारणतः शब्दार्थ अपभ्रष्टरूपापुढें न देतां शिष्ट रूपापुढें देण्याचा प्रघात ठेवला आहे.

गाळलेले शब्द—जुन्या कोशांतून किंवा परंपरेनें जे चुकीचे शब्द आलेले आहेत किंवा मुद्रणदोषामुळें भलतेच शब्द बनले आहेत ते बहुधां गाळण्याचा क्रम अवलंबिला आहे. उदा० हणावनी (हंसकोश–बीजप्ररोहण+अवनी. –ज्ञा १८.१०). असले बहल अशले, उपेणेबहल उपणे इ०. कांहीं शब्दार्थहि चुकीचे जे वाटले ते बदलले आहेत. पूर्वीच्या ग्रंथकारांच्या काल्पनिक अर्थाचीहि शहानिशा करून व्युत्पत्तिदृष्ट्या पटणारे अर्थ तेवढेच ठेवले आहेत.

प्रांतिक-परकी शब्द:—प्रांतिक बोलींतील अगदीं रूढ व विशेष परिचयाचे तेवढेच शब्द घेतले आहेत. थोडथोडा फरकानें इकडलाच शब्द असेल तर तो स्वतंत्र घेतला नाहीं. इंग्रजी शब्दहि जास्त प्रचारांतले तेवढेच घेतले आहेत. शास्त्रीय परिभाषा देखील लेखनिविष्ट जी आढळते तीच संगृहीत करण्यांत आली आहे. नवीन परिभाषा पुरवणीविभागांत देण्याचा विचार आहे.

अवतरणें—अवतरणें होतां होईतों जुनीं व कालानुक्रमानें देण्यांत आलीं आहेत. पण ज्ञानेश्वरीसारख्या फार परिचित ग्रंथांतील अवतरणांपुढें अज्ञात पण परिचययोग्य ग्रंथांतील अवतरणें वगळलीं जाऊं नयेत म्हणून कोठें कोठें त्यांना प्राधान्य दिलेलें आढळेल. एका शब्दाला विविध अवतरणें सहज देतां येण्यासारखीं असूनहि स्थलसंकोचास्तव तसें करण्याचा मोह आवरलेला दिसून येईल. तथापि चांगलीं अवतरणें निवडण्याचा प्रयत्न केला आहे.

व्युत्पत्ति—एका शब्दाचे अनेक अर्थ असतां ते व्युत्पत्तिदृष्ट्या वेगवेगळाले फोडून स्वतंत्र शब्दांपुढें देण्यांत आले आहेत. उदा. **आर्ष**=मूळच्याच (सं. आर्ष), **आर्ष**=ऋषीसंबंधी (सं. ऋषि). **आन** (सं. अन्य), **आन** (आण ऊंबर (वृक्ष) ऊंबर (उमर), इ०. बहुतेक शब्दांची व्युत्पत्ति कांहीं निश्चित, कांहीं संभाव्य तर कांहीं संशयित दिलेली आढळेल. कांहीं संस्कृत शब्दांचे मूळ धातुहि दाखविले आहेत. कोठें कोठें पाश्चात्य शब्दांशींहि तुलना केली आहे. द्राविडी शब्दांपासून कांहीं मराठी शब्द कसे साधले आहेत हें दाखविण्याचा यांत केलेला प्रयत्न व्युत्पत्तिपंडितांना नवीन वाटेल. एकदां व्युत्पत्ति दिली असल्यास पुन्हां ती साधित किंवा सामासिक शब्दांपुढें पुनरुक्ति टाळण्यासाठीं दिलेली नाहीं.



श्रीमंत महाराज सर सयाजीराव गायकवाड, बडोदें.

श्री

श्रीमंत महाराज सर सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादुर,

फर्जंद – इ – खास – इ – दौलत – इ – इंग्लिशिआ;

जी. सी. एस. आय.; जी. सी. आय. ई; एलएल. डी.

सरकार, संस्थान बडोदें, यांचे सेवेसी

क्षात्रकुलभूषण, पतितपावन, महाराज साहेब,

आपली प्रजाहितदक्षता, सर्वव्यापी विद्वत्ता, गुणग्रहणतत्परता, आणि कर्णासारखी दानशूरता, आपलें अखिल समाजाबद्दल सहानुभूतिपूर्ण अंतःकरण, साहित्य सेवकांचा स्वयंस्फूर्त व अयाचित सत्कार, देशी भाषांचा सक्रिय पुरस्कार, भारतवर्षात एकभाषाप्रचार करण्यास उत्तेजन व विशेषतः या मराठी कोशरचनाकार्याबद्दल आपण आरंभीच दाखविलेली आत्मीय भावना आणि तत्प्रसिद्ध्यर्थ दिलेली मोठी मदत, इत्यादि सद्गुण- समुच्चयावर आणि महनीय कृतींवर लुब्ध होऊन आम्ही संपादिलेला हा

महाराष्ट्र शब्दकोश

अत्यंत आदरानें व कृतज्ञता बुद्धीनें सविनय अर्पण करीत आहों.

आपले नम्र,

संपादक

प्रस्तावना

कोशरचनाशास्त्र व कोशवाङ्मय

शब्दकोश—हा शब्द शब्द+कोश या दोन शब्दांचा समास होऊन बनलेला आहे. यावरून एखाद्या भाषेंतील शब्दांचा संग्रह असा बोध होतो. यांतील पहिला अवयव शब्द हा तृतीय गणांतील शप् धातूपासून झालेला दिसतो. यापासून शब्दायते असा नामधातु बनतो. याचा अर्थ प्रथम ध्वनि, आवाज असा असून पुढें अर्थयुक्त ध्वनि असा झाला. अशा अर्थयुक्त ध्वनींचा म्हणजे शब्दांचा जो संग्रह तो शब्दकोश होय. कोश हा शब्द कुक्षि किंवा कोष्ठ या शब्दांतील कुश् किंवा कुष् धातूपासुन निघाला असुन त्याचे अर्थ पात्र, पेटी, संग्रहस्थान, शब्दकोश इत्यादि आढळतात. आरंभीं हा शब्द कोश याच स्वरूपांत आढळतो; पण पुढें पुढें कोश व कोष अशीं दोन्ही रूपें आढळतात. कोश शब्दाचा कळा अथवा बीजपेटिका (पुष्पकोश, बीजकोश) असाहि अर्थ आहे; आणि त्याच अर्थी व तत्सदृश हिब्रू व ग्रीक भाषांत अनुक्रमें गुकाग व कोक्कॉस असे शब्द आढळतात, व याच ग्रीक शब्दावरून पुढें कोकून म्हणजे रेशमाच्या किड्याचा कोश हा इंग्रजी शब्द निघाला आहे. असो. सध्यां कोश अथवा शब्दकोश यानें एखाद्या भाषेंतील शब्दांचा संग्रह असा बोध होतो.

कोशाची कल्पना—भरतखंडामध्यें शब्दकोशाची कल्पना फार प्राचीन काळींच उद्भूत झालेली दिसुन येते. भाषेंतील शब्दांचा एकत्र संग्रह करण्याची ही कल्पना आपणांस प्रथम वेदांगग्रंथांमध्यें आढळणाऱ्या ' निघण्टु ' या ग्रंथांत दृष्टीस पडते. वास्तविक ' निघण्टु ' हा शब्दसंग्रह शब्दकोश ह्या संज्ञेस पात्र नाहीं. त्यास केवळ शब्दमालिका हें नांव अन्वर्थक होईल. असा शब्दसंग्रह करण्याची आवश्यकता जेव्हां एखादा विषय दुर्बोध होऊं लागतो किंवा एखादा विषय दुसऱ्यास शिकवावयाचा असतो त्यावेळीं उत्पन्न होते. जोंपर्यंत एखाद्या विषयाची परंपरा मूळापासुन फारशी दूर गेलेली नसेल व त्या विषयाचें अध्ययन चालू असेल तेव्हां त्यावर टीका, भाष्यें, टिप्पणी किंवा कठिण शब्दांवरील अर्थबोधक टीपा यांची आवश्यकता नसते. परंतु जसजसे ग्रंथकर्ता व वाचक किंवा अभ्यासक यांमधील अंतर वाढूं लागतें तसतशी या उपसाहित्याची गरज भासूं लागते. त्याप्रमाणेंच एखाद्या भाषेचें स्वरूप हळू हळू बदलत जात असतां जेव्हां अशी स्थिति प्राप्त होते कीं एका स्वरूपांतील भाषा अथवा शब्द उत्तरकालीन भाषेपासून व शब्दांपासून विशेष पृथक्त्व पावून दुर्बोध होतात तेव्हां भाषेंतील पूर्वस्वरूपांतील शब्दांच्या अर्थाचें ज्ञान निश्चित होण्याकरितां त्या स्वरूपांतील शब्दांवर टिप्पणी किंवा निर्वचन लिहिणें जरूर होतें व असें निर्वचन करण्याकरितां त्या स्वरूपांतील शब्दांचा–निदान दुर्बोध शब्दांचा–संग्रह करणें जरूर पडतें. तेव्हां शब्दकोशाची प्रथमावस्था म्हणजेच कठिण व दुर्बोध शब्दांचा संग्रह ही होय. अशाच रीतीनें वेदाभ्यासकांच्या उपयोगार्थ प्रथम दुर्बोध व आर्ष शब्द व वचनें यांचा संग्रह करण्यांत आला. तथापि आरंभीं यावर स्वतंत्र भाष्याची जरूर वाटत नव्हती; कारण वेदाभ्यासाची परंपरा अव्याहत चालू होती व अध्यापकांस केवळ या यादीवरून आपलें अध्यापनाचें कार्य करतां येत असे. परंतु कालांतरानें या शब्दयादीवर लिखित टिपणें तयार झालीं. निरुक्ताचा उगम प्रथम या कालीं झाला असला पाहिजे व यानंतर त्यावरील भाष्यांची परंपरा सुरू झाली असावी.

पाश्चात्त्य:—ग्रीसमध्येंहि आपणांस अशीच स्थिति आढळते. ग्रीसमध्यें आरंभीं होमरचे ग्रंथ एवढेच काय ते विशेष ज्ञान देणारे ग्रंथ होते व तेथील विद्यालयांत होमरच्याच ग्रंथांचें अध्ययन करीत असत. त्यामुळें व्याकरण व इतर शास्त्रांचा उदयहि होमरच्या ग्रंथांच्या अभ्यासामुळेंच झालेला आपणांस दिसून येतो. भरतखंडांत ज्याप्रमाणें वेद हे सर्व विद्यांचा उगम आहेत त्याप्रमाणेंच ग्रीसमध्यें होमरचे ग्रंथ हेच सर्व विद्यांच्या मुळाशीं आहेत. शिवाय वेदांचा धर्माशीं संबंध असल्यामुळें त्यांचा अभ्यास भरतखंडामध्यें विशेष आस्थापूर्वक व परिश्रमपूर्वक होत असे आणि त्यामुळेंच व्याकरणाचा अभ्यास भरतखंडांत ग्रीसपेक्षां प्राचीनकाळींच सुरू होऊन त्या शास्त्रांत भरतखंडाची फार प्राचीनकाळींच अत्यंत प्रगति झाली होती, व ज्याप्रमाणें वेदांचे उपग्रंथ म्हणून निघण्टु तयार झाले त्याप्रमाणें ग्रीसमध्यें पेरिक्लीजच्या काळीं होमरच्या ग्रंथावर ग्लोस्साइ=ग्लॉसरीज=शब्दटिप्पणी तयार झाल्या (ख्रिपू. ७०० ते ६००). या बाबतींत दोन्ही देशांत विद्येची वाढ एकाच दिशेनें चाललेली आपणांस आढळून येते, परंतु यापुढें भरतखंडांत वेदांचा अभ्यास पुरोहितवर्गातच चालू राहिल्यामुळें त्या अभ्यासांत सायण किंवा महीधरपर्यंत फारशी प्रगति आपणांस झालेली दिसत नाहीं. उलट होमरचे ग्रंथ हे लौकिक असल्यामुळें पेरिक्लीजपासून अलेक्झांड्रिया कालापर्यंतच होमरच्या ग्रंथांच्या अभ्यासांत आपणांस बरीच वाढ झालेली दृष्टीस पडते.

भरतखंडामध्यें धार्मिक वृत्तीचें प्राबल्य विशेष झाल्यामुळें व प्रत्येक गोष्टीस वेदग्रंथांत आधार पहावयाच्या प्रवृत्तीमुळें या ग्रंथांचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति नष्ट झाली व शब्दांच्या व भाषेच्याच अभ्यासाकडे अधिक लक्ष लागून व्याकरणशास्त्राची मात्र फार झपाट्यानें वाढ झाली व या बाबतींत मात्र भारतीय पंडितांनीं प्रीक पंडितांवर ताण केली.

त्यामुळें आरंभीं, आपणांस सध्यां उपलब्ध असलेल्या निघण्टुप्रमाणें, दुसरेहि शब्दसंग्रह अस्तित्वांत असणें शक्य आहे. तथापि सध्यांच्या निघण्टूच्या उत्कृष्टतेमुळें त्याची परंपरा कायम राहिली असावी व बाकीचे लुप्त झाले असावे. त्याचप्रमाणें ऋग्वेदाप्रमाणेंच इतर संहितांचेहि निघण्टुग्रंथ कदाचित् प्रथम तयार झाले असतील पण ऋग्वेदसंहितेला जें महत्त्व आहे व त्या संहितेचा अभ्यास जो अधिक सूक्ष्मपणें व मोठ्या प्रमाणावर करण्याची परंपरा दिसून येते तीमुळें त्या संहितेच्या निघण्टूसच महत्त्व येऊन बाकीचे लुप्त झाले असावे व त्याचाच अभ्यास परंपरेनें चालू राहिला असावा.

निघण्टु—या 'निघण्टु' ग्रंथाचा कर्ता कोण असावा याबद्दल कांहींच निश्चितपणें सांगतां येत नाहीं. प्रत्यक्ष 'निघण्टु' मध्यें तत्कर्तृत्वबोधक असें गमक कांहींच नाहीं व त्याबद्दल केवळ कल्पनेवरच विसंबून रहावें लागतें. महाभारताच्या मोक्षधर्मपर्वामध्यें (३४२, ८६–८७) पुढील दोन श्लोक आढळतातः–'वृषोहि भगवान् धर्मः ख्यातो लोकेषु भारत। निघंटुकपदाख्याने विद्धि मां वृषमुत्तमम्। कपिर्वराहः श्रेष्ठश्च धर्मश्च वृष उच्यते। तस्मात् वृषाकपिं प्राह कश्यपो मां प्रजापतिः।' या श्लोकांमध्यें 'निघंटु' चा कर्ता महर्षि कश्यप होता असें म्हटलें आहे. परंतु या उल्लेखास ऐतिहासिक महत्त्व काडीचेंहि देतां येत नाहीं. असाहि संभव आहे कीं, प्रस्तुत 'निघंटु' हा शब्दसंग्रह एकाच वेळीं बनेलेला नसून त्यामध्यें अनेक वेळां भर पडलेली असावी व सध्यांचें उपलब्ध स्वरूप हें त्याचें अंतिमस्वरूप असावें. या संग्रहाचे पांच अध्याय आहेत. पहिल्या अध्यायांत भौतिक वस्तूंचीं नांवें दिलेलीं आहेत. उदा० पृथिवी, हिरण्य, उषा, इ० सतरा विषयांचीं नांवें आहेत. दुसऱ्या अध्यायांत मनुष्य, त्याचे निरनिराळे अवयव व मनुष्यसंबद्ध संपत्ति, राग, युद्ध वगैरे गोष्टींचीं नांवें असून त्यांत बावीस विषय आहेत. उदा० कर्मनामानि, अपत्यनामानि, बाहुनामानि, धननामानि इ०. तिसऱ्या अध्यायांत गुणधर्म अथवा भाववाचक शब्दांचा संग्रह आहे. यांत तीस विषय आहेत. उदा० बहुनामानि, उरुस्थनामानि, सुखनामानि, रूपनामानि इ०. या पहिल्या तीन अध्यायांस 'नैघंटुककांड' असें नांव आहे व त्यांत समानार्थक शब्दांचा संग्रह केला आहे. चौथ्या अध्यायास 'नैगमकांड' असें नांव असून त्यांत वेदांतील अनेकार्थवाचक व कठिण शब्दांचा संग्रह आहे व पांचव्या अध्यायास 'दैवतकांड' असें नांव असून त्यांत निरनिराळ्या देवतांचीं नांवें दिलेलीं आहेत.

यास्क-निरुक्त—या निघण्टूवर यास्काचें निरुक्त या नांवाचें भाष्य उपलब्ध आहे. यास्काचार्याबद्दल आपणांस फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तैत्तिरीय संहितेच्या काण्डानुक्रमांत (५.३) त्यास पैंगि असें संबोधिलें आहे व वैशंपायनानें ती संहिता प्रथम यास्कास देऊन यास्कानें तित्तिरीस दिली असें म्हटलें आहे. पिंगऋषीचा उल्लेख आश्वलायन श्रौतसूत्रांत (१२.१२) आढळतो व तो आंगिरस होता असें तेथें म्हटलें आहे. तेव्हां यास्क आंगिरसगोत्रांतील असावा. परंतु त्याच ठिकाणीं भृगुवंशामध्यें यस्क ऋषीचा उल्लेख असून त्याचा वंशज यास्क होता असें म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच महाभारत मोक्षधर्मपर्वामध्यें 'यास्को मामृषिरव्यग्रोऽनेक यज्ञेषु गीतवान्। शिपिविष्ट इतिख्यस्माद् गुह्य नामधरो ह्यहम्॥ स्तुत्वा मां शिपिविष्टेति यास्क ऋषिरुदारधीः। मत्प्रसादादधो नष्टं निरुक्तमधिजग्मवान्॥' (३४२. ७०–७१) याप्रमाणें यास्काचार्यांचा निरुक्तकार म्हणून उल्लेख आहे. निरुक्ताच्या शेवटीं 'नमः पारस्कराय नमो यास्काय' असें म्हटलेलें आढळतें. यावरून यास्क हा निरुक्ताचा कर्ता ही गोष्ट जी आपणास परंपरागत माहीत आहे ती महाभारतकालापासून निर्विवाद आहे असें स्पष्ट होतें. आतां यास्कास पारस्कर म्हटलें आहे व पाणिनीनें 'पारस्करप्रभृतीनि संज्ञायाम्' (६.१.१५७) असें एका सूत्रांत ग्रथित केलें आहे व त्यावरील पतञ्जलीच्या भाष्यांत 'पारस्करो देशः इति' असें स्पष्टीकरण दिलें आहे यावरून यास्क हा पारस्करदेशीय असावा असें दिसतें. तसेंच शथपथ ब्राह्मणांतील वंशक्रमामध्यें 'भारद्वाजाच्चासुरायणाच्च यास्काच्च' व बृहदारण्यकांतील वंशक्रमामध्यें 'जातूकर्ण्य आसुरायणाच्च यास्काच्च' असा उल्लेख आहे. परंतु हे सर्व उल्लेख निरुक्तकार यास्काबद्दलच आहेत काय याबद्दल अनिश्चितता आहे त्यामुळें यास्काबद्दल किंवा त्याचा देश, काल, गोत्र इत्यादीबद्दल आपणांस निश्चित कांहींच सांगतां येत नाहीं. निरुक्ताशिवाय दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाचें कर्तृत्व यास्काकडे आढळत नाहीं. मात्र पिंगलाच्या छंदःसूत्रांमध्यें 'उरोबृहती यास्कस्य' म्हणून यास्कानीं उरोबृहती हें नांव एका छंदास दिल्याचा उल्लेख आढळतो. तेव्हां यास्काचा छंदःशास्त्रावर ग्रंथ होता किंवा काय अशी शंका येते पण यास प्रत्येंतर पुराचा दुसरा कोठें आढळत नाहीं. यास्कानें वेदांतील निरनिराळ्या शब्दांवर अर्थविवेचक व व्युत्पत्तिदर्शक टीपा दिलेल्या असून तत्तदर्थबोधक अवतरणेंहि दिलेलीं आहेत; परंतु यास्काचार्यांचें निरुक्त हेंच पहिलें निरुक्त नसून यास्काचार्यांपूर्वीहि अनेक निरुक्तकार होऊन गेलेले असावेत. खुद्द यास्काचार्योंनीं आपल्या निरुक्तामध्यें पूर्वीच्या निर्वचनकारांचाच केवळ नव्हे तर निरनिराळ्या

भाषाशास्त्रविषयक अभ्यासकांच्या संप्रदायांचा उल्लेख केलेला आपणांस आढळून येतो. यास्काचार्यांनीं नैरुक्ताः (१.१२;२.१४; १६ इ०) म्हणून व्युत्पत्तिशास्त्रज्ञांच्या संप्रदायांचा उल्लेख केलेला आहे. तसेंच वैय्याकरणाः (१.१२; ९.५;) म्हणून व्याकरणशास्त्रज्ञांच्या संप्रदायाचा; पूर्वयाज्ञिकाः (७.२३;), याज्ञिकाः (५.११; ७.४ इ०) म्हणून यज्ञसंस्थेच्या अभ्यासकांच्या संप्रदायांचा; ऐतिहासिकाः (२.१६; १२.१ इ०) म्हणून कथाभ्यासकांचा व नैदानाः (६.९; ७.१२) म्हणून आद्यकारणसंशोधकांच्या संप्रदायाचा उल्लेख केलेला आहे. यावरून पूर्वी शब्दांचा अनेक अंगांनीं अभ्यास होत असून यास्काचार्य हे अशाच एका अभ्यासकांच्या संप्रदायांतून तयार झालेले पंडित असले पाहिजेत. यास्काचार्यांनीं वरील संप्रदायांप्रमाणेंच पूर्वीच्या अनेक विवेचकांचा किंवा आचार्यांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केलेला आपणांस आढळून येतो. उदा० आग्रयण (१०.८), आग्रायण (१.९; ६.१३;), आचार्याः (७.२२), औदुंबरायण (१.१), औपमन्यव (१.१,२.२), और्णवाभ (२.२६; ६.१३), कात्थक्य (८.५; ६), कौत्स (१.१५), कौष्टुकी (८.२), गार्ग्य (१.३; १२), गालव (४.३), चर्मशिरस् (३.१५), तैटिकी (४.३; ५.२७), वार्ष्यायणि (१.२), शतबलाक्ष (११.६), शाकटायन (१.३, १२), शाकपूणि (२.८; ३.११), शाकल्य (६.२८), स्थौलाष्ठीवि (७.१४; १०.१). याप्रमाणें निरनिराळ्या पण्डितांचे अथवा त्यांच्या संप्रदायांचे उल्लेख निरुक्तांत आढळतात.

व्युत्पत्तिशास्त्र—तसेंच यास्कानें जें देवतांचें त्यांच्या प्रभावानुसार पृथ्वीवरील, अंतरिक्षांतील व स्वर्गांतील असें वर्गीकरण केलें आहे तेंहि इतरत्र आढळणाऱ्या पुराणाभ्यासकांपेक्षां विशेष आहे. तसेंच त्यानें समानार्थक व अनेकार्थक शब्दांचें जें विवेचन केलें आहे तेंहि शास्त्रशुद्ध आहे व विशिष्ट शब्दांचा विशिष्ट अर्थ निश्चित करीत असतां आपल्या विवेचनास त्यानें उदाहरणें देऊन पुष्टि आणली आहे; एवढेंच नव्हे तर शब्दांचा अर्थ निश्चित करण्याकरितां व्युत्पत्तीचें महत्त्व किती आहे हें त्यानें पुढें दिल्याप्रमाणें दिग्दर्शित केलें आहेः—१. वैदिक ऋचांचा अर्थ समजण्याकरितां व्युत्पत्तिज्ञान अवश्य आहे. २. व्युत्पत्ति ही व्याकरणास पूरक आहे. ३. व्युत्पत्ति ही संहितेचा पदपाठ करण्याच्या कार्मी व सामासिक शब्दांचें पृथक्करण करण्याच्या कार्मी अवश्य आहे. ४. विशिष्ट मंत्राची मूळ देवता शोधून काढून यज्ञाची पूर्तता करण्याच्या कार्मी व्युत्पत्तीचें ज्ञान आवश्यक आहे. ५. तसेंच व्युत्पत्ति हें शास्त्र असून त्याचा अभ्यास करणें आवश्यक आहे. याप्रमाणें यास्काचार्यांनीं व्युत्पत्तिज्ञानाचें महत्त्व दिग्दर्शित केलें आहे. [अथापीदमन्तरेण मन्त्रेष्वर्थप्रत्ययो न विद्यते । ... । तदिदं विद्यास्थानं व्याकरणस्य कार्त्स्न्यं स्वार्थसाधकंच । ... । अथापीदमन्तरेण पदविभागो न विद्यते । ... । तेचेदह्नयुर्लिड्गाश्च अत्र स्म इति । ... । नि. १.१५–१७.]

वरील विवेचनावरून यास्ककालीं शब्दांचा अभ्यास करण्याचें शास्त्र कोठपर्यंत वाढलें होतें हें आपणांस कळून येईल. यास्काचार्यांचा काल ख्रिस्तपूर्व ७०० पासून ५०० पर्यंत धरावयास हरकत नाहीं असें पाश्चात्य पंडितांचें मत आहे. तथापि यास्क पाणिनीपूर्वं असला पाहिजे व पाणिनीचा काल जर रा. राजवाडे यांच्या मताप्रमाणें ख्रि. पू. ७०० च्या पूर्वी असेल तर यास्काचार्य ख्रि. पू. १००० च्या पूर्वी होऊन गेले असले पाहिजेत.

निरुक्तभाष्यें—यानंतर आपणांस यास्काचार्यांच्या निरुक्तावर निरनिराळ्या टीका अथवा भाष्यें झालेलीं आढळतात. त्यांतील प्रमुख भाष्यकार म्हणजे उग्र, स्कंदस्वामी व दुर्गाचार्य हे होत. यांपैकीं दुर्गाचार्य हा १३ व्या शतकांत होऊन गेला असावा. यानें निरुक्तांतील सर्व वचनें आपल्या भाष्यांत घेऊन त्यांचें विस्तृत विवेचन केलें आहे.

इ. स. पंधराव्या किंवा सोळाव्या शतकांत रंगेशपुरी येथें होऊन गेलेल्या यज्ञेश्वरपुत्र देवराजयज्वा नांवाच्या अत्रिगोत्रोत्पन्न पंडितानें नैघण्टुक कांडावर एक टीका लिहिली आहे. त्यानें त्या टीकेच्या उपोद्घातांत असें म्हटलें आहे कीं, यास्कानें आपल्या निरुक्तामध्यें नैगमकाण्ड व दैवतकाण्ड यांतील प्रत्येक शब्दावर भाष्य केलें आहे व तत्पुष्ठ्यर्थ अवतरणें दिलीं आहेत; परंतु नैघण्टुक कांडांतील एकंदर १३४१ शब्दांपैकीं फक्त कांहीं शब्दांवरच भाष्य केलें आहे व उतारे दिले आहेत. त्यानंतर स्कंदस्वामीनें यास्काचार्यांनीं केवळ सामान्यतः विवेचन केलेल्या कांहीं शब्दांची विस्तृत चर्चा केली आहे (नै. १.४; ३,१३; ३, २९). परंतु बरेच शब्द चर्चा करावयाचे राहिलेले आहेत व सांप्रत कलियुगांत वेदाभ्यासाची परंपरा त्रुटित होऊं लागली असून केवळ कोशावरून पुरेसा बोध होणें अशक्य आहे व ग्रंथामध्यें लेखकप्रमादांमुळें व पाठभेदांमुळें शब्द गळण्याचा अथवा विकृत होण्याचा संभव आहे, याकरितां शुद्ध पाठ प्रचलित रहावा व अभ्यास सुलभ व्हावा म्हणून त्यानें यास्क व स्कंदस्वामी यांनीं सोडलेल्या शब्दांवरहि भाष्य लिहून व अवतरणें देऊन चर्चा केली आहे व ही चर्चा यास्कांनीं इतस्ततः विवेचन केलेल्या सुमारें ३५० शब्दांवरील टीपा व स्कंदस्वामीनें विवेचिलेले सुमारें २०० शब्द यांचें साहाय्य घेऊन व इतरांनींहि निरनिराळ्या प्रसंगानुसार इतर शब्दांचें जें विवेचन केलें आहे तें आधारास घेऊन साक्षेपानें केली आहे व पाठ कायम केले आहेत. खेरीज त्याच्या कुलामध्यें जी अध्ययनाची परंपरा अत्रुटित चालू होती तिचेंहि साहाय्य त्यास झालें आहे व त्यानें अनेक हस्तलिखित

प्रतींचें, वेंकटाचार्यपुत्र माधव यानें भाष्य केलेल्या नामानुक्रमणी, आख्यातानुक्रमणी, स्वरानुक्रमणी, निपातानुक्रमणी, निबन्धनानुक्रमणी इत्यादि अनुक्रमणींचें साहाय्य घेतल्याचें नमूद केलें आहे. तसेंच यानें आपल्या आधारग्रंथांत निरुक्त, स्कंदस्वामिकृत निरुक्तटीका, स्कन्दस्वामि–भवस्वामि–राहदेव–श्रीनिवास–माधवदेव–उवटभट्ट–भास्करमिश्र–भरतस्वाम्यादि विरचित वेदभाष्यें, पाणिनीय व्याकरण, विशेषतः उणादि, त्याची वृत्ति, क्षीरस्वामि–अनंताचार्यादिकृत निघण्टुव्याख्या, भोजराजीय व्याकरण, अमलनयनीय, निखिलपदसंस्कार यांचा उल्लेख केला आहे.

देवराजयज्वानें केवळ नैघण्टुक काण्डावरच टीका लिहिली आहे. तथापि त्यानें ऋग्वेदामधीलहि अवतरणें सर्व शब्दांस दिलेलीं नाहींत व 'वचन शोधावयाचें आहे.' ('निगमो अन्वेषणीयः') ही पुस्ती त्यास अनेक शब्दांस जोडावी लागली आहे. तथापि त्यानें बऱ्याच विस्तृत प्रमाणावर वैदिक वाङ्मयाचा आपल्या टीकालेखनांत उपयोग केला आहे.

निघण्टु व संस्कृत भाषाकोश–वैदिक निघण्टु व पुढील संस्कृत भाषेचे कोश यांची तुलना केली असतां फक्त 'महाव्युत्पत्ति' या बौद्ध कोशासारख्या कांहीं कोशांचेंच वरील निघंटूशीं साम्य दिसतें. परंतु उत्तरकालीन कोश व निघण्टु यांमध्यें फार अंतर असुन त्यांचा निघण्टूशीं फारसा संबंध असावा असें वाटत नाहीं. त्याप्रमाणें जसे वैदिक निघण्टु हे विशिष्ट ग्रंथांशीं संबद्ध असे आढळतात व विशिष्ट ग्रंथांतीलच शब्दांचा संग्रह करतात (अथर्वनिघण्टु, निगमपरिशिष्ट इ०) तसे संस्कृत कोश हे विशिष्ट ग्रंथांशीं संबंद्ध असलेले आढळत नाहींत. जरी कांहीं शब्दांचे अर्थ विशिष्ट ग्रंथांतील वचनांस अनुसरून दिलेले आढळतात तरी विशिष्ट ग्रंथांतील शब्दांस अनुसरूनच एखादा कोश झालेला आहे, असें आढळत नाहीं. तथापि हे कोश म्हणजे केवळ शब्दांच्या यादीच नसून त्यांत इतरहि माहिती उध्दृत केलेली मधून मधून आढळते. निघंटूमध्यें नामें व अव्ययें, यांप्रमाणेंच धातूहि संगृहीत केलेले आढळतात. परंतु कोशामध्यें फक्त नामें व अव्ययें यांचाच संग्रह केलेला दिसून येतो. यावरून नामपारायण आणि धातुपारायण अथवा कोश आणि धातुपाठ अशी विभागणी पूर्वीच झालेली असावी असें दिसुनयेतें. निघण्टूची रचना गद्य असुन कोशांची रचना पद्यमय असते व बहुधां ती अनुष्टुप् छंदांत आढळते. मधून मधून आर्याहि दिसुन येतात; व अभिधानरत्नमाला या कोशांत तर अनेक प्रकारचीं वृत्तें आढळतात. तसेंच निघंटूची रचना वैदिक शब्दांचा अर्थनिश्चय करण्याकरितां केलेली आढळते, तर कोशांचा मुख्य उद्देश जरी शब्दार्थीचेंच विवरण करण्याचा असला तरी पुष्कळशा कोशांत केवळ महत्त्वाचे अथवा क्वचित योजले जाणारे शब्द संगृहीत केलेले असुन त्यांचा उपयोग मुख्यतः कवींकरितांच असावा. उदा० 'क्रवीनां हितकाम्यया' (धनंजय), 'कवीनां सुखहेतवे' (धरणीकोश), 'कृपामुपेत्य सतां कवीनां' (महेश्वर), 'कवेः शीघ्रकवित्वाय' (शीघ्रबोधिनी), 'कविकंठभूषणार्थं' (हलायुध), 'संवित्तीनां भूषणं सत्कवीनां' (वैजयंति) इ०. अभिधानकोशांचें ज्ञान हें एक काव्याभ्यासाचें अंग समजलें जात असे. याप्रमाणें कोश हे निघण्टूंहून रचना, स्वरूप व हेतु या तिन्ही बाबतींत भिन्न होते असें दिसुन येतें. तसेंच त्यांमध्यें कालाचेंहि बरेंच अंतर दृष्टीस पडतें. अमरकोश तयार झाल्यानंतर पूर्वीचे कोश बहुतेक सर्व मागें पडून नष्टप्राय झाले असावे, व अमरकोशापूर्वीच्या कोशांचा आपणांस कोठें कोठें आलेल्या उल्लेखांवरून व त्यांच्या अपरिपक्व स्वरूपावरून मात्र बोध होतो (शाश्वत–हलायुध).

संस्कृत भाषेंत पूर्वी शब्दकोशास कोश, अभिधानकोश, नाममाला, नामपारायण (धातुपारायण याच्या उलट) व निघण्टु (निर्घण्टु, निघण्ट, जैन प्राकृत निग्घण्ट) इत्यादि नांवें आढळतात. सायणाचार्यांनीं आपल्या ऋग्वेदभाष्यांत एका ठिकाणीं निघण्टु शब्दानें एकार्थवाचक शब्दांच्या संग्रहाचा बोध होतो असें म्हटलें आहे. 'एकार्थवाचिनां पर्यायशब्दानां संघो यत्र प्रायेणोपदिश्यते तत्र निघण्टु शब्दः प्रसिद्धः; तादृशेषु अमरसिंह–वैजयन्ती–हलायुधादिषु दश निघण्टव इति व्यवहारात्। (ऋग्वेद–गणपत कृष्णाजी प्रत सायणभाष्य–उपोद्घात. पृ. ३३.)

निघण्टु शब्द दक्षिणेकडे विशेष प्रचारांत आहे व वैजयन्ती कोशाचा कर्ता आपल्या कोशास प्रशस्तीमध्यें वैजयन्तीनिघण्टु असें म्हणतो व सांप्रतहि दक्षिणेकडे ग्रंथांच्या यादीमध्यें सर्व कोश निघण्टु या सदराखालीं नमूद केलेले आढळतात. परंतु निघण्टु शब्दानें वैदिक कोशांचा बोध होतो व सध्यां निघण्टु हा शब्द विशेषेंकरून वैद्यकीय कोशांस लावेलेला आढळतो. उदाहरणार्थ धन्वन्तरिनिघण्टु, निघण्टुशेष, राजनिघण्टु इ०.

संस्कृत शब्दकोशांमध्यें मुख्यतः आपणांस दोन वर्ग आढळून येतात.–एक एकार्थवाचक किंवा समानार्थवाचक शब्दांचा म्हणजे ज्या शब्दांचा एकच किंवा सारखा अर्थ आहे असे शब्द एकत्र देणारा व दुसरा अनेकार्थवाचक किंवा नानार्थवाचक म्हणजे ज्या एकाच शब्दाचे अनेक अर्थ होतात ते सर्व अर्थ एकत्र देणारा. तथापि अशा तऱ्हेचे अगदीं एकमेकांपासुन स्वतंत्र असे कोश फारसे उपलब्ध नाहींत व पहिल्या प्रकारच्या बहुतेक महत्त्वाच्या कोशांत (अमर, वैजयन्ती) नानार्थवाचक शब्दहि एखाद्या

प्रकरणांत किंवा परिशिष्टरूपानें दिलेले आढळतात. हेमचंद्रानें मात्र पहिल्या प्रकारच्या शब्दांचा संग्रह 'अभिधानचिंतामणि' या कोशांत व दुसऱ्या प्रकारच्या शब्दांचा संग्रह 'अनेकार्थसंग्रह' या नांवानें स्वतंत्र केला आहे.

अमरपूर्व कोशकार—आतां अमरसिंहापूर्वी कोणते कोशकार होऊन गेले तें पाहूं. अमरसिंह आपल्या कोशाच्या प्रशस्तींत पूर्वीच्या कोशकारांचा उल्लेख करीत नाहीं. तर केवळ 'समाहृत्यान्यतन्त्राणि' असें म्हणतो. म्हणजे पूर्वीच्या कोशांचा यानें उपयोग केला होता एवढेंच दिग्दर्शित करतो. तथापि अमरकोशावरील टीकेमध्यें कांहीं जुन्या कोशकारांचीं नांवें आपल्यास आढळतात. या जुन्या कोशकारांपैकीं कात्य हा सर्वांत जुना असावा. याच्या कोशाचें नांव 'नाममाला' (हें कदाचित सर्वसामान्य नांवहि असूं शकेल) असें होतें. कारण काव्यालंकारवृत्ति (१.३६) व काव्यानुशासन (६.१६) यांमध्यें जें "नाममालाप्रतीक" उल्लेखिलेलें आढळतें तें कात्याचें असावें असें मंख कवीच्या आधारावरून महेंद्रसूरीनें विधान केलें आहे. अमरसिंहापूर्वी होऊन गेलेला कात्यायन व हा कात्य हे एकच असावे. कात्य आणि कात्यायन यांचा अर्थ कोशकार एकच देतात. तसेंच क्षीरस्वामीनें आपल्या टीकेमध्यें मुनि म्हणून ज्याचा उल्लेख केलेला आहे तो कात्य किंवा कात्यायनच असावा असें प्रो. शकारिया म्हणतात. परंतु रा. कृ. गो. ओक आपल्या क्षीरस्वामीकृत टीकायुक्त अमरकोशाच्या प्रतींत मुनि हा व्याडि असावा असें मत देतात.

"धन्वंतरिनिवण्टु" या वैद्यकीय कोशाचा कर्ता धन्वंतरि हाहि अमरसिंहापूर्वी होऊन गेलेला असावा. कारण धन्वंतरीच्या चुका अमरसिंहानें दाखविल्या आहेत असें क्षीरस्वामी आपल्या टीकेंत म्हणतो. तसेंच क्षीरस्वामीनें वारंवार उल्लेख केलेला भागुरि हाहि त्याच्या मताप्रमाणें अमरसिंहापूर्वी होऊन गेला असावा. हलायुधानें भागुरीचा प्रमाण म्हणून उल्लेख केलेला आहे (१. २). याच्या कोशाचें नांव "त्रिकांड" होतें, असें रायमुकुट म्हणतो. व त्रिकांड नांवाच्या ग्रंथाचा उल्लेख अमरामध्यें आढळतो. प्रत्यक्ष अमरकोशाचाहि त्रिकांड अथवा त्रिकांडी या नांवानें उल्लेख केलेला दृष्टीस पडतो (उदा. पुरुषोत्तम–त्रिकांडशेष). अमरसिंहानें आपली त्रिकांडात्मक वर्गीकरणपद्धति कदाचित् भागुरीपासून घेतली असावी. ऑफ्रेटच्या म्हणण्याप्रमाणें भागुरीचा त्रिकांडकोश दक्षिणहिंदुस्थानांत अद्यापि उपलब्ध आहे (ऑफ्रेट संस्कृत ग्रंथ यादी २.४७९०). तसेंच रंति अथवा रंतिदेव आणि रभस अथवा रभसपाल हेहि अमरसिंहापूर्वी होऊन गेलेले असावे, असें म्हणतात.

कोल्ब्रुक व वुइल्सन यांच्या म्हणण्याप्रमाणें अमरसिंहानें आपल्या आधारग्रंथांत रभस याचा उल्लेख केला असावा. वररुचि या वैय्याकरण व कोशकाराचाहि अंतर्भाव कांहीं टीकाकार अमरसिंहाच्या आधारग्रंथांत करतात. व रायमुकुट याच्या म्हणण्याप्रमाणें "लिंगविशेषविधि" या वररुचीच्या तंत्राचा उल्लेख तन्त्र या शब्दांत अभिप्रेत असावा. परंतु प्रत्यक्ष अमरानें याचा उपयोग कितपत केला असेल हा स्वतंत्र प्रश्न आहे.

वाचस्पति हाहि एक प्राचीन कोशकार असावा. याचा उल्लेख पुरुषोत्तमदेवानें आपल्या "हारावली"च्या अखेरीस केला आहे. तसेंच हेमचंद्रानें आपल्या अभिधानचिंतामणीवरील टीकेच्या आरंभीं केला आहे. वाचस्पतीचा आधार यादवप्रकाशानें आपल्या "वैजयंती" कोशाकरितांहि घेतला असावा. त्यांतील अनेक अवतरणांवरून हा कोश वैजयंती कोश वगळून इतर सर्व कोशांपेक्षां मोठा व अधिक माहितीनें भरलेला असा असावा.

विक्रमादित्य (कदाचित साहसांक) व बोपालित (बोपालित ? षट्कोशसंग्रहांत गोपालित असें रूप आढळतें. याचा आधार हलायुधानें घेतलेला आहे) हेहि दोन जुने कोशकार दिसतात.

व्याडि हाहि निःसंशय एक प्राचीन कोशकार असावा. याचा "लिंगानुशासन" या नांवाचा एक ग्रंथ असून त्याचा अभिधानचिंतामणि टीकेच्या प्रस्तावनेमध्यें हेमचंद्रानें एक महत्त्वाचा आधारग्रंथ म्हणून उल्लेख केला आहे. पुरुषोत्तमदेवानें आपल्या हारावली कोशाच्या अखेरीसहि याचा निर्देश केला आहे आणि वैजयंतीकार यादवप्रकाश यानेंहि बहुधां याचा उपयोग केला असावा. व्याडि व विंध्यवासी हे बहुधां एकच असावे. त्याचा ग्रंथ बराच मोठा असावा. यास बौद्धधर्माचें चांगलें ज्ञान असावें, हें त्यानें चौतीस जातकांचा उल्लेख केला आहे यावरून दृष्टीस पडतें.

हुग्ग हाहि एक जुना कोशकार दिसतो. याचा दुर्ग या नांवाशीं नेहमीं घोंटाळा करण्यांत येतो.

उत्पलिनी, शब्दार्णव व संसाराणव या कोशांचा उल्लेख हारावली व मेदिनी कोशांत आढळतो. उत्पलमाला म्हणजेच उत्पलिनीकोश असावा. कामसूत्रावरील आपल्या टीकेमध्यें यशोधर, अभिधानकोश म्हणजे उत्पलमालादि असें विवेचन करतो. उत्पलमाला हा कोश दक्षिणहिंदुस्थानांत अद्यापि अस्तित्वांत असावा असें ऑफ्रेटच्या यादीवरून दिसतें (९६१.४१०९).

हारावलींत खालील श्लोक आढळून येतो (५, २७५, मुंबई १८८९ द्वादशकोशसंग्रह २७३) "शब्दार्णव उत्पलिनी संसारावर्त इत्यपि। कोशा वाचस्पतिव्याडिविक्रमादित्यनिर्मिताः॥" याचा अर्थ असा लावतां येईल कीं, शब्दार्णव हा वाचस्पतीचा, उत्पलिनी व्याडीचा व संसारावर्त विक्रमादित्याचा होय. उत्पलिनी हा व्याडीचाच आहे त्याबद्दल अमरचंद्राचा पुरावा

आढळतो. आपल्या काव्यकल्पलतावृत्तिपरिमलांत दोन ठिकाणीं उत्पलिनींतील अवतरणें घेतांना तो 'व्याडिकृतोत्पलिनीमध्यात्' असे शब्द घालतो. याविरुद्ध अमरावर टीका करतांना (५.२) रायमुकुट हा उत्पलिनी व व्याडि यांचा भिन्न संबंध दाखवितो. 'त्रिकाण्डोत्पलिन्यादीनि नाममात्रतन्त्राणि व्याडिवररुच्यादिप्रणितानि लिंगमात्रतन्त्राणि।' तथापि लिंगानुशासन हें व्याडिकृत आहे अशी कांहीं खरीखोटी समजूत प्रचलित आहे, तिला उद्देशून रायमुकुटानें असें लिहिण्याचा संभव आहे.

शब्दार्णव हें वाचस्पतिकोशाचें दुसरें नांव आहे. याला पुरावा असा देतां येईल कीं, अमर १, १, २२ वर टीका करतांना रायमुकुट 'सौरिश्रीवत्स दैत्यारिविष्वक्सेनजनार्दनाः॥' हे शब्द शब्दार्णवींतील असल्याचें लिहितो. परंतु रामनाथ आपल्या त्रिकाण्डविवेकांत तेच शब्द वाचस्पतिकोशांतील अवतरण म्हणून देतो.

कोशरचना—प्रस्तुत उपलब्ध असलेल्या कोशांकडे वळण्यापूर्वी कोशरचनेसंबंधीं जरूर ती माहिती सांगितली पाहिजे. कोशांचा उपयोग करण्यापूर्वी, त्यांची–विशेषतः नानार्थकोशांची–रचना कशी असते हें समजावून घेणें अगत्याचें आहे. बहुशः त्या त्या कोशांतील विषयांचा अनुक्रम व त्यांतील शब्दांचें लिंग वगैरे संबंधीं माहिती प्रस्तावनेंत म्हणजे परिभाषांतून देण्याची कोशकारांची वहिवाट आहे. शब्दकोश समजण्यास या परिभाषांचा उपयोग किल्लीसारखा होत असतो.

समानार्थ अथवा एकार्थ कोश बहुधा विषयवारी रचलेले असतात. यांतील पुष्कळ भागांची तुलना लहान लहान कोशाबरोबर करतां येईल. उदा. अमरसिंह आपला शब्दकोश तीन काण्डांत विभागतो. प्रत्येक कांडांत पुन्हां वर्ग केलेले असतात. पहिल्या कांडांत स्वर्ग, देवता, देवशत्रु, जलचर व जलवनस्पतीकरितां शब्द सांगितलेले आहेत. दुसरें कांड सर्वांत मोठें आहे. त्यांत पृथ्वी, चार वर्ण व त्यांचीं कर्में यांसंबंधीं शब्द दिले आहेत. तिसरें सामान्य कांड. त्यांत विशेषेंकरून मिश्रशब्द, व तीन परिशिष्टें आहेत. दुसऱ्या सर्व एका कोशांतून हाच किंवा अगदीं याचसारखा अनुक्रम आढळतो. विशेष सांगण्यासारखें इतकेंच कीं, ज्या विषयाला अमरानें अडीच कांडें खर्ची घातलीं आहेत त्यालाच हलायुधानें अभिधानरत्नमालेंत चार, यादवानें वैजयंतींत पांच व हेमचंद्रानें अभिधानचिंतामणींत सहा अर्शी कांडें खर्ची घातलीं आहेत.

एकार्थवाचक शब्दांचा अनुक्रम वर्णानुसार देण्याची पद्धति आढळत नाहीं. फक्त नानार्थकोशांतून ही पद्धति आढळते. ती सुद्धां जुन्या काळांत नाहींच. तथापि यांत कांहीं कमीपणा आहे असें नाहीं. कारण कोशांचा उपयोग अर्थप्रतिपादनाकडे नव्हे तर महत्त्वाच्या व विरळ सांपडणाऱ्या शब्दांचे समूह तोंडपाठ करण्याच्या कामीं होत असे. शिवाय केवळ विषयवारी रचनेव्यतिरिक्त आणखी एक बाह्यस्वरूपावरून व अत्यंत प्राचीनकाळापासून प्रचारांत असलेलें असें रचनातत्त्वहि आढळून येतें. तें असें कीं, एकार्थ किंवा अनेकार्थ शब्दांच्या स्पष्टीकरणाचा विस्तार जसा असेल त्याप्रमाणें म्हणजे मुख्य विषयाला लागणाऱ्या समानार्थक शब्दांची संख्या किंवा एका शब्दाचे जे निरनिराळे अर्थ असतील त्यांची संख्या किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे विषयविवेचनाचा विस्तार जसा असेल त्याप्रमाणें–त्याचा अनुक्रम ठरत असे. उदा. हारावलींत स्पष्टीकरणांच्या विस्तारानुरूप शब्दांचा अनुक्रम दिलेला आहे. प्रथम पूर्ण श्लोकांचीं स्पष्टीकरणें, नंतर अर्धश्लोकांचीं व नंतर पादस्पष्टीकरणें. (द्वादशकोशप्रत. ७) प्राकृत कोश 'पाइअलच्छी (इ. स. ९७२) यांत सुद्धां याप्रमाणेंच म्हणजे प्रथम 'एक गाहा, नंतर गाहद्ध व नंतर गाहाचलण'–विस्तारार्ची स्पष्टीकरणें अनुक्रमानें दिलीं आहेत.

नानार्थकोशांतूनहि विषयविस्तारानुरूप अनुक्रम धरण्याची पद्धति यापेक्षां अधिक प्रमाणांत आढळते. सर्वांत मोठीं वर्णनें प्रथम व नंतर लहान लहान असा नियम आढळतो. उदा. शाश्वत कोश, अनेकार्थध्वनिमंजरी, हारावलींतील नानार्थकोशविभाग व अजयकोश (यांत ३,४ श्लोकांचीं वर्णनें सुद्धां आढळतात). याचे विरुद्ध धरणीकोशांत लहान वर्णनें आधीं दिलेलीं आहेत. 'पादैः पादद्वयैः श्लोकैरनेकार्थसमुच्चयः।' जे कोशकार अनेकार्थशब्द अर्थसंख्येच्या अनुक्रमानें देतात, त्यांना तसें करण्यांत असा एक फायदा मिळतो कीं, जे शब्द अर्थानें, व्युत्पत्तीनें अगर दुसऱ्या कांहीं कारणानें परस्परांशीं संबद्ध असतात ते सर्व एका ठिकाणीं आणतां येतात. उदा. शाश्वत १४६: 'हुताशने निशानाथ सहस्रकिरणे तथा। तमोनुदः समौ दृष्टौ विरोचनतमोपहौ॥' याचे उलट अमरानें अंत्यव्यंजनानुसार शब्दांचा अनुक्रम लावल्यानें त्याला तमोनुद, विरोचन व तमोपह हे शब्द तीन निरनिराळ्या जागीं वर्णावे लागले आहेत. धरणीकोशासंबंधीं सांगतांना त्याच्या प्रस्तावनेंतील सातवा श्लोक येथें दिला म्हणजे पुरे. या श्लोकांत विपर्यासांचा स्पष्ट निर्देश आहे: 'क्वचिदेषां विपर्यासो लिंगार्थैस्यानुरोधतः। यथेह भोगिभोगिन्योर्यथा विवररन्ध्रयोः।' अक्षरसंख्येनुसार शब्दानुक्रम ज्यांत दिलेला आहे अशा यादवकृत वैजयंतीच्या नानार्थविभागांत विषम विस्ताराचे (विषमाक्षराः) अनेकार्थ शब्द पांच निरनिराळ्या विभागांत घातले आहेत (पान २६९, २७२. २७४, २७६, २८०; उदा. 'वृक्षेऽद्रौ शिखर्यगनगागमाः' २७०, २)

कोशांतील एकार्थवाचक शब्द अथवा नानार्थवाचक शब्दांचे अर्थ ज्यावेळीं अमुक एका श्लोकविभागांत घालावयाचे असतात त्यावेळीं जागा शिल्लक असल्यास ती खालीलसारख्या शब्दांनीं भरून काढतात. 'मतः, मता, मतम्, स्यात्, भवेत्, उच्यते, इति कथ्यते सद्भिः, प्राहुः सन्तः, प्रचक्षते प्राज्ञाः वगैरे. ज्या शब्दाचा अर्थ द्यावयाचा त्याला 'शब्द' 'ध्वनि,' 'आख्या,' असा शब्द जोडतात; उदा. उणा. सू. १३०.२ वर उज्ज्वलदत्तः–" माः शब्द "; शाश्वत ६६ प्रतिसरध्वनि, ३६ करणाख्या. शाश्वत व हलायुध यांच्या ग्रंथांत हें वारंवार आढळून येतें. एकार्थवाचक शब्द किंवा अर्थ यांची संख्या नमूद करण्याचाहि एक प्रघात दृष्टीस पडतो; उदा. 'त्रयः' अमर ३.३,१४९,१९४. शाश्वत, २००. हलायुध १,६६,१४९. पंचस्वर्थेषु शाश्वत ६६. 'हरयो दश' हला. ५.७०. वगैरे. शाश्वत व हलायुधामध्यें अनेक उदाहरणें सांपडतात. अनेक कोशकारांना एका शब्दाचा अर्थ देण्याकरितां संबंध वाक्येंच्यावाक्यें लागतात. उदा. शाश्वत १२१, हलायुध १,९०. या पाल्हाळपद्धतीचे अवशेष अर्वाचीनांच्या ग्रंथांतूनहि दिसून येतात. सामान्यतः असा नियम बांधतां येईल कीं, शब्दार्थ देण्यांत जितका पाल्हाळ अधिक तितका तो कोशकार अधिक प्राचीन असला पाहिजे.

अमरसिंहप्रमुख अनेक कोशकारांनीं विवेचनाची मर्यादा अमुक एक श्लोकविभागांवर ठरवावयाची हें तत्त्व सोडून देऊन विषयाची मांडणी थोडक्यांत कशी करतां येईल याकडेच लक्ष दिलेलें आहे व तसें करण्यांत त्यांना यशहि आलेलें आहे. यादव व हेमचंद्र हे पादपूरणार्थक शब्द कमी करून टाकण्याचे बाबतींत सर्वांत पुढें गेलेले आहेत. संक्षेप करण्याचें एक मोठें साधन म्हणजे समानार्थक शब्द व शब्दार्थ एका समासांत देणें हें होय. उदा. " आकाशविहायसी " (अमर); " पवित्रं कुशपूतयोः " (शाश्वत); दवदावौ (हलायुध). नानार्थकोशांतून एकशेषद्वंद्व समास फार झ्प्रेस पडतो. ज्या शब्दांचे दोन अर्थ असतील ते प्रथमेच्या द्विवचनांत, तीन अगर अधिक अर्थ असतील ते प्रथमेच्या अनेकवचनांत व त्या शब्दांचे अर्थ त्या त्या विभक्तिवचनासहित द्वंद्वसमासांत घातलेले असतात. " गणाः प्रमथसंख्यौघा श्रावणौ पर्वतोत्पलौ " (वैजयंतीच्या नानार्थविभागांतून). शांश्वत (५९५–६२७) वगैरेंतून हे एकशेष पुष्कळच आढळतात. अमरानें शब्द व अर्थ याशिवाय त्यांचीं लिंगेंहि दिलेलीं आहेत. त्यानें पूर्वपद्धति सोडून देऊन जेथें एखाद्या शब्दाचे सर्व अर्थ एकलिंगीच असतील त्या ठिकाणींच फक्त एकशेषाचा उपयोग केलेला आहे उदा० " सुरमत्स्यावनिमिथौ " किंवा " खश्रावणौ नभसी " असें न म्हणतां " नभः खं श्रावणो नभः " (शाश्वत ६३० प्रमाणें शब्दांची पुनरावृत्ति) असें म्हटलें आहे. याशिवाय समानार्थवाचक शब्द जेव्हां एकलिंगी असतील तेव्हांच त्यांचा समास केला जातो. उदा. " स्वर्गनाकत्रिदिवत्रिदशालयाः " (सर्व पुल्लिंगी शब्द). याविषयीं आणखी जास्तीकमी माहिती अमरकोशाच्या टीकाकारांनीं दिलेली आढळते.

एका शब्दाचे अनेक अर्थ निरनिराळे न सांगतां समासपद्धतीनें सांगितल्यामुळें चुका व गैरसमजुती यांना जागा रहात असे. उदा. हे समास पहा. " (सुधा) गड्गेष्ठिकास्नुहीमूर्वापीयूषेषु, " –(शाश्वत), " (वली) मध्यमरेखोर्मिजीर्णित्वग्गृद्दारुषु " –(वैजयंती), "(निमित्तं) हेतुचिह्नागन्तुदैवादेशपर्वसु. " –(त्रिकां.) यांपैकी पहिल्या समासांत गड्गेष्ठिका हा एक शब्द कीं गंगा व इष्टिका (वीट) असे दोन शब्द समजावयाचे यावद्दल संशय राहतो. तथापि ही समासपद्धति त्याज्यहि समजत असत असें आपणांस प्राचीन काळींहि आढळलें. अजयकोशांतील प्रस्तावनेंत ग्रंथकर्त्यानें असें म्हटलें आहे कीं, " तीन अर्थांपर्यंतच मी द्वंद्वसमास करून बहुवचन लिहिलें आहे. चार अगर अधिक अर्थांचा समास केलेला नाहीं " (" त्रिष्वेव बहुवचनं कृतं न चतुरादिषु । "). यांवरून अजय जेव्हां सुधागड्गेष्ठिकाचूर्णेस्नुहीषु " असें लिहितो तेव्हां त्या ठिकाणीं गड्गा व इष्टिका असे निरनिराळे शब्द घेतां येत नाहींत हें उघड आहे. असो.

जे शब्द समानार्थक नाहींत ते एकमेकांपासून वेगळे करतां यावेत व त्यांचा अनेकार्थाप्रमाणें अर्थ लावूं नये म्हणून दोन साधनांचा उपयोग करीत. अशा ठिकाणीं अथ (अथो) व तु (आणि पुनर्) हीं अव्ययें योजीत. ज्या शब्दाच्या पूर्वी अथ असेल किंवा ज्याच्या मागून तु येईल तो शब्द पूर्वशब्दाबरोबर घेतां कामा नये. " त्वन्ताथादि न पूर्वभाक् "(अमर), "न पूर्व शब्दभागन्नपुनस्त्वंन्तमथादितः " (वैजयंती), "त्वन्ताथादि न पूर्वगौ" (हेमचंद्र). एका विषयाला ठराविक जागा पुरत असेल म्हणजे त्या विषयाचा आरंभ व समाप्ति श्लोकाच्या पादारंभाबरोबर अथवा पादसमाप्तीबरोबर जुळत असेल तर तेथें स्वाभाविकपणें विरामचिन्ह असतेंच. तशींच अथ व तु हीं एक तऱ्हेचीं कृत्रिम विरामचिन्हें होत. ही पद्धत कदाचित् अमरसिंहानें प्रथमच उपयोगांत आणली असेल.

नानार्थकोशांतून असा एक नियम आढळतो कीं, अनेकार्थवाचक शब्द प्रथम व त्यानंतर त्याचे अर्थ दिलेले असतात. विश्वकोशाच्या प्रस्तावनेंत (२२) असें म्हटलें आहे:–" नानार्थः प्रथमान्तोऽत्र सर्वत्रादौ प्रदर्शितः । सप्तम्यन्तेषु शब्देषु वर्तमानः सुनिश्चितः । " मेदिनीकोशाची (११) परिभाषा जवळ जवळ याच शब्दांत दिलली आहे. अनेकार्थसंग्रहांत (२) हेमचंद्र लिहितोः–" उद्देश्यवचनं पूर्वं पश्चादर्थप्रकाशनम् । ". पूर्वी " विधौ भूपे प्रजापतिः " असा प्रयोग करीत (त्रिकांडशेषांत सुध्दां हा

आढळतो, ३.३,१६७). नंतर फक्त "प्रजापतिर्विधौ भूपे" (विश्वकोश) असें आढळतें. अमरकोशांत व वैजयंतींत हा नियम आढळत नाहीं. तथापि या व इतर कोशांतून अनेकार्थवाचक शब्द वर्णानुक्रमानें लावल्यानें असल्या चुका होत नाहींत. नंतरच्या कोशकारांनीं-उदा. हेमचंद्रानें-वर्णनपध्दतींत अधिक संक्षिप्तता आणली इतकेंच नव्हे तर गैरसमजुती राहूं नयेत म्हणून विशिष्ट साधनें उपयोगांत आणिलीं. तशांतूनहि नवीनांनीं त्यांचा अर्थ लावण्यांत चुका केल्या आहेत, त्याचीं कारणें परिभाषांकडे दुर्लक्ष, टीकांचा अभाव व सदोष हस्तलिखितें व प्रकाशनें हींच असलीं पाहिजेत. नंतरच्या कोशकारांनीं जुने कोश वापरतांना चुका केल्या असणें संभवनीय व साहजिक आहे. त्यांचें टीकात्मक परीक्षण पुढें होणें जरूर आहे. सध्यां हें काम होणेंच मुष्किलीचें आहे. कारण कांहीं कांहीं महत्त्वाच्या कोशांचें विश्वासार्ह पध्दतीनें प्रकाशनहि अजून झालेलें नाहीं.

नानार्थशब्दकोशांचीं वरील वर्णनांत आलेलीं अशीं कांहीं विशिष्ट लक्षणें थोडक्यांत सांगितलीं पाहिजेत. वर्णनपद्धती विषयीं सांगावयाचें म्हणजे अगदीं प्राचीन ग्रंथांत अनेकार्थवाचक शब्द व त्यांचे अर्थ एकमेकांजवळ प्रथमाविभक्तींत (किंवा-"विदुः कृष्णां पिप्पलीं द्रौपदीमपि" शाश्वत २८ अशा ठिकाणीं द्वितीयेंत) ठेवीत असत असें वाटतें. असें करतांना अनेकार्थवाचक शब्दांची पुनरुक्ति करण्याची चाल होती. उदा "बलं शक्तिर्बलं सैन्यं बलं स्थौल्यम्" वगैरे. शाश्वतांत(६२८-६३५) अशी पुनरुक्ति पुष्कळच आढळते. इतर ठिकाणींहि असली शब्दावृत्ति अथवा पुनरुक्तता फार येते. उदा. प्राचीन असलेल्या अनेकार्थध्वनिमंजरींत तिचा उपयोग केलेला आहे. अनेकार्थवाचकाची पुनरुक्ति अनेकार्थवाचक अमुकच शब्द होय हें दाखविण्याकरितां करीत हें उघड आहे. ज्या ग्रंथांतून अनेकार्थवाचक शब्द व त्यांचे अर्थ प्रथमाविभक्तींत एकमेकांजवळ दिलेले असतात व शब्दांचा अनुक्रम वर्णानुरूप वगैरेहि नसतो अशा ग्रंथांत या गोष्टीची जरूरी भासते. शाश्वतानें (६३२) जर "क्षीरमम्बु पयः क्षीरम्" असें न लिहितां "क्षीरमम्बु पयः" इतकेच लिहिलें असतें तर कोशकाराच्या मनांत कोणत्या शब्दाचें स्पष्टीकरण करावयाचें होतें याविषयीं संशय उत्पन्न झाला असता, परंतु हा प्रश्न अमरकोशांतील " वणिक्पथः पुरं वेदो निगमः " या उदाहरणाच्या बाबतींत संभवतच नाहीं. येथें निगम हा अनेकार्थवाचक शब्द होय. कारण अमर हा अन्त्यव्यंजनानुसार शब्दानुक्रम देतो व वरील अवतरण " म-अन्त " विभागांतील आहे. तथापि अनेकार्थवाचक शब्द निरनिराळ्या रूपांत म्हणजे निरनिराळ्या लिंगी वगैरे असतांना त्यांचे अर्थ सोप्या रीतीनें सांगावयाचे असल्यास ही युक्ति अवलंबितां येते. उदा. "सहा मासः सहो बलम्। " (शाश्वत), "सहो बलं सहा मार्गः"(अमर). अर्वाचीन कोशकार फक्त लिंगभेद दाखविण्यापुरताच शब्दावृत्तीचा उपयोग करतात. उदा. महेश्वराचा विश्वकोश २३. " स्पष्टाय लिंगभेदाय काप्यत्र पुनरुक्तता। " त्याचप्रमाणें धरणीदास " स्पष्टाय लिंगभेदाय क्वचिदावृत्तिरिष्यते। " अजयपालाचे शब्द यापेक्षांहि निश्चित स्वरूपाचे आहेत " विना लिंगविशेषेण नैवात्र पुनरुक्तता ". तसेंच मेदिनीकार " शब्दावृत्तिर्न लिंगैक्ये. "

अनेकार्थवाचक शब्द व त्याचे अर्थ जवळ जवळ देणें हीच सर्वांत जुनी वर्णनपद्धति समजली पाहिजे; कारण ती सर्वांत स्वाभाविक आहे. तथापि उपलब्ध असलेल्या अति प्राचीन कोशांतून अर्थवाचक शब्द पुष्कळदां सप्तमींत दिलेले आढळतात. या पध्दतींत अर्थ अधिक स्पष्ट होतो यांत शंका नाहीं व अनेकार्थवाचक शब्दांची पुनरावृत्ति (प्रथमेचीं रूपें निरनिराळीं असतील तेवढ्या बाबतींत सोडून) करण्याचें कारणहि रहात नाहीं. असें असतांनाहि प्रथमेचीं समानरूपेंहि जेथें पुनरुच्चारित आढळतात (उदा. "परिग्रहः परिजने शपथेच परिग्रहः।" शाश्वत ३१) तेथें त्यांना पूर्वरुढीच्या निरर्थक अवशेषांवांचून दुसरी किंमत देतां येत नाहीं. नंतरच्या कोशकारांनीं अनेकार्थवाचक शब्द प्रथमेंत व त्यांचे अर्थ सप्तमींत असा नियम केलेला आढळतो (विश्व. २२ इ.; मथुरेश-"नानार्थः प्रथमान्तः स्यात्सप्तम्यन्ते तु वर्तते।"). अजयपालानें हा नियम कडक रीतीनें पाळला आहे, हेमचंद्रानें तसा पाळलेला नाहीं; अर्थात त्यामुळेंच केवळ त्याच्या अनेकार्थकोशास कमीपणा आलेला आहे असें नाहीं.

शब्दरचना करतांना कांहीं तत्त्वें-बहुतेक सर्व तत्त्वें-एकाच वेळीं पाळलीं आढळतात. एकार्थशब्दकोशांतून आढळणारा जो विषयविस्तारानुरूप शब्दानुक्रम त्याविषयीं पूर्वी लिहिलेंच आहे. या आद्यतत्त्वाखेरीज आणखी खालील तत्त्वें नमूद करतां येतील.

वर्णानुक्रमानें रचना करणें, मग ती अन्त्यव्यंजनानुसार असो, प्रथमवर्णास (स्वर अथवा व्यंजनास) अनुसरून असो किंवा एकाच वेळीं अन्त्यव्यंजन व प्रथमवर्ण या दोहींनुसार असो. सर्वांत जुनी पद्धति अन्त्यव्यंजनानुसार रचना करण्याची होय. अमरकोशांतील नानार्थवर्गांत (३,३) हे एकच तत्त्व अनुसरलेलें आढळतें.

याठिकाणीं लक्षांत घेण्यासारखी अशी एक गोष्ट आहे कीं, कांहीं कोशकार मध्ययुगीन वर्णमालेस प्रमाण मानतात, म्हणजे क्ष हें नेहमीच्या वर्णमालेच्या शेवटीं आणखी एक निराळें अक्षर समजतात. उदा. विश्वप्रकाश व मंखकोश यांतून ' अक्ष ' सारखे शब्द ' क्षान्त ' खालीं न पाहतां ते ' क्षान्त ' नंतरच्या एका निराळ्या सदराखालीं ' क्षान्त ' वर्गांत शोधिले पाहिजेत.

प्रथमवर्णानुसार शब्दरचना वैजयन्ती, देशीनाममाला व अजयकोश (यांत क्ष नें आरंभ झालेले शब्द शेवटीं आहेत) यांतून आढळते. एकाच वेळीं अंत्य व्यंजन व प्रथम वर्ण या दोहींनुसार शब्दरचना–उदा. त्रिकांडशेषांतील नानार्थवर्ग, अनेकार्थसंग्रह व मेदिनीकोश यांतून आढळते. वर्णानुक्रमानें शब्दरचना करण्याचे बाबतींत भारतीय त्यावेळीं फारसे पुढें गेलेले दिसत नाहींत. म्हणून प्रथमाक्षरानुसार शब्दरचना करतांना त्याचे पुढील स्वर किंवा व्यंजनें यांजकडे लक्ष दिलें जात नाहीं. उदा. अजयकोशांत एकामागून एक " गो, गौर, गुरु, गुण, ग्रहण, गंधर्व, ग्राह, गव्य, गोधा, " असे शब्द येतात. फक्त अनेकार्थसंग्रह, देशीनाममाला व मेदिनीकोश एवढेच या बाबतींत अपवाद आंहेत, या कोशांतून स्वरक्रमाकडे म्हणजे प्रथम व्यंजनापुढें जोडून अगर निराळ्या येणाऱ्या स्वराकडेहि लक्ष पुरविलेलें आढळतें. उदा. अनेकार्थसंग्रहांत (२. १७४–१७८) 'त्' नें संपणारे व 'प्' नें आरंभ होणारे शब्द खालील क्रमानें दिलेले आहेत:–पक्ति, पंक्ति, पत्ति, प्राप्ति, पित्सत्, पीत, पीति, प्रीति, पुस्त, प्च्युत, पूर्त, पृषत्, प्रेत, पोत, प्रोत.

शब्दांच्या अक्षरसंख्येनुसार त्यांचा अनुक्रम ठेवण्याचाहि प्रघात फार आढळतो. अमरकोशांत हा नाहीं. याविषयीं लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, शेवटचें व्यंजन असणाऱ्या शब्दांत तें व्यंजन विश्व व मेदिनीकोश (धरणीकोशांतहि) पूर्ण अक्षराप्रमाणें धरतात. उदा. ककुभ् (विश्व) त्र्यक्षरी शब्दांखालीं सांपडतो व यक्षराज् चतुरक्षराखालीं सांपडतो.

वैजयंतींत अक्षरसंख्या व प्रथमवर्ण शिवाय करून लिंग हेहि एक आणखी रचनातत्त्व मानलें आहे.

विश्वप्रकाशांत अन्त्यव्यंजन व अक्षरसंख्या यांशिवाय शब्दाचें प्रत्यय लागून जें रूप तयार झालें असेल त्यासहि अनुसरून शब्दरचना केली आहे.

लिंगनिर्देशः—अनेक कोशांतून अर्थीबरोबरच लिंगहि दाखविलेलें असतें म्हणजे नामानुशासन व लिंगानुशासन एकत्र केलेलीं असतात. उदा. अमरसिंहाच्या कोशाचें नांव 'नामलिंगानुशासन' म्हणजे नाम व लिंग यांचें अनुशासन (नामाच्या लिंगाचें अनुशासन नव्हे) असें आहे. कित्येक कोशकार लिंगाचा अंतर्भाव नामांबरोबरच न करतां त्यांचा निराळा विभाग करून (लिंगभेद किंवा लिंगसंग्रह असा) ग्रंथाच्या शेवटीं जोडतात. ज्या कोशांतून लिंगानुसार शब्दरचना केलेली आहे असेहि कोश पूर्वी होते. उदा. वैजयंतीचा नानार्थविभाग. हीं कोशाच्या रूपांत दिलेलीं लिंगानुशासनेंच होत. अशीं उदाहरणें वोपालित याचा कोश, अमरमाला व रत्नकोश यांचीं देतां येतील.

लिंगनिर्देश कोणत्या पध्दतीनें केलेला आहे यासंबंधीं कोशांच्या परिभाषांतून माहिती दिलली असते. महत्त्वाच्या परिभाषा अमरकोश, वैजयन्ती, व मेदिनीकोश या कोशांच्या होत. तदनुसार लिंग हें रूपभेदानें अथवा लिंगविशेषविधीनें (म्हणजे स्पष्ट लिंगनिर्देश करून) दाखविलें जातें. साधारणमानानें व्याकरणाच्या रूपावरून (म्हणजे बहुतेक प्रथमेच्या एकवचनावरून) " प्रायशो रूपभेदेन " लिंग ओळखलें जातें. नानार्थकोशांतून अनेकार्थवाचक शब्दाचे निरनिराळ्या लिंगीं निरनिराळे अर्थ जेथें असतील तेथें त्या शब्दाची पुनरावृत्ति करतात. उदा. विश्व " मित्रं सुहृदि मित्रोऽर्के " किंवा "पुमान्, ना, पुंसि, नरि, स्त्री, स्त्रियाम्, योषिति, नपुंसके, क्लीबे, षंढे " इ० शब्दांनीं लिंगांचा स्पष्ट निर्देश करतात. वैजयंतींत षण् (षंढ, षंड), क्लीं (क्लीब), नपुम् (नपुंसक) अशीं संक्षिप्त रूपें आढळतात. ज्या शब्दाला अमुक एक लिंग निषिध्द सांगितलें असेल तेथें तो शब्द इतरलिंगी असतो. ('निषिध्दलिंगं शेषाधिम्') उदा. 'वज्रमस्त्री' म्हणजे वज्र हें पुल्लिंगी व नपुंसकलिंगी आहे. जेथें 'द्वयोः' म्हटलें असेल तेथें पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी समजावयाचें, अर्थात् द्विहीन किंवा द्वयहीन म्हणजे नपुंसकलिंगी.

तीनलिंगी शब्द (उ. स्फुलिंग, मंडल वगैरे नामें व विशेषणें) त्रिषु अशा शब्दानें निर्देशितात. ज्या कोशांतून लिंगभेद रूपभेदानें दर्शविला जातो तेथें 'त्रिषु' याच्यापुढें लिंगेषु न समजतां 'अर्थेषु' समजावयाचें असतें (तुल. शाश्वत १५१,१८५; हलायु. ५,६०) "त्रिलिंग्यां त्रिष्विति पदम्" हा नियम अमरानें पूर्वीच्या कोशकारांच्या पद्धतीला विरुद्ध म्हणून प्रथमच केला असावा. वैजयंतींत जे शब्द "स्वतो न वाच्यवशात" त्रिलिंगी आहेत (उदा. मण्डल) त्यांच्यामध्यें व विशेषणांमध्यें भेद दाखविला आहे. पहिल्यांना त्रिलिंग व दुसऱ्यांना वाच्यलिंग असें म्हणतात (परिभाषा. ७) "त्रिष्वित्युक्तिर्वाच्यलिंगे त्रयीशब्दस्त्रिलिंगके। " उ. 'त्रिलिंगं' मण्डलम् २९२,१३०; "त्रयीस्फुलिंगाः" ११,६१ (अमर–त्रिषुस्फुलिंगा) "जीवः प्राणे त्रयी, नातु जन्तावात्मनि गीष्पतौ, त्रिषुजीवति" २३२,६६.) इतर अनेक कोशांत विशेषणात्मक शब्दांना 'त्रिलिंग' व 'वाच्यलिंग' दोन्ही लावतात. याशिवाय अन्यलिंग, अथैवलिंग, भेद्यगामिन्, अन्यवत्, अभिधेयवत्, वाच्यवत् वगैरेहि लावतात.

अमरकोश—अमरसिंह या ग्रंथकर्त्याच्या नांवावरून तो रजपूत असावा. ग्रंथाचें खरें नांव 'नामलिंगानुशासन' असून त्याला त्रिकांड अथवा त्रिकाण्डी सुद्धां म्हणतात. यांत १५०० श्लोक असून बहुतेक अनुष्टुप् छंदांत आहेत. तीन कांडांपैकीं प्रत्येकाचे वर्ग केलेले आहेत.

अमर हा निःसंशय बौद्ध होता. मंगलाचरणावरून हें स्पष्ट होतें (बुद्धाचा स्पष्ट निर्देश बौद्धेतरांना न दुखविण्याकरितांच केला नसावा). बुद्धाचीं नांवें ब्राह्मणी देवतांच्या नांवांच्या अगोदर दिलेलीं आहेत यावरूनहि हेंच सिद्ध होतें. बाकी व्याडीप्रमाणें शाखेरीज फारसें बौद्धनिदर्शक अमरांत नाहीं. अशी एक आख्यायिकाहि आहे की, शंकराचार्यांच्या काळीं बौद्धांचा जो छळ झाला त्यांत अमरकोशासहित त्याचे सर्व ग्रंथ यांचा नाश करण्यांत आला.

अमरकोशाचा काळ निश्चित करणें–विशेषतः तो आपल्या पूर्वीच्या ग्रंथकारांचीं नांवें देत नाहीं म्हणून–फार अवघड आहे. या प्रश्नासंबंधीं अनेकांनीं लिहिलें आहे. कृष्णाजी गोविंद ओक यांनीं आपल्या प्रस्तावनेंत 'द्वौ द्वौ माघादिमासौस्याद्दतुस्तैरयनं त्रिभिः' या कालवर्गातील श्लोकावरून क्षीरस्वामीन 'माघादयुपक्रमस्ततोयनारम्भात्' असें विवेचन केलें आहे व उत्तरायन माघांत होत असे असें सांगितलें आहे; तसेंच "हेमन्तादि वत्सरस्यारंभः" या क्षीरस्वामीच्या विधानावरून अमरसिंह पंधरा सोळाशें वर्षांपूर्वी होऊन गेला असावा असें म्हटलें आहे. त्यासच दुसरें प्रमाण त्यांनीं असें दिलें आहे कीं, अमर हा चंद्रगोमीच्या व्याकरणाचा अनुयायी नसून पाणिनीच्या व्याकरणास अनुसरतो म्हणून तो चंद्रगोमीच्या पूर्वी होऊन गेला असावा. अर्थात् अमरसिंहाचा काल इ. स. चवथें शतक होय. यासंबंधीं प्रो. हकरिया म्हणतात:

दंतकथेनुसार विक्रमादित्य नांवाच्या राजाच्या दरबारांत नऊ रत्नें होतीं. अमरसिंह, कालिदास व वराहमिहिर हीं त्यांत होतीं. यांपैकीं वराहमिहिर हा सहाव्या शतकांतील आहे. म्हणून अमरकोशहि ५५० च्या सुमारास झाला असावा. अर्थात ही दंतकथा किती विश्वासार्ह आहे, त्याच्यावर व सर्व अवलंबून आहे गया येथील ९४८ सालच्या लेखांत विक्रमादित्याच्या दरबारांतील नऊ रत्नांपैकीं जो अमरदेव त्यानें गयेला एका बुद्ध मूर्तीची स्थापना केली व एक देऊळ बांधलें असा उल्लेख आहे म्हणतात. त्यांत अमरसिंहाला अमरदेव म्हटलें आहे तसें इतरत्र कोठेंहि म्हटलेलें आढळून येत नाहीं. त्यांतून जरी हा लेख खरा व त्याचें भाषांतर खरें मानलें तरी त्यावरून फार तर ९४८ सालीं लोक काय समजत होते याचा बोध होऊं शकेल.

अमरकोशाचें चिनी भाषेंत ५५० च्या सुमारास भाषांतर झालेलें होतें अशी एक समजूत होती. बुनयु नंजिओ यानें ही चुकीची आहे असें दाखविलें आहे. एवंच वराहमिहिर व अमरसिंह हे समकालीन होते या अनिश्चित दंतकथेपासून फारसा बोध होत नाहीं. अमरसिंहाचें महत्व जाणून व त्याजविषयीं आदरभाव असल्यामुळें नंतरच्या लोकांनीं त्याला प्राचीन काळीं घातलें असावें हें मात्र शक्य आहे. कारण त्याच्या ग्रंथांतून तशा काळाचीं चिन्हें दिसत नाहींत. ज्याचा काळ कांहींसा खात्रीनें अनुमानितां येतो असा जो हलायुधाचा प्राचीन कोश तो अमरकोशापेक्षां पुष्कळच प्राचीन असल्याचें स्पष्ट दिसतें. बाकी भारतीय वाङ्मयांत साधी व किष्ट रचनापद्धति एकाच वेळीं प्रचलित असलेली आढळून येते, हें विसरून चालणार नाहीं.

वैय्याकरणग्रंथकारांत ज्याप्रमाणें पाणिनी त्याचप्रमाणें जवळ जवळ कोशकारांमध्यें अमर समजतात. त्याच्या पूर्वीचे ग्रंथ (कदाचित शाश्वत सोडून?) नाहींसे झालेले दिसतात. अमरकोशाचा हिंदुस्थानांत व इतरत्र हिंदुस्थानाबाहेरहि प्रसार झालेला आढळतो. या कोशाचीं अनेक पुरातन हस्तलिखितें सगळीकडे आढळतात. ग्रंथकर्ता बहुतेक उत्तरहिंदुस्थानांतील असल्यामुळें त्या प्रांतांत त्याचा ग्रंथ विशेष प्रसिद्धीस आला. ११८५ सालच्या नेपाळच्या सांपडलेल्या एका हस्तलिखितांत प्रत्येक कांडाच्या शेवटचे श्लोक गाळलेले आढळतात. नेपालांतील कीर्तिचंद्रानें केलेल्या अमरकोशाच्या तिबेटी भाषांतराचाहि येथें उल्लेख करणें जरूर आहे. बोथलिंगनें त्याची प्रस्तावना व पहिल्या स्वर्गवर्गातील दहा श्लोक जर्मन भाषांतरासहित दिलेले आहेत. अमरकोशाची नक्कल मागाहून पुष्कळ झाली. कांहीं कांहीं कोश तर अमरकोशाच्याच वाढविलेल्या आवृत्त्या आहेत. मोग्गलानाचा "अभिधानप्पदीपिका" हें अमरकोशाचेंच एक निराळें स्वरूप होय. अग्निपुराणांतील कोशविभाग (अध्याय ३५९–३६६)–अमरकोशांतल्या प्रमाणेंच वर्णानुक्रम असणारा–हा अमरकोशांतूनच घेतलेला असावा.

अमरकोशावरील टीका—प्राचीन कोशकारांनीं स्वतःच आपल्या ग्रंथांवर टीका लिहिल्या असतील हें म्हणणें मान्य होण्यासारखें नाहीं. तसें असतें तर उदा. अमर २.९,५८ येथील पादबंधनमूचे जागीं "यादवं धनम्" असा पाठभेद आला नसता, व पेशीकोश हा समास मानणें अथवा पेशी व कोश असे दोन शब्द मानणें (अमर. २.५,३८) अशा प्रकारच्या नंतरच्या टीकाकारांत मतभेद राहिला नसता. तथापि अमरकोशावरील टीका एकंदरींत महत्त्वाच्या होत. स्वतः कोशकारांनीं स्पष्टार्थक लिहिण्याची खबरदारी घेतली असली तरी कांहीं कांहीं ठिकाणीं त्यांच्या सांगण्यांत अस्पष्टपणा राहतोच. एकार्थकोशांत एका अर्थाचे शब्द कोठपर्यंत समजावयाचे यासंबंधीं शंका राहूं शकते, व अनेकार्थकोशांत कोणता शब्द अनेकार्थवाचक आहे यासंबंधीं व त्यापेक्षांहि खुद्द अनेकार्थवाचक शब्दाइतकेच अनेक अर्थ असणारे त्यांचे अर्थ कसकसे समजावयाचे यासंबंधीं शंका राहते.

अमरकोशावरील सुमारें ५० टीकांचीं नांवें उपलब्ध आहेत. टीकाकार भट्ट क्षीरस्वामी हा दाक्षिणात्य असावा, "स्वामिन्" या उपाधीवरून हा पुष्कळ जुना असणें शक्य आहे व राजतरंगिणीतील (४.४८९) काश्मीरच्या जयापीड राजाच्या कारकीर्दीत (८ व्या शतकांत) राहणारा जो शब्दविद्योपाध्याय 'क्षीर' तो व हा एकच असें एक मत आहे. क्षीरस्वामीनें भोज उध्दृत केला आहे व गणरत्नमहोदधीचा कर्ता वर्धमान (इ. स. ११४०) यानें क्षीरस्वामीमधील अवतरणें दिलीं आहेत, म्हणून त्या दोघांमध्यें (अकरावें शतक) क्षीरस्वामीचा काल असावा असें ऑफ्रेक्ट म्हणतो. त्याच्या टीकेचें नांव 'अमरकोशोद्घाटन' असें आहे व रायमुकुटाच्या टीकेप्रमाणें अवतरणांनीं भरून काढलेली नाहीं. तथापि ही मूल्यवान आहे. अमरकोशासह ही टीका कृ. गो. ओक यांनीं सँपादिली आहे. या टीकेंत काव्य, मुनि, भागुरि, माला अथवा मालाकार, निघण्टु, शाश्वत, अमरमाला, अभिधानकार, अभिधानशेष, अनेकार्थ, श्रीहर्ष, दुर्गा, भोज, रुद्र या कोशांचा अथवा कोशकारांचा उल्लेख व उपाध्याय, गौड, भोज, आचार्याः, नारायण इत्यादि टीकांचा उल्लेख आढळतो. या ग्रंथाच्या शेवटीं क्षीरस्वामीनें उल्लेखिलेल्या सुमारें २४० ग्रंथांची यादी व टीकेंतील व मूळांतील शब्दांच्या सूची दिल्या आहेत त्या महत्त्वाच्या आहेत.

सुभूति (सुभूतिचंद्र) या बौद्ध टीकाकाराचा काल अनिश्चित आहे. तथापि तो रायमुकुटाच्या आधींचा आहे. कारण रायमुकुटानें याचे उल्लेख केले आहेत. सुभूतीच्या 'कामधेनु' नांवाच्या या टीकेचे तिबेटी भाषांतर उपलब्ध आहे. चंद्र व्याकरणाचे पूर्ति करणारे व त्यावर टीका करणारे जे बौद्ध पूर्णचंद्र व रत्नमति, त्यांचे ग्रंथ इतर कांहीं ग्रंथांबरोबर या टीकेंत उल्लेखिलेले आहेत.

पूर्वीच्या दहा टीकांचा सारांश आपल्या 'टीकासर्वस्वांत' देणारा (दशटीकाविद्) सर्वानंद वन्द्यघटीय हा सुद्धां रायमुकुटाच्या पूर्वीचा असून दक्षिणहिंदुस्थानचा होता.

बृहस्पति रायमुकुटमणीची 'अमरकोश पंजिका पदचंद्रिका' ही टीका विस्तृत व विद्वत्तापूर्ण आहे. आपल्या प्रस्तावनेंत हा स्वतःस गोविंदाचा मुलगा व बंगालमधील राढाचा रहिवाशी असल्याचें लिहितो. व आपली टीका पूर्वीच्या सोळा टीकांचें सार असल्याचें सांगतो. टीकेतील एका ज्योतिषशास्त्रविषयक उल्लेखावरून (१.४,२१) टीकेचें साल इ. स. १४३१ निघतें. या टीकेचा उल्लेख रायमुकुटी(टीका) असा सुद्धां केलेला आढळतो. तदनुसार तिचा कर्ता 'रायमुकुटीकार' यानांवानें उल्लेखिला जातो. रायमुकुटानें २७० ग्रंथ व ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे.

भट्टोजी दीक्षिताचा मुलगा भानुजी दीक्षित (१७ वें शतक) याच्या 'व्याख्यासुधा' अथवा 'रामाश्रमी' नामक टीकेची एक शिलाप्रेसची प्रत(क्लॅट–हेड्डी एम् डी. ३५–१९०) आढळते. पंडित शिवदत्तानें प्रकाशित केलली (मुंबई १८८९) व उत्तम छापलेली एक प्रत आहे. तींतील विशेषेकरून अवतरणें बिनचूक नाहींत; परंतु यांतील दोन सूची–दुसरी टीकेंतील शब्दांची आहे–फार उपयुक्त आहेत. याखेरीज पुढील टीकांचा ऑफ्रेक्टच्या ग्रंथ सूचींत उल्लेख आढळतो.

टीकाः–अमरविवेक–महेश्वर; बृहद्वृत्ति; व्याख्याप्रदीप–अच्युत उपाध्याय; क्रियाकलाप–आशाधर; काशिका–काशीनाथ; अमरकोशोद्घाटन–क्षीरस्वामिन्; बालबोधिनी–गोस्वामी; कौमुदी–नयनानंदशर्मन् व रामचंद्रशर्मन्; अमरकोशपंजिका अ० पदार्थकौमुदी–नारायणशर्मन्; अमरकोशमाला–परमानंद (सूचिपत्र); अमरकोशपंजिका–बृहस्पति; गुरुपालप्रबोधिनी–भानु दीक्षित; बुधमनोहरा–महादेव; पदचंद्रिका–रायमुकुट; कामधेनु–सुभूतिचंद्र; शब्दार्थसंदीपिका–नारायण विद्याविनोद; सुबोधिनी–नीलकंठशर्मन्; मुग्धबोधिनी–भरतसेन; व्याख्यासुधा अ० सुबोधिनी–भानुजी दीक्षित; सारसुंदरी–मथुरेश विद्यालंकार; अमरपदपारिजात–मल्लिनाथ; विद्वन् मनोहरा अ० बुधमनोहरा–महादेवतीर्थ (वर पहा); अमरकोशविवेक–महेश्वर (वर पहा); त्रिकांडचिंतामणि–रघुनाथ चक्रवर्ती; त्रिकांडविवेक–रामनाथ; वैपम्यकौमुदी–रामप्रसाद; प्रदीपमंजरी–रामेश्वरशर्मन्; पदमंजरी–लोकनाथ; व्याख्यामृत–श्रीकर आचार्य; टीकासर्वस्व–सर्वानंद; बृहदमरकोश–उल्लेख रायमुकुट. पुढील ग्रंथकारांनींहि अमरकोशावर टीका लिहिल्या आहेत. अपय्य दीक्षित; मंजु भट्ट; रंगाचार्य; रामकृष्ण दीक्षित; लिंगयसूरि; (लिंगभट्ट ?); वेंकटाचार्य; कलिंग; उल्लेख उज्ज्वलदत्त व रायमुकुट; मुकुंदशर्मन्; राघवेंद्र; रामशर्मन्; रामस्वामी; रामाश्रम (भानुजी); लक्ष्मणशास्त्री; श्रीधर.

अमरोत्तर कोश––पुरुषोत्तमदेवाचे शब्दकोशः–पुरुषोत्तमदेवानें अनेक व्याकरण व कोशविषयक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं या ठिकाणीं विशेषेकरून त्रिकांडशेष व हारावलीचा विचार करावयाचा आहे.

पुरुषोत्तमदेवाचा काल पूर्णपणें निश्चित करतां येत नाहीं. बुहल्सनच्या म्हणण्याप्रमाणें पुरुषोत्तमदेव सुमारें १०० या किंवा ११ व्या शतकांतील असावा. आनंदराम बरुआ यांच्या म्हणण्याप्रमाणें लक्ष्मणसेनाचा प्रधान हलायुध याचा हा वंशज समजतात, म्हणून १३ व्या शतकाच्या उत्तरार्धापूर्वी हा असूं शकणार नाही. हा बंगाली होता याविषयीं शंका दिसत नाहीं. बुहल्सननें याला जैन

म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. स्वतःचे समकालीन व सहकारी म्हणून पुरुषोत्तम आपल्या हारावलीच्या प्रशस्तींत धृतिसिंह आणि जनमेजय यांचीं नांवें व त्याच ठिकाणीं आपले आधार ग्रंथ म्हणून 'शब्दार्णव', 'उत्पलिनी' (त्रिकाण्डशेषाच्या शेवटीं सुद्धां) व 'संसारावर्त' हीं नांवें देतो.

त्रिकाण्डशेष हें अमरकोशाचें परिशिष्ट आहे, हें त्याच्या नांवावरून उघड होतें. यांत १०५० श्लोक असून त्यांत अमरांत व नेहमीं न येणाऱ्या शब्दांची फार महत्त्वाची व एकंदर चित्ताकर्षक स्वरूपाची अशी यादी आहे. विषयरचना अगदीं अमरकोशासारखीच आहे. मात्र नानार्थवर्गांत अमरापेक्षांहि सुधारणा करून वर्णानुक्रमानेंहि शब्दरचना केली आहे. (स्वरकायादिकाद्यन्तक्रमात्) विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे कांहीं क्वचित् आढळणारीं बुध्द नांवें, प्रज्ञापारमिता नांवाच्या बौद्ध ग्रंथाचें नांव व बौध्द संस्कृतांतील अनेक शब्द यांत आले आहेत. हें ज्ञान यानें वडिलांपासुन घेतलें असण्याचा संभव आहे. आणखी विशेष म्हणजे रिंचोली=ओळ वगैरे सारखे फक्त प्राकृतांत आढळणारे कित्येक शब्द आपल्या कोशांत यानें दिले आहेत.

हारावलींत २७० श्लोक असुन तिचे दोन भाग–एकार्थ व अनेकार्थ असे–पडतात. दुसऱ्या भागांत फक्त ४५ श्लोक आहेत व १२६ अनेकार्थवाचक शब्द अर्थांसहित दिले आहेत. एकार्थविभागांतील विषय बहुतेक त्रिकांडशेषांतील प्रमाणेंच आहेत परंतु हारावलींत आणखी बरेच क्वचित आढळणारे शब्द दिले आहेत. हा ग्रंथ तयार करण्याकरतां पुरुषोत्तमदेवाला १२ वर्षे लागल्याचें लिहिलें आहे. याचा अर्थ क्वचित आढणारे शब्द शोधण्याकरितां त्यानें १२ वर्षे ग्रंथवाचनांत घालविलीं असा समजतां येईल. याचा एक एकाक्षरकोश व एक द्विरूपकोश अथवा शब्दभेदप्रकाश असे आणखी दोन कोश प्रसिध्द आहेत.

शाश्वतकोशः––शाश्वताचा "अनेकार्थसमुच्चय" हा ८०४ श्लोकांचा असून त्यांत १८०० शब्दांचे अर्थ दिले आहेत. शाश्वतकोशाची रचना व वर्णनपद्धति प्राथमिक स्वरूपाची असल्याचें वर सांगितलेंच आहे. शाश्वताचा काल अनिश्चित आहे. कोशाच्या प्राथमिक स्वरूपावरून हा बराच प्राचीन असावासें दिसतें. परंतु नंतरच्या कोशांतून सुद्धां शाश्वतांत दिसून येणारीं विशिष्ट लक्षणें थोड्याफार प्रमाणांत दिसुन येतात. शाश्वत हा सर्वांत जुना म्हणजे अमराच्याहि पूर्वीचा असावा. शाश्वतानें आपल्या प्रशस्तींत (५,८०६–७) आपले सहकारी म्हणून दिलेल्या चार व्यक्ती (खुडुल, विद्याविलास, महाबल, वराह) माहीत झाल्या तर त्याचा काल निश्चित होईल.

त्याच किंवा दुसऱ्या शाश्वताच्या नांवावर एक औषधीवनस्पतींचा कोश सरस्वतीनिघंटु नांवाचा–कोलंबो (१८६५ व १८८४) येथें प्रसिध्द झाला आहे.

अनेकार्थध्वनिमंजरिः––काश्मीरच्या महाक्षपणकानें केकेल्या अनेकार्थ अथवा नानार्थध्वनिमंजरीचा शाश्वतकोशाशीं जरी फार जवळचा संबंध असला तरी ती त्यांतील केवळ वेंचे घेऊन लिहिली आहे असें नाहीं. शाश्वतांत नसलेले अनेक शब्द व अर्थ यांत आहेत. याची रचना हुबेहूब शाश्वताप्रमाणें आहे. एक अनेकार्थवाचक अव्ययांचें प्रकरण मात्र गाळलें आहे. त्याऐवजीं कांहीं कांहीं हस्तलिखितांतून शेवटीं तर परिशिष्ट एकाक्षरनिघंटु म्हणून मुख्य ग्रंथांच्या तीन विभागांना (श्लोकाधिकार, अर्धश्लोकाधिकार व पादाधिकार) जोडलेले आढळतात.

उपलब्ध ग्रंथ सदोष आहे. हस्तलिखितांच्या वर्णनावरून निरनिराळ्या प्रतींतील ग्रंथविस्तार इतका भिन्न आहे कीं त्या एकाच ग्रंथाच्या निरनिराळ्या आवृत्ति असाव्यात असें वाटतें. याशिवाय हाच किंवा यासारखाच एक ग्रंथ गडसिंह अथवा दुर्गसिंह याच्या नांवावर आहे.

महाक्षपणकाचा काल तूर्त निश्चित करतां येत नाहीं. जुन्या टीकाकारांना (रायमुकुटासुध्दां) याचा ग्रंथ माहीत असल्याचें दिसत नाहीं. कदाचित हा महाक्षपणक व उणादिसूत्रांचा टीकाकार क्षणपक हे एकच असतील.

विषय व विस्तार या बाबतींत शाश्वतकोशाशीं बरोबरी करणारे अजयपाल व धरणीदास यांचे दोन नानार्थकोश छापलेले नाहींत.

अजयपालः––याच्या नानार्थसंग्रहांत सुमारें १७३० शब्द आहेत. त्यांपैकीं बहुतेक शब्द शाश्वतांत आलेले आहेत. यांची रचना वर्णानुक्रमानें अक्षरसंख्येकडे लक्ष न देतांना व वर्णविस्तारानुरूप केली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं अव्ययें दिलीं आहेत. इतर ठिकाणच्या प्रमाणें त्यांचें स्वतंत्र प्रकरण करून शेवटीं जोडलें नाहीं. शब्दांचे अर्थ देण्याची अजयाची पध्दति फार कौशल्याची आहे. पूर्वीच्या कोशग्रंथांत ज्याप्रमाणें गैरसमजुती होण्यास जागा राहते तशी राहूं नये म्हणून यानें खबरदारी घेतली आहे.

अजयपालाचा काल सुमारें ११०० च्या नंतरचा नसावा. कारण वर्धमानाच्या गणरत्नमहोदधींत (११४० त रचलेल्या) याचा उल्लेख सांपडतो. हेमचंद्र व त्याचा शिष्य महेंद्रसूरि यांनांहि याची माहिती असावी असें दिसतें. रायमुकुट याचा उल्लेख वारंवार करतो.

धरणीकोशः—धरणीदासाच्या अनेकार्थसाराचा उल्लेख बहुधा धरणीकोश अथवा नुसता धरणी (मेदिनी पहा) असा केलेला आढळतो. याची रचना अन्त्यव्यंजन व अक्षरसंख्येनुसार केलेली आहे. "क्षान्त" शब्द "हान्त" इत्यादिच्या नंतर दिले आहेत. रायमुकुटानें याचा उल्लेख केलेला असून याचीं हस्तलिखितें फार दुर्मिळ आहेत. ग्रंथकर्ता बुद्दल्सनच्या म्हणण्याप्रमाणें कनोजचा ब्राह्मण असून बरुआनें त्याला तेराव्या शतकांत घातले आहे.

हलायुधः—जुन्या कोशांपैकीं हलायुधाच्या अभिधानरत्नमालेचाच काल काय तो कांहींसा निश्चयपूर्वक अनुमानितां येतो. डॉ. भांडारकरांशीं जुळणाऱ्या लुडविग हेलरच्या या बाबतींतील काळजीपूर्वक संशोधनानुसार हलायुध १० व्या शतकाच्या मध्यास झाला असावा. त्यानें तीन ग्रंथ लिहिले. अभिधानरत्नमाला, कविरहस्य व मृतसंजीवनी. यांपैकीं कोश सर्वांत पूर्वीचा असावा. कविरहस्य हें ९५० त मान्यखेटच्या तिसऱ्या कृष्णराजाच्या दरबारीं व मृतसंजीवनी धारचा मुंजवाक्पति याच्या दरबारीं लिहिली गेली. हलायुध आपल्या पूर्वीचे म्हणून अमरदत्त, वररुचि व भागुरि आणि वोपालित यांचीं नांवें देतो. "इत्यमरदत्त वररुचि भागुरि वोपालितादि शास्त्रेभ्यः। अभिधानरत्नमाला कविकण्ठविभूषणार्थमुद्रियते" ॥ १२ ॥ पूर्वीच्या कोशांतून यानें पुष्कळ भाग शब्दशः घेतले असणें संभवनीय आहे. ३५८ श्लोकांतील दुसरी ओळ अभिधानचिंतामणीच्या टीकेंत हेमचंद्रानें म्हटल्याप्रमाणें भागुरीची आहे. अभिधानरत्नमालेचें स्वरूप जुनें दिसतें. शब्द व अर्थ सोप्या पद्धतीनें व पाल्हाळिकपणें दिलेले आहेत. लिंगें स्पष्टपणें पुल्लिंगी वगैरे शब्दांनीं सांगितलेलीं नाहींत. फक्त रूपभेद मात्र दर्शविला आहे. मोठ्या कोशांच्या आरंभीं येणारी परिभाषाहि नाहीं. यांत सुमारें ९०० श्लोक आहेत (अमरकोश याच्या जवळ जवळ दुप्पट आहे) व त्याचीं पांच कांडें केलीं आहेतः—स्वर्ग, भूमि, पाताळ, सामान्य व अनेकार्थकांड. आजड टीकाकारानें वर्ग मानिले आहेत.

हलायुधकोशाची ऑफ्रेक्टनें (लंडन १८६१, ग्लॉसरीसह) प्रकाशित केलेली प्रत उत्तम आहे. षट्कोशसंग्रहांत (बनारस १८७३) दुसरी एक प्रत आहे. याची तिलक नांवाची एक टीका बुल्हरनें आपल्या गुजराथ हस्तलिखितांच्या कॅटलॉगांत उल्लेखिली आहे (३. पृ. ३४). स्वतःस त्रिभुवनपालाचा मुलगा व डाल्यणिपृथ्वीपाल (डाह्लणि?) चा नातू म्हणविणाऱ्या श्रीमदाजडाची (श्रीमहाजडाची?) टीका आहे. या टीकेंत भागुरि, शाश्वत, अमरकोश, क्षीरस्वामी, बुध्दिसागर, विश्वप्रकाश, शब्दभेद, भोज व अमरमाला इतक्यांचा उल्लेख आहे. अभिधानचिंतामणीच्या सारोध्दारांत पुन्हां पुन्हां उल्लेखिलेली हलायुधटीका व आजडाची टीका या कदाचित एकच असतील. टेलर (कॅ. १.३९५) व किटेल (इं. ॲं. ४.१७) यांनीं हलायुधाच्या एका कानडी टीकेचा उल्लेख केलेला आहे.

यादवः—हलायुधाच्या अभिधानरत्नमालेपेक्षां सुमारें शंभर वर्षांनीं अलीकडील यादवप्रकाशाची वैजयन्ती होय. यापेक्षां अधिक खात्रीचा काल निश्चित करतां येत नाहीं. यादव हा दंतकथेवरून रामानुजाचा समकालीन प्रथम शिक्षक, नंतर शिष्य होता. कांजीपुरम् जवळील एका खेड्यांत याचा जन्म झाला होता व हा कांजीपुरम् येथेंच वैष्णवसन्यासी होऊन मेला. हलायुधकोश व पुढें वर्णिलेला धनंजयकोश यांच्याप्रमाणें वैजयंती ही दक्षिण हिंदुस्थानांतील होती.

आपण कोणत्या मूळ ग्रंथाचा आधार घेतला याविषयीं यादवानें कांहीं सांगितलेलें नाहीं. तथापि बहुशः त्याच्या आधीं हलायुध व वाचस्पति आणि व्याडि हेहि होऊन गेले असावेत.

अभिधानरत्नमाला व वैजयंती यांच्या कालामध्यें फारसें अंतर नसलें तरी दुसऱ्यानें पहिल्याच्यापुढें पुष्कळच प्रगति केलेली आढळते. शब्दांचे अर्थ, रचना व लिंगनिर्देश बिनचूक असून कौशल्यानें मांडले आहेत. ग्रंथ लावण्याची किल्ली परिभाषेंत सांगितली आहे, त्यासंबंधीं वर उल्लेख आलाच आहे.

वैजयंतीचा विस्तार बराच मोठा आहे. या बाबतींत तिची, इतकाच विषय देणाऱ्या सर्व जुन्या—व कदाचित नव्याहि—कोशांवर ताण आहे. वैजयंतीतील आठ कांडांपैकीं १—४ त एकार्थवाचक शब्द व ५—८ त नानार्थवाचक शब्द आहेत. ग्रंथाचे शेवटीं अव्ययांचें एक प्रकरण, एक लिंगसंग्रह व पर्यायसंयोगन्यायप्रदर्शनाध्याय नांवाचा एक नानार्थवाचक शब्दांचा संग्रह आहे.

धनंजयः—के. बी. पाठक व डॉ० भांडारकर यांनीं धनंजयकवीची नाममाला ही प्राचीन कोशांपैकीं आहे असें सांगितलें नसतें तर तिचा येथें निर्देश करण्याचेंहि कारण नव्हतें. या ग्रंथाच्या पहिल्या परिच्छेदाच्या शेवटीं दोन श्लोक आहेत. त्यांत धनंजय स्वतःला कवि व द्विसंधानकाव्याचा कर्ता म्हणविते. हें काव्य—याचें दुसरें नांव राघवपांडवीय—काव्यमालेंत (१८९५) छापलें आहे व गणरत्नमहोदधींत (११४० तील) यांतील चार अवतरणें सांपडतात. यावरून धनंजय कवि—अर्थात नाममालेचा कर्ता—जास्तींत जास्त बाराव्या शतकाच्या आरंभींचा असेल. डॉ. भांडारकरांच्या म्हणण्याप्रमाणें कविराज (सुमारें १०००) यानें राघवपांडवीयाची बहुतेक नक्कल केली असल्यामुळें तो कविराजाच्या पूर्वीचा असावा. पाठकांच्या म्हणण्याप्रमाणें धनंजयाला श्रुतकीर्ति त्रैविद्य म्हणत असत व राघवपांडवीयाची रचना त्यानें इ. स. ११२३ नंतर लवकरच केली. याशिवाय आपल्या एका प्रशस्तीमध्यें राजशेखरानें

धनंजयाची स्तुति केलेली आहे. क्लॅटनें म्हटल्याप्रमाणें हा राजशेखर व नाटककार राजशेखर एकच असल्यास धनंजयाचा काल पुष्कळच मागें न्यावा लागेल.

धनंजय हा दिगंबर जैन असुन कर्नाटकचा रहिवासी होता. नाममालेची–हिचेंच नांव निघण्टुसमय–अनेक संस्करणें झालीं. त्यांत एकार्थवाचक शब्दांचे २०० श्लोक आहेत. रचना थोडी चमत्कारिक आहे तथापि वुइल्सन याला कोणत्याहि विशिष्ट पध्दतीनें न बांधलेला समानार्थक शब्दांचा हा अगदीं लहान गट आहे असें म्हणतो, तें थोडें अतिशयोक्तीचें आहे. मूळ नाममालेच्या शेवटीं पांच श्लोकांची प्रशस्ति आहे. त्यांत स्वतःच्या काव्याखेरीज अकलंक व पूज्यपाद यांचीं नांवें तो उल्लेखितो. शिवाय नाममाला " शतद्वयं श्लोकानाम् " आहे असेंहि तो स्पष्ट म्हणतो. (" प्रमाणमकलंकस्य पूज्यपादस्य लक्षणम् । द्विःसंधानंकवेःकाव्यं रत्नत्रयम पश्चिमम् ॥ ३ ॥ कवेर्धनंजयस्येयं सत्कवीनां शिरोमणेः । प्रमाणं नाममालेति श्लोकानांच शतद्वयम् ॥४॥ ") म्हणून ही शिळाप्रत बहुतेक मूळच्या ग्रंथाचीच असावी. परंतु कांहीं हस्तलिखितांतून नानार्थवाचक शब्दांचाहि एक ५० श्लोकांचा दुसरा परिच्छेद आढळतो. त्यांत पहिल्या परिच्छेदास शब्दसंकीर्णप्ररूपण व दुसऱ्यास शब्दसंकीर्णस्वरूपनिरूपण असें म्हटलें आहे (उदा. प्रो. याकोबीकडे असलेल्या एका हस्तलिखितांत). दुसऱ्या हस्तलिखितांत (उदा. इंडिया ऑफिसमधील) निराळींच नांवें आहेत. बर्नेलनें थोडक्यांत वर्णिलेल्या एका हस्तलिखितांत ग्रंथाचे तीन परिच्छेद केले आहेत. टेलरच्या कॅटलागांत कानडी टीकेसहित असलेल्या हस्तलिखितांचा निर्देश आहे.

धनंजयाचा टीकाकारांनीं उल्लेख फार कमी केलेला आढळतो. रायमुकुटानें एकदां व हेमाद्रीनें रघुवंशदर्पणांत कांहीं वेळां याचा उल्लेख केला आहे.

धनंजयाच्या नाममालेमध्यें सामासिक शब्द मुख्य शब्दाजवळच देण्याचा–इतर कोशांत न आढळणारा–विशेष प्रकार आढळतो. उदा. " कुंभिनीलोवैराचोर्वी जगतीगोवैसुंधरा ॥६॥ तत्पर्यायधरः शैलस्तपर्यायपतिर्नृपः । तत्पर्यायरुहो वृक्षः शब्दमन्यंच योजयेत् ॥ ७ ॥ ... ॥ तत्पर्यायचरो ज्ञेयो हरिर्वैलिमुखः कपिः । वानराः प्लवगश्चैव गोलांगूलोऽथ मर्कटः ॥ १२ ॥ ... कान्तारमटवीं दुर्गं तच्चरः स्याद्वनेचरः ॥१३॥ ... शरं वनं कुशं नीरं तोयं जीवनमत्विषम् । तत्पर्यायचरोमत्स्यस्तपर्यायप्रदोषनः । तत्पर्यायोद्भवं पद्मं तत्पर्यायधरोम्बुधिः ॥ १६ ॥ "

महेश्वरः—महेश्वरकवीचा विश्वप्रकाश नामक २२४० श्लोकांचा नानार्थकोश ग्रंथकर्त्याच्याच उल्लेखावरून १११९ त रचिला गेला. मूळ कोशाला २३ श्लोकांची प्रस्तावना असुन त्यांत महेश्वरानें आपले पूर्वज व उपयोग केलेले ग्रंथ यांविषयीं माहिती दिली आहे. वैद्यांच्या कुलांत याचा जन्म झाला होता. व चरकतंत्रावर टीका लिहिणारा व साहसाङ्क राजाच्या दरबारीं राजवैद्य असलेल्या हरिश्चंद्राचा हा मुलगा होता. महेश्वरानें स्वतःहि एक साहसाङ्कचरित लिहिलें आहे (साहसाङ्कचरित, प्रस्तावना ५,१२). पूर्वजांपैकीं गाधीपुरच्या राजाच्या दरबारचा वैद्य कृष्ण, दामोदर, मल्हण, व त्याचा पुतण्या केशव (कृष्ण) यांचीं नांवें सांगितलीं आहेत. शेवटचा मुलगा श्रीब्रह्म हाच महेश्वराचा बाप होय. ग्रंथाच्या शेवटीं ग्रंथकर्त्याला " सकलवैद्यराजचक्रराजशेखर " अशी (किंवा अशासारखी) पदवी लावलेली आढळते.

आपल्या पूर्वी होऊन गेलेल्यांपैकीं महेश्वरानें भोगींद्र, कात्यायन, साहसांक, वाचस्पति, व्याडि, विश्वरूप, अमरमंगल, शुभांग, वोपालित, व भागुरि यांचा उल्लेख केलेला आहे. " भोगीन्द्र कात्यायन साहसांक वाचस्पति व्याडिपुरःसराणां । सविश्वरूपामरमंगलांना शुभांग वोपालित भागुराणां । कोशावकाशात्प्रकटप्रभाव संभावितानर्घ्यगुणः स एषः ॥ "

प्रस्तावनेनंतर ग्रंथाचा मुख्य भाग–मुखखंड–सुरू होतो (विश्वप्रकाश प्रस्तावना ५.१४). शब्दरचनेसंबंधीं वर सांगितलेंच आहे. मुखखंडाच्या शेवटीं नानार्थअव्ययें आहेत, नंतर आणखी थोडे श्लोक आहेत. त्यांतील शेवटच्या श्लोकांत ग्रंथाचा काल दिला आहे. " रामानलव्योमरूपैः शककालेभिलक्षिते (१०३३) । कोशं विश्वप्रकाशाख्यं निरमाच्छ्रीमहेश्वरः ॥ "

वल्लभगणीनें सारोद्धारांत एका लुप्त विश्वटीकेचा उल्लेख केला आहे. त्या ठिकाणीं दिलेल्या अवतणावरून असें दिसतें कीं, या टीकेंत शब्दार्थ स्पष्ट करण्याकरितां वाङ्मयांतून उदाहरणें दिलीं आहेत. उदा. "मोहमिच्छन्ति मूच्छींयामविधायांच सूरयः" या स्थळीं मूर्च्छेचें उदाहरण (कुमारसंभव ४.१) व अविधेचें (=विपर्यय): भर्तृहरीतील " न मुंचामः कामानहह गहनो मोहमहिमा " असें दिलें आहे.

मंखः—११३५ ते ११४५ च्या सुमारास श्रीकण्ठचरित लिहिणारा काश्मीरी मंख व अनेकार्थकोशाचा कर्ता मंख हे एकच असल्यास मंखचा काल १२ व्या शतकांत पडेल. हे दोघे एकच याविषयीं जवळ जवळ शंका नाहींच. कांहीं झालें तरी हा मंख ११५० च्या फारसा अलीकडचा असणें शक्य नाहीं. कारण हेमचंद्राचा शिष्य हेमचंद्रसूरि हा त्याचा उल्लेख वारंवार करतो.

मंखकोशांत सुमारें १००० श्लोक आहेत. रचनेंत सांगण्यासारखा विशेष असा कांहीं नाहीं. अनेकार्थ व त्यांचीं स्पष्टीकरणें यांपैकीं कांहीं केवळ मंखांतच सांपडणारीं आहेत. परंतु साधारणपणें अमराचा नानार्थवर्ग व शाश्वत यांच्यांतील विषयच

यांत आहेत. या दोहोंचा उल्लेख तो आपल्या प्रमाणग्रंथांत करतोहि. यांशिवाय भागुरि, कात्य, हलायुध, हुग्ग व धन्वंतरीचा निघंटु हे याचे आणखी प्रमाणग्रंथ होत.

मंखकोशाला इतकें महत्त्व येण्याला त्याची एक टीका कारणीभूत झालेली आहे. तिचा पहिला दोननृतीयांशच भाग उपलब्ध आहे. हिचा कर्ता स्वतः मंखच असावा. यांत त्यानें शब्दार्थीचें विवरण वाङ्मयांतील उदाहरणें देऊन केलें आहे. त्याला हें बहुतेक बाबतींत चांगलें साधलें आहे. ज्या बाबतींत त्याला उदाहरण माहीत नसेल त्यावेळीं तो आपलें अज्ञान स्पष्टपणें कबूल करून "उदाहरणमन्वेष्यम्" असें सांगतो.

काश्मीरच्या बाहेर मंखकोश फारसा प्रसिद्ध नाहीं. स्तुतिकुसुमांजलीच्या व युधिष्ठिरविजय काव्याच्या आपल्या टीकांत राजानक रत्नकंठ यानें व अनेकार्थसंग्रहाच्या टीकेंत मंदेहानें याचा वारंवार उल्लेख केला आहे. स्तुतिकुसुमांजली टीका १.५;२.१४; ५.१२ या ठिकाणीं मंखांतील अवतरणें बरोबर दिलीं असल्यामुळें मंखानें आणखी एक एकार्थकोशसुद्धां रचिला असावा असें वाटतें.

हेमचंद्राचे शब्दकोशः—(१०८८-११७२) हे भारतीय कोशशास्त्राच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. हेमचंद्राच्या व्याकरणाप्रमाणेंच त्याचे शब्दकोशहि भारतीय संशोधनाचें व्यापक व पूर्ण स्वरूप दर्शवितात. हेमकोश फार चांगल्या स्वरूपांत आज उपलब्ध आहेत. आज उपलब्ध नसलेल्या साधनांचा हेमचंद्रानें उपयोग केलेला होता व आज उपलब्ध असलेल्या हस्तलिखितांपेक्षां त्याचे वेळचीं हस्तलिखितें अधिक खात्रीलायक होतीं. याशिवाय त्याच्या कोशांवर त्यानें स्वतः, त्याच्या शिष्यांनीं अगर नंतरच्यांनीं टीकाहि लिहिलेल्या आहेत. व्याकरणशास्त्राच्या इतिहासाला ज्याप्रमाणें हेमचंद्राच्या शब्दानुशासनांच्या टीकांचें महत्त्व आहे त्याप्रमाणेंच शब्दकोशशास्त्राला या टीकांचें महत्त्व आहे.

हेमचंद्रानें चार शब्दकोश लिहिले आहेत. एक एकार्थः "अभिधानचिंतामणिनाममाला," दुसरा अनेकार्थः "अनेकार्थ-संग्रह," तिसरा अत्यंत महत्त्वाचा प्राकृत शब्दकोशः "देशीनाममाला अथवा रत्नावलि" व चौथा "निघण्टुशेषः". देशीनाममालेच्या शेवटीं म्हटल्याप्रमाणें 'वायरणसेसलेसो' (८) हे चारी कोश त्याच्या व्याकरणाचे परिशिष्ट म्हणूनच समजावयाचे. कोशांचा व त्यावरील टीकांचा काळ कोणता यांसंबंधीं बुल्हरच्या म्हणण्याला अनुसरून खालील गोष्टी सांगतां येतील—व्याकरणाची रचना समाप्त झाल्यावर व राजा जयसिंहाचे मरणाच्या अगोदर (११४१ ते ११४३ चे दरम्यान) बहुतेक एकार्थकोश व अनेकार्थ कोश तयार झाले असावेत. जयसिंहाचा मृत्यु (११४३) व राजा कुमारपालाशीं हेमचंद्राचा परिचय झाला ती वेळ (सुमारें ११५८) या दोहोंच्यामधील कालांत प्राकृत कोश व निघंटुकोश यांची रचना झाली. अभिधानचिंतामणीचीं परिशिष्टें ("शेषाः") याच कालांत तयार झालीं असणें शक्य आहे. यांचें स्वतंत्र नांव शेषाख्यनाममाला अथवा शेषसंग्रह असें आढळतें. व हीं अभिधानचिंतामणीलाच जोडलेलीं, टीकेच्या कित्येक हस्तलिखितांतून आढळतात. यावरून हीं अभिधानचिंतामणीबरोबरच म्हणजे हेमचंद्राच्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं रचिलीं असावींत. अभिधानचिंतामणीची टीका हा निःसंशय हेमचंद्राचा शेवटचा ग्रंथ होय. अनेकार्थसंग्रहाची टीका त्याच्या एका शिष्यानें लिहिलेली आहे.

अभिधानचिंतामणि सहा कांडांचा असून त्यांत १५४२ श्लोक आहेत. प्रस्तावनेंत (१–२३) ग्रंथकारानें आपल्या नाममालेंत कोणकोणत्या प्रकारचे शब्द (रूढ, यौगिक व मिश्र) दिले आहेत त्याविषयीं सविस्तर लिहिलें आहे. रूपभेद दाखविला आहे. परंतु अमर वगैरेप्रमाणें लिंगभेद हेमचंद्रानें दाखविलेला नाहीं. "लिंगंतु ज्ञेयं लिंगानुशासनात्" (१९) असें म्हणून आपल्या (स्वोपज्ञ) 'लिंगानुशासना'वर हवाला दिला आहे. ही गोष्ट हेमचंद्राच्या इतर कोशांसहि लागू आहेच. प्रस्तावनेच्या शेवटच्या चार श्लोकांत प्रत्येक कांडाची विषयसूची दिली आहे. पहिल्या कांडांत जैनांच्या अधिदेवतांचें सांग वर्णन, दुसऱ्यांत राहिलेल्या ब्राह्मण देवतांचे वर्णन, तिसऱ्यांत मनुष्यें, चौथ्यांत पशु, पांचव्यांत पाताळवासी, सहाव्यांत भाववाचकें, विशेषणें व अव्ययें यांचें वर्णन आहे. प्रस्तावनेची समाप्ति संक्षिप्त परिभाषांनीं केली आहे "त्वन्ताधादि न पूर्वगौ."

ज्या ग्रंथांचा साधनाप्रमाणें उपयोग केला असेल त्यांचेविषयीं हेमचंद्रानें एका शब्दानेंहि उल्लेख केलेला नाहीं. तथापि अमरकोशाशिवाय हलायुधकोश व वैजयन्ती या बाबतींत उपकारक झाली असावी.

अभिधानचिंतामणींतील उतारे घेऊन शुभशीलगणीनें (१५ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक 'पंचवर्गसंग्रह' म्हणून ग्रंथ तयार केला. हा ग्रंथ अभिधानचिंतामणीचेंच एक तऱ्हेचें रूपांतर असावें असें दिसतें. ग्रंथकर्ता अकबराच्या कारकीर्दीत (१५५६–१६०५) होऊन गेला. साधु सुंदरगणीच्या शब्दरत्नाकरांत (१७ व्या शतकाचा आरंभ) अभिधानचिंतामणीप्रमाणेंच विषयविभाग आहेत, व त्याच्याशीं याचा अगदीं जवळचा संबंध आहे.

अभिधानचिंतामणीच्या टीका अनेक आहेत—पहिली हेमचंद्राची स्वतःची. या टीकेच्या (विवृत्तीच्या) प्रस्तावना—श्लोकांत व्याडि, धनपाल व वाचस्पति यांना प्रमाण मानलें आहे. या टीकेंत ज्या ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख आलेला आहे

त्यांचा संग्रह बोथलिंगनें आपल्या अभिधानचिंतामणीच्या प्रतींत केला आहे. हेमचंद्राच्या टीकेचा एक सारांश (अवचूरी, अवचूर्णिका) एका हस्तलिखितांत असावासें वाटतें.

दुसरी एक टीका वाचनाचार्य वादिश्रीवल्लभ (वल्लभगणी) याची योधपुरचा राजा सूर्यसिंह याच्या कारकीर्दीत (१६११ त) लिहिलेली 'सारोद्धार' ही टीकाकाराच्या स्वतःच्या म्हणण्याप्रमाणें 'नामनिर्णय' नांवाच्या एका मोठ्या ग्रंथाचा सारांश आहे 'निरणायि मया नाम्नां निर्णयो नामनिर्णये.' तिच्या नांवावरून हें स्पष्ट दिसतें. १६३० त झालेली देवसागरगणीची 'व्युत्पत्तिरत्नाकर' नांवाची एक तिसरी टीका आहे.

अभिधानचिंतामणीचे 'शेषाः' (शेषसंग्रह परिशिष्ट) बोथलिंगन आपल्या अभिधानचिंतामणीच्या प्रतींत शेवटीं (पृष्ठ ४२१–४३ मध्यें) दिले आहेत. अभिधानसंग्रहांतहि ते छापले आहेत. आफ्रेक्टच्या म्हणण्याप्रमाणें वल्लभगणीनें रामदासमालेच्या अभिधानचिंतामणीच्या प्रतींत (पृ. २१९–३१) व अभिधानसंग्रहांत (२ रे. ११) एका जिनदेवमुनीश्वरानें अभिधानचिंतामणीचे काढलेले वेंचे (शिलोंछ) छापलेले आहेत.

अनेकार्थसंग्रहांत ७ काण्डें व १८२९ श्लोक आहेत. पहिल्या षट्कांडांत खरा अनेकार्थसंग्रहाचा भाग असून त्यांत एक-दोन-तीन-चार-पांच व सहा अक्षरी शब्द (नामें व विशेषणें) ओळीनें दिलेले आहेत. सातव्या काण्डांत अनेकार्थअव्ययें असून तें षट्काण्डाच्या शेषाप्रमाणें आहे. त्याचें नांव हस्तलिखितांतूनहि 'अनेकार्थसंग्रह' असें आढळतें.

अभिधानचिंतामणीच्या प्रस्तावनेंतल्याप्रमाणें याहि कोशाला साधनीभूत झालेल्या ग्रंथांचा उल्लेख याच्या प्रस्तावनेंत नाहीं. विश्वकोश हें बहुतेक मुख्य साधन असावें. तसें नसेल तर विश्व व अनेकार्थ यांमध्यें जो निकट संबंध दिसून येतो तो दोघांनींहि एकच जुन्या साधनांचा उपयोग केल्यामुळें उत्पन्न झाला असेल. अनेकार्थसंग्रह हा शब्दरचनेशिवाय इतर बाबतींत विश्वकोशाची हुबेहुब प्रतिकृति आहे. व म्हणून तो नंतर कोणी तरी अभिधानचिंतामणीला पुस्ती म्हणून तयार केला असावा. या विल्सनच्या विलक्षण विधानाचें वेबर्‍यें गोल्डस्टकरनें (१८५० तच आपल्या संस्कृत डिक्शनरी पृ. २४५ त) आपल्या कोशाच्या प्रस्तावनेंत असें दाखविलें आहे कीं, हे उपर्युक्त अनेकार्थकोश सारखे सारखे आहेत परंतु एक नव्हेत.

अनेकार्थसंग्रहांत ३९०० शब्द थोडक्यांत परंतु स्पष्टपणें सांगितले आहेत. शब्दरचनाहि उत्तम आहे. हेमचंद्रानें अक्षरसंख्याच केवळ नव्हे तर आद्याक्षर व अन्त्याक्षर, शिवाय प्रथम व्यंजनापुढचा स्वर या सर्वांचा विचार वर्णानुक्रमरचनेंत केला आहे.

या कोशावर 'अनेकार्थकैरवाकरकौमुदी' नांवाची टीका आहे. हेमचंद्रानें स्वतः लिहिल्याप्रमाणें हिचा आरंभ आहे. 'निजानेकार्थसंग्रहे वक्ष्येटीकाम्।' टीकेला आरंभ करून दुसरा श्लोक पुरा होण्याच्या पूर्वीच त्याला मृत्यूनें गांठलें असावें हेंहि असंभवनीय नाही. हस्तलिखितांत २ ऱ्या, ३ ऱ्या व ७ कांडाच्या शेवटीं आढळणाऱ्या प्रशस्तींत महेंद्रसूरि नांवाचा त्याचा शिष्य स्वतःस टीकेचा कर्ता अथवा प्रकाशक म्हणवितो. आपल्या गुरूनें स्वमुखानें सांगितलेल्या अर्थानुसार लिहून त्याच्या नांवानेंच ही टीका प्रसिध्द केल्याचें तो लिहितो. यापेक्षां अधिक सूक्ष्म माहिती लागत नाही. टीकेचे आधार प्रस्तावनेंत सांगितले आहेत ते –विश्वप्रकाश, शाश्वत, रभस, अमरसिंह, मंख, व्याडि, धनपाल, भागुरि, वाचस्पति, यादव, व धन्वंतरिनिघंट. बाकी या यादीवर फारसा भरंवसा ठेवण्याचें कारण नाही.

निघंटुशेषः—हा वनस्पतिशब्दकोश ३९६ श्लोकांचा असून त्याच्या नांवावरून हा अभिधानचिंतामणींतील ज्याला 'शेषाः' लिहिले नाहींत अशा वनस्पतिकोषाचें (श्लो. ११३१–१२०१) परिशिष्टच होय. या पुस्तकांचीं सहा कांडें आहेत व त्यांत ओळीनें वृक्ष, गुल्म, लता, शाक, तृण, व धान्य असे विषय आहेत. कमळाच्या जाती (३. ३२३–३१) व संबंध धान्यकांड अभिधानचिंतामणींतील त्या त्या भागाशीं (११६० पुढें, ११६८ पुढें) तंतोतंत जुळतें. डॉ. भाऊ दाजींच्या तोंडी सांगण्यावरून बुल्हरनें म्हटल्याप्रमाणें मात्र रत्नविभाग निघंटुशेषाच्या उपलब्ध प्रतींत सांपडत नाहींत. या प्रतींत (अभिधानसंग्रह २ रे. ९) पहिल्या कांडाच्या आरंभीं एक मोठा व इतर कांडांत लहान लहान खंड पडलेले आढळून येतात. पीटरसनच्या ५ व्या रिपोर्टींत पृ. २३ वर हेमचंद्राच्या मरणानंतर सुमारें ५० वर्षांनीं लिहिलेलें निघंटुशेषाचें हस्तलिखित उल्लेखिलें आहे. या हस्तलिखिताच्या आधारानें मुंबई प्रतीपेक्षां अधिक शुध्द व संपूर्ण नवी प्रत काढणें अशक्य नाहीं. निघंटुशेषावर टीका नसावीसें दिसतें.

मेदिनीकराचा नानार्थशब्दकोशः—याचा मेदिनीकोश अथवा मेदिनी या नांवानें उल्लेख करितात. कलकत्ता आवृत्तीप्रमाणें हा २३०० श्लोकांचा आहे. ग्रंथकर्ता स्वतःस प्राणकर (पण्डुनकर ?) म्हणवितो. त्याच्याविषयीं अधिक माहिती नाहीं. भांडारकरांच्या हिशोबानें (मालतीमाधवाच्या [१८७६] प्रस्तावनेंतील पृ. १३) मेदिनीकराचा काळ १४ व्या शतकाच्या अखेरचा असावा.

मेदिनीला आरंभ परिभाषांनीं होतो, त्यांत मुख्यतः लिंगनिर्देश कसा केला आहे यासंबंधीं वर्णन दिलें आहे मुख्य कोशाचे वर्ग केले आहेत (कान्तवर्ग वगैरे). शब्दरचना उत्तम आहे. अनेकार्थसंग्रहाच्या रचनेहून फारसा फरक नाहीं. शेवटच्या श्लोकांत साधनीभूत ग्रंथांची व कोशकारांची यादी आहे. या यादींत अनेक कोशकारांचा उलेख आहे म्हणून ती येथें उध्दृत करतोः– "उत्पलिनी शब्दार्णव संसारावर्त नाममालाख्याम्। भागुरि वररुचि शाश्वत वोपालित रंतिदेव हरकोषान्॥ अमर शुभांक हलायुध गोवर्धन रभसपालकृतकोषान्। रुद्रामरदत्तजयगंगाधरधरणिकोशाश्च ॥ २॥ हारावल्यभिधानं त्रिकांडशेषंच रत्नमालांच। अपि बहुदोषं विश्वप्रकाशकोषंच सुविचार्य ॥ ३॥ वाग्भट माधव वाचस्पति धनेश्वपाडितारपालाख्यान्। अपि विश्वरूप विक्रमादित्य नामलिंगानि सुविचार्य ॥ ४॥ कात्यायनवामनचंद्रगोमिरचितानि लिंगशास्त्राणि। पाणिनिपदानुशासनपुराणकाव्यादिकंच मुनिरूप्य ॥ ५॥ षट्गत गाथाकोश प्रणयन विख्यात कौशलेनार्य। मेदिनिकरेण कोशः प्राणकरसनुना रचितः ॥ ६॥" यांत विश्वप्रकाश कोश आहे परंतु त्याला 'बहुदोष' असें विशेषण लावलें आहे. विश्वांत शब्दरचना सोपी व लिंगनिर्देश बिनचूक नाहीं म्हणूनच हें विशेषण लावलें असावें. तथापि विश्वाचा उपयोग मेदिनीकारानें चांगलाच करून घ्यावयास कमी केलें नाहीं. इतकेंच नव्हे तर हा 'बहुदोष' विश्वच त्याचा मुख्य आधार असणें संभवनीय आहे. बाकी मेदिनीकर स्वतंत्रपणें पाठभेद देतो हेहि सांगितलें पाहिजे. उदा. हा कुन्तल चा अर्थ चषक असा देतो; तर महेश्वर लांगल असा देतो. असो.

मेदिनीची एक टीका आहे म्हणतात. परंतु त्यासंबंधीं सविस्तर माहिती अजून मिळाली नाहीं.

अलीकडील शब्दकोश––मेदिनीची गणना यांतच व्हावयाची. त्याशिवाय आणखी कांहीं येथें सांगावयाचे आहेत. त्यांपैकीं कांहींचा काळ निश्चित आहे. हे शब्दकोश जुन्या कोशांतीलच विपुल परंतु अधिक शुद्ध रूपांत देतात म्हणून यांचा उपयोग जुने अशुद्ध हस्तलिखितांतून मिळालेले शब्दकोश शुद्ध करण्याकडे होतो.

केशवाचा कल्पद्रु (शब्दकल्पद्रु):—अ. नामकल्पद्रुम हा तीन स्कंधांचा एकार्थशब्दकोश भरपूर माहितीचा असून मल्लिनाथ व दिनकर (१३८५ त लिहिणारा) या टीकाकारांनीहि याचा उल्लेख केला आहे.

महीपाचा शब्दरत्नाकरः––या कोशाच्या नानार्थविभागाचें नांव नानार्थ किंवा अनेकार्थतिलक असें असून त्याचा काल १३७४ दिला आहे.

नानार्थरत्नमालाः––याचा कर्ता इरुगप दण्डाधिनाथ उर्फ भास्कर हा १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत विजयानगरच्या दुसऱ्या हरिहराच्या कारकीर्दीत होऊन गेला. याचें नांव निरुपम अथवा मिरुग असेंहि दिसलें आढळलें. याचा कोश बहुतेक वेजयंतीवर उभारलेला असावा.

जटाधराचें अभिधानतंत्र (नामलिंगानुशासन):––ही एक तन्हेची अमरकोशाचीच वाढविलेली आवृत्ति आहे. कर्ता चाटि अथवा चट्टग्रामचा (चितागांग–बंगाल) होता. ऑफ्रेक्टच्या म्हणण्याप्रमाणें हा रायमुकुटाच्या पूर्वीचा असावा.

रूपचंद्रः––याची लहानशी रूपमंजरी नाममाला ही १५८८ त रचिली गेली. याच सुमारास पुंडरीक विठ्ठलानें शीघ्रबोधिनीनाममाला रचिली.

हर्षकीर्तीची शारदीयाख्या नाममालाः––ही १६ व्या शतकाच्या अखेरीस तयार झाली. हा ग्रंथ षट्कोशसंग्रहांत शिळाप्रेसवर छापला आहे. यांत प्रथम शारदेची नावें दिली आहेत, त्यांवरूनच यांचें नांव वरीलप्रमाणें असावें. हा श्रीमालागुपुरीचा जैन रहिवाशी होता. "श्रीमालागुपुरीयकाव्हय तपागच्छाधिपः पूज्यपात्सुरि श्रीप्रभुचंद्रकीर्तिगुरवस्तेषां पदानुग्रहात् भूमावाभिजनोचितां लघुतरां श्रीनाममालामिमां चक्रे पाठक हर्षकीर्तिरखिलां श्वेताबरं ग्रामणीः ॥ "

अप्पय्यदीक्षिताची नामसंग्रहमाला (सुमारें १६ वें शतक):—हा एकार्थकोश असून यावरील टीकेंत जुन्या कोशांतील अनेक अवतरणें दिलीं आहेत.

पद्मनाभाचा भूरिप्रयोगः––यांत एक लहान एकार्थकोश व मोठा अनेकार्थकोश असे कोश असून अमरकोशाचा टीकाकार नारायणशर्मन् या ग्रंथकर्त्याचा उल्लेख करतो.

रामेश्वराची शब्दमालाः—ही भूरिप्रयोगासारखीच आहे. काळ माहीत नाहीं.

वेणीदत्ताचा पंचतत्त्वप्रकाशः—हा १५४४ त झाला. याची शिळाप्रत षट्कोशसंग्रहांत आहे. यांत बरेच अर्वाचीन शब्द आहेत. उदा. "आरोहयत्रंपल्याणं ॥ जीन ॥ तरवारिस्तीवमार्गः कृपाणः कोषमंदिरः। तलवार। दिल्लीपतिः सार्वभौमोधीशोभूपपुरंदरः। पातिसाहः शाककर्ता। सार्वभौमस्य" याचे भूमिभानुः, जलभानुः, तेजोभानुः, वायुभानुः, आकाशभानुः असे पांच भाग असून त्यांत मनुष्यमरीचिः, शैलमरीचिः, दिक्पालमरीचिः शब्दमरीचिः अशीं पोट प्रकरणें आहेत. याचा काल 'क्षितिगगन तुरंगक्षोणिसंख्येक वर्षे (१७०१) शुचिधवल सुषष्ठयां भानुवारेच हस्ते।' असा दिला आहे. ग्रंथकर्त्यानें आपलें वर्णन 'श्रीयाज्ञिकवंशावतंस नीलकंठात्मज जगज्जीवनसुत वेणीदत्त' असें दिलें आहे.

मथुरेश विद्यालंकारः—याची शब्दरत्नावलि ही बरुआच्या म्हणण्याप्रमाणें अलीकडील सर्व कोशांत उत्तम असून १६६६ त रचली असावी.

अथेन्सचा डेमेट्रिॲस गॅलानास याची १७८६–१८३३ च्या दरम्यान रचलेली संस्कृत एकार्थशब्दसूची (ग्लॉसरी) यासंबंधीं बेबरनें माहिती दिली आहे. व तदनुसार एकार्थकोश रचण्याची भारतीय पद्धति व युरोपियन शास्त्राच्या आकांक्षा यांचा मेळ या सूचींत घातला गेला आहे. यांत मुख्य शब्द प्रथम षष्ठी विभक्तींत दिला असून त्याचे समानार्थक शब्द (सुमारें २५०००) त्यापुढें प्रथमेंत दिले आहेत. गॅलानासच्या प्रस्तावानुसार ही सूची त्याच्या एखाद्या ब्राह्मण मित्रानें तयार केली असावीसें वाटतें. बेबरनें याचे कांहीं उतारे दिले आहेत. बोथलिंगच्या लहान शब्दकोशांत या कोशांतील अवतरणें घेतलीं आहेत. यांत कांहीं कांहीं ठिकाणीं मूळ साधनें सदोष असल्यामुळें अथवा तीं वापरण्यांत चूक झाल्यानें चुका झालेल्या आहेत.

विशिष्ट विषयांचे शब्दकोश—या प्रकारच्या शब्दकोशांच्या जाती व त्यांतील मुख्य ग्रंथ पुढें दिले आहेत.

एकाक्षरकोशः—या तऱ्हेच्या कोशांतून एकाक्षरी नामें ख, गो, भ वगैरे सारखीं किंवा समुसारखीं अव्ययें अथवा निरनिराळ्या अर्थानें वापरलीं जाणारीं कांहीं गुणार्थव्यंजक वर्ण किंवा अक्षरें दिलेलीं असतात यामुळें या कोशांचा तंत्रवाङ्मयाच्या मातृकाकोशाशीं संबंध लागतो. असे कांहीं ग्रंथ खालीं दिले आहेत.

पुरुषोत्तमदेवाचा एकाक्षरकोशः—हा द्वादशकोशसंग्रहांत शिळाप्रेसवर व अभिधानसंग्रहांत (१ नं. ४) व मुंबईस सदाशिव बजाबा अमरापुरकर शास्त्री यांनीं १८५४ मध्यें छापला आहे. याची श्लोकसंख्या ३८ असून वर्णानुक्रमांत ह नंतर क्ष घेतला आहे. अशाच नांवाचा एकाक्षराभिधान अथवा एकाक्षरनिघंटु वररुचीच्या नांवावर प्रसिद्ध आहे.

'संस्कृत कोशयुग्म' मध्यें छापलेली विश्वंभूची 'एकाक्षरसूत्रनाममाला' ११५ श्लोकांची आहे. वल्लभगणीनें या ग्रंथकर्त्याचा उल्लेख वारंवार केला आहे. याशिवाय अधिक माहिती नाहीं. सुधाकलशाची एकाक्षरनाममालिका ही १४ व्या शतकांतील व भरतसेनाचा एकवर्णार्थसंग्रह हा १८ व्या शतकांतील आहे.

मातृकाकोशांपैकीं द्वादशकोशसंग्रहांत शिळाप्रेसवर छापलेला महीदासाचा मातृकानिघंट उल्लेखतां येईल.

द्वादशकोशसंग्रहांतील महादेवाचा अव्ययकोश हा या प्रकारचा असा एकच स्वतंत्र दिसतो. मोठ्या कोशांतून–एकार्थ व अनेकार्थ कोशांतून–अव्ययासंबंधीं विभाग असतोच.

द्विरूपकोश (शब्दभेद):—या लेखनपद्धतीविषयक सूचींपैकीं सर्वांत महत्त्वाचा व बहुतेक सर्वांत जुना म्हणजे महेश्वराचा शब्दभेदप्रकाश होय. अभिधानसंग्रहांत (१ नं. ५०) पुरुषोत्तमदेवाचा द्विरूपकोश छापला आहे त्यांत ७५ श्लोक आहेत. द्वादशकोशसंग्रहांत याचीच एक निराळी प्रत ५५॥ श्लोकांची व एक द्विरूपकोश ५५॥ श्लोकांचा निनांवी छापला आहे. आणखी येथें निर्देश करण्यासारखे कोश म्हणजे भरतसेनाचा द्विरूपध्वनिसंग्रह व कचण विल्हणकवीचा त्रिरूप कोश हे होत.

उणादिकोशः—शिवरामाचा लक्ष्मीनिवासाभिधान कोश (१८ व्या शतकांतील) पट्कोशसंग्रहांत प्रसिद्ध झालेला आहे. यानें आपल्या प्रस्तावनेंत "नालेखितस्त्वयोन्नियं योधैः शब्देंशुशेखर मनोरमायां व्याख्यात्रा सोप्यत्र लिखितोमया" असें म्हटलें आहे. व स्वतःची माहिती शेवटीं 'श्रीमल्त्रिपाठ्युपनामक त्रिलोकवंद्रात्मजकृष्णरामसूनु शिवरामकृतौ' अशी दिली आहे. रामशर्मन्च्या उणादिकोशासंबंधीं ऑफ्रेक्टनें आपल्या उज्ज्वलदत्ताच्या प्रस्तावनेंत (पृ. २१) लिहिलें आहे. शुभशीलगणीची उणादिनाममाला १५ व्या शतकाच्या उत्तरार्धातील आहे रामगोविंदच्या शब्दार्थचंद्रिकेचें वर्णन एगलिंगनें दिलें आहे (कॅ. पृ. २४५). कालिदासाच्या नानार्थशब्दरत्नकोशावर निचुलयोगीन्द्रानें टीका लिहिली असून इंडियन ॲन्टिक्वेरीतील (१.३४१) वर्णनावरून तो कोश याच सदराखालीं येईलसें दिसतें.

वैद्यशास्त्रविषयक वनस्पतिकोश—या कोशांतून वनस्पति, पशु, अन्नें, सर्व तऱ्हेच्या औषधी यांचीं वर्णनें–म्हणजे जवळ जवळ औषधीविद्याच–दिलेलीं असतात. व यांचे विशिष्ट नांव म्हणजे निघण्टु. सर्वांत जुना म्हणजे धन्वंतरीनिघण्टु. यांचीं ९ प्रकरणें आहेत आणि क्षीरस्वामीच्या म्हणण्याप्रमाणें हा अमरकोशाच्या आधींचा आहे. आनंदाश्रमग्रंथावलींत (नं. ३३) हा महत्त्वाचा कोश छापला आहे. शाश्वताचा या सदराखालीं येणारा एक कोश व हेमचंद्राचा निघण्टुशेष यासंबंधीं वर लिहिलेंच आहे. एका अज्ञात ग्रंथकर्त्याची मल्लिनाथानें उल्लिखलेली अभिधानरत्नमाला (षड्रसनिघण्टु), १३७४ त रचलेला मदनपालाचा मदनविनोद, ऑफ्रेक्टच्या म्हणण्याप्रमाणें यापेक्षां अलीकडचा असलेला नरहरीचा राजनिघण्टु, चक्रपाणिदत्ताची शब्दचंद्रिका व १६७७ त झालेला शिवदत्ताचा शिवप्रकाशटीकेसहित असलेला शिवकोश नांवाचा नानार्थकोश इतक्यांचा येथें आणखी निर्देश करण्यासारखा आहे.

ज्योतिष व ज्योतिषशास्त्रविषयक कोशांपैकीं हरिदत्ताची गणितनाममाला (द्वादशकोशसंग्रहांत शिळाप्रेसवर छापलेली), वेदांगरायाचा १६८३ त रचलेला इराणी–अरबी–संस्कृत पारसीप्रकाश व वज्रभूषणाचा त्याच सुमारास रचलेला पारसीविनोद यांचा उल्लेख करतां येईल.

क्षेमेंद्राच्या लोकप्रकाशावर बुल्हरनें काश्मीररिपोर्टांत (पृ. ७५) लिहिलें आहे. कोशवाङ्मयांत याचें स्थान विशिष्ट प्रकारचें असून वेबरच्या मतें तो १७ व्या शतकांतील आहे.

कोशसंग्रह--अमरकोश-त्रिकांडकोश-हारावली-मेदिनी यांचा संग्रह कोलब्रूकच्या प्रयत्नानें (कलकत्ता १८०७) छापला गेला. ही प्रत फार सदोष आहे. सदाशिव बजाबाशास्त्री अमरापूरकर यांनीं कोशचतुष्टय (त्रिकांड, मेदिनी, हारावली, एकाक्षरी (मुंबई १८५४) या चार कोशांच्या संग्रहाची शिळाप्रेस प्रत छापली आहे. 'संस्कृतकोशयुग्मम्' (कराची १८६७) यांत वेश्वशंभु व महाक्षपणक यांचे कोश आहेत. बनारसचे शिळाप्रेसवरचे 'षट्कोशसंग्रह' व 'द्वादशकोशसंग्रह' हे त्यापेक्षां महत्त्वाचे आहेत. यांपैकीं पहिले १८७३ (संवत १९३०) सालीं प्रकाशित असून त्यांत हेमचंद्राचे एकार्थ व अनेकार्थ कोश, शिवरामाचा उणादिकोश, पद्मतत्त्वप्रकाश, शारदीनाममाला आणि विश्व आणि हलायुध हे आहेत. विश्वाचें प्रकाशन अगदींच सरासरी आहे. परंतु दुसरी प्रत उपलब्ध नसल्यामुळें त्याशिवाय चालणार नाहीं. द्वादशकोशसंग्रहांत (१८७३ संवत १९२९) मेदिनी, एकाक्षरकोश (पुरुषोत्तमाचा), दोन द्विरूपकोश, त्रिकांडशेष, अनेकार्थध्वनिमञ्जरी, हारावली, धनंजयकोश, वरुरुचिकोश, गणितनाममाला, मातृकाकोश (महीधराचा) व महादेवाचा अव्ययकोश इतके आहेत.

आनंदराम बरुआच्या नानार्थसंग्रहांत (संस्कृत भाषेचें व्याकरण ग्रंथ ३, भाग १, कलकत्ता १८८४) महत्त्वाच्या अनेकार्थकोशांतील कोशसाधनें एके ठिकाणीं केलेलीं आहेत. त्यांत अमर, हलायुध, त्रिकांडशेष व हारावलीतील नानार्थविभाग व अनेकार्थसंग्रह, विश्वकोश, मेदिनी व आणखी कांहीं लहान कोश आहेत. बरुआनें नानार्थवाचक शब्द वर्णानुक्रमानें-हल्लींच्या पद्धतीप्रमाणें-श्रवले आहेत. प्रत्येक शब्दाखालीं अनेकार्थकोशांतील शब्दशः अवतरणें दिलीं आहेत. पुस्तकाच्या शेवटीं महेश्वराचा 'शब्दभेदप्रकाश' जोडला आहे. हा 'नानार्थसंग्रह' शब्दभेदग्रंथ म्हणून उपयोगी आहे. बाकी तितकया काळजीपूर्वक तयार केलेला नसल्यामुळें पूर्ण विश्वासार्ह नाहीं.

अभिधानसंग्रह या प्राचीन कोशसंग्रहाचे दोन विभाग बाहेर पडले आहेत. (मुंबई १८८९, १८९६) त्यांतील पहिल्या भागांत अमरकोश; पुरुषोत्तमाचे त्रिकांडशेष, हारावली, एकाक्षरी व द्विरूप; व हेमचंद्रकोश व टीका आहेत. दुसऱ्या भागांत विश्वकोश आणि शब्दभेदप्रकाश हे आहेत. 'संस्कृत कोशवाङ्मयाचे मूलग्रंथ' ही सर्वांत महत्त्वाची ग्रंथमाला असून तिच्या पहिल्या वेभागांत (१८९३) हेमचंद्राच्या अनेकार्थसंग्रहाचे मर्हेंद्राच्या टीकेंतील पुष्कळ उतारे देऊन प्रो. झकारियानें प्रकाशन केलें आहे. दुसऱ्या विभागांत (१८९५) हेमचंद्राची उणादि गणवृत्ति प्रकाशित केलेली आहे. तिसऱ्या विभागांत संखकोश यावयाचा आहे.

याखेरीज ऑफ्रेक्टच्या ग्रंथसूचीवरून केलेली एकंदर संस्कृत कोशांची यादी शेवटीं दिली आहे.

याप्रमाणें संस्कृत वाङ्मयांतील कोशभांडारांचें थोडक्यांत समालोचन केलें. यावरून आपणांस हें स्पष्ट होतें कीं संस्कृत शब्दकोश हे कवीस अथवा ग्रंथकारास योग्य शब्द सुचविण्याकरितां किंवा एकाच शब्दाचे श्लेषादि उपयोगाकरितां अनेकार्थ सुचवेण्याकरितां उपयुक्त होत. अर्थात् टीकाकार या कोशांचा अर्थ लावण्याच्या कामींहि उपयोग करीत हें त्यांनीं आपल्या टीकांत वारंवार कोशांचे आधार दिले आहेत यावरून दृष्टीस पडतें. परंतु भाषेंतील सर्व शब्दांचा संदर्भसुलभसंग्रह करून त्या शब्दांचे अर्थ युप्ति वगैरे देऊन स्पष्टीकरण करण्याचें काम या कोशांकडून होत नव्हतें व हीं कोशकारांची दृष्टीहि नव्हती. वर्णानुक्रमरचनेच्या बाबतींत नानार्थ किंवा अनेकार्थ कोशांनीं कांहीं प्रगति केलेली दिसून येते. या कोशांत विशिष्ट अक्षर शेवटीं असलेले शब्द वर्णानुक्रमानें लावून त्यामध्यें पुन्हा त्यांतील अक्षरसंख्येनुसार एकापुढें एक लावलेले आढळतात व हे लावतांना कांहीं कोशकारांनीं आद्य अक्षर व कांहींनीं आद्य अक्षर व त्या पुढील स्वर एवढे लक्षांत घेतलेले आढळतात पण पुढील अक्षराकडे कोणीच लक्ष दिलेलें आढळत नाहीं. सामासिक मुख्य शब्द शब्दाच्या पोटांत देण्याचा प्रयत्न एका कोशकारानेंच (धनंजय) केलेला आढळतो. व्युत्पत्ति गैरे स्पष्टीकरण करण्याचें काम टीकाकाराचें समजण्यांत येई व कोश हा मुखोद्गत करावयाचा असल्यामुळें तो पद्यात्मक आणि क्षिप्त करण्याकडे प्रवृत्ति असे. कांहीं कोशांवरील टीकांत अर्थ स्पष्टीकरणार्थ अवतरणें घेतलेलीं आढळतात. पण या सर्वांचा अंतर्भाव करून संदर्भसुलभ कोशरचना करण्याकडे पूर्वीच्या ग्रंथकारांचें लक्ष्य गेलें नव्हतें; व हें कार्य पाश्चात्त्यांचा संबंध आल्यानंतर आपल्याकडे होऊं लागले आणि अर्वाचीन संपूर्ण कोशाची कल्पना आपण पाश्चात्त्यांकडूनच घेतली. तेव्हां या कोशरचना शास्त्रामध्यें पाश्चात्त्यराष्ट्रांत कशी प्रगति होत गेली त्याचें आतां अवलोकन करूं.

पाश्चात्त्यकोश, उगम—पाश्चात्त्य देशांमध्यें कोशरचनापद्धतीचा विकास कसा झाला यांचें आपणांस ज्ञान करून घ्यावयाचें झाल्यास आपणांस परिचित अशी जी इंग्रजी भाषा तीमध्यें कोशरचनेची परिणति कशी झाली हें पाहिलें असतां पुरें होईल. सर्व यूरोपप्रमाणें इंग्लंडमध्येंहि ग्रीक व लॅटिन या भाषांचें वर्चस्व दीर्घकालपर्यंत होतें. विशेषतः धार्मिक ग्रंथांची भाषा लॅटिन असल्यामुळें व पुस्तकलेखनाचें काम बहुधा धर्मोपदेशकांकडेच असल्यामुळें बहुतेक ग्रंथ धार्मिक विषयांवर व लॅटिनमध्येंच लिहिले जात व त्यांचा अभ्यासहि बहुधा नवशिके धर्माध्यापकच करीत असत. या अभ्यासकांस जेव्हां एखाद्या ग्रंथांतील लॅटिन शब्दाचा

अर्थ समजण्यास अडचण पडे किंवा कठिण वाटे तेव्हां त्या शब्दाचा अर्थ कळल्यावरते आपल्या पुस्तकामध्यें तो अर्थ बाजूस लिहून ठेवीत असत. हा अर्थ लॅटिन भाषेंतील दुसऱ्या सोप्या शब्दांच्या रूपानें किंवा देशी भाषेंतील शब्दांमध्यें लिहिलेला असे. अशा तऱ्हेनें लॅटिन ग्रंथांतील शब्दांवर ग्रंथांतल्याग्रंथांतच प्रथम टिप्पणी लिहिल्या जात. पुढें अशा टीपांचा उपयोग इतरहि ग्रंथ वाचतांना व्हावा म्हणून या टीपा स्वतंत्र कागदावर लिहिल्या जाऊं लागल्या व अशा तऱ्हेनें लॅटिन शब्दांचे सुलभ अर्थ देणाऱ्या कांहीं याद्या तयार झाल्या.

कालांतरानें या याद्या एकत्र करून त्यांचा उपयोग आपलें लॅटिन शब्दांचें ज्ञान वाढविण्याकडे व विद्यार्थ्यांस लॅटिन शिकविण्याकडे करण्याची कल्पना कोणास तरी सुचली असावी; व अशा याद्या एकत्र करतांना त्यांतील शब्द शोधून काढणें सोपें जावें म्हणून प्रथम सर्व याद्यांतील A अक्षरानें आरंभ होणारे शब्द एकत्र आणून नंतर B अक्षरानें आरंभ होणारे शब्द, नंतर C आद्याक्षर असणारे शब्द अशा रीतीनें आद्यवर्णानुक्रमानें रचलेली एक यादी त्यानें तयार केली असावी. यानंतर आणखी एखाद्या लेखकानें अशा अनेक याद्यांचा संग्रह करून त्या एकत्र करण्याची खटपट केली असावी, व ती करतांना पहिल्या दोन वर्णांच्या अनुक्रमानें तिची रचना केली असावी.

या वरील तिन्ही स्वरूपांतील याद्या आपणांस इंग्लंडमध्यें पहावयास सांपडतात. उदा. लीडन येथील शब्दयादींतील शब्द जसे निरनिराळ्या ग्रंथांतील टीपा उपलब्ध झाल्या तसेच ग्रंथवार एकत्र केलेले आढळतात. एपिनॉल शब्दयादीमधील शब्द अनेक याद्या एकत्र करून जमविलेले व आद्यवर्णानुक्रमानें लावलेले आढळतात. या यादींत "A" अक्षरांत ५५० शब्द दिलेले आहेत व कोणताहि एक शब्द हुडकून काढण्यास हे ५५० शब्द डोळ्याखालून घालावे लागतात. कॉपेस ग्लॉसरी नांवाच्या तिसऱ्या यादीमध्यें Aa, Ab, Ac, अशा तऱ्हेनें पहिल्या दोन वर्णानुक्रमानें शब्द लावलेले आढळतात. दहाव्या शतकांतील एका यादींत तिसऱ्या वर्णापर्यंत अनुक्रम लक्षांत घेऊन शब्द लाविलेले आढळतात. ही यादी ब्रिटिश म्युझियममध्यें उपलब्ध आहे (एच्. ए. भार्. एल्. ३३७६). या बाबतींत यापुढें मात्र प्रगति झालेली आढळत नाहीं. वरील याद्यांपैकीं कॉपेस यादी ही आठव्या शतकांतील असून एपिनॉल व लीडन या तीपेक्षां जुन्या आहेत; म्हणजे इंग्रजी कोशरचनेचा आरंभ ख्रिस्त शकाच्या सातव्या शतकांत जातो.

पहिले इंग्रजी कोश—या याद्यांत प्रथम प्रथम लॅटिन शब्दांचे लॅटिन भाषेमध्येंच अर्थ देण्याची प्रवृत्ति विशेष दिसून येते; परंतु हळू हळू ही प्रवृत्ति कमी होत जाऊन इंग्रजी भाषेमध्यें अर्थ देण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आढळते. मध्यंतरीं नॉर्मन विजयामुळें फ्रेंच भाषेचा पगडा इंग्रजी भाषेवर पडून इंग्रजी भाषेची प्रगति खुंटल्यासारखी झाली होती. परंतु चौदाव्या शतकाचे अखेरीस इंग्रजी भाषा पुन्हां प्रगतीच्या मार्गास लागली. याच सुमारास छापण्याची कलाहि वाढीस लागली होती व पंधराव्या शतकांत आपणांस एक पंचवीसशें शब्दांचा पूर्णपणें वर्णानुक्रमानें लाविलेला इंग्रजी कोश आढळतो. पंधराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारासच 'मेडुलाग्रॅमॅटिसेस' नांवाचा पहिला लॅटिन-इंग्रजी शब्दकोश तयार झाला. आतांपर्यंत तयार झालेले सर्व शब्दकोश अर्थात लॅटिन शब्दांचे इंग्रजींत अर्थ देणारे लॅटिन-इंग्रजी कोश होते. व या कोशांनां नांवेंहि निरनिराळ्या प्रकारचीं असत. आपल्या शब्दकोशाला डिक्शनरी हें नांव प्रथम सर टॉमस इलियट यानें दिलें.

जरी वर्णानुक्रमरचनापद्धति रूढ होत चालली होती तथापि विषयवार शब्दरचनापद्धति पूर्णपणें लोप पावली होती असें नाहीं. उदा० १५५४ सालीं जे. बिथॉल्स् यानें प्रसिद्ध केलेल्या शब्दकोशामध्यें शब्दांचा अनुक्रम विषयवारीनें असून ते पुढें दिलेल्या सारख्या कांहीं मथळ्याखालीं दिलेले आढळतातः—आकाश, राशी, ग्रह, काल, ऋतु, वारे, जगाचे विभाग, पक्षी, माशा, मासे, गलबत, धातु, सर्प, कीटक, सरपटणारे प्राणी, चतुष्पाद प्राणी वगैर. पहिला इंग्रजी—लॅटिन शब्दकोश जॉफ्रे या वैय्याकरणानें इ. स. १४४० मध्यें लिहिला. त्यामध्यें १० हजार शब्द असून त्याचें नांव 'प्रॉम्प्टोरियन' असें होतें. याच्या पुढें अनेक आवृत्ती निघाल्या व त्याची पहिली छापील प्रत १४९९ मध्यें प्रसिद्ध झालेली आढळते. यानंतर नांव घेण्यासारखे इंग्रजी कोश म्हटले म्हणजे विल्यम हॉमॅन याचा 'व्हल्गॅरिया' (१५१९) नांवाचा कोश व रिचर्ड हॉवलेट याचा 'ॲबिसिडॅरियम' (१५५२) आणि जॉन बॅरेट याचा 'अल्व्हेरी' (१५७३) हे होत. यांतील पहिल्या कोशांत वाक्प्रचार व म्हणी असून त्याची रचना विषयवारी आहे. दुसऱ्या कोशांत मात्र इंग्रजी शब्दांचे लॅटिनबरोबर इंग्रजींतहि अर्थ दिलेले आढळतात. याच सुमारास पीटर लेव्हिन्स (१५७०) यानें 'इंग्लिश व्हायर्मिंग डिक्शनरी' नांवाचा शब्दांच्या अंत्याक्षरानुक्रमानें लाविलेला यमक कोश तयार केला.

वरील सर्व कोशांत आपणांस लॅटिन भाषेस विशेष महत्त्व दिलेलें आढळतें. याच सुमारास इंग्रजी राजघराण्याचा संबंध फ्रेंच राजघराण्याशीं आल्यामुळें (आठव्या हेन्रीची बहीण मेरी हिचें लग्न फ्रान्सच्या बाराव्या लुईशीं झाल्यामुळें) इंग्रजी-फ्रेंच कोशहि तयार झाले. त्याचप्रमाणें या सुमारास इटॅलियन-इंग्लिश कोश (जान फ्लोरिओ १५९९) व स्पॅनिश-इंग्लिश कोश

(रिचर्ड पर्सिव्हल १५९९) हेहि प्रसिद्ध झाले. याचीच परिणति म्हणजे १६१७ मध्यें जॉन मिन्सो यानें एक बहुभाषाकोश तयार केला. यामध्यें इंग्रजी, वेल्श, लो डच, हाय डच, फ्रेंच, इटॅलियन, स्पॅनिश, पोर्तुगीज, ग्रीक, लॅटिन, हिब्रू इतक्या भाषांचा अंतर्भाव केलेला आढळतो. तथापि अद्यापपर्यंत या निरनिराळ्या कोशांमध्यें जरी त्या वेळच्या इंग्रजी भाषेतील शब्दांचा संग्रह आढळून येतो तथापि इंग्रजी भाषेचें स्वतंत्र ज्ञान होण्यास इंग्रजी भाषेचा स्वतंत्र कोश असण्याची भावना प्रदीप्त झालेली दिसत नव्हती. त्या वेळच्या विद्यापुनरुज्जीवनाच्या काळांतील पंडितांस ही कल्पना बाष्कळ वाटत असे व १९ व्या शतकांतीलहि कांहीं पंडितांस ती तशीच वाटत होती. तथापि या काळांत विद्येच्या प्रसाराबरोबर पुष्कळच लॅटिन, ग्रीक, हिब्रू, अरबी या भाषांतील पंडिती शब्द इंग्रजी भाषेंत प्रविष्ट झाले होते व त्यांचे शुद्ध स्वरूप व अर्थ स्पष्ट करण्याची मात्र आवश्यकता सर्वांस भासूं लागली होती. त्यामुळें अशा कठिण शब्दांचे कोश १७ व्या शतकांत प्रथम तयार होऊं लागले. असा १२० पृष्ठांचा एक कोश रॉबर्ट कॉड्रे नांवाच्या शाळा-मास्तरानें १६०४ मध्यें प्रसिद्ध केला. त्यांत ३००० कठिण शब्द वर्णानुक्रमानें लावलेले आढळतात. या कोशाच्या १६१२ पर्यंत ३ आवृत्ती निघाल्या. असाच एक कोश डॉ. जॉन बुलोकर यानें १६१६ मध्यें प्रसिद्ध केला. याच्याहि १६८४ पर्यंत अनेक आवृत्ती निघत होत्या. तथापि 'दि इंग्लिश डिक्शनरी' असें नांव धारण करणारा पहिला शब्दकोश १६२३ मध्यें हेन्री कॉकेरॅम यानें प्रसिद्ध केला. याचे तीन भाग असून पहिल्या भागांत कठिण शब्दांचे अर्थ दिले आहेत. व दुसऱ्या भागांत सोप्या शब्दांना कठिण प्रतिशब्द दिले आहेत. याचा उद्देश लेखकाला प्रौढ शब्दयोजना करण्यास सुलभ पडावें हा होता. तिसऱ्या भागांत देव-देवता, स्त्री-पुरुष, राक्षस, युद्धें, पक्षी, पशु, वनस्पती, दगड, झाडें, कुत्रे, मासे वगैरेबद्दल माहिती असून ऐतिहासिक व पौराणिक उतारे दिले आहेत. या कोशाच्याहि पुढें अनेक आवृत्ती निघाल्या. अशाच तऱ्हेचा हिब्रू, ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांतील जे शब्द इंग्रजींत आले होते त्यांचा कोश १६५६ मध्यें टॉमस ब्लंड यानें प्रसिद्ध केला.

व्युत्पत्तिकोश—परंतु अद्यापपर्यंत इंग्रजी शब्दकोशामध्यें सर्व इंग्रजी शब्द आले पाहिजेत ही कल्पना कोणास सुचली नसावी किंवा निदान ती कोणीहि अमलांत आणली नव्हती हें मात्र खरें. अशा तऱ्हेचा प्रयत्न प्रथम नॅथेनियल बेली नांवाच्या इंग्रज गृहस्थानें करून आपली "युनिव्हर्सल इटिमॉलॉजिकल इंग्लिश डिक्शनरी" १७२१ त प्रसिद्ध केली. या कोशांत शब्दांचे केवळ अर्थच स्पष्ट केलेले नसून त्यांची व्युत्पत्तीहि दिलेली होती. या कोशाच्या पुढील वीस वर्षांत दहा आवृत्ती निघाल्या. यांचेंच अनुकरण पुढें डाइक आणि पार्डेन (१७३५), बी. एन्. डिफो (१७३५) आणि बेंजामिन मार्टिन (१७४९) यांनीं केलें.

जॉन्सनकोश—अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास इंग्रजी भाषेचा एक अधिकृत कोश असावा अशी कल्पना अनेक विद्वान लोकांच्या मनांत घोळूं लागली. ही कल्पना इंग्लंडबाहेरहि याच सुमारास उद्भूत झालेली दिसते; व इटली व फ्रान्स ह्या देशांमध्यें याच कार्याकरितां विद्यापीठें (ॲकेडमीज) स्थापन करण्यांत आलीं होतीं. इंग्लंडमध्यें अशा तऱ्हेची ॲकेडमी नव्हती. तथापि त्या देशांतील विद्वानांनीं ही कल्पना पार पाडली. अशा तऱ्हेच्या कोशाची कल्पना प्रथम अलेक्झॅंडर पोपपुढें मांडण्यांत आली होती व त्यासंबंधी पत्रहि होती. परंतु तो १७४४ त मृत्यु पावल्यानंतर ही कल्पना सॅम्युअल जॉन्सन यापुढें मांडण्यांत आली व १७४७ मध्यें लेडन मधील ५।६ प्रकाशकांनीं ३ वर्षांत असा कोश १५०० गिनीमध्यें करून देण्याचा करार त्याजपाशीं केला. तथापि प्रत्यक्ष त्या कार्यास तिप्पट काल लागला; व ठरलेली रकमहि कधींच उडून गेली. अखेरीस १७५५ मध्यें प्रसिद्ध जॉन्सनचा कोश दोन भागांत बाहेर पडला. या कोशाचें वैशिष्ट्य म्हणजे शब्दांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं वापरलेलीं अवतरणें होत. या कोशामुळें इंग्रजी भाषेतील कोशरचनेस मोठें महत्त्व प्राप्त झालें. शब्दांतील कोणत्या अवयवावर जोर द्यावयाचा हें देण्याची पद्धत बेलीनेंच आपल्या कोशांत समाविष्ट केली होती. परंतु अद्याप शब्दांचा प्रत्यक्ष उच्चार कसा करावयाचा ही गोष्ट कोशामध्यें दिग्दर्शित केली जात नव्हती. तें कार्य डॉ. वुइल्यम केन्रिक यानें प्रथम आपल्या 'न्यू डिक्शनरी' (१७७३) या कोशांत केलें; व तेंच कार्य जॉन वॉकर यानें १७९१ मध्यें पूर्ण केलें.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत जॉनसनचा कोश हाच आधारभूत मानला जात असे व यालाच पुरवणी म्हणून अनेक लहान लहान कोश प्रसिद्ध करण्यांत येत होते. इ. स. १८१८ मध्यें 'टॉड्स-जॉनसन' नांवाची या कोशाची दुसरी वाढविलेली आवृत्ति आर्चबिशप टॉड यानें प्रसिद्ध केली. याच सुमारास इंग्रजी कोशांमध्यें दोन महत्त्वाच्या कोशांची भर पडली. त्यांपैकीं एक नोहा वेब्स्टर याचा अमेरिकन कोश व दुसरा डॉ. चार्लस रिचर्डसन याचा इंग्रजी कोश होय. वेब्स्टर याचा इंटरनॅशनल कोश हा सध्यां एक अधिकृत कोश समजला जातो. परंतु त्याच्या पहिल्या आवृत्तींत मन:कल्पित व्युत्पत्ती फार दिलेल्या होत्या, त्या अलीकडे अधिक शास्त्रशुद्ध केलेल्या आढळतात. रिचर्डसन यानें अवतरणें देण्याचें महत्त्व ओळखून अनेक अवतरणें धुंडाळून आपल्या कोशांत समाविष्ट केलीं; व इ. स. १३०० पासून प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांतील अवतरणें त्यानें प्रथमच प्रकाशांत आणलीं. याचा उद्देश अवतरणावरूनच शब्दाचा अर्थ वाचकांनीं समजून घ्यावा असा होता, परंतु कितीहि अवतरणें दिलीं

तरी तीं पुरेशीं होत नाहींत व वाचकांस त्यांतून अर्थ धुंडाळून काढणें दुरापास्त होतें. तथापि अवतरणांच्या दृष्टीनें हा कोश अत्यंत महत्त्वाचा आहे.

विविध प्रकारचे कोश—परंतु हें सर्व भाषेतील शब्दांच्या संबंधीं झालें. परंतु ज्ञानाची वाढ जसजशी झपाटयानें होऊं लागली तसतशी पदार्थांचीं किंवा कांहीं व्यक्तींचीं, स्थानांचीं नांवें वगैरेहि शब्दच असून इतर शब्दांप्रमाणें त्यांचा अर्थ देण्याची जरूरी जास्त भासूं लागली त्यामुळें कोशांमध्यें वरचेसा अशा शब्दांचा भरणा केला जाऊं लागला. कालांतरानें स्वतंत्र विषयांकरितां स्वतंत्र संदर्भग्रंथ होऊं लागले व अशा तऱ्हेच्या स्वतंत्र ग्रंथांची वाढ पुष्कळच झाली. व हल्लीं तर शब्दकोशांपेक्षां या इतर कोशांचीच संख्या व आकारहि फार वाढत गेले आहेत. सध्यां आपणांस चरित्रकोश, ऐतिहासिककोश व वास्तविक किंवा काल्पनिक निरनिराळ्या देशांसंबंधीं व व्यक्तींसंबंधीं विशिष्ट अथवा सामान्य गोष्टी, धंदे वगैरेचे कोश आढळतात. याचें मोठें उदाहरण म्हणजे इंग्रजी राष्ट्रीयचरित्रकोश हा ग्रंथ होय. तसेंच विशिष्ट देशासंबंधीं किंवा ग्रंथांसंबंधीं संदर्भग्रंथकोश; सर्व जग किंवा विशिष्ट देश, प्रांत, शहर, ग्राम, किल्ले, मठ वगैरेचे स्थलकोश; तत्त्वज्ञानकोश; बायबलकोश; गणितकोश; सृष्टिशास्त्रकोश; प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, पक्षी, वृक्ष, वनस्पती, पुष्पें इ.चे कोश; रसायन, भूस्तर, खनिखोदन इ. शास्त्रांचे कोश; वास्तुसौंदर्य, चित्रकला, गायन इ.चे कोश; औषधि, शस्त्रक्रिया, शारीर, चिकित्सा, इंद्रियविज्ञान, राजकारण, दिवाणी–फौजदारी, धार्मिक इ. कायदे, राजनीति व समाजनीति यांचीं शास्त्रें, शेती, वृक्षसंवर्धन, व्यापार, नौकानयन, अश्वशास्त्र, युद्धशास्त्र, यंत्रशास्त्र, हस्तव्यवसाय इ. कला, यांचे कोश तयार होत आहेत. तसेंच पुराणवस्तु, शक, सन, वंशवृक्ष, राजनीति, शब्दसंक्षेप, औषधांच्या सारणी, नामसंक्षेप इ. अनेक तऱ्हेचे कोश निरनिराळ्या भाषांतून तयार होत आहेत. व सर्व शास्त्रें, विद्या, कला इ. ची माहिती देणारे ज्ञानकोशहि बाहेर पडत आहेत. परंतु हे सर्व कोश स्वतंत्र असून आपणांस सध्यां फक्त शब्दकोशाविषयींच विचार कर्तव्य आहे. शब्दकोश व ज्ञानकोश यांमध्यें हा मोठा फरक आहे कीं, ज्ञानकोशामध्यें विशिष्ट शब्दानें प्रतीत होणाऱ्या विषयाची पूर्ण माहिती द्यावयाची असते तर शब्दकोशामध्यें केवळ त्या शब्दाची माहिती द्यावयाची असते. तथापि इंग्रजी भाषेतील सेंचरी डिक्शनरीप्रमाणें कांहीं कोश शब्दकोश व ज्ञानकोश यांच्या संयुक्त स्वरूपाचेहि तयार होऊं लागले आहेत.

गरजेप्रमाणें कोशांचें स्वरूपहि निरनिराळ्या प्रकारचें असावें असें वाटूं लागतें. उदाहरणार्थ, जेव्हां एखाद्या शब्दाचा आपणांस पूर्णतः अभ्यास करावयाचा असतो किंवा एखाद्या शब्दाचा अथवा वाक्यांशाचा अर्थ निश्चित करण्याच्या कार्मी शंका उत्पन्न होते तेथें मोठ्या कोशाचा उपयोग होतो. परंतु विशिष्ट तऱ्हेच्या अभ्यासास विशिष्ट कोश जास्त उपयोगी पडतात. उदा. एका शब्दास अनेक पर्यायशब्द पाहिजे असतील तर समानार्थ कोश जास्त उपयोगी पडेल. तसेंच वरचेवर कोश पहावयाचा असतां किंवा एखाद्या अपरिचित भाषेतील मजकुराचें भाषांतर करावयाचें असेल तर लहान कोश जास्त उपयुक्त ठरतो, कारण त्यांतून शब्द लौकर शोधून काढतां येतो. आणि त्यांत अर्थहि थोडक्यांत दिलेले असतात. कांहीं कोश अनेक भाषांमध्यें असतात. उदा. कांहीं कोशांमध्यें एका भाषेतील शब्दाचा अर्थ दुसऱ्या भाषेतील शब्दांमध्यें दिलेला असतो. अशा तऱ्हेच्या कांहीं कोशांमध्यें–उदा. जालऱ्या नाविक कोशांत–समुद्रपर्यटणासंबंधीं अनेक भाषांतील शब्दांचा संग्रह असून त्यांचा अर्थ फ्रेंच भाषेत दिला आहे. तसेंच एका लॅटिन कोशामध्यें (Clepini Octoglotton) लॅटिन शब्दांचे लॅटिनमध्यें व इतर सात भाषांमध्यें अर्थ दिले आहेत. पॉथिएरच्या अनामी कोशांत अनामी शब्द चिनी लिपीमध्यें लिहून त्यांचे चिनी व अनामी उच्चार दिले असून अर्थ फ्रेंच भाषेत दिला आहे. अशा तऱ्हेचे व्युत्पत्तिकोश, परभाषाकोश, उपभाषाकोश, गुप्तभाषाकोश, ग्राम्य शब्दकोश, असंस्कृत शब्दकोश, अशुद्धप्रयोगकोश, निवडक शब्दकोश, वृत्तकोश, शब्दोच्चारकोश, शब्दमातृकाकोश, वक्तृत्वकोश, काव्यकोश, कायदेकोश, गानकोश, विशेषनामकोश, विशिष्टग्रंथकारकोश, नामकोश, क्रियापदकोश, अव्ययकोश, द्विरूपकोश, कठिण शब्दकोश इ. अनेक प्रकारचे कोश अलीकडे तयार होऊं लागले आहेत. एका कोशामध्यें (फिक्) तर इंडो–युरोपियन लोक जव्हां एकत्र होते त्यावेळीं ते जी भाषा बोलत असावे अशी कल्पना करतां येते अशा शब्दांचा संग्रह करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. तसेंच एकानें (पॉट) इंडो–युरोपियन धातूंचाहि (२२२६, पृष्ठें ५१४०) तुलनात्मक कोश तयार केला आहे.

अभिजातकोश—कोशासंबंधीं प्राथमिक कल्पना अशी होती कीं, कोशकारानें अभिजात शब्दांचाच संग्रह करून त्यांचा अभियुक्त उपयोग तेवढाच दिग्दर्शित करावा. निदान तत्कालीन भाषेमध्यें अभिजात शब्द कोणते व त्यांचा योग्य अर्थानें उपयोग कसा करावा हें दिग्दर्शित करणें हें कोशकाराचें काम समजलें जात होतें; म्हणजे कोशकारानें शब्दांची निवड करून शुद्ध स्वरूप देऊन त्यांचा योग्य उपयोग कोणता यासंबंधीं अधिकारपूर्वक सर्व प्रश्नांचा निर्णय करून त्या वेळच्या लोकाभिरुचीप्रमाणें भाषेचें स्वरूप निश्चित करावयाचें असे. या उद्देशास अनुसरून इटलीमध्यें सोळाव्या शतकांत " अॅकेडेमिया डेलाकुस्का " नांवाचें विद्यापीठ स्थापन करून इटेलियन भाषेचें स्वरूप शुद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत आला; आणि त्या संस्थेमाफत १६१२ मध्यें त्या

भाषेचा अभिजात कोश प्रसिद्ध करण्यांत आला. फ्रान्समध्येंहि फ्रेंच ॲकेडेमी स्थापून इ. सन १६९४ मध्यें जो फ्रेंच भाषेचा कोश प्रसिद्ध करण्यांत आला त्याचाहि उद्देश हाच होता. अशा तऱ्हेचा इंग्रजी भाषेचा कोश करण्याची कल्पना अठराव्या शतकाच्या आरंभीं उत्पन्न झाली व त्या वेळच्या विद्वानांची–विशेषतः अलेक्झांडर पोपसारख्या कवीची–अशी कल्पना होती कीं, इंग्रजी भाषेची त्या वेळीं पूर्ण वाढ झालली असून जर एखाद्या कोशाच्या रूपानें तिचें स्वरूप निश्चित केलें गेलें नाहीं तर तिच्या अवनतीस लवकरच प्रारंभ होईल. व ज्याअर्थी इंग्लंडमध्यें ॲकेडमीसारखी संस्था नव्हती त्या अर्थी ज्या ग्रंथकाराची भाषा प्रमाणभूत मानण्यांत येत असे अशा ग्रंथकारानेंच हें काम करणें अवश्य होतें. तेव्हां हें काम सॅम्युअल जॉन्सन याजकडे आलें. व त्यानें १७५५ मध्यें आपला कोश दोन भागांत प्रसिद्ध केला हें वर सांगितलेंच आहे. तो जरी अनेक दृष्टींनीं चांगला होता तरी त्या वेळच्या भाषेचें अभिजात स्वरूप निश्चित करण्याच्या कार्मी तो समर्थ नव्हता. एखाद्या भाषेच्या स्वाभाविक वाढीला नियंत्रण घालतां येईल या कल्पनेवर जॉन्सनचा स्वतःचाहि विश्वास नव्हता. तथापि त्याचा कोश पुढें एक शतकभर तरी प्रमाणभूत मानला जात असे. वरील समजुती-विरुद्ध पहिली घोषणा डीन ट्रेंच यानें फिलॉलॉजिकल सोसायटीपुढें १८५७ सालीं "सध्याच्या इंग्रजी कोशांतील कांहीं दोष" अशा अर्थाचा एक निबंध वाचून केली. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, कोश म्हणजे केवळ भाषेंतील शब्दांचा संग्रह असावा. कोश-कारानें काम शब्दांची निवड करून त्यांतील चांगले शब्द शोधून काढणें हें नव्हे. त्यांचें काम केवळ भाषेंतील बरेवाईट सर्व शब्द एकत्र करून व्यवस्थित मांडण्याचें आहे; मग त्यांतील कांहीं शब्द त्यास पसंत असोत वा नसोत. तो भाषेचा टीकाकार नसून इतिहासकार होय! याचा थोडक्यांत अर्थ असा कीं, कोशाचें ध्येय जें भाषेचें अभिजात स्वरूप दिग्दर्शित करावयाचें तें बदलून त्याच्या जागीं शास्त्रीय व व्युत्पत्तिदर्शक ध्येय ठेवावयाचें हा होय. जर्मनीमध्यें हें काम जेकब व विल्हेल्म ग्रिम या बंधुद्वयानें जर्मन भाषेच्या बाबतींत यापूर्वीच केलें होतें. व त्यांच्या कोशाचा पहिला भाग १८५४ मध्यें प्रसिद्ध झाला होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एखाद्या भाषेचा कोश करावयाचा म्हणजे त्या भाषेंतील प्रचलित अथवा लुप्त सर्व शब्द व त्यांचे अर्थ आणि उपयोग यांचा संग्रह करावयाचा अशी समजूत आहे. हें करीत असतांना विशिष्ट शब्दांचा अभिजात उपयोग कोणता हें केवळ अप्रत्यक्ष रीतीनें दर्शविण्यास हरकत नाहीं. परंतु तें कोशकाराचें मुख्य काम नव्हे. हल्लींच्या समजुतीप्रमाणें अभिजात कोश ही कल्पना बाष्कळपणाची नसली तरी अशक्य मात्र मानली जाते.

नवीन ऑक्सफोर्डकोश—वर सांगितल्याप्रमाणें एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास वेस्ट मिन्स्टर येथील डीन डॉ. ट्रेंच यानें लंडन येथील फिलॉलॉजिकल सोसायटी(भाषाशास्त्रमंडळ)पुढें इंग्रजी कोशांतील कांहीं दोष या विषयावर दोन निबंध वाचले. त्यांत विशेषतः त्यानें उपलब्ध कोशांत शब्दांचा इतिहास सांपडत नाहीं हें दिग्दर्शित केलें व विशिष्ट शब्द प्रथम केव्हां प्रचारांत आला, त्याचा कोणता अर्थ प्रथम रूढ होता व त्यांतून निरनिराळ्या अर्थांची वाढ कशी होत गेली व विशिष्ट शब्द केव्हां लुप्त झाला हें उपलब्ध कोशांतून मुळींच आढळून येत नाहीं, व लुप्त शब्द तर बहुधा कोशांतून गाळलेलेच असतात तेव्हां अशा तऱ्हेचा शब्दांचा इतिहास देणारा कोश या संस्थेनें हातीं घ्यावा अशी त्यानें सूचना केली. यांतूनच पुढें वर्णन केलेला 'ए न्यु इंग्लिश डिक्शनरी ऑन हिस्टॉरिकल प्रिन्सिपल्स' किंवा 'ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी' या नांवाचा कोश तयार झाला. फिलॉलॉजिकल सोसायटीनें प्रथम सामान्य कोशाच्या कल्पनेचा विचार करून अखेरीस ७ जानेवारी १८५८ रोजीं संपूर्ण नवीन इंग्रजी कोश करण्यासंबंधीं ठराव केला. या ठरावाप्रमाणें कोलरिज आणि फर्निव्हल यांजकडे या कोशाच्या प्रका-शनाची व्यवस्था ठरविण्याचें काम सोंपविलें. व पुढें नोव्हेंबर १८५९ मध्यें कोलरिज याची संपादक म्हणून नेमणूक केली. त्यानें १८६० मध्यें दोन वर्षांत आपण पहिला भाग प्रसिद्ध करूं असें प्रसिद्ध केलें. प्रथम त्यानें कोशाकरितां जें खणाळें तयार केलें होतें त्यांत ६० हजार चिठ्ठ्या मावतील इतकी व्यवस्था होती. परंतु प्रत्यक्ष कोश तयार होतांना भाषेंतील अगदीं कमी महत्त्वाच्या अक्षरांसुद्धां त्यापेक्षां जास्त चिठ्ठ्या लागल्या. कोलरिज १८६१ मध्यें मरण पावल्यानंतर संपादकीय काम फर्निव्हल याजकडे आलें व त्यास प्रथम कच्ची माहिती गोळा करण्यानेंच काम बरेच दिवस चालू ठेवलें पाहिजे असें वाटूं लागलें, व माहिती जम-विण्याचें व स्वयंसेवक, उपसंपादक नेमण्याचें काम त्यानें चालू ठेवलें. यानंतर या डिक्शनरीसंबंधीं बरींच वर्षेपर्यंत फारशी माहिती उपलब्ध नाहीं. पुढें कोशसंपादनाचें काम डॉ. जे. ए. एच्. मरे याजकडे आलें. त्यानें १८७९ मध्यें फिलॉलॉजिकल सोसायटी-तर्फे क्लारेंडनप्रेसबरोबर कोश छापण्याचा करार केला. या वेळची कोशाची कल्पना सध्यां प्रसिद्ध झालेल्या कोशाच्या सुमारें निम्म्या इतकी होती. प्रत्यक्ष कोशाच्या छपाईस सुरुवात १८८२ मध्यें झाली आणि पहिल्या ग्रंथाचा पहिला भाग १ फेब्रुआरी १८८४ मध्यें बाहेर पडला. व पहिला ग्रंथ १८८८ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यावेळीं सर्व कोश सुमारें ११ वर्षांत बाहेर पडेल असा डॉ. मरे याचा अंदाज होता. परंतु प्रत्यक्ष हा कोश पुरा होण्यास १९२८ सन उजाडला! म्हणजे कोश छापावा असा मूळ ठराव १८५८ मध्यें करण्यांत आल्यानंतर ७० वर्षांनीं हा कोश प्रत्यक्ष बाहेर पडला!

या कोशाचें स्वरूपः—या कोशामध्यें ४१४८२५ शब्द आहेत. त्यांपैकीं २४०१६५ मुख्य शब्द असून ६७१०५ दुय्यम प्रतीचे शब्द, ४७८०० विशेष संयुक्तशब्द, ५९७५५ सामान्य संयुक्त शब्द आहेत. यांत सुमारें ५००००० शब्दांच्या व्याख्या असून १८२७३०६ अवतरणें आहेत. या कोशांत सुमारें १२ शतकांत प्रचलित असलेल्या शब्दांचा समावेश केलेला आहे. या कोशांत प्रत्येक पानांत सुमारें ११२ ओळींचे तीन रकाने आहेत असे एकंदर रकाने ४६४४ असून ते एकापुढें एक मांडल्यास त्यांची लांबी ९ मैल होईल व त्यांतील ओळी एकापुढें एक मांडल्यास त्यांची लांबी १७८ मैल होईल व या ओळींत सुमारें ५ कोटी शब्दसंख्या असून २२ कोटी अक्षरसंख्या आहे. यांतील २४०१६५ मुख्य शब्दांपैकीं १७७९७० प्रचलित असून ५२४६४ लुप्त आहेत व ९७३१ परकीय आहेत. 'एस्' या अक्षरांत सर्वांत जास्त म्हणजे ५७४२८ शब्द आहेत. यानंतर 'पी' ३७६८९ व 'सी' मध्यें २९२९५ आहेत. या कामांत शब्द जमविण्याच्या कामीं सुमारें ४०००० स्वयंसेवक लोकांचे श्रम खर्ची पडले आहेत. इ. स. १८५७ मध्यें शब्दसंग्रहाचें काम सुरू झाल्यापासूनच ७६ स्वयंसेवक मदत करण्यास पुढें आलेले दिसून येतात. ही संख्या पुढें १८८१ मध्यें ८००, तर अखेरीस दीडहजार जवळ गेलेली आढळते. यांत फक्त मुख्य शब्दसंग्राहकांचाच अंतर्भाव केलेला आहे. या खेरीज किरकोळ मदत करणारे असंख्य लोक होते. या लोकांमध्यें अमेरिकेपासून व्हिएन्नापर्यंत सर्व प्रदेशांतील लोक आढळतात. थामस ऑस्टिन, आर. जे. व्हिटवेल, व टी. हेंडरसन यांसारख्या लोकांनीं लाखों अवरणांच्या चिठ्या करून पाठविल्या. कांहींनीं शास्त्रीय व पारिभाषिक शब्द लिहून पाठविले. ए. क्यालेंड नांवाचा गृहस्थ तर हॉलंडमध्यें राहून अनेक वर्षे प्रुफें तपासण्याचें काम करीत होता. याखेरीज प्रत्यक्ष उपसंपादकाचें कामहि विनामूल्य करणारे अनेक लोक होते. तसेंच प्रुफें तपासणारे व संदर्भ तपासणारेहि अनेक स्वयंसेवक ठिकठिकाणीं काम करीत असलेले आढळतात. या कोशाच्या संपादकवर्गांत पुढील नांवें आढळतातः—डॉ. जे. ए. एच्. मरे (१८३७–१९१५), हेनरी ब्राडले (१८४५–१९२३), विल्यम केग व चार्लस ओनियन्स. ह्या कोशाचा पहिला भाग १८८४ मध्यें बाहेर पडल्यामुळें त्यावेळीं भाषेमध्यें प्रचलित नसलेले अनेक शब्द आज इंग्रजी भाषेंत रूढ झालेले आहेत. त्या वेळीं अपेंडिसाइटिस (आंत्रपुच्छदाह) हा रोग किंवा ॲव्हिएशन अथवा विमानविद्या हे शब्द अज्ञात होते; त्यामुळें हा कोश पुरा झाला नाहीं तोंच त्यास पुरवणीची जरूर भासूं लागली व अशा तऱ्हेची पुरवणी तयार करण्याचें काम चालू असून प्रत्येक शब्दाचा सर्वांत जुन्यांत जुना उल्लेख शोधून काढण्याचें काम चालू आहे. या कोशाचा विशेष हा आहे कीं, प्रत्येक शब्दाचा प्राचीनतम उल्लेख दाखविणारें अवतरण प्रथम दिलेलें असून नंतर त्या शब्दाच्या रूपांत किंवा अर्थांत कसकसा फेरफार होत गेला आहे हें निरनिराळ्या काळच्या ग्रंथांतील अवतरणें देऊन दाखविलेलें आहे. यामुळें या कोशांत प्रत्येक शब्दाचा इतिहास आपणास पहावयास सांपडतो; व आजची शब्दकोशाबद्दलची सर्वांत परिणत कल्पना म्हणजे प्रत्येक शब्दाचा इतिहास देणें हीच होय.

संपूर्ण कोशाच्या अडचणी, शब्दसंग्रहः—तथापि वर सांगितलेलीं कोशाचीं निरनिराळीं अंगें पूर्णपणें उपयोगांत आणणें व्यवहारतः जवळ जवळ अशक्य होतें, व त्यामुळें सोईप्रमाणें आपलें क्षेत्र आंखून घ्यावें लागतें. आपल्याला ज्या भाषेचा कोश करावयाचा त्या भाषेचा आरंभकाल कोणता धरावयाचा किंवा शब्दसंग्रहास आद्य मर्यादा कोणती घालावयाची हें कोशकारास स्वतःच निश्चित करून घ्यावें लागतें. कारण विशिष्ट कालापूर्वीचे शब्द साधनांच्या अभावीं संगृहीत करणेंच अशक्य असतें. उदाहरणार्थ मराठी भाषेंतील जुनें वाङ्मय अद्यापि प्रकाशांत यावयाचेंच आहे. महानुभावी वाङ्मयप्रकाशनास आतां कोठें आरंभ होत आहे. तसेच अनेक संतकवींचे ग्रंथ अद्यापि अनुपलब्ध असून उपलब्ध हस्तलिखित ग्रंथांचेंहि योग्य प्रकाशन किंवा सूचीकरण झालें नाहीं. तसेंच प्राचीन किंवा अर्वाचीन लिखाणामध्यें आढळणारे एकूण एक सर्व शब्द कोणत्याहि संपूर्ण म्हणविल्या जाणाऱ्या कोशांतहि अंतर्भूत करणें अशक्य होतें. एखाद्या भाषेंतील वाङ्मयामध्यें किंवा ग्रंथांमध्यें आढळणारे बरेचसे शब्द कोशरचनेच्या दृष्टीनें त्या भाषेंतील शब्द म्हणून धरतां येत नाहींत. तसेंच कांहीं शब्द कोशकाराच्या दृष्टीनेंहि त्या विशिष्ट भाषेच्या कक्षेबाहेरील समजले जाण्याचा संभव आहे. इंग्रजी किंवा मराठी भाषेच्या बाबतींत ही गोष्ट आपणांस विशेष स्पष्टपणें दिसून येते.

सध्यां इंग्रजी बोलणाऱ्या लोकांच्या भाषणांत आढळणाऱ्या अनेक शब्दांभोंवतीं कोशकाराच्या दृष्टीनें तेजोमेघाप्रमाणें एक अस्पष्ट धुकें पसरलेलें असतें. विशिष्ट शब्द कोशांत समाविष्ट करावे किंवा नाहीं याबद्दल त्याला नेहमीं संशय उत्पन्न होत असतो. उदा. सृष्टिशास्त्रांतील लॅटिन भाषेवरून बनविलेल्या हजारों संज्ञा; प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इ. शास्त्रांतील वर्गीकरणविषयक रोज नवीन नवीन उत्पन्न होणारीं लॅटिन नांवें; रासायनिक संयुक्त द्रव्यें, खनिज पदार्थ इ.चीं नांवें; अर्धवट रूढ झालेले परकीय भाषांतील शब्द; निरनिराळ्या पोटभाषांतील किंवा बोलींतील शब्द; ग्राम्य शब्द; व्यापारी लोकांत रूढ असलेले सांकेतिक शब्द; विशेषनामें; वगैरे अनेक शब्दांचे असे प्रकार आहेत कीं, जे सर्वतः पूर्ण म्हटल्या जाणाऱ्या कोशामध्येंहि समाविष्ट होण्याचें कारण नाहीं. याखेरीज इतर सर्व शब्दांचा मात्र कोशांत समावेश झाला पाहिजे. परंतु या दोघांमध्यें विभागणीची रेषा कोठें मारावी याबद्दल नेहमीं मतभेदच राहण्याचा संभव आहे.

यानंतर प्रत्यक्ष शब्दसंकलनाचें कार्य करतांना ज्या अमेक अडचणी येतात व ज्यामुळें कोणत्याहि कार्यकर्त्याच्या क्षेत्रास मर्यादा उत्पन्न होतात त्या निराळ्याच. हें कार्य एकटया दुकटयाचें नसुन त्यांत अनेकांचें सहकार्य अवश्य लागतें व तें ज्या प्रमाणांत मिळेल त्या प्रमाणांत शब्दसंग्रहाचें कार्य पूर्ण किंवा अपूर्ण राहतें. कोशाचें शब्दसाहित्य जमविण्याच्या कार्मी किती अडचणी येतात व बाहेरून सहकार्य कसें नियमितच मिळतें याचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या 'कोर्ट ऑफ डायरेक्टर्स' यांच्या आज्ञेनें एच्. एच्. विल्सन यानें एक हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत व भाषांत न्याय आणि जमाबंदी खात्यांत वापरल्या जाणाऱ्या पारिभाषिक शब्दांचा कोश इ. स. १८५५ मध्यें प्रसिद्ध केला. तो तयार करीत असतां शब्द जमविण्याच्या कार्मी त्यास काय अडचणी आल्या त्या त्यानें प्रस्तावनेंत नमूद करून ठेवल्या आहेत. तो म्हणतोः–या कार्मी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत जे कंपनीचे नोकर आहेत, त्यांचें साहाय्य मिळाल्याशिवाय असा कोश होणें शक्य नाहीं असें दृष्टीस पडल्यावर हिंदुस्थानसरकारकडे असा हुकूम पाठविण्यांत आला कीं त्यांनीं निरनिराळ्या इलाख्यांतील कामदारांस या कार्मी साहाय्य करण्याकरितां हुकूम काढावे. या कामदारांस कामाची दिशा समजावी म्हणून एक वर्णानुक्रमानें रचलेल्या छापील यादीच्या शकडों प्रती हिंदुस्थानांत निरनिराळ्या कामदारांस वांटण्याकरितां पाठविण्यांत आल्या. आणि त्यांस त्या याद्या त्या त्या ठिकाणीं प्रचारांत असलेले अधिक शब्द मधून मधून घालून पूर्ण करून व शुद्ध अर्थ व स्पष्टीकरणें देऊन परत पाठविण्यास सांगण्यांत आलें. या याद्या अशा तऱ्हेनें छापण्यांत आल्या होत्या कीं, त्यांत मध्यंतरी नवीन शब्द, स्पष्टीकरणें व मूळ शब्दांचे अर्थ देण्यास पुरेशी जागा सोडली होती. या याद्या सहा महिन्यांनीं भरून परत येतील अशी अपेक्षा होती.

परंतु सहा महिन्यांपेक्षांहि अधिक काळ वाट पाहून झाल्यावर बंगाल व मद्रास प्रांतांतून कांहीं याद्या परत आल्या; मुंबई इलाख्यांतून एकहि यादी परत आली नाहीं. परंतु ज्या याद्या आल्या त्यांपैकीं बऱ्याच कोऱ्याच परत आल्या व कांहींचीं तर पानेंहि कापलीं नव्हतीं. कांहींमध्यें अगदीं सामान्य शब्द मधून मधून घातले होते. कांहीं याद्या ज्या देशी मुन्सफ, अमीन, सदर अमीन, डेप्युटी कलेक्टर वगैरे सारख्या कामदारांना देण्यांत आल्या होत्या त्यांनीं कांहीं शब्द भरून पाठविल्या. हे बहुतेक कंपनीच्या सनदी नोकरांखेरीज होते. परंतु यांतहि पुष्कळांना मूळ उद्देश न समजल्यामुळें कांहीं तरी शब्दांचा भरणा केलेला आढळून आला व कांहींनीं तर शेक्सपिअरच्या हिंदुस्थानी कोशासारख्या कोशांतीलच शब्द उतरून दिले.

एकंदरींत कंपनीच्या सनदी नोकरांचा सार्वजनिक कार्य करण्याचा उत्साह व भाषाशास्त्रीय विद्वत्ता यांस ही गोष्ट मुळींच भूषणावह नाहीं असें उद्गार शेवटीं विल्सन यांनीं काढले आहेत. तेव्हां सरकारी व इंग्लंड मधून हुकूम सुटून होणाऱ्या प्रयत्नाची जर ही दशा तर खासगी रीतीनें कार्य करणाऱ्यांच्या मार्गांत किती अडचणी असतील याचा विचार वाचकांनींच करावा!

कोशांत शब्देतिहासः—ट्रेंचनें आपल्या निबंधांत दुसरी एक गोष्ट विशेष प्रामुख्यानें नमूद केली होती ती म्हणजे 'अर्वाचीन शास्त्रीय दृष्टीनें तयार होणाऱ्या कोशांमध्यें केवळ शब्दांची नुसती नोंद करून भागणार नाहीं, तर ती नोंद ऐतिहासिक पाहिजे.' प्रत्येक शब्दाच्या रूपाची वाढ कसकशी होत गेली हे कोशामध्यें नमूद होणें जरूर आहे. पूर्वीच्या कोशांत शब्दाच्या धात्वर्थापासून त्याची व्युत्पत्ति लावण्याचा प्रघात असे व त्याचे इतर अर्थ पुढें ऐतिहासिक क्रमाकडे दुर्लक्ष करून कोणत्या तरी क्रमानें दिलेले असत. परंतु व्युत्पत्तिशास्त्रज्ञाला भाषेमध्यें प्रत्येक शब्द, त्याचें प्रत्येक रूप व अर्थ हीं प्रथम केव्हां आढळतात, तसेंच तो शब्द लुप्त झाला असल्यास तो केव्हां लुप्त झाला व त्या शब्दाच्या रूपामध्यें किंवा अर्थामध्यें फरक कसकसा होत गेला या सर्व गोष्टींचा इतिहास ज्ञातव्य असतो. त्यामुळें त्याची अशी अपेक्षा असते कीं, कोशकारानें विशिष्ट शब्दाचा जो अर्थ सर्वांत कालदृष्ट्या प्रथम आढळेल तो प्रथम देऊन पुढील अर्थ कालानुक्रमानें दिल पाहिजेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कोशांतील प्रत्येक शब्दावरचा लेख म्हणजे त्या शब्दाचें पूर्ण चरित्र असलें पाहिजे व त्याचे निरनिराळे अर्थ प्रथम प्रचारांत कसकसे येत गेले किंवा ते किती काल अस्तित्वांत राहिले व केव्हां लुप्त झाले तें सर्व नमूद व्हावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत याहि बाबतींत विशिष्ट मर्यादेपर्यंतच कार्य करतां येणें शक्य असतें व निरनिराळ्या कालच्या लेखांचा अभाव ही ह्या गोष्टींतील मुख्य अडचण होय. तसेंच कांहीं शब्दांच्या इतिहासाचें महत्त्व इतकें अल्प असतें कीं, तो जुळविण्याच्या कार्मी लागणारा वेळ व स्थळ त्यांचा अपव्ययच होतो.

कोशांत अवतरणेंः—कोशांतील शब्दांचे अर्थ ऐतिहासिक दृष्टीनें द्यावयाचे म्हणजे त्या मानानें अवतरणांची संख्या वाढविणें जरूर होतें. अवतरणांचें अर्थनिश्चयाच्या कार्मी प्रतीत होणारें महत्त्व निदर्शनास आणण्याचें श्रेय इंग्रजी भाषेच्या बाबतींत डॉ. जॉन्सन यास आहे, व त्याच्या कोशाचा सर्वांत हाच भाग जास्त महत्त्वाचा आहे. डॉ. चार्ल्स रिचर्डसन यानें आपल्या कोशांत (न्यू डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज, १८३५–३६) अवतरणें अधिक प्रमाणांत उपयोगांत आणलीं व त्याचा कोश म्हणजे अवतरणांचा संग्रह असें मानिलें जातें. तथापि अवतरणांचा उपयोग अद्यापपर्यंत केवळ विशिष्ट अर्थास प्रत्यंतर पुरावा म्हणून करण्यांत येत असे. ऐतिहासिक पुरावा म्हणून त्याकडे पाहण्याची प्रवृत्ति नव्हती; आणि म्हणून हीं अवतरणें बहुधा उत्तम

ग्रंथकारांच्या ग्रंथांतून घेतलेलीं असत. परंतु ऐतिहासिक दृष्टीनें शब्दांचें विवेचन करावयाचें म्हणजे सर्व वाङ्मयांतून अशीं उदाहरणें निवडलीं पाहिजेत व जर अवतरणांची निवड व रचना व्यवस्थितपणें करतां आली तर शब्दांचा व्याख्यारूप अर्थ देण्याचें काम बरेंचसें हलकें होईल; अर्थात् अशा वेळीं प्रत्येक शब्दाचें सर्वांत जुन्यांत जुनें अवतरण प्रथम देऊन शेवटीं सर्वांत अर्वाचीन अवतरण दिलें पाहिजे व विशेष महत्त्वाच्या शब्दांच्या बाबतींत निरनिराळ्या कालांतील अवतरणें देणें अवश्य होईल व ऐतिहासिक दृष्टीनें उपयुक्त असलेलें अवतरण वाङ्मयदृष्टीनें निरुपयोगी असलें तरी गाळून चालावयाचें नाहीं. अर्थात् जेथें उत्कृष्ट ग्रंथकाराचें तितक्याच महत्त्वाचें अवतरण उपलब्ध असेल तेथें वर्तमानपत्रासारख्या कमी दर्जाच्या लिखाणांतील अवतरण गाळण्यास हरकत नाहीं. मात्र हीं अवतरणें देतांना तीं शब्दाच्या ज्या स्वरूपांत असतील त्याच स्वरूपांत त्यांचा काल, स्थल, (ग्रंथकार, ग्रंथनाम, विभाग, पृष्ठ, आवृत्ति इ.) पूर्णपणें देऊन नमूद केलीं पाहिजेत.

अवतरणें देण्याच्या कामांत तीं जमविण्याचा एक मोठा प्रश्न आहेच, परंतु त्याखेरीज त्यामुळें कोशाचा वाढणारा आकार हीहि एक अडचणीची बाब आहे. तेव्हां जीं अगदीं जरूरच असतील तेवढ्या अवतरणांस प्रथम स्थान देऊन केवळ पद्धतीच्या दृष्टीनें घालावीं लागणारीं अवतरणें जितकीं कमी करतां येतील तितकीं करावीं. तथापि कितीहि अवतरणें घातलीं तरी कोशांत नमूद केलेल्या आद्य अवतरणापेक्षां पूर्वीचें किंवा शेवटच्या अवतरणानंतरचें सांपडणारच नाहीं असें केव्हांहि म्हणतां यावयाचें नाहीं. म्हणजे अवतरणाच्या अभावावरून आपणांस कोणतेंच अनुमान काढतां येणार नाहीं.

व्युत्पत्तीचें महत्त्वः—शब्दकोशाचें एक महत्त्वाचें उपांग म्हणजे शब्दांची व्युत्पत्ति होय. अलीकडे व्युत्पत्तिशास्त्राची वाढ झपाट्यानें होत आहे. यामुळें विशिष्ट भाषेमध्यें एखादा शब्द प्रविष्ट झाल्यानंतर त्याच्या स्वरूपांत पडणारा फरक आणि त्यापूर्वी त्याचें स्वरूप कसकसें बनत गेलें या दोन गोष्टींतील संबंध ही एक महत्त्वाची बाब मानली जाऊं लागली आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे शब्दाची व्युत्पत्ति म्हणजे तो शब्द भाषेंत समाविष्ट होण्यापूर्वीच्या त्याच्या स्वरूपाचा इतिहास होय. व्युत्पत्तिज्ञानामुळें विशिष्ट शब्दार्थी संबद्ध असलेल्या इतर शब्दार्थांशीं त्यांचें असलेलें नातें निश्चित करतां येतें. आणि एकाच स्वरूपाच्या परंतु भिन्न मार्गानें व्युत्पादित शब्दांमध्यें फरक स्पष्ट करतां येतो. यामुळें शब्दांचा वांशिक इतिहास आपणांस उपलब्ध होतो. अलीकडील महत्त्वाच्या कोशांमध्यें ह्या अंगास विशेष महत्त्व दिलें जातें. शब्दाचा मूळ धातु किंवा उगम दाखविण्याबरोबरच त्या शब्दाच्या स्वरूपांत किंवा उच्चारांत फरक किंवा अपभ्रंश कसकसे होत गेले किंवा चुकीनें त्याचे संबंध भलत्याच शब्दार्थी जोडले गेले असल्यास ते कसे जोडले गेले हें दाखवितां येतें. यामुळें शब्दांच्या बाबतींत अनेक महत्त्वाचे शोध व उपयुक्त माहिती कोशकाराला प्रकाशांत आणतां येते.

अर्थात् वरील सर्व अंगांचा अंशतःहि परामर्श घेणें हें नवीन ऑक्सफोर्ड कोश ज्या परिस्थितींत निर्माण झाला तशी परिस्थिति असल्यासच शक्य होतें. या कार्यास लागणारे परिश्रम बरेच मोठे असून अशा रीतीनें तयार होणाऱ्या कोशाचा आकारहि फार मोठा होणें अपरिहार्य आहे. परंतु अशा तऱ्हेच्या एका मोठ्या कोशामध्यें एखाद्या भाषेतील शब्दांचा इतिहास पूर्णपणें नमूद करून ठेवला गेल्यास त्यावरून आपल्या निरनिराळ्या गरजांप्रमाणें लहान लहान कोश निर्माण करणें फार सुलभ होतें. एखाद्या भाषेच्या ज्ञानकोशामध्येंहि निदान शब्दांचा अर्थ देण्याच्या बाबतीमध्यें वरील पद्धति अनुसरणें इष्ट आहे.

कोशार्थे साहित्यसंशोधनः—अशा तऱ्हेनें सर्वांगपरिपूर्ण कोश तयार करावयाचा म्हणजे त्याला लागणारें साहित्य प्रथम गोळा केलें पाहिजे. आणि हें साहित्य गोळा करावयाचें म्हणजे भाषेतील सर्व लिखाण तपासून पाहिलें पाहिजे. याकरितां वाङ्मयांचे किंवा लेखनाचे सर्व प्रकार संशोधिले पाहिजेत व भाषेच्या वाङ्मयांतील प्रत्येक कालखंडांतील लिखाण आपणांस उपलब्ध असलें पाहिजे. अशा रीतीनें अनेक ग्रंथ, चोपडीं, नियतकालिकें, वर्तमानपत्रें, बखरी, कागदपत्र वगैरे हजारों कागद वाचून काढून त्यांतील अवतरणें घेतलीं पाहिजेत. ऑक्सफोर्ड कोशांत अशीं अवतरणें लक्षावधि आहेत. अर्थात हें काम एकट्यादुकट्या व्यक्तींचें नसून याला अनेक लेखकांचें साहाय्य पाहिजे. यामुळें असा कोश करावयाचा म्हणजे पूर्वी जेथें १०।१२ उपसंपादक पुरत असत तेथें आतां शेंपन्नास अपुरे पडूं लागतात. एवंच शेंकडों किंवा हजारों लोकांनीं हातभार लावल्याशिवाय कोणत्याहि भाषेचा संपूर्ण स्वरूपाचा कोश होणें शक्य नाहीं. ऑक्सफोर्ड कोशामध्यें अशा तऱ्हेचें साहाय्य त्यास किती मिळालें हें वर दिलेंच आहे. तथापि या कोशांतहि दुय्यम किंवा तिय्यम दर्जाच्या ग्रंथकारांच्या ग्रंथांतील अवतरणें बरींचशीं घेतलेलीं दिसतात, त्याऐवजीं त्या जागीं पहिल्या प्रतीच्या ग्रंथांतील अवतरणें त्याच अर्थाचीं घेतां आलीं असतीं. तसेंच या कोशांतील अर्थ सेंचरीकोशांतील अर्थाइतके चांगले व स्पष्ट दिलेले दिसत नाहींत असें कांहीं टीकाकारांचें मत आहे. तथापि 'या कोशांत समाविष्ट केलेल्या वाङ्मयाची व्यापकता, शब्दांच्या उगमाचा काळजीपूर्वक लावलेला छडा व कालनिदर्शन, तसेंच त्यांच्या स्वरूपांत आणि अर्थांत

पडलेला निरनिराळ्या काळीं फरक, एकंदरींत इंग्रजी भाषेच्या स्वरूपाचें पूर्णपणें केलेलें दिग्दर्शन या गोष्टींतच ऑक्सफोर्ड कोशाचें महत्त्व आहे ' हें कार्टेली रिव्ह्यूनें केलेलें त्याचें वर्णन सर्वथा योग्य आहे.

जर्मनकोश—जेकब आणि वुइल्हेल्म ग्रिम यांनीं संपादिलेला जर्मन कोशहि याच पद्धतीनें तयार केलेला आहे. जर्मनी-मध्यें ही कल्पना प्रथम लिब्निट्झ व दुसऱ्या कांहीं अठराव्या शतकांतील पंडितांस सुचली होती. परंतु ग्रिमबंधूंना हा कोश करण्याची प्रवृत्ति व्युत्पत्तिशास्त्राच्या वाढलेल्या अभ्यासामुळें झाली. यांनीं पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून आजतागायतचे शब्द आपल्या कोशांत समाविष्ट केले आहेत, व त्यांची व्युत्पत्ति आणि इतिहास देऊन पोटभाषांतील व बोलींतील त्यांचीं रूपेंहि दिलीं आहेत व त्यांचा उपयोग अनेक अवतरणें देऊन दिग्दर्शित केला आहे. या कोशाचा पहिला भाग १८५४ सालीं प्रसिद्ध झाला. तथापि या कोशांत शब्दांचे उच्चार दिलेले नाहींत व हा ऑक्सफोर्ड कोशाइतका व्युत्पत्तिदृष्ट्या पद्धतशीरहि नाही. या कोशाचे एकंदर नऊ भाग व दहाव्याचा कांहीं अंश म्हणजे सर्व कोशाचा पांचषष्ठांश भाग प्रसिद्ध व्हावयास पाउणशें वर्षे लागलीं. ऑक्सफोर्डकोशाच्या मानानें या भागांची एकंदर पृष्ठें सुमारें ११००० भरतील.

फ्रेंचकोश—ई. लित्रे यानें संपादिलेला फ्रेंच भाषेचा कोशहि महत्त्वाचा असला तरी तितका पद्धतशीर रीतीनें तयार झालेला नाहीं. यांत प्रथम सर्वांत मूळचा अर्थ देऊन पुढील अर्थ ऐतिहासिक म्हणण्यापेक्षां तर्कशास्त्रदृष्ट्या एकापुढें एक येणारे असे ओळीनें मांडले आहेत. त्यांतील अवतरणेंहि केवळ वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाचीं आहेत. पुष्कळ ठिकाणीं तर त्यांचा अभावच दिसतो. सोळाव्या शतकाच्या पूर्वीच्या शब्दांचा इतिहास देतांना मात्र ऐतिहासिक पद्धति वापरली आहे. एकट्या मनुष्यानें केलेला असा हा सर्वांत मोठा कोश म्हणतां येईल. हा प्रसिद्ध करण्यास १८६३ पासून १८७२ पर्यंत नऊ वर्षे लागलीं.

लॅटिनकोश—बर्लिन, गॉटिंज्जेन, म्युनिच व ह्विएन्ना येथील जर्मन ॲकेडमींनीं तयार केलेला लॅटिन कोश हा कोश-रचनेच्या बाबतींतील सहकार्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या कोशामध्यें दुसऱ्या शतकापर्यंतच्या लॅटिन ग्रंथकारांच्या ग्रंथांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ स्पष्ट करणारीं अवतरणें संगृहीत केलीं आहेत व सातव्या शतकापर्यंतच्या ग्रंथकारांच्या ग्रंथांतील महत्त्वाचे उतारे घेतले आहेत व या साहित्याच्या साहाय्यानें लॅटिन भाषेचा नवा कोश तयार करावयाचा आहे.

नेदर्लंडांतील भाषेचा कोश—या कोशाच्या कार्यास आरंभ १८५०–१ मध्यें झाला व पहिला भाग १८६४ मध्यें प्रसिद्ध झाला. एकंदर ६१ वर्षांत अकरा भाग प्रसिद्ध झाले व त्यांत डच भाषेंतील शब्दांपैकीं सुमारें चारपंचमांश शब्दांचा संग्रह केला गेला. या कोशाची ऑक्सफोर्डकोशाच्या मानानें सुमारें ६७०० पृष्ठें होतील.

अमेरिकनकोश—वर उल्लेखिलेल्या मोठमोठ्या कोशांमध्यें पंडितांची व सामान्यतः लोकांची गरज भागविणें हा मुख्य हेतु दृष्टीस पडतो. तथापि लोकांच्या आवडीकडे दृष्टि दिल्यास त्यांस शब्दकोश व ज्ञानकोश यांचें स्वरूप एकत्र केलेला कोश अधिक आवडतो असें दिसतें. अशा तऱ्हेच्या कोशाचें उदाहरण म्हणजे पायरी लारूस यानें केलेल्या फ्रेंच कोशाचें होय. यामध्यें शब्द व त्यांच्या व्याख्या देऊन शिवाय विशेषनामें, चरित्रें, भौगोलिक, ऐतिहासिक व इतर लेख दिलेले आहेत. वास्तविक या इतर गोष्टींचा शब्दकोशाशीं कांहींहि संबंध नाहीं. परंतु त्यांत अनेक दोष असले तरी सुद्धां तो फार लोकप्रिय आहे, असें दिसून येतें. अमेरिकेमध्यें प्रो. डब्ल्यु. डी. व्हिटने यानें तयार केलेला सेंचरीकोशहि याच प्रकारचा आहे. याचे सहा भाग असुन पृष्ठ-संख्या सात हजारांवर आहे. यामध्यें शब्दांची व्युत्पत्ति दिली असली तरी प्रत्येक शब्दाचा इतिहास दिला नाहीं. यामध्यें बरे-चसे शास्त्रीय व पारिभाषिक शब्द संगृहीत केले असुन अवतरणेंहि भरपूर दिलीं आहेत. या कोशांत शब्दांचे अर्थ विस्तृततेनें व स्पष्टपणें दिलेले असुन या बाबतींत ऑक्सफोर्ड कोशापेक्षांहि हा कोश अधिक महत्त्वाचा आहे असें ब्रिटानिका म्हणतो. परंतु या कोशांत विशेषनामें गाळलेलीं आहेत. या कोशाच्या संपादनांतहि अनेक पंडितांनीं सहकार्य केलें आहे. ऑक्सफोर्ड कोशानंतर इंग्रजीभाषेंतील विशेष महत्त्वाचा असा हाच कोश होय.

कोशांचे प्रकार—एकंदर भाषेची व वाङ्मयाची जसजशी वाढ होत जाते तसतसा त्याचा अभ्यासहि विशेष रीतीनें व विशिष्ट प्रयोजनाकरितां होऊं लागतो व त्यामुळें विशिष्ट संदर्भासाठीं व निरनिराळ्या उपयोगांसाठीं विविध प्रकारची कोशरचना जरूरीची वाटूं लागल्यामुळें साहाजिकच त्यांचे वेगवेगळे प्रकार आढळतात. या निरनिराळ्या प्रकारांचें सामान्य दिग्दर्शन पूर्वी केलेंच आहे. आतां या प्रकारांपैकीं कांहीं कोशांची माहिती पुढें दिली आहे.

ग्रंथ-ग्रंथकारांचे कोश:–एखाद्या प्रख्यात ग्रंथकाराचे अनेक ग्रंथ असून त्यांचा अभ्यास करणें महत्त्वाचें मानिलें जातें अशा वेळीं फक्त त्याच ग्रंथकाराच्या ग्रंथांत आढळणाऱ्या शब्दांचें अथवा भाषा व वाक्प्रचारांचें स्पष्टीकरण करणारे कोश तयार होत असतात. उदा. लुई स्पेन्सनें केलेला मध्ययुगीन रोमान्स ग्रंथकारांचा कोश (१९१३), ए न्यु शेक्सपीरियन डिक्शनरी (कीनलिफ कृत, १९१०), प्रसिद्ध ग्रंथकारकोशमालेंतील डिकन्स (फिलिप्प), थॉमस हार्डी (सॅक्सेलबी), थॅकरे (मज), ओस्कार

वाइल्ड (मेसन), इ. कोश. बायबलचेहि अनेक कोश आढळतात (उदा. स्मिथकृत, १८८४), तसेंच निरनिराळ्या ग्रंथांची माहिती देणाराहि कोश उपयुक्त वाटतो. उदा. हेलेन रेक्स केलरनें १९२३ त 'दी रीडर्स डायजेस्ट ऑफ बुक्स' असा एक कोश रचला आहे. यांत निरनिराळ्या ग्रंथांचे सारांश दिले आहेत. 'डिक्शनरी ऑफ युरोपियन लिटरेचर' (युरोपीय साहित्यकोश) या सारखे व्यापक माहितीचेहि कोश दिसतील. लॉरी मॅग्नस यानें संपादिलेल्या या कोशांत युरोपखंडांतील महत्त्वाच्या ग्रंथांविषयीं माहिती दिली आहे. मराठींतहि ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, यांच्या शेवटीं शब्दकोश दिलेले असतात. त्यांचा त्या त्या ग्रंथांपुरता उपयोग होतो. मराठी वैदिक कोश हा अशा प्रकारचाच कोश आहे.

चरित्रकोशः—या कोशांची व्याप्ति वाटेल तितकी लहान किंवा मोठी असूं शकते. एखाद्या विशिष्ट काळांतील किंवा ग्रंथांतील व्यक्तींपासून तों सार्वकालिक, सार्वराष्ट्रीय व्यक्तींपर्यंत या कोशांत माहिती दिलेली आढळते. डिक्शनरी ऑफ नॅशनल बायॉग्रफी (राष्ट्रीय चरित्रकोश) यांत इंग्रजी गृहस्थांचीं चरित्रें असून याचे अनेक विभाग आहेत. चेंबर्स बायॉग्राफिकल डिक्शनरींत सर्व प्रमुख व्यक्तींचीं चरित्रें आहेत; तर 'डिक्शनरी ऑफ नोटेड नेम्स ऑफ फिक्शन' या व्हीलरच्या कोशांत कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या पात्रांची माहिती आढळेल. तथापि व्यापक जागतिक चरित्रकोश करण्याकडे आजकाल विशेष प्रवृत्ति दिसून येते. उदा. वाटकिन्सकृत, 'दि युनिव्हर्सल बायॉग्राफिकल डिक्शनरी,'; कॉक्रेमकृत 'ट्रेझरी ऑफ मॉडर्न बायॉग्राफी' यांत १९ व्या शतकांतील प्रसिध्द वाङ्मयसेवकांचीं चरित्रें आहेत. आपल्याकडेहि पूर्वीचे र. भा. गोडबोलेकृत प्राचीन व अर्वाचीन कोश असून वैदिक–पौराणिक चरित्रकोश (चित्राव), आधुनिक मराठी वाङ्मयसेवक (खानोलकर) इ. चरित्रपरकोश सध्यां तयार होऊं लागले आहेत.

द्वैभाषिक कोशः—एका भाषेंतील शब्दांचा अर्थ दुसऱ्या भाषेंत सांगणारा कोश तो द्वैभाषिककोश. उदा. इंग्रजीचे मराठी, कानडी, गुजराथी, हिंदी इ. देशी भाषांत अर्थ देणारे कोश, पाश्चात्त्य देशांतील प्रमुख भाषांतून दुसऱ्या भाषांतील शब्दांचे अर्थ देणारे अनेक कोश आहेत. किंबहुना जगांतील बहुतेक भाषांचे कोश युरोपियन भाषांतून आहेत, असें निर्विवाद म्हणण्यास हरकत नाही. विल्सन, मोनियर विल्यम्स इ.चे संस्कृत–इंग्रजी कोश व अनेक देशी भाषांचे इंग्रजींतील कोश याच सदरांत येतात. युरोपीय भाषांचे परस्पर अर्थ देणारे अनेक कोश आहेत पण अलीकडे शास्त्रीय ज्ञानाची विशेष वाढ झाल्यानें नवीन नवीन शास्त्रीय संज्ञा निरनिराळ्या भाषांत तयार होतात त्यांचे परकीय भाषांत अर्थ देणारे कोश होणें आवश्यक होतें. अशा तऱ्हेचे विशेषतः परकीय भाषेंतील पारिभाषिक संज्ञाकोश मुद्दाम तयार करण्यांत येतात. उदा. आर्थ्रेबेजर स्मायली यांचे जर्मन, फ्रेंच, डच, इटॅलियन या भाषांतील जीवशास्त्रीय परिभाषेचे कोश इंग्रजींत केलेले आहेत. व्यापारासाठींहि असे कोश लागतात. असा बाईथचा इंग्रजी–जर्मन व जर्मन–इंग्रजी कोश असून १९२७ त त्याची दुसरी आवृत्ति निघाली. टॉल्हॉन्सेन याचा एक फ्रेंच, जर्मन, इंग्रजी भाषांतील यांत्रिक शब्दकोश आहे.

शास्त्रीय परिभाषाकोशः—शास्त्रीय ज्ञानाची वाढ झाल्यापासून त्याचा अभ्यास सर्वत्र फैलावला आहे. तेव्हां शास्त्रांतील संज्ञा, प्रमेयें आणि सूत्रें यांची स्पष्ट माहिती देणारे कोश साहजिकच तयार झाले. त्यांपैकीं कांहींचीं नांवें व्यवयाचीं झाल्यास हेंडरसनचा 'डिक्शनरी ऑफ सायन्टिफिक टर्म्स' तसाच १९२८ सालांतील 'दि सायन्टिफिक एन्सायक्लोपिडिया ऑफ फार्म्युलाज' इ. सांगतां येतील. गुदस्ता बडोदें सरकारनें 'श्रीसयाजी शासनशब्दकल्पतरु' या नांवाचा राजव्यवहारांतील शब्दांचा (निरनिराळ्या आठ भाषांतील) कोश प्रसिद्ध केला आहे, हा अशा तऱ्हेच्या कोशांमध्यें फार महत्त्वाचा आहे. या कोशांत शासनविषयक इंग्रजी शब्दाला योग्य असे गुजराथी, मराठी, संस्कृत, उर्दु, फारसी, हिंदी, बंगाली या भाषांतील प्रतिशब्द देऊन शेवटच्या रकान्यांत त्यांतील सर्वांत योग्य असा व सर्व भरतखंडभर वापरला जाईल असा शब्द प्रथम देऊन नंतर दुसऱ्या, तिसऱ्या प्रतीचे शब्द एकाखालीं एक दिले आहेत. या कोशामुळें भरतखंडांत शासनशास्त्रविषयक एक परिभाषा रूढ होण्यास मदत होऊन निरनिराळ्या प्रांतांतील देशी भाषांतीलहि परिभाषाकोश सहज तयार होणार आहेत. व अनेक भाषांतील शब्द एकापुढें एक मांडल्यामुळें योग्य शब्दाची निवड करण्यास फार मोठें क्षेत्र निर्माण झालें आहे. प्रसिद्ध झालेला या कोशाचा भाग प्रयत्नवजा असून यापेक्षांहि याची रचना व्यापक दृष्टीची ठेवण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत या दिशेनें नागरी प्रचारणी सभा वगैरेकडून प्रयत्न होत आहेत. द्वैभाषिक शास्त्रीय परिभाषाकोशासंबंधानें वर माहिती आलेलीच आहे.

भाषाविषयक कोशः—भाषेची व्युत्पत्ति, रचना, घटना, समानार्थक शब्द, वाक्प्रचार यांची माहिती देणारे कोश या सदरांत येतात. इंग्रजी शब्द आणि भाषणसंप्रदाय यांचा संग्रह करणारा पीटर रॉजेट याचा 'थेसॉरस' कोश सुविख्यात असून १९२१ सालापर्यंत त्याच्या २९ आवृत्ती निघाल्या. मराठींत याचें राजकोश नांवाचें रूपांतर चालू होतें, पण पुढें संपादकाच्या मृत्यूमुळें तें बंद पडलें. रॉजेटसारखाच दुसरा क्रॅबचा इंग्रजी समानार्थक शब्दांचा कोश आहे (१८८२) व 'सिग्निफिकंट एटिमॉलॉजी'

हा मिचेलचा व्युत्पत्तिकोश १९१८ सालांतील आहे. 'ए कॉंप्रेहेन्सिव्ह गाइड टु गुड इंग्लिश' (कॅप) यांत वाक्प्रचारांचा योग्य उपयोग दाखविला आहे.

म्हणींचा कोशः--भाषाभ्यासांत वाक्प्रचार व म्हणीहि येतात. यांचेहि कोश बरेच आढळतात. उदा. ब्रुअरचा 'डिक्शनरी ऑफ फेब्लेस अँड फेबल्स' हा कोश. याच्या बऱ्याच आवृत्ती निघाल्या आहेत. त्याचेच दुसरें एक निरनिराळ्या गोष्टींचा, नाटकांतील पात्रांचा, कथानकांचा व व्यक्तींचा संदर्भ सांगणारें हॅंडबुक आहे. आपल्याकडेहि म्हणींचे कांहीं जुने तसेच आपटे व भिडे यांचे नवे कोश आढळतात.

विशिष्ट विषयवार कोशः--अभ्यासाचे अनेक विषय झाल्यामुळें त्या त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांना उपयुक्त असे त्या त्या विषयाचे स्वतंत्र कोश होऊं लागतात. उदा. ऐतिहासिक, रासायनिक, औद्योगिक, पदार्थविज्ञानविषयक, प्राणिशास्त्रीय इ. कोश यांतच. बाल्डविनचा तत्त्वज्ञान व मानसशास्त्र यावरील कोश (३ भाग, १९०१) येतो. 'हयात अल् हयवान' या अरबी बऱ्याच जुन्या प्राणिशास्त्रीय कोशाचें इंग्रजी भाषांतर ले. कर्नेल जयकर यांनीं अबल इंग्रजींत केलेलें आहे. जॉर्ज वाटचा हिंदुस्थानांतील औद्योगिक द्रव्यांचा कोश (१८८९ सालीं रचलेला) ६ भागांत असुन व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्लेझब्रुकचा 'डिक्शनरी ऑफ अप्लाइड फिजिक्स' हा पांच भागांचा पदार्थविज्ञानाचा व्यावहारिक कोश १९२३ त बाहेर पडला. कांहीं कोशांत अनेक विषयांची माहिती दिलेली असते, ते एका प्रकारें ज्ञानकोशच होत. उदा. बाल्फोरचा 'एन्सायक्लोपीडिया ऑफ इंडिया अँड ईस्टर्न अँड सदर्न एशिया' (औद्योगिक, व्यापारी व शास्त्रीय) हा ज्ञानकोश ३ भागांचा आहे. असाच बॉन लायब्ररीनें (१८४८ त) काढलेला एक राजकीय भौगोलिक माहितीचा ज्ञानकोश आहे.

उपभाषाकोशः--भाषेच्या वाढत्या अभ्यासाबरोबर तिच्यामध्यें अंतर्भूत होणाऱ्या उपभाषांचेहि कोश आवश्यक होतात. 'चेंबर्स स्कॉट डायलेक्ट डिक्शनरी' (१९११) अशासारखे प्रांतिक भाषाकोश त्या त्या भाषाभ्यासाला उपयुक्त वाटतात. आपल्याकडे गोमांतकी (कोंकणी) भाषेचे कोश आहेत.

सर्वसंग्रहकोश किंवा ज्ञानकोशः--ज्ञान अतिशय वाढल्याकारणानें तें सर्व मुखोद्गत किंवा डोक्यांत असणें शक्य नसतें, तेव्हां त्याचा थोडक्यांत संग्रह एकेठिकाणीं हाताशीं असावा असें लेखकांना व विद्वानांना वाटूं लागलें व ही गरज भागविलीहि जाते; म्हणजे विविध माहितीचा संग्रह करणारे कोश तयार होतात. याच्याच मोठ्या स्वरूपाला ज्ञानकोश म्हणतात. मोठाल्या ज्ञानकोशांची माहिती सर्वांना आहेच. असे लहान कोश म्हणजे इतिहास-भूगोल-चरित्रविषयक सर्व माहितीचा ब्रिटनचा कोश (४ भाग), सर रिचर्ड फिलिप्सचा 'मिलियन ऑफ फॅक्टस', जर्मनवरून भाषांतर केलेला नेटलशिप-लॅंडिस याचा 'डिक्शनरी ऑफ क्लासिकल ॲंटिक्विटीज' हा कोश (१८९१) इ. आपल्याकडे असे कोश गेल्या शतकांत झाले. तारानाथ तर्कवाचस्पति याचा १० भागांत असलेला 'वाचस्पत्य कोश,' राधाकान्तदेव बहादुर यांचा 'शब्दकल्पद्रुम' (कलकत्ता शके १८०८) हे मोठे संस्कृत कोश ज्ञानकोशाच्या स्वरूपाचेच असुन भारतीय पांडित्यास भूषणभूत आहेत.

याप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रामध्यें विशेषतः इंग्रजी भाषेमध्यें शब्दांच्या टिप्पणी व याद्यांपासुन हळूहळू सर्वांगपरिपूर्ण कोश करण्याकडे कसकशी प्रवृत्ति होत गेली व कोशरचनाविषयक कल्पनांची वाढ कशी झाली यांचें थोडक्यांत समालोचन केलें आहे. यावरून आजची भाषाविषयक संपूर्ण कोशाची कल्पना म्हणजे भाषेतील प्रचलित अथवा लुप्त असलेल्या प्रत्येक शब्दाचें चरित्र त्याची निरनिराळ्या काळचीं निरनिराळीं रूपें त्याचे निरनिराळ्या काळीं बदलत गेलेले अर्थ वगैरे आधारांसह देणें, मूळ तो शब्द कोणत्या भाषेतून व कोणत्या स्वरूपांतून आला हें दाखविणें इत्यादि सर्वांगांची परिस्फुटता करून देणें हा असुन ऑक्सफोर्ड कोश हें त्याचे उदाहरण आहे ही गोष्ट निर्दिष्ट केली आहे. तसेंच राष्ट्राचे निरनिराळे व्यवहार जसे व्यापक होत जातात व ज्ञानाची वाढ जसजसी विविध अंगांनीं होते तसतसे शब्दकोशाबरोबरच इतर अनेक ज्ञानांगांचें संदर्भसुलभ स्पष्टीकरण करणारे अनेक कोश तयार होऊं लागतात व अनेक भाषांचा जेथें संनिकर्ष होतो तेथें द्वैभाषिक, त्रैभाषिक अगर बहुभाषिक कोश कसे तयार होतात त्यांचींहि कांहीं उदाहरणें वर दिलीं आहेत. इंग्रजी वगैरे यूरोपीय भाषांतून असे अनेक प्रकारचे असंख्य कोश दरवर्षी प्रसिद्ध होत आहेत. यापेक्षां या कोशांच्या निरनिराळ्या प्रकारांचें दिग्दर्शन करण्यास येथें अवकाश नाहीं. आतां आपल्या मराठी भाषेच्या कोशासंबंधीं आपल्याकडे काय कल्पना दिग्दर्शित झाल्या आहेत व कोशरचनेच्या बाबतींत आजपर्यंत कोणकोणते प्रयत्न झाले आहेत त्यांचें थोडक्यांत समालोचन करूं.

कै. वि. का. राजवाडे यांनीं सरस्वतीमंदिर मासिकांत (शक १८२७ श्रावण, पृ. १-१४,) 'राष्ट्रीय मराठी कोश' म्हणून एक लेख लिहिला होता. त्यांत त्यांनीं आपली संपूर्ण मराठी कोशाची कल्पना नमूद करून ठेवली आहे. तिचा येथें सारांशानें उद्धार करून विचार करणें अस्थानीं होणार नाहीं.

'संपूर्ण व राष्ट्रीय मराठी कोश रचणारानें खालील गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. (१) भाषेंत रूढ झालेल्या नव्या व जुन्या, लुप्त व प्रचलित, ग्राम्य व सभ्य, राष्ट्रीय व प्रांतिक, एकोणएक शब्दांचे संक्षिप्त, समर्पक व अव्याप्त्यतिव्याप्त्य-संभवादिदोषरहित अर्थ दिले पाहिजेत. (२) मराठी शब्दांतील अक्षरांचे उच्चार योग्य संकेत ठरवून द्यावे. (३) कोणता शब्द कोणत्या भाषेंतून आला तें संकेतानें दाखवावें. हें काम कोशकाराला सुलभ व्हावयाला मराठीची समग्र व्युत्पत्ति अगोदर तयार झाली पाहिजे. (४) रूढ होऊन बसल्यामुळें जे सामासिक शब्द एका शब्दासारखे भासतात त्यांखेरीज इतर असंख्य सामासिक शब्द देऊं नयेत. (५) संहितशब्द देऊं नये. तें व्याकरणाचें काम आहे. (६) नामरूपें व धातुरूपें देऊं नयेत. तें व्याकरणाचें काम आहे. (७) ग्रंथनामें, थोर पुरुषांचीं नामें, प्रसिद्ध स्थलांचीं नामें, पौराणिक पुरुषांचीं व स्थलांचीं नामें, वनस्पतींचीं, धातूंचीं, द्रव्यांचीं, माशांचीं, दगडांचीं वगैरे पारिभाषिक नांवें भाषाकोशांत देऊं नये. व्यावहारिक नांवें तेवढीं द्यावीं. ग्रंथकोश, महन्नाममाला, स्थलकोश, पुराणकोश, वनस्पतिकोश, रसायनकोश, प्राणिकोश, मच्छकोश, पक्षिकोश, दशल्कोश वगैरे कोश स्वतंत्र असतात. भाषाकोशांत इतर शास्त्रांतल्या व विषयांतल्या विशेषनामांचा संग्रह अप्रस्तुत व अनवस्थ होय. (८) छंदःशास्त्र, व्याकरणशास्त्र, उच्चारशास्त्र कोशांत देण्याची जरूर नाहीं. (९) वाच्यार्थाव्यतिरिक्त लक्ष्यार्थ व व्यंज्यार्थ कोशांत देऊं नयेत. जे लक्ष्यार्थक शब्द वाच्यार्थक शब्दांच्या स्थितीला आले ते अवश्य द्यावे. (१०) शब्दांचा उपयोग दाखविण्याकरितां ग्रंथांतील वाक्यांचा उद्धार कोशांत करूं नये. हें काम कोशाचें नाहीं. साहित्यशास्त्राचें आहे. (११) भाषेंत जो शब्द नाहीं तो कोशकारानें नवीन बनवून घालूं नये. भाषेंत जो शब्द आहे तो कोशकारानें वगळूं नये. (१२) सभ्य शब्दाचा ग्राम्य उच्चार निराळा शब्द मानूं नये. परंतु ग्राम्य शब्द रूढ झाल्यास निराळा स्वतंत्र शब्द मानावा. (१३) परधर्मीयांनीं परदेशस्थानीं व पतितांनीं स्वभाषेंतील किंवा परभाषेंतील भ्रष्ट केलेले शब्द कोणत्याहि राष्ट्रीय कोशांत घेण्यास योग्य नाहींत.'

याप्रमाणें कै. राजवाडे यांनीं राष्ट्रीय कोशाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. त्यांतील कांहीं लक्षणें सर्वमान्य असून कांहीं मात्र अर्वाचीन दृष्टीच्या कोशकारांस मान्य होण्यासारखीं नाहींत; उदाहरणार्थ अवतरणें हीं आजकाल प्रत्येक कोशास आवश्यक समजलीं जातात व निरनिराळया अर्थाचें स्पष्ट ज्ञान होण्यास–विशेषतः जे अर्थ लुप्त झाले असतील त्यांच्या बाबतींत तर–त्यांचा अत्यंत उपयोग होतो. 'संस्कृत कोशांत कोशकार ग्रंथोद्धारांचें काम करीत नाहीं. कोशाचा टीकाकार करतो.' असें कै. राजवाडे यांनीं आपल्या विधानाचें समर्थन केलें आहे व त्याला चार कारणें दाखविलीं आहेत. (१) व्याकरण, छंद, अलंकार, कोश यांचे प्रांत भिन्न आहेत असें ते समजतात. (२) सूत्रपद्धति त्यांच्या हार्डीमार्शी खिळली आहे. त्यामुळें वायफळ व विस्तृत लिहिण्याला अवकाश नसतो. (३) बहुतेक सर्व कोश वृत्तरूप आहेत. (४) कोश विद्यार्थ्याकडून तोंडपाठ करून घ्यावयाचे असतात.' परंतु संस्कृत कोशांचें जें प्रयोजन तत्कालीन लोक समजत असत त्यांत व सध्यां जे निरनिराळया भाषांचे कोश होत असतात त्यांच्या प्रयोजनांत फरक आहे. व संस्कृत कोशकारांचा भाषेंतील सर्व शब्दांचा संग्रह करण्याचा आग्रह नसे आणि त्यावेळीं भाषेचें क्षेत्रहि मर्यादित असून कोश तोंडपाठ करणें ही गोष्ट त्यावेळीं जशी सुलभ व शक्य होती तशी ती आतां वाढत्या भाषांच्या बाबतींत राहिली नाहीं. त्यांत प्रत्येहीं नवीन नवीन शब्द निर्माण होत आहेत आणि ज्ञानाचा संग्रह तर इतका वाढत आहे कीं, पाठ करावयाच्या गोष्टींमध्यें कोशाचा समावेश होणें अशक्य आहे. 'राष्ट्रीय कोश अगडबंब असलाच पाहिजे अशी युरोपियन कल्पना आहे. वेब्स्टरच्या इंग्रजी कोशाला अमरकोशाची बरोबरी करतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे' अशीहि त्यांनीं टीका केली आहे. पण वाढत्या भाषेबरोबर कोशाचा आकारहि वाढणें जरूर असून अमरकोश व वेब्स्टरकोश यांचे काल व प्रयोजनें इतकीं भिन्न आहेत कीं त्यांची तुलना करणेंच योग्य होणार नाहीं. तसेंच 'व्युत्पत्ति वगैरे अप्रस्तुत प्रकरणांचें निष्कारण प्रदर्शन करण्यांतच कोशाचें सर्वस्व आहे असें युरोपियन कोशकारांचें मत दिसतें तें अशास्त्र आहे. व रानांतून आणलेल्या औषधींचा काढा करण्याचें काम चालू असतां त्या औषधींच्या उत्पत्तीचें, वृद्धीचें, संकराचें व रंगाचें बारीक वर्णन एखाद्या काकूबाईपुढें करणारे वैद्यराज जितके अप्रयोजक तितकेच हे युरोपियन कोशकार होत', अशी टीका त्यांनीं केली आहे तीहि आज कोणास मान्य होणार नाहीं. त्यांचें म्हणणें: 'शब्दांची व्युत्पत्ति, रचना, समास, रूपें वगैरे बाबींचा विचार करण्याचें काम व्याकरणाचें आहे. त्यांत कोशकारांनीं हात घालण्याचें प्रयोजन नाहीं.' परंतु सध्यां आपण भाषेची निरनिराळया अंगानें होणारी वाढ लक्ष्यांत घेतली तर संदर्भसुलभ व प्रत्येक शब्दाचा थोडक्यांत इतिहास देणारा कोश म्हणजेच सर्वांगपरिपूर्ण कोश होय हीच कल्पना मान्य होत चाललेली दिसते व पूर्वीच्या संस्कृत कोशांची योग्यता कितीहि मोठी असली तरी वाचकास एखादा संस्कृत ग्रंथ वाचीत असतां एखाद्या शब्दाचा अर्थ ज्ञातव्य असेल तर तो अमरकोशापेक्षां आपटे किंवा मोनियर विल्यम्स याच्याच शब्दकोशाकडे प्रथम धांव घेईल हें विसरून चालावयाचें नाहीं.

मराठी कोश––इतर कोशांप्रमाणें मराठीचेहि एकभाषिक (मराठी–मराठी) व द्वैभाषिक (मराठी–इंग्रजी, इंग्रजी–मराठी, कानडी–मराठी इ.) असे दोन प्रकार पडतील. एकभाषिककोश द्वैभाषिकांपेक्षां संख्येनें फार थोडे आहेत. याचें बव्हंशीं

कारण ज्ञानाच्या प्राथमिक अवस्थेंत स्वतःची भाषा शिकण्याला स्वभाषेचे कोश वापरण्याची फारशी जरूरी भासत नसे; केवळ ज्ञानेश्वरी, महानुभावी ग्रंथ, मोरोपंती काव्य इत्यादिकांचा अभ्यास करण्याला अशी शब्दार्थाची फोड करणाऱ्या कोशाची एखादेवेळेस जरूरी भासत असेल, पण पूर्वी धार्मिक ग्रंथांचा परिचय गुरुमुखानें होत असल्यानें अभ्यासकाला स्वतः कोश शोधण्याची गरजच पडत नसे. असो, सांगावयाचा मुद्दा असा कीं, ज्याची जी स्वभाषा नाहीं त्याला ती शिकण्यासाठीं, विशेषतः परभाषक राज्यकर्त्यांसाठीं द्वैभाषिक कोशांची अत्यंत जरूरी असते व त्यामुळें असे कोश एकसारखे तयार होत असतात. मुसुल्मानी अमदानींत फारसी संस्कृत कोश झाले व शिवकालांत राजव्यवहार कोश तयार झाला ही गोष्ट याच प्रवृत्तीची द्योतक आहे. इंग्रज राज्यकर्त्यांनीं मिशनऱ्यांकडून असे द्वैभाषिक कोश देशी भाषा समजण्यासाठीं मोठ्या खर्चानें व प्रयत्नानें तयार करविले. मिशनऱ्यांनाहि येशूचा धर्म वाढविण्यासाठीं देशी भाषांतून बायबल व प्रवचनें भाषांतरावयाचीं असत; त्यांना स्वतः धर्मोपदेशासाठीं या भाषा शिकाव्या लागत; तेव्हां देशी भाषांचे इंग्रजी कोश फार लवकर प्रसिद्ध झाले. त्यांच्या दोन दोन, तीन तीन आवृत्तीहि निघाल्या, व उपलब्ध कोशांत तेच मोठे व प्रमाणभूत ठरले. पण त्यांवरच आजपर्यंत आपणास अवलंबून बसावें लागलें आहे ही आपल्याला अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे यांत शंका नाहीं.

एकभाषिक मराठी कोश, ब्रिटिश अमदानीपूर्वीः—मराठी भाषा साधारणपणें प्रौढवाङ्मयीन भाषा होण्याचा काळ म्हणजे यादवकाळ होय. या काळांत कांहीं शुद्ध मराठी कोश—अर्थात संस्कृतच्या धर्तीवर—नाथपंथीय, महानुभावी व हेमाद्री संप्रदायी पंडितांनीं केलेले असावेत. महानुभाव ग्रंथकारांनीं रचलेला एक मध्ययकालीन मराठी शब्दांचा कोश कै. वि. का. राजवाडे यांच्या पहाण्यांत होता असें ते लिहितात (राष्ट्रीय मराठी कोश—सरस्वतीमंदिर, श्रावण, १८२७). हा गद्य कोश असून यांतील शब्दार्थ सुबोध असल्यांचें ते सांगतात. बहुधां हा महानुभावी ग्रंथावरील टिप्पणींचा संग्रह असावा. यानंतरचा एक ज्ञानेश्वरीकोश राजवाडेयांना मिळाला होता. तो तीनशें-सवातीनशें वर्षांचा जुना असून त्यांत ज्ञानेश्वरींतील दुर्बोध शब्द अकारविल्यानें दिलेले आहेत व त्यांचे प्रतिशब्द अर्वाचीन मराठींत आहेत. पण विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे यांत दोनचार ठिकाणीं याहून प्राचीन कोशांचा हवाला दिलेला आढळतो, असें ते लिहितात. पण या कोशांचा सध्यां कांहीं मागमूस नाहीं. असे कांहीं प्राचीन मराठी कोश त्यावेळीं खात्रीनें असावेत असें बाराव्या शतकातील मराठी भाषेच्या प्रौढ स्थितीवरून वाटतें. तथापि हे सर्व लव्हानसहान व विशिष्ट मर्यादेचे व उपयोगाचे असावेत.

महाराष्ट्र भाषेचा कोश, ब्रिटिश अमदानीः—या अमदानींत म्हणजे १९ व्या शतकारंभापासून आजतागायत कोश या प्रौढ नांवाला शोभणारा पहिला एकभाषिक कोश म्हणजे शास्त्रीमंडळीनीं केलेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' होय. या कोशाचा प्रथम भाग (अ—न) इ. स. १८२९ त मुंबई शिक्षामंडळीच्या शिळाछापखान्यांत छापला आहे. याचे संपादक (१) जगन्नाथशास्त्री कमवंत, (२) बाळशास्त्री घगवे, (३) गंगाधरशास्त्री फडके, (४) रामचंद्रशास्त्री जानवेकर, (५) सखाराम जोशी, (६) दाजीशास्त्री शुक्ल आणि (७) परशुरामपंत गोडबोले हे (मुंबईचे शिक्षामंडळीचे आज्ञांकित पंडित) असून यांनी शिक्षामंडळीचे (बॉबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी) आज्ञेवरून हा रचिला.

या कोशाला आधारभूत झालेले ग्रंथ दिले नाहींत. 'महाराष्ट्र भाषा म्हणजे महाराष्ट्रदेशीं राहणारे जे देशस्थ ब्राह्मणादिक लोक त्यांची बोलायाची प्राकृत भाषा' याप्रमाणें या कोशकारांनीं मराठी भाषेची व्याख्या केली आहे व कोशाचें कारण पुढीलप्रमाणें दिलें आहेः—'आजपर्यंत ह्या भाषेवर कोश, व्याकरण करावयास कोणी प्रवृत्त झाला नाहीं हें मनांत आणून सर्व लोकांचे कल्याणार्थ राजकार्यधुरंधर प्रजापालनैकरत हानरबल मौंट स्त्युवर्त एलफिन्स्तनसाहेब पात्रण आणि गवर्नर यांनीं मुंबईतील शिक्षाशाळामंडळीस आज्ञा करून हा ग्रंथ बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजी शास्त्री शुक्ल आणि परशुरामपंत बोडबोले यांचे हातून करावयास आरंभिला. पुढें त्यांचेच हातून प्रतापसिंह परमकारुणिक हानरबल जनराल सिरजान मालकमसाहेब बहादुर पात्रण आणि गव्हनैर यांनीं शेवटास नेला.' कोशांत घेतलेल्या शब्दांबद्दल 'जितका लोकांचा व्यवहार आढळांत आला तितक्यांचें बुद्धीनें आकलन करून' असा उल्लेख कोशकारांनीं केला आहे. प्रांतिक पोटभाषा व त्यांतील शब्द यांची फोड पुढीलप्रमाणें केली आहेः—'महाराष्ट्रदेशाचा मध्यभाग म्हटला असतां प्रायः पुणें प्रांत होतो. अतएव पुणें प्रांतीं जे शब्द प्रसिद्ध आहेत ते प्रायः सर्व महाराष्ट्रदेशभर प्रसिद्ध असें समजून ते शब्द प्रांताचे खुणेवांचून लिहिले आहेत.' बाकीचे प्रांतिक शब्द जे घेतले आहेत त्या प्रांतांचीं नांवें व मर्यादा कोशकारांनीं खालीलप्रमाणे दिलीं आहेतः—(१) देश (गंगथडी धरून पंढरपुरच्या आसपासचा प्रदेश), (२) कोंकण (मुंबईपासून बाणकोटचे खाडीपावेतों), (३) राजापूर (बाणकोटचे खाडीपासून मालवणपर्यंत), ४ वाडी (सावंतवाडीच्या आसपासचा प्रांत). ग्रंथांचा उल्लेख नांवानें न करितां सर्व ग्रंथोल्लेखनांचा सामान्यत्वें ग्रंथी या नांवाचा संक्षेप 'ग्रं.' असा वापरला आहे. उदा. 'अंतुरी' या शब्दापुढें 'ग्रं.' असा संक्षेप आहे.

व्यवहारांत क्वचित येणाऱ्या संस्कृत शब्दांचा समावेश केला नाहीं. 'ज्या' ऐवजीं ह्या कोशकारांनीं 'जा' असें रूप सर्रास वापरलें आहे. उदा. 'म्हणून जा अर्थाचा वाचक शब्द या भाषेंत प्रसिध्द नाहीं तो अर्थ प्रतिपादायाचा असतां त्याविषयीं संस्कृत शब्द योजितात.'

फारसी, अरबी वगैरे मुसलमानी भाषेंतील शब्दांवर कोशकारांचा विशेष कटाक्ष आहे. त्यांच्यामतें हे शब्द मराठी भाषेंत 'राजकीय व्यवहाराचे अनुरोधानें आले, म्हणून राजकीय व्यवहारींच ... शोभतात. इतर साधारण व्यवहारीं सरासरी ते बरे दिसतात, परंतु शास्त्रीय व्यवहारादिसंबंधीं प्रौढ म्हणून जी भाषा तींत तर अगदींच शोभत नाहींत, याकरितां प्रौढ भाषेंत ते शब्द घेऊं नयेत.'

या कोशाची आंतररचना अशीः —'अ' मध्येंच 'अं' चा समावेश संस्कृतप्रमाणें केला आहे. पण 'क्ष, ज्ञ' हीं वस्तुतः जोड अक्षरें परंतु लोकव्यवहारानुसार हे वर्ग पृथक् मानून या क्रमानें लिहिले.

ह्न, ह्म, ह्र, ह्ल हीं अक्षरें संस्कृत शब्दांत असतां हकारादिक. आणि प्राकृत शब्दांत असतां 'न' कार 'म' कारादिक असतात ही व्यवस्था धरून तद्विशिष्ट शब्द वर्णक्रमानुरोधानें त्या त्या स्थानीं लिहिले आहेत.

कोंकणी, राजापुरी, वाडी अशा तीन पोटभाषा, वनस्पती, प्राणी, खाद्य वगैरेंचे थोडे थोडे शब्द यांत आहेत. कांहीं संतकवींच्या काव्यांतील शब्द तुरळक आढळतात. व्युत्पत्ति मुळींच दिली नाहीं (क्वचित दहा-बारा ठिकाणीं आढळते). ग्रंथांचा उल्लेख किंवा त्यांतील अवतरणें दिलीं नाहींत. ऐतिहासिक शब्द नाहींत; इंग्रजी रूढ शब्द नाहींत (आज जे रूढ आहेत ते त्यावेळीं रूढ नव्हते). इंग्रजी शास्त्रांतील नवीन पारिभाषिक शब्द तेव्हां रूढ नसल्यानें आलेले नाहींत. शब्दांचे अर्थ व्याख्यारूपानें पंडिती भाषेंत दिले असल्याकारणानें ते क्लिष्ट व बोजड झाले आहेत.

कै. राजवाडे यांबद्दल जगन्नाथशास्त्री क्रमवंतास दोष देतात; पण मोलस्वर्थेच्या इंग्रजी-मराठी कोशाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत या कोशाच्या रचनेचा जो खुलासा आहे त्यावरून असें दिसतें कीं, शास्त्री मंडळी केवळ युरोपियन पंडितांच्या सांगण्याप्रमाणें त्यांना मदत करीत होती.

हंसकोश—हा कोश म्हणजे महाराष्ट्रभाषेच्या कवितांतील कठिण व निवडक शब्दांचा कोश. हा रघुनाथ भास्कर गोडबोले या प्रसिद्ध कोशकारानें सन १८६३ त रचला. याला आधारग्रंथ विवेकसिंधु, परमामृत, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, रुक्मिणीस्वयंवर, मुक्तेश्वर, दासबोध, आगमसार, पंचिका, सदाचार, वाक्यवृत्ति, रामविजय, शिवलीलामृत, मोरोपंत-आर्या, वामन-श्लोक, इ. जुने वेदांतपर काव्यग्रंथ होत. यामुळें ते ग्रंथ वाचण्यास याचा फार उपयोग व्हावा हें साहाजिक आहे. या कोशाची रचना थोडक्यांत अशीः—१ एकूण शब्दसंख्या सात हजार आहे. २ मराठी कवितेंतील शब्दास लागणारे प्रत्यय, विशेषणें, अव्ययें, क्रियापदविचार, अर्थ (विध्यर्थे वगैरे), यमकें, छंद, कविरूढी, संस्कृत-प्राकृत शब्दांचा मराठींतील अपभ्रंश, कवितेबद्दलचे कांहीं नियम इ. उपयुक्त टिपणें प्रस्तावनेंत दिलीं आहेत. ३ मराठी भाषेंतील किंवा व्यवहारांतील शब्द नाहींत. ४ व्युत्पत्ति न देतां फक्त शब्दाचें मूळ (सं, प्रा.) तेवढें दाखविलें आहे. ५ अत्यंत आवश्यक अवतरणें दिलीं आहेत, बाकी नुसते स्थलोल्लेख आहेत, ६ "अ" मध्यें "अं" घातला आहे; क्ष व ज्ञ स्वतंत्र ठेविले आहेत. ७ बहुतेक वेदांतग्रंथांतील शब्द असल्यानें संस्कृत शब्दांचा भरणा जास्त आहे. ८ कांहीं ठिकाणीं संस्कृत शब्द तोडण्यांत चूक झाली आहे. उ. 'जय जय देव श्रीगुरो। अकल्पनाख्य कल्पतरो। स्वसंविद्द्रुमबीजप्ररो-। हणावनी॥' अशी ज्ञानेश्वरींत (१८.१०) एक ओवी आहे. तींतील हणावनी हा शब्द स्वतंत्र धरून कोशकारानें 'हणावनी' म्हणजे 'आवड' असा अर्थ दिला आहे. अशा कांहीं चुका आढळतात. यांतील कांहीं शब्दांचे अर्थहि चुकीचे आढळतात. तसेंच 'अ' नें आरंभ होणारे शब्द 'आ' मध्यें व 'आ' नें आरंभ होणारे कांहीं शब्द 'अ' मध्यें असें जें झालेलें दिसतें तें अशुद्ध पोथ्यांच्या प्रतींमुळें असावें.

रत्नकोश—कर्ता बालकृष्ण मल्हार बीडकर. हा १८६९ त छापलेला आहे. हा कोश केवळ मराठी शाळांतील विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडावा म्हणून केला असल्यामुळें यांत फक्त मराठी क्रमिक सहा पुस्तकांतील शब्दांचा संग्रह केला आहे. विशिष्ट वर्गासाठीं विशिष्ट मर्यादेचे कोश होण्यास सुरवात झाली होती हें या व मागील हंसकोश यांवरून दिसून येतें.

मराठी भाषेचा नवीन कोश—यालाच राजवाडे सुबह कोश म्हणतात. हा १८७० त रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं, मुंबई सरकारच्या विद्याखात्याच्या हुकुमावरून छापला आहे. विद्यार्थ्यांना उपयोगी पडावा एवढीच व्याप्ति यांत ठेविली आहे. याचा मुख्य आधार म्हणजे शास्त्र्यांचा कोश. त्याच्यांतील 'ज्यांचा नेहमींच्या भाषणांत उपयोग नाहीं असे फार अवघड जे शास्त्रीय संस्कृत शब्द व ज्यांचा अर्थ सहज मनांत येतो असे साधारण शब्द गाळून' हा कोश केला आहे. तसेंच हंसकोशहि यांत सामील केला आहे. शिवाय अरबी, फारशी, व्यावहारिक शब्द यांत दिले आहेत. यांत पोटभाषेंतील शब्द नाहींत, व्युत्पत्ति नाहीं, अवतरणें किंवा त्यांचे उल्लेख नाहींत.

शुद्ध मराठी कोश—सन १८९१. कर्ते विष्णु रामचंद्र बापट व बाळकृष्ण विष्णु पंडित. प्रकाशक गोंधळेकर, जगद्वितेच्छु छापखाना, पुणें. याला मोलस्वर्थ, गोडबोले, हंस या कोशांचे साहाय्य घेतलें असावें असें वाटतें. यांत मूळ शब्दाची व्युत्पत्ति समग्र न देतां शब्दाच्या मूळ भाषेचें नांव तेवढेंच दिलें आहे. शास्त्रीय पारिभाषिक, पशुपक्षी व वनस्पतिविषयक वगैरे शब्द यांत आले आहेत. ज्ञानेश्वरी वगैरे जुन्या ग्रंथांतील शब्द व रूढ इंग्रजी शब्द दिलेले नाहींत. हा कोश निव्वळ शालोपयोगी वाटतो.

नामजोशी कोश—हा समग्र अप्रसिद्ध असून याचा उपयोग प्रस्तुत कोशास मात्र करतां आला. लो. टिळकांचे परमस्नेहि व १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अनेक विधायक चळवळींचे उत्पादक माधवराव नामजोशी यांनीं मोठ्या 'मराठी मराठी' कोशाची उणीव जाणून हा कोश तयार करण्यास आरंभ केला व कामाची पहिली पायरी म्हणून मोलस्वर्थच्या मराठी–इंग्रजी कोशाचें संपूर्ण शब्दशः भाषांतर करून घेतलें; व त्यांत हंसकोशाची भर घातली. याशिवाय शेतकी मासिक, निबंधमाला, शिल्पविद्या, मोरोपंत, वामन इ. काव्यग्रंथ वाचून त्यांतील अवतरणें घेतलीं. आणखी अनेक ग्रंथ वाचून व धंदे, कला, उपभाषा इत्यादींची भर यांत घालून प्रस्तुत कोशाप्रमाणें हा मोठा मराठी कोश रचण्याचा त्यांचा फार स्तुत्य व अवाढव्य प्रयत्न इतर चळवळींप्रमाणें त्यांच्या अकाली मृत्यूमुळें अपुरा राहिला. लो. टिळकांचे ज्येष्ठ चिरंजीव रा. रामचंद्र बळवंत टिळक यांनी याची 'संपूर्ण प्रत आम्हांस उपयोगास दिली याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

मराठी शब्दरत्नाकर—अथवा मराठी शब्दांचा मराठींत अर्थ देणारा कोश (इ.स. १९२२ आवृत्ति १ ली; १९३२ आवृत्ति दुसरी). सुप्रसिद्ध बालमासिक 'आनंद' याचे संपादक व अनेक विषयांवरील लेखक कै. वासुदेव गोविंद आपटे यांनीं हा कोश रचिला. पोथ्या, कागदपत्रें पहात असतां त्यांत अपपाठ व चुकीचे अर्थ आढळले म्हणून १९०८ पासून त्यांनीं या कोशास आरंभ केला. ५।७ वर्षे एकट्यानींच काम केलें. डॉ. भांडारकर, रा. ब. महाजनी, गणपतराव आगाशे, हरिभाऊ आपटे, जोगवुवा, दी. वि. माडगांवकर वगैरे मंडळींचा सल्ला घेतला, तुकाराम सोसायटीचें दप्तर चाळलें, नंतर अलीकडील शब्द गोळा केले. कांहीं संत वाङ्मय, लावण्या, पोवाडे व शास्त्रीकोश, मोलस्वर्थ–कॅंडीकोश, गोडबोल्यांचा हंसकोश व मराठी भाषेचा नवीन कोश हे कोश त्यांनीं आधारास घेतलेले दिसतात. जुन्या संतवाङ्मयांतील एकूणएक कठिण शब्द घेण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. फक्त कांहीं ढोबळ शब्द घेतले आहेत व हंसकोशाप्रमाणें त्यांचा अर्थ दिला आहे. प्रादेशिक, संख्यावाचक, औषधें, वनस्पती, प्राणी, खाद्य इ० शब्द यांत नाहींत. व्युत्पत्तीकडेहि फारसें लक्ष दिलें नाहीं. परिशिष्टांत राजवाडे वगैरेंनीं सुचविलेल्या २००० शब्दांच्या व्युत्पत्ती दिल्या आहेत. अवतरणें नाहींत. कांहीं ठिकाणीं–बहुधा हंसकोशांतील–नुसता स्थलनिर्देश आहे. ऐतिहासिक कागदपत्रांतील अपरिचित शब्द अजीबात गाळले आहेत. 'मराठी भाषेची शब्दसंपत्ति' नांवाचा एक निबंध कोशाला जोडला आहे, त्यांतील कांहीं विधानें जरी वादग्रस्त असलीं तरी तो परिश्रमपूर्वक लिहिला आहे एवढें खरें. वाक्प्रचार व म्हणी फारच कमी आहेत. इंग्रजी रूढ शब्द घेतले आहेत. उ. इंजिनियर, इंजिन, टेबल, तिकीट, कोर्ट, बूट इ. ज्या देशी किंवा मराठी प्रांतिक पोटभाषेच्या शब्दांचा निर्णय करतां आला नाहीं त्यांचें मूळ प्राकृत असें दिलें आहे. मात्र परभाषांचा (इंग्रजी, अरबी, कानडी गुजराथी, तामिळ, तेलुगु, फारशी, हिंदी, उर्दू एवढ्यांचा) उल्लेख केला आहे. इंग्रजी शास्त्रीय शब्दांना मराठी पारिभाषिक शब्द नाहींत. शब्दांचा अर्थ बहुधा एका (फार तर तीन) प्रतिशब्दावर भागविला आहे. याची पहिली आवृत्ति फार झपाट्यानें खपली. पण विद्यार्थ्यांकरितां 'शब्दार्थचंद्रिका' म्हणून काढलेली छोटी आवृत्ति मात्र पडून राहिली. दुसरी यंदाच श्री. लेलेशास्त्री यांजकडून सुधारून घेतलेली प्रसिद्ध झाली आहे. पण तींत प्रांतिक शब्द गाळले आहेत. जोड संस्कृत शब्द गाळले आहेत. एकंदर तीन खंड केले आहेत. (१) अ ते न, (२) प ते प व (३) स ते ज्ञ. शिवाय एक पुरवणी (३८ पानें), एक परिशिष्ट, (विशेषतः राजवाडे यांच्या व्युत्पत्तींच्या शब्दांचें, २१ पानें) व प्राकृत ग्रंथांतील जुन्या मराठी भाषेचें स्थूल नियमांचें दुसरें परिशिष्ट (६ पानें) दिलें आहे.

मराठी भाषेचा वज्रकोश—संपादक गोपाळ बाबाजी जोशी, महाडकर. हा कोश शालोपयोगी कोशांत मोठा आहे. याची व्याप्ति फार मर्यादित आहे.

मराठी भाषेचा सरस्वतीकोश—(सन १९३०) संपादक विद्याधर वामन भिडे, प्रकाशक चित्रशाळा, पुणें. हा कोश शब्दरत्नाकराहून मोठा आहे. आरंभी जें मोठा संपूर्ण कोश करण्याचें धोरण आंखलें होतें तें लगेच सोडून दिलेलें दिसतें. मोलस्वर्थच्या कोशांतीलहि सर्व शब्द यांत घेतलेले नाहींत. संस्कृत शब्दांचे मराठींत न येणारे सर्व अर्थ देऊन उगाच जास्त जागा अडविली आहे. अशिक्षित लोकांच्या तोंडचे शब्द बरेचसे घेतले आहेत. याचप्रमाणें जर प्रांतिक भाषांतील घेतले असते तर चांगलें होतें. कांहीं ठिकाणीं व्युत्पत्ति जी उघड आहे ती दिली आहे, पण इतर शब्दांच्या बाबतींत मुळींच प्रयत्नहि केला नाहीं. अर्थस्पष्टीकरणार्थ लहान लहान उदाहरणें कोशकारानीं स्वतः बनवून दिलीं आहेत. थोडीशीं पूर्वीच्या कोशांतून जशींच्या तशींच,

वेळीं किरकोळ फरक करून घेतलीं आहेत. अनुकरणवाचक शब्द फारच थोडे दिले आहेत, संतकवींनीं आपल्या काव्यांत योजिलेले परंतु सध्यां प्रचारांत नसलेले असे शब्द पहिल्या ७५ पानापर्यंत देऊन पुढें प्रकाशकाच्या सांगण्यावरून ते गाळले आहेत; बखरी, ऐतिहासिक कागदपत्र, यांतील शब्द घेतले नाहींत. धंद्यांचे व शास्त्रीय शब्दहि समाविष्ट केले नाहींत. 'मराठी भाषेची उत्पत्ति' या नांवाचा एक छोटासा निबंध जोडला आहे त्यांत ऐतिहासिक बाबतींत पुष्कळच चुका आहेत. कोशास परिशिष्टें जोडलीं आहेत त्यांत काव्यांतील वृत्तें, ज्योतिषविषयक माहिती व हिंदूंचे सण ही माहिती दिली आहे. हा कोश असावा तसा पूर्ण नाहीं अशी तक्रार गैरवाजवी नाहीं.

यांखेरीज कांहीं शालोपयोगी कोश आहेत पण ते येथें उल्लेखिण्याजोगे महत्त्वाचे नाहींत. शब्दरत्नाकर किंवा सरस्वती-कोश तयार झाले ती वेळ राजवाडयांच्या योजनेप्रमाणें मोठा 'राष्ट्रीय मराठी कोश' करण्याचीच वास्तविक होती. पण एवढें मोठें अवघड कार्य शिरावर घेण्यास कोणी व्यक्ति किंवा संस्था तयार नव्हत्या यामुळें असे लहान लहान कोश कसेतरी बाहेर पडून पुढें मोठा कोश निघून खपण्याचा मागेहि थोडा अडथळा टाकला.

द्वैभाषिक मराठी कोश. ब्रिटिश अमदानीपूर्वीः—हेमाद्रीच्या रघुवंशावरील टीकेंत कित्येक संस्कृत शब्दांना मराठी पर्याय दिलेले आढळतात. तेव्हां मराठी जाणणाऱ्यांसाठींच हा प्रयत्न असला पाहिजे हें उघड आहे. यावरून द्वैभाषिक कोशांचें अस्तित्व शक १११० पर्यंत मागें जातें. १३ ते १६ व्या शतकांत महाराष्ट्रांत जेव्हां मुसलमानी अंमल होता तेव्हां राजा-प्रजा यांना परस्परांची भाषा कळण्यासाठीं फारसी-मराठी व मराठी-फारसी कोश तयार झाले असले पाहिजेत. लोकांच्या बोलण्यांतहि हाटबाजार, हुडाबुरूज, पोथीकिताब, चीजवस्त इ. समानार्थक मराठी-फारसी सामासिक शब्द आलेले होते. ऐन मुसलमानी अंमलांत मराठीचें फारसीकरण तर ऐन मराठी अमदानींत फारसीचें मराठीकरण चालू होतें. राजव्यवहारकोश हा दुसऱ्या प्रकारचें उदाहरण म्हणून सांगतां येईल. सरकारी अधिकाऱ्यांजवळ असे द्वैभाषिक हस्तलिखित कोश असत. यांपैकीं कांहीं इतिहाससंशोधकांना सांपडलेले आहेत. फारसी, इंग्रजी, कानडी, तामिळ, पोर्तुगीज इ. भाषांतील शब्दांचे कोश पेशवे व त्यांचे सरदार यांच्या दप्तरखान्यांत असत; याच्या उलट पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज, डच इ. सरकारांच्या दप्तरांत मराठी शब्दांचे कोश असत.

आतां यापुढें द्वैभाषिक कोशांच्या संस्कृत, इंग्रजी, कानडी, फारसी इ. कांहीं प्रकारांचें थोडक्यांत अवलोकन करूंः—

संस्कृत—मराठ्यांच्या अमदानींत अमरकोशाचें मराठी भाषांतर झालेलें राजवाडे यांना मिळालें होतें. ब्रिटिश अमदानीपूर्वी कांहीं संस्कृत-प्राकृत कोश संस्कृतच्या अभ्ययनासाठीं तयार झाले असतील यांत शंका नाहीं. पण ते याद्यावजा पंडितांच्या घरोघरीं असावेत. ब्रिटिश अमदानींतील पहिला कोश म्हणजे अनंतशास्त्री तळेकर यांनीं सरकाराकरितां तयार केलेला संस्कृत-प्राकृत शब्दकोश (१८५३) होय. यांत अमरकोशांतील शब्द वर्णानुक्रमानें लिहून प्रत्येक शब्दाचा अर्थ मराठींत दिला आहे. प्रस्तावनेंत लिंगपरिभाषा दिली आहे. प्रथम शब्द, पुढें व्याकरण, नंतर अर्थ दिला आहे. उदाहरणें दिलीं आहेत पण तीं फारच थोडीं. यांतील शब्दसंख्या सुमारें पांचसहा हजार असेल.

यानंतरचा म्हणजे माधवचंद्रोबा यांचा 'शब्दरत्नाकर' होय. हा १८७० त मुंबई येथें प्रसिद्ध झाला. हा आकारानें बराच मोठा असून आज उपलब्ध असणाऱ्या संस्कृत-प्राकृत कोशांत सर्वांत मोठा म्हणतां येईल. यांत वैद्यक शास्त्रांतील परिभाषा विस्तारानें विवेचिली आहे. यानंतर नारो आपाजी गोडबोले व गोपाळ जिवाजी केळकर यांनीं संपादिलेला एक 'संस्कृत व प्राकृत कोश' (१८७२) आढळतो. याचें स्वरूप शालोपयोगीच आहे. यांत 'अमरकोश, त्रिकांडशेष, मेदिनी, हारावली व एकाक्षरी कोशांतील कांहीं ग्रंथांश व शाळेकडील मराठी क्रमिक सहा पुस्तकें व नवनीत आणि हितोपदेश यांतील शब्द घेतले आहेत.' बाबा पदमनजी, वा. गो. आपटे इ. कांहीं मंडळींचे कोश आहेत पण ते लहान असून नवीन श्रमाचे नाहींत. लोकशिक्षणाचे संपादक कै. जनार्दन विनायक ओक यांचा 'गीर्वाण लघुकोश' मात्र उल्लेखिण्यायोग्य महत्त्वाचा आहे. संपादकांनीं स्वतः श्रम करून नवीन धर्तीवर हा तयार केला (शके १८३७). या कोशाचे एकंदर ३ भाग आहेत. पहिल्यांत धातुंखेरीज सर्व शब्द आहेत. दुसऱ्यांत धातु आहेत. तिसऱ्यांत विशेषनामें आहेत. यांत देव-गंधर्व-यक्षादि नावें गाळलीं आहेत. चार परिशिष्टें आहेत. पैकीं पहिल्यांत न्याय, दुसऱ्यांत अलंकार, तिसऱ्यांत वृत्त, व चौथ्यांत ज्योतिष (शब्द वगैरे) दिले आहेत. अवतरणें न देतां स्थलनिर्देश दिले आहेत. सामान्यतः पंचतंत्र, रघुवंश, गीता, मनुस्मृति इ. ग्रंथांतील आधार पहिल्यानें व ते न मिळाल्यास रामायण, भारत, उपनिषदें वगैरे वरिष्ठ ग्रंथांतील आधार दिले आहेत. काव्यग्रंथांतील उताऱ्यांच्यापुढें प्रथम कांड, स्कंध किंवा पर्व; नंतर अध्याय-श्लोकांचा आंकडा दिला आहे. धातूंच्याखालीं उपसर्ग देऊन त्या उपसर्गामुळें होणारे धातूचे अर्थ

दिले आहेत. कोश कसा वापरावा याबद्दलचे २० नियम प्रस्तावनेत दिले आहेत. तसेंच धातूंचे अनुबंध व त्यांचीं कार्यें उध्दृत केलीं आहेत.

इंग्रजी—यांत इतर द्वैभाषिक कोशांप्रमाणें उलटसुलट (म्हणजे मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी) असे प्रकार पडतील. ब्रिटिश अमदानी महाराष्ट्रांत सुरू होण्यापूर्वीच श्रीरामपूर येथें क्यारे नांवाच्या मिशनऱ्यानें १८१० त एक मराठी शब्दांची यादी प्रसिद्ध केली. हाच क्यारेचा कोश होय. यांत मराठी शब्द मोडी लिपींत देऊन अर्थ इंग्रजींत दिले आहेत. यानंतर मुंबई एस कनैल केनेडी यानें १८२४ त मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी असा एक लहान कोश प्रसिद्ध केला.

केनेडी कोश—या कोशाचे आधारग्रंथ म्हणजे अमरकोशाचें भाषांतर (एका ब्राह्मणानें करून दिलेलें), सरकारी कागदपत्रांतून व अर्ज वगैरेतून केनेडी याला आढळून आलेले शब्द; याशिवाय आल्किनजवळ कॅप्टन कॉक् या लष्करी अंमलदारासाठीं त्याच्या दोन सुन्शीनीं तयार करून दिलेल्या कोशाचे दोन हस्तलेख, हे होत. याला मराठी भाषा किंवा तिच्या वाङ्मयाचें मुळींच ज्ञान नव्हतें असें दिसतें. कारण तो प्रस्तावनेत म्हणतो कीं, ही नुसती बोली आहे; तींत गद्यपद्य ग्रंथ मुळींच नाहींत व ही बोलणारे लोक शेतकरी असल्यानें शास्त्र, धर्म इ. च्या कल्पना दुसऱ्या भाषेतील उसन्या आहेत! याला ज्ञानेश्वर, मुकुंदराज, रामदास, एकनाथ वगैरे मागील काळांतील कवी जरी ठाऊक नसले तरी होनाजी, निदान त्याच्यावेळीं जिवंत असलेला प्रभाकर शाहीरसुद्धां माहीत नसावा हें मोठेंच आश्चर्य आहे! ज्याच्या कोशांत घोडागाडी, शेतवाडी, नोकरचाकर असले शब्द आढळत नाहींत त्यास "मराठी भाषेंत एकहि सामासिक शब्द नाहीं," असें म्हणण्याचा मूर्खपणाचा हक्कच आहे. 'मराठी भाषा शिकणाऱ्या पाश्चात्त्यांसाठी हा कोश तयार केला' असल्यानें व तोहि एका लष्करी गडयानें केला असल्यामुळें असा हास्यास्पद होणें साहजिकच आहे.

मोलस्वर्थ कोश—(मराठी-इंग्रजी) संपादक जे. टी. मोलस्वर्थ व कँडी. प्रकाशक बॉंबे एज्युकेशन सोसायटी (मुंबई शिक्षामंडळी). याची पहिली आवृत्ति १८३१ मधील असुन शास्त्रग्रंथांचा कोश व ही आवृत्ति बरोबरच तयार होत होती. पण तो मराठी-मराठी कोश प्रथम (१८२९ त) बाहेर पडला. कोशाला आधारभूत असे पुढील ग्रंथ घेतल्याचा उल्लेख आहे.—विल्सन-संस्कृत-इंग्रजी डिक्शनरी; एल्. डी. रीड-कोंकणी शब्द (हस्तलिखित), डॉ. कॅरेचा कोश, बापूदेव-ज्योतिषविषयक संस्कृत शब्द; गणेश मनोहर-वाक्प्रचार व म्हणी; साइक्स-वनस्पति शब्द; स्टीव्हन्सन-शेतकी शब्द. पहिल्या आवृत्तीचें काम करण्यास सहा वर्षे लागलीं. हा तयार करण्याला सर्वस्वी सरकारची मदत असल्यानें खेडोपाडयांतून सरकारी हुकुमानें शब्द जमविण्यांत आले. पण प्राचीन काव्यांतले शब्द मात्र फारसे घेतले नाहींत. शास्त्र्यांनी सांगितलेला अर्थ ऐकून इंग्रजींत तो उतरावयाचा या भानगडींत समजण्यांत, ऐकण्यांत, लिहिण्यांत अशा बऱ्याच चुका होणें साहजिक होतें.

यांत साधित शब्द, शब्दांचे वाक्प्रचार व म्हणी त्या त्या शब्दाखालीं दिले आहेत. व्युत्पत्तिदर्शक अरबी, फारसी, उर्दू, हिंदी शब्द कंसांत फारसी लिपींत लिहून पुढें अर्थ इंग्रजींत दिला आहे. दुसऱ्या आवृत्तींत प्रांतिक पोटभाषेंतील व देशी शब्दांचा भरणा पहिल्यापेक्षां थोडा जास्त आहे. यांत अवतरणें थोडीं असून ग्रंथांतील अवतरणांचा स्थलोल्लेख नाहीं. दुसरीमध्यें पहिलींतील अनवश्यक संस्कृत शब्द गाळले आहेत. दुसरी आवृत्ति इ. स. १८५७ मध्यें प्रसिद्ध झाली असून तींतील शब्दसंख्या ६० हजार आहे. पहिलींत ४० हजार शब्द होते. इंग्रजी अपभ्रष्ट शब्द जे पुष्कळ प्रचारांत होते त्यांपैकीं कांहीं घेतले आहेत; पण रैटर, सकटारी, प्रमुसर, कलक्टर असे सोडले आहेत. व्युत्पत्ति जेथें सहज आढळली तेथें दिली आहे. अशिष्ट शब्दहि दिले आहेत. कारण खालच्या वर्गातील लोकांच्या तोंडीं ते पुष्कळ आढळतात. शब्दाचा अर्थ देतांना प्रथम धात्वर्थ आणि जुना अर्थ व मग त्याचे लाक्षणिक वगैरे इतर अर्थ दिले आहेत. मराठी मूळ शब्द २० हजार असावेत व मग साधारणतः पुढें साधितरूपानें किंवा लाक्षणिक रूपानें त्यांचा पुष्कळ विस्तार झाला असावा. असल्या प्रकारचे जितके जमविले तितके शब्द दिले आहेत.

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं ब्राह्मण लोक नेमून त्यांच्याकडून त्या त्या ठिकाणचे शब्द गोळा केले; ते पुष्कळ होते. त्यांतील द्विरुक्तीचे, बिनकामाचे इ. शब्द गाळून एकंदर शब्द २५ हजार झाले. नंतर त्यावर निरनिराळे संस्कार होऊन (क्रियापदें, विशेषणें, साधितशब्द, सामासिक शब्द इ.) त्यांची संख्या ४० हजार झाली. ही संख्या पहिल्या आवृत्तींत होती. दुसरींत ६० हजार झाली. शब्द तपासणीसाठीं ३ वेळां शब्दाची छाननी होई. प्रथम शब्दाचें व्याकरण, अर्थ प्रांत वगैरे ठरवीत; नंतर त्याचे आधार, अवतरणें, म्हणी, वाक्प्रचार घेत आणि शेवटीं सर्व प्रकारचा मजकूर जुळवून जेथील तेथें लिहून काढीत. यासाठीं संपादकांचे तीन वर्ग केले होते. हा अवाढव्य कोश रचण्याचा खरा हेतु ख्रिस्ती धर्मप्रसार (प्रोपेगेशन ऑफ दि गॉस्पेल) असून तो लपविलेला नाहीं. हा कोश निघून आज जवळ जवळ ७५ वर्षे झालीं आहेत, तरी याला अद्याप एकमेवाद्वितीयत्वाचा मान आहे. कारण इतका मोठा मराठी कोश उपलब्धच नाहीं. या कोशाच्या कांहीं संक्षिप्त आवृत्ती पुढें झाल्या; व त्यांपैकीं महत्त्वाची म्हणजे बाबापदमनजींनें काढलेली होय. हा सर्व देशी भाषांच्या कोशांत उत्तम आहे असें एच्. एच्. विल्सन यानें म्हटलें आहे.

बाबा पदमनजी कोश—(पहिली आ. सन १८६३; दु. आ. १८७५) याला कांहीं सरकारी मदत होती. दुसऱ्या आवृत्तींत ३१ हजार शब्द म्हणजे पहिलीपेक्षां २ हजार जास्त आहेत. यांतील शब्दक्रम शब्दाच्या कुटुंबाप्रमाणें लाविला आहे, म्हणजे एका मूळापासून उत्पन्न झालेले साधित किंवा संयुक्त शब्द एका गुच्छांत गुंफिले आहेत. ही रचना शब्द पाहण्यास अवकाश न लागावा व अडचण न पडावी अशा बेतानें वर्णानुक्रमाला जितकी अनुसरून करवेल तितकी केली आहे. तथापि ही सर्व प्रकारें शब्दांच्या धातूस लागून आहे असें समजूं नये, म्हणजे प्रत्येक गुच्छाच्या आरंभीं जो शब्द आहे तो त्यांतील शब्दांचें मूळ आहे असें सर्वदां समजूं नये. कित्येक शब्द सजातीय, कित्येक एकमेकांचे संबंधी, कांहीं संयुक्त व कांहीं मिश्र आहेत. तरी त्या सर्वांचा परस्परांशीं मूळ धातूच्या योगें संबंध असल्यामुळें त्यांचा एकच गुच्छ बांधावा लागला. या व्यवस्थेनें व्युत्पत्ति शिकणारास थोडाफार लाभ होईल (मोलस्वर्थेनें हीच पद्धत स्वीकारली आहे). या खेरीज १८५१ साली एच्. ए. कॅनन यानें एक ' मराठी इंग्लिश व्होकॅब्युलरी ' म्हणून लहानसा कोश व १८९६ मध्यें अंबाजी कोन्हेरे यानें एक कोश प्रसिध्द केला त्यांत मराठी शब्दांचे मराठींत व इंग्रजींत अर्थ दिले आहेत. शालोपयोगी मराठी-इंग्रजी कोश बरेच झाले आहेत. आतां महत्त्वाच्या इंग्रजी-मराठी कोशाकडे वळूं.

कॅंडीकोश—(इंग्रजी-मराठी) हा मुंबई सरकारच्या मदतीनें मेजर कॅंडीनें १८४७ त प्रसिद्ध केला. याला प्रथम मोलस्वर्थेचें साहाय्य होतें. याची रचना अशी:-जॉन्सनचा इंग्रजी कोश-टॉडनें प्रसिद्ध केलेला-प्रथम उतरून घेऊन त्यापुढें मोलस्वर्थेनें आपल्या मराठी-इंग्रजी कोशांतील मराठी शब्द निवडून ते घालून हा कोश तयार केला आहे. क्रियापदाचा अर्थ देतांना तेथें सर्व प्रकारचा अर्थ दिला आहे. नंतर त्याच क्रियापदाचीं धातुसाधितें, नामें, विशेषणें, क्रियाविशेषणें इ. चा अर्थ देतांना प्रथम वरील क्रियापदाचा निरनिराळ्या प्रकारच्या अर्थांचा संबंध देऊन नंतर जरूरीपुरता संक्षिप्त अर्थ दिलेला आहे; त्यामुळें जागेची बचत झाली आहे.

समानार्थक शब्दांपैकीं जो विशेष प्रचारांत आहे त्या ठिकाणीं सर्व निरनिराळ्या तऱ्हेचे त्याचे अर्थ देऊन पुढील निरनिराळ्या समानार्थक शब्दांचा अर्थ देतांना त्या पहिल्या शब्दाचा संदर्भ दिला आहे; यामुळेंहि बरीच जागा वांचली आहे.

इंग्रजी भाषेंत मराठी भाषेंतल्या पुष्कळशा वाक्प्रचारांना आणि बोलींतील शब्दांना समानार्थक वाक्प्रचार व शब्द मुदलांतच आढळत नाहींत. परंतु मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या इंग्रज विद्यार्थ्यांना या मराठींतील खाचाखोंचांचा पूर्ण परिचय व्हावा म्हणून त्याची इंग्रजींत भाषांतर करून सोय केली आहे. मोलस्वर्थेच्या मनांत प्रथम थेसॉरस (समानार्थक शब्दकोश) च्या धर्तीवर हा कोश करावयाचा होता, परंतु तें न जमल्यानें सांप्रतच्या स्वरूपांत कोश तयार केला आहे. तथापि कोशाचें थेसॉरसचें स्वरूप बरेंचसें कायम राहिलें आहे. त्यामुळें ज्या इंग्रजाला थोडेफार तरी पूर्वीचें मराठीचें ज्ञान असेल त्यालाच हा कोश उपयोगी पडेल. नाहीं तर भलत्याच अर्थाचा (ध्येयार्थाचा) शब्द भलत्याच ठिकाणीं योजण्यांत येण्याचा संभव आहे. यांत आरंभीं इंग्रजी आणि मराठी भाषेमधील समान व असमान अशा निरनिराळ्या गोष्टी, प्रकार यांवर एक उत्कृष्ट निबंध रे. डॉ. स्टिव्हन्सन यानें लिहिला आहे.

रानडेकोश—(दि ट्वेन्टीएथ सेंचरी इंग्लिश मराठी डिक्शनरी) कॅंडीच्या कोशाला मागें टाकणारा हा कोश प्रो. एन्. बी. रानडे यांनीं १९०३-१९१६ या अवधींत सुमारें २००० पृष्ठांत प्रसिद्ध केला. या सुमारें १८ वर्षे चाललेल्या कामाला पाऊण लाख रुपयांपर्यंत खर्च आला. हिंदुस्थान व मुंबई सरकार, संस्थानें व धनिक यांच्याकडून मोठ्या देणग्या मिळाल्या होत्या म्हणून एका माणसाच्यानें हें काम शक्य झालें. गेल्या ५० वर्षांतील पाश्चात्य वाङमयग्रंथ, शास्त्रीय ग्रंथ, क्रीडाग्रंथ व कायदा, वैद्यक, इंजिनिअरिंग यांतील विद्वान व मराठी भाषापंडित व सुतार, लोहार इ० धंदेवाले या सर्वांच्या साहाय्यानें हा कोश केला. ५ वर्षे हा अभ्यास केला. डॉ. मरे याचा इंग्रजी मोठा कोश हा मुख्य आधार. खेरीज साधे वाक्प्रचार व म्हणींचे, वैद्यकाचे व्यापाराचे, शास्त्रीय परिभाषेचे, कायद्याचे, ऐतिहासिक, भाषाशास्त्रीय वगैरे निरनिराळ्या प्रकारचे कोश, लॅटिन व्याकरण इ. ग्रंथ आधारास घेतले. तसेंच मोलस्वर्थकॅंडी व शास्त्री (यांचा महाराष्ट्र भाषेचा) यांचे कोश आणि गेल्या ५० वर्षांत निरनिराळ्या विषयांचीं प्रसिद्ध झालेलीं मराठी पुस्तकें व प्राचीन संस्कृत (शास्त्रीय) ग्रंथ घेतले. त्यांत वाङ्मय, शास्त्र व इतर धंद्यांचेहि शब्द आहेत. मराठी शास्त्रीयपरिभाषा घेतली आहे; त्यासाठीं नागरी प्रचारिणी सभेच्या एतद्विषयक कोशाचें साहाय्य घेतलें आहे. इंग्रजी शब्दशास्त्राचा अभ्यास संपादकानें केला होता. पदार्थविज्ञान व रसायन यांतले बहुतेक शब्द बडोद्याच्या कलाभुवनमध्यें रूढ असलेले घेतले आहेत. नाविक शब्द प्रत्यक्ष गोद्यांत, जाऊन मजुरांच्या तोंडचे, घेतले आहेत. इंग्रजी खेळांतील शब्दांना एक संस्कृत व एक मराठी असे प्रतिशब्द दिले आहेत.

फारसी—मराठ्यांच्या अमदानींत कांहीं फारसी कोशवजा याचा कशा हातार्शी असत हें मागें सांगितलेंच आहे पण ब्रिटिश अमदानींत फारसीचा मराठींत कोश करण्यास कोण सरसावणार ? पण आनंदाची गोष्ट ही कीं खासगी एकटयाच्या प्रयत्नानें एक फारसी–मराठी कोश नुकताच तयार झाला आहे. प्रो. माधव त्र्यंबक पटवर्धन यांनीं भारत इ. सं. मंडळाच्या साहाय्यानें शके १८४७ त हा फार्शी–मराठी कोश प्रसिद्ध केला. याला अवतरणांसाठीं आधार म्हणून बहुतेक मराठींतील ऐतिहासिक लिखाण घेऊन हा इतिहासवाचनाला–किंबहुना संशोधनाला–उपयुक्त असा कोश तयार केला आहे. यांत फारसी, अरबी, तुर्की, शब्दांचे मराठी उच्चार दिले आहेत. ऐतिहासिक साधनांतील अवतरणें व त्यांची टिकाणेंहि दिलीं आहेत. शेवटीं फार्शी–अरबी शब्दांचें मूळ फारसी अक्षरांत दिलें आहे. दंततालव्य अक्षरांच्याखालीं उच्चाराच्या सोयीसाठीं टिंब दिलें आहे. शब्दाची व्युत्पत्ति दिलेली आहे. उपोद्घातांत फारशीचा मराठीवर झालेला निरनिराळ्या रूपांचा परिणाम दिला आहे. त्यांत फारशींतून मराठींत आलेले व्याकरणविशेष व शब्दसिद्धि हीं दोन टिपणें महत्त्वाचीं आहेत. एकंदरींत मराठी वाङ्मयाभ्यासाला हा कोश फार उपयुक्त आहे. तेव्हां या कोशाची भर मराठींत महत्त्वाची समजण्यास हरकत नाहीं. वाडांच्या सवाईमाधवरावाच्या रोजनिशीस (भाग ४) शेवटीं एक फारसी शब्दांची सार्थ यादी जोडलेली आहे.

बंगाली—अर्वाचीन कथात्मक गद्य वाङ्मयांत बंगालीच्या मराठींत भाषांतर–रूपांतर पावलेल्या ग्रंथांचा बराच समावेश झालेला आहे. बंगालीचा अभ्यास बरेच महाराष्ट्रीय लेखक करूं लागले आहेत. त्यामुळें बंगाली–मराठी कोशाची गरज भासणें साहजिक होतें. ती गरज भागविण्याचें पहिलें श्रेय श्री. वा. गो. आपटे यांना आहे. यांचा 'बंगाली–मराठी कोश' हा लहानसाच कोश असून तो शके १८४७ त प्रसिद्ध झाला. मराठींतल्याप्रमाणेंच बंगालींत संस्कृतचा भरणा जास्त आहे. तेव्हां तत्सम, तद्भव शब्द यांत आहेत. बंगाली वाक्प्रचार दिले आहेत. प्रथम बंगाली शब्द देवनागरींत, मग व्याकरण, नंतर अर्थ असा क्रम आहे. भिन्न अर्थानें आलेले संस्कृत शब्द दिले आहेत; मूळ अर्थानें आलेले दिले नाहींत.

कानडी—कानडी व मराठी भाषा जवळजवळ असल्यानें एका भाषेसंबंधींचें ज्ञान दुसऱ्या भाषेत सांपडणें साहजिक आहे. तेव्हां कानडी शब्दांचा अर्थ सांगणारे कांहीं लहान लहान ग्रंथ आढळणें शक्य आहे. तसाच पुढील मराठी कानडी कोश (मराठी व कानडी भाषेचें परिज्ञान)–कर्ता नारायण मोरेश्वर सप्रे (१३०० फसली साल). हा एक लहान ग्रंथ आहे. यांत नेहमीं प्रचारांत येणारे कानडी शब्द दिले आहेत. देवनागरी मूळाक्षरें व लिपी देऊन तिच्याखालीं कानडी दिली आहे. प्रथम मराठी व त्याच्यापुढें तद्वाचक कानडी शब्द, दोन्ही देवनागरींत दिले आहेत. जात, धंदा, आप्त, अवयव, जनावरें, पक्षी, कीटक, वृक्ष–वेली, भाज्या, फळें, धान्य, रसपदार्थ, रंग, किराणामाल, इमारत, भांडीं, लांकडी सामान, हत्यारें, भोजन पदार्थ, वार्षे, दागिने, वस्त्रें, कापड, व्यंगें, शेतकी, धातु व नाणीं, कुंभारी सामान, चांभारी सामान, खेळ, रोग, वजन–मापें, स्टेशनरी सामान, किरकोळ क्रियापदें इ. संगृहीत केलेलीं आहेत.

पोर्तुगीज—मराठीची पोटभाषा गोमंतकी (कोंकणी) हिचा संबंध पोर्तुगीज भाषेशीं असल्यानें असे कोश तयार होणें क्रमप्राप्तच आहे. 'महाराष्ट्र–पोर्तुगेझ कोश' (१८७९) संपादक सूर्याजी आनंदराव राजादिक्ष दळवी (नवीन गोवा), हा मोलस्वयंच्या मराठी–इंग्रजी कोशाबरहुकूम मराठी–पोर्तुगीज कोश करावा या उद्देशानें संपादकानें हातीं घेतला. त्याचें काम १५ वर्षे चाललें होतें. धातुसाधित नामें, गोव्यांतील ग्रामस्थांचे व्यवहारोपयोगी शब्द, तसेंच ग्रामसंमंडळयांच्या व्यवहारोपयोगांतील शब्द, एकूण शब्दसंख्या ५४००० होईल असा अंदाज होता. हा कोश गोवें सरकारच्या खर्चानें छापला आहे. पण हा पुरा झाला नसून फक्त 'अ–थ' पर्यंतचा भाग काय तो प्रसिद्ध झाला आहे.

कोंकणी पोर्तुगीज कोश (१८९३)—दाल्गादोकृत. याचा प्रथम देवनागरींत कोंकणी शब्द, मग व्याकरण व पोर्तुगीजमध्यें अर्थ, शेवटीं व्युत्पत्ति असा क्रम आहे. यांत सुमारें १९०० शब्द आहेत. उपलब्ध कोंकणी कोशांत हाच मोठा आहे.

हिंदी–हिंदी ही राष्ट्रभाषा होऊं पहात असल्यानें ती भाषा शिकण्याची पुष्कळांना जरूरी भासते. कांहीं शाळांतून ही भाषा आवश्यक म्हणून शिकविली जाते. पण हिंदी–मराठी मोठा कोश अद्याप व्हावयाचा आहे. पुढील एक लहान कोश नुकताच तयार झाला आहे. 'हिंदी मराठी कोश' नारायण तंमाजी कातगडे उर्फ पुंडलिक यांनीं १९२८ त हा तयार केला व तो अजमीर सस्तासाहित्यमंडळानें प्रसिद्ध केला. हा कामचलाऊ कोश म्हणून बरा आहे.

गुजराती–मराठी—गुजराथी–मराठी किंवा मराठी–गुजराथी असा कोश अद्यापि तयार झालेला नाहीं. मुंबईसारख्या शहरांत या दोन्ही भाषा शेजारीं शेजारीं आज इतक्या दिवस रहात असतां असे कोश तयार झाले नाहींत हें आश्चर्य होय; पण या दोन्ही भाषा परस्परांस शिकण्यास फार सुलभ असल्यामुळें व इंग्रजी या भाषेच्या सामान्य माध्यमामुळें कदाचित् असा प्रकार घडला असावा. हीच गोष्ट इतर देशी भाषांच्या बाबतींतहि लागू आहे. यांखेरीज इतर भाषांच्या मराठी द्वैभाषिक कोशासंबंधीं विवेचन स्थलाभावीं टाळलें आहे.

विशिष्ट प्रकारचे मराठी कोश—कोशांचे कसे कसे प्रकार असतात हें सांगून पाश्चात्त्य कोशांचीं कांहीं उदाहरणें पूर्वी दिलीं आहेत. तसेच कांहीं प्रकार मराठींतहि आढळतात.

सर्व विषयांचे विश्वकोश--एन्सायक्लोपीडियाप्रमाणें एकंदर सर्वच विषयांची थोडीफार माहिती देणारें कोश मराठींत महाराष्ट्रीय ज्ञानकोशापूर्वी जरी झालेले नव्हते तरी ते करण्याचा प्रयत्न चालू होता. १८७८ सालीं जनार्दन हरि आठल्ये यांनीं 'विद्यामाला' नांवाचा विश्वकोश छापण्यास सुरवात केली होती. पण त्याची मजल २०० पृष्ठांपुढें गेली नाहीं. बडोद्याचे सांबारे यांनींहि 'विद्याकल्पतरु' रचण्यास हातीं घेतला पण हाहि प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. फक्त 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हा २३ भागांचा व सुमारें ११००० पृष्ठांचा विश्वकोश १९२८ त पुरा झाला.

धातु-व्युत्पत्तिकोश--या क्षेत्रांत मराठीचा पहिला प्रयत्न म्हणजे 'विग्रहकोश' होय. हा वेदशास्त्रसंपन्न गोपाळशास्त्री घटि यांनीं रचिला (१८६७). हा शिळाछापाचा आहे. यांत अमरकोशांतील शब्दांचा विग्रह देऊन त्याची मराठींत फोड केली आहे. उदा. 'नगरं–नगाः सन्त्यस्मिन्निति नगरं=नानाविध वृक्ष आहेत जाचे ठायीं तें.' 'दुकूलं–दुष्ट कुलतीति दुकूलं= दुष्ट शरीरावयवाचें आच्छादन करितें जें तें'. विग्रहानंतर धातु दिला असुन पुढें शब्दार्थ मराठींत सांगितला आहे. यांतील बरेच विग्रह पटणार नाहींत हें खरें पण प्रयत्न प्रशंसनीय आहे. यापूर्वी दोन वर्षे विष्णु परशुराम पंडित यांनीं 'संस्कृत आणि महाराष्ट्र धातुकोश' तयार केला होता. यांत संस्कृत धातूंचा सांगोपांग विचार आहे. असेंच दुसरें पुस्तक जनार्दन हरि आठल्ये व विनायकशास्त्री आगाशे यांचें 'शब्दसिद्धिनिबंध' होय. हें १८७५ त मुंबईसरकारच्या विद्याखात्यानें प्रसिद्ध केलें. यांत 'प्राकृत भाषेत ज्यांचीं बारंबार रूपें येतात असे संस्कृत धातू ७७३ घेतले आहेत.' १८७८ सालीं प्रभाकर रामचंद्र पंडित यांनीं 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' हें पुस्तक लिहून मराठी व्युत्पत्तिशास्त्रांत चांगली भर टाकली. यामध्यें शब्द अपभ्रष्ट कसा होतो याबद्दल नियम देऊन संस्कृत, फारसी इ. शब्दांपासुन मराठींत अपभ्रष्ट शब्द कसे आले आहेत याची अकारविल्ह्यानें यादी दिली आहे. यावर निबंधमालेंत विस्तृत टीका आली आहे.

व्युत्पत्तिप्रदीप (आवृ. ७ वी, १९०८)—संपादक गोविंद शंकर बापट. मराठी भाषेतील संस्कृतपासून निघालेल्या शब्दांची व्युत्पत्ति यांत सांगितली आहे. प्रस्तावनेंत व्याकरणविषयक नियम दिले आहेत. तसेंच धातूस लागणारे उपसर्ग दिले आहेत. अरबी व फारसी शब्दांची यादी शेवटीं जोडली आहे. तत्सम, तद्भव रूपापभ्रंश वगैरेच्या व्याख्या व उदाहरणें दिलीं आहेत. शब्दावरील व्याकरणविषयक विशेष अर्थांच्या टीपा खालीं दिल्या आहेत. देशी नाममालेंतील व संस्कृत नाटकांच्या बालभाषेतील शब्दांची यादी एका स्वतंत्र परिशिष्टांत दिली आहे. संस्कृत, झेंद, ग्रीक, लॅटिन या भाषांत समान उच्चाराचे व एकार्थवाचक (थोड्या फार फरकानें) जे शब्द आहेत त्यांचें एक कोष्टक दिलें आहे; शेवटीं सर्व शब्दांची सूची दिली आहे. याप्रमाणें हा छोटासा व्युत्पत्तिकोश सर्वांगपरिपूर्ण म्हणतां येईल. श्री. य. ग. फडे यांनीं 'व्युत्पत्तिदीपिका' नांवाचें शालोपयोगी जें पुस्तक केलें आहे तें शिक्षकांना अत्यंत उपयुक्त वाटेल. कै. वि. का. राजवाडे यांनीं एक 'मराठी धातुकोश' कच्च्या स्वरूपांत तयार करून ठेवला असुन तो धुळेकरांजवळ आहे. त्यांत सुमारें २००० मराठी धातूंची व्युत्पत्ति लावण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत कोशाला तो जोडण्याची परवानगी धुळेकरांनीं दिली नाहीं, तेव्हां आला तो कधीं बाहेर पडेल तो पडो! आमच्या पाहण्यांत ज्या या कोशाच्या पत्रिका आल्या त्यांत फक्त पूर्व तयारी केली असुन संपादकीय टिपणें लिहावयाचें काम व्हावयाचें राहिलें आहे.

विशिष्ट शब्द-म्हणी-वाक्प्रचार-यांचे कोश—असे लहान सहान कोश अनेक तयार होतात व त्यांचा कांहीं वेळां चांगला उपयोगहि असतो. विशेषतः लेखकांना त्वरित समानार्थक शब्द पाहण्यास किंवा कांहीं संख्यावाचक शब्दांतील अवयवार्थांची फोड (उदा. पंचप्राण, षट्कर्मे, इ.) होण्यास ते उपयोगी पडतात. असा पहिला प्रयत्न बाबापदमनजींनीं १८६० त 'शब्दरत्नावली' रचून केला. यांत मोलस्वर्थ–कँडी यांच्या मराठी–इंग्रजी व इंग्रजी–मराठी कोशांतील निवडक शब्द उतरून घेतले आहेत. या पुस्तकाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत मोलस्वर्थ कोशांतील कित्येक चमत्कारिक, पारिभाषिक, व ज्यांच्या पोटांत बहुत उपविषय किंवा व्याख्या आहेत असे कांहीं शब्द निवडून घेतले आहेत. व दुसऱ्या भागांत कँडीकृत कोशांतील ज्या महाराष्ट्रशब्दास बहुत उपशब्द आहेत ते त्या शब्दासहित निवडून घेतले आहेत. थोडक्यांत हा रॉजेटच्या थेसॉरससारखा एक लहान कोश आहे. रॉजेटच्या कोशाबरहुकूम तयार करण्यांत येणारा 'राजकोश' दोन भाग निघून संपादक श्री. अनंत सीताराम काळेले यांच्या मृत्युमुळें बंद पडला (१९३०). वाक्प्रचार–म्हणींचे कोश बरेच आहेत. 'मराठी भाषेतील म्हणी रत्नमाला' (सोळंकर), 'मराठी म्हणींचा कोश' (देशपांडे–तारळेकर), 'मराठी व्यवहारांतील म्हणी' (छत्रे), 'मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी' (वा. गो. आपटे), 'मराठी वाक्प्रचार व म्हणी' (वि. वा. भिडे) इ. बरींच पुस्तकें म्हणीसंबंधी आहेत. कॅ. मॅनवरिंगनें मराठी म्हणींचें इंग्रजी भाषांतर केलें आहे (१८९९). त्यांत म्हणींचें वेगवेगळ्या–धंदे, शरीरावयव इ. विषयानुसार वर्गीकरण केलें आहे; हें पुस्तक विशेष महत्त्वाचें वाटेल. सदाशिव विश्वनाथ यांचें 'सर्व देशांतील निवडक म्हणी' देणारें एक पुस्तक आहे. रघुनाथ देवजी मुळे यांचा 'हिंदुस्थानांतील संख्यावाचक दुर्बोध कोश' हाहि या विशिष्ट सदरांत येईल.

चरित्र व ऐतिहासिक कोश—रघुनाथ भास्कर गोडबोले या मराठींतील धुरंधर लेखकानें 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' व 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश' हे दोन मोठे कोश रचून चरित्रपर कोशांचा चांगला पाया घातला. या कोशांतील कांहीं माहिती चमत्कारिक व चुकीची वाटली तरी विशेषतः पुराणांतील व्यक्तींची एकत्रित माहिती पाहण्याच्या कामीं त्यांचा फार उपयोग होतो; म्हणूनच पहिल्या कोशाची दुसरी आवृत्ति काढणें चित्रशाळेला जरूरीचें वाटलें. या कोशांच्या

धर्तीवरच पण वैदिक व्यक्तींची जास्त माहिती घालून विद्यानिधि चित्रावशास्त्री यांनी चरित्रकोश (भाग १) नुकताच प्रसिध्द केला. साहित्यसेवकांचीं चरित्रें देणारे कोशहि तयार होत आहेत (गं. दे. खानोलकरकृत ' अर्वाचीन वाङ्मयसेवक '). तथापि अनेक क्षेत्रांतून काम केलेल्या व करणाऱ्या थोर व्यक्तींची चरित्रें संगृहीत करणारे कोश अद्याप व्हावयाचेच आहेत. इतिहासाचें विविध मराठी साहित्य अभ्यासतांना जे अनेक अरबी, फारसी, परकीय, सांकेतिक इ. शब्द येतात त्यांचे अर्थ देणारा ' फार्सी–मराठी कोशा ' पेक्षां व्यापक असा कोश महाराष्ट्र शब्दकोशाचे एक संपादक श्री. आबा चांदोरकर यांनीं लिहून तयार केला आहे. पण तो अप्रसिध्द आहे. त्याचा उपयोग महाराष्ट्र शब्दकोशाच्या कामीं केलेला आहे.

शास्त्रीय व पारिभाषिक कोश—आपल्याकडे भौतिक शास्त्रांवरचें वाङ्मय विपुल नसल्यानें त्यावरचे कोशहि फार अल्प असणार. वनस्पतीसारख्या कांहीं थोडया शास्त्रांवरचे व कांहीं शास्त्रीय परिभाषेचे कोश आढळतात. उदा. मेजर कीर्तिकर यांचा छोटा वनस्पतिकोश (संस्कृत–मराठी), वनस्पतिविषयक कोश, सयाजी वैज्ञानिक शब्दसंग्रह, विद्युत्कोश, महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत प्रसिद्ध झालेल्या कांहीं याद्या, इ. शास्त्रीय ग्रंथांच्या शेवटीं किंवा आरंभीं बहुधा परिभाषा दिलेली असते. राजव्यवहारशास्त्रांतील जुना परिभाषाकोश म्हणजे शके १५९६–९७ मध्यें रघुनाथ पंडितानें शिवाजीच्या सांगण्यावरून रचिलेला ' राजव्यवहारकोश ' होय. यांत शिवकालीन रूढ दरबारी मुसलमानी शब्दांना जुने संस्कृत प्रतिशब्द दिलेले आहेत. रचना अमरकोशाच्या धर्तीवर वर्गवार आहे. राज, कार्यस्थान, भोग्य, शस्त्र, चतुरंग, सामंत, दुर्ग, लेखन, जनपद व पण्य असे शब्दांचे दहा वर्ग पाडिले आहेत. असा अर्वाचीन व मोठया प्रमाणावर प्रयत्न बडोदें सरकारनें ' श्री सयाजीशासनशब्दकल्पतरु ' हा राजव्यवहारांतील शब्दांना अनेक भाषांतील प्रतिशब्द सुचवून त्यांतून उत्कृष्ट सर्वमान्य शब्द निवडण्याला मदत होईल अशा रीतीनें तयार केला आहे (१९३१). यासंबंधीं उल्लेख पूर्वी आलाच आहे. हा उपयोगांत आणल्यानें बरेच परकीय शब्द–आज जे निरुपाय म्हणून वापरावे लागतात ते–जातील व भाषा शुद्ध होईल.

सूची–कोश—सूचीग्रंथ हे एकप्रकारचे कोशच होत. कारण कोशाप्रमाणें त्यांचा उपयोग सुलभसंदर्भाला होत असतो. अशा सूचींत महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळाकरितां रा. यशवंत रामकृष्ण दाते यांनीं संपादन केलेली ' महाराष्ट्रीय वाङ्मयसूची ' पहिल्या दर्जाची ठरेल. १८१० ते १९१६ पर्यंतच्या शंभर वर्षांतील प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची व सुमारें १००–१२५ महत्त्वाच्या मासिकांतील लेखांची यांत नोंद आहे. एवढा मोठा साहित्याचारचा सूचिग्रंथ इतर कोणत्याहि भारतीय भाषांत नाहीं; ही मराठी भाषेला भूषणावह अशी गोष्ट आहे. बाळकृष्ण बाबाजी करकरे व गोपाळ बाळकृष्ण वैद्य यांनीं १८९६ त केलेला ' स्थलनामकोश ' हा भौगोलिक स्थलांची माहिती होण्याला फार उपयोगी आहे. यांत पृथ्वीवरील बहुतेक मोठीं शहरें, नद्या, पर्वत, बंदरें इ. उल्लेखित असून हिंदुस्थान आणि मुंबई इलाखा यांतील अधिक स्थलांची माहिती आहे. पण नकाशांच्या पुस्तकाच्या शेवटीं असलेल्या सूचीप्रमाणें हा कोश वाटतो. कै. गो. का. चांदोरकर यांनीं राजवाडेखंड १–८, १०–१२, १५–१९, यांतील स्थळांच्या उल्लेखांची एक स्थलसूची केलेली आहे. या ऐतिहासिक साधनांपुरती ती पुरी आहे. पण आजचें सर्व ऐतिहासिक लिखाण पाहतां ती फार अपुरी वाटेल. तेव्हां सर्व उपलब्ध ऐतिहासिक ग्रंथांतील स्थळांची सूची तयार होण्याची फार जरुरी भासते. याच गो. का. चांदोरकरांनीं संपादन केलेली संतकविकाव्यसूचि ही संतकविवाङ्मयग्रंथांची एक उत्तम निर्देशिका आहे. या सूचींत मुद्रित व अमुद्रित अनेक मराठी कवींच्या काव्यांचा निर्देश केलेला असून कांहीं कवींची परंपराहि दिलेली आहे त्यामुळें विशिष्ट काव्याचा कर्ता किंवा विशिष्ट कवीचे ग्रंथ व ग्रंथकारांचा परस्परसंबंध हीं शोधून पाहण्यास हें सुलभ साधन झालें आहे.

भारतीय व भारतीयेतर भाषांचे कोश—याप्रमाणें मराठी भाषेंत आढळणाऱ्या कोशांचें थोडक्यांत समालोचन केलें आहे. यापेक्षां विस्तृत विवेचनास स्थलावकाश नाहीं. आतां आपणांस परिचित अशा भारतीय व भारतीयेतर भाषांच्या कोशांचें विहंगमावलोकन करूं. त्यांत आपल्या निकटच्या भाषा म्हणजे गुजराथी व कानडी या होत म्हणून त्यांस आद्यस्थान देऊं.

गुजराथी कोश—मराठी भाषेच्या निकटच्या आणि स्वसंस्थानीं असलेल्या गुजराथी भाषेतील कोशवाङ्मयाकडे आपण जर दृष्टिक्षेप केला तर आपणांस थोडासा तुलनात्मक व उद्बोधक विचार करतां येईल. इंग्रजी अमदानीमध्यें देशी भाषांच्या अभ्यासामध्यें प्रगति होऊं लागली, तेव्हां गुजराथी कोश तयार होऊं लागले. कवि नर्मदाशंकर यानें १८५१ मध्यें गुजराथी कोश (नर्मकोश) रचण्याचें काम हातीं घेतलें आणि १२ वर्षांत एकट्यानें तें पूर्ण केलें. ह्या कोशास जॉन्सनच्या कोशाप्रमाणें महत्त्व देण्यांत येतें. यानेंच १८७० मध्यें ' कथाकोश ' नांवाचा एक कोश रचला होता; तो सध्यां (१९३२ सालीं) बं. देरासरी यांचा ' पौराणिक कथाकोश ' पांच भागामध्यें प्रसिद्ध होईपर्यंत महाभारत, रामायण आणि पुराणें यांतील व्यक्तींची माहिती देण्याच्या कामीं आधारभूत समजला जात असे. यानंतर आपणास निरनिराळ्या वेळीं पुढें दिल्याप्रमाणें कोश प्रसिध्द झालेले आढळतात:–रा. ब. छोटालाल सेवकरामकृत ' गुजराथी शब्दमूलदर्शक कोश '. (इ. स. १८७९); यामध्यें शब्दांची व्युत्पत्ति दिलेली आहे. रा. प्रभाकर रामचंद्रशास्त्रीकृत ' अपभ्रष्ट शब्दप्रकाश '. (इ. स. १८८०); रा. सा. लल्लुभाई प्राणवल्लभदास पारेखकृत ' शब्दार्थभेद '; (१८९१); दलाल विठ्ठल राजारामकृत ' गुजराती शब्दार्थसिंधु '; रा. ब. गोविंदभाई देसाईकृत ' प्रांतिक शब्दसंग्रह '; भोगीलाल भिखाभाई गांधीकृत ' रूढीप्रयोगकोश '; कवि हिराचंद कहानजीकृत ' कोशावली ' इ. कोश निरनिराळ्या उद्देशानें रचलेले आढळतात.

गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीनें 'गुजरातीभाषानो कोश' आरंभिलेला असून 'अभर' पर्यंतचा भाग प्रसिद्ध झाला आहे, परंतु तो बऱ्याच अंशीं अपूर्ण आहे. पटेल खुशालदास यानें 'गुजराथी शब्दकोश' नांवाचा एक कोश रचला आहे. जीवनलाल अमरशी मेहेताकृत 'शब्दार्थचिंतामणी' (१९२५) हा एकंदरींत बरा कोश आहे. गुजराथ विद्यापीठानें केलेला 'सार्थ गुजराथी कोश' (१९३०) हा ह्या दिशेनें केलेला एक शास्त्रशुद्ध प्रयत्न आहे. परंतु त्यांत शब्दसिद्धि, व्युत्पत्ति इ. बाबतींत न्यूनता आहे. गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीनें जमीर मिय्या शरुकी यांजकडून 'गुजराती-फारसी-अरबी' कोश दोन भागांत तयार केला आहे.

सांप्रत गोंडळ राज्यातर्फे 'गोमंडळ कोश' या नांवाचा एक मोठा कोश तयार करण्याचें काम चालू आहे. यामध्यें शब्दांचें व्याकरण, व्युत्पत्ति, अवतरणें वगैरे यावयाचीं आहेत.

'संस्कृत-गुजराथी' कोशामध्यें सवाईलाल छोटालाल वारा यांचा 'शब्दार्थचिंतामणी' (१९०५), तसाच गिरिजाशंकरशास्त्रीकृत 'संस्कृत गुजराथी शब्दादर्श' (१९३०) हे दोन कोश नमूद करण्यासारखे आहेत. पंडित गणेशदत्त शर्मा यानें 'गुजराथी-हिंदी शब्दकोश' तयार केला आहे. 'गुजराथी-इंग्रजी' कोशांमध्यें बेलसरे यांचा (सुमारें १९००) कोश महत्त्वाचा आहे. भगुभाई फत्तचंद करभारी यांनींहि एक 'गुजराथी-इंग्रजी' कोश रचलेला आहे; याचीच संशोधित नवीन आवृत्ति भानुसुखराम व भरतराम मेहेता यांनीं १९२५ त प्रसिद्ध केली आहे. 'इंग्रजी-गुजराथी' कोशांमध्यें दि. ब. अंबालाल साकरलाल देसाई यांचा कोश शिष्ट व आधारभूत समजला जातो. त्यापूर्वी राणीना यांचा एक कोश प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर व्यास व पटेल यांनींहि एक 'इंग्रजी-गुजराथी' कोश प्रसिद्ध केला आहे.

विश्वनाथ मगनलाल भट्ट यांनीं गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटीकरतां एक पारिभाषिक शब्दांचा कोश दोन भागांत प्रसिद्ध केला आहे. ठक्कर देवजी गोवर्धनदास यांनीं एक 'गुजराथी-बंगाली' कोश (१९२८) तयार केला आहे. करीमअली नानजी यांनीं एक 'कच्छी-गुजराथी-इंग्रजी' भाषेचा कोश रचला आहे.

वैद्य बाप्पालाल गबेडदास यांनीं 'निघण्टु आदर्श' या नांवाचा दोन भागांमध्यें एक 'वनस्पतिकोश' रचला आहे.

अद्यापपर्यंत 'गुजराथी-मराठी' अगर 'मराठी-गुजराथी' शब्दकोश तयार करण्याकडे कोणी लक्ष दिलेलें आढळत नाहीं. तसेंच 'हिंदी-गुजराथी' अगर 'गुजराथी-बंगाली' शब्दकोश तयार व्हावयाचे आहेत. निरनिराळ्या प्रांतांतील परस्पर दळणवळण जसजसें वाढत जाईल तसतसे देशी भाषांमधील कोश तयार होत जातील.

कानडी—शब्दस्मृति-नागवर्माकृत (१२ वें शतक), कानडी पद्यात्मक व्याकरणग्रंथ; वस्तुकोश-नागवर्माकृत (१२ वें शतक) संस्कृत कानडी कोश, यांत अमरकोशाचा उल्लेख आहे; शब्दमणिदर्पण-केशिराजकृत (१३ वें शतक), हा प्रमाणभूत व्याकरणग्रंथ आहे, हा डॉ. किटेलनें १८७२ त प्रसिध्द केला; कर्णाटक शब्दानुशासनम्-भट्टाकलंकदेवकृत (१६०४), हा संस्कृत ग्रंथ कानडी व्याकरणावर आहे. यांत ५९२ सूत्रें असून त्यांना वृत्ति व व्याख्या संस्कृतांतच जोडिल्या आहेत, यांत प्रमुख कानडी लेखकांचे उतारे व त्यांचे उल्लेख आहेत; कविकंठाहार (१६१०)-समानार्थक शब्दांचा छंदोबध्द कोशग्रंथ; अमरकोशव्याख्यान-नाचिराचिकृत (१३ वें शतक), अमरकोशावरील एक टीकाग्रंथ; कर्नाटक शब्दसार (१३५०), १४१६ शब्दांचा पद्यकोश; अभिनवनिघंटु (१३९८)-अभिनवमंगराजकृत, संस्कृत शब्दांचा कानडीत अर्थ; चतुरास्यनिघंटु (१३५०)-बोम्मरसकृत, समानार्थक शब्द १३० खंडांत दिले आहेत; कब्बिगर कै-पिडी (१४६०)-लिंगकृत, ९९ पद्यांतील समानार्थक शब्दकोश. कर्नाटक शब्दमंजरी (१४८०)-तोडद आर्यकृत, तद्भव व कानडी शब्दांचा कोश; कर्नाटक संजीवन (१६ वें शतक)-शब्दकोश; नानार्थरत्नाकर-वेंकोत्तमकृत, संकृत पद्यमय शब्दकोश; रेव्ह. रीव्ह्-इंग्लिश कर्नाटक व कर्नाटक इंग्लिश कोश, मद्रास, १८२४-३२, दुसरी आवृत्ति १८५८; रेव्ह. किटेल-कन्नड इंग्लिश डिक्शनरी, मंगळूर, १८९४, हाच कोश आज प्रमाण समजला जातो. यांत संस्कृत (तद्भव) व द्राविडी असे शब्द वेगळे दाखविलेले आहेत.

हिंदी—ॲडॅम-हिंदी डिक्शनरी, कलकत्ता; नागरीप्रचारिणी सभा-हिंदी शब्दसागर, ६ भाग (बनारस १९२८); थॉमसन (दिल्ली, १८४६); मथुराप्रसाद मिश्र-इंग्रजी, ऊर्दु व हिंदी (बनारस, १८६५). **हिंदुस्थानी**—टेलर-हिंदुस्थानी-इंग्रजी कोश २ भाग (कलकत्ता, १८०८); शेक्सपीयर-आवृ. २, (१८२०); डंकन फोर्ब्स-आवृ. २, (लंडन १८५७); फेलन, बनारस १८७६. **सिंधी**—ईस्टविक-मुंबई, १८४३; कॅ. स्टॅक-मुंबई, १८५५.

पंजाबी—स्टार्की, १८५०; लुधियाना मिशन-लुधियाना, १८५४-६०. **काश्मिरी**—एलमस्लाय-लंडन, १८७२. **पुश्तु**—डॉर्न-सेंटपीटर्सबर्ग, १८४५; रॅव्हर्टी-लंडन, १८६०, १८६७.

बंगाली—डॉ. केरी-बंगाली भाषेचा कोश, (१८१५-२५); फॉर्स्टर-बंगाली कोश, कलकत्ता, १७९९-१८०२; रोझारियो-१८३७; रेव्ह. कृष्णमोहन बानर्जी-बंगाली ज्ञानकोश-विद्याकल्पद्रुम १३ भाग, सुरवात १८४६; सुबलचंद्रमित्र-बंगाली-बंगाली कोश, कलकत्ता १९०९; आदिया-शब्दबुधि, कलकत्ता, १८५४; वा. गो. आपटे, बंगाली-मराठी कोश, शके १८४७. **पाली**—मोग्गलन थेरो (१२ वें शतक) कृत अभिधानप्पदीपिका, कोलंबोप्रत, १८६५; क्लौ-कोलंबो १८२४; चाइल्डर्स-लंडन, १८७२-७५. **भूतानी**—श्रोटर-श्रीरामपुर, १८२६. **आसामी**—मिसेस कटर-सद्दपुर, १८४०; ब्रॉन्सन-लंडन, १८७६,

६१७ पानें. **उरिया**—मोहनप्रसाद ठाकूर, श्रीरामपुर, १८११; सटन-कटक, १८४१-४८ (३ भाग). **खासिया**—रॉबर्ट्स-कलकत्ता, १८७५.

मद्यंाळी—बेली-कोट्टयम, १८४६; गुंडर्ट-मंगळूर, १८७१. **तामिळ**—रेव्ह. पर्सिव्हलनें इंग्रजी-तामिळ कोश केला आहे (१९००); शूळामणि निघंटु-मंडलपुरुषकृत (इ. स. ८७५ चा सुमार), डॉ. रोटलर-डिक्शनरी ऑफ दि तामिळ अँड इंग्लिश लँग्वेजेस, १८३४, मद्रास. जाफना बुक सोसायटी-जाफना, १८४२, ५८५०० शब्द; विन्स्लो-मद्रास, १८६२, ९९२ पानें, ६७४५२ शब्द. **तुळु**—रेव्ह. मॅनर-तुळु इंग्लिश डिक्शनरी, १८८६ मंगळूर. **तेलगु**—आंध्रशब्दचिंतामणि (११ वें शतक)-नन्नयभट्टकृत, तेलगु भाषेचें संस्कृत व्याकरण; आंध्रनामसंग्रह-लक्ष्मणकविकृत, तेलगु शब्दकोश. यांत बहुतेक तेलगु शब्द दिले आहेत. कंपबेल-डिक्शनरी ऑफ दि तेलगु लँग्वेज, १८२१, मद्रास; ब्राऊन-तेलगु-इंग्लिश डिक्शनरी, १८५२, मद्रास.

ठगी—स्लीमन, कलकत्ता, १८३०, ६८० रामोशी शब्द. **जिप्सी**—पसपती-कॉन्स्टँटिनोपल, १८७८; स्मार्ट आणि कॉफ्टन-लंडन, १८७५.

आशिया खंड-सिंहली—क्लॉ-सिंहली-इंग्लिश डिक्शनरी, कोलंबो, १८२१,१८८२. **इंडोचिनी**—लेडन-ब्रह्मी, मलायी व थई भाषांचा तौलनिक शब्दसंग्रह, श्रीरामपुर, १८१०. **आनामी**—कॅथोलिक मिशनऱ्यांनीं सर्व पौरस्त्य भाषांत या भाषेचा विशेष अभ्यास केला. व्होड्स-(पोर्तुगीज आणि लॅटिन) रोमाई (१६५१). या पाद्र्याचा कोश आज अपुरा वाटला तरी फार महत्त्वाचा आहे. याची लिपि लॅटिन आहे यानंतर बरेच चांगले कोश झाले उ. पॉथियर (चिनी, आनामी, फ्रें. लॅ.)-पॅरिस, १८६७. **ब्रह्मी**—जुडसन-रंगून, १८६६, २ भाग, ९६८ पानें. ब्रह्मी प्रदेशांतील कांहीं भाषांचा तौलनिक शब्दसंग्रह; डॉ. बुचॅनन-एशियाटिक रिसर्चेस व्हा. ५; फिनेची पॉकेट डिक्शनरी, १९१७. **कांबोज**—आयमोनियर-सायगांव, १८७४. **करेण**—सौ-कौ-दु (करेण) टव्हाय, १८४७. **मलाया**—डेव्हिड हीक्स यानें मल्यु-डच कोश प्रथम केला. याचें लॅटिन भाषांतर १६३१ त झालें. या भाषेचे कोश लॅटिन, डच, इंग्लिश व फ्रेंच भाषेत असून सर्वांत जास्त कोश डच आहेत. **मलाया द्वीपसमूहांतील भाषा**—बटक, बुगिस, डाइक, जाव्हानीज, मकासर, सुंदा, फोर्मोसा या भाषांचे कोश युरोपियनांनीं केलेले असून ते बहुतेक डच आहेत.

हीब्रू—हीब्रू कोशासंबंधीं स्थानिक भाषेत प्रयत्न नवव्या शतकापासून चालू आहेत. इब्नसरूकनें दहाव्या शतकांत लिहिलेला मोठा कोश १८५५ त एडिंबरो येथें फिलिपोवस्कीनें छापला. कांहीं जुने कोश होते पण ते उपलब्ध नाहींत. लॅटिन, इंग्रजी, डच इ. भाषांतून हीब्रू कोश आहेत. **खाल्डी, असुरी, समारिटन, सिरिअॅक**—या भाषांचे कोश प्रसिद्ध झालेले आहेत. सिरिअॅक भाषेचा कोश फार जुना म्हणजे जोशुआ बिन अली यानें ८८५ च्या सुमारास केला. हाफमननें याचा कांहीं भाग छापला आहे (१८७४). ब्रिटिश म्युझियममध्यें एलिआस शिनया याचा सिरियाक-अरबी कोश १००९ मध्यें लिहिलेला ठेविला आहे. याचें लॅटिन भाषांतर १६३६ त रोम येथें प्रसिद्ध झालें. **अरबी**—अरबांनीं केलेले आपले कोश पुष्कळ आणि फार मोठे आहेत. लेन आपल्या अरबी-इंग्लिश कोशांच्या प्रस्तावनेंत ३० कोशांचीं नांवें देतो. पहिला 'ऐन' अलखलीलचा आठव्या शतकांतील आहे. बहुतेक पाश्चात्त्य व प्राच्य भाषांत अरबी कोश झालेले आहेत. इंग्रजींतील पहिला प्रसिद्ध म्हणजे लेनचा (१८६३-९३) होय. यासाठीं लेन सात वर्षे कायरोला जाऊन राहिला होता. व तेथें त्यानें अरबी भाषेचा अभ्यास करून बरींच जुनीं अरबी लिखाणें जमा केलीं. अलीकडचा कोश न्यूमनचा आहे. हा लंडन येथें १८७२ त प्रसिद्ध झाला. सालमोनेच्या कोशांत सुमारें सव्वा लाख अरबी शब्द आहेत. **आर्मेनियन**—मेकिटारकृत, व्हेनिस, १७४९-१७६९, २ भाग; औचरकृत, व्हेनिस १८३६-३७. २ भाग. **तुर्की**—रेडहाऊस, लंडन, १८५६; इतर पाश्चात्त्य भाषांतून बरेच आहेत.

फारसी—रिचर्डसन-पर्शियन आणि अरेबिक डिक्शनरी; अयोध्येचा राजा गाझीउद्दीन हैदर यानें हफ्त कुलझुम नांवाचा कोश ७ भागांत १८२२ त लखनौ येथें प्रसिद्ध केला. बहुतेक पाश्चात्त्य व कांहीं भारतीय भाषांत फारसी कोश झालेले आहेत. प्रो. पटवर्धन यांचा फार्सी-मराठी कोश. बंगालींत १८१८ त जयगोपाळानें फारसी कोश श्रीरामपुर येथें प्रसिद्ध केला. एफ्. स्टेनगॅस-पर्शिअन-इंग्लिश डिक्शनरी (दु. आ. १९३०). **पहलवी**—वेस्ट-मुंबई, १८७४. **अवेस्ता**—प्रो. जस्टी-अवेस्ताकोश (जर्मन), १८६४; कांगा-(गुजराथी) मुंबई, १९००.

आंग्लोइंडियन—व्हिटवर्थ-ॲन आंग्लो इंडियन डिक्शनरी, यांत इंग्रजींत उपयोजिले जाणारे हिंदी भाषांतील शब्द व इंग्रजी किंवा इतर भारतीयेतर शब्दांना हिंदुस्थानांत कोणता विशिष्ट अर्थ आला आहे तेंहि दिलें आहे (१८८५); फेनेलचाहि असा एक इंग्रजी भाषेंत आलेल्या परकीय शब्दांचा कोश आहे. त्यांत कारकून, जमादार, गोसाई, हुक्का, चिलीम, हूली (होळी), हुंडी इ. शब्द घेतले आहेत.

चिनी—चिनी लोकांनीं आपल्या भाषेंत केलेले कोश असंख्य असून त्यांपैकीं पुष्कळांच्या आवृत्तीहि निघाल्या आहेत. हु शिनचा श्वो वन हा कोश ख्रि. पू. १५० त प्रसिद्ध झाला. त्यांत ५४० मूळ शब्दांखालीं आणलेले १०,००० शब्द (वर्णे) आहेत. याचे १२ भाग आहेत. त्यानंतर ५३० सालांतील कुये वंगच्या 'यु पियेन' कोशांत ५४२ मूळ शब्द आहेत. १७११ त वाङ्मयीन वाक्प्रचारांचा एक कोश जो झाला त्याचे १३० भाग आहेत. १७१६ त कांघी राजाच्या आश्रयाखालीं ४० भागांचा एक कोश झाला. त्यांत ४९०३० शब्द आहेत. हाच कोश चीनमध्यें आधारभूत समजला जातो. लॅटिन, इंग्रजी व

फ्रेंच भाषांत चिनी कोश झालेले आहेत. या भाषेवर जितके पाश्चात्त्य कोश आहेत तितके इतर भाषेवर क्वचित आढळतील. लोब्स-चीडच्या चिनी-इंग्रजी कोशांत मूळ शब्दांच्या क्रमानें मांडणी केली आहे.

जपानी—स्थानिक कोश फार थोडे आहेत. बहुतेक पाश्चात्त्य भाषांतून युरोपियनांनीं केलेले आढळतील. जपानी-इंग्रजी कोश हेप्बर्नचा आहे.

फिलिप्पाइन्स—बिकोल, बिसय, इबनाक, इलोकन, पंपंग, तगल इ. भाषांचे कोश आहेत.

उत्तर आणि मध्य आशिया—तुरिअत, कालमुक, चुवश, जगताई, मांचू, मोंगोल, ओस्टिअक, समोयेद, तातैर, तिबेटी, तुंगुसियन, उइगुर इ. भाषांचे कोश आढळतात. पैकीं मांचू व तिबेटी कोश फार महत्त्वाचे आहेत. बहुतेक कोश जर्मन व रशियन आहेत. एच्. ए. जस्चकी यानें केलेला तिबेटी-इंग्रजी कोश आहे. यांत तिबेटी उपभाषांचाहि उल्लेख आहे. नुकताच डॉ. टर्नरनें एक मोठा तिबेटी-इंग्रजी कोश रचिला आहे. तो व्युत्पत्तिदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

कोरिया—या भाषेचे कोश कोरिया, चिनी, जपानी व रशियन भाषांतून आहेत.

आफ्रिका—इजिप्शियन्, कॉप्टिक, एथिओपिक, आम्हारिक, पूर्व किनाऱ्यावरील, मालागासी, दक्षिण आफ्रिका, पश्चिम आफ्रिका, मध्य आफ्रिका व बबर या भाषांतले कोश फ्रेंच, जर्मन आणि इंग्लिश लोकांनीं केलेले आहेत.

ऑस्ट्रेलिया, पॉलिनेशिया—यांतील भाषांचे कोश इंग्रजांनीं केलेले आहेत.

अमेरिका—यांतील अनेक स्थानिक भाषांचे (युरोपीय भाषांखेरीज) कोश उपलब्ध आहेत. उदा. एस्किमो, ओटोमी, मय, ग्वारनी, आयमारा इ. भाषांचे कोश. इतर कोशांप्रमाणेंच हे सर्व युरोपियन प्रयत्नांनीं झालेले आहेत हें सांगावयास नकोच.

मागें वर्णन केलेल्या कोशांसुध्दां ऑफ्रेटच्या सूचींत आढळणाऱ्या सर्व संस्कृत कोशांची यादी पुढें दिली आहे. यांत उ. =उल्लेख असें समजावे.

१ अकारादि निघण्टु. २ अगस्त्यनिघण्टु. ३ अनादिकोश. ४ अनेकाक्षरकोश. ५ अनेकार्थ. ६ अनेकार्थकोश–हेमचंद्र. ७ अनेकार्थतिलक, नानार्थरत्नतिलक–महिप. ८ अनेकार्थदीपिका–उ. मल्लीनाथ, (किरातार्जुनीय) ११.५९. ९ अनेकार्थ–ध्वनिमंजरी–गदसिंह, तसेंच–महाक्षपणक. १० अनेकार्थनाममाला. ११ अनेकार्थशेष–हेमचंद्र. १२ अनेकार्थसंग्रह–हेमचंद्र (टीका–अनेकार्थकैरवाकरकौमुदी–महेंद्रसूरि). १३ अनेकार्थसंग्रह–अर्वाचीन. १४ अनेकार्थसमुच्चय–शाश्वत. १५ अभिधानचिंतामणि अथवा अभिधानचिंतामणिनाममाला–हेमचंद्र (टीका–अवचूरी, नामसारोध्दार, व्युत्पत्तिरत्नाकर–देवसागरगणि, महेंद्रसूरि, वादिशैवल्लभ, नाम्नाम् सारोद्धार–वल्लभगणि–अभिधानचिंतामणौ शेषसंग्रह, शेषनाममाला, शेषसंग्रहसारोध्दार, बृहदभिधानचिंतामणि). १६ अभिधानतंत्र अथवा नामलिंगानुशासन–जटाधर. १७ अभिधानमंजरी. १८ अभिधानमाला उ.–रायमुकुट व भट्टोजी. १९ अभिधानरत्नमाला–हलायुध (टीका–आजड). २० अमरकोश अथवा नामलिंगानुशासन अथवा त्रिकांड–अमरसिंह. २१ अमरदत्त (कोशकार)–उ. हलायुध, मेदिनीकर, रायमुकुट, भानुजी. २२ अमरमंगल–उ. महेश्वर, केशव. २३ अमरमाला–उ. क्षीरस्वामी, वर्धमान, रायमुकुट, भरतसेन, भानुजी. २४ अमरशेष–उ. देवण्ण (स्मृतिचंद्रिका), त्रिकाण्डशेष–पुरुषोत्तम. २५ अर्धनारीश्वर (कोशकार)–उ. चारित्रवर्धन (रघुवंश). २६ असालतिप्रकाश (काश्मीरचा राजा असालति याच्या आज्ञेनें झालेला कोश). २७ उग्र–(कोशकार), हेमचंद्रावर टीका. २८ उत्पलमाला अथवा उत्पलिनी–उत्पल. उ.–पुरुषोत्तमदेव (हारावली), मेदिनीकोश, मल्लिनाथ, रायमुकुट, शिवराम (वासवदत्ता), भानुजी. २९ एकवर्णार्थसंग्रह–भरतसेन. ३० एकाक्षरकोश –पुरुषोत्तमदेव, महाक्षपणक, महीधर, वररुचि. ३१ एकाक्षरनाममाला (अमरकृत?) –अमरकांत, वररुचि, सुधाकलश, हिरण्यनाभ, विश्वशंभु. ३२ एकाक्षरनाममालिका–विश्वशंभु. ३३ एकाक्षरनिघण्टु –हरुगप दण्डाधिनाथ, वररुचि, शांतवीर, देशिकेंद्र, सदाचार्य. ३४ एकाक्षरमाला. ३५ एकाक्षरनिघण्टुमाला–उ. –हेमाद्रि (रघुवंश). ३६ एकाक्षरमाधवनिघण्टु. ३७ एकाक्षरमातृकाकोश. ३८ एकाक्षरमालिका–अमरसिंह (?), विश्वशंभुमुनि. ३९ एकाक्षरत्नमाला. ४० एकाक्षराभिधान–(वररुचिकृत). ४१ एकाक्षराभिधानमाला–उ. पद्मनाभदत्त. ४२ एकाक्षरीकोश–माधव. ४३ एकार्थनाममाला व द्व्यर्थनाममाला–सौभरि. ४४ ऐंद्रनिघण्टु–वररुचि. ४५ औणादिकपदार्णव–पेद्दभट्ट.

४६ कल्पद्रु (नाममाला)–केशव. ४७ कविजनशेवधि–आदिनाथ कवि. ४८ कविजीवन–धर्मराज. ४९ कविदीपिका निघण्टु–विक्रमादित्यराज. ५० कविसेवादिनिघण्टु. ५१ कात्य–उ. क्षीरस्वामी, हेमचंद्र, केशव, महेश्वर, रायमुकुट, भानुजी. ५२ कात्य (कोशकार)–उ. मंख. ५३ कोशकल्पतरु–विश्वनाथ. ५४ कोशसंग्रह–राधाकृष्ण. ५५ कोशसार–उ. शिवराम (वासवदत्ता). ५६ क्रियानिघण्टु–भट्टमल्ल. ५७ गणनिघण्टु. ५८ गणमंजरी–निहेक कविवल्लभ. ५९ गाथाकोशवह्नी. ६० गीर्वाणभाषाभूषण–त्रिविक्रमाचार्य. ६१ गोवर्धनकोश–उ. मेदिनीकर. ६२ चंद्रकोश–उ. भट्टोजी. ६३ चन्द्रनंदन (कोशकार)–उ. क्षीरस्वामी (अमरकोश). ६४ जैमिनीनिघण्टु. ६५ तारपाल (कोशकार)–उ. मेदिनीकर, रायमुकुट, भानुजी. ६६ त्रिकांडशेष अथवा अमरशेष–पुरुषोत्तमदेव–उ. मेदिनीकर, रघुनंदन, उज्ज्वलदत्त, मल्लिनाथ, शिवदत्त इ. ६७ त्रिरूपकोश–कचणविल्हणकवि. ६८ त्रिलिंगनिर्णयोदाहरण अथवा रत्नकोश. ६९ त्रिविक्रम (कोशकार)–उ. हेमाद्रि, दिनकर ('रघुवंश'). ७० दामोदर (कोशकार)–उ. रायमुकुट. ७१ द्रव्यगुणविचार (कोश?)–रत्नाकर (सूचीपत्र). ७२ द्वंद्वादिकोश. ७३ द्विरूपकोश–(उ. रायमुकुट) पुरुषोत्तमदेव, हर्ष,

महेश्वर. ७४ द्विरूपध्वनिसंग्रह–भरतसेन. ७५ द्व्यक्षरनाममाला–सौभरि. ७६ द्व्यर्थकोश–पुरुषोत्तमदेव. ७७ धन्वंतरिनिघण्टु–वैद्यक. ७८ धरणिकोश–धरणीदास–उ. मेदिनीकर, रायमुकुट, उज्ज्वलदत्त, गदसिंह व आणखी. ७९ धातुकोश (कविकल्पद्रुम)–बोपदेव. ८० धातुपारायण–जूमरनन्दिन्, पूर्णचंद्र, हेमचंद्र. ८१ नक्षत्रकोश. ८२ नक्षत्रनिघण्टु. ८३ नक्षत्राभिधान. ८४ नानार्थकोश –शाश्वत, हेमचंद्र. ८५ नानार्थध्वनिमंजरी–गदसिंह अथवा दुर्गसिंह. ८६ नानार्थपदपेटिका–सर्वज्ञसुजन. ८७ नानार्थमंजरी. ८८ नानार्थरत्नतिलक (अनेकार्थतिलक पहा). ८९ नानार्थरत्नमाला–हरुगप दंडाधिनाथ अथवा दंडिनाथ, दंडेश अथवा (भास्कर-हरिहर-कालीन). टीका–वंयभट्ट. ९० नानार्थरत्नाकर. ९१ नानार्थशब्दकोश–मथुरेश (शब्दरत्नावली पहा). ९२ नानार्थशब्दरत्न–कालिदास, टीका–तरला –निचुल कवि योगिचंद्र. ९३ नानार्थशब्दानुशासन–मंडनमिश्र. ९४ नानार्थसंग्रह–अजयपाल उ.–गणरत्नमहोदधि, मेदिनीकर, उज्ज्वलदत्त, रायमुकुट, शिवदास. ९५ नानार्थसंग्रह–हरिश्चंद्र. ९६ नामनिघण्टु (वैदिक)–माधव–उ. देवराज. ९७ नामनिधान–सर्वज्ञनारायण–उ. रायमुकुट, भानुजी. ९८ नामप्रपंच–उ. रायमुकुट. ९९ नाममातृकानिघण्टु–वरदराजाचार्य. १०० नाममाला–दंडिन्. १०१ नाममाला–उ. क्षीरस्वामी (अमरकोश) वामन, हेमचंद्र, मेदिनीकर. १०२ नाममाला (वर्णानुक्रमचित्तकोश). १०३ नाममाला–धनंजय (धनंजयनिघण्टु), धनंजयकोश, प्रमाणनाममालानिघण्टुसमय (दोन भाग–एकार्थ व नानार्थ), धनंजयनाममाला. १०४ नाममाला–साधु. १०५ नाममाला–हर्षकीर्ति (शारदीयाख्यानाममाला). १०६ नाममालाकोश. १०७ नाममालिका–भोज महिप. १०८ नामलिंगाख्या कौमुदी–रामकृष्ण, सूचीपत्र. १०९ नामलिंगानुशासन–अमरसिंह. ११० नामसंग्रह–भानुचंद्र. १११ नामसंग्रहनिघण्टु–भार्गवाचार्य. ११२ नामसंग्रहमाला–अप्पय्यदीक्षित. ११३ नामसारोद्धार–हेमचंद्र (अभिनवचिंतामणीवर टीका). ११४ नामावली–गोवर्धन (?) –धनंजय. ११५ निघण्टुशेष–हेमचंद्र. ११६ निर्हेक कविवल्लभ–गणमंजरी. ११७ निजविनोद–महादेव वेदान्ती. ११८ नीलकंठकोश–(अमरकोश टीका पहा). ११९ नैघण्टुकैकाध्याय–बाल्हिकेयमिश्र. १२० न्यायकोश.

१२१ पंचतत्त्वप्रकाश–वेणीदत्त. १२२ पंचरूपकोश. १२३ पदचंद्रिका–मयूर. १२४ पदमंजरी–कविवल्लभ, भल्लटकवि, १२५ पदार्थकौमुदीकोश. १२६ पदार्थकौमुदीसारकोश. १२७ पदार्थभास्कर. १२८ पद्मकोश–प्रयागदास. १२९ पर्यायपदमंजरी–हम्मीरमिश्र. १३० पर्यायरत्नमाला–महेश्वरमिश्र. १३१ पर्यायार्णव–नीलकंठमिश्र. १३२ प्रयुक्तपदमंजरी–ईश्वरकृष्णकालिदास. १३३ बालप्रबोधिका–नत्किरकवि. १३४ बीजकोश. १३५ बीजनिघण्टु. १३६ बृहद्वत्नाकर–वामनभट्ट. १३७ भागुरि–उ. क्षीरस्वामी, हलायुध, महेश्वर, हेमचंद्र, केशव. महिप, मेदिनीकर, रायमुकुट, मल्लिनाथ. १३८ भारतमाला. १३९ भावप्रकाशनिघण्टु. १४० भुवनप्रदीपिका–सार्वभौममिश्र. १४१ भूरिप्रयोग–पद्मनाभदत्त–उ. नारायणशर्मन, रामनाथ, भट्टोजी. १४२ मातृकाकोश–चतुर्भुजशिष्य. १४३ मातृकानिघण्टु–मातृकाक्षरनिघण्टु–महीधर. १४४ मात्राकोशभारविका. १४५ माधवकोश.–उ. मेदिनीकर. १४६ मानमंजरी (संकृत व भाषाकोश)–नंदकवि. १४७ मालतीमाला–उ. मल्लिनाथ, रामानंद (काशीखंड). १४८ मुक्तावली–उ. रंगनाथ. १४९ मुग्धबोध (इ.स. १३९४). १५० मुनि–व्याडि? किंवा कात्यायन?. १५१ मेदिनीकोश अथवा नानार्थकोश–मेदिनीकर–उ. शिवकोश, असालतिकोश, भूरिप्रयोग. १५२ यादवकोश–यादवप्रकाश (वैजयंती पहा). १५३ रघुनंदनकोश–(स्मृतितत्त्वावरील कोश). १५४ रत्नकोश–उ. मल्लिनाथ, रायमुकुट, गदसिंह, शिवराम (वासवदत्ता), भानुजी; रत्नकोश–कालिदास. १५५ रत्नप्रकाश. –उ. मल्लिनाथ (शिशुपाल वध १२,१६). १५६ रत्नमाला–माधव–उ. रायमुकुट. १५७ राजकोशनिघण्टु–राजव्यवहारकोश–रघुनाथपंडित. १५८ राधाकृष्ण कोश–राधाकृष्ण. १५९ रुद्रकोश–रुद्र–उ. मल्लिनाथ, मेदिनीकर. १६० रूपभेदप्रकाश (शब्दभेदप्रकाश पहा). १६१ रूपरत्नाकर –उ. रायमुकुट, भानुजी. १६२ लघुनिघण्टुसार–केशव. १६३ लघ्वमर. १६४ लिंगभट्टीय–भानुदीक्षित. १६५ लिंगानुशासन. १६६ वररुचिकोश–उ. हलायुध, मेदिनीकर (एकाक्षरकोश, एकाक्षर निघण्टु, एकाक्षरनाममाला, एकाक्षराभिधान, ऐन्द्रनिघण्टु). १६७ वर्णनिघण्टु (प्रश्नशास्त्र). १६८ वर्णप्रकाश–कविकर्णपूर. १६९ वस्तुकोश. १७० वाचस्पति (कोशकार)–उ. हेमचंद्र, महेश्वर, केशव, रायमुकुट, भट्टोजी, भानुजी, पुरुषोत्तमदेव, मेदिनीकर, सुंदरगणि. १७१ वामननिघण्टु–वामन. १७२ विक्रमादित्यकोश (हारावली)–उ. मेदिनीकर, सुंदरगणि, भानुजी. १७३ विचित्रनाममाला. १७४ विबुधोपदेश. १७५ विश्वनिघण्टु–विश्वकवि, परमेश्वरभट्ट (?). १७६ विश्वकोश–विश्वप्रकाश–महेश्वर, रत्नाकर, वाचस्पति. १७७ विश्वमेदिनी–वाचस्पतिमिश्र, सारस्वतमिश्र. १७८ विश्वप्रकाश–वाचस्पति, महेश्वर. १७९ विश्वरूप (कोशकार)–उ. महेश्वर, मेदिनीकर, भट्टोजी. १८० विश्वलोचन–उ. विश्वप्रकाश. (?). १८१ वेदनिघण्टु–पिंगलाचार्य (?). १८२ वैजयन्ती–यादवकोश–यादवभट्ट–उ. हेमचंद्र, मल्लिनाथ, देवण्ण.

१८३ शब्दकल्पद्रु–केशव. १८४ शब्दकल्पद्रुम–राधाकांतदेव. १८५ शब्दकल्पद्रुम –व्यासकेशव. १८६ शब्दकौस्तुभ–भट्टोजी. १८७ शब्दचंद्रिका–बाणकवि. १८८ शब्दचिंतामणि–व्यास विठ्ठलाचार्य. १८९ शब्दतरंगिणी–उ. उज्ज्वलदत्त,

१९० शब्दप्रभेद–शिवदीन. १९१ शब्दभेद–उ. जयमंगल (भट्टिकाव्य). १९२ शब्दभेदनिर्देश. १९३ शब्दभेदप्रकाश अथवा शब्दभेदनाममाला–महेश्वर, (टीका–ज्ञानविमलगणि)–पुरुषोत्तमदेव. १९४ शब्दमाला–रामेश्वरशर्मन्. १९५ शब्दमुक्तामहार्णव–रामचंद्रपुत्र तारामणि (कोलब्रुक करितां केलेला, अर्वाचीन). १९६ शब्दरत्न. १९७ शब्दरत्नप्रदीप–काशीराम (मथुरादासाचा मुलगा). १९८ शब्दरत्नसमन्वय–शाहाजी राजे, तंजावर. १९९ शब्दरत्नाकर–महिप, वामनभट्ट, अथवा शब्दप्रभेदनाममाला–सुंदरगणि. २०० शब्दरत्नावली. २०१ शब्दरत्नावली–मथुरेश. २०२ शब्दलिंगार्थचंद्रिका–उ. वेंकट, सुजन. (टीका–चकोरभट्टाचार्य, विद्वत्कालोलभट्टाचार्य). २०३ शब्दशब्दार्थमंजूषा–उ. वेंकट. २०४ शब्दसंदर्भसिंधु (शब्दार्णवाभिधान)–काशीनाथ भट्टाचार्य. २०५ शब्दसारनिघण्टु. २०६ शब्दस्तोममहानिधि. २०७ शब्दाब्धि–प्राणकृष्णाच्या आज्ञेनुसार केलेली. २०८ शब्दाब्धितरि–रामगोविंद. २०९ शब्दार्णव–उ. पुरुषोत्तमदेव (हारावलीमध्ये), मेदिनीकर, उज्ज्वलदत्त, रायमुकुट, मल्लिनाथ, भानुजी, शिवकोश, सुन्दरगणि. २१० शब्दार्थकल्पतरु–वेंकट. २११ शब्दार्थचंद्रिका. २१२ शब्दार्थचिंतामणि. २१३ शब्दार्थमंजरी. २१४ शब्दार्थमंजूषा (टीका–मुरारिमिश्र). २१५ शब्दार्थरत्नाकर–सुंदरगणि. २१६ शाश्वत–अनेकार्थसमुच्चय–उ. क्षीरस्वामी, वररुचि, गणरत्नमहोदधि, मेदिनीकर, उज्ज्वलदत्त, मल्लिनाथ. २१७ शिवकोश–शिवदत्त (टीका–शिवप्रकाश). २१८ शीघ्रबोधिनी नाममाला–पुंडरीक विठ्ठल २१९ शेष–उ. क्षीरस्वामी. २२० श्रीधर–उ. सुंदरगणि. २२१ श्रुतशब्दार्थ–समुच्चय–सोमेश्वर. २२२ श्लेषार्थपदसंग्रह–श्रीहर्षकवि. २२३ षडर्थनिर्णय–कवि राक्षस. २२४ सज्जन (कोशकार)–उ. मल्लिनाथ. सैजीवनी. २२५ सरस्वतीविलास–विद्वच्चकोरभट्ट, सरिद्वलभमिश्र. २२६ सारस्वताभिधान–भावपाद. २२७ सुप्रसिद्ध पदमंजरी–मुरारि श्रीपति सार्वभौम. २२८ हारावली–पुरुषोत्तमदेव–उ. मेदिनीकर, भूरिप्रयोग, असालतिप्रकाश, शिवकोश (टीका–मथुरानाथ शुक्ल), बृहद्धारावली–उ. रायमुकुट, भानुजी.

प्राकृत व फारसी कोश–१ अर्धमागधी कोष–जैनमुनि श्री रत्नचंद्रजी. २ गाथासप्तशती अथवा गाथाकोश–हाल. (टीका)–कुलनाथ, गंगाधर, पीतांबर, प्रेमराज, भुवनपाल; मुक्तावली–साधारणदेव. ३ नाममाला–हेमचंद्र (अभिधानचिंतामणि देशीनाममाला). ४ पाइअलच्छिनाममाला–धनपाल. ५ पाइअसद्द महण्णवो–हरगोविंददास. ६ पारसीप्रकाश किंवा पारसी कोश–विहारि कृष्णदास (अकबरकालीन). ७ पारसी विनोद–व्रजभूषण. ८ पारशीप्रकाश–वेदांगराय (ज्योतिषविषयक).

ही प्रस्तावना लिहिण्याच्या कामीं कचेरींतील संपादकवर्गाखेरीज ज्यांचें साहाय्य झालें आहे त्यांचे आभार मानिले पाहिजेत. या कामांत फर्ग्युसन कॉलेजमधील प्रो. डॉ. व्ही. व्ही. गोखले, एम्. ए. पी.एच्. डी. यांनीं प्रो. झकारिया यांच्या संस्कृत कोशवाङ्मयावरील जर्मन निबंधावरून मराठी टिपणें तयार करून दिलीं व गुजराथी कोशसाहित्यावरील टिपण रा. एम्. आर्. मजमुदार, एम्. ए. एलएल्. बी. यांनीं करून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

या निबंधाकरितां खालील ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे व त्या ग्रंथकारांचे आम्ही आभारी आहों.

निरुक्तः—Dr. Laxman Sarup. (Oxford, 1920); जीवानंद विद्यासागर भट्टाचार्य (कलकत्ता, १८९१); व्यंकटेश्वर प्रेस; Introduction to the Nirukta by Rudolph Roth. translated by Rev. D. Mackichan M. A. D. D. LL. D. Bombay, 1919.

षट्कोशसंग्रह—(हेमचंद्र, उणादि, पंचतत्त्वप्रकाश, शारदीनाममाला, विश्व, हलायुध) बाबू वाराणसीप्रसाद, बनारस, संवत् १९३०.

द्वादशकोशसंग्रह—(मेदिनी, एकाक्षरी, द्विरूप, द्विरूप, त्रिकांडशेष, अनेकार्थध्वनिमंजरी, हारावली, धनंजय, वररुचि, गणितनाममाला, मातृकाकोश) बाबू वाराणसीप्रसाद, बनारस संवत् १९२९.

संस्कृत कोश (चतुष्टय)—(त्रिकांडशेष, मेदिनी, हारावली, एकाक्षरी. यांपैकीं उपलब्ध प्रतींत हारावलीकोश नाहीं) सदाशिव बजाबा शास्त्री अमरापूरकर, मुंबई १८५४.

अमरकोश (क्षीरस्वामीकृत ' अमरकोशोद्घाटन ' टीकेसह)—कृष्णाजी गोविंद ओक, पुणें १९१३.

Catalogus Catalogorum—Theodor Aufrecht, Leipzig 1891.

Die Indischen Worterbucher–Theodor Zachariae (Grundriss). Strassburg 1897.

Encyclopædia Britanica 11th and 14th Edition.

Evolution of English Lexicography by J. A. H. Murray.

The Periodical, 15 February 1928. Oxford University Press.

शास्त्री, मोलस्वर्थ, केनेडी, H. H. Wilson, इत्यादिकांचे विविध कोश व त्यांच्या प्रस्तावना.

राजवाडे लेखसंग्रह भाग २ रा–संपा. शं. ना. जोशी. शक १८५४, चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ श्री ॥

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग पहिला

अ

अ—१ वर्णमालेंतील पहिला स्वर. या वर्णाचें सर्वांत जुनें स्वरूप अशोकाच्या गिरनार शिलालेखांत सांपडतें—ओझा ज्ञाको. २ पु. ब्रह्मा: विष्णु; महेश; सूर्य; अग्नि; वायु; ब्रह्म: मोर. ३ उपसर्ग नकारार्थी प्रकार सातः (अ) त्यासारखें पण तें नव्हे. 'अब्राह्मण' (ब्राह्मणासारखा पण ब्राह्मण नव्हे); 'अचक्षुर्दर्शन'. (आ) अप्राशस्त्य; अयोग्यता; अनुचितपणा. 'अकाल' (अयोग्य काल); 'अवेळ' (अयोग्य वेळ); 'अपथ्य'. (इ) निषेध; प्रतिषेध. 'अदर्शन'. (ई) अभाव. 'अज्ञान'; 'अक्रोध'. (उ) त्याहून इतर, किंवा भेद. 'अमनुष्य' (मनुष्येतर, जनावर वगैरे). (ऊ) अल्पत्व: कर्मधा. 'अबोल्या'. 'अनुदरा' (कृशोदरी); 'अशिजा(अर्धवट शिजेलला). (ऋ) विरोध: उलटपणा. 'अधर्म'; 'अनीति'. ४ निरर्थक. 'अघोर' (घोर); 'अपरोक्ष' (पाठीमागें). ५ क्रिवि. मूळ स्थितीला जाणे. 'असुजणें' (सूज उतरणें).

अ—वर्गीकरणामध्यें उत्तम, प्रथम या अर्थी. 'अवर्ग' 'बवर्गी' इ०.

अइ—स्त्री. १ आई. २ उद्गा. दुःख आश्चर्यादिवाचक उद्गार. [ध्व. आई पहा.]

अइ, अई—हे व यांनीं प्रारंभ होणारे शब्द ए मध्यें पहा.

अइलिया—पु. शेतांतीलमजूर—भादिसंवृ ६८. [द्रा अलिआ=मद्रासी शेतकरी जात?]

अइनी—आयणी पहा.

अइसा—असा पहा.

अई—स्त्री. १ (कों.) आजी. २ आई. ३ उद्गा. दुःख—शोकदर्शक उद्गार.

अईन—स्त्री. १ चांगली कुळी—चाल—वर्तणूक. 'हा अ० चा गृहस्थ'; 'हा अ० नें चालतो'; 'याची मोठी अ० आहे'. **म्ह.** १ अ० ला मरावें, खरवडीला झुरावें (जेवणाचें आमंत्रण ऐटीनें नाकारावयाचें परंतु त्यांतील शिळ्या तुकड्यांसाठीं हपापावयाचें). २ अ० गवगाची व आम लेंडुकाची (रावणाप्रमाणें ऐट पण आकांक्षा भिकाऱ्याची). [फा. आयीन=सार; सत्त्व.] २ ऐन पहा.

अईन—पु. एक मोठें, लांब पानांचें झाड: याचें लांकूड गलबतें व डमाल्ली यांच्या उपयोगीं पडतें व मजबूत असतें; काळा आणि पांढरा अशा दोन जाती. काळ्याची साल कोळी लोकांस जाळें रंगविण्यास लागते, तिला सादडा म्हणतात. —वगु. २ ऐन पहा. [?]

अईसभईस—वि. (व.) अद्‌भुत (गोष्ट). [ऐसपैस?]

अउटकी, अउटी—अवटकी, अवटी पहा.

अउट (ड), अउट(ड)कें—औट, औटकें पहा.

अउडबारा—बारा × ३॥ हात (१ पुरुष); बारा पुरुष. 'कृष्णें बाण सोडिला तिधारां। रुक्मियासी लागला पिसारा। मागें साधिला अउडबारा। शक्ति अंबरां उडविली॥'—एरुस्व १२. १२१. [अउड=औट+बारा]

अउणापाउणा—वि. सुमारें एक किंवा थोडें (पाव) कमी अधिक. 'अउणेपाउणे ५ रुपये द्या.' [सं. अर्धोन + पादोन]

अउत्या—पु. औत पहा.

अउर—और पहा.

अऊ—पुढील खेरीज अऊनें आरंभ होणारे शब्द औमध्यें पहा.

अऊत—करी—काठी—पटी—बंदी—भरणा—औत पहा.

अऊर—पु. (कों.) नदीचा पूर: ओर. और पहा. [आ+पूर?]

अऊस—अवस पहा.

अऋण(णी)—वि. कर्जे नसलेला. 'अऋणी, अप्रवासी तोच सुखी'. [सं. अ+ऋण]

अक—न. दुःख; पाप. [सं. अ=नाहीं+क=सुख]

अकच्छ—वि. कासोटयाविरहित: (ल.) मुसलमान. [सं. अ+कच्छ=कासोटा]

अकंटक—वि. निष्कंटक; (ल.) शत्रु-संकटरहित. [सं. अ+कंटक=कांटा]

अकटचिकट—वि. १ विशेष चिकित्सा करणारा. २ चिकाटी करणारा; हट्टी; आग्रही. ३ फार बारकाईनें शोध घेणारा. ४ चिवट; विशेष चिकित्सा करून बसविलेला (वेत, योजना वगैरे). [चिकट द्वि.]. **०सोळा**–वि. सोंवळ्यासंबंधीं अतिशय चिकित्सा करणारा. सोंवळा पहा.

अकट (टो) विकट—वि. अतिशय मोठा व ओबडधोबड; भयाढव्य; बेढब; अकाळविकाळ; अगडबंब; भव्य; भयंकर; (उप.) अत्यल्प; अकटोपासून विकटोपर्यंत (ज्ञान). [विकट द्वि.]

अकटी—स्त्री. लहान शेगडी; आगटी [सं. अग्निस्थिति]

अकटेदुकटें—न. ठिक-यांच्या खेळांतील घरांचें नांव. ठिक-या पहा.

अकड, अक्कड—स्त्री. १ ऐट; आव; डौल; झिमाख; नखरा; टांक. २ ऐंकाव्या गोष्टीचा झिमाख दाखविणें, मिरविणें, करणें. **०बाळगणें-धरणें-दाखविणें.** [सं. वक–अकर; आकृति; ? हि अकड] **०णें**–अकि. ऐट करणें; डौल मिरविणें; नखरा करणें. **०खोर ०बाज**–वि. ऐट, छानछोकी करणारा; फांकडा; नटवा. **०खोरी ०बाजी-अकडाई**–स्त्री. ऐट करण्याची संवय.

अकडकडवें—न. पालुपद; आंकणकडवें पहा.

अकडंतिकडं—न. १ ताळतंत्र नाहीं असें बोलणें; वायफळ बडबड, भाषण. २ टाळाटाळ; चुकवाचुकवी. –क्रिवि. वायफळपणें; मुद्द्याला सोडून; विसंगतपणें (भाषण–क्रिया करणें, बोलणें). [इकडे तेकडे अप. सं. अकडमं=अ, क, ड इ० अक्षरांकित एक गूढ चक्र ?]

अकढा—वि. १ न कढलेला; अर्धवट कढलेला (पदार्थ). २ वेतलेपर्यंत न तापविलेला (धातु). [अ+कढणें]

अकण—वि. १ कणी नसलेला (तांदूळ वगैरे). २ कणसांत दाणे नसलेलें (पीक); पोल. ३ खावयास धान्य नाहीं असा; दरिद्री; निर्धन. ' अकणा कण होय, अधना धन होय '. [सं. अ+कण] **०कडवें**–आकण कडवें पहा.

अकत्यार—अख्त्यार पहा.

अकथित—वि. न सांगितलेलें; न बोललेलें. [सं.]

अकथ्य—वि. अकथनीय; न सांगण्यासारखें; अवर्ण्य. [सं.]

अकद—वि. ज्यास आकार नाहीं असा. [अर. कद = ठेवण; बांधा]

अकदस—वि. पुण्यवान; पुण्यशील; धर्मात्मा. –रा १५, १६४. [अर. अक्दस्=फार पुण्यशील, अत्यंत पवित्र]

अकपट—वि. १ निष्कपट; सरळ. २ खरा; वास्तविक. **-न.** मोकळेपणा; निर्व्याजता; खुलें दिल; शुद्ध भाव. [सं. अ+कपट]

अकब—क्रिवि. मागून; नंतर. ' अकब अंदाज आशूरा ' –पया ३८५. ' अकबत् अझ् आशूरा ' = आशूऱ्यानंतर. [फा.]

अकबर—वि. श्रेष्ठ; थोर; मोठा. –पु. एक मोंगल बादशहा. [अर. अक्बर]

अकबरनवीस-नीस—अख्त्यार पहा.

अकबरशाही—वि. अकबरानें चालू केलेलें (रुपया, मोहोर वगैरे नाणें.). –स्त्री. अकबराची कारकीर्द; अकबराच्या कारकीर्दी-संबंधीं माहिती. –पया ३८५. [फा.]

अकबराबाद—न. आग्रा शहर. –रा ६.५८४; पया ४४६ [अर. अक्बर+फा. आबाद=बसविलेलें गांव]

अकबरी—स्त्री. १ अकबराची मोहोर. २ तांदुळाच्या पिठाचा केलेला एक पदार्थ (लुस). –वि. अकबरासंबंधी(कायदे, नाणीं, प्रघात.) **०मोहर-मोहोर**–स्त्री. १ अकबराचें उत्तम सोन्याचें नाणें, १५ रु. किमतीचें. २ या नाण्यांची केलेली माळ. ३ (ल.)–चांगल्या प्रतीचा किंवा इज्जतदार (व्यापारी, फायदेशीर धंदा, सुपीक जमीन इ०). [अर. अक्बर=श्रेष्ठ + ई]

अकबार—वि. पूर्ण बहारयुक्त. ' केतकी कर्दळी अकबार। बहु टवटवती ' –पला ३.६. [अखा+बहार]

अकबार—अख्त्यार पहा. [फा.]. पु. **०नवीस-नीस**–अख्त्यार खालीं पहा.

अकमान—पु. (गो.) अपमान. [सं. अप+मान]

अकरकीं—न. अव. अकरापासून वीस पर्यंत अंकांचा परस्पर गुणाकार करून बसविलेले पाढे. ' अकरें अकरें एकविसावें '. [अकरा]

अकरकीं—क्रिवि. अकरीं; सोंगट्यांमध्यें अकराव्या घरांत. [अकरा]

अकरण—न. कर्महित्य; निष्क्रियत्व; कर्मापासून मुक्तता. ' तरी अकरणाचेनि खेदें । ' ज्ञा १८. ५९२. [सं.]

अकरणरूप—न. (व्या.) कोणताहि धातु निषेधु किंवा नाहीं या अर्थानें चालविला असतां त्याचें होणारें रूपांतर. ' मी नाहीं '; ' तो करणार नाहीं '. [सं.]

अकरणीय—वि. करण्यास अयोग्य; निषिद्ध; त्याज्य. ' परि-करणीया अकरणीया न देखा ' –ऋ ४५. [सं.]

अकरताळ–ळ्या—वि. हट्टी; माथेफिरू; कजाग; खोडकर; दांडगा (विशेषतः मुलें व स्त्रिया यांच्या बाबतींत). [सं. अकृत+लु=आळ; प्रा. दे. अक्कसाला=उन्मत्त स्त्री]

अकरनकर—वि. सांगितलेलें काम न करतां न सांगितलेलें काम करणारा; हट्टी; दुराग्रही. [सं. अकृ+नकृ]

अकरम—वि. कृपावंत; दयाळु. [अर. अकाम्]

अकरमाशा-शी—वि. १ (क्वचित्) अकरा मासे वजनाचा (तोळा, रुपया इ०). २ अनौरस; जारज; हीन बीजाचा; कमजात;

दासीपुत्र. (बारा मासे नाहींत म्हणून कमी असा). [अकरा+मासे] ३ (ल.) कृतघ्न. ४ अकरा महिने पोटांत गर्भ बाळगणारा प्राणी (म्हैस). [अकरा+मास]. **०खरबूज**–खरबुजाची एक जात.

अकरमास—पु. (व.) वर्षश्राद्ध; अब्दपूरित? [अकरा+मास]

अकरमाही—स्त्री. बारा महिने चाकरी घेऊन अकरा महिन्यांचा पगार देण्याची रीत. ही इंग्रजी अंमलापूर्वी सरकारी व खाजगी नोकरींत बहुतेक हिंदुस्थानांत प्रचलित होती. ' साल अखेर २९ दिवस वजा करून देणे ' (११ महिने १ दिवस धरून)–समारो. २. ४९. [अकरा+फा. माह=महिना]

अकरस—आकरस पहा.

अकरा—वि. ११ संख्या. **०इंद्रिये**–५ कर्मेंद्रिये, ५ ज्ञानेंद्रिये व मन.–एभा १४.१०४. **०नरक** –तामिस्र, अंधतामिस्र, रौरव, महारौरव, सांडस, कुंभीपाक, काळसूत्र, तप्तसूर्मि, वैतरणी, वज्रकंटक व असिपत्र. नांवांबद्दल एकवाक्यता नाहीं.–कथा. ६.४.१२७. **०रुद्र**– रैवत, अज, भीम, भव, वाम, वृषाकपि, अजैकपाद, उग्र, अहिर्बुध्न्य, बहुरूप व महान. –हेको. वीरभद्र, शंभु, गिरीश, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली, स्थाणु व भव –सप्राको. नांवांविषयीं मतभेद आहे. [सं. एकादश; प्रा. एग्गारह, एआरह; पा. एकादस, एकारस; अमा. एक्कारस; सिंह. एकोळोस, एकोळह; काश्मी, काह; बं. उरि. एगार; हिं. इगारह, ग्यारह; पं. ग्याराम; सिं. इकारहम, यारहम; गु. अग्यार.]

अकरावा—वि. १ क्रमानें १० नंतरचा. पु. १ मुताच्या ११ व्या दिवशींचा वृषोत्सर्गादि विधि. २ दाट मैत्री, (अकराव्या राशीला गुरु आला असतां तो शुभ असतो म्हणून). **०गुरु**–दाट मैत्री (बारावा बृहस्पति=शत्रुत्व). **०रुद्र**–शिवाचा एक अवतार; मारुती. (ल.) अतिरागीट माणूस (सर्व रुद्रांत ११ वा जास्त क्रूर). [अकरा]

अकरुळ विकराळ—वि. भयंकर; भीतिदायक. [सं. कराल द्वि.]

अकरीं—सोंगटयांच्या पटांत विवक्षित घरापासून अकराव्या घरीं. 'सोंगटी अकरीं–बारीं–तेरीं आहे.' [अकराची सप्तमी]

अकरीत—अकीत पहा.

अकरुण—वि. निर्दय; निष्ठुर. [सं. अ+करुणा]

अकरें—न. १ (देवापुढें लावण्याच्या) ११ वातींचा समूह. २ आज १, उद्यां २, परवां ३ असे चढत्या क्रमानें ११ पर्यंत व पुन्हां उतरत्या क्रमानें १ पर्यंत देवापुढें लावण्याचे पिठाचे दिवे. ३ अकरकीं पहा.

अकरोट (ड)—अकोट पहा.

अकर्तव्य—वि. करण्यास अयोग्य. [सं. अ+कृ]

अकर्ता—वि. १ करण्यास अपात्र, अयोग्य. २ कांहींच कर्तव्य न उरलेला; सिद्ध. ' जे अकर्त्याच्या ठायीं वैसों येती। ' ज्ञा १३. २८०. ३ कांहीं न करणारा (आळशी); स्वस्थ. [सं. अ+कृ]

अकर्तृक—वि. (व्या) १ ज्यास कर्ता नाहीं तो प्रयोग; ज्याचा कर्ता क्रियापदापासून निराळा असत नाहीं असा; ' फावणें, सांजावणें ' इ० धातू. २ कर्त्याबांचून असलेले. [सं. अ+कृ]

अकर्तृत्व—न. नालायकी; असामर्थ्य; करण्यास अपात्रता. [सं. अ+कृ]

अकर्म—न. १ वाईट काम; पाप कृत्य; निषिद्ध कर्म. 'तंव तंव होतीं थोराडे । अकर्मांचीं तळवुडें ॥ ' ज्ञा १५. १६८. २ ज्यास कर्म नाहीं असें; कर्मातीत; ब्रह्म. 'जे कर्मावेगळे सर्वांगें । जेथ लाविताहि न लगे । जे नव्हें कर्मठाजोगें । ते जाणसवेगें अकर्म ॥ ' –एभा ७. ६६. [सं. अ+कर्म]

अकर्मक—वि. (व्या.) ज्यास कर्म नाहीं तें (क्रियापद).[सं.]

अकर्मकर्तरी—वि. (व्या.) जेथें अकर्मक क्रियापदाचा योग असून कर्त्याच्या अनुरोधानें क्रियापद असतें, तो प्रयोग. उ० ' तो चालतो ' ' तो निजतो.' [सं. अकर्म+कर्तृ]

अकर्मा—वि. १ कर्महीन; रिकामा; कर्मातीत; कर्मरहित. ' मी अकर्मा । न करोनि करीं कर्म ॥ ' –एभा. २. ३९८. २ साहसकर्म करणारा. **०कार**–वि. वाईट, पाप, साहस करणारा. ' अंबालर्यी यादव वीर । उतरले आहेती अकर्माकार ॥ ' एरुस्व ६.४१. [सं. अ+कर्म]

अकर्मी—वि. १ अकर्म करणारा. २ दुर्दैवी; अभागी; कमनशिबाचा.

अकल–करा–कऱ्हा–काडा–काढा–कारा—अकल पहा.

अकल—वि. कलारहित. ' जयजय अकलकलाशून्य । ' –यो १.९. [सं.]

अकलं (ळं) क—वि. निष्पाप; निर्दोष; कलंकरहित. [सं. अ+कलंक]

अकलदमा, हकलदमा—न. (स्त्रि.) रक्ताचें शेत. हें यरुशलेमाबाहेर सियोन डोंगराच्या दक्षिणेस आहे. यहुदा इस्कारयोत यास गुरुद्रोहाचा मोबदला म्हणून जो पैसा मिळाला त्याचें हें शेत विकत घेण्यांत आलें होतें; म्हणून त्यास अकलदमा म्हणजे रक्ताचें शेत हें नांव पडलें. हल्लीं त्या ठिकाणास हक्–एल्–दम अरें म्हणतात. ' त्यांच्या भाषेंत त्या शेताला अकलदमा म्हणजे रक्ताचें शेत असें नांव पडलें आहे.' प्रेक्. १.१९. मत्त. २७.३.१०. [अॅरे. हखल+दमा]

अकला—पु. घोडयाचा एक रोग; यापासून घोडा लंगडतो. –अश्वप. २.३१९. [फा.]

अकलाद—वि. (कर.) अल्लाद पहा.

अकल्पन—वि. कल्पनारहित; निरिच्छ. 'अकल्पनाख्य कल्पतरो।' ज्ञा. १८. १०. ०**अकल्पनीय**–वि. कल्पना करतां येणार नाहीं असें; अतर्क्य; न सुचणारें. [सं. कल्पृ]

अकल्पित—वि. १ ज्याची कल्पना होणार नाही असे. 'कि अकल्पित द्रव्य अपार। दुर्बळ ब्राह्मणां दिधलें॥' २ ज्याविषयीं पूर्वी कांहीं योजना, तयारी, बेत, विचार केलेला नाहीं असें. ३ अकृत्रिम. ४ अनुद्दिष्ट. –क्रिवि. अकस्मात्. [सं.]

अकलमन्द—वि. १ शहाणा; चतुर; हुषार; बुद्धिमान. विद्वान २ (चुकीनें) वेअकली; मूर्ख. [अर. अक्ल+फा. मन्द]

अकल्मष—वि. निष्पाप; निर्दोष. [सं. अ+कल्मष]

अकल्याण—वि. अशुभ. वाईट. –न. अमंगल. [सं. अ+कल्याण]

अकलवंत—वि. अकलमंद; बुद्धिमान्. 'हरिपंत फडके बहुत अकलवंत होते.' पया २. [अर. अक्ल+सं वंत]

अकवि—वि. मूर्ख; अज्ञानी. –हंको. [सं. अ+कवि]

अकस—पु.स्त्री. द्वेष. मत्सर; हेवादावा; चुरस; अदावत द्रोह; वैर. 'सर्व सराफ अकसीने फिरोन कजिया करितात.'–रा ११.६९. [अर.]. ०**खोर, अकसी**–वि. खुनशी. दुष्ट. हेवेखोर; द्वेष्टा; मत्सरी.

अकसणें—अक्रि. आंखूड होणें; अक्रसणें [सं. आ+कृष्]

अकसारणें—अक्रि. प्रसिद्ध होणें. [अस्करा. फा. आश्कारा]

अकसाळी—स्त्री. कर्नाटकी सोनारांची जात. [सं. अर्क. प्रा. अक्क=पुवर्ण+शाला=दुकान]

अकसीर—वि. रामबाण; गुणकारक; परिणामकारी. [अर. इक्सीर=अमृत]

अकस्मात्—वि. १ एकाएकीं. अकल्पित २ विचार केल्याशिवाय. 'दृष्टि न पहातां अवघा ग्रंथ। उगाच दोष ठेविजे अकस्मात॥ तो शतमूर्ख जाण निश्चित। नव्हे पंडित विवेकी.' [सं अ+कस्मात]. ०**अकस्मात्**–अकस्मात्. अप.

अकळ—वि. अगम्य; न समजणारें. 'अकळ देख लीला त्यांची॥ –ह ८.१२०; 'सकळांसि आश्चर्य वाटलें तेव्हां। अकळ माया देखोनिया॥' –मक ३६.९०; 'येरु म्हणे जी चक्रपाणी। तुझी तों अकळ दिसे करणी॥' –जै. ९२. ८०. [सं. अ+कल्=समजणे, जाणणें]

अकळणें—अक्रि. आकळी, जांभई, उचकी, अखेरचा श्वास येणें–देणें. [सं. आ+कल्=अस्पष्ट ध्वनि करणें] २ आकळणें पहा.

अकळत अकळून, नकळत नकळून—क्रिवि. न समजतां; अर्धवट समजून. 'मी बुद्ध्यां अपराध करणार नाहीं, अकळत नकळत झाला तर क्षमा करावी.' [सं. अ+कल्=जाणणें]

अकळषणी—न. भलत्याच वेळीं पडणारा पाऊस; अकालवृष्टि. [सं. अकाल+वन–(प्रा.) वण=पाणी]

अकळी—स्त्री. १ अखेरचा श्वास; उचकी; आंचका. २ जांभई. ०**देणें–येणें**. [ध्व. सं अ+कल्=अस्पष्ट ध्वनि करणें]

अका—अक्का पहा.

अकाउंट—पु. १ हिशेब; जमाखर्च. २ हकीकत. ०**बुक**–जमाखर्चाची वही, चोपडी. **अकाउंटंट**–हिशेबनीस; फडणीस. [इं]

अकांचन—वि निष्कांचन; निर्धन द्रव्य नसलेला; गरीब; दरिद्री. [सं. अ+कांचन]

अकांड–डी—वि अकाली; अनपेक्षित 'अकांड प्रळयीं रक्षणकारी।' –सप्र ६.२१; 'रामदेवरावाच्या पश्चात्.....एकाएकीं अकांडीं पहिला उत्कर्षकाळ आटोपला' –देभा ४. [सं. अ+कांड=उचितकाळ]. ०**तांडव**–न १ व्यर्थ, भलत्याच वेळीं, अकाली बडबड, सोंटघाने व रागाने केलेली बडबड. 'युक्ति वादवुनि उदंड। नाना मते अकांडतांड (व)। साध्य संघरोनि पाखांड। गर्जत तोंड महावादे॥' –एभा १०२ १९. २ रागाच्या भरांत दुसऱ्यावर झाडलेला ताशेरा. ३ मोठे गाजवजून सोडणारें कार्य [सं. अकांड+तांडव=नृत्य]

अकांत—पु.प्र आकांत १ कोलाहल आरडाओरड; आक्रोश; अतिशय शोक. २ मोठा अनर्थ [सं. आक्रंदन] ०**णें–होणें–करणें–मांडणें**–मोठ्यानें शोक करणें. 'अकांतले पृथ्वीचे जन.' ०**वर्पणें**–अनर्थ ओढवणें.

अकांत लोकांत—पु १ मोठमोठ्यानें लोकांसमोर आक्रोश. ०**करणें–मांडणें** २ (गो) घाबरणें.

अकाबर—पु मोठे लोक; श्रीमंत. [अर. अक्बरचें अव.]

अकाबाई—अक्काबाई पहा

अकार्मी—वि. निरुपयोगी. निकामी; व्यर्थ [अ+काम]

अकाम्य—वि. निर्हेतुक निर्लोभी. [सं.]. ०**कर्म–धर्म–भक्ति–सेवा**

अकार—पु अ हा स्वर [सं] ०**मात्रा**–स्त्री. प्रणवांतील पहिली अर्धी मात्रा. 'अकार उकार मकार। तिन्ही मिळुनि ओंकार॥'

अकारण—क्रिवि. १ निमित्तावांचून; विनाकारण; निष्कारण. २ निरुपयोगी; बेफायदा; ज्याची गरज नाहीं असें; व्यर्थ; मिथ्या. 'म्हणवुनि मज एकेविण। हे व्यर्थधर्म अकारण॥' –ज्ञा ९.३३४; 'आत्मदृष्टीचे लक्षण। दृश्य द्रष्टा आणि दर्शन। तिन्ही होउनि अकारण। परिपूर्ण श्रीकृष्ण॥' –एरुस्व १३.८१. ०**बंधु**–पु. निरपेक्ष सहाय्यक; निमित्त नसतांना होणारा मित्र. 'सरकारचे अकारणबंधूहि त्याजविरुद्ध आहेत.' –टि. २. २. २७५. [सं.] **अकारणिक (णी)**–वि. निरुपयोगी.

अकारत (थ)—वि. व्यर्थ; विनाकारण. [सं. अ+ कार्य]

अकारादि वर्ण—पु. अव. अकारापासून सुरू होणारी वर्णमाला. [सं. अकार+आदि+वर्ण = अ आहे आरंभी ज्यांच्या अशीं मूलाक्षरें]

अकारान्त—वि. अ आहे शेवटीं ज्याच्या असे. [सं अकार +अन्त]

अकारीब—पु. १ नातलग; जवळचे लोक २ माहीतगार; भूम्या; जाणता. 'तुम्ही सर्वे त्या प्रांताचे अकारीब, जावे न जावे' —रा १.२८१; 'हुजूरचे अकारीब' —रा. १५.२५. [अर. कर्रबचें अब]

अकार्पण्य—न. कृपणतेचा अभाव; समृद्धि. [सं. अ+कार्पण्य]

अकार्य—न. अयोग्य कृत्य; गुन्हा; अपराध; दोष —वि. करण्याची गरज नाहीं असें; अयोग्य [सं]

अकाल—पु. १ अयोग्य वेळ. २ दुष्काळ, दुर्भिक्ष ३ ईश्वरांचा ईश्वर. 'सत श्री अकाल' [सं अ+काल]. **०गमन**—न अवेळी जाणें **०ज**—वि. अवेळीं जन्मलेला. **०जन्म**—पु अवेळी जन्म **०मरण**—**मृत्यु**—न. पु. अवेळीं मरण **०वृष्टि**—स्त्री. अवेळीं पडलेला पाऊस

अकालिक—वि अवेळीं, भलत्यावेळीं, अयोग्य वेळी केलेले—घडलेलें. [सं.]

अकालिफा—न. (कुण० खलिफा) तांबडसर रंगाचिरंगी पानांचे बागेंतील एक शोभेचें झाड. [इं.]

अकाली—पु. शीखांचा एक पंथ. [सं. अ+काल]

अकालीन—वि. अवेळचा; अप्रासंगिक, अयोग्यवेळी आणलेला, केलेला. [सं. अ+काल]

अकालोत्पन्न—वि. पूर्ण दिवस भरण्यापूर्वी जन्मलेला [सं. अ+काल+उत्पन्न]

अकाल्पनिक—वि अकृत्रिम; वास्तविक; सत्य बनावट नसलेला; मूळांसं धरून. [सं. अ+कल्पू]

अकाशिया—स्त्री. (गु.) पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी (भात) जमीन. [सं. आकाश]

अकाळ—पु. अयोग्य वेळ. अकाल पहा 'जैसे कां अभ्रपटळ। अकाळीचें ॥' ज्ञा. ३.१४१ **०वाणी**—अकळवाणी पहा **०वृष्टि**—अकाल पहा

अकाळ्या—वि. अप्रासंगिक; अवेळीं पडलेला (पाऊस). [सं. अकाल]

अकांक्षा—आकांक्षा पहा.

अकि—स्त्री. सडीक तांदूळ. [का. अक्कि]

अकिंचन—वि. अतिशय गरीब; जवळ कांहीं एक नाही असा; दरिद्री; कंगाल. 'हा सारा जन्मभर अकिंचन राहिला'. नि ५.१. [सं. अ+किम्+चन]

अकिंचित्—वि. किंचितहि नाहीं; मुळींच नाहीं. [सं. अ+किम् +चित्]. **०कर**—वि. क्षुल्लक; क्षुद्र. **०ज्ञान**—अगदीं थोडें ज्ञान. **०प्रद-बोध-वत्.**

अकीक—पु. एक तांबूस, कठिण, चांगली जिल्हई बसणारें रत्न —कॉर्नेलियन. हें मुद्रा करण्यास योग्य असून अंगठ (गोमेद), रेती किंवा सिलिका (गार) यांचें बनलेलें असतें. [अर.]

अकीदत—स्त्री निष्ठा; विश्वास. [अर.]

अकीन—पु. खात्री. सत्य. २ सत्याचा वाली [अर. यकीन]

अकीर्तनीय—वि. स्तुति करण्यास अपात्र अवर्ण्य. [सं. अ+कृत]

अकीर्ति—स्त्री. दुष्कीर्ति; कुप्रसिद्धि; बदनामी दुर्लौकिक. [सं.]

अकुटेंदुकुटें—ठिकऱ्या पहा.

अकुंठ-ठित—वि १ अबाधित २ दृढ ३ अप्रतिबद्ध; अप्रतिहत (भाषण, कार्य) 'तो दशकंठ अकुंठ विमां भुजि ते विषकंठ धनू उचली ॥ —पारस्व. ४ अखंड (वाचा गति कृति, इ०). [सं अ+कुंठ]

अकुतोभय—वि अपभ्रंशरूप अक (कु) तोभय १ जो कशाहि भीत नाहीं ज्यास कोणतीहि भीति नाहीं असा (पुरुष, वस्तु). २ निर्भय भीट सैकटें सहन करण्यास समर्थ; बेडर. मजबूत (इमारतीसंबंधी) 'मातीची भित घालितां त्यांपेक्षां चिऱ्यांची घातली स्थणेज अकुतोभय होईल.' [सं. अ+कुत +भय]

अकुलज—वि. हीनकुलोत्पन्न; क्षुद्र नीच; ग्राम्य. [सं. अ+कुल+ज]

अकुलीन—अकुलज पहा

अकुशल—वि. १ अडाणी, अतज्ज्ञ २ अशुभ ३ (तत्त्व.) असुखवेदनीय; दुःखकारक. [सं. अ+कुशल]

अकुळी—वि कुलरहित; कुळाचा पत्ता नाहीं असा. 'एक म्हणती नंदाचा। एक म्हणती वसुदेवाचा। ठाव नाहीं बापाचा। अकुळी साचा श्रीकृष्ण ॥' —एरुस्व २. ३. [सं. अ+कुल]

अकूट—न विष न पाजलेलें (शस्त्र) [सं. अ+कूट=विष]

अकूपार—पु समुद्र २ खवदक ३ कांसव. कूर्मावतार. ४ सूर्य. [सं.]

अकूर—पु घोड्याचा एक रोग—घोड्याने उडी मारली असतां वरगडी मोडते तो —अश्वप ३०१ [सं अक+उरस्]

अकृत—वि न केलेले; न संपविलेले. [सं. अ+कृत]. —न. वाईट कृत्य, पातक [सं. अ+कृत्य]. **०काल**—वि अनिश्चित कालाचें; ज्यास कालाची मर्यादा घातली नाहीं असें; विनमुदतीचें (कर्ज, व्याज इ०). [सं] **०घ्न**—वि कृतघ्न; उपकार स्मरणारा. [सं. अ+कृतघ्न] **०ज्ञ**—वि. कृतघ्न; उपकार न स्मरणारा. [सं. अ+कृतज्ञ]. **०अकृत**—(अकृताकृत) अकीर्तार्थी चुकीने, अकीत पहा

अकृताश्रम—वि. आश्रमातीत; वर्णाश्रमधर्मापलीकडे गेलेला. 'आत्माभ्यासीं परिश्रम। करूनि निरसिले कर्माकर्म। यालागीं तें अकृताश्रम। निजनिश्रम स्वयें जाहले ॥' —एभा २. १६६ [सं. अकृत+आश्रम]

अकृतोभय—(अर.) अकुतोभय पहा.

अकृत्य—न. निषिद्ध कर्म; वाईट काम; पाप. 'अकृत्य कुडें तें लोकीं। वाळावे गा।' –ज्ञा १६.४६६. [सं.]

अकृत्रिम—वि. १ कृत्रिम नव्हे तें; सहज; स्वाभाविक. 'कां चंदनाची हुती जैसी। चंदनीं भजे अपैसी। कां अकृत्रिम शशी। चंद्रिका ते॥' –ज्ञा १८. ११५०. २ स्वयंभू; मनुष्यानें न केलेली (देवता इ०). ३ वास्तविक; खरें. 'तंव शब्दविता प्रगट पोटीं। तेंचि अकृत्रिम भजन उठी। ब्रह्मार्पण मिठी। श्रवणें पंडे।' –एभा २.३६४. ४ निष्कपट, प्रामाणिक, मोकळ्या मनाचा. –न. मोकळेपणा, निष्कपटता; निर्व्याजता. [सं.]

अकल्पित—वि. ज्याबद्दल पूर्वी कांही योजना केली नाहीं अशें. [सं. अ+कल्पित]

अकेंद्र—(पाश) केन्द्रीभूत न झालेलें 'नॉन न्युक्लीएटेड' [सं. अ+केंद्र]

अकेला—वि (हिं.) एकटा, एकला, एकाकी. [सं. एकल.]

अकोचणें—अक्रि. संकोचणें; अंग लपविणें. 'मूळ तों लपाला अकोचुनी।' –दावि २.२८. [सं. आ+कुच्]

अकोटा—न (कों.) एकाचे मालकीचें गलबत दुसऱ्यास वापरण्यास दिल्याबद्दलचें भाडें (नोर नव्हे). **०पत्र**—न. वरील बद्दलचें करारपत्र; भाडेपट्टा. [?]

अकोनाईट—न. एक होमिओपाथीचें हितताप, संधिवात, गोंवर, यांवरील विषारी वनस्पतीपासून तयार केलेलें औषध; बचनाग. २ अतिविष. [ग्री. ई]

अकोल(ळ)—न. कण्हेरीच्या पानाप्रमाणें लांबट, रुंद, वरेरपा असलेल्या पानांचें एक झाड. हे वांतिकारक असून विष, कफ, कटिशूल, कृमी, सूज, यांवर व कुत्रें, मांजर, उंदीर यांच्या विषावर गुणकारक आहे. यांचें बींहि औषधी असून त्यांचें तेल त्वग्दोषावर व मंत्रतंत्रामध्यें उपयोगी आहे. –वगु. [सं.]

अकड—अकट पहा.

अकण—वि. (कों.) चिकट. 'अकण माती चिकण माती' –मसाप २.१. [चिकण द्वि.]

अकरताळा—अकरताळ पहा.

अकल—स्त्री. शहाणपण; चातुर्य; बुध्दि. [अर. अक्ल]. **०गुंग होणें**–बुद्धि कुंठित होणें. **०जाणें**–शहाणपण नाहींसें होणें. **म्ह.** 'आधीं जाते अकल, मग जातें भांडवल.' **०विकत घेणें**–धडा शिकणें; पुष्कळ किंमत देऊन शहाणपण शिकणें; फार महाग पडलेल्या अनुभवानें शहाणें होणें. **०सांगणें**–सल्ला देणें; युक्ति सांगणें. **०से खुदा पछानना**–शहाणपणानें देवासहि जाणतां येतें; ही म्हण एखाद्याला आपल्या बुद्धीचा उपयोग करावयास सांगण्याकरितां वापरतात. **–लेचा कादा–खंदक–गड्डा**—अति शहाणा; दीडशहाणा; मूर्ख. **–लेचा गधडा**–मूर्ख; ढ, मतिमंद; बावळट. **–लेचे तारे तोडणें**–अविचारानें बोलणें. 'ललिके! ज्या तोंडानें हे अकलेचे तारे तोडीत होतीस, त्याच तोंडाला असे खंडे चारतांना मला कल्पांतापर्यंत सुद्धां दया येणार नाहीं.' –भा १६५. **–लेचा बंद**–दूरदर्शित्व; शहाणपण; चातुर्य. 'अकलेचा बंद नाहीं घातला.' –दा १९.८.१५.

अकलक(का)डा–ढा–रा–हा—पु. एक हात भर उंचीचें झाड. हे बंगाल, अरबस्तान, इजिप्त इकडे फार होतें; झेंडूसारखीं पिवळीं फुलें येतात, तीं खोकल्यावर घेतात व जिव्हेसंबंधीं व्यंग असल्यास झाडाची कांडी तोंडांत धरतात, याचा काढा संधिवातावर घेतात. –वगु. [अर. अक्क+कन्हा]

अकलखाद—वि. संपूर्ण; समूळ; अगदीं साफ (सर्वनाश दाखविणारें विशेषण). 'यंदां शेतें अकलखाद बुडालीं.' [अर. अक्क+सं. खाद् = खाणें]

अक्कलदाढ—स्त्री. अगदीं शेवटच्या खालच्या व वरच्या दोन दाढांपैकीं प्रत्येक. या सगळ्यांच्या शेवटीं येतात.

अक्कलबाज–मंद–मान–वंत–वान—वि शहाणा; चतुर; धूर्त; युक्तिबाज; (उप) मूर्ख.

अक्कलबुद्धीनें–क्रिवि. विचारपूर्वक; शहाणपणानें.–रा ८.२२४.

अक्कलहुशारी—स्त्री. पूर्ण खुषी व संमति; सावधानचित्त; राजीखुषी (दुसऱ्यानें सक्ति न करतां अगर न फसवितां) (कागदपत्र, दस्तऐवज वगैरेमध्यें वापरतात).

अक्का—स्त्री. वडील बहीण. [सं. अक्का=आई; का. अक्का= वडील बहीण. मूळ द्राविड].

अक्काबाई—स्त्री. लक्ष्मीची वडील बहीण; (ल.) दारिद्र्य; दुर्दशा; दुर्दैव; दुर्बुद्धि; दुष्ट, भांडकुदळ स्त्री. 'अक्काबाई दोहीं दारीं फुगटया घालिती.' [का. अक्का]. **०चा पाया**–दुर्दैवाची पूर्व चिन्हें. **०चें पोर**–दुर्दैव. 'हें अक्काबाईचें पोर (१९०१ चें शेतवी बिल) सबे इलाखा भिकारी करील'.– टि २.२.२६७. **०चा फेरा**–वाईट दशा; दारिद्र्य, दुर्दैवाचे आगमन. **०ची दया**–दारिद्र्य. **०चें बाळ**–दुर्दैवी मूल.

अक्खा—अखा पहा.

अॅक्चुअरी—पु. विम्याच्या हिशेबी कारभारांतला तज्ज्ञ. [इं]

अॅक्ट—पु. १ कायदा; शासन. २ नाटकांतील अंक. [इं.]

अॅक्टर—पु. नट. [इं.]

अॅक्टिंग—पु. सोंगाची संपादणी; अभिनय; हावभाव. 'बाल गंधर्वाला मेनकेचे अॅक्टिंग साधणार नाहीं ही गोष्ट साधारण नव्हे.' नाकु–१७. –वि. दुसऱ्याकरितां तात्पुरतें काम करणारा; बदली; अमानी. [इं.]

अक्टोबर—पु. इंग्रजी १० वा महिना–दिवस ३१. मराठी आश्विन–कार्तिकाचा सुमार. [इं.]

अक्दस—अकदस पहा.

अक्बर—अकबर पहा.

अकताळा-ळी, अकस्ताळा-ळी–अकरताळ पहा

अकतोभय—(अप) अकुतोभय पहा.

अकबपेनी—वि. पानासारखा ठिळा कपाळावर असणारा (घोडा).–अश्वप १०४. [उर्दु]

अकम—वि. अव्यवस्थित; क्रमरहित. ' वाचेचें विठ्ठळणें । सावरोनि प्राणें । अकमाचें श्रमणें । देवोनि ठायीं ॥' –ज्ञा १८. १५१७ –पु एक पत्र्यांचा खेळ; यांत सर्व पत्र्यांची किंमत ठरविलेली असते, त्यावरून हातांत असलेल्या पानांचे गुण २१ अगर जवळ जवळ २१ होतील अशा प्रयत्न खेळाडूनें केला पाहिजे; २१ पेक्षां जास्त गुण झाल्यास नुकसान होतें. [सं. अ+क्रम]

अकरय-अक्रय—वि. विक्रत घेतां न येण्यासारखा, विक्रता न येण्यासारखा. [सं. अ+क्री]

अकरस—वि. रुक्ष; नीरस; तृपदृश्य नसलेले; अगात्विक (अन्न) [सं. अकृ=जाणे+रस ?]. **०तकरा**–रुक्ष [अकरस हि.]

अकरस्ताळा—अकरताळ पहा.

अक्रा-अक्रावा—अकरा पहा.

अकाळविकाळ—अकराळविकराळ पहा.

अक्रिय—वि. न करणारा; कोणतीहि क्रिया न करणारा; निष्कर्म (ईश्वरासंबंधीं, जसें–निर्गुण, निराकार); निष्क्रिय; क्रियारहित 'मज अक्रियासी कर्म । '–ज्ञा ९ १५६. [सं अ+क्रिया]

अक्री—अखरी पहा

अक्रीं—अकरी पहा.

अक्रीत—वि. (हा शब्द व्युत्पत्तिदृष्ट्या बरोबर असून याचा उपयोग मात्र अनियंत्रितपणें होतो.) १ बेसुमार; अतिशय. **०घेणें –देणें**–एखादी वस्तु प्रमाणाबाहेर अतिशय किंमत देऊन विकत घेणें, अथवा विकणें, अतिशय जबर व्याज घेऊन रकम देणें. २ भलत्याच दरानें; बाजारभावाच्या मानानें अतिशय जास्त भावानें. ३ मोफत; फुकट; मोबदला न घेतां. ' मी अक्रीत खात नाहीं. ' 'मी कोणाचें अक्रीत घेणार नाहीं '= मी दुसऱ्याचें कांहीं चुकीनें घेणार नाहीं. अक्रीताचा व्यवहार=अप्रामाणिक व्यवहार. ' अक्रीत मिळविलेला पैसा जयास जात नाहीं. ' [सं. अ+क्री] **०विक्या**–वि. भलतीच किंमत घेऊन विकणारा.

अक्रीत–वि. असंभवनीय; न करण्यासारखी (कृति). [अ+कृ]

अकुसणें-अकसणें—अक्रि. संकुचित होणें; आंखडणें; एकत्र होणें; घट्ट होणें. [सं. आ+कृष्]

अकें—अकरे पहा.

अक्रोट(ड)—पु. हें झाड हिमालयाच्या आसमंतात व चीन. उत्तर हिंदुस्थान, इराण इकडे होतें; याला ३०।४० वर्षांनीं फळ येतें; हें पेरूएवढें असून कच्च्या फळांचे लोणचें घालतात. यांचें तेल खातात व जाळतात; फळ मधुर, पौष्टिक, पित्त, क्षय व रक्तदोषावर उपयोगी; यांचें टरफल व पान स्तंभक; लांकूड सुरेख व मजबूत असल्यानें नक्षीकामास चांगलें. [सं. अक्षोट–ड]

अक्रोध—पु रागाचा अभाव, रागाचें दमन; यतिधर्मापैकीं एक लक्षण (योगधर्म पहा). –वि. रागरहित. [सं. अ+क्रोध]

अक्लिष्ट—वि. गुंतागुंत नसलेलें; सोपें, सहज होण्याजोगें. **०पणें**–क्रिवि. अनायासें, त्रासाशिवाय; मोकळेपणानें [सं अ+क्लिष्ट]

अक्लेश—क्रिवि. त्रास न पडतां, श्रम, काळजी यांशिवाय. [सं. अ+क्लेश]

अक्लेश-शीं——क्रिवि पूर्णपणें, सर्वथा. अगदीं. जितका लाभ व्हावयाचा त्यांत कांहीं कमी न होतां; कांहीं बाकी न रहातां (नाश होणें, मेंगणें, वागणें, नासणें, मरणें, जाणें इ० क्रियापदांबरोबर उपयोग करतात). [सं. अकृ=जाणे+क्लेश, किंवा अलेश]

अक्स्यायर—सक्रि १ सरकारी किंवा सार्वजनिक कामाकरितां कायद्याच्या सहाय्यानें (जमीन वगैर) विक्त घेणें २ सेपाइणें; कमाविणें. [इं.]

अॅक्शन—पु १ खटला; दावा २ कार्य, क्रिया; पार्ट; प्रत्यक्ष हालचाल; चळवळ. ' या पुढील आपल्या पदिल्या प्रवेशापासून अॅक्शनला सुरवात करावयाची. '– भा १५०.

अक्शा—न द्राक्ष. [का.]

अक्शा (क्सा) बोंकडी–क्सी–ओक्साबोक्सी पहा.

अक्शी—(कुण.) समूळ; सर्वांशीं; अगदीं; पूर्णपणें. ' अक्षि जिर्‍या घरूनइयानी समद्या गांवांत चिड कादीन ' –वाय ३. २. [सं. अ+क्षय]

अॅक्सिडेंट—पु. अपघात. [इं.]

अखई—क्रिवि. अखंड; अक्षयीं. ' करी लागपाठ चित्तवित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज भोगईल नाहों ॥ '–तुगा २८८. [सं. अ+क्षय]

अखंगळ—वि. (व.) खोडकर. [सं. अ+खञ्ज]

अखजा–जी–उजी, अखीतीं–ज—स्त्री.वैशाख शुद्ध तृतीया. अक्षय्य तृतीया पहा. [सं. अक्षय+तृतीया; प्रा. अक्खय+तइया; गु. अखात्रीज; हिं. अखेतिज, अखतीज; काश्मि. अचित्रय]

अखटा—वि. वाईट; तिरस्करणीय. ' जेयें अशा स्नेहाची जात, तेथें उभयतांतें द्वैत अखटा ' –होला ७२. १०५. [सं. उच्छिष्ट; प्रा. ओखट; तुल. का. अकट=दुःखोद्गार]

अखटाई(य)—स्त्री. (गो.) १ लबाडीचा अभाव. २ (ल.) शहाणपण. [सं. अ+शठ; म. अ+खट]

अखडणें—आखडणें पहा.

अखंड(डी)—वि. १ संपूर्ण; सगळा; अखुंटित. २ तुकडे नसलेला; एकसंधी; सलग; तुकडे जोडून न केलेला. –क्रिवि. सतत; अप्रतिबद्ध; न थांबतां. निरंतर. 'अखंड बोलो आवडे।' –ज्ञा १५. ४४८. [सं. अ+खंड]. **०क्रम**–पु पत्त्याच्या बिछिक (पाट) च्या खेळांत हुकमाच्या एक्क्यापासून दहिल्यापर्यंतची एकसारखी रांग (सीकवेन्स); यात २५० मार्क असतात. –पाट १६. **०चोळी**–स्त्री. बाह्यांविना सर्व सलग अवयवांची–लाग, पन्हे, ठुशा (कोरा) व पाठ–जोड नसलेली चोळी. **०दंड**–वि. एकसारखा चालणारा, असणारा. 'शत वर्षे अखंड दंड। पर्जन्य वितंड पैं वर्षे॥ –एभा. ३.१६८. **०दंडायमान**–वि. अमर्याद; अनंत; घटका, पळे, दिवस, वर्षे इ० कालविभागविरहित **०द्वादशी**–स्त्री. मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी. **०पद**–(ग) बीजगणितांतील मूळ प्रकाशक नसलेले अकरणी पद. **०श्रेढी**–स्त्री. (ग) गणितांतील एक श्रेढीप्रकार; यांतील पदें क्रमाने खंड न पडतां एकसारखीं असतात. **०सौभाग्य**–न. १ अव्याहत, एकसारखी, सतत भरभराट–ऐश्वर्य–कल्याण २ केव्हांहि वैधव्य प्राप्त न होणें, नवऱ्याच्या आधी मरणें [सं.] **०सौभाग्यवती**–स्त्री. जिला सतत सौभाग्यसुख लाधलें किंवा लाधणार आहे अशी स्त्री; अविधवा. २ (ल.) वेश्या. **०स्वारी**–स्त्री. सर्व लवाजम्यासहित. 'अखंड स्वारी रायाची निघाली चौथीच्या अमलामधीं' –प्रला. ३०९ **०ज्ञान**–न १ सतत ज्ञानमय स्थिति; स्थिर शुद्धि. २ संयोजीकरणानें होणारें ज्ञान खंडज्ञान पहा [सं.]

अखंडनीय—अखंडय पहा

अखंडाकार—क्रिवि. (कवि.) अखंडितपणे अव्याहत रीतीनें. 'परमाणि प्रपंची साचार। अखंडाकार चाले वैर।' [सं. अखंड+आकार]

अखंडित—वि. १ अखुंटित, अविभक्त, विनतुकड्याचा २ (ल.) पुष्कळ; अपरंपार; अगाध; अतिशय; अमर्याद. २ अपराजित; खोडून न टाकलेला; खोटा न ठरलेला; रद्द न केलेला. –क्रिवि. अप्रतिबद्ध; निरंतर; सतत. [सं. अ+खंडित] **०आचार–धर्म पराक्रम–बुद्धि–लक्ष्मी–संपत्ति–ज्ञान**इ० ४ **०लक्ष्मी आलंकृत**–मोठमोठ्या सत्ताधीश, धनिक लोकांना लिहावयाचा जुन्या पत्रांतील आरंभींचा मायना. [सं. अखंडित+लक्ष्मी+अलंकृत=अपार संपत्तीनें युक्त]

अखंडैकरस—पु. पूर्णब्रह्म; परब्रह्म. [सं. अखंड+एक+रस]

अखंड्य—वि. खोडून काढण्यास अशक्य; प्रत्युत्तर देण्यास कठीण. [सं. अ+खंड्य]

अ (आ) खण—न. बैलांच्या पायाखालीं एकदां मळणी झालेलीं कणसें. आकन–मदन पहा. [सं. आ=ईषत्+क्षुण्ण=किंचित मळलेलें]

अखणी, अखणें— अंकणी, अंकणें पहा.

अखत(ता)—अक्षत–ता पहा

अखत्यार—अख्त्यार पहा.

अखवार—अख्बार पहा.

अखम—वि. पंगु; निर्बल; अशक्त; रोगी; दुबळा. 'दाते हो दान करा, जाते पंढरपुरा। न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा॥' –तुगा ३४९. [सं. अ+क्षम]

अखय—वि. नित्य; अक्षय; सदैव, अखंड; नाशरहित. 'दिलें अक्षय अभयदान गा।' –तुगा. ३४३ [सं. अ+क्षय]

अखर्वे—वि. (गो.) विक्षिप्त.

अखर–री—पु. स्त्री. १ गांवाच्या कडेची किंवा सभोंवतालची जागा; यावरून गुरें एकत्र करण्याची किंवा विसांव्यास बसण्याची जागा; 'चुकले गुरूं अखरास पहावें.' –क्रिवि. शेवट; शेवटीं; अखेरीस. अखेर पहा. [अर. आखिर=शेवटचा; शेवट] **०नखर, अखीर नखीर**–क्रिवि. अखेरीस, सरतेशेवटीं. 'अखरनखर मराचाच' [अर. अखीरनखीर]. **०पख**–(व.) भाद्रपद वद्य (सर्वपित्री) अमावास्या; पक्ष (श्राद्ध) करावयाचा शेवटचा दिवस [अर. आखीर+सं. पक्ष]

अखर—वि. अविनाशी; अक्षय. [सं. अ+क्षर]

अखरकर्णे—क्रि. ओढून आणणें; ताब्यांत देवणें. 'मंत्रें देव प्रगटती। मंत्रें भुतें अखरकिर्तीं॥' –दा. ९.८.३३. [सं. आ+कृष्]

अखरा—१ अखाडा; शस्त्रागार. –क्रिवि. (व.) अखेरीस; शेवटी अखर पहा.

अखरी—स्त्री. १ गाडीचा आंस व साटी यामधले लांकूड; बुटें [गो. अक्ष; प्रा. अख्ख; आंख]. २ धान्य संपणें; अखेरी पहा.

अखरीत—अक्षीत पहा.

अखरें—वि. खरें नव्हे तें; खोटें (नाणें). 'पारखिया अखरें पडे– ज्ञा १७.३९५. [अ+खरें]

अखवानजी—पु. पंतोजी; शिक्षक; अखुनजी; अखुंजी; 'आमच्या अखवानजीला व्याकरण येत होतें असें नाहीं.' –अरु २.१०-११ [फा. आखून = शिक्षक; हिं. आखुनजी.]

अखसा—वि. अख्खा; सर्वे. [स. अ+क्षतः+सन् म. अख+सा]

अखळ—वि. अक्षर; शब्द; नांव. 'तुम्हीं अखळिचिया राजकुमरी। जाणतुगीं तुमची थोरी।' –शिशु. ६७९. [सं. अक्षर]

अखा–ख्खा–ख्खें—वि. १ अखंड; अविभक्त; धड; शाबूत; अखुंटित; न दुखविलेलें. २ एकूण; सर्वः; एकंदर (संख्या, रास वगैरे). [सं. अ+क्षत; प्रा. अक्खय; गु. आख्खो, आखुं; खा. अख्ख]

अखाड—पु. आषाढ महिना. [सं. आषाढ]

अखाडा—पु. (मूळ अर्थ जुगार खेळण्याची जागा, त्यानंतर पुढील अर्थ). १ जमातः एखाद्या विशिष्ट कार्याकरितां किंवा अभ्यासाकरितां एकत्र जमणाऱ्या लोकांची राहण्याची किंवा जमण्याची जागा; विद्यालय; चर्चास्थल. २ तालीमखाना किंवा त्यांतील होदा. 'देवेसीं कोलकाटी धरूं। अखाडा झोंबीलोंबी करूं ॥ ' –ज्ञा ११. ५४८. ३ रंगस्थल; सर्कस, क्लब किंवा त्याची जागा; रिकामटेकडे लोक बसण्याची जागा; अड्डा; गप्पा वगैरे मारणारे कुटाळ लोक जमण्याची जागा. ४ संप्रदाय; गोसाव्यांचे पुढील १८ अखाडे किंवा मठ आहेतः अघोरी, अरण्य अवधूत, आनंद, आश्रम, ईद्र, उदासी, कानफाट्या, कालवेला, गोदंड, गोरखपंथी अथवा गोरखनाथी, डवरा, नंगागिरी, निरंजनी, निर्वाणी, पुरी, भराडी, भारती, राऊळ, बन, सरभंगी, पर्वत, सागर, तीर्थ, सरस्वती. यांची संख्या व नावें यांहून निरनिराळीं सांपडतात. ५ अड्डा; गाड्या वगैरे उभ्या राहण्याची जागा. ६ गुरे येऊं नयेत म्हणून तात्पुरते उभे केलेले कुंपण, फाटक. [सं. अक्षवाटक; प्रा. अक्खाडग–अक्खाडय=खेळण्याची जागा, –अक्खाड. म अखाडा]

अखाडा—पु पालखीचा दांडा [सं. अक्ष–आंख+आड]

अखाडी—वि आषाढी. –स्त्री दुष्काळ; आखाडी पहा. [सं. आषाढ]

अखात—न. १ स्वाभाविक बनलेलें तळें, सरोवर. ' असती बहुत अखातहि त्यांमाजीं पूर्ण जीं जले अमलें । '– कुअक ७७. २ जमीनींत घुसलेला समुद्राचा भाग. [सं. अ+खात=खणलेलें]

अखाद्य—वि. खाण्यास अयोग्य; निषिद्ध; अभक्ष्य; अभोज्य ' अखाद्याचेनि भोजनें । '–ज्ञा १८ ८०६. [सं. अ+खाद्य]

अखिल (ळ)—वि. १ सर्व; संपूर्ण. ' तूंचि अवघे अखिल जन । ' –एरुस्व १.२ २ अनंत; न संपणारें. ' माया पाहतां अभंग । अखिळ वाटे ॥ ' –दा ७.१.५८. **–लार्थ**–पु. मुख्य मुद्दा; सारांशः तात्पर्य. [सं. अ+खिल = अवशिष्ट]

अखुंजी—शिक्षक; अखवानजी पहा.

अखुटणें—आंखटणें पहा.

अखुड—वि. तोटकें; आकुंचन पावलेलें; लहान. अपुरें. [सं. आकृष्ट; प्रा. आकड्ढ]. **०णें**–उक्रि. १ लहान होणें, करणें. ह्रस्व होणें; संकोच पावणें. खुरटणें; आक्रसणें; आंखडणें. अक्रि. २ थांबणें, ओढणें; हात धरणें. ३ ओढून धरणें (पाऊस). **०शिंगी–शृंगी**–लहान शिंगाची. ' अखुड शिंगी बहुदुधी ' (गाय).

अखुनजी—अखवानजी पहा.

अखूड—अखुड पहा.

अखें—न. कैठाळी, पडशी, गोणी, पखाल, माकण, इ. कांची एक बाजू; तसेंच बैलांच्या पाठीवरील तूप, तेल इ. कांचा एका बाजूचा बुदला; अटकें. [सं. अर्द्धक]

अखेतय, अखेती–ज—अखजा पहा.

अखेर—स्त्री. १ शेवटः समाप्तिः अंत, परिणाम. –वि. शेवटीलः शेवटचा–ला; पूर्ण झालेला; संपलेला; मृत. ' मशारनिल्हे अखेर झाले '. –क्रिवि शेवटीं; अंतीं शेवटास; सालअखेर. [अर. आखिर; फा]. **०आढावा**–पु साल अखेर येणें–देणें समजण्याकरितां मांडलेला जमाखर्च. **०नौबत(द्)**–स्त्री. चौघड्याच्या शेवटी जलद वाजविण्याची एक गत; (ल) शेवटचें यश. **०साल**–न. १ वर्षाचा शेवटः मृगारंभः उन्हाळ्याचा शेवट व पावसाळ्याचा प्रारंभ म्हणजे ज्येष्ठ महिना ' शेवटीं अखेर साल जहाले ' –ग १९, ७६, –ख १२३१. –पया ६७ २ विशिष्ट वर्षचक्रांतील शेवटचे वर्ष ३ हिशेबाच्या वर्षाचा शेवट **०चा हुकुमनामा**–पु. ज्या हुकुमावरून दाव्याचा निकाल होतो तो

अखेरी—स्त्री समाप्ति, अंत; शेवट (कामाचा). संपणें; खलास होणेः आटोपणें (सामुग्री, धान्य) [अर. आखिर] **०मारणें–साधणें–सांभाळणें**–१ प्रथम फारसा प्रयत्न न करतां शेवटी एकदम जोराचा प्रयत्न करून यश मिळविणेः शेवटचा तडाखा लगावणें. २ दशावतारी सोंगिफात शेवटचा हात मिळविणें किंवा डाव साधणें. –क्रिवि अखेरीस. (कों. अखेरीक). **०चे दिवस**–शेतकामांत हंगामाचे शेवटचे दिवस, वैशाख महिन्याचा शेवटचा पंधरवडा. अखेरसाल पहा.

अखोट—अकोट पहा

अखोंट—वि. खोड (दोष) नसलेलें. निर्दोष. शुद्धः निर्मळ. [अ+खोड].

अखोटा—पु. १ (एखाद्या काठीचे किंवा खुंटीचे भोंवतीं) दोरी बांधण्याकरितां पाडलेली वाटोळी खांच. खोबणः कंगोरा. २ खराडी किंवा कर्परी (पुरी) मधील वाटोळी खाच ३ पुढे आलेलें टोंक; धसः मुळका. **०लागणें**–आंखटणें [सं आ+खन–खात]

अखोर—वि (स्त्री.) आणिकः अधिक [सं. अधिकतर, अक्षुर ?]

अख्खा(ख्खें)—अखा पहा.

अख्तर—पु. १ तारा. नक्षत्र २ गूढ शकुन [फा]

अख्त्यार—पु १ गोंरविलेला अधिकार. दिलेला हक, मुखत्यारीः सत्ता. २ निवड. पसंती. –वि. अख्त्यारी [अर. इख्तियार] **०पत्र**—न. प्रतिनिधित्वाचा अधिकार देणारें पत्र **–री**—स्त्री १ अख्त्यारः अधिकार. सत्ता. २ पु. अधिकार दिलेला प्रतिनिधिः व्यवस्थापक, चालकः अधिकारी; मुख्त्यार.

अख्बार—स्त्री. १ बातमी, वर्तमानः वार्ता २ वर्तमानपत्र. बातमीपत्र. ३ परराष्ट्राच्या दरबारी ठेवलेल्या आपल्या वकिलाकडून आलेलें बातमीपत्र. ' त्याणीं तिकडील अख्बार आणिली आहे '

–रा १०. २७३. [अर. खबर अव.]. **०नवीस**–पु. १ बातमीपत्र पाठविणारा. २ आपला खास बातमीदार. ३ मंत्री. [फा.]

अख्येत–अक्षत पहा. 'ते अख्येतीं न्हातिती' –उषा ३४.

अख्री–(धान्य संपणें याअर्थी) अखरी पहा.

अग–उद्गा. १ लक्ष्य वेधण्यासाठीं काढलेला संबोधनार्थी उद्गार. २ स्त्रीस उद्देशून वापरावयाचें संबोधन. **म्ह.** –अग अग म्हशी मला कां नेशी! [सं. अग; का. अक]

अग–पु. पर्वत; वृक्ष. [सं. अ+गम्=जाणें]

अगइ (ई)—उद्गा. आश्चर्य, आनंद किंवा भय दाखविणारा उद्गार; अगबाई; अगाई; अगग. 'म्हणे अगइ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप गा!' –केका १०; 'त्यावरि न देखिले ते दाखविलें म्यां कशास अगई! तें' –मोवन ५.८३. [अग+आई]

अगग—उद्गा. अगई पहा. [सं. अंगक=अकल्क अंग? –भाअ १८३४; म. अग+अग]

अगगाई—उद्गा. अगई पहा. [अगग+आई]

अगजाळी—आगजाळी पहा.

अगट—न. (बे.) कोंडें. [सं. अघट्टि?]

अगटचिगट—वि. मंद; चेंगट; आळशी; दिरंगाई लावणारा. अकटचिकट पहा. [चिकट–चिगट द्वि.]

अगटी—आगटी पहा.

अगड—पु. १ आड; बांधीव विहीर. २ खंदक; खांच; लवण. 'कृष्ण समुद्राचिया अगडा–। माजीं दुर्गी वसतसे॥' –एरुस्व २.८. ३ तट. 'हा लोकालोक महागड। त्रैलोक्याशीं अगड। रचिला असे॥' –कथा ६.४ १०. ४ पशूंचे (विशेषतः हत्तींचे) खेळ खेळण्यासाठीं उंच तट असलेलें आवार. (असें आवार वडोदें येथें असून त्यांत पशूंचे खेळ होतात). ५ वि. (गो.) अंगाध. [सं. आगर्त; प्रा. अगड=कूप, हौद; का. अगळ = खणणें, खंदक; अगडु = खेळ.]

अगडत(द्)(ध)(ब)गड—न. १ क्षुद्रक वस्तु; अडगळ; सटरफटर. २ अमर्याद, शुष्क, निरर्थक बडबड; वांकडेतिकडें बोलणें–करणें–वागणें, वगैरे. ३ शिळेपाकें जाडेभरडें अन्न; गरीबीचें खाणें; भिकार खाणें. –क्रिवि. कसेंतरी; वेडेवांकडें; ओबडधोबडपणें. [विचित्र प्रयोग. सं. अ+घट्; म. घाट]. **अगडीं दगडीं जीव घालणें–पाडणें**–एखाद्यास अडचणींत घालणें. **अगडीं दगडीं पडणें**–अडचणींत सांपडणें.

अगडधू–च—वि. लढेभारती; लढनिरंजन; अगडबंब; हत्तीचें पिल्लूं; धिप्पाड (स्त्री, पुरुष). [सं. अवधूत?]

अगडधूत—पु. गोसावी; बैरागी; लढेभारती माणूस. 'देवापुढें नृत्य करीत। अगडधूत मिळवूनियां॥' [सं. अवधूत]

अगडबंब—वि. लढेश्वर; फार लठ्ठ; अवजड; धिप्पाड. [सं. अगद:च असो बंब:च=निरोगी व लठ्ठ. –भाअ १८३४. किंवा अघट+का. बंबल = ढीग?]

अगडा—पु. गाडीचें जूं व दांडी यांनां बांधणारी दोरी; कसणी; धुरेकट. [सं. अग्रगता?]

अगडू–अगड पहा. 'तो जीतां अगडू देखीनिला। समुद्राचा॥' –शिशु ३१३.

अगणनिगण–आकणनिकण पहा.

अगणनीय–अगणित—वि. १ अमोज; अमाप; मोजतां येण्यास अशक्य; असंख्य. २ (ल.) क्षुद्रक. खिसगणतींत नसलेलें. [सं. अ+गण् = मोजणें]

अगणित—वि. (गो.) अतिरेक; अतिशयोक्ति. 'अगणितच करणें=अतिरेक–अतिशयोक्ति करणें.

अगणेय–अगण्य—अगणनीय पहा. अनादि जे 'अगण्य परमतत्त्व।' –ज्ञा ६.३२०.

अगत—न. अगत्य; काळजी; आस्था. –क्रिवि. (गो.) अगतून; अगत्यपूर्वक; खचित. 'त्येकां अगत यींक सांग=त्याला अगत्य यायला सांग' [म. अगत्य अप.]

अगतिक—वि. १ निरुपाय; अनन्योपाय; निराधार; असहाय्य. २ कुंठितगति; मार्ग अडला गेला आहे असा; अवरोधित (कार्य, संस्था वगैरे). ३ गत्यंतर नाहीं असें; अवश्यक; अनिवार्य. 'प्राटेस्टंटांचा व इंग्लंड देशाचा द्वेष करणें अगतिक बनून राहिलें होतें.' –इमु ३०७. **०गति**–स्त्री. १ संकटावस्थेतून किंवा अनेक अडचणींतून पुढें जाणें; संकटांतून निभावून नेणें. २ संकटसमयींचा उपाय; अखेरचा उपाय; आणीबाणीच्या वेळची हिकमत. –पु. असहाय्याला मदत करणारा; अनाथनाथ; वाली; आसरा (देवता, परमेश्वर वगैरे). –वि. अनन्यगति. [सं]

अगत्य—न. १ आस्था; कळकळ; पोटाग; आदर. 'या सुभेदारास सर्वांपेक्षां शास्त्रीबोवाचें अगत्य फार आहे.' २ अत्यंत अवश्यकता; फार जरूरी; टाळतां न येण्यासारखी स्थिति. 'मला तंबाकूचें अगत्य नाहीं.' 'जें अगत्य होतें तैसें जालें.' –दावि ३५. –क्रिवि. निश्चयें करून; अवश्यमेव; खात्रीनें; कसेंहि करून. 'तो तिमाजीपंतास अगत्य जालेंकीं'–मार्द्रिंसंवृ ५४. [सं. अगति]. **०पूर्वक**–क्रिवि. १ निश्चयानें; खात्रीनें; अवश्यमेव. २ बुद्धिपुरस्सर; मुद्दाम. **०रूप**—क्रिवि. मुद्दाम; बुद्धिपुरस्सर; अगत्यपूर्वक. 'सद्विद्या... विरक्त पुरुषें अभ्यासावी। अगत्यरूप॥' –दा २.८.३२. **०वृद्धि**–स्त्री. **०वाद**–पु. महत्त्व; जरूरी; काळजी; आवश्यकता वाटणें; भीड; मुर्वत. **०वादी**–वि. एखाद्या गोष्टीबद्दल विशेष तत्पर किंवा उत्सुक असलेला; अमुक जरूरीचे वाटणारा; त्याची तरफदारी करणारा. यांखेरीज अगत्यमेव, अगत्याचा, अगत्यानें, अगत्यास (निकरास) असे प्रयोग होतात. 'आतां अगत्यास आलें.' –यथादी १.२५७.

अगद—न. औषध. 'मद्वाक्य तुला न रुचे मरणारा अगदसें अगा! बापा!' –मोसभा ४.१३. –वि. निरोगी. [सं. अ+गद=रोग]

अगदी—वि. १ सर्व; एकूणएक; तमाम; पूर्ण; निःशेष; समूळ; अपवादरहित. 'घरांतील माणसें अगदीं मेलीं'; 'पाऊस अगदीं गेला;' 'तुम्हांस पोथी अगदीं दिली'. २ शेवटच्या पायरीवरचा; पहिल्या नंबरचा; पक्का; खरोखर; आत्यंतिक; पूर्ण. 'अगदीं, अंधळा–वेडा–मूर्ख'. ३ पराकाष्ठेचा; अतिशय. 'हें काम मला अगदीं नेहटलें, केलेंच पाहिजे'. –क्रिवि (नकारार्थी) मुळींच, कोठेंच किंवा कधींच. 'यांत मूळ अगदीं नाहीं'; 'असला पदार्थ अगदीं ब्रह्मांडांत नाहीं'; 'ही गोष्ट अगदीं होत नाहीं.' [सं. अगति ?]

अगन—पु. (कुण.) अग्नि; विस्तव. [सं. अग्नि अप.]

अगननगन, अगाननगन, अगानीनगानी—क्रिवि. चुकून, चुकीनें; अन्यायानें; विनाकारण. [फा. ना गहानी=अवेळीं, अस्थानीं–द्वि.]

अगनबेद—पु. भिलावा; बिब्बा. –अश्वप२३५. [सं. अग्नि+बंध]

अगप—वि. आगप; हळवें; लवकर तयार होणारें (पीक); मागप याच्या उलट. [सं. अग्र+पत्]

अगबाई—उद्गा. (बायकी) भीति, आनंद, आश्चर्य इत्यादि विकार दाखविणारा उद्गार. 'अगबाई! कसायाचाच बाजार किंग सारा!' –पूच. [अग+बाई]

अगम—पु. १ वृक्ष; झाड. 'झालों कृतकृत्य तयीं बहु शक्ति न पारिजातकीं अगमीं।' –मोसभा १. ३६. [सं. अ+गम्=जाणें]. २ वि. गुप्त; जाणतां न येणारें. 'आदीं तेआचा जल्मु कवणें जाणितला। कि होता अगमु'– (खिपु १.१६३) [सं अगम्य]

अगमनीय—अगम्य पहा.

अगम्य—वि. १ न जातां येण्यासारखें; दुर्गम; प्रवेश होणार नाहीं असें. २ जेथें जाऊं नये असें; गमनास अयोग्य: (ल.) क्षेत्रें, पवित्र शास्त्रें; (संभोगास अयोग्य) नात्याच्या पायऱ्या. ३ बुद्धीला आकलन करतां येणार नाहीं असें; अतींद्रिय; अतर्क्य. 'अगम्य तेज हृदयींच्या पदका।' –एभा ११.१४८१. ४ जेथें पोंचतां येणार नाहीं असें; अप्राप्य; असाध्य; अशक्य; जें करतां येणार नाहीं असें. उ० इंद्रियागम्य, दृष्ट्यागम्य, बुद्ध्यागम्य, इ०. **०पण**–न समजण्यासारखी स्थिति; अज्ञेयता. 'बैसलीं सहजासनीं। अगम्यपणीं अगोचरु॥' –एभा १.२२. [सं. अ+गम्]

अगम्या—स्त्री. विवाहास अयोग्य; जवळच्या नात्याची, सकुल, सगोत्र, भिन्नवर्णीय, किंवा आपणाहून वडील अशी स्त्री. [सं. अ+गम्]. **०गमन**–न. शास्त्रानें संभोगास अयोग्य मानलेल्या –अगम्या स्त्रीशीं संभोग; व्यभिचार.

अगर—आगर पहा.

अगर–रु—पु. न. आसाम–भूतानकडील एक मोठें व सदोदित हिरवें झाड. पानें अडुळशासारखीं, लांकूड नरम सच्छिद्र व राळेसारख्या पदार्थानें भरलेलें; या लांकडाच्या माळा करण्याची पूर्वी चाल होती; हा पदार्थ झाडास चोंचे मारून काढतात; लांकडाचे तुकडे पाण्यांत कुजवितात तेव्हां त्यास सुगंध येतो; झाड २० वर्षांचें झाल्यावर त्यापासून ऊद (अगरु) काढतात; याचे कृष्णागरु काष्ठागरु, दाहगरु, स्वादगरु व मांगल्यागरु असें पांच प्रकार आहेत; हा पित्तनाशक, पौष्टिक व केशवर्धक आहे. 'कर्पूर चंदन अगरु ऐसेया सुगंधाचा महामेरु।' –ज्ञा ९.३९१. २ चंदन. [सं. अगरु; हिं. बं. गु. का. ता. अगर; अर. उदगरकी]. **०चंदन**–सुगंधी धूप; अगरबत्ती किंवा ऊदबत्ती, उटी–वगु.

अगर–चे—उअ. अथवा; किंवा; जर; जरी: यद्यपि; जेव्हां. 'हे मुलकाची आब–हवा आम्हास रास्त नाहीं: अगर हुकूम होईल तर विलायतेस येऊं.'– पदमव १०९. [फा. अगर, अगर्चेह]

अगरगंड—वि. (व.) हट्टी: निष्काळजी; बेफिकीर; आळशी; बेगुमान; मुस्त. 'सून मोठी अगरगंड मिळाली.' [सं. अग्र+गंड=वीर? का. गंडु=बलशाली, नवरा]

अगरडा–अगारडा–आगरडा—पु. शिखर; टोंक; शेंवट; अग्र; शेंडा. 'दिवसें दिवस गर्भ वाढे। फुटती हातपायांचे आगरडे.' –स्वानुदिन २. ३. ४. [सं. अग्र+ट (ड)]

अगरताळ–ळा–ळी–ल्या—अकरताळ पहा.

अगरबत्ती—स्त्री. कापूर, ऊद वगैरे सुगंधी द्रव्यें घालून तयार केलेली उदबत्ती; धूपकाडी. [सं. अगरु+वर्ति=वात]

अगरवादी—पु. फिर्यादी; वादी. [सं. अग्रवादी]

अगरसाळ—स्त्री. (गो.) देवालयाजवळ बांधलेली धर्मशाळा; देवळासभोंवार मुख्यतः उत्सव प्रसंगींच्या जेवणावळीसाठीं बांधलेली इमारत. 'अगरसाळेंत लोक जेवूक लागले.' [सं. अग्र+शाला]

अगरी—आगरी पहा.

अगरी—स्त्री. डिरी; कोंब; मोड. **०फुटणें–येणें.** [सं. अग्र]

अगरू—अगर (झाड) पहा.

अगरूं—न. १ गुदद्वारांतून बाहेर आलेलें अंग, आंतडें; हगरूं २ (गुजराथी) अन्ननलिकेस रोग झाल्यामुळें जिभेवर आलेले खरे. [सं. अग्नि किंवा अंग+रुह्=वाढणें]

अगर्ह्य—वि. अनिंद्य, निंदा करण्यास अयोग्य. [सं. अ+गर्ह्]

अगल–ला–ली–ल्या—वि. १ पुढचा; पुढील; अग्रभागीं असलेला; श्रेष्ठ; प्रमुख; पहिला. 'अगला पडला तर मागला हुशार'. २ नांगराच्या एकापेक्षां अधिक बैलांच्या जोडींतील पुढील (जोडी); ती हांकणारा (मुलगा); सदर जोडी हांकण्यासाठीं अंसलेली बैठक. ३ [कुण.] बाप. [सं. अग्र+ल; प्रा. अग्गलो; गु. आगलुं, आगळ; सिं. आगरो; व. अगेल; हिं. आगला; बं. उ. आगलि; जि. अग्ले] **०मागला**–पुढील व मागील. आगल पहा

अगल्याबगल्या—वि. आश्रित; पदरीं किंवा एखाद्यावर अवलंबून असलेला; बगलबच्चा; कनिष्ठप्रतीचा. [बगल द्वि.]

अगवड स्त्री. (गु.) अडचण; गैरसोय [सं. अव+घट्; म. अवघड]

अगवळ–अगूळ—पु. स्त्री. न. वेणी घातल्यानंतर केसांचीं जीं टोंकें शेवटीं राहतात तीं मोकळीं राहून वेणी सुटूं नये म्हणून शेवटास, लोंकर, सोंपट वगैरे दोरा लावतात तो; अंगवळ. [सं. अग्र+वलय]

अगवाडा—पु. (हि.) घराच्या पुढला भाग; अघाडी. [सं. अग्र+वाट]

अगस–र्णे—आगस–र्णे पहा.

अगसाळी–अकसाळी पहा.

अगस्ता–त्या—पु हदगा: (व.) हेटा फुलें व शेगा यांची भाजी होते; फुलांवरून तांबडा व पांढरा असे दोन प्रकार: आंवळीच्या पानांसारखी पानें; हा शीतल, वातुळ, व त्रिदोषनाशक आहे. [सं. अगस्त्य. हि. अगथिया–हाथिया; ता. अगीति; लॅ. इं. एगाटी]

अगस्ताळ—अकरताळ पहा.

अगस्ति—पु.१ एक ऋषि. २ एक दक्षिणेकडील तारा (कॅनोपस). ३ एक वृक्ष. अगस्ता पहा. ४ (ल.) खादाड माणूस (अगस्तीनें समुद्र प्राशन केल्यावरून). [सं.]

अगळ—पु. स्त्री. दाराला लावण्याचा अडसर; निर्बंध; कडी; सांखळी; अडणा. [सं. अर्गला, प्रा. अग्गल; गु. अगळी, आगळो; हिं. अगल. आगल; का. अगळी: पं अग्गळ; वं. अगड; सिंह. अगुल] **०घालणें**–अडविणें. **०पडणें**–प्रतिबंध होणें.

अगळ—स्त्री. गोट्या खेळण्याकरितां केलेली खळगी; गल; बदा; त्रिटी कोलण्याची गळी. [का अगळु=खड्डा.सांच]. **०गोटी–डाव**–स्त्री. ज्या गोट्यांच्या डावांत बदे असतात तो: कोंडडाव याच्यापासून निराळा.

अगळ—न.(गो.) १ कोंकंबाचा रस ' आज भिंडा–अगळाची कडी करची '. २ (ल.) लालभडक पातळ पदार्थ. ' रोस सामकॉ अगळ कसॉ जाला ! '

अगळ—आगवळ पहा.

अगळा—आगळा पहा.

अगळावणें—सक्रि. (गो.) (कोंकंबाचीं सोलें ज्यास्त आंबट होण्यासाठीं त्यांनां) कोंकंबाच्या रसाचीं पुरें देणें. अगळ पहा.

अगळीक–त—आगळीक पहा.

अगा—उज्ञा. १ पुल्लिंगी संबोधन. हें नामाच्या पूर्वी लावितात किंवा ' अ ' गाळून पुढें जोडतात. अरे !. अहो !; ' राही म्हणे तरि अगा ! जा, पूस समेत तूं असें आर्या। ' –मोसभा ४.९५ २ ' अगे ' याचे अव. ३ (गों.) अगे, अगो. अग पहा.

अगा–(ह)(ही)—स्त्री. १ अंदाज; धोरण; अनुसंधान; आशा; अगाऊ कल्पना. ' वाघ पाठीवर येईल ही अगा नव्हती'.–ख ६६३५. ' या महिन्यांत पाऊस पडेल याची मला अगा नव्हती '. २ शुद्धि; स्मृति. ' मी चकलों खरा, मला त्या वेळेस अगा राहिली नाहीं. ' (या शब्दाचा गतकालीन गोष्टींशीं संबंध असून पुढें नास्तिरूप येतें.) [फा. आगाह=जाणीव असलेला]. **०अगा घेणें**–एखाद्या गोष्टीची व्यवस्था, किंवा जबाबदारी अंगावर घेणें: पुढाकार घेणें. **०अगा बांधणें**–पुढील अंदाज, तजवीज, तदतूद करणें.

अगाइ(ई)—अगई पहा. ' अगाई ! हा बाई ! त्वरित वरि जाईल पळुनी। '. –नल ९१.

अगाऊ—वि. आधींचा; अगोदरचा. –क्रिवि. आधीं; प्रथम; पहिल्यानें; पूर्वी; अगोदर. [सं. अग्र; हि. अगाव; सिं. अग्याउं.]

अ(अं) गाकडा—पु. पानगा; गेट; गेडगा. [सं. अंगार+कट ?]

अगाजणें—अक्रि. १ गाजावाजा होणें; चोहोंकडे प्रसिद्ध होणें; टिमकी वाजणें. २ कीर्ति, लौकिक होणें, प्रसिद्धी होणें. 'हे भीमकी ही नवरी अगाजे।' –रुह २.६०. [सं. आ+गर्ज; फा. आगाजाह्]

अगाजा—पु. १ ओरड; गलबला; गोंगाट; कल्ला. २ गाजावाजा; बोभाटा; गवगवा. 'त्या गोष्टीचा अगाजा झाला. ३ कीर्ति; लौकिक; नांव. ' कौरवेंद्र दुर्योधन राजा । ज्याचा महिवरि थोर अगाजा ॥ –वत्स. **०चा**–प्रसिद्ध; विश्रुत; लौकिकवान्. [सं. आ+गर्जना; फा. आगाजाह्]

अगा (गां) त—न. १ लवकर पिकणारें, हळवें, हंगामाच्या आधींचें पीक–धान्य. मागातच्या उलट. २ वि. अगोदरचें (हंगामा) पूर्वीचें–पेरलेलें, पिकलेलें. [सं. अग्र+जात]

अगांतु(तू)क—आगंतुक पहा.

अगाध—वि. १ अमर्याद; गंभीर; खोल, गहन; ज्याचा अंत लागत नाहीं असें (पाणी, ज्ञान, संपत्ति इ०); गूढ. ' ऐसें जें अगाध। जेथ वेडावती वेद ' –ज्ञा १.७३. २ अगम्य; अतर्क्य. ३ कठीण; असंभाव्य; अशक्य. ' त्याच्याहि पारिपत्यास अगाध आहे असें नाहीं. ' –शारो ३३; –पया १३८. [सं. अ+गाध=खोल; प्री. अगथॉस; गॉ. गॉथ्स]. –न. समुद्र; गंभीर सागर; खोल पाणी. ' अगाधें हीं उचंबळती । ते चंद्रींचि ना शक्ती ।' –अमृ १०.५. **०पण** गूढपणा; (ल) महत्त्व. ' तें अगाधपण जाईल । मग हिणावो अंगा येईल । ' –ज्ञा २.२१७.

अगाननगान—अगनगन पहा.

अगाप—अगप पहा.

अगापिछा–च्छा—पु. १ पुढील व मागील भाग; दर्शनी बाजू व मागील बाजू; अघाडी व पिछाडी. २ जवळचें आप्तसंबंधी;

नातेवाईक (आई, बाप, मुलें इ०). [सं. अग्र+(पि) पुच्छ=शेंपूट]. **०पहाणें**–सर्व बाजूंनीं विचार करणें; मागचा पुढचा विचार करणें; युक्तायुक्त पाहणें.

अगाव—वि. मजबूत; श्रेष्ठ. [तु. आघा=श्रेष्ठ; अर. अघलब]

अगावानी—स्त्रि. अंगरख्याची मलमल, कापड; याचे अंग पांढरें व विणकरींत किंवा कशिद्यांत बुटी असते. [तु. आघा + श्रेष्ठ+सं. वर्ग=वाण]

अगार—न. घर; स्थान; मंदिर (समासामध्यें) कीडागार (खेळण्याची जागा), धनागार, धान्यागार, भांडागार, देवागार, शयनागार, शस्त्रागार इ०. ' कां श्रमलासि स्वकरें अग्नि कसा लाविसी अगारा या । ' –मोसभा ४.१२. [सं.]

अगार—स्त्री. (बे.) ग्रीष्मर्तूत वळिवाचे पाऊस पडल्यानंतर तळ्याविहिरींतील पाणी आटण्याची क्रिया.

अगारडा—अगरडा पहा

अगारणें—अक्रि. वाढणें; ओगरणें. [सं. उद्+गृ]

अगारी—स्त्री. १ कोंब; डिरी. [सं. अग्र]. **०फुटणें०येणें**

अगारी–(व.) तूप वाढावयाचें भांडें. [सं उद्+गृ]

अगाव—अगाऊ पहा. [हि.]

अगाविंत—क्रिवि. (गो.) अभावित, एकाएकीं. [सं. अभावित्]

अगाशी–सी—स्त्री. १ खुली असलेली गच्ची; अटाली. ' दुसऱ्या मजल्यावर टोंकावर । अगाशी गच्ची चौफेर ॥ ' –गापो ३६. २ पडवी; सोपा. [सं. आकाशिका: तु०–का. अगशी=वेस. हिं.]

अगास—न. (कुण.) आकाश. ' घार फिरती अगासी । तिचें चित्त पिल्लापासीं ॥ ' [सं. आकाश]. **०दिघा**–पु. आकाशदिवा.

अगिटी—आगटी पहा. ' क्रोध लोभाची धुपे अगिटी ।'–एभा १८.२९६.

अगिदवणा—पु. एक प्रकारचा दवणा–वनस्पति. [सं. अग्निदमन]

अगि(गी)न—पु. (कुण.) आग; (वि. प्र. काव्यांत). [सं. अग्नि]. **०गाडा**–पु., **०गाडी**–स्त्री. आगगाडी. ' टोपीवाल्यांचा मूलुख । आगीन गाडीला कूलुप । ' **०बंद**–वि. न जळणारें; अग्नीनें नाश न पावणारें; अदाह्य. ' अगिनबंद रशीम '.

अगियाळें—आगियाळें पहा.

अगी—स्त्री. (कुण.) आग; [सं. अग्नि]

अगीडगा—पु. (बे.) भाताचा एक प्रकार. याला पाणी फार लागत नाहीं; या भाताचा रंग तांबडा असतो.

अगीदुगी—आगीदुगी पहा.

अगुण—वि. १ निर्गुण; सगुण याच्या उलट. ' सर्वें तुकया मेला । त्याणें अगुणा आणिला ॥ ' –तुगा २१६. २ गुणरहित; थोडे किंवा मुळींच गुण नसलेला; अवगुणी. ' कृष्ण अगुणाचा अरूप । कन्या सगुण आणि स्वरूप ॥ ' –एरुस्व १.९६. [सं. अ+गुण]

अगुणी–अगुण्या—गुणरहित. अगुण पहा.

अगुदर—(कुण.) अगोदर पहा ' भिऊ० –मरनाच्या अगुदर हिला सावरूनश्यानी धरावी '. –बाय २.२.

अगू, अगेरू—अगरू पहा.

अगूळ—अगवळ पहा.

अगे—उद्गा सामान्यतः स्त्रियांना संबोधून बोलतांना किंवा हांक मारतांना योजावयाचें संबोधन. अग पहा **रह.**—(१) अगे **मुने** महापाप, सासूबाई तुमचेंच माप; (२) अगे माझे वाहले, **सर्व** तुला वाहिलें. [अग; कों. आगे]

अगेरी—स्त्री. १ पारशांची अग्निशाला: देऊळ. अग्यारी. २ शूद्रांमध्यें श्राद्धाच्या दिवशीं अग्नींत तुपाची आहुति देतात ती. **०घालणें–करणें**. [सं. अग्नि+अगार]

अगेल—वि. (व.) पहिला. अगल पहा. ' या डावांत **मी** अगेल, तूं दुगेल. '

अगो—उद्गा.(कों.) अग; अगे पहा. 'सदाशिव:–अगो, **समजलीस** कां? '–कफा. १. स्त्री. (व्यक्तिवाचक) स्वत:ची बायको; **गो** असाहि प्रचार आहे. [तु०–बं. अगो]

अगोचर—वि. १ ज्ञानेंद्रियांना न जाणतां येणारा. न भासणारा;अज्ञात; अगम्य. ' ध्यानासिही जें नागवें । तें अगोचर फावें ॥' –ज्ञा १५.१६. २ चमत्कारिक, नवीन, पूर्वी ऐकण्यांत न आलेला. [सं अ+गोचर]

अगोचर—वि. १ अडदांड; अविचारी: अघोचर. क्रात्य; खट्याळ. ' काय मेलीं अगोचर पोरें हीं ! ' –सुशिलेचा देव २७; ' धाकटी नार निघाली अगोचर ' –मसाप १.१.२ २ अफाट; अवघड. ' नाहीं कवणाचे कटाव दखनेला पडले अगोचर –ऐतिपो ३४७. [सं अघोर + चर]

अगोचरी—स्त्री. योगशास्त्रांतील चौथी मुद्रा. या मुद्रेंत दृष्टि आकाशाकडे असते. ' अगोचरी मुद्रा यांची जानकी । ' –सप्र ८. १३.८०. [सं. अ+गोचर]

अगोट–ठ—स्त्री. १ शेतीच्या हंगामाची सुरवात. पावसाळ्याचा आरंभकाल; मृगारंभ; (ल.) चातुर्मास: संबंध पावसाळा. [सं. अग्रवृष्टि–अगोटी–अगोट]. **०साधणें–दाखविणें**–(मा.) मारणें ' कुत्र्याला अगोट दाखीव. '

अगोतली—आगोतली पहा.

अगोद(ध)र—क्रिवि. विवक्षित क्रियेच्या किंवा कालापूर्वी; आधी; पहिल्यांदा. **०चा,–रील**–वि. पूर्वीचा; पहिला; प्रथमचा; मागचा. [सं. अग्रतर किंवा आदोकर–आदोगर–अगोदर; सि. अगभरो]

अगोस्ती—स्त्री. (विप्र.) अंगुस्ती पहा. (अंगावरील) शहारे; कांटा. **०येणें–चाटणें**–'तिच्या (घोडीच्या) अगास अगोस्ती येऊन ती अंग झाडते.' –अश्वप १५७. [सं. अंग+उत्+स्था]

अग्गड—अगड पहा.

अग्गत(द)—(गो.) अगत्य पहा. ठाम. मुहाम. 'हो कागद तेणि माका अग्गत दिलोसा.'

अग्न—पु. स्त्री. अग्नि; आग; विस्तव. 'अग्न गृहासी लागला। आणि सावकाश निजला॥' –दा ११.३ ७; 'बाच्छायजादी कोधा आली। जैशी अग्न परजळली।' –ऐपो १०. [सं. अग्नि]

अग्नि—पु. १ विस्तव; आग; अनल. २ पंचमहाभूतांतील एक देवता. ३ जठराग्नि: (ल.) भूक. ४ आग्नेयी दिशा व तिचा अधिपति. ५ यज्ञीय देवता; गार्हपत्य, आहवनीय व दक्षिणाग्नि असे तीन त्रेताग्नि व सभ्य आणि आवसथ्य मिळून पंचाग्नि. ६ तीन संख्येचा वाचक. ७ चित्रकादि जठराग्नि प्रदीप्त करणाऱ्या वनस्पती. [सं.]. **०घेणें**–दारूगोळ्याचा मार सहन करणें. **०देणें**–प्रेत जाळणें; उत्तरक्रिया करणें. **०चा पाऊस पडणें**–अग्निवर्षाव होणें: एकदम अनेक संकटें-जुलूम कोसळणे, गुदरणें. **०आराधना**–शत्रूंचीं गांवखेडीं, शेते-भातें जाळणें. –ख २०९९. **०कण**–पु विस्तवाची ठिणगी; स्फुलिंग. फुणगी. **०कमळ**–न.योगशास्त्रांतील एक संज्ञा. भुवयांच्यामध्यें अग्निनामक कमळ आहे तें विशुद्धीं असून त्याला दोन पाकळ्या आहेत तेथे 'ह' 'क्ष' हीं बीजचिन्हे आहेत. –विउ १.५३. **०कार्य**–न. उपनयनानंतर ब्रह्मचारी धर्माप्रमाणें करावयाचा होम, अग्नि–उपासना **०काष्ठ**–न. निखारा. पेटलेलें लांकूड; विस्तव. **०काष्ठ भक्षणें**–१ अग्निप्रवेश करणें: अग्नींत उडी टाकून मरणें. 'अर्जुन म्हणे हेचि शपथ। जरी मोडोनि पडेल मात। तरी मी अग्निकाष्ठें भक्षीन सत्य।' –ह ३२ १६९. २ सती जाणें. 'आपला पति मृत झाल्याची खबर कानीं पडतांच तिनें अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा निश्चय केला'. **०काष्ठ ॲसिड**–(पायरोलिग्निअस ॲसिड) हे लांकडांतून कच्च्या स्वरूपांत निघतें. –सेंपू २.४२. **०कुंड**–न. होमाच्या वेळीं अग्नि ठेवण्याकरितां केलेला खड्डा, पात्र; वेदी. **०कुमार**–पु. अजीर्ण, कॉलरा, वातजन्य रोग यांवरील पारा, गंधक, बचनाग टांकणखार वगैरेचे केलेलें औषध, रसायन. –योर १.५०२. **०क्रीडा**–स्त्री. दारुकाम; आतषबाजी; दारूगोळ्याचा भडिमार; फटाके, दारू उडविणें. **०खांब**–पु. तप्तलोहस्तंभ; शिक्षेचा एक प्राचीन प्रकार; नरकयातनांपैकीं एक; यम लोकींची एक शिक्षा. 'तप्तभूमीवरी चालविती। अग्निखांबासहि कवळविती॥'. **०चक्र**–न. १ षट्चक्रांपैकीं एक; अग्निकमळ पहा. –एभा १२.३३५. २ शकुन, फलज्योतिष यांतील एक संज्ञा; शांतिकर्मासाठीं अग्नि कोठें आहे हें पहावयाचें चक्र. शुक्र प्रतिपदेपासून चालू तिथीपर्यंत मोजून त्या संख्येंत एक मिळवावा व रविवारापासून चालू वारापर्यंतची संख्या मिळवावी व त्या संख्येस ४ नी भागावें. बाकी शून्य किंवा तीन उरल्यास अग्नि पृथ्वीवर असून शुभ होय; २ उरल्यास अग्नि पातालीं व १ उरल्यास अग्नि स्वर्गलोकीं होय; हे दोन्ही अग्नि शांतिकर्मास अशुभ होत –धसिं २८४. [सं.]. **०ज खडक**–पृथ्वीच्या पोटांतील अग्नीनें आंतील पदार्थांचा रस होऊन त्यापासून बनणारा खडक; लाव्हा. –भू ७८. **०ज्वाला**–स्त्री. अग्निशिखा; ज्योत; जाळ. **०तीर्थ**–न. तीर्थ पहा. **०दिव्य**–न. दिव्य पहा. **०नाश**–पु. श्रौत स्मार्त अग्नि विझून जाणें; अग्निहोत्रांतील अग्नि नष्ट होणें; (यावद्दल प्रायश्चित्त घ्यावें लागतें). **०नौका**–स्त्री. आगबोट; वाफर; स्टीमर. **०पंचक**–न. फलज्योतिषांतील एक योग; हा घातक असून त्यांत अग्नीपासून भय असतें. यासारखेंच चौरपं०, मृत्युपं०, राजपं० वगैरे योग आहेत. शुक्र प्रतिपदेपासून चालू तिथीपर्यंत मोजून त्यामध्यें चालू लग्न मिळवून त्या संख्येस नवानीं भागून बाकी दोन राहिल्यास तें अग्निपंचक होय. हें सर्व गृहकर्मास वर्ज्य मानितात. –मुमा. [सं.]. **०परीक्षा**–स्त्री. अग्निदिव्य पहा. **०पात्र**–न. (शिंपी.) इस्त्री यंत्र; कपडा कडकडीत करण्याचे यंत्र; इस्तरी पहा. **०पुट**–न रसायन, औषधें, मात्रा वगैरे करण्यास त्यांना अग्नीची आंच देऊन जो संस्कार करितात तें. **०प्रद**–वि. पाचक; अग्निवर्धक; अग्निदीपक. **०प्रवेश**–पु. १ स्वतःस जाळून घेणे. २ सती जाणें; अग्निकाष्ठ भक्षणें पहा. 'पुत्रवंत्या स्त्रिया विशेष। तिहि न करावा अग्निप्रवेश॥' **०बाण**–पु, दारूनें वर उडवावयाचा बाण; दारूचा बाण; अग्न्यस्त्र. **०मणी**–पु. एक काल्पनिक रत्न; सूर्यमणि; रविकांत. सूर्यकांत मणी पहा. **०मांद्य**–न. अपचनाचा रोग; जठराग्नि प्रदीप्त नसणें; भूक न लागणें. **०मापक**–पु. न. अत्युष्णतामान मोजण्याचें यंत्र; पायरॉमीटर. **०मुख**–न. १ हिंग एक भाग, वेखंड २ भाग, पिपळी ३ भाग, सुंठ ४ भाग, ओवा ५ भाग, हिरडेदळ ६ भाग, चित्रकमूळ ७ भाग व कोष्ट ८ भाग यांचें चूर्ण. हें अग्निमांद्यावर देतात. –योर १. ४९३. २ देव. ३ ब्राह्मण. **०यंत्र**–न. १ बंदूक; तोफ. 'यांच्या अग्नियंत्रशौंडत्वाची तारीफ व्हायला वेळेनुसार चुकायची नाहीं.' –नि ८०८. २ दारूकाम; आतषबाजी. 'भरूनी रजतमाचें औषध। करूनी अग्नियंत्र सन्नद्ध। कृष्णापुढें अतिविनोद। एक प्रबुद्ध दाविती॥'–एरुस्व १५.११७. **०रथ**–पु.आगगाडी. **०रोहिणी**–स्त्री. काळपुळी पहा. **०वर्ण**–वि. अग्नीसारखा तांबडा लाल (रंग); रक्तकांति. **०वर्धक**–वि. पाचक. **०वर्धन**–न. पचन; जठराग्नीचें

उद्दीपन. **०विच्छेद**–पु. अग्निनाश; पत्नी मृत झाली असतां अथवा इतर कारणांनीं अग्निहोत्र बंद पडणें. (याबद्दल प्रायश्चित्त सांगितलें आहे). **०वृद्धि**–स्त्री. अग्निवर्धन; पचनशक्तीची वाढ; जठराग्नि प्रदीप्त होणें; आहाराचें प्रमाण वाढविणें. **०शस्त्र**–न. बंदूक, तोफ वगैरे दारूनें उडणारें हत्यार. **०शाला**–स्त्री. अग्न्यागार; अग्निगृह; अग्नि ठेवण्याची जागा; यज्ञशाळा; होमशाळा. **०शिखा**–स्त्री अग्नीची ज्वाळा; अग्निज्वाळा. **०द्युत्**–पु (स्त्रि) 'एंवर डेज' या इंग्रजी शब्दाचा पर्याय; राखेचे दिवस; ज्यांची दीक्षा होणार आहे त्यांच्यासाठीं प्रार्थना करण्याचे दिवस. 'उपोषणमंडळाशिवाय या चर्चेच्या प्रार्थनासंग्रहांत अग्निष्टुत्, अनुनय व कित्येक विशिष्ट दिवसांच्या पूर्वी करावयाचीं प्रदोषोपोषणें...सांगितलीं आहेत'. –ना वा. टिळक. उ. सं. ३. [सं. अग्नि+स्तु]. **०ष्वात्त**–पु अव. पितृदेवता, ज्यांस मंत्राग्नि मिळालेला आहे असे; ज्यांनीं जिवंतपणीं अग्निहोत्र पाळलें नाहीं असे; मरीचीपुत्रांपैकीं पितर. जिवंतपणीं श्रौताग्नि ज्यांनीं ठेवला नाहीं (अग्निष्टोमादि याग केले नाहींत) असे पितर (सायण). **०सेवा**–स्त्री. अग्नीची उपासना, पूजा. **०स्थान**–न. अग्निकमळ-चक्र पहा. 'आकळलेनी योगें । मध्यमा मध्यमार्गें । अग्निस्थानीं निगे । ब्रह्मरंध्रा ॥' –ज्ञा ८.९४. **०होत्र**–न. १ श्रौताग्नीची उपासना; सकाळसायंकाळ अग्नीला होम देऊन अग्नि सतत राखण्याचें व्रत. २ (थट्टेनें) धूम्रपान; विडी ओढणें. **०होत्री**–पु. अग्निहोत्र पाळणारा; (थट्टा) तंबाकू ओढण्याचें व्यसन असणारा. **०स्नान**–न. (व.) एक ताब्याभर पाण्यांत स्नान करणें.

अग्न्यायतन—न. अग्निकुंड. [सं. अग्नि+आयतन]

अग्न्युत्पात—पु. १ वणवा; आगधाड; अग्नीचा डोंब. २ उल्का [सं. अग्नि+उत्पात]

अग्या—वि. म्होरक्या; पुढारी. (मुलांच्या खेळांत). –पु पुढारीपण; पुढाकार. **०घेणें–धरणें–पत्करणें.** [सं. अग्र; प्रा. अग्ग; गु. अगुवो; हिं–अगवा–ना, आगे; पं. अग्गे; जि. अगोर]

अग्या—पु. १ काजवा. 'अग्या निजतेजसत्ता। अभितेज प्राग्यें जातां। तोंड जळे चवी चाखितां। '–एभा ४.८६. २ एक खाजरी अंगाची आग करणारी वनस्पति (खाजकुयरी). [सं. अग्नि]

अग्या(गे)री—स्त्री. अग्निपूजकांचा किंवा पारशांचा पवित्र अग्नि ज्या ठिकाणीं असतो ती जागा; पारशांचें देऊळ. [सं. अग्नि+अगार; प्रा. अग्गिआर–अग्यारी]

अॅग्यु—पु. हिंवतापाचा एक प्रकार. [इं.]. **०मिश्चर**–न. या तापावरील औषध. [इं.]

अग्र—न. १ टोंक; शेवट; कळस; बिंदु; शेंडा. २ पुढचा भाग; अघाडी. ३ दिगंश. ४ (समासांत श्रेष्ठार्थी); पहिला; पुढचा; मुख्य; प्रधान. [सं.]. **०का–ज्या**–स्त्री दिगंश; सूर्य, तारे किंवा इतर ग्रह हे क्षितिजाच्या ज्या बिंदूंत उगवतात किंवा मावळतात तो बिंदु आणि क्षितिजावरील पूर्व किंवा पश्चिम बिंदू यांच्यामध्यें जो कंस होतो तो. **०गण**–पि श्रेष्ठ, प्रवीण, तरबेज. 'रुक्मिणी अग्रगणी सकळिकां।' –एरुस्व ६.७०; 'चपळविशई अग्रगण।' –दा १.२.२२. [सं. अग्रगण्य]. **०गण्य**–वि. श्रेष्ठ. प्रमुख, पुढें नेणारा. अग्रगण्यु, अग्रण्य अशीहि रूपें आढळतात. **०गामी**–वि. पुढें जाणारा; नेता; पुढारी. **अग्रगामिनी**–स्त्री. **०ज**–वि. प्रथम जन्मलेला–वडील भाऊ **०णी**–वि. मुख्य, नायक; म्होरक्या, मुखिया. मार्गदर्शक. **०तः**–क्रिवि पुढें; अग्रभागीं **०धान्य**–न जोंधळा, अरगडी, भात, बाजरी वगैरे खरीपाचें पीक. खरीप पहा. **०तलसंचर (पाद)**–वि (नृत्य) नाचण्याम उभे असतां पायाची टांच वर उचलून आंगठा जमीनीला टेंकून बाकीच्या बोटांची अग्रे वांकडी करणें. **०पूजा**–स्त्री. समेत विद्या, तप, वगैरेमुळें जो श्रेष्ठ असतो त्याची प्रथम करण्यांत येणारी पूजा–मुख्य मानपान. **–मान**–वरील पूजेचा मान. 'ज्याची अग्रपूजेची मान्यता...।त्या ब्रम्ह्यासि माझी काळमत्ता। ग्रामी सर्वथा॥'–एभा. १० ६१३. [सं अग्र+पूजा] **०फूल**–न. वेणीच्या अग्रांत गुंतविलेलें सोन्याचें जोड फूल. वेणी खोवली असतां तिच्या मध्यभागीं हें दोन बाजूंनीं दिसतें. [अग्र+पुष्प]. **०भाग**–पु अग्र पहा. १ पुढला भाग २ टोंक; शेवट; कळस; माथा; शिखर; शेंडा. **०भोजन**–न. पहिल्याप्रथम जेवणें; आधीं जेवणें; प्रथम जेवण्याचा मान, सर्वांच्या आधीं जेवणास बसण्याचा मान. [सं. अग्र+भुज्]. **०भोजी**–वि. अग्रभोजनाचा मान असणारा: आधीं जेवणारा. **०लेख**–पु वर्तमानपत्रांतील मुख्य लेख (लीडर); संपादकीय लेख. [सं. अग्र+लेख]. **०वन**–न. १ झाडाच्या फांदीला फुटणारी डिरी. 'अर्थु कामु पसरे। अग्रवनें घेतीं थारे।'–ज्ञा १५. १५८. २ अरण्याची सरहद्द. [सं. अग्र+वन]. **०वर्ण**–पु. श्रेष्ठ जात; (ल.) ब्राह्मण. 'त्यांहीं माजीं उत्तमता कैशी। अग्रवर्णासी पै जन्म॥'–एभा ७.६३५. [सं अग्र+वर्ण]. **०वर्ती**–वि. अघाडी, पुढें असणारा–जाणारा. (स्थल व काल यांनां अनुसरून लावितात). [स. अग्र+वृत्]. **०वादी**–पु १ वादी; फिर्यादी: वादाचा प्रथम उपक्रम करणारा; प्रतिवादीच्या उलट. २ आपल्या मताचा किंवा पक्षाचा जोरानें पुरस्कार करणारा. [सं. अग्रवादिन्]. **०सर**–वि. १ अग्रेसर; अग्रगण्य; पुढारी; व्यवस्था पहाणारा; नेता. २ प्रमाणांत असलेल्या दोन संख्यांपैकीं पहिली. ३६:४८ यांतील ३६. –छअं १०४. **०स्कंध**–पु. खांद्याचें पुढच्या भागाचें माप (शिवणकाम). 'अग्रस्कंध व पाठतोल हीं दोन्ही योग्य असतां बॉडीकोट पार्टीत फार रुंद असतो याचें कारण काय?'–काप्र. २५. **०हार**–पु. ब्राह्मणांना किंवा देवस्थानाला निर्वाहासाठीं दिलेलें गांव, जमीन वगैरे इनाम; (अप.)

अग्राहार. 'वापी कूप आराम। अग्रहारें हन महाग्राम।' –ज्ञा १८.९९. २ एक दुमाला. एका कुटुंबाहून जास्त कुटुंबांस निर्वाहार्थ जो गांव अगर जमीन देतात त्यास अग्रहार दुमाला म्हणतात. –इनाम २८. [सं. अग्र+हृ]

अग्रा—स्त्री. अग्रका पहा. समांशाचा कोटिकोन पूर्व किंवा पश्चिम समबिंदूपासून द्युमंडलाचे पातापावेतों मोजला जातो त्यास अग्रा म्हणतात. –सूर्य १७ [सं.]

अग्रार—स्त्री. अग्रहार पहा. 'तीर्थी अर्पी जो अग्रारें।' –दा २.७.१९. [सं. अग्रहार]

अग्रांशु—पु. प्रकाशकिरणांचा शेवटः केंद्रबिंदु. [सं. अग्र+अंशु=किरण]

अग्रासन—न. सभेतील प्रमुख स्थान; मुख्यासन, अध्यक्षपद. [सं. अग्र+आसन]

अग्राह्य, अग्रहणीय—वि. घेण्यास अयोग्य; वाईट; बेकायदेशीर; अमान्य; अधर्म्य; नालायक. 'मॉटेस्क्यु सुधारणा अग्राह्य आहे.' –टि. ३.४२५. [सं. अ+ग्रह]

अग्रिम—वि. १ पुढचा; आधींचा. २ पुढारी; मुख्य; प्रमुख; वडील. ३ अग्रज; वडील भाऊ. **०धान्य**–न. अग्रधान्य पहा.

अग्रेवन—अग्रवन पहा.

अग्रेसर—अग्रसर पहा.

अग्रो(ग्रो)—पु. आग्रह पहा. [सं. आग्रह]

अग्रोदक—न. १ कोणाचाहि स्पर्श होण्यापूर्वी घेतलेलें पाणी. २ ताजें पाणी; स्वयंपाकासाठीं सोंवळ्यानें आणलेलें पाणी. 'अग्रोदकाचा भरून कलश.....पूजावया परमपुरुष।' –ह ३४.१८२. [सं. अग्र+उदक]

अग्र्य—वि. प्रमुख; श्रेष्ठ; नेता; पुढारी. [सं.]

अघ—न. १ पाप. 'म्हणोनि सांडिजे तो अधीं।' –ज्ञा ३.१२३. २ दोष; गुन्हा; अपराध. [सं]. **०गोवा**–पातकांचा बंद, नड; गुंता. 'मद्भजनें तोचि निस्तरला अघगोवा रे॥' –शिक १९. [गोंवणें]

अघटघटी—वि. अशक्य गोष्ट घडवून आणणारी. 'अघटघटी हरीची माया।' –एभा ७.५७४. [सं. अ+घट्+घट्]

अघटमान—वि. न घडणारें. असंभाव्य. अशक्य. 'हे चर्चा अघटमान पै।' [सं.]

अघटित—वि. १ असंभाव्य; विलक्षण; चमत्कारिक; लोकोत्तर. 'अघटित वार्ता। कोल्हे गेले तीर्था॥'; 'हरिच्या दासां चिंता। अघटित हे वार्ता॥' –तुगा २३११. २ अघोर; अति वाईट; भयंकर; राक्षसी; आसुरी. –न. अतर्क्य, अश्रुतपूर्व गोष्ट–प्रसंग. 'अघटित घडे कापसा॥ कापसानें कपाळ फुटे॥'; 'कर्मी त्यांचे अघटित। –ऐतिपो १४५. [सं.]. **०घटना**–स्त्री. विलक्षण गोष्ट; आश्चर्यकारक बनाव, प्रसंग; नवल. [सं.]. **०घटी**–वि. न घडणारें तें घडवून आणणारी. 'ईश्वराची माया पूर्ण। अघटितघटी तिचें लक्षण॥' –एभा २३.४२१. [सं.]. **०विंदाण–न**–न. विलक्षण किंवा आश्चर्यकारक गोष्ट; नवल; चमत्कार; करणी (काल, दैव, ईश्वर यांची). 'कोरडे कागद उदकीं राखणें। हें अघटित विदान दाविलें॥'

अघटी–टें–आगटी पहा.

अघड—वि. न घडविलेलें; घडींव नसलेलें; ओबडधोबड (दगड, वस्तु इ०). [सं. अ+घट्]. **०ता**–वि. न घडणारा; अशक्य. 'तेथ परिवारु बहुये। अघडता कीं॥ –अमृ ९.३८; 'हे असो मात अघडती।' –ज्ञा १.२३५; 'म्हणाल हे उपदेशिली नीती। आम्हांस तव अघडती।' रास १.६४०.

अघननघन–अघाननाघान–अघानीनाघानी—अगननगन पहा.

अघमर्षण—वि १ पापनाशक. –न. स्नानविधि व संध्या या कर्मांत घ्राणस्थित पापपुरुषाचें उच्चाटण करण्यास हातांत उदक घेऊन त्यावर नाकांतील वायु सोडून त्या पाण्यानें जमीनीवर आघात करणें (म्हणजे पापपुरुषाचा नाश झाला ही भावना). 'येथींच्या अर्थी बुडी देऊन। जे सदां करिती अघमर्षण।' [सं. अघ+मृष्]

अघरडा—पु. १ जीभ, नाक, बोट, लेखणी इ० चें टोंक; झाडाचा शेंडा; (सामान्यतः) शेवट; टोंक. [सं. अग्र]. २ अघाडा पहा.

अघव–वा, अघा—वि. १ अवघा–चें; पूर्ण; सर्व; एकंदर. 'देवकी उदरींचा आठवा. निजध्यास बैसला कंसभावा। जनींवनीं अघवा। आठवा आठवा आठवत॥' –ह ३. ६०'; 'ऐसेनी आघव चोहोंकडे। बैसितें जालें। –दाव २०३. 'होति अघवियांची विरहिणी।' –शिशु ७५४. [सं. अघवत्; प्रा. अग्घव –अघव]

अघ(घा)ळणें—उक्रि. पाण्यांत खळबळणें, धुणें (वस्त्र इ०). [का. अगळ, अगुळ=पाण्यांत बुडविणें; सं. आ+गल्]

अघळपघळ—वि. १ ऐसपैस; मोकळें; सैल; लांबलचक. २ (ल.) स्वतंत्र; अनिर्बंध; निष्कपट; मोकळ्या मनाचा. –क्रिवि मोकळेपणानें; ऐसपैस रीतीनें; (बोलणें, बसणें). [सं. प्रगल्–पघळ द्वि. किंवा का. अगल=विस्तृत द्वि.]

अघळाअघळ—स्त्री. (पाण्यांत) पुन्हां पुन्हां खळबळणें. [अघळणें]

अघा—पु. १ धनी; यजमान. २ मुसलमान बादशहाचा खास खोजा. ३ तुर्की राज्यांतील सेनापति, मुख्याधिकारी इ० ची पदवी. [सं. अग्र; तु. आघा=श्रेष्ठ]

अघाऊ—अगाऊ पहा.

अघाड—वि. (चेंद्र.) उंच; मोठें. [सं. अ+घट; किंवा तु. अघा]

अघाडा—पु. १ आषाढांत उत्पन्न होणारें एक औषधि झाड; पांढरा, रक्त व पाण असे तीन प्रकार; दंतधावन, आम, व्रण यांवर

उपयोगी. उंची ४ ते सहा फूट. दांडयावर रेषा व लव. पानाची वरची बाजू नरम व खालची खडबडीत. राख खतांच्या उपयोगी. क्षाराचा उपयोग धोबी लोक कपडे धुण्याकडे करतात. २ बाय कांच्या केसांची अग्रे. (क्रि० बांधणें–विंचरणें). [सं. अग्रजात. प्रा. अग्गाड; गु. अघेडो]

अघाडी—स्त्री १ पुढला भाग· पिछाडीच्या उलट. २ सैन्याचा पुढला भाग; विनी. ' रोखिले अघाडी जेजाला. । ' –एपो ११८ ३ घोडयाच्या गळयाला बांधावयाची पुढील दोरी; दवासन. –क्रिवि. पूर्वी; पुढें; अगोदर. [सं. अग्र]. ०**घेणें**–पुढें होणें; पुढाकार घेणें. ०**मारणें**–१ पुढें जाणें. ' तोंपर्यंतच काय जी अघाडी अंमल ती मारली पाहिजे. ' –चंद्रगुप्त १२१. २ सैन्याची बिनी कापणें. ०**साधणें**–दुसऱ्याच्या आधीं जाऊन काम पुरें करणें.

अघाडीपिछाडी—स्त्री. १ घर, सैन्य इ० चा पुढला व मागला भाग. २ घोडयाच्या डोक्याकडील व मागच्या पायाकडील बांधावयाचे दोर; दवासन आणि पायबंद. –क्रिवि. पुढें मागें; पूर्वी नंतर. [सं. अग्र+ पिछ. हिं.]

अघात—पु. आघात (अप.); संकट. ' हरिनामें प्रल्हाद तरला । नाना अघातापासून सुटला ॥ ' –दा ४.३ १७. [सं. आघात]

अघेडा—अघाडा पहा.

अघोट—अगोट पहा.

अघोर—वि. १ अचाट; फार भयंकर; भीतिप्रद; अमंगळ. (**वस्तु, क्रिया, स्थान**). २ अकाळविकाळ; अकटोविकट. ३ निष्काळजी; बिनघोर; निर्भय; स्वस्थ; बेफिकीर. ४ सौम्य; घोर नाही असा. 'अघोरचक्षुः अपतिघ्न्येधि ।' –ऋग्वे १०.८५.४४ –अंतरपाट काढल्यानंतर ' ही वधू सौम्य दृष्टीची असावी ' असें म्हणतात. –पु. १ संकट; घोर. ' मासी हरिली त्वां जरा । आणि देहींच्या अघोरा दवडिलें ॥' –कथा २.५.१७७. २ शंकर. यावरून अघोरपंथ निघाला. ' या ते रुद्र शिवा तनूरघोरा पापकाशिनी । ' –तैसं० रुद्र. ३ एक नरक. ' जो द्विजदेवांची वृत्ति हरी...ते तिघे अघोरीं पचिजेति । ' –एभा २७.३९३. ०**अरण्य**–न. भयंकर अरण्य. ०**कर्म**–न. भयंकर, धाडसी किंवा अमंगळ काम. ०**जप**–पु. पिशाच मंत्राचा जप. ०**दंड**–पु. जबरदस्त दंड. ०**निद्रा**–स्त्री. गाढ झोंप. ०**पंथ**–पु. गोसावयांचा एक पंथ; हे लोक हातांत नरकपाल घेणारे व नरमांस भक्षण, मलभक्षण व इतर अघोर (अमंगळ) कृत्ये करणारे असतात. ०**पंथी**–वि. वरील पंथाचे अनुयायी. [सं. अघोर + पथिन्]. ०**मत-मार्ग**–अघोरपंथ पहा. –**मार्गी**–अघोरपंथी पहा. ०**योगी**–पु. अघोरपंथ व त्याच्या अनुयायांचा समाज. 'शाक्त आगम आघोरयोगी । कैसे ते ऐकावे ॥ –दा ४.१.१३. [सं.]

अघोरी—वि. १ अघोरपंथी; साहसादि कर्मे करणारा; स्नानसंध्यादि आचार न पाळतां अव्यवस्थितपणें वागणारा. ' रांखेचा बोकाणा तोंडांत भरून मेल्यासारखा पडतो. तिळाची पेंड कुजविली म्हणजे तिची किंमतीसारखी घाण येते हीं नकली विद्या त्याप्याची भीति घालून अघोरी पैसे उकळतो ' –गांव १३३ २ तिरस्करणीय. निंद्य. त्याज्य. भयंकर. दुष्ट. साहसी. अमंगळ. [सं अघोर]

अचकट, अचकटविचकट—वि अश्लील; वाईट. घाणेरडे वाग्यात वीभत्स; शिनळ चावट(भाषण, भाषण करणारा). ०**उच्चारणें**—अपशब्द, अश्लील वाक्यें उच्चारणें. जननेंद्रियावरून शिव्या देणें. [सं विचु=निराळें करणें. म विचकट द्वि.]

अचकचाचक—स्त्री गैरपद्धतीनें, अस्ताव्यस्तपणें, कसेतरी, अधूनमधून घेणें–उपटणें (शेतांतील गवत वगैरे) [वोचक द्वि.]

अचकचोचक, अचकचाचक—क्रिवि अव्यवस्थितपणें; कसेतरी; अस्ताव्यस्त (गवत काढणे, घांस घेणे) शिवाय अचट बोचट पहा [वोचक, वचक द्वि.]

अचकय—क्रिवि (गो) अजगय, हलकट नकळत [सं अ+ज्ञा. म अजाण]

अचकलदचकल—न.(व) कोणतेंहि, वाईट, जाडेभरडें अन्न, काहींतरी अयोग्य खाद्य. ' अचकलदचकल तुला पचणार नाहीं ' [अचकळ किंवा अचकूल द्वि.]

अचकलेंविचकलें—अच्कलेंविच्कलें पहा.

अचकळ—वि पाणचट; पाचकळ. [सं अधि+कल]

अचकाविचका—पु गोंधळ, गुंतागुंत, चिवटाचिवट; अव्यवस्थितपणा (ल.) नाश, बिघाड, दुर्दशा विचका पहा. [विचका द्वि.]

अचकागचका—पु. १ अपस्मार, फेफरें वगैरेंत शरीराला बसणारा हिसका. २ एकाएकी चलाखीनें ओढणें, हकलणें, ठोसा देणें; धक्का मारणें. (क्रि० देणें). ३ धसका, दहशत (क्रि० बसणें). ०**खाणें**–बोलण्यांत अडखळणें [अचका+गचका. सं आ+कृष्ट; प्रा. अंच; का. अच्चग=धावणे होणे. द्वि]

अचकी—स्त्री. उचकी हिक्का उचकी पहा. (क्रि० देणें–येणें).

अचकी—वि. सर्व, संपूर्ण; अस्सी. ' ठेवीस (अचकी) अचकी रदनाग्री । ' –गणपि ४६. [सं आसाग्र; म. असगा–गी]

अचकुल—वि. (वे.) १ नाजुक. हळुवार. २ अशक्त, फुसका; रोगट; हलकट; निरुपयोगी कुचकामी (इंद्रिय, अंग, यंत्र वगैरे) ३ मोडलेला; दुखावलेला; व्यंग· पंगु [सं अधेकल्य]

अचंगळ—वि कुरूप.. शरीर वाईट असला नकोसा तो. [अ+का. चांगु=भले]

अचंचल—वि. १ न चळणारा न हलणारा. दृढ. स्थिर २ न बदलणारा; ठाम निश्चयाचा. निश्चळ. [सं.]

अचटबोचट—क्रिवि कसेंजाल्यार: विषम: अर्धमुर्धें; एकसारखें नव्हे: उंचसखल रीतीनें (कापणें, झाडणें, सारवणें, लावणें). **०चकबोचक** पहा. [ध्व.]

अचडेंबचडें अचडंबचडं, अचबुचबु—न. १ लाडकें मूल २ त्याचें संबोधन: छबेला! छबेली! 'अचडुबचडु नामें बाळ बिला.' –अमृतक ५९; 'माझें अचडें ग बचडें! छकडें! ग!.' [सं. वत्स: प्रा. वच्छ, बच्च: बच्च+ड: द्वि. बच्छड, बच्चड द्वि.]

अचतुर—वि अकुशल: चावलट अडाणी: निर्बुद्ध: जड [सं.]

अचपळ—वि. १ खोडकर; उत्पाती, चेचळ. 'अचपळ मन माझें नावरे आवरीतां.' –रा. २ चपळ: तरतरीत: **उत्साही: हुषार.** 'अचपळ गुण गुणी बैसली प्रीति दृष्टी.' –दावि १५४. [सं. अ+चपल] **०पण**–न. खोडयाळपणा, चपलपणा. 'भरारी तो वारा अचपळपणें देश पिकती.' –दावि २२५.

अचंब—पु घोडयाचा एक रंग. –अश्वप २८.

अचंबा—पु १ आश्चर्य: चमत्कार: कौतुक: नवल. २ आश्चर्याची गोष्ट: नवलपरी [सं. अत्यद्भुत: प्रा. अच्चब्भुय–अचंबअ–अचंबा: हि अचंभा गु. अचंबो]

अचंबीत—वि. आश्चर्यचकित: विस्मित: थक्क. –क्रिवि अचानक: एकाएकी. [अचंबा]

अचर—वि. स्थिर: स्तब्ध: गतिरहित: अढळ: स्थावर [सं. अ+चर]

अचरट—वि. (मूळ आचारांचें जास्त स्तोम माजविणारा त्यावरून) वाचाल: भलतेसलते:अद्वातद्वा:अयोग्य: अनर्थवान (भाषण, बोलणारा): व्राल्य: अधवट: चावलट: मूर्खासारखें वर्तन करणारा. 'बाहेर ऐक तें' (अळवाची भाजी), आणि अचरट मागें सांभाळें.' [सं. आचारवत् किंवा अ=नाही+चव्हाट=दावें (!)]

अचरटपचरट—वि १ कोरडें: भरड: रुक्ष: बेचव (अन्न) २ असंबद्ध: पालुपाळिक: भ्रमिष्ट, (भाषण बोलणारा). अरबटचरबट पहा [अचरट द्वि.]

अचरप (ब) चर—अचरटपचरट पहा. [ध्व.]

अचर्चे—वि १ चर्चेचा–वादाचा विषय होऊं शकत नाही असा 'देवी देवो म्हणती अचर्चा तें.' –ज्ञा ४ ६९. –पु. (ल.) नवरा (बायकोनें त्याचें नांव घेतां किंवा चर्चा करितां कामा नये म्हणून). –मनको. [स. अ+चर्च]

अचल—वि. १ स्थिर. गतिरहित 'अचलु हा शाश्वत.' –ज्ञा २.१४१ २ अक्षय: अखंड. 'बंधु.. अचलिचें राज्य करिती.' –वसा ६६. ३ शांत. धैर्य: अचेचल: दमदार. निश्चित हेतु असलेला –पु पर्वत: टेकडी 'तैं पापाचा अचळु फिटे.' –ज्ञा ४.५६. [सं. अ+चल]. **०तारा**–पु. स्थिर तारका. **०स्वर**–पु. (संगीत) आपल्या जागेवरून न हालणारा (खालींवर न होणारा) स्वर: हे दोन आहेत: षड्ज व पंचम.

अचला—पु हातरुमाल अचळ पहा. [सं. अंचल]

अचला—स्त्री. पृथ्वी. 'कैपातें भीष्मार्जुन देती अचळेसि शस्त्रसंपातें.' –मोभीष्म ३.३० [सं.] **०गौर**–स्त्री. मकरसंक्रांतीच्या दिवशीं बायका एका बाईस आपणावर बसवून तिला खाऊं पिऊं घालतात. मुलींचे हाले देत नाहींत, ती बाई

अचलित—वि. स्थिर: स्थावर: ठाम; निश्चल: न हललेलें. [सं.]

अचळ—वि. १ अचल पहा. २ न शिवलेला: न हाललेला, किंवा हालविलेला: उपयोग न केलेला: अस्पृष्ट(खाण्याचा पदार्थ इ.) ३ (ल.) अवघ: बाकी; शिलक. –क्रिवि अलगत: अलाद: **दमानें**; हळहळ. 'हें तोंडातोंड भांडें भरलें आहे. अचळ उचलून टेव.' [सं. अचल]

अचळ, अंचळ—पु. १ पदर: ओघा 'नाहीं अचळ सावरावा ठावे.' –तुगा १११. 'लपविला कृष्ण, अचळ पल्लव मुखावरी घाली.' –भज ३५. २ अंचूळ: आंचूळ: स्तन: थान (गुरांचें) ३ बारीक वस्त्र: हातरुमाल 'सवेंचि निर्मळा आंचळें दाटिले. । मेघक जनीं ॥' –ऋ ८४. [सं. अंचल]

अचळपद—न. अढळपद. मोक्ष. [सं.]

अचळय—क्रिवि. (गो) १अलगत: थक्का न लावतां. २ (ल) सहज: कष्ट न पडतां: अनायासानें 'ताका गिरिंस्तकाय **अचळय** मेळळी.' [सं. अचल]

अचळघी—वि. १ अचल, अचळ पहा. **०बाण**–मकर संक्रांतीला जिचीं सर्व मुलें जिवंत आहेत अशा सुवासिनीस आधल्या दिवशीं विरजन देवलेलें व हात न लावलेलें असें दहीं पात्रामधूंन, स्वत:च्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठीं बाण म्हणून देतात तें. [सं. अचल+बायन]

अचळाबाण–स्त्री. अचळघी बाण जिला द्यावयाचें ती. तिची न्हाऊमाऊ घालून ओटी भरून पूजा करतात.

अचळोजी, अचळोबा—पु. आळशी: मंद: मट्ट: लट्ट: ढेंदी: लडघ्या: गुळाचा गणपति. [सं. अचल]

अचक्षु—वि.ज्याला डोळे नाहींत असा:अंधळा[सं.] **०दर्शन**–न. डोळे मोडून बाकीच्या इंद्रियांनीं व मनानें होणारें ज्ञान. **०पण**–न चक्षुरहित स्थिति; अंधत्व: आंधळेपणा. 'जयाचेनि बळें। अचक्षुपण आंधळें ॥ फिटोनि वस्तु मिळे.' –अमृ ७.१२०.

अचांगणें—अक्रि. उमेद, हुशारी, वाव नाहींशी होणें: **कोमजणें**: बाळणें: अचांगी भरणें: आजारी होणें. [अ+का. चांग]

अचांगळी—वि. उणें: वाईट 'अचांगळी अधिक शब्द। ऐकून उठिला वीर गद ॥' –गुरुस्व ९. ४. [अचंगळ]

अचांगी—स्त्री. आजार: दुबळता: ऱ्हास. **०भरणें–होणें**–आजारी पडणें. 'अचांगी भरली पोर मेला.' **०नें शिवी देणें–बोलणें**–तोंडानें वाईट बोलणें, शिव्या देणें. [अ+का. चांग]

अचांचल्य—न. स्थिरपणा; निश्चितपणा: अचलता. [सं.]

अचाट—वि. फार: अतिशय; विलक्षण: अफाट; लोकोत्तर, बेसुमार; अपरिमित; अतर्क्य: चमत्कारिक: फाजील; अनिबिद्ध. 'ते दोन्ही शब्द अचाट।' –ज्ञा १.१४७; 'लाटांवरी अचाट लाटा।'–एभा २.९४; 'रत्नमुक्तमाणिक राशी। शृंगारादि अचाट।'–नव २१. १०३; (कि० बोलणें, लिहिणें, करणें) **म्ह०** १ अचाट खाणें मस णांत जाणें: २ अचाट बुद्धि खेळवावी बळेंच लक्ष्मी मेळवावी. [सं अत्यर्थ; प्रा. अच्चत्थ अच्चट–अचाट]

अचाट—वि. चावट: फाजील: लुच्चा. 'केलीं मुलें ही अवघीं अचाटें।' –सारुह १. ६७ [सं. अ+चाट=लबाड]

अचानक—क्रिवि. १ एकदम: अकल्पितपणें. 'अचानक गनीम येऊन पडला.' २ तडक: सरळ: बिनहरकत. 'त्या मार्गानें अचानक पुण्यास जाशील' ३ हळूच. अलगद. 'ही कांचेची हंडी अचानक उचलून ठेव.' ४ सहज, अनायासानें. 'हा ग्रंथ मला अचानक मिळाला.' ५ चोरून: गुपचिप 'हा कांही कांही अचानक खातोसें दिसते' ६ अस्पृष्ट: अचळ: जसेंच्या तसें: कमजास्त न होतां. याशिवाय या शब्दाचे आणखी बरेच शिथिलपणें झालेले अर्थभेद आहेत [सं. अज्ञातनत: ? हिं. अचानक, अचानचक.]

अचापल्य—न स्थिरता: दृढता. अचंचलता: सततपणा [सं.]

अचार—पु. आचार: लोणचें [हिं मु आचार]

अचाल—स्त्री. खोटी: खोळंबा: अडचण 'तुझी अचाल असल्यास दोन दिवस माझी कोयती घेऊन जा.' [अ+चाल=प्रगति]

अचाव(वा)चा, अच्यावच्या—क्रिवि. १ बोलण्यास अयोग्य; निरर्थक; असंबद्ध; अद्वातद्वा; अचकटविचकट (भाषण). २ गैरशिस्त; उद्दीपणानें (काम करणें) ३ अव्यवस्थित. कसेतरी. 'तो अचावचा खातो.' [ध्व. सं. अवाच्य+वाच्य]

अचिकित्सनीय—वि. असाध्य: उपायाबाहेर गेलेला (रोग इ०) [सं.]

अचिंत—वि चिंतारहित; काळजी नसलेला 'जें अचिंतां अनाथांचें मायपोट।' –ज्ञा ८.१९५. [सं. अ+चिंत=विचार करणें]

अचिंतित—वि. अकल्पित; ज्याचा विचार मनांतहि आला नाहीं असें; अतर्कित; अभावित. [सं.]

अचिंत्य—वि. विचाराच्या कल्पनेच्या पलीकडील: अतर्क्य. 'हेतु जया विहि। अचिन्त्य जें।' –ज्ञा ८. ८८. [सं.]

अचिद्—न चेतना नसलेलें: जड (वस्तु, जग इ०): अज्ञान 'अचिदाचेनि नावें। आलें जें चिन्मात्रदशे।' –अमृ ५. २९. [सं.]

अचिन्ह—न (गो.) दुश्चिन्ह: अशुभ गोष्ट [सं]

अचिर-अचिरात—क्रिवि. अचिरेंकरून: लवकरच: थोड्या वेळांत-दिवसांत: थोडया अवधीनें. 'सुरवरदाय कांहीं न पवे अचिरें।' –भामु १ १. [सं.]. **०काळ**–पु. थोडा अवधि वेळ. **०स्थायी**–वि. लवकर नाश पावणारें: अल्पकालीन: क्षणभंगुर: पळघुटें. न टिकणारें. **अचिरेंकरून**–क्रिवि लवकरच

अचिरकाय—स्त्री. (गो.) १ अवधान. 'म्हाका तितलीशी अ० उरली ना.' २ आठवण. 'हांवें तितली अ० धरली ना'

अचींपर्ची—स्त्री. (गो.) सागरगोटणांप्रमाणें दगड मेळून खेळावयाचा एक खेळ. हा पांचसात खडयांनीं खेळतात [सं. पंच. पर्ची द्वि.]

अचुक—अचूक पहा

अचुंगळ—वि. अचंगळ पहा

अचुंबित—वि. १ नवीन: साजूक 'विशेष भक्तिप्रेम अचुंबित।' –एभा ११ ६८१, अचुंबित कल्पना गोष्ट=अगदीं नवीन कल्पना-गोष्ट. २ अपूर्व: अद्भुत. पुढें अचुंबित निरूपण।'–एभा ३०. ४१३ ३ अचूक 'जो परिणामींचा निर्वाळा। अचुंबितु ये फळा।' –ज्ञा ५. ७ ४ स्पर्श न झालेलें: अस्पृष्ट. 'जैसें वज्रकवच लेइजे। मग शस्त्राचा वर्षावो साहिजे। परी जैनेंसीं डरिजे। अचुंबिता।' –ज्ञा २. २३२ ५ निर्भेळ निर्लेप 'तें ज्ञान पात्रे निश्चित। जयामाजि अचुंबित। शांति असे॥' –ज्ञा ४ १८९. ६ निर्मळ 'तेणें श्रीकृष्णें स्तविली भक्ती। परम प्रीती अचुंबित॥' –एभा २९. ६४९. ७ सर्व. अगणित. 'तुझ्या विभूती अचुंबिता। कृपनें.. सांग॥'–एभा १६. २३४. ८ अनासक्त: निसंग 'परी अचुंबित वर्तणें। अघटमान कर्म करणें॥' –एभा ३. २९३ [सं. अ+चुंबित=न चुंबिलेली; न भोगिलेली]

अचुंबित—क्रिवि (को) अकस्मात. अचंबीत [अचंबा]

अचूक—वि. नेमकें, बिनचूक: दोषरहित. निर्दोष. 'अचुक येत्न करवेना. म्हणून कलें तें मंजेना।'–ज्ञा १२. २६. [सं अच्युत: प्रा. अचुक] **०संधान**–न. १ न चुकणारा नेम, क्रिया. गोष्ट. 'अचुक मारुतीचें संधान। सोडिता झाला असंख्य बाण॥' २ बरोबर घडणारा बेत: न चुकणारी सल्ला. मसलत **अचुकसंधानी**–वि. बिनचूक कार्य करणारा.

अचेत—वि अचेतन: जड: चैतन्यरहित 'अचेत लोहचुंबकें चळे।' –एभा २. ७०२ [सं अचेतस्]

अचेतन—वि १ निर्जीव: प्राणरहित. मृत. जड '...खांबसूत्री। अचेतन पुतळया नाचवी यंत्रीं।' –एरुस्व १३ ६४. २ बेशुद्ध: मूर्च्छित. [सं.]. **०भार**–(स्था.) निर्जीव वजन (डेड लोड. पुलावरचें वगैरे).

अचेष्ट—न. (पदा.) वातावरणांतील वायुघटकांपैकीं एक मूल द्रव्य: "अर्गान" –झाको अ ६१. [सं]

अचैतन्य—न. बेशुद्धि: निर्बुद्धि: मूर्च्छा: निरुत्साहीपणा [सं.]

अचोज—न. आश्चर्य: नवल 'अचोज हा बळिया झाला।' –निगा १६. [सं. अ+चोद्य: प्रा. चोज्ज: म. चोज]

अचोष्य—वि. चोखण्यास अयोग्य-अशक्य; अप्राशनीय. [सं.]

अच्चकलेंविच्चकलें—क्रिवि. १ अचकटविचकट; अव्यवस्थित; वाह्यात. 'किती येक तीं अच्चकलेविच्चकलेसी।'—दावि २८४. २ अचकुल पहा. [विचकणें–विचकल द्वि किंवा अचकल द्वि.]

अच्चकित—क्रिवि. (गो) अकस्मात; अकल्पितपणें. 'म्हाका तॉ अच्चकित वाटर मेळळॉ' [अवचित?]

अच्चावच्चा—अचावचा पहा.

अच्छ—वि. १ विमल, स्वच्छ 'बहुधां समर्थिला बहु जन्म श्री राम अच्छविभवानें।'—मोभीष्म ३.६४ [सं]. २ श्रेष्ठ, उत्कृष्ट; उत्तम. —उक्रा. ठीक! बरोबर! बरें! [हिं अच्छा]

अच्छा—क्रिवि. (चि) अलीकडे; हल्लीं; आतांशां. [आतांशां अप]

अच्छा—वि. १ छान; सुंदर, चांगलें. —उक्रा. उत्तम, बरें! ठीक! होय. [सं. अच्छ; हि]

अच्छिद्र—वि १ भोंकाशिवाय, व्यंगरहित २ पूर्ण [सं]

अच्छिन्न—वि अखंड; सबंध, न कापलेलें विभागलेलें [सं]

अच्छेखां, अच्छेखान—वि (व ना) तिस्मारखान, टेकोजी (प्रमाणें), वरिष्ठ, मोठा 'तूं नाही मोठा अच्छेखां आला त (तर) मी डरत नाहीं.' [हि अच्छा]

अच्छेर—पु. अर्धाशेर (वजनी मापी) [सं अर्ध+शेर; का अच=अर्धा]. ०**पावशेर**—पु. अव (कु) कच्चींबच्चीं.

अच्छेव—पु. (गो.) उच्छाद; धांगडधिंगा, हैदोस; धुडगूस. 'ह्या मुरग्यांचे सामकों अच्छेव आयला!' [सं उच्छेद]

अच्युत—पु १ परमेश्वर (विष्णु). —वि. न पडणारा न ढळणारा; स्थिर, अचल नाशरहित जसे अच्युतपदवी अच्युताधिकार. 'अचळु मी अच्युतु।'—ज्ञा १८.११९४ [सं] ०**फळ**—न आंबा (फळ). [सं च्युतफल]

अछंदस्क—वि कवितावद्ध नसलेला (गद्य) [स]

अछांडा—पु. (गु) कामगा. (बैलाचा) दोर काढणीं; चाबूक [प्रा. अच्छोडिअ –अछोड, म. अमोड]

अज—वि. अजात; नित्य; जन्मरहित 'मी अजुही परि-संभवें। प्रकृतियोगें।'—ज्ञा ८.४४. —पु १ ब्रह्मदेव, शिव; विष्णु; चंद्र; कामदेव; सामान्यतः ईश्वर. २ श्रीरामाचा आजा. ३ बोकड; बकरा. [सं अ+जन=जन्मणे]

अज—अव. १ पासून, मुळें, कडून. २ अनेक सदरें वेगळालीं व्हावीं आणि बेरजांचा ताळा पडावा म्हणून सदरवार बेरजांच्या एकेदर बेरजांची जी पंक्ति मांडतात ती. [फा. अज़]

अज—आज पहा.

अजकदीम—क्रिवि. पूर्वीपासून 'अजकदीम इनायत अमें' —बाडमा १.६५. [फा. अज़+अर. कदीम=प्राचीन, जुना.]

अजका—वि. अजिंक्य (!) —शर. [सं. अजय]

अजंगम—वि. स्थावर; न हलणारें (घर, झाड इ०). 'अजंगमाची खाल काढविली।'—ज्ञा १३.२२७. [सं.]

अजगय—क्रिवि. (गो.) हळूच; नकळत. [सं. अ+जगृ]

अजगर—पु. एक प्रचंड साप; (कों) आर. हा **बकरीलाहि** गिळतो म्हणतात म्हणून अज+गर (गिळ) हें नांव. हा हिंदुस्थान, आफ्रिकेंतील दलदलीचे प्रदेश व अमेरिकेंतील उष्ण प्रदेशांत आढळतो. हा फार सुस्त व हालचालीस मंद असतो. **विशेषतः अमेरिकेंत** १०० फूट लांबीचाहि आढळतो. [सं.]. —वि. १ (ल.) **सुख दुःखातीत** (योगी); कर्मासंबंधीं कांहीं प्रयत्न न करणारा; **केवळ ईश्वराचर भरवंसा ठेवणारा.** २ आळशी; मंद; जड. उ० **अजगरस्वभाव–प्रकृति**-चाल-संप्रदाय; अजगरासारखा पडणें-पसरणें-निजणें-चालणें-**पोसणें.** ०**वृत्ति**—स्त्री. आपोआप येऊन पडलेली भिक्षा (खाण्याची) **वृत्ति**; आळशीपणाची वृत्ति; आळशीपणा; अगांतुकी करण्याचा **स्वभाव**; ऐदीपणा.

अजगूळ—वि. (कों.) १ **अधू नेत्राचा. २ अचकुल पहा.** [अचकुल]

अजगैं—क्रिवि. (गो.) **वाजवीपेक्षां अधिक.** 'तुजेकडेन **अजगैं** आसल्यार दी म्हाका.'

अजज—पु. घोड्याच्या पायाचा (खुराचा) रोग. —**अश्व २७१.**

अजंट—वि. (ना.) अडल; अस्सल; लफंगा; **लबाड.** [हिं. अजंट=पूर्णपणें तयार].

अजड—वि. १ चैतन्ययुक्त; जडत्वा उलट. 'तो **जडाजडातें** विरविनु।'—ज्ञा ८.९७. २ मंद, मूर्ख नव्हे तो. [सं.]

अजडांश—पु. जडपणा नसणारा, पदार्थ, गोष्ट इ०; **अमूर्त**, निराकार वस्तु (ब्रह्म, आत्मा इ० संबंधीं योजतात). [सं.]

अजनरफ–अजतर्फ—अव. पासून; कडून, बाजूनें. (**जुन्या** पत्रव्यवहारांत वरिष्ठांकडून खालील अधिकाऱ्यांस योजितात)–**पया** ४००. [फा. अज़+तरफ़]

अजन्म–न्मा—वि. १ न जन्मलेला; ज्यास जन्म नाहीं **असा.** (ल०) ब्रह्म; ईश्वर. 'अजन्मा होता निजेला।'—दा. २ **शाश्वत**; निरंतरचा [सं.]

अजप—अजब पहा.

अजपत्र—न. अभिप्रायपत्र. (!)—शर.

अजपा (जप)—पु. १ एका अहोरात्रांत माणसाचे **२१६००** श्वासोच्छ्वास होतात. त्यांवर 'सोहं' हें बसवून जो **सहज, आयास**-विरहित जप करावयाचा तो. श्वासाबरोबर 'सः' व उच्छ्वासाबरोबर 'अहं' (तें ब्रह्म मी आहें) म्हणावयाचें; याला **हंसमंत्र असेंहि** म्हणतात. 'येकवीस सहस्र स्वासें जपा। नेमून गेली ते **अजपा**।'—ज्ञा १७.५.१. (सामान्यतः) श्वासोच्छ्वास. 'पवन विंजितसे **अजि**

पाळवें । मृदु असूं गतिनें अजपा लवे।' –मंगधा–मक १६२.[सं.] **•गायत्री** स्त्री., **•मंत्र**–पु. वरील जपालाच म्हणतात.

अजपूजाश्रीसरस्वती—स्त्री.श्रीसरस्वतीच्या पूजामंत्रांसहितचा: (विजापूरचा दुसरा इब्राहीम आदिलशहा हा हिंदुधर्माला मान देणारा असून त्याला हिंदी गायनाची फार आवड होती व त्यासाठीं त्यानें राजधानींत सरस्वतीची मूर्ति स्थापिली होती. त्या सरस्वतीच्या मंदिरांत त्यानें राज्यकारभाराची कचेरी करून तेथून तो सर्व बादशाही फर्मानें काढी. म्हणून असल्या फर्मानांच्या डोक्यावर किंवा समाप्तींत 'अजपूजा श्रीसरस्वती' हीं अक्षरें लिहिलीं जात.) –भाद्रि-संवृ ५.१; ६८.

अजब—वि. आश्चर्यकारक; विलक्षण; चमत्कारिक. उ.–अजब ख्याल; अजब तऱ्हा इ०. 'कल्पनाशक्तीनें कांहीं तरी दरवर्षी अजब चिजा काढल्याशिवाय आमच्या पाश्चात्यांनां चैन पडत नाहीं.'–नि ४१६. [अर. अजब]. **•खाना**–पु. पदार्थसंग्रहालय: म्युझियम: चमत्कारसंग्रह.

अजबाई—स्त्री नवल: आश्चर्य: चमत्कार: अलौकिकपणा [अर. अजब; हिं. अजाइब]

अजबाब, अज्जाब—पु. स्त्री. १ मालमत्ता: जमीनजुमला: सामानसुमान; चीजवस्त; बरोबरचा सरंजाम –शिदि २४७. 'जुन्या कमिटीकडून अजबाब सोंपून घेण्याचें काम सुरू होऊन तें सन १८८६ सालीं पुरें झालें.' –जनि ३. २ युद्धसाहित्य: युद्धसामुग्री. **असबाब पहा.**

अजबायेस—शअ. कारणानें. 'अजबायेस बिमारी'=आजारा-मुळें. –पदमव ११४. [फा. अझ्+अर. बाईस=कारण]

अजबुनात–द–दी—वि. प्राचीन. 'बाळाई तक्त दिल्ली अज बुनांत जागा।' –पला ९.. [फा. अझ्+बुनयाद=स्थापना, प्रारंभ]

अजम—वि. १ श्रेष्ठ; थोर; सन्मान्य: राजश्री; पदवी (विशेषतः मुसलमान आणि ब्रिटिश लोक यांनां). 'अज्जम चापलेनसाहेब यांणीं' –मुंब २३६. मुसलमानी आणि पेशवाईंतील पत्रव्यवहारांत कनिष्ठांकडून वरिष्ठांस हा शब्द लाविला जात असे. 'अजम अफझलखान महमदशाही.' परंतु इंग्रजी अमदानींत हा कनिष्ठांस लावतात 'अजम पाटील कुळकर्णी.' [अर. अझम्. तु० –सं. अयैमन्=सूर्य, श्रेष्ठ; प्रा. अज्जम–अजम ?]. –पु. १ सामर्थ्य; जोर: अभिमान. २ निश्चय; विचार. 'ऐशा समयास नबाब मौसुफ यांनीं अजम केल्यास पातशाही दाब व बहुत कामें घडून येतील.' –दिमरा १.४९

अजमत—स्त्री. थोरवी; श्रेष्ठता; प्रभाव: मोठेपणा; ग्राबल्य; करामत. 'कांहीं एक अजमत दाव मला।' –अझाअ १० **म्हण** जेथें अजमत तेथें करामत.[अर. अझ्मात्]. **•खान–पीर**–पु जेजुरीची देवता; एकदां औरंगजेबानें जेजुरीचा खंडोबा फोडण्याचा प्रयत्न केला त्यावेळीं असंख्य भुंगे त्याच्या पाठीस लागले. तेव्हां त्यानें एक रत्नजडित भुंगा करून खंडोबास वाहिला. तो भुंगा पुढें उमाजी नाईकानें नेला. अशी अख्यायिका आहे

अजमाव–वा—पु १ प्रयोग. परीक्षा. कसोटी २ अजमास: अंदाज: हिशेब. गणती [फा अझ्माइश]. **–णें** सक्रि १ प्रयत्न करणें; परीक्षा करणें 'शमनापीरें यमर्थ अजमाविले।' –सप्र ८.३ ७३ २ अजमास पाहणें. हिशेब करणें. अंदाज करणें.

अजमास, अजमास—पु.(गो.)? अजमाव पहा. 'अजमास घे आणि मागें पुढें सर' २ सालाची जमाखर्चाची ठराविक रकम. बजेट: जमाखर्च अंदाजपत्रकाचा तक्ता. मामलेदारानें आपल्या ताब्यांत जो प्रांत आहे त्याचा वसूल कोणत्या रीतीनें करावा व दर एक गांवची कमाल बेरीज किती व प्रांतांपैकीं दुसाले गांव किती व नक्त खर्च किती याविशीं बंधारण करून जो कागद दरसाल हुजूर तयार होऊन मामलेदाराकडे पाठवीत त्यास अजमास म्हणतात– इनाम. ५.०. –चित्रगुप्त ८८. –खेर २८१६ –पया ९१. [फा अझ्माइश, गु. आजमायश]. **–णें**–क्रि. अंदाज करणें. कल्पना बांधणें. **अजमासानें खोगीर खाणें**–(क) अनुमानानें विधान करणें. **अजमास पंचे दाहोदशें** =अंदाजी विधान.

अजमासी—वि १ अंदाजी. हिशेब करून काढलेला: गणती केलेला २ (गो.) अंदाज करण्यांत हुशार, पटाईत. 'अजमासी खरो केनाच चुकचोना' =बरोबर सांगेल कधीं चुकणार नाहीं. **अजमासें**–क्रिवि. मगासरी [फा अझ्माइश]

अजमेरीजोडा—पु विशिष्ट मारवाडी जोडा. साधी घडण –घाट असलेला जोडा [अजमीर].

अजमोदल—न ओव्याचें तेल: थायमॉल. हे गजकर्ण, **इसब** वगैरेवर लावतात. [अजमोदा]

अजमोदा—पु. १ (या नांवाच्या तीन वेगळ्या वनस्पती आहेत. सामान्यत.) ओवा. ओव्याचें झाड अगर त्याचा एक प्रकार. यास पांढऱ्या रंगाची फुलें येतात. पोटदुर्खी, गजकर्ण, अतिसार, अजीर्ण वगैरेवर औषध म्हणून उपयोग. –वगु. १ ८. [सं. अजमोदा; हि. गु. अजमोद; ऊ. अज्मूद–अज्मोदा: का. अजमोदा: ते. आजमौदा]

अजय्य—वि. अजिंक्य [सं]

अजर—वि. शाश्वत. वृद्धपणा येत नाहीं असा. अविनाशी: क्षय न पावणारा: ज्यास जरा प्राप्त होत नाहीं असा –देव. [सं.]

अजररुस्तखाने—क्रिवि. यांच्याकडून यांच्या कचेरींतून. [फा. अझ्=पासून+रुस्तखाना=कचेरी+ई]

अजरामर—वि. अविनाशी: जरा व मृत्यु यांपासून अलिप्त: अक्षय [सं. अजर+अमर]

अजरामरा (म्हा) मत—अझामत=हामत पहा.

अजरुये—अजूय पहा.

अजवला—पु. काळी तुळस; वैजयंती.

अजवल्ल—(बायकी) अजल्ल पहा

अजवान—अजमोदा पहा. [हि.अजवाइन]

अजशृंगी—स्त्री. मेंढशिंगी; मेषशृंगी; काकडशिंगी. याद्रि भागांतही वनस्पति आढळते. रस दुधासारखा; कफ वाहेर काढणारी. [सं.]

अजसबब—शअ. कारणानें. 'अजसबब दुर्गगह' =रस्त्याच्या लांबीमुळें. –पदमब ११२. [फा. अज्+सबब्]

अजस्र (स्रु), अजास्र—वि (ल.) मोठा; विस्तृत; प्रचंड; जंगी; धिप्पाड; राक्षसी. –पु. अग्निहोत्राचा एक प्रकार (यांत तिन्ही कुंडांतले अग्नि कायम ठेवतात–अजस्रपक्ष) [सं अजस्र= सतत; कायम टिकणारा; शाश्वत]

अजस्रलय—स्त्री. नृत्यांतील मोठी लयदारी [सं]

अजहत्—पु. प्रतिनिधि; गुमास्ता. [अर. वजाहत=रूप; आदर]. **०दार**–पु. बदली कामगार. [फा]. **०सरदेशमुख**–सरदेशमुखाचा प्रतिनिधि (मराठी राज्याचे व मुसलमानी राज्याचेहि सरदेशमुख छत्रपति होते. त्यांनी आपल्यासाठी नेमलेला प्रतिनिधि.)

अजहत्स्वार्थलक्षणा, अजहल्लक्षणा—स्त्री पदाचा जो शक्य अर्थ त्याचा त्याग न करतां त्याहून कांहीं अधिक विशेषार्थ घेतलेला असतो ती लक्षणा; उ० 'पानपतावर एक लाख बांगडी फुटली '=एक लाख माणसें मेलीः 'एक कप आण' =एक कपभर चहा आण: ' कावळ्यांपासून दहीं रक्षण कर '=कावळे, मांजर वगैरे पासून; ' दोनशे भाले आले. ' इ०. [सं.]

अजा—स्त्री. १ शेळी; बकरी. २ माया· मोह; भास 'अजाची ते अजामाया। ' –एभा ७.५८६. [सं] **०कृपाणीयन्याय**–पु. शेळी जावयास व तिच्यावर तरवार पडण्यास एकच गांठ पडणें. यावरून डोक्यावर तरवार टांगली असतां अथवा अगतिक अवस्था असेल तेव्हां योजितात. ' वर्तमानपत्र–कर्त्याच्या डोक्यावर प्रेस–ॲक्टाची तरवार अजा–कृपाणीयन्यायानें टांगली आहे. ' **०ग (ल) ळ**–वि. १ बावळा; कर्तृत्वहीन; मूर्ख. [सं अजागल] २ निराधार; निरर्थक **०गळस्तन**–न. (शेळीच्या गळ्याजवळचा मांसल अवयव: याचा उपयोग नसतो म्हणून लक्षणेनें) कर्तृत्वहीन, कुचकामाचा पुरुष, बैल, इ०. ' धर्मार्थ-काममोक्षाणां यस्यैकोपि न विद्यते । अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम ॥ ' –सुभाषित. **०पुत्र**–पु. १ कोंकरूं २ (ल) गरीब माणूस. '**अजापुत्रं बलिं दद्यात**=यज्ञांत बोकडासच बळी देतात; तद्वतच गरीब निराश्रित माणसास लोक छळतात. [सं.] **०पालक**–पु. १ धनगर २ मल्हारराव होळकर व त्याचे वंशज यांना जुन्या कागदपत्रांतून लक्षणेनें हा शब्द लाविताः. [सं.] **०युद्ध**–न. बकरीं फार वेळ भांडत नाहींत नुसता आव आणतात; त्यावरून लक्षणेनें पोकळ धमकी –भांडण. [सं]

अजा—पु. आईचा–बापाचा–बापः आजा. ' अज्यास नातु शिकवतो. ' [सं. आर्यः प्रा अज्ज]. **०गुरु**–पु. गुरूचा गुरु; शिक्षकाचा शिक्षक

अजाइब, अजायब—पु. आश्चर्यः अजब पहा. ' तुम्ही ऐसा गोष्टी करितां अज्याइब आहे. ' –ग १.५२. [अर. अजाइब्]

अजागळी—स्त्री. मनमर्जी खोडचाः दांडगाई धिंगाणाः अरवाळी. [सं. अजागल ? प्रा अजुअ=अयुत+आगळी ?]

अजाण—वि. १ अडाणी नेणताः माहिती नसलेला· अनभ्यस्त. २ उपकाराची जाणीव नसलेला; कृतघ्नः हराम. ३ विचार नसणाराः मूर्खः बुद्धिहीन. [सं. अज्ञानः प्रा. अजाण]. **०ता**–वि. गाधाभोळाः बावळाः मूर्ख **०पणा**–पु. अज्ञानः नेणतेपणा.

अजात—वि. १ उत्पन्न न झालेलाः जन्म न पावलेला. कांहीं सामा. शब्दः–अजातदंत–पर्ण–पुत्र–यौवन [सं अ+जात]. **०पक्ष**–वि. पंख न फुटलेला. ' जैशी अजातपक्षांचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ ' –ज्ञा ९.३३९. [सं. अजात+पक्ष]. **०भय**–वि. कधींहि भीति शिवली नाही असा–माणूस. कांही सामा. शब्दः– अजातकाम–क्रोध–लोभ–मोह–मद–मत्सर इ०. **०व्यवहार**–पु. वयांत न आलेला मुलगाः अज्ञान. [सं.]. **०शत्रु**–वि. १ ज्याला कोणी शत्रु नाहीं असाः शत्रुरहितः सात्त्विक २ गरीब; निरपराधी. ३ पु. युधिष्ठिर. ' यजमानहि गुरुदेव द्विजभक्त अजातशत्रु तजाया. ' –मोसभा २.२१ [सं.] **०सिद्ध**–वि स्वयंसिद्धः स्वयंभु.

अजात—वि. १ अज्ञात जन्माचा किंवा ज्याच्या जन्माचा ठिकाण लागत नाहीं असाः अकुलीन. वाईट लौकिकाचा. २ (व.) मोठा लुच्चा. ' अजात दिसतं स्वारी ! ' [सं. अज्ञात]

अजात—वि. मुक्तः स्वतंत्र. ' तुम्हांस माथां तेल घालोन अजात केलें असे. ' –वाशाछ २१३ –क्रिवि. अलादः अलगतः कोठें किंवा कशाला न लागतां. [फा. आझाद]. **०पत्र**–न मुक्तिपत्रः मोकळें केल्याचा दाखला

अजातप्रकार–न. जेथें जातिभेद पाळीत नाहींत असा आचार, वागणूक, पद्धति. (तुळजापूर, व्यंकटगिरि वगैरे ठिकाणीं असतो तसा). [सं. अ+जाति+प्रकार]

अजाति—वि. १ जातिरहितः कुलहीन. ' हा तों दिसे कृष्ण स्वयें अजाति। ' –नदा २.५७. २ वर्गातीतः कोणत्याहि वर्गांत घालतां येत नाही असा. ' तें कीर अनाम अजाती । परी अविद्यावर्गाचिये राती– । माजीं वोळखावया श्रुती । खूण केली ते । ' –ज्ञा १७.३२९. [सं. अ+जाति]

अजाबुजा—वि. माझातुझा; मी तूं पणाचाः आपपर. **०कार**–भार–प्रकार–भाव–विचार–संबंध इ०. [दुजा द्वि.]

अजान—स्त्री. नमाजाच्या वेळचें बोलावणें: प्रार्थनेच्या वेळीं निमंत्रणादाखल होणारा पुकारा. [अर. अज्ञान]

अजानबाहु—वि अाजानुबाहु पहा

अजानवृक्ष—पु आळंदीस ज्ञानोबाच्या देवळांत ज्ञानेश्वरानें लाविलेल्या फांदीपासून वाढलेला वृक्ष: पृथ्वीवर हा अद्वितीय समजतात. 'वृक्ष अजाना देखुनि वंदी जरि भावें।' –निमा १.९४. [सं अज्ञात(ल.) =प्राचीन+वृक्ष ?]

अजाप—(गो.) अजब पहा. 'मा कां अजाप दिसलें '

अजाबा—पु (कुण) वृद्ध माणूस. आजोबा.

अजाबाद—क्रिवि. अचानक. [अजीबाद अप.]

अजाम्ल—न. कॅप्रिक ॲसिड. हे अम्ल लोणी, खोबरेल वगैरेपासून काढतात –मॉ २ [लं. कॅप्रि=अजा, बकरी]

अजायब—अजब पहा

अजार—पु. रोग. विघाड: उपद्रव: पीडा: दुखणें: व्यथा. 'आजार पहा त्याणी त्यतेस काडीचा आजार द्यावया गरज नाहीं.' –रा ८ २४. [फा आझार]. **–री**–वि दुखणाईत: व्याधिग्रस्त: रोगी अजार असणारा

अजारस—अजस्र पहा

अजाहत— १ बदली किंवा नायब: गांव-कामगार, प्रतिनिधि पाटील, कुळकर्णी, बतनी, गुमास्ता वगैरेस लावतात २ (ल.) अबाधित: अव्याहत. 'माझी वृत्ति तीन पिढ्या अजाहत चालत आली.' [अर. वजाहत्=सन्मान: दर्जा. नायब किंवा प्रतिनिधि याला सन्मानानें हा हुद्दा लाविताता]

अजाक्षीर—न. बकऱ्याचें दूध. 'क्षीरसिंधूसी समर्पिलें अजाक्षीर।' [सं.]

अजि—उद्गा. अहो' (पुरुषांनां किंवा स्त्रियांनां लावतात). 'संबोधन प्रसंगीं, यामि म्हणेलचि संभेत अजि तरणी।' –मोभीष्म ३.२९; 'धृतराष्ट्रासि म्हणे मी संजय व्हा सावधान अजि राया॥' –मोकर्ण १.५. [सं अयि: हि अजि–जी]

अजि—क्रिवि आज. 'वधिले पांचाळ वृषे वीरनिधन मज न सांगवें अजि तें॥' –मोकर्ण ३५.३८ 'आणुनि धर्मासि दिलें यश आम्हांलाहि गावया अजि तें।' –मोसभा १.११५. [सं. अद्य: प्रा. अज्ज; म. आज]

अजिंक—वि न जिकतां येणारा अजिंक्य: अजय्य 'तूं तव अजिंक गा धडफुडा।' –एरुस्व ४ ३६ [सं. अ+जी=जिकणें]

अजिंक्य—अजिंक पहा. **०पत्र**–न. अजितपत्र पहा

अजिजी—स्त्री. दीनता: लीनता: गयावया: आजिव: हांजीहांजी. 'किती अजिजीनें हातांपायां पडून त्यांनीं माघ्याकडून तसें वचन घेतलें.' –भा १७४. **०करणें**–आजीव करणें [अर. आजिझी, आजिझ्=कमकुवत: असमर्थ: फा. तुल० सं. अयि+अयि: म. अजी+अजी किंवा जी जी]

अजिटन, अजिटंट—पु एक लष्करी अधिकारी: वरिष्ठ अधिकारी किंवा सेनापति सांगेल ते हुकूम काढणें व त्वरा करणें हें त्याचें काम [इं ॲडज्यूटंट]

अजित—वि. ज्याचा कोणी कधी पराभव केला नाहीं असा (ईश्वर). 'अजित नाम वरीं भलत्या मिषें। सकल पातक भस्म करीतसें।' –वामन. [सं.]. **०जाणें**–एकाथाला हार जाणें: एकाथाचें वर्चस्व कबूल करणें: –चुकीचा प्रयोग. जित ण्वजीं अजित. 'मी कशाला कोणाला अजित जाऊं.' 'मी काय तुला अजित जाणार कीं काय!' **०होणें**–(ना.) मेटाकुटीस येणें: रडकुंडीस येणें: नुकसान येणें: **०पत्र**–न १ पूर्वी पंडित वादविवाद करीत इतर पंडितांस वादांत जिंकण्याकरितां फिरत असत त्यावेळीं विशिष्ट व्यक्ति अजिंक्य ठरली असें लिहून दिलेलें पत्र: त्यावरून पुढें उलट अर्थे आला: **जितपत्र**: वादांत किंवा खेळांत पराभूत झाल्यानें तशी कबुली देणें २ खटल्यांत हरलेल्या पक्षानें ज्यावर आपला पराभव लिहून दिला तें पत्र. 'त्या गावच्या ब्राह्मणांनीं त्या विद्वानास अ० दिलें' 'गमभट काशीस जाऊन अ० घेऊन आला ' (याप्रमाणें हा शब्द द्वयर्थी वापरतात).

अजितेंद्रिय—वि. ज्यानें आपलीं इंद्रियें, **मनोधर्म** किंवा विकार हीं जिंकिलीं नाहींत अमा: अविरक्त: अवैराग्यशील. [सं.]

अजिदिलृयखलास्—अ शुद्ध प्रेम करणाऱ्याकडून कनिष्ठाकडून वरिष्ठाला जाणाऱ्या पत्रांतील मायना [फा. अजि+दिल्+अर. इख्लास्=स्नेह]

अजिन—न. बसण्यासाठीं किंवा पांघरण्यासाठीं (विशेषत: हरणाचें) कातडें: मृगचर्म: कृष्णाजिन. [सं.]

अजिन्नाफुस्की—स्त्री (गो) भित्री भागूबाई: (ल) भ्याड: नामर्द 'नाऱ्यान कितें जाता? ती पैली मामकी अजिन्नाफुस्की' ' [सं अजीर्ण प्रा अजिण्ण+ध्व. फुस् ?]

अजिर—न. अंगण: चौक: खुली जागा. 'होय अमृत स्रोत: शत वाहे समराजिरी खळखळांतें।' –मोद्रोण २.२३ [सं]

अजिसौब—अजींसोब: याकडून: यापासून: यामार्गानें: (वरिष्ठाकडून जाणाऱ्या पत्रांतील मायना). 'अजसौब जन्नल' –भऐपायाव ४५. [अर. सौब=मार्ग बाजू, तर्फे]

अजी—उद्गा अहो' अजि पहा.

अजी—स्त्री. आईची–बापाची आई: सामान्यत: वृद्ध. पंक्त बाई असाहि अर्थ होतो. **म्हण** खायला अजी करावयाला शेजी =खाण्याच्या वेळीं अजीचें नातें लावावयाचें, पण कामाच्या वेळीं शेजारीण म्हणून दूर गाढवावयाचें. [सं आर्यिका: प्रा अज्जिआ–अज्जी].

अजीअजी करणें—खुषमस्करी करणें: आजीव करणें. अजिजी पहा. [अजी+अजी किंवा फा. अजिजी]

अजीं—अ यापासून; यापुढें. 'अजीपासून फुसर न कीजे' –रा १५.२४८ क्रिवि. पूर्णपणें अगदीं; मुळींच. 'शिर्मा मोडकी अजी मोडकी' –अमृतवाल ८ [फा. अज=पासून+ईन] **०नसणें**–मुळींच नसणें अगदीं नसणें; पूर्णपणें अभाव; (अजांत= एकूण वरेजंत, नसणें). अजीं इवी नाहीं, तपकीर कोणीकडे पहावी' **अजीं मार्फा**–स्त्री सबंध सारा माफ असणारी जमीन. **अजीं वास्ते**–याकरितां' म्हणून. –इम ६६ [फा. अझी+वासिता] **अजीं सबब. अजसबब**–याकरितां; म्हणून 'अजसबब दूरीहाह.' =रस्त्याच्या लांबीमुळें –पदमव ११२. **अजींसोंब**–अजिसोंब पहा. यामार्गे याकरितां –काप्रइसा २२ [अर. सौब्=मार्ग]

अजीज—वि. १ प्रिय; लाडका; प्यार. २ बहुमूल्य; महाग; दुर्मिळ; उत्कृष्ट –पु आप्त. [अर अझीझ=सन्मान्य, प्रिय]

अजीज–वि. १ दीन; लीन. 'सरदार यांणी जाऊन इंग्रेजांस अजीज केलें' –रा १९ १०५. २ मोताद; महाग. 'अन्नास अजीज जाहलो' –इत ५ १०३. [अ. आजिज=दीन; दुबेल]

अजीजी—अजिजी पहा

अजीबाई—स्त्री (आद) आजी; वृद्ध बाई (अजीसारखी); भजी पहा.

अजीबात (व), अर्जीबात (द)—क्रिवि. १ बिलकुल; अगदीं;सर्वस्वीं; निखालस; समूळ; मुळींच. २ यापुढें; यानंतर 'अजीबात चेनापट्टणकडे जाण्यास दिवसगत न लागावी' –रा १०. १६७ **अजींबात करणें, अजीं वजा करणें**–मुळींच काढून टाकणें; तपशील काढून हिशेबांत घेण्यापूर्वी अजांतून बाहेर काढणें. फा. अझीबाद]

अजीं याय(ये)स—क्रिवि कारणानें; म्हणून. अजबायेस पहा. 'अजी बायेस अजे एसी जे' –पदमव ११२. [फ. अझीं आइस्]

अजीर्ण—न १ अपचन विकार –वि न फाटलेलें; जुनें सलेलें; खराब न झालेलें. २ न पचलेलें; न जिरलेलें [सं.] **०ता**–स्त्री. अजीर्णाचा विकार; अपचन.

अजीर्णाशा—पु. १ अवघट पचन २ न पचलेलें अन्न [सं]

अजीर्णी—स्त्री अपचनावर देण्यांत येणारा काढा [सं]

अजीव—वि जीवरहित; निर्जीव; (सजीवच्या उलट); (इं.) ॲझो. 'अजीव सृष्टि'. [सं तुल० ग्री. इ. ॲझो]

अजीहूनां—क्रिवि. आजपासून 'तुज एसे श्रमें अजीहूनी प्रतारणी।' –सप्र २.३१. [सं. अद्य, म. अजि+हून; हि. अजहू.]

अजु—क्रिवि. अजून; अद्यापि. 'अजु तें कृत्य न साधलें।' –दार्वि १८०; 'दोणपा वदे तो अजु देवाला।' –दार्वि ३७७ [अजून पहा. गु. हजु]

अजुक—क्रिवि. (व) उजुक; आणखी; पुन्हा एकदां; अजून पहा.

अजुनि—क्रिवि. अद्यापः आतांपावेतों; अजूनपर्यंत; अजून पहा.

अजुरदर्गी, अजुर्दगी, आजुर्दगी—स्त्री. खिन्नता; नाराजी; रुसणें; रुसवा 'या दिवसांत कोणाची अजुर्दगी नसावी'. –रा १०.६८. [फा. आझर्दगी]

अजु (जू) रदा, अजुर्दा, आजुर्दा—वि.१ निष्काळजी; निरुत्साही; आस्थाहीन; अनुत्सुक; त्रासलेला; खिन्न; उदासीन. २ दुःखी; कष्टी; श्रमी. 'लष्करी एकही नाहीं अजुरदा।' –ऐपो. ३५१ [फा. आझुर्दा=दुःखी]

अजु(जू)र्दार, अजुर्दार—पु. अमुक मुदतींत पत्र पोहोंचविण्यास भाड्यानें ठेवलेला माणूस; नोकर; मजूर; जासूद. 'आमचे जासूद काशीद न पावले तर तुम्ही अजुर्दार करून पत्रें पाठविणें'. –रा ३ १६३; –खरे ३०९.२; 'आपली मुलगी व उमेदवार अजुरदार या दोघांनीं मिळून चोरी केली असें त्याचे मनांत पक्कें भरलें.' –घाको ६६. [अर. अजूरा=मजुरी फा.]

अजु (जू) रदारी, अजु (जू) रा—स्त्री १ मजुरी; वेतन 'कासीद पाठवावा त्यासी अजुरा पोचत नाहीं'. –रा ८.२१२. [अर. अजूरा=मजुरी] २ (बा.) त्रास; मेहनत; अजोरा पहा.

अजु (जू) र्देपणा—अजुर्दगी पहा.

अजु(जू)र्या—अजुरदार पहा.

अजूरा—वि. (कों.) उद्धट; अनादर करणारा; बेगुमान; भाड दांड. [सं. अ+युज्–जूरा]

अजून–न, अजूनि–नीं, अजुनियां—क्रिवि. अद्यापि; आजपावेतों; आतांपर्यंत. [सं. अद्यतन किंवा अद्य+पुनः; प्रा. अज्ज+ उण; हि. अजहूं तुल० फा. हनूझ]. **०तरी**–क्रिवि. आतां तरी; निदान यापुढें.

अजूळ—न. अ(आ)जोळ; आईच्या बापाचें घर. [सं. आर्या-लय–आर्येकुल; प्रा. अज्जउळ]

अजेक—स्त्री ममता (१) –मनको.

अजेगुरु—अजागुरु पहा.

अजेचीर–वाण—न. नवऱ्या मुलीच्या आजीला वरपक्षाकडून लग्नामध्यें दिलेलें मानाचें लुगडें किंवा अहेर. [सं. अजी+चीर=वस्त्र किंवा वाण]

अजेय—वि अजय्य; अजिंक्य. [सं.]

अजेसासरा–सासू—सासऱ्या–सासूचा बाप किंवा आई. आजेसासरा–सासू पहा.

अजोगी—वि. (कों.) अळटाळ किंवा चेंगटपणा न करणारा; न गमणारा २ अचळवी पहा. [अ+जोगावणें]

अजोडा—वि. धन न जोडणारा; कांहीं न मिळविणारा. [अ+जोडणें]

अजोनी—अजून पहा. 'सुवेष पतिव्रता मुनिकामिनी। कां जी अजोनी न दिसती ॥ ' –जैअ २८. २८.

अजोबा—आजोबा पहा.

अजोरा—पु. गाय वगैरे जनावराचा गर्भ. (क्रि. टाकणें–पडणें–येणें). [सं. आ+जरायु=गर्भाशय]

अजोरा—पु. कटकट; त्रास. 'गप्प बसा राव, उगीच अजोरा कां ? ' [फा. आझुर्दा]

अजोळ—अजूळ पहा.

अज्यम–अजम पहा.

अज्जी, अज्जीबात–अर्जी पहा. 'हे कायदे अर्ज्जी रद्द करणेंहि धोक्याचें काम झालें असतें.' –इंम ३०४.

अज्तरीक मेहेबानी–कृपापूर्वक. 'अज्तरीक मेहेबानी, दर्खास्त करितात कीं व्याज माफ करावें.' –पया ४००. [फा.]

अज्य—न. तुप. 'कितीयेक तें आणिलीं अज्य तेलें ।' –राक १.७७. [सं. आज्य]

अज्या—क्रिवि. (ना.) इकडे. अथज्या पहा.

अज्याइब—अजाइब पहा.

अज्रा—अज्राहे पहा. **०एख्लास**–स्नेहपूर्वक. 'पारचे पाठविले असे; अज्रा एख्लास घेतला पाहिजे'. –रा १०.११८. [अर. इख्लास्] **अज्राहे**—क्रिवि. रस्त्यानें; मार्गानें; पूर्वक; रीतीनें. [फा. अझ्+राह=रस्ता]. **०खानगी**–घरोब्याच्या रीतीनें. ' आम्हाकडे अज्राहे खानगी सांगून पाठविलें होतें'. –रा ५.८५. **०दोस्ती**–मैत्रीपूर्वक. 'परंतु अज्राहे दोस्ती तुम्हांस गोश्गुजार करून ठेवतों हे निमित्त उलट येईल.' –रा ५.१६४. **०मेहेरबानगी**–क्रिवि. कृपापूर्वक. ' खत अज्राहे मेहेरबानगी पाठविलें तें पोहचून खुशी हासल जाहली. ' –रा १०. २१२. **०हरामजादगी**–बेइमानीनें. ' तुम्ही अज्राह हरामजादगी स्वामींच्या पारपत्यकारांसी रुजू न होऊन मोरोपंतासी रुजू होतां.' –रा. ११.४१.

अज्रा मन्हामत—क्रिवि. कृपेनें; कृपादत्त; बक्षीस. 'हें वतन... यास अज्रा मन्हामत वतन करून दिलें असे.' –रा ८.४७ [फा. अझ्राह्+अर. मर्हमत्=कृपा]

अज्रा(जरा)वळ—स्त्री. लहान मुलीच्या गळ्यांत(दृष्ट लागूं नये म्हणून) घालण्याचा एक दागिना; दृष्टमण्यांची माळ. [वज्रावळ पहा.]

अज्रूय—क्रिवि. रीतीनें; रहेनें. ' अज्रूय वाजवीच्या हक परस्तीच्या इन्साफाच्या रीतीनें इन्फिसाल करितील.' –पेअ ६१. [फा. अझ्+रू+ए=मुळें; योगानें]

अझ—अज (पासून) पहा.

अझुण–णी, अझून—अजून पहा.

अट—स्त्री. १ अडथळा; अडचण; अटकाव; हरकत; नड. २ चाक पुढें जाऊं नये म्हणून चाकास लाविलेला दगड किंवा घुणा; उटी. ३ (ल.) ठरलेल्या गोष्टीविरुद्ध आचरण घडूं नये म्हणून त्याबद्दल केलेला करार–शर्त; देण्याघेण्याविषयीं कुळाकडून जो निर्बंध करून घेतात तो. ४ हट्टीपणा; हेका; हट्ट; दुराग्रह. ५ घट्ट बसविलेला सांधा उचकटण्याकरितां तरफेप्रमाणें लावलेला दगड, खिळा, पहार वगैरे; जोर. ६ विण्याची किंवा सतारीची घोडी; सतारीच्या दांडीवरील हस्तिदंती पट्टी-हिच्यावरून तारा खुंटीला अडकविलेल्या असतात. ७ दोरीचा गुंता; गुंतवण; पीळ; अढी. ८ (ल.) मनांतील गांठ; विपरीत ग्रह. ९हातमागाच्या परदेशी नांवाच्या खुंट्यापुढें बांधलेली, करकोचे पाडलेली काठी– हिला विणावयाचे धाग्याचे पुंज निरनिराळे बांधलेले असतात. १० गोट्या खेळतांना हातास व बोटांस जोर येण्यासाठीं आधाराला जमीनीवर टेंकलेला अंगठा; किंवा जेवें असा अंगठा टेंकला जातो ती जागा. [प्रा. का. अड–डु=आडवा, अडथळा.]

अट—स्त्री. मोट वगैरे थांबल्यानंतर पाटांतून वाहणारें पाणी; (अटत अटत राहिलेलें जें पाणी). ' एवढया अटीनें वाफा भरेल, मोट उभी कर.' [अटणें]

अटअट—स्त्री. परिश्रम; त्रास. अटाअट, अटापिटा वगैरे पहा. [सं. आर्ति; प्रा. अइ; का. अट]

अटक—स्त्री. अट पहा. १ बंदी; अडथळा; अटकाव; प्रतिबंध; मर्यादा. 'जया सोहंभाव हा अटकु.' –ज्ञा ६.११५; 'तुला कोठेंहि बंद अटक नाहीं.'–नल१२०. २ वचक,धाक; दबदबा. ३ कैद. 'जवाहरलाल यांना सरकारनें अटक केल्याबद्दल मिरवणूक निघाली. ' –केसरी१६. ४.१९३०. **अटकेत घालणें**–कैद करणें. **अटकेत पडणें**–कैदेत पडणें. ४ अडचण; नड; खोळंबा. ' तरी उरलें असे एक । थोर अटक मजलागीं॥ ' –एभा ६.२६७. ५ (करार मोडल्याबद्दल) प्रायश्चित्त; दंड; शिक्षा. ६ कापड विणण्याच्या मागांत ज्यावर फणी आपटते तें लांकूड– वीण घट्ट, मजबूत व ठासून बसविण्याच्या कामीं याचा उपयोग होतो. ७ गाडीचा वेग बंद करण्याकरितां केलेला चाप; घुणा. ८गाडीची साठी व बुटे यांना जोडणारा दांडा. ९ सिंधुनदाच्या काठचे एक गांव व तेथील सिंधुनदाच्या भागास दुर्धनीयतेमुळें मिळालेलें नांव. ' असे सांडाव देत आले अटक उतरून नऊ कोसांवर । ' –ऐपो १२१. **अटकेवर झेंडे लावणें**– (राघोबा दादानें अटकेपर्यंत मुलुख काबीज केल्यावरून) शतकृत्य करणें; मोठा दिग्विजय मिळविणें. 'अटकेवर झेंडे न्याया यापुढें आणितां कोठुनि भरारी (राघोबा)।' –विक ९. सतारीची घोडी;अट. –वि. न गवसणारें;हातीं न लागणारें. ' बाह्य शत्रु मरणात्मक । मन मरणासीही अटक ॥ ' –एभा २३. ७२३. २ कठिण; अवघड. ' निर्गुणाचा बोध अटक । ' –एभा २७. २५१. ३ अशक्य; अगम्य. ' ऐसें जें कांहीं एक । बोला बुद्धीसिही अटक ॥ ' –ज्ञा. १८.१४२०; ' माझेनि हस्तें काय वेगें । जे कां अटक सुरनरां ॥ ' –सुवन ६. ३४. [प्रा. का. अड–अट्ट.]

अटकचटक-मटक—स्त्री. १ लीला: चेष्टा; खेळ; नखरा. 'अटकचटक मटक दाउनि मन तुझें मोहिलें रे ॥' –अमृत २३.२५. २ एक खेळ; आटकमाटक पहा. [अटक+चटक. चटक द्वि. तुल० का. अटिग=खेळणें; आटिके=खेळ; गु. अटकबाळु=चेडेखोर]

अटकडी—स्त्री. १ माळवदाची तुळईवरील लहान तुळई. २ छताच्या खालची तुळई, हिच्यावर नक्षी काढतात. ३ खिडकीची दारें उघडीं राहण्यास केलेली लोखंडी आंकडी.[का. अड–अट+कडी]

अटकण—न. अडकण पहा.

अटकणें—अक्रि. अडकणें; थांबणें. गुंतून पडणें; अटकाव, अडथळा होणें. 'इतकें बोलून अटकला.' –बाळ २.१७३. [अटक]

अटकर—वि. बांधेसूद; नीटनेटका; आटोपशीर: व्यवस्थित. 'अटकर बांधा.' –क्रिवि. घट्ट; चापून चोपून; गच्च: आंवळ. [अटणें+कर प्रत्यय]

अटकर—वि. हट्टी: हेकेखोर; अडखोर: अडेल. [प्रा. का. अइ]

अटकविणें—उक्रि. थांबविणें: अडथळा करणें: प्रतिबंध करणें: अटक करणें. [अटक]

अटकळ—स्त्री. १ अजमास: अनुमान: अंदाज: सुमार; तर्क; मत; कल्पना. २ गणित किंवा इतर शास्त्रांतील नियम, सिद्धांत; रूढ किंवा लौकिकांतील चाल, रीत (कुस्ती, दांडपट्टा खेळण्याची, घोडयावर बसण्याची किंवा कोणतीहि विद्या-कला पार पाडण्याची). [सं. अर्ध+कल्=मोजणें; सांगणें. हिं. अटकल; गु. अटकल; सि. अटूकल]. **०णें**—उक्रि. १ ज्ञात होणें: माहीत होणें. 'गुप्त करी सदसतकृत तत्काळ दहाजणांस अटकळतें ॥' –मोआदि २८.१. २ अंदाज करणें; कल्पना, तर्क करणें; निश्चित करणें-बोलणें सांगणें. 'किती आहे तें मला अटकळत नाहीं.' **०पंचविशी**—स्त्री. आधारावांचून बांधलेला तर्क: अनुमान धपका; तर्क: अजमास; कल्पना; तगदमपट्टी. **०बाज**—वि. अंदाज करण्यांत तरबेज. **०बांधणें**—कल्पना करणें

अटकळणें—अक्रि. अडक(ख)ळणें पहा.

अटका—पु. एक ताब्यांचें नाणें; अर्धा रुक्का: अडका पहा. **म्हo** 'अटक्याची कोंबडी आणि टका फळणावळ.' [सं. अर्धक]

अटका—पु. १ प्रहग करण्याची शक्ति; व्याप; आटोका. २ अंदाज; अजमास; हिशेब; गणना. [सं. अर्ध+कल्; म. अटकळ]

अटकाव(वा)—पु. १ अटक: अडथळा; प्रतिबंध; प्रतिरोध; विघ्न; अडकाठी. २ कैद: अटक. 'त्यांच्या अटकावापासून...शोध लागेल.' –टि २. २०१ [अटक]. **०ण–णी**—स्त्री. अडथळा; हरकत.

अटकाविणें—उक्रि. अटकविण अटकाव करणें; थांबविणें. [अटक–अटकाव]

अटंकाळ—पु. दुष्काळ: महगता; दुर्भिक्ष; चणचण (पाऊस, पाणी, धान्य वगैरेची). (क्रि० पडणें, होणें). [अटणें+काळ]

अटकी—स्त्री. एक वनस्पति.

अटकी—स्त्री. अ (आ) ठकी: सागरगोटयांच्या खेळांत आठ सागरगोटे एकदम हातांत घेऊन नववा झेलण्याचा डाव. 'तुझ्यावर अटकी लागली.' [सं. अष्टक प्रा. अट्ठक: म. अटक]

अटकीचा दगड—पु शेताच्या सरहद्दीचा–बांधावरील दगड. [अटक]

अटकें—न. १ बैलावर लादलेल्या ओझ्याचा पडशीचा-एका बाजूचा भाग. २ कुडतन: अर्धे (विड्याच्या पानांचें, भाजीचें, फळांचें वगैरे). [सं. अर्धक]

अटकें—न. अडथळा: अटकाव. [अटक]

अटकोल—वि. पान्हेचोर; पान्हा चोरणारी: हट्टी (गाय इ०). [अटखोर]

अटखोर—वि हट्टी: हेकेखोर; अडीबाज. आग्रही. [अड–ट+खोर]

अटंग–अटंग्य—वि.(गो.)अवाढव्य:अफाट: भयंकर;विस्तीर्ण; घनदाट: निबिड. 'त्या अटंग्य रानांत तपाक बशिल्ो एक साधू ताका दिष्टी पडलों.' [अथांग (अप.) अटव्य ?]

अटघाट—पु. स्त्री. अटाघाट; अटाआट; वायफळ श्रम; अटापिटा; वाटाघाट; काथ्याकूट. 'सभेमधें आटघाट। समाधान कैचें।' –दा १९.२.७. [सं. अर्थ+ घात: प्रा. अट्ठघात: किंवा सं. आर्त+घट् ?]

अटघोळणा—पु त्रास: उपद्रव; छळणूक; गांजणूक: हालहाल. (क्रि० करणें, होणें). [सं आर्त+घोलन; प्रा अट्ठघोळण]

अटण—न भ्रमण: भटकणें: हिंडणें; 'समर्थे भरतखंडीं अटणें केलीं।' –सप्र ५.८.३.५. [सं अट्]

अटणावळ—स्त्री. सोनें, चांदी अटविण्याची मजुरी. [अटणें. प्रा. अट्ट= शुष्क होणें, सुकणें; का. अट्टु=आटविणें, शुष्क करणें]

अटणी—स्त्री. १ मूस. 'जन्म कर्माची आटणी।' –दा ३. १.२. २ धातूचें वितळणें; रस होणें. ३ शोष: लुप्त होणें; सुकणें; वाळणें. 'पर्जन्यानें पृथ्वीवर उदक जें वाढतें तें सूर्यानें शोषणरूप अटणी लाविली आहे त्यामुळें अटलें जातें.' ४ दाब; धाक; जरब; प्रतिरोधन. **म्हo** १ दाळ घालावी दाटणींत लेक घालावी अटणींत. २ वरण दाटणी आणि बायको अटणी. ५ झिजणें; श्रम; यत्न 'तैशी लटिकियालागीं अटणी। विषयसाधनीं नरदेहा॥' –एभा २.२२६. ६ क्लेश; त्रास. 'तेवीं आपलिया आटणिया। सुखें असतया प्राणिया॥' –ज्ञा १७.२६१. ७ मिश्रण. [अटणें]

अटणी—स्त्री. १ गोणपाटाच्या मागांतील ताण्याचे धागे खालींवर होऊन मधून घोटा किंवा आडवा दोरा टाकण्यास जागा करण्याकरितां रुळासारखें वाटोळें लांकूड घालतात तें. २ गोणपाटाच्या

मार्गांतील धागे खालीं वर करणारीं दोन दांडकीं; हीं व गोमटें मिळून ओवी किंवा वही होते. [अट]

अटणूक—स्त्री. १ आटणें; कोरडें पडणें; दुर्भिक्ष; शोषण. २ (ल.) व्यापारांत उतरती कळा; अवकळा; जातापाय. [अटणें]

अटणें—अक्रि. १ (उष्णतेनें) घट्ट होणें, कमी होणें (दूध, रस वगैरे). २ आकसणें; आंखुड होणें; आकुंचन पावणें; आक्रसणें (कापड इ०). ३ कामास पडणें; खपणें; विवक्षित कार्याकडे विनियोग होणें. ' दोन्ही अंगरख्यांचें कापड एका अंगरख्याला अटलें. ' (ल.) एकजीव-एकरूप होणें. ' मीचि होऊनि आटले । उपासिती । ' –ज्ञा ८.१२६. ४ सोनें, चांदी वगैरेचा रस होणें; वितळणें. ५ ऱ्हास-क्षय पावणें; खर्च होणें (माल्मत्ता, संग्रह वगैरेंचा). ' तैसें तुकयाचें धनधान्य समस्त । अटोनि गेलें जेथचें तेथें ॥ ' ६ घट्ट होणें; मजबूत होणें. ' नित्य मेहनत केली असतां शरीर अदून बळकट होतें. ' ७ नाश होणें; लुप्त होणें; शुष्क होणें; बाळणें; नाहींसें होणें. ' साहावी माझी ओवी । साहाही आटली । ' –तुगा ३८४८; 'दुहोत भलते सदां तरि न लेशही आटती । '–केका ५.८. ८ –उक्रि. पीळ घालणें; वळणें. ' हें सुंभ तिपदरी अदून आण. ' ९ त्रास देणें; बेजार करणें; निःपात करणें; निकाल करणें. ' अटीन सकळ त्रिभुवन । जैसें प्रल्हादाकारणें संपूर्ण । श्रीनृसिंहें अटिलें ॥ ' १० अटविणें; वितळणें (धातू). [प्रा. अट्ट; का. अट्टु]

अटणें—अक्रि. भ्रमण करणें; प्रवास करणें; फिरणें; भटकणें; हिंडणें. ' पुढें मृगयामिषें अटतां । गंगातीरा पातला ॥ ' [सं. अट्=भ्रमण करणें]

अटता काळ, अटता पाया—पु. ऱ्हासाचा, उतरता काळ; अवकाळ. ' धंदा करितां नये यश । अटता काळ यासि आला ॥ ' [अटणें+काळ, पाया]

अटदार—अटखोर पहा.

अटन—अटण पहा. उ० देशाटन, तीर्थाटन, भिक्षाटन, इ०. ' तीयें अटन विशेषें । हालि चालि करिते भिक्षुके । ' –ऋ २१.

अटप—पु. १ संकुचित करणें; थोडक्यांत आणणें; आकुंचितपणा–स्थिति. २ ताबा; वचक; अंमल; दाब. ३ व्यवस्थितपणा; सुटसुटितपणा; आटोप; आवर; उरक. ४ आटपणें; गुंडाळणें; बंद करणें; मोडणें. [सं. आटोप ? का. अट्टु ?]

अटपणें—उक्रि. १ एकत्र करणें; गुरफटणें; अकुंचित करणें. २ व्यवस्थित लावणें (पुस्तकें, हत्यारें वगैरे). ३ ताब्यांत घेणें; हातांत घेणें; गोळा करणें. 'बापाची संपत्ति वडील भावानें अटपली. ' ' वारा पुढचा आला, शीड लवकर आटप. ' ४ उरकणें; झटपट करणें. ' स्नान-संध्या अटपून पढावयास ये. ' ५ गांठणें; मजल मारणें; मिळणें. 'तूं पुढें गेलास तरी मी धांवत येऊन तुला अटपीन.' ६ सांभाळणें; व्यवस्थितपणें चालविणें. उदा० संसार अटपणें. ७ संपविणें; खलास करणें. ' भांडथांतला गूळ अटपला. ' ८ आवरणें; थांबविणें; मर्यादा घालणें; दाबणें. ' धीर धरोनी आटप म्हणुनी बाष्पें मजसाठीं ॥ ' –केक ८१. –अक्रि. १ मरणें; नाश पावणें. 'पांच हजार फौज अटपली '. २ सुकणें; संपणें; नाहींसें होणें. ' या तळथांतील पाणी अटोपलें तेव्हां पक्षींदेखील गेले.' [सं. आटोप ?]

अटपता, अटपशुद्ध, अटपसार—वि. वेताचा; सुटसुटीत; दुमदार; बांधेसूद; लहानसर; सोइस्कर; (शरीर, इमारत, कपडा). उ० अटपसार अंगारखा. [अटपणें]. **अटपता करणें–घेणें–धरणें**–१ थोडक्यांत आवरणें; संकुचित करणें (काम, धंदा). २ शेवटास नेणें; संपवीत आणणें.

अटपविणें—उक्रि. १ एकत्र, एके ठिकाणीं, जमा करणें; गुंडाळणें. २ उरकणें; संपविणें; विल्हेवाट लावणें; फन्ना करणें (काम, खाद्यवस्तु वगैरे).

अटपळ, अटफळ—न. पासोडीच्या दोन तुकडथांपैकीं प्रत्येक; कांबळ्याचा एक पट्टा. [सं. अर्ध+पट]

अटपाअटप—स्त्री. अवराअवर; विल्हेवाट; निरवानिरव; वारासार; विसकटलेल्या वस्तूंची जमवाजमव. [अटप द्वि.]

अटपाट—आटपाट, आठपाट पहा.

अटबाज—वि. हेकेखोर; हट्टी; मानी. [अट+बाज]. **अटबाजी**–स्त्री. हेका; हट्ट.

अटरणें—उक्रि. १ अक्रसणें; आंखडणें. २ खूप बसणें; फुगणें; ताठणें. अठरणें, अवटरणें पहा. [का. अट्टु; म. अठी, अठ्र.]

अटरफटर—न. १ सटरफटर; रद्दी; लटरफटर; ऐलफैल. २ बडबड; वाचाळपणा; वटवट. –वि. अप्रस्तुत; निरुपयोगी. [सं. अ+स्फुट; प्रा. फुट. फुट. द्वि.]

अटवणें, अटविणें—आटवणें पहा. **अटवून टाकणें**–(मंत्रानें भूत, सर्प, वगैरेस) बांधून टाकणें; रोधणें.

अटवल—आटवळ पहा.

अटवळा—पु. शेताची राखण करण्यासाठीं किंवा धान्य उफणण्यासाठीं किंवा कडबा वगैरे ठेवण्यासाठीं शेतावर बांधलेला माळा; अटोळा. शिवाय अटाळी, अटाळा पहा. [सं. अट्ट=गच्ची. माळा+वलन]

अटवी—स्त्री. जंगल; अरण्य; वन. ' अटवियेमाजी जैसा । वन्हि रिघतां सहसा ॥ ' –ज्ञा १८.१५२१ [सं. तुल० का. अट=गति; ते. अडवी; ' अड ' हा द्राविडी धातु व वी हा प्रत्यय]

अटव्य—वि. घोर; निबिड (रान–अरण्य). ' वनें अटव्यें उल्लंघून.' –मुआदि २.९०. 'चोरांच्या अटव्य रानांत नेऊन सांडा.' –रोज्यू १६२. –न. अरण्य. ' द्वितिय वर अटव्या राघवा पाठवावें । ' –राअ २८. [सं. अटवी]

अटस—वि. अडस; लहान; घट्ट; मजबूत (शरीर, बांधा). –क्रिवि. आवळ; घट्ट; करकचून (बसणें, जुळणें). [का. अट्टु, अट्टिसु=अटवणें]

अटहोम, ०पार्टी—स्त्री. मित्रमंडळींना छोटी मेजवानी, फराळ, उपहार. यावेळीं पदार्थ मांडून ठेवलेले असतात. पाहुण्यांनी लागेल तें खावें. गाणें, नाच, खेळ वगैरे करमणुकीचे प्रकारहि फराळासोबत असतात. 'त्यांनां या औपचारिक गोष्टी आवडतच नसत. ॲट ०चें नांव काढलें कीं अण्डरसनसाहेबांचें डोकें उठत असे. –नपुक २२. [इं.]

अटळ—वि. न टळणारा; चुकवितां येणार नाहीं अशा; न सुटणारा. [सं. अ+टळणें. सं. अटल=स्थिर, भक्कम; का. तळर्=हालणें, चळणें]

अटा—पु. प्रतिबंध; अडथळा. 'हृदय विकळ जेव्हां देहभावा अटा कीं।' –राधा १४८. [का. अड्ड; म. अट]

अटाअट—स्त्री. १ वाण; उणीव; टंचाई (पैसा; धान्य यांची). २ कोरडे पडणें; वाळून जाणें; शुष्कपणा (विहीरी, नद्या यांचा). अटअट पहा. [अटणें]

अटाई—स्त्री. १ अटविण्याची मजुरी. २ शुष्कपणा; कोरडेपणा.

अटा-आट-घाट-पीटा-पिटी-पिट, अटाटी—स्त्री. १ छळ; गांजपूक; नाश; कापाकापी. 'यादवांचेआं कटकां भीतरीं। पारकां आटाआटीं केली थोरी॥'–शिशु ९८८. २ त्रास; भगीरथ प्रयत्न; खस्त; दगदग. ३ थकवा; भागवटा; शीण. [अटणें, घाटणें, पिटणें. लष्करचे लोक गांवीं उतरले असतां तेथील लोकांकडून आटा (पीठ) फुकट मळून घेत; तसेंच ऋणकोकडे तगाद्यास आलेला शिपाई ही करी. त्यावरून विनाकारण त्रास (सरकारी किंवा सावकारी). भातृसंवृ. हिं. अटा+म. पीठ]. **अटापीट पाडणें**–मेटाकुटीस आणणें.

अटांक—वि. (गो.) टांक नसलेला. [सं. अ+टंक.]

अटांगपटांग—वि. लांबलचक; लंबाचवडा. 'अटांगपटांग बाता तेवढ्या पाहून घ्या.' [पटांग (ण) द्वि.]

अटाट—स्त्री. श्रम; यातायात. 'ग्रंथ पूर्ण लिहून झाल्यावर छापून काढायची अटाट पडली.' –नि ६१०. अटअट पहा. [अट द्वि.]

अटाटा—पु. खल; गाजावाजा; बोभाटा. 'आधीं उमासासूबाईसारखी सच्छील बायको, त्यांत त्या रुपयांचा इतका अटाटा झालेला आणि त्या कशा मागतील'. –पकोघे. [अट द्वि.]

अटाटी—स्त्री. कष्ट; श्रम; दगदग; हाल. 'टाकिली अटाटी भोगावया।' –दावि ३५. [अट द्वि.]

अटानिमा—पु. त्रास; अटाअट पहा.

अटारणें अठारणें—उक्रि, अंवटरणें पहा.

अटारन्या घोळणें—(व.) सतावून सोडणें. 'तुम्ही गेल्यावर आमच्या खूप अटारन्या घोळल्या त्यानें.'

अटारा—पु. १ काबाडकष्ट; ढोर मेहनत; मेटाकुटीस येणें. २ कष्टामुळें थकवा, ग्लानि येणें. (क्रि० पडणें, पाडणें).

अटारे (रो) टा—पु. १ सारा वसूल करणाऱ्या शिपायास (पीठ) रोटी वगैरे शिधा देण्याची रीत. २ किरकोळ काम; हलकीं कामें (दळणकांडण, मोलमजुरी वगैरे). 'दादला मेल्यापासून मी अटारेटा करून पोट भरित्यें.' ३ अटापिटा पहा. [सं. अट्ट=अन्न; हिं. अट्ट+रोटी]

अटाला—पु. (क.) घरचीं माणसें, जनावरें; खटला; लष्करी तळाचें सामानसुमान, सरंजाम; मंडळी; अवजड सामान इ०. –ख ४७२९.

अटाली—स्त्री. मनोरा; मोठा वाडा; गच्ची; माडी; अटवळा; माळा. 'मोडिल्या गोपूर आटाळीं।' –मुवन ३.५; 'आटाळयावरि लोकलाज त्यजुनि बाळा उभ्या ठाकती'–शशिसेना 'वाटाबिही नामभरें अटाळ्या। पौरांगना वाजवितात टाळ्या॥' –सारुह ५.१२. [सं. अट्टाल, अट्टालक, अट्टालिका; प्रा. अट्टालग –य; ते. अट्टालकमु–वेशीवरचा मजला; का. अट्ट=माळा; सिं. अटहलो, आटालो; इं. ॲटिक=पोटमाळा.]

अटास—(प्र.) अट्टहास; अट्टहास; प्रचंड उद्योग; अत्यंत परिश्रम, मेहनत, कष्ट; अटाअट. [सं. अट्ट=मोठे, फार+आयास=कष्ट]

अटाळा–ळी–ळें—पु. स्त्री. न. १ अटोळा; अटवळा; अटाली पहा. 'माडग्या अटाळ्या आणि उंच भिंती।' –सारुह ७.६८. २ (व.) अडगळीचा माळा. 'मोडकी खाट अटाळ्यावर पडली असेल.' [अटाली पहा.]

अटी—स्त्री. १ मोहरमांत हातांत घालावयाची पिळदार दोरी; सैली; सुताची किंवा रेशमाची लड; कळी. २ अट–गोटीखेळ पहा. ३ हट्ट; अट. 'ऐसी एका अटीं। रितीं शिणती करंटीं॥' –तुगा २७८४. ४ कष्ट; श्रम. [अट, अटा]. **०तटीचा सामना**–चुरशीचा सामना. [अट+तट+सामना]

अटीचा—वि. अटील; हेकेखोर; मानी. 'बिडकर खुर्देकर आटीचे।' –ऐपो २२२. [अट]. **०करार–बोली–खेळ**–पु. जो हरेल त्यानें अमुक शिक्षा भोगावी किंवा दंड द्यावा असें ठरवून खेळतात तो शर्तीचा खेळ. **–ची चाकरी–काम**–स्त्री. विशेष शर्तीवर करावयाची, चाकरी काम. **अटीबाज–खोर**–वि. मानी; अटदार. [का. अड्ड; म. अट+फा. बाज–खोर]

अँटीमनी—स्त्री. अंज धातु; सुरम्याची धातु. याचा मुख्य उपयोग छापखान्यांतील टाईप तयार करण्याकडे करतात. [इं.] **०फ्रूड**–न. एक होमिओपॅथिक औषध; सर्दी व मस्तकशूळावर उपयोगी. [इं.]

अटील—वि. हट्टी; मानी; अटीचा. [सं. अटल; म. अट]

अटीली—अटाली पहा.

अटीव—वि. १ उकळून, अटवून घट्ट केलेलें (दूध, खीर वगैरे). २ वितळलेलें (सोनें). ३ ओतींव; वितळवून तयार केलेले. 'अटींवा लोहाचे खांब जैसे।' –ज्ञा १६.३७९. ४ कुस्ती इ० परिश्रमानें घट्ट–मजबूत बनविलेलें, पिळदार (शरीर). 'जो आटींव जेठिया ऐसा।' –सुसभा ६.१५३.५ संकुचित; अकुंचित; आखूड केलेलें. [अठणें. प्रा. अट्ट; का. अट्टु]

अटीवाद—पु. हेकेखोरपणाचा वाद: हट्टीपणानें भांडणें; हटवाद पहा. [अट+वाद]

अटु—आटु–टू पहा.

अटुकमटुक—अटकमटक पहा.

अटुवें—वि. संकुचित; वांकडें. 'अटुवें हियें आवळी॥' –ज्ञा ६.७७. [अटणें]

अटुळणें—आटुळणें पहा.

अटेंडन्स—पु. हजिरी. 'अटेंडन्स अलावन्स'=हजेरी भत्ता. [इं]

अटेन्शन—न. (ड्रिल हुकूम) लक्ष; सावधान. [इं.]

अटोका—पु. शक्तीची किंवा सामर्थ्याची मजल, इयत्ता; योग्यता; आकलनशक्ति; अवांका; झेप; पोंच. [का. एटकु=आटोक्यांत येणें; एट्टिके=अटोका]

अटोका(क)ट—वि. १ अत्यंत; शिकस्तीचा; वरच्या दर्जाचा; अमर्याद; अचाट; (सद्गुण, अत्युच्च गोष्टी इ.). 'त्यांचें अटोकाट ज्ञानहि लक्षांत येऊन,'–नि ५७६. २ अढल; वरचढ; अतिशहाणा; योग्य; जहांबाज; प्रचंड. ३ सर्व; समग्र; पूर्ण; एकूणएक (लहानथोर सर्व दर्जाचे). [सं. अट्ट=उच्च+काष्ठा=सीमा, दिशा: प्रा. अट्टकट्ठा. सं. आ+कंठ?]

अटोप–र्णे—अटप, अटपणें पहा. 'त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या। कोणें येऊन आटोपाव्या॥' –दा १९.८.१८. **–अटोपता–सार**–अटपता–अटपसार पहा.

अटोपी—वि. (व्यवस्था करण्यांत) हुशार; तरबेज; चपळ; चलाख. [अटपणें]

अटोफळी—स्त्री. आठ फळांचें वायन; प्रत्येक ब्राह्मणास आठ आठप्रमाणें ६४ फळांचें दान; अठफळी; अष्टफळी. [सं. अष्टफल]

अटोमॅटिक—वि. १ आपोआप चालणारें, होणारें; स्वयंसिद्ध. 'अटोमॅटिक रिव्हायव्हल' (विमा)=अपोआप चालू होणारी. २ न कळत घडणारें; केवळ यांत्रिक; बुद्धीच्या उपयोगाशिवाय. [इं.]

अटोळा—अटवळा, अटाळी पहा. 'वदोनि अटोळीं निजला घोरत।'–दावि ३४७.

अटोळी—स्त्री. १ फणसासारख्या कांहीं (खारीक, जांभूळ इ.) फळांतील बी; अठळी. आंब्याच्या कोयीलाहि म्हणतात. २ पुरुषाच्या वृषणांतील दोन गोटयांपैकीं एक; अंड. [सं. अस्थि–अष्टि–अष्ठि; प्रा. अट्ठि=अपरिपक्व फळ; अठी. किंवा सं. अष्ठीला, अष्ठिलिका=गोटी, गांठ; अट्ठिलिआ–अठळी.]

अट्टरणें—अटरणें पहा. **अट्टरणा पाडणें**–(माण.) जनावरांस खूप दमविणें.

अट्टल—वि. १ निपुण; हुशार; निष्णात. उ० अट्टल पोहणारा-धांवणारा; लिहिणारा. २ पक्का; वस्ताद; तरबेज; बेरकी; लब्बाड. उ०–अट्टल चोर [सं. हट्टचौरक=बाजारांत चोरी करणारा; प्रा. अट्टचोर; अट्ट (ल) चोर. 'ल' स्वार्थी प्रत्यय –भाअ १८३५]; अट्टल सोदा, वगैरे. ३ अस्सल; खरा. उ० अट्टलमित्र–स्नेही. ४ स्थिर; अढळ; निश्चल. [सं. अटल=स्थिर, अचंचल; प्रा. अट्ट=निलेज्ज, बेशरम; का. आटआळी=खेळाडू; हिं. अटल; बं. अटल.]

अट्ट(ट्टा)हास—पु. १ जोरानें, मोठ्यानें हसणें. २ मोठा आवाज, स्वर; आकोश. 'करि रुदन अट्टहासें।' –एभा ३०.२३१. 'अचेतन पडिलें शरीर प्रेत। जवळी स्त्री आली धांवत। अट्टहासें शोक करित।' –ह ३३.२०८. [सं. अट्ट=मजला+हास]. अटास पहा. **०धरणें**–महत्त्वाकांक्षा बाळगणें; हट्ट धरणें. 'मराठेशाही बुडविण्याचा अट्टाहास धरून आपल्या अफाट सेनेसह महाराष्ट्रांत तळ देऊन बसलेला बादशहा यावेळीं कोणती गोष्ट करीत होता?' –स्वप १३३.

अट्टा—पु. (वे.) विहिरीच्या तळाशीं बांधकामाच्या खालीं बसविलेली चौकट.

अट्टाहास्य—मोठा प्रयत्न; अट्टहास पहा. 'चोरासाठीं रदबदल अट्टाहास्य। जळो जिणें दास्य बहुतांचें॥' –तुगा १८९४.

अट्टी—स्त्री. (कर्ना.) वाहाणा, जोडे यांचा तळ. 'या माझ्या वाहाणा दोन अट्टीच्या आहेत. [का.]

अट्टी—स्त्री. (क.) अट (१०) पहा. 'अट्टी न उचलतां गोटी मार.'

अट्टीखोर–बाज—वि. अटखोर पहा.

अट्टीवाद—पु. हट्ट; दुराग्रह; ठोक निश्चय. अटीवाद पहा. (क्रि० करणें, लावणें, धरणें.)

अठ—क्रिवि. (खा.) इथें; येथें; अठें पहा.

अठंगुळा(ळें), अठंगूळ—अठांगुळें पहा.

अठताल—पु. कर्नाटक संगीतांतील एक ताल. याचे मात्राप्रकार पांच आहेत; ते असे: १०,१२,१४,१८,२२. अष्टताल पहा.

अठतीस—अडतीस पहा.

अठप (फ) ळें—अटपळें पहा.

अठफळी अटोफळी पहा.

अठरणें—अटरणें पहा.

अठरा—वि. १ एक संख्याविशेष; १८. २ (सांकेतिक) पुराणें (मुख्य पुराणांची संख्या १८ आहे). 'कृष्ण वर्णुनियां श्रेष्ठ। चौघे गजेताती भाट। अठरा मागध उद्भट। वंशावळी वर्णिती॥' –एरुस्व ६.७६. तो हा पंढरीचा राणा। पुसा सहा चौं अठरां जणां॥' –तुगा २५३९. [सं. अष्टादशन्; प्रा. अट्ठदह, अट्ठारस–ह; हिं. अठारह]

पं. अठारां; बं. आठार; उ. अठर; गु. अढार, सि. अडहं]. ०**अखाडे**–अखाडा पहा. ०**उपधान्यें**–न.अव. सजगुरा, भादली, वरी, नाचणी, बरस, कांग, खपले गहूं, मका, करडई, राजगिरा, मटकी, पावटा, मूग, वाल, कारळा, देवभात, सात, अंबाडी. (दुसरी गणना) सजगुरा, नाचणी, वरी, मका, मटकी, राजगिरा, शिरस, पांढरफळी, जिरें, मेथी, वेणुबीज, देवभात, कमलबीज, पाकड, अंबाडी; भेंडीबीज, गोवारी, कुडयाचें बीज, यांमध्यें कोठें कोठें खसखस व पांढरा राळा घालून ही संख्या विसावर नेण्यांत येते. ०**उपपुराणें**–उपपुराणें पहा. ०**उपजा(या)ती**–स्त्री. अव. अठरापगड जातींप्रमाणें ज्या अठरा उपजाती आहेत त्या अशाः भिल्ल, कोळी, मांग, अंत्यज, चांडाळ, पुल्कस, जिनगर, सलतानगर, चर्मक, डोहर (ढोर), भाट, वुरुड, रजक, दांगट, मोचेकरी, खाटिक, लोणारी व कैकाडी. –स्वादि ६.५.३७–३८. ०**कचेरी**–स्त्री. (सं.) राज्यकारभारांतील सर्व वरिष्ठ खातीं असणारी मोठी कचेरी; सेक्रेटेरिएट. ०**कारखाने**–पु.अव. १ राज्यकारभारांतील खातीं (अ) उष्टर,सवुतर, जनान, जवाहीर, जामदार, जिकीर, तालीम, तोफ, थट्टी, दफ्तर, शरू, दिवान, नगार, पील, फरास, बंदी, मोदी व शिकार हे अठरा कारखाने. (आ) तोप, पील, उष्टर, फरास, शिकार, रथ, जामदार, जवाहीर, जिराईत, नगार, दारू, वैद्य, लकड, इमारती, मुदबख, कुणबिणी, खाजगत, थट्टी. (इ) खजीना, दफ्तर, जामदार, पील, जेराईत, अंबर, फरास, मुदबख, नगार, सरवन, आवदार, शिकार, तालीम, दारू, उष्टर, बकरे, तोप, सराफ. या तीन व आणखीहि केत्येक निरनिराळ्या याथा सांपडतात. हे सर्व कारखाने सरकारी असून त्यांवर स्वतंत्र अधिकारी असत. सर्वांवर खानगी कारभारी मुख्य असे. 'त्याच्या अठरा कारखान्यांच्या गेल्या कळा.' –तेपो १४२ २ (ल.) मोठ्या संसाराच्या किंवा व्यवहाराच्या शाखा–जातीं. [अठरा+फा. कार्खाना]. ०**खूम**–न. लोकांच्या अठरा जाती. सर्व प्रकारचे लोक; अठरापगड जात. 'या गांवांत एक मुकादम नाहीं, अठरा खुमाचे अठरा वेगळाले आहेत;' शिवाय –भाअ १८३४.४७. अर० कौम; फा. खूम=जात,]. ०**गुणांनीं खंडोबा**–पु. (ल.) सर्व (दुर्)गुणांनीं भरलेला, लुच्चा किंवा लबाड इसम: अडल सोदा. तोळा गुणांच्यावर कडी –जसा नाशिककर हा काशीकरांपेक्षां शंभर टींनें वरचढ तसा हा. २ अक्षयी रोगी; दुखणेकरी; अनेक रोगांनीं ;खांनीं व्याप्त. ०**जाती**–स्त्री.अव. कुंभार, तेली, कासार, तांबोळी, हावी, परीट, कलाल, कोष्टी, झारा (झांरकरी), महार (चांभार), न, जती, दुंडे, गुजर, मारवाडी, सोनार, सुतार, हलालखोर (कसाब). -कोको. अठरापगड जाती पहा. ०**टोप(पी)कर**–हिंदुस्तानांत गलेले युरोपियन आपल्या निरनिराळ्या देशरिवाजांप्रमाणें टोप्या ापरीत; तेव्हां त्यांना टोपकर असें नांव पडलें. १८ प्रकारचे (युरोपेयन) टोपकरः १ फिरंगी (पोर्तुगीज); २ वलंदेज (हालंड–डच); ३ निविशयान (नार्वेजियन); ४ यप्रदोर ?; ५ ग्रेग (ग्रीक); ६ रखतार ?; ७ लतियान (लाटिन); ८ यहुदिन (ज्यू); ९ इंगरे (इंग्रज); १० फरासीस (फ्रेंच); ११ कसनल्यान (शेटलंडियन केल्टिक ?); १२ विनेज (व्हेनेशियन); १३ दिनमार्के (डेन्मार्क; १४ उरुस (आयरिश किंवा रशियन); १५ रुमियान (रुमानियन किंवा रोमन); १६ तलियान (इटालियन); १७ सुवेस (स्विस); १८ प्रेमरयान (पोमेरॅनियन). –भाइ १८३५. दुसरी एक यादी– फिरंगी इंग्लिश, फ्रान्सीस, सिध, पावलिस्त, फिस्त, ब्रम्हेय, डौन, हुप, क्राज, मुस्त, नाग, जर्मिनी, कालील, बांक, चीन, युवरेर, दौंडी. –कोको. यांत नुसते युरोपियन येत नसून हिंदुस्तानाबाहेरील चिनी वगैरेहि लोक येतात. 'वडिलांची अठराटोपीकरावर सलाबत आहे.' –विवि. ८.३.५५. ०**तत्त्वें**–न. अव. महान् (बुद्धि), अहंकार, मन, दहा इंद्रियें आणि पंचतन्मात्रे –गीर १८५. ०**धान्यें**–न. मुख्य धान्यें–गहूं, साळ, तूर, जव, जोंधळा, वाटाणा, लाख, चणा, जवग मसूर, मूग, राळा, तीळ, हरीक, कुळीथ, सावा, उडीद, चवळी. ०**धान्यांचें कडबोळें**–न (भाजणी–अठरा धान्ये भाजून केलेल्या पिठाचा एक खाद्य पदार्थ) (ल.) १ निरनिराळ्या प्रकारच्या गोष्टींचें मिश्रण. २ अनौरस अपत्य, जारज. ३ भिन्न जातींचा संकरः संकरजात; संकर जातींतील व्यक्ति. ०**पगडजात**–स्त्री. १ तांबट, पाथरवट, लोहार, सुतार, सोनार, कासार, कुंभार, देवळक (गुरव), धनगर, गौळी, लाडवाणी, जैन, कोष्टी, साळी, चितारी, माळी, तेली, रंगारी. –स्वादि ६.५.३५-३६. जशी युरोपियनांत टोप्यांची –अठरा टोपकर–तशी हिंदु लोकांची पगडया बांधण्याची तऱ्हा जातीजातींत वेगळी आहे; तेव्हां जितक्या जाती तितके पगडयांचे प्रकार; यावरून सर्व जाती किंवा जातींचे लोकः एकूणएक लोक. २ अव्यवस्थित, मिश्र जनसमूहः नाना धर्मांचा जमाव. 'या यात्रेंत अठरापगड जात मिळाली आहे, तेथे सोंवळें काय पुसतां?' [अठरा+पगडी किंवा पगडा=फाशावरील संख्यावाचक चिन्ह] ०**पद्मे वानर**–पु.अव. तरुणांचा जमाव, टोळी, सैन्यः वानरसेना. (रामाला मदत करणारीं १८ पद्मे वानरें होतीं). ०**पर्वें**–न.अव. महाभारताचीं मुख्य प्रकरणेः–आदि, सभा, वन, विराट, उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, सौप्तिक, स्त्री, शांति, अनुशासन, अश्वमेध, आश्रमवासी, मौसल, महाप्रस्थानक व स्वर्गारोहण. ०**पर्वे भारत**–न. (ल.) मोठी केटाळवाणी गोष्ट; लांबलचक, जींत अनेक भारुडें व दु.खप्रसंग भरले आहेत असें कथन; चऱ्हाट. ०**पुराणें**–पुराणें पहा. ०**बाबू**–लबाड किंवा लुच्च्या लोकांची टोळी; आळशी लोकांचा कंपू; अव्यवस्थित लोकांचें मंडळ; वारभाई. (हलीं) कारकून वर्ग. **बाबू** पहा. [बं. हि. बाबू=राजेश्री; समान्यः आंई. इंग्रजी लिहिणारा हिंदु कारकून]. ०**भार वनस्पति**—स्त्री. पृथ्वीवरील सर्व वृक्ष–वनस्पति यांचा समुदाय. 'अठराभार वनस्पतींची लेखणी।'–ऋ्यं ३१.

०वर्ण–पु.अव. अठरा (पगड) जाती. यांची एक याद अशी. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, कुंभार, गवळी, तेली, पांचाल (सोनार, सुतार, लोहार, तांबट, पाथरवट, हे पांच मिळून), कोष्टी, रंगारी, शिंपी, न्हावी, पारधी, महार, धनगर, परीट, मांग व चांभार. **०विसवे (विश्वे)**–वि. अतिशय; बहुतेक परिपूर्ण; जास्त प्रमाणांचें. विश्वा, विसवा पहा. [अठरा विसांश; वीस विसवांचा एक रुका, अठरा विसवे म्हणजे दोन विसवा कमी इतकें; बहुतेक पूर्ण] **०दारिद्र्य (दरिद्र)**–न. अतिशय गरिबी. 'त्याच्या घरीं अठरा विश्वे दरिद्र आहे.' 'अठराविश्वे दरिद्र पाणी वाहतें.' **०विश्वे–पापपुण्य–चौकशी–मूर्ख–धर्म–रोग** इ० वाक्प्रचार.

अठलींग—क्रिवि. (खा.) येथपर्यंत: (व.) **अठलांक.** 'अठलोक आरता?' [सं. अत्र+लग]

अठव, अठवगिरी—पुस्त्री. आठवण: स्मृति; स्मरण. आठवण पहा. 'अठव देई सूर्यनंदना।' (क्रि० देणें, होणें).

अठवडकरी—पु. आठवड्याच्या आठवड्याला (आठ दिवसांनीं) व्याज मागणारा; पिळून काढणारा खिस्ती, सावकार. [अठवडा+करी]

अठवडा—पु. आठ दिवसांचा काल (रविवार ते रविवार दोन्ही दिवस धरून); महिन्याचा एकचतुर्थांश भाग. पंधरवड्याचा निम्मा. [सं. अष्टावर्त–अष्टवासर–अष्टवार; प्रा. अट्ठवाड, अट्ठाह: म. आठवडा; हिं. अठवाहा, आठवारा; सि. अठिडयो; ते. अठावंडि]. **–डा–ड्या**–वि. १ आठ दिवसांनीं तापानें अजारी पडणारा; कधीं बरा तर कधीं दुखणेकरी (चाकर, मूल. इ०) २ आठ दिवस दूध देऊन नंतर तें देण्याचें बंद करणारी (गाय, म्हैस).

अठवडे पा(वा)ईक—वि. 'पोंडे दिवस चालणारा किंवा टिकणारा; अठवड्याच्या मुदतीचा; (ल.) थोड्या मुदतीचा, लवकरच कामावरून दूर होण्यासारखा (सरकारी कामगार, नोकर. इ०) [अठवडा+सं. पदाति: प्रा. पाइक्क: म पाईक=गांवकामगार वाईक प्रत्यय]

अठवण—स्त्री. ध्यान. स्मरण; स्मृति. धारणा: धारणाशक्ति आठवण पहा. 'पूर्व सुखाची अठवण देती। स्थळें कितीक विपिनीं॥' –मंमं १.

अठवर—वि. १ अविवाहित: विवाहाचे वय होऊन गेलें आहे असा; घोडनवरा–री. (कातकरी लोक अजून हा शब्द वापरतात). 'फुन भूतळीचेआं रायां अठवरां। माझेयां खांडयाचा करोनि नोवरा॥' –शिशु ७२७. २ निवर: निवरट. 'तुजवेची कन्हेणें बोलें। आंगां आठुवरपण आलें॥' –शिशु २०८. [सं. अष्टि: प्रा. अट्ठी=अठळी; निवर; मोठा. अट्ठ+वर. तुल० अष्टवर्षा]

अठवा—वि. आठवा पहा

अठविणें—आठविणें पहा.

अठवें—न एक कैली माप: निठवें: अर्धाशेर: पायलीचा ८ वा हिस्सा. [आठ]

अठसटि, अठसठ—६८ संख्या: अडुसष्ट पहा. 'अठसटि तीर्थांचा तोडरू।' –शिशु १४.

अठहत्तर—वि. ७८ संख्या: अठ्याहत्तर पहा [हिं.]

अठळी—अठोळी पहा.

अठांगळें, अठांगुळें, अठांगूळ—न. गर्भाधानसंस्कार योग्य कालीं व्हावयाचा राहिल्यास गर्भाच्या आठव्या महिन्यांत पुंसवन व सीमंतोन्नयन या दोन संस्कारांसह गर्भाधान संस्कार करतात यांतील सर्व विधि गर्भाधानाप्रमाणेंच (ऋतुशांतीसह) करावयाचा असतो: अष्टमांगल्य पहा. 'मग जीवांचिनि मेळें। विकरलेपणाचें आठांगुळे केळें॥' –शिशु ९०: 'तुझ्या भयानें आलों आम्ही आंगुळ करावया आठ॥' –होला ३९. [सं. अष्टांग–अट्ठंग? अष्ट+अंगुल?]

अठार्यी—क्रिवि. १ अनाठार्यी, भलत्या जागीं. एकीकडे. 'अठार्यी ठेऊनिया नवनीत। मांजरा कर्वी चाटवीत॥' (चोरट्याच्या जागीं. शरीराच्या नाजूक, गुह्य भागीं (दिलेला ठोसा. धक्का इ०). [सं. अ+स्थान: प्रा. ठाण–ठाय]

अठाविसायुगीं—क्रिवि अठ्ठाविसाव्या युगांत (ल.) कधींच नाहीं (चार युगांची एक अशा सात आवृत्त्या व्हावयाच्या, म्हणजे इतका लांबचा काळ, यावरून लक्षणेनें); कडक्या आदितवारीं.

अठिवेठी—स्त्री. येरझारा: जाये: जाणें–येणें. [सं. अत्र; खा. अठी=येथें. द्वि.]

अठी—स्त्री कपाळावरील सुरकुती: अठी: वळी 'एक ह्यास पाहतां दुजी। कपाळासी घालती अठी॥'. २ मनांतील गांठ किंवा विपरीत बाईट ग्रह ३ सैली. अठी (१) पहा. ४ मिटी: ऐक्य. [का. अट्ट]. (क्रि० धरणें). **०घालणें** १ कपाळ संकुचित करणें: नाखुशी–तिरस्कार दाखविणें. २ आलिंगिणें, कवटाळणें. **०कमरेस घालणें**–कमरेस विळखा घालणें: मिठी मारणें.

अठी—स्त्री. १ फळांतील बी: अठोळी: अठळी. २ (ल.) कठीण चिवट गोष्ट–मुद्दा–प्रसंग: अवघड, भानगडीची बाब. [सं अष्टि; प्रा. अट्ठी]

अठी—क्रिवि. (खा.व.) इथ: येथें. [सं. अत्र]. **०तठी**–क्रिवि. इकडे तिकडे: येथे तेथें. 'अठीतठी काय फिरतोस?' [सं अत्र+तत्र]

अठीं–अठें—क्रिवि. आठांनीं गुणिले असतां. 'एकी अठीं आठ.' [आठ+ई, एं तृ०चे प्रत्यय]

अठूर—क्रिवि. (कु.) पुष्कळ: भरपूर. [सं. आढ्य: प्रा. अड्ढ; का. अड्ड=संपन्न, पुष्कळ?]

अठूळ—अठोळी पहा.

अठे—क्रिवि. (खा.) अठी; एथें; येथें. [सं. अत्र]

अठोक(प) परब्रह्म—न. (ब्रह्माचें एक गुणनाम) १ असामासिक, सिद्ध किंवा असाधित शब्दाला ही उपरोधिक संज्ञा लाविताततः मूळ शब्द. २ (ल.) मठ; दगड; ठोंब्या; ज्याला शिकविण्याचा कांहीं उपयोग नाहीं असा; निसर्गसिद्ध बाळ! [अठोक =अघड, अजात+परब्रह्म]

अठोनीवेठोनी—वि. १ पिळदार; पटीदार. २ (ल.) वेडावांकडा; कसातरी. 'अठोनी वेठोनी बांधला मुंडासा । फिरतसे म्हैसा जनामधीं ॥ ' –तुगा ३१७४. [अठीवेठी; अठी+वेष्टन: किंवा वेठ (=वेष्टन) द्वि.]

अठांपहार—क्रिवि. नेहमीं; सतत; कायम; अष्टौप्रहर पहा. [आठ प्रहर. सं. अष्टौप्रहर] **०बत्तीस घडया**–निरंतर; कायमपणें; सारखें चालू.

अठोफळी—अठोफळी (वाण) पहा.

अठोळा–ळी—स्त्री. अठळी; बी; अटोळी पहा.

अठ्ठा—पु. १ फांशाच्या खेळांत आठाचें दान. २ पत्त्याच्या खेळांत आठ चिन्हांचा पत्ता: अठ्ठा. [सं. अष्ट; म. आठ]

अठ्ठावन–न्न—वि. ५८ ही संख्या. [सं. अष्टपंचाशत्–अष्टपंचाश प्रा. अट्ठावन्न; सिं. अठ्वंजाह ; हिं. अठावन.]

अठ्ठावीस—वि. २८ ही संख्या. [सं. अष्टाविंशति; प्रा. अट्ठावीसइ–अट्ठावीस; सिं. अट्ठावीह; हि. अठाईस.]

अठ्ठीं—क्रिवि. (पटाच्या खेळांत) आठव्या घरांत. अठीं पहा. [आठ+हूं]

अठ्ठेचाळ–चाळीस, अठ्ठेताळ–ताळीस, अठ्ठयेचाळ–चाळीस, अठ्ठयेताळ–ताळीस—वि. ४८ ही संख्या. [सं. अष्टचत्वारिंशत्: प्रा. अट्ठचत्तालीस; अट्ठतालीस; हिं. अठतालीस; सिं. अठेतालीह]

अठ्ठेहत्तर, अठ्ठयाहत्तर, अठ्ठयेत्तर—वि. ७८ ही संख्या. [सं. अष्टसप्तति= प्रा. अट्ठत्तरि, अट्ठहत्तरि; हिं. अठत्तर; सिं. अठहतरी]

अठ्ठया—पु. गंजिफा आणि पत्त्यांच्या खेळांतला आठ-चिन्हांचा पत्ता; अठ्ठा. [आठ]

अठ्ठयाऐंशीं–यशीं–अठ्यांशीं—वि. ८८ ही संख्या, [सं. अष्टाशीति; प्रा. अट्ठासीइ, अट्ठासिः हिं. सिं.–अठासी]

अठ्ठाणवन्नव—वि. ९८ ही संख्या. [सं. अष्टनवतिः प्रा. अट्ठाणउइ; हिं. अठानवे; सिं. अठानवे]. २ (व.) बदमाष; लबाड.

अड—अ. कमीपणा, उणेपणा, दुय्यमपणा, न्यूनता, गौणता दर्शविणारें उपपद. हें लागून कित्येक सामासिक शब्द बनतात; जसें अडघोडा, अडघोतर; अडलेंड, अडसर. **इ०. अड**च्या ऐवजीं कधींकधीं ' आड ' असें रूप येतें सामान्यतः देशावरील लोक **अड** असें योजितात; कोंकणांत **आड** असें वापरतात तेव्हां अड आणि आड यांनीं आरंभ होणारे शब्द एकमेकांत घुसडले जातात. त्याकरितां इष्ट शब्द एकाखालीं नसल्यास दुसऱ्याखालीं सांपडेल. **सूचना:**– संकृत अर्ध या ब्दापासून बनलेले व कानडी **अड्ड** (=अडवा, हट्ट; दुराग्रह) या शब्दापासून बनलेले सामासिक शब्द यांचा घोंटाळा होऊं देऊं नये, म्हणून प्रथम अड–अर्ध पासून संभवलेले शब्द दिलेले आहेत; नंतर कानडी अड्ड पासून साधलेले शुद्ध घेतले आहेत. कांहीं शब्द या दोन्ही वर्गांतहि पडतील; पण ते कोटेंतरी एका ठिकाणीं दिले आहेत. ज्यांचा संबंध या दोहों अडशीं नाहीं किंवा जे महत्त्वाचे वाटले, ते स्वतंत्रच दिले आहेत. [सं. अर्ध; प्रा. अड्ढ]. **०कणी**–स्त्री. तांदूळ, डाळ, इत्यादिकांची मोठी कणी; प्रसंगविशेषीं ही तांदूळ–डाळींतहि मोडते; फुटका, अर्धवट दाणा; कणी. ' कापुरांचिआं भांजनियां। वाडौनि मौक्तिकांचिआं अडकणियां ॥ ' –शिशु ५९१. **०काष्ठा**–पु. धोतर वगैरेचा आखुड किंवा अपुरा मुडपा, काष्टा. आडकाष्ठा पहा. **०कुडतें**–न. लहान कुडतें; कुडतें पहा. **०खंड**–पु. तुकडा; अर्धवट, अपुरा भाग. ' मालांत माती नसून अडखंड नसावेत.' –मुंव्या २६. **०खप्या**–वि. १ अंगमेहनतीनें कांहीं कामें करून पोट भरणारा मुलगा; पोऱ्या. २ किरकोळ काम करणारा नोकर; आडकाम्या; बगल्या; दुसऱ्याच्या हाताखालीं काम करणारा. **०खोल**–न. १ बांधून न काढलेली , सरासरी खणलेली विहीर; रेताड जमीनींत खणलेली व न बांधलेली विहीर. २ केरकचरा टाकण्याची विहीर, खड्डा; होरलेली विहिर; अर्धीच खणून टाकलेली विहीर. **०गडी**–पु. कामकऱ्याच्या हाताखालचा गडी किंवा मजूर; मदतनीस; हस्तक; अडखप्या. **०गांव**–पु न. लहान खेडेंगांव; मोठी बाजार पेठ नसलेलें पण ज्याच्या जवळपास मोठे रहदारीचे रस्ते नाहींत असा भररस्त्यावर नसलेला गांव; खेडें; वाडी; गांवडें गांव. **०गोखमा**–अडवाप्या; पोरगा; गोखमा पहा. **०गोण**–स्त्री. बैल वगैरेवरून वाहून नेतात ती धान्याची लहान गोणी. **०घर**–न. मुख्य घराजवळ बांधलेलें लहानसें घर किंवा छप्पर; झोंपडें; सोपा; पडवी. आउट हौस **०घोडा**–पु. लहान घोडा; प्रसंग-विशेषीं मोठ्या घोड्याचेंहि काम करणारा घोडा; तट्टू. **०जात**–आडजात पहा. **०जिना**–पु. दुसरा लहान जिना; मागील जिना; चोर जिना. **०जुना–जून**–वि. अर्धवट जुना; उपयोगानें कांहींसा नादुरुस्त झालेला. वापरलेला; निरुपयोगी. **०दाणा**–पु. घोड्यास खावयास हरभऱ्याव्यतिरिक्त, दिलेलें धान्य, दाणा; (घोड्याचा दाणा म्हणजे हरभरा). **०दाळ**–स्त्री. डाळीमधला मोठा किंवा जाडा चुरा; अडकणी. **०धोतर**–न. लहान धोतर किंवा मोठा पंचा. अडपंचा पहा. **०नर**–स्त्री. स्त्रीत्व नसणारी; स्त्री–इंद्रिय असून ऋतु प्राप्त होत नाहीं अशी. **०पंचा**–पु. अगदीं लहान पंचा; **०पडदणी**–स्त्री. न्हातांना वेढून घेण्याची लहान पडदणी, वस्त्र; जुनेर. **०पन्हळ**–पु. अडनळ पहा.

•पेठ—स्त्री. अडगांव; छोटासा बाजारगांव. **•फळें**—न.अव. अटपळें पहा **•बंदर**—न. १ लहान किंवा विशेष व्यापारी महत्त्व नसलेलें बंदर. २ गलबतांना तात्पुरतें नांगरण्याला पुरेसें, लहान, किंवा सुरक्षित नसणारें बंदर. **•बाप्या**—पु बालपण गेलें पण अजून बाप्या झाला नाहीं असा जवान पोऱ्या; तरुण बांड; सोळा सतरा वयाचा मुलगा: प्रौढपणा न आलेला माणूस. **•बायको**—स्त्री. वधूटी; नुकतीच वयांत आलेली मुलगी (बारा-तेरा वर्षांची); अर्धवट प्रौढ बायको. **•मुलगा**—पु. मुलगा: पोऱ्या: छोकरा: अडबाप्या. **•म्हातारा**—पु म्हातारपणांत प्रवेश करणारा; जरा उतार वयाचा माणूस: मध्यमवयस्क **•शहर**—न. लहान शहर. 'वेळ जवळच हांकेवर होतें. आडशहरांतले ते, किती मोठे असणार!' —मुंद २.४. **•सांग**—न. नाटकांतील दुय्यम किंवा हलका नट; हलके, गौण पात्र **•स्वयंपाक-सैंपाक**—पु चटण्या, कोशिंबिरी,भाज्या वगैरे; मुख्य पदार्थांखेरीज इतर किरकोळ स्वयंपाक

अड—स्त्री. १ अडथळा: अटकाव. आडकाठी प्रतिबंध. २ दुराग्रह: हट्ट: हेका ३ बोली: अट: शर्त वगैरे. इतर सर्व अर्थी अट पहा. [का. अड—ड्=आड, अडविणें, आडवा येणें, अडथळा करणें, विरुद्ध जाणें (तुल० हिं. अड=भांडण] **•कट-कंठ**—पु आडमार्ग: आडवाट: कठीण वाट. 'येई प्राणायामाचेनि अडकेंठे। वरौता गा ॥' —ज्ञा ६.५५. [आड+कट=वाट,+कंठ]. **•कथा**—स्त्री. १ उपकथा: सहज, ओघानें आलेली गोष्ट: प्रसंगोपात्तकथा. 'आतां असो हे आडकथा। दशरथा लागली अवस्था ॥' —कथा ३.३ १६ २ विषयांतर; अवांतर कथा; आगंतुक गोष्ट ३ वाग्यांत किंवा बाष्कळ भाषण. **•कर**—वि. १ हट्टी: हेकखोर: अटखोर पहा २ अडून बसणारा; अडेल-(घोडा.) ३ गच्च बसणारा; कठीण: जड (कपडा इ०) [अड=अट+कर]. **•काठी**—स्त्री. आडकाठी पहा. **•काम**—न. १ दुसऱ्या कामाच्या आनुषंगिक काम. मुख्य कामात निघालेलें किरकोळ काम; बारीक काम. अडप झडप. २ सडा, संमार्जन, भाजी चिरणें इत्यादि स्वयंपाकाच्या अंगभूत गौण कामे **•काम-म्या**—वि. अडकामाच्या, किरकोळ कामाच्या उपयोगीं: बारीक सारीक कामें करणारा. **•कूट**—न कुडण: कुंपण. कोंपाउंड. आडकूट पहा. [आड+कूड]. **•खर्चे**—पु संसारास नित्य लागणाऱ्या अन्नवस्त्रादि जरूरीच्या मुख्य खर्चांखेरीज (प्रसंगविशेषीं उद्भवणारा पानसुपारी. ख्यालीखुशाली वगैरे संबंधी) किरकोळ खर्च, किंवा जादा खर्च **•खळ-खुळा-खूळ**—पु. स्त्री. न १ अडथळा. अटकाव; व्यत्यय: **अडचण; अडगळ.** (क्रि० करणें, घालणें, लावणें). 'कर्माकर्म अव्यक्तमूर्ती। कैशापरी अडखळ ॥' —भवि १४.१५.४. २ टेंच लागण्यासारखी, अडथळा होण्याजोगी जागा. [अडखळणें]. **•खाणें-द्य**—न. जेवणाशिवाय फळफळावळ, मेवामिठाई, यांसारखें दुय्यम खाणें; फराळ; उपहार; किरकोळ खाणें. **•खोर**—वि. अडेल; आग्रही; हेकेखोर; हट्टी; अटखोर. **•गल्ली**—स्त्री. बारीक बोळ; लहान गल्ली; मोठ्या रस्त्याला फुटणारा लहान रस्ता; चिवळ वाट. **•गाळा**—न. (बे.) बैलगाडीचा साटा. [म.गाळा किंवा का. गळे=वेद्ध, बांधू] **•गिरा(ऱ्हा)इक-की**—वि. दुकानदारापासून प्रत्यक्ष विकत न घेतलेला किंवा त्याला विकत न दिलेला. **•गिरा(ऱ्हा)इक**—पु. न. दुकानदारापासून प्रत्यक्ष विकत न घेणारा माणूस; दुकानदार नसलेला; बिनउदमी. **•गांष्ट**—अडकथा पहा. **•घाई (ह) क-की**—अडगिराइक पहा. **•तट्टू**—पु. १ अडणारा, अडून राहणारा तट्टू; **अडेल** तट्टू. २ (ल.) अडून बसणारा; तिरसटपणा, हेकेखोरपणा धरून सरळ न वागणारा; अडेलेड पहा **•ताळा**—पु. १ अडथळा पहा 'कांहींच सद्धक्तां नसे अडताळा ॥' —दावि ५. [अडथळा अप.]. २ हिशेबाचा पडताळा. [अड+ताळा]. (क्रि० घेणें, पाहणें). **•नळ**—पु. १ रहाटगाड्याच्या कोळंब्यापासून मोठ्यापन्हळापर्यंत पाणी जाण्यास घातलेला दोन्ही तोंडें बंद असलेला व एका टोंकास खालच्या बाजूस पाणी पडण्यासाठीं भोंक असलेला लहान आडवा पन्हाळ. २ दार लावतांना दारावर बसविण्याची चिमणी ३ पाण्याचा पाट चालू रहावा म्हणून मध्यें घातलेला लहान पन्हळ. **•पसारा**—पु. सटरफटर; अडगळ; फालतूक वस्तू. **•भित**—स्त्री. आडवी भित; आडोसा. 'अडभित तेथ लागडें आहे।' —सप्र २.१२. **•मार्ग**—पु. आडवाट. **•मिळकत-प्राप्ति**—स्त्री. जादा मिळकत—नफा; नेहमींच्या ठराविक प्राप्तीशिवाय मिळणारी अधिक मिळकत; नेहमींच्या प्राप्तीच्या मार्गाशिवाय इतर मार्गानें होणारी मिळकत. **•रान**—न. १ आडमार्ग: एकीकडची जागा—स्थळ: रस्त्यापासून दूरचा प्रदेश. २ (ल०) वावविवादप्रसंगीं बोलण्याची, सरळ रीत सोडून धरलेली वांकडी रीत. विषयांतर. सरळ मार्ग सोडणें; अडरान पहा. **•वळण-णी**—न राजरस्त्यांत नसलेला, एका बाजूस असणारा प्रदेश; एकीकडचे, एकांत स्थळ —वि. आडवळणांत असलेला(गांव वगैरे). —क्रिवि मर्यादेपलीकडे एके बाजूस एकीकडे. **•सट्टा**—पु. १ अजमास: अंदाज: वेत (क्रि० पाहणें). २ टप्पा: पोहोंच: धांव; आवांका ३ (खा.) अडचण [हि अडसट्टा: सि. अठिसठो; गु. अडसठो] **•सट्टयांत येणें**—(व) अडचणींत येणें: कचाट्यांत सांपडणें. **•सर**—पु. आडसर पहा.

अड—आड पहा

अडऊं—न अरण्य. रान अटवी 'योगियां रीगता अडऊं ।' —शिशु १०९. [सं. अटवी: प्रा अडई]

अडक—स्त्री न आडनांव: कुलनाम. घराण्याचें नांव. [गु.

अडकई—स्त्री (कु.) एक औषधि वनस्पति.

अडकण—न अडथळा किंवा अटकाव करणारी कोणतीहि वस्तु: उ० घुणा, गाडी थांबविण्यासाठीं लावलेला दगड, दाराची खिटी, माळेची गांठ, अडसर, खिळा वगैरे. [अडकणें]

अडकणी—स्त्री. अडकवणें; थोपविणें; थांबविणें; अडचण; अडथळा करणारी गोष्ट. [अडकणें]

अडकणें—अक्रि. गुंतून राहणें; प्रतिबंध होणें; चिकटलें जाणें; पकडलें जाणें; कुंठितगति होणें; थांबविलें जाणें. [अटक–अडक]

अडकणें—न. पुरुषाचा एक सोन्याचा दागिना –ऐरापुविवि ४२६. [अडकण]

अडकवण—स्त्री. ज्यामुळें अटकाव होतो ती वस्तु (गांठ, आंकडा, घोडा, फांसा इ०); अडकण. [अडकणें]

अडकविणें—उक्रि. थांबविणें; थोपविणें; हरकत करणें; अटकाव करणें; प्रतिबंध करणें; बंद करणें. [अडकणें]

अडकळणें—अडखळणें पहा.

अडका—पु. १ अर्धा रुका. २ (सामान्यतः) दाम; पैसा. 'शिष्यास न लावितीं साधन। न करविती इंद्रियें दमन। ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळोले तरी त्यजावे॥' –दा ५.२.२१. ३ रुक्याचा चतुर्थांश. –शास्त्रीको. **म्ह०**–१ अडक्याची देवता (किंवा भवानी), सापक्याचा शेंदूर; २ जळला तुमचा अडका माझा मूलच लाडका. ३ अडक्याची केली वाण, लोणच्याची केली घाण; ४ (व.) अडक्याचें दिडकें, पैशाचें सव्वा शेर=ज्याला हिशेब करतां येत नाहीं त्याची अशी समजूत करून देणें; ५ हातीं नाहीं अडका, बाजारांत चाललाय धडका. ४ जमीनीच्या मोजमापांत अर्धा रुका (६¼ बिघे विस्ताराची जमीन). [सं. अर्द्ध रुका; अर्द्धक]. **अडक्याचा घोडा**–(ल.) थोडक्या प्रयासानें व हलक्या मोलानें मिळणारी वस्तु.

अडका—न. (गोंडी) मडकें. 'अडका ते अडका कोसाला अडका.'

अडकाअडकी—स्त्री गुंतागुत; अटकाव: अडथळा: विघ्न. [अडकणें]

अडकाव–णी, विणें—अटकाव–णी,–विणें पहा.

अडकित्ता—पु १ सुपारी कातरण्याचें, कापण्याचें एक हत्यार–साधन: सरोता. २ (व.) ताब्यांत किंवा प्रतिबंधांत ठेवणारा माणूस–प्रस्तु. 'वडिलांचा अडकिता असावा'=आपल्यापेक्षां मोठ्या व वरिष्ठ लोकांची भीति धरून वागणूक ठेवावी; शिस्तींत रहावें. [का. अडकोत्तु (अडके=सुपारी: कोइत्तु=तासणें, कापणें): तुळु; इडकत्ति, ते. अडकत्तु]. **अडकित्यांत घालणें–धरणें**–अडचणींत, पेंचांत धरणें; अनिष्ट स्थितींत अटकावून ठेवणें. **अडकित्यांत सांपडणें–पडणें**–संकटांत, पेंचांत सांपडणें–पडणें.

अडकूल—न. (व.) पोहे; भातकूल. [सं. अट्ट=शिजविलेले तांदूळ+कुट्ट ?]

अडकें—न. अडथळा: अडकाठी: प्रतिबंध: विघ्न; त्रास. [अडकणें]

अडखळण—स्त्री. (अडखळ पहा). १ ठेंचकाळून पडण्यासारखी जागा–प्रसंग; अडखळ. २ एखादी वस्तु पडूं नये–सांडूं नये म्हणून केलेली योजना (उ० दौतीचा ठोकळा; दाराची खिटी, खीळ; जोडवें पडूं नये म्हणून केलेलें वलय, इ०). **–णी**–स्त्री. ठेंचकळणी; अडखळण पहा

अडख(खु)ळणें—अक्रि. १ ठेंचकळून थांबणें: ठेंचकळणें; धडपडणें: गतिरोध होणें: अडणें. ' अडखुळलों म्यालों म्हणती ते पतिव्रते। ' –वसा ४. २ जिव्हादोषामुळें बोलतांना लागणें, अडणें; चावळणें; चांचरणें: गुमळणें. ' तिनें भिऊन अडखळत आपलें वर्तमान सांगितलें. ' –पाण्ड ४८ ३ कामांत कचरणें; धरसोड करणें; कांकूं करणें; नानू करणें (अडचणींत) सांपडणें; ४ गुंतणें; हात अडकणें. [सं. अर्ध+स्खलन: का. अड्डड+खळण]

अडख(क)ळणें—(कों.) आढळणें पहा.

अडखळविणें—उक्रि. ठेंचकाळावयास लावणें; गडबडविणें; अडखळायास लावणें (शब्दश. व ल.)

अडगई—स्त्री. महालुंग सोलून, शिजवून त्यांत दहीं, हिंग, मीट वगैरे घालून केलेलें गायतें, कोशिंबीर. [?]

अडगव–णी—स्त्री. रचना. लावालावी· व्यवस्था यथायोग्य मांडणी. [का. अडकु=रचणें, लावणें]

अडगवणी—स्त्री. (कों.) भातानें पीक तयार होऊन कापून वाळलें म्हणजे त्याचे भारे बांधून उडवी डाळतात ती कृति. 'काल आमची अडगवणी सेपली. ' [का. अडकु=गुंजी करणें, रचणें]

अडगव(वि)णें—अक्रि. (कों.) १ योग्य जागीं, जागच्या-जागीं ठेवणें; व्यवस्था करणें. २ कामधंद्याकडे उपयोगास लाविणें; उपयोगी लावणें. ३ (ल.) मरणोत्तर व्यवस्था करणें; विल्हेवाट लावणें. 'म्हातारी एवढी अडगवली म्हणजे मी मोकळा होईन.' ४ निवडणें. [का. अडकु=रचणें, नीट ठेवणें]

अडगळ—स्त्री. निरुपयोगी, अडचण करणाऱ्या वस्तू–**सामान**; पसारा: परवड. –पु. (क) अडमर. [सं. अर्गल: का. अड्ड= आड+गळणें]

अडगा—वि. (कर. कुण.) अडाणी; अशिक्षित; अज्ञ. 'अडगा माणूस निरुपयोगी आहे ': ' असा अडग्यासारखा काय करतोस? '

अडगाई—अडगई ! **०चाटाई**—लघळपणा ! ' ऐसें लटिकेंचि अडगाई चाटाईनें बोलिला । ' –पंच ३.१५.

अडगुणबडगुण—न. (प्रां.) फालतुक वस्तू: सटरफटर सामान; अडगळ. [अडगवणें]

अडगुलेंमडगुलें—वि. खेळकर–बोलकें(मूल). गाणें–' अडगुलं मडगुलं । सोन्याचं कडगुलं । रुप्याचा वाळा । तान्ह्या बाळा । तीट' (अर्थ) किती बाळ खेळतं! किती बाळ बोलतं! हातांत सोन्याची कडी, पायांत रुप्याचा वाळा घातला आहे. बाळा ! तुला दृष्ट होऊं नये म्हणून तीट लावतें. –चिज १२. १९१६. [का. आडु=खेळ+ कुळी=कर याप्रमाणें प्रत्यय. मातु=बोल, भाषा+गार–कार]

अडघण—वि. (ना.) हट्टी; हेकेखोर; लवकर वठगीस न येणारा.

अडचाली—स्त्री. आडमार्गी. –मनको. [अडगळी ?]

अडच-च्च—क्रिवि. गच्च; मजबूत; घट्ट; आवळून, अडून. [अडणें]

अडचण—स्त्री. १ अरुंदपणा; चिंचोळेपणा; जागेचा अभाव; आकुंचितपणा; संकोच. २ गर्दी, दाटी यामुळें होणारा त्रास किंवा उपद्रव; गैरसोय. ३ सटरफटर; फालतूक सामान; अडगळ. ४ (ल.) पंचाईत; निकड; तारंबळ; लगबगींचें काम, वेळ, स्थिति; संकट; त्रास; निरुपायदशा. ५ वैगुण्य; ठेंचाई. [अडचा]. ०**येणें**–मुतक येणें; रजःस्वला होणें; कांहीं विघ्न येणें. ०**सांगणें**–सबब, खेकटें, नड सांगणें; आपणास अडथळा करणाऱ्या गोष्टी सांगणें. **अडचणींचें दुःख**—भलत्याच किंवा अवघड जागीं [गुह्यभागीं] झालेलें दुःख, आजार, विकार. **ग्रह०** अ० आणि जांवई वैद्य. **अडचणींची वाट**–घोंटाळ्याचा–अवघड रस्ता

अडचणणें—अक्रि. गर्दी, दाटी, अडचण होणें; चिमटलें जाणें २ तारांबळ होणें; ओढ, निकड, ताण लागणे. [अडचण]

अडचणूक—स्त्री. घोंटाळा गैरसोय; अडचण पहा. ०**मोडणें**–नड, अडचण नाहींशी करणें; अडचण काढून टाकणें; विघ्न, संकट निवारणें.

अडचणें—अक्रि. १ आवळ, घट्ट होणें; दाटणें; अडस होणें; (कपडा, बांगडी). २ आवळणें; आवळून बांधणें; थोड्या जागेंत समाविष्ट करणें (वस्तू, ओंढी). ३ (ल.) अडचणींत सांपडणें; संकटांत अगणें. [अडच]

अडची—स्त्री. गाय, म्हैस इत्यादिकांचें दूध काढण्याच्या वेळीं त्या हातूं नयेत, लाथा मारूं नयेत म्हणून त्यांना अडचण होण्याजोगे जे दोन दोहींकडे वांस बांधतात ते [अडच]

अडचें(जें)—क्रिवि. (अडचाच्या पाडयांत) अडीच वेळां. ' पंचवीस अडचें साडे वाम्हण '. [अडीच]

अॅडजर्न—सक्रि. १ तहकूब करणें; लांबणीवर टाकणें. २ नियमित काम अपूरें राहिल्यास सभा पुनः बोलाविणें; दुसऱ्या बैठकीपर्यंत सभा तहकूब ठेवणें. [इं.]. ०**मेंट**—स्त्री. तहकुबी.

अडज्यूटंट—अजिटन पहा. [इं]

अडंडळ—वि. अढळ· बिनधोक ' तगवया भवाब्धि प्रबळ । चरणाची नाव अडंडळ ॥ ' –एभा ५. ३७९. [प्रा. डिंडिल्ल=स्खलित; ढंढल्ल=भ्रमित]

अडण—न. १ गाई–म्हशींचा ओटी; कास· अडाण पहा. [तुल० इं. अडर]

अडण—स्त्री. १ सुपाच्या कांठाला मजबुतीसाठीं लावलेली कामटी. २ संकट; अडचण. ' धांवसी आडणीं ऐकोनियां धांवा । कइवारें देवा भक्तांचिया ॥ ' –तुगा ८६८. –वि. हट्टी; माथेफिरू; स्वेच्छाचारी. [का. अड्ड]

अडणा–णें—पु. न. अडसर. ' पण स्वर्गसुखाच्या मंदिराच्या दाराला हा कोर्टिंगचा एवढा अडणा नसता तर फारच चांगलें. ' –सु १११. [सं. अर्गल; का. अडने=आडवें]

अडणी—स्त्री. १ दिवा, भांडीं वगैरे जिन्नस ठेवण्याकरितां तिवई, चौरंग. ' अडणीवरि सोन्याचें ताट ॥ ' –सुग ३४. २ शंखाची बैठक तिवई. ३ अडसर. ४ लांकडी पाटास खालून लावलेले दोन लांकडी खूर. ५ (कों) दाराची कडी. ६ टेंका; आधार ' घायाळा घालोनि वोडणी । धनुष्यदंडाच्या अडणी । उचलोनि दोघीं दोघीं जणीं । वीर श्रेणी आणिल्या ॥ ' –एरुस्व १२.२६. ७ सुपाची पुढील कामटी; अडणपट्टा. ८ मर्यादा; सीमा; रंगण. ' इंद्रधनुष्याचिये अडणी–। मार्जी भेघ गगनरंगणीं । तैसें आवरिलें शाङ्गपाणी वैजयंतिया ।' –ज्ञा ११. ६०३. [का. अड्डणिगे=तिपाई]. ०**वरचा (शंख)**–पु. १ शंख; (ल.) मूर्ख; अशिक्षित माणूस. ' अशा तऱ्हेचे उद्गार अहोरात्र त्याच्या कानींकपाळीं पडल्यामुळें म्हणा पण शिकण्यासवरण्यांत तो अडणीवरचाच झाला.' –यशख. २ उच्च स्थानावर-अधिकारावर असलेला बेअकली माणूस.

अडणूक—स्त्री. १ अडचण; अडथळा; हरकत. ' परोपरीं सिकावें । आडणुका सांगत जाणें ॥ ' –दा १९.१०.१५. २ अट; हट्ट; विरोध. (क्रि० घेणें, धरणें). ३ अडवणूक; प्रतिबंध करणें. [का. अड्ड]

अडणें—अक्रि. १ प्रतिबंध–अडथळा होणें; अडकला जाणें; वेढला जाणें; खोळंबून राहणें. ' तरी मग सांग पां कैसेनि अडे. ' –ज्ञा ६. ४०१. २ आवळ, घट्ट बसणें; अडस होणें; जेमतेम जाणें. ३ इनकार करणें; ना म्हणणें; नाकारणें; नडून किंवा रुसून बसणें; हट्ट धरून बसणें. ' दोघांचें (जहाल मवाळ पक्षांचें) जें कांहीं अडतें आहे तें कांहीं हेतूबद्दल नव्हे, कृतीबद्दल आहे. ' –टि ३.२५३. ४ प्रसूतींत अडथळा येणें. ५ दाटणें; संकटांत सांपडणें–पडणें; चिमटलें जाणें. ६ चालतां चालतां थांबणें, स्तब्ध राहणें; पुढें पाऊल न टाकणें (गाडी, घोडा इ.). ७ वेढणें; अडविणें; व्यापणें. ' सागरें कवणें ठायीं नाहावें हें गगनचि आडे आघवें ॥ –ज्ञा ९.११. **ग्रह०** १ अडली गाय फटके खाय. २ अडला नारायण गाढवाचे पाय धरी–प्रसंगीं श्रेष्ठ, शहाण्या माणसास (नारायणास) मूर्खाचे पाय धरण्याची पाळी येते [का. अड्ड]. **अडतें(ल)धरणें–पाहणें–मोजणें**—संकटांत पडलेल्यास मदत न करतां उलटा आनंद मानणें; किंवा त्याच्या अडचणीचा फायदा घेणें: एकाद्याला नडविणें. **अडला नारायण**–अडचणींत सांपडलेला माणूस (अडला नारायण गाढवाचे पाय धरी या म्हणीवरून). **अडला भिडला**–संकटांत-अडचणींत पडलेला; ग्रस्त. ' अडल्या भिडल्यासी वेगीं पार पाडूं । ' –दावि ४२८. (अडणें याच्या रूपापुढें भिडणें यांचीं रूपें लायून पुष्कळ शब्द बनतात उ० ' अडलेंभिडलें काम असलें तर मला सांग. ' ' अडलाभिडला कोण्ही आला तर त्याचा समाचार घ्यावा. ').

अडत—स्त्री. १ सराफी किंवा व्यापारी व्यवहारांतला पत्रव्यवहार किंवा देवघेव. २ त्या कामाबद्दल मिळणारा मोबदला; दलाली. ३ एकाद्या मालकाचा माल विकण्याकरितां ठेवणें, विकून देणें इ० क्रिया; एजन्सी; मध्यस्थी. ३ दस्तुरी; दुकानची पट्टी. ४ (कायदा) मुनीमपणा; गुमास्तेगिरी. [सं. अट्ट = बाजार; ते. अडिति]

अडताल—पु.एकताल,झंपाताल पहा. [का.अड. ते० अटतालमु]

अडती—स्त्री. १ प्रतिकार; अडवणूक; अडथळा; विरोध. २ सतारीची–वीण्याची खालची घोडी, चौकी. ३ (कों) दाराची खिडकी. ०घालणें–मोडता घालणें. [अडणें]

अडतीस—वि. ३८ ही संख्या. [सं. अष्टत्रिंशत, प्रा. अट्ठतीस]

अडत्या—पु. कोणत्याहि व्यापारामध्यें, देवघेवीचीं कामें करण्याकरितां, कारखान्यांत तयार केलेला अगर कोठारांत सांठविलेला माल खपविण्याकरितां, किंवा इतर व्यवहारांत आपल्या तर्फे जबाबदारी अंगावर घेऊन (अडत ठेवून) व्यवहार करणारा. मध्यस्थ; दलाल; गुमास्ता; एजंट. [सं. अट्टपति = बाजाराचा मोकदम / अडत]

अडथळणी–(णूक)—स्त्री. हरकत; अडथळा पहा. !

अडथळणें—उक्रि. प्रतिबंध–हरकत–अटकाव करणें; प्रत्यवाय, विघ्न आणणें; बंद पाडणें. [अडथळा]

अडथळा—पु. १ अटकाव; हरकत; अडचण; प्रतिबंध. २ खोळंबा; खोटी; गुंता. [अडणें (अड्) + स्थळ]

अडदर–रा–रू—पु. धाक; भय; भीति. 'तेथ दानवां अडदरू। नागार्जुनाचा दातारू ॥' –शिशु ३६३; 'ते वेळीं स्वर्गालागीं आदरु। कां नरकाचा अडदरु ॥' –ज्ञा १६ ३१६. 'घाई अडदर लासीं मुहाडा ॥' –उषा १४२५. [सं. अट्ट = मोठी + दर]

अडदरी—स्त्री. खोल, अडचणीची, एकीकडची दरी, जागा. 'दंभमान तो पाहाडफत्तर। अडदरीं वागती पाशादि तस्कर'॥–दावि ७६१. [अ (आ) ड + दरी]

अडदल—पु. अडली; लष्करी कामगाराचा हुजऱ्या. 'अडदलीचे शिपाई.' [इं. ऑर्डर्ली]

अडदांड–गा—वि. धसमुसळ्या, धटिंगण; दांडगा व अडाणी; बेसुर्वत; रानवट. [अड्ड + दंड]

अडदावा—पु. गूळमिश्रित हरभऱ्याची डाळ. (ही तट्टांस खुराक म्हणून देतात.) –मोको. [हिं.]

अडन—संकट; अडचण; अडण २ पहा. 'पडलियां संसारा चियां अडनीं' –एभा. ११.४.

अडना—अडणा पहा.

अडनाट–ड—वि. अडनीड; अडनेड; अडनीट; नीट किंवा बरोबर, हिशेबाच्या दृष्टीनें पूर्ण, नमलेला–दहा, वीस, शंभर इ० ठोकळ संख्येचा–परिमाणाचा नसलेला, अधल्यामधल्याच संख्येचा–गैर-सोयीचा. 'एक रुपयाचें होईल तें भात ने किंवा मणभर ने, अडनीड अकरा पायली नेऊ नको.' –क्रिवि. सोईस्कर नाहीं, अशावेळीं; अनिश्चितपणें; धड इकडे नाहीं, धड तिकडे नाहीं अशा तऱ्हेनें. 'आंत तरी बैस नाहींतर बाहेर तरी बैस, मध्येंच अडनीड बसूं नकोस.' [सं. अर्ध + नीत; का. नेट्टगे; ता. निट्टुः म. नीट]

अडनांव—न. १ उपनांव; घराण्याचें–वंशाचें नांव; कुलनाम; आडनांव पहा. २ अयथार्थ नांव. 'जीभ जै आरोगूं जाये। मग रसना हें होये। आडनांव कीं ॥' –अमृत ६.६२; 'तैसें स्त्रीसंगें जें सुख। तें अडनांवामात्र देख ॥' –मुरंशु ३६५; [सं. अर्धनाम? का. अड्ड+नावः तु० का. अड्डेहसरु. अड्ड = मोठें, (श्रेष्ठ) + नाम. ई. सर (श्रेष्ठ) + नेम (नांव). हिं. अडक]

अडनांवाचा—वि. केवळ नामधारी; फक्त नांवापुरता म्हणजे त्याप्रमाणें कृति–पराक्रम नसलेला ब्राह्मण, कारकून, शिपाई इ०. 'रामाजीपंत आडनांवाचे कारकून परंतु कागदावर धड ओळ कांहीं ओढतां येत नाहीं.' 'नररत्न तोचि तूंचि स्त्रीरत्न उदंड आडनांवाचीं।' –मोरो. नलोपाख्यान.

अडनीट–ड,–नेड—अडनाट पहा.

अडपझडप—क्रिवि. १ चोरूनमारून; अयोग्य किंवा भलत्याच प्रकारें; कपटानें; 'अनेक उपायांनीं. नाना तऱ्हेनें; हरएक युक्तीनें; (प्राप्ति, डल्ला मिळ(वि)णें). २ लपूनछपून; गुप्तपणें (शिंदळकी, व्यभिचार करणें). कांहीं नामांनीं विशेषणाप्रमाणें उपयोग होतो. त्यावेळीं या शब्दाचे होणारे अर्थः–१ अप्रत्यक्ष; अनिश्चित; जादा (नफा, खर्च). २ लहान; हलकीं; किरकोळ (कामें, उद्योग). ३ संकीर्ण; मिश्र; अस्पष्ट (गोष्टी). विनमाहितीचा; जमावांतील; किरकोळ; अप्रसिद्ध (इसम, माणूस). 'कांहीं अडपझडप सरदार विशाळगड सोडून पळण्याच्या बेतांत होता.' –स्वप १७३. [अडप द्वि. हिं. अडपझडप = गरज]

अडपणें—उक्रि. अडचणींत पडणें; दगदगींत पडणें; अडवणें. [का. अड्]

अडपतादडपता—वि. देखरेख करणारा; ताळ्यावर आणणारा; नियंता. दाबांत–धाकांत–जरवेंत ठेवणारा (आईबाप, वडील माणूस). 'अडपती नाहीं सासू दडपता नाहीं भाका.' [दडपता द्वि.]

अडपदडप—स्त्री. दाब, धाक, वचक.

अडपैजणें—अडपणें पहा. 'आणि मुखाचिया आर्ति। अड पैजेना ॥' –ज्ञा २-२९४. [अडपणें यांत ज चा समावेश]

अडप–(फ)–ळ–ळें—अटपळ पहा.

अडफांटा—पु. अडथळा; विघ्न; हरकत; आडफांटा पहा. [अड = आडवा + फांटा]. ०**काढणें–घेणें–फोडणें**—(कार्याचा) बिघाड करणें.

अडबंक-ग, अडबंगा-गी, अडबांक—वि. १ भसाडा; वांकडातिकडा; ढोवळ; भोपळमुर्ती; भोंगळवार; ओवडधोवड. २ मूर्ख; स्वेच्छाचारी; अडमुठा; दुराग्रही; अडेल (घोडा). ३ ठोकळ. **अडमाप.** [सं. अर्ध्द + वक्र: १ + भंग = भम्र; हिं अडबंगा: गु. अडबंग = हट्टी, मूर्ख]

अडबंकी—स्त्री. दाराची खीळ.–शर, अडबंकी पहा

अडबंद—पु.कटिसूत्र.करदोडा.'नासिलें अडबंद कौपिन माळा।' –तुगा २८९७; 'कटीं अडबंद कौपीन॥' –दावि २४० [अड+बंध]

अडंबर—अवडंबर पहा. [सं. आडंबर]

अडबाजार—पु. बाजारच्या दिवसाखेरीज आडवारीं भरलेला बाजार; लहान, शिळा बाजार.

अडबेलें—न. गळ्यांत होणारा एक रोग –मनको

अडभंग—अडबंग पहा. [अर्ध + भंग = भम्र]

अडभरीं भरणें—धुमाकूळ; शिगाणा, दंगा घालणें [का आडु = खेळ. खेळाच्या भरी भरणें]

अडमड—स्त्री **अडमडा**—पु (कों.)लहान मुलाची चलवळ; घुळबूळ; अंगवळा; खोडकरपणा. **–ड्या**–वि. चपळ. वळवळ्या. **०णें**–१ खोडया करणें; चुळबूळ करणें (लहान मुलाबद्दल वापरतात). २ धडपडणें; टेंचाळणें; त्रासांत, संकटांत असणें 'मर.' राहा मेल्यासारखा अडमडत' –आंमू ९. [प्रा अडवडण=स्खलन का आडु माडु=खेळकर]

अडमाप—न. १ वाजवी, सरळ, खऱ्या मापापेक्षां कमी अगर जास्त असलेलें असें अघळेंमघळें माप (सव्वातीन शेरी किंवा साडेतीन शेरी पायली हें अडमाप). २ दिडकें माप! ३ (ल.)खोटें माप. –वि. प्रमाणशीर–बद्द नसलेला; अडबंक. [सं. अर्ध किंवा का. अड्ड= आडवेंतिडवें + मापन]. **अडमापानें मोजणें**—बेसुमार, गैरशिस्त अंदाज बांधणें, अपेक्षा करणें; फाजील आशा धरणें.

अॅडमिनिस्ट्रेटर—पु. १ कारभारी; वहिवाटदार; (राज्य) कारभार चालविणारा; व्यवस्थापक. २ (कायदा) मयताच्या इस्टेटीची व्यवस्था पाहणारा (अधिकारी, इसम). [इं.]

अॅडमिनिस्ट्रेशन—न कारभार; व्यवस्था. राज्यकारभार. राजशासन. [इं.]

अॅडमिरल—पु. १ आरमारावरचा मुख्याधिकारी 'जपानचें अॅडमिरल यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला' –के १७-६-३०.

अॅडमिशन—न प्रवेश (शाळात वगैरे); प्रवेश करण्यास मोकळीक. [इं.]

अडमुठ—स्त्री. डोंगराळ शेतांत, जेथें नागर चालत नाहीं तेथे मुठीनें धान्य पेरण्याचा प्रकार. [आड+मूठ]

अडमु(मू)ठी—वि. मुलभ; सहज; अनायासें; न कळत 'तेंचें आम्हां तुम्हां जाहलें। जे आडमुठीं तत्त्व फावलें॥' –ज्ञा ६.४

अडमुशी, अडमुसा–वि. १ गुदमरण्याच्या स्थितींत असलेला गुदमरून गेलेला; श्वास कोंडल्यामुळे व्याकूळ झालेला २ गठडी वळलेला (तापामुळें). (क्रि० पडणें, होणें). [सं. अर्ध+मुह्]

अडमुसणें—अकि. १ गुदमरणें; घाबरा होणें; जीव कोंडल्यासारखा होणें. २ (तापामुळें) गठडी वळणें. अडमुशी होणें. [सं. [अर्ध+मुह्]

अडमुळीं—क्रिवि. अकस्मात. – शर

अडमूट(ठ)—वि.अडमुठा, अडमुद्रा, अडमुठ्या, अडमोट–ठ्ठें इतर रूपें. १ अडाणी. अडदांड मूर्ख. गांढवळ २ पोऱ्या; आड बाप्या. [सं. अर्द्ध+मूढ का. अडमुड्]

अडमूठ–ठा—वि. मुठींत न मावणारा आटपशीर न समणारा वेडावांकडा; बोजड अकुशल [अर्ध+मुष्टि]

अडमोरी—क्रिवि. बाजूस तोंड करून. तोंड फिरवून; **अडमोर** पहा 'शिवतां नये म्हणून माजघरामधें अडमोरी बसले।' –पल ११ [सं. अर्धः का अड्ड+मोहन (मुख)]

अडल—स्त्री अडचण. प्रतिबंध; आडल पहा. 'नानापुत्रा चेया अडला।' –उषा ३५. 'दिशा झालिया सानुकूल। मधील गेले माया अडल।' –सिसं ३.५१. [अड]

अडल—स्त्री अडथा. बदकाची एक जात [सं. अटिल; प्रा अडिल्ल]

अडलंड—वि १ (प्रां) प्रसंगी आडवा किंवा विरुद्ध बाजूचा होणारा; गरजेच्या वेळीं धोका देणारा. संकटप्रसंगीं सोडणारा तोंडघशीं पाडणारा (इसम, घोडा) २ हेकट. हट्टी कटकट्या अडतट्टू. [अड्ड+लेंड तुच्छतादर्शक प्रत्यय]

अडला, अडलाऊ—पु.स्त्री.न. (बायकांचें) एक शस्त्र. विळी कोयती. (गो.) आडोळी. 'कीं प्रमदाचा बळिया। अडलाळें तो॥ –शिशु २६४. (सामान्यतः) शस्त्र. आडाल पहा [सं. अड्ड=हल्ला करणें]

अडलाओ, अडलाव—पु.संरक्षण;पाठीराखेपणा. 'तूं धर्माचा कुढावा। तरि तेयांचा अडलाओ करावा।' –शिशु ४९१. [अ (आ) ड+लावणें]

अडली—नोकर; नैनातीतील मनुष्य; ऑडेली (अप.) पहा.

अडलेपण—न. १ हट्ट. 'जीव अति अडलेपणें। जे मागे मज कारणें।' –एभा १३.१५३. २ संकटांत सांपडणें. 'जीव अत्यंत अडलेपणे। ईश्वरासि 'धांवधांव' म्हणे।' –एभा ११.१७२

अडव—न. जंगल; अरण्य. 'तरि वाघाचिये अडवे॥' –ज्ञा १३.७६३. [सं. अटवी; प्रा अडवी]

अडव—न. शेतांत उपटून ठेवलेले हरभऱ्याचे झाहले. गोपें मुठींत मावेलशी (हरभऱ्याची) पेंढी. [आडवा]

अडव–पु. १ अडचण; अटकाव; प्रतिबंध. २ परीक्षा; कसोटी. –सोहिमह. [अडविणें]

अडवंकी–गी—स्त्री. १ अडसर; खीळ. 'नवद्वारांचिया चौचकीं। बाणूनि संयमाची आडवंकी ॥' –ज्ञा १२.५२. २ अडथळा. अडकाठी. [का. अड+वंकी=आंकडा]

अडवट–ठ—न. १ बीन तासींव–घडींव अनघड तुळई; तुलईच्या उपयोगी लांकूड; आडवें–मोठें लांकूड; आडवा सोट २ आडवी तुळई लाट, गज. ३ विणलेल्या कापडांतील आडवे धागे; आडवीण. ४ गोणीच्या दोन्ही तोंडांमधील–बैलाच्या पाठीवरील पट्टी. ५ गाडीची खरडी; उतरंडीवरून जातांना घसरूं नये म्हणून गाडीच्या मागच्या चाकांना घांसण्यासारखी एक आडवी काठी टांगतात ती. –पु. नथचा मधला भाग– त्यांतील दोन मोत्यें. [का. अड्ड= आडवी+सं. वर्त–वट्ट–वट]

अडवण—स्त्री. न. १ अडवणूक. अडथळा. हरकत प्रतिकार २ अडचण; अडथळा करणारी किंवा थांबविणारी कोणतीहि वस्तु; अडकण; आडकाठी; उटी

अडवण–स्त्री अडवी वीण; आडवीण. पूरण; वाणा (उभवण किंवा ताणा यांच्या उलट). [अड=आडवा+वीण]

अडवणी—स्त्री. (नाविक) १ अव. गलबताच्या दोन फळ्यांनां जोडणारे सरळ वळ किंवा आडव्या रांगा. २ एकंद. समुद्राच्या पाण्याच्या झडीकरितां गलबताच्या दोहों बाजूंस बांधलेली लांकडी साटी. [का. अड्ड+सं. वर्ती]

अडवणूक, अडवाई—स्त्री. १ अडवण. थोपविणें; थांबविणें; अडथळा; हरकत. प्रतिबंध; अटकाव. २ (विप्र. अडवणूक)बहिष्कार: निःशस्त्र प्रतिकार; सत्याग्रह ' अडवणुकीच्या मार्गानेंच सरकारास लोकांनीं वठणीवर आणले पाहिजे.' –टि. ३.१९९. [अडविणें]

अडवण्या—स्त्री. अव ज्येष्ठा नक्षत्र व त्या नक्षत्रांत पडणारा पाऊस. [अड+ सं वन–वण=पाणी]

अडवण्या, अडवंता—वि. थोपविणारा 'किंवा अडथळा करणारा; अडविणारा. [अडविणें]

अडवर्णाचा—वि. आडवर्णाचा पहा.

अडवा–वें—वि. १ उभा नव्हे तो; तिर्यग्; क्षितिजसमांतर पातळींतील. २ रुंद (उभा=लांब याच्या उलट). ' तो अंगानें अडवा आहे.' ३ तिरपा; वांकडा; आड. ५ विरुद्ध; प्रतिकूल; उल्टा; तुकसानकारक असा. ' त्यांचें दैव अडवें आलें.' ४ प्रतिबंध करणारा. –क्रिवि. बाजूनें; बाजूवर; सामोरा. **०करणें**–आड आणणें; करणें. **०ठाकणें–भेटणें**–स्त्री येणें; अडथळा करणें. **०येणें**–१ गांठणें; भेटणें; मार्गांत येणें. २ विरुद्ध जाणें; नाउमेद करणें; प्रतिबंध करणें. 'हा आडवा येईल कोण पाहो।' –सारु ८.२९. ३ (विप्र. अडवें येणें) गर्भांतील मुलानें सरळ न येतां प्रसूतिद्वारासीं वांकडे होणें; अडून रहाणें. **म्हo** (ल.) ' आडवें आलें असतां कापून काढावें '=मार्गांत कोणी जबर दस्त अडथळा आणला तर त्याचा प्रथम नाश केलाच पाहिजे. ' लोक म्हणती आडवें आलें। खांडून काढा ॥ ' –दा ३.१.४०. ४ सामोरें जाणें; स्वागत करणें. **०घेणें**–१ दोषैकदृष्टीनें पाहणें; वांकडें घेणें; शंका घेणें. २ खरडपट्टी काढणें (विप्र.) आडवातिडवा घेणें. ३ मुलाला पाजणें. **०जाणें**–१ रस्ता ओलांडून जाणें. २ सामोरें जाणें. ३ हरकत करणें. **०टाकणें**–ओलांडणें. ' त्यांचें घर आडवे टाकून जा. ' **०झेलणें–झोकणें–टाकणें–देणें**–धोंडा, गोळा, वीट, घागर इ० वस्तू एका रांगेने उभे राहिलेल्या लोकांच्या हातांतून एकाकडून दुसऱ्याकडे अशा देणें, नेणें. (अडवें) **नेसणें–लावून घेणें**–(बायकी)लहान वस्त्र, तात्पुरते (स्नान किंवा वस्त्रांतर करतांना) गुंडाळणें, वेढून घेणें; उभें घेणें. **०पडणें**–१ भांडणतंटा तोडण्यास मध्ये पडणें. तडजोड करूं पहाणें. २ लोटांगण घालणें; दयेची याचना करणें; उद्दिष्ट कार्य थांबविण्याविषयीं विनंति करणें. ३ विघ्न–विरोध करणें. **०बोलणें**–१ मुद्दा सोडून बोलणें. २ वांकडे बोलणें; लावून बोलणें; विरुद्ध बोलणें. ' म्हणोनि घडलें बोलणें आडवें ॥ ' –दावि १३५. **०लावणें**–१ परत पाठविणें. २ वस्त्रांतर करतांना किंवा स्नान करतांना आंखुड वस्त्र नेसणें; वस्त्र अपुरें व मैल नेसणें; उभें–आडवें नेसणें. ३ वांकडा अर्थ घेणें· बोल लावणें; निर्भत्सना करणें; अडथळे उपस्थित करणें. **०होणें**–१ (जमीनीवर) आंग टाकून लोळणें–निजणें; कलंडणें. २ (ल.) खालीं पडणें, ३ लढ होणें. ४ आड येणें; मध्ये येणें. **अडव्या अंगाचा–काठीचा–वांध्याचा–हाताचा**–१ लढ. २ उंचीपेक्षां जास्त रुंद; आडवा वाढलेला. **अडव्या जिभेचा**—वांकडेतिकडें बोलणारा; दुर्भाषण करणारा; भांडखोर. **अडव्या सुडक्याची बायको–रांड**–अत्यंत दीन, दुर्बल (विधवेबद्दल किंवा एकाद्या बाईबद्दल बोलतांना ग्राम्य शिवी). ' तूं लहान झालास तरी पुरुष आणि मी मोठी झाल्यें तरी अ० बायको. माझे हातून काय दरबारांत बोलवेल ?' **अडव्या हातानें देणें** (**हातीं देणें**)–लांच देणें. **अडव्या हातानें घेणें**–(ना) खरडपट्टी काढणें. **अडव्यांत शिरणें**–१ वाम मार्गाचा अवलंब करणें; सरळ रस्ता सोडून जाणें. २ वांकडें बोलणें; विषयांतर करणें.

अडवाअडव—स्त्री. १ एकदम जोरानें अडथळा करणें. २ त्रास देऊन बेजार करणें; तगादा, निकड लावणें.

अडवा उभा—वि. क्षितिजसमांतर व उर्ध्वाधर; अडवा व उभा; उंच व लांबट; पसरलेला व ताठउभा; वांकडा व सरळ.

अडवाट—आडवाट पहा.

अडवातिडवा—वि.वांकडातिकडा; कांहींसा तिरकस, बांकदार. **०फुटणें**–वांकडेतिकडें, कुरूप व वेडौल वाढणें–होणें–बनणें (शरीर, झाड). [का. अड्ड+सं. तिर्यक्]

अडवारा—पु. आडवारा पहा.

अडवाल-ळ, अडिवाळ—वि. अडेल; हट्टी. हेकेखोर (मुलें). [का. अड्ड+वाल प्रत्यय. तुल० मस्त-वाल]

अडविणें—सक्रि. थोपविणें; थांबविणें; हरकत, अडथळा, अटकाव करणें; प्रतिबंध करणें. [अडणें]

अडवी—स्त्री. १ लहान अडणा; आडखिळी; गज. गराद (दाराचा-खिडकीचा). २ अडवा, अडवें पहा. [अडवा] ०**पालखी**—स्त्री. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनां पालखीच्या दांडयांचीं टोकें करून पालखी आडवी नेण्याचा मान. हा मान दंगेखोरांच्या शेकऱ्यांचा आहे.

अडवी—स्त्री. अटवी; रान; आडमार्ग; अरण्य. 'आडघु ज्ञानुडें आडवीं। मग आढघता जेवीं हारवी ॥'—ज्ञा १३.२०५. [सं. अटवी]

अडवीज—वि. (गो.) बेकार· निकामटेकडा. 'तूं आंगी राव: तों पडला अडवीज'.

अडवें—न. (कों.) (विप्र.) उडवें: उडवी पहा.

अडवेउभें—न. वांकडया मसलीं-वेत. लव्हाडीचे डाव. कुवेडे. [आडवा+उभा]. **अडवें पाणी**—न. (शेतवागायतीना) नव्या, विहिरी, तळीं इ०चें पाणी-पावसाचें नव्हे. अडव्या पाण्याचा-लें असेहि प्रयोग प्रचारांत आढळतात.

अडवेळ—स्त्री. १ मुख्य वेळ सोडून दुसरा समय; अवेळ. २ सूर्यास्तापूर्वी घटिका दोन घटिका दिवस: संध्याकाळीं मुलें जेवतात तो काळ.

ॲडव्हान्स—पु. पैसे-रक्कम अगाऊ देणें; आगप; तसलमात; उचल. [इं.]

ॲडव्होकेट—पु. वकील. [इं.]

अडशेरी, अडिश्री—स्त्री. १ अडीच शेरांचें माप-वजन: (पूर्वी पांच शेरांची पायली असे त्याचा अर्धा. २ (हल्लीं) अधोली, अर्धीपायली. ३ नोकरांस दररोज किंवा महिन्याच्या महिन्याला दिलें जाणारें धान्य; मासिक वेतन; मजूरी (एका दिवसाचा २॥ शेर वजनाचा शिधा, भत्ता यावरून). [अडीच+शेर सं. अर्धतृतीय; अडीच]

अडस—वि. १ अडचण; घट्ट; गच्च; आवळ; मजबूत बसणारी (खुंटी; खिळा वगैरे). २ (ज्यांत खिळा वगैरे गच्च बसतो असें) बारीक; चिवळ (भोंक, बीळ, छिद्र वगैरे). ३ आटोपशीर. 'तेंणें परवटा वरिया अडस।' —उषा २९; 'स्वरुपाची अडस ठेवण।' —प्र १०५. ४ अडथळा करणारें. 'न संगे तयाचा अतिसो। ग्रंथोक्ती तेज आडसो। घालितासी कां॥' —ज्ञा १३.६३३. [का. अडसु=कोंबणें, खेंचणें]. **-सी, ०खोर-तट्टू**—वि. हट्टी; दुराग्रही; अडेल-तट्टू.

अडसट—अडसष्ट पहा.

अडसटणें—सक्रि. (क.) अंदाज करणें: कच्चा खर्डा काढणें: अदमास पाहणें; अडसट्टा पहा.

अडसण—न. पाखडलेलें किंवा पाखडण्याकरितां सुपांत ठेवलेलें धान्य. [ते. का. अडि-अडुसु=माती+सण्=फेंकणें ?].

अडसण—न. खळ्याळ गाईम्हशींची धार काढण्यासाठीं तिच्या भोंवती बांधलेल्या अडव्या काठ्या· अडचीं. [अडचण]

अडसणी—स्त्री. (गो.) आच्छादन. 'त्ये तेर अडसणी घालून दवर.' -त्यांच्यावर आच्छादन घालून ठेव. [अडोसा]

अडसणें—सक्रि. सुपानें पाखडणें· निवडणें; निवड करणें 'आड सोनी शुद्ध करी वो साजणी।' —तुगा २६१ [अडसण]

अडसणें—सक्रि. १ फांद्या तोडणें· छाटणें· खडसणें. २ आधार लणें घर बांधणें· करणें. —अक्रि. ३ रुसून बसणें अडून रहाणें; हट्ट धरणें. ४ आड बसणें लपणें आश्रय करणें. 'आडसुनि अंधारी खद्योत दीप्तिशि धरी.—अमृ ७.२. ५(व) मानास चढणें; ताठणें; गर्व धरणें. 'इतका अडसूं नको एवढयांतच.' [अडस]

अडसणें—अक्रि. अडचणें पहा.

अडसंधी—स्त्री १ जांघ (मांडीच्या मुळाशीं असणारा भाग) (के) कांख, कानाच्या मागील जागा इ० शरीरावरच्या अडचणीच्या जागापैकीं. २ अडचणीची जागा. ३ रिकामा वेळ. ४ संकट· आपत्ति ५ (गो.) अडगळ. [अड+संधि]

अडसभडस—वि. १ कांहींतरी चरबट; रुक्ष. 'साधुसंत अडभडस। न खाती कां प्रश्न। दावि २७३. २ यथेष्ट; भरपूर. [अड द्वि.]

अडसर—पु. आडसर पहा.

अडसष्ठ—वि. ६८ ही संख्या. [सं. अष्टषष्टि: प्रा. अडसठ्ठी; हिं. अठसठ]

अडसांगड-डी—स्त्री. १ लहान सांगड ताफा-तर. 'मो विस्तीर्ण पात्र तें सुजाउद्वला यानें अडसांगडीनें रिकामें यावें जावें -भाव ६४. २ पोहणाऱ्याकरितां केलेला (दोन जोडलेले भोपरे इ०चा) ताफा. [सं. अर्ध+सांगड]

अडसांगडी-ड्या—वि. अडसांगड चालविणारा. २ सांग न घेतां पोहणारा.

अडसांगडीं—क्रिवि. सांगड न घेतां सांगडीवांचून: (उतरणें· जाणें-पोहणें).

अडसाळ—न. (बे.) कुळवाचें आडवें लांकूड (का.).

अडसुडी—पु. (कर.) गुळव्याच्या हातासाठीं काम करणारा

अडसून खडसून—क्रिवि. हडसून खडसून; दाटून दबकावून स्पष्टपणें; बजावून. [हडसणें-खडसणें]

अडसो—अडस पहा.

अडहतेर-हत्यार—न. किरकोळ शस्त्र, (बंदुक, तोफ व सारख्या अन्याखेरीज इतर कोणत्याहि हत्याराला हें नांव कोण लावितात. तरवार, बंदूक इ० खेरीज खंजीर, कटयार, पेशकब्ज वगैरे). [सं. अर्ध+हत्यार]

अडहतेरी-हत्यारी—वि. अडहत्यार बाळगणारा (पूर्वीच्या फौजेत सरकारी शिपायांखेरीज अमे निराळे शिपाई लोक असत)

अडळ-ळ—पु. (नांगऱ्यानें ह्यातील धरण्याची) नांगराच्या रुमणीची खुंटी-दांडा [सं. हर्दी=लांकडाची बेडी ?-का. अड्-अड =अडवा]

अडळ—पु. १ अडल पहा. २ साध्य, मदत. ३ पृथकपणा. ४ विकल्प. [अड]

अडळ—पु शोध; आढळ पहा

अडळ—पु. एक सुमुहूर्त. [?]

अडळ—पु परिमळ ?-शर

अडळणें—अक्रि. अडखळणे [अड-ळ]

अडाअड—स्त्री मोठा अडथळा; खोळंबा; अडचण; अटकाव. -नागा १०२२ (क्रि० करणें-घालणें-होणें). [अड+अड]

अडाअड—अडाडी पहा.

अडांख—पु. अज रेघ; हिशेबाच्या कागदावरील आंकड्यावरून ओढलेली रेघ अज पहा. [अड+अंक] **०ताळा**—वेरीज बरोबर आहे कीं नाहीं हें पाहण्याची रीत प्रथम आडव्या रकान्यांतील रकमांची वेरीज करून ती उभ्या रकान्यांतील रकमांच्या बेरजेशीं बरोबर आहे किंवा नाहीं हें ताडून पाहणें

अडाखा—पु. १ मेळ; ताळा; ठोकताळा. २ धोरण; युक्ति. ३ एक ताळा पाहण्याची रीत. (रकान्यांतील सर्व रकमांच्या बेरजेतून शेवटच्या रकमेखेरीज सर्व रकमा एकामागून एक वजा करून राहिलेली संख्या शेवटच्या रकमेशी मिळते कीं नाहीं हें पाहणें; मिळत असल्यास वेरीज बरोबर). ४ ताळेबंद; तपशीलवार पत्रक. ' तुका म्हणे ताळा घातला अडाखीं । ' -तुगा १२३८. [अडांख].

अडाघडी—स्त्री. जगाची रचना. ' क्षणिक जाणून अडाघडी। वेगें लावी प्रेमाची शिडी।' -ह १९.७६. [अंड+घटना ?]

अडाडी—स्त्री. १ प्रतिबंध; अटक; 'तमी दाटती खद्योतकोडी । तेवीं अज्ञानीं कर्मांची आडाडी । ' -एभा २७.३९. २ उत्कंठा; घाई. ' होत डोळ्या आडाडी। अभिनव गोडी कृष्णाची॥' -एभा ३१.३०. ३ गर्दी; पसारा; रगाडा. ' सर्व धर्मांची आडाडी। घायेंवीण बापुडीं निमाली ॥ ' -एभा ११.११०४. [अड+अड].

अडाण—न १ शेती नसलेले किंवा न करणारे गांवकरी; शेतकऱ्यांउलट; बलुतेदारांपेक्षां हे निराळे. [सं. अज्ञान. का. अडनें] **० कबाड**—न. अडाण; खेड्यांतील कारागीर, व्यापारी, मजूर, कामकरी, इ० (शेतकरी नव्हे ते). (अडणारा; शेतकऱ्यांवर अवलंबून रहाणारा तो अडाणी-गांगा ८). [अडाण+कावाडी]. **०चोट**—वि. अडाणी; मंदबुद्धीचा; घोडचुकया करणारा; मद्दड. **०जात**—स्त्री. अशिक्षित, रानवट, जंगली लोक; रीतभात माहीत नसणारे. **०पट्टी**—स्त्री. शेतकरी व बलुतेदार या लोकांखेरीज बाकीच्या सर्व धंद्यांच्या व उद्योगी (अडाण) लोकांवर बसविलेला कर. अडाण-बाकी-वसुली वगैरे अशे सामानिक शब्द अनेक होतात. **०मत**—न. खेडवळ, विलक्षण, भलतेच विचार-समजूत-कल्पना वगैरे; हटवादीपणाचें मत; दांडेकमत. **०वस्ती**—स्त्री. बलुतेदार व शेतकरी यांवांचून बाकीच्या (अडाण) लोकांची खेड्यांतील अगर त्याच्या एकाद्या भागांतील वस्ती.

अडाण—न. कास; ओटी; अडण पहा. [सं. ऊधस्-न.; ग्री. औथर; ज. युटेर; इं. अडर.]

अडाण—न पाटबंधारा; बंधारा (डॅम). [अडण-णा]

अडाणा—पु. गायन शास्त्रांतील एक राग. ह्या रागास षडज, तीव्र ऋषभ, कोमल गंधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार वर्ज्य व अवरोहांत धैवत वर्ज्य. ह्याची जाति षाडव षाडव आहे वादी तार षडज व संवादी पंचम आहे. गानसमय रात्रीचा तिसरा प्रहर हा कानडा रागाचा एक प्रकार आहे.

अडाणा—पु १ अडची. अडमण पहा. २ उसाच्या चरकाला बैल जुंपण्याचा दांडा-लाट. ३ दरवाजाचा अडणा; अडसर. [अड]

अडाणी—वि. १ अकुशल, अनिपुण; अनभ्यस्त; कलाहीन (माणूस); रानटी; ग्राम्य; जंगली; असभ्य; अशिष्ट; उद्धट; खेडवळ (भाषा, रीतभात); ओबडधोबड; वेडीवांकडी (वस्तु, पदार्थ). २ अज्ञानी; न शिकलेला; विद्याहीन. ३ विगर शेतकरी; अडाण. ' थोड्याशा भांडवलावर व्याजवट्टा करणारे अडाणी त्यांचे दस्तैवज प्रपंचखर्चासाठीं होतात. ' -भांगा १६०. **म्ह०**—१ अडाणी कृणवी दुष्पट (दुणा) रावे. २ अडाण्याचा आला गाडा, वाटेवरच्या वेशी मोडा **०कबाडी**—पु. अव. १ अडाणकबाड पहा. २ (व.) पांढरपेशे; मजूर; कावाडकष्ट करणारे. ३ गांवढळ; टोणपे; वेडगळ. **०गांठ**—चुकीची निरगांठ; सहज सुटणारी चावेगांठ. **०जात**—स्त्री. रानटी, अबुज जात(पठाण वगैरे) [सं. अज्ञानी]

अडात-थ—पु. १ दरवाजा, फाटक, खिडकी इ० दारावर मजबुतीसाठीं खिळे मारून बसविलेला आडवा गज. २ बसावयाच्या पाटाखालील आडव्या पट्ट्या किंवा पाय. [का. अड+ सं. स्थ]

अडातुटी-डी—क्रिवि मधून मधून, थांबून; राहून राहून; केव्हांतरी; विसांवा घेत घेत. [सं. अर्द्ध+त्रुट्]

अडांबरी—पु. (कों.) नैर्ऋत्येकडून वाहणारा वारा. (हा आषाढाच्या सुमारास ४२ दिवस वाहतो.) [सं. आडंबर]

अडाव-वा—पु. सालअखेर देणेंघेणें इ० व्यवहाराच्या सर्व हिशेबाचा सर्व साधारण मेळ पाहण्याचा तक्ता; जमाखर्चाचें पत्रक-झाडा-तेरीज-ताळेबंद; अडाववंद, अडाववाकी, अडाववसूल, अडावसूट वगैरे कांहीं सामासिक शब्द. २ खर्चाचा कच्चा खर्डा.

अडावणी—स्त्री. अडचिणें; अडचणूक; अटक. 'त्याचें व आमचें तरांडयाची अडावणी केली.' –विवि ८.३ ५५.

अडाळा—(हट.) विळी; मोरळी; अडला पहा.

अडिंबा—पु अडसर (दारा–खिडकींचा). [का. अड्ड–अड+ए]

अडिंबा—पु संचार; वारे; योग 'शृंगाराचा अडिंबा।' –भाए १८० [सं. आटोप; प्रा. आडोव=आडंबर ?]

अडिवाळ—अडवाल पहा.

अडिशेरी–अडिश्री—अडशेरी पहा.

अडी—स्त्री (विप्र. अडी). फळें पिकविण्यासाठीं गवतांत घातलेले फळांचे थर या व इतर अर्थांसाठीं अडी पहा

अडी—स्त्री १ (व.) जमीन खोदून केलेली लांब चूल; चर (मेपाकाकरितां) २ अडसर. अट. प्रतिबंध 'गृहरक्षणार्थ कुलपें, कडया, कोयंडे, अडी, कठंड, मेहरावी आदिकरून. ... सर्व पदार्थ लोभेंवाचेंच करतात' –नाना मोरोजी, विधी ग्रं २२२ [अ (आ) ड]

अडी—स्त्री खळें मळणीची जागा.

अडीच—वि १ दोन आणि अर्धा २ वृद्धिबळाच्या खेळांतील घोडयाची दोन सरळ व एक आडवें घर अशा प्रकारची चाल [सं. अर्धतृतीय. प्रा. अड्ढाइज्ज (अर्धीच). पं. ढाई; गि.–हिं अढाई; बं. अढाई]. **०कीं**–न अव उजळणीचा प्रकार; शंभरापर्यंत अडचांचा पाढा. **०पेडी वेणी**–स्त्री दोन मोठे व मध्यें एक लहान पेड ठेवून घातलेली वेणी. ही वेणी चांगली बंद व आंवळ येऊन तिच्या माथील बाजूस पन्हळ पडतो. **०मासा**—पु (क. बे.) श्रावण धेवडा; हा २॥ महिन्यांनीं तयार होतो याला अडीच माशाची शेंग अशेंहि म्हणतात. [अडीच+मास=महिना].

अडीमांडी—स्त्री. आडमांड पहा.

अडील—वि. १ अडेल, हट्टी. हेकेखोर. स्वैरआचारी २ आश्रयास असणारा; आड दडलेला. –क्रिवि. आड; आश्रयार्थ पुढें. [अड–आड]

अडील—न. कोणी कोणी मनुष्याच्या शरीरांतून रात्रंदिवस एका तऱ्हेचें तेज निघत असतें तें –पवि. १२ [?]

अडीश्री—अडशेरी पहा

अडु—स्त्री. १ दोन तुळया अगर चिरेबंदी फरशी यांत मजबुतीसाठीं मारलेली लोखंडी पट्टी. २ वस्तु अडवून धरून कातरणारें यंत्र. ३ (व.) विहीर खणण्याची दीड फूट लांबीची मोठी छिणी; पाथरवटाचें एक हत्यार. [अड].

अडुक—वि. (कों.) तुरट; कडू.

अडुमाडू—न. माडू नांवाचें एक हत्यार. माडू पहा. –वि. १ (ल.) शूर; धीट; धाडशी. आडदांड (शिपायी, योद्धा, मारा वयास व मरावयास सिद्ध असा); (उप.) शेंदाडशिपाई; रगडमळ; वीरपीर; तिस्मारखान. २ दांडगा, जबरा, अतिहुशार–निपुण (लेखक, वक्ता इत्यादीबद्दल गौरवपर किंवा व्याजोक्तिपूर्वक). –शिवदि ४०८. [माडू द्वि.]

अडुमाडू—वि. अलवत्यागलवत्या; कोणीतरी. (माडू=करणें या कानडी शब्दावरून कोणी कानडीसारखें–न समजण्याजोगें बोलणारा). [का. माडु]

अडुसष्ठ—अडसष्ठ पहा.

अडुळसा—पु एक वनस्पति औषध, रंग, खत वगैरे कामा करितां याचा उपयोग करतात. जुनाट कफविकार, क्षय, दमा या रोगांवर या वनस्पतीचा चांगला उपयोग होतो याच्या पांदरा व काळा अशा दोन जाती आहेत. फुलें पांढरीं. –वगु [सं. अटरूष–अडळस, हिं अडूसा का आडसोगे गु. अरडुसो–अडुसी, ते० आडसार, आडापाकु; ता. आधडोडे ल. आधातोडा–वासिका]

अडू—पु अडु पहा शिवाय १ पिंजऱ्यांतील पक्ष्याची बसावयाची दांडी २ लाट; आडकाठी (लोकांनीं आंत घुसूं नये म्हणून देवळांत लोकांचे दांडे उभे करून त्याला आडवें लांकूड बसवतात ते). ३ एखाद्या वस्तूस बांधलेली दोरी मजबूत बसण्यासाठीं किंवा आंवळण्यासाठी जिनें पीळ देतात ती काठी ४ तरफ लावतांना उपयोगांत आणलेला दगड किंवा ठोकळा; उटाळी; टेंका –वि हट्टी. हेकेखोर, अडेल. [अड]

अडून—क्रिवि १ एकाद्याच्या आड उभें राहून किंवा एकाद्याच्या मागें लपून. २ एकाद्याच्या मध्यस्थीनें–करवीं; मार्फत [आड होऊन] **०गोळी मारणें**–आपण प्रत्यक्ष एकाद्याचें नुकसान न करता परभारें दुसऱ्याकडून करविणें. शिवाय 'अहाइन पहाइन' पहा. **०झडून**–क्रिवि. आइन. लपून छपून 'कोणी अडुनझडुन। अडचणींत दडुन। कोणी राहाती पडुन। खालती॥.' –प्रला २०५ [अइन द्वि] **०बोलणे**–अप्रत्यक्ष रीतीनें लागेलसें छद्मी बोलणें.

अडे—न (ना.) नदीकांठाजवळ असलेलें वावर

अडेक—वि. (गो.) गोण; बरकरणी [?]

अडेचा—वि. (गो.) कृत्रिम; उसना 'निजा ते निजाचें, अडे तें अडेचें.'

अडेजाववडेजाव—पु वडेजाव पहा. [वडेजाव द्वि]

अडेवाटको—वि (गो.) नवशिक्या. [अडेक]

अडेल—वि. अडखोर; हट्टी; दुराग्रही; हेकेखोर; अडून बसणारा; खलेल [अड]. **०गुण**–पु. अटचणीची–संकटमय-स्थिति. तारवेळ. 'कोणाचा अडेलगुण पाहूं नये.' **०तट्टू**–न हट्टी, हेकेखोर; अडेल माणूस.

अडेशिरी—(गो.) आहार; खाणें; अडशेरी पहा. 'अडेशिरी कितेंय पडल्याबगर तों केन्नाच हालचों ना'

अडेसरी—अडशेरी पहा.

अडोंगीं—क्रिवि. एका-आडबाजूस; एका बाजूनें आडमार्गानें; सरळ रस्ता सोडून. [का. अडंगु=लपणें]

अडोपर—स्त्री. १ अटकाव; अडथळा; प्रतिबंध. विरोध; हरकत; अडवणूक. (क्रि० करणें–दाखविणें–लावणें). **म्ह०** महाराची अडोपर वेशीपाशीं (आपणाला जे मागावयाचें तें महार वेस अडवून मागतो) २ आग्रह करणें–धरणें. पाठीस लागणें; पिच्छा पुरविणें. ३ अडून बसणें; खनपटीस बसणें, एकच धरून बसणें. (क्रि० दाखविणें–धरणें–लावणें). ४ खबदी, हरकती पुढें आणणें; शंका काढणें; कठिण करून ठेवणें. (क्रि० धरणें) ५ गरज: नसलें तर अडेल अशी स्थिति. जरूरी. ' आज चांदणें पडलें आहे केदिलाची अडोपर नाहीं.' ६ (सामान्यतः) गुंता· रुद्धता: प्रतिबद्धता: अगतिकपणा. (क्रि० पडणें–लागणें–होणें). [अड+पर प्रत्यय !]

अडोशीपडोशी—वि. जवळपासचा; शेजारपाजारचा, आसपासचा. ' गोपाळरावांचे अडोशीपडोशी लोक पकडून कैदेत घातले तेव्हां त्याचा राग थोडासा शांत झाला. ' –विक्षिप्त १.१३. [सं. प्रातिवेशिक; प्रा. पडवेसिअ; हिं. पडोसी. पडोशी द्वि. हि. अडोसपडोस; गु. अडोसीपडोसी]

अडोशींपडोशीं—क्रिवि. आसपास; आसमंतात: आजूबाजूस.

अडोसा—पु. आडपडदा; आच्छादन; आडबाजू करण्याकरितां उभारलेला कूड: दृष्टीस प्रतिबंध करण्यासाठीं केलेली पडद्यासारखी योजना: आसरा. (क्रि० करणें–घेणें–देणें). [अड्+सं. वस्]

अडोळणें—आढळणें पहा

अडोळसा—अढळसा पहा.

अडोळा—पु आढें (धराचें). [सं अटाल; का अड्ड+ळा]

अड्डताल–अंपताल पहा.

अड्डा—पु. अखाडा पहा १ जूट, संघ. एकत्र जमाव समुदाय (गाडीवान, मजूर वगैरे विशिष्ट व्यवसायी लोकांचा); २ तळ; गोट; नाकें; खुंट· चव्हाटा; अखाडा; बाजारांतील देवघेव करण्याची जागा; प्रवासी लोकांची विसावा घेण्याची–मध्यंतरीं उतरण्याची जागा. ३ सतत किंवा मोठ्या प्रमाणावर चालणारा व्यवहार–उद्योग. जसें–गाण्याचा–नाचण्याचा–वादाचा अड्डा. ४ आखाडा; तालीम; रंगभूमि वगैरे शोकाचीं ठिकाणें. ५ आळशी किंवा व्यसनी लोकांची जमण्याची–शिळोप्याच्या गप्पा मारण्याची–जागा. [सं अड्ड: का. अडमु=जमणें. जमविणें. किंवा सं. अट्ट (हट्ट) =बाजार]

अड्डा—पु. (क) आग्रह: हट्ट. ' खाणें थोडें पण अड्डाच जास्त.' [अड–ट]

अड्डा—पु. आढ्यता: बाणा; प्रौढी; प्रतिष्ठा; फुशारकी. क्रि० बाळगणें–' अरे तूं शिपाइगिरीचा अड्डा बाळगतोस आणि चोर येतांच पळालास कां ? ' [सं. आढ्य; प्रा. अड्ढ]

अड्डा—पु. (विणकाम) फणीच्या चोया करण्याची सुरी. ही लांकडी ठोकळ्यांत बसविलेली असते. [तुल० ई अड्झ=एक कुऱ्हाड; म. अडला. सं. का. अड्ड=हाडा करणें]

अड्डावणें—अक्रि. ओरडणें; बोंबलणें. [सं. अट्ट+आरव]

अड्डितचारी, अड्डितभौमि—स्त्री. (नृत्य) उजवा पाय नुसत्या बोटांवर उचलून तो एकदां डाव्या पायाच्यापुढें व एकदां मागें असा त्याला अगदीं चिकटून ठेवणें. [सं.]

अड्डेकरी—पु अड्डा ठेवणारा इसम किंवा अड्ड्याचा मालक.

अड्डेबाज—वि अड्ड्यावर जाणारा: अड्ड्यांत पडून असणारा.

अड्डेबाज, अड्डेबाइक—वि. टेंभा–प्रौढी–डौल मिरवणारा. [अड्डा+फा. बाख्तन=खेळणें]

अड्डयाल—वि. अलीकडील इकडील. –क्रिवि. ह्या बाजूला; अलीकडे: इकडच्या बाजूला–अंगाला. 'आमचें शेत नदीच्या अड्डयालच आहे.' [प्रा. अड्ड=हा, ही, हे+ल]. **०पड्याल**–अलीकडे पलीकडे. [तुल० आयल+पयल]

अड्डयाळू—पु. (व.) लांकडी नांगराम मागच्या बाजूस हातीं धरण्याकरितां वीत दीड वीत लांबीचा एक खुंटा असतो तो. [अड+आळू प्रत्यय]

अड्रेस—पु. १ भाषण; व्याख्यान. २ पत्ता: मायना. [इं.]

अढेच—वि मोठा; थोर. ' अढेच अचाट ऋषीदेवघाटे.' –दावि ३३३. [आढ्य+अंत्र !]

अढण—स्त्री सुपाच्या तोंडाशीं असणारी कांबटी: अडण २ पहा.

अढल—वि. अढळ: हुशार: वाकबगार. ' अढलाचे बरकंदाज.' –समारो २.१८७

अढळ—पु १ आढळ. थांग: पत्ता. शोध; भेट; उपलब्धि. 'त्या श्लोकाचा मला पूर्वी अढळ झाला नव्हता. ' २ ज्ञानाचें-अनुभवाचें क्षेत्र; आटोका ' ही गोष्ट माझे अढळांत नाहीं.' [आढळणें]

अढळ—न. अविनाशपद; स्थिरपद; मोक्ष. ' शरण येती त्यांचे न विचारिंगी दोष। न मागतां त्यांस अढळ दसी ॥' –तुगा ८९८ –वि. १ अचल; कायम; स्थिर; दृढ. 'तेंचि प्रमेय एकवेळ । शिष्यीं होआवया अढळ । ' –ज्ञा १८.१२३८. २ खरा; खात्रीचा. ' हा बोलु तुझा कीर अढळु । मातें आम्ही ॥ ' –ज्ञा ११.४९१. [सं. अटल=स्थिर; प्रा. ढल्=पडणें; हिं. अटल]. **०पद**–न. अचल, निश्चल, कायम असें स्थान; स्थिरपद; कोठल्याहि गोष्टीमुळें जें जाण्याची-ढळण्याची भीति नाहीं असें स्थान-पद. (ध्रुवताऱ्याच्या किंवा नक्षत्रांच्या अचलपणाला तसेंच स्वर्गांतील वैकुंठादि स्थानांना हा शब्द वापरतात).

अढळ—न. १ नशीब. प्राक्तन. 'वैद्य म्हणती तये वेळीं । नव्हे बरवें यासि अढळीं । ' –गुरु ३०.४३. [सं. अटल]

अढळणें—अक्रि. अढळ होणें; भेटणें; दिसणें; सांपडणें; गवसणें; आढळणें; ज्ञानगोचर होणें; लक्षांत येणें. [आढळणें]

अढा—पु. १ काठी, खांब वगैरेभोंवतीं घातलेला दोरीचा वळसा, विळखा. २ दोरीचा फासा, अंडी; दुमड; पेंच. ' मी वावडी तूं एक सडा नको मारूं आढा. ' –सभा २. ३ अव.नी उपयोग–अंढे; अंढपारडें पहा. [का. अट्ट]

अढाउ(ऊ)—पु. १ आढाव: सैन्यांत एक प्रकारची वरची बाळगणारा आड हत्यारी शिपाई: सामान्यतः सैनिक; शिपाई. ' भीतरी परवडी आढावाची। शस्त्रें उघडीं होतीं त्यांचीं । ' –एरुस्व ६.५१. २ सैन्यांतील परिचारक: जखमी झालेल्यांची सेवाचाकरी करणारा. ॲब्युलन्समधील माणूस. ' अढाउ–कीं लोट्सी नेला । काठीचीये मानेवरी ॥ ' –उषा १६ [सं. अधिधारिक- अइहाइअ–आढाअ–अढाऊ]

अढाऊ—वि. (व.) १ वरमाप, लवाड. ' ही जात जात्या फार अढाऊ, कितीहि समजुतीच्या गोष्टी सांगा पण डोक्यांत उजेड म्हणून कसा पडणार नाहीं. ' २ द्वाड: उनाड, मुखे. ३ न घेरतां आपोआप उगवणारा. मेहनत न करतां उत्पन्न होणारा. ' हीं झाडें अढाऊच उगवलीं आहेत. ' [का. अड्ड–अड–अढव]

अढाचौताल—पु. एक ताल: आडा चौताल पहा. [हिं.]

अढाल—स्त्री. ढाल: निशाण: ॲडा. ' फडकती तडकेचि अढाला । ' –दावि ३७९.

अढाव—अढाऊ पहा

अढाव(वा)—पु अढाव पहा

अढावेढा—पु. १ अढा पहा. २ आळा; प्रतिबंध; आडकाठी. ' जिव्हेला अढावेढा असला म्हणजे मूर्खास बरा. ' [अढा+वेढा].

पायाला अढावेढा—पायांत पाय (घालणें–घुटमळणें).

अढाळ—वि. (कों) अतिशय मोठें (पात्र, गृह इ०)–न. मोठें स्थान (सिंहासन, अर्धासन). ' जे आदरिलें अढाळ । राजाश्रियेचें । ' –शिशु ७२९. [सं. आधा (न)+आल=मोठें किंवा अर्धालय=अर्धासन]

अढी—स्त्री. फळें पिकविण्यासाठी गवतांत घालून ठेवण्याची केलेली योजना. **अढींत उतरणें**–अशा रीतीनें पिकणें [का. अड्डि=पक्वदशा]

अढी—स्त्री. रास: ढीग. [का. अडकु=ढीग करणें. ते. अड=ढीग: सं. आढय ?]

अढी—स्त्री. १ पायावर पाय ठेवून, तिडा देऊन बसण्याची रीत. २ फाल्गुन अमावास्येच्या दिवशीं शकुन पाहून भविष्य सांगण्याची एक रीति (ग्रामजोशी त्या दिवशीं देवलांत अठरा धान्यें निरनिराळ्या भोंकांत घालून त्यावर पानें झांकण घालतो. दुसऱ्या दिवशीं जें पान ओलसर झालें असेल त्या धान्याची पुढील सालीं सुबत्ता होणार असें भाकित करतो). ३ धान्याच्या राशीवर कडब्याच्या पेंढ्या घालून केलेलें छप्पर. ४ (कों.) गाई, म्हशी यांचें दूध काढतांना त्यांना घालण्यांत येणारा भाला. ५ (गो.) चिरकामासाठीं केलेली योजना. ६ दोरीचा वेढा, विळखा, दुमड; मुरड, गुंता: अढा पहा. (ल.) अडचण: बांधा. नड. ' ऐशिया निरूपण घडमोडी । तुझेनि बोलें पडे अढी । ' –एभा २०.५६. (क्रि० उलगडणें, पडणें) ७ तेढ; मनांतील गांठ; विपरीत ग्रह; अनिष्ट शंका– विचार; रुखवा. (क्रि० धरणें, पडणें). ' कां मनि धरिली अढी । ' ८ कपाळावरील सुरकुती वळी. ' भृकुटिये आढी घालोन। –रावि १०.३९. ९ व्हाट गाडग्यामधील रव्यांच्या वरील आडवें लांकूड (यावर माळ टाकलेली असते). १० मिठी. ' चरणीं घालनियां अढी । कोंगव गजानें पै ओढी ॥ ' –मुआ ५. १०८. ११ (व.) स्वयंपाकासाठीं खणलेला चर [का. अड्ड= आडवे: अडें=धीरा, टेका] **०खोर**–वि. मनांत तेढ बाळगणारा; खुनशी. **०मारून निजणें**–अक्रि. डोक्याखालीं व पायाखालून पांघरूण दुमडून घेऊन निजणें; पांघरूण गुरफटून घेऊन निजणें.

अढी—स्त्री., पूजेचा एक विचित्र प्रकार (बार्शी सोलापूरकडे ब्राह्मणांत दुंगणाची पूजा करण्याची चाल आहे; तसेंच खंडोबाच्या दुंगणाची पूजा करण्याची चाल अजून कांहीं ठिकाणीं आहे असें मांगतात). [सं. आधि ?]

अढीच्यादिढीं—क्रिवि. अवाच्यासवा, अतिशयोक्तीनें. प्रमाणाबाहेर; उधळेपणानें, फाजील: बेसुमार (क्रि० बोलणें–वागणें). [दीड दि]

अढें—न. १ घराच्या छपरावरचें दोन्ही पाख्यांमधलें लांब लांकूड; अडोळा (अडाणा पहा). ' घरा पंच वासे असे एक आढें. ' –कथेसुच २. २ मानेच्या दोन्ही बाजूचा खांद्यावरील भाग (शरीराचा, अंगांत घालावयाच्या वस्त्राचा, स्त्रियांच्या चोळीचा). ३ दोन माणसांनीं चालवावयाची करवत. ४ एकादी वस्तु फिरविण्यासाठीं त्यांत खुपसलेला गज, दांडा. (जसें उंसाच्या चरकाच्या लाटा फिरविण्याकरितां बैल जोडण्याकरितां असलेलें लांब लांकूड; किंवा नांगर उठविण्याच्या यंत्रांतील (कापसन) दांडा). ५ चांभाराची कातडें बाळत घालण्याची आडवी दांडी तुळई. **एका अढ्या खालचा**–एका घरांतील-कुटुंबांतील. **अढ्याला पाय लावून निजणें**–किंवा झोंप घेणें=खुशाल, स्वस्थ पडणें; अत्यंत बेफिकिरपणें निजणें असणें. [का. अड-अड्ड]

अढें—न. कांस; ओटी (गाय, म्हैस इ० जनावराची).

अढेकड—पु. चाकाच्या अऱ्यांचीं दोन्ही टोकें सांधणारा आडवा तुकडा. [का. अड्ड+कड]

अढेपाट—पु अडथ्याचें लांकूड, अढें.

अढेपारडे (ढे)—पु. अव. जमीनीच्या उत्पन्नांतील गांवपाटलाचा हिस्सा: पाटलचि हक्क:—पाटलाच्या इनाम जमीनीला पासोडी व लग्नांतील त्याचा जो हिस्सा असतो त्याला शेलावाटी म्हणतात. सरकारांतून मिळणारा जो त्याचा पगार ती नेमणूक.

अढेवेढे—पु. अव. १ बेसूर आणि वेडयावांकडया ताना घेऊन केलेलें गायन. २ वांकडें तिकडें, आड फांटयाचे टाळाटाळीचे मुद्दे, हरकती, कांक्षा. ३ अेळपिळे; आडवे तिडवे वळसे. **०घेणें**—अक्रि. कांकें करणें; अडचणी हरकती उपस्थित करणें. [का. अड्ड-अढा (डी)+सं. वेष्टन वेढ]

अढ्या—पु. सूत काढण्यासाठीं किंवा मोकळें करण्यासाठीं ज्या दोन खुंट्यांभोंवतीं तें गुंडाळतात त्यांपैकीं प्रत्येक. [अंड]

अढ्याकरवत—पु. स्त्री. दोन्ही टोंकांस लाकडी मुठी असलेला दोघांनीं चालवावयाचा मोठा करवत, अंडे. [अढें+करवत]

अढ्याचौताल—पु एक ताल: आडाचौताल पहा. [हिं]

अणकुचीं—स्त्री टोंक:तीक्ष्ण बिंदु शेवट. 'त्याच्या (भोंड्याच्या) अणकोच्या झिजल्या.'—सूव ६१. [सं. अणि+का. कुचि=लवुता]

अणखर—पु. दूध काढतांना शेवटच्या जोरानें पिळाव्या लागणाऱ्या लहान धारा [अणि+क्षर ?]

अणखर—वि. १ बळकट; मजबूत; टिकाऊ;भक्कम, (लुगडें सणंग —विशेषत: नारायण पेठी कापडास, कारण तें पक्क्या रंग्याचें व टिकाऊ असतें, भरीव, शुद्ध धातूचे (दागिने). २ कठीण;कठोर; तडकाफडकी; रोख-ठोक; निर्भीड (भाषण वर्तन). ३ दु खग्रद-ममभेदी, खोंचदार भाषण-(वर्तमान-गोष्ट). ४ विलक्षण: चमत्कारिक: कधीं न घडणारी; अलौकिक [का. १ अणिवर=उत्कृष्टता, सुंदरता. वेतवात २ अणक=चेष्टा, निंदा]

अणखी—क्रिवि. १ अधिक; जास्त. शिवाय २ पुन्हां; परत. ' एकदां भेटीस गेलों होतों मग अणखी कशाला जाऊं ? ' —उअ. आणि; व. अणिक पहा. [सं. अन्यत्+क=अणिक]

अणगुरणें—अक्रि. दुधाचा पान्हा दाटल्यामुळें सड-आंचळ-ओटी ताठणें, तरारणें, फुगणें. ' गाय अणगुरली.' [सं अन्+क्षर. म. अणखर]

अणगट—स्त्री. न.१ (अंगापासूनची) फांदी; अणी: टोंक: अंकुर. ' विशिष्ट व्रतांचे फोक। धीराच्या अणगटीं तिख।'—ज्ञा १५. १९१. [सं. अंग+गत]

अणगें—न. (गो.) तंबाकूची मोठी मोट; अखें: गड्डा. ' तीणें पांच अणगीं विकलीं घेतल्यांत.' [का. अंडिग=अखें, अर्धी गोणी]

अणगु—वि. स्थूल, मोठा. ' अन्थूलु मी अणगू। जें कांहि तें मी। ' —ज्ञा १८. ११९१. तुल० ' स्थूलु मी अणु। जें कांहीं तें मी। ' —(वें) ज्ञा १८.११९७. [सं. अन+अणु]

अणणें, अणणावळ, अणवाई, अणाआण—आणणें पहा.

अणद्‌ळ—न. (ना.) ताम्हन. [?]

अणबुजणें—अक्रि. चमत्कारिक—नवल—आश्चर्य वाटणें. [अण बूज]

अणबूज—वि. १ परका; अपरिचित; नवीन. २ चमत्कारिक; आश्चर्यकारक. [सं. अन्+बुध् ; प्रा. अण+बुज्झ]

अणवट—पु. एक तऱ्हेचा रुपयाचा दागिना (पायांतील); पायाच्या आंगठ्यांत घालावयाचें जोडवें 'चटपट अणवट जोडव्याची झटपट, दाहीं बोटीं मेंदी रंगली।' —राला ६०. [वैदिक सं. अण्वी=बोट+वृत. किंवा अण्=शब्द करणें. का. आणी=बाटोळेपणा+वृत—वेढे ? गु अणवट].

अणवा—वि (गो.) १ न शोभणारा: हलक्या-कमी प्रतीचा. ' तां कित्या घेता ? तों सामकां अणवां. ' २ अव्यवहारी; अडाणी; मूर्ख [सं अणु+वत्]

अणवा, अणवाणी, (क.) **अणवाई**—क्रिवि. अणव्या—उवड्या पायानें; अनवाणी पहा.

अणस—न. (गो.) एक प्रकारचें भात [सं अणु. तुल० कणिस (कण+स)]

अणस—स्त्री. (गो.) लोखंडाचा वाळा. वेडें. उ० मुसळाची अणस. [का. आणि=वंतुळपणा].

अणसूट—अनसूट पहा. 'अणसूट निर्मल चार वाजी।' —वेगी स्व. ८.१०९.

अणा—आहणा पहा.

अणा-णी—पु.स्त्री आणा एक सोळांश रुपया: आणा पहा.

अणि-णी—स्त्री. १ टोंक; शेवटचा बिंदु: अग्र. ' कैसाच्या अगी इतकेंमुद्दां हटविणारा प्राणी मला संसारांत दिसत नाहीं. ' —पपप्रे १०५. २ अंकूर; अग्र (वृक्ष, पर्ण इ० चा) ३ ऐनवेळ; अणिवाणीची वेळ. 'अणी चुकली बारा वर्षांचा वायदा'=योग्य समय चुकला कीं बारा वर्षे काम होत नाहीं. ४ भोंवऱ्याची आर—अरी. ५ जोडयाचे बाकदार मुरडलेले टोंक ६ लगामाचें हातांत धरावयाचें टोंक—शेवट. ७ गाडीच्या आंसांत घालण्याची खीळ—खुंटी. [सं. अणि: ता. अणि=खीळ]. **०दार**—वि. अणकुचीदार, टोंक असणारें **०वाणी**—स्त्री. ऐनवेळ.

अणि-णी—उअ. आणि; शिवाय; अणखी. ' कदाचित् त्या देवी, अणि फणिमणीच्या पण मुळी। '—केक ३३.

अणिक-ख—उअ. (कवितेंत) आणखी, आणि. —वि. वेगळा: भिन्न; विशेष: दुसरा: अन्य. ' जेथील तेथें आणिकीं। कामा नये सर्वथा। '—दा ७.९.१५. [सं. अन्यत्+क; प्रा. अण्ण+क].

अणिमा—पु. स्त्री. १ अष्ट सिद्धींतील एक; अणु एवढा लहान; अष्टमहासिद्धि पहा. ' दिले अणिमादैश्वर्य अष्टगुण गा ! या '

मोअनु ६.५१. २ अणुत्व; अतिशय सूक्ष्मपणा, बारकाई. [सं. अणिमन्].

अणिमोल—अनमोल पहा.

अणिया—वि. अणीदार. 'पुढील अणिया भाले।' –उषा १४. –स्त्री. (गो.) गलबताच्या पुढचा (अणकुचीदार) भाग [सं अणि प्रा. अणिय=अग्रभाग].

अणियाळें—वि. अणीदार; अणकुचीदार; टोंकदार; तीक्ष्ण 'अणियाळिया दृष्टि।' –भाए ३६५., 'दीर्घ नासिक आणियाळें।' –एभा १४.४७५. [सं. अणि+आलच्]

अर्णाक, अर्णाकु—अणिक पहा उ अर्णाक प्रकार, अर्णाक विध.

अर्णाकसा—वि. विलक्षण; असाधारण असामान्य. चमत्कारिक. [सं. अन्यत्र+क+सदृश; म अणिक+सा]

अर्णाबार्णा—स्त्री. १ गमार्दी–शोभाची स्थिति, क्षुब्धता, हमरी–तुमरीवर येण्याची अवस्था (क्रि० येणे) मी खूळीत बोलत असतां तूं अर्णाबार्णावर येतोस हें काय?' २ कार्य सिद्ध होण्याची जवळ आलेली स्थिति, ऐनप्रसंग. सोक्षमोक्षाचीवेळ. 'आमची पंचाईत अर्णाबार्णीस आली' ३ निकडीचा, कठीण प्रसंग–समय. 'त्याची अर्णाबार्णी म्यां संभाळली.' [अर्णा + बार्णी. किंवा बार्णी द्वि] **०चा कज्जा–भांडण–लढाई–वाद**–कडाक्याचा, निकराचा, जोराचा कज्जा वगैरे. **०चें काम**–नाजूक काम; ऐनवेळेचे, अगदी संपविलेंच पाहिजे असें काम **०स येऊन नासणें**–ऐनवेळीं बिघडणें–बिघाड होणे.

अणु—पु. १ पदार्थांचा स्वतंत्र रीतीने अस्तित्व असणारा अतिसूक्ष्म भाग. रज कण (सूर्यकिरणांत जे धुळीचे कण दृगोचर होतात त्यांच्या षष्ठांशाने लहान असणारा); (इं) मोलेक्युल. 'जें पाहतां त्रिभुवन। अणुही नोहे॥' –ज्ञा १६ ३३१. २ कालाचा एक भाग–मुहुर्ताचा (४८ मिनिटांचा) ५,४३,५०,००० वा हिस्सा. ३ (संगीत) पावमात्रा काल. –वि. अति लहान; अल्प; सूक्ष्म 'तुम्हांसमचि हें गुणें अणु उणें नमें नाम हा।' –केका ७५. [सं.]

अणुआर—पु. बारिक सुरा चाराचुरा. 'तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। आडळु निघाला जो अपारु। तो महाभारतप्राकारु। भोंवता केला॥' –ज्ञा १८.३६. [सं. अणु + अर = अल्प!]

अणुगुरुत्व—न. (पदा. रसा) वाफेचें विशिष्ट–गुरुत्व; अणुभार. (मोलेक्युलर डेन्सिटी)

अणुभार—अणुगुरुत्व पहा.

अणुमन्द्रसप्तक—न. (संगीत) मन्द्रनादापेक्षां ध्वनीनें नीच नाद असणारें स्वरसप्तक.

अणुमात्र—वि. अगदीं थोडें; किंचित; ईषन्मात्र; किंचिन्मात्र. 'तुज भय नाहीं अणुमात्र।' –रावि ९.६७.

अणुरेणु—पु. अतिशय लहान कण. सूर्य किरणांत दृष्टीस पडतात असे जे धुळीचे वगैरे अति सूक्ष्म कण त्यांतील एक. (सामान्यतः अव. प्रयोग). 'अणुरेणु सूक्ष्मश्लोका पार नाहीं। श्रुती नेती त्याहीं खुंटलिया॥' –तुगा २२०४. [सं अणु+रेणु=धूळ] **०जाल**–न. १ सूर्य किरणांतील अणु परमाणु २ अतिसूक्ष्म कणांचा समुदाय. [सं.]

अणुवाद–पु (तत्त्व) जगांतील सर्व वस्तुमात्राची उत्पत्ति अणूंपासून आहे व हे अणू अनंत काल आहेत असा सिद्धांत [सं.]

अणुसूट—अनसूट पहा.

अणेगा—स्त्री. अणेगा पहा

अणेगी, अणेकी—वि. अनेकी. अनंत पुष्कळ 'मायासूत्राची करोनि दोरी। जो ब्रह्मादिकां खेळवी अणेगी परी।' –शिशु १. 'भणें हांचि खेळतुमें अणेकी खेळीं।' –दावि ३४०. [सं. अनेक]

अण्णा—पु १ (मूळ अर्थ) वडील भाऊ २ बहुमानार्थी टोपण नांव. लहान मुलांनाहि लाडकें नांव म्हणून लावतात [प्रा. अण्ण–अ; का. अण्ण=मोठा भाऊ]

अण्णाटें—न (गो.) पायलीच्या १६ व्या भागाएवढें एक माप. 'अण्णाटेंभर तांदूळ घेवून यॉ.'

अण्वी—वि. अणुरूप, सूक्ष्म. 'अण्वी जीवकळा तेथ। पहावी माझी॥' –एभा २.७८७. [सं.]

अतः—क्रिवि. म्हणून, एतदर्थ; अतएव, यामुळे, या कारणास्तव [सं.] **०कारणात**–क्रिवि. अतएव; यामुळें, याकारणास्तव. **०पर**–क्रिवि म्हणून; यापुढें; पुन.. (नकाराथीं वाक्यात). [सं.]

अतएव—क्रिवि. याच कारणासाठीं यास्तव. 'एक परमहंसाचें लक्षण। ज्ञानपरिपाकें परिपूर्ण। अतएव शांति शोभेंगे आंगण।' –एभा १८.१८४. [सं. अत एव]

अतखानी—वि. (प्रां) मत्सरी, दीर्घद्वेषी. [?]

अतर्ण—आतर्ण पहा

अतन—उद्गा एकाएकीं अचंबा, आश्चर्य वाटणे असतां निघणारा उद्गार. अबब!. 'अतत केवढा हा नदीस पूर आला!' [सं. हा + आ) तात!]

अततता—स्त्री १ चोंचरे, अडखळत केलेले भाषण; बोलतांना लागणें २ (ल) कोंकें, नाचू करणें, मागे पेणे, कचरणें. (क्रि० करणे, मांडणे, लावणे.) [ध्व]

अतताई,–त्याई–त्यार्या—वि. (क्रोधाच्या भरांत) साहसकर्म, त्रागा करणारा. (खोडकर व्रात मुलाला लावतात.) [सं. आततायिन्]

अतत्त्वार्थ—वि अगत्य अयथार्थी. 'अतत्त्वार्थे भाषणीं धरावें मौन।' –गुच ५३.८८. [सं. अ+तत्त्व+अर्थ]

अतथ्य—वि. खोटें; असत्य; बनावट. [सं. अ+तथ्य]

अतद्व्यावृत्ति—स्त्री. सर्व पदार्थांचा निरास करणें; आत्म्याशेवाय सर्व पदार्थ दूर करणें –वेगळे करणें. 'श्रुति 'नेतिनेति' येणें शब्द। अतद्व्यावृत्ती निषेधबोधें।' –एभा ३.६६७. [सं. नतत्=अतत्+व्यावृत्ति=पृथक् करणें]

अतर—अत्तर पहा.

अतर्कित—वि. अटकळ, कल्पना, तर्क न केलेलें; अनपेक्षित; अचिंतित; अगोदर लक्षांत न आलेलें; आकस्मिक; अकल्पित. [सं.]

अतर्क्य—वि. कल्पनातीत; अचिंत्य; गूढ; तर्क करण्यास कठीण. अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार बा हे विधी' –केका २७. [सं.]

अतर्पणीय-अतर्प्य—वि. संतुष्ट करण्यास कठिण; समाधान न पावणारा; तृप्त न होणारा; असोसी. [सं. अ+तृप्]

अतल-ळ—न. सप्त पातालांपैकीं पहिलें. 'आतालो गेलों, गाताळो गेलों। तिथून आणली ... ...।' –लोककथा. –वि. अगाध; अतिखोल. [सं.]. **०स्पर्श**—पु. ज्याचा तळ, ठाव लागत नाहीं असा; अतिखोल (डोह वगैरे).

अतल(ळ)स—स्त्री. साटीन; रेशमी कापड; गर्भरेशमी कापड; काळसर लाल साटीण. 'अतळस कुतन्याहीं साहिल्या रुंदतोली।' –सारुह ३.४०. [अर. अत्लस]

अतल(ळ)स—पु. परिमळ; स्वाद? –मनको. 'वेडे धिरडीं वाद घेती। आतळस आपालांचा।' –दा १८.१.८.

अतस, अतसिका, अतसी—स्त्री. जवस; अळशी. 'ज्या गांवळया अतसिका कुसुमासमाना।'–वामन ४.३.६. [सं. अतसी; हिं. गु. अलसी; का. अगसी; बं. तिसी; म. अळशी]. **०पुष्प**—न. जवसाचें फूल. 'नाना अतसपुष्पांचिया परी।' –रंयोवा ४३.

अतक्षणीं—क्रिवि. याचक्षणीं; याच वेळेला. [सं. एतत्क्षण]

अतज्ञ—वि अनभिज्ञ; विषयाची पुरी माहिती नसलेला. [सं. अ+तज्ज्ञ]

अतां—क्रिवि. सध्यां; यावेळीं; आतां. [सं. अतः; प्रा. अत्तो; सं. इताम्]. **०शां-शीं-शें-सा**–अलीकडे; हल्लीं; सध्यां.

अताई-यी—वि. १ शिक्षकाच्या मदतीवांचून नुसत्या परंपरेनें शिकलेला (गवई, वैद्य); विनाशिक्षक येत असलेली (गायनादि कला). २ (ल.) दक्ष; कुशल; प्रवीण. [तुर्की अतालीक=बाजगी शिक्षक; हिं. अताई=विनामूल्य गाणारा व नाचणारा; गु. अत्तम गाणारा]

अतातय, अताता—उद्गा. आश्चर्यदर्शक उद्गार; अतत पहा.

अतात्त्विक—वि. असत्य; असार; अवास्तविक; पोकळ; खरें नव्हे तें. [सं.]

अतायत—वि. आजन्म; तहाहयात; मरेपर्यंत. [फा. ता–हयात]

अतार-री—पु. १ सुगंधी अत्तरें करणारा–विकणारा; अत्तारी; आतारी; गंधी. २ (व.) बेगड, भिन्याचे कागद, रंग वगैरे विकणारा. [अर. इत्र; फा. अत्तार–री]

अति—क्रिवि. पुष्कळ; फार; अधिक; जास्त; अतिशय. 'हा अति बोलतो.' **म्ह०** १ अति सर्वत्र वर्जयेत=कोणतेंहि वाजवीपेक्षां जास्त करणें टाळावें. २ अति तेथें माती. –शअ. (नामापूर्वी हा उपसर्ग पुढील कांहीं अर्थानीं योजतात.) वरचढ; सरस; मागें टाकणारा; पलीकडे; वरून. उ० अति कठिन–कोंधी–गर्व–मिष्ट–मृदु इ०

अतिइच्छा—स्त्री. (विप्र.) अतीच्छा; फार लोभिष्टपणा; अतिशय लुब्धपणा; अगोदीपणा.

अतिकरणें—सक्रि. ओलांडणें, पलीकडे जाणें; अतिक्रांत होणें. 'निपजलें अन्न तैसें। दुपाहरीं कां येरें दिवसें। अतिकरें तैं तामसें। घेईजे तें॥' –ज्ञा १७.१५५. [सं. अति+कृ]

अतिकाल-ळ—पु. उशीर; अवेळ; विलंब; योग्य वेळ टळून गेलेला काळ. (पेरणी, भोजन वगैरेस योग्य काळ जो वर्षाऋतु, मध्यान्ह इ० तो टळून अनुक्रमें शरदृतु, तृतीयप्रहर इ० पुढचा काळ). **०ळ्या**–पु. स्नानसंध्या, पूजा, भोजन इत्यादि नैमित्तिक कर्में उशीरां करणारा माणूस; अतिकाळीं वागणारा माणूस [सं. अति+काल]

अतिक्रमण—पु. १ उल्लंघन; पराभव; अतिक्रांत करणें; ओलांडून जाणें. 'तैसा भेटलियां न करवे। अतिक्रमु॥'–ज्ञा १३.२५९; 'तेवीं असल्याचेनि अतिक्रमें। वाचा प्रकाशे सत्य संभ्रमें।' –एभा ३.५३५. २ (ल.) अमर्यादा; अपमान; अव्हेर (गुरु, शास्त्र इत्यादिकांचा): अनादर. ३ उल्लंघन; अतिक्रांतस्थिति. ४ (कायदा) अपराध; गुन्हा (आज्ञा, हक्क उल्लंघन केल्याचा). 'स्थावर मिळकतीवर अ० केल्याबद्दल नुकसान भरपाई' सामा. शद्ब-आज्ञातिक्रम, गर्वातिक्रम, कालातिक्रम, देशातिक्रम, मार्गातिक्रम, मर्यादातिक्रम, निद्रातिक्रम, भोजनातिक्रम. [सं.]

अतिक्रमणें—अक्रि. १ पलिकडे जाणें: उल्लंघणें. २ आज्ञा मोडणें, तोडणें; अमर्यादा करणें; अवमानणें; अपराध करणें. 'व्यसनीं स्वयें नव्हे हा आर्य अतिक्रमिसि कां बुधा! याला?!' –मोसभा ५.३९. ३ पराभव करणें; जिंकणें. ४ व्यापणें.

अतिक्रांत—वि. १ (काल, स्थल, मर्यादा, इ०) ओलांडलेला; पलीकडे गेलेला. २ ज्यानें अतिक्रमण केलें आहे तो. ३ संपविलेली; होऊन गेलेली (गोष्ट). ४ व्यापलेला. ५ जिंकलेला. [सं.] **०करण**–(नृत्य) नाचण्याची एक तऱ्हा (पाय संकुचित करून एकदम वर उचलून पुढें पसरणें व पुनः उंच करून खालीं टाकणें).

अतिक्रांताशौच—न. सुतकाचा अवधि टळून गेल्यानंतर समजल्यामुळें धरण्यांत येणारें सुतक. [सं. अतिक्रांत+अशौच]

अतिगंड—पु. सत्तावीस योगांतील सहावा योग. [सं.]

अतिचर—वि. अतिवेगवान; अतिचंचल (ग्रह, मंगळ वगैरे). अतिचार पहा. [सं.]

अतिचार—पु. १ (ज्यो.) एकाद्या ग्रहाने पूर्व राशीचा शेष शीघ्रगतीनें उल्लंघून दुसऱ्या राशीवर (ठरीव वेळेपूर्वी) जाणें. ' तेथ एकाची ते शीघ्रगती । एक ग्रह मंदगामी होती । अतिचार कां वक्रगती । मंडळभेदें येती एकत्र ॥ ' –एभा २३. ८२७. २ अति वेगवान माणूस, ग्रह इ० [सं.]

अतिचौकस—वि. फाजील, वाजवीपेक्षां जास्त चौकशी करणारा; अति चिकित्साखोर; छडा न छडा काढणारा. [चौकस पहा]

अतिच्यार—वि. मर्यादेबाहेर; फाजील; अतिचार. ' हा भाजो वाणितां जामी अतिच्यारी । तरी रसिकु कोपती ॥ ' –शिशु ७१९. [अति+चर]

अतिछत्र(त्रा), अतिछत्रका—१ शेपू (भाजी). २ न. बेखंडासारखा वास येणारें एक प्रकारचें गवत. ३ बडिशेप. [सं.]

अतित—पु. अतिथि पहा. ०**अभ्यागत**–अतिथि; वेरागी गोसावी, इ० पाहुणा. [सं. अतिथि]

अतितत—वि. अतिशय विस्तृत. ' पुरोभागीं जो हा अतितत सभामंडप असे । ' –सारुह ८.९२. [सं अति+तन्-तत]

अतिताई—स्त्री. अतताई पहा.

अतितार सप्तक—न. तार सप्तकापेक्षां उंच सुरांचें सप्तक. [सं.]

अतितृष्णा—स्त्री. अतिशय लोभ; हांवरेपणा; अधाशीपणा; लुब्धपणा. ' अतितृष्णा न कर्तव्या '. –सुभाषित. [सं.]

अतित्याई—स्त्री. अतताई पहा.

अतिथि—पु. १ पाहुणा; पांथस्थ. २ ऐन जेवणाच्या वेळीं आलेला, अनाहूत मनुष्य; अगंतुक पाहुणा. 'असा अतिथि धार्मिक स्तुतपदा ! कदा सांपडे।' –केका १२१. [सं.]. ०**काळ**–पु. पाहुणा येण्याची वेळ; (ल.) दोन प्रहर; जेवणाची वेळ. 'अन्न द्यावें निर्धारीं । अतिथिकाळीं परियेसा।' –गुच३२.२१. ०**द्वेष**–पु.आलेल्या अतिथीबद्दलचा द्वेष किंवा अनादर. ०**पूजन**–न. अतिथीचा आदरसत्कार, स्वागत; (गृहस्थाश्रमांतील एक मुख्य कर्तव्य). ०**भोजन**–न. अतिथीला आपल्या पंक्तीला घेऊन करावयाचें भोजन; पाहुण्याला घातलेलें जेवण. ०**यज्ञ**–पु. पंचमहायज्ञांपैकीं दुसरा–मनुष्य यज्ञ. ०**वेळा**–स्त्री. अतिथिकाळ पहा. ०**संतर्पण**–न. ब्राह्मण भोजन; अतिथियज्ञ पहा; पंचमहायज्ञांपैकीं एक. ' अतिथि संतर्पण हा मनुष्य यज्ञ ।' –गीर २८८. ०**सत्कार**–पु. अतिथीचें आदरातिथ्य, मानमरातब.

अतिथ्यरीति—स्त्री. अतिथीच्या सत्कारासंबंधीं पद्धत-नियम. [सं. आतिथ्य+रीति]

अतिदिष्ट—आज्ञापित; अतिदेश पहा. [सं.]

अतिदेश—पु. १ प्रस्तुत विषयाच्या बाहेरील विषयास एकादा नियम, मुद्दा, विधान, तत्त्व लागू करणें; लागू पडेल त्या त्या ठिकाणीं लावणें. २ आज्ञा; हुकूम; आदेश. [सं. अति+दिश]

अतिनीलकिरणें—न. अव. (शाप.) सूर्याच्या वर्णपटांतील नील किरणांच्या पलीकडचीं किरणें; ' अल्ट्रा व्हायोलेट ' किरणें.

अतिपरमाणुविद्युत्कण—पु. (शाप) पदार्थांचा विद्युद्युक्त परमाणूपेक्षां लहान कण; इलेक्ट्रॉन.

अतिपरिचय—पु अति स्नेह, फाजील सलगी, वाजवीपेक्षां जास्त संघटण. **म्ह**० अतिपरिचयादवज्ञा=कुणाकडे अति जाणें येणें असल्यास आपला आदर, मान राहत नाहीं. [सं]

अतिपाड—पु १ अतिशय मोल, किंमत. २ (ल.) फार मोठी सीमा, मर्यादा ' ब्रह्मविद्या देतां उदारू । जे अति पाडाचे ॥ ' –विसि १.१.८६. [अति+पाड]

अतिपात—पु. (नियम) भंग. उल्लंघन; अतिक्रमण; शास्त्र, रीतीभाती यांना न जुमानणें. [सं.]

अतिप्रसंग—पु. १ पराकाष्ठा; कमाल; अतिशयितता, अमर्यादा. २ वाईट परिणाम; अनर्थ. ' बोलतां बोलतां (किंवा खेळतां खेळतां वाद करतां करतां) अ० झाला.' ३ फार निकट संबंध; सलगी. ४ विषयांतर; अप्रासंगिक भाषण; पाल्हाळ. 'हा असो अतिप्रसंगु । न सेडीं पां कथालागु । ' –ज्ञा ५.६६. [सं.]

अतिबद्ध—वि. अतिकृपण; चिक्कू. ' एकें उदारें अतिबद्धें । कुद्धें एकें ॥ ' –ज्ञा ११.१२६. [सं. अति+बंधू]

अतिबळी—वि. अतिशय ताकदवान, बलिष्ठ. ' अतिबळी बळी छळिला । ' [सं. अति+बलिन्]

अतिभर—पु. विपुलता; आत्यंतता, तीव्रता; पुष्कळपणा; फार जोर; चढ. 'व्यर्थचेनि अतिभरें ।' –विभि १.६.२३. [सं. अति+भर]

अतिमनुष्य—पु. अतिमानुष पहा. ('सुपरमन'ला प्रति शब्द) ' ज्यांना अतिमनुष्यकोटीचा दर्जा प्राप्त झाला, ' –केले १.१८१. [सं.]

अतिमर्याद—वि. मर्यादेपलीकडे, सीमेपलीकडे; निःसीम; पुष्कळ; अतिशय; वाजवीपेक्षां जास्त; फाजील.

अतिमात्र—वि. क्रिवि. अतिशय; अतीव; अत्यंत; फार; पुष्कळ. ' रसु होआवा अतिमात्रु । ' –ज्ञा १३.६३५; 'कलकल्ली अतिमात्रे । ' विवि. ८.६.११९. [सं.]

अतिमान—वि. अतिशय; बेसुमार; अमर्याद; विवक्षित मर्यादेच्या पलीकडे गेलेला (काम, क्रोध, वायु, पित्त इ०.). 'ब्रह्मगोळ अतिमानें कोंदाटला । ' –सप्र ८.२०.१७. [सं. अति+मान]

अतिमानुष—वि. १ मनुष्याला असाध्य असें; अमानुष; अपौरुष; अमानव. २ अलौकिक; मनुष्यापेक्षां गुणानें अधिक.

अतिमुक्ता—स्त्री. १ मधुमाधवी वीरवंती माधवीलता; कस्तुरमोगरा. २ निवस. टेंभुरणी. [सं.]

अतिरथ-थी—पु. १ रथांत बसून असंख्य योद्ध्यांशीं लढतो तो; मोठा योद्धा; वीर; शूर पुरुष. २ (ल.) वादविवादांत हार न जाणारा. [सं. अतिरथ]

अतिरथीमहारथी—पु अव. मोठमोठे वीर; एकापेक्षां एक वरचढ, पराक्रमी पुरुष; श्रेष्ठ पुरुष. [सं. अतिरथ+महारथ]

अतिरस—पु. अतितीव्रता; अतिशयपणा; अत्युष्णता. 'ग्रीष्माच्या अतिरसीं। सबीजें तृणें जैसीं।'—ज्ञा ९.१०१. [सं.]

अतिराग—पु. अत्यंत राग-क्रोध. —वि. अतिशत रागीट; क्रोधी. 'अतिरागा भीक मागा। त्याहून रागा देशा त्यागा.' [सं.]

अतिरिक्त—वि. १ अतिशय; मर्यादेच्या पलीकडे गेलेला. 'पूर्वीच्या काळीं मराठी व इंग्रजी शाळेंत असतांना मुलें अतिरिक्त अभ्यास करीत होतीं'—ज्ञाप्र १०६ २ पलीकडे; शिवाय, वर, निराळा, पुढें या अर्थी समासांत. उ० एतदतिरिक्त=ह्याशिवाय; तदतिरिक्त=त्याहून निराळा. 'हें मला ठाऊक आहे; एतदतिरिक्त ठाऊक नाहीं.' [सं.]

अतिरुद्र—पु रुद्राच्या १३३१ एकादशण्या. (रुद्राचीं ११ आवर्तनें=१ एकादशणी; ११ एकादशण्या=१ लघुरुद्र, ११ लघुरुद्र किंवा १२१ एकादशण्या = १ महारुद्र; ११ महारुद्र किंवा १३३१ एकादशण्या=१ अतिरुद्र). 'अतिरुद्र केलें फळद्दशा।'—युच १९.८९. [सं.]

अतिरेक—पु. भरमसाटपणा; अमर्यादपणा; पराकाष्ठा. विपुलता; आधिक्य; कळस [सं.]

अतिरोग—पु कफक्षय रोग. [सं.]

अतिवयस्क—वि. १ वयातीत; म्हातारा; अतिवृद्ध; उतार वयाचा. २ (विवाह: विवाजन इ० ला) असमंथ नालायक. [सं. अति+वयस्+क प्रत्यय]

अतिवस—वि. पुष्कळ; बहुवस; अतिशय. 'तैसें सकल जीवांचें जीवन। जें अतीवम प्रसन्न।'—ऋ ३२. [सं. अति+वस्]

अतिवाद—पु. १ हेकडपणाचा वाद; वितंडवाद; 'आम्हांसमक्ष करिशी अतिवाद, त्यायुनि लाज आयेंशीं।'—मोसभा ६.३६. २ निंदा; अपशब्द; कठोर भाषण. —दी—वि. अतिवाद करणारा. [सं.]

अतिविष-षा—न. (विप्र. अतिविख) एक औषधि वनस्पति. ही ज्वरघ्न व शक्तिवर्धक आहे. अपचन, उलटी होणें, हगवण व खोकला या विकारांवर हिचा उपयोग होतो. साल पांढरी-तांबडी अगर काळी असते. हें औषध बाळगुटींत घालतात. वस्त्र रंगविण्याच्या कामीं सालीचा उपयोग होतो. —वगु १.१९. [सं. अतिविषा; का. अतिविषा. हि. अतिस: गु. अतवस; बं. आतईच; ते. अतिवासा; लॅ. अॅकोनिटम, इं. अॅकोनाईट]

अतिवृष्टि—स्त्री. अतिशय पाऊस; अनर्थकारक वृष्टि. [सं.]

अतिव्यय—पु. उधळेपणा (मितव्ययाच्या उलट); बेताल खर्च; उधळपट्टी. [सं.]

अतिव्याप्ति—स्त्री. १ वाजवीपेक्षां अधिक विस्तार; फाजील गोष्टींचा समावेश; मर्यादेचें उल्लंघन: अतिविस्तृतता. २ (न्याय) अलक्ष्यांवर लक्षणाची व्याप्ति: व्याख्येय जातीमध्यें ज्या ज्या वस्तूंचा समावेश व्हावा अशी इच्छा असते त्यांखेरीज एखाद्या निराळ्या वस्तूचा समावेश होतो असें दिसेल तर त्या व्याख्येमध्यें 'अतिव्याप्ति' हा दोष आहे असें म्हणतात. उ० 'पदार्थाची देवघेव करण्याच्या साधनास नाणीं म्हणतात,' अशी नाण्याची व्याख्या केल्यास बायका बोहऱ्यापासून भांडीं घेऊन त्यांबद्दल त्यास जीं फाटकीं चिरगुटें देतात त्यांसहि नाणें म्हणावें लागेल: म्हणून वरील व्याख्येंत अतिव्याप्ति हा दोष आहे. —मुको ४१. [सं.]

अतिशय—पु. १ विपुल्य; बाहुल्य; विपुलता: भरमसाटपणा. २ अतिरेक: अत्याचार; दांडगाई. 'जो हा करूं अतिशय। कांहो तुम्हां दया नये।'—तुगा ५२५. ३ मेजवानींत जेवण्याचा आग्रह. ४ अति प्रसंग; अनर्थ. 'तेवींचि संजयो म्हणे चित्तीं। हा अतिशयो या नृपती।'—ज्ञा १७.४३१. ५ निकड; तकार: त्रागा: जिकीर: करडा अंमल. 'तथापि अतिशय करतील.'—रा ३.४३६. ६ नेट; माथेफोड. 'म्हणे भगवत्सत्ता प्रमाण येथें। मी अतिशय व्यर्थ कां करूं॥'(कि० करणें) [सं.]

अतिशय—वि फार; विपुल; बहुत: वाजवीपेक्षां जास्त; भरमसाट.

अतिशयित—वि. अतिशय; फार: मोठें; पुष्कळ; विपुल. 'अतिशयित भाग्य त्याचें स्वीयहि अतिशयित दुःख कळवीलें॥'—मोसभा ३.३९. [सं.]

अतिशयेंकरून—क्रिवि. आग्रहानें 'अतिशयेंकरून बोलावून'—ख १९१९.

अतिशयेंसी—क्रिवि. अत्यंत; विपुलतेनें; भरपूरपणानें. 'ऐसें आवर्षण आलें। तेणें घरचि बुडालें। पुढें देसीं सुभिक्ष जालें। अतिशयेंसी॥'—दा ३.५.११.

अतिशयो—अतिशय पहा.

अतिशयोक्ति—स्त्री. १ स्वाभाविक गुणापेक्षां अधिक करून सांगण्याची रीत. २ वाचालता; अति बडबड: चाटाई. ३ एक अर्थालंकार. वस्तूचें लोकमर्यादेच्या बाहेर प्रतिपादन केलें म्हणजे हा अलंकार होतो. याच्या प्रकारांत (अ) भेदीं अभेदाची, (आ) अभेदीं भेदाची, (इ) योगीं अयोगाची-संबंधीं असंबंधाची, (ई) अयोगीं

योगाची–असंबंधी संबंधाची, (उ) कार्यकारणाच्या समकालत्वाची आणि विरोधाची कल्पना केलेली असते. उ० 'शोणित नदींत गेलें समटरथद्विरद वाहवाहून।' –मोभीष्म ३.६१; 'जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे। तो चंद्रमा निजतनूवरि डाग लाहे॥' –नल ३१. **०करणें**–अक्रि. फुगवून सांगणें; तिखटमीठ लावून सांगणें: भलतेंच सांगणें. [सं. अतिशय+उक्ति]

अतिशहाणा—वि. फार मसलत्या, छुबा; अति धूर्त; फाजील शहाणा; ज्याची योजना चुकते असा; अव्यावहारिक; (ल.) मूर्ख. **म्हण०** अतिशहाणा त्याचा बैल रिकामा=वाजवीपेक्षां जास्त चिकित्सा करतो त्यास यश येत नाहीं. [अति+शहाणा]

अतिशूद्र—पु. शूद्रजातीपेक्षां हलकी जात; या जातीचा; मनुष्य अस्पृश्य वर्गातले महार, मांग, इ०; चांडाल. [सं. अति+शूद्र]

अतिशो—अतिशय पहा. 'तूं आधींचि काय नेणसी। कीं हे गोत्रज नोळखसी। वायांचि काय करिसी। अतिशो आतां॥' –ज्ञा २.२४. [अतिशय]

अतिसार—पु. ज्यांत मलविसर्जन अतिशय होतें असा– हगवणीचा रोग; या रोगाचे प्रकार:–आमातिसार, ज्वरातिसार, पित्तातिसार, रक्तातिसार, श्लेष्मातिसार, सर्वसामान्य अतिसार. यावर पित्तपापडा गुणकारी असतो म्हणून त्यास 'अतिसारघ्न' असें नांव आहे. [सं. अति+सृ=सरणें]. **–री**–वि. अतिसारानें पीडित असा.

अतिसूक्ष्मदर्शकयंत्र—न. अत्यंत लहान वस्तू ज्याच्या योगानें पहातां येतात असें यंत्र. (अल्ट्रा मायक्रॉस्कोप). [सं.]

अतिसो—अतिशय पहा. 'सोहरिकेचा अतिसो। पोखितमे। –अमृ २.६९.

अतिस्नेह—पु. गाढ मैत्री; दाट स्नेह–मैत्री; दृढ प्रेम. [सं.] **–ही**–जीवश्च कंठश्च मित्र; जिवलग मित्र; अतिशय सलगीचा दोस्त. [सं. अति+स्नेह]

अतिस्वार्थ—पु. अतिशय स्वार्थ अगर लोभिष्टपणा. आप्पलपोटेपणा;हांवरेपणा.[सं.अति+स्व+अर्थ]. **–र्थी**–वि. अतिशय हावरा किंवा लोभी; मतलबी; केवळ स्वत:पुरतें पाहणारा; आप्पलपोट्या.

अती—अति पहा. **०करप**–(गो.) अतिरेक करणें. [गो. करप=करणें]. **०जावप**–(गो.) फाजील होणें; मस्त होणें. [गो. जावप=जाणें]

अतीत—वि. १ गत; भूत; गेलेला; संपलेला; जवळून गेलेला; अतिक्रांत (काल, मार्ग वगैरे) उ० अतीत काल=गेलेली वेळ. 'तैवीं अतीता जन्माचें। उणें जो वाहे॥' –ज्ञा १३.५३७; 'अतीतानागतज्ञानवंत। ऋषीश्वर मीनले समस्त।' –एभा १.३४४. २ मुक्त झालेला; पलीकडे गेलेला. उ० कालातीत, जरातीत, दु:खातीत, देहातीत, देशातीत, दृश्यातीत, बुद्धयातीत, बोधातीत, मोहातीत, लोभातीत, वयातीत, सुखातीत. 'म्हणौनि जन्मक्षयां। अतीत

ते धनंजया॥'–ज्ञा १४.५९; 'भोग भोगूनी भोगातीत।' –एरुस्व ७.५९. –शअ. पलीकडे; वेगळा. [सं.]

अतीत (ग्रह)—पु. (संगीत). गायन सुरू झाल्यावर कांहीं वेळानें ताल देण्यास आरंभ करणें. [सं.]

अतीत—पु. १ पाहुणा; अतिथि पहा. 'तेथें समर्यी आला अतीत। सन्यासी ब्रह्मचारी अभ्यागत॥' –एभा ८.१५४; 'पाळी देव आज्ञा ब्राह्मणांचा मान। अतीतपूजन वैष्णवांचें।' –तुगा १०२. २ वैरागी; भिकारी; पांथस्थ. 'अतीत वेषा देउनि तुजला नेतों मी विपिनांत।' –रत्न २.२. [सं. अतिथि]. **०अभ्यागत**–पु.अतिथि; पाहुणा; आगंतुक. [सं. अतिथि+अभ्यागत]

अतीतणें—अक्रि. होऊन जाणें. 'येथें भूतें जियें अतीतलीं॥' –ज्ञा ७.१६१. [सं. अतीत]

अतींद्रिय—वि. इंद्रियांस आकलन न होणारा; त्यांच्या सामर्थ्या बाहेरचा; इंद्रियांस अगम्य, अगोचर (परमाणु, ईश्वरस्वरूप, इ०.) 'जरी अतींद्रिय लाहिजे। ज्ञानबळ॥' –ज्ञा ६.३३. [सं. अति+इंद्रिय]. **०विचारसंक्रांति–संक्रमण, ०सहसंवेदन**–न. दूरच्या-दोन इसमांच्या मनांत एकाच वेळीं एक विचार–भावना येणें. 'टेलिपथी.' **०ज्ञान**–न. पंच ज्ञानेंद्रियांस आकलन न होणारें ज्ञान; इंद्रियांस अगम्य ज्ञान; भूत भविष्य कालासंबंधीं, तसेंच दुसऱ्याच्या मनांत काय विचार चालले आहेत त्यांचें ज्ञान. **० ज्ञानी**–वि. अतींद्रिय ज्ञान असलेला.

अतीव—क्रिवि. फार; पुष्कळ; अत्यंत; बहुत. [सं. अति+इव]

अतुट—क्रिवि. सतत; न तुटतां; तूट न येतां; अतूट पहा. [अ+तुटणें. सं. अ+त्रुटित]

अतुडणें—आतुडणें पहा.

अतुर—आतुर पहा.

अतुर्बळ—न. अपार शक्ति; धाडस. –वि. बलाढ्य; शक्तिमान 'यादव करूनि अतुर्बळ। नाना दुष्ट दमिले सकळ॥' –एभा १.२२१. [सं. अतुल+बल]. **–ळी–ळी**–अतिशय कणखर; मजबूत: बलाढ्य; दांडगा; पराक्रमी; बिनजोड; धाडसी. 'ज्ञानमार्गी अतुर्बळी। तुमचें दैन्य हरील॥' –तुच ५.३१. (ल.) फारच मोठा; अवाढव्य; अचाट.

अतुल—वि. (विप्र. अतूल); तुलना नाहीं असें; बिनजोड; असामान्य; अनुपम. 'अतुल बळें अतिप्रबळ। वाढलें जें यादवकुळ॥' –एभा १.२२७. [सं.]

अतुलनीय, अतुल्य—वि. १ बिनजोड; तुलना करावयास योग्य नाहीं असे. २ असमान; असदृश. अतुल पहा. [सं.]

अतुवट—आंतुवट पहा.

अतुष्ट—वि. असंतुष्ट; नाखुष; असमाधानी; अतृप्त. [सं.]

अतूट—वि.१ तूट न येणारें; समृद्ध; पुष्कळ; अक्षय (धान्य वगैरे). २ अडथळा न झालेले; अप्रतिबद्ध; सतत; अभंग (वृत्ति

वगैरे). ३ घट; सोडण्यास किंवा तोडण्यास कठिण. 'आलिगनीं मैंदपाशू । अतूट कंठीं शिरकला । ' –मुआदि ३५.८९. ४ अखंड; पूर्ण; अनुदित (अक्षता, तांदूळ–कणी नसलेले वगैरे). [सं. अ+त्रुट्–त्रुटित]. **०भाता**–ज्यांतील बाण कधीं संपत नाहींत असा भाता; अक्षयतूणीर.

अतृप्त—वि. असमाधानी; तृप्तता न झालेलें–पावलेलें; असंतुष्ट; अपूर्ण; न भरलेलें (पोट). [सं.]

अतृप्ति—स्त्री. असमाधान; असोशी; हांव; लोभ; लाहो; वखवख. [सं.]

अते—क्रिवि. (खा.) आतां. [सं. अतः]

अतेव—अतएव पहा.

अतोनात, अतोनास्त—वि. अतिशय; बहुत; पुष्कळ; विपुल. 'यापाशीं अतोनात द्रव्य आहे.' 'नदीस अतोनात पाणी आलें.' [सं. अतः +नास्ति]

अतौत–ता–तीं–तें—शब्द. आंत; मध्यें. ' तेथें कृष्ण जळा अतौता ।' –निगा ४५; ' आणि कोणासहि जगा अतौता । काळी मुष्टीची बाधा होतां ।' –नव ६.५२. आतौता पहा. [सं. अन्तः]

अत्कारी, अदकारी—अधिकारी पहा.

अत्तर—न. सुवासिक फुलांचें अगर पदार्थांचें शुद्ध सुवासिक सत्त्व, अर्क; सौगंधिक अर्क; पुष्पगंधार्क; निरनिराळे प्रकार:–१ वाळा (हिंदी खस), २ मेंदी (हिं. हिना), ३ गुलाब (हिं.), ४ मोतिया (मोतियाच्या फुलांचें), ५ पाच पानडी, ६ चमेली (जाईजुईच्या फुलांचें), ७ केवडा. वरील पदार्थ एका भांडयांत पाण्यासह घालून त्याची वाफ करून ती एका नळीद्वारां दुसऱ्या थंड भांड्यांत सांठवितात. त्या वाफेचें द्रवरूप तें अत्तर. [अर. इत्र. तुल० इं. आटो] **०जाळणें,–राचे दिवे लावणें**–मूर्खेपणानें उधळपट्टी करणें. 'अगोदर अत्तराचे दिवे जाळून मग काय धुळीचे दिवे खात जावयाचें आहे ?' **०गुलाब**–सभा बरखास्त होण्यापूर्वी सभासदांस पानसुपारी, अत्तर, गुलाबपाणी वगैरे देण्याचा विधि; (सामान्यतः) पानसुपारी; संभावना. [फा.]. **०दाणी–नी**–अत्तर ठेवण्याचें पात्र. ' त्यांत फुलें अ०। लोकामाजीं मिरवतसे ॥ ' –नव २०.१०१. [अर. इत्र+फा. दान्]

अत्तां—क्रिवि. ह्याक्षणीं; आतांच; हल्लीं. [सं. अतः; प्रा. अत्त; म. आतां; खा. अते]

अत्तार–री—गंधी; सुगंधी; आतार पहा.

अत्तुरी—स्त्री. (काव्य) स्त्री; भार्या; बायको. [अस्तुरी, अंतुरी पहा]

अत्यंत—क्रिवि. वि. अतिशय; फाजील; फार; मनस्वी; बेसुमार; अमर्यादपणें; बहुत; बेहद्द. [सं.] **०स्वजन–पु.** निकटचा, अगदीं जवळचा नातलग; अति प्रीतीचा माणूस. ' दारा पुत्र धन यौवन । बंधु सेवक अत्यंतस्वजन । '

अत्यंताभाव—पु. १ तिन्ही काळीं किंवा कधींहि एकादी वस्तु अस्तित्वांत नसण्याची स्थिति; पूर्ण अभाव. उ० वंध्येचा पुत्र. २ (न्याय) अभावाच्या चार प्रकारांपैकीं एक प्रकार; अभाव पहा. [सं.]

अत्यय—पु. १ विध्वंस; शेवट; अखेर; नाश; नुकसान; नाहींसें होणें. सामा. शब्दः धनात्यय, धर्मात्यय, पापात्यय, प्राणात्यय, भ्रमात्यय, मोहात्यय, सत्यात्यय. ' जीणें असे अत्यय पातकासी।' –सारुह १.३९. २ सोडणें; पलीकडे जाणें; त्याग करणें. (ल.) मरण. उ० गेहात्यय, दारात्यय, देहात्यय, पुत्रात्यय. ३ अतिशय, पराकाष्टेचे, मर्यादेबाहेर, असणें; अमर्यादता; अतिक्रांतता. [सं. अति+इ=जाणें]

अत्यर्थ—वि. क्रिवि. पुष्कळ; अतिशय; फार; अतोनात. [सं. अति+अर्थ]

अत्यवस्थ—वि. मरावयास टेंकलेला; मरावयाच्या बेतांत असलेला; मरणोन्मुख. (अत्यावस्थ रूप चुकीचें आहे.) [सं. अति+अवस्था]

अत्यवस्था—स्त्री. वाईट–बिकट दशा (शरीराची). ' मागें कांहीं दिवस मदनमंजरीची अत्यवस्था झाली होती. '–मयं १४१.

अत्या—आत्या पहा.

अत्यागी—वि. कामुक; वासनायुक्त; फलेच्छा न टाकणारा. ' एवं गोंविले संसारें । अत्यागी ते । ' –ज्ञा १८.२५६. [सं.]

अत्याग्रह—पु. अतिशय आग्रह; निकड; माथेफोड. [सं.] **–ही**–वि. अतिशय आग्रह करणारा–धरणारा.

अत्याचार—पु. १ अविहित, व्यवहारविरुद्ध वर्तन. २ अधर्माचरण; अनुचित आचार. ३ बलात्कार; जुलूम. ' चालू हिंदवासियांवरचे राज्यकर्त्यांचे अत्याचार आणखी किती दिवस सहन करावयाचे ? ' –के १६.४.३०. ४ (कांहें देखील धुऊन घ्यावीं इ० छांदिष्टपणा दिसण्याजोगा) अनवश्यक आचार. ५ वेकायदेशीर राज्यद्रोही, क्रांतिकारक कृत्य. 'हिंदुस्थानांत इतर कोठेंहि अत्याचार झाला तरी मी (गांधी) माझा निश्चय पार पाडणार. ' –के २५.३.३०. [सं.]. **–री**–१ विहित आचार–विधि सोडून वागणारा; अतिरिक्ताचारी; नेमाळ्या; फुकून पाऊल टाकणारा. २ जुलमी; कुकर्मी; पापी. ३ क्रांतिकारक.

अत्यादर—पु. १ विशेष आदर; सत्कार; स्वीकार; सन्मान; अंगीकार. 'असेल अशि आवडी करिशि कां न अत्यादर । '–केका ६१. २ विशेष प्रेम; श्रद्धा. ' मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसार पुरु। म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी । ' –ज्ञा १.२२. [सं. अति+आदर]

अत्यावस्थ—अत्यवस्थ पहा.

अत्यासक्त—वि. एखाद्यासंबंधीं विशेष आवड गोडी-आसक्ति असलेला; अत्यंत उत्सुक-तत्पर-तल्लीन. [सं.]. –क्ति–स्त्री. विशेष ओढा, कल, आवड, शोक; तल्लीनता; तत्परता; अत्यंत प्रेम, भक्ति. [सं. अति+आसक्त]

अत्युक्ति—स्त्री. अतिशयोक्ति पहा. 'अत्युक्ती ही नाहीं नाहीं. खरेंच तुजला कथितों ॥ ' –टिक ३७. २ वाचाळता; बडबड. [सं.]

अत्युद्धार, ०घात—पु. एक प्रकारचा वात; यांत रोग्याला ढेंकरा फार येतात. [सं. अति+उद्गार,+वात]

अत्युष्ण—वि. अतिशय उष्ण; तप्त. [सं.]

अत्र-त्रे—क्रिवि. ह्या स्थळीं; येथें. ' अत्र गंध सुमनी पूजा. करीतसे धर्मराजा ॥ ' –कथा ६.२१.४. (' अत्र गंध–पत्र–पुष्प–धूप–दीप ' इ० पूजा मंत्र) [सं.]

अत्र—अत्रप–ब पहा.

अत्रक—(गो.) प्रतिबंध. ' प्रसिद्ध लेखानें आईकट करून एकत्र राहण्यास अत्रक होत नाहीं. ' –गोमांतक रीतिभाति, पृ ११. [अटक]

अत्रत्य—वि. येथील; या ठिकाणचे; स्थानिक. [सं.]

अत्रप-फ-ब—वि. १ अधिक; फालतुक; जास्ती; रिकामा; निराळा. ' तुम्हापाशीं अत्रप अंगरखा असेल तर द्या. ' २ जवळचा, शेजारचा, सभोंवतालचा. [अर. अत्राफ्]

अत्रप-ब—न. अनिश्चितपणा; असंबद्धपणा; दुटप्पीपणा (भाषणाचा, आचरणाचा वगैरे). (क्रि० ठेवणें, राखणें). –वि. अनिश्चित; मोघम. ' चार तंटघांतून तीन निवडले एक अत्रब राहिला आहे. ' –क्रिवि. असंबद्धपणें; विसंगतपणें; अनिश्चितपणें; दुटप्पीपणानें. [सं. अत्र कः संदेहः याचा संक्षेप ? अर. अत्राफ् ?]

अत्रवीद्—वि. (गो.) बेमुर्वतखोर. ' सगल्यांभितर हॉ चढ अत्रवीद. ' [पोर्तु. आत्रेव्हीदु]

अत्राप-फ—वि. अत्रप पहा. 'वरकडही अत्राफ शिलेदार वगैरे लोकांस याचप्रमाणें ताकीद आहे. ' –रा ७.५४. [अर. (तरफ अव.) अत्राफ्=बाजू; सभोंवार. तुल० ते. अत्रापु=शेजारचे]

अत्लस—रेशमी कापड; साटीण; अतलस पहा. ' अत्लस हात चौदा. ' –रा. ३.१९.

अत्वातत्वा—अद्वातद्वा पहा.

अत्विख-ष—अतिविष पहा.

अथ—अ. १ (संस्कृत ग्रंथारंभीं लिहिण्याचा शुभ शब्द) आतां येथून; पुढें; नंतर; अशा रीतीनें. २ अथवा. ' आपण अश्व असे विकिले मग एक बसो अथ दोन वरी. ' –वामन ४.४. **०पासून इतिपर्यंत**–आरंभापासून अखेरपर्यंत. आदीपासून अंतापर्यंत; सार्धंत. [ग्रंथाच्या आरंभीं 'अथ' व शेवटीं 'इति' असते म्हणून]

अथज्या—क्रिवि. (ना.) इकडे. [सं. अत्र+त्य]

अथर्गण—न. (कों.) रानटीपणाची, आडदांड वागणूक; आरडाओरड; अट्टाहास; आदळ आपट; शिवी-गाळ; उतावीळपणा; घाई किंवा आग्रह; तारांगण. [सं. अथर्वण]

अथर्वण—पु. १ चौथा वेद. ' अथर्व ' वेदाचीं २० कांडें आहेत. त्यांत जारण-मारण यांसंबंधीं मंत्र आहेत. याचें वैतानस नांवाचें श्रौतसूत्र असून कौशिक वगैरे गृह्यसूत्रें आहेत व त्या त्या ग्रंथांत अथर्ववेदांतील तत्तद्विषयक मंत्रांचे विनियोग दिले आहेत. २ अथर्ववेदाचा द्रष्टा-संपादक ऋषि. ३ आपल्या फायद्यासाठीं दुसऱ्याची चहाडी, लावालावी इत्यादि खेळ करणें किंवा जो करतो तो. [सं] **०विधि**–अथर्ववेदांत सांगितलेलें कर्म; जारणमारण. **अथर्ववेदी**–अथर्वण संस्कार ज्याच्या परंपरेंत आहेत असा ब्राह्मण; त्या शाखेचा.

अथर्वणें—क्रिवि. (गो.) अर्थावीण. [अर्थ+विना]

अथवा—उअ. पक्षांतरबोधक अव्यय; अगर; किंवा; निराळे किंवा विरुद्ध पदार्थ, शब्द किंवा गोष्टी अलग अगर वेगळे करण्यासाठीं योजावयाचा शब्द. साधारण मानानें किंवा, व, अथवा हे शब्द सारख्याच अर्थानें योजतात. [सं. अथ+वा]

अथाक, अथांग—वि. (काव्य) तळ, ठाव, थांग लागत नसलेलें; अतिशय खोल; अतलस्पर्श. ' क्षमा आणि शांतीचा दुजा अथाक सागर तूं. ' –प्रला १७१. [सं. अस्थाग=फार खोल; प्रा. अत्थग्घ=अगाध]

अथापि—उअ. असें असतांहि; तथापि; तरीसुद्धां. ' तो कोपून शिव्या दऊं लागला अथापि मी बोललों नाहीं. ' [सं. अथ+अपि]

अथांबी—क्रिवि. अथांग; खोल. ' वधू गौतमाची पतीशाप डोही. बुडाली अथांबी शिलारूप होई. ' –वामन–बोध ३०. (अककभा २) [अथांगी अप.]

अथारी—स्त्री. १ (व.) (कांहीं वखरवाले मिळून) समाइकीनें शेत वखरण्याची अगर नांगरण्याची पाळी. ' आमच्या शेतांत उद्यां अथारी चालेल. ' २ एकाधा शेती कामाच्या मोबदल्यांत गडीमाणसांना दिलेलें जेवण. ' रामानें शेती नांगरल्यानंतर आपल्या सर्व गडयांना अथारी दिली. ' [?]

अथाव—वि. १ खोल; ओंड; अथांग; अगाध. –पु. खोल पाणी. ' पै अथार्वी घट बुडाला. ' –ज्ञा ८.६५; ' जेवीं अथार्वी पडिला चिरा. तेवीं बाहिरा निर्घों न शके. ' –एभा ५.२९८. २ खोली. ' तो विषयविषाचा अथावो. ' –ज्ञा १८.१०५४. [सं. अ+स्थापय्; प्रा. अ+ठाव]

अथिमाय—वि. (व.) बायल्या; नामर्द. ' इतका कसा अथिमाय तूं ? '

अथिर—वि. चळवळया;चळवळ करणारा.–क्रिप्रि. [सं. अस्थिर]

अथिल-ला—वि. आश्रय केलेला; योग्य; समर्थ; थोर; भाग्यवान्. ' चिद्धाग्यें अथिला विदेह मिथिलाभूपाळ भूपावली. ' –आसी १. आधि–ला पहा. [सं. अस्ति; प्रा. अत्थि+ल]

अथिलीथडी—स्त्री. अलीकडील बाजू; (ल.) आस्तिक्य बुद्धि. [सं. अस्ति+तट]

अथिलेपण—न. थोरपण; सामर्थ्य; भाग्य; आथिलेपण पहा

अथी—आहे; आथी पहा.

अथेति—अ. आरंभापासून शेवटपर्यंत; अथपासून इतिपर्यंत. [सं. अथ+इति]

अद्—वि. अर्धा; निमा; शब्दांना हा उपसर्ग म्हणून लागतो. **जसें**:—अदकोस; अदखंडी; अदगज; अदघडी; अदतोळा; अदधडी: अदपाव: अदमण; अदशेर; इ०. [सं. अर्ध; गु. अद–ध: पं. हिं. अद, आद; कों. अद]

अद्—न. (शाप.) एक अधातु द्रव्य; इं. आयोडिन; हें औषधांत व फोटोग्राफींत उपयोगांत आणितात.

अदकाव–अदकाचा—अधकाव पहा.

अदखणा—वि. १ कुरूप; देखणा नव्हे तो. २ ज्यास पाहवत नाहीं तो; परोत्कर्षासहिष्णु; दुष्ट; मत्सरी. 'आद्दत्त झोड आदखणा।' –दा २.३.२८; 'पंडीत वाचाळी ठकडे अदखणी।घडिघडी करिती निंदा जाचणी।' –दावि ४५८. [सं. अ+दर्शन, प्रा. अ+दक्खण; म. अ+देखणा]

अदगळणें—अक्रि. (व.) झुरणें; दुःखित होणें; व्यथित होणें; वेदनांनीं विव्हळ होणें. 'खांडकानें रात्रंदिवस तो अदगळतो.' [सं. अर्ध+गल्?]

अदट—वि. १ दृढ; निश्चल. 'रुक्मिणीचा भक्तिभावो अदट।' –कथा ४.८.१७३. २ धीट; अजिंक्य; पराक्रमी; सामर्थ्यवान् 'भगवंत महाअतुबेळी। अदट दैत्यातें निदौळी।' –एभा२.७७६. [सं. दृढ; प्रा. दळ. तुलः का. अदटु=सामर्थ्यवान्]

अदंडनीय–अदंड्य—वि. दंड–शिक्षा–शासन करण्यास अयोग्य. [सं.]

अदत्त—स्त्री. १ अहल; शासन. 'त्यानें आपणास घडलेल्या अदतीची हकीकत त्यास सांगितली.' –बाळ २.१. २ खोड: संवय; (वाईट) स्वभाव. (क्रि० धरणें, पडणें, लागणें.). [अर आदत्=संवय, चाल]

अदत्त—वि. १ न देणारा; कृपण; चिक्कू; कवडीचुंबक; कद्रू. 'आद्दत्त झोड आदखणा॥' –दा २.३.२८. २ न दिलेला. [सं. अ+दा]. **०शिखामणी–शिरोमणी**–पु. पराकाष्ठेचा कृपण.[सं.]

अदना—वि. नीच; कनिष्ठ; अदना पहा. [अर अदना=कनिष्ठ]

अदपाव—पु. अर्धापावशेर; शेराचा आठवा हिस्सा. [सं. अर्ध+पाद]

अदपुत्तिक—न. (शाप.) अद(आयोडिन)संयुक्तद्रव्य; जखमा भरून काढण्यास उपयोग. इं. आयडोफार्म.

अदब—स्त्री. मर्यादा; विनय; नम्रता; सन्मान; प्रतिष्ठा; मोठेपणा; आदर. (क्रि० ठेवणें, राखणें, संभाळणें, राहणें). **चालविणें**=सन्मान राखणें. **०धरणें**–सलामी देणें. 'फौजेचा कदम धरि अदम झडतो शिल्लका।' –ऐपो २४०. **०बजाविणें**–छातीवर एकावर एक हात ठेवून नम्रतापूर्वक उभें राहणें (मुजरा करणें, मान देणें). [अर. अदब्=मर्यादा राखणें; नम्रता; शिष्टाचार]

अदब—पु. १ चिंता; श्रम; दुःख; त्रास. (क्रि० पडणें, पावणें, सोसणें). २ निकड, जरुरी (कामाची, बाबीची). (क्रि० पडणें). [दबणें]

अदबखाना—पु. तुरुंग; कैदखाना. 'हरदोजणास अदबखाना ठेवलें.' –रा १८.१९: 'आठदहा महिने अदबखाना, पार्यी बेडी घालून बहुत कष्टी केलें.' –वाड सनदा ३४ [अर. अदब्]

अदबणें—अक्रि. १ खालावणें; अशक्त–अधू होणें; खितपत पडणें (आजारानें). २ टेकीला येणें–गांजणें, बेजार होणें (दुःखानें–त्रासानें, पीडेमुळें). ३ रंजीस येणें; मेटाकुटीस येणें; थकून भागून जाणें (श्रम–मेहनत–कष्ट–काळज्या यांनीं). ४ परिश्रम करणें; खावाडकष्ट करणें, अति खटपट करणें; दगदग सोसणें. 'मी लमाविषयीं अदबलों तेव्हां तें झालें.' [दबणें]

अदबशीर—क्रिवि. नम्रतापूर्वक; लक्षपूर्वक: काळजीनें; कळकळीनें. (क्रि० ठेवणें–राखणें–सरणें–हालणें). –वि. १ पडदा इत्यादिकानें अच्छादिलेलें; सुरक्षित; मर्यादेनें राहिलेला. 'हीं कांचेचीं भांडीं पेटींत ठेवा म्हणजे अदबशीर राहतील.' २ आदर बाळगणारा; सन्मान ठेवणारा. ३ आटोपशीर. [अर. अदब्]

अदभागी—वि. हतभागी; फुटक्या कपाळाचा–नशीबाचा; दुःखी व दरिद्री; उपभोग नशीबांत नसणारा. [सं. हतभागिन्]

अदंभित्व—न. (काव्य) साधेपणा: नम्रता; आळ्यता नसणें; ढोंग न करण्याचा गुण; साधुपणा. 'तरि अदंभित्व ऐसें। लोभियाचें मन जैसें॥' –ज्ञा १३.२०२. [सं.]

अदभ्र—बहुत; मोठा; फार. 'अन्योन्य कृताघातें बा मूर्छा पावले अदभ्रा ते।' –मो. [सं. अ+दभ्र=लहान]

अदमण–णी—पु. स्त्री. अर्धामण (माप- वजन); अर्धामण वजनाचा जिन्नस. [सं. अर्ध+मान]

अदमणका, अदमणा—वि. अर्ध्या मणाच्या वजनाचें–मापाचें (भांडें, वजन, दगड इ०).

अदमास(से)–णें—अजमास(से)–णें पहा.

अदमु(मो)रें—न. पूर्णपणें न विरजलेलें दूध; विरजण लावल्यापासून अजमासें १२ तासांत तयार होणारें दहीं; गोड दहीं; थोडा आंबटपणा असलेलें दहीं; अर्धे मुरलेलें. **०घालणें**–(बायकी) विरजणाची अर्धवट स्थिति करून ठेवणें. [सं. अर्ध म. अद + मुरणें] **०चांदिणें**–कोवळें चांदणें? 'अदमुरें चांदिणें फोडिजे। कैरवांचा मकरंदु काढिजे।' –शिशु ७७६.

अदम्य—वि. दमन करण्याला कठिण; ताब्यांत आणण्यास कठिण; वश, अंकित करण्याला अयोग्य. [सं.]

अदय—वि. निर्दय; कठोर; दुष्ट; निष्करुण. [सं.]

अदरून—आदरून पहा.

अदर्शन—न. १ दर्शन न होणें; नाहींसें होणें. २ दिसण्याची स्थिति नसणें; न दिसणें; लोप; तिरोधान; अदृष्टावस्था. [सं.]

अदल—वि. वास्तविक; खरा; रास्त; न्यायी. 'या खटल्यांत अदल इन्साफ झाला.' –विक्षिप्त १.४०. –पु. इन्साफ करणारा. अद्दल पहा. [अर. अदल्=न्याय]

अदल—अदळ पहा.

अदलंड मदलंड—अधलंड मधलंड पहा.

अदलबदल—(कों.) अदलाबदल पहा.

अदला—वि. मालेंतील पहिला किंवा सर्वांत पुढचा; आधींचा; अगोदरचा; आरंभींचा; पहिला. [सं. आदि]. **–लें वर्ष–साल**–मागील वर्ष; गतसाल; गुदस्त साल. **०दिवस**–विवक्षित दिवसाच्या मागचा; अगोदरचा. **–ल्या घरचा** पहिल्या नवऱ्यापासून झालेला (मुलगा). **०जन्म**–मागील जन्म. **०मधला**–मधल्या भागांतला. ना पहिला ना शेवटचा; कोठला तरी.

अदलाबदल—स्त्री. १ ह्याचें त्याला व त्याचें ह्याला असा फेरफार; येथलें तेथें, तेथलें येथें; परस्पर देवघेव; बदलाबदल; मोबदला. २ (व्यापार) चढत्या व पडत्या भावांत विक्री; इं. एक्स्चेंज. [बदल द्वि.]

अदवासुंठ—स्त्री. आलेंसुंठ. 'अदवासुंठ चार टाक।' [सं. आर्द्रक; हिं. आदरक=आलें; गु. आदु=सुंठ]

अदवेचा—आदवेचो पहा.

अदशेर—पु. अर्धशेर (माप किंवा वजन). [सं. अर्ध+शेर]

अदहनीय–अदाह्य—वि. जाळण्याला किंवा दहन करण्याला कठिण अयोग्य; दहन न करतां येण्यासारखें. [सं.]

अदळ—वि. १ अयोग्य; असार; गर किंवा मगज कमी असलेला. २ कच्चा; हळवा. उ० अदळ पोटाचा किंवा कासोट्याचा=ज्याचें पोट हलकें आहे किंवा ज्याला लवकर शौचास होतें असा; मृदुकोष्ठ अदळकानाचा=ज्याच्या जवळ गुप्त गोष्ट टिकत नाहीं असा; चहाडखोर. [सं. अ+दल]. **०पण**–असमर्थता; अयोग्यता; असारता. 'जें अदळपण देखिलें। तुझिये प्रज्ञे।' –ज्ञा १३.९४९.

अदळ—पु. स्त्री. १ झीज; वापर; वर्दळ; रहदारी; त्रास; जिकीर; छळ; अटाअट. २ घाव; धक्का; हेलकावा. (क्रि० काढणें, लागणें, लावणें) 'दारिद्र्याचा अदळ संपत्तिमानास फार लागतो.' 'ह्या ओझ्यावर सर्वांचा अदळ.' [सं. आ+दल्]. **०अ(आ)पट, ०उपट, ०उप(फ)ळ, ०धोप, ०धोपट,–ळा आदळ**–स्त्री. रागाच्या भरांत चीज वस्तूंची फेंकाफेंक; दंगा; धिंगामस्ती.

अदळणें—उक्रि. १ कोसळणें; धडकणें; थडकणें; आपटणें. 'आधि नगार्टीं घाला धैर्यशैव आदळोनियां भग्न।'–मोकर्ण १.१८. 'जैसा पर्वतावरी पडला पर्वत। तैसा सुप्रिवावरी आदळत।' २ चालून जाणें; तुटून पडणें; जोरानें हल्ला करणें. 'एथून फौज उठली ती थेट किल्ल्याच्या माचीस जाऊन अदळली.' ३ (ल.) अधाशीपणानें खाणें; (दांताखालीं) रगडणें. [सं. आदलन; किंवा अद्=खाणें+ल स्वार्थी. –भाअ १८३४].

अदा—पु. १ नखरा; नजर फिरविणें, डोळे मोडणें वगैरे शृंगारिक हावभाव; अभिनय; विलास; अंगविक्षेप; चेष्टा; ऐट. 'डबगहिन्यांत उभी होती शयनांत खूण अदाची मारी लहरा।' –पला ७२. 'हसत मुख सदां पाहुन तुझी आदा। भुलुन झुकले।' –हो १३५. 'त्या मैफलींत त्या नाटकशाळेनें अदा करून लोकरंजन केलें.' २ खुण; शकून; चेष्टा. 'जवळ जाऊन पहातो तों कावळा अदा दाविती।' –अफला ७५. [?]

अदा—१ लाभ; नफा; फायदा. २ संग्रह; साठा; संचय; मुदल; भांडवल; मालमत्ता. ३ उत्पन्न; वसूल; मिळकत; प्राप्ति. 'अदा पाहून खर्च करावा.' 'तीन टक्के अदा त्रेपन्न टक्के खर्च.' ४ पूर्ण करणें; भरपाई; फेड. 'आम्ही आपला आमील ठेवून तुमचा पैका अदा करून देऊं.' –दिमरा १.२१४. **करणें**–फेडणें; देणें; वारणें; देऊन टाकणें (मागणी, कर्ज). [अर. आइदा किंवा अदा. तुल० सं. आ+दा=देणें. पं. आदाय]

अदाई—स्त्री. १ मिळकत; प्राप्ति; उत्पन्न. २ भरपाई; फेड. ३ (ल.) कामाची पूर्णता. –वि. हातीं आलेले; भागविलेले–देऊन टाकलेले-पैसे. [अदा]

अदाता—वि. अनुदार; कृपण; कंजूष. 'अदातयाचें उंच मंदिर।' –रावि ६.३४.

अदातृत्व—न. कृपणपणा. [सं.]

अदांभित्व—अदंभित्व पहा.

अदालत—स्त्री. १ न्यायकचेरी; न्यायसभा; कोडत; कोर्ट. २ खटला; चौकशी; इन्साफ; न्यायव्यवहार. [अर.]

अदावत—स्त्री. १ वैर; दुष्टावा; हेवा; भाऊबंदकी; अकस; शत्रुत्व; द्वेष; मत्सर; दावा. उ० अदावतीच्या फिर्यादी. २ आळ; दोषारोप. (क्रि० करणें, घालणें, घेणें, पडणें). ३ दुखापत. ४ संकट. **–ती–त्या**–वि. द्वेष्टा; अदावत आणणारा; भांडखोर; कुभांड रचणारा. [अर.]

अदावळ—स्त्री. १ खोडसाळपणा; टवाळकी; दांडगाई; चेष्टा; उपद्रव (लहान मुलांचा). २ खोटा आरोप; तोहोमत; दोषारोपण; आळ. (क्रि० घालणें, टाकणें, येणें.) 'मल्हारराव यांनीं पुत्राच्या कटाचें हे अदावळ घातली आहे.' –भाव ६. ३ लचांड; संकट; छळ; त्रास. [अदा+वळ; किंवा अदावत]

अदिति—स्त्री. इंद्रादि देवतांची–आदित्यांची माता. [सं.]

अदिनाशंबा—शुक्रवारची रात्र. [फा.]

अदीक—(गो.) अधिक पहा.

अदींचेंबि(वि)दीं, अदींविदीं—आदींचे बिदी पहा.

अदीक्षित, दीक्षितेतर—वि. दीक्षा न झालेला; प्राकृत जन; सामान्य जन; 'लेमन' या इंग्रजी शब्दाचा पर्याय. 'कौंसिलचे एकाद्या सालचे अदीक्षित कामदार पुढीलसालीं निवडून न आल्यास त्यांस सदर सालाकरितां कौंसिलचे सभासद समजावें.' –ई. वि. १८९. कौं. ध व नि. ९.१३ इ. [सं. अ+दीक्ष]

अदुःखनवमी—स्त्री. भाद्रपद शुद्ध नवमी (भावी वर्षांतील सर्व दुःखें टळावीं म्हणून या दिवशीं स्त्रिया देवीची पूजा करितात). [सं.]

अदुगर—(कुण.) अगोदर पहा. 'ए बया, माझा अदुगर कडे लोट कर.' –बाय २.२.

अदूरदृष्टि—स्त्री. १ ज्याला दूरचें दिसत नाहीं असा; 'शांटे साईट' असणारा; अधू डोळ्याचा. २(ल.) उतावळा, अप्रबुद्ध; दूरवर विचार न करणारा. [सं.]

अदूषणीय–अदूष्य—वि. दोष देतां न येण्यासारखा; अनिर्भर्त्सनीय; अनिंद्य; अवाच्य. [सं.]

अदृशी—वि. अदृश्य; गुप्त; अप्रकट. 'श्रीगुरु जाले अदृशी।' –गुच ५१.४४४. [अदृश्य अप.]

अदृश्य—वि. दिसत नाहीं असा; गुप्त; अगोचर; अलक्ष. [सं.]

अदृश्यवाद—पु. ध्येयवाद; काल्पनिक अत्युत्कृष्टपणा; इं. 'आयडियालिझम.' –राजिगी. [सं.]

अदृष्ट—वि. न दिसलेलें; न पाहिलेलें; गुप्त. –न. नशीब; दैव; प्राक्तन; कपाळ (शुभाशुभ फल होण्याविषयीं प्रयोजक जें आपलें प्राक्तन, कर्म तें –त्याचा ब्रह्मलेख कपाळीं लिहिला असतो); प्रारब्ध; ईश्वरी संकेत. 'होय अदृष्ट आपैतें। तंयिं वाढ्‌वि रत्नें परते॥' –ज्ञा १५.२२; 'मरमर विधातया दुष्टा। काय अदृष्टा लीहिलें' –एरुस्व ५. ६९. **–घ्रास येणें**–क्रि. अनुचित गोष्टीस करावी लागणें; नशीबीं येणें, भोगावें लागणें. **०खर्च** पु. दानधर्म, इत्यादि न दिसणारा खर्च; याचें फल पुढील जन्मीं मिळतें. **०धनसंचय** पु. गुप्त धनसंग्रह. **०पूर्व**–वि. पूर्वी कधीं न पाहिलेला. **०फल**–न. भविष्य काळीं मिळणारें फल. **०भय**–न. स्वकर्माच्या परिणामासंबंधाची, कृतकर्माविषयीं भीति किंवा काळजी. **०वंत–वान**–पु. ज्याचें नशीब चांगलें आहे असा; नशीबवान. **०वशात्**–यदृच्छेनें; दैवयोगानें; नशिबानें. **०मत–वाद, अदृष्टार्थ–मतवाद**–१ दैववाद किंवा तसें मत; कर्मवाद. २ या जन्मांतील पापपुण्यांचें पुढील जन्मीं फल मिळतें असा विश्वास. **०वादी, अदृष्टार्थवादी–दैववादी**; अदृष्ट मताचा पुरस्कर्ता. **०हीन**–दैवहीन; दुर्दैवी; फुटक्या नशीबाचा. 'शक्तिहीन सामर्थ्यहीन, अदृष्टहीन भिकारी।' –दा २.३.३४. [सं.]

अदेख—वि. १ मत्सरी; असहिष्णु; दुसऱ्याचा उत्कर्ष पाहवत नाहीं असा; वाईटावर असलेला. २ (बायकी) ज्याचें तोंड बघूं नये असा. [सं. अ+दृश्; प्रा. देख; हिं. देखना]

अदेखणा—वि. १ कुरूप; बेडौल; दिसण्यांत वाईट. अदखणा पहा. २ मत्सरी; हेवेखोर; असहिष्णु. **–णेंपण**–दुसऱ्याचें बरें न पाहवणें; विद्वेषसंतोषीपणा; मत्सर. [अदेख]

अदेखाई—स्त्री. शत्रुत्व; मत्सर; हेवा. 'दुसऱ्याचे भाग्याची अदेखाई न करावी.' –सिंब ५१.

अदेय—वि. न देतां येण्यासारखें; बहाल न करण्यासारखें. **०दान**–न. अयोग्य देणगी. [सं.]

अदैव—वि. हानिकारक; मारक; विरुद्ध. 'अदैव वडवानळ। दानवांसी।' –शिशु ५१६. [सं.]

अदोळणें—अक्रि. अंदोळणें; आपटणें; आदळणें; हालणें; आंदोलन पावणें. 'हार गळ्यांतील ख्याल करित महिभाळ अदोलित।' –अमृत ५१. [सं. आ+दोल्; आंदोलन]

अदोळसो—पु. (गो.) अडुळसा पहा.

अद्दल—स्त्री. न्याय. (ल.) ठेंच; ठोकर; कृतकर्मांचें प्रायश्चित्त; शासन; शिक्षा; सावधगिरी; ताकीद. **०घडणें**–अक्रि. शिक्षा मिळणें; ठोकर बसणें; इशारत मिळणें. –वि. नेमकें; बरोबर; तितकेंच; मोजकें (माप, प्रमाण, वजन, हिशेब इ०). 'जी खेळांतील मार्कांची सीमा ठरवावी तितकेच अद्दल मार्क झाले तरच तो खेळ जिंकतो.' –पाट २६. [अर. अदल्=न्याय]

अद्दल—हुशार; अट्टल पहा. (चांगल्या अर्थी) अ० न्हावी–शिंपी-कसबी इ०. (वाईट अर्थी) अ० चोर–लबाड–शिनळ–हरामी.

अद्दना—वि. नीचतम; कनिष्ठ. 'प्रस्तुतचा रंग तर असा दिसतो जे आला व अद्दना खाविंदापाशीं बराबर.' –रा ५.९. [अर]

अद्‌भागी—वि. दुर्दैवी; हतभागी; अदभागी पहा. [सं. हत+भागिन्]

अद्‌भुत—वि. अपूर्व; आश्चर्यकारक; पूर्वी न झालेलें; चमत्कारिक; विलक्षण; अचंबा वाटण्यासारखें. 'अद्‌भुत वार्ता आणि कोल्हे गेले तीर्था.' 'तो (सिंहनाद) गाजत असे अद्‌भुतु।' –ज्ञा १.१२६. –न. १ आश्चर्य; उत्पात; चमत्कार (धरणीकंप; उल्कापात; पुरुषास हत्तीचें बळ इ०). २ नवरसांपैकीं एक रस. अ० रस पहा. 'जेथ शांताचिया घरा। अद्‌भुत आला आहे पाहुणेरा। आणि वेरांही रसां पांतिकरां। जाहला मानु॥' –ज्ञा ११.२. **०मांडणें–विलक्षण गोष्टी** करावयास लागणें. **०कौतुक**–न. चमत्कार; आश्चर्यकारक कृत्य. 'अद्‌भुत कौतुक वर्तिलें जाण। ऐका तें भाविकहो।' **०दृष्टि**–स्त्री. आश्चर्यकारक गोष्टी पाहिल्या असतां पापण्याचे केस (भुंवया?) आकुंचित होतात, बुबुळें व तारका चढतात, अशी कृति करणें. हा अद्‌भुत रसाचा अभिनय आहे. **०रस**–पु. काव्यांतील नवरसांपैकीं

एकरस. ०शांति—स्त्री. (शेडेनक्षत्र, धरणीकंप इ०) भावी अरिष्टसुचक कांहीं अद्‌भुत झालें असतां त्या अरिष्टाचे निरसनार्थ जें होमादि कर्म (विधि) करतात तें.

अद्य—अ. आज; हल्लीं. [सं.]. **०तन**—वि. आजचें; चालू दिवसा संबंधाचें —**न.** एका मध्यरात्रीपासून दुसऱ्या मध्यरात्रीपर्यंतच्या चोवीस तासांचा काल; आजचा दिवस. [सं.]

अद्यतनभूत—पु. १ [व्या.] अपूर्ण भूतकाळ (चालू भूतकाळ). २ सामान्य-अनियमित भूतकाळ. [सं.]

अद्यप्रभृति—आजपासून. [सं.]

अद्यावत्—क्रिवि. (विप्र. अद्यावत) आजपर्यंत; आजपावेतों. [सं.]

अद्या—पु. अदा; नफा; मिळकत; लाभ; प्राप्ति (व्यापार, नोकरी यांपासून). [अर. अदा]

अद्याप-पि—क्रिवि. अजून; अजूनहि; हा वेळपावेतों; आजपर्यंत; [सं. अद्य+अपि]

अद्यापपर्यंत-वर—क्रिवि. अजूनपर्यंत; अद्यापि.

अद्यापय—क्रिवि. (गो.) अद्यापपर्यंत; अद्यापहि. ' अद्यापय जेवुक ना ? दोन वरां झाली. ' [सं. अद्य+अपि+हि]

अद्यावस्थ—अत्यवस्थ (अप.) पहा.

अद्र—अभ. (व) उलट. ' पाण्यांत उडी टाकून त्यानें मुलीला तर बाहेर काढलें नाहींच अद्र आपणच मेला. ' —क्रिवि. मुद्दाम; हटकून. ' मला अद्र विटाळ करतो. ' [अदरून]

अद्रक—न. आलें [सं. आर्द्रक; हिं. अद्रक]

अद्राव्य—वि. (शाप.) वितळण्यास कठीण; ज्याचा रस होत नाहीं किंवा जें विरघळत नाहीं असें. [सं. अ+द्रु]

अद्रि—पु. पर्वत; डोंगर; गिरि. ' नातरी तपस्थाचनेलागीं । दुजेपण मांडूनि जगीं । महत्त्वाद्रीच्या शृंगीं । बैसावया ॥ ' —ज्ञा १७. २४२. [सं.]

अद्रीण—न. (गो.) अजीर्ण. [सं. अजीर्ण]

अद्रुष्ट—न. (बायकी, कुण.) कपाळ; नशीब; अदृष्ट पहा. ' स्नान झाल्याबरोबर "अद्रुष्टाला" ऊफे कपाळाला कांहीं न लावणें हें वरिष्ठ जातींतील चांगल्या घराण्यांत चांगलें मानीत नाहींत. ' —आगर ३.११.

अद्रून—अ—आदरून (अप.) पहा.

अद्रें—क्रिवि. (खा.) आदरून; मुद्दाम. [सं. आदर]

अद्वंद्व—न. सुखदुःख, मान—अपमान इत्यादि द्वंद्वांपलीकडील; निर्द्वंद्व पहा. (अप. रूप अद्वद.)

अद्वय—वि. द्वैतविरहित; एकरूप; अभेद. ' तें आपणचि अद्वय ब्रह्म । ' —ज्ञा ५.९६. **०युक्ति**—स्त्री. अद्वय—अद्वैत तत्त्वज्ञान पद्धति. ' कि प्रेमरसावरून भक्ति । निरपेक्षावरून वरति । कि पावला अद्वय युक्ति । सहपश्चात्ताप त्यागें जाणिजे । ' **०वादी**—वि. अद्वैतवादी; सर्व वस्तू एकचित्स्वरूप आहेत असें मानणारा; बुद्ध. [सं.]

अद्वातद्वा—क्रिवि. विसंगत; असंबद्ध; भरमसाट; भलतेंसलतें; अचकटविचकट; ताळतंत्र सोडून; मनस्वीपणानें; बेतालपणानें (भाषण, वर्तणूक, बोलणें). ' यद्वातद्वा भविष्यति ' या म्हणीवरून. ' त्यानें अद्वातद्वा विचार प्रकट केल्यास तो उपहासास पात्र होईल. ' —टि ४.३१५. [सं. यद् वा तद् वा]

अद्वितीय—वि. ज्यासारखा दुसरा कोणी नाहीं असा; विलक्षण; निरुपम; बिनजोड; सर्वश्रेष्ठ; लोकोत्तर; असामान्य. ' जें अद्वितीय उत्तम । ' —ज्ञा १.४९. [सं.]

अद्वैत—वि. १ जीव व शिव (परमात्मा) एकच असें मत. ' जड-सृष्टि आभासात्मक असल्यामुळें खोटी व ब्रह्म हेंच एक सत्य व आत्मतत्त्व आहे, जीव हा परमात्म्यापासून अभिन्न असल्यामुळें तो व शिव एकच होय, ' हें शांकर (शंकराचार्योंचें) मत. २ ब्रह्म. ३ (ल.) मतैक्य; ऐक्य; दाट परिचय; सलगी; एकोपा. **०कुसरी**—स्त्री. (काव्य) अद्वैत मतांचें गूढ ज्ञान. ' एक नाम हरी द्वैत नाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणें ॥ ' **०भाव, ०ताभाव**—पु. अद्वैतपण; एकी; ऐक्यमत्य. **०मत**—न. जीवात्मा व परमात्मा यांचा वस्तुतः अभेद असें मत. **०वन**—न. महाभारतांत वर्णन केलेलें एक वन; (जेथें सर्व पशु वैरभाव विसरून आनंदानें राहात.). **०वाद**—पु. अद्वैत; अद्वैत मत पहा. **०वादी**—वि. अद्वैतमतास अनुसरणारा (शंकराचार्यादि). ' रिपुशर विजयी गमती द्वैतीं अद्वैतवादि पंडितसे । ' —**मोकर्ण** ४७. १५. **०सुख**—न. अद्वैताच्या साक्षात्कारामुळें मिळणारें सुख-आनंद. [सं.]

अद्वैतानंद—अद्वैतसुख पहा.

अधः—क्रिवि. खालीं; तळाला; समासांत खालचा या अर्थी जसें:—अधःप्रदेश, अधोभाग. ' तेथ अध वशैतें आकुंचे । ' —ज्ञा ६.२३७. [सं. अधः]

अधकाव-वाचा—वि. अधिक; उरलेला; जास्त; फालतूक, फाजील. [सं. अधिक]

अधकुरो—वि. (गो.) अर्धवट; अपूर्ण. [सं. अर्ध+कृत—कुर—खुर—(खोर); सिं. अधोखारो, अथोखो]

अधकोर—पु. वितकोर; आठवा भाग (भाकरीचा). [सं. अर्ध+(चत) कोर; किंवा अष्टकृत—अठकुर—अठकोर—अधकोर]

अधचामधचा—वि. १ अधील मधील; अर्धवट; मधल्या ठिकाणचा; ना पहिला ना शेवटचा; कोठील तरी. २ कोणत्याहि एका वर्गांत न पडणारा; धड ना शहाणा ना मूर्ख; न खरें न खोटें; ना शैव ना वैष्णव इत्यादि. [सं. आद्य+मध्य]

अधडा—आधडा पहा.

अधण—आधण पहा.

अधन—वि. निर्धन; दरिद्री; निष्कांचन. **०व्यवहार**–फौजदारी प्रकरण बाब; ज्यांत पैसा किंवा मालमत्ता यांचा संबंध नाहीं अशी कायद्याची बाब. [सं.]

अधपणें—क्रि. होरपळणें. 'अधपलीं तवकें । इंद्रियें घरिलीं ।' –ज्ञा १२.४६. [सं. अर्ध+तपन–अधपन]

अध:पतन—न. १ खालीं पडणें; अध:पात. २ पुण्यक्षयामुळें नरकांत पडणें; स्वर्गांतून मृत्युभूमीवर किंवा नरकांत पडणें. ३ नरकपुरी. 'वेदशास्त्रें पुराणें तया बोलती अध:पतन । जया नाहीं परिज्ञान गुरुपरंपरेची ॥' [सं.]

अध:पंथ—पु. नरकांत जाण्याचा मार्ग. [सं. अध:पथ]

अध:पात—अध:पतन पहा. **०होणें**–हीनावस्थेस पोंचणें; नरकांत पडणें. 'करितां ऐके जो निंदा या संतांची। तयासि होतोचि अध:पात ॥.' **अध:पातीं**–निराशेच्या–क्लेशाच्या खोल दरींत: दुसऱ्याच्या अविश्वासामुळें किंवा चुकीमुळें उत्पन्न झालेल्या अडचणी-मध्यें, संकटांत. (क्रि० घालणें, पडणें).

अध:प्रमाण—वि. (शाप.)–प्रमाणापेक्षां कमी; खालच्या प्रतीचें; कमी तीव्र (मद्य). इं. अंडरप्रूफ. –सेंपू भा. २

अध:प्रवाहीचक्र—न. (शाप.) पाणी जेथून पडतें अशा ठिकाणीं बसविलेलें चक्र; हें पाण्याच्या जोरानें फिरतें. (इं. अंडरशॉट् व्हील).

अधम—वि. १ हलका; कनिष्ठ; क्षुद्र; क्षुल्लक. २ (ल.) नीच; वाईट; हलकट; नष्ट; निंद्यकर्मा; दुष्ट; विरुध्द. 'वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥'–तुगा ६४२. **०किडा**–पु. १ बकऱ्याच्या यकृतामधील रक्त ज्या विकारावर सांगितलें आहे असा एक घोडयाचा विकार. २ मनुष्याचें यकृत ज्यावर सांगितलें आहे असा एक रोग (एका दंतकथेप्रमाणें). ३ काळपुळी (कांहींच्या मतें). ४ नेहमीं दुखणेकरी इसम–मुलगा. [सं. अध: + म]

अधमद्दा(दृष्टि)—स्त्री. (नृत्य) खालीं बघणें, डोळ्यांची उघडझांप करणें; बाहुल्या कधीं दृश्य व कधीं अदृश्य करणें असे प्रकार ज्यांत होतात ती. [सं.]

अधमर्ण—पु. कर्जदार; ऋणी; देणेदार. [सं. अधम+ऋण]

अधर—वि. खालचा, तळचा; हलका. –पु. अधरदिशा; अध:स्वस्तिक; अधोबिंदु. –पु. १ खालचा ओंठ. २ (सामान्यत:) ओंठ. 'जीवशिव एकाकार । तैसे मिनले दोन्ही अधर ॥' –एरुस्व १.५७. ३ (नृत्य अभिनय) खालच्या ओंठानें (अधरानें) दाखविले जाणारे अभिनय. याचे सहा प्रकार आहेत. विकूणन, कंपन, विसर्ग, विनिगूहन, संदष्टक व समुद्र. **०चावणें–चावून खाणें**–क्रि. रागानें ओंठ चावणें; अतिशय रागांत असणें. 'परमसंताप वाटला तेव्हां । अधर चावून खातसे ॥' **०पान**–ओंठांचें चुंबन; मुका. **०पुट**–(काव्य) दोन्ही ओंठ. (अंजलिपुटाप्रमाणें शब्द). 'बत्तीस हिरकण्या एकवळीनें विराजती अधरपुटीं ।' **–रामृत**–न. ओंठांच्या चुंबनापासून मिळणारा अमृततुल्य रस (इतका मधुर).

अधर, अधर—वि. १ अधीर; उतावीळ; दम नसलेला; असहिष्णु. २ निराधार; अधांतरीं असलेला; अंतराळीं असलेला. [सं. अ+धृ=धारण करणें]. –क्रिवि. १ अह्लाद; वरचेवर; अधांतरीं; हलकेंच; सैलपणें; २ अचळवी; अरळ; अचानक; **०ठेवणें–लोंबविणें**–अधांतरीं–कांहीं आधार नसतां मध्येंच लोंवत ठेवणें. **०बसणें–लोंबणें**=आधारावांचून असणें, रहाणें, लोंबणें.

अधरोत्तर—न. दुरुत्तर. 'परंतु अधरोत्तरें करण्यांत भागुरायण मुळींच हुषार नव्हता.' –चं १७९.

अधरोष्ठ—पु. खालचा ओंठ.

अधर्म—पु. १ शास्त्रविरुद्ध आचरण, वर्तन; धर्मबाह्य आचरण. २ पाप; गुन्हा; वाईट कर्म. [सं.]. **०चारी**–वि. अधर्मानें वागणारा; धर्मबाह्य वर्तन करणारा. **०युद्ध**–न. बेकायदेशीर–अनीतीचें युद्ध; कपटयुद्ध. **०रत**–वि. अधर्माचरण करण्यांत आनंद मानणारा. 'अवघे देखिले अधर्मरत । वरिवरि आचार दाखवित । जैशी शांति मैंदाची ॥' **०विपाक**–पु. अधर्माचा अखेरचा (वाईट) परिणाम; अनीतीचें फल.

अधर्माचरण—न. धर्मविरुद्ध वर्तन; अनीतीची वागणूक. [सं.]

अधर्मात्मा—वि. अतिदुष्ट; अनीतिमान मनुष्य. [सं.]

अधर्मिष्ठ—वि. अतिशय अधर्मी माणूस. [सं.]

अधर्मी—वि. अधर्मानें वागणारा. [सं.]

अधलंड—वि. न अधला न मधला असा. **०मधलंड, अधरलंडमधलंड**–वि. अधचामधचा कोठील तरी. 'याचे गाण्याचा संप्रदाय धड हिंदुस्थानी नव्हे, धड कर्नाटकी नव्हे; अधलंडमधलंड आहे.'

अधला—वि. पहिला; आधींचा; प्रथम; अदला पहा. [सं. आद्य] **०मधला**–वि. मधील भागाचा; अधीलमधील. [सं. आद्य+मध्य; किंवा मधला द्वि.]

अधवड—वि. अधोड पहा.

अधवडचा–अलीकडचा; ताजा; अर्वाचीन. [सं. अद्य+वर्त]

अधवणी—न. आधण घेण्यासाठीं, उकळण्यासाठीं ठेवलेलें पाणी; आधणाचें पाणी. [आधण+सं. वन–वण=पाणी]

अधवरौतें—क्रिवि. खालचा वरतीं. 'तेथ अधवरौतें आकुंचे।' –ज्ञा ६.२३७. [अध+वरौतें=वरतीं. सं. अध: + उपरि; प्रा. उवरि; म. वरि]

अधवा—वि. तिघांत वडील (अधवा, मधवा, धाकटा). [सं. आद्य]

अधषा—वि. नवीन; अर्वाचीन. [सं. अद्य ? आद्य ?]

अधव्याचा—वि. १ उपटसुंभ; उपरी; अकस्मात प्राप्त. २ सरळ मार्गांत नसलेला; शिरस्त्यांत नसलेला; मध्येंच आडळणारा. **म्ह०**

अधव्याचा जोडला व पिडीचा मोडला (बरोबर होत नाहीं). ३ कायमचा नव्हे असा; तात्पुरता. ४ बापजाद्यांना माहीत नाहींत अशा गोष्टी करणारा; कधीं कुळांत कोणी केलें नाहीं अशा भानगडींत पडणारा. ५ एकाएकीं सत्ताधारी बनलेला. ६ अलीकडील. [सं. अध्वन्=मार्ग]

अधष्टणें—सक्रि. अधिष्ठिणें; अवलंब करणें. 'अधष्टुनी मायेतें।' –रासपं १.३. [सं. अधि+स्था]

अधस्तन—वि. खालचा. [सं.]

अधःस्त(स्थ)लीं—क्रिवि. (वायकी) १ खालीं; अधोदिशेकडे. २ अभरवशीं (पडणें, पाडणें). [सं. अधः+तल किंवा स्थल]. **०पहावयास लावणें**–मानखंडना करणें; फजिती करणें; तोंडघशीं पाडणें. 'त्या मेल्यानें मला अधस्थळीं पाहायाला केलें.'

अधःस्वस्तिक—न. (ज्यो.) खस्वस्तिकापासून काढलेली लंबरेषा अधोदिशेकडे वाढविली असतां आकाशाच्या अदृश्य गोलार्धाला ज्या बिंदूंत छेदते तो बिंदु; अधोबिंदु; अधर. [सं.]

अधस्वी—स्त्री. १ दासी. २ ठेवलेली बाई; रखेली. 'अधस्वीगमनी' =रखेली ठेवणारा. [सं. अधः+स्वीय किंवा स्वपिति]

अधस्वी—वि. अधाशी; अधोरी; अतिखादाड. [अधाशी अप.]

अधांटी—अंधाटी पहा.

अधाडा—पु. १ तुटलेला कडा. 'मग प्रत्याहाराचा अधाडा। जो बुद्धीचियाही पाया निसरडा। जेथ हटिये सांडिती होटा। कडेलगा।' –ज्ञा ६.५६; 'जिये ब्रह्माचळाचा आधाडां।' –ज्ञा ७.६९. २ (ल.) आधार.

अधाडें—शअ. मध्यें; कडे. –वि. अर्धघट. [सं. अर्ध+कड]

अधांतरीं—क्रिवि. हवेंत; अंतराळीं; आकाशांत; वर; निराधार; मध्येंच. 'आधांतरीं होती वेडे।' –ज्ञा ३.७.१५. [सं. अधः+अन्तर्]

अधांतरी—वि. निराधार; एकांडा. 'अशा अधांत्री व सर्वतंत्र स्वतंत्र लोकांनीं सुरत येथील हिंदुसभेच्या निर्णयाकडे पाहून नाकें मुरडावीं त्यांत आश्चर्य नाहीं.' –सासं २.१६४. [सं. अधः+अंतर्]

अधातुरूप—वि. (रसा.) धातुविरहित: ज्यामध्यें धातु नाहीं असें (मूलद्रव्य); (इं.) नॉनमेटल.

अधांत्री-त्रीं—अधांतरी पहा.

अधाधिणें—अक्रि. भिवविणें; भेडसावणें; आधाधिणें पहा. [?]

अधाधे—वि. अर्धे अर्धे. 'स्त्रीपुरुष नामभेदें नांदे। जग सकळ आधाधे–। पगें जिहीं।' –अमृ १.१७. [सं. अर्ध+अर्ध]

अधार्मिक—वि. धर्माप्रमाणें न चालणारा; दुराचारी; अन्यायी; पातकी. [सं.]

अधाशी-सी—वि. हावरा; असोशी; अतृप्त; लोभी; खादाड. [सं. अति किंवा अधि+आशी]

शको. १. ८

अधास—स्त्री. हांव; लोभ; उत्कट इच्छा. [सं. अधि किंवा अधः+आश=खाणारा; प्रा. आस. किंवा अधि+आशा; प्रा. आसा]

अधासा—अधाशी पहा.

अधि—शअ. नेहमीं नामाशीं संयुक्त असणारा उपसर्ग. वर: वरचढ (स्थल, परिमाण, गुण यांनें). उ० अधिपति.

अधिक—वि. १ जास्त; पुष्कळ; फार. (ल.) नकोसा; नावडता. 'मावशींना चंद्रिका जशी अधिक झाली तशी चंद्रशेखरांना कांहीं झाली नव्हती.' –निचं ११८. २ अधिक मोठें; गुरुतर. ३ वर; पेक्षां जास्त. उ० गुणाधिक=गुणांनीं वरचढ; रसाधिक=रसेंकरून अधिक, चांगली चव असलेला. ४ जास्त; वर–समासांत संस्कृत संख्यावाचक शब्दांच्या मध्यें. उ० एकाधिक शत. ५ विशेष; पटाईत; निष्णात; अडल; असाधारण (वाईट अर्थी–द्वाड, दांडगा, खोडकर मूल). ६ जादा; वाढीचा (महिना अधिक–मास). [सं.] **०होणें**–१ संपणें; कमी होणें. 'करंडयांतलें कुर्कुं अधिक झालें.' २ वाजवीपेक्षां जास्त पिकणें; अविकणें (फळ वगैर). **०अलंकार**–एक अलंकार; यांत कार्यनिष्पत्तीची सामुग्री पूर्ण असूनहि कार्य होंत नाहीं म्हणून उपरोधपर वर्णन असतें. उ० 'ज्या उदरांत सकलहि लोकत्रय सावकाश राहतसे। त्यांतचि मुनिवरदर्शन होतां आनंद तो न मावतसे॥' –साचं ४४. **०आगळा**–थोडेसें वर; थोडें जास्त.' अधिक आगळे चार रुपये लागले तरी चिंता नाहीं.' **०उणा**–वि. १ कमीजास्त. २ लहानमोठा. ३ बरावाईट. **०उणा शब्द**–पु. मर्यादेचें उल्लंघन करण्या. सारखा शब्द; टाकून बोलणें. **०प्रसंग**–पु. दंगामस्ती; मांडण; उपमर्द. 'अधिक प्रसंग करशील तर एका क्षणांत तुझें तोंड कायमचें बंद करीन.' –अरुंतेभा १२४. **०भेट**–स्त्री. साक्षात्कार. –मनको. **०महिना-मास**–सुर्यसंक्रांतिरहित चांद्रमास; चांद्रवर्षांत सुमारें दर तीन वर्षांनीं येणारा तेरावा महिना. हा महिना ३२ महिने १६ दिवस आणि ४ घटका इतक्या कालानंतर पुन: येतो. इष्ट शकांत ९२८ वजा करून १९ नें भागावें; बाकी १, ४, ६, ७, ९, १०, १२, १४, १५, १७, १८ अशी राहिल्यास अधिक येत नाहीं; ०, २, ३, ५, ८, ११, १३, १६ राहिल्यास अनुक्रमें वैशाख, आश्विन, चैत्र, श्रावण, ज्येष्ठ, आषाढ, भाद्रपद, हे महिने अधिक येतात. बारा वर्षांत चैत्र, ज्येष्ठ, श्रावण हे अधिक होतात. अठरा वर्षांनीं आषाढ अधिक. चोवीस वर्षांनीं भाद्रपद अधिक. १४१ वर्षांनीं आश्विन अधिक. ७०० वर्षांनीं अधिक कार्तिक येतो. कार्तिकापुढील चार महिने अधिक होत नाहींत व आश्विनाचे पूर्वी क्षयमास होत नाहीं. –ज्ञको (अ) १५२. **अधिकस्याधिकं फलम्**–अधिक केल्यास अधिक प्राप्ति होते; अधिक प्रयत्न केल्यास अधिक यश मिळतें.

अधिकरण—न. १ स्थान याअर्थी व्याकरणांतील एक पद (सप्तमीचा अर्थ). २ पाया; विषय; आधार; आश्रयस्थान; ज्यावर उभारलें असतें तें स्थल. 'जाणिवां पंडितांसि अधिकरणु

होएं।' –ऋ ६; 'सकळ विद्यांचें अधिकरण।' –ज्ञा १३.१. [सं.] **–णें**–आश्रय करणें. 'भूतांतें अधिकरूनि असे।' –ज्ञा ८.३२.

अधिकरणी—वि. अधिकरण असलेलें; ज्यास कांहीं आधार-आश्रय आहे असा. [अधि+कृ]

अधिकाई—स्त्री. १ समृद्धि; अधिकपणा; वैपुल्य. २ मोठेपणा; श्रेष्ठत्व; वरचढपणा. 'ऐसें अगाध तुझें भजन। अगम्य भजनाचें महिमान। भक्तिअधीन तुझें देवपण। मा मोक्षासि कोण अधिकाई।' –एभा २९.७३७. [अधिक+ई प्रत्यय]

अधिकांग—न. एकादा अधिक असलेला अवयव (सहावें बोट). –वि. ज्यास एकादा अवयव अधिक आहे असा. [सं. अधिक+अंग]

अधिकाधिक—वि. जास्तजास्तच. 'तों अधिकाधिक वाढे पुच्छाग्र। जैसा पंडिताचे बुद्धीचा प्रसर। बहुत बोलतां नसंरचि॥' [सं.]

अधिकार—पु. १ सनेचें स्थान; जबाबदारीची जागा. २ धनीपणा; वर्चस्व, प्रभुत्व; हक्क. ३ कार्यक्षेत्र; मर्यादा; प्रांत. ४ योग्यता. 'अधिकार तैसा करूं उपदेश।' 'जैसा पाहोनि अधिकार। तैसें बोलावें उत्तर।' –तुगा ८१७. ५ (व्या.) सर्व साधारण नियम, विधान, दिग्दर्शक वाक्य; कांहीं विशिष्ट गोष्टींना लागू होणारा सामान्य नियम अथवा मथळा; अशा नियमाचा उपयोग. ६ विषय; प्रकरण; ज्याविषयीं विचार केला आहे तें. 'ब्रह्मज्ञान उद्देशून वेदांत प्रवृत्त झाला तस्मात् त्यामध्यें ब्रह्मज्ञानाचाच अधिकार.' ७ राज्य; अधिसत्ता; अमलदारी. [सं.अधि+कृ]. **०च्युत-भ्रष्ट**–वि.(प्रधान, सुभेदार इ० मानाच्या)अधिकारापासून भ्रष्ट; अधिकारावरून–नोकरीवरून काढलेला; कमी केलेला. **०च्युति-भ्रंश-पुस्त्री.** सत्तानाश; पदच्युति; अपकर्ष; -हास. **०त्याग-विसर्जन, अधिकारोत्सर्ग**–पु. सत्ता किंवा स्थान सोडणें; अधिकार टाकणें. **०बाजी**–स्त्री. अधिकाराची हौस. 'पटेल कमिटीचा रिपोर्टच अधिक विश्वसनीय ठरत असतां, तो रिपोर्ट सरकारजमा करण्यांत यावा आणि ज्या अधिकाऱ्यांनीं निष्कारण गोळीबार करून शेंपन्नास इसम नाहक ठार केले ते अधिकारी सरकारच्या दृष्टीनें सच्चे ठरून आपली अधिकारबाजी गाजवीत रहावे, यापेक्षां न्यायदेवतेचा उपमर्द तो कोणता?' –के १६–९–३०. **०विभागणी**–(इं. डिसेंट्रलायझेशन) एकाकडेसच सर्व अधिकार न ठेवतां कांहीं बांदून देणें; मध्यवर्ती सरकार व वसाहती किंवा प्रांतिक सरकार यांच्यामधील अधिकाराची वांटणी. 'जेथें अशी अधिकार विभागणी असेल तेथें स्वराज्य नांदत नसून गुलामगिरीच वावरत आहे असें खुशाल म्हणावें.' –के २–१२–३०. **०शिष्टाई**–एकाद्या अधिकाऱ्याच्या स्थानीं असल्यामुळें वागणुकींत दाखवावयाची अदब, गौरव वगैरे. **०स्थ**–वि. स्थानापन्न; सत्ताधिष्ठित. [सं.]

अधिकारणें—अक्रि. एकाद्याला उद्देशून करणें–बोलणें (उघड किंवा मनामध्यें); स्पष्टपणें एकाद्यास उद्देशून एकादी गोष्ट करणें. 'धन्वंतरीसारिखे जे मोठेमोठे वैद्य त्यांतें अधिकारून वैद्यस्तुति केली असतां जितकी केली तितकी शोभेल.' 'यानें मला अधिकारून शिव्या दिल्या.' [सं अधिकृ]

अधिकारी—पु. १ कामगार; अंमलदार; हुद्देदार. 'अधिकारिया रिगतां गांवो। होय जैसा उत्साहो।' –ज्ञा १८.७९५. २ विशिष्ट स्थानाबद्दल सत्ता, हक्क, विशिष्ट गुण, पात्रता असलेला; हकदार; वारसदार. ३ अध्यक्ष; चालक; देखरेख करणारा; व्यवस्थापक; मॅनेजर. ४ देशमुखाच्या खालील एक जिल्हाकामगार; गांवकामगार पाटील यासहि हा शब्द लावतात. ५ नियामक; प्रवर्तक; उगमस्थान. 'जन्माचे अधिकारी आईबाप, कर्माचा ज्याचा तो.' ६ एक आडनांव. –वि. अधिकार असलेला; लायकीचा; योग्य तेचा; पात्र. [सं. अधिकारिन्]. **०वर्ग**–अंमलदार मंडळी; कार्यकारी मंडळी; नोकरशाही.

अधिकृत—वि. १ विशिष्टस्थानापन्न; सत्ताधिष्ठित. २ अधिकार मिळालेला; नेमलेला. 'ठाणेदाराची आपण अधिकृत बातमीदार आहोंत अशी खात्री पटवावी लागे.' –के १२-७-३०. ३ मनांत असलेलें; उद्दिष्ट; अधिकारलेला; अनुलक्षित. [सं.]

अधिकोत्तर—वि. १ विशेष; अधिक; याहून जास्त. 'अधिकोत्तर कांहीं नाहीं'. २ असामान्य; विलक्षण; वाजवीपेक्षां जास्त; लोकोत्तर, वरचढ; एकाहून एक; अभूतपूर्व; भयंकर. 'तेथें न चाले तंतर मंतर, वर्तमान हें एक अधिकोत्तर।' –गेपो २१४. [सं. अधिक+उत्तर]

अधिगत—वि. १ प्राप्त; पोंचलेला; २ ज्ञात; जाणलेला; अवगत; माहीत. [सं. अधि+गम]

अधिगम—पु. १ बोध; उमज; प्राप्ति: ज्ञान. २ (कायदा) सांपडलेली ठेव, पैसा. [सं.]

अधिगम्य—वि. प्राप्त होण्यासारखें; प्राप्त व्हावयाचें (ज्ञान, ज्ञानाचा विषय).

अधिदेवता, अधिदैव, अधिदैवत—स्त्री.न. १ मानलेली, स्थापन केलेली, अधिष्ठित देवता. २ मनुष्याच्या विशिष्ट अवयवांत, इंद्रियांत, शक्तींत अधिष्ठित असलेली देवता. उ० सूर्य, नेत्रांमध्यें; अग्नि, नाकामध्यें; दिशा, कानांमध्यें; वरुण, तालूमध्यें; वायु, त्वचेमध्यें; इ०. अधिभूत हें ज्ञेय म्हणजे जाणण्याची वस्तु असते; अध्यात्म हें ज्ञानसाधन म्हणजे जाणण्याचें साधन असतें व अधिदैवत हें ज्ञाता म्हणजे जाणणारी शक्ति असते. उ० मन अध्यात्म, जेथें मंतव्य अधिभूत, चंद्रमा अधिदेवता; त्वचा अध्यात्म, जेथें स्पर्शितव्य अधिभूत, वायु अधिदैवत. 'अधिदैव अध्यात्म अधिभूत। त्रिपुटी बोलिजे ते हे येथ।' –एभा २२. ३२६. ३ ग्रहमख वगैरे कृत्यांत मुख्य देवतेच्या उजव्या बाजूला

स्थापन केलेली देवता. डाव्या बाजूच्या देवतेस प्रत्यधिदेवता म्हणतात. [सं.]

अधिप, अधिपति—पु. स्वामी; मालक; धनी; सत्ताधीश; राजा; अधिराजा. उ० ग्रामाधिपति, देशाधिपति, राज्याधिपति. [सं. अधि+प]

अधिभूत—न. साक्षात वस्तु; ज्ञानाचा विषय होण्यासारखी वस्तु; अधिदैवत पहा. [सं.]

अधिमधि—शअ. मध्यंतरीं; अधेमध्यें; कोठेंतरी मध्येंच. 'नसता अधिमधि उतरा । नसतींच विघ्नें येती घरा ।' –नव १४.१२६. [सं. आदि+मध्य]

अधिमास—पु. अधिकमास पहा.

अधिराज—पु. सार्वभौम राजा; मुख्य. 'तरी सकळ वीराधिराजु । जो सोमवंशीं विजयध्वजु ।' –ज्ञा १२.२० **–ज्य**—न. सार्वभौमत्व; साम्राज्य. [सं.]

अधिरोहण—न. बसणें; चढणें (राज्यावर, सिंहासनावर). उ० राज्याधिरोहण. [सं. अधि+रुह्]

अधिवास—पु. १ राहण्याचें स्थान; वास्तव्य; राहणें. 'यज्ञीं अधिवासु श्रुति ।' –ज्ञा ३.१३७. २ शेजार. [सं. अधि+वस्]

अधिवासन—न. १ व्रतोद्यापनादि कर्तव्य असतां तत्तत्कर्मांग देवतांचें पूर्वी विधिपूर्वक सर्वतोभद्रादि आसनांवर जें स्थापन करतात तें; देवतास्थापन. २ देवतेची प्राणपतिष्ठा किंवा स्थापना करण्यापूर्वी आदल्या दिवशीं तिला अक्षतांवर किंवा पाण्यामध्यें ठेवणें. ३ (ल.) कर्ज वसूल करण्यासाठीं किंवा आपली एकादी मागणी मान्य करून घेण्याकरितां एकाद्याच्या दारांत धरणें धरून बसणें. [सं.]

अधिवेशन—न. सभा; बैठक (इं. सेशन याला प्रतिशब्द). 'हें प्रजापरिषदेचें ८ वें अधिवेशन आहे.' –के १६–४–३०. [सं. अधि+विश्]

अधिष्ठणें—अक्रि. १ (चुकीनें अधछणें) आश्रय करणें; रहाणें; असणें; वास करणें; बसणें; युक्त होणें. 'तैसें देख पां विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें ।' –ज्ञा ३.४३. २ स्वीकारणें; अंगीकारणें; हातीं घेणें. 'म्हणे जें जें हा अधिष्ठील । तें आरंभींच यया फळेल ।' –ज्ञा ६.१५१. [सं. अधि+स्था]

अधिष्ठाता–त्रा—पु. १ राहणारा; वास करणारा; आश्रयभूत. 'इंद्रियग्रौढीमंडळा । शृंगारु एकचि निर्मळा । जै अधिष्ठात्रिया कां मेळा । देवतांचा जो ।' –ज्ञा १८.३४९. २ अध्यक्ष; आश्रयस्थान; नियामक; (परमेश्वर). 'पार्थु अधिष्ठात्री तेथिची । मातृका गा ।' –ज्ञा ६.१२७; 'ब्रह्मपदींचा अधिष्ठात्रा । त्यासी देती ब्रह्मसूत्रा ।' –एरुस्व १५.१४७. [सं.]

अधिष्ठान—न. १ वास; निवास; राहणें; वास्तव्य. 'या गांवांत आमचें दोन महिने अधिष्ठान आहे.' २ स्थान; ठिकाण; आश्रम; मठ; निवासस्थान; राहण्याचें मुख्य घर. 'येती अधिष्ठानें पहावया ।' –सप्र ८.१०.९३. 'नेत्रांतर्वर्ती जो मांसगोलक हें चक्षुरिंद्रियाचें व तद्देवतेचें अधिष्ठान.' ३ (ल.) एकाद्याच्या दारीं धरणें धरून बसणें (कर्जवसुलीकरतां). ४ दिखाऊ पसारा; आव; अवडंबर; थाटमाट; बडेजाव; बोभाटा; (ज्ञान, विद्वत्ता, संपत्ति, पावित्र्य इ० चा). (क्रि० माजणें, मांडणें, वाढणें). ५ भ्रामक आश्रयस्थान; आरोपितवस्तु. 'भ्रमविषय तयांचें अधिष्ठान रज्जू.' 'गगनीं चंद्रद्वयसें नसतां ये प्रत्यया अधिष्ठानीं ।' –मोमंभा २.११४. ६ ब्रह्म; परब्रह्म. 'जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसें ।' –ज्ञा ६.१७१. ७ आश्रय; आधार. 'जेव प्रकृतीचें अधिष्ठान ।' –ज्ञा ३.५३. ८ प्रभुत्व; सत्ता. ९ आसन; सिंहासन. [सं.]

अधिष्ठित—वि. १ व्यापलेलें; ताब्यांत घेतलेलें; वास केलेला. २ बसविलेला; स्थापलेला. ३ निश्चित केलेला; नियत. [सं.]

अधिष्ठिति—स्त्री. १ स्थिति; अस्तित्व; वसति; निवास; वास्तव्य. २ वसतिस्थान; निवासस्थान. ३ आधान; निवेश; स्थापना. [सं.]

अधिक्षेप—पु. निंदा; दूषण; आरोप; हेटाळणी. [सं. अधि+क्षिप्=टाकणें, फेंकणें]

अधीं—क्रिवि. १ पूर्वी; अगोदर. २ प्रथमपासूनच; पूर्वीच; पूर्वीपासूनच. 'अधींच बाई नाचरी तिचे पायांत बांधली घागरी' [सं. आदि.]. **०चा**–अगोदरचा; पूर्वीचा.

अधीं—क्रिवि. खालीं. 'तेवींचि गा धनेजया । संसारतरु यया । अधींचि आथी खांदिया । हेंही नाहीं ।' –ज्ञा १५.५९. **०चा**–खालचा. 'आणि अधींचीं हीं मूळें । उपपनीं परिसविली सविवेळें ।' –ज्ञा १५.२०९. [सं. अधस्]

अधींचे बदीं–बिदि, अधीं बिदीं—क्रिवि. सर्वांच्या पूर्वी; सगळ्यांत आधीं. आदींचे बिदीं पहा. [अधीं द्वि]

अधीत—वि. १ पठण केलेला–वाचलेला (भाग–ग्रंथ). २ ज्यानें पठण केलें आहे असा; शिकलेला–पढलेला (माणूस). [सं. अधि+इ=जाणें]

अधीन—वि. १ अवलंबून असलेला; ताब्यांत असलेला; सत्तेखालील; वश; हातांतील. विशेषतः समासांतः–एतदधीन; क्रोधाधीन; तदधीन; दैवाधीन; पराधीन; पापाधीन; रोगाधीन; लोभाधीन; स्वाधीन. 'तन्ही वृत्ति वर्णत्रया–। अधीन तयाची ।' –ज्ञा १८.८२०९ १२.३३. 'प्राप्ताप्राप्तीची गणना । अधीन कोणा पै नाहीं ॥ ।' –एरुस्व [सं.] **०पण**–न. ताबा; वर्चस्व; सत्ता.

अधींनामधीं, अधींमधीं—क्रिवि. १ मध्याजवळ; आरंभीं ना शेवटीं; कोठेंतरी; भलत्याच ठिकाणीं. 'हें झाड मुळापासीं तोड;

अधींमधीं तोडूं नको.' २ अव्यवस्थितपणें. ३ अवेळीं. **अधींमधीं-अध्यामध्यांत-अधेंमधें-असणें-पडणें**-संबंध ठेवणें; मध्यें पडणें. [सं. आदि+मध्य]

अधीर—वि. १ उतावीळ; चंचल; अस्थिर; घोटाळलेला; धरसोडया; अनिश्चित. 'कळों ही आली तयाची जोडी। अल्प रोकडी बुद्धि अधिरा ॥' –तुगा ७००. २ धीट नव्हे असा; भ्याड; भेकड. [सं. अ+धीर]. –पु १ धैर्याचा अभाव; भीति; भ्याडपणा; कमकुवतपणा. 'अधीरें दुणावती कष्ट।' –मुआदि २९.१४३. २ उतावीळपणा, चंचलपणा. [सं.]

अधील—वि. अगोदरचा; पूर्वीचा, पहिला; प्रथम. [सं. आदि+ल]

अधील—वि. खालचा; नीच; क्षुद्र. 'मग आधिलीं देहांतरें।' –ज्ञा १५.९२. [सं. अधः+ल]

अधीलपण—न. १ श्रेष्ठपणा; मुख्यपणा; अग्रता. 'तुका म्हणे अधीलपणें। नेली लंकेसि चेदनें।' –तुगा १०४७. २ मूळ स्वरूप. पूर्वस्वरूप. [सं. आदिल+पण]

अधीलमधील—वि. मध्याजवळचा, पहिला किंवा शेवटचा नव्हे तो; कोठला तरी. [सं. आदि+मध्य]

अधीश, अधीश्वर—पु. धनी; मालक; राजा; सार्वभौम; स्वामी. [सं. अधि+ईश]

अधुना—क्रिवि. आतां; सध्यां; हल्लीं; अलीकडे. [सं.]

अधुपा, अधुषा—वि. न धुतलेला; (तांदूळ वगैरे रोज धुण्याचा जिन्नस धुतला नसतां वापरतात). [सं. अ+धू=धुणें]

अधुरा—वि. १ अपूर्ण; अर्धवट; अपुरा. 'हें काम अधुरें पडलें आहे.' २ पूर्णपणें तयार नसलेला; कच्चा; अप्रवीण. 'हा पंडित अधुरा आहे.' गुप्त गोष्ट मनांत न ठेवणारा; [सं. अर्ध+पूर्ण–पुरा] –क्रिवि. अर्ध्या मार्गांत.

अधुरी—वि. १ उतावीळ; अधीर. २ कच्ची; अर्धवट. 'अशी अधुरी गांठ देऊं नको बळकट दे.' ३ अधाशी; हपापलेला; हांवरा; अधोरी. [सं. आतुर? अधीर? अर्धपुरा–उरा=अधुरा]

अधू—वि. १ व्यंग असलेला; उणीव असलेला; कुरूप; बेढब; लुला अवयव, गात्र, इंद्रिय; अशक्त; विकल; पंगू (इसम). वाप्र. डोळा अधू, पाय अधू, दातानें अधू, कानानें अधू. २ नीट न चालणारें. 'गिरण अधू आहे.' ३ कच्चा–विषय, अभ्यास वगैरे. ४ हळवा–मनाचा. [सं. अर्ध.]

अधृति—स्त्री. अधैर्य; भीति; भय. 'तयासि क्षोभु नाहीं बुद्धि। आणि न पवतां न बाधी। अधृति तयातें ॥' –ज्ञा २.३६०. [सं. अ+धृति.]

अधे—पु. अध्याय; प्रकरण. 'वेगे ऋचा श्रुति स्मृति। अधे स्वर्ग स्तबक जाती। प्रसंग मानें समास पोथी। बहुधा नामें ॥' –दा १२. ५.४. [सं. अध्याय]

अधेन—न. अध्ययन; पाठ. 'विद्वांसास अधेनप्रीती।' –दा ७.९.४५. [सं. अध्ययन]

अधेंमधें—क्रिवि. प्रशस्त अधींमधीं पहा.

अधेला—पु. १ अर्धा पैसा (पुण्यामुंबईकडे). खानदेशाकडे पाव आणा. 'मज तरि सपनींही हा दिसेना अधेला। अक्षुणि तरि न लागे आगि यांच्या क्षुधेला ॥' –सारुह ४.६८. [सं. अर्ध+ल= अर्धल=अधल. सिं. अधेलो.] २ (ना.) भागीदारीनें शेती करणारा.

अधेला—पु. एका जातीचा निर्विष साप. हा पिवळट रंगाचा, बराच लांब असून फक्त रविवारीं चावल्यास याचें वीष बाधतें असें म्हणतात. 'अधेल्याच्या मनीं आदितवार.' (कों.) 'अधेलें'

अधेली—स्त्री. १ अर्धा रुपाया; आठ आणी–नाणें. अधेल्यांची माळ'=घोडयाच्या गळयांतील दागिना. २ अर्धा पैसा; अधेला. 'तुम्हांसारखे सरदार लोक देतात शिवराई अधेली. –स्वरापरि. ३०. ३ (व.) निम्मे हिश्शानें शेत करण्याची पध्दति [सं. अर्ध+ल].

अधेलें—न. (कों.) अधेला साप.

अधैर्य—वि. अस्थिर; चंचल; अनिश्चित; उतावळा; भित्रा; भेकड. –न. धैर्याचा अभाव; अनिश्चितता; भीति; भय. [सं.]

अधोक—वि. सुरक्षित; नुकसानीपासून मुक्त–व्यापारा–साव कारीसंबंधीं. –क्रिवि. सुरक्षितपणें; बेशक; भरभराटीनें; नुकसानी-शिवाय. [अ + धोका.]

अधोगत—पु. (नृत्य) एक अभिनय: डोकें अगदीं खालीं करून पाहणें, लाज दाखविणें, नमस्कार करणें, दु:खानें तोंड खालीं घालणें, या गोष्टी दाखविण्याकरितां हा अभिनय करतात. –स्त्री. अधोगति पहा. –वि. १ खालीं आलेला, उतरलेला, गेलेला, राहिलेला. २ हीन स्थितीस, निकृष्ट अवस्थेस गेलेला; पतित. –क्रिवि. १खालीं;खालच्या बाजूस. २ (ल.) व्यर्थ. 'माझें सांगणें अधोगत गेलें.' [सं. अध:+ गत]

अधोगति—स्त्री. १ उच्च प्रदेशाकडून नीच प्रदेशाकडे जी गति ती; घरून खालीं जाण्याची क्रिया; अवपतन; अवतरण. २ नरक; नरकगति. ३ अध:पात; निकृष्ट जन्म; हीन स्थिति; अवनति; दीन अवस्था. 'पुढीले अधोगतीची लाज नेणवे।' –ज्ञा ७.१०४. –वि. खालीं उतरणारा; खालीं जाणारा; नीच स्थितीप्रत जाणारा; खालवणारा; खालावत चाललेला.–क्रिवि. खालीं; खालच्या दिशेस; हीनावस्थेस; अवनतीप्रत. 'तैसे मस्तकीं केश कुरळ। कृष्णमुखेंसीं विन्मुख सबळ। अधोगती धांविन्नले।' –एरुस्व १.६३. [सं.]

अधोगमन—न. खालीं जाणें; अवनति; अध:पात; अवपतन; हीनावस्था; निकृष्टावस्था; फजीति. (ल.) व्यर्थपण. 'या नांव सार्थक चरण। इतर संचार तें अधोगमन।' –एभा ११.१२११. [सं.]

अधोगामी—वि. वाईट मार्गाकडे जाणारा; हीनावस्थेस जाणारा; खालावत चाललेला; नरकाकडे जाणारा. ' देओ परात्पर तरु । मी अधोगामिया नितरु । ' –ज्ञ ४७. [सं.]

अधोजिव्हिका—स्त्री. पडजीभ; प्रतिजिव्हा; उपजिव्हा. [सं.]

अधोड–वि. धिप्पाड, खादाड व मद्दड (म्हशीबद्दल तिरस्कार निदर्शक शब्द); ओबडधोबड, लठ्ठ व फार वाढलेल्या अविवाहित मुलीबद्दल योजतात. [धूड ?]

अधोड—न. १ अर्धे कातडें; फाकी. २ (म्हशीचें, बैलाचें) न कमावलेलें कातडें; चामडें; लोथ (क्रि० कापणें, टांगणें, बेतणें, सालहिरडा भरणें–ढोरांच्या धंद्यांतील शब्दप्रयोग). ३ गुरांचें कातडें घेण्याचा महाराचा हक्क. ०**शिवणें**–चामडें कमावण्यासाठीं टांगण्याकरितां व त्यांत मसाला भरण्याकरितां पिशवी शिवणें. [सं. अर्ध+ढोर; अर्ध+वत्; अधूत ?]

अधोडी—वि. कच्च्या कातड्याचा बनविलेला, डोल, जोडा, बादला वगैरे. ' आम्हां आधोडीचे जोडे । ' –तुगा ४३५४. २ दांडगा; राकट;; (बिनकौशल्याच्या कारागिराच्या कामाबद्दल योजतात).

अधोडी—वि. हांवरा; लोभी.

अधोडी—स्त्री. (काव्य) एका खेळाचें नांव.

अधोदंत—पु. खालच्या जबडयांतील दांत [सं.]

अधोदिशा—स्त्री. अधःस्वस्तिक; अधरदिशा; खालची दिशा. [सं.]

अधोद्वार—न. १ उपस्थ; योनि–लिंग. २ गुदद्वार; मलद्वार. ' चरण आणि अधोद्वार । पायू हे प्रकार । ' –ज्ञा १३. १००; ' शर्धा करिती अधोद्वारें ॥ ' –एभा २३.५५८. [सं.]

अधोपर—न. शिखर. ' ना तरी कैलासाचीं अधोपरें । आळंगितु इन्द्रनीलांचीं शिखरें ॥ '–शिशु ६२. [सं. अर्ध+उपरि]

अधोपरी—वि. जन्मजात नव्हे तें; नवीन; स्वकर्तृत्वाचें. अधोपरी श्रीमंत=स्वकर्तृत्वानें श्रीमंत;अधोपरी–अंधळा–दरिद्री–पांगळा–बेडा. **म्ह**० १ अधोपरी जोडलें पिढीजात तोडलें. २ अधोपरी आलं राज (राज्य) कोंबडी मागते जानबाज. –क्रिवि. मध्येंच; अर्ध्यावर [सं. अर्ध+उपरि]

अधोपी—अधुपा पहा.

अधोभाग—पु. १ खालचा भाग; तळ; बूड. २ गुदप्रदेश; अधोद्वार. [सं.]

अधोभुवन, अधोलोक—न. पु. पाताळ. [सं.]

अधोभूमि—स्त्री. तळमजल्याची जागा; खालची जागा; खोल जागा. [सं.]

अधोमुख—वि. अधोवदन; खालीं तोंड करून असलेला; (ल.) खिन्न; ओशाळलेला; लाजलेला; शरमलेला. ' तेथें अवघीं झालीं पराङ्मुखें । पाठमोरीं निघालीं अधोमुखें ॥ ' –एभा ४.८८. –न. (ल.) भीड. ' अधोमुखें भेद वाढतो । ' –दा २०.३.२२. [सं.]

अधोमुख(बाहु)—वि. (नृत्य) नृत्यामध्यें शरीराच्या दोन्ही बाजूस हात स्वाभाविकपणें लोंबत ठेवणें. [सं.]

अधोमुखी—वि. खालीं तोंड केलेला. ०**गोम**–खालीं तोंड करून असलेलें गोमेच्या आकाराचें केसांचें वळण. हें एक घोडयाचें शुभ चिन्ह मानतात. याच्या उलट शब्द ऊर्ध्वमुखी गोम.

अधोर्यंत्र—न. अर्क काढण्याच्या आसुतिपात्राप्रमाणें जोडनळयांचें असलेलें अधःपात्र. दारू–अर्क काढण्याचा भांड्याचा एक भाग. [सं.]

अधोरंध्र—न. अपानद्वार; गुदद्वार. ' अधोरंध्राचेनि वाहे । अपानु हें नाम लाहे । ' –ज्ञा १८.३३८. [सं.]

अधोरा–री—अधुरा पहा. **म्ह**० १ आधोरें (अर्धघट) उपाशीन् जीव टोपल्यापाशीं. २ अधोऱ्याचा गिण अवकळ्याची चाकरी (कधीं करूं नये). –मसाप २.३.६०.

अधोर्ध्व—क्रिवि. खालींवर. ' अधोर्ध्व अष्टहि दिशा । तिचें उदक करी वळसा ॥ ' –दा ११.७.१४. [सं. अधः+ऊर्ध्व]

अधोर्ध्व—क्रिवि. खालींवर. ' अधोर्ध्वे काय नेणों जाहलें । ' –ज्ञा ११.१८९. –पु. १ श्वासोच्छ्वास. २ अस्तित्व; जीवमानता[सं.]

अधोली—स्त्री. १ पायरीच्या अर्ध भागाचें माप; दोन शेरांचें माप. २ अधोलीच्या आकाराचें दारूचें एक खापरी भांडें; त्यांत नारळाच्या आकाराचे दारू भरलेले कागदी गोळे भरून तोंडाशीं दुतोंडया बाण ठेवतात व नळा दाखवितात. जेव्हां गोळे जोरानें बाहेर येतात व वर उंच जाऊन फुटतात; त्यावेळीं त्यांतून तारे निघतात. [सं. अर्ध]

अधोवदन—वि. अधोमुख; खालीं मान घातलेला; खिन्न; दु.खी; अवमानित. [सं.]

अधोवात, अधोवायु—पु. पादः अपानवायु; पंचप्राणांपैकीं एक; गुदद्वारांतून सरणारा वायु. [सं.]

अधोशाखा—वि. खालीं फांद्या असलेला. ' हें असो अधोशाखा । ' –ज्ञा १५.५१९. [सं. अधःशाखा].

अधोष्ठ—न. भगोष्ठ; स्त्रीजननेंद्रियांतील ओष्ठसदृश भाग. [सं.]

अध्धर—क्रिवि. अधांतरीं; निराधार; अधर पहा. [सं. अ+धर]

अध्धा—पु. (ताल) तिस्रवाडा पहा. [सं. अर्ध]

अध्धी—स्त्री. (व.) अर्धशिशी. [सं. अर्ध]

अध्यग्नि—न. लग्नाच्या वेळीं होमासमोर दिलेलें स्त्रीधन. –याज्ञवल्क्य स्मृति, व्यवहाराध्याय ८.१४३. [सं.]

अध्ययन—न. अध्ययन; पठण; अभ्यास. ' ब्राह्मण पुरीत अध्ययनें करिती । ' –सप्र ८.८. [सं. अध्ययन]

अध्ययन—न. १ पठन; वाचन; अभ्यास (विशेषतः धार्मिक ग्रंथाचा). २शिकलेलें, पठण केलेलें शास्त्र;अधीतशास्त्र. 'अनभ्यासामुळें

मी अध्ययन विसरलों.' [सं. अधि+इ=शिकणें]. ०शील–वि. अध्ययनाची–अभ्यासाची आवड असलेला; अभ्यासिक. [सं.]

अध्यलंडमध्यलंड—अधलंडमधलंड पहा.

अध्यवसाय—पु. १ आत्म्याला किंवा स्वत्वाला जाणीव; आत्मबोध; सदसद्विवेकबुद्धीनें केलेला निश्चय: मनोभाव. २ ठराव; निर्धार. ३ दीर्घोद्योग; प्रयत्न. ४ (तर्क.) तर्कानें कार्यकारणसंबंध पाहून एकादें निश्चित अनुमान किंवा कार्याकार्यनिर्णय करणें. –गीर १३३. [सं. अधि+अव+सो=प्रयत्न करणें]

अध्यवसित—वि. स्वत: किंवा आत्म्यानें जाणलेलें; निश्चित ठरविलेलें; अध्यवसाय पहा. [सं.]

अध्यस्त—वि. १ आरोपित; कल्पित; मानलेलें (रज्जूच्या ठिकाणीं सर्पत्व; मृगजलाच्या ठिकाणीं जलत्व इ०). २ चिंतिलेलें; चिंतन केलेलें; विचार केलेलें; मनन केलेलें. [सं. अधि+अस्त अस्=ठाकणें]

अध्यस्थि—स्त्री. घोड्याच्या पायाचा रोग. –अश्व २ ३८. [सं. अधि+अस्थि]

अध्यक्ष—पु. १ संस्था अगर मंडळ यांचा त्यांच्या नियमाप्रमाणें निवडलेला अगर ठरविलेला मुख्य–नियंता; प्रमुख. –सभा ७१. २ स्वामी; मुख्य; नियंता; वरिष्ठपणानें देखरेख करणारा; दिशा दाखविणारा; नियामक; नियंत्रक. उ० दानाध्यक्ष, धनाध्यक्ष, धर्माध्यक्ष. 'जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु।' –ज्ञा ८.३४. [सं. अधि+अक्षि=डोळा]

अध्यक्षाधिष्ठित—वि. प्रमुखस्थानीं अध्यक्ष असलेली एक प्रकारची लोकनियुक्त (अमेरिकेसारखी शासनपद्धति, राज्य). [सं.]

अध्यक्षी—पु. सर्वांकडे पहाणारा; सर्वत्र ज्याची दृष्टि आहे असा; सर्वश्रेष्ठ. 'सर्वांसाक्षी। अध्यक्षी हें नाम त्या॥' –निगा ४१३. [सं. अध्यक्ष]

अध्या—पु. अध्याय; प्रकरण; सर्ग. 'अध्या इतुकेन जाला पूर्ण॥' –दावि २५९; 'वाचा एकेकाचा भागवत अध्या।' –अमृत ११७. [सं. अध्याय]

अध्यात्म—न. १ आत्म्याबद्दलचें ज्ञान; ब्रह्मज्ञान; अधिभूतापासून परिणाम पावलेली भावना, सामर्थ्य: वेदांत. 'तेथ अध्यात्मा नवलपण पुरे।' –ज्ञा ७.१७७; 'येरवीं देवर्षिही अध्यात्मगातां।' –ज्ञा १०.१५७. २ शरीरस्थित (त्वंपदवाच्य) आत्मा. ३ प्रत्येक वस्तूचा स्वत:चा जो मूळ भाव (स्वभाव). ४ परमात्म्यासंबंधी निरूपण. 'आज पुराणांत कथा नव्हती अ०च निघालें.' –वि. १ आत्मविषयक; आत्म्यासंबंधी;. आत्म्याबद्दलचें; शारीरिक; शरीर, इंद्रियें व प्राण यांपासून होणारें. 'तैसें अधिभूताधिदैवां। अध्यात्मादि उपद्रवां। पातलेया पांडवा। गिळूनि घाली॥' –ज्ञा १६.१९५ २ अध्यात्मासंबंधी; वेदांतविषयक. [सं.] ०विद्या–शास्त्र–ज्ञान–वेदांतशास्त्र; ब्रह्मविद्या; उपनिषदांत सांगितलेलें ज्ञान [सं.]

अध्यात्मविज्ञान—न. परलोकविद्या; (इं.) स्पिरिच्युॲलिझम. 'आपल्या स्त्रीच्या मृत्यूच्या शोकानें फार विव्हळ होऊन ते अ०ची चर्चा करूं लागले' –पलोवि ३६.

अध्यात्मा—पु. १ आत्मा; ईश्वरांश; शरीरांत व्यापून असणारा परमात्म्याचा अंश; चैतन्य. २ आत्मज्ञान. [सं.]

अध्यात्मिक—वि. १ अध्यात्मासंबंधी; आध्यात्मिक पहा. २ (विप्र. अध्यात्मक) दांभिक; ढोंगी.

अध्यात्मी—पु. वेदांतशास्त्रामध्यें मग्न; परमार्थी; वेदांती. 'देवगृहीं अवघे अध्यात्मि जालेती सर्वही।' –सप्र ८.१०.३०. [सं.]

अध्यापक—पु. शिक्षक; गुरु; (इं.) प्रोफेसर. [सं.]

अध्यापन—न. शिकविणें; पढविणें; अध्यापकाचा व्यवसाय [सं.]. ०शास्त्र–न. शिकविण्याचें शास्त्र: शिक्षणशास्त्र; (इं.) पेडागॉजी.

अध्यामध्यांत—क्रिवि. अध्यांतमध्यांत; भानगडींत; कारभारांत. 'कोणाच्या अध्यामध्यांत न पडतां आपलें काम बरें कीं आपण बऱ्या अशा प्रकारें त्यांनीं वागणूक केली.' –मायेचा बाजार. [सं. आद्य+मध्य]

अध्याय–य—पु. खंड, पर्व, परिच्छेद (पुराणादि ग्रंथांचे); प्रकरण; विभाग. 'एवं जन्यजनकभावें। अध्यायो अध्यायातें प्रसवे।' –ज्ञा १८.७५. [सं. अधि+इ=अध्ययन करणें, शिकणें]

अध्यारोप—पु. मिथ्या आरोप; भ्रम; कल्पना; माया. 'सुखद सृष्टिचा आटोप। वेदांत्या अध्यारोप॥' –टिक १६२. [सं.]

अध्यावाहनिक—न. वरातीच्या वेळीं मिळालेलें स्त्रीधन. याज्ञवल्क्य स्मृति ८.१४३. [सं.]

अध्यास—पु. १ पूर्ण चिंतन; ध्यास; लक्ष लावून केलेला विचार; निरंतर ध्यान. 'अध्यासबळानें पुण्यपुरुष। होऊनि तद्रूपें दिसती॥' –दावि ७७९. २ चुकीची कल्पना, जाणीव; खोटी कल्पना; मिथ्याग्रह; आरोप; आळ. 'देहादि अध्यासू आपुल्याठायीं। श्रवणें मननें मिथ्या केला पाही॥' –एभा ११.६४०. [सं.]

अध्याहार—पु. १ वाक्य पुरें करण्यासाठीं एक किंवा अनेक शब्द घेणें: पदरचे घालणें. २ अध्याहृत किंवा गाळलेला शब्द; पदरचा घातलेला शब्द. [सं. अधि+आ+हृ=घेणें]

अध्याहार्य—वि. अध्याहार करावयाचें (पद); पदरचा घालायाचा (शब्द). [सं.]

अध्याहृत—वि. १ मूळांत नसतां अर्थबोध व्हावयाकरितां घालावा लागलेला (शब्द–वाक्यखंड). २ तर्कित; गृहीत. [सं.]

अध्यैमध्यें—अधींमधीं पहा.

अध्रुव—वि. चिरकाल न टिकणारें; अनिश्चित; चंचल; क्षणभंगुर. [सं.]

अधुवात्मक—वि. (ज्ञाप.) ध्रुवीभवन न झालेलें. [सं.]

अध्वपरिमाण, अध्वमान—न. मार्ग किंवा अंतर मोजण्याचें साधन–माप; कोस, योजन इत्यादि रस्त्याच्या लांबीचें परिमाण. [सं. अध्वन्+मान.]

अध्वर—पु. १ यज्ञयाग. 'ऐशी हे आदि परंपरा। संक्षेपें तुज धनुर्धरा। सांगितली या अध्वरा। लागौनियां॥' –ज्ञा ३.१३८. २ अष्टवसूंपैकीं एक. [सं.]

अध्वरिअें—अध्वर्यु पहा. 'तेथ होतें अध्वरिअें उद्गातें। मेळ-ओनि यज्ञ–द्रव्यातें॥' –शिशु ८५७. [सं. अध्वर्यु]

अध्वर्यु—पु. १ यज्ञ चालविणारा; उपाध्याय. 'अध्वर्यु याज्ञ-वल्क्य, ब्रह्मा श्रीव्यास पैल मुनि होता।' –मोसभा २.१८. २ यज्ञां-तील मुख्य ऋत्विज. ३ (ल.) मुख्य व्यवस्थापक; पुढारी; नायक; अध्यक्ष; धुरीण; प्रमुख; मुख्य. [सं.]

अध्वसंक्रमण—न. मार्गसंक्रमण; वाटचाल. [सं.]

अध्वा—पु. रस्ता; मार्ग; पथ. [सं. अध्वन्]

अध्यावरचा—वि. १ मार्गातील; रस्त्यावरील. २ (ल.) तात्पुरता; उपरि; अधव्याचा ५ पहा.

अन्—अ. १ नकारार्थी. [सं. न; तुल० इं. अन्]

अन्—अ. रसायन शास्त्रांतील (इं.) ॲन उपसर्गाबद्दल; जसें अनहायड्राइड=अनाद्रे.

अन्, अन—वि. अन्य; इतर; दुसरा. 'लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण। आन यातिसि पुसे कोण॥' –दा ५.१.१४. [सं. अन्यत्.] –उभ. आणि, व, आणखी. 'या पुढें अन् मला सुचवेना।' –किंगवि ५५. [सं. अन्यत् तुल० इं. अॅड]. –किवि. १ एकूणएक; सर्व. 'वाघाला पाहतांच अन माणसें पळूं लागलीं.' २ एन; अति-शयें करून. 'अन उन्ह पडलें होतें तशांत मी शेतांत गेलों'

अनक—पु. सैनिक. 'तंव वेढिलें पौंड्रकें। शस्त्रास्त्रीं सहस्र अनकें। विधितातीं॥' –कथा १.४.६८. [सं. अनीक.]

अनंकपृष्ठ—न. अंक नसलेलें पोथीचें पान; ज्यावर पानाचा आंकडा घातला नाहीं असें पान. [सं.]

अनकरीब—अन्करीब पहा.

अनकष्टी—वि. (व.) आळशी; कष्ट न करणारा माणूस. [सं. अ+कष्ट]

अनकळित—क्रिवि. अडचणींत न पडतां; प्रयासरहित; श्रम विरहित; सहज; न कळतां; अक्लेश; निर्वैर. 'मग निघाले अनक-ळित। निवृत्तितटीं॥' –ज्ञा ७.१०१.

अनकूळ—अनुकूल पहा.

अनखर—अणखर ४ पहा.

अनंग—वि. अंगरहित; निराकार. 'जे अनंगु तो पैंधा। निक-वडा नुसधा॥' –ज्ञा १३.९८०; 'मदनें कृष्ण देखिला सांग। आंग जाळनि झाला अनंग॥' –एरुस्व १.७२. –पु. मदन; कामदेव; काम. ०दहन–शंकर; शिव. [सं. अ+अंग.]

अनगट—अणगट पहा.

अनघ—वि. १ निष्पाप; २ निर्मळ; ३ सुंदर. [सं.]

अनघटित—वि.१ अद्भुत; अघटित; न घडणारें.२ अवघड; कठिण, 'तरी हें असें अनघटित। वायां दुःख दुणावत।' –कथा १. ४.१७९. [सं. अ+घटित]

अनघड—वि. १ न घडलेला; न घांसलेला; न तासलेला-(लांकूड, दगड). 'दगडाची बाजू खाणींतून जशी अनघड येईल तशीच असावी.' –मॅरट तप. ४०. २ अप्रबुद्ध; अज्ञान; अजाण; अडाणी; असंस्कृत. 'अनघड संग प्रसंग नकोंरे देवराया।' –दावि १८६. [सं. अ+घट्]

अनच्छ—पु. अस्वच्छ पदार्थ; चिखल; गाळ. 'मग चिरकालें गा तो अनच्छ। उपमिल येळराची।' –कथा २.१६.१८३. [सं. अ+अच्छ]

अनणु—अणणु पहा.

अनंत—वि. ज्याला अंत नाहीं असा; शाश्वत; अमर्याद; देशकाल-परिच्छेदशून्य; असंख्य; अपार (काळ, स्थळ, संख्या, ब्रह्म). 'मी जैसा अनंतानंदु।' –ज्ञा १४.५३. –पु. १ विष्णूच्या असंख्य नांवां-पैकीं एक. 'आपुलिये चाडे श्री अनंता। उमगु नोहे॥' –ज्ञा ५.३. २ सर्पांचा राजा–नागांपैकीं एक–शेष. 'नागांमाजीं समस्तां। अनंतु, तो मी।' –ज्ञा १०.२४२; 'अनंतासी (शेष) म्हणे अनंत (विष्णु)।' –ह ३.१४. ३ अनंतचतुर्दशी (संक्षिप्त रूप). ४ भाद्रपद शु॥ १४ च्या दिवशीं पूजा करून उजव्या हातांत बांधावयाचा चौदा गांठींचा रेशमी गोफ–दोरा. 'तूं आताराकडून अनंत घेऊन ये; पूजेची वेळ झाली.' ५ कानांत घालण्याचा एक दागिना. ६ एक फुलझाड; अनंत तगर; याचीं फुलें शोभिवंत, वास मधुर; पांढरा व तांबडा अशा दोन जाती. ७ (गणित) अमर्याद संख्या; अगणित संख्या; अनंतराशि पहा. ८ (सामान्यतः) परमेश्वर; परब्रह्म. ९ जैन लोकां-तील चौदावा तीर्थंकर. [सं. अ+अंत] ०ख्याल–पु. अव. अपार, विनोदी–लहरी–मौजा–गमती–युक्त्या–चाळे. ०ख्याली–वि. अनंतख्याल किंवा अमर्याद, अपार विनोद करणारा. ०गांठ्या–पु. एक किड्यासारखा वारीक व विळविळीत समुद्रांतील मासा. ०चतु-र्दशी–व्रत–स्त्री. न. भाद्रपद शुद्ध चतुर्दशी या दिवशीं करावयाचें (विष्णु प्रीत्यर्थ) व्रत. चौदा प्रकारचीं फुलें, फळें, नैवेद्यास चौदा पक्वान्नें, अनंत दोऱ्याला चौदा गांठी, व चौदाव्या तिथीला पूजा हा चौदांचा मेळ अभ्यसनीय वाटेल. ०तगर–पु. एक फूल, अनंत. ०पाद्–पु. (प्राणि.) घोणवर्गांतील अनेक पाय असणारा प्राणी; (इं.) मिरिआपोडा. ०पार–पु. ज्यास अंत किंवा पार नाहीं असा; अमर्याद; अफाट. 'अनंतपारं किल शब्दशास्त्रम्।' –पंच तंत्र. ०भट्टी–स्त्री. प्राचीन काळीं अनंत नांवाच्या एका विद्वानानें

केलेल्या ग्रंथाचें नांव; यावरून (ल.) विद्वत्तेचें किंवा बुद्धीचें खोटें प्रदर्शन; घमेंड; रिकामा डौल, प्रतिष्ठा. (क्रि० दाखवणें, मिरवणें). **०मूळ**–न. एक वनस्पति; इंग्रजी सार्सापरिल्याच्या तोडीचा रक्त-शुद्ध करण्याचा गुण हींत आहे. काढा किंवा पाकाच्या स्वरूपांत अनंतमूळ देतात. अग्निमांद्य, ज्वर, रक्तदोष, उपदंशादि विकार यांवर हा गुणकारी आहे. पर्यायनामें:–(कों.) उपळसरी, तुणतुणी. (खा.) दुधी. **०राशी**–स्त्री. (गणित.) अगणित संख्या, रकम, राशी. **०वात**–स्त्री. चार बोटांवर १४ दोरे घेउन केलेली कापसाच्या सुताची वात. ह्या अनंतचतुर्दशीपासून दररोज दोन वाती अशा वर्षभर लावतात अगर एकदम लक्ष वाती लावतात. [सं. अनंत+वर्ति; प्रा. वट्टि; म. वात]. २ त्रिदोषजन्य डोळे, भुवया व आंख या ठिकाणीं होणारा एक विकार–योर २.५१२. **०व्रत**–न. अनंतचतुर्दशीच्या दिवशीं करण्याचें व्रत; अनंतचतुर्दशी पहा. **०लोम**–पु. (प्राणि.) अंगावर पुष्कळ केंस असलेला प्राणी. **०श्रेणी**–स्त्री. (बीज.) अंत न पावणारी श्रेणी.

अनंतत्व—न. १ ज्या स्थितीला अंत नाहीं अशी शाश्वत स्थिति; आनंत्य; अनंतता; अपारता; निरवधिभाव. २ संपूर्णता; अभंगता. ३ (गणित.) अनंत संख्या; अनंतता. [सं. अनंत+त्व]

अनंतर—वि. १ मध्यंतरीं अंतर न देवतां, खंड न पडतां येणारा; अगदीं लागून किंवा पाठोपाठ येणारा; आनुक्रमिक. २ अव्याहत; निरंतर; अविच्छिन्न; अखंड; सतत. –क्रिवि. मागाहून; पश्चात्; नंतर; पाठीमागून; मग. –शअ. मागें; मागून; पश्चात्; पाठीमागें; नंतर. [सं. अ+अंतर]

अनंती—स्त्री. अनंताची बायको. अनंतचतुर्दशीस अनंताबरोबर दुसऱ्या एका लहान रेशमाच्या दोऱ्याची पूजा करतात व तो दोरा पूजा करणाऱ्याच्या पत्नीच्या डाव्या दंडांत बांधतात. [सं.]

अनत्याचारी—वि. अत्याचाररहित; सात्विक; अराजक नव्हे असा; सनदशीर. ' अत्याचाराला तोंड देण्याचा प्रसंग अनात्याचारी लोकांस आला आहे. ' –के १६.४.३०. [सं. अ+अत्याचारी]

अनंदक—वि. न नांदणारें; अपेशी. भूतादि बाधेमुळें ज्यांत कुटुंब नांदत नाहीं असें (वसतीला–राहण्याला अयोग्य घर). [सं. अ+नन्द्]

अनद्यतनभूत—पु. (व्या.) एक भूतकाळ. –चालू दिवससंबंधी नव्हे तो. अद्यतन पहा. [सं.]

अनधिकारी—वि. १ अधिकार, हक्क, योग्यता, नसलेला; अपात्र; अयोग्य. ' एऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं । आवडों लागतां अनधिकारी । परी शेखीं तेचि उजरी । पात लाभली ॥ ', –ज्ञा १५.५९०. २ (व्यापक.) ज्याचा वारसा –हक्क गेला आहे असा; बेवारसी. ३ साधनचतुष्टयसंपन्न नव्हे असा. [सं.]

अनधिगत—वि. माहीत नसलेलें; शोध लावून न काढलेलें; अज्ञात; अलब्ध; न संपादिलेलें; प्राप्त न झालेलें. [सं.]

अनधीत—वि. १ न वाचलेलें; न पढलेलें (पुस्तक). २ जो पढला नाहीं किंवा ज्यानें वाचलें नाहीं असा; अक्षरशत्रु; न शिकलेला. [सं. अ+अधीत]

अनध्याय—पु. (विप्र. अनध्या). (वेद) पठण करण्यास निषिद्ध मानलेला दिवस; (ल.) सुट्टी. (वेद) पठणांत किंवा अभ्यासांत खंड; खळ; अडथळा. अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा, अमावास्या, प्रतिपदा सूर्यसंक्रांति, मन्वादि, युगादि; कार्तिक, आषाढ, फाल्गुन या महिन्यांच्या कृष्ण पक्षांतील द्वितीया; तूळ व मेष या संक्रांतींचे १२ प्रहर हे काल वेदाभ्यास करण्यास अयोग्य व अनध्यायाचे समजतात. या दिवशीं वेदाध्ययन करीत नाहींत. –धसिं २ ' कीं अनध्यायामाजी रसाळ । वेदाध्ययन राहिलें ॥ ' [सं.]

अनन—न. (गो.) सिताफळ. (लॅ. पोतै. अनोना स्पेमोसा).

अनन—न. १ अन्न. २ जेवणखाण; भोजनादि व्यापार. ' अर्धी अनन मग तननं । ' [सं. अन्न]

अनन(ना)स—पु. एक फळ व झाड; हें उष्ण प्रदेशांत होतें; केतकीच्या झाडाप्रमाणें व झुपकेदार; फळें रुचकर व गोड. फळांचा रस औषधि असून पित्तनाशक आहे. फळांचा मुरंबा होतो; चटणी कोशिंबीरहि करतात. [का. अणसु; पेरु. अनन; इं. अनन+स अव. प्रत्यय]. **०भात**–पु. तांदुलांत अननस घालून शिजवून केलेला भात. –गृशि ३७१.

अनन्य—वि. १ एकरूप. ' सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्यु होय । ' –ज्ञा १८.१३९७. २ एकमेव; एकटा. ' येणेंपरी परिसतांचि तया अनन्या । ' –नल. १२१. ३ एकनिष्ठ; दुसऱ्याचा आश्रय न घेतलेला. ' जो मज होय अनन्य शरण । ' –ज्ञा ९.२८८; ' जाति कुळ नाहीं तयासी प्रमाण । अनन्या अनन्य तुका म्हणे ॥ ' –तुगा ६९. ४ अन्योन्य; परस्पर. ' न तुटे अनन्यमिळणी योग । भिन्न विभाग दाविती । ' –एभा २४.२७. ५ एकाकी; अनाथ; ज्यास दुसरा कोणी तारणारा नाहीं असा; ज्यास दुसरा उपासनाविषय, देव, आश्रयदाता वगैरे नाहीं असा. ' अनन्यास रक्षीतसे चापपाणी । '–राम ३५. ६ स्वकीय; आपला; स्वतःचा (मुलगा, मूल). ' पायें अनन्य लोटुनि लावावें काय अन्य थानातें । ' –मोभीष्म ४.५. ७ अद्वैत. **०गति–क**–वि. एकनिष्ठ; दुसरा मागे किंवा उपाय नसलेला; अगदीं अवलंबून असलेला. ' ऐसे अनन्यगतिकें चित्तें । चिततसांते मार्ते । ' –ज्ञा ९.३३७. ' हें अनन्यगतीचें मज । आथी व्यसन । ' –ज्ञा १८. १३४९. **०भक्ति**–स्त्री. केवळ एका (देवा) चीच भक्ति. **०भाव**–पु. १ अंतःकरणांत एकच एक विचार असणें; निःसीमभक्ति; कळकळ; आस्था; एकनिष्ठता. २ सरळभाव; प्रामाणिकपणा; साळसूदपणा; कपटराहित्य. (याच्या उलट दुजाभाव). **०विषय**–वि. केवळ एकच विषय असलेला; एकचित्त; एकनिष्ठ; एकदिलाचा. **०वृत्ति, ०मनस्क**–वि. एकाच पदार्थावर विषयावर, मन, ध्यान

किंवा लक्ष असलेला; सावधानचित्त; एकाग्रचित्त. **०वेद्य**–वि. दुसऱ्याला जाणतां न येण्यासारखें; स्वतःलाच समजणारें; आपल्या अनुभवानेंच जाणतां येणारें; दुसऱ्यास त्याची जाणीव करून देतां न येण्यासारखें (ब्रह्म, सुख, मनांतील गुप्त गोष्ट इ०). **०शरण**–वि. दुसरा आसरा किंवा आधार नसलेलें; दुसरा ठाव नसलेलें; एकाच आश्रयावर अवलंबून असलेलें. **०साधारण, ०सामान्य**–इतरत्र न आढळणारें; अलौकिक; सामान्यतः न दिसणारें (धैर्य, शौर्य इ०).

अनन्योदक—न. एकनिष्ठारूप पाणी; (ल.) भक्ति. ' अनन्योदकें धुवट। वासना जे तत्रिष्ठ।' –ज्ञा १५.३. [सं. अनन्य+उदक]

अनन्वय—पु. १ विसंगतपणा; असंबद्धता; अप्रस्तुतता. २ एक अर्थालंकार. एकाच अर्थास उपमानत्व आणि उपमेयत्व कल्पून जो उपमानोपमेयभाव वर्णिला असतो तो. उ० ' समर्था या लोकीं तुजसम अये तूंचि अससी। ' –वामन (गंगालहरी); ' समुद्रासारिखा एक समुद्रच आहे. ' [सं. अ+अन्वय].

अनन्वित—वि. १ असंबद्ध; विसंगत; अव्यवस्थित; मलभलतें; (भाषण, ग्रंथ, इ०). २ शास्त्र व लोकव्यवहार याला विरुद्ध; अनियमित; अयोग्य (वर्तन, वागणूक, वगैरे). ३ बेताल; अमर्याद; प्रमाणाबाहेर (छळ इ०). [सं. अ+अन्वित.]

अनपत्य—वि. अपत्यरहित; संतति नसलेली; वांझ; वांझोटी; (ल.) फटिंग. [सं. अ+अपत्य]

अनपराध—वि. (विप्र. अनपराधी). निर्दोष; निष्पाप; निरपराध. –क्रिवि. दोष-चुकी नसतांना; विनापराध. [सं.]

अनपाय—वि. १ अपाय न करणारा; अविघ्नकारी. २ अपायरहित; नाश न पावणारी; अविनाशी; अखंड. ' तैसी क्रियाशक्ति पवनीं। असे जे अनपायिनी। ते पडिली नानास्थानीं। नाना होय।' –ज्ञा १८.३३३. ' तिष्ठत असो अनपायिनी। न स्मरो विषयादि कांहीं।'–रास १.१७. [सं. अ+अपाय] –क्रिवि. अपाय न करतां; **उपद्रव** दिल्याशिवाय, त्रासरहित. तयावनीं एक तडाग तोयें। तुडुंबलें तामरसानपायें ॥ नल ३६.

अनपाळणें—सक्रि. (गो.) न पाळणें; (सांगितलेलें) न ऐकणें. [सं. अ+पाल्]

अनपेक्ष—वि. १ अपेक्षा नसलेला; निरपेक्ष; निरिच्छ; बेगरजू. २ बेफिकीर; उदासीन. [सं. अ+अपेक्षा]

अनपेक्षित—वि. १ अनिच्छित; जरूर नसलेलें. २ अनिष्ट. ३ ध्यानींमनीं नसलेलें, अकल्पित; अकस्मात उत्पन्न झालेलें. [सं.]

अनबनाव—पु. बेबनाव; वैमनस्य; शत्रुत्व. [हिं. अ+बनाव]

अनबुज—वि. अज्ञानी; बुद्धिहीन; अडाणी. ' तुझें थोरपण तुजलाची साजे। येरी अनबुजे होय देवा।' –ब ७१०; ' स्वर ऐकून कोकिळा दडाल्या गिरिकंदरीं अनबुजा।' –पला ५९. [सं. अ+बुध्; प्रा. बुज्झ; हिं. अनबुझ.]

अनभग्न—वि. (प्रां.) अभ्यास नसलेलें; अनिष्णात; अनिपुण; अनभ्यस्त; कच्चा. [सं. अ+भग्न]

अनभरंवसा—पु. (ना.) अविश्वास; बेभरंवसा. [अ+भरंवसा]

–शी, अन भरोशी–अविश्वासी.

अनभावार्थी—वि. (गो.) कपटी; धूर्त; बाहेर एक व मनांत दुसराच हेतु असलेला. [सं. अ+भाव+अर्थ]

अनभिज्ञ—वि. १ परिचय नसलेला; अपरिचित; **दिन माहितीचा.** २ अजाण; अडाणी. [सं. अ+अभिज्ञ.]

अनभ्यस्त—वि. न आचरलेला; सराव किंवा परिपाठ नसलेला; अपरिचित; तरबेज किंवा कुशल नसलेला; माहिती नसलेला. [सं. अ+अभ्यस्त.]

अनभ्यास—पु. १ अभ्यासाचा अभाव; परिपाठाचा अभाव; परिचय नसणें. **म्ह०** अनभ्यासे विषं शास्त्रम्. २ (संगीत) एकादा स्वर रागालापांत फार थोडा वेळ घेणें. [सं. अ+अभ्यास]

अनभ्यासी—वि. १ न अभ्यासिलेलें; सराव किंवा परिपाठ नसलेलें. २ अभ्यास किंवा सराव न करणारा; अभ्यासाच्या कामीं आळशी; अनभ्यस्त.

अनभिषिक्त—वि. अभिषेक न झालेला (राजा, पुढारी, इ.). ' तरुण बंगाल ज्याला अ० राजाचा मान देत आहे, ' –टि ३.७५. [सं. अ+अभिषिक्त]

अनमान—पु. १ अनादर; दुर्लक्ष; उपेक्षा; अवगणना; हेळसांड; हयगय. २ संशय; शंका. ' तैसाचि तो मयूरकेतु। पूर्ण करील मनोरथ। यांत नसे अनमान।' –जै ४६.८५. ३ संकोच. [सं. अ+मन्]. **०करणें**–१ दुर्लक्ष करणें. २ संकोच करणें. **०न टेवणें–धरणें–पहाणें**–१ संकोच न करणें; भीड न धरणें. २ अव्हेरणें; अनादर करणें; दुर्लक्ष करणें; हयगय करणें. **०णें**–सक्रि. अव्हेरणें; अवज्ञा करणें; उपेक्षणें. उ० अनमानून खाणें, चालणें, जेवणें, बोलणें, लिहिणें, वाचणें, उत्तर देणें, इ०.

अनमानधप(ब)का—पु. निव्वळ तर्क; कल्पना; अंदाज; अटकळ; अटकळ पंचविशी, (बहुधा तृतीया विभक्तींत उपयोग-अनुमानधपक्यानें=अंदाजानें, ठोकळ मानानें). ' त्याला बघितलें विचारून नुसतें अनमानधपक्यानें. ' –भा १.१. [सं. अनुमान+म. धपका]

अनमानिक—वि. निष्काळजीपणाचें; बेफिकीरपणाचें; अनादराचें; ज्यांत अनमान आहे असें (भाषण वगैरे). [अनमान]

अनमानिक—वि. अनिश्चित; मोघम; संदिग्ध (इसम, भाषण वगैरे). [सं. अनुमान]

अनमानीत—वि. घोंटाळ्याचें; संशयित; मोघम; अनिश्चित; संदिग्ध; दुटप्पी (उद्योग, कारभार, भाषण, वगैरे). [सं. अनुमान]

अनमान्या जाणें—(व.) बेशुद्ध पडणें; घेरी येणें. ' एक बुक्की छाताडावर मारली तर अनमान्या गेला. ' [सं. अ+मन]

अनमार्ग—पु. १ असन्मार्ग; वाईट मार्ग; कुमार्ग. २ दुसरा रस्ता; अन्यमार्ग; विपथ; कुपथ. 'सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें ।' –दा ५.१०.२. [सं. अ, अन्य+मार्ग.]

अनमोल—वि. विनमोल; बहुमोल; अमोल; अणिमोल. [सं. अ+मूल्य]

अनय—पु. १ अन्याय; अनीति; अप्रामाणिकपणा. २ कपट: पाप. [सं. अ+नय] –वि. अनीतीचें; अन्यायाचें.

अनयाळें—अणियाळें पहा.

अनर—स्त्री. न. (कों.) १ रामफळ. [हिं. एनोना; बं. नोना; लॅ. अनोना रेटिक्युलाटा]. २ (दारूकाम) अनारनळा: हिंगणबेट. [फा. हिं. अनार]

अनरसा—पु. तांदुळाच्या आंबलेल्या पिठांत गूळ मिसळून त्याच्यावर खसखस थापून तुपांत तळून (बडेघारच्यासारखें) केलेलें पक्वान्न. [तुल० ते. अरिसे]

अनरसा—पु. एक प्रकारचें कापड. [फा. अनार]

अनराह(हा)टी—स्त्री. गैरशीत: कुमार्ग; आडरस्ता. 'अधर्म अनराहाटी शोकसंप्रहो।' –दा २.३.२७. [अ+राहटी]

अनरूढा—स्त्री. अनूढा; अविवाहित; कुमारिका. 'जैसी अनरूढा रूपवंती ॥ देखौनि वेधे चक्रवर्ति ।' –ऋ ५३. [सं. अनूढा]

अनर्खण—न. (गो.) (निंदार्थी) पोट.

अनर्गल-ळ—वि. अडकाठी नसलेला; बेकैद; उच्छृंखल; स्वच्छंदी; मनस्वी; स्वेच्छाचारी. 'तूं ठार्यींचा गोवळ । अविचारी अनर्गळ ।' –तुगा १८५. –क्रिवि. मनसोक्त; स्वेच्छाचार.नें; स्वैर; अप्रतिबन्ध. 'शिष्या मुक्तपणें अनर्गळ। करिसी इंद्रियें बाष्कळ।' –दा ५.६.६०. [सं. अ+अर्गला]. **०ता**–स्वच्छंदपणा; स्वेच्छाचार; स्वैर वर्तन. 'अनर्गळता करूं नये।' –दा १४.१.२५.

अनर्गळी—स्त्री. स्वेच्छाचारी आचरण: स्वैर वर्तन; खोडया; छंद; चार; चाळे: लहर. [सं. अ+अर्गला]

अनर्घ-र्घ्य—वि. १ अमोल; अंदाज न करतां येण्यासारखें; बहुमोल: अतिशय किंमतीचें. 'कंठीं माळा अनर्घ्यमणी।' –सीस्व ४.५७. [सं. अ+अर्घ: अर्घ्य]

अनर्थ—पु. १ अतिशय अनिष्ट गोष्ट; मोठें अरिष्ट. 'आमचें कुटुंब समग्र । कुंभकर्णें ग्रासिलें ठार । थोर अनर्थ मांडिला ॥' २ अव्यवस्था; थैमान; दंगा किंवा त्यापासून उद्भवणारें दु:ख, संकट, विघ्न. 'हें असो जें सागरू । अनर्थांचा ॥' –ज्ञा ८.१४९. [सं. अ+अर्थ] ३ निरनिशयता; अमर्यादता; अपरंपारता; असामान्यता; अतिशयता. या शब्दाचा उपयोग फार स्वैरपणें केला जातो. उ० (अ) 'एक जाउनी सांगती सिते । अनर्थ मांडिला तुझिया सुतें।' –भनंत लवकु. (आ) 'वेळ बांधावयाचा यानें अनर्थ मांडिला.' =वेळ बांधण्याच्या प्रयत्नाची पराकाष्ठा केली. (इ) 'यंदा सस्ताईचा अनर्थ झाला. १५ पायल्या तांदूळ रुपयास मिळतात.' (ई) 'त्यानें एका दिवसांत ५०० श्लोक लिहून अनर्थ केला.' वरील अर्थी विशेषण व क्रियाविशेषणाप्रमाणें उपयोग. 'हा अनर्थ बोलतो.' 'त्याची अनर्थ बुध्दि.' ४ अर्थहीनता; अर्थशून्यता; निरर्थकता; (ल.) मूर्खपणा. 'श्लोकांचा अर्थ सोडून अनर्थ केला.' ५ पोकळपणा; नि:सत्त्वता; नि:सारता. 'जडा ऊनर्थांत समान साचा । जो अर्थ तो मी प्रियमाणसाचा ॥' ६ शत्रुत्व; वैर. 'मज सांगा वृत्तांत । कीं कृष्णजरासंधा अनर्थ । वाढला कां ॥' –कथा २.२.११. [सं. अ+अर्थ]

अनर्थक—वि. १ निरर्थक; अर्थशून्य (ग्रंथ पद्य; वाक्य; इ०). २ बिनफायदेशीर; व्यर्थ; पोकळ. ३ अनर्थकारी; उपद्रवी [सं.]

अनर्थभान—न. (लु.) अरिष्टाची दुर्दैवाची, जाणीव; मानसिक विकल्प; हूरहुर; अनर्थाची पूर्वकल्पना. [सं.]

अनर्थापात—न. १ मोठया अरिष्टाचा आघात; अरिष्ट कोसळणें; संकट वगैरे येणें. २ अतिशयितता; अतिरेक. अनर्थ पहा. [सं.]

अनल-ळ– पु. १ अग्नि; विस्तव; आग. सामाशब्दः कामानल, क्रोधानल, तृषानल, क्षुधानल–वियोग–विरह–शोक–अनल, इ. जैसा उद्यानामार्जी अनळु ॥' –ज्ञा १.२३०. देउनि उपशम अनळा। जाळिती क्रोधाचा भुईनळा।' –एरुस्व १५.१२१. [सं.]

अनलस—वि. आळस नसलेला; तत्पर; दक्ष; उद्योगी; मेहनती. 'अनल समीहित साधी राया वारा महिवरा कामा । अनलस मीहि तसा धीरा यावा रामहि वराका मा ॥' –मोरो. [सं.]

अनॅलिसिस—न. पु. १ (शाप.) रासायनिक पृथक्करण; मूलद्रव्यशोधन; घटकसंशोधन. २ (व्या.) वाक्यपरिच्छेद; पृथक्करण. ३ (गणित.) पृथक्करणपद्धति. [इं.]

अनल्प—वि. पुष्कळ; थोडा नव्हे तो. [सं. अ+अल्प]

अनव—वि. वृध्द; जुनाट. 'बहु हेंहि पदभरिहि जरि सारील अनव करी नवा रणगा ॥' –मोभीष्म ४.१०. [सं. अ+नव].

अनवकाश—वि. १ वेळ, सवड नसलेला; बिनफुरसतीचा. २ स्थल जागा नसलेला. –पु. कालाचा, जागेचा अभाव. [सं. अ+अवकाश]

अनवच्छिन्न—वि. अखंड; अकुंठित; व्यापक; अभंग. 'ऐसी अनवच्छिन्न समता। भूतमात्रीं सदयता।' –ज्ञा २.२९८. [सं. अ+अव+छिद्]

अनवट-ठ—पु. पायाच्या अंगठ्यांत घालावयाचा रुप्याचा दागिना; 'अणवट' पहा. 'अनवट निटल्या ही जोड त्या जोड-व्यांचा।' –सारुह ६.३१; 'जोडवी अनवठ मासोळ्या ॥' –स्त्रीगीत ६५.

अनवटी-ठी—स्त्री. हनुवटी. [सं. हनु+वृत्]

अनवगी—वि. पायांत जोडा वाहणा किंवा कांहीं पादत्राण न घातलेला; अनवाणी पहा.

अनवधान—न. दुर्लक्ष; अलक्ष; बेसावधपणा. –वि. बेसावध. **०ता**–निष्काळजीपणा; बेसावधपणा. [सं. अ+अव+धा]

अनवधानी—वि. १ स्वतःस विसरणारा; स्वतःची शुध्द नसलेला; ध्यान नसलेला. २ बेसावध; गाफील; दुर्लक्ष असलेला: बेफिकीर. [सं.]

अनवरणें—सक्रि. त्याग करणें; सोडणें; टाकून देणें. 'लोभ आणि अहंकार आम्ही अनवरिला बाई.'–भज ४१. [सं. अ+वृ]

अनवरत—वि. अविरत; अविश्रांत; सतत चालणारें; अखंड. 'जयजय वो शुध्दे। उदारे प्रसिध्दे। अनवरत आनंदे। वर्धतिये।' –ज्ञा १२.१. –क्रिवि. न थांबतां; न अडखळतां; एकसारखें; सतत; निरंतर. 'हे पत्रत्रय अमृत सेविजे अनवरता॥' [सं.]

अनवल–स्त्री. अनवलें–अनोलें—न. (कों) रामफळाचें झाड-फळ; अनर. [बहुधा पाश्चात्य शब्द]

अनवला—पु. (बे.) आबाळ; हेळसांड. [अ+नवल]

अनवलोभन—न. सोळा संस्कारांपैकीं एक; गर्भिणीच्या तिसऱ्या महिन्यांत हा करावयाचा असतो. अश्वगंधा वनस्पतीचा रस नवऱ्यानें गर्भिणीच्या नाकांत पिळावयाचा हा यांत मुख्य विधि असतो. त्या रसामुळें गर्भ सुरक्षित राहतो. [सं. न अवलुप्यते गर्भोऽनेन]

अनवसर—पु. १ अवेळ; अकाल; फुरसत किंवा सवड नसलेली वेळ; असमय; भलतीच वेळ. 'अथवा अवचटें ऐसें घडे। जें अनवसरें देह सांडे।' –ज्ञा ८.२०५. २ अनधिकार; अयोग्यता. 'स्त्रीशूद्रादिकां प्राणिया।(वेद) अनवसरू मांडुनियां। राहिला आहे।' –ज्ञा १८.१४५८. ३ वियोग; लोप; अभाव. 'जयाचेनि अनवसरें। द्रष्टा ले दृश्याचें मोहिरें।' –अमृ २.९. ४ जागेचा अभाव; अवकाशाचा अभाव. ५ संकट; दुष्काळ; वाईट काल; आपत्काल; आपत्ति. **०पतित**–वि. बेहंगामी; अकाली घडणारा–पडणारा–येणारा. [सं. अ+अव+सृ]

अनवसरी—स्त्री. अकाल; जागेचा अभाव. [सं.]

अनवस्था—स्त्री. १ अनिश्चित–चंचल–विस्कळित स्थिति; निराश्रित स्थिति; निराधारता. 'पुरतें वैराग्य न होतां उगीच हट्टानें विषयत्याग केल्यानें अंतःकरणाची अनवस्था मात्र होईल.' २ अव्यवस्था; घोंटाळा; तारांबळ. ३ अवस्थातीतत्व; अवस्थेच्या–अस्तित्वाच्या पलीकडील स्थिति; अमूर्त–निराकार स्वरूप, स्थिति. ४ अमर्यादता; असमाप्ति; अनवस्थाप्रसंग; निरवधित्व; अनियमितता. 'परमाणूचा अवयव, पुनः त्याचा अवयव अशी कल्पना करीत सुटल्यास अनवस्था होईल.' ५ अनास्था; दुर्लक्ष; हेळसांड (मुलांची, जनावरांची). **०प्रसंग**–पु. निराधार स्थिति; अव्यवस्था; अमर्यादपणा; [सं. अ+अवस्था]

अनवस्थित—वि. १ अनिश्चित; अव्यवस्थित; विस्कळित; बेदाद. २ वास्तव्य नसलेलें; मोकळें; रिकामें. [सं.]

अनवस्थिति—स्त्री. अनिश्चितपणा; कायम नसलेली अवस्था. (ल.) (कामाचा, मनाचा, स्वभावाचा) चंचलपणा, अस्थिरता. [सं. अ+अवस्थिति]

अनवळखी—अनोळखी पहा.

अनवा—पु. गोराडूच्या जातीचा, फणसाप्रमाणें, खाण्याचा मोठा कंद; गोराडूचा कांदा.

अनवा—पु. कच्ची नक्कल; घाईघाईनें खरडलेला लेख; मसुदा; कच्चा खर्डा. –खरे १८६५. [सं. अन्वय?]

अनवा—वि. १ सर्वोत्कृष्ट; अमोलिक. 'नवरत्नामधीं चंद्र पहिला तेजस्वी आनवा।' –सला ५३. २ नवीन तऱ्हेचें; विलक्षण; विचित्र; तऱ्हेवाईक. 'आजचें गाणें अ० झालें;' 'हें लिहिणें कायहो अनवा.' [अर. अन्वा=तऱ्हा, प्रकार]. **०अपरूप**–(चुकीनें अनवल अवरूप) नवोनव; विलक्षण; अपूर्व व मनोवेधक; आश्चर्यकारक; अप्रतीम. [अनवा+अपूर्व अप.]

अनवाणा–णी, अनवहाणी—वि. क्रिवि. पायांत पादत्राण (वाहणा, जोडा) न घातलेला; उघड्या पायाचा–पायांनीं. 'अनवाणी घाई राव हळुहळु.' –सप्र २.१४. [सं. अ+उपानह्.] **०काशीकर**–पु. (पायांत कांहींहि न घालतां आपण काशीस जाऊन आलों अशी बढाई मारणारा. यावरून) पक्का लबाड, छचा; अट्टल सोदा; भामटा. **०पायांनीं**–पायांत कांहीं न घालतां; उघड्या पायांनीं.

अनवाळ—वि. उच्छृंखल; बेफिकीर; खोडकर; स्वैर; उनाड. 'दशवर्षा माजीं बाळ। तारुण्यांत अनवाळ।' –आप ८१. [अर वाळ अप? किंवा सं. अ+आ+विल्=मोडणें, फोडणें]

अन(नु)वाळी—स्त्री. टवाळी; चेष्टा; खोडया. 'तूं व्रजपाळकवाळक होउनि हे अनुवाळी, करिशी मुरारी।' –वामन ४. कात्यायव्रत. [अनवाळ]

अनवाळें—न. (गो.) सोंवळें. [सं. अनाविल=शुध्द]. **०लयादांडी**–सोवळें वाळत घालावयाची दांडी.

अनवेक्षण—न. अनादर; दुर्लक्ष. 'म्हणे ही तपःसिध्दी तत्त्वतां। अनवेक्षणीं रूसली।' –जै २९.२. [सं. अ+अव+ईक्ष्=पहाणें]

अनव्यावृत्तिसिद्ध—वि. दुसऱ्याच्या निरासानें सिध्द होणारा [सं. अन्यव्यावृत्तिसिध्द]

अनशन—न. उपवास; उपोषण; निराहार (क्रि० करणें, होणें). [सं. अ+अशन; प्रा. अणसण]. **०व्रत**—न. उपोषण करण्याचें व्रत.

अनशवें–अनशिळें–अनशें–अनशो–अनशोय–अनसोलें पोट—न. रिकामें किंवा अन्न नसलेलें पोट. (अनशवें

वंगरे विशेषणांचा कधीं प्रथमाविभक्तींत उपयोग करतात. उ० अनशवें पोटीं पाणी प्यालें असतां नजांत भरेल) ०पोटीं–क्रिवि. कांहीं न खातां; खाल्यावांचून; उपाशी असतां. [सं. अनशित; प्रा. अणसिय; म. आनशे–पोटीं]

अनशुद्ध–शुद्ध–सूद—अशुद्धि पहा.

अनश्रुत—वि. १ न ऐकलेलें; अश्रुतपूर्व. २ अपूर्व; अलौकिक; ज्याविषयीं पूर्वी ऐकिलें नाहीं असा (विषय). ३ ज्यानें पूर्वी एकाद्या गोष्टीविषयीं ऐकलें नाहीं असा (मनुष्य). ' अग्निगर्भनिगमागमानश्रुन । जो दिगंबर अवधूवरहित । ' [सं. अ+श्रुत अप.]

अनश्वर—वि. शाश्वत; नेहमीं टिकणारा; नाश न पावणारा. ' नश्वरें अनश्वरासी । उत्तीर्णता कैंची घडे । ' –एरुस्व ५.९३. [सं. अ+नश्वर]

अनस—(गो.) अननस पहा. (अनशी=अननसाचें झाड)

अनसबाबा—पु. घोड्याचा एक रोग; ह्यांत सर्दी किंवा गर्मीपासून फोड होतात. –अश्वप २९५.

अनसाईपणा—पु. उतावीळपणा; असहिष्णुता. ' कीं निरुती हन मुकें। अनसाइपणा । ' –अमृ ७.७९. [असहनचा वर्णविपर्यास]

अनसूट—वि. १ चव न घेतलेलें; उष्टें न केलेलें; न वापरलेलें; स्पर्श न केलेलें; जसेंच्या तसें असणारें. (दुधतें, पाणी, वगैरे). ' म्हणे दधि दूध जें सांचलें । अनसुट घरी येथूनी । ' –ह ७.२८. २ खर्च न करावयाचें; न वापरण्याजोगें; आधीं उष्टें न करण्याचें. ' माता म्हणे आजि मित्रवार । दुग्ध अनसूट असे समग्र । ' –ह ९.१९३. ३ (ल.) वांटणीचा भाग ज्यास मिळाला नाहीं असा. ४ वैषयिक अनुभव न घेतलेला; ब्रह्मचारी (पुरुष किंवा स्त्री). ' उरों नेदी कोठें अनसूट । परद्वारी हा क्रियाभ्रष्ट । ' –ह १६.१६. ' आजवर नीट अनसुट राहुन । कसें मन मोहुन । घडोघडीं केला विषय पलंगावर संशय सोडुन । ' –प्रला ७२.१७९. ५ बिन बडबलेला (बैल); खच्ची न केलेला (घोडा); (ल.) वीर्यवान् ' अनसुट निर्मळ च्यारि वाजी । ' –सीस्व ८.१०९. [सं. अनुच्छिष्ट]

अनसूट—वि. १ पूर्ण; अखंड. ' दोरीं दोरपण अनसूट '–एभा २९.३६३. २ (श्राद्ध किंवा पक्ष याशब्दाला जोडून) भरणी श्राद्ध-भाद्रपद वद्य पक्षांतलें. (न जोडतां) मृताच्या वर्षश्राद्धाच्या पूर्व दिवशीचें श्राद्ध. [सं. अनुस्यूत]

अनसूट—स्त्री. (को.) अनशुध्दि.

अनसूट—वि. शुध्द; पवित्र. ' वाचा अनसुट धरणें जाण । ' –एभा १७.२३८. [सं. अ+अशुद्ध–असूत]

अनसूय—वि. मत्सररहित. [सं. अ+असूया]

अनसूया—स्त्री. १ मत्सरराहित्य. २ अत्रिपत्नी; दत्तमाता. [सं. अ+असूया]

अनस्ता—अनास्था (अप.) पहा.

अनहित—न. तोटा; अहित; नुकसान अकल्याण. [अन+सं. सहित]

अनळ—पु. अग्नि; अनल पहा. ' कां कस्तुरीसगट परिमळ । उष्मेसगट अनळ । ' –अमृ १.४२. [सं. अनल]

अनक्षर—वि. १ निरक्षर; खेडवळ; अशिक्षित; जंगली; अडाणी. २ शब्दातीत (परब्रह्म). [सं. अ+अक्षर]

अनक्षर—वि. क्षयरहित; कमी न होणारा; न झिजणारा. [सं. अ+क्षर्]

अनाइकी—वि. अराजकता; अनायकी पहा. [सं. अ+नायक]

अनाकार—वि. आकाररहित; निराकार. ' तया ऐशी अनाकारु । जे दशा गा । ' –ज्ञा १५.५०६. [सं.]

अनाक्रोश—वि. आक्रोशरहित; सहजः अक्लेश. ०क्षमा–सहजशांति. [सं.]

अनागत—वि. १ पुढें होणारा; पूर्वी आलेला नव्हे तो. ' जे कां अतीत अनागत । वर्तमान जे प्रस्तुत । ते अवतार समस्त । इत्यंभूत सांगावे । ' –एभा ४.३४. २ भविष्यकालचें; भावी. ' अतित अनागत वर्तमान । हें तापसांसी उठे प्रपंचज्ञान । ' –विउ ४.४२. ०ग्रह–पु. (संगीत) ताल देण्यास सुरवात झाल्यानंतर कांहीं वेळानें गाण्यास आरंभ करणें. ०चिंता–स्त्री. पुढील तरतूद, काळजी; भविष्यकाळासंबंधीं विचार. ०द्रष्टा–वि. भविष्य जाणणारा. ' जे तपसामर्थ्यें समर्थ थोर । अनागतद्रष्टे ऋषीश्वर । '–एभा २२.३२. ०विधाता–वि. दूरदर्शी; भविष्य ओळखणारा; धोरणी; पुढील तरतूद करणारा. [सं.]

अनागम—वि. ज्याचा आरंभीचा अगर सुरवातीचा काल माहीत नाहीं असा; पूर्वापार; अति प्राचीन; स्मृतिकालातीत (वतन, मालमत्ता, हक्क, रिवाज). [सं. अ+आ+गम्]

अनागम्य—वि. १ दुर्गम; आटोक्यांत न येण्याजोगें. २ अप्राप्य; अवघड; दुरापास्त; असाध्य; दुर्मिळ. [सं.]

अनागामी—वि. न येणारा (ल.) पुनर्जन्मरहित. ' इतर सर्व कर्मांचें फळ क्षांति, अनागामी (पुनर्जन्मरहित) वृत्ति अथवा अहैत्पद प्राप्त केलें असतां चुकवितां येतें. ' –ज्ञाको (क) १३९.

अनागोंदी, अनीगोंदी—न. कर्नाटकांतील विजयानगर साम्राज्याचें प्राचीन राजधानीचें एक शहर. ०कारखाना–कारभार–जमाखर्च–बक्षिस–बोलणें–खोटा, अव्यवस्थित गोंधळी, पोकळ, रिकामा, कारभार–जमाखर्च, इ०. (विजयानगर साम्राज्य नष्ट झाल्यानंतरचा कोणी एक राजा आपलें वैभव दाखविण्यासाठीं पृथ्वीवरील सर्व देशांचा भपकेदार जमाखर्च आपला म्हणून मांडीत असे; म्हणजे त्यांच्या सर्व उत्पन्नाच्या मोठमोठ्या रकमा जमेच्या बाजूस मांडून तेवढ्याच रकमा पुन्हा खर्चाच्या बाजूस मांडीत असे. यावरून वाक्प्रचार). [का. अने=हत्ती+गुंदी–गोंदी=गाही]. –चा राजा–पु. मागितलेली वस्तु विचार न करतां

देणारा; भोळा सांब; गबाळी. ग्रह० 'सर्वच अनागोंदी;' 'सगळा अ० कारभार' =जिकडे तिकडे सर्व अव्यवस्थित अशा अर्थानेंहि वापरतात.

अनाघात—क्रिवि. अतिशय; प्रमाणाच्या बाहेर; भरमसाट-पणें. 'यंदा अनाघात पाऊस पडला.' [सं. अनागत ?]

अनाचार—पु. अनिष्ट, अनियमित वर्तन; विहित आचार सोडुन वागणें; आचारभ्रष्टता; अधर्म; दुराचार. 'विवेकें त्यजावा अनाचार हेवा।' –राम ६९. **-री**–वि. धर्मलंड; अनाचार करणारा; स्वैरी; स्वेच्छाचारी; दुराचारी. [सं.]

अनाज—न. धान्य. [सं. अन्न हिं]

अनाजीपंताचा धारा—पु. शिवाजीमहाराजांचा सचीव अनाजी दतो यानें जी तरमवेदी केली ती. –रा २१.७९.

अनॉटमी—स्त्री. (शाप.) शारीर; शारीरशास्त्र; शरीरव्यवच्छेदन शास्त्र. [इं.]

अनाठायीं—क्रिवि. १ अयोग्य ठिकाणीं, स्थळीं, जागीं; गैर मार्गानें; भलत्याच गोष्टींत. 'न देवाय न धर्माय.' 'द्रव्याचा धर्मार्थि व्यय करावा किंवा उपभोग तरी करावा उगेच अनाठायीं घालवूं नये.' 'दुष्टास हितोपदेश केला म्हणजे अ० जातो.' २ व्यर्थ; फुकट. [सं. अन्य+स्थान, प्रा. अण्ण+ठाय. समासांत वापरतात]

अनाड—वि. १ अडाणी. 'मी अनाड कांहीं कळेना गे ये ये। देहजड पडली भ्रांति॥' –पला २२.५६. २ उनाड; द्वाड; नाठाळ. अधर्मशील लातरी. सर्वापरी अनाड।' –एभा ११.५५७. –स्त्री. अडचण; संकट. 'येथ मांडलिया तांतडी। तैं प्राण पडेल अनाडीं।' –एभा १४.४२५. [सं. अज्ञानी किंवा अडाणी] **०चोट**–अडाणचोट पहा.

अनाड-ढ, अनाडकी, अनाडचाळ, अनाडबाहुला, अनाडभाजी, अनाडझाड, अनाडणें—वगैरे शब्द, उनाड या अर्थी आहेत. त्याकरितां उनाड खालीं पहा.

अनाडा—अडाणा पहा.

अनाडी—वि. १ अडाणी; अशिक्षित; मूर्ख; खेडवळ; अनभिज्ञ; गांवढळ; निरक्षर; अजागळ. 'अनाडी लोकांचा चौथा वर्ग झाला असेल.' –निमा १०७४. २ अजाण; वयानें लहान. 'कोणी वदती रे अनाडी सुंदरी.' –दावि ३५. [सं.+अज्ञानी; हिं. गु. अनाडी]

अनात-थ—स्त्री. कृपा; मेहेरबानी; रयात; खैर. **०करणें**–कृपा करणें. –सभासद १९.५०. [अर.इनायत.]

अनात्म-त्मा—वि. मायामय; नश्वर; आत्म्याविरहित; आत्मा नसलेला; अशाश्वत; जड. 'आणि अनात्मवर्गनीर। सांडुनि आत्मरसाचें क्षीर। चरताति जे सविचार। राजहंस॥' –ज्ञा १५. २९६. [सं. अ+आत्मन्]

अनाथ—वि. दीन; निराश्रित; गरीब; पोरका; निरालंब. 'जें अचिंता अनाथांचें मायपोट।' –ज्ञा ८.१९५. [सं. अ+नाथ=ऐश्वर्ययुक्त असणें]. **०नाथ**–पु. ईश्वर; साधु; मालक; गरिबांचा कैवारी; अनाथबंधु–पालक. **०प्रेत**–न. बेवारसी प्रेत. **०बंधु**–पु. निराश्रितांचा सहाय्यक; दीनबंधु; **०विद्यार्थीगृह**–न. निराश्रित विद्यार्थ्यांकरितां बांधलेलें वसतिगृह-शाळा–आश्रम. महाराष्ट्रांत या नांवाची एक मोठी संस्था आहे. **०वाणी**–क्रिवि. अनाथाप्रमाणें; केविलवाणी; दीन; असहाय्य. 'झाली अयें परिसतांची अनाथवाणी। ठावी नसे जिस कधीं अशि नाथवाणी।' –वारु १८. इतर सामासशब्दः अनाथपालन; अनाथपूजा; अनाथभोजन; अनाथवत्सल; अनाथसमाचार; अनाथसेवा.

अनाद—स्त्री. १ (गो.) अन्न. २ तांदूळ. [सं. अन्न]

अनादर—पु. तिरस्कार; अवहेलना; तुच्छता; अपमान; अवज्ञा; [सं.]. **०ण**–न. अवहेलना; धिक्कार. **०णें**–क्रि. अवहेरणें; अपमान करणें; तिरस्कार करणें. **०बुद्धि**–स्त्री. तुच्छता; तिरस्कार.

अनादि—वि. १ आरंभरहित; उत्पत्तिरहित (ईश्वर, माया). 'अनादिमायाप्रभावें।' –ज्ञा १७.५६; 'मी आदिची अनादिआदि।' –एभा २.३९७. २ ज्याच्या आरंभकाळाचा थांग लागत नाहीं तो; चिरंतन. ३ मूळचा; स्वभावतः. 'तैसाचि श्रुत स्वर्गादिक। अनादि दोषयुक्त देख।' –एभा १०.४९६. –न. परब्रह्म. **०त्व**–आरंभरहित स्वरूप. 'आपुलें अनादित्व भेटे।' –ज्ञा १७.२२०. **०निधन**–न. व्यास आदि–अंत नाहीं असा; ज्यास आरंभ व शेवट नाहीं तो; विष्णु. **०परंपरा**–स्त्री. अति प्राचीन काळापासुन चालत आलेली रीति, पद्धति. (क्रि० असणें–चालत येणें–होणें). **०वनजर**–पु. (लु.) अतिशय जुनाट जंगल; झुडुपांचें रान [अनादि+वनचर]. **०सिद्ध**–वि. अनादिकालापासुन असलेला: स्वयंसिद्ध; अनिर्मित; स्वयंभु (ब्रह्म, ईश्वर इ०). 'जरी भिन्नचि अनादिसिद्ध।' –ज्ञा १५.३२३. **०सोयरा**–पु. ईश्वर. 'भेटला तो अनादि सोयरा॥' [सं. अ+आदि.]

अनादृत—वि. तिरस्कृत; तुच्छतेनें वागविलेला; [सं.]

अनाद्यनंत—वि. १ आरंभ व शेवट नाहीं असा; चिरकाल टिकणारा. २ ईश्वर; शंकर; विष्णु. [स. अनादि+अनंत]

अनान—वि. वेगवेगळा; निरनिराळा; पृथक. –पु. पृथकत्व; वेगळेपणा. 'दोहींचीं अभिधानें। अर्थाचेनि अनानें। विप्लवलीं।' –अमृ ८.१३. [सं. अन्य+अन्य.]

अनानस—अननस पहा.

अनापेक्षी—वि. १ अपेक्षेबाहेरचा, कल्पनेबाहेरचा. २ कोणतीहि अपेक्षा, इच्छा नसलेला; निरिच्छ; निष्काम 'सुगड संगीत गुणग्राही। अनापेक्षी लोकसंग्रही॥' –दा २.८.१९. [सं. अ+अपेक्षा]

अनाप्त—वि. परकीय; नातलग किंवा संबंधी नव्हे तो. 'जे नवमास वाहे उदरांत। ते माता करूनि अनाप्त। स्त्रियेसि मानिति अति आप्त।' –एभा ३.२३६. [सं. अ+आप्त]

अनाम—न. लोक; जग; मनुष्यमात्र. [अर.]

अनाम—वि. नामरहित असा (ईश्वराचें विशेषण). 'अज अजित पूर्ण अनाम ॥' 'यया अनाम्या नामें ठेविती।' –ज्ञा ४.६९. [सं. अ+नामन्]

अनाम—पु. एक प्राचीन राष्ट्र; कोचीन, चीन, आणि टाँकीन या भागास हें नांव आहे.

अनामत—वि. १ विश्वासानें दुसऱ्याजवळ ठेवलेली (ठेव). २ (ल.) अगाऊ विश्वास पटण्यासाठी दिलेली (टेंडर बरोबरची वगैरे रक्कम). ३ जप्त; सरकार जमा 'जयदेवरायास हरामखोरी लावून देशमुखी अनामत केली.' –ह्मं ३३. [अर. अमानत–वर्ण विपर्यास]. ४ तसल्मात; मोघम; हिशेबांत नांवाखालीं दाखल न केलेलें. ५ तिऱ्हाइताकडे ठेवलेली (वा शांतीळ वस्तु). सामाशब्दः–अनामत खर्च–खालें–जमा–झाडा–रक्कम–हिशेब इ०. –क्रिवि. १ खर्च न करतां; उपभोग न घेतां; स्पर्श करून न बिघडवितां; जशीच्यातशी. 'तुम्ही धान्य ठेवून गेलां तें अजून माझे घरीं अ० पडलें आहे;' 'सारी जिंदगी वांटून घेतली शेतें मात्र अ० राहिलीं आहेत.' २ अलगत; अछाद; हळूच; सावकाश; स्थिरपणें. 'ही भरलेली दउत अनामत उचलून ठेव.' इतर अर्थांसाठीं अचानक पहा. **०वही**–कायम निकाल न लागलेल्या अशा अनिश्चित पैशाच्या देवघेवीसंबंधीं–तसल्मात रकमांची ठेवलेली हिशेबाची चोपडी.

अनामय—न. आरोग्य; निरोगीपणा; सुदृढ–निकोप प्रकृति. [सं. अ+आमय]

अनामिक—वि. १ नांव घेण्याला अयोग्य; अस्पृश्य (महार, मांग, चांभार वगैरे). 'पवित्राला म्हणती नको हा कंटक। मानिती आत्मिक अनामिका॥' –तुगा. ४०८. २ ज्यानें आपलें नांव गुप्त ठेविलें आहे असा; निनांवी. ३ अनामक, नामरहित अमा (ईश्वर). [सं. अ+नामन्]

अनामिका—स्त्री. करंगळीच्या शेजारचें बोट; आंगठीचें बोट. [सं. अ+नामिक]

अनाम्ल—न. (शाप.) अम्लास निर्गुणत्व (उज्जनिःसारता) आणणारा जो पदार्थ त्यास अनाम्ल म्हणतात. भस्म; लवणोत्पादक धातु. (इं. बेस.) [सं, अ+अम्ल]

अनायक–की, अनायेक—वि. नेता, किंवा सत्ताधारी पुढारी नाहीं असें; बेबंद; निर्नायक; अंदाधुंदीचें; अव्यवस्थित. 'सत्यासत्य हारपलें। अवघें अनायेक जालें। चहूंकडे॥' –दा ११.२.२४; 'या राज्यांत आतां अनायक झालें. येथें राहण्याची सोय नाहीं.' [सं. अ+नायक]. **०ता**–स्त्री. अराजकता; बेबंदशाही; निर्नायकी.

अनायती—स्त्री. कृपा. 'अनायती नजर' =कृपादृष्टि. [अर. इनायत.]

अनायत्त—वि. स्वतंत्र; पराधीन नसलेलें; स्वावलंबी. [सं. अ+आयत्त]

अनायास—पु. परिश्रमाची किंवा कष्टाची जरूरी नसणें किंवा त्यापासून मुक्तता; (बहुतकरून तृतीया विभक्तींत उपयोग; जसें:– अनायासें, अनायासानें=परिश्रमावांचून; सहज). **०कृत**–वि. श्रम न घेतां, पडतां, सहज केलेलें. **०साध्य**–वि. करण्याला सोपें; सुलभ. [सं. अ+आयास]

अनार—न. १ डाळिंबाचें झाड; फळ. 'विलायती अनारें या दिवसांत तेथवर गर्मीमुळें न पावतील;' –दिमरा १.३३. २ (साधारणतः डाळिंबाच्या आकाराचा) दारूचा नळा; हिंगणबेट. याचे प्रकार:– मोतिया, चमेली, सुरू, शेवंती, बैठकी आणि साधा अनार; हे जेवतांना पंगतींत लावतात. 'हवया भुनळे चंद्रज्योती जळती। अनारे जातगी या जागोजागीं लाविती।' –स्त्रीगीत ३७. [फा.]. **०दाणा**–पु. डाळिंबाच्या बियांप्रमाणें दिसणारें एक धान्य. –सुंव्या ११०. [फा. अनार+दान]. **०दाणी**–वि. डाळिंबाच्या रंगाप्रमाणें किंवा दाण्यासारखें (ठिपके) विणकरींत ज्यावर बूट केलें आहे असें (पागोटें, शेला, दुपेटा वगैरे). –मराठी तिसरें पुस्तक(१८७३) ६४.

अनारणें—(विप्र. आयनेरणें पहा.) अवथणें; आळसणें; सुस्त होणें.

अनारत—वि. सततचें; निरंतरचें. –क्रिवि. सतत; अविरत. [सं. अ+आ+रम्]

अनारब्ध—वि. न आरंभलेलें; सुरू न केलेलें; भावी; पुढचें. **०कार्य**–न. पुढें सुरू करावयाचें काम; भविष्यकालीन कार्य; क्रियमाण असें कर्म. 'वेदांतसूत्रांत प्रारब्धासच प्रारब्धकार्य आणि जीं प्रारब्ध नाहींत त्यांस अनारब्धकार्य अशीं नांवें दिलीं आहेत.' –गीर २६९.

अनारसा—अनरसा पहा.

अनारिस–सा—वि. १ भिन्न; दुसरा; वेगळा; भलता. 'आपण विसरोनि अनारिसें। देखे पिसें जयापरी।' –रंयोवा १.४६३. २ दुसऱ्या जातीचें–रीतीचें; विलक्षण; नवीन; निराळें. 'बाई तुझा नवा शृंगार। अनारिसा दिसतो मुखचंद्र। तरी कोण जोडला वर। सांगे आम्हां।' –कथा १.१२.९. ३ अपूर्व; अद्वितीय. 'अमृत पाजीलें चवी अनारिसी। साक्ष ज्याची त्यासी मनामार्जी।' –ब २५.१२; 'मागें युद्धें झालीं अपारें। स्वयें केलीं असतीं धनुर्धरें। परी हें अनारिसें निर्धारें। दिसोनि आलें सकळासीं।' –जै ६६.७७. [सं. अन्यादृश; प्रा. अणारिस]

अनार्की—स्त्री. अंदाधुंदी; अनायकी; अराजकता; बेबंदशाही; क्रांति. **–किस्ट**—वि. अराजक; क्रांतिकारक; बंडखोर. [इं.]

अनार्त—वि. निरिच्छ; दुःखरहित; सुखी. 'होआल तुम्ही अनार्त।' –ज्ञा ३.१०२. [सं. अ+आर्त]

अनार्य—वि. १ आर्य महावंशांतील नव्हे तो; द्राविड, मोंगल वगैरे आर्येतर वंशांतील. २ आर्य किंवा श्रेष्ठ नव्हे तो; नीच; दुष्ट.

३ आर्यास अनुचित; अयोग्य; न शोभणारें; अप्रतिष्ठाकारक. ४ असभ्य; गांवढळ; प्रतिष्ठा नसलेला. –पु. १ भिल्ल, कोळी, कातकरी इत्यादि गुन्हेगार जाती. –मांगा २४. २ आर्य वंशांतील नव्हे तो माणूस; म्लेंच्छ, शक, हूण, शूद्र वगैरे लोकांना अनार्य म्हणत असत; आर्येतर मानववंशांतील इसम–द्राविड, मोंगल, नीग्रो इ०. [सं. अ+आर्य]

अनावड–डी—स्त्री. गोडी, आवड इत्यादींचा अभाव. तिरस्कार; नावड; तुच्छता; तिटकारा; अप्रीति; अरुचि; अनादर. 'पांतां प्रमेयांची गोडी । अमृता उपजे अनावडी ।'–शिशु १८: 'कृष्णीं लागलीसे गोडी ! अनावडी विषयाची ।' –एरुस्व ५. ६३. 'द्वेष कांटाळा अनावडी' –यथादी ४.८४६. [अ+आवड]

अनाव(वा)र—वि. बेलगामी; स्वैर; अमर्यादित; बेताल· आटोक्याबाहेरचें. 'हें अनावर न विचारितां । वायांचि धिवसा उपनला चित्ता ।' –ज्ञा १.६७. [सं. अनिवार्य]

अनावरण—वि. ज्यावर झांकण नाहीं असा; वस्त्रांत गुंडाळतां न येण्यासारखा; उघडा. 'मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासि भूषण ।' –ज्ञा ९.१६२. [सं. अ+आ+वृ]. **०समारंभ**–पु. प्रकट करण्याचा–उघडण्याचा समारंभ (तसबीर, पुतळा, इमारत वगैरे).

अनावसर—अयोग्य वेळ; अवेळ; अस्थान [सं. अनवसर]

अनावस्था—अनवस्था पहा.

अनावळी—वि. १ अनावळ पहा. –स्त्री. खोडी, चेष्टा; अरवाळी. [अ+आंवळ=आवर ?]

अनाविल—वि. १ शुद्ध; सोंवळें. –पु. गुजराथी ब्राह्मणांची एक जात; अनाविल ब्राह्मण. [सं. अनाविल]

अनावृत—वि. १ आवरण–झांकण नाहीं तें; उघडें; जाहीर. प्रकट; बंद न ठेवलेलें; न झांकलेलें. २ अनियंत्रित; अनावर; आटोक्यापलीकडील; बाहेरचें; अतीत. 'माझें स्वरूप गा असमसहस । गुणमायेसी अनावृत ।' –एभा १५.२२७. ३ (ल.) असंरक्षित [सं.अ+आ+वृ]. **०पत्र**–वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणारें पत्र. **०बीजवर्ग**–ज्यांचें बीज उघडें असतें अशा देवदार वगैरे वृक्ष जातीचा वर्ग.

अनावृत्त—वि. आवृत्ति नसलेला; पुन्हां न येणारा. [सं. अ+आ+वृत्]

अनावृष्टि—स्त्री. अवर्षण; पावसाचा अभाव. 'कि अनावृष्टि वर्षे घन । मृत्युसमयीं सुधापान ।' [सं. अ+आ+वृष्=पाऊस पडणें]

अनाश्य—वि. न विघडणारें; नाश न पावणारें; क्षय न होणारें; ऱ्हास न पावणारें. [सं. अ+नश्=नासणें]

अनाश्रम–मा—वि. समावर्तन होऊन विवाह झाला नाहीं असा; चार आश्रमांत जो मोडत नाहीं असा. [सं. अ+आश्रम]

अनाश्रय—पु. आश्रय; संरक्षण–आधार यांचा अभाव. [सं.]

अनाश्रय–यी, अनाश्रित—वि. निराधार; आश्रयहीन; निराश्रित. [सं. अ+आश्रय]

अनासक्त—वि. उदासीन; आसक्त नसलेला. 'ऐसा भूतकर्मी अनासक्तु मी भूर्ती असे ।' –ज्ञा ९.१२९. [सं. अ+आसक्त]

अनास्थ—वि. आस्था किंवा कळकळ नसलेला; निष्काळजी; बेफिकीर. [सं. अ+आ+स्था]

अनास्था—स्त्री. निष्काळजीपणा; बेफिकीरी हयगय; हेळसांड; धरसोड; कळकळीचा अभाव. [सं. अ+आस्था]

अनाहत, अनुहत—वि. १ न मारलेला, हाणलेला. २ स्वयमेव; स्वभावतःच उत्पन्न झालेला. ३ कोरें; न धुतलेलें (वस्त्र). ४ सततचा; अखंड. **०कमळ, ०चक्र**–न. (योग.) शरीरांतील षट्चक्रांपैकीं हृदयामध्यें अनाहत नामक चौथें कमळ आहे. त्याचा रंग अग्नीसारखा असुन तें बारा पाकळ्यांचें असतें. क पासुन ठ पर्यंत तेथें बीजाक्षरें प्रत्येक दळावर प्रकाशमान झालेलीं असतात. 'हृदयीं अनाहत कमळ । तें अग्निवर्ण द्वादशदळ । कं पासुनि ठं बीजीं करी झळाळ । प्रतिपत्रीं ॥' –विउ १.५१. [सं. अ+हन् = मारणें]. **०गजर, ०ध्वनि**–१ पु. योगसाधनानें ऐकूं येणाऱ्या दश नादाच्या ध्वनीपैकीं एक किंवा दहाहि. 'हें असो ते कुंडली । हृदयाआंतु आली । तंव अनाहताचा बोली । चावळे ते ।' –ज्ञा ६.२७४. २ एकसारखा अखंड अव्याहत सूर–आवाज. 'जैसा अनुहाताचा गजर । तैसीं पुरें वाजती अपार ।' –एरुस्व ६.७२. ३ सोहं शब्दः श्वासोच्छ्वास.

अनाहार—पु. उपवास; उपोषण; अन्नावांचून राहणें. [सं. अ+आ+हृ=घेणें]. **–री**–वि. उपवास करणारा. [सं.]

अनाहूत—वि. १ न बोलावलेला; आमंत्रण न दिलेला; आगंतुक. २ अनपेक्षित; अकल्पित; आकस्मिक. [सं. अ+आ+ह्वे=बोलावणें]

अनाक्षर—अनक्षर पहा.

अनिकट—पु. नदीला बांधलेला बंधारा; बांध; धरण. [इं. अनिकट. मूळ द्राविड शब्द–का. अणे=बंधारा+कट्टु=बांधणें. अणेकट्टे= बंधारा; ते. अडकट्ट=बंधारा]

अनिगा–घा—स्त्री. काळजीचा अभाव; हयगय; आबाळ; अनास्था. **०करणें**–निगा न राखणें; अनास्था करणें. [अ+फा. निगाह]

अनिगूत–ती—स्त्री. (प्रां.) आबाळ; दुर्लक्ष; अनिगा. 'हा घोडा अनिगुतीमें नासला.' [अ+फा. निगाह; म. निगूती]

अनिचाड—वि. चाड नसणारा; अनुत्सुक; अनास्थ; निघोरी. [अ+चाड]

अनिच्छ—वि. निरिच्छ; इच्छा नसलेला. [सं. अ+इच्छा]

अनिच्छा—स्त्री. निरिच्छता; बेफिकीरपणा; आकांक्षेचा अभाव. 'विषयाची अनिच्छा असावी.' **०प्रारब्ध**–न. दैववशात प्राप्त, केवळ इच्छा नसतांना घडून आलेली गोष्ट; नको तें नशीबीं येणें; परेच्छा प्रारब्ध (स्वेच्छा प्रारब्ध याहून भिन्न). [सं.]

अनित्य—वि. नित्य, शाश्वत नव्हे तो; नश्वर; विनाशी; क्षणिक. 'अनित्य प्रपंच जो अनात्मा।' [सं. अ+नित्य]

अनित्य—न. अनीति (अप.); वाईट गोष्ट–हेतु. 'अनित्य पोटीं धरूं नये।' –दा१४.१.२८. [सं. अ+नीति]

अनिंदक—वि. निंदा न करणारा. 'जो अनिंदकु अनन्यागती।' –ज्ञा ९.४०. [सं. अ+निन्द्=दोष देणें]

अनिंदित—वि. न निंदिलेलें; दोषरहित; निर्दोष. [सं.]

अनिंद्य—वि. निंदा न करण्याजोगें; निष्कलंक; अवाच्य; उपहास करण्याला अयोग्य; स्तुत्य. [सं.]

अनिपुण—वि. अकुशल; नवशिका; अजाणता; तरबेज नसलेला; निष्णात नव्हे तो. [सं. अ+निपुण]

अनिबद्धगान—न. (संगीत.)ज्या गायनांत रागाच्या धोरणानें केवळ स्वरांचें अनेक प्रकारें उच्चारण होतें पण त्यांत चिजेचीं अक्षरें व ताल असत नाहीं तें. [सं.]

अनिभ्रांत—वि. १ निःसंशय; खात्रीचा; निश्चित; खचित. २ भ्रांतिरहित; विकल्परहित. [सं. अ+नि+भ्रम्=विकल्प होणें]

अनिमि(मे)ष—पु. ज्याच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहींत असा: देव किंवा मासा. –वि. न मिटणारे, लवणारे; उघडे (डोळे); सदा जागरूक. –क्रिवि. डोळे न मिटतां; डोळ्यांत तेल घालून; टक लावून; सावधानतेनें. [वैसं. अ+निमिष्=मिटणें]

अनियत—वि. १ अनिश्चित; अनियमित; अनियंत्रित; पक्कें न ठरलेलें. २ नियमानें न वागणारा. 'अनियतासि सर्वथा योग्यता नाहीं।' –ज्ञा ६.३४४. [सं. अ+नियत]

अनियंत्रित—वि. १ निर्बंध नसलेलें; बेफाम; अमर्याद. २ स्वैर; झुलमी (सत्ता). 'सीझरनें अनियंत्रित सत्ता आपल्या हातीं घेतली होती.' –टि २.४४३. [सं. अ+नि+यम्=निर्बंधांत ठेवणें.–यंत्र]

अनियम—पु. अनिश्चितपणा; कायमपणाचा अभाव; कायम न केलेली स्थिति. –वि. अनियमित पहा.

अनियमित—वि. १ अनिश्चित; न ठरलेला. २ अमर्याद; अपरिमित; निरंतरचा. 'जीवीं अनियम चिंतवणी।' –ज्ञा १६.३३२. [सं.]

अनियम्य—वि. नियमन किंवा दमन करतां न येण्याजोगें; आवांक्यांत न आणण्याजोगें; हुकमत न चालवितां येण्यासारखें; अनिवार. [सं.]

अनियाळें—वि. वांकडें; तिरपें; तिरकस. 'मुरडिवें आंगें झाडी करितु। अनियाळां डोळां वेंस चेतु॥' –शिशु ७१०; [अणियाळें]

अनिरूप—वि. निरूपण करण्यास कठिण. 'तें अनिरूप कीं निरूपिजे। ऐकतां बुद्धि आणिजे।' –ज्ञा १३.१७६. [सं. अ+निरूप्=सांगणें]

अनिरूप्य—वि. वर्णन करतां न येण्यासारखें; न सांगण्यासारखें. [सं. अ+निरूप्=सांगणें]

अनिर्णय—पु. अनिश्चितता; धरसोड; निश्चित किंवा कायम नसलेली अवस्था; निकालाचा अभाव. –वि. अनिश्चित; अनियत. [सं. अ+निर्णी=ठरविणें]

अनिर्णीत—वि. कायम किंवा निश्चित न केलेलें; संशयित. [सं.]

अनिर्देश्य—वि. दाखवितां येत नाहीं असा. [सं. अ+निर्+दिश्=दाखविणें]

अनिर्वचनीय—वि. अनिर्वाच्य पहा. **०ख्याति**–वेदांतांतील एक वाद. 'आख्याति अन्यथाख्याति। शून्यख्याति सत्ख्याति। अनिर्वचनीय जे ख्याति। तो वादुनिश्चिती मी उद्धवा।' –एभा १६. २०७.

अनिर्वाच्य—वि. १ अवर्णनीय; वर्णन करण्यास कठिण; विवेचन, स्पष्टीकरण करण्यास अवघड (ईश्वर, दुःख, सुख). 'ब्रह्म तें अनिर्वाच्य जाण।' 'आणि इये अनिर्वाच्यपण। तें दुर्जेही देवांगणा।' –अमृ ६.३९. २ सांगण्याला अयोग्य. ३ अर्वाच्य याअर्थी. [सं. अ+निर्+वच्=सांगणें] **०पण**–न. उच्छृंखलपणा.

अनिर्वाह—पु. निर्वाहाचा अभाव; बिकट किंवा अनिष्ट अवस्था; निरुपायाची स्थिति; नाइलाज. [सं. अ+निर्+वह्=नेणें]

अनिर्वाह्य—वि. आवरण्याला, व्यवस्था करण्याला कठिण; चालवावयास कठिण. [सं.]

अनिल—पु. १ वायु; वारा. 'सहजें मलयानिलु मंदु सुगंधु।' –ज्ञा ४.२२०. २ अष्टवसूंपैकीं एक. [वैसं. अन्=श्वास घेणें. तुल० आयरिश अनल्]

अनिवड—वि. अतुलनीय; निवड करतां येत नाहीं असा; प्रचंड; भयंकर. 'अनिवड उठला टगकु। अंबरीं नादु थेकु॥' –गीता १.७७८. [सं. अ+नि+वृत्, प्रा. अणिवट्ट; म. अ+निवड]

अनिवार—वि. १ अतिशय; अमर्याद; प्रमाणाबाहेर; फार मोठा. 'जन्ममरणकोडी अनिवार।' –एभा २.२८४. २ आवरण्याला कठिण; दुर्निवार; खोडकर. 'मूल तुझा अनिवार यशोदे।' –राला १८. ३ अनिवार्य; अपरिहार्य; न टाळतां येणारी; न चुकविण्यासारखी (आपत्ति, विपत्ति; गंडांतर, अरिष्ट इ०). आम्हां जन्ममरण अनिवार।' –एभा ३.१११. ४ जागृत; कडक; पराक्रमी 'दख्खनेशी अंबाभवानी दैवत अनिवार॥'–ऐपो २७४. [सं+अनिवार्य]

अनिवार्य—वि. निवारण, प्रतिबंध करतां न येण्यासारखें; अपरिहार्य; टाळण्यास कठिण; वारण्यास अवघड. [सं. अ+नि+वृ]

अनिश्चित—वि. कायम अखेर, खात्री, निर्णय न केलेलें. [सं.]

अनिष्ट—वि. १ इष्ट नसलेलें; अप्रिय; नापसंत. २ प्रतिकूळ; अशुभ; वाईट; अकल्याणकारक; अननुकूल. –न. तोटा; नुकसान; अनर्थ; अहित; अकल्याण; अप्रिय, नापसंत गोष्ट, वगैरे. **०सूचक**–न. अनिष्ट फल सुचविणारें; वाईट गोष्टीचें पूर्वसूचक; अशुभ दर्शविणारें; दुर्लक्षणी; अभद्र; अमंगल. [सं. अ+इष्ट]

अनिष्टापत्ति—स्त्री. १ अनिष्ट घडणें; संकट येणें; अनर्थ ओढवणें. २ (न्याय.) जें सिद्ध करावयाचें नाहीं तें सिध्द करणें–होणें. [सं. अनिष्ट+आपत्ति]

अनिष्टापात—पु. अनिष्ट घडणें; आपत्ति; दुर्दैव; विपत्ति; दुर्घटना; संकट कोसळणें–येणें. [सं. अनिष्ट+आपात]

अनिष्पन्न—वि. १ न संपलेलें; अपुरें; अर्धेमुर्धें. २ ज्यापासून कांहींएक उत्पन्न झालें नाहीं असें, निष्फळ [सं. अ+निस्+पत्]

अनिळ—पु. वायु; अनिल पहा.

अनी—स्त्री. अणकुची; टोंक; अणी पहा. [सं. अणि]

अनीक—पु. न. १ सैन्य; फौज. २ समुदाय; जमाव. 'पुनरपि परते मार्गीं माधव हरिसा शिरे गजाअनिकीं।'–मोद्रोण ११. ३९. [सं.]

अनीकसा—वि. अणीकसा; भिन्न; दुसरा. [सं. अन्यत्क+सदृश म. अणिक+सा]

अनीगा—स्त्री. आण; शपथ; आणेगा पहा. 'माझें चरित्र कोणीं पाहूं नये अशी 'अनीगा' विनायकानें घातली.' –विक. चरित्र. [सं. आज्ञा; प्रा. आणा; म. आण]

अनीति—स्त्री. १ अधर्म; पाप; अनाचार; अन्याय; व्यभिचार. २ असभ्यपणा; अशिष्टता; ग्राम्यता; वाईट चालरीत. [सं.]

अनीन—स्त्री. लगाम (वादी, दोरी). 'एकदांच घोडयांच्या अनिना उठवून मोहलाच्या माशा उडतात त्याप्रमाणें सर्वत्रांनीं उडी घातली.' –पाव ४५. **अनीनीस अनीन लागणें**=काम अगदीं घाईत येणें. 'ज्यावेळीं अनीनीस अनीन लागेल त्यावेळीं येतील तितके ठेवून घेऊं.' –रा १२.३४. [अर. इनान.]

अनीबानी—अणीबाणी पहा.

अनीमोल—अनमोल पहा. 'मुक्त तुरा पदकीरत्न असे अनीमोल। राजेंद्र भूपती शान सर्वांवर डोल।' –होला ११९.

अनीश्वरभाव—पु. ईश्वर नाहीं असा भाव; नास्तिक, पाखंडी मत. (याच्या उलट ईश्वरभाव). [सं.]

अनीश्वरवाद—पु. पाखंडमताचें समर्थन; नास्तिकमताचा पुरस्कार. **–वी**–वि. निरीश्वरवादी; पाखंडी, नास्तिक; ईश्वर नाहीं असें मानणारा. [सं.]

अनु—अ. एक उपसर्ग. अर्थ: १ मागून, पश्चात्, उ० अनुगमन, अनुचर. २ सारखा; प्रमाणें; बरहुकूम. उ० अनुरूप. ३ खालीं (ल.) खालोखाल; दुय्यम प्रकारचा; पेक्षां हलका. उ० अनुकल्प. ४ मिळून: बरोबर. उ० अनुकंपन. [सं.]

अनु—वि. आनु; दुसरा; अन्य. 'मनोरथाचें परिमळ। आरोगिजतु कां लक्ष वेळ। परि उपवासावेगळ। आनु आथी।' –अमृ ६.३३. [सं. अन्य].

अनु—क्रिवि. मुळींदेखील; किंचित सुद्धां. 'मुसळाचें अनु। तुका म्हणे नव्हे धनु।' –तुगा ३१४५. [सं. अणु]

अनुकंपा—स्त्री. (दुसरा भीतीनें कांपत असला म्हणजे आपणहि दयेनें कांपतों म्हणून) दया; करुणा; कृपा; कळवळा; कींव. 'नच सुंदरी! करुं कोपा। मजवरि धरि अनुकंपा।' –सौभद्र. [सं. अनु+कंप्] **–कंपनीय**–वि. दयेस योग्य. **–कंपित**–वि. दया दाखविलेला; ज्याची दया आली आहे असा. **–कंप्य**–वि. दयेस पात्र; दया करण्याजोगें. [सं. अनु+कंप्=कांपणें]

अनुकरण—न. १ नक्कल; दुसऱ्याप्रमाणें वागणें; प्रतिकृति. २ हुबेहुब काढलेला आवाज (जनावर, पक्षी इ०चा); ध्वन्यनुकरण; ध्वनिवाचक शब्द उ० धडाधड, धबाधब, पटापट, भडाभड, वगैरे. [सं. अनु+कृ]. **०धातु**–पु. आवाजाच्या अनुकरणानें बनविलेला धातु; अनुकरणवाचक धातु. जसें:–करकरणें; खरखरणें; चुकचुकणें; चुरचुरणें. **०शब्द**–पु. आवाजावरून बनविलेला शब्द. उ० सपसप, सळसळ.

अनुकरणें—अक्रि. अनुकरण करणें; सदृश वागणें–होणें. 'जो आपु लेनि विसरें। सवें भूतत्वें अनुकरे। तो आत्मा बोलिजे क्षरें। पुरुषनामें।' –ज्ञा १५.४९५; 'जैं प्रकृति डंका अनुकरे। तै प्रकृति डंके अवतरे।' –अमृ ५.३६. २ उत्पन्न करणें. 'तया कर्माभाजीं मग। संहरो आघवें जग। अथवा नवें चांग। अनुकरो॥' –ज्ञा १८.४३२.

अनुकर्ष—पु. १ आकर्षण. २ कालांतरावर किंवा दिवसगतीवर लोटलेलें कर्तव्याचरण; विहित कालानंतर केलेली क्रिया (याउलट–अपकर्ष). ३ (व्या.) पूर्वीच्या नियमांतील शब्द पुढील नियमांत घेणें. [सं.]

अनुकल्प—पु. १ मुख्यत्वेंकरून जें कर्मादि सांगितलें असतें त्याच्या अभावीं कांहीं गौण कर्मादि करावें अशी जी शास्त्रादिकांत अनुज्ञा असते ती; गौणकल्प. जसें–कुशाच्या ऐवजीं दुर्वा उपयोगांत आणणें; २ प्रतिनिधि; बदली. [सं.]

अनुकार—पु. १ अनुकरण; अनुसरण. 'जातीचेनि अनुकारें। जेणें अवसरें। करणें पावे॥' –ज्ञा ६.४५. २ आकार; स्वरूप. कैवल्यपंथाचा उध्दारू। करावेआं रेखांचा विस्तारु। तैसा दिसे अनुकारू। वळीत्रयांचा!' –शिशु ३९५. ३ संप्रदाय. ४ प्रतिबिंब; नक्कल. 'ते आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर।'–ज्ञा ५.१३८. ५ साम्य; सारखेपणा; सादृश्य. [सं.] **–री**–वि. १ अनुकरण करणारा. २ सदृश असणारा, दिसणारा. **–र्य**–वि. अनुकरण करण्यायोग्य, नक्कल करण्यायोग्य. [सं.]

अनुकूल-ळ–वि. १ फायदेशीर; उपकारी; सहाय्यक; धार्जिणा; शुभ; कल्याणप्रद; हितकर; हितावह; योग्य; मनाच्या आवडीप्रमाणें असलेला. 'पूर्वेकडे गमनास पश्चिमवायु अनुकूल होतो.' २ जुळणारा; जमणारा; संमत; अनुसरून असणारा. 'मीमांसामत धर्मशास्त्रास अनुकूल आहे.' ३ तयार; हातांत, ताब्यांत, हुकमतींत असणारा. (पैसे, धान्य वगैरे). 'अनुकूल स्त्रियापुत्र। अ० मंत्री पवित्र। अ० राज्य सर्वत्र। भोगिले विचित्र नानाभोग॥' –एभा २.१४३. –न. योग्य परिस्थिति; सहाय्यक परिस्थिति; अनुकूलता; सोईस्करपणा. (प्रतिकूल याच्या उलट). 'यंदा काशीस जाण्याचें आम्हांस अनुकूल नाहीं; सारीं माणसें घरीं दुखणाईत आहेत.' [सं.] **-ता**–स्त्री. १ ऐपत; सामर्थ्य. २ संमति. [सं.]

अनुकृति—स्त्री. १ अनुकरण. २ नक्कल; वांकुल्या; विडंबन. [सं.]

अनुक्त—वि. १ अविहित; निषिद्ध (शास्त्रानें न सांगितलेलें म्हणून). २ न बोललेलें; न सांगितलेलें. **०संकेत**–पु. प्रत्यक्ष न बोलतां परस्पर समजुतीनें ठरलेली गोष्ट. 'तुम्ही आमच्याकरितां अमुक कराल तर आम्ही तुमच्याकरितां अमुक करूं असा लिबरल पक्षांतील पुढाऱ्यांचा अनुक्त संकेत किंवा मुग्ध करार असतो.' –आगर (अफूचें कमिशन). [सं. अ+उक्त]

अनुक्रम—पु. १ परंपरा; ओळ; एकामागून एक येणें. २ पद्धति; नियम. ३ विशिष्ट पध्दतीप्रमाणें–किंवा नियमांप्रमाणें–रचना, मांडणी. 'कोशांतील शब्द वर्णानुक्रमानें लावलेले असतात.' 'देखें अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरे।' –ज्ञा ३.८०. [सं. अनु+क्रम]

अनुक्रमणिका—स्त्री. पुस्तकांतील विषयांची, प्रकरणांची आरंभीं दिलेली यादी; विषयसूची; प्रकरणसूची. [सं.]

अनुक्रमणें—क्रि. (काव्य) योग्य काळीं सुरवात करणें; प्रारंभ करणें; करूं लागणें; हातीं घेणें (काम वगैरे). [सं.]

अनुक्रमें—क्रिवि. १ अनुरूप; अनुसरून. 'जेवीं राजाज्ञा अनुक्रमें।' –एभा ३.५३५. २ ओळीनें; क्रमानें; क्रमवारी. [सं.]

अनुक्रांत—वि. अनुक्रम लावलेला; अनुक्रमानें मांडणी, विशिष्ट रचना केलेला. [सं. अनु+क्रम्]

अनुग—पु. अनुचर; अनुयायी. 'कला त्यांची त्यांना असतिल तयांचे अनुग जे। तयांनां, आम्हांला अरसिक जनां काय समजे।' –टिक ८७. [सं. अनु+गम्=जाणें]

अनुगत—वि. आसक्त; अनुसरणारा; जोडलेला; पुरवणी लावलेला. [सं.]. **०धर्म**–नैसर्गिक, जाति-गुण-धर्म; आनुवंशिक गुण; सहजधर्म. 'गंधवत्त्व हा पृथ्वीच्या ठायीं अनुगत धर्म आहे.' [सं.]

अनुगम—पु. १ एखाद्या विषयाचें संपूर्ण आकलन. २ सर्व शास्त्रांचा विचार करून होणारें अनुगतधर्मादि ज्ञान. ३ अनुगमन; मागें जाणें; अनुसरणें. [सं.]

अनुगमन—न. १ मागून जाणें; अनुसरण; पश्चाद्गमन. २ सती जाणें; सहगमन; चितारोहण; क्षत्रिय व खालच्या वर्गांतील विधवा नवऱ्याच्या चितेंत उडी न टाकतां, नवऱ्याच्या पादुका, वस्त्र इ० वस्तूंसह दुसऱ्या एका चितेवर आरोहण करतात तें; किंवा नवरा परगांवीं मरण पावल्यास त्याची पलाशप्रतिमा करून सहगमन करतात तें. [सं.]

अनुगामी—वि. १ अनुसरणारा; नोकर; शिष्य; अनुयायी; आश्रित; खिदमतगार. २ मताप्रमाणें वागणारा; सांप्रदायी. 'बहुतेक ते अनुगामी आहेत.' –विक्षिप्त १.१४२. [सं. अनु+गम्]

अनुगुण—वि. १ जुळणारा; जमगारा; समानशील; अनुकूल. 'औषध पाहून तदनुगुणच पथ्य केलें पाहिजे.' २ योग्य; शोभणारा; मनाजोगता; सामाशब्दः–कर्मानुगुण; दैवानुगुण; पित्र्यानुगुण; शास्त्रानुगुण; इ०. ३ एक अर्थालंकारः–एकाच्या पूर्वसिद्ध गुणाचा दुसऱ्याच्या गुणसान्निध्यानें उत्कर्ष वर्णन करणें. 'आधींच मकेट तशांतहि मद्य प्याला।' [सं. अनु+गुण]

अनुगृहीत—वि. अनुग्रह, कृपा केलेला; कृपाळूपणानें, अनुकूलतेनें वागविलेला, मानलेला; काळजी घेतलेला; 'तैसा मी अनुग्रहीतु। साधूचा निरूपितु। ते आपुला अलंकारितु। भलतयापरी॥' –ज्ञा १.८२. [सं. अनु+गृह्]

अनुग्रह—पु. १ कृपा; दया; दयाळूपणा; मेहेरबानी; प्रसाद. (देवता, राजा, गुरु इ०चा). 'तुमचा अनुग्रहो गणेशु।' –ज्ञा १०.६; 'ज्यास परिहिती बहु तो करि धृतराष्ट्रीं अनुग्रह व्यास।' –मोभीष्म १.१. २ वेदमंत्राचा उपदेशः गुरूपासून उपदेश. (क्रि० देणें, घेणें). 'आपण धरूनि विप्रवेष। यावा तुक्यासी अनुग्रह।'. ३ अवलंबन; व्यापन; सहाय्यकारी संबंध. 'अंतःकरणाच्या अनुग्रहावांचून इंद्रियांस विषयग्रहणीं सामर्थ्य येत नाहीं.' **-ही**–वि. ज्यास उपदेश दिला तो; उपदिष्ट; ज्यावर अनुग्रह झाला आहे असा. **०वाद**–पु. ईश्वराची कृपा संपादन करण्याचें तत्त्व; भक्तिमार्ग. (इं. डॉक्ट्रिन ऑफ ग्रेस). 'युरोपांतील अनुग्रहवाद आणि आपल्याकडील पुष्टिवाद याची वाचकांना आठवण करून दिली.' –विचावि ८२.

अनुग्राहक—वि. १ अनुग्रह करणारा; दया दाखविणारा. २ उपदेश देणारा; उपदेष्टा (गुरु). [सं.]

अनुग्राह्य—वि. १ अनुग्रह, दया करण्यास पात्र. २ उपदेश करण्यास योग्य. [सं.]

अनुघडी—क्रिवि. एकसारखी; निरंतर; सतत. 'अमृताची सात बांकुडी। लागो कां अनुघडी।' –ज्ञा १३.६४०. [सं. अनु+घटि]

अनुघड-डु—पु. १ आच्छादन; आवरण; ढगांची काळोखी. **०फुटण**–उघडणें; उघडें होणें; आवरण नाहींसें होणें. 'जेव्हां शारदीयेचा अनुघडु फुटे। तेव्हां घनजात आटे।' –ज्ञा ९.१०२. [अ+उघड]

अनुघड-डु—स्त्री. अडचण; अवरोध; (हलचाल बंद पडणें). 'इंद्रियां अनुघडु पडलिया ।' –ज्ञा ८.१२०. [सं. अनु+घट्. अनुघटन=एकत्र जुळणी]

अनुचर, अनुचारी—पु. सेवक; आश्रित; अनुयायी; पदरचा. 'मी श्रीरामाचा अनुचर । हनुमंतनामें वायुकुमर ।' [सं. अनु+चर्]

अनुचरण, अनुचर्या—न. अनुसरण; चाकरी; नोकरी; सेवाशुश्रूषा; हजेरी. [सं.]

अनुचार—पु. १ अनुचरण पहा. २ अनुक्रम; अनुसरणक्रिया; पाठीमागून येणें. 'चाप ओढणें व आवाज त्यांमध्यें अनुचार आहे.' –न्यायपद्धति २६९.

अनुचित—वि. १ अयोग्य; अशिष्ट; वावगें; न शोभणारें; अप्रशस्त. 'तूं अनुचिता चित्त नेदसी ।' –ज्ञा २.८. २ अपात्र; अयोग्य; नालायक; असमर्थ; योग्य गुण नाहींत असा. [सं. अ+उचित]

अनुच्चारणीय—वि. बोलण्यास अयोग्य; अशिष्ट; अश्लील. [सं. अ+उच्चर्]

अनुच्छिष्ट—वि. १ उष्टें न केलेलें; उपभोग न घेतलेलें; उपभोगांत न आणलेलें; नवीन; न विटाळलेलें; सोंवळें; सेवन न केलेलें; अस्पृष्ट; ताजें (अन्न, पाणी इ०). 'सातही पदें अनुच्छिष्टें । नवलें आहारीं ।' –ज्ञा ७.१९७. २ (ल.) अप्राप्य; आटोकयाबाहेर; शक्तीपलीकडील. 'असो हें अनादि अविट । जो वाक्चातुष्टया अनुच्छिष्ट ।' –ऋ ४३. [सं.]

अनुज, अनुजन्मा—पु. पाठीमागून जन्मलेला; धाकटा भाऊ. [सं. अनु+जन्=जन्मणें]

अनुजा—स्त्री. धाकटी बहीण.

अनुजायिनी—वि. अनुकूल असणारी; 'पै स्वहिता अनुजायिनी । मेधा ते गा मी ये जनीं ।' –ज्ञा १०.२१९.

अनुजीवि—पु. आश्रित; नोकर; हुजऱ्या; दास. [सं. अनु+जीव्=राहणें]

अनुज्जिद्—न. (पाश.) उज्ज (हायड्रोजन) विहीन (अम्लें); अनाद्रें. (इं.) अनहायड्राइड. [सं. अ+उज्ज]

अनुतप्त—वि. पश्चात्ताप, अनुताप पावलेला; दुःखी; पश्चात्तापी. 'शापूनि होय अ० मुनी सतीतें ।' [सं. अनु+तप्=तापणें]

अनुताप—पु. पश्चात्ताप; अयोग्य कृत्याबद्दल वाटणारा खेद. 'आठवीन पाय धरुनि अनुताप । वाहे जळ डोंप नाहीं डोळां ।' **–तुगा** १०७६. 'अनुदिनीं अनुतापें तापलों रामराया ।' –राक. **०णें**–अक्रि. पश्चात्ताप पावणें; खिन्न होणें; दुःखानें व्याप्त होणें. 'ऐसा अनुतापोनि वाल्हा । नारदापासीं परतोनि आला ॥' **–रावि**, [सं.]

अनुतापी—वि. १ आपल्या कृत्याबद्दल लागलाच किंवा नेहमी पश्चाताप पावतो तो; अशा स्वभावाचा. २ पश्चात्ताप झाला आहे असा; अनुतप्त; खिन्न; दुःखी. [सं.]

अनुताल—पु. एक ताल; अनागत पहा. [सं.]

अनुत्तर—न. १ उत्तराचा अभाव; विसंगत, भलतें, अपूर्ण उत्तर **म्ह०** अनुत्तरम् उत्तरम्. किंवा अनुत्तरम् एव उत्तरम्. 'कोणें कांहीं फार मागूं लागला असतां संकोचादि कारणानें कदाचित् अनुत्तरच उत्तर कल्पावें लागतें.' २ (कायदा) उत्तर देण्याच्या चार प्रकारांत समावेश न होणारें उत्तर, 'उत्तर' पहा. ३ वचनभंग; करार न पाळणें; ठरलेल्या गोष्टीप्रमाणें न वागणें, करणें. 'सदरहु लिहिल्या प्रमाणें करीन; ह्यास अनुत्तर करणार नाही.' –वि. १ उत्तर देण्यास असमर्थ; निरुत्तर. २ उत्तम; अद्वितीय; सर्वांत श्रेष्ठ. [सं. अ+उत्तर]

अनुत्पत्ति—स्त्री. निष्प्रतिपत्ति; उत्पन्न न होणें. [सं.]

अनुत्पन्न—वि. १ उत्पन्न न झालेला. २ उपजीविकेचें साधन नसलेला. 'श्रोत्री, कुटंबवत्सल, अनुत्पन्न, असे सद्ब्राह्मण पाहून ग्राम अथवा भूमि देणें ती द्यावी.' –आज्ञापत्र २५. 'तर गरीब अ० असे ब्राह्मण पुण्यांत असतील...त्यांस शंभर रुपयेपर्यंत येकास याप्रमाणें धर्मादाव करणें.' –पेद १८.१३०.

अनुत्साह—पु. कोणत्याहि गोष्टीबद्दल आवड, गोडी, किंवा आनंद नसणें; तिरस्कार; उदासीनता; उत्सुकता नसणें. [सं. अ+उत्साह]

अनुदात्त—पु. १ वेदांतील तीन स्वरांपैकीं (उदात्त, अनुदात्त, स्वरित) ज्याला कोणताहि स्वर नाहीं असा वर्ण. [सं. अ+उदात्त]

अनुदार—वि. कोत्या मनाचा; उदार नाहीं असा; क्षुद्र बुद्धीचा. [सं. अ+उदार]

अनुदिन-नी—क्रिवि. दररोज; प्रत्येक दिवशीं. 'अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।' –राक [सं. अनु+दिन]

अनुद्भूत—वि. अप्रकट; अनुत्पन्न; गुप्त. [सं.] **०उष्णता**–स्त्री. (शाप.) पदार्थ विरल होतांना त्यांतील उद्भूत उष्णता गुप्त होऊन आपल्या त्वचेस समजेनाशी होते–ती उष्णता. (इं. लेटन्ट हीट). –भू ३१.

अनुद्वाह—पु. लग्न न होणें; अविवाहित अवस्था–स्थिति; ब्रह्मचर्य; कौमार्य. [सं.]

अनुद्वेग—पु. संतोष; निर्भयता; आनंद. –क्रिवि. निश्चिंत; बेफिकीर. 'रहावें आपण अनुद्वेग ।' –एभा २९.८२३. [सं. अ+उद्वेग]

अनुधार—अ.न धांवतां; सतत; अविरत. [सं. अनु+धारा=प्रवाह]

अनुधावन—न. १ मागून धांवणें; पाठलाग करणें. २ पूर्ण तपास, शोध, चौकशी; पिच्छा; दीर्घ शोध; अभ्यास; सैशोधन. [सं. अनु+धाव्=धावणें]

अनुधावन—न. शुध्दि किंवा स्वच्छता. [सं. अनु+धू=धुणें]

अनुध्यास—पु. पूर्ण चिंतन; एकाग्र मनानें आराधन; पूर्ण लक्ष; चित्ताची एकाग्रता; मनन. [सं. अनु+ध्या=मनन करणें]

अनुध्वनि—पु. १ मुख्य आवाजानंतरचा आवाज; प्रतिध्वनि; पडसाद. २ वाद्य बंद केल्यानंतर चालू राहणारा नाद–सूर–कंप. [सं. अनु+ध्वनि]

अनुनय—पु. १ नम्र विनय; विनंति; प्रार्थना. २ आदर-सत्काराची–सन्मानाची–पूज्यतेची नम्रपणाची वृत्ति; विनयशील वागणूक. ३ बरोबर नेणें; अनुसरण्यास लावणें; (ल.) शिकवण: मागानें नेणें; शिस्त लावणें; वळण लावणें. ४ प्रियाराधन. (इं. कोर्टीग.) **–यी**–वि. १ आदराचा–सन्मानाचा–पूज्य. २ शिकविणारा; वळण लावणारा. [सं. अनु+नी=नेणें]

अनुनय—पु. (ख्रि.) मध्यस्थाच्यातर्फे विनंति करण्याचे तीन दिवस. ' रोजेशन डेज् ' या इंग्रजी शब्दाचा पर्याय. ' ख्रिस्ती पंचांगाप्रमाणें ख्रिस्ताच्या स्वर्गारोहणाच्या दिवसापूर्वीचा सोमवार, मंगळवार व बुधवार. –रे. टिळक उपोषणमंडळ ३. [सं. अनु+नी.]

अनुनादक–पेटी—स्त्री. नाद किंवा ध्वनिवर्धक–पूरक अशी पेटी; आवाज वाढविणारी–मोठा करणारी पेटी. (इं. रेझोनन्स बॉक्स). [सं. अनु+नाद]

अनुनासिक—वि. ज्याचा नाकांतून उच्चार होतो असा. हा उच्चार जाणावयाकरितां वर्णाच्या माथ्यावर अनुस्वार देतात. ज्या वर्णाच्या माथ्यावर हा अनुस्वार असतो त्यास अनुनासिक–सानुस्वार म्हणावें. –न. पंचवर्गांतील शेवटचीं वर्ण्यजनें:–ङ्, ञ्, ण्, न्, म्; **ह्**. [सं. अनु+नासिका] **०ता**–स्त्री. (संगीत) नाकांत गाणें.

अनुनीत—वि. १ नम्रपणानें विनविलेलें, प्रार्थिलेलें. २ पुढें नेलेलें; शिक्षण दिलेलें; वळण लावलेलें. ३ शांत केलेलें; मनधरणी केलेलें, संतुष्ट केलेलें. [सं.]

अनुनीति—स्त्री. १ समजूत काढलेली–सांत्वन केलेली अवस्था; संतुष्ट स्थिति; समाधान. २ शिकवण, वळण, शिस्त लावलेली अवस्था [सं]

अनुपकारी—वि. १ उपकाराची फेड न करणारा; उपकार न जाणणारा; कृतघ्न. २ दुसऱ्यावर उपकार न करणारा. ३ (व्यापक) निरुपयोगी; कुचकामाचा: निरर्थक (पदार्थ–वस्तु). [सं. अ+उपकार]

अनुपठण—न. दुसऱ्याच्या मागून वाचणें–म्हणणें–पाठ करणें; संथा घेणें. **–ठित**–वि. दुसऱ्याच्या मागून म्हटलेलें; पाठ केलेलें. [सं. अनु+पठ्=वाचणें, म्हणणें.]

अनुपत–द, न. अनुपत्ति—स्त्री. १ उत्पन्न नसणें; निर्वाहाच्या साधनाचा अभाव. 'आपदा अनुपत्ति कदान्न। या नांव आदिभूतिक।'–दा ३.७.८१. २ विपत्ति; दारिद्र्य; कंगालपणा; ओढ; आपत्काल. ' ब्राह्मणासि हिंसाकर्म । तो जाण पां परम अधर्म । लागल्या अनुपत्ती दुर्गम । तै क्षात्रधर्म करावा ॥' –एभा १७. ४५५. [सं. अ+उत्+पत्=पडणें]

अनुपत–द––क्रिवि. (अनुपपत्त अप.) व्यर्थ. 'अनुपद तुझिया मी व्यर्थ पोटास आलें । ' –सारुह २.१०६. [सं. अ+उप+पत्]

अनुपद—क्रिवि. पावलोपावलीं; वरचेवर. ' अनुपद तिस कोणी विंझणें जाणवीती । ' –सारुह ३.६६. [सं. अनु+पद=पाय]

अनुपपत्ति—स्त्री. १ निर्वाहाच्या साधनांचा अभाव; दारिद्र्य. अनुपत–द पहा. २ काट्याकूट; उपपत्तीचा अभाव; कांही निष्पन्न न होणें. ३ अप्रगति; समाप्ति. ' अंगाचिया अनुपपत्ति । आटलिया उपपत्ति । ' –अमृ ५.५५. [सं. अ+उप+पत्–उपपत्ति]

अनुपपन्न—वि. १ सिध्द न झालेलें; स्थापित न झालेलें; पोकळ. २ निर्वाहाचें साधन नसलेलें; कंगाल. ३ उत्पन्न न झालेलें; अनुत्पन्न [सं. अ+उप+पत्]

अनुपम—वि. (अप. अनुपम्म) १ दुसरी उपमा किंवा तुलना नाही असें; अतुल्य; निरुपम. ' तो सुखसोहळा अनुपम्यरासी । ' –तुगा ८१. २ प्रतिस्पर्धी नसलेला. ३ सर्वोत्कृष्ट. [सं. अ+उप+मा]

अनुपमेय—वि. अतुल्य; अनुपम पहा. [सं.]

अनुपयुक्त—वि. १ निरुपयोगी; निकामी. २ न जमणारा; न जुळणारा; न शोभणारा; विशोभित. [सं. अ+उप+युज्]

अनुपयोग—पु. निरुपयोग; अनवश्यकता; निकामीपणा; निष्फळत्व. [सं.]

अनुपयोग–गी––वि. अनुपयुक्त; निरुपयोगी; निष्फळ.

अनुपरोध—वि. निर्विकार; स्पष्ट; यथार्थ. ' हें अनुपरोध मत माझें । जिहीं परमादरें स्वीकारिजे । '–ज्ञा ३.१९२. [सं. अ+उप+रुध्]

अनुपस्थित—वि. १ प्रचलित नाहीं असें; लुप्त; नामशेष झालेलें (शास्त्र, कला. इ.). २ गैरहजर; उपस्थित नव्हे तो. ३ मागितल्याबरोबर तयार नसलेला: सिध्द नसलेला. ४ स्मरणांत नसलेलें; मलिन झालेलें; ताजें नसलेलें, (संपादित ज्ञान, अभ्यास, इ.) [सं. अ+उप+स्था]

अनुपस्थिति—स्त्री. १ गैरहजेरी; अभाव; अस्तित्व नसणें. २ विस्मरणामुळें (ज्ञान) जागृत नसणें [सं.]

अनुपलब्ध—वि. प्राप्त न झालेलें; न गवसलेलें; न मिळालेलें. [सं. अ+उप+लभ्]

अनुपात—पु. (गणित) त्रैराशिक; प्रमाणगणित. [सं. अनु+पत्]

अनुपान—न. १ (वैद्यक) औषध घेतांना त्याबरोबर घ्यावयाचा पदार्थ; रसायनादि सिध्द औषध ज्यांत मिसळून घेतात असे पदार्थ (आल्याचा रस, मध इ.). ' भोजना न द्यावें आन । जेणें चुके अनुपान । तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥'

–तुगा ७२४. २ औषध घेत असतां खावयास योग्य पदार्थ; पथ्य पदार्थ. ३ औषधावर, विषावर किंवा इतर बाबतींत उतारा. उ० पालींचें तेल विंचवावर अनुपान; अजीर्णाचें अनुपान लंघन. ४ भोजन; खाद्य; साहित्य. ' भवानराव प्रतिनिधी आले अनुपान भोगुनि। एक मोर्चा त्यानि रोखुनि।' –ऐपो २७८. ५ शेत, मळा वगैरे संबंधींच्या लक्षांत घ्यावयाच्या गौण (अनुषंगिक, तत्संबंधीं, बरोबर असणाऱ्या) बाबी किंवा गोष्टी, –क्रि० धरणें, बाळगणें, संभाळणें. **०जमणें–बसणें–साधणें–होणें**–प्रधान किंवा मुख्य गोष्टींशीं गौण गोष्टींचा मेळ बसणें; उतारा लागू पडणें. [सं. अनु+पान]

अनुपाय—पु. निरुपाय; नाइलाज; अगतिकता –वि.–निरुपायाचें; नाइलाजाचें, उपायहीन. [सं. अ+उपाय]

अनुपेग–गी—वि. (कों.) निरुपयोगी; निष्फळ; निकामी; ' त्यांसि इंद्रियांचें बंधन। सर्वथा जाण अनुपेगी.' –एभा २८.३२६. [सं. अनुपयोगी अप.]

अनुप्रवेश–पु. १ मुख्य प्रवेशामागून झालेला–केलेला प्रवेश. २ मागोमाग–क्रमानें आंत जाणें–शिरणें: उ०. विषयानुप्रवेश. ' मग परस्परें केला अनुप्रवेश।' [सं. अनु+प्र+विश्]

अनुप्रास—पु. (काव्य) एक शब्दालंकार. काव्यांत एका किंवा अनेक अक्षरांची पुनः पुनः आवृत्ति आली असतां हा अलंकार होतो. अनुप्रासाचे प्रकार: १ छेक–अनेक व्यंजनांची आवृत्ति साधणें. ' नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरि।' –वामन (गजेंद्र मोक्ष). २ वृत्ती–तेंच तेंच व्यंजन पुन्हां पुन्हां येणें ' वंशी नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटीपटीं।' –वामन (वनसुधा). ३ श्रुति–कंठतालव्यादि स्थानांपैकीं कोणत्याहि एकाच स्थानाचीं अनेक अक्षरें अनेक वेळां येणें. ' अलसत्रुलित मार्गी चालतां श्रांत झाली।' –गोडबोले (उत्तरराम). ४ लाट–शब्दासहित अर्थाची आवृत्ति होणें. ' जो कल्याणगुणी गुर्णांच अगुणी भूतें मणी ज्या गुर्णी।'–आसी (सीस्व). [सं. अनु+प्रास]

अनुफा—पु. शिधा; रोजमुरा. उल्फा पहा. ' जे शिपाईलोक सरकार इंग्रजांकडून येतील त्यांस अनुफा अडीअी श्रीमंत महाराज राजे देतील ' –पया ४०१. [अर. उल्फा]

अनुबंध—पु. १ पाश; बंधन; बेडी; लोढणें; अडथळा; कुटुंबासंबंधीं ओढा; ओझें; काळजी; संसारपाश. २ भाषेचें मूलतत्त्व; जसें धातु, प्रत्यय, कार्ये. ३ अवलंब, आश्रय; जवळचा संबंध; उपांग; अंग; आनुषंगिक भाग. ४ गौण–दुय्यम प्रतीची सूचक प्रीति, भाव. ५ सतत प्रवाह; अखंडता; परंपरा. **०चतुष्टय**–पु. शास्त्रांतील किंवा वादविवादांतील विषयप्रतिपादनाचे चार प्रकार:–१ विषय. २ प्रयोजन. ३ संबंध. ४ अधिकारी. [सं. अनु+बंध्=बांधणें]

अनुबंधी—वि. १ जवळचा; संबंधी. २ आनुषंगिक; अनुयोगी; अवलंबून असणारा; कार्यकारणसंबंधी. सामाशब्दः कर्मानुबंधी, हितानुबंधी, नाशानुबंधी. ३ आसक्त. [सं. अनु+बंध्]

अनुभव—पु. १ प्रत्यक्ष ज्ञान; प्रचिति; स्वतः मिळविलेलें ज्ञान; अनुमान, शब्द इ० द्वारां मिळालेलें ज्ञान; साक्षात्कार. २ (कायदा) उपभोग; कबजा. ३ (ल.) परीक्षा. ४ (तत्त्व.) निरनिराळ्या गोष्टींचें स्मरण. ५ दृष्टांत; दाखला. ६ चव; आस्वाद;. ७ (ल.) ईश्वरविषयक ज्ञान. ' गुरुविण अनुभव कैसा ठसे।' [सं. अनु+भू] **म्ह**० अनुभवासारखा शिक्षक नाहीं. **०घडणें**–आस्वाद मिळणें; '(कवीच्या वाणीचा) अनुभव घडून एकंदर कवितेविषयीं कल्पना करतां येते.'–निमा ४४२. **०येणें**–प्रचीति मिळणें; प्रत्यक्ष कळणें. **०गम्य**–वि. प्रत्यक्ष अनुभवानें जाणण्याजोगें; अनुभवानें समजणारें; अनुभवज्ञेय (ब्रह्मज्ञान इ.). **०जन्य**–वि. अनुभवानें मिळालेलें. ' अनुभवजन्य ज्ञानाच्या समुच्चयानें विषयग्राहकता उत्पन्न होते.' –मुकौ ९. **०रसिक**–वि. उपभोग, चव घेतलेला; अनुभवानें रसिकता प्राप्त झालेला (कविता, अन्न इ० विषयीं). **०शीर, ०सिद्ध**–वि. अनुभवानें किंवा प्रचीतीनें निश्चित किंवा सिध्द झालेलें. **–वाद्वैत**–न. प्रचीतीनें जीवाशिवाचें ऐक्य सिध्द करावें असें मत प्रतिपादन करणारें तत्त्वज्ञान. हें मत मद्रासेकडे आढळून येतें व ही एके कर्मयोगाचीच नक्कल आहे. –गीर ३६३ पहा. **–वारूढ**–वि. अनुभवानें माहीत झालेला; प्रचीती घेतलेला.

अनुभव(वि)णें—सक्रि. १ प्रचीति घेणें; अनुभव घेणें; अनुभवास येणें; चांगलें कळून येणें. ' देव तेही सर्व येती तियें बेर्डी। मृत्यु अनुभवेल तूज तेव्हां॥' –ब ८६. २ उपभोग घेणें, उपयोग करणें किंवा फायदा घेणें. [सं. अनु+भू]

अनुभवि(वी)क—वि. १ प्रचीति घेतलेलें; माहीत झालेलें; चव घेतलेलें; ज्याचा अनुभव आला आहे असें; अनुभवसिद्ध. २ (ल.) तिखट; तीक्ष्ण; झोंबणारें; पटणारें; लागणारें; हृदयस्पर्शी (काव्य वगैरे). ३ (चुकीनें) अनुभवी. [सं. अनु+भू]

अनुभवी—वि. १ अनुभव, प्रचीति घेतलेला; अनुभव आलेला. ' त्या बुद्धी जो अनुभविया।' –परमा १४.२५. २ ज्यानें उपभोग घेतला आहे असा; ज्यानें उपयोग केला आहे असा. **०ज्ञान**–न. अनुभवानें मिळालेलें ज्ञान; शहाणपण. [सं.]

अनुभाव—पु. १ योग्यता; मान्यता; प्रभावः महात्म्य; अधिकार; सामर्थ्य; मोठेपणा. २ (साहित्य.) एकभाव; अंतस्थितीचा शरीरावर दिसून येणारा परिणाम किंवा मनोविकाराचीं चिन्हें; आविर्भाव. भाव पहा. [सं. अनु+भाव]

अनुभाविक—पु. अनुभवणारा; अनुभविक पहा. ' तैसें अनुभाव्य अनुभाविक। इहीं दोहीं अनुभूतिक। तें गेलिया कैचें एक। एकासीचि।' –अमृ ५.६१. [सं.]

अनुभाव्य—न. अनुभवण्याचा विषय –अमृ ५.६१. अनुभाविक पहा.

अनुभूत—वि. चव घेतलेलें; प्रत्ययास आलेलें; कसोटीस लावलेलें; अनुभवसिद्ध. [सं.]

अनुभूति—स्त्री. प्रत्यय; अनुभव. 'अनुभवू वेडावला । अनुभूतिपणें ।' –ज्ञा १८.१२१७. [सं.]

अनुभूतिक—न. प्रत्यय; अनुभव. –अमृ ५.६१; अनुभविक पहा.

अनुभूयमान—वि. (वर्तमानकालीं) प्रचीति येत असलेलें; उपभोगित असलेलें. [सं.]

अनुमत—न. १ अनुमोदन; संमति; मान्यता; खातरी; अभिमत; कबुली. 'तोचि मार्ग दावि आम्हांते । तुझिया अनुमतें चालू आम्ही ।'. २ अनुकूल मत; एकमत; एकभाव. ३ निर्णय; बनलेलें मत; निवाडा; फैसला. (न्यायाधीश किंवा पंच यांचें). –वि.– पसंत केलेलें; आवडलेलें; अनुकूल असलेलें. [सं. अनु+मन्]

अनुमति—स्त्री. १ पसंति; कबुली; संमति; मान्यता; अनुज्ञा. २ चतुर्दशीयुक्त पौर्णिमा तिथि. श्रौत कर्मांत या देवतेस हविर्भाग देतात. [सं.]

अनुमान—न. तर्क; कल्पना; अटकळ; अंदाज, (क्रि० काढणें–बांधणें) 'एव्हवी अनुमानाचेनि पैसें । आवडे कीर कळलें ऐसें । परि मृगजळाचेनि वोलांशे । काय भूति तिमे ।' –ज्ञा ९.१३७. २ ज्ञात गोष्टीवरून अज्ञात गोष्टीबद्दल काढलेला तर्क किंवा निर्णय; (न्यायशास्त्रांतील चार प्रमाणांपैकी दुसरें); (सामान्यतः) तर्क; सिद्धांत. ३ (कायदा) तर्कावरून काढलेला पुरावा. ४ (काव्य) (अनमान अप.). दोलायमानवृत्ति; संकोच; शंका; संशय; किंतु. 'मोह दवडूनियां परौता । अनुमाना हाणोनियां लत्ता ।' –मुआदि २६.९१; 'तुका म्हणे आहे ठायीचाचि मान । आतां अनुमान कायसा तो ।' –तुगा १४९३. 'ये गोष्टीस करील अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन ।' –दा ६.९.३०. ५ एक अर्थालंकार; साधनावरून साध्याचें ज्ञान तर्कानें काढलेलें असतें तो. 'भवन्मतिस आवडे जरि धनादिकांलागि तें । मदीय गुणकीर्तनश्रवण कांतरी त्यागिते । असेंहि म्हणशील बा! जरि तरी तुझी मावली । तुज त्यजुनि पाजितां कशि दुधाकडे धांवली ॥' –केका ५२. **०गम्य**–वि. तर्कानें, धोरणानें जाणण्यासारखें. **०धप(ब)का**–पु. अनमान धपका पहा. **०सिद्ध**–वि. तर्कानें निश्चित केलेलें; ठरविलेलें; जाणलेलें. [सं. अनु+मा=मोजणें]

अनुमानणें—सक्रि. तर्क करणें; तर्कानें ताडणें; कल्पना करणें; अजमावणें. 'मनी अनुमानी पै येथू । कपटाचार दिसतसे ।' –मुआदी. ४.१६०. [सं. अनु+मन्=विचार करणें]

अनुमानी—वि. तर्क करण्यांत, तर्कानें ताडण्यांत कुशल; धोरण बांधण्यांत, अटकळ किंवा अंदाज करण्यांत कुशल–तरबेज. [सं.]

अनुमानोक्ति—स्त्री. १ तर्कानें बोलणें; अंदाज–अटकळ करणें; २ अनुमानानें किंवा तर्कानें केलेली मांडणी; अनमानधपका. [सं. अनुमान+उक्ति]

अनुमापक—वि. ज्याच्यावरून अनुमान करतां येईल असा; यथार्थ कल्पना देणारें; अनुमानाला साधन किंवा जागा करून देणारें; तर्क करण्यास आधारभूत (गोष्ट वगैरे). 'प्रतिबिंब बिंबा अनुमापक' अमृ. १.२६. [सं]

अनुमित—वि. अनुमानानें–तर्कानें ठरविलेला–जाणलेला. [सं.]

अनुमिति—स्त्री. तर्क; निर्णय; (न्याय) अनुमानानें तर्कानें होणारें ज्ञान. [सं.]

अनुमेय—वि. तर्क करतां येण्याजोगें; अटकळ करतां येण्यासारखें. 'हो कां घ्राणानुमेयो । येवो कां हातीं घेवो ।' अमृ. ७ २३८. [सं.]

अनुमोदक—वि. संमति देणारा; पसंति दर्शविणारा; अनुकूल मत देणारा, ठरावास वगैरे. [सं. अनु+मुद्]

अनुमोदन—सक्रि. १ पसंत करणें; संमति–मान्यता–कबुली–परवानगी–देणें. 'पडतां वानरांचें अनुमोदन। स्वयें पुसे रघनंदन।' २ वाहवा करणें; प्रशंसणें. ३ चित्त; लक्ष. 'श्रवणीं पठणीं निजध्यास। आदरें धरावा दिवसेंदिवस। अनुमोदन देतां कथेस। सर्व पापास क्षय होय॥' –शिवी. १.६९. ४ सूचनेस दुजोरा. 'बहुधा अनुमोदनाशिवाय सूचना (ठराव) विचारास घेत नाहींत; सभापतीनें सुचविलेल्या सूचनांस अनुमोदनाची जरूरी नसते' –सभा ७१. ५ उत्सव; अनुष्ठान; उपासना; समारंभ; सांगता. 'माझ्या पर्वाचें अनुमोदन। करी करवी आपण।'–एभा ११.१२५५. (क्रि० करणें–घेणें–देणें–पडणें.) [सं. अनु+मुद्=आनंद पावणें]

अनुमोदित—वि. पसंत केलेलें; वाखाणलेलें; स्तुति केलेलें; मान्यता दिलेलें; परवानगी दिलेलें.

अनुयान—न. १ अनुसरणें; मागून जाणें; येणें. २ (ल.) निकाल; निर्णय; परिणाम; शेवट; [सं. अनु+या=जाणें]

अनुयायी—वि. १ अनुसरणारा; मागून येणारा; (ल.) शिष्य; नोकर; हुजऱ्या; अनुचर. २ एखाद्या पक्षाचा, पंथाचा किंवा विशिष्ट मताचा. उ० बौद्धानुयायी; टिळकानुयायी. ३ मागून येणारें; मधून निघणारें; उद्भवणारें; परिणामाचें. [सं.]

अनुयोगी—वि. पूर्वीचा; अगोदर येणारा; मूळचा; आरंभींचा; विषय, आधार, स्थान, उगम इ० होणारा; अधिकरणविषयक; प्रतियोगीच्या उलट. उ० राजाचा चाकर, बोटाचें नख, आणि पापाचें फल. यांमध्यें राजा, बोट, आणि पाप हे अनुयोगी व चाकर नख आणि फल प्रतियोगी. २ जोडणारा, संबद्ध. [सं. अनु+युज्=जोडणें]

अनुरक्त—वि. न. १ इच्छायुक्त; अनुरागी; प्रेमबद्ध; विषयी; संसारी; प्रेम बसलें आहे असा; मन गुंतलें आहे असा. २ निष्ठावंत; आसक्त; रत; परायण. [सं. अनु+रञ्ज्=आनंद पावणें]

अनुरक्ति—स्त्री. प्रीति; आसक्ति; भक्ति; आवड; इच्छा; निष्ठा; स्नेह. [सं.]

अनुरंजक—वि. करमणूक करणारा; मन वेधणारा; संतोष देणारा; सुखदायी. [सं.]

अनुरंजन—न. १ करमणूक; मनोरंजन; विहरण; संतोष; मौज. २ सुखावस्था; आनंदवृत्ति. [सं.]

अनुरणन—न. १ प्रतिध्वनि, पडसाद. २ वाद्य वाजविणें बंद झाल्यानंतर त्यांतून कांहीं वेळ घुमणारा, टिकणारा ध्वनि; आवाजाची धून. ३ सतारीच्या जोडांच्या तारांतून निघणारा ध्वनि किंवा कंपन. ४ (साहित्य.) व्यंगार्थ. [सं. अनु+रण् = नाद करणें.]

अनुरत—वि. आसक्त; लंपट; अनुरक्त. [अनु+रम्]

अनुरति—स्त्री. अनुराग; आसक्ति; प्रेम; प्रीति. [सं. अनु+रम्=आनंद पावणें]

अनुराग—पु. प्रेम; प्रीति; इच्छा; निष्ठा; अंतःकरण वेधणें; विरागाच्या उलट. ' हा अनुराग भोगितां । कुमुदिनी जाणें ॥ ' –ज्ञा १.६०. [सं. अनु+रञ्ज्]

अनुरागी—वि. प्रेमी; शोकी; आसक्त; इच्छा–प्रेम असलेला; प्रणयी; प्रीतियुक्त; ममताळु; स्नेहाळू. [सं. अनु+रञ्ज् = आनंद पावणें]

अनुराधा—स्त्री. क्रांतिवृत्तांतील सत्तावीस नक्षत्रांपैकीं १७ वें नक्षत्र; (राधा=विशाखा, तेव्हां अनुराधा म्हणजे या नक्षत्राच्या मागून येणारें नक्षत्र; याचे चार तारे असतात.). [सं.]

अनुरूप—वि. १ जुळणारें; शोभणारें; योग्य; यथायोग्य; साजणारें; सयुक्तिक. ' ही स्त्री या पुरुषास सर्व गुणांनीं अनुरूप आहे. ' २ सदृश; सारखें; समान. सामाशब्द–आज्ञानुरूप, कालानुरूप, देशानुरूप, सामर्थ्यानुरूप, योग्यतानुरूप. –शअ. अनुसरून; अन्वयें; यथावत्, अनुरोधानें. ' तुमची आज्ञा होईल तदनुरूप मी चालेन. ' [सं.]

अनुरूपबाजू—स्त्री. (गणित.) सरूप त्रिकोणाच्या समान कोनांसमोरच्या बाजूंना परस्परांशीं अनुरूप बाजू म्हणतात. –महमा १५०.

अनुरोध—पु. १ कल; गति; धोरण; रोंख; लावून दिलेली दिशा; सरणी. ' आतां प्रतीतीनें जो अनुरोधू । तो सत्यासि बाधू । करुं न शके ॥ '–एभा ११.९६. २ मान्यता; संमति; अनुसंधान; मर्जी. ३ हुकमत; वर्चस्व; आटोका; कह्यांत जाणें; तावडींत सांपडणें. ' मीपणाचेनि अनुरोधें । गिळिलों होतों मोहमदें ।'–एभा ३.५९५. तृतीया विभक्तींत नेहमीं उपयोग. उ० नावेंत बसलें म्हणजे नावेच्या अनुरोधानें जिकडे जाणें घडेल तिकडे जाणें प्राप्त. ' ज्याला शास्त्रज्ञान आहे त्याला तदनुरोधानें बोलावें लागतें; ' –पृथ्वीच्या उतरतेपणाच्या अनुरोधानें उदक जातें. ' [सं. अनु+रुध्=प्रतिबंध करणें]

अनुरोधी—वि. अनुसरणारा; अनुरूप; यथायोग्य; अनुसरून असलेला; अनुकूल ' तो आड्ड नोहे अनुरोधी । बोल तया ॥ ' –ज्ञा १५.२३०. [सं.]

अनुर्वाच्य—वि. बोलतां न येण्यासारखें; अवर्णनीय. ' अनुर्वाच्य जे शब्दब्रह्म । स्वानंदसुख । ' –स्वादि १.५.३९. [सं. अ+निर् +वच्=सांगणें अनिर्वाच्य अप.]

अनुलग्निक—वि. (गो.) जबाबदार; संबंधी. [सं. अनु+लग्न]

अनुलक्षून—क्रिवि. अवधान देऊन; लक्षांत घेऊन; मन लावून; अवलोकन करून; अनुसरून; उद्देशून. [सं. अनु+लक्ष]

अनुलक्ष्य—न. लक्ष देऊन केलेली वागणूक; आज्ञेनुसार, अनुकरणपूर्वक, किंवा लक्ष देऊन केलेली गोष्ट; धोरण; अनुवर्तन; अनुरोध पहा. [सं.]

अनुलेख—पु. (ज्योतिष.) रेषेच्या दोन टोंकांपासून पातळीवर दोन लंब काढले तर त्यांचे पाये सांधून जी रेषा त्या पातळींत होते ती. –सूर्य ८. (इं.) प्रोजेक्शन.

अनुलेप–न—पु. १ माखणें; लेप देणें; उटण्यानें शरीरास चोपडणें. (क्रिया) ' जयाचे निर्लेप अनुलेपु करी । '–ज्ञा ११.२२५. २ उटी; उटणाचें द्रव्य; लेप. (पदार्थ) ३ माखलेली; चोपडलेली. (लेप लावलेली स्थिति). [सं. अनु+लिप्=लेप देणें]

अनुलोम—वि. योग्य क्रमानें उत्पन्न झालेला किंवा जन्मलेला (विशेषतः संकरजातीविषयीं उपयोग); उच्च वर्णाचा ब्राह्मण क्षत्रियादि पुरुष व त्याहून खालच्या वर्णांतील स्त्री यापासून झालेली संतति. –क्रिवि. योग्यक्रमानें; व्यवस्थित पद्धतीनें; नैसर्गिक पद्धतीप्रमाणें किंवा रीतीनें; शिस्तवार. २ (ल.) अन्वय. ' अनुलोम प्रतिलोम । विवंचना वाढेल दुर्गम । हें न करितां सांख्य सुगम । आकळे तें वर्म सांगेन । '–एभा २४.६०३. [सं. अनु+लोम=केश] **०ज**–पु. अनुलोम विवाहापासून झालेली संतति. ' हीन वर्णाची जे नारी । उत्तम पुरुषाचा गर्भ धरी । ते अनुलोमज संसारी । शास्त्रकारी बोलिजे । ' –एभा २०.३२. **०विलोम**–वि. नैसर्गिक पध्दतीनें व त्या विरुध्दहि असलेलें; योग्य क्रमानें असलेलें व नसलेलें; उलसुलट; उरफाटें सुरफाटें. **अनुलोमविलोमश्लोक**–पु. सुलटा किंवा उलटा वाचला असतां सारखाच वाचला जाणारा श्लोक. उ० मुरुज बंध. ' या माता ममतामाया । '

अनुलोम विवाह—पु. अनुलोम पद्धतीनें झालेलें लग्न; उच्च वर्णाचा पुरुष व कनिष्ठ वर्णाची स्त्री यांचा विवाह. [सं. अनुलोम=केश]

अनुवर्तणें—सक्रि. १ दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागणें; सेवा करणें. २ एखाद्याच्या मागेंमागें असणें; चिकटून राहाणें; धरून बसणें. ३ एखाद्या परंपरेंतील प्रत्येक वस्तूला, भागाला किंवा गोष्टीला लागू करणें; संबंध लावणें. [सं. अनु+वृत्=असणें]

अनुवर्तन—न. अनुकरण; अवलंबन; सेवा; चाकरी; अनुरूपत्व; मागून जाणें; अनुवृत्ति पहा. [सं. अनु+वृत]

अनुवर्ती—वि. १ सेवा किंवा चाकरी करणारा; कामास किंवा उपयोगास येणारा. २ आश्रय, आधार देणारा. ३ समाविष्ट, अंगभूत असणारा. ४ संबंध धरून असणारा. ५ आज्ञांकित; मताप्रमाणें वागणारा; मागोमाग येणारा. [सं. अनु+वृत्=असणें]

अनुवाअ—पु. (अन्वय अप.) संबंध; संसर्ग. 'चांदिनेयाचेनि अनुवाअे। हे मधुमालती कोमाअे।' –शिशु ६८७. [सं. अन्वय]

अनुवाकू—पु. ऋग्वेदसूक्तांचा एक समुच्चय; संहितेच्या अध्यायांतील पोटभाग; प्रकरण; परिच्छेद. [सं. अनु+वच्=बोलणें]

अनुवाद-वादन—पु.न. १ (सभेमध्यें) दुसऱ्याचें बोलणें किंवा स्वतःचें म्हणणें पुनःपुनः सांगणें किंवा मांडणें; पुन्हा स्पष्टीकरण; स्पष्टीकरणार्थ पुनरुक्ति. २ एखाद्यावरचा शाबीत झालेला आरोप सर्वांस सांगून त्याला दिलेलें शासन पुन्हां सांगणें. ३ दुसऱ्याची दुष्कृत्यें उघडकीस आणणें. ४ द्विरुक्ति; वरचेवर तेंच सांगणें. पुनरुक्ति; पाठ. 'हेचि अनुवाद सदासर्वकाळ. करूनि गोपाळकाळा सेवूं ॥' –तुगा २४२. (ल.) वर्णन करणें. 'एकां गुणानुवादु करितां. उपरति होऊनि चित्ता।' –ज्ञा २.१७३. ५ (व्यापक.) संवाद; संलाप; भाषण. 'दोहींचा अनुवाद परिसाय जे।' ६ (धर्म.) प्रायश्चित्त घेतेवेळीं पातकांचा व प्रायश्चित्ताचा उच्चार करणें. ७ (कायदा) सिद्ध करणें. प्रस्थापित करणें. (जुनी रीत, रिवाज वगैरे). ८ (ल.) भाषांतर; नक्कल (ग्रंथ, काव्य वगैरे) ९ (तत्त्व.) 'अर्थ व वेदांतील वर्णन वस्तुस्थितीस धरून असेल तर त्यास अनुवाद म्हणतात.' –गीर २२. १० दुजोरा. [सं. अनु+वद्=बोलणें]

अनुवादक-अनुवादी—पु. १ अनुवाद करणारा. २ भाषांतर, नक्कल करणारा. ३ प्रायश्चित्त घेतेवेळीं, प्रायश्चित्त घेणाऱ्याच्या पातकांचा उच्चार करणारा. (संस्कारकौस्तुभ) –वि. (संगीत) रागांतील वादी, संवादी सोडून बाकीचे स्वर. [सं.]

अनुवादणें—क्रि. १ पुन्हां पुन्हां सांगणें, म्हणणें; पाठ करणें; पोपटपंची करणें. 'त्याचें नाम व्यर्थ वारंवार। जैसें कीर अनुवादति।' २ बोलणें; सांगणें. 'तें दुःख मनां वाचेसीं। अनुवादवे ना।' –शिशु १०२; 'तो स्वयें सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला ॥' –ज्ञा १.७२; 'ऐशी शूर्पणखा अनुवादली' –रावि १४.१३७. ३ स्पष्ट करणें; 'ऐसें बहुधा निरोपिलें। ग्रंथगर्भीं जें बोलिलें। तें अवघेंचि अनुवादलें। न वचे किं कदां।' –दा १.१.१३. [सं.]

अनुवास—पु. १ उटणें. २ सुवासित करण्याची क्रिया. ३ (वैद्यक.) तैलबस्ति. [सं. अनु+वास]

अनुवाळी—अनवाळ पहा.

अनुवृत्त—वि. १ संबद्ध; निगडित; अनुयायी. **०दर्शन**—न. नृत्यामध्यें एकादा पदार्थ निरखून पहाण्याचा अभिनय (नृत्य). [सं. अनु+वृत्]

अनुवृत्ति—स्त्री. १ परंपरेनें चालत आलेला संबंध, क्रम, मालिका रांग. 'याचे सातव्या पुरुषानें यज्ञदीक्षा घेतली होती ती दीक्षितपणाची अनुवृत्ति सात पिढ्या चालत आली.' 'अर्जुना इयापरी। मिळ्याद्यष्टीच्या घर्तीं। युगानुवृत्तीची करी। चोज पाडले।' –ज्ञा १४.११३. २ सेवा; चाकरी; आज्ञापालन; शुश्रूषा. 'आम्ही राजाची अनु० करून असतों.' ३ साहचर्य. 'अलंकाराचे ठायीं सुवर्णाची अ० आहे तसीच जगाचे ठायीं सदूपें करुन ब्रह्माची अ० आहे.' ४ अनुकरण; नक्कल. ५ संमति. ६ (व्याक.) पूर्वगामी नियमांचा प्रभाव चालू नियमावर चालू राहणें. 'आरंभ श्लोकांत राजपद असतें त्याची अ० पुढील सर्व श्लोकांत होते.' **०पथ**—पु. सुषुम्नानाडी. 'मग अनुवृत्तिपंथें आणावा। मूर्ध्नीवरी।' –ज्ञा ८.११४. [सं.]

अनुवेल-ळ—क्रिवि. पुनः पुन्हा; वारंवार; फिरफिरून; अनेकवार. [सं. अनु+वेला]

अनुव्यवसाय—पु. प्रबोध; भान; सारासार विचार; चैतन्य; जाणीव. [सं. अनु+व्यवसाय]

अनुशासणें—सक्रि. १ नियमित, परिमित करणें; बंदोबस्त ठेवणें; राज्यकारभार चालविणें; कायद्यानें नियमानें बांधून ठाकणें. २ विवरण, विवेचन, उहापोह करणें. [सं. अनु+शास्=नियमन करणें]

अनुशासन—न. १ आज्ञा; २ कायदा; नियम; ठराव; ३ निश्चित, मर्यादित, सुयंत्रित करण्याचा व्यापार. ४ व्यवहारशास्त्र. ५ अनुष्ठान. 'मग मांडिलें अनुशासन। आणि रुद्राचें करी चिंतन।' –कथा ४.१३.२८. [सं.]

अनुशास्ता—पु. १ अनुशासन, नियम न करणारा; राज्य चालविणारा; बंदोबस्त राखणारा; कारभारी; शिक्षा करणारा नियंता. २ उपदेश करणारा. [सं.]

अनुशीलन—न. १ परिशीलन; पिच्छा; हव्यास; आसक्ति; अनुरक्ति; पाठीस लागणें; पाठपुरावा; सराव; अभ्यास. २ एकनिष्ठ सेवा. [सं. अनु+शीलन]

अनुशेपोट—न. (अनशन) अनशनें पोट पहा.

अनुश्रुत—वि. परंपराप्राप्त; पूर्वापार चालत आलेलें. 'अनुश्रुत हें प्रासादिक। कृपाभीक स्वामीची।'–तुगा २१३२. [सं. अनु+श्रु=ऐकणें]

अनुषंग—पु. १ संगति; भागीदारी; संसर्ग; सोबत; साहचर्य; सख्य; निकट समागम; संबंध. 'सोचाचे अनुषंगानें भला फसतो.' २ आश्रय. ३ मिश्रण; जोड; मिलाफ. 'ताकाचे अनुषंगानें दुधाचें दहीं होतें.' ४ एक अलंकार –एका क्रियेपासून अनेक कार्यसिद्धी झाल्याचें वर्णन जेथें असतें तेथें हा अलंकार साधतो; उ० छळी नृप बळी बळी तरिच तो नसे आटळा.' –केका ७६. [सं. अनु+संग]

अनुषंगिक—वि. संबंधी; बरोबरचा; आनुषंगिक पहा.

अनुष्ट—वि. उष्टे न केलेलें; (अन्न, पाणी वगैरे); अनुच्छिष्ट पहा.

अनुष्टुप-ब-भ—पु. चार चरण, आठ अक्षरें, लघु गुरु अनियमित असा एक छंद. उ० 'मातेंचि मानुनी थोर । कर्में सर्व समर्पिती । तरी अद्वैतयोगेंचि । मातें ध्याती उपासती ।' –वामन. –गीस १२.६. –न. (वैदिक छंदांत याच्या चरणांत अक्षरें सर्वांत कमी असल्यामुळें लाक्षणिक अर्थानें) अल्पत्व; अल्पराशि; थेंब; संक्षेप. 'केवळ अनुष्टुप निवेळ । ऐसें दिसे पांडवदळ ।' –जै ४२.३२. 'या तुमच्या कोंकणांत तुपाचें अनुष्टुप दिसतें.' [सं. अनु+स्तुप् ?]

अनुष्ठणें—क्रि. १ विधिपूर्वक आचरण करणें. 'म्हणोनि आपुलियापरीं । शास्त्र अनुष्ठिती कुसरी ।' –ज्ञा १७.९२. २ अनुष्ठान करणें. 'जियें कर्में हा प्रयोगु । अनुष्ठिजे सद्विनियोगु । तेथ अनुष्ठिला सांगु । वेदुचि जाणा ।' –ज्ञा १७.४१३. ३ करणें; संपादणें; साधणें; सिद्ध करणें; शेवटास नेणें; पार पाडणें (धंदा, उद्योग इ०). 'अन्योक्तीनें प्रसंगीं चतुरा । धाकुटे काज सांगे असुरा । त्यावरी अभिमान ये थोरा । कार्ये अनुष्ठितील ते ।' –मुआदि ४.६५. [अनु+स्था]

अनुष्ठाता—वि. अनुष्ठान करणारा.

अनुष्ठान—न. १ विधिपूर्वक धर्मकृत्य, कर्म यांचें आचरण. **म्ह०** यथा अनुष्ठान तथा सिद्धि. 'म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञयाजन । जो करी तया बंधन । कहींच नाहीं ।' –ज्ञा ३.८३. २ देवाप्रीत्यर्थ अभिषेक, पूजा, पाठ, होम, हवन, दानधर्म वगैरे कर्म. ३ (ल.) मोठया परिश्रमाचें काम; महत्कार्य, अवघड कृत्य. ४ (सामान्यतः) संपादणी; आचरण; करणें; पार पाडणें. (क्रि० करणें, चालविणें, बजावणें, मांडणें). **॰पद्धति**–स्त्री. (स्त्री.) धार्मिक विधि यथासांग करण्याची पद्धति. (इं.) **आर्डर ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन.** 'प्रभूचें भोजन म्हणजे पवित्र सह भागिता इची अनुष्ठान पद्धति.' –साप्रा ९०.९८.१०५.१२४. **॰प्रसंग**–पु. अनुष्ठानकर्म. 'या गांवांत कोणाच्याहि घरीं अनुष्ठानप्रसंग झाला असतां दीक्षितांस आमंत्रण येतें' [अनु+स्था]

अनुष्ठानी—वि. १ अनुष्ठान करणारा. 'जैसें अनुष्ठानिअें लोचनु । तें बांचवेआं स्त्रीरत्नु । करितांति धारी तर्पणु । मदन लिंगासी ।' –शिशु ८४९. २ अनुष्ठानामध्यें कुशल, निपुण; यजमानाचें अनुष्ठान चालविणारा; अनुष्ठान–प्रतिनिधि. [सं.]

अनुष्ठित—वि. केलेलें; बजावलेलें; उरकलेलें; आचरलेलें; अनुष्ठिलेलें; साधलेलें. [सं.]

अनुष्ठेय—वि. अनुष्ठान करण्यास योग्य; करणीय; करण्याजोगें; आचरणीय; बजावण्यास योग्य. 'हेंचि नित्यनैमित्तिक । अनुष्ठेय आवश्यक ।' –ज्ञा १८.११९. [सं.]

अनुसंग—(विप्र.) अनुषंग पहा. 'तूं अनुसंगाचा ठावो ।' –ज्ञा ४.३०. [सं. अनुषंग]

अनुसट—वि. मोकळा; अनसूद पहा. 'पुत्रपुत्र संग्राम केला । निजपुत्र अनुसट राहिला । आतां माझा युद्धसोहळा । दुरून पाहे स्वाभिया ।' –जै ४.१०१. [सं. अनुच्छिष्ट]

अनुसंधान—न. १ जोडणी; जुळणी; मांडणी; संगति; संगतवार जुळविणें–जोडणें–व्यवस्थित लावणें, (मुद्दा, विषय, अनुक्रम इ०). २ लक्ष; अवधान; चित्त; ध्यान. 'कृष्ण चरणीं जडलें मन । यालागीं वाचे पडलें मौन । दृढ लागलें अनुसंधान । सहजस्थिति चालली ।' –एरुस्व ६.६७. ३ हेतु; ध्येय; बेत; योजना; लागाबांधा; वळण; वशिला; मसलत; धोरण; युक्ति. (क्रि० बांधणें, लावणें). 'मुख्य जागीं दाद लागायाजोगें मी अनुसंधान बांधून ठेवलें आहे.' 'त्यांचें अनुसंधान कोणास कळत नाहीं.' ४ कथेतील आख्यान. 'आज गोसाव्यानें (हरिदासानें) हरिश्चंद्राचें अनुसंधान लाविलें होतें.' 'अवघें पोठासाठीं सोंग । तेथें कैंचा पांडुरंग । लावी अनुसंधान । कांही देईल म्हणून ।' –तुगा २८८३. ५ जम; मेळ; समन्वय; मिलाफ; आनुकूल्य. ६ (कर्षी कर्षी) अनुरोध या अर्थी. ७ प्रस्ताव; प्रस्तावना; प्रवेश. ८ चौकशी; शोध; मागोवा. ९ क्रमप्राप्त गोष्ट; ओघानें आलेली गोष्ट. 'यानें शिवी दिली तेव्हां याच्या तोंडांत मारावी हें अनुसंधान आलें.' [सं.]

अनुसंधानी—वि. १ मसलत करण्यांत धूर्त; युक्त्या, बेत योजण्यांत हुषार; मोठा हिकमती; शकूल लढविणारा. २ आख्यान लावणारा (हरिदास). ३ (नुसत्या वासावरून) मार्ग काढणारा; सुगावा लावणारा; परान्नरुचि; परपाकरुचि. [सं.]

अनुसपोटी—(क.) अनशवें पोटीं पहा.

अनुसरण—न. १ अनुकरण; अनुवर्तन; मागोमाग जाणें; सदृश आचरण; नक्कल करणें. 'अनावडीचा वर्षावो । तेणें नुगवे अनुसरन भावो ।' –ज्ञाप्र २४३. २ अंगीकार.

अनुसरणें—क्रि. १ अनुकरण करणें; सदृश आचरण ठेवणें; अनुलक्षून वागणें. २ अनुकूल होणें; संमत होणें; मिलाफ करणें; जुळणें; जमणें. ३ मताचा स्वीकार करणें; अनुयायी होणें; वश होणें. ४ स्मरणें; भजणें. 'नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका म्हणे नांवा अनुसरे त्या ।' –तुगा ८३. ५ अनुरक्त होणें. अधीन होणें; वरणें;

' योजनगंधा मुनिला जसि गंगा शंकराशि अनुसरली । ' –मोआदि ८.३७. [सं. अनु + सृ]

अनुसार—वि. प्रमाणें; सारखा; सदृश; अनुरूप; जुळणारा; सामाशब्द– आइनुसार वर्तन, पापानुसार कीर्ति, श्रमानुसार लाभ, कालानुसार, योग्यतेनुसार, इ०. 'तुम्ही बोलाल तदनुसार मी वर्तेन.' ' औषधानुसार गुण आहे.' यांखेरीज कसेतरी बनलेले व्यापक अर्थाचे अनेक सामाशब्द आढळतात. जसें, कामानुसार, काळानसार, देशानसार, छंदानसार, अन्नानसार बुद्धि, बुद्धिनसार, मर्जीनसार, वेळेनसार इ०. ' कामानुसार माणसाची गरज लागली. ' **म्ह**० अन्नानुसार बुद्धि=ज्याचें अन्न खातो त्याप्रमाणें वागतो. –पु. १ अनुसरण; अनुवर्तन, सारखें वागणें. २ क्रम; सरणी; मार्ग. ' जो दाविला तुम्हीं अनुसारा । तो पल्हण्याहनि पाय उतारा । सोहपा जैसा । ' –ज्ञा ५.१६५. –अ. धोरणानें; क्रमानें; अनुरूप. [सं.]

अनुसारी—वि. अनुसरणारा; मार्गोमाग जाणारा; अनुकरण करणारा; आज्ञेप्रमाणें वर्तणारा, योग्य जमणारा; अनुसार पहा.

अनुसूट—अनसूट पहा.

अनुसृत—वि. मार्गे गेलेला; अनुसरलेला; अनुयायी झालेला; प्रमाणें वागलेला. [सं.]

अनुस्तरणी—स्त्री. (मूळ वैदिक अर्थ. सूत्रकारीं अग्निहोत्र्याच्या उत्तरक्रियेंत गाय मारून तिची वपा काढून तिनें अग्निहोत्र्याच्या प्रेताचें अच्छादन करीत त्या गाईस वैतरणी म्हणत). हल्लीं उत्तरक्रियेंत वैतरणी तरावयासाठीं देण्यांत येणारी गाय. –आश्वगृसू ४. [सं.]

अनुस्फटिक—वि. स्फटिकमय. (इं.) क्रिस्टलॉईड. [सं.]

अनुस्यूत—वि. नियमितपणें, अखंडित जाणारा; अनुस्यूत (उपभोग, कारभार, वृत्ति, इ०); सरळ व न अडखळणाऱ्या गतीचा; एकसारखा; व्यापक. ' सता अनस्यूत अबाधिति । ' –ज्ञेवो १.८१. [सं.] **०पण**—न. अखंडितपण; सतत स्थिति; व्याप्ति; एकसारखेपणा. ' गंधा पासोनि पृथ्वी कढिण । उपजली आपी आपण । येरेयेरांचें अनुस्यूतपण । सर्वथा जाण मोडेना । ' –एभा २४.१२५.

अनुस्यूति—स्त्री. अखंड गति; अनुस्यूतपण पहा. ' वेगळाल्या मूर्ती । जयाचिये अनुस्यूति । ' –ज्ञा १३.९१६. [सं.]

अनुस्वार—पु. १ श, ष, स, ह या अक्षरांच्या पूर्वीच्या अक्षरावरील नाकांतून उच्चार दर्शविण्याकरितां रोज, वरचे टिंब. २ पुढें कोणतेंहि व्यंजन असून त्यापूर्वी ह्, ञ्, ण्, न्, म् यांपैकीं कोणतेंहि व्यंजन उच्चारावयाचें असलें म्हणजे येणारें अक्षराबरील टिंब. ३ नाकांतून होणारा उच्चार व त्याचा प्रतीक शीर्षबिंदु. [सं.]

अनुहु(हा)त–गजर–ध्वनि–चक्र—अनाहत गजर–ध्वनि–चक्र पहा. ' अनुहताचा हळुहु गासी । ' –ज्ञा १२.७. ' जैसा अनुहताचा गजर । तैसी तुरे वाजती अपार । ' –एरुस्व ६.७२. ' जातिस्वर राखों जातें टिपरिया घाई । अनुहात वाय मांदळा रे ॥ ' –तुगा २४६.

अनुक्षणीं—क्रिवि. क्षणोक्षणीं; प्रत्येक क्षणीं. ' आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे यांच्या कृपाईक्षणीं । ' –आसी १६.१८. [सं. अनु+क्षण]

अनुक्षेत्र—न. लहान क्षेत्र; किंवा महत् (काशी आदि) क्षेत्र सदृश–पंढरपूर. **०पाळ**–पंढरपूरचा विठोबा. ' धन्य वेणुनाद अनुक्षेत्र पाळा । ' [सं. अनु+क्षेत्र]

अनुज्ञा—स्त्री. १ आज्ञा; हुकूम; परवानगी; संमति. ' वरवंडले जयाचिया । अनुज्ञा कां । ' –अमृ २.१७. २ एक अलंकार; दोषांत कांहीं एक गुण आहे या बुद्धीनें केलेली दोष देण्याविषयींची प्रार्थना. ' तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी । ' –तुगा ११९३. ' प्रसाद करीं मनीं जरि नसेल हें आवरा । ' –केका १४. [सं. अनु+ज्ञा]

अनुज्ञात—वि. आज्ञापित; हुकूम केलेलें; संमत; विहित. [सं.]

अनुज्ञापक—वि. शिफारस करणारें; परवानगी देणारें; (इं.) रेकमेंडेटरी. (सं.)

अनूढ–ढा—वि. अविवाहित. [सं. अ+वह्–ऊढ]

अनूप—वि. निरुपम; असाधारण; अलौकिक; विलक्षण; चमत्कारिक; असामान्य; नवलाईचें; आश्चर्यकारक. **–प**–(शाप.) माशी ग्यास; अनूपवायु पहा. [सं.]–पु एक देश; जांबरी, बेत, ताड, केळ, वळ इत्यादिकांनीं युक्त असा खोल प्रदेश यांत डोंगर झाडी फार असून फार पाऊस आणि (कफजन्य) रोग होतात. –वोर १.२८; –अश्व २.७. **०वायु**–पु. (इं.) माशी ग्यास, हा कर्वेचा एक परमाणु उज्जाच्या जास्तींत जास्त चार परमाणूंशीं संयोग पावून बनतो. सेंद्रियरसायनशास्त्रांत यास मथुन (मिथेन) असेंहि म्हणतात; दलदलवायु, मथिल, उदिद अशींहि नांवें आहेत. दलदलीच्या जागेंतील कुजलेल्या पाण्यांतून व इतर पदार्थांतून हा निघतो. याच्यामुळें खाणीमध्यें भयंकर स्फोट होतात. –ज्ञाको(क) १२८.

अनूराधा—अनुराधा पहा.

अनृण–णी—वि. कर्जे, रीण नसलेला; ऋणमुक्त. [सं.]

अनृत—न. लबाडी; खोटेपणा; असत्यता. –वि. खोटें; लबाड; अतथ्य (भाषण व०). [सं. अ+ऋत=सत्य]

अनृत्य—अनृत पहा. ' द्वेषवचनी अनृत्यवचनी । बाष्कळवचनी धिःकारु । ' –दा २.३.२२.

अनेक—वि. एकापेक्षां अधिक; कांहीं; पुष्कळ, सामाशब्द– **अनेकविध, अनेकप्रकार, अनेकवार. ०चर**–वि. संघानें राहणारा,

संचर, समचर, (एकचर याच्या उलट). ०छिद्रधारी–वि.(प्राणि.) शरीरावर अनेक छिद्रें असलेला; (इं.) पोरिफेरा. ०जिह्व–वि. पुष्कळ जिभा असलेला; (ल.) खोटें बोलणारा; बोलणें बदलणारा. ०त्र–अ. अनेक ठिकाणीं. ०धा–विधा–अ. पुष्कळ रीतींनीं, प्रकारें. ०मातृक–वि. पुष्कळ आया असलेला. ०वचन–न. १ ज्यावरून अनेक वस्तूंचा बोध होतो तें; बहुवचन. २ नामाचें निरनिराळ्या विभक्तीमधील बहुसंख्याबोधक व क्रियापदाचें त्याच्या पुरुष आणि काळ यांमधील बहुसंख्याबोधक रूप. ३ बहुवचनांतील शब्द. ०वगैसमीकरण–न. (बीजग.) दोन किंवा अधिक राशी अव्यक्त असतांना मांडावयाचें समीकरण. ०वारी–वि. पाखंडीमताचा. ०वार–अ. पुष्कळ वेळां; वारंवार; नेहमीं. सतत. ०शः–अ. पुष्कळ प्रकारें. [सं.]

अनेग—अनेक पहा. 'जो स्वयें होय अवयें जग। त्यासि लागतां उपद्रव अनेग।' –एभा २३.५३. 'धाविलासी लागवेगें। वेंध्रें पुरविलीं अनेगें॥' –देवसंत १३.

अनेगा—स्त्री. (प्र.) आण; आणेगा पहा. 'रामसमर्थाच्या ही आहे मज अनेगा।' –पला ३८९९. 'महार लोकांना डुकर खाण्याची अनेगा आहे.'

अनेळी—वि. (कों.) गुळाची एक जात, (एका विशिष्ट पध्दतीनें बनविलेला गुळाचा प्रकार, या गुळाचा उपयोग औषधांत व कांहीं दुखण्यांत करण्यांत येतो.)

अनैकमत्य—न. मतभिन्नता; (ऐकमत्याच्या उलट). [सं.]

अनैक्य—न. १ फरक; भिन्नत्व; एकत्वाभाव. २ एकी नसणें; वैमनस्य; वेबनाव; बिघाड; वांकडें. ३ द्वैत; अर्थ, वचन किंवा संदर्भ, यांमधील विरोध, तफावत. [सं.]

अनोठा—वि. नवीन; विलक्षण; असामान्य; चमत्कारिक. 'त्याणें आज दोन राग अनोठे गायले.' [अ+ठावा किंवा सं. अ+उत्=स्था; प्रा. अन्+उट्ठ; हिं. अनोठा.]

अनोपत—न. आपत्ति; अनुपत; अनुपत्ति पहा.

अनोल—अनवल पहा.

अनोल—वि. (खा.) आळणी. 'अनोल औशद खायान गुन लड्ड यीन.' =अळण औषध खाल्ल्यानें गुण लवकर येईल [सं. अल्वण वा विपर्यास]

अनोवीन्य—अन्योविन्य पहा.

अनोशी–इया–रोटी—अनशवें पोटीं पहा.

अनोळख—वि. १ ओळख नसणारा; नवा; अपरिचित. २ कृतघ्न; (उपकार) न जाणणारा. 'दुष्ट दुरात्मे अनोळंख।' –एभा २९.३७५. [अ+ओळख] ०पण–न. परकेपणा; अपरिचितपणा. 'तया आघवयांचेंचि फिटलें। अनोळखपग॥' –ज्ञा १०.१६३.

अनोळखी–अनवळखी—वि. १ न ओळखीचा, न ओळखणारा; नवखा. २ बिन माहितीचा; गैरमाहित; ठाऊक नसलेला. (इसम, बाब, लोक, वस्तु इ.).

अनौचित्य—न. उचितपणा नसणें; अयुक्तपणा; अयोग्यपणा; गैरशिस्तपणा; चुकी. [अ+औचित्य]

अनौति—वि. दुसरा; आनौति पहा.

अनौरस—वि. औरस नसलेली; विवाहसंबंधापासून न झालेली; जारज; अकरमाशी. ०ता–स्त्री. जारजता; अविधिजन्म. ०संतति–स्त्री. (कायदा) ज्यांचा कायदेशीर रीतीनें विवाह झालेला नाहीं अशा स्त्रीपुरुषांची संतति. [सं.]

अन्करीब—क्रिवि. १ जवळ. 'फिल्हाल मजल हुत्तीचे रोज अ० येऊन पोहचतील.' –पया ३८४. २ लौकरच. 'खर्चाचा मजकूर तर खर्चासही येथून अन्करीब पाठवीत असो.' –सावंतवाडी संस्थानचा इतिहास. [अर. अन्करीब्]

अन्न—वि. (अन्य अप.); दुसरा–रें. 'देवावांचूनि नेणे अन्न।' –द्रा. १४.५.३०. [सं. अन्य]

अन्न—न. १ धान्य वगैरेचा तयार केलेला खाण्याचा पदार्थ; (विशेषतः भात, भाकरी, भाजी, पक्वान्नें वगैरे नेहमींच्या खाद्यांतील जिन्नस); आहार; भक्ष्य; भोज्य. 'मृत्यूचें आघवेंचि अन्न।' –ज्ञा १८.५६३. म्ह० १ अन्नासारखा लाभ (नाहीं) मरणासारखी हानि (नाहीं). २ अन्न तारी, अन्न मारी, अन्नासारखा नाहीं वैरी. ३ अन्नाची वाण, शरीराची घाण. २ (सामान्यतः) धान्य. ३ चरितार्थाचें साधन (रोजगार, नोकरी). ४ पक्वान्न; जेवण्याचा पदार्थ. 'विचित्र अन्नें वाढिलीं पात्रीं।' ०अंगीं लागणें–पचणें; कामीं येणें; उपयोगी पडणें. 'खाल्लें अन्न अंगीं लागत नाहीं' =केलेल्या कर्मापासून किंवा संपादलेल्या वस्तूपासून कांहीं लाभ होत नाहीं. ०अन्न करणें–करीत फिरणें–अन्नाकरितां भिक्षा मागणें, दारोदार फिरणें. 'तुकयाची जेष्ठ कांता। मेली अन्न-अन्न करतां।' ०कडे–कांटास ठेवणें–भुकेच्या अंदाजाप्रमाणें ताटांत अन्न वाढून घेतल्यानंतर जरूरी लागल्यास घेतां यावें म्हणून बाजूस काढून ठेवणें. ०चारणें–खाऊं घालणें; जेवूं घालणें; पोसणें. ०जाणें–भूक असणें; अन्न पचणें; तोंडाला चव असणें. ०परब्रह्म–न. अन्न हेंच परब्रह्म; (ल.) अन्नाशिवाय दुसरें कांहीं महत्त्वाचें नाहीं (असा माणूस); खादाड. ०पाणी तुटणें–राहणें; अन्नावर वासना नसणें; तोंडास चव नसणें; भूक कमी होणें. ०पाणी सोडणें–अन्न न खाणें; अन्नपाणी टाकणें; उपाशी राहणें. ०व खोबरें बरोबर असणें–श्रीमंत पण कंजुष माणसाला लावतात. अन्नावर अन्न, वस्त्रावर वस्त्र–अन्न जिरलें नाहीं तोंच पुन्हां अन्न सेवन करणें व एकाच्या ठिकाणीं अनेक वस्त्रें पेहेरणें. (केव्हांहि अहितकारक आहे; यावरून कोणतीहि वस्तु चांगली असली तरी

मितपणा सोडून एकसारखें अधिक सेवन करूं नये). **–आड येणें, –घर उठणें**–एकाद्याच्या उदरनिर्वाहाच्या साधनास व्यत्यय आणणें किंवा तें साधन नाहींसें करणें; पोटावर पाय आणणें. **–चा, अन्नानें पोसलेला–वाढलेला**—'दास म्हणे तुझ्या अन्नाचा वाढलों साचा।' –दावि १७. **–चा मारलेला खालीं पाही**–(तरवारीचा मारलेला वर पाही)= अन्न खाऊं घातल्यास तो नेहमीं आपल्यापाशीं नम्र आज्ञाधारक राहतो, परंतु मनुष्यावर प्रहार केल्यास तो उलट प्रतिकार करण्यासाठीं मगरूरपणें टंवकारून वर पाहूं लागतो. (ल.) दयेनें, सौम्यतेनें माणूस जिंकला जातो, कठोरतेनें मनुष्य शत्रु बनतो. **–चा किडा**–पु. १ खादाड; २ नुसता खाऊन स्वस्थ बसणारा इसम; वृद्ध इसम किंवा लहान मूल. **०चा पिंड**–१ पोषणाची योग्य काळजी घेऊन वाढविलेला (इसम–प्राणी); आश्रित; पोष्य; पोसणा. २ अन्न बंद केलें असतां ताबडतोब मरणारा–म्हातारा, लहान मूल; अन्नाचा किडा. **०ची क्रिया**–स्त्री. १ एखाद्याचें अन्न खाल्ल्यामुळें भासणारें त्याबद्दलचें कर्तव्यकर्म; उपकार; (क्रि० टाकणें, धरणें, सोडणें). २ शपथ; भाक. (क्रि० करणें) **–ची लाज धरणें**–खाल्लेल्या अन्नाबद्दल उतराई होणें; कृतज्ञता बाटणें. **–चें खोबरें होणें**–अन्नाची वाण किंवा दुष्काळ होणें–पडणें; (ज्या देशांत खोबरें फार कमी व महाग तेथील लोकांच्या तोंडांत असलेली म्हण). **–चे पाठीं लागणें**–निर्वाहाच्या साधनांच्या मागें लागणें; नोकरी पहाणें–करणें. **–चें पाणी करणें–होणें**–अन्नांतील पौष्टिकपणाचा व चवीचा नाश करणें, होणें; अन्न निःसत्व व बेचव करणें; (खाण्याच्या वेळीं कांहींतरी अभद्र, अनिष्ट किंवा भीतिप्रद बोलण्यामुळें). **–च्या गारगोट्या**–(गारगोट्यांसारखें थंड झालेलें) अगदीं निवालेलें अन्न. **–त माती कालविणें–घालणें**–एखाद्याच्या निर्वाहाच्या साधनांचा नाश किंवा बिघाड करणें; पोटावर पाय आणणें; अन्नाआड येणें; नोकरी घालविणें. **–त माशी पडणें–माशी** अन्नाबरोबर पोटांत गेली असतां अन्न ओकून पडतें त्यावरून–अगदीं सिद्ध होत असलेल्या कामांत अवचित कांहीं अनिष्ट गोष्ट घडून कार्यनाश होणें. 'त्यागमति असी कोठुनि आली या भोजनांत हे मासी।' –मोआश्रम ३.२९. **–मुळें वाळणें**–अन्नाच्या अभावामुळें रोड किंवा कृश होणें; खंगणें. **–वर वाढणें**–आश्रयावर लहानाचें मोठें होणें. 'पेशव्यांच्या अन्नावर वाढलेलीं व पेशव्यांमुळें नांवारूपास आलेलीं शेंकडों घराणीं जेथें ह्यात आहेत तेथें पेशव्यांचा शेवटला वंश बंडखोर ठरतो तरी आम्हांस बिलकुल पर्वा नाहीं.' –टि ४.१७९. **–स जागणें**–(पोषियाला) कृतज्ञ राहणें; ऋणी असणें; उपकार स्मरून उतराई होणें. **–स महाग–मोताद**–अत्यंत दरिद्री; कंगाल; नेहमींच्या सामान्य गरजांची वाण असलेला; बुभुक्षित. **–स लावणें–अन्न लावणें**–निर्वाहाचें साधन मिळवून देणें; काम, उद्योग, धंदा देणें.

अन्नई—स्त्री. (व.) लोखंडी अगर पितळी ताट ठेवण्याची तिवई. [सं. अन्न+वाही ?]

अन्नकूट—पु. बलिप्रतिदेच्या दिवशीं गोवर्धनादि देवापुढें ठेवण्याचा अनेक प्रकारच्या अन्नांचा ढीग. [सं.]

अन्नकोश—पु. शरीर; अन्नमयकोश पहा. [सं.]

अन्नगुरु—पु. १ खादाड. २ अन्नाचा किडा –पिंड. [अन्न+गुरु]

अन्नछत्र—अन्नसत्र पहा. 'नागवुनि यात्रा समग्र। अन्नछत्र घातलें॥' [सं. अन्न+सत्र]

अन्नत्याग—पु. प्रायोपवेशन; अन्न वर्ज्य करणें. [सं.]

अन्नदाता—पु. अन्न देणारा; जेवूं घालणारा; पोषण करणारा; यजमान. 'अन्नदाता सुखी भव=अन्नदात्याचें कल्याण होवो।' [सं.]

अन्नदान—न. अन्नसंतर्पण; जेवूं घालणें; भोजन देणें. [सं.]

अन्नदेवता—स्त्री. १ खाद्य पदार्थादि उपजीविकेच्या वस्तूंवर अधिष्ठित असलेली देवता; अन्न देणारी देवता; प्रयोजन, जेवणावळ वगैरे प्रसंगीं हिची आराधना करतात. २ (देवतातुल्य) अन्न; धान्य. [सं.]

अन्नद्वेष—पु. १ अन्नाचा वीट, तिटकारा, कंटाळा; असें होणारा विकार. [सं.]

अन्ननलिका—स्त्री. अन्नमार्ग पहा.

अन्नपचन—न. अन्न पचणें, जिरणें; अन्नपरिपाक. (अपचनाच्या उलट) [सं.]

अन्नपाणी—न. १ अन्न आणि पाणी. २ जीविताला आवश्यक असलेल्या वस्तू; निर्वाह–साधनें. 'अन्नपाणी तोची देतो। प्रेमें सर्वां सांभाळीतो॥' [सं. अन्न+ म. पाणी]

अन्नपान—न. (विप्र.) अन्नप्राशन. [सं.]

अन्नपूर्णा—स्त्री. १ दुर्गा; पार्वती, भवानी; अन्नदात्री, अन्नाधिष्ठित देवता; समृद्धि देवता. २ (ल.) जिच्या हातचा स्वैंपाक–अन्न पुरवठ्यास येतें अशी बाई; स्वयंपाकीण. ३ (उप.) भिक्षेची, मधुकरीची झोळी. [सं.]

अन्नपूर्णी—स्त्री. काशीकडील पाणी पिण्याचें भांडें. (काशीच्या अन्नपूर्णा देवीच्या नांवावरून) **०येणें**–अन्नास पुरवठा येणें.

अन्नप्राशन—न. लहान मुलास प्रथम अन्न खाऊं घालण्याचा उष्टावणाचा विधि (सोळा संस्कारांपैकीं एक). 'गर्भाधान, पुंसवन। जातकर्म अन्नप्राशन। हीं समस्त कर्में पूर्वी जाण। केलीं संपूर्ण चौलांत॥' –एभा १७.२७०. [सं.]

अन्नब्रह्म—न. अन्न हेंच ब्रह्म; अन्नपरब्रह्म पहा. 'अन्नब्रह्मातें आळंकारणें, –दावि ३११. [सं.]

अन्नभूली—स्त्री. अन्नद्वेष. 'नियतच तुज आली हे असे अन्नभूली।' –सारुह. २.८०. [अन्न+भुली]

अन्नमय—वि. अन्नापासून-त्यें बनलेलें, अन्नावर अवलंबून असणारे (प्राण, देह, इंद्रियें इ.) ' कलियुगीं अन्नमय प्राण । ऐसें बोलती सज्जन ॥ '. ' अन्नमय प्राण, प्राणमय पराक्रम ' =अन्न मिळाल्यास प्राण राहतो व प्राण राहिल्यास पराक्रम शक्य होतो. [सं.]

अन्नमयकोश—पु. चैतन्याला आवरण असलेल्या पांच कोशांपैकीं पहिला ; स्थूल देह (कारण हा देह अन्नापासून बनलेला असतो). पंचकोश पहा. [सं.]

अन्नमार्ग—पु. तोंड आणि पक्वाशय यांच्यामध्यें एक लांब नळी असते ती; अन्ननलिका; ही नलिका स्नायूंची असून सुमारें नऊ इंच लांब असते. [सं.]

अन्नमोड—पु. १ अन्नपचन. २ भुकेचें समाधान, तृप्तता: अन्नासंबंधीं आशामोड. [सं. अन्न+मोड]

अन्नरस—पु. १ अन्नाचें पचन होऊन झालेला रस. २ अन्नांश: ' रोग्याच्या पोटांत कांहीं करून अन्नरस जाईसें कर म्हणजे थंडावा येईल. ' ३ खाणें; आहार; भक्ष्य. [सं.]

अन्नवस्त्र—न. १ मनुष्यास निर्वाहार्थ लागणारें अन्न आणि वस्त्र. २ (कायदा) आपल्या पोषणाची तजवीज कायदेशीर रीतीनें एकाद्या व्यक्तीकडून अगर मालमत्तेंतून करून घेण्याचा हक्क; यास अन्नवस्त्राचा हक्क असें म्हणतात; पोटगी; जितरोटी; खावटी. [सं.]

अन्नविकार-विकृति—पु. स्त्री. १ अपचनामुळें पोटांत-आंतड्यांत झालेला विकार-बिघाड. २ अन्नद्वेष; अन्नावर वांच्छा नसणें. ३ अन्नाचें रूपांतर -एक अवस्था: अन्नापासून बनलेलें (प्राणि, शरीर, अवयव इ०) रूप. ४ अन्नामध्यें होणारा रासायनिक फरक; अन्नाच्या घटकांपासून तयार होणारा एक नवीन पदार्थ. [सं.]

अन्नविपाक—पु. १ अन्नपचन झाल्यानंतरची अवस्था; २ अन्नपचनाची क्रिया. ३ अन्नपचनानंतर बनलेलें द्रव्य (रक्त, मांस इ०). [सं.]

अन्नव्यवहार—पु. रोटीव्यवहार; जेवण; पंक्तिभोजन; एकमेकांच्या हातचें खाणें; एका ठिकाणी किंवा परस्परांचे घरीं भोजन करणें. ' दाक्षिणात्यांचा आणि गुर्जरांचा प्रायः अन्नव्यवहार नाहीं.' [सं.]

अन्नशांति—स्त्री. १ (विप्र. अन्नशांत); भुकेल्यांना, क्षुधितांना अन्नदान करणें. २ ब्राह्मणभोजन. [सं.]

अन्नशुद्ध-शूद्, अनशू(सू)द्—अन्नशुद्धि) अप.) पहा.

अन्नशुद्धि—स्त्री. १ अन्न भोजनास योग्य करण्यासाठीं किंवा नैवेद्यासाठीं भातावर तूप वाढावयाचें हा विधि. २ तूप; अन्नशुद्धीचा पदार्थ; ' वरणभातावर तुपाची अ० घालतात. ' [सं. अन्न+शुद्धि=पवित्रीकरण]

अन्नशेष—पु. उच्छिष्ट अन्न; उष्टें; जेवण झाल्यावर राहिलेलें अन्न. [सं.]

अन्नसंतर्पण—न. अन्नदान; अन्नशांति. [सं.]

अन्नसत्र—न. (विप्र. अन्नछत्र) १ याचकवर्ग किंवा ब्राह्मणलोक यांना भोजन देणें. अन्नदानाचें धर्मकृत्य. २ या कामासाठीं बांधलेली इमारत; अन्नछत्राचें गृह. **म्ह**० अन्नसत्रीं जेवणें आणि मिरपूड मागणें=धर्मादाय मिळालेल्या गोष्टींवर तृप्त न राहून आणखी मागणी करणें; फुकटावर श्रीमंतीचे चोचले करणें. ३ मुक्तद्वार. ' आवोजावो घर तुमारा.' [सं. अन्न+सत्र]

अन्नसंपर्क-संस्कार—पु. जेवण; जेवणें; भोजन करणें. (प्रत्यक्ष जेवणें; उपाहार किंवा अल्पाहार नव्हे); आहार. ' महागिरींत बसल्यापासून आठव्या दिवशीं बंदरास लागलों तेव्हां अन्नसंपर्क झाला. ' ' याला पंधरा दिवसांत अन्नसंस्कार नाहीं कांहीं औषध तरी योजून सांगा. ' [सं.]

अन्नाच्छादन—न. अन्नवस्त्र. ' अन्न आच्छादन । हे तो प्रारब्धा आधीन ॥ ' [सं. अन्न+आच्छादन]

अन्नाठी—स्त्री. (गो.) पावशेर. [अर्ध+निठवें]

अन्नाडी—वि. (गो.) अनाडी पहा.

अन्नान्नगत-ति, अन्नान्नदशा—स्त्री. अन्न ! अन्न ! करीत दारोदार भटकत फिरण्याची अवस्था; अत्यंत विपन्नावस्था; कंगालपणा; घोर दारिद्र्य. [सं. अन्न+अन्न+गति.]

अन्नाभायर—वि. (गो.) (अन्नाबाहेर अप.) अन्न खावयास न मिळे असें (करणें). [सं. अन्न+बहिः]

अन्नार्थी—वि. १ अन्नाची जरूरी असलेला; अन्नाच्या मागें लागलेला; अन्नासाठीं हपापलेला. २ जीविताला आवश्यक असलेल्या वस्तूंची जरूरी असलेला किंवा त्या वस्तूंच्या शोधांत असलेला. [सं. अन्न+अर्थिन्]

अन्नावणें—अक्रि. भुकावणें; भुकेलेला असणें; भुकेनें व्याकूळ होणें; अन्न न मिळाल्यामुळें दुस्थितींत असणें. [सं. अन्न]

अन्नाशय—पु. जठर; पोट; उदर; कोठा; कोथळा. [सं. अन्न+आशय]

अन्नास—अननस पहा.

अन्नोदक—न. १ अन्न आणि पाणी. २ योगक्षेममवृत्ति; उपजीविकासाधन-व्यवस्था. [सं. अन्न+उदक] **०ऋणानुबंध**—पु. १ अन्नोदक दिल्या घेतल्यानें उत्पन्न होणारा संबंध; पूर्वजन्मीं केलेल्या सुकृताची, ऋणाची किंवा उपकाराची या जन्मीं फेड; प्रारब्धानें कारणीभूत झालेला संबंध. [सं. अन्न+उदक+ऋण+अनुबंध] २ अन्नोदक देण्यासारखा जडलेला संबंध, झालेला उपकार.

अन्मार्ग—पु. असन्मार्ग; वाईट मार्ग; दुवृत्त. ' अशुद्ध अन्मार्गी चालती जन । ' -दावि ३. [सं. अ+मार्ग किंवा अन्य+मार्ग]

अन्मीख—वि. अनिमिष; पापण्या न हालवितां एकसारखा उघडा (डोळा). ' अन्मीखे पाहों ठेलें। राजा मुरारि तें ॥ ' –दाव ७३. [सं. अनिमिष अप.]

अन्य—वि. १ दुसरा; इतर. २ एकरूप नसलेला; परका; निराळा; भिन्न; वेगळा. ३ अधिक; शिवायचा. [सं.]

अन्यकारणक—वि. ज्याचें कारण वेगळें आहे असा. ' अन्य कारणकाचि तैशिया । ' –ज्ञा १८.२७७. [सं. अन्य+कारण+क]

अन्यच्च—दुसरें; अधिक. –क्रिवि. पुन्हां; आणखी. [सं अन्यत्+च]

अन्यजन्मार्जित—वि. मागील जन्मांत केलेलें किंवा मिळविलेलें (सुकृत, दुष्कृत, पुण्य, पाप.) [सं. अन्य+जन्म+अर्जित=संपादलेलें]

अन्यतः—अ. दुसऱ्यामुळें, कडून, पासून, कडे. [सं.]

अन्यतम—वि. दुसरा; अनेकांपैकीं कोणताहि एक; कोणीहि एक; कोणीहि; कोणताहि. [सं.]

अन्यतर—वि. १ दोहोंपैकीं कोणताहि एक. २ दुसरा; वेगळा निराळा; भिन्न. [सं.]

अन्यत्किंचित्—न. १ दुसरें कांहीं तरी; वेगळें; निराळें. २ सध्या न दिसणारें; (वर्तमान सुखदुःखास कारणीभूत) पूर्वजन्मांतील पापपुण्याचा शेष; पूर्वजन्मार्जित; संचित. **म्ह०** अन्यत्किंचित् भविष्यति (दुसरें कांहीं थोडें होईल). [सं. अन्यत्=दुसरा (जन्म)+किंचित्]

अन्यत्र—क्रिवि. १ दुसरीकडे; कोठेंहि दुसऱ्या ठिकाणीं; इतर स्थळीं. ' नाना एका ठाऊनि उठी। अन्यत्र नव्हे पैठी । ' –अमृ ७.१८८. २ खेरीज; शिवाय; वांचून [सं. अन्यत्र]. **०ठायीं**–क्रिवि. (अशुद्ध प्रयोग) दुसऱ्या ठिकाणीं; अन्यस्थळीं. ' त्या भूमिकेवांचूनि सांपडेना ॥ अन्यत्र ठायीं पदरीं पडेना ॥ '

अन्यथा—क्रिवि. १ नाहींतर; नाहींपेक्षां; एरवीं; असें नसेल तर. ' हें औषध घ्याल तरच गुण पडेल अन्यथा पडणार नाहीं. ' २ दुसऱ्या रीतीनें–प्रकारानें–पद्धतीनें; अन्य प्रकारें; वेगळ्या तऱ्हेनें. ' हें वांचूनि पार्था । राहाटों नये अन्यथा । ' –ज्ञा ३.१२६. ३ खोटें. असत्य; मिथ्या; अयथार्थ; अनृत. ' मी खरें असेल तेंच सांगेन, अन्यथा बोलणार नाहीं. ' ४ विपरीत; व्यर्थ. ' मीं इतकी मेहनत केली अन्यथा गेली, कांहीं उपयोग झाला नाहीं. ' ५ चुकीनें; अयोग्य पणानें; गैर रीतीनें. [सं.] साभाशब्दः–अन्यथाकारी अन्यथाचारी अन्यथाभाषी, अन्यथाभोजी, अन्यथावर्ती. **०ख्याति**–स्त्री. (तत्त्व) एक प्रकारचें विज्ञान; चुकीचें विज्ञान; ' ख्याति ' पहा. ' आख्याति अन्यथाख्याती । शून्यख्याती सत्ख्याती । अनिर्वचनीय जे ख्याती। तो वादू निश्चितीं मी उद्धवा ॥ ' –एभा १६.२०७. [सं.] **०त्व**–न. विपरीत प्रकार. ' जे नेणणें माझें प्रकाशूनि । अन्यथात्वें भातें दाऊनि । ' –ज्ञा १८.१११४. [सं.] **०दृष्टि**–स्त्री. विपरीत ज्ञान. ' अवस्थात्रय तिन्ही लोक । प्रकाशूनि अशेख । अन्यथा दृष्टि पांथिक । देवविलें । ' –ज्ञा १८.१३००. [सं.] **०बोध**–पु. विपरीत ज्ञान, समजूत. ' पैं अन्यथाबोधु आघवा । मावळोनि तया पांडवा । ' –ज्ञा १८.९६४. [सं.] **०भाव**–पु. पालट; बदल; अवस्थांतर (विशेषतः वाईट). अपकर्ष; ऱ्हास; अधोगति. [सं.] **०मति**–स्त्री. विपरीत ज्ञान, बुद्धि. ' ते वेळीं विश्वस्वप्नासहित्ें। कोण अन्यथामति निर्दलें। पांभाळी तुरेचि जेवें। मायाराती ॥ ' –ज्ञा १६.११. **०सिद्ध**–वि. १ इतर कांहीं उपायांनीं–मार्गांनीं साधलेलें–स्थापन केलेलें. २ (तर्क) जो नसला तर गरज भागवितां येईल असा; ज्यावांचून अडणार नाहीं असा. अनवश्यक (जसें मडक्याची माती आणावयास गाढवच पाहिजे असें नाहीं दुसरा आणूं शकेल यावरून व्यापक) कुचकामाचा; व्यर्थ; फुकट, निरुपयोगी. [सं.]. ३ चुकीनें सिद्ध केलेला (योग्य कारण न देतां). **०सिद्धि**–स्त्री. १ कांहींतरीं, निराळ्या उपायानें सिद्ध करणें, साध्य करणें. २ त्याच पूर्वपक्षावरून वेगळा, भलता निर्णय प्रस्थापित करणें. उ० ' तूं लहान मूल आहेस सबब ही गोष्ट तुला सांगतां कामा नये; ह्याला उलट उत्तर असें देतां येईल कीं, ही लहान मूल आहे ना, मग तें मला सांगण्याला हरकत नाहीं. ' ३ (ल.) चुकीचें अनुमान. **०ज्ञान**–न. विपरीत ज्ञान. ' आतां अन्यथाज्ञानीं । या दोनी अवस्था जया जनीं । ' –ज्ञा १५.५२५. [सं.]

अन्यदा—क्रिवि. (लु.) दुसऱ्यावेळीं; दुसऱ्यांदा; दुसऱ्या एकाद्या वेळीं; अन्यसमयीं [सं. अन्यधा]

अन्यदीय—वि. दुसऱ्यासंबंधी; दुसऱ्याचा; इतराचा; परकीय [सं.]

अन्यपूर्व—वि. पूर्वी दुसऱ्याचें असलेलें; विवक्षित कालापूर्वी जीवर दुसऱ्याची मालकी होती अशी (भूमि, वृत्ति. इ०). [सं.]

अन्यपूर्वा—स्त्री. वि. १ एकाशीं अगोदर वाङ्निश्चय झाला असून मग दुसऱ्याशीं जिचें लग्न झालें आहे किंवा होणार आहे अशी मुलगी. २ पुनर्विवाहित. [सं.]

अन्यबीज—वि. दुसऱ्याच्या पोटचा; जारज. ' कुलगुरु देव विद्या जो शिकवी । त्यासी जो नाठवी अन्यबीज ॥ ' –ब२५०. [सं.]

अन्यमनस्क, अन्यमना, अन्यमानस—वि. १ मन किंवा विचार इतरत्र संचारत असणारा; अनवधानी; दुर्लक्ष असलेला; त्रेधान; भ्रमिष्ठ; विमनस्क. २ चंचल वृत्तीचा; अविश्वासी; एकनिष्ठ नसणारा. [सं. अन्य+मनस्]

अन्यमूर्ति—वि. दुसऱ्या आकाराचा; रूपांतरित; भिन्नरूपी; दुसरा देह धारण केलेला. [सं.]

अन्यरेताचा—वि. अन्यबीज; जारज. (शिवी) ' यः पुत्रो पितरोद्वेषी वचन । द्वेषी ब्रह्मविदो जनः दुर्जन । तो अन्यरेताचा

म्हणोन खुण । दाविती पंडित शास्त्रांतरीं ॥ ' –दावि ७६३. [सं. अन्य+रेतस्]

अन्यशाखी—वि. दुसऱ्या शाखेचा, पंथाचा (वेद, धर्ममत इ०च्या). [सं. अन्य+शाखा]

अन्यसाधारण—वि. सर्वसामान्य लागू पडणारा; सामान्य; सार्वजनिक. [सं.]

अन्याय—पु. १ अपराध; गुन्हा; कायदा सोडून केलेलें वर्तन; कायदेभंग. २ अनीति; अधर्म; शास्त्राविक्रम. ३ जुलूम: जबरदस्ती. ४ चुकीचा निकाल. **०वर्तन**–न.**०वृत्ति**–स्त्री. अनीतीनें वागणें; गैरशिस्त वागणूक; स्वैर वर्तन. **–चा प्रतिबंध**–पु (कायदा) ज्या दिशेकडे जाण्याचा कोणा मनुष्याचा हक्क आहे त्या दिशेकडे जाण्यास हरकत करणें. (इं. राँगफुल कन्फाइन्मेंट) **–याची कैद**–स्त्री. अमुक मर्यादेच्या पलीकडे कोणत्याहि दिशेनें जाण्यास केलेला प्रतिबंध. [सं.] (इं. राँगफुल रिस्ट्रेन्ट)

अन्यायी—वि. १ अपराधी; अपराधाचा; गुन्हेगारीचा. दोषी. २ अनीतीचा; अधर्मी; अयोग्य आचरण करणारा; पापी. ३ कायदा सोडून वागणारा. [सं.]

अन्यायोपार्जित—वि. अनीतीनें संपादिलेलें; अन्यायानें, अनीतीनें मिळविलेलें (द्रव्य वगैरे). [सं. अन्याय+उपार्जित]

अन्यारदान—न. (व.) भुइनळे. [फा. अनार+दान]

अन्याव-वो—पु. अन्याय; अपराध; चुकी: गुन्हा, ' द्रौपदी वस्त्राहरण पहाहो । मुख्य अन्यावो हा कौरवांचा ॥ ' –एभा १.२१२. ' अरे अन्यावो करितोसि । ' –पंचतंत्र ३१. [सं. अन्याय अप.]

अन्याविशी—अ. (गो.) १ अन्यायानें; विनापराध. २ विनाकारण. [सं. अन्याय–अन्याव+शी]

अन्यून—वि. अपुरें नसणारें; उणीव नसलेलें; पूर्ण; सगळें; अव्यंग. [सं. अ+न्यून]

अन्यो—पु. अन्याय; अपराध. ' बैसोनियां तक्तां । अन्योविण पिंडिती लोका । ' –तुगा २९८४. [सं. अन्याय अप.]

अन्योक्ति—स्त्री. १ आडून बोलणें; अप्रत्यक्ष बोलणें. २ एक अर्थालंकार; अप्रस्तुतप्रशंसा; जेथें अप्रस्तुत गोष्टीच्या वर्णनानें प्रस्तुत गोष्टीची प्रतीति होते तो. १ कार्यावरून कारणाचें, २ कारणावरून कार्याचें, ३ सामान्यावरून विशेषाचें व ४ विशेषावरून सामान्याचें वर्णन करणें हीं कांहीं अन्योक्तीचीं अंगें आहेत. उ० द्वारीं मृगपति हस्तांतून अहो वीरराय जी मुक्ता । ती सेविजेल इतरें सिंहाबांचून काय जी मुक्ता ॥ ' –मोरो. ' येथें समस्त बहिरे बसतात लोक । कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक । हे मूर्खे ज्यांस किमपीहि नसे विवेक । रंगावरूनि तुजला गजितील काक ॥ ' (हा शब्द श्रीयुत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं रूढ केला. या अलंकाराला मूळ संस्कृतामध्यें अप्रस्तुतप्रशंसा असें म्हणतात). ३ गूढ अर्थाचें भाषण. ' परोक्ष वाद वेदव्युत्पत्ती । त्यागयुक्तें गा अन्योक्ती । सांडवी विषयासक्ती । ब्रह्मप्राप्ती लागूनी । ' –एभा २१.३५३. [सं. अन्य+वच्=बोलणें]

अन्योन्य—वि. १ एकमेक; परस्पर. ' या उभयतांनीं अन्योन्याला शिव्या दिल्या. ' ' धांवति अन्योन्यावरि ते दोघे आठवूनि अपकार । ' मोकर्ण ४५.२. २ एक अर्थालंकार. एकाच क्रियेच्या द्वारें दोन वस्तू परस्परांस उपकारक होतात असें वर्णन. यांत परस्परांनीं परस्परांना भूषविण्याचा प्रकार असतो. उ० श्रीकृष्ण रुक्मिणीला श्रीकृष्णा रुक्मिणी जशी आतां । दमयंतीस नल नला दमयंती आयकों जें गातां ॥ ' –मोवन ४.२१. ' पागोटयास डोकें डोक्यास पागोटें. ' ' नाकास नथ नथीस नाक. ३ सर्वस्वीं. (महिकावती बखर ११.१२) [सं. अन्य द्वि.]

अन्योन्यभाव—पु. १ परस्परांमधील परस्परांचा अभाव. उ० घट तो पट नव्हे, पट तो घट नव्हे अशा प्रतीतीनें समज. २ (न्याय.) पूर्ण भेद. अभाव पहा. [सं.]

अन्योन्यविण—वि. अनन्वित; भलतेंसलतें; गैरशिस्त. ' बोलो नये घडलें ऐसें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी । ' –तुगा ४०६५. [सं. अनन्वित अप ?]

अन्योन्यसंपूरक—वि. एकमेकांची पुरवणी. ' अन्योन्यसंपूरक लेख. ' ' साकेटीस संवाद १६२. [सं.]

अन्योन्याध्यास—पु. सत्यावर मिथ्याचा व मिथ्यावर सत्याचा आभास तो. [सं. अन्योन्य+अध्यास]

अन्योन्यालंकार—अन्योन्य पहा.

अन्योन्याश्रय—पु. परस्परांचा परस्परांना आधार; परस्परांमधील साहाय्य; परस्परावलंबन; कार्यकारणभावसंबंध. **०ता**–परस्पराश्रयित्व. **–श्रित**–परस्परांवर अवलंबून असणारे; परस्परांकडून साहाय्यभूत. [सं.]

अन्योविण्य–न्य—वि. १ अर्थबद्ध; विचित्र; अर्थवट, विसंगत; गैरशिस्त, (भाषण, लेखन इ.) २ कल्पनातीत; स्वैर; बेफाम; बेकैद (आचरण, वर्तन इ.) ' जैसा मदिरापानें उन्मत । विसरूनि आपुला जिज्ञासार्थ । मग अन्योविन्य अनर्थ । आत्मघात करूं धांवे । ' –एभा १३.२२७. ३ भरमसाट, अद्वातद्वा, ' पुढें अन्योविण्य वर्णनकर । होणार आहे ॥ ' –दा. ६.४.८६. अन्योन्यविण पहा. [सं. अनन्वित किंवा अन्य द्वि. अन्यविन्य ?]

अन्वय—पु. १ संबंध; अवलंबून असणारें अस्तित्व; आधार; मिलाफ; योग; संयोग; ' प्रसंग अन्वय राखतें । ' –वेसीस्व ३-२३. ' अंतःकरणाचे अन्वयावांचून सकळ इंद्रियें विषयग्रहणाविषयीं जडप्राय आहेत. ' ' जितक्या चंद्रकलांवर सूर्यकिरणाचा अन्वय होतो तितक्या कला प्रकाशमान दिसतात. ' ' देवीं देवोचि न मायें । मा देवीं के अन्वयो आहे । –अमृ ९.३८. २ (व्या.) व्याकरणांत

अनेक पदें, वाक्यें यांचा परस्पर अर्थानुरोधी संबंध (कर्तृकर्मेक, क्रियाकारक, विशषणविशेष्य, इ०). ३ काव्याची गद्यमय सरल रचना; एकाद्या कवितेंतील शब्दांची रचना बदलून आपण नेहमीं बोलतों त्याप्रमाणें करणें. ४ तर्कपद्धतीस अनुसरून रचना. ५ इंगित; कल; धोरण; मुद्दा; हेतु; उद्दिष्ट; सारांश. 'याचे बोलण्यांतील अन्वय माझे ध्यानांत येत नाहीं.' ६ कुल; जाति; परंपरा; वंश. 'विटंबिला अन्वय भूभुजांचा।'–सारुह ३.२३. ७ (न्याय) विग्रहनाचा एक मार्ग. न्यायप. १५५. ८ ओघ; अनुसंधान. पुढें कथेचा अन्वय। सावध ऐका॥'–दा ५.१०.८. ९ व्याप्ति; अन्वयव्याप्ति पहा. १० (सामा.) कार्यकारणसंबंध. [सं. अनु=मार्गे+इ=जाणें]. **०लावून बोलणें**–१ दुसऱ्यास न दुखवितां बोलणें; गोडीनें बोलणें. २ (ल.) काम साधणें. ३ लांबण लावणें. **०मार्ग**–वृत्ता(घडलेल्या गोष्टी)च्या दोन किंवा अधिक उदाहरणांमध्यें आणखी एक सर्वसाधारण कारण दाखविणारें वृत्त तें. –न्याय १३३.१५५. (इं. मेथड ऑफ अॅग्रिमेंट) **०मुखें**–प्रत्यक्ष रीतीनें; पदार्थ आहे असें कल्पून अर्थ समर्थन करण्याचा एक प्रकार (व्यतिरेक मुखें याच्या विरुद्ध). 'जडपट व्यतिरेक मुखें हरि। तदपि अन्वय दावुनि दे हरि॥' **०योजना**–स्त्री. काव्यांतील शब्द सरळ गद्य वाक्यामध्यें मांडणें; अन्वय करणें. (सामा) वाक्यरचना. **०व्याप्ति**–स्त्री. (तर्क.) भावांचें साहचर्य; कार्यकारणसंबंध; अस्तिपक्षीं प्रमेयापासून अस्तिपक्षीं अनुमान. एकाच्या अस्तित्वावर दुसऱ्याचें अस्तित्व अवलंबून असणें. उदा. धूर असेल तेथें अग्नि असतो.

अन्वयव्यतिरेक–पु. १ एकी व भेद; ऐक्यभेदाची सांगड. २ (तर्क.) अन्वय म्हणजे अमुक गोष्ट असतां अमुक गोष्ट घडणें आणि व्यतिरेक म्हणजे अमुक गोष्ट न घडलीतर अमुक दोष उत्पन्न होईल अशा प्रकारचा साध्य व साधन यांच्यामधील परस्पर संबंध; भावाभावसंबंध. 'अन्वये आणि वीतरेक। हा शब्दभेद कोणी येक। निशब्दाचा अंतरविवेक। शोधिला पाहिजे॥'–दा ९.२.२१. 'जें काय अन्वयव्यतिरेकांहीं सिद्ध त्यांत तूं वस रे।'–मोमंभा २.११६. [सं. अन्वय+व्यतिरेक] **०व्याप्ति**–स्त्री. (तर्क) अन्वय (अस्ति) व व्यतिरेक (नास्ति) उभयपक्षीं संबंध; दोन वस्तूंचा भाव व अभाव यांचें साहचर्य. उ० जेथें धूर असतो तेथें विस्तव असतो. ही अन्वयव्याप्ति आणि जेथें विस्तव नसतो तेथें धूर नसतो ही व्यतिरेकव्याप्ति. तेव्हां विस्तव आणि धूर या जोडीसंबंधानें अन्वयव्याप्ति आणि व्यतिरेकव्याप्ति हीं आहेत. [सं.]

अन्वयव्यतिरेकी–वि. ज्या विधानांची सत्यता सरळ व उलट दोन्हीं पक्षीं पटते तें. जेथें अन्वय आणि व्यतिरेक या दोहोंचाहि उपयोग होतो तें. [सं.]

अन्वयी–वि. १ संबंधी. सामाशब्द–अन्य–अपर–इतर–उत्तर उभय–एतत्–तत्–दूर–पूर्व–अन्वयी. २ दोन गोष्टींचें साहचर्य असणारा. –न्यायप. १७७. [सं.]

अन्वर्थ–क–वि. १ यथार्थ वर्णनात्मक, गुणदर्शक; सार्थ; यथार्थ; यौगिक अर्थ न सोडतां अर्थाची अभिधानता पावलेला (शब्द; नांव इ०). उ० भूपाल=राजा, जलधि=समुद्र; आतपत्र=छत्र; ज्ञानवल्ली=भांग; इ०. 'मनोभव ही मदनाची अन्वर्थक संज्ञा आहे.' [सं. अनु=प्रमाणें+अर्थ=शब्दार्थ] २ वास्तविक; सत्य; आभासात्मक नव्हे तो; खरा. [सं. अनु+अर्थ=सत्यता]. ३ नांवाबरहुकूम; लायक; योग्य.

अन्वष्टका–स्त्री. मार्गशीर्ष, पौष, माघ आणि फाल्गुन यांची वद्य नवमी. –मनु ४.१५०. **–क्य**–न. त्या दिवशींचें श्राद्ध. [सं.]

अन्वाधान–न. (याज्ञिक) १ अग्नीवर समिधा ठेवणें. २ ज्या देवतांना उद्देशून याग करावयाचा त्यांचा व त्यांच्यासाठीं उपयोगांत आणावयाचें होमद्रव्य याचा व आहुतींच्या संख्येचा उल्लेख करणें. [सं. अनु+आ+धान]

अन्वाधेय–क–न. स्त्रीधन (विवाहानंतर बापाकडून किंवा सासरकडून मिळालेलें) –मनु ९.१९५. [सं.]

अन्वारब्ध–वि. एकाच कर्माचे दोन अधिकारी असल्यास एकानें प्रत्यक्ष कर्म करावें व दुसऱ्यानें त्याच्या हातास आपला उजवा हात लावावा म्हणजे कर्माचें फल हात लावणारास मिळतें. उ० धार्मिक कृत्यांत यजमानाच्या हातास हात लावणें. –संस्कारकौस्तुभ. –वि.– संबंध, स्पर्श असलेलें; अनुसरलेला. [सं. अनु+आरब्ध]

अन्वारंभ–अन्वारब्ध पहा. आचार्य, यजमान, इ० जो मुख्य कर्ता त्यास कर्मकालीं इतर ऋत्विज, पत्नी इ० माणसें जो हस्तस्पर्श करतात तो. [सं. अनु+आरंभ]

अन्वारोहण–न. सहगमन; सति जाणें; अनुगमन पहा. [सं. अनु+आरोहण]

अन्वाहार्यश्राद्ध–न. दर अमावास्येला करावयाचें पार्वण श्राद्ध; मासिक पितृश्राद्ध. [सं.]

अन्वाहित–वि. मालकाला देण्याकरितां एकाद्या इसमाजवळ ठेवलेली (एखादी वस्तु, ठेव.) उपनिधीच्या पांच प्रकारांपैकीं दुसरा प्रकार.) [सं. अनु+आहित]

अन्वित–वि. १ संबद्ध; जोडलेला; युक्त. २ युक्त असलेला; आधीन; ग्रासलेला. उदा. कामान्वित; अकर्मान्वित (दुष्ट कर्म करणारा). क्रोधान्वित; लोभान्वित; शर्करान्वित. ३ व्याकरणामध्यें किंवा वाक्यरचनेंत संबद्धयुक्त; संबद्ध व अशाच पण अनेक व्यापक अर्थी अलंकारिक रीतींनीं या शब्दाचा उपयोग करण्यांत येतो. उ० माया प्रीति; सुख–दुःख; धर्म–अधर्म; पाप–पुण्य; भार्या–पुत्र–मित्र; हर्ष–आनंद, शोक–संताप, वगैरे पुढें अन्वित लावितात. [सं. अनु+इ]

अन्वेषण–न. १ शोध; संशोधन; चौकशी; तपास. २ पाठलाग; मार्ग काढणें [सं. अनु+इष्]

अन्वेषणें—सक्रि. तपास करणें; शोध करणें; माग काढणें; धुंडाळणें. [सं. अनु+इष्]

अन्वेष्टा-ष्टी—पु. संशोधक; अन्वेषण करणारा. [सं.]

अन्हव(धा)णी—वि. अनवाणी पहा. 'पळतचि निघाला अन्हवणी पाई।' –दावि ३०८. 'पदिं अन्हवाणी कुंजवनीं मी आलें श्रीरंगा।' –केप ८०.२.

अन्हाड-डी—अनाड पहा.

अन्हित—अनहित पहा. 'हित अन्हित परीक्षिलें । परीक्षा वंतीं।' –दा १३.७.२०. [अन्+हित]

अप—अ. एक उपपद किंवा शब्दयोगी अव्यय. याचे अर्थ– १ कमीपणा; हीनता. उ० अपशब्द, अपपाठ, अपकीर्ति. २ अभाव. उ० अपयश, अपमान. ३ वियोग, उ० अपभय, अपकरुण. ४ विरोध. उ० अपसव्य. [सं.]

अप—न. पाणी. [सं. अप्]

अपक(ख)रा—पु. १ करवलीच्या हातांत असलेलें (मडकें) भांडें त्यास करा म्हणतात; त्यांत पाणी असतें म्हणून अपकरा. [सं. अप्+करा; आपस्कर?] २ अपकारा; पाण्याची झारी. 'जिल्हइदार अपकरे वाटतें आज चरकीं धरिले। बिब दिसे कलशांत शुद्ध अवयव शरिरावरले।' –प्रला ११९. ३ पूंजेला पाणी घेण्याचें लहान भांडें. [फा. अबखुरा; तुल० सं. अप्+करक=करा, भांडें किंवा अपस्कर=गाडीची साटी बैठक. सं. आपस्कार=अग्र, मूळ, बैठक]

अपकर्ष-ण—पुन. १ खालीं ओढणें; मागें ओढणें. २ कमीपणा येणें; हीनपणा येणें; अपमान–अप्रतिष्ठा होणें; हीनस्थितीस पोंचणें; न्यूनता; ऱ्हास; अवनति. ३ वेळेपूर्वीच, अगोदर करणें (धर्मकृत्य). ४ (काव्य) पुढें येणाऱ्या एकाया शब्दाचा अगोदरच अध्याहार करून एकाया ओळीचा किंवा श्लोकाचा अर्थ पूर्ण करणें. ५ (संगीत) विकर्षण पहा. [सं. अप+कृष्]

अपकर्षक—वि. हीनता आणणारा; अपकर्ष करणारा. [सं.]

अपकर्षणें—उक्रि. १ हीनता आणणें. २ मागें घेणें, ओढणें. ३ अर्थ लावण्याकरितां पुढील शब्द मागें घेणें. अपकर्ष पहा.

अपका—पु. हपका; हातानें केलेला पाण्याचा जोरानें मारा; **छिडकाव**; (पाणी दूध, शिंपडणें, इ.) जोरानें मारणें. (क्रि० टाकणें, देणें, मारणें). [ध्व. किंवा सं. अप्]

अपकार—पु. १ इजा; नुकसान; दुःख; उपद्रव; रोग. 'उपकाराची फेड अपकारानें करूं नये.' २ नुकसान, दुखापत वगैरे करण्याची क्रिया. ३ गुन्हा; अन्याय; दोष. 'जी भृगूचा कैसा अपकारु।' –ज्ञा १६.२६. [सं. अप+कृ]

अपकारक-कारी-कारीक—वि. अपकार करणारा; इजा, नुकसान करणारा–देणारा; त्रासदायक; उपद्रवी. 'परीं तेथींची नवलपरी। अपकाऱ्या होय उपकारी।' –एभा १७.१०८.

अपकीर्ति—स्त्री. (विप्र. अपकीर्त) १ निंदा; अपमान; मानहानि. २ दुष्कीर्ति; दुर्लौकिक; बदनामी; बदलौकिक. [सं. अप+कीर्ति]

अपकृति—अपकार पहा.

अपकृत्य—पु. १ (कायदा) कायद्यानें घालून दिलेला नियम मोडला म्हणून नुकसान भरपाईदाखल कोणातरी व्यक्तीला त्याकरितां कोर्टांत फिर्याद आणतां येते असा विशिष्ट गुन्हा; इं. टॉर्ट. २ दुष्कृत्य; विघातक कृत्य. 'किचनेर यांनीं लष्करी खर्च वाढविला काय आणि कर्झन साहेबांनीं तिबेट मिशनमध्यें पैसे ओतले काय, हिंदुस्थानांतील लोकांच्या दृष्टीनें दोन्हींहि एकसारखींच अपकृत्यें आहेत.' –टि २.५९७. [सं. अप+कृ]

अपकृष्ट—वि. १ खालीं ओढलेला; अवनत; अपकर्ष पहा. २ नियमित; ठराविक कालापूर्वी केलेलें. ३ मंत्रसाहाय्यानें खेंचून आणलेला. ४ नीच; हलका; दुष्ट; अधम. [सं. अप+कृष्]

अपंक्त—वि. (प्र. अपांक्त) पंक्तींतून–जातींतून बाहेर टाकलेला; वाळींत टाकलेला; जातिबाह्य; बहिष्कृत. [सं. अ+पंक्ति]

अपक्रम—पु. १ उलटा क्रम; व्युत्क्रम; (ल.) उलथापालथ; अव्यवस्था. २ अतिक्रम; ठरून जाणें; निघून जाणें. ३ (ज्यो.) क्रांति; अपम (तारे, नक्षत्र इ० चा). [सं. अप+क्रम्=पलीकडे जाणें]

अपक्रमण—अपक्रम पहा.

अपक्रांत—वि. निघून गेलेला; ढळलेला; उलटून गेलेला. [सं.] **०आकाशचारी**–(नृत्य) कुंचित पाय करून गुडघा वक्षस्थळाइतका वर नेणें व दुसरा पाय उद्घटित करणें. **०करण**–(नृत्य) पाय मांडीकडे वळवून वक्षःस्थळाइतका उंच करणें, दुसरा पाय उद्घटित करणें.

अपक्रिया—स्त्री. १ दुष्कृत्य; वाईट काम. २ (कायदा) मालकाचें नुकसान व्हावें या इरादानें त्याच्या मालाची नुकसानी–खराबी करणें. इं. मिश्चिफ. [सं. अप+कृ]

अपक्व—वि. १ कच्चा; हिरवा; न पिकलेला (फळ). २ न शिजलेला; अशिजा; कच्चा; अर्धवट (भात, स्वयंपाक वगैरे). ३ अननुभविक; कच्चा; अडाणी; कोरा. [सं. अ+पच्=शिजणें; पिकणें]

अपखडी—स्त्री. निंदा. [सं. अप+अक्षर?]

अपख्यात-ती—स्त्री. अपकीर्ति. 'दयाधर्म सत्कीर्ति लोटुनि पाये । सखी जोडली म्यां अपख्यात माये।' –मुरामा २.८७. [सं. अप+ख्या]

अपंग—वि. स्वतःचीं कामें स्वतः करावयाला असमर्थ; विकलांग; व्यंग असलेला; लुळा, अंधळा, पांगळा इ०. 'मी तो अपंग अनाथ । तूं तो अनाथाचा नाथ।' [सं. अप+अंग]

अपंगणें—उक्रि. (प्र. आपंगणें) १ संभाळणें; वाढविणें; पालन पोषण करणें; आश्रय देणें; जवळ करणें. 'वैभवहीन जाल्यां अपंगी कोण।' –दावि ७८. 'दिनबंधु दिनानाथा। पाहिजे अपंगीले।' –देप ५. २ स्वीकारणें. 'गति रीति कैसी अपंगिती। सज्जनाची स्थिति न कळे हो कवणासी।' –दावि २३०. आपंगणें पहा.

अपंगत—वि. १ दूर केलेला, गेलेला. २ वियुक्त; विभक्त. [सं. अप+गत]

अपंगिता—वि. आश्रयदाता; संभाळणारा; पोसणारा; पोषिंदा; आपंगिता पहा.

अपंगिस्त—वि. परावलंबी नाहीं असा; स्वतंत्र. 'जें जें विषयांचें सुख। तें तें इंद्रियपंगिस्त देख। अपंगिस्त भक्तिसुख। सभाग्य लोक पावती॥' –एभा १४.२१७. [सं. आत्म–आप+अंग किंवा अ+पंगु]

अपघात—पु. १ मरणास कारण होणारी आकस्मिक गोष्ट; (सर्पदंश, पाण्यांत बुडणें, इ०). २ आकस्मिक मरण (वरील रीतीनें आलेलें); अकालीं मरण. 'मग प्रसन्न होऊनि रुक्मिणीकांत। चुकविला काळाचा अ०॥' ३ अपघाताची आगा. 'त्या कृशाचा करी निःपात। तरीच ब्राह्मणाचा होसी भक्त। नातरी करी अपघात। तुजवरी देवा।' –कथा २.३.४१. [सं. अप+हन्]

अपघाती—वि. हट्टी; अडदांड; धाडसी; साहसी. [सं.]

अपघातीं—क्रिवि. आकस्मिक; अकस्मात्; एकाएकीं.

अपचय—पु. ऱ्हास; तोटा; अवनति; क्षय; नाश. [सं. अप+ची=गोळा करणें]

अपचार—पु. १ अपथ्य आहार; कुपथ्य. २ वांकडा मार्ग; दुर्वर्तन; कुमार्ग. ३ उपद्रव; पीडा. [सं. अप+चर्]

अपची—स्त्री. गंडमाळा रोग. [सं.]

अपंचीकृत—वि. (पंचमहाभूतांपैकीं प्रत्येक सूक्ष्मभूत) वेगवेगळीं; अमिश्रित. 'विषय तेंचि महाभूतें। तामस प्रसवला अपंची कृतें।' –एभा २४.१२३. [सं. अ+पंच+कृ]

अपच्छाया—स्त्री. १ अशुभ छाया. २ पिशाच; भूत. [सं.]

अपजय—पु. पराजय; पराभव. [सं.]

अपजणें—अक्रि. उपजणें; उत्पन्न होणें. 'कीळेंचें पांघुरण। रत्ना उ(अ)पजवी कोण।' –अमृ ७.१६६. [उपजणें अप.]

अपजा(ळ)ळ—न. आळ; खोटा आरोप. (क्रि० घालणें, घेणें, टाकणें). 'जो तुझें करील मुखावलोकन। त्यावरी येती अपजाळ।' –ह २५.१४३. [सं. अप+जाल]

अपट—पु. पडदा; आडोसा; अडभित. 'तें रौरव गा तंववेरि। आइकिजति गा अपटांतरीं।' –राज्ञा १६.४२५. [सं. अपटी=पडदा, कनात.]

अपटचापट—स्त्री. (परस्परांच्या खेळांत) पत्ते पिसणें. [अपडणें+चापटणें]

अपटणें—उक्रि. १ आदळणें; पाडणें; जोरानें टाकणें, पडणें; फोडणें; एकदम पुष्कळ वस्तू जोरानें खालीं पडणें. 'धाडधाड माणसें अपटतात.' २ मारणें; हाणणें; हाणमार करणें. ३ (ल.) वादांत पराजय करणें; हरविणें. ४ खालीं येणें; आपला हट्ट सोडणें; दुसऱ्याचें म्हणणें (अटी) कबूल करणें; वादांत हरणें. ५ (बे.) खेदणें; शिवणें; स्पर्श करणें. [सं. आपतन; प्रा. आपड]. **आपटोंच अपटणें**–(ल.) एकादी गोष्ट दुसऱ्यानें विनविलें असतांहि न करणें पण ती मग स्वतः होऊन करणें. **म्हण०** कोण्ही अपटला पोर कोण्ही अपटला भोपळा=एकानें एक मूर्खपणाची गोष्ट केली म्हणून दुसऱ्यानेंहि दुसरी वरचढ मूर्खपणाची गोष्ट करणें. **लठ अपटणें**–(आपल्या शत्रूवर सूड उगविण्याच्या दृष्टीनें) हातांतील काठी, सोटा वगैरे अपटणें.

अपटणें धोपटणें—उक्रि. जोरानें ठोकणें; आदळआपट करणें; निष्ठुरपणें मारणें. [अपटणें]

अपटधोपट, अपटाआपट–टी, अपटा धोपट–टी—स्त्री. जोरानें, आवेशानें मारणें; आदळआपट; हाणमार. [अपटणें]

अपटधोपट, अपटूनधोपटून—क्रिवि. जोरानें मारून ठोकून; बळजबरीनें. [अपटणें]

अपटफुटी—स्त्री. एक झुडुप; झाडरूं.

अपटबार—पु. अपटून आवाज काढण्याचा एक फटाका. [अपटणें]

अपटा—पु. एक झाड. दसऱ्याच्या दिवशीं शमी नसल्यास याची पूजा करून पानें सोनें म्हणून इष्ट मित्रांस देतात. पानें कांचनाच्यापेक्षां जाड व मोठीं पानांच्या विड्या करतात. यास लांब शेंगा येतात; अंतरसालीचे बंदुकीचे तांडे करतात व दोर करतात. –वगु १.४१. (सं. नांव अश्मंतक.)

अपटांतर—वि. १ मध्यें पडदा नसलेला; आड नसलेला. (ल.) प्रत्यक्ष; जवळचा. २ पडद्यामागें; आड. अपट पहा. [सं. अ+पट+अंतर; अपटी+अंतर]

अपटी—स्त्री. १ धक्का; संकट; दुर्दशा; (व्यापारांत) नुकसान; तोटा; बूड. २ (व.) रस्त्यांतील चाकोरीवर पावसाळ्यांत पडलेल्या खड्यावरून जातांना गाडीचें आपटणें, (सामा.) पडणें; ठेचकाळणें. (क्रि० खाणें). [अपटणें. सं. आपत्; प्रा. आपड] **०देणें**–गोत्यांत आणणें; खोडी काढणें. 'कठिण काल मज प्राप्त जाहला, कपटी हरिनें अपटी दिधली।' –अमृत ३८.

अपटुडेट—वि. १ आजतागायत २ (ल.) पूर्ण सुधारलेला; अगदीं फॅशनेबल. 'त्याची राहणी अ० आहे.' ३ चोख; अगदीं व्यवस्थेशीर; टापटिपीचा. [इं. अप्=पर्यंत+टुडेट=आजदिवस].

अपड—स्त्री. हट्ट; पड न घेणें; ओढून धरणें. 'तव बोलिलें दैत्यविभांडें। आतां उसीरूं होइलु अपडें॥'–शिशु १८५. [अ+पड]

अपंडित—पु. अविद्वान्; न शिकलेला. [सं.]

अपढंगीपणा—पु. वाईट वर्तणूक, चाल. [अप+ढंग]

अपण—आपण पहा.

अपतर—वि. (व.) खोडकर; अचपळ. ' मुलगा मोठा अपतर आहे. ' अतर पहा. [अर. अब्तर=बिघाड]

अपतिव्रता—स्त्री. पतिव्रता नव्हे अशी; व्यभिचारी स्त्री; पतीशीं वेइमान, बेमुर्वतखोर स्त्री; पतीची आज्ञा न पाळणारी स्त्री. ' अपतिव्रता मुसळदेवता । ' [सं.]

अपत्नीक—वि. पत्नीविरहित (पुरुष); विधुर; कुमार. (ल.) एकटा. [सं.]

अपत्य—न. १ मूल; संतान (पुत्र किंवा कन्या); संतति. 'जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ॥ ' –ज्ञा १.६४. २ वडील माणसास (विशेषतः मातापितरांस) लिहितांना स्वत.स वापरावयाचा शब्द. ' अपत्यें (बालकें) वामनाचा शिरसाष्टांग नमस्कार. ' ०**वाचक**–वि. (व्या.) मातापित्याच्या किंवा एकाद्या पूर्वजाच्या नांवावरून पडलेलें; वांशिक (वंश) नाम. उ० कौशिक, भार्गव, कौंतेय, पार्थे, राघव. इ०. ०**विक्रय**–पु. मुलाची विक्री (एक महापातक). [सं. अ+पत्]

अपत्रपा—स्त्री. १ लाज; भीड; मर्यादा; संकोच. २ गोंधळ; लाज; शरम. (अपराध उघडकीस आल्यामुळें वाटणारी). ' हें कटक सोड तिकडे चाल तुझ्या हरुनि गोधना खळ तो । प्राणत्राणपरायण जिकडे निरपत्रपापरणी पळतो । ' –मोविराट ४.८०. (क्रि० पावणें येणें). [सं. अप+त्रप्=लाजणें]

अपथ—पु. १ पाखंड; कुमार्ग. २ अनियमितपणा; रूढमार्गाविरुद्ध आचरण; रीतीवेगळें-बाहेरचें वर्तन. [सं. अ+पथ]. ०**गमन–वर्तन–संचार**–पु. १ पाखंडमार्ग. २ नियमांविरुद्ध, अशिष्ट वर्तन; दुराचरण; वाईट वर्तन. ०**गामी–चारी–वर्ती**–वि. १ पाखंडी; धर्मबाह्य आचरणाचा. २ नियम, रूढी न मानणारा; दुराचारी; कुमार्गी.

अपथ्य—न. १ अयोग्य, अपायकारक, रोग्याला वर्ज्य (तेलकट, तिखट असें) अन्न–पदार्थ; कुपथ्य. ' अपथ्यरुचिहरण तो कटुक ओखदें कोण पी । ' –केका ८९. २ पथ्याला, नियमांना सोडून वागणूक; नियमच्युति. ३ (ल.) अहित; अकल्याण; अमंगल.–वि. अहितकारक; अशुभ; इजा करणारें; न सोसणारें, वर्ज्य (अन्न किंवा वागणूक). [सं.] ०**शील**–वि. पथ्य न करणारा. ' जरी अपथ्यशीळा व्याधी । कळे साधूसी दुजेनाची बुद्धि ।' –ज्ञा ७.९३.

अपदागिरी–गीर—अबदागिरी पहा.

अपदार्थ—पु. (तर्क.) नास्तित्व; अभाव; अविद्यमानता. [सं.]

अपदेवता—स्त्री. दुष्ट देवता; राक्षस, पिशाच, इ०. [सं.]

अपदेश—पु. १ सबब; मिष; सोंग. २ तोड; युक्ति; बेत. ३ गुप्त वेश, छद्मवेश, कपटरूप. [सं.]

अपधाक—पु. १ आकस्मिक भीति; एकाएकीं मनावर होणारा भीतीचा परिणाम; धडकी; धसका. ' अपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें ।' –दा ५.९.४३. २ आपलीच आपल्याला वाटणारी भीति. ' तीं अपधाकानीं अर्धमेलीं झालीं. ' –बालमित्र १.१. ७०.८०. [आप=आपला किंवा अप= अकस्मात् वाटणारा, अंकोली+धाक=भीति]

अपधाकणें—अक्रि. भीति वाटणें; भिणें; घाबरणें; हाय घेणें धसका बसणें. [अपधाक]

अपनयन—न. डोळे पुसणें; समाधान करणें; सांत्वन करणें. [सं. अप+नयन]

अपनयन—न. अपहार; अन्यायें. [सं. अप+नी]

अपन्यास—पु. (संगीत) रागालापांत ज्या स्वरावर मध्यंतरीं विश्रांति घेतात तो स्वर. [सं.]

अपन्हव—पु. (प्र.) अपह्नव पहा.

अपन्हुति—स्त्री. (प्र.) अपह्नुति पहा.

अपपर—आपपर पहा.

अपपाठ—पु. चुकींचा पाठ: अशुद्ध पाठ (ग्रंथादिकांतील); चुकीचा शब्द, तऱ्हा, सरणी. [सं.]

अपप्रयोग—पु. शब्दाचा अशुद्ध प्रयोग, दुरुपयोग; (एक भाषादोष). [सं.]

अपबळ—अ. आपण होऊन; स्वतः होऊन. ' छपन देशिचे गुणीजन येती या जागीं अपबळ । ' –होला १८४. [सं. आत्मन्–आप+बळ]

अपभवन—न. (शाप.) प्रकाशकिरण वंगेरे सरळ रेषेपासून च्युत होणें. इं. डिफ्लेक्शन. [सं.]

अपभाषण—न. वाईट भाषण; शिवीगाळ; निंदा; दुर्भाषण; दुरुक्ति; अपशब्द. [सं.]

अपभाषा—स्त्री. मूळ भाषेची अपभ्रष्ट झालेली भाषा; अशुद्ध, गांवढळ भाषा. अपभ्रंश पहा. [सं.]

अपभ्रंश—पु. १ मूळ भाषेंतील शब्द इतर भाषेंत आल्यामुळें झालेली विकृति किंवा रूपांतर. उ० सं. गृह–म. घर; सं. अक्षयतृतीया म. अखेती इ०. २ दूषित होणें; अशुध्द स्वरूप प्राप्त होणें; भ्रष्ट होणें. (ल.) विकार; नाश; हानि. –स्त्री.–एक प्राकृत भाषा. (ही मूळ संस्कृत भाषेपासून अपभ्रष्ट झाली म्हणून हें नांव). –वि. भ्रष्ट करणारा; अधोगतीला नेणारा; मुकविणारा; विघ्नकारी. ' हे असतिये कीर्तीसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु । ' –ज्ञा २.२०. ' म्हणुनि हा अपभ्रंशु । विषयसंगु ॥ ' –ज्ञा २.११८. [सं.]

अपभ्रष्ट—वि. १ अपभ्रंश–अशुध्द रूप पावलेला. २ नष्ट; अधोगतीस पोंचलेला; दुराचारी; हीन. [सं.]

अपम—पु. (ज्यो.) कांति; अपक्रम पहा.

अपमान—पु. अनादर; मानभंग; मानखंडणा; अप्रतिष्ठा; तेजोभंग; पाणउतारा; बेअब्रू. [सं.] **०गिळणें**–पाणउतारा, अपमान सहन करणें. 'सायमनसप्तकापुढें व त्याच्या अपमानगिळ्ह सहकाऱ्यांपुढें कोणीहि स्वाभिमानी मनुष्य पुराचा देणार नाहीं.' –अभ्युदय पत्र ३१–१०–१९२८. [सं.]

अपमानणें—अक्रि. अपमान– मानखंडणा, अनादर करणें; धिक्कारणें. 'तुझें महिमानु कवण जाणें ॥ जेगें एके शक्तीचेनि गुणें। ब्रह्मा अपमानिला ॥' –दावि ३४९. [अपमान]

अपमानित—वि. अपमान केलेला; धिक्कारलेला. [अपमान]

अपमृत्यु—पु. १ जिवावरचें दुखणें; (सर्पदंश वगैरे) गंडांतर; फार मोठें संकट. 'हा 'पोर विहिरींत पडला, आगींत पडून भाजला परंतु याचे दोन्ही अपमृत्यु टळले.' रूढ० अपमृत्यूचा एखाद वेळ महामृत्यु होतो. २ आकस्मिक मृत्यु; अपघात; अकालीं मृत्यु (क्रि० चुकणें–निवारणें. टळणें–येणें). [सं.]

अपयश—न. (विप्र. अपेश). पराजय; कार्यनाश; अपकीर्ति. **०स्कर**–वि. अपमानकारक; लाजिरवाणा; इज्जतखाऊ.–**चा धनी**–पु.–**चें खापर फुटणें**–दुसऱ्याच्या चुकीकरितां स्वतःवर दोषारोप येणें; दुसऱ्याच्या चुकीकरितां प्रायश्चित्त भोगणें. [सं. अप+यशस्]

अपयशी—वि. दुर्दैवी; अयशस्वी; मंदभाग्य; कपाळकरंटा. 'तो जन्मोजन्मीं अपयशी। यश कधीं न ये तयाशी ॥'

अपर—वि. १ दुसरा; द्वितीय; अन्य. 'सुंदर तरी अपर मदन। क्रोधी तरी यमासमान।'–जै २३.४. २ (ल.) अतुल. ३ (समासांत) दूरचा; पुढील; मागचा; पलीकडचा; उ० अपरार्ध (दुसरा, पुढला अर्धे), अपरात्र (उत्तररात्र), अपराण्ह–दिवसाचा उत्तरार्ध, दोनप्रहरानंतरचा, पूर्वापर (पहिला व दुसरा) इ०. ४ पश्चिमेचा. 'कां पूर्वापर सरिता। भिन्न दिसली पाहतां।'–ज्ञा ३.३९. [सं.]

अपरत्र—क्रिवि. दुसरीकडे. 'एकत्र केशव वसे अपरत्र वैरी।' –नीतिश्लोक १८. [सं. अपर+त्र]

अपरपर्याय—पु. प्रतिशब्द; तद्वाचक दुसरा शब्द. उ० उदक–याचा अ० जल. [सं.]

अपरपक्ष—पु. १ दुसरा पंधरवडा; वद्यपक्ष. २ खटल्यांतील दुसरी बाजू; प्रतिवादी; सामनेवाला. ३ पितृपक्ष. भाद्रपद वद्य पक्ष; पितृपंधरवडा. 'आला विप्र महाधनी। अपरपक्ष करणें मनीं।' –गुच ३६ २२. [सं.]

अपरपाठ—पु. दुसरा पाठ; इतर पाठ. [सं.]

अपरंपार—वि. अनंत; अमर्याद; असंख्य; अफाट; अगणित (शक्ति, गुण, बुद्धि, पराक्रम, महत्त्व वगैरे). [सं. अ+पर+पार]

अपरमात–वाद—पु. ठपका; बोल; आरोप; मिथ्यादोष; अन्यथा गोष्ट; आळ. 'धुंडी०:–हा माझ्यावर निव्वळ अपरमात आहे.' –भा ७५. [सं. अपर+मात–वाद]

अपरमाय—स्त्री. दुसरी आई; श्रेष्ठ माता. 'जय जय देवी सर्वगे। सत्त्वश्रिया श्रीरंगे। सर्वातीत निसंगसंगे। अपरमाय तूं।' –स्वादि १.४.५. [सं. अपर=अन्य, सर्वश्रेष्ठ+म. माय=माता]

अपरव—पु. १ मालमत्तेसंबंधीं भांडण. २ (सामा.) भांडण; कज्जा; तंटा; बखेडा. [सं. अप+रव]. –वि. निर्विवाद; हक्कशाबीत (मालमत्ता, वारसा) –मोको. [सं. अपगत+रव]

अपरवड–डी—स्त्री. १ क्रम सोडणें; बिगर रीत; पद्धत नसणें, सोडणें; विरूढि. २ (काव्य) विलक्षणपणा; तऱ्हेवाईकपणा; वैचित्र्य; असामान्यपणा; नवलाई. (क्रि० वाटणें, होणें). ३ अन्याय; गैररीत. 'परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोडी। तरी कां अपरवडी। आणावी आंगा ॥'–ज्ञा १८.९४२. ४ अपकीर्ति; गैर चाल; गैरवर्तणूक; आगळीक. 'युष्मीं खांडमिशा बोडी। हे अपरवडी तुवां केली।'–एरुस्व १३.११. ५ भटकणें; मार्ग सोडून जाणें. 'वेषधारी वृथा मुंडी। त्यांचे संगतीची अति गोडी। जेथ अपरवडी विधिवेदां ॥'–एभा १३.१२१. [सं. अ+परिपाठ–ठि; प्रा. अ+परिवाडि]

अपरवय—न. वृध्दापकाळ. 'अपरवय होतां काळें। पति तुझा यती होईल ॥'–गुच १३.५४. [सं. अपर+वयस्]

अपरवाद—पु. ठपका. अपरमात पहा.

अपरवासी—वि. (व.) विटाळशी; रजस्वला; अस्पर्शे. 'आई अपरवासी असल्यामुळें स्वयंपाक करावा लागला.' [अपर+वास?]

अपरसूर्य—पु. सूर्यासारखा; दुसरा सूर्यच. (ल.) अत्यंत विद्वान, तेजस्वी ब्राह्मण; दैदीप्यमान तारा इ० [सं. अपर+सूर्य]

अपरस्वस्तिक—न. (ज्यो.) क्षितिजावरील पश्चिम दिग्बिंदु. [सं.]

अपरा—वि. कनिष्ठ प्रतीची. 'ही अपरा म्हणजे खालच्या प्रतीची (प्रकृति) झाली.'–गीर ७१५. अपर पहा. [सं. अपरा]

अपरा—वि. आपुरा; अखूड. उ० अपरें नाक, अपरा अंगरखा. [सं. अ+पूर्; प्रा. अ+पूर; म. अपुरा]

अपराजित—वि. अजिंक्य. 'सात्यकि अपराजितु'–ज्ञा १.१५२. **०अंगहार**–पु. (नृत्य) दंडपाद करून उजवा हात **इकडे** तिकडे फेंकणें, नंतर व्यसितकरण करून त्यांतील डावा हात व डावा पाय पुढें पसरणें; मग दोन वेळ निकुट्टित करून आक्षिप्त उरोमंडल, करिहस्त व कटिच्छिन्न हीं क्रमानें करणें. [सं.]

अपराजिता—स्त्री १ (विजयादशमीस जिची पूजा करतात ती) दुर्गा देवी. २ जमीनीवर पसरणारी एक वेली; दूर्वा; शेफालिका, जयंती, विष्णुकांता, शमी वगैरे वनस्पति. ३ ईशान्य दिशा. ४ एक अक्षरगण, समवृत. यांत प्रत्येक पादांत १४ अक्षरें असतात. उ० 'धनयश मिळण्या त्यजूं निज तत्त्व मी?। स्वहृदयमणि तो न कांहीं मला कमी ॥'–छंर ३३. [सं.]

अपराण्ह—पु. १ दिवसाच्या १९–२४ किंवा २१–२५ या घटका; दिवसाच्या पांच भागांपैकीं चौथा भाग; किंवा दिवसाचे दोन भाग केले असतां दुसरा, तीन भाग केले असतां तिसरा भाग. २ तिसरा प्रहर. [सं. अपर + अहन्]

अपरात्र—स्त्री. अपरात्र; उत्तररात्र; मध्यरात्रीनंतरचा काल; रात्रीचा शेवट. [सं. अपर+रात्रि]

अपरांत—पु. कोंकण देश. [सं.]

अपराद्—पु. (गो.) अपराध (अप.)

अपराध—पु. १ दोष; चुकी; अन्याय; अतिक्रमण: गुन्हा; अधर्माचरण; दुर्वर्तन. २ (कायदा) कायद्यानें शिक्षा सांगितलेलें एकादें कृत्य, किंवा अकृत्य (कर्तव्याकरण, हयगय). (क्रि० करणें). **०पोटांत घालणें**–अपराधाबद्दल क्षमा करणें. 'अपराध सर्व माझे घाली पोटांत जोड मज दे ही. पावे सरी सुराशीं, मर्त्यहि दावुनि दया समज देही ॥.' 'मागां अपराधा केले क्षमा' –मुसभा ७.२. [सं.]

अपराधी—वि. दोषी; गुन्हेगार. [सं.]

अपरापरी—स्त्री. १ दुर्दशा; वाताहत. 'एके घरीं कोणी कोणासी न धरी। ऐसी अपरापरी केली आम्हां।' –तुगा ४०७८. [सं. अपरापरण=निःसंतान] २ परकेपणा. [अपर द्वि.]

अपरिग्रह—पु. १ परिवारशून्यत्व. २ उपाधिरहित्य. उपाधि जवळ न बाळगणें; कोणत्याहि वस्तूचा स्वीकार न करणें. 'साधूची अपरिग्रहता। परिग्रहो नातळे चित्ता।' –एभा ११.९०१. ३ असंचय; दारिद्र्य; निर्धनता; अकिंचनत्व. [सं.]

अपरिग्रही—वि. संग्ररहित; परिवार नसलेला. 'सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं। तोचि म्हणऊनि ॥.' –ज्ञा ६.१०६. [सं.]

अपरिचित—वि. ओळख नसलेला; अनोळखी. [सं.]

अपरिच्छिन्न—वि. क्रिवि. अखंड; सतत; एकसारखा. [सं.]

अपरिणीत—वि. (अप. रूपें–अपर्णीत–णित). अविवाहित; लग्न न झालेला. [सं.]

अपरितुष्ट—वि. असंतुष्ट; असमाधानी; अतृप्त. [सं. अ + परि+तुष्]

अपरितोख—पु. असंतोष. 'तरी तेथिंचेनि अपरितोखें। क्षोभावें ना।' –ज्ञा २.२६९. [सं. अपरितोष]

अपरिमित—वि. १ अतिशय; अगणित; असंख्य. २ अनियमित; अमर्यादित; अचाट; अवाढव्य. 'हा किळा अपरिमित मोठा आहे.' ३ वाजवीपेक्षां अधिक; फाजील. 'जितक्यास तितकें बोलावें, उगीच अपरिमित बोलूं नये.' [सं.]

अपरिहर—वि. टाळण्यास अशक्य; अपरिहार्य. 'जे जन्ममृत्यु हे पाहीं। अपरिहर।' –ज्ञा २.१५८. [अ+परिहार्य]

अपरिहार्य—वि. अनिवार्य; न टाळतां येणारें; परिहार करण्यास अशक्य; अपरिहर; (ल.) असाध्य; अलंघ्य. [सं.]

अपरीति—स्त्री. गैरशिस्त वर्तन; वांकडा मार्ग–रीत–चाल. [सं. अप+रीति]

अपरीक्षित—वि. न तपासलेलें; न सिद्ध केलेलें; परीक्षा न केलेलें. [सं.]

अपरुख—क्रिवि. (गो.) अपरोक्ष; अभावीं. [सं. अ+पर+अक्षि–अपरोक्ष]

अपरूप–च–भ—वि. विचित्र; चमत्कारिक; विलक्षण; अद्भुत. 'अपरूप होये ब्रह्मादिका।'–दावि ८७. [वैदिक सं. अप+रूप=कौतुक, आश्चर्य, आनंद; किंवा सं. अपूर्व]. २ दुर्मिळतेमुळें महत्त्व आलेलें; मौल्यवान; दुसऱ्या ऋतूंत उत्पन्न होणारें पण सांप्रत मिळालेलें. 'हें फळ या सांत अपरूप आहे.' [सं. अप+ऋतु–अपर्तु–अपरुक–अपरूप]. ३ (ल.) (कर्ना.) दुर्लभ; दुष्प्राप्य. 'देशावर फणसपोळी हा जिन्नस फारच अपरूप आहे.' (ल.) मुष्कील; मोताद; पारखा. 'अन्नाला अपरूप झाला.' ४ (ल.) (व.) प्रिय; आवडतें. 'त्याला केळ मोठें अपरूप आहे.' ५ अपूर्व. 'प्रभाकर गाई बुट। अपरूप अनुसुट। प्रला ११२. [सं. अपूर्व]. ६ कुरूप; बेढब; बेडौल. [सं. अप+रूप]

अपरूपमेवा—पु. १ दुर्मिळ खाद्य. २ (ल.) स्वतःचें मूल; अपत्य. [सं. अपूर्व+फा. मेवा=फळ]

अपरूपाई–बाई–भाई–वाई—स्त्री. १ दुर्मिळता; अपूर्वायी; नवलाई; उत्कृष्टता; बहुमोलपणा. २ दुर्मिळतेमुळें आलेलें महत्त्व. ३ अत्यंत, चळ लागल्यासारखें प्रेम; अपरूप पहा.

अपरोध—पु. १ (कों.) अवरोध; विरोध; अडथळा. २ लाजाळूपणा; विनय; संकोच; मर्यादा. [सं. अप+रोध]

अपरोधणें—अक्रि. १ विरोध होणें. २ लज्जित होणें; थोडेसें गोंधळणें; संकोचणें. [सं.]

अपरोक्ष—वि. दृष्टीआड नव्हे, अदृश्य नव्हे असा; दृश्य; दृग्गोचर. –क्रिवि. १ (चुकीनें पण रूढ) गैरहजेरींत; पाठीमागें; दृष्टीआड. 'तो माझ्या अपरोक्ष माझी निंदा करतो.' २ साक्षात्; समक्ष; प्रत्यक्ष. 'ज्यासि अपरोक्ष पूर्णशांति। तो सद्गुरु मूर्ति निश्चयें राया।' –एभा ३.३१५. **०बोध**–पु. प्रत्यक्ष ज्ञान; अपरोक्षानुभूति. 'स्वप्नीचें दरिद्र समर्थता। जेवीं मिथ्या दोनी जागतां। तेवीं द्वंद्वबाधेची वार्ता। न बाधे गुरुभक्तां अपरोक्षबोधें ॥.' –एभा ३.४७१. **०स्थिति**–स्त्री. साक्षात्कार. 'प्राप्ती म्हणजे अपरोक्षस्थिति। भगवंत स्फूर्ती अनिवार।' –एभा २.६०९. **०ज्ञान**–न. १ प्रत्यक्ष ज्ञान; साक्षात्कारपूर्वक ज्ञान. २ आत्म्यासंबंधीं किंवा ईश्वरासंबंधीं ज्ञान; आत्मज्ञान–प्रतीति. 'अपरोक्षज्ञान प्राप्त। सद्गुरुवांचोनि न घडे।' –ह १.५६. [सं. अ+पर+अक्षिन्]

अपरोक्षानुभव—पु. ब्रह्मसाक्षात्कार. [सं.]

अपर्याप्त—वि. अमर्यादित; अफाट; अगणित. –गीर ६०४. [सं. अ+पर्याप्त]

अपलक्षण—अवलक्षण पहा.

अपला—आपला पहा.

अपलाण-णी—वि. अपलाणी; खोगीर न घातलेला (घोडा). [अ+पल्याण–णी. फा. पलान=खोगीर]

अपलाद—अफलाद पहा.

अपलाप—पु. १ सत्य लपविणें–टाळणें; सत्यगोपन. २ अज्ञानप्रदर्शन, उडवाउडवी; विपर्यास. 'ह्या रीतीनें कांहीं सत्याचा अपलाप करून कॅबिनेटचा कारभार सुरळीत चालवावा लागतो.' –इंमु ३५२. छेकापन्हुति पहा. [सं. अप+लप्]

अपलाला-ले, अपल्याअपण—आपलाला वगैरे पहा.

अपवर्ग—पु. मोक्ष; चार पुरुषार्थांपैकीं चवथा; मुक्ति. 'जया चिए गांविचा मागुं । चुके साधनाचा वर्गु । तो देआवेया अपवर्गु । घांवे घरोघरीं ।' –ऋ ७७. [सं.]

अपवर्त—पु. १ संक्षेप देणें; काढून टाकणें. २ (अंकगणित) सामान्य–साधारण भाजक. [सं. अप+वृत्]. ०क–पु. वि. ज्यानें संक्षेप दिल्यांत येतो तो अंक, संक्षेपक.

अपवर्तन—न. (अंकगणित) १ सामान्य भाजकानें भागणें; संक्षेप देणें. २ संक्षेप देऊन आलेलें रूप. उ० भाज्य ६४ व भाजक ४०. तेव्हां अपवर्तक ८ नें अपवर्तन करून ८ (भाज्य) व ५ भाजक) अशा लघुभूत राशी होतील. [सं.]

अपवाड—पु. बोलण्यास असमर्थता; अकथनीयत्व. 'वाचेसि अपवाडु ।' –ज्ञा १३. ५६८. [पै. अ+प्रवाद; प्रा. अपवाड]

अपवाद—पु. १ अयोग्य, अन्यायमूलक निंदा; दोष. 'हानि लाज न देखे । परापवादु नाइके ।' –ज्ञा १३.७९१. २ आळ; ठपका. 'आतां सांगेन अपवादातें । सावधचित्तें परियेसी ।' –एभा ९.२८७. ३ नियमाविरुध्द गोष्ट; नियमास बाध. ०क,–वादी–वि. १ अपवाद, नियमन करणारें; मर्यादित करणारें (वचन; वाक्य; विधि). २ अपवाद काढणारा; निंदक; दोषी. ३ (ल.) वाईट भाषण करणारा. 'भूमीवरी मनुष्य लोक । असत्य निंदा अपवादक ।' –गुच २.६५. [सं.]

अपविद्ध—वि. १ अशुध्द; अनिर्मळ; गढूळ; अमंगळ; अस्वच्छ; घाणे रडें. २ विधिबाह्य; नीतिबाह्य; भ्रष्ट; अनैतिक; पातकी. ३ सोंवळें नव्हे तें; ओंवळें. [सं.]

अपविध(द्ध) (पुत्र)—पु. आईबापांनीं टाकलेला व तिऱ्हाइतांनीं पुत्राप्रमाणें मानलेला मुलगा. मनूनें सांगितलेल्या बारा वारसपुत्रांपैकीं एक. –मनु ९.१७१; –याज्ञ २.१३२

अपविध्द(अंगहार)—पु. (नृत्य) ह्यांत अपविद्ध, व सूचीविद्ध करणें करून हात उद्वेष्टित करणें; त्रिक फिरविणें, व मग उरोमंडल हात करून कटिछिन्नकरण करणें; ०करण–न.(नृत्य) उजवा हात शुकतुंड करून एकदां वाटोळा फिरविणें व मांडीच्या पाठीकडे लावून ठेवणें व डावा हात वक्षःस्थलावर ठेवणें. ०बाहु–पु. (नृत्य) छातीवरील बाहु तोंडासमोरून डोक्यापर्यंत नेत असतांची स्थिति. [सं.]

अपविध—अपविध्द–पुत्र पहा.

अपव्यय—पु. उधळेपणा; अतिशय खर्च; निरर्थक खर्च; उधळपट्टी; दिवाळखोरी. –यी–वि. अतिशय खर्च करणारा; उधळ्या. [सं. अप+व्यय]

अपशकुन—पु. १ अशुभ गोष्ट; दुश्चिन्ह. 'सत्यवंत म्हणे सावित्री । अपशकुन तुज देखा ।' –वसा ५९. २ अवलक्षण. [सं.]

अपशब्द—पु. १ (व्या.) अशुद्ध शब्दप्रयोग; अपप्रयोग. २ दुरुक्ति; शिवी; दुर्वचन; दुर्भाषण. ३ अशुभ, अपशकुनी शब्द, वचन. [सं.]

अपशराण-न—न. १ (कों.) आळ, तुफान (घेणें). २ वाईटपणाची जबाबदारी; अपेश; ठपका दोष. [सं. अपसरण]

अपशांच, अपशेंच, अपशां-शीं—क्रिवि. आपोआप; आपसूक; आपण होऊन; आपशांच. [सं. आत्मन्–अप+स्वयमेव]

अपशारण—पु. (गो.) विनाकारण आळ; अपशराण पहा. [सं. अपसारण]

अपशोषण—न. (शाप.) शोषण; शोषून घेणें; आत्मसात् करणें. [सं.]

अपसंत-द—वि. अप्रिय; न आवडणारें. [सं. अ+फा. पसंद]

अपसद—वि. दुष्ट; अधम. 'अश्व.–अरेरे सूतापसदा! तूं माझी निंदा करतोस काय?' –गोड. वेणीसंहार अं. ३. [सं.]

अपसया—क्रिवि. आपोआप; अपसूक; 'उसळोनि सर्पीचीं वेटाळीं। कुंडीं पडलीं अपसया।' –मुआदि. ९.४; 'अपसया सिद्धि विचित्र होत।' –दावि २६. [सं. आत्मन्–अप+स्वयम्]

अपसर, अप्सर, अफसर, अफ्सर—पु. अधिकारी. [इं. ऑफिसर. (अप.)]

अपसरण—न. १ दूर सरणें, जाणें. २ आळ; ठपका; बोल; दोष. अपशराण पहा [सं. अप+सृ=सरणें]

अपसर्प(अंगहार)—पु. (नृत्य) अपक्रांतचारी करून, उजवा हात व्यंसितकरणांतील करणें, नंतर तोच हात उद्वेष्टित करणें व अर्धसूचीकरण करणें; नंतर विक्षिप्त, कटिछिन्न, उध्दृत्त, आक्षिप्त, करिहस्त व कटिछिन्न हीं क्रमानें करणें. [सं.]

अपसव्य—वि. १ उजवा, डावा नव्हे. 'सव्य अपसव्य भोंवडी गदा'–एरुस्व. ९.४८; 'सव्यें मिनल्या महानदीसी। अपसव्यें आल्या गांवरसासी।'–एभा ११.८६२; 'पितरस्वरुपीं तूंचि जला देन। सव्य तें कवण अपसव्य।'–तुगा ३७८०. २ विरुद्ध; उलट; विपरीत. जसें, उजवीकडून डावीकडे लिहित जाणें. (फारसी ऊर्दु लिहिणें.) उजव्या खांद्यावरून जानवें घालणें (श्राद्ध इ. मध्यें) [सं.]

अपसांत—क्रिवि. आपापल्यांत (भांडणें, समजणें); आपसांत पहा.

अपसातुपसी—स्त्री. हमरीतुमरी; विरोध; वादविवाद; कल्हः भांडण. [आप(मी)+तूं]

अपसारण—न. दूर करणें; काढून टाकणें. [सं. अप+सृ]

अपसारित—वि. दूर केलेला; टाकलेला. [सं. अप+सृ]

अपसिध्दांत—पु. चुकीचा निर्णय; तर्कशास्त्रास सोडून केलेला निकाल. [सं.]

अपसु-(सू)क, अपसुख-खें—क्रिवि. आपोआप; आपल्या संतोषानें; आपण होऊन; राजीखुषीनें. [सं. आत्मसुखेन]

अपसूर—पु. (गाण्यांतील आवाज, सूर) षड्जादि स्वरांच्या मर्यादेचा भ्रंश होऊन जो भलताच स्वर निघतो तो; वर्ज्य स्वर लावणें. –वि. बेसूर; स्वरशून्य, रुक्ष. [सं. अपस्वर अप.]

अपसुऱ्या—वि. बेसूर आवाजाचा (गवई, वाद्य)

अपसूर्य—अपरसूर्य पहा.

अपसृत—वि. दूर केलेला; दूर अंतरावर गेलेला. अपसारित पहा. **०पार्श्व**—न. (नृत्य) एका पायाच्या चवड्यावर उभें राहून कटिविवृत करीत असतां वरचा सर्व भाग फिरवावा लागतो तो फिरवून पुन्हां जशाचा तसा आणण्याची क्रिया. [सं.]

अपसोस—अफसोस पहा.

अपसोशी-सी—वि. दुःख करणारा; दुःखी. [फा. अफ्सोस]

अपस्कंदित(भौमीचारी)—वि. (नृत्य) एक पाय दुसऱ्या पायापासून मागच्या बाजूस पांच ताल ओढून ठेवणें. [सं.]

अपस्नात—वि. मृत माणसाच्या उत्तरक्रियेसाठीं बरोबर गेल्यामुळें स्नान केलेला. **–स्नान**—न. १ वरील कारणामुळें करावें लागणारें स्नान. २ मृतासंबंधीं स्नान. [सं.]

अपस्मार—पु. फेंफरें; घुरें; भुरें; मिरगी; मनोवहस्रोतसांमधील दोष, काळजी व शोक इत्यादिकांनीं प्रकुपित होऊन स्मृतिनाश करून अपस्मार उत्पन्न करतात. यांत छाती धडधडणें, स्मरणशक्ति नाहींशी होणें, घाम येणें, मूर्च्छा येणें, तोंडांतून फेस वगैरे लक्षणें असतात. [सं. अप+स्मृ=स्मरण करणें.] ' अपस्मार एकां आंगीं ते भीति पाणिया लागीं । ' –गीता १३.२४९३.

अपस्मार—वि. दुष्ट, मृत्युसमान. ' पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावे । ' –दा १८.६.५. –न. (गो.) १ अपथ्य. २ अपस्मारापण. **०पण**—न. आवांक्याबाहेर काम करणें. [अप+मारण]

अपस्मरी—वि. अपस्मार रोग असलेला. [सं.]

अपस्वर—अपसूर पहा.

अपहरण—न. हिरावून घेणें; लुटणें; लुबाडणें; नागविणें. [सं.]

अपहर्ता—वि. लुटणारा; हिरावून घेणारा; लुबाडणारा. [सं.]

अपहस्तकीं, अपहस्तें—आपल्या हातें. आपहस्तक पहा. ' या ब्राह्मणाचें कार्य अपहस्तें परहस्तें होईल तितकें करावें. '

अपहार—पु. १ अन्यायानें घेणें; कपटानें संपादन करणें; लबाडीनें मिळविणें. २ अन्यायानें संपादन केलेलें द्रव्य ' आइते अपहार । आणूनियां भरी घर । ' –तुगा २९७४. ३ ज्याचें अपहरण झालें आहे त्यास होणारें दुःख. [सं. अप+हृ= हरण करणें]

अपहारक-री—अपहर्ता पहा. [सं.]

अपह्नव-अपह्नुति—पु. स्त्री. ? लपवणूक; लपविणें; दडविणें. ' करीतसें नित्य अपह्नवाला । ' –सारुह २.७४. २ एक अर्थालंकार. उपमेय उपमान असल्याचें वर्णन; उपमेय वर त्याच्या वास्तविक स्वरूपाचा अपलाप करून उपमानाचा आरोप करणें. हा अलंकार उपमेचाच एक प्रकार आहे. उ० ' नहें नभोमंडल वारिराशि । ' इ०

अपळाण-णी—अपलाण-णी पहा.

अपळें—वि. (व.) पूर्ण दिवस भरण्यापूर्वी जन्म झाल्यानें अवयवांची संपूर्ण वाढ न झालेलें (मूल). [सं. अ+पूर्ण=पूरें; प्रा. अप्पउलिय=न पिकलेलें.]

अपक्ष—वि. १ पंख नसलेला (मनुष्य, पशु इ.) २ कोणतीहि बाजू नसलेला. **०पात**—पु. १ पक्ष, बाजू, तर्फ न घेणें; कोणत्याहि बाजूचा कैवार न घेणें. २ लोकांची भीडमुर्वत न ठेवणें. [सं.]

अपक्षय—पु. ऱ्हास; उतार; उतरती कळा; क्षय; कमजोरपणा. ' चंद्रकलांची शुक्लपक्षीं वृद्धि आणि कृष्णपक्षीं अपक्षय होतो. ' [सं. अप+क्षी]

अपक्षिप्त—वि. खालीं फेंकलेलें, टाकलेलें. [सं. अप+क्षिप्]

अपक्षीण—वि. ऱ्हास पावलेला; अवनत स्थितीस आलेला; उतरती कळा लागलेला; कमजोर झालेला. [सं. अप+क्षी]

अपक्षेप-ण—पु. न. खालीं फेकणें, टाकणें.

अपा-प्पा—पु. १ थोर किंवा वडील इसमाचें आदरानें व्यावयाचें टोपण नांव. २ लहान मुलास ठेवलेलें प्रेमाचें नांव. ३ (वरील अर्थी) नांवाच्या पुढें हा शब्द कित्येक वेळां जोडतात. उ० चिमाजी अप्पा. **म्ह०** सोनार, सिंपी, कुळकर्णी अप्पा । तिघांची संगत नकोरे बाप्पा ॥. **०शाही जोडा**–अप्पा नांवाच्या कोणा व्यक्तीनें वापरलेल्या जोडयासारखा जोडा. [द्राविडी. प्रा. का. अप्पा=बाप. अप्प=बाप]

अपांक्त—अपंक्त पहा. [सं.] **०पत्र**—न. (जात गंगेनें) एकाद्यास जातीबाहेर टाकल्याबद्दलचें निर्णयपत्र.

अपांग—वि. १ डोळ्याच्या बाहेरच्या अंगचा कोण; नेत्रप्रांत २ कटाक्ष; दृष्टिक्षेप. ' ज्याचेन कृपापांगें । ' –एभा १.७९. ' कृपापांगें अंगें निवटि करि संसार धिवसा ' –सीतालोपा १३. [सं.] **०पात**–पु. कटाक्षपात. ' जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्षपणीं आते । ' –अमृ २.४.

अपांग—वि. १ अवयवांत किंवा इंद्रियांत व्यंग, खोडी असलेला; विकलांग उ०. आंधळा, बहिरा, लंगडा. [सं. अप+अंग] २ (कों.) स्वतंत्र.

अपांगणें—उक्रि. १ विघ्न उपस्थित होणें; उखळणें; लंगडे होणें; हातपाय मोडल्यासारखें होणें; नडणें. २ आपंगणें पहा. [अपांग]

अपाड-डु-डें—वि. क्रिवि. १ अतिशय; फार. 'एऱ्हवीं या लक्षणांचिया निजसारा। मी अपाडें कीर अपुरा।'—ज्ञा ६.१४०. 'याच्या बळा ब्रह्मांडगोळा। तुळितां उणा अपाडें।'—मुआदि २७. १८३. २ अप्रतिम. 'जरी चतुर अपाडाचा।'—विपू १.१७. ३ अशक्य; योग्यतेबाहेरचा. 'म्हणऊनि अपाडु हें आघवें। निर्धारितां।'—ज्ञा १.६९. ४ अंतर; असाधारणत्व; असादृश्य. 'कनका आणि कापूसा। अपाडु कां जैसा।'—ज्ञा १३. ११०१. 'आणीकही अपाड तुज आणि देहासी॥'—रंयोवा ६.३२८. [सं. अ+प्रति; प्रा. अ+पडि].

अपाड—वि. अपक्व; चुकीचें; खोटें. 'तुम्हीं चालिजे हें मत कुड। अपाड कीं।'—शिशु ४८५. [अ+पक्व=पाक=पाड]

अपात्र—वि. अयोग्य (दान करण्यास वगैरे); नालायक. 'देतां न म्हणसी पात्रापात्र।'—ज्ञा ११.५८. [सं.] ०**दान**—न. अयोग्य ठिकाणीं दिलेली देणगी. 'अपात्रदानें दरिद्र पूर्ण।' [सं.]

अपाद्—वि. ज्यास पाय नाहींत असें. [सं.]

अपादणें—क्रि. संपादणें. [सं. अप+आ+दा]

अपादान—न. १ पंचमी विभक्तीचा अर्थ. २ दूरीकरण; वियोग ३ पंचमी विभक्तींतील नाम. [सं. अप+आ+दा]

अपान—पु. १ पंचप्राणांपैकीं दुसरा, अधोगामी वायु; हा गुदप्रदेशीं राहतो; पाद. 'मग अपानाग्नीचे मुखीं। प्राणद्रव्यें देखीं।'—ज्ञा ४.१४५. 'कंठीं उदान गुदीं अपान।'—दा १७.८.१२. 'प्राणापानांची चुकामुकी। जाहली होती बहुकाळ कीं।'—एभा ९. ११८. २ गुदद्वार. ३ आंत येणारा श्वास. —गीर ६७८. (हा अर्थ नेहमींच्या अर्थाहून भिन्न आहे.) [सं.] ०**द्वार**—न. गुदद्वार, मलद्वार. ०**वायु**—पु. १ गुदद्वारीं स्थिर झालेला वायु. २ पाद; अपान पहा. [सं.]. ०**रंध्रद्वय**—न. शिश्न व गुद. 'अपानरंध्रद्वया—माझारीं धनंजया।'—ज्ञा १८.१०३६. 'अपानीं मेखा मारणें'=गांडींत खुंटी ठोकणें, पूर्वीच्या शिक्षांपैकीं एक. 'कानीं खुंट्या आदळती। अपानीं मेखा मारिती।'—दा ३.७.७३. [सं.]

अपाप—अ. आपोआप; आपल्याआपण; आपण होऊन. 'जशी त्यांस गरज लागते तशी त्यांचीं आच्छादनें अपाप बदलतात'—मराठी ६ वें पु. (१८७५). [सं. आत्मन्—आप]

अपाप—वि. निष्पाप; निर्दोष; शुद्ध. [सं. अ+पाप]

अपांपति—पु. समुद्र. 'मोक्षासकट गती। जेथें येती विश्रांति। गंगादि अपांपती। सरिता जेवीं।'—ज्ञा १३.१०७४. [सं. अपः—अपाम्+पति]

अपांपरी—स्त्री. अव्यवस्था; दुर्दशा; अपरापरी पहा. 'इंद्रियें प्रकृति भूललीं। वाचा प्राणासि चूकली। ऐसी अपांपरि होती जाली। शरीरमार्गीं।'—राज्ञा ११.६५५. [सं. अप+प्रति—परि]

अपापला—आपापला पहा.

अपापा—आपापा पहा.

अपापी—आपापी पहा.

अपामार्ग—अघाडा पहा.

अपाय—पु. इजा; विपत्ति; अनर्थापात; कहर; आपदा; विनाश. 'शिणतां बाह्य उपायीं। जन अपायीं पडताती।'—एभा १३. ५३८. [सं.]. ०**यंत्र**—न. अपायकारक प्रकार, युक्ति. 'एकालागी उभारिती। अपाययंत्रें।'—ज्ञा १६.३४४.

अपायी—वि. अपायकारक. [सं.]

अपार—वि. १ अमर्याद; अपरिमित; अंत नाहीं असें. 'हें अपार कैसेनि कवळावें।'—ज्ञा १.७४. २ अतिशय; पुष्कळ; फार; 'तेणें देवयानीच्या चित्ता। स्नेह वाढला अपार।'—मुआदि १७.५५. [सं. अ+पार]

अपारणें—क्रि. दूर जाणें; कमी होणें; उतार पडणें; ओसरणें (नदी, त्रास, दुःख). [सं. अ+पॄ]

अपारदर्शक—वि. ज्याच्यांतून पलीकडचें दिसत नाहीं असें (भिंग वगैरे). [सं.]

अपारस्थायसंचारता—स्त्री. (संगीत) गातांना अनेक रागावयव रचण्याचें ज्ञान असणें. [सं.]

अपारा—अपार पहा.

अपारांतर—वि. अमर्याद अंतरावर असलेलें. —न. फार अंतर. 'एवं तपसाधन जें ठेलें। अपारांतरें।'—ज्ञा ११.६२०. [सं. अपार+अंतर]

अपारू—वि. अपार पहा. 'जो अपारू सुस्वादु। निस्तरंगु अगाधु।'—ऋ २. [अ+पार]

अपार्थ—वि. निरुपयोगी; निरर्थक. 'जेंग सत्य अर्थ नाहीं। तो अपार्थ म्हणिजे पाही।'—एभा २८.१५९. [सं. अप+अर्थ]

अपालिपा—पु. (लु.) लपंडावाचा एक खेळ; आंधळी कोशिबीर. [सं. लिप्—द्विरु०]

अपाव-वो—अपाय पहा. 'विकळ जाहलिया साधनांसी। ये साधकांसी अपावो॥'—एभा २९.६८.

अपावृत—वि. प्रकट; उघड. 'तेथ अपावृत जाहले। इंद्रियानळ।'—ज्ञा ४.१२८. [सं. अप+आ+वृ]

अपास्त—वि. दूर अंतरावर टाकलेला, फेकलेला. [सं. अप+अस्त]

अपितर—न. (व.) बदमाष; खोडकर; उनाड. अप्तर पहा.

अपितार—पु. (कु.) अजागळ व्यक्ति. [अर. अब्तर=बिघडलेला; छंदी.]

अपिधान—न. झांकणें; आच्छादन; लपविणें. 'भरलें रतिसागरीं विषयउद्यान। करूं कुठवर करीं अपिधान।' –मला ३९. [सं. पिधान]

अपील—न. १ खालच्या न्यायाधिशानें दिलेला निकाल तपासण्याकरितां वरच्या न्यायाधीशाकडे अर्जे करणें, रुकार मागणें; विनंति अर्जे. 'त्या अपिलाचा जो निकाल होईल तो कायमचा वज्रलेप समजला जाईल.' –घका १२२. **–लेटकोर्ट**–न. मूळ दिवाणी किंवा फौजदारी कोर्टांनीं दिलेला निकालांचा फेरविचार करणारें वरच्या दर्जाचें न्यायासन. [इं.].

अपुत—वि. अशुद्ध; अपवित्र. 'रमुनि अपुत केली ते कशी पूत नारी' –मोराधा ८. [सं. अ+पूत]

अपुत्र–क, अपुत्री–क—वि. निपुत्रिक; संतति नसलेला; संतानविरहित; अपत्याशिवाय. **म्ह**० अपुत्रिकाचें अन्न खाऊं नये. [सं.]

अपुनरावृत्ति, अपुनर्भव—स्त्री. परत येण्याचा अभाव; अखेरची मुक्ति; मोक्ष (जेथून पुन्हां जनन–मरण लागत नाहीं); निर्वाण; जननमरणाच्या फेऱ्यापासून आत्म्याची मुक्तता. [सं.]

अपुनर्लभ्य—वि. पुन्हां न मिळणारें, प्राप्त न होणारें. [सं.]

अपुरकीं—क्रिवि. (गो.) पश्चात्; मागें; (म.) अपरोक्ष; (सं. परोक्ष)

अपुरता–अपुरा—वि. १ पूर्ण न भरलेला; न संपलेला; पुरा न झालेला; कमी असलेला. २ पुरेसा किंवा भरपूर नसलेला; उणा; थोडा; असमर्थ; अयोग्य. 'मी अपाडें कीर अपुरा।' –ज्ञा ६.१४०. ३ अपरिपक्व; अधेवट; पोरकट. 'अपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं।' –तुगा १८७८. [सं. अपूर्ण]

अपुरवाय, अपुर्वाय—स्त्री. (गो.) १ नवलाई; अपूर्वता. 'त्या गोष्टीची इतकी अपुरवाय ती कसली?' २ अतिशय ममता; प्रेम; लाड. 'काय त्या मुलाची अपुरवाय करताय?' [सं. अपूर्व–अपूर्वाई]

अपुलिया—(काव्य) आपल्या. 'दावावें कुशलत्व त्या अपुलिया।' –विविभामिनी ८.६.११९. आपुलिया पहा.

अपुष्पवनस्पति—स्त्री. (शाप.) वनस्पतिशास्त्रांतील दोन मुख्य भागांपैकीं एक. ही वनस्पति जननपेशीपासून उत्पन्न होते व सपुष्प वियांपासूनहि होते. –झाको अ २०७. [सं.]

अपूज्य—वि. पूजेस–आदरास पात्र नसलेलें. [सं.]

अपूट—वि. १ अस्पृष्ट; हात न लावलेलें. (न मोडलेलें; न उघडलेलें वस्त्र, अन्न इ.) 'कुंजपुरीयाची वस्ती अपूट होती; लूटहि मुबलक सांपडली.' –भाव १२१. २ स्वतंत्र शिल्लक राहिलेलें; वगळलेलें. ३ वैषयिक समागम झाल्यानें दूषित न झालेला (पुरुष, स्त्री). ४ अशिक्षित; वठणीस न आणलेलें (अपेट या अर्थी). ५ (व्यापक.) अचूक, अचानक या अर्थी. [सं. अस्पृष्ट].

अपूप—पु. अनरसा; घारगा. 'निंबें नारिंगें नारेळे। अपूप लाडू अमृतफळें।' –एरुस्व ६.८६. [सं.]

अपूर—स्त्री. उणीव; कमतरता; उणेपणा; भरपूर नसणें. अपुरा पहा. [सं. अ+पूर्ण]. **०नपूर**–स्त्री. किंचित् उणीव असलेलें.

अपूर्ण—वि. १ न भरलेलें; अपुरें; कमतरतेचें; पूर्ण नसलेलें; कमी असलेलें. २ निष्णात किंवा तरबेज न झालेला. ३ अतृप्त; 'आणि पसरिला अभिलाषु। अपूर्णु होय तोचि द्वेषु।' –ज्ञा १६.३३९. **०भविष्य**–पु. (व्या.) एकाद्या क्रियेस आरंभ होऊन तिचा व्यापार त्या काळीं चालत राहणार असेल, असा बोध ज्या क्रियापदापापासून होतो त्याचा काल. उ० 'मी करीत असेन.' **०भूत**–पु. (व्या) हा काळ एकादी क्रिया अर्धवट झालेली असून पुरी व्हावयाची असते असें दाखवितो. या काळाच्या ठायीं क्रियेची अपूर्णता दर्शविली जाते. उ० 'मी करीत होतों.' **०माफी**–स्त्री. साऱ्याचा कांहीं भाग भरावी लागणारी जमीन. [सं. अपूर्ण+अर. माफी]. **०वर्तमान**–पु. एकादी क्रिया चालू आहे असें दाखविणारा काळ; या काळाचे ठायीं अर्थभेद इतका आहे कीं याचा प्रयोग असतां कर्ता जो आहे त्याची त्या त्या क्रियेच्या ठायीं जी तात्कालिक निमग्नता तिचा बोध होतो. उ० 'मी करीत आहें.' [सं. अ+पूर्ण]

अपूर्णांक—पु. पुरा नसलेला अंक; अंकाचा भाग. उ० एक चतुर्थांश, सात अष्टमांश **०गणित**–न. अपूर्णांकांचें गणित किंवा उदाहरण. [सं.]

अपूर्व—वि. १ पूर्वी कधीं न घडलेलें, झालेलें; प्रथमचें; अगोदरचें; आरंभाचें. या गांवांत मांसें येणें हें अपूर्वच आहे.' २ विलक्षण; चमत्कारिक; असाधारण. ३ अद्भुत; आश्चर्यकारक; असामान्य; श्रेष्ठ दर्जाचें; अत्युत्कृष्ट; फार मोलाचें. 'म्हणौनि तयां निर्मळा। मुख ज्ञानी सरळा। अपूर्व ये फळा। सात्त्विक तें।' –ज्ञा १४.२६१. –न. चमत्कारिक, आश्चर्यकारक गोष्ट; अद्भुत वस्तु; नवल, 'येतां देखिलें मार्गासी।अपूर्व परियेसा।' –गुच ३४.१०२. –न. (तत्त्व) पूर्वजन्मविरहित इह जन्मांतील कृत्यांपासून होणारें पापपुण्य; सुखदुःख होण्याविषयीं प्रयोजक आत्म्याच्या ठायीं पापपुण्यात्मक कर्मजन्य जो संस्कार राहिला असतो तें. **०दर्शन**–न. १ पहिलें दर्शन. २ कांहींतरी नवीन किंवा चमत्कारिक पाहणें. [सं.]

अपूर्वाई–यी—स्त्री. अपुर्वाय पहा. विलक्षणपणा; असाधारणपणा; उत्कृष्टपणा; भलाई; अत्यंत चांगलेपणा. **०करणें**–क्रि. कौतुक करणें; फार प्रशंसा करणें; फार फार मानणें. [सं. अपूर्व]

अपूर्वाय—स्त्री. (गो.) अपूर्वता; अपुरवाय पहा.

अपूस—पु. (गो.) एक उत्कृष्ट जातीचा आंबा. हापूस. [पोर्तु. आल्फान्सो]

अपृष्ठवंश-वंशीय—पु. (शाप.) पाठीला कणा किंवा मणके नसलेला एक प्राणिवर्ग. (इं.) इन्व्हर्टेब्रेट. [सं.]

अपेट—वि. १ अंडिल; अंड न बडविलेला (बैल, पशु); सांड. ' अपेट वृषभ असती सात । त्यांसी घालील जो नाथ । ' –कथा ४.११.११२. २ अंगांतली रग न मोडलेला; बठणीस न आलेला; नरम न झालेला; काम न शिकविलेला; तरबेज न झालेला. ३ अननुभवी. ४ संसारकृत्य इत्यादिकांनीं जर्जर न झालेला; जगरूढीला अनभ्यस्त. [सं. अ+पिष्ट; प्रा. पिट्ठ–पेट्ठ–पेट]

अपेटी—वि. (व.) १ रस्त्यापासून दूर; आडवळणीं; एका बाजूस. ' तुमचा गांव अगदीं अपेटीस पडला. ' [सं. अपेत]

अपेंडिक्स—न. १ पुरवणी; परिशिष्ट. २ पोटांतील आंतडयाचा शेंपटासारखा एक लहान भाग; आंत्रपुच्छ. **अपेंडिसाइटिस**–आंत्रपुच्छदाह नांवाचा एक रोग. मोठया आंतडयापासून लांबट पोकळ अर्बुद अशी जंताकृति एक नळी निघालेली असते. हिचें मोकळें तोंड मोठया आंतडयांतील पोकळीशीं जोडलेलें असतें व त्याच्या मुखावर अपुरा पडदा असतो. या नळीच्या पोकळींत दाह अथवा सूज, पू उत्पन्न होतो त्यास हें नांव आहे. [इं.]

अपेत—वि. दूर गेलेला; मार्गच्युत–भ्रष्ट. [सं. अप+इ=जाणें]

अपेप—आपोआप पहा. ' सहस्र वर्षे होतां पूर्णे . अपेपचि उलेल हें । ' –मुआदि ४.३९.

अपेय—वि. पिण्यास अयोग्य; शास्त्रानें पिण्याला निषिद्ध मानलेलें. (दारू इ०) 'कां बधिराचे नीट कान । अपेया नाम पान । '–ज्ञा १८.५८०. [सं.]. **०पान**–दारू वगैरे निषिद्ध पेयांचें सेवन करणें.

अपेरण—न. (शाप.) किरणांचें अकेंद्रीभवन; केंद्रांतून न जाणें; अपायन. (इं.) ॲबरेशन. [सं.]

अपेश—न. अपयश; दुष्कीर्ति; पराभव. ' आणि अपेश तें न बचेल. कल्पांतवरी । '–ज्ञा २.२०१. [सं. अपयश] **–शाचें खापर–टोपलें–मोडकुळें**–न. अपमानाचें व लाजेचें (कांहीं अनिष्ट कृत्यामुळें) दुसऱ्यांनीं ठाकलेलें–लादलेलें ओझें. (वर किंवा डोक्यावर शब्दाबरोबर आण, दे, घाल, घे, ये, फोड, या क्रियापदांशीं योजतात.) [अप. रूप अपेस.]

अपेशी—वि. पराभव झालेला; दुष्कीर्ति झालेला. [अपयशी]

अपेष्टा—स्त्री. त्रासदायक, दुःखदायक स्थिति; कष्ट; त्रास; खेंकटें; लचांड; ब्याद; विघ्न. [सं. अप+इष्ट.]

अपेक्षणीय—वि.वाट पाहिलेला;मार्गप्रतीक्षा केलेला; आशाभूताप्रमाणें पाहिलेला–शोधलेला; आशा वाटत असलेला; वचन किंवा खात्री दिलेला. २ इच्छा करण्यास योग्य. 'अपेक्षणीय जें कांहीं . तें मीचि केला । ' –ज्ञा १८.१११८. [सं. अपेक्षणीय]

अपेक्षणें—अक्रि. इच्छा करणें; वाट पाहणें; जरूर असणें. 'जें अपेक्षिजें विरक्तीं । सदां अनुभविजे संतीं । ' –ज्ञा १.५३. [सं. अप+ईक्ष्]

अपेक्षया—शअ. पेक्षां. उ० तदपेक्षया=त्यापेक्षां, मदपेक्षया= माझ्यापेक्षां. [सं.]

अपेक्षा—स्त्री. १ इच्छा; वांछा; आकांक्षा; वासना. ' ऐसी अपेक्षा जालिया । बद्ध मुमुक्षुते आलिया ।'–ज्ञा १८.१४४१. २ गरज; कारण; प्रयोजन; जरूरी; मागणी. **०करणें**–(मिळण्याच्या) आशेनें किंवा इच्छेनें पाहणें, बघणें, शोधणें; मार्गप्रतीक्षा करणें; इच्छा करणें. **०बुद्धि**–स्त्री. आकांक्षा; मनीषा; आशा (कांहीं मिळण्याची). (क्रि० धरणें, ठेवणें, करणें.) [सं.]

अपेक्षित—वि. १ आशेनें इच्छिलेलें; मार्गप्रतीक्षा केलेलें. ' काय अपेक्षित तुमचें चित्त । तें निश्चित मी करीन । ' –एरुस्व ३. ४२. २ वांच्छित; इच्छित. ३ जरूर असलेलें. ' मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगती पुसिलें । ' –ज्ञा ४.१६८. [सं.]

अपेक्षितव्य—वि. १ अपेक्षा करावयाचें. २ काम्य; स्पृहणीय; इच्छिण्याजोगें. [सं.]

अपेक्षी—वि. १ अपेक्षा, इच्छा करणारा. २ गरजू. [सं.]

अपैता-तें—वि. स्वाधीन; प्राप्त; वश. [सं. आप्त]

अपैशुन-न्य—न. सरळपणा; प्रामाणिकपणा; इमान; दोष ठाकून गुण घेण्याची दृष्टि; सौजन्य. ' अगा अपैशून्याचें लक्षण । अर्जुना हें पुढें जाण । ' –ज्ञा १६.१५३. [सं. अ+पैशुन–न्य]

अपैसा-सी-सें—आपैसा पहा.

अपोआप—आपोआप पहा.

अपोशन, अपोषण, अपोष्णी, अपूष्णी—न. पाणी पिणें. १ आचमन; ब्राह्मणादि त्रैवर्णिकांनीं संध्यादि कर्माच्या वेळीं किंवा भोजनाच्या वेळीं चित्राहुती घातल्यानंतर व भोजनांतीं तळ हातावर थोडें पाणी घेऊन आचमनासारखें एकदांच पिणें. ' ' शुद्धमतीनें आपण । कृष्णासीं दिधलें आचमन । तीन वेळां न करी जाण । सर्वापोशन एकवेळा । ' –एरुस्व १५.१४६. २ (कर्ना.) लग्नांत जेवावयास बसतांना सासुनें आपल्या पतीचें नांव घेऊन जावयाच्या हातावर तूप घालणें. ३ (ल.) त्याग; ' केलें अपोषण कर्मासी ॥ ' –निगा ४२. [सं. आपः+अशन]

अपोस—अपूस पहा.

अपोहन—न. त्याग; दूर करणें; घालवणें. ' सविलास अविद्यानिरसन । अपोहन या नांव । ' –एभा १३.१८५; ' अगा सर्व संगाचें अपोहन । ' –रंयोवा ३.३६७. [सं. अप+ऊह]

अपौरुष—वि. १ मनुष्यानें केलेलें नव्हे तें; ईश्वरकृत. ' वेद हे अपौरुष आहेत. ' २ मनुष्याच्या अवांक्याबाहेरचें; दैवी; अतिमानुष. ३ भित्रें; भित्रेपणाचें. [सं.]

अप्—न. पाणी; आप. [सं.]

अप्तर—वि. १ बिघडलेलें; दोषयुक्त; नासलेलें. 'तितका बयान श्रीमंतास लिहिला असतां बाजी अंतर होती.' –रा.५.११६. २ उनाड; उजाड. [अर. अब्तर]

अप्तरी—स्त्री. बिघाड; नुकसान. [अर. अब्तरी]

अप्ती—स्त्री. १ आपत्ति; संकट. २ वाण; उणीव. [सं. आपत्ति अर. आफत]

अप्पा—अपा पहा.

अप्पाधप्पा—पु. लहान मुलांचा एक खेळ– 'अप्पा धप्पा। वेणी वेणी गप्पा। आणा दोर। बांधा चोर।' इत्यादि गाणें म्हणून टाळया वाजवीत फिरावयाचें. अप्पाधोप्पा असेंहि म्हणतात.

अप्रकट—वि. अप. अप्रगट. १ अप्रसिद्ध; विख्यात नसलेला: उघड न केलेला; न दाखविलेला. २ अस्पष्ट; संदिग्ध. [सं. अ+प्रकट]

अप्रकांडकथा—स्त्री. विसंगत भाषण; भाकडकथा; अवांतर कथा; आडकथा. [सं. अ+प्रकांड=दांडा]

अप्रकृत—वि. १ विषय, प्रसंग सोडून असलेलें; विसंगत २ असंबध्द; अप्रस्तुत. –न्यायप १३६. –न.(साहित्य) उपमान. [सं.]

अप्रगल्भ—वि. अपक्व; पूर्णावस्था प्राप्त न झालेलें; कच्चें; पूर्ण न झालेले (विचार वगैरे). [सं.]

अप्रज—वि. १ संतान नसलेला. २ प्रजा–लोक नसणारा; उजाड (गांव, राज्य वगैरे). [सं. अ+प्रजा]

अप्रणीत—वि. १ न केलेलें; न बनविलेलें. २ न रचेलें; अप्रबंधित. [सं.]

अप्रतर्क्य—वि. तर्क न करतां येण्याजोगें; न जाणण्याजोगें. (ईश्वर स्वरूप–महात्म्य इ०) [सं.]

अप्रतिबंध—वि. १ अडथळा न केलेलें; अटकाव, हरकत नसलेलें; २ (कायदा) अनिर्बंध; निर्विवाद; तंटा, भांडण किंवा वाद नसलेलें (वतन वगैरे). **०दाय**–पु. ज्या मिळकतीवर जन्मतःच सत्ता प्राप्त होते म्हणजे सत्ता प्राप्त होण्यास कोणत्याहि प्रकारचा अटकाव नसतो ती मिळकत; बापरोटी (इं.) अनऑब्स्ट्रक्टेड हेरिटेज; याच्या उलट सप्रतिबंध–दाय. **०व्यापार**–पु. खुला व्यापार; आयात व निर्यात मालावर जकात न घेण्याची पध्दति. (इं.) फ्री ट्रेड. 'अर्थशास्त्रावरील इंग्रजी पुस्तकांत अप्रतिबंध व्यापाराचें जें महत्त्व गाईले असतें,' –टि १.५१६. [सं.]

अप्रतिभट—पु. दुसरी तोड किंवा जोड नसलेला योध्दा: दुसरा प्रतिस्पर्धी नाहीं असा; सेनापति. [सं. अ+प्रति+भट=योध्दा]

अप्रतिम—वि. १ दुसरा बरोबरी करणारा ज्यास नाहीं असा; जोड किंवा तोड नसलेला. २ अद्वितीय; अनुपम. [सं. अ+प्रतिमा]

अप्रतिमल्ल—पु. बिनजोड पहिलवान; अप्रतिभट पहा. 'हे अप्रतिमल्ल जगीं। पुरता प्रतापु अगीं।' –ज्ञा १.११०. [सं.]

अप्रतिरथ—वि. अविवादित मिळकत; अप्रतिबंधदाय पहा.[सं.]

अप्रतिष्ठा—स्त्री. १ दुष्कीर्ति; दुर्लौकिक; अपमान; फजीती; मानखंडणा. [सं.]

अप्रतिहत—वि. अनिरुध्द; स्वैर; अनिर्बंध; नेहमीं, सदोदित असणारें; अव्याहत. 'कोणत्याहि भाषेची प्रगल्भता म्हणजे सर्वत्र तिचा अप्रतिहत संचार सुरू असला पाहिजे.' –टि ४.४.१५७. [सं.]

अप्रतीत—वि. माहीत नसलेलें; अननुभवी; अपरिचित. [सं.]

अप्रतीति—स्त्री. अनुभवाचा अभाव; प्रतीति, अनुभव, माहिती नसणें. [सं.]

अप्रत्यय—पु. अविश्वास; विश्वासाचा, भरंवशाचा अभाव; बेभरंवसा. [सं.] **–यी**–वि. अविश्वासी; बेभरंवशी.

अप्रत्यक्ष—वि.समक्ष नव्हे तो; एकाच्याच्या पाठीमागें. **०कर**–पु. प्रत्यक्ष व्यक्तीवर न बसवितां मालावर बसविलेला कर. उ० व्यापारी जिन्नस, मादक पदार्थ, मीठ वगैरेवरील कर, जकात. (इं.) इंडायरेक्ट टॅक्स. **०पुरावा**–पु. अनुमानिक व परिस्थितीचा पुरावा. (इं.) इंडायरेक्ट एव्हिडन्स. **०प्रतीकार**–पु. (इं. पॅसिव्ह रेझिस्टन्स) सरळ मार्गानें अडवणूक न करतां अन्य मार्गानें अडवणूक करणें. 'अप्रत्यक्ष प्रतिकार हें एक बलवान शस्त्र आहे.' –टिव्या

अप्रधान—वि. दुय्यम; वरिष्ट किंवा मुख्य नसलेलें; गौण; कमी प्रतीचें. [सं.]

अप्रफुल्ल—वि. अविकसित; न फुललेलें. [सं.]

अप्रबुध्द—वि. १ अज्ञानी; मठ्ठ; मूर्ख; महड. २ अपक्व समजुतीचा; अप्रौढ. ३ माहिती नसलेला; तरबेज नसलेला; विषयाशीं अपरिचित. [सं. अ+प्र+बुध्]

अप्रमाण—वि. १ पुरावा–आधार नसलेलें;अविश्वसनीय; निराधार. २ जें प्रमाण होऊं शकत नाहीं असें; भरमसाट. 'प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।'–दा १२.१.९. ३ किंमत, महत्त्व नाहीं असें; गैरलागू; आदर्श न मानलेलें. 'म्हणोनि भक्ति गा येथसरे जाती अप्रमाण।'–ज्ञा ९.४५२. [सं. अ+प्रमाण]

अप्रमाणिक—वि. अप्रामाणिक पहा.

अप्रमाद—वि. बिनचुक; दोषरहित. 'विहित परी अप्रमादें। अनुष्ठावें।' –ज्ञा ११.१४३८. –पु. प्रमाद; दोष. (अचपळप्रमाणें रूप). 'करूं आवडे अप्रमाद। तो तमोगुण।' –दा २.६.१९. [सं. अ+प्रमाद]

अप्रमेय—वि. १ न मापतां येण्यासारखें; अमर्याद. २ निश्चित करतां न येण्यासारखें; प्रमाणांनीं सिद्ध करतां येत नाहीं असा. 'तरि आतां अप्रमेया। मज शरणागता आपुलिया।' –ज्ञा ११.५६०. [सं.]

अप्रयास—पु. श्रमांचा अभाव; कष्टाभाव; कष्टराहित्य; सुलभता. 'अप्रयासें नारददेवा । मरणार्णवा मज तारी ।' –एभा २.१०१; 'निधान लाधे अप्रयासीं । तरी कां कष्ट सायासीं ।' –ज्ञेश्व १.५८. [सं.]

अप्रयोजक-जिक—वि. १ निरुपयोगी; बेजरूरीचें; कवडीमोल; अनवश्यक. 'परी रात्रीविषयीं अप्रयोजिकु । जालाचि कीं ।' –अमृ ६.६४. २ गैरवाजवी; विसंगत; अनुचित. 'हा सुधारणेचा हुतूतू अगदीं अप्रयोजक होता' –टि ४.२९४. [सं. अ+प्रयुज्]

अप्रवासी—वि. प्रवास न करणारा; देशाटन न करणारा. 'अक्षरणी अप्रवासी तोचि सुखी.' [सं. अ+प्रवास]

अप्रवाही—वि. (शाप.) न वाहणारा; घन (पदार्थ). [सं.]

अप्रवीण—वि. तरबेज नसलेला; अकुशल; न मुरलेला. [सं.]

अप्रवृत्ति—स्त्री. १ प्रवृत्तीचा अभाव; नावड; मनाचा ओढा नसणें. २ शास्त्रनिषिद्ध कर्म; कुमार्ग. 'जे अप्रवृत्तीचा अव्हांटा । सांडूनि विधीचिया निघे वाटा ।' –ज्ञा ७.४८. [सं.]

अप्रशस्त—वि. १ अशंद; मोकळें नसलेलें; चिंचोळें. २ बेडौल: विशोभित. ३ अनभिजात; गैर; अशिष्ट; अनभिमत; संप्रदायास सोडून. [सं. अ+प्रशस्त]

अप्रशिखा—स्त्री. एकाचा मित्र त्यास ठार करावयास प्रवृत्त झाला असतां आपलें मृत्युवृत्त इतरांस ज्ञात व्हावें म्हणून त्यानें अ–प्र–शि–ख या आद्याक्षरयुक्त रचलेली एक चार चरणांची कविता. अनेन तव पुत्रेण । प्रसुप्तस्य वनांतरे । शिखामादाय हस्तेन । खड्गेनोपहृतः शिरः ॥ (त्यावरून) सांकेतिक किंवा लाक्षणिक भाषा.

अप्रसक्त—वि. विसंगत; असंबद्ध; अप्रस्तुत; विषय, प्रसंग सोडून असलेलें; अनुचित. [सं.]

अप्रसंग—पु. १ अवेळ. २ अप्रस्तुत, अयोग्य गोष्ट. 'म्हणौनि अप्रसंगु तेगें । म्हणावा कीं तो ।' –ज्ञा १८.१६२६. [सं.]

अप्रसन्न—वि. नाखुष; असंतुष्ट; इतराजी झालेला; गैरमर्जी असलेला. [सं.]

अप्रसाद—पु. अवकृपा; नाखुषी; इतराजी; गैरमर्जी. [सं.]

अप्रसिद्ध—वि. १ खरें अस्तित्व नसलेलें; विद्यमान नसलेलें, उपलब्ध नसलेलें; कवींच्या असंभाव्य कल्पनेतच असलेलें. जसें– खपुष्प, शशविषाण, वंध्यापुत्र वगैरे. ३ प्रचलित, रूढ नसलेला. ४ अप्रकाशित; न छापलेला (ग्रंथ). ५ सांदीकोंदीचा; अविख्यात. कीर्तिमुळें–लौकिकानें प्रसिद्धीस न आलेला. ६ हलका; क्षुद्र; [सं.]

अप्रस्तुत—वि. चालू काळाला किंवा विषयाला अयोग्य किंवा न शोभणारें; अप्रासंगिक; अनुचित; विसंगत. [सं.] ०**प्रशंसा**—स्त्री. एक अर्थालंकार; अन्योक्ति पहा.

अप्रा—अपुरा; अपरा पहा.

अप्राकर्णिक—प्रकरणास सोडून; अप्रस्तुत. [सं. अ+प्रकरण]

अप्राट—वि. (कायवडी) अपरंपार. 'अप्राट त्यानें पुण्य केला.' –मसाप ३२०. [सं. अपार ?]

अप्रांत—वि. अमर्याद. 'प्रभुतरें सरलें । अप्रांतें एकें ।' –ज्ञा ११.१२४. [सं.]

अप्राप्त—वि. १ न मिळालेलें; अनागत; अलब्ध. २ अकृतार्थ; (ल.) ज्यास ब्रह्मानंद मिळाला नाहीं असा. 'परी नेणती ते काय कीजे । अप्राप्त देखें ।' –ज्ञा २.२५३. ०**यौवन**–न. वयांत न आलेला; यौवनावस्था प्राप्त न झालेला; कोंवळा. ०**व्यवहार**–पु. वयानें वयांत न आलेलें मूल; अज्ञान; अजातव्यवहार पहा. [सं.]

अप्राप्ति—स्त्री. न मिळणें; प्राप्ति न होणें; (ल.) ब्रह्मानंदप्राप्तीचा अभाव. [सं.]

अप्राप्य—वि. अलभ्य; मिळण्यास कठिण. [सं.]

अप्रामाणिक—वि. १ अविश्वसनीय; विश्वासाहे नाहीं असा; विश्वासास अपात्र. २ लुबा; खोटा; शंका येण्यासारखा. [सं. अ+प्रमाण]

अप्रामाण्य—न. पुराव्याचा–आधाराचा अभाव. ०**ग्रह**–पु. खोटें मानणें; असत्य मानणें; अविश्वास. [सं]

अप्रासंगिक—वि. अयोग्यकाळीं, अवेळीं केलेलें; विषयाला किंवा प्रसंगाला सोडून असलेलें; विसंगत; असमयोचित. [सं.]

अप्रास्ताविक—वि. अयोग्य तऱ्हेनें, अवेळीं सुरवात केलेलें, सांगितलेलें; प्रसंगाला न शोभणारें; अप्रासंगिक; अप्रस्तुत. [सं.]

अप्रिय—वि. पसंत न पडणारें; असंतोषकारक; न आवडणारें; नावडतें. [सं.]

अप्रीति—स्त्री. असंतोष; नापसंती. 'सरकारचेबद्दल लोकांचे मनांत अप्रीति किंवा द्वेष उत्पन्न करणें यास राजद्रोह म्हणतात.' –टि १.६८३.

अप्रुक—वि. (ना.) अलौकिक; नाविन्यपूर्ण; अपूप पहा. [सं. अपूर्व]

अप्रुपाई-बाई—अपुरबाय पहा.

अप्रुब—वि. (गो.) अपूर्व; प्रिय. [सं. अपूर्व]

अप्रूप—वि. अपूर्व; अपरूप पहा. [सं. अपूर्व किंवा अपरूप]

अप्रें—अपरा पहा.

अप्रेंटिस—पु. उमेदवार; शिकाऊ मनुष्य. [इं.]

अप्रोक्ष—अपरोक्ष पहा.

अप्रौढ—वि. लहान; वयांत न आलेला 'नाना अप्रौढ बाळकीं । तारुण्य राहे थोकीं ।' –ज्ञा १३.७८. [सं. अ+प्रौढ]

अप्सतुकेफलचारी—पु. सर्व शरीर लाल, कपाळावर पांढरा ठिपका, नाक व वरचा ओंठ पांढरा, डोळे घारे, हातांपायांवर काळे, जर्दे, पांढरे ठिपके असेलेला घोडा. –अश्वप २९. [उर्दू]

अप्सरण—न. (कर्ना.) दोष; अपशरण पहा. 'जीव देण्याचें अप्सरण माझ्यावर लादूं पाहतोस काय ?' –मेनका २८.

अप्सरा—स्त्री. स्वर्गीतील स्त्रिया, देवस्या; (ह्या समुद्रमंथनकालीं अपः म्हणजे पाणी यापासून उत्पन्न झाल्या). गंधर्वांगना; देवलोकींच्या नृत्यांगना. यांचीं प्रख्यात ७ कुळें आहेत. (१ घृताची, २ मेनका, ३ रंभा, ४ ऊर्वशी, ५ तिलोत्तमा, ६ सुकेशी, ७ मंजुघोषा). 'येउनि वरापरा अवलोकी राजन्यसंगरा ज्या जी।' –मोभीष्म २.१०. (ल.) सुंदर स्त्री. [सं. अप्सरस्; अप्+सृ]

अफजाईश—स्त्री. वृद्धि; वाढ. –पेअ ६१. [फा. अफजाईश]

अफट्ट—वि. (गो.) तुडुंब.

अफतर—अप्तर पहा.

अफतरी—वि खराबी; दुर्दशा; दैन्यावस्था; नाश; हानी. [अर. अब्तरी]

अफतरी—अकीर्ति; दुष्कीर्ति; बदनाम; बदलौकिक; 'खराब जन निजकर्में करिती अधर्म राजाची अफतरी।' –ऐपो ३६८ [अर. इफतिरा]

अफतादार—वि. उजाड; ओसाड; न व्यापलेली; पडून राहिलेली (जमीन, घर, मकाण). [फा. उफ्तादह्=पडलेला.]

अफताब—पु. सूर्य; सूर्यप्रकाश. 'अफताब अस्तास कां जात नाहीं?' –मराचिधाशा ६१. [फा० आफ्ताब्=सूर्य] **०गीर**–स्त्री. अबदागीर पहा. [फा. आफ्ताब+गिरफ्तन=पकडणें]. **–गिऱ्या**–अबदागिऱ्या पहा.

अफरातफर–रा–री—स्त्री. १ घोटाळा; गोंधळ; गडबड पांगापांग (देशांतील). २ परागंदा स्थिति (लोकांची वगैरे). ३ अव्यवस्थित, विस्कळित स्थिति (वस्तूंची, कामाची). ४ लबाडीनें केलेल अपहार. 'किल्लयावर लोकांचा ऐवज नक्त वगैरे असेल त्याची अफरातफर होऊं न देतां जप्त करून ठेवणें.' –वाडसमा ३.६५. [अर. तफ्रीक्=फूट द्वि.]

अफरातफरा–तफ्रीक—वि. परागंदा; नष्ट; बेपत्ता; 'हिंदू माणूस होते ते ही अफरातफरा जाहले.' –रा १०.२९८; 'असल तहनामे विठ्ठलसुंदर यांचे गारतीचे वेळेस अफरातफ्रीक जाले' –रा ७.२२३ **–री**–क्रिवि. १ अव्यवस्थित रीतीनें; ढिलाईनें; गडबडीनें तारांबळीनें. [अर. तफ्रीक्=फूट द्वि.]

अफराद—पु. १ सेवक. २ एकटा. 'हाली विसाजी राम, कृष्णाजी बायदेऊ याचा फर्जेद हा अफराद देशपांडेगिरीचा वारिसी होय.' –भाइसअ. १८३४.५७. [अर. इफ्राद्=एकाकी]

अफल–ळ—वि. निष्फळ; व्यर्थ; फुकट. [सं.]

अफलाक–ग—क्रिवि. अधांतरी; फार वरून; अल्लाद–घोडयाच्या किंवा माणसाच्या (उडीला लावतात–) [अर. अफलाक=आकाश. अर. फलक=आकाश यांचें अव.].

अफलाकांक्षी–वि. बक्षिसाची इच्छा न धरणारा; निरिच्छ. [सं.]

अफल्लाद–अफ्वाद–अहफाद—स्त्री. १ मुलीचा वंश. 'अल्लादअफ्वाद (वंशपरंपरा) देविले असे' –रा १५.१५९; 'व –औलाद व अहफाद चालविजे' –रा. २०.१४१. २ दत्तक पुत्राचा वंश. ३ रखेलीची, पाटाच्या बायकोची, किंवा दासीची संतति; लेकवळा. [अर. अहफाद्=नातवंडें] **–दी**–अफलाद पहा.

अफवा, अफवाई—स्त्री. कंडी; वार्ता; बाजारगप्प; अवाई; भुमका. 'अफवाई गोष्टीवर मदार नाहीं.' –रा ५.२९. [अर. अफवाह=तोंडें; फ्वाह्(तोंड)चें अव. फा. अफ्वाही]

अफसोस—पु. १ शोक; दुःख. 'नबाबांनीं ऐकोन बहुत अफसोस केला.' –रा ७.१४२. २ (ल.) पश्चात्ताप. ३ उद्गा. दुःखदर्शक उद्गार; अरेरे, ! हायहाय ! 'अफ्सोस ! प्रत्यक्ष आमच्या शत्रूकडे !' –स्वप २२५. [फा. अफ्सोस्=शोक. तुल० सं. अप+शुच् (शोक करणें)]

अफळणें—अक्रि. १ हिरवें, कच्चें किंवा अपक्व राहणें (फळ). २ अर्धवट शिजणें (अन्न). [सं. अ+फल्]

अफळणें—उक्रि. (काव्य) आपटणें; आदळणें; वर जोरानें पडणें. [सं. आ+स्फाल्]

अफाट—वि. १ विस्तीर्ण; विस्तृत (स्थळ, अरण्य, तलाव, समुद्र, इमारत, काम). 'जैसा कां अफाट समीर।' 'ऐसा गाढा आणि अफाटु। आतां कोण करी यया शेवटु।' –ज्ञा १५.२१३. २ मोठें; अचाट. ३ प्रबळ; अतिशय सामर्थ्यवान्; आश्चर्यकारक; उत्कृष्ट. सामाशब्द– अफाट बुद्धि, अफाटपराक्रम, अफाटसंपत्ति. [सं. अ+स्फुट; अ+फाट=फाटणें?] **०गुरू**–न १ उनाड, मोकाट जनावर. २ (ल.) अशिक्षित; अडाणी; ठोंब्या; धांगड.

अफार—वि. अतृप्त. 'आनंदसुत विभु हा नंदनंदन अफार विचरे घरे।' –आपद ८४. [सं. अपार]

अफारी—वि. फार वेळ समाधान न देणारा; थोडा वेळ भूक शमविणारा. [अफार पहा.]

अॅफिडेव्हिट—न. (कायदा) शपथपूर्वक लेखी जबानी; प्रतिज्ञालेख. [इं.]

अफिण्या, अफिमी–म्या—वि. अफू खाण्याचें व्यसन असणारा; अफीण पहा.

अफीण–म—स्त्री. अफू; खसखशीच्या बोंडांतील वाळलेला मादक किंवा कैफ आणणारा चीक. यांचें पीक हिंदुस्थानांत विशेषतः माळव्यांत येतें. हें झाड ३ ते ५ फूट उंच असून, फळास दोडा म्हणतात. त्यांतील बीं तें खसखस होय. अफू खाण्यानें निशा येते. ही अतिसारावर देतात. अफूच्या उतारावर मोहरीचें पीठ, रिठ्याचें पाणी देणें. अफू अग्निदीपक, पाचक, वीर्यस्तंभक आहे. [सं. अहिफेन; हिं. आफीम–ण; बं. अफेवा; गु. अफे–फीण. अर. अफ्यून; इं. ओपियम. ग्रीक ऑपिआन, ओपॉस=वनस्पतीचा चीक]. **०सारखा जीव ओढणें–लागणें**=अतीशय आवड

किंवा उत्कंठा असणें; ओढा असणें. **०उतरवणें**–(व.) एकाद्याची चांगली खोड जिरविणें. **०बाज**–वि. अफूचें व्यसन असणारा. [अफीण + बाझ; अर. अफ्यून]

अफु–फू—अफीण पहा.

अफुट—वि. न फुटलेलें; अभेद्य; अद्वैत; अखंड. 'हें सरले अद्वैता अफुटामाजी।' –अमृ ९.७ [सं. अ+स्फुट्]

अफू—अफीण पहा.

अफेक—स्त्री. मोठी किंवा प्रबळ इच्छा; उत्कंठा; आशा, आवड; चट; चटक. (क्रि० धर, बाळग). [सं. अपेक्षा=अपेक्खा= अफेका]

अफ्–फ्—उद्गा. (व.) धनगराचा बकऱ्या हांकण्याचा शब्द: हर्रर्रे.

अफजाईश–अफ्तर–अफ्तरी–अफ्तागीर–गिऱ्या–अफ्ताब·अफ्राद–अफ्लाद–अफ्वा–अफ्वाई–अफ्वाद—अफजाईश–अफ्तर–अफवा इत्यादि पहा.

अब—क्रिवि. आतां; सध्यां. सामाशब्द–अबतक, अबतई= आतांपर्यंत. अबतब=वारंवार. [सं. अद्य. हिं.]

अबई—स्त्री. १ एक फूल झाड. २ एक वेल; घेवडयाची एक जात; याला खडसंबळ, पठारी, कोयतेवाल, ब्रम्ही अशीं नांवें आहेत. यास आश्विनांत शेंगा येतात त्यांची भाजी करतात.

अबक—स्त्री. इटिदांडूच्या किंवा चेंडूच्या खेळांतील शब्द. 'एक' या अर्थी. जसें,–अबक, दुबक;तिबक; अबकी, दुबकी, तिबकी: एक, दोन, तीन.

अबकरा–खरा—अपकरा पहा.

अबका—अपका पहा.

अबकार—पु. एक प्रकारचा किडा: जो चावल्यानें आंग सुजतें. [का.]

अबकारी—आबकारी पहा.

अबखाद्—(ना.) अवकात–द पहा.

अबगाळला—वि. (व.) आबाळ झालेला; ज्याच्याकडे दुर्लक्ष झालें आहे असा. [अवगळणें. सं. अवगलित]

अबजब—पु. हमरीतुमरी; अरेतुरे .[हिं. अबे–जाबे]

अबजाळ—अपजाळ पहा.

अबजुक—वि. (क.) अवघड.

अबडधोबड— ओबडधोबड पहा.

अबडूं—न. जाकीट? 'अंगरखे जाऊन अबडूं; पाटलोणी, कोट निघाले.' –ज्ञान १८. ९. १८७१.

अबद्–पैबंद—वि. अशाश्वत 'दौलत अबद–पैबन्द' –रा २०. २८६. [फा. अबद्–पैबन्द्]

अबदा—स्त्री. १ संकट; विघ्न; अरिष्ट; २ पीडा; त्रास; दुःख. [सं. आपदा]

अबदागि(गी)र—स्त्री. १ राजे वगैरे थोर लोकांच्या डोक्यावर सूर्याचें ऊन निवारणार्थ मिरवणुकीच्या वेळीं धरावयाचें छत्र. हें राजासाठीं किंवा सरदारासाठींहि असे. हा एक मान असून तो सरकार ज्याला देईल त्यानेंच ही वापरावयाची; दुसऱ्यानें वापरल्यास शिक्षा होई. यासाठीं लागणाऱ्या गडयाचा पगार व दर तीन वर्षांनीं कापड दांडा वगैरेचा खर्च सरकार देई. ही सालीना ६० ते ७० रुपयांची तैनात असे.–थोमारोजभा २.२७५.'तीस हजार अबदागिरी बरोबर चाले ढिगारा' –ऐपो १११. [फा. आफ्ताब= सूर्य + गिरफ्तन् = पकडणें]. **०गिऱ्या**–पु. अबदागीर धरणारा सेवक. पगार दरमहा ५ रुपये –समरो २.६०. **०बाळ्या**–स्त्री. कानांत घालावयाच्या ३२ बाळ्यांपैकीं एक दागिना. 'नालबाळ्या अबदागिरबाळ्या तकैधर।' –अफला ५५.

अबदार—पु. जलशाळेवरील पाणी थंड, स्वच्छ करणें वगैरे कामावरचा अधिकारी. [फा. आब्दार तुल. सं. अप्] **०खाना**–पु. पिण्याच्या शुद्ध पाण्याचा खजिना, सांठा; जलशाला; हौद. पाण्याचें खातें व या खात्याचें काम.

अबदारी—स्त्री. अबदाराची कचेरी व काम; अबदारखाना.

अबध्द—वि. १ न बांधलेलें; मोकळें; स्वतंत्र. २ (ल.) असंबध्द; मूर्खपणाचें; विसंगत–(भाषण, वर्तन वगैरे). 'देह पांचभौतिक प्रसिद्ध। तो मी म्हणणें हें अबध्द।' –एभा ९.२८८;'कृष्णासी शरीरसंबंध। हा तंव बोलचि अबध्द।' –एहस्व २.१. ३ ढिले; ढिलाईचें; बेकैद; बेबंद; स्वैर; स्वच्छंदी; (वर्तन वागणूक). ४ अशुध्द; बेडेवांकडे. 'अबध्द वांकुडें जैशातैशापरी। वाचे हरिहरि उच्चारावें।' –तुगा ८०९. 'अबध्द पोथी लेहों नये। पोथीवीण कामा नये। अबध्द वाचूं नये। वाचल्यावीण खोटें।'–दा १४.१.७८.–न. चूक; प्रमाद. **०मंत्र**–पु. शास्त्रविरुध्द पिशाच्चादि साधनांचा मंत्र. **०मुख**–वि. घाणेरडया तोंडाचा; शिवराळ; अभद्र बोलणारा; फटकळ. [सं.]

अबध—अबद्ध अप. 'रामीं रामदास ऐसें अबध बोलतो।' सप्र २.१८१.

अबंध—वि. निर्बंधरहित; स्वैर; मोकाट. 'परि अबंधा नित्य ब्रह्मभावा। बिघड नाहीं।' –ज्ञा २.२५७. [सं. अ+बंध]

अबंधडका—वि. (कर्ना.) अनागोंदी; अंदाधुंदीचा कारभार. [अबंध+धडका]

अबधाक–णें—अपधाक–णें पहा.

अबना–ल–ळ—न. तरवारीच्या म्यानाचें वरचें ठोपण (चांदीचें अगर सोन्याचें); याच्या उलट तहनाल. [?]

अबब—उद्गा. आश्चर्योद्गार; अहह! [का. अब्ब; ते. अब्बब]

अबरगत—स्त्री. (कु.) संकटाची भीति; खोटें संकट; बलागत पहा. [बलागत अप. सं. अभ्यागति ?]

अबरगोबर—क्रिवि. अव्यवस्थितपणें; ढिलाईनें; गबाळपणें. (क्रि० सारवणें, माखणें, वगैरे) [?]

अबरचबर—न. (प्र. अरबटचरबट), निःसत्व, बेचव अन्न; नीरस–रुक्ष खाणें, बोलणें. –क्रिवि. मूखपणानें; नीरसपणानें. [सं. चर्व्. तुल. फा. चर्ब=तेलकट, द्विरुक्ति]

अबरु—अब्रू पहा.

अबर्गत—वि. (कों.) १ लहान मुलासारखा; असहाय्य. २ रोगिष्ट. [सं. अभै=लहान मूल+गति किंवा अभैकवत]

अबलक–ख—वि. १ चित्रविचित्र रंगाचा; अनेक रंगांचा; सर्व शरीर लाल असून त्यांत पांढरे, काळे, जर्दे पट्टे असलेला घोडा. हा घोडा फार दुर्मिळ होय. –अश्वप २९. ' पंचकल्याणी घोडा अबलक । ' ' अबलक पंचकल्याणी कुमाइत । ' –ऐपो १३९. [अर. अब्लक्]

अबला—स्त्री. बायको; बाई; स्त्री. ' अबला सांगती वडिलां । येणें अभिमान सांडिला । ' –एरुस्व १६.६३. ' बाळा खेळती अबला । त्याही विसरल्या । ' –तुगा १२५. [सं.]

अबळ—वि. १ ताकद किंवा बळ नसलेला; अशक्त; कमजोर; दुबैल; दीन; ' बळी अबळातें खाय. हेंचि बाधित जरी होय । ' –ज्ञा १६.३०२. [सं. अबला] २ (ल.) अज्ञानी. ' बाळकाहातीं दिधल्या फळा । खावें हें न कळे त्या अबळा ॥ ' –एभा १५.२०. [सं अबल तुल० अर. अब्लह्=मूर्ख, अडाणी.]

अबळ—स्त्री. हयगय; आबाळ. [आबाळ]

अबा–ब्बा—उद्गा. अबब पहा.

अबा—पु. १ वडील माणसास आदरार्थी नांव. २ बाप –ख २६८१. [अबा हा शब्द सेमेटिक व इंडोआर्यन या भाषांतून आढळतो. याची अम्री, अब्बा, अत्ता वगैरे रूपें आहेत. लहान मूल प्रथम बापाला या शब्दानें हांक मारतें म्हणून तो तद्वाचक शब्द बनला. इं अब्बा=बाप; हिं. बाप, बाब; अर. अब्बास, अबु=श्रेष्ठ; हिब्रू आबा=बाप; खाल्डियन–सिरिअक अब्बा=बाप. लॅ. अब्बास=बाप, परमेश्वर; सिं. अबो; ते. का. अब्ब=बाप.]

अबाजा—पु. संबंध; अधिकार. ' मठानजीक माती खणावया तुमचे काय अबाजा आहे ! ' –रा१५.१५९. [अर. इझाफा; अजाबा ?]

अबाट—वि. १ न बाटलेला; जो भ्रष्ट झाला नाहीं असा; दूषित नसलेला; दोष न देतां येण्यासारखा. २ (क.) जातीबाहेर, वाळींत न टाकलेला. [सं. अ+भ्रष्ट]

अबाठ—वि. लहान व अपुऱ्या बनलेल्या कोयीचा–अंबा. [अ+बाठा]

अबाद–अबादानी—आबाद पहा.

अबादगुणी—वि. (व.) ज्यांत अनेक दुर्गुण भरले आहेत असा. [आबाद+गुण ?]

अबाध–धित—वि. १ अदूषित; आक्षेप न घेतलेला; शास्त्रादिकांनीं संमति दिलेला; अविरोध. २ विरोध–प्रतिकार न करतां येण्यासारखें; कायम; नाकबूल करतां न येण्यासारखें. सामाशब्द–अबाधितबुध्दि–कल्पना–पराक्रम–सामर्थ्य–चातुर्य–कौशल्य. ३ उत्पत्ति, स्थिति व लय यांची बाधा न होणारें; मुक्त. ४ त्रिकालाबाधित (भूत, वर्तमान, भविष्य या तिन्ही काळीं बाध न येणारें). [सं]

अबाब—पु. १ अवबाब; निरनिराळ्या प्रकारचे सरकारी कर. २ गांवचे हकदार यांचा वांटा वजा करून सरकारला साऱ्याबद्दल जें धान्य, ऐन जिनस द्यावयाचें तें. ३ (नगर)–आंब्याच्या पिकाचा अंदाज. [अर. अबवाब, बाबचें अव.]

अबाबय–अबावा—उद्गा. अबब पहा. आश्चर्य; अचंबा. **०करणें, वाटणें**—क्रि. अवडंबर माजविणें; कांगावा करणें; थैमान मांडणें; बोंबाबोंब करणें. [ध्व.]

अबा(ब्बा)शाई–ही; अब्बाशी—वि. गहिरा–गर्द तांबडा व काळसर–अब्बास फुलासारखा रंग. या रंगाचें वस्त्र. [हि.]

अबांव—न. कांगावा; थैमान; बोंबाबोंब; अबाबा पहा.

अबीर—पु. चंदन, केशर, कापुर, कस्तुरी यांच्या मिश्रणानें केलेला सुगंधी पदार्थ. [अर. अबीर]

अबुज—क्रिवि. (व.) बुजल्यासारखें; ओकें. **अबुज वाटणें**–न करमणें; चैन न पडणें; न सुचणें; न बुजणें. [सं. अ+बुध्]

अबुध्द—वि. माहीत नसलेलें; न समजलेलें. **–ध्दि–ध**–वि. मूख; समज नसलेला; शहाणा नसलेला. [सं. अ+बुद्धि]

अबुद्धिपूर्वकस्फूर्ति–प्रवृत्ति—स्त्री. (तत्त्व.) उपजतबुद्धि. (इं. इन्स्टिंक्ट).

अबुध्दया—वि. अजाणतां; नकळत; अबुद्धिपुरस्सर. ' यावरून राष्ट्रीय पक्षास ' इंग्रजी साम्राज्यांतर्गत स्वराज्य ' मान्य नाहीं असें जें कित्येक बुद्धया किंवा अबुध्दया विधान करतात तें सर्वस्वीं निर्मूल होय. ' –टि. ३.२८३. [सं.]

अबूज—वि. अडाणी; अल्लड; चमत्कारिक; विचित्र [सं. अबुध्द; हि. अबूझ]

अबे—उद्गा. अरे. [हिं.]

अबेदबे—स्त्री. १ अरेतुरे; हमरीतुमरी. २ उध्दटपणाची भाषा वापरणें–करणें; वांकडेतिकडें बोलणें. (क्रि० करणें.) [हिं. अबे द्वि.]

अबोट—वि. (प्रां.) बोट न लावलेलें; स्पर्श न केलेलें; चव न घेतलेलें; उपयोगांत न आणलेलें; (अन्न, पदार्थ, वगैरे). २ अखंडित लेप (रा.) अनामिका (बं.) ' तें लागलेलें अबोट । चंदनाचें । ' –ज्ञा १५.३.

अबोध—वि. अज्ञानी; जाणीव नसलेला. –पु. अज्ञान; ज्ञानाभाव, 'वस्तूसी अपुला जो अबोधु। तो ऊर्ध्वी आठुलैजे कंदु।' –ज्ञा १५.८८. **०बोधन-ध्य**–न. मूर्खास शिकविणें. **–नीय-ध्य**–वि. १ सांगण्यास, जाणण्यास, शिकविण्यास कठिण. २ शिकण्याला कठिण; जड; मंद; बुध्दिहीन. [सं. अ+बुध्]

अबोल, अबोलका-णा, अबोल्या—वि. १ मुखस्तंभ; बडबड न करणारा; जास्त बोलावयास नको असलेला; मितभाषी. 'आत्मा अबोलणा स्वयें। परि तोचि बोलतो म्हणावा निश्चयें।' –यथादी ४.३०७. २ गाण्यांतला विशिष्ट स्वरयुक्त जो बोल त्या विरहित असा. 'कां न सज्जितां वीणा। तो नाद जो अबोलणा।' –अमृ५.४१. ३ मुका; स्तब्ध. 'एक सदां गाती नाचती। एक ते होती अबोलणें।' –एभा २.६३१. [सं. अ+बोलणें]

अबोला—पु. १ कोणाच्या चुकीबद्दल रागावून न बोलणें; कुढया मनानें राहणें; परस्पर मैत्रींत अंतर पडणें; रुसवा किंवा द्वेष इ. कारणांमुळें एकमेकांशीं न बोलणें. २ (सामा.) मौन. 'ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैतत्वें तो भेटावा।' –ज्ञा १७.३३२. (क्रि. धरणें, करणें.) **–लण्या**–वि. न बोलण्यासारखा. 'तुका म्हणे नष्टा। अबोलण्या तुझ्या चेष्टा।' –तुगा १४१९. [अ+बोलणें]

अब्ज—न. एक संख्या; शंभर कोटी; अर्ब. [सं. अर्बुद?]

अब्ज—न. कमळ. [सं. अप्=पाणी+ज=जन्मलेलें]

अब्जिनी—स्त्री. कमलिणी. 'अद्वयाब्जिनी विकासु। वंदूं भातां।' –ज्ञा १६.१.

अब्जुग—न. नवलविशेष; अद्‌भुत. [?]

अब्द—पु. १ मेघ. २ वर्ष. ३ सांवत्सरिक श्राद्ध. 'प्रयागीं अब्दश्रवदा श्रीरामें सांग सारिले।' –मोरा १३. [सं.]

अब्धकर्णे—क्रि. धक्का बसणें; भीति वाटणें; अपधाकर्णे पहा. [सं. अप+धाक]

अब्धि—पु. १ समुद्र; महासागर. 'नातरी शब्दब्रह्माब्धि। मंथिलेया व्यासबुध्दि।' –ज्ञा १.५१. २ (एकंदर समुद्र सात आहेत, त्यांवरून) ७ संख्या. [सं.]

अब्ब-ब्बा—उद्गा. अहा! ओहो! अबब पहा. (क्रि० करणें, म्हणणें). [ध्व]

अब्बस—स्त्री. निर्भत्सना; फजीती; अपमान. (क्रि० करणें). 'अब्बस केली.' =फजीती केली. [अबे किंवा अब्+बस=आतांपुरे]

अब्बा—पु. (ख़ि.) बाप; बाबा. 'तो बोलला अब्बा, बापा तुला सर्व साध्य आहे.' –मार्क १४. ३६; रोम ८. १५; गल ४.६ [अबा पहा]

अब्बाशाई-ही—अबाशाई पहा.

अब्बाशी—स्त्री. १ अबाशाही. २ (व.) लहर; मिजास. 'एवढी अब्बाशी नाही चालणार येथें.' [अब्बा+शाही]

अभ्रश—वि. १ घनश्याम; काळासावळा. २ ठिपकेदार; कुष्टी. [अर. अब्रस=कुष्टी तुल. सं. अभ्रसम]

अब्रह्मण्य—वि. ब्राह्मणास करण्यास अयोग्य. –न. ब्राह्मण्याविरुद्ध गोष्ट; पाप; दुष्कृत्य. [सं.] –उद्गा. (ल.) अरेरे! घात झाला!

अब्राह्मण—पु. ब्राह्मणेतर हिंदु; शूद्र. [सं.]

अब्रू—स्त्री. मान; कीर्ति; लौकिक; प्रतिष्ठा; मान्यता; इज्जत. [अर. आब=पाणी+ए=तोंड–तोंडावरील कळा, तेज.]. **०गाडण्यावरून चालणें-जाणें**–दुष्कीर्ति होणें; बदलौकिक होणें. –बाळ २.११, **०खाऊ-घेणा**–वि. १ दुसऱ्याची अब्रू घालविणारा, घेणारा. २ भ्रष्ट किंवा निष्फळ करणारा; मोडता घालणारा; भोंदणारा; चकविणारा; पेंचांत घालणारा. **०घेणें**–क्रि. १ अपमान करणें; अप्रतिष्ठा करणें; मानहानि करणें. २ शील भ्रष्ट करणें; (संभोगाचा) बलात्कार करणें. **०चा-दार**–वि. प्रतिष्ठित; योग्यतेचा; माननीय; लौकिकवान; इज्जतदार. **०ची चाड**–स्त्री. प्रतिष्ठेची आस्था; काळजी. **०चे कांकडे**–पु. अब्रूचा नाश. –स्व २८३. **०जाणें**–क्रि. अपमान होणें; कीर्तिनाश होणें. **०नुकसानी**–स्त्री. (इं. डिफेमेशन) (कायदा). कोणा मनुष्याच्या मनःस्थितीला किंवा बुध्दीला, सद्‌गुणाला, जातीला, धंद्याला कमीपणा येईल असा मजकूर बोलून किंवा लिहून प्रसिध्द करणें; लेखानें, भाषणानें, खुणांनीं अगर चिन्हांनीं एकाद्याची बेइज्जत करणें.

अब्लक—अबलक पहा.

अभक्त—वि. भक्त नसलेला; पूज्यबुध्दि नसलेला. 'तेवि भक्तपाळक अभक्त संहार॥' [सं.]

अभक्ति—स्त्री. १ अप्रीति; श्रध्देचा अभाव. २ द्वेष; नावड. [सं.]

अभंग—वि. १ अविनाशी; अखंड; अक्षय; निश्चल; निरंतर. 'श्रीकृष्णरंगें सुरंग। अहेवपण तेणें अभंग। तेंचि कुंकुम पैं चांग। मुखचंद्री चंद्रमा।' –एरुस्व ७.१७. २ (ल.) ब्रह्मस्वरूप; अविनाशी स्थिति. 'हे करणी केली जनार्दनें। मज अभंगीं घातलें तेणें।' –एभा १८.३९३. ३ न तुटलेलें, फुटलेलें, उल्लंघलेलें; सतत; अविरत. 'प्रपंचाची धाडी। अभंग हे।' –ज्ञा १३.९९२. 'यालागीं जो निःसंगु। तोचि अभंगु साधक।' –एभा २.१५६. [सं. अ+भंग] –पु. एक मात्रावृत्त. चरण चार. या वृत्ताला धरबंध फारसा नाहीं. याला मात्रा वगैरेचा नियम फारसा लागू पडत नाहीं. चरणांत तीनपासून आठपर्यंत अक्षरें. महाराष्ट्रांत या वृत्ताचा प्रसार वारकरी पंथांतील संतांनीं फार केला. उदा. सुंदर तें ध्यान उभें विटेवरि। कर कटावरि ठेवूनियां॥ तुगा १

अभंग—पु. अयोग्य गोष्ट; खोटी रीत. 'तेथ न सुवावा अभंगीं। आत्मराजु।' –ज्ञा १८.२८०. [सं.]

अभंगी—वि. अभंग पहा.

अभंड—न. १ भांडयांतून जिन्नस तोलून देण्यापूर्वी त्या भांडयाचें वजन करण्यासाठीं वजनें किंवा इतर जिन्नस तराजूंतील दुसऱ्या पारड्यांत टाकून कांटा समतोल करणें. २ अशा तऱ्हेनें वजन करण्यासाठीं टाकलेलीं वजनें किंवा इतर पदार्थ. [सं. भड्=परिमाणे=वजन करणें. –पाणिनी]. (क्रि० करणें). ३ जिनसाचे फार मोठे गठ्ठे; एका गाडींत दोनन डाग जातील अशा प्रकारचे मालाचे गठ्ठे. ४ (व.) संकट; चिंता. 'या लग्नाचें मला मोठें अभंड पडलें आहे.'

अभंड—वि. १ पुष्कळ; अमर्याद; फार. 'यंदा नदीला पाणी अभंड आलें.' सामाशब्द– अभंड पाऊस–पीक–धान्य–वार इ०. 'तुका म्हणे काळें काळें केलें तोंड. प्रकाश अभंड देखोनियां.' –तुगा ३९८६. २ कुमांडी; खोडसाळ. ३ जहांबाज; आडदांड; भांडखोर; कजाग. 'सवती ग सवती नित्य भांडती नाहीं कोणाचा कमजोरा. पति पांगळा करुनि बसविला अभंड नारी शिरजोरा.' –पला ५.९. [सं. भेड्=पट्टा करणें; भांडणें.]

अभद्र—न. वाईट गोष्ट; अकल्याण; अरिष्ट. 'अभद्र व्हावें शिशुपाळासी.' –एरुस्व १३.४२. –वि. १ वाईट; अशुभ; अनिष्ट –भाषण (मरण, आजारीपण इ० चें); घाणेरडें; अपशब्दांचें–बोलणें; गचाळ; तिटकारा उत्पन्न करणारें; बीभत्स; द्वाड. 'असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण.' –केका ९४. २ वाईट नजरेचा; दुष्ट भाषण करणारा. [सं.]

अभय—न. १ सुरक्षितपणाची, निर्भयतेची खात्री. २ भीति नसणें; सुरक्षितता. 'अभय असें'=कशावद्दलहि भिऊं नकों; निर्भय रहा. ३ अभयमुद्रा. –वि. निर्भय. 'स्वकर्म आचरणारे अभय जे वळी सर्वा ठाई.' –ऐपो ४२०. **०कर**—पु. अभय दक्षिणारी देवतेची किंवा राजाची हस्तमुद्रा किंवा हात. 'तुझीयेन अभयंकरें. अनावर माया हे वोसरे.' –दा १.४.९. **०डिंडिम**–पु. १ निर्भयता असल्याबद्दल वाजविण्याचा डमरु; दुंदुभी वगैरे. २ (ल.) संरक्षणाच्या खात्रीबद्दल स्पष्टपणें जाहीर रीतीनें बोलणें; सुरक्षितपणाबद्दलचें वचन–कौल वगैरे. **०दान**—न. सुरक्षिततेबद्दलची देण्यांत येणारी खात्री–हमी, वचन. **०पण**—न. अभयदान. **०पत्र**—न. सुरक्षितपणाबद्दलचें राजपत्र; कौल; सरकारच्या दहशतीनें अथवा दुष्काळानें रयत परागंदा झाली असतां तिला आश्वासन द्यावयाचें पत्र, दवंडी, जाहीरनामा. **०मुद्रा**–अभयकर पहा. **०लेख**–अभयपत्र पहा. 'समुद्रयान करण्याचा जर त्यास प्रसंग आला तर कपतानाकडून नौकेबद्दल अ० घेतल्यावांचून तो तिजवर पाऊल ठेवणार नाहीं काय?' –नि ८८८. **०वचन**–अभयदान पहा. **०हस्त**–अभयकर पहा. 'धर्मप्रतिष्ठा तो सिध्दु. अभयहस्तु.' –ज्ञा १.१३.

अभयंकर—वि. भीति वाटण्यासारखें नसलेलें; सौम्य. [सं.]

अभर—स्त्री. आकंठतृप्ति; पूर्णता; विटपर्यंत समाधान.(क्रि० करणें, होणें, धरणें). –वि. अतिशय तृप्त झालेला; भरलेला; श्रीमंत. 'विर वरा अभर जाले बहुत.' –दावि ८; 'येक लाभें अभर जाले.' –दा ११.४.२५. [सं. आ + भृ]

अभरवण—स्त्री. १ आकंठ भरणें; अधिक घेणें. २ पोटापेक्षां जास्त जेवणें. (क्रि० घे, ये). [सं. आ+भृ]

अभरंवशीं—क्रिवि. १ आपतींत; निराशेच्या अवस्थेंत; आशाभंगानें ओढवलेल्या संकटांत. 'अभवेसी नको टाकु जसें जळ वळवाचें वाहवलें.' –होला ७९. २ बेभरंवसेपणानें; विश्वासघातानें. [अ+भरंवसा]

अभरंवशी—वि. अविश्वासी.

अभरंवसा—पु विश्वासाचा अभाव, निराशा; विश्वासघात 'तुमच्या भरंवशावर मी राहिलों, आतां ऐते वेळेस अभरंवसा करूं नका.' [अ+भरंवसा]

अभराड—वि. (कों.) गर्भधारणेशिवाय जाणारें वर्ष; वांझकाळ (गाय, म्हैस इत्यादींच्या बाबतींत). –न. गर्भधारणेशिवाय राहणारें गुरूं. [सं. अ+.भृ]

अभर्तृका—स्त्री. १ विधवा; (प्र.) गतभर्तृका (याच्या उलट सभर्तृका). २ कुमारी. [सं.]

अभव—पु. संसाराच्या उलट स्थिति (मोक्ष). 'ॐनमो श्रीजनार्दना. नाहीं भवअभवभावना.' –एभा १.१. [सं.]

अभक्षणीय–अभक्ष्य— वि. खाण्यास निषिद्ध–अयोग्य–निरुपयोगी (मांस, मद्य इ०). [सं.]

अभागी–अभाग्य–अभाग्यवान—वि. कपाळकरंटा; खोट्या नशिबाचा; दुर्दैवी. 'त्यासी न भजे अभाग्य कोण.' –एभा २.२९.

अभाग्याची पुतळी—स्त्री. दुर्दैवी, कपाळकरंटी स्त्री. 'तिथंही अभाग्याच्या पुतळ्या, कपाळकरंट्या गोपिकाबाई.' –तोवंड १९.

अभाग्ये—न. (गो.) अभागी माणूस. 'अभाग्ये तूं नशिबान मेळौंक जाय.' [सं. अभागी]

अभांड—अभंड पहा.

अभांडकुभांड—न. तोहमत; आळ; किंचाउ; कुभांड पहा. **–डी कुभांडी**–कुभांडी पहा. [कुभांड द्वि.]

अभाय—न. (खा.) आभाळ.

अभार—आभार पहा.

अभारण—न. निरवणूक; सोंपवणूक; भार घालणें; टाकणें. 'पांडवांचें अभारण घातलें कवणासेंगे.' –भाए ११६. [सं. आ+भार]

अभाव—पु. १ वाण; मुळींच नसणें; असंभव; शून्यता; नास्तित्व. अभावाचे ४ प्रकार.–१ प्रागभाव. २ प्रध्वंसाभाव. ३ अन्योन्याभाव. ४ अत्यंताभाव. उ० १ लग्नापूर्वीचें ब्रह्मचर्य. २ मृत्यूनें नाश होणें.

३ पुरुषाचे ठिकाणीं स्त्रीत्वाचा अभाव. ४ वंध्यापुत्र. २ नास्तिकपणा; नास्तिकबुद्धि. 'अभावाची घेतली नरडी। धाकें उदर तडाडी।' –दा ५.९.४६. [सं अ+भू=होणें]. **–अभावीं**–अ. १ ऐवजीं; नसला तर. २ असंभव असतां.

अभाव—पु. १ शंका; वहीम; अंदेशा; कल्पना; समज. 'हा श्रीमंत आहे असा लोकांमध्यें अभाव आहे.' २ भरंवसा; विश्वास. 'भाषेचें तिसरें वसतिस्थान न्यायाधिशांच्या कचेऱ्या. या ठिकाणचा मराठी भाषेच्या कैवाऱ्यांस मोठा अभाव आहे.' –नि ११३. [सं. आ+भाव]

अभावणी—स्त्री. १ पिकाचा अंदाज: कोंकणांत खोत हा दरेक शेताचा पीक उभें असतांना पंचांसमक्ष व पाटल्यासमक्ष पाहणी करून जो पिकाचा अंदाज ठरवितो ती; पिकांची आणेवारी. 'अर्धेलीबद्दल पुढें मागें तकार पडूं नये म्हणून शेतांत उभीं पिकें असतांनाच एकंदर उत्पन्नाचा अजमास किंवा अभावणी करण्यांत येते' –टि २. ६०७. २ प्रत्येक शेतवार अभावणीचें नोंदणीपत्रक. हें खोतांचें नोंदणीपत्रक असून यांत एकंदर कुळांचीं नांवें, जमीन, पीक व खोतानें घ्यावयाचें पीक यांची नोंद असते. यावरूनच खतावणी म्हणून दुसरें एक नोंदणीपत्रक करतात; अंदाजपत्रक. [सं. आ+भू (भाव)]

अभावनीय—वि. १ अतर्क्य; न जाणण्याजोगें; न समजण्यासारखें. २ अचिंतनीय; मनांत घेण्यास, विचार करण्यास अयोग्य. [सं.]

अभाविक— वि. १ देवावर विश्वास न ठेवणारा; श्रद्धा नसलेला; भाविक नव्हे तो. २ अतर्कित; अकल्पित; आकस्मिक; आगंतुक, विचार न केलेला; चिंतन न केलेला. –न. अल्पत्व; अल्पराशि; जवळजवळ अभाव. 'त्याचे घरीं भोजनास गेलों परंतु तूपसाखर यांचें अभाविक होते.' [सं. अ+भाव]

अभावे ब्रह्मचर्य—न. विषयपूर्ततेचीं साधनें नसल्यामुळें, न मिळाल्यामुळें आपोआप घडणारें ब्रह्मचर्य; तुरगब्रह्मचर्य. 'वृध्दानारी पतिव्रता' यासारखा सोंवळेपणा.

अभाळ—न. १ आकाश; अस्मान. म्ह० अभाळ फाटलें तर ठिगळास काय द्यावें. २ अभ्र; ढग; मेघपटल; काळोखी; ढगानें व्यापलेलें आकाश; ढगाळपणा. 'कडकडित अभाळें. येऊनि आकाश झांकोळे.' –एभा ७.४४९. 'गगनीं अभाळ आलें. मागुती सवेंचि उडालें.' –दा २०.७.२६. ३ (ल.) संकट; बंड. 'मोंगलांचें पारिपत्य झालें म्हणजे चार अभाळें उठलीं आहेत हीं विरतील.' [सं. अभ्र+आलय, प्रा. अब्भ; गु. आभ; झें. अब्र; फा. अब्र]. **०कोसळणें**–मोठे अरिष्ट येणें; गुदरणें. **०खराळणें**–(व.) आकाशांत जोराचा गडगडाट होणें. **०डोक्यास टेकणें, लागणें, दोन घाटें उरणें, ठसठसां लागणें, ठेगणें दिसणें–होणें**=अति गर्विष्ठ माणसाबद्दल योजावयाचे प्रयोग. **०फाटणें**=मोठें अरिष्ट गुदरणें; सर्वच बाजूंनीं संकटें येणें. **०येणें**–कि. संकट येणें. **–वर अ०येणें** -एकावर एक संकटे येणें, ओढवणें. **–ळाखालीं–तळीं**–पृथ्वीच्या पाठीवर; मृत्युलोकीं; पृथ्वीवर. **–वर थुकणें**–निष्फळ प्रयत्न करणें किंवा आपल्याच अंगावर बाजू ओढवेल असें कृत्य करणें. **–शीं भांडणें**–१ अती ऊंच होणें, असणें; गगनचुंबित असणें–झाडें, इमारती वगैरे. २ भयंकर भांडखोर असणें; निष्कारण कलह करणें; वाऱ्याशीं भांडणें. **–वर चढणें**–१ वरचढपणानें अधिकाधिक मागणी करणें; एकसारख्या मागण्या करीत राहणें. २ अरेराव होऊं लागणें; आज्ञतेखोर बनणें. **–स भोंक पडणें**–अति वृष्टीबद्दल योजावयाचा प्रयोग; मुसळधार पाऊस पडणें. संततधार लागणें. **–चा गंड**–पु. (शेतकी)=अंब्रा ढगांची गर्दी. **–चा गाळ**–पु. गर्द ढग; मळभ; ढगाची काळोखी. **–ची सावली**–स्त्री. क्षणभंगुर गोष्ट; पाण्यावरील बुडबुडा; अभ्रच्छाया; ढगाची सावली.

अभि—उपसर्ग व शब्दयोगी अव्यय. १ सारखेपणा, साम्य, सादृश्य. उ. अभिरूप; अभिराम (याप्रमाणें, असें). २ सान्निध्य उ० अभ्यग्नि; अभिचर; अभिमुख; (पुढें; म्हणून). ३ वेगळेपणा; पृथक्त्व (निरनिराळ्या प्रकारें, वेगवेगळे,) ४ संयोग; विवक्षितपणा (संबंधीं, विषयीं.) उ. अभिधान; [सं. अभि; तुल. ग्री. अम्फि; लॅ. ऑब; झेन्द. अइबि; गॉ. बि; ओल्ड हायजर्मन. बी]

अभिकार–गार–घार—पु. १ यज्ञांत हवन करावयाच्या द्रव्यावर किंवा होमाकरितां घेतलेल्या अवदानावर तूप घालणें. २ (व.) जेवणाच्या सुरवातीस वाढावयाचें तूप; अन्नशुद्धि. ३ (ल.) पाहुण्यांच्या पानावर थोडेसेंच तूप ओतणें. ४ सिंचन.[सं. अभिघार]

अभिघारणें—सक्रि. तुपानें सिंचन करणें. 'नमस्कारावें वाढितां अन्न। अभिघारावें पहिलेंचि जाण। –गुच। ३७.१२५. [सं. अभिघार]

अभिचार—पु. दुसऱ्याला दुखापत किंवा नाश करण्याचे मंत्र किंवा जादूटोणा; जारणमारण; करणी. 'यालागीं रिघे अभिचारीं। ते ममता खरी तामस।' –एभा २५.१३२. 'क्षतहतशेष द्रुत गज ते अभिचारप्रयोगसे फिरले।' –मोभीष्म १०.६९. २ यासंबंधी होमादिकर्म; अनुष्ठान इ. ३ हिंसा; वध. [सं. अभि+चर्]

अभिचारक–रिक—वि. १ जारणमारण करणारा; अभिचार करणारा; जादूगार. 'आणि अभिचारकीं तिहीं। उपद्रविजे जेतुलें कांहीं।' –ज्ञा १६.४००. २ जारणमारणसंबंधीं; अभिचाराचें; जादुगिरीचें. 'तेथींचा अगम अभिचारक। वेदविरुद्ध मार्ग देख।' –एभा। १३.१२०.

अभिचारी—पु. अभिचार करणारा; मांत्रिक; जादुगार. 'ऐसां कव्हणी नाहीं अभिचारिकू। जो होमी कोकिळांचा देशिकू।।'–शिशु ८४३. [सं.]

अभिजन—पुन. १ जन्मभूमि; मातृभूमि; स्वदेश. २ कुटुंब; कुल; वंश. ३ उत्पत्ति. ४ उच्च कुल; सत्कुल. ५ पूर्वज किंवा वंशज.

६ नातलग; परिवार; सेवकजन; अनुचर. [सं.] ०सत्ता—स्त्री. जींत सरदार प्रमुख आहेत अशी राज्यपध्दति; उमरावसत्ता; इं. ॲरिस्टॉक्रसी. 'परंतु त्यांतील अभिजनसत्तेचें बीज मात्र त्यांनीं नेलें नाहीं.' —पार्लमेंट २७६.

अभिजपणें—सक्रि. जप करणें; पुनःपुन्हा उच्चार करणें; पठण करणें. 'शब्दगर्भमंत्र अभिजपून लतांच्या पानांतील हिरव्या रंगाच्या मनोहारितेला हरताळ फांसणार असेल.' —विचावि २. [सं. अभि+जप्]

अभिजात-त्य—वि. १ कुलीन; सभ्य; थोर मनाचा; प्रतिष्ठित; उच्च दर्जाचा. 'तरि आतां पवित्र तयाचेंचि कुळ। अभिजात्य तेंचि निर्मळ।' —ज्ञा ९.४२१. २ सुसंस्कृत; विदग्ध; इं. क्लासिकल. ०वाङ्मय—न. विदग्धवाङ्मय; उच्च दर्जाचें वाङ्मय; श्रेष्ठ प्रतीचें—पहिल्या प्रतीचें ग्रंथसाहित्य. (इं. क्लासिकल) [सं.]

अभिजाति—स्त्री. १ मनाचा थोरपणा; सभ्यपणा. २ कुलीनता; उच्च वंश. [सं.]

अभिजित्—न. २८ वें नक्षत्र. उत्तराषाढा नक्षत्राचा शेवटचा (चौथा) भाग व श्रवण नक्षत्राचा १५ वा अंश एवढ्या कालास अभिजित् नक्षत्र म्हणतात (इं. लायरा). या नक्षत्राचा क्रांतिवृत्ताशीं संबंध नाहीं. हें फारच उत्तरेस आहे. 'तो मी अभिजित् म्हणे हरी।' —एभा १६.२२१. —पु. १ दोन प्रहरचे बारा वाजण्याच्या पूर्वी एक घटका व नंतर एक घटका मिळून दोन घटकांचा काळ; सूर्योदयापासून आठवा मुहूर्त. 'वीरांच्या अभिमाना झाला अस्त। मध्यान्हीं आला आदित्य। मुहूर्तीं मुहूर्त अभिजित। समयो उचित लग्नाचा।' —एरुस्व ७.६४. २ आगंतुक; आकस्मिक; अनपेक्षित (पाहुणा, खर्च, एकादी गोष्ट). 'आम्हीं आहे खटलें यास पुरायाजोगी वर्षाचे खर्चाची बेगमी केली आहे, आतां मध्येंच अभिजित् एकादा खर्च उभा राहिल्यास पुरणार नाहीं. नवें घेतलें पाहिजे.' [सं.]

अभितः—क्रिवि. सर्वोवार; सर्व बाजूंनीं; सर्व दिशांनीं. [सं.]

अभितप्त(दृष्टि)—वि. (नृत्य) पायण्यांची उघडझांप करणें व बाहुल्यांची चमक कमी करणें. हा अभिनय निराशा, पीडा, संकट इ० अवस्थादर्शक आहे. [सं. अभितप्त=तापलेला, दुःखी]

अभिधा—स्त्री. १ संकेतानें शब्दाचा वाच्यार्थ दाखविण्याची शक्ति. २ शब्दशः अर्थ; वाच्यार्थ; यौगिक अर्थ. ३ नांव; पदवी: लक्षण. [सं.] ०वृत्ति—स्त्री. शब्द व त्याचा यौगिक अर्थ यांमधील संकेत.

अभिधान—न. १ नांव; नाम. 'आतां विषयाभिधान—। भेदु आइकें॥' —ज्ञा १३.११६. २ नामनिर्देश; उल्लेख; अर्थबोध. 'घट हा शब्द कंबुग्रीवादिमान् जो व्यक्तिविशेष त्याचें अभिधान करतो.' ३ नांव सांगणें; नांव घेणें. ४ व्याख्या करणें; लक्षण करणें. 'आतां दुःखाची आंतुवट केली। दोषकाटयांची जरी भरली। तरी निजाभिधानीं घाली। असुरी ते।' —ज्ञा १६.२१३. ५ शब्द. ६ शब्दसंग्रह; शब्दकोश. उ० हेमचंद्राचा अभिधानचिंतामणि हा समानार्थक कोश; हलायुधाचा अभिधानरत्नमाला हा कोश. ७ (व्या.) कर्त्याबद्दल विधान. [सं. अभि+धा=ठेवणें]. ०कोश—पु. अनेक कोशांचें ज्ञान; चौसष्ट कलांपैकीं एक कला. [सं.]

अभिधायक—वि. नामनिर्देश करणारा; उल्लेख करणारा; कथन करणारा; दर्शविणारा (शब्द, वक्ता). [सं.]

अभिधेय—वि. नांवाचें; उल्लेखिलेलें; निर्दिष्ट केलेलें; निर्देशिलेलें; दाखविलेलें; कथन केलेलें. —न. अर्थ (शब्दाचा); विषय (बोलण्याचा). [सं.]

अभिनंदन—न. कोणी कांहीं चांगलें केल्यास, किंवा कोणाचें कांहीं चांगलें झाल्यास त्याबद्दल आनंदप्रदर्शन, कौतुक, स्तुति. [सं. अभि+नन्द्]

अभिनय—पु. १ मुद्रेनें किंवा अंगविक्षेपानें किंवा इतर हावभाव करून मनांतील भावना व्यक्त करणें. २ (नाट्य) ज्याचें रूप घेतलें असेल त्याचें—वेष, भाषण, चेष्टा, मनोविकार इत्यादि सर्व गोष्टींमध्यें अनुकरण. कवीनें रंगविलेल्या भूमिकेचें तंतोतंत ज्ञान, हावभाव व वेष यांनीं श्रोत्यांस बरोबर करून देणें. ३ (नृत्य) हस्तपादादि अवयवांच्या नियमबद्ध हालचालींनें रस व भाव प्रकट करणें. ४ (सामा.) हावभाव; चेष्टा; अंगविक्षेप. [सं. अभि+नी=जवळ नेणें]

अभिनव—वि. १ नवीन; नूतन. 'आतां अभिनव वाग्विलासिनी'। —ज्ञा १.२१. २ अपूर्व; आश्चर्यकारक; विलक्षण. 'कृष्ण पहावयाच्या लोभा। नयनीं नयनासी निघती जिभा। श्रवण श्रवणासी वल्लभा। अभिनव शोभा कृष्णाची।' —एरुस्व १.७६. —न. नवल; आश्चर्य. 'अभिनव करिती सकळ जन। म्हणती वांझेसी गर्भधारण।' —गुच ३९.३३. [सं.]

अभिनवणें—अक्रि. अपूर्वतेनें प्रकट होणें. 'तो शांतुचि अभिनवेल। ते परियसा मऱ्हाठे बोल।' —ज्ञा ४.२१४. [सं. अभि+नव]

अभिनिविष्ट—वि. १ अभिनिवेशयुक्त; उत्सुकतापूर्वक: लक्ष देणारा; पूर्ण व्यग्र किंवा एकचित्त झालेला; अति आसक्त. २ निपुण; परिचित; निष्णात असलेला. ३ गर्विष्ठ; हेकेखोर. [सं. अभि+नि+विश्]

अभिनिवेश—पु. १ औत्सुक्य; एकचित्तता. २ निश्चय; प्रयत्न; नेट; आग्रह; धीर. ३ दमदारपणा; नैपुण्य; तरबेजपणा: प्रगति; परिचय; परिज्ञान. ४ मनावरील परिणाम किंवा ठसा: कल्पना; ग्रह. ५ अहंकार; अभिमान. ६ (व्यापक) संचार. (क्रि० धरणें.) [सं.]

अभिनिवेशी—वि. १ अभिनिवेश बाणलेला. २ हेका धरणारा; हेकड; हट्ट धरून राहणारा. ३ निग्रही; दमदार: चिवट; पिच्छा धरणारा. [सं.]

अभिनीत—वि. १ चांगला शिकविलेला; शिक्षण दिलेला; तरबेज केलेला. २ हावभाव करून व्यक्त केलेले किंवा अभिनयानें दर्शविलेले (मनोविकार, भावना). [सं.]

अभिनीति—अभिनय पहा. [सं.]

अभिन्न—वि. १ पृथक् किंवा वेगळें नसलेलें; भेदरहित. 'एवं जीवधर्महीनु। जो जीवेंसीं अभिन्नु।' –ज्ञा १३.१०६६. २ (ल.) अद्वैत; एकरूप; सरूप. 'अभिन्न सुखसेवेआंतु। नारद आनंदें नाचत गातु।' –एभा १.९३. ३ (गणित) अपूर्णांक नसलेले; पूर्णांक. संकलन (बेरीज), व्यकलन (वजाबाकी), गुणन (गुणाकार), भाजन (भागाकार) या शब्दांशीं जोडून उपयोग करतात. ४ अखंड; सगळा. [सं.]. ०**परिकर्माष्टक**–न. (गणित) पूर्णांकांचीं मुख्य आठ कृत्यें (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ); [सं.]

अभिन्नव—अभिनव (अप.) पहा. –नागा ६३०. [सं. अभिनव]

अभिपट्टी—स्त्री. जादा कर. –शर.

अभिप्राय-व—पु. १ अर्थ; उद्देश; हेतु; भाव. 'तैसा नव्हे हा अभिप्राव।'–रास १०.८६. 'तुझा अभिप्राय पाहून मला फार खेद वाटतो.' –बाळ २.२२१. २ भावार्थ; सारांश; मथितार्थ. 'भक्ति चेन योगें देव। निश्चयें पावती मानव। ऐसा आहे अभिप्राव। ईये ग्रंथीं।' –दा १.१.४. ३ मत; शेरा; सरकारी कामगाराचा शेरा किंवा अहवाल; रिपोर्ट. 'मामलतदाराचा अभिप्राय पहावा.' [सं. अभिप्राय]

अभिप्रेत—न. अर्थ; हेतु; उद्देश; योजना; सारांश. –वि. १ उद्देशिलेलें; योजिलेलें; ठरविलेलें. २ इष्ट; प्रिय 'निष्कामासि अभिप्रेत। सवेदा जें।' –ज्ञा ८.१०५. 'प्रार्थना हें या वर्गास अभिप्रेत असलेल्या साधनांपैकीं मुख्य साधन आहे' –टि ३.२४३. [सं. अभि+प्री]

अभिभव—पु. पराभव; पराजय; मोड; दाणादाण. 'विघ्नीं अभिभव नव्हे त्यासी। तूं हृषीकेशी रक्षिता।' –एभा ४.१५५.

अभिभवणें—उक्रि. (काव्य) १ पराभव करणें; जिंकणें; घेरणें. 'ना तरी रणीं शव सांडिजे। तें चौमेरी गिधीं विदारिजे। तैसें स्वधर्महीन अभिभविजे। महादोषीं।' –ज्ञा २.२००. २ उदय पावणें; पसरणें. 'तेथ यजन म्हणिजे स्वयें यज्ञ करावे। जे कां सोमादि अश्वमेधांत बरवे। अथवा नित्यकर्मी अभिभवे। श्रौतस्मार्तादिक।' –स्वादि ५.४.४. [सं. अभि+भू]

अभिभूत—वि. पराभूत; पराजित; वश. 'देखें कामना–अभिभूत।' –ज्ञा २.२४८. [सं.]

अभिमत—वि. प्रिय; संमत; पसंत. [सं. अभि+मन्]

अभिमंत्रण—न. १ मंतरणें; मंत्र म्हणून विशिष्ट संस्कार करणें; सुसंस्कृत करणें; मंत्रानें पवित्र करणें; भारणें. २ आमंत्रण; निमंत्रण; बोलावणें; हांक मारणें. [सं. अभि+मन्त्र्]

अभिमंत्रणें—क्रि. मंतरणें; मंत्र म्हणून सुसंस्कृत–शुद्ध करणें.

अभिमंत्रित—वि. १ मंतरलेलें; अभिमंत्रण केलेलें; मंत्र म्हणून पवित्र केलेलें. २ बोलाविलेलें; आमंत्रण दिलेलें–केलेलें; आमंत्रित. [सं. अभि+मंत्र्]

अभिमनस्क-अभिमना—वि. १ विशिष्ट गोष्टीकडे मन वळलें आहे असा; विशिष्ट गोष्ट ज्याच्या मनांत आहे असा; चित्त एकाग्र असलेला; तल्लीन; आसक्त. २ उद्युक्त; तयार; उत्कंठित असलेला; सावधान. [सं. अभि+मनस्]

अभिमर्द—पु. जोरानें तुडविणें; किंवा मर्दन करणें–मळणें; अतिशय तुडवातुडव–चेंदामेंदा; नाश; नासधूस. [सं. अभि+मृद्]

अभिमान—पु. १ गर्व; ताठा; आढ्यता; तोरा, चढेलपणा; मगरूरी. २ आत्मिक भावना; आपलेपणाची दृष्टि किंवा जाणीव; आपल्या स्वतःविषयीं किंवा आपल्या वस्तूंसंबंधीं हा माझा असा ग्रह असणें; मन व अंतःकरण लावणें किंवा गुंतविणें; जेणेंकरून त्या त्या विषयाचें जें बरें वाईट तें तें आपलेंच असें वाटणें. सामाशब्द–कुलाभिमान, अधिकाराभिमान, जात्यभिमान, देशाभिमान. ३ एकाचाकडे ठेवलेला, लावलेला हक्क; हक्क सांगणें; स्वत्व-स्वामित्व-वाद. ४ मान; योग्य गर्व; उच्चतेबद्दलची भावना; उदात्त किंवा थोर मनोविचार. (क्रि० धरणें, भोगणें, वाहणें, मानणें, करणें). कांहीं वाक्प्रचार– **अभिमान धरणें–पडणें**=एकाद्या गोष्टीबद्दल अतिशय काळजी, कळकळ, आस्था बाळगणें. **अभिमानाखालीं जाणें**–१ गर्वामुळें नाश पावणें; नुकसान होणें. २ अहंकारानें बोलणें, वागणें. **म्ह०** अभिमानाचें घर खालीं असतें=गर्विष्ठ मनुष्य नेहमीं अवनत स्थितींत असतो, त्याचा कधीं उत्कर्ष होत नाहीं. **अभिमानानें मरणें**–१ गर्वामुळें आपाला जीव, दर्जा किंवा सौख्य नाहींसें करणें. २ कांहीं झालें तरी (जिवावर बेतली तरी) आपला ताठा किंवा मत, पक्ष, हेतु कायम ठेवणें; हेका न सोडणें. **अभिमानास पडणें-पेटणें**–लाजेमुळें किंवा केवळ अपमानाच्या कल्पनेमुळें मोठ्या खटपटीस लागणें; ईर्षेस चढून कार्योद्युक्त होणें.

अभिमानणें—उक्रि. (काव्य) अभिमान (सर्व अर्थीं) धरणें, बाळगणें. 'निज शरीरचि म्यां अभिमानिलें। प्रभूस गर्वभरें अपमानिलें।'

अभिमानधन—वि. अभिमानाला महत्त्व देणारा; अभिमान धरणारा; स्वतःच्या शब्दास जागणारा; धीराचा; निश्चयी; दमदार. [सं.]

अभिमानशून्य—वि. अभिमान नसलेला; स्वाभिमान न बाळगणारा; पाणी नसलेला. [सं.]

अभिमानी—वि. १ गर्विष्ठ; मगरूर; दिमाखी; ताठ्याचा. २ योग्य अभिमान बाळगणारा. [सं. अभिमानिन्]

अभिमुख—वि. १ सामोरा; सन्मुख; –कडे तोंड केलेला; रोख असलेला. उ० पूर्वाभिमुख; सूर्याभिमुख; मदभिमुख इ०. २ (ल.) प्रवृत्त; उद्युक्त; सज्ज असलेला; इरादा असलेला; (अमुक एका गोष्टीच्या) चिंतनांत किंवा विचारांत गढून गेलेला. उ० अध्ययनाभिमुख; यज्ञाभिमुख: प्रयाणाभिमुख इ०. ३ अनुकूल; फायदेशीर; उत्कर्षकारक (नशीब, काल, परिस्थिति). उ० दैवाभिमुख. [सं.]

अभियुक्त—वि. १ आरोप असलेला; विरुद्ध तक्रार असलेला; आरोपित; आरोपी. २ पूज्य; पवित्र मानलेला; अधिकारी म्हणून मानलेला (ग्रंथ, ग्रंथकार). ३ अभिजात (क्लासिकल) पहा. 'वरील अभियुक्त (ग्रीक व ल्याटिन) भाषांतले शब्द लोकभाषेत थोडथोडे मिसळत चालले होतेच.' –नि ५,५२. **०उक्ति**–स्त्री. (अभियुक्तोक्ति) अधिकारयुक्त वचन किंवा बोलणें; अभियुक्त जनांची उक्ति, सूत्र, वचन. **०प्रयोग**–पु. अधिकारयुक्त प्रयोग; अधिकारी माणसांनीं योजलेला प्रयोग. [सं.]

अभियोग—पु. १ फिर्याद; आरोप; (वादीची) तक्रार; आळ; दोष. २ वाद; युद्ध; भांडण; हल्ला. 'श्रींच्या अधिकाऱ्यांसमोर वादी प्रतिवादीच्या अभियोगांत झालेला पुरावा कोणत्या तरी सभेपुढें यथेच्छ वाचीत बसण्याचें.....नाकारलें.' –टि ४.१२७. ३ मनन; अभ्यास; चिकाटी. [सं.]

अभिराम—वि. १ सुंदर; रमणीय. २ आनंददायक; आल्हादकारक; सुखदायक; समाधानकारक. [सं.]

अभिरुचि—स्त्री. १ चव; गोडी; आवड; शोक. [सं.]

अभिरूप—वि. १ सदृश; सारखें; एकरूपी; साजेसा; शोभेसा. २ सुंदर; रम्य; देखणें; सुरेख. [सं.]

अभिलषित—वि. इच्छित; इष्ट; प्रिय. 'जो अभिलषित मनोरुचि। पुरविता तो।' –ज्ञा १.२७. [सं. अभि+लष्=इच्छिणें]

अभिलाष-ख—पु. १ प्राप्तीची इच्छा; हेतु. 'स्वधर्म करणे आवश्यक। तेथें सांडणें फळाभिलाख।' –एभा १८.३६८. 'म्हणे अर्जुना परियेसीं। जो हा अभिलाषु प्रौढमानसीं।' –ज्ञा २.२९१. २ लोभ; हांव; हांवरेपणा. ३ दुसऱ्यांच्या द्रव्यादिकांचा अपहार करण्याची इच्छा; दुराचार गिळंकृत करणे; अपहार. 'करितां परदारेचा अभिलाष। कोण कधीं पावला यश।' [सं. अभि+लष्=अभिलाष]. **०बुद्धि**–स्त्री. अपहार करण्याची इच्छा.

अभिलाष(ख)णें—क्रि. १ इच्छा करणें; अपहार करणें. 'शरीरनिर्वाहाविखीं। कोठें कांहीं नाभिलाखी।' –एभा ३.५०१. 'माझी अभिलाषिती जननी। म्हणोनि विधिलें कामबाणीं।' –एरुस्व ७.५४.

अभिलाषित—वि. वांच्छित; मनोगत; इच्छा केलेलें; लोभ ठेवलेलें; हांव धरलेलें; अभिलषित पहा.

अभिलाषी—वि. लुब्ध; लोभिष्ट; हांवरा; इच्छा करणारा. 'तैसेनि साहंकारें। फळाभिलाषियें नरें।' –ज्ञा १८.६०५. [सं. अभिलाषिन्]

अभिवचन—न. वचन; भाक; खात्रीचा शब्द; वाग्दान; हमी. [सं.]

अभिवंदणें—सक्रि. नमस्कार करणें. 'तैसा पुढतपुढती तोचि। मियां अभिवंदिला श्रीगुरुचि।' –ज्ञा १.२७.

अभिवंदन—न. नमस्कार; सर्वांशेकरून नमन; नामगोत्रोच्चारपूर्वक वडील, गुरु यांना नमस्कार करणें. [सं. अभि+वन्द्]

अभिवादक—वि. नमस्कार करणारा; (मी अमुक अमुक असें सांगून) अभिवादन करणारा. [सं. अभि+वद्]

अभिवादन—न. १ नामगोत्रोच्चारपूर्वक वडील–गुरु यांना नमस्कार. २ (सामा.) नमस्कार, प्रणिपात; नमन. [सं.]

अभिविधि—पु. समावेश, अंतर्भाव; –पासून–पर्यंतचा सर्वांचा समावेश. उ० रविवारपासून शनवारपर्यंत अभिविधि विवक्षित असतां सात दिवस घडतात, नाहींतर पांचच होतील. पुण्यापासून नाशिकपर्यंत अभिविधि विवक्षित नसतां मध्यें एकदेखील शहर नाहीं. [सं.]

अभिवृद्धि—स्त्री. वाढ; उत्कर्ष; वृद्धि; भरभराट; चढ; वाढवा; वर्धन. उ० आयुष्याभिवृद्धि; ऐश्वर्याभिवृद्धि. [सं.]

अभिव्यक्त—वि. स्पष्ट; स्वच्छ; उघड: उघडें; खुलें. [सं. अभि+व्यक्त]

अभिव्यक्ति—स्त्री. खुलासा; स्पष्टपणा; उघडपणा; स्वच्छपणा; पुरें व्यक्त करणें; पूर्ण प्रदर्शन; स्पष्ट रूपरेषा किंवा गुणवर्णन; प्रकटभाव. 'तेथें महाभूतांची। अभिव्यक्ति होय।' –ज्ञा १४.९२. [सं.]

अभिव्यंजक—वि. स्पष्ट; उघड व्यक्त करणारें; पूर्ण रूपरेखा, वाढ दर्शविणारें; खुलासा करणारें; गुणादिकांची अभिव्यक्ति करणारें. [सं.]

अभिव्यापक—वि. सर्वत्र वेढणारें–पसरणारें; सर्व कवटाळणारें, व्यापणारें; स्वीकारणारें; आक्रमण करणारें; सर्वव्यापक. [सं.]

अभिव्यापणें—अक्रि. (काव्य) सर्वत्र पसरणें–आक्रमणें–फैलावणें.

अभिव्याप्ति—स्त्री. सर्वत्र विस्तार–फैलाव–प्रसार; विश्वव्यापकत्व; सर्वव्यापकता. 'सर्व लोकांवर आकाशाची अभिव्याप्ति आहे.'

अभिशप्त—वि. १ खोटा आळ (अभिशाप) ज्याच्यावर आला असा. २ शाप दिलेला. [सं. अभि+शप्]

अभिशंसन—न. १ तुफान; वावंटळ; अभिशाप; खोटा आरोप; आळ. २ निंदा; अपमान. [सं. अभि+शंस्]

अभिशंसी—वि. खोटा आरोप पसरविणारा, फैलावणारा; तुफान घेणारा; निंदक. [सं.]

अभिशस्त—वि. निंदित; आरोपित; अभिशप्त पहा. [सं.]

अभिशस्ती—स्त्री. १ (व.) आळ; आरोप; निमित्त. 'नाहक आमच्यावर अभिशस्ती आणूं नका.' २ निंदा; अपमान. [सं.]

अभिशाप—पु. विप्र. अभिश्राप. १ अन्यायानें ठेवलेला आरोप, आळ; खोटा आरोप–ठपका. २ तळतळाट; शाप; निंदा. (क्रि० देणें). 'अभिशाप होईल माझे माथा । ऐसें सर्वथा न करावें ।' 'असती कीर्ति जाईल । जगचि अभिशापु देईल ।' –ज्ञा २.१९८. [सं. अभि + शप्]

अभिशिस्ती—(व.) अभिशस्ती पहा.

अभिशेष—पु. अभिषेक (अप.) पहा. 'जिंमे लाखोली अभिशेष । नामस्मरणीं विस्वास ।' –दा २.७.७६. [सं. अभिषेक]

अभिश्रवण—न. १ श्राद्धाचे ब्राह्मण जेवावयास बसले असतां त्यांना ऐकावयासाठीं म्हणण्यांत येणारे वेदमंत्र. २ असे मंत्र म्हणणें. [सं.]

अभिश्राप—अभिशाप पहा. 'अभिश्राप पूर्ण तुजवरी ।' –सप्र २.३. [सं. अभिशाप]

अभिषव—पु. १ धर्मकृत्य करण्यापूर्वीचें स्नान. २ सोमलतेचा रस काढणें; (सामा.) मद्य तयार करणें. ३ यज्ञयाग. ४ अभिषेक. ५ (सामा.) स्नान. –न.–कांजी: अंबील. [सं. अभि+सु]

अभिषिक्त—वि. (विप्र.) अभिषेकी. १ ज्यास अभिषेक केला आहे तो (देव, राजा). २ संस्कारानें स्थापलेला; अधिकारारूढ; पदारूढ. [सं.]

अभिषेक–पु., **अभिषिंचन–अभिषेचन**—न. १ विधिपूर्वक व संस्कारपूर्वक स्नान घालणें. अभिषेकपात्रांत पाणी, दूध, वगैरे घालून मंत्र म्हणून, पात्रांतील पाणी येंब येंब पाडून देवाची मूर्ति, राजा, उपाध्या, आजारी मनुष्य इ० स) स्नान घालणें; देवपूजेंतील स्नान; धर्मसंस्कारांत यजमानावर पाणी प्रोक्षण करणें; सतत धार धरणें. 'पय दधि आणि घृत । मधु शर्करा गुड संयुक्त । मूर्ति न्हाणोनि पंचामृतें । अ०करिती मग तेव्हां ॥' २ सिंचन; शिंपडणें. ३ राज्याभिषेक. **०पात्र**–न. देवादिकांवर अभिषेक करावयास, सतत धार पडण्याजोगें सच्छिद्र भांडे. [सं. अभि + सिच्]

अभिषेक(च)णें—उक्रि. संस्कारपूर्वक स्नान घालून प्रतिष्ठापन करणें; पदारूढ करणें: अभिषेक करणें. 'इंद्रे स्कंदास आणून । सेनापतित्व दिधलें जाण । दिव्यरथीं बैसवून । अभिषेकिला आवर्डी ॥'

अभिष्ट—अभीष्ट पहा.

अभिष्यंद—न. डोळे येणें–गळती लागणें; एक नेत्ररोग. [सं.]

अभिसंधि—पु. ध्येय; लक्ष; उद्देश; बेत. (क्रि० ठेवणें) [सं.]

अभिसरण–न. १ इकडेतिकडे धांवणें–वाहणें (द्रवपदार्थ); २ खालीं जाणें, सरकणें. (आंतड्यांतील वायु) ३–कडे जाणें=जवळ पोहोंचणें; अभिगमन. ४ (शाप.) अ. दोन द्रवरूपी पदार्थांचें एकमेकांत संमिश्रण होणें. –ज्ञाको (अ) ३१८. **आ.** प्रसरण; विक्षेप; इं. डिफ्यूजन. –रसामृपू ३५. उ० उष्णताभिसरण; वाय्वाभिसरण. [सं. अभि+सृ=सरणें]

अभिसार–पु., **अभिसारण**—न. सांडलवंड; इकडेतिकडे पसरणें: विस्कळित पसरणें; वाताहत; दाणादाण; सैरावैरा होणें. [सं.]

अभिसारिका—स्त्री. पूर्वी संकेत करून प्रियकराकडे ठरलेल्या जागीं संभोगार्थ जाणारी स्त्री. [सं.]

अभिसाट—न. तक्ता; पगारपत्रक. 'एकदां तुकोजीराव महाराजांनीं त्यांच्या संमतीवांचून एक हुकूम दिला होता म्हणून आफिसांत त्याचें नांव अभिसाटांत लागत होतें.' –विक्षिप्त २.६०. [इं. ॲब्स्ट्रॅक्ट अप.]

अभिहत—वि. १ वश झालेला; नरम आलेला; वठणीस आलेला: नम्र झालेला. २ मारलेला; पीडलेला; बडविलेला; झोडपलेला. [सं. अभि+हन्]

अभिहित—वि. म्हटलेलें; बोललेलें; कथन केलेलें; नामनिर्देश केलेलें. [सं. अभि+धा]

अभिज्ञ—वि. १ जाणणारा; माहितगार. 'कैवल्यमार्गीचा अभिज्ञु । सांगाती हा ।' –ज्ञा १६.९९. २ निपुण; कुशल; तरबेज; निष्णात; पारंगत; मर्मज्ञ. [सं.]

अभिज्ञात—वि. पूर्ण माहीत असलेलें; पूर्णपणें जाणलेलें; अवगत असलेलें; अभिज्ञ पहा. [सं.]

अभिज्ञान—न. १ पूर्ण किंवा खोल ज्ञान; संपूर्ण ज्ञान; माहिती. २ खूण (ओळख पटण्यासाठीं केलेली किंवा दिलेली). उ० अभिज्ञानशाकुंतल. [सं.]

अभीप्सित—वि. १ इच्छिलेलें; प्रिय; आवडलेलें; इच्छित; वांच्छित; मनोगत. २ अनुकूल; उत्कर्षकारक; फायदेशीर. –न. कल्याण; हित. [सं. अभि+ईप्स्]

अभीर—आभीर पहा.

अभीरी—पु. (संगीत) एक राग; या रागास षड्ज. तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत स्वर वर्ज्य आहेत व अवरोह संपूर्ण आहे. जाति औडुव–संपूर्ण. वादी स्वर मध्यम व संवादी निषाद. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर. [सं. आभेरी=एक रागिणी]

अभीष्ट—वि. अभीप्सित पहा. [सं. अभि+इष्ट]. **०चिंतक**–वि. एकाद्याचें कल्याण इच्छिणारा; तशी प्रार्थना करणारा. [सं.]. **०चिंतन**–न. कल्याण व्हावें अशी (ईश्वराजवळ) प्रार्थना; इच्छा. [सं.]

अभुक्त—वि. १ ज्याचा उपभोग कोणी घेतला नाहीं असें; न उपभोगलेलें; उपयोग न केलेलें; उपयोगांत न आणलेलें. २ न जेवलेला; उपाशी; उपभोग न घेणारा. ३ ज्यानें उपभोग (संभोग) घेतला नाहीं असा (मनुष्य). [सं. अ+भुज्]. **०मूळ**—न. ज्येष्ठा नक्षत्राच्या शेवटच्या चार व मूळ नक्षत्राच्या पहिल्या चार घटिका असा आठ घटिकांचा काळ. [सं.]

अभुला—वि. न भुलणारा, विसरणारा. [प्रा. अ+भुल्ल म. भूल]

अभूक—स्त्री. तृसि.

अभूट—न. (खा.) अभ्रे; मळभ. [सं. अभ्र+ट]

अभूत—वि. न झालेला; नसलेला. [सं.]. **०पूर्व**—वि. अपूर्व; पूर्वी कधीं न झालेला; नसलेला. [सं.]. **—तोपमा**—स्त्री. असंभवनीय कल्पनेपासून घेतलेली उपमा किंवा उदाहरण; जी गोष्ट संभवनीय नाहीं, घडलेली नाहीं तिची उपमा. [सं.]

अभेड—वि. (व.) अडाणी; अल्लड. [सं. अ+भण्=पठण करणें, शिकणें.]

अभेद—पु. १ अभिन्नता; फरक नसणें; भेद नसणें; एकरूपता; एकत्रता; एकी; एकदृष्टि व एकभावना असणें; ऐक्य. 'आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरे ।' —अमृ ४.१. 'या नामा नामी आश्रयो तैसा । अभेदु असे ।' —ज्ञा १७.४०३. २ अभेदभाव—मत पहा. [सं. अ+भिद्]. —वि. अभिन्न; भाग करतां न येण्यासारखें अद्वैत; एकरूप. **०भाव, ०मत**—पुन. विश्व व ब्रह्म किंवा जीव व शिव हीं एकच आहेत असें मत; तत्त्वः अद्वैतमत. [सं.]. **०भक्ति**—स्त्री. आत्मा व ईश्वर (जीवात्मा व परमात्मा) एक होत ही जाणीवः तसेंच या भावनेनें केलेली ईश्वराची भक्ति. **०वाद**—पु. अभेदमत व त्याचें समर्थन. **०वादी**—वि. अभेदमताचें अनुकरण करणारा; अभेदमत मानणारा. [सं.]

अभेद्य—वि. १ वेगळें न होणारें; न फुटणारें—मोडणारें—तुटणारें—भंगणारें; भाग न करतां येण्यासारखें. २ भोंसकतां न येणारें. [सं.]

अभोगत—वि. १ न भोगलेलें; हिशेबांत न घेतलेलें; अनिश्चित; न ठरविलेलें; अखेरचा निकाल लागला नाहीं असें; अजूनपर्यंत न स्वीकारलेलें किंवा न घेतलेलें—केलेलें. २ मोघम; अजमासानें घेतलेलें; —ख ३३११. [सं. अ+भुज्=अभुक्त]

अभोगती जाणें—(अधोगतिचा अपभ्रंश.); अधोगतीस जाणें; चिरडलें जाणें; चुराडा होणें; नाश होणें. [सं. अधोगति]

अभोग्य—वि. उपभोग घेण्याला—करण्याला अयोग्य. [सं.]

अभोज्य—वि. न खाण्याजोगें; खाण्यास अपवित्र, अयोग्य; अभक्ष्य. [सं.]. **०अन्न**—वि. ज्याच्या (पतित, सुतकी इ.) हातचें अन्न खाण्याला निषिद्ध मानलें आहे असा. [सं.]

अभोळ—वि. दुर्बल; अशक्त. 'आम्हां सारखिया अभोळां।' —ज्ञा ५.१६६. [सं. अबल]

अभ्यक्त—वि. तैलमर्दन वगैरे केलेला; अभ्यंग केलेला.

अभ्यंग—न. (स्नान करण्यापूर्वी) तेल, तूप, अत्तर इत्यादि स्निग्ध पदार्थांचा शरीरास करण्यांत येणारा लेप. माखणें; चोपडणें; उटी लावणें; शरीर मर्दन करणें. 'नाहीं अभ्यंग केश विंचरण। तेणें जटा वळल्या आपण। हें ब्रह्मचारियासि जाण। व्रतधारण नेमस्त॥' —एभा १७.२८१. **०स्नान**—न. अभ्यंग लावून केलेलें स्नान; न्हाणें. [सं. अभि+अञ्ज्]

अभ्यंग—पु. (स्त्रि) 'अंकुशान' या इंग्रजी शब्दाचा पर्याय; एक्लेसियेच्या बडिलानें प्रभूच्या नांवानें आजारी मनुष्याच्या सर्वांगास विधिपूर्वक आशीर्वादित केलेलें तेल लावूनत्याच्यासाठीं प्रार्थना करणें. 'प्राचीन एक्लेसियेमध्यें अभ्यंग करण्याचा प्रघात होता.' —ई. वि. १९६, याकोपत्र ५.१४.१५०. [सं. अभि+अञ्ज्]

अभ्यंजन—न. तैलमर्दन; अभ्यंग पहा. [सं. अभि+अञ्ज्]

अभ्यंतर—न. १ आंतील भाग; अंतर्भाग; गाभा; मध्यभाग; अंतरंग. 'आणि अभ्यंतरिलियेकडे।' —ज्ञा १३.३८४. २ मन; हृदयः अंतःकरण. ३ समाविष्ट झालेली जागा; माजघर; आंतील बाजू. ४ अंतःकरणांतील हेतु. 'तुका म्हणे यासी। न लावी उशीर। माझें अभ्यंतर जाणोनियां।' —तुगा १६४७. ५ उदर; अंतरंग; पोट. 'नित्य निर्मोल्य मिरवेशिर्षी। चरणतीर्थ अभ्यंतरीं।—एभा २.२९६. **०ज्ञ**—पु. अंतर्ज्ञानी. **०ज्ञान**—न. अंतर्ज्ञान पहा. [सं.]

अभ्यर्चणें—क्रि. पूजा करणें.

अभ्यर्चित—वि. पूजित. [सं. अभि+अर्च्]

अभ्यर्थना—स्त्री. १ प्रार्थना; विनंति; विनवणी; याचना. २ अर्जी. [सं. अभि+अर्थ्]

अभ्यस्त—वि. १ निपुण; परिचित; अभ्यास केलेला; वाकबगार; पटाईत. २ ज्याचा अभ्यास, सराव केला आहे तो (शास्त्रादिक). ३ गुणलेला; आवृत्ति केलेला. [सं. अभि+अस्=फेकणें; टाकणें.

अभ्यस्त—वि. सूर्यास्ताच्या वेळीं निजलेला. —क्रिवि. सूर्यास्तकालीं; सूर्यास्तासमोर. [सं. अभि+अस्=असणें]

अभ्यागत—पु. १ पाहुणा; अतिथि. २ सत्कार; पाहुणचार 'कांइ करौ अभ्यागतु। तुम्ही निजानंदें तृप्तु।' —शिशु ७४. [सं. अभि+आ+गम्]

अभ्यास—पु. १ व्यासंग; सराव; परिपाठ; संवय. 'अभ्यासें प्रगट व्हावें। नाहीं तरी झांकोन असावें।' —दा १९.७.१७. २ मनें जाणण्यासाठीं केलेली आवृत्ति; घोकणें; पुनरुक्ति; निदिध्यास. 'ग्रंथांत अभ्यास म्हणजे पुनरुक्ति किंवा वारंवार काय सांगितलें आहे तें पहावें' —गी २२. ३ सरावानें मिळविलेलें कौशल्य—योग्यता. ४ (अंक) गुणाकार; पट. ५ (संगीत) रागविस्तार करतांना एकाया

स्वराचें पुन्हां पुन्हां उच्चारण करणें. ६ (व्या.) धातूंतील पहिल्या अक्षराची पुनरुक्ति (अर्थ पुनरुक्त अक्षर मूळ धातूस द्विवार अभ्यास करून एक नवें क्रियापद सिद्ध करतात. जसें –मामारलें, करकरून; दा-ददाति. 'धधरुनि मोरचे मारी । नाना म्हणे श्रीहरी । वैराकार केला ।' –ऐपो ९३.) **–साखालीं पडणें**–एकाग्रचा नेहमींच्या सरावामध्यें असणें; **रूढ०** अभ्यासपरिणति विद्या अभ्यासामुळें प्राप्त होणारी विद्या. [सं. अभि+अस्=फेकणें, टाकणें]. **०गम्य**–वि. अभ्यासानें, सरावानें प्राप्त होणारें. **–सागम्य**–वि. अभ्यासानें प्राप्त न होणारें. [अभ्यास+अगम्य]

अभ्यासणें––क्रि. अभ्यास करणें; शिकणें; सराव करणें; नेहमीं परिपाठ ठेवणें. पाठांतर करणें; आवृत्ति करणें. 'हेंच काधिसयावरी होये । ऐसा जरी संदेहो वर्तत आहे । तरी अभ्यासूनि आदीं पाहें । मग नव्हे तरी कोपें ।' –ज्ञा ८.८०. 'ज्याचे (उच्चै. श्रव्याच्या) चरणीं मनपवन । अभ्यासिती चपलता ।' –मुआदि ४.४५. [सं. अभि+अस्=फेकणें, टाकणें]

अभ्यासन––न. अभ्यास. 'नलगे यापरतें कांहीं करणें । नाना परींचीं अभ्यासनें । संकल्पविकल्पात्मक साधनें । सवें त्यजीजे ॥' –परमा २.४. [सं.]

अभ्यासी––वि. १ अभ्यास केलेला; निष्णात; २ अभ्यास करणारा; व्यासंगी; अध्ययनशील. [सं.]

अभ्युत्थान––न. १ भेटावयास आलेल्याच्या स्वागतार्थ उठणें; मानसन्मान (क्रि. देणें, घेणें.). २ उदय; उत्कर्ष. 'अभ्युत्थानमधर्मस्य' –गीर ७६७. ३ एकाद्या विरुद्ध शस्त्र उचलणें; मोहिमेवर निघणें [सं. अभि+उत्+स्था]

अभ्युदय––पु. १ वर येणें; दिसूं लागणें; उदय; उगवणें (आकाशातील ग्रह–तारे इ०). २ (ल.) उत्कर्ष; भरभराट; चालताकाळ; नशीब उघडणें–उदयाला येणें; ऊर्जितावस्था. 'म्हणौनि जेथ श्री तेथें श्रीमंतु । जेथ तो पांडूचा सुतु । तेथ विजय समस्तु । अभ्युदयो तेथ ॥' –ज्ञा १८.१६५५. [सं. अभि+उदय]

अभ्युदित––वि. १ उगवलेला (सूर्य इ.) २ (ल.) नशीब काढलेला; अभ्युदय झाला आहे असा. ३ सूर्योदयाच्या वेळीं किंवा त्यानंतर निजलेला. [सं. अभि=समोर+उदित=उगवलेला]

अभ्युपगम––पु. १ (विशेषतः प्रतिपक्षाचें म्हणणें पुढें खोडून काढण्यासाठीं तूर्त) गृहीत धरून चालणें, कांहीं वेळ अनुमति देणें, स्वीकारणें; २ जवळ जाणें–येणें. आगमन; अभिगमन. ३ सारखेपणा; साम्य; तुल्यभाव; उपमान. [सं.]

अभ्युपेत्यवाद––पु. पुढें खोडून काढण्यासाठीं प्रतिपक्षाचें म्हणणें किंवा बाजू कांहीं वेळ गृहीत धरून त्यावर भाषण करणें. [सं.]

अभ्र––न. १ मेघ; ढग. 'ना तरी अभ्रवातें हाले ।' –ज्ञा २.३. २ ढगांची काळोखी; आभाळ; मळभ. ३ आकाश; अंतरिक्ष. ४ (ल.) संकट. [सं. १ अभ्र (अप+भृ=पाणी धारण करणारा); २ अभ्र=गमन करणें (पाणिनी); फा. अब्रः झेंद अब्र; ग्री. ओंब्रॉस, ॲब्रॉस; लॅ. इंबेर.]

अभ्रक––पुन. पारदर्शक व पापुद्र्यांनीं युक्त असें खडकांत सांपडणारें एक खनिज द्रव्य. प्रकार चार.–पांढरा, तांबडा, पिंवळा, काळा. विजेच्या कारखान्यांत व औषधाच्या कामीं विशेषतः याचा उपयोग होतो. [सं. अभ्रक. अभ्रा–मेघाप्रमाणें] **०भस्म**–न. धान्याभ्रक करून तें सुकवून रुईच्या चिकांत एक दिवस खलून त्याची दामटी करावी व त्याच्या भोंवतालीं रुईचीं पानें गुंडाळून शरावसंपुटांत घालून मातकापड करून गजपुट द्यावें. अशीं ७ पुटें दिल्यानंतर वडाच्या पारंब्याच्या काड्यांची वरीलप्रमाणें ३ पुटें देणें. हें सर्व रोगांवर योजतात. **०मारणें**–न. (खडीकाम) खडीकामावर चकाकी यावी यासाठीं अभ्रकाचा भुसा वर मारणें.

अभ्रछाया––स्त्री. १ ढगाची सावली. २ (ल.) क्षणभंगुरता; पाण्यावरचा बुडबुडा. 'अभ्रीची साळ्ळी, जाईल लया ।' **०पटल–पडळ**–न. ढगांनीं आकाश आच्छादिलें जाणें, व्याप होणें; किंवा व्याप झालेली स्थिति–अवस्था; मेघावरण. [सं. अभ्र+पटल=आच्छादन; पडदा.]

अभ्रमु––स्त्री. (इंद्राचा हत्ती) ऐरावताची स्त्री. 'त्यासि जयश्री न त्यजि तसि जशि ऐरावतासि अभ्रमु रे ।' –मोसभा ७.८२. [सं.]

अभ्रा––पु. छत्री, लोड, तक्या गादी, गालिचा, इ० कांवरील वस्त्राचें आच्छादन (अभ्र आकाशास झांकितें त्याप्रमाणें). [सं. अभ्र; फा. अब्र.]

अभ्रांत––वि. भ्रांतिरहित; निःसंशय. 'तरि मी धनंजयाधिक होइन तुज जय घडेल अभ्रांत ।' –मोकर्ण २०.४१. [सं. अ+भ्रांति]

अमइ––उद्गा. अगबाई! आई! (आश्चर्य–उद्गारवाचक). 'अमइ! निरखिली म्यां चोरटी चौंदिसां गे ।' –आक १८. [म. अग+माई किंवा अम्मा+इ]

अमका––वि. १ कोणी एक इसम; फलाणा; कोणी विवक्षित मनुष्य; कोणी एक. 'लोक म्हणतील अमक्याचा अमुक । घरोघरीं मागतो भीक ।' –नव १८.५१. २ (नामाबरोबर उपयोग) कोणी; विशिष्ट; विवक्षित(इसम, पदार्थ). [सं. अमुक.] **०तमका–ढमका–धमका**–कोणी तरी; कांहींएक (इसम, वस्तु) [अमका द्विरु.]

अमंगल––वि. विप्र. अमंगळ. १ अशुभ; मंगल नसणारें; अनुकूल नसलेलें; अहितकारक; अनिष्ट. २ घाणेरडें; खराब; गचाळ; अपवित्र; ओंगळ; भ्रष्ट (कांहीं विधि, आचार, क्रिया, स्थळ,

इसम). ३ (कों.) ओंवळें. ४ (उप.) ज्याच्या कुंडलींत मंगळ अशुभस्थानीं नाहीं असा.

अमटी—अंबटी पहा.

अमडा—अंबाडा पहा.

अमत्र—न. पात्र; भांडें. –मोकृवि ३४.२५. [वैदिक सं. अमत्र=पात्र, भांडें.]

अमंत्र-क—वि. १ ज्यास वेदमंत्रांचा अधिकार नाहीं तो (स्त्री, शूद्र); वेदाला अनधिकारी. २ न मंतरलेलें; वैदिकमंत्र न म्हणतां केलेला (विधि, समारंभ). ३ मंत्रांखेरीज इतर. ' अमंत्र-मक्षरं नास्ति । ' [सं. अ+मन्त्र]

अमंत्रि—वि. ज्याला मंत्री (प्रधान) नाही असा. ' अमंत्रिया राज्याची परी होये । बलासिया । ' –राज्ञा १३.५५५. [सं.]

अमंद—वि. १ शीघ्र; मंद नव्हे असा. २ पुष्कळ. ' सस्नेह ज्यांत अतिसुंदर हास्यमंद । प्रेमप्रसाद शुभ ज्यांत असे अमंद । ' –ध्यानमाळो. ११. [सं. अ+मन्द]

अमद(दा)नी—स्त्री. १ हंगामांत उत्पन्न होणाऱ्या वस्तू; विवक्षितकालीं बाजारामध्यें येणारा माल. २ हंगाम; मोसम; सुगी; विपुलता. ३ आयात मालावरील जकात; दस्तुरी. ४ (जकाती भार्षेत) नव्या रस्त्यावरील, पुलावरील किंवा नदीच्या तरीवरील, रहदारी; व्यापारी वाहतूक. ५ उत्कर्षाचा, भरभराटीचा काळ; ऊर्जित काळ. ' सांपत तुझी अमदानी आहे म्हणून मोठाल्या गोष्टी सांगतोस. ' ६ अवांतर मिळकत; खेरीज प्राप्ति; आगंतुक लाभ; आडमिळकत. ७ कारकीर्द; अंमल. ८ (व.) उत्पन्न; अमदनी. ९ आवक; उत्पन्न; वसूल. ' चहूंकडून गल्ला येथें येण्याची आमदानी बंद जाली. ' –रा ५.४४. [फा. आमदनी=मोसम; येणें; आयात (माल) उत्पन्न]

अमन—वि. मनरहित; निर्विकार. ' व्रत तप यज्ञ दान । त्याहून अधिक हरीचें ध्यान । निमिषामाजी समाधान । अमन मन होऊनि ठाके ॥ ' –एरुस्व ४.२२. [सं. अ+मन]. **०मन**—न. (मन या) उपाधिरहित मन; मनावांचून उत्पन्न झालेला आदि संकल्प. ' इयें प्रकृतिपुरुषें दोनी । उपजलीं जयाचिया अमनमनीं । ' –ज्ञा ९.२७२. [सं.]

अमनचमन-चमीन-चैन—स्त्री. १ शांति–समृद्धि; वैपुल्य; सुबलकपणा. २ मौज; मजा; गंमत. –वि. विपुल; भक्कळ; पुष्कळ; अघळपघळ; अतिशय; उदंड; यथेच्छ. –क्रिवि. सुरक्षितपणें; शांतपणें; निर्धास्तपणें; निर्भेयपणें; सुखानें; चैनीनें. [अर. अम्न=सुरक्षितता+चैन=मजा]

अमनधबका-क्का—अनमानधपका पहा.

अमनसभा—स्त्री. देशावर येऊं पाहणारें संकट टाळण्यासाठीं उपाय सुचविणारी सभा; शांतिसभा (असहकारितेच्या चळवळीपासून सरकार अशा सभा भरवितें). [अर. अम्न, अमान=सुरक्षितता शांति]

अमनस्क—वि. विमनस्क; मनरहित; शून्यमनाचा; लक्ष नसलेला; व्यग्रचित्त. ' तया अमनस्कायें मन । बुद्धीही होय । ' –ज्ञा १३.१००२. [सं. अ+मनस्+क]

अमनी—उद्गा. आई ! अगबाई ! इ० उद्गार; अमई पहा. ' मकर केतनोद्भ्रमणी । मुखिं म्हणती अमनी अमनी । ' –आमपद ९०.

अमर—वि. न मरणारें; मृत्यूच्या आधीन नसलेलें; मृत्युरहित; नाशरहित, ' सहजें दुवेंचा डिरु । आंगेंचि तंव अमरु । वरी आला पूरु । पीयूषाचा ॥ ' –ज्ञा १४.२८. –पु. अमर्त्य; देव; देवता; सुर. ' कृष्णरस जे सेवित । तयांसी फिकें होय अमृत । अमर अमृतातें संवित । तेही चरफडित हरिरसा ॥ ' –एरुस्व १.७७. –न.(गो.) करवंद फळ. [सं.]. **०कंद-कांदा**–पु. १ या नांवाच्या अनेक प्रकारच्या वनस्पती व कांदे आहेत. उ० गुळवेल, कोरफड, निर्गुंडी इ. २ अमरवेलाचा कांदा–गड्डा. ' नवसार अमरीसी वाटुनु अंजन कीजे ' वैद्यकवाड ७७. भाइसमंडळ अहवाल. ३ काल्पनिक सर्व रोगनाशक मुळी. हिच्या सेवनानें तारुण्य कायम रहातें अशी कल्पना आहे. ४ महाबळेश्वराकडे मिळणारा एक कांदा. **०काया**–स्त्री. १ न मरणारें शरीर; निरोगी व जोरकस शरीर. (आशीर्वाद देतांना किंवा औषधोपचार करतांना हा शब्द वापरतात.) **०तरु**–पु. कल्पवृक्ष; देवांचा वृक्ष; देवदार. **०ता**–स्त्री. अमरपणा; चिरंजीवपणा; मृत्यु न येण्याची स्थिति. ' कृष्णाच्या अधरामृतें अमरता तत्काळ त्या पावल्या.' **०पट्टा-टा**–पु. **०पत्र**–न. अमरपणाचा लेख; मृत्यूपासून सुटका केल्याचा हुकूम–आज्ञा–ताम्रपट; मरण न येण्याचें आश्वासन. ' तूं काय अमरपट्टा घेऊन आलास ? ' 'तूं आपणाला महाराणी म्हणवितेस म्हणून तुला देवाकडून अमरपट्टा थोडाच मिळाला आहे ? ' –राक्षसी महत्त्वाकांक्षा. [सं. अमर+पट=लेख, करारनामा]. **०पण**–अमरता पहा. ' सेविली अमृतसरिता । रोगु दवडूनि पंडुसुता । अमरपण उचिता । देऊनि घाली ॥ ' –ज्ञा १५.५८३. **०पाट**–अमरपट्टा पहा. **०वेल**–स्त्री. १ सोनवेल; आकाशवेल; ही आंब्याच्या झाडावरहि उगवते, ही आम व पित्तनाशक आहे. २ अमृतवल्ली पहा. **०साहित्य**–न. मरण न देणारें साधन; अंगांत घालावयाचें चिलखत इ० ' अमरसाहित्य अंगांतील काढोन ' –रा ३.१९१.

अमरंथ—न. १ कोरांटी, गुलमखमल वगैरे फुलझाड. २ तांदुळजा, माठ, राजगिरा, वगैरे पालेभाजी. [सं. अमरण. तुल० ग्री. अमरंतोस (अ=नाहीं+मरत=मुकणें)=कधीं न कोमेजणारें एक फूल.]

अमरसा—पु. एका दागिन्याचें (?) नांव. –मोल

अमराई—आंबराई पहा.

अमराधिप—पु. (देवांचा राजा) इंद्र. [सं. अमर+अधिप]

अमरावती—स्त्री. १ स्वर्गांतील इंद्राची राजधानी. 'जेथ अमरत्व हेंचि सिंहासन। ऐरावतासारिखें वाहन। राजधानी भुवन। अमरावती॥' –ज्ञा ९.३२०. २ मद्रास इलाखा, गंतुर जिल्ह्यांतील धरणीकोट नांवाचें सांप्रतचें खेडें. हें पूर्वी आंध्र राजांची राजधानी असून तेथें एक प्रेक्षणीय बौद्ध स्तूप (इ. स. १३०) आहे. ३ वऱ्हाडांतील उमरावती शहर. [सं.]

अमरेंद्र—अमराधिप पहा.

अमर्त्यभाव—अमरता पहा.

अमर्पीत—न. (गो.) १ आम्लपित्त रोग. २ नाकांतून निघणारें रक्त. [सं. अम्लपित्त अप.]

अमर्याद—वि. १ (लोक, शास्त्र इ० च्या) मर्यादेच्या किंवा योग्य सीमेच्या पलीकडे गेलेला: ठराविक मर्यादा उल्लंघन करणारा; स्वैर; स्वेच्छाचारी; मोकाट; अव्यवस्थित; (ल.) फंदी; अनाचारी; चैनी. २ अतिशय; अत्यंत; प्रमाणाबाहेर; बेसुमार; कल्पनेच्या–आटोक्याच्या बाहेर; विपुल (क्रिया, रकम, गुण, इसम वगैरे.) [सं. अ+मर्यादा]

अमर्यादा—स्त्री. १ सीमा–मर्यादा यांचें उल्लंघन. २ अनादर; अपमान; उद्धटपणा; विनय सोडून वागणें. [सं.]

अमर्ष—पु. क्रोध; संताप; असहनशीलता. 'जगचि देह जाहलें। म्हणोनि प्रियाप्रिय गेलें। हर्षामर्ष ठेले। दुजेनविण॥' –ज्ञा १२.१६८. [सं. अ+मृष्]

अमल—पु. १ मलरहित; शुद्ध; स्वच्छ. 'उघडी अमल राजीव–नयन।' –रावि ६.२४८. २ आवळी; शिकेकाई; खडीसाखर. [सं. अ+मल]

अमल—पु. १ अधिकार; स्वामित्व; सत्ता; राज्य; ताबा; हुकूम. २ बजावणी; निवाडा लागू करणें; कृतींत आणणें. 'पुढें अमलांत येईल ते मागाहून विनंती लिहूं'–दिमरा १.३७. ३ कैफ; निशा; औषधाचा पगडा. 'दारूच्या अमलांत झमाझम उडूं लागल्या तलवारा' –ऐपो ३२४. ४ पदार्थांतील कैफ आणणारा गुण. ५ दारू, गांजा वगैरे कैफी पदार्थ. 'रुक्यादोरुक्याचा अमल से उनि'–दावि ४५२. ६ सुभा, मामला इ० जागा; हुद्दा; अधिकार. ७ (अमीन अप.) जमीनीचा सारा वसूल करणारा सरकारी अधिकारी, कलेक्टर; त्यावरून सध्यां खेड्यांतील सारावसुलींतील एक हक्क. ८ वेळ; काळ. 'साखरा वांटून दीड प्रहरचे अमलांत तोफांचे बार पांच करविले.' –ख ११.५६९६. 'साठीच्या अमलांत.' [अर. अमल्] **०करणें**–मादक पदार्थ खाऊन कैफांत गुंग होणें; दारू वगैरे घेणें. **–च्या जोरानें**–अधिकारामुळें प्राप्त झालेल्या सत्तेनें. **–त आणणें**–१ (निवाडा, ठराव, हुकूम वगैरे) लागू करणें. २ (गांव किंवा देश वगैरे) आपल्या सत्तेखालीं आणणें; ताब्यांत घेणें. **०गाजविणें**–अधिकार चालविणें. **०कलम**–न. क्रियालेख. 'बोलण्यांत गोष्टी आल्या असतील, परंतु दस्तैवज अथवा वचन, शपथ, क्रिया, अमलकलम असें कांहीं झालें नाहीं.' –रा ५.१५. **०गहाण**–न. ताबेगहाण (नजर गहाणाच्या उलट) **०दस्तूर**–पु. नियम; कायदा; वहिवाटीचा हुकूम; शासन. **०दार**–पु. अधिकारी; अखत्यार असलेला सरकारी नोकर; सुभेदार; मामलेदार वगैरे. [अर. अमल+फार. दार]. **०दारी**–स्त्री. अंमलदाराचें काम–हुद्दा. **०बजावणी**–स्त्री. कार्य घडवून आणणें; अधिकार वतविणें; अमलांत आणणें; (हुकुमा)प्रमाणें वर्तन करणें; अनुरूप वागणें. '(रामकालीन) राजा हा फक्त अंमलबजावणी करणारा अधिकारी असून तो प्रजेच्या नियंत्रणाखालीं असे.' –मसाप २.११२. **०मस्त**–वि. सत्ता असल्यामुळें मगरूर बनलेला. **०मस्ती**–स्त्री. सत्तेचा गर्व; ताठा.

अमलतास—पु. बहाव्याच्या शेंगांचा मगज. –मुंव्या १५६ [हिं.]

अमला—पु. कारकून; अधिकारी; अमलदार. 'तालुक्यास अमला योजून बंदोबस्त करावा.' –रा ७.४५. [अर. अमला; आमिलचें अव.] **०फैला**–पु. १ अमल; अधिकार; ताबा. 'त्या देशावर अ० चांगला बसला.' २ कारकून; पांढरपेशा; इतर लोक; प्रजा. 'दिल्लीतहि अमलाफैला पळावयाचा इरादा करीत आहेत.' –रा १०.३४७. –क्रिवि. पूर्णपणें; एकंदर; निखालस (विक्री; देवघेव इ. व्यापाराच्या कामांत).

अमला—पु. सोन्याचा डूल (कानांतील); लोलक; आंबला. [सं. आमलक]

अमली—वि. १ कबजी; सरकारच्या सत्तेंतील (गांव, कसबा, प्रांत वगैरे). उ० सरकार अमली=सरकारचे ताब्यांतील, पदरभार अमली=दुसऱ्याच्या सत्तेखालचें. 'हिंदुस्थान गुजराथ पर्यंतचा मुलूख अगदीं अमली आहे. आम्ही वाटेनें काय खाणें?' –ख १.७९. [अर. अमल्]. –पु. १ कैफी; निशा आणणारें. २ निशा करणारा; व्यसनी. **०पदार्थ**–पु. मादक पदार्थ. (ज्यामुळें अंमल चढतो असे; दारू, भांग इ.). **०बाब**—स्त्री. जमाबंदींतील एक खातें (दारु, कलाली, अफू, ताडी, माडी, शिंदी इ०); अंमली पदार्थांचें विल्हेवारीचें खातें व त्या खात्यापासून होणारें उत्पन्न. **०सन**—पु. ओरिसांत प्रचारांत असलेला एक शक. याचा आरंभ भाद्रपद शु॥ १२ पासून होतो.

अमवाळ—वि. आंबट. 'न साहे रुक्ष, क्षार, अमवाळ' –गीता १२.१८१. [सं. अम्ल]

अमसू(सो)ल—न. कोकमसाल; रातंबीच्या फळाची सुकविलेली साल. रंग काळसर, चव आंबट, हें हिरवें असतांना वातकारक, उष्ण व अतिशय जड आहे व पिकलें म्हणजें हलकें व ग्राहक असून संग्रहणी, कफ व वातनाशक आहे. **०तेल**–न. रातंबेल, [स. अम्ल+छाल–साल]

अमसूळ—वि. आंबटसर. 'रसास थोडा कचरा लागला तरी तो अमसूळ होतो.' –कृषि ४८०. [सं. अम्ल+सदृश]

अमळ–सा—वि. थोडा; किंचित्; जरासा; कांहींसा. –क्रिवि. **थोडावेळ**; अल्पकाल. [वैसं. अम्रस्; सं. अम्=थोडें; लवकर]

अमा—स्त्री. १ अमावास्या; आंवस; सूर्य व चंद्र यांच्या युतीचा दिवस; चंद्राची १५ किंवा १६ वी कला. 'अमारात्रीचें तम केवळ।' –कथा ५.५.४०. [सं. अमा=अमावास्या]

अमा—पु. स्तन; थान. 'बा घे अमा पाजितें' –राला ८ (पोतु.) अंगावर दूध पाजणारी दाई. अम्मी=लहान मुलाच्या भाषेंत थान.

अमा—स्त्री. (का.) आई; एकाद्या स्त्रीस आदरार्थी संबोधितात. [सं. मातृ–मा; अर. उम्म=आई; द्रा. अम्मा=आई]

अमा—अ. परंतु; तरीपण; उलट; इकडे; इतक्यांत. 'कागद घेतला अमा दाम दिला नाहीं.' –भाइ (१८३४.) १४४. 'अमा पातशहा खलेल करविताती. –रामदास रामदासी भाग १५.२११. [अर. अम्मा=परंतु. तुल. ता. अमा=होय, परंतु]

अमाईकपण—न. 'निष्कपटपण. अमाईकपणें मनींचें सांगसी' –दावि २६३. [सं. अ+माया=कपट+पण]

अमांत—वि. अमावास्येला संपणारा. [सं. अमा+अन्त] **०मास**–पु. शुद्ध प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत असणारा एक चांद्रमास. हा दक्षिणेकडे प्रचारांत आहे.

अमात्य—पु. १ आठ प्रधानांपैकीं एक; यानें सर्व राज्यांतील लष्करी आणि मुलकी वसूल व हिशेब ठेवून युद्धावरहि जाण्याचें काम करावयाचें असे; फडणिशीपत्रावर याची निशाणी असे. –इऐ २२.४४. –पया ३५५; ३५९–६०. फारशी नांव मज्मुदार. २ (सामा.) मंत्री; प्रधान; सल्लागार; सचीव. [सं. अमा=जवळ+त्य]

अमात्र—वि. १ निर्विषय; अविषय. २ प्रणवातीत. ३ अभौतिक; पंचमहाभूतात्मक नव्हे तो. –पु. परमात्मा. [सं. अ+मात्रा]

अमाथ—क्रिवि. (कर्ना.) अचूक.

अमान—स्त्री. अमान्य करण्याची बुद्धि; अनादरवृत्ति. 'सर्व शस्त्रविद्या सिकवोन कोणी। परिपूर्ण जाले वदतां ऐकुनी। चेले न लेखिती पडोन अमानीं।' –दावि २०१. [सं. अ+मन्]

अमानणें—सक्रि. न ऐकणें; न मानणें; अनादर करणें. [सं. अ+मन्]

अमानत—स्त्री. १ (विरू. अनामत) ठेव; निधि; विश्वस्त वस्तु. २ जप्त; सरकारजमा. 'जयदेवरायास हरामखोरी लावून देशमुखी अनामत केली.' –इम ३३. अनामत पहा. [अर. अमानत]. **०दार**–पु. विश्वस्त; ठेव सुरक्षित ठेवणारा; ट्रस्टी; अमीन; **०नामा**–पु. विश्वस्तपत्र; ठेवपत्र; ट्रस्टडीड **०पत्र**–न. जप्तीपत्र; वादग्रस्त वस्तु तात्पुरती सरकाराच्यांत घेतल्याबद्दल किंवा एकाद्या विश्वस्ताजवळ ठेवल्याबद्दल लिहिलेला लेख. 'एक वादी भोगवटा करतो दुसरा फिर्याद आला, सबब लिहिणें तें' –भाइअ १८३२.

अमानतपन्हा—पु. श्रेष्ठ याजर्थी एक पदवी; अमीर (प्रमाणें). –रा ३.५५. [अर. इमारत्पन्हा]

अमानवी—वि. माणसाहून निराळें; अमानुष; दैवी. 'त्यांतून (प्रसंगांतून) पार पडून पुनः आज आपलें पूर्व कर्तव्य करण्यास त्यास जें सामर्थ्य आलें आहे तें त्याच्या दृष्टीनें तरी कांहीं अमानवी कारणांमुळें आलेलें आहे.' –टि २.१. [सं.]

अमानित्व—न. (काव्य) निरभिमानपणा; निगर्वता; अहंभाव नसणें; निगर्वीपणा; नम्रता; विनय. 'पैं अमानित्व पुरुषीं। तें जाणावें इहीं मिर्षी।' –ज्ञा १३.२०१. [सं.]

अमानी—स्त्री. १ गैरहजारा; गैरमक्तेदारी; रयतवारी (पध्दत). 'तालुक्यावर ताहूद केलें तें मोडावें आणि अमानी करावी.' –रा ५.२३. २ ठेव; विश्वस्त वस्तु; अमानत पहा. –वि. १ तात्पुरता कामावर नेमलेला; कायमची नेमणूक न झालेला; बदली; इं० ॲक्टिंग. २ कायम नसलेल्या अंमलदारानें चालविलेलें. [अर.अमानी]

अमानुष–ष्य—वि. १ मानवी सत्तेबाहेरचें; अमानवी; दैवी; स्वर्गीय; अद्भुत; मनुष्यदेहधर्मरहित. 'तेंवि अमानुषा मानुष। मानाल मातें॥' –ज्ञा ९.१४२. २ मनुष्यजातीला अयोग्य–न शोभणारें; राक्षसी; पाशवी. ३ मनुष्यानें न आचरण्यासारखें. [सं.]

अमान्य—वि. १ पसंत–मान्य नसलेलें;स्वीकारण्याला अयोग्य; नापसंत; अप्रिय; तुच्छ. २ पसंत न पडणारें; मान्य नसणारें. [सं.]

अमान्य—न. कच्चें अन्न; शिधा. 'अयाचित अमान्यें उदंड आलीं।' –सप्र ८.११४. [सं. आम=कच्चें+अन्न अप.]

अमाप–य—वि. १ न मापतां येण्यासारखा. २ न मावणारें. ३ (ल.) असंख्य; पुष्कळ. 'अमाय पोरांची भिळवीन मांदी।' –दावि २१. [सं. अ+मा]

अमाय—वि. १ मायेचा अभाव; सत्यज्ञान. २ निष्कपटता. [सं. अ+माया]

अमायिकवृत्ति—स्त्री. मायेमध्यें न गुरफटलेली वृत्ति–वर्तन–ज्ञान; निर्विकार स्थिति; निर्लेप वृत्ति. [सं. अ+माया+वृत्ति]

अमारतपन्हा—अमानतपन्हा पहा.

अमार्ग—पु. १ अपथ; आडमार्ग; चुकीचा रस्ता. २ असमंजसपणा. ३ व्यतिक्रम; विलक्षणपणा. (बोलणें–वागणें–न्याय करणें यांमध्यें). ४ कुमार्ग; व्यभिचार. 'मार्गामार्गे येकवढें। करीत चाले।' –ज्ञा १८.६२५. [सं.]

अमालत—पु. वचस्व; सत्ता. [अर. अमल्]

अमा(व)वास्या, अमावास—स्त्री. कृष्णपक्षाची अखेरची तिथि; सूर्य व चंद्र ज्या दिवशीं जवळ जवळ येतात तो दिवस अंवसेची तिथि. [सं. अमा=जवळ+वस्=राहणें]

अमांश—पु. आंब; आमांश पहा.

अमास, अमांस—(गो.) अमावास्या.

अमासा—वि. क्रिवि.(कों.)अल्प; लहान; अमळ—सा पहा. 'तो अंतरात्मा आहे कैसा । प्रस्तुत वोळखाना अमासा । ' –दा १०. १०.३६. **–सें**–क्रिवि. (व. अमाशानें.) थोड्या वेळानें; अंमळशानें. ' किंबहुना ज्याचें नाम ऐसें । त्याचें स्वरूप असेल कैसें । तें पाहों आयंत अमासें । निजनाम सोई । ' –स्वादि १.५.४१. [वैसं. अम्रस्; सं. अम्=थोडें]

अमासुस्त—वि. सर्वस्वीं थंड; आळशी. ' मोंगलाई कारभार अमासुस्त । ' –रा १.१४७. [फा. आम्+सुस्त]

अमाळ—वि. (अमल अप.) शुद्ध; स्वच्छ; शुभ्र. 'चापेकळयांच्या मिरवेत माळा। मुक्ताफळांच्या दिसती अमाळा।'–सारुह ६.२९.

अमाळसा—अमळसा पहा. ' उभा न राहेच अमाळसा गे । ' –सारुह ७.७४.

अमित—वि. १ न मापलेलें, मोजलेलें. २ मोजतां न येण्याजोगें; अपरिमित; अपार; पुष्कळ. ' तुज नमो अमितविक्रमा । ' –ज्ञा ११.५३३. [सं. अ+मा=मोजणें]

अमित्य—(काव्य) (अमित अप.) पुष्कळ. 'अमित्य सेना न्यावी होती । ' –वेसीस्व १.९०. [सं. अमित]

अमित्र—पु. शत्रु; स्नेही नसलेला; द्वेषी; वैरी. [सं.]

अमिद—(शाप.) अम्लसंयुक्तद्रव्य. (इं. अमाईड)

अमिदिन—न. (शाप.) इमिदाचें अनाम्ल. हें एकाम्लक मसून फार स्थिर नसतें. अमिदहरिदें किंवा गंधकिल अमिदें यांवर पंच किंवा अभिनें यांची क्रिया केली म्हणजे अमिदिन तयार होतें. -ज्ञाको अ ३३८ (इं. अमिडाइन)

अमिन—न. (शाप.) अम्र(अमोनिया)मधून उज्ज (हायड्रोजन) परमाणु निःसारित करून होणारें द्रव्य. [इं. अमाइन]

अमिल—न. (इतर रासायनिक द्रव्यांबरोबरच असणाऱ्या स्वतंत्र राहूं न शकणाऱ्या) मूलद्रव्यांपैकीं एक. [इं.]

अमिल—अंमलदार; अधिकारी. ' चांगलासा आश्रय मिळता र तुमच्या अमिलाचा रंगमहाल टाकून देखील मी ह्या भिकार ांवकुसाच्या वाहेर पडतों ' –विवि ८.११.२०६. [अर. आमिल्]

अमिली—स्त्री. अंमलदारी; कारभार. ' अमिली न शोभे ष्टे बहु । ' –दावि ७७७. ' यांचे अमिलीचे कारस्तानाचा बयान ल्यावरून ' –रा ७.४५. [अर. आमिल्]

अमीन—पु. १ निधिधारक; विश्वस्त; ट्रस्टी. 'वारीसदार हजर सेल तर ती जिनगी अमीन याचे ताब्यांत देऊन ' –ऐस्कु ५८. २ मोगलाईंतील व पेशवाईंतील एक अधिकारी.–यांचीं कामें–प्रत्यक्ष मसूल जमा करणें, कज्जांचा निवाडा करणें, सामान्य राज्यव्यवस्थेर देखरेख ठेवणें इ.; तपासणी अंमलदार; तालुकादार; मामलेदार; तहसीलदार; लवाद; पंच; पगार व काम यांसाठीं –थोमारो १.३४२. २.१२०, २४१–४२ पहा. आरमार अमीन=आरमाराची पहाणी करणारा. [अर. अमीन]

अमीनचमीन—अमनचमन पहा.

अमीनी–अमिनी—स्त्री. १ अमिनाचें काम.–पया ५७. २ व्यवस्थितपणा; सरकारी अधिकाऱ्याकडून जमीनीची तावडतोब लागलेली व्यवस्था. [अर. अमीन]

अमीबा—पु. इंद्रियरहित आदिजीवांचा एकपेशीमय सूक्ष्म जंतु; हा चिखलांत झांपडतो. हा प्राणी आपल्या पोटांत गेल्यास रक्ताची आंव पडते.–घारपुरेकृत प्राणी आणि आरोग्य. ' जीवकोटींतील अगदीं खालच्या दर्जाचा अमीबा नांवाचा जो प्राणी आहे त्याची रचना इतकी साधी...असते ' –वस्व ७९.

अमीर—पु. १ थोर किंवा बडा इसम; सरदार; उमराव; उच्च घराण्यांतील मनुष्य. ' धीर वीर किति अमीर होउनि फकीर भिक मागती । ' –ऐपो ३६७. २ आज्ञा करणारा अधिकारी [अर. अमीर=सरदार; श्रेष्ठमनुष्य. आमिर=आज्ञा करणारा; शास्ता. अम्र=आज्ञा; हुकूम सं. मित्र (सूर्य) किंवा अमर=देव, श्रेष्ठ. फा. मिहिर.१]. **०उमराव**–पु. बडे लोक; सरदारमंडळी. [अमीरउम्रा अमीरचें अव.]. **०उल्–उमरा(व)**–अमीरांतील श्रेष्ठ; सरदारांचा नायक. (मालोजी घोरपडे यास ही पदवी होती.) **०उल्–ममालिक**–राज्यांतील श्रेष्ठ अधिकारी. **०राव**–एक पदवी. –मदन १.१२.

अमी(मि)राई—स्त्री. सरदारी; सरदारी वैभव. ' आहे घरीं पुरी अमिराई ' –प्रला १३९. [अर. अमीर]

अमी(मि)री—स्त्री. १ सरदारी; सत्ता; सर्वाधिकारित्व. २ बडेजाव; मोठा थाट. ३ अमिराचा दर्जा. [अर. अमीर]

अमील—अधिकारी; अंमलदार. ' अमिलानी हाल व इस्तकबाली' =आजचे व भावी अधिकारी. –रा ८.६७. [अर. आमिल्]

अमु–मू—वि. (कों) ज्यास वाचा नाहीं असे (पशुपक्ष्यादि, लहान मूल). [सं अ+मुख; अ+मू]

अमु–मू—पु. आमा; स्तन. अमा, आमा पहा.

अमुक—वि. विवक्षित; कोणीएक नांव न घेतां सामान्य रूपानें सांगण्यास इष्ट असा. ' कोणीतरी करा असें सांगूं नको, अमुकानें करावें असें सांग ' –न. १ विवक्षित वस्तु; इसम. 'तरी अमुकाचि मी स्वयसेव । तो सांग कवण तूं।' –विउ ३.११. २ फलाणा; कोणी तरी माणूस. अमका पहा. [सं. अमुक, अदस् यांचें रूप]. **०तमुक**–वि. अमकातमका; विवक्षित; कोणीएक; असातसा. ' मी बाजारांत जातों अ० काय जिन्नस आणायाचे असतील ते सांग, आणीन. ' –न. कांहीं एक वस्तु; ही किंवा कोणतीहि वस्तु; सर्व अर्थी अमका तमका पहा. [अमुक द्वि.]

अमुक्ताभरण—न. भाद्रपद शुद्ध सप्तमीस आचरावयाचें देवीचें व्रत. [सं]

अमुत्र—पु. परलोक; पुढील जन्म; जन्मांतर. [सं.]

अमुप—वि. अमूप पहा.

अमुर्पिका—वि. (गो.) अर्धवट पिकलेला; न सुरतां पिकलेला. [अमूर+पिका]

अमूप—वि. प्र. अमाप. मोजतां न येण्याजोगें; असंख्य; अतिशय; फार; पुष्कळ; अपार; अमितः अमाप पहा. ' कुळशीळ धनरूप । विद्यावयसा अतिस्वरूप । शांति कांति तेज अमुप । करिती तप तुजलागीं । ' –एरुस्व ४.९. [अ+मा=मोजणें]

अमूपार—वि. अनंत. [अमूप+अपार]

अमूर्त—वि. आकार किंवा रूप नसलेलें; आकृति रेखाद्वन स्पष्टीकरण किंवा विवरण न करितां येण्यासारखें; अव्यक्त; निराकार; आकाररहित. उ० आकाश, हवा, वेळ, काळ, अंतर, आत्मा, ब्रह्म, [सं.]

अमूल्य—वि. किंमत करतां न येण्यासारखें; बिनमोल; अमोल; मूल्यवान. [सं. अ+मूल्य]

अमूस-अमोस-अमोशा—स्त्री. अमावास्या, आवस. [सं. अमावास्या]

अमृत—न. १ देवलोकींचें पेय (यानें वृद्धावस्था किंवा मृत्यु येत नाहीं); समुद्रमंथनांत निघालेल्या चौदा रत्नांपैकीं १४ वें; सुधा; पीयूष; सुधारस. ' जोडे अमृताची सुरसरी । तैं प्राणातें अमर करी । ' –ज्ञा १७.२१९. २ दूध आटवून त्यांत खडीसाखर, जायफळ, वेलदोडे वगैरे पदार्थ घालून रात्रीं थंडींत उघडयावर ठेवून दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं तें दूध घुसळून त्यावर फेंस येतो तो. ३ मरणापासून मुक्तता, सुटका; मोक्ष. ' जिणें गरळ पाजिलें अमृत पाजिलें तीस तां । ' –केका ९१. ४ उदक; (ल.) देवाचें चरणतीर्थ. ५ ब्रह्म. ' अमृत म्हणजे अविनाशी ब्रह्म हा अर्थ उघड असून ' –गीर ३५८. ६ दूध. ' सर्प पोसुनिया दुधाचाहि नाश । केलें श्वेता विष अमृतायें । ' –तुगा ३०७३. ' अमृता चवी यावयालागून । साकर घालून पहावी । ' ' अमृतें तरिच मरिजे । जरी विखेंसीं सेविजे । ' –ज्ञा २.२२४. ७ पंचमहायज्ञ करून जें अन्न शिल्लक राहतें तें किंवा यज्ञशेष अन्न. –गीर २८८. ८ (उत्तरहिंदुस्थान) पेरू; जांब. [तुल० फा. अमरूद] ९ शीख पंथांतील एक संस्कार–एका मोठ्या भांड्यांत पाणी व साखर घालून तें मंत्र म्हणत किरपाणानें ढवळतात व मग तें प्राशन करावयास देतात. सामाशब्द–ज्ञानामृत, गीतामृत, अधरामृत. **म्ह०** १ अमृतायें जेवण मुतायें आंचवण=भव्य व चांगला आरंभ केला असून त्याचा शेवट क्षुद्रपणानें किंवा कमीपणानें झाला असतां योजितात. २ पासला पाडून अमृत पाजणें=बळजबरीनें एखाद्यास त्याच्या कल्याणाच्या किंवा हिताच्या मार्गास लावणें. ३ अमृत देणाऱ्यास (तें चाखण्यास) जीभ दे असें सांगणें लागत नाहीं. ' अमृतप्रदा म्हणावें न लगे रसना मुखांत दे खाया. ' –मोआश्रम ५.११. ४ अमृत सेवन करूनहि मरण येतें=एकाद्याच्या दुर्दैवानें त्याला अमृत मिळालें तरी मृत्यु (हानि) येतो. ' अमृत सेवितांचि पावला मृत्य राहो । (राहू). ' –दा १.१.२५. [सं. अमृत]. –वि. अमर, मरणाधीन नसलेला; मृत्यूपासून सुटका झालेला. [सं.] **०कर**–पु. चंद्र. [सं.] **०कळा**–स्त्री. १ गाल; गालफड. २ घशांतल्या गांठी (टॉन्सिल) ' येकांच्या बेसल्या अमृतकळा. –दा ३.५.४. **म्ह०** अमृतकळा बसणें=मृत्यूचा काळ जवळ येणें. ' अ० बसल्या आतां वाचणें कठिण.' ३ ' चंद्राची सतरावी कळा' –ज्ञा १२.७. **०कुंड**–न. स्वर्गातील अमृत भरलेलें पात्र–भांडें. **०कुंडली**–स्त्री. वाजविण्याचें एक चर्मवाद्य. **०घटका, घडी**–वेळ पहा. **०घुटका-घुटिका**–पु. १ अमृताचा घोट. २ मजेदार गोष्टींचा चुटका. ३ छोटीशी व सुंदर गाण्याची चीज. **०झोप**–स्त्री. पहाटेची साखरझोंप. **०धारा**–स्त्री. एक वृत्त. **०ध्वनि**–पु. एक छंद, वृत्त. **०पाक**–पु. रव्याच्या एका प्रकारच्या वडया. **०पान-प्राशन**–न. अमृत पिणें; अमृतसेवन; अमृतघुटका; (ल.) विष पिणें–खाणें ' खुरशेट मोदी यानें अमृतप्राशन केलें. ' **०पी-प्राशी**–वि. अमृत पिणारा. **०फळ**–न. १ जें फळ खालें असतां मनुष्य अमर होतो तें. एक काल्पनिक फळ. राजा भर्तृहरीला असें फळ मिळालें होतें. २ पेरू, आंबा, द्राक्ष, बेदाणा, खिसमिस वगैरे. ३ एक पक्वान्न; मोदक. ' कीं देवाचिये सन्निधी अमृतफळें । पावतें जाली. ' –ऋ८२. ' निंबे नारिंग नारेळे । अपूप लाडू अमृतफळें.'–एरुस्व ६.८६. ' तिळवे लाडू अमृतफळें '–वसा २६. **०मंथन**–न. अमृतासाठीं देव व दैत्य यांनीं केलेलें समुद्राचें मंथन, घुसळणें. ' एऱ्हवीं अमृतमंथना । सारिखें होईल अर्जुना । ' –ज्ञा १८.१४८२. **०महाल**–स्त्री. म्हैसूर राज्यांतील या नांवाच्या महालांतील बैलांची एक जात. ' खिलारी, अ० व कृष्णाकांठ या जातीचे बैल तयार करणें. ' –के १८.७.३१. **०वर्षाव**–पु. अमृताचा पाऊस, त्यावरून चांगल्या व संतोषकारक गोष्टींचा किंवा पदार्थांचा वर्षाव किंवा देणगी; समृद्धि. **०वल्ली**–स्त्री. १ जिच्यामुळें अमरत्व प्राप्त होतें अशी एक काल्पनिक वेल. २ (ल.) भांग. ३ अमरवेल; गुळवेल. **०वेळ**–स्त्री. १ तीस घटकांपैकीं एक शुभ काल. एकंदर दिनमानाचे व रात्रिमानाचे ८ भाग धरून मुख्यतः आठ वेळा कल्पिल्या आहेत. ३।।। घटका हें यांचें मध्यम प्रमाण आहे. दिनमानाप्रमाणें त्यांचा काल कमीजास्त होतो (वेळ पहा). ' अमृतवेळ प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें । '–दा ४.१.२०. २ करमणूक; विलास व उपभोग यांची योग्य वेळ. ३ औषध देण्याची योग्य वेळ (सकाळ). ४ शांत, खुषींत असण्याचा–स्नेहभावाचा काल. **०संजीवनी**–स्त्री. १ मृतास जीवंत करणारी विद्या: मृतसंजीवनीचा पर्याय. २ अमृत. ३ (ल.) अद्वैतबोधरूपी अमृत. ' ते नमस्करूं अमृत संजीवनी । श्री देववाणी । ' –ऋ १. ४ चंद्राची अमृत झिरपणारी १७ वी कळा.

'सतरा वियेचें स्तन्य देसी।' –ज्ञा १२.७. –वि. मृतास सजीव करणारी. 'अमृतसंजीवनी विजविली खाई। अंगें तये ठायीं हारपलीं।'–तुगा ३७८९. ०**सिद्धियोग**–पु. रविवारीं हस्त,सोमवारीं श्रवण किंवा मृग, मंगळवारीं अश्विनी, बुधवारीं अनुराधा, गुरुवारीं पुष्य, शुक्रवारीं रेवती, शनिवारी रोहिणी याप्रमाणें वार व नक्षत्र यांचा योग. हा कोणत्याहि कार्यास शुभ असतो. [सं.]

अमृता—स्त्री. गुळवेल. [सं.]

अमृती–त्ति—स्त्री. १ वैष्णव लोकांजवळील देवाचें तीर्थ ठेवण्याची लहान गिंडी. 'अमृतीमधें आकाश। सगळें साठवतां प्रयास।' –दा ७.४.१८. २ पाणी पिण्याचें लहान भांडें. ३ हिरडा, आंवळी, तुळस, दूर्वा इ० वनस्पती. [सं. अमृत]

अमृतोपम—वि. अमृतासारखें–प्रमाणें. [सं.]

अमृत्यु—पु. अमरत्व. –वि. अमर. [सं.]

अमेज–द्–ल–स्त्री. मिश्रण; गायनांतील राग वगैरेंचा मिश्र सूर. –वि. मिसळलेलें; मिश्रित. [फा आमेज=मिसळणें]

अमेध्य—वि. अप. अमेय–शर. १ हवन करण्यास अयोग्य; अपवित्र; घाणेरडें; कुजकें; बिघडलेलें (अन्न, वस्त्र इ.) 'मग केवळ ये देह खोडां। अमेध्योदकाचा बुडबुडा।' –ज्ञा १६.३१७. २ विष्ठा; मल; गू. [सं.]

अमेय—वि. मोजतां न येण्याजोगें; अमोज. 'मज अमेया मान।' –ज्ञा ९.१५९. [सं. अ+मा=मोजणें]

अमोघ—वि. १ योग्य प्रकारें लागू होणारें; अचूक; हटकून काम करणारें. 'आपल्या मनांत येणारे विचार तसेच कांहीं तरी अमोघ असायचे.' –चंद्रगुप्त ११९. २ गुणदायी; फलदायक (शक्ति, पराक्रम, औषध, मंत्र, कौशल्य, शस्त्र, वीर्य). 'मसा तेथिचे जे अमोघ। अलौकिक भोग।' –ज्ञा ६.४४२. ३ (चुकीनें) निरुपयोगी; निष्फळ; बिनकिफायतीचें; व्यर्थ. [सं. अ+मोघ=व्यर्थ]. ०**वीर्य**–वि. १ ज्याचें वीर्य (रेत) यथे जात नाहीं असा; प्रजननशक्ति चांगली असणारा (माणूस). २ (ल.) पराक्रमी; उत्कर्षकारक; सामर्थ्यवान. ३ नेहमीं गुणकारक असलेलें; रामबाण; हटकून गुण आणणारा (उपाय, मंत्र, औषध.)

अमोज—वि. १ मोजमाप करतां न येण्यासारखें; गणना न करतां येण्यासारखें; अमाप; असंख्य. २ न मोजलेलें; न गणलेलें. [सं. अ+मा=मोजणें]

अमोड–डी—वि. न मोडलेलें; साग्र. 'तळवटीं अमोडी। कुशांकुर॥' –ज्ञा ६.१८२. [सं. अ+मृद्=मोडणें.]

अमोण—अंबोण; आंबोण पहा.

अमोद्—आमोद पहा.

अमोनिया—पु. नत्र व उज्ज यांच्या संयोगानें होणारा वायु. हा तीव्र वासाचा असतो. नवसागरासारख्या क्षारपदार्थापासून उत्पन्न होतो. पाण्यांत मिसळतो. (आफ्रिकेंतील लिबिया प्रांताचें पूर्वीचें नांव अमोनि होतें. तेथें ज्यूपिटर अमोनीचें देऊळ होतें, तेथें उंटाची लीद जाळीत. त्याच्या धुराच्या वासावरून त्या वायूस अमोनिया हें नांव पडलें असें म्हणतात). अमोनियापासून बनणारीं संयुक्त द्रव्यें:–अमोनिअदिद (अमो० आयोडाईड); अमोनिकबित (अ० कार्बोनेट); अमोनिगंधकित (अ० सल्फेट); अमोनिनत्रायित–नत्रित (अ० नायट्राइड–नायट्रेट); अमोनिप्राविद (अ० फ्लुओराइड); अमोनिस्तंभिद (अ० ब्रोमाइड); अमोनिस्फुरित (अ० फॉस्फेट); अमोनिहरिद (आ० क्लोराइड) इत्यादि. [इं.]

अमोल, अमोलिक, अमोल्य, अमौल्य––वि. १ किंमत न करतां येणारा; बिनमोल; किंमत किंवा महत्त्व, अंदाज करतां न येण्यासारखें; अमूल्य; अनर्घ. २ उत्कृष्ट; सुंदर; छानदार; सुरेख. 'अमोल काया जाइल वाया।' ३ (ल.) ज्याची मुळींच किंमत नाहीं असा; कवडी किंमतीचा; क:पदार्थ. 'बापु राजत वेठिला। जीतेयां शिशुपाळाचा अमोला।' –शिशु ५१५. [सं. अ+मूल्य]

अम्न—अमोनिया पहा.

अम्मल, अम्मल–दस्तूर–दार–दारी–बजाबणी—अमल पहा.

अम्मली—अमली पहा.

अम्मळ–सा—अमळसा पहा.

अम्मा—स्त्री. आई; (सामा) स्त्री; बाई (द्राविडी प्रांतांतून हा सररहा आढळतो). 'अम्मायें उतावीळ चित्त।' –दावि ४११. [सं. अंबा; प्रा. अम्मया, अम्मा; द्रा. अम्मा.]

अम्मा—अ. पण; तथापि. अमा पहा. [अर.]

अम्मासा—अ. (व.) अमळसा; अमासा पहा.

अम्याग—वि. (कों.) सौम्य; नरम; म्याड; भेकड; निरुपद्रवी. [अम्म=किंचित्; अमळ+सं. आग=अपराध?]

अम्ल—वि. आम्ल; आंबट. –पुन. १ आंबटपणा. २ रासायनिक आंबट द्रव; ॲसिड. ३ महालुंग, निंबु, नारिंग, चिंच, आंवळा, कवठ वगैरे आंबट फळ. ०**त्व**–न. आंबटपण; (इं.) ॲसिडिटी. [सं.] –**पित्त**–न. एक रोग. हा स्वतंत्र नसून अग्निमांद्य किंवा दीर्घकालीन अपचन या रोगांच्या अनेक लक्षणांपैकीं एक आहे. यानें आंबट ढेकरा व अन्नाची आंबट वांती होते. थकवा, छातींत ढवळाढवळ सारखी होते, घशांत जळजळ व अरुचि येते. [सं.]

अम्लान—वि. म्लान नसणारें; न कोमेजणारें; ऱ्हास न पावणारें; खिन्न न होणारें; टवटवीत; प्रफुल्ल. [सं.]

अम्ली—स्त्री. चिंच (झाड व फळ). [सं. अम्लिका; हिं. इमली] ०**करण, ०भवन**–न. अम्ल(ॲसिड) करणें–होणें.

अय—न. लोखंड. [सं. अयस्]

अयकर्णे—ऐकणें पहा.

अयगारकी—स्त्री. (कर्ना.) अव्याचा बलत्याचा हक्क. [का. अय्या]

अयट-टा-टी—स्त्री. १ ऐट; अक्कडबाजी; भपका; दिमाख; छानछोकी; डौल; तोरा. २ नखरा; आविर्भाव (मुद्रेचा, वागण्याचा, चालण्याचा, कृतीचा). ३ तडफ. [सं. आकृष्ट; प्रा. आय ड्ढ किंवा सं. आयत? हिं. ऐंठना = आंखडणें] **०णें**–ऐट करणें. **०बाज**–वि. भपकेबाज; नखरेबाज; दिमाख दाखविणारा; नखरा, आविर्भाव करणारा; छानछोक; अक्कडबाज. **०बाजी**–स्त्री. भपका; छानछोकी; नखरा; डौल.

अयणी-अयणुटें—वि. (कों., व.) अळणी, अळणुटें; किंचित अळणी असलेलें; अळणी पहा. [सं. अलवण–अलयण–अयण]

अयणी—आयणी पहा.

अयता—आयता पहा.

अयत्नतः-त्नानें, अयत्नें—क्रिवि. कष्ट, श्रम, प्रयत्न न करतां; अनायासें; सहज; सहजगत्या; सहजासहजीं; आपोआप. (क्रि० सांपडणें, मिळणें). [सं. अ+यत्न+तः]

अयत्नसिद्ध—वि. प्रयत्न न करतां मिळविलेलें–साधलेलें–केलेलें. [सं.]

अयथार्थ—वि. १ खरें किंवा खऱ्याप्रमाणें नसलेलें; खोटें; असत्य. २ बुद्धीस न पटणारें; अवास्तव; निराधार; अयोग्य. –क्रिवि. १ खोटेपणानें; लबाडीनें. २ अप्रमाणशीर; निराधारपणें. [सं. अ+यथा+अर्थ]

अयदी—वि. सुस्त; भेद; आळशी; जड; ऐदी पहा. [सं. अयत्नी?]

अयन—अईन पहा.

अयन—न. १ सूर्याचें उत्तर किंवा दक्षिण दिशेनें गमन. उ० उदगयन–उत्तरायण; =सायनमकरारंभापासून कर्कारंभापर्यंतचा उत्तरायणाचा काळ; दक्षिणायन=कर्कारंभापासून मकरारंभापर्यंतचा दक्षिणायनाचा काळ. २ सहा महिने; अर्धे वर्ष; तीन ऋतू. 'कोठें वर्षे कोठें अयन.' ३ अयनांत; अयनबिंदु; इं. सॉल्स्टिस. ४ रस्ता; मार्ग; पंथ. 'पौष्यापति जातां जो पुरुष वृषारूढ देखिला अयनीं।' –मोआदि २.१२८. ५ (समासांत) जाणें; येणें; गति. ६ प्रवेशद्वार (सैन्याचें); सैन्यप्रवेशमार्ग. –भगवद्गीता १.११; –गीर ६०४. [सं. इ=जाणें]. **०काल**–पु. दोन संपातांमधील काल (सूर्याच्या गतीला लागणारा); दोन अयनबिंदूंतील काळ; अयन पहा. **०चलन**–न. पृथ्वीचे ध्रुव एका बिंदूभोंवतीं फिरत असल्यानें ताऱ्यांचें होणारें चलन; क्रांतिपात किंवा क्रांतिसंपातगति; संपाताच्या स्थानाचें मागें सरणें. **०घलन**–न. विशिष्ट ताऱ्याच्या क्रांतिवृत्तीय स्थानापासून ध्रुव व कदंब यांवर जाणाऱ्या सूत्रांमधील कोण. **०वायु**–पु. एक प्रकारचे नियतकाल वाहणारे वारे; ६।६ महिन्यांनीं यांची दिशा बदलते त्यावेळीं मोठमोठीं वादळें होतात. मुख्यतः हिंदीमहासागरांत वाहतात. –सृष्टिज्ञान २८. **०वृत्त**–न. भवलय; भवृत्त; क्रांतिवृत्त; विषुववृत्तापासून २३॥ अंशांवर उत्तरेस व दक्षिणेस असलेलीं अक्षवृत्तें. उत्तरेकडील कर्कवृत्त व दक्षिणेकडील मकरवृत्त. या दोन वृत्तांमधील प्रत्येक अंक्षांशावर एकदां सूर्य अगदीं डोक्यावर येतो. (इं. ट्रॉपिक्स.) [सं.]

अयनक—न. चष्मा; उपनेत्र; चाळिशी; आरशी. 'माझ्या अयनकीला भिंग बसवावयाचें आहे.' [अर. आयनक. अयन= डोळा यांचें द्विवचन. तुल० सं. नयन; इं. आय]

अयनक—पु. आरसा; दर्पण; कांच. **अयनेमहाल**–पु. सर्वत्र आरसे असलेला दिवाणखाना. **अयन्याची अंबारी**–स्त्री. राजे लोकांची आरसे असलेली अंबारी. 'अयन्याची अंबारी गगनीं तारांगण।' –ऐपो १०९ [अर. आइना=आरसा]

अयना—पु. आरसा; अयनक पहा.

अयनांत—पु. १ अयनाचा शेवट; अयनबिंदु; दोन अयनांमधील संधिकाल. २ अयनअर्ध ३ पहा. [सं.]

अयनांश—पु. निरयन गणनेचें आरंभस्थान जी निःशर रेवती योगतारा (झिटापीशियम) तीपासून सायन मेषसंपातापर्यंतचें क्रांतिवृत्तीय अंशादि अंतर. [सं.]

अयनी—आयणी पहा.

अयब—पु. १ दोष; उणीव; अपुरेपणा; खोड; व्यंग; **न्यून.** 'नाहींतर शरकती (शरीक, मदतनीस) आहेत म्हणून कमती सरन्जामाची होती तर इंग्रजांचे जवामर्दीस अयब लागता.' –ख ८. ४३५४. 'जापतें नेणतें अनुचित कर्म होत असेल तर ती गोष्ट चित्तांत ठेवून त्याचा अयब इतर लोकांत न बोलतां' –आज्ञापत्र १९. २ दुर्गुण; दुराचार. ३ (ल.) धक्का. [अर. अयब] **०दार**–वि. न्यून किंवा दोष असलेला; अपुरेपणाचा.

अयबुगयबु, अयबोगयबो—पु. (कों.) कोणी तरी व्यक्ति; कोणीहि आला गेला; कोणतेहि सामान्य लोक. [सं. आ+या आणि +गम्; आया+गया]

अयमुर्चें—क्रि. (गो.) फुलाची कळी अर्धवट उमलणें. [सं. अर्ध+मुच्; का.–मुरुघु=मुरडणें.]

अयय्यो—उद्गा. आई! आई! बापरे! आश्चर्य किंवा दया, भीति वाटली असतां निघणारा उद्गार. [प्रा. अइया=स्त्री; किंवा प्रा. अहय=दयाहे. का. अय्या द्वि.]

अयराण-न—न. अरण्य; जंगल; रान. [सं. अरण्य. फा. वैरान]

अयल—अयाळ पहा.

अयध नवमी—अविधवानवमी पहा.

अयं विशेषः—प्रथम मान्य झालेली जी गोष्ट, तिच्याबद्दल पुक्त्यंरादि पुन्हां सांगितलें असतां पहिल्यापेक्षां ती जास्त मान्य झाली असतां हें वाक्य म्हणतात. (चुकीनें अहं विशेषः) [सं.]

अयश—न. पराभव; अपकीर्ति; दुर्लौकिक; फजिती; अपमान. [सं. अ+यशस्]

अयश—चैन; ऐषआराम. ' पातशहा बदस्तूर दिल्लींत अयश करून आहेत. ' –दिमरा १.९१. [अर. ऐष=सुख, आनंद]

अयस्—न. १ लोखंड ' त्वद्गुरुचे काष्ठायस दंत हिरण्मय तुझे मसोत असे. ' –मोआदि २.४८. २ पोलाद. [सं.]

अयस्कांत—पु. लोहचुंबक; लोहकांत. [सं.]

अया–य्या—पु. १ लिंगाइत लोकांत सन्मानदर्शक संज्ञा. २ यांचा गुरु–जंगम. ' आकर्णुनि ऐस्या शुद्ध ज्ञानगोष्टी। वृत्ती अय्याची चाली उफराटी। ' –दावि ३५७. ३ (सामा.) बहुमानार्थी पदवी स्वामी; साहेब याप्रमाणें). ४ गुरव; पुजारी. कर्नाटकांत हा एक लुतेदार आहे. ५ स्वयंपाकी; आचारी. ' हुजूर मुदबकखान्यांतील गमाठी, भालेकरी, अय्या लोकांशीं संबंध येत असे. ' विक्षिप्त .९५. [सं. आर्य; द्रा. अय्या] –स्त्री. युरोपियन लोकांजवळ रसणारी हिंदु दाई; (सामा.) दासी. [सं. आर्या; पोर्तु. अइआ दाई. आईअी=शिक्षक याचें स्त्रीलिंगी रूप]

अयाचित—१ वि. याचना न केलेलें; न मागतां मिळालेलें सं.]. २ न मागतां इतरांकडून सहज मिळणाऱ्या भिक्षेवर अन्नादिकेंकरून ज्याची उपजीविका चालते असा निर्वाह करणारा. धनाचा सद्व्यो खरा. द्यावें अनाथ प्रेतसंस्कारा. अर्पावें दीनांच्या द्धारा. धाडावें घरा अयाचिताच्या ॥ ' –एभा २३.३९६. –क्रिवि. मागतां; आपोआप; सहजासहजीं (मिळालेलें). [सं. अ+याच्] **बाबा**–पु. अयाचितपणें येणारा साधु. [अवचित] **०व्रत**–न. **वृत्ति**–स्त्री. याचना न करतां जें मिळेल तेवढ्यावर निर्वाह करण्याची वृत्ति. याचना केल्यावांचून ज्या दिवशीं जें अन्न मिळेल तेंच जेवन करून राहाणें. (ल.) संतोषवृत्ति. **०व्रत**–न. वरील तऱ्हेनें राहण्याचा केलेला निश्चय.

अयाचित—क्रिवि. (बायकी) अनाहुत; अवचित. ' मी तेथें अयाचित गेलें. ' **०खून**–पु. एकाकीं केलेली हत्या; मनुष्यवध.

अयाचिती—स्त्री. अयाचिताकडे पाठविलेलें द्रव्य, भिक्षा-गैरे. [सं.]

अयान–अयां—वि. व्यक्त; श्रुत; स्पष्ट. ' मुकदमे इजविहार ाले, अयां जाले. ' –पया ४९०. [अर. अयां=स्पष्ट. फा.]

अयांनम—(गो.) अविधवानवमी पहा.

अयाल–ळ—स्त्री. घोडा, सिंह वगैरे जनावरांच्या मानेवरचे लांब केस. **०दांडी**–स्त्री. अयाळ आणि शेंपटीचा बुंधा–**दांडी**. ' घोडयाची अयाल दांडी धरून चालावें. ' [फा. अयाल]

अयाल–ळ—स्त्री. विधवेच्या नांवापुढें नवऱ्याच्या नांवापूर्वी (कागदोपत्रीं) लिहिण्यांत येणारा (कोम, प्रतार याअर्थी) शब्द; जसें–साळू सोळसकरीण अयाळ विठोजी सोळसकर. [अर. इयाल=कुटुंब. फा. अयाल=पत्नी, स्त्री.]

अयाव—इतर रूपें–आयव–आयाव (गो.) अहेव; अविधवा; सवाष्ण. [सं. अविधवा]

अयांवया—क्रिवि. गयांवयां; दीनवाणें; रडवें तोंड करून (क्रि० करणें). [ध्व. गयांवयां]

अयुक्त—वि. १ न जोडलेलें, जुळलेलें. २ अयोग्य; अनुचित;निरुपयोगी. [सं. अ+युज्] **०पण**–न. विलगता; चंचलता, ' म्हणोनि अयुक्तपण मनाचें. ' –ज्ञा २.३४७.

अयुत—न. दहा हजार ही संख्या. ' जो देवालयाची वृत्ति हरी। जो ब्राह्मण वृत्तीचा लोप करी। तो अयुतायुत वर्षेसहस्रीं। योनीं सूकरीं विष्ठा भोगी ॥ ' –एभा २७.३९२. [सं.]

अये—उद्गा. हे ! अगे ! (संबोधन). ' अये, ये भूलोकीं कवण तरुणीचें तप फळे। ' –सारुह ७.८२. [सं. अयि]

अयेर, आयेर—(गो.) अहेर पहा.

अयो–अयोनवमी—(कों) अविधवानवमी पहा.

अयोगसंभव–असंयोगिक—वि. (शाप.) स्त्रीपुरुषसंयोगाशिवाय झालेली (प्रजा). [सं.] (इं.) असेक्सुअल.

अयोग्य—वि. १ न शोभणारें; योग्य, युक्त नसलेलें. २ निरुपयोगी; नालायक; अपात्र. [सं.]

अयोनिसंभव—वि. १ शुक्रशोणितसंयोगानें उत्पन्न न झालेला; जारज, अंडज, स्वेदज नव्हे असा. ' जो अयोनिसंभव श्रीहरी। जगन्निवास लीलावतारी। ' –ह ५.१५. २ मानसपुत्र. [सं.]

अयौतक—न. स्त्रीधनाचा एक प्रकार; विवाहप्रसंगाशिवाय इतरवेळीं मिळालेलें स्त्रीधन. [सं. अ+यौतक]

अर—(कुण.) अरे पहा.

अर—स्त्री. अलीकडील बाजू. ' अर बांधे तर बांधे ' –वैद्यकबाड भाईअह १८३२.८५. [सं. आर=सान्निध्य]

अरई–य—स्त्री. विप्र. आरई. मांडीवरील खांडुक किंवा गळूं; गुदस्थानांतील गळूं (भगंदर). [सं. अरति. प्रा. अरइ=अस्वस्थता; दुःख.]

अरकशी–बरकशी—स्त्री. कलागत; कचकच; कटकट; धुसफूस; तोंडातोंडी; हमरीतुमरी. (क्रि० लागणें, चालणें). [**बर्कशी**. फा. बर+अक्स्=भांडण, द्वि.]

अरकस—पु. १ करवत चालविणारा; अरकसी. २ करवत. [फा. अरा=करवत; अराकश्=करवत्या; का. अर=कानस. तुल.

सं. क्रकच(र)=करवत]. **०काम**–न. चिरकाम; (माप–एक गज म्हणजे २४ तसू लांब आणि ६ तसू रुंद; एक दोरी म्हणजे ४ गज किंवा १२ फूट लांब आणि ६ तसू रुंद. अरकसकाम अशा दोरीनें किंवा गजानें मोजतात). **०दार**–पु. करवत चालविणारा; करवत्या; अरकसी. **०बरकस**–स्त्री. १ भिकार, बेचव, सत्वहीन, अन्न; रुक्ष, अस्वादिष्ट अन्न; कदन्न. २ नीरस बोलणें; मुळमुळीत भाषण करणें; कांहीं तरी पाणचट बोलणें. ३ भांडाभांडी; तोंडातोंडी; कचकच; अरकशी बरकशी पहा.

अरकसणें—उक्रि. करवतीनें कापणें; करवतणें.

अरकसलें–बरकसलें—न. पचनास कठिण किंवा जड, रुक्ष जाडेभरडें अन्न; अरकसबरकस अर्थ १ व बरकसल पहा.

अरक–सी–शी—पु. करवत चालविणारा; करवत्या; अरकस पहा. –वि. त्यानें केलेलें (काम); करवतीचें (काम).

अरकाट—न. प्र. अर्काट. कर्नाटकांतील एक शहर. –वि. अर्काटी; अर्काट शहरचे (रुपये, नाणें). उ० अरकाट गंजीकोट= अर्काटांतील एक विशिष्ट रुपया. [अर्काट व गंजीकोटकडील]

अरकाट—पु. लुच्चा; भांडखोर; धूर्त; हुषार; अर्कट पहा.

अरकान—पु. १ खांब. २ (ल.) संचालक; आधारस्तंभ; प्रधान. [अर. रकन=खांब अव]. **०इ दौलत**–स्त्री. राज्याचे मंत्री; राज्याचे आधारस्तंभ. (एक पदवी)

अरखडा—अराखडा पहा.

अर(रा)खणा—स्त्री. (प्रां.) निग्रह; दमन; निरोधन; दाब; प्रतिरोध. [सं. आ+रक्षण; प्रा. आरक्खण; म. राखण]

अरखुंडा, अरखुडा—पु. १ चोळवटून, घासटून पडलेली खूण (दोरीनें वगैरे); करकोचा. २ खांच, खोबण (दोरी बांधण्यासाठीं, काठी–खुंटीला पाडलेली). [ओरखडा]

अरगजा—पु. अनेक मसाल्याच्या द्रव्यांनीं मिश्रित असलेली पिंवळी सुवासिक पूड; एक सुगंधी, सुवासिक उटीचा पदार्थ. [हिं.]

अरगडी–ड—स्त्री. खरीपाच्या पिकांपैकीं हलकी–तीन महिन्यांत येणारी ज्वारी. ही मृगारंभीं पेरतात. [का. आरु=लहान+गे,=वाणे, कांदे ?]

अरगळणें—अक्रि. गोंधळणें; अडखळणें; घोटाळणें; कुंठित होणें; भांबावणें. [सं. अर्गल]

अरगाल—न. (कर्ना.) चाकोरी; नेमि.

अरगिन—पु. टांगण्याचा (लोंबता) राकेलचा दिवा. [हिं. अरगनी=दोर. सं. अ+लम्बी–अलगीन. तुल० इं. अर्गंड=वाटोळ्या बातीचा दिवा]

अरगीपारगी, अरगोपारगी, पारगीघारगी—स्त्री. १ आळीपाळी; अदलाबदली; आलट पालट. २ हातोहात देवघेवीची क्रिया. (उ० कौलें, विटा वगैरेच्या भरलेल्या टोपल्या एकानें दुसऱ्याच्या, त्यानें तिसऱ्याच्या हातीं, अशा रीतीनें घेऊन जाणें व रिकाम्या परत आणणें. (तृतीया किंवा सप्तमी विभक्तींत नेहमी उपयोग) अरगीपारगीनें, अरगींपारगीं. [सं. आर=सान्निध्य+तस्; प्रा. आरओ; म. अर, आर=अलीकडे+सं. गम्+पार=पलीकडे+सं. गम्=(येणें, जाणें)]

अरजणें—क्रि. (व.) पखडणें; बनणें; चालणें; जमणें; जुळणें. 'ज्याला अरजेल तो घेईल पीतांबर.' [सं. अर्ज्=मिळविणें]

अरजल–जली–जेल—वि. एका (किंवा तीन) पायानें पांदरा असलेला (घोडा); चित्रभंगी, हा अशुभकारक मानतात. [अर. अरजल्; हिं. सं. अर्ज्=चकाकणें, पांढरें असणें.]

अरड—स्त्री. ते ; काढण्यासाठीं करडई, एरंडी वगैरेंचा भाजून, कुटून तयार केलेला कुट्टा; करडई वगैरेंपासून तेल काढून घेण्याची क्रिया. (क्रि० घेणें) **अरड काढणें–घेणें**–१ एकाद्याची खरडपट्टी काढणें; हजेरी घेणें. २ (जिवाला) मरमरेतोंपर्यंत त्रास देणें किंवा बेजार करणें; दमविणें; शिणविणें; झिजविणें; झीज सोसावयास लावणें; घायकुतीला आणणें; भंडावणें; हाडें घुसळणें. **अरड निघणें**–जोर गमावणें; सत्वहीन होणें; दमणें; त्रासणें; गळणें; थकणें. [का. अरळु=भाजलेलें धान्य. अरि=दळणें; चुरडणें.]

अरड—स्त्री. आरडाओरड; आकोश; बखेडा; गलबला; गलका. [सं. आ+रट्; प्रा. आरड]

अरडणें—अक्रि. ओरडणें; आरडणें; रडणें; आकोश करणें; हंबरडा फोडणें. 'तों अरडत कौसल्यामाय। वरतें करोनिया बाहे।' [सं. आ+रट्=ओरडणें प्रा. आरड]. **०अरडणें**–आरडाओरड करणें [अरडणें द्वि.]

अरडा—अरड पहा. **०अरड–ओरड**–स्त्री. **०ओरडा**–पु. एकदम ओरड; कल्लोळ; सर्वांनीं मिळून केलेला आकोश; गडबड.

अरडीदरडी—स्त्री. अवघड जागा; कडा; उतरण चढण; नदीचा कांठ. 'जैशा भोंवत दिसती अरडीदरडी।' –ह्मा ९.८१. –एभा १९. १००. 'महा अवघड अरडीदरडी। उतरतां कडे कडाडी।' –कथा ६.५.९८. [दरडी द्वि]

अरडींदरडीं—क्रिवि. खाचखळग्यांत, रानांत–डोंगरांत. 'गायी राखें अरडी दरडी।' –एभा १४. १५६. [सं. दरी=दरडी. दरड द्वि.]. **जीव अरडींदरडीं घालणें–पाडणें**–संकटांत घालणें; साहस करणें; त्रास सोसणें; अतिशय कष्ट करणें; **–पडणें**–संकटांत सांपडणें; पेंचांत येणें.

अरडीपरडी—स्त्री. परडी (द्वि.) 'अरडीबाई परडी ग। परडी एवढें फूल ग।'

अरडेल—न. अरड घेऊन काढिलेलें तेल, अरड पहा. [अरड+तेल.]

अरड्या—वि. ओरडणारा; बोंबल्या; किंकाळणारा; रडणारा. 'तुमचा गडी नुसता अरड्या आहे.' [सं. आ+रट्]

अरणी—स्त्री. १ शेताची बांधवरुळी; सींव; ओटा. २ रणांगण; रणमैदान; युद्धभूमि; रणक्षेत्र. 'पारकियां चिए अरणी। घालितु आला लोहा ची गवसनी।'—शिशु ९७९. 'तेव्हळीं ष(ख)ळबळलि अरणी।'—उषा १४१६. ३ (ल.) पुढारी; सेनाव्यूह. 'देषा(खा) मोडलिया अरणी।'—उषा १६०६. [सं. अ+रण, अरणी; सं. अरण=हिंसा, वैर. किंवा सं. रण]

अरणी—स्त्री. ऐरण; लोखंड वगैरे धातु ठोकण्याचा ठोकळा. 'जैसी लोहाची अरणी। तैशी मेरूची घडणी।'—कथा ६.२.२६. [सं. अरणि]

अरणी—स्त्री. (व.) एक प्रकारच्या फुलाची वेल. ही बहुधा कटिरी कुंपणांत वाढते. फुलाचा वास दुरून चांगला येतो व जवळून वाईट येतो. [सं.]

अरणी-अरणीपात्र—न. अग्न्याधानाच्या वेळीं अग्निहोत्री ज्या लांकडांतून मंथन करून अग्नि पाडतात तें (पिंपळाचें) लांकूड. 'जैशा दो काष्ठांच्या अरणी। मधूनि काढिजे जेवीं अग्नि।'—एरुस्व ५.५. —एभा १९.७४. [सं. अरणि]

अरणें—सक्रि. (गो.) आवळणें; आखडणें. आरणें पहा.

अरण्य—न. १ ओसाड,निर्जन प्रदेश; मोठें जंगल;वन;झाडी. २ जमीनीची स्थिति, पाण्याची दुर्मिक्षता, आणि अशाच कांहीं दुसऱ्या कारणांनीं जी जमीन लागवडीस व वसाहतीस निरुपयोगी असते ती; वैराण प्रदेश. ३ गोसावी लोकांतील एक पंथ. [सं.]. **०पंडित**—पु. अडाणी लोकांतील शहाणा, ज्याच्या विद्वत्तेचा व्यवहाराला उपयोग नाहीं असा. (ल.) मूर्ख. (फक्त अरण्यांतला विद्वान्, तेथें त्याची विद्वत्ता अजमावण्यास कोणी येत नाहीं). 'असे अ० इंग्लंडांत गेल्यावर 'एरंडोपि द्रुमायते' या न्यायानें तेथें...मान पावतात.'—नि. **०रुदन-रुदित-रोदन**—न.(निर्जन अरण्यांतील निष्फळ रडणें) ज्या तक्रारीचा किंवा विनवणीचा उपयोग होत नाहीं अशा वेळीं योजावयाचा शब्द; व्यर्थ श्रम; निरुपयोगी खटपट. 'आपल्या देशबंधूंची जी काकूळत केली ती केवळ अरण्यरुदिताप्रमाणें निष्फळ झाली.'—नि. **०वास**—पु. तपश्चर्येकरितां गांव सोडून अरण्यांत राहणें. **०सेवन**—न. अरण्यवास. **०सेवी**—वि. अरण्यवासी; अरण्यांत राहणारा.

अरतणेंपरतणें—उक्रि. उलथें पालथें करणें (भाकरी, पोळी). [सं. परिवर्तन=परतणें. द्वि. अरता+परता]

अरतवण-परतवण—न. नवीन लग्न झालेल्या मुलीचें सासर-माहेर करणें. [सं. परिवर्तन=परतणें द्वि. अरतवणें—परतवणें]

अरता-ती-तें, अरुता—क्रिवि. अलीकडे; इकडे; येथें; ह्या बाजूला,भागाला. याच्या उलट परता. 'देव सारावे परते। संत पुजावे अरते।' 'तो गांव नदीचे अरता आहे.' (ल.) अधिक प्रिय किंवा आवडता. 'मला लेंक अरता आणि पुतण्या परता, असें नाहीं दोघे सारखेच. [सं. आर=सान्निध्य+तस्]. **०परता**—क्रिवि. १ बाजूकडे पलीकडे; इकडे तिकडे; दोन्ही बाजूला; सर्व बाजूंनीं; सर्भोवार. २ तेथेंच; आगेंमागें; जवळ; आसपास; कमीअधिक; लवकर किंवा उशिरां. —वि. १ इकडचा तिकडचा या बाजूचा त्या बाजूचा; दोहींकडील; एकाच विवक्षित सदराखालीं न येणारें. उ० अरतीपरती मिळकत; जादा आड मिळकत. २ क्षुद्र; किरकोळ; अवांतर; सटरफटर. 'मी एकच चाकरी करीन अरतें परतें कांहीं करणार नाहीं.'

अरती—स्त्री. १ कंटाळा; तिटकारा; वीट; विरक्ति. २ असमाधान; अतृप्ति. —वि. कंटाळा करणारा; विरक्त; अतृप्त; असमाधानी. [सं. अ+रति]

अरती—आरती पहा.

अरतीर—न अलीकडची थडी—कांठ वगैरे. 'प्रपंच नगरासर्भोवतीं। कर्मनदीची महाख्याति। तिचेनि जेथें जीव वर्तती। उत्पत्तिस्थिती अरतिरीं।—एभा ११.१०५२. [अर=अलीकडील+तीर=कांठ]

अरत्नि—स्त्री. १ कोपरापासून करंगुळीच्या टोंकापर्यंतचें हाताचें माप; हात. २ किष्कु; लांबी ३४'२ इंच —छ अंक १९९. [सं.]

अरत्र—क्रिवि. १ येथें. २ इहलोकांतलें, मृत्युलोकचें जीवित; याच्या उलट परत्र. ३ इहलोक; मृत्युलोक. 'तेथें अरत्र ना परत्र। कांहींच नाहीं।'—दा ५.३.४. [सं. परत्रच्या उलट]. **०ना परत्र**—अ. इकडे नाहीं व तिकडे नाहीं अशा प्रकारें; इथें ना तिथें; अधांतरीं.

अरद—वि. (गो.) अर्ध पहा. ज्या सामासिक शब्दांत अर्ध हें पद आहे त्या ठिकाणीं अरद हेंहि पद चुकीनें पुष्कळदां वापरतात. उ० अरदकच्चा—जेवा—पडा—पिका—वाट. [सं. अर्ध]

अरदळ—तैनातीची अर्धी रक्कम; अर्धेली. —ख ३६८०. [सं. अर्ध]

अरंवळणें—अक्रि. १ ओरडणें; गर्जना करणें; गोंगाट करणें. २ हातपाय आपटणें; चरफडणें; अदळ आपट करणें. [सं. आक्रंदन किंवा आरुद्]

अरद्र—वि. आर्द्र (अप.) ओलें. 'कितेक दिवस अरद्र शुष्कपणें'—सप्र ८.२० [सं. आर्द्र]

अरंधें—न. संततीचा अभाव; अनपत्यता; निसंतान. [अ+रांधणें?]

अरपार—आरपार पहा.

अरब—पु. अरबस्तानांतील रहिवासी–माणूस–घोडा. (ऋग्वेदांत अर्व–र्वा हा शब्द घोडा या अर्थी येतो. अर्व देश म्हणजे हल्लींचें अरबस्तान असावें). [अर. तुल० सं. अर्वन्=घोडा. प्रा. आरव=अरब]

अरबचरब, अरबट, अरबटचरबट—वि. १ बेचव; नीरस; बेलज्जतदार; निःसत्त्व, रुक्ष (अन्न). २ धश्चोट; निलाजरा; उनाड; तोंडासतोंड देणारा; उद्धट; राकट; असभ्य; जंगली; खेडवळ (इसम, भाषण, चालरीत, संवय, देश, मुलुख, रान, जागा इ०). 'मोठा अरबट दिसतो हा!' –न. बडबड; बकबक; वटवट; बाष्कळ, निष्कारण गप्पा. –क्रिवि. निरर्थकपणें; बाष्कळपणें; कांहींचे बाहीं (बोलणें). [सं. आरभट=साहसी अप. किंवा चर्व्, चर्व=चावणें, खाणें द्वि. किंवा ध्वनिवाचक]

अरबट दांड—वि. जंगली; खेडवळ; अडदांड; रानवट; अडमुठ्या; ठोंब्या. [सं. आरभट]

अरब(स्ता)स्थानी—अरबी पहा.

अरंबळ—न. क्षीणता; कासावीस होणें; घाबरणें; कुंथणें. 'तेवि मुडपोनि सुजला पाये। तरी अरंबळ न करिती।' –दावि १३३. [सं. आ+रु=ओरडणें, शब्द करणें.]

अरंबळणें—अक्रि. विप्र. आरंबळणें. १ झोपेंत बरळणें, बडबडणें; कुंथणें. २ झोंपेनें घेरलेला असणें; पेंगणें. ३ ओरडणें; भ्रमांत बहकणें; आकोश करणें; हंबरडा फोडणें. ४ निष्कारण किंवा व्यर्थ बडबड करणें. [सं. आ+रु किंवा आ+रंभ्=ओरडणें, शब्द करणें]

अरंबळणें—अक्रि. पोळणें, भाजणें.

अरबा—वि. चार संख्या (सूर सन) [अर. अरबाह्]

अरबा—पु. १ अरबांची लढाई–हल्ला; युद्ध. (क्रि० (वर) झाडणें). २ शिव्यांचा किंवा धमक्यांचा वर्षाव. ३ कोणतीहि तडफदारी, जोराची क्रिया; झपाटा; तडाखा; धडाका. जसें–रागाचा –जेवणाचा–लिहिण्याचा अरबा. ४ (सोलापूर प्रांत) गांवाची किंवा किल्ल्याची वेस. ५ अराबा पहा. (वर) **०उडणें**–रागानें–त्वेषानें उठणें, उठाव करणें. **०पिऊन जाणें–पिणें–सोसणें**–त्वेष, राग, आवेश सहन करणें, सोसणें. २ तोफांचा मारा सहन करून आंत घुसणें. [अर. अराबा]

अरबाड—न. (व.) ऊर; फांसळ्या; बरगड्या किंवा त्यांची बाजू. 'अरबाडावर लाथ मारली.' [सं. उरस्+वर्तिः]

अरबाडी—पु. (व.) विंचू व सर्पदंशावरील मंत्र जाणणारा मांत्रिक. 'अरबड्याच्यानें साप उतरला नाहीं.' [सं. उरग, आर=अजगर+बाधा; फा. अरबद=सर्प]

अरबाणा—पु. हुकमत; वचस्व; ताबा; आटोका. [फा. अराबा+बाणा=रीत, चाल; अरे+बाणा? मोको] **–ण्यांत असणें–चालणें–राहणें–थागणें**–आज्ञेंत किंवा कह्यांत असणें. **–ण्यांत नसणें–तून जाणें**–आज्ञेंत नसणें; आटोक्याबाहेर जाणें.

अरबी—वि. अरबस्तानासंबंधीं. (ल.) भाषा, घोडा, वेष, लिपि, फळफळावळ वगैरे. 'मंद हळु हळु चालतो। चपळ कैसा आटोपतो। अरबी फिरवणार तो। कैसा असावा।' –दा १९.७.१८. **०तगादा**–पु. अरबी शिपायांनी लाविलेला तगादा. हा अतिशय जुलमी व त्रासाचा असतो. यावरून (ल.) अतिशय निकडीची–सक्तीची–जोराची मागणी; मारवाडी तगादा. **०पहारा**–पु. अरब लोकांची चौकी. हा फार कडक व जालीम असतो त्यावरून कडक व सख्त पहारा. (क्रि० करणें, लावणें, मांडणें, बसवणें, लागणें, बसणें). **०साल**–न. **०सन**–पु. अरबी वर्ष; मृगसाल; शुहुरसन (सूर); याची संख्या मांडण्याची रीत पुढीलप्रमाणें. अहदे–इहिदे १, इसन्ने २, सल्लास ३, अरबा ४, खम्मस–सिन ५, सीत ६, सब्बा ७, सम्मान ८, तिस्सा ९, अशर १०, अहद अशर ११; इसन्ने अशर १२, सल्लास अशर १३, तिस्सा अशर १९, अशरीन २०, सल्लासीन ३०, अरबैन ४०, तिस्सैन ९०, मया १००, मयातैन २००, सल्लासमया ३००, अरबामया ४००, तिस्सामया ९००, मय्या व अलफ ११००, मय्यातैन व अलफ १२००, अशर अलफ १००००. हे उजवीकडून डावीकडे मांडीत जातात. ठोकळ मानानें अरबी सनांत ५९९ मिळविले म्हणजे इसवी सन येतो. कागदपत्रांत हे अक्षरांनीं लिहितात. उ० इसन्ने सल्लासीन तिस्सैनमया व अलफ= २+३०+९००+१०००=१९३२.

अरबु(ब्जु)ज–द्—वि.(विप्र. अर्बुज) रांकट; अाडदांड; खेडवळ; मठ्ठ; रानटी; जंगली; अडाणी; रद्दड; क्रूर; ओबडधोबड. 'अतिसात्विकता दृष्टीं पडे। तरी मानी वेडें अर्बुज।' –एभा २३.२६४. [सं. अ+बुध; प्रा. अ+बुज्झ=अरबुझ]. **०जात**–रानवट, अडदांड जात; अशा जातीचे लोक–भिल्ल, पठाण वगैरे. 'इराणी दुराणी, जात अर्बुज. त्यांनी कित्येक तरुण स्त्रियांच्या अब्रू घेतल्या.' –भाब ८.

अरबैन—वि. ४० संख्या; अरबी साल पहा. [अर.]

अरब्बा—अरबा पहा.

अरंभ–अरंभिक—(गो.) आरंभ पहा.

अरम(मा)र—आरमार पहा.

अरमिन—एक मुंगसाच्या जातीचा, अंगावर लव किंवा लोंकर असलेला प्राणी. य. लोंकरीचे झगे न्यायाधीश, सरदार यांच्याकरितां करितात. [इं. इर्मिन]

अरर—न. दार; दाराची फळी; कवाड. 'जाय बळें उघडाया कर देउनि उघडिल्याहि अररा ज्या.' –मोसभा ३.४. [सं. अरर=दार]

अरर—उद्गा. अरेरे! दुःख; शोक; आश्चर्य व्यक्त करणारा उद्गार. [सं. आ+रु]

अरब—वि. अर्बे; दहा कोटी संख्या. [सं. अर्बुद]

अरबळ—वि. (गो.) खोडकर; पोरकट; वेडसर. [सं. आ+रब+ल]

अरवा—वि. नाजुक; अरवार; अरुवार पहा. 'माझुक मउ मुखचंद्र सकुमार पुष्पाहुनचि अरवा।' –प्रला २३०.

अरवा—स्त्री. मर्जी ? शर.

अरवाडी(ळी)—क्रिवि. (व.) अवेळीं; अकालीं. [येर+वेळीं; सं. अपर+वेला]

अरवार—वि. (गो.) खोडकर; खोडसाळ; उनाड; दांड; अरवळ (मूल.) [सं. आ+रव+ल]

अरवार-ळ—वि. अरुवार पहा. १ हलकें; सहज तुकडे पडणारी (भाकरी, पोळी इ.); खुसखुशित (पक्वान्न). २ मऊ; नरम (आंबे, केळीं, इ.) 'मुले चांगले अरवार असतात' –बागेची माहिती ३४. ३ (काव्य) नाजुक, सुकुमार. –स्त्री. मृदु शय्या, शेज: अरुवार पहा. [का. अरलु=फूल ? ते. अरवरलु=काटकुळा, पातळ.]

अरवाळी—स्त्री. खोड्या; दांडपणा (लहान मुलांच्या) चेष्टा; उनाडक्या. –वि. खोडकर.

अरविंद—न. कमल; पद्म, 'नमो विशदबोधविद्रुदा। विद्यारविंदप्रबोधा।' –ज्ञा १०.१. 'रामाचें वदनारविंद।' [सं.]

अरशिसि—अर्धशिशी पहा. [का. अर=अर्ध+सं. शीर्ष=डोकें]

अरशी-सी—स्त्री. १ उपनेत्र; चष्मा. २ लहान आरसा; आरशी. 'त्या आरशा घालुनि अंगठ्याला' –सारुह ६.२७. [सं. आदर्श]

अरस—वि. रसहीन; नीरस. (ल.) बेचव; शुष्क. 'कशासाठीं गावीं अरस कवनें मी स्ववदनें' –केक ६. [सं. अ+रस]

अरसट्टा—अडसट्टा पहा.

अरसपरस—क्रिवि. १ भोंवतालीं; जवळपास; आसपास; आजूबाजूस. २ (कों.) अवरसचवरस. [सं. परिसर–परस द्वि.]

अरसपरस—क्रिवि. (बडोदें) परस्पर. 'अरसपरस सलाम्या होळ्ली। परत आले.' –गापो ६७. 'शेवटीं उभयपक्षीं अ० हळदीकुंकू देण्यांत येतें.' –ऐरापुविवि १४६. [सं. परस्पर; गु. अरसपरस]

अरसा—आरसा पहा.

अरसा-आरसा—अर्सा पहा.

अरसिक—वि. १ सौंदर्य व मोहकपणा न जाणणारा किंवा त्यासंबंधीं अडाणी; चव किंवा गोडी नसलेला; मर्म न जाणणारा. ज्याचें ललितकलादि गोष्टींत मन रमत नाहीं असा 'सेवंतीये अरसिकांहीं। आंग पाहतां विशेषु तरी नाहीं। परी सौरभ्य नेलें तिहीं। भ्रमरीं जाणिजे॥' –ज्ञा १५.५९४. २ बेचव; नीरस. [सं. अ+रसिक]

अरसेनिक—न. सोमल; ताल; रसायनांतील एक मूल द्रव्य होमिओपाथींत हें महामारी, अतिसार, शक्ति, दमा वगैरेवर औषध. [इं.]

अरस्य—वि. निरस 'चाखों ते तें अरस्य' गीता १.२३१८ [सं. अ+रस]

अरळ—न. १ फूल. 'शेजेवरी अरळ सुकलें.' –ह ३०.२७. २ (गो.) मऊ झालेलें. –क्रिवि. (आल्हाद या अर्थी) 'उंच होवोनि ऊर्ध्वे हस्तें। अरळ कळिका तोडिल्या' –ह. १७.१०९. [का. अरलु=फुलणें; फूल] –वि. (ल.) नाजुक, मृदु. 'शय्या घालुनी एकांती। अरळ सुमनांची निगुति।' –एहस्व ३.२६ अरवार; अरुवार, अरुवाळ. पहा.

अरळ, अरळतरळ—वि. १ सैल; ढिलें (बोचकें, गाठोडें.) २ अव्यवस्थित बसविलेलें; नीट, सरळ नव्हे; वेडेवांकडें; अयोग्य बसविलेलें (धोंडा, खांब, तुळई.) ३ अनिश्चित; घोटाळ्याचें; घालमेलीचें; मोघम, पिळपिळीत (बोलणें, भाषण). ४ अव्यवस्थित; ढिलाईची; मंदीची (वागणूक, उद्योगधंदा.) –क्रिवि. ढिलाईनें; सैलपणानें; सरळ नव्हे (बांधणें); अयोग्यरीतीनें (बसविणें, लावणें, रोवणें); सैल; विस्कळित (रचणें, ठेवणें,) मोघम; पिळपिळितपणें (बोलणें, करणें.) [अरळ+तरळ]

अरळी—स्त्री. विप्र. अरोळी. (कों.) मोठ्यानें मारलेली हांक; आरोळी; मोठ्यानें ओरडणें–आवाज देणें–करणें. [सं. आ+रु=शब्द करणें; प्रा. रोल=कोलाहल]

अरळी—स्त्री. घोड्याच्या अंगावरील उलटी गोम (केसांची); एक अशुभ लक्षण. [?]

अरक्षित—वि. रक्षण न केलेलें; असंरक्षित; न राखलेलें–पाळलेलें [सं.]

अराइणें—आराइणें पहा.

अराकस—अरकस पहा.

अराखडा—पु. १ ठोकळ अंदाज, बेतबात; नकाशा; मसुदा; रूपरेषा; खुणा; योजना. [सं. आ+रेखा, आलेख] (क्रि० घालणें; करणें; मांडणें). २ हिशेबाचें अंदाजपत्रक; खर्डा. ३ मर्यादा किंवा सीमा; इयत्ता; कार्यक्षेत्र; ४ नकाशा; चित्रें वगैरे काढण्यापूर्वीचा आकृतिपट (आऊट लाईन). ५ ओरखडा; ओरबडा; रेघोट्या; खरडलेल्या खुणा. (क्रि० ओढणें, काढणें, पडणें.)

अराखणा—स्त्री. (कों.) दमन; निग्रह; संयमन; आकलन; दाब; प्रतिरोध; दाबांत ठेवणें; रोधणें. [आ+रक्षण=राखण]

अराजक—वि. १ राज्यसत्ता नष्ट करूं पाहणारा; बंडखोर; क्रांतिकारक. २ राजसत्ताविरहित, शास्ता नसलेला (देश). [सं.] **०कत्व**—न. बंडाकडे प्रवृत्ति; अराजकपणा; अराजकता. 'एकादी सुधारणा करणें म्हणजे अराजकत्वाकडे पाऊल टाकणें कीं काय असें लोकांस वाटूं लागलें होतें.' –इंभू ३१३.

अराजक-ता, स्त्री. अराज्य—न. (राजाच्या) सिंहासनावर किंवा गादीवर कोणी नसणें. (ल.) निर्नायकी; अंदाधुंदी; बेबंदशाही; अराजककाल; सरकार या संस्थेचा अभाव. [सं. अ+राज्, राज्य]

अराटी—स्त्री. कांटी; एक झुडुप; हीं झाडें कंटकयुक्त वेली-प्रमाणें पसरणारीं आहेत. पानें खैराच्या पानासारखीं वात, कास व पित्तरोग यांवर गुणकारी. –वगु १.२७. (सामा.) कटिरी झुडुप. ' अराटीलागी मृदुता । कोठोनि असेल कृपावंता । ' –ब्यं १५ [वै. सं. अराटकी; सं. आरी ?]

अराठणें, आरठणें—अक्रि. कावूंत येणें. [सं. आरात् ?]

अराणूक—स्त्री. १ विश्रांति; स्वस्थता; स्वास्थ्य; फुरसुद; रिकामपण. २ शांतता; सौख्य; शांति; तृप्ति; समाधान. ' तुका म्हणें नाहीं । अराणूक तुज कांहीं । ' –तुगा ५८२. [सं. आ+रम् +णूक]

अराबा—स्त्री. १ तोफ; तोफेची गाडी. २ बातेरी; तोफांचा मारा; सरबत्ती, अरब लोकांचा सपाटयाचा गोळीबार. अरबा पहा. ३ गराडा; व्यूह. ' देऊनि अराबा भंवतीं । ' –संग्रामगी ५८ ४ लवाजमा; इतमाम; ताब्यांतील मालमत्ता; प्रापंचिक पसारा-निरनिराळे व्याप (कुटुंबें, गुरेढोरें, जमिनी वगैरे). (क्रि० पडणें, घालणें, मांडणें, पसरणें, उचलणें आटपणें). ५ मोठा बडेजाव; डौल; दिमाख; भपकेदार प्रदर्शन; अवडंबर; (क्रि० घालणें, घालून बसणें.) ६ (व.) घोंटाळा; गोंधळ. **०पिणें**–शत्रूचा गोळीबार सहन करून शत्रूच्या फौजेंत जाणें. –ख ४८६०. ' इंग्रजांचा अराबा पिऊन मराठी फौजा आंत घुसल्या, हत्यार चालले. इंग्रजी लोक बहुतेक कापून काढाडले. ' –रा १९.६३. [फा. अराबा=तोफेचा गाडा]

अराम-खाना-शीर—आराम पहा.

अराल—वि. वांकडें ' आम्हांसी सांगाती । होती अराले ते होती । –तुगा. १८०७. [सं. अराल]

अराल—(हस्त) पु. (नृत्य) आंगठा अकुंचित करून तर्जनी धनुष्याच्या आकाराप्रमाणें मध्येंच वांकवून ठेवणें व बाकीचीं बोटें सरळ पसरून ठेवणें. [सं.] **०खटकामुख** (संयुत हस्त)–पु. (नृत्य) दोन्ही हात उपपद्मक करून पद्मकोष करणें व मग अराल करून खटकामुख करणें.

अराष-स-सी–स्त्री. आरास; सुंदर रीतीनें केलेली मांडणी. सजावट; आरसे, छतें, चित्रें, दिवे इत्यादिकांनीं शृंगारलेलें घर: थाटमाट; भपका; आराईश '–रा १.१९०. ' करून तेव्हां घरिंच्या अरासी । ' –सारुह. ८.३१. [फा. आराइश्]

अराष्ट्रीय—वि. राष्ट्रसंबंधी नव्हे तें; राष्ट्रहिताचें नव्हे असें; विदेशी; परकीय; राष्ट्रीय भावनेच्या विरुद्ध. ' शिक्षणक्रमास जास्तच अराष्ट्रीय स्वरूप आलें आहे. ' सेपू २.१५. [सं.]

अराळफराळ—न. (कु.) अप्रस्तुत भाषण. अरळतरळ पहा. [विचित्र रूप. फराळ द्वि. किंवा अरळ+फराळ]

अरि—पु. १ शत्रु; वैरी; दुष्मन्. ' मज सर्वांतरातें कल्पिती । अरि मित्र गा । ' –ज्ञा.९.१६६. २ चक्र. [सं.] **०मर्दन**–वि. शत्रूला ठार मारणारा; नाश करणारा. ' अरिमर्दना उठ आतां । ' **रावि.** –न. शत्रूचें निर्दालन, हनन; शत्रूचा पराजय. ' तेंचि धगधगीत चक्र। अरिमर्दनीं उद्भट ' –एरुस्व १.४७. **०राय**–पु. अरिराव; शत्रूचा राजा; शत्रुश्रेष्ठ. ' देवांचेनि तेजें बहुवशें । अरिराए जिंतिलें अनायासें ॥ ' –शिशु ७३५. [सं. अरि+राजन्]

अरिठा—पु. रिठा [सं. अरिष्ट]

अरिथ-अरथ—पु. (गो.) अर्थ [सं. अर्थ]

अरिष्ट—न. १ अनिष्टकारक, दुःखकारक गोष्ट; अशुभ किंवा त्रास उत्पन्न करणारी गोष्ट. २ लढाऊ, दरोडेखोर, टोळधाड, धूमकेतु, उल्कापात, धरणीकंप, नैसर्गिक संकट, किंवा अशा तऱ्हेचा अनिष्टकारक प्रसंग, आपत्ति. ३ खोडया (लहान मुलांच्या). ४ दुर्दैव; दुर्भाग्य. ५ अनर्थकारक अतिरेक; नुकसानीचा जोर उ० पावसाचें पडणें, वारा वाहणें. (कि. ओढवणें; कोसळणें; मांडणें). (सामाशब्द) अरिष्टनिरसन–कारक–सूचक. ६ आसव; अर्क; **मद्य**; पाणी आदि करून द्रव पदार्थांत औषधी द्रव्यें घालून काढण्याप्रमाणें अग्नीवर तयार करून आसवाप्रमाणें पुरून ठेवून काढतात तें. ७ (वैद्यक) मरणचिन्ह. ८ सूतिकागृह; बाळंतिणीची खोली. ' मेळविले देव सकळ जाउनि विधिनें स्वयें अरिष्टांत । ' [सं.]. –वि. कठिण; अवघड; प्रचंड; प्रयासाचें ' वेद मुखोद्गत करणें म्हणजे केवढें अरिष्ट काम. ' नि. १०५५. **०संतोषी**–वि. दुसऱ्यांवर संकटें आलीं असतां आनंद मानणारा.

अरी—स्त्री. १ आर (चांभाराचें टोचण्याचें हत्यार); टोंचणी. **म्ह०** गांडीखालीं अरी, चांभार पोर मारी = स्वतःजवळ जिन्नस असून तो हरवला असें समजून शोध करणें. २ लोखंडी अणकुचिदार टोंक (भोंवऱ्याचें, पराणीचें). [सं. आरा]

अरी—स्त्री. हारी; ओळ; रांग [सं. अर=चाकाचा आरा]

अरीणी—वि. (गो.) अऋणी (अप.) कर्ज नसलेला. [सं. अ+ऋणी]

अरीनबरुन्—क्रिवि.सध्यां. [फा.]

अरीभवन—न. (शाप.) सरळ रेषांत बाहेर पडणें (प्रकाशाचें); किरणरूपानें निघणें; किरणविसर्जन. (इं.)रेडिएशन. [सं.]

अरीस—स्त्री. मूळव्याधीचे मोड. ' एक वडी सेंविजे अरीस मरति । ' वैद्यकबाड भाइअ ४६. [सं. अर्श]

अरीळ—वि. न चाखलेलें; शुद्ध.. ' फळें कंदमूळें जरी ही न मीळे । तरी काळ कर्मी जळें कीं अरीळें । ' –किंसुदा २.८. [सं. अलीढ ?]

अरुच—वि. (गो.) १ रुचकर नसलेलें. २ तुच्छ; न रुचणारें. [सं. अ+रुचि]

अरुचि—स्त्री. १ कंटाळा; तिटकारा; अनावड; अप्रीति; नापसंती. २ (वैद्यक) पोटांत भूक असूनहि रोगामुळें तोडांत घातलेलें अन्न खावावत नाहीं अशी अवस्था. चव नाहीशी होणें; जिभेला गोडी नसणें. ३ अमान्यता; अननुकूलता; अनभिमतत्व (प्रतिपादित अर्थासंबंधीं). ' या दुसऱ्या उदाहरणावरून पूर्वोदाहरणीं कांहीं ग्रंथकारांची अरुचि आहे असें दिसतें. ' [सं.]

अरुचिर—वि. १ बेचव; कंटाळवाणें; नापसंत; तिटकारा उत्पन्न करणारें. २ सुंदर नसलेला. [सं. अ+रुचिर]

अरुण—पु. १ सूर्याचा सारथी; कश्यपपुत्र; गरुडाचा वडील भाऊ. २ उषःकाल; प्रभात; पहांट; अरुणोदय; (तांबडें फुटणें). –वि. तांबडा; लाल; रक्त; आरक्त. ' रागेजली अरुणकांति विराज वीते. ' –नल ९७ [सं.]. **–णिमा**—स्त्री. तांबडेपणा; लाली; रक्तिमा. **–णोदय**–पु. तांबडे फुटणें; सूर्योदयापूर्वी पूर्वदिशेकडे रक्तप्रकाश दिसूं लागणें; सूर्य उगवण्यापूर्वी तीन घटकांचा काळ; प्रभात; पहांट. ' घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला. ' –होला १६.

अरुता—क्रिवि. इकडे; अलीकडे; अरता पहा. ' तो बुध्दियोग विवरिता। बहुतें पार्डे पार्था। दिसे हा अरुता। कर्मयोगु। ' –ज्ञा २.२७४. ' तें अरुतेंचि ठेलें। ' –दाव १९४. [सं. आर+तस्]

अरुता–अरू—स्त्री. १ हक, जागा; योग्यता; योग्य स्थान किंवा धंदा, उद्योग. २ पूर्ण आवश्यकता–जरुरी (हजेरीची, मताची, येण्याची); अपरिहार्यता; अगत्य. ' त्याच्यापुढें बोलण्याची कांही अरुता नाहीं. ' –ख ३२०३. (क्रि० धर; ठेव) ' मी आतां गेलों असतों पण दादाची अरुता आहे. ' ' कुळाची अरुता न धरतां जामीनदार खुद्द रुपये देईल. ' [सं. अहेता]

अरुंतुद—पु. (शाप.) एक उत्कबे; (इं.) ॲक्रिडाइन.

अरुंद—वि (कधीं अरुंध.) रुंदीला कमी किंवा अपुरें. [अ+रुंद]

अरुंधती—स्त्री. १ वसिष्ठऋषीची पत्नी; कर्दमकन्या. २ सप्तर्षीमधील वसिष्ठाच्या जवळचा तारा; (ज्याला अरुंधती दिसत नाहीं तो लवकर मरतो. कारण दृष्टि इतकी मंद झाल्यानंतर आयुष्य फार थोडें उरलेलें असतें असा समज आहे.). ३ (योग) जीभ; जिव्हा; जिव्हाग्र. –योर १.२६. **०दर्शनन्याय**–पु. अरुंधती तारा वसिष्ठाच्या खुणेवरून दाखवितात त्यावरून लक्षणेनें. शेजारच्या मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टीचा निर्देश करणें. [सं.] **०केश**–ही राशि उत्तरगोलार्धांत सिंह आणि भूतप यांच्या मध्यें आहे. (इं. कोमा बेरेनिसेस).

अरुवार—वि. १ कोमल; नाजूक; मृदु; सुंदर; मऊ; हलुवार; सुकुमार. ' कीं अरुवरें करें । विचित्रा धातुचीं सपुरें । ' –ऋ ७८. ' कां अन्न लाभें अरुवारें । रांधितिये उणें ' –ज्ञा १८. १४२. ' रातोत्पल सुकुमार । त्याहूनि पदें तुमचीं अरुवार । ' –राबि १३.५९. ' कीं कमळिणी सुकुमार ... कीं शिरस फूल अरुवार । क्षणमात्रें कुचुंबे । ' –हरि २.१३५. २ खुसखुशीत; हलकी; हलु. ' एक सच्छिद्रें अरुवार । नवनीतसडूगें गोडसीं । ' –मुआदि२९.८४. ३ हलकें. ' वाळल्या अनुतापकचरिया । वैराग्य–तळणें अरुवारिया । ' –एरुस्व १४.१०८. [हलुवार. का. अरळु=फूल]. –न मृदु शय्या. ' महा सुखाचे अरुवारीं । ' –परमा १२.७. ' तो असे क्षीरसागरीं । निद्रिस्त शेषाचे अरुवारीं । ' –कथा २.५.१५७. अरवार पहा.

अरु(रू)श–ष, अरुसा—वि. १ आर्ष; मूढ; विचित्र; मंद; जड; वेडावांकडा; मंदबुद्धीचा; बोबडा; मूर्ख. ' हा अरुष भक्तिचा भाव । दयाळा धांव घेई धनुकरा । '–देप २८.१. २ विचित्र; विक्षिप्त (माणूस). ' येक अरुषें आक्षेपिलें ' –सप्र ८.१२२. [सं. आर्ष]

अरूप—वि. १ आकार किंवा रूप विरहित; निराकार (ब्रह्म, वायु, ध्वनि, इ०) ' अरुप तें रूपास आलें. ' २ कुरूप; बेढब; बेडौल ' कृष्ण अगुणांचा अरूप । कन्या सगुण आणि स्वरूप । ' –एरुस्व १०.९६. [सं. अ+रूप]

अरे—उद्गा. पुरुषाला हांक मारतांना–बोलावतांना सलगीनें अगर तिरस्कारानें बोललेला शब्द; संबोधन–रे, ए वगैरे. **म्ह०** अरे तर कारे अहो तर काहो. कधीं आश्चर्य वाटलें असतांना अरे ! असा उद्गार निघतो. नामापुढें लावतांना अ गाळतात. जसें–रामरे ! [सं. अरे] **०अरे करणें–करूं नको म्हणणें**; मना करणें; ताकीद देणें. **०जारे**–(क्रि० बोलणें – म्हणणें – चालणें – भांडणें). उद्धटपणा, उर्मटपणा. **०तुरे**–स्त्री. शिष्टाचार सोडून अमर्यादपणें, हलकटपणानें बोलणें; एकेरीवर येणें; हमरी तुमरी; हातघाई; कजाखीची लढाई. –शिदि १४०. (क्रि० बोलणें, करणें) **०तुरेनें**–अहमहमिकेनें अधिक उत्साहानें. ' योग्य मनुष्यास उमेद चढून दुसऱ्यानें अ० कामें करीत असावें. ' –स्वप २७१. **०तुरेवर येणें**–एकेरीवर येणें; भांडण्यास लागणें. ' बाईसाहेब असें अरेतुरेवर एकदम येऊं नका. ' –इंप १०१. **०बापरे**–आश्चर्याचा–भीतीचा उद्गार.

अरेकस—पु. करवत्या; अरकस पहा. ' अरेकसाच्या कामाला चिरकाम म्हणतात. ' –महमा १२६.

अरेराव—पु. अरे ! अरे ! करण्यांत पटाईत. फुशारकी मारणारा; फुकट प्रतिष्ठितपणा दर्शविणारा; खणक्या; धटिंगण; खलेल; टेकोजी; लोकांत मन मानेल तसें वागणारा; रगडमल्ल; अहंमन्य; गर्विष्ठ; अल्पाधिकारानें प्रमत्त झालेला; तिस्मारखान. ' राष्ट्रीय सभा पूर्णपणें राष्ट्रीय हित साधणारी व्हावी, तिचें काम जनतेच्या बहुमतानें व जाहीर रीतीनें व्हावें, तें एखाद्या अरेरावाच्या खोलींत खासगी रीतीनें होऊं नये असें आमचें म्हणणें आहे. ' –टिव्या. [अरे+राव] **–वी–वकी**—स्त्री. जुलूम; अहंमन्यता; दडपशाही; फुशारकी. ' विद्याखात्याचें धोरण अरेरावीचें असून ' –केले १.४९. –वि. जुलमी; अहंपणाचें; आडदांडपणानें; उद्धट; अन्यायी. ' चालेस

इलियट यांच्या सारख्या अरेराची अंमलदारास खोल पाण्यांत शिरावयाचें होतें.' –टि १.१६२.

अरेरे—उद्गा. दुःखोद्गार; शोक–विस्मय–भय यांचा किंवा महत्त्वाची चूक आठवली असतां पश्चात्ताप होण्याच्या वेळीं येणारा उद्गार; अरर्रे [अरे]

अरेलिया—न. एक सुंदर पानांचें बागेंतील झाड. [इं.]

अरैठ—न. अनर्थ; अरिष्ट पहा. 'शैल्ये थोर अरैठ केलें। तवें तीनि ओतना वाइले। –शिशु ९८७. [सं. अरिष्ट; प्रा.]

अरोग–गी—वि. निरोगी; आजारी नसलेला; निकोप प्रकृतीचा; धडधाकट; सुदृढ. [सं. अ + रोग]

अरोचक—पु. अरुचि; तोंडाला चव किंवा रुचि नसणें; भूक नसणें. (ल.) कंटाळा; शिसारी. 'तेतुलें अरोचक। विषयीं घेईल॥' –ज्ञा १२.१०६. –वि. न रुचणारा, आवडणारा; कंटाळवाणा. [सं. अ + रुच्]

अरोबा—अराबा पहा.

अरोसा—पु. १ अणकुचीदार, निमुळतें टोंक; शेवट (दोरी–दोराचा). २ निमुळत्या शेवटाची दोरी. जीभ. अरुसा पहा.

अरोळी—स्त्री. निखाऱ्यावर भाजलेली चांदकी. अहारोळी पहा. [आहार=विस्तव + पोळी]

अरोळी—स्त्री. १ मोठ्यानें मारलेली हांक. २ ओरडणें; मोठ्यानें आवाज करणें. [सं. आ+रु=आवाज करणें] **०हाकाहाक**—स्त्री. मोठी हाकाटी व गोंगाट.

अरौतें—क्रिवि. अलीकडे; अरुता; आरौतें पहा. 'पैं परतत्त्वां अरौतें' –ज्ञा १३.१५८. [सं. आर+तस्]

अर्क—पु. १ सूर्य; आदित्य. 'तो तंव अर्काचाहि आदि अर्क।' –एरुस्व ७.६१. २ रुईचें झाड; मंदार. ३ बारा ही संख्या (बारा आदित्य असतात म्हणून). [सं.]

अर्क—पु. १ सत्त्वांश; तत्त्वांश (औषधादिकांचा); रस; मद्य; सार; कस; निष्कर्ष; काढा. २ गड्डा; गाभा; गाळींव सार. (ल.) अक्षल सोदा; चोर; लबाड. 'हा लबाडाचा अर्क; चोराचा अर्क.' तुल० इं. आर्चे. [सं. अर्क; अर. अरक्=रस; सत्त्वांश]

अर्क—स्त्री. न. कमान (भितीची, कोनाडयाची). [पोर्तु. आर्चे; इं. आर्क.]

अर्क—पु. बालेकिल्ला. 'याखेरीज येथें किल्हे अर्कांत तोफा पांचसात आहेत.' –रा १.१८. [फा. अर्क=बालेकिल्ला]

अर्कट–र्काट—वि. अर्क; वस्ताद; लुच्चा; पटाईत. [अर. अरक् इं. आर्चे]

अर्कटी—वि. १ लबाड, वस्ताद; हट्टी. अर्कट पहा. २ अर्काटी; अरकाट पहा.

अर्कद्वेष—पु. उभा दावा; हाडवैर. [अर्क+द्वेष]

अर्कमंडळ—न. सूर्यमंडळ. [सं. अर्क=सूर्य+मंडल]

अर्कविवाह—पु. पुरुषाच्या तिसऱ्या लग्नाच्या वेळीं रुईशीं प्रथम विवाह करतात तो, कारण लग्नाची तिसरी बायको ही भाग्यशाली नसून लवकर मरते अशी समजूत. [सं. अर्क=रुईचें झाड + विवाह]

अर्कशी–अर्कस—अरकस पहा.

अर्कानी–दौलतानी—अरकान पहा. –इम २३६.

अर्कांश—पु. (ज्यो.) ग्रहणाचा विस्तार दाखविण्याकरतां सूर्याचे (व्यासाचे) १२ भाग करतात, त्यापैकीं प्रत्येक. [सं.]

अर्की—स्त्री. (काव्य) मंदार; रुई. [सं. अर्क]

अर्कुलें–र्कूल—न. १ रकार किंवा रफार बद्दलची अर्ध्या र ची अक्षराच्या डोक्यावर द्यावयाची (ॅ) खूण; रेफ. २ इ उ स्वरांना दीर्घत्व येण्याकरितां दिलेलें चिन्ह (ॅ). 'अडव्या मात्रा त्याही नीट। अर्कुलीं वेलांटया।' –दा १९.१.३. [?]

अर्केंदुसंगम—पु. अमावस्या; आवस; सूर्य व चंद्र यांची युति, (संगम) या दिवशीं होते. [सं. अर्क + इंदु + संगम]

अर्खणे—पु. अव. (कों.) तांदुळाचे तुकडे; मोठाल्या कण्या. [सं. अर्ध+खंड–किंवा कण]

अर्गजा—अरगजा पहा.

अर्गट—वि. हेकेखोर; अकैट पहा.

अर्गडी—अरगडी पहा.

अर्गल (करण)—(नृत्य) उजवा पाय पाठीमागच्या बाजूस दोन ताल उचलून पसरणें; तसेंच उजवा हात पुढच्या बाजूस तितक्याच अंतरावर पसरणें. [सं.]

अर्गळ–ळा–ला—स्त्री. १ अडसर; अडणा; कडी; अगळ. 'घेतली द्वाराची अर्गळा।' –कथा १.७.३३. २ शृंखला; सांखळी; बेडी; खोडा; पायबेडी; हातकडी. ३ (ल.) दाब; दमन; निग्रह; प्रतिरोध; अडकाठी; प्रतिबंध; नड; अटकाव. (कि० घालणें). [सं. अर्गला]

अर्गानर्गा—पु. वेडा; कोंडमारा. 'मोंगलांचा अर्गानर्गा केला आहे. गळा, वैरण, काडी, कूल बाद जाहली आहे.' –पया २९. [फा. नर्गा=वेडा द्वि.]

अर्घ्य—न. १ ओंजळींत किंवा लहान पात्रांत पाणी घेऊन त्यांत गंधाक्षता–फुलादि घालून देवादिकांस, ब्राह्मणांस पूजासमर्थी जें अर्पण करतात तें. 'भरूनिया पुष्पांजुळी। अर्घ्यु देवों॥' –ज्ञा १५.२. २ संध्यावंदनादि कर्मांत सूर्यास उद्देशून जें ओंजळींतून उदक सोडतात तें. –वि. १ पूज्य; पूजनीय; दर्शनीय; सन्माननीय. २ मूल्यवान. [सं.] **०देणें**–वरप्रमाणें पाणी वगैरे देणें. (ल.) उदक सोडणें; नाश करणें; इजा करणें; सत्यनाश घडवून आणणें. **०घेणें, ०घेऊन उभा–तयार राहणें–असणें**–नाश करण्यासाठीं तयार असणें, टपून बसणें.

अर्घ्या—पु. अर्घ्य देण्याच्या उपयोगाचें एक पात्र. [सं. अर्घ्य]

अर्चक—वि. पूजा करणारा; अर्चन करणारा. [सं. अर्च्=पूजा करणें]

अर्चणें, अर्चिणें—उक्रि. उपासना, सेवा, पूजा करणें; भजणें; स्तवन करणें. 'देखे मातापितरें अर्चिजती।' –ज्ञा २.३२. [सं. अर्च्=पूजा करणें]

अर्चन—न. पूजा; अर्चा; उपासना; सेवा; वंदन (देवांना किंवा ब्राह्मण, थोर लोक यांना केलेलें). 'सर्वहि अर्चनें घडलीं हो।' –सप्र ८.५४. [सं.]. ०**पात्र**–न. देवपूजेच्या साहित्याचें भांडें; पूजापात्र. ०**पूजन**–न. (व्यापक) पूजाअर्चा; उपासना; सेवा. ०**भक्ति**–स्त्री. नवविधाभक्तींपैकीं पांचवी भक्ति. [सं.]

अर्चनीय, अर्च्य—वि. पूजनीय; वंदनीय; वंद्य. [सं.]

अर्चेघट—वि. (लु.) अचरट; बेअकली. [आचरट अप.]

अर्चा—स्त्री. १ पूजा; अर्चन; उपासना. २ मूर्तीची स्थापना; प्राणप्रतिष्ठा (नवीन बसविलेल्या मूर्तीची) किंवा पुनःशुद्धि (विटाळल्यामुळें) करण्याचा विधि; अर्चाशुद्धि. ३ स्तुति (वैदिक). ४ देवाची प्रतिमा. –शास्त्रीकोश ०**शुद्धि**–अर्चा अर्थ २ पहा. देवाच्या मूर्तीस अपवित्रेचा स्पर्श झाला असतां किंवा नवीन मूर्ति बसवितांना होम वगैरे अनुष्ठानानें जी शुद्धि करतात ती. [सं.]

अर्चि—स्त्री. ज्वाला; दिव्याची ज्योत. 'दीपकाची अर्ची।' –ज्ञा १३.११२३. [सं. अर्चिस्]

अर्चिक तान—(संगीत) एकच स्वराची तान (सामगायनांतील एक प्रकार). ह्यावरून पूर्वी ऋचा एकाच स्वरांत म्हटल्या जात असाव्या. [सं. ऋक्]

अर्चित—वि. पूजित; वंदित; पूजिलेला. [सं.]

अर्चिरादि (मार्ग)—पु. १ ब्रह्मलोकाचा मार्ग. ह्याला देवयान, उत्तरायण मार्ग असेंहि म्हणतात. याच्या उलट धूमादि मार्ग. या मार्गांच्या सर्व गोष्टी प्रकाशासंबंधींच आहेत. उ० नित्य दिवस, इत्यादी सूर्याचे समीप गमन, चंद्रबलाची वृद्धि इ०. 'यातें अर्चिरा मार्गु म्हणिजे।' –ज्ञा ८.२२५. –गीर २९२. २ ज्योतिर्मार्ग. ३ (ल.) उत्तम मार्ग. [सं. अर्चिः+आदि+मार्ग]

अर्च्य—अर्चनीय पहा.

अर्च्या शुद्धि—अर्चाशुद्धि पहा.

अर्ज—पु. जमिनीची रुंदी; विस्तार; क्षेत्रमापनांतील रुंदी. ०**काठी**–स्त्री. जमीन मोजण्याची काठी. –पया २९. ०**भूज**–स्त्री. रुंदी (जमीन मोजणींत). [अर. अर्ज़]

अर्ज—पु. १ विनंति; प्रार्थना; निवेदन; अभ्यर्थना; विज्ञप्तिपत्र. २ फिर्याद; दरखास्त. ३ श्रुत; मारूज. 'हे खबर श्रीमंत खुदावंत न्यामत यांस अर्ज होतांच.' –पया ४८२. (क्रि० करणें, ठोठावणें, ठोकणें, सजविणें, बनविणें). [अर. अर्ज़]. ०**दार**–पु. विनंति करणारा; याचक; दरखास्त देणारा; फिर्यादी. [फा.] ०**दास्त**–स्त्री. लेखी अर्ज; दरखास्त. 'दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त। लिहून खेलती मुद्रा केली।' –तुगा ४४३६. [फा. दाश्त्]. ०**बाब**–स्त्री. तैनातीशिवाय कारणपरत्वें लग्न वगैरे कार्यप्रसंगीं सरकारांतून मिळालेली देणगी. –ऐस्फुले ७३. [फा.]. ०**बेग–बेगी**–पु. अर्जदाराचा अर्ज हुजुरास–राजास ऐकविणारा (तोंडी किंवा लेखी) अधिकारी. 'महाराजांचा भोळा अर्जबेगी' –दावि [फा.]. ०**मात**–स्त्री. १ अर्ज. २ अर्जदार. 'सर्व अर्जमात आले भेटी।' –सप्र २.९६. [फा.]. ०**विनंति**–स्त्री. अर्ज पहा.

अर्जक—वि. मिळविणारा; संपादन करणारा. [सं अर्ज्=मिळविणें]

अर्जंट—वि. जरूरीचा; तांतडीचा. [इं.] ०**तार**–स्त्री. तांतडीची तार; निकडीचा संदेश; एक्सप्रेस तार.

अर्जणें, अर्जिणें—क्रि. संपादन करणें; मिळविणें; प्राप्त करून घेणें. 'जरी बहुतां जन्मीं बहुते। अर्जिलें सुकृतें।' –रासपं. १.७८४. 'अर्जिलें तें भावें जीवीं धरूं'। –तुगा ७८३. [सं. अर्ज्]

अर्जणें–अर्जिणें—अर्ज करणें; विनंति करणें. 'अर्जिती आम्हा कीजे पावन।' –दावि ४११. [फा. अर्ज़]

अर्जन—न. **अर्जना**–स्त्री. मिळवणूक; संपादन; प्राप्ति; संपादणी; सामाशब्द–द्रव्यार्जन, विद्यार्जन. [सं. अर्ज्]

अर्जमंद—वि. उत्कंठित; उत्सुक. [फा. आर्ज़ुंदन्=इच्छाकरणें –आर्ज़ुमंद]

अर्जल—वि. अप्रसिद्ध; गैरनामी; किरकोळ. 'सत्तावीस सरदार नामी मारिले; दीडशें सरदार अर्जल जखमी केला.' –जोरा ९०. [अर. अझ़्ल्=अप्रसिद्ध]

अर्जल—अरजल पहा.

अर्जव—आर्जव पहा.

अर्जानी—वि. हस्तगत; प्राप्त; ताब्यांत असलेलें. 'हाली साहेबासी मुकासा अर्जानी जाला आहे.' –इम. ४४. [फा. अर्ज़ानी =प्राप्त. तुल. सं. अर्ज्]

अर्जित—वि. मिळविलेलें; संपादिलेलें. [सं. अर्ज्]

अर्जी—स्त्री. अर्ज पहा. ०**इनाम**–न. सरकारास नजराणा देवून घेतलेलें ईनाम. –भाइअह १८३२. ०**इल्तमास**–स्त्री. विनंति. 'नबाब व राजेबहादर यांस माघारे फिरल्यावरी अर्जी इल्तमास लिहावी कीं' –ख २.४७९. [फा. अर्ज़+इल्तिमाश]. ०**मर्जी**–स्त्री. स्नेह; मैत्री. 'अर्जीमर्जीमध्यें विकल्प उडवा।' –पला १६४. [फा.]

अर्जुन—पु. पांच पांडवांपैकीं तिसरा; पार्थ. २ सहस्रार्जुन कार्तवीर्य. ३ अर्जुनसादडा–सातारा; पांढरा ऐन. याचा पांढरा डींक औषधी आहे. हें झाड कोंकणांत होतें. याच्या सालींचा उपयोग

कातडें कमाविण्यास व औषधास होतो. पानें वीतभर लांब, फुलें पांढरीं. साल पांढरी, लांकूड हरकामास उपयोगी. अइन पहा. –वि. पांढरा; श्वेत. [सं.] **०वाद्य**–न. बोंब; शंखध्वनि; अर्जुनाचें दुसरें नांव फाल्गुन यावरून फाल्गुनांतील वाद्य म्हणजे बोंब. 'अर्जुन वाद्यें केलीं' –ख १९३०. **०रुख**–पु. एक झाड; अर्जुनसादडा, अर्जुन (अर्थ ३) पहा. 'जै अर्जुनाचें रूख मोडिलें।' –दाव ३३६. [सं. अर्जुन+वृक्ष]

अर्णव—पु. समुद्र; सागर. सामाशब्द–शोकार्णव; मोहार्णव; दुःखार्णव. 'मग मोहार्णवगवाक्षें। रिघोनि ठेला।' –ज्ञा ११.६१. [सं.]

अर्त(र्त्त)णें—अक्रि. अत्यंत उत्सुकतेनें, उतावळेपणानें अधीर, व्याकूळ होणें; पीडित होणें. [सं. आर्त]

अर्ता–र्ति—क्रिवि. अलीकडे 'तया अर्ता पर्ता नाहीं कांहीं।' –दावि ३५. 'म्हणे राम बीभीषणा वैस अर्ता।' –राक १.१७ 'माया अर्ति पार ब्रह्मास नाहीं।' –दा ६.५.१०. अरता पहा. [सं. आर=सान्निध्य+तस्]

अर्ता–र्ति—स्त्री. आवड, इच्छा; आशा 'माझे मनीं असे जे अर्ता पुरवावी ते देवराया।' –गुच ५.१८. [सं. आर्तिः]

अर्तांग—न. (गो.) अर्धे तांग; अदतांग–आठ रेसांचें तांब्याचें नाणें. [सं. अर्ध+टंक]

अर्ती—स्त्री. अपेक्षा; आवड; इच्छा; उत्कंठा. 'अर्तीन जातो ते सर्तीन जायना' = प्रेमानें होतें तें स्पर्धेनें होत नाहीं. [सं. आर्तिः]

अर्तु—पु. दुःखी; रोगी; पीडिलेला. [सं. आर्त]

अर्थ—पु. १ अभिप्राय; भाव; भावार्थ; तात्पर्य; काम; हेतु; कारण. 'हे आणिकाही एका अर्था। उपकारे।' –ज्ञा ३.१५३ [सं. अर्थ्=मागणें.] २ मतलब; आशय; उद्दिष्ट; इंगित; उद्देश; हेतु; ध्येय. 'मग ते तुम्हां ईप्सिता अर्थातें देती. –ज्ञा ३.९५. 'यास्तव शोचिसि कीं हतफळ झाले अर्थ जे मनामधिले.।' –मोकर्ण १.१०. ३ द्रव्य; लाभ; मालमत्ता; धन. 'अर्थ प्राण देतां न सोडी सर्वथा।' –तुगा १३०. 'जयांपासोनि होय अर्थप्राप्ति। ते समर्थ शिष्य आवडती।' –एभा २३.२३३. ४ मिळविण्याची किंवा साध्य वस्तु; संपादनीय गोष्ट–विषय–ध्येय. ५ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांपैकीं दुसरा; कीर्ति, सत्ता व संपत्ति यांपासून मिळणारें सुख. ६ द्रव्य; जड पदार्थ, वस्तु; सृष्टपदार्थ; निर्माण केलेला जिन्नस; (व्यापक अर्थानें) अस्तित्व किंवा संबंध, इंद्रियांचा विषय. 'तैसें भारतीं सुरवाडलें। अर्थजात॥' –ज्ञा १.४०. 'तेंमेचि तया संगती। इंद्रियें आपलाला अर्थी वर्तती।' –ज्ञा १५.३७४. 'तृण जळ नाना अर्थ। तेही पराधे धरीतसे।' –एभा ७.३७९.७ फळ; निष्पत्ति परिणाम; बनाव; (ल.) प्रसंग. 'अर्थ तसा आलाहे कां, जी मधुसूदना कपाळाला।' –मोभीष्म ९.५८. ८ इच्छा; आकांक्षा; अपेक्षा. ९ कस; दम; जोर; सत्त्व; हंशील. 'या शेतांत आतां कांहीं अर्थ राहिला नाहीं.' १० (समासांत) आशय, भावार्थ याअर्थी विद्वानांचे संभाषण, चर्चा यांतून नेहमीं उपयोग करतात जसें:–लक्ष्यार्थ, वाच्यार्थ, व्यंग्यार्थ. ११ (समासांत) साठीं, स्तव, करितां म्हणून, इ०. हेतुदर्शक अर्थानें. जसें:–शीतनिवारणार्थ, उदरपोषणार्थ, देवतार्चनार्थ, दानार्थ. 'कामसुख कामिनीमेळीं। सुखार्थे स्त्रियेतें प्रतिपाळी।' –एभा २३.४२७. १२ जरकरितां, तरकरिता, (त्या) साठीं, (ज्या) पक्षीं–पेक्षां, (त्या) पक्षीं–पेक्षां त्या अर्थी. जसें:–ज्याअर्थी तुम्ही मागतां त्याअर्थी दिलें पाहिजे. कोणत्याहि अर्थानें तुमचें व्हावें=कोणत्याहि प्रकारानें किंवा तऱ्हेनें किंवा कसेंहि करून कोणत्याहि स्थितींत तुमचें व्हावें. १३ (कायदा) दावा; बाब; फिर्याद; मिसल; विवादाचा विषय १४ करावयाची–समजावयाची–विश्वासावयाची–वगैरे कोणतीहि किंवा कोणत्याहि प्रकारची गोष्ट, बाब. 'एवं इया आघवेया। अर्था रूप करावया। विषो एथ चौदाविया अध्यायासी।' –ज्ञा १.३७. 'दोहींतूनएक अर्थ करावा.' –भाव ८. 'वाल्हा जाहाला रुद्रदित। म्हणे कैसा अर्थ करूं आतां॥' १५ काळजी, आस्था, गरज, हितसंबंधाची जाणीव 'सर्वांस सर्वांचा अर्थ असावा.' १६ (व्या.) कर्त्याचा क्रियाविषयक हेतु, १ स्वार्थे, २ आज्ञार्थे, ३ विध्यर्थे. ४ संकेतार्थे. ५ संशयार्थे. १७ (ल.) ब्रह्म. 'जेंहीं शोधून पाहिला। त्यासी अर्थ सांपडला। येरां असोनि अलभ्य जाला। जन्मोजन्मीं।' –दा १.९.१२. १८ (ल.) स्वतःची मत्ता, स्त्री. 'आपुलें अर्थे दुसऱ्यापाशीं। आणि दुसऱ्याचें अभिळाषी।' –दा २.१.६१. १९ बोल; दोष. 'या प्रकरणांत आपलेकडे कांहीं अर्थ नाहीं.' –शिवदि २७२. २० (समासांत) प्रभाव; सामर्थ्य; जोर; कारण; अवलंबन; 'जन्मलोसि बळार्थे। धर्मासेनि।' –ज्ञा १६.४६४. [सं. अर्थ] **०फावणें**–कि. सांपडणें, मिळणें, संगति लागणें. 'एवं सर्व शब्दाचा अर्थ फावे।' –यथादी ११.५८५. **म्ह०** १ अर्थ वा साधनेत देहें वा पातेयेत्=यश मिळवावे किंवा मरावें. २ अर्थाचे तुकडे भागवताच्या चिध्या=ओढून ताणून केलेलें विवरण किंवा टीका; भलताच, कांहींतरी अनुवाद. **अर्थाला मरणें**=स्वतःच्या फायद्यासाठीं धडपडणें किंवा अति उतावीळ असणें. **अर्थणें**–उक्रि. मागणें; याचना करणें; विनंति करणें; विनवणी करणें; प्रार्थना करणें. 'अर्थी आल्या अर्थावियासी। विमुख न व्हावें सर्वेस्वेंसी।' –एभा ७.४०५. **०अपुर्वाय**–स्त्री. (गो.) लाड; कोड; कौतुक. अपुर्वाय पहा. 'त्याची अ० बरी चालते.' **०गम्य**–न. अर्थाचें ज्ञान, अर्थबोध. 'हा मुलगा श्लोक लावितो परंतु त्यास अर्थगम्य नाहीं.' [सं. अर्थ+गम्] **०गौरव**–न अर्थाचा भारदस्तपणा. 'वक्त्याचे वाग्प सुदृढ अत्यंत। अर्थ गौरव मुख लखलखीत।' [सं.] **०ग्रह**–पु अर्थ जाणणें, समजणें, स्वीकारणें; अर्थबोध होणें; ग्रहणशक्ति. **०दर्शक**–वि. अर्थ दाखविणारें;

किंमती दाखविणारें. उ० अर्थदर्शक परिमाणें (किंमती दाखविणारीं, रुपये, आणे, पै). –छत्रे अंक ६८. ०दास–वि. द्रव्याची अति हाव बाळगणारा; कवडीचुंबक; पैशासाठीं धडपडणारा; पैशासाठीं वाटेल तें करील असा. ०बुद्धि–स्त्री. १ गरज; इच्छा; अपेक्षा. २ आवड; कळकळ; हितबुद्धि; पोटाग. ०भेद–पु अर्थांतील फरक. ' ना कांहीं आथी अर्थभेदु । तो देव करोतु विशदु । '–ज्ञा १८.८९. ०वाद–पु. १ अतिशयोक्तिपूर्वक स्तुति किंवा निंदा; अति प्रशंसा; अतिनिंदा; अतिशयोक्तीचें वर्णन. ' कां हा अर्थवादु म्हणती । वाचालपणें ॥ ' –ज्ञा ३.१९५. २ (काव्य) स्पष्टीकरणार्थ करण्यांत येणारा युक्तिवाद; फलश्रुति; अर्थगौरव; कविलाघव. काल्पनिक मंडन ' वेदींच्या अर्थवादासरिसा । मनीं बांधोनि भोगाशा । यज्ञमिषें पशुहिंसा । भोगलिप्सा करू धांवती ॥ ' –एभा ५.२६२. ३ मिथ्याकल्पना; काल्पनिक स्पष्टीकरण; ऊहापोह; चुकीची समजूत. ' चिचुंदरी मांजराची भावडी म्हणून तिला मांजर खात नाहीं, हा उगीच अर्थवाद, वस्तुतः पाहिलें असतां घाण येते म्हणून खात नाहीं. ' ४ (ल.) (मीमांसा) आगंतुक विधान. –गीर २८५. ५ अर्थासंबंधीं वाद–चर्चा; वादविवाद.–टि ४.६३ ०शास्त्र–न. १ संपत्तीचें उत्पादन व व्यय यांचें विवेचन ज्यांत केलें आहे तें शास्त्र. (इं. इकॉनॉमिक्स). ' पण त्या घडवून आणण्याचे खरे उपाय आमचे वृथा देशाभिमानी गांवढळ अर्थशास्त्री सांगतात ते नव्हत. ' –आगर ३.९७. २ ऐहिक सुखासंबंधीं लौकिक व्यवहारशास्त्र (धर्मशास्त्राच्या उलट). ' अर्थशास्त्राहून धर्मशास्त्र बलाढय. ' ३ राज्यव्यवहारशास्त्र; राजनीति–शासनशास्त्र उ० कौटिलीय अर्थशास्त्र. ४ दंडनीति (याच्या उलट आन्वीक्षिकी). दंडनीति पहा. ०समर्थता–स्त्री मनांतील आशय स्पष्ट करण्याची कुवत. ' या भाषेला इतकी म० आलेली आहे कीं कोणत्याहि विषयावर हिच्या द्वारां शिक्षण देतां येईल. ' ०सिद्ध–वि. १ अर्थात् सिद्ध; गर्भित, ध्वनित, फलापेक्षित. २ सिद्धार्थ; ज्याचा हेतु तडीस गेला आहे असा.

अर्थतः—क्रिवि. १ अर्थाप्रमाणें; अभिप्रायाप्रमाणें, भावार्थाप्रमाणें; २ अलबत्, अर्थात्, खात्रीनें; जरूर. [सं.]

अर्थना—स्त्री. याचना, विनंति; मागणी; अभ्यर्थना; प्रार्थना. ' हेचि होऊनि अर्थना । मीचि माझ्या अर्थी अर्जुना । ' –ज्ञा १८. ११२०. [सं. अर्थ्]

अर्थविणें—सक्रि. अर्थ करणें; अर्थ सांगणें; प्रतीति सांगणें. ' यथार्थ पूर्ण अर्थवी । ' –एभा २.७९३. [सं. अर्थ्]

अर्थाअर्थीं—क्रिवि कोणत्याहि मार्गानें–रीतीनें–पद्धतीनें; कांहीं एक अर्थानें–करारानें–कांहींएक संबंध नसतांना; किमपि, यत्किंचित्तहि (नकारार्थी प्रयोग). ' तुमचा खटला तुटला, आतां त्यांचा व तुमचा अ० संबंध नाहीं. ' [सं. अर्थ]

अर्थागळें—वि. अर्थप्रचुर; सार्थ; अन्वर्थक; ज्यापासून कांहीं बोध होईल असें; सुबोध. ' कवित्व असावें अर्थागळें । ' –दा १४. ३.३७. [अर्थ+आगळें]

अर्थात्—क्रिवि. १ कारणामुळें; कारणास्तव; अवश्य परिणामानें. ओघानेंच; साहाजिकच; आपोआप. ' वस्त्र घुतलें असतां अर्थात मळ जाईलच. ' २ वस्तुतः वास्तविक; परिणामीं; अंतीं; फल दृष्टीनें पाहतां. [सं. अर्थ पंचमी विभक्ति]

अर्थांतरन्यास, अर्थांतरोपन्यास—पु. १ एक अर्थालंकार; यांत सामान्य आणि विशेष अशा दोन्ही गोष्टींचें अर्थाच्या साधर्म्यावरून अथवा वैधर्म्यावरून एकाच वेळीं कथन असतें. एखादी विशेष गोष्ट सांगून तिचें समर्थन एखादी सामान्य गोष्ट सांगून केलेलें असतें किंवा सामान्य गोष्ट सांगून तिचें समर्थन विशेष गोष्टीनें केलेलें असतें. याचे चार प्रकार आहेत. १ साधर्म्यावरून सामान्याचें विशेषानें समर्थन. २ साधर्म्यावरून विशेषाचें सामान्यानें समर्थन. ३ वैधर्म्यावरून सामान्याचें विशेषानें समर्थन. ४ वैधर्म्यावरून विशेषाचें सामान्यानें समर्थन. उ० ' तदित्थ खग भेणें वेगळाले पळाले । उप वनजलकेली जे कराया मिळाले । स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो । कठिण समय येतां कोण कामास येतो । ' –नल ४४. २ सामान्य गोष्ट–सिध्दांत सांगणें. उ० ' तुम्ही मनावर घेतलेंत तर होईल, कां कि थोरास काय अवघड आहे. ' [सं. अर्थ+अंतर+न्यास]

अर्थानुसंधान—पु. मागील विधानांचा व पुढील विधानांचा अर्थाच्या दृष्टीनें समन्वय; अर्थसंदर्भ; पूर्वापर संबंध, किंवा धागा. (क्रि० राखणें; ठेवणें.). [सं. अर्थ+अनुसंधान]

अर्थान्वय—पु. अर्थाचा संबंध; अर्थाविषयीं धोरण; संदर्भ; संबंध; वाक्यामधील शब्दांच्या अर्थांतील एकसूत्रीपणा. [सं.]

अर्थापत्ति—स्त्री. १ स्पष्ट न केलेलें परंतु गर्भितपणें किंवा ध्वनित करून समाविष्ट केलेलें अनुमान; गर्भितार्थ. २ अनुमान किंवा तर्क काढणें, बांधणें; अनुमानसिध्दांत; कल्पना; तर्क; अटकळ; आनुषंगिक सिद्ध गोष्ट. ' अर्थापत्ति उपमान । इतिहास परिशेषादि प्रमाण । तयासिहि स्वतंत्र कवण । प्रमाण तो बोलेल ॥ ' ३ एक अर्थालंकार. यांत प्रस्तावित अर्थावरून गर्भित अर्थाची व गर्भित अर्थावरून प्रस्तावित अर्थाची उपस्थिति होते. उ० दंडापूपन्याय, कैमुतिक न्याय. ' बृहस्पती शशी दैत्यगुरू तिघे तेजहीन तेजीं बुडले । इतर तारे तर लहान केवळ मग दिसतिल कोणीकडले । ' –प्रला २४. ' काळहिवळें कितीहा न तृणवळें वन्हि होय बध्द रणीं । ' –मोआदि ३२.२४. ४ प्रत्यक्षादि जीं सहा प्रमाणें (म्हणजे प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अनुपलब्धि, अर्थापत्ति) त्यांतील एक प्रमाण. उ० 'देवदत्त दिवसां न जेवतां धष्टपुष्ट आहे–त्याअर्थी रात्रीं जेवतो. ' [सं.]

अर्थाभास—पु. अर्थाचा आभास; अर्थसादृश्य; चुकीची विचारसरणी. [सं.]

अर्थार्थी—वि. १ धनाची इच्छा करणारा; द्रव्येच्छु- 'तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा ॥' –ज्ञा ७.१०९. २ प्रवृत्तिपर चार प्रकारच्या भक्तांतील पहिला; सकाम भक्त [सं.]

अर्थार्थी—अर्थाअर्थी पहा.

अर्थालंकार—पु. अर्थाच्या योगानें काव्यास शोभा आणणारा, अलंकार. (उपमा रूपक इत्यादि). याच्या उलट शब्दालंकार. [सं.]

अर्थिक—वि. १ याचक. २ उपयोगी पडणारा; सेवक. 'कोण कोणा अर्थिकु। कोण जाणें ॥' –ज्ञा १८.१५९७. [सं.]

अर्थिल—वि. जरूरी असलेला;गरजू;आस्थेवाईक. [सं. अर्थिन्] **–लें ठिकाण**–न. गरजू ठिकाण, स्थळ; जेथें जरूरी आहे असें स्थळ. 'अर्थिलें ठिकाण पाहून मुलगी द्यावी, माजोऱ्यास देऊं नये.' [सं. अर्थ्]

अर्थी—वि. १ अर्ज, याचना, विनंति करणारा; प्रार्थना करणारा. 'अर्थी आल्या अर्थावयासी। विमुख न व्हावें सर्वस्वेसीं।' –एभा ७.४०५. २ (समासांत) इच्छिणारा; आकांक्षा असणारा; गरजू. उ० विद्यार्थी, पुत्रार्थी, मोक्षार्थी, धनार्थी. ३ द्रव्यवान. [सं. अर्थिन्]

अर्थीप्रत्यर्थी—वि. परस्परापेक्ष; परस्परांवर अवलंबून असणारा; एकमेकांची गरज लागणारा. 'या प्रकरणीं त्यांचा आमचा थोडासा अर्थीप्रत्यर्थी संबंध आला आहे' –टि ४.६६. [सं.]

अर्थे—क्रिवि. करतां; साठीं. अर्थे पहा.

अर्थेला—अर्थिल पहा.

अर्देखाप—न.(गो.) प्रत्येक फळीला अर्धी खांच घेऊन फळ्या जोडण्याचा साधा प्रकार. [अर्धे+खाप]

अर्दमापटें—वि. (गो.) अर्धे मापटें; एक माप; पावशेर. [सं. अर्ध+मा; मापटें]

अर्दास—अर्जदास्त पहा.

अर्दितवायु—पु. तोंडाचा पक्षघात; पक्षवायु; अर्धांगवायु. [सं.]

अर्दी—स्त्री. १ पै. २ (गो.) १३ पैसे १ पै किंमतीचें नाणें. [अर्धी]

अर्धक—न. (कु.) अर्धाभाग; नारळाचा अर्धा भाग. [सं. अर्ध]

अर्धवट—वि. (गो.) अपुरें; अर्धवट. [सं. अर्धवत्]

अर्धी—वि. (गो.) अर्धा. [सं. अर्ध]

अर्धे—न. १ एका पदार्थाचे जे दोन सम विभाग ते प्रत्येकीं; निम्मा तुकडा, अर्धा भाग. २ (समासांत) अर्धा:निम्मा. उ० अर्धकोस, अर्धघटिका इ. [सं.] **०कच्चा**–वि. १ अर्धामुर्धा पिकलेला, तयार झालेला किंवा शिजलेला (फल, धान्य, विद्या, अन्न); अर्धामुर्धा; अपूर्ण; अपुरा. २ पुरें शेवटास न जातां अर्धवट राहिलेलें (काम). **०कंधरा**–पु. लगामाचा प्रकार. –अश्व १८५. [सं. अर्ध+कंधरा] **०काची**—वि. अर्धीकच्ची. 'एक अर्धेकाचीं तुरटें।' –एरुस्व १४.१०६. **०कोर**–स्त्री. अर्धा चतकोर; (गो.) नितकोर (भाकर). **०घबाड**–पु.न. एक शुभ मुहूर्त, परंतु घबाडापेक्षां कमी महत्वाचा. घबाड पहा. **०चंद्र**–पु.१ वद्य किंवा शुद्ध अष्टमीचा चंद्र· अर्धा चंद्र. २ अर्ध चंद्राच्या आकारासारखी वस्तु. ३ (गचांडी देतांना हाताचा आकार अर्धचंद्रासारखा होतो म्हणून;) हकालपट्टी. 'या अष्टमीच्या चंद्राच्या मुहूर्तावर मलाहि अर्धचंद्र मिळाला.' –मूकनायक. 'आणिक म्हणे भृत्यजना। यासी अर्धचंद्राची द्यावी दक्षिणा। देशाबाहेरी या ब्राह्मणा। घाला वहिले ॥' –कथा ५.११.७१. (हा प्रयोग मूळ संस्कृतांतच आहे.) (क्रि० देणें, मारणें, मिळणें, इ०). ४ (नृत्य) हातांचीं चार बोटें एकमेकांस लागून ताठ ठेवणें व आंगठा दूर पसरून ठेवणें. ५ अर्धचंद्राकृति (फालाचा) बाण. **०चंद्री, तंद्री**–स्त्री. अर्धवट झोंप, मूर्च्छा. 'बाण भेदिला जिव्हारीं। निर्दूरथ पडिला धरणीवरी। डोळां लागली अर्धचंद्री। जेवीं खेचरी योगिया।' –एरुस्व ९.३२. [सं अर्ध+तंद्रा]. **०चरतीय, जरतीय**–वि. अर्धे किंवा अर्धवट काम; अनिश्चित स्वरूपाचें काम; मोघम किंवा अनिश्चित भाषण. 'येतो म्हण किंवा नाहीं म्हणउगीच अर्धचरतीय सांगूं नको.' [सं. अर्ध+जरा–जरित किंवा जर्जरित; अर्ध+चरित]. **०जेवा**–वि. अर्धवट जेवलेला; अर्ध्या जेवणांतून उठलेला; अर्धपोटीं. [अर्ध+जिम्]. **०देशी कापड**–न. विदेशी सुताचें, हिंदुस्थानांत विणलेलें कापड. **०धणी**–वि. अर्धतृप्त; अर्धपोटी. 'भलतें करीं परी अर्धेधणीं। नुरीं कदा।' –ज्ञा १६.३०. **०नार**–स्त्री. स्त्रीजातींतील पंढ; पंढा; अर्धवट स्त्री; स्त्रीधर्मापैकीं कांहीं बाबतींत उणीव असलेली स्त्री. [सं. अर्ध+नारी]. **०नारीनटेश्वर**–पु. १ अर्धे आपले (पुरुषाचें) व अर्धे पार्वतीचें (स्त्रीचें) असें शंकराचें रूप; अर्धनारीश्वर; शिवशक्ति. मोहिनीराज हें विष्णूचें रूप (यांत अर्धा विष्णु व अर्धी अमृतकलश घेतलेली मोहिनी असें अर्धनारीश्वर स्वरूप असतें. नेवासें येथें असा देव आहे). २ अर्धा पुरुष व अर्धी स्त्री एकत्र. 'अर्धनारीनटेश्वरी। जो पुरुष तोचि नारी।' –ज्ञा ९.२७०, -एभा ११.३६९. ३ प्रकृतिपुरुष; शिवशक्ति. 'प्रकृतिपुरुष शिवशक्ति। अर्धनारीनटेश्वर म्हणती।' –दा २०.३.१०. **०नारीश्वर**–अर्धनारीनटेश्वर पहा. **०निकुटटक**–(अंगहार) –पु. (नृत्य) उजवा पाय नूपुर करून मग तीचारी सोडून भराभर आक्षिप्तचारी त्याच पायानें करणें. नंतर दोन्ही हात फेंकून त्रिक वळविणें व शेवटीं निकुट्टक व कटिचिन्हे हीं करणें. **०निकुट्टित** (करण)–न. (नृत्य) खांदा आकुंचित करून त्यावर त्या बाजूचा हात ठेवून बोटें हळु हळु ठोकणें व दुसरा हात आपल्या तोंडासमोर बोटें करून ठेवणें. उजवा पाय कुट्टित करणें व डावा पाय स्तब्ध ठेवणें. **०पड–डा**–वि. अर्धवट पडलेलें–केलेलें–बजावलेलें–म्हटलेलें; अपुरें साधलेलें, बजावलेलें; वरकरणीपणानें केलेलें.

(सामा.) अपुरें; वरवर; सरासरी. [अर्ध + पडणें]. **०पद्मासन**–न डाव्या पायाची मांडी मोडून बसणें व उजवा पाय मोडून डाव्या पायावर ठेवणें. **०पक्षकीटक**–पु. (प्राणी) एक कीटक वर्ग यांतील किड्यांचे पुढील अर्धे पंख ढाली द्रव्यानें कठिण झालेले असतात म्हणून यास हें नांव आहे. –प्राणिमो १०३. **०पिका**–वि. अर्धवट पिकलेला (फळ वगैरे) [अर्ध + पिकणें] **०पुडी**–वि अर्धवट, अल्पायुषी (अर्धे झोपेंत जातें म्हणून). 'थोडें जिणें अर्धपुडी काया। गर्व करिती रडाया।' –दा १८ ५ ३५. [सं. अर्ध + पुट १]. **०पोटीं**–क्रिवि. अर्धेच पोट भरलें असतां; पूर्ण न जेवतां; भूक पुरी न भागतां. (क्रि० जेवणें, जाणें, असणें, उठणें, राहणें). **०फोड**–अर्धवट फोडलेलीं लांकडें; ठोकळे. (वुरूड) बांबू उभा चिरून केलेले दोन भाग. **०बाट–गा**–वि. १ अर्धवट संस्कार झालेला (वाटण्याचा-कुटण्याचा-शिजण्याचा इ०); अर्धवट बन विलेला, अर्धबोबडा. २ अर्धवट भ्रष्ट झालेला, बाटलेला; जातींतून अर्धवट बाहेर पडलेला; वाळींत टाकलेला ३ ज्याचा बाप एका जातीचा व आई दुसऱ्या जातीची आहे असा. ४ अर्धवट किंवा वरवर ज्याला माहिती-परिचय आहे असा. ५ (ल) अर्धवट शिकलेला (विद्यार्थी, कारागीर, पंडित इ०). **कडेचा** पोहणारा; अतज्ज्ञ. –क्रिवि. अर्धेमुर्धे करून; अपुरेपणानें; उणेपणानें. [अर्ध + भ्रष्ट=बाट]. **०बाटे पाऊण मराठे**–न. १ संकर; पंचमिसळ; खिचडी; घेडगुजरी (भाषा, काम, पदार्थ); बारभाई; वजबजपुरी. २ (ल.) उच्छृंखलपणाची वागणूक-आचार. **०बिंब**–न. १ अर्धवर्तुळ आणि त्यावरील टिंब २ (ल) ओंकाराची-प्रणवाची अर्ध मात्रा. 'जेव मात्रात्रय मावळे। अर्धविवीं।' –ज्ञा ८.११५. **०बुकट–बुकुट**–वि. (राजापुरी) अर्धवट पहा. [अर्ध + बुकटी]. **०बोबडा**–वि १ अर्धवट कुटलेलें–चेचलेलें–वाटलेलें (मिरें वगैरे). २ शिजतांना अर्धवट राहिलेला–(भात-डाळ इ० पदार्थ); मऊ न झालेला, बोटचेपा. ३ (ल.) कसें तरी ओबडधोबडपणें केलेलें काम; बिगारी–वेठ काम. **०भरपोशाख**–पु. भर पोशाखांतील फक्त कांहीं विशिष्ट वस्तुयुक्त मामुली पोशाख –बडोदें खानगी खातें नियम नोकर पोशाख पा ३ **०मत्तल्लि(करण)**–न. (नृत्य) पाय अडखळल्यासारखें करून मागें टाकणें, डावा हात रेचित करणें व उजवा हात कमरेवर ठेवणें. **०मत्स्येंद्रासन**–न योगासनांतील एक प्रकार. –संपूर्ण योगशास्त्र पा. ३२५ **०मागधी**–स्त्री. एक प्राकृत भाषा. जैन धार्मिक ग्रंथ या भाषेंत लिहिले आहेत. हिलाच भारतीय वैय्याकरण आर्षभाषा म्हणत. शौरसेनी व मागधी भाषा प्रदेशांच्यामध्यें अर्धमागधीभाषाप्रदेश होता (म्हणजे हल्लींचा प्रदेश अयोध्या). त्याच्या दक्षिणेकडील मराठी भाषा कांहीं अंशीं या भाषेवरून बनली आहे. प्रचारकाल खि. पू. ४ थ्या शतकाचा शेवट –हाको अ ४७५. **०मांडणी**–स्त्री. अर्धी मांडणी पहा. **०मात्रा**–स्त्री १ ओंकारांतील अर्धी मात्रा. 'अर्धमात्रापर तें न सांपडे।' –परमा २.१३. २ एका वेळीं घ्यावयाच्या औषधाच्या प्रमाणाच्या अर्ध्या इतकें. 'अर्धमात्रा रस देऊनिया जीव। रोग दूरी सर्व करितासी।' –व २२२.१; ३ (ल.) औषध; रसायनगुटिका. 'पंचगव्य तेंचि जाण अर्धमात्रा।' –व १०४.५. ४ किंचित्; थोडें. 'हे कृष्णकथा अलौकिक। महादोषासी दाहक। भवरोगासी छेदक। अर्धमात्रा सेविलीया।' –एहस्व १८.७५. ५ व्यंजन; **अर्धस्वर. ६** संगीतांत स्वर घेतांना घेतलेली विश्रांति; एका मात्रेचा अर्धा काल. **०मुकुल(दृष्टि)**–स्त्री. (नृत्य) अर्धवट डोळा उघडणें; पापण्यांचे केस एकमेकांस लागतील इतके जवळ आणणें. आल्हादकारक सुगंध, मुखस्पर्श ह्या गोष्टी हा अभिनय दर्शवितो. [सं. मुकुल = किंचित् उमललेली कळी]. **०मेला**–वि. १ अर्धवट मेलेला; थोडासा जिवंत राहिलेला. २ जर्जर; मृतप्राय, व्याकुळ. 'ती भुकेनें अर्धमेली झाली आहे.' –पाव्ह २३. **०रथी**–वि (रथांत बसून) एका रथ्यासहवर्तमानहि युद्ध करतां येत नाहीं तो; रथीहून अल्पबळी. (ल.) कच्चा योद्धा. 'अतिरथ नव्हे रथ नव्हे हा (कर्ण) केवळ अर्धरथचि अविदग्ध।' –मोउद्योग १२.५८. [सं.]. **०रात्र**–स्त्री. मध्यरात्र. **०रेचित (करण)**–न. (नृत्य) उजवा हात तोंडासमोर नेऊन डोक्यावर उचलून धरणें व उजव्या पायाकडील भाग किंचित वांकवून तो सूची करून जमिनीवर हळु हळु आपटणें. [सं.] **०रेचित(संयुक्त हस्त)**–पु. (नृत्य) डावा हात चतुर व उजवा हात रेचित करणें. [सं.] **०लंड–मर्धलंड**–पु. अधलंड, अधलेडमधलंड पहा. **०वट**–क्रिवि १ अर्धेपणानें; अपुरेपणानें; उणीव असलेल्या रीतीनें, वरवर; वरकरणी: मोघमपणें. 'काम पुरतें करावें, अर्धवट ठेवूं नये' [सं. अर्ध+वत्] २ अर्ध्यांत; मध्यभागीं; दोन्ही टोंकाच्या मध्यें. –वि. १ अधलामधला; अपुरा; २ (ल.) वेडा; अप्रबुद्ध; कमी समजूत असलेला. 'हा पुरता वेडा नव्हे पुरता शाहणा नव्हे, अर्धवट आहे.' ३ अर्ध वय झालेला; तरणा नव्हे 'आरशी म्हैस घेतली ती तरणी नाहीं, अर्धवट आहे.' **०वर्तुल–ळ**–न (गणित.) अर्धे वर्तुळ वर्तुळाचा निम्मा भाग, व्यास आणि त्यानें कापलेला परिघाचा भाग यांच्यामध्यें जो वर्तुलाचा भाग सांपडतो तो –महमा ६. (इं.) सेमि–सर्कल. **–विराम**–पु. १ अर्धी विश्रांति; पूर्ण विरामापेक्षां कमी थांबण्याची जागा. २ ती दर्शविण्याचें चिन्ह. **०वेडा**–वि. वेसडर; मूर्ख; अर्धवट. **०शिजा**–वि. अर्धवट शिजलेला; पुरता न शिजलेला (भात वगैरे) **०शिशी**–स्त्री. अर्धे कपाळ दुखण्याचा रोग; यानें अर्ध्या मस्तकाकडील **मानेचा** भाग, भुंवई, आंख, कान, डोळा व अर्धे कपाळ–या ठिकाणीं तरवारीच्या आघातासारखें दुःख होतें. यावर गोकर्णाचें मूळ व फळ पाण्यांत वांटून त्यांचें नस्य करावें अथवा मूळ कानांत बांधावें. [सं. अर्ध+शीर्ष] **०सम(वृत्त)**–न. ज्यांत दोन दोन उ० पहिला आणि

तिसरा व दुसरा आणि चौथा हे चरण सारखे असतात तें वृत्त. उ० पुष्पिताग्रा; हरिणीप्लुता; वियोगिनी, अपरवक्त्रा. [सं.]. **०मूर्ची (करण)**–न. (नृत्य) उजवा पाय सुनी करून उजवा हात उपपद्म करणें व डोक्याच्या वरच्या बाजूस नेऊन ठेवणें **०स्थित(स्वर)**–पु (संगीत)द्वयर्ध आणि द्विगुण या स्वरांमधील म्हणजे पांचवा, सहावा व सातवा हे स्वर. **०स्वस्तिक(करण)**–(नृत्य)पु पाय स्वस्तिक ठेवून उजवा हात कमरेवर व डावा हात वक्षःस्थलावर ठेवणें. **०स्वर**–पु. य्, व्, र्, ल्, हीं व्यंजनें स्वराबद्दल योजिलात म्हणून त्यांस अर्धस्वर किंवा अंतःस्थ वर्ण म्हणतात. **०हार**–पु. बारा किंवा चौसष्ट सरींचा हार; एक दागिना.

अर्धल-ली-अर्धल्या—अर्धेल पहा.

अर्धा—वि. एखाद्या वस्तूचे दोन सारखे भाग केले असता त्यांपैकीं प्रत्येक; निम्मा. [सं. अर्ध] **–र्ध्या जिवाचा**–वि. अर्धमेला; अशक्त. **०जीव होणें**–१ आजार, त्रास, काळजी, कष्ट, भीति वगैरेंनीं जीव त्रासणें, जर्जर होणें. २ अधीर होणें. **अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणें**–थोड्याशा लाभानें फुगून जाणें, ताठून जाणें; गर्विष्ठ होणें. **०अधिक**–वि. अर्धा व किंचित् जास्त; अर्ध्यापेक्षां जरा मोठा. **०अर्ध**–क्रिवि. (गो.) निम्मेनिम; अर्धेंअर्धें, अर्धे अर्धे करून. **०कोर**–पु. भाकरीचा आठवा भाग; अदकोर, नितकोर; (कांहींच्या मतें) अर्धी भाकरी. [कोर=एकचतुर्थांश, किंवा लहान तुकडा]

अर्धांग—न. १ अर्धें शरीर; शरीराची एक बाजू; मांडी. 'जगज्जननी असे वामभागीं। भीमकी शोभली अर्धांगीं। जैसी विद्युल्लता झळके मेघीं। दर्शनें भंगी महा दोष॥' –तुगा ७३३ २ पत्नी; स्त्री; गृहस्वामिनी; घरधनीन; अर्धांगी पहा. 'की तें (यमुना) रत्नाकराचें अर्धांग।' –दाव १७८. ३ (ल.) मित्र, साहाय्यक. ४ पक्षवात; पक्षवायु; अर्धांगवायु. **०वायु**–पु १ अर्धांग; एक बाजूचा रोग, ज्यामुळें शरीराचा अर्धा भाग निकामी होतो. २ एक घोड्याचा रोग यास 'लखवा' म्हणतात. [सं. अर्ध+अंग]

अर्धांगी—स्त्री. पत्नी; भार्या, स्त्री, बायको. 'अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा।' [सं.]

अर्धांगीकार—पु अर्धी अनुमति, अर्धवट संमति; माफक कबुली. [सं. अर्ध+अंगीकार]

अर्धांमर्धा-मुर्धा—वि. जवळ जवळ अर्धा–निम्मा; सरासरी अर्धा; अर्ध्यापेक्षां कमी किंवा अधिक. [सं. अर्ध द्वि.]

अर्धार्ध—क्रिवि. अर्धा अर्धा पहा.

अर्धाला—वि. १ अर्धा (वांटणीचा भाग दर्शवितांना एकेदर संख्येपैकीं प्रत्येकाविषयीं बोलावयाचें झाल्यास). 'सर्वांस अर्धाल्या भाकऱ्या दे.' 'अर्धाला खांब पूर.' [आकारांत विशेषणांना 'ला' हा विभागगीवाचक प्रत्यय लागतो. उ० मोठाला, इवलाला इतकाला, इ० अर्धा+ला]

अर्धासन—न. १ अर्धे आसन, वसावयाच्या आसनाचा अर्धा भाग २ (ल.) सहकारित्व; सहचारित्व (नवरा आणि बायको, दोन मित्र, राजा आणि सामान्य प्रजाजन यांचें). ३ त्यावरून अर्ध्या आसनावर वसण्याचा दिलेला मोठा मान; विशेष घरोबा, परिचय, सलगी, जिवलगपणा. **–नी**–वि अर्ध्याआसनाच्या वांटणीचा मान उपभोगणारा; अर्ध्या आसनावर वसण्याची पात्रता असणारा; विशेष स्नेह असलेला. [सं. अर्ध+आसन]

अर्धासा—वि अर्ध्यासारखा, जवळजवळ निम्मा. (गो.) अर्धोंसो. [सं. अर्धसदृश]

अर्धिकभौमिचारी—वि (नृत्य) उजव्या पायामागें डावा पाय ठेवून तो मागच्या बाजूस ओढून घेणें. [सं.]

अर्धी—अर्धे, अर्धी पहा. १ निम्मी–'वडिलांची अर्धी भाकर खाउं धुऊन।' –पला ९.१९. **म्ह०** अर्धी टाकून सगळीला धांवूं नये. २ (मुंबई) एक पै. ३ (गो.) तीन आणे चार पै किमतीचें एक अर्धदर्शक परिमाण. (विरू.) अर्दी पहा. **०कोर**–स्त्री. अदकोर; अर्धकोर पहा. **०पट्टी**–स्त्री ओझें लादलेल्या बैलावरील पट्टी–कर.

अर्धी मांडणी शिरस्ता—पु. शेत करण्यास कुळास देतांना शेताचें निम्मेनिम उत्पन्न व निम्मेनिम सारा मालकानें व कुळानें वांटून घेण्याची रीत.

अर्धीम्हैस—स्त्री चार वेतें दिलेली म्हैस (कारण म्हैस सुमारें आठ वेतें देते. अर्धवट पहा.

अर्धूक—न. अर्धा भाग अर्धेल, निम्मे, निमाई, निमखाई; [सं. अर्ध+क]

अर्धेल—स्त्री. १ (सामा.) निम्मे वांटणी. २ (शेतकी–ज्या पार) उत्पन्नाचा वांटणीतील अर्धा हिस्सा; शेतीच्या उत्पन्नांतील अर्धा शेतमालकाचा व अर्धा कुळाचा हिस्सा, भांडवल पुरविणाऱ्याचा व अंगमेहनत करणाऱ्या इसमाचा–मजुरांच्या परस्पराच्या उत्पन्नांतील किंवा आपसांतील अर्धावाटा. 'शेत अर्धेलीनें केलें आहे.' ३ अशा पद्धतीवर दोन इसमांनी केलेली भागीदारी. अर्धेली ४ लागवड करणाऱ्याने जमीनीच्या मालकास उत्पन्नाचा अर्धा वाटा देण्यासंबंधानें कबुलायतपत्र ५ पैशाची, मालाची अर्धी होण्याची स्थिति; मूळ वस्तूचे (पैसा, माल) अर्धे होणें; निम्मेभांडवलाइतकें **नुकसान** येणें. 'ह्या व्यापारामध्ये मिळकत व्हावी तीतर नाहींच आणि पैक्याची अर्धेली झाली.' ६ निम्मे; निमखाई. [सं. अर्ध+ल] **०तिर्धेल**–स्त्री. १ जमीनीच्या उत्पन्नांतील तिसरा हिस्सा; एकतृतीयांश उत्पन्न २ हें उत्पन्न घेण्याचा खोत वगैरेंचा हक्क. –टिले २.६०४.

अर्धेली-ल्या—वि. अर्धेल करून व्यवहार व तो करणारा (शेतकरी, व्यापारी).

अर्धेवचन—न. तावडतोब फलद्रूप होणारें वचन, वचक किंवा अधिकार. 'तेथें तुझें अर्धेवचन आहे.' **-वचनांत असणें-वागणें**-विनयपूर्वक आज्ञाधारक असणें; अगदीं तत्परतेनें आज्ञा पाळणें.

अर्धोअर्ध—अर्धाअर्ध पहा.

अर्धोत्रा—पु. दरमहा दरशेकडा अर्धा (टक्का) रुपया व्याज किंवा तें घेण्याची पद्धति. (सं. अर्ध+उत्तर=वर किंवा अधिक)

अर्धोदक—न. १ कमरे इतकें खोल पाणी. २ (ल.) उपोषण करून अर्धे शरीर बुडे इतक्या गंगेच्या पाण्यांत राहून प्राणत्याग करणें; जलसमाधि. 'कां बुडोनि प्राण गेले। ते अर्धोदकीं निमाले।' -ज्ञा १८.१९४. [सं. अर्ध+उदक]

अर्धोदय—न. १ एक पर्व. पौष वद्य अमावास्येचा प्रथम भोग, रविवार व श्रवण नक्षत्राचा मध्यभाग व व्यतिपाताचा अंत्यभाग हे योग असतां तें पर्व असतें. याचें पुण्य कोटि सूर्यग्रहणसमान आहे. (धर्मसिंधु) 'हे कृष्ण उद्धव अर्ध मात्रा। अर्धोदयो महायात्रा।' -एभा ५.५५९. २ आकाशस्थ ग्रहांचा किंवा ताऱ्यांचा अर्धा उदय होणें. [सं.]. **-अर्धोदयीं पडणें**-आरंभिलेलें काम अर्धवट होणें, लांबणीवर पडणें; भिजत घोंगडें राहणें.

अर्धोन्मीलित—वि. (काव्य) अर्धे उघडलेले (डोळे, कळी इ.) 'तेथ अर्धोन्मीलित स्थिती। उपजे तया।' -ज्ञा ६.२०३. 'निर्विकल्प समाधि प्रवर्तली। दृष्टि अ० झाली।' [सं.]

अर्ध्य—अर्घ अप. पहा.

अर्पण—न. १ देणें; समर्पिणें २ वाहणें; बक्षीस देणें; बहाल करणें; दान. [सं. ऋ=जाणें प्रयोजक] **०पत्रिका**-स्त्री. ग्रंथ ज्यास अर्पण करावयाचा त्यासंबंधीं मजकूर लिहितात तें पुस्तकांतील पहिलें पान.

अर्पणीय—वि. देण्यास योग्य; देय. [सं.]

अर्पणें, अर्पिणें—उक्रि. १ बक्षीस देणें; इनाम देणें; दान करणें. 'योगी विषय जे त्यागिती। ते भक्त अर्पिती भगवंतीं॥' -एभा २.२८९. २ ओपणें; देणें; वाहणें. अर्पण पहा. [सं. ऋ=जाणें प्रयोजक]

अर्पित—वि. १ उपायन-वायन दिलेलें; दान केलेलें; बक्षीस दिलेलें. २ दिलेला; अर्पण केलेला; वाहिलेला. [सं.]

अर्बा, अर्बा-अशर-मया, अर्बैन—अरबा पहा.

अर्बुज—वि. अर्बुद; दशकोटी. 'एका पासोनि एकु आगळा। ऐसिआं सैन्यां अर्बुजें सोळां।' -शिशु ९.२६. [सं. अर्बुद]

अर्बुज—अरबुज पहा. 'आम्ही तरी श्रेष्ठ तुझे। तीं गौळिये असतीं अर्बुजे।' -कथा ४.६ ५२. 'खेडेगांवच्या बायका म्हणजे अर्बुजें, त्यांस कांहीं कळत नाहीं.'

अर्बुद—वि. दशकोटी. 'अर्बुद गायी देतों अथवा देतों स्वराज्य भोगाया।' -मोआदि ३२.१०. [सं.]

अर्भक—न. १ लहान मूल; बालक; लेकरूं. 'अर्भकाचे साठीं। पंते हातीं धरली पाटी।' -तुगा २१८०. २ (ल.) मूर्ख; वेडसर; मतिमंद; असमंजस माणूस **-की**-स्त्री. लहान मुलगी; अजाण पोर. [सं.]

अर्भाटी—स्त्री. एक काव्यप्रकार. भाटांचीं गीतें यांत रचिलेलीं असतात; आरभटी. 'नेटें गर्जति भाट भाटिव। महाअर्भाटि आरंभिलें।' -असी ८१. [सं. भट्-बोलणें. आरभटी=विशिष्ट लेखन, कथानक, नाट्यविशेष.]

अर्म(र्मा)र-री—आरमार पहा.

अर्यमा—पु १ सूर्य. २ पितृगणांपैकीं मुख्य. 'आणि पितृगणा समस्ता-। माजीं अर्यमा जो पितृदेवता।' -ज्ञा १०.२४४. ३ उत्तराफल्गुनी नक्षत्र. [सं.]

अर्‍या—पु. आऱ्या, बोऱ्या; फजिती.

अर्ब—वि. दहा कोटी [सं. अर्बुद; हि. अर्ब]

अर्ब—स्त्री. (शाप.) दुर्मिळ मृत्तिकाधातूंपैकीं एक धातु. (इं.) अर्बियम. एक रासायनिक मूलद्रव्य; यास गादोलिनाइट असेंहि म्हणतात. [सं.]

अर्वळ—वि. (गो.) फाजील लाडांत वाढलेला; अरवळ पहा. इतर रूपें-आराबाय, आळुबाय.

अर्वाक्-चू—वि. आधींचा; ठरलेल्या वेळेच्या अगोदरचा; पूर्वीचा. -क्रिवि अगोदर; आधीं; अलीकडे. [सं. अर्वै+अंचू-अर्वाच्]

अर्वाक—अर्वाच्य पहा. 'अर्वाकानें फार बोलत्ये हाचि त्रास जाला।' -बयाबाई पृ. ९०. पद ७. [सं. अवाच्य]

अर्वाचिक—वि. (काव्य) कच्चा; अननुभवी; निपुण नसलेला; अकुशल; नवखा; नवशिक्या. [सं. अर्वै+अंच्-अर्वाचीन]

अर्वाचीन—वि. अलीकडचा; सद्य:कालीन; आधुनिक, हल्लींचा. याच्या उलट प्राचीन. 'म्हणितलें या ज्ञानी। अर्वाचिना।' -ज्ञा १३ ४०. [सं.]. **-लेखी**-अलीकडील; अर्वाचीन केलेली; नवीन (भाषा). 'त्याची भाषा अ० आहे' -वैद्यक ७८.

अर्वाच्य—वि. १ नीच; हलकटपणाचें; खेडवळ; घाणेरडें, अभद्र (भाषण, माणूस वगैरे). २ खोडकर; खोडसाळ; खटयाळ; उनाड; उच्छृंखल; द्वाड. 'आमच्या रावबहादुर प्रभृति अर्वाच्य पंडितांनीं आज जो भटांवर इतकीं वर्षे बिचारा सारखा भडिमार चालविला आहे.' -नि १०५५ [सं. अवाच्य]

अर्वाळी—स्त्री. अरवाळी पहा.

अर्ह—वि. अर्हं; योग्य. 'जाला बहु अर्ह कृपेसी।' -दावि ४२८. [सं. अर्ह]

अर्श—पु. चुकीनें अर्ष. १ मूळव्याध. २ वेंड, गळूं. उ० नासाशी; कर्णार्श. [सं.]

अर्शग्रहणी—अतिसार; संग्रहणी; कॉलरा. 'एकार्ते अर्ष ग्रहणी' –गीता १३.२४८८. [सं.]

अर्सा—पु. १ अंतर; आडपडदा; कालावधि; अवकाश. 'लाड कारण वालीस सहेंद्देस दाखल होण्यास अर्सा फार थोडा' –ख ८. ४४३४. २ फेरा; मैदान; क्षेत्रफळ; आंगण. [अर. अर्सा=अंगण, जागा; अवधि]

अर्सेनिक—अरसेनिक पहा.

अर्ह—वि. योग्य; साजणारें; शोभणारें; युक्त; लायक. उ० पूजनार्ह, दानार्ह, पठनार्ह. [सं.]

अर्हळ-तर्हळ—अरळतरळ पहा.

अलक—पुन. केंस; कुरळे केंस. [सं.]

अलकट-पालकट—अलखटपालखट पहा.

अलकतरा—पु. राळ आणि तेल यांचें मिश्रण करून बनविलेला पदार्थ. [अर.]

अलंकरण—न. शोभविणें; भूषविणें; नटविणें; अलंकृत करणें. [सं. अलंकृ]

अलकापुरी—स्त्री. १ आळंदी; ज्ञानेश्वराच्या समाधीचें गांव. (जि० पुणें). २ आळें–ज्ञानेश्वरानें ज्या रेडयाच्या तोंडून वेद म्हणविला त्या रेडयाच्या समाधीचें गांव (जि. पुणें). ३ अलका; हिमालयाच्या उत्तरेकडील कुबेराची राजधानी.

अलकाब—पु. पत्रांमध्यें लिहावयाच्या मायन्यांतील पदव्या किंवा मायने. 'हल्का अलकाब लिहिलियासुळें विषम मानितात.' –दिमरा १.८ [अर. अल्काब, लकबचें अव.]

अलंकार—पु. १ दागिना; भूषण (पोषाखांतील व दागिन्यांतील), रत्नें, दागदागिने, शोभादायक वस्तू इत्यादि. 'अलंकारातें आले। तरी सोनेपण काइ गेलें।'–ज्ञा १४.१२४. २ (भाषेतील) चित्ताकर्षक शब्दरचना, अर्थरचना, उपमा, रूपक, यमक, प्रास, अनुप्रास; इ० मुख्य अलंकार तीन आहेत. त्यांत बाकीचे सर्व प्रकार येतात. जसें:–शब्दालंकार, अर्थालंकार, उभयालंकार. 'अलंकारु म्हणिजे। काय तें नेणें।'–ज्ञा१८.१७६७. ३ (सामा) शोभणारी–शोभा देणारी वस्तु; गुण. 'क्षमा ही समर्थास अ० होय, जशीं चित्रें हीं भितीस अ०' ४ (संगीत) स्वरांची विशेष व नियमित रचना. अलंकारांची संख्या ६८ आहे. स्थायी वर्णाचे ७, आरोही वर्णाचे १२, अवरोही वर्णाचे १२, संचारी वर्णाचे २५, गीतोपयोगी ७, व रागोपयोगी ५. ५ साहित्य शास्त्र. [सं.]

अलंकारणें—उक्रि. अलंकार घालणें; सुशोभित करणें; आरास करणें. [सं. अलंकृ]

अलंकारिक-री—आलंकारिक पहा.

अलकृत—वि. (व.) नाजूक; कोमल; हलुवट. सुकुमार. [सं. अरूक्षित. प्रा. अलुक्खि=कोमल]

अलकृत—वि. एक प्रकारचा मासा.

अलंकृत—वि. शोभविलेलें; विभूषित; सुशोभित; सजलेलें. [सं.]

अलकोल—नवलकोल पहा.

अलक्त-क—पु. लाख; अळता; अळिता पहा.

अलख, अलखनिरंजन—पु. १ अलक्ष; ब्रह्म; त्यावरून ईश्वर. 'अलखमो पलख देखलें मौजा। सब घटमो नाथ विराजा।' –देवनाथ. २ गोसावी लोक भिक्षा मागतांना हा शब्द उच्चारतात. ३ अदृश्य. [सं. अलक्ष्य]

अलखट पालखट, अलखंड पालखंड, अलखण पालखण, अलखत-पालखत—न. चाराच्या आंकड्यासारखी घातलेली मांडी, मारलेली बैठक; आसनमांडी. [सं. प्लेंख=पालखी, पाळणा, पालख द्वि]

अलखालक-ख-खालिक—स्त्री. किनारीदार रू भरलेलें एक वस्त्र. एक प्रकारचा डगला, अंगरखा. –हिंदइ १४६. [तुर्की. अर. अलखालक = अंगरखा]

अलग—वि. वेगळें; निराळें; भिन्न; स्वतंत्र. [सं. अ+लग्, लग्न]

अलग, अलगत—क्रिवि. १ निराळ्या प्रकारें; भिन्नपणें; फटकून; विरळ. २ कशास न लागतां, स्पर्श न होतां; सरळ अडथळ्याशिवाय; तडक (धोंडा, गोळी इ० कोणेक मार्गानें जाणें, उडणें, पाठ म्हणणें वगैरे). ३ पृथक्; दूर. ४ विवक्षित संस्कार–संबंध न होतां (क्रि० असणें, राहणें, ठेवणें). 'माहामारीनें सर्वांचा समाचार घेतला, एवढें मात्र घर अलग राहिलें.' 'जे प्राप्ती तव अलग ठेली।'–ज्ञा ६.४३५. ५ हलकेंच, अचळ; अढाद. ६ स्वतंत्रपणें; मोकळेपणें. ७ लोंबकळत; ओळंबत; अधांतरीं,एकीकडे; एकलकोंडे. 'आमचे यजमान गेल्यापासून आम्ही येथें उगीच अलग पडलों आहों.' [सं. अ+लग्–लग्न]

अलंग—स्त्री. १ लांबच लांब सोपा; चाळ; गोठा; खंदक; तट; फौजेची पागा; रांग वगैरे. 'इकडील अलंग फोडून पलीकडील सफेल फोडून गोळा फा(पा)र झाला.'–होकै २०. २ फरा (लढाईतला). 'रास्त्यानीं एक अलंग धरून' –पया ५४. –ऐपो २७७. ३ बाजार पेठेंतील दुकानांची लांब ओळ, रांग. [सं. अलंघ्य; म. अलग=स्वतंत्र. फा. आलंग्=खंदक. हिं. अलंग=बाजू, मार्ग.]

अलंग—अलेंबी पहा.

अलगट—वि. १ स्वतंत्र; फाजील. 'अलगट बहु होशी ढाल हें काय केलें.।' –सारुह ४.६४. 'अहो सत्यभामे अलगटी। सापे जाहलीस तूं धीटी। परि न मागतां जगजेठी। मणीलागी दीपलीसी ॥'

–कथा ४.१८.११८. ३ द्वाड; कुभांडी. आलघट पहा. [अ+लगत. सं. लग्न; प्रा. लग्ग=जवळ]

अलगड—स्त्री. घोटाळविणारें, मति कुंठित करणारें काम. उद्योग; त्रास; अडचण. (क्रि० पडणें, येणें). २ पेंच; कोंडी; कातरी. [अडगळचा वर्णव्यत्यास ?]

अलगणें—अक्रि. १ (पासून) लोंबकळत किंवा लटकत राहणें (पिकलेलीं फळें वगैरे). २ झुबके, घड किंवा घोस लटकत राहणें– (फळांसंबंधीं). ३ (सामा) ओळंबणें; लोंबकळणें. ४ (कों) पूर्ण पिकून गळावयास होणें. (फळ). 'त्यांतून अलगलेले चांगले चांगले पाड तेवढे भागिरथीचे ओटींत पडले.' –बाळमित्र २.६७. [सं. आ+लग्]

अलंगणें–दुलंगणें—अक्रि. (व.) चुकणेंमुकणें; चुकून राहणें. [अलग द्वि.]

अलगत–द्–ज—अलग पहा.

अलंगनौबत—स्त्री. डंका–निशाण; पहारा. 'ठाणाचे चाकरी अलंग–नोबत करून असणें' 'अलंग नौबतीची सेवा घेणें.' –शारो ५९३. [अर. अलम्=निशाण+अर. नौबत=नगारा]

अलगपीत—क्रिवि. १ एकदम; एकाएकीं; अकस्मात. २ सावकाश; हळूच; अलगत; न हालवतां–हलतां; बेतानें. ३ चोरून; छपून; चोरपावलानें; नकळत. ४ (इतर अर्थांसाठीं) अलग अलगत पहा. [सं. अकल्पित (अप.) अलगत]

अलंगभवरी—स्त्री. पायाच्या एक्या आंगठ्यावर फिरणें. 'देतां छत्रभवरी अलंगभवरी ।' –भाए ४५९ [अलग+भंवरा ?]

अलगरजी–जू, अलगरदी–द्—वि. १ मंद; ढिलाईचा; निष्काळजी; हलगर्जी; अव्यवस्थित; बेशिस्त; विस्कळित; सैल (इसम, उद्योगधंदा). 'परंतु अलगर्जीपणामुळें किंवा दुसऱ्या एकाथा कारणामुळें' –साकेसं ९. २ (विशेषतः अलगरजी) ऱ्हास पावलेला; खालावलेला; वय झाल्यामुळें उतरलेला: चुराडा झालेला; बिनटिकाऊ; हलगर्जी पहा. ३ आपल्या कामापुरतें दुसऱ्याचें बाह्यात्कारीं आजेव करणारा; आपलपोट्या; स्वार्थी. [अर अहल्–ई–गरज.]

अलगरजी–नें—क्रिवि. ढिलेपणानें, सैलपणानें (क्रि० धरणे).

अलगुजें–गूज—नपु. १ एक प्रकारचा पांवा. हें वाद्य बांबूचें किंवा धातूच्या नळीचें असतें. लांबी वीतभर व जाडी पायाच्या आंगठ्याएवढी असते. एक बाजू बंद असून तिला बारीक भोंक ठेवतात. दुसऱ्या बाजूस तिरकस खाप पाडून पायरी करतात व त्यांत गाबडी बसवून वाजविण्यासाठीं चीर ठेवितात. तोंडापासून चार बोटांवर वाटाण्याच्या आकाराची सहा भोंकें समान अंतरावर पाडतात. तोंडापासून तीन बोटांवर चौकोनी भोंक ठेवितात. तेथपर्यंत गाबडीचा तुकडा एकचतुर्थांश भोंक शिलक राहील इतका असतो. विरुद्ध बाजूस पहिल्या व दुसऱ्या भोंकाच्या मध्यावर एक भोंक ठेवतात. शिपी तोंडांत धरून फुंकलें म्हणजे नळी वाऱ्यानें भरते व हाताचीं बोटें भोंकांवर ठेवून इच्छित स्वर काढून हवें तें गीत वाजवितात. बांसरी, मुरली हींहि याच जातींतील वाद्यें आहेत. २ खोगीराच्या दोन्ही बाजूंना पाठीवर जोडणारे नवारीचे पट्टे. [फा. अलयुजह]

अलंघन—न (संगीत) रागविस्तार करतांना एकादा स्वर पूर्णपणें घेणे. [सं.]

अलंघनीय–अलंघ्य—वि. (अक्षरशः किंवा ल.) ओलांडून जाण्याला कठिण: दुर्लंघ्य; उल्लंघन करण्याला कठिण [सं.]

अलटापालट—स्त्री. मागचें पुढें; आधीचें मग; उलटा पालट पहा. [प्रा. अलट्टपल्लट्टः पाल्ट द्वि.]

अलड—अल्हड पहा.

अलतड—स्त्री. ऐलतड; नदीची अलीकडची बाजू; अल्याड. [सं. आदि–ल+तट]

अलतमघा—स्त्री. राजानें दिलेली इनामी जमीन, सनद, वंशपरंपरागत जहागीर. –पया २३. [तुर्की अल्तमघा=तांबडा झिका]

अलताभलता—वि. कोणी तरी; अलबत्या गलबत्या; गोमाजी तिमाजी; गैरमाहितीचा; अनोळखी. [भलता द्वि.]

अलंदुनिया—(विप्र.) अलमदुनिया पहा.

अलप—पु. (व.) बैलांचा सरकी, ढेप, वगैरे खुराक. [सं. अल्प (खाद्य)]

अलपल्लव–हस्त—(नृत्य) उपपद्मक पहा.

अलंप्रतीति–स्त्री., **अलंप्रत्यय**—पु. पुरेसेपणाची जाणीव; समाधान; तृप्तता; शांति. [सं. अलम + प्रतीति]

अलफ—वि. एक हजार. (अरबी सालाबाबत उपयोग) [अर. अल्फ्=एक हजार]

अलबत्–त्तां—क्रिवि. १ खात्रीनें; जरूर; खरोखर; निश्चयानें; निश्चितपणें; खास; अगत्यपूर्वक; हमखास. 'एथें गुरांचा उपद्रव आहे तेव्हां अलबत कुंपण केलें पाहिजे.' 'हे गृहस्थ संभावित, शांत आणि अलबता जमाखर्चाचे कामांत हुशार असलेच पाहिजेत.' –विक्षिप्त १.१४४. २ निदानपक्षीं; निदान; कमींतकमी (रकम, संख्या). 'अलबत शंभर रुपये तरी पदरीं असावे तर घर बांधावयास आरंभावें.' [अर. अलबत्ताह्]

अलबत्या–गलबत्या—पु. कोणीहि; कोणीतरी; भलतासलता; साळकोजीमाळकोजी; गोमाजीसोमाजी. यःकश्चित्, लुडबुडया माणूस: अलतुफालतु; अव. अलबतेगलबते 'खुद्द त्याच्या कुटुंबांत चार पांच माणसें आहेत परंतु पंक्तीला पंचवीस अलबते गलबते असतात' कधीं विशेषणार्थी उपयोग. 'कित्येक अलबतीं गलबतीं माणसें किल्लेदारांच्या घरीं येऊन रहात.' –कोरकि ८०. [गफलत–गफलत्याची द्विरु. किंवा अलबत–त्या द्वि.]

अलबम—पु. चित्रवही; चिकटवही; चित्रे, फोटोग्राफ वगैरे एकत्र ठेवण्याचें (संग्रह) पुस्तक; यांत प्रसिध्द पुरुषांचे फोटो, तसेंच स्वदस्तुरचे लेख, गद्यपद्यांतील वेंचे वगैरे ठेवतात. [इं.]

अलबला—अलाईबलाई पहा.

अलबलीत गलबलीत—वि. ढिला; मंद; सैल; अव्यवस्थित; विस्कळित [सं. गलित द्वि.]

अलंबीं—क्रिवि. (कों.) आधारावांचून; निराधारीं; अनिश्चित; धोक्याच्या ठिकाणीं (फांदीच्या टोंकावर, कडयाच्या कांठावर). [सं. आलंब]

अलंबुद्धि—स्त्री. समाधान; तृप्ति; तृप्तता; तृप्ततेची भावना; शिसारी. [सं. अलम्=पुरे+बुद्धि]

अलबेल—स्त्री. सर्व नीट सुरळीत चालले आहे अशी हमी; अहवाल; हालहवाल. 'अलबेलीचे शब्दातें।' –संग्रामगीतें १५४. 'पालेमेंटच्या माहितीकरितां प्रति दहा वर्षीं हिंदुस्थानची अलबेल कशी आहे याचा रिपोर्ट असतो.' –टि १.३२९ [इं. ऑल्‌बेल्]

अलबेला—वि. १ हलका; हवेशीर; बेफिकीरीचा (कपडा, गति). २ सैल; पोकळ; ढिलें (गाठोडें, बोचकें, काम). ३ कमजोर; जुजबी; दिखाऊ (इमारत). ४ अक्कडबाज; नखरेबाज (इसम). ५ सुंदर; रंगेल; प्रिय; लाडका. 'तो जिवबादादा बक्षी अलबेला।' –ऐपो २८३. ६ मोघम; पुळपुळीत; अनिश्चित (भाषण). 'त्यास खसखशीत ताकीद कर, उगीच अलबेलें सांगून येऊं नको. [हि. अलबे(भे)ला=अकृत्रिम; निरपराध (मूळ अर्थ)]

अलबेली—स्त्री. रंगेल स्त्री; चालक भवानी; चटकचांदणी.

अलबेलीं—क्रिवि. सहजासहजीं.

अलभ्य—वि. मिळण्याला, लाभण्याला कठिण; संपादन करण्याला कठिण, अशक्य. [सं.] ०**लाभ**–पु. लाभण्याला अशक्य, अटकळीच्या बाहेर किंवा असंभवनीय असा लाभ; अनपेक्षित फायदा; दुष्प्राप्य मिळकत; केवळ दैवयोगानें झालेला लाभ. [सं.]

अलम—झेंडा; निशाण. 'भांडीं, फिरंगा; अलम, निशाण' –मेस्तक–पुस्तक; जमेलेखन १३९. [अर. अलम्]. ०**खाना**–पु. वाद्यशाळा; छत्र, पालखी, चवरडोल, हौद, निशाणें इ. सामान ठेवण्याचें ठिकाण.

अलम—पु. लहान पागोटें; बत्ती (मुलांकरितां). [अर. आलम=मुलें ?]

अलम—१ जग; लोक; जनसमुदाय. २ काळ; स्थिति; अंमल. आलम पहा. [अर. आलम=जग] ०**गीर**–पु. जगज्जेता; औरंगजेबाची पदवी. ०**दुनिया**–स्त्री. सर्वजग; मानवी जात. 'तुमच्या शिवाय हें कृत्य झालें नाहीं हें मीच काय पण अ० म्हणत आहे.' ०**दुनिया झुकणें**–(विशिष्ट प्रसंगीं) मनुष्यांची अलोट, गर्दी होणें. [अर. आलम+दुन्या=जग] ०**पन्हा**–वि. जगरक्षक. [अर. आलम्पनाह्]

०**रोशन**–वि. जगाला प्रकाशविणारा; जगद्विख्यात. 'त्याचा फायदा तो अलम–रोशन आहे.' –पया.

अलमक—क्रिवि. (व.) नेमका. [अर. अलामत्=खूण ?]

अलमगिरी पैसा—पु. औरंगजेबाच्या शिक्क्याचा पैसा.

अलमदांड—वि. अतिशय उध्दट, दांड; आडदांड; अति मस्त; धिंगाणा घालणारा. [अर. आलम्+म. दांड]

अलमारी—स्त्री. १ खण असलेलें कपाट. २ (ल.) सांठा; संचय; तिजोरी. [पोर्तु. अल्मारिया. इं. अल्मारी; स्कॉच ऑम्‌री; हिं. अल्मारी]

अलम्—क्रिवि. पुरे; बस्. [सं.]

अलर्क—पु. १ पिसाळलेला कुत्रा व त्याच्या चावण्यापासून होणारा रोग. २ रुईचें झाड. [सं.]

अललल—उद्गा. अचंबा–आश्चर्य दर्शविणारा उद्गार;अरर;अबब. –मोर प्रहसन २८. ०**दुर्र**–उद्गा. पौराणिक नाटकांत देव व राक्षस यांची लढाई चाललीं असतां अललल्लदुर्रं असें राक्षस ओरडत असत म्हणून पौराणिक नाटकाला अललल्लदुर्रंचीं नाटकें म्हणत असत. [सं. अलले=पिशाचादींचा अर्थशून्य उद्गार]

अललित—वि. (गो.) ढळमळित. [सं. आ+लल्=हलणें]

अलल्हिशेबी—वि. चालू हिशेबी. 'अलल् हिशेबी वसूल.' –रा २२.७३. [अर. अल्हाल=चालू+हिसाब्]

अलवण–णी—वि. बिगरमीठ; अळणी; 'एकें नुसतीं अलवणें। बरवेपणें मिरवतीं॥' –एरुस्व १४.१०५. 'हरिप्राप्तीविण प्रवृत्तिक ग्रंथ। काय कविता अलवण ते।' –ह २१.२४. [सं. अ+लवण]

अलघर तालघर, अलघार तलघार—न.पु. अव. थोर किंवा सन्माननीय समजून वागविणें; शिष्टाचार करून व सभ्यपणा दाखवून मोठेपणा राखणें किंवा मोठेपणानें वागविणें. (क्रि० करणें, ठेवणें, राखणें). [अर. तालीवार=नशिबवान्. तालवर द्वि.]

अलवान—स्त्री. न. १ एक प्रकारची शाल. २ एक प्रकारचें तांबडें कापड. [अर. अलवन (लवन=रंग. अव.)=अनेक रंगी. तुल० सं. आरक्तवर्ण; प्रा. आलवण्ण]

अलवार—वि. (व.) कोमल; अरुवार–ल पहा. 'अधिकचि तें अलवार जाहलें।' –विक ५५.

अलस—आळस पहा.

अलसंदा—पु. अळसुंदा; चवळीसारखें मोठें कडधान्य. [का. अलसंदी]

अलसिका—स्त्री. १ पेटके आणणारी महामारी; कॉलऱ्याची दुसरी अवस्था; पेटके; विषूचिका पहा. [सं.]

अलक्ष—अलख पहा. 'ते संधीस गोरक्ष जाऊन। अलक्ष आदेस जल्पतसे।' –नव ९.११०. [सं. अलक्ष्य]

अलक्षण—(प्र.) अवलक्षण पहा.

अलक्षपण—न. लक्षांत न येण्याजोगी स्थिति; दुर्ज्ञेयता. 'बोलता ना उगला। अलक्षपणें ॥' –ज्ञा १३.१११९. [सं.]

अलक्षित—वि. अटकळ किंवा अनुमान न केलेलें. (बहल किंवा विषयीं) लक्ष न दिलेलें; न शोधलेलें; न पाहिलेलें; अकस्मात्. [सं.]

अलक्ष्मी—स्त्री. दुर्दैव; दुर्भाग्य; दारिद्र्य; विपत्ति; अवलक्ष्मी; अक्काबाई. लक्ष्मी आणि अलक्ष्मी या दोन बहिणी असून त्या समुद्रांतून निघाल्या अशी सार्वत्रिक समजूत आहे. पहिलीनें विष्णूशीं लग्न लाविलें व दुसरी नवरा पहात दारोदार भटकते. ज्येष्ठा व कनिष्ठा पहा. [सं.]

अलक्ष्य—न. १ दुर्लक्ष; गैरसावधता; अनवधानता. २ परमेश्वर; ब्रह्म. –वि. (अप. अलक्ष); कल्पनातीत; दुर्बोध; अज्ञेय; अतर्क्य. 'ध्वजवज्रांकुशरेखा। चरणींची सामुद्रिकें देखा। न वर्णवतीं सहस्रमुखा। ब्रह्मादिकां अलक्ष्य ॥' –एरुस्व १.२२. ०**लेखणें–धरणें–मोजणें–मानणें–पाहणें–जाणणें**–किंमत न देणें; क्षुद्र किंवा क्षुल्लक मानणें; तिरस्कारणें; अनादरणें; अवज्ञा करणें. [सं.]

अलक्ष्या—स्त्री. योग्याची एक मुद्रा. मुद्रा पहा. [सं.]

अला—पु. वैभव; श्रेष्ठता. –वि. सर्वश्रेष्ठ; सर्वज्ञानी. [अर. अला]

अलाईबलाई, अलायबलाय—स्त्री. सर्व दुःख–त्रास–पीडा; इडापिडा; संकट; दृष्ट काढण्यासाठीं दिवे ओवाळतांना किंवा कानशिलावर बोटें मोडतांना अनिष्ट निवारण व्हावें म्हणून असें म्हणतात; (यावरून) दृष्ट काढणें. (क्रि० घेणें). 'मातुश्रीनीं अलायबलाय घेऊन मस्तकीं विजयहस्त ठेवला' –चित्रगुप्त ११. अव० अलायाबलाया. 'तुका म्हणे वपु काय घेतो अलाया बलाया।' [अर. बला=दुर्दैव द्वि. तुल० सं. अलात–अलाय=कोलीत]

अलागत—अलगत पहा.

अलांछन—वि. कलंकरहित. 'चंद्रमे जे अलांच्छन।' –ज्ञा १८.१७९८. [सं. अ+लांछन]

अलॉट—सकि. वाटणें (कंपनीचा भाग; पैसे वगैरे). ०**मेंट**–स्त्री. वाटणी; वांटा; भाग. [इं.]

अलाड—क्रिवि. अलीकडे; येथें; इकडे; ह्या किंवा जवळच्या बाजूस; अलतड पहा. ०**पलाड**–क्रिवि. अलीकडे पलीकडे; इकडे तिकडे; ऐल पैल. [सं. आदिल–अहल+तट]

अलांडाबलांडा—पु. अडथळा; विघ्न. 'नसता अ० व जेवे वेठबिगारी मनस्वी बालून तगादा करिताति.' –मसाप २.३९६.

अलाणटप्पू, अलालटप्पू—पु. १ निष्काळजीपणें, उनाडपणें भटकत राहणारा इसम; उडाणटप्पू. २ आयतगब्रू; आयता; ऐदी.

अलात—न. (नाविक) १ वल्ह्याचें पातें किंवा फळी. २ तारवें पाण्यांतून जमीनीवर ओढण्याची जाड व बळकट दोरी. [सं. अरित्र=वल्हें; प्रा. अलित्त; अर. आलत्=हत्यार, साधन, नावेचा दोर]

अलात—न. कोलीत; मशाल. [सं.] ०**चक्र**–न. कोलीत गरगर वाटोळी फिरविली असतां दिसणारें चक्र; अग्निचक्र. 'जैसें अ० फिरे। तैसा हनुमंत असुरांत वावरे ॥'

अलात(आकाश-चारी)—स्त्री. (नृत्य) पाय पाठीमागच्या बाजूला वळवून चोहोंकडे आंतल्या आंत फिरवून बाजूस टांचेच्या आधारावर टेकणें. [सं.]

अलात(करण)—न. (नृत्य) उजवा पाय अलात करणें व उजवा हात वक्षःस्थलावर ठेवून उंच करून खालीं सोडणें व ऊर्ध्वजानुचारी करणें. [सं.]

अलातक(अंगहार)—पु. (नृत्य) स्वस्तिककरण करून व्यंसितकरणाप्रमाणें हात ठेवणें. नंतर क्रमानें अलातक, ऊर्ध्वजानु, निकुंचित, अर्धसूचि, विक्षिप्त, उद्वृत्त, आक्षिप्तक, करिहस्त व कटिछिन्न हीं करणें.

अलाद—स्त्री. गंजीफांतील एक संज्ञा. –मोको

अलाद, अलादि—अचानक; अलग्न पहा. 'स्वस्थ गच्छलों, अलाद ठकलों।' –अमृत पृ. २८.

अलादा—(व.) अलाहिदा पहा. 'वराता तीन अलादा अलादा सावकाराचे नांवें होत्या.' –मदधा २.३४.

अलाप, अलापिणें—आलाप, आलापिणें पहा.

अलाबला—अलाईबलाई पहा. 'अलाबला कुणी घेउन आनंदें, लिंबलोण उतरिती। आभर्णे कुणी चहुकुन आवरती।' –प्रला २३२. 'मी एकटा मेलों तरी शिवाजी राजे यांची अलाबला गेली; लाख मरावे परंतु लाखांचा पाळणारा कायम रहावा.' –मदरु १.५४. 'तेव्हां वाटलें कीं सारी अलाबला टळली म्हणून.' –भा १०४.

अलाबु—पु. दुध्या भोपळा. 'बुडतां जों चिंतेच्या झालें अद्भुत अलाबु ओघीं तें।' –मोसभा १.७६. [सं.]

अलाभ—पु. १ लाभ, मिळकत न होणें. २ जरूरी; पाहिजे असणें; अभाव, वाण. 'तुमच्या भेटीचा अलाभ होता ती प्राप्त झाली!' 'राज्याला कशाचा अलाभ नाहीं.' [सं. अ+लाभ; लभ्=मिळणें]

अलायी—वि. प्रचंड; व्यापक; अलिजाही. ०**कारखाना**–पु. मोठा कारखाना; फाकटपसारा; प्रचंड तयारी; मोठें प्रदर्शन; डामडौल; व्याप. [अर. अला=मोठा]

अलारशी—अल्लारशी पहा.

अलार्म—पु. १ भयाची हांक; ओरड; सूचना (धोक्याची). २ गजर. **०क्लॉक-वॉच**–न. गजरी घड्याळ. **०बेल**–स्त्री. भयसूचक घंटा; हुलीचा नगारा. [इं.]

अलालनामा-हिशेब—पु. १ चालू हिशेब; देण्याघेण्याचा किंवा अगाऊ दिलेल्या रकमांचा हिशेब; चालू खातें. २ (विशे. अलालनामा) कच्चा हिशेब, ठांचण. –क्रिवि. अशा हिशेबाप्रमाणें–रीतीनें. [अर. अल्हाल=चालू, वर्तमान]

अलावत—स्त्री. (कु.) बायको.

अलावत लावणें—(व.) एकादा जड पदार्थ ओढण्याकरितां बैलाच्या जोड्या लावणें.

अलावन्स—पु. भत्ता; मुशाहिरा. [इं.]

अलाव—पु. १ मोहरमांत डोल्यांच्यापुढें जी खांच खणतात ती. या खाचींत आग पेटवून मुसलमान लोक तिच्याभोंवतीं नाचतात. २ आगटी; नगारा, चौघडा तापविण्याची जागा. [सं. अलात; हिं. अलाव]

अलाहिदा—वि. अलादा; वेगळा; निराळा; भिन्न; पृथक्; विभक्त; स्वतंत्र. अलादा पहा. –क्रिवि. वेगळेपणें; भिन्नपणें; अलगपणें. [अर.] **०जमा**–स्त्री. स्वतंत्रजमा, जमीन महसुल सोडून आलेली इतर बाबींपासूनची जमा.

अलि—पु. भुंगा; भ्रमर. 'बोधमदामृत मुनी–। अली सेविती ॥' –ज्ञा १.१६. [सं.]

अलिक—न, कपाळ; ललाट; भाल. 'भीमातें वाहनि गुरूनें नाराच हाणिला अलिकीं।' –मोद्रोण ११.६३. [सं.]

अलिकडचा-ला—अलीकडचा पहा.

अलिखित—वि. लेखी नसलेला (कायदा, ठराव, नियम). (इं.) अन् रिटन. [सं.]

अलिजाहां, अलिशा—अलीजाहां; आलिशा पहा.

अलिता—पु. १ लाख वगैरे पदार्थांचा रंग; अळिता; याचा तांबडया शाईप्रमाणें उपयोग होतो. बायका पायांनाहि लावितात. २ अलित्याच्या रंगांत बुडविलेला कापूस. ३ अर्धे सुती व अर्धे रेशमी असें कापड. [सं. अलक्तक. प्रा. अलत्त. तुल० द्रा. आल = लाल कमळ]

अलिंद—पु. घराच्या पुढील ओटा; देवडी; महाद्वारावरील गोपुर. 'अलिंदीं नंदाचें घन, रुचिर चैतन्य मिरवे।' –सारुह १.५७. [सं.]

अॅलिनिएशन ऑफिस—न. इनामासंबंधीं तपास करून निवाडा देणारी कचेरी; इनाम इन्साफ खातें. [इं.]

अलिप्त—वि. १ न चोपडलेलें–माखलेलें; भ्रष्ट न झालेलें; निर्मळ. २(ल.) दुष्कृत्यें करून पुन्हां शुद्ध किंवा पवित्र दिसणारें. **म्ह०** करणी-करून अलिप्त. ३ संलग्न, संयुक्त न झालेला; वेगळा; निराळा; अलग. 'आतां ऐक वो सुंदरी। परमात्मा अलिप्त चराचरीं। संयोग वियोगाची परी। न धरी संसारीं सर्वथा ॥' –एरुस्व १३.६१. [स. अ+लिप्=माखणें] **०पणा**–पु., **स्थिति**–स्त्री. अलिप्त असण्याची अवस्था; अनासक्तता; पवित्रता. 'अलिप्तपणाचा निश्चयो। बोलिला असे ॥' –दा १.१.७.

अलिंब—अळंबें पहा.

अलिशान—वि. प्र. आलीशान; उच्च मानाचा, दर्जाचा. [अर. फा. आली+शान्]

अलीक—वि. खोटें; असत्य. –पु. खोटा, लबाड माणूस. 'काय अलीका ? सगळी प्रीति लटकी ती ठरली !' –मेमं ३. [सं.]

अलीकडचा, अलीकडील—वि. १ ह्या किंवा जवळच्या बाजूचा. २ हल्लींचा; थोडया दिवसांचा: नवा, आधुनिक; अर्वाचीन. [सं. आदिम–ल; प्रा. आइल्ल+कट–कड]

अलीकडून—क्रिवि ह्या किंवा जवळच्या बाजूनें; इथून. २ (अमुक–मागील काळापासून) आतापावेतों; अमुक काळापुढें.

अलीकडे-स—क्रिवि. १ ह्या किंवा जवळच्या बाजूला; येथें; इकडे. २ या काळात; सांप्रत; हल्लीं.

अलीगोल—पु. गोलंदाज: तोफची. 'पुण्याहून बारूद आली त्याजबरोबर अली–गोल दोनशें नवें माणूस आलें.' –ख १२, ६३४४. [फा. अहलिगोल्]

अलीजाहां—वि. १ भव्य; विस्तीर्ण; डौलदार; दिमाखी; छाप बसविणारा (कारखाना, व्यवहार, कारभार वगैरे). २ थोर पदवीचा (सरदार). ही पदवी निजामास आहे. [अर. आली+जाह्] **०दरबार**–पु. **अलीजाही**–स्त्री. अवाढव्य थाटमाट. २(ल.) अव्यवस्थित व अंदाधुंदीचा कारभार (वैभवशाली). 'जुन्या लोकांच्या तोंडून...मोगलाईची तारीफ कधीं कधीं ऐकूं येते ती काय तर अंदाधुंद कारभार ! अलीजाही कारखाना।' –चिपळूणकर लेखसंग्रह. 'ही अलीजाही आम्हास पुरती भोंवून तिनें अगदीं अन्नास मोताद करून टाकलें आहे.' –केसरी. **०बहादर**–पु. १ एक पदवी. ही शाहाआलमनें महादजी शिंदे यांस दिली. ही ग्वाल्हेरकर शिंदे अद्यापि बाप रतात. २ (ल. उप.) थोरगृहस्थ; बडे लोक. [अर फा. आलीजाह्]

अलीफ—अ या उच्चाराचा अरबी पहिला वर्ण, पत्राच्या डोक्यावर मराठींतील श्रीकाराप्रमाणें लिहितात. [अर. तुल० ग्रीक अल्फा; हिब्रू अलेफ=बैल]

अलीशान—अलिशान पहा.

अलुका-पु., की—स्त्री. व्यंजन; मूक; आलुका पहा. –वि. भुकेलेला. [सं. अलुच्]

अलुता-त्या—पु. तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळावंत, डोरी, ठाकर, घडशी, तराळ, सोनार, चौगुला हे बलुत्याच्या खालच्या वर्गाचे १२ कामगार होत. ग्रॅन्टडफच्यामतें सोनार, जंगम,

शिंपी, कोळी, तराळ, वेसकर, यांचा हक्क महारापेक्षां निराळा. माळी, डवऱ्यागोसावी, घडशी, रामोशी, तेली, भिल्ल, सांबोळी, गोंधळी यांना नारूकारूच्या उलट अशी संज्ञा आहे. शेतकऱ्यांकडून यांना जें धान्य हक्क म्हणून मिळतें त्याचें प्रमाण ठराविक नाहीं. यांतील सोनार सरकारी नाणीं पारख करणारा पोतदार होय. तराळ म्हणजे पाटलाजवळ सतत हजर असणारा, सरकारी अधिकाऱ्यांची सरबराई करणारा, त्यांचें सामान वाहणारा महार होय. बाराच्या बारा अलुते कोळ्याहि खेड्यांतून क्वचितच सांपडतात. कोठें कोठें वाजंत्री, गारपगारी वगैरे नवीन अलुतेदार आढळतात. बलुता पहा. [बलुता द्वि.]

अलुतींबलुतीं—न.अव. अलुतेदार व बलुतेदार या गांवकामगारांना असणारे वतनी हक्क.

अलुदा—वि. १ मिश्रित. २ (ल.) जुळणारा; परिचित. ३ (ल.) दूषितपणें, अपवित्रपणें मिसळलेला. [फा. अलुदाह्=खराब झालेला]

अलुबुखार—पु. एक प्रकारचें अंबूस व रुचकर फळ व त्याचें झाड. झाडापासून बाभळीच्या गोंदासारखा डिंक निघतो. बियांपासून काढलेल्या तेलाचा उपयोग जाळण्याकडे करतात. त्याचें फळ वाहेरून तांबूस व काळसर असतें. मेह, गुल्म, अर्श, ज्वर, वायु यांचा नाश करतें. –वयु १.४७. [फा. आलु=गड्डा+बुखारा. सं. अलुक]

अलुलकी—स्त्री. मोहबत; कृपा; मेहेरबानगी. [फा.]

अलुलित, अलुल—वि. बुजट;नाचरा;बुजरा; रगेल;फुलल्या; मस्त (ठाणबंद घोडा). [सं. आ+लुल्=लोळणें]

अलें—न. आलें; ओली सुंठ; अलें हें पाचक, सारक, अग्निदीपक, रुचिप्रद व कंठास हितकर आहे. सूज, कफ, वायु, कंठरोग, खोकला, दमा, मलबद्धता, वांति, शूळ यांचा नाश करतें. अलें हिंदुस्थानांत सर्व प्रदेशांत होतें. याच्या झाडाच्या मुळयांस शेंगाप्रमाणें अल्याचीं कुर्डी येतात. **अल्याचा चटका**–पु. अलें धुवून बारीक किसून तुपांत परतून त्यांत सैंधव, मिरीं किंवा मिरची, जिरें, शहाजिरें यांची पूड घालून हरबऱ्याचें पीठ लावून तूप–हिंगाची फोडणी देतात. **०पाक**–पु.अल्याचा तयार केलेला एक औषधी पाक. हा श्वास, कास, अग्निमांद्य, अरुचि, यावर प्रशस्त आहे. [सं. आर्द्रक; प्रा. अल्लय; अद्दअ; द्रा. अल्ल; हिं. अदरख–क; बं. आदा; गुज. आदुं]

अलेकमूसलाम—उद्गा. तुम्हाला सुखशांति लाभो ! असें मुसलमानांत एकमेकांस भेटतांना नमनार्थी म्हणण्याचा प्रघात आहे. [अर. अलैकुम्–अस्सलाम]

अलेख—अलख पहा.

अलेंबिक—न. अर्क काढण्याचें यंत्र; आसुतिपात्र; ऊर्ध्वयंत्र. उ० अलेंबिक केमिकल कंपनी. [इं. प्री. अंबिक्स; अर. अल्+अंबिग=अर्कयंत्र; फ्रें. अलंबिक; तुल० सं. अंभस्]

अलेमान—स्त्री. दोन हात लांब व कांहींशी बांकदार पात्याची उत्कृष्ट पोलादी तलवार. [अर. अल्–अमान=जीवदान मागणें, किंवा अलामान=जर्मन माणूस. लॅ. अलेमन्नी; जर्मन अल्समन्नेर= एक लढाऊ जात]

अलेल—वि. (कों.) पक्का; अट्टल; अस्सल (सोदा, लुच्चा, चोरटा, लबाड, शिनळ, बटक्या, मस्त्या या शब्दांबरोबर विशेषतः उपयोग). **०टप्पू**–(ना.) उडाणटप्पू; उनाड; भटक्या. [?]

अलैय्या—पु. (संगीत) एक रोग. या रागास षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम व पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत मध्यम वर्ज्य. जाति षाडव संपूर्ण. वादी स्वर धैवत व संवादी गांधार आहे. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. अवरोहांत कोमल निषाद घेतात. हा एक बिलावलाच्या प्रकार आहे. [हिं.]

अलोचणें—सक्रि. १ न पाहणें. २ हलक्या सांगणें (?). ' सांगतां आपुली गुह्यगोष्टी । अलोचावया वेगळा नुठी । ' –एभा ११.१०३६. [सं. अ+लोचन]

अलोचन जागरण—न. डोळे न मिटतां रात्रभर केलेलें जागरण; अखंड जागर. [सं. अ+लोचन+जागरणम्]

अलोट—वि. १ मागें न परतणारा–पडणारा; फरक न पाडणारा; न बदलणारा–उलटणारा–फिरणारा; २ दुर्निवार; अनिवार्य. ' आतां घेई शाप दुर्गम । जो कां अलोट हरिहरां । ' मुआदि १९. ६८; ' मग तिनें शापिलें त्यातें । जो अलोट हरिहरातें । ' ३ अनिर्वचनीय; अचाट;अपरंपार; अतिशय. ' कीं गगन चक्र उठावलें अलोट । काळरात्रीचें । ' –शिशु ९३१. ४ अचूक; खरें. ५ निश्चित; दृढ. ' जेणें चैतन्य ईश्वरा ब्रह्मा । देहचि केलें परमसीमा । तया आत्मा कर्ता हे प्रमा । अलोट उपजे ॥ ' –ह्रा १८.३८२; –एभा २०. ११३. ६ अनुल्लंघनीय; दूर टाकून देतां न येणारें; अतिरस्करणीय, ' त्या आज्ञा अलोट माते ' [सं. अ+लुट्=लोटणें]

अलोट—पु. अधिक परिचय किंवा तरबेजपणा; निपुणता; अनायासानें–संवयीनें आलेला शहाणपणा. [सं. आलोडय]

अलोटणें—क्रि. करणें; बजावणें; साधणें,लोटणें. ' हें काम मला अलोटणार नाहीं ' [सं. आलुट्]

अलोढणें—सक्रि. १ आलोडणें; धुंडाळणें; शोधणें. २ सर्व संदर्भ जमून येणें ? –मनको. ३ पारंगत होणें; हस्तगत करणें; आलोडन करणें. [आलोडन. सं. आलुट्-ढ्-ड्]

अलोणि—अलवणी पहा. ' अलोणि कीं जाहलें क्षारें । क्षणोनि चाखिलें जिव्हाग्रें । '–कथा ४.१२.८३. [अलवण=अलोण=अलोणी]

अॅलोपॅथी—स्त्री. विषमचिकित्सा; भिन्न किंवा उलट स्थिति होईल अशाप्रकारें औषधोपचार करून व्याधिनाश करणारी पद्धत. याच्या उलट होमिओपॅथी. [इं.]

अलोभ—वि. निर्लोभ, लोभ रहित. –पु. प्रेमाचा किंवा प्रीतीचा अभाव. 'तुमचा ऐलीकडे अलोभ दिसतो.' [सं.]

अलोलकी—स्त्री. १ अति चाहा; महत्त्व; किंमतवान किंवा अमोलिक समजून अतिशय घेतलेली काळजी; आवड; प्रेमळपणा; भावना; लडिवाळपणा; मान; किंमत. (क्रि० करणें). २ (व.) कौतुक; हौस; लालनपालन; लाड; आवड.

अलोलिक—न. १ अलोलकी पहा. 'सर्वत्रांसी भजनाची अलोलिक।' –सप्र ८.९१. –वि. चमत्कारिक; आश्चर्यकारक; नावीन्याचें; कौतुकास्पद; अपूर्व. 'रामावेगळें अलोलिक। तां मज दिधले तिन्ही लोक।' –वेणासीस्व १.३८. २ प्रेमळ; आवडतें; हृदयंगम; लडिवाळपणाचें (भाषण, चालरीत, वागणुक). 'पुढील कथा अलोलिक।' –एरुस्व १०.१००. ३ सुंदर; नाजुक; सुकुमार; उत्कृष्ट (माणूस, स्वभाव). 'ते महालावण्यरूपकळा। शृंगारें आथिली मंगळा। चंद्रवदनीं तेजकळा। अलोलिक॥'–कथा २.११. २०. [सं. आलोलिक]. ०**तालोलीक**–न. लाड; लडिवाळपणाची वागणुक; कोड पुरविणें; कौतुक करणें; खुशामत करणें; मिजास पुरविणें. 'मी नवऱ्याचें अलोलिकतालोलीक कोठपर्यंत करूं?' [अलोलीक द्वि.]. ०**रचना**–स्त्री. अपूर्व रचना–घडण. (विशे. सृष्टीची) 'अलोलिक रचना दाखविली।' –व्यं. १० [सं.]

अलोलुपत्व—न. अनासक्ति; निर्लोभता; लोभ नसणें; निरिच्छा; 'अलोलुपत्ववशा ठाउकी। जाण ते हे।' –ज्ञा १६.१६७. [सं.]

अलौकिक—वि. १ चमत्कारिक; जगाविरहित; लोकोत्तर; अद्वितीय; विलक्षण; अपूर्व; असाधारण (इसम, क्रिया, गुण, दोष वगैरे). 'विश्व हें मोहरें लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रति।' –ज्ञा ३.१७१. २ अरण्यवासी; लोकांत (जगांत) न राहणारा. –पु. दुर्लौकिक; दुष्कीर्ति; अपमान; फजिती; सार्वत्रिक अनादर. [गं.]

अलू—१ अरबी भाषेंतील षष्ठीचा प्रत्यय, चा, ची, चे. उ० अल् बेरुनि=बेरुनीचा. २ इंग्रजी 'दी' प्रमाणें निश्चितार्थी उपपद. उ० अलेंबिक–अल्=उपपद+अंबिग=आसुतिपात्र.

अल्क—कल्याव; खार; क्षार; अम्लप्रतियोगी. (इं. अल्कली) अल्क पदार्थांचे विशिष्ट गुणधर्म: हे पाण्यांत विरघळतात; अम्लाचें निगुणीकरण करतात; सेंद्रिय पदार्थांला जाळतात वगैरे. अल्क किंवा अनाम्ल याची क्रिया अम्लावर केल्यास अम्लांतून उज्ज निःसारित होऊन पाणी बनतें. [अर. अल्+कलिय्=भाजणें, राख]

अल्कल, अल्कहल—पु. अल्क; अल्कोहल; मद्यार्क. [अर. अल्+कोह्ल=सुरमा, तुल० सं. कल्या=दारू]

अल्कली—अल्क पहा.

अल्काब—पु. मायना; पदव्या; अलकाब पहा. 'हल्का अल्काब लिहिलियामुळें विषम मानितात।' –दिमरा १.७. [अर. अल्काब-लकब्चें अव.]

अल्कोद—पु. वनस्पतिजन्य व फार विषारी अनाम्ल. [इं. अल्कलाइड]

अल्कोनेट—न. एक विलायती रंगाची वनस्पती; यांच्या मुळांत एक उत्तम लाल रंग असतो. निरनिराळीं तेलें, रोगणें, मलमें, द्रव यांमध्यें उपयोग करतात. (सामा.) एक तांबडा रंग. (इं.) अल्कनेट. [अर. अल्+हेन्ना=वनस्पति; स्पॅ. अल्कना]

अल्खालक—अलखालक पहा.

अल्गर्जी—वि. स्वार्थी. अलगरजी पहा. 'आतां कशाला जाऊन राहिला पोकळ अल्गर्जी।' –पला १७१. [फा. अहलि–गरझ्]

अल्गुज—अलगुजें पहा.

अल्जिब्रा—पु. बीजगणित. (इं.) [अर. अल्+जबरा=पुन्हां एकत्र करणें.]

अल्तम्गा—बक्षीस सनद; अलतमघा पहा. 'पर्वाना अल्तम्गा' –पया २३. [तुर्की अल्तम्घा]

अल्प—वि. १ थोडें; लहान; कोतें **म्ह०** अल्प मोली बहुगुणी. सामाशब्द–अल्पबुद्धि–बल–व्यापार–लाभ–भाषी–विद्य–व्यय; २ क्षुद्र (जन, पुरुष); दरिद्रि; भिकारी. 'कृष्णासि भेटलाहो स्पर्शसुख जगीं अलभ्य अल्पा तें।' –मोकर्ण. ५०.१६. ३ मूढ; मूर्ख. 'मानिति माया केवळ अल्प सभेंतील भूमितळ–पट हो।' –मोसभा ५.८७. [सं.] ०**करणी**–स्त्री. थोडें, किंचित् किंवा अपुरें करणें. 'अल्प करणी बोभाट बहुत।' ०**कर्ण**–र्णी–वि. विप्र. अल्पकानी. १ हलक्या कानाचा; कानपिसा; सहज विश्वास ठेवणारा; भाविक; भोळा, श्रद्धालु. २ गुप्त गोष्ट ज्याच्याजवळ ठरत नाहीं असा; जिभेचा हलका. ०**कालिक तारे**–पु. अव. क्षणिक दिसणारीं नक्षत्रें. ०**क्रोधी**–वि. चिडखोर; शीघ्रसंतापी; शीघ्रकोपी. ०**खादी**–वि. थोडेसें खाणारा. 'अशा प्रकारची आखूडशिंगी, कृष्णवर्णी, बहुदुधी, अल्पखादी व अल्पमोली गाय पैदा करावी.'–आगर ३.८४. ०**गति**–वि. मंदगतीचा. ०**गुणें**–क्रिवि. सहज; थोडक्यांत. 'आणिक एक आह्मां देणें। मुक्ति होय अल्पगुणें।'–गुच २९.१९०. ०**गोष्ट**–स्त्री. लहान बाब; क्षुल्लक गोष्ट; बिनमहत्त्वाची बाब. ०**ग्रह**–पु. किरकोळ ग्रह (आकाशांतील). (इं.) अस्टेरॉईड. ०**जनसत्ताक**–वि. थोड्याशा लोकांची हुकमत असलेली. –नि ८२. ०**तृष्णा**–स्त्री. थोडीशी तहान, हांव. ०**दृष्टि**–वि. १ आकुंचित, कोत्या मनाचा; अदूरदृष्टीचा. २ बारकाईनें व काळजीनें पाहणारा; काटेकोर; बारीकसारीक देखील पाहणारा. ३ (ल.) कृपण; चिकट. ०**धन**–वि. गरीब; दरिद्री; कंगाल; अपुऱ्या साधनाचा, ऐपतीचा. ०**निद्रा**–वि. थोडीसी झोंप

ज्याला पुरते असा; ज्याची झोंप लवकर मोडते असा. **०प्राण**–पु. व्यंजनांतील एक भेद. जीं व्यंजनें उच्चारण्याला फार सोपीं आहेत तीं; ज्यांत हकाराचा ध्वनि येत नाहीं तीं; जोर न देतां सहज उच्चारावयाचा साधा उच्चार किंवा अक्षर उ० क्, ग्, ङ्, च्, ज्, ञ्, ट्, ड्, ण्, त्, द्, न्, प्, ब्, म्, य्, व्, र्, ल्, आणि ळ्. एकूण २०. महाप्राण पहा. **०बुद्धि-मति**–वि. कोत्याबुद्धीचा; अल्प समजुतीचा. **०भाष-भाषी**–वि. मितभाषी; अबोलका; वटवट न करणारा; **०मोली**–वि. थोडक्या किंमतीचा; हलक्या किंमतीचा; स्वस्त. **म्ह०** अल्पमोली बहुदुधी. **०वय-वयस्क**–वि. लहान उमरीचा; बाल. **०विचार-री**–अल्पबुद्धि पहा. **विद्य-द्या**–वि. थोडकें शिकलेला; वरवर ज्ञान असलेला; उथळ ज्ञान असलेला. **म्ह०** अल्पविद्यो महागर्वी. **०विषय**–पु. क्षुल्लक बाब, गोष्ट; हलकें काम; बारीक सारीक प्रकरण. **०वृत्त**–न. लहान वर्तुळ–मंडळ (भौगोलिक किंवा खगोलिक); लघुवृत्त. **०शक्ति**–वि. अशक्त; निबेल; कमताकद. **०संख्यांक**–वि. थोडया प्रमाणांत असलेले (लोक, द्रव्य, वगैरे). अल्पपक्ष. (इं.) मायनॉरिटी. **०संतुष्ट-संतोषी-समाधानी**–वि. ताबडतोब किंवा थोडक्यांत संतुष्ट होणारा, खूष होणारा; कमी महत्त्वाकांक्षी. **०सत्ताकपद्धति**–अल्पजनसत्ताक पहा. (इं.) ऑलिगार्की. **०समजूत**–वि. कोत्या समजुतीचा; अडाणी. **०सामर्थ्य**–न. थोडिशी शक्ति; अल्पबल. **०सिद्ध**–वि. थोडक्या श्रमानें–मोलानें–साधनानें मिळविलेलें, मिळालेलें, केलेलें. **०स्वल्प**–वि. कांहींसें; थोडेसें; जरासें; किंचित; लहान प्रमाणाचें–रकमेचें; थोडेंबहुत. **०ज्ञ-ज्ञान**–वि. कोत्या बुद्धीचा, समजुतीचा; अल्पबुद्ध; अल्पसमजूत.

अल्पक—वि. दरिद्री; कंगाल. 'एके दिवसींचेनि परान्नें । अल्पकु जैसा ॥' –ज्ञा १६.२२७. [सं.]

अल्पत्व—न. १ थोडेपणा; कमीपणा. २ (संगीत) रागालाप करतांना एखादा स्वर थोडक्या प्रमाणांत घेणें; ह्याचे प्रकार दोन आहेत लंघन व अनाभ्यास. [सं.]

अल्पविर्णे—अक्रि. बुडविणें; आप्लविणें (अप.) पहा. 'तिन्ही लोक अल्पावती. –विउ ५.३७. [सं. आप्लवन]

अल्पशः—क्रिवि. किंचित्; थोड्या प्रमाणांत. [सं.]

अल्पाक—न. दक्षिण अमेरिकेंतील पेरु देशांत एक अल्पाका नांवाचें उंटासारखें जनावर असतें, त्याच्या अंगावरील लोंकर व तिच्यापासून होणारें कापड. अल्पाकाचीं ब्लँकेटें व झगे करितात. **०हिरवी**–वि. (विणकाम) सर्व पोत हिरव्या उभाराचा व आडवण सर्व तांबडें, किनार कोणतीहि अशा लुगडयाची एक जात. **०पिंवळी**–वि. सर्व पिवळा उभार व आडवण सर्व तांबडी, किनार कोणत्याहि रंगाची. या प्रकारचें लुगडें. [अर. अल्+पेरूव्हिअन पको=पेरू देशांतील एक जनावर.]

अल्पायास—पु. थोडके परिश्रम, कष्ट, मेहनत. षष्ठी किंवा तृतीया विभक्तींत फक्त उपयोग. उ० अल्पायासाचा, अल्पायासानें. [सं. अल्प+आयास] **म्ह०** अल्पायास आणि महाफल.

अल्पायु, अल्पायुष-षी—वि. थोडथा, अपुऱ्या आयुष्याचा, जीविताचा; थोडे दिवस जगणारा. [सं. अल्प+आयुस्]

अल्पारंभ—पु. हळुहळु किंवा थोडासा प्रारंभ, सुरवात; सावकाश व संथ आरंभ; मंद प्रवेश, शिरकाव. [सं. अल्प+आरंभ]

अल्पाहार—वि. मिताहारी; खाणेंपिणें नेमस्त, माफक असलेला. –पु. थोडेसें खाणें; फराळ; उपाहार. [सं. अल्प+आहार]

अल्फा व ओमेगा—पु. (स्त्रि.) १ आदिमाक्षर व अंतिमाक्षर. २ आदिअंत. (ख्रिस्त अखिल इतिहासाचा आधार आहे आणि अर्थातच त्या इतिहासाच्या उत्पत्तिस्थितिनाशाहून त्याचें अस्तित्व भिन्न आहे हें यावरून दर्शविलें जातें). 'प्रभु देव... म्हणतो, मी अल्फा व ओमेगा आहे.' –प्रक १.८. [ग्रीक वर्णमालेंतील पहिलें व शेवटलें मूळाक्षर.]

अल्बत-ता—अलबत पहा. 'अल्बता येणें, कांहीं मुलाहिजा न करणें' –रा १७.७.

अल्विदा—पु. अखेरचा सलाम. तावूत बुडविल्यानंतर ह्याचा उच्चार करतात. [अर. अल्+विदाअ=पाठवणूक.]

अल्मारी—अलमारी पहा.

अल्मुल्कलिल्लाह—'विश्व परमेश्वरासाठीं आहे.' हें वाक्य आदिलशाही बादशाही फर्मानाचे प्रारंभीं नेहमी असे. [अर.]

अल्याड-पल्याड—अलाड पहा.

अल्युमिनिअम—न. एक रासायनिक धातुरूप मूलद्रव्य; हें शुद्ध स्वरूपांत सांपडत नसून सिलिकेट रूपानें इतर पदार्थांशीं संयुक्त स्थितींत सांपडतें. ही धातु फार हलकी व पांढरी असते. हिचे पातळ पत्रे करून त्यांचीं भांडीं करतात. तारहि काढतां येते. हीवर क्षाराचा परिणाम होतो. ही डांकानें जडत नाही. (शाप.) स्फट. [इं.] **०झाँझ**–स्त्री. सोन्यासारखी दिसणारी परंतु सोन्याहून कठिण अल्युमिनिअम व तांबें यांची रसमिश्र धातु. ही हलकी असते. हिच्या डब्या, सांखळ्या व कांहीं अलंकार करतात. [इं. अल्युमिनिअम+वाँझ]

अल्ल—अलें पहा.

अल्लख—वि. अलगअलग; स्वतंत्र; अलग पहा. 'झगडे, बोटे, फाकडे अल्लख अल्लख' –ऐपो २४०. [सं. अ+लग्]

अल्लख—अलख पहा. **०दादोजी**–पु. (गो.) कफल्लक मनुष्य.

अल्लड, अल्हड—वि. १ अननुभवी; कच्चा; निपुण नसलेला; प्रौढ नसलेला; कुशल नसलेला; अपक्व बुद्धीचा; अज्ञानी (माणूस, विशेषतः तरुण). २ अपेट पहा. [हि. अल्हड. का. अल्ल=दांडगाई; अल्लडु=दंगेखोर; मल्याळी अले].

अल्लफ--अलफ पहा.

अल्ला, अल्लाह्—पु. (मुसलमानांत) ईश्वर; देव; खुदा. 'अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज।' –तुगा ३२७. –उद्गा. (गो.) वा! ओ–ह्यो! एक उद्गार. **०अल्ला**–उद्गा. आश्चर्य किंवा दुःखोद्गार. **अल्लाहो कबर**–ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. **अल्लाची गाय**–(ल.) अत्यंत गरीब निरुपद्रवी माणूस. (कारण मुसलमान खाटीक गाईच्या मानेवर सुरी ठेवीत असतांहि ती शांत व स्तब्ध असते). [अर. अल्+इलाह्=देव; अल्लाह्; हिब्रू एलोहा. तुल० सं. अल्ला=देवी].

अल्लाद–दी, अल्लाद्–दी—अलाद पहा. 'हां! हां! कांचेचें भांडे आहे, फुटेल, अल्लाद ठेव.' 'मी अल्लादीच जाऊन त्याच्या मागें बसून राहिलों.' [सं. अ+लग्. तुल. अर अलकत्=लोंबणें; टांगणें]

अल्लारखी—वि. परमेश्वरानें राखलेला किंवा सुरक्षित ठेवलेला ज्याला कोणी वाली नाहीं असा; अनाथ इसम; किंवा कोणी पहात नाहीं अशी बाब. [अल्ला+रखी=राखणारा].

अल्लारशी, अल्ला ऋषि, अल्लारुषी—वि. १ ढिलें; ढिलाईचें; निष्काळजीपणाचें; गैदीपणाचें; गबाळग्रंथी, अव्यवस्थित. (काम, वागणूक). २ नेभळट; माभळभट; भोंगळट; ढिला; शिथिल; सुस्त; हयगयी; दुर्लक्ष करणारा (माणूस). 'टोपी कोणीकडे, जोडा कोणीकडे, अल्लारुषी आहे.' [अल्ला+वारसी किंवा ऋषि]

अल्हाद—पु. आनंद; आह्लाद पहा. [सं. आह्लाद]

अल्हे—क्रिवि. लवकर; एकदम. –शर. [सं. अ+लघु–लहु–ल्हे]

अल्होट—अलोट पहा. 'पण ते अभंग अल्होट।' -उषा १६७६.

अल्ह्या—पु.स्त्री. (संगीत) एक रागिणी –राग प्रकार.

अव—शअ. बाहेर; पासून खालीं; पासून दूर, लांब. –उपसर्ग १ न्यूनता; ऱ्हास; कमीपणा. उ० अवदशा. २ अनादर. उ० अवज्ञा, अवमान. ३ निश्चय. उ० अवधारण. ४ विस्तार; व्याप; पसारा. उ० अवकीर्ण. ५ आधार. उ० अवलंब. ६ खालीं; खालीं जाणें. उ० अवतार, अवगाह. शिवाय अप पहा. [सं.]

अवई—अवाई पहा.

अवकटा—क्रिवि. (काव्य) एकाएकीं; अकस्मात; एकदम; अवचट पहा.

अवंकण–णी—स्त्री. दुसऱ्या मळणीच्या वेळचें धान्य; अकण पहा. [सं. अव–अल्प+कण]

अवंकणी—स्त्री. अटकळ; आकलन. 'तन्ही उन्मेखाचिये पेठे। गुणा अवंकणी भरीन बुद्धीचि साटें॥'–ऋ १४. [अवांका पहा]

अवकर्णे—अक्रि. विप्र. अविकर्णे. (कों.) अधिक पिकून जाणें व विघडणें. अलगणें पहा. [सं. अति+पच्]

अवकर्णे—अवांकर्णे पहा.

अवकत–द्—अवकात पहा.

अवकल—वि. १ न आकळलेला; अनावर; दाबांत नसलेला; ओढाळ; हट्टी; वेलगामी. २ आकलण्याम कठिण; दुःसाध्य; दांडगा. [सं. अव+आकलन]

अवकल–ळ—स्त्री. १ आयुष्यांतील उतार, ऱ्हास, अधःपात; शक्तिहानि; सत्त्वहानि; दुर्बलता; निःसत्त्वता. [सं. अव+कला] **०तवकल**–तवकल पहा.

अवकलणें—अक्रि. उतरती लागणें; कमजोर होणें; ऱ्हास पावणें (आयुष्य). [सं. अव+कला]

अवकहडाचक्र—न. (ज्योतिष) मुलाचा जन्म ज्या नक्षत्रावर झाला असेल त्या नक्षत्राचे चार चरण कल्पून त्यांस दिलेल्या संज्ञेवरून नांव (विशे. संध्येतील) ठेवण्याविषयीं तयार केलेलें कोष्टकवजा चक्र. यांत प्रत्येक नक्षत्राच्या चारी चरणांच्या निरनिराळ्या संज्ञा, अंत्य–मध्य इत्यादि नाडी, जाति, गण, योनि, नक्षत्र, राशि इत्यादि दाखविलेल्या असतात. [अबक ग्री. आल्फा बीटा गॅमा इ० अर. अलीफ, बे, पे.]

अवकळवणी—स्त्री. अकाळी पाऊस. [सं. अव+काल+वन=पाणी]

अवकळा—वि. तेजोहीन; निःसत्व. 'कलहंसां अवकला करीन मी।'–शिशु २७. –स्त्री. १ तेजोहीन दशा; अवदशा; निस्तेजता; ऱ्हास; उतरती कळा; अधःपात. 'कटाक्षाचा मोसु देखिला। तेणें नीलोत्पलां जाली अवकळा॥'–शिशु ८०६. 'यमदमा अवकळा आणिली।'–ज्ञा ९.१९८. २ दुर्दशा; अप्रतिष्ठा; फजिती. 'आणि हे पळतां पळों नेदिती। धरूनि अवकळा करिती॥'–ज्ञा २.२१८. 'कृष्ण नेईल भीमकबाळा। यासी अवकळा वरील'–एरुस्व २.४०. [सं. अव+कला]

अवकात–द्—स्त्री. १ शक्ति; सामर्थ्य; प्राज्ञा; ताकद; बळ; उपाय; साधन. (शरीर–धनसंबंधीं). २ निर्वाह; गुजारा. (ना.) अबखाद. 'अबे चाल, मले माराची तुही का अवखाद आहे?' [अर. औकात=परिस्थिति.]

अवकादा—पु. पृथक् ओझें? –शर (सोहिमह).

अवकाल—पु. अकाल; अयोग्य काल; अवेळ. **अवकाळ** पहा.

अवकाश—पु. १ अवधि; समय; वेळ; प्रसंग. २ फुरसत; निवांतपणाची वेळ; सवड; रिकामा वेळ. 'व्योमकेश ऋषीकेश। स्मरतां नाही ज्या अवकाश॥'–मुविराट ५.२७. ३ जागा; प्रदेश;

स्थल. 'न त्यांत अवकाश या स्थळ दिलें तदा कां दवा।' –केका १७. ४ मधलें अंतर–जागा–काळ. 'पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाशु। दोहीं माजी॥' –ज्ञा ६.४०. ५ भेद; वेगळेपणा; अंतर. 'तो आत्मारज्जुसर्पाभास। अवकाश हा।' –यथादी २.६४५. ६ विलंब; उशीर; वेळ. ७ सामर्थ्य. 'मातें जाणावया होआवा। अवकाशु गा।' –ज्ञा १०.७१. ८ शून्य; आकाश; पोकळी; पोकळ जागा; रिकामी जागा. 'येथून तेथवरी अवकाश' –दा २०.१०. २२. 'कुरु शस्त्रजाळ पसरिति अवकाशा न उरवी नभाच्या तें।' –मोभीष्म १०.४५. ९ सवड; सोय; संधि. [सं.] **०धरणें**–थोडा वेळ थांबणें, वाट पहाणें; दम धरणें.

अवकाळ—पु. अकाल; अयोग्य वेळ; भलतीच वेळ. –स्त्री दुर्दशा; वाईट काळ. 'फुटली मुठ आवळयाची राव पडला अवकाळीला।' –ऐपो ४१०. –वि. अकाळी आलेला; योग्य वेळेचूवीं येणारा. 'एन्ह्वीं तरी आकाश मांडी। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी तो अवकाळ मेघु काय घडी। राहात आहे॥' –ज्ञा १७.२५१. –क्रिवि. सांप्रत; सध्यां; हल्ली; अलीकडे; आतांशीं. [सं. अव+काल]

अवकाळ—वि. (व.) पुष्कळ; पोटभर.

अवकाळवणी—अवकळवणी पहा.

अवकाळी-ळ्या—वि. अयोग्य काळचा; बेहंगामी; अयुक्त-वेळचा; अकालीं येणारा, घडणारा, पडणारा (पाऊस वगैरे). 'हा पहा, अवकाळ्या वारा आणि पाऊस आला.' –बाळमित्र २.२४.

अवकिरिया—स्त्री. (कु.) दुखणें; आजार. [सं. अवक्रिया]

अवकीर्ण—वि. पसरलेलें; विस्तारलेलें; विखुरलेलें; वरून आच्छादलेलें, माखलेलें; व्याप्त. सामाशब्द–केशावकीर्ण, जलावकीर्ण पर्णावकीर्ण, पुष्पावकीर्ण, फलावकीर्ण, मेघावकीर्ण, रक्तावकीर्ण, रजोवकीर्ण. [सं. अव+कृ=पसरणें, ढाकणें]

अवकृपा—स्त्री. गैरमर्जी; इतराजी; नाखुषी; राग; प्रेमाभाव. [सं.]

अवक्र—वि. १ वांकडा नव्हे, नसलेला; सरळ. २ प्रामाणिक; निष्कपटी; शुद्धांतःकरणाचा. 'नित्य प्रिया भजति संत अवक्र तूंतें।' [सं. अ+वक्र=वांकडा]

अवक्रिया—स्त्री. १ तिरस्कार; निंदा; हेटाळणी; फजिती; उपहास; पाणउतारा. २ अपमान; हयगय; उपेक्षा; कमी लेखणें. [सं. अव+कृ]

अवखणणें—क्रि. (व.) अडचणींत सांपडणें; आंखडणें; अवघडणें. 'एका पायावर बसून बसून अवखणून गेला आहे.' [सं. अव+कृष्]

अवखंद—पु. मोठा खड्डा; मोठा ओहोळ. 'खंदक अवखंदे भडमार। जळें जाती।' –दावि २४४. [सं. अव=खोल+खन्, अवखात=खोल खंदक]

अवखळ—वि. विप्र. अवकळ पहा. १ अनिर्बंध; बेलगामी; आळा नाहीं असा. २ उनाड; दांडगा; खोडकर (मूल). 'देहयोगासाठीं अवखळजनीं लोक पडला।' –दावि २२७. [सं. अव+कला किंवा खल]

अवखळा—स्त्री. कमताई; न्यूनता. 'तेवीं अपेक्षेचा अवखळा। न पडे जयां।' –ज्ञा १५.३०३. [सं. अव+कला]

अवखा—–स्त्री. दुखणें; विकार; विकृति; अस्वास्थ्य; असमाधान. [अर. वाकिया=मृत्यु; तुल० सं. अवक्षेप. प्रा. अवक्खेव]

अवखा—पु. अवांकाबद्दल चुकीनें उपयोग. अवांका पहा.

अवखात-द—अवकात-द पहा.

अवखादणें—अक्रि. (कु.) त्रासणें. [सं. अव+खिद्]

अवखुण—स्त्री. वाईट कृति; खोडी; दोष. 'बाई! हे हरिची अवखुण गे।' –आगो ११०. [सं. अव+क्षुद्–क्षुण्ण किंवा अवगुण]

अवखुळा—पु. आडकाठी; अडथळा. [सं. अव+स्खलन]

अवग, अवाग—न. (कु) माशाचे हृदय व फुप्फुस. [सं. अव+अंग ?]

अवगण—पु. अनादर; उपेक्षा; त्याग, अवगणना पहा. 'अनंत तपाच्या अवगणा। जोडिलें विदेहनाम भूषणा।' –सीस्व १०.५८. [अवगणन अप.]

अवगणणें—उक्रि. तिरस्कारानें किंवा उपहासपूर्वक वागविणें; कमी लेखणें; तिरस्कारणें; अवहेलणें; अनादरणें; तुच्छ मानणें. 'पिता अवगणुनी तूंतें निंदी। होय अपराधी सर्वथा।' –एरुस्व १२.१४२. [सं. अव+गण्]

अवगणन-ना—न. स्त्री. तिरस्कारानें किंवा हेटाळणी करून वागविणें; झिडकारणें; अवमान; अनादर; अपमान; हेटाळणी. 'भक्तवचनाची अवगणना। देव सर्वथा न करीचि।' –एरुस्व ४. ७१. [सं. अव+गण्]

अवगणित—वि. अवमानलेला; अपमान केलेला; तिरस्कृत; अनादृत. [सं.]

अवगणी—स्त्री. (काव्य) वेष; रूप; सादृश्य; सोंग; ओळखण्याची खूण. 'आत्मा घे नाना शरिराची अवगणी।' –भाए ५१८. 'जो प्रसिद्ध असे पुराणीं। कृष्णत्वाची अवगणी। बलिरामातें पुरःसरोनी। अवतरला येथें।' –रास २.२८९; 'घेऊनि पक्ष्याची अवगणी। जातीची सारंगपक्षिणी। तियेशीं रतला।' [सं. अव+गम्]

अवगंणी—स्त्री. खोळंबा; थांबणें; अवंगणें पहा.

अवगणें—क्रि. १ दिसणें; सारखें वाटणें; सादृश्य असणें; भासणें. 'तो सूत्रधारू राऊ तैं अवगला। तो कैसा सांगौं।' –शिशु ९९८. 'वारणावरी धावला मृगेंद्र। तैसा अवगला वायुपुत्र।' २ समजले जाणें; माहीत होणें; ठाऊक होणें; जाणणें. 'वृत्तांत

सर्व अवगला ' ३ धारण करणें; आचरणें; स्वीकारणें; अंगीकारणें. ' कां अवगे तरुवरें । भूमिरसु । –ज्ञा १४.२८१. ४ सोंग घेणें, नटणें. ' राजसां तामसां भावाची परी । तेही नटिला तो ॥ ऐसें अवगोनि मुरारी । येतुसें गोकुळा माझारी ।' –दाव २८९-९० [सं. अव+गम्]

अवगणें—अक्रि. (कों.) बाष्कळपणें, स्वच्छंदीपणें वागणें. (कर्ना.) माणसांतून उठणें. [सं. अव+गम्=जाणें]

अवगंणें—अक्रि. थांबणें; खोळंबणें; तिष्ठत राहणें; वाट पहाणें; मार्गप्रतीक्षा करीत राहणें. [सं. अ+वंघ्=जाणें]

अवगत—वि. ठाऊक असलेला; कळलेला; समजलेला; माहीत असलेला. ' प्रणयचंचला, त्या भूलीला । अवगत नव्हत्या कुमारिकेला ।' –बालकवि (फुलराणी). –पु. ज्ञान; माहीत असलेली गोष्ट. ' कोण कधीं आला काय तो भाव । नुचारितां अवगतामाजीं ठेवीं ।' –दावि ७६३. [सं.]

अवगत, औवग—स्त्री. (कु) गरोदरपणांत मेलेली स्त्री. [सं. अवगत]

अवगति—स्त्री. १ अधोगति; अधःपात (नरकांत, दुस्थितींत वगैरे). ' युद्ध सांडून जे पळाले । ते पावले अवगती ।' –एरुस्व १०.९८. २ (सामा.) खालीं येणें; उतार; उतरण. ३ अवगम पहा. [सं.]

अवगम—पु ज्ञान; जाणीव; आकलन; अवगमिणें; जाणणें. [सं.]

अवगमणें—उक्रि. वाटणें; भासणें; जाणणें. ' मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ' –ज्ञा १.१६. अवगणें पहा. [सं. अव+गम्]

अवगळणें—क्रि. १ ठाकणें; गाळणें. ' जो मने विकल्पें भरला । अडवींचा अवगळला । कुहा जैसा ।'–ज्ञा १३.६७७. २ चुकून राहणें ' आणि अभिचारावेगळें । विपायें जें अवगळे ।' –ज्ञा १६.४०१. ३ झोंबणें; बिलगणें, गळ्यांत पडणें. ' मागत दधिगोळे । न देतां अवगळें । दापितां चोळी डोळे ।' –अमृत ४४. [सं. अव+गल्=गळणें]

अवगाहणें—अक्रि. अवगाहन करणें. [सं. अव+गाह्]

अवगाहन—न. १ पाण्यांत डुंबणें; बुडी मारणें; स्नान करणें. ' कां तीर्थें जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं ।' –ज्ञा १ २६. २ (शास्त्र किंवा विषय) प्रवेश; शिरकाव; संचार; अध्ययन; अभ्यास. [सं.]

अवगाळ—पु. गाळ; चिखल; दलदल; खड्डा. ' भ्रांतीचेनि खडुळें । रेवलें आस्थेचें अवगाळें ।' –ज्ञा ७.७८. [सं. अव+गाल्]

अवगाळणें—क्रि. (व.) दुर्लक्ष करणें; अवगळणें पहा.

अवगी—स्त्री. घोड्याची ऐटींत थाटाची चाल. (क्रि० धरणें). ' ज्या ठिकाणीं घोडा हुकूम अमान्य करील त्या ठिकाणीं अवगीनें इशारा करावा ' –अश्व १६९. [सं. आ+वल्=नाचणें, थयथय करणें (घोडा); प्रा. आवग्ग]

अवगुंठन—न. लपेटणें; लपविणें; आच्छादणें; गुरफटणें; वेष्टन; बुरखा; घुंगट; ओढणी. [सं.]

अवगुंठित—वि. वेष्टिलेलें; लपेटलेलें; आच्छादिलेलें; लपेटलेलें; बुरखा घेतलेली (स्त्री). [सं.]

अवगुण—पु. १ दुर्गुण; वाईट गुण; खोडी; वाईट संवय; दोष. ' सकळ अवगुणामधें अवगुण । आपले अवगुण वाढती गुण।' –दा १९.८.८. २ वाईट परिणाम; अपायकारक प्रयोग; अनिष्ट किंवा इजा करणारी क्रिया (औषध, उपाय, इत्यादिकांची). [सं.]

अवगुणी–वि. १ दुर्गुणी; दुराचारी. 'मी अवगुणी अन्यायी। किती म्हणोन सांगों काई। आतां मज पायीं। ठाव देई विठ्ठले ॥ ' –तुगा ५१८. २ अनिष्ट; अपायकारक; वाईट गुणधर्मांचा. ३ स्वैर. ४ अवलक्षणी; अपशकुनी. ५ खोडकर; वात्य. [सं.]

अवगून—क्रिवि. अवजून पहा.

अवग्र—वि. सर्व; सगळें; एकूण एक; एकंदर (रास, गोळा, संघ). ' पर्ण अवग्र लिहिविलें ।' –दावि १८२; ' क्रिया घेऊनि सोडून दिले धनी महाराज (अ)वग्र ।' –एपो ३४०. [सं. अव्यग्र]

अवग्रह-ग्राह—पु. १ थांबणें; विराम. २ पाऊस पडावयाचा थांबणें; अनावृष्टि, अवर्षण. ३ परिच्छेद. ४ संधि झाला असतां व पुढच्या शब्दाच्या आरंभीं अ असतां त्याचा लोप करून त्या ऐवजीं जें चिन्ह (ऽ) लिहितात तें. [सं. अव+ग्रह]

अवग्रहण—अवघ्राण पहा. ' मस्तक अवग्रहण करी । सप्रेम वैसवी अंकावरी ।'

अवघड—वि. १ कठिण; कष्टप्रद; (करण्याला, जाणण्याला, पोहोंचण्याला, सोसण्याला किंवा घडण्याला); दुर्घट; जबर; दुष्कर; श्रमसाध्य; अशक्य; असंभाव्य; दुर्जेय; दुर्गम; दुर्लंघ्य; दुष्प्राप्य. 'मिळाला जो अवघड वर । तो ऐकावा जी विचार ।' –कथा १.३.१३. २ अडचणीचें; अप्रशस्त; अरुंद (स्थळ, जागा). ३ विलक्षण; लोकोत्तर; लोकबाह्य; वाईट; तऱ्हेवाईक (कृत्य). ४ गैर; भलतेंच; चमत्कारिक; गैरसोईचें; घोटाळ्याचें; संकटावह (स्थळ, परिस्थिति, अवस्था). ' अवघड जागीं दुःख व जांवई वैद्य. ' ५ कठिण (बहुतेक सर्व लाक्षणिक अर्थानें) जसें: विलक्षण, चमत्कारिक, अनियमित; वेशिस्त (करणी); दुःखप्रद, त्रास देणारी, पीडाकरणारी (गोष्ट). बुद्धीला न पटणारें, बळजबरीचें; अयोग्य; सक्तीचें; ओढून ताणून आणलेला. ' हे असो दीपाचिये सिद्धी । अवघड धू आधीं ।' –ज्ञा १८.७८०. ६ वेडेंवांकडें; चमत्कारिक; भिन्नभिन्न आकारांचें. ' होतू कां उजू वांकुडें । परि बोरीचें हे न मोडे ।'

तैसीं भूतें अवघडें । परि वस्तु उजू । '–ज्ञा १३.१०६१. ७ दुःसाध्य; कठिण (दुखणें). [सं. अव+घट्]. --न. अडचण; लचांड; संकट; त्रास. 'समर्थांचिनि नामेंचि अवघडे निस्तरीजति ' –पंचतंत्र ३.९. **०वाटणें, होंणें**–१ अस्वास्थ्य; असमाधान वाटणें; संकोच वाटणें; कसेसें वाटणें. ' मला त्याच्या घरीं अवघड वाटतें. ' २ गोंधळणें; भांबावणें; घोंटाळ्यांत पडणें. ३ असह्य वाटणें; दुःख होणें. 'मुलगी सासरी जावयाला निघाली, तेव्हां तिला अति अवघड वाटलें.' **०जागा**–जांघ वगैरे जागा; अडसंधि. ' अवघड जागीं दु.ख आणि जांवई वैद्य. '

अवघडणें—अक्रि. १ अडचणींत–संकटांत सांपडणें, पडणें. २ पेचांत सांपडणें; गोंधळणें; भांबावणें; घाबरणें; मति गुंग होणें. ३ अडकून राहणें; खोड्यांत पडणें; गोत्यांत येणें; अटकेंत पडणें; पंचायतींत, तारांबळींत सांपडणें. ४ एखाद्याची निकड लागणें; गैरसोय होणें; नेट लागणें; तगादा लागणें. ५ अडचणणें; अडणें; अतिशय ताण बसणें; अडथळा होणें; कोंडमारा होणें; कुचंबणें. ' स्वभाव त्यायोगें अवघडला । ' –विक ३. ' ऐसा स्मृतिभ्रंशु घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । ' –ज्ञा २ ३२७. ६ (शरीराचें गात्र) भारावणें; सुंग्या येणें (रक्तप्रवाह बंद झाल्यामुळें); ताठणें. ' याला घे, माझा हात अवघडला. ' ७ गरोदरपणामुळें भारावणें. ' शिवनेरीवर सडा शिंपला अवघडल्या तो हार्ती ' –शिवभाय (स्वातंत्र्यशार्दूल).

अवघंडणें—अक्रि. अडचणींत आणणें; कोंडणें; त्रास देणें. अवघडणें पहा. ' कीं अविद्याटुगी अवघंडी । अविचिती मोक्षाची धाडी । भणोनि विषयाचिया नाइकुवाडी । पळतां दीसती । ' –शिशु २४. [अवघड]

अवघडनाथ—पु. १ अडव्या अंगाचा; स्थूल; गलेलठ्ठ; ढेरपोट्या माणूस. २ (ल.) ढोण्या; लठ्ठया. ३ अवघड्या. **अवघड्या**–वि. अडचणी उत्पन्न करणारा; शंका उपस्थित करणारा; कुरकुरणारा; अळंटळं करणारा. [अवघड + नाथ]

अवघडपंथ-थी—पु. बैराग्याचा एक पंथ; अघोरपंथ पहा.

अवघा—वि. १ सगळा; सर्व. २ प्रत्येकजण. ' अवघाचि काळ जरी सजे । तरी अवघेचि होती राजे । ' –दा १८.१०.४. [सं. अप्रवत्; प्रा. अग्गवा–अघवा–अवघा]

अवघात—स्त्री. (ना.) गैर हंगाम; गैर मोसम. [सं. अव+हन्]

अवघ्राण—न. १ वास घेणें; हुंगणें. २ टाळू हुंगून शुभचिंतन करणें. [सं. अव+घ्रा]

अवघ्रात—वि. वास घेतलेला; हुंगलेला. [सं.]

अवचक—वि. अवाच्य; अगणित; अमूप. ' अवचक धनाचा ठेवा । ओपूनि पाठविलें पार्थिवा । ' –मुआदि २०.१५५. [सं. अ+वच्]

अवंचक—वि. प्रामाणिक; न फसविणारा. ' ऐसा अवंचक वदोनि नृपाल आला ' –नल ४४. [सं. अ+वञ्च्] **०पण–पु. पणा**–न. (काव्य) फसवणुकीचा अभाव; कापट्याचा अभाव; चोख व्यवहार. ' धान्य टेविलें त्वां सांठवून । तें देवालयाचे कामा लावून । अवंचकपणें सर्वार्थें ॥ '–मोको [सं.]

अवचट—वि. १ आकस्मिक; दैववशात् प्राप्त. ' अशामध्यें तूझा अवचट मला लाभ घडला । ' –सारुह ५.७२. ' अवचट सुकृतें नरदेहा झाली भेटी । '–श्रीधर नवनीत ४४३. –न. १ अनपेक्षित, अनिष्ट गोष्ट; अतर्कित अरिष्ट. ' अवचटाचें कवचट झालें '=विलक्षण अनर्थ गुदरला. –क्रिवि. अकस्मात्; एकदम; एकाएकीं; अकल्पितपणें; अवचित; सतत; सहजगत्या. ' तैसें पुरुषांचें दुर्लभ दर्शन। अवचटें कृपाकर लागतां पूर्ण । ' –पांप ५.८०. २ (ना. व.) क्वचित्. इतर रूपें–अवचटी. –ऐभा २.५५५. अवचटें. –ज्ञा २.१९५. [सं. अवचित्त]

अवचित–ता–तां–तीं—क्रिवि. १ अकस्मात्; एकाएकीं; अकल्पितपणें; सहजगत्या; अवचट. ' वरपडा जाहला अवचितां । '–ज्ञा ६.१६८. (व.) क्वचित्. [सं. अव+चित्त; किंवा अयाचित; किंवा आहोस्वित्? तुल० सिं. ओचिंतो]. **०च्या कवचित**–क्वचित्, केव्हांतरी. ' तो आमच्याकडे अवचितच्या कवचित येतो. '**०पर्व**–न. एकाएकीं उद्भवलेला प्रसंग. ' नारद बरोबर आहे, अग हें अवचित पर्व । ' –चित्रसेनगंधर्व नाटक २८.

अवचित-फळ—न. मूल होण्यासाठीं स्त्रिया एक व्रत करतातें. मकरसंक्रांतीचे दिवशीं ब्राह्मणाच्या घरांत कोणाला न कळत (पाण्याच्या भांड्यांत वगैरे) नारळ टाकणें; असा टाकलेला नारळ. [सं. अवचित्+राव]

अवचितराव—पु. १ मोठेपणाला चढलेला किंवा ज्याचें प्रस्थ वाढलें आहे असा; निवाल्या किंवा अज्ञातपितृक मनुष्य. २ पालक बापाच्या जिंदगीला वारसदार झालेला किंवा तिचा उपभोग घेणारा ३ (ल.) उपटसुंभ. [अयाचित]

अवचितिया—वि. अकस्मात्, एकाएकीं आलेला; अज्ञात. ' अवचितिया वृक्षाचीं अंगें. ' –ज्ञा १८.१५. [अवचित]

अवचितें, अवचित—न. एका जातीचें हळवें भात. हें फार जलद पिकतें. [अवचित]

अवचित्त—न. (गो.) दुर्लक्ष; चित्त नसणें. [सं. अव+चित्त]

अवचित्या—वि. १ उनाड; खोडसाळ. २ अवचित आलेला; अनोळखी; पूर्वी माहीत नसलेला. ' अवचितयावरी सर्वस्व सांडिजे । मग चोख तरी तोचि भांडारी कीजे । ' –ज्ञा १०.५२. [अवचित]

अवचिंद, अवचिन्ह—न. (कों.) १ अपशकुन; दुश्चिन्ह; अवलक्षण; उत्पात; अद्भुत. [सं. अव+चिन्ह]

अवचिंद्या—वि. १ अवलक्षणी; अपशकुनसूचक. २ उनाड; खोडकर (मूल); कमनशिबी; दुर्भागी; दुर्दैवी (इसम). [सं. अव+चिन्ह].

अवचिन्ह—न. दुश्चिन्ह; अशुभ गोष्ट; अपशकुनी, वाईट किंवा दुष्ट लक्षण. –वि. अशुभ; कुलक्षणी, [सं. अवचिन्ह]

अवचीन—वि. (गो.) अवचिन्ह (अप.) पहा. 'तो अवचीन पोर आसा.' 'असॉ अवचीन बोलॉ नको.' [सं. अवचिन्ह]

अवचुकून—क्रिवि १ गफलतीनें; इच्छा नसतांना, गैरसावधपणें; दुर्लक्षामुळें; चुकून. २ अकस्मात; एकाएकीं. [सं. अव+म. चुकून]

अवच्छिन्न—वि. १ तोडलेला; विभागलेला; वेगळा केलेला; अलग केलेला; उ० घटावच्छिन्न; पटावच्छिन्न. २ वर्जित; विवक्षित; विशिष्ट; परिच्छेद केलेला. अवच्छेद पहा. [सं.]

अवच्छेद—पु. १ तुकडा; विभाग, विभाजन; भिन्नीकरण; वेगळें करणें; भिन्न करणें. २ वियुक्तावस्था; परिच्छेद–पृथकावस्था; (रेषा, चिन्हें, फटी, वर्गेरेनीं किंवा वर्ग–योग्यतेनुरूप निरनिराळी सदरें पाडून). 'तैसीं सिनानीं चारीं पदें। श्लोक श्लोकावच्छेदें।' –ज्ञा १८.५८. ३ विभागणारी, वेगळें करणारी खूण, चिन्ह, जागा; फाड; चीर; छेद; खाप; खांच; खांडः सड; फट; सांध (ऽ)अवग्रह, (॥) चरणरेघ, इत्यादि सामासिक शब्दांचीं पदें किंवा कवितेचे चरण दाखविणारीं चिन्हें. ४ उच्चाटन करणें; उतारा. ५ व्यतिरेक; वर्जन; व्यवच्छेद, निष्कासन; अवकर्षण. ६ आक्रमण; व्याप्ति. वस्ती (उ० पृथ्वीमध्यें गंध, अग्नींत उष्णता, विश्वांत ब्रह्म यांची); स्वभावसिध्द किंवा अविनाशभूत अधिष्ठान (उ० आदिभौतिक पदार्थांच्या ठायीं घटकावयवांचें, सजीव प्राण्याच्या ठायी मृत्यूचें.) 'आहारनिद्राभय जीवावच्छेदेंकरून आहे.' ७ विशेष गुण–धर्म: व्यावर्तक लक्षण; वैशिष्ट्य. ८ सीमा; मर्यादा; अवरोधक पदार्थ किंवा वस्तु. [सं.] **अवच्छेदकावच्छेदेंकरून**–सर्वांना (व्यक्ति, जाती, वर्ग, पंथ वगैर) घेऊन किंवा त्या सर्वांचा समावेश करून; सर्वांचा (माणसें, प्रकरणें, गोष्टी वगैरेंचा) स्वीकार करून किंवा त्यांची गणना करून; कोणतेंहि वर्ज्य केलें असता किंवा कसेंहि व्यक्त केलें असतां. **एकसमयावच्छेदेंकरून**–एकदम; एकाचवेळीं; एकाच खेपेंत; दुसरीकडे लक्ष न देतां; विश्रांति न घेतां(करणें, उरकणें). **एतत्कालावच्छेदेंकरून**–फक्त याच वेळीं, समयीं. **शक्त्यवच्छेदेंकरून**–(माझी, तुझी) सर्व शक्ति खर्च करून.

अवच्छेदक—वि. तोडणारा; विभागणारा; कापणारा; अवच्छेद करणारा; अवरोधक: व्यापक; संबध्द; अधिष्ठित. [सं.]

अवच्छेदकावच्छेद—पु. १ अपवाद, मर्यादा, परिच्छेद नाहींसें करणें; वैशिष्ट्य; समतेंत, साधारणपणांत आणणें. [सं.]

अवच्छेदणें—क्रि. वेगळें करणें. 'जर ब्रह्म अवच्छेदवे' –भाए ५.००. [सं. अव+च्छिद्=तोडणें]

अवजड–जाड–झड—वि. १ फार मोठें; अचाट; अवाढव्य; अफाट; दांडगा; भारी; जड वजनाचा; स्थूल; बोजड. 'संसार-शकट अवजड, पुरुष स्त्री दोन हीं तया चाकें. जरि एक उंच, दुसरें नीच, तरी शकट हा कसा हाके? ॥' –वा. अ. भिडे. २ अवघड; कष्टप्रद. [सं. अव+जड.]

अवजणें—अक्रि. (व.) उपयुक्त होणें; बनणें; चालणें; उपयोगी पडणें. 'आईचा हात अवजत नाही आजच्या दिवस.' 'आमच्या हातचें अन्न त्याला अवजत नाही म्हणून तो स्वतः स्वयंपाक करतो.' [सं. आ+वज्=जाणें, हालणें; गो. वचणें=जाणें]

अवजतन—न. आबाळ, दुर्लक्षपणाची, निष्काळजीपणाची वागणूक; हेळसांड; कळकळीचा अभाव; हयगय. [सं. अव+यत्=प्रयत्न करणें. म. जतन]

अवजा—पु. वेळ; उशीर, अवधि. 'दासा मनीं तजविजा अवजा न लागे।' –दावि ३३८. [अवधि?]

अवंजा, औजा—पु (कों.) भातें लावण्याचा हंगाम. [अवधि?]

अवजार—न. १ मोठें शीड, (सामा.) शीड. २ हत्यार (कारागिरांचें). ३ (ल.) साधन; वस्तु. [अर. औज्झार=गलबतांचें साहित्य; सि. ओजाउ]

अवजाळी—वि. (कों.) दांडगा; अडदांड; उनाड. [सं. अव+ज्वल् किंवा जाल]

अवज्या, अवजता—वि. (व.) ज्याच्या हातचें पाणी वगैरे चालतें व जो घरांत वापर करूं शकतो असा (माणूस). [सं. आ+वज्=जाणें; चालणें; अवजणें पहा.]

अवझरता–झडता—(प्र.) ओझरता पहा.

अवझा—स्त्री. हिडिस्स, ओंगळ, रांड; रांडरु; घाण, अमंगळ स्त्री. –वि. खराब; टाकाऊ; जड. 'असें झाला माझा म्हणुन मजला जीव अवझा।' –सारुह ६.१६०. [सं. अ+ओज=ओझ्स=वझ्न किंवा सं. अवद्य; प्रा. अवज्ज=निंद्य, पाप]

अवट—पु. १ इमारती लांकडांचा–जळाऊ ओंडयांचा ढीग–रास. [वैदिक अवत=खळगा; सं. वट्=वांधणें, रचणें; का. ओट्टु, म. ओटा]

अवट–अवटाण—ओहोटी पहा.

अवटकी—स्त्री. १ अवटीची कचेरी, नोकरी, माल्मत्ता. २ औटकी पहा.

अवटणें—अक्रि. (कों.) ओहटणें; ओहोटी लागणें. –क्रि. शेतांतील पीक गोळा करून देणें. [सं. आ+वृत्; प्रा. आवट्=शोषणें]

अवटणें—न. वीट; तिटकारा. 'कालिदासाच्या काव्यरूप पक्वान्नांनीं अवटणें आलेल्या वाचकांच्या जिभेला फिरून रुचि उत्पन्न

करण्याकरितां कै. अण्णा किर्लोस्कर यांनीं संगीत सौभद्राचें तिखट करून वाढलें. ' –आगर ३.१४५. [विटणें]

अवटरणें–अवटारणें–अवटरणें—उक्रि. १ आक्रसणें. 'पानें अवटरतात. ' २ संकोच पावणें; आटणें; आखूड होणें (कमावलेलें कातडें, दोरा). ' आंगरख्याचें कापड अवटरलें ' ३ ताठरणें; ताठणें; अवघडणें (कंबर, मान इत्यादि लचक–उचक भरल्यामुळें) ४ (ल.) उदासीनपणें मुग्ध होणें; आखडून बसणें; रुसणें; अंग काढून घेणें [सं. आकुंच्न प्रा. आउंटण–आउट्ट–अवट]

अवटळणें–अवटाळणें—अवटरणें पहा.

अवटळा—पु. ताठा; ताठरपणा; लचक. अवटळणें–अवटरणें पहा. ' नाहीं तर अवटळा भरेल. ' (क्रि० भरणें–येणें–काढणें–निघणें).

अवटा—पु. कुढेपणा; कुरठेपणा; घुमेपणा; ताठरता; खुंदून अमणे. खळ घेणें. (क्रि० धरणें–घेणें). [सं. आकृष्ट किंवा आवृत्त; प्रा. आवट्ट=मागें खेंचलेला. अवटणें पहा.]

अवटाण—न. अयोग्य वेळ; गैर हंगाम; अवताण पहा. ' भरतीचे ताणावर होडींत बस, अवटाण झालें म्हणजे चालणार नाहीं. ' [सं. अव+तन्]

अवटाळणें—उक्रि. १ कवटाळणें; मिठी मारणें; धरणें; पकडणें; वेंगाटणें; कवळून धरणें. २ (ल.) समावेश करणें; आकळणें; अंतर्भूत करणें. ३ जमविणें; सांठविणें (वाईट प्रकारांनीं किंवा फसवणुकीनें पैसा वगैरे). [कवटाळणें द्वि. तुल० का. ओट्टु=रास, ढीग (धातु ओदट्टु=जमविणें, एकत्र करणें)]

अवटाळणें—उक्रि. लांबणीवर टाकणें; दूर ढकलणें; (कपटानें) थोपविणें. [सं. अव+म. टाळणें.]

अवटी—स्त्री. १ (सोनारी धंदा) दागिन्याच्या भागांवर नक्षी अगर ठसा उमटविण्याचा एक छाप; हत्यार. हा कांशाचा किंवा पंचरसी धातूचा असुन चौकोनी किंवा लांबट कांबीसारखा असतो. बहुधा याची लांबी, रुंदी व उंची हीं सारखींच असतात व तोंडावर विवक्षित आकार कोरून ठेवलेले असतात. कांहीं प्रकार:–१ पेरांची आवटी. २ वाघाची आवटी. ३ कांकण आवटी–हिनें सोन्याच्या बांगडीवर निरनिराळे उठाव उठवितात. ४ करडे–आवटी–ही नक्षी उठविण्यासाठीं लहान व बारीक कंगोरे व वेलबुट्टी उठवलेली पट्टी असते; ही लांबट, मध्यें जाड व कडेच्या बाजूस पातळ होत गेलेली असते. २ (तोडावयाच्या किंवा तासावयाच्या) लांकडावर घेतलेली कोरणी सारखी खांच (क्रि० घालणें, घेणें पाडणें) ०**काम**–न. अवटीचा उपयोग करून करण्यायें छापकाम. [सं. अवटी=खांच.]

अवटी—पु. १ (कारखान्यांतून धान्यादिकांचें) मोठ्या प्रमाणावर माप करणारा; मापारी. २ वजन–मापावर देखरेख ठेवणारा; ज्याच्या स्वाधीन सरकारी वजनमापें असतात असा अधिकारी; बाजारांत आलेलें धान्य, माल मापणारा अधिकारी. ३ सर्व शेतांतील उत्पन्न मोजून त्या अनुरोधानें सरकारसारा ठरविणारा अधिकारी. मोंगली अंमलांत हा वतनदार असे पण मराठी राजवटींत त्यायें वतन काढून घेतलें. –समारो २.२१५. [सं. आवृत्; म. अवट ?]

अवटी—स्त्री. (व.) खोल खड्डे असलेला, उंचसखल असा लांबट रस्ता. ०**जमीन**–स्त्री. पिकाची जमीन; डोंगराळ जमीनीच्या उलट. [सं. अवटी=खांच]

अवटी—स्त्री. (कों.) ओहोटी.

अवठा—पु. अवठण; रुसवेपणा; रुसण्याची लहर; घुमा राग. (क्रि० धरणें, सोडणें, येणें). [सं. अव+स्थान ?]

अवठाण—न. एक रोग. यांत घोड्याच्या अंगावर गांठी उठतात. अवठाणूं पहा. [सं. अव+उत्+स्थान]

अवठाण—न. १ शक्यता. २ जोर, शक्ति. [सं. अवस्थान]

अवठाणूं—न. (विरू.) उठाणू पहा. गळे; अवाळूं; केसतूड; खांडूक.

अवड—आवड पहा. ०**गोड**–वि. १ आवडता म्हणून गोड (देणगी, बक्षीस, सेवा). २ आवडल्या माणसानें केलेलें म्हणून गोड (चाकरी, देणगी). ०**चतुर**–वि. आवडत्या गोष्टींत चातुर्य, हुषारी दाखविणारा; आवडत्या गोष्टी जाणणारा. ०**चतुराई**–स्त्री. १ आवडत्या गोष्टींत दाखविलेलें कौशल्य. २ आवडेल तें तें करणें; स्वेच्छाचार; स्वच्छंदी वर्तन; आवडीची चतुराई.

अवडकचवडक, अंवड(क)चंवडक—स्त्री. १ मुलांचा खेळ. आंडकचौडक पहा. २ पसारा; गोंधळ; अव्यवस्था (घरांतील वस्तूंची वगैरे). (क्रि० करणें, मांडणें, चालवणें). ३ अव्यवस्थित, गोंधळाची स्थिति, अवस्था. [ध्व. किंवा चिवड द्वि. ?]

अवडचिवड–स्त्री. **अवडाचिवडा**—पु. १ अव्यवस्थितपणें कालवणें, कोळणें, चेंदामेंदा करणें, दाबणें, पिळणें, कुसकरणें. २ चिवडलेली–विस्कटलेली अवस्था; चिवडाचिवड; विस्कटाविस्कट; लादालगदा. [चिवडणें द्वि.]

अवडणणें—अक्रि. कंटाळा, किळस येणें; अवडणणें पहा.

अवडणें—न. १ तोंडाची अरुचि; वीट; किळस; कंटाळा; अवटणें पहा. (क्रि० पडणें). अवडणें पहा. २ आवडणें पहा.

अवडता—आवडता पहा.

अवडंबर, अवडांबर—न. १ भपका; डौल; देखावा. ' मोठें अवडंबर रचलें असतां त्याचा शेवटीं एका क्षणांत ..... विध्वंस होऊन जातो ' –नि ६६९. २ आवेश; गर्व; तोरा; ताठा. ३ हूल दाखविणें. आडंबर पहा. [सं. आडंबर]

अवडळ–ळु—आवडळ पहा.

अवडा—वि. आवडा; आवडता; लाडका; नावड शब्दाच्या जोडीनें उलट अर्थी वापरला जातो. ' मला हा पुत्र अवडा तो नावडा असा नाहीं, ते दोघे सारखेच. ' [आवड]

अवडादेवडा—वि. अडवातिडवा; वांकडातिकडा; अप्रिय; संतापदायक; अपमानकारक (मनुष्य, भाषण, कृत्य इ.). [अडवा–अवडा द्वि.]

अवढंगी—वि. वाईट चालीचा; बेढंगी. [सं. अव+हिं. ढंग]

अवढणणें—अक्रि. वीट-विळस-शिसारी येणें; अवढणें पडणें; कंटाळा येणें; तिटकारा येणें. [?]

अवढणें—न. वीट; तिटकारा; शिसारी, कंटाळा. अवढणें पहा. (क्रि० पडणें, येणें).

अँवढा—पु. १ मुखांतील द्रव (रस) जो क्षणक्षणीं गिळावा लागतो तो. (क्रि० येणें, जाणें, परतणें, उतरणें, गिळणें). 'मला अँवढा जात नाहीं, दूध कसें गिळूं. २ (कों.) चिडखोरपणाची किंवा घुम्या रागाची लहर; रागानें किंवा इतर विकारानें मनःक्षोभ होऊन कंठ दाटून येणें, (क्रि० धरणें–सोडणें–येणें इ०). ३ हुंदका.

अवढा, अवढाय, अवढ्या—पु. (कों.) अरुचि; नावड; अभक्ति; किळस; वीट; कंटाळा. (क्रि० पडणें–येणें–काढणें). [अवढणें]

अवढाण—वि. (कों.) द्वाड; ओढाळ; हट्टी; अनावर; मोकाट; मस्त (गुरु, ढोर). 'ते मज नाटोपे अवढाण।' –दावि ७६७. [सं. अव+स्थान?]

अवंत्र्यानागनाथ–पु. अवंढे येथील देवस्थान. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. अवंढे हें परभणी जिल्ह्यांत आहे.

अवण–णी–णें—आवण–णी–णें पहा.

अवणापावणा—क्रिवि. अडणापाडणा पहा.

अवंतण–णें–न., **अवता**—पु. १ आमंत्रण; बोलावणें. (क्रि० देणें, सांगणें, करणें). 'जन्ममरणासी अवतणें। दीधलें तेणें सर्वथा।' –एरुस्व १२.३८. २ अक्षता टाकून आव्हान करणें; विधिपूर्वक बोलावणें, अभिमंत्रण करणें. आंवतण पहा. म्ह० अवतण टाकून भीक मागणें = दिलेल्या आमंत्रणाला झिडकारून भीक मागत हिंडणें म्हणजे (ल.) मूर्खीपणानें वागणें. [सं. आमंत्रण; प्रा. आमंतण–अपभ्रष्ट आवंतण; द्रा. अउतण]

अवंतणें—क्रि. आमंत्रण देणें; बोलावणें; पाचारणें. 'भुजंगगृहीं जो करी वास। त्याणें अवंतिलें मृत्यूस॥' –जैअ ४१.३. [सं. आ+मंत्र्]

अवतरण—न. १ उतरणें, खालीं येणें; देवादिकांचें पृथ्वीवर–मृत्युलोकीं जन्मास येणें; अवतार; अवतरण्याची क्रिया, व्यापार. 'पावेती म्हणे माग वरदान। तंव अदिती विनवी वचन। कीं त्वां करावें अवतरण। माझे ठाईं॥' –कथा २.११.३७. २ अधःपात; अधोगति; अवपतन. ३ विवरणात्मक भाषण किंवा विधान (श्लोक, वाक्य इ०वर); टीका स्पष्टीकरण; भाष्य; टिप्पणी. ४ उतारा; उध्दृतवचन; 'अभियुक्त ग्रंथकारांच्या ग्रंथांतून आपल्या मतास पुष्टि आणण्याकरतां किंवा लेखास शोभा आणण्याकरतां घेतलेलें वचन' –नि. १४३. ५ आवेश; वारें; संचार. 'जेणें चैतन्यासी भरे अवतरण।' –विपू ५.३९. ६ मूर्ति; प्रत्यक्षपण; प्रत्यक्ष अवतार. 'तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण।' –ज्ञा ११.४२. 'ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे।' –ज्ञा ६.३४७; १४.४१४. [सं. अव+तृ] ॰चिन्ह–न. ग्रंथांतील किंवा भाषणांतील उतारा दाखवितांना प्रारंभीं व शेवटीं उलटया व सुलट्या स्वल्पविरामाच्या आकारांचीं चिन्हें (‘ ’) देतात तीं.

अवतरणिका—स्त्री. १ अवतरण; भाष्य; टीका. २ प्रस्तावना; सूचना. ३ अनुक्रमणिका; विषयसूचि; सारांश. 'ऐसें नामधारक विनवीत। सिद्धाचे चरणीं लागत। म्हणे श्रीगुरुचरितामृत। अवतरणिका मज सांगा॥' –गुच. ५.३.१३. [सं.]

अवतरणें—अक्रि. १ अवतार घेणें; देहधारी होणें; आकारास येणें; प्रगट होणें (देवदेवता, देवलोकवासी). 'तेथ रुद्रगणांचे संघाट। अवतरत देखे॥' –ज्ञा ११.१४३. २ (काव्य) खालीं येणें; उतरणें; अधोगमन करणें; अध.पतन होणें. ३ (ल.) बडबडणें; प्रलापणें; असंबद्ध बोलणें; अचरटपणा करूं लागणें; अव्यवस्थितपणें वागणें. ४ आवेश येणें; संचार होणें; वारें शिरणें. 'जे प्रकृति डंका अनुकरे। ते प्रकृति डंके अवतरे।' –अमृ ५.३६. ५ सरसावणें; पुढें होणें. 'तेथ सुगरणी आणि उदारे। रसज्ञ आणि जेवणारे। मिळनी मग अवतरे। हातु जैसा॥' –ज्ञा १३.११९. [सं. अव+तृ]

अवतरविणें—सक्रि. प्रगट करणें. 'आत्मा अवतरवित मंत्र। अक्षरें इयें।' –ज्ञा १५.५७६. [सं. अव+तृ]

अवतंस—न. १ पुष्पें, रत्नें इत्यादिकांचें केलेलें शिरोभूषण; झुबका; गुच्छ; तुरा; मुगुट; किरीट. 'भुजपर्यंत लोळे अवतंस॥' २ कानांतील एक दागिना; कुंडल; कर्णभूषण. [सं.]

अवताण—न. अयोग्य किंवा भलती वेळ, काळ; अकाल; अवठाण; योग्य हंगामापूर्वीचा काळ. ताण पहा. [सं. अव+म. ताण]

अवताभवता, अवतींभवतीं—क्रिवि. सभोंवती; भोंवताली; सभोंवार; इकडे तिकडे. [भवता द्वि.]

अवतार—पु. १ एकाया देवतेचें मनुष्याच्या किंवा पशूच्या रूपानें किंवा इतर कोणत्याहि रूपानें पृथ्वीवर अवतीर्ण होणें. 'कृष्ण हा देवाचा आठवा अवतार आहे.' विष्णूचे मुख्य दहा अवतार–मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी. त्यांपैकीं आठ होऊन गेले व नववा चालू आहे; अवतरण. २ (ल.) पवित्र किंवा असाधारण सुप्रसिद्ध माणूस; दैवी अंशाचा माणूस; देवावतार. ३ अघोरकर्मे करणारा; महापापी;

राक्षस अवतार. ४ उनाड, उपद्व्यापी, शिरजोर, त्रास्य माणूस–मुलगा; उत्पातीपणा. ५ अवतरण; उतरणें; खालीं येणें. ६ प्रस्ताव; उतारा वगैरे अवतरणाचे अर्थ. अवतरण पहा. ७ (दशावतारांवरून) दहा संख्या. 'अवतार पावेतों.' –रा १२.१२४. ८ आयुष्य; जीवन. 'अवतार जरी संपेल।' –संग्रामगीतें ४८. ९ स्वरूप; वेष. 'आज तुमच्या मुलाचा अवतार पाहण्यासारखा होता!' १०(ख्रि.) इन्कारनेशन या इंग्रजी शब्दाचा पर्याय. प्रभु येशू ख्रिस्ताचें देहधारण. ख्रिस्ताचें स्वतःचें ऐतिहासिक प्रकटीकरण. 'येशू ख्रिस्त... त्याचा अवतार झाल्यापूर्वी जें काम करीत होता तें तीन प्रकारचें होतें. –ईवि ४१. अवतार शब्दापासून बनलेलीं कांहीं वर्णनात्मक–संकेतवाचक नामें. १ कर्णावतार=विलक्षण उदार माणूस; अतिशय दानधर्मी. २ धर्मावतार=फार न्यायी, सद्गुणी, स्वभावानें सात्त्विक असा मनुष्य. ३ कृष्णावतार=अत्यंत खेळाडू, चैनी, विलासी, गमत्या, चेष्टेखोर मनुष्य. ४ बौद्धावतार=शांत,मौनी माणूस. ५ रामावतार=पवित्र, सत्यवादी, निर्मळ, पापभीरु, एकवचनी माणूस. ६ रुद्रावतार–यमावतार=संतापी, उग्र, क्रूर, भयंकर माणूस. ७ वामनावतार=खुजा, खुरटा मनुष्य. **०घेणें–धरणें**–विशिष्ट काम अतिशय करूं लागणें; उच्छृंखलपणें, अव्यवस्थितपणें–दुष्टपणानें–वेडगळपणानें–वागणें. **०आटोपणें–होणें–संपणें**–१ उत्कर्षदशा जाऊन निकृष्टावस्थेस पोंचणें; शून्यत्व पावणें. २ मरणें. 'पति गेल्यावर आटपला श्वशुराचाही अवतार'–विक १५. **०कार्य–कृत्य**–न. १ अवतार घेण्याचा उद्योग, कारण, विषय; २ (ल.) आयुष्यांतील मुख्य कर्तव्य. 'आमुचें अवतारकृत्य जाहलें समग्र॥' [सं.]

अवतारणा—स्त्री. आश्रय; अवलंबन; अवतार. 'वस्तुस्थितीचें वर्णन संपल्यावर कल्पनेची अवतारणा करून प्रश्न करी' –पप्रे ४३. [सं. अव+तृ]

अवतारणें—अक्रि. वेड–चळ लागणें; चळणें; स्वच्छंदी बनणें; पिसाटणें; अव्यवस्थित, बेशिस्तपणें वागणें. [सं. अवतार]

अवतारी—वि. त्रिप्र. अवतारीक. १ पृथ्वीवर देहधारी, प्राणिरूप धारण केलेली (देवता). २ अत्यंत पवित्र किंवा बुध्दिमान; सुप्रसिध्द; असामान्य; दैवी अंशाचा; लोकोत्तर (व्यक्ति). 'परिस्थितीला न जुमानतां राष्ट्राला वळण देणें हें अवतारी माणसांचें कर्तव्य आहे.' अवतारी पुरुष असा रूढ प्रयोग. ३ धाडसी; अतिदुष्ट; उनाड; आडदांड; उग्र; घोरकर्मी (इसम, मुलगा). [अवतार]

अवतारू—वि. (गो.) दहा संख्या (व्यापारी भाषेंतील सांकेतिक संज्ञा). अवतार अर्थ ६ पहा.

अवंति, अवंतिका—स्त्री. उज्जनी; सात अतिपवित्र, संस्मरणीय नगरांपैकीं एक. 'अयोध्या म(दु)धुरा माया काशी कांची अवंतिका।' इ० **०देश**–पु. माळवा. –पया २११. [सं.]

अवतीर्ण—वि. १ मानवी स्वरूप धारण केलेली; अवतार घेतलेली (देवता). २ प्रगट झालेला; पुढें आलेला; जाहीर; ज्ञात झालेला. ३ खालीं आलेला; उतरलेला; अधःपात झालेला. [सं.]

अवथण(न)करू—वि. अवथणलेलें (मूल)

अवथणणें, अवथ(था)नणें—अक्रि. १ अंगावर प्यावयाचें बंद केल्यानें (विशेषतः गरोदरपणीं) मुलाची प्रकृति खालावणें; अंगावर पिण्याचें तुटणें. आयनेरणें पहा. [सं. अव+स्तन]

अवथान—न. अंगावर पिण्याचें बंद केल्यामुळें लहान मुलाची झालेली स्थिति (विशेषतः आईच्या गरोदरपणीं); आयनेरें. [सं. अव+स्तन].

अवथिणें—सक्रि. १ इच्छिणें; योजणें. 'प्रतिज्ञेतें भीष्में मनि अवथिलें या दृढतरे॥' –वामन (भीष्म प्रतिज्ञा). 'लाथेनें अपुल्या मनीं अवथिलें स्वर्गावरी जावया।' –केक ६. [सं. अव+स्था ?]

अवद्-दा-ध—पु. अवधि; अवकाश; मध्यंतरींचा काळ. [सं. अवधि]

अवदशा–सा—स्त्री. १ दुर्दैव; दुर्भाग्य; कमनशीब. 'आतुडलों होतों मरणगांवीं. ते अवदसाचि अवधी। फेडिली आजी।' –ज्ञा १६.३४. २ विपत्ति; विपन्नावस्था; दारिद्र्य; निकृष्ट स्थिति. 'श्रीमूर्ति देखोनि राउळिची। फिटली अवदशा डोळेआंची॥' –ऋ ३६. 'तुज आली अवदशा यथार्थ॥' ३ (ल.) कर्कशा; भांडकुदळ स्त्री; जगभांड (शिवी). 'तूं घराण्याचें वाटोळें करायला वसली आहेस. अवदसा नाहीतर!' अमात्यमाधव (न. चि. केळकर). [सं.] **०आठवणें**–वाईट, निकृष्ट स्थिति प्राप्त होईल असे भलतेसलते घातक विचार मनांत येणें; वाईट वर्तन करणें. 'अहह! आठवली मजही अशी। अवदसा, वद सांप्रकरी कशी॥' –लक्ष्मण शास्त्री लेले. [सं.]

अवदसचिन्ह—न. ओढवणाऱ्या दुर्दैवाचें किंवा दारिद्र्याचें चिन्ह, लक्षण, खूण; भावी संकटाची, दारिद्र्याची खूण. **अवदसेची फेरी**–स्त्री. दुर्दैवी, अभागी इसम. [अवदशा]

अवंदां—क्रिवि. (कुण.) १ यंदा; चालू सालीं; औंदा. २ सध्यां; सांप्रतकाळीं. 'अवंदाचां काळीं । मोठकी राणीव सांसीनिली।' –शिशु ४८१. 'दाविले दुःखाचे दिवस, वृथा गेलें नवस, सख्यारे अवंदा।' –प्रला १७८. ३(हेट) अवनु पहा. [फा. कुण. आयन्दा=पुढें, भविष्यकाळीं. तुल० सं. आयात्+दा, किंवा अद्य]

अवदांडा––पु. (कर.) भूदैड. [सं. अव+म. दांडा]

अवदान—न. १ अग्नींत टाकावयाच्या एका आहुतीस पुरायाजोगें होमद्रव्य. (सामा.) आहुति. 'तेथ पूर्णाहुतीस कारण। घालितां जीवभावाचें अवदान।' –एभा १९.७७. 'टाकोनि हातींचें

अवदान। ' –रावि ३८.६. २ (ल.) लांच, बक्षीस–खाणें–घेणें; अपहार; लबाडीनें केलेला अभिलाष; खाद; खादगी; हरामखोरी. (क्रि० देणें, मारणें). ' आजपर्यंत किती अवदानं तूं घशाखालीं घातलींस बोल ? ' –तोर्वं १६४. **म्ह०** गृहस्थास अवदान, भिक्षुकास शय्यादान किंवा कारकुनास अवदान, भटास महादान. ३ बळी. ' मेंदरीहेंदरीं दैवतें । कोण तीं पूजी भूतेंखतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागतीं शितें अवदान । ' –तुगा ७००. [सं.]

अवदार––न. (नाविक) शीड; अवजार पहा.

अवदिवस, अवदिस––पु. १ वाईट दिवस; अनिष्ट दिवस; साधारण दिवस. २ आड दिवस; सण नसणारा दिवस. **म्ह०** सणीं घुगऱ्या, अवदिशीं पुऱ्या. [सं. अव=वाईट+दिवस]

अवदीप्ति––स्त्री. तेज; प्रकाश; ज्ञान. ' जे श्रीकृष्णाचि आंजवलि का। अवदीप्ती कृमी कीटकां ' –दाव १२२ [सं.]

अवदुंबर––पु. औदुंबर पहा.

अवध––स्त्री. १ शेवट; अखेर; अंत (मुदतीचा); निघून जावयाची वेळ. २ अवधि; वेळ; अवकाश; मधला काळ. ' स्वयंपाक होण्यास मध्यें चार घटका अवध आहे. ' ३ मधील अंतर; ओलांडावयाची, चालून जावयाची, शिल्लक राहिलेली जागा–जमीन [सं. अवधिः गु. अवध–धी=शेवट, मुदत]

अवधंडा––पु. जिकडे तिकडे पसरलेलें मोठें संकट; फार मोठा अनर्थ, उत्पात. जसेः वादळ; भूकंप; ढोळधाड इ० [अवदांडा ?]

अवधणा, अवधाण, अवधान––पु. गर्व; दुखापत झाली असतां बगलेंत किंवा सांध्यांत येणारी गांठ; वाधणा. [सं. अवध्मान, अवदहन ?] **खाजवून अवधणा आणणें**–भांडण उपस्थित करणें–काढणें. स्वतःवर त्रास किंवा संकट मुद्दाम ओढून आणणें.

अवधा––स्त्री. (गणित) शिरोकोनापासून पडलेल्या लंबाच्या योगानें त्रिकोणाच्या पायाचे जे दोन भाग पडतात ते प्रत्येकीं. [सं. अवाधा]

अवधात––वि. उनाड; खोडकर; खोडसाळ; हट्टी; शिरजोर, अवखळ, त्रासदायक (मूल). [सं. अव+धा किंवा धातु ?]

अवधातु––वि. ज्यामध्यें कोणताहि धातु नाहीं असें; अधातु; निकृष्टधातुयुक्त. ' अष्ट धातु सायासें । जेवि वेधिजेति स्पर्शे । तरि नोहें ऋद्धिपुर ऐसें । तें अवधातुते वेधी । ' –ऋ २०. [अव+धातु]

अवधान––न. १ लक्ष; एकाग्रता; ध्यान; भान; सावधगिरी; हुशारी; जागृति. ' यापरी जे निजसज्जन । तिहीं व्हावें सावधान । द्यावें मज अवधान ॥ ' –एभा १.५५. २ मनाचा कल, ओढा, अनुसंधान; उद्देश; हेतु; नजर; रोंख; चित्त. [सं.]

अवधानी––वि. पुष्कळ गोष्टींकडे एकाचवेळीं लक्ष पुरविणारा; एकाच वेळीं अनेक मोठ्या व गुंतागुंतीच्या मानसिक क्रिया, व्यापार करणारा; उ० अष्टावधानी, दशावधानी, शतावधानी इ०. [सं. अवधानिन्]

अवधारण–न. **णा**––स्त्री. १ दृढ निश्चय, खात्रीनें, निश्चयानें ठरविणें; स्पष्टपणें निवेदन करणें, मांडणें, धरणें. २ (व्यापक) प्रसंगावधान, आत्मसंयमन; सावधगिरी; हुशारी; देहभान. ३ लक्षांत ठेवणें; स्मरणांत ठेवणें; स्मृति; स्मरण; धारणा. [सं.]

अवधारणें––उक्रि. १ (काव्य) स्पष्टपणें–खात्रीचा निश्चय करणें; निश्चित मत, धोरण ठेवणें; ठाम मत असणें. २ मनांत, लक्ष्यांत, ध्यानांत, स्मरणांत ठेवणें. ' ऐसे अभ्यंतरीं अवधारी । ' ३ ऐकून घेणें; लक्ष्य देणें; ध्यानांत आणणें; लक्ष लावून श्रवण करणें. ' आतां माझें विणविलें । अवधारिजे । ' –शिशु १४६. ' हे माया मूलप्रकृती । पैरमपुरुषाची निजशक्ती । तियेसी तेणेंसी संगती । ते अवधारिजो । ' –विपू ३.४६. [सं. अव+धृ]

अवधारित––वि. १ निश्चित; ठराविक; खात्री केलेलें; निर्धारित. २ स्मरणांत, आठवणींत असलेलें. [सं]

अवधि–पु **धी**––स्त्री. १ मर्यादा; सीमा; कार्याच्या आरंभाची व समाप्तीची वेळ–घटका; पर्यवसान; शेवट; एखाद्या वस्तूचा अथवा गोष्टीचा परिच्छेद करावयाचा असला म्हणजे जी रेषा काढतात ती. ' तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । ' –ज्ञा २.२४१. ' यद्भुजबलनिधिला नसे अवधि राहे । '–मोकर्ण ४३.८७. २ मधला काळ; अवकाश; मुदत, ठराविक अंतर. ' तुकयाबंधु म्हणे थोडें । अवधि उरली आहे पुढें । ' –तुगा २७३. ३ उपमा देण्याचें प्रमाण; तुल्ना करण्याचें मोजमाप–इयत्ता; अमुक गोष्टीहून लहान–मोठें, चांगलें–वाईट ठरवितात ती गोष्ट. ४ सुरवातीची जागा–स्थळ–काळ; अवलंबिलेला उद्दिष्ट मार्ग; आरंभाची किंवा अखेरची गोष्ट. ५ मूळस्थान, उगमस्थान; उत्पत्तिस्थान; आरंभस्थान (एकाद्या कामाचें–व्यवहाराचें); उत्पादक; जनक. ६ (समासांत) शब्दयोगी अव्ययाप्रमाणें १ पर्यंत, पावेतों याअर्थी उपयोग.–राज्यावधि, कालावधि, देशावधि, दिन–मास–वर्ष–अवधि; –ज्ञा ८.९६३. २ कालांत, अंतरांत, भर असतांना या अर्थी. ७ आश्रयस्थान; अंतिमस्थान. ' तुजचि अवधि करून । ठेविले असती प्राण । ' –रास ३ ५८. ८ अवधारणा पहा. **०शेष**–वि. उर्वरित. –न. ब्रह्म. [सं.]. **०साकांक्ष–सापेक्ष**–वि. अवधीची आकांक्षा किंवा अपेक्षा असणारें; तुल्नात्मक; संबंधीं; कांहीं तुल्नात्मक मापार्शी किंवा इयत्तेशीं संबंध असणारें.

अवधुत (शीर्ष)––न. डोळे एकदांच वांकडे करून खालीं करणें, निरोप पोचविणें, ओळख पटलेली दाखविणें इत्यादींबद्दल हा अभिनय करितात. [सं. अव+धू=हलविणें]

अवधूत––वि. १ टाकलेलें, सोडलेलें. २ विरक्त; विरागी; वैष्णविक विकारालिप्त. ' अवधूत निराकारी । तयाची तिन्ही लोकीं

फेरी' ३ नग्न; दिगंबर.–पु. १ दत्तात्रेयाचा अवतार. २ विरक्तावस्थेत फिरणारा गोसावी; गोसावी पंथांतील; नग्न गोसावी. **०गीता**–स्त्री. भागवतांतील एक प्रकरण. ही अवधूतपंथी तोंडानें म्हणत फिरतात. **०पंथ–मार्ग–संप्रदाय–चरित्र–दीक्षा**–पुनस्त्री. १ अवधूत गोसाव्यांचा संप्रदाय, त्यांची रीतभात, रहाणी. २ (ल.) जात गोत न पाळणें; वर्णसंकर; भ्रष्टाकार; दुराचरण. **०मूर्ति**–वि. दत्तात्रेय. 'सकळ ब्रह्मांडीचीं दैवतें धावतीं । अवधूत मूर्ति पहावया ।' [सं. अव + धू = धुणें]

अवध्य—वि. १ वधासाठीं निरुपयोगी; ज्यास ठार मारावयाचें नाहीं असा. २ न मारला जाणारा. [सं.]

अवंध्य—वि. लाभदायक; फलदायक; फायदेशीर; नफ्याचा; मिळकतीचा; हिताचा; उपयोगी. 'दिवस अवंध्य करावा, वंध्य जाऊं देऊं नये.' [सं. अ+वंध्य=नापीक, विफल]

अवन—न. रक्षण; संरक्षण. 'दीनावनाविणें क्षण देइल दयिता दया कशी वर्तु ।' –मोसंशयरत्नमाला २४. [सं. अव्=संरक्षण करणें]

अवन—वि. निर्जल. [सं. अ+वन=पाणी]

अवनत—वि. १ लवलेला; वांकलेला; ओणवा. २ नम्र; शरण; वश; निरहंकार; विनयशील. [सं. अव+नम्–नत]

अवनति—स्त्री. १ खालीं जाणें. २ अपकर्ष; दुस्थिति; दुर्दशा; खालावलेली स्थिति. [सं. अव+नम्–नति]

अवन(ना)स—स्त्री. (कों.) अनन्नस पहा.

अवनि—स्त्री. पृथ्वी; धरित्री; धरणी. 'येरें वायव्यास्त्र लाविलें गुर्णीं । ब्रह्मामारुत सुटला रर्णीं । वा–यानें जाऊं पाहे अवनी ।' –एरुत्व १२.१०५. [सं.]

अवनिगा–घा—स्त्री. हयगय; निष्काळजीपणाची वागणूक; काळजीचा अभाव; उपेक्षा; हेळसांड; अवजतन. [अव + फा. निगा=दृष्टि]

अवनीति—स्त्री. अन्याय. 'अवनीतीनें वर्तों नये। आंगबळें।' –दा २.२. २२ [सं. अव+नीति]

अवनु—क्रिवि. (कु. हेद.) चालू सालीं; अवंदा पहा. 'अवनु सुपारी बरी पिकुंक ना.' [फा. आयंदा=पुढें]

अपथ्य—वि. कुपथ्य; पथ्यास अहितकारक; विरोधक. [अपथ्य अप.]

अवपीड—पु. १ स्त्रियांचा डोक्यांत घालण्याचा एक दागिना. (?) २ शिंक आणणारा पदार्थ; औषध. [सं.]

अवबाधा—(गणित) अवधा पहा. [सं.]

अवबोध—पु. ज्ञान; जागृति; जाणीव; बोध पहा. 'हे स्वप्नावबोधु ठेले।' –ज्ञा ३.५७. [सं. अव+बुध्]

अवबोधक—वि. बोधक पहा.

अवभाष—स्त्री. दुरुत्तर; दुष्ट बोल; निंदा. [सं. अव+भाष्]

अवभास—पु भास; भ्रम; भ्रांति. 'माया अविद्येचिया अवभासा ।' –विपू ७.२६. [सं. अव+भास्]

अवभिताड—न. कुंभाराच्या भट्टीच्या पुढची भिंत. [अवा+भिताड; द्रा. आवि=भट्टी+सं. भित्ति=भित]

अवभृत (थ), अवभृत–स्नान—न. यज्ञसमाप्तीच्या वेळीं करावयाचें स्नान. 'पूर्णाहुती पडली हुतार्शी । तेथ अवभृथ समरसीं । सहजे जाहलें ।' –ज्ञा ४.१३८. 'अवभृथ स्नान केलें । तैसे सकळ लोक सुस्नात जाहले ।' –ह ३५.१४०. [सं.]

अवमत—वि. अपमान केलेला; तिरस्कृत; अवमानित. [सं.]

अवमर्द–न—पुन. १ तुडविणें; चेचणें; कुबलणें; कुसकरणें; दाबणें; मळणी करणें; पिळणें. मर्दन करणें २ (ल.) नासधूस; पायमल्ली. [सं.]

अवमर्यादा—स्त्री. अमर्यादा. अपमान; हेटाळणी; मर्यादेचा अतिक्रम, उल्लंघन. [सं. अमर्यादा अप.]

अवमान—पु. अपमान; हेलना; तुच्छता. अनादर; अवहेलना; उपेक्षा; दुर्लक्ष. [सं.]

अवमानणें—उक्रि. अपमान करणें; अनादर करणें; तिरस्कार करणें, वाईट रीतीनें वागविणें. [सं. अव+मन्]

अवमानित—अवमत पहा.

अवमास—वि. १ ढिला; अव्यवस्थित; विस्कळित; गैदीपणानें चालविलेला (उद्योग, धंदा). २ उद्धट; बेपर्वा; धाडसी; हट्टी; अडदांड (इसम, जनावर). –क्रिवि. स्वैरपणानें; मोकाटपणें; मोकळेपणाने; स्वेच्छाचारानें; बदफैली पणानें. (क्रि० असणें, फिरणें, हिंडणें, राहणें). [सं. अव+मस्=मापणें, मोजणें]

अवयव—पु. १ शरीराचा भाग; गात्र, इंद्रिय. २ परस्पर संबद्ध झालेल्यांतील सुटा; एखाद्या गोष्टीचा भाग, तुकडा; जोडाव याचा भाग (पंचभूतांपैकीं प्रत्येक भाग; सामान, कपडे यांपैकीं प्रत्येक). 'मग दोन घटिका स्वस्तिक्षेम। सेविनी ते विश्राम । उपरी अवयव परिघानून । मार्ग कसूं म्हणताती ॥ ।' –नव २३.६९. ३ (अनेकवचनी प्रयोग) स्त्रीचे स्तन. (क्रि० येणें) 'मुलीला अवयव आले.' ४ (बीज.) गुणक; बीजगणितांतील एखाद्या संख्येचे भाग (इं.) फॅक्टर. ५ (संगीत) चिजेचे निरनिराळे भाग. नांवें:– उद्ग्राह, मेलापक, ध्रुव, अंतरा, आभोग, स्थायी, संचार. हे प्रबंधाचे प्राचीन अवयव होत. व स्थायी, अंतरा, संचारी व आभोग हे आधुनिक चिजांचे अवयव होत. [सं.]

अवयवशः—क्रिवि. प्रत्येक भाग घेऊन; पृथक्पणें प्रत्येक वेगवेगळें करून; भिन्न करून; एकेक (संस्कार करणें). 'हा ग्रंथ मी अवयवशः अवलोकन केला.' [सं.]

अवयवार्थ—पु. १ समासादि शब्दांतील प्रत्येक अवयवाचा-पदाचा अर्थ. २ सरळ वाच्यार्थ. [सं.]

अवयवावयवी भाव—पु. अवयव आणि अवयवी यांचा जो परस्पर संबंध तो; पदार्थ व त्याचे भाग यांमधील संबंध. उ० पट व तंतु यांमधील. [सं.]

अवयवी—पु. निरनिराळे भाग, इंद्रियें, उपांगें असलेला-जोड भाग असलेला पदार्थ, शरीर; शरीरी; देहधारी. ' सांगपा धनंजया । अवयवी अवयवियां । आच्छादिजे कीं तया । तेंचि रूप ॥ ' -ज्ञा १४.१२५. [सं.]

अवयाल—न. (हेट) ओल्या खोबऱ्याचें कढवून काढलेलें तेल. अरंडेल पहा. [गो. अवल=पूर्ण तयार झालेला नारळ]

अवर—क्रिवि. अलीकडचा; ह्या बाजूचा (कधीं ' तवर ' शीं जोडून उपयोग). ' म्हणौनि पुरुषु क्षराक्षर । दोन्ही देखोनि अवर ॥ ' -ज्ञा १५.५३८. -वि. १ धाकटा; वयानें लहान. २ पाठीमागचा; नंतरचा. ३ कनिष्ठ; नीच. ४ पश्चिमेकडील. [सं.]

अवर—पु. तास. ' नंतर चिकण मातीने ह्या मुशींचीं तोंडें बंद करून त्या भट्टींत घालून किती एक अवरपर्यंत तापवितात. ' -मराठी ६-वें पुस्तक. पृ. १२९ १८७५. [थ्री. लॅ. होरा=तास; इं. अवर]

अवरंगाबादी—वि. १ औरंगाबादसंबंधीं-विषयक. २ (उप.) (काशीकर, नाशिककर याप्रमाणें संकेतानें) हुशार; कावेबाज; भामट्या; धूर्त; सोदा. (अवरंगाबाद शहर मोंगलाईत आहे) [फा. औरंग+आबाद+इ]

अवरज—पु धाकटा भाऊ. **०जा**-स्त्री. धाकटी बहीण [सं. अवर+ज]

अवरज—न. (प्रां.) मोठें, अपार नुकसान; सर्वप्रकारें नाश; समूळ, निःशेष नासधूस; नुकसान. जमें-गुरांनीं केलेली शेतांची नासाडी. [सं. अ+वर्ज्]

अवरजा—पु. १ हिशेबाची वही, डायरी, रोजनिशी, खतावणी यांतील एक सदर; उतारा; खतावर्णीतील एक स्वतंत्र खातें; रोजकीर्दीतील एकाद्या विशिष्ट बाबीच्या जमाखर्चाचा उतारा. २ (सामा.) हजेरी पत्रक. आवर्जा पहा. [फा. आवर्जा, आवारचह् अवारिज, आवारिजह्=रोजकीर्द]

अवरजून—अ. (विरू) आवरजून १ स्पष्टपणें; हडसून खडसून. २ प्रत्यक्ष; मुद्दाम; एकदम; तडक; बुध्द्या. ' अवरजून पंचप्राण झड घालिती खगेंद्र सुधारसा । ' -होला १०७. [सं. अ+वर्ज्य, किंवा आर्जव ?]

अवरटा-डा—वि. विवाहाची योग्य वेळ गेल्यानंतरहि विवाह न होतां राहिलेला अविवाहित; ब्रह्मचारी. अठवरा पहा. [सं. अ+ष्ठ+स्था; किंवा अठवरा वर्णविपर्यास]

अवरटेपणा—पु. ब्रह्मचर्य; कौमार्य.

अवरणें—आवरणें पहा.

अवरपर—वि. परोक्षापरोक्ष; दृष्टश्रुत-हंको. वाक्य २२६७. [सं. अवर+पर किंवा अपर]

अवरस—औरस पहा.

अवरस चवरस—औरस चौरस पहा.

अवरा—पु. (कों.) कडवे वाल; कडवा; पावटा; अळंमुंग्यासारखा एक धान्याचा प्रकार. [का. अवरी; ता. वेलावरायी: तुर्की अवेर. तुल० सं. अवारिका.]

अवरात्र—स्त्री. रात्रीचा शेवटचा प्रहर. [अपरात्र अप.]

अवरी—वि. अविवाहित; कुमारी. ' त्याची कन्या चंपकमालिनी । ते अवरीच असे आजुनी । ' -जै ५५.८४. [सं. अ+वृ]

अवरीत—स्त्री. १ दुर्वर्तन; विरुद्ध वर्तन, आचरण. २ अप्रीति; खप्पामर्जी. आवरी पहा. [सं. अव+रीति]

अवरुद्ध—वि. १ अडथळा केलेलें; रोधलेलें; अटकाव केलेलें; हरकत घेतलेलें; थांबविलेलें; बंद पाडलेलें. २ राखलेली; ठेवलेली; बाळगलेली (राख, रांड). [सं. अव+रुध्]

अवरोध—पु १ अडथळा; हरकत; अटकाव; अडकाठी; प्रतिबंध; कुंठितावस्था; ' कृष्णप्राप्तीशीं अवरोधु । सबळ क्रोधू उपजेल ॥ ' -एरुस्व २.४८. सामाशब्द-मलावरोध, मूत्रावरोध, श्वासावरोध, रक्तावरोध, कंठावरोध, व्यवहारावरोध, गत्यवरोध, मार्गावरोध, शक्त्यवरोध. २ नातलगाच्या मृत्यूच्या श्रवणानें येणारी अशुद्धता; सुतक, मृताशौच. ३ अंतःपुर; जनानखाना; राणीवसा. ' तदुपरि अवरोधद्वार किंचिद्विलंबें । यदुपति मग पातें पार्थे हस्तावलंबें ॥ ' -सारुह ५.४३. -स्त्री. कुलीन स्त्री; औरत. [सं.]

अवरोधणें—उक्रि. (काव्य) अडथळा करणें; हरकत करणें; आडकाठी करणें; थांबविणें; खोळंबविणें. ' वदन विधुभयानें ध्वांत हें कावगंधे । ' -सारुह ६.३२ [सं अव+रुध्]

अवरोह-ण—पुन. १ खालीं उतरणें; अवतरण; अधोगमन; पासून, खालीं, वरून, बाजूनें जाणें. २ वर चढणें, जाणें; जसें-मंचकावरोहण. ३ (संगीत) निषादापासून खालीं षड्जाकडे स्वर म्हणत येणें याच्या उलट आरोह. **अवरोहीवर्ण**-पु. (संगीत) निषादापासून खालीं षड्जाकडे येतांना लागणारे वर्ण. [सं.]

अवर्गीय—वि. वर्गीकरण, वर्गवारी न केलेलें, न करतां येणारें; संकीर्ण; किरकोळ; ज्यांत निरनिराळे अनेक प्रकार आहेत असा. व्याकरणांत हा प्रयोग येतो. [सं.]

अवर्जुन—अवरजून पहा.

अवर्ण—वि. १ विजातीय, आपल्या जाति-वर्णाबाहेरील; २ (ल.) नित्य; दूषणीय; चातुवर्ण्याबाहेरील. ' जो खादाड आणि स्थूलोदर । जो अवर्णस्त्रियेचा करी स्वीकार । जो श्वशुरगृहीं राहे निरंतर । तयाचा विचार नायकावा ॥ ' -जै २.९१. [सं. अ+वर्ण]

अवर्ण—अवर्णनीय, अवर्ण्य पहा. 'अवर्ण अंबाऱ्या शोभल्या ॥' –नव १३.७५. [सं. अ+वर्ण]

अवर्णनीय, अवर्ण्य—वि. वर्णन करण्यास कठिण असे; शब्दातीत; अनिरूपणीय. [सं. अ+वर्ण्]

अवर्णपूजा—स्त्री. उपदेवतांची पूजा; मुख्य देवतांखेरीज इतर देवतांची पूजा. 'भक्तजनाचिया काजा । जेवीं करिती अवर्णपूजा । तेवीं सैन्य रचिलें वोजा । ' –एरुस्व ६.५४. [सं. आवरण]

अवर्षण—न. १ पावसाचा अभाव; वृष्टीचा अभाव. अनावृष्टि. 'मरतया अमृतपान । कीं अवर्षणीं वर्षे घन । '–एरुस्व ५ ८४. २ दुष्काळ, 'आणि सुखाचें अवर्षण पडिलें । ' –ज्ञा ११.३८१. [सं. अ+वृष्]

अवल—वि. १ पहिला; उत्तम; प्रमुख. २ (ल.) अतिशय –पया ७२. मोठा; उच्च. ३ (गो.) पूर्णपणें तयार झालेला (नारळ). ४ पहिल्या प्रतीचा, दर्जाचा, (जमीन, रेशीम वगैरे) वर्गवारींत पहिला –सन १७८८ चा पहाण खर्डा (कासारीतफै कागद). –क्रिवि. प्रथमतः; पहिल्यांदा; प्रारंभीं; आदौ. –स्त्री. पहिला किंवा आरंभींचा भाग. 'पावसानें अवल साधली, अखेरी घालविली. ' [अर. अव्वल; अव्वल, दूम, सीम=पहिला, दुसरा, तिसरा.) ०**अखेर-आखर**–क्रिवि. आरंभापासून अखेरपर्यंत; अयपासून इतिपर्यंत (नकारार्थी प्रयोगांत) पूर्णपणें; एकंदर; समूळ; बिलकूल; अगदीं; सर्वस्वीं. [अर. अव्वल+आखिर=शेवट.] ०**अखेर(आखर)इस्तावा**–पु. नवीन जमीनीवर दरवर्षी वाढत जाणाऱ्या करापैकीं पहिला. ०**अर्जी**–वि. (कायदा) मूळ फिर्याद; तक्रार; अर्ज. ०**आढावा**–पु. साल आरंभीं मागचें येणें–देणें समजण्यासाठीं मांडलेला जमाखर्च. ०**काकून**–पु. मुख्य कारकून; फडणीस. ०**कोर्ट**–न. मूळ दावा किंवा फिर्यादीबद्दल ज्या कोर्टांत संपूर्ण चौकशीचें काम चालून निकाल मिळतो तें कोर्ट; (इं.) ओरीजनल कोर्ट. ०**जप्ती**–स्त्री. (इं.) अट्टॅचमेंट बिफोरे जज्मेंट; दाव्याचा निर्णय होण्यापूर्वी मिळकत कोर्टाच्या ताब्यांत घेणें. ०**पुरावा**–पु. (इं.) प्रायमरी एव्हिडन्स; पहिल्या प्रतीचा पुरावा; कोर्टानें समक्ष पहावा म्हणून मूर्तिमंत हजर केलेला दस्तऐवज. ०**रजिस्टर**–न. आजमितीस दरएक गांवांतील जमीनी कोणाकोणाकडे कोणत्या हक्कानें वहिवाटीस आहेत त्यांचें तपशीलवार नोंदपत्रक. ०**दोड-द्वाड**–वि. वाईटपणांत, द्वाडपणांत अग्रगण्य; बिलंदर; अट्टल; पक्का. ०**साल**–न. १ वर्षाचा आरंभीचा भाग. २ विवक्षित संख्येंतील–मालिकेंतील पहिलें वर्ष. ३ हिशोबाच्या सालांतील पहिलें साल. ४ सुदुर एका वर्षाच्या काळांत ज्येष्ठांतील (वैशाखांतील सुद्धां) कांहीं मित्या दोन वेळां येतात यामुळें त्यांच्या निर्देशांतील संदिग्धता घालविण्यास 'अवलसाल' 'अखेरसाल' हे शब्द योजतात. 'ज्येष्ठ शुद्ध ४ घटी ५ अवलसालीं राजश्रीची मुंज जाहली' –शिवप्र २७.

अवलकी—स्त्री. पोहे. [का. अवलक्की; अवल=कुटणें+अक्कि=तांदूळ]

अवलणें—उक्रि. वल्हविणें; हांकारणें. 'ज्ञान वैराग्य भक्ति । हेचि अवलें अवलिर्तीं ॥ ' [अवलें=वल्हें. सं. आ+वल्=वल्हविणें]

अवलंब—पु. १ आसरा; आश्रय; संरक्षण; थारा; आधार. 'म्हणोनि तुझा अवलंब केला । ' –सारुह १.१८. २ लंब; (इं.) परपेंडिक्युलर. ३ (ज्योतिष) एखाद्या स्थळाचें खस्वस्तिकापासून खस्थ ज्योतीपर्यंत दृङ्मंडलावरील अंशात्मक अंतर; कोव्यंश; नतांश. [सं. अव+लंब]

अवलंबणें—उक्रि. १ आश्रय करणें; आधार धरून राहणें. २ पकडणें; लोंबकळणें; धरणें; चिकटणें; कवटाळणें. 'प्रवेशें मौन्य अवलंबून । ' ३ धारण करणें; उचलणें; स्वीकारणें, अंगीकारणें. 'त्वां बरी युक्ति अवलंबिली पाहि । '

अवलंबन–न. ग्रहण; स्वीकार; धारण; आश्रयण. 'चित्त अवलंबनें वीण । ' –विपू २.९३.

अवलंबित—वि. १ आश्रय दिलेला; संरक्षिलेला; हातीं धरलेला; पोसलेला; बाळगलेला; कैवार घेतलेला. २ घेतलेला; धरलेला; कवटाळलेला; पकडलेला (संरक्षणासाठीं). ३ लोंबता; लटकता; हालता.

अवलक्षण—न. १ अशुभ–अनिष्टसूचक चिन्ह, खूण, देखावा चेष्टा, कृत्य; दुश्चिन्ह. उ० सहावें बोट; झोंपेंत दांत खाणें. इ० २ अपशकून; अरिष्ट; उत्पात. ३ वाईट संवय; खोड. 'बहुतांसी न मने तें अवलक्षण । सहजचि जालें ॥ ' –दा १९.३.२७. **म्ह०** हात दाखवून अवलक्षण करणें. [सं अव+लक्षण]

अवलक्षणी—वि. १ दुर्गुणी; खोडसाळ. २ अरिष्टकारक; दुश्चिन्हाचें; अवकृपेचें; औत्पातिक. ३ शारीरिक व्यंग असलेला; कुरूप; विद्रूप. [सं.]

अवलक्ष्मी—स्त्री. कमनशीब; दुर्दैव; दुर्भाग्य; विपत्ति; आपदा. [सं. अव+लक्ष्मी]

अवला—पु. (विप्र.) १ अवलें, वल्हें पहा. २ वल्हेकरी.

अवलाद—स्त्री. १ पुत्रपौत्रादि संतति; वंश; कुळी; प्रजा. 'राम अवलाद कुशपत्नी धामा । अवलाद देह असे हा ॥ ' –नव ८.८१. हा शब्द विशेषतः मुलाच्या वंशाला लावितात. अफलाद पहा. २ (उप.) वात्य; खोडसाळ. [अर. औलाद; वलद् अव.] ०**अफलाद खाणें**–वंशपरंपरा उपभोग घेणें.

अवलाहो, अवल्हाओ—पु. अनिष्ट प्राप्ति; अपलाभ. 'तैसा कर्माकारा दूजेया । तो करितेपणांचा आत्मेया । अवल्हाओ ये तो गेलेया । कांहि उरे ॥ ' –राज्ञा १८.४०९. [सं. अव+लाभ]

अवलिप्त—वि. १ माखलेला; चोपडलेला. २ (ल.) दुष्कृत्यांत संबंध असलेला; अनिष्ट कृत्यांत भाग घेणारा; एखाद्या दुष्कर्माचा वांटेकरी. [सं. अव+लिप्–लिप्त=दुष्कृत्यानें माखलेला]

अवलिया—पु. १ साधु; संत; पुण्यात्मा; पुण्यपुरुष; परमेश्वराच्या चिंतनांत मग्न असणारा; विदेही. २ (ल.) लहरी ३ स्वच्छंदी; छांदिष्ट मनुष्य. [अर. अवलिया; वली=साधु यांचें अव.]

अवलिला-ळा, अवलीला-अवलीळा—क्रिवि. १ सहज; लीलेनें; सुलभपणें. 'रामनाम जपमी जरी अंतरीं। अवलिळा तरसी भवसागरीं॥' 'जे जे जगीं अप्राप्त वस्त। ते ते लाधे अवलीळा॥' –मुआदि ४०.६६. 'हरि म्हणे ते वेळां। मी बाळक होईन अवलीला। परि मज सत्वर गोकुळा। नेऊनिया घालावें॥' –ह ३.१६६. 'श्रीपादें उठवूनि अवलीळा। सांगती गोप्य अवधारा।' –गुच ११.९४. [सं. अवलीलया] –स्त्री. खेळ; लीला; कसरत; उड्या वगैरे. 'तार्किकांचियां वन्नसांखळा। कीर्ती खांबीं नाळीची अवलिळा॥' –शिशु २५. [सं. अव+लीला]

अवली—स्त्री. आघाडी; प्राथम्य; गुणाधिक्य; वरचष्मा; उत्कर्ष; प्रकर्ष. (क्रि० साधणें) [अर. अव्वल्=पहिला]

अवलीद—पु. घोड्याच्या अंगावरील केसांचा भोंवरा–शिंपीसारखे अनेक भोंवरे एकत्र असणें. –अश्वप ८५. [सं. अव+लिह्]

अवलुंठन—न. १ लोळण; लोळण्याची क्रिया; लुंठन. २ लुटणें या अर्थी चुकीनें वापरतात. [सं. अव+लुंठ्]

अवलें—न. वल्हें. 'स्वयें अवलें घेऊनि करीं वेगें। नाव हळु हळु लोटीत जळासंगें।' –अकक १.१४२. [सं. आ+वल्=वलविणें; प्रा. अवलय; दे. अवलक]

अवलेकरी, अवल्या—पु. १ वल्हेकरी; वल्हे मारणारा. 'गंगा म्हणतां गीता गंगा सरी न पावे। अवले पोहतां बुडती म्हणवुनि सरी न सामावे।' –ब ६२८. २ (ल.) सत्ता गाजविणारा; सत्ताधीश; दिशा दाखविणारा, नायक. [सं. आ+वल्]

अवलेप-न—पुन. माखणें; सारवण; चोपडणें. [सं. अव+लिप्]

अवलेह—पु. चाटण; पाक; रसक्रिया, लेह. (इं.) इमल्शन. [सं. अव+लिह्=चाटणें]

अवलोक—पु. १ नजर; दृष्टि. 'करूनि आपुलिये दिठी चोखु। मग घापें अवलोकु। तयावरी।'–ज्ञा १६.१४७. २ प्रकाश. 'कां घराआंतुल एकु। दीपाचा तो अवलोकु।'–ज्ञा १८.३२८. ३ दर्शन; निरीक्षण; अवलोकन; पाहणें. 'येथें मी वांचून अवलोकीं। आन हेतु असे।' –ज्ञा १५.४२४. [सं. अव+लोक्]

अवलोकणें—उक्रि. पाहणें; बघणें; प्रेक्षणें; विलोकणें; न्याहाळणें; निरखणें; निरखून पाहणें. 'हें अर्जुनें तियेवेळीं। अवलोकिलें।' –ज्ञा १.१८४. 'कामें नेलें चित्त नेदी अवलोकू मुख।'–तुगा ४५६. [सं. अव+लोक्]

अवलोकन—न. निरीक्षण; चिंतन; विलोकन; पाहणी; कोणेक विषय डोळ्यानें किंवा विचारात्मक बुद्धीनें जाणण्याचा व्यापार. ०शक्ति–स्त्री. निरीक्षणशक्ति; पाहण्याचें सामर्थ्य. [सं.]

अवलोकित—वि. १ निरीक्षिलेलें; पाहिलेलें. २ चिंतिलेलें; ध्यान केलेलें. ०दर्शन–न. (नृत्य) नृत्य करतांना खालील वस्तु पाहण्याचा अभिनय करणें. [सं.]

अवलोडन––न. पाण्यांत डुंबणें; डुबकणें; बुचकळ्या मारणें. [सं. अव+लुड्]

अवश––वि. १ स्वतंत्र; दुसऱ्याच्या ताब्यांत नसलेला; वश न झालेला; न माणसाळलेला. २ पराधीन; परतंत्र, स्वाधीन नसलेला. –ज्ञा ५. [सं. अ+वश्]

अवशक्ति—स्त्री. अशक्तता; निर्बलपणा; असमर्थता; नाताकद; कमकुवतपणा; दौर्बल्य; शक्तिक्षीणता. [अशक्ति अप. किंवा अव=ऱ्हास+शक्ति]

अवशिष्ट—वि. बाकी; उरलेलें; शेष; शिल्लक राहिलेलें; उर्वरित. [सं. अव+शिष्]

अवशी—स्त्री. पूर्वरात्र; प्रदोषसमय; तिन्हिसांज. अवस पहा. 'मग अवशीची प्रहररात्र सुदरलियावर गुमपणें हत्तीच्या घांटा काढून, डेरेदांडे पाडून झाडून निघाले' –भाव ११९. [प्रा. आओस; म. अवस]

अवशीं, अवशीस—क्रिवि. पूर्वरात्रीं.

अवशेष—पु. १ बाकी; शिल्लक; शेष; अवशिष्ट; उरलेला भाग. २ राहिलेली रक्कम किंवा संख्या. [सं.]

अवश्य—वि. अनिवार्य; दुःसाध्य; वश न होणारें; न टळणारें. [सं. अ+वश्]

अवश्य, अवश्यक—क्रिवि. १ आवश्यक बहल चुकीनें उपयोग; जरूर; खचित; खात्रीनें; खास; अलबत; निःसंशय; अगत्य; निखालस. २ कोणेकानें सांगितलेल्या गोष्टीच्या अंगीकाराचें द्योतक, संमतिदर्शक होय, बरें या अर्थी अव्यय. [सं. अ+वश्]

अवश्यक—वि. जरूरीचा; अगत्याचा; आवश्यक पहा. [सं. आवश्यक]

अवश्यकता—स्त्री. जरूरी; अगत्य; अवश्यबुद्धि. [सं. आवश्यकता]

अवश्यबुद्धि—स्त्री. आस्था; अगत्य; कळकळ; आसक्ति; अपेक्षाबुद्धि; आवड; अमुक गोष्ट अमुक कार्यार्थि आवश्यक आहे अशी समजूत. [सं.]

अवश्यंभावी—वि. खचित–खास होणारें; खात्रीचें; खचित; निश्चित; अचूक. [सं. अवश्यं+भू–भावि]

अवश्यमेव—क्रिवि. खात्रीनें; जरूर; अगदीं खचित–खास; अवश्यच; निसंशय; निखालस. [सं. अवश्यम्+एव]

अवष्टब्ध—वि. १ प्रतिबद्ध; अडविलेला; थांबविलेला; थोपविलेला; अडथळा केलेला २ (शब्दशः व ल.) आधार दिलेला; तोललेला. अवष्टंभ पहा. [सं. अव+स्तब्ध]

अवष्टंभ—पु १ अडथळा; अटकाव; खोळंबा; हरकत. २ टेंका, आधार; आश्रय; आसरा. ३ (ल.) कृपादृष्टि; दया; हिमाईत; मदतः पाठिंबा. ४ अहंकार; गर्व; आढ्यता. 'येर अवष्टंभु जो आघवा । तो आरूढोनि मद्भावा ।'–ज्ञा ९.४१४. ५ अष्टसात्विक भावांच्या उर्मी, फुंज. 'आपण पां करूनि स्वयंभु । बुझाविला अवष्टंभु । संजयें तेणें ॥ ' –ज्ञा १८.१६२२. ६ मलावरोध. [सं. अव+स्तंभ्]

अवस, औस—स्त्री. अमावास्या. [अमावास्या; अमावसी]. **अवसेस (औसेस) पुनवेस येणें–घडणें**–केव्हांतरी प्रसंगवशात् येणें–घडणें; एखाद्या वेळीं, अधूनमधून येणें, अनिश्चितपणें येणे, अवसेपुनवेला येणें.

अवस, औस—स्त्री. १ रात्रीचा–मध्यरात्रीचा पूर्वीचा भाग. 'न म्हणे अवसीं पाहाटीं ।' –ज्ञा १३.२९. २ पहाट. उषःकाल; अरुणोदय. नेहमीं सममीत प्रयोग. अवसपहाट अमा सामासिक शब्द रूढ आहे. (क्रि० करणें). अवशी पहा. [सं. उषसि; प्रा. आओस=प्रदोषसमय]

अवसति—क्रिवि अकस्मात्; अवस्तुक; एकाएकीं. [सं. आत्मन्+स्वतः म. आपस=आपोआप]

अवसर—पु. १ रिकामा वेळ; अवकाश; फुरसत. २ योग; संधि; प्रसंग; वेळ; काळ. 'अवसर मदनाला तोच अत्यंत फावे ।' –सारुह २.६४. 'चिंतित होतों चित्तीं तेरा वंर्श सदा अवसरा ज्या ।' –मोभीष्म १.५७ ३ योग्य काळ; योग्य वेळ, समय; सोईस्कर वेळ (कोणत्याहि कार्याची), हंगाम सामाशब्द–भोजनावसर, स्नानावसर; पूजावसर ४ संचार; वारें; घुमारा. 'मनुष्याच्या अंगांत अवसर येतो' –न्यायप ४४९. 'दुसऱ्या दिवशीं श्री वेताळाचा अवसर येत असे' –भारतमित्र (फेब्रुअरी १९२५ पृ.३०) [सं. अव+सृ] **०माता**–स्त्री. अंगांत येणारी जागृत देवता. 'अवसरमाता चोपडाई करी धांवणें ।' –ऐपो ३३४.

अवसरणी—स्त्री. १ आकाशवाणी. 'अवसरणी वाचा झाली। –वसा ६३. २ एखादा विचार किंवा बेत करीत असतां दुसऱ्याचें साहजिक बोलणें ऐकून, ते शब्द आपल्या मनांतील विचारास लागू करून घेऊन, व आपल्या मनांतील कार्यास जोडून शंका निवारण किंवा अनुमान किंवा तदनुरूप वर्तन करतात ते शब्द. ३ लौकिक वार्ता; भाकित; होरा. (क्रि० काढणें; निघणें). [सं. अवसर+वाणी किंवा अशरीरिणी]

अवसरणें—अक्रि. (ना.) झुरणीस लागणें; खंत घेणें. 'मुलांची आई जर गांवाला गेली तर तिचे पश्चात् मुलें अवसरतात.' [सं. अव+सृ]

अवसरी—स्त्री. १ अडचण; अडथळा; हरकत; शंका. 'पहावें दिसें तंववरी । दिठीतें न सडी दीप जरी । तरी कें आहे अवसरी । देखावया ॥ ' –ज्ञा १८.१०४४. 'माझी अवसरी ते फेडीं । विजयाची सांगे गुढी ॥ '–ज्ञा १४.४१०. २ अभाव, उणीव. 'पै मानसींचि जरी । अहिंसेची अवसरी । तरी कैंची बाहेरी । बोसंडेल ॥ ' –ज्ञा १३.२९७. ३ अवकाश; जागा; अवस्थिति; स्थान. 'अनुभव हा ठाव वरी । आपुलीचि अवसरी ॥ ' –अमृ ५.६२. [सं. अव+सृ]

अवसरी—पु. वेळ दाखविणारा, घडयाळजी. 'इशानु अवसरी । कुबेरू भांडारी । इंदु हडप धरी । आंगाजवळी ॥ ' –शिशु ४९. [सं. अव+सृ; अवसर]

अवसरी–ऱ्या—वि. ज्याच्या अंगांत संचार झाला आहे असा; अंगांत आणणारा–झाड, देवऋषी, भगत. [सं. अवसर]

अवसरू—पु. अवसर पहा. 'साक्षात ब्रह्मी घडला । अवसरू त्यातें ।' –रास १.२६१. 'तुका अवसरु जाणवितो पुढें । उघडली महाल मंदिरें कवाडें ।' –तुगा ४६३.

अवसरोचित—वि. समयोचितः यथाकाळ. 'मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ।' –ज्ञा ३.१८८. [सं. अवसर+उचित]

अवसांत—क्रिवि. एकदम; एकाएकीं; अकस्मात्. 'पाठीं अवसांत ये चेवो । तैं तें अवचेंचि होय वावो ।'–ज्ञा ६.६९. [सं. अव+वस्तुतः]

अवसाद—पु. १ श्रम, थकवा; ग्लानि; कळमळ. २ औदासिन्य; विषाद; खिन्नता. [सं. अव+सद्]

अवसान—न. १ अंत; शेवट; समाप्ति; अखेरी. 'हें कार्य आरंभापासून अवसानापर्यंत निर्विघ्नपणें गेलें म्हणजे बरें.' 'तत्परी जया ज्ञाना । शिवादि तृणावसाना । इया भूतव्यक्तिभिन्ना । नाडळतीं ॥ ' –ज्ञा १८.५३१. 'त्या ध्यानाचें परिस अवसान। चैतन्यधन पावावें ॥ ' –एभा १३.९७. आदि–मध्य–अवसान असा वाक्–प्रचार 'आठवतसे तुझ्या प्रश्नीं । आदि मध्यावसानक ॥ ' –गुच ४.२. २ (ल.) मृत्यु; मरण; नाश. 'वैद्याचें कार्य काय अवसानीं ।'–मोभीष्म ११.१४९. ३ खंड; विराम; तहकुबी; विश्रांति; खाडा; अवसाय. 'एकसारखें काम केलें पाहिजे, मध्यें अवसान घेतां नये.' 'नाठवुनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मधीं.' –तुगा १५९४. ४ (संगीत) विराम; विश्रांतिस्थान, विरामचिन्हें खुणा (पदांवर). 'म्हणतांना अवसानावर दम घ्यावा मध्यें घेऊं नये.' ६ धैर्य; हिंमत; धाडस; मनोधैर्य; प्रसंगावधान; आवेश; दम; धमक; उत्साह; हिय्या. 'परि हें अनावर आवरितां आवडि । अवसान तें घडी पुरों एकीं देत नाहीं ॥ ' –तुगा ४५८. (क्रि० धरणें, खचणें, सुटणें, गळणें, फुटणें.) ७ जोर; शक्ति; सामर्थ्य; प्रयत्न; परिश्रम; ताण; ओढ; नेट; कष्ट; भर; शक्तिप्रयोग; दम.

'तूं दमला असल्यास बैस, मी एक अवसान मारतों.' 'या मतावर श्रीधरपंत वारंवार फार अवसान देतील.' –आगर ३.१४३. ८ ऐनवेळ; ऐनप्रसंग; आणीबाणीची वेळ; अडचणीचा प्रसंग. (क्रि० साधणें–संभाळणें) 'पाऊस पुष्कळ लागून अवसानीं घालवितो त्या पेक्षां अवसानें सांभाळून थोडा थोडा जरी लागला तरी पुरे.' ९ संधि; प्रसंग; योग. १० आवेश; उत्साहाची घटका; विकाराची उत्कटता; मनोवृत्तींचा क्षोभ; माज; मस्ती. ११ खोटा डौल, आव. [सं. हिं. अवसान, औसान] **अवसानांत येणें–असणें**–आटोक्यांत आवांक्यांत असणें. **अवसानांतून जाणें**–सामर्थ्याबाहेर, आटोक्यांतून जाणें; हातांतून निसटणें. **अवसान–तुटणें**–धीर खचणें. 'ही बातमी ऐकून सर्व मराठ्यांचें अंथें अवसान तुटलें' –स्वप २७

अवसानघातकी—वि. आणीबाणीच्या वेळीं निराश करणारा; पाहिजे त्या वेळीं काम न करून घात करणारा; गरजेच्या वेळीं उपयोगी न पडणारा. **म्ह**० अवसानघातकी महापातकी. [सं.]

अवसानी—वि. प्रसंगावधानी; प्रसंगीं उपयोगी पडणारा; आणीबाणीच्या वेळीं तत्पर, सिद्ध असणारा; धारिष्टवान. [सं.]

अवसाफ—स्त्री. स्तुति; प्रशंसा; देणग्या. [अर. असफ् अव.]

अवसाब—पु. (व.) दरारा; धाक; ख्याती. 'त्याचा अवसाब असा होता कीं गाभणी गाभ टाकी.' [अर. अवसाफ ?]

अवसाय—पु. १ बंद होणें; उपरम; विराम; थांबणें. २ अंत; शेवट; अखेरी; समाप्ति. [सं.]

अवसार—(काव्य) वेळ; प्रसंग: योग अवसर पहा. 'कानाडी ओढुनि ते अवसार.' [अवसर]

अवसी—अवशी पहा

अवसुती—वि. १ गैर; भलतेंच; अव्यवस्थित; विस्कळित; सैल; गोंधळलेलें; घोटाळ्याचें (काम, कारागिरी). २ ओबडधोबड किंवा अडमुठें काम करणारा; अडाणी; अजागळ; गोंधळ्या. (माणूस) [सं. अव+सूत्र] **–त्या**–पु. अवसुती माणूस; अडाणी इसम.

अवसूद—वि. नेमस्त, प्रमाणशीर; वेताचा; मर्यादित. [अर. औसत्=मध्यम.]

अवस्छा—स्त्री. अवस्था: स्थिति. 'कैसी अवस्छा भूतळी वाटु पांतां.' –शिशु १७१. [सं. अवस्था]

अवस्ता—स्त्री. दुरवस्था; वाईट अवस्था या अर्थी. 'झाडीन अवस्तेचें विष.' –उषा ७. 'मनोगत राखोन जातां. परस्परें होये अवस्ता.' –दा १३.१०.२८. [सं. अवस्था]

अवस्तां, अवस्तू, अवस्तूक, अवस्थ, अवस्था—क्रिवि. १ एकदम; एकाएकीं; अकस्मात्; गैरसावध असतां. २ एकंदरीनें; पूर्णपणें; अगदीं; कधींहि; चुकून देखील; बिलकूल. 'हा मजशीं अ० बोल्ला नाहीं.' **अवस्तुक कुडाळी**. [सं. अवस्तु, अवस्तात्]

अवस्तु—न. १ नास्तित्व; वस्तूचा अभाव. २ अवास्तवत्व; खोटेपणा; भ्रामकपणा; शुष्कपणा; पोकळपणा. [सं. अ+वस्तु]

अवस्तुत—क्रिवि. (कों.) अवस्तां पहा.

अवस्था—स्त्री. १ स्थिति; दशा; प्रसंग; प्राप्त काल; हवाल. २ उत्कंठा; आवड; चटका: चिंता; काळजी; हुरहुर; आशा; छंद; वेध; नाद; तन्मयता. 'येरीकडे राजकुमारी। अवस्था लागलीसे भारी।' –एरुस्व ५.४३. 'भक्तप्रेमाची देवासी होय अवस्था।' –सप्र ९.१७. 'तुका म्हणे त्याचें न कळे अंतर। अवस्था ते फार होते मज।' तुगा ५९८. 'आजि अवस्था लागली मानसी' –दावि २३८. **०चतुष्टय**–न. मानवी आयुष्याच्या चार अवस्था, पर्याय, काल (बाल्य, पौगंड, तारुण्य, वार्धक्य; किंवा बाल्य, तारुण्य, मध्य, वृद्ध) **०त्रय**–न. १ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. 'अवस्थात्रय तिन्ही लोक' –ज्ञा १८.१३०० २ बाल्य, तारुण्य, वृद्धत्व. ३ सात्विक, तामस व राजस, अशा अवस्था. 'किंबहुना अवस्थात्रया। हें अधिष्ठान धनंजया।' –ज्ञा १८.३२०. गीर १५५. **०द्वय**–न मानवी जीविताच्या दोन अवस्था. १ पूर्वावस्था (बाल्य, यौवन) व उत्तरावस्था (प्रौढता, वार्ध्यक्य). २ जागृतावस्था व सुषुप्त्यवस्था; जागृति–निद्रा ३ आयुष्याच्या दोन स्थिती; सुख दु.ख. [सं.]

अवस्थातीत—वि. मानवी जीवितांतील अवस्थांच्या पलीकडे गेलेला; मुक्त; ब्रह्मामध्यें विलीन झालेला. [सं.]

अवस्थान—न. १ राहण्याची जागा, ठिकाण; वसतिस्थान; वास. २ राहण्याची, असण्याची रीत. ३ पदार्थांची स्थिति; पद. ४ अस्तित्व, वसती, गुप्तवास. 'न करितां मंथन। काष्ठीं अवस्थान। जैसें कां हुताशन सामर्थ्याचें।' –अमृ ७.५९. [सं. अव+स्था]

अवस्थापणें—सक्रि टेवणें. 'लीलेनें द्विजिभांचा न मदअवस्थापिता महात रणीं।' –मोभीष्म २.२. [सं. अवस्थापन]

अवस्थाभेद—पु. जीवात्म्याच्या निरनिराळ्या अवस्था; जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था; पहिली विष्णूची व सत्त्वगुणाची, दुसरी ब्रह्मदेवाची व रजोगुणाची, तिसरी शिवाची व तमोगुणी. त्यांना अनुक्रमें विश्व, तैजस व प्राज्ञ अशाहि संज्ञा आहेत. यांखेरीज तुरिया व उन्मनी अशाहि दोन अवस्था आहेत. अवस्था पहा. [सं.]

अवस्थित—वि. १ स्थल–कालव्यापक; वास केलेला; राहिलेला; थांबलेला; बसवलेला. २ स्थिर; घट्ट; बळकट; मजबूत; पक्का. ३ अकस्मात शब्दाबदल चुकीनें वापरतात [सं.]

अवस्थिति—स्त्री. १ राहणें; वास करणें; मुक्काम करणें; नांदणें. २ वसतिस्थान; राहण्याचें ठिकाण; स्थान; स्थळ; स्थिति; अवस्था. [सं.]

अवस्वर—पु. वेळ; प्रसंग; क्षण; अवसर पहा, 'प्राणु नाहीं तिये अवस्वरी।'–उषा ४३. [सं. अवसर अप.]

अवहार—पु. १ एकत्र जमविणें; गोळा करणें; गुंडाळणें. २ उपसंहार; समारोप. ३ तहकुबी; खंड; (युद्धादिकांचा) मुदतीचा–तात्पुरता तह; सावधिक संधि. (इं.) आर्मिस्टिस, ट्रुस. ४ मोळ्या सैन्याचा आळा–पसारा, [सं. अव+हृ]

अवहित—वि. हजर; तत्पर; सावधान; सादर; अवधानी; लक्ष दिलेला. [सं.]

अवहित्थ(स्थान)—न. (नृत्य) एकावाजूकडील कटी, गाश्वेभाग व जंघा किंचित उन्नत करणें, एक हात ललाख्य करणें, दुसरा हात नितंबाचे बाजूस सोडणें, उजवा पाय किंचित् तिरकस व डावा पाय मागें ओढून सम ठेवणें. पतीची वाट पहाणें, लीला, वेलास वगैरे भाव दर्शित करण्याच्यावेळीं अशा स्थानाचा अंगीकार करितात. [सं.]

अवहित्थ(संयुतहस्त)—पु. (नृत्य) शुकतुंड हात वक्षःस्थळासमोर अंचित करून ते हळुहळु अधोमुख करणें. [सं.]

अवहित्था—स्त्री. १ शरीरावर हर्षक्रोधादि विकार–भाव प्रगोचर होत असतां ते बळेंच लपवून ठेवणें; खरें रूप झांकून ठेवणें; आकारगोपन. २ कपटी व्यवहार; ढोंग. [सं.]

अवहेलणें—उक्रि. हेटाळणी करणें. 'द्विजाची मर्यादा तदपि अवहेलूंच न शके'–सारुह ५.७०. [सं. अव+हेलन]

अवहेलन–ना—नस्त्री. (विरू.) अवहेळणा–हेटाळणी; अव्हेर; तिरस्काराची–अपमानाची वागणूक; अनादर; अप्रतिष्ठा. [सं.]

अवळ—वि. १ घट्ट; गच्च; आवळून बसणारें, अटस. २ अरुंद; बारीक; आकुंचित; आंखुड; संकुचित (गळा, मनगट, नळी). सं. आ+वल्]

अवळ—वि. (खा.) चांगलें; बरें; उत्तम (गोष्ट). [अर. अब्वल]

अवळकटी–ठी, अवळकाठी—स्त्री. वाळलेले आंवळे; तुकडून ठेवलेले आंवळ्याचे तुकडे. [सं. आमलक+काष्ठ]

अवळका—न. अपयश. 'अवळका करुनि सेवटी विटंबून गाये।'–भाए ३६५. [सं. अ+बल्]

अवळचवळ—क्रिवि. (कर. बायकी व कुण.) अर्धवट, अपूर्ण–अव्यवस्थितपणें चावून. 'विडा अवळचवळ खातोस, त्यानें तोंड रंगत नाहीं.' [सं. अर्ध=चर्वित; चबळ द्वि.]

अवळणें—अक्रि. १ आकसणें; आकुंचित होणें; आंखुड होणें. २ दृढ होणें; घट्ट होणें; खालीं बसणें (चिखलांत बांधलेली इमारत, चित्रा नक्षत्रांतील पावसानें भिजलेली जमीन). ३ गच्च बसणें; आंवळणें (दांत, हिरड्या). ४ भरून येणें; दाटणें; रसरसीत, भरदार होणें (वेळेवर पडलेल्या पावसामुळें येणारें पीक). ५ लठ्ठ होणें; अंग भरून येणें; गुबगुबीत होणें (रोड जनावरांस चांगलें खाद्य मिळाल्यामुळें जनावर, गरिबाची स्थिति सुधारल्यामुळें माणूस). वरील कांहीं ठिकाणीं सकर्मकहि उपयोग करतात. [सं. अव, आ+वलन]

अवळणें—उक्रि. १ घट्ट बांधणें–करणें; आंवळणें; मजबूत बसविणें; ताठ ओढणें. २ गच्च दाबणें; जोरानें पकडणें. ३ रगडणें; दाबणें; चुरणें (अवयव). ४ आवळून धरणें; घट्ट मिटणें (मूठ). ५ लुबाडणें; बळकावणें; जबरदस्तीनें ताबा घेणें; हिसकावून घेणें; काबीज करणें. 'अरबांनीं किल्ला अवळला.' ६ फौजेचा व्यूह रचून तयार होणें. आवळणें पहा. [सं. आ+वलन]

अवळबंधा—स्त्री. निवारण; मनाई; आकलन; नियमन; नियंत्रणा; दाब: गवसणी. (क्रि० करणें, लावणें, मांडणें, होणें). [अवळणें व बांधणें. सं. आ+वल्+बंध्]

अवळसर—वि. १ किंचित्, कांहींसें घट्ट; मजबूत. २ किंचित् बारीक; अरुंद; चिंचोळें; किडकिडीत. [अवळ+सर]

अवळसरा—वि. आंवळ्यासारखा; खडे असलेला. –पु. गंधकाचा एक प्रकार; खड्यागंधक. [आंवळा+सरा=सारखा]

अवळा—पु. १ आवळा; एक तुरट फळ. २ समईच्या उभ्या दांड्याला असणारे वाटोळे वेढे. **–ळ्याची मोट**—स्त्री. तात्कालिक फायद्याकरितां एकत्र जमलेल्या लोकांचा समुदाय, गट. टोळी. **ग्रह०** १ अवळा पिकायचा नाहीं, समुद्र सुकायचा नाहीं.=घडण्यास अशक्य अशा गोष्टीबद्दल म्हणतात. २ अवळ्याची मोट बांधणें=(आवळे एकत्र बांधतां, जुळवितां येत नाहींत, ते निसटून जातात, यावरून) अशक्य गोष्ट करूं पाहणें. ३ अवळा देऊन कोहळा (किंवा वेल) काढणें=थोड्याचा बराच फायदा मिळविणें; आपण थोडें देऊन दुसऱ्याकडून अधिक घेणें; थोड्या मोबदल्यावर पुष्कळाची आशा करणें. **(चे) अवळे उघडणें**–मोठा राग काढणें; अपशब्दांचा भडिमार करणें; ठोकणें; बुकलणें; फाडून खाणें (अवळकाठी करतांना अवळे उकलतात त्याप्रमाणें). **अवळ्या येवढें पूज्य**–न. पूर्ण अभाव; शून्य. **अवळे शिजणें**–(कर.) पाचावर धारण बसणें; घाबरणें. [सं आमलक; प्रा. आमल–ग–य; हिं. आमला, आंवला; बं. आम्ला; गुज. आंवळां; फा. आम्लज्ञ; अर. अम्लज्; पंजा. आवला; लॅ. फिलेन्थस् अंब्लिका.]

अवळाअवळी—स्त्री. बांधाबांधी; आवराआवरी; सैन्याची कूच करावयाच्या वेळची, किंवा प्रवासास जाण्याची तयारी. [सं. आ+वल् द्वि.]

अवळी—स्त्री. अवळ्याचें झाड; याचे दोन प्रकार आहेत–एक रायआवळी व दुसरी कृष्ण आवळी. पहिलीचीं पानें बदामी आकाराचीं दुहेरी असतात. फळास करमऱ्या मण्याप्रमाणें करवे असतात. हें फळ फक्त खाण्याच्या उपयोगी असतें. दुसरीचीं पानें शमीच्या

पानासारखीं असतात; फळ सुपारीयेवढें व आंबट असतें; हीं फळें कार्तिकांत येतात व माघ महिन्याच्या सुमारास पक्कीं होतात. पक्क्या अवळ्यांचा मोरावळा करतात. तो पित्तशामक आहे. तसेंच अवळ्याचें लोणचें करतात. अवळीच्या सालींपासून कात होतो शिवाय सालींचा कातडी रंगविण्यासहि उपयोग होतो. सुकलेले अवळे (अवळकाठी) औषधी आहेत. हिरडा, बेहडा व अवळकठी यांचें चूर्ण करतात, त्यास त्रिफळा म्हणतात. अवळीचें लांकूड पाण्यांत टिकाऊ असल्यामुळें विहिरीच्या कामीं त्याचा उपयोग करतात. [सं. आमलकी] **०भोजन**–न. कार्तिक शुद्ध चतुर्दशीस कृष्ण अवळीच्या झाडाखालीं देवतासमाराधनेनिमित्त केलेलें जेवण

अवळीजावळी—आवळीजावळी पहा.

अवळ्या गंधक—अवळसरा पहा.

अवळ्यांची समई—स्त्री. जिच्या मधल्या दांड्याचे वेढे अवळ्याप्रमाणें वाटोळे, गेंदेबाज असतात अशी समई.

अवळ्यावंब—वि. अगडबंब; गलेलठ्ठ; ठोंब्या. [आवळा+बंब]

अवक्षर—(प्र.) अवाक्षर पहा.

अवक्षारण—न. उपनयनांतील एक विधि; गुरूनें आपल्या ओंजळींतील पाणी बटूच्या ओंजळींत घालणें व ओंजळ धुणें. [सं.]

अवक्षिप्त—वि. खालीं टाकलेला; फेंकलेला. [सं. अव+क्षिप्]

अवक्षेप–ण—पुन. १ खालीं टाकणें; फेकणें. २ (ल.) टोमणा; व्याजस्तुति; औपरोधिक भाषण; मर्मी भाषण. [सं.]

अवज्ञा—स्त्री. आज्ञाभंग; अनादर; अवमान; तिरस्कार; अपमान; हेळणा. (क्रि० करणें). 'जे सामान्यत्वें लेखिती । अवज्ञा करूनि देखिती ।' –ज्ञा ३.१९५. 'पितृवचनीं घडली अवज्ञा अविचार । कुटिळ कुत्सितवादी नित्य ।' –तुगा २२६०. [सं. अव+ज्ञा]

अवज्ञात—वि. अनादरानें–तुच्छतेनें वागविलेला; ज्याची अवज्ञा केली आहे असा. [सं. अव+ज्ञा]

अवा—पु. विरू. आवा. १ कुंभाराची भट्टी. २ भाजावयाच्या किंवा भाजलेल्या मडक्यांची रास. 'आवा भाजलियावर । घेऊनि जाई सत्वर ।' –भवि ९.१७०. **०लुटणें**–भाजलेल्या मडक्यांची रास करून तिचें पंचोपचारें पूजन करून सुवासिनींकडून लुटविणें. **(चा) ०उतरणें**–१ मडक्याची भट्टी नीट भाजून निघणें. २ स्वतःचीं सर्व मुलें जगून प्रौढदशेस येणें. ३ उपाय सफल होणें. **म्हण०** ज्यानें न पाहिला अवा त्यानें पाहिला दिवा=अशक्य गोष्टी सांगणें. [का. आवि=कुंभाराची भट्टी. तुल० सं. आपाक; हिं. आवा]

अवा—स्त्री. १ आवा; बाई. अवाजी पहा. २ राख; टेवलेली स्त्री; रक्षा. ३ रंडी; वेश्या; व्यभिचारी स्त्री. [का. अव्वा–व्वे=आई, आजी, पोक्त बाई. कु. आवो. तुल० सं. अंबा]

अवाई—स्त्री. १ आवई; कंडी; लोकवार्ता; भुमका; वार्ता; खबर; गप्प; बोलवा; बातमी. 'जनि वनि पसरे राक्षसीची अवाई' –आपू ४३. **म्हण०** तवाई पुरवते, अवाई पुरवत नाहीं. २ प्रसिद्धि; प्रख्याति. 'धर्मराज श्रीमंत धन्याची त्रैलोक्यामध्यें अवाई' –ऐपो २०२. **०पडणें**–बातमी पसरणें. 'मोठें बक्षीस मिळेल अशी अवाई पडल्यावर बक्षिसाचे लालचीनें जिकडून तिकडून तमाशेवाले आले.' –नि १४८; 'अशी लोकांत जिकडे तिकडे अवाई पडली पाहिजे' –तोबं ५०. [सं. आ+ई; प्रा. आव=येणें; हिं. आवाई]

अवाईतवाई—स्त्री. संकट. 'अवाई तवाई शिपाई लोकांवरी येऊन पडतच आहे.' –ख ७.३२४६. [सं. आपद्; प्रा. आवई=संकट; फा. तबाही=नाश]

अवाक्—क्रिवि. खालीं; अधःप्रदेशाकडे; सामाशब्द–अवाङ्मुख, अवाग्वदन=लज्जित, खिन्नवदन, खालीं तोंड असलेला. [सं.]

अवांकणें—अक्रि. १ विचार करणें; मनन करणें; मनांत आणणें; चिंतन करणें. २ कांकूं करणें; डगमगणें; आशंकणें. ३ योजणें; बेत करणें; हेतु असणें. 'मनांमाजि अवांकिलें सर्व कांहीं ।' –राक ४.३. 'आम्हीं यंदा लग्न करायास अवांकलें होतें परंतु घडलें नाहीं.' ४ अंदाज करणें, अटकळ करणें; कल्पना होणें; तर्क बांधणें. 'हा लाख रुपयांचा धनी आहे असें मला अवांकत नाही.' [सं. अव+अंक; अवांका]

अवाकणें—अक्रि (कृ.) अति पिकणें; अविकणें; [अविकणें]

अवांका—(विरू.) आवांका पहा. –पु. १ सामर्थ्य; शक्ति; ताकद; धैर्य; हिंमत. अवसान. 'विप्र मुंदर नेटका । परी कोडमुखीं देखा । तरी तो जाणावा अवांका । सर्व व्यर्थ ॥' –व ६१०. २ आटोका; कबजा; आक्रमण; पकड; डाव. 'तो माझ्या अवाक्यांत आला म्हणजे पाहून घेईन.' ३ धारणा; अटकळ; धोरण; मनाची गति; आकलन. ४ अभिप्राय; समज; कल्पना; तर्क; अटकळ; संभवनीयतेचा विचार–दृष्टि. ५ आकार, विस्तार. [सं. अव+अंक्]

अवांग—न. (शरीराचा) नाजूक भाग; मर्मस्थान. (क्रि० अवांगीं लागणें, पडणें, मारणें). [सं. अव+अंग]

अवागणें—अक्रि (कृ.) वाईट मार्गाला लागणें. [सं. अ+वागणें]

अवाची—स्त्री. दक्षिण दिशा. [सं.]

अवाचीन—वि. दक्षिणदिशेकडील–संबंधी. [सं.]

अवाचेसवा–च्यासघा—क्रिवि. अतिशय; लांबलचक; प्रमाणाबाहेर; वाटेलतितकें; भल्लें; जास्त; अवाढव्य. 'गोकुळला अवाचेसवा गोष्टी सांगण्याचें अति वेड आहे.' –प्रेमसंन्यास. 'बाजारांत माल थोडा आणि मागणी फार; अशी स्थिति पहातांच

व्यापाऱ्यांनीं कापसाचा भाव अ० वाढविला.' (क्रि० बोलणें, खाणें, वाढणें, खर्च करणें). [सं. सपाद. प्रा. सवाय=सवा द्वि.]

अवाच्य—वि. १ उच्चारण्यास-सांगण्यास कठिण, अयोग्य; बोलण्यास अयोग्य. 'अवाच्य ते टाळी । जीभ चि गा ।' –ज्ञा १४.२०९. 'तुम्ही जरी अवाच्य वदाल । तरी हा विप्र तत्काळ जाईल ।' –जै ४७.११. २ अवर्णनीय; वर्णन करण्यास कठिण; अकथनीय. ३ विरुद्ध बोलतां न येण्यासारखें; अनिंद्य. [सं. अ+वच्]

अवाज-दार-री—आवाज पहा.

अवाजवी—वि. गैरवाजवी; अयोग्य. [अ+वाजवी; अर. वाजिब्=जरूरीचें, योग्य, अगत्याचें]

अवाजी—स्त्री. अवा; शूद्र स्त्रीला सन्मानार्थी बोलावण्याचें संबोधन (बाई, आजी याप्रमाणें). [का. अव्वा+जी]

अवाट—वि. आड मार्गानें जाणारा. [सं. अ+वर्त्मन्=वाट]

अवाटा—पु. (कर्ना.) (मालकीची) मर्यादित केलेली जागा. ओटा. [?]

अवाड—न. घराभोंवतालची बंदिस्त जागा; आवार, अंगण; पटांगण; परसू. [सं. आवार]

अवाडाव—स्त्री. १ अमार्गी, कुमार्गी वर्तन; सैन्याचा-लुटारूंचा हल्ला; त्यांनीं केलेली नासधूस, जुलूम, जबरदस्ती, जाळपोळ. २ खोडसाळपणाचें कृत्य, लहान मुलांच्या खोड्या. ३ अटोका; पकड; मिठी (सप्तमी विभक्तींत प्रयोग). 'हा माझे अवाडावांत आला म्हणजे मी मारीन.' [अ+वाट+डाव=भलत्या मार्गानें जाणें. आव=कबजा+डाव]

अवाडू—वि. वाव, रीघ नाहीं असें. 'त्यागा भोगा होय अवाडू' –भाए १४१. [अवाट]

अवाढवी—अवाडाव अप. 'मुलखांत अवाढवी सर्वथा होऊं न द्यावी' –मराआ ३७.

अवाढव्य—वि. फार मोठें; विशाळ; अचाट; फार विस्तारचें; राक्षसी; भयंकर; विपुल. (इमारत, शरीर, जंगल, ओबडधोबड मोठा पदार्थ, वस्तु). [सं. अव+वृध्; प्रा. वड्ढ=वाढणें]

अवात—वि. निर्वात; निवांत. –न. १ शांतता, निवांतता. [सं. अ+वात.] २ मोठें वादळ; जोराचा वारा; तुफान. ३ एकाएकीं प्राप्त झालेलें मोठें संकट–अरिष्ट, आपत्ति. [सं. अव+वात.]

अवांतर—वि. १ इतर; दुसरा; बाकीचा; उरलेला (भाग, संख्या). २ मुख्य विषयाला सोडून; किरकोळ. 'मालती मग अवांतर कांहीं बोलूं लागली तों काकू वर आल्या.' ३ गौण; अनिश्चयात्मक; विवक्षित सदरांत, प्रकारांत न येणारा, किरकोळ. 'चाकरीचे शंभर रुपये येतात अवांतर शंभर रुपये मिळतात.' **०प्राप्ति**–स्त्री. किरकोळ मिळकत; आड मिळकत. **०कार्य**–न. निराळें काम; किरकोळ काम. **०खर्च**–पु. आडखर्च. **०भोजन**–न. पाहुण्यांना, अतिथींना भोजन; कुटुंबांतील माणसांशिवाय इतरांना भोजन घालणें. [सं. अव+अंतर]

अवाप्त—वि. १ मिळविलेला; संपादन केलेला; ज्यानें मिळविलें आहे असा. **०काम**–वि. ज्याची इच्छा तृप्त झाली आहे असा. 'श्रीकृष्ण अवाप्तसकळ काम ।' –एभा १.२९६. [सं.]

अवाप्ति—स्त्री. मिळकत; लाभ; संपादणूक. सामाशब्द–सुखावाप्ति; दुःखावाप्ति; आनंदावाप्ति; मोक्षावाप्ति. [सं. अव+आप्]

अवार—क्रिवि. (कुण) अलीकडील किंवा जवळच्या बाजूला. 'तवार' या शब्दार्शी योजितात. [सं. अवार=अलीकडील किनारा, बाजू]

अवार—वि. मोठें; अफाट; अपार. [सं. अपार; प्रा. अवार]

अवार—पुन प्राकार; आवार पहा. 'भवतां वेढिला अवारु ।' –उषा ३८. [सं. आ+वृ]

अवारित—वि प्रतिकार, अडथळा न केलेलें; हरकत न केलेलें; अप्रतिबद्ध. [सं. अ+वृ=प्रतिबंध करणें]

अवारू—न. साधन. 'मोक्षाचें करूनि अवारू ।' –भाए ५२. [वारू?]

अवारू—वि. येरू; दुसरा. 'ऐसा न लागे त्याचा पार । मग अवारू जोडूनिया कर ।' –भवि १८.९३. [सं. अवर=दुसरा]

अवॉर्डि—पु. निवाडा, लवाद निवाडा; पंचांचा निर्णय. [इं.]

अवाईडपॉइझ—पु. इंग्रजी वजनाचीं विशिष्ट परिमाणें; औषध, मूल्यवान धातू, याखेरीज गूळ, साखर वगैरेसारखे पदार्थ मापावयाची जी (वजनी) पद्धति. तिचें कोष्टक जसें–१६ द्राम=१ औंस. १६ औंस=१ पौंड. २८ पौंड=१ क्वार्टर. ४ क्वार्टर=१ हंड्रेडवेट. २० हंड्रेडवेट=१ टन. [इं. फ्रें. अवॉं दे पॉइ]

अवार्य—वि. ज्याचें निवारण किंवा ज्याला प्रतिबंध करता यावयाचा नाहीं असें; अनावर [सं. अ+वृ]

अवालीपन्हा—वि. उच्च पदाचा; पहिल्या प्रतीचा. [अर. अव्वल्+फा. पन्हाह्=आश्रय]

अवालीमजलत—वि. पहिल्या प्रतीचा सामर्थ्यवान्. [अर. अव्वल्+मजाल्=सामर्थ्य]

अवासवा—अवाचेसवा पहा.

अवाहक—वि. (शाप.) विद्युत्, उष्णता इ० ज्या पदार्थांतून वाहत नाहीं असे (पदार्थ) (इं.) नॉन-कंडक्टिबल [सं. अ+वाहक]

अवाहन—आमंत्रण; आवाहन पहा. [सं. आ+व्हे]

अवाही—वि. (व.) मशागत न करतां लागवड केलेलें. अंदाज ३ अर्थ पहा. [सं. अ+वह्] **०डांगर**–पु. जमिनीची मशागत न करतां, न परतां, न लावतां आलेला डांगर–भोपळा.

अवाळूं—आवाळूं पहा.

अधाक्षर—न. १ वाचण्यांत, बोलण्यांत, लिहिण्यांत निघालेलें भलतें अक्षर; बोलण्यांत, लिहिण्यांत चुकी–प्रमाद; अशुद्ध उच्चार. २ एकहि अक्षर; शब्द; आवाज; ध्वनि; उद्‌गार; चकारशब्द (मुग्धतेच्या उलट अर्थी). 'एक अवाक्षर तोंडांतून काढायची नाही.' –फाटक, नाटघछटा १. 'तूं दुसऱ्या कोणाजवळ अवाक्षर बोललास तर ठार मेलास म्हणून समज.' –उषःकाल. ३ अपशब्द; निंदायुक्त, अभद्र, शिवराळ, भाषा; दुर्भाषण; शेवटच्या दोन अर्थी नकारात्मक उपयोग. [सं. अव+अक्षर]

अवि—पु. १ मेंढा. २ कुंपण; वई. 'मृतिदायक सापाची छाया भेका, अवींसहि कसापाची।' –मोकृष्णवि ३८.४८. [सं. अवि-स्; लिथु. अविस्; स्लाव्ह. ओव्क्ष; लॅ. ओव्हि-स्; ग्री. ओइस्; गॉथिक. अविस्]

अविकर्णे—अक्रि. उतरणें; अतिशय पिकणें; पिकून बिघडणें; नासणें (फळ). [सं. अति+पच्]

अविकळ—वि. १ अखंड; सबंध; संपूर्ण. 'तेथें भागवतधर्म हे सकळ। शिकावे अविकळ अनन्यश्रद्धा।'–एभा ३.६१४. 'स्त्रियांचें यालागीं व्रत सफळ झालें अविकळा।' –कात्यायन व्रत २०. २ व्यवस्थित; निर्दोष. 'त्रिषवण त्रिकाळ। पूजा करितां अविकळ। भजोनि जिंकिला कळिकाळ।' –एभा ६.१२१. ३ विकाररहित; स्थिर; दृढ. 'तैसीं नाना कर्में करितां सकळ। सदां अविकळ योगिया।' –एभा ८.४३. ४ अव्यंग; ज्याची गात्रें सुदृढ आहेत असा. [सं. अ+विकल]

अविकार—वि. विकाररहित; निर्दोष. 'बोलणें जें अविकार। तें सत्य येथें॥' –ज्ञा १६.१२४. [सं. अ+विकार]

अविकारी, अविकार्य—वि. १ विकृति न पावणारें; फरक, बदल न पावणारें; निर्विकल्प; नित्यसम. २ नाश, ऱ्हास न पावणारें. ३ (व्या.) अव्यय; ज्यास लिंग, वचन, विभक्ति लागत नाहीं असा. [सं. अ+विकार]

अविकृत—वि. १ रूपांतररहित. २ विकार न पावणारा; न बदलणारा. 'व्यक्तीसी अतीतु। आनदि अविकृतु। सर्वरूप॥' –ज्ञा २.१५०. [सं.]

अविक्रिय—वि. १ विकाररहित. 'म्हणौनि कैंचे अंश अविक्रिया। एका मज।' –ज्ञा १५.३३७. [सं. अ+वि+कृ]

अविक्रिय—वि. अक्रिय; क्रियाशून्य. [सं. अ+वि+कृ]

अविक्रिया, अविक्री—स्त्री. १ विकार; विकृति; बिघाड; दुखणें; अजारीपण; असमाधान. २ किळस; वीट; ओकारी; कंटाळा; शिसारी. [सं. अ+वि+कृ]

अविचार—पु. अविवेक; विचाराभाव; दुर्लक्ष्य; अज्ञान; वेडेपणा. –वि. अविचारी पहा. [सं. अ+विचार]

अविचारणीय—वि. १ विचाराच्या आवांक्या बाहेरचें. 'मग अविचारणीय तें आंगा। घडोनि जाय।' –ज्ञा ६.४६७. २ अशंकनीय; शुद्ध. [सं.]

अविचारणें—अक्रि. अविचार करणें. 'मग सुमती बोले प्रधान। राया बरवें पुशिलें वर्तमान। अश्व धरिला अविचारून। यासी परिहार एक आहे॥' –जै २३.४१. [सं.]

अविचारशील, अविचारी—वि. विचार न करणारा; लक्ष न घालणारा–देणारा; अविवेकी; गाफील; असंयमी; तापट. [सं.]

अविचारित—वि. ज्याबद्दल मनन, विचार केलेला नाहीं असें; अविचाराच्या लहरींतलें; पूर्णपणें आकालन न केलेलें; 'हें एकलौतें चराचर। अविचारित सुंदर।' –ज्ञा १४.११०. 'तेवीं इहामुत्र कामनीय। जें अविचारित रमणीय।' –एभा १४.३५६. [सं.]

अविच्छिन्न—क्रिवि. १ निरंतर; अव्याहत; एकसारखें; अखंड; सतत. 'ही वृत्ति आम्हांकडे पांचशें वर्षे अ० चालली आहे.' २ तंतोतंत; बरोबर; निवळ; यथास्थित; व्यवस्थितपणें; सुंदर रीतीनें. 'यंदाचे व्यवहारांत अ० दोन हजार रुपये मिळाले.' –वि. अविभक्त; अत्रुटित; अखा; सबंध; सगळा. 'सरकारी सभासदांचें अविच्छिन्न बहुमत सदैव कायम राहील' –टि ३.२१६. [सं. अ+वि+च्छिद्=कापणें]

अविट—वि. (विरू.) अवीट. १ अविकार्य; उत्कृष्ट. न विटलेले. 'अविट अमळ अनुपम्य अतिभव्य तेज फांकलें।' –केप १६३; 'अविट ज्याची करणी ऐकतां देहप्राण होतो थंडा।' –होला १४. २ सतत कार्य करणारा; न कंटाळतां काम करणारा; दमदार; शूर. 'बापु गोखले केवढे अविट। म्हणे शत्रुची लागली बिट।' –गापो १०४. अवीट पहा. [अ+विटणें]

अविद्—अविंध पहा. 'अविंदाचें राज्य बेदरीं असतां। कागद पाहतां तलाब केली॥' –तुगा ४४३६. [सं. अ+व्यध्]

अविदग्ध—वि. मूर्ख; अडाणी; अकुशल. [सं. अ+विदग्ध]

अविद्धयोनी—वि. अक्षतयोनि; जिला पुरुषाचा संग झाला नाहीं किंवा जिचा कौमार्यभंग झाला नाहीं अशी; अनुपभुक्त (विधवा, कुमारी). [सं. अ+विद्ध+योनि]

अविद्य—वि. अविद्वान; मूर्ख; अडाणी. 'अविद्य सुविद्य न म्हणतां जाण। धरातळीं ब्रह्म ब्राह्मण। त्यांचें करूं जातां छळण। कुळनिर्दळण आवश्यक॥' –एभा १.३६४. [सं. अ+विद्या]

अविद्यमान—वि. हजर नसणारा; अनुपस्थित; नाहींसा झालेला; निर्गत; विनष्ट; मयत; अवर्तमान. [सं. अ+विद्+असणें]

अविद्या—स्त्री. १ विद्या नसणें; अज्ञान; अजाणपणा. 'हे चिदंश अविद्येमुळें आत्मस्वरूप विसरून आपण जीव असें मानून संसारांत पडले.' –शास्त्रीको. २ माया; अवास्तविक गोष्टी खऱ्या मानणें. 'तेथें मायेच्या प्रपंचासच अविद्या ही संज्ञा आहे' –गीर २०८. 'परमात्म्याचीं दोन आवरणें –स्थूलदेह, लिंगदेह– आहेत या कल्पनेच्या मुळाशीं अविद्या आहे.' **॰पसारा**–पु. अज्ञानाचा

प्रसार, व्याप; मायाजाल; मोहजाल. 'स्त्री केवळ अविद्याप-सारा.' **-द्योपाधि**-पु. अविद्या-अज्ञान याची उपाधि; अज्ञानरूपी आवरण. उपाधि पहा. [सं.]

अविंध—वि. छिद्र, भोंक न पाडलेला (मोतीं, कान). -पु. मुसलमान; यवन; म्लेंछ; मुसलमानाच्या कानास हिंदूप्रमाणें भोंकें पाडलेलीं नसतात म्हणून. (सामा.) अहिंदु. [सं. अ+व्यध्]

अविधवा—स्त्री. जिचा नवरा जिवंत आहे अशी स्त्री; सुवासिनी;सवाष्ण. [सं. अ+वि+धव] **०नवमी**-स्त्री. भाद्रपद शुद्ध नवमी; या दिवशीं पिता जिवंत असून माता मृत असेल अशा गृहस्थानें श्राद्ध करावयाचें असतें. हें श्राद्ध सपिंडक करावें. माता मृत असून पुढें कांहीं दिवसांनीं पिता मृत झाल्यास हें अविधवा नवमी श्राद्ध करूं नये असें कांहीं म्हणतात. -धसि २.

अविधि—पु. नियमाचा-विधीचा अभाव; शास्त्रविरुद्ध वर्तन; स्वैराचार; धर्मबाह्य आचार; अनाचार. 'रुक्मिया म्हणे लग्न लावूं नियां। मग कन्या नेऊं अंबालया। राजा म्हणे कुलधर्म टाकोनियां अविधि कवि करावा।' -ह २३.२३८. -वि. अव्यवस्थित; विधिपूर्वक न केलेलें; अशास्त्र. -क्रिवि. अशास्त्ररीतीनें; अव्यवस्थितपणें. [सं. अ+विधि]

अविंधी—वि. मुसलमानी; यावनी; अहिंदु; विधर्मी (अमदानी). [सं. अ+व्यध्]

अविनय—पु. उद्धटपणा; दांडगेपणा; मस्तवालपणा; विनयाभाव. -वि. उद्धट; मस्त; उमेट; हट्टी; गर्विष्ठ. [सं.]

अविनाश—पु. नित्यत्व; शाश्वतता; नाशाचा अभाव; अनश्वरत्व. -वि. नाशरहित असा; शाश्वत; नित्य; अनश्वर. 'पाहती मज अविनाशातें। तरी कैचा दिसे।' -ज्ञा ९.१५२. [सं. अ+वि+नश्] **०पद**-न. मोक्ष; कैवल्य. 'या देहाचेनि साधनें। अविनाशपद पावणें।' -एभा ९.२८१. **०भाव**-पु. नित्यत्वबुद्धि; अविनाशी आहे असा समज. 'तो देखतसे अविनाशभावें। आत्मबुद्धि॥' -ज्ञा ४.१२०.

अविनाशित्व—न. (शाप.) सातत्य; नित्यत्व. (इं.) कॉंझरवेशन. [सं.]

अविनाशी—वि. नाश न पावणारें; अनश्वर; नित्य; शाश्वत; नष्ट न होणारें. [सं.]

अविनिगमक—वि. (लुप्त) शास्त्रप्रामाण्य, पुराव्याचा आधार नसलेला. [सं. अ+वि+निगम+क]

अविनीत—वि. उद्धट; अनम्र; गर्विष्ठ; अविनय पहा. [सं.]

अविभक्त—वि. समाईक; एकत्र. **०कुटुंब**-न. एकत्र राहणारें हिंदु कुटुंब, घराणें. (इं.) जॉइंट फॅमिली [सं. अ+विभक्त]

अविभाज्य—वि. १ भाग, वांटा, वांटप न करतां येणारें; विभाग न होणारा-रें. २ भाग करण्यास योग्य नाहीं असा. **०अवयव**-पु. (गणित) ज्याचे अवयव पुन्हां पडत नाहींत असे अंक. उ० ११, ७, ३. **०मिळकत**-स्त्री. १ जिची वांटणी करूं नये असें कायद्यानें ठरविलें आहे अशी मिळकत, राज्य वगैरे. २ कुटुंबांतील इतर इसमांत वांटून न देतां एकाच इसमाकडे चालणारी मालमत्ता. [सं.]

अविमुक्तक्षेत्र—न. काशीक्षेत्र. 'अविमुक्त महास्मशान। वाराणशी, आनंदवन। एकासीचि नावें जाण।' -एभा ३१.५२६; ख ३६९९. [सं.].

अविरजी—वि. न विरजलेलें. 'अविरजी दुधाचें भांडें।' -ज्ञा १८.१४७६. [अ+विरजणें]

अविरट्या—अरवटा पहा.

अविरल—वि. १ पातळ नव्हे तो; दाट; घट्ट. २ एकसारखा; निरंतर. 'जगदुन्मीलनाविरल। केलिप्रिय॥' -ज्ञा १८.६. [सं.]

अविर्भाव—आविर्भाव पहा.

अविलंब—पु. शीघ्रता; तांतडी; उशीराचा अभाव. 'सकळाभीष्टें साधती। अविलंबेंसी।' -गुच १.६. -क्रिवि. जलद; लवकर. [सं. अ+विलंब]

अविवक्षित—वि. १ विवक्षित, विशिष्ट, निराळा नसलेला; विशेषेंकरून उद्देशिलेला किंवा इच्छिलेला नव्हे तो. २ ज्याचा विचार किंवा मनन केलेलें नाहीं असा; अचिंतित. ३ अनिश्चित; कोणताहि. [सं.]

अविवाहित—वि. लग्न न झालेला. [सं.]

अविवेक—पु. अविचार; विचाराचा अभाव; तारतम्य नसणें; मूर्खपणा. 'जरी जाहला अविवेकु। तरी संतकृपादीपकु। सोज्वळु असे।' -ज्ञा १.७६. [सं. अ+विवेक]

अविवेकी—वि. अविचारी; सदसद्विवेकबुद्धीचा उपयोग न करणारा; तारतम्यज्ञान ज्याला नाहीं असा; मूर्ख; असमंजस. 'जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोलें विकी। तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु॥' -ज्ञा २.२५४. [सं.]

अविश्रम—क्रिवि. एकसारखें; विसांवा न घेतां. 'त्या भोगाचें फळ गहन। अविश्रम जन्ममरण।' -एभा २८.१५७. [सं. अ+विश्राम]

अविश्रांत—क्रिवि. न दमतां, थकतां; विश्रांति घेतल्याशिवाय; सतत; अखंड; निरंतर. [सं.]

अविश्वसनीय—वि. विश्वास ठेवण्यास अयोग्य; गैरभरंवशाचा. [अ+विश्वास]

अविश्वास—पु. बेभरंवसा; विश्वासाचा अभाव. 'तिजवर माझा अविश्वास आहे.' -न्यायप. ३९१. [अ+विश्वास]

अविश्वासी-सू-सूक—वि. १ बेभरंवशाचा; साशंक; विश्वास, श्रद्धा न ठेवणारा. २ विश्वास, भरवंसा ठेवण्याला अयोग्य. [सं.]

अविष्करण—विप्र. आविष्करण पहा.

अविसाळ—न. पक्ष्यांचें घरटें; कोट; कोठार. 'कां महावृक्षीं अविसाळें। पक्षजातीचीं।'–ज्ञा ११.२५८. 'हो कां पक्षिणी देखोनि पिलें।...सांडोनियां अविसाळें। मुख कोवळें जेवीं पसरी॥' –एभा ७.१५७. [सं. अविस्+आलय=आश्रयस्थान]

अविस्रां—क्रिवि. एकाएकीं; न समजतां. [सं. आ+विस्मृति=आ+विसर]

अविस्वासणें—अकि. अविश्वास ठेवणें; विश्वास नसणें. 'भगवद्वचनीं अविस्वासे। ऐसा कोण पतित असे।' –दा १.१.२१. [सं. अ+विश्वस्]

अविहित—वि. शास्त्रामध्यें न सांगितलेलें; न आज्ञापिलेलें; शास्त्रविरुद्ध. 'अविहित कामस्थिती। हा स्वभाव ज्याचे वृत्ती। ते अंत्यजादि प्रकृती। जाण निश्चितीं उध्दवा॥' –एभा १७.२२३. [सं.]

अवीक—वि. (गो.) जास्त; फाजील; अधिक. [सं. अधिक]

अवीट—वि. १ न विटणारा; पक्का (रंग); चवदार; न बिघडणारें (अन्न). 'अवीट न विटे परमान्न।'–भज ४२. न बिघडणारा; निस्तेज, खराब न होणारा (रत्न, मणि, धातु); कंटाळा, किळस, शिसारी नसणारा (मुद्दाम दुष्टपणा, पापाचरण करणारा इसम); लवकर जीर्ण न होणारें–न झिजणारें–खराब न होणारें, सुदृढ (दागिने, भांडीं, शरीर, इमारत); उच्छृंखलपणाचें; अमर्यादः अविनयशीलपणाचें (भाषण); विपुल; समृध्द (पीक, धान्य); यांखेरीज इतर पुष्कळ निरनिराळ्या अर्थानें हा शब्द योजतात, पण बहुतेक अक्षय, टिकाऊ या अर्थीच असतो. २ अढळ; अच्युत; अक्षय्य; अनश्वर (ईश्वराबद्दल योजतात). 'धीटपणेंचि अवीट पदाप्रति नीट करुनि मन सत्वर पावा।' –रत्न ८. ३ ऐटदार; आकर्षक. 'धीट सभांतरिं नीट रिघोनि, अवीट बसे कवणास न साहे।'–आसी २९. अविट पहा. **०आवडी**–स्त्री. अढळ, अक्षय, श्रध्दा–प्रेम. 'तैसा तुका वैष्णव वीर। अवीट आवडी त्याची थोर।' [अ+वीट]

अवील, अवीलचूल—अवेल व अवेलचूल पहा.

अवीस—न. मांस. [सं. आमिष]

अवृष्टि—स्त्री. अवर्षण. 'जे अवृष्टीचेनि उपद्रवें.' –ज्ञा १३.२२१. [सं. अ+वृष्]

अवेक्त—वि. अव्यक्त (अप.) 'जे अवेक्त पुरुषाची वेक्ती। विस्तारें वाढली इच्छाशक्ती।' –दा १.३.११. [सं. अव्यक्त]

अवेप्रता—स्त्री. अव्यग्रता (अप.) एकतानता. 'कीर्तेनें अवेप्रता घडे। कीर्तेनें निश्चये सांपडे' –दा ४.२.२९. [सं. अव्यग्रता]

अवेच—वि. खर्च वांचविणारा; बचत करणारा; काटकसरी; कृपण; कंजूष; हाताचा जड. [सं. अ+वि+ची; म. अ+वेंचणें]

अवेर–रां—क्रिवि. (गो.) एरवां; पुढें येणाऱ्या किंवा गेल्या चौथ्या दिवशीं. (काल किंवा उद्यां), परवां, तेरवं. अवेरां (एरवा) असा अनुक्रम. [सं. अपर, अवर]

अवेल—स्त्री. अयाळ पहा. **०केश**–वि. ज्यांचें अयाळ खरापर्यंत पोहोंचतें असा (घोडा).

अवेल(ला)—पु. चुलीच्या बाजूला, लहान सहान भांडें ठेवण्याकरितां केलेला एक भाग. (यास स्वतंत्र तोंड नसून चुलींतून जाळ जावयास जागा असते, असे एक, दोन क्वचित् तीनहि अवेल एका चुलीस जोडलेले असतात.); वैल पहा. **०चूल**–स्त्री. जीस वईल आहे अशी चूल. [?]

अवेव—पु. अवयव (अप.) शरीराचा भाग. 'कां कूर्म जियापरी। उवाइला अवेव पसरी' –ज्ञा २.३०१. 'हात पाये अवेव नाना।' –दा १५.७.२४. [सं. अवयव]

अवेश्वरी—क्रिवि. योग्य किंवा या, त्या वेळीं, काळीं, समयीं–प्रसंगीं. 'ह्या अवेश्वरीं त्या अवेश्वरीं।' –शर (शुभा उद्यो ५.१) [अवसरीं अप.]

अवेळ—स्त्री. १ योग्य वेळ निघून गेल्यानंतरची वेळ; उशीर; विलंब. २ अयोग्य वेळ–काळ–समय; अनवसर. [सं. अ+वेला] **०सवेळ**–स्त्री. योग्य–अयोग्य, अनुकूल–प्रतिकूल वेळ–समय; वेळ–अवेळ. 'अवेळसवेळ पाहून काम करणें तें करावें भल्तेच्हां करूं नये.' [सं. अवेला+सुवेला]

अवेक्षण—न. १ शोध; तपास; चौकशी; पाहणें. २ लक्ष; देखरेख; अवलोकन; रक्षण. ३ कृपा; लोभ. ४ काळजी. [सं. अव+ईक्ष]

अवो—उद्गा. अहो! अगे! एक संबोधन. 'अवो अवो कृशोदरिअे। अडखळसी रत्नांचिअे पायरिअें।'–शिशु ६९२. 'अवो तूं देवाची प्रिय परम अर्धांग हरिचें।' –सारुह ७.९९. [ध्व.]

अवो—पु. आव पहा. [सं. आकार]

अवोज—पु. आबाळ; ओज नसणें. 'नातरी होता कृषीचा अवोज। पेरितां नासे बीज पाहा।' –जै. ६३.२०. [सं. अव+ओजस्]

अवोक्षण—न. औक्षण; अभिषेचन; पाणी शिपडणें (विशेषतः विधि, संस्कार यांमध्यें [सं. अव+उक्ष्=शिपडणें]

अव्कात—अवकात पहा.

अव्जार—अवजार पहा

अव्यक्त—वि. १ व्यक्त नव्हे तें; उघड–प्रकट नाहीं तें; अस्पष्ट; अदृश्य; दृग्गोचर नसलेलें; मानवी दृष्टीला अगम्य (देवता, परमेश्वर,

आत्मा). ' वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकारु सूर्य जैसा । ' –अमृ ६.३. २ (गणित) अस्पष्ट; अज्ञात; माहीत नसलेली (बीजगणितांतील राशि, संख्या). ३ अस्पष्टोच्चारित; ककारादि वर्णरहित शुद्ध ध्वन्यात्मक (शब्द.) ४ (ल.) गुळमुळीत (आवाज, ध्वनि.) ५ निराकार. ' आधु मी व्यक्तु । अव्यक्तु ही मी । '–ज्ञा १८.११९४. ६ अतिसूक्ष्म. –न. माया; ब्रह्म; प्रकृति; कारण. ' विराटाचा विराज पुरुषु । तो अव्यक्तीं करी प्रवेशु । ' –एभा ३.१७५. [सं.] ०**गणित**–न. बीजगणित; यांतील कांहीं राशी अव्यक्त असतात. ०**गुणन**–न. (बीज.) अव्यक्त राशींचा गुणाकार. ०**पक्ष**–पु. पिसवांच्या वर्गातील प्राणी. याचे पंख दिसत नाहींत. याच्या अनेक जाती आहेत. ०**भजन**–न (गणित) अव्यक्त संख्यांचा भागाकार. ०**राशी**–पु. (बीज) जिची किंमत दिली नाहीं किंवा माहीत नाहीं अशी संख्या. संस्कृत बीजगणितांत इंग्रजी एक्स्, वाय, झेड् प्रमाणें अव्यक्त संख्यादर्शक कांहीं संज्ञा योजिल्या आहेत, उ० कालक, नीलक, पीतक, लोहितक. चित्रक, हरितक, मेचक, श्यामलक, कपिलक, पिंगलक इ० ०**साम्य**–न. (बीज.) अव्यक्त राशींचें समीकरण.

अव्यक्तता—स्त्री. (संगीत) वर्णोच्चार स्पष्ट नसणें [सं.]

अव्यंग—वि. १ उणेपणा नसलेला; सर्व अवयवांनीं, घटकांनीं परिपूर्ण; सगळा; संपूर्ण; सांग. ' जिंतिला जन्ममरणाचा पांग । सुख अव्यंग पावलें ॥ ' –एरुस्व १०.८६. २ व्यंग नसलेला; दोषहीन; निर्दोष. ' आदरि जो अव्यंगु । संन्यासु तो । ' –ज्ञा १८.६९. ०**वाणें**–वि. व्यंगरहित; दोषरहित; पूर्ण. ' तया अव्यंगवाणेंया ब्रह्मातें ।...जाणोनि स्मरे । ' –ज्ञा ८.९१. [सं.]

अव्यग्र—वि. (काव्य.) अस्वस्थ नसलेला; न क्षोभविलेला; अनुद्विग्न, शांत; संयत; स्वस्थ; एकाग्रचित्त; पूर्ण लक्ष असलेला; ज्याचे चित्त तुसरीकडे गुंतलें नाहीं असा. ' गुंफेद्वारें लक्ष्मण । बैसला रक्षण अव्यग्र । ' –रावि [सं.]

अव्यत्यय—वि. उपद्रवरहित; एकसारखा; अखंडित. ' मग समाधि अव्यत्ययां । ' –ज्ञा १८.१७५४. [सं.]

अव्यभिचार—पु. एकनिष्ठता; अनन्यता; एकाग्रता. ' घणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । ' –ज्ञा १५.५. **अव्यभिचारित**–वि. सदोदित; अखंडित. –न्यायप. १६८. **अव्यभिचारी**–वि. सर्वसाधारण, सामान्य नव्हे असा; योग्य; बरोबर; आवश्यक; विवक्षित. [सं.]

अव्यय—न. (व्या.) १ अविभक्तिक किंवा अविकारी शब्द; ज्यास लिंग,वचन,विभक्ति,प्रत्यय लागत नाहीं किंवा ज्याचें रूप बदलत नाहीं असा शब्द उ० क्रियाविशेषण; उभयान्वयी. –वि. अविनाशी; नष्ट न होणारें; न बिघडणारें; फरक किंवा बदल न होणारें; शाश्वत; व्ययरहित; अनश्वर; विकाराक्षम; व्यर्थ न जाणारा. ' व्ययामार्जी मी अव्ययो ' –एभा २.३९४. २ अमोघ; व्यर्थ न जाणारा, ' बाण अव्यय काढिला । गुणीं अवगुणाचे जोडिला । अकूरें कानाडीं वोढिला । उडविला विदूरथ । –एरुस्व ९.३०. ३ व्ययरहित (ब्रम्ह, स्वर्गलोक). अक्षय ' अन्य पुरुषाची जों वरी सुशिला । नसे, गेली जों न ती अव्ययाला ॥ ' –टिक ७३. [सं.]

अव्ययीभाव—पु. (व्या.) एक समास. ज्या समासांतील पहिलें प्रधानपद अव्यय असून सबंध समासाचा उपयोग अव्ययासारखा होतो तो समास. उ० यथाशक्ति, हरघडी, दरदिवस, अनुरूप, प्रतिवर्ष. [सं.]

अव्यवस्थ–स्थित—वि. १ योग्य, यथास्थित, जेथल्यातेथें न लावलेलें–रचलेलें–मांडलेलें–ठेवलेलें; विस्कटलेलें (गोष्ट, काम); गुंतागुतीचें (काम). २ बेशिस्त; अनियमित; टापटीप नसलेला; अजागळ (इसम). [सं.]

अव्यवस्था—स्त्री. व्यवस्थेचा अभाव; बेशिस्तपणा; घोंटाळा; घालमेल; गोंधळ; अनियमितपणा. [अ+व्यवस्था]

अव्यवहार—वि. व्यवहाररहित; अव्यवहारी पहा. –पु. खोटा व्यवहार; चोरी; नियकर्म. ' का राजाज्ञा अव्यवहारु । कुंठवी जेवीं । ' –ज्ञा १८.७३३. [सं.]

अव्यवहारित—वि. उपयोगांत न आणलेला; व्यवहारांतून गेलेला; रद्द; अनुपलब्ध; अव्यवहारी-यें पहा. [सं.]

अव्यवहारी–यें—वि. १ व्यवहारांतील नाहीं असें; असामान्य; ज्यासंबंधानें कोणताही व्यवहार होऊं शकत नाहीं असें. ' आणि संवादाचेनि मिषें । जे अव्यवहारी वस्तु असे । '–ज्ञा १८.८१. २ बहिष्कृत. ३ ज्याला व्यवहार माहीत नाहीं असा. [अ+व्यवहार]

अव्यवहित—वि. १ अव्याहत; अप्रतिबध्द; अखंड; अडथळा न केलेलें, झालेलें; सतत चाललेलें. २ जुळलेलें; जोडलेलें; चिकटून असलेलें; लगतचें. ३ एकनिष्ठ; व्यवहित; व्यवधान न पावलेला. ' ते अव्यवहिता भक्ति । ' –यथादी १८.२४३८. [सं. अ+वि+धा]

अव्या—पु. (कों.) १ अडथळा, आडकाठी, हरकत. २ खंड, भंग (चालीरीतीचा); दुःखप्रद प्रसंग; अरिष्ट; अनर्थ.

अव्याकुळ—वि. अनुद्विग्न; अव्यग्र; एकाग्र; स्थिरचित्त. 'सदामहूपें मननशील । अव्याकुळ श्रवणार्थी । ' –एभा १३.७३९. [सं. अ+व्याकुल]

अव्याकृत—वि. १ विवरण, स्पष्टीकरण, टीका न केलेलें. २ अस्पष्ट; अव्यक्त; गूढ. ३ विकाररहित; अविकृत. ' कारणदेह अव्याकृत । प्रलय अवस्था वर्ते तेथ । ' –विउ ५.२५. ४ चांगलें अगर वाईट असें कोणतेंच फल न देणारें (कर्म). **कर्माचे तीन विभाग करितात**–कुशल, अकुशल आणि अव्याकृत. –ज्ञाको (क.) १३८. [सं.]

अव्याकृति—वि. सुंदर; सुरूप. 'शेषशयना अव्याकृति । घनश्याम तूं लावण्य जोती ।' –मक ३२.१६२. [सं. अ+वि+आकृति]

अव्याज—वि. निष्कपट; साधा; सरळ; पाचपेंच नसलेला. [सं. अ+व्याज=कपट]

अव्यापारेषु व्यापार—पु. नसता उद्योग; भलतीच गोष्ट; विकतश्राद्ध; ओढवून आणलेली अडचण. (पंचतंत्रांत एक खुंटी उपटणाऱ्या वानराची गोष्ट आहे तींतील एका श्लोकाचा हा आरंभ आहे).

अव्यापी—वि. न व्यापणारें; व्यापक नसणारें. [सं.]

अव्याप्ति—स्त्री. अपुरी व्याख्या; लक्ष्यार्थाचा एकदेश (कांहीं भाग) लक्षणानें व्याप्त न होतां (शिल्लक) राहतो असा दोष तो; –शास्त्रीको. व्याख्येय जातीमध्यें ज्या ज्या व्यक्तींचा समावेश व्हावा अशी इच्छा असते, त्यांपैकीं एखाद्या व्यक्तीचा समावेश तींमध्यें होत नाहीं असें व्याख्येवरून दिसणारा एक दोष, जसें–पदार्थाची किंमत देण्याघेण्याच्या सोयीकरतां राज्यकर्त्यांनीं केलेले जे धातूचे तुकडे त्यास नाणीं म्हणावें अशी नाण्याची व्याख्या केली तर तीवरून कवड्या, बदाम इत्यादिकांचा समावेश नाण्यांत होणार नाही. यांत अव्याप्ति हा दोष आहे. –सुकौ ४१. [सं.]

अव्याप्यवृत्ति—स्त्री. १ (तर्कशास्त्र) कालासंबंधीं, स्थिती संबंधीं वगैरे अपूर्ण अस्तित्व; जसें–दुःखावस्थेंत सुखाभाव, सुखावस्थेंत दुःखाभाव पूर्णपणें होत नाहीं. २ सावधिकत्व; समर्यादत्व; हिच्या उलट विश्वव्याप्यवृत्ति, अमर्यादत्व. [सं.]–वि. (तर्कशास्त्र) १ विश्वव्यापक किंवा सर्वव्यापी नसणारा. २ अकथनीय; अवाच्य; असंभवदुक्तिक. [सं]

अव्यावस्त, अव्यावेस्त— अव्यवस्थित पहा. 'बहुधा बोलणें अव्यावेस्त । बोलींचि नये ।' –दा ४.२.१८. [अव्यवस्थित अप.]

अव्याहत—वि. अबाधित; अखंड; अडथळा न होतां चाललेलें; अप्रतिहत; अप्रतिबध्द; निर्विवाद; अविच्छिन्न. 'देखसी तो अव्याहतु । तामसु कर्ता ॥' –ज्ञा १८.६८८. –क्रिवि. सदोदित; अखंड; खंड न पडतां; सतत. [सं.]

अव्युत्पन्न—वि. १ ज्याची व्युत्पत्ति लावलेली नाहीं असा; मूळ न शोधलेला (शब्द, नियम); असाधित (शब्द). २ अविद्वान्; अडाणी. [सं.]

अव्रण—वि. १ दुःख, जखम, क्षत, रोग वगैरेंतून मुक्त (इसम, जनावर, फळ.) २ निर्दोष; उणेपणा नाहीं असें; भंग किंवा तडा, चीर नसलेला (कलश, पात्र, खापर वगैरे). [सं.]

अव्लाद्—अवलाद पहा. 'लेकराचे लेकरीं अव्लाद्–अफ्लाद् तुवां खाणें ।' –रा ८.२६.

अव्लिया—अवलिया पहा.

अव्वल—अवल पहा. 'अव्वलीपासून जातीनें मन्सुब्यास धक्का कोठेंहि बसला नव्हता ।' होकै ६. [अर.]

अव्वा—स्त्री. स्त्री, बाई; वृद्ध बाई. अवा पहा. [का. अव्वा=आई; सं. अंबा, प्रा=अव्वा]

अव्हा—वि. १ उजवा; –एभा १३.७५७. **०शंख**–पु. दक्षिणावर्ती, उजव्या मुखाचा शंख; हा फार मंगलदायक असतो असें म्हणतात. 'अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पती अमोल ।' –दा ६.९.१२. २ भलता; नियमरहित; अनियमित. **०सव्हा**–क्रिवि. उजवाडावा; इकडेतिकडे; हवेतसें; अवाच्यासवा. 'जो इंद्रियें अव्हासव्हां । चारी येथ ।' –ज्ञा १३.७६९. 'घालितां अव्हासव्हा पाय । शिवयात्राचि होती जाय ।' –भमृ ९.५३. [सं. सव्यच्या उलट ?]

अव्हाट—स्त्री. आडवाट; वाममार्ग. –एभा ११.१०७२; 'पूर्व पाप ओढवलें...। मन अव्हाटीं पहिलें । सर्वकाळ ।'–दा ५.८.१३. 'नीट वाट सांडूनि अव्हाटें जाती' –दावि ४०९. [अ+घाट; सिं. अवाट]

अव्हाटणें—अक्रि. १ आड मार्गानें जाणें. 'अव्हांटलिया आस्थाबुद्धि । विषय सुखचि परमावधि ।' –ज्ञा ४.२१. २ (व.) मागील गाडी पुढें काढण्यासाठीं चकारी सोडून बैल हांकणें; रस्ता सोडून बाजूला जाणें; बाजू देणें. 'गाडी अव्हाटली म्हणून चाक मोडलें.' [अवाट]

अव्हारणें—सक्रि. (व.) विस्तारणें; पसारा घालून ठेवणें. 'महालक्ष्म्याच्या सणाची तयारी केली होती, त्या अव्हारल्या कशा टाकाव्या म्हणून पूजा, जेवण त्यानें उरकलें व मग गेला.' [सं. अव+ह्–हार ?]

अव्हावणें—अक्रि. बोलावणें. [सं. आ+व्हे=बोलावणें]

अव्हेर—पु. १ हेटाळणी; अनादर; अवज्ञा; हेळसांड; अवहेलना; धिक्कार; तिरस्कार. 'तूं करिसी माझा अव्हेर । तरी त्यागीन शरीर ।' –कथा १.५.१०५. २ त्याग. 'जे परदेशीय आचार विचार आपल्या रीतींस जुळत नाहींत त्यांचा या पुस्तकांत अव्हेर केला आहे.' –नि ५४२. [सं.]

अव्हेरणें—उक्रि. १ अपमान करणें; तिरस्कारानें, तुच्छतेनें वागविणें; अनादर करणें; त्याग करणें. 'तें देखिलेयां दुर्योधनें । अव्हेरिलें कवणे मानें ।' –ज्ञा १.९२. 'द्विजगुरु तीर्थें जे अव्हेरिति । त्या टाकिति नरकमूर्त्तीं ।' २ हेळसांड, उपेक्षा, दुर्लक्ष्य, हयगय करणें; अव्यवस्थित, धूळखात पडणें; दुर्दशा होणें (भांडीकुंडीं, पुस्तकें, खोल्या, जागा वगैरे). [सं. अव+धीर्, प्रा. अवहीर –अवहेरी=अवगणन]

अशकारा—पु. कीर्ति; नांवलौकिक; प्रसिद्धि अस्कारा, अस्करा आश्कारा पहा. [फा. आश्कारा]

अशक्त—वि. १ निर्बल; असमर्थ; दुर्बल; हीनशक्ति. २ नालायक; अयोग्य. **०नी दुर्जन**–पु. दरिद्री असून गर्विष्ठ; दुर्बळ परंतु दुष्टबुद्धीचा माणूस. [सं.]

अशक्य—वि. शक्य नव्हे तें; असंभवनीय; न घडण्यासारखें; न करतां येणारें. **०सनद**–स्त्री. अव्यवहार्य वचन; कधीं अमलांत न येणारी सनद. 'राणीचा जाहीरनामा 'अशक्य सनद' म्हणून बाजूस ठेवण्यास खुद्द लॉर्ड कर्झन तयार आहेत.' –टिळे २.५७४. [सं.]

अशन—न. १ खाणें; भोजन; भक्षण. २ अन्न; खाद्यपदार्थ. 'अशनाचेनि पावकें । हारपतां प्राणु पोखे ।' –ज्ञा १८.१०२६. 'अशन अपुनिया स्वसुखालया' [सं.]

अशना—स्त्री. भूक; क्षुधा. [सं.]

अशनि—पु. वीज; विद्युत्; वज्र. 'एकोन योजनें शत टाकी मथुरापुरींत अशनीची । शक्ति किती' –मोसभा १.८५. [सं.]

अशब्द—वि. शब्दरहित; मूक. 'अर्थ तुमजतां ज्या लिहिती । अशब्दकाव्यें रोज किती!।' –ललितलहरि [सं.]

अशर—वि. दहा संख्या. अरबी सनाबद्दल वापरतात. [अर. अशर्]

अशरफी—अश्रफी पहा.

अशरीन—वि. वीस संख्या. अरबी सनाबद्दल वापरतात. [अर. इश्रीन्]

अशरीरवाक्, अशरीरिणी-वाक्-वाणी, अशरीरा-(री)वाणी—स्त्री. आकाशवाणी; देववाणी. एभा २४.१५५; 'अशरीरिणी अंबरीं । वदती झाली ।' –कथा. 'तों अशरीरिणी वदली उत्तर । धर्मयुध्द नव्हे हें' –पांप्र ४५.३९. अपभ्रष्ट अशायणी पहा. [सं.]

अशांत—वि. (गो.) क्वचित; विरळा.

अशांत—वि. १ क्षुब्ध; अस्वस्थ; खवळलेला (समुद्र, मन, वारा इ०); दमन न केलेला; न जिंकिलेला (विषय, विकार). २ षड्विकार ज्यानें जिंकिले नाहींत असा. (विषयी,क्रोधी,लोभी इ०).

अशाश्वत—वि. (बायकी अशाश्वती) कायम न टिकणारें; क्षणभंगुर; अनित्य; क्षणिक; नश्वर. [सं.]

अशास्त्र—वि. १ शास्त्रविरुद्ध केलेलें; शास्त्राला अमान्य; शास्त्राविहीत; आचाराकडे-नियमाकडे दुर्लक्ष करून किंवा त्यांचा भंग करून केलेलें; शास्त्रनिषिद्ध. २ अशुध्द; अयोग्य; अडाणी. [सं.] **०सिद्ध**–वि. शास्त्राप्रमाणें सिध्द न झालेलें (इं.) इनव्हॅलिड. [सं.]

अशिजा—वि. अर्धवट शिजलेला; पूर्ण शिजलेला नव्हे असा. [अ+शिजणें]

अशिलता—(प्र.) असिलता. तरवार पहा. 'दळ अशिलता धरून करा पाई।' –ऐपो २६८. [सं असि+लता]

अशिव—न. अकल्याण. [सं.]

अशिष्ट—वि. १ असभ्य; न शोभणारें; लज्जास्पद; लाजिरवाणें; विचकट; बीभत्स; कुत्सित; अव्यवस्थित; गैरशिस्त; अनगेल (मनुष्य, व्यवहार, चालरीत, मार्ग वगैरे). २ शिष्ट, थोर लोकांना संमत नसणारें; रूढ नसणारें; सर्वमान्य नसणारें. [सं.] **०व्यवहार**–पु. अनुचित, असभ्य चाल-व्यवहार (दासीगमन, लावण्या म्हणणें वगैरे).

अशिक्षित—वि. १ न शिकलेला; शिक्षण न घेतलेला. २ कवाईत न दिलेला; तयार न केलेला-झालेला; वळण, शिस्त न लावलेलें. [सं. अ+शिक्ष]

अशी—स्त्री. आशीर्वाद. [सं. आशिस्]

अशी—वि. असा याचें स्त्रीलिंग. –क्रिवि. या स्थितींत; याप्रमाणें. **अशी होणें**–विधवा होणें; वैधव्य येणें. 'तिकडच्या मरणानें मी अशी झालें ना!' –अस्तंभा १५८. **अशी राहणें**–वैधव्य आल्यावर सकेशा स्थितींत राहणें. 'ही चांडाळीण अशी राहिली आहे म्हणून मला घरांतलीं किती तरी कामें करावीं लागतात.' –सदानंद [सं. ईदृशी]

अशी—स्त्री. १ काशींतील नदी; असी. अशी व वारणा मिळून वाराणशी. २ काशींतील एका टोंकास असलेल्या तीर्थाचें नांव. 'मर्यादा श्वेत वरुणा अशी। मध्यें नांदे पंचकोशी।' –एभा ३१. ५२९. [सं.]

अशीतशी—वि. लहानसहान; किरकोळ; क्षुल्लक; महत्त्व नसलेलें.

अशीर—वि. (कों. गो.) शिरण्याला-शिरकाव होण्याला कठिण; अरुंद; चिंचोळें; २ सैल नव्हे असें; आटोपशीर. [अ+शिरणें]

अशीर—बंदीवान; असीर पहा.

अशील—पु. १ खासा; खानदानीचा; अभिजात; असील पहा. २ वकीलाचें कूळ; पक्षकार. [अर. असील्]

अशील—वि. जखमी (लढाईतील कैदी). असीर पहा. [अर. असीर]

अशुचि, अशुचिभूत—वि. अशुध्द; अस्वच्छ, अपवित्र. (शब्दशः व लक्षणेनें) 'तया तोंडीं कांटिवेडें। आंतु नुसतीं हाडें। अशुचि तेणें पाडें। सबाह्य जो।' –ज्ञा १३.६७८. [सं.]

अशुद्धाळ, अशुद्ढाळ, अषढाळ—वि. घाणेरडा; अव्यवस्थित; झोंपाळू; अजागळ (माणूस); गिचमिड, चुकर्यांनीं भरलेला (कागद, लेख); गिचमिड लिहिणारा; अजागळ पणाचें (भाषण, काम); चेंगट; अडाणी; गबाळ्या; भोंगळ; अव्यवस्थित. 'कोण अशुद्धाळ माणसें बोवा हीं?' –सूर्यग्रहण ७७. [का. असड्डाळ=तिरस्कारता, निंद्य वर्तन. किंवा का. असड्ड=मूर्खपणा! सं. अशुद्ध + आलय]

अशुद्ध—वि. १ शुध्द नसलेलें; चुकीचें; सदोष; प्रमादयुक्त. २ घाणेरडें; अस्वच्छ; बिघडलेलें; अपवित्र; अमंगळ; विटाळलेलें. **-ध्या**—वि. नेहमी चुका करणारा; गोंधळया; प्रमादी. -न चूक; चुकी; प्रमाद; दोष (बोलण्यांत-लिहिण्यांत). [सं.]

अशुध्द—न. (काव्य) रक्त. ' परि ते अव्हेरूनि गोचिड । अशुध्द काय नेघती ॥ ' -ज्ञा ९.५७. ' घायीं चूर केलीं हाडें । अशुध्द उडे आकाशीं ॥ ' -एरुस्व १०.३३. ' अशुध्द पूर वाहों लागले । वीर आटले अपार । ' -जै. ७८.८५. [सं.]

अशुभ—न. १ अमंगलपणा; अनिष्ट; दुर्भाग्यता; दुर्दैव; अकल्याण **म्ह०** अशुभस्य कालहरणं । शुभस्य शीघ्रम्. २ अनिष्ट कार्य; अमंगल कार्य. ३ पातक. ' आमुच्या अशुभाशयाचा घातु । करिता चरणधूमकेतू । ' -एभा ६.१११. [सं.] -वि. १ अमंगल; अभद्र; अनिष्ट; प्रतिकूळ (देखावा, सूचना, मतलब, अर्थ, योग, क्रिया, शब्द, खुणा, चिन्हें, लक्षणें वगैरे). **०कर्म**—न. अमंगल किंवा तिरस्करणीय विधि. **०आचार**—पु. १ ज्यांत उत्सव-सुखसोहळा नाहीं अशा तऱ्हेचें कार्य किंवा समारंभ; विशेषतः औध्वदैहिक क्रिया-उत्तर क्रिया. २ पापाचरण; अनाचार; दुष्कर्म. [सं.] **०चिन्ह-०लक्षण**—न. १ अमंगल, अनिष्ट, चिन्ह-लक्षण, छाया, व्यंजन; दुश्चिन्ह; अनिष्ट सूचक गोष्ट. ' अशुभचिन्हें अत्यंत । लंकेमाजि होति बहुत ।'. घोडयाचीं कांहीं अशुभलक्षणें-'अंसुढाळ किंवा अंसुपात,शृंगी, अंजनी (चांदणी), द्वयखुरी, कुखावर्ते, एकांगुळ, त्रिकर्णी, थनी, हीनदंती, अंडावर्ते, अधिकदंत, काळवदन, विकाळ, पंचनखी, कराळ, अहीमुख, तुटपट्टा, वाणिया, वार्शिंग, आसनखऊ, सर्पिण, कृष्णांजनी, खानखऊ, गोमीपांच, हरिणांग, पितांजनी, काखावर्ते, सारभूकण (सारभाजन), एकांडी, काळांजनी, अंगावर्ते, दाढशृंखळ, पुसावर्ते, श्वेतांजनी, लेंडावर्ते, शून्यमस्तक, हृदावर्ते, नासावर्ते, पोटावर्ते, तळावर्ते, शिळावर्ते, नेत्रावर्ते, भाळलोचन, व्याघ्रकांत, कृष्णटाळ, कपिमुख, जानूवर्ते, आजेळ, कर्णमूळ, शिंपला, पंचनखी, मेंढमुख, खरमुख, रावामुख, कौस्तुकी, हयभंग, केरसुण्या, मध्यदंती, खुंटीउपाड, अश्रुपात, सेनाभंजन, ढाशी, पोटसूळ, खळतो, रातांधळ, लीदखातो, माथेशूळ, पडमुत, रक्तमुततो, पाण्यांत बसतो, चऱ्हाटें खातो, डसतो, बुजतो. याशिवाय इतर खोडी-उतरड, चिमटा, डंकी, बोंबल्या, एका अंगावर झुलणें, बसला असतां उठतांना गुडघे टेकून उठणें, मगरूरी करणें, फार हिंसणें, भित्रेपणा, उडया मारणारा, पळण्याची खोड, लाथ मारणें व भांडखोर, पुढें आलेल्या जिनसावरून उडून जाणें, चावणें, दोन पायावर उभें राहणें, नालबंदी करूं न देणें, पंचवाख, बांधरीनाख (हरिनाख), उपानयन, जीनपाठक, तंगावर्ते, मांडवर्ते, चित्री, शाखी, दोसीना, रुईकांती, जंबावर्त, पंचपर्व गुदक, पापवर्ण. घोडयाचे कांहीं अशुभ भोंवरे-असलि, यकूब, सार्फान, सिपलक, सिंगन, कनहसलि, च्छपरखट (जनाजा), इतलसार, डंखउजाड, संगिनमाक, कुऱ्हेज, सफादारा, गातदार, मुरापा, चवडाशुंभ, मुत्लककूलफेदान, मुल्ककूललर्जेन, मुलकूलयेसार, मुलकूलयोजान, मुलारत, चारगुल, खाल्दार, चवदस्त, सिकल, गोवस्तान, कच्छि, तबरंगु, तस्मागर्दन, औसिकम, मर्दजान, मोथेवाला, चपरहडी, पोतेअलग, पोपेला, पेरसोन, अकबपेसानी, माहिरू, ढपल, सिलारपेसानी, सिकाल, खुंटेउखाड, चांदसुरज, गजदंत, चक्रावळ, उंटाच्या दांतासारखे दांत असणारा, उंच कपाळाचा, चाल्तांना बाहेर जीभ काढणारा, पाणी पितानां पाण्यांत फार तोंड बुडविणारा, दाणा खाऊन शिल्लक कांहीं न ठेवणारा, अंडावर गाईसारखें थान, सड व त्यावर केंस असणारा, एकांडया, अंडांत कोंय नसणारा, काळ्या जिभेचा, एका अंगास झुलणारा, छातीवर भोंवरा (वेड फोड) असलेला, कुसगोम, किरकावदाल, अदमचसव, खांडकुहा, हृदावळ, विषानेनी, पितानी ' वगैरे. -अश्वप ९३-१०६. या शब्दांच्या अर्थासाठीं ते ते शब्द पाहणें. **०वर्तमान**—न. वाईट बातमी; अमंगल, अनिष्ट बातमी. ' (बिशपसाहेबांच्या) अशुभवर्तमानानें फसून जाण्यइतके मूर्ख आतां आम्ही राहिलों नाही. '-टिले २.५६२. [सं.]

अशुश्रूषु—वि. सेवा न करणारा. ' शठ नास्तिक दंभयुक्त । अशुश्रुषु आणि अभक्त । ' -एभा २९.५०१. [सं. अ+शुश्रूषा]

अशें—वि. (गो.) असें.

अशेख—वि. एकंदर; अशेष; निःशेष; सर्व; संपूर्ण. ' गुणरत्नाचा परीक्षक । स्वयें सद्गुण पूर्ण अशेख । ' -निमा १.१०४. -अमृ ७.१४६; -एभा १.१४१. [सं. अशेष]

अशेर, अशेरी, अशीरगड—पु. (ना.) बऱ्हाणपुराजवळील दक्षिणची वेस या नांवानें प्रसिध्द असलेला किल्ला. याला अहीरगड (अहीर=गवळी राजानें बांधलेला म्हणून) असेंहि नांव आहे. -ख २१९८.

अशेला—वि. (प्र.) असला; अशा प्रकारचा, अशा जातीचा [असा+ला प्रत्यय]

अशेष—वि. ज्याची बाकी-शिल्लक उरत नाहीं असा; निःशेष; संपूर्ण; सगळा; सर्व; अवघा; अशेख पहा. ' द्विधा केली अशेषें । ' [सं.]

अशोक, अशोग—पु. १ एका वृक्षाचें नांव, ज्याचीं पानें आंब्याच्या पानांपेक्षां लांब व कुरळीं असुन शोभिवंत असतात; हीं झाडें देवळांत, बगीचांत लावतात. दाह, गुल्म, उदर, विष, रक्तरोग, स्त्रियांचे प्रदर वगैरेवर औषधी म्हणून याची साल उपयोगांत आणतात. संस्कृत काव्यांतून याचा नेहमीं उल्लेख येतो. यास गरोदर स्त्रीनें लत्ताप्रहार केल्याशिवाय फुलें येत नाहींत अशी समजूत आहे. २ एक बौध्दकालीन मौर्यवंशीय सम्राट (खि. पू. ३७३-२३२). ३ एक अरण्य. ' रावणानें सीतेस अशोकवनांत राक्षसिणींच्या

पाहन्यांत ठेविलें होतें.' **अशोकवनिकान्याय**–एखादी गोष्ट करण्याचे अनेक तुल्य मार्ग असतांना त्यांपैकीं अमुकच कां स्वीकारला याचें कारण सांगतां न येणें. जसें– रावणानें सीतेला अशोक वनांत कां ठेविली तर कोठें तरी ठेवावयाची ती अशोक वनांत ठेविली. [सं. अशोक (अ+शुच्) हिं. अशोग.]

अशोधित—वि. १ अशुद्ध; शुद्ध न केलेला; खाणींतून काढलेला व वर कोणतीहि क्रिया न केलेला (धातु). २ शोधून न काढलेला; अज्ञात. [सं.]

अशोभ—वि. न शोभणारा. [सं. अ+शुभ्]

अशौच—न. (प्र.) आशौच. १ सुतक; अपवित्रस्थिति. आशौच पहा. २ मलिनपणा; अपवित्रस्थिति. 'अशौच तो बाधी आणिकां अक्षरां। नाम निदसुरा घेतां तरे॥' –तुगा २५१३. –वि. अपवित्र; पतित. 'जालों मी अति अशौच।' –विपू १.९०; –एभा १६.३०४. [सं. आशौच]

अशौचक—वि. अपवित्र, 'तोंडाळ, वोढाळ, पतिनिंदक। ते स्त्रियेच्या ऐसे देख। अशौचक सबाह्य।' –एभा १७.२०३.

अशौच्य—वि. अशौच; अशुद्ध. 'कां अशौच्या मंत्रें। बीजें कथिलीं।' –ज्ञा ९.१७७. [सं. अ+शुचि]

अश्म—पु. दगड; अश्मा पहा. **०युग**–न. पाषाणयुग; जगाच्या संस्कृतीची पहिली अवस्था. [सं.]

अश्मंतक—पु. अपट्याचें झाड. [सं.]

अश्मरी—स्त्री. १ मूतखडा; मूत्ररोग, मूत्रकृच्छ्र. [सं.]

अश्मसार—पु. १ लोखंड; लोह. २ हिरा. [सं. अश्मन्+सार]

अश्महृदय—वि. पाषाणहृदयी; निर्दय; निष्ठुर. [सं.]

अश्मा—पु. १ दगड; पाषाण. 'लिळा पदें देउनि अश्मा। उद्धरिला' –ऋ ६०. २ उत्तरक्रियेच्या वेळीं ज्या दगडावर तिलांजलि देतात तो दगड; जीवधोंडा. [सं. अश्मन्]

अश्मीभूत—वि. (शाप.) दगडाचें रूप पावलेला; दगडासारखें कठिण झालेलें; प्रस्तररूप पावणारी (वनस्पति वगैरे). [सं.]

अश्रणी—अशरीरिणी(वाक्) पहा.

अश्रद्ध—वि. श्रद्धा नसणारा; भाव, भक्ति नसलेला. [अ+श्रद्धा]

अश्रद्धा—स्त्री. १ श्रद्धेचा अभाव; भरंवसा, भक्ति यांचा अभाव (ईश्वराच्या ठिकाणीं). २ अप्रीति; नावड; कंटाळा; तिटकारा. ३ गैरविश्वास; अविश्वास. [सं.]

अश्रद्धेय—वि. श्रद्धा ठेवण्यास अयोग्य–नालायक. [सं.]

अश्रफ—वि. थोर; मोठ्या योग्यतेचा; अत्यंत अभिजात; उदारमनाचा (माणूस). [अर. अश्रफ्]

अश्रफी—स्त्री. एक सोन्याचें नाणें; मोहोर (किंमत सुमारें रु. १५); असर्फी पहा. 'मी दोन अश्रफी कबूल केल्या.' –सूर्यग्रहण ३५०. [फा. अश्रफी]

अश्राप–फ—वि. १ अश्रफ पहा. अभिजात; सभ्य; थोर; खानदानीच्या घराण्यांतील (माणसें). २ रोहिलखंड, अयोध्या व बनारस या बाजूस हा शब्द कांहीं विशिष्ट हक्क असलेल्या जमीनदारांस लावतात. ३ गरीब (जनावर). 'जनावर मोठें खरं, पण फार अश्राप.' **०गाय**–निरुपद्रवी मनुष्य. [अर. शरीफचें अव.]

अश्रायिणें—सक्रि. आश्रय करणें. [आश्रयणें अप.]

अश्राव्य—वि. १ न ऐकूं येणारें. २ ऐकण्याला किंवा श्रवण करण्याला अयोग्य (ईश्वर–साधुनिंदा इ०). ३ बीभत्स; अश्लील. [सं. अ+श्रु=ऐकणें]

अश्रु—पु. असूं; आसूं; रोदन–हर्षादि समयीं डोळ्यांत जें पाणी येतें तें; सामाशब्द–प्रेमाश्रु, आनंदाश्रु, शोकाश्रु इ०. [सं. तुल० फ्रें. जिप्सी अस्व] **०ढाळ**–वि. सारखे अश्रु गाळणारा; घोड्याचें एक कुलक्षण. **०धारा**–स्त्री. अश्रू वाहाणें; एकसारखें रडणें; अश्रूंचा पात–धारा, प्रवाह. 'नयनीं वाहत अश्रुधारा' **०नाली**–स्त्री. व्रण; भगंदर; नासूर. **०पात**–पु. १ अश्रूंचा पात–धार–प्रवाह; सारखें रडणें. (क्रि० चालणें, वाहणें). 'ऐसें बोलतां अश्रुपात। नेत्रीं रायाचे चालले।' २ घोड्याच्या डोळ्यांखालील भोंवरा; घोड्याचें एक अशुभ लक्षण. **०पात्र**–न. कांच किंवा भाजलेली तांबडी माती (टेराकोटा) यांपासून केलेलें एक प्रकारचें भांडें. हीं भांडीं ग्रीक व रोमन थडग्यांतून सांपडलीं असून शोक करणारीं माणसें त्यांत आपले अश्रू गाळीत असत असें म्हणतात. –ज्ञाको (अ) ६०३. **०पिंड**–पु. अश्रूत्पादक मांसग्रंथि. [सं.]

अश्रुत—वि. १ न ऐकलेलें; ठाऊक नसलेलें; अज्ञात. 'अश्रुत फळें या वेगळीं। श्रवणीं पडतां त्याही फळीं' –यथादि २.१२४२. २ ज्यानें ऐकलें नाहीं किंवा ज्याला ठाऊक नाहीं असा; अशिक्षित. ३ वेद न जाणणारा. ४ वेदविरुद्ध; वेदानें विहित न केलेला; वेदास असंमत असा; अशास्त्र; वेदबाह्य. ५ करारानें–शपथेनें–प्रतिज्ञेनें स्वतःला बांधून न घेणारा. [सं.]

अश्लाघनीय–अश्लाघ्य—वि. स्तुति करण्याला अयोग्य; प्रशंसा करण्याला अयोग्य; अप्रशंसनीय; निंद्य. [सं.]

अश्लील—वि. १ असभ्य; अयोग्य; लज्जास्पद; शरम वाटण्याजोगा; अनीतिसूचक–मूलक. २ असभ्य भाषा असलेलें (वाङ्मय); शिवराळ; गांवढळ. [सं. अ+श्रील=शोभिवंत]

अश्व—पु. घोडा. एक चतुष्पाद प्राणी; हा मनुष्यास बसावयाचे व गाडी वगैरे ओढण्याचे उपयोगास येतो. [सं. अश्व (अश्=व्यापणें; अ=नाहीं+श्वन्=कुत्रा?). झेंद अइप; फा. अस्प; प्री. इप्पॉस; लॅ. इक्वस; लिथुआनि. अस्वस; ओल्ड आयरिश इश].

०क्रांत(स्थान)–न. (नृत्य) एक पाय समस्थित ठेवणें, दुसरा पाय अग्रतलसंचर करून पाय अंगठ्यावर टेंकून दुसऱ्या पायाजवळ ठेवणें. अडखळणें, वस्त्र उचलणें, झाडाच्या फांद्या ओढणें वगैरे दर्शक हें स्थान आहे. **०खाद्य**–न. हरभरा; घोड्खाद्य; अश्वजीवन. **०गति**–स्त्री. घोड्याची चाल–गति. **०गंधा**–ह्या झाडाच्या कांद्यास आस्कंद म्हणतात. ही फार पौष्टिक औषधि आहे. यास आस्कंद, अजगंध, ढोरगुंज अशीं निरनिराळीं नांवें आहेत. हें झाड खानदेश, नाशिक, वऱ्हाड आणि घाटावर आढळतें. उंची दोन फूट. झाड ४।५ वर्षे जगतें. पानें कोरांटीसारखीं असतात. हरभऱ्याएवढीं लाल फळें येतात. पाक धातुपौष्टिक आहे. इतर अनेक रोगांवर याचा पाक गुळवेलीचें सत्व व मध यांबरोबर देतात. **०गुण**–पु. १ घोड्याचा गुण–धर्म. २ घोड्याचा विशेष सुलक्षण-उत्कृष्ट गुण. **०गुटिका-घुट-टि-का**–स्त्री. एक विवक्षित वाजीकरण (औषध, मंत्रसिध्दि, ताईत या द्वारें). **०चिकित्सा**–स्त्री. घोड्यांचे औषधी उपचार. **०चिकित्सक**–पु. शालिहोत्रज्ञ; अश्ववैद्य; घोड्याचा वैद्य. **०दोष**–अशुभ चिन्हें पहा. घोड्याचे दुर्गुण. **०धाटी**–स्त्री. एक वृत्त. याला मंदारमाला असेंहि म्हणतात. उ० 'वाचाळ मी नीट पाचारितों धीट याचा नयो वीट साचा हरी।' –वृत्तदर्पण ३२. या दोहोंत फरक म्हणजे अश्वधाटींत बाराव्या अक्षरावर पदसमाप्ति, तर मंदार मालेंत अकराव्या अक्षरावर असते. मंदारमाला पहा. **०धाटीयमक**–न. हें मागें व पुढें निराळें व्यंजन असल्यामुळें घोड्याप्रमाणें उड्या मारीत चाललें आहे असा भास होतो. उ० 'गाजत वाजत साजत आज तया जतन करुनि आणाहो'–मोविराट६.७५. **०परीक्षक**–पु. घोड्याच्या शास्त्रांत प्रवीण. **०परीक्षा**–स्त्री. १ घोड्यासंबंधानें ज्ञान, परीक्षा. २ घोड्याच्या मांसाचें ज्ञान; अश्वमांसज्ञान. **०भार**–पु. १ अश्वसेना; घोडदळ; घोडेस्वारांचें सैन्य. २ घोड्यांचा जमाव, समूह. [सं.] **०मूत्राम्ल**–न. (इं.) हिप्यूरिक ॲसिड. हें अम्ल वनस्पत्याहारी जनावरांच्या मूत्रांत सांपडतें. **०मेध**–पु. सार्वभौम राजानें करावयाचा यज्ञ. हा यज्ञ केल्यानें पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळतें व असे शंभर यज्ञ केल्यानें इंद्रपद मिळतें, अशी समजूत आहे. [सं.] **०राती**–स्त्री. एक वनस्पति. हरितालिका पूजेतील पत्रीपैकीं एक. **०वाहक**–पु. सारथी; घोडे हांकणारा; चाबूकस्वार. 'जेथ अश्ववाहकु आपण'–ज्ञा १.१४०. [सं.] **०वैद्य**–पु. घोड्यांचा वैद्य; शालिहोत्रज्ञ; घोडाडाक्टर. **०शक्ति**–स्त्री. घोड्याचें बल, सामर्थ्य. (इं.) हॉर्सपावर. **०शाणी-साहणी**–पु. चाबूकस्वार; घोड्यांची परीक्षा करणारा; अश्ववैद्य, परीक्षक. 'बोलावोनिया अश्वशाणी। म्हणती घोडे निवडी गा ये क्षणीं।'–कथा ४.९.१५. 'जैसा वारु उपलाणी। वश्य करी अश्वसाहणी'–एभा २०.२१६. [सं. अश्व+म. शहाणा] **०शाला**–स्त्री. १ घोड्यांची पागा; तबेला. २ घोड्यावर बसविण्यास जेथें शिकवितात तें गृह. **०शिक्षक**–पु. घोड्यांना शिकविणारा; चाबूकस्वार; घोडे हांकणारा. **०शिक्षा**–स्त्री. घोड्यांना शिकविणें, शिक्षा लावणें (गति, चाल वगैरे). **०सारथ्य**–न. रथ किंवा त्याला जुंपलेले घोडे चालविणें–हांकणें, त्यांची व्यवस्था. [सं.] **०हृदय**–न. १ घोड्यासंबंधी रहस्य किंवा गुप्त गोष्टींचें ज्ञान; अश्वशास्त्र; अश्वविद्या; घोड्यावर बसण्याची विद्या. २ घोड्यांच्या प्रकृतीचें निदान किंवा त्यासंबंधाचें शास्त्र; शालिहोत्र. [सं.]

अश्वत्थ—पु. एक झाड, पिंपळ. हा अतिशय मोठा, फार वर्षे वांचणारा व अनेक औषधिधर्मांनीं युक्त असल्यामुळें हिंदू लोक यास पवित्र मानितात. धार्मिक संस्कारविधींत याच्या समिधा वापरतात. 'कल्पद्रुम हन पारिजातु। गुणें चंदनुहि वाड विख्यातु। तरि ययां वृक्षजातांआंतु। अश्वत्थु तो मी॥'–ज्ञा १०.२३५. –वि. उथापपेंत न टिकणारा. 'आणि अश्वत्थ ऐसें यया तें। म्हणती जे जाणते।'–ज्ञा १५.११०. **०नारायण**–पु देवतारूप मानिलेला अश्वत्थ. मद्रासी–कानडी लोकांत हें नांव असतें 'अश्वत्थनारायण सूर्यनारायण'–दा ४.५.१३. **०त्थोद्यापन**–न. पिंपळास पार बांधून मंत्रांनीं जो संस्कारविशेष करतात तो. [सं. अश्वः+स्थ]

अश्वस्थ—वि. अस्वस्थ (अप.) 'अश्वस्थ संसार हा स्वस्थ नाहीं जाणा'–सप्र ५.२१. अश्वथ्य असेंहि रूप आहे.

अश्वारी-नी—स्त्री. (गो.) घोडेस्वारांची पलटण.

अश्वासन—आश्वासन पहा.

अश्विन, अश्वीन–पु. चैत्रापासून सातवा महिना; आश्वीन.

अश्विनी—स्त्री. १ घोडी. 'म्हणे अश्व करितां जळपान। अश्विनी केवीं जाहली।'–जै २१.८५. २ सत्तावीस नक्षत्रांपैकीं पहिलें. या दोन किंवा तीन तारका समजतात. [सं.]

अश्विनी-कुमार-पुत्र, अश्विनौ, अश्विनौदेव—पु. १ देवांचे वैद्य; अश्विनी नांवाच्या अप्सरेचे दोन जुळे मुलगे. २ (ल.) कुशल वैद्य. 'पै सोम्यतेचा बोलवा। मिती नेणिजे अश्विनौदेवा।'–ज्ञा ११.१४४. ३ एक औषधि मात्रा–रसायन.

अश्वील-अश्वल—अस्वल पहा.

अश्वेत—वि. पांढरें नव्हे तें. [सं. अ+श्वेत]

अश्शी—वि. ऐंशीं पहा. [सं. अशीति]

अषढाळ—वि. ताळतंत्र (बोलणें, करणें इ० कांमध्यें) नसलेला; अशुढाळ पहा.

अषाढ—आषाढ पहा

अष्ट—वि. आठ संख्या: सामाशब्द–अष्टगुण, अष्टादश, अष्टविंशति व पुढील शब्द. [सं. अष्टन्] **०क**–न. १ आठ पदार्थांचा समुदाय. २ पाणिनीच्या व्याकरणाचे (सूत्रपाठाचे) आठ विभाग आहेत त्यांतील प्रत्येक. ३ ऋग्वेदसंहितेचे पठणाच्या सोयीकरत

आठ भाग केले आहेत, त्यांतील प्रत्येक. ४ आठ श्लोकांचा समूह; एक काव्यरचनाषप्रकार. उ० मंगलाष्टकें, करुणाष्टकें. [सं.]–वि. आठ किंवा आठवा. **०कपाळ्या**–वि १ अष्टांगें–दोन हात,दोन पाय,दोन गुडघे, वक्ष.स्थळ आणि कपाळ इतक्यांचा उपयोग करूनहि ज्यास कांहीं मिळत नाहीं तो. २ (ल.) पूर्णपणें दुर्दैवी; आपद्ग्रस्त; भव्या; कपाळकरंटा. **०कर्णिका**–स्त्री कमळाच्या पाकळ्या. 'माझें हृदय दिव्य कमळ । जें तेजोमय परम निर्मळ । अष्टकर्णिका अतिकोमळ । मध्यें घननीळ विराजे ।' –ह ३५.१. **०कुलाचल**–पु. मेरूच्या चारी दिशांस जे भारतादि वर्ष आहेत त्या प्रत्येकाची मर्यादा करणारे (नील, निषध, विंध्याचल, माल्यवान्, मलय, गंधमादन, हेमकूट, हिमालय इ०) आठ पर्वत. **अष्टकोन–नी–ण–णी**–वि. आठ कोन–बाजू–असलेली, (वस्तु, आकृति) **०गंध**–न. आठ सुगंधी द्रव्यें (चंदन, अगरु, देवदार, कोष्ठकोलिजन, कुंकुम, शैलज, जटामांसी, गुरुगोरोचन) एकत्र करून केलेलें गंध; (सामा.) उटणें. **०गुण**–वि. आठपट. –पु आठ गुण. ब्राह्मणाचे आठ गुण–दया, क्षांति, अनसूया, शौच, अनायास, मंगल, अकार्पण्य, अस्पृहा. वृष्टीचे आठ गुण–शुश्रूषा श्रवण, ग्रहण, धारण, चिंतन, ऊहापोह, अर्थविज्ञान, तत्त्वज्ञान. **०गोल–गोली**–वि. –कांठापदरांवर वेलबुट्टी काढलेला (चौपदरी शेला). 'कोणासी पागोटें परकाळा । कोणी मागती अष्टगोली शेला –भक्तवि. ३०.४१. [सं. अष्ट+गोल] **०गोळी**–क्रिवि. सर्वतऱ्हेनें; एकंदर **०घाण**–स्त्री. अतिशय दुर्गंधी–घाण. [अष्ट+घ्राण]. **०ताल**–झंपाताल पहा. **०दल–ळ**–वि. आठ पाकळ्यांचें; आठ पानांचें; अष्टकोनी; अष्टभुज. –न. १ कमळाच्या आकाराची काढलेली आठ पाकळ्यांची किंवा भागांची आकृति. 'गर्भें रचिलीं उदंडें । अष्टदळें ।' –ऋ ७३. २ एक प्रकारची रांगोळी. ३ (ना.) ताम्हण; संध्या पात्र; 'एक अष्टदळ आणवा.' **०दानें**–न. अव. आमान्न, उदकुंभ, भूमि, गोदान, शय्या, वस्त्र, छत्र, आसन हीं आठ वस्तूंचीं दानें औध्वदेहिकांत द्यावयाचीं असतात. **०दिक्पाल**–पु. अंतरिक्षाच्या आठ दिशा पालन करणाऱ्या देवता. जसें–पूर्वेचा इंद्र, आग्नेयीचा अग्नि, दक्षिणेचा यम, नैर्ऋत्येचा नैर्ऋत, पश्चिमेचा वरुण, वायव्येचा मारुत, उत्तरचा कुबेर (सोम), ईशान्येचा ईश; अष्ट दिग्पाल. 'इयेवरी सप्तसागर । मध्यें मेरु महाथोर । अष्टदिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिले ॥' –दा ४.१०.४. **०दिग्गज**–पु. ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम, सुप्रतीक असे अष्ट दिशांस पृथ्वीचे आधारभूत आठ हत्ती आहेत. [सं.] **०दिशा**–स्त्री. आठ दिशा; दिक्चक्राचे आठ भाग–पूर्व, आग्नेय, दक्षिण, नैर्ऋत्य, पश्चिम, वायव्य, उत्तर, ईशान्य. **०देह**–पु. देहाचे आठ प्रकार–पहिले चार पिंडीं व पुढील चार ब्रह्मांडीं. 'स्थूल, सूक्ष्म,कारण। महाकारण,विराट, हिरण्य। अव्याकृत, मूलप्रकृति जाण। ऐसे अष्ट देह।' –दा ८.७.४०. **०धा**–वि. आठ प्रकारचे; 'भूतें गुण मेळविजे। त्यासी अष्टधा बोलिजे।' [सं.] **०धामूर्ति**–स्त्री.आठप्रकारच्या मूर्ती. 'शैली दारुमयी लौही लेप्या लेख्याच सैकती। मनोमयी मणीमयी प्रतिमा अष्टधा स्मृता ॥' –ब्रभा २७ ९८-१०३; 'शैली, दारुमयी, लेप्या, लेख्या, सैकती अथवा सूर्यमंडळीं, जळीं, स्थळीं, अष्टमूर्तिस्वरूप श्रीहरीसी पूजावें ।' –अमृतध्रुव ६. अष्टमूर्ति पहा. **०(देह)प्रकृति**–स्त्री. पृथ्वी, पाणी, अग्नि, वायु, आकाश मन, बुद्धि आणि अहंकार मिळून आठ प्रकारे विभागलेली ... प्रकृति.' –गीर ७१५. **०(विध)प्रकृति**–असाहि वाक्प्रचार आहे. सत्व, रज, तम, व मूळ पांच तत्त्वें मिळून आठ प्रकारची प्रकृति. 'पंच भूतें आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृति जाण।' –दा ६.२.१४. **०धातू**–पु सोनें, रुपें, तांबें, कथील, शिसें, पितळ, लोखंड, तिखें (पोलाद). कोणी पोलादाच्या ऐवजी पारा धरतात. 'अष्टधातु सायासें । जेवि वेधिजति स्पर्शे ।' –ऋ २०. **०धार**–वि. आठ धारा असलेलें. 'तंव तेणें साधकें एक अष्टधार आड धरिलें ।' –कृमुरा २२.९६. **०नायका–नाईका**–स्त्री. १ अव. श्रीकृष्णाच्या आठ आवडत्या पत्न्या–रुक्मिणी, सत्यभामा, जांबवंती, कालिंदी (सूर्यकन्या), मित्रवृंदा (अवंतिराजकुंता), याज्ञजिती (यज्ञजितकन्या), भद्रा (कैकेयनृपकन्या), लक्ष्मणा (महेंद्रनाथकन्या). २ इंद्राच्या आठ नायका–उर्वशी, मेनका, रंभा, पूर्वचित्ती, स्वयंप्रभा, भिन्नकेशी, जनवल्लभा, घृताची (तिलोत्तमा). 'अष्टनायिका येऊनि । सर्वा घरीं नृत्य करिती ।' –ह २६.२२८. ३ (साहित्य) वासकसज्जा, विरहोत्कंठिता, स्वाधीनभर्तृका, कलहांतरिता, खंडिता, विप्रलब्धा, प्रोषितभर्तृका, अभिसारिका. **०नाग**–पु. आठ जातीचे सर्प–अनंत, वासुकी, तक्षक, कर्कोटक, शंख, कुलिक, पद्म, महापद्म. **०पत्री**–वि. १ कोणत्याही विशिष्ट आकाराच्या (काऊन, डेमी) छापावयाच्या कागदाचीं आठ पृष्ठें होतील अशा तऱ्हेनें घडी पडणारें छापलेलें (पुस्तक) (इं.) ऑक्टेव्हो. 'पांच पांचशें पानांचें अष्टपत्री सांचाचें एक एक पुस्तक.' **०पद**–पु. १ कोळी वर्गांतील प्राणी– गोचीड, सूतकिडे, विंचू, कातीण वगैरे. (इं.) अकॅनिडा. २ आठ पायांचा काल्पनिक प्राणी. **०पदरी**–वि. आठपदरांचा (शेला), आठसरांची (माळ), आठ पेडांची, धाग्यांची (दोरी) [सं. अष्ट+पल्लव] **०पदी**–स्त्री. १ आठ पदांचा समुदाय. २ आठ चरणांचें एक कवन; कविताप्रकार. **०पाकूळ**–न. (लुप्त). आठ पाकळ्यांचें फूल **०पाद**–अष्टपद पहा. **०पुत्रा**–वि. आठ पुत्र आहेत जिला अशी (स्त्री). सौभाग्यवती स्त्रीला असा आशीर्वाद देतात. **०पुत्री**–स्त्री. विवाहामध्यें वधूला, काठाला हळद लावून नेसावयास दिलेलें शुभ्र वस्त्र. तिला पुष्कळ अपत्यें व्हावींत या इच्छेचें द्योतक. 'फेडिलें मायेचें वधूवस्त्र। अष्टपुत्र्या पीतांबर। नेसली कृष्णमय स्वतंत्र। तेणें सुंदर शोभली।' –एरुस्व १६.१५. **म्ह०** अष्टपुत्री

मेहुणीकुत्री. **०पैलू**–वि. १ ज्याला आठ पैलू (बाजू) आहेत असा (हिरा, रत्न). २ (ल) हुषार; कलाभिज्ञ; व्यवहारचतुर (इसम). **०पैलू माळ**–(गोफ) स्त्री. घोड्याच्या गळ्यांतील दागिना; आठ पैलू असलेल्या मण्यांची माळ किंवा आठ पदर असलेली माळ. **०प्रकृति, ०विधप्रकृति**–अष्टधाप्रकृति पहा. **०प्रधान**–पु राज्यकारभारांतील आठ प्रधान–प्रधान, अमात्य, सचीव, मंत्री, डबीर, न्यायाधीश, न्यायशास्त्री, सेनापति. अष्टप्रधानांची पध्दत शिवाजीनें सुरू केली. कांहीं जण वैद्य, उपाध्याय, सचीव, मंत्री, प्रतिनिधी, राजाज्ञा, प्रधान, अमात्य हे आठ मंत्री समजतात 'प्रधान अमात्य सचीव मंत्री । डबीर न्यायाधिश न्यायशास्त्री ॥ सेनापती त्यांत असे सुजाणा । अष्टप्रधानीं नृप मुख्य जाणा ॥' हा श्लोक रूढ आहे. **०फळी–ळी, ०फळ–फल**–स्त्रीन. अठोफळी पहा. **०भार**–पु. ८००० तोळ्यांचा एक भार. अगे आठ भार. 'नित्य प्रसवे अष्टभार सुवर्ण । सूर्यासम प्रभा परिपूर्ण ।' –ह २.५ १५. **०भाव**– पु अव. (साहित्य.) शरीराचे सत्त्वगुणाचे आठ भाव, प्रकार–स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग किंवा वैस्वर्य, कंप किंवा वेपथु, वैवर्ण्य, अश्रुपात, प्रलय. पर्याय–कंप, रोमांच, स्फुरण, प्रेमाश्रु, स्वेद, हास्य, लास्य, गायन. –हंको. 'आठवीया दिवशीं नाश अष्टभावा । अद्वयानुभवासुखें राहे ॥' –व ११०. 'अष्टभावें होऊनि सद्गद । आनंदमय जाहला ।' **०भैरव**–पु. भैरव ही शिवगणांतील स्वतंत्र देवता असून तिचीं पुढील आठ स्वरूपें आहेत–असितांग, संहार, रुरु, काल, क्रोध, ताम्रचूड, चंद्रचूड, महा. यांतील कांहीं नांवांऐवजीं कपाल, रुद्र, भीषण, उन्मत्त, कुपति इत्यादि नांवें योजिलेलीं आढळतात. **०भोग**–पु. आठ प्रकारचे भोग.–अन्न, उदक, तांबूल, पुष्प, चंदन, वसन, शय्या, अलंकार. **०म**–वि. आठवा.–स्त्री. अष्टमी. **०मंगल**–वि. (विरू) अष्टमंगळ. १ ज्यांचें तोंड, शेपूट, आयाळ, छाती व चार खूर शुभ्र आहेत असा; कित्येकांच्या मतें ज्याचे पाय, शेपूट, छाती व वृषण शुभ्र आहेत व जो कटिप्रदेशीं भोवऱ्यांनीं युक्त (नवांकित) असून ज्याच्या कपाळावर कमलाकृति केसांचें वेटोळें असतें असा (घोडा). २ (सामा.) आठ शुभलक्षणांनीं युक्त असा (घोडा). –न. पुढील आठ मंगल वस्तूंचा समुदाय–ब्राह्मण, अग्नि, गाय, सुवर्ण, घृत, सूर्य, जल व राजा. कांहींच्या मतें सिंह, वृषभ, गज, पूर्णोदककुंभ, व्यजन, निशाण, वाद्यें व दीप (राज्याभिषेकाच्या समयीं या अष्ट मंगलकारक वस्तू लागतात). **०मंगलघृत**–न. वेखंड, कोष्ट, ब्राह्मी, मोहऱ्या, उपळसरी, सेंधेलोण, पिंपळी व तूप या औषधांच्या मिश्रणानें विधियुक्त बनविलेलें तूप. हें बुद्धिवर्धक आहे. –योर २.६७० **०महारोग**–पु. आठ मोठे रोग–वातव्याधि, अश्मरी, कुष्ठ (किंवा कुष्ठ), मेह, उदर, भगंदर, अर्श (मूळव्याध). संग्रहणी. महारोग पहा. **०महासिद्धि**–१ अणिमा=शरीर अत्यंत सूक्ष्म होणें; २ महिमा=शरीर मोठें होणें; ३ लघिमा=शरीर वजनांत हलकें होणें; ४ प्राप्ति=सर्व प्राण्यांच्या इंद्रियार्थी त्या त्या इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवतांच्या रूपानें संचेंव घडणें; ५ प्राकाश्य=एकून ठाऊक असलेल्या व स्वर्गादि पारलौकिक स्थानीं, व दिसण्याजोगे इहलोकच्या स्थानीं भोग व दर्शनाचें सामर्थ्य येणें; ६ ईशिता=शक्तीची, मायेची व तिच्या अंशाची ईशाच्या ठिकाणीं व इतरांच्या ठिकाणीं असणारी प्रेरणा; ७वशिता=विषय भोगीत असूनहि त्यांच्या ठिकाणीं आसक्त न होणें; ८ प्राकाम्य=ज्या ज्या सुखाची इच्छा करावी तें तें सुख अमर्याद प्राप्त होणें. –एभा १५. ४२ ते ४७. **०मयांदागिरी**–पु. आठ मोठे पर्वत–हिमालय, हेमकूट, निषध, गंधमादन, नील, श्वेत, शृंगवान व माल्यवान. हे जंबुद्वीपांत असून ते त्यांतील नऊ वर्षां(भागां)च्या मर्यादा आहेत. **०मांगल्य**–न. त्रैवर्णिकांचा एक संस्कार. अठांगुळें पहा. **०मातृका**–स्त्री. आठ ईश्वरी शक्ती–ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, कौबेरी, चामुंडा. सामान्यत. कौबेरी सोडून या सात असतात. विवाहादि मंगलप्रसंगीं यांची पूजा करतात. 'वेगे आल्या अष्ट मातृका । एकी चढिन्नली वृश्चिका । वाराही ते सूकरमुखा । वऱ्हाड देखा निघालें ॥' –एरुस्व १४.५८. **०मांश**–पु १ आठवा अंश; भाग. २ (वैद्यक) ज्वर नाहींसा होण्यासाठीं आठभाग पाण्याचे सात भाग आटवून एक अंश उरवितात तो काढा. **०मी**–स्त्री. चांद्रमासांतील प्रतिपदेपासून आठवी तिथि; या महिन्यांतून दोन येतात–शुध्द व वद्य. **०मूर्ति**–स्त्री पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश, सूर्य, चंद्र व ऋत्विज् या परमेश्वराच्या आठ मूर्ती; शंकर; महादेव, अष्टधामूर्ति पहा. **०योगिनी**–स्त्री.अव आठ योगिनी; पार्वतीच्या सख्या; या शुभाशुभ फल देणाऱ्या आहेत–मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिध्दा, संकटा. दुसरा पाठ–मार्जनी, कपुरा तिलका, मलयगंधिनी, कौमुदिका, भेरंडा, माताली, नायकी, जया (शुभाचारा) यांत कधीं कधीं चुलक्षणा, सुनंदा हींहि नांवें आढळतात. **०वक्र**–अष्टावक्र पहा. **०वर्ग**–पु. १ आठ औषधींचा समुदाय–ऋषभ, जीवक; मेद, महामेद, ऋध्दि, वृध्दि, काकोली, क्षीरकाकोली. २ मौंजीबंधनांत मातृभोजनांत भोजनाच्या वेळीं आठ मुंज्या मुलांना भोजनास बोलावितात तें कर्म **०वर्ग्य**–ग्र्या–पु. अष्टवर्गास जेवणारा बटु; उपनयनाच्या दिवशीं मातृभोजनाच्या वेळीं आठ बटू भोजनास बोलावितात ते प्रत्येक. **०वर्षा**–वि. आठ वर्षे वयाची (कुमारिका), (त्यावरून लग्नाला योग्य झालेली) उपवर. **०वसु**–पु अव. प्रतिमन्वंतरांतील आठ वसू. चालू मन्वंतरांतील धर्मऋषि व दक्षकन्या वसु यांचे पुत्र–धर, ध्रुव, सोम, आप, अनिल, अनल, प्रत्यूष, प्रभास भागवतांत द्रोण, प्राण, ध्रुव, अर्क, अग्नि, दोष, वसु, विभावसु अशीं नांवें आढळतात. 'इंद्र चंद्र वरुण कुबेर । अष्टवसु गंधर्वकिन्नर ।' –ह २५.१४१.

०वायन–न. आठ वस्तूंचे दान; हळकुंड, सुपारी, दक्षिणा, खण, सूप, कंकण, धान्य, कांचमणी, या आठ पदार्थांचे वायन (वाण) सौभाग्यसंपादनार्थ लग्नांत आठ ब्राह्मणांपैकीं प्रत्येकाला वधूकडून दिलें जातें. **०विध समाधि**–स्त्री.समाधियोगाचे आठ प्रकार–यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि. **०विधा शृंगारनायका**–(साहित्य) अष्टनायका पहा. **०विनायक**–पु. अव. गणपतीचीं आठ स्थानें– १ मोरेश्वर गणनाथ, (जेजुरी नजीक मोरगांव जिल्हा पुणें). २ बल्लाळेश्वर (मूळ मुरुड हल्लीं पाली, खोपवली नजीक–जिल्हा कुलाबा). ३ विनायक (कर्जत नजीक मढ–जिल्हा कुलाबा). ४ चिंतामणी (लोणी नजीक थेऊर–जिल्हा पुणें). ५ गिरिजात्मक (जुन्नर नजीक लेण्याद्रि–जिल्हा पुणें). ६ विघ्नेश्वर (जुन्नरजवळ ओझर–जिल्हा पुणें). ७ गणपति (नगर सडकेवर रांजणगांव–जिल्हा पुणें). ८ गजमुख (दौंड नजीक सिध्दटेक–जिल्हानगर). **०विवाह**–पु विवाहाचे आठ प्रकार–१ ब्राह्म=सालंकृतकन्यादान; २ गांधर्व=उभयतांच्या अनुमतीनें; ३ राक्षस=जबरीनें कन्या हरण करून; ४ दैव=यज्ञप्रसंगीं ऋत्विजास कन्यादान करून; ५ आर्ष=गाय, बैल घेऊन कन्यार्पण; ६ प्राजापत्य=धर्माचरणार्थ कन्यार्पण; ७ असुर=शुल्क घेऊन; ८ पैशाच=कन्या चोरून आणून पत्नी करणें. सविस्तर माहिती धर्मसिंधु परिच्छेद ३ पूर्वार्ध पहा. **०सात्विक भाव**–अष्टभाव पहा. **०सावध**–वि. पुष्कळ गोष्टींकडे एकदम लक्ष पुरविणारा–देणारा; अष्टावधानी. **०सिद्धि**–अष्टमहा सिद्धि पहा. 'अष्ट सिद्धि चामरें घेऊनी। वरी वारिती अनुदिनीं।' –ह १.१५. **०सृष्टि**–स्त्री. काल्पनिक, शाब्दिक, प्रत्यक्षा, चित्रलेपा, स्वाप्नी (स्वप्नसृष्टि), गंधर्वा, ज्वरिका (ज्वरसृष्टि), दृष्टिबंधना. –दा ६.६.५१. [सं.]. **०क्षार**–पु. पळस, निवडुंग, सज्जी, अघाडा, रुई, तीळ, जव व टांकणखार.

अष्टाकपाल—पु. १ ज्यांत आठ खापरीच्या तुकडयांवर भाजलेल्या पुरोडाशाचा हवि देतात तो याग. २ तो पुरोडाश. [सं.]

अष्टांग—पु. १ शरीराचीं आठ अंगें:–दोन हात, उर, कपाळ, दोन नेत्र, ग्रीवा, कटि; दुसरा पर्याय– दोन हात, उर, भाल, दोन पाय, दोन गुडघे; तिसरा पर्याय– दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, वाचा, मन; चौथा पर्याय– हात, पाय, गुडघे, छाती, मस्तक, दृष्टि, मन, वाणी. –एभा २०.२९१ २ (सामा.) सर्व शरीर; सर्वांग देह. अष्टांगीं पहा. 'आरोग्यता तुका पावला अष्टांगीं।'–तुगा ३९५८. ३ अष्टविध समाधि पहा. 'अष्टांग अभ्यासिला योगु तेणें।' –ज्ञा ९. ४२२. ४ आठपट. ५ वैद्यकशास्त्राचे आठ भाग:–शल्य, शालाक्य, कायचिकित्सा, भूतविद्या, कौमारभृत्य, अगदतंत्र, रसायनतंत्र, वाजीकरणतंत्र. ६ स्मृतीचीं अष्टांगें.–कायदा, न्यायाधीश, पंच, लेखक, ज्योतिष, सोनें, अग्नि, पाणी. ७ पूजेचीं अष्टांगें:–पाणी, दूध, तूप, दहीं, दर्भ, तांदूळ, जव, सर्षप. ८ मैथुनाचीं अष्टांगें:–स्मरण, कीर्तन, क्रीडा, दर्शन, गुह्यभाषण, चिंतन, निश्चय, संयोग. ९ बुध्दीचीं अष्टांगें:–शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारण, चिंतन, ऊहापोह, अर्थविज्ञान, तत्त्वज्ञान. **०नमन–पात–प्रणाम**–न.पु. हात, पाय, गुडघे, वक्षस्थल, मस्तक, दृष्टि, मन व वाणी हीं आठ अंगें जमीनीवर टेकून नमस्कार करणें. अतिशय आदरार्थी नम्रतापूर्वक नमस्कार. –एभा २०.२९१. **०योग**–अष्टविध समाधि पहा. 'येक सांगती अष्टांगयोग। नाना चकें॥' –दा ५.४.२४. **०लवण**–न. पादेलोण, ओवा, आमसुलें, आम्लवेतस हीं एकएक भाग, दालचिनी, वेलदोडे व मिऱ्यें हीं अर्धा भाग व साखर सर्वांच्या बरोबर घालून केलेलें चूर्ण. हें अग्निदीपक आहे. **०साधन**–अष्टविध समाधि पहा. 'योगी करिती अष्टांगसाधन। त्यांसीही नव्हे ऐसें दर्शन।' –ह ८.१८२. [सं.]

अष्टांगीं—क्रिवि. अष्टांग (सप्तमींत प्रयोग) सर्व शरीरांत-देहांत (अकरणरूपी प्रयोग). (क्रि० नसणें). 'मी इतका उपदेश केला परंतु त्याचे अष्टांगीं नाहीं' [अष्टांग]

अष्टादश—वि. अठरा. **०धान्य–पुराण–उपपुराण**–अठरा धान्यें वगैरे पहा. **०पदें**–न.अव. गयाक्षेत्रीं विष्णुपदाजवळ–कश्यप, अगस्ति, कौंच, मतंग, कण्व, दधीच, गणेश, कार्तिकेय, ब्रह्मा रुद्र, इंद्र, सूर्य, चंद्र, व आहवनीय, दक्षिण, गार्हपत्य, सभ्य, आवसथ्य, (हे अग्नि), या अठरा पदांवर पिंडप्रदान करावें लागतें. हीं अठरा पदें म्हणजे खडकावर पावलाच्या आकृतीचे काळे डाग उमटलेले आहेत. हीं पावलें अति सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यासच दिसतात. [सं.]

अष्टाधिकार—पु. अव. १ (अ) जलाधिकार–प्रवाशांना व सरकारी नोकरांना पाणी पुरविण्याचा अधिकार. (आ) स्थलाधिकार–अनेक प्रकारच्या वस्तींच्या जागा ठरविणें व दाखवून देणें. हा पाटलाचा अधिकार. (इ) ग्रामाधिकार–लहान गांवांतील व्यापार व सामान्य धंदे यांची देखरेख करणें. (ई) कुललेखन–रयतेचा सरकारी हिशेब ठेवणें व सरकारी दप्तर सांभाळणें–हें कुळकर्ण्याचें काम. (उ) ब्रह्मासन–वेलिफाचा अधिकार. (ऊ) दंडविनियोग–मामलेदाराचा अधिकार. (ऋ) पौरोहित्य–ग्रामोपाध्यायाचें किंवा कुलोपाध्यायाचें काम. (ॠ) ज्योतिष–ग्रामज्योतिषाचें काम; जोसकी. या अधिकारांचींच रूढ असलेलीं नांवें:–कोळीपणा, पाटिलकी, देशमुखी किंवा महाजनकी, कुळकरण, वतनी, धर्माधिकार, उपाध्यिक किंवा भटपणा, जोशीपणा. २ (ल.) स्नान, शौच, भोजन, निद्रा, वसणें वगैरे शरीराच्या दैनिक विधींनाहि थेटनें हा शब्द योजितात. 'एका खणाचे खोलींत सगळे अष्टाधिकार करूं म्हणतां ते होतील कसे?' ३ राज्यादिसंबंधीं प्रधानकी, सेनापत्य इ० जे सर्वाधिकार ते; गडी, कारकून वगैरेकडून होणारीं कामें. 'नारू एक असला म्हणजे दुसरा गडी, कारकून, मोतदार इ० कोणी नको सगळे अष्टाधिकार एकटा संभाळील' [सं.]

अष्टावक्र, अष्टवक्र—वि. १ या नांवाचा कहोड ऋषीचा मुलगा; (गर्भांत असतां बापास अध्ययनांतील चुकीबद्दल यानें हिणविलें म्हणून त्याच्या शापानें हा आठ ठिकाणीं वांकडा झाला. त्यावरून) आठ ठिकाणीं वांकडा. २ (ल.) कुरुप; विद्रूप; विलक्षण दिसणारा (इसम, वेढब वस्तु).

अष्टावधानी—वि. अनेक गोष्टींकडे एकदम लक्ष पुरविणारा किंवा अवधान देणारा. अष्टसावध पहा. [सं. अष्ट+अवधान]

अष्टास्र—न. अष्टकोण–न; अष्टकोनाची आकृति. –वि. अष्टकोनी. [सं. अष्ट+अस्र=कोन]

अष्टाक्षरी—स्त्री. १ एका छंदाचें नांव. कांहीं अभंग व ओव्या अष्टाक्षरी असतात. गायत्री छंद हाहि अष्टाक्षरी असतो. औटचरणी, त्रिचरणी असे अष्टाक्षरीचे कांहीं प्रकार आहेत. 'विरोन जो मुरेलरे। भल्यांत तो सरेल रे। विरेचिना मुरेचिना। भल्यांत तो सरेचिना॥' –दावि ७७६. २ मद्रास इलाख्यांतील (सातानींची) एक जात. 'ओं नमो नारायणाय' या अष्टाक्षरी मंत्राच्या प्रभावावर त्यांचा विश्वास असतो. ०मंत्र–पु. १ आठ अक्षरें ज्यांत आहेत असा मंत्र. 'ओं नमो नारायणाय' २ (ल.) 'कसें करुं काय करूं' हा आठ अक्षरांचा मंत्र; अतिशय दारिद्र्य, मोठें संकट किंवा अडचण प्राप्त झाली असतां असे शब्द तोंडून निघतात. 'त्याला हें उदाहरण सुटत नाहीं, तो अष्टाक्षरी मंत्र जपीत बसला आहे.'

अष्टेदळ—(व.) अष्टदळ पहा.

अष्टोदरशें—वि. (पाढ्यांत) १०८ संख्या. [सं. अष्टोत्तरशत]

अष्टोपद्वीप—न. पृथ्वीवरील आठ उपद्वीपें–स्वर्णप्रस्थ, चंद्रशुक्ल, आवर्तन, रमणक, मंदरहरिण, पांचजन्य, सिंहल, लंका.

अष्टोप्रहर, अष्टौप्रहर—क्रिवि. रात्रंदिवस; अखंड; सतत; निरंतर (दिवसाचे आठ प्रहर यावरून).

अष्टौविवाह—अष्टविवाह पहा.

अष्ठी—स्त्री. गांठ; अठळी; गठोळी. 'जै मागुनी होय गर्भइच्छा. गर्भकोश वाढे मासांमासां। तैं अष्ठी पडे शुद्धांशा। स्तनक्षीरासी॥ –कथा ५.७.१२२. [सं. अष्ठि=बी, अठळी]

असक—असका पहा. 'विवंचूनिया पाहिलें असक।' –दावि ८१.

असकट—वि. १ वारंवार. २ (ल.) बारीक. 'कणिक चाळावी असकट। पाखइनि सांडावें कसपट। होईल परिपाक चोखट। पूर्णपुरिया सिध्दलाडू॥'–एरुस्व १८.५०. [सं. असकृत्]

असका—वि. एकटा. 'कृष्णु असकाचि सापडे।' –उषा २९. [सं. अ+सखिन्–सखा]

असका-कें—वि. १ सर्व; सगळें; एकूण एक; एकंदर. 'त्रिलोकींचें पाप असकें।' –एभा २७.३९८. २ सर्वांतील प्रत्येक किंवा सर्व एकदम. 'आतां उठाउठी। असकेयां ब्रह्मगोळकां देइनु मोठी।' –शिशु ९११. 'तो तूं परब्रह्मचि असकें। मज दैवें दिधलासि हस्तोदकें।'–ज्ञा १०.३२२. [सं. आसाग्र, प्रा. आसग्ग, आसका, असका.]

असकृत्—क्रिवि. वारंवार; पुनःपुनः; अनेकवार. [सं.]

असक्त—वि. विरक्त; उदासीन. [सं.]

असंख्य, असंख्याक–त, असंख्येय—वि. १ अगणित; अगण्य. 'आतां शब्दब्रह्मीं असंख्याकें।' –ज्ञा १०.३०. २ न मोजलेला; न गणलेला. [सं.]

असंग—पु. संग–संगतीचा अभाव. –वि. १ सर्वसंग परित्याग केलेला; संन्यासी; विरक्त. २ एकटा; एकलकोंडा; कोणाची संगत, जोड नसलेला; संगतीला कोणी नसलेला. ३ संगति न करण्याजोगा; संगतीस अयोग्य. **म्ह**० असंगाशीं संग प्राणाशीं गांठ. [अ+स+गम्]

असंगडी—असंघडी पहा.

असंगत—वि. १ असंबध्द; विसंगत; संदर्भ जुळत नाहीं असें (भाषण–विचार). २ अयुक्त; अयोग्य; विपरीत (वर्तणूक, वर्तन).

असंगति—स्त्री विसंगतपणा; असंबध्दता; अयोग्यपणा–भाषण, विचार यांचा. [सं.]

असगोत्र—वि. भिन्न गोत्राचा; स्वगोत्रांतील नव्हे तो; समान गोत्रांतील नव्हे तो. [सं.]

असगंध—पु. अश्वगंधा; आस्कंद. [सं. अश्वगंधा, हि. असगंध]

असंघड–डी—पुस्त्री. अयुक्तता; अशक्यता; विरुध्दपणा. 'प्रकृतिपुरुषांची कुलवाडी। सांघतां देखे असंघडी।' –राज्ञा १३. ९७२. [सं. अ+सम्+घट्]

असंचळ—न. (गो.) स्वैरबुध्दि. [सं. अ+सं+चल्]

असंजाळ—पु (कों.) खोटा, मिथ्या आरोप–आळ. [सं. असत्+जाल]

असट—वि. पातळ; सरबरीत; विलबिलीत; रबरबीत; पाणी अधिक झाल्यामुळें ज्याचा गोळा बनत नाहीं असें (पीठ, भात वगैरे) [सं. आ+सक्त] ०**भाजी**—स्त्री. पिठाबरोबर शिजविलेली भाजी; गोळाभाजी.

असट—वि. आसक्त; गुरफटलेलें. 'धरितां इच्छा दुरी पळे। पाठी सोहळे उदासा। म्हणऊनि असट मन। नका खूण सांगतो।' –तुगा ३२९३. [सं. आ+सक्त]

असडणें—उकि. १ हिसका देऊन ओढणें; हिसकणें; खेंचणें (इंद्रिय, अवयव इ०). 'कीं हृदयीं भावि खद्योत। असडोनि आदित्य खालीं पाडूं।'. 'कीं दुःखव्याघ्राच्या असडून होटी। माये भेटी केली असे।' –नव २२.५०. २ सुपाने विशिष्ट प्रकारें

हिसेके देऊन गदळ काढणें; कणी वगैरे काढणें; नीट करणें; स्वच्छ करणें. ३ असडा, हिसडा देऊन–जोरानें आपटणें; (खालीं, वर) आदळणें. हांसडणें पहा. ४ एकदम, खाडकन् फटकावणें (चाबूक वगैरे). ५ धुतारणें; मुंडणें; भोंदणें; लबाडीनें–टकवून उपटून नेणें (पैसे, माल वगैरे). ६ (शाप किंवा अपशब्द यांचा) भडिमार करणें. ७ खालीं पडणें. [सं. आ+सूद्. आसद् ध्व.]

असडा—पु. १ एकदम–चटकन दिलेला जोराचा हिसका, हिसडा (अवयव–गात्राला); असा हिसका वसल्यामुळें होणारें दु.ख. (क्रि० देणें, बसणें). एकदम हिसकणें, फटकावणें, उडविणें (चाबूक, दोरी वगैरे); एकदम धरणें, पकडणें. २ पिळवटणारा कंप; तिडीक; वेणा; आंचका (वुडणारा, फांशी जाणारा, गुदमरणारा किंवा मरावयास टेकलेला जसें करतो तसा). (क्रि० देणें, येणें;) ३ धक्का; धडकी; तडाखा (व्यापारांत, पिकासंबंधानें) सोसावें लागणारें नुकसान–तोटा; (क्रि० बसणें.) [असडणें]

असडा–डी–डीक—वि. १ न सडलेला; न कांडलेला; उखलांत न कुटलेला; स्वच्छ, पांढरा न केलेला (तांदूळ, धान्य वगैरे). २ (ल.) अशिक्षित; बेशिस्त; वळण नसलेला; असभ्य; असंस्कृत; अशिष्ट; अपेट; अडाणी; गांवढळ; अज्ञानी. ' तुम्ही फार असडी आहांत. ' –नामदेव नाटक ९०. [अ+सडणें]

असडी, अंसडी—स्त्री. १ जखमेवर वसणाऱ्या माशांनीं, केलेली विष्टा; क्षतादिकांवर माशा वसल्यामुळें त्यांत होणारी कृमींची उत्पत्ति; सडण्याची–कुजण्याची क्रिया. (क्रि० पडणें; घालणें). २ (कांहींच्या मतें) जखमेंतील कृमी किंवा त्या उत्पन्न करणारी माशी. [सडणें ?]

असण–णा–असणी—पुस्त्री. असाण्याचें झाड. याच्या फांद्या मोठ्या व लांबट असून लांकूड इमारतीस उपयोगी पडतें. मूत्र, संग्रहणी व कुष्ट इत्यादिकांवर गुणकारी. [सं. आसन]

असणें—अक्रि. १ वर्तणें; अस्तित्वांत असणें; जिवंत असणें; जगणें. २ राहणें; वास्तव्य करणें; मुक्काम–वस्ती करणें; **म्ह०** १ असुन अडचण नसुन खोळंबा. २ असल्या दिवशीं दिवाळी नाहीं तेव्हां शिमगा. [सं. अस्=राहणें]

असत—न. असत्यपणा; अविनाशी पदार्थ. [सं. अ+सत्]

असंत—वि. असंथ; अस्थिर. ' जैसें वाहतें पाणी जाय वेगें. तैसेंचि आणिक मिळे मागें. तेवीं असंतचि असिजे जगें. मानिजे संत ' –ज्ञा १५.१३३.

असंत—वि. १ अविद्यमान; खोटी. असत् पहा. ' म्हणोनि हें असंतचि सरें. ' –परमा १०.२४. २ लबाड; नास्तिक; संत नव्हे तो. **०पण–ता**–नस्त्री. १ नास्तिकपणा; असाधुवृत्ति. ' ज्याचेनि वाक्यें असंतता. निःशेष मावळे तत्त्वता. त्यासीचि गा सद्गुरुता. वेदशास्त्रार्था प्रतिपाद्य ॥ ' –एभा ३.२८७. २ असत्कर्म; मिथ्यात्व; खोटेपणा. ' तैसे एकचि गुणेवीण. संतचि परि असंतपण. ' –ज्ञा १७.३९०. [अ+सत्–संत]

असता—वि. १ असणारा; असलेला. ' कीं असते आपुले डोळे. आपण झाकीं ' –ज्ञा ६.७३. ज्याच्याजवळ कांही अर्थ आहे असा; संपत्तिमान; गब्बर; ऐपतदार; ऐवजदार. **म्ह०** असल्याचे विकार नसल्याचे घोरकार=जो श्रीमंत आहे त्यास चैनी कराव्याशा वाटतात व गरीबाला काबाडकष्ट करावे लागतात. २ समर्थ; क्षम; योग्य; लायक; उपयोगी; कामाचा. **म्ह०** असल्याचा बाप नसल्याची आई=मिळविता किंवा कामाचा मुलगा बापाला आवडतो पण ज्याला कांहीं मिळत नाहीं, जो कांहीं उद्योग करीत नाहीं, असा मुलगा फक्त आईलाच आवडतो. **०करी**–(माण.) पैसेवाला.

असती—स्त्री. १ साध्वी किंवा पतिव्रता नव्हे अशी स्त्री; कुलटा; जारिणी. ' हरणार असु हरुनि वसु तदभिलषित न गणिका तसी असती. '–मोसभा १.६१.–वि. दुष्ट; नीच; वाईट. ' ज्यांची मति, सोडीना दुराग्रहा असती. ' –मोकर्ण. १.२५. [सं.]

असंतुष्ट—वि. १ नाखूष; असमाधानी; अतृप्त. २ गैरमर्जी झालेला; रुष्ट. [सं.]

असंतृप्त—वि. (शाप.) पुरें न भरलेलें; कणांत कण न विरलेलें; पूर्णपणें न मुरलेलें; असंपृक्त; (इं.) अनसॅच्युरेटेड. ' हे (आल्डिहाईड) असंतृप्त असल्यानें साक्षात् दोन एकमूल्यतत्त्वांशीं किंवा मूलकांशीं संयोग पावूं शकतात. ' –सैंपू २.१६. [सं.]

असतेपण—न. अस्तित्व; असणेपणा; जगणें; असणें. ' माझें लपो असतेपण. नांवरूपासी पडो खंडन ॥. ' ' तेंगें असतेपण आहाच ' –ज्ञा ८.३१. [सं. अस्]

असंतोष—पु. १ नाखुषी; इतराजी; खेद. ' याचकांनीं किती मागितलें तरी मला असंतोष नाहीं. ' २ असमाधान; अतृप्तता. ३ (राजकीय) प्रजेच्या मनाची अस्वस्थता; अशांतता; चलबिचल–खळबळ होण्याची स्थिति (इं.) अनरेस्ट. ' असंतोष हा सर्व भावी उत्कर्षाचें, प्रयत्नांचें, ऐश्वर्याचें व मोक्षाचें बीज आहे, हा जर आपण सर्वांनीं नष्ट केला तर या जगांत व परलोकांत देखील आपली धडगत लागणार नाहीं. ' –टिस् १२. [सं.] **–षी**–वि. नाखूष; अतृप्त; असमाधानी; समाधान पावण्याला कठिण; हांवरा; लोभी.

असत्—वि. १ खरें नव्हें तें; खोटें; असत्य; मिथ्या; अवास्तव; विनाशी; ज्याला अस्तित्व नाहीं तें; काल्पनिक; अस्सल नव्हे तें. ' तैसी सत् ना असत् होये. ' –ज्ञा १५.८१. ' तरी सच्छब्दें येणें. आदूनि असतायें नाणें. दाविजे अव्यंगवाणें. ' –ज्ञा १७.३८०. [सं.] २ वाईट; दुष्ट; असाधु; खटपाळ. ३ अन्याय्य; अयोग्य; सामाशब्द–असन्मित्र=खोटा मित्र, प्रसंगीं उपयोगी न पडणारा मित्र. असद्विद्या=कुविद्या; पिशाचविद्या; दुःशास्त्र. असन्मार्ग=कुमार्ग, अनिष्ट–वाईट मार्ग; असद्व्यापार–व्यवहार=वाईट–

मूर्खेपणाचीं कर्में–प्रघात. असद्भाव=दुष्टस्वभाव. असत्कर्म; असत्पथ; असत्पुत्र; असत्संसर्ग; असद्विचार; असदाचार; असद्वृत्ति इ० [सं.]

असत्कार—पु. अनादर; अवज्ञा; अपमान; असन्मान: अवहेलना. [सं.]

असत्काळ—स्त्री. (कों.) अनिष्ट–दुष्ट–अन्यायाचा काळ; ज्यांत दुर्गुणी पुरुषांची प्रतिष्ठा व सद्गुणी पुरुषांना दैन्य असतें अशा तऱ्हेचा विपरीत काळ–दशा. भ्रष्टाचार, मचमच, दैन्यावस्था, यांचें प्राबल्य माजल्यामुळें दु.ख करतांना हा शब्द योजितात. [सं. असत्+काल]

असत्प्रायस्वर—(संगीत) विवादी स्वर पहा.

असत्य—वि. खरें नव्हे तें; अनृत; मिथ्या; खोटें; अवास्तविक; अवास्तव –न. खोटेपणा; खोटी गोष्ट. ०**प्रतिज्ञ**–वि वचनभंग करणारा; करार मोडणारा; बेइमानी; अविश्वासी; वेभरंवशाचा; खोटी प्रतिज्ञा करणारा. ०**भाषी** ०**वक्ता**–वि. असत्य भाषण करणारा; खोटें बोलणारा. [सं.]

असत्संग—पु. वाईट, दुष्ट संगति; असन्मैत्री. [सं.]

असदर्थनिदर्शना—स्त्री. निदर्शनालंकाराचा एक भेद. आपल्या वाईट व्यापारानें दुसऱ्यास त्याच्या वाईट व्यापाराचा व त्याच्या फलाचा जेथें बोध करतात तेथें हा अलंकार होतो. उ० 'असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ.' 'रामाशीं जो द्वेष करी। तो जाय यममंदिरीं। असें बोधित मारिच। मरे हेममयत्वच ॥' [सं.]

असदाचार—पु. वाईट वर्तन; दुराचरण; दुर्वर्तन. [सं.]

असंदिग्ध—वि.निःसंशय; निश्चांत; निःशंक; निर्विवाद. [सं.]

असद्व्यय—पु. मूर्खेपणानें–अयोग्य रीतीनें केलेला खर्च–व्यय. [सं.]

असंपन्न—वि. निर्धन; दरिद्री; कंगाल; गरीब. [सं.]

असंपृक्त—असंतृप्त पहा.

असंप्रज्ञ—वि. निर्विकल्प. **असंप्रज्ञातसमाधि**–स्त्री ज्या समाधींत सर्व वृत्तींचा लय होऊन आत्मा केवळ आपल्या स्वरूपाचे ठिकाणीं लीन असतो ती; निर्विकल्पसमाधि. –सप्र १८.५६. [सं.]

असफज्या–ह—पु. एक पदवी. ही हैदराबादच्या निजामांना आहे. 'नबाब असफज्या ह्याचा विचार दगाबाजीचा. एकास पळ म्हणावे एकास पार्टी लाग म्हणावे' –पया. [अर. आसफ=साले मनच्या वजिराचें नांव. (सामा.) वजीर, दिवाण+ज्याह–जहान्=जग, जगाचा वजीर; असफउद्दौला=संस्थानचा वजीर]

असंबध्द—वि. १ विसंगत; असंयुक्त; संबंध लक्षांत न घेतलेलें (भाषण, लेखन); विपरीत; बेढंगी; अनाचारी; अयोग्य; अयुक्त (कृत्य, आचरण). 'जरी भिन्नचि अनादिसिध्द। तरी न येती हे असंबध्द।' –ज्ञा १५.३२३. २ अलग; वेगळा; तुटक; निराळा, संबंध तोडलेला. 'साधू संसाराचे ठायीं असंबध्द असतात.' ३ चमत्कारिक; असंभाव्य; असमंजसपणाचें; असमर्पक; बुध्दीला न पटणारें; अयुक्त. 'पाण्यानें घर जळालें म्हणतोस परंतु हें मला असंबध्द वाटतें.' [सं.]

असंबंध—पु. संबंधाचा अभाव; मेळ किंवा समन्वय यांचा अभाव. –वि. निराळा; वेगळा. [सं.]

असबस्ट, असबस्टास—पु. एक तंतुमय खनिज द्रव्य; याचें वस्त्रावाचा परिणाम होत नसल्या कारणानें बॉयलर व वाफ नेण्याच्या नळ्यांभोंवती हें लावतात. तसेंच जेथें आगीचें भय त्या ठिकाणीं वापरतात. [इं. ॲस्बेस्टॉस]

असबाब—स्त्री १ वीजवस्त; मालमत्ता; सामानसुमान; साधन सामग्री; साहित्य; वस्तू. २ युध्दसामग्री; युध्दोपयोगी सामान. अजबाब पहा. [अर. अस्बाब, सबबचें अव.]

असबाबा—पु. धोब्याच्या गुडघ्यावर फोड येऊन जो रोग होतो तो. –अश्वप २.२२८.

असंभव—पु १ संभवाचा–होण्याचा अभाव; २ (ल.) अशक्यता; असंभाव्यता; दुर्घटता; असणेंपणा; अभूत गोष्ट. ३ असंबंद्धता; असमर्पकता; अयुक्तता; वैपरित्य; विजोडपणा. ४ (साहित्य) एक अलंकार; अशक्य गोष्टीचें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. याला असंभावना अलंकारहि म्हणतात. उ० १ उंदरानें मांजरास मारलें, २ गज गोष्पदीं बुडाला हा दैवा सिधु शोषिला सशकें। न शके सोसाया हें वधिला तो केसरी कसा मशकें॥' –मोद्रोण ३.२. ५ (साहित्य) उद्दाख्येय जातीमध्यें ज्या ज्या व्यक्तींचा समावेश व्हावा अशी इच्छा असते त्यांपैकीं एकाचाहि समावेश तीमध्यें होत नाहीं असें जर व्याख्येवरून दिसेल तर तीमध्यें असंभव हा दोष आहे. असें म्हणावे. जसें– पदार्थाची किमत देण्याघेण्याच्या योगीकरितां राजकर्त्यांनीं जे कधींच न झिजणारे पदार्थ केलेले असतात, त्यांस नाणीं म्हणावें. ही नाण्यांची व्याख्या कोणत्याच नाण्यास लागू होण्याचा संभव नाहीं. कां कीं कधींच न झिजणारा असा एकहि पदार्थ नाहीं म्हणून ह्या व्याख्येमध्यें असंभव हा दोष आहे –सुकी ४१. [सं. अ+सं+भू]

असंभवदुक्तिक—वि. ज्या उक्तीचा मुळीं संभवच नाहीं असा (अर्थ); अशक्यप्राय. 'सूर्य अंधारामुळें ठेंच लागून पडला ही गोष्ट असंभवदुक्तिक दिसते.' [अ+संभवत्+उक्ति+क]

असंभवनीय—असंभावनीय पहा.

असंभवी—वि. दरिद्री. 'जेवी असंभवियांचें लेंकरूं। घे पयो पानी हावरूं।' –ऋ ६२. [अ+संभव]

असंभवी–विक–वित–भव्य—वि. १ विपरीत; विचित्र; विजोड. २ (ल.) संभव नसलेलें–नसणारें; असंभाव्य; अशक्य. 'साहित्य भरतें अपार। असंभव्य दाटलें।' –रावि. [सं.]

असंभाड—(क्र.) असंभड; असंभाव्य. –वि. फार; बेसुमार. 'तरी तयाचिसारिखें । असंभाड पाप पिकें ।' –ज्ञा १३.३१. [सं. असंभाव्य]

असंभावना—स्त्री. १ संभव किंवा मिलाफ यांचा अभाव; २ (ल.) अशक्यता; असाध्यता; असंभाव्यता; दुर्घटता. ३ (वेदांत) जीव व ब्रह्म यांचा भेद प्रतिपादन केला आहे कीं अभेद प्रतिपादन केला आहे हा प्रमाणगत संशय; आणि जीव व ब्रह्म यांचा भेद सत्य आहे हा प्रमेयगत संशय या दोन्ही संशयांना असंभावना म्हणतात. 'असंभावना विपरीत भावना । निःशेष तुटलिया वासना । निजस्वरूपीं तेव्हां जाणा । जागेपणा तो आला ॥' –एभा ११.४३२. [सं.]

असंभावनीय—वि. १ असंभाव्य; असंभूत; अगदीं विरुद्ध. विजोड; विपरीत. २ अशक्य; दुर्घट. [सं. अ+सं+भू]

असंभावित—वि. १ असंबद्ध; विसंगत; न जुळणारा; संदर्भशून्य; असमर्पक. २ (ल.) असंभवनीय; अशक्य, असाध्य. ३ संभावित, सभ्य नाहीं असा; हलकट; नीच; बेअब्रूचा. [सं.]

असंभाव्य—वि. १ घडण्यास, होण्यास असमर्थ (अयुक्तता, विपरीतता या कारणांनीं); अक्षम, अशक्य; अघटित; असाध्य. 'हें बहु न सांगोंचि जे कथा । असंभाव्य हें ॥' –ज्ञा १८.८०९. २ अतर्क्य; अघटित. 'असंभाव्य श्री रामचरित्र ।' –रावि १.५. ३ पुष्कळ; अतोनात; अतिशय; अमाप. 'जें जें मनीं इच्छिलें । तें तें हरीनें पुरविलें । सकळ राजे भृत्य जाहले । द्रव्य संचलें असंभाव्य ।' –ह ३३.१३३. [सं.]

असंभूत—वि. १ बुद्धीला न पटणारें, न जुळणारें; असमर्पक; अयुक्त. २ (ल.) अस्तित्व नसलेलें; न घडलेलें–होणारें; असंभवनीय; अशक्य किंवा असाध्य. [सं. अ+सं+भू]

असंभूति—स्त्री. अस्तित्व नसणें; नाश. 'विद्येस संभूति म्हणजे जगाचें आदिकारण आणि त्याहून भिन्न जी अविद्या तिला असंभूति किंवा विनाश अशीं दुसरीं नांवें देऊन याच्या पुढल्या तीन मंत्रांत पुनः (तोच अर्थ) वर्णिला आहे.' –गीर ३५७. (ईश उपनिषद् १२.१४.) [सं.]

असभ्य—वि. १ (मूळ अर्थ) सभेंत बसण्यासवरण्यास अयोग्य, अयुक्त. २ (ल.) शिष्टाचाराविरुद्ध; अशिष्ट; वाईट, भलत्या रीतीचा, वर्तनाचा; जंगली; क्षुद्र; अडाणी; गांवढळ; हलकट; ग्राम्य. [सं. अ+सभा]

असम—वि. सदृश, सारखा नाहीं असा; विषम. –पु. (साहित्य) एक अलंकार. जेथें उपमाच नाहीं असें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. उ० 'वन्यगुणें काय घडे मारुतिसीं इतर वानरा जन्य।' –मोभीष्म १.६५. [सं.]

असमज—पु. समजुतीचा अभाव; अज्ञान; गैरसमज. –वि. समजूत नसणारा–न पडणारा. [अ+समज]

असमंजस—न असादृश्य; असाम्य; अननुरूपता; फरक; तफावत. –वि. १ असदृश; असमान; असम. २ मंद; ज्याला ग्रहणशक्ति नाहीं असा; मूर्ख; अविचारी; बुद्धिहीन; अविवेकी; तारतम्यज्ञान नाहीं असा. [सं.]

असमजुती–त्या—वि. विनवणी करून किंवा स्पष्टीकरणानें समजूत पडत नाहीं असा; समजूत होण्याला अशक्य; मनधरणी करण्यास, मन वळविण्यास अशक्य–कठिण; शांत करण्याला कठिण.

असमजूत—स्त्री. गैरसमजूत; विपरीत ग्रह; मतभेद; बेबनाव.

असंमत—वि. १ अमान्य; संमत, मान्य नसलेलें; २ (ल.) नामंजूर; त्याज्य; निषिद्ध. 'परि ही गोष्ट असंमत।' [सं.]

असमर्थ—वि. सामर्थ्यहीन; अशक्त; दुर्बळ; अक्षम; नाताकद; नामर्द; नालायक. [सं.]

असमवायी—वि एकसमयावच्छेदेंकरून नसणारा; संबध्द नसणारा; अंगभूत नसणारा: आकस्मिक; नैमित्तिक; प्रासंगिक; यदृच्छाभूत [सं.] ०**कारण**–न. (न्याय) नित्य संबंध नसलेलें कारण. उ. तंतुयोग हें पटाचें कारण.

असमसहास,असमसास,असमसाह(हा)स—वि. १ फार, अमर्याद साहसी; ज्याच्या साहसकृत्यास तुलना नाहीं असा. २ असंख्यात; पुष्कळ; अतिशय; अपार; अमर्याद. 'पांचाळाचे सैन्य असमसास।' –शिशु ९२७. 'मग तया ब्रम्हगोळकांचे अंशांश। प्रसवती आदि संकल्प असमसहास ॥' –ज्ञा ८.२४. –एभा ६.३८. 'असमसाहास कृप सखोल।' –दावि ७३. ३ अनिवार. –एभा ३.२६७. असमास पहा. [सं. अ+सम+साहस; अ+समास= मर्यादा, संकोच.]

असमाई—वि. १ न मावणारी; मनांत न राहणारी 'आपुलिया मना बरवी। असमाई गोठी जीवीं।' –ज्ञा ६.११८. २ असह्य. 'मायबाप निमाल्यावरी। घातलें भावाचे आभारीं। तोहि परि हरी। तुज जाला असमाई।'–तुगा ४०९०. [सं. अ+सम्+अव+ई–असमाई–मिलाफ न होणें]

असमांतरभुज चौकोन—पु. (गणित.) ज्या चौकोनाच्या कोणत्याहि दोन बाजू परस्परांशीं समांतर नसतात असा चौकोन. [सं.]

असमाधान—न. १ नाखुषी; असंतोष; अशांतता; अस्वास्थ्य; मनस्ताप. २ दुखणें; आजार. 'विप्र पडला असमाधानीं। दैववशें करूनि। पंचत्व पावला परियेसा.' –गुच ८.२६. [सं.]

असमान—वि. असदृश; विषम; अधिकउणा; एका पातळींत नसलेला; भिन्न. 'की जगजुग पडिलें असमानू। ऐके बेळें.' –शिशु ६३. ०**गति**–स्त्री. १ नागमोडी, वांकडीगति–वळण–मार्ग–

ओघ. २ अनियमित, अव्यवस्थित, विषम, प्रगति–सुधारणा. **०देश**–पु. १ चढउताराची, उंच–सखल जमीन. २ अनेक भेद–प्रकार असलेला प्रदेश. [सं.]

असमान—न. अस्मान; आकाश. 'नव खंड पृथ्वी पिकें मृगजळें। डोंगर भेटे बळें असमानासी।'–तुगा ४२१०. अस्मान पहा.

असमाप्त—वि. न संपलेलें; समाप्त–परिपूर्ण न झालेलें; अपूर्ण [सं.]

असमास—वि. १ मर्यादित, संकुचित नसलेलें; पसरलेलें; फैलावलेलें. 'मध्यें सुगंध सुवास। तेथें उठतो असमास॥' २ (काव्य) अमर्याद; असंख्यात. 'पुच्छावरी असमास। शस्त्रघाय प्रेरिती॥' असमसहास पहा. [सं. अ+समास=जूट, संकोच]

असंमितता–मिति—स्त्री. (शाप.) विसादृश्य; भिन्नता; दोन बाजूंत सारखेपणाचा अभाव. (इं.) असिमेट्री. [सं.]

असंयुक्त— वि. (शाप.) संयोग न पावलेलें; वेगळें; निराळे (परमाणु) (इं.) अन्कंबाइन्ड.

असंयुक्तावस्था—स्त्री. (शाप.) स्वतंत्र, वियुक्त स्थिति. (इं.) फ्री स्टेट. [सं.]

असर—पु. १ परिणाम; अंत; शेवट. 'कृष्णरावजी यांचे प्राणानें असर केला असें वाटलें.'–रा ५.८३. २ परिणाम; ठसा; प्रभाव; कार्य. 'असरकारक भाषण' –मौज २.६.३०. ३ अंश. 'धुधामध्यें पाण्याचा असर आहे.' ४ (व्यापक) छटा; चिन्ह; खूण; वास; लज्जत, लकेर. [अर. असर्=चिन्ह, परिणाम]

असरणी—(कों.) अशरीरिणी पहा.

असर्फी—स्त्री. (गो.) एक नाणें. किमत सहा आणे आठ पै (०–६–८). अश्रफी पहा.

असल—वि १ मूळचें; अवल; आद्यकालिक; पहिलें 'याची नकल तुम्ही घ्या आणि असल पत्र मजपाशीं ठेवा.' २ मुख्य; प्रधान; उत्कृष्ट; श्रेष्ठ; पहिल्या प्रतीचा. ३ नकली नव्हे तो, खरा; अकृत्रिम. ४ थोर; कुलीन; उच्च घराण्यांतील–वंशांतील–जातींतील. ५ मूळाबरहुकूम; हुबेहुब (चित्र, तसवीर, खेळ). ६ औरस; धर्मपत्नीपासून झालेला. [अर. अस्ल=मूळ, वंश] **०नसल**–वि. औरस संतति; प्रजा; कुटुंब. [अर. अस्ल्+नस्ल]

असल अर्जी—स्त्री. (कायदा) मूळ तक्रार; दाखल फिर्याद. [अर. अस्ल+अर्जी]

असलग—वि. १ संलग्न; जवळचा. 'असलगु ऐसां आवडे। सिओसिओ न ए कन्हणीं कडे।'–शिशु ६८४. २ सोपें; सुगम. 'एकें घृणितें सावधें। असलगें एकें अगाधें।'–ज्ञा ११.१२६; 'येर तो अचिरा मारुं। तो वसता आणि असलगु।'–ज्ञा ८.२३७. **०पण**–न. सुगमपण; सुलभता. 'कैसा झकविलों असलगपणें। अक्षरांचेनि।'–ज्ञा ७.१९४. [सं. आ+संलग्न]

असलंग—क्रिवि. जवळ; संगतींत. 'अशाच्या बसूं नये असलंगी।'–राला ४४. [गं. आ+संलग्न]

असल(ळ)णें—अक्रि. उसळणें. 'कीं गंगापय असलळें।'–ज्ञा १३.२६८. [उसळणें]

असलफूल—न. १ शुद्ध ऊदफूल. २ शुद्ध अर्क. [अर. अस्ल+सं. प्रा. फुल्ल म. फूल]

असलबाब—स्त्री. १ मूळचा–पहिला करपट्टा; मूळची बाब–कलम. २ किल्ल्याच्या बंदोबस्ताकरितां ठेवलेल्या सैन्यास कमी दरानें पदार्थ पुरविण्याची सरकारची रयतेवर असलेली सक्ती. [अर. अस्ल+बाब]

असला—वि. अशा प्रकारचा; ह्या जातीचा; अशा घडणीचा. [सं. ईदृश]

असलाई—स्त्री. १ अस्सलपणा; खरेपणा; उत्कृष्टपणा. 'असलाईस खोटें काम करणें मोठें लांछन' २ मोठेपणा; थोरपणा; सभ्यता; कुलीनपणा, घराण्याचा उच्चपणा. 'प्राणहि वेंचुनि करणी करील तो असलाई।'–राला ११. [अर अस्ल+ई प्रत्यय]

असली—वि. अस्सल. [फा. अस्ली]

असंवय—वि. (गो.) संवय नसलेला.

असंवर–र्य—वि. न सांवरणारें; अमर्याद. 'तेथ असंवरें आनंदें।'–ज्ञा १८.१६२०; 'सेना पाहे असंवर। आतां ते कैशी आईकें उत्तर।'–गीता १ ३१७; 'म्हणोनि हें असंवर्य। हें दैविकेंचें औदार्य। वाचूनि स्वातंतर्य। माझें नाही।'–अमृ १०.६. [अ+सांवरणें. सं. अ+सं+वृ]

असवर्ण—वि. भिन्नवर्णाचा; भिन्न जातीचा–रूपाचा; विजातीय. [सं.]

असवल, असवाल—न. ऋक्ष; रीस; भल्लूक; अस्वल पहा.

असविणें—क्रि. १ नवीन मृत्तिकापात्र–मडकें राबविणें–रांपविणें (तापवून व दुधानें भरून) २ (ल.) कौमार्य भंग करणें; एखाद्या कुमारिकेशीं संभोग करणें. ३ (सामा.) एखाद्या स्त्रीशीं अशास्त्र किंवा बेकायदेशीर समागम–संग करणें; जारकर्म, व्यभिचार करणें. [सं. आसव?]

असविणें—उक्रि. रिंगणामध्यें भोंवरा टाकणें–मारणें. [म. आंस]

असंसक्ति—स्त्री. (वेदांत) अनासक्ति; प्रेम, लोभ यांचा अभाव; ज्ञानी जीवाची सप्त भूमिकांतील पांचवी स्थिति. –हंको. [सं.]

असंसृष्ट—वि. १ न मिसळलेला. २ निराळा; वेगळा; पृथक् (इसम, मालमत्ता). [सं. अ+सं+सृ]

असंस्कृत—वि. १ कोणताहि संस्कार (लग्न, मुंज वगैरे) न झालेला; संस्कार विरहित. २ गांवढळ; हीन संस्कृतीचा. [सं.]

असहकार—पु. सहकाराचा अभाव; तुटकपणा; अलगपणा; बरोबर काम न करणें; मदत न करणें. 'असहकार जरि वरिला।' –सन्मित्रसमाज मेळा सन १९२९. पद ८.

असहकारिता—स्त्री.(इं.)नानकोऑपरेशन. एकत्र किंवा परस्परांचें काम करण्याचें नाकारणें; बलिष्ठ सरकाराशीं दुर्बल व निःशस्त्र प्रजेनें जुलमानें गांजून गेल्यामुळें कोणत्याहि प्रकारची सहकारिता न करण्याचा उपक्रम. 'असहकारिता श्रेष्ठ का सहकारिता श्रेष्ठ हे राजकीय विषय आहेत.' –नाकु १७. [सं.]

असहन—न. १ सहन करण्याची असमर्थता. २ दुसऱ्याची ऊर्जितावस्था, भरभराट, उत्कर्ष सहन न होणें; मात्सर्य. [सं. अ+सहन]

असहानु—वि. सहन करण्यास कठिण. 'असहानु जगीं जगदळां चौहातु मल्लु।' –शिशु ५१५. [सं. अ+सहन]

असहाय—वि. १ एकटा; जोडीदार नसलेला; मित्र, मदतनीस, अनुयायी नसलेला. २ अनाथ; निराश्रित. [सं.]

असहाल—पु. घोड्याचा एक रोग. यानें घोड्याच्या पोटांतून मैल निघतो. 'नलखरी' असाहि एक शब्द आहे.'–अश्वप २.१९६.

असह्य—वि. सहन करण्यास कठिण, अशक्य; दुःसह. 'चांदणें देखोनि प्रकाशमान। संतुष्ट होतील इतरजन। परि तस्कारांचें न आनंदे मन। त्याजकारणें असह्य।' [सं.]

असळका–सा—पु. आलिंगन; मिठी; कवटाळणें. [सं आश्लेष अप.]

असा—वि. असला; अशा प्रकारचा; अशासारखा; विशिष्ट; इतका. 'म्हणोत म्हणणार बा तुज असा नसेल क्षमी।' –केका ५१. –क्रिवि. १ अशा रीतीनें; ह्या प्रकारें; म्हणून. २ सारखा–शब्दांतील आरंभीचा अ गाळून तो शब्दाच्या शेवटीं जोडून नेहमीं वापरतात. उ० 'भीष्म ग्रीष्म तरणिसा अर्जुन हेमंत तरणिसा गमला।' –मोभी १०.९१. 'गोरगरीबांस अन्न द्यावेसें मला वाटतें.' [सं. ईदृश; प्रा. अइस; म. असा] **०तसा**–वि. कोणी तरी; साधारण, हलका; सामान्य प्रतीचा; क्षुल्लक; कमी प्रतीचा, दर्जाचा; नालायक; असाच पहा. 'हा पंडित केवळ अशातशांतला नव्हे.' –क्रिवि. कोणत्या तरी उपायानें, रीतीनें, युक्तिप्रयुक्तीनें; अडपझडप. [सं. ईदृश+तादृश]

असाइन—पु. मुखत्यार. **०मेंट**–न. विमापत्रक वगैरे कांहीं हक्क एखाद्याच्या नांवानें करणें **–नी**–पु. ज्यास बेचन करून द्यावयाचें–कोणतीहि गोष्ट नांवें करून द्यावयाची तो; मुखत्यार. [इं.]

असांगडे, असांघडें—वि. निरुपम; ज्यास संगत, बरोबरचा कोणी नाहीं असा; ज्याला सांगड नाहीं असा. 'हें किती बोलूं असांगडें.।' –ज्ञा १५.३०४. [सं. अ+सं+गम् किंवा घट्; म. सांगड]

असाच—वि. १ निकृष्टप्रतीचा; सामान्यप्रतीचा. 'तो सेनापती असाच होता.' २ बिन लग्नाचा; आहे तसाच; जशाचा तसा (उ० ठेंब्या इ०) 'त्याला तुम्ही असाच किती दिवस ठेवणार.' –क्रिवि. माघाऱ्या पावलीं; इतक्यांत. 'मी असाच परत आलों पहा'. [असा]

असाजे, पेसाजे—क्रिवि. (पत्रादिकांच्या आरंभीं) पुढें दिल्याप्रमाणें; येणेप्रमाणें.

असाडी, असांडी—स्त्री. १ अ (अं) सडी पहा. २ (गुप्तपणें) वाईट अपकृत्य विषयक, दुष्कृत्यासंबंधीं घातलेलें वजन, भीड; अनुचितवजन; अनिष्ट पगडा.

असाणा—असणा पहा.

असाधारण—वि.१ सामान्य, साधारण नव्हे असा; एकाकी; विशिष्ट, विवक्षित प्रकारचा; विशेष; अगदीं निराळा. २ विलक्षण; असामान्य; लोकोत्तर. 'आणीक ही असाधारण। जे शस्त्रास्त्रीं प्रवीण।' –ज्ञा १.९६. ३ सन्माननीय; मान्यता असलेला; विख्यात; पूज्य. ४ सुलभ नव्हे असें; कठिण. 'सांगितले तुम्ही आचार दोनी। कष्ट बहु विधवापर्णी। अशक्य आम्हां न ठाके स्वामी। असाधारण असे दातारा॥' –गुच ३२.६८. [सं.]

असाधु— वि. वाईट; साधु नव्हे तो; दुष्ट; अधम. 'पै असाधु-कर्मा तैसा।' –ज्ञा १७.३९९. 'कौरव हो गौरव हो सुजनीं न करुनि असें असाधु तरा।' –मोसभा ६.१००. **०वाद**–पु. निंदा.

असाध्य, असाधनीय—वि. १ साधण्याला–साध्य करून घेण्याला कठिण; संपादण्यास–प्राप्त होण्यास अशक्य. २ बरा न होण्यासारखा; न सुधारण्यासारखा; उपाय–योजना लागू न पडणारा (रोग). [सं.]

असाध्वस—वि. निर्भय. [सं. अ+साध्वस=भीति]

असान—न. उपकार; दया; कृपा; मेहेरबानी. [अर. इहसान]

असान—वि. सुलभ, सुगम, सोपें; सुखकर. [फा. आसान.]

असान—न. अवसान; धैर्य. 'भणओनि असानेयां होइजे। पुढां भाटुं धाडिजे।' –शिशु ४७४. [अवसान अप.]

असांप्रत—वि. अकालिक; अप्रस्तुत; हार्ती घेतलेल्या–चालू गोष्टीशीं विसंगत; अप्रासंगिक; अनुचित; अयुक्त. [सं.]

असामदार—पु. सरकारांतून नेमणूक, असामी असलेला; वेतन घेणारा (सरदार, दरकदार, इनामदार, कामदार, इ०) 'असामदाराचें घोडें परिच्छिन्न लहान जमेस धरूं नये.' –खरे ११. ५७०७. [अर.]

असामी—पु.स्त्री. १ इसम; व्यक्ति; माणूस, 'तुकोजी शिंदे यांनीं मौजे मुल्खेडें येथें बटकी देखील पोरें असामी तीन येकूण रुपये दीडशांस विकत घेतली.' –वाड बाबा २.१९१. २ देणेकरी;

कर्जदार; ऋणको; प्रतिवादी. 'ती असामी भारी आहे.' ३ धारेकरी; भाडेकरी; कूळ–खंडकरी. ४ हजीरीपटावर असलेलें नांव; नोंद 'मातबर लोकांत असामी घातली.' सभासद. –पु. १ सरकारी नोकरी; चाकरी; नेमणूक; उपजीविकेचें साधन. 'राबटे आर्म हा इस्ट ईंडिया कंपनीच्या पदरी कारकुनाची एक लहान असामी पतकरून ...हिंदुस्थानांत आला.' –नि. ६१२. २ मोठा, मातबर माणूस; स्वारी. 'दक्षिणेंत केवळ असामी नाहीं दुसरा।'–ऐपो २३६. [अर. इस्म=नांव अव.] ०दार–असामदार पहा. ०वार–क्रिवि. १नेमणुकीप्रमाणें; हुद्याप्रमाणें. 'वरकड पांच इसम यांस असामीवार शिरपेंच, पानदान देऊन वाटेस लाविले.' –रा ५.१४१. २ प्रत्येकी; वेगवेगळें; मनुष्यागणीक; नांवनिशीवार. ३ कुळाप्रमाणें; रयतवार. [फा.]

असार—वि. १ निःसत्व; सारहीन. २ खोटें; मिथ्या; निकामी; पोकळ. 'असार जीवित.' 'येथें एक वर्म पाहिजे धीर। परि म्या लेखिलें असार।' –तुगा ७११. 'असार म्हणिजे नासिवंत। सार म्हणिजे तें शाश्वत' –दा १४.९.५. [सं.]

असार—१ सामा. अंतर; दोन वस्तूंमधील क्षेत्र. २ (गवंडी काम) भिंतीची रुंदी. ३ दार किंवा खिडकी यांच्या दोन बाजूंमधील अंतर; चौकटीचें क्षेत्रफळ. [अर. अर्सा?]

असार—परिणाम, अंश वगैरे. अर्थासाठीं असर पहा. दुधामध्यें पाण्याचा असार आहे.' पाण्याचा असार लागून गांठोडें भिजलें.'

असार—(विणकाम) असारा–री पहा.

असारणें—उक्रि. पसरणें. 'का समुद्राचेनि पैसारें। वरी तरंगता असारे।' –ज्ञा १५.१०७. [सं. आ+सृ]

असारा—पु (विणकाम) मैदानांत पाजण करण्याकरितां पसरलेला सुताचा ताणा. [सं. आ+सृ; द्रा. आसु=ताणा]

असारा–री—पुस्त्री. (विणकाम) १ परता किंवा फालका (किंवा असारा) यावरून सूत उकलून ज्या कामटीच्या केलेल्या हंडीच्या आकाराच्या चक्रावर घेतात तो. यावर सुमारें एक थोक सूत उकलतात; सूत गुंडाळण्याचें चाक; त्यावर गुंडाळलेलें सूत किंवा रेशीम; वळीव रेशीम. [सं. आ+सृ–सर; द्रा. आसु=पसरणें, ताणा] ०परती–स्त्री. पतंगाचा मांजा (दोरा) ज्यावर गुंडाळतात तें चाक.

असाल—पु. मद्य. 'प्रवासांत नून (रोटी), मॉस (दहीं), असाल (मद्य) आणि प्याज (कांदा) या व्यतिरिक्त कोणतेहि पदार्थ घेतले नाहींत.' –सासं २.२६३. [अर. असल=मद्य]

असावणें—क्रि. आशायुक्त, आतुर होणें. 'तुका म्हणे माझ्या असावल्या बाह्या। तुज क्षेम व्हाया पांडुरंगा।' –तुगा ८२९. [सं. आशा]

असावणें—क्रि. अश्रुयुक्त होणें. [सं. अश्रु; म. असूं]

असावध—वि. १ लक्ष नसलेला; गैरसावध; गाफील; अनवधानी; दुर्लक्ष असणारा. २ गफलत्या; प्रमादी; अनवधानदृष्टि. [सं. अ+स+अवधान]

असावरी—पु. १ (संगीत) एक राग. आसावरी पहा. २ एक वनस्पती, शतावरी.

असावरी–ली–कांठ—पु. शेला वगैरे वस्त्रांत विणलेले कांठ. एका वनस्पतीच्या पानांसारखी नक्षी असलेले कांठ. अस्वली कांठ पहा.

असासा—पु. उसासा–धापा टाकणें; नाकातोंडांतून वायु जोरानें बाहेर सोडणें; सुस्कारा; मोठा दुःखाचा उच्छ्वास (क्रि० टाकणें–देणें–घेणें–सोडणें). [सं. अस्=श्वास घेणें]

असासित—क्रिवि. एकदम; अकस्मात्. 'सिंहासना वरौनि ऊठिला। तंवेंकें असासितु निगाला।' –शिशु ९८९. [सं. अशासित?]

असाहाणुपणें—क्रिवि. सहन न करतां; असूयेनें; मत्सरानें. 'तरि तेहीं खिळनी केली इअर्सी। असाहाणुपणें॥' –शिशु ८०४. [सं. अ+सहन]

असाह्य—वि. एकटा; एकाकी; कोणाकडून मदत नसलेला. [सं. अ+सहाय]

असाळ–ळी—स्त्री. १ राक्षसिणीचा एक प्रकार; पिशाची; हडळ. आसाळी पहा. २ (ल.) कर्कशा स्त्री; अवदसा; राक्षशीण; कृत्या. 'परम विरस वाक्यें बोलते जों असाळी।'- सारुह ४ ७१. [सं. ईर्षालु–इसालु किंवा प्रा. आसालिय=सापाची एक जात.?]

असाक्ष–क्षिक—वि. १ न पाहिलेला; न देखलेला; ज्यास साक्षी नाहीं असा. २ (ल.) अतिथीस न देतां सेवन केलेलें. 'असाक्ष भक्षिलें मिष्टान्न।'–मक १४.८८. ०भोजन–न. पंचतीस कोणी नसतां केलेलें भोजन. –एभा २१.१३१. [सं. अ+स+अक्षि=डोळा]

असि—पु. बाजारांत मांडलेल्या मालावरील कर. 'इयां पाटणीं जे केणें उघटे तेहाचा असि आऊं.. मठा दीन्हला।'–पाटण शिलालेख, शके ११२८.

असि—स्त्री. तरवार, खड्ग. 'जेथ असिपत्र तरुवर।' –ज्ञा १६.३७३. [सं.] ०धारा–स्त्री. तरवारीची धार. ०धारा व्रत–न. १ स्त्रीपुरुषांनीं संगमनिवारणार्थ उभयतांच्यामध्यें नागवी तरवार ठेवून एका शय्येवर निजणें. २ (ल.) मनोविकारांचें संयमन करणें; यावरून अत्यंत कठिण, दुर्घट व्रत–नियम. [सं.] ०पत्र–न. तरवारीचें पान, धार. ०पत्रतरु–पु. ज्याला तरवारीसारखीं पानें आहेत असें झाड. 'जेथ असिपत्रतरुवर। खदिरांगाराचे डोंगर।' –ज्ञा १६.३७३. ०पत्रमत्स्य–पु. एक जातीचा मासा. (इं.) सॉफिश.–प्राणिमो ९०. ०पत्रघन–न. तरवारीसारखीं पानें आहेत अशा झाडांचें वन. पापी लोकांना तीक्ष्ण तरवारीसारख्या पानांनीं या (नरक

लोकांतील) अरण्यांत मोठे क्लेश देण्यांत येतात. **०पत्रव्रत**–ब्रह्मचर्य; असिधारावत पहा. 'चैत्री पौर्णिमेसीं सोडावा। वर्षपर्यंत तो रक्षावा। स्वयें असिपत्रव्रत नेम धरावा। आणि वर्जावे भोगमात्र॥' –जै. १.९३. [सं.]

असिका—स्त्री. (काव्य) राहण्याची, अधिष्ठानाची जागा. 'स्वानुभूतीची असिका आनंद मात्र तूं।'–वि. असणारा. 'एऱ्हवी स्वामि दुऱ्हा असिका। मीं केवि उरे।'–ऋ ५३. [सं. अस्=असणें, राहणें.]

असिका-कें—वि. संपूर्ण; सर्व; समग्र. असका पहा. 'जियेचेनिं स्नेहमयेंके। दु.खतम निरसे असिके। तिये प्रभुशक्ति शंके। अविद्या जात।'–ज्ञाप्र. २२. 'उठावला वोथरे तंवका। तो सुनाट पडे असिका।'–अमृ ६.४६. 'त्यागीन तिला कां मी यज्ञयागें निष्फळें यशें असिकीं।'–मोसभा ४.७. [सं. आसाग्र]

ॲसिड–न. अम्ल;; तेजाब. अम्ल पहा. [इं.]

असित—वि. पांढरें नव्हे तें; काळें; निळें. [सं. अ+सित=पांढरें] **०पथ**–पु. (ज्याचा मार्ग काळा असतो तो) अग्नि. **०पक्ष**–पु कृष्ण-वद्य-पक्ष. 'असितपक्ष माघमासीं।'–गुच ७.११२.

असिद्ध—वि. १ सिद्ध नव्हे तें. पुरावा नसलेलें. २ अस्तित्वांत नसलेलें; अनुपलब्ध; अविद्यमान. [सं.]

असिपद—न. तत्त्वमसि यांतील असि=आहे हें पद. तत्पद आणि त्वंपद या दोहींचें निरुपाधिक ऐक्य जेथें होतें तें पद. 'असिपदीं तदात्मा अलिप्त।'–परमा १.१७. [सं. असि–अस्–व. द्वि. ए.]

असिरणि—अशरीरिणी पहा. 'असिरणि वाचा जालि।'–पंचतंत्र ३.१९.

असिल—न. (रसा.) पांढरा स्फटिकाकार व नत्रप्रचुर असा स्नायूचा घटक. (इं.) क्रिएटाईन.

असिलता असिलूलता—स्त्री. १ तरवार. 'हातीं असिलता करिं खेटकें। कटि झळके यमदंड॥' २ तरवार परजणें; पटे फिरवणें. ३ विजेची वक्रगति–लकाकी; चमक. [सं. असि=तलवार+लता]

असिलेपण—न. अस्तित्व. 'नाहीं अज्ञानावांचूनि मूळ। ययाचें असिलेपण टवाळ।'–ज्ञा १५.१४०. [सं. अस्]

असिवाद—पु. तरवारीचें युद्ध. 'असिवादा असिवार तों ठाईं'–ऐपो २६९.

असिवार—पु. खड्गधारी; घोडेस्वार; राऊत. 'धरोनि घोडाचां गौडीं निवटिती असिवारा तें!'–शिशु ९६९; –एभा ३०.९३. [असि+स्वार; असि+वारु ?]

असिस्टंट—वि. दुय्यम; नायब; उ० असिस्टंट मॅनेजर (दुय्यम व्यवस्थापक); असिस्टंट कलेक्टर वगैरे. [इं.]

असीम—वि. निस्सीम, अमर्याद. 'मूर्ति असे अत्युग्रा दीनजनीं करिसि परि असीम दया।'–कुअक. [अ+सीमा]

असील—पु. घोड्याच्या डोळ्याजवळचा भोंवरा. हा डोळ्यावर असल्यास चांगला व डोळ्याखालीं असल्यास वाईट.'–अश्वप १०२. [सं अक्ष किंवा सं. अक्ष]

असील—असल पहा.

असु—पु. १ प्राण; जीव; श्वासोच्छ्वास. 'असु जातां तनु विकळा, कीं जातां वत्स जेवि धेनु सती।'–मोसभा ७ ४०. [सं.] २ (शाप.) ऑक्सिजन. सामाशब्द–असुश्लिथ अमिन, असुकितन वगैरे.

असुआर—पु. घोडेस्वार; असिवार पहा. 'तंवं पुढिलां असुआरां। भिडौ सरलें।'–शिशु ८७४. [सं. अश्ववार–कार]

असुख—न. सुखाचा अभाव; दुःख; त्रास; अस्वस्थता; पीडा; असमाधान. 'देखोनिया असुख घे स्वकुलाभिमानें।'–आक्र १२. [सं.]

असुख, असूख, असृक—न. १ स्त्रियांस अवेळीं विटाळ येणें; अकालीं, अनियमित ऋतुप्राप्ति. (क्रि० सुटणें). [सं. असृक्] २ देवीचा रोग.

असुखी—वि अस्वस्थ; बेचैन; दुःखी; असमाधानी. [सं.]

असुखोदर्क—वि. शोकपरिणामी; शोकपर्यवसायी. –गीर ६६. [सं. असुख+उदर्क]

असुजणें—अक्रि. (कों.) सूज नाहींशी होणें, थांबणें, ओसरणें, बसणें, जिरणें, मावळणें. [अ+सुजणें]

असुडणें—क्रि हिसकणें; फेकणें. 'कृष्णें तेव्हां काय केलें। गोपीचें वस्त्र वेगें असुडलें। तत्काळ धरेवरि पडिलें। उघडें जाहलें सर्वांग।'–ह ७.१३२. 'मग हनुमंतें असुरी समग्र। बांधोनिया असुडिल्या'; 'कां केळीचा गाभा मोडला। चोखळा असुडला। आकाशाचा।'–अमृ ७.६९. [सं. आ+सुद]

असुढाळ—वि. १ ज्याच्या डोळ्यांतून पाणी गळतें असा; पिचकुडा; पिचक्या डोळ्याचा (घोडा). हें घोड्याचें अशुभलक्षण आहे. दोन्ही डोळ्यांच्या खालील बाजूस गोम किंवा भोंवरा असतो त्यांत डोळ्याचें पाणी जात असल्यास मालक नेहमीं रडत राहणार असें मानतात. २ रडवा; रडका; रड्या. –पु.स्त्री. गळका, पिचका डोळा–घोड्याचा एक प्रकारचा रोग. [सं. अश्रु+म. ढाळणें.]

असुणी—न. अश्रू; 'नितंबातें कुंभस्थळ निरखितां मत्तकरिचें। महालज्जेनें ते श्रवति असुणी साचपरिचे।'–निमा ३.६९. [सं. असु अव.]

असुद्–ध—न. रक्त; अशुद्ध. 'वाहाती असुधाचिया सरिता।' –उषा ८.३२. [सं. अशुद्ध]

असुदगी—स्त्री. शांतता; भरभराट. 'तिनी सर्काराची नजर रयतीचे व मुल्काचे व शहरचे असुदगीवर सादर आहे.' –पेश ६२. [फा. आसुदगी]

असुदा–य—वि. १ आनंदी; उल्हासी; हुषार; विशेषतः पुष्कळ दिवस तबेल्यांत बांधून ठेवलेला (घोडा). २ ताजातवाना (काम केल्यानंतर–श्रमल्यानंतर); दमदार; जीवदार; जिवट; ईरयीचा; जोरदार; ज्याला श्रम लवकर भासत नाहींत असा; चपळ; उत्साही; थकवा न येणारा; ताकतवान. –ख ३१२९. ३ (व्यापक) रिकामा; मोकळा; स्वतंत्र; निर्वेध; न गुंतलेला–अडकेलेला (कामधंद्यांत); सुटा, मागें (संसार, बायका पोरें यांचा) पाश, लोढणें नसलेला; कोणी रहात नाही, वापरीत नाहीं अशी (जागा, भांडी इ०). 'तुम्ही अटक पावेतों मुलुक कावीज केला, आतां मोहिमेस राज्य असुदें कोणते?' –भाब ३७. 'राज्य ही असुदें आहे; पैसा पाहिजे तितका मिळेल' –भाब ३५. ४ अननुभवी; अपरिचित; ज्याला पूर्वी कांहीं माहीत नाहीं असा; ज्यानें पूर्वी कांहीं केलेलें नाहीं असा. ५ अनसूट अर्थ ४ व ५ पहा. [फा. आसुदा] **असुदादम**–पु. नवीन दम; विश्रांतीनंतर येणारी टवटवी; उल्हास.

असुदा–य—वि. (गो.) १ आयतें; तयार. २ मनसोक्त; स्वैर. असुदा पहा.

असुपात—असुडाळ पहा.

असुमाई—वि. १ अतिशय; बेसुमार; २ (ल.) आश्चर्यकारक. असमाई पहा. 'बाणली असुमाई आंगीं योगकळा।'–निगा ३०९. 'परि दाखविली लीळा असुमाई।'–निगा ३११. [अ+समावणें]

असुर—पु. १ दैत्य; राक्षस; दानव (सृष्टयुत्पत्तीच्या आरंभी तुफानी वाऱ्यांस असुर म्हणत, नंतर अंधारास म्हणत, त्यानंतर आर्येतर जातींस ही संज्ञा लावीत. ऋग्वेदांत बहुतेक ठिकाणीं असुर याचा अर्थ शक्तिवान, वीर्यवान असाच केला आहे. पुढील वाङ्मयांत देवशत्रु असा रूढ अर्थ झाला.) 'सुरांअसुरातें ठकवूनी। महादेव मोहिला॥' –एरुस्व २.१९. २ असिरिया देश; त्या देशांतील लोक. ३ बिहारमधील एक अनार्य जात. [सं. असु=प्राण, बल–असुर]

असुरवाड—न. दुःख; क्लेश; त्रास; कष्ट. 'ए–हवीं विहितत्त्वें मांडी। परी घालितां असुरवाडी।' –ज्ञा १८.१८९.

असुरवेळा—स्त्री. संध्याकाळ. 'दश मास झालिया प्राप्त। मेधावती झाली प्रसूत। असुरवेळांयोगें सुत। तिघे तामस जाहले' –जै. ७८.६२.

असुरा—पु. मोहरमची १० वी तारीख. [अर. अशूरा–अशरा]

असुरी—स्त्री. राक्षसीण; असुरस्त्री. –वि. १ असुराविषयीं संबंधी; दैत्यविषयक. २ राक्षसी; धाडसी; क्रूर; कठोर; तामसी **०अन्न**–न. १ उडीद, बाजरी व दुसरीं कांहीं धान्यें. मापात्र पहा २ ज्यांत केंस आढळतो असें अन्न. **०उपाय**–पु फारच कठोर व जालीम उपाय; जसें–अंगच्छेदन, डाग इत्यादि क्रूरपणानें रोगावर केलेले उपाय, तापदायक औषधें इत्यादि. 'वायु झाला असतां डाग देणें हा असुरी उपाय.' **०कर्म**–न. अंगावर शहारे आणणारें क्रूर कृत्य; दुष्टपणाचें कृत्य. **०खाणें**–न. मांस, दारू इत्यादिचें सेवन. **०विद्या**–स्त्री. मंत्रतंत्र, जारणमारण, मोहन, स्तंभन, विध्वंसन यांचा जींत समावेश होतो अशी कुविद्या; अभिचारकर्म. [सं. असुर; असु=प्राण, बल; अस्=श्वास घेणें]

असुर्पी–र्फी—(गो.) असर्फी पहा.

असुळविसुळ—वि. अस्ताव्यस्त; विस्कळित. 'असुळविसुळ न होती। ब्रह्मसंविती स्फुरे म्हणोनी।' –विपू १.४४. [ध्व सं. अ+सु+वि+सु+ल. सु=हालणें]

असुज्ञ—वि. १ अजाण; अकुशल; अनिष्णात; गैरमाहित गार. २ मुज्ञ नव्हे तो; अज्ञानी; मूर्ख. [सं.]

अस्रूं—पु.न. डोळ्यांतील पाणी; अश्रू पहा. 'एकाचिये डोळ अस्रूं बाष्पात्कारी। नाहीं तीं अंतरीं जळतील।' –तुगा ४६ **असवें उगळणें**–(अंतःकरण सद्गदित होऊन) अश्रू ढाळणें. [सं अश्रु; प्रा. अस्सु; गु. अंस, अंसु; नेपाळी अस्सु; पं. अम्झु; जि अश्रव; मि. आश; फा. अश्क.]

असूक्त—वि. चांगलें नव्हे–योग्य नव्हे तें (कृत्य). [सं अ+सु+उक्त]

असूख—न. (गो.) देवीचा रोग. असुख पहा. [सं. असुख]

असूड—पु. गाडीवाल्याचा–शेतकऱ्याचा लांब चाबूक; कोरडा [सं. अस्=फेकणें; ध्व. सट्]. **०गांठ** (असूर गांठ)–स्त्री. एक पद धरून आंसडा दिला असतां सुटण्याजोगी गांठ; सुरगांठ.

असृत–द्—न. खातांपितांना अन्नाचा अंश श्वासनलिकेंत जाऊन व त्यामुळें ठसका लागून जीव घाबरा होणें. (क्रि० जाणें). 'तूं हंसूं नको, तुला असुद जाईल.' [सं. उत्+सिक्थ=भाताचें शीत] **असुद–दा जाणें**—भलत्याच मार्गानें जाणें, आड मार्गानें जाणें. [अ+शुद्ध+म. सुदा–धा?]

असूत–द्—न. रक्त. [सं. अशुद्ध अप.]

असूदगी—असुदगी पहा.

असूदी आबादी—स्त्री. शेताची लागवण, गांवाची वसाहत इ० शांततेच्या काळांतील गोष्टी. [फा.]

असून असून—क्रिवि. मधून मधून; थांबून थांबून; राहून राहून. 'असून असून पोटांत तिडिक येते.' [असणें द्वि.]

असूया—स्त्री. १ मत्सर; द्वेष; हेवा. २ द्वेषबुद्धीनें दुसऱ्याविषयीं खोट्या अफवा पसरविणें; चहाडी; आळ; तुफान. [सं.]

असूर—न. (गो.) रक्त. 'त्याला असूर पडलें. [सं. असृक्]

असूरखाना—पु. ताबूत करण्याची जागा. [अर. असुर+फा. खाना]

असूरा—असुरा पहा.

असृक्, असृज—न. रक्त; रुधिर; शोणित. 'हो असृक् स्रोतशत वाहे समराजिरीं खळखळाले।' -मोद्रोण २.२३. **०पीटिका**—स्त्री. रक्ताचे गोलक. (इं.) ब्लड सेल, कॉर्प्युस्कल. [सं.]

असें—असा पहा. -क्रिवि. १ याप्रमाणें; अशा रीतीनें. -नव १२.१५१. **(असें) अस्सें होणें**—(बा.) वैधव्य येणें. 'माझें हें अस्सं झालें तेव्हांच सारा ग्रंथ आटोपला.'—सुदर्शन २८. **असें काय तें! असें काय करावें**-एक काकुळतीचा उद्गार. 'बाळे असें काय तें अगदीं' —रजपूत कुमारी तारा ७६. [असा पहा.]

असें करतां—क्रिवि. ह्याप्रमाणें चाललें तर पुढें शेवटीं; सरते शेवटीं; परिणामीं; या प्रमाणांत; या हिशेबानें; फार तर. 'एवढें घर बांधलें असतां आठशें रुपये लागतील, असें करतां हजार लागतील' [असा+करणें]

असे(ख)खा—वि. संपूर्ण; सर्व; अशेख. 'असेख ऋद्धिपुर वसो। भणौनि चरणांकीतें।' —ऋ १३. 'राणे हो आपुल्या मुखा। तुम्हींच झालेति असेखा।' —विपू ७.४३. [सं. अशेष]

असेत, असेति—क्रि. असती; आहेत. 'असेत माझ्या अपराध कोटी।' —सारुह १.१३. 'जेथ अखंड असेनि सुरगण।' —दाव १३१. [अस्]

असेला—वि. असला, अशा प्रकारचा-जातीचा. [असा+ला प्रत्यय]

असेली—असल पहा.

असेसर—पु १ मागा, कर, पट्टी ठरविणारा-वसविणारा-घालणारा. २ जमाबंदी करणारा, बसविणारा. ३ फौजदारी कोर्टांत किंवा विशेषेंकरून सेशन कोर्टांत न्यायाधिशास मदत करण्यासाठीं नेमलेला माणूस (पगारी नव्हे); पंच. 'अजदाराचे जातीचे तीन असेसर्स नेमावे.' –टि ४.३३७. [इं.]

असैनु—क्रि. असेन. 'मीं असैनु श्रीकृष्णा तुझा होता।' –दाव ४८५. [असणें]

असो—क्रि. असूंदे; राहो; पुरे; असेना. 'अथवा हें असो। बाप ओदार्याचा अतिसो।' –ऋ १३. 'असो वरि कसा तरी विमल भाव ज्याचा करा। –केका ६७. [सं. अस्तु-अस्सु-असो]

असों—वि. (कों. गो.) असा. 'असो येकलो फिरु नाकां'.

असोक-ग—पु. अशोक वृक्ष. अशोक पहा. [सं. अशोक]

असोड—असूड पहा.

असोल—वि. न सोललेला (नारळ, रोठा वगैरे) 'त्यांचें काव्य असोल्या नारळासारखें कठिण असून तें उकलायास मोठा प्रयास पडतो.' –नि ७६६. [सं. अ+छाल; म. साल=सोलणें]

असोशी-सी—स्त्री. १ सोस; हव्यास; अतृप्तता; फाजील लोभ; आतुरता; उत्कट इच्छा. 'कृपा करोनिया पुरवी असोसी। आपुल्या व्रीदासी राखावया॥' –तुगा ४४९५. 'नाहिं झाला भोग तुम्ही फेडून घ्या असोशी।' –अफला ५८. 'सुखकर अमुची हे पूर्ण कीजे असोशी।' –महाराष्ट्र काव्यग्रंथ ५१, (माधव कृत) रामायण, अयोध्याकांड ६. –वि. अतृप्त, लोभी; आतुर; (अधिकाराची वगैरे) हांव धरणारा. [सं. आ+शोष=सोस]

असोशीक—वि. सहन न करणारा; चिडखोर; अविचारी; रागीट; उच्छृंखल. [अ+सोशीक]

असोस-सु—वि. सहन न होणारें; अतिशय; फार मोठें; अमर्याद; पुष्कळ, शिवाय सोस पहा. 'किंबहुना माया असोस। ज्ञाना जी तुझेनि डोळस।' –ज्ञा १४.१०. 'आतुडे जेथ सुख असोस।' –रंयोवा १.८९. –क्रिवि. हावरेपणानें. 'त्रिविधविकारीं बहुवस। वाढवी असोस संसारू।' –एभा २४.१२२. **०पण**—न. हावरेपणा. [अ+सोसणें]

असोळीं—न. अव. पक्ष्यांचीं घरटीं. अविसाळीं पहा.

असौरभ्य—वि. सुगंधरहित; सुवास न घेतां येण्याजोगा. 'जो नाइकिजतां नादु। जो असौरभ्य मकरंदु।' –ज्ञा १५.७४. [सं.]

अस्क—असका-कें पहा 'लेखिका हातीं श्रध्दापूर्वक। उतार करविले कवन अस्क।' –दावि १८२.

अस्कट-ड—न. (गो.) १ अडचणीची जागा. २ जेथें गवत, झुडपें वगैरे दाटीनें एकत्र वाढतात ती जागा; रान; दरड [सं. अस्=फेकणें] **०विस्कट**—न.स्त्री. अस्ताव्यस्तपणा; अव्यवस्थित स्थिति; विस्कटणें; पसारा. –वि. गबाळ; अस्ताव्यस्त. 'कितीयेक तीं अस्कटेविस्कटेसीं'–दावि २८४. [अस्कट+विस्कट-विस्कटणें]

अस्कत—(गो.) अशक्त. [वर्णविपर्यास होऊन]

अस्कंद—अश्वगंधा पहा.

अस्करणें—अक्रि. धिक्कार करून बोलणें; हूर्यो करणें; अस्कारणें निस्कारणें पहा. 'सारी खेळतां अस्कारूं। निकरेही भांडों।' –ज्ञा ११.५४८. [सं. अस्त्कार किंवा अस्=फेकणें]

अस्करा, अस्कारा—पु. कीर्ति; नांवलौकिक; ख्याति; आख्या; लौकिक. 'सकळ सुरप मंडळींत माझ्या स्वरुपाचा अस्करा।' –प्रला ५८. 'नाजूक रुपडें दिपडें ठिकडें, जिकडे तिकडे अस्कारा।' –पला १७४ (फा. म. कोश). [फा. आश्कारा=प्रसिद्धि]

अस्कवळ—वि. एका घासांत गट्ट केलेला [सं. आ+कवल]

अस्का—-अस्क; असका–कें पहा. 'दैन्यवंत अस्का मी तों मुळीं।' –दावि ७६.

अस्कारणें, अस्करणें—अकि. कीर्ति मिळविणें; नाणावणें; प्रसिद्ध असणें. [फा. आश्कारा]

अस्कारणें निस्कारणें—उकि. तिरस्कारणें; धिक्कारणें; हिडिसफिडिस करणें; हेटाळणें; अस्करणें पहा.

अस्कारी—स्त्री. (विशेष प्रसिद्ध अशी) काळ्या द्राक्षांची जात. [फा. आश्कारा]

अस्खलित—वि. १ न अडखळतां; अप्रतिबद्ध; एकसारखें; अखंड; अचूक; खंबीर; अढळ. २ निरंतर; सतत; अखंड. **०गति**—स्त्री. १ अनिरुद्ध गति; एकगति. ३ (ल.) सदाचाराचा मार्ग; निर्दोष वर्तणूक **०बुद्धि**–स्त्री. तर्कशुद्ध–अचूक विचारसरणी, कधीं न चुकणारा तर्क, ज्ञान. **०ब्रह्मचारी**–पु कुमार्गाला न जाणारा ब्रह्मचारी. न चळणारा–अढळ ब्रह्मचारी. **०भाषण**–न. स्पष्ट व न अडखळतां केलेलें भाषण, वाणीचा अखंड प्रवाह. **०वीर्य**–वि. आजीव, अखंड (ब्रह्मचारी). –क्रिवि. सतत; निरंतर; अखंड. 'माझी वृत्ति अस्खलित चालली.' [सं.]

अस्टर—न. एक विलायती फुलझाड. [इं.]

अस्त—पु. १ अंतर्धान; अदृश्यत्व; लोप. २ (ज्यो.) आकाशांतील ग्रहादिकांचें भूगोलाच्या आड गेल्यामुळें होणारें अंतर्धान–मावळणें (सामा.) मावळणें. उ० सूर्यास्त, चंद्रास्त. ३ मंगळ, शुक्र, गुरु, शनि इ० ग्रह हे सूर्याजवळ असले म्हणजे अदृश्यत्व पावतात, दिसत नाहींत ती स्थिति गुरु, शुक्र यांच्या अस्तांत मुंज, लग्न इ० नैमित्तिक कर्में करीत नाहींत. ४ नाश; क्षय (मरण, दुर्लौकिक वगैरेमुळें). ५ (ल.) सांदीकोंदीत पडणें; मागें पडणें. ६ सपणें फस्रा; अभाव; राहित्य; उणीव. [सं.]

अस्तंगत—वि. मावळलेला; अदृश्य झालेला (आकाशज्योति, ग्रह). 'अस्तंगत दिनकरकरांरंजित मंडप शोभे वरि गगनाचा।' [सं.]

अस्तगिरी—पु. पश्चिमेकडील काल्पनिक पर्वत. याच्या पाठीमागें सूर्य विश्रांति घेण्यास जातो अशी कल्पना आहे. (सामा.) पश्चिम दिशा. 'तरि अस्तुगिरिचिया उपकंठीं।' –ज्ञा १२.३५ [सं. अस्त+गिरि]

अस्तनी—स्त्री. बाही; बाहीचा कोंपरापासून पुढील भाग. **अस्तन्या वर सारणें**–युद्धास सज्ज होणें; लढाईची तयारी करणें. 'आमचे दोघेहि वीर आपापल्या अस्तन्या वर सारण्याच्या विचारांत होते.' –स्वप ६१. **अस्तनींतील अग्नि–आग–निखारा**–पुस्त्रीपु. गुप्त शत्रु; घरचा दावेदार, वैरी; गृहकलह करणारा; विश्वासघातकी; घरभेद्या; दगलबाज. **०नर**–पु. (शिवणकाम) बाहीची वरची बाजू (दर्शनी बाजू). **०मादी**–स्त्री. (शिवणकाम) बाहीचा आंतला भाग. [फा. आस्तीन्]

अस्तबाल—पु. तबेला; पागा. 'पीलखाना व अस्तबालास व उष्टांस दाणा नाहीं; फाके गुजरतात.' –रा १.५.४. [अर. इस्तबल; तुल० लॅ. स्टॅबुल्म=उभे राहणें; जुनें फ्रें. इस्टेबल; इं. स्टेबल; सं. स्था]

अस्तम—पु (गो.) अस्तमान. 'अस्तम जॉचो वेळ आयलो' [सं. अस्त]

अस्तमन–मान—न. १ (नाविक). गलबताच्या तळास मध्यभागीं चार–सहा बांकांवर एक–दोन हात रुंदीचें व वीत दोन वीत जाडीचें लांकूड बसवितात. त्याला वरच्या अंगास काठी उभी केलेली असते. यांत डोलकाठीचा बुंधा बसवितात. हीं अस्तमनें दोन–तीन असतात. २(हेट.) अस्तमन असलेला तळमजला (गलबताचा). [सं. आ+स्तंभन]

अस्तमय, अस्तमान—पु.न. मावळणें; अस्त; अस्ताची वेळ (ग्रह–तारका यांची) 'कां अस्तमानीं निशी'–ज्ञा २.३२४. [सं.]

अस्तमान, अस्तमित—वि. अस्तंगत, मावळलेला, अस्तास गेलेला (ग्रह, तारा) [स.]

अस्तर—न. १ अंगांत घालण्याच्या कपडयाला आंतून लाविलेलें पातळ (मऊ) कापड; (सामा.) कोणत्याहि वस्त्राला आंतल्या अंगास लावतात तें कापड. २ जोडयास आंतील बाजूस जोडलेले मऊ कातडें. ३ (वैपक) आवरणत्वचा. आंतरत्वचा. (इं.) मेंब्रेन 'तोंडापासून सर्व नळीस आंतल्या बाजूस एक तांबडया रंगाचें फार पातळ व नाजूक असें अस्तर आहे.'–आरोशा १.६. [फा. आस्तर्; सं. आस्तृ–आ+स्तरण] **०गिरी**–स्त्री. गिलाव्याचें काम, चुन्याचें लिपण. 'शिखरास अस्तरगिरी होत आहे.' –रा १०.५. [फा आस्तर्+गिरी प्रत्यय]

अस्तरि—स्त्री. बायको, अस्तुरी पहा. 'बोलाविलें अस्तरीला।' –एपो ११६. [सं. स्त्री]

अस्तलग्न—न १ क्रांतिवृत्ताचा पश्चिमक्षितिजावरील भागबिंदु. याच्या उलट अंगलग्न. २ मावळता राशि. [अस्त+लग्न]

अस्तवणें—१ अंतर्धान पावणें; अदृश्य होणें; लोप होणें निकाल, खलास होणें. २ अस्तास जाणें; मावळणें. 'आवो दुसर झळक येइल। तरि जीवनकळा अस्तवेल।' –शिशु ८३०. [सं अस्त]

अस्ताई—स्त्री. (संगीत) ध्रुपदाच्या तीन भागांपैकीं पहिला दुसरे दोन–अंत्रा व आभोग. [सं. आ+स्था]

अस्ताचल—पु. पश्चिमेकडील पर्वत (सूर्यास्ताची जागा) पश्चिम दिशा. 'तों अस्ताचला गेला गभस्ती।' [सं.]

अस्तायी—अस्ताई पहा.

अस्तावा—(विप्र.) तस्त पहा. [फा. आफ्ताबा=झारी]

अस्ताव्यस्त, अस्तवेस्त—वि. अव्यवस्थित; घोंटाळ्याचा; घालमेलीचा; वेशिस्त. ' आतां जापार्णी जापार्णी आपुलें । अस्ताव्यस्त हें । '–ज्ञा ११.३८१. –क्रिवि. उलटापालट करून; अव्यवस्थित रीतीनें. [अस्त+वि+अस्त]

अस्ति—१ आहे. ' स्वामी बोलिलें मुख्य भक्ती । इतर जे राधलें सांगती । त्यांसि प्राप्तीची अस्तिनास्ति । देवें मजप्रती सांगावी । ' –एभा १४.३४. २ असण्याचा भाव. [सं. अस्; तृ. पु. एकवचन]

अस्तित्व—न. १ असण्याचा धर्म–भाव–स्थिति. २ असणें ३ राहणें; वास्तव्य. [सं.]

अस्तिनास्ति—न. काय आहे, काय नाहीं तें. ' म्हणे घरांत अस्तिनास्ति, सर्व ठाऊकें असे । ' –कचेसुच ४ –क्रिवि. १ होय किंवा नाहीं; संमतीनें अगर नकारानें. (क्रि० म्हणणें). २ कांकूं करून; नानू करून. (क्रि० करणें).

अस्ती–ति—स्त्री. हाड; अस्थि. ' अस्तिसांदे दु.खती जाण । या नांव आध्यात्मिक । ' –दा ३.६.२४. [सं. अस्थि अप.]

अस्तु—अ. १ असो; तर्में असूं दे; बरें; कांही एक गोष्टीचा विस्तार न करतां अंगीकार करून दुसरी गोष्ट बोलायासाठीं किंवा एखादीचा जेव्हां उपसंहार कर्तव्य आहे तेव्हां या शब्दाचा उपयोग करतात. २ तथास्तु. ' मजकडे दोष नसतां तूं मला लबाड म्हणतोस, अस्तु, थोर आहेस ! ' [सं.]

अस्तुरी—स्त्री. (कुण.) लग्नाची बायको; स्त्री. ' डोळाभर नाहीं पाहिलें अस्तुरीला । ' –ऐपो १५९. [सं. स्त्री]

अस्तेकरी—वि. १ ज्याच्या जवळ द्रव्य–मालमत्ता आहे असा; गब्बर; जवळ डबोलें असलेला. २ लौकिकवान्; अब्रूदार. जिम्मेदार; जबाबदार. [असणें+करी]

अस्तेनस्ते—वि. अप्रस्तुत; अप्रासंगिक; ज्याची गरज नाहीं असें; उकरून काढलेलें; नसता पहा. [असणें+नसणें]

अस्तेय—न. चोरी न करणें; चौर्यकर्मापासून परावृत्ति; चोरी न करण्याचा धर्म. [सं.]

अस्त्युत्तर—न. १ कोणत्याहि गोष्टीवर प्रत्युत्तर; हजरजबाब (वाईट अर्थी).'अस्त्युत्तर भानुचोद'=एक शिवी. २ एखाद्या गोष्टीच्या सत्यत्वाबद्दल अमान्यता दर्शविणें; ज्या योगानें लोकांचे उपकार–देणग्या कस्पटासमान भासतात, ज्या योगें आपल्यावर अन्याय होतो, मान मिळत नाहीं, बुद्धि आहे त्यापेक्षां लोक कमी लेखतात असें वाटावयास लागणारा मनाचा कमकुवतपणा–असंतुष्टता–कृतघ्नता–यासंबंधानें प्रयोग करतात. –वि. कृतघ्न. [सं. अस्ति+उत्तर]

अस्त्र—न. १ फेंकण्याचें शस्त्र. २ अभिमंत्रित शस्त्र किंवा मंत्र. सामाशब्द–अग्न्यस्त्र; वारुणास्त्र; मेघास्त्र; नारायणास्त्र इ०. [सं.]

अस्त्रशस्त्र—न. १ शस्त्रास्त्रें. २ सामानसुमान; मालमत्ता; चीजवस्त. **०विद्या**–स्त्री. शस्त्रास्त्रांचें ज्ञान. ' अस्त्रशस्त्रविद्याप्रवीण । जाहले राम आणि लक्ष्मण । ' [सं. अस्त्र+शस्त्र]

अस्त्री—स्त्री. स्त्री (अप.). ' भंवती अस्त्रीयांची रापणे ' –उषा २४.२१. ' चांगयान घोड्यानें रूप अस्त्रीचें घेतलें । ' –ऐपो ६८.

अस्था—आस्था पहा.

अस्थान—न. (ठाणें) वृत्ति; पूजा इत्यादिकांसंबंधीं हक्क, तद्रूप वृत्ति. –पोर्तु. दस्त २९.११ १६५६. [सं. अर्चा+स्थान]

अस्थायी—वि. अनित्य; क्षणिक; लवकर नाहींसें होणारें; वितळणारें; अदृश्य होणारें. [सं.]

अस्थि—स्त्री हाड. **०गत**–वि. हाडांत गेलेला; मुरलेला (ज्वर). ' आंतली मज्जा कांहीं । अस्थिगत । '–ज्ञा ६.२१८. **०गतप्राण**–वि. मरणाच्या द्वारीं पडलेला. **०त्वचा**–स्त्री. हाडें आणि कातडें (रोड, अशक्त माणसाबद्दल). ' त्याच्या अगदीं अस्थित्वचा उरल्या आहेत. ' **०पंजर**–पु. हाडांचा सांपळा. ' तिचा केवळ अस्थिपंजर राहिला होता. ' –पॉव्ह २३. **०भंग–भेद**–पु हाडाचा भंग; हाड मोडणें. **०माला**–स्त्री. हाडांचा सांपळा. **०मेद**–पु. हाडांतला मेद; चरबी. (इं.) बोनमॅरो. **०व्रण**–पु. हाडाव्रण; हाडास क्षत किंवा जखम होणें. **०शोष**–पु हाडें वाळणें–क्षीण होणें. **०संचय**–पु. प्रेतदहन झाल्यानंतर त्याच्या अस्थी विशिष्ट संस्कारासाठीं राखून ठेवण्याकरितां गोळा करणें; राख सांवडणें. **०संधि–सांधा**–पु. १ हाडांचा सांधा–जोड–दुवा. २ हाडें जोडण्याची क्रिया. **०समर्पण**–न. मृत मनुष्याच्या अस्थी तीर्थांत टाकणें. **०सिंचन**–न. (मृत मनुष्याच्या) तिसऱ्या दिवशीं राख टाकण्याकरितां मृताच्या अस्थींवर जलसिंचन करण्याचा विधि. [सं. अस् अगर अ+स्था; तुल० लॅ. ऑस; ऑसिस; ग्री. ऑस्टिऑन; स्या. कोस्ति; झें. अस्त; फा. अस्ताह्, उस्तुखवान्]

अस्थित—वि. अस्तित्वांत–हयात नसलेली; लुप्त; अनुपलब्ध; धुळीस मिळालेली; नाहींशी झालेली. [सं.]

अस्थिति—स्त्री. १ अनास्तित्व; अनुपलभ्यता; लुप्तता; अदृश्यता. २ टिकाऊपणाचा, निभावणीचा अभाव; कायमपणा नसणें; सतत, अखंड न चालणें. [सं.]

अस्थिर—वि. १ स्थिर नव्हे तो; अनित्य; क्षणिक. २ एका जागीं न टिकणारा; डळमळित. ३ चंचल; उतावळा. **०तेलें**–न.अव. उडून जाणारीं, न टिकणारीं, वायुपरिणामी तेलें. (इं.) व्होलटाईल. **०प्राय**–वि. १ न राहणारा; न टिकणारा; अशाश्वत. २ सहनशीलपणा नसलेला; उतावळा. [सं.]

अस्थैर्य—न. चंचलवृत्ति; उतावळेपणा; अस्थिरता; अशाश्वतता; अनित्यता. [सं.]

अस्नात—वि.,(अप.) अस्नाती. १ अंग न धुतलेला; स्नान न केलेला. २ (ल.) अशुद्ध; अमंगळ. [सं.]

अस्प—पु. घोडा; अश्व पहा. [फा. सं. अश्व] **०स्वार**–घोडेस्वार. –रा २०.१६२.

अस्पर्लुंग—पु. घोड्याचा एक प्रकार; याचें सर्व शरीर पांढरें, गुडघ्यावर काळा रंग किंवा शरीराचा अर्धा भाग काळा, डोळे हरणासारखे काळे, पाठीवर सैली दूमपर्यंत, कानाचीं टोकें काळीं असलेला हा घोडा शुभलक्षणी व धन्यास संतोष देणारा असतो. –अश्व ३१.

अस्पताल—न. (ना.) इस्पितळ; रुग्णालय; रोग्यास औषधें देण्याची जागा. [इं. हॉस्पिटल; म. इस्पितळ.]

अस्पर्श—वि. स्पर्श करण्यास, शिवण्यास अयोग्य; घाणेरडा; अशुद्ध; अपवित्र. २ सुतकी. ३ रजस्वला. [सं.]

अस्पष्ट—वि. उघड न केलेलें–बोलेलें–सांगितलेलें; अंधुक; गूढ; अव्यक्त; पुसट, अस्फुट; दुर्बोध. [सं.]

अस्पृश्य—वि. १ स्पर्श करण्यास अयोग्य, अशक्य; अस्पर्श पहा. –पु. हिंदु समाजांत असा एक वर्ग आहे कीं ज्यास शिवलें असतां विटाळ मानतात उ० महार, चांभार, ढोर, मांग, होलार, हलालखोर, मांगगारोडी इ०. [सं. अ+स्पृश्य]

अस्पृश्यता—स्त्री. विटाळ मानला जातो ती स्थिति; अस्पृश्य जातींचा विटाळ मानणें; महार, मांग इ० अस्पृश्य जातींशीं संबंध न ठेवणें. ' अस्पृश्यता ही वैदिक धर्मास संमत नाहीं ' –टिसु १३. **०निवारण**–न. अस्पृश्य जातींचा विटाळ काढून टाकणें; त्यांस अस्पृश्य मानण्याची कल्पना नाहींशी करणें. ' अस्पृश्यतानिवारण हें राष्ट्राचें पहिलें बीजतत्त्व ' –के १६.४.३०.

अस्पृश्योद्धार—पु. अस्पृश्य लोकांची उन्नति; अस्पृश्यता निवारण. [सं. अस्पृश्य+उद्धार]

अस्फुटोच्चार—पु. अव्यक्त–अस्पष्ट उच्चार; अशुद्ध वाणी; दुर्बोध भाषण; अडखळत बोलणें. [सं. अ+स्फुट+उच्चार]

अस्फुर—वि. अस्फुट; अस्पष्ट (वाणी). ' तैसेयाचेया **अस्फुरा** । वेगी धांवे सारंगधरा । ' –उषा १७४४. [सं. अस्फुट]

अस्फूर्ति—स्त्री. १ स्फूर्तीचा अभाव. २ विस्मरण; विस्मृति; व्यामोह. ३ लक्षांत न राहणें; मनांत–ध्यानांत न येणें. [सं.]

अस्बाब—न. सामान; असबाब पहा. ' बायकापोरें आणि अस्बाब कोठें ठेवावा. ' –रा ७.१५३. ' जो आम्हापाशीं **अस्बाब** आहे तो हस्रतचे कृपेचा **आहे**, हा घेऊन फौजेचे खर्चीत आणावा ' –दिमरा १.२१२. [अर. सबबचें अव.]

अस्मत्—सना. आम्ही. सामाशब्द–अस्मद्गृह; अस्मत्पत्नी; अस्मत्कुल इ० [सं.]

अस्मतपन्हा, अस्मतपना—वि. पावित्र्यरक्षक; पातिव्रत्यशील; सन्मान्य; कुलीन; पत्रांतून स्त्रियांना लिहावयाचा मायना. (सामा.) शुद्ध; पवित्र. [अर.इस्मत्=पातिव्रत्य, शुद्धता+पनाह्=रक्षक]

अस्मदीय—सना.वि. आमचा; माझें; मम. [सं.]

अस्मद्वाच्य—पु. (व्याक.) प्रथम पुरुष; मी वाचक. [सं.]

अस्मसास—असमसहास पहा. ' गदायुद्ध अस्मसास । ऐसें प्रवर्तला । ' –गीता १.३५४.

अस्माकं—सना. आम्ही; आमचे (विनोदानें प्रयोग). ' अरे अस्माकंवरी कर्म प्रगटे । ' –दावि २६.

अस्मादिक—सना. आम्ही; खुद्द; आम्ही स्वतः (आपला विशेषपणा वर्णन करावयाचा असतां आम्ही या ठिकाणीं उपयोग, शिवाय बढाई, विनोद यावेळीं). ' तुमच्या अलीकडच्या नाटकांतील अद्भुतप्रसंग वस्तुस्थितीस अनुसरून नसल्यामुळें ते अस्मादिकांना पसंत नाहींत. ' –नपुक ८९. ' येथें अस्मादिक होते म्हणूनच या कामाचा उलगडा झाला. ' [सं. अस्मत्+आदि+क]

अस्मान—न. आकाश; अंतराळ; स्वर्ग. ' अस्मानीं फत्तेची ध्वजा लागली. ' –चित्रगुप्त ३३. ' अस्मानहि बुडालें तरी (मराठे) आपल्या मर्दानगीस अंतर करणार नाहींत. ' –मरि ३. ७१. **०गिरी**–पु. चांदवा; छत; चांदणी; मांडवाचें आच्छादन; मांडव; छप्पर; वळचण. **०चपेटा**–पु. १ परमेश्वरी कोप; मोठा प्रलय; संकट; दैवी आपत्ति; अरिष्ट. २ (व्याजोक्ति) आकाशांत उड्डाण करणारा घोडा (एखाद्या रद्दी, टाकाऊ, निकामी घोडयास म्हणतात). **–ची परी**–स्त्री.अप्सरा; सुंदर स्त्री. 'तबियतखानाचें सर्व लक्ष्य हातीं लागलेल्या अस्मानच्या परीकडे होतें. ' –स्वप ४२९. **०तारा**–पु. १ आकाशांत चमकणारा तारा; चांदणी. २ धूमकेतु; उल्का. (कि० तुटणें). ३ सुंदर, चपळ घोड्याबद्दल अगर खंद्या घोडेस्वाराविषयीं, तसेंच उत्तम गवई, उत्तम लेखक, उत्तम बजवय्या इत्यादिकांची प्रसंशा करतेसमयीं म्हणतात. **अस्मान तारा तुटणें**–१ उल्कापात होणें; तारे निखळून पडणें. २ निरर्थक बडबड करणें. **अस्मान जमीनीची तफावत**–स्त्री. महदंतर; फार मोठें अंतर. ' त्या सुमारास व या लिहिण्यास पाहतां अस्मान–जमीनीची तफावत. ' –ख १२१५. **अस्मान ठेंगणें होणें**–स्वर्गे दोन बोटें उरणें; ताठ्याचा–गर्वाचा कळस होणें. ' नवऱ्याच्या पगारामुळें तर तिला अगदीं अस्मान ठेंगणें झालें होतें. ' –पकोघे [फा. आस्मान्= आकाश]

अस्मानी—स्त्री. ईश्वरी कोपामुळें आलेलें संकट (अतिवृष्टि, सांथ वगैरे). –वि. १ आकाशी; फिकट जांभळा; आकाशाच्या रंगासारखा निळा; निळसर; मेघवर्ण. २ आकाशांतील; स्वर्गांतील; दैवी. ' शिकंदर ताले ! **अस्मानी** फत्ते (दिग्विजय) होत चालली आहे. '–ख ७.३२३६. **०रंग**–पु. आकाशी रंग; निळा रंग. **०सुलतानी**–स्त्री. १ दैवी व राजकीय आपत्ति; ईश्वरी व मानवी क्रांति; ईश्वराचा व राजाचा कोप झाल्यामुळें ओढवणारीं संकटें. २ (ल.) जुलूम जबरदस्ती. ' जेथें अस्मानी सुलतानी एकदम कोसळतात तेथें बिचारा

माणूस काय करणार ?' 'अस्मानी सुल्तानी मजरा असावी' –सासंह–झुले ९२. आकस्मिक हानी; दैवी आपत्तीमुळें नुकसान. 'आमच्याकडे विछायतांकडून विक्रीस आलेल्या मालाची अस्मानी-सुल्तानी झाल्यास त्याची जबाबदारी आमच्याकडे नाहीं.' –मुंव्या ७१. [फा. आस्मान्+सुल्तान=बादशाहा]

अस्मार्त—वि. १ आठवणीच्या पलीकडचें, स्मृतीस अगम्य; अतिप्राचीन. २ स्मृतिविरुद्ध; अशास्त्र; धर्मशास्त्रास सोडून; धर्मशास्त्रविरुद्ध; धर्मशास्त्रबाह्य; बेकायदेशीर; बेकायदा. ३ अस्मार्त-कालिक पहा. ०काल–पु. आठवणीच्या पलीकडचा–अतिप्राचीन काल; (कायदा) शंभर वर्षांपूर्वीचा काल. ०कालिक–वि. (कायदा) शंभर वर्षांपूर्वीपासून उपभोग घेतलेली (जिनगी, मालमत्ता). [सं. अ+स्मृ–स्मार्त]

अस्राप—अश्राप पहा.

अस्लूब—पु. रीति; पद्धति; व्यवस्था. 'तेव्हां करारीं कोणे प्रकारच्या व कशा, याचा अस्लूब काय तन्हेचा ?' –रा ७.८२. [अर. अस्लूब्, उस्लूब्=रीत, पद्धति]

अस्वडीं—क्रिवि. (गो.) मागें; परोक्ष; सवड नसतां; अयोग्य-वेळीं. [अ+सवड]

अस्वत्व—न. मालकीचा, धनीपणाचा, स्वामित्वाचा अभाव. (कायदा) जिनगी, मालमत्ता वगैरेवरील वारसाचा, मालकीचा अभाव; बेवारसा. [सं. अ+स्व+त्व]

अस्वपात—पु. आंसवें ढाळणें; अश्रुपात. 'अस्वपात पडती नयनी.' –उषा ४८.४८. [अश्रुपात; अश्रु=असु+पात]

अस्वयंवेद्य—वि. स्वतःस न कळणारा; अज्ञेय. 'अस्वयंवेद्य म्हणजे आपल्या स्वतःस न कळणारा अहंकार' –गीर १७१. [सं.]

अस्वरस—पु. नापसंति; इतराजी; नावड; मनाची किंवा प्रीतीची अनासक्ति; अनिष्ठा. [सं. अ+स्वारस्य]

अस्वल—पु. १ एक पुष्कळ केंस असणारा चतुष्पाद प्राणी; रीस. हा ऑस्ट्रेलियाखेरीज सर्व देशांत सांपडतो. २ मोठाले केंस असलेला मुरवंट. [सं. ऋक्षभल्ल–अच्छभल्ल–अस्विल–अस्वल. (राजवाडे) ऋक्ष+ल (स्वार्थी)] म्ह० १ अस्वला आधीं आरोळी=दुसऱ्यानें आपणांसंबंधीं तक्रार करण्यापूर्वी आपणच त्याबद्दल तक्रार सुरू करणें. २ अस्वलाच्या अंगास (गांडीस) केंसांचा (शेटांचा) दुष्काळ, किंवा अस्वलाच्या रानांत केसांचा दुष्काळ=एखादी गोष्ट हटकून ज्या ठिकाणीं असेल अशी अपेक्षा असते त्या ठिकाणीं तिचा अभाव. वाप्र. म्ह० अस्वलीचा कान दरवेशाचा हातांत=प्रत्येकाला योग्य नियंता असतो.

अस्वली—स्त्री. एक वनस्पति. असावरी; शतावरी ?

अस्वलीकांठ—(प्र.) असावरी–ली कांठ. अस्वली वनस्पतीच्या पानासारखी नक्षी असलेले कांठ.

अस्वली पायपुसणें—न. पायाची माती–चिखल पुसण्याकरितां दरवाजावळ ठेवलेलें काथ्यांचें अस्वलीच्या केसासारखें केसाळ खरखरीत तरट.

अस्वस्थ—वि. अस्थिर; अशांत; स्वस्थपणा नसलेला; मन स्थिर नसलेला; प्रकृतीस समाधान नसलेला. [सं. अ+स्वस्थ]

अस्वस्थता—स्त्री. १ असमाधान, असंतोष. २ राजकीय असंतोषामुळें उद्भवणारी चळवळ. (इं.) अनरेस्ट. '(धीरनपाल) यांनीं केलेलें अस्वस्थतेचें निदान शास्त्रदृष्ट्या फारच चुकीचें...आहे.' –टि २.१६. ३ प्रकृतीस स्वास्थ्य, आराम नसणें; दुखणाईतपणा. [सं.]

अस्वाधीन—वि. (शब्दश. पराधीन पण प्रचारांत) स्वतंत्र; दुसऱ्यावर अवलंबून नसलेला. [सं. अ+स्व+आधीन]

अस्वामि–अस्वामिक—वि. ज्याला राजा–धनी–पुढारी–अधिपति–पालक–मालक–वारसदार नाहीं असा; बेवारसी. ०विक्रय–पु (कायदा) मालकी हक्क किंवा अधिकार असल्याशिवाय केलेली मालाची, जिंदगीची, मालमत्तेची विक्री, बेकायदेशीर केलेली विक्री. [सं. अ+स्वामिक]

अस्वाम्य—न. (कायदा) जिंदगीवर कायदेशीर हक्काचा अभाव; स्वामित्व नसणें. [सं.]

अस्वार—वि. घोडा, हत्ति, उंट इत्यादिकांवर आरूढ झालेला, वर बसलेला. –पु स्वार; शिलेदार; राऊत. [फा. सवार्]

अस्वारस्य—न. नापसंति; अरुचि; नावड; स्वारस्य, लोभ, प्रीति नसणें. [सं.]

अस्वास्थ्य—न. १ स्वास्थ्याचा अभाव; असमाधान; असंतोष; असुख. २ शारीरिक व्याधि किंवा विकृति; प्रकृति बरी नसणें. ३ निर्धनता; दारिद्र्य. [सं.]

अस्सँ—उद्गा. (कुण.) अस्सां; खरें कीं काय ?; खरं ?. [असें तुल० सं. अंजस–अँसा–अस्सें (राजवाडे) –भाअ १८३२. ईहशम्]

अस्सल—वि. मूळचें; खरें; अकृत्रिम; गैरनकली; असल पहा. [अर. अस्ल्]

अस्सा—वि. (गो.) १ चिकार; गच्च. २ अस्सा; अस्सँ पहा.

अह—पु. दिवस. [सं. अहन्, अहस्]

अहं—सना. १ मी; स्वतः; प्रथम पुरुष. 'तो अहं म्हणून बसला आहें.' 'अहं कोहं सोहं भेद.' –एभा २२.४६७. 'तेथें अविद्येसी अहं लीन राहे. यालागीं होय भवभ्रमु.' –एभा ३.७३३. २ मीपणा; गर्व; ताठा; अहंकार. [सं.]

अँहँ—उद्गा. नापसंति, असंमति, नकारदर्शक उद्गार.

अहंकर्ता—पु मी सर्व करणारा असा गर्व; मीपणा; अहंकार; ताठा; स्वत.च्या कृत्याबद्दल प्रौढी. 'अहंकर्ता भाव गाळून । मन निमग्न रघुनाथीं ।' [सं. अहं+कर्ता]

अहंकाम—पु. हुकूम; सत्ता; हुकमत; परवानगी. 'याप्रमाणें मुख्तारीचे अहंकाम आणून दिले.' –चिरा २४. [अ. अहकाम् हुकम अव.]

अहंकार—पु. १ आपली, स्वतःची जाणीव; आत्मज्ञान. २ अभिमान; गर्व, मीपणा; ताठा. ३ परमात्म्यापासून किंवा बाह्य विश्वापासून आपण वेगळे आहों अशी भावना. 'बुद्धीपासून पुढें उत्पन्न होणाऱ्या पृथक्‌पणाच्या या गुणासच अहंकार असें म्हणतात.' –गीर १७१. ०भेद–पु. अहंकाराचे तीन प्रकार–सात्विक, राजस आणि तामस; यासच अहंकारत्रय किंवा त्रिविध अहंकार म्हणतात. [सं.]

अहंकारणें—अक्रि. गर्वानें फुगणें; ताठणें.' अहंकारला रावण। कोटी गुणें।' –राक १.१४.

अहंकाराशय—पु. अहंकाराचें.(किंवा आत्म्याचें) स्थान; शरीर. [सं.]

अहंकारारूपद—वि. ज्याबद्दल अहंकार वाटावयाचा तो (देह आत्मा). [सं.]

अहंकारी—वि. अहंकार असलेला; गर्विष्ठ; ताठर. [सं]

अहंकृति–भाव—स्त्री.पु. अहंकार; गर्विष्ठपणा; ताठा; स्वतःची प्रौढी. 'तूं श्रमलेपणें अहंकृति। यांसि घातु न धरिसी चित्तीं।' –ज्ञा २.९८. 'ऐसेनि अहंकृतिभावो। जयाचा बोधीं जाहाला वावो' –ज्ञा १८ ४२२. [सं. अहम्+कृ]

अहंग—पु (संगीत) एक राग. राग पहा

अहंचत्वंच—स्त्री. अरेतुंर, मी तूं करणें; बाचाबाची. [सं. अहं+च+त्वं+च]

अहटणें—अहाटणें पहा

अहडणी—स्त्री. (कांसारी धंदा) नवीन घडविलेल्या भांड्यावरील ठोके साफ, गुळगुळीत करण्याचें–मठारण्याचें हत्यार.

अहंता—स्त्री. १ अहंकार, मीपणा; अभिमान; गर्व. 'थोर ते गळाली पाहिजे अहंता। उपदेश घेतां सुख वाटे।'–तुगा ३६३६. 'हळु हळु अहो अहंता सहमर्नी वाढ्लीं जशी शेंडी।' –मोरोपंत 'पतनाथे का अहंता पोषावी गा तरीच का ममता।' –मोवन २. ८७. २ स्वाभिमान (अभिमान शब्दाखाली दिलेले वाक्प्रचार आणि म्हणी येथेंहि लावतात) [सं.]

अहद् तहद्—क्रिवि १ या टोंकापासून त्या टोंकापर्यंत; या हद्दीपासून त्या हद्दीपर्यंत. 'हा गांव अहद तहद दोन कोस लांब आहे.' २ पासून–पर्यंत. 'अहद सयमिरी तहद चेंजी चेंजावर.' –चित्रगुप्त १६१. 'अहद् पुणें तहद् काशी सारखा पाऊस पडला.' 'अहद् दर्या तहद् सूर्य' अहत तहत असाहि शब्द लिहितात. [फा. अझ्–हद+ता- हद]

अहदनामा—पु. वचनपत्र; करारनामा. [अर. अहद्=वचन, करार+फा–नामा]

अहद्–पैमान—पु. करार; करारमदार. 'अहद–पैमान व्हावे ते सर्व स्वामीपाशीं आल्यावर अर्ज करितों.' –रा १.१५९. [अर. अहद्+फा. पैमान=करार]

अहद्–शर्त—स्त्री. तह; करार; अट. 'यांस अहदशर्तीचे कागदपत्र देऊन रवाना केले.' –रा १९.८. [अर. अहद=करार+फा. शर्त=अट]

अहंदेहबुद्धि—स्त्री. १ स्वत.च्या अस्तित्वाची कल्पना, जाणीव, भावना (त्यावरून). २ (तत्त्व.) मीपणा; अहंकार; पोकळ गर्व; ताठा; आढ्यता. 'दुर्धर अहंकार दशानन। अहंदेहबुद्धि लंकाभुवन।'; 'जैसी अहंदेहबुद्धि सांडोन । योगी विचरे निरंजनीं।'. –वि. ज्याला आढ्यता, मीपणा आहे असा; अहंदेही. [स.]

अहंदेही—वि. ज्याला आढ्यता, मीपणा आहे असा; अहंदेहबुद्धि. [सं.]

अहंपण–णा—नपु. अहंता पहा. 'उगाढूनि अहंपण। सोऽहं काढिलें शुद्ध चंदन।' –एरुस्व १.६२. [सं. अहं+पण]

अहंपदार्थ—पु (तत्त्व.) अहंपणाची मांडणी; मीपणाचें निश्चयात्मक कथन; आपल्या स्वतंत्रपणाची भावना अहंता पहा [सं.]

अहंपूर्विका—स्त्री. १ प्रत्येक कार्यांत मी पुढें आहे अशी भावना ठेवून वागणें; आपलें घोडें पुढें दकलणें. २ लढाईत योद्धयांचें एकमेकांना अहंतापूर्वक आह्वान; हा मी पुढें झालों असें ईर्षेनें सांगणें. अहमहमिका (युद्धांत). [सं. अहं+पूर्व]

अहफाद—मुलीची संतति; अफलाद पहा. 'ब–औलाद व अहफाद चालविजे' –रा २०.१४१. १५.३६४. [अर. हफद=कन्या; हाफिद=जांवई, कन्यावंश, अव.]

अहंबळ—न अभिमान; अहंकार. 'उरकीं रिघाले जे समेळ। तें स्वभावें करी निर्मेळ । परी न धरी अहंबळ । जे म्या हेमळ क्षालिले।' –एभा ७.४६२. [सं. अहं+बल]

अहंबुद्धि—स्त्री. अहंता; अभिमान; आपलेपणाची जाणीव. [सं. अहम्+बुद्धि]

अहंब्रह्मास्मि—(मी ब्रह्म आहे हा मूळ अर्थ, यावरून ल.) मी कार्य तो श्रेष्ठ; सर्वांत मी मोठा असा अभिमान. 'अहं ब्रह्मास्मि ब्रह्माहमस्मि। येथींचा अर्थ ब्रह्मचि मी।' –विउ ७.७८, –दा ५. ६.४४.

अहंभाव, अहंमति, अहंमान—पुस्त्रीपु. अहंकार पहा. १ अहंपणा; मानीपणा; मीपणा; दर्प; ताठा; गर्व. 'अहंभाव ज्या मानसींचा विरेना' –राम १५९. –तुगा ७१. 'न पुसतांचि व्यर्थ श्रमति । अहंमति भुलोनिया ।' 'परी देहाहंमान भुली ।' –ज्ञा १८. ३८१. २ (चुकीनें उपयोग) भाव; अभाव; कल्पना; तर्क; अनुमान; अटकळ.

अहंममता—स्त्री. १ मी व माझें अशी कल्पना, अहंभाव; अहंकार पहा. २ स्वतःघद्दल, स्वतःच्या माणसाबद्दल, गोष्टीबद्दल, ममता–लोभ. 'अहंममतेनें जग बुडालें' 'तैसी अहंममता किरीटी । तुरेचि तया ।' –ज्ञा १८.४०८. [सं. अहं+मम+ता]

अहंमहमिका—स्त्री. (मूळ अर्थ मी पुढें, मी समर्थ असें म्हणें). स्पर्धा; चढाओढ; ईर्षा; अहंकार. 'यूरोपांतील राष्ट्रांमध्यें.. समुदायपलीकडे मुलूख मिळविण्याची अहंमहमिका सुरू झाली' –वस्व ३. [सं. अहम्+अहम्+इका]

अहंमानी—वि. अहंकारी; अभिमानी. [सं. अहंमान]

अहर्गण—पु. १ (ज्यो.) दिवसांचा समुदाय; इष्टकालिक ग्रहादींचें गणित वर्तविण्यासाठीं विवक्षित अवधीपासून गतदिवसांचा समुदाय. ज्योतिषशास्त्रामध्यें अहर्गणाचा उपयोग मध्यमग्रहसाधन करण्याकरतां होतो. अहर्गणावरून मध्यम ग्रहसाधन करावयाचें म्हणजे करणापासून गेलेल्या वर्षसंख्येस ३६५। यांनीं गुणून आलेला गुणाकार. यावरून व दिनगतीवरून मध्यमग्रहसाधन करतां येतें. २ यावरून पुष्कळ दिवसांचा काळ; बरेच दिवस. 'अहर्गणाचे अहर्गण लोटले' [सं. अहन्, अहस्+गण]

अहर्निश-शीं—क्रिवि. रात्रंदिवस. 'जे यत्नशील अहर्निशीं' –ज्ञा ४.१२३. [सं. अहस्+निशा]

अहर्बिंब—न. सूर्यबिंब; सूर्योदय; 'तेथें प्रातःकाळिं अहर्बिंब-समई सहपरिवारिं ।' –पंच ५.१०. [सं. अहस्+बिंब]

अहल—न. लोक. –पेभ. ५९. [अर. अहल्]

अहल्कार—पु. कारकून. 'साहेबानें फैज–बक्षीकरून लष्कर जाब पाठवावयाविशीं अहल्कारास आज्ञा सादर जाली पाहिजे ।' –पदभव ११२. [फा. अहल्+इ+कार]

अहल्या—स्त्री. १ गौतमस्त्री. पांच पतिव्रतांपैकीं एक. २ (ल.) पतिव्रता स्त्री.

अहल्याबाई—स्त्री. १ मल्हारराव होळकराची सून. ही मोठी साध्वी, सत्त्वशील व दानशूर होती. २ (ल.) दानशूर, सत्त्वशील स्त्री.

अहलुक—पु. भिक्षा मागतांना गोसावी लोक जो शब्द म्हणतात तो; अलख; अलख पहा. [सं. अलक्ष्य]

अहवाल—पु. कामाची केलेली नोंद–वृत्तांत–हकीकत. (इं.) रिपोर्ट–कैफियत. [अर. अहवाल्; हाल अव.]

अहसन—वि. उत्कृष्ट [अर. अहसन्]

अहह—उद्गा. अरेरे; शोकाचा–खेदाचा उद्गार. 'अहह दारुणतात तुझा पण !।' –सीस्व ५. 'मुनीच्या शापानें अहह सतिचा त्या प्रियपती ।' –विवि (१८७२) अंक १.पृ. २०. [ध्व. तुल० इं. अहा, आह्]

अहळण—अहाळण पहा. 'प्रपंचीं अहळण त्या सुटेना ।' दावि २३४.

अहळणें—अहाळणें पहा. 'तेवि अहाळली कोमलांगी ।' –दावि २६३.

अहळबहळ—आहाळबहाळ पहा.

अहळी—स्त्री. अग्नीची ज्वाळा; आग; तेज; उष्ण वारा; झळ; (सामा). अनेकवचनी प्रयोग. **अहळींत असणें**–भिऊन चालणें–वागणें; धाकांत चालणें; अहाळणी. [म. आहार=विस्तव; का. होळकु–पु=तेज]

अहळींव—न. एक वनस्पतीचें पौष्टिक बीं. यांचीं झाडें बागाईत जमीनींत होतात. रंग तांबूस, बीं बारीक. हें त्वचादोष, वायु व गुल्म यांचा नाश करणारें आहे. अहळींवाचे लाडू पौष्टिक असल्याकारणानें बाळंतिणीस देतात. [फा. हालम. हिं.बं. हालिम, हालों; सं. अहालिब]

अहा, अहाहा—उद्गा. आनंद, आश्चर्य, शोक, निंदा इत्यादींचा वाचक उद्गार. 'नृपति बहु विलाप करी सूतासि म्हणे, अहा ! कसें घडलें ।' –मोकर्ण ६ ३. 'अहा निपट धृष्ट मी ।' –केका १६. 'अहाहा ! बारा येतांच बरें वाटलें.' [ध्व.]

अहाई—स्त्री. (विप्र.) अही पहा.

अहाःकार—पु. १ हाहाःकार; अहा, हाय असा शोक करणें; मोठ्यानें रडणें. २ आक्रंदन; आकोश, आकांत [सं. अहह+कृ]

अहाच—वि. आहाच पहा. १ वरवर; सरासरी, दिखाऊ. २ सत्याचा आभास असणारा; मिथ्या; मायिक, व्यर्थ; सामान्य; साधारण. 'नामरूपात्मक प्रपंच । मिथ्या मायिकत्वें अहाच ।' –एभा २८.५८३. 'देवा समुद्र गंभीर ऐकिजे । वरुतोहि अहाच देखिजे ।' ०**वहाच**–क्रिवि. वरवर; बाह्यात्कारी; उगीचच्याउगीच. 'माझा भाव नाहीं जिव्हारी । अहाचवाहाच भक्ति करी ।' –एभा १७.११८. [सं. असत्य, अ+साच, किंवा प्रा. अहा=यथा+च;दे. आहच्च=अतिशय, बेगुमार. अहाच द्वि.]

अहाटणें—उकि. १ (शिजलेली डाल वगैरे) पळी इत्यादिकांनीं घाटणें. २ (ल.) त्रास देणें; छळणें; पिच्छा पुरवणें. ३ (लाटणें; लोटणें; रगडणें यांशीं सदृश अर्थानें) एकत्र गणणें; आंत ढकलणें; एक करणें (अविचारानें व बेलाशक). 'राजा प्रधानास चोरामध्यें अहाटतो.' [सं. आ+घट्=घाटणें]

अहाटींव—वि. १ अहाटलेली–घाटलेली (डाळ). २ छळ केलेला; त्रास दिलेला.

अहाडून पहाडून—क्रिवि. आडून पाडून; घालून पाडून; टोंचून; टोमणा देऊन; वर्मी लागण्यासारखें औपरोधिकपणें; आहाडून पाहाडून पहा. [आडून+पाडून]

अहाणा—पु. १ उखाणा (लग्नांतील). २ कोडें. ३ म्हण; उक्ति. आहणा पहा. [सं. आहनस्या; प्रा. आहाण=उक्ति, वचन]

अहादी—पु. माणूस; एकांडा शिपाई. ' अहादीवर अहादी रवाना केले. ' –मराचि थोशा ६४. [अर. अहदी=एक]

अहाय अहाय—उद्गा. अरे अरे; हाय, हाय (क्रि० करणें). [ध्व. हाय]

अहार—आहार पहा.

अहार—पु. अजगर; आर [सं. अहि + आर]

अहार—पु. १ विस्तव; निखारा; फुंफाटा. २ इस्त्री करणें (क्रि० देणें). [म. आहार=विस्तव; का. होळकु–पु=तेज]

अहारणें—अक्रि. अति अन्न खाल्ल्यामुळें सुस्त पडणें; जेवण अंगावर येणें; सुस्ती येणें. [सं. आहार=जेवण]

अहारणें—अक्रि. १ निसटणें; बाहेर येणें; ओघळणें (रहाटाची माळ). २ खचणें, खालीं पडणें; आधार सुटणें (इमारत, खांब, जमीन). [सं. आ+हृ]

अहारोळी—स्त्री. निखाऱ्यावर भाजलेली पोळी, दामटी; आरोळी. [अहार=विस्तव+पोळी]

अहालक्कर—अहल्कार पहा.

अहाली मवाली—वि उच्चनीच, सर्व दर्जाचे (लोक). ' यावरी तमाम अहाली व मवाली पर्गणे मज्कूर व गिर्दनवाही जमीनदार हर कोणी लहान थोर सांगताती जे. ' –वाड सनदा १४०. [अर. अहल् = लोक]

अहाळणी—स्त्री. १ उष्ण वाऱ्यानीं भाजणें, पोळणें. २ धाप; दम; उसासा. ३ (ल.) उत्कंठा; लालसा; हांव; वासना (क्रि० देणें). [म. अहार; का. होळकु–पु=तेज] **अहाळणी, अहाळण्या कहाळण्या टाकणें, देणें**–द्वेष, राग इत्यादि मनोविकारांना वाव देणें. दुःखोद्गार, शोकोद्गार काढणें.

अहाळणें—अक्रि. १ सूर्याच्या, अग्नीच्या झळींनें भाजणें–पोळणें–होरपळणें. २ नाश पावणें. ' सेजार अहाळ अहाळलें दिव्य भोगांचें. ' –भाए ८९. ' कामानळें जीव महा अहाळे. ' –सारुह १.६. ३ अतिशय दुःखित होणें–पीडणें. ' अहाळिली अवनी क्षत्रियांची । ' –एभा ४.२४३. [म. अहार का. होळकु–पु=तेज प्रा. अहिऊल=जाळणें. का. हाळु=नाश]

अहाळबाहाळ—वि. फार; बहुत; अत्यंत. ' तो मी येथें अहाळबाहळीं कांपे । ' –ज्ञा ११.३५१. [सं. बहुल; का. बाहाळा. बाहाळ द्वि.]

अहाळींव—अहळींव पहा.

अहि—पु. सर्प. ' पाहुनि अजातरिपुची तादृक् गुरुचरणभक्ति, महिवरले । अहिवरलेखवरांहुनि बहु कठिनहि यवन वीर गहिवरले । ' –मोभीष्म १.११४. [सं.] **०नकुळ न्याय**–पु. साप आणि मुंगुस यांच्यामधील जन्मजात वैराप्रमाणें वैर. २ (ल.) जन्मद्वेष; हाडवैर.

अहित—न. १ तोटा; नुकसान; हानि; अपाय; अकल्याण. –पु. २ शत्रु; वैरी; द्वेष करणारा. ' करितां सारथि मस्तक–कोदंड–च्छेद पौरवें अहितें । ' –मोभीष्म –वि. १ अकल्याणकारक; नुकसानीचें. २ शत्रुत्वाचें; वैराचें. [सं.]

अहिनी—वि. लोखंडी. ' अहिनी, दगडी जिन्नस दारूचे अंतरीं ठेवावे । ' –मराआ ३५. [फा. आहनीन्]

अहिमही—पु.विना. १ हे दोन पाताळांतील राक्षस अत्यंत पराक्रमी व बलाढ्य होते. रामानें यांना ठार मारिलें. यावरून २ (ल) दोन जुळे वीर; जोडीचे पराक्रमी पुरुष. ' पण मराठेशाहीची मदार या दोघां अहीमहीवर आहे. ' –स्वप २१०.

अहिरण—ऐरण पहा. ' कीं अहिरणीं गुंततां हिरा । हिरकणी काढी तया सत्त्वरा । ' –नव १८.१३४. [सं. अयस्+हन् तुल० इं. आयर्न.]

अहिरण–णी—स्त्री. गुराखीण, गवळण. –वि. अहिराणी पहा [सं. आभीर–अहीर]

अहिरा, अहेरा—पु. १ डोळ्याचा एक रोग; बुबुळावर रक्ताप्रमाणें एक लाल ठिपका असतो तो. यास अर्जुन असेंहि म्हणतात. २ एक तांबडा कठिण दगड; डोळ्यांतील रोग बरा करण्यास हा अंगठींत बसवून डोळ्याच्या बुबुळावरून फिरवितात. याला अहिऱ्याचा खडा म्हणतात. अंगठींत बसविण्याकरितां तयार केलेल्या खड्यास अहिऱ्याचा मणी किंवा त्या अंगठीस अहिऱ्याची मुदि असें म्हणतात. [प्रा. अहरी=जात्याचा दगड]

अहिराणी—स्त्री. एक खानदेशांतील भाषा. ही मराठीची पोट भाषा म्हणून मानण्यांत येते. हिच्यावर गुजराथीचा बराच परिणाम झालेला दिसतो. [सं. आभीर–अहीर, एक राष्ट्र]

अहिरी—स्त्री. १ लग्न–मुंजींत बोहल्याभोंवतीं उतरंडी रचायाकरतां उपयोगांत आणतात तीं रंगीत मडकीं; वही म्ह० लोटा घडतां येईना आणि अहिरीचा इसार. ' सोन्याची अहिरी । मोत्यांचे कळसत्यावरी । रंगाचे परोपरी चारी । शोभा दिसतसे अहिरी । ' –स्त्रीगीत २२. ' बोलावा साळवी । अहिरी सांगावी । ' –स्त्रीगीत २२.

अहिरी—स्त्री. अहेर करण्यास योग्य वस्त्र. अहेराऊ पहा.

अहिर्णेसी, अहर्निशीं—क्रिवि. रात्रंदिवस; अहोरात्र. ' राम ध्यावा अहिर्णेसी । ' –वेसीस्व १.१४. [सं. अहर्निश अप.]

अहिवा—वि. अविधवा; सुवासिनी; सवाष्ण स्त्री. ' अहिवा नारी कुरवंडया करती । ' –बसा ३०. [सं. अविधवा] **०नवमी**–स्त्री. अविधवानवमी पहा.

अहिंसक, अहिंस्र—वि. हिंसा न करणारा; हत्या न करणारा; कोणास न मारणारा. 'मित भाषण शांत दांत। अंगीं अमानित्व अदंभित्व । अहिंसक अतिविरक्त । तोचि गुरु करावा।' [सं.]

अहिंसा—स्त्री. १ हिंसेचा अभाव; केवळ मांसाकरतां जीवाची हत्या न करणें. अशा कारणांकरतां मनुनें हिंसा त्याज्य ठरविली आहे (मनु ५.४३.). शाकाहारव्रत. २ कोणत्याहि प्राण्याला इजा, दुखापत न करणें; रक्तपात न करणें; हें जैनांचें आद्य तत्त्व आहे. [सं.] ०धर्म–पु. प्राणिहत्या न करण्याचा धर्म. 'अहिंसा परमो धर्मः'

अहिस्ता—पु. संघड्यायामामधील एक (हिंदी) हुकूम. 'जोश कदमनें जात असतां लांबवर अडथळा होईल असें कांहीं असेल तर त्यांतून सावकाश जातां यावें म्हणून हा हुकूम देतात; सावकाश चालावयाचें असेल तरीहि देतात.' –संज्ञा २२. (इं.) स्ट्रेप् शॉर्ट –ड्रिल [फा. आहिस्ता=सावकाश. (अप.) आस्ते]

अही—स्त्री. १ विस्तवाची–अग्नीची धग, आग. 'जठराग्नीची अही थोर।' –मुरंशु ४३३. २ उष्ण वारा; झळ; मृगजळ. (अव.) अह्या. [सं. अहि=सूर्य]

अहीमुखी—वि. ज्यांचें तोंड सापासारखें आहे असा (घोडा).

अहीर—पु. १ गवळी; गवळ्याची जात. 'शिरे विषयवासना जशि शुका अहीरास भी।' –केका ५४. 'त्यामाजि बोध वृषभानु अहीर थाची। निमूनि भक्ति दुहिता तिस फार याची'–मंराधा ५. २ आभिर–गवळी जात. ही खानदेशांत व निजामशाहींत आढळते. हें पूर्वी मोठें राष्ट्र असून यांतील निरनिराळे धंदे करणाऱ्या लोकांच्या जातींना पूर्वी हें राष्ट्रनाम लावलेलें आढळतें. जसें–अहीर सोनार, अहीर हलवाई. [सं. अहीर, आभीर]

अहीर—पु. १ अजगर; आर; अहार. २ गोड्या पाण्यांतील एक सापासारखा मासा; हा काळा असून याच्या अंगास चिकट बळस असतो. [सं. अहि=साप]

अहीरभैरव—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गंधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर येतात. ह्याची जाति संपूर्ण–संपूर्ण आहे. वादी स्वर षड्ज व संवादी पंचम गानसमय प्रात.काळ हा एक भैरवप्रकार आहे [सं.]

अहूर—पु. (कों.) नदीचा पूर. अऊर, और पहा.

अहेतु, अहेतुक—वि. ज्याला हेतु–कारण नाहीं असें; विनाकारण; अकारण; निष्काम. याच्या उलट सहेतुक. 'अहेतुकें चित्तें। अनुष्ठा पां यायातें।' –ज्ञा ३.९२. 'आमच्या देशांतील सुशिक्षित वर्ग स्वभाषेचा अहेतुक शत्रु बनला।' –टि ४.४९९. [सं.]

अहेदी—ऐदी पहा.

अहेनवमी—अविधवानवमी पहा.

अहेर—पु. लग्न, मुंज, गर्भाधान इत्यादि मंगल प्रसंगीं अथवा एखाद्याच्या सत्कारार्थ–अभिनंदनार्थ त्यास त्याचे इष्टमित्र, सगेसोयरे, नातेवाईक यांच्याकडून शेला, पागोटें वगैरे पोशाख, दागिना वगैरे जी देणगी मिळते ती. (सामा.) देणगी उपायन; बक्षिस. 'तैसें यागाचेनि नावें। जग वाउनि हावें। नागविती आघवें। अहेरावारीं॥' –ज्ञा १६ ३८७. **म्ह०** अहेर चोळीचा आणि गजर वाजंत्र्याचा=लहान कृत्यास गाजावाजा जास्त या अर्थी. [सं. आ+हृ=हरण; आहरण=भूषण, अलंकार; तुल० फा. महर=स्त्रीधन]

अहेरण—ऐरण पहा. 'हिरा ठेवितां अहेरणीं। वांचे मारितां जो घनीं।'

अहेरण—स्त्री. सोनामुखीची एक जात. आयरण; ऐरण.

अहेरा—अहिरा पहा.

अहेराऊ, अहेरी, अहीराऊ, अहीरी—वि. १ अहेर करण्याच्या उपयोगी–योग्य (वस्तु, अलंकार इ०). २ टिकाऊ, पक्क्या रंगाचें नव्हे असें; कामचलाऊ; मामुली; दिखाऊ, [अहेर]

अहेरावा—(व) अहिरा (रोग) पहा. 'डोळ्यांत अहेरावा पडला.'

अहेव—स्त्री. अविधवा; सौभाग्यवती–सुवासिनी स्त्री. 'भर्तारेंवीण अहेव। जाण पां तो सर्व विटंबू।' –एभा १४.२५७. **म्ह०** अहेवचा मेला खेळायला गेला=नवरा असलेल्या बाईचा मुलगा मेला तर तो खेळायला गेल्यासारखाच असतो, कारण तिला दुसरा होण्याचा संभव असतो. २ सौभाग्य; भाग्य. 'ब्रह्मविद्येचें अहेवकांकण आज फुटलें।' –भाए ८५. 'परंतु हे मम सुखसार्थकता हेंच मदीय अहेव।' –टिक ४०. [सं. अविधवा; प्रा. अविहवा] ०तंतु–पु. (काव्य) मंगळसूत्र, सौभाग्यसूत्र. 'कृष्णमणी अहेवतंतु। कंठीं धरिला न तुटतु।'–एरुस्व ७.३६. ०दोरा–पु. १ मंगळसूत्र. २ नेहमीं पाठीस लागलेली नोकरी, उद्योग–धंदा; नेहमीं टिकणारा, कायमचा दर्जा, मान, पदवी. ०नवमी–अविधवानवमी पहा. ०पण–न. सभर्तृकत्व; पति जीवंत असण्याची स्थिति; सौभाग्य. 'वल्लभाचिया उजरिया। आपणया पति कुस्रिया। जोडोनि तोषिती जैसिया। अहेवपणें।' –ज्ञा १६. ३७७. 'सौभाग्य नटोनि अहेवपण। ऐसी मिरवीत निघाली।' –भवि ३.२४७. 'राखें मजला अहेवपणीं। प्राणेश्वरातें सोडी पितया।' –गुच ७.३४. 'अहेवपणें हळद कुंकुममण्डित मरावें हीच इच्छा सर्व स्त्रियांची.' –भावबंधन ९३. ०मणि–पु. मंगळसूत्र. 'कीं अजय झाले रणीं। अहेवमणी।' –पला ४०. १०१. ०मरण–न. सौभाग्यवती असतां, पति जिवंत असतां, सवाष्णपणीं आलेलें मरण. हें स्त्रिया फार प्रिय व मंगलकारक समजतात. ०सवाष्ण–स्त्री. सौभाग्यवती स्त्री; सुवासिनी. ०सुयेष–वि. पति जिवंत असतांना मरण येत असलेली (स्त्री). [अहेव+असु+ई]

अहो—उद्गा. कोणाला मोठ्या गौरवानें किंवा बहुवचनीं संबोधून हांक मारावयाचा प्रयोग. अरेचें अव. कांहीं शब्दांपुढें यांतील अचा लोप होतो; जसें–कायहो–कांहो. २ आकस्मिक आनंद–आश्चर्य यांचा उद्गार. **०जाहो**–अ. आदरपूर्वक बोलणें, हांक मारणें. 'कोणी थोर आला असतां त्यास अहोजाहो म्हणावें.' [अहों+जा+अहो]

अहोदिवस—क्रिवि. सर्व दिवसभर; रात्रंदिवस अहोरात्र शब्दावरून (सं. अहस्=दिवस हा अर्थ न समजून) केलेला चुकीचा प्रयोग. 'अहोदिवस अहोरात्र शास्त्राचें अध्ययन केलें तरी तें जास्त जास्त गूढ वाटणार' –नि ४६०.

अहोपी—वि. (अहोदिन पान करणारा). लोभी; आशाळभूत; अधाशी. [सं. अह+पा]

अहोरातीं—क्रिवि. रात्रंदिवस. 'राखें अहोरातीं निज भक्तां।' –एभा २० १३९; 'शेवा करी अहोरातीं।' –मुआदि ३०.४७ [सं. अहस्+रात्रि]

अहोरात्र—पुन दिवस आणि रात्र; चोवीस तासांचा, तीस मुहूर्तांचा किंवा साठ घटकांचा दिवस. पृथ्वीला आपल्या आंसाभोंवतीं प्रदक्षिणा करण्यास जो काल लागतो तो कालावधि. सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काल. 'कां अहोरात्रींची गोंवी। आंधळें नेणें।' –ज्ञा १८.७१८. –क्रिवि. १ रात्रंदिवस. २ (चुकीनें) सर्व रात्रभर. [सं. अहस्+रात्रि] **०वृत्त**–न. सूर्याच्या दैनंदिन गतीचें वर्तुळ–वृत्त, क्रांतिवृत्त, शुक्ल्यासमांतरवृत्त; ज्या वृत्ताची पातळी विषुवार्शी समांतर असून आकाशांतील तारे यांतून जातें तें वृत्त. [सं.]

अह्येय—उद्गा. (खा.) वारे वा! [अहा]

अळ, अळई—स्त्री. कीड; अळि पहा.

अळई—स्त्री. एक झाड. हें डोंगराळ प्रदेशांत होतें; उंची सुमारें पुरुषभर असून पानें, टाकळ्यासारखीं. यास 'ओवी' असें म्हणतात. गांठ किंवा उठणू जिरण्यास याचा उपयोग करतात. –वगु १.३९.

अळंकरण, अळंकार, अळंकारणें, अळंकारिक, अळंकारी, अळंकृत—अलंकरण, अलंकृत पहा.

अळका–अळंका—वि. १ पाटीमागें लागलेला; धाधावलेला; वखवखलेला; ध्यास, छंद घेतलेला. उ० झोपेचा अळका, भुकेचा अळका. २ (ल.) अडकया; पैशाचा दास. 'परि अळंकिया आंग वर्णें होऊनि ठेला।' –भाए ७१९. [का. अळिपु; ह. का. अळकरियु=इच्छा करणें; म. आळ]. **–केपण**–न. आसक्ति, आवड. अळकुवा पहा.

अळकुटी—वि. (चांभारी धंदा) जोडयाचा एक प्रकार [अळकुट]

अळकुडी—स्त्री. अळवाचा गड्डा, कांदा किंवा मूळ. [अळूं+कुडें=मूळ]

अळकुवा—वि. (कों.) आसक्त; गुंग झालेला; अतिशय प्रेम करणारा; लंपट; पाटीमागें लागणारा. अळका पहा.

अळंग—अलंग पहा.

अळग, अळंग—अलग पहा.

अळगत—अलगत पहा.

अळगावणें—अक्रि. १ व्यायला होणें; प्रसूति अवस्थेला येणें (गाय, म्हैस वगैरे). २ अलग्णें पहा. [सं. अलग्न. म. अलग]

अळगु—क्रिवि. अलग; अळग; एकीकडे. 'मी उखेंडी जाय अळगु।' –भाए १४०. [सं. अलग्न. म. अलग]

अळंगें—न. गोणीच्या प्रत्येक आख्याच्या तोंडाला असणारा फांसा, कडी; यांतून गोणी आंवळण्यासाठीं तडकणी ओंवून घेतलेली असते. [का. अळ=जोडणें किंवा आळि=वर्तुळ?]

अळंगें चिळंगें—न. अव. आळोखे पिळोखे; अळे पिळे; (क्रि० देणें). [सं. अलग्न+विलग्न. का अळुगु=कांपणें, हलणें.]

अळंटळं–टाळं–टाळी—न.स्त्री. १ चेंगटपणा; चुकारपणा; ढिलाई, दिरंगाई, हेळसांड; हयगय, सुस्ती; सावकाशी; आळस; दुर्लक्ष. (क्रि०मांडणें–लावणें–करणें). २ टाळाटाळ; चुकवाचुकव; टंगळमंगळ; लांबणीवर टाकणें. 'यानें कामाची अळंटळं मांडली.' ३ अनिश्चितता; शंकास्पद स्थिति; मोघमपणा. 'त्याचें येण्यायें अळंटळं दिसतें.' –क्रिवि. दिरंगाईनें, हयगयीनें [सं. अलं+तत्+अलं किंवा टाळं–टाळणें द्वि]

अळण—न. १ हरभऱ्याचें पीठ पाण्यांत शिजवून मसाला घालून कालवणाचा पदार्थ करतात तें; कालवण; पिठलें; ताक व हरभऱ्याचें पीठ लावून केलेली पातळ भाजी २ पातळ भाजी दाट होण्याकरितां तींत पीठ वगैरे घालतात तें; बेसन; आळण पहा. [का. अळक=अर्धवट पातळ; सं. आ+लयन?]

अळणट—वि. थोडा अळणी. [सं. अ+लवण+ट प्रत्यय]

अळणी—वि. १ मीठ कमी असलेला; मीठ न घातलेला; मिळमिळीत. २ कमी प्रतीचें; ज्यांत सत्त्व, तेज, जीव, पाणी, रस, खोंच नाहीं असें (भाषण, सौंदर्य, लेख, शरीराची ठेवण, मुद्रा, चेहरा वगैरे) खरमरीत किंवा कडक नव्हे असें (भाषण). ३ (सामा.) बेचव. **म्ह०** नावडतीचें मीठ अळणी. [सं. अ+लवण; प्रा. अलोण; बं. आलुणी]

अळणें—उक्रि. १ घट्ट, दाट करणें. २ घट्ट, दाट होणें (दूध, पाक). ३ सुकून, वाळून जाणें; रोड होणें; बारीक होणें; कृश होणें. 'उपवास करून तो अगदींच अळला आहे.' ४ वयांत येणें; यौवनावस्था येणें. ५ आटणें; आळणें पहा. [का. अळक=अर्धवट घट्ट पातळ; सं. आ+लयन?]

अळता—पु. १ लाखेपासून तयार केलेला तांबडा रंग. २ त्यानें भिजविलेला कापूस. [सं. अलक्तक]

अळती—स्त्री. (कर्ना.) माप. [का. अळि=मापणें; अळति=माप]

अळंदें भळंदें—न. पोळा नामक सणांत वापरण्यांत येणारा रांजण–घागर. [का. अळिगे=रांजण]

अळपण–णें—न. १ बांधण्यासाठीं घेतलेली कोणतीहि वस्तु; **निर्बंधन करणारी वस्तु; बंद. २** (ल.) निर्बंध; नियमन; अडचण; **मोडता** (एखाद्या कामांत.) **३** (व.) ढोराच्या शेपटास गुंडाळलेली चिंधी. [का. अळपु. सं. आवलन, म. आवळणें याचा वर्णविपर्यास]

अळपणें—उक्रि. जोरानें आंवळून बांधणें; घट्ट करणें; भोंवताली वेष्टून बांधणें. टीप–या क्रियापदाला, ज्या पदार्थानें बंधन करावयाचें त्या पदार्थाचा वाचक शब्द कर्म नसून जो पदार्थ बांधला जातो त्याचा वाचक शब्द कर्म असतो. याशीं संबद्धक्रियापद बांधणें उ० अळपून बांधणें.

अळपा—पु. १ बांधण्याकरतां घातलेला वेढा. (क्रि० घालणें–घेणें–देणें). २ बांधण्याचें–वेष्टण्याचें साधन. ३ घट्ट बांधणें–वेष्टणें. (क्रि० घेणें–देणें.)

अळंप्रतीति—स्त्री. तृप्ति; पुरेपणा; अलंप्रतीति पहा. ' तद्हि भोगितां आनंदावाप्ति । न पवती अळंप्रतीति । ' –रास ४.१२२. [सं. अलं+प्रतीति]

अळबळीत गळबळीत—वि. १ साधा; मनमिळाऊ; घळघळीत; जुळतें, मिळतें ध्यावें अशा स्वभावाचा. २ निष्कपट; अनुकूल, प्रिय भाषण–बोलणारा. [गळबळ द्वि.]

अळंबें–में—न. एक वनस्पती; कुत्र्याचें मूत; भुइछत्री; याचे दोन प्रकार–गोडें व विषारी, यानें अंमल चढतो, वांती होते जाती–चुडयें, चितळें, गवतें, कुवळें, करडी, तेलंगी, भुईफोड, मोगराळें. हें शीत, मधुर, त्रिदोषकारक, कफप्रद आहे. [का. अळिबें]

अळंबो, ओळंबो—पु (गो.) वाळवी; वाळिवे.

अळमळीत, अळमळीतगुळमळीत, अळमळीत गुळमुळीत—वि. १ मोघम; अनिश्चित (भाषण). २ मिळमिळीत; कडक, स्पष्ट नसणारें. ३ हयगयीचें;बिन कळकळीचें; टाळाटाळीचें; सुस्ताईचें (काम–कृत्य). [गुळमुळीत द्वि.]

अळमाळु—अळुमाळु पहा. ' तंव अळमाळु रूपु झळकलें ' –शिशु ४१

अळमें, आळमें—न. (गो.) अळंबें पहा.

अळय—अळवट पहा.

अळघ—अर्घ पहा.

अळवट—स्त्री.(शती) नांगरलेली जमीन साफ करण्याचें हत्यार, साधन. [का. हलिवे. सं. हल+वर्ती ?]

अळवंटण—न. स्वयंपांकास लागणाऱ्या मसाला वगैरे जिन सांची पिशवी; पंचपाळें.

अळवडी—स्त्री. अळवाची वडी; अळवाच्या पानास पीठ लावून तव्दून केलेली वडी. [अळू+वडी]

अळवण—न. १ पातळ पदार्थ–भाजी दाट होण्याकरतां लावलेलें पीठ; अळण पहा. २ दाट होणें. घट्ट होणें; जमणें. ३ (ल.) उपासामुळें वाळणें, सुकून जाणें. (क्रि० काढणें–घालणें–निघणें) [अळणें]

अळवण—स्त्री. आळवण; अळविणें; गोंजारणी; समजूत. [अळविणें]

अळवणी—वि. अळणी. ' स्वल्प रूक्ष अळवणी । ' –गीता २.२१४१.

अळवणी—वळवणी व अकाळवणी या दोन शब्दांबद्दल चुकीनें वापरतात.

अळवंत—स्त्री. बाळंत होत असतांना मृत झालेली पिशाचरुपी स्त्री; बाळंत स्त्रीचें भूत; हडळ; जखीण. [सं. बालवती–बाळवंत ?]

अळविणें—अळणें पहा.

अळविणें—उक्रि. १ समजूत घालणें, प्रार्थना करणें; प्रेमानें–लाडक्या शब्दानें वश करणें–मन वळविणें (देव, राजा, वल्लभ वल्लभा यांचें); अंजारून गोंजारून, लाडीगोडीनें समजावणें (तान्ह्या मुलास वगैरे); शांत करणें; सांत्वन करणें. ' आतां नाळवावें तुम्हीं मातें । ' –ज्ञा २.८२. ' सद्भावें अळवुनियां पंढरीराया । केली काया ब्रह्मरूप । ' २ विनवणी करणें; मिनतवारी करणें. ३ आलापणें; गायन करणें; मंजूळ स्वरानें, तालसुरावर गाणें (राग, गीत, रागिणी, तान). ४ हाक मारणें; बोलावणें. आळविणें पहा. [सं. आलापन; प्रा. आलावण]

अळवी—क्रिवि. सन्मुख. ' बीजे करितां चुकवी । न ऱ्हायें दृष्टीचिए अळवी । ' –ऋ ५०. [प्रा. अल्लिअ=समीप जाणें ?]

अळवी—स्त्री. (कर्ना.) धान्यरूपी कर्जे. [का. अळवी=जमीन धारण करण्यासंबंधी करार)

अळवीण—अळू पहा.

अळव्यान—वि. (गो.) करारबंद; करार केलेलें. [का.अळवी]

अळशिकावणें—क्रि. (गो.) लज्जा उत्पन्न करणें. [अळशीक]

अळशी, अळस, अळसी, अळसावणें, अळा, अळाबांधा, अळीकर, अळीपाळीनें—आमच्यें पहा.

अळशी, अळसी—स्त्री. जवस. (इं.) लिन्सीड. [सं. अतसी–अडसी. प्रा. अलसी. का. अगशी]

अळशीक—स्त्री. (गो.) १ लज्जा. २ घाण; घाणजागा. ३ आळशीपणा. **अळशीकणो**–वि. घाणेरडा. [सं. आलस्य]

अळशी, अळाशी—स्त्री. एक पेंढी–जुडी बांधतां येईल इतकें शेतांत कापून वाळत ठेवलेलें पीक; मूठभर रास. (सामा.) कापून

वाळत ठेवलेलें पीक. पाथरा व अळशी हीं एक नव्हत. [अळा, आळा]

अळसंदा, अळसंदी—पुस्त्री. एकप्रकारचें कडधान्य; मोठी चवळी; चवळीची एक जात. [का. अळसंदी; गो. अळसांदो]

अळसिणी—स्त्री. आळशी स्त्री. 'तेथें येकी अळसिणी असे।' –पंच ४.१६. आळशी पहा.

अळापिळा—पु. मुरडा; अळखाविळखा, पिरगळा (अंगाचा, वस्त्राचा इ०) (क्रि० देणें) [पिळा द्वि.]

अळि—पु. भ्रमर; भुंगा. 'कल्हारीं कुमुदोत्पळीं अळि शरत्काळीं जळीं गुंजती।' [सं. अलि] **०उळ**–पु. भ्रमरांचा समुदाय. –एभा ५.५५५. 'भक्त अळिउळ आलापवी स्वयें।' [सं. अलिकुल]

अळिका—स्त्री. अळी; कीड. 'कीं अळिकेवरी द्विजराज।' –राम २७.८१. [सं. अलीक=क्षुद्र, अति लहान. का. आळि=वर्तुळ, वेटोळें. म. अळें]

अळिता—अळता पहा. 'रंग पिळुनि अळिता जणु देति फेंकुनी।' –मृ ४२.

अळी—स्त्री. १ धान्य इत्यादिकांत बारीक तंत्वाकार क्षुद्र जीव–कीडा उत्पन्न होतो तो; किड. [सं. अलीक. का. आळि=वेटोळें]

अळी—स्त्री. बोळ; गल्ली; लहान रस्ता. [सं. आलि=रांग, ओळ] **०कर**–वि. शेजारी; जवळचा. **०न वळीचा**–शेजारचा, आळींतला नव्हे असा; लांबचा; दूरचा. कांहीं संबंध नाहीं असा.

अळी—स्त्री. छंद; रळी; हट्ट. [का. अळु=रडणें] **०कर**–वि. छांदिष्ट; हट्टी.

अळी—स्त्री. अळें १ व ३ पहा.

अळीपिळी—स्त्री. १ (दोरीचा–वस्त्राचा) वळसा; वेढा. अळापिळा पहा. (क्रि० देणें–घालणें–खाणें–येणें–पडणें). [पिळा द्वि.]

अळीमिळी गुपचिळी—स्त्री. कांहीं न बोलणें; गप्प बसणें. (लहान मुलांच्या खेळांतील शपथ). 'यावेळीं अळीमिळीगुपचिळी हें वेदसूत्र आठवतें ना? या वेळीं आधीं बोलेल त्यानें भांडी घासावीं' –हाच मुलाचा बाप. **०घालणें**–न. बोलण्याची शपथ घालणें, ताकीद करणें.

अळींब—वि. १ आटवलेला; दाट केलेला (रस, पातळ पदार्थ). २ प्रौढ झालेला; वयांत आलेला (मनुष्य, देह). [अळणें]

अळु—वि. किंचित्; थोडें. 'नसे अळुहि प्रपंच लालची।' –दावि ११८. [सं. अणु]

अळुकी—स्त्री. आवड; भूक; प्रीति. अळका पहा. –वि. भुकेलेला. [का. अळुगु=प्रेम करणें.]

अळुकैलें—वि. भुकेलेलें. अळका, अळुका, आळुकणें पहा.

अळुमळु, अळुमाळ, अळुमाळु—वि.क्रिवि. १ (काव्य) थोडें थोडें; अल्प; किंचित्. 'मुख माखिलेंसें अळुमळु' –कृष्णाची भुपाळी १८. 'मजही दर्शन दिधलें अळुमाळ । घातला कवळ मुखामाजीं.' –ब ३०. –अमृ २.३०. 'हा आतपुही अळुमाळु।' –ज्ञा ६.१७५. (विशेषतः कृत्याविषयीं) क्षणभर; लहानसें; कमी. 'अळुमाळु प्रकाश करी । तेतुलेंनेच उभारूं धरी।' 'म्हणुनि आतां पुसों अळुमाळुसे। मग करूं देवा ठाकें जैसें' २ परिपूर्ण; ओतप्रोत; विस्तारानें. 'हाडांच्या अळुमाळ डोलति गळां माळा, कटीं कांबळा।' –आता १२. 'अंगीं तारुण्य प्रबळ । शृंगार केला अळुमाळ।' –कथा १.६.५३. ३ हळु हळु. ४ किंचित् दखील; अणुमात्र. 'जैसें तीर्थ आणि जळ ॥ भिन्न नसेचि अळुमाळ।' –भवि १२.११६. [सं. अणुमात्र]

अळू—पु. एक फळ झाड. यांचें फळ तपकिरी रंगाचें असतें. [सं. आलु]

अळूं—न. एक शाक भाजी; याच्या निरनिराळ्या जाती–राजाअळूं धांवअळूं, काळेंअळूं, पानअळूं, रुखअळूं, मुंडलेंअळूं, रानअळूं (तेरी). काळेंअळूं उत्तम असुन अग्निदीपक, रक्तपित्तीचा नाश करणारें, बलवृद्धिकारक आहे. **म्हण०** अळवाची खाज अळवास ठाऊक=ज्याची चिंता त्यास ठाऊक. **अळवाची देंठी**–स्त्री. अळवाच्या देंठ्यांचें दह्यांतील रायतें. **अळूवडी**–स्त्री. अळवाच्या पानांची तळून केलेली भाजी. शिवाय गाटी, कोरडी भाजी, ताकाचें अळूं इ० पदार्थ अळवाचे करतात **अळवावर अंचविणें**–उपकाराची जाणीव नसलेल्या माणसावर उपकार करणें (अळवाच्या पानावर पाणी टिकत नाहीं यावरून) **अळवावरचें पाणी**–(अळवाच्या पानावर पाणी ठरत नाहीं यावरून ल.) क्षणभंगुर; अशाश्वत; चंचल; अस्थिर (लक्ष्मी–देह–वस्तु–मन इ०) [सं. अळुक; गुज. अळवी, अळू, हिं. आळु, व. धोपा]

अळें—न. १ वृक्षाच्या बुंध्याशीं पाणी सांचण्याकरितां केलेला खळगा; माती, चुना यांचा चिखल–रद्दा करण्याकरितां केलेली खळी; भोंपळा, पडवळ इत्यादींचीं बीजें रुजविण्याकरितां व पाणी ठरून राहण्याकरतां केलेला मातीचा उंचवटा. **अळेवाफे**–भोंपळा, दोडका, इ० वेल लावण्यासाठीं केलेलें अळें वगैरे. 'काय! थंवां अळेवाफे कांहीं लावलेस कीं नाहीं!' २ वांगीं, मिरच्या इ० कांचें खळींत एकेक लावलेलें रोप. अशांच्या समुदायांना दंड म्हणतात. ३ एक कुळव. इतर प्रांतांत डिफळा असा प्रचार आहे. (नांगरल्यानंतर मातीचीं डिफळें फोडण्याचें साधन). [सं. आलवाल. तुल० का. आळि=वर्तुळ.]

अळें—न. किंमत, वजन, मापदर्शक दुय्यम परिमाणाच्यामागें प्रथम परिमाणाचा अभाव अगर त्यापासून भेद दर्शविणारें चिन्ह. उ० २॥; २।३; दोन रुपये तीन आणे. ५।३।८ पांच खंडी, तीन मण आठ शेर. ४३।४ सवातीन मण चार शेर.

अळेण, आळेण—न. (गो) अळण; तांदुळाचें पीठ. [अळणें]

अळेदांडी, अळेपिळणें—स्त्री. न. गाडीचा अगडा (जूं आणि दांडीची दोरी) नीट फिरवून घट्ट आंवळण्याकरितां ज्या लांकडाच्या दांडक्याचा उपयोग करतात तें. [अळणें+दांडी–पिळणें]

अळेपिळे, अळोके पिळोके, अळुके पिळुके–पु अव.

अळ्यापिळ्या—स्त्री. अव. अळापिळा पहा. 'अळेपिळे अंगासीं देत। हिंडे क्षुधातृषापीडित।'

अळेंबळें—क्रिवि. कसेंतरी, कांहीतरी; प्रयासानें, जबरीनें; जुलमानें; जेमतेम; होय नाहीं करतां, रडतकढत. 'म्यां अळेंबळें दोन घांस खाले.' [बळें द्वि]

अळांचो मळांचो, अळांचो पाळांचो—लहान मुलांचा एक खेळ. दोन मुलें एका मुलाला दोन्ही कांखेंत धरून झोंके देतात तेव्हां हें गाणें म्हणतात. [का. अळुवु, अळुगु=हालणें. सं. पर्यंक= प्रा. पलिअंक–पलंख–पालख–पाळणा द्वि.]

अळोणी—अळवणी पहा.

अळ्य—स्त्री. (गो.) १ अळें (गणितांतील). २ शेत साफ करावयाची फळी. [अळें]

अक्ष—पु. १ फांसा (सोंगट्या खेळण्याचा). उ० अक्षक्रीडा; अक्षकुशल. २(ल.) द्यूत. 'हे दुर्दशा बरी कीं पूर्ति असे कीं न अक्षतृष्णेची.' –मोसभा ५.३२. ३ माळेंत घालण्याचा मणि; इद्राक्ष.

अक्ष—पु. १(ज्यो.)दीर्घ वर्तुळाचा व्यास. २ विशिष्ट स्थलाचें विषुववृत्तापासून अंतर; अक्षांश. ३ (गणित) ज्या काटकोन त्रिकोणाच्या फिरण्यानें शंकु तयार होतो त्याच्या स्थिर राखिलेल्या बाजूला त्या शंकूचा अक्ष म्हणतात. –महमा १२. [सं. लॅ. इं. ॲक्सिस; ग्री. ॲक्सॉन; जर्मे. अक्से; लिथो. ॲस्सिस; फ्रेंच. जिप्सी. अकेस]

अक्ष—पु. नेत्र; डोळा. [सं. अक्षि]

अक्ष—न. (गो.) आरोप; जबाबदारी, खापर; अपेश. अकस पहा. [अर. अकस्]

अक्ष—पु. कपाळावर एकावर एक असे दोन भोंवरे असणारा घोडा.

अक्षई—क्रिवि. सर्वकाळ; नेहमीं वारंवार. 'अक्षई पदाचें अधिष्ठान।' –वेसीस्व १.९. [सं. अक्षय]

अक्षक—न. १ (शारीर) गळसरीचें हाड; जत्रु. २ (प्राणि) पक्ष्यांच्या पंखांतील हाडांतील कांब; मणिबंधास्थि. [इं. रेडियस]

अक्षकर्ण—पु. (ज्यो.) अक्षक्षेत्राची कर्णरेषा; पलकर्ण.

अक्षक्रीडा–अक्षद्यूत—स्त्रीन. फाशांनीं सोंगट्या खेळणें; पण लावून फाशांनीं सोंगट्या खेळणें; द्यूत. [सं.]

अक्षज्या—स्त्री. (ज्यो.) अक्षांशाची ज्या; पलज्या. [सं.]

अक्षत—स्त्री. १ अभिमंत्रित केलेले किंवा अभिमंत्रित करण्यासाठीं घेतलेले तांदूळ; लग्न, मुंज इ० समारंभांत प्रधानभूत व्यक्तींच्या डोक्यावर टाकण्याकरतां, देवतांच्या कपाळीं लावण्याकरतां, किंवा लग्न, मुंज इ० चें आमंत्रण देण्याकरतां घेतलेले तांदूळ. २ लग्न–मुंज प्रसंगींच्या आमंत्रणाकरतां मिरवणूक निघते ती (देवास आणि शिष्ट लोकांस अक्षत देण्यासाठीं). ३ कपाळीं लावलेल्या गंधांत काळ्या रंगाचा जो ठिकला लावतात तो किंवा तें गंध. ४ (सामा.) तांदूळ. **वाप्र**–वाटाण्याच्या अक्षता लावणें=साफ नाकारणें; (वाटाणे वाटोळे असल्यामुळें कपाळास चिकटून रहात नाहींत म्हणून). **अक्षत काढणें–फिरविणें–निघणें**–समारंभाचें निमंत्रण करण्याकरतां मिरवणूक निघणें. **अक्षत टाकणें**–१ एखाद्या घरावर अक्षत टाकून आंतील लोक काय बोलतात तें ऐकणें. हा एक शकुन पाहण्याचा प्रकार आहे. २ (देवावर) पूजेकरतां आव्हान केलेल्या देवतेचें विसर्जन करणें. ३ एखाद्या गोष्टीवरील सत्त्व सोडून देणें. ४ लग्नांत वधूवरांवर तांदूळ टाकणें; लग्न लावणें. 'अक्षत टाकिली जैसी। मांदिये वरी।' –ज्ञा १८.७२३. **अक्षत देणें**–विवाहादि समारंभास निमंत्रण करणें. **अक्षत घेणें**–निमंत्रणाचा स्वीकार करणें. **डोक्यावर अक्षत(ता)पडणें**–विवाह होणें. **०टाकणें**–लग्न लावणें, करून देणें. **तांडावर अक्षत पडणें**–मनसोक्त,वाटेल तसें बोलणें. **अक्षत भरणें**–शेंस भरणें. 'अक्षत भरिली भाणा। दुजा ब्राह्मण मेहुणा। आला होता पाहुणा। स्त्रियेस मूळ।'–दा३.३.१०. **अक्षत लावणें**–(घरास, चुलीस) घरांतील सर्व माणसांस, कुटुंबास भोजनास बोलावणें केल्यामुळें चूल न पेटविणें. **अक्षत लावणें**–(देशीस) गांवभर–सर्व लोकांस आमंत्रण करणें. **अक्षत लावणें**–१ भाकीत करणें. २ गुंतवून घेणें; प्रयुक्त होणें. **अक्षत वाहणें**–(मूर्तीवर) अभिमंत्रित तांदूळ देवावर टाकणें–वाहणें. **म्हु** या या माझ्या कपाळाच्या अक्षता पहा=दुसऱ्याला विनाकारण हांक मारणाऱ्या किंवा बोलावणाऱ्या मनुष्याबद्दल रागानें म्हणतात. **वरतीं अक्षता, मध्यें गोपीचंदन खालीं रक्षा** (अंगारा)–तोंडाशीं हिरवा, मध्यें गोपीचंदनासारखा मऊ व तळाशीं रक्षा झालेला असा भात; चांगला न शिजलेल्या भाताचें विनोदप्रचुर, खुबीदार वर्णन. वैष्णवीभात पहा. –वि. १ अभंग; इजा न झालेला; शाबूत; धडधाकट; सर्वांग. 'अक्षतधनु तोंवरि हें वीरशिरोरत्न नावरायाचें'–मोद्रोण ३.१२१. २ पतिसमागम न झालेली (स्त्री); तीन पुनर्भूपैकी. पुनर्भू पहा. अनुपभुक्त स्त्री. [सं. अ+क्षत]

अक्षतमरिष्ट—क्रिवि. अडथळा न येतां; अप्रतिहत; अव्याहत; संकट, विघ्न न येतां; बिन हरकत. 'आमची वृत्ति पांचशें वर्षे

अक्षतमरिष्ट चालत आली आहे.' 'तुमची संपत्ति अक्षतमरिष्ट असो.'[सं. अक्षतं+अरिष्टं. 'अक्षतमरिष्टं चास्तु' या ब्राह्मणपूजन विषयक मंत्रावरून']

अक्षतय—स्त्री. (गो.) अक्षयतृतीया.

अक्षतयोनी—वि.१पुरुषाशीं संग न घडलेली, अनुपभुक्त (स्त्री); बालविधवा; कुमारी, अविद्धयोनि [सं.]

अक्षता—अक्षत पहा.

अक्षतारोपण—न. कंकणें बांधिलीं गेल्यावर वधुवरांचें आयुष्य वाढविण्याच्या उद्देशानें वधूवरांनीं एकमेकांच्या डोक्यावर अक्षता टाकण्याचा विधि. [सं.]

अक्षतिज—स्त्री. अक्षय तृतीया. 'नवशिके टाउके वेसुर। चाल बदलून गाती टौर। घरोघरीं वाजविती डौर। जशी अक्षतिजेची गौर।' –पला १५.

अक्षतृतीया—अक्षयतृतीया पहा.

अक्षतेचें खोड—न काळें गंध लावण्याकरितां उगाळावयाचें लांकूड; देंभुर्णीचा नार; काळधा टाकळीचें मूळ

अक्षभा—स्त्री. (ज्यो.) पलभा पहा.

अक्षम—वि. १ उतावीळ; असहनशील. २ मत्सरी; हेवेखोर. ३ खुनशी; दया न करणारा. [अ+क्षमा]

अक्षम—वि. पंगू; दुर्बल; असमर्थ; अशक्त; व्यंग असणारा; (आंधळा, लुला, इ०) 'अक्षमें आणि संज्ञाविलें। कां निरिंधन आणि विझालें।'–ज्ञा १३.२७९. 'कोंवें धरिल्या अक्षमा। अक्षम होती साधनें।' –मुआदि ७.९८. [सं. अ+क्षम]

अक्षमा—स्त्री. १ उताविळपणा, असहनशीलता; अविवेक; अधीरपणा. २ क्षमेचा अभाव; क्षमा न करणें. ३ मत्सर; हेवा. [अ+क्षमा]

अक्षमाला—स्त्री. रुद्राक्षांची माळ; मण्यांची माळ, जपमाळ.

अक्षमी—वि. १ क्षमेस अयोग्य २ असमर्थ. 'केवि गति लाहिजे अक्षमी।' –ऋ. ७. [सं.]

अक्षय, अक्षय्य—वि. १ अविनाशी; अनश्वर; नाश न पावणारा; ऱ्हास न पावणारा; नित्य; शाश्वत. 'क्षय पावती इंद्र चंद्र। कृष्ण नरेंद्र अक्षयी।' –एरुस्व १.७८. २ कधीं न सरणारा; कमी न होणारा; निरंतर असणारा. उ० अक्षय भाता=नेहमीं बाणांनीं भरलेला असा भाता. '.. माझें घरुप्य। अक्षयभाते विशेष। वरद शस्त्रें अणावीं।' ३ (व्यापा.) निरंतर, नेहमींचे; निरंतर. 'आमचें राहूंत ह्या गावांत अक्षय असलें तर घर बांधेल असतें.' –पु. क्षयाचा अभाव; अविनाशित्व. [सं. अ+क्षय]

अक्षयतृतीया—स्त्री. वैशाख शुद्ध तृतीया; कृतयुगाचा आरंभ दिवस. ह्या दिवशीं केलेल्या जप, होम, तर्पण, दान वगैरेंचें फल-अक्षय टिकणारें असतें. [सं.]

अक्षयत्व—न. अविनाशित्व; अमरत्व. 'जेणें जोडे जीविता। अक्षय्यत्व।' –ज्ञा १८.९४६. [सं.]

अक्षयवट—पु प्रयाग (अलाहाबाद) येथें गंगा व यमुना यांच्या संगमाजवळ असलेला एक वटवृक्ष. हा फार प्राचीन असून कधीं मरत (वठत) नाहीं असें सांगतात. अशा नांवाचे वृक्ष इतर क्षेत्रांतूनहि दाखवितात.

अक्षयवाण—न. दीर्घायुष्य व समृद्धि प्राप्त होण्याकरितां सुवासिनी स्त्रिया ब्राह्मणांना जें वायन (नारळ, वस्त्र, तांदूळ इ०) देतात तें. 'अक्षय वाणें घेऊनि। धांवती नगरीच्या गौळिणी।' –ह ४.३१. [सं. अक्षय+उपायन–वायन=वाण]

अक्षयवीट—स्त्री. विठोबाच्या पायाखालची वीट. 'अक्षयवीट चरणतळवटीं।' –विठ्ठलाची भूपाळी २४.

अक्षयसुख—न. चिरकाल सुख; ब्रह्मानंद; ब्रह्मसुख. [सं.]

अक्षयीं—क्रिवि. १ नेहमीं; सतत; सदांसर्वकाळ; कधीं न चुकतां; कधीं न टळतां. २ सबंध, अशेषतः; सर्वथैव्या सर्वथा; यच्चयावत. ३ (निषेधार्थी) मुळींच; अगदीं. [सं. अक्षय]

अक्षय्य—अक्षय पहा. उ० अक्षय्यतृतीया, अक्षय्यत्व; अक्षय्यवट. [सं.]

अक्षर—न. १ वर्णमालेंतील वर्ण किंवा मातृका. २ ज्यांचा पूर्ण उच्चार होतो असे वर्ण; शब्दावयव. (ई.) सिलेबल. ३ (ल.) विद्या; विद्वत्ता; अध्ययनसंपत्ति. 'अक्षर नाहीं चातुर्य नाहीं मग प्रतिष्ठा कशानें होईल' ४ ब्रह्म. 'मग वेदांतें परापर। प्रसवतसे अक्षर।' –ज्ञा ३ १३६. ५ अव्यक्त प्रकृति. –गीर.१५८. ६ लेख (पत्र, दस्तएवज). –वि. अविनाशी; नाशरहित; शाश्वत; अव्यय; कूटस्थ; अव्यक्त. 'अक्षयो मी अक्षरु।' –ज्ञा १८.११९३; 'सर्व भूतें क्षर म्हणती। अक्षर कूटस्त बोलिजे।' –दा १०.१०.४५. [अ+क्षर] ०**ओळख**–स्त्री. १ अक्षरांची, मूळाक्षरांची ओळख· ज्ञान. २(ल) लिहितां–वाचतां येणें. ०**जीवी** (अक्षरोपजीवी)–वि.१ विद्येवर उपजीविका करणारा २ लेखक किंवा कारकून. ०**न्यास**–पु. अक्षरांची मांडणी.शुद्धलेखन,शब्दांतील प्रत्येक अक्षर स्पष्ट मांडणें. ०**पद्धति**–स्त्री. शब्दांतील अक्षरांची रचना; अक्षरन्यास. ०**परिभाषा**–१ लिहिण्याची घाटणी. २ विशिष्ट अक्षरांना विशिष्ट किंमत देऊन लिहिण्याची पद्धति. ०**माला**–स्त्री. वर्णमाला. ०**मुष्टिकाकथन**–न. मनांतील अक्षरें सांगणें; मुठीमध्यें कोणता पदार्थ आहे हें सांगणें. ०**वटिका**–स्त्री. १ स्पष्ट वर्णोच्चार; शब्दांचा शुद्ध व स्पष्ट उच्चार करण्याची पद्धति. २ अक्षरांचें वळण. [अक्षर+वर्तिका]. **अक्षरशः, अक्षरागणिक**–क्रिवि. प्रत्येक अक्षर घेऊन; प्रत्येक अक्षराचा उपयोग करून. 'या कूट श्लोकाचा अर्थ मला अक्षरशः लागत नाहीं.' ०**शत्रु** ०**शून्य**–वि. अशिक्षित; निरक्षर;

अज्ञ; मूर्ख. 'एखादा अक्षरशत्रु हमाल असो किंवा कवींचा कवि असो दोघांचाहि श्रीगणेशा एकच' –एकच्याला.

अक्षरारंभ—पु. मुमुहूर्तावर लहान मुलांस मूळाक्षरें शिकविण्याचा आरंभ; विद्यारंभ. [सं.]

अक्षरी—वि. १ अक्षरासंबंधी. २ अक्षरांनीं लिहिलेली (संख्या). ३ वार, नक्षत्र इत्यादिकांचे ज्ञापक अंक न घालतां त्यांचीं आद्याक्षरें घालून केलेलें (पंचांग). [सं. अक्षर]

अक्षरेषा—स्त्री. (गणित) समीकरणलेखनांतील मूळ रेषा; निर्णयरेषा; मापनरेषा. (इं.) ॲक्सिस.

अक्षवण–वाण, अक्षवाणी—नस्त्री. १ मंगलप्रसंगीं पुष्कळ वाती लावलेला दीप (घरचा यजमान किंवा देवता यांच्या भोंवतीं) ओवाळतात तें; संकटें, अरिष्टें नाहींशी करण्याचा हा विधि आहे. 'कौसल्यात्मजा रघुवीरा। अक्षवाणें केलीं' –वेसीस्व ८.६. 'राया जनकाच्या वऱ्हाडिणी। रामा केली अक्षवाणी।'–वेसीस्व ९.३२. २ मूल वगैरेस न्हाऊं घालतांना अखेरीस पाणी ओवाळतात तें, औक्षण; अरिष्टें टाळण्याचा आणि दीर्घायुष्य चिंतण्याचा यांत हेतु असतो. [सं आयुष्यवान्; म. औक्षण]

अक्षवलन—न. (ज्यो.) क्रांतिवृत्तीय स्थानावरून ध्रुव व समबिंदु यांवर जाणाऱ्या चापामधील कोण. [सं.]

अक्षविचलन—न. (ज्यो.) अंडाकृति पृथ्वीवरील चंद्रसूर्यांच्या विषम आकर्षणामुळें खगोलीय ध्रुवाचें त्याच्या मध्यम स्थितीसभोंवतीं जें भ्रमण होतें तें. [सं.]

अक्षविक्षेप—पु. फांसे टाकणें; द्यूत खेळणें; अक्षक्रीडा. [सं.]

अक्षवृत्त—न. विषुववृत्ताशीं समांतर वृत्त; त्यावरून आपणांस एखाद्या स्थलाचे अक्षांश समजतात. अक्षांशवृत्त; (इं.) पॅरल्ल ऑफ लॅटिट्यूड. [सं.]

अक्षसूत्र—न. रुद्राक्षांची माळ. –एभा २३.५२०.

अक्षहृदय—न. द्यूतक्रीडाज्ञान; फांशांचें अंतरंगज्ञान. [सं.]

अक्षक्षेत्र—न. (ज्यो.) ज्यांतील एक कोण अक्षांशतुल्य आहे असा काटकोनत्रिकोण.

अक्षांति—स्त्री. १ उतावीळपणा; असहनशीलता; असहिष्णुता; अक्षमा. २ दुसऱ्याच्या विजयाचा, वैभवाचा, वर्चस्वाचा मत्सर; हेवा; असूया. [सं.]

अक्षारलघण—न. १ सूतकांत किंवा व्रतस्थवेळीं खावयाचें अन्न (मीठ वगैरे शिवाय–अळणी), जसें गाईचें दूध, तूप, तांदूळ इ०. २ असें (अळणी) अन्न खावयाचें एक व्रत. [सं. अ+क्षार+लवण]

अक्षांश—पु. (ज्यो.) दोन्हीं ध्रुवांपासून ९० अंश अंतरावर काढलेलें जें भूविषुववृत्त, त्यापासून खस्थळापर्यंत जें गोलीय लंबरूप अंशात्मक अंतर तें: विशेषस्थळीं ओळंब्याचा (किंवा भूत्रिज्येचा) विषुवार्शी जो कोन होतो त्याचा अंश. (इं.) लॅटिट्यूड. **०वृत्त**–न.अव. विषुववृत्ताशीं समांतर अर्शी, त्याच्या दक्षिणेस व उत्तरेस काढलेलीं वर्तुलें. [सं.]

अक्षि—पु. नेत्र; डोळा. सामाशब्द–अक्षिगोचर, अक्षिमीलन, अक्षिपात, अक्ष्युन्मीलन. [सं. अक्षि; लॅ. ओक्यूलस्; फ्रें. ओकोस; झें. अक्षि.]

अक्षिकूटक, अक्षगोल–क—पु. डोळ्याचें बुबूळ. [सं.]

अक्षिकोश—पु. डोळे ज्यांत बसविले आहेत तो खोल भाग; डोळ्याची खांच. [सं.]

अक्षितारा—स्त्री. डोळ्याची बाहुली. [सं.]

अक्षिपटल—न. डोळ्यावरील कातडें–आवरण. [सं.]

अक्षिव—न. समुद्राच्या पाण्यापासून झालेलें मीठ. [सं.]

अक्षी—क्रिवि. अक्शी पहा. 'अक्षी लई छान!'

अक्षीवक्षीच्या वाती—स्त्री. (कर्ना.) एक प्रकारचें व्रत; ज्या स्त्रीला भावंडें असतात ती तुलसीविवाहाच्या दिवशीं वाती करून देवापुढें लावते. [अक्षय]

अक्षीर, अशीर—वि. (गो.) अरुंद. [अ+शिरणें]

अक्षुण्ण—वि. १ इजा न झालेला; अखंड; न झिजलेला; न वापरलेला. २ (ल.) अस्पृष्ट; अक्षत; अभुक्त; बिनवहिवाटीचा. **०मार्ग**–पु. १ न वापरलेला रस्ता. २ थोडासा केलेला अभ्यास; थोडीशी पढलेली एखादी विद्या. [सं.]

अक्षे—अक्षय पहा. [अक्षय अप.]

अक्षेप—पु. (प्र.) आक्षेप; संशययुक्त पृच्छा; शंका; हरकत.

अक्षै—अक्षयीं पहा. 'ऐसा जो विरळा संत। अवघ्यां वेगळें मत। अक्षै ज्यांचें।'–दा ५.२.३८. [अक्षय अप]

अक्षो—स्त्री. (गो.) तागाचें वीं; सणबिया.

अक्षोट–ड—अक्रोट–ड पहा. [सं. अक्षोट]

अक्षोभ—वि. १ फार खोल; ज्याला अंत–ठाव नाहीं असें; अगाध; अथांग (पाणी). 'वरी उदकासी नाहीं अंतपार। अक्षोभ सागर भरलासे॥'–तुगा ५१. २ स्थिर; शांत; खळबळ नसणारें. 'तैंचि निश्चिर कां अक्षोभ जळ।'–एभा २१.११९. [सं. अ+क्षुभ्]

अक्षोभनरक—पु. या नांवाचा एक अत्यंत खोल नरक. [सं.]

अक्षोभ्य—वि. अक्षोभः क्षुब्ध न करतां येण्यासारखा; खवळतां न येण्यासारखा; शांत; सौम्य; गंभीर; न रागावणारा (स्वभाव, खोल पाणी). [सं.]

अक्षौणी, अक्षौहिणी—स्त्री. १ गज २१८७०, रथ २१८७०, घोडे ६५६१०, पायदळ १०९३५० इतकें मिळून होणारें सैन्य. 'आंगवणा करावेआं खोंचणी। बेठिलिआं बत्तीस अक्षौणी।'–शिशु १०३५. 'तीन कोटि म्लेंछ त्याचे। तेवीस अक्षौहिणी

दळ मागधांचें ।' –ह २२.१४७. २ एकावर एकवीस शून्यें दिलीं असतां जी संख्या होते ती. [सं.]

अक्षवण—न. ओवाळणें; अक्षवण पहा.

अज्ञ—वि. अजाण; विद्या नसलेला; मूर्ख. [सं.]

अज्ञात—वि. १ माहीत नसलेला. २ (क.) अजाण; अज्ञ. ३ जो कोणाला आकलन झाला नाहीं असा (परमेश्वर). 'अज्ञातानें घालुनि दिधलीं चक्रें तीं चुकविणें।'–विवि. डिसेंबर १९२२. **०पातक, ०पाप**–न. अज्ञानामुळें किंवा नकळत घडलेलें पाप. **०पूर्व**–वि. १ पूर्वी माहीत नसलेला; पूर्वी न घडलेला. २ अगदीं नवीन; विलक्षण; अपूर्व. **०यौवना**–स्त्री. अजाण; अल्लड; वयांत न आलेली कुमारी; बालिका; तारुण्य (विकार) प्राप्त न झालेली स्त्री. **०वास**–पु. गुप्तपणानें, एकांतांत राहणें, कोणाला उमगूं न देतां राहणें; दूर राहणें. **०हत्या**–स्त्री. न कळत–अजाणतेपणीं झालेला खून, हत्या. [सं. अ+ज्ञा=जाणणें]

अज्ञातता—स्त्री अज्ञान; अविकल्प भाव. [सं.]

अज्ञान—न. १ ज्ञानाचा अभाव; अजाणतेपण. 'नेणे जीव तो अज्ञान।'–दा ११ १.३४. २ निरक्षरता; अशिक्षितता. ३ मोह; भ्रमात्मक ज्ञान 'सर्पविषयक भ्रमाचें रज्जुविषयक अज्ञान कारण' 'मी करतों, मी लोकांचें चालवितों इत्यादि अज्ञानामुळें जीव मानतात. वस्तुत पाहिलें असतां ईश्वर करतो–चालवितो.' ४ तारतम्यबुद्धीचा अभाव: अयमंजसपणा; समज नसणें. 'पाषाणादि जड पदार्थीं अज्ञान राहतें' ५ मूर्खपणा; अप्रबुद्धता; जडत्व. ६ जीवाच्या सात अवस्थांतील पहिली अवस्था. –वि. १ अडाणी; ज्ञान नसलेला; न शिकलेला; अजाण; जड; मंद. 'कृष्णः–प्राणवल्लभे, किती अज्ञान आहेस?' –पारिभौ १७. २ (कायदा) (अ) विवाह, आंदण, घटस्फोट या बाबतींत सोळा वर्षे पुरीं होण्यापूर्वी अज्ञान; (आ) इतर बाबतींत अठरा वर्षे पुरीं होण्यापूर्वी अज्ञान. (इ) कोर्टानें पालक नेमला असल्यास एकवीस वर्षे पुरीं होईपर्यंत अज्ञान. (इं.) मायनर. [सं.] **०गत**–स्त्री. भांबावलेली स्थिति; मोहाची–चित्तवैकल्याची अवस्था. 'ते वेळेस मला अज्ञानगत झाली.' **०जन**–पु. निरक्षर मनुष्य; अविचारी, अज्ञ, जड मनुष्य. **०तिमिर**–पु. अज्ञानांधकार; गाढ अज्ञान. **०धन**–न. (कायदा) वयांत न आलेल्या मनुष्याची किंवा वेड्या मनुष्याची संपत्ति, मालमत्ता. **०पटल-पडळ**–न. (काव्य) आध्यात्मिक अज्ञान; आध्यात्मिक ज्ञानाचा अभाव; ब्रह्म, माया इत्यादिकांच्या संबंधीं वास्तविक ज्ञान नसणें. 'तुझें अज्ञान पटल विरालें। तुज झाली दिव्य दृष्टि।' **०पालक**–पु. (कायदा) वयांत न आलेल्या मनुष्याच्या मालमत्तेची व्यवस्था पाहणारा किंवा त्याची काळजी वाहणारा. (इं.) गार्डियन. **०प्राणी**–पु. बुद्धिहीन प्राणी; विचार–विवेक नसलेला प्राणी; पशु. **०बुद्धि**–स्त्री. १ विवेकहीन किंवा मूर्खपणाची समजूत, कल्पना, ग्रह. 'हें तूं म्हणतोस अज्ञानबुद्धीनें.' २ मूर्खपणा, बुद्धिहीनता. –वि. मूर्ख; बुद्धिहीन; भोळा; बालक. **०भुरें–भुरळ**–(काव्य) अज्ञानाचा मोह; भ्रम. 'जै फिटे अज्ञान भुरें' **०सिद्ध**–वि. १ अज्ञानामुळें निश्चित झालेलें, बनलेलें (मत–कल्पना). २ अज्ञानामुळें निश्चित–प्राप्त होणारें; मूर्खपणापासून अवश्य मिळणारें (फल–शिक्षा). ३ अडाणी लोकांसहि निश्चित माहीत असलेलें. 'तापावर दूध प्यायलें असतां विकार होतो हें अज्ञानसिद्धच.'

अज्ञानी—वि. अडाणी; अजाण; न शिकलेला; ज्ञानी नव्हे तो; अज्ञ. [सं.]

अज्ञाव—स्त्री. (गो.) अवज्ञा. 'अज्ञाव केली बरी न्है.' [सं. अवज्ञा वर्णविपर्यास]

अज्ञेय—वि. विचारशक्तीच्या पलीकडील; बुद्धीस अग्राह्य; अलक्ष्य. [सं.]

अज्ञेयवाद—पु. (तत्त्व.) (इं.) ॲग्नॉस्टिसिझम; आपणांस जें वास्तविक ज्ञान होतें तें इंद्रियांस गोचर होणाऱ्या वस्तूंचेंच होतें. ईश्वर, अमरत्व या गोष्टी इंद्रियांच्या म्हणजे प्रत्यक्षाच्या कक्षेपलीकडील असल्यानें त्यांसंबंधीं निश्चित असें कांहीं मत स्थापणें अशक्य आहे असा वाद; मत. –ज्ञको (अ) ६९४. **अज्ञेयवादी**–वि. अज्ञेय (वाद) मतानुयायी. 'ती नास्तिक नाहीं आहे, ती स्पेन्सरप्रमाणें आणि माझ्याप्रमाणें अज्ञेयवादी आहे.' –सुदे १०८

अज्ञी—पु. (चुकीचें रूप) अग्नि. 'करोनि थारोळी अज्ञी। आहरसिद्ध।' –दावि ३४७.

आ

आ—१ वर्णमालेंतील दुसरें अक्षर. याचा अक्षरविकास साधारण अ सारखाच झाला आहे. २ संस्कृत शब्दाच्या मागें जेव्हां हें अक्षर उपसर्ग म्हणून लागतें तेव्हां त्याचे पुढील अर्थ होतात–(अ) लघुता; अल्पता; कमीपणा. उ० ओष्णम्=कोंबट (उष्णम्=कढत, ओष्णम्=किंचित् उष्ण–कोंबट) (आ) व्याप्ति; प्रसार; वाढ. उ० आभोग=समृद्धि; पूर्णता. (भोग=सुख, आभोग=अधिक भोग, भोगाची वाढ). (इ) उपक्रमाची मर्यादा (अमूकपासून). उ० आसमुद्रात्=समुद्रापासून, आजन्मतः=जन्मापासून. (ई) अवसानमर्यादा; शेवटची, अंताची मर्यादा (अमूकपर्यंत, पावेतों) उ० आफलोदय=फलप्राप्ति होईपर्यंत; आजानु=गुडघ्यापर्यंत; आकर्ण; आमरण=मृत्यूपर्यंत. (उ) अंतर्भूत व समाविष्ट मर्यादा. उ० आक्रमण (क्रम्=जाणें, चालणें, पाऊल टाकणें)=व्यापून टाकणें, आसकलात् ब्रह्म=ब्रह्म वस्तुमात्र व्यापून आहे. (आ+सकळ=सर्व). (ऊ) अतिरिक्त; अकारण, वाजवीपेक्षां अधिक;

निरर्थक; द्विरुक्ति. उ० आभास, आघ्राण, आह्लाद, आघात, (भास, घ्राण, ह्लाद, घात, याप्रमाणेंच अर्थ). (ए) आ लावल्यानें शब्दाचा अर्थ वाढतो, मर्यादित होतो, बदलतो किंवा फिरविला जातो उ० आग्रह(ग्रह=घेणें–घेतल्यानंतर त्यालाच चिकटून राहणें)= हेका. आचार (चर्=चालणें)=शास्त्राप्रमाणें वागणूक ठेवणें. आगमन (गमन=जाणें)=जवळ जाणें, येणें. आमोद (मोद=आनंद)= सुवास. आकृति (कृति=कृत्य)=मूर्ति; स्वरूप; आकार.

आ—(आ अक्षर उच्चारतांना होणाऱ्या ध्वनीचा अनुवाद व तोंडाचा आकार) तोंड वासणें, उघडणें; उघडलेलें तोंड. (क्रि० करणें, पसरणें, वासणें). 'तव सुप्रसाद मुद्रिा इच्छितसे चातकी करुनि 'आ' हे।' –मोआ ४.८३. 'हृदयें वाट पहाती मेघाची जेंवि करुनि आ शेतें।' –मोशांति ३.६५. **०वासणें**–१ तोंड पसरणें; आ करणें; जांभई देणें. २ खाऊन टाकण्यासाठीं तोंड उघडणें. ३ मदतीसाठीं याचना करणें. जसें–चीं चीं करणें, बें बें करणें; दयेची याचना करणें; आधीनता, अंकितपणा कबूल करणें; शरण आलों म्हणून कबूल करणें. **म्ह**० नाक दाबलें म्हणजे आ वासतो. **०वासून, पसरून बसणें**–आशा धरून, उत्कंठेनें बसणें. **०पसरणें**–तोंड उघडणें; पदार्थ खाण्यासाठीं आ करणें. '.. आ ज्याला। कवळार्थ पसरिला...' –मोभीष्म १.२४.

आ—(संक्षेप) पत्रव्यवहारांत मोठ्यानें लहानास लिहितांना 'आ' (आशिर्वाद या अर्थी) लिहितात. जसें–कळावें हे आ०. दंडवत बहुतेक नुसता 'द' लिहितात.

आ—उद्गा. १ खबुतर, मोर, इत्यादि पक्ष्यांस बोलावण्याचा शब्द. २ (अनुमोदनार्थी) होय; बरें.

आ—भिन्नी भाषेंतील षष्ठीचा प्रत्यय. उ० उनाड पोयराआ हानोपेन=उनाड पोऱ्याचें लहानपण. -भिन्नी भाषेंतील गोष्टी ३०.

आं—उद्गा. १ सांगितलेली गोष्ट चांगली ऐकली नसतां पुन्हां बोल असें म्हणण्याच्या अर्थानें केलेला उच्चार; काय ? आं ! (प्रश्नार्थी). २ षष्ठीचा विभक्तिप्रत्यय. 'तेंवं तो धारासिंपे तिरवटें। डोळेआं उजूं।' –शिशु ७११. 'तेआं पासाव जगजीवनें। काइ आधिष्ठीलेति।' –ऋ १३. [सं. आम्]

आँ—सना. तो–ती तें. 'आँ साहेबी'–त्या प्रभूंनीं. –अ. असें कीं. [फा. आँ]

आआडणें—अक्रि. (भि.) ओरडणें. 'जीव वाचवाखातीर तो मोठानें आआडाआ लागयो' –भिन्नी भाषेंतील गोष्टी १७.

आइकट—पु. (गो.) तह. [का. आयकट्टु=व्यवस्था]

आइकणें–आइकभट्टी–आइकीव—ऐकणें, ऐकभट्टी, ऐकीव पहा. **आइका**–ऐका पहा. 'ते प्रसिद्ध नागांविका। प्रसन्न होए आइका।' –ऋ ४. **आइकत**–ऐकोत. 'तें आइकतु रसिकु आतां॥' –शिशु ७४३. **आइकौनि**–ऐकून. 'जेआंचे आइकौनि बरवेपणा।' –दाव ४८. **आइकीजे**–ऐका. 'आइकीजे द्वारकापुरा नगरी' –उषा ६४७. **आइकें**–ऐक. 'आणीक आउकें यादव टीळका।' –उषा ८१३. **आइकशी**–(रा. कुण) ऐकशील. 'माजें आइकशी ता तूं मुंबयच्या वांट पडों नुको.' –मसाप २.४.१११. साधारणपणें जुन्या मराठींत लिहितांना ऐ बद्दल आई किंवा अई येतें.

आइणी—आयणी पहा.

आइतवार—आदितवार पहा.

आइ(इ)ता–ती–तें—वि. १ स्वतंत्र, स्वतःसिद्ध; स्वयंपूर्ण. 'तो तुझा तूं आइता'–परमा ४.१६. 'म्हणूनि हें आइतें। सच्चिदानंद।' –विउ १०.२५.२ श्रम, यत्न न करतां प्राप्त झालेला, मिळालेला. 'हा दागिना मीं करविला नाहीं, मला आइता मिळाला. आयता–ती–तें पहा. **म्ह**० आइती गुरवीण होईन, नैवेद्य खाईन= आयतें केलेलें अन्न खाण्यास मागेंपुढें न पाहणारी ऐदी स्त्री. [सं. अ+यत्=प्रयत्न करणें]

आइती—स्त्री. १ सिद्धता; तयारी; सामग्री 'मग म्हाइंभटीं ऋद्धिपुरा जावेयाचि आइती करूं आदिरिली' –ऋ १३३. 'जुंझाची आइती। करवीतुसें यदुपती।'–शिशु ९१०. 'ऐसेंणिसिया आइती। जयाची परी असती।' –ज्ञा १३.५९१. 'करा तुम्ही बाशिंगाची आइती।–स्त्रीगीत ८. आयती पहा. [सं. आ+यत्= प्रयत्न करणें]

आइतोजी—वि. पूर्वी खटपटीच्या वेळीं न येतां फलोपभोगसमयीं मात्र येणारा. [आइता]

आइतोळा—पु. पाटाच्या स्त्रीला तिच्या पूर्वभर्त्यापासून झालेला पुत्र. आयतखाऊ, आयतोजी. (हा दुसऱ्या भर्त्यास आयता मिळालेला असतो).

आइंद–दा–दे—क्रिवि. १ येणारा; पुढें; पुढील वर्षी. 'हाली (सध्यां) व आइन्दे'–पया ४९३. 'सरकारचे वचनाची कायमी कशी तें आईन्दे जहुरांत येईल.' –रा १०.१६६. २ यंदां; या सालीं [फा. आयन्दा=येणारा, भावी.]

ऑइल—न. तेल, अर्क; एल (तिळेल, फुलेल यामधील). [इं.] **०इंजन, ०एंजिन**–तैलयंत्र, तेलानें (तेलाच्या वाफेनें) चालणारें इंजन. 'आइल एंजिनांतील कूड ऑइल वापरण्याचा प्रघात बऱ्याच जणांस विदित असेल.' –सासं २.१३२. [इं.]

आइस—पु. बर्फ [इं.] **०क्रीम**–न. दूध, दहीं, रस किंवा अशाच पातळ पदार्थांत साखर (कधीं बदाम, केशर) घालून यंत्राच्या व बर्फाच्या साहायानें घट्ट केलेलें खाद्य. 'यापुढें विश्वामित्राचें कुलपीमलाय आइसक्रीम थंडगार होतें' –नाकु ३.७९.

आई—एक भावदर्शक प्रत्यय. हा विशेषणास लावला असतां भाववाचक नाम होतें. उ० भला–भलाई कुचर=कुचराई; नरमाई, बारकाई, गनिमाई. [फा.]

आई—स्त्री. १ जननी; माता. 'आई वदे बा न मानीं संकट' –दावि १६०. २ जगदंबा; देवी; देवींच्या नावापुढें लावावयाचें उपपद; जसें–तुकाई, मरीआई, काळकाई. ३ (सांकेतिक) वारकरी पंथांतील लोक ज्ञानेश्वरीस म्हणतात. ४ (सामा.) देवी 'आईच नवसु नाहीं पुरविला' –दावि ३४७. ५ देवी (रोग); फोडया. ६ लहान मुलाला लडिवाळपणें संबोधितात. [सं. आर्ये, किंवा अयि? सं. आदि? प्रा. आइ?] शिवाय अइ पहा. **म्ह**० १ आईचें दूध कीं गायीचें दूध=दोन समान गोष्टींपैकीं सरसनिरस ठरवितां येत नाहीं अशा वेळीं योजतात. यासारखीच दुसरी म्हण–आई गोड कीं खाई गोड. २ आईजीच्या दौंदावर (जिवावर) बाईजी उदार=दुसऱ्याच्या मालमत्तेवर उदारपणा दाखविणें; आयती चैन करणें. ३ आई जेवूं घालीना, बाप भीक मागूं देईना=दोन संकटें आलीं असतां किंवा दोन परस्परविरुद्ध मतांच्या अधिकाऱ्यांची मर्जी संभाळावयाची असतां योजतात (इकडे आड तिकडे विहीर याप्रमाणें). ४ एका आईचीं लेंकरें=बंधुभाव दाखविण्याकरितां योजतात. ५ लहानपणीं आई आई, थोरपणीं बायलाबाई=लहानपणीं आईची आठवण वारंवार होते पण प्रौढपणीं स्त्रीमुळें विसर पडतो. ६ आई मेल्यावर बाप मावसा (भिक्काळजी) होतो. ०**आंग**–न. आईपणा–मायपणा ज्या अंगापासून येतो तें अंग; स्त्रीचें किंवा प्राण्यांतील मादीचें जननेंद्रिय, व अंतील गर्भाशयाचा भाग; गुह्यांग. 'बाळंत होतांना तिला त्रास झाला, आईअंग बाहेर आलें' [आई+अंग] ०**काळी**–स्त्री. शेतजमीन. ही आईसारखी पोषक असते म्हणून आदरार्थी. –गांवगाडा. [आई+काळी =शेतजमीन] ०**पांढर**–स्त्री. गांवठाण; गांव ज्या जमिनींत वसतो ती जमीन; ही शेताच्या निरुपयोगी म्हणजे साधारण पांढऱ्या रंगाची असते. [आई+पांढरी] ०**पोरका**–वि. आईवांचून उघडा पडलेला; ज्याची आई मेली आहे असें (मूल) ०**बाई**–स्त्री. १ आई सारखी वयाने श्रेष्ठ, मुख्यत्वाची अशी बाई; आईप्रमाणें स्त्री. **म्ह**० देई घेई ती आई बाई, न देई ती मसणांत जाई. २ शेजारची बाई: शेजारपाजारची स्त्री; शेजारीण. ३ कोणी तरी बाई. (अनेकवचनी उपयोग). **म्ह**० परीट नागविला तर आयाबाया नागविल्या=परटाच्या येथें चोरी झाली तर त्यांचें कांहीं जात नाही, उलट इतर लोक उघडे पडतात. ०**करणें**–खुशामत करणें; गोंजारणें. ०**बाप**–पु आई व बाप; वडील व मातोश्री; मातापिता. (अव.) आई व बाप. 'माझीं आईबापें आणि माझे शिक्षक जें मला सांगतात तें कां केलें पाहिजे?'–मराठी ३ रें पुस्तक (१८७३) पृ. ४१. **आईबापावरून पावणें, आईबाप उद्धरणें**–आईबापावरून शिव्या देणें; वेड्यावांकडया, वाईट शिव्या देणें. ०**माई**–स्त्री. व्यापक अर्थानें बाई; एखादी आईसारखी मानलेली स्त्री, माउली; आईबाई. ०**माई उद्धरणें**–आईवरून शिव्या देणें. ०**माई करणें**–खुषमस्करी करणें; मनधरणी करणें.

आईक—वि. ऐकिव; पाहिलेली नाहीं अशी. –वामन बालक्रीडा ७३. (शर.)

आईणी—आयणी पहा.

आईदे—क्रिवि. यापुढें; आइंद पहा. –ख ३५७६; पया ४.६६.

आईन—पु एक झाड; अईन पहा. 'ते पाईरहि खैर, किंजळ, तियें आईन ही वाढती.' –केक १२९.

आईस—(कों. गो. कुण) आई; माता; देवी; लक्ष्मी; आई पहा. 'मीं जरी सलगीचा चांगु. तरी काय आइसीहूनि अंतरंगु.' –ज्ञा ११.३२. 'आईस लागे की बहिण लागे सांग शिवशक्तिचें नांव' –मसाप १.१.४. [आई+स प्रत्यय]

आउक-ख, औख-क्ष—न आयुष्य; हयाति; जीवित. 'नाहीं फिटली आसोसी देवा आउक दिला थोडा.'–ऐपो ८९. [सं.] आयुष्य=आउख] ०**वंत**–वि. आयुष्मान्, दीर्घायुषी. [आयुष्यवान्]

आउंज—आविंज पहा.

आउट-ऊट-कें—औट पहा.

आउत—औत पहा.

आउलें—वि. वेगळें; निराळें; वायलें. 'चाऱ्ही वेदयासीं आउलें टेविलें. बळीसि दिधलें बलिदान॥' –व १९८. [उवाइला वाइला पहा.]

आउ(ऊ)स—(कों. कुण.) आई; माता; आईस.

आउ(ऊ)क्ष—आउख (आयुष्य) पहा. 'आउक्ष तानाजीचें समजलीं. घोरपड फिरली.' ऐपो ४१. 'अगे बाई! आला! सोनियाचा बाळा. आउक्ष तयाला. उदंड हो॥' –वाट बघ (जननी जनकज कृत काव्य). ०**वंत**–आउखवंत पहा.

आऊ—स्त्री. अवा पहा. १ मराठ्याच्या स्त्रीला आदरार्थी संबोधितात. उ० जिजाऊ. 'आऊसाहेब'–पया ५२७. २ **आवडी** नांवाचें संक्षिप्त रूप. ३ (ल.) हलक्या शीलाची स्त्री; आवा; अवाजी. ४ (सामा.) स्त्री. 'ही आऊ कोण बुवा?' [सं. अंबा; प्रा. अब्बा–आऊ, का. अव्वा] ५ स्तन; थान. 'आईचा आऊ तें पिऊं लागेल' –नीतिशास्त्रप्रवेश पृ १००. [अमा–आमा–आमू]

आऊ—न. १ कण्हणें; विव्हळणें; अयाय करणें; मारतांना काढलेला किंवा असाच दुःखाचा उद्गार. २ कांकूं करणें; नकार दर्शविणें. [ध्व. ऑ+ऊं]

आऊट-की-कें—अवटकी, अवटी, औट पहा.

आऊड—साडेतीन हाताचा पुरुष; औट पहा. ०**बारा**–अउडबारा पहा. [प्रा. आउट्ठि=साडेतीन]

आऊड—पु. (औंध) १ टप्पा. २ बंदुकीच्या गोळीच्या टप्प्याइतकें अंतर. [औट, आउट]

आऊत-काठी-की-घेणें-फाटा—औत पहा.

आऊत—न. (कृ.) मासे धरण्याचें जाळें. [सं. आयुध]

आओ—पु. आकृति; रूप; आकार. ' जरि माजा सीं मोटकाचि आओ । तरि चराचरां कैसां भाओ । ' –शिशु ३९४. [सं. आकार, तुल० म. आव]

आक—पु. १ (गु.) गाडीचा कणा; आंख. [सं. अक्ष. म. आंस] २ (घडकाम) लोखंडी लांबट तुकडा; गज; बार.

आंक—पु. १ अंक पहा. २ आंख पहा. ' आंका वैसला भाला ' सयाजी गायकवाड पडला । ' –ऐपो ८७.

आकटी—आगटी पहा.

आकंठ, आकंठमर्यांद—क्रिवि. गळ्यापर्यंत–पावेतों (भोजन, जल, संकट, इ० किंवा त्यांत बुडणें, निमग्न होणें.) ' हिमोदकें आकंठें । ' –ज्ञा १७.२५८. [सं. आ+कंठ=गळा]

आकंठणें—उक्रि. (काव्य) गांठणें; आटोपणें (पकडणें, धरणें). ' देव भोळा भावे भक्ता पाठोपाठीं । उचिता आकंठी माधोमाघ ।' [सं. आ+कंठ]

आकडसासु—स्त्री. (व.) बायकोची वडील बहीण; वडील मेव्हणी, [आक्का+सासू]

आकडा, आंकडा—पु. १ संख्या; अंक; गणितांतील एक चिन्ह. २ बांकदार, वांकडें टोंक; आंकडी; हूक. ३ (ल.) विंचू किंवा खेंकडयाची नांगी. ४ लांब मिरची किंवा चिच. ' चिचेचा आकडा. ' ५ टोंक; शेडा. ' आंकडयाचें पान ' ' तैसे आवाळुवा वरी आंकडे । धगधगीत दाढांचे । ' –ज्ञा ११. ३६३. ६ घोडा (छत्रीचा वगैरे). ७ (जरतार धंदा) फिरकींतून जाणाऱ्या तारेस एकाच दिशेनें फिरण्यास लावणारें यंत्र. ८ (गो.) अंगठा. [सं. अंक्=खूण करणें, अंक=चिन्ह, आंकडा] **०वळणें**–थंडीनें किंवा भीतीनें अंग आखडणें. **०मोडणें–वसणें**–विण्याच्या अगोदर गाय किंवा म्हैस या जनावरांच्या दुंगणाच्या दोन्ही बाजू खोल जाणें. **आंकड्यास येणें–लांबणें–लवणें**–वांकणें, पिकणें (शेत, पीक, धान्याचीं कणसें). ' कितेक भारें आकडया लवती'–सप्र १२.४३.

आंकडी—स्त्री. आंकडा पहा. १ (गो.) थंडी वाजून भरणारें कांपरें. ' माकां आंकडी आयली ' [गो. आंकडुंचें=कांपणें] २ लहान मुलांच्या पोटांत होणारा व हातापायास आंचके बसणारा रोग. [तुल० सिं. आकुडु.] ३ उंचीवरील वस्तू (फुलें, फळें वगैरे) तोडण्यासाठीं एका उंच काठीच्या टोंकाला कोयती, विळा किंवा तशाच प्रकारचें हत्यार बांधून केलेलें साधन. ' आंकडी घेऊन पानें काप ' ४ (कों.) कमरेस कोयती ठेवण्यासाठीं एका दोरीला गेळ केलेला लांकडाचा तुकडा बांधून केलेलें साधन. ' कंबरेला आंकडी लाव. ' ५ नांगराचें जूं ज्याला बांधतात तो मुख्य दांडा. –मसाप २.३.७७. ६ दुबेळक्यासारखें चिऱ्याचा गळपट्टा बांधण्याचें एक हत्यार; एस्की; इचकी. –चिऱ्याची माहिती पृ. २१.७ समेळ (डम व डंका) वाजविण्याची वेताची वांकविलेली लहान काठी. ८ (खा.) सोनारी (धंदा) गावी नांवाच्या तार काढण्याच्या ठोकळ्यावर लोखंडी जाड पट्टीची कमान बसविलेली असते ती. [आंकडा, सं. आकृष्ट; प्रा. आकड्ढ]

आकडी—वि. (कर.) पाणी न मिसळलेलें–कोरें; निरसें (दूध) ' आकडी दूध महाग असतें. ' आखरी दूध पहा. [?]

आंकडेपत्रक—न. वस्तुस्थितिनिदर्शक आंकडयांचा तक्ता. (इं.) स्टॅटिस्टिकल रिटर्न. [सं. अंक+पत्रक]

आंकडेशास्त्र—न राज्यकारभारांत ज्या गोष्टींचें ज्ञान अवश्य असेल तें परिमाणात्मक करण्यासाठीं आंकडे गोळा करण्याचें शास्त्र (इं.) स्टॅटिस्टिक्स. [अंक+शास्त्र]

आकण—न. १ एकदां मळणी केलेलीं कणसें (जोंधळा, बाजरी इ० चीं). २ (कांहीं प्रांतांत) दुसरी मळणी झाल्यानंतरचें धान्य; मदन पहा. ३ धान्याची मळणी झाल्यानंतर उरलेलें, माती खडे मिसळलेलें धान्य; मातेरें. –ज्ञायो १.४४. [सं. आकृष्ट+कण किंवा आ+कंडण किंवा आ=ईषत्, किंचित्+क्षुण्ण=मळलेलें] **०निघणें**–(व.) पिढा पडणें; खात्री निघणें; अतिशय दमून थकणें. ' फार मजल तो चालून आल्यामुळें त्याची खूपच आकण निघाली. ' **०निकण**–एकदां मळून, धान्य काढून झालेलीं कणसें पुन्हां मळून त्यांतून निघालेलें धान्य.

आंकण–णा–णें—पुन. १ पायांत घालावयाचा तोडा (पूर्वी शत्रूला जिंकल्यानंतर त्याचें नांव एका तोडयावर खोदून तो पायांत घालण्याची चाल होती त्यावरून);पराक्रमसूचक पादभूषण. ' तो रणीं जिंतिला करूनि नेम । तेणें संतोषोनि परम । आपलें नाम आंकणा घाली । ' –एभा १९. १४३. [सं. अंकन] २ (सामा.) ब्रीदः बिरुद; ब्रीदावळी; अलंकार; भूषण. ' आंगांचेनि गोरेपणें । हे पण्हरयांवरी पढवी आंकणें । ' –शिशु ८०७. ' हें आंकणें अनंता तुजचि साजे । ' –भाए ६५०.

आंकणकडवें, आंकडकडवें—न. १ गाण्यांतलें पालुपद; ध्रुवपद; पेडाबंद. २ (ल.) एकदां नाकारलेली गोष्ट पुन्हां पुन्हां काढणें; विनंति करणें; टरलेली गोष्ट पुन्हां उपस्थित करणें; जपमाळ घेणें; घोळणें; तुणतुणें गाणें, घोकणें. ३ एखाद्याच्या भाषणांत वारंवार येणारा शब्द; पादपूरण; वाक्यपूरण. [अखंड+कडवें. गुज. आंकणी, आखणी]

आंकणा–ना—पु. अंकित; ताबेदार; आज्ञांकित. ' तेजाचेआं आळवना । जेआं बारां हीं सूर्य्यें आंकनां । ' –शिशु ३९८; ' माझिया प्रतापें यमु आंकणां ' –कृमुरा ३.५४; ' विठ्ठल म्हणा विठ्ठल म्हणा । कळिकाळ आंकणा मग तुम्हां । ' –निगा पृ. १५५. [आंकण पहा]

आकणी—स्त्री. (का.) रस्सा [अ+कण]

आंकणी—स्त्री. १ आंखणी; रेघा वगैरे आंखण्याची पद्धति; रूळ. २ रेघा मारणें; आंखणें; खुणा करणें. ३ पेटींतील खण–कप्पा. ४ योजना; बेत; रूपरेषा; चित्राकृति; (इं.) प्लॅन; स्कीम. ५ जनावरांना रोग झाला असतां डागण्याची सळई. [सं. अंकन, म. आंखणें]

आंकणें—सक्रि. (विरू.) आंखणें. १ आंखणें; चित्रित करणें; क्रमांक घालणें; सरळ रेषा ओढणें; मोजमाप करणें. २ (सोनारी धंदा) कैवारानें माप घेणें. अंकणें पहा. [सं. अंकन]

आकतीज—अखतीज; अक्षयतृतीया पहा. 'भाऊबीज आकतीज जाल्या यापरी। –दावि ४५६.

आकदस—अकदस पहा.

आंकपट्टी—स्त्री. १ कापडाचा ताका किंवा सणंग वगैरेवर मालाची किंमत व क्रमांक दाखविण्यासाठीं डकविलेली चिठ्ठी. अंकपट्टी पहा २ कापडाच्या गांठींतील निरनिराळ्या वस्तूंच्या किमतीची मोठी यादी. ३ आंकणी अर्थ १ पहा. [सं. अंक+म. पट्टी]

आकपिकुळ— वि. (गो.) सद्गदित. करुणेनें द्रवलेला; गहिंवरलेला. [सं. व्याकुल, अक=दु.ख+म. पिकुळ=पिकलेला]

आकंपित—न. (नृत्य) नृत्यामध्यें डोके खालीं व वर हळूहळू हालविणें. हा अभिनय ओळख पटली अगें दाखविणें, उपदेश करणें, प्रश्न विचारणें, स्वाभाविक भाषण इत्यादि गोष्टी दर्शवितो. [सं.]

आकबंद—वि. सबंध; संपूर्ण; पूर्ण; पुरा. (मालावर किमतीचा आंक, अंक, आंकडा घालून व इतर सर्व साधनें पुरीं करून तयार केलेला माल). उ० आकबंद पेटी. [सं. अंक+बध्द]

आकबरीमोहर—अकबरी मोहर पहा.

आकय—(गो.) अक्का पहा.

आकर—पु. खाण; ठेवा; सांठा; संग्रह; आगर. उ० रत्नाकर. करुणाकर, कुसुमाकर. 'ऋतूंमाजीं कुसुमाकरु। वसंतु तो मी॥' –ज्ञा १०.२८३. [सं.] **०ग्रंथ**–पु. मोठें–जाड पुस्तक; प्रचंड ग्रंथ. **०ज्ञान**–न. खनिज्ञान; खाणींसंबंधीं शास्त्राचें ज्ञान–माहिती; जमीन पाहून त्या ठिकाणीं कोणत्या पदार्थांची खाण लागेल हें समजण्याची विद्या.

आंकर—पु. (गो.) अंकुर; मोड; कोंब. [सं. अंकुर]

आकरणें—उक्रि. आकार देणें–घेणें; उत्पन्न होणें–करणें. 'आकरलें जें जें माथिक तें खरें।' –व २१२. [सं. आ+कृ]

आकरताळी—अकरताळ पहा.

आकरसणें—उक्रि. १ जोरानें ओढून, आंवळून, करकचून बांधणें; घट्ट बांधणें; बांधणें यासाठीं प्रयोग. उ० 'आकरसून बांध.' २ ओढणें, ओढला जाणें; आकर्षिणें. [सं. आ+कृष्]

आकरसणें—सक्रि. अक्रसणें; संकोचणें; आंखडणें; आटणें. [आ+कृष्]

आकरा—अकरा पहा. 'शिणल्या बहुत चौसष्टी। आठ जणी बहुत कष्टी। आकराही हिंपुटी। स्वरूप तुझें वर्णिता। –ह ३.४.

आंकरी—स्त्री. १ अंकुर; कोंवळा शेंडा; डिरी. २ कोंवळें कणीस. [सं. अंकुर]

आकरीत—वि. अक्रीत पहा. १ अतिशय; फार. 'नको करुं आग्रह आकरित।' –प्रला १२२. २ लबाड; धूर्त; फाजील. 'लई अंतरची खोल मोठी वर नट केवळ सात्त्विक दिससी। गरीब रीतीनें करून आकरितपणीं जनीं अससी।' –होला ८९. [अ+की]

आकरोट—अक्रोट–ड पहा. 'बदामें आकरोटें खिसमिस उतल्या आणवील्या सवंगा।' –सारुह ३.४८.

आकर्ण—क्रिवि. कानापर्यंत. 'धनुष्य आकर्ण ओढून बाण सोडला' [सं. आ+कर्ण]. –वि. कानापर्यंत लांब. उ० आकर्ण नयन–लोचन. **०धनुरासन**–न. योगशास्त्रांतील एक आसन. –संयोग ३४७. **०वरी**–क्रिवि. कानापर्यंत. 'अर्धचंद्र बाण त्वरित। आकर्णवरी वोढिला।'

आकर्णणें—उक्रि. (काव्य) ऐकणें; श्रवण करणें; लक्ष देणें. 'हे आकर्णुनि पूर्ण तूर्ण विभवज्ञानार्णव, क्ष्मापती।' –आसीस्व ९. 'तुम्हीं नगरीं हिंडता निरंतर। आकर्णिता जनवार्ता समग्र। –रावि ३७.२०. [सं. आ+कर्ण]

आकर्णन—न. श्रवण; ऐकणें. 'परी आकर्णनीं नाहीं। चाड जरी॥' –ज्ञा १८.१४८९. [सं.]

आकर्णित—वि. ऐकलेलें.

आकर्षक—वि. १ ओढून घेणारा; ओढणारा; खेंचणारा. २ (ल.) मनोवेधक; चित्त रमविणारें; सुंदर. [सं. आ+कृष्]

आकर्षक्रीडा—स्त्री. १ खेळ (सोंगट्या, बुध्दिबळ इ०). २ मल्लयुद्ध (६४ कलांपैकीं). [सं.]

आकर्षण—न. १ ओढून घेणें. २ (ल.) वेधून घेणें (मन, चित्त वगैरे), ओढा; ओढ (मनाची). ३ आकुंचन; आकरसणें. [सं. आ+कृष्]. ४ (संगीत) वाद्याची वाजती तार ताणून तिच्यावर नखीचा आघात करून उच्च स्वर काढणें. ५ ओढून घेण्याची शक्ति; आकर्षणशक्ति पहा. सामाशब्द– विद्युदाकर्षण; लोहाकर्षण इ० (इं.) अॅट्रॅक्शन. **०शक्ति**–स्त्री. (पदार्थ.) जिच्या योगें वस्तूंतील प्रत्येक परमाणु आपापल्या आकारमानाप्रमाणें व अंतराप्रमाणें इतर परमाणूंस आपल्याकडे ओढतो ती. [सं.]

आकर्षणें—उक्रि. १ ओढून घेणें, वेधून घेणें; आकर्षण करणें. 'तक्षक आकर्षुनि आम्ही। पाडीत असों इयें होमीं।' –मुआदि ११.१३७. २ आकुंचन पावणें; घट्ट होणें; आकरसणें. 'अगा हिम जें आकर्षलें।' –ज्ञा १४.३७६. [सं. आ+कृष्]

आकर्षित—वि. १ आकर्षण केलेलें; वेधून, ओढून घेतलेलें. २ संकुचित, घट्ट केलेलें; आकुंचित; आकरसलेलें.

आकलणें—आकळणें पहा.

आकलन—न. १ बंधन; आळा; ताबा; वर्चस्व; पराधृत करणें; (कार्य) करूं न देणें. २ समावेश; व्यापणें; आंत घेणें; सांठवेणें. ३ बोध; समज; ग्रहण शक्ति; ज्ञान. [सं. आ+कल्]

आकलित—वि. आकलन केलेलें (सर्व अर्थीं).

आकली—न. (कों.) (मासे पकडण्याचें) पाग पेक्षांही ह्हान जाळें. [सं. आकलन]

आकल्प—अ. १ ब्रह्मदेवाच्या सबंध दिवसापर्यंत, म्हणजे ४३ कोटी २० लक्ष मानव वर्षे जाईपर्यंत. २ (ल.) फार अमर्याद काळ ावेतों; जगाच्या अंतापर्यंत. 'आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळां. ाक्षिया सकळां हरिच्या दासां।' [सं. आ+कल्प]

आंकवर—पु. (गो.) कुमार, अविवाहित. [सं. कुमार; प्रा. ुआॅर; हिं. कुंवर]

आकवात—न. (कु.) एक वेळ जेवून राहणें. [एक+वख्त]

आंकवार-वारीण—स्त्री. कुमारी; कुवारीण. [सं. कुमारी; ा. कुआॅरी; म. कुंवारीण.]

आकस—अकस पहा. 'गर्जोनी मग काळदंड त्यजिला ालोनियां आकर्षी।' –लहुकुश ५९.

आकसर—वि.(गो.)लग्नास योग्य असून लग्नावांचून राहिलेला रुष किंवा स्त्री, कुमार, कुमारी. [आंकवर. का. अक्क=मोठा]

आकसांवां—न. (गो.) आकांडतांडव; नाटकी आविर्भाव गर बोलणीं. 'ता गेलीं आकसांवां सदाचींच!' [पो. आक्सांव, . ॲक्शन]

आकस्मिक—वि. अचानक; अनपेक्षित; अकस्मात, अवेत घडलेलें, आलेलें. [सं.]

आकळ—आकलन पहा. 'ब्रह्मादिकां न कळे खोळ. ते हे ाकळ धरियेली।' –तुगा २२३. –वि. १ अकळ पहा. २(ल.) रब्रह्म. –शर.

आकळण—न. समजण्याची शक्ति; विवेकबुद्धि. आकलन हा. 'विवेक विसरला आकळण।' –एभा २३.९५८.

आकळणें—उक्रि. १ ओढणें; निग्रह करणें; ताब्यांत ठेवणें; ांधणें. 'परी त्या गर्वे आकळिलीं' –रासपं २.५९८. 'अंगुष्ठमात्र ाण पुरुष। आकळोनि काढिला।' –मुवन ६.६३. २ समजणें; बोध ोणें; लक्षांत येणें; आटोक्यांत, आवांक्यांत येणें. 'किती समुदाय ाकळेना।'–दा १९.१०.११. 'बळें आकळेना मिळेना मिळेना।' राम १४२. –एभा २०.६९. 'परि योग्य वीर समर–क्रीडोत्सुक– वस्त काय आकळते।' –मोभीष्म १२.६५. ३ (ल.) आवरणें; ंचित मर्यादित करणें (धंदा, प्रकरण वगैरे). ४ सांपडणें. 'अहं सोहं ब्रह्म आकळलें।' –तुगा ४०३६. ५ व्यापला जाणें. 'तैसा तो धनुधेर महामोहें। आकळिला।' –ज्ञा १.१९०. ६ ओढून घेणें; वश करणें. स्वाधीन ठेवणें. –एभा २९.४७. 'तुझें कुशल नाम बा हळुहळू मना आकळी।' –केका ७४. ७ जवळ घेणें; ओढणें; कुरवाळणें. (ल.) चुंबिणें. 'थानें चोळूनिशानें वदनकमळहि आकळीलें पतीनें।' –विद्रल्लत रंसमंजरी १०. [सं. आकलन]

आका—१ अक्का पहा. २ (गो.) आत्या. ३ निरर्थक शब्द; आकाबाका (ओठोप्रमाणें). 'आका म्हणतां बाका येत नाहीं= ओ म्हणतां ठो येत नाहीं; अडाणी; अक्षरशत्रु.

आकाटाका—पु. (व.) आटोका, अंदाज. 'आलें माझ्या आकाटाक्यांत तर टाकतोंच एक घर घेऊन.' [आटोका]

आंकाडा—पु. (हेटकरी) कुंपण असलेल्या परसांत जावयाच्या वाटेतील बेडें; वाडग्यांत जावयाच्या वाटेंत पुरलेल्या दुबेळक्यावरील आडवें लांकूड. [आंकडा]

आकांत—अकांत पहा. 'आमचा देव बहु सत्य. आम्हां आकांतीं पावत।' –दा ६.६.४२.

आकांतणें—१ अकांतणें पहा. 'त्याचिया पापरहाटी. आकांतली सर्व सृष्टी।' –मुसभा ५.१४१, २ (गो.) घाबरणें; बावरणें. 'ता गॅल्या बोवेन हांव सगलो आकांतलो [सं. आकान्त]

आकातला—वि. (व.) हपापलेला. 'आकातल्यासारखा खायला धांवतो.' [आकांतलेला]

आकाबाई—अक्काबाई पहा. ०**आठवणें**–अवदशेची इच्छा करणें. 'तर तुम्हाला पुरतीच आकाबाई आठवली आहे असें मी समजतों.' –अरबी भाषेंतील गोष्टी.

आकाय—स्त्री. (गो.) वडील बहीण; वयोवृध्द स्त्री. अक्का पहा.

आकार—पु. १ आकृति; ठेवण; रूप; घडण; मूर्ति. 'पै ब्रह्मबीजा जाहला अंकुर। घोषध्वनी नादाकार।' –ज्ञा ९.२७५. २ बाह्यस्वरूप; देखावा. ३ (ल.) साम्य; सादृश्य; तुल्यता. ४ मनावर ठसलेली आकृति–ठसा–मूर्ति; मनावर झालेला परिणाम–कल्पना-ग्रह. ५ (पूर्णतेस येणाऱ्या कामाच्या, ध्येयाच्या किंवा योजलेल्या गोष्टीच्या, मसलत इ०च्या) स्वरूपाचा निश्चितपणा. ६ खर्च, नफा, उत्पन्न, वसूल इत्यादि गोष्टींचा अजमास–अंदाज; जमाबंदीचा अंदाज, ठरावणी. ७ खूण; चिन्ह; अंदाज; दिग्दर्शन. 'या व्यवहारांत शंभर रुपये मिळतील असा आकार दिसतो.' ८ मनोविकारांचा शरीरावर होणारा परिणाम; विकारदर्शक स्थिति, भाव. जसें–कांपणें, हंसणें, रोमांच उभे राहणें–भीतीनें, आनंदानें वगैरे ९ (भूमिति) आकृति; चित्र. (इं.) फिगर. १० (भूमिति) आकृतिमान; परिमाण. (इं.) व्हाल्युम. ११ पद्धत; वागणूक; राहणी; चाल; ढब; रीत; तऱ्हा. 'मी परब्रह्म येणें आकारें।

जेथें जीवस्वरूप स्फुरे ॥ ' ' या रीतीं बहुत आकारें तिनें झाडितां ।' –पंच ३६. १२ पृथ्वीतील एकंदर वस्तुजात, विश्व. ' तरी ती हरीची ज्ञान कळा केवळ । हा आकार अवघा तुझा खेळ ।' –ह २४.८७. १३ सारा (जमिनीचा). १४ किंमत. १५ (कर.) आव, आविर्भाव. ' आकार तर एखाद्या वकिलाचा आणला आहेस '. एखाद्या वस्तूचा अमुक एक आकार आहे हें दाखविण्यासाठीं हा शब्द योजून सामासिक शब्द बनवितात उ० मंडलाकार; चक्राकार; गोलाकार, वर्तुलाकार इ० [सं. आ+कृ] **–रात जागें**–(ना.ग.) व्यर्थ जागें; असफल होणें. ' एवढी उठाठेव करूनही अखेरीस ती गोष्ट आकारांतच गेली कीं नाहीं ?' **०दाखविणें**–१ मिष करणें; आव आणणें; ढोंग करणें; बहाणा करणें. २ एखाद्या गोष्टीचें स्वरूप, मान दाखविणें–व्यक्त करणें. **–रास येणें**–१ एखादी गोष्ट, धंदा, दुखणें, काम कांहीं विवक्षित स्वरूपास येणें, रंगास येणें, मूर्त स्वरूपांत येणें; दृग्गोचर होणें. 'कर्म आलें हो आकारा'–विष्णुची भूपाळी २५. फळास येणें. ' त्यांची अवस्था तीच तुमची पुढें येईल आकारास ' –ऐपो. ३०६. २ कमी प्रमाणावर–संख्येवर येणें; खालावणें. **०गोपन**–न. १ खऱ्या स्वरूपाची, आकृतिची, मनोविकाराची छपवणी; लपविणें; गुप्त ठेवणें; पडदा पाडणें. २ ढोंग; छद्मीपणा; छद्मी व्यवहार. **०जमा**–स्त्री. अंदाजानें ठरविलेला वसूल; वसुलीजमेच्या उलट. **०जात**–न. वस्तुजात; उत्पन्न झालेल्या सर्व वस्तु; विश्व. ' जे आकारजातांचें दुस । घडी केलें । ' –ज्ञा १५.८३. **०बंद**–पु. १ लिहिलेला, तयार झालेला मसुदा (वसूल, जमीन, पट्टया, वरातीइ० चा). २ जमाबंदीचें सरकारी वार्षिक अंदाजपत्रक (सारा, जमीन पट्टया, सूट, इनामें वगैरेचें). ३ सामान्य अंदाज पत्रक–खर्डा. [आकार+बंद] **०मान**–न. १ विस्तारमान; बाह्य स्वरूपावरून केलेला अंदाज. २ आकृतिमान; परिमाण. (इं.). व्हॉल्युम. (प्र.) आकारमहत्त्व **०शुद्ध**–वि. नीटनेटकया, व्यवस्थित, पाहिजे तशा आकृतीचें, प्रमाणबद्ध (भांडें, घर, माणूस). [सं.] **०शुद्धि**–स्त्री. आकृतीचा, स्वरूपाचा, बांधेसूदपणा; अंगसौष्ठव; प्रमाणबद्धता [सं.] **म्हo** ' आकारे रंगती चेष्टा ' ' आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च। नेत्र वक्त्रविकाराभ्यां लक्ष्यतेऽन्तर्गतं मनः ॥ (आकार, इंगित, चालचलणूक, कृति, भाषण, डोळे; मुद्रा, इत्यादि गोष्टींवरून मनुष्याच्या मनांत साधारणपणें काय चाललें आहे तें कळतें.) या श्लोकाचा आरंभीं दिलेला पहिला चरण अपभ्रष्ट होऊन मराठींत आला आहे. मनुष्याच्या बाह्यस्वरूपावरून त्याच्या हातून घडणाऱ्या कृतीचें स्वरूप ताडतां येतें; जसें–' आकारेंचि परेंगित कळलें बोलोनि काय हो कळतें ।' –मोवन १.१२.

आकारण—न. आव्हान; आमंत्रण; बोलावणें; हांक [सं. आकारण]

आकारणी—स्त्री. १ गणती; संख्या; माप; मोजणें; मोजणी; हिशेब. २ पाहणी; प्रतबंदी (जमीनीची); जमीन मोजणी; ३ सामाशब्दः–आकारणीखर्डा – ताळेबंद–तेरीजपत्र–बाकी–वसूल–सुट–हिशेब. ३ ठोकळ अंदाजपत्रक; कच्चा खर्डा. ४ वर्गणी; दर.

आकारणें—उक्रि. १ आकारास येणें २ (काव्य) बोलावणें; आव्हान करणें; आमंत्रण करणें. ३ आकारणी करणें (जमीन इ० ची). ४ रंगारूपास आणणें; विवक्षित स्वरूपास आणणें; आकार धारण करणें; आकारास येणें. ' अवयव आकारले सांग. '–मुआदि. ४.३६. ' आकारलें रूप असेल जेव्हां ' –साहह २.३९. ५ निदान करणें (रोग वगैरेचें). ६ अंदाज, हिशेब, मसुदा करणें. ७ व्यवयाची रक्कम ठरविणें.

आकारीब—अकारीब पहा.

आकालिक—वि. अकालिक पहा.

आकाश—न. १ आभाळ; आपल्या डोक्यावर दिसणारी घुमटाकार पोकळी. हिचा रंग निळसर असतो. ' आकाश म्हणजे अवकाश पसरला पैस ' –दा १३.७.१. २ वातावरण; अंतराळ. ३ पोकळी–एभा १९.१९३. ४ एक संख्या (शून्य). ५ पंचमहाभूतांपैकीं शेवटचें. यांत इंधक (ईथर) भरला असून तो ध्वनिवाहक आहे. ६ (वेदांत) निर्गुण स्वरूप. ' ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा ॥ ' –ज्ञा १२.७४. कांहीं समासशब्द–घटाकाश; मठाकाश; महदाकाश; चिदाकाश इ० [सं.] हा शब्द पाताळ शब्दाबरोबर येतो. असे कांहीं वाक्प्रचार. **०पाताळ एक**–गर्वानें फुगून गेलेल्या माणसाबद्दल योजतत. **०पाताळ एक होणें**–अति जोराचा पाऊस पडणें (मोठया पावसांत जमीन–अस्मान एक झालेलें दिसतें म्हणून.) **०पाताळ एक करणें**–हलकल्लोळ करणें; आरडा ओरडा करणें; धिंगाणा घालणें (रागानें, हट्टानें). **०पाताळाचा भेद**–दोन वस्तूंमधील महदंतर दाखविणें. 'आत्मा आणि बुद्धि हीं जर तूं एक समजत असलास, तर आकाश पाताळाचा भेदच तूं नाहींसा केलास असें म्हटलें पाहिजे.'–**ला घेरा घालणें–देणें**–अचाट कृत्यें करणें; मोठमोठे पराक्रम करणें; दिग्विजय करणें; अशक्य गोष्टीस हात घालणें; महत्त्वाकांक्षी होणें. **०शाची चौघडी करणें**–आकाशाला घेरा घालणें. ' आकाशाची करवेल चौघडी । महामेरूची बांधवेल पुडी । शून्याची मुरडवेल नरडी । परी मनाच्या ओढी अनिवार ॥ ' **–ची दोरी तुटणें**–आकाशाची कुऱ्हाड पडणें. ' तों एकाएकींच आकाशाची दोरी तुटते तैशी गोळी येऊन...उजवे बगेडींत लागली. ' –भाव ८१. **–शीं राहाणें**–वरच्या मजल्यावर,आढ्याखालीं राहाणें. **–ला गवसणी घालणें**–अशक्य गोष्ट करावयास धजणें; आकाशाला घेरा घालणें. **–ची कुऱ्हाड–धाड पडणें**–दैवी आपत्ति येणें; निसर्गाच्या आपत्ती येणें; अत्यंत मोठी हानि होणें. उ० पति मरणें; एकुलता एक पुत्र मरण पावणें. ' चिटणीस, तुमच्यावर आज आकाशाची कुऱ्हाड कोसळली आहे. ' –स्वप ४४६. **म्हo** आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याच्या दांतांवर. **–ची साल काढणें**–निष्फळ प्रयत्न

करणें. 'तेणें साली काढावी आकाशाची।'–अमृ ६.४७. **–तून उतरणें, पडणें** किंवा **अस्मान फाडून येणें**–अघटित घटना दाखविणें. **म्ह**० आकाशांतून पडलों आणि भुईवर सावरलों. –नि ५९४. **–ला शिडथा लावणें**–शक्तीबाहेर काम करणें. **०फाटणें**–सर्व बाजूंनीं एकदम संकटें येणें. 'आकाश फाटलें त्याला लावावें ठिगळ कुठोनी।' **–संग्रामगीतें**. हेंच दुसऱ्या शब्दांत उदाहरण. **–शास ठिगळ लावणें**–निरर्थक प्रयत्न. 'हरि–भय–दीणे नभ करिल धड लावुनि कृष्णसार थिगळाला।'–मोभीष्म ६.४४. **०कक्षा**–स्त्री. दृश्य क्षितिज. **०कुसुम**–न. खपुष्प; असंभाव्य किंवा अवास्तविक गोष्ट (सशाच्या शिंगाप्रमाणें). **०गंगा–नदी**–स्त्री. आकाशांतील नदी; तारांचा एक विशिष्ट समुदाय; अति सूक्ष्म अशा ताऱ्यांचे आकाशांत दिसणारे दोन पट्टे. हे दक्षिणोत्तर गेलेले दिसतात. पहिला पट्टा अगस्ति ताऱ्याच्या पूर्वेस मघांच्या रेखांशांजवळून निघून व्याधाच्या पूर्वेकडून आर्द्रांच्या पश्चिमेस वळतो व तेथून तो ध्रुवाच्या पश्चिमेपर्यंत पसरलेला आहे. दुसरा पट्टा श्रवण नक्षत्राजवळून ध्रुवाच्या पूर्वेकडे गेलेला आहे. पहिल्यापेक्षां दुसरा पट्टा लहान आहे. दुर्बिणींत दिसणारे यांतील तारे सुमारें दोन कोटी आहेत. **०गमनविद्या–सिद्धि**–स्त्री. यौगिक सिद्धीपैकीं एक; आकाशांत संचार करण्याची माहिती; अर्वाचीन विमानविद्या. **०दिवा–दीप**–पु. आश्विन शुद्ध पौर्णिमेपासून कार्तिक शुद्ध पौर्णिमेपर्यंत (पितरांना प्रकाश दिसण्या करितां) भिंगाचा किंवा कागदाचा दिवा (कंदील) करून एखाद्या उंच काठीस किंवा झाडास टांगून लावतात तो. २ खुणेसाठीं एखाद्या उंच जागीं लावलेला दिवा. **०नगर**–ढगांच्या विचित्र आकृतींवरून वाटणारें ढगांतील किंवा आकाशांतील काल्पनिक शहर; (विप्र.) गंधर्वनगर; गंधर्वसृष्टि. **०पट**–पु. ज्यामध्यें अक्षांश, रेखांश, विषुववृत्त, क्रांतिवृत्त, अयनवृत्त, नक्षत्रें, राशी, तारे, यांच्या आकृती दिलेल्या असतात असा नकाशा. यावरून सूर्य, चंद्र, ग्रह, उपग्रह, यांचे मार्ग ठरवितां येतात. [सं.] **०पथ–मार्ग**–पु. १ अंतराळ; आकाशांतून जाणारा रस्ता; यौगिक सिद्धींपैकी एक सिद्धि. 'दे आकाश पंथें झोंकून. दशदिशा गेले पाषाण।' 'आकाश मार्गी गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ॥' –दा. २ हवेंतील रस्ता, वाट. **०पाणी**–न. (ल.) ताडी, माडी, इ० मादक पेय; ताड, माड हीं झाडें फार उंच असतात व त्यापासून ताडी, माडी काढतात ती त्यांच्या शेंड्याजवळच्या भागापासून काढतात यावरून. [सं.] **०भाषण**–न. १ स्वर्गीय देवतांशीं संभाषण; (नाटकांत वगैरे) आकाशाकडे पाहून, देवांना हांक मारून, त्यांचें उत्तर आपण ऐकलेसें दाखवून जें भाषण नाटकांतील व्यक्ति करितें तें. उ० 'हे स्वर्गस्थ देवतांनो!' २ (नाटकांत) रंगभूमीवर नसलेल्या दुसऱ्या एखाद्या पात्राचे शब्द आपण ऐकत आहों असें रंगभूमीवरील पात्र हावभाव करून सुचवितें व त्यास उत्तर देतें ते शब्द. [सं.] **०मंडप**–पु. आकाशाचें छत; आकाश हाच मांडव. 'आकाशमंडप आसडत। नक्षत्रें रिचविती अपार पै॥' **०मंडल**–न. खगोल. **०मापक**–पु. (शाप.) वातावरणोष्णतास्थित्यंतर मापक यंत्र; किरणविसर्जनदर्शक यंत्र. (इं.) ईश्रिओस्कोप. **०मुनि**–पु. उंट (हा वाक्प्रचार उंटाची मान उंच असल्यामुळे पडला.) **०मूलि**–स्त्री. एक झाडाचा वर्ग (कुंभिका, पुन्नाग, यांचे मूळ जमिनींत नसून अधांतरीं असतें). जलसंधर्धी वनस्पति. **०यान–वहन**–न. विमान. **०वल्ली–वेल**–स्त्री. १ बांडगुळ; वृक्षरुहा; वृक्षावर वाढणारी वेल. २ शेर वगैरे झाडांवर वाढणारी व बारीक बारीक पिवळे तंतू असणारी वेली; सोनवेल; अमरवेल; अंतरवेल. याच प्रकारच्या दुसऱ्या एका वेलीस फुलें येतात. **०वाणी**–स्त्री. १ आकाशापासून निघणारा शब्द; अशरीरिणी वाणी; देववाणी. 'तुझें हें गाणें म्हणजे आकाशवाणीच मी समजतों.' –स्वयंवर. २ कोणाकडून एखादी गोष्ट समजली हें जेव्हां सांगावयाचें नसतें तेव्हां म्हणतात. जसें– 'चिलिट गुणगुणलें.' **०वास**–पु. वृक्षांदिकांवर राहाणें; उंच राहणें.

आकाशांतला बाप—पु. (वि.) खिस्तीधर्मांतील देव; ईश्वर. 'त्याला होय? –त्याला, त्याचा बाप–आणि बाप नसला तर आकाशांतला बाप आहेच!' –सुदे ५९.

आकाशिकीचारी—स्त्री. (नृत्य) काश नांवाच्या गवताच्या चटईवर केल्या जाणाऱ्या एका पायाच्या क्रिया. या सोळा आहेत. त्यांचीं नांवें–अतिक्रांत, पार्श्वक्रांत, अपक्रांत, ऊर्ध्वजानु, नूपुरपादिक, सूचीपाद, प्रक्षिप्त, दोलापाद, आविद्ध, उध्दृत्त, विद्युत्भ्रांत, अलाता, भुजंगत्रासित, हरिणीलुप्त, भ्रमरी, दंडपाद.

आकांक्षणीय, आकांक्ष्य—वि. अपेक्षणीय; स्पृहणीय; इष्ट; इच्छा करण्यास योग्य [सं.]

आकांक्षणें—सक्रि. इच्छा करणें; अपेक्षा करणें. 'जाहला यालागीं जो कांहीं। आकांक्षी ना।' –ज्ञा १२.१९३

आकांक्षा—स्त्री. १ इच्छा; आशा. २ गरज; अपेक्षा; मागणी. ३ (कांक्षा या अर्थी चुकीनें) तर्क; शंका; संशय. 'होत करित कांडीं। आकांक्षेचीं।' –ज्ञा १५.१०० ४ (कक्षा अप.) आक्षेप; हरकत; उत्तरपक्ष. [सं.] **०पूरण**–न. १ प्रतिपाद्य विषयाचें किंवा अर्थाचें पूरण करण्याकरितां लागणारें गौण वाक्य किंवा शब्द पुरविणें. 'जो एथें आहे या वाक्याचें तो याच्या प्रयोगावांचून आकांक्षापूरण होणार नाहीं.' २ (सामा.) उणीव; गरज भरून काढणें–भागविणें.

आकांक्षित—वि. इच्छिलेलें; अपेक्षित, इष्ट, जरूर असलेलें. [सं]

आकांक्षी—वि. गरजू, इच्छा करणारा; इच्छिणारा. [सं.]

आकी—अ. तेंकीं; असेंकीं–इम ६५. [फा. आकि]

आकीर्ण—वि. गजबजलेला; गर्द; भरलेला; दाटलेला; व्याप्त; परिपूर्ण; व्याप्त. सामाशब्द–जलाकीर्ण; मेघाकीर्ण; वृक्षाकीर्ण. [सं. आ+कृ]

आकु—उद्गा. १ (ना.) जवळ बोलावण्याचा शब्द, (उ० कुत्र्याला). २ (ल.) कुत्रा. [ध्व.]

आकुंचणें—अक्रि. आखडणें; संकुचित करणें; संकोचणें; आकरसणें. 'आकुंचुनि अध। देऊनि तिन्ही संध।' –ज्ञा १८. १०३७ [सं. आ+कुंच्=वांकडें होणें.]

आकुंचन—न. १ आखडणें, संकोचणें, आटणें, आकरसणें; अर्धवट मिटणें; थोडी जागा व्यापेल असें होणें; संकोच. २ आवळणें; घट्ट करणें; ओढून घेणें; आकुंचित करणें. ३ वांकणें; वांक घेणें. ४ संक्षिप्त करणें; कमी करणें; पसारा, व्याप आंवरणें. ५ जमा करणें; गोळा करणें. [सं. आ+कुच्–कुंच्]

आकुंचित—वि. १ संकोचित; आखडलेला, वांकेलेला; गोळा झालेला; आकरसलेला; कमी झालेला. २ अडचणीचा; अप्रशस्त; संकुचित; लहान (जागा वगैरे).

आकुत—न. (कु.) गंध (कपाळी लावण्याचें); अक्षत. [सं. अक्षत]

आकुर्ती—स्त्री. अकूमारखा अंमली पदार्थ; याकुती पहा. 'माझ्या प्रीतिवर विजरी पडली । खाउनि निजते आकुर्ती।' –सला ७१. [गु आकुदी; फा. याकुती]

आकुर—पु (गो.) पावसाळ्याच्या आरंभीं खाऱ्या नदीच्या, खाडीच्या कांठीं होणारी भाजी. [सं. अंकुर]

आंकुरणें—क्रि. उद्भवणें; प्रकट होणें; अंकुरणें पहा. [सं. अंकुर]

आकुल-ळ, आकुळ—वि. घेरलेला; ग्रस्त झालेला; पूर्ण व्यापलेला, गच्च, व्याकुळ. सामाशब्द–कोधाकुल; चिंताकुल; निद्राकुल; कामाकुल, शोकाकुल; दु.खाकुल. 'शोकाकुल रुदनातें। करीतु अंगे' –ज्ञा २.१. [सं. आकुल]

आकुलित—वि. ग्रस्त; व्याप्त, व्याकुल; आकुल पहा. 'शोकाकुलित अर्जुन।' –एभा १६.११७. 'शोकाकुलित द्विपंचवदन। म्हणे हें प्रगटलें अद्भुत विघ्न।' [सं.]

आकुल्यादियोग—पु (वैद्यक) अंकोलाच्या कळ्या, आंवळकाठी व हळद यांचें चूर्ण मधाशीं चाटावें हें २० प्रकारच्या प्रमेहांचा नाश करतें –योर २.१६२. अंकूल पहा. [सं. अंकोल]

आंकुवार-री-पण-वत—वि. (गो.) कुमार; कुंवार, कुवारपण इ०. आकवा-री पहा. 'देवमाता तूं स्वामिनी। तूं सदा आंकुवारी।' –शिशु १.१.४८.

आकूळी—वि. आकलन केलेली; ताब्यांत ठेवलेली; स्वाधीन; स्वस्थ. 'परी जिव्हा न राहे आकुळी । हे हरिवंशीची बोली। म्हणोनि ते वर्णिली। दैत्य कुमारी।'–कथा १.२.४७. [आकलन]

आकूड—वि. (व.) कुजट; कुबटलेलें. 'फार दिवस राहिल्यानें मेतकूट आकूड लागतें.' [सं. कूट=वाईट]

आकूत—पु. आशय; भावार्थ; हेतु; इच्छा; अभिप्राय. [सं.]

आंकूर—अंकूर पहा.

आंकूल—स्त्री. (गो.) एक वनस्पति; अंकोली; सर्पदंशावर हिच्या मुळीचा उपयोग होतो. [सं. अंकोट; हि. अंकोल; म. अंकोली; गु. अंकोल्या]

आकृति—स्त्री. १ आकार; रूप; घाट. २ प्रतिमा; मूर्ति; चित्र. ३ शरीर; देह. 'जैसा देह पंचभूतीं। मिळोनि होय आकृती।' –गुच २१.४. ४ (ल.) मूर्ति; व्यक्ति; मनुष्य. ५ (गणित) रेषाचित्र; गणितांतील विवेचन करितांना त्यामधील सिद्धांतांतील विषयीभूत अंगें जींत स्पष्टपणें दाखविलेलीं असतात त्यास आकृति म्हणतात. (इं.) फिगर. ६ एक किंवा अनेक मर्यादांनीं सर्वांगांकडून मर्यादिलेल्या पातळीला व अवकाशाला (म्हणजे पोकळीला) आकृति म्हणावें. –ममा ४. ७ एक छंद (दंडक वृत्तांतील); मंदारमाला पहा. [सं.] **०लेखक**–पु. एखाद्या समपृष्ठाकृतीची (प्लेनफिगर) बरोबर, लहान किंवा मोठी नकल करण्याचें यंत्र. (इं.) पँटोग्राफ. **०लेख-न**–पुन. चित्राची रूपरेषा (पेन्सिलीनें काढलेली); (इं.) स्केच. [सं.]

आकृष्ट—वि. ओढलेला; आंखडलेला; खेंचलेला; आकर्षित. [सं.]

आके—स्त्री. (गो.) नगंद. [का. अक्का, आके=ती (स्त्री)]

आकें—न. (कु.) मासे धरण्याचें धनुष्याकृति जाळें. यास आटा लाविलेला असतो. [आंख]

आकेकर (दृष्टि)—स्त्री (कृ.) डोळ्याचे प्रांतभाग व पापण्या आकुंचित करणें, दृष्टि अर्धवट मिटणें, झोंपेतून जागें होणें, डोळे दिपणें वगैरे गोष्टींचा द्योतक अभिनय. [सं.]

आंके—आँकी पहा.

आंकें—अखें पहा.

आकै—स्त्री. (गो.) १ नि.शक्त स्त्री. २ तरुण असून म्हातारी दिसणारी स्त्री 'तिका पळोच्या जाता? ती सामकी आकै जाल्या.'

आकोचणें—क्रि. मिटणें; आकुंचणें पहा. 'कमळ आकोचें कोंडे भ्रमर।' –ह ७.२१. 'अज्ञानकमळीं आकोचले।'–दावि ५०३.

आकोडा—(नाग.) छत्री वा घोडा; आंकडा पहा. [आंकडा]

आकोंता—पु. कोंडाळें; कोचाळें; घेरा; वेढा (शस्त्रास्त्रांचा). 'कीं तेवढेया निरयांचे आकोंता। आगविले।' –ऋ ८. [सं. आ+कुंत=शस्त्र; प्रा. कोंत; म. कोंतळे–कोचाळें]

आकोर—पु. (व.) अंकुर. [अंकुर]

आकोल, आंकोल—न. १ सोललेल्या चिंचेचा आकडा. २ चिंचेच्या फळाचें पोकळ टरफल. –स्त्री. एक झाड. अकोल–अंकोल पहा. [सं. अंकोट]

आकोल—स्त्री. तंबाखूचा एक प्रकार; अकोला गांवावरून नांव पडलें.

आकरी—(भिमथडी) अखरी पहा.

आकस—अकस पहा.

आकाडा—पु (विणकाम) फणीबंद यांना फणी बांधण्यासाठीं लागणारा लांकडी सांचा.

आकाबाई—अकाबाई पहा.

आक्त—पु. (गो.) लग्न, मुंज, जेवणावळ वगैरेंचा समारंभ. [पो. आक्तु=कृत्य; इं. अॅक्ट]

आक्तार—क्रिवि. (गो.) वेळींच; ऐन प्रसंगीं.

आक्या—पु. (व. ना.) देवाच्या नांवानें सोडलेला गोऱ्हा, पोळ, सांड, खोंड, कठाळ्या. 'हा मारुतीचा आक्या मोकाट असतो.' [अखा; आखला=न बडवलेला]

आक्टोपस—पु. समुद्रांत सर्वत्र आढळणारा एक शीर्षपादी वर्गांतील प्राणी. [इं. सं. अष्टपाद. ग्री. आक्टो = आठ + पोउस = पाय]

आक्टोबर—पु. इंग्रजी वर्षाचा दहावा महिना. [इं.]

आक्त—स्त्री.(व.) आळ. 'मी कांहीं कोणावर आकत घेत नाहीं, खरें तें सांगतों.' अकीत पहा. [अ+कीत; अकृत्य]

आक्रंदणें—अक्रि. मोठ्यानें ओरडणें; रडणें; टाहो फोडणें; विलाप करणें; आकांत करणें. 'बहुत जाचलों संसारें । मोहमाया-जाळाच्या विखारें । त्रिगुण येताती लहरें । तेणें दुःखें थोर आक्रंदलों ।' –तुगा ७०४. 'मच्छ तळमळती जळाविण । कीं मातेवांचूनि आक्रंद तान्हें ।' [आ+क्रंद्]

आक्रंदन—न. मोठ्यानें रडणें; ओरडणें; हंबरडा फोडणें; रडारड; आरडाओरडा; विलाप; शोक. [सं.]

आक्रम—पु. १ चढणें; वर जाणें. २ चढ; मार्गे टाकणें; वर्चस्व; आधिक्य; ओलांडून जाणें; वरचढ; वरचष्मा. ३ पराक्रम. ४ संचार; वारें; गर्व. 'एकासि जाणिवेचा आक्रम । एकाचे पोटीं भ्रम । महासिद्धींचा ।' –एभा. ३.३२६. ५ हल्ला; छापा. [सं. आ+क्रम्] **०शक्ति**—स्त्री. १ आवांका; आवरशक्ति; आटोप; पराक्रम. 'लबाडी पचविण्याची आक्रमशक्ति नाहीं.' –गांगा १५५. २ पोंच; समज; आकलनशक्ति.

आक्रमण—न. १ आक्रमण करणें; व्यापणें; वेढणें; ग्रासणें; स्वाधीन करून घेणें (देश, शास्त्र, विषय); वरून किंवा मधून जाणें; ओलांडणें. २ वर्चस्व स्थापन; वरचढपणा करणें; मागें टाकणें; वर जाणें. [सं.]

आक्रमणें—अक्रि. आक्रम किंवा आक्रमण करणें; आक्रांत करणें; व्यापणें; वर्चस्व स्थापन करणें; ताब्यांत घेणें; ओलांडणें. 'तरी आक्रमिला देख दुःखें । सांसारिकें ।' –ज्ञा २.३५०. 'आक्रमी स्वचरणें त्रिजगातें राम ।' [सं. आ+क्रम्]

आक्रसणें, आक्रुसणें—आकरसणें पहा.

आक्रांत—वि. आक्रमण केलेलें; दडपलेलें; व्याकुळ झालेलें. जसें–कामाक्रांत; शोकाक्रांत; भयाक्रांत; पादाक्रांत; मोहाक्रांत. [सं. आ+क्रम्]

आक्रांत—पु. मोठ्यानें रडणें; हंबरडा फोडणें; विलाप करणें; आकांत [सं. आक्रंदन किंवा म. आकांत अप.]

आक्रांतणें—अक्रि. व्याप्त होणें; खालीं दबणें; भुकेनें व्याकुळ होणें; वखवखणें; खाखावणें; धावावणें. 'मला भुकेनें आक्रांतलें.' [सं. आ+क्रांत.]

आक्राळ—पु. मोठ्यानें रडणें, आरडणें. [अकरताळ अप. किंवा सं. आ+कराल]

आक्राळविक्राळ—अकराळविकराळ पहा.

आंक्री—(गो.) अंकुर. पहा. [सं. अंकुर]

आक्रूड—अकोट–ड पहा.

आक्रें—वि. (व.) उठावदार; लक्षांत भरण्यासारखें; आक्रमण करणारें. 'मुलगी काळी आहे, पण तिचें पाणी आक्रें आहे.' [सं. आक्रम्?]

आक्रोश—पु. १ मोठ्यानें रडणें; हंबरडा फोडणें; विलाप करणें; आक्रंदन; आकांत; कल्लोळ; चरफड. 'वोळख तूं निरुतें । आक्रोशेंवीण जेयें । क्षमा असे ॥' –ज्ञा १३.३१९. २ निंदा; ओरड; बडबड. ३ आवेश; अट्टाहास. 'तेवींचि आक्रोशबळें । व्यापारें कोणे एके वेळें । निगालें तरी आंधळें । रोषे जैसें ॥' –ज्ञा. १८.१८९. [सं. आ+क्रुश्]

आंक्वार—वि (गो.) अविवाहित, उपवर; आंकवर–वार पहा. 'आंक्वार चेडूं.'

आक्सांबोक्सी—ओक्सांबोक्सी पहा.

आक्सांव—न. (गो.) ग्रामसंस्थेचा किंवा एखाद्या कंपनीचा भाग (शेअर). [पोर्तु.]

ऑक्सिजन—पु. प्राणवायु; अम्लजन. [इं.]

आख—पु १ डोळा. 'आखीं ल्याहीली काजळ.' –स्त्रीगीत ३०. [सं. अक्षि; अक्षन्=डोळा] २ डोळा आणि कान यांच्यामधील मर्मस्थान; गंडस्थल. **०मोडणें**–डोकेदुखी बरी होण्यासाठीं आखावर बिब्याच्या फुल्या घालणें.

आख—पु (गो.) शेताचा विभाग.

आंख—पु. १ संख्या; आंकडा; अंक (गणितांतील); चिन्ह. 'तेथ स्वानंदाचा ग्राहकु । तत्काळ भेटला नेटकु । त्यासि जीवेंसहित विवेकु । घालूनि आखु संवसाटी केली ।' –एभा ११.१००० [सं. अंक] २ (व.) शेंडा; आंकडा. 'आख्याचें पान.' ३ किंमतीचा आंकडा; किंमतीचा आंकडा वर घातलेलें कापड. ४ (ल.) कापड. 'सरकारांतून अमुकास दोनशें आंख पोचतात.' 'पोटास

(रोख) व आख (वस्त्र) पावत नाहीं.' –थोमारो ५.५४. ५ (सामा.) रक्कम; आंकडा. 'जैसें सरलियां लेख। आंख होती एक।' –ज्ञा १३.९३७. 'निरूपण जमाबंदी घालूं आंख।' –दावि ४२८. **०घालणें**–(व.) निश्चितसा अंदाज करणें. 'तुम्हीं तर नापासाचा आंख घालून ठेविला आहे.'

आख—गाडीच्या दोन्हीं चाकांतून बसविलेला लोखंडी जाड दांडा; कणा; आंस [सं. अक्ष]

आख—(कों.) वर्ष्याच्या शेंगा भाजण्याचें कुपट–आगटी. [आग; सं. अग्नि]

आंख—पु. गाय, म्हैस इ० जनावरांचा फरा. **०मोडणें–बसणें**–आंकडा मोडणें–बसणें पहा.

आंखटणें—उक्रि. घाईनें किंवा साधारणपणें आंखणें; कच्ची रूपरेषा काढणें–खरडणें; आराखडा घेणें. [सं. अंकन; म. आंखणें]

आखटणें, आंखडणें—अक्रि. (कों.) धस किंवा कोंच, लागून पडणें; (कांड्यानें, खिळ्यानें) वस्त्र फाटणें. [सं. आ+कृष्ट; प्रा. आकड्ढ=खेंचणें]

आखटें—वि. (गो.) वाईट; ओखटें; वोखटें [ओखट]

आखडणें—उक्रि. अखुडणें पहा. १ आकसणें; आक्रसणें; कमी होणें; संकोच पावणें. २ ओढून धरणें; संकोचित करणें; आखूड करणें; आवरून धरणें. (दोर, वस्त्र, जनावर इ०) 'वासरूं आखड, सवें दूध पिऊन टाकील'. ३ थांबणें, बंद होणें; 'सध्यां आमची गाय आखडली आहे, दूध कमी झालें आहे.' ''आतां पाऊस आंखडला.' ४ गर्वानें ताठणें; रागानें रूसून–फुरकटून बसणें. [सं. आ+कृष्; प्रा. आकड्ढ; म. अखूड]

आखंडल—पु. इंद्र. [सं.]

आंखडा–खाडा—(कों. गो.) १ बेडग्याचें दुबळकें; कुंपणातील अरुंद वाट. २ आकडी अर्थ ५ पहा. ३ (गो.) आंगठा. ? ४ अडसर; बेडें; लहान कवाड. 'गोरवा येतील आखंडी लाव.'

आखडी—क्रिवि. (गो.) मागें. [आ+कृष्ट=मागें ओढलेलें; प्रा. आकड्ढ; म. आखडणें.]

आखण–णी–णें, आंखपट्टी—आंकण–णी–णें, आंकपट्टी पहा.

आंखणकडवां—(चि.) आंकणकडवें पहा.

आखणें—(भि. कातकरी) म्हणणें; सांगणें. 'एहंकी आखताहा!'=असें म्हणतात.'–भिल्ली भाषेंतील गोष्टी ३०. [सं.आ+ख्या]

आखत—स्त्री. दृष्टि; डोळे. 'पौर्णिमेचे चांदिने। आखतीं–वीण जाणे। ते यातें पुसवणें। करी जातां॥' –शिशु ८१८. [आंख सं. अक्षन्]

आखता—स्त्री. अक्षता; तांदूळ. 'इभेते ओवाळोनि आखतां।' –शिशु ८१७. [अ+क्षत]

आखंदुळणें—सक्रि. हासडणें; हालविणें; खालीं वर करणें (तांदूळ सारखे धुतले जाण्यासाठीं व भाजींतील पदार्थ सारखे होण्यासाठीं). [आ+स्खद्–खद्. म. खदखदणें]

आखबंद—आकबंद पहा. **०डोक्याचा**–वि. हुषार; हिशेबी 'अगदीं आखबंद डोक्याचा मनुष्य.' –भा ६. [अंक+बद्ध]

आखर—वि. अक्षय; अखर पहा.

आखर—पुस्त्री. गांवाच्या शेवटचें शेत; गुरें दुपारीं बसण्याची सावलीची जागा; गोठण; गांवाची सीमा. अखर पहा. 'वोढाळाच्या खुरीं। आखरू आतें बुरी।–ज्ञा १३.५५८. 'आखरें हुंबळी गुरें' –एभा ५.४११. –क्रिवि. शेवटीं; अखेर. अखर पहा. 'आखर वक जाऊन काम कांहीं सज्ज होणें नाही.' –रा ३. ३७२. [अर. आखीर]

आखर—न. १ अक्षर; अकारादि प्रत्येक वर्ण; लेखनचिन्ह. 'लिहुनि ऋद्विपुरीचेणि आखरें। चरणु लिपी।' –ऋ १३. [सं. अक्षर; प्रा. अक्खर]

आखरनखर—अखरनखर, अखीरनखीर पहा. **०पेटी**–स्त्री. (खा) गाडीचा आस–कणा ज्या लांकडी खोबणींत वसवितात ती.

आखरपख—अखरपख पहा.

आखरी—अखरी पहा.

आखरी दूध—वि. (माण.) पाणी न घातलेलें दूध; कोरें दूध. [अ+क्षर]

आखरखणें—अखरकणें पहा.

आखरेखणें—सक्रि. (कु) तरतूद करणें; सांभाळणें. 'आखरेखून ठेव'=सांभाळून ठेव. [सं. आंखणें+रेखणें]

आखला—(गु) पोळ; सांड; न बडविलेला बैल; वळु [अखा–आखा=संबंध+ल प्रत्यय; गु. आखलो=अंडील बैल]

आंखली—(कु.) आंबे वगैरे झाडावरून काढण्याचा घळ; झेला; आंखी; गांजिवा; आंकडी [सं. आ+कृष्; अंक?]

आखा—वि. अखा–अखें पहा.

आंखा—पु. नारळ, कलिंगडें इत्यादि टेवण्यासाठीं काथ्याची विणून केलेली जाळी; आंखली; गांजवा.

आखाजी—स्त्री. (खा.) अक्षयतृतीया.

आखाड—पु. आषाढ; अखाड पहा. **म्ह०** आखाडांत तट्टू, भादव्यांत भट्टू. **०झड**–स्त्री. १ आषाढ महिन्यांतील एकसारखा लागून राहणारा पाऊस. २ कंटाळवाणें, नीरस–भाषण. **०दवणा**–पु. दवणा किंडा (हा आषाढ महिन्यांतच आढळतो). **०पाटी**–स्त्री. लग्न झाल्यानंतर येणाऱ्या पहिल्या आषाढ महिन्यांतील वद्य पक्षांत वधुपक्षाकडून वराकडे फळफळावळ, मेवामिठाई व विटीदांडू, लगोरी चेंडू, भोवरा, सोंगटया, बुद्धिबळें, कल्मदान, गंजिफा वगैरे खेळण्याचें सामान व पोशाख वगैरे पाठवितात ती. **०पागोळी**–स्त्री. आषाढ

महिन्यांत घराच्या वळचणींतून पडणारें पाणी. हें पाणी नवीन लग्न झालेल्या मुलीनें आपल्या सासरीं पाहूं नये (म्हणून तिला माहेरीं धाडतात). हें पाहिलें असतां सासूस वाईट. **०पाळी**–स्त्री. आषाढ महिन्यांत शेतास द्यावयाची कुळवाची पाळी. **०भूती**–पु. सोदा, लुच्चा, लबाड मनुष्य; प्राचीन काळीं या नांवाचा कोणी लुच्चा माणूस असावा. 'आखाडभूती ऐसा जाण। गुरूपाशीळ न्यावया धन। उपदेश घेऊनि दीन। तो दांभिक जाण शठशिष्य' –एभा २३.२३६. –स्त्री. कपटव्यवहार; लुच्चेगिरी; लबाडी; भोंदूपणा; ढोंग; दंभ. **०लाणी–लाहणी**–स्त्री. आषाढ महिन्यांतील मेंढयांच्या केसांची कापणी, कातरणी, भादरणी. 'मेंढयांची आखाडलाणी झाली.' [सं. लु=कापणें; सं. लवनं=कापणें] **०सासरा**–पु. १ कोणी पुरुष दवावणीची किंवा उपदेशाची गोष्ट सांगूं लागला असतां त्यास बायका निंदेनें म्हणतात. २ (ल.) दुसऱ्यावर करडा अम्मल चालविणारा मनुष्य; नसता मोठेपणा आपणाकडे घेऊन दुसऱ्यावर करडा अंमल चालविणारा मनुष्य (लग्न झाल्यानंतर प्रथम येणाऱ्या आषाढांत नव्या सुनेस सासऱ्याचें तोंड पहावयाचें नसतें व यासाठीं तिला दुसऱ्याच्या घरीं ठेवतात–तो परका मनुष्य तिच्यावर सासऱ्यासारखा अधिकार गाजवूं लागला म्हणजे त्यास आखाडसासरा म्हणतात यावरून). 'मोठा मेला आखाडसासरा उपदेश करायला आला आहे!'

आखाडखाना—पु. १ शस्त्रागार; हत्यारें ठेवण्याची जागा. 'गेला आखाडखान्यामधीं। पार्थी तुमानीं...वाघनखें चढविलीं।' –ऐपो ५७. २ तालीमखाना. [अखाडा+खाना. अखाडा पहा.]

आखाडणें—अक्रि. ऐट करणें; अक्कडबाजी करणें. [आखडणें]

आखाडा—पु. (कों.) गुरें वगैरे आंत शिरूं नयेत म्हणून कुंपणाला खिंडीसारखी केलेली अडचणीची वाट; वेडें; (गो.) आखाडो. [आंकडा]

आखाडा—पु. तालीमखाना; अखाडा पहा. **आखाड्यांत उतरणें**–१ कुस्तीस-लढाईस तयार होणें. २ (ल.) वादविवादास सिद्ध होणें.

आखाडी—वि. १ आखाड–आषाढ महिन्यासंबंधीं. –स्त्री. आषाढी पौर्णिमा. २ आषाढ महिन्यांतील पावसाची एकसारखी झड. (क्रि० बसणें, लागणें). ३ अशा पावसाचा काळ; आषाढांतील पावसाळा. 'आखाडीच्या दिवसांत दुखणें फार म्हणून जपून असावें.' ४ आषाढांत पाऊस न पडल्यामुळें व त्यामुळें पुढें पिकें न आल्यामुळें पडणारा दुष्काळ. या महिन्यांतील पावसाचें फार महत्त्व असतें, कारण त्यानें मुख्यतः पिकें होतात. ५ (ल.) कोणत्याहि वस्तूची उणीव, टंचाई, चणचण; दुष्काळ. 'यंदा विहिरीमध्यें पाण्याची आखाडी पडली.' 'यंदा पावसाची आखाडी म्हणून धान्याची आखाडी.' (सामा.) दुष्काळ. ६ आषाढांतील शुद्ध एकादशी; या दिवशीं पंढरपूरची यात्रा भरते. 'आखाडी कार्तीकी भक्तजन येती।' –आरती विठोबाची. ७ या महिन्यांत गुरांना होणारा रोग. ८ (नाशिक) या महिन्यांत जत्रेतून वगैरे होणारे खेळ; वसंतक्रीडा. 'या सोमवारी ओझर येथें आखाडी सुरू होणार आहे.' [सं. आषाढ; म. आखाड]

आखांडो—(गो.) आंगठा. [आंकडा]

आखात—अखात पहा.

आखामसाला—पु. मसाल्याच्या जिन्नसा न वाटतां फडक्यांत बांधून अथवा सबंधच तशा मांसांत टाकतात त्याला म्हणतात. (हिं.) खडा मसाला. [अखा+मसाला]

आखॉमाखॉ—स्त्री. (गो.) लहान मुलांचा एक खेळ.

आखिन—वि. (व.) आणखी. 'लय देव (=पुष्कळ दिलें) देवानं, मंग (=मग) आखिन् काय पाहिजे!' [आणखी अप.]

आंखिला—वि अंकित; अंकिला पहा. 'जो सद्गुरुवचनें निवाला। तो सायोज्यतेचा आंखिला।' –दा ५.३.३९. 'जो गुरुभजनीं भावार्थी। जगामाजीं तोचि स्वार्थी। त्याचापायीं माझी सद्भक्ती। असे तिष्ठती आंखिली॥' –एभा ११.१५२४.

आखिरी—अखेरी पहा.

आंखी—स्त्रि. आंबे इत्यादि उतरून काढण्याकरितां काठीच्या शेवटास जाळी वगैरे बांधतात ती; झेला; गांजवी, घळ; आंखला पहा.

आखीरश—क्रिवि. अखेरीस; शेवटीं. 'त्यावर दुसरे दिवशीं आखीरश् इंग्रज ज्ञेहिमत होऊन...' –पया ४८०. [फा. आखिरश्]

आखु—पु उंदीर. 'ज्याचें आखु वाहन शोभे रणरंगीं।' –गणेशाष्टक मकाग्रं १.३. [सं.] **०कर्णी–पर्णी**–वि. उंदीरकानी; एक वनस्पति, हिचें फूल व पान उंदराच्या कानासारखें असतें.

आखु—आंस; आंख पहा. 'आखु छेदलिया पडिपाडें। रथ न चाले असतांहि घोडे।' –एभा १२.२२६. [सं. अक्ष]

आखुड, आखूड—अखु(खू)ड पहा. **०पासोळ्या**–वि. (व.) कमी ऐपतीचा मनुष्य; दरिद्री.

आखुडणें—क्रि. अखुडणें पहा. 'मवतिया से पडे। तें लाजही लाजो आंखुडे। मविती जैसी।' –अमृ ५.२७.

आखुडवटी—स्त्री. (को.) (रहाट) कनेकड विहिरीवर ज्या लांकडावर फिरत असतें तें लांकूड.

आखुडवण—न. (कों.) विहिरीचें पाणी कमीजास्त जसजसें होतें तसतशी राहाटाची माळ खालीं वर करतां यावी म्हणून मध्यंतरी थोडी (माळ) दुमडून बांधून ठेवावयाची दोरी.

आखु(खू)डवत—न. (कों.) कोंक्याच्या अगोदरचें लहानसें केळीचें पान.

आखुणें—सक्रि. (भिल्ली) आंखणें पहा. म्हणणें; बोलणें. 'हावभाव किइन आखुलों.' –भिल्ली भाषेंतील गोष्टी ३०. [सं. आ+ख्या]

आखुपुष्पी—आखुकर्णी पहा.

आखूडमाळ—स्त्री. (कों.) विहिरीचें पाणी जसजसें खालीं जाईल त्याप्रमाणें रहाटगाडग्याची माळ लांबवितां यावी म्हणून मधून मधून माळ खापेकडांच्या तीन किंवा दोन जुळ्याइतकी आंखडून बांधून ठेवितात ती माळ. [अखूड+माळ]

आखूत—(गो.) अकोट-ड पहा.

आखूर—आखर अर्थ १ पहा.

आखें—आकें पहा.

आखेर, आखेरनौबत, आखेरसाल, आखेरी—अखेर, अखेरनौबत, अखेरसाल, अखेरी पहा.

आखेंलेखें—क्रिवि. आंकडे मांडून, लिहून; स्पष्टपणें; अंकीं-लेखीं. 'तो ज्ञानाचें तत्त्व न देखे। हें सांगावें आखेंलेखें। न लगे तुज।' –ज्ञा १३.८४६. [अंक+लेख]

आंखांआंख—क्रिवि. चिठ्ठीवर लिहिलेल्या किंमतीच्या अनुक्रमानें; मूळ किमतीनें. [आंख]

आखोटा—पु. (राजा.) गलबतांचें वार्षिक भाडें. अकोटा पहा. (दुसऱ्याला भाड्यानें गलबत वहावयास दिलें म्हणजे त्याच्यापासून भाडें घेतात तें). याच्या उलट गलबतांतून एखादा जिन्नस नेण्याबद्दल भाडें देतात त्यास नोर म्हणतात.

आखोमाखो—पु. (गो.) लहान मुलांचा एक खेळ.

आखोर—अखोर पहा.

आखोळ, आखळ—पाऊस नसलेला दिवस; खळ असलेला (पावसाचा) दिवस. [सं. आ+स्खलन]

आख्ख-ख्खा—अखा पहा.

आख्य—वि. नांवाचा; नामधेय; नांव धारण करणारा. उ० रामाख्य इ० [सं. आ+ख्या]

आख्या—स्त्री. १ कीर्ति; ख्याति; प्रसिध्दि. 'मोठ्या आख्येच्या रूपवती स्त्रिया सुध्दां' –म्हेनिसचा व्यापारी ११. २ लोकापवाद; जनवार्ता; गप्प; बातमी; कंडी. ३ अभिधान; पदवी; नांव. ४ कथा; आख्यायिका; हकीकत. [सं. आ+ख्या]

आख्यात—वि. १ सांगितलेलें; प्रसिध्दीस आलेलें; बोलबाला झालेलें; कळलेलें. २ (व्याक.) धातूंना लागणारे प्रत्यय; आख्यात विभक्ति. 'तोच न्याय धातूंच्या प्रत्ययासहि म्हणजे आख्यात विभक्तीसहि लागू आहे.' –दामले, शास्त्रीय व्याकरण ४३६, दुसरें कारक प्रत्यय म्हणजे नामास लागणारे विभक्तिप्रत्यय. जसे– रामास, रामाचा. [सं.]

आख्याति—स्त्री. ख्याति पहा. 'आख्याति अन्यथा, ख्याति। शून्यख्याति सत्ख्याति।' –एभा १६.२०७. [सं.]

आख्यान—न. गोष्ट; कथा; कहाणी; दृष्टांत. 'पुराणें आख्यानरूपें जगीं। भारता आलीं।' –ज्ञा १.४६. [सं.]

आख्यायिका—स्त्री. १ दंतकथा; कल्पित कथा 'या गोष्टी नुसत्या आख्यायिका आहेत.' २ इतिहास, पुराण वगैरेंतून परंपरेनें आलेली गोष्ट. ३ (सामा.) गोष्ट; कथा; आख्यान. [सं.]

आग—पु. अपराध. 'त्यजिले खळ सुत कवियीं पाहुनि सत्संग्रहांत अत्याग।' –मोसभा ४.१६. 'नागबधूतें जाणों पाजी वर दुग्ध करूनिया आग।' –मोसभा ६.४३. [सं. आगस्]

आग—स्त्री. १ विस्तव; अग्नि; विस्तवाचा भडका; ज्वाला. २ भाजणें; पोळणें; काहील होणें; दाह होणें. 'हातांपायांची आग होत आहे, कांहीं सुचत नाहीं!' ३ (ल.) राग; क्रोध; संताप 'तनुला जाळी। आग भडकली।' ४ आवेश; ताव; तडफ; फाजील उत्कंठा. 'सत्कारूनि म्हणें जी यावें सद्भाषणें न आग मनीं।' –मोवन ४.५४. ५ ताप, ज्वर (येणें). ६ दारूगोळ्याचा–तोफेचा भडिमार. 'मोंगलाची आग भारी.' ७ (ल.) तोफखाना; तोफ. 'मन्सुरअली याजपाशीं आग भारी म्हणून भडभुंजे अभिधान होतें' –भाब २७. [सं. अग्नि, प्रा. अग्गी–अग्गी; पं. अगन; बं. आगुन; हिं. अगनी.] **०असणें**–एखाद्या गोष्टीची फार उत्कंठा असणें; तीव्र इच्छा असणें. **०उठणें–पडणें** (पोटांत)–अतिशय भूक लागणें. **०ओतणें**–आग पाखडणें; संकट आणणें. 'अन्यायानें लोकांवर आग ओतली गेली आहे.'–विक्षिप्त १.२०. **०झाडणें–पाखडणें**–एखाद्यावर अतिशय दोषारोप करणें; शिव्यांचा वर्षाव करणें; निंदा करणें; कठोरपणें बोलणें; रागें भरणें. 'नाहक सख्या आग मजवर पाखडली रे.' –प्रला १८७. 'जीवर नित्य करीं अनुराग। तिजवर झाडितसें मी आग!॥'–उत्तरराम (गोडबोले)पद७८. **०घालणें**–आग लावणें 'निजामअलीनें पुण्यास वेढा देऊन आग घातली.'–विवि (१८७६) ८.६.१०९. **०मारणें**–(यंत्र.) कोळसा घालणें. 'बॉयलरांत आग मारतेवेळीं'–एंजिनिअरिंगची तोंडी परीक्षा (बावीकर) १२. **०रिघणें**–सती जाणें. **०लागणें**–१ धान्य, वस्त्र इ० महाग होणें. २ (लागो) नाश होवो! जळो! मरो! इ० उद्गार. 'आग लागो या राजकारणाला!'–तोबं १९. **०लावणें**–दुही माजवणें; भांडण उपस्थित करणें; कलागत लावणें. 'या कारटीनें आग लावून दिली असेल. ही मोठी चोमडी आहे असे आजोबांच्या तोंडचे शब्द माझ्या कानीं पडले.' –पकोघे. **म्हo** १ आग लावील आणि विझली कीं नाहीं जाऊन पाहील= जो लोकांमध्यें आधीं भांडणें लावून त्याचा परिणाम काय होईल, भांडणें कशीं मिटतील अशी काळजी वाहतो असें बाह्यात्कारी दाखवितो अशा विघ्नसंतोषी मनुष्यास ही म्हण लावतात. २ आग-लाव्या बोंबमाऱ्या=आपण दुष्कृत्य करून तें दुसऱ्यावर घालणारा. **०वरसणें**–धान्याची, फळांची, गुळाची, तुपाची, लाडवांची आग वरसणें म्हणजे ते ते जिन्नस पुरून उरण्याइतके प्रचुर होणें. **म्हo** १ 'आग हातीं धरवेल पण (हा) हातीं धरवणार नाहीं.' हें वाक्य

एखाद्या तामसी, एककल्ली, विलक्षण स्वभावाच्या माणसास लावतात. २ आगीवांचून कढ नाहीं आणि मायेवांचून रड नाहीं. **आगींत उडी घेणें-घालणें-टाकणें**-धोक्याच्या धंद्यांत, उद्योगांत, कामांत धाडसानें शिरणें किंवा हात घालणें. **आगींत किंवा आगीवर तेल ओतणें-घालणें**-भांडण चाललें असतां तें आणखी चिडीस नेणें. तुल० 'दीप्तालय विझवाया दादुनि घालील कोण तेलातें.' -मोउद्योग ४.९. **आगींत तावून काढणें**-पक्का कसोटीस उतरविणें. **आगीवांचून धूर निघत नाहीं**-कांहीं तरी मुळांत खरें असल्याशिवाय बाहेर उगीच भुमका उठत नाहीं. या अर्थानें अशाच दुसऱ्या म्हणी-वाऱ्याशिवाय लाट उठत नाहीं, पिकल्याशिवाय विकत नाहीं इ० **आगी वाऱ्याचें भय** (आगीपासून व वाऱ्यापासून)-जरीमरीचें भय. **आगी वाऱ्याचे दिवस**-ज्या दिवसांत वावटळी फार सुटून गवत, केरकचरा वगैरे चोहोंकडे उडतो (व आगीहि लागतात) ते दिवस. (क्रि० होणें, लागणें, सुटणें). [आग+वारा] **आगीस पडणें**-(व.)धडपडणें; हावरेपणानें-अधाशीपणानें काम करणें. **कोणी आग व्हावें कोणी पाणी व्हावें**-कोणी भांडण काढावें कोणी मिटवावें. म्हणजे(ल.)कांहीं माणसें एका स्वभावाचीं असावींत व कांहीं निराळ्याच स्वभावाचीं असावींत, कांहीं चपळ व तत्पर असावींत व कांहीं जड व शांत असावींत अशा वेळीं उपयोग. (कोणाच्या) **आगीदुर्गांत नसणें**-अध्या मध्यांत नसणें; संबंध न ठेवणें. **आगींतून निघून फांफाट्यांत जाणें-पडणें**-एका संकटांतून निघून दुसऱ्या संकटांत पडणें. **तळ ब्याची आग मस्तकास जाणें**-अतिशय राग येणें. 'तळ ब्याची चढली आग। मस्तकास जाउनि भिडली।' -संग्रामगीतें ५८. **कोरडी आग पुरवते पण ओली पुरवत नाहीं**-विस्तवाची आग पुरवते पण भुकेचा त्रास सोसवत नाहीं.

आंग--अंग पहा. आंग पासून साधणारे सर्व शब्द अं मध्यें पहा.

आंगओलाचें--वि. (कों.) पावसाळा संपल्यावर जमिनींत शिल्लक राहिलेल्या ओलीवर पिकणारें (शेत, जमीन). [अंग+ओल]

आगकाडी--स्त्री. विस्तव पेटविण्याची काडी; हिच्या एका टोंकास ज्वालाग्राही द्रव्य लावलेलें असतें व हें टोंक विशिष्ट (ज्वालाग्राही) पदार्थ लावलेल्या पृष्ठभागावर घासलें असतां पेट घेतें [आग+काडी]

आंगकीर्तींचा--वि. (गो.) शारीरिक. [सं. अंग+कीर्ति]

आगखाडा--पु. अग्नि पेटविण्याकरितां केलेला खाडा, खड्डा; शेकोटी; आगटी. -भा. इ. सं अहवाल १८३४. [आग+खाडा]

आगगाडी--स्त्री. लोहमार्गावरून वाफेच्या इंजिनाच्या साह्यानें चालणारी गाडी; हिंदुस्तानांत आगगाडी १८५४ सालीं मुंबई ते ठाणें येथें प्रथम चालू झाली. [आग+गाडी] **-डीचें यंत्र**-न. इंजन, (इं.) लोकोमोटिव्ह.

आंगचें—न. १ अंगांत एखाद्या देवतेचा किंवा पिशाचाचा संचार होणें. २ गुदद्वारांतून बाहेर येणारें आंतडें; अगरूं पहा. ३ देवी (फोड्या). (क्रि० उतरणें, येणें). [अंग]

आंगच्या—स्त्री.अव. (राजा.) देवी; गोंवर; उष्ण विकार.

आगजदिवा—पु. (ना.) आकाशदिवा पहा. [आकाश+दिवा]

आगज-स-पाळणा—पु. (ना.) जत्रा, यात्रा वगैरे ठिकाणीं असणारे फिरते पाळणे किंवा झाडास दोऱ्या बांधून केलेले झोपाळे. [आकाश+पाळणा]

आगजाळी-ळ्या—वि. १ आग लावणारा; खोडसाळ; उपद्व्यापी. २ रागीट; तामसी; जहाल. ३ दंश ठेवणारा; दुष्ट. ४ भांडखोर; त्रागा करणारा, दुष्ट, खोडसाळ (पुरुष, स्त्री). 'बाई येथें नाहीं माझ्या बऱ्यावर कोणी। आगजाळ्या रांडा जळती मला पाहुनि।' -होला ७९. ५ ओंगळ; वाईट; घाणेरडें (माणूस अथवा कृत्य). [आग+जाळणें]

आगट—न. (व.) स्मशानांत प्रेत नेतांना त्यापुढें ज्यामधून विस्तव नेतात तें मडकें [सं. अग्नि; म. आगटी]

आगटा-टी-टें—पु.स्त्री.न. १ काटक्या, गवत इत्यादिक पेटवून तयार केलेला विस्तव; शेगडींत घातलेला आहार किंवा निखारे; शेकोटी; धुणी; परसा. 'पाहेपां कामिकांच्या पोटीं। सदा क्रोधाची आगटी।' -एभा १७.२२४. २ सोनाराची शेगडी--कुंडी; बागेसरी. **म्ह०** सोनाराचें पाहणें आगटींत=थोड्याशा लाभासाठीं मनुष्य एखाद्या क्षुल्लक गोष्टींतहि मन घालतो या अर्थानें. ३ (गो.) होमकुंड. ४ थोडीशी आग. [सं. अग्नि+स्थिति; प्रा. अग्गिठिई=आगिटी-आगटी. सिं. आगिटो.] **०पेटविणें**-भांडण तंटा-कलह-कलागत-लावणें-चेतविणें; कलह माजविणें. **०विजवून टाकणें**-१ आग विजविणें. २ (ल.) एखाद्या कुटुंबाचा समूळ नाश, नायनाट करणें.

आंगटी—स्त्री. (गो.) एखाद्या जुन्या वस्त्राचा तुकडा, फडकें, चिंधी.

आंगठवण—स्त्री. (गो.) अंगाची ठेवण; शरीराचा बांधा, ठेवण. [सं. अंग+म. ठेवण]

आंगठसा—पु. शरीराची ठेवण, बांधा, आंगलोट, आंगकाठी. 'भीमा ऐसा आंगठसा। माझिये दृष्टी भासतसे।' -मुसभा ६. १५३. [अंग+ठसा]

आंगठा—पु. अंगठा पहा. [सं. अंगुष्ठ]

आंगठी, आंगठेदाम-आंगठेधरी, आंगठोळा, आंगठ्याचा मान-आंगडी-डें-आंगण—हे शब्द अं मध्यें पहा.

आगड—अगड पहा. 'आगड खणविला क्षेत्राप्रति।' –एभा ३१.३९९; २२. शिवाय २९२; ९.१३५.

आगड—वि. (गो.) अगाध; अतिशय. 'आगड उदाक'= अगाध जल. [सं. अगाध]

आंगड—स्त्री. (गो.) बाजार. 'आंगडींत वचून शाक घेत्र या.' [का. अंगडी=दुकान]

आंगडकार—वि. (गो.) सोबती; सोबत करणारा. [सं. अंग]

आगडणें—क्रि. (गो.) नाहींसें होणें; हरविणें.

आंगडणें—क्रि. आंगास आलेपिळे देणें. 'चाले वेळ्यातें उकलिती। कवतिकें होय आंगडिती।' –स्वादि ९.५.११.

आगडब्बी—स्त्री. (ना.) काडयाची पेटी; आगपेटी. [आग+ डबी]

आगडा—पु. अघाडा पहा.

आंगडी—१ अंगडी पहा. २ (गो.) चिधी; आंगटी पहा

आगडोंब—पु. १ आगीचा भडका. २ (ल.) मोठें संकट; अतिशय त्रास. [आग+डोंब]

आगड्याचेंबगडें—न. लहान मूल. 'आगड्याचेंबगडें म्हणाल झणीं.' –दावि ४०९. [बगा–बगड द्वि.]

आंगण–आंगणें—अंगण पहा.

आगत—वि. आलेला; प्राप्त झालेला; पोंचलेला; दाखल झालेला. [सं.] **०स्वागत**–न. अदरातिथ्य; पाहुणचार; पाहुणेर: आदरसत्कार. [सं.]

आगत—अगत्य, अगत पहा.

आंगतपंगत—स्त्री. मुलांच्या एकत्र भोजनाचा एक प्रकार; प्रत्येकानें आपआपल्या घरचें अन्न आणून त्यांतील कांहींची देव घेव करून एकत्र भोजन करणें. [सं. पंक्ति द्वि]

आगती—स्त्री.१ येणें. 'भूतांची आगती निगेती स्वयें जाणें।' –एभा १५.८९. २ विवाहार्थ वराच्या घरीं येणारी वधू; वधूनें उच लून वराच्या गांवीं येण्याचा समारंभ. [सं. आ+गत]

आगंतुक—(विरू.) अगांतुक. –वि. १ आकस्मिक; अनपेक्षित; अवचित प्राप्त. २ पाहुणा; नेहमीं राहणारा नव्हे तो; नवखा; उपरी, फिरस्ता; वाटसरू; पांथस्थ; परकी. ३ जेवणाच्या वेळीं कोणी न बोलावतां अवचित आलेला (मनुष्य); अगांतुक. ४ (शाप) विजातीय; वेगळा; परकीय; आपाततः प्राप्त. 'या रीतीनें केलेल्या शिऱ्यांत पुष्कळ आगंतुक द्रव्यें असतात.' –सेपु २.४५ ५ शाश्वत नसणारें (सुख, दुःख, लाभ, इ०). –क्रिवि. (चुकीनें) आकस्मिक, एकदम; एकाएकीं. **०खर्च**–पु. अनपेक्षित, एकदम, एकाएकी उपस्थित झालेला खर्च. **०गुण**–पु. अंगीं नव्हेत असे अभ्यासानें येणारे गुण. 'रूप लावण्य अभ्यासितां नये। सहज गुणास न चले उपाये। कांहीं तरी धरावी सोये। आगंतुक गुणाची।' –दा २.८.३१. **०लाभ**–पु. १ अकस्मात, अकल्पित घडलेला फायदा; घबाड. २ आड मिळकत. **०वृत्ति**–स्त्री. अगांतुकी; आगंतुकी, भोजनाच्या वेळीं आमंत्रण नसतां अवचित जाऊन जेवण्याची पध्दति. **०व्रण**–पु. (वैद्यक) कांहीं प्रसंगानें पडलेलें, नैसर्गिक नसलेलें क्षत किंवा खोंद; शारीरव्रणाच्या उलट.

आगंतुकी—आगंतुक वृत्ति पहा.

आगदा—स्त्री. (व.) दिपवाळींत धान्यरूपानें व द्रव्यरूपानें द्यावयाची देणगी. [अग्र+जात ?]

आगदावणा—वि. (व.) आक्रस्ताळ्या. 'मूल मोठें आगदावणें आहे' [सं. अग्नि+दर्श=दाव, आग+दावणा; म. दावणें= दाखविणें.]

आगधाड—स्त्री. १ वणवा; आगीचा डोंबाळा, २ (ल.) अतिशय भूक लागणें. ३ जुलमी, छळणारा, त्रासदायक, खोडसाळ मनुष्य किंवा पोर–जनावर, ४ अति दुःख; मोठें संकट, त्रास; आपत्ति. [आग+धाड]

आंगधार—स्त्री. दुभत्या जनावराची जोरानें पिळून काढलेली धार (अंबोण पुढें टेवून अगर वांसरूं थानास लावून जो मोठा पान्हा सुटतो त्याच्या उलट). [सं. अंग+धारा]

आगप—अगप पहा

आगपरमे—पु.अव गर्मी, परमा; मूत्रद्वारासंबंधी विकार; लघवी करतांना आग होणें [आग+प्रमेह]

आगपाई—स्त्री १ (कों.) आगपपणा, उतावळेपणा; धडपड; एखादी गोष्ट अगोदर करण्याची घाई; अघाडी. २ होरा वर्तवणें; भविष्य सांगणें; हेरणें. [आगप; सं. अग्र+पाती] **०करणें–साधणें**– अव्वल साधणें; आघाडी मारणें.

आगपाणी—न. १ नायट्रिक ॲसिड; नत्राम्ल, ॲक्वा फॉर्टिस. (गेल्या शतकांत- सुमारें १८५७–वनविलेला शब्द). २ दारू, मद्य करण्याच्या उपयोगी. ३ सल्फ्यूरिक ॲसिड; गंधकाम्ल [आग+ पाणी]

आगपेटी—स्त्री. आगकाड्यांची पेटी (हा शब्द सन १८५० पासुन उपयोजिलेला आढळतो.)

आगपेण–पैण—स्त्री. उष्णतेमुळें अंगावर येणारे देवींच्या फोडांपेक्षां मोठे व फार आग होणारे फोड. [सं. अग्नि+पीटिका]

आगबंब—पु. आग विझविण्याचें इंजिन. [आग+बंब]

आगबोट—स्त्री. वाफेच्या शक्तीनें पाण्यावर चालणारें जहाज, तारूं. (हा शब्द १८५० च्या सुमारास रूढ झाला.) [म. आग+इं.बोट]

आगम—पु १ वेद; श्रुति. 'निगमागम दुमफळ। फलप्रद।' –ज्ञा १८.२. –एभा १४.१३५. २ तत्त्वज्ञान. ३ धर्मशास्त्र. ४ मंत्रशास्त्र; तंत्रशास्त्र. 'प्रतिपादिती अभिचार। आगम जे परमार' –ज्ञा १५.१६७.

५ प्राप्ति; फल; मिळकत; उत्पन्न. ६ मिळकतीचे कागद; दस्तऐवज (अल्कब्ज दलील उल्मुल्क); पुरावा; प्रमाणपत्र. ७ मूळ; सुरवात; आरंभ; प्रारंभ. 'पातक आगमीं गोड निगमीं कडू' 'आगमे सुखमाप्नोति निगमे प्राणसंकटं.' ८ येणें; आगमन. 'जालिया होय अभ्रागमु. व्योम तें नेणे.'–ज्ञा १८.३०८. ९ (व्याक.) उपपद किंवा प्रत्यय; शब्दाच्या आरंभीं, मध्यें किंवा शेवटीं नवीन येणारा वर्ण; उ० परिच्छेद या शब्दांत छ च्या पूर्वी जो च् येतो तो. ९ (न्याय.) आप्तवाक्य. [सं. आ+गम्] ०**निरपेक्ष**–वि. जिचा ताबा शाबीत करण्याची (दस्तऐवजानीं) (शंभर वर्षे ताब्यांत असल्यामुळें) जरूर नाहीं अशी (जमीन, इस्टेट). हक्क शाबीत करण्याची जरूरी नसणारी (मिळकत). [सं.] ०**निर्गम**–पु. १ येणें आणि जाणें; प्रारंभ आणि समाप्ति; उपक्रम आणि परिणाम; २ (ल.) एकंदर व्यवहार, कारभार. 'तुमचे व्यवहाराचा सर्व आगमनिर्गम मला ठाऊक आहे.' [सं.] ०**रहित-विरहित**–वि. दस्तैऐवज किंवा हक्क प्रस्थापित करणारा लेखी पुरावा नसलेला; विनाप्रमाण. [सं.] ०**संपादक**–वि. एखाद्या जमिनीचा किंवा जिंदगीचा हक्क, सनद ज्यानें प्रथम संपादन केला तो; संस्थापक; मूळ पुरुष. [सं.] ०**सापेक्ष**–वि. जिच्या संबंधीं हक्क शाबीत करणारा दस्तैऐवज नाहीं अशी; आगमरहित (जिंदगी) [सं.]

आगमन—न. येणें; जवळ जाणें; उपस्थित होणें. 'नोवरीचें दुश्चित मन। कृष्ण आगमन पाहातसे।–एरुस्व ५.२०. [सं.]

आगमाग—पु. पत्ता; मागमूस; ठावठिकाण; सुगावा –स्त्री. (गो.) थांगपत्ता. 'ताजी ह्या दिवसांत आगमाग कांय ना!' [माग द्वि.]

आगमापायी—वि. १ येणारा जाणारा. 'सुखदुःखादि नाना व्यथा। आगमापायी अविद्यकता।'–एभा ११.४६३. २ (ल.) अशाश्वत. [सं. आगम+अपायिन्]

आगमी—वि. तंत्रमार्गानुयायी; शाक्तपंथी. [सं.]

आगर—पुन. १ नारळ, सुपारी, इ० झाडांची बाग, मळा, शेत. 'दोल्हावतु का मानसें। आगरातळीं।'–अमृ ६.३५. (सामा.) शेत; मळा. 'आगर बागा नाहीं मिती।'–वेसीस्व ३.५४. –मुवन ७.५० २ घराभोंवतीच्या आवारांत भाजीपाला लावण्याची जागा; परसूं. 'झोंपडीच्या बाहेर गवतावर केळीच्या झाडाखालीं, आगरांत न्याहारी करीत.' –पाण्ड १७. ३ (कों. गो.) समुद्रकिनाऱ्या वर किंवा खाडीजवळ मीठ तयार करण्याचें क्षेत्र, जागा; मिठागर. ४ कांहीं विशेष गुणांचें किंवा प्रचुरतेचें स्थान; साठा; संग्रह; खजीना. ५ संग्रहस्थान; जमें–विद्येचा आगर; गाण्याचा आगर. 'पाहेन श्रीमुखें साजिरें सुंदर। सकळ आगर लावण्याचें।' –तुगा २०२०. ६ उत्पत्तिस्थान; खाण. 'जो सकळ धर्मांसि आगरु'–ज्ञा २.३७४. [सं. का.]

आगर—न (काव्य) अग्र; टोंक; अणकुची; शेवट, दोंडा. 'मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या आगरीं। मसक भरल्यावरी स्वाद नेणें।' [सं. अग्र]

आगर—पु. चंदन. अगर–रु पहा. [अगरु]

आँगर—न. १ (कों.) कुंपणाचें बेडें; दुबेळकें लांकूड (कुंपणाला दार म्हणून पुरतात तें). २. गोठ्यामध्यें गाताडी (गव्हाणीचें लांकूड) ज्यास बांधतात तें पुरलेलें लाकूड.

आंगरखा-राखा—पु. (प्र.) अंगरखा. अंगांत बंडीच्या वर घालावयाचा बंदांचा घेरदार, मनुष्याच्या उंचीच्या मानानें उंच असलेला कपडा; डगला;(गो.) सदरा. [सं.अंग+रक्षक;प्रा.रक्खग–अ; हिं. रखा] अंगरख्याचे कांहीं प्रकार–**प्यालेदार**–याचा छातीचा भाग प्याल्याच्या आकाराचा कापलेला असतो. **कंठीदार**–याचा छातीचा भाग कंठीसारखा असतो. **–गुंडीदार**–गळ्याला गुंडी असलेला. **नीमकंठी**–अर्धी कंठी (चौकोनी छाती) असलेला. **–गजरेदार**–गजऱ्याप्रमाणें चूण असलेला. **–छडीदार**–छडीसारखे पट्टे ज्यावर आहेत अशा कापडाचा. **–छिटाचा**–चिटाचा; छापील कापडाचा. **जरदोजी**–जरीचा. **–अगाबानी**–बुट्टीदार अगाबानी कापडाचा. **–बनातीचा**–लोंकरीचा **–मलमलीचा** इ० आंगरख्याचे अवयव–**आगा, कळी, खुटकळी, पेशकळी, बंद, चोळा, घेर, अस्तन्या** इ० यासंबंधीं माहिती त्या त्या शब्दाखालीं पहा.

आगर(री)गांव––पु. आगर–पोफळ, नारळी यांच्या बागा–असलेला गांव. [आगर+गांव]

आगरडा–डें––पु. अग्र; टोंक; अगरडा–डे पहा. 'कांहीं कांहीं आगरडीं। दंष्ट्रांचीं माखलीं॥' –ज्ञा ११.४१६.

आगरडांगर––किनारा आणि डोंगर;(व्यापक) सरहद्द;आवार; प्राकार.

आगरबत्ती—अगरबत्ती पहा.

आगरमाळ(ळि)का––स्त्री. नारळी,पोफळी यांच्या बागांच्या एकापुढें एक, एकसारख्या असलेल्या रांगा. [आगर+माळ]

आगरवाडी—स्त्री. राहत्या घराभोंवतीं भातखांचरासह फळबाग व भाजीपाला करण्याचें आवार. [आगर+वाडी]

आगरवाल—स्त्री. एक व्यापारी जात, दिल्लीपासून कांहीं अंतरावर असलेल्या आग्रोहा या गांवचे राहणारे यावरून नांव पडलें. ही जात बहुतेक सर्व ठिकाणीं व विशेषतः संयुक्त प्रांतांत व पंजाबांत आढळते.

आगरामेर––स्त्री. मळ्याच्या कुंपणाजवळची झाडांची रांग; कुंपणाजवळची जागा; शेताची कड, बांध. 'कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरें ठेविला।' –ज्ञा १८.४३८. [आगर+मेर=कड]

आगरी—पु. १ एक कुणबी जात; आगले कुणबी; बागवान २ बागाईतदार; आगर म्हणजे पोफळीच्या बागा मक्त्यानें करणारा. हा शब्द १२८९ च्या नागांवच्या शिलालेखांत आलेला आहे. 'हे दाम वरत सकोश कवळिआ मुख्य करूनि समळि आगरियां मागि उडिळि' –यादवांचा शिलालेख (श. १२८९.). ३ कोळ्यांपैकीं एक जात. हे मिठागरांत राहातात व होडया, मचवे हांकारतात. यांच्यापैकीं कांहीं गुत्ते चालवितात. हे जेजुरीच्या खंडोबाची भक्ति करतात. ४ (गो.) मिठागरांतील कामकरी. [सं. का. आगर] –वि. आगरासंबंधी; आगरांत उत्पन्न होणारा (पदार्थ). **०बागायत**—स्त्री. किनाऱ्यावरील, खाडीवरील रेताड जमीनींतील नारळ, केळी वगैरे होणारी बाग; आगरांतील बाग. **०भाषा**—स्त्री. ठाणें व कुलाबा या जिल्ह्यांतील आगरी लोकांची भाषा. ही भाषा देशी कुणब्यांच्या भाषेहून बरीच भिन्न आहे. **०मिरीं**—न.अव. आगरांत पिकणाऱ्या काळ्या मिऱ्यांची जात.

आंगरुखा—स्त्री. (कों.) एका अखंड लाकडाची केलेली होडी. [अंग+रुख=वृक्ष]

आगरूं—अगरूं पहा.

आगल—वि. पहिला; पुढचा.—स्त्री. १ नांगराच्या बैलजोडयांतील शेवटची बैलजोडी. पहिली धुरवी व दुसरी चाहुरी. जेव्हां तीनच जोड्या असतील तेव्हां तिसरी ती आगली, आणि चार किंवा अधिक जोड्या असतील तेव्हां धुरवी व चाहुरी शिवाय बाकी सर्व जोडयांस (शेवटाकडून पहिली–दुसरी–तिसरी) आगली म्हणतात. २ अगल–ला–ल्या–पहा. [सं. अग्रल]

आगल—स्त्री. (ना.) आगळ; अडसर; अर्गला. [सं. अर्गला]

आगॅल—न. (गो.) आकाशांतून पडणारें आगीचें पाणी. [आग]

आंगलग—वि. अंगासंबंधीं.

आंगला–डा—(कु.) आंगरखा पहा.

आगलाव्या—वि. भांडण, कळ, कलागत लावणारा, कज्जेदलाल; कळचेटया; कळीचा नारद; कळलाव्या; आगलावणें पहा. [आग+लावणें]

आगली—आगल–ला पहा.

आंगलें—न.अव. (भिल्ली) बोटें. [सं अंगुली]

आंगलें—न. आंगडें. 'लेवविलीं पांचपुडीं आंगलीं।' –शिशु ९१.(गो.) झबलें. 'ताका मावशेन कितलीशीं आंगलीं धाडल्यांत!' 'आंगलें तॉपरे घालप=पोशाख घालणें–चढविणें. [सं. अंग]

आंगवण—अंगवण पहा.

आंगवणें—क्रि. (गो.) अंगवण, नवस करणें. अंगवण पहा. 'ताणें देंवाक बोकडॉ आंगैल्या.'

आगवळ—अगवळ पहा.

आगवा—स्त्री.प्रगति; वाढ. 'संत समागम धरावा। तेणें ब्रह्मानंदी होय आगवा गा।' –भज २०. [अग्रवत्]

आगवाडा—अगवाडा पहा.

आगवान—पु. (गु.) १ पुढारी; मुख्य. २ वाटाडया. [सं. अग्रवत्]

आगवाला—(यंत्र.) बॉयलरमध्यें कोळसा घालणारा;(इं.) फायरमन. [आग+वाला]

आंगवाळें—न. (गो.) अंगांत घालण्याचा कोणताहि शिवलेला कपडा, आंगलें. 'तूं नाटकाक यॅतलों ज्यालयार तुगलीं आंगवाळीं घाल.' [सं. अंग+म. वाल]

आगवीस—स्त्री. (कु.) १ रानांत वणवा लागला म्हणजे भोंवतालचीं झाडें–झुडपें तोडून वणवा विजविणें–थांबविणें. (क्रि० काढणें). २ आलेलें संकट निवारण करणें. [आग+विझणें]

आगशी—स्त्री. (कों.) अग्नीची ज्वाळा; झोत; अही. [अग्नि+शिखा]

आगशी—स्त्री गच्ची; अगाशी पहा. [सं. आकाशिका]

आगष्ट—पु. इंग्रजी वर्षाचा आठवा महिना. हा श्रावण–भाद्रपद या महिन्यांच्या सुमारास येतो. (इं.) ऑगस्ट. [इं. ऑगस्टस्]

आगस्—न. पातक; अपराध; गुन्हा. [सं.]

आगस—वि. आगप; लवकर, अगोदर किंवा योग्य वेळेच्या पूर्वी पिकलेलें तयार झालेलें (फळ–धान्य). याच्या उलट मागस. (इतरत्र फारसा उपयोग करीत नाहींत). [सं. अग्र+स्]

आगसणें—अक्रि. योग्य कालाच्यापूर्वी तयार होणें; पिकणें. **म्ह०** आगसली ती मागसली आणि मागून आली ती कापुसली= गर्भार झाली. (विशेषतः सुनेच्या बाबतींत उपयोग). तुल० 'कानामागून आली, तिखट झाली.'

आगसपाळणा—पु. (व.) आश्विनाच्या महिन्यांत खुल्या जागेंत लांब व उंच झोंके घेण्याकरितां पाळणा बांधतात तो. [आकाश+पाळणा]

आंगसां—पु. (गो.) वस्त्राचा तुकडा; रुमाल; फडका. 'तॉ आंगसां हांगाहाड पळॉया.' [सं. अंगवस्त्र, म. अंगोच्छा; हि. आंगच्छा]

आगस्कर—पु. अपराधी; गुन्हेगार. 'परि म्हणतों यासमयीं येतां आगस्करांहि अन्यां या।' –मोभीष्म १.१०९. [सं. आगस्+कृ]

आगस्ता—अगस्ता पहा.

आगस्ताळ—अगस्ताळ, अकरताळ पहा.

आगळ–गुळ–गोळ—पु. (कु.) रातंब्याच्या फळाचा तांबडा रस. अगळ पहा.

आगळ, आगळगोटी, आगळडाव, आगळा—अगळ–अगळगोटी–अगळडाव पहा.

आगळ—स्त्री.(व.) १ जमीनींत खोदलेली लांब चूल; ढोब चूल; चर. २ विटीदांडू, गोट्या खेळण्याकरितां केलेली खळगी; अगळ पहा. [का. अगळु=खड्डा]

आगळणें—क्रि. रातंब्याच्या सालीस पुटें देणें. अगळावणें पहा. [भा+गल्]

आगळा—वि. १ अधिक; वरती; जास्त. 'चउ आगळे चाळीस गड।' –ऐपो १४. शेर आगळें मण = १ मण १ शेर. **म्ह०** (क.) जवा आगळी काशी=काशीपेक्षां जवभर अधिक. २ अधिक किंमतीचा; उंची; वरचढ; श्रेष्ठ; मोठा. 'अग्राकडूनि इक्षुरस। मुळां येतां आगळा सुरस।' –मुआदि २.५७. 'सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा.' –केका ४६ ३ (संख्येनें किंवा परिमाणानें) मोठा; पुष्कळ. 'देखोनियां धार्मिकांची लीळा। अपवित्रास खेद आगळा।' ४ अधिक (वाईट, फाजील, खोडघाळ). ५ उध्दट; उद्दाम; मगरूर (नोकराचें भाषण, वर्तन वगैरे). 'तो रुक्मिया असत्य स्वार्थे बोले। म्हणे येवेलें म्यां जिंकिलें। तों रेवतीवर म्हणे आगळें। असत्य न बोले कपटिया॥' –ह ३२.६९. ६ निराळा; भिन्न; वेगळा. 'उपमा देऊं अप्सरा। तरी त्या व्यभिचारी समग्रा। हे त्याहून आगळी सुंदरा। पतिव्रतारत्न॥' –कथा १.८.९२. [का. अगल=मोठा; श्रेष्ठ; सं. अग्र+ल; प्रा. अग्गल=अधिक; हिं. आगला; जि. अंगळे]

आगळा—स्त्री. अडसर; अर्गला. अगळ पहा. 'गळेत त्या आपण आगळा हो।' –सारुह १.५१.

आंगळी—स्त्री. (शु.) अंगुली अप.

आगळी, आगळिक, आगळीक, आगळी-त—स्त्री. १ आधिक्य; वाढ. 'तैसीं मि आं केली थोरी आगळी।' –दाव ३९०. 'रंगीं सुरंगतेची आगळीक।' –ज्ञा १.३८. 'करतळानें ताडूनि कवतुकीं। आगळीक दावणें।' –मुआदि ३१.४६. २ कुरापत; खोडी; अमर्यादा; औद्धत्य; मर्यादेपलीकडील कृत्य. (क्रि० करणें). [का. अगळिके; म. आगळा]. ३ (कायदा) कोणा मनुष्याच्या ताब्यांतील गोष्टींत (मालांत किंवा मालावर) धमकी देणाऱ्या, त्रास देण्याच्या किंवा गुन्हा करण्याच्या इरादानें जाणें. (इं.) ट्रेसपस.

आगा—उद्गा. अगा पहा. 'आगा तुम्हां देवां दोघां जणा।' –उषा १७६९.

आगा—पु. १ अंगरख्याचा पेश कळी आणि खुटकळी यांच्यामधील भाग. २ पुढील भाग. –वि. मुख्य; श्रेष्ठ. उ० आगा हैदर. [सं. अग्र; प्रा. अग्ग; फा. आगा=श्रेष्ठ]

आगा—स्त्री. अगा (ह) पहा.

आंगां—न.अव. (गो.) काड्यास लागणाऱ्या औषधी; अंगें. [सं. अंग]

आंगा—अ. (गो.) येथें; इथें; हंग. [तुल० कुण. अंग, हंग, हथं]

आंगा—पु. अंगरखा, कुडतें; अंगा पहा.

आगाऊ—अगाऊ पहा.

आगाखानी—पु. एक मुसलमानी धर्मपंथ; आगाखानाला गुरु समजणाऱ्या इस्मायली मुसलमानांचा पंथ. [आगा+खान]

आंगागवडी, आंगागणिक—क्रिवि. (कों.) पृथक् पृथक्; निरनिराळें; प्रत्येकीं; वेगवेगळें; प्रत्येक माणसाला निराळें. 'आंगागवडी शेला पागोटें दिलें.' 'आंगागणिक कारभार करूं लागले तर राज्य बुडतें.' आंगोगडी–डया पहा. [अंग+अंग+वर्ती; अंग+गणिक]

आगाजणें—अगाजणें पहा.

आगाजा—१ अगाजा पहा. **०उठणें–होणें**–बोभाटा होणें. २ वाद्य. 'आगाजांचे धडधडाट।' –वेसीस्व ६.७६; ९.६३.

आगाडा—(गो.) आघाडा.

आगाड्याचें बगाडें—न. (गो.) अवाच्यासवा सांगणें; अतिशयोक्ति. [का.]

आगांतुक-की—आगंतुक पहा.

आंगाथिणें—क्रि. १ पुष्ट होणें. 'भणऔनि आंगाथिलें ठीक लग।' –दाव १७८. २ अंगिकारणें. अंगाविणें पहा. [सं. अंग+स्था]

आगादज्वारी—स्त्री. अगात ज्वारी; मृग नक्षत्राच्या वेळीं पेरतात ती ज्वारी; लवकर येणारी ज्वारी; अगात पहा. [सं. अग्र जात; म. अगात+ज्वारी]

आगाप—अगप पहा.

आगापिछा—अगापिछा पहा. 'आतां मला आगा पिछा कांहीं नाहीं. काशीवासास जावें म्हणजे जन्माचें सार्थक होईल.'

आगाबानी—अगाबानी पहा. 'अंगीं आगाबानी अंगरखा। चहूंकडून डौल सारखा।' –प्रला ११६.

आगामी—वि. पुढील; येणारें; भविष्यकाळचें; भावी. [सं. आ+गम्]

आंगार—अ. (गो.) अंगावर. अंग पहा. **०जावप**–क्रि. अंगावर जाणें; विटाळशी होणें; ऋतुप्राप्त होणें; रजस्वला होणें. **०घॅवप**–क्रि. १ अंगावर घेणें. २ (ल.) मुद्दाम दुसऱ्याशीं स्पर्धा करून त्याला तोशीस लावणें; खोट बसणें. **०यावप**–क्रि. अंगावर येणें; खेंकरणें; वसकन अंगावर येणें. **०लॉळप**–क्रि. अंगावर लोळणें; विधिनिषेध न बाळगतां (एखाद्याशीं) लगट करणें. यांखेरीज वाक्प्रचारांसाठीं अंग पहा.

आगार—न. १ घर; मंदिर; वाडा; महाल; अगार पहा. २ सांठा; संचय; खाण. [सं. आगार]

आगार—पु.स्त्री. अंकुर; (व.) आगारे. अगारी पहा. 'तें बौपासि घेऊनि आगारें। खोलावती ॥' –ज्ञा १५.९२. 'जन्मवरी भागारी। वाढतीचि असे ॥' –ज्ञा १५.१७२. [सं. अग्र]

आंगारइचें—क्रि. (गो.) रागावणें; चिडणें. [सं. अंगार=अग्नि]

आंगारडबी—स्त्री. (व.) आगकाडयांची पेटी; आगपेटी. [अंगार+डबी]

आगारा–री–रें—पुस्त्रीन. अंकुर, शेंडा, डिरी. आगर, आगार पहा. [अग्र]

आंगारा—अंगारा पहा.

आगाव—अगाऊ पहा. 'आगाव रुपये दिले असतां सस्ते मिळेल, ऐतेवेळेस दिले तर महाग पडेल.'

आंगावो—पु. (गो.) मोठेपणा.

आगाशी–सी—अगाशी–सी पहा.

आगासदिवा—(व.) आकाशदिवा पहा.

आगासताळपणा—अकरताळ(पणा) पहा.

आगाह–ही—अगा(ह–ही) पहा

आगाळा—पु. (चि.) मुडा; ज्यांत धान्य अथवा पेरणीचें बीं बांधून ठेवतात असा पेंढ्याचा अंडाकृति बोजा; मोटकुळें; गाठोडें बिवळा; कोळें इ०

आगिअेल–येल—न. आग; विस्तव; आगीचा डोंब. –वि. विस्तव किंवा अग्निसंबंधी. 'जें आगिएलाचां सरोवरीं । घालिजे पुढिला तें ॥' –शिशु ७५६; ९८०. [अग्नि+आलय]

आगिओ—पु. (गु.) जोंधळ्याच्या पिकांत उगवणारें एक रोपटें. यामुळें जोंधळ्याचें ताट सुकतें; आगी पहा. [का. अगे=कोंब; अंकुर; रोप.]

आंगिक—अंगिक पहा.

आगिटा–ठा—पु. विस्तव; आगटी. 'कोणी एकु सुभटा। विचाराचा आगिटां।' –ज्ञा १३.१०३६.

आगिटें—न. आगटी. 'मग तिहीं आणिलीं वांगीचीं काष्ठें। तापावया केलें आगिटें।' –कथा २.९.१९.

आगिठ–टी–ठें—पु स्त्री.न. आगटी; भट्टी; शेगडी; विस्तव; आग. 'कीड आगिठां पडे। तरी मळु तुटे वानी चढे।'–ज्ञा १८.१२१. 'लोहाराची आगिठी जैसी।' –एभा २६.४४. 'हें वाङ्मयाचें साटें। साकारपणाचें वसौटें। प्रपंचाचें आगिठें। अखंड धुपे ॥' –स्वादि १३.३.४५. 'नेत्र जैसे कुंडींची आगिठी ॥' –कृमुरा. २७.४५. [सं. अग्नि+स्था]

आगिनगाडी—स्त्री. आगगाडी; वाफेच्या साहाय्यानें चालणारी गाडी; बाष्परथ. (इं.) रेलवे. 'टोपीवाल्याचा मूलुख। आगिन गाडीला कुलूप।' –बाळगीत [सं. अग्नि–म. आगिन+गाडी]

आगिया—पु. काजवा; अग्या. 'सीतकाळी आगिया देखौनि आगि म्हणोनी पानिं झांकिला।' –पंच १.४५.

आगियाळें—न. आगिअेल पहा. १ अग्निकुंड. 'घृतें आंबुखूनि आगियाळें।'–ज्ञा १४.१६२. २ ललाटस्थ अग्निचक्र. [सं. अग्नि+आलय]

आगिवळा—पु. १ अभक्ष्य पदार्थ ठेवल्यानें अशुद्ध झालेलें भांडें शुद्ध करण्यासाठीं वापरायाची विस्तवाची आंच. (क्रि० देणें). २ इमारतीचें लांकूड (नवें तोडलेलें) आक्रसण्यासाठीं त्यास धुरकटविणें. **–ळी**—स्त्री. अग्नीची ज्वाळा. [सं. अग्नि+वलय]

आगी—१ अग्नि; आग; विस्तव; निखारा. 'जिव्हारीं आगीं सुदली। तापत्रयाची।' –ज्ञा ३.२५४. **–चा पुलाव**–पु. अति तापट, कडक मनुष्य. [आग+पुलाव] **–चा लोळ–कल्लोळ**–पु. १ आगीचा डोंब, झोत. २ मोठा, दांडगा प्रतिस्पर्धी; योद्धा. ३ (ल.) संतापी मनुष्य. **–चीं जीभ**–स्त्री. अग्नीची ज्वाळा; अग्निजिव्हाशिखा. **–चा विमा**–पु आगीमुळें कोणत्याहि मालमत्तेच्या होणाऱ्या नुकसानीबद्दल किंवा नाशाबद्दल मोबदला देण्याचा करार. **–ची वृष्टी**– स्त्री. १ तोफ, बंदूक यांचा मारा. २ (ल.) संकटपरंपरा. 'तिच्यावर सारखी आगीची वृष्टी होत होती.' –इंप ५६.

आगी—पु. शेवट. '(घाण्याचा बैल) भंवतां फिरे लागवेगीं। परी पाहतां नलगे आगी।' –एभा २१.२३२. [सं. अग्र=टोंक]

आगी—स्त्री. (कर्ना.) पड जमीनींत प्रथमच पीक करतांना उगवणारें रोपटें. [का. अगे=कोंब; अंकुर]

आंगी—अंगी पहा.

आगीदुगी—स्त्री. १ भानगड, चोंबडेपणा करून किंवा मध्यें तोंड घालून दुसऱ्यानें केलेला अपराध किंवा मूर्खपणा पुढें आणणें; चव्हाडी; आगलावेपणा (अकरणरूपांत उपयोग व ज्या वस्तूवर क्रिया घडते तिची षष्ठी योजितात). (क्रि० काढणें, पाहणें, करणें, उकरणें) 'मी कोण्हाची आगीदुगी पहात नाहीं.' २ उठाठेव; दुसऱ्याची पंचाईत; भानगड. 'बाबा कोणी कांहीं करो, कोणी कोणाची आगीदुगी करूं नये.' [सं. आगस्; म. आग=अपराध, द्वि.] **आगीदुगींत नसणें**–भानगडींत नसणें; उठाठेवींत, पंचायतींत न पडणें. **आगीभागी पडणें**–धोक्याच्या व दगदगीच्या धंद्यांत पडणें; गोत्यांत पडणें. [सं. अग्नि; म. आग+भाग]

आगीन—स्त्री अगिन; अग्नि (अप.) 'तिसऱ्या पानावरी जळते नित्य आगीन।' –लावण्या (मसाप १.१.१.)

आगीमण्यार—स्त्री. मण्यार; सर्पांतील एक अतिउग्र, भयंकर विषारी जात. [आग+मण्यार]

आगीमाशी—स्त्री. जंगलामध्यें सहा प्रकारच्या माशा असतात, त्यांपैकीं एक. ही चावली असतां दंश कृष्णवर्ण होऊन स्रवतो, सुजतो व पिकतो. ही माशी प्राण हरण करणारी आहे. [सं. अग्नि+मक्षिका]

आंगु—अंग पहा.

आंगुठ—पु. आंगठा. 'देपा धोत्राची नीरी। आंगुठेंन चेपते पुढां।' –उषा १८४६. [सं. अंगुष्ठ]

आगुदान—न. बाराव्या शतकांतील देवगिरीच्या राज्यांतील एक सोन्याचें नाणें. 'तीस तीस आगुदानां दिधलिया.' –भाअ १८३६. पृ. ६३.

आगुल-गूल—स्त्री.(व.) नांगराच्या बैलजोडयांपैकीं शेवटची, पुरवणी जोडी; आगली पहा. २ बैलाच्या चाहोरांतील पुढचा भाग. 'आगुलीची जोडी हलकी असली तरी चालते.' –वि. (व.) आगुल्या; आगुली (आगली) हांकणारा मनुष्य. [सं. अग्र+ल; म. आगल]

आगुल्ल—वि. (गो.) कजाग; कर्कश (स्त्री, पुरुष); भांडखोर. 'तें झगडूं गेल्यार सामके आगुल्ल।' [पोर्तु. आगुल्ह. तुल० सं. अग्नि+तुल्य]

आंगुळ—न. १ आठ यव रुंदीचें माप; आठ यव एकाशेजारीं एक ठेवून जें प्रमाण होईल तें. २ बोटाच्या रुंदीचें माप. [सं. अंगुलि]

आंगुळी-आंगूळ-आंगोळी—अंगुळी पहा.

आगू—पु. श्रौत यज्ञांत याज्या म्हणावयाच्यापूर्वी म्हणावयाचा विशिष्ट मंत्र. [वै.]

आंगूळ—अगूळ, अगवळ पहा.

आगे—उद्गा. अग, अगे पहा.

आगें—क्रिवि. (हिं.) पुढें. [सं. अग्र] **०मागें**–क्रिवि. पुढें मागें; अंमळ पुढें अगर पाठीमागें; याबाजूला अगर त्याबाजूला; जवळपास; इकडे तिकडे; अलीकडे पलीकडे (स्थळ, काळ संबंधीं). 'मागाल तेव्हांच रुपये देईल असें प्रमाण नाहीं, परंतु आगेमागें देईल, बुडविणार नाहीं.' 'तो श्लोक त्याच ठिकाणीं कोठें आगेमागें असेल.' [आगे; सं. अग्र,+म. मागें का. मगचु; प्रा. अग्गओमग्गओ.]

आंगें—क्रिवि. खुद्द; स्वतः; जातिनिशीं. 'तेचि वस्तु होये आंगें। या नांव साधक।' –दा ५.९.२१. [सं. अंग]

आगेरूं-रू—अगरूं (रोग) पहा.

आगेल—न. १ (गो.) आग; विस्तव. 'त्येचा घराचेर आगेल पडों.' [सं. अग्नि] २ (कु.) नारळाचें उष्ण तेल. [आग+तेल]

आगेवान—वि. पुढारी; दर वीस इसमांवरील नाईक. –डुकराची शिकार ४. [सं. अग्रवत्–वान; सिं. अगवाणु]

आगो—उद्गा. (कों. गो.) अग पहा. 'आगो, तूं थै वचूं नका.'

आँगोगडी-ड्या—क्रिवि. (कों.) प्रतिव्यक्तीवर निरनिराळा अन्वय होईल असें (देणें, सांगणें). प्रत्येकीं; निरनिराळ्या व्यक्तीस स्वतंत्रपणें. 'एक जण कोण ते काम सांगा, आंगोगडी सांगू लागलां तर म्यां काय करावें.' 'सगळे गांवकऱ्यांस शंभर रुपये बक्षीस दिले, आंगोगडी दिले नाहींत.' [आँग+गडी]

आंगोघडी-ड्या—क्रिवि. १ आंगोगडी पहा. २ पुनःपुनः; वारंवार. [अंग+घटि–डि]

आगोज—वि. मोठें; भयंकर; अगाध. 'भल्लें जड पडो भारी। जीवावरी आगोज।' –तुगा ६६१. [सं. आ+गज्?]

आगोट-टी-ठ—स्त्री. पावसाळ्याचा आरंभ. अगोट पहा. 'आगोठी मेघ वर्षले।' –गीता १.२३९१. [सं. अग्र+वृष्टि]

आगोटणें—सक्रि. (व.) आवरणें; ताब्यांत आणणें. 'बैल आगोटले तेव्हां गाडी थांबली.' [सं. आकृष्ट]

आगोटता—वि. (व.) आटोपशीर. 'त्याचा कारभार आगोटता आहे.' [आगोटणें]

आगोतली-थली, आगुतली, आगोती—स्त्री. (कों.) केळ, चवेण यांच्या पानाचा शेवटचा–जेवणास उपयोगी पडेल असा भाग. दांडाळवत याच्या उलट. 'श्राद्धाकरितां चार आगोतल्या पाहिजेत.' 'केळीच्या लांब लांब आगोतल्या हींच ताटांचीं रुप्याचीं ताटें.' –पाव्ह १७. [सं. अग्र+दल]

आगोदर-धर—अगोदर-धर पहा.

आंगोपती—क्रिवि. अंगप्रती; वेगळाले; प्रत्येक जण आपल्यापुरतें; स्वतंत्रपणें. 'ते चौघे भाऊ आंगोपती संसार करूं लागले म्हणून घर बुडालें.' आंगोगडी पहा. [सं. अंग+प्रति]

आगोस—स्त्री. (कों.) उन्हाळ्याच्या सुरवातीचे दिवस. जसे– आगोठ=पावसाळ्याचा आरंभ. [सं. अग्र+उस=किरण; प्रा. ऊस; आग+ऊस]

आंगोस्तर, आंगोस्ती—अंगोस्तर-अंगोस्ती पहा.

आगोळ—१ (कु. गो.) रातबीच्या फळापासून होणारा रस; तांबडा रंग. अगूळ पहा. २ अगवळ पहा.

आगोळा—(गो.) आगाळा पहा. [चि. गो. आगोळो]

आंगोळी—अंगुळी, अंगोळी पहा.

आग्न—पु. आग; विस्तव. 'आग्न म्हणे आमुचें घर। भस्म करूं।' –दा १.१०.४६. [सं. अग्नि]

आग्नेय—वि. १ विस्तवासंबंधीं; अग्निदेवतेसंबंधीं. [सं] –स्त्री. २ आग्नेयी (अग्निदेवतेची पूर्व व दक्षिण यांमधील) दिशा.

आग्नेयी—स्त्री. अग्नि अधिष्ठित दक्षिण आणि पूर्व यांमधील दिशा. [सं.]

आग्या—पु. १ खाजरी; खाजकुइली; स्पर्श झाला असतां आग होणारी एक वनस्पति; पीतवर्णी. हिचीं जाईच्या पानासारखीं पानें असून सफेद रंगाचीं लहान बोंडें येतात; धान्याच्या शतांत हीं झाडें झाल्यास पीक जळून जातें. 'आग्या आणि काचकुहिरी।' –दा ३.७.५. २ काजवा. अग्या पहा. ३ सुतेरा (कोळी); पाऊस

कमी झाला असतां जोंधळ्याच्या पिकावर होणारा किडा. –कृपिवि १७४. ४ आगी माशी; मोहळाची माशी; चावणारा–आग करणारा (चावल्या–डसल्यानंतर) साप इ० प्राणी. –वि. १ आग करणारा; दंश करणारा. २ अतिशय रागीट; तापट, जहाल (मनुष्य, स्वभाव). [सं. अग्नि] **०घणस–घोणस**–पु. ज्यानें दंश केला असतां अंगाची आग होते असा घणस. **०झोंटिंग**–पु. आग्यावेताळ पहा. 'जाखाई जोखाई मायाराणी। मारको मेसको यक्षिणी। आग्याझोटिंग जखिणी। त्यांस भजोन जन बुडाले॥' –ह १३.६७. **०देवी**–स्त्री. देवी (फोड्यां)चा एक जाज्वल्य प्रकार. **०फुरसें**–पु. (कु.) सर्पाची एक जात. **०विंचू**–पु. एक प्रकारचा विंचू; काजव्यासारखा प्रकाशणारा. 'आगाया विंचु झाला म्हणून काय कंठींच कवळावा।' –भज ८८. **०वेताळ**–पु. १ आग लावणारा पिशाचांचा राजा. याचा एक मंत्र आहे. तो जपला असतां ज्या मनुष्याचा नाश कर्तव्य असेल त्याच्या शरीरास किंवा मालमत्तेस आग लागते. रात्रीं डोंगरावर इकडे तिकडे जाळ दिसूं लागला असतां आग्या वेताळाचा संचार सुरू झाला असें म्हणत २ अति तामसी, तापट, तडफदार मनुष्य. 'आमचे रावसाहेब म्हणजे शुद्ध आग्यावेताळच आहेत.' **०सर्प**–पु. एक सापाची जात. 'गगनीं लागती ज्वाळ। आग्यासर्पे।'–दावि २४४. **०सोमल**–पु. मनशील.

आग्यें फुरसें—न. (कों) एक जातीचें फुरसें; सर्प. [आग्या+फुरसें]

आग्यें मोहोळ—न. आगीमाशीचें पोळें. [आग्या+मोहोळ]

आग्येल—न. (गो.) अग्निवर्षाव; आकाशांतून पडणारें आगीचें पाणी. [आग+तेल]

आग्रयण—न. नवीन धान्याचें भक्षण; नवीन तांदुळाच्या केलेल्या भाताचा स्थालीपाक (होम) करून तो भक्षण करणें. हा विधि आश्विन शुद्ध पौर्णिमेस करतात; नवान्नेष्टि. [सं.]

आग्रह—पु. १ जो हेतु किंवा जें मत एकदां झालें असेल तें बळकट धरणें; दृढमत; दृढनिश्चय. २ हेका; हट्ट. (क्रि० धरणें). 'ऐसियाहि करूं म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे।' –ज्ञा ३.६३. ३ मिनतवारी; प्रार्थना; गळ घालणें; अगत्याचें बोलावणें किंवा आमंत्रण. (क्रि० करणें). ४ दुराग्रह; अनमान; हरकत. 'गज दशसहस्र वधितां भीमभुजांला नसे लवायास। आग्रह करिति अशाच्या चरणीं त्वत्सुत कसि लवायास।' –मोभीष्म ५.३१. [सं. आ+ग्रह] **आग्रहास पेटणें**–आग्रह धरणें.

आग्रहणें—अक्रि. आग्रह धरणें. 'आग्रहाल तरी सेवीन अन्न वैश्वानर।' –वसा ४२.

आग्रहायण—पु. मार्गशीर्ष महिना. [सं.]

आग्रहायणी—स्त्री. १ मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा. २ त्या पौर्णिमेस करावयाचा पाकयज्ञ (एक होमविधि). ३ (ज्यो.) मृगनक्षत्र.

आग्रही—वि. १ निग्रही; आग्रह धरणारा; हट्टी; हेकेखोर. (विशेषतः निंदाव्यंजक अर्थानें उपयोग). २ चिकाटी–नेट धरणारा. ३ आग्रह करणारा; अगत्य दाखविणारा.

आघाव—पु (गो.) हरकत; विरोध 'हाजेर म्हणॉलां कांयूच आघाव ना' [सं. आग्रह; तुल० पोर्तु. आग्राव्हो]

आघाळ—स्त्री. (व.) आळ 'त्यानें माझ्यावर उगीच आघाळ घेतली.'

आंग्ल—वि (इं) इंग्रज किंवा इंग्रजी यासंबंधीं. [इं. आंग्लो]

आंग्लोइंडियन—वि. युरेशियन; हिंदुस्थानांतील रहिवाशी, हिंदुस्थानांत जन्मलेले, इंग्रज व हिंद यांच्या मिश्रणानें उत्पन्न झालेले इंग्रज.

आंग्ळ—न. (व.) सद्रा.

आघ, आघटी, आघटें—आग-टी-टें पहा.

आघरू—(प्र.) अगरू, आगरू, अगरू पहा

आघवा—वि. एकंदर; सर्व; अवघा. अघवा पहा. 'म्हणऊनि अपाडु हें आघवें। निर्धारितां।'–ज्ञा. १.६९.; 'असत्य हे माया म्हणतां प्रत्यक्ष। मायेचा हा पक्ष दृश्य आघवें। –व १६५

आघळ—पु स्त्री. दाराचा अडसर; अगळ पहा. [सं. अर्गला]

आघळणें—आघाळणें पहा.

आघा—वि. १ सर्व, अवघा; अघवा पहा. २ अघा पहा.

आघाट–ण–णें—पुन. सीमा; हद्द; मर्यादा; चतु.सीमा. 'भूतग्रामांचे आघाट चिरिले चारी' –ज्ञा १३.४५. 'ऐसि आघाटणे चिआ।' –शक १२८९ तील यादवांचा नागांव येथील शिलालेख (ग्रंथमाला पु ६) [सं. आघाट=हद्द; मर्यादा]

आघाटी—स्त्री. एक तंतुवाद्य; किनरी; एकतारी. 'रंगावति अे तूं घेई आघाटी। गाई स्वरांचा पडिमेटी।'–शिशु ६९७. [वै. आघाटि (ऋग्. १०.१४६.२)]

आघाडा–डी, आघेडा—अघाडा–डी, अघेडा पहा.

आघात—पु. १ तडाखा; गुद्दा; चपेटा; धक्का; प्रहार; मार. 'माया करुणा हे करिते बहुत। किती सोसूं या जगाचे आघात।' –तुगा ११९. २ वधस्थान. ३ (यंत्र.) चलनयुक्त पदार्थ दुसऱ्या पदार्थास जो धक्का देतो तो. –यंमु २११. [सं. आ+हन्]

आघार—पु. कोणत्याहि होमांत मुख्य देवतेसंबंधीं याग होण्यापूर्वी अग्निस्थंडिलाच्या वायव्य कोपऱ्यापासून आग्नेय कोपऱ्यापर्यंत एक व नैर्ऋत्य कोपऱ्यापासून ईशान्य कोपऱ्यापर्यंत एक अशा संतत धार धरून दोन तुपाच्या आहुति देतात तो. [सं.]

आघारी—स्त्री. शूद्र लोक श्राद्धाच्या वेळीं पितरांना उद्देशून अग्नींत तुपाची किंवा भाताची आहुती देतात ती; किंवा कावळ्यास काकबळी (भाताचा पिंड) देतात ती. [सं. आघार]

आघाळणें—क्रि. वस्त्र वगैरे खळबळणें, पिळणें, चुबकणें. [सं. आ+क्षालन; आ+घळ (घ्व) किंवा का. अगळु; अगळ=हालविणें] **०पाघ(घा)ळणें**-खळबळणें.

आघिवळा, आघिवळी, आघीदुघी, आघीमण्यार—आगिवळा, आगिवळी, आगीदुगी, आगीमण्यार पहा.

आघी-आघीमाशी—आगीमाशी पहा. **म्ह०** मेलें मेंदरूं आघीस भीत नाहीं.

आघोट—आगोट, अगोठ पहा.

आंघोळ-आंघूळ—अंघोळ-अंघूळ पहा.

आघ्या—आग्या; हा व यापासून साधलेले शब्द आग्या खालीं पहा. **०वाघळी**—स्त्री. वाघळी नांवाची समुद्रांतील माशांची एक जात.

आर्घे—न. १ (कों.) मधपाशांचें पोळें; आग्यें मोहोळ [आग] २ आग्या; मधमाशा; आगीमाशी [सं. अग्नि, म. आग]

आघ्रव-आघ्रो—आघ्रह पहा. [सं. आघ्रह अप.]

आघ्राण—न. वास घेणें; हुंगणें. [सं.]

आघ्रात—वि. वास घेतलेलें; हुंगलेलें. [सं.]

आंच—१ विस्तवाची झळ; धग; शेक. २ विस्तवाची उष्णता (शिजविण्याकरितां, भाजण्याकरितां, औषधें, धातु वगैरे वितळविण्याकरितां). ' विस्तवाची आंच लाविली म्हणजे धातूंचा रस होतो. ' (क्रि० देणें). ३ (ल०) काळजी; चिंता; धागधूग, सावधगिरी. (क्रि० लागणें). ' गंगाधराला संसाराची आंच लागली. ' ४ धक्का; धसका; भीतियुक्त मनाची स्थिति; भय; भीति. (क्रि० बसणें). ५ (ल.) बोट भाजणें; जळून जाणें; हात पोळणें; (एखाद्या धाडसांत किंवा उलाढालींत) तोटा येणें. [सं. अर्चिस्; हिं. बं. आच; का. इचु] **०बसणें-लागणें**-पोळणें; चटका बसणें; डाग दिला जाणें. **-चींत असणें**-धाकांत-दराऱ्यांत असणें.

आंचकट—अचकट पहा.

आंचकणें—उकि. १ जोरानें ओढणें; हिसका देणें; हिसडणें, २ तोडणें; खुडणें; सोलणें. ३ लुबाडणें, हिसकणें. ४ (अश्लील) *उपटणें, *विचकणें. [सं. अंच्=जाणें; वांकविणें]

आंचका—पु. १ एकाएकीं चलाखीनें ओढणें; ताण; खेंच; हिसका; एकदम दिलेला धक्का. (क्रि० देणें). २ भीतीचा धक्का; धसका. (क्रि० बसणें). ३ झटका; कंप. [सं. अंच्; का. अंजिके=भय ?]

आंचकूड, आंसकूड—पु. (व.) बैलगाडीचा आंख; आस. [सं. अक्ष; सं. आंस]

आंचकूल—वि. (गो.) जायबंदी; लुला. अचकुल पहा.

आंचकोन—पु. (वास्तुशास्त्र) (अप.) आंचकोन; दोन शेजारच्या कमानी एकाजागीं मिळतात त्या जागीं होणारा कोन; **स्प्रिंजर वरील कोन** [इं. आंचकोन]

आंचंगणें, आंचांगणें—अचांगणें पहा.

आंचगुल—वि. कृपण; अचंगळ पहा. ' हीन आणि कृत्रिमी । रोगी आणी कुकर्मी । आंचगुल आणी अधर्मी । वासना रमे । '-दा २.३.१४. [अ+चंगळ]

आंचणी—स्त्री. आंच २ व ३ अर्थ. [आंच.]

आंचणी—स्त्री. (कों.) ओटी; ज्या घरीं लग्न वगैरे असेल त्या घरच्या बायकांची ओटी भरण्यासाठीं हळद, कुंकू, खण, नारळ, अक्षता इत्यादि साहित्य तबकांत भरून नेतात ती. [सं. अचैन; किंवा अंच्=पूजणें; प्रा. अच्चण]

आंचणी—स्त्री. रवीनें घुसळण्याची दोरी. [सं. अंच्=वळविणें]

आंचणें—(गो.) जमीन तयार करणें; जमिनीचा पोकळपणा घालविणे. [गो. आंचप. सं. अंच् जाणें; फिरविणें]

आचंद्रार्क—अ. सूर्य, चंद्र आकाशांत आहेत तोंपर्यंत; शाश्वत; चिरकाल; निरंतर; यावच्चंद्रदिवाकरौ. [सं. आ+चंद्र+अर्क]

आचपळ—अचपळ पहा.

आचंबणें—अक्रि. (क्र.) आश्चर्यचकित होणें; अचंबा वाटणें; नवल वाटणें. [अचंबा]

आचंबा—अचंबा पहा.

आचमन—न. १ धार्मिक कृत्याच्या आरंभीं शरीरशुद्धयर्थ उजव्या (गोकर्णाकृति) तळहातावर पाणी घेऊन तें मंत्र म्हणून पिणें, असें तीन वेळ मंत्रासह पाणी पिऊन चौथ्या वेळीं दोन्ही हात धुणें. या सर्व विधीस आचमन म्हणतात. कर्माच्या शेवटींहि दोन वेळ आचमन करतात. त्याप्रमाणें भोजनानंतरहि आचमन करतात. ' आचमन करून सागर । उदरामाजीं जिरविला ॥ ' **०देणें**-आपोष्णी घालणें. ' कर वाहेना तुला आचमन शुद्धाला याया. ' -विक १. २ (ल.) एकदम गट्ट करणें; आचमनासारखें पिऊन टाकणें; मुखरोग नाहींसा करण्यासाठीं बाभळीच्या सालींच्या काढ्यांत तुरटी,मध घालून त्याच्या गुळण्या करणें. [सं. आ+चम्] **०पळी**—स्त्री. संध्येची पळी.

आचमनीय—वि. आचमन करण्यास योग्य (पाणी).

आचरट—अचरट पहा.

आचरण—न १ वर्तणूक; वागणूक; विधि; एखादें कृत्य करणें-पार पाडणें, २ व्रत, नियम; चाल; आचार; रीत; रिवाज. **०करणें**—बरहुकूम चालणें; नियम पाळणें; आचरणें; अभ्यासणें. [सं. आ+चर्]

आचरणीय—वि. १ आचरण करण्यास योग्य; पाळण्यास योग्य (उपास, व्रत, विधि इ०). २ अनुसरणीय; अनुसरण्यास योग्य; करण्यालायक.

आचरणें—उकि. १ आचरण करणें, ठेवणें; वागणें. ' बहिणी म्हणे ऐसे भक्त आचरित । तयासी भगवंत जवळींच । ' -ब ५४०.

२ चालविणें; करणें; उरकणें; अभ्यासणें. 'ज्या अंगना कधिं न आचरिल्या तपातें ॥.' [सं. आ+चर्]

आचरय—न. (खा.) आश्चर्य. [सं. आश्चर्य अप.]

आचरित—वि. १ आचरलेलें; पाळिलेलें (व्रत, काम); अभ्यासिलेलें; अनुसरलेलें –न. १ वर्तणूक; वागणूक; आचरण. २ (कायदा) कर्ज वसूल करण्याचा एक प्रकार–ऋणकोच्या दारांत उपाशीं बसणें.

आँचवणें, आंचविणें—अंचवणें पहा. [सं. आचमन]

आंचळ–ळी—अंचळ–ळी पहा.

आचांगळी—वि. वाईट, अभद्र, निंदात्मक. अचांगळी पहा. 'आचांगळी अधिक शब्द। ऐकून उठिला वीर गद।' –एरुस्व ९.४. [अ+चांगलें]

आचार—न. लोणचें; अचार पहा.

आचार—पु. १ श्रुति–स्मृतींना अनुसरून वर्तन–वागणूक; विहित आचरण; शास्त्रशुद्ध वर्तन. **म्ह०** दोन प्रहर आचार, नंतर अनाचार=बारा वाजेपर्यंत धर्माचरण करून नंतर विषयासक्त होणें किंवा दोन प्रहरपर्यंत धर्म कर्म केलें तर तो आचार व त्यानंतरचा अनाचार समजला जातो. २ (सामा.) वर्तन; वागणूक; राहाणी. सामाशब्द –शिष्टाचार; दुराचार, लोकाचार, कुलाचार; सदाचार, आचार–प्राप्त–युक्त–शील–प्रिय–वेत्ता; आचारानुमत–नुरूप इ. [सं. आ+चर्] **०पद्धति**—स्त्री. वागण्याची चालरीत; नेहमींचें आचरण, वर्तनक्रम; राहाणी. **०पूत–वान–शुद्ध–संपन्न**–वि. १ कुलधर्म व कुलाचार व इतर रीतीभाती वगैरे व शुद्ध रीतीनें आचरणारा; सद्वर्तनी. २ योग्य; रीतीप्रमाणें. 'केवळ सलगीच्या मनुष्याबरोबर जरी देवेंधेव करणें झालें तरी खतपत्र करून करावें, कांही कोणताहि व्यवहार आचारशुद्ध असावा.' **०प्रसिद्ध**–वि. लोकरूढींतील, शिष्टाचाराचा; शिरस्तेबाईक. [सं.] **०भ्रष्ट–वर्जित–हीन**–वि. विहित धर्मकृत्यें न करणारा, न आचरणारा; अनगेल. बेशिस्त; धर्मलंड, अनाचारी. **०भ्रष्टी**–वि. आचारभ्रष्ट (अशुद्ध रूप). **म्ह०** आचारभ्रष्टी सदा कष्टी. **०वाणें**–(गो.) अमंगळ; अभद्र [सं. आचार+विहीन] **०विचार**–पु. शास्त्रविहित असे कुळाचार, धर्माचार, विधि संप्रदायशुद्ध आयुष्य घालविण्याचे मार्ग, नियम, शिस्त, मर्यादा इ०; शास्त्रोक्त आचार विचार. 'शहरांत राहिलें असतां तादृश आचारविचार रहात नाहींत.' **०शील**–वि. आचारसंपन्न, सदाचारी. **०शोधक**–वि. सदाचार व अनाचार यांचें परीक्षण करणारा, विवरण करणारा.

आचारी—पु (प्र.) आचार्य. १ गुरु; उपदेष्टा; उपदेश करणारा. 'जैसी तैसी असो पुढिलांचे सोई। धरिती हातीं पायीं आचारिये॥' –तुगा १९०३. रामाचारी, कृष्णम्माचारी वगैरे नांवांत आचारी हें पद आचार्याचें अप. असतें. [सं. आचार्य.] २ स्वयंपाक करणारा; स्वयंपाकी; दुसऱ्याच्या घरीं स्वयंपाक्याची नोकरी करणारा (विशेषतः ब्राह्मण जातीचा). [सं. आचार्य] **०पाणक्या**–पु. १ स्वयंपाक करणारा व पाणी भरणारा. २ (ल.) जड बुद्धीचा; अशिक्षित; ठोंब्या माणूस.

आचारु—पु. आचार; वागणूक. 'येरु आचारु जो परावा। तो देखतां कीर बरवा।' –ज्ञा ३.२२०.

आचार्य—पु. १ उपनयन करणारा, वेदमंत्र शिकविणारा गुरु. २ उपाध्याय; धर्मकृत्यें चालविणारा; भटजी; पुरोहित. ३ धार्मिक पंथाचा संस्थापक, प्रवर्तक इ० मध्वाचार्य; रामानुजाचार्य. ४ अध्यात्मज्ञान करून देणारा 'जें जाणणें या आघवेयांचें गांवीं। गुरुत्वाची आचार्यपदवी। जें सकळ गुह्यांचा गोसावी। पवित्रां रावो।' –ज्ञा ९.४७. ५ पंडित; निष्णात या अर्थी नांवाच्या पुढें लावण्यांत येणारी पदवी; प्रोफेसर. जसें– राघवाचार्य; व्यंकटाचार्य इ० ६ (ख्रिस्ती) मिनिस्टर याचा पर्याय; ख्रिस्ती लोकांचे धर्मविधि, संस्कार व उपासना चालविणारा दीक्षित; ख्रिस्ती धर्मोपाध्याय; सेवक. 'कोणीं कारण न दाखविल्यास आचार्यानें बधूवरांच्या आप्तांना पुढें बोलावून यात्रप्रमाणें उपासना करावी'–उपासनापद्धति ३१, –ईवि १३८. –साप्रा. ६८. इ० ७ (उप.) आचारी; स्वयंपाकी. ८ आद्य शंकराचार्य; किंवा त्या पीठावरील अधिष्ठित व्यक्ति. 'आचार्यस्वामीची साजे उपमा।'–सप्र २.९९. **०वरण**–न. धार्मिक कृत्यासाठीं आपल्या अंगत्वानें यजमान एखाद्या उपाध्यायाची धार्मिक पद्धतीनें योजना करतो तें; पौरोहित्य. 'कश्यपा दीधलें ब्रह्मासन। दत्तात्रेया आचार्यवरण।'–कथा २.१४.६०. [सं. आचार्य+वृ] **आचार्योपास्ती**–स्त्री गुरुसेवा, आचार्यांची पूजा. 'ते आचार्योपास्ती। प्रकटिजेल तुजप्रती।' –ज्ञा १३.३७०.

आचावाचा—अचावचा पहा. 'काम वाढे भय वासनेच्या द्वारें। सांडावें तें धीरें आचावाचा।' –तुगा २८०३.

आचिरकाय—स्त्री. (गो.) कल्पना, अंदाज, अटकळ.

आंची—अंची पहा.

आचीर—न. (क. कुग.) आश्चर्य. [सं. आश्चर्य अप.]

आंचुंक-चौक, आंचेवक-चुक—(गो.) अंचवणें पहा.

आचुडमूळ—वि. आमूलाग्र; सर्वांच. 'मग देखों लागे सकळें। आचुडमुळें पीतवर्णें.' –एभा ५.१७४. [सं. आ+चूडा+मूल]

आचुंबित—अचुंबित पहा.

आचुळ–च्चळ, आंचुळ—पु. १ गुराचें थान; सड; आंचळ. २ (विणकाम) विणून झालेल्या कापडाचे उरलेले शेवटचे धागे, ज्यास नवीन ताणा (विणावयाच्या सुताचे उभे धागे) जोडतात ते. या व इतर अर्थी अचळ, अंचल पहा [सं. अंचल]

आचूक—अचूक पहा.

आचोज—न. नवल; आश्चर्य; अचोज पहा. 'नंद नंदन हा आचोज आंबुला वो' –शिगा ६५. [सं. आ+म. चोज]

आचांद्रा, अर्चुंद्रा—वि. १ पिचक्या किंवा चिपडया-डोळ्याचा; अधु दृष्टि असलेला; २ (ल.) बावळ्या मुद्रेचा. [सं. आ+तंद्रा=चंद्रा]

आच्कलें—वि. (गो.) एकटें; एकलें.

आच्छन्न, आच्छादित—वि. १ झांकलेलें; वर पसरलेलें; व्यापलेलें. २ लपविलेलें; गुप्त; गुपित. [सं. आ+छद्]

आच्छरिय—न. (गो.) आश्चर्य; नवल. [सं. आश्चर्य अप.]

आच्छा—अच्छ पहा.

आच्छादक—वि. १ झांकणारा; पसरणारा; व्यापणारा. २ लपविणारा; गुप्त ठेवणारा. [सं.]

आच्छादणें—अक्रि. १ झांकणें; पांघरूण घालणें (वस्त्र वगैरेनीं वस्तू इ०) २ छपविणें, लपविणें. [सं. आ+छद्]

आच्छादन—न. १ झांकणें; पांघरूण घालणें; आच्छादणें; व्यापणें; लपविणें, छपविणें. [सं.] २ गुप्तावस्था, गुप्त स्थिति; गुप्त असणें. ३ (सामा.) झांकण; पांघरूण; कपडे; वस्त्रप्रावरण. ४ आच्छादनाचें साधन; जसें– तरवारीचें म्यान; घराचें छप्पर; कीटकांवरील कोश. इ०

आच्छुरित—न. (अंगहार) (नृत्य.) उजव्या हाताने नूपुरकरण करणें, त्रिक फिरविणें व मग व्यंसितकरणांतील हात करून त्रिक फिरविलेलें नीट करणें, नंतर उजवा पाय अलातक करून त्याच पायानें सूची करणें व शेवटीं करिहस्त व कटिच्छिन्न करणें. [सं.]

आच्यांव—पु. (गो.) कांचेची बरणी. [पोर्तु. आशांव]

आच्यावाच्या—अचावचा पहा. 'आच्यावाच्या बोलवितो । ज्यामीं त्यामीं ॥' –दा १३.९.१६.

आज—अज पाहा. हा शब्द व त्यापासून झालेल्या म्हणी–उ० आजीं नसणें इत्यादि, अजीं शब्दाखालीं पहा.

आज—क्रिवि. वर्तमान, चालू दिवस–काळ; या शब्दापुढें बहुधा दिवस शब्द येतो. जसें–आजचा दिवस. [सं. अद्य; प्रा. अज्ज; सिं. अजु; हि गु आज; बं. आइज; पं. अज्ज; गो. आंज] ०**उद्यां**–क्रिवि. पुढें ढकलणें, लांबणीवर टाकणें. (कि० करणें). 'त्याचें आज उद्या दोन वर्षे चालले.' ०**काल**–क्रिवि. चालू काळ; आतांशा; सांप्रत; या दिवसांत; सध्यां.हल्लीं, सांप्रतकालीं. 'दीन-गरीब याचा समाचार घेणारा आज काल कोण आहे बाबा!' ०**तंव-ताग्राइत-यत,-पर्यंत**–क्रिवि. या दिवसापर्यंत; आज पावेतों. ०**दिन-पर्यंत**–क्रिवि. आज पावेतों ०**दिवसीं**–क्रिवि. १ गुदस्तां किंवा मागें या दिवशीं. २ आज; आजच्या दिवशीं. ०**लग**–क्रिवि. (हा शब्दप्रयोग फक्त लिहिण्यांतच उपयोगांत येतो, बोलण्यांत नाहीं) आतांपर्यंत. [अद्य+लग्न] ०**ला**–क्रि. वि. १ आज; आजच्यासाठीं, करतां. 'मला आजला खर्चायास कांहीं रुपये पाहिजेत.' २ आजच्या दिवशीं; एव्हांना. 'मुंज झाल्यापासून जर अध्ययन केलें असतें तर आजला पंडित झालों असतों.' ०**वर-वरी-वेरी-वैरी**–क्रिवि. आजपर्यंत; हा काळ पावेतों. ०**वर्दी-वर्षे-वर्षीं**–क्रिवि. ज्या काळास आज वर्षे झालें तो काळ दाखविणें या अर्थी; तो दिवस; 'आजवर्दी आम्हीं पंधरीस गेलों होतों.' [आज+वर्ष] **म्ह०** १ आज माझा उद्यां तुझा=चालू घडीस काम करून घेणें, उद्यांवर न टाकणें. २ आज अमीर तर उद्यां फकीर.

आजगर—अजगर पहा.

आजगा-गो—(गो.) भाता (साळी)ची एक जात.

आंजणी, आंजिणी, आंजणवाडी—स्त्री. (कों.) रांजणवाडी; डोळ्याच्या पापणीस होणारा एक फोड–पुळी. [सं. अंज्=काजळ घालणें; अंजनावती]

आंजन—पु. १ अंजन पहा. २ अंजनीपुत्र मारुती. [सं.]

आजन्म—क्रिवि. १ जन्मापासून; जन्मप्रभृति. या शब्दाच्या ऐवजीं **आजन्मपर्यंत, आजन्मापासून, आजन्मप्रभृति, आजन्मांत** इ० शब्द चुकीनें योजतात. [सं. आ+जन्म] २ (चुकीनें) मरणापर्यंत; जोपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत. जसें–आजन्म-सेवक=लाइफमेंबर. 'मी आजन्म ब्रह्मचारी राहणार!' –सु ५१. ०**मरण(णें)**–क्रिवि. जन्मापासून मरणापर्यंत.

आजन्मतः—क्रिवि. १ जन्मापासून. २ (चुकीनें) मरणापर्यंत; आमरण.

आजन्मांत—क्रिवि. १ जन्मापासून आजपर्यंत; आजतागायत. २ सर्व आयुष्यांत.

आजम—पु (व) सामर्थ्य; अजम पहा. 'तुमच्यांत तर आजम नाहीं.'

आजमा—पु. अजमोदा; ओवा; अजमोदा पहा.

आजमावणें—अजमावणें पहा.

आजमावा—अजमाव पहा. –वामन विराट ८.३१. (शर.)

आजमास—अजमास पहा.

आंजरली, आंजुर्ली—आंजणी पहा.

आजराहे—अन्नाहे पहा.

आंजली—अंजली पहा.

आजवळ—आजूळ पहा. 'राम म्हणे वत्से! तूं आजवळा पावलीस न वनातें।' –मो उद्योग. १३.८; –मोवन ६.५३.

आजस्वारी—अ. (आज स्वारी अमुक मुकामीं आहे वगैरे मायना). लष्करांतून; स्वारीमधून (हुकूम निघतो की=आज्ञापत्र निघतें जें). जुन्या कागदपत्रांत हा शब्द आज्ञापत्राच्या आरंभीं लिहितात. [फा. अज्=पासून+स्वारी]

आजा—अजा पहा. 'वधिलें कैसें धनार्थ आज्याला!' –मोभीष्म १.२४. **म्ह०** १ आजा मेला नातू झाला=एकाच्या जागीं दुसरा आला. २ आज्यास नातू शिकवितो.

आजागुरु—अजागुरु पहा.

आजात-द—वि. स्वतंत्र; मुक्त. अजात पहा. 'यांच्या मुलांमाणसांचें चालवून (त्यांस) आजात करावें.' –ऐटि १.२२. [फा. आझाद् = स्वतंत्र]

आजादी—स्त्री. स्वातंत्र्य. [फा. आझादी]

आजादेवी—स्त्री. एक क्षुद्र देवता (क्षुद्रादिकांची). [अजा+देवी]

आजानुबाहु—वि. उभा राहिला असतां ज्याचे हात गुडघ्यापर्यंत पोंचतात असा (मनुष्य). 'ऐके आजानुबाहो नृपनाथा।' –एभा ३.७६. [सं. आ+जानु+बाहु]

आजाबा—आजोबा पहा.

आंजाम—अंजाम पहा.

आजार—पु १ रोग; दुखणें, व्याधि. २ (ल) उपद्रव; पीडा, जुलूम; त्रास. 'त्याणीं रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाहीं.' –रा ८ २४. [फा. आझार्; तुल. सं. आ+ज्वर]

आजारणें—अक्रि. आजारी पडणें, नादुरुस्त होणें; तंदुरस्ती नसणें. 'जोड्यापरी तुज धड बनवावें, आजारगी तूं नित।' –घड्याळ कविता (विवि. १९२२ डिसेंबर.)

आंजारणें—अंजरणें पहा.

आजारी—वि. दुखणाईत; रोगी; पीडित; बेमार; व्यथित. [फा. आझार्; तुल. सं. आ+ज्वर]

आजास—(कों. कु.) आजा पहा.

आजि—आज. 'आजि या म्हण रामयासी। आणि तूं आतां।' –लक्ष्मीनारायणकल्याण नाटक (शके १६०४.) 'प्रसन्न नाहीं मन आजि तूंसें।' –सारुह १.१०. **०च्यानें**–क्रिवि. आजपासून: यापुढें. 'काकुळती येती हरी। म्हणे आजिच्यानें मी न करी चोरी।' –ह ९.७०. [सं. अद्य. म. आज]

आजि—पु. रण; समर; युद्ध. 'कथिलें तेंचि तुजें विजयें मज आजि आजि-दक्षातें।' –मोद्रोण ११ २४. [वै. आजि=शर्यत, युद्ध]

आजिजी—अजिजी पहा.

आजिमांय—स्त्री. (गो.) आजेसासू.

आजिमांव—पु. (गो.) आजे सासरा.

आजी—अजी पहा.

आजी—क्रिवि. आज. 'आजी जरी ते असतीं। तरी मजला कदा न विशंभती।' –दा ३.४.३६. [सं. अद्य]

आजीआजी करणें—अजीअजी करणें पहा.

आजीज—वि. दीन. अजीज पहा. 'मारतां मारतां मरावें परंतु केवळ आजीज होऊं नये.' –भाव ७. [फा. आजिझ्=दीन]

आजीबाई—स्त्री. अजी, अजीबाई पहा.

आंजीमांजी—पु (कु.) लपंडाव खेळ.

आजीव—क्रिवि. जन्मभर; मरणापर्यंत; आयुष्यभर. उ० आजीव सभागद=लाईफमेंबर. (इं) [सं.]

आजीवक—पु. १ भिकारी; भिक्षुक. २ एक धर्मपंथ, अस्तित्व सुमारें ख्रिस्तपूर्व ६ वें शतक. [सं]

आजीस—स्त्री. (कों.) आजी.

आजीसवब—क्रिवि. या कारणास्तव–सार्ठी, अजीसवब पहा. [फा.]

आजु—क्रिवि. (गो.) आज 'आजुच सेपलें पूण;'

आजुनि-आजून—अजून पहा.

आजुरदा-आजुरा-आजुर्दा—वि.खिन्न,दुःखी,श्रमी. अजुरदा पहा. 'रामा नापास झाल्यामुळें आज तो फार आजुर्दा आहे.'

आजूद—न (गो.) वस्ति, एनिमा; पिचकारी. आज्यूत पहा.

आजूबाजू, आजूबाजूस—क्रिवि. आसपास, भोंवताली, सभोंवतालीं; जवळपास; शेजारीं. 'बैल शेतांत नसला तर तेथेंच आजूबाजूस कोठें असेल पहा.' [बाजू द्वि.; फा. बाझू=हात द्वि]

आजूळ-आजोळ—अजूळ पहा. **०वंश**–पु.मातामहाचा वंश.

आजेगुरु—अजागुरु पहा.

आजेचीर-चाण—अजेचीर पहा.

आजेसासरा—पु. सासऱ्याचा किंवा सासूचा बाप; बायकोचा किंवा नवऱ्याचा आजा; आजेसासूचा नवरा. [आजा+सासरा]

आजेसासू—स्त्री. सासऱ्याची किंवा सासूची आई; बायकोची किंवा नवऱ्याची आजी, आजेसासऱ्याची बायको. [आजा+सासू]

आजोबा—पु १ बापाचा किंवा आईचा बाप. २ वृद्ध मनुष्यास आदरार्थी म्हणतात. [आजा+बा]

आजोरा—पु. १ कटकट; त्रास (जास्त कामाचा वगैरे). अजोरा पहा. २ विनाकारण लागणारा खर्च. [फा. आझुर्दा]

आजोवळ, आजवोळ—न. (गो.) आजोळ. 'त्ये कां आजवोळ आसात्रे?'

आजोळा-ला, आज्वळा-ला—अजवला पहा.

आज्माईश—पु परीक्षा; प्रत्यय. अजमावणें पहा. 'एक वेळ आम्ही स्नेह म्हटला तेथें चाल कसी पडती याचा आज्माईश नबाब साहेब यांस अद्याप नाहीं.' –रा १९.१०१. [फा. आझ्माइश्]

आज्य—न. १ शेळीचें तूप. २ (सामा) तूप (गाय, म्हैस इ० चें). 'आज्य मी समिधा। मंत्रु मी हवि।' –ज्ञा ९.२६७. –वि. शेळीसंबंधी. [सं. अजा]

आज्याबा—आजोबा 'मामाजींस म्हणसि, तें न म्हण आर्थे आज्याबा।' –मोआदि ३२.७२. [आजा+बा]

आज्यूत—न. (गो.) एनिमा; वस्ति. 'ताका दिसपट्टें आज्यूत घेंवपाची संवय आसा.' आजूद पहा

आझान—न (मशीदीच्या मनोऱ्यावर उभें राहून केलेलें) नमाझ पढण्यासाठीं बोलावणें, हाकामारणें. [फा. आवाझिदन्]

आझुइ-आझुणी, आझूं-ई, आझुण-णु-न-नि, आझौनि—क्रिवि. अजून; अद्यापि 'अगा! जी हृषीकेशी आझुइ किती चाळविशी।' –शिशु. ७८. 'आझूई उजगरा किर्तीं। कराल तुम्हीं।' –शिशु १२२. 'आझौनि सांडौनि अहंकारातें।' –दाव. ३७६. [अजून]

आझोडणें—क्रि. चांगलें झोडणें; ठोकणें; मारणें. 'विकारें विचारातें आझोडी।' –भाए १८२;१९५;४३७. [सं. आ=आमर्मंतात्+म. झोडणें]

आट—स्त्री. अट पहा. १ हट्ट; हेका. 'नाहीं चाखून कोणी पाहिलें वृथा आट धरणें। ईंद्रास पाहिल्यामुळें भगेंद्र भरणें.' प्रला. १९२. २ (ना.) मिजास; अभिमान; पीळ; ताठा; दिमाख. ३ वेडा; वळसा; पीळ. 'भीतरु भरला आटा। आदि शेंवाचे या सेवटा' –ऋ. ९२. ४ अडचणीची जागा, आडवाट. 'मार्गी रोधिला देखोनी आट। मार्गस्थातें मांडिला अनर्थ।' –मुवन ७.१७९. [का. अट्ट; म. अट]

आट—पु. संताप; त्रास; अटअट पहा. [सं. आर्ति; प्रा. अट्ट]

आट—स्त्री. १ धारगे मऊ होण्यासाठीं कण्या उकडून त्यांत पीठ घालून तयार करतात ती; शिजलेल्या तांदुळाच्या कण्या. २ –पु. आटवलेला पदार्थ. 'वेधाचा वळसा। चैतन्याचा आट भवें जैसा।' –शिशु ५९५. ३ आटणी. ४ (ल.) नाश; शेवट. 'विकळ देखोनि दळभार। मागधवीरीं केला मार। आट भविन्नला थोर। हाहाकार उठिला॥' –एरुस्व १०. ४२. [का अट्टु=शिजविणें; म. आटणें]

आटक—न. (कों.) करवंदासारखें एक फळ. हें पिकल्यावर आंत-बाहेर लालसर होतें.

आटक—न. (गो.) नारळाचा वाळलेला गोटा, पाणी आटलेला नारळ. [का. अट्टु=आटणें]

आटक—स्त्री. कैद; प्रतिबंध; अटक. पहा.

आटकमाटक—१ लहान मुलांचा एक खेळ. या खेळांतील गाणें–'आटकमाटक। चल्ले चाटक। चल्ले झाले गोड गोड। त्यावर बसला। रामजी पोर। रामजी पोराचे हातांत। तुळशी माळा एक एक हात फुलल्यो॥' =रांजणगांव म्हणून एक गांव आहे, त्याला लागून असलेल्या डोंगरावर उंबर व मत्तीसारखीं मोठालीं झाडें व चत्तीसारखीं व बाभुळीचीं लहान झाडें दाट उगवलेलीं आहेत. तेथें उन्हही पडतें. पाऊसहि थोडाबहुत पडतो. तर मग पीक कां बरें आलें नाहीं. –चित्रमयजगत् (डिसें. १९१६) कानडींत या खेळाला अंटकमंटक म्हणतात. [का. अत्ति=उंबराचें झाड; मत्ति=एक झाड]

आटकळणें—अटकळणें, अडखळणें पहा.

आटका—पु (क.) आठ बियांचें फळ. [अष्टक]

आटंका, आटांका—अटका पहा.

आटकाटी—स्त्री. (गो.) आडकित्ता. 'आटकाटेन मात्सा बॅडॉ कातलून दी'

आटकांड—न. (क.) ज्यांतील पाणी आटत आलें आहे असें डबकें. [का. अट्टु=आटणें+म. कुंड]

आटंकाळ—अटंकाळ पहा.

आटकी—स्त्री. १ अटकी पहा. २ आठ माणसांचा समुदाय; वजन; आठ माणसांनीं वाहून नेण्यासारखा पदार्थ. आठका–की पहा. [सं. अष्टक]

आटकूल, आटुक—न. १ (क.) आठ चिंचोक्यांचा समुदाय. 'आटकूल कर,' 'आटुक झाला.' २ अटकी पहा. [सं. अष्ट+कुल; अष्टक]

आटकें—न. १ अच्छेर; अर्धा शेर; मापटें; पायलीचा अर्धा भाग. आठकें पहा. [सं. अर्धक] २ (चेंडुलाचा खेळ) अट पहा.

आटखोर, आटणी, आटणें, आटताकाळ, आटदार, आटप-पणें, आटपता, आटपसार, आटपळ, आटपा-अटप–अ मध्यें पहा.

आटघन—वि. (व.) अडून बसणारा; लवकर न वळणारा. [का. अट्टुड]

आटघाट—अटाघाट पहा.—स्त्री. १ त्रास देणें; छळणें; कुरापोड करणें. २ त्रस्तावस्था; श्रम; त्रास; छळ; खराबी, नाश. 'देशांत होईल खट आटघाट।' –दावि २११. [आटणें+घाटणें]

आटछाट—स्त्री. १ आग्रह; हट्ट; छांदिष्टपणा. २ फाजील टापटीप; बातचेत; व्यवस्थितपणा; कडक तंतोतंतपणा; चोखंदळपणा. (क्रि० करणें–धरणें–लावणें). ३ शेलक्या शेलक्या–निवडक वस्तू; मासलेवाईक (वाईट अथवा चांगले) पदार्थ. **–टीचा**–वि. १ मासलेवाईक, निवडक. २ बारीक पाहणारा; चोखंदळ; कडक बातचेताचा, शिस्तीचा; शिष्टाचाराकडे फार लक्ष देणारा. [आटणें+छाटणें]

आटण—न. प्रवास; पर्यटन. अटण–न पहा. 'समर्थ भरतखंडीं आटणें केलीं।' –सप्र ३.५.

आटण—अटणी पहा. **०कळा**–स्त्री. उतरती कळा.

आटणी—स्त्री. अटणी पहा. १ मूस. 'जन्म कर्माची आटणी।' –दा ३ १.२. २ नाश. 'हे महाभूतांची फुडी। आटणी देखा॥' –ज्ञा ६.२९०. ३ श्रम; त्रास. 'नेणतां सोसिली तयाची आटणी।' –तुगा १५३२. ४ आटविणें. 'त्याची जंव जंव आटणी कीजे। तंव रसपाक ते शर्करादि निपजे।'–रंयो ८.२८. **०पडणें**–क्षीण होणें; व्यर्थ खर्ची पडणें. 'एऱ्हवीं नरदेहाही येवढें। धन आटणीये पडे।' –ज्ञा १८.६१६.

आटणें—१ अटणें पहा. 'तैसी सुबद्ध आटली।' –ज्ञा ६. २२५. 'दुहोत भलते सदा तरि न लेशही आटती।' –केका ५८ २ आटोपणें; मागें हटविणें; पराभव करणें. 'शिक्षोत्साह बळानें कोणी कोणासि त्यांत आटेना' –मोकर्ण ४७.५५. कमी होणें; नाश पावणें. ३ मरणें; मारणें; नष्ट होणें. 'वैरी एकदांचि आटावे।' –रावि ३१.२०९. 'अपराहूणीं बहु दारुण रण झाला, फार आटले कटक।' –मोकर्ण १९ ३. 'कित्येक मलेच होऊन गेले। कित्येक फिरंगणांत आटले।' –दा १५.२.३. [का. अट्टिसु]

आटतीपरी—स्त्री. हट्टाची बागणूक, वर्तणूक. 'चित्तीं कष्टी होतसे भारी। आटती परी देखोनिया॥' [अट=अडणें+सं. प्रति= परी]

आटप—(गो.) अटपणें पहा. 'आटापां येना'=आटपत नाहीं. शिवाय आटोप पहा.

आटप—पु. उरक; अटप. आटोप पहा (कामाचा) ०**असणें**–कामाची माहिती असणें; उरक असणें.

आटपणें—अटपणें पहा. 'धीर धरोनी आटप म्हणुनी बाष्पें मजसाठीं।' –केक ४१.

आटपता, आटपसार—अ मध्यें पाहणें.

आटपाट—पु १ मुलींचा एक शिवाशिवीचा खेळ. या खेळांत एकीवर डाव असुन तिनें इतर मुलींना शिवावयाचें असतें. या खेळांत डाव घेणारी मुलगी इतर मुलींना शिवावयास लागली तर त्यांनीं (खेळांत) बसावयाचें (छपापाण्याप्रमाणें) नसतें; पाठशिवणीचा खेळ. (क्रि० घेणें; खेळणें). –स्त्री. १ (ल.) गळ घालणें; गळीं पडणें; आग्रह, नेट धरणें. (क्रि० धरणें). २ ठामपणा; पक्केपणा. [आट+ पाट. प्रा. अट्ट=फार]

आटपाटनगर—न. १ कोणतें तरी निनांवी, रहदारीचें गांव. [सं.अट्ट=गमनेव पट्ट=गमनेंआलेंगेलें गांव (राजवाडे)]. २ आठ पेठा असलेलें मोठें शहर. [सं. अष्ट=आठ+पट्ट=पेठ] ३ बाजाराचे आठ चौक असलेलें शहर. [अट्ट=बाजार+पट्ट=चौक; पेठ] ४ आठ मोठे राजरस्ते असलेलें गांव. [अष्ट+पथ=पाट; कोंकणांत गुहागर या गांवी एका रस्त्याच्या दोन बाजूस सारखी वस्ती असून त्या वस्तीच्या दोन वेगवेगळ्या भागांस खालचा पाट व वरचा पाट अशीं नांवें आहेत.] कहाण्यांतून नेहमीं हा शब्द आरंभीं येतो. उ० आटपाट नगर होतें, तिथें एक ... वगैरे. [तुल० गु. पाडा= भाग, वस्ती, पेठ. उ० नवापाडा]

आटपिरड—(ब) घुसफुस; वैमनस्य; रुसणें; फुगणें; रागावणें.

आटपीठ—अटापीटा पहा.

आटफाट—(गो.) आटपाट खेळ पहा.

आटबाज—अटबाज पहा.

आटरणें—अटरणें पहा.

आटवणें-विणें—कि. १ (सोनारी धंदा) सोनें, रुपें इ० धातूंचा रस करणें; अटण्याची क्रिया करणें. २ द्रव पदार्थ उष्णतेच्या साहा-यानें घट्ट करणें, अटतील असें करणें ३ (ल.) कमी करणें, ठार मारणें. 'द्रौणिपराभवकाळीं म्यां कौरव सैन्य फार आटविलें।' –मोकर्ण ४०.३४. [अटणें प्रयोजक]

आट(ठ)वल-ली-ले—पुस्त्रीन. १ (कों.) तांदूळ किंवा तांदुळाच्या कण्या; यांत पाणी अधिक टेवून त्यांचा पातळसर भात करतात तो; कण्हेरी; पेज. 'श्री महालक्ष्मि देविसि प्रातकाळि आट-वलिच्या उपहारासि दिधलें' –शक १३३५ चा बांदिवडथाचा शिलालेख [का. अट्टु=शिजविणें]

आटवा—पु. (ना.) दगदग; त्रास. [सं. आर्ति; प्रा. अट्ट; म. अट]

आटवाळ—(क) तांदुळाची कण्हेरी. आटवल पहा.

आटविणें—कि. (ना) त्रासविणें; रडकुंडीस आणणें [आटवा]

आटवी—स्त्री. एक मादक वनस्पति; हीस पांढरीं फळें येतात.

आटा—पु १ (यंत्र) स्क्रूचा फेरा-दोरा-कंगोरा; पेंच २ वाटोळे कडे-वेढे (तबला, पींप व जुन्या काळच्या तोडग्याच्या बंदुकीच्या नळीस बळकटी येण्यासाठीं बसविलेले). ३ लहान मुलांचे खेळण्याचें लोखंडी कडें, जें मुलें रस्त्यानें पळवीत नेतात तें. ४ एखादा पदार्थ आवळून बांधण्यासाठीं वापरायाचा दोरीचा वेढा; विळखा; वळसा. (क्रि० भरणें; बसणें). (सामा.) पीळ. ५ (कों. राजा.) छत्री, इरले यांचा सांगाडा. [सं. अट=भ्रमणें, सं. अष्टन= चकाकार शस्त्र]

आटा—पु. (हिं.) गहूं इ. धान्यांचें पीठ 'आमचाच आटा बेद जाला' –भाव १३०.

आटा—पु. (कों.) गाडीच्या दोन धुऱ्या (दांडया) मधील तिसरें लाकूड. [अट]

आटा—पु. (का.) खेळ; नाटक सन १८४१ च्या सुमारास प्रथम कानडी नाटकमंडळ्या सांगली–मिरजेकडे आल्या, तेव्हां हा शब्द मराठींत शिरला. [का.]

आटाआट-टी—स्त्री. १ खटपट; श्रम; दगदग; अटअट; अटाअट; अटाट-टी पहा. २ धुमाकूळ, घोटाळा; नाश; गडबड. 'यादवांचेआं कटकां भीतरी। पारकां आटाआटी केली थोरी।' –शिशु ९८८. –एभा ३.८२४.

आटाघाट, आटापीटा-टी-पिट, आटाळी—अमध्यें पहा.

आटाट-आटाटी—अटाट–अटाटी पहा. 'निवासस्थानाची आटाटी। सर्वथा पोटी न धरावी।' –एभा ७.४०. शिवाय १२. ५९१. 'जर मराठी भाषा होतां होतां इंग्रजीच बनली तर आपल्या लोकांचा तीत ग्रंथ लिहिल्याचा आटाट सर्व केवळ व्यर्थ झालासें होईल!' –नि ६.

आटाट्ट—वि. (माळवी) अतिशय; फार. ' आटाट्ट जेवण झालें. ' [हिं. अटाट्ट]

आटाणू—पु. ढाल, तरवार बाळगणारा शिपाई. [सं. अङ्गन= ढाल]

आटाप—पु. (गो.) व्याप; पसारा. ' ताणे लग्नाचॉ आटाप व्हॅड्लॉ धल्ला. ' [आटोप]

आटापाणी—१ पीठ व पाणी; दररोजची शिधासामग्री. २ जीवितार्चे साधन; अन्नाची वेगमी. [हिं आटा+म. पाणी] **०बंद करणें**–तगादेदारानें कुळाच्या दारांत बसून कुळार्चे जेवणखाण बंद करणें.

आटापिटा-टी, आटापेट—अटापीटा पहा. **०पाडणें**–मेटाकुटीस आणणें. ' खऱ्याखुऱ्या पोटच्या पोराच्या लग्नांत त्या विहिणीचा बया किती आटापिटा पाडील तें एक देव जाणें. ' –फाटक (नाटयछटा) १.

आटाफंड—पु. (धान्याचा, पिठाचा) मुष्टिफंड (मूठभर धान्याची मागणी). ' पंजाबांत आर्यसमाजाचे मिशनरी आटाफंडहि...गोळा करतात. ' –टि ४.५११.

आटारा—पु. (गो.) अटापिटा; श्रम; आटा. अटारा पहा.

आटारोटा—अटारेटा-रोटा पहा.

आटालें-लें—न. (कों.) गुरांना पाणी पिण्याचें एक विशिष्ट आकाराचें लांकडी भांडें. [?]

आटास—अट्टाहास पहा. ' हाक फुटली आटासे '–उषा १४१९ [सं. अट्टाहस]

आटाळ—पु. अडथळा. –शर. अडल पहा. [अट–ड]

आटाळ-ळा-ळी-ळें—पुस्त्रीन. माळा; गच्ची. अटाळा–ळी–ळें पहा. ' मोडिल्या गोपुर आटाळी. ' –सुवन ३.५.

आटिवेठी—स्त्री. १ श्रम; कष्ट. २ (ल.) येरझारा. अटिवेठी पहा. ' तें अभ्र आल्यागेल्यापार्टी । सुर्यासि न पडे आटिवेटी ' –एभा २८.३३७. [आटी द्वि.]

आटी—स्त्री. १ श्रम; यत्न; खटपट. (क्रि० काढणें). ' तयातें इंद्रियबैलांची पेटी । न म्हणे अवसीं पाहार्टी । विषयक्षेत्रीं आटी । काढी भली ' –ज्ञा १३.२९. ' चितिलें पावलीं जया कृष्णभेटी । एरवीं ते आटी वायांवीण । –तुगा ९८. २ मिठी. अढी पहा. ' प्रियो तमाचिया कंठीं । प्रमदा घे आटी । ' –ज्ञा १३.७८५. ३ (गो.) (गोण वगैरे एकावर एक ठेवून केलेली) उभी रांग; अढी. ' पांचव्या आटयेंतलॉ एक तांदलॉचॉ साक (पोतें) ताका दी ' [अढी] **०चें रेशीम**–न. (चोभारी धंदा) जोडयास भरतात तें एक प्रकारचें रेशीम. अटी (रेशमाची लड) पहा.

आटीक—स्त्री.न. एक झाड व त्यार्चे फळ.

आटीचा, आटीबाज, आटीव, आटोका, आटोपणें, आटोपता, आटोपसार, आटोपी—हे शब्द अ मध्यें पहा.

आटीव—वि. पीळदार. अटीव पहा. ' जो आटींव जेठिया ऐसा ' –मुसभा ६.१५३.

आटु-टू—पु. लय, आटणी; नाश. ' तंव शब्दाचा दिवो मावळला । मग तयाहि वरी आटु भविन्नला । ' –ज्ञा ६. ३१४. ' आटु भवीनला यादवा ' –उषा १६८८. [आटणें]

आटु—पु. हट्ट. अट पहा ' आटु वेगु विंदाणु । ' –ज्ञा १३. २७१. [का. अट्टु]

आटु—वि. कष्टपूर्ण; वेदनायुक्त. ' आटु भवंडिला सिहा रिसाचा । एक पाडू या फिलिस्तेवाचा । '–खिपु १ २४.४५. [प्रा. अट्ट; सं. आर्त; म. अट]

आंटुळणें—१ (व.) आंकुचित होणें; आक्रसणें. ' कापड आटुळलें. २ (व.) हटून बसणें; रुसणें ' आटुळतोस तर आटुळ ' [अटणें]

आट्ट—वि. (व.) हट्टी; कुढणारा. आटु पहा.

आट्ट—वि. १ कोरडें. २ दुर्बोध. –शर

आंट्ट—पु. शरीराचा संकोच; आटुळणें. [अटणें]

आटेजणें—क्रि. आटणें; आळणे. अटणें पहा.

आटेविटे; आठेविठे—पु.अव. १ (गो.) आळेपिळे; आळोखे पिळोखे. [का. अट्ट, म. अठी-ढी] २ आढेवेढे. ३ (गो.) उबग.

आटोकाट—अटोकाट पहा. ' आटोकाट मिळाले आटोकाट स्वदृष्टिचा म्हणती । ' –मोअनु ३.८३. त्यार्चे आटोकाट ज्ञान व अपूर्व रचनाचातुर्य हीं लक्षांत येऊन मन अगदीं थक्क होऊन जातें ' –नि ५७६. [सं. आ+कंट]

आटोप—पु. १ सामर्थ्य; आवेश. ' सूर्यउदयपर्यंत कोपें । प्राची जिंतिली आटोपें । ' –मुआदि २१.१२. २ पसारा; व्याप. ' व्यापेंविण आटोप केला । ' –दा १९.८.१५. ' सुखद सृष्टीचा आटोप । वेदांत्या अभ्यारोप ! ॥ '–टिक १६२. ३ ' संघटना; सुयंत्रणा; व्यवस्था. ' गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते । ' –दा ३.९.५१. ४ बंदोबस्त; नियंत्रण; निर्बंधन; संरक्षण. ' गुरें शेतांत येतात तर आपले शेताचा आटोप करा. ' ५ अभिमान; गर्व; ताठा; डौल. ' आपलेनीचि आटोपें । धनित्वाचेनि दर्पे । '–ज्ञा १७.९५. ६ जोर, अतिक्रम; प्रभाव; क्षोभ. ' ज्वराचेनि आटोपे । रोगी भल्लतैसें जल्पे । ' –ज्ञा १६.३६४. ७ आवर; उरक; आवरशक्ति. ' एवढा कारभार झेपावयास त्याचे अंगीं आटोप नाहीं. ' ८ स्वाधीनता; ताबा. ' प्रकृतीचेनि आटोपें । वर्ततु असे ॥ ' –ज्ञा ३.१८४. ९ संधान. –शर. १० अटप पहा. [सं. आटोप=व्याप, पसारा यावरून ताबा; म. अटपणें]

आटोपणें—क्रि. अटपणें पहा. १लहान करणें. 'आटोपी मूर्तिप्रति (स्वतःच्या) मारुति हा कविहि तद्विशाल कथा।' –मोवन ५.७२. २ आवरणें; मागें घेणें; गुंडाळणें; संपविणें; नाहींसें करणें. 'प्रभुवर तें विश्वरूप आटोपी' –मोउद्योग १०.२०. ३ (पुढें गेलेल्यास मागच्यानें) गांठणें. 'आटोपिलाचि गेला होता जरि भीमसेन दूरवर।' –मोएषिक २.३. ४ ताब्यांत घेणें; व्यापणें. 'जै देहीं आटोपे पित्त' –ज्ञा १४.१९६. ५ उरकणें; सांभाळणें. 'आटोपसील संसारु।' –दावि २२. ०**शुद्ध**–वि. नीटनेटका; नेमस्त; आटोपसर.

आटोळा—अटवळा, अटाळा पहा.

आटोळा—पु. (नाविक) वल्हें अडकविण्यासाठीं नावेवर असलेला खुंटा. हा पेरजेस पाडलेल्या भोंकांत बसविलेला असतो. [अट; का. अट्ट]

ऑट्ट—न. (गो.) बाग; बगीचा. [पोर्तु. हॉर्टा]

आट्टखुरी—वि. गाभण (मेंढी वगैरे); आठ खुरी म्हणजे तिचे चार व कोंकराचे चार खूर धरून. [सं. अष्ट+खुर]

आट्यापाट्या—स्त्री. एक महाराष्ट्रीय खेळ. एकानें दुसऱ्यास ठराविक जागेंत–पार्टींत–अडवावयाचें व दुसऱ्यानें त्याला हुलकावणी देऊन निसटून जावयाचें अशी खेळाची ठोकळ रूपरेषा आहे. यांत खेळणाऱ्यांच्या दोन बाजू असून दर बाजूकडे सुमारें आठ गडी असून त्यांत एक सुरकरी व सात पाटी धरणारे गडी असतात. सुराचा उभा पट्टा असून पाटीच्या आडव्या पट्ट्या असतात. [सं. अष्ट+पट्टिका; का. आटा=खेळ; पाट द्वि.]

आठ—वि. १ आठ ही संख्या. २ (ल.) अष्टसिद्धी. 'शिणल्या बहुत चौसष्टी। आठ जणी बहुत कष्टी।' –ह ३.४. [सं. अष्ट; प्रा. अट्ठ–अठ; ग्री. ऑक्टो; झें. अस्तन्; फा. हश्त] **म्ह**० १ आठीं जेवणें, मठीं निद्रा=भिक्षा मागून (आठ जणांकडून) राहणें व कोठें तरी झोंपणें. उडाण टप्पू भटक्या माणसाला लावतात. २ आठ हात लांकूड, नऊ हात ढलपी=अतिशयोक्तीनें सांगणें, बोलणें. ३ आठ परदेशी, नऊ चुली (चौके) किंवा ४ आठ पेटल, नऊ चौधरी किंवा ५ आठशें लष्कर, नऊशें न्हावी=ज्या कामास थोडीं माणसें पुरतील तेथें विनाकारण जास्त माणसें लावणें. ०**आणी**—स्त्री. अर्धा रुपयाचें नाणें; अधेली. [आठ+आणा]

आठऊ—पु. आठव; स्मरण; आठवण. 'देहेबुधिचा आठऊ नाठवावा।' –राम १६९. [आठवणें]

आठका—वि. आठ संख्या किंवा तिनें युक्त; आठांनीं मिळून झालेला; आठांनीं बनलेला किंवा आठजण लागतील किंवा आठ जणांना योग्य असें; उ० आठ हमालांचें ओझें; आठ मणांची खंडी 'सुरती खंडी आठकी.' –पु. (ना.) आठ मणांचें माप (खंडी) [सं. अष्टक]

आठकी—स्त्री. १ आठका पहा. [अष्ट] २ आठबैलांमागें एका बैलाच्या जकातीची जी सूट जकातदार देतो ती. ३ सागरगोट्यांच्या खेळांतील एक प्रकार आठ खडे एका वेळीं गोळा करून वर उडविलेला नववा खडा झेलणें. अटकी पहा

आठकें—न. १ अटकें पहा २ अच्छेराचें माप. [सं. अर्धक]

आठकें—वि. (गो.) आठवें. 'हें वर्स आठकें आसा.' [अष्टक]

आँठखणें-ऑठखणें—क्रि. (गो.) अटकून (भितीस वगैरे) बसणें; टेकून बसणें. 'भितिक ऑठखॉन वसूं नाकां.' ओठंगणें पहा.

आठंगुळ—अठांगूळ पहा.

आठघात—पु. एक वाक्प्रचार. आठव्या महिन्यांत (गर्भाच्या) जन्मलेलें मूल जगत नाहीं या अर्थानें; याच्याच पुढें सातारें म्हातारें=सात महिन्यांचें मूल म्हातारें होतें असें म्हणतात.

आठणी—(गो.) अठणी पहा.

आठतीस—वि. (गो.) अडतीस. [सं. अष्टत्रिंशत; प्रा. अट्ठतीस]

आठनहाण-न्हाण—न. लग्नानंतर आठव्या दिवशीं वधुवरास स्नान घालण्याचा एक सोहळा. या प्रथम महिन्यांत या प्रमाणें चार स्नानें असतात. जसें–आठन्हाण; दसन्हाण; सोळन्हाण; मासन्हाण इ० किंवा आठबंधन; दसबंधन; सोळबंधन; मासबंधन इ० 'वरात आणि आठनहाणें। कनकवस्त्रें नाना भूषणें' –कथा ३. ७.१९२. कोल्हापुराकडे **आठणाण** असें (अप.) रूप आढळतें [सं. अष्ट+स्नान]

आठपाठ—आटपाट पहा.

आठबैली—वि. आठ बैलांनीं ओढली जाणारी (मोट, नांगर इ०)

आठभाव—अष्टभाव पहा. 'आठभावांची परवडी। उभवूनि स्वानंदाची गुढी।' –एरुस्व ५.७९.

आठमुठ्या—वि. अडमुठ्या; अडमूट–ठ पहा.

आठयो—पु. (गो.) तांब्यांचें जुनें नाणें.

आठरणें—अटरणें पहा.

आठरा—अठरा पहा. 'साही त्रिकुट आठरा रांडे तेहि वेडावलीं' –दावि १२३. ०**आणेअबरु**–स्त्री. मोठी कीर्ति. 'विलायतेंत आठरा आणे अबरू आमच्या प्रभूची असे' –होला १८५. ०**नारू-अलुतेदार**–पुअव. तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डोंरी, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणा, वाजंत्री, घडशी, कलावंत, तराळ किंवा कोरवू, भोई इ० –गांगा १४. अलुता–त्या पहा.

आंठल—स्त्री. (कों.) फणसांतील वी; अठळी. [सं. अष्टि प्रा. अट्ठि]

आठव—अठव पहा. (क्रि० करणें; देणें). ' अपराध नसे केला, स्मरण नसे काय? मन न आठव दे ' –मोउद्योग ९.४३. **०देणें**–आठवण करून देणें; स्मरण करविणें. ' उद्धवा तूं जाय मथुरापुरा । आठव देई यादवेंद्रा । ' –ह २१.१९१. **आठवगाठ**—स्त्री. एखाद्या गोष्टीचा विसर न पडावा म्हणून धोतरास गांठ देतात ती. [आठव+गांठ]

आठवगात—स्त्री. (गो.) फराळाची वेळ. (टिफिन टाईम) [आड+वखत]

आठवगिरी, आठवडकरी, आठवडा–ड्या, आठवडे-पाईक, आठवा–वें, आठली, आठांगळें, आठांगुळें–आठी—अ मध्यें पहा.

आठवडा—पु. अठवडा पहा. तेथें दिलेल्या व्युत्पत्ती खेरीज पुढील विवेचन पहा. [१ नेमाडांत सात या संख्येला हाट म्हणतात. सात दिवसांची मजुरी देतात तिला हाटवटी म्हणतात. हाट= बाजार. बाजाराचे दिवशीं मागील सात दिवसांची मजुरी देतात. बहुधां या हाटवटी शब्दावरून हाटवडा=आठवडा असा शब्द निघाला असावा. २ (राजवाडे मत) हा शब्द अशिष्ट लोक अठवडा असा उच्चारतात व तोच उच्चार व्युत्पत्तिदृष्ट्या इष्ट आहे. अष्टावर्त (स्वार्थे क)–अष्टावडअ=अठावडा=आठवडा. आठव्या दिवशीं ज्या काल्मानांत त्या वाराची आवृत्ति अथवा आवर्त होतो तो आठवडा; दुधाचा आठवडा=दुग्धस्य अष्ट दिवसावृत्ति. ' –भाअ १८३२.] **–डी कौल**–पु. (कों.) देवाजवळ आठ दिवस गुण मागण्याबद्दलचा प्रश्न; शकुन.

आठवण—स्त्री. १ स्मरण; सय; याद; आठव; पुन्हां लक्षांत किंवा ध्यानांत आणणें; स्मृति. २ आठवणीकरितां ठेविलेली वस्तु; यादगिरी. [सं. आ+स्थापन; प्रा. आठ्ठापण]

आठवणीचा—वि. ज्याची स्मरणशक्ति चांगली आहे असा. **०धड–आटोकाट–बहादुर–खबरदार**–वि. चांगल्या आठवणीचा; स्मरणशक्ति उत्तम असणारा.

आठवणूक—स्त्री. १ दूर असलेला किंवा मृत झालेला जो आपला इष्टमित्र त्याची आपणास आठवण होण्यास कारण जी वस्त्र इ० वस्तु ती; आठवणीचा पदार्थ. २ त्या योगानें त्याचें जें स्मरण होतें तीं. आठवण पाहा.

आठवणें—उक्रि. आठवण करणें, होणें; स्मरणांत, लक्षांत, ध्यानांत, मनांत येणें. ' बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडि घडी मला गे ! । ' –शारदा २२.

आठवणेस—क्रिवि. आठवणींत; जाणोपरी पहा.

आठवता—वि. आठवण करणारा. ' दास म्हणे ते दैवाचे । आठवत रघुरायाचे । ' –दावि ५०३.

आठवर—वि. १ अठवर पहा. ' ज्यांचा विवाहयोग्यकालांत नुकताच प्रवेश झालेला आहे, त्यांना नव+वर–नोवरा–नवरी असें म्हणतात. विवाहयोग्यकाळ सुरू होऊन अर्धवट गेला तरीहि ज्यांचा विवाह झाला नाहीं त्यांना अर्धवट म्हणजे आडसर किंवा आठवर म्हणतात. '–मसाप १.२.८. २ (कातकरी) कुमारी –मसाप १.१.२.

आठवल—न. (गो.) मेथी, तांदूळ वगैरे घालून केलेली खीर. (बारश्यास नामकरणविधीच्या प्रसंगीं ही करण्याचा प्रघात आहे). ' तांगेर आज पाळण्यांत घालतात, आठवल बी खूब कॅलं. ' आटवल पहा.

आठवळा—आठोळा पहा.

आठवा—पु. १ अठवें पहा. २ (गो.) अर्धीपड (माप); आठवोः पायलीच्या आठव्या भागाएवढें माप. ' ती पायली आनी तॉ आठवॉ मात्सॉ ताका आठवा व्हरून दी. '

आठवा—वि. क्रमानें मोजिलें असतां सातव्यानंतर येणारा.

आठवी—स्त्री. (व.) अष्टमी; विशेषतः आश्विन वद्य अष्टमीस म्हणतात; ' आठवीपासून दिवाळी आठ दिवस राहाते. ' **०मासळी**–स्त्री. (कों.) दुसऱ्या गांवाहून भरून आलेल्या सुक्या माशांच्या होड्यांवर ऐन जिनसी बसविलेली जकात.

आठवेठ—स्त्री. आठ दिवसांतून एक दिवस खोत प्रत्येक कुळाकडून फुकट चाकरी घेतो ती. [आठ+वेठ]

आंठळ–आंठोळ–ळी—अटोळी पहा.

आठांग—अष्टांग पहा. ' आठांगाचा हुडा झुंझते दिसे । ' –भाए ४५८.

आठांगुळें—अठांगळें पहा. ' मग जीवांचेनि मेळें । निकरलेपणाचें आठांगुळें केलें । ' –शिशु ९०.

आठॉळॉ—वि. (गो.) आठव्या महिन्यांत प्रसूत होऊन झालेलें (मूल). ' आठॉळॉ चलॉ चढ करून वांचना म्हणतात. ' **आठोळी बाळंत जावप**–आठव्या महिन्यांत बाळंत होणें.

आठाळें—अटाळी, अटाळी पहा. ' आठाळेया वरी उभे ठाकावें । ' –उषा १११८.

आठिव—वि. (कों.) आठ थर असलेलें (मधमाशांचें पोळें); सात थर असणाऱ्या पोळ्यास सातेरें म्हणतात. [सं. अष्ट]

आठिळा—स्त्री. (कों.) अठळी. अटोळी पहा. ' आठिळांची भाजी गोड लागते. ' [सं. अष्टि]

आंठी—सवें अर्थी अठी पहा. –स्त्री. १ अठळी; कोय. ' सकळ फळें फळल्या पाठीं । आम्रवृक्ष फळे शेवटीं । रसस्वादाचिया खोटी । पोटींची आंठी सांडिलिया ॥ ' –एरुस्व १६.१४७. २ गांठ. ' गळबाच्या आंठींतून पू निघत आहे. ' [सं. अछिल]

आठी—क्रिवि. (खा.) येथें; या ठिकाणीं. अठी पहा. 'मांगो दुला आठी कालदी उनता' =मांगो दुला काल येथें आला होता. [सं. अत्र]

आंठी—स्त्री. मिठी. अठी पहा. 'मग सुखेंसी घे आंठी। गांढेपणें।' –ज्ञा ५.१३२. [का. अप्पु]

आठीवेठी—अठिवेठी पहा.

आंडु—आडु पहा.

आंडुरणें-आठारणें—अटरणें पहा. –क्रि. १ (कों.) ओढून घेतलें जाणें; ताठरणें (अंगाचें कातडें किंवा अवयव) २ बांधणें; आवळणें. ३ (विप्र.) सेकोचणें; आक्रसणें; आंखडणें. [का. अट्टु=आटणें]

आठुवर—अठवर पहा. **०पण**–न. निबरटपणा. 'नुजवेचि कव्हणें बोलें। आंगां आठुवरपण आलें।' –शिशु २०८.

आंठुळणें—क्रि. बांधणें. आंडुरणें २ पहा. 'तो ऊर्ध्वीं आठुळेजे कंदु।' –ज्ञा १५.८८.

आंठुळी—अटोळी पहा. 'आंठुळी ते टाकणें कीं वरील साली काढणें।' –शिवरामकृत गीताचंद्रिका ५९.

आठें, आठोपहार, आठोफळीं, आठ्ठी—अ मध्यें पहा.

आठेविठे—पु. (गो.) अठेवेठे. अंडवेंढ पहा.

आठो—स्त्री. (व.) अष्टमी तिथि. [आठ]

आठो—स्त्री. आठवण; स्मृति. 'म्हणोनि निदकें निंदाचि करावी। तया तोचि जीवीं आठो असे।' –ब ५३६ [आठव]

आठोक—वि. रोखठोक. 'उपहार केला आठोक बोलणें।' –दावि १०१. [ठोक]

आठोडिया—वि. आठवड्याचा. 'पर्वकाळिं धर्म त्या न कवडी केलारे आठोडिया :' –देप ५८.

आठोपार—अथौपहर. अठोपहार पहा. 'ठाईं ठाईं नित लढाई होई आठोपार।' –ऐपो ३४१.

आठोळा—आठाळा पहा.

आठोळा—वि. (गो.) आठवा.

आठोळी—स्त्री. आठव्या महिन्यांत बाळंत होणारी स्त्री. आठाळा पहा.

आंठोळी—स्त्री. कोय; अटली; बी अटोळी पहा. 'असारें साली आठोळी।' –ज्ञा १८ २०४. –एभा १५ २४. **०पांगळी**–स्त्री. (व.) एक खेळ. यांत विशिष्ट आकाराचीं घरें पाडून त्यांत आंब्याची कोय ठेवून ती एका पायानें लंगडत ठेंच मारून बाहेर काढणें; ठिकरी. 'आठोळीपांगळी रोज चाले त्यांत डाव माझ्यावर येई.'

आठौ—आठव; आठवण पहा. 'जे आपणपां आठौ होये.' –ज्ञा १४.३१७.

आठ्ठावन्न, आठ्ठावीस, आठ्ठेचाळीस, आठ्ठ्याण्णव, आठ्ठ्याहत्तर, आठ्ठ्यांशी—अ मध्यें पहा

आड—पु. वाटोळी, पायऱ्या नसलेली व लहान तोंडाची विहीर; कुवा; कूप 'असतां आयु, न हो कां क्षम पळ जलधीस आड वाराया।' –मोभीष्म. ७.४९. 'आडांत पडला मृगेंद्र। कीं सांपळ्यांत कोंडिला व्याघ्र। तैसा साचार गुंतलों मी।' [सं. अवट=खळगा; प्रा. अड=कूप; अअड=आड] **म्ह०** १ आडांत नाहीं तर पोह=यांत कोठून येणार? २ इकडे आड तिकडे विहीर= दोन मोठ्या अडचणींत, संकटांत सांपडणें. ३ आडांत घालून दोर कापणें=विश्वासघात करणें. 'सकळांसी आडामध्यें घालून। दोर कापून गेलासी।' –ह १७.१५१. ४ अर्ध्या आडांत सोडणें=संकटांत टाकून जाणें. ५ आडांतला बेडूक आणि समुद्राच्या गोष्टी सांगतो= अल्प ज्ञान असून मोठाल्या गोष्टी सांगणें.

आड—न. (ना.) घराचें आढें. 'आड बसलं की नाहीं.' [का. अड्ड] –स्त्री. १ (राजा.) दोन डोंगरांच्या मध्यें पाण्याजवळ असलेली वस्तीस योग्य अशी जागा; घळ; दरी; खोरें. [का. अड्ड]. २ विरोध; अडथळा; अटकाव. –स्त्री. ३ हट्ट; हेका, आग्रह. या सर्व अर्थी अड पहा. 'धरिली भाऊनीं आड।' –ऐपो १२६.

आड—अ १ हा शब्द उपपदाप्रमाणें कित्येक शब्दांना जोडून येतो. याची सविस्तर माहिती अडमध्यें दिलेली आहे. या शब्दाचे अर्थ–(अ) एकीकडे; एका बाजूस; दूर; मार्गाच्या बाहेर; रीतीवेगळा; सांधीकोंदींत. उ० आडमार्गी; आडबाजू. (आ) मधून; वरून; उलट; विरुद्ध, मार्गीत (प्रतिबंधरूपानें); उ० आडदंड; या उपपदांतील आणि अड उपपदांतील अर्थभेद 'अड' शब्दामध्यें पहा. २ एखाद्या पदार्थाच्या मागें; पलीकडे; पाठीमागें; पुढें, मागें, न दिसेल असा; एका बाजूला. 'जे नित्य मायापट आड लावी.' –सारुह १.५. 'मेघ आड आला म्हणजे चंद्र दिसणार नाहीं.' ३ (दृष्टिविरोध करण्याकरितां, प्रवेशप्रतिबंधाकरितां, आश्रय देण्याकरितां, संरक्षण करण्याकरितां) मध्यें येणारा; मार्गीत असणारा, मध्यंतरीं; मागें. 'आतां आड उभा राहें नारायणा। दयासिंधुपणा साच करीं।' –तुगा १५६८. ४ एखाद्याच्या छत्राखालीं, आश्रयाखालीं; उ० शेताआड चोरी (आपल्याला स्वतःचें शेत आहे तेव्हां दुसऱ्याचें चोरलें असा आरोप येणार नाहीं). दादल्या आड शिंदळकी; यावरून **आड करणें, आड दडणें**=आश्रय घेणें. ५ द्विरुक्तीनें आलेल्या शब्दांत आड शब्द आल्यास त्याचा अर्थ प्रत्येक दुसरा; एक टाकून एक असा होतो. जसें–सालाआड साल; झाडाआड झाड; एकाआड एक. द्विरुक्ति नसतांहि आड या शब्दाचा असा उपयोग करतात. जसें– तासाआड बैल आणि दिसा आड बायको (मारावी म्हणजे ठीक). ६ (समासांत) विवक्षित कालाव्यतिरिक्त. जसें–आडवार; आडसाल;

आडदिवस=ठराविक दिवसांपेक्षां इतर दिवशीं. समासांत आड याचा अर्थ केव्हां केव्हां अकस्मात् असा होतो. कांहीं वाक्प्रचार- **०पडप**-(गो.) वामकुक्षीकरितां आडवें होणें. [पडणें] **०यॅवप**-(गो.) विरोध करणें; आड येणें. [येणें] **०लावून घेणें**-ओंवळ्या लुगड्यावर सोंवळें नेसतांना बायका मध्यें एखादें वस्त्र लावून घेतात तें किंवा नाहण्याच्या वेळीं लावून घेतात ती पडदणी; पडदा. ' नव्हे सपातळ आड लावणें । ' -ज्ञा ६.११४. **०जाणें**-१ आडरस्त्यास, आडमार्गास लागणें; रस्ता चुकून भलतीकडे जाणें; २ जवळून जाणें. ' जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखंडियाहि आस्था । समूळ होय । ' -ज्ञा ६.१६७. **०पडणें**-१ नमस्कार करणें; विनवणी करणें. -शर. २ अडविणें ' तिये कडोन येतसे वारा । देखोनि धांवे सामोरा । आड पडे म्हणे घरा । बीजे कीजो । ' -ज्ञा १३.३७५. ३ मुरकुंडी वळणें. ' गोपाळ हांसां आड- पडतु । ' -दाव २१७. **०घालणें**-१ मध्यें आणणें; रक्षण करण्या- साठीं कांहीं मध्यंतरी ठेवणें. ' तंव आड घातलें आणीकी वीरी ' -उषा ६१६. २ उडी घालणें. ' कोणी आड घाली काय अथावीं । ' -ज्ञा ८.२४०.

आंड—अंड पहा.

आडआरी—स्त्री. (चांभारी धंदा) कातडयास भोंक पाड- ण्याचें मध्यम हत्यार. अरी पहा. [आड+आरी]

आडई—स्त्री. (कों.) विश्रांतीसाठीं आडवें होणें. (क्रि० घेणें). ' अंमळ आडई घेतली तों किंचित डोळा लागला. ' [का. अडइ; म. आडवा]

आडऊ—पु. चाराचुरा; डबर; गाळ. ' आडऊ निघाला जो अपारु । तो महाभारतप्राकारु । भोंवता केला । ' -ज्ञा १८. ३६. [आड]

आडऊड—क्रिवि. १ एखाद्या वस्तूच्या मागें (लपून, दडून); छत्राखालीं. २ सांधीकोंदींत; आडबाजूस; आसपास. ' रस्त्यांत कांहीं आडऊड खांचखळगा नाहीं ना ? ' [आड द्वि.]

आडक—पु. त्रास; प्रतिबंध. ' अपमानाचिये आडके । देखोनि न फडके भयभीतू । ' -एभा ११.४६४. [अडकणें]

आडकंठ—अडकंठ पहा.

आडकडा—पु १ कडयाचा मध्यभाग; अर्धा कडा; दुर्गम कडा. ' तपोदुर्गाचा आडकडा । ' -ज्ञा ६.४७६. २ (खि.) अडथळा. [आड=अर्धा+कडा]

आडकण—अडकण पहा.

आडकणी, आडकथा, आडकर, आडकळणें, आडका, आडकाम, आडकित्ता—अ मध्यें पहा.

आडकाठी—स्त्री. १ अडथळा; अटक; प्रतिबंध; हरकत; प्रत्यवाय. (क्रि० घालणें). ' परीणामी त्वां लाविली आम्हा आड- काठी । हें सांग काय म्हणउनीया नये सदनाशीं ॥ ' -होला १२३. २ दाब; बंधन; ताबा; वचक. (क्रि० करणें, घेणें).

आडकाष्ठा—पु. १ कासोटा न सोडतां थोडा बाजूस खोंवून लघवीस बसणें. २ अडकाष्ठा पहा. [का. अडइ+सं. कच्छ+पट्टिका; प्रा. कच्छुटिया]

आडकीसुडकी—स्त्री. (शब्दशः अर्थ अर्धें पटकूर लावणारी) एखादी क्षुद्र स्त्री. ' बसलास झाडावर एक आडकी सुडकी । न धरी मायेची द्वाही ॥ ' -होला ५३. [आडकें=अर्धें+सुडकें=वस्त्र]

आडकुचा--पु. (क.) आडोसा.

आडकुडता-चा—पु.हाताचा केलेला आडवा चुळका;कुडता. (पाणी प्रिण्यासाठीं तोंडाजवळ आडवा हात धरतात तो). ' आड- कुडता करून पी; आडकुडत्यानें पी. [का. आड+कुडत=पिणें; म. कुडता=बोटें जुळवून केलेला तळ हाताचा खळगा]

आंडकुली, आंडकूल—अंमध्यें पहा.

आडकुशीचा—वि. (लु.) एका बाजूस असलेला; मुख्य विषयांत नसलेला; मुख्य विषयास सोडून. [आड+कूस]

आडकुशीस, आडकुशीं—क्रिवि. (लु.) सरळमार्गापासून दूर; आजूबाजूस; एकीकडे; अडगळीच्या जागीं.

आडकूट-ड—न. अडोशासाठीं घातलेली भित, पडदा, कुंपण. २ (प्र.) अडखूळ; प्रतिबंध; अडथळा. (क्रि० करणें; लावणें; घालणें; लागणें, पडणें; येणें) [आड+कूड; सं. कुड्य]

आडकूल—अडकूल पहा.

आडकूस—स्त्री. आडबाजू. -वि., -क्रिवि. आडकुशीचा, आडकुशीस पहा.

आडकोठा—क्रिवि. (काव्य) कोपऱ्यांत; एकाबाजूस; एकी- कडे. ' जैसा वृश्चिक अन्याय करूनि । बैसे लपोनि आडकोठा । ' [आड+ सं. कोष्ठ]

आडखप्या-खर्चे-खळ-खळणें-खाणें-खाद-खुळणें-खूळ-खोल-गडा-गल्ली-गांव-गिऱ्हाईक-गिऱ्हाईकी-ग्राहकी-घोडा—अ मध्यें पहा.

आडखिळा—पु. लगोरीची रचना; ज्यावर नेम धरावयाचा असें स्थळ; निशाण; लक्ष्य. ' आपणचि आडखिळा कीजे । तो कौतुकें जैसा विंधोनि पाडिजे । ' -ज्ञा ११.४७८. [आड+सं. कीलक; प्रा. खिल्ल=खिळविणें ?]

आडखिळी—स्त्री. १ दाराचा अडसर, कडी, खिटी. २ (व.) अडथळा; हरकत. [आड+खिळा-ळी-टी]

आडखेडें—न. (गो.) अडचणीच्या वाटेवर असलेलें खेडें. अडगांव पहा.

आंडगडी—अं मध्यें पहा.

आडगत-गात—वि. (गो.) आडगिऱ्हाईकी; आयता, तयार मिळालेला-ली-लें; वापरलेला. (इं.) सेकंडहँड. 'हांवेंही आमीर आडगत घेतल्या.' [आड+सं. गम्-गत]

आडगळ—स्त्री. १ (कों.) अडसर. [आड+गळणें] २ अडगळ पहा. ३ (कु.) वाडी; खेडेंपाडें. **-ळीचा**—वि. गांवढळ; खेडवळ; गव्हार; अप्रसिद्ध.

आडगा—अडगा पहा.

आडगांठ्या—वि. चुरशी, खुनशी; द्वेषी; तेढ उत्पन्न करणारा. [आड+गांठ]

आडगाडी—स्त्री. छकडयाहून मोठी पण गाडीहून लहान अशी गाडी. [अर्ध+गाडी]

आडगात—न. १ शरीराचा घेर. २ पलंग, बाज वगैरेंचें आडवें लांकूड. [आड+गात्र]

आडगात-त्या—वि. वक्र; कुटिल; तऱ्हेवाईक; विलक्षण; शंकेखोर; विरोधी बोलणारा. 'आडगात ना उभगात वांटेनें चालला गीत गात.' [आड=आडवें+गाणें]

आंडगी—स्त्री. (क.) (व्यापार) गठ्ठा. 'काल इरकलहून चार आंडगी लुगडीं आलीं.' 'आंडगींतलीं लुगडीं हिरव्या रंगाचीं होतीं.' [का. अडिगे=अखें, अर्धे बैलाचें ओझें]

आडगुड—स्त्री. (चं.) पडदणी. [आड+गुंडाळणें]

आडगु-गू-ण—पु. १ (कों. गो.) भुतांखेतांचा जोर; भुतानें पछाडणें; कांहीं चिन्हांवरून दिसून येणारें भुतांखेतांचें दुखणें; बाहेरची बाधा. २ कुटुंबांतील मृतांच्या अवकृपेमुळें होणारी बाधा. [आड+गुण]

आडगोखमा—अडगोखमा पहा.

आडघात—स्त्री. अवेळ; अकाळ; वेहंगाम, गैरमोसम, अयोग्य संधि. [आड+घात]

आडचा—वि. छत्राखालीं, आश्रयाखालीं असणारा. [आड]

आडचावट—वि. कंटाळवाणें बडबडणारा; बडबड्या; बोलण्यानें त्रासदायक वाटणारा; वाचाळ. [आड+वाचाट]

आडचोर—वि. सांदीकोंपऱ्यांत पडलेल्या, किरकोळ वस्तू चोरणारा; उचल्या; भुरटा. [आड+चोर]

आडच्च, आडजुना, आडणा, आडणी, आडत, आडत्या, आडदांड, आडदाळ, आड धोतर, आडनळ, आडपंचा, आडपेठ, आडबंक, आडबांक, आडनाड, आडनीट, आडनीड, आडनेड, आडपन्हळ, आडफळें—अ मध्यें पहा.

आडजात—स्त्री. मुख्य जातीखेरीज हलकी जात; तेली, तांबोळी, वगैरे. -वि. खट्याळ; हिरवट; द्वाड; खोडकर; त्रासदायक (मूल). [आड+जात]

आडजाळ—क्रिवि. अकल्पित, भलतें संकट. 'जैसें गगनीं आभाळ। ना तरी तरणीं मृगजळ। तैसें नाथिलें आडजाळ। तुज पडिलें हें।' -विपु ७.४५. [आड+जाल]

आडजीभपडजीभ—स्त्री. (व.) जिभेचा एक भाग; (सामा.) पडजीभ. **म्ह०** आडजिभेनें पाहिलें, पडजिभेनें वास घेतला=खाऊन मन तृप्त झालें नाहीं म्हणजे ही म्हण योजितात.

आडझट—न. लहानसें संकट; अडचण; बारीकसारीक त्रास; उमेद खचविणारी गोष्ट. एखाद्या नीच मनुष्यानें आणिलेलें संकट. [आड+झट]

आडणी—(कु.) अडणी पहा.

आडणीसावकार—पु. किरकोळ, लहान सावकार. 'व्याजाच्या आशेनें लहान रकमा कर्जाऊ देतात. जमीनी गहाण घेतल्या त्या गहाणदारांना किंवा इतरांना वटाईनें, खंडानें लावतात. त्रागा, शिव्याशाप देऊन कर्जे वसूल करण्याचा यत्न करतात. पण कुणबी शेतमाल त्यांच्या हातीं लागूं देत नाहींत. कांहीं दिवस अंदरबट्टा सोसून बहुधां मुद्दल रुपयांचे सहा ते बारा आण्यांवर आपले रोखे वाण्यांना वेचन करतात.' -गांगा १६१. [आडणी किंवा अडाणी+सावकार]

आडणूक—अडणूक पहा. 'परोपरीं सिकविणें। आडणुका सांगत जाणें।' -दा १९.१०.१५.

आडणें—अडणें पहा.

आडताल—पु कोणत्याहि तालाचें दीडपटीचें आवर्तन. अडताल पहा.

आडतास—न. जमीन नांगरतांना नांगरास पुष्कळ बैल असल्यामुळें शेताच्या बांधापर्यंत नांगर जाऊ शकत नाहीं अशी नांगराव-याची राहिलेली जमीन आडवी नांगरतात त्यास म्हणतात. [आड+तास]

आडताळा—अडताळा अर्थ २ पहा. 'परी हा सूक्ष्म आडताळा। वारी विवेकें वेगळा।' -दा ८.१०.६९.

आंडत्रास, आंडदोरी, आंडधरणी—अं मध्यें पहा.

आडथळा—अडथळा पहा.

आडदंड—पु. अडथळा. आडकाठी पहा. 'द्वारपाल आडदंड। घालूं न शकती महाभये।' -पांप्र ३.१५. [आड+दंड]

आडदंडगी—स्त्री. (वे.) (विणकाम) विणलेलें कापड मापांत व ठराविक उंचीवर येण्याकरितां ठेवलेलें आडवें लांकूड. याच्या पुढें आडसरावर कापड गुंडाळलें जातें व विणकरी त्यावर रेलून विणतो. [का. अड्ड=आडवें+दंडगी=काठी]

आडदरा—अडदरा पहा. 'येतां जातां नेणों काळाचा आडदरा।' -निगा ६६.

आडदावा—पु. गुप्त द्वेष; हेवा; खुनस. [आड+दावा]

आडदिवस-दिस—पु. १ ज्या दिवशीं कांहीं नेमधर्म किंवा आचारसंस्कार नाहीं असा रिकामा दिवस. २ एक सोडून एक दिवस; दिवसाआड दिवस; अधला मधला दिवस. ३ बिन हंगामी; अयोग्य दिवस. [आड+दिवस]

आडनर—पु. (नळीस वगैरे) आंतील बाजूस आटे पाडणारें यंत्र. [आड+नर]

आडनळी—अडनळी पहा.

आडनाम—अडनांव पहा. —न. टोपण किंवा औपरोधिक नांव. ' आडनामीं वर्मी बोलावितु । गोपाळ हांसां आड पडतु । तेवींची अमृतां दृष्टीं नीवतु । सवंगडेया तें । ' —दाव २.१७.

आडनांव—न. १ अडनांव पहा. २ समाजांत एकाच नांवाच्या अनेक व्यक्ती सांपडतात. त्या अर्थी व्यक्तीचा निर्देश अधिक निश्चितपणें करतां यावा म्हणून त्याच्या वृत्तीवरून, गांवाच्या अगर देशाच्या नांवावरून जें त्याला विशिष्ट नांव लाविलेलें असतें तें; कुलनाम; उपनांव. ' अस्तमानाचें जयासी । आडनांव नाहीं । ' —ज्ञा ८.९०. २ (ल.) व्यर्थ नांव; खोटें नांव. ' जीभ जै आरोगूं जाये । मग रसना हे होये । आडनांव कीं ॥ ' —अमृ ६.६२. ' तैसें स्त्रीसेंगें जें सुख । आडनांव मात्र देख । ' —मुरंशु २८.

आडनीत—न. १ (गो.) अन्याय्य निवाडा. २ अन्याय्य कृत्य. ' तागली ही आडनीत हें कोणीय सांगत. ' [का. अड्ड=आडवी, वांकडी+सं. नीति]

आडपडदा—पु. १ मध्यें सोडलेला—लावलेला—टांगलेला पडदा (पलीकडचें दिसूं नये म्हणून). २ (ल.) आच्छादन; गुप्तपणा; झांकण. ' येथें आडपडदा तरी आहे कां ? ' ३ मर्यादा; दाब; विनय; लज्जा. ' वडिलां देखत तपकीर ओढणें झालें तर एकीकडे तोंड करून ओढावी, इतका तरी आडपडदा असावा. ' [आड+पडदा]

आडपदर-पद्रा—पु. १ पडदा (डोळ्यावरील, व्रणावरील). २ आडपडदा; गुप्तपणा; झांकण; संकोच; विनय; लज्जा. [आड+पदर]

आडपाग—न. मासे धरण्याचें मोठें जाळें (हें बारा हात व्यासाचें असतें). [आड+पाग]

आडपाट—स्त्री. पडशी(गोणी)च्या दोन्हीं तोंडाच्यामधील भाग—तरट. [आड+सं. पट; म. पाट]

आडफट—स्त्री. १ चीर; भेग (तक्तपोशी, दार वगैरेंतील). २ एकीकडचा कानाकोपरा; एकीकडची जागा; एकांत स्थळ. [आड+फट]

आडफागुर—पु. (गो.) एकाच्या खालीं एक असे डाहळीला मोड येणें, फुटणें; आडवे अंकूर फुटणें. [आड+फागूर=अंकुर, फांदी]

आडफांटा—पु. १ क्षुल्लक अडथळा; आक्षेप; हरकत; तकार; हुज्जत. अडफांटा पहा. २ अवचित अडथळा; विघ्न; संकट. ३ (कों.) भुतांखेतांची बाधा; भुतानीं पछाडणें. **०भरणें**—आडमार्गानें जाणें; बहकणें. ' अहंकार मद्य पिऊनी । भ्रमती मायाघोरविपिनीं । आपली शुद्धि विसरोनि । आडफांटा भरले हो । ' —ह ७.२२८. [आड+फांटा] **०ट्या**—वि. १ आडफांटा, अडचणी, अडथळा घालणारा; तकार करणारा; तक्रारी. २ लहरी; चिडखोर; तिरसट; छांदिष्ट.

आडबंदर, आडबाप्या, आडबायको, आडमाप, आडमूठ, आडमुठा, आडमुठ्या, आडम्हातारा—अ मध्यें पहा.

आडंबर—पुन. (श्रीमंती, विद्वत्ता, पवित्रता इ० कांचा) डौल; दिमाख; पोकळ बडेजाव; रिकामी ऐट. अवडंबर पहा. ' जैसें आडंबर स्वप्न भेदाचें । नाथिलेंचि । ' —विउ ८.४५. (क्रि० घालणें; मांडणें). [सं. आ+डंबर]

आडंबा—पु. (कों.) दारास, खिडकीस लावण्याचा आडसर [का. अड्ड]

आडबाजू—स्त्री. मुख्य मार्गाहून एकीकडचा प्रदेश. [आड+बाजू] —क्रिवि. एका बाजूस; आड बाजूस; कोनाकोपऱ्यांत; नेहमींच्या जागेच्या पलीकडे. **०चा**—वि. एकीकडचा; एकेबाजूचा.

आडबारें—न. (गो.) मंडपाच्या उभ्या मेढीवर जे बांबू अगर पोफळीचे सोट आडवे घालतात त्यांपैकीं प्रत्येक.

आडबिदी—स्त्री. आड गल्ली; आड रस्ता; लहान मार्ग. ' जेथ जैन मार्गाचिआं आडबिदी । '—शिशु ९७. [का. अड्ड+बिदी=गल्ली]

आंडबुली—अंडबुली पहा.

आडबोली—स्त्री. (कों. गो.) १ वांकडें बोलणें. २ संदिग्ध, अस्पष्ट, न समजण्यासारखें बोलणें. [आड+बोली]

आडभंगड—वि. (व.) मूर्ख; अडाणी. अडबंक पहा. ' रामा फार आडभंगड माणूस आहे. '

आडभर-भारी—स्त्री. १ अडचण; संकट. २ अडवेपणा. **आडभरींभरणें**—१ (गर्भांत) आडवें होणें, येणें. २ वांकडे जाणें. ' चित्त बहु निर्बुजलें । तेंगे आडभरीं भरलें । ' —दा ३.१.४०. [आड+भरणें]

आडभित—स्त्री. पडदी; दोन भाग करण्यासाठीं मध्यें घातलेली भित. अडभित पहा. **म्ह०** आडभितीची पडभित, पड भितीचा पोपडा=दूरचें नातें दाखविणें या अर्थी.

आंडमळणी—अंडमळणी पहा.

आडमार्नई-आडमानाय—पु. (राजा.) पोरगा; मुलगा; आडबाप्या. [आड+माणूस ? सं. मान=माप]

आडमार्ग—पु. आडवाट; आड वळणाचा, एका बाजूचा, दूरचा रस्ता. ' परमार्थे पंथ क्रमितां सांग । पाऊल पडलें आडमार्गे । [आड+मार्ग]

आडमिळकत—अडमिळकत पहा.

आडमुद्दा—पु. सबब; तक्रार; अडथळा; भलता विषय. [आड+मुद्दा]

आडमेळा-ळें—पुन. (गो. कों.) अकस्मात उत्पन्न झालेली इचण; आडकाठी; प्रतिबंध; विघ्न; व्यत्यय; अपशकुन. 'तें काम केंक हांव गेल्लों, इतल्यांत मदींच हें आडमेळें आयलें' [आड+मेळणें–मेळ]

आडमोड—स्त्री. मोडतोड; कापाकाप; नाश. 'तळीं रिचतां वोघें । पाताळादि विवरें वेगें । नाशूनियां पन्नगें । अंगभंगें आडमोडी करी।' –एभा ७.५२४. 'कवाडें करोनि आडमोडीं। वेशाला आंत।' –कथा ४.३.१८. (तुल.) अडमड पहा. [आड+आड]

आडमोरा-मोहरा—वि. १ एका बाजूस; समोर नाहीं असा; ता; रस्त्यावर नाहीं असा. 'जाय पाहतां आडमोहरा । संत सपर्ये विती।' मुक्तिराट ७ १०३. [आड+मोरा–मोहरा=मुख] क्रिवि. ख्यें; आड मार्गांत; प्रतिबंध रूपानें. (क्रि० घेणें; असणें; होणें, डणें; घालणें; ठेवणें इ०); **–रीं**–क्रिवि. १ आडून; दडून; आडोनें. २ कोनाकोपऱ्यांत; सांधीकोंदींत, बाजूला; एकीकडे.

आडय—स्त्री. एक पक्षी. [सं. आडि]

आडय, आडव—स्त्री. (कों.) आडवें होणें; कुशीवर निजणें, डणें, टेकणें. (क्रि० घेणें.) [आडवा]

आडरझांव —न. (गो. कु.) अन्यायानें बोलणें. 'तागेलें हें लीं आडरझांव !' [आड+पोर्तु. राझांव=न्यायीपणा]

आडरात—स्त्री. अर्धी रात्र; मध्यरात्रीनंतरची रात्र; भलतीच त्रीची वेळ. [अर्ध+रात्र]

आडरान—न. अरण्य; आडवाट. 'ना तरी सेऊनि घोर आड ान।' –दावि ३९. अडरान पहा. **०घेणें**–वांकडें बोलणें. मुद्दयाला ोडून बोलणें; भलतेंच समजणें. 'ऐसा श्रोतयांचा अनुमान। श्रोतीं ेतलें आडरान।' –दा ९.३.७. या शब्दाचा उपयोग पुढील केयापदांशीं करतात. जसें–आडरानांत भरणें, जाणें, शिरणें, फिरणें, हकणें, गुंतणें, भटकत फिरणें. **–नांत शिरणें**–जाणून बुजून अज्ञान दाखविणें; वेड पांघरणें. 'तर ते त्याचा अर्थवाद करून आडरानांत शिरतील काय ?' –टि ४.४.६३.

आडरानी—वि. गांवढळ; खेडवळ; शहरांतील नव्हे असा (धंदा, रीत, माणूस, पदार्थ, व्यापार).

आडल—पु. आडहत्यारी. आडाऊ पहा. 'स्वारमाणूस आडलाचे.' –थोमारो. १. ३२२. [अडला–ऊ पहा]

आडला—पु. विळी; विळा. अडला पहा.

आडलॉ—अ. (गो.) दांड टाकण्यापूर्वी टाकतों या अर्थी सावधगिरीचा इशारा.

आडलागांजला-पिडला-भिडला—वि. अडचणीत असलेला, आलेला, सांपडलेला. [अडणें+गांजणें]

आडव—न. १ (कु.) वेंग किंवा दोन हातांची कवळी. २ (ल.) एका कवळींत मावणारी भाल्याणाची पेंढी.

आडव—न. १ अरण्य; रान; जंगल. 'जी जीवित्वाच्या आडवीं.' –ज्ञा १६.३४. –एभा १३.१३४. २ अडवर्णीचें ठिकाण. 'ते चोरांसी आडव होये।' –ज्ञा १८.७२४. [सं. अटवी]

आडवंकी-गी—अडवंकी-गी पहा. 'संकल्पाचीही आडवंगी। न करणें जें ॥' –ज्ञा १६.२०३.

आडवट—अडवट पहा.

आडवण, आडवाण—न. १ (कों.) डोंगराचा मध्यभाग; शिखर आणि पायथा यांमधील भाग [सं. अधिवत्] २ डोंगरावरील उताराची जागा; उतरण; उतरणीवरील जंगल. ३ अडवण पहा.

आडवत—न. (कों.) काकडीचा कीस तांदुळाच्या पिठांत शिजवून केलेलें एक पक्वान्न.

आडवर्ण—पु. आडजात [सं. अर्ध+वर्ण] **–चा**–वि १ आड जातीचा; संकरजातीचा (मनुष्य). २ भुतासेताऱ्या बाधेपासून झालेला (रोग, व्यथा). [आड+व्रण]

आडवल—स्त्री. (गो.) हिंदी पोषाखांतील (मजूर वर्गातील) किरिस्तांव. –स्त्री.न. वधूला लग्नाच्या वेळीं हळदीचा रंग दिलेलीं वस्त्रें नेसविल्यानंतर त्यावर त्याच रंगाचें एक वस्त्र गुंडाळून हातांत धरावयास लावतात तें. [आड+सं. वलन=वेष्टन]

आडवली—स्त्री. (गो.) विळी. अडला–ऊ पहा.

आडवस्ती—स्त्री. १ एकाबाजूस, आड वळणास, किंवा खोलगट जागेंत वसलेलें गांव. २ वरील प्रकारच्या जागीं केलेली वस्ती, वसाहत, रहिवास. [आड+वसति]

आडवस्त्र—न. मुख्य वस्त्राशिवाय मध्यें पुरुष पंचा किंवा स्त्रिया पडदणी वगैरे नेसतात तें; सोंवळें नेसतांना मध्यें दुसरें वस्त्र नेसतात तें. [सं. अर्ध+वस्त्र; अंतः+वस्त्र]

आडवळण—अडवळण पहा.

आडवा-आडवातिडवा, आडवेंउभें, आडसणें, आडसांगड-डी, आडहतेर-री-हत्यार-री—अ मध्यें पहा.

आडवांग—न. एक बाजू. 'आपुलिया उसीसा कां आडवांगीं ठेउनि आपण पाइत्याकडे खालिं नीजति।' –सूप्रपाठ (महानुभाव) [आडवें+अंग]

आडवाट—स्त्री. १ एका बाजूचा, आड वळणाचा रस्ता; आडमार्ग. २ मोठया रस्त्याच्या बाजूची वाट; रस्त्या वीकड. [का. अड्ड+म. वाट; सं. अंतर्वाट (राजवाडे)] **–ट्या**–वि. रूढ मार्गानें जाणारा; सरळ न वागणारा; एककल्ली; करनकऱ्या.

आडवादंड—पु. (व्यायाम) दोन खांब जमीनींत पुरून त्यांच्या शेवटास दोन भोंकें पाडून त्यांत आडवी गुळगुळीत पहार बसविलेली असते. ही पहार अधिक खालीं घेणें झाल्यास दोन्ही खांबांस समोरासमोर आणखी भोंकें असतात. या पहारेस दोन्ही हातांनीं धरून किंवा पाय अडकवून वेगवेगळ्या प्रकारच्या उडया घेतात. या उडयांचे अनेक प्रकार आहेत. (इं.) हॉरिझॉंटल किंवा सिंगल बार.

आडवार—पु. १ कोणत्याहि विशिष्ट दिवसाशिवाय किंवा नेमलेल्या दिवसाशिवाय इतर दिवस; अधलामधला दिवस. २ भलता, अयोग्य दिवस. [आड+वार]

आडवारणें, आडवरणें—अक्रि. (प्रां.) रेलणें; (निजण्यासाठीं) आडवें होणें. [आडवा+आरणें=लोळणें; अहारणें]

आडवारा—पु. अडथळा; प्रतिबंध. ' करितसे आडवारा । विश्वाभासु जो ' –ज्ञा १५.४६. –एभा ११.११७१. ' जैसें सिंहाचिया आहारा । जंबुक करिती आडवारा । ' –कथा ४.११.१२८. [आड+वारणें]

आडवाव—पु. आड रस्ता; अडथळा; मधला रस्ता. ' न फेडितां आडवावो । ' –अमृ ७.२६५. [आड+वाव=वाट]

आडवी—स्त्री. अडवी पहा. **०काडी**—स्त्री. अडथळा; प्रतिबंध. ' कामप्राप्तिसी आडवी काडी । होतां क्रोधाची पडे उडी । ' –एभा २३.२५२.

आडवीण—अडवण पहा.

आडवें—अडवें पहा.

आडवें—न. अरण्य. ' अविद्येचें आडवें । भुंजीत जीवपणाचें भवें । ' –अमृ २.२. [सं. अटवी]

आडवें—अडवा–वें पहा.

आडवेळ—अडवेळ पहा.

आडवोल—न. (गो.) ओलें वस्त्र. [आड+ओलें (वस्त्र)]

आडसणें—अडसणें पहा.

आडसंधि-सांध—अडसंधि पहा.

आडसर—पु. १ दार किंवा खिडकी बंद करण्याकरितां लांकडी किंवा लोखंडी दांडी, गज, खीळ, अडणा, अडू; लांकडी अडसर. हा कोठें कोठें दाराच्या पाठीमागच्या भिंतीत भोंक ठेवून त्यांत बसविलेला असतो व दार बंद करतांना तो दोन फळ्यांच्या आड लावतात. [आड=आडवें+सरणें]

आडसर—नपु. (कों.) ज्यांत पाणी अधिक असून खोबरें थोडें झालें आहे असा कोंवळा नारळ; शहाळें. [सं. अर्ध+सदृश] २ डोंगराभोंवतीं असणारी वाट; ज्याचा खालचा भोंवतालचा भाग तुटल्यासारखा दिसतो असा डोंगराचा भाग; डोंगराच्या माथ्यावरची धार; डोंगराची बगल. ' आडसरामाजीं राहिले । '–दाधि २५०. ३ गांवच्या शिवेचा दगड. ४ (विणकाम) उभा ताणा सारखा पसरलेला रहावा म्हणून वहीच्यापुढें ताण्याच्याखालीं आडवी काठी लावतात ती. ५ दांडगट, धटिंगण, आगडबंब मनुष्य. [आड+सं. सृ=सरणें] - क्रिवि. घट्ट; आवळ; ताठ. **आडसरासारखा पडणें-निजणें-पसरणें**–अव्यवस्थितपणानें रस्त्यांत वगैरे पडणें, निजणें, लोळणें.

आडसाटी—स्त्री. (गो.) पूर्ण नव्हे व अपूर्ण नव्हे अशी मधली स्थिति. [अर्ध=आड+सं. स्थिति]

आडसाटो—वि. १ (गो.) मध्यम स्थितींतील; पूर्ण किंवा अपूर्ण नाहीं असा; अर्धवट.

आडसाटो—पु. (गो.) आडसट्टा. आडसट्टा पहा.

आडसाठा—पु तात्पुरती एका बाजूस करून ठेवलेली, नेहमीं न लागणाऱ्या वस्तूंची रास, संग्रह. प्रायः सप्तमी विभक्तींत प्रयोग. जसें–आडसाठयांत. यावरून भलत्या ठिकाणीं ठेवलेलें, टाकलेलें. [आड+साठा]

आडसार—पु. (हेट) पूर्ण न झालेला नारळ. आडसर पहा. ' आडसार खाउक गोड लागता. ' [सं. अर्ध+सदृश]

आडसाल—न. १ एक वर्ष टाकून एक वर्ष; वर्षाआड वर्ष. २ (शेती) विवडाचें साल. जसें–ज्या जमिनींत एक वर्षी जोंधळ्याचें पीक केलें तींत पुढील वर्षी बाजरी इ० दुसरीं पिकें करणें. **–ल्या ऊंस**–पु. अठरा महिन्यांनी होणारा म्हणजे एक वर्षाआड येणारा ऊंस.

आडसींग, आडांख, आडांखताळा, आडांखा, आडाणचोट - पट्टी - वस्ती – आडाणा–णी - आडाणीजात–आडाणी कबाडी, आडात, आडातुडी, आडाथ, आडाव, आडावा, आडून—अ मध्यें पहा.

आडळ—न. (कों.) गोरवी कटगी या नांवाचें झाड.

आडळ—आढळ. आडळू पहा.

आडळ—पु. स्पर्श. ' कामक्रोधादि त्यां नाहीं आडळ. '–रंयो १.५२५.

आडळ—पु. १ विकल्प. ' कवणे विखीं आडळु । ने घे चित्त । ' –ज्ञा १३.३५८. २ अडथळा; प्रतिबंध. ' मग घरींचाचि ठेवा । जेवीं डोळ्यां दावी दिवा । तरी घेतां काय पांडवा । आडळु असे । ' –ज्ञा १८.८९२. ३ यत्किंचित्. ' जळीं जळावेगळ । कापूर न दिसे आडळ । ' –अमृ ३.२७. अडळ पहा.

आडळणें–क्रि. अडखळणें. अडळणें पहा. ' तरी उजूचि कां आडळिजे । जयापरी । ' –ज्ञा १.२४७.

आडळणें—क्रि. आढळणें; प्राप्त होणें. ' ए–हवीं हा योगियां नाडळे ' –ज्ञा ४.१३.

आडळी—स्त्री. एक पक्षी. अडल पहा. [सं. आडि]

आडळीभ्रमणी—स्त्री. (व.) अंधुक पूर्व कल्पना; संभव. 'आडळीभ्रमणी नसतां तो वारला.' [अटकळ+भ्रम]

आडळू—पु. आढळ. 'जेणेसीं होतां आडळू। पुरे जिणें।' –गीता १.४३४.

आडा—पु. १ (कों.) शेतास केलेलें कांटेरी झाडाझुडपांचें किंवा निवडुंगाचें कुंपण. [का. अड्ड] २ (गो.) घराभोंवतालचें दगडी कुंपण. 'तांणें पोर्साभोंवतीं आडॉ केलॉ.' (सामा.) कांपाउंड; आडोसा. ३ (कु.) दरवाजा बंद करावयाचा आडसर. ४ (हेट.) गलबताच्या व कलमीच्या आधारासाठीं एकाखालीं एक असलेलीं दोन मोठीं लाकडें. ५ (हेट.) घराचें आढें. [का. अड्ड] ६ रेषा; रेघ. 'भालप्रदेशीं चंदनाचा आडा लेखिती।' –पूजावसर (महानुभाव.) [का. अड्ड]

आडा—पु. एका जातीचा पक्षी, बगळा. [सं. आडि]

आडाआडी—स्त्री. धडपड; खटपट; श्रम; आटाआट. 'करूनि आवडीच्या कावडी। या रामेश्वरीं येती भाविक कापडी। क्षणिक आयुष्य जाणुनि तांतडी। आडाआडी पावले।' –ह १५.१४०. 'एवढी जिवाची आडाआडी करून तुम्ही साधणार काय?' अट-अट पहा.

आडाऊ—पु. बंदूक, तरवार या शिवाय हलकें हत्यार वापरणारा–पायदळ शिपाई; आडहत्यारी. 'आडाऊ पार्यींचे चालत।' –मुआदि १९.१०. अढाऊ पहा.

आडांख-खा, आडाखा—अ मध्यें पहा.

आडांगपण, आडांगाय—न. (गो.) वात्रटपणा; खोडी; मस्ती; आडदांडपणा. 'ता गेलीं आडांगपणा चढल्यांत.' [आड+अंगी]

आडांगी—वि. (गो.) वात्रट; आडदांड; दांडगा; भांडखोर; मस्त. 'भारी आडांगी जाला तॉ चलॉ!' [आडवें+अंग]

आडाचौताल—पु. (संगीत) एका तालाचें नांव; यांत मात्रा चौदा व विभाग सात असतात. [आडा+चौताल]

आडाडी-आडाणचोंट, आडाणा-णी, आडाणीजात, आडात-थ, आडांबरी—अ मध्यें पहा.

आडांत्री—क्रिवि. (कु.) नाजूक स्थानीं किंवा मर्मस्थानीं. (क्रि० लागणें; पडणें; मारणें.) [आड+आंतर्]

आडांवॉ-वों—पु. (गो.) कडी, आडसर. 'दाराक आडामॉ (आडांवॉ) घाल.'

आडामोडा—पु. उंसाच्या रसानें भरलेलीं (चरकाजवळील) भांडीं चुलाणाकडे नेणारा. –कृषि ४७३.

आडाव—पु. १ आड हत्यारी. अढाऊ-व पहा. 'मावळे आडाव इडेकरी, पट्टाईत...यांची संजगणी करून हशम मेळविले.' –मराआ ६. २ धाडसी, शूर शिपाई.

आडाव—न. (कर्ना.) (कडव्याच्या?) पांच पेंढ्या. अडव पहा.

आडांव—न. (कों.) चालू कामापुरती खणलेली, न बांधलेली विहीर. [आड+सं. वापी; म. बाव]

आडाव-वु—वि. (क.) आडगिऱ्हाइकी; जुनाट (वस्तू). 'आडाव वस्तु घेतली म्हणजे स्वस्त मिळते.' [आड]

आडावण—अडवण पहा.

आडावणी—स्त्री. (नाविक) अडवणी पहा. अडवण पहा.

आडावणें—क्रि. (कु.) बंदरांत आगबोट दूर उभी असतां उतारू उतरून घेण्यासाठीं आगबोटीस पडाव लागणें. [अडविणें प्रयोजक]

आडावतपाग—न. (कों. राजा) बारीक मासे पकडण्याचें 'रोंगो' नांवाच्या जाळ्याहून लहान जाळें. आडपाग पहा. [अर्धवत्=अर्धवट+पाग=जाळें]

आडास—पु. (गो.) आडोसा; आच्छादन; छाया; अंधार. [आडोसा]

आडास—स्त्री. (शेती) जमीन एकदा उभी नांगरल्यावर तीच पुन्हां आडवी नांगरणें. पहिल्या नांगरणीस तास म्हणतात. [आड+तास]

आडासन—न. कंबर. 'आडासनी दोनी दोनी ष(ख)गें।' –उषा ८२४. [सं. अर्धासन]

आडाळणी—स्त्री. (कु.) पेरणीच्या दुसऱ्या दिवशींची नांगरणी.

आडाला-ळो—पु (कु) विळी. अडला पहा.

आडाळी—स्त्री. (कु.) मातीच्या भितीचें कुंपण.

आडि—स्त्री. (गो.) एक लहान मासा; खर्वा बांगडा. [सं. आटि–डि]

ऑडिट—न. हिशेबाची अखेर तपासणी (सरकारी किंवा नियोजित हिशेबतपासनीसाकडून) [इं.]

ऑडिटर—पु. हिशेबतपासणी करणारा; अधिकृत हिशेबतपासनीस. [इं.]

आडिबा—पु. (कों.) अडसर; अडवट; अडणा. [अड्ड]

आडी—स्त्री. एक पक्षी; बगळी. [सं. आडि]

आडी—अढी पहा. –स्त्री. १ (कों.) रहाट–गाडग्याच्या चाकाला परिघाच्या बाजूनें अक्षार्शी समांतर अर्शी रुंद्यावर मारलेलीं लांकडें, एका राहाटास अशा बारा आडद्या असतात. [का. अड्ड] २ धार काढतांना गाईनें लाथ मारूं नये म्हणून तिच्या सभोंवार बांधावयाच्या काठ्या. ३ (मल्लशास्त्र) कुस्तींत प्रतिपक्ष्यास पायांत घालावयाची आढी. ४ (सामा.) आढी (आंब्याची, गवताची, कपाळ, पाय इ. ची). अढी पहा. ५ (कों. गो.) जनावराचा पाय मोडला असतां तो नीट करण्यास दोन बाजूंस लांकडें

बांधतात ती. ६ (गो.) घराच्या भोंवतालचें दगडी कुंपण, गडगा. ७ (कर्ना.) नदी उतरून जाण्याचा लांकडी पूल. ८ आडकाठी; अडथळा; प्रतिबंध. ' जन्मसहस्रांचिया आडी । ' –ज्ञा ६.४६५. ' मार्गी कांहीं पडली आडी । दूत तांतडी पाठविले । ' –एरुस्व १४.६७. ९ शंका. १० (कासारी धंदा) भांडीं घडविण्याच्या उपयोगी असलेलें दगडी, चपटें आरपार भोंक असलेलें उखळ. ११ (नाविक) गलबताच्या झाडीच्या वरील लांकडी तक्त; उतारूंना बसावयासाठीं केलेली जागा; होडीवरील बसण्याकरितां असलेली फळी. १२ (गो.) काना. १३ (गो.) अडसर

आडी—स्त्री. (संगीत) गानप्रकार, आदिपरंपरा. (गाणें.) ' आडी गातांतीं देवांगणां. ' –दाव १६५ [सं. आदि ? का. आडु= गाणें]

आडी—स्त्री. (कु.) भोंपळ्याची कापलेली फाक; तुकडा.

आंडी—स्त्री. (प्र.) अंडेर. (खा.) मुलगी. [सं. अंड, अंडीर =पूर्ण वाढीचा माणूस]

आडील—वि. आडचा; आश्रयाखालील; छत्राखालील; आच्छादनाखालील; आडोशाचा. [आड. का. अड्ड+ल प्रत्यय]

आंडील, आंडुकली—अं मध्यें पहा.

आडीसरी–श्री, आडुक, आडुमाडु, आडुळसा, आडून—अ मध्यें पहा.

आडू—१ स्त्री. (कों.) घाटांतील सडकेच्या (डोंगराच्या बाजूशिवाय दुसऱ्या) बाजूस असलेली दगडी अर्धी भिंत, बांध. २ (पाथवेट काम) दगड फोडण्याचें पोलादी हत्यार; मोठा हातोडा. अडू पहा. [का. अड्ड]

आडुक—वि. (गो. कर्ना.) कडवट. ' हॉ रोस आडुक जाला. ' [का.]

आंडुगांडू—वि. षंढ; बुळा; कुचकामाचा; मुर्दाड (माणूस). ' चार आंडुगांडू मिळाले म्हणून न्याय होतो काय ? ' [गांडू द्वि.]

आडे—क्रिवि. (खा.) बाजूस; पलीकडे; आड. ' नग आडें जाले झाडी बहुत । ' –दावि ७७८.

आडें—वि. (कों.) आडवें; कलतें. (क्रि० घेणें). [का. अड्ड]

आडें—न. १ (कों.) आढें (घराचें). अढें पहा. २ उंवरा; उंबरठा. ' ग्रामद्वारींचें आडें । नोलांडी कोण । ' –ज्ञा १३.६९९. ३ दोन माणसांनीं कापण्याची करवत; आढया करवत. ४ (नाविक) नावेचा कणा; एक जाडें लांकूड; हें नावेस बोडतांच्या दुरमीणावर बसवितात. यानें आंतल्या बाजूस मजबुती व काठीस टेकावा मिळतो. ५ उंसाच्या चरकाचा आडवा दांडा (ज्यास बैल जोडतात तो). ६ (कर्ना.) घरावरील छप्पर; माळ्यावरचा भाग. [सं. अट्ट= माडी. का. अड्ड] ७ तागडी; ताजव्याची दांडी. –शर [का. अड–इ] ०करी–वि. तागडी वाला.

आंडें—अंडें पहा.

आडेकरी—वि. १ आड, आडवा येणारा. २ (ल.) वाटमाऱ्या. [आड+सं. कृ–कर]

आडेचाँ–क्रिवि. (कु.) वरकरणी; ढोंगीपणानें. –वि. (गो.) तात्पुरता; वेळेपुरता.

आडेचें—वि. (गो.) चालू; हलींचा. [सं. अथ]

आडेपाडें—न. शेतांतील दरएक खळ्यांतून कांहीं धान्य घेण्याचा पाटलाचा हक्क. अर्देपारडें पहा. [सं. अर्ध+(पाड=माप, किंमत.) म. परडें]

आंडेर—अंडेर पहा.

आंडेल—पु (गो.) ताडाएवढा वाढलेला पण ठोंब्या असा मनुष्य. [अंडिल; सं. अंडीर=पूर्ण वाढलेला माणूस]

आडो—न. (गो.) शेत, बाग, घर इ०चें दगडी कुंपण; तट; गडगा; आडा पाहा.

आंडोर—अंडोर पहा.

आडोरा—पु. व्यभिचार; बलात्कार. ' फिरला पापकर्मे डांगोरा । विध्वंसिला यज्ञ सारा । मांडिला स्त्रियांसि आडोरा । प्रगटपणें । ' कथा. ६.५.४३. . [दे. आडोलिया=रुद्ध; रोखलेलें. दे. अडाड= बलात्कार.]

आडोशीपाडोशी, आडोसा—अ मध्यें पहा.

आडौणें—(गो.) अडविणें. पहा.

आडौनि—क्रिवि. बाजूस; आडवें. ' आगाअे वीर हो आडौनि सरा । उजू हातिअेरूं धरा । ' –शिशु ५६४. –शअ. आडून. ' पूर्ण चंद्राडौनि आभछु काढिलें. । ' –शिशु ७२० अडून पहा.

आड्डा—पु. (दारू काम) चंद्रज्योती लावण्याकरितां एका कळकाला लोखंडी फूल (अटा) लावतात तो. [अट, अड्ड]

आडयाळ—न. (माण.) नांगराचें रुमणें. अडयाळ पहा.

आढई—स्त्री. (कु.) वगळी. [सं आडि]

आढक—वि. ओढून धरणारा; आव्हयतेचा. [प्रा. अडिव्य. म. ओढणें.]

आढक—पु. आठ पौंड, चार शेर किंवा पायलीचें माप. बंगालमध्यें दोन मणांचें माप. [सं. आढक=एकचतुर्थांश द्रोण=१६ कुडव=७ पौंड, ११ औंस]

आढकस—वि. १ मजबूत; घट्ट. अटस पहा. २ (ल.) धाडसी. [अटस]

आढगळा—पु. मांग लोकांचा सरपंच –गांगा. ३०.

आढणी—स्त्री. तिवई. अडणी पहा. ' रत्नजडित दीप ठेविले जवळी । जडित आढण्या त्या तळीं । ' –ह २४.११९.

आढन—पु (व.) गाय, म्हैस इ०ची कांस. अडण पहा.

आढमूढ—वि. विस्तृत; अफाट; बेफाम. अडमूठ पहा. ' आरामवाटिकेंत आढमृढ वाढून, आकाशास हात घालणाऱ्या वृक्षाची योजना ' –टि १.१५२. [सं. अर्ध+मूढ. का. अडमुट्ट]

आढवारा—पु. छळ. –शर. –शुभानंद उद्योगपर्व. १२.२८. आडवारा पहा.

आढळ, आढा, आढाऊ, आढाल—अ मध्यें पहा.

आढळणें—अढळणें पहा.

आढळून जाणें—भेटून जाणें. 'तिलाहि तो आढळून जात असे.' –खरा देशभक्त २५९.

आढाल—न. शस्त्र; अडला. 'उगाउगीच भांडतो । उगाउगीच तंडतो । उगाउगीच ढालघे । उगाउगी आढाल घे. ।' –दावि ७७६. [सं. अड्=हट्टा करणें] **०ढालाची**–वि. ढालगज; धीट. 'आढालढालाची पै थोर । अभावभावें अति सुंदर । दाटोनि रिघों पाहे घर । वशीकरण मज करील ।' –एरुस्व ५.४५.

आढाव, आढांव—आडाऊ, आडाव पहा.

आढावा—अडावा पहा.

आढाळ—न. डोंबारी खेळ करतांना दोरीवरून चालतांना तोल सांभाळण्यासाठीं हातांत घेतात तो वेळू. 'ब्रह्मगोळकाचे आढाळ करी ।' –भाए ६०५. [का. अड्ड; आड+ल]

आढी, आढें, आढेकड, आढेवेढे—अ मध्यें पहा.

आढी—स्त्री. फळें गवतामध्यें थरावर थर रचून पिकविण्याची योजना. अढी पहा. 'यासी शुकमुख लागलें । आवडीचे आढिये मुराले । संतजन सेवितां धाले । आनंदले परिपूर्ण ॥ ' –ह १९.२२५ [का. अडकु=डाग करणें.]

आढें—न. घराच्या किंवा छपराच्या दोन पाण्यामधील लांब लाकूड. 'गृहा पांच वांस अर्से येक आढें ।' –कचेमुच २ –एभा ८ २३३ **०खांब**–(कों.) खांवणी; आढें व तुळई यांस जोडून असलेला खांब. (इं.) किंग पोस्ट. **०आढ्याचें ताक**–न. (क.) आढें ज्यांत दिसेल इतकें पातळ ताक. 'आढयाचें ताक व पोहे तो नेहमीं खातो.' [आढें+ताक]

आढ्य—पु धनिक; श्रीमान; संपन्न; युक्त सामाशब्द धनाढ्य; बलाढ्य; गुणाढ्य, गर्वाढ्य. 'आढ्य कुलीनजनाचें दावी औदार्य जें वितरणीं तें ' –मोभीष्म ५.४५. [सं.]

आढ्यता—स्त्री. १ गर्व; ताठा; विजिगीषुवृत्ति; प्रतिष्ठितपणा डौल. 'तुला निरोप पाठविला म्हणजे तूं यावें; तुम्हीं आला तरच येईन इतकी आढ्यता कशास पाहिजे. ।' २ श्रीमंती. 'आढ्यु आतुडे आडवीं । मग आढ्यता जेवीं हारवी ।' –ज्ञा १३.२०५. (क्रि० धरणें; बाळगणें, मिरवणें.) [आढ्य+ता] २ ख्याति; प्रसिद्धि (निदान्यंजक) [सं.]

आढ्याकरवत—पु. अढ्या करवत पहा. दोन माणसांनीं चालवावयाचा करवत.

आढ्याचाखोबळा—पु. उंसाच्या चरकाच्या लाटां(खुंटां) पैकीं मधल्या लाटेच्या (नराच्या) डोक्यावर बसविलेली इंग्रजी U च्या आकाराची लोखंडी पट्टी. हींत चरक फिरविण्याचें जोखड बसवितात [आढें+खोबळा]

आढ्यामारणें—क्रि. १ (व.) धडपड करणें. 'पहिल्यानें स्वस्थ बसले आणि आतां आढ्या मारतात.' २ (ना.) हेलपाटे घालणें.

आण—स्त्री. १ शपथ. 'श्री विठ्ठलाची आण' –शक ११९५ चा चौऱ्यांशींचा शिलालेख. (क्रि० घालणें; वाहणें; घेणें.). माझ्या गळ्याची आण; देवाची आण वगैरे प्रयोग आहेत. 'कां भीमकाची आण । हे चंद्रकिरण ।' –शिशु ८२२. 'धाडी बळें वृकाच्या घालुनि हरिणीस आण गेहाला ।' –मोविराट १.५३ [सं. आज्ञा; प्रा. आणा; सि. गु का. आण; ते आन]

आण—स्त्री. (कों.) मिठाची रास (माप), कांहीं बंदरांत तीन खंडीची तर कांहीं बंदरांत अडीच खंडीची रास असते.

आण—उअ. १ आणिक; आणि; व. [सं. अन्य]–वि. अन्य; दुसरें; निराळें. 'आण करूं नये बापा ।' –उषा १०९८ 'तुजसम वीर नाही आण ।' –मुशांति ३०.१५६. [सं अन्य; प्रा. अण्ण]

आंण—न. (गो.) अंड; वृषण.

आणआणूं—क्रिवि. एकमेक; परस्पर. 'मग बोलतीं निपनवसां आणआणूं ।' –शिशु ८१. [सं. अन्योन्य]

आणको—पु. (गो.) टोमणा; वाक्प्रहार. (अव. आणके.) [आण]

आणक्रिया—स्त्री. शपथक्रिया; प्रतिज्ञा; आणभाक. [म. आण+सं. क्रिया]

आणखी, आणखीन—अणखी पहा.

आणणावळ, आणवाई—स्त्री. सामान वगैरे वाहून आणण्याची मजुरी. [आणणें]

आणणें—उक्रि. १ घेऊन येणें. जावून आणणें. २ बहुतेक; जवळजवळ या अर्थी. आणणें हें सहाय्य क्रियापद ईत प्रत्ययांत कोणत्याहि क्रियापदास जोडलें असतां त्या क्रियापदानें दर्शविलेली क्रिया बहुतेक पूर्ण झाली आहे असा अर्थ होतो. 'किल्ला बांधीत आणला होता; शत्रूची फळी फोडीत आणली होती.' [सं आ+नी; प्रा. आणि सि. आणणु; फ्रें. जिप्सी. अन]

आण ने—स्त्री. १ (एखादी वस्तु) वारंवार इकडून तिकडे नेणें आणि आणणें. २ (ल.) उपद्व्याप; दगदग; कुतरओढ. तारंबळ [आणणें+नेणें]

आणप्रमाण—स्त्री. शपथ; शपथक्रिया; आणभाक. [आण+प्रमाण]

आणभाक-प—स्त्री. १ शपथेनें दृढ केलेला करार किंवा वचन 'लटकें जाहलिया आणभाकेसि'–एभा १२.२५६. [आण+सं. भाषा म.भाक] २ लग्नांत कंकणबंधनाच्या वेळीं घ्यावयाची शपथ. या करारामुळें दोन्ही पक्ष ठरावाप्रमाणें वागण्यास बांधले जातात.

आणशपथ—स्त्री. वचन; शपथ. [आण+शपथ]

आणा—पु. १ रुपयाचा सोळावा भाग, हिस्सा. १ जमीन मोजणींत ७.५६२५ चौरस यार्ड म्हणजे एक गुंठ्याचा $\frac{1}{160}$ किंवा एकराचा $\frac{1}{640}$ भाग; गुंठ्याची साखळी १६ कडयांची किंवा आण्यांची असते; २$\frac{1}{2}$ फूट लांब रेषेचें माप, प्रमाण. ३ कोणत्याहि वस्तूचा $\frac{1}{16}$ भाग. [अणू–आणक=लहान; हलकें. सं. अंकनक; किंवा (कार्ष–आपणक – आअणअ – आणा (राजवाडे) तुल० आपण=बाजार आपणक)] **आणे पैचा हिशेब**–पु. तंतोतंत हिशेब. **आणेवारी**–स्त्री. पाटील कुळकर्णी वगैरे सारा आकारण्यापूर्वी उभ्या पिकाची पहाणी करून अंदाज करतात तो.

आणा—उखाणा. आहणा पहा.

आणाआण—क्रिवि. लागोपाठ घाईघाईनें सामानसुमान आणणें इकडून तिकडून सर्व बाजूंनी –दिशांकडून आणणें, जमा करणें; जुळवाजुळव. [आणणें द्वि.] **०आणाआणीचा संसार**–घरचें उत्पन्न ज्यास अगदींच नाहीं अशा मनुष्यानें बाहेरचें मिळवून केलेला संसार. **आणा आणा मागें लागणें अथवा पाठीस लागणें**–१ हें पाहिजे, तें पाहिजे असा घरचा तगादा मागें लागणें. २ (ल.) लग्न करणें; कुटुंबवत्सल होणें; पुष्कळ माणसांचा प्रपंच चालविणें; अडचणींत येणें. ' भाऊराव, तुमच्या मागें आतां आणा लागला आहे, व्यवस्थित वागा हां ! '

आणा–दोन आणे–वि. थोडा तरी; किंचित; १६ आण्यांपैकीं कांहीं अंश (१६ आणे गुण=पूर्ण गुण). ' रोग्यास आणा दोन आणे तरी गुण दिसला पाहिजे.

आणा, आणिखी, आणी, आणीक, आणीदरा, आणी बाणी—अ मध्यें पहा.

आणापट्टी—स्त्री. प्रत्येक बिघा, नांगर, मनुष्य इत्यादिकांगणिक घेतलेला एक आणा जादा कर.

आणि, आण्, आन्(अन्)–न–नि—क्रिवि. आणखी या अर्थी मराठींत कित्येक वक्ते पुढील प्रयोग करितात–१ अशा प्रकारची व्यवस्था आणि सरकारनें केली. २ तो आणि तसा वागेल हें संभवत नाहीं. ३ ब्राम्हण नि दारू पिईल हें होणार नाहीं. या स्थळीं आणि नि हे शब्द हन्त, हान या शब्दांचे अपभ्रंश आहेत. [सं. हन्त=(ज्ञानें.) हान–हानि–आणि–णि–आन्–न–नि. हान शब्द ज्ञानेश्वर असाच योजतो. –राजवाडे (१८३२) ' म्हणौनि उदकीं हान रसु । कां पवनीं जो स्पर्शु । ! ' –ज्ञा ७.३२.]

आणि—उअ. आणखी; व; शिवाय; आणिक. [सं. अन्य]

आणिक—उअ. आणि. –वि. अधिक; निराळा; वेगळा. अणिक पहा. ' मग आणिकु उपचारु केला तेहीं । तो सांगिजैलु आतां । ' –शिशु ७७२. –एभा ३.६९८. [सं. अन्यत्क; प्रा. अणिक्क]

आणिकचि—अ. भलतेंच; विलक्षण. ' आणिकचि सुख होऊनि जाये । म्हणूनि विसरे । ' –ज्ञा ६.३७१.

आणियाळें—वि. तीक्ष्ण; टोंकदार. अणियाळें पहा. ' अत्यंत सूक्ष्म आणियाळें । तांदुळां वेळिलें सोज्वळें । ' –एहस्व १४.१२३. **आणियाळीदृष्टि**–स्त्री. कटाक्ष; नेत्राच्या कोंपऱ्यांतून पाहणें; वांकडी दृष्टि. ' आणियाळिया दृष्टी । ' –भाए ३६५ [सं. अणि]

आणी—स्त्री. एक आणा किमतीचें चांदी, निकल इ० धातूंचें नाणें. आणा पहा.

आणी—स्त्री. (चांभारी धंदा) जोडण्यास शोभा आणण्यासाठीं ठोपरामधून आणलेली दोंडी, टोंक. अणि–णी पहा. [सं. अणि] **आणीशिवणें**–(चांभारी धंदा) तजाच्या मध्यें टोंकाग रेशीम भरणें.

आणीक—अणिक, आणिक पहा. ' हरिरहित सुखाचा हेतु आणीक नेणे । ' –साहह २.६७.

आणीकसारखा—पु. दुसरा कोणीतरी; भलताच. ' आणीकसारखा असता तर चांगला चोप देता. ' [अन्यत् + क+सदृश]

आणीया—पु. अफूच्या (खसखशीच्या) पिकावरील एक रोग –कृवि ५०७.

आणेक—पु (गो.) टोमणा.

आणेगा—स्त्री. १ अधिकाऱ्याच्या द्वाहीनें (एखादी गोष्ट) बंद करणें. २ प्रतिबंध; मनाई. ३ द्वाही; दुराही. ४ शपथ; आण. अनेगा पहा. (क्रि० घालणें; करणें; मोडणें; मानणें). [आण]

आणेआन—वि. भलतेंच. ' एऱ्हवीं होईल आणेआन । ' –उषा ६५०. [सं. अन्य द्वि.]

आणोजें—न. अंकुर. ' देहीं कर्माचें आणोजें । ' –ज्ञा १४. ३२७. [सं. अणि]

आण्कुमाण्कुल्यो—स्त्री. (गो.) लहान मुलांचा एक खेळ.

आत—स्त्री. १ आत्या; बापाची बहीण. (मूळ संस्कृतांत स्वतःची वडील बहीण हा अर्थ असून बापाची बहीण हा अर्थ पुढें मराठींत रूढ झाला). २ मामी; सासू (या अर्थी कुणबी लोकांत कोंकणांत वापरतात). हा शब्द हाल–गाथा सप्तशतीमध्यें या अर्थी येतो. मराठे लोकांत मुलीची सासू म्हणजे तिची आत–बापाची बहीण–अर्थात; तेव्हां आत म्हणजे सासू. [दे. अत्ता=सासू, मामी (गाथासप्तशती); का. अत्ते=सासू, आई; ते. अत्त; द्रा. आत्त=आई; हिं. अत्ता; सं. अत्ता, अत्तिका=वडील बहीण.]

आत—न. (कों. गो.) सीताफळ, (गो) आंत. [सं. आतृप्त्य= सीताफळ; बं. आता; पोर्तु. आत; मलायी आत]

आंत—शअ.क्रिवि. १ आंतल्या बाजूस; अंतर्भागांत. [सं. अंतर्] २ ठराविक मुदतीच्या पूर्वी; अगोदर. ' माझे पैसे महिन्याच्या आंत परत दे. ' ३ मध्यें; मिळून; धरून; संबंधांत किंवा संबंधानें;

रोबर; (गौणपणें) एकांत एक; जसें–कामांत काम, खर्चांत खर्च; गोष्टींत गोष्ट, उदीमांत उदीम करणें; पोटांत पोट चालविणें. ३० हणजे पुष्कळ, गोष्टी किंवा कामें हातांत घेणें किंवा करणें, किंवा मुख्य काम अगोदर करून त्याच्या अनुषंगानें इतर कामें करणें. **०मध्यें**– अशुद्ध प्रयोग परंतु सामान्य लोकांत रूढ) अंतर्भागांत. आंतल्या बाजूस **०बाहेर करणें**–किंवा **पाहणें**–मागचा पुढचा विचार करणें **०येणें**–खालावणें; ऱ्हास पावणें; एखादा धंदा तोटयांत येणें; साधनसामग्रीचा अभाव होणें. **म्ह०** आंत असें जसे, बाहेर पडे तसें=चांगलें आंत असेल तरच चांगलें बाहेर येईल.

आंत—न. आंतडें; आंत्र. ' एकाचीं लोंबतीं आंतें । घार्‍यीं कोतें पडकलीं । ' –एरुस्व १२.२२. [सं. अंत्र; प्रा. अंत]

आतई, आतांई—पु. (व.) आतेचा नवरा. ' माझा आतई थेंथे राहतो. ' [सं. अत्तिका+पति]

आंतउतां–तीं—शअ. (काव्य) आंत; अंतर्भागीं; अतोत–तों हा. ' सांग जाई गृहाआंतउतां । ' [सं. अंतर्]

आतंक—पु. १ भीति; धाक. ' तयाच्या आतंकें द्विजतिलक थें चळवळी । ' –सारुह ७.२. २ रोग; व्याधि. [सं.] **०निग्रह**– याधिनाश; रोगहरण.

आंतकडीं–किर्टी–किडीं—स्त्री.अव. (गो.) आंतडीं. ' तॉ ल्या आंतकडेक कसलें दुर्‍यैस जालां ख ? ' [सं. अंत्र]

आंतकोनाडा—पु. मोठया कोनाडयांत राखलेला लहान नाडा.

आतखानी—वि. मत्सरी; द्वेषी; असहिष्णु. [आंत+खाणें]

आतगी—स्त्री (वाणी जातींत) आत; आत्या; बापाच्या हिणीस बहुमानार्थी म्हणतात. [आत+गी–गे]

आंतचा—वि. आंतील; आंतला. [आंत.]

आंतचाल—स्त्री. (ज्योतिष) एक मुहूर्त. सूर्य नक्षत्रापासून दिन क्षत्रापर्यंत होणाऱ्या नक्षत्रांपैकीं आरंभींच्या चार नक्षत्रांचा काल. ा मुहूर्त गाय, म्हैस नेण्या–आणण्यास शुभ मानतात. वरील एकं र नक्षत्रांत क्रमानें प्रथमच्या चार नक्षत्रांस आंतचालीचीं व त्या ढील तीन नक्षत्रांस बाहेर चालीचीं अशी संज्ञा आहे. [सं. अंतर्+ र्]

आंतडी, आंतडें—स्त्री.न. १ आंत; अंत्र; नलाकृति अन्न गें; पोटांतील नळी. २ तातीचें चर्म. [सं. अंत्र. तुल० (इं.) स्ट्रेल; ग्री. एन्तेरोन्] **आंतडयाला पीळ बसणें**–खरी कळ ळ, काळजी वाटणें. **आंतडीं कुंपणावर घालणें**–(क) अति य त्रास देणें. शिवाय अंतडी–डें पहा.

आतणें—क्रि. १ होणें; पावणें. ' बकाच्या ऐसे आतलें वळ । ' –मुआदि १९.७७. ' असो जळीं लवण· विरोनि गेलें । रे क्षारतेसीं होतें उरलें । तैंहि हळु हळु मधुरता आतलें । या नांव ज्ञान स्थिति । ' –स्वानु ११.१.८५. २ दडपणें. ' परि कैसा भारें आतला पिकें । दैवाचेनि । ' –ज्ञा ६.१४५. ३ देणें; अर्पण करणें. ' प्रसन्न होऊनि वरदानास । साबरी विद्या आतुली । ' –नव ७.३. ४ व्यापणें. ' विचित्रता भूतांचियां । आपण आंतोनि ठिकरिया । '–ज्ञा १८.५३९. ५ स्पर्शणें; शिवणें. आतळणें पहा. [सं. आप्=मिळणें]

आततायी–आतत्याई–यी—वि. अपराधी; गुन्हेगार; खुनी, विष घालणारा, चोर, आगलाव्या, दुसऱ्याची जमीन बळकावणारा व दुसऱ्याची स्त्री हरण करणारा या सहांपैकीं एक; आतताई मनुष्याचे हे सहा प्रकार शुक्रनीतींत दिले आहेत. ' अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः । क्षेत्रदारापहारी च षडेते आततायिनः । ' ' शुक म्हणे कुरुनंदना । यादव टेंकले आत्ममरणा । ते मारावया रामकृष्णा । आततायी जाणा लोटले । ' –एभा ३०.१५८. २ (ल.) साहसी; हेकड; मूर्खपणाचें धाडस करणारा. [सं.]

आतप—पु. ऊन; सूर्याचा प्रकाश, ताप. ' सांगें वातवर्ष आतपु धरे । ' –ज्ञा ५.११४. [सं.]

आतपत्र, आतपत्राण—न. छत्री किंवा अबदागीर; ऊन निवारण करण्याचें साधन. ' छत्रातपत्रचामरयुग्म । ध्वजीं उत्तम गरुडलांछन । ' –एभा १५.१७३. ' निजबोधाचें आतपत्र । शिरीं तन्मयाचें छत्र । ' –एरुस्व १५.९६. [सं. आतप+त्र]

आतपमूर्च्छा—स्त्री. ज्या रोगांत कडक ऊन किंवा उष्ण हवेचा परिणाम शरीरांतील मज्जातंतूंवर प्रथम होऊन त्यामुळें हृदय व श्वसनेंद्रियें यांची क्रिया बिघडते व त्यानें मूर्च्छा व ताप येतो तो रोग. (इं.) सन्स्ट्रोक.

आंतबट्टा—पु. १ निरनिराळ्या प्रकारच्या नाण्यांची अदलाबदल, देवघेव करतांना मूळ रकमेंत येणारी तूट; बाहेरबट्ट्याच्या उलट [आंत+बट्टा=घट]. २ नफा अपेक्षित असतां नुकसान होणें; खोट; तोटा. ३ (ल.) बुडता धंदा. ' आंतबट्ट्याच्या या अजागळ सट्टयाला आंधळया श्रद्धेची साक्ष आणि अनोळखी ईश्वराची जामिनकी. ' –प्रेमसंन्यास. **–ट्ट्याचा व्यापार**–पु. नुकसान सोसून केलेला–चालविलेला व्यापार–धंदा.

आतबड—आधबड; कातडें; अधोड पहा. ' बारा आतबडीचा जोडा ' –ऐपो ५७.

आतर—पु. उतारा; नावेंतून नदी उतरून जाण्याचें भाडें; नोर. ' तुम्हींच मग आतरास्तव मला सुदीना विका ' –केका २२. [सं. आ+तॄ–तर]

आंतर—वि. आंतला; आंतल्या बाजूचा; मधला. [सं.] **०त्वचा**–स्त्री. झाडाची आंतली साल. ' या आंतरत्वचा भवद्दुमा । वल्कलें म्हणावया महिमा । ' –एभा १२.४३९. **०राष्ट्रीय**–वि. भिन्न भिन्न राष्ट्रासंबंधीं; परस्पर राष्ट्रांमधील; सांवराष्ट्रीय (व्यवहार). (इं.) इंटर नॅशनल. **०विवर**–न. (प्राणि.) पोकळी. (इं.) व्हॅक्युओल. **-रास्तर**–न. (प्राणि.) गर्भपिडाचें एक आंतील आवरण. (इं.) हिपोब्लास्ट.

आंतर्भाव—पु. प्रीति; प्रेम; लक्ष. 'आंतर्भाव ते सासुरवाडीं। मायबापें राहिलीं बापुडीं।' –दा ३.२.३८. [सं. अंतर्+भाव]

आंतर्वक्र पृष्ठ—न. (ज्यो.) आंतील बाजूनें गोलाचें पृष्ठ पाहिलें असतां दिसणारा गोलाचा भाग. [सं.]

आंतला—वि. आंतील बाजूचा; अंतर्भागासंबंधीं. [अंतर्]

आंतलीखूणगांठ–स्त्री. मनांतील गुप्त हेतु; मतलब. **आंतलीचाल**–(राजा.) आंतचाल पहा. **आंतलीपाळ**–स्त्री. कानाच्या आंतील कड–बाजू–मांसल भाग; याच्या उलट बाहेरील पाळ.

आंतल्या आंत—क्रिवि. १ अंतर्भागांत; आंत; मध्यें. २ गुप्त रीतीनें; मनांतल्या मनांत; मुकाटयानें. ३ आपआपसांत; घरांतल्या घरांत; आपल्या मित्रमंडळींत.

आंतल्याकडचा–कडला–कडील–धडचा—वि.आंतल्या बाजूचा; आंतील; मधील.

आंतल्याकडेस–धडेस—क्रिवि. आंतल्या भागावर;आंतल्या बाजूनें; आंतून.

आंतल्या गांठीचा—वि. खोल मनाचा; ज्याचे हेतू–बेत गुप्त आहेत असा; गुप्त मसलत्या; गुप्त कारस्थानी; मिस्किल; मतलबी.

आतवता—आतौता पहा.

आंतवर–वार—न. १ (चि. कों.) स्वयंपाक घर; माजघर; घराचा मध्यभाग; याच्या उलट बाहेरवार. 'आम्ही पुरुष बाहेर निजूं बायकांस आंतवार जागा पाहिजे!' [सं. अंतर्+वर्ती]

आतश–ष—पु. अग्नि. [फा. आतिश्=अग्नि; तुल० सं. आतप] **०खाना**–पु. तोफखाना. 'किल्ल्यांत अबदुल अहदखानाचे आतश्खान्यांत रहावें.'–दिमरा १.८६. **०बाज**–वि. प्रेक्षणीय दारूकाम करणारा. –ऐटि १.४३. [फा. आतिश्+बाझ] **०बाजी**–स्त्री. १ अग्निक्रीडा; शोभेचें दारूकाम; दारूची लंका. 'रात्रीं नाच रोशनी आतश्बाजी जाली।' –रा ७.१४५. २ (ल.) चैन; करमणूक. [फा. आतिश्+बाझी] **०बेहराम**–पु. पारशी लोकांचें अग्निमंदिर; [फा. आतिश्+बेहराम] अग्यारी पहा.

आतस—स्त्री. (कों. कुण.) आत; आत्या. [सं. अत्ता]

आतसबाजी—आतशबाजी पहा.

आतळणें—उक्रि. १ (काव्य.) संसर्ग होणें; स्पर्श करणें; शिवणें; भेटणें. 'ते कर्मी तरी वर्तती। परी कर्मफळा नातळती।' –ज्ञा २.२७८. –एभा २.४८०. आतणें पहा. २ पावणें; लाभणें. 'तुजहूनि शाल्व पवित्र भला। नाहीं अंबेसी आतळला।' –मुसभा ११.४९. ३ धारण करणें; पावणें; प्राप्त होणें. 'अगाध महोदधीचें जीवन। आतळे धवळ दुग्धवर्ण।' –मुआदि ४.११०. [सं. आप्=मिळणें]

आंता—क्रिवि. १ सांप्रत; या वेळेस; एव्हां 'एवढा वेळ घरीं होते, आतां बाहेर गेले.' अतां पहा. २ यापुढें; चालू क्षणानंतर. 'आतां पारा कैसा सोधावा'–वैद्यक बाड ७८. ३ ग्रंथ, विषय यांचें आरंभप्रतिज्ञेचें द्योतक. 'आतां शब्दाचे प्रकार सांगतों.' 'आतां वंदू कवीश्वर।' ४ सांप्रत; सध्यां. [वै. अधा, सं. एतर्हि, अथ; आत्तः (इतोपीत्यर्थे); आतां काय म्हणतोस (=इतोपि किं भणसि) आतः=आता, आतां. –राज भाअ. १८३४.]

आँतॉ—पु. (गो.) भात शिजतांना येणारा कड, ऊत.

आतांघटके—क्रिवि. (कुण.) या घटकेस; यावेळीं. [आतां+घटिका]

आंतॉड—न. (गो.) बांबूचें बेट, बन.

आताता—उद्गा. अतत पहा.

आताशीं–शें–सां—अ. यावेळीं; हल्लीं; सांप्रत; आजकाल; अलीकडे. [आतां+असा]

आति—क्रि. होय; आहे. 'तुज सर्वज्ञा विचारितां धर्मे। कांइ संसारा आति।'–ऋ ४४. 'काइसे रचिति ते त्यासि सामर्थ्ये आति।' –चक्रसिद्धांतसुनें १७.३. [सं. अस्ति; म. आहति]

आतित—अतित पहा.

आतित्य—आतिथ्य पहा. 'आलयाचें करावें आतित्य।' –दा ४.७.२५.

आतिथ्य—न. अतिथीचा सत्कार, सन्मान, पूजन, आदर; पाहुणचार; पाहुणेर. [सं.]

आतिथ्य, आतिथेय—वि. अतिथीला योग्य अशें; पाहुण्यासंबंधीं, आदरसत्कार, पाहुणचार यासंबंधीं.

आंतिमधारण—न. (वास्तु.) अखेरचा जोर; दाब. (इं.) अल्टिमेट स्ट्रेस.

आतिशय—अतिशय पहा.

आतिसो—पु (काव्य) पुष्कळ; फार. अतिशय पहा. –वाक्य वृत्ति ४५७६. (–शर)

आती—स्त्री. (गो.) आत; आत्या. [सं. अत्ता]

आती—वि. आर्त; त्रस्त. 'आती रक्षावेआं।' –दाव ३३८. [सं. आर्ति]

आंतील—वि. १ आंतील बाजूचा; मधील; अंतर्गत. जसें–आंतील फितूर, दंगा, फूट, भेद. [सं. अंतर्] २ गुप्त; अंतर्गृहांतील. जसें–आंतील जाच–जुलूम–यातना–संताप–खातें–पत्र–हिशेब–वही इ. **०आंख**–पु. व्यापारी लोक मालावर किमतीचा गुप्त आंकडा घालतात तो, किंवा कांहीं खूण. [सं. अंतर्+अंक] गुप्त याअर्थी इतर उपयोग–आंतील खातें–पत्र–याद–वही–हिशोब इ० **०करारनामा**–पु. खाजगी रीतीनें घेतलेली वचनचिठ्ठी, करार. **०जामिनकी**–स्त्री. आंतील जामीनदाराचें काम, धंदा. **०जामीनदार**–पु. सरकारी रीतीनें

किंवा उघड रीतीनें जामीनदार झालेल्यास आंतून जामीन राहणारा किंवा त्याला हमी देणारा. ०**टांग**–स्त्री. (मल्लविद्या) कुस्तींतील एक डाव; आपल्या एका हातानें जोडीदाराचा हात आपल्या बगलेंत धरून आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराचें मनगट धरावें. ज्या बगलेंत आपण जोडीदाराचा हात धरला असेल त्याच बाजूच्या आपल्या पायानें जोडीदाराच्या दोन्ही पायांत आपला पाय घालून, जोडीदाराच्या हातास झटका देऊन आपली मान बाहेर फिरवून, ज्या बगलेंत जोडीदाराचा मुंडा आपण धरला असेल तो आपला मुंडा जमिनीवर टेकून, जोडीदारास चीत करणें. ०**भांक**–न. गुप्त गोष्ट; एखाद्या गोष्टींतील व्यंग, छिद्र, दोष; रहस्य. ०**मजकूर**–पु. १ (पत्रांतील) वृत्तांत; मजकूर. २ (ल.) मनांतील गुप्त हेतु, मसलत. ०**रोग**–पु. १ गुप्त रोग. २ (ल.) जुलूम, दुबेलता, ऱ्हास वगैरेंचें अंतस्थ, गुप्त कारण.

आतीव्र—न. (शाप.) हें रासायनिक धातुमूलद्रव्य असून दुर्मिळ मृत्तिकाधातुवर्गातील आहे. याचा शोध १८७७ साली लागला. (इं.) इटर्बिअम्. [स्वीडनमध्यें इटर्बी]

आतुटी—अ. अखंड; अतूट पहा. ' चंद्र चकोरा चोखटीं। वोळे अमृतधारीं आतुटी। ' –ऋ ५२. [सं. अ+त्रुट्]

आतुडणें—अक्रि. १ (काव्य) सांपडणें; स्वाधीन होणें. ' कट-कटा क्षुद्र मंडळांतु आंतुडलों। '–पंचतंत्र १.३९. २ (ल.) आकलन होणें; समजणें. ' माझें मजचि वो आतुडलें गुज। ' –निगा ७४. ' जे मना आकळितां कुवाडें। घाघुसितां बुद्धी नातुडे। '–ज्ञा ५.६७. ३ लाभणें; प्राप्त होणें; हातीं येणें. ' न करितां भगवद्भक्ति। सज्ञा-नाहि नातुडे मुक्ती। ' -एभा ३.१८६. ' तो देवेंद्रपदा चढे। सुर-वधूसंभोग तया आतुडे। ' –निमा १.१७. ४ संबंध येणें; निकट येणें; स्पर्शणें. ' मां साक्षात् तुं शामसुंदर। आंतुडलासी कीं। ' –रास १.१०३२. [द्रा. आतु=धारण करणें; जवळ असणें.]

आतुणें—सक्रि. देणें. ' प्रसन्न होऊनि वरदानास। साबरी विद्या आतुली। ' –नव ७.३. [सं. आप्=मिळणें, क्रि. अर्प्=देणें]

आतुर—वि. १ उत्सुक; उतावीळ; उद्युक्त. ' बहुतकरूनि कौरव। हे आतुर दुस्वभाव। ' –ज्ञा १.१७२. २ आर्त; विव्हळ; व्यथित; पीडिलेला; दुखणाईत. सामाशब्द. कामातुर–अर्थातुर–क्षुधातुर–चिंतातुर इ० ' कामातुराणां न भयं न लज्जा। अर्थातुराणां न पिता न माता। क्षुधातुराणां न रुचिर्न पक्वं। चिंतातुराणां न सुखं न निद्रा। ' [सं.] ०**संन्यास**–पु. मरणसमयीं घाईघाईनें घेतलेला संन्यास; केवळ प्रेषोच्चारादिक विधि करून घेतलेला संन्यास, चतु र्थाश्रम. [सं.]

आतुरता—स्त्री. विशेष उत्सुकता, घाई. [सं. आतुर]

आतुराय—वि. (गो.) आतुर; अधीर; उतावीळ; उत्सुक. [सं. आतुर]

आंतुरी—अंतुरी पहा.

आतुर्बेळी—वि. महाबलाढ्य; अचाट सामर्थ्यवान; अतुर्बेळी पहा. ' अकर्मे जाण आतुर्बेळी। ' –एभा १०.५९१. 'धनुष्यकोटीनें आतुर्बेळी। गंगा आणिली आश्रमाजवळी। ' –मुआदि १६ ८८.

आंतुल-ला-ली-लूं-लें—वि. आंतील; आंतील बाजूचा; अंतर्गत; मधील. ' परि तयाआंतुल नव्हे हे देवा। ' –ज्ञा ११. ३८८. ' फेडितांचि तो बाहिरलूं। कड फिटे आंतीलु। न फेडि-तांचि। ' –अमृ २.४८. [सं. अन्तर्]

आंतुवट—वि. आंतील; अंतरंगांतील. ' मी देव तो भक्तशुद्ध। हा बाहेरी नांवाचाचि भेद। आंतुवट पाहतां बोध। सच्चिदानंद जनि ठेक्यें। ' –एभा २१.४७१. –न. अंतरंग हृद्गत; गुप्त, गुह्य गोष्ट. ' हें आंतुवट तुज वर्मे। दाविजत असे। ' –ज्ञा ८.२०३. [सं. अंतर्+वर्ती]

आतू—स्त्री. आत; आत्या; आत्याबाई. [सं. अत्तिका]

आंतू—शअ. आंत; मध्यें. [सं. अंतर्]

आंतून—शअ. क्रिवि. आंतल्या बाजूनें; अंतर्भागापासून; बाहे-रूनच्या उलट. [आंत+हून] ०**पाय काढणें**–(मल्लविद्या) जोडी-दार आपल्या पाठीवर आपणास धरतो त्या वेळेस आपण खालीं वांकून आपल्या दोन्ही पायांतून त्याचे पाय काढून घेणें. जोडीदार आपल्या पाठीवरून आपणास धरतो तेव्हां आपण झटक्यानें खालीं वांकून आपल्या दोन्ही हातांनीं जोडीदाराचा पाय घोटघाजवळ धरून वर उचलावा व तो उचलतांना आपण जोडीदाराच्या मांडीवर बसावें म्हणजे जोडीदार चीत पडतो. ०**पाय मोडणें-ओढणें**–एखादें कृत्य करीत असतां दुसऱ्यानें त्यास गुप्तपणें विरोध–प्रतिबंध करणें. ' नानांचे पाय आंतून ओढण्याचा विसूभाऊंचा यत्न होता. ' –अस्तंभा ११२.

आतृप्त-तृप्ति—क्रिवि. तृप्ति होईपर्यंत; शांत होईपावेतों (खाणें पिणें, भोगणें इ०). (विरू.) आतृप्त. [सं.]

आते—क्रि. १ आहे. ' हा ही हातपिटी खेळती आते। जगजेटींसीं। ' –शिशु ६८९. २ होतें; असतें; बनतें. ' पाणी बुडऊं ये मिठातें। तंव मीठचि पाणी आतें। ' –ज्ञा १६.७२. ३ येतो; प्राप्त होतो. ' जयाचेनि अपांगपातें। बंध मोक्षपणें आते। ' –अमृ २.४. सं. अस्ति]

आते—स्त्री. (कों.) आत्या; आत; आत्याबाई. ०**गौरव-चीर-वाण-मान**–पुन. वरपक्षाकडून वधूच्या आतेला मिळणारें मानाचें लुगडें–चोळी. २ अशा प्रकारें दिलेला मान, किंवा मानाची रीत–प्रकार. ०**दीर**–पु. नवऱ्याचा आतेभाऊ. ०**बहीण**–स्त्री. आतेची मुलगी. ०**भाऊ**–पु. आतेचा मुलगा. ०**मामे भावंडें**–नअव. भावाचीं मुलें तीं बहिणीच्या मुलांचीं मामेभावंडें व बहिणीचीं मुलें तीं भावाच्या

मुलांचीं आतेभावंडें होत. [आत+मामा] **०सासरा**–पु. १ सासऱ्याचा आतेभाऊ. २ आतेसासूचा–सासऱ्याच्या बहिणीचा–नवरा **०सासू**–स्त्री. सासऱ्याची बहीण; नवऱ्याची किंवा बायकोची आत.

आंतें—न.अव. आंतडीं. आंत पहा. ' घाये आंतें काढितीं. ' –एरुस्व ८.४५. [सं. अंत्र]

आतेगवर—(गो.) वर पक्षानें वधूच्या आतेस अर्पिलेले लुगडें; आते गौरव–चीर पहा. [आते+गौरव]

आंतेर—स्त्री. (गो.) सिताफळीचें झाड. आत पहा. ' ती आंतेर बरी मातल्या. ' [पोर्तु. आतेयर्. सं. आतृप्य]

आतेस—स्त्री. (कों.) आत्याबाई; आते पहा.

आतोजी—स्त्री. (कों.) सासू. [का. आते=सासू]

आतांड—पु. (गो.) डोंगराच्या पायथ्यापासून थोडा उंच पण साधारण सपाट भाग; यांत काजू, बांबू, आंबे, फणस, कोकंब इ० झाडें लावतात व याच्या खालच्या भागांत केळी, सुपारी यांच्या बागा करतात. [सं. आ+तुंड]

आतोनात—अतोनात पहा.

आतोळ्योपातोळ्यो करप-सांगप—(गो.) अंगविक्षेप करून एखादी लांबलचक हकीकत सांगणें. ' आताळो गेलों पाताळो गेलों, तिथून आणली ... ... ' या गोष्टी प्रमाणें सुरवात करून सांगणें. [सं. अतल+पाताल]

आंतौटेपण—न. अस्तित्व; आंत असणें. ' हे कवणाजोगे न होती. आंतौटेपणें. ' –ज्ञा ३.२५९. [आतौता+पण]

आंतौत-तां-ती-तें–आंतउतां–ती, अतौत पहा. ' पै परतत्त्वा अरौतें. स्थावरांता आंतौतें. ' –ज्ञा १३.१५८. ' तरंग समुद्रा आतौता. म्हणे माझेनि मेघ तत्त्वतां. ' –एभा २.३८८. –मुआदि २.४५; ६.८४ इ० [अंतर्+वर्ती]

आंतौर—अंतुरी पहा.

आत्काटी—स्त्री. (गो.) आडकित्ता. आटकाटी ?

आत्तां—आतां पहा.

आत्म—वि. १ आत्म्यासंबंधीचें. २ स्वतःचें; आपलें. [सं.] **०कार्य**–न. आपलें काम; स्वतःचें काम. –क्रिवि. खासगी कामाकरितां; आपल्या कामासाठीं (व्यापारी लोकांच्या पत्रव्यवहारांत हा शब्द येतो). हें अप. रूप आहे. **०ख्याति**–ख्याति पहा. **०गत**–वि. स्वगत; आपल्यापुरतीं (नाटकांत एखाद्या पात्रानें केलेलें भाषण). **०गति**–स्त्री. १ आत्म्याची अखेरची अवस्था. २ आपली अखेर. ' प्रिये आत्मगति यांची दिसताहे. ' –सप्र १३.१४. **०ग्रह**–पु. १ आत्मज्ञान. २ स्वीकार करणें; स्वतःचें मानणें; आपला म्हणणें; कैवार घेणें. **०घात**–पु. १ आत्महत्या; स्वतःचा घात, नुकसान (धर्मशास्त्रविहित प्राणत्यागास हा शब्द लावीत नाहींत). ' तंव तो वशिष्ठ गुरूनाथ. म्हणे सहसा न करावा आत्मघात. ' **०घातक-की, घाती**–वि. १ स्वतःचा घात करणारा. २ (ल.) स्वतःचें नुकसान करणारा; स्वतःच्या पायांवर धोंडा पाडून घेणारा. **०घ्न**–वि. १ आत्महत्या करणारा. २ आत्मघातकी. **०चर्चा**–वि. आत्म्यासंबंधीं वादविवाद; ब्रह्मविचार; आत्मानात्मविचार. [सं.] **०च्छाया**–स्त्री. स्वतःची सावली. ' कां कवळिलिया न धरे. आत्मच्छाया ॥. ' –ज्ञा १८.५३०. [सं.] **०ज**–पु. स्वतःपासून जन्मलेला; पुत्र; मुलगा. ' पैल इतरु हा आत्मजु. हें उरेल के. ' –ज्ञा ५.९३. **०जा**–स्त्री. स्वतःची मुलगी. ' अगा आत्मजेच्या विषीं. ' –ज्ञा १२.१३२. **०जिज्ञासु**–वि. आत्मज्ञानाची इच्छा करणारा. ' ऐसे आत्मजिज्ञासु जे होते. '–ज्ञा १६.५२. **०तत्त्व**–न. ब्रह्मज्ञान; आत्मज्ञान. ' येर आत्मतत्त्व उदासीन ' –ज्ञा १८.३०६. **०तोख, तोष**–पु. आत्मानंद; स्वसंतोष. **०त्याग**–पु. स्वार्थत्याग. ' हा आत्मत्याग व लोकाश्रय सरकारचे गुप्त हेतु पर्यायानें सिद्धीस नेण्यास जर उपयोगी पडला ... ' –टि ३.१८२. **०त्व**–न. आत्मस्वरूप. ' न लगती तपें व्रतें अनुष्ठान. आत्मत्वाची खूण बेगळीच ' –ब. १७९. **०धन**–न. १ स्वतःची संपत्ति. २ स्वतःचा आत्मा; स्वतः ३ (ल.) स्वत चा पुत्र. **०निंदा**–स्त्री. स्वत.ची निंदा; स्वतःस दोष देणें; स्वतःवर दोषारोप करणें (पश्चात्तापाच्या वेळीं). **०निवेदन**–न. आत्मसमर्पण; परमेश्वराच्या ठिकाणीं स्वतःस वाहून घेणें; नवविधाभक्तींतील शेवटचा–नवव्या भक्तीचा प्रकार, म्हणजे जीवशिवैक्य. ' आत्मनिवेदनाचें लक्षण. आधीं पाहावें मी कोण. मग परमात्मा निगुण. तो वोळखावा. ' –दा ८.८.१३. २ स्वतःची कथा, खुलासा; आत्मचरित्र. **०निश्वास**–पु. वेद (यस्य निःश्वसितं वेदाः =वेद ज्याचे (परमेश्वराचे)निःश्वास आहेत या वाक्यावरून). **०निष्ठ**–वि. १ आत्मस्वरूपीं तल्लीन असलेला; आत्मानंदीं, ब्रह्मानंदीं निमग्न असलेला. २ मनोभावाचा; कळकळीचा; उत्तुक. **०निष्ठा**–स्त्री. १ आत्म्याच्या ठिकाणीं निष्ठा. २ स्वतःवर विश्वास; आत्मविश्वास. **०परिचय**–पु. आत्म्याविषयींचें किंवा स्वतःविषयींचें ज्ञान–ओळख. **०पोटी**–वि. अप्पलपोटपा; स्वार्थी. ' तव भीम म्हणे श्रीकृष्णासी. तूं बरवा आत्मपोटी कळलासी. मी अतिथी उभा असता द्वारासी. भोजन सावकाश करिसी तूं. ' –जै १०.२. **०प्रची(ती)ति**–स्त्री. १ आत्मज्ञान; स्वप्रतीति, गुरुप्रतीति, आत्मप्रतीति या तीन प्रतीतींपैकीं एक. २ स्वतःच्या अनुभवावरून मिळविलेलें ज्ञान–बोध; आत्मानुभव. ' नाना ग्रंथांच्या समती. उपनिषदें वेदांत श्रुती. आणि मुख्य आत्मप्रचीती. शास्त्रेंसहित. '–दा १.१.१५. **०प्रशंसा**–स्त्री. स्वतःची स्तुति; आत्मस्तुति–श्लाघा. **०प्राप्ति-लाभ**–स्त्रीपु. आत्मज्ञान; ब्रह्मज्ञान. ' महामंत्र आत्मप्राप्तीची खाणी. ' **०बंधु**–पु. स्वतःचा नातेवाईक; चुलत–मावस–आते–मामे भाऊ. **०बिंब**–न. १ प्रतिबिंब. ' का आत्मबिंबा घेतलें. बाळकें जळीं. ' –ज्ञा १८.१३०६. २ जीवात्मा (परमात्म्याचें प्रतिबिंब). **०बोध**–पु. आत्मज्ञान. ' मग

सत्त्वे चोखाळें। उघडती आत्मबोधाचे डोळे।' –ज्ञा १८.२१०. **–आत्मंभरी**–वि. अप्पलपोटया. **०यज्ञ**–पु. स्वार्थत्याग; जीवितांचें बलिदान; स्वतः मरणाला तयार होणें. **०राज**–पु. आत्मा; स्वतः 'तेथ न सुवावा अभंगीं। आत्मराजु।' –ज्ञा १८.२८०. **०रूप**–न. स्वस्वरूप. 'जयजय स्वसंवेद्या आत्मरूपा।' –ज्ञा १.१. **०लिंग**–न. १ आत्मस्वरूप. 'पै तुझी आण वाहणें। हें आत्मलिंगातें शिवणें।' –ज्ञा १८.१३६९. २ शिवाचें मुख्य लिंग (प्रतीक). शंकरानें आपल्या भक्तासाठीं आत्मस्वरूपाचा तत्त्वांश मूर्त करून देवला आहे. ३ अस्थेत जिवलग मनुष्य; प्रेमाचें माणूस. 'एके दिवशीं बाजीरावसाहेब हे नानासाहेबास भोजनाचे वेळीं बोलले कीं, रघुनाथराव यांचे पूर्वज विठ्ठल शिवदेव हे आमचे दादासाहेबांचे आत्मलिंग होते.' –तीर्थयात्राप्रबंध ८२. **०वत्**–वि आपल्या प्रमाणें; स्वतःसारखें; भेदभाव, आपपरभाव न ठेवितां. 'आत्मवत् सर्व भूतानि।' या वचनावरून. 'आत्मवत् देखावे अवघे जन। नलो देहभान किंचित।' **०वश**–मनोनिग्रह; आत्म निग्रह–आत्मसंयमन. **०विचार**–पु. आत्म्यासंबंधी चर्चा; ब्रह्मविचार 'संतसंगे आत्मविचार.' **०विद्या**–स्त्री. १ ब्रह्मविद्या, अध्यात्मविद्या; वेदांत. २ आत्मज्ञान; स्वतःसंबंधीं जाणीव. **०विधि**–पु. आत्म्याचें कर्तव्य, गुणधर्म. 'ऐका चित्त देउन आत्मविधि।' **०वेत्ता**–पु. ज्याला स्वस्वरूपाची पूर्ण ओळख झाली, स्वहृदयांत वास करणारा ब्रह्मांडव्यापी परमात्मा आपण आहों असा ज्याच्या बुद्धीचा निर्धार झाला तो; मी ब्रह्म आहे असें मानणारा. **०शास्त्र**–न. अध्यात्मविद्या–शास्त्र. **०शुद्धि**–स्त्री. चित्तशुद्धि; स्वत.चे आचारविचार, वर्तन शुद्ध ठेवणें. **म्ह०** आधीं आत्मशुद्धि मग देवशुद्धि. **०संतोषानें**–क्रिवि. राजीखुशीनें; कोणाची भीड न धरतां; आपखुशीनें. 'हें खत मी आत्मसंतोषानें लिहून दिलें असे.' **०संतोषी**–वि. १ आत्मानंदांत सुख मानणारा. २ (ल.) आपमतलबी. **०सत्ता**–स्त्री. ब्रह्मज्ञान; आत्मस्वरूप. 'तैसें होईजे जाइजे देहें। ते आत्मसत्ते अविक्रिये।'–ज्ञा १५.३८०. **०संयम**–आत्मवश पहा. **०साधन**–न १ आपल्या जीवाचें किंवा जन्माचें सार्थक करणें. 'जैसि संताचि कास मुमुक्षु नर। धरिति आत्मसाधना।' २ स्वतःच्या उपजीविकेची व्यवस्था–तरतूद. ३ (ल.) स्वतःचा मतलब. 'त्याचें कांहींतरी आत्मसाधन असेल तरच तो इतकी खटपट करितो.' **०साक्षात्कार**–पु. निर्गुण साक्षात्कार (सगुण साक्षात्काराच्या उलट); अंतर्यामीं परमेश्वर–ब्रह्म याचें दर्शन होणें. **०सुख**–न. स्वतःचें (शारीरिक किंवा मानसिक) सुख; आपल्या ठिकाणींच सुख; ब्रह्मज्ञानापासून होणारें सुख. **०स्तुति**–स्त्री. स्वतःची प्रशंसा; आत्मप्रशंसा. 'आत्मस्तुति मनांतून। स्वप्नीं जयासि नावडे।' **०स्थिति**–स्त्री. ब्रह्मस्वरूपाची स्थिति; आत्म्याची स्वतंत्र अवस्था; शरीर किंवा इतर वस्तु यांहून भिन्न अशी अलिप्त स्थिति. कांहीं वाक्प्रचार-आत्मस्थिति ओळखावी–जाणावी–संपादावी–जोडावी–धरावी = सोडूं नये; आत्मस्थितीवर असणें. **०हत्या**–स्त्री. १ (कायदा) शास्त्रविधिविरहित स्वतःस मरण येईल असें कृत्य स्वतः करून मरणास कारण होणें; हेतुपुरस्सर स्वतःचा जीव स्वतः घेणें; आत्मनाश; आत्मघात. २ आत्महत्येचें पाप, गुन्हा. **०हत्यारा**–वि. आत्मघात करणारा. 'जो आपला आपण घातकी। तो आत्महत्यारा पातकी।' –दा १७.७.१०. **०हित**–न. १ (ईश्वरप्राप्तीनें होणारें) जीवाचें कल्याण; देहाचें सार्थक; भगवत्प्राप्ति. 'आहा नरदेह उत्तम पूर्ण। केवळ भगवत्प्राप्तीचें स्थान। म्यां आत्महित न करून। वुडालें कि अंधतमीं।' २ स्वत.चा फायदा. **०ज्ञान**–न. १ ब्रह्मज्ञान; स्वस्वरूपाचें ज्ञान; अध्यात्मज्ञान. 'ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान। पाहावें आपणासि आपण।' –दा ५.६.१. २ स्वतःच्या वर्तनाची जाणीव. **म्ह०** आधीं आत्मज्ञान, मग ब्रह्मज्ञान.

आत्मक—वि. आत्मा असणारें; आत्म्याच्या ठिकाणीं असणारें; पूर्ण; भरलेलें; तत्स्वरूपी; तन्मय. 'हें जग पंचभूतात्मक आहे.' 'अलंकार सुवर्णात्मक आहेत.' इ० समासांत नेहमीं उपयोग. सामाशब्द-संकल्पात्मक; पापात्मक; ध्वन्यात्मक; इ०

आत्मसात् करणें—क्रि. १ आपलेसे करणें; आपल्या कामीं लावणें; वळकावणें. २ अभ्यासानें एखादी विद्या अवगत करणें; पांडित्य संपादणें. ३ स्वस्वरूप करणें; आपणासीं एकरूप करणें; (इं.) असिमिलेशन.

आत्मा—पु. १ जड सृष्टीपेक्षां अत्यंत भिन्न असें आदितत्त्व; जीवाचें मूलबिंब; निराकार, अमर्त्य, परमात्मा= परब्रह्म. २ प्रत्येक देहमात्राच्या ठिकाणीं त्या त्या देहाची अभिमानी असलेली जाणीव, चैतन्य, प्राण; जीव. ३ मी, आपण, स्वतः एतद्वाचक शब्द. ४ अंतःकरण; स्वभाव; प्रकृति. ५ देह. ६ बुद्धि; समज. ७ (स्त्रि.) ज्याला विचार, भावना, इच्छाशक्ति आहेत असें आध्यात्मिक व्यक्तित्व –योहा ३.५.८; ४.२४. 'माझा आत्मा जसा आरसा। पाहो जन त्यामाजि तुला।' – उसं २८१. [सं. अत् = निरंतर चालणें] ८ (पिंजारी) कापूस पिंजण्याच्या कमानीच्या पंख्याच्या कडेवर एक चामड्याची पट्टी असते, तिच्या आंत वसविलेली घोडीवजा एक कातड्याची, घडी केलेली पट्टी. हिनें कमानीस असलेली तात ताणून अधिक आवाज निघतो. **०नंद**–पु. विषयसुखापासून चित्त आवरून परमात्म्याचें ध्यान केल्यानें होणारें समाधान. ब्रह्मज्ञानापासून होणारा आनंद; आत्म्याची जाणीव झाल्यामुळें लाभणारें सुख. भारतीय तत्वज्ञानांत आनंद हा आत्म्याचा एक घटक मानिला आहे. आनंद पहा. [आत्मा+आनंद] **०नात्मविचार–विवेक**–पु. देहाच्या ठायीं शुद्ध निर्विषय जो ज्ञानांश तो मात्र मी, इतर देहादिक तें अनात्मा होय म्हणजे मी नव्हे असा विचार; आत्मा आणि अनात्मा यासंबंधीं विचार. [स. आत्मा+अनात्मा+विचार, विवेक] **०नुभव**–पु. आत्म्याचा परिचय; आत्मज्ञान; ब्रह्मज्ञान. 'तेथें

आत्मानुभव बोलिजे कैसा कवण परि । ' [सं. आत्मा + अनुभव] **आत्मानुसंधान**—न. १ परमार्थविषयक सत्याकडे, आत्मज्ञानाकडे लागलेलें लक्ष. २ (ल.) अप्पलपोटेपणा. [सं. आत्मा + अनुसंधान] **०राम**—पु. १ आत्मा; जीव; अंतःकरण. ' तुम्ही जेवून आत्माराम थंड करून घेतलात, मी मात्र उपाशी मेलों ' २ विषयपराङ्मुख व ईश्वराराधनेविषयीं तत्पर; ब्रह्मनिष्ठ; आत्मानंद लाभलेला; स्वसंतुष्ट. ३ परमेश्वर; परब्रह्म. ' आत्मारामाचेनि विरहें । जेयां जीवीतु न साहे ' —ऋ ६. ' जयदेव, जयहेव जय आत्मा, रामा । परमार्थें आरती तुज पूर्णकामा ॥ ' [आत्मा+राम] **आत्मार्पण**—न. स्वतःला ईश्वरास वाहून घेणें. ' आत्मार्पणाविण हरी वळतो कसा रे । ' [आत्मा + अर्पण] **०श्रयदोष**—पु. (तर्क.) स्वाश्रयावर अवलंबून-विसंबून असणें हा दोष; अन्योन्याश्रय दोष. उ० घट हा घटजन्य ज्ञानास कारण होय. [आत्मा+आश्रय+दोष] **–त्मोन्नति**—स्त्री. स्वतःचा उत्कर्ष. ' आधीं आत्मोन्नति, मग देशोन्नति ' **–त्मोपासना**—स्त्री. ध्यान करून परमेश्वराची उपासना करणें. कर्मोपासना, ज्ञानोपासना पहा. **–त्मौपम्य**—न. १ परब्रह्मस्वरूपार्शी एकरूपता. २ आत्म्यार्शी, आपल्यार्शी ऐक्य. आप परभाव नसणें. ' आत्मौपम्यानें सर्व जग पहावें. **–त्मौपम्यबुद्धि**—स्त्री. सर्वत्र आपल्यासारखी बुद्धि. ' सर्वाभूतीं एक आत्मा किंवा आत्मौपम्यबुद्धि या तत्त्वानें व्यावहारिक नीतिधर्माची जशी उपपत्ति लागते, तशी दुसऱ्या कोणत्याच तत्त्वानें लागत नाहीं. ' –गीर ३८२.

आत्मिक–त्मीय—वि. १ स्वकीय; आपले नातलग; सोयरे धायरे. ' आणि मी अर्जुनु हे आत्मिक ॥ ' –ज्ञा १८.१२८२. २ स्वतःसंबंधींचें.

आत्यंतिक—वि. १ अतिशय; फार. ' रायें पुसिलें आत्यंतिक क्षेम । तदर्थी कवि ज्ञाता परम । ' –एभा २. २७७. २ शेवटचा; निर्वाणीचा. [सं. अति + अंतिक] **०प्रळय**—पु. १ ब्रह्मा-शिवाय इतर सर्व वस्तुमात्रांचा नाश. ' म्हणोन हें अशेष प्रपंचबंधन निःशेष सेंहारे तो प्रलयो देख आत्यंतिकी ' २ मोक्ष प्राप्त झाल्यावर सर्व जगाचा भासणारा अभाव. मोक्षप्राप्ति. निद्रा व मरण हे दोन पिंडीचे आणि कल्प व महाकल्प हे दोन ब्रह्मांडीचे असे चार प्रलय आहेत, पण यांत जीवास मुक्ति नाहीं. म्हणून हा पांचवा अत्यंतिक प्रलय कल्पिला आहे. हा मुक्तिप्रद आहे.

आत्या—स्त्री. १ आत पहा. देशस्थ ब्राह्मणांत आत्ती म्हणतात. [सं. अत्ता, अत्ती, अत्तिक; प्रा. अत्ता = आई, सासु; का. अते, अत्ति=सासू] २ पुरुषास बहुमानार्थी लावावयाचा शब्द. रंगनाथस्वामी निगडीकर यांच्या वडील भावास आत्यास्वामी म्हणत असत. **०बाई**—स्त्री. १ बापाची बहीण; आत. २ सासु. (कांहीं जातींत आत्या ही सासु होऊं शकते). ' तंव सत्यभामा म्हणे आत्याबाई । तुम्हासी तरी म्हणावें काई । तुम्ही कां म्हणवितां यांची आई । केवीं उदरीं धरिलें हो ॥ ' –जै ९. ७२. **म्ह०** आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटलें असतें=जी गोष्ट किंवा स्थिति पालटणें आपल्या हातीं नाहीं ती तशी नसती तर बरें झालें असतें असें व्यर्थ म्हणणें.

आत्येसा—क्रिवि. अतिशय; फार (शोक). ' मुर्दा डेऱ्यास आणला ... आनंदी करितसे आत्येसा । ' –ऐपो ८९. [अतिशय]

आंत्र—अंतर पहा.

आंत्र—स्त्री. आतडें, आंत पहा. **०कलाधमनी**—(प्राणि) लघ्वंत्रावरणत्वक्–धमनी (इं.) मेसेंटेरिक. **०वेष्टण**—न. (शाप.) १ उदरांतर्वेष्टन; पर्यंत्रक (रानडे). (इं.) पेरिटोनिअम.

आत्रपैऱ्यान, आत्रोपयरी, आत्र्यापय–यान—क्रिवि. (कु. गो.) एक दोन दिवसांआड; वरचेवर. ' आत्रपैऱ्यान हांव थीं एक पावूट मारताच ' [पोर्तु. इं. अल्टरनेट ?; गो. पैरा=एक दिवसाआड]

आंत्रावरोध—पु. एक रोग. यांत आंतड्यांतील मल नेहमींप्रमाणें ढकलला जात नाहीं; आंतड्यांत उत्पन्न झालेला अडथळा. [सं.]

आंत्रिक—वि. गाळलेलें; ओलांडलेलें, वगळलेलें. अंत्रिक पहा. [सं. अंतर्]

आंत्रिक—वि. आंतड्यांसंबंधीं. [सं. अंत्र]

आत्राटण—न. ताडण; मारणें. ' निर्विकल्प करितां आत्राटणा ' –गीता २.२२५०. [सं. आ+तड्–ताडन]

आत्राटणें—अक्रि. थापटणें; ताडन करणें; मारणें.

आत्रेय—पु. (शाप) एक रासायनिक मूलद्रव्य. (इं.) यिट्रियम.

आत्साण—स्त्री. (गो.) स्वाद; चव. [सं. आ+स्वाद; प्रा. अस्साद]

आत्साण—(गो.) उकिरडा. [सं. उत्सर्जन ?]

आथ—पु. (भिल्ली) हात. [सं. हस्त; गो. आत]

आथडणें—उक्रि. (प्रां.) हसडणें; हिसकणें; हिसका मारून–हिसकून–घेणें; पकडणें; बलात्कारानें धरणें. [सं. आ+स्तभ्]

आथडणें—अक्रि. जाऊन थडकणें; पोंचणें; थांबणें. [सं. आ+स्तभ्]

आथडा—पु. आथडण्यानें बसलेला हिसका; हासडा; हिसडा. [सं. आ+स्तभ्]

आथणें—अक्रि. (भिल्ली) शिवणें; हात लावणें. ' आव मोडो वेहे ताहां बुकाल आथलेंबी नेज. ' –भिल्ली भाषेतील गोष्टी ३१. [आथ=हात]

आंथर—पु. कामटयाची, गवताची चटई; आंथरी; हातरी. [सं. आस्तरण; प्रा. अत्थरण]

आंथरणें—अंथरणें पहा.
आंथरी—आंथर, अंथरी पहा.
आंथरूण—अंथरूण पहा.
आथर्वण-विधि—जारणमारण; अथर्वण पहा. 'विधि आथर्वण। हातीं आथी ॥' –ज्ञा १३.८२९.
आथवँ—वि. (गो.) नवखें.
आथवां—(गो.) अर्धा शेर. आठवा पहा.
आथारी—अथारी पहा.
आथि-थी—कि. १ (जुनें मराठी काव्य) आहे. आति पहा. पिंगलकु सिंहु येथें आथि।' –पंच १.२४. 'एतद्विषयीं विषाद। आथीचिना ॥' –विउ ८.२९. [सं. अस्ति-अन्थि-आथि-आति] २ (भिल्ली) होती. 'एक कुकडी (कोंबडी) आथी' –भिल्ली भाषेतील गोष्टी ९. **०ला**–१ झाला; असला; होता; असणें या क्रियापदाचें भूतकालाचें जुनें रूप. 'कामें आथिला मैथुना रिघे।' **०लें**–१ झालें; आलें. वायूपोटीं पाहे तेज जन्मलें आपण। तेहि रे पांचागुणीं आथिलें जाण।' –ब ५.८७. २ असलेलें; असतें; युक्त; संपन्न (कोणत्याहि गोष्टीनें). 'नाथिलें चिंती तें अतिचिंता। आथिलें चिती ते निश्चितता।' –एभा २.४१४. **०लेंपण**–न. असतेपण; अस्तित्व.
आथिला—वि. १ भाग्यवान; थोर. 'सदाभ्यासाचेनि योगें। भगवत्प्रसादप्रसंगें। लाहोनि युक्तिसौभाग्यें। आथिला होय तो।' –रासपं. २.६०५ २ युक्त किंवा संपन्न. 'ऐसेनि गंभीरपणें। स्थिरावलेनि अंतःकरणें। आथिला तोचि जाणें। मानूं इये ॥' –ज्ञा १.६१. –एभा २३.९३७. 'पुरुषचिन्हें जो आथिला।' –मुआदि २३.११६. शिवाय नामाथिला (–मुआदि २१.४१) मोहाथिला (–मुआदि २२.२२) इ० रूपें आढळतात. **०लेंपण**–न. संपन्नता; थोरपणा; भाग्य. 'एथ जाणीव करी तोचि नेणे। आथिलेंपण मिरवी तेचि उणें।' –ज्ञा ९.३६८. [सं. अस्ति; प्रा. अत्थि; म. आथि]
आथी—पु. (भिल्ली.) हत्ती. [सं. हस्ती]
आथुरण—अंथरूण पहा. 'ते गोपाळ झाले जाणते। आपले आथुरणावरी।' –रासपं ५.५१.
आद—वि. अर्ध, अद पहा. सामाशब्द–आदपाव; आदमण इ० [सं. अर्ध]
आद—स्त्री. वंशाची माहिती; आदि; वंशावळ–कोईसाले ४७. [सं. आदि]
आंद—स्त्रीअव. (व.) मागासलेल्या जाती. [सं.अंध]
आंदकणें—अक्रि. (माण.) नाउमेद होणें. अदबणें पहा. [प्रा. आदण्ण=व्याकुल]
आदकरणी—स्त्री. मागील आचरण; पूर्वीची कृति. 'तीर्थवासि सांगतां ऐकली सुमित्र तुमची आदकरणी।' –प्रला ९१. [सं. आद्य+कृ; आदि+करणी.]
आदखणा—अदखणा पहा. 'बहुकृपण बहु खंदस्ती। बहु आदखणा बहु मस्ती।' दा ५.७.३५. **०णेपण**–न. मात्सर्य; द्वेष. 'आदखणेपण करूं नेये।' –दा २.२.२२.
आदगी—स्त्री. नणंद, नवऱ्याची बहिण. [का. आदंगी=स्त्री]
आदघर—न. आदिघर; आद्यस्थान; पुराणप्रसिद्ध क्षेत्र. [आद्य+गृह] 'खुब जुर्तीनें किल्ला राखावा हें पूर्वीचें आदघर।' –ऐपो ३५१.
आदट—वि. न दटावण्या जोगें; बलवान. अदट पहा. 'खातीं इंद्रियें आदटें।' –भाए ५१०; 'निळा म्हणे माझा पुरता आला वीट। देखोनी आदट कर्म बळी ॥' –निगा २१५. 'इंद्रियें करूनि आदटें। परी अंतीं होती शांत।' –विपु ६८. [अ+दाटणें, दटावणें]
आदटणें—अक्रि. दबणें, जिरणें; कमी होणें. 'बुद्धी भ्रम सुटे प्रशस्त न दटे धोका सवे आदटे।' –दावि ४३६ [आ+दाटणें–दटणें]
आदडा—स्त्री. (चे.) गर्दी; दाटी. [दडणें=दाबणें; दाटणें]
आंदण-णा-णी-ण्या—अं मध्यें पहा.
आदत—स्त्री. संवय; खोड; अदत पहा. 'जयाजी शिंदे यांस आदत अशी होती कीं स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत रहावें' –भाब १५. 'त्याला खोटें बोलण्याची आदत आहे.' [अर. आदत्=संवय]
आदंतर—न. (गो.) आगाऊ. [सं. आदि+अंतर]
आदन—न. (गो.) आधण, भात इ० शिजविण्यास लागणारें, उकळी आलेलें पाणी. [आधण अप; प्रा. आदाण; सं. आदहन]
आदन—न. (गो.) अवलंबन; आश्रय. **०करप**–अवलंबून असणें, राहाणें; विसंबून असणें, राहाणें. 'हांवें ताजेर भोव आदन केलां!' [सं. आधान]
आदब-खाना, आदबणें, आदबशीर—अ मध्यें पहा.
आदमास—अजमास पहा.
आदमी—पु. १ मनुष्य; मानव; पुरुष (आदमचे वंशज). २ इसम; माणूस; व्यक्ति. [अर. आदम]
आदमुरें-मोरें—अदमुरें पहा.
आदमुसा—वि. (व.) मूर्च्छित; अर्धमेला. 'मारून मारून आदमुसा केला.' [सं. अर्ध+मूर्च्छा.]
आदर—पु. १ मान; श्रद्धा; पूज्यबुद्धि. 'गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती।' –केला २३. २ (हुंडी) स्वीकार; सत्कार; होकार. ३ सद्भाव; हौस; आवड. 'तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आदरांत।' –ऐपो १९८. ४ (सामा.) गौरव; सत्कार; स्वागत; आदरातिथ्य. [सं. आ+दृ; हिब्रू. अधरध] **–रातिथ्य**–न. पाहुणचार (भोजनासंबंधींचा); आदरसत्कार.

[आदर+आतिथ्य] ०**उपचार-मान-सत्कार**–पु. १ पाहुणचार; मानसन्मान; मानमरातब; संभावना; आसन, अभ्युत्थान, भोजन वगैरे देणें.

आदरण—न. (कों. गो.) बहुमान, सन्मान; आदर; श्रद्धा; पूज्यबुद्धि; अगत्य.

आदरणीय—वि. बहुमानास योग्य; मान देण्यास योग्य; माननीय; आदराहे.

आदरणें—क्रि. १ मान–सन्मान करणें; आदर ठेवणें. २ स्वीकारणें, घेणें; कबूल करणें; मान्य करणें. 'जयें प्रार्थितांचि आदरिलें।' –मोऐपि १.३०. ३ (एखादा धंदा–विषय) हातांत घेणें, पत्करणें. 'धरिला राज्य मनोरथ म्यां मूर्दे, न वनवास आदरिला।' –मोभीष्म ११.१. [सं. आ+दृ; तुल. हिब्रू. अधरथ]

आंदरणें—(गो.) पावसाचे ढग जमा होणें; अंधारणें [अंधार]

आदरदोदर—वि. (व.) अर्धवट कुटलेलें–चेचलेलें. 'हीं औषधें प्रथम खलवत्त्यांत जरा आदरदोदर करा नि मग त्यांचा अष्टमांश काढा उतरा.' [सं. अर्ध+दृ]

आदरून—क्रिवि. १ मनापासून; अंतःकरणपूर्वक. २ दृढ निश्चयानें; खडसून; खात्रीनें; साफ; चकचकीत. ३ मुद्दाम; जाणूनबुजून. [आदर]

आदरेखून—अ. (कों.) मुद्दाम; आदरून. 'बाबू केशव चंद्रसेन यांचीं नव्या धर्मावर व्याख्यानें हीं फार मननीय असत. तीं नेटिव्ह ओपिनियन आदरेखून प्रसिद्ध करी.' –वि. ना. मंडलीकचरित्र. १.२१४.

आदर्श—१ आरसा. 'अंधास आदर्श जसा दिसेना।' –सारुह २.१२. २ एखाद्या ग्रंथावरील टीका; भाष्य. ३ कित्ता; नमुना. [सं. आ+दृश्] ०**अंबारी**—स्त्री. आरशाची अंबारी. 'गजपृष्ठीं आदर्शअंबारी।' –ऐपो २६६.

आदला—अदला पहा.

आदवड—न. (कु.) चामडी रापविण्यासाठीं पाणी ठेवण्याचें कुंड. [अधोड]

आदवसाण—स्त्री. (गो.) आशा; फायदा; फल; परिणाम. [आदि+अवसान=आरंभ व शेवट]

आदवेचो-आदवो—वि. १ अदवेचा पहा. (चि. गो.) प्रथम, पहिल्यानें परिचय झालेला; प्रथम परिचयाचा. २ अपरिचित. [सं. आद्यवत्]

आदळ-आपट-उपट, आदळणें-आदळपण—अदळ पहा.

आदळ-ळु—पु.स्त्री. १ धक्का; हेलकावा; घाव. अदळ पहा. 'विषयाचे आदळ रोकडे। चुकवूनि धडपुडे। काढिती तीरा।' –एभा २.३१६. २ झोंबी; झुंज; टक्कर; हातघाई. 'मग दोंहीं दळां आदळु जाला ॥ तो कैसा सांगौं' –शिशु १०४१.

आदा—पु. सर्व अर्थी अदा पहा. आवक; उत्पन्न. 'दुसालां मिळोन खर्च भारी झाला, आदा नाहीं' –ख ४. १८३३. [अर. अदा] **म्ह**० आद्यापेक्षां खर्च मोठा, त्याचा होय सदां तोटा.

आदाँगाद—पु. (गो.) वकील. [पोर्तु. अदवोगादो; इं. ॲडव्होकेट]

आदान—न. १ कुयोग; अशुभ सूचक प्रसंग. २ (ल.) ज्यांतून निभावणें–जगणें कठिण असा आजार किंवा अपघात; पुनर्जन्म देणारें संकट. 'म्यां भोगिलीं आदानें। गर्भवासी अपार।' –मुरंशु ४३५. (क्रि० येणें; जाणें; चुकणें; टळणें; करणें; [सं. आ+धान]

आदान—न. घेणें; स्वीकारणें; बळेच घेणें–मिळविणें; अंगिकारणें. [सं. आ+दा]

आदापावती—स्त्री. (सावकारास) कांहीं रोख व कांहीं हवाल्यानें दिलेल्या रकमेची पावती. भरणा केलेली पावती. [आदा+पावती]

आदाब—स्त्री. अदब पहा. १ वंदन, मुजरा (क्रि० बजावणें). 'सर्वांनीं आदाब बजावली.' –ऐटि १।१२. २ भेटीचें जवाहीर, अलंकार, नजराणा. 'नवाबांनीं मोत्याच्या कंठ्या तीन व जिगा, कलगी वगैरे अकरा आदाब इनायत केले.' –रा ५.१९१. [अर. अदब्=नम्रता, मर्यादा राखणें] ०**बंदगी**–स्त्री. वंदन; अभिवादनपूर्वक विज्ञप्ति. 'आदाबबंदगी ऐसीजे' –ख ११.५९१८.

आदाम—पु. (स्त्रि.) १ सृष्ट्युत्पत्तीच्या आद्य कर्त्रेत प्रथम मानवास दिलेलें नांव. २ येशुख्रिस्त. 'त्यानें (देवानें) त्यास आदाम हें नांव दिलें.' –उत्प ६.२ [इं. ॲडॅम; हिब्रू. आदाम; अर. आदम]

आदाय—पु. नफा; फायदा; मिळकत. अदाई पहा. [सं. आदाय=स्वीकार; तुल. अर अदा]

आदारी—स्त्री. (माण.) भंडारा ठेवण्याची कातड्याची पिशवी. [सं. आधार]

आदाव—पु (गो.) १ हंशील, फायदा, आदा. आदाय पहा.

आदांव—पु (गो.) एक झाड. हें फक्त गोव्याकडेच होतें.

आदावत-ती-त्या-आदावळ—अमक्यें पहा.

आदांवत—पु. (गो.) आळस. [तुल० इं. आयडल=आळशी **-ती**–वि. आळशी.

आंदाळी-गुंडाळी—स्त्री.(गो.) फिरवाफिरव. [आंदोलन–आंदोळी+गुंडाळणें]

आदाळो-आदळो-दोळी-दोळो—स्त्री. (गो. कु.) विळी; किसणीसह विळी. अडला पहा.

आदि—स्त्री. १ आरंभ; उगम; मूळ; प्रारंभ; पहिला भाग. 'म्हणौनि नाहीं ऐसिया भवा। आदि कैची।' –ज्ञा १५. २३५. 'सारांश, शक ६०२ पर्यंत अर्वाचीन मराठी भाषेची आदि नेण्यास सबळ कारणें आहेत असें दिसतें.' –प्रभात पाटण शिलालेख. (राजवाडे)

२ उद्भव; उत्पत्ति; मूळ उत्पत्तिस्थान. ३ (ल.) खाण; झरा. [सं.] ४ मालेंतील पहिली संख्या किंवा वस्तु; (गणित) श्रेढींतील प्रथम पद. ५ वंश; चरित्र; कुळी; कुळकथा. –वि. १ पहिला; प्रथम, अगोदरचा; मूळचा; प्रमुख; अग्रणी. २ समासांत या शब्दाचा मूळ अर्थ कायम रहातो तरी तेथें ' इत्यादि ' असा विशेष अर्थ होतो जसें–इंद्रादि देव; रंभादि स्त्रिया, कामक्रोधलोभादि. ३ सामासिक शब्दांत या शब्दास क प्रत्यय लागतो जसें–अकारादिक वर्ण= अ पासूनचीं मूळाक्षरें; ब्राह्मणादिक जाती, आकाशादिक भूतें. सामाशब्द–आदिकाव्य; आदिदेव; आदिधर्म; आदिभाषा इ० –क्रिवि. अगोदर; आधीं. ' मी आदि उठेन मग तूं ऊठ. ' ०अंत–पु. आरंभ आणि शेवट; प्रारंभ आणि समाप्ति; अव्वल आणि अखेर; शेंडा आणि बुडखा.

आदिक—वि. १ अधिक; जास्त. ' ऐसें तें निज ठेवणें । कदापी पालटों नेणें । अथवा नव्हे आदिक उणें । बहुतां काळें । ' –दा १.९.९. [सं. अधिक] २ आदि (विशेषण अर्थ ३) पहा.

आदिकरून—क्रिवि. एका समुदायांतील कांहीं विवक्षित वस्तु प्रमुख धरून ती वस्तु प्रथम असें समजून ती व त्या बरोबर इतर, इत्यादि, वगैरे. ' ज्ञान झाल्यानंतर देहादिकरून सर्व पदार्थ तुच्छ वाटतात. ' [सं. आदि+करणें]

आदिकवि—पु. १ पहिला काव्यकर्ता; २ (ल.) श्रेष्ठ; आद्यकवि; ब्रह्मदेव; वाल्मीकि, व्यास यांना आदिकवि म्हणतात; यावरून एखाद्याची फार प्रशंसा करणें असतां त्यास म्हणतात. [सं.]

आदिकारण—न. निदान; आद्यबीज, पहिलें कारण, मुख्य कारण. [सं.]

आदिकारी—पु. (गो.) अधिकारी; कुलकर्णी. [सं. अधिकारी अप.]

आदिकुमारी—स्त्री. दुर्गादेवी. ' आदिकुमारी येउनि जाण । कृष्णासी तेल लावी आपण । बांधोनि हस्याचें कंकण । जीवें जीव म्हणतसे । ' –एरुस्व १५.७३. [सं.]

आदिगादी—स्त्री. मूळ सिंहासन, तख्त; राज्यसंस्थापकाची गादी किंवा तक्त; मूळ स्थान; पीठ. [सं. आदि+ म. गादी]

आदिग्रंथ—पु. शीख लोकांचा मुख्य धार्मिक ग्रंथ; यासच ग्रंथसाहेब म्हणतात. ग्रंथ या नांवानेंहि हा उल्लेखिला जातो. हा ग्रंथ वाचणारास ग्रंथी म्हणतात. याचे दोन मुख्य भाग आहेत. पहिल्यांत अर्जुन नांवाच्या पांचव्या गुरूनें पहिल्या चार गुरूंचें म्हणणें –आज्ञा–एकत्र केल्या आहेत. दुसरा दशम पादशाही (संक्षिप्तरूप दसमग्रंथ) दहावा पादशहा जो गुरुगोविंदसिंग याचा ग्रंथ. सर्व शीख लोक पहिल्यासच प्रमाणभूत मानतात, व कांहीं जहाल शीख दुसऱ्यास मानतात. याची भाषा हिंदी व लिपी गुरुमुखी आहे. [सं. आदि+ग्रंथ]

आदिघराणें—न. १ वंशाचें मूळचें कुटुंब, अगदीं पहिलें कुटुंब. २ संस्थापकाचें किंवा मूळ पुरुषाचें गृह किंवा कुटुंब. [सं. आदि+ गृह–घर]

आदिजीव—पु (प्राणि.) सर्वांत खालच्या कोटींतील एकपेशी मय प्राणी, हे सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्याशिवाय दिसत नाहींत; मूलरूप प्राणी. (इं.) प्रोटोझोआ. [सं. आदि+जीव]

आदित—क्रिवि. प्रथमतः; आरंभापासून; पहिल्यापासून; मूळापासून; उगमापासून. [सं. आदितः]

आदित—पु. (गो.) सूर्य. [सं. आदित्य अप] ०वार–पु. आदित्यवार; रविवार.

आदिताल—पु. (संगीत) संगीतांतील एक ताल किंवा मात्रा. [सं.]

आदित्य—पु १ सूर्य; रवि. ' वीरांच्या अभिमाना झाला अस्त । माध्यान्हीं आला आदित्य । ' –एरुस्व ७.६४. २ बारा आदित्य (देवता)–धातु, मित्र, अर्यमन्, रुद्र, वरुण, सूर्य, भग, विवस्वत्, पूषन्, सवितृ, त्वष्टृ, व विष्णु हीं बारा महिन्यांतील सूर्याचीं बारा रूपें आहेत. ३ अदितिपुत्र. (सामा.) देवता किंवा देव. ४ सूर्यकमळ. ' आदित्याचीं झाडें । सदा सन्मुख सूर्याकडे । ' –ज्ञा १८.८६५ [सं] ०वार–पु. रविवार. **–त्याची छत्री**–स्त्री. अळंबे; एक वनस्पति. **–त्याची तुळस**–स्त्री एक तुळशीसारखी वनस्पति.

आदिधन—न. (गणित) गणित किंवा भूमितीश्रेढींतील प्रथमपद किंवा आदिपद [सं.]

आदिना—पु शुक्रवार. [अर.]

आदिनाथ—पु. १ शंकर. ' देवांचें दैवत । तुज नमिलें आदिनाथें । ये वो कृपावंतें । भोगा माझ्या धावत । ' –तुगा २८६. २ नाथपंथाचा संस्थापक; मच्छेंद्रनाथाचा गुरु. ' नमस्कार माझा तया आदिनाथा । ' –नाथनामावली. [सं.]

आदिनारायण—पु. १ प्रथम किंवा आदिकारण; भगवान्; विष्णु; क्षीरसमुद्रांत शेषावर निजलेलें भगवत्स्वरूप. ' परब्रह्म असतां निश्चळ । तेथें संकल्प उठिला चंचळ । तयास बोलिजे केवळ । आदिनारायेण । ' –दा १३.३.३. [सं.]

आदिपद—आदिधन पहा. [सं.]

आदिपश्चात्—क्रिवि. १ जरा अलीकडे पलीकडे, पुढें मागें; आजूबाजूस. जवळपास; आगें मागें. २ लवकर किंवा उशीरां; कांहीं दिवस अगोदर किंवा कांहीं दिवस मागून. ' आदितवारींच आलें पाहिजे कीं आदिपश्चात् आलों तर येईल कामास ? ' ३ अस्ताव्यस्त; एकांत एक मिसळून. ४ उलटापालट; इकडचा तिकडे, तिकडचा इकडे; क्रमरहित. ' पोथीचीं पानें आदिपश्चात् लागलीं असतां नीट करा. ' [सं.]

आदिपीठ—(विरू.) मूळ पीठ; आद्यस्थान. [सं.]

आदिपुरुष—पु. परमेश्वर; शंकर; विष्णु. ' तें देखोनि आदिपुरुष । विस्मितु । ' –ज्ञा १.१५९. २ मूळ पुरुष; कुळांतील पहिला पुरुष. [सं.]

आदिपृथक्करण––न. (रसायन.) प्राणिज किंवा उद्‌भिज पदार्थांचे मुख्य घटक एकमेकांपासून वेगळे करणें. पृथक्करणाचे दोन प्रकार–आदि पृथक्करण व अंतिम पृथक्करण. (इं.) प्रॉक्सिमेट ॲनॅलेसिस्. –सेंपू १.४१० [सं.]

आदिबीज—न. मूळ उगम, कारण, तत्त्व; आदिकारण; परमेश्वर; प्रणव; ओंकार. ' तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज । ' –ज्ञा १.२०. [सं.]

आदिभूतिक—वि. (प्र.) आधिभौतिक; पंचमहाभूतांपासून होणारा (त्रास, दुःख, सुख इ०). ' येकताप आध्यात्मिक । दुजा तो आदिभूतिक । ' –दा ३.६.९. [सं. आधिभौतिक]

आदिम—वि. १ पहिला; मूळचा; अगोदरचा. २ (प्राणि.) शरीराच्या मध्येरेषेच्या जवळ असणारा. [सं.]

आदिमग—क्रिवि. १ आरंभीं किंवा मागाहून; लवकर अथवा उशीरां; आधीं किंवा नंतर. २ पुढचा मागें मागचा पुढें; उलट सुलट; आदिपश्चात्. [अशुद्ध प्रयोग. सं. आदि+म. मग]

आदिमध्यांतरहित—वि. ज्याला प्रारंभ, मध्य, शेवट या तीन अवस्था नाहींत असा (परमेश्वर). [आदि + मध्य + अंत + रहित]

आदिमसंघ—पु. (प्राणि.) अतिसूक्ष्म प्राण्यांचा संघ; गोडें व खारें पाणी, पाणथळ जमीन आणि ओला, कुजका पाला यांत मुख्यतः हे प्राणी उत्पन्न होतात. –ज्ञाको (आ) १२१. (इं.) प्रोटोझोआ. आदिजीव पहा. [सं.]

आदिमाया-माता-शक्ति—स्त्री. १ आदिप्रकृति; मूळमाया; जगदुत्पादक शक्ति; सर्व संसाराला, प्रपंचाला कारणभूत अशी देवता. २ आदिपुरुषाची स्त्री; पार्वती; शक्ति. ' तूंचि आदिमायेचा निजवर । ' –ह १.२ [सं.]

आदिमूर्ति—स्त्री. मूळ पुरुष; ईश्वर; नारायण. ' आदिमूर्ती निश्चिता । होते वटपत्रशयनीं । ' –गुच २.४०. २ श्रीकृष्ण. ' हेम सिंहासनीं आदिमूर्ती । बैसला असे सहज स्थिती । ' - एरुस्व ३.२१. [सं.]

आदिरस—पु. (शाप.) जीवनरस; जीवरस. (इं.) प्रोटोप्लासम. [सं.]

आदिल—पु. न्यायाधीश. [अर. आदिल=न्यायी, सचोटीचा]

आदिल, आदील—वि. पहिलें; मूळचें; प्रथमचें; अव्वलचें. ' जैसा दीपें दीपु लाविजे । तेथ आदील कोण हें नोळखिजे । ' –ज्ञा ९.४२८. [सं. आदि]

आदिवंत—वि. १ मूळचा; पहिला; आदिल. २ (ल.) मिरासदार. ' महासुखक्षेत्रीं । आदिवंत । ' –ज्ञा ६.४४९. [आदि+वत्]

आदिवदन—न. (गणित.) गणित किंवा भूमितिश्रेढींतील दोन टोकांच्या पदांपैकीं पहिलें पद. आदिधन पहा. –मोल [सं. आदि+वदन]

आदिवराह—पु. विष्णूचा वराह अवतार. [सं.]

आदिशून्य—न. १ आदिशक्ति; माया. ' भरे आदिशून्याचा गाभारा । नाणेयांसी । ' –ज्ञा ७.२४. २ आकाश. ३ आदिसृष्टिजल. [सं. आदि+शून्य]

आदिष्ट—वि. आज्ञा, हुकूम केलेला; सांगितलेला; आज्ञप्त; कथित. [सं.]

आदिष्टपदार्थ—पु. (रसायन.) एखाद्या वस्तूबद्दल दुसरी येणारी वस्तु; बदली पदार्थ. –सेंपू १.६३. (इं.) सब्‌स्टिट्यूशन प्रॉडक्ट.

आदिसंकल्प—पु. ब्रह्माच्या ठिकाणीं उत्पन्न होणारी ' एकोऽहं बहुस्याम् ' (मी एक आहे, अनेक असावें) ही मूळ इच्छा; पहिली इच्छा (माया). ' पै निर्विकल्पाचिये बरडीं । फुटे आदिसंकल्पाची विरूढी । ' –ज्ञा ८.२२. [सं. आदि+संकल्प]

आदिसिद्ध—वि. प्रारंभीं असलेलें; शाश्वत. [सं.]

आदिसिद्धांत—(न्याय.) अखेरचा सिध्दांत; मूळ सिध्दान्त.

आदिसोयरा—पु. (काव्य.) पहिला सोयरा, नातलग; ईश्वर. ' जो जगद्‌वंद्या आदिसोयरा । ' [सं. आदि+म. सोयरा]

आदीं—क्रिवि. आधीं; प्रथम; अगोदर. [सं. आदि]

आदीं—शअ. पूर्वी; पूर्वीचा; मागचा. ' उत्पत्ति आदीं प्रपंच नसे । अंतीं कांहीं उरला न दिसे । ' –एभा १९.८७. [सं. आदि]

आदी-कर-कारी—पु. अधिकारी; सुभेदार–शक १५६५ चा कल्याणचा ताम्रपट. (यावरून अधिकारी. अदकारी, आदीकारी हीं आडनांवें पडलीं आहेत). [सं. अधिकारी] **आदींचें बिदीं, आदीं बिदीं**–क्रिवि. १ सर्वांच्या आधीं; सर्वांच्या अगोदर, लवकर. ' उषां आदीं बिदीं निजून कोण उठतो पाहूं. ' २ पुष्कळ अगोदर; बराच वेळ पूर्वी. ' आदींबिदीं घर शाकारलें म्हणजे पाऊस केव्हां कां पडेना. ' [आदी द्वि.]

आंदु-वू—अंदु पहा.

आदुफ—न. (गो.) मोठी खिडकी.

आंदुर्ली-ल्ही—स्त्री. (कु. गो.) रांजणवाडी. आंजरली, आंजणी पहा. [सं. अन्ध]

आंदुळणी—स्त्री. (राजा.) रांजणवाडी.

आंदुळणें-आंदोळणें—उक्रि. (काव्य.) झोकें घेणें, देणें; हेलकावे खाणें; हलविणें; हलणें; कंप पावणें; खालीवर होणें (जहाज इ०). ' आंदोळला सत्यलोकु । ' –उषा १६८७. २ लहान मुलांस पाळण्यांत घालून हलविणें. [सं. आंदोलन]

आंदुळो—पु. (कों.) झोपाळा. [सं. आंदोलक; म. आंदोळा]

आदत—वि. १ आदर केलेला; मान दिलेला. २ स्वीकार केलेला; ग्रहण केलेला (नजराणा, बक्षीस इ०). [सं.]

आदें—वि. (गो.) अर्धे. [सं. अर्ध]

आदेखाई—अदेखाई पहा.

आदेय—वि. ग्राह्य; मान्य; संमत; स्वीकार करण्यास योग्य. [सं.]

आदेश—पु. १ उपदेश. २ आज्ञा; हुकूम; विधि; नियम. 'दास म्हणे आदेश तयाला।'—दावि २७४. ३ अतिदेश या अर्थी चुकीनें योजिला जातो. ४ कानफाटे, नाथपंथी (गोसावी) लोक परस्परांस नमस्कार करतांना उपयोगांत आणितात तो शब्द. 'अलक्ष आदेस जल्पतमे।'—नव ८.११०. ५ (व्या.) मूळ अक्षराबद्दल दुसरें योजिलें जाणारें अक्षर (प्रतिनिधि); बदली येणारा वर्ण. उ० इ+इ च्या स्थानीं ई आदेश होतो. ६ (शाप.) बदली वस्तु, पदार्थ; प्रतिनिधि. ७ (राजनीति) हुकूम; आज्ञा; बदली कारभार करण्याचा ठराव. (इं.) मॅन्डेट. 'वरील विचारास संलग्न असलेलें दुसरें एक तत्त्व म्हणजे आदेशाचें होय.'—वस्व ५५. ८ (भाषा.) समानार्थक अन्य शब्द; प्रतिनिधि. उ० दृश् (धात्वादेश) पश्य. [सं.] ०**प्रधान**—वि. (भाषा.) ज्यांत शब्दांचीं रूपें बदलतात अशा सप्रत्ययी (संस्कृत, लॅटिन वगैरे भाषा). (इं.) इन्फ्लेक्शनल. ०**प्रकरण**—न. भाषेंतील ध्वनींस होणाऱ्या विकृतींबद्दलचें विवेचन; ध्वनिशास्त्र. (इं.) फोनेटिक्स. —ज्ञानेश्वरी व्याकरण १.

आदेस—पु (गो.) अर्धा दिवस. [सं. अर्ध+दिवस]

आदो—न. (गो.) आर्द्रा नक्षत्र. [सं. आर्द्रा]

आदोगर—क्रिवि. (प्र.) अगोदर. [सं. आदो+अग्रे]

आदोड—वि. (गो.) अधाशी; हांवरा; अधोडी.

आदोंदी—(गो.) खांचर; खारवट शेताचा तुकडा.

आंदोरी—अंतुरी पहा.

आंदोल—पु झोंपाळा; पाळणा; [सं. आंदोलक]

आंदोलक—पु. घड्याळाचा लंबक, लोलक. [सं.]

आंदोलणें-ळणें—क्रि. हलणें; हेलकावे खाणें. आंदुळणें पहा. 'आंदोलत ब्रह्मांड पै।'

आंदोलन—न. १ झोंका; हेलकावा; खेप. [सं.] २ (हि.) राजकीय किंवा औद्योगिक चळवळ. (इं.) ॲजिटेशन —केसरी ११.१०.३०. ३ (संगीत) स्वर कांहीं वेळ वर खालीं करीत राहणें. ०**लेखक**—पु. विद्युत्प्रवाहाच्या शक्तींत होणारी कमी जास्त तीव्रता दाखविणारें यंत्र. (इं.) ऑसिलोग्राफ. ०**सिध्दांत**—पु. सूर्य किंवा दुसरा तेजस्वी पदार्थ याचा वायूवर (ईथरवर) व्यापार घडून लाटा उत्पन्न होतात व त्या डोळ्यांस लागून प्रकाशाचें ज्ञान होतें असें मत. [सं]

आंदोला, आंदोलिका—पु.स्त्री. १ झोंपाळा. २ पालखी. ३ पाळणा. [सं.]

आंदोळणें—आंदोलणें; आंदुळणें पहा. 'जळावरी कमळकळिका। जेवीं आंदोळे।'—ज्ञा ११.२४९. 'सप्तपातालें आंदोळतीं। शेषकूर्म दचकले चित्तीं।'—रावि ३३.१०२.

आंदोळविंदोळ—वि. हलणारा; लहरीनें युक्त. 'तेथ घट जो होय चंचळ। ते प्रतिबिंब होय आंदोळविंदोळ।'—एभा ११.१५०. 'आंदोलविंदोळ होये।'—कृमुरा ५९.४५. [आंदोळ द्वि.]

आंदोळी—स्त्री. (गो.) विळी. अडला पहा.

आंदोळी—स्त्री हेलकावा; झोंका. आंदोलन पहा. 'आसोडितां विचारा आंदोळी जाली।'—भाए ४३७.

आदौ—क्रिवि. प्रथमारंभीं; सुरवातीस; आरंभीं; पहिल्यानें; अगोदर; पूर्वी. [सं. आदि सप्तमि]

आंदौळणें—आंदोळणें; आंदुळणें पहा. 'कीं रावणाचेनि भुजांबळें। कैलासतेजु आंदौळलें।'—शिशु २३९. [सं. आंदोलन]

आदत्त—वि. अदत्त (अप.) न देणारा. 'स्वार्थी अभिलासी वोढाळ। आदत्त झोड आदखणा।'—दा २.३.२८. [सं. अ+दा]

आद्य—वि. १ पहिला; आरंभींचा; अगोदरील; उपक्रम, सुरवात करणारा (वेळ, स्थळ संबंधीं). २ मुख्य; प्रमुख; सर्वोत्कृष्ट. ३ आदि; प्रभृति. 'काशी यात्राद्य यात्रा यार्णे केल्या आहेत.'—पु. १ आदिपुरुष; परमेश्वर. 'ओं नमोजी आद्या।'—ज्ञा १.१. [सं.] ०**कवि-कारण-काल-काव्य-देव-धर्म-पुरुष-इ** या सामासिक शब्दापेक्षां आदिकवि—आदिकारण इ० शब्द अधिक प्रशस्त. ते पहावे ०**गोदान**—न. मुख्य अनुष्ठान करण्यापूर्वी प्रायश्चित्तांगभूत करावयाचें गाईचें दान. [सं. आद्य+गो+दान] ०**ग्रह**—पु. पहिल्याप्रथम एखाद्या विषयीं असणारी होणारी भावना, ग्रह, ठसा, पूर्वग्रह. ०**जंतु**—पु (प्राणि.) आदिजीव; (इं.) प्रोटोझोआ. ०**नाडी**—स्त्री. (ज्यो.) नाडी पहा. ०**पीठ-स्थान**—न. १ पूर्वजांची भूमि किंवा स्थळ. २ देवता जेथें प्रथम अवतीर्ण किंवा उपलब्ध झाली तें स्थान. ३ प्राचीन व पूज्य असें क्षेत्र, नगर, स्थळ [सं.] ०**वेद**—पु. ऋग्वेद. ०**वेदी**—वि. ऋग्वेदी शाखेचा. 'आद्यवेदी असे आपण।'—गुच १७.१७. ०**ज्ञान**—न. १ प्रथमचें, मूळ ज्ञान...शहाणपण. २ उपजत, अंगचें अथवा जातीचें शहाणपण; नैसर्गिक बुद्धि. ३ मूळ कल्पना. ४ नवीन शोध, शक्कल; प्राथमिक युक्ति, प्रयुक्ति. [सं.]

आद्यंक—पु. (गणित) त्रैराशिकांतील पहिलें पद. [सं.]

आद्यंत—पु. आरंभ आणि शेवट; संपूर्ण; समग्र. 'बोलिलीसे आद्यंतीं। परमात्मस्थिती निजबोधू।'—एभा १.१९७. उपजनिपज पहा. —क्रिवि. आरंभापासून शेवटपर्यंत; अवल अखेर; अथपासून इतिपर्यंत. [सं. आदि+अंत]

आद्या—पु. नफा; फायदा. अदा, आदा पहा. [सं. आ+दा]

आद्याचार—पु. पूर्वापार चालत आलेली रूढी, रीतिरिवाज, वहिवाट. [सं. आदि किंवा आद्य+आचार]

आद्याक्षरसंयोग—पु. संक्षिप्त नांवाचा शिक्का, आकृति; एकाक्षरी शिक्का. हें मूळ एकाक्षरी सहीचें चिन्ह असून सध्यां दोन किंवा अधिक अक्षरें एकमेकांत गुंतवून तयार केलेली आकृति असा याचा अर्थ होतो. हा साधारणतः अंगठीवर कोरतात. (इं.) मोनोग्रॅम.

आध—क्रिवि. खालीं. 'भारें धरा हे आध जाउं पाहे।' –दावि १२७. [सं. अधः]

आधडणें—क्रि. (व.) खूप जेवणें; अधाशीपणानें खाणें. [सं. अद्=खाणें]

आधडा—वि. मूर्ख; अडाणी 'नकरी तो अधडा दुराग्रही।' –दावि. २४९. [सं. अर्ध, प्रा. अद्ध+म. धड; अ+धड]

आधण—न. १ विस्तवावर तापविल्यामुळें कढत होऊन उकळूं लागलेलें पाणी; उकळण्यासाठीं विस्तवावर ठेवलेलें पाणी. 'जरि अमृत घालें आंधणा। कापुरु मेळउ इंधना।' –ऋ ५११. २ त्या-प्रकारची पाण्याची अवस्था; उकळी; कढ. (क्रि० येणें). ३ मूळ, काकवी, वगैरे करण्यासाठीं काहिलींत कढण्यासाठीं घातलेला उंसाचा रस. ४ (ल.) राज्य, एखादा कारभार, संसार इत्यादि व्यवस्थित चालविण्याविषयींची जबाबदारी किंवा भरंवसा (सामा.) ओझें; भार; जबाबदारी. (क्रि० ठेवणें). ५ अपमृत्यु; आधाण पहा. [सं. आदहन,प्रा. आदाण,तुल० गो. आधण] **जिवावरचें आधण उतरणें**–आलेलें मोठें संकट आपोआप नाहींसें होणें, टळणें. **०निवविणें**–मकरसंक्रांतीच्या दिवशीं सुवासिनी स्त्रीनें ब्राह्मणाच्या घरीं जाऊन त्याच्या चुलीवर ठेवलेल्या आधणांत (भाताच्या भांड्यांत) तांदुळांत सोन्यारुप्याचा तुकडा घालून ते वैरणें. **म्ह०** आधणांतले रडतात आणि सुपांतले हांसतात (सुपांतल्या तांदुळावरहि आधणांत पडून रडण्याचा प्रसंग येतो)=आज जे सुखांत आहेत त्यांना भावी दुःखाची कल्पना नसली तरी तें प्राप्त होतेंच, तें सृष्टिनियमाला अनुसरून आहे.

आधणणें—क्रि. आधण येणें; उकळी येणें. [आधण]

आधमण—अदमण पहा

आधमर्ण्य—अधमर्ण पहा.

आधरून—क्रिवि. हटकून; आदरून; पहा. 'मी दाणे वाळत घातले म्हणजे आधरून पाऊस येतो.'

आधल—न. (खा.) पितळेचें उभट भांडें. याचा उपयोग धार काढतांना करतात. हें बोगोण्यासारखें असतें. [सं. आ+धा=ठेवणें]

आधला—पु. (खा) एक पैसा. अधेला पहा. [सं. अर्ध]

आधला-ली-लें—वि. पूर्वीचा; पहिला. आदला पहा. 'आतां होतांति आधलें। कृष्णमूर्तीलागीं।' –ज्ञा ११.६०६. [सं.आदिल]

आधवड-आधवणी-आधव्याचा—अ मध्यें पहा.

आधळा—वि. (कों.) ज्यांतील पाणी आटलें नाहीं असा नारळ; कोंवळा नारळ. आडसर पहा. [सं अर्ध+आर्द्र; प्रा. अध्द+ओल्ह; म. अर्ध ओला]

आंधळा—अं मध्यें पहा.

आंधळी कोशिंबीर, आंधळें नक्षत्र-करण—अं मध्यें पहा.

आधा—वि. (काव्य.) अर्धा; निम्मा. 'हरें चंद्रमा आधा ऐसा। वाहिजत असे शिरसा।'–ज्ञा ९.४८६. 'आणि जो कुंभ असे आधा तिजा विभागें। त्यासीं डिगीमिगी उगीचि होऊं लागे।' –स्वादि १.१.१०१. [सं. अर्ध; प्रा. अद्ध]

आंधाटी–अंधाटी पहा.

आधाटी—स्त्री. आघाटीबद्दल चुकीनें उपयोग; एक वाद्य. आघाटी पहा. 'हातीं घेउनियां आधाटी।' –उषा १८१३.

आधा-धें—अधार्धें पहा. .

आधाडा—अधाडा पहा. 'जिये ब्रह्माचळाचा आधाडा।' –ज्ञा ७.६९; –दाव ३२१.

आधाण-न—न. अपमृत्यु; मोठें अरिष्ट; जिवावरचें दुखणें; मरण प्राप्त होण्यासारखें मोठें भयंकर संकट. आधण अर्थ ५ पहा. (क्रि०–येणें; जाणें; चुकणें; टळणें; वारणें; निवारणें) 'शेवटीं तित-क्याही आधानांतून पार पडून आपल्या कुटुंबांत सुरक्षित येऊन पोंहोंचला.' –बाळ २.२०४. [सं. आ+धान]

आधांतरी—अधांतरी पहा. 'आधांतरी होती वेडे। या नांव आदिभूतिक।' –दा ३.७.१५

आधातुर—वि. अर्धतृप्त; अर्धं भुकेला; अर्धपोटी. 'जेथ चैतन्यें आधातुरें। करूनि असिजे।' –ज्ञा ६.२८०. [सं. अर्ध+आतुर]

आधातुरी—स्त्री. आंथरूण; शय्या. आथरी पहा. 'विरहा-नलाचा भरी। आंबे पालवे यांची करौनि आधातुरी।' –शिशु २८३. [सं. अधः+आस्तरण; आध+आथरी.]

आधांतुरें—अ. अधांतरीं; अंतराळीं; निराधार. [अध किंवा अर्ध+अंतर]

आधाधिणें—क्रि. भिणें; भीति घेणें. 'मृत्यूनि आधाधिलें। तिहीं निरंजन सेविलें।' –ज्ञा १३.२३ [सं. आ+धा]

आधान—आधाण. आधण अर्थ ५ पहा.

आधान—न. १ स्थापना; प्रस्थापना; ठेवणें. २ अग्निहोत्र-प्रहणाचा संस्कार. अन्याधान ३ गर्भाधान या शब्दाचें संक्षिप्त रूप. [सं.]

आधान—आदान पहा.

आधायक—वि. ठेवणारा; स्थापन करणारा. [सं.]

आधार—पु. १ आश्रय; ठेंका; धीर; (अक्षरशः व लाक्षणिक) धारण करण्याची, सहनकरण्याची शक्ति; दिलेला आश्रय. 'सर्व जगतास पृथ्वीचा आधार आहे.' सामाशब्द–आधार-गत-चलन–च्युत–भूत–भ्रष्ट–स्थान–स्थित-इ० २ निर्वाहाच्या साधनाची मदत; आश्रय; आसरा 'जवळ पैसा नाहीं आणि कशाचे आधारागर लग्न आरंभावें.' ३ (ल.) फूस; मदत; कृपा; संमति; मान्यता; अधिकार; ४ प्रमाण; बळ. 'तुम्हीं वतन माझें म्हणतां याला आधार कशाचा म्हणाल तर भोगवटा.' ५ (योग.) षट्चक्रांपैकीं पहिलें; शिश्न व गुद यांच्या मधील मूलाधारचक्र; याचा रंग तांबडा व पाकळ्या चार असून त्या प्रत्येकीवर 'वं, शं, षं, सं,' हे वर्ण असतात. 'मग कुंडलिनियेचा ठेंभा । आधारीं केला उभा । –ज्ञा १२.५१०. –विउ १.४८. ६ (व्या.) सप्तमी विभक्तीचा अर्थ अधिकरण (आत, वर, कडे). **०लावणें**–आश्रय देणें; मदत करणें; पाठपुरावा घेणें. **–स लावणें**–(एखाद्या गोष्टीचा) शेवटपर्यंत छडा–तपास–शोध लावणें–करणें. **–स लागणें**–(एखाद्या गोष्टीच्या) मूळापर्यंत जाणें; थाऱ्यास लागणें. **–स पंथ**–पु. एखादी गोष्ट समजण्यासाठीं, सिद्ध करण्यामार्टी लागणारी कारणपरंपरा, साधन, लक्षण; विशेषतः नकारात्मक उपयोग. 'मला ओळखीचा वाटला म्हणून त्यास विचारीत होतों परंतु त्याणें आधारास पंथ लागूं दिला नाहीं.' (क्रि० लावणें; लागणें; दिसणें; असणें). **म्ह० १** 'आधाराला मधार' २ 'म्हातारा नवरा कुंकवाला आधार.' **०कमळ–चक्र**–न. (योग) आधार अर्थ ५ पहा. 'आधारचक्रीं सूक्ष्म प्राण.' –एभा १२. ३१२. [सं.] **०द्रुम**–पु. आधारचक्र. आधार अर्थ ५ पहा. ' चरणतळें देव्हडीं आधारद्रुमाच्या बुडीं.' –ज्ञा ६.१९३. **पत्र**–न. पत्रावळीस मधोमध लावलेलें लहानसें वेगळें पत्र; ताटाखालचें पान. २ पोथी–पुस्तकांत दोन्ही बाजूस लावलेला जाड कागद वगैरे पुष्टीपत्र. ३ प्रमाणपत्र; आधारवचन. **०बहाल**–न. ज्यावर छपराचा सर्व भार असतो तें. **०बिंदु**–पु. (शाप.) तरफ; टेकू (इं.) फलक्रम. **०मुद्रा**–स्त्री. योगशास्त्रांपैकीं दहा मुद्रांतील एक. शोधूनि आधारमुद्रा बरवी।' –ज्ञा ८.४९. [सं.] **०शक्ति**–१ (योग.) मूलाधारचक्र; आधार अर्थ ५ पहा. ' आधारशक्तीचिया अंकीं । ' –ज्ञा १२.५. २ अधिष्ठान; माया; ब्रह्म.

आंधार–कांडी–खण–खणी—अंधार पहा.

आंधारण—(गो.) अंधारणें पहा.

आंधारी–रात्र—अंधारी पहा.

आंधारें—(गो.) अंधेरी पहा.

आधावती—स्त्री. मूळ कारण. 'त्या संसाराची आधावती' –एभा २८.२०१. [सं. अधस्+वर्ती]

आधि—पु.स्त्री. मानसिक दुःख; भीति, शोक, चिंता इत्यादिकांपासून होणारें दुःख; काळजी. 'ते बुडाले द्वंद्व संधी । आधि व्याधि महाणेवी । ' –एभा २.२८९; –तुगा १५७०. ' तव सेनेंतील धरिति आधि रथी । ' –मोकर्ण १४.४९. –पु. गहाण; करार; वायदा. –स्त्री. १ (व्यापक.) पाठीमागें लागणारें लचांड, पीडा, उपाधि, कुलंगडें, खेकटें. २ (ल.) उत्कंठा. ' हा बोलु आइकत खेवीं. अर्जुना आधि न माये जीवीं ॥ ' –ज्ञा १७.३२६. [सं. आधि]

आधिकमास—अधिक महिना पहा.

आधिक्य—न. १ अधिकपणा; बहुलता. २ अतिरेक. [सं.]

आधिदैविक—वि. १ इंद्रियाधिष्ठित देवतांसंबंधीं; स्वर्गांतील देवांसंबंधीं; देवतोपदिष्ट; अधिदेवतेच्या कक्षेंतील, सामर्थ्यांतील. ' अधिदेवता ' पहा. २ दैवकृत; दैवी; परमेश्वरी प्रेरणेनें उत्पन्न झालेलें. **०ताप**–पु. देवांकडून शीत, उष्ण, अतिवृष्टि, अनावृष्टि, भूकंपादि होणारें दुःख. त्रिविधताप पहा. ' देवापासूनि तो आधिदैविक । मानस ताप तो अध्यात्मिक । ' –एभा २२.३०९. **–विवेचन**–न सर्व परमेश्वरकृत आहे असें स्पष्टीकरण. ' पांचभौतिक सूर्याच्या जड किंवा अचेतन गोळ्यांत तदधिष्ठात्री सूर्य या नांवाची एक देवता असून तीच जड सूर्याचे व्यवहार चालविते असें जेव्हां आपण मानितों तेव्हां त्यास आधिदैविक विवेचन म्हणतात. ' –गीर ६२. [सं.]

आधिपत्य—न. १ स्वामित्व; अधिकार; धनीपणा. २ प्रतिष्ठा; गौरव. ' पुरुष निर्गुण जरी असला तरी सासुरवाडीस गेला म्हणजे त्याचें आधिपत्य मांडतें ' –शास्त्रीको. [सं.]

आधिभौतिक—वि. १ आधिभूतासंबंधीं; प्राण्यांसंबंधीं. अधिदैव, अधिभूत पहा. २ आद्यतत्वासंबंधीं. ३ जड; स्थूल; पंचभूतात्मक; द्रव्यात्मक; प्राकृतिक. आध्यात्मिकच्या उलट. (इं.) मटीरियल, फिजिकल **०ताप**–पु.स्वशरीराहून भिन्न अशा चक्षुगोचर प्राण्यांपासून होणारें दु.ख. –एभा २२.३०९. त्रिविधताप पहा. **०विवेचन**–न. जड सृष्टींतील पदार्थ आपल्या इंद्रियांना ज्याप्रमाणें गोचर होतात त्याचप्रमाणें ते आहेत, त्यापलीकडे कांहीं नाहीं अशा दृष्टीनें त्याबद्दल विचार करणें. ... त्यास आधिभौतिक विवेचन म्हणतात. –गीर ६२. [सं.]

आधिला—वि. अर्धा [सं. अर्ध]

आधिला–ली—वि. पहिला; अगोदरचा–ची. ' आधिल्या व्रतारें काम नव्हे पुरा.' –तुगा ३०२. ' परपुरुषीं रतलें मन । आधिला व्रतार नावडे जाण ' –कथासारामृत ११.११०. [सं.आदिल]

आधिवेदनिक—न.नवऱ्यानें दुसरी बायको करतांना पहिल्या बायकोला तिची समजूत घालण्याकरतां दिलेलें स्त्रीधन. –घरचा कायदा. ६१. ' आधिविन्नस्त्रियै दद्यादाधिवेदनिकं समं । ' –याज्ञवल्क्यस्मृति २.१४८. [सं.]

आधिव्याधि—स्त्री. मानसिक व शारीरिक दुःख. [आधि+व्याधि]

आधीं—क्रिवि. अगोदर; पूर्वी; मूळांत. 'आधींच समुद्र पाहीं । तेथ दुवाडपण कवणा नाहीं ।' –ज्ञा १. ११७. **०विधीं–चेंव(वि)धीं**–आदींचे विदीं पहा. **म्हण** १ आधीं अननम् मग तननम्=जेवण झाल्यावर गाणें सुचतें. २ आधीं गुंतूं नये मग कूंथूं नये. ३ आधींच बहु बावळी अन् बीचमें खाई भंग. ४ आधींच उल्हास त्यांत आला फाल्गुनमास (आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला इ०) =स्वतःच्या हौसेंत दुसऱ्याच्या उत्तेजनाची भर पडणें. ५ आधीं जाते बुद्धि, मग जातें भांडवल किंवा लक्ष्मी=मनुष्याला वाईट दशा येण्यापूर्वी भलभलत्या गोष्टी करण्याकडे त्याची प्रवृत्ति होणें. ६ आधीं पोटोबा, मग विठोबा; आधीं स्वार्थ, मग परमार्थ. ७ (व.) आधी मला वाढा मग ओढीन कामाचा गाडा, आतां मी जेवलें हातीपायीं रेवलें=प्रथम जेवणास घाला मग काम करीन असें म्हणावयाचें व जेवल्यानंतर जेवण अंगावर आल्यामुळें निजावयाचें; एकूण केव्हांच काम व्हावयाचें नाही. कामचुकार, कामचुचर. ८ आधी होती पतिव्रता मग झाली मुसळदेवता=प्रथम गरीब मग भांडखोर.

आधी—स्त्री. मानसिक दुःख. आधि पहा. 'मनाचा छेदावया आधी । योग त्रिशुद्धी साधावा' –एभा २८.६१०.

आंधी—वि. (माळवी) बावळट. [सं. अंध; हिं. आंधी]

आधीन—वि. स्वाधीन; ताब्यांतील; नियंत्रित, अधीन पहा. 'देखे इंद्रियांआधीन होईजे।' –ज्ञा २.११९.

आधीनांमधीं, आधींमधीं, आधील, आधेली, आधोड, आधोडी, आधोरी, आधोली—अ मध्यें पहा.

आधुक—वि. अधाशी; खाखा करणारा. 'मुरक चहती कुणी भूक म्हणती द्विज आधुक तशा ब्राह्मणी।' –राला १०८. –ऐपो ३७० [सं. अद्=खाणें]

आधुत (शीर्ष)—न. (नृत्य) डोकें एकदांच किंचित वांकडें करणें व मग ऊंच करणें. गर्व, असंभाव्य गोष्ट घडून येणें वगैरे गोष्टींचा द्योतक अभिनय. [सं.]

आधुनिक—वि. १ अलीकडचें; नूतन; सांप्रतचा; आतांचा. २ (चुकीनें) नाशिवंत; न टिकणारा; अशाश्वत. [सं.]

आधेन—वि. स्वाधीन. अधीन पहा. 'सांडुन सर्वहि गोत। स्त्री आधेन जीवित।' –दा २.१.९.

आधेन—न. अध्ययन; अभ्यास. 'आधेन आणि अध्यापन। स्वयें करी दानपुण्य' –दा २ ७.१३. [सं अध्ययन]

आधेय—वि. १ ठेवलेला, स्थापिलेला; निहित. २ आश्रय दिलेलें; आश्रित. 'अभय मी आधारु। आधेय मी॥' –ज्ञा १८. ११९५. ३ आंत असलेला; भरलेला; व्यापलेला. ४ स्थापावयाचा; ठेवावयाचा. ५ गहाण, ठेव म्हणून ठेवावयाचा. [सं.]

आंधेर, आंधेरकांडी, आंधेरी—अ मध्यें पहा.

आधेला–लें—अधेला पहा.

आधोरण—पु. हत्तीचा महात. –विठ्ठलरुक्मिणी ४.४. (–शर.) [सं.]

आंध्य—न. १ अंधलेपणा. २ काळोख; अंधार. 'कां जगाचें आंध्य फेडितु।' –ज्ञा १६.२००. [सं.]

आध्या—अध्या पहा.

आध्यात्मिक—वि. १ अध्यात्मज्ञानविषयक; तत्त्वज्ञानासंबंधी. अध्यात्म पहा. २ ईश्वर, परब्रह्म, आत्मा यासंबंधी; पारमार्थिक; (इं.) स्पिरिच्युअल. 'जे सात्विकाचेनि वडपें। गेलें आध्यात्मिक खरपें।' –ज्ञा ६.४९०. ३ धार्मिक ४ मानसिक; बौद्धिक. **०ताप**–पु. देह, इंद्रियें व प्राण यांच्यापासून होणारें दुःख; स्थूल व सूक्ष्म शरीरामध्यें होणारें आधिव्याधिरूप दुःख. –एभा २२.३०९. **०मार्ग**–पु. आत्मा प्रधान मानून वासनेच्या शुद्धतेचा विचार केला म्हणजे तो नीतिनिर्णयाचा आध्यात्मिक मार्ग होय. –गीर ३७८. **०विवेचन**–न. मनुष्याच्या स्वरूपांत आत्मस्वरूपानें राहून त्याला सकळ सृष्टीचें ज्ञान करून देणारी अशी एकच इंद्रियातीत चिच्छक्ति या जगांत असून त्या शक्तीनेंच हें जग चाललें आहे असें जेव्हां मानितात तेव्हां त्यास आध्यात्मिक विवेचन हें नांव देतात. –गीर ६२. [सं.]

आंध्र—पु. तैलंगण देश; दक्षिण हिंदुस्थानांतील एक प्राचीन राष्ट्र; नेलोर, गंतूर, मच्छलीपट्टण, राजमहेंद्री, विजगापट्टण व गंजम इतक्या भागास आज आंध्र देश म्हणतात. [सं; ते. अंध्रमु] –पु. तैलंगण देशांतील लोक. **०भाषा**–स्त्री तेलगु भाषा. **०राज्य**–न आंध्र लोकांचें राज्य; हें इसवी सनाच्या पहिल्या शतकांत दक्षिणहिंदुस्थानांत होतें.

आध्वर्यव—न. अध्वर्यु नामक ऋत्विजानें करावयाचें श्रौतस्मार्तविषयक कर्म. [सं.]

आध्वाचा—क्रिवि. (व) १ आधुनिक; अलीकडचा. २ उपटसुंभ; उपऱ्या. अध्व्याचा पहा. 'आमचे वाडवडील येथें पुरातन काळापासून रहातात, पण हा मनुष्य मात्र आध्वाचा आला आहे.'

आन—अ. (अडाणी लोकांत) ऐन, अतिशय, सपाटून या अर्थी. उ० आन महागाई–उन्ह–पाऊस. इ० [ऐन] –उअ. आणि. अन, अन पहा. 'म्हणौनि आहे सात्विकांचा मेळावा केला आन गेलो. –ऋ ६० (टीप).–वि. दुसरें; निराळें; भिन्न; वेगळें. 'मग आन कांहीं आहे। पापावांचुनी।' –ज्ञा १.२४८. २ (ल.) विचित्र. 'नाभी वाळे आन करीन.' –उषा २८.१०. अन्, अन पहा. [सं. अन्य] **०आन**–क्रिवि. निरनिराळें. 'न करितां सद्गुरु भजन। नव्हे भववृक्षाचें छेदन। जरी कोटी कोटी साधन। आनआन केलिया।' –एभा १२.४७२. [सं. अन्य द्वि.]

आन—स्त्री. (प्रा.) शपथ. आण पहा.

आन—न. (भिक्षी) घर. ' आन को आलो. ' –भिक्षी भाषेंतील गोष्टी २५.

आनक—पु. १ नगारा. [सं.] ०**दुंदुभी**–पु. कृष्णपिता वसुदेव; याच्या जन्माच्या वेळेस स्वर्गांत दुंदुभी (नगारे) वाजल्या म्हणून [सं.]

आनखशिख—क्रिवि. पायाच्या बोटाच्या नखापासून शेंडीपर्यंत, सर्व शरीरभर; नखशिखांत. ' मी असें बोलतांच तो क्रोधानें आनखशिख लाल झाला ' [सं. आ+नख+शिखा]

आनंतर्य—न. १ अंतर नसणें; अखंडपणा; एकसंधीपणा; अत्रुटितपणा (जागेचा अथवा वेळेचा). २ सातत्य; सान्निध्य. [सं.]

आनंत्य—न शाश्वतपणा, अपरंपारपणा (कालाचा किंवा स्थलाचा) अनंतत्व पहा. [सं.]

आनंद—पु. १ हर्ष, सुख; संतोष, उल्हास, समाधान; उत्साह; आल्हाद. प्रमोद. पंचदर्शीत पुढील पांच प्रकारचे आनंद सांगितले आहेत–आत्मानंद; ब्रह्मानंद, विषयानंद, विद्यानंद; योगानंद. २ संन्यासी व गोसावी यांचा एक संप्रदाय ' हा (विठ्ठल) भीमातीर दिगंबर। आदिपुरुषपरात्पर। आनंद मांप्रदाय थोर। तेथूनिया वाढिला ' –ह ३६.१९.७. ३ साठ संवत्सरांतील ४८ वें संवत्सर. –न. ब्रह्म. ' स एको ब्रह्मण आनंद: ' –तैत्तिरीय उपनिषद २.८.३.६. [सं. आ+नन्द्=हर्ष पावणें.] –**दाची घडी**–स्त्री. आनंदाचा–सुखाचा काळ. (क्रि० येणें, उगवणें; उपस्थित होणें; निघणें; चालणें). [आनंद+घडी] –**दाचें युद्ध**–न. प्रेमकलह; मित्रकलह. ' वैरभाव नसतां किंचित। हें आनंदाचें युद्धहो।' [सं. आनंद+युद्ध] ०**कंद**–पु. (काव्य) आनंदाचा उगम, मूळ; गड्डा; झरा; परमेश्वर. ' आनंद कंद ऐसा। हा हिंदे देश माझा।' –टेकाडे आनंदगीत. ०**कोश**–पु. आत्म्याच्या आवरणाच्या पंच कोशांपैकीं शेवटचा कोश; अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे पांच कोश मानितात; सूक्ष्मतेन आणि चांगलेपणा ठेवून त्यांत आनंद मानण्याचा धर्म. या कोशाची देहाशीं (कारणदेह किंवा अविद्या यांशीं) सांगड आहे. ' चित्त जेव्हां वृत्तिशून्य। ध्येय ध्याता न दिसे अन्य। अनुभवा आलें शुद्ध चैतन्य। आनंद कोश ते समयीं। ' –निगमागमसार ८.२७. [सं.] ०**घन**–वि. १ (काव्य) पूर्ण व शुद्ध आनंदानें परिपूर्ण. [सं.] २ (ल.) ब्रह्म; परमेश्वर. ०**भैरव** (वटी)–पु. १ (वैद्यक) एक रसायन; बचनाग, मिऱ्ये, पिंपळी, टाकणखार यांची गोळी, व हिंगूळ यांचें समभाग चूर्ण करून केलेली वडी; ही अतिसार व मेह यावर एक गुंजभर दररोज देतात. –**योर** २.१७८. २ (संगीत) एक राग; या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. याची जाति संपूर्ण–संपूर्ण असून वादी षड्ज व संवादी मध्यम आहे. गानसमय प्रातःकाल. हा भैरवाचाच एक प्रकार आहे ०**मय**–वि. हर्षयुक्त; संतुष्ट, आनंदानें भरलेलें. ' आनंदमय सकळ ब्राह्मण। चिंतिती रामविजय कल्याण। ' ०**मयकोश**–पु. कारण शरीर; सत्त्वप्रधान ज्ञान. आनंद कोश पहा. ०**वन**–न. काशी क्षेत्र. ' दंडकारण्य वृंदावन। नैमिषारण्य आनंदवन। ' –एभा १८.१५५. ' कीं क्षेत्रांमाजी आनंदवन। ' –ह १.११०. ०**वनभुवन**—न. नाशिकपासून कोल्हापुरापर्यंतचा प्रदेश; महाराष्ट्र. ' वुडाला औरंग्या पापी म्लेच्छ संहार जाहला। मोडली, मांडिलीं क्षेत्रें आनंदवनभूवनीं। ' –राक. ०**वल्ली**–स्त्री. १ भांग. २ नाशिकच्या पश्चिमेस तीन मैलांवर एक गांव. येथे आनंदीबाई पेशवे रहात असत. –ख ८१५. ३ तैत्तिरीय शाखेच्या उपनिषदांपैकीं एक उपनिषद् ०**वृत्ति**–स्त्री. आनंदी स्वभाव. –वि. रंगेल; आनंदी. –**दाश्रु**–पु अति आनंदामुळें डोळ्यांतून येणारें पाणी. (क्रि० येणें; आणणें). ०**पिकणें**. अतिशय आनंद होणें. ' आनंद पांडुचा पिकला। ' –मोआदि २०.१. –**दानें टाळी पिटणें**–अतिशय आनंद पावणें. ०**ब्रह्मांडांत न मावणें**–आनंदानें बेहोष, बेभान होणें. –**दाचें भरतें येणें**–अतिशय आनंद होणें, आनंदानें ऊर दाटणें. ' आनंदाचें भरतें तेणें राजाला लोटलें ' –विक २७. –**दित**–वि. संतुष्ट; सुख पावलेला; हर्ष पावलेला.

आनंदणें—अक्रि. हर्ष पावणें; सुखी होणें; उल्हसित असणें. ' तैशा देखोनि संत मूर्ति। वाग्देवी आनंदति॥ '

आनंदन—न. आनंद; सुख; सुख–आनंद देणें; पावणें. –वि. आनंददायक; आल्हादकारक. ' वरी आनंदीनी श्रीकृष्णकथा। ' –दाव २७.

आनंदवणें—क्रि. आनंद देणें, सुख देणें; संतोषित करणें ' तूं सुखानें भावी युवराजांसह त्यांना आनंदविशील. ' –राणी चंद्रावती १६५.

आनंदी—वि. हर्षयुक्त; रंगेल; उल्हासी; हास्यमुख. ०**आनंद**–पु. पूर्णानंद; अतिशय आनंद; जिकडे तिकडे सर्वत्र आनंद होणें, असणें.

आनंदेशीं—क्रिवि. (काव्य) आनंदानें, सुखाने.

आनद्धवाद्य—न. कातड्यानें मढविलेलें वाद्य; याचे प्रकार —पखवाज, नाल, तवला, बाह्या, डफ, संबळ, चौघडा, ताशा, ढोल, मरफा, खंजिरी, डौर, कुडबुंडे, इत्यादि [सं. आनद्ध; आनक=नगारा]

आनन—न. १ तोंड; मुख. सामाशब्द–दशानन; षडानन; गजानन इ० ' वचन हें निघतां ऋषि आननीं। ' २ चेहरा. [सं.]

आनरसा—अनरसा पहा.

आनर्त—पु. द्वारका प्रांत. याची राजधानी आनंदपूर किंवा आनर्तपूर (हल्लींचें बडनगर) येथें होती.

आनवा—अनवा पहा. ' नवरत्नामधि चंद्र पाहिला तेजस्वी आनवा। ' –सला ५३. [सं. नव]

आनस—(कों.) भात. अन्न पहा. [अन्न]

आनसा—वि. (काव्य) दुसरा; निराळा; इतर. [सं. अन्य+सदृश]

आनाकानी—स्त्री. (हिं.) दुर्लक्ष; कानाडोळा; चालढकल; डोळेझांक; टंगळमंगळ; अळंटळं; टाळाटाळ; निष्काळजीपणा. (क्रि० करणें). ' यास जें काम सांगितलें त्याविषयीं हा आनाकानी करतो ' [सं. अ+आकर्णन=न ऐकणें]

आनागुना—(व.) आनाकानी पहा.

आनाद—पु. (कातकरी) आनंद पहा. ' राजाला मोठा आनाद वाटला. ' [आनंद अप.]

आनान—वि. वेगवेगळा; भिन्नभिन्न; अनान पहा. ' ए=हवीं दीपाप्रति काई आनान । प्रकाशु आहाती ॥ ' –ज्ञा ५. २७ [सं. अन्य+अन्य]

आनार, आनाचार, आनास्था—अ मध्यें पहा.

आनाह—पु. मूत्रावरोध; मलबद्धरोग. [सं.]

आनित्य-आनीत्य–.न अनीति (अप.) ' बहु आनित्य अविचार । या नांव बद्ध ' –दा ५.७.२८. [सं. अ+नीति]

आनी, आनीक, आनींग—वि. (गो.) आणीक; आणखी.

आनीत—वि.आणिलेलें; जाऊन आणलेलें. [सं. आ+नी=नेणें]

आनीन—अनीन पहा.

आनीबानी—अणीबाणी पहा.

आनींबे—पु. पानवेलीवरील एक रोग. –शेतकरी मासिक ७. २८३ नामजोशी कोश [?]

आनु—वि. १ आणखी; अन्य. ' आनु वेंचें भरलीं ' –वसा ३६. २ दुसरा; भिन्न. ' तें वाचौनि श्रोत्रें । आनु सेवीतिना. –ऋ २५. [सं. अन्य]

आनु—वि. थोडें; अल्प; किंचित. ' येक म्हणती येकचि खरे । आनुहि नाहीं दुसरें । ' –दा ८.२.४२. [सं. अणु]

आनुकूल्य—न. १ अनुकूलता; युक्तता. २ (ल.) कृपा, बहाली. सामाशब्द–प्रहानुकूल्य; देशानुकूल्य; कालानुकूल्य; लोकानुकूल्य इ० [सं.]

आनुपूर्वी, आनुपूर्व्य—स्त्रीन. १ (एका पुढें एक असा) क्रम; शिस्त; टापटीप; पद्धत; व्यवस्था. २ संगति, एकवाक्यता यावरून एखाद्या ग्रंथावरील टीका, टीप, भाष्य. [सं. अनु+पूर्व]

आनुभविक—वि. अनुभवास आलेलें. अनुभविक पहा. ' हें औषध माझें आनुभविक आहे म्हणून तुम्हाला घ्यावयाला सांगतों. '

आनुमानिक—वि. तर्क केलेलें; अंदाजिक; कार्यकारणसंबंध लक्षांत घेऊन अटकळ केलेलें. [सं. अनु+मा=मोजणें.]

आनुल्ली—स्त्री. (गो.) रांजणवाडी–आंजरली. [सं. अंध]

आनुल्लें—न. (गो.) चौघांनीं वाहून नेण्याजोगें, मेण्यासारखें परंतु वरील भाग उघडा असलेलें, गोमांतकप्रांतीं रूढ असलेलें एक वाहन; माचील; मंचील.

आनुवंशिक—वि. १ वंशपरंपरागत चालत आलेला; बापापासून मुलास, त्याच्या मुलास, असे आलेले (गुण, दोष). पिढीजाद; वारशानें मिळालेला; वडिलोपार्जित (धन, वतन, इ०) [सं. अनु+वंश]

आनुवंशिकता—स्त्री. १ वंशपरंपरागत प्राप्त अशी स्थिति; पिढीजादपणा. (इं) हेरेडिटी. २ प्राणिज व उद्भिज या कोटींतील व्यक्तीमध्यें आपापल्या मातापितरांच्या ठायीं वसत असलेले गुणदोष प्रायः उतरतात. त्यावरून जीं ढोबळ अनुमानें काढतां येतात तीं ज्या शास्त्रांत समाविष्ट केलीं आहेत असें शास्त्र.

आनुषंगिक—वि. १ बरोबर असणारें; सहस्थित; अनुषंगानें बरोबर येणारें ' आपणांस त्यांचे प्रधान व गौण अथवा आनुषंगिक असे दोन भाग पाडतां येतात. ' –वस्व २९. २ कार्यकारण संबंधी; तत्संबंधी; तन्निमित्त; अनुसारी; परिणामक ३ योग्य प्रमाणाचा; सदृश; तुल्य; बेताचा. [सं.]

आनृण्य–.न. कर्ज, ऋणें नसणें. [सं. अ+ऋण]

आने—वि. अन्य. आन पहा. ' हा वेव्हार कृपासिंधु । आनें तुटेना । ' –ऋ ४३. ०**आन**–क्रिवि १ दुसरें; अन्य; निराळें. भलतेंच. ' तरि तियेसी प्राणी न भजोन । मध्येंचि करिती आनेआन । ' –स्वादि ७.२.५१. ' तंव मनें केलें आनेआन । ' –एभा २९.५१. [सं. अन्य+अन्य] २ परस्पर. [सं. अन्योन्य]

आनेगा—अनेगा, आणेगा पहा.

आनोज—पु. अंकुर. –मनको.

आनोविन—वि. बाटेल तसें; अशास्त्र रीतीनें. अन्योविन्य पहा. ' बसतां एकत्र आनोविन । होईल जघन्य निमीयें । ' –निगा २८५.

आनौति—क्रिवि. १ दुसरीकडे; अन्य ठिकाणीं. ' सौंदर्या आनौती वासु । पाहों नेदी । ' –ऋ ८९. ' तयां मी वांचूनि धांव । आनौति नाहीं । ' –ज्ञा १२.७९. [सं. अन्यत्र] –वि. २ दुसरी; अन्य. ' गुरुवांचोनि निरंतरीं । चिंता न करी आनौती । ' –एभा १०.१३५. [सं. अन्यत्]

आन्वीक्षिकी—स्त्री. १ राजनीति–शास्त्राच्या (आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीति) चार प्रकारांपैकीं पहिला प्रकार. विचार करून, अनुमति घेऊन केलेला बेत किंवा काढलेली युक्ति; तर्कशास्त्र; आन्वीक्षिकींत न्यायशास्त्राचाहि समावेश होतो. त्रयी वार्ता व दंडनीति हे शब्द पहा. ' आत्मानात्मविवेक केवळ । ते आन्विक्षिकी विद्या कुशळ ' –एभा १६.२०५. २ अध्यात्मविद्या; आत्मानात्मविचार. ' करितां त्वंपदार्चे शोधन । होय तत्पदीं समाधान । हे आन्वीक्षिकी विद्या जाण । विवेकसंपन्न पावती । ' –एभा २०.२८५. [सं. अनु+ईक्ष्=पाहणें]

आन्हिक—न. स्नानसंध्यादि रोजचे धर्मकृत्य; नित्यकृत्य. (प्र.) आह्निक पहा. 'तों संपादुनि आन्हिक, पूजुनि परमेश्वरा भवा वरदा' –मोकर्ण १९.७. [सं. अहन्=दिवस]

आप—न. उदक; पाणी; जल; नीर; अंबु; वन. [सं. अप्; ग्री. अपॉस; झेंद अप्; फा. आब्.]

आप—सना. १ आपण स्वतः. २ (ल.) आपला; स्वकीय; स्वजातीय. 'नमि, ज्याचे रिपु वसले ज्यासह होऊनि आप, गात नय.' –मोअनु ८.३४. [सं. आत्मन्; हिं. आप] **म्ह०** १ आप सुखी जग सुखी=आपण सुखी असतां सर्व सुखी आहेत अशी भावना. २ आप मेलें, जग बुडालें=आपल्या मागें कांहीं कां होईना या अर्थी. –वि. आपलें; आपलें स्वतःचें. सामाशब्द–आपहस्तें; आपमुखें; आपखुषीनें. 'आपकार्याहून जीवीं । पर कार्यसिद्धि करावी.' –दा २.७ **६५**. –न आपण; स्वतः; अहं; सामाशब्द–आपगर्जी; आपढंग; आपमतलबी **०आंगें**–क्रिवि. स्वतः; स्वांगें. 'तिथें चालत जाईन आपआंगे स्वतां' –होला १४९. **०अपर**–आपपर पहा. **०आप, आपजात**–क्रिवि. आपण होऊन; आपखुशीनें; आपोआप; आपल्याआपण. **०आपणिया**–वि. आपण आपल्याला. 'आप आपणिया देखणें. सबाह्याभ्यंतर समदृष्टि.' –एरुस्व १.५९. **०भापला**–वि. प्रत्येकाचा; स्वतःचा; ज्याचा त्याचा. 'सर्वांस आपआपला स्वभाव चांगला वाटतो.'

आप–पु (गो.) आम्र. 'तो आप लागता'=तो आम्र लागतो.

आप—वि. स्वाधीन; स्वायत्त; आपल्या ताब्यांतील. 'एथ पृथ्वीतळ आपु होईल। हें महेंद्रपदही पाविजेल। परिमोह हा न फिटेल। मानसींचा।'–ज्ञा २.६५. [सं. आप्=मिळणें; आप्त=मिळालेलें]

आपई—स्त्री. १ आपलेपणा; आपलेपणाचें द्योतक कृत्य; परस्थळीं असलेल्या मित्रास फळें, वस्त्रें इत्यादिकांची पाठविलेली भेट; देणगी; नजराणा. २ (प्रा.) ठेव. [सं. आत्मन्]

आपकरा-कुरा-खरा—अपकरा पहा.

आपका—अपका पहा.

आपखुदी—स्त्री. १ आपण स्वतः, खुद्. २ स्वसामर्थ्य. 'तो खावंद त्या पाणियांतील आपखुदीनें होऊन' –चित्रगुप्त ८३. [हि. आप+फा. खुद=स्वतः]

आपखुशी-षी—स्त्री. आपली मर्जी; स्वतःची मर्जी; इच्छा; स्वेच्छा. 'तूं आपखुषीनें माझी वस्तु मला देऊन टाक' –के १२.७.३०. [हिं. आप+फा. खुशी] (विरू.) **आपखुषींनें**–क्रिवि. (कायदा) स्वतःच्या मर्जीनुरूप; आपण होऊन. (इं.) व्हॉलंटरीली.

आपगंड—वि. (राजा.) हट्टी; स्वच्छंदी; मनस्वी; स्वेच्छाचारी. [आप+का. गंड=मोठा]

आपंगणें—अक्रि. अपंगणें पहा. १ आश्रय देणें, प्रेमानें वाढविणें, संभाळणें, पोसणें, बाळगणें; आपलासें म्हणणें. 'जे जे शरण आले। ते ते आपंगिले। पेवाडे विठ्ठले। ऐसे तुझे।' –तुगा १६३६. 'आपंगिलें मज श्रीराम समर्थे।' –दावि ३६२. 'याचे आईबाप हा लहान असतानांच मेले तेव्हां आम्ही याला आजपर्यंत आपंगले.' २ स्वीकारणें; अंगीकारणें; आश्रय करणें. 'मग येथ अथवा स्वर्गी । जेथ जे देह आपंगी।' –ज्ञा १५.३६८. [आप+अंग]

आपगरजी, आपगर्जी—वि. स्वार्थी, अप्पलपोट्या; मतलबी. 'प्राणार्शी प्राण देणार नव्हे आपगर्जी राव जी जी' –होला १७५. [आप+गरज]

आपगा—स्त्री. नदी. 'मला निरखितां भवच्चरणकन्यका आपगा।' –केका १०. [सं. अप्=पाणी+गम्=जाणें]

आपंगिता—वि. आश्रयदाता; पोशिंदा; अपंगिता पहा. 'ज्यासि आपंगिता नाहीं।त्यासि धरी जो हृदयीं।' –तुगा२२१५

आपघर—न १ आपलें घर. २ नवऱ्याचें घर; सासर. 'मग आपघर त्यागूनि बापघरीं केली वस्ती।' –सप्र ११.४९. **म्ह०** आपघर किंवा बापघर=विवाहित स्त्रीला एक नवऱ्याचें कीं एक बापाचें घर राहण्यास योग्य. [आप+घर]

आपजणें—अक्रि उपजणें; उत्पन्न होणें; घडणें; घडून येणें. 'पंचभूतांचें धान्य निपजे । तयाचा अन्नरस आपजे।' –विपू ६.१०. 'कां भूमि कुंभ ठेविजे । तैं सकुंभता आपजे।' –अमृ ४.४२. २ भासणें; वाटणें. 'जैसे स्वप्नामाजीं देखिजे। तें स्वप्नींचि साच आपजे।' –ज्ञा २.१३९. [आप+जन्=उत्पन्न होणें]

आपजविणें—सक्रि. उत्पन्न करणें. [आपजणें प्रयोजक;]

आपटणें, आपटा, आपटी—अ मध्यें पहा.

आपठौळ—वि. १ चहाटळ; गुंड. २ बेपर्वा; स्वच्छंदी; अपगंड; अठवर; नाठाळ; आज्ञा मोडणारा. 'कीं आपठौळ आज्ञापालनीं। मीं स्थीर नव्हे।' –रू ५०. [?]

आपड, आपाड—स्त्री. (राजा. कुण.) शिवाशीव. [सं. आ+पत्]

आपडणें—अक्रि. शिवणें; स्पर्श करणें.

आपडी, आपडाआपड—स्त्री. (गो.) शिवाशीव.

आपडीशी—स्त्री. (कु.) विटाळशी; रजस्वला [आपड]

आपढंग—पु. (हिं.) स्वेच्छाचार; जाणूनबुजून केलेल्या खोड्या; बेडेचार; चाळे. [सं. आत्मन्+म ढंग; हिं. आबेढंग] **०गी**–वि. ढंगी; उनाड; स्वच्छंदी दुर्वर्तनी.

आपण—सना. १ स्वतः ; हें सर्वनाम मीं, तूं,तो,आम्ही, तुम्हीं, ते किंवा मी स्वतः, तूं स्वतः, तो स्वतः, आम्ही स्वतः, तुम्हीं स्वतः यावद्दलहि योजितात. जसें–म्या त्याला जेऊं घातलें मग आपण (मी) जेवावयास बसलों; तूं मला खटपटीस लावून आपण (तूं) स्वस्थ बसलास; त्यानें चोरी करावी आणि आपण (त्यानें स्वतः) चोर चोर म्हणून हाका मारीत सुटावें. याप्रमाणेंच अनेक वचनीं रूपें– आपण (तुम्हीं) येत असाल तर मी येईन इ०. २ दरबारी भाषेंत बोलणारे राजे, सरदार, मोठे लोक, संपादक वगैरे प्रथमपुरुषीं एकवचनी बहुमानार्थानें स्वतः या अर्थीं व सत्कार पूर्वक भाषणांत तूं या अर्थी आपण हा शब्द वापरतात. परस्पर संभाषणांत द्वितीयपुरुषी एकवचनी व बहुमानार्थानें वापरतात. व संभाषणांत ज्यार्शी संभाषण चाललें असेल त्याशिवाय अन्य म्हणजे तृतीय पुरुषासंबंधीं बोलतांनां एकवचनांत आपण शब्द योजतात [सं. आत्मन्; प्रा. अप्पणा–णे; पं. गु. आपण; सि. पाण.] ३ (विशेषेंकरून) मी, मी स्वतः, आम्ही किंवा आम्ही स्वतः यांच्या विषयीं आपण हा शब्द वापरतात. जसें–त्यापाशीं मागितलें असतां तो आपणास देईल. ४ (प्रथमपुरुषीं अ.व) एका स्थानीं असलेले सर्व लोक (बोलणारा धरून) किंवा त्यांना उद्देशून. 'सभ्य गृहस्थहो, आज आपण याठिकाणीं कां जमलों आहोंत हें सांगण्याचें कारण नाहीं.' **म्ह०** आपणावरून जग ओळखावें= आपल्यास जसें होतें तसें दुसऱ्यासहि होत असेल असें समजावें. **आपणावर आणणें-वर्तविणें**–केलेल्या कृत्यांचें यश किंवा श्रेय आपल्यावर घेणें. 'सांगतो हळुहळूच अचाटें । आपणावरि वर्तवितो । ' **आपणास म्हणविणें**–आपण मोठ्या योग्यतेचे, मोठे हुषार निष्णात असें मिरविणें; प्रौढी सांगणें. **आपण होऊन**–आपखुशीनें; आत्मसंतोषानें; स्वतःच्या प्रेरणेनें. 'मी आपण होऊन तुला हें बक्षीस देणार होतों.' आपण या शब्दाला **पयां, पां, पें, पेयां**–हे प्रत्यय स्वत. ; स्वत.स; आपल्या स्वत.ला; आपणास या अर्थी लागतात (विशेषत. काव्यांतून). 'तिआ न सांभाळिती । आपणपआं ते । '–दाव ३१९. ' चक्षुरूप राहिले आपणपां । ' –विपू ४.२५. ' जेया आपणपें सांडूनि कहीं । इंद्रियग्रामुवेरि येगें नाहीं । '–राज्ञा ५.१०४. ' अहंकारु अहंत्वेसि मुरे । आपणपेची । ' –ऋ ६३. ' तेही विसरले आपणपें । '–उषा १८१५. [आपण+पें]

आपण—पु. बाजार किंवा दुकान. 'क्षेत्र म्हणिजे शेत गहन । हाट उत्पन्न द्रव्य आपण । ' –एभा २७.३७९. [सं. आपण; आ+पण=नाणें (८० कवडयांचें); पण् =विकत देणें–घेणें]

आपणया, आपणिया—सना आपणाला; स्वतःस; आपण पां–पें. ' आत्मा बोले भेटला । आपणया ' –अमृ ६.८. ' ऐसें आपणया आपण बुझे । ' –विपू ६.१०९. –एरुस्व १ ८३. ' ते आपणिया करी निःशेख । ' –परमा ६.१४.

आपणुन—क्रिवि. आपण होऊन. ' आपणांत आपणुन करी रीघ । ' –दावि २९७.

आपणें—क्रि. १ पावणें. २ प्राप्त होणें. [सं. आप्=मिळणें]

आपत्—स्त्री. आपदा; दुर्दैव; संकट; पीडा; विपत्ति. आपत्ति पहा. [सं. आपत्ति] **०काळ**–पु. प्रतिकूल, अनिष्ट, हलाखीचे, वाईट दिवस. **०पुरवणी**–स्त्री. वादविवादांत जी एखादी गोष्ट घसरली किंवा बिघडली तिची कशी तरी संपादणी करणें; चुकींचें समर्थन करणें.

आपत—वि. नातलग; संबंधी; लग्याबांध्याचें. [सं. आप्त अप.] **आपत आणि घातक**–आपल्या आप्तेष्टांचा–नातलगांचा घात करणारा दुष्ट मनुष्य; माणुसकी नसलेला. **०विषयी**–पु. नातलग; संबंधी; ऋणानुबंधी. [सं. आप्त+विषय]

आपतंत्री—वि. स्वैर; स्वतंत्र. [आप+तंत्र]

आपती—स्त्री. आपत्ति; संकट; आपत्ति (अप) पहा. ' त्वरित बहुत घाई होतसे आपतीची । ' –सारुह ३.६०. [आपत्ति]

आपत्ति—स्त्री. १ (दारिद्र्यामुळें, आजारीपणामुळें, दुर्दैवामुळें आलेलें) संकट; अडचण; हाल; दुर्दशा. (अप.) आपत्; आपत्य. २ (समासांत) प्राप्ति; मिळणें; प्राप्त होणें. उ० सुखापत्ति; इष्टापत्ति; दुःखापत्ति; अनिष्टापत्ति. [सं. आ+पद्=येणें] **०काल**–आपत्काळ पहा.

आपदणें—क्रि. कष्टणें; क्षिणणें. ' नेणतां कोणी येक ते । आपदों लागती । ' –दा १८.५.१९. [सं. आ+पद्]

आपदा—स्त्री. संकट; अरिष्ट, आपत्ति. ' आपदा गिधीं चुविजत । उधवला ठायीं । ' –ज्ञा ७.८७. २ दुःख; क्लेश, खाण्यापिंचून किंवा दुखण्यामुळें होणारे हाल; कष्टावस्था; दुर्दशा. ' उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलाची सदा दया चित्तीं । ' –तुगा १९०३. [सं.]

आपदावर्णे—अक्रि. (प्रा.) अडचणींत, दुःखांत, संकटांत सांपडणें; कुचंबत राहणें [सं. आपदा]

आपद्दृष्टि—वि. स्वार्थी; मतलबी; आपल्यापुरतें बघणारा; अप्पलपोटया. [आप+दृष्टि]

आपदेश—पु.(काव्य) स्वदेश; आपला प्रदेश, प्रांत. [आप+देश]

आपद्धर्म—पु. वर्णाश्रमधर्मविहित कृत्य करण्याला कालाच्या प्रतिकूलतेमुळें जो असमर्थ त्यासाठीं सांगितलेला गौण मार्ग अथवा कृत्य; निरुपायास्तव करावयाची गोष्ट. उ० आगगाडींत ओंवळयानें खाणें. [सं. आ+पद्+धर्म]

आपधाक, आपधाकणें—अ मध्यें पहा. ' आपधाकें विघ्नें पळतीं जाण । ' –एभा ४.२०६. ' तो इतका घाबरला कीं आपधाकेंच मटकन बसला. ' [आप+धाक=भीति]

आपनेयां—सना. आपणांस. आपणया पहा. 'पैल भावरमगी। आपनेयां तें भणवी शिहाणी।'–शिशु ६८६. [आपण+या प्रत्यय]

आपन्न—वि. १ विपत्तिदशा पावलेला; आपत्तीनें घेरलेला; हाल–अपेष्टेंत पडलेला; कष्टी. २ मिळविलेला; कमावलेला; संपादन केलेला; प्राप्त; व्याप्त. सामाशब्द–खेदापन्न; शोकापन्न; हर्षापन्न; स्थानापन्न. [सं. आ+पद्]

आपपर—वि. १ आपला आणि दुसऱ्याचा; आपलें व परकें; द्वैत. 'जेथ आपपर ऐसा। भागु नाहीं।'–ज्ञा ९.४०७. **०भाव–बुद्धि–भेद–मत–वृत्ति–विचार–दृष्टि**–आपल्या आणि दुसऱ्याच्या वस्तूमध्यें भेद राखणें; आपले इष्टमित्र, नातलग व इतर जनता यांमध्यें भेद पाहणें. २ द्वैतभाव; दुजाभाव (क्रि० पाहणें). [सं. आत्मन्–आप+पर=दुसरा]

आपपरकी, आपपरकीय—वि. आपला आणि दुसऱ्याचा; स्वतःचा व परक्याचा; आपपर. **०भाव–भेद**–आपपर पहा.

आपबळ—क्रिवि. आपोआप; आपण होऊन. अपबळ पहा.

आपमतलबी—वि. स्वार्थी; अप्पलपोट्या; स्वतःपुरतें पाहणारा. 'ज्याला मोठेपणा हवा असेल त्यानें आपमतलबी लोकांच्या कोल्हेकुईकडे लक्ष पुरविलें पाहिजे.'–टि २.५४. [आप+मतलब]

आपमती—वि. आपल्या बुद्धीनें चालणारा. 'पुसौ जावें ऋषी-प्रती। तंव ते सदां आपमती। आपुलें मत प्रतिष्ठिती। अन्यथा देती शापातें॥'–एभा ७.१८०. –क्रिवि. आपल्या बुद्धीनें. 'आपमतीं भजतां राया।'–एभा ३. ८०७; [आप+मत]

आपमरण—न. आपोआप येणारें मरण; आपमोती [आप=आपोआप+मरण]

आपमुखतार–त्यार—वि स्वतंत्र, स्वैर; अनियंत्रित –पु. धनी. [आप+मुखत्यार]

आपमुखत्यारी—स्त्री. स्वतंत्रता; अनियंत्रितपणा; धनीपणा; मालकी.

आपमृत्यु—पु. अपमृत्यु पहा. 'संसारकोडे आपमृत्य। या नांव आध्यात्मिक।'–दा ३.६.४७.

आपमोती–मौती—स्त्री. अपघात न होतां यथाकाल आलेलें मरण; आपोआप, वृद्धपणामुळें आलेलें मरण. आपमरण पहा. (क्रि० मरणें.) [आप+हिं मौत. सं. मृत्यु]

आपयणें—अक्रि. (गो.) बोलावणें. [सं. आ+अपायनं=जाणें याच्या उलट]

आपरंग—क्रिवि. (ना.) आपण होऊन; आपोआप. [आप+रंग]

आपरस—पु. फळांचा अथवा पानांचा (आंत पाणी न मिसळतां काढलेला) आंगचा रस. उ० ओल्या खोबऱ्याचें, पाणी न घालतां काढलेलें दूध; नारळाचा रस. (गो.) आप्रोस. [आप+रस]

आपरापिपरी—स्त्री. (व्यायाम) एक प्रकारचा खेळ. –संव्या ५.१.

आपरूप—अपरूप पहा.

आपरूपी—वि. ज्याचा चेहरा, तोंडावळा बापासारखा किंवा आईसारखाहि नाहीं, निराळ्या प्रकारचा आहे असें (मूल). [आप+रूपी]

ऑपरेशन—न. शरीरावरील शस्त्रक्रिया; चीरफाड. उ० डोळ्यांचें–कानांचें–पोटाचें वगैरे ऑपरेशन. [इं.]

आपलकी, आपलीक, आपलपणा, आपलेपणा—स्त्रीपु. १ मालकी; आप्तसंबंध; सोयरगत, स्नेह किंवा मालकी इ० कांनीं आलेला आपलेपणा; आपलेपणामुळें उत्पन्न झालेला अभिमान, माया, पक्षपात, कैवार 'मानिसिलइगीं आपलिक कांहीं। येरझार पाही न चुके कदा।'–तुगा २६९७. 'परी हें गुणें अति निर्गुण। आपलीक या नाहीं।' २ (क.) मीपणा; अहंकार. ३ स्वाभिमान; ममता. **०लावणें, दाखविणें, माजविणें**—दृढ संबंध अथवा नातें गोतें सांगणें, स्थापणें; तुम्हांपंकींच मी एक आहें असें दाखविणें किंवा तशी स्वतःची वर्तणूक ठेवणें. [सं. आत्मन्–आप]

आपलेपणांत येणें—क्रि. वशांत, उमेदींत येणें; शरीराची पूर्ण वाढ होणें. 'मी जेव्हां आपले पणांत येऊं लागलें तेव्हां नव्या भावना खऊबळूं लागल्या.' –गुपचूप (रसिकरंजन माला).

आपलपोट्या–ट्या, आपलपोट्या–वि. स्वार्थी; स्वतःपुरतें पाहणारा; आत्मंभरी. [आपला+पोट] ग्रहo आपलपोट्या गंगाळ उपटला.

आपला–सना. (आपण षष्ठी). १ स्वत.चा; मालकीचा; आपण या शब्दाप्रमाणें याचाहि प्रयोग तिन्ही पुरुषी, दोन्हीं वचनांत करतात. आपण पहा. २ भ्रांतिष्ट किंवा अनिश्चयी मनुष्याच्या बोलण्यांत हा शब्द निरर्थक, वाक्यपूरणार्थक येतो. उ० मी आपला येथून उठलों; तो आपला त्याच्या घरीं गेला. 'काय मेलीं अलीकडचीं कार्टी तरी! ... ... लहान नाहीं, मोठं नाहीं, आपलं उंठ घोड्या पाणी पी!'–सुंदरची संक्रांत. आपला हा शब्द पुष्कळ वेळा सुशिक्षित लोकांकडूनहि आपण या अर्थी वापरण्यांत येतो; जसें–आपल्यास किंवा आपल्याला=आपणांस. [आपण षष्ठी; सं. आत्मीय; प्रा. अप्पुल्ल; गु. आपणु] **आपली वाढवून खाणें**–आपमतलबीपणानें आपलेंच घोडें पुढें ढकलणें; आपल्या हिताकडेच पाहणें. **–आपलीशी करणें**–१ आपलें म्हणणें (पक्ष, मत) सिद्ध करणें, प्रस्थापित करणें; आपली सरशी करणें. २ वश करणें; ताब्यांत आणणें. 'प्रपंच वैरी मारावा। अथवा आपलासा करावा।' विपू. ७.१४४. ३ स्वतःच्या मनाप्रमाणें वागणें. **आपला–आपलासा म्हणणें–समजणें**–एखाद्यास आत्मीय भावनेनें किंवा मित्रत्वाच्या भावनेनें वागविणें; मित्र समजणें. 'ज्यास मीं एकदां आपलासा म्हटलें त्याच्यासाठीं मीं हवी

तितकी घस सोशीन.' **तूं आपला ऐस**–तूं आपलें स्वतःचें काम पहा, दुसऱ्याची उठाठेव करूं नको **म्ह**० १ आपल्या(ला)चेप्या,दुसऱ्या(ला) फुल्या = आपल्यास घ्यावयाचें असलें म्हणजे माप दाबून भरणें व दुसऱ्यास द्यावयाचें असलें म्हणजे माप पोकळ भरणें. ही म्हण लोभी किंवा **आपमतलबी** माणसास लावतात. २ आपलें तें मापलें व दुसऱ्याचें तें दुपायलें. ३ आपला कान पिळून घेणें=एखादी गोष्ट **करून** ती बिघडली म्हणजे पुन्हां तशी न करण्याचा निश्चय करणें; अद्दल घडणें ४ आपला हात आणि जगन्नाथ=एखादें कार्य स्वत.च्या हातांत असलें म्हणजे त्यांत स्वतःचा स्वार्थ साधणें. (जगन्नाथपुरी येथील प्रसाद एका ठिकाणीं ठेवलेला असतो व त्यांतून यात्रेकरूनें हवा तितका (पुष्कळ सुद्धां) घ्यावयाचा असतो; किंवा जगन्नाथ म्हणजे सर्व सत्ताधीश-हात) विपुल्या व हवें तेवढें घेण्याची मुभा याअर्थी ही म्हण रूढ झाली असावी. **०तुपला**–वि. माझा तुझा; स्वतःचा व परक्याचा; आपपर. २ आपली मालकीची; आपली म्हटलेली (मिळकत, जिन्नस वगैरे). आपपर किंवा आपभपर याच्यासारखेच आपला तुपला यापासून सामसिक शब्द बनतात. **०माणूस-मनुष्य**–पुन प्रीतीचा मनुष्य. ' आपल्या मनुष्याला कोणी कमी कां करतो ? '–करंज्याचा फार्स २२. **आपलाला**–वि. आपआपला; ज्याचा त्याचा स्वतःचा; ' आपलाले कपडे सांभाळा ! ' **आपलूक, आपलुकी**–स्त्री. (चि.) आपलेपणा; स्वकीयता. **आपले आपण, आपल्याआपण**–क्रिवि. आपल्युपरीनें; स्वयंप्रेरणेनें; आपण होऊन. **आपलें उगीच**–विनाकारण; निरर्थक आपला अर्थ २ पहा. ' आपलें उगीच कारागिराची कुशलता पाहून माझी दृष्टि तिकडे वळली. ' –मृ ५८. **–आपल्या अंगीं-अंगें-अंगानें**–स्वतः; खुद. **आपल्या आपण**–दुसऱ्याच्या मदतीवांचून; स्वत.च; आपसूक. **आपल्या घरचा थोर-राजा**–वि. १ हट्टी, हेकेखोर मनुष्य. २ स्वतःच्या घरीं जबरदस्तीनें वागणारा व बाहेर लोकांत थंड–नरमपणानें वागणारा; गांवचा गांड्या आणि बायकोचा देशपांडंया. ३ दुसऱ्यावर विनाकारण वर्चस्व गाजविणारा. ' तो असेल आपल्या घरचा थोर, मला काय ? ' **आपल्यांत**–स्वगत (भाषण) जुन्या नाटकांतून स्वगत या अर्थी आपल्यांत हा शब्द योजीत असत. ' भीमरावः–(**थांबून** आपल्यांत) ' –रत्नकांता नाटक २४.

आपवणी—न. पाटांतून वाहणारें पाणी (भांड्यांतून आणलेलें नव्हे); वागाईत शेतीमध्यें याचा उपयोग करतात. [आप+पाणी; किंवा आप+सं. वन=पाणी]

आपवणें—अक्रि. बोलावणें; आमंत्रण देणें. आपयणें पहा. ' आपविल्या द्विजा । अष्ट देवतांची करिती पूजा ॥. ' –वसा ३२. [सं. अपयानं=मागें सरणें याच्या उलट; किंवा प्रा. अप्पाह=सांगणें; खबर देणें.]

आपवणो-णों—वि. (गो.) बोलावणारा.

आपशांच-आपशी, आपशेंच—अ मध्यें पहा.

आपशुद्धि—स्त्रि. १ स्वतःची शुद्धि. ' आपशुद्धि नेणती । ' –दावि ४९६. २ आत्मानात्मविचार. ' दृढ करूनियां बुद्धी । आधीं घ्यावी आपशुद्धी ॥ ' –दा ६.१०.१२. [सं. आत्मन्+शुद्धि]

आपसंत—वि. १ स्वतः पसंत केलेलें; ' वडील माणसांचे विचारावांचून आपसंतपणानें केलेल्या कृत्याचें फळ भोग आतां. ' रत्नकांता नाटक २६. [आप+पसंत]

आपसया—क्रिवि. आपसूक; आपोआप. अपसया पहा. ' तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया ॥ ' –तुगा ३४२४.

आपसाच—आपशांच पहा.

आपसां, आपसांत, आपभाआपस-सीं, आपसांमध्यें—क्रिवि. परस्परांत; आपआपल्यांत; एकमेकांशीं; आमच्या आमच्यांत, तुमच्यातुमच्यांत, त्यांच्यात्याच्यांत; एकमेकांत. ' शत्रूवर जाण्याचें सोडून आपसांतच भांडूं लागले. ' [आप. सि. आपसू+ आं–आंत–ई–मध्यें]

आपसुक-ख, आपसूक-ख—अपसुक पहा.

आपसे—क्रिवि. आपोआप; सहज; अनायासें. ' कवणाचें मन आपसें अभिलाष न करी । ' –भाए ३४. [आप]

आपसोशी—क्रिवि. (राजा.) १ मन मानेल त्याप्रमाणें; कोणाचा अडथळा न मानतां; स्वेच्छेनें; यथेच्छ; या शब्दाचा प्रयोग ठोक देणें, इजा करणें, उद्दे काढणें, इ अर्थाच्या क्रियापदांबरोबर करतात. २ निर्भयपणानें; निःशंकपणानें; परिणामाकडे लक्ष न देतां; चैनींत. –वि. लोभी; आपमतलबी. [आप+सोस]

आपस्तंब—पु. १ कृष्णयजुर्वेदावरील चार सूत्रांपैकीं एका सूत्राचा प्रवर्तक ऋषि. २ आपस्तंब सूत्राचे अनुयायी ब्राह्मण. [सं.] **०सूत्र**–न. कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेच्या चार सूत्रांपैकीं एक सूत्र. [सं.]

आपस्तुति—स्त्री. स्वतःची प्रशंसा; आत्मस्तुति. ' आपस्तुतीनें दाविती थोरीव ' –दावि ४८४. [आप+स्तुति]

आपस्वरूप—न. आत्मस्वरूप; ब्रह्मस्वरूप. ' मग अखंड उरे आपस्वरूप । ' –दावि १२५. [आप+स्वरूप]

आपस्वार्थ—पु. (स्वार्थ याच अर्थानें अडाणी लोकांत आपस्वार्थ हा शब्द वापरतात) आपला स्वार्थ; स्वतःचा मतलब. [आप+स्वार्थ]

आपस्वार्थी—वि. आपमतलबी; स्वतःचा स्वार्थ पाहणारा. ' म्हणे मी काये आपस्वार्थी । ' –दा ५.८.३५. [आप+स्वार्थ]

आपहस्तक-कीं, आपहस्तीं-स्तें—क्रिवि. आपल्या हातानें; आपल्या कह्यन; आपल्या सामर्थ्यानें; आपल्याच्यानें. **'गरीबाचें काम आपहस्तें-परहस्तें होईल तितकें करावें. '** [आप+हस्त]

आपा-प्पा—पु. १ वडील माणसांना, किंवा लहानास प्रेमानें हाक मारतांना योजावयाचा संबोधनार्थी शब्द; टोपण नांव आप्पा; आप्पासाहेब. २ एखाद्या नांवाच्यापुढें लावतात. जसें–गोविंदपंतआपा; गणुआपा. **म्ह०** सोनार शिंपी कुळकरणी आपा, तिघांची संगत नकोरे बापा. ३ (कर.) जार; ठोल्या; यजमान. 'ती बाई आपा ठेवून बसली आहे.' [सं. आप्त; प्रा. अप्प; का. अप्पा=पिता]

आपाआप-आपाप—अपाप पहा.

आपाड—वि. अपार. अपाड पहा. 'तयांची उमाणितां कीर्ती। उणीव दिसे आपाडे।'–मुआदि ११.९३.

आपाततः—क्रिवि. १ खोटें ठरेतोंपर्यंत, खोडून टाकीतोंपर्यंत टिकणारा, चालू (मुद्दा, उलगडा, अनुमान, उपपत्ति). २ अगदीं आरंभीं; प्रथमच; चटकन; तत्क्षणीं. [सं. आ+पत्-पात+तः]

आपातरमणीय—वि. आपाततः, आरंभीं चांगलें दिसणारें; तात्पुरतें ग्राह्य (विधान, सिध्दांत इ०). [सं.]

आपाद—क्रिवि. पायापर्यंत; पायापासून. 'आपाद पायुतलें। पुलकांचलें।'–ज्ञा ११.२४६. [सं. आ+पाद] **०कंचुकित**–वि. पायापासून मस्तकापर्यंत अंगवस्त्र घातल्यासारखें. 'वाचा पांगुळली जेथिंचि तेथ। आपादकंचुकित रोमांच आले।'–ज्ञा ९.५२७. [सं. आ+पाद+कंचुकी] **०तलमस्तक**–क्रिवि. पायाच्या तळव्यापासून डोक्यापर्यंत. [आपाद+तल+मस्तक] **०मस्तक**–क्रिवि. नखशिखांत; डोक्यापासून पायापर्यंत. [सं.आ+पाद+मस्तक]

आपादणें—सक्रि. १ स्वीकारणें; घेणें; मिळविणें; संपादन करणें. 'आणि आपुलालिये चाडे। आपादिलें हें मांडे।'–ज्ञा ३.५१. २ कर्म करणें. 'करचरणें आपादिजे। घेईजे जें जें कांहीं।'–रंयो ७.११६. [सं. आ+पद्-आपादन]

आपादन—न संपादन; मिळवणी; प्राप्ति. 'ऐसें ठेलें आपादन। शास्त्रांचें जयां।'–ज्ञा १७.३८. [सं.]

आपान, आपाप, आपांपति, आपांपरी—अ मध्यें पहा.

आपाप-पा—क्रिवि. आपोआप. अपाप पहा. 'पापात्मबुद्धि धरूनी मरती अपापां।'–वामन विराटपर्व ५.१८. **म्ह०** आपापाचा माल गपापा=जो माल किंवा वस्तु मिळविण्यास श्रम पडले नाहींत ती वस्तु किंवा माल वाटेल तसा खर्च करणें; अन्यायानें मिळविलेलें द्रव्य हवें तसें उधळणें; याच अर्थी फारसी–माल मुफ्त दिल् बे रहम.

आपापला—आपआपला पहा.

आपार—पु. (गो.) टांकाचें टोंक; निब. [पोर्तु. आपारो]

ऑपार—स्त्री. (गो.) उपमा; व्याजोक्ति. 'आपार माल्ली' =टोमणा दिला.

आपारणें, आपाशाई जोडा, आपूस, आपोस—अमध्यें पहा.

आपाल—पु. (व. ना.) घारगा. [सं. अपूप]

आपालिया, आपितर—अमध्यें पहा.

आपिक्षीर—स्त्री. गाभण्या गाईच्या पिठाच्या पापडीची खीर. –पाठक पाक शास्त्र ७०.

आपु—वि. १ स्वाधीन; प्राप्त. 'हा सदां दुर्लभु मना। आपु नोहे साधना।'–ज्ञा २.१४९. २ स्वतःसारखें; आपलें; आप्त. 'तेणें संसरलेनि करीं। आपु विश्व।'–ज्ञा ७.१३५. 'तों जीवी लागे ज्ञानदीपु। तंवची स्त्रीपुत्र मायबापु। ये कव्हणीची नव्हेति आपु। प्रकाशले जया।'–ज्ञाप्र १६३. [आप]

आपुथिणें—क्रि. गांजणें. –मनको.

आपुलकी—आपलकी पहा.

आपुला—वि. (काव्य) स्वतःचा. आपला पहा. 'रमती श्रीचरणकमलीं सुखी। मानसीं आपुलांचि।'–ऋ २७. [सं. आत्मन्]

आपुलिया, आपुलेया—आपल्या. अपुलिया पहा. 'तरी यांहीं आपुलिअे चाडे। वावरों न अें।'–शिशु १८५. 'तरि आपुलेआं चा होअे संहारू।'–दाव १०६.

आपुलीक—ममता. आपलीक पहा. –ज्ञानेश्वर योगवासिष्ठ ६.४८.

आपुलेन—वि. (काव्य) स्वःतच्या; आपल्याच. 'आपुलेणीं परीवारेसी।'–उषा ९७. 'लेंकुरां नाहीं वाढवितें। अन्न करावें लागे आपुलेन हातें।'–दास ३.५.१२.

आपुल्याकून—क्रिवि. १ (काव्य. कुण.) आपल्याकडून; आपणाकडून; स्वतःकडून २ आपण होऊन.

आपूर—वि. अपुरा; अपूर्ण. 'तरी तुमची वर्णितां स्तुती। आपूर असे माझी मती।'–नव २२.११२. [सं. अ+पूर्]

आपूशन—न. अपोष्णी. अपोशन पहा. 'सुंदरमूर्ति आपूशन। करून सौमित्रानंदन।'–वेसीस्व १.१३.

आपें, आपेंआप—क्रिवि. १ आपल्याआपण; आपण होऊन; स्वतःच. 'विच्यारें आपेंआप धनी।'–मुआदि १६.२८. 'जरी आपेआप आम्हासि वरी। तरी ते गोष्ट बहु बरी। नातरी कपटरूपें सुंदरी। आणू येथें।'–कथा १.८.९९. २ स्वभावतः; सहज. 'ऐसिया आपेंआप लाघविया। नमों तुज।'–ज्ञा १४ ६

आपेशी-सी—वि. अपयशी. 'द्वाड आपेसी वोंगळ। चाळक चुंबक लव्याळ।'–दा २.३.२८. [सं. अप+यशस्]

आपैणें, आप्वणें—सक्रि. (कों. गो.) आमंत्रण करणें. 'तो आपैता.' 'जेवणाक आपौणें करचें झालें.' [सं. अपायन]

आपैता, आपैतिया-ती, आपैतें—वि. १ स्वाधीन; अनुकूल. 'तैसीं इंद्रियें आपैतीं होतीं।'–ज्ञा २.३०२; –एभा १३.१७०.

२ प्राप्त. 'हा भिक्षुगीतार्थ धरितां चित्तीं । शांति आपैती साधकां ।' –एभा २३.९६८. ? 'आणि अभ्यासुही याचा स्वामिया । जेणें आपैतिया होती भूमि.' –रंयो ९.३२२. ३ (चुकीनें) आयतें; आपोआप. [सं. आप्=मिळणें]

आपैस–सा–सी–से—क्रिवि. आपल्याआपण; आपोआप; सहज; आपसूक. अपशांच पहा. 'मग समाधी विसजेन आपैसा.' –विउ ११.९३. 'तंव उसळोनि सर्पाच्या कोटी । कुर्डी पडाव्या आपैसा ।' –मुआदि १०.४४. 'नातरी कुटिल येतां सभेसी । निंदा प्रकटे आपैसी ।' –भवि १.६०. 'चारी पुरुषार्थ जैसे । भक्तापाशीं येती आपैसे ।' –एरुस्व ६.५८. [आत्मन्+स्वयम्]

आपैसा—वि. आपलासा; वश; स्वाधीन. (क्रि० करणें). 'समाधि भंगोनी कामकळे । भुलवोनि करी आपैसा ।' –मुरंशु १२. [आप+असा]

आपोआप—क्रिवि. १ (काव्य.) एकदम स्फूर्तीनें. २ अपाप; आपल्याआपण; प्रयत्नावांचून; खटपट न करतां; 'माळावर गवत आपोआप उगवतें.' [आप द्वि.]

आपोशण–न, आपोष्णी—अपोष्णी पहा. 'हातू न मागितां सर्वापोशन । रसनेविण सेवितू ।' –एभा ११.३०८.

आपोहिष्टा—(व.) (ल.) चट्टामट्टा; फन्ना; नाश; 'सगळ्या तुपाचा आपोहिष्टा केला.' [सं. आपोहिष्टा इ० मंत्रावरून]

आपौणें—क्रि. (गो.) बोलावणें. आपैणें पहा. –न. मोट, रहाट याच्या शिवाय आपोआप मिळणारें पाटाचें पाणी.

आप्त—वि. १ संबंधी; एका रक्तामांसाचा; नातलग; गोतेवाईक; सोयरा. 'आप्तांचीं नच मुखें भलासुकवी । –मोमंभा १.५३. 'ईश्वर ही झालिया आप्त । विश्वास तेथें न धरावा ।'–मुआदि ३४.२१. २ आपला असा मानलेला; इष्टमित्र; हितकर्ता. 'रुचोकृति सभाग्य तूं सुनय आप्त का मातशी ।' –केका ३८. ३ विश्वासु; प्रामाणिक; विश्वासार्ह; प्रमाणभूत; भरवंशाचें. 'आप्त म्हणजे विश्वसनीय पुरुष होय.' –गीर ४०७. ४ (समासांत) प्राप्त. जसें–पर्याप्त; समाप्त. ५ गुरु; पूज्य पुरुष; सन्माननीय व्यक्ति; यथार्थ वक्ता; ज्यांचें वचन ईश्वरवचनासारखें प्रमाण मानतात तो. **॰वाक्य, –वचन, –उक्ति**–नस्त्री. विश्वसनीय; साधार; प्रमाणयुक्त (भाषण–शब्द); थोरांचें वचन. [सं.] **॰मित्र**–पु.अव. सोयरे; नातलग; भाऊबंद; इष्टमित्र सर्व मिळून. **॰विषय**–पु. १ नातलग; सोयरा. २ नातें; संबंध. **॰विषय–यी, –संबंधी**–वि. स्नेहभावानें बांधलेलें, नात्यागोत्याचें. 'एका गलबतावर आमची आप्तविषयी बाई जाणार आहे.' –पाव्ह ६६.

आप्तई—स्त्री. आपत्ति; संकट. 'आकूर हें नामाभिमान सांगून पाही । आकुरें निष्ठुरपणें केली गोकुळांत आप्तई ।' –होला ११. [सं. आपत्ति]

आप्तकाम—पु. संतुष्टता; पूर्ण काम; इच्छापूर्ति. 'जशी पृथुक तंदुलप्रसृति आप्तकामा तशी ।' –केका ३८. [आप्त+काम]

आप्तर—अप्तर पहा.

आप्तागिरी–ऱ्या–गीर–अफतावगीर, अबदागीर पहा.

आप्ताफितरती—स्त्री. अस्मानी सुलतानी; दुष्काळ; अतिवृष्टी; परचक्र. इ० [अर. आफत+फत्रत्]

आप्ति—स्त्री. आपत्ति; वाण. अप्ती पहा. 'त्याचप्रमाणें पीक पाण्याचीही दिवसेंदिवस अधिकच आप्ति पडूं लागली.' –धर्माजी ३२. [सं. आपत्ति]

आप्तोर्याम––पु. अग्निष्टोमादि सप्त सोमसंस्थांपैकीं एक संस्था; सोमयज्ञ. [सं.]

आप्पा––आपा पहा. हें टोपण नांव (बहुमानार्थी) आजच्या प्रमाणें मागच्या काळांतहि आढळतें. चिमाजी बल्लाळ पेशवे (–पया ८५), चिमणराव सांगलीकर (–पया ४३), जयाजी शिंदे (–पया ३२०) वगैरेंना आप्पा संबोधीत.

आप्पा––रव्याच्या तळून केलेल्या गोड वड्या किंवा गोळे. –गृशि ३९०.

आप्पाधप्पा—अमर्ष्यें पहा.

आप्य—वि. १ पाण्यासंबंधीं; जलमय. २ पाणचट. –ज्ञा १८.१०. [सं.अप्=पाणी]

आप्य—वि भिळण्याजोगें;संपादण्याजोगें.'जय जय देव श्रीगुरो। अकल्पनाप्य कल्पतरो।'–ज्ञा १८.१०. [सं. आप्=मिळणें]

आप्यायन—न. १ पोषण; पुष्टता. २ शरीरपोषक द्रव्य; भक्ष्य; आहार; खाद्य; जीवन. 'तो व्यान देहींच्या नाडींतें आप्यायन पुरवी.' ३ सुप्रास अन्नाचें सेवन; दुग्धप्राशन ४ अपहार; अभिलाष; पैसा खाणें [सं.]

आप्रीसूक्त—न. ऋग्वेदांतील या नांवाचीं सूक्तें. हीं दहा असून पशुसंबंधीं प्रयाजयागामध्यें गोत्रपरत्वें यांचा विनियोग करतात. [वै.]

आप्रोस—पु. (गो.) नारळाचा अंगरस, दूध. आपरस पहा.

आप्लविणें—सक्रि. बुडविणें. 'तेवीं अब्रह्म कुळ आवघें। आप्लविजे ॥' –ज्ञा १.२५६. [सं. आप्लव]

आप्लुत—वि. भिजलेला; बुडलेला; सिंचिलेला. सामाशब्द आनंदाप्लुत; शोकाप्लुत; स्नेहाप्लुत इ०

आप्वन—पु. (शाप) एक उत्कर्ष. हा वर्णहीन, अत्यंत बाष्पभावी व ज्वालाग्राही आहे. [इं. युपिअन]

आप्सर—वि. (व) १ मोठा. 'काय आप्सरसर्प हा.' २ पाजी; हलकट; अडदांड. 'ती घोडी फार आप्सर आहे.' [सं. अप+सृ]

आप्सुलाद—वि. (गो.) स्वतंत्र वृत्तीचा; आपल्या मतानें वागणारा [आप+सल्ला]

आफड—स्त्री. (कु.) शिवाशिव. भ्रष्टाकार. आपड, आपाड पहा. [सं. आ+स्पृश्]

आफडणें—अक्रि. शिवणें; ओंवळें करणें; विटाळणें. 'आरती ये आफडूं नको. '

आफडूं नयेशी—वि. शिवूं नयेशी; विटाळशी. [आफडूं नये अशी]

आफडी—स्त्री. (गो.) विटाळशी स्त्री.

आफत-आफती—स्त्री. १ संकट; आपदा; गोंधळ; दुर्दैव; अडचण; क्लेश; अरिष्ट. 'पादशाहीवर आफत पडली ऐसें झालें. '–चित्र गुप्त ३५. २ (ल.) दुष्काळ; अनावृष्टि. ' रयतेस आफतीच्या वेळीं धान्य आणून पुरविलें.' –विक्षिप्त २.५३. (क्रि० पडणें; येणें; गुदरणें) ३ तोटा. [अर. आफत्; सं. आपत्ति] ०**अस्मानी-आस्मानी**–स्त्री. दैवी आपत्ति (अवर्षण, अतिवृष्टि, टोळधाड वगैरे); दुष्काळ. 'मुलूक जागिरा आहेत त्यांत आफत–आस्मानी जाली. ' –दिमरा १.१०५. (याच्या उलट) ०**सुलतानी**–स्त्री. सरकारकडून अगर खास राजाकडून येणारें संकट.

आफताब—अफताव पहा.

आफरी—पु. १ अव्यवस्थित; बंडखोर. –शिवदिग्विजय १३८. २ नाखुष. –शिवदिग्विजय १५६ [अर–इफ्राद् किंवा अफरीत=दैत्य]

आफरीन—पु. शाबासकी; स्तुति. आफ्रीन पहा. [फा. आफ्रीन्=स्तुति]

आफळणें—अक्रि. १ आदळणें; खालीं आपटणें. ' नातरी उदकाचिये भूमिके । आफळलेनि कंदुकें । ' –ज्ञा १७.२८०. 'खेळत असतां सारीपाट। फांसे भूमी आफळिले । ' –मुविराट ६. १६७. २ (एखाद्या वस्तुवर) जोरानें मारणें; ठोकणें; (काव्य) प्रहार करणें. 'भुजदंड आफळी कोधायमान । ' –ह ११. ४९. अफळणें पहा. [सं. आ+स्फल्]

आफळणें—शिवणें. आफडणें पहा.

आफावणें—क्रि. बोलावणें; आदरसत्कारानें आमंत्रण करणें. (गो.) आपोंजें; आप्वणें 'ते वेळीं देवे आफाओनु। भीमा दीन्हला सवें मानु । ' –शिशु ९२४; ' आगम आफाविले । मूर्त होती ॥ ' –ज्ञा १३.८३० [सं. आप्]

ऑफिस—न. (अशुद्ध) हापिस; हपीस; कचेरी; फड. [इं.]

ऑफिसर—पु (अशुद्ध) हापीसर, कामगार; अधिकारी; अंमलदार. हुद्देदार. [इं.]

आफीण-न—स्त्री. अफीण पहा.

आफीयत—स्त्री. वृत्त; गोष्ट [अर. अफाल=कृत्य]

आफु—अफू, अफीण पहा.

आफुडणें—आफडणें पहा.

आफ्तर—वि. उजाड; बेचिराख; नष्ट. [अर. अबतर]

आफ्तागीर—अबदागीर पहा.

आफताबा—पु. पाणी ठेवण्याची प्रवासी झारी. [फा. आफ्ताबा=पाण्याचें भांडें]

आफ्रिडी—पु. काबूल नदीपासून कोहाटपर्यंतच्या प्रांतांत राहणारे पठाण. [फा.]

आफ्रीन—स्त्री. स्तुति; प्रशंसा. ' बहुत खुश्वक्त होऊन आपल्या तद्विरेस व जुरतेस तहसीन व आफ्रीन फर्मावितली. ' –पया ४८२. ०**तहसीन**–स्त्री. स्तुति; अभिनंदन. ' निजामन्मुल्क यांनीं स्वहस्तें आफ्रीनतहशीनचा शुक्रा तुम्हांस पाठविला. ' –रा ६. ६२७. [फा. आफ्रीन्=भले; शाबास. अर. तहसीन्=स्तुति]

आब—पु.न. १ पाणी. २ (ल.) (तोंडावरील) पाणी; डौल; तेज; प्रतिष्ठा; अब्रू. ' आब राखून सलूख करून निघावें. ' –इम२८१. [फा. आब्=पाणी; सं. अप्; म. आप] ३ इज्जत; योग्यता; महत्त्व. ' त्यांत त्यांचा ... बराच आब रहात जाईल. ' –नि ३७८. ४ पत; ख्याति; लौकिक (खरेपणा, सचोटी, विद्वत्ता, संपत्ति इ० विषयीं); वजन. ' नायकीस आब पडे असें कोणी नव्हतें. ' –रा ३.४१९. ५ ढबदार वर्तणूक; वचक बसण्यासारखें वर्तन किंवा ऐट (मनुष्याची, घेण्याची किंवा व्यवहाराची). ६ काळजी (सामानसुमानाची); बोज. ' आपण पांघरुणाचा आब ठेवावा, पांघरूण आपला आब ठेवील. ' (क्रि० राखणें)

आब—पु. (गो.) मेलेला बाप. [आबा ?]

आंब—स्त्री. १ हरभऱ्याच्या झाडावर घाटा येण्यापूर्वी संध्याकाळच्या वेळीं हरभऱ्याच्या ढाळ्यांवर फडकें पसरून जें अम्ल दवाबरोबर उत्पन्न होतें तें फडकें पिळून काढतात ती. ही पोटदुखी, मोडशी आणि पटकी यांवर देतात. २ लांबट फळ येणाऱ्या आंब्याची एक जात. ३ आंबण्याचा धर्म, शक्ति (ही शक्ति हवा आणि उष्णता यांत जास्त्याच असते). ' थंडीच्या दिवसांत आंब कमी म्हणून दहीं फार आंबत नाहीं. ' ४ आंबटपणा. (गो.) आंबटपदार्थ (चिंच इ०); आंबोण; अम्लरस. ' जाणपणें न पिएति आंब । ' –शिशु ८४. ५ (गो.) मासळी नसलेली कांद्याची आमटी; सार्धे आंबट वरण, सार. [सं. अम्ल] ०**ओरपणें**–(गो.) १ दळ, मगज, गीर काढून घेणें. २ (ल.) एखाद्या पदार्थांतील सत्त्वांश काढून घेणें; चांगलें तेवढें घेणें. **आंब रंगांत घालणें**–(चांभारी) बाभळीची साल व हिरडा यांचा रंग रापून थोडा हिणकस झाल्यानंतर त्यांत चामडें ठेवणें.

आबई—स्त्री. एक झाड; अबई पहा. ' तो पुलींग परसैय्या । जेथ मुळ बांधलें आबइया । ' –ऋ ७२.

आबक, आबका—अ मध्यें पहा.

आंबकट—वि. (गो.) आंबट; आंबटसर. ' आंबकट वास येता '

आंबकटी-काठी—स्त्री. आंब्याच्या कैऱ्यांच्या वाळविलेल्या फोडी; यांचा उपयोग चिंचेऐवजीं कालवणांत घालण्याकडे करतात; किंवा लागेल तेव्हां लोणचें करतात. अंबकटी पहा.

आबकार—पु. दारू गाळणारा; कलाल. [फा. आब्कार्=कलाल, मद्यपी]

आबकारी—स्त्री. १ दारू, अफू वगैरे मादक पदार्थांवरील जकात; कर. २ दारू वगैरे काढण्याचा धंदा; कलाली धंदा. ३ हा शब्द विशेषेंकरून मादक पदार्थांच्या शाखांना लावतात. त्या शाखा- मद्य काढणें, अफू तयार करणें, गांजा तयार करणें, आणि बोजा (बिअर दारू) तयार करणें. ४ मादक पदार्थांसंबंधीं खातें, उत्पन्न- वगैरे. (इं.) एक्साईज. [फा.] –वि. मादक द्रव्यासंबंधीं; आब कारी खात्याचे–विषयीं.

आबखरा-खुरा—अपकरा पहा. –वाडबावा २.१५४.

आबखाऊ, आबघेण्या-णा—वि. इज्जत, अब्रू घेणारा; इज्जत खाऊ [आब+खाणें, घेणें]

आबगार—न. (व.) तूप. ' भातावर आबगार वाढल्याशिवाय अन्न शुद्ध होत नाहीं. ' [सं. अभिघार]

आबघात—पु. (गो.) अपघात. (अप.)

आंबटओला-चिंबट-ढाण-वणी-वेल, आंबटा-ई-टाण, आंबटी-ट्या, आंबणें—अं मध्यें पहा.

आंबटणें—उक्रि. (कों.) आंबणें (ताक, कणिक इत्यादि) आंबट होणें. [आंबट]

आंबटाण—स्त्री. (गो.) टरफलें काढलेली चिंच.

आबटाब—आबताब पहा.

आंबडणी—स्त्री. नांगरणी. [आंबडणें]

आंबडर्ण—उक्रि. (कों.) १ झटून, सपाटून काम करणें. २ (माणसाळण्यासाठीं) जनावरास बडवणें. ३ (कु.) (गुरें गांवाबाहेर नेण्यासाठीं किंवा गावांत आणण्यासाठीं) एके ठिकाणीं जमा करणें.

आबडधाबड—वि. बेडौल; भोपळसुती. ओबडधोबड पहा.

आंबण—स्त्री. एक जंगली झाड; आमण; याच्या पानास आंबट वास येतो.

आबताब—पुस्त्री. तेज; प्रतिष्ठा; अब्रू; छाप (अधिकार, विद्वत्ता किंवा संपत्ति यांमुळें लोकांवर पडलेली). ' पुढेंहि आमची आब- ताब रक्षण करणार स्वामी समर्थ आहेत. '–दिमरा २.१८३. [फा. आब्ताब्=तेज]

आंबतें—न. (कों.) १ आंबण्यासाठीं ठेवलेली कणिक इ० पदार्थ. २ अशा रीतीनें आंबलेली कणीक, पीठ. [आंबणें]

आबदा—आपदा पहा. ' पुर्वी पाण्याची आबदा चहुंकडे । तलाव कोरडे । ' –गापो ३९.

आबदागिरी-गीर—अमध्यें पहा.

आबदाब—आबताब पहा. (क्रि० राखणें; संभाळणें; सोडणें; गमावणें; उडवणें). **आबादाबानें**–क्रिवि. इभ्रत आणि लौकिक यांच्या जोरावर; मान्यतेनें; लौकिकानें; अब्रूनें.

आबदार—क्रिवि. (माण.) अल्लाद; हळूच. **०उचलणें-धरणें**–हलक्या हातानें, अलगत उचलणें, धरणें.

आबधाकणें—अपधाकणें पहा.

आबनूस—पु. एक झाड; टेंभुर्णी. टेंभुर्णीच्या आंतला काळा नार. (इं.) एबनी. [फा.]

आंबर—अंबर पहा.

आबरू-चा-दार—अब्रू पहा.

आंबला—पु (गो.) कर्णलोलक; डूल. अमला पहा.

आंबली-आमली—स्त्री. (गो.) १ चिंचेचें झाड व चिंच. [सं. अम्ल; हिं. इमली] २ आंब्याचें लहान झाड. ३ (कु.) खारांतील कैरी. [सं. आम्र; म. आंबा]

आंबले, आंबवण, आंववणी, आंबविणें, आंबवारंग, आंबशाण-साण-सुका, आंबसूल—अं मध्यें पहा.

आबहवा—स्त्री. (हिं.) (काशी) हवापाणी. ' ठिकाणही मातबर नाहीं; परंतु आबहवा मात्र कांहींशी बरी. ' –रा १. ११५. [फा. आब्=पाणी+उर्दु. हवा]

आबळ, आबळा—स्त्री. आबाळ; हयगय; हेळसांड; हल- गर्जीपणा; दुर्लक्ष्य; उपेक्षा. 'ज्याची सारखी आबळा चालली आहे' –नि १०६९. (क्रि० होणें; करणें.) आबाळ पहा. [सं. अ+पाल्; अ+म. बाळगणें]

आबळागोबळा—वि. सर्वत्र दिशांस व्यापून असणारा. ' असो चहूं देहावेगळा । जन्ममर्मासी निराळा । सकळ आबाळ गोबळा । सबाह्य तूं । ' –दा ५. ६. ५६. २ –क्रिवि. एकंदर. [सं. आ+वलय+गो (दिशा)+वलय]

आबा—अबा पहा.

आंबा-आंबडा-डी—अंमध्यें पहा.

आबॉक—न. (गो.) रोगण; हवक. [इं. हवक]

आबाद—वि. १ समृद्ध; संपन्न; साधनसामग्रीयुक्त; भरभराट- लेलें (शहर, देश, वस्ती, लागवड). ' दिल्लीहून सरंजाम आणवून सारें लष्कर आबाद करावें. '–भाब १११. २ सुरक्षित; स्वस्थ (प्रांत) ' आपला जागा आबाद ठेवितो. ' –दिमरा २. १५७. ३ सुखासमाधानानें सारा येणारा (प्रदेश). –स्त्री. १ समृद्धि; भरभराट; स्वास्थ्य. ' ह्याप्रमाणें हे योद्धे जिंकलेल्या लोकांनीं

आबादींत आणलेल्या प्रांतांचे एकदम जमीनदार व सुभे बनले.' –इंमू २६. २ एखाद्या भरभराटलेल्या शहराच्या किंवा एखाद्या मनुष्यानें वसविलेल्या शहराच्या नांवाच्या शेवटीं लावतात. जसें– मुर्शिदाबाद, औरंगाबाद, हैदराबाद इ० [फा. आबाद्]

आबादान—वि. सुरक्षित. आबाद पहा. 'वरकड विषय चोरांनीं नेला, पेटी मात्र आबादान राहिली.' 'वरकडही जिन्नस सर्दी न लागे असे आबादान ठेवावे.' –मराआ ३५. २ समृद्ध; संपन्न; भरभराटलेलें (शहर, लष्कर इ०) 'सरंजामही येऊन पोहोंचेल; लष्कर आबादान झाल्यावरी पुन्हा गिल्च्यांचें पारिपत्य करूं' –भाव १११. [फा. आबादान्]

आबादानी, आबादी—स्त्री. १ (दाट वस्ती, लागवड, पिकाऊ जमीन इत्यादींनी युक्त असा) सुखाचा अंमल, राज्य. 'आबादी जालिया हा प्रांत कोडीचा आहे.' –इम २६७ २ शांतता संपन्नता; विपुलता (देश, प्रांत, वगैरेंची). 'रयतेची आबादानी होण्यास व रयतेस तगाई देण्यांत आधीं बहुत यत्न करावा.' –ऐरुकु ५०. ३ जमीन महसूल. 'आठ वर्षांत आबादी ९१६६॥ वाढली.' –विक्षिप्त २.५३. ४ लावणी; पीक. [फा.]

आबादाबांत—क्रिवि. १ लौकिकाच्या, अब्रूच्या जोरावर; आपल्या वजनानें. 'फजीती होण्यापेक्षां आबादाबांत वेळ मारून न्यावी हें चांगलें.' –सूर्योदय २२८. २ (ल.) चोरून मारून; लपून छपून. 'प्रथम हें सर्व आबादाबांत चालत होतें.' –हाच का धर्म २७. [आब + दाब]

आबादीआबाद—स्त्री. अतिशय भरभराट; जिकडेतिकडे समृद्धि, शांतता. [फा.]

आबाधा—स्त्री. अबाधा (गणित); त्रिकोणाच्या शिरोबिंदूपासून पायावर काढलेला लंब पायाला (किंवा वाढविलेल्या पायाला) ज्या बिंदूंत मिळाला असेल त्या बिंदूपर्यंत पायाच्या दोन्हीं टोकांपासून जीं अंतरें त्यांस आबाधा म्हणतात. –महमा २०. अवधा पहा. [सं. अवधा]

आबाय-अज्जाद्—पुअव. बाप-आजे; बापजादे; पूर्वज. 'अज् कदीमुल् अय्याम व आबाय अज्जाद मोक्र असे' –बाड-सनदा १४०. [अर. आबा+अज्जाद]

आंबारणें—अक्रि. (ना.) पक्व होऊं लागणें.

आबालवृद्ध—क्रिवि. लहानांपासून थोरांपर्यंत; सर्व; सर्व लोक; जनता. [सं. आ+बाल+वृद्ध]

आबालसुबोध—वि लहान मुलापासून तों जाणत्यापर्यंत सहज कळणारा. 'तेणें आबालसुबोधें । बोधीयेचेनि प्रबंधें ।' –ज्ञा १८.१७४२. [सं. आ+बाल+सुबोध]

आबॉलार—वि. (गो.) कासावीस. [पोर्तु. आवलर]

आबांब—अबांब पहा.

आबाशाई, आबाशी—अबाशाई पहा.

आबाळ-ळी—स्त्री. १ हेळसांड; हयगय; निगेचा अभाव. आबळ पहा. 'हा घोडा खाण्यापिण्याचे आबाळीमुळें खंगला, एरव्ही चांगला आहे. २ अन्नवस्त्रादि पदार्थांच्या अभावमूलक विपत्ति; आपत्काळ. ३ फजीती; दुर्दशा; हाल. 'करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥.' –तुगा ५७७. [अ+बाळगणें; सं. अ+पाल्; का. बाळ=सुखांत रहाणें; सिं. अबालो=मित्रहीन] **आबाळणें**–क्रि. हयगय करून, दुर्लक्ष्य करून वागविणें; हेळसांड करणें.

आबाळया—वि. निर्बल; अशक्त. [अ+बल]

आंबिका, आंबी, आंबीण, आंबील, आंबूर, आंबूस, आंबेकरी, आंबेमोहर, आंबेहळद, आंबोण, आंबोशी, आंबोळी—अं मध्यें पहा.

आबुखा—पु. हातानें मारलेला पाण्याचा हपका; आबका; आपका; अपका; अबका. अपका पहा. (क्रि० टाकणें; मारणें). [ध्व. सं. अप्=पाणी]

आबुट—पु. मेघ; ढग. 'ना तें ओळलें आबुट । मकरंदाचें ।' –शिशु ६१६. [सं. अभ्र+ट प्रत्यय]

आंबुला-आंबुली, आंबेली—अं मध्यें पहा.

आंबुले—पुअव. इल; आंबले; आमले; अमला पहा. 'कुमारांचे आंबुले, कडदोरी. मजपाशीं आणिजे' –लिपु १; १९; ३९. [सं. आम्र किंवा आमलक]

आंबुलेपण—न. नवरेपण. अंबुलेपण पहा. 'निदेलेनि भ्रतारें। जे विये चराचरें । जियेचा विसांवलाबुरे आंबुलेपणहि ।' –अमृ १,३७; [अंबुला=नवरा]

आबू—पु. एखाद्या माणसाचें ठेवलेलें नांव; अबा; अबू. संस्कृत नाटकांत हा शब्द बोलण्याच्या भाषेंत येतो, तसा मराठींतही येतो. –भाअ १८३२. [राजवाडे] जसें–आबूराव असें प्रख्यात बाबुजी नाईक बारामतीकर यांच्या भावास म्हणत.

आबेजाबे-जुबे—अबेदबे पहा.

आंबेबार—अंबा मध्यें पहा.

आंबेल—स्त्री. (गु.) दिवसांतून फक्त एक वेळ शिजविलेलें अन्न खाण्याची जैन लोकांनी घेतलेली शपथ व्रत.

आबेळ—पु. अर्धा आणा किंवा रुपया. (वेळ, दुबळ आणि निबळ या शब्दांबरोबर वापरतात).

आंबेळ— स्त्री. अंबेळ; एका जातीची केळ. **आंबेळें**–न. आंबेळीचें फळ; केळें.

आंबोती—अं मध्यें पहा.

आबोल-ली—स्त्री. १ पिवळी कोरांटी. २ अबई. 'उन्हाळ्यामध्यें आबोलीच्या शेंगा तटतट फुटून उडतात.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) २४३.

आबोलें—न. १ पिंवळ्या कोरांटीचें फूल. २ अबईचें फूल.

आंबोसा—अं मध्यें पहा.

आब्जाडणें—क्रि. (गो.) लाथानीं बडविणें; मारून जेरीस आणणें. [आब+झाडणें ?]

आब्बस—अब्बस पहा.

आब्रह्म—क्रिवि. ब्रह्मलोकापर्यंत. ' तेवीं आब्रह्म कुळ आवघें । आळविजे ॥ ' –ज्ञा १.२५६.

आब्रह्मस्तंभपर्यंत—क्रिवि. ब्रह्मलोकापासून पृथ्वीपर्यंत (त्यांत निरनिराळे १४ लोक–भुवनें येतात). ' आब्रह्मस्तंभपर्यंत । नाना योनि विकारवंत । ' –एभा २२.६१९.

आबू-चा-दार—अ मध्यें पहा.

आभ—न (कों.) १ आकाश; आभाळ. २ ढग; अभ्र; आभाळ येणें. ३ प्रतिबिंब –आगमसार पंचिका १.२ ३४. (हंको) [सं. अभ्र]

आभंड, आभांड, आभय, आभर—अ मध्ये पहा.

आभरण—न. १ दागिना; अलंकार, रत्न; जवाहीर. 'मुक्ताफळेंसीं आभरणें । सौभाग्यद्रव्यें कंठाभरणें । ' –एरुस्व ६ ८७. २ शोभा; शृंगार; मंडन; विभूषण. [सं.]

आभरणें—क्रि. १ नटणें; शृंगार करणें; अंगावर दागिने घालणें; मंडित करणें. २ तृप्त होणें. ' आत्मारामीं मन भरलें । स्वात्मसुखें मग आभरलें । ' –आभ ४८. [सं. आ+भृ–भर]

आभलाख—(गो.) अभिलाष पहा.

आभा—स्त्री. तेज; कांति; प्रभा; प्रकाश; चकाकी. सामाशब्द– अंजनाभ, सुवर्णाभ. [सं. आ+भा=प्रकाशणें]

आभाइणें—अक्रि. बोलणें; भाषण करणें. ' तंव वैदर्भी आभाइली । सावासिनीतें । –शिशु १९० [सं. आ+भाष्=आभाख–क–आभाकि–आभाइ]

आभार—पु. १ उपकाराची जाणीव; कृतज्ञता; उपकाराचें ओझें मानणें. २ भार, ओझें. ' जळचरु जळाचा आभारु धरी । ' –ज्ञा ११.७९. ३ (ल.) जवाबदारी; भार; भीड. ' प्रसन्न होवोनि म्हणे शंकर । वन शाप न टळे दुर्धर । परि तुझे तपाचा आभार । जाहला मज ॥ ' –कथा १.१२.१५७. [सं. आ + भृ – भार]

०भरित–वि. (गेल्या शतकांतील प्रयोग) आभारी; अत्यंत ऋणी असलेला; उपकारबद्ध; ऋणी. **०मानणें**–कृतज्ञता, उपकार व्यक्त करणें. (इं.) थँक ला प्रतिशब्द. **आभारलेपण**–न. ऋणी असलेली स्थिति; उपकारबध्दता. ' सर्वेश्वर आभारलेपणें । ' –विपू ५.२४.

आभारणें—अक्रि. १ आभारी असणें; उपकाराच्या ओझ्याने दडपणें. ' तेणें उपकारें काय आभारैला । वंगी तयातें । ' –ज्ञा २.३७. –सक्रि. २ नटविणें; आभरण घालणें. ' तेव्हां आभारूनीयां अति नवल । सभा यापरी सिध्द केली । ' –कृष्णकौतुक २.२६ (महाराष्ट्र कवि क्रमांक १७) ३ उपकार करणें.

आभारी—वि. ज्याच्यावर उपकाराचें ओझें आहे असा; कृतज्ञ; ऋणी. (इं.) थँकफुल ला प्रतिशब्द.

आभाव—पु. उणीव. अभाव पहा. [सं.]

आभाव—पु. (कों.) १ तर्क; अटकळ. २ अंदेशा; शंका. अभाव पहा. 'ज्यास अंक मोडायासच ठाऊक नाहींत त्यास हिशेबाचें काम म्हटलें म्हणजे मोठा आभाव वाटतो. ' [सं. आ+भू–भाव]

आभावणी—अभावणी पहा.

आभास—पु. १ भास. २ सादृश्य; सारखेपणा; प्रतिकृति; प्रतिबिंब. ' कां परता केलिया आरिसा । लोपु जाला तथा आभासा । ' –ज्ञा १५.३७८. ' साकार साभास आभास । चौथें जाणिजे निराभास । याहूनि पर तूं परात्पर हंस । तृणावर्ते प्राणहरणा । ' –ह २०.१४५. ३ कल्पना; अंदाज; अटकळ; विचार; ग्रह; समजूत; थोडा विश्वास; थोडा खरेपणा वाटणें. ' सांडिजे दुजया नामाचा आभासु । ' –ज्ञा ६.४०. ४ (तर्क.) प्रमाणसादृश्य, बरोबर वाटणारें पण चुकीचें मत, मुद्दा; चुकीची विचारसरणी. उत्तराभास; रसाभास; हेत्वाभास; भावाभास; पक्षाभास पहा. इतर कांहीं सामाशब्द. करुणाभास; क्रोधाभास, स्नेहाभास इ०. [सं आ+भास्=प्रकाशणें]

आभासणें—अक्रि. भासणें, प्रतिबिंबित होणें. ' आभासोनि आविष्करें । देहपणें जें । '–ज्ञा १८.३२४. ' मिथ्याचि आभासे । निरंतर पाहातां । ' –दा ६.८.३४.

आभासन—न. भास; आभास. ' दृश्य मृगजळ आभासन । ' –परमा ५ ३३. [सं. आ+भास्]

आभाळ—न. आकाश; ढग. अभाळ पहा. ' जैशी आभाळाची बुंथी । ' –ज्ञा ६.२५१; –एभा १०.५१४.

आभाळी—स्त्री. मेघपंक्ति. –शर. [सं. अभ्रावली]

आभिचारिक, आभिमुख, आभिशाप—अ मध्यें पहा.

आभीर—पु १ गुराखी; गवळी, अहीर; गवळी जात. अहीर पहा. ' हा आभीर गभीर सूपति असा सोडीच ना ते मिठी । ' –आर्क ९. ताल्मीच्या भूगोलामध्यें आभीर हें नांव सिंधु नदाच्या मुखाजवळील प्रदेशांत रहाणाऱ्या एका जातीचें म्हणून दिलेलें आहे. ही जात ब्राह्मण पुरुष व अंबष्ठ स्त्री यांपासून झालेली मानतात. २ एक प्राचीन राष्ट्र. –झाको (आ) १९३ पहा. [सं.]

आभु—पु. ब्रह्म. ' तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत् । ' –ऋग् १०.१२९.३. ' आभु (ब्रह्म) व त्याला आच्छादणारी माया (तुच्छ) हीं दोन्हीं पहिल्यापासूनच आहेत. ' –गीर २५३. [सं. आभु=व्यापणारें]

आभुग्न (वक्षःस्थळ)—न. (नृत्य) नृत्यास उभें असतां शरीराचा तोल थोडा मागें गेला असतां खांदे किंचित् पुढें येतात, पाठ वर येते व ऊर आंत जातो, ती स्थिति. गोंधळलेली किंवा विषादयुक्त मनःस्थिति दाखविणें झाल्यास हा अभिनय करणें.

आभेळ--न. (कों.) आभाळ; ढग; आकाश. [अभाळ पहा.]

आभोग--पु. (संगीत) १ चिजेचा शेवटचा भाग; रागाच्या स्वरांची परिपूर्णता यांत होते. याला दोन तुक (भाग) असतात, परंतु अस्ताई व अंत्रा यांनां प्रत्येकीं एकच तुक असतो. २ (कुबडी-चेंडू खेळ) सुमारें पंचवीस हात चौफेर प्रदेश. -कुबडीचेंडू २२. [सं आ+भुज्-भोग]

आभ्यंतर--वि. आंतील; अंतर्गत. अभ्यंतर पहा. **०प्रयत्न**-पु. (संगीत) गातांना प्रत्यक्ष शब्दोच्चार किंवा स्वरोच्चारण (बाह्य प्रयत्न) करावयाच्या अगोदर गवई कंठ अगर फुफ्फुसें फुगवून साफ करतो ती क्रिया; आभ्यंतरप्रयत्नाचे चार भाग आहेत-स्पृष्ट, ईषत्स्पृष्ट, विवृत, संवृत. बाह्यप्रयत्नाचे ११ प्रकार आहेत-विवार, संवार, श्वास, नाद, घोष, अघोष, अल्पप्राण, महाप्राण, उदात्त, अनुदात्त, स्वरित. [सं. आ+अभि+अंतर्]

आम--वि. १ अर्धेकच्चें; अर्धवट शिजलेलें. (उ० आमान्न). २ कच्चें; हिरवें; न पिकलेलें. [सं.] --पु. १ आंव; आमांश; खाल्लेलें अन्न चांगलें पचन न झाल्यामुळें क्रमानें थोडा थोडा सांठत जाणारा जो अन्नरस त्याला आम अगें म्हणतात. हा मस्तक व सर्व शरीर यांमध्यें पीडा उत्पन्न करतो. २ (शाप.) अर्धपक्व अन्न; आमरस. (इं.) चाईम.

आम--आंबा. [सं. आम्र]

आम--वि. सार्वजनिक. सामान्य; सरसकट. 'हा आमरस्ता नाहीं.' दीवाण इ-आम; जलसा इ-आम, इ० [अर. आम्म=सामान्य] **०खास**--क्रिवि. सरास. 'सदईप्रमाणें धारण छ २५ रजबीं आमखास बाजारांत जाली.' -रा ७.१४७. -पु. दरबार; लोकसभेचा दिवाणखाना. 'तैसेच आमखासमध्यें कुलवजीर मुस्तेद करून उभे केले' -सभासद ३८. [अर. आम्म+उर्दू खास्स=सामान्य] **०दार**-पु. (अर्वाचीन) प्रांतिक कायदेमंडळाचा सभासद; एम्. एल्. सी.; वरिष्ठ कायदेमंडळाच्या सभासदाला खासदार म्हणतात.

आमकाठी--आंबकाठी पहा.

आमगूळ--वि. आंबट-गोड; आंबूस; मधुराम्ल. [सं. अम्ल+गुड]

आमचा-ची-चें--आम्ही या सर्वनामाचें षष्ठीचें रूप.

आमचेपणा--पु. आपलेपणा. 'त्यांत आमचेपणा नाहीं' ठिण्या.

आमच्याइथें, आमच्याइथलीं माणसें, आमच्याघरांत--नवऱ्याबद्दल (नांव घ्यावयाचें नसतें म्हणून) बहुमानानें असा वाक्प्रचार योजितात. 'आमच्या इथें रात्रंदिवस काळजी लागली आहे.' -मोर १४. 'आमच्या घरांत देखील स्वभाव असाच पैशाचा लोभी.' -विवि ८.३.९. 'अभिमानानं मिरवावयासारखी आमच्या इथली माणसं होण्याइतकं पाणी स्वार्थ्यांच्या जवळ नव्हतं!' -गुपचूप (रसिकरंजनमाला)

आमटी--अंबटी पहा.

आमंटुक--क्रिवि(व.) अंदाजानें 'ज्वारी कशास मोजतोस, आमंटुकच दे म्हणजे झालें.' [सं. अ+मन्-मंतु]

आमडी--अंबाडी पहा. 'कुणास न मिळे भाजी कुणि राजी करडी मिळो आमडी जुनी.' -राला १०८.

आमण--न. (कों.) चाकांत वाटोळें लोखंडाचें पंचपात्रें ठोकतात तें; आवण. यांत आंस फिरतो; [सं. अक्ष-आंस+वत्-वण?]

आमण--स्त्री. (कों.) एक जंगली वृक्ष; आंबण.

आमंत्रण--न. १ निमंत्रण; बोलावणें; पाचारण; आंवतण; आव्हान. (क्रि० करणें; देणें) २ आमंत्रणाला निघालेली मंडळी. [सं. आ+मन्त्र्] **०पत्रिका**-स्त्री. बोलावणें करण्याचें पत्र; कुंकुमपत्रिका; लग्नचिठ्ठी इ०

आमंत्रणें--उक्रि (काव्य) १ बोलावणें. २ आमंत्रण देणें; आंवतणें.

आमंत्रणा--वि. १ (जेवावयास) बोलावणें करणारा नोकर; बोलावणेंकरी. २ आमंत्रणास जाणारा; अक्षत घेऊन जाणारा (यजमान, आप्त वगैरे).

आमंत्रित--वि. ज्याला आमंत्रण, बोलावणें केलें आहे असा; निमंत्रित.

आमद--स्त्री. उत्पन्न; आवक. 'दौलत आहे तेथें आमदही आहे व खिसाराही आहे.'-रा १०.१६६. 'पैशाची आमद राहणार गाहीं.' -ख ७.३५७५. [फा. आमद्]

आमदन--न. येणें; आगमन. 'आं अमारत्पन्हाचें आमदन या जिल्ह्यास जल्दीनें होय तें करावें.' -पया ३९४. [फा. आमदन]

आमदनी, आमदानी--अमद(दा)नी पहा.

आमद्रफ्त, आमद्रफ्ती--स्त्री. १ ये जा; रहदारी; दळणवळण. 'हजारों मनुष्यांची आमद्रफ्त, त्यांत असा चोरून जो येणार तो कोणे स्वरूपानें व कशा येतो हें कशावरून समजावें' -रा ७.१३५. २ व्यापारी मालाची ने आण व त्यावरील जकात 'सुख इप आमदरफ्त होऊं देत नाहींत. -रा ३.८८. 'मागीं येतां जातां आमद्रफ्तीचा उपसर्ग न लावणें' -रा १५.२३०. ३ रहदारीची परवानगी, मुभा, मोकळीक. 'तो किल्ला घेतला म्हणजे दर्यातून जहाजें येण्यास आमद्रफ्ती जाली' -ख ८.४३५४. [फा. आमद्=येणें+रफ्त=जाणें]

आमना--स्त्री. (व.) १ कामना; इच्छा; मनीषा; हेतु. 'त्या बाबतींत तुमची काय आमना आहे.' २ अंदाज; तर्क. [सं. आ+मन्]

आमनासामना, आमनेसामने--पुवि. (हिं.) समोरासमोर; तोंडास तोंड देऊन (झालेल्या गोष्टी, भांडण); समक्ष. [सामना द्वि.; सिं. आमो+साम्हों]

आमनेर—स्त्री. (व.) ज्वारीची एक जात. वऱ्हाडांतील आमनेर या गांवावरून नांव पडलें असावें.

आमपाचन—वि. हगवण; आंव वगैरे नाहींसें करणारें; (औषध); आमांशावर उतारा. –न. हगवण, अमांश या विकारापासून होणारी मुक्तता. [सं. आम+पच्]

आमय—पु. रोग; व्याधि; दुखणें; आजार; विकृति. [सं.]

आमरण, आमरणांत—क्रिवि. मृत्यु येईपर्यंत; मरेपर्यंत. [सं. आ+मरण+अन्त]

आमरवेल—अमरवेल पहा.

आमरस—पु. पिकलेल्या आंब्याचा पिळून काढलेला रस; आंबरस. [सं. आम्र+रस]

आमराई—स्त्री. आंब्यांच्या झाडांची बाग, वन; अंबराई. [सं. आम्र+राजी]

आमल—पु. कैफ; अमल पहा. ' रुक्या दोरुक्याचा आमल सेऊनि । ' –दावि ४५२.

आमलक—पु. आंवळ्याचें झाड व फळ. ' तुरट वाटे आमलक परि पुढें गोडी दिसे अधिक । ' [सं.] **–की**—स्त्री. १ आंवळी; आंवळ्याचें झाड. २ आंवळकाठी. [सं.] **आमलक्यादि चूर्ण**—न. आंवळकांठी, चित्रकमूळ, हिरडेदळ, पिंपळी व सैंधव यांचें चूर्ण. हें सर्व ज्वरांचा नाश करतें. हें भेदक, रुचिकर, कफनाशक, अग्निदीपक व पाचक आहे. –योगर १.६६९.

आमला—पु. कारकून, अमलदार. अमला पहा.

आमली—स्त्री. (भिल्ल.) इम्ली; चिच. (अव.) आमल्या. [सं. अम्लिका; हिं. इम्ली]

आमली—स्त्री. (गो.) कैरी; आंबली. [सं. आम्र+ल=लघुत्व-प्रत्यय]

आमलेखामले—पु. अव. (बायकी) मंगळागौरीच्या पूजेसाठीं देवीच्या चार बाजूस कणकीचे चार खांब बसवितात ते. [सं. स्तंभ–खांब–खांबले द्वि.]

आमवात-वायु—पु. संधिवात; एकदम कुपित झालेले आम व वात हे दोष माकडहाड व सांधे यांमध्यें शिरून सर्वांग ताठवितात तो विकार. लक्षणें–अंग मोडून येणें, अरुचि, तहान, आळस, जडपणा, अन्नपचन न होणें, हातपाय वगैरे अवयवांना सूज येणें वगैरे. –योर २१. २३.

आमविकार-विकृति—पुस्त्री. आमांशापासून होणारा रोग; आंतड्यासंबंधीं होणारा रोग. [सं.]

आमशूल—पु. आमांशाच्या संचयामुळें जो पोटशूल जडतो तो; वातजन्य पोटदुखी.

आमसाण-सूल-सोल—अमसूल पहा.

आमा—पु. स्तन, अमा पहा. ' हे तात काय जेथें न बहु मता दे मुखांत आमा जी । ' –मोस्त्री ४.४९. इतर अर्थी अमा पहा.

आमाक—क्रिवि. (व.) अंमळ; घटकाभर; थोडावेळपर्यंत. [वै. अन्नस्; सं. अम्=थोडें, लवकर]

आमाडा-डो—पु. (कु.) केसांचा आंबाडा. अंबाडा पहा.

आमातिसार—पु. आंव हगवण; अतिसार; संग्रहणी. [सं. आम+अतिसार]

आमात्य—अमात्य पहा:

आमानी—अमानी पहा.

आमान्न—न. कोरान्न; शिधा; कच्चें अन्न; बिन शिजविलेलें ब्राह्मणांना वगैरे देतात तें. ' ब्राह्मणांस संकल्पपूर्वक दक्षिणेसहित आमान्न देतात. ' [सं. आम=कच्चें+अन्न; गो. आमान्य]

आमाभामर—वि. (गो.) जीव कीं प्राण अशी; अत्यंत प्रिय (वस्तु).

आमाला—वि. चोहोंकडून मारा करणारा. ' दाटदळेआं देवांचा आमाला । दापितेआं देवांचा जगदळा । ' –शिशु १५५. [सं.आ=आसमंतात्+मारक–प्रा. आमालअ–आमाला=चारी बाजूचा मारा ?]

आमांश—पु. १ अपक्व अन्नाचा अंश; आंतड्यांत अगर पोटांत पचन न होऊन राहिलेलें अन्न. २ त्यामुळें आंतड्यासंबंधीं झालेले विकार, हगवण, आंव इ [सं.आम=अपक्व–पचन न झालेला+अंश]

आमाशय—पु. ज्यांत आम सांचतो तो पोटांतील भाग; पक्वाशय; कोठा; पोट. [सं. आम+आशय]

आमाशिक-सिक—वि. (ना.) अंमळसा; जरा; थोडा; अमासा पहा.

आमासा—अमासा पहा.

आमिष—न. १ मांस; भक्ष्य. २ प्रलोभन; लालूच; लांच; वक्षीस; मधाचें बोट. ' जयासि भुकेलियां आमिषा । ' –ज्ञा ३.२४६. ३ माशास पकडण्याकरितां गळास लावलेली उंडी वगैरे खाद्य पदार्थ. ' जैसा गळीं मीनु आमिषें । भुलविजे गा । ' –ज्ञा ३.२१३. –एभा ३.७९८. ४ (ल.) बुद्धिबळाच्या खेळांत प्रतिपक्षावर आपल्या मोहऱ्यांचा मारा जोरानें चालावा म्हणून फुकट दिलेले मोहरें किंवा प्यादें. (इं.) गॅबिट ५ (ल.) मोहक पदार्थ.–स्त्री. धन, इ०. [सं.]

आमिक्षा—स्त्री. (वै.) कढत दुधांत दहीं घालून होणारा पदार्थ. [सं.]

आमीं—क्रिवि. (भिल्ली) आतां. ' आमीं इं वोठों पाठकेयाबिगर मान सुटकोज नाहां । ' [?]

आमीग—पु. (गो.) मित्र; दोस्त. [पोर्तु. आमीगु]

आमीन—उद्गा. (हिं.) तथास्तु. [अर. आमीन; इं. आमेन]

आमील—अमीन पहा.

आमुडणें—उक्रि. (गो.) हांकलणें; हांकून लावणें. 'त्या कावळ्यांक आमूड.' [सं. आ+मुच्]

आमुतें—सना. (काव्य) आम्हांस; आम्हांला; आम्हांकारणें आमुतें जिंतिलें फुडे। नेणों केवी।' –शिशु ७२९. [सं. अस्मत्]

आमुला—वि. संततिरहित; स्वतःचें मूलबाळ नाहीं असा. 'ते आमुला हे आमुली। यया संगति नाहीं देखली। परि सकळ कुळवाडी जथिली। ययांचि दोघीं।'–स्वादि १३.३.३२. [अ+मूल]

आमुष्मिक—वि. दुसऱ्या जगांतील; पारलौकिक. [सं. अदस्‌ची षष्ठी; अमुष्य यापासून आमुष्मिक]

आमूलचूड—क्रिवि. मूळापासून शेवटपर्यंत; आरंभापासून अखेरपर्यंत. [सं. आ+मूल+चूडा]

आमेज—पु. भेसळ; मिश्रण. अमेज पहा. 'मुंबईची भाषा शुद्ध मराठी नव्हे; कांहीं अंत गुजराथी भाषेचा आमेज आहे.' [फा.]

आमेट—स्त्री. (गो.) (खेळांत) तहकुबी.

आमेद—स्त्री. (व.) १ आमदानी; उत्पन्न; आमद. अमदानी पहा.

आमेन—उद्गा. (ख्रि.) तथास्तु; आमीन पहा. 'पाद्रीसाहेब जें जें सांगतील त्यास आमेन् या एक्या पदानेंच उत्तर करावयाचें हीच कां धर्मनिष्ठा.' –नि ८७६. 'तेव्हां सर्व लोकांनीं आमेन म्हणावें.' –अनु २७.१५. –वि. १ स्थिर. –प्रक ३.१४. २ सत्य; बायबलमध्यें ख्रिस्ताच्या प्रवचनांत या शब्दाचें भाषांतर सत्य, सत्य (व्हेरिली, व्हेरिली) असें केलें आहे. –पु. १ येशूख्रिस्ताचें एक नांव. २ संमति, समाप्ति दर्शक शब्द. –गण ५.२२. –नेह ५.१३. –स्तोसं १०६.४८. [हिब्रू. थ्री. लॅ. इं. आमेन; अर. आमीन]

आमोट—सना. (गोंड.) आम्ही.

आमोण—अंबोण पहा.

आमोद—पु. १ सुगंध; सुवास. 'कृष्णमुखकमळ सुंदर। जननयन तेचि भ्रमर। तेथेंचि गुंतले साचार। कृष्णआमोद रसभावें।' –एरुस्व ६.१८. २ आनंद; सुख. [सं.]

आमोदित—वि. १ सुगंधित; सुवासिक. २ सुखी; आनंदी. [सं.]

आमोरी—स्त्री. (गो.) (ख्रिस्ती लोकांत) दिवे लावण्याची वेळ; तिन्हीसांज. 'आतां आमोरी जाली, चल तूं घरा.' [पोर्तु. ऑव्हे मेरिया किंवा मारीय हें तिन्हीसांजां म्हणावयाचें स्तोत्र]

आमोला—चोहोंकडून मारा. आमाला पहा. 'आमोलेयांचेआं दळभीडा। पुरतां हातियेरूं कैचा तेहवडा।' –शिशु ८८०. 'आमोले उसासितांती रणीं। कटारे वेन्हीं।' –शिशु १०४६. **–लेपण**–न. मारण्याची बुद्धी; शौर्य. 'भीडला समरंगणीं आमोले पणें।' –शिशु ९७९.

आम्ना—स्त्री. (व.) इच्छा; आमना पहा. 'आतां लोकांची कापूस विकावयाची आम्ना आहे.' [सं. आ+मन्]

आम्नाय—पु. वेद; श्रुति. 'सुकृत कीजे पुसतां। आम्नायातें।' –ज्ञा १८.२४३. 'तुजसम आम्नाय बोलका नाहीं।' –मोआदि १.३. [सं.]

आम्र—पु. आंब्याचें झाड, फळ; आंबा. [सं.] **०पल्लव**–पु. १ आंब्याची टहाळी. ही शुभ व अशुभ अशा दोन्ही प्रसंगीं वापरतात. २ (ल.) चांगल्या वाईट प्रसंगीं पुढें होणारा, विवेकशून्य, हलकट माणूस.

आम्ल—न. आंबट; आंबटपणा. अम्ल पहा. 'कां चुनियाहुनि दासट। आम्लीं हन।' –ज्ञा १७.१३९.

आम्लपित्त—अम्ल पहा.

आम्लवेतस्—न. १ महाळुंगाप्रमाणें ही एक लिंबाची जात आहे. ही फार आंबट असते, इतकी कीं फळांत पोलादी सुई टोंचून ठेवली तर विरघळते म्हणतात. हीं फळें काशीकेडे फार होतात; (व.) सुळे निंबु. २ चुका; आंबट भाजी. [सं.]

आम्ही—सना. प्रथमपुरुषी मीचें अव. बहुमानार्थी एकवचनी अर्थानेंहि वापरतात. राजे, सरदार, मोठे लोक, संपादक, अधिकारी इ० आपल्याबद्दल बोलतांना आम्ही शब्द वापरतात. आपण पहा. 'आम्ही कोण म्हणून काय पुससी? आम्ही असुं लाडके। देवाचे' –केक (आम्ही कोण). **म्ह०** १ (व.) आम्ही तुम्ही भाऊ भाऊ तुमचे पोहे आमचा कोंडा मिळून मिसळून फुंकून फुंकून खाऊं. २ आम्ही तुम्ही भाऊ आमच्या कठाळ्यास हात नका लावू. ३ आम्ही खावें आम्ही प्यावें जमाखर्च तुमच्या नांवें. या सर्व म्हणी आपलपोट्या, मतलबी माणसास लावितात. [सं. अस्मत्; अहं; प्रा. अहमे; त्सीगन. आमेन किंवा आमे; फ्रेंच–जिप्सी अमिन; खान. आमु–आम्हु; गोंडी अमात; उरिया अम्हे; हळेका. आम; मं. आमी; राजस्था. हम्, म्हे; गु. अमे; हिं. हम्; पं. असीम; नेपा. हासी; काश्मिरी असि.]

आय—पु. १ नफा; फायदा; मिळकत; उत्पन्न; आदा. याच्या उलट व्यय. २ (ज्यो.) कुंडलींतील ११ वें स्थान; **आयस्थान**. ३ अलुतें, बलुतें; उत्पन्नांतील गांव कामगाराचा हक. अलुतींबलुतीं पहा. [सं. आ+इ=जाणें]

आय—स्त्री. (कु.) आई. अई, आई पहा.

आय—न. लोखंड. [सं. अयस्]

आय—पु. १ आटोका; आटोप. 'हे आदिपुरुषाची माया। ब्रह्मेयाही नयेचि आया।' –ज्ञा १.२०३. २ अस्तित्व. –सोहिरोबा अद्वयानंद ३. –शर. ३ आकार; स्वरूप. 'ते म्हणती भला भला रे नेटका। बरवी आणिली आया ग्रंथपीठिका।' –एभा १.१७९. घर वगैरे बांधण्याकरतां जी जागा ठरविली तिच्या लांबीरुंदीच्या गुणाकारास आठानें भागून जी बाकी राहील ती. हे आय

आठ आहेत.–ध्वज, धूम, सिंह, श्वान, वृषभ, खर, कुंजर व ध्वांक्ष. घर बांधण्यास विषम स्थानाचे आय शुभ व समस्थानचे अशुभ समजतात; लांबीस रुंदीनें गुणून (आठांनीं भागून) शेषांक जो राहील तो –शिवदिग्वि ४१६. 'सभा रचिली तें वेळीं । आठही आय साधले त्या स्थळीं । अष्टदिक्पाळ महाबळी । पायाचे मूळीं स्थापिले ।' –ह ३४. ११५. 'मर्दी तरी चौफळें । आयें दिसे ।' –ज्ञा १३. ८९७. **आया येणें**–सक्रि. १ समजणें; आकलन होणें. 'कीं शिव ब्रह्मादिकां न येसी आया ।' –ह २३.१५३. 'जो देवादिका नये आया ।' –दावि १५१. २ प्रत्ययास येणें 'तें मिथ्या कैसेनि ये आया ।' –रंयो १.११२६. ३ स्वाधीन होणें; ताब्यांत येणें; आटोक्यांत येणें. 'ब्रह्मादिकां नयेचि आया । देव याया देहबुद्धी ।' –एरुस्व १३.५०. आय पहा. ४ शरण येणें; पराभव होणें; जेरीस येणें; मऊ येणें. –ख ३५३८. –पया १९४. 'सरकारी दावरदट्ट्या लागला तेव्हां तो आयास आला.' ५ आकारास येणें; अस्तित्व असणें. 'ब्रह्मावेगळी माया । सर्वथा नये आया ।' –एभा २४. ४७७. 'तये काशीपुरी जावया । तीन मार्ग योजिले सविया । कोण कोण ते आया । आणिजती ।' –स्वादि १०.४.५८. [सं. आ+यम् =पसरणें]

आयआय—उद्गा. अंगांत एखादी आकस्मिक वेदना उत्पन्न झाली असतां किंवा कांहीं दुःख झालें असतां एकदम उद्गार निघतो तो; अयोयो. [सं. अयि]

आयकर्णे, आयकभट्टी, आयकीव—ऐकर्णे पहा.

आयकरी—पु. (व.) गावांतील वरठी, न्हावी, सुतार वगैरे कामदार; बलुतेदार; यांनां कामाबद्दल धान्यरूपानें मजुरी द्यावयाची असते. [आय+करी]

आयकविर्णे—ऐकविर्णे पहा.

आयचन—स्त्री. (व.) अडगळ; कचरा. 'आयचनांत जाऊं नकोस, तेथें विंचू–कांटयाचें भय असतें.' [अडचण]

आयचो—वि. (गो.) आजचा. [सं. अद्य; म. आज]

आयंडा—पु.(कों. गो.) १ भात झोडण्याच्या वेळीं एका वेळीं जेवढी भाताची पेंढी हातांत घेतात तीस म्हणतात; पेंढी; लाळा; भाताचा भारा; बडवल्यानंतर नुसते काडाच्या भाऱ्यास पेंढा, पेंढका, पेंढकें, आयंडयाची पेंढी इ० म्हणतात २ भातेण्याचा–झोडलेल्या भाताचा–भारा. ३ वरील पेंढीस बांधावयाची दोरी. [सं. आ+यम्]

आयडोफार्म—अदपुत्तिक पहा.

आयणॉ—पु. (गो.) पंखा; विंझणा [पोर्तु. जिप्सी आइरण सें. व्यजन; म. विंझणा]

आयणी—स्त्री. १ इच्छा; हेतु; वासना. 'तुका म्हणे मन तुमचे चरणीं । एवढी आयणी पुरवावी ।' –तुगा १६१९. –निगा ११९. २ मत. ३ मन; बुद्धि. 'हे सद्गुरूची विनवणी । कीं ब्रह्मसुखाची खाणी । परिसतां सप्रेम बोलणीं । रिझली आयणी सज्जनांची ।' –एभा ४.२३ ४ चांगली चाल. –मनको. ५ सामर्थ्य.–मनको. ६ मालिका; ओळ. 'तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं । शोभती आयणी । चोखट आइका ।' –ज्ञा १० ४५. ७ चातुर्य; युक्ति 'नातरी जाणिवेच्या आयणी । करितां दधि कडसणी । मग नवनीत निर्वाणी । दिसें जैसें ।' –ज्ञा २. १२९. ८ अभिमान; गर्व. 'तो (शेष) ही बोलिकेपणें आयणी । बोलतां रसना गेली चिरूनि ।' –स्वादि १. २. २१. (आइणी, आयनी, ऐणी अर्शी इतर रूपें.) [सं. आ+या; आयान]

आयणी—स्त्री. म्हण; आहणा

आयत—वि. लांब; विस्तृत; मोठें; लांबरुंद. 'पैं कमलायत डोळसा ।' –ज्ञा ११.६९. –पु. (गणित) ज्या चौकोनाचे सर्व कोन काटकोन असतात परंतु बाजू असमान असतात त्याला आयत म्हणतात. –महमा ८ (इं.) रेक्टँगल. –न. (नृत्य) स्त्रियांनी उभें राहण्याचें स्थान; डावा पाय सरळ व स्वाभाविक स्थितींत ठेवणें व उजवा पाय एकताल अंतरावर किंचित् तिरकस ठेवणें, मुख प्रसन्न, ऊर सम व उन्नत, हात नितंबाच्या बाजूस ठेवणें; रागाचा अभिनय, गंभीरपणा, शृंगारभाव दाखविणें, वगैरे वेळीं था स्थानांत उभें राहणें. [सं. आ=यम् =पसरणें]

आयत—स्त्री. कुराणांतील ईश्वराचें वाक्य. 'ईश्वराचें वाक्य कुराणशरीफच्या ग्रंथांत असतें त्यास आयत असें म्हणतात.' –वाड –सनदा २३. [अर. आयत्]

आयतन—न. जागा; स्थळ; राहण्याचें घर; वसतिस्थान-देऊळ; अग्निकुंड. 'परी संतकृपेसि मी आयतन' –एभा ५.७४. सामाशब्द–भोगायतन=भोग भोगण्याचें स्थान; शरीर. मूलायतन=उगम, मूळ, उत्पत्तिस्थान. [सं.]

आयता—पु. (कों. ना.) तांदुलाच्या पिठाचें आंबोळीसारखें एक खाद्य; धिरडें. याचें पीठ आंबवीत नाहींत. हें आयत्या वेळीं करतां येतें. आइता पहा. [सं. अयत्नतः किंवा आयत्त]

आयता—क्रिवि. १ प्रयत्न केल्यावांचून; श्रम केल्यावांचून; दगदग, काळजी न करतां; हातार्शी सज्ज, तयार; श्रम न करतां; चालून येणारें. 'हा दागिना मीं करविला नाहीं, मला आयता मिळाला.' 'पाजी असाचि मजला गंगास्तन आयती सु–धारा हो. –मोभीष्म १२.१२. [सं. आयत्त=चालून आलेलें; किंवा अयत्नतः] २ बोलावल्याशिवाय; आपण कारण झाल्याशिवाय; आपल्या संमतीशिवाय (येणें, प्राप्त होणें, घडणें–माणूस, प्रसंग, इष्ट गोष्ट.)–वि. प्राप्त झालेला; आलेला; सध्यां हजर; चालत असलेला (काळाविषयीं). 'लग्नाचें साहित्य आधीं करून ठेवा म्हणजे आयत्यावेळीं खोळंबा होणार नाहीं.' **म्ह**० १ आयत्या पिठावर रेघा ओढणें, गुटका मारणें= वडिलार्जित किंवा आयत्या मिळालेल्या संपत्तीवर चैन करणें, दिवाळी

करणें. याच अर्थाची दुसरी म्हण–आयत्या विळीं नागोबा बळी २ आयत्यावर कोयता=अगदीं तुटायला झालेल्या लांकडावर कोयत्याचा एक घाव मारून सर्व लांकूड तोडण्याचें श्रेय आपण घेणें, (ल.) एखादें भांडण अगदीं मिटावयास आलें असतां मध्यें पडून तें मिटविण्याचें श्रेय आपण मिळविणें या अर्थी, किंवा दुसऱ्याच्या द्रव्यावर चैन करणें या अर्थी ही म्हण योजितात. ३ आयत्यावर रायतें करणें=हातार्शी असेल त्यांतून खर्च करणें. **आयत्यावेळीं** –ऐन प्रसंगीं; नडीच्या वेळेस.

आयतामूल—पु. एखाद्या विधवेचा पाट लावण्यापूर्वीचा मुलगा; आयतोळा.

आयतार—(गो.) आदितवार; रविवार. [सं. आदित्यवार]

आयताळें—न. लागणाऱ्या वस्तूंची किंवा पदार्थांची तयारी. 'माझ्या घरीं आयताळें आहे.' [आयता]

आयती—स्त्री. १ स्वयंपाकासाठीं (निवडून, धुवून, दळून, ठेविलेलें डाळ, तांदूळ पीठ इ०) साहित्य; रिद्धता; तयारी 'पहा हो समाराधनेची आयती। घेऊनि आला अतिभक्ति।' –गुच ३८.१५. २ विस्तार, थाट. 'गंभीर वाचा ते आयती। गर्जनेची॥' –ज्ञा २.७८. ३ सहज; आयता याचें स्त्रीलिंग; आयता पहा. 'ना ते अखंडचि आयती। परि संगे भिन्न गमली होती। ते सारिलिया मागौती। जैसी का तैसी।' –ज्ञा ८.४४. **०वेळ**–स्त्री. १ जेवण वगैरेंच्या तयारीची वेळ; ऐन कामाची, घाईची, जरूरीची वेळ. २ मळणीची किंवा पेरणीची घात, वेळ; हंगाम. [आयता]

आयती बायको—स्त्री. न्हातीधुती स्त्री; वाढलेली, मोठी बायको.

आयतें—१ धिरडें. आयता (पक्वान्न) पहा. 'आई मला ज्वारीचीं आयतीं करून घाल.' २ आयती अर्थ १ पहा. ३ (गो.) आमटींत टाकण्यासाठीं तयार केलेला कच्चा मसाला. ४ इतर अर्थांकरितां आयता पहा.

आयतेंकार—पु. (गो.) स्वयंपाकाची पूर्व तयारी करणारा.

आयतें सुयतें—न. एखाद्या कामास लागणारीं हत्यारेंपात्यारें, साधन, सरंजाम; साधनसामग्री. [आयतें द्वि.]

आयतोजी, आयतगब्बू, आयतमार–च्या, आयतोबा—पु. आयत खाऊ; कांहीं कष्ट न करतां दुसऱ्याचें खाणारा; जेवणाचे ऐन वेळीं येणारा; श्रम करण्याच्या वेळीं दूर राहून फलप्राप्तीच्या वेळीं हजर होणाऱ्या माणसास हा शब्द लावतात. म्हण १ आयत गब्बू आणि पैसा ढब्बू. २ आयतमार आणि खायाला तय्यार. ३ आरतमाऱ्या आणि ताट शृंगाऱ्या. [आयता]

आयतोळा—वि. १ श्रम न करतां मिळालेला, सांपडलेला; आयता. २ (थट्टेनें) पाट लावलेल्या विधवेचें पहिल्या घरचें मूल (हें दुसऱ्या नवऱ्यास आयतेंच मिळालें असतें म्हणून). [आयता]

आयतोळा—पु. कुणबी बायकांच्या गळ्यांतील एक दागिना.

आयतोळा—वड्यांचा एक प्रकार. –गृशि ३६२.

आयत्त—वि. स्वाधीन; आधीन; अवलंबून असणारा; अनुयायी; अनुषंगी; हाताखालचा [सं.] **०कंठ**–वि. (संगीत) ज्याचा गळा, आवाज स्वाधीन आहे असा (मनुष्य). **०कंठत्व**–न. (संगीत) आवाज ताब्यांत असणें.

आयदण–न, आयदाण–न–न. (राजा. गो.) बांबूच्या बारीक पट्ट्यांची विणलेळी पाटी, टोपली, गोण, भांडें. 'आयदाणा साटकर (लवकर) घास. २ कोंबडयाच्या डोक्यावरील तुरा? [सं. आयतन]

आयंदा—आइंदा पहा.

आयदी—अयदी पहा.

आयनक–आयना—अ मध्यें पहा.

आयनरणें–आयनेरणें––अक्रि. आई गरोदर झाली असता तिचें दूध प्याल्यामुळें आजारी होणें; आयनेन्याचा रोग होणें. अवथणणें पहा. [आई+न्यारें=निराळें.]

आयनी—आयणी पहा.

आयनी—वि. १ लोखंडी; लोखंडाचा. 'आयनी गोळे सांपडले.' –ख ४. १५८८. [फा. आहनीन् = लोखंडी; तुल० सं. अयस्=लोखंड; इं. आयर्न]

आयनेरें—न आईचे अंगावर पिणें तुटण्यामुळें मुलास होणारी विकृति; आई गरोदर असतां तिचें अयोग्य दूध प्याल्यामुळें मुलास होणारी विकृति (गरोदरपणीं आईचें दूध चांगलें नव्हे म्हणून मुलांना यावेळीं तोडतात). [आई+न्यारा]

आयपत—ऐपत पहा.

आयपाय—पु.अव. (गो.) आईबाप. [आई + पोतुं. पाय=बाप]. **०वैरकाढणें**–(गो.) आईबापावरून शिव्या देणें,उद्धार करणें.

आयपूत—पु. (राजा.) दत्तक घेतलेला मुलगा. [आयता+पुत्र. किंवा सं. आदा; प्रा. आया=स्वीकार+पुत्त]

आयब—अयब पहा.

आयबें—कुत्र्याची छत्री; अळबें पहा.

आयराणी––स्त्री. हडळ, जखीण, जाखाई–जोखाई या सारखी एक क्षुद्र देवता; हिला मायराणी असेंहि म्हणतात. [वै. सं. अरण्यानी =वनदेवता. किंवा आय=आई+राणी ?] **०मायराणी**–(विनोद. उप.) नट्टापट्टा, नखरा करणारी स्त्री.

आयल––अयाळ पहा.

आयलड–डी––क्रिवि. (कु.) अल्याड; अलीकडची बाजू. 'आयलाडी ये.' [अल्याड]

आयलें—वि. (गो.) अलीकडील. [सं. आदि+ल]

आयस्थान—क्रिवि. (गो.) अलीकडे किंवा जवळ. (स्थलदृष्टया)

आयवट—ऐवट पहा.

आयव्यय—पु. १ जमा, आणि खर्च; वसूल आणि खर्च; उत्पन्न आणि खर्च; येणें देणें २ (फलज्यो.) कुंडलीतील ग्रहांच्या शुभाशुभ लक्षणांवरून मनुष्याच्या आयुष्यांतील लाभ, हानि यांचें गणित; आयव्ययायाचीं स्थानें; कुंडलींतील अकरावें स्थान आयाचें आणि बारावें व्ययाचें धरितात. [सं.]

आयशिलो—वि. (गो.) जवळचा; लगतचा.

आयशी—स्त्री. (कों.) आई, आईस; आवशी पहा [आई. तुल० सिं. आयली]

आयस—वि. लोखंडाचें; लोहमय; लोखंडी. [सं. अयस्–आयस] –न. लोखंड. ' सिवतलियाही परिसें । लोहत्वाचिये अवदसे । न मूकिजे आयसें । तैं कवणा बोलु । ' –ज्ञा १८.१७७१. ' आयस जड मी, चुंबकमणि तूं । ' –प्रभावती.

आया—अया पहा.

आया—स्त्री. आकलन; लाटोका. आय पहा. (क्रि० येणें).

आयाओया—आय आय पहा.

आयागमन—न. पुनरागमन; पुनर्जन्म. 'मागुती होय आयागमन । सर्व जीवांचें । ' –कथा १.१५.३३. [सं. आय + आगमन]

आयात—वि. जवळ आलेला; प्राप्त झालेला. [सं.] –पु. परक्या ठिकाणाहून, बाहेरून आलेला माल. (इं.) इंपोर्ट. याच्या उलट निर्गत–निर्यात. **०जकात**–स्त्री. 'रठिकाणाहून किंवा परदेशाहून आलेल्या मालावर घेण्यांत येणारा कर. हा एक अप्रत्यक्ष कर असून तो सर्व रयतेवर बसतो. **०निर्गत**–वि. आलेला व गेलेला; प्राप्त झालेला व निघून गेलेला. –स्त्री. १ परदेशाहून आलेला व परदेशीं गेलेला माल. २ त्यावरील जकात.

आयानाम्ल—न. तेजाब; चरबीपासून काढलेलें एक अम्ल. (इं.) ॲंडिपिक ॲसिड.

आयाबाया—स्त्री.अव. १ शेजारणी पाजारणी; नात्यागोत्याच्या नसलेल्या, कोणीतरी सामान्य स्त्रिया; आईबाई पहा. २ (ल.) नेभळट, कमजोर, निसत्त्व किंवा भागुबाई माणूस, वस्तू इ०; पराक्रमहीन, दरिद्री पुरुष. ' अरे, तुझ्यासारखा वीर जेथें थकला तेथें या आयाबायांच्या हातून काय व्हावयाचें आहे ? ' [आई+बाई] **म्ह०** वृक्षामध्यें एक साया (साग), वरकड साऱ्या आयाबाया.

आयाम—पु. जमीन वगैरेची लांबी. [सं.]

आयाव—न. (गो.) अहेव; सौभाग्य. [सं. अ+वैधव्य] **०पण**–न. अहेवपण पहा.

आयाचाया—अयांचायां पहा. ' संसारीं करिती व्यर्थ । आयाचाया । ' –दावि २१४.

आयास—पु. १ श्रम; मेहनत; दगदग; कष्ट. ' भणौनि तुझां आयास । ' –शिशु १२३. ' रायाला न गमे न जाय रजनी आयास होती महा । ' –नल २८. २ (अव.) थकवा; गळून जाणें. (क्रि० होणें; पडणें). [सं. आ+यस्=श्रम करणें] **०प्रयास–सायास**–पु. अव. अनेक दुःखें; श्रम; कष्ट; मेहनत; कसोशी; प्रयत्न. [आयास द्वि.]

आयासी—वि. १ कष्टी; श्रमी. ' तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी । ' –भक्तमयूर (पराडकर) केका २८. २ मेहनत करणारा; कष्टाळू; प्रयत्नी; खटपटी.

आयाळ—भ्रतार; कोम या अर्थी. अयाल–ळ पहा.

आयिता—आयता पहा. 'निजमोक्ष लाभे आयिता । '–एभा १७.५६. ' या लोकीं सकळार्थसिध्दिफळ तें पावे पहा आयिता । ' –निमा १.१५.

आयु—न. आयुष्य; जीवितकाल. ' कार्यें उरकुनि घे रे तेरा बर्‍हेंचि राहिलें आयु । ' –मोसभा ७.२४. [सं.] सामाशब्द–अल्पायु; शतायु; दीर्घायु; सहस्रायु. ' बापुडा हा त्रिभुवनगोळु । अल्पायु जाहला । ' –ज्ञा ११.३८९.

आयुध—न. १ शस्त्र; हत्यार (तलवार, भाला इ०). 'सत्त्वकाळीं कामां न येतीं आयुधें । सोयरीं संबंधें सैन्य लोक । ' –तुगा ३५६. २ (ल.) अवजार; उपकरण; साधन (शेती, कारागिरी इ० चें). [सं. आ+युध्=लढाई करणें]

आयुरारोग्य—न. पुष्कळ आयुष्य व आरोग्य; दीर्घायुष्य व जन्मभर दुखण्याबाहाण्यांतून मुक्तता; निरोगी स्थिति. ' आयुरारोग्य ऐश्वर्य अपार । संतति संपत्ति ज्ञान विचार । श्रवणमात्रें देणार । ' [सं. आयुः+आरोग्य]

आयुर्दाय—पु. (अशुध्द आयुर्दाव) आयुष्यमर्यादा; जीवन काल. [सं.]

आयुर्भाव—पु. (आविर्भाव अप.) अभिमानानें मनांतील विचार दृग्गोचर करणें, हावभावानें व्यक्त करणें, सांगणें. ' ऐकोनि श्रोता आयुर्भाव । आशंका घेतली । ' –वेसीस्व १०.१०७. [सं. आविर्भाव]

आयुर्भोग—पु. आयुष्याचा अनुभव. ' तुका म्हणे दुःखें आला आयुर्भोग । झाला बहु जीव कासावीस । ' –तुगा ३९५९. [सं. आयुः+भाव]

आयुर्वृद्धि—स्त्री. आयुष्याची वाढ. [सं.]

आयुर्वेद—१ वैद्यक शास्त्राचा मूळ प्रमाणभूत ग्रंथ; ऋग्वेदाचा एक उपवेद. उपवेद पहा. [सं.] २ वैद्यकशास्त्र; वैद्यक. ' आणि आयुर्वेदुही आघवा । ' –ज्ञा १३.२२४.

आयुःशेष—वि. मरणोन्मुख. –पु १ राहिलेलें, शिलकी आयुष्य. 'त्याचा आयुःशेष होता म्हणून तो वांचला.' २ आयुष्याचा शेवट. [सं.]

आयुष्मान्—वि. दीर्घायु; चिरंजीव; पुष्कळ आयुष्य असलेला; एखाद्यास आशीर्वाद देतांना आयुष्मान् भव=दीर्घायुषी हो, असें म्हणतात. -स्त्री. आयुष्मती. -पु. सत्तावीस योगांपैकीं तिसरा योग. [सं.]

आयुष्य—न. १ जीवितकाल; हयात; आयुर्दाय; जन्मल्यापासून मरेपर्यंतचा काल. २ वय; उमर. ३ वेळ; अवधि; फुरसत. 'या पुरुषांत सर्वगुण चांगले आहेत परंतु बोलण्यास मात्र आयुष्य थोडें.' [सं.] **आयुष्याचें उर्णे करणें**–आयुष्य फुकट दवडणें. **०क्रम**–पु. जीवितक्रम; रोजची वागणूक; वर्तणूक; राहणी. **०दोरी, –ची दोरी**–स्त्री. आयुर्मर्यादा. (क्रि० तुटणें). त्याच्या आयुष्याची दोरी तुटली=त्याचें आयुष्य संपलें; भरलें. **०मर्यादा**–स्त्री. जगण्याची इयत्ता किंवा अवधि. **०मागणें**–आयुष्य वाढविण्याबद्दल देवाजवळ प्रार्थना करणें; हित चितणें. 'आयुष्य मागेन तुझ्या राज्याला.' –ऐपो ३२.

आयुस–आयूस—न. आयुष्य अप. जिवितकाल. [सं. आयुष्य]

आयुःक्षय—पु. आयुष्याचा नाश; आयुष्य घालविणें. [सं.]

आये–अयाये—उद्गा. दुःखोद्गार; शरीरास कष्ट झाले असतां निघणारे उद्गार; विवळणें; अयायी–अयोयो, ओयओय इ. [ध्व.; आई द्वि.]

आयेतुटी—वि. श्रमलेलें, कष्टी झालेलें; सामर्थ्यहीन झालेलें; अखेरीस टोंकावर आलेलें. 'तेह वेळीं कुच पर्वताच्या घाटीं। ओळघतां डोळे आले आये तुटी।' –शिशु ५६०. [आय+तुट्]

आयोडिन—अद; हें एक महत्त्वाचें औषधी द्रव्य आहे. याचा बहुधा बिन्याप्रमाणें बाह्योपचाराच्या कामीं उपयोग करतात. याच्या अंगीं जंतुनाशक (अॅन्टी सेप्टीक) व दुर्गंधिनाशक धर्म आहे. अद पहा. [इं.]

आयोधन—न. (काव्य) युद्ध; लढाई. [सं. आ+युध्–योधन]

आर—स्त्री. (गो.) अर्धांगवायु; 'आर मारची' =अर्धांगवायूचा झटका येणें.

आर—पु. १ अजगर; अहार. 'आरें धारणु गिळिला'–ज्ञा १३. ७२४; –एभा १३.१९४. आरें गिळितांहि संकटीं। तें स्मरण करितां सोडगें॥' –मुआदि १२. ३९. २ सुस्त, आळशी माणूस; अजगर वृत्तीचा, जड माणूस. [सं. अजगर; प्रा. अअर.]

आर—स्त्री. १ भोंवरा, जातें, अंकुश, काटीचा शेवट, लांकडी कणा यांची अरी किंवा अणकुचीदार लोखंडी टोंक. अरी पहा. २ जरूर; निकड; तातड; घाई; उत्कंठा; बोंचणी. (क्रि० लावणें; लागणें.) ३ दोरींचे बारीक टोंक किंवा शेवट. ४ अंकुर, मोड– विशेषतः जुन्या नागवेलीस फुटणारे अंकुर, धुमारे. या धुमाऱ्यांचा वियाण्याकरतां उपयोग करतात. **म्ह०** नागवेलीची आर एकदां रुजली म्हणजे वेल वाढतो. ५ (सामा.) पागोरा; तंतु; वेलीचा ताणा; अंकुर. 'तेथ आरघेणें मूळाचें। तें ऐसें असें।' –ज्ञा १५.७९. ६ काळजी; टोंचणी; आच. 'त्याला आतां संसाराची आर लागली आहे.' (क्रि० लावणें, लागणें). ७ गुरांना टोंचण्याची पराणी. 'जुंतिलें घाणां बांधोनी डोळे। मागें जोडी आर तेणेहि पोळे।' –तुगा ७०१. ८ (ओतकाम) चरकीवर भांडें झिलई (पॉलिश) करतांना त्याच्या मधोमध दोन्ही बाजूनीं लावले जाणारे खिळे. ९ (व.) करारीपणा; एखाद्याचें कोणाशीं विनसलें असतां पुन्हां त्याच्याशीं बोलणें–चालणें इ० व्यवहार किंवा संबंध न ठेवण्याची वृत्ति; गर्व; ताठा; अभिमान. 'इतकी मुद्दां आर असूं नये तुम्हाला?' [सं. अर, आरा.]

आर—स्त्री. चाकाचा तुंबा व पाटा यांच्या मधील लाकडी तुकडा. [सं. अर.]

आर—स्त्री. गुदस्थानांत होणारें गळूं; अरई पहा. [सं. अर]

आर—स्त्री. शरीरावरील केंसांचा भोंवरा किंवा झुपका. [सं. आवर्त]

आर—पु. विटीदांडूच्या खेळांतील मोजण्याचा ६ वा आंकडा (वकट, लेंड, मुंड, नाल, ऐद, आर इ०). [का. आरु=६]

आर—उद्गा. अरे! अर–र–र! [ध्व.]

आर—अ. संस्कृतमधील कार (=करणारा) या अर्थी मराठींतील प्रत्यय, हा कारागिरांना लागतो. जसें सोनार, सुतार, लोहार, चांभार. इ० [सं. कृ–कार]

आरई—अरई पहा.

आरऊं—पु. अंकुर; आर अर्थ ५ पहा. 'जेथें शक्तितरूचा आरऊं।' –शिशु १०९. [सं. आरा]

आरकटी—अर्काटी. अरकाट पहा.

आरकसदार—अरकसदार पहा.

आरक्त—वि. लाल; तांबडा; तांबूस. 'मस्तकीं मुकुट कानीं कुंडलें तेज फांके। आरक्त दंत हिरे कैंस शोभले निके॥' –तुगा ४८३. [सं. आ+रक्त]

आरक्तोष्ण—वि. तांबडें होईपर्यंत तापलेलें. [सं. आरक्त + उष्ण]

आरखंडा—पु. (कों.) डबर; खाणींतून काढलेल्या दगडांचा एक प्रकार. [अर+खंड]

आरखणा, आरखुडा—अ मध्यें पहा.

आरखें—न. कमानी कापण्याची बारीक करवत. अरकस पहा. [फा. अरा=करवत.]

आरगड, आरगिन आरगीपारगी—अ मध्यें पहा.

आरगूढाळ—स्त्री. (व.) हयगय. ' तुम्ही या कामाची फार आरगूढाळ चालवली आहे ' [अरग+टाळणें]

आरचेस्ट्रा—पु. १ नाटकगृहांत प्रेक्षक व रंगभूमि यांच्यामध्यें तबला, पेटी इ० वाद्यें वाजविणाऱ्या लोकांची बसण्याची जागा २ वरच्या दर्जाच्या प्रेक्षकांची बसण्याची जागा. [इं.]

आरज—पु. १ आजीव; लाड. ' कांहीं न जना करितील आरज । ' –दावि २६४. ' तुम्ही पोरांचे खूपच आरज करता ' [अर. अर्झ्]

आरज—स्त्री. आढ्यता. –नागा ५३. (–शर) –वि. आर्य; श्रेष्ठ; पूज्य. ' जो आरजास गोवी । तो येक मूर्ख । ' –दा २.१. २०. [सं. आराध्य; प्रा. आरज्ज]

आरजा—स्त्री. ऋतु प्राप्त झालेली स्त्री; युवती; तरुण मुलगी. ' हरि म्हणे वस्त्र काढून बुजा । तेंवेंच करिती आरजा । म्हणती काय करावें अधोक्षजा । संकट थोर मांडिलें । '–ह ९.२७४. –निगा ७०. [सं. आ+ रजस्]

आरड, आरडणें, आरडा, आरडाओरडा, आरडेल, आरड्या, आरता, आरतापारता—अमध्यें पहा.

आरडावणें—कि. (व.) ओरडणें. अरडणें पहा. [सं. आ+रुद्]

आरण—पु. (कृषि) (गु.) निळीचा रंग तयार करतांना निळीचीं झाडें ज्या हौदांत भिजत घालतात तो हौद. [वै. सं. आरण = खोली खोलपणा]

आरण, अरण—न. आरण्यक म्हणून जो वेदाचा भाग आहे त्यास भिक्षुक लोक चुकीनें म्हणतात. [सं. आरण्यक]

आरण—स्त्री. (गु.) अपेक्षा; इच्छा. ' आम्हां द्रव्याची नाहीं आरण । आम्ही करावें वेद पठण । ' –कथा ६.१९.१९८. [आर]

आरण, आरणी—स्त्री.अरणी पहा. १ युद्धभूमि. ' जया जिया अक्षौहिणी । तेणें तिया आरणी । वरगण कवण कवणी । महारथीया । ' –ज्ञा १.१२२. –एभा २२.२९५. २ युद्धाची उठावणी; युद्धविषयक हुकूम. ' आणि धुरे नाहीं रणीं । तरी कोणें यावी आरणी । ' –कथा ३.११.१८०. ३ शस्त्र. –नागा २१०८. (–शर) [सं. आ+रण]

आरणूक—स्त्री. विश्रांति; अराणूक. ' आरणूक ते मना नाहीं जयाचियां । ' –गीता १२.३१४. [सं. आ+रम]

आरणें—अक्रि. आरवणें; शब्द करणें (कोंबड्याचें). [सं. आ+रु]

आरणें—अक्रि. (राजा.) अजगरासारखें सुस्त पडणें; अहारणें. [आर=अजगर]

आरणें—अक्रि. (एखाद्या गोष्टीविषयीं) उत्सुक होणें; अधीर होणें. ' आरोनियां पाहे वाट । कटकट सोसेना । ' –तुगा ६७६. [आर]

आरणें—अक्रि. १ (कर्ना.) ओली जमीन उलणें, भेगलणें, वाळणें, सुकणें. २ शांत होणें; शमणें; तृप्त होणें. ' उपकारी असे आरोनि उरला । आपुलें तयाला पर नाहीं ' –तुगा २३९५. [का. आरु=सुकणे]

आरण्य, आरण्यक—वि. १ अरण्यासंबंधीं; वन्य; जंगली; रानटी. अरण्य पहा. [सं.]

आरण्यक—न. वैदिक वाङ्मयांतील अध्यात्मविषयक भाग. ब्राह्मणग्रंथांच्या शेवटीं हा भाग असून तो बहुतेक गद्य असतो. वेदांच्या प्रत्येक शाखेचें स्वतंत्र आरण्यक आहे. आरण्यक ग्रंथाचें अध्ययन घरांत करीत नाहींत; अरण्यांत किंवा गांवांतील एखाद्या देवळांत करतात. प्रथमच अध्ययन करावयाचें तें उदगयनांत करतात. ऐतरेयारण्यक, तैत्तिरीयारण्यक, बृहदारण्यक इ० आरण्यकांचीं नांवें आहेत. [सं. अरण्य]

आरत—न. इच्छा; आवड. ' पोटींचे आरत रामा झडकरि पुरवावें ' –दावि १९९. [सं. आर्ति; गु. आरत=गरज; जरूरी]

आरत—न. (गो.) आरती (देवादिकांची करतात ती) पहा. ' रामीरामदासें आरत ओवाळीलें ' –दावि ४८२. [सं. आरतिः]

आरत—क्रिवि. अलीकडे. अरता पहा. ' म्हणतिलें आरत ये श्रमलासि भूपा ' –दावि ४३८. [सं. आर=सान्निध्य; आरात्]

आरतलें—वि. (व.) आवड पुरविणारें; काळजी घेणारें. ' मुलीला आरतलें ठिकाण सांपडलें. [सं. आर्ति; म. आरत]

आरता, आरती—क्रिवि. अलीकडे; अरता पहा. ' केल्याविण नव्हे हातीं । धरोनि आरतीपारती ' –तुगा १६०. ' सोहं हंसगति क्रमी वसुमती ये उंबऱ्या आरती । ' –मेराधा ८२. ' सूर्याबा रे बंधु आरता येरे माझ्या दादा । ' –ऐपो ४५. [सं.आर=सान्निध्य; आरात्]

आरती—स्त्री. १ तबकांत लावलेलें निरांजन किंवा जळता दिवा ठेवून त्यानें देव, गुरु यांना ओवाळण्याचा विधि. २ ओवाळण्यासाठीं तयार केलेलें जें दीपासहित ताम्हन, तबक इ० साहित्य. ३ देवास निरांजन ओवाळतांना म्हणावयाचें स्तुतिपर गीत. उ० 'सुखकर्ता दुःखहर्ता । वार्ता विघ्नाची । ' ४ तबकामध्यें काढलेली कमल, स्वस्तिक यांची आकृति. ५ पुरणाचे, तांदुळाच्या पिठाचे, कणकीचे दिवे करून त्यांत तूप, वात घालून प्रदीप्त करून देवास ओवाळतात ती. ६ प्रशंसा; सन्मान; बडेजाव. (क्रि० करणें). ' लॉर्ड सॅंडर्स्ट यांचीहि आरती करण्याचा आमचा विचार आहे. ' –टि २. १०३. [सं. आरति; आर्तिक्य] ०**कुरवंडी**–स्त्री. लग्नादि मंगल कार्यांत संकट निवारणार्थ स्त्रिया जें वधूवरांना ओंवाळतात ती. (सामा.) आरती; ओवाळणी. ' ओवाळूं आरत्या कुरवंड्या येती '–विठ्ठलाची आरती.

आरतें, आरतेंपरतें—अरता–ती–तें पहा.

आरत्र—अरत्र पहा. 'सुचि नाहीं स्वधर्म नाहीं। आचार नाहीं विचार नाहीं। आरत्र नाहीं परत्र नाहीं। मुक्त क्रिया मनाची।' –दा २.४.२२.

आरंदळणें—अरंदळणें पहा.

आरद्रा—स्त्री. सत्तावीस नक्षत्रांपैकीं ६ वें नक्षत्र. [सं. आर्द्रा]

आरंभ—संतान नसल्यामुळें होणारें दुःख. अरंधें पहा 'तेणें बहुत दुःख जालें। घरीं आरंधें पडलें। म्हणती आम्हांस कां टेविलें। देवें वांझ करूनी।' –दा ३. ३. ३७. [सं. आ+रभ्=नाश]

आरधेली—अर्धेली पहा.

आरपणें—क्रि. नष्ट होणें. –सदाचार १५९९. (हंसस्वामी कृत) –शर. [सं. अर्प्]

आरपार—क्रिवि. वेध्य, किंवा उल्लंघ्य पदार्थाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत (वेधणें; उल्लंघणें; इ.); येट मधून, आंतून, वरून; या बाजूपासून त्या बाजूपर्यंत; इकडून तिकडे; अलीकडून पलीकडे. [पार द्वि.; सिं. आरपारी] ०**सुजणें**–सर्व बाजूंनीं सुजणें; सर्वभर सुजणें.

आरफुल—न. (गो.) एक दागिना.

आरब, आरबट, आरंबळ—अमर्ध्ये पहा.

आरंबळणें—अक्रि. पोळणें. 'जैसा आरंबळला आगीं।' –ज्ञा ११.३२५.

आरंबळणें—अक्रि. आक्रंदणें; हंबरडा फोडणें; विवळणें. अरंबळणें पहा. 'शरीं खिळिले पांचही जण। आरंबळत पडियेले।' –रावि २८.४५; –स्वादि ३.५ ३३. [सं आ+रभ्=शब्द करणें]

आरबळणें—अक्रि. १ (व.) घाबरून जाणें; गुदमरणें. 'त्या गर्दीत मी तर आरबळून गेलों.' २ क्षीण होणें. 'स्वशरीर दुःखें करुनी। आरबळतु जाय प्रतिक्षणीं।' –रंयो १.१०८७.

आरबाई—स्त्री. लळीत नांवाचें एक मोठ्यानें म्हणावयाचे लांब लचक गाणें. 'घनसान म्हणतां आरबाई घेतां' –भाए ४६१. [सं. आ+रु=बोलणें; म. आरव]

आरबाज—वि. आब्यतेखोर; आर बाळगणारा. आर पहा.

आरबिट्रेशन—न. लवाद; पंचामार्फत निवाडा. [इं.]

आरबी—अरबी पहा. 'एक घोडे ढवलवर्ण विशाल। एक नीलवर्ण अतिनिर्मळ। एक पिवळेचि केवळ। आरबी चपळ चौताळती॥' –ह २२.३९.

आरबैन—अरबैन पहा.

आरब्ध—वि. आरंभिलेलें; सुरवात केलेलें; हात घातलेलें. [सं.] ०**कार्य**—न. (वेदांत) प्रारब्ध; संचिताचा एक भाग. 'प्रारब्धासच आरब्धकार्य असें दुसरें नांव आहे.' –गीर २९६.

आरंभ—पु. १ सुरवात; उपक्रम; प्रारंभ; (एखाद्या) कार्यांत, धंद्यांत हात घालणें. २ अस्तित्वांत आल्यावेळची, मूळची स्थिति; प्रथमावस्था, क्रिया, प्रवेश 'उ० जगाचा आरंभ, सृष्टीचा आरंभ.' ३ जेथून सुरवात होते तो भाग; आदिभूत विभाग. 'ही नदी या गांवाचा आरंभ.' [सं. आ+रभ्] ०**वाद**–पु. जगाच्या उत्पत्तीसंबंधीं एक मत; सूक्ष्म व नित्य परमाणूंचा परस्परसंयोग होण्यास जेव्हां आरंभ होतो तेव्हां सृष्टींतील व्यक्त पदार्थ बनूं लागतात. या कल्पनेस आरंभवाद अशी पारिभाषिक संज्ञा आहे –गीर १४९. ०**शूर**–वि. कोणत्याहि कामास आरंभ करावयाच्या वेळींच ज्यास्त उत्साह दाखवून आळसानें शेवटीं अर्धेंच कार्य टाकून देणारा, आरंभीं उत्साह दाखवून शेवटीं हातपाय गाळणारा. [सं. आरंभ+शूर] **म्ह**० आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः।=दाक्षिणात्य (दक्षिणी, महाराष्ट्रीय लोक) आरंभीं कामांत मोठे पटाईत पण तें कार्य तडीस नेण्याची मात्र त्यांच्यांत धमक नसते.

आरभटी—स्त्री. ओढाताण, गडबड, 'मोठी आरभटी करूनि विकटी दंतावळी चावुनी।' –आसी ४२. [सं. आरभटी=शौर्य]

आरंभण—न. सुरवात; प्रारंभ. [सं.]

आरंभणीय—वि. आरभ्य पहा.

आरंभणें—अक्रि. सुरवात करणें; प्रारंभ करणें; हात घालणें. [सं. आरंभण]

आरभार—पु. (गो.) भरंवसा; भरिभार. 'आतां म्हजा आरभार सगळो देंवाचेर!' [भार]

आरभ्य—वि. आरंभ करण्यास योग्य; आरंभणीय. –क्रिवि. आरंभ केल्यापासून. उ० जन्मादारभ्य. 'एवं कथिलयादारभ्य।' –ज्ञा १५.५७०. [सं. आ+रभ्]

आरमान—स्त्री (व.) हौस 'या प्रवासानें आमची चांगली आरमान फिटली.' [आर]

आरमार—स्त्री. (गो.) कपाट. अलमारी पहा. [पोर्तु. आर्मारियु]

आरमार—न. १ लढाऊ जाहजांचा तांडा; जहाजावरील योद्धे, अधिकारी व जहाजावरील युद्धसामग्री या सर्वांस आरमार म्हणतात. [पोर्तु. स्पे. आर्माडा; लॅ. आर्मेर] २ लढाऊ जहाजें. ३ नाविक दल. ०**कर**–वि. (हेट) आरमारांची गलबतें संग्रही असणारा. हें आडनांव देखील आहे.

आरमारी—वि. आरमारासंबंधीं; नाविक दलासंबंधीं.

आरय—स्त्री. (गो.) काळी रेती. [पोर्तु. आरेइआ]

आरय—गर्द्ध. आरई पहा.

आरव—पु. ध्वनि; शब्द; आवाज. [सं.]

आरव—पु १ वृक्ष. 'संवरितु नगराची बरंव। तैसे चातुर्दक्ष आरव।'–क्रु १५. 'जेथिचें हांसती आरव उभावनां ते।'–शिशु २४९. २ बाग; अरण्य; राई. 'तिये विनयद्रुमाचिये आरवीं।' –ज्ञा ११. ३३७; १८.१७९७. ३ (गो.) शेतविभाग. [सं. आ+रुहवन्=रोप]

आरंवठा-ठी—पु.स्त्री. कापणी झालेलें भाताचें शेत (जमीन न भाजतां दुसऱ्या वर्षाच्या पेरणीसाठीं राखून ठेवलेलें.) [सं. आ+रुह्वन्=रोप]

आरवणी—स्त्री. पक्ष्यांचें-विशेषतः कोंबड्याचें ओरडणें, आरवणें. 'कोंबडी सकाळींच आरवली.' [सं. आ+रु-रव]

आरवणें—अक्रि. ओरडणें; शब्द करणें. आरवता कोंबडा= आरवण्याजोगा मोठा झालेला कोंबडा. [सं. आ+रु]

आरवसा—पु. अंकुर; आर. अरोसा पहा. 'यया महदादि आरवसें। अधो शाखा।' -ज्ञा १५.१०९. [सं. आर=अंकुर]

आरवार, आरवाळी, आरशिशि, आरशी, आरस, आरसी, आरळ, आरळी—अ मध्यें पहा.

आरसड—न. (विणकाम) लावगण (उभा ताणा) तरंगून रहावें म्हणून लावणाखालीं असलेला २-३ हात लांब व १-२ सूत जाडीचा लाकडी तुकडा.

आरसपान—पु. संगमरवरी दगड. [हिं.; सं. आदर्श+पाषाण]

आरसपानी—वि. १ संगमरवरी. २ आरसे लावलेला (महाल वगैरे)

आरसा—पु. प्रतिबिंब दिसण्याची कांच, धातु वगैरे पदार्थांत केलेली योजना (धातू घासून चकचकीत करून किंवा कांचेच्या मागें पारा लावून); दर्पण; आदर्श. 'पाहातें आरिसां पाहे। तेथें कांहींचि नवल नव्हे।' -अमृ ६.२. [सं. आदर्श; प्रा. आअरिस-आरिस्स]

आरसा—पु. (व.) अर्सा पहा.

आरसूड-आरसोड—पु. (व.) असुड पहा. [आर+सूड=काठी, लाकूड]

आरसेनिक—अरसेनिक पहा. [इं.]

आरसेमहाल—पु. चोहोंकडे आरसे लावले आहेत असा महाल, दिवाणखाना; अयनेमहाल. [सं. आदर्श+अर. महाल]

आरळ—वि. नाजुक; अरुवार; मृदु. अरळ पहा. 'कवणाचिये सेजे फुलांचे आरळ घालिजे।' -भाए १३०. 'मागें बुचडा आरळ झोक माथ्यावर पदराचा। चार आंगुळें सरळ लपविला चंद्र तारफेचा।' -होला १००.

आरा—पु. (व.) वीस पंचवीस हात लांब व चार पांच हात रुंद जमीन; एक नांगरानें नांगरण्याइतकी, नांगरभर जमीन. 'मी एक आराभर काम केलें.' [का. आरु=नांगर]

आरा—पु. गवताची चुंबळ (भांड्याखालीं ठेवण्यासाठीं). (प्र.) आहरा. [सं. हार]

आरा—पु. साधन; (पण वगैरे लावण्यास) द्रव्य. 'तंव देवी म्हणे कर्पूरगौरा। तुम्हां खेळावया नाहीं आरा।' -कथा २.१५. १२३. [प्रा. अर (सं. कर) हुंडा, शुल्क]

आरा—पु. पिकाची कापणी. -शेतकरी मासिक ७.२९. -नामजोशी कोश.

आरा—पु. (कर्ना.) लाकडावरची रेघ [आराखडा]

आराइणें—क्रि. १ धारण करणें; धरणें. 'किंवा मनोभिमान धरिला। तोही आजिचौ सार्थ झाला। जो गोपीमनें आराइला। कृष्णप्राप्तीलागीं।' -रास ५.७११. [प्रा. आराइअ=गृहीत, प्राप्त]

आराइणें—अक्रि. अर्पण करणें; अनुकूल असणें. 'परी सर्व प्राणें मजचिलागीं। आराइले असती। -ज्ञा १.११०. २ उत्पन्न होणें. 'किंबहुना तृषितालागीं। पाणी आयिलें असे जगीं।' -ज्ञा १६.१६१. [सं. आ+ऋ किंवा आराध्]

आराइणें—अक्रि. थांबणें; बंद करणें; कंटाळणें, पुरें करणें. 'जे भोगितां उन्मनी। आरोधना।' -ज्ञा १२.२०९. [सं. अ+ऋ-आर. का. आरु=शमणें]

आराखडा—अराखडा पहा.

आराखा—पु. (व.) मर्यादा; कुंपण. [सं. आ+रक्ष् किंवा आ+रेखा]

आराजी—स्त्री. (व.) १ क्षेत्रफळ. 'शेताची आराजी किती'? [इं. एरिया?]

आराजी—स्त्री. व्यवस्था. -नामजोशी कोश. [आ+राज्]

आराड-ड—स्त्री. (गो.) आरडा; ओरड. अरडा पहा.

आराटी—अराटी पहा. 'वोरवडित स्नेहाची आराटी -एभा १०.६.

आराटेंपराटें—वि. (गो.) उलटें सुलटें. अरतें परतें पहा. 'आराट्यांनीं पराट्यांनीं उलवप' =वांकडें, टोंचून बोलणें.

आराठीमाल—निरनिराळ्या प्रकारचा माल. मसाप २.१४२. [प्रा. आरडिअ=चित्रयुक्त?]

आराणुक-णूक—१ सर्व अर्थी अराणूक पहा. 'आराणूक नाहीं चित्ता' -एभा १०.२०५. उसंत. 'बहुत कामें मज नाहीं आराणुक।' -तुगा ११३. -ब ५००. २ खटपट. 'तुझ्या पायांसाठीं केली आराणूक' -तुगा ११२०.

आरातणें—क्रि. जवळ येणें; उत्पन्न होणें. आराइणें पहा. 'कांई लावाकैआं केउतें। आरातीचि ना।' -शिशु ११६. [सं. आ+ऋ; आरात्]

आरातारा—(हिं.) रागरंग. [तारा द्वि.]

आराति—पु. शत्रु 'दीर्घद्वेषी या सृष्टीचा कोण असा आराति। -टिक ३२. [सं. अराति=शत्रु]

आरातिक—न. आरती. 'आरातिकें घेऊन भक्त येती' -सारुह ७.५६. [सं. आरति]

आराध—पु. खटपट; श्रम 'आराध करी सोसी। त्यासी हांसे तो आळसी।' -तुगा २७३५. [सं. आ+राध्=तुष्ट करणें]

आराधक—वि. आराधी; उपासक; आराधना करणारा. [सं. आ+राध्=पूजा करणें]

आराधणूक—स्त्री. पूजा; सेवा; प्रार्थना; [सं. आराधना]

आराधणें—उक्रि. १ पूजा, सेवा, भक्ति, स्तुति, भजन, मनधरणी, खुशामत करणें. ' एकाभावें तुम्ही गायत्री आराधिजे । ' –वसा २०. २ प्राप्ति, उपार्जन, संपादन–करणें, मिळविणें. [सं. आ+राध्=पूजा करणें; मर्जी संपादन करणें]

आराधन—न. १ पूजा; प्रार्थना; सेवा; उपासना; खुशामत; मनधरणी. ' योगादिकें साधनें । साकांक्ष आराधनें । ' –ज्ञा ३.९०. –एभा २.४४६. २ प्राप्ति; उपार्जन; संपादन. ३ उपास्य देवता. ' माझें आराधन । पंढरपुरीचें निधान । ' –तुगा ८२१. [सं.]

आराधना—स्त्री. १ आराधन पहा. २ ब्राह्मणभोजन; संन्यासी समाधिस्थ झाल्यावर त्याच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं प्रतिवर्षी प्रथम श्राद्ध करून नंतर ब्राह्मणपूजन, त्यांच्या तीर्थाचें पूजन, ब्राह्मणभोजन इ० करावयाचा विधि. संन्याशाच्या पुण्यतिथीचा समारंभ. [सं.]

आराधी–न, (विप्र.) **आरादी–ण**—पु.स्त्री. १ आराधना करणारा-री. २ (विशेषतः) देवीचा पुजारी ण, भक्त; खंडोबाचा भक्त. ३ खंडोबाच्या, देवीच्या नांवानें भिक्षा मागणारांची एक जात. ४ भोलाईचे भक्त; नपुंसक; पंढ. [सं. आराधी–धिनी]

आराधुरा—पु (व.) १ सारासार विचार. ' कांहीं आराधुरा न पाहतां टाकली आडांत उडी ' २ भीड–मुरवत. [आरा–चाकाचा+धुरा=धूं]

आराध्य, आराधनीय—वि. १ पूजा किंवा भजन करावयास योग्य. २ ज्याची खुशामत किंवा चाकरी करावयाची तो. ३ ज्याची प्राप्ति करून घ्यावयाची ती वस्तु; संपादनीय गोष्ट. ' मोक्षु दुराराध्यु कीर होय । ' –ज्ञा ११.९९. [सं.]

आराध्यदेवता–दैवत—स्त्रीन. कुलस्वामिणी–स्वामी; कुलदेवता; कुलदैवत; उपास्य देवता. [सं.]

आराध्य–ब्राह्मण—पु. तैलंगणांतील शैव ब्राह्मण; यांच्या गळ्यांत जानवें असून लिंगाकृति प्रतिमा असते. हे भस्म व रुद्राक्ष धारण करतात. मद्रास इलाखा व द. हैद्राबादकडे यांची विशेष वस्ती आहे. **आराध्यलिंग**–न. उपास्य दैवत; पूजनीय देवता. ' स्वजनवनचंदना । आराध्यलिंगा । ' –ज्ञा १०.३. [सं.]

आरापारा—क्रिवि. (राजा.) तुरळक; विरळपणें; इकडे तिकडे. ' यंदा या आंब्यावर आंबे आरापारा धरले आहेत, दाट नाहींत. ' [अरत्र+परत्र; आर=इकडे+पार=तिकडे]

आरापुट्ठा—पु. (ना.) शरीरांगची ठेवण, बांधा; आंगलट (आरा व पुट्ठा हे चाकाचे भाग आहेत) [आरा=चाकाचें उभें लांकूड+पुट्ठा=नाभि]

आराब—न. (गो.) एक वाद्य; ताशा [अर. फा. रबाब=तंतुवाद्य ?]

आराव–वा—१ पु. अराबा पहा. २ (व.) घोंटाळा; गोंधळ; रगाडा; मांड; पसारा. ' लग्नाचा आरावा पडला. '

आरावाय—स्त्री. (गो.) मध्यें लुडबुड करणारी स्त्री.

आराम—पु. (जरतारी घंदा) विवक्षित अंशापर्यंत (तारेस) उष्णता देणें; यासुळें तारेस झिलाई येते.

. आराम—पु. १ विश्रांति; विसावा; आनंद. 'ज्याचा आराम मजमाजीं । '–एभा ११.७४८. २ दुःख किंवा आजारापासुन मुक्तता; स्वास्थ्य; सुखरूपता. ' दौलानीं तबियत आराम झाल्याची नबाबास मजर पाठविली ' –रा७.१२०. ३ बाग; उपवन; उद्यान; क्रीडाभुवन. ' आगम निगमांचा कल्पद्रुम । कीं सकळ विद्यावल्लींचा आराम । ' –जै १.५७. [सं. आ+रम्; फा. आराम्] –वि. विश्रांति घेणारा (अशुद्ध प्रयोग). ४ (संघ व्यायाम) एक आज्ञा. (इं.) स्टँड इझी=हात खालीं सोडून, दोन पायांत एक फूट अंतर ठेवून ताठ उभें राहणें. –सेन्या ७. **०खाना**–पु. १ विश्रांतिस्थान; शेजघर. २ अठरा कारखान्यांपैकीं एक कारखाना. [फा.] **०खुर्ची**–स्त्री जिच्यावर निजतां येईल अशी कापड किंवा वेत वगैरे लावलेली खुर्ची; (इं.) इझीचेअर. ' तो आरामखुर्चीवर स्वस्थ पडून होता ' –नाकु २.

आरामशीर—वि. सुखदायक; प्रशांत; सुखावह; स्वस्थता, हुषारी देणारा, आणणारा, (झोंप औषध, पथ्यपाणी वगैरे); सुखदायक; आनंददायक (रस्ता, वाहन वगैरे). [फा.]

आरारूट—न. ज्यापासून पौष्टिक मैदा तयार करतात असें एक झाड व कांदा. आरारूटचें झाड साधारण हळदीसारखें असतें. या झाडाच्या कांद्यापासुन बलक काढतात व त्यापासून तवकीर तयार करतात. तें हलकें व सहज पचण्यासारखें असल्यामुळें लहान मुलांस व आजारी माणसास देतात. तवकील पहा. [इं.]

आराव—पु. शब्द; आवाज; पक्ष्यादिकांचा गलबला, ध्वनि; गर्जना. ' अमरवेंचि भरावें तैं नभ बहु न मानवाऽरावें । ' –मो विराट ५.७५ –मो भीष्म ९.२२. [सं. आ+रु=आवाज करणें]

आरावण–पु. (गो.) लग्नांत नारळ चंदन, तांदूळ, खण वगैरे घालून वरावरोबर मिरवणुकींत एक नोकर डोक्यावर घेऊन नेतो ती बांबूची दुरडी. या दुरडींत शिवाय वधूगृहीं वरास लाग्णीय विधिसाठीं लागणारें सामान असतें. [सं. आहरण=भूषण, अलंकार; म. अहेर]

आरावणें—क्रि. (गो.) आटोक्यांत आणणें.

आरावणें—क्रि. हातपाय ताणून निजणें; अहारणें. आरणें पहा.

आरास—अरास पहा.

आरासारा—पु. आवरसावर; आवराआवरी; (सामान वगैरे) थोडक्या जागेंत नीटनेटकें लावून ठेवणें. [आवरासावरचा संक्षेप]

आरिख—वि. १ ऋषिप्रणीत; छांदस; वैदिक. ' पुराणिचे आरिख बोल ' –दाव १७. २ छांदिष्ट; आर्ष; अव्यवस्थित. ' जैवि

कां तें बाळ अज्ञान पंचवार्षिक । जडबुद्धि केवळ आरिख । ' –स्वादि ४.४.४२. ३ बोबंड; असंस्कृत. ' तो आरिखा शब्दांमाझारी । चातुर्यें बोलां ते पुरी । स्वाक्षरें मुखाबाहेरी । पडो नेदी । ' –ज्ञाप्र ७९२. [सं. आर्ष]

आरिसा—पु आरसा पहा. ' आत्मा आत्मसुख देखे । आरिसां जिये । ' –अमृ २.६. ' न दिसेचि पाहतां आरिसा । ' –शिक १८.७४. [आरसा अप.]

आरी—स्त्री. १ चांभाराचें हत्यार, यानें कातडयास भोंकें पडतात. अरी पहा. २ चाकाचा भाग. आरा पहा. ३ करवत. आर पहा. ४ निंगध वृक्ष, बेल्या खैर; अराटी पहा. ' लागलें आळवीचें रान । आरीबोरीचें दारुण । ' - वसा ७. –ऐपो ४५. [सं. आरि] ५ (तंतुवाद्यें) सतार वगैरेंची तार ओंवण्यासाठीं एक वतार टकण्यासाठीं एक हस्तीदंती फणी. ६ (कु.) कोंबडयाच्या डोक्यावरील तुरा. ' ह्या कोंबडयाक आजून आरी देखूल फुटांक नाय ' [आर]

आरीफ—वि. जाणता; सुज्ञ. ' विशेष लिहावें तरी महाराज साहेब आरीफ असेती ' –रा ८.७. [अर. आरिफ्=जाणता; शहाणा]

आरीबोरी—स्त्री. १ आरी, बोरी यांसारखीं विशेषतः कांटेरी व फुलांस वास नसलेलीं झाडें. आरी अर्थ ४ पहा. ' चंदनाचे संगतीवरी । सुवास होती आरीबोरी । त्यांतें देवद्विज वंदिती शिरीं । तेवीं साधकां करी सत्संग ' –एभा २९.२५२. २ (सामा.) बोरीचें झाड; बोरीबरोबर आरीचाहि निरर्थक उल्लेख येतो. ' आरी बोरी रुई कारली ती शीघ्र आण । जवळि राखण मांडा । ' –वसा ७. [सं. आरि+बोरी; किंवा बोरी द्वि.]

आरीयत—स्त्री. शरम. ' गुदस्तां दादासाहेब पुण्याजवळून आले; परंतु पुणें पाहिलें नाहीं हे आरियत मातुश्रीस फार आहे. ' –मदबा १.६२. [अर. फा. आर्=लाज]

आरु—आर पहा.

आरुता—स्त्री. योग्यता. ' म्हणोनि लोटिला ऊर्ध्व चरणी । आरुता नाहीं स्वर्गभुवनीं । ' –कथा ३.७.३३. अरुता पहा. [सं. अर्हता]

आरुता-ती-तें—क्रिवि. अलीकडे; जवळ; अगोदर; इकडे. अरुता, अरता पहा. ' वहिली गे धाअे । बालावी आरुतीं । ' –शिशु ८२९. ' तंव ध्यानस्थ होते पशुपती । शेजे उभी असे शक्ति । खुणावूनि म्हणे ये आरुती । नारद देवो । ' –कथा ३.९.९. [सं. आरात्-अर=सान्निध्य]

आरुवार-ळ—अरुवार पहा. ' क्षीराब्धीं शेषाचा आंरुवारी । ' –कृमुरा ६.६८.

आरुष—वि. (प्र.) आर्ष; छांदस्; वैदिक. १ असमंजस; असंबद्ध; वेडीवांकडी; गांवढळ; बोबडी; रुक्ष; छांदिष्ट; पोरकट; अडाणी (वाणी, बोल, भाषण, कृति वगैरे). ' ते माझे मन्हाटे आरुष बोल । सद्गुरूनें केले सखोल । ' –एभा १६.७. ' माझ बोलणें आरुष अत्यंत । ' –रावि १.२. २ मंद; मूर्ख; अजागळ; रुक्ष, गोसावडयासारखा. ' या आरुष नामांचा चाळा । घेऊनि गर्जती वेळोवेळां ' -एभा ५४१२. [सं. आर्ष]

आरुसा—वि. टोंकदार. [आर+सा (सदृश)] **०करणें**–क्रि. (चांभारी धंदा) दोऱ्याचें टोंक बारीक करणें. –पु. जुंपणीस ज्या कडया असतात त्यांस बांधणारा सळ किंवा वादी. अरोसा पहा. [आर.; तुल० का. आर=जुंपणी]

आरूढ—वि. चढलेला; वर बसलेला–गेलेला; आरोहण केलेला. (क्रि० होणें). ' जरी संग्रामारूढ आहों । जाहलों आम्हीं । ' –ज्ञा ४.३०. सामाशब्द–अनुभवारूढ=अनुभविक; इंद्रियारूढ=इंद्रियांच्या योगानें जाणीव झालेला; अधिकारारूढ; गर्वारूढ; पदारूढ; विषयारूढ; ज्ञानारूढ; संप्रदाय–धर्म–योग–राज्य–स्थान–काम–कोध–लोभ–शांति–कर्ण–जिव्हा वगैरेवर आरूढ [सं. आ+रुह्–आरूढ]

आरूढणें—क्रि. १ आरूढ होणें; वर चढणें; वर बसणें; स्वार होणें. ' असो हें जमार्सी जेयांचा भेदारा । तें राऊंत आरूढिले । ' –शिशु ९३८. ' आरूढले वीरवर नारायण नंदन । ' –ऐपो ३०९. २ (ल.) लोकांच्या तोंडीं असणें, बभ्रा होणें; बोभाटा होणें; [सं. आ+रुह्=वाढणें]

आरे—पु. १ कर्नाटकांतील एक दक्षिणी लोकांची जात. दक्षिणेकडे मराठे जातीनां आरे हें उपपद लावतात. उ० आरे–कापू. [सं. आर्य]

आरे—उद्गा. अरे; संबोधनार्थी. ' आरे, जें आकारासी येतें । तें अवघेंच नासोन जातें । ' –दा १८.८.१८.

आरेकस—(ना.) अरकस पहा.

आरेकसणें—क्रि. (खा.) अरकसणें पहा.

आरेख-खा—पु (प्रा.) निग्रह; संयमन, धाक; वचक; ताबा; हुकमत. [आ+रेखा]

आरेखडा—अराखडा पहा.

आरेखणें—उक्रि. (प्रां.) आरेख्यांत ठेवणें; ताब्यांत, धाकांत ठेवणें; संयमन करणें; निग्रह करणें. [आरेखा]

आरेभेरें—क्रिवि. (गो.) अप्रत्यक्षपणें; परभारें. [सं. भृ-भरभेरे–भेरे द्वि. किंवा भार=बाहेर अप.]

आरोगण-णा—न.स्त्री. भोजन; जेवण; मेजवानी; भोजन करणें; अन्न सेवन करणें. ' आंधोळी देवें पूजा सारिली । आरोगणा सपरिवारीं जाली । ' –शिशु ५७६. ' दुग्धसार घृत सुस्वादें । आरोगणें सारिलीं । ' –मुआदि ४२.६३. ' मग जाहली आरोगणा । स्त्री जोडली तया मदना । ' – कथा १.११.१३३. [का. आरोगण= खाणें; भोजन प्रा. आरोग्य=भोजन करणें, खाणें; हिं. आरोगना] **०भूमि**–स्त्री. जेवणाची जागा. ' तंव रंगमाळिका देखे कुसरी । आरोगण भूमि । ' –ऋ ७८.

आरोगणें—उक्रि. भोजन करणें; खाणें; जेवणें. 'दोषादोष न पाहतां प्रभुवरा ! आरोगिसी चांगलें।'–निमा १.५०. 'आरोगुनी मग। बैसलासी जैसा बग।' –तुगा १४६८. [का. आरोगण]

आरोग्य—न. १ निरोगीपणा; (प्रकृतीचें) स्वास्थ्य. २ आरोग्यशास्त्र. [सं.] ०**चिकित्सा**–न. आरोग्य राखण्यासंबंधीं शास्त्र; आरोग्यशास्त्र. [सं.]

आरोचक—अरुचि, अरोचक पहा. 'कीं बाधिलेंती आरोचकें।' –शिशु ११९.

आरोंठा—आरंवठा पहा.

आरोण-आरुणी—न.स्त्री. (ना.) चाराच्या फळापेक्षां थोडें लहान असणारें व अंबुस-गोड स्वादाचें एक जंगली फळ.

आरोंथा—स्त्री. तीव्र इच्छा; उत्कंठा. अरुता पहा. 'पायांवरी डोई ठेवाया आरोंथा–झाली यावी सत्ता क्षेम ऐसी।' –तुगा ३८०४. [अरुता–आर्ति]

आरोप-आरोपण-णा—पु न.स्त्री. १ लावणें; पुरणें (वृक्ष इ०). २ (ल.) चिकटविणें; लावणें; जोडणें. 'परी करितां बीजारोपण। अंकुर जाण त्या नाहीं।' –एभा १३.५८३. सामाशब्द–वृक्षारोप; बीजारोप; स्तंभारोप; दोषारोप; गुणारोप वगैरे. ३ धर्म; गुण. 'शोषण उष्णादि आरोप। तेज जाणावें।' –दा ८.५.२८. 'मना कोपआरोपणा ते नसावी।'–राम १०७.४ दोषारोप; गुन्हा लादणें; ठपका ठेवणें. 'जल्पती ठेवूनि आरोपण।' –दावि २८५. ५ (अलंकार) उत्प्रेक्षालंकार उ० 'तेजस्वितादि कारणामुळें सूर्यत्वाचा आरोप करून हा ब्राह्मण केवळ सूर्य आहे असा आरोप होतो. 'कां वस्त्रपणाचेनि आरोपें। सूर्खाप्रति तंतु हारपे।'–ज्ञा १८.५४४. ६ खोटा आळ; बालंट: चुकीची समजूत; चूक. [सं. आ+रोप्]

आरोपणें—उक्रि. १ लावणें; रोपणें; पेरणें; पुरणें. 'नातरी विधिचिये वापि। सत्क्रियाबीज आरोपे।' –ज्ञा १३.३२. 'हो कां वापी कूप आराम। वृक्षारोपण वनविश्राम।' –एभा १२.२३. 'आरोपिलें बीज फळास आलें।' –सारुह ७.१५९. २ (ल.) चिकटविणें; अंगीं लावणें; लादणें. 'तैसी इयें निर्मळ माझ्या स्वरूपीं। जो भूतभावना आरोपी।' –ज्ञा ९.७९. ३ हवालीं करणें; सोंपविणें; स्वाधीन करणें; वर ठेवणें 'शस्त्रार्थी जिव्हारें आरोपुनी।'–ज्ञा १.२२. ४ राहणें; ठाकणें, माजणें. 'मग अधमुचि आरोपे। कुळामाजीं।' –ज्ञा १.२४५. ५ आरोप ठेवणें; दोष देणें; ठपका ठेवणें; आळ घेणें. [सं. आरोप्]

आरोपार—आरपार पहा.

आरोपित, आरोपी—वि. १ आरोप केलेला; आरोप असलेला; (आरोपाच्या सर्व अर्थानें) आरोप पहा. २ खोटा; वनावट; ढोंगी. ३ गुन्हेगार; ज्याच्यावर आरोप ठेवला गेला आहे असा. 'समोर आरोपिताकरतां जागा होती.' –राणी चंद्रावती १५३. 'प्रेसअॅक्टाप्रमाणें आरोपित लेखांचा नाटघटट्या विचार करण्याचा अधिकारच.. कोर्टाला नाहीं.'–टि ३.३५३. [आरोप]

आरोरा—पु उषा; अरुण; प्रभात; प्रभातकालीन आकाशाचा वर्ण. [इं.] ०**बोरिआलिस**–पु. उत्तरध्रुवाजवळील प्रदेशांत पडणारा एक चमत्कारिक प्रकारचा प्रकाश.

आरोशापारोशानें—क्रिवि. स्नान न करतां, न धुतां तसाच (माणूस, कपडा, भांडें वगैरे). पारोसा पहा. [पारोसा द्वि.]

आरोसा—अरोसा पहा.

आरोह—पु. (संगीत) षड्ज स्वरापासून वर निषादाकडे स्वर म्हणत जाणें. [सं.]

आरोह, आरोहण—पुन. १ चढणें; वर जाणें; उठणें. 'सिंहासन होईन आपण। वरि गुरु करिती आरोहण।' –ज्ञा १३.४२४. २ (ल) प्रगति; वाढ; वृद्धि. ३ आरंभ करणें; उद्युक्त होणें. 'चढतें प्रेमाचें भरतें। तें नावेक आवरोनि चित्तें। पुढील कथा निरुपणातें। करीं निश्चितें आरोहण।' –एभा १.१७६. [सं. आ+रुह्=वाढणें, चढणें]

आरोही वर्ण—पु. (संगीत) षड्जापासून निषादाकडे वर गात जावयाचे स्वर [सं. आरोही+वर्ण]

आरोळी—स्त्री. १ जोराची हांक; ललकारी. अरोळी पहा. (क्रि० ठोकणें; मारणें) २ मोठ्यानें ओरडणें, गर्जणें; गर्जना करणें. 'वाळें चरफडतां देखे जाळीं। आरोळी दे आरोळी।' –एभा ७.६००. [सं. आ+रुह्=आवाज करणें] **म्ह०** अस्वला आधीं आरोळी=संकट येण्यापूर्वीच त्याबद्दल गाजावाजा करणें. 'सरकारनें आपलें नवें धोरण जाहीर करण्यापूर्वीच अस्वलाआधीं आरोळी या न्यायानें जनतेनें आपल्या गाऱ्हाण्यांची दाद सरकारपुढें मांडली पाहिजे.' –मासं २.२३८.

आरोळी—स्त्री. १ कणीक व हरभऱ्याचें पीठ एकत्र करून त्यांत तूप व मीठ घालून, साखर, वेलची इ. घालून तिवून तें भजाप्रमाणें तळून करतात. –गृशि ३९. २ गाखर, निखाऱ्यावर भाजलेली जाड पोळी. ३ चांदकी; पानगी; अरोळी. [अहार=निखारा+पोळी]

आरौने—अरुतें -अरुतें पहा १ पूर्वी; अगोदर. अरुता पहा. 'पै चंद्रोदया आरौतें। जयांचे डोळे फुटती असते। ते काउळे केवीं चंद्रातें। वोळखती' –ज्ञा ४.२४. २ अलीकडे; या बाजूला. 'चौघ शापूनि केले परते। कनिष्ठा पाचारिलें आरौतें।' –सुआदि १९.१०२. ३ शिवाय; विना 'जैसें कल्पांतीचें भरितें। स्थळ जळां दोहीतें। बुडविल्या आरौतें। राहूंचि नेगे।' –अमृ ४.११. –वि. अपुरें; कमी. 'तो काय बोलोनि दाखवूं आतां। बोलणें बोलतां आरौते पडे।' –निगा १९६. [सं. अर=सान्निध्य; आरात्=निकट]

आर्क—१ बालेकिल्ला. –रा १.१९४. अर्क पहा. २ कमान. [पोर्तु. आर्कु; इं. आर्क] **आर्की घालीत बचणें** (जाणें)–(गो.) वाकडें तिकडें जाणें; झिंगत जाणें.

आर्क लाइट—पु. (फोटो.)काळोखाच्या वेळीं विशेषतः पावसाळ्यांत ज्या प्रकाशांत फोटो घेतात तो प्रकाश. हा विद्युत्जन्य आर्क नांवाचा विशिष्ट प्रकाश कर्बापासून घेण्यांत येतो. [इं. आर्क+लाइट=प्रकाश]

आर्कारी—स्त्री. (गो.) (वहाणेचा) थोरला (पहिला) पट्टा. (तळास शिवण्यांत येणाऱ्या वक्राकृति दोन पट्ट्यांपैकीं अलीकडचा पट्टा) हा दुसऱ्यापेक्षां रुंद असतो. शोभेसाठीं कोठें कोठें या पट्ट्यावर एक अगर तीन गुंडथा बसवितात.

आर्गळा—स्त्री. अडसर; अर्गळा पहा. ' आपोआप बेडथा तुटल्या शृंखळा । बंदारुया आर्गळा कुलपें कोंडे ॥ ' –तुगा १०.

आर्द्रमास—न. (गो.) कात, गूळ वगैरे घालून तयार केलेला चुना. [पोर्तु. ऑर्गामस].

आर्चकोन—कमानीचे वगड;आचकोन पहा. 'कमानीची जाडी ३ फुटांपेक्षां अधिक असल्यास आर्चकोन कमानीच्या पूर्ण जाडीचे पाहिजेत. ' –तपशीलपत्रकें (म्यारट) ४७. [इं. आर्च=कमान]

आर्चलॅम्प—(सिनेमा, फोटो) विशिष्ट वस्तूवर तीव्र प्रकाश पाडण्याचा (फोकसिंगचा) दिवा. [इं.]

आर्जल—अरजल पहा.

आर्जव—न. १ सरळपणा; ऋजुता;प्रामाणिकपणा; साधेपणा; भलेपणा. ' तैसे प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें । ' –ज्ञा १६.११३. ०**शक्ति**–सभ्यपणें किंवा नम्रपणें वागण्याचा गुण; चांगली रीतभात; सौजन्य; कुलीनता. [सं. ऋजु–आर्जव]

आर्जव—नस्त्री. १ स्तुति; विनंति; सेवा; उपासना; मनधरणी. ' कैसें यायें आर्जव फळलें । ' –गुच. ९.२२. २ (ल.) खुशामत; शुंकी झेलणें; हांजी हांजी करणें. ' आर्जव वाटेल त्यानें वाटेल त्याचें करावें. तें करण्याची सनद अगर हक्क कोणी कोणास द्यावा लागत नाहीं. ' –टि ३.१६७. ' त्यास योगक्षेमाविषयीं कोणाचें आर्जव न पडे तें करावें. ' –मराआ ११. ' तो (घाशीराम) प्रथम कांहीं दिवस सरकारदरबारांत जाऊन मुत्सद्दी मंडळीचे आर्जवांत असून उमेदवारी करून पोट भरीत होता. ' –घाशीराम–ग्रंथप्रवेश. (क्रि० संपादणें). [फा. आर्झ्] ०**शक्ति**–स्त्री. १ सेवा; खुशामत, आर्जव करण्याची शक्ति; हांजीखोरपणा. ' मी म्हातारा झालों, व माझ्या अंगांत आतां आर्जवशक्ति नाहीं. ' ०**संपादन**–न. (अशुद्ध प्रयोग) मनधरणी; हांजी हांजी; खुशामत. (क्रि० करणें).

आर्जविणें—उक्रि. आर्जव करणें; खुशामत करणें; हांजी हांजी करणें; आर्जव करून प्रसन्न करणें; मिनतवारी करणें. [फा. आर्झ्; तुल० सं. आर्जव]

आर्जवी–वू—वि. १ आर्जव करणारा; आर्जवांत राहणारा. २ खुशामत करणारा; हांजीखोर. ३ आर्जवासंबंधी.

आर्जू—स्त्री. इच्छा. ' बल्की मागील फडचे व पुढें स्वच्छता व्हावी ऐसी कल्याणराव यांची आर्जू ' –रा ७. खलप २.१८. –वि. इच्छा करणारा; इच्छु; आर्जूमंद. 'गोहजवालाही फार आर्जू आहे कीं ग्वाल्हेर घेऊन माझा मुलुख सोडून द्यावा. ' –मदबा १.१९०. [फा. आर्झू]. ०**मंद–वंद**–वि. आर्जू; इच्छु; उत्सुक. ' फराशीस सर्काराशी दोस्ती करण्यास वकील पाठवून बहुत आर्जूमंद ' –ख ७.६, ६६. ' अगोधर कांहीं आर्जूवंद नव्हतो व पुढें ही आम्ही होत नाहीं. ' –रा ६.६०५ [फा.]

आर्जो—स्त्री. मनधरणी; आर्जव. ' तेथील अमीर आमची आर्जो करितात. ' –रा ३.४२८. [फा. आर्झू]

आर्टिकल—न. १ वृत्तपत्रांतील किंवा मासिकांतील लेख. ' आर्टिकलची मर्यादाहि भरत आली. ' –आगर ३. १४२. २ नियम; करार; सॉलिसिटर व्हावयाकरतां करावा लागणारा करार. ३ वस्तु. ४ उपपद. [इं]

आर्टिकल्स ऑफ असोसिएशन—न पु. (कंपनी कायदा) कंपनीचे नियम, शर्ती; कलमबंदी. [इं.]

आर्टिलरी—स्त्री. तोफा; तोफखाना. [इं.]

ऑर्डर—स्त्री. १ व्यवस्था; क्रम; परंपरा. २ बंदोबस्त; ठाकठिकी; जम. ३ आज्ञा;हुकूम. ४ (व्यापारी) मागणी; मागणीची नोंद. ' कित्येक व्यापाऱ्यांनीं विलायती मालाच्या दिलेल्या ऑर्डरी रद्द केल्या ' –के ३१.५.३०. ०**बुक**–न. आज्ञापुस्तक; कार्यक्रमाचें पुस्तक; मागणीवही. [इं.]

ऑर्डर्ली—पु. लष्करी अंमलदारास लष्करखात्याकडून तैनाती करितां दिलेला फौजी नोकर; हुजऱ्या, (अप.) अडली. [इं.]

ऑर्डिनन्स—पु. १ शासन; कायदा. २ वटहुकूम. ' ऑर्डिनन्स प्रसिद्ध करून वृत्तपत्रांची मुस्कुटदाबी करण्यांत आली. ' –के १७.६.३०. [इं]

आर्त—स्त्री. १ उत्कंठा; आतुरता; तळमळ; इच्छा. ' पाहे पां श्रीशंभूची प्रसन्नता । तया उपमन्यूचिया आर्ता । काय क्षीराब्धि दूधभाता । देइजेचिना । ' –ज्ञा ५.११. ' श्रेष्ठ दुर्लभ जो पदार्थ । त्यावरी सकळांचीही आर्त । ' –मुआदि ४.१५०. –वि. १ रोगी; आधिव्याधिग्रस्त. २ दुःखित; पीडित; त्रस्त. ' नातरि आर्तांते स्पर्शिजे । अळुमाळु । '–ज्ञा १३.२८७. 'भीष्म द्रोणासि म्हणे आला कीं आर्तशब्द हा कानीं । '–मोभीष्म ५.५५. ३ आतुर; उतावळा. सामाशब्द–कामार्त;क्षुधार्त; रोगार्त;तृषार्त वगैरे. [सं.] ०**बंधु**–पु. दीन बंधु; पीडितांना संकटांतून सोडविणारा. ' आइके गा आर्तबंधू । निरंतरकारुण्यसिंधू । ' –ज्ञा १४.३. ०**भूत**–वि. उत्कंठेनें पीडिलेला; खंत घेतलेला; आर्त झालेला. ' पत्रिका देखोनि कृष्णनाथ । श्रवणार्थी आर्तभूत । ' –एरुस्व ३.५३. ०**साधु–अभिमानी**–वि

दीनांना दयाळु; दुःखितांचा परामर्ष घेणारा; आर्तबंधु. **०स्वर**–पु. दुःखिताचा आक्रोश; दुःखाची आरोळी; संकटाच्या वेळची हाक.

आर्तक—वि. उत्कंठित असणारा; आतुर असलेला. 'अहो ऐका भाविक । संत आर्तक मुमुक्षु ते ।' –निगा १५२. [सं. आर्त]

आर्तव—पु. स्त्रियांचा विटाळ; स्त्रीरज; शोणित. –वि. विटाळासंबंधी. जसें–आर्तवदोष=प्रदर, धुपणी वगैरे विटाळासंबंधी रोग. [सं. ऋतु]

आर्तवंत—वि. उत्सुक, आतुर. 'धाविन्नले लह्मानथोर। आर्तवंत पहावया ।' –मुआदि २८.५४. [सं. आर्त]

आर्ता—क्रिवि. अलीकडे; इकडे. अरता पहा. 'देव पर्ताचि आर्ता ।' –दावि ४१३.

आर्ति—स्त्री. १ दुःख; पीडा; उपद्रव. 'जयाचि आर्तीचि भोगित । विषयीं त्यजिले संत ।' –ज्ञा २.१७०. २ उत्कट इच्छा; आतुरता. 'कीं गोपिकांची पुरवावया आर्ती । मी झालों श्रीपती कामारा ।' –एभा १६.३१४. 'तुका म्हणे तरी सज्जनांची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळाची ।' –तुगा १९०३ [सं. आर्तिः]

आर्तिक—वि. इच्छा करणारा; इच्छाढ्य; सकाम; लोभी. 'मग तो म्हणे स्त्रियेकारणें आर्तिकु नरू काय न करी ।'–पंच ४.७. [सं. आर्त]

आर्ती—क्रिवि.(चि. गो.) अलीकडे; जवळं; अगोदर. अरता पहा.

आर्थ—वि. १ अर्थासंबंधी; विषयासंबंधी; वाच्यार्थासंबंधी. शाब्द याच्या उलट. २ अभिप्रेत; ध्वनित; गर्भित. [सं. अर्थ]

आर्थिक—वि. १ आर्थ पहा. २ अर्थशास्त्रानुसार. (इं.) इकानॉमिक. अर्थशास्त्र पहा. ३ संपत्तीच्या आयव्ययासंबंधी; नफ्यातोट्यासंबंधी; सांपत्तिक. द्रव्य, धन यासंबंधी (इं.) फायनॅन्सिअल. 'सुधारणाकायद्यांत आर्थिक स्वायत्तत्तेचा मागमूसहि नव्हता.'–के १४.६.३०. 'आर्थिक स्वरूपाचीं (फायनॅन्स) विलें मात्र समग्र सभेच्या कमिटीकडेच जावीं लागतात.'–पार्लमेंट ९०. [सं. अर्थ= द्रव्य]

आर्द्र—वि. ओला; आंबट ओला; दमट, भिजलेला. सामाशब्द–दयार्द्र; प्रेमार्द्र. इ० [सं.]

आर्द्रक—न. आलें; ओली सुंट. [सं.]

आर्द्रता—स्त्री. १ ओलेपणा; ओलावा. २ (पदार्थविज्ञान) हवेंतील दमटपणा. (इं.) ह्युमिडिटी. **०दर्शक**–पु. (इं.) हायग्रोस्कोप. **०मापक**–न. हवेतील आर्द्रता मापण्याचें यंत्र; (इं.) हायग्रोमीटर. [सं.]

आर्द्रा—स्त्री. सत्तावीस नक्षत्रांपैकीं ६ वें नक्षत्र; [सं.]

आर्फनेज—न. अनाथबालगृह; बालाश्रम; संगोपनगृह. [इं. ऑर्फन=पोरका, अनाथ मूल]

आर्म—न. १ शस्त्र; हत्यार; चिलखत. २ हात; बाहू. **०चेअर**–स्त्री. हाताची किंवा हात असलेली खुर्ची. [इं.]

आर्मी—स्त्री. सैन्य; फौज; लष्कर. [इं.]

आर्य—पु. १ एक मानववंश; (इं) आर्यन्. २ वैदिक; प्राचीन वैदिक ऋषींनीं, ब्राह्मणांनीं प्रस्थापित केलेल्या देवतांची उपासना करणाऱ्या जातींस हें राष्ट्रवाचक नांव होतें. याच्या उलट अनार्य; श्रेष्ठ; विद्वान्; आदराहं माणूस; कुलीन; सदाचारी माणूस. ३ मद्रास इलाख्यांतील पत्तर ब्राह्मणांची विशिष्ट जात. [सं. आर्य]

आर्य—वि. १ कुलीन; श्रेष्ठ; सभ्य; मान्यवर, वडील. 'परमोदार वृकोदरभुज यश देतील शीघ्र आर्यातें ।' –मोसभा १.८६. 'सौमित्रे मजविषयीं तूं आर्यप्राथेना करी कांहीं '–भक्तमयूर केका ११४. २ आर्य लोकांना शोभणारें (वर्तन, वागणूक इ०); ३ यथोचित, युक्त; लायक; योग्य. जसें–आर्यवेष; आर्यधर्म [४ आर्यासंबंधीं; आर्यांची. जसें–आर्यभाषा; आर्यदेश. ५ मोठ्या माणसांना आदरार्थी वापरतात; बहुमानसूचक पदवी. 'आर्या, राजा कोठें बाधे तदद्दशेनेंचि भी माते।'–मोकर्ण ३९.४९. 'पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं असलेला पत्रवधेनांचा वकील बाबा काळे आपल्या पत्रव्यवहारांत परशुरामभाऊंना 'आर्ये' शब्द योजी.' –खरे ५२८५. व ५२९८. [सं.]

आर्यन्—आर्य पहा. –वि. (भाषा, समाजशास्त्र) १ आर्य भाषा, लोक वगैरे संबंधीं; आर्यवंशय;आर्यपरंपरेतील. २ आर्य भाषा वंश; याला इंडोयूरोपियन किंवा इंडोजर्मानिक म्हणतात. संस्कृत, झेंद, पार्शी, ग्रीक, लॅटिन, केल्टिक, ट्युटॉनिक आणि स्लॅव्होनिक या भाषा आपल्या अर्वाचीन पोटभाषांसह आर्यन् भाषेत समाविष्ट केल्या जातात. ३ आर्य मानववंश; आर्य भाषा बोलणारे लोक यांत येतात. हिंदी लोक, इराणी, ग्रीक, रोमन, इंग्रज, फ्रेंच, जर्मन, स्कॅडिनेव्हियन्, स्पॅनिश, केल्ट व स्लाव्ह हे प्रमुख लोक या आर्यन् महावंशांत येतात.

आर्यपुत्र—पु. श्रेष्ठ, थोर माणूस (संस्कृत नाटकांत नवऱ्याला संबोधितात). 'आता आर्यपुत्रापुढें स्वतां केलेली कांहीं कविता म्हणून दाखीव. ' –कमं ३०. [सं.]

आर्यभाषा—स्त्री. १ आर्यभाषावंशातील भाषा. २ संस्कृत भाषा.

आर्यव्रत—न.आर्यांनीं घालून दिलेले आचार;नियम; कौल्न्य; सदाचरण (शरणागताची उपेक्षा न करणें, दीनांवर दया करणें इ०). 'आतां यांही आर्यव्रत कैसें जीवितार्थ सोडावें ।' –मोउद्योग ४. ७६. [सं.]

आर्यसमाज—पु. स्वामी दयानंदसरस्वती यांनीं स्थापन केलेला, वेद मानणारा धार्मिक पंथ. हा हिंदुस्थानांतील एक महत्त्वाचा एकेश्वरी पंथ आहे. आधिभौतिक, आध्यात्मिक, सामाजिक वगैरे बाबतींत मनुष्यजातीचें कल्याण करावें हा याचा उद्देश आहे. हा संप्रदाय जातिभेद मानीत नाहीं. हिंदु संघटनेच्या कार्यी यानें अलौकिक काम केलें आहे. [सं.]

आर्या—स्त्री. १ श्रेष्ठ, आदरणीय स्त्री; स्वाध्वी स्त्री. (सिं.) आर्याणी=पडदानशीन स्त्री. 'चाले देवी (द्रोपदी) जीचा कैवारी देवदेव ती आर्या।' –मोस्त्री २.३. २ एक वृत्त, छंद; आर्येच्या प्रत्येक अर्धांत साडेसात मात्रागण असावेत. त्यांत विषमस्थानीं ज गण नसावा आणि षष्ठस्थानीं ज गण किंवा न गण यावा हा सामान्य नियम आहे. आर्या, गीति, उपगीति, उद्गीति आणि आर्यागीति असे आर्यावृत्ताचे पांच भेद आहेत. यांतील प्रथम आर्या हा वृत्तप्रकार संस्कृत असुन मराठींत हें वृत्त क्वचित येतें. आर्या नांवाचें जें वृत्त मराठींत आहे तें वास्तविक गीति आहे.मोरो पंत यासच आर्यावृत्त म्हणतात. 'झोभा आर्यावृत्तें आली भुल्लतील यासि कवि कोटी।' –मोभीष्म १२.७९. पहिल्या व तिसऱ्या पादांत १२ मात्रा, दुसऱ्यांत १८ आणि चौथ्यांत १५ असें वास्तविक आर्यावृत्ताचें लक्षण आहे. 'गीति' पहा. 'आर्या आर्योसि रुचे ईच्या ठायीं जशी असे गोडी। आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीसती थोडी॥' –मोस्फुटआर्या. **आर्यागीति**—स्त्री. या वृत्ताच्या पहिल्या व तिसऱ्या चरणांत १२ मात्रा असुन दुसऱ्या व चौथ्या चरणांत २० मात्रा असतात. उदा० सत्यप्रतिज्ञ भीमस्तुतिपावे बंधु कंठलोहितपानें। मारी वसिष्ठ–सुत जो मुनि विश्वामित्र तत् कीर्ति तोहि तपानें॥' –मोकर्ण ६.३२. [सं.]

आर्या (र्ये) करणें–होणें—क्रि. १ खालीं करणें; खालीं ठेवणें, पाडणें. 'आगबोटीचो जिनो आर्या कर.' २ (नाविक) शीड उतरणें; शीड खालीं करणें, पाडणें. ३ (कु.) मरणें. 'बातमी ऐकल्याबरोबर त्यानें आर्यो केलान्.' ४ नाश करणें. 'भटाच्या गवताची आर्यो रे। माझ्या बैलानं केल्यान् रे. [का. आर्=विझणें, नष्ट होणें]

आऱ्या—फजीती; अब्रू पहा. [बोऱ्या द्वि.]

आर्या—पु. (भिल्ली) सोबती; मित्र. 'आमी मांआं आऱ्यो दांबज्यो तियाआ गोठव्याओंवं' [सं. आर्य=मित्र]

आर्यावर्त—पु. आर्यांचा प्रदेश; आजचा उत्तरहिंदुस्थान; आर्यावर्ताची प्राचीन सीमा–पूर्व समुद्र, पश्चिम समुद्र, उत्तरेस हिमाचल आणि दक्षिणेस विंध्याचल; यामधील भाग. [सं.]

आर्विल्ली—वि. (गो.) अर्वाचीन.

आर्श—पु. मूळव्याध. अर्श पहा. [सं. अर्श]

आर्ष—वि. ऋषिसंबंधीं; ऋषिप्रणीत (ग्रंथ, आचार, प्रयोग इ०) 'रामयशोग्रंथशर्ती क्षम जीवां जेवि आर्ष ताराया।' –मोभीष्म ५.२५. २ प्रवित्र; पूज्य; प्रमाणभूत; आधारभूत (ग्रंथ, संप्रदाय, ज्ञान वगैरे.) ३ (ल.) मंद; जड; अव्यवस्थित; मूर्ख; हट्टी; हेकेखोर. ४ असमंजस; अयुक्त; मूर्खपणाचें; फाजील (भाषण, मत वगैरे). 'तैसें माझें आर्ष बोलणें पूर्ण। अंगीकाराल वाटतें।' –भवि १.४१. ५ विचित्र; तऱ्हेवाईक; रूढीस धरून नसलेला. [ऋषिकालीं संस्कृत भाषा प्रचलित असल्याकारणानें तिच्यांत नेहमीं फेरबदल होत असत म्हणजे पूर्वीचे कांहीं शब्द व रूपें नष्ट होऊन नवीन शब्द व रूपें भाषेंत येत असत. ऋषींनीं आपल्या वेदमंत्रांत योजिलेले शब्द व रूपें हीं जेव्हां अप्रचलित झालीं तेव्हां त्याना आर्ष (ऋषींनीं योजिलेलीं) असें म्हणत व असे अप्रचलित शब्द व रूपें चालू नसल्यामुळें कानाला विचित्र लागत. यावरून आर्ष शब्दाचे लाक्षणिक अर्थ झाले.] ०**प्रयोग**—पु. ऋषींनीं दृष्ट अशा वेदग्रंथांत पाणिनीय व्याकरणाच्या नियमांना सोडून असणारे प्रयोग. ०**भाव**—पु. भोळा भाव. 'परि सगुणस्वरूपें आर्षभावार्थे।'–सप्र १.७१. ०**विवाह**—पु त्रैवर्णिकांच्या अष्टविवाहांतील एक प्रकार, यांत मुलीचा बाप वराकडून गाय व बैल यांची एक किंवा दोन जोड्या घेऊन त्यास आपली मुलगी देतो. 'अष्टविवाह' पहा. [सं.]

आर्सेनिक—अरसेनिक पहा.

आऱ्हां—क्रिवि. अलीकडे 'जया जें आऱ्हां परौते। जया जें पुढें मागौ तें।'–ज्ञा १५.७५ [सं. अर=सान्निध्य; प्रा. आरओ]

आल—स्त्री. एक झाड; याच्या मुळ्यांपासून व सालीपासून तांबडा रंग काढून त्याचा कातडें, रेशीम वगैरे रंगविण्याकडे उपयोग करतात. यास सुरंगी असेंहि म्हणतात. यांचीं पानें मोहाच्या पानासारखीं व फुलें पांढुरक्या रंगाचीं असून तीं बारमहा येतात. यांचीं फळें लोणच्यांत घालतात. याची लागवड वऱ्हाड–खानदेशांत फार होते. रंगाच्या उपयोगी झाड होण्यास तीन वर्षे लागतात. मुळ्यांपासून पक्का तांबडा रंग होतो. त्याचा सतरंज्या, पासोड्या रंगविण्याच्या कामीं उपयोग होतो. वऱ्हाडांत आल नांवाचे वृक्ष आहेत त्यांच्या मुळ्यापासून तांबडा रंग करतात. आलवण म्हणजे आल वृक्षापासून जो तांबडा रंग निघतो त्यानें रंगविलेलें कापड. अलवन पहा. [सं. आलक्त; हि. आल; अर. अलवन]

आल—वि. (गो.) १ कोंवळा. 'नाल मात्सो आल आस'= नारळ थोडा कोंवळा आहे. २ मूर्ख; खुळा. [सं. आर्द्र; म. ओला तुल० प्रा. आल=कोमल]

आलक—पु. कपटी, लबाड मनुष्य; गुन्हेगार. 'असे जरी आपण आलकांही। न देय येऊं पण आळ कांहीं।' –सारुह १.६५. [सं. आल=कपट]

आलकटपालकट—अलखट पालखट पहा.

आलकडी—स्त्री. (गो.) हालकडी पहा.

आलंकारिक—वि. १ अलंकारयुक्त; भूषणें, दागिने, शोभादायक वस्तू यांनीं मंडित; सुशोभित; सुंदर. २ साहित्यशास्त्रांतील गुणांनीं युक्त; उपमा, रूपक, वगैरे काव्यगुणांनीं पूर्ण (पद्य, ग्रंथ, भाषा सरणी). ३ अलंकारशास्त्राचें ज्यास ज्ञान आहे असा (मनुष्य). [सं.]

आलख—पु. अलक्ष; ब्रह्म. अलख पहा. 'आलख तो सकळाहुनि वर्ता.' –दावि ३७९.

आलखणें—क्रि. हलणें; ओघळणें. 'तो परमानंद आलखैला.' –शिशु ४१०. [सं. आ+लख्=जाणें, हलणें; किंवा पालख द्वि; तुल० का. अलकु=हालणें]

आलखतीं—क्रिवि. अदृश्य; न कळण्याजोगें. 'सत्यलोकीं आलखती बांधिली. तैसीं अमृतें दृष्टीं पातलीं.' –दाव ४७८ [सं. अलक्ष्य]

आलखपलख, आलखटपलखट मारणें—मांडी घालणें; अलखटपालखट पहा. 'आलख पलख मारी धवपी कमाना तीर कसुनि कस्ती.' –सला ६३.

आलखिडी—स्त्री. (गो.) आंकडी अर्थ ४ पहा. विळा, कोयती वगैरे टेवण्याचा खांच पाडलेला एक लांकडी तुकडा. एका वाटोळ्या फळीस एक लांबट खांच पाडून त्या खाचेंत कोयता टेवतात व त्या फळीस एक आडवें भोंक पाडून त्यांतून दोरी ओवून त्या दोरीनें फळी कंबरेस बांधतात. ती बांधल्यावर त्या खाचेंत कोयता स्थिर राहतो. माडावर चढतेवेळीं कोयता नेण्यास हिचा उपयोग होतो. एका खाचेंत एकच कोयता ठेवतात.

आलग—न. १ अग्र, टोंक. २ (ल.) क्षेप; फेंक. 'पुढें दृष्टिचेनि आलगें. खोंचि कीं निवटी मागें.' –अमृ २.१९. [सं अ+लग]

आलगट—वि. द्वाड; कुभांडी. अलगट पहा. 'आलगटा अवघ्याचि नारी. नसतींच गाऱ्हाणीं आणितां.' –निगा ३५.

आलगरजी—अलगरजी अर्थ ३ पहा. 'कामापुरता हात वरवर कुरवाळसी. आलगरज्या काम करून कंटाळसी.' –होला ८५.

आलटपालट-उलटापालट—अलटापालट पहा.

आलतड—(गो.) अलतड पहा. 'गोरां आलतडी आसा कीं पलतडी ?'

ऑलटॅर—न. (गो.) पहुडण्याची खुर्ची; आरामखुर्ची. [फ्रें. व्होलेटेर]

आलपीन—स्त्री. (कर.) केसांची विशिष्ट रचना. 'बाब्द अलपीन राखू नको' 'त्यानें आलपीन राखली' [इं. आलपीन या विशेषनामावरून]

आलंपेडुथार—वि. (गो.) वडील अगर पालक याचा दाब नसलेला; रिकामटेकडा.

आलंब—पु. १ ओळंबा; लंबक. २ आश्रय; आसरा; अवलंबन 'तेयेचेनि आलंबें. तो तयासी न विसंवे.' –विपू ७.१२३. [सं.]

आलबेला— अलबेला पहा. 'सखये द्रुंगाररसाचे रंगे. बनली आलबेली.' –होला ८४.

आलॅभाव-य—पु. (गो.) सोयरे; दूरचे नातेवाईक; अलबतेगलबते. उ० ऑलभाय कॉलभाय=रिकामटेकडे माणूस. [इं. ऑल=सर्व किंवा म. आला+भाड]

आलम—अलम पहा. १ जग; लोक. 'रघुनाथराव बिरादर असतां त्याणीं दगा केला; आलमशिवाय (दुनियेविरहीत) हे गोष्ट त्यांजकडून अमलांत आली' –ख ७.३५६६. 'संपूर्ण आलमांत जालें कीं.. यांची दोस्ती होऊन टोपीकरास सजा करावी ऐसा नक्षा अला हा लौकिक' –रा १९.९२. २ काळ; स्थिति; अंमल. 'करारप्रमाणें फडचे करावे, याप्र दिरंग लावून तफावत होणें दोस्तीचे आलमांत दुरुस्त नाहीं.' –रा ५.३४. [अर. आलम=जग]

आलमगिरी—पु. (व.) एक अल्प किंमतीचें नाणें. अलमगिरी पैसा पहा. 'मी तुला एक आलमगिरी सुद्दां देत नाहीं.'

आलमारी—अलमारी अर्थ २ पहा. 'विषयसुखाच्या आलमाऱ्या माझ्या तीवर तपेरुद्रा.' –पला ९३.

आलय—न. घर, राहण्याचें ठिकाण; निवासस्थान; वसतिस्थान; मंदिर. २ सांठा; खजिना; कोठार. सामाशब्द–देवालय; धर्मालय; सर्पालय. 'जें धर्मालय म्हणिजे.' –ज्ञा १.८६. [सं.]

ऑलराइट—उद्गा. १ सर्व ठीक; बरोबर. २ बरें तर; तसेंच. –सु ४. [इं. ऑल=सर्व+राइट=बरोबर]

आलवण—अलवान पहा.

आलवारजोडा—पु. (चांभारी.) मारवाडी जोडा (साध्या घाटाचा). [अलवार नांवाच्या गांवावरून तेथील घाटणीचा जोडा]

आलवाल—न. आळें; पाणी राहण्यासाठीं झाडाभोंवतीं केलेला खळगा; 'आलवाल न भरितां जळें. सुरतरू ओपी इच्छिलीं फळें.' –मुआदि ३०.१३०. [सं.]

आलस, आलस्य—पु.न. आळशीपणा. आळस पहा. 'सर्वेंद्रिया जाडय. मनामाजीं मौढ्य. माल्हाती दार्ढ्य. आलस्याचें॥' –ज्ञा १४.१७९. [सं.]

आलव्हीस—स्त्री. (गो.) आनंदप्रसंगीं देतात ती चिरीमिरी किंवा तश्रीफ. [पोर्तु. आलव्हिस्]

आला—अक्रि. येणें याचा भूतकाळ; आगमन झालें–केलें. [सं. आगत; प्रा. आअअ; आल]. **॰गेला-भला**–वि. १ येणारा जणारा. २ (ल.) पै-पाहुणा; अतिथि-अभ्यागत. 'त्याच्या घरीं आल्यागेल्याची वर्दळ फार, तरी कंटाळा नाहीं.' **आल्यागेल्याचें घर**–ज्या ठिकाणीं नेहमीं पाहुणे येतात तें घर. **म्ह॰** १ आलागेला गोसावी दाढेला दिला. २ (कर.) आलाभला भावकाईला टोला=एकाच माणसाला काम सांगून अथवा बोलून बोलून

सतावणें या अर्थी. **०दिवस**–क्रिवि. खंड न पडतां; दररोज; प्रत्येक दिवशीं; जो दिवस येतो त्या दर दिवशीं. 'सुदीत घरीं आल्यापासून हा आला दिवस खेळतो आहे.'

आला—वि. अत्युच्च; सर्वश्रेष्ठ. 'प्रस्तुतचा रंग तर असा दिसतो जे आला व अद्दना खाविंदापाशीं बराबर.' –रा ५.९. [अर. आला=श्रेष्ठ] **०दर्जा**–पु. (ना.) उत्कृष्ट, सर्वोत्तम स्थिति. **०हज्रत**–पु. सर्वश्रेष्ठ स्वामी. द्वैद्यावादच्या निजामाला त्याची प्रजा या नांवानें संबोधितात. [हज्रत=स्वामी]

आलात—पु. कोलीत; जळतें-पेटलेलें लांकूड. अलात पहा. **०चक्र**–न. कोलीत वाटोळें फिरविलें असतां दिसणारें चक्र, कडें. 'आलातचक्रींचा निर्धार । अग्नि सत्य मिथ्या चक्र ।' –एभा १३. ५५१. [सं.]

आलाप-फ—पु. १ बोल; बोलणें; भाषण. 'त्यांचिये वाचेचा ठाईं । कृष्णवीण वार्ता नाहीं । आलापु जितुका कांहीं । तो तद्विषयांक जयांचा ।' –रास २.६७२. २ परस्पर भाषण–बोलणें; संभाषण; चर्चा. 'दैत्य मिळोनिया सकळीं । आलाप मांडिला पातालीं ।' –कथा ४.१३.४९. 'परी हे प्रासंगिक आलाप । आतां असतु न बोलें संक्षेप ।'–ज्ञा ७.४४. ३ वर्णन; गोष्ट; कथा. 'जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टी भोगी माझेंचि रूप ।' –ज्ञा ९.४४५. ४ गाण्यांतील–संगीतांतील स्वर, तान, लकेर; रागाचा आकार. ५ आवाजी जमविणें; गाण्याची तयारी करणें. ६ (ल.) रडणें; ओरडणें. [सं. आ+लप्–आलाप]

आलाप(फ)चारी—स्त्री. १ आलाप; आलाप काढणें; गाण्याला सुरवात करण्यापूर्वी स्वर जमविणें. [सं. आलाप+चर–चारी]

आलाप(फ)णें, आलापि(फि)णें—अकि. आलाप करणें; आलाप घेऊन गाणें; आलाप काढणें.

आलापाला—पु. पाला, कंदमुळें वगैरे भक्ष्य; जाडें भरडें अन्न; कदन्न; कसें तरी देह निर्वाह होण्यासाठीं अन्न. **म्ह०** आलापाला खाल्ला आणि गोसावी धाला=जाडेभरडें किंवा अगदीं साधें अन्न खाऊन जो संतुष्ट असतो अशा माणसाला लावतात. [पाला द्वि.]

आलापिनी—स्त्री. १ (संगीत) सतराव्या श्रुतीचें नांव. २ वीणा. [सं.]

आलाबु—पु. भोंपळा. अलाबु पहा. 'आला मुनी जवळि, आलापितांचि जळि आलाबुसा उसळला ।' –आमा ४५. [सं. अलाबु]

आलायबलाय—अलाईबलाई पहा.

आलांवतीण—स्त्री. १ (गो.) बाळंतपणांत मेलेल्या स्त्रीचें पिशाच. 'आलांवतीण जावून गोमटेरे फसली.' २ (ल.) राक्षसी; भांडखोर स्त्री. [सं. आ+बाल+वती ?]

आलावा—पु. आगटी; ताबुतांतील विस्तवाचा खड्डा. अलावा पहा. 'त्या मंदिरासमोर मुसलमानांचा आलावा नव्हता पण तेथील मुसलमानांनीं तो पाडण्याचें ठरविलें.'

आलाशिरा, आलासिरॉ—पु. (गो.) आधार; आसरा; आश्रय. 'पूत जोडू लागिल्लॉ जाल्यार कितेय आलाशिरॉ जातलॉ आशिलॉ.' [सं. आश्रय]

आलिकडचा–ला, आलीकडचा, आलीकडील-कडून, आलीकडे—अमर्त्ये पहा.

आलिंग—पु. १ बैलास मारावयाच्या कोरड्याची तुताती (वादी) ज्या कातडी कडीला–वळयाला (कोरड्याच्या मुठीच्या अग्रार्शी) बांधलेली किंवा अडगविलेली असते तें वळें; कडी. २ (व.) (शिवाळीचें) पातें वर करण्यासाठीं किंवा बैलाच्या गळ्यास घट्ट करण्याकरितां जी 'दोरी उपयोगांत आणतात ती. [सं. आ+लिग्]

आलिंगणें—क्रि. कवटाळणें; मिठी मारणें; आलिंगन देणें; भेटणें. 'कीं आलिंगावेंआं श्रीकृष्णराजा ।' –दाव १७१. [सं. आलिंगन]

आलिंगन—न. कवटाळणें; मिठी; भेट. (क्रि० देणें.) (गो.) **आलिंगणा घालप**–लोटांगण घालणें; मनधरणी करणें.

आलिंगित—क्रि. वि. कवटाळलेला; मिठी मारलेला. आलिंगन दिलेला.

आलिजा, आलिजाहा, आलेजा—वि. उच्च पदवीचा. उ० आलीजा बहादर शिंदे. अलीजाहा पहा. [फा. आलीजाह्]

आॅलिव्ह—पु एक फळझाड; भूमध्यसमुद्राच्या आजूबाजूस याची लागवड होते. याच्या फळाचें तेल काढतात. कांहीं ठिकाणीं फळांचें लोणचें घालतात. फळापासून रंग तयार होतो. आलिव्हाचें पान, फांदी, माळ स्त्रिस्ती लोकांत शांततेचें निदर्शक मानितात. [इं.]

आलिशां, आलिशान—वि. उच्च दर्जाचा; मोठ्या मानाचा अलिशान पहा. [फा. आलीशान्]

आली—स्त्री. आलीचा रंग करणारी एक जात. हे लोक नेमा डांत राहतात. –कृषि ४१४. आल पहा.

आली—स्त्री. १ सखी; मैत्रीण. 'गेली मदत कराया संकटि पाहूनि आपुली आली.' 'आलीजनें अति सुगंधहि धूपवीले.'–सारुह ६.२०. २ पंक्ति; ओळ; रांग. [सं.]

आलीगेली—स्त्री. नफानुकसान; जमाखर्च; यशापयश; जयपराजय. 'तुम्ही आपले निराळे, आलीगेली मजवर लोटणार.' [येणें जाणें.]

आलीढ (अंगहार)—पु. (नृत्य) आलीढस्थान करून व्यंसितकरणांतील हातांप्रमाणें हात करून खांद्यावर हळू हळू ठोकणें, डावा पाय नूपुर व उजवा आलात करणें, नंतर उजवा पाय पुढें फेकून हात उरोमंडल करणें, शेवटीं करिहस्त व कटिच्छिन्न क्रमानें करणें.

आलीढस्थान—न. (नृत्य) ऐन्द्रस्थानाप्रमाणें उभे राहणें व उजवा पाय पांच ताल पुढें ठेवणें. मल्लयुद्ध, शस्त्रांची हेटाळणी वगैरे गोष्टी या स्थानांत उभे राहण्यानें सूचित होतात. [सं.]

आलीवाट—स्त्री. आलेला मार्ग. ' बाण वर्षला घनदाट । रुक्मिया भुलविला आलीवाट ' –एरुस्व १२.१३५. [आली+वाट]

आलु–लू—पु. १ खाण्याजोगें कंदमूळ; २ (हिं.) बटाटा, गोराडू, वगैरे कंद. [सं.]

आलुका–की, आलुकेपण—अलूका, अळका पहा. ' कसा प्रीतिचा आलुका देव ।' किमुदाम. ३०. ' रसनेच्या ठायीं आलुकपण ।' –प्रंथराज ७६.

आलुता–ते—अलुता पहा.

आलुबुखार—अलुबुखार पहा.

आलें—अलें पहा.

आलेपण—न. येण्याची स्थिति. ' कीं निद्रेचेनि आलेपणें । निदेलें तें जाय प्राणें ।' –अमृ ४.२९. [सं. आगत–आला+पणा]

आलेख्य—न. चित्रें काढणें; चित्रकला; रेखाटणें; लिहिणें; चौसष्ट कलांपैकीं एक कला. चौसष्ट कला पहा. [सं.]

आलेभाऊ, आलेभाय, आलेभाव—पु.अव. (गो.) सोयरे-धायरे; दूरचे नातेवाईक. **०कोल्हेभाऊ**–येणारे जाणारे; मौज पाहणारे; तमासगीर; बघे. [आला+भाऊ]

आलें—न. अलें पहा. ' कृष्णकथेचें आलें कीजे खोलु । बुडीं भावरसाची जीती ओलु ' –शिशु २२. [सं. आलवाल; तुल. का. आळि=वर्तुल]

आलोक, आलोकन—पु.न. अवलोक–न पहा. १ पाहणें; बघणें. २ दृश्य; देखावा; रूप; आकार. ' पैल खांब कां पुरुखु । ऐसा निश्चयो नाहीं एकु । परी काय वोज नेणो आलोकु । दिसत असे ' –ज्ञा १४.७६. ३ प्रकाश; तेज; दीप्ति. ४ विचार; विचार करणें. [सं. आ+लोक्]

आलोकशब्द—पु. राजा चालतांना किंवा समेत बसला असतां त्यानें लोकांकडे पहावें, रामराम घ्यावा इ. अर्थाचे चोपदार जे शब्द बोलतात ते; ललकारी; पुकारा. [सं.]

आलोकित—वि. पाहिलेला; अवलोकन केलेला; अवलोकित. –न. (नृत्य) नृत्यामध्यें एखाद्या वस्तूकडे पाहणें. [सं.]

आलोच—पु. विचार; मनोगत; आलोक. ' मग समुद्रापैलाडी देखे । स्वर्गींचा आलोचु आइके । मनोगत बोळखे । मुंगियेचें ' –ज्ञा ६.२६९. [सं. आ+लोच्]

आलोचणें—सक्रि. १ पाहणें; बघणें; विचार करणें. ' माये-पुढें बाळका । रिगतां न पडे शंका । तैसें मन देतां लोकां । नालोची जो ' –ज्ञा १३.३६०. ' आलोचिलें कीं पीडितील व्यर्थ –दावि ३०९. २ सांगणें. ' धावोनि मिठी घालावयासी । हितगुज आलो चासी । ' –एभा ११.११५७. [सं. आ+लोच्]

आलोचन–ना—नस्त्री. परीक्षण; निरीक्षण; बारकाईनें पाहणें; विचार करणें; चर्चा; विचार. अवलोकन पहा. ' तयाप्रती कुलिश पाणी । आलोचना करी विश्वासे ।' –मुआदि १७.२९. [सं.]

आलोडणें, आलोढणें—उक्रि. १ हालचाल करणें; ढवळा-ढवळ करणें; इकडे तिकडे करणें; घुसळणें; मिसळणें. २ (ल.) मनांत घोळणें–घोळविणें; पुन्हां पुन्हां विचार करणें. ' तुम्ही आलो-डून स्वप्नाची खूण । सांगा मजलागीं ।' ३ अध्ययन करणें; अभ्या-सणें. ' तैसे शब्दजात आलोडिले ।' –ज्ञा १०.१७२. ' आलोडूनि वेदशास्त्रार्थ । ज्ञातेपणें जे पंडित ।'–एभा ५.५७. [सं. आ+लुड्= हलविणें; आलोडन]

आलोडन—न. (अप.) आलोढन. १ कांहीं एक पदार्थ ढवळ-ण्याचा व्यापार. २ (ल.) ग्रंथादिकांतील तत्त्व समजावें म्हणून अनेकवार, अनेकप्रकारें अभ्यासून पाहण्याचा क्रम: दीर्घ अभ्यास; अध्ययन. [सं.]

आलोडित—वि. आलोडन केलेलें. [सं.]

आलोड्य—वि. (विप्र.) आलोढ्य, (क्र.) आलोड. १ आलो-डन करावयाजोगा; ज्याचें आलोडन करावयाचें आहे असा (ग्रंथ वगैरे). २ पुष्कळ आलोडन झाल्यामुळें चांगला परिचित झालेला (विषय) किंवा त्या विषयाचा तज्ज्ञ (माणूस). –न. प्राविण्य; पंडितत्व; पांडित्य. ' ज्योतिषशास्त्रांत त्याचें चांगलें आलोड्य आहे. ' [सं.]

आलृगाशी—क्रिवि. (व.) अचानक. अलगपीत पहा. ' कृष्णा गोविंदाला आल्गाशी भेटला. '

आल्ब्युमिन—न. श्वेतकल्कवल्क; हा दुधांत, अंड्यांत, रक्तांत, वनस्पतींत वगैरे सांपडतो. (अ) (रसायन) अंड्यांतील पांढरा बलक. (आ) (वनस्पति) गर्भपोषक द्रव्य; मगज; बीजसंवर्धक द्रव्य. (इ) (वैद्यक) रक्तांतील एक घटक; औजस द्रव्य. **आल्ब्युमि-नॅइड पेपर**–पु. (फोटो.) अंड्यांतील पांढऱ्या बलकानें तयार केलेला कागद. [इं.]

आल्म—न. (गो.) धैर्य; धाडस. [पोर्तु. आनिमु]

आल्मा–आवै—स्त्री. (गो.) वेढब, कुरूप स्त्री. [पोर्तु. आल्म+ आवै=आवा, आई]

आल्याड—क्रिवि. अलीकडे. अलाड पहा. ' सरस्वतीच्या आल्याड आलों. ' –बाय २.२.

आल्यापावलीं—क्रिवि. एकदम; ताबडतोब; आलातसा. ' तूं आल्यापावलीं परत जावेंस हें फार चांगलें. '–नाकु ३.१२. [आलें+ पाऊल]

आल्हर—पु. अंगाई गीत. ' गाऊनिया आल्हर मुखें । निजीं निजवी त्या सुखें ।' –निगा १२५. [अल्हा !]

आल्हाद—आह्लाद पहा.

आल्हादी—क्रिवि. (व.) अल्हाद. अलग पहा.

आव—पु. १ डौल; थाट; मोठा आविर्भाव; प्रतिष्ठा; महत्त्व. ' येथूनि रसां झाला आवो । रसाळपणाचा । ' –ज्ञा १.३३. (क्रि० घालणें; आणणें). ' अंगांत कर्तृत्व नसून आव घालण्याचा आमच्या लोकांना मोठा अहंपणा. ' –नि ६४. २ नीटनेटकेपणा; सुंदरता; बाह्यसौंदर्य; आकारमनोरमता; सुंदर घाट; (सामा.) आकार; घाट; घडण. ' सप्तावरणेंसि प्रचंड । आवो साधूनि उदंड । निर्माण केलें ब्रह्मांड । मयूरांड आकारें । ' –एभा २४.१४२. ३ धैर्य; हिंमत; हिय्या; धमक; अवसान. (क्रि० धरणें; आणणें) ' त्या धर्मसैनिं कांचे झाले होतेचि सर्व आव रिते । '–मोकर्ण १२.५. ४ दाब; आटोप; आब; दबदबा; शक्तिक्षेत्र; बल; सामर्थ्य. ' तुझिया लाठेपणाचा आवो । तिहीं लोकीं । ' –ज्ञा २.९. ' फोडून चित्ताची धांव बसविसील आव न कळे कैसा । ' –होला १०१. ५ नेम; पवित्रा. ' दृढ साधोनियां आवो । निजबळें घालिता घावो । ' –एभा १२. ५८८. ६ घाट; घडण (भांडें वगैरेची). ७ उद्भव; उद्गम. –शर. [सं. आ+इ=जाणें]

आव—वि. (व.) निर्भेळ; ताजें; कोरें; जसें–आवचें दूध= निरसें–निर्भेळ दूध. [सं. अव=शुद्धतादर्शक उपसर्ग ?]

आव—पु. आवक; प्राप्ति; लाभ. ' केवढा माझा उवावो । करितां कोण प्रस्तावो । केलियाहि आवो । काय येथ । '–ज्ञा १८.६२२. [सं. आय, प्रा. आव]

आव—क्रि. (आज्ञार्थी द्वि. पु.) (हिं. गु.) ये. [सं. आ+या; प्रा. आव.हिं. आव गु.आवो,आवजो] **आवजा**–(भिक्षी)(आज्ञार्थी) या. ' हा काल लाकडी लिईन आवजा. ' **आवजाव**–१ या आणि जा. ये, जा; पुन्हां ये असें सांगणें. २ (ल) हेलपाटा. (क्रि० करणें, मांडणें; लावणें;). आवजाव घर तुम्हारा = दानशूर माणसाचे घरीं कोणी येतो जातो त्यास अनुलक्षून योजितात.

आंव—स्त्री. आंतड्यासंबंधीं रोग, आमांश; पोटांतील अपक्वता, अपचन, अजीर्ण. **०रक्त**–न. रक्ती आंव, रक्ताची हगवण. [सं. आम; हिं. आव; सिंधी आंहं; काश्मिरी ओमु; सिंहली अमु]

आवई—अवाई पहा.

आवक—वि. आलेला; प्राप्त झालेला; आयात; मिळालेला. –स्त्री. १ जमा; उत्पन्न. ' जरी त्याची आवक मोठी असून काटकसरही मोठी असे तरी त्याला जबर कर्जे असे. ' –इरामू २९२. २ आलेलीं पत्रें–पुस्तकें, कागद, वगैरे; याच्या उलट जावक. **०जावक**–स्त्री. १ आयातनिर्गत; जमाखर्च. २ आवकजावक बारनिशी; आल्यागेल्या पत्रांची नोंद. **०बारनिशी**–स्त्री. आलेलीं कागदपत्रें जींत बार करतात ती वही. [सं. आ+इ=जाणें; प्रा. हिं. आव]

आंवकणें, आवकणें, आवंकणें—अक्रि. अडखळणें; थांबणें; कचरणें; साशंक होणें. अवांकणें पहा. ' पण यशवंत तूं करणार ना आज सारं ? राधाबाईनीं जरा आवंकत विचारिलें. –हाच कां धर्म २३९ ' आंतून गाण्याचे कोमल सूर येत होते, मी जरा आवंकलों दाराशीं ' –हाचकां धर्म २९५ इतर अर्थांकरितां अवांकणें पहा.

आवग—न. (कु.) माशाच्या पोटांतील आंतडें. अवांग पहा.

आवगणें—अक्रि. १ वाईट मार्गाला लागणें; स्वैरेच्छाचारी, दुराचारी बनणें; बहकणें; बावचळणें. अवगणें पहा. ' चोरी–जारी अनाचर । करूनि नाहीं म्हणती नर । तैसा नावेक राजेश्वर । असत्या जागीं आवगला । ' –मुआदि १६.११६१. [सं. अव+गम्]

आवगणें—सक्रि. धारण करणें; अंगीकारणें; अंगीं आणणें, घेणें; अवगणी घेणें. ' कीं मानुषपणा आवगला । भणऔनि सत्यलोकां एओ बिहाला । ' - दाव ३५२. ' अमूर्तुही मूर्ति आवगे । ' –ज्ञा ६.१३१. शिवाय अवगणें पहा [अव+अंग किंवा अव+गम्]

आवगणें—सक्रि. आटोपणें. –हंको. [आव=आटोप]

आवगुंडी—स्त्री. (शेती–चांभारी) मोठेच्या बैलांस मागें ओढतांना उपयोगांत आणावयाची, कासऱ्यास जोडलेली वादी.

आवचट—अवचट पहा. ' आवचटें निधान जोडलें । तें कवडीच्या बदल नेलें । ' –दा ३.१०.३४.

आवंजणें, आवंजे—आंवणें, आवणी पहा. ' माझें आवंजे (भाताची लावणी) उद्या होणार आहे. '

आवजा–झा—वि. अवलंबन; भार; ओझें. अवझा पहा. ' तया मोक्षाचा आवझा । आपणेया कवणें लावीला । ' –भाए ७८३. ' जिवलगासि आवजा जाला ' –दावि ७७४. [सं. अवह्; प्रा. आवज्ज; किंवा अवजड (अप.)]

आवझथरो—वि. (हेट.) (शिवी.) आईशीं वाईट कर्म करणारा; मात्रागमनी. [आव=आई+झथरो=झवणारा]

आवट—पु. लांकडाची रास. अवट पहा. ' आवटामध्यें मांडवाचा सरा आहे, तो आण. '

आवटचावट—क्रिवि. भलतेंसलतें; अरबटचरबट. [चावट द्वि.]

आवटणी,आंवटणी—स्त्री. (कों.) (भाताची) पुन्हां लावणी; आवटण्याची क्रिया; दाट आलेलीं रोपें उपटून दुसरीकडे लावणें. [आवटणें]

आवटणें, आंवटणें—उक्रि. (कों.) पेरलेलें धान्य (बहुधा नागली व वरी, क्वचित एका जातीचें भात) उगवून आल्यावर उपटून नांगरलेल्या जमीनींत काडी काडी आडवी फेकणें (म्हणजे तें जीव धरतें). [सं. आ+वट्=वेगळें करणें]

आवटणें—क्रि. उरणें. (–शर.)

आंवटरणें–टारणें, आवटळणें–टाळणें, आवटळ, आवटी—अम०यें पहा.

आवटळा—पु. गात्रसंकोच; उसण; अवटळा पहा. 'उठवणें ताठा करक । आवटळे आणि लचक ।' –दा ३.६.४६.

आवठ—पु.(व.) अस्पष्ट आकृति; अस्पष्ट चिन्ह, भाग. 'येथून चोर गेल्याचा आवठ दिसतो.' (क्रि० उठणें; वठणें).

आवठणें—(कों.) आवटणें पहा.

आवड—स्त्री. १ गोडी; संतोष; आनंद; इच्छा. **म्ह०** आवडीला मोल नाहीं आणि प्रीतीला तोल नाहीं; २ प्रीति; चांगला भाव; रुचि; पसंति. (क्रि० ठेवणें; होणें; असणें.) 'आवडीची क्षुधा जयाप्रती । तयासि रुचे पाकनिष्पती ।' –मक २२.१५. [सं. आ+वृ=वरणें] **०कृत्य**–न. (काव्य) आवडीचें, मनाजोगें, संमत असलेलें, आवडणारें काम; 'शीघ्र येऊनि पुत्रासहित । संपादीन आवड कृत्य ।' **०गोड–चतुर–चतुराई**–अभ्यें पहा. **०नावड –निवड– तिटकारा**–स्त्रीपु. प्रीति आणि अप्रीति; हवें असणें नको असणें; एक गोष्ट पाहिजे असणें दुसरी नको असणें; २ (ल.) विषमबुद्धि; द्वैत; समतेचा अभाव. **०निवड**–स्त्री. मकरसंक्रातीच्या दिवशीं सुवासिनी स्त्रियांनीं करावयाचा एक विधि. तो एखाद्या सुवासिनीस बोलावून तिच्या आवडीप्रमाणें तिला चोळी शिवून देणें हा होय. **०भूत**–वि १ आवडतें झालेलें; आवडलेलें; प्रिय झालेलें; संमत असलेलें 'हें घर मला मोठें आवडभूत आहे.' २ प्रीति, आनंद; प्रेम; आवड. 'अमक्यावर आवडभूत आहे; आमक्याची आवडभूत आहे.'

आवड—स्त्री. (शाप) स्नेहाकर्षण; रासायनिक आकर्षण. (इं.) ॲफिनिटी. [आवड]

आवड—पु. (व.) मोठ्या शेताचा एक भाग. अवाड पहा. [सं. आवार]

आवडकचवडक—औडकचौडक पहा.

आवडणें—सक्रि. पसंत असणें; रुचणें; आनंददायक किंवा मनाजोगें असणें. **आवडून घेणें**–आपली प्रीति बळेंच ठेवणें; आपल्याला प्रेमबद्ध करून घेणें. [आवड; सिं. आउडणु]

आवडणें—सक्रि. दिसणें, वाटणें; भासणें. 'तो मनुष्यासारिखा तरी आवडे । परी मनुष्यत्व तया न घडे' –ज्ञा ४.१००.

आवडणें, आवाडणें—सक्रि. (राजा. कुण.) शौचविधीनंतर ढुंगण धुणें; कुल्ले धुणें. [अवटणें; सं. आ+वृत्; प्रा. आवट्ट= शोषणें ?]

आवडता—वि. १ पसंतीचा; आवडीचा; लाडका; आनंददायक; संतोषकारक. २ (ल.) वाटेल तो, पाहिजे तो; हवा तो; भलता. 'हे जें साधन तुम्ही निरूपिलें । तें आवडतयाहि अभ्यासिलें ।' –ज्ञा ६.३३७. 'तैसा आवडतिये भूमिके । आरूढलियाहि कौतुकें ।' अमृ. ७.२६०.

आवडती बायको—स्त्री. १ आवडणारी, पसंत असलेली, बायको; २ (ल.) विजवराच्या किंवा दुसऱ्या लग्नाच्या बायकोबद्दल म्हणतात.

आवडतें शास्त्र—न. १ एखाद्या वाक्याचा (शास्त्रादि ग्रंथांतील) सत्याला जरा सोडून आपल्या इच्छेप्रमाणें किंवा मताप्रमाणें अर्थ करणें; अनुकूल शास्त्रार्थ काढणें. २ आपल्या इच्छेचा कायदा किंवा आपली इच्छा हाच कायदा, शास्त्र; स्वच्छंदीपणा; मनाला वाटेल तसें करणें.

आवडवणी—न. आरोग्यासाठीं स्नानाकरितां लिंबाचीं पानें वगैरे टाकून तापविलेलें पाणी. [?]

आवडसावड—स्त्री. १ माणसें, बैल, नांगर इ० एकमेकांच्या उपयोगासाठीं एकमेकास देण्याघेण्याची शेतकऱ्यांची पद्धति; २ एकमेकास केलेली मदत; मदतीची अदलाबदल. [सवड–सावड द्वि.]

आवडळ—वि. यत्किंचित्; थोडा; अल्प. अवडळ अर्थ ३ पहा.

आवंडा–ढा—भंवडा पहा.

आवडाव—अवाडाव पहा.

आवडी—स्त्री. (काव्य) आवड; प्रीति; पसंति. आवड पहा. 'तुका म्हणे कुडी । जेवी प्राणाची आवडी ।'; 'अमेचि अशि आवडी करिशि कां न अत्यादर ।' –केका ६१.

आवढ–ढें—क्रिवि. (खा.) इतका; एवढा; येवढा [एवढा]

आवण—न. गाडीच्या चाकाच्या भोंकांत घातलेलें लोखंडी वर्तुळाकार वेढें किंवा मायणी. हिच्यामध्यें गाडीचा कणा फिरत असतो. 'चाकांचें आवण वाटेंत पडलें.' २ (यंत्र.) (इं.) बेअरिंग; फिरणाऱ्या दांडयाच्या खालीं–वर असणारा भाग, खोबण; याचा उपयोग घर्षणानें होणारी झीज कमी करणें हा असतो. आवणांत शाफ्टिंग बसविलेलें असतें. [सं. आ+वृत]

आवण—न. (कों.) १ भातांचें उभें शेत; रोपे. 'आमच्या शेताला १० मणांचें आवण लागतें.' २ वार्गी, नाचणी, वरी मिरची यांचें दुसऱ्या ठिकाणीं लावण्याकरितां तयार केलेलें रोप; नारळी, पोफळी यांचें रोप. ३ ज्यांत प्रथम रोपें लावतात ती जमीन; जींत बीं पेरून रोपें तयार करतात ती जमीन. ४ (उत्तर भाग) भातांचीं रोपें पहिल्या ठिकाणावरून उपटून ज्या दुसऱ्या जमीनींत लावतात ती जमीन. ५ (सामा. कांहीं प्रांतांत) धान्य, भाजीपाला यांचीं रोपें लावतात ती जमीन; आवणी ही जमीन. [सं. आ+वप्–आवापन–आवण]

आवणा—वि. (कु.) शिळा.

आवणी, आंवणी—स्त्री. १ लावणी; दाढींतील भातांचें रोप उपटून दुसरीकडे लावणें. २ जींत भातांचीं रोपें लावतात ती जमीन. आवण पहा.

आंवणू—न. (कों.) १ आंवणीसाठीं काढलेलीं रोपें लावण्याकरितां तयार केलेली जमीन; जींत आवणी करावी लागते ती (जमीन, क्षेत,). २ पुन्हां लावणी केलेलीं आवणांतील भाताचीं रोपें वगैरे; आवणी करून झालेलें भात. [आवण]

आवणें, आंवणें—अक्रि. (चि. गो.) जेवण झाल्यावर हात व तोंडधुणें. आंचवणें चित्पावनी रूपें–आंव = आंचव; आंवयव= आंचवव=हात धूववं; आंव्वे=आचवावयास. [सं. आचमन=आंच वणेंचा वणेंविपर्यास व वणेंलोप]

आंवणें—उक्रि. (कों.) आवण उपटून दुसरीकडे लावणें; भात, नागली, मिरची, वांगीं वगैरेच्या रोपांची दुसऱ्या जागेंत लावणी करणें; आवणांतून काढलेलीं रोपें आंवणूंत लावणें. [आंवण]

आवणें—अक्रि. समाविष्ट होणें; सामावणें; मावणें. ' सकल करतलांत क्षिती आवली । ' –प्रला ११७. [आव]

आवत––(कृ.) औत पहा.

आवतण, आवतणें—कि. १ बोलावणें; आमंत्रणें. अवतण, अवतणें पहा. ' गोमायुगृध्रपलभुक्परिवारा मुत्युलागिं आवतणें । दिधलीं कुरुसैन्यांनीं...' –मोकर्ण ८ ४. २ अभिमंत्रण करणें. ' मल्लविद्येचा अभ्यास । आंवतूनि चालिला चंडीश । हां हां म्हणतां नागपाश । घातिला त्यासि ॥ ' –कथा ३.१०.१६३. ' ज्ञनवारीं आणिला जरी आंवतुन धोतरा । निरमाल्य गमे नाहीं तेज कुण्या मंतरा । ' –प्रला १०४. ३ भोजनास बोलाविणें. ' भोजना आवंतिला सहपरिवारीं । ' –मुआदि ४०.७२.

आवंतर—अवांतर पहा. ' आधींच पुणें गुलजार, तशामधिं अपूर्व वसला आदितवार । त्यांत कृष्ण श्रीमंत आवंतर समस्त यादव परिवार । ' –ऐपो २००.

आवतासवदा—पु. (व्यापारी) वायद्याचा सट्टा. भविष्यकाळीं होणाऱ्या देवघेवीचा करार. –मुंव्या २४९. [गु. आवता= आगामी+सवदा]

आवतिकाय—स्त्री. (गो.) गति; स्थिति; विशेषेंकरून दुस्थिति दुर्दशा. ' म्हज्या दुस्मानानीं म्हज्या घरार कितें (जादुटोणा) करून घालें तेतपासुन म्हजी आवतिकाय ही अशी जाल्या. [अवगतिका]

आवती, आवथी—स्त्री. १ आहुती. २ (ल.) नाश. [सं. आहुति]

आवतीक—(गो.) न. नाश; नुकसान, आवती पहा. ०**मारप**= नुकसान करणें.

आवतीभोंवतीं––क्रिवि. सभोंवतीं; आजूबाजूस; जवळपास. ' आवतीभोंवतीं अशीं किलबिल करूं लागलीं म्हणजे जिवाला गारवाऱ्यावर चांदण्यांत पडल्यासारखें वाटतें ' –भा १३ [भोंवतीं द्वि.; स. आवृत+भ्रमित. प्रा. आवत्त]

आवंती—वि. अवंती नमरासंबंधीं. –स्त्री. एक भाषा. ही महाराष्ट्री व शौरसेनी यांचें मिश्रण आहे. [सं.]

आवदा—स्त्री. आयुष्य मर्यादा. ' मृत्युलोकीं मनुष्यमर्यादा । शतवर्षे जी गोविंदा । ते अतिक्रमोनि आवदा । अधिक मुकुंदा पंचवीस जाहलीं । ' –एभा ६.२५४. [सं. आयुर्दाय]

आवंदा—क्रिवि. येंवा; अवंदा पहा. ' तुम्ही आवंदाची मस्लत बुडविली तरी पुरवेल. ' –भाब ४४. ' चवरी आबदागीरी बक्षीस कंठी मोत्याची आवंदाची बोली येक पालखीची । ' –होला १६७.

आवदुध—न. (व.) १ बिन पाण्याचें दूध. २ न तापविलेलें–कच्चें–निरसें दूध. ' तापविलेल्या दुधापेक्षां आवें दूध घेणें हितकर आहे ' [सं. आप; प्रा. आव=पाणी+दूध. किंवा अव=शुद्धतादर्शक आगम]

आवनो—वि. (कु.) न भाजलेला; कच्चा. [आवा ?]

आवभाषी—(प्र.) दुरुत्तर; दुष्ट बोल. ' जमाना आला उफराटा । सुन सासुला लावी बट्टा ।...लेकबापाशीं लावी आवभाषी । ' –अफला ६८. [सं. अप–अव+भाषा]

आवय––स्त्री. (गो.) आई; माता. ०**बापुय**–अव. आईबाप. [अव्व–अवा=आई]

आवंय, आंयंय—उद्गा. (गो.) छी;, थूः, इश्श. [सं. अ+वच्; प्रा. अवय]

आवर—पु.स्त्री. १ आटोप; आटोका; आटोक्यांत आणणें; आटोपतें घेणें; थोडक्यांत आणणें; गोळा करणें; बंद करणें; संपुष्टांत आणणें. २ नियंत्रण; तावा; वचक; निग्रह; अंमल. ३ व्यवस्था; कारभार; पाहणी; धंदा चालविण्याचें कौशल्य; उरक. ०**आटोप-शक्ति**–स्त्री. उरक. ' मोठें काम करण्यास आवरशक्ति असेल तो कामाचा. ' [सं. आ+वृ]

आवरक—वि. आवरणारा; वेढणारा; बांधणारा; संयम करणारा; अटक करणारा; तावा ठेवणारा; आळा घालणारा. आवरण घालणारा. ' आहो भक्तीचें बळ थोर आहे देवराया आवरक । ' –दावि २७९. ' अज्ञान अविद्या आवरिका । विपरीत ज्ञान विक्षेपिका । '–विपृ ५.५७. ०**शक्ती**–स्त्री. आवरशक्ति; उरक; व्यवस्था ठेवण्याचें कौशल्य.

आंवरक्त—न. रक्ताची हगवण, आमांश. [आमरक्त]

आवरजा—अवरजा, अवर्जा पहा.

आवरजून—अवरजून पहा.

आवरण—न. १ आवरणें; आटोप; आवरण्याचा व्यापार. २ वेष्टन; आच्छादन; वेढा; झांकण; रक्षण साधन (कठडा, कुंपण, वई, झांकण, पुठ्ठा, पेटी, पडदा, झगा इ०). ३ वेढणारी, बांधणारी वस्तु. ४ आच्छादनावस्था; प्रावरणावस्था; संरक्षणावस्था. ' मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासि भूषण । ' –ज्ञा ९. १६२.

'धाकटया भोवतें आवरण। मी घालूनि धरितसे।' –रावि ३८. १९. ५ तावा; नियमन; अंमल; व्यवस्था; अधिकार; आटोप; उरक. ६ भाद्रपद शुद्ध द्वितीयेच्या रात्रीं बायकांचें आकंठ भोजन– खाणें–कराळ (कारण दुसऱ्या दिवशीं हरितालिकेचा उपवास कांहीं न खातां करावयाचा असतो). ७ (तत्त्वज्ञान) चुकीच्या कल्पनेच्या दोन कारणांपैकीं (आवरण व विक्षेप) एक; आच्छादन; लपविणें. 'भ्रमज्ञानास आवरण आणि विक्षेप हें कारण होय.' [आ+वृ= आच्छादन करणें] ०देवता–स्त्री. मुख्य देवतेच्या भोंवतालच्या अवांतर देवता. जसें:–अनंताच्या भोंवतीं असणारे अष्टदिक्पाल. ८ (ल.) राजाच्या भोंवतालचे मंत्री, खुषमस्करे वगैरे, मोठया माणसाच्या भोंवतालचा परिवार. ०पूजा–स्त्री. मुख्य देवतेच्या भोंवतीं असलेल्या देवतांची पूजा; अनंतचतुर्दशीस अनंताच्या भोंवतालच्या अष्टदिक्पालादिकांची पूजा. 'कृष्ण परमात्मा मध्यमूर्ती। आवरणपूजा यादवपंक्ती।' –एरुस्व १४.१००. ०शक्ति–स्त्री. १ आटोपण्याची; नियमन करण्याची, ताब्यांत ठेवण्याची शक्ति. आवरक शक्ति पहा. २ माया; वस्तूच्या खऱ्या गुणांचें आच्छादन करण्याची शक्ति; मोह; अविद्या.

आवरणें—उक्रि. १ एकत्र करणें; गुंडाळणें; आटोपणें; थोडक्या जागेंत आणणें; गोळा करणें; संपविणें (वस्तु, कामें इतर गोष्टी इ०). आटपतें घेणें. 'जी ताईसाब! पण आपुन जरा आवरतं घ्या.' –चंद्रग्रहण ४१. २ (ल.) माघारें घेणें; परत घेणें. 'प्रसाद करणें मनीं जरि नसेल हें आवरा।' –केका १४. ३ वहिवाटणें; व्यवस्था पाहणें; देखरेख करणें; अम्मलबजावणी करणें. ४ झांकणें; वेढणें; आच्छादणें; गुंडाळणें; व्यापणें; व्याप्त असणें. 'म्हणोनि आम्ही तयातें। म्हणों सर्वत्र आइकतें। एवं जें सर्वांतें। आवरूनि असे॥' ज्ञा. १३.८८२. 'तूं सर्वात्मा असतां हृदयीं। चित्त प्रवेशेना तुझ्या ठायीं। तें आवरिलें असें विषयीं। नवल कायी सांगवे' –एभा ७.१६८. ४ तावा चालविणें; नियमन करणें; अटकाव करणें; हुकमतींत ठेवणें. 'तेणें तिया आवरिजे। भीष्मातळीं राहिजे।' –ज्ञा १.१२३. 'तैसा आत्मा आवरला। प्रपंचें हा।' –विपू ७.११३. ५ आपल्याकडे घेणें; सांभाळ करणें; वाढविणें (अनाथ पोरक्या मुलांचा वगैरे). ६ (काव्य) रक्षण करणें, मदत करणें, आश्रय देणें; आच्छादन घालणें. 'मज बुडतां आवरी। देवा प्रपंचसागरीं॥' [सं. आ+वृ]

आवरणें—न. आवरण ६ पहा. हरितालिकापूजेच्या आदल्या रात्रीं (भाद्र. शु. २) करावयाचा फराळ.

आवरणें—न. (सोनारी काम) भांड्यास पसरट आकार देण्यासाठीं उपयोगांत आणावयाची हातोडी. [सं. आ+वृ]

आवरणें आटोपणें—उक्रि. आवरणें व आटोपणें संयु.क्रि. १ आवरणें पहा. (जोडक्रियापदामुळें अर्थवृद्धि होते)

आवरदा—वि. १ आयात माल. २ (कधीं कधीं) आवक. ०जमा–स्त्री. आयात जकातीचें उत्पन्न. **आवरदेखाना**–आयातनियोंत; त्यावरील जकात. [फा. आवर्दन्=आणणें; अव. आवरदे]

आवरसावर, आवराआवर—स्त्री. बांधाबांध; गोळा करणें; आटोपणें; झांकापाक. [आवरणें+सावरणें–आवर द्वि.]

आवरॉ—पु. (गो.) धीर, ०उडप–धीर सुटणें. [आवरणें]

आवरॉ—पु. (गो.) आळसुंद्यासारखें एक धान्य; चवळी; कडवेवाल. अवरा पहा. [का. अवरी]

आवराबावरा—कावराबावरा पहा.

आवरिव—न. भक्षणाकरितां पुरवठा; मेजवानी. 'ते तुआं आवरिवं केली। दैत्यमांसाची।' –शिशु ४४५. [सं. आ+वृ]

आवरी—वि. आवरणारा; देखरेख करणारा; कारभारी; व्यवस्थापक. 'जया प्राणाचे घरीं। अंगें राबते भाऊ चारी। आणि मना ऐसा आवरी। कुळवाडी करं।' –ज्ञा १३.२८.

आवरीत—(विरु.) अवरीत पहा. 'आधीं मसी लावलीस प्रीत। पुढें त्वा केलीस आवरीत।' –होला १४४.

आवर्जणें—सक्रि. टाकणें; त्याग करणें; सोडणें; 'गडी म्हणती जगज्जीवना। कां आवर्जिली यमुना। कोण्या व्रिचारें मधुसुदना। कोप धरिला तिजवरी' –ह १०.८२. [आ+वृज्]

आवर्जा—हिशेबवही. अवरजा पहा. 'कीर्दी, नावनिशीवार पत्रकें आवर्जे पहावे' –ख ४.१४३३.

आवर्जून— क्रिवि. अगत्यपूर्वक. अवरजून पहा.

आवर्ण—पु. (रामदासी वाङ्मय) समुद. 'तिघा आधार आवर्णोदकाचा' –दावि २८२. –दा १३.४.१८. [अर्णव अप.]

आवर्त—पु. १ चक्राकार भ्रमणगति; फेरा; वळण. २ पाण्याचा भोंवरा. 'जे द्वेषाच्या आवर्ती दाटत। मत्सराचे वळसे पडत। माजि प्रमदादि तळपत। महामीन।' –ज्ञा ७.७२. ३ चक्रवात; वावटळ; तुफान; (इं.) सायक्लोन. 'समर्थें सज्जनदुर्गी पर्वत आवर्त पाहणें।' –सप्र ९.१५. 'सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस असतां शांत प्रदेश उत्तरेस येऊन तेथें व्यापारी वारे समोरासमोर येतात, लंबकिरणांनीं जमीन फार तापते म्हणून त्यांस जोर येतो, त्यांचें चक्र बनून तें गरगर फिरूं लागतें, हें चक्र वर आकाशांत जाऊन प्रतिव्यापारी वाऱ्याबरोबर ध्रुवाकडे जातें यास आवर्त असें म्हणतात.' –सृष्टिशास्त्र ७३. ४ पाण्यांतील भोंवऱ्याच्या आकृतीप्रमाणें अंगावरील केशांची रचना, आकृति (विशेषतः घोड्याच्या अंगावरील). उ० जंघावर्त; जानुवर्त. ५ मनांत एकसारखें घोळणें; विचार. [सं. आ+वृत्]

आवर्त (करण)—न. (नृत्य) उजवा पाय कुंचित करून पुढें पसरणें, असें अनेकवार करणें, उजवा हात आकुंचित करून पुढें पसरणें व पुन्हां आकुंचित करणें, डावा हात वक्षस्थलावर ठेवणें.

आवर्तणें—सक्रि. आवर्तन करणें; घोकणें. 'येरां स्तोत्र कां नाममंत्र। आवर्तणें पवित्र' –ज्ञा १६.१०४. [सं. आवर्तन]

आवर्तदशांश—पु. (गणित) व्यवहारी अपूर्णांकास दशांशाचें रूप देतांना कधीं कधीं भाग बरोबर तुटत नाहीं व भागाकारांत तेच तेच अंक पुन्हां पुन्हां येतात. उ० $\frac{१५}{९०}=\frac{५}{६}=१.०५५५५$ इ० अशा जातीचे दशांशास आवर्तदशांश म्हणतात. हा ·५ असा लिहितात. फिरून फिरून येणारा जो भाग त्यास **आवर्तप्रदेश** म्हणतात. –छअ १७.

आवर्तन—न. १ फिरणें; भोंवतालीं फिरणें, फिरवणें; ढवळणें. २ पुन्हां पुन्हां म्हणणें; आवृत्ति; संथा; पाठ; पारायण (धार्मिक ग्रंथ, स्तोत्र, रुद्राध्याय इ. कांचें) 'नित्य दहासहस्र आवर्तनें पूर्ण क्षोणी पाळा करी सप्तदिन।' –शिवलीलामृत ११ ११९. ३ अभ्यास करणें; सवय करणें; पठण करणें. ४ एखाद्याकडे वळणें, फिरणें, येणें. ५ (संगीत) कोणत्याहि एका तालाचा संपूर्ण मात्रासमूह. [सं.]

आवर्तनी—स्त्री. सोनें इ० धातु आटविण्याचें भांडें, मूस. [सं.]

आवर्तप्रतिध्वनि—पु. (संगीत) पुन्हां पुन्हां ऐकूं येणारा प्रतिध्वनि. 'निरनिराळ्या अंतरावरील समांतर अडथळ्यावर ध्वनि आपटून आवर्तप्रतिध्वनि उत्पन्न होतो.' –स्वरशास्त्र ३५. [सं.]

आवर्तप्रदेश—आवर्तदशांशापैकीं पुन्हा पुन्हां येणारा भाग; पहा.

आवर्तित (जंघा)—स्त्री. (नृत्य) डावा पाय उजव्या पायावरून उजव्या बाजूस व उजवा पाय डाव्या पायावरून डाव्या बाजूस नेऊन ठेवला म्हणजे जंघांचें एक स्वस्तिक बनतें, ती स्थिति. विदूषकाचें चालणें दाखविण्याच्या वेळीं हा अभिनय करितात. [सं.]

आवर्दा—पु. जीवित; आयुष्य. –नामजोशी कोश. [सं. आयुर्दाय अप.]

आवर्षात—क्रिवि. संबंध वर्षांत; उभ्या वर्षांत; वर्षभर; सालभर. [सं. आ+वर्ष+अंत]

आवलणें—उक्रि वल्हविणें; वल्हें मारणें; नाव चालविणें. 'जें आवलितां भावबळें। तोडी कर्माकर्मकूरजळें।' –एभा २.३१५. 'ये नदीतील जलचर थोर। ध्रुव प्रल्हाद विधिपुत्र। येथील अनंत एक कर्णधार। आवली कृपादृष्टीनें।' –जै ८०.७. [सं. आ+वल्]

आवला, आवलकरी—पु. वल्हें मारणारा; वल्हविणारा; वल्हेकरी; आवल्या; अवलेकरी पहा. 'मग डोहीं महा विशाळीं। बाळ लोटिलासे जळीं। परि धरिला वरुण आवली। विष्णुचेनि धाकें' –कथा ७.७.२०.२. (ल.) कर्णधार; सूत्रधार; मार्गदर्शक. 'उसती पुसती नेत्र युक्तीनें समजाविती राज्याचे आवले नाना।' –गापो ८३. [सं. आ+वल्; प्रा. अवल्लय, अवल्लक=वल्हें.]

आवली—स्त्री. पंक्ति; ओळ; रांग; पंगत. सामाशब्द–रोमावली; रत्नावली; पद्मावली इ० [सं.]

आवलें—न. वल्हें. अवलें पहा. 'लावूनि विवेकाचें आवलें। तोडिती कर्माकर्मांचीं जळें।' –एभा २०.१७८.

आवल्या—पु. १ आवला पहा. २ (व.) शेतीवाडीच्या सर कामाची देवघेव ठेवून तें काम व्यवस्थित चालविणारा मनुष्य कर्णधार. ३ लंपडाव खेळांत भोग्यास शिवणाऱ्या मुलांना उद्देशून म्हणतात. 'आवल्या येरे लवकर, भोग्याजवळ कोणी नाहीं. [आवलें]

आवशी—स्त्री. पूर्वरात्र. अवशी पहा. 'काळ न म्हणे हा घाट। न म्हणे आवशी पहांट।' –एभा १०.४२४.

आवशी—स्त्री. (गो. कों. कुण.) आई; आईस. 'म्हेनत करू हेच धर्तरि आवशीची चाकरी कर.' –मसाप २.३६९. **आवशीचं घव**–पु. (अपशब्द) (हेट.) आईचा नवरा. [आयशी, का. अव्वा]

आवशुद्ध—वि. नीट; बांधेसूद; प्रमाणशीर; आकारशुद्ध [आव=आकार+शुद्ध]

आवश्य, आवश्यक—अवश्य, अवश्यक पहा.

आवस—स्त्री. आई. आवशी पहा.

आवस-आंवस—स्त्री. अमावास्या. अवस पहा. 'ते वेळ पुनिवा भरे। ना आवसां सरे।' –अमृ ४.१५.

आंवस—न. १ वाघ, सिंह इत्यादि हिंस्रपशु गाय, हरिण वगैरेनां मारून त्यांचें थोडें मांस खाऊन दुसऱ्या दिवसासाठीं कांहीं राखून ठेवतात तें. २ आमिष; गळ वगैरेस पीठ लावितात तें. [सं. आमिष] **आंवसांवरचा घाघ**–पु. १ आंवस (पूर्व दिवशी राखून ठेवलेलें मांस) खाण्यास आवेशानें जाणारा वाघ. २ (ल.) चिरकाल इच्छित वस्तूचा उपभोग घेण्यास प्रवृत्त झालेला; तापट अधिरा; रागीट; जलाल (मनुष्य).

आवसथ्य—पु. १ अग्निहोत्र्याच्या पंचाग्नींपैकीं एक. पंचाग्नि पहा. २ गृह्याग्नि. 'आवसथ्याग्निहवन। गुरुवासरीं अवंतिये जन्म दिन।' –स्वादि १०.३.२०. [सं.]

आवसा—पु. तात्पुरतें बांधलेलें घर; झोंपडी; खोप; खोपडी मांडव; प्लेग वगैरे रोग गावांत झाला असतां बाहेर तात्पुरती बांधतात ती झोंपडी. 'पांढरपेशी ब्राह्मण, गुजर, सोनार, कासार वगैरे मंडळी गांवाबाहेर आवशांत किंवा शेतांतल्या पडळींत वगैरे राहण्यास गेली.' –सुदे २०१. [सं. आ+वास; प्रा. आवास; सिंह अवस, अवा; गु. अवास; हिं. आवास]

आवस्ता—वि. (रामदासी वाङ्मय) अवास्तव; विनाकारण 'आम्ही आवस्ता भुललों तुह्मया योगें।'–दावि ७७६. [सं. अ+वस्तु]

आवस्वर—पु. वेळ; अवसर. अवस्वर पहा. 'विश्वामित्राचे अंतरीं। क्रोध तत्काळ प्रवेश करी। मग उठतां ते आवस्वरीं। वशिष्ठ बैसविला।' –वेसीस्व १.४९. [अवसर अप.]

आवह—वि. आणता; नेता; घडविता; वाहून आणणारा; संपादन करणारा; प्रापक. सामाशब्द-गुणावह; सुखावह; दुःखावह; दोषावह; संकटावह; हितावह; शोकावह; भयावह; हर्षावह; कल्याणावह इ० [सं.]

आवळणें—उक्रि. अवळणें पहा. १ रगडणें; दाबणें; चुरणें; धुणें. 'जळीं आवळी वस्त्रमोळी।' –गंगाधरकृत रसकल्लोळ ५८. २ व्यूह रचणें (फौजेचा). 'तिकडे मोंगल आपले तळावर तयार होऊन जमावबुद्धा आवकून उभा राहिला.' –भाव १४४. ३ आलिंगणें; मिठी मारणें. 'त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला।' –भक्तमयूर केका २८. [सं. आ+वल्]

आंवळा, आंवळकटी-काठी, आंवळणें, आंवळसर-सरा, आवळा, आवळी, आवळीभोजन, आवळ्या गंधक–अ मध्यें पहा.

आवळा—(खा) हुळा पहा. [म. हवळा, हावळा, हुळा]

आवळाजावळा—वि. जुळें. [जावळा–जुळें द्वि; सं. युगुल]

आवळेंजावळें, आवळ्याजावळ्या, आवळींजावळीं—पु.स्त्री.न.अव. जुळीं भावंडें.

आवा—पु. कुंभाराची भट्टी; मडक्यांची रास; वही. अवा पहा. 'कुंभ अवघा एक आवा।' –तुगा ३१९५.

आवा—स्त्री. १ बाई. 'असली तरवारबहादुर आवा आमासनी साफ बायकू नको.' –बाय २.३. २ रांड; राख. अवा पहा.

आवा—पु. (कों.) १ आवणांतून काढून आवणींत लावण्यासाठीं उपटलेलीं मृठभर भातांचीं रोपें, रोपांचा पुंजका; पुन्हां लाव लेलीं अशीं रोपें. २ वांगीं, मिरच्या वगैरेंची नवीन वाफ्यांतून लाव लेली रोपांची जोडी. आवण पहा. [आवण, आवणें, सं. आ+वप्=पेरणें]

आवाई—अवाई पहा. 'टिपूची बाजारआवाई येत होती ती लटकी; तो आहे...' –ख ७.३६१६. **०खाणें**-भिंगें. 'मुख्य शत्रु आवाई खाऊन व्यग्र जाहला आहे तो सांवर धरितो.' –मराआ ७.

आवांकणें—अवांकणें पहा. 'जें एक वेळ आवांकुनियां सांगावें ज्ञान।' –ज्ञा १८.१३३७.

आवांका—अवांका पहा. १ शक्ति; सामर्थ्य; आकारमान; अवसान; धैर्य; उमेद. 'बहुतीं मांडिलें आवांके। वीरश्रीम्लान मुखें। म्हणती पातलों कौतुकें। महोत्साह पहावया।' –मुआदि ४१.४८. 'जयसिंगालाहि आपला आवांका काय आहे तें समजेल' –सूर्यग्रहण ८४. २ विचार; सारासार विचार; मर्यादा; रीत. 'अहो जी आइका। तुमतें नाहीं कृपेचा आवांका। तरि येथें बीजे करोनी कां मातें चुकविलें।' –ऋ ३२. –एभा ३१.५५५. ३ अभिमान. 'मी एक चतुर बोलका। हाही नुठी त्या आवांका। बोल बोलूं नेणें फिका। बोलोनि नेटका अबोलणा।' –एभा २८.४४९. ४ सार; अभिप्राय; गोळाबेरीज. 'तया अर्थजातां अशेषां। केला तात्पर्याचा आवांका। तो हा आठरावा देखा। कलशाध्यायो।' –ज्ञा १८. १४.४५. 'एवं भारताचा आवांका। आणूनि श्लोका एका।' –ज्ञा १८.१६५९. ५ आटोका कबजा. 'तेथ एरादळांचा आवांका। कवणुकरी।' –शिशु ९०७.

आवाज, आवाजी—पुस्त्री. १ ध्वनि; सूर; शब्द; नाद. २ बातमी; गडबड. [फा. आवाझ्] **०काढणें**–१ बोलणें; शब्द करणें; कुरकुर करणें. २ (कु.) ऐपतीबाहेर आव दाखविणें. ३ (कानाखालीं) थोबाडींत मारणें. **०दार**–वि. चांगल्या आवाजाचा; चांगल्या नादाचा, ध्वनीचा. **०दारी**–स्त्री. आवाजी; सुरेलपणा; आवाजाचा झोंकदारपणा, खणखणीतपणा. **०देणें**–हाक मारणें. 'त्या वेळीं जमादार त्यास आवाज देऊन आपलेकडे बोलावून घेतो.' –चित्र्याची माहिती १७.

आवाज—पु. नग. ऐवज पहा. 'थोरलीं भांडीं एकूण आवाज दीड हजार.' [फा. इवझ्=द्रव्य]

आवाजदारकाम—न. (बडोदे) सोन्याच्या, चांदीच्या, अल्युमिनमच्या वगैरे जाळीदार घाटांत नक्षामध्यें रत्न खुल्लें (इं. ओपनसेटिंग) बसविण्यांत येतें तें काम. –जव्हेरखानानियम (पारिभाषिक) १.

आवाजा—पु. १ ध्वनि; शब्द. आवाज पहा. २ प्रसिद्धि; कीर्ति; बोलबाला. [फा. आवाझ्]

आवाजावा—स्त्री. ये जा; येणेंजाणें; दळणवळण; वहिवाट; वहिवाटीचा हक्क. [सं. आया=येणें+जावा=जाणें; हिं. आवजाव]

आवाट—पु (गो.) १ परिघ; घेर. २ आसमंतांतील प्रदेश. [सं. आवृत्त; आवार]

आवाठ—पु. (कु.) वाडी; वाडा; आवाड. 'तॉ सुतारांचा आवाठाक आसा' =तो सुतारवाड्याला आहे. [सं. आ+वाट; आवार]

आवाठ—पु. (गो.) १ मोठेपणा; व्यापकता. आवाट पहा. २ ताकद; शक्ति. [सं. आ+वृद्धि=वाढ–आवाढ]

आवाड—न. आवार. अवाड पहा.

आवाडाव—अवाडाव पहा.

आवाडी—स्त्री. (कों.) (नाविक) सुकाणू फिरविण्यासाठीं लावलेला दांडा, काठी. [सं. आवृत्=फिरणें; प्रा. अवट्ट=फिरणें]

आवाण—न. (कु.) नागली, मिरची वगैरेचें कोंवळें रोप. आवण पहा.

आवातण-न—न. (कुण.) आमंत्रण. अवतण पहा. 'तुमचें आवातण येईल म्हणून मी बराच वेळ वाट पाहिली.'

आवांतर—अ मध्यें पहा.

आवाप—पु. पेरणें; सामाशब्द–धान्यावाप; बीजावाप; क्षेत्रावाप. [सं. आ+वप्=पेरणें]

आवार—पु. १ कुंपणाच्या आंतील जागा; परसू; वाडगें; अंगण. 'उत्तरद्वारीं यादवेश्वर । पैल मदनाचा आवार ।' –कथा १.६.१५५. २ कुंपण; हद्द; ज्यानें वेढतात, मर्यादित करतात असें वई, वडांग, कठडा, भित, तट, गडगा, गांवकुसू. 'कीं गंधर्वनगरीचें आवार ।' –ज्ञा ९.१७३. 'पाडोनि देवाचें शिखर । घातलें सभोवतें आवार ।' ३ वेढा; आवरण; बंदिस्तपणा. [सं. आ+वृ] **०खाना**–पु. आवारांतील पायखाना; शेतखाना. [आवार+फा. खाना]

आवारा—पु. १ भाव; मोठी तयारी; बडेजाव; कांहीं मोठ्या योजनेचा थाट, डौल. (क्रि० घालणें). २ (ल.) फुटल्यानंतर पुन्हां फुगणें, तयार होणें (गळूं वगैरे). (क्रि० धरणें; घालणें). [आव, आवार]

आवारा—वि. (मालवी) भटक्या मारीत फिरणारा; रिकामटेकडा. 'तो आजकाल आवारा आहे.' [फा. आउर्दन्=भटकणें; आवारा=भटक्या]

आवारा—पु. नासाडी; नुकसान. 'गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ।'–तुगा ३१२८. 'त्याचे सेताचा आपण आवारा केला.' –रा १५.३४. [फा. आवारा करना=नासाडी करणें]

आवारिव—न. भक्षण; भोजन; मेजवानी. 'भूतावळीं आवारीव केलें । दैत्य मांसाचें ।' –शिशु १०५९.

आवारी—पु. (व.) १ शेतावरचा मोकदम. २ पाटलाच्या घरचा कारभारी. [आवरणें]

आवारू—वि. (नंदभाषा) दोन. 'सेलू पोकू आणि ढकार । आवारू खूण सांगती सत्वर ।' –भवि ४२.४६. 'आवारू उदानके (पैसे) धर्माथे बाळले (दिले)' **०बिट्टी**–दोनशें. **०काटी**–चाळीस.

आवास—पु. निवासस्थान; वसतिस्थान; ठिकाण; राहणें; वस्ति. [सं.]

आवाहणें—उक्रि. बोलावणें; आमंत्रण करणें; आवाहन करणें. [सं. आवाहन]

आवाहन—न. आमंत्रण; बोलावणें. 'ज्ञानाचे आवाहन मंत्र । जें ज्ञान पिकतें सुक्षेत्र ।' –ज्ञा १८.७१. २ नवीन केलेली मूर्ति किंवा एखादी वस्तु यामध्यें देवतेला प्रवेश करण्यासाठीं बोलावणें. [सं.] **०विसर्जन**–न. १ बोलावणें व निरोप देणें. 'आवाहनविसर्जनेवीण । शालिग्रामीं माझें अधिष्ठान ।'–एभा ११.१३५४. २ देवतेची प्राणप्रतिष्ठा करणें व तिला निरोप देणें. **म्ह०** आवाहनविसर्जन बराबर=क्षणिक टिकणाऱ्या किंवा अल्पजीवि अशा वस्तूबद्दल म्हणतात. उ० पाण्यावरचा बुडबुडा. [सं.]

आवाहनपत्र—न. (स्त्रि.) १ एखाद्या सनदी उपदेशकास मंडळीचें पाळकपण स्वीकारण्यासंबंधानें पाठविलेलें पत्र. २ पाचारणपत्र; निमंत्रणपत्र. –साप्रा ७०.

आवाहित—वि. १ आवाहन केलेली (देवता). २ बोलावलेला. [सं.]

आंवाळ काथॉ—पु. १ (गो.) गणगोत; आप्तेष्ट मंडळी. २ एकत्र जमून केलेला काथ्याकूट. [आवळणें+काथ्या ?]

आंवाळगॉत्र—न. (गो.) गोतावळा. [आंवळ+गोत्र]

आवाळबोय—स्त्री. आंवळकाठी पहा.

आवाळा-ळी—(गो.) आवळा, आवळी पहा.

आवाळूं—न. १ ओठाचा भाग; ओठ. 'जे अनर्थाचे कानवेरी । आवाळुवें चाटीत निघे बाहेरी ।' –ज्ञा ९.१८२. 'सहस्र संख्या वृक्षघाती । तिये जाहली जागृति । आवाळुये चाटिती । उठली ते ।' –कथा ३.४.१२६. २ जबडा. 'मग पसरूनियां आवाळें । ग्रासुं धांवला गोपाळें ।' –कथा ४.६.१८. ३ गंडस्थळ. 'मुडींव शुंडादंड सरळे । शोभें अभिनव आवाळें ।'–दा १.२.१२. ४ डोकें. 'आकाशीं लागलें आवाळें ।' –वेसीस्व १.६५. [द्रा. औडु–आवुडु=खालचा ओंठ; तुल० सं. आ+वल्]

५ गळूं; मासा·बुंद; चामखीळ; वाळुक. हें जन्मतः किंवा नंतर रक्तदोषामुळें उत्पन्न होतें. 'शोभें जयास निटिळीं लघुसें अवाळें ।' –रामदासवर्णन (रघुनाथपंडित कृत) ९. [सं. अर्बुद]

आविंज-ञ—स्त्री. (कों.) आंवणी; भाताची पुन्हां लावणी; आवाणांतून काढून आवणींत रोपें लावणें; आवणें; आवणें पहा. **०णें**–आविंज करणें; आवणींत रोपांची लागण करणें. आवणें पहा. [सं. आ+विन्द्=अलग करणें; आवणें]

आविद्ध (आकाशीचारी)—न. (नृत्य) जंघांत स्वस्तिक करून कुंचित पाऊल पुढें पसरणें व खालीं आणतांना चवडा जमीनीवर टेकणें, हा टेकतांना दुसऱ्या पायांत अडकविणें.

आविद्धवक्त्रक (संयुतहस्त)—न. (नृत्य) उजव्या हातानें डाव्या खांद्यापासून डाव्या हाताच्या कोपऱ्यापर्यंत, तसेंच डाव्या हातानें उजव्या हाताच्या खांद्यापासून उजव्या हाताच्या कोपऱ्यापर्यंत हात फिरवून आपल्या समोर तळहाताच्या पाठी जुळवून धरणें.

आविर्भवणें—अक्रि. १ (काव्य.) प्रगट होणें; उत्पन्न होणें; व्यक्त होणें. 'कृष्णस्वरूपाची प्राप्ती । भीमकी सादर श्रवणार्थी । हृदयीं आविर्भवली मूर्ती । बाह्यस्फूर्ती मावळली ॥' –एरुस्व १.८७. २ दिसणें; दृग्गोचर होणें; स्पष्ट, उघड दिसणें. 'कीं संध्यारागु पश्चिमें आविर्भवला ।' [सं. आविर्भू]

आविर्भवन—न. प्रकटीरण; दृग्गोचरपणा; उघडपणा; प्रसिद्धि [सं.]

आविर्भाव–पु. १ प्रगट स्वरूप; अवतार; उघडपणा; मोकळेपणा; स्पष्ट दर्शन; प्रसिद्धपणा २ हावभाव; अंगविक्षेप; चेष्टा; मनांतील विकारांचें दिग्दर्शन; हातवारे. ३ आव; डौल. 'शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव। नाहीं आविर्भाव आणिलिया।' –तुगा ३१३८. ४ (संगीत) एखाद्या रागाचे आलाप घेत असतां अन्य रागाची छाया सामान्य स्वरसमुदायामुळें उत्पन्न होऊं लागल्यास प्रस्तुत रागाचे रागवाचक स्वरसमुदाय पुढें आणून ती छाया दूर करणें व प्रस्तुत रागाचें स्वरूप प्रगट करणें. [सं.]

आविर्भूत—वि. अवतरलेला; प्रकट झालेला; उघड झालेला; दिसलेला; मुळींच गुप्त न राहिलेला; स्पष्ट; उदय पावलेला; उगवलेला. [सं. आविर्भू]

आविष्करण—न. प्रसिद्धीकरण; प्रकटीकरण; उघड करणें; फोडणें (गुप्त गोष्ट); स्पष्ट करून दाखविणें; उघडकीस आणणें; जाहीर करणें. [सं. आविस्+कृ]

आविष्करणें—उक्रि. १ प्रकट होणें; प्रतिबिंबित होणें; स्फुरणें. 'नाना कथारूपें भारती। प्रकटली असे त्रिजगतीं। आविष्करोनि महामतीं। व्यासाचिये।' –ज्ञा १.३२; ६.१९. २ अभिमान धरणें; गर्व वाहणें; आवेश चढणें. 'जो कांसे लागोनि तरे। तया पोहती उर्मी नुरे। पुरोहितु नाविष्करे। दातेपणें।' –ज्ञा १८.१७९. [सं. आविष्करण]

आविष्कृत—वि. आविष्कार केलेलें; व्यक्त, प्रकट केलेलें, झालेलें [सं.]

आविष्ट—वि. स्वाधीन झालेला; ग्रासलेला; पछाडलेला; व्याप्त झालेला (विकार वगैरेनीं). सामाशब्द–कामाविष्ट; क्रोधाविष्ट; कोपाविष्ट; लोभाविष्ट; हर्षाविष्ट; शोकाविष्ट इ० शिवाय आवेश शब्द पहा. [सं. आ+विश्]

आविं(वीं)स, आविस—न. १ आमिष; लालूच; 'न धावे अर्थ कामाचिया आविसा।' –भाए २५९; 'आविसासाठीं फासा मान। पाडी धनइच्छा ते।' –तुगा १०३६. २ मांस आंवीस आरोगिलें, उडाला।' –उषा. ८५४. [सं. आमिष]

आविसाळें—न. पक्ष्याचें घरटें; आश्रयस्थान. अविसाळ पहा. 'सत्संग सूर्याचे मेळीं। देहाचीं आंविसाळीं। सांडिती जीव।' –एभा २६.४३७. [सं. आविस्+आलय]

आवीज—पु. (गो.) सूचना; नोटीस. [पोर्तु. आव्हीजु]

आवृत—वि. व्याप्त; वेष्टिलेला; आच्छादिलेला; गुरफटलेला. 'तिहीं गुणीं आवृत। हे वेद जाणें निश्चित' –ज्ञा २.२५६. [सं. आ+वृ] –स्त्री. आवृत्ति (अप.) पहा.

आवृत्त—वि. फिरलेला; वेढे घेतलेला; गुंडाळलेला; गरगर फिरलेला; धोळलेला; ज्याची आवृत्ति झाली आहे असा [सं. आवृत्]

आवृत्ति—स्त्री. १ उजळणी; एखाद्या गोष्टीचें आरंभापासून शेवटपर्यंत पुन्हां एकवार अनुष्ठान २ परतणें; परत येणें; ये जा करणें; परत करणें; परत तेंच करणें; पुन्हांपुन्हां उजळणी; अभ्यास 'इतिहासाची आवृत्ति तशी पुनः पुन्हांः दावी।' –विक ५. ३मनांत घोळणें; चिंतन करणें; 'वृत्ती तये आवृत्तीसीं। बुडोनि जाय।' –ज्ञा १८. ११३५. ४ (तत्त्व.) पुनर्जन्म; जन्ममरणाचा फेरा. ५ एखाद्या पुस्तकाचें पुन्हां मुद्रण–प्रकाशन; 'काव्याची पुनरावृत्ती काढतेवेळीं ज्यास्त टीपा द्याव्या' –विवि (१८७६) ८.७.१२६. [सं.] **०वाचक**–वि. पट्टी दाखविणारा; आवृत्तिदर्शक (प्रत्यय). जसें–एकपट, पांचपट वगैरेतील पट हा प्रत्यय

आवें—वि. (व.) कच्चें; निरसें (दूध). आव पहा.

आवेग—पु. १ जोर; वेग; जोराची गति. २ मनःक्षोभ; संताप; आवेश. ३ तीव्रता (दुखण्याची); ठणका; तिडीक; अस्वस्थता. ४ एक गौण मनोभाव, व्यभिचारी भावाचा एक प्रकार. भाव पहा. ५ घाई; लगबग; धांदल. सामाशब्द– दुःखावेग; शोकावेग. [सं.]

आवेदन—न. नम्रतापूर्वक विनंति, अर्ज; निवेदन; गाऱ्हाणें; फिर्याद [सं. आ+विद्=जाणणें]

आवेल— (कों. गो.) नारळ खवून त्याचा चव पाण्यांत उकळून त्याचें काढलेलें, किंवा चवाचा दाट रस कढवून काढलेलें तेल. हें थंडीनें अंग फुटलें असतां त्यावर किंवा जखमेवर लावतात;आव्याळ; गुटेळ. अवताल पहा. [गो. अवल=कोंवळा नारळ+म. तेल]

आवेल—पु. वेल; अवेल पहा. 'अवश्य म्हणोनि पंचचुली चेतविले आवेला।' –सप्र १५.४.

आवेव—पु. अवयव. अवेव पहा. 'अघटघटी हरीची माया। अलक्ष लक्षेना ब्रह्मया। आवेव अंडामाजीं तया। देवमाया रचियेले।' –एभा ७.५७४. 'वर्णी स्त्रियांचे आवेव। माना नाटकें हावभाव।' –दा २.१०.१९.

आवेश—पु. १ एका मनोभावाचें किंवा विकाराचें मनावर वर्चस्व; एका विकाराधीन सर्व मनोव्यापार असणें; क्षोभ; आवेग; संचार; विकारवशता; विकाराचा जोर. सामाशब्द—कामावेश; क्रोधावेश; पिशाचावेश; लोभावेश; मोहावेश; शौर्यावेश. २ उत्कंठा; उत्सुकता; तल्लखपणा; त्वरा; घाई. ३ संताप; राग 'देवे एव्हढा आवेशु कीजे। कवणांवरी' –शिशु ६७२. [सं. आ+विश्=शिरणें]

आवेश—पु. लक्ष; अवकाश. 'निगणेया आणि प्रवेशा। चित्त नेदीतु आवेशा।' –ज्ञा १६.२८२. [सं. आ+विश्=प्रवेशणें]

आवेशणें—अक्रि. १ आवेशयुक्त होणें; स्फुरण पावणें; उद्युक्त होणें. २ रागावणें; संतापणें; क्षुब्ध होणें. 'तंव वातात्मज आवेशला। म्हणे धरूनि आणीन दुंदुभीला। मग तो आकाशीं उडाला। नाहीं देखिला कोणीहि।' –जै ६७.३९. 'आवेशोनि रावण देखा।' –गुच ६.१८४. २ प्रवेश करणें; शिरणें; व्यापणें 'मनीं आवेशलें अद्भुत' [सं. आ+विश्]

आवेशी—वि. आवेशयुक्त; उत्साही; जोरदार; तापट; तल्लख. [आवेश]

आवेस—पु (गो.) शरीरयष्टि; ठेवण; शरीराचा बांधा. 'मामाली चली तुमॅल्या, आवेसान म्हणसारकी काय ना' [सं. आ+विश्]

आवेष्टित(अंगुलि)—स्त्री (नृत्य) एका हातानें दुसऱ्या हाताच्या तर्जनीपासून आरंभ करून त्या हाताच्या तळहाताच्या बाजूनें वेढा घालणें.

आवै—स्त्री. (गो.) आई. **म्ह०** १ आवै नासिल्याचें पोट व्हड=ज्याला आई नाहीं त्यानें थोडें खाल्लें तरी पुष्कळ खाल्लें असें सांगणें. २ आवै सोसीत, बापूस पोशीत=आई शुश्रुषा करणार व बाप पैसा खर्च करणार (तिऱ्हाइतांचें काय जातें?) [द्रा. अव्वा–आवा]

आवो—पु. प्राप्ति; प्रतिष्ठा; डौल. इ० अर्थी. आव पहा. जयासी कां बीजभावो। वेदांतीं केला ऐसा आवो।' –ज्ञा १५.५१२; १.३३; १८ ६२२. इ०

आवों—उद्गा. अहो; अगे. अवो पहा. 'तंवं सावासिनी भणितिलें। आवो आवो गोसावी आले।'–शिशु १७४. 'आवो आइकै राजकुमरी।' –उषा ६५०.

आव्त, आवृत—पु. (गो.) खटला. [पोर्तु. आवृतु]

आव्ती—स्त्री. (गो.) आहुती; आवती. **०मारप**–(गो.) खर्चांत पाडणें; खोट आणणें. आवतीक पहा.

आव्हाट—पु. आडमार्ग; अव्हाट पहा. 'कीं आव्हाटीं म्हैसवा थरु। नव्हतां दृष्टीगोचरु।'–ऋ ४८. 'जैसें आंधळें सुईजे आव्हांटा।' –ज्ञा ३.९. [अ+वाट]

आव्हाटचक्र—न. उल्हाटचक्र–शक्ति; मायाजाळ. 'जें अंतरींच भ्रमलें। मायासंभ्रमें संभ्रमलें। तयासह कैसे उकलें। आव्हाटचक्र।' –दा १४.९.२३.

आव्हाटणें—अव्हाटणें पहा. 'आव्हांटलिया तरी जोडे। स्वर्गसुख।' –ज्ञा ६.१५८.

आव्हान, आव्हानणें—आह्वान आह्वानणें पहा.

आव्हेर–आव्हेरणें—अव्हेर, अव्हेरणें पहा.

आश—पु. चमच्यानें खाण्याचा लापशीसारखा पातळ पदार्थ. –गृशि २.१८८. [सं. अशन; हिं. आश]

आश—स्त्री. आस; आशा; इच्छा. 'लोकांचा सारविला उंबरा देखती। तरी एका शितांची आश करिती।'–शिशु १५०. [सं. आशा; म. आस]

आशक—वि. १ खुष; फिदा; अनुरक्त. 'ते (संभाजीराजे) परस्त्रियांवर आशक होते.' –मदस १.१०६. २ प्रणयी; प्रियकर. (माशूक बरोबर उपयोग). [अर. आशिक्] **०माशूक**–न. प्रणयी जोडपें; प्रियकर व प्रियकरीण.

आशकड—आसकड पहा.

आशंकणें—अक्रि. १ (काव्य.) शंकित होणें; साशंक होणें; कचरणें; भिणें; भय वाटणें. २ शंका येऊन प्रश्न करणें. [सं. आ+शंक्]

आशंका—स्त्री. १ भीति; अंदेशा; शंका; संदेह; खात्रीचा किंवा समाधानाचा अभाव; संकोच. २ (तर्क.) आक्षेप; शंका; विधानाला हरकत. 'आतां प्रश्न शर घेऊन। विदारीत आशंकाते –पांप्र २७.४२. –दा १.१.१२. **०निवृत्ति**–स्त्री. शंकेचें, आक्षेपाचें निरसन; स्पष्टीकरण; फोड. [सं.]

आशंकित—वि. १ भ्यालेला; साशंक झालेला; विश्वास ढळलेला; बुजलेला. २ शंका घेणारा; भीति बाळगणारा; अंदेशा असलेला. [सं.]

आशकी—स्त्री. प्रणयानुनय; प्रियाराधन. [फा. आशिकी]

आशनाई—स्त्री. मैत्री; नातें; परिचय. आश्नाई पहा. [फा.]

आशय—पु. १ उद्देश; हेतु; अभिप्राय; मनीषा. २ ठिकाण; स्थान; आगर; सांठा. सामाशब्द–अन्नाशय; जलाशय; मूत्राशय. इ० 'अमुच्या अशुभाशयाचा धातु। करिता चरणधूमकेतु।' –एभा ६.१११. [सं. आ+शी=राहणें]

आशरफी—स्त्री. सोन्याचें नाणें. अश्रफी पहा.

आशा—स्त्री. १ अपेक्षा; आकांक्षा. 'आशा अमर आहे.' २ इच्छा; वासना; मन. 'पेरू पाहिले तेव्हां माझी आशा त्यांजवर गेली.' ३ आवड; प्रेम; लोभ. 'आतां या फाटक्या आंगरख्याची आशा कशाला धरतोस। एखाद्यास देऊन टाक.' ४ दिशा. 'धेनु कुरुनीं वळिल्या येवूनि उत्तराशेला' –मोविराट ६.६३. [सं.] **०कार**–वि. आशा करणारा; आशावादी. **०दुराशा**–स्त्री. बरीवाईट इच्छा; अपेक्षा; माया; लोभ; आशा आणि भीति. 'आशा दुराशा त्यजा। आधि तो उमजा। स्वहित समजा। दुर्भाव टाका दुजा। मुक्तीस लावा ध्वजा।' **०धोशी**–वि. (गो.) हांवरा. 'किते आशा धोशी रे बाबा मनीस हॉ' **०निराशा**–स्त्री. आशा आणि निराशा; आशेची निराशा. **म्ह०** आशेसारखें दुसरें दुःख नाहीं आणि निराशे सारखें सुख नाहीं. **आशेची निराशा होणें**–अपेक्षा, आशा, हेतु फलद्रूप न होणें; हिरमोड होणें. **०पाश**–पु. १ संसारांतील अपेक्षा, इच्छा, हेतु, यांचें जाळें; मोहजाळ; विषयजाल. २ (व्यापक.) जगराहाटी; जग. **०बद्ध**–वि. १ आशापाशांत सांपडलेला; सांसारिक, आशा, अपेक्षा यांनीं जखडलेला; लोभी; हांवरा. 'आशाबद्ध बोलो नये। विवेकेवीण चालो नये।' –दा १४.१.७७. २ आशावादी; आशायुक्त. **०भंग**–पु. निराशा; हिरमोड. **०भूत**–वि. (निंदाव्यंजक) (प्र.) आशाळभूत; हांवरा; लोभी. **०वाद**–पु.

जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे आणि जगांत अखेर सत्याचाच किंवा सत्पक्षाचाच विजय होणार आहे असें प्रतिपादन करणारें मत. (इं.) ऑप्टिमिझम. **०वान-वादी**–वि. (विरु.) आशावंत–आशाविष्ट=आशायुक्त. आशा ठेवणारा. [सं.]

आशावणें, आशवणें—अक्रि. आशा करणें; इच्छा करणें; आस धरणें; लोभणें. [आशा]

आशाविणें—उक्रि. आशा करावयास लावणें; आशा उत्पन्न करणें; लोभविणें. [आशा]

आशाळ, आशाळु—वि. १ लोभी; हांवरट; अधाशी. २ आशावादी. 'प्रो. गोखले हे आमच्यांतले अत्यंत आशाळु गृहस्थ आहेत.'–टि ३.९८. **आशाळभूत**–पु. १ आशाभूत पहा. अतिशय अधाशी. २ आशावादी. [आशा+आलु प्रत्यय]

आशिक—पु.स्त्री. आशीर्वाद. 'सकळिक आशिका देती।' –वसा ७०. [सं. आशिस्]

आशिल्लो—वि. (गो.) खाऊन पिऊन सुखी असा (मनुष्य.) [सं. अश्=खाणें]

आशी—वि. खाणारा; सेवन करणारा. सामाशब्द–अमृताशी, विषाशी; अन्नाशी; अल्पाशी; मिताशी; पथ्याशी, बह्वाशी. [सं.]

आशी—पु. आशीर्वाद. 'त्यासी आशी देतो, देतो पुत्रांजशी पिता ठेव।' –मोआदि २.२३. [सं. आशिस्]

आंशीं—न. (कों.) पोहे पाखडतांना जे बारीक कण निघतात ते. [सं. अंश]

आंशीं—स्त्री. (गो.) १ सुकलेलें गवत. २ एक रोपटें.

आशीक—वि. प्रणयी; लुब्ध; (विशिष्ट गोष्टीची) आवड असणारा. आशक पहा. [अर. आशिक्]

आशींपाशीं—क्रिवि. सभोंवतालीं; चौफेर; जवळपास. आसपास पहा.

आशीर्वचन, आशीर्वाद—नपु. एखाद्याचें कल्याण चिंतिलें; आयुरारोग्य, पुत्रपौत्र, संपत्ति इ० प्राप्त होवो असें इच्छिलें; स्वस्तिवाचन; शुभचिंतन; दुवा. (क्रि० देणें; घेणें; करणें) **पत्र**–न. वडील माणसाकडून लहानास, वरिष्ठ जातीकडून (विशेषतः ब्राह्मण जात) खालच्या जातीच्या माणसास जें अभीष्टचिंतनपर व आशीर्वाद देणारें पत्र जातें तें. [सं. आशीः+वचन]

आशीर्वादणें—अक्रि. आशीर्वाद देणें; अभीष्ट चिंतणें. 'आशीर्वादुनि साधु साधु वचनें आले तदा गोपुरा।' –आता ४.

आशीर्वादार्थ, आशीर्वादार्थक—वि. शुभेच्छा प्रदर्शक; अभीष्ट चिंतणारें; ईश्वराचें स्वरूप वर्णन करून. 'असा जो ईश्वर तो तुमचें रक्षण करो.' अशा अर्थाचा (श्लोक, वाक्य इ०); आशीर्वादपर. [सं.]

आशीविष—पु. साप; सर्प. 'कुद्धाशीविष गरुडा, कीं जिंकाया अशुद्ध-धी शुद्धा।' [सं.]

आशीष—पु. आशीर्वाद. 'चंद्र इंद्र प्रजापति सकळिक आशीष देती।' –वसा ५०. [सं. आशिस्–आशीस्]

आशु—वि. सत्वर; लवकर; शीघ्र. 'सलज्जांची लज्जा हरि परि हरी आशु भजनी।' [सं.]

आशुग—पु. शर; बाण; इषु. 'गुरु सात्यकिमुक्ताशुगपटल न दे लेश मागें वातातें।' –मोद्रोण ११.४४. [सं. आशु=जलद+ग=जाणारा]

आशुद्ध—न. रक्त. अशुद्ध पहा. 'रुते बाण तेथूनि आशुद्ध वाहे' –वामनविराट ७.१७९. –दा ३.१.१७.

आशुरा, आशूरा, आशोरा—मोहरमचा नववा अथवा दहावा दिवस. मोहरमचे पहिले दहा दिवस. अमुरा पहा. 'सांप्रत मोहरमचे आशुऱ्याचे दिवस' –रा ५.९३. [अर. अशूरा]

आशेभाण—न. (गो.) कमालीचा हांवरा, अधाशी. 'तॉ म्हणजे सामकें आशे–भाण' [सं. आशा+भांड=भांडें]

आशौच—न. १ कोणी सपिंडादि जन्मला किंवा मेला असतां किंवा प्रेत वाहून नेलें असतां (खांदा दिला असतां), त्याचें दहनादिक केलें असतां धर्मशास्त्राप्रमाणें श्रौतस्मार्तादि कर्मांविषयीं अनर्हता आणि अस्पृश्यत्व अशी जी स्थिति मनुष्यास कांहीं काल प्राप्त होते ती. २ ग्रहण लागलें असतां तें सुटेपर्यंत व त्यानंतर स्नान करीपर्यंत येणारें अशुचित्व. ३ (सामा.) सुतक (मेल्याचें); विटाळ. सामाशब्द–जननाशौच; ग्रहणाशौच; निर्हरणाशौच; जाताशौच; प्रेताशौच; स्त्रावाशौच; शवाशौच; पाताशौच; अनुगमनाशौच; दर्शनाशौच; स्पर्शाशौच. इ०. ४ (ल.) अशुद्धत्व; घाणेरडेपणा; गबाळपणा; अजागळपणा. [सं.]

आशौची—वि. आशौच असलेला; सुतक असलेला.

आश्कारा, आस्कारा—पु कीर्ति; प्रसिद्धि; लौकिक; अस्करा अस्कारा पहा. 'भवानीपंताचा आश्कारा मात्र, सोंगें कांहीं चमत्कारिक नव्हतीं.' –ऐटि १.५८. [फा. आश्कारा]

आश्चर्य—न. १ विस्मय; कौतुक; नवल; अचंबा. 'आश्चर्या अति पावली बघुनियां तूणीर पाठीवरी।' –शबरीआख्यान. २ अद्भुत गोष्ट; चमत्कार; आश्चर्य वाटणारी गोष्ट. 'कांहीं आश्चर्य पहावें असें मनांत आहे.' –कमं १.३८. अशुद्ध रूपें–आश्चिर्य; 'ब्रह्मानंद ते समईं। कोण आश्चिर्य होतसें।' –वेसीस्व ३.२२. (गो.) आश्चिर. [सं.]

आश्चर्यणें—अ.क्रि. (काव्य अर्वाचीन रूप) आश्चर्यचकित होणें; विस्मय वाटणें. 'आश्चर्यें शिवकार्य ऐकुनि शहा युद्धत्ति हो गोजिऱ्या' –जयजयकार (स्वातंत्र्यशार्दूल)

आशाई—स्त्री. स्नेह; सख्य; परिचय. आशनाई पहा. 'तेथें रंगोजी पटवारी यासी आशाई होती त्या आसरियानें राहिलें.' –भाअ १८३४.१४१. 'राव पंतप्रधान याजकडील सर्दारांशीही रफ्त आशाईचा आहे. –रा ५.१०१. [फा. आशाइ =मैत्री]

आश्रम—पु. १ ब्राह्मणक्षत्रियादि त्रैवर्णिकांनां धर्मानें घालून दिलेले ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार मार्ग किंवा अवस्था. यांस वर्णाश्रम असेंहि म्हणतात. 'नित्यानित्य होमद्वारें। ब्रह्माग्नि प्रज्वळला एकसरें। जाळूनि आश्रमांचीं चारीं घरें। केलें खरें निराश्रमी॥' –एभा ७.२६६. २ पर्णकुटी; पर्णशाला; निवासस्थान; मठ; पाठशाला; ऋषींच्या वस्तीचें ठिकाण. 'आणि वयसा वित्तकाशु। ययांचा वाढवी संभ्रमु। म्हणौनि मदें आश्रमु। तोचि केला।' –ज्ञा. १८.७५७. 'देवें आश्रम कांहीं चालवावे भले।' सप्र. ८.३३ ३ गृहस्थाश्रम; संसार. 'आपणासि आश्रम करणें नाहीं।' –स २.१९. 'साहोनि काम क्रोध अहंकार। आश्रमीं अविनाश साधी रे।' –तुगा २४८३. ४ संन्यास; चतुर्थाश्रम. ५ गोसाव्यांतील एक पंथ. ०**चतुष्टय**–ब्रह्मचर्य; गार्हस्थ्य वानप्रस्थ संन्यास हे चार आश्रम. ०**धर्म**–पु. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यास हे चार आश्रम व त्यांत स्वाध्याय, यज्ञकर्में, ज्ञानप्राप्ति, सर्वसंगपरित्याग इत्यादि कर्में आचरणें हा धर्म. [सं.]

आश्रमांतर—न. एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जाणें, दुसऱ्या आश्रमाचा स्वीकार. [सं.]

आश्रमी—वि. १ चार आश्रमांपैकीं एका आश्रमाचा. २ आश्रमवासी; तपस्वी; ऋषि वगैरे. [सं.]

आश्रय—पु. १ आश्रयाचें स्थान; आधारस्थान; निवाऱ्याची जागा. २ संरक्षण; छत्र; आधार; आसरा; थारा; आच्छादन; 'तिला परमुलखांत कोणाचा आश्रय नव्हता' –पाण्ह ५. ३ (ल. व अक्षरशः) दुजोरा; मंजुरी; पुस्ती; आधार; प्रमाण; कैवार, आधारभूत; प्रभाणभूत; कैवारी. ४ आश्रय असणें; अवलंबन करणें; स्वीकारणें; उपयोग करणें; पाळणें; वागणें; अनुसरणें; अभ्यासणें. ५ शेजार; सान्निध्य. 'अग्नीच्या आश्रयास तूप ठेवूं नको, वितळेल. (सामाशब्द) जलाश्रय; ग्रामाश्रय; वृक्षाश्रय इ० [सं. आ+श्रि=आसरा घेणें]

आश्रयण—न. आश्रय पाहणें; आधार घेणें; आश्रयार्थ अवलंब करणें; धरून बसणें; चिकट्न राहणें (मत, सिद्धांत इ. कांस). [सं.]

आश्रयणें—उक्रि. १ आश्रय घेणें; निवाऱ्याकरितां अवलंब करणें; मदत घेणें; 'सांडूनि आपला आडळ। लवण आश्रयी जळ।' –ज्ञा १८.१२५०. 'तयाचा आश्रम अति सुंदर। जेथें वाघीण्याघ्रां नसे वैर। विडाल आश्रयती उंदिर। निद्रा करिती स्वलीलें।' –जै २९.१५. २ अनुसरणें; ग्राह्य मानणें; चिकट्न बसणें (मत, सिद्धांत यांस). ३ अवलंब करणें; स्वीकारणें; पाळणें (उपाय, योजना). [आश्रयण]

आश्रयराग—पु. (संगीत) थाटास ज्या एखाद्या प्रसिद्ध रागाचें नांव दिलेलें असतें तो.

आश्रयी—वि. आश्रय करणारा; आश्रय घेतलेला; ज्यानें आश्रय घेतला आहे तो; शरणार्थी; शरणागत. [सं.]

आश्रा—पु. आस्रा. आश्रय पहा. 'आपला सरकारचा आश्रा गेला असें त्यास वाटलें.' –टि ४.४४. [सं. आश्रय; हिं. आश्रा]

आश्राप-ब—वि. गरीब; निरुपद्रवी. अश्राप अर्थ ३ पहा. 'जनावर मोठें खरं, बाकी फार आश्राव'

आश्रायणी—अशरीरिणी पहा. 'तंव आश्रायणी सूचनावचन।' –दावि ४२.

आश्रित—वि. १ आश्रय दिलेला; सांभाळलेला; पोसलेला. २ संरक्षणासाठीं ज्याचा आश्रय घेतला आहे असा; जो आश्रयिला जातो तो; आश्रय देणारा. ३ अनुसरलेला; पाळलेला; अभ्यासिलेला. ४ उपयोग केलेला; कामीं लावलेला; आसरा घेतलेला; अवलंब केलेला ५ आश्रयास असलेला, ज्यास कांहीं कामगिरी नसून केवळ योगक्षेमासाठीं ज्यास श्रीमंत लोकांनीं नेमणूक करून दिली आहे असा भिक्षुक वगैरे. सामाशब्द–राजाश्रित, भिक्षाश्रित इ० [सं.].

आश्रुढाळ—वि. (व.) अश्रु गाळणारा; घोडयाचें एक लक्षण. अंसुढाळ पहा.

आश्लिष्ट—वि. आलिंगिलेला; कवटाळलेला. [सं. आ+श्लिष्]

आश्लेष—पु. आलिंगन; भेट. [सं]

आश्लेषणें—अक्रि. आलिंगणें; आलिंगन देणें. 'सर्व इंद्रियेंहि आश्लेषावें। स्त्रियांतेंचि।' –ज्ञा १६.३३२.

आश्लेषा—स्त्री. सत्तावीस नक्षत्रांपैकीं नववें नक्षत्र. [सं.]

आश्वलायन—पु. या नांवाचा एक ऋषि; आश्वलायन श्रौत व गृह्य सूत्राचा कर्ता; कात्यायनाच्या ऋग्वेदसर्वानुक्रमणीवरील षड्गुरुशिष्यानें केलेल्या टीकेंत आश्वलायन हा शौनकाचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे. २ आश्वलायन शाखेचा (अनुयायी) ब्राह्मण. ०**सूत्र**–ऋग्वेदाच्या शाकल शाखेचें सूत्र, याचे १६ अध्याय असून १२ अध्यायांस श्रौतसूत्र व चार अध्यायांस गृह्यसूत्र म्हणतात. श्रौतसूत्रांत हौत्र विषय असून गृह्यसूत्रांत संस्कार व इतर स्मार्त विषय आहेत. [सं.]

आश्वास—पु. धीर; आश्वासन. 'आश्वास दिधला दयाघनें।' –दावि २६०. [सं. आ+श्वस्]

आश्वासणें—सक्रि. १ धीर देणें; आशा दाखवून उद्युक्त करणें; उत्तेजन देणें. 'परि आश्वासिले पार्थातें। विहालियासी।' –ज्ञा ११.६५४. 'आश्वासावे दास। तरी घडतो विश्वास।' –तुगा १६८५. २ बोलावणें; हांक मारणें. 'ऋषी करूं गेला अनुष्ठान।

मार्गें आले त्रयमूर्ति आपण। अनुसयेसी आश्वासुन। अतिथि आलों म्हणती।' –गुच ४.२७ [सं. आश्वासन]

आश्वासन—न. धीर; उत्साह; उत्तेजन. 'तिसी यावें आश्वासन। उदईक आहे तुझें लग्न। तुवां असावें सावधान। पाणिग्रहण मी करीन।' –एरुस्व ५.७८. [सं.]

आश्वासित—वि. आश्वासन दिलेला; प्रोत्साहन, धीर दिलेला. [सं]

आश्विन—पु. चैत्रादि बारा महिन्यांतील सातवा महिना [सं. अश्व–अश्विन्–आश्विन]

आश्विनगोरी—वि. आश्विनांतील गौरीच्या सुमारास तयार होणाऱ्या नाचणीच्या एका प्रकाराचें नांव. [सं. आश्विन+गौर]

आश्विना–नी—वि. आश्विन महिन्यासंबंधीं (आदितवार, पौर्णिमा तिथि इ०) [सं. आश्विन]

आषक—आशक पहा.

आषाढ—पु. चैत्रादि बारा महिन्यांपैकीं चौथा महिना. [सं]

आषाढ झड, आषाढ दवणा, आषाढखाना, आषाढपागोळी, आषाढपाटी, आषाढभूती—आखाड पहा.

आषाढा–ढी—वि. आषाढासंबंधी.

आषाढी—स्त्री. आषाढ महिन्यांतील शुद्ध एकादशी. शिवाय आखाडी पहा. **म्ह०** (व.) आषाढीं तट, श्रावणीं भट, भादवीं कुणबट (माजतात).

आष्ट—एक झाड. आस पहा

आष्टा—स्त्री. (व.) रानतुळस.

आष्णी—(गो.) घुसळखांबाची दोरी. आसणी पहा.

आस—स्त्री. आशा; इच्छा; अपेक्षा; उत्कंठा. 'परी कर्मफळीं आस न करावी। आणि कुकर्मी संगति न व्हावी।'–ज्ञा २.२६६. 'काल्याचिये आसे। देव जळीं जाले मासे।' –तुगा १८९. (क्रि० धरणें; घेणें; लागणें). **म्ह०** १ श्वास तो आस. २ आसका बाप निरासकी माय. ३ आशा अमर आहे. [सं. आशा; प्रा. आसा]

आस—पु.स्त्री. १ (भोंबऱ्याचा खेळ) रंगणांत नेमका भोंवरा टाकणें; रंगणांतील भोंवऱ्यास दुसरा भोंवरा मारणें; रंगणटोला. २ (बैदुलाचा खेळ) एक बेदूल दुसऱ्या बेदुलास नेम धरून मारणें. [सं. अस्=फेंकणें]

आंस, आस—पु. १ गाडीचा कणा; हा लोखंडी किंवा लांकडी असतो. २ (ज्यो.) दोन ध्रुवांना जोडणारी जी कल्पित रेषा व जी पृथ्वीगोलाच्या अगदीं मध्यांतून जाते तिला आंस म्हणतात. (सामा.) ज्या कल्पित रेषेभोंवतीं कोणताहि गोल फिरतो ती रेषा. [सं. अक्ष]

आस—पु एक झाड. (लॅ. हिबिस्कस पाप्युलनिओआइड्स). –स्त्री. एक प्रकारचें झाड. **आंसफळ**–न. आस झाडाचें फळ. –स्त्री. (कों.) फणसाची एक जात.

आस—न. धनुष्य. 'गणेश घे रत्नजडीत आसा।' –सारुह ५.३०. [सं.]

आसं—क्रि. (चि.) आहे. [सं. अस्=असणें]

आसक, आसुक—न. (बायकी) वाखा,पूर्ण दिवस भरण्यापूर्वी प्रसुति. [सं. सू=प्रसवणें]

आसकड—न. अडचणीची जागा; खवदाड; दुर्गम स्थान. 'शब्दाचिया आसकडीं। भेदनदीच्या दोहीं थडीं। आरडत विहरवेडीं। बुद्धिवोबु।' –ज्ञा १६.५. [सं. आस+कूट]

आसका–कें—क्रिवि. सगळा; संपूर्ण. असका पहा. 'राया तूं पाहे पां विवेकें। जगचि आसकें गुरु दिसे।' –एभा ७.३४३.

आसका—वि. आश्रित. 'कंगाल तरी मी तुमचाच आसका।' –दावि ६०. [सं. अस्=असणें]

आंसकूड—पु (व.) गाडीचा आंस, कणा. आंस पहा.

आसक्त—वि. अनुरक्त, परायण; निरत; लंपट; लोभी. 'तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावें। तरतील नावें विठोबाच्या।' –तुगा २४९१. सामाशब्द–विषयासक्त; गृहासक्त; भजनासक्त. [सं. आ+संज्=बांधणें]

आसक्ति—स्त्री. लोभ; तत्परता; तल्लीनपणा; लंपटता; भक्ति; व्यासंग; हव्यास. 'परी कर्मफळीं आसक्ती। धरूनियां।' –ज्ञा २.२४५ [सं.]

आसखा—वि. सर्व; प्रत्येक; किंवा सर्व समुदाय. 'कवणु कवणा न देखे। होते तेथें राहिले आसखे। येरीकडा जाऊ न सके। अंधारें करोनी।' –खिपु १.१६.११२. असका पहा.

आंसट—पातळ; सरबरीत. असट पहा.

आंसड—पु. गाय, म्हैस, इ० कांचे थान; सड; अचळ. [म. सड]

आंसडणें—सक्रि. (कर्ना.) कांडणें; सडणें. [सडणें]

आंसडणें, आंसडा, आसडी, आसण–णा—अ मध्यें पहा. 'मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें। आसडूनि नागविलें।' –ज्ञा ११.४६९.

आसडा—पु. जोराचा हिसका. असडा पहा. 'रंगलें तें अर्गी दावी। विष देववी आसडे।' –तुगा ३१६४. 'वोढिले मारोनि आसडा।' –मुआदि १०.१०१.

आसडी—स्त्री. (कों.) गाय, बैल, म्हैस इ० कांनीं मारलेली लाथ. (क्रि० मारणें). [सं. अस्=फेकणें]

आसणी—स्त्री. घुसळखांबास बांधावयाची रवीची दोरी. [आसडणें; सं. अस्=फेंकणें; प्रा. असण=फेंकणें, ओढणें]

आसतुटी—वि. निराशा करणारें; आशा तोडणारें. 'तेवींचि कठिण बोलें आसतुटी । अर्जुन होईल हिंपुटी ।' –ज्ञा ११.४५३. [सं. आशा+त्रुट्=तुटणें]

आसंद—पु. एक औषधी वनस्पति; आस्कंद. [सं. अश्वगंधा]

आसंदी—स्त्री. १ (श्रौतकर्म) लांकडी चार पायांची घडवंची. ही मोळाच्या दोरीनें विणलेली असते. हिच्या विणलेल्या भागाच्या वर सुमारें हातभर पायांची उंची असते. सोमयज्ञांतील सोमवल्ली हीवर ठेवतात. २ (हिं.) खुर्ची; आसन; खाट. [सं.]

आसन—न. १ बैठक; बसकर; बसण्याच्या उपयोगी पाट, खुर्ची, कोच, सतरंजी वगैरे वस्तू. सामाशब्द:–कुशासन; दर्भासन; तृणासन. 'होईन गुरूचें आसन। अळंकार परिधान। चंदनादि होईन। उपचार ते ॥' –ज्ञा १३.४२०. २ बसण्याचें वाहन–पक्षी, उंदीर, वगैरे जसें–विष्णूचें वाहन गरुड, गणपतीचें वाहन उंदीर, शंकराचें वाहन बैल. ३ हातपाय वगैरे अवयवांची योगाभ्यासांत किंवा सुरतप्रसंगीं जी विशिष्ट प्रकारची रचना ती. जसें–कुक्कुटासन; मयुरासन. इ० हीं आसनें ८४ आहेत. 'तेंचि षष्ठामाजीं प्रगट। आसनालागोनि स्पष्ट। मैथुनें लिहिली जीं वीट। वैराग्यातें उपजविती।' –ज्ञा १०.२६. 'येकीचे हातीं विचित्र पट। चौऱ्यांयशी आसनांचे प्रगट।' –मुरंशु ३. **म्ह०** एक्या मांडीवर चौऱ्यांशीं आसनें. ४ बसण्याचा विशिष्ट प्रकार. जसें–वीरासन; पद्मासन. ५ घोड्यावरील बैठक; घोडयाची पाठ; घोड्याच्या पाठीवर बसण्याची जागा. ६ पुस्तकाच्या पानावरील रकाना, कॉलम; खातें; कोठा. **०ओळखणें**–आपला स्वार कोण आहे हें (घोड्यानें) जाणणें. **०गुंडाळणें**–बोचकीं बांधून, निघून जाणें; बिऱ्हाड उचलणें. **०घालणें–ठोकणें**–आसनमांडीप्रमाणें एखाद्या विशिष्ट पद्धतीनें बसणें; स्थिर होणें; हट्टन बसणें. **०जड होणें**–१ घट्ट बसणें; बसून राहणें. २ चढून जाणें; गर्वानें फुगून जाणें. **०जमणें**–१ चांगला जम बसणें. २ गच्च भरून येणें; दाटणें (ढग वगैरे). **०जमविणें**–आपला बस बसविणें; आपलें स्थान स्थिर करणें. **०जोडणें**–उकिडवें बसणें. **०ठरणें**–घोड्याच्या पाठीवर बसणें; स्थिर होणें. **०ठेवणें**–(घोडयावर) चढणें. **०डळमळणें**–१ आपली जागा, बैठक अस्थिर होणें. २ (ल.) अस्वस्थ–चंचल होणें. घडी विस्कटणें; बसलेला जम विघडणें. **०ढळणें**–आपला बस, जम, योग्यता–दर्जा वगैरे गमावणें. **०पडणें**–जागा मिळणें; जम बसणें वगैरे. **०बसणें**–आसन ठरणें पहा. **०रुंदावणें–वाढणें**–१ रुंद होणें; लठ्ठ होणें (शरीर). २ (ल.) मोठेपणा मिळविणें; लवाजमा वाढणें. **०सोडणें**–नेहमींची जागा, दर्जा, प्रांत, सोडणें. **आसनीं–खेळणें**–१ (भुताटकी) आपल्या झाडामध्यें स्वच्छंदानें वावरणें –खेळणें. अंगांत येणें. २ आपल्या जागेंत आपल्या साधनांनीं खोडया, चेष्टा करणें. **–नीं येणें**–मूळपदावर, मूळ स्थितीला येणें **०कुहा–धा**–पु. **०खोड–य**–स्त्री. घोडयाच्या ७२ खोड्यांपैकीं एक खोड; घोडयाच्या पाठीवर बसण्याजागीं कांहीं रेघा किंवा विशिष्ट रंग असणें हें या खोडीचें लक्षण आहे. घोडयाला हें अशुभ लक्ष्मण असेल तर धन्यावर मृत्यु किंवा एखादें मोठें संकट ओढवतें. **०चलन**–न. चंचलता; अस्थिरता; घरसोड; (अक्षरशः व लक्षणेनें). **०बंध–रचना**–पुस्त्री. आसन बसविणें, नक्षी करणें, घालणें (विशेषतः योगांत). **०मांडी ०वटा**–स्त्रीपु. दोन्ही पावलें दुपून एक पाऊल दुसऱ्या गुडघ्याशीं आणि दुसरें पाऊल पहिल्या गुडघ्याशीं लावून बसण्याचा प्रकार. **०विधि**–पु. १ योगांतील आसनें कशीं करावीं, कशीं ठेवावीं वगैरे ज्यांत सांगितलें आहे असा विधि. २ एखादें धर्मकृत्य (जप, पूजा इ०) करण्यासाठीं बसावयाच्या वेळीं, तें कर्म संपेपर्यंत उठावयाचें नाहीं अशा नियमानें बसणें व त्यावेळीं करावयाचें न्यास वगैरे विशिष्ट कर्म. [सं.] **०शुद्धि**–स्त्री. आसनाची ठेवण व रीत निश्चित करणें, अनुष्ठानापूर्वी तंत्रशास्त्रांत आसनांचे अनेक प्रकार सांगितले आहेत त्याप्रमाणें आसन करणें.

आसनपेडी—स्त्री. (गो.) बांक (बसावयाचें). [सं. आसन+पीठ]

आसनी—स्त्री. पूजेस वगैरे बसण्यासाठीं केलेलें लोंकरीचें लहान आसन. [सं. आसन]

आसनी—स्त्री. (व.) आश्विनी पौर्णिमेस सर्वांत वडील मुलास ओंवाळण्याचा विधि. 'आज मुलाची आसनी करावयाची आहे.' [सं. आश्विनी, प्रा. आसिन]

आसनीवान—वि. (व.) यथेच्छ. 'आज आसनीवान जेवण झालें.' [सं. आशा+म. नीवविणें]

आसन्न—वि. जवळचा; समीप असणारा. [सं.] **०काल–मरण–मृत्यु–अवधी**–वि. मरणोन्मुख; मरणास टेकलेला. **०निद्र**–वि. झोंपेस आलेला. **०प्रसव–प्रसूति**–वि. बाळंत होण्यास टेकलेली; प्रसूतिकाल जवळ आलेली (स्त्री, गाय, म्हैस इ०) **०समाधि**–वि. समाधि घेण्याच्या बेतांत आलेला (संन्यासी).

आसपास—क्रिवि. भोंवतालीं; आजूबाजूस. –पु. (पुस्तक बांधणी) पुस्तकाची बांधणी करतेवेळीं त्याच्या दोन्ही बाजूस चिकटवावयाचे कोरे कागद; (इं) साइडपेपर. [सं. आस्य=तोंड; किंवा आसन्न=जवळ+पार्श्व; प्रा. आस+पास=जवळ; वै. आसा–सं. आस=जवळ, +पार्श्व=बाजू. हिं. आसपास; सिं. ओसेपासे]

आसपासचा–पासील—वि. आसपास असणारा; जवळपासचा; आजूबाजूचा.

आसपाव—पु. (कर्ना.) दोरी, पट्टे, कांसरा, इत्यादि जोत जुंपण्याचें सामान

आसभास—पु. पुढें होणाऱ्या गोष्टीचा भास, चिन्ह, स्वरूप; लक्षण; तर्काला किंवा कल्पनेला वाव. 'मला अगदीं आसभास

समजला नाहीं.' 'हा चोर निघेल असा मला आसभास नव्हता.' [भास द्वि.].

आसभास—स्त्री. (गो.) रीतिरिवाज; रीतभात. 'आसभास कांयच्च कळना मरे तुका.' [भांत=चाल, रीत द्वि.]

आसमंतचा—वि. शेजारचा; जवळचा; आसपासचा.

आसमंतात्—क्रिवि. सर्व बाजूनीं; सभोंवतालीं; चोहोंकडून; आसपास; या शब्दाचीं अशुद्ध रूपें–आसमंत, आसमंतजागीं, आसमंतभागीं. [सं. आ+समंतात्]

आसमाप्ति—क्रिवि. समाप्तिपर्यंत; शेवटपर्यंत; पूर्ण होईपर्यंत. [सं. आ=पर्यंत+समाप्ति=शेवट]

आसमास—क्रिवि. सर्वत्र, सभोंवतीं; आसपास; पुष्कळ; अतिशय; सतत; सहसा; कधींहि; केव्हांहि. 'मुखीं घालितां एक घास। स्वर्गी घणघर्णी घंटाघोष। कदा न राहे आसमास। गजर विशेष जाहला।'–ह ३४.९५. 'तुझें गुणलक्षण चिदाकाश। तेथें व्यासादिक उडती राजहंस। भेदित गेले आसमास। ज्यांच्या मतीस सीमा नाहीं।'–ह २.५. 'मी तूस न होतां जगन्निवास। तें घर नांदतचि आस। तेथें अवदशा ये बहुवस। आसमास कष्ट होती।'–ह ७.१४९. 'तीन राती तीन दिवस। युद्ध झालें आसमास।'–रावि २५.१६७. 'कृष्णासि जरी देती गोरस। तरी शतगुणें वाढे विशेष। ते गृही दशा न ये आसमास। गोरस हरीस अर्पितां।'–ह ६.१९१. [सं. आ+समास; असमसाहस पहा]

आसमाळ्यो—स्त्री. अव. (गो.) उतार्णे निजून, पाय वर करून त्यांवर लहान मुलाला दिलेले झोके. [अस्मान+अळंच्यो]

आसर—पु. (गो.) आश्रय; मदत. [सं. आश्रय]

आसर, आसोर—पु. (कों. गो.) पावसाळ्यांत पाऊस थांबून उघाडी पडते ती; उघडीप. [सं. अपसृ; प्रा. ओसर; म. ओसरणें; तुल० सं. आसार=जोरानें पाऊस पडणें]

आसर—पु. परिणाम; असर पहा. 'माझ्या बोलण्याचा त्याच्यावर चांगलाच आसर झाला.' **०पाडणें**–परिणाम घडवून आणणें.

आसरण—न. (कृ.) पावसापासून रक्षणाचें साधन, छत्री इ० [सं. आश्रयण. म. आसरा]

आसरा—स्त्री. १ जलदेवता; तळीं, विहिरी वगैरे ठिकाणीं वास करणाऱ्या सात देवता; शेतांतील देवता; प्रसूतिदेवता. आसराई पहा. 'वनदेवता गंधर्व यक्षिणी। गोंधळ घालिती महावनीं। आसरा जाज्वल्य रूप दाऊनी। तेच क्षणीं गुप्त होती।'–ह ११.१९१. 'सातवे दिवशीं साती आसरा। गुप्त रीतीचा घालिती फेरा।'–पाळणा (शाहूमहाराजांचा) ८. [सं. अपू+सृ; अप्सरा; प्रा. अच्छरा]

आसरा—पु. १ आश्रयस्थान; आश्रयाची, निवाऱ्याची जागा; आडोसा; 'तूझिया कृपेवीण ईश्वरा। आसरा आम्हा नाहीं दुसरा।' २ बचाव; रक्षण; आच्छादन; छत्र. ३ आधार; प्रमाण. ४ (ल.) संमति; अनुमति; अधिकार; परवानगी. [सं. आश्रय; हिं. आसरा]

आसराई—स्त्री. प्रसूतिदेवता; आसरा 'आसराई सादर केला। रामचंद्र कौसल्ये।...'–स्त्रीगीत १२. [आसरा]

आसलग—वि. सोपें; सुगम; असलग पहा. 'अपाय हहीं आसलग।'–ज्ञा १६.४२९.

आसव—पु. १ पाणी वगैरे द्रवपदार्थांत औषधी द्रव्यें घालून अग्निपचन न करितां तसेंच पुरून ठेवून मद्याप्रमाणें तयार करतात तें. जसें–कुमारीआसव. २ द्राक्षें; कोरफड इ० औषधी पदार्थांचा अग्निसंयोगानें औषधार्थ जो द्रव काढतात तो. उ० द्राक्षासव ३ ज्यंस, काकवी वगैरेपासून काढलेली दारू. ४ (सामा.) मद्य. ५ अर्क; (इं.) टिंक्चर. [सं. आ+सू]

आसवणें—अक्रि. आशाबद्ध होणें. आसावणें पहा. [सं. आशा; म. आस]

आसवल—अस्वल पहा. 'आसवले गुर्गुरिती।'–दावि २४४.

आसवें—न.अने. अश्रू. 'आसवें लोचनीं आलीं।'–विक ९. [सं. अश्रु; प्रा. अंसु; म. असूं]

आसवेल—स्त्री. एक वनस्पति; शितागौड; दिसमावळी; शतावरी पहा.

आसळसा—स्त्री. (गो.) आश्लेषा नक्षत्र. [सं. आश्लेषा.]

आसा—क्रि. (कों. गो.) आहे; जिवंत आहे. 'तोचि आसा कीं काय आजून हें न कळे कोणाला। नाहीं त्याचा विश्वास जाईल अवचित घालुन घाला।'–होला १२. 'आवय आसा काय?' [सं. अस्=असणें]

आसों—पु. (गो.) तांदुळांत एखादा सकवच असलेला भाताचा दाणा; भातगोटा; भातकण, आंशीं पहा.

आसा, आसाणा—पु. एक झाड. असणा पहा.

आसाटणें—सक्रि. (भिक्षी) आपटणें. 'तियांन आपो टोपी काडिन तोर तीवे आसाटी।' =त्यानें आपली टोपी काढून जमिनीवर आपटली [म. असडणें]

आँसाड—स्त्री. (गो.) सुकतीच्या वेळीं नदीच्या पाण्यास येणारी जोराची उसळी.

आसाडी—स्त्री. जखमेवर बसणाऱ्या माशांनीं केलेली विष्ठा. असडी पहा.

आंसाडी—स्त्री. (व.) आळी, कीड. अंसडी पहा. 'झडीनें घोंगडयावर आंसाडी पडली.'

आँसाद—पु. (गो.) छत्रीचा अग्रा; छत्रीच्या सऱ्यांचा सांगाडा. [पोर्तु.]

आसादन—न. १ ठेवणें; रचणें; मांडणें; लावणें (यज्ञांतील पात्रें–सामुग्री, किंवा जेवणाचीं ताटें, इतर साहित्य). २ मिळविणें; संपादणें; प्राप्त करून घेणें. [सं. आ+सद्=बसणें]

आसादित—वि. आसादन केलेला [सं.]

आसान—वि. (व.) (हिं.) सोपें; सोईस्कर. 'परदेशांत नांव मिळविणें आसान गोष्टी नाहीं' [फा. आसान=सोपें]

आसानी—स्त्री. (व.) (हिं.) साहजिकपणा; सुलभता; सौकर्य. 'या उपायानें रोग आसानीनें हटतो' [फा. आसानी]

आसामदार, आसामी, आसामीदार, आसामीवार–अ मध्यें पहा.

आसार—स्त्री. संततधार; निरंतर वृष्टि. 'वर्षाकालीं आसारीं राहे। हेमंतीं जळाशयें।'–एभा २४.२८४. [सं. आसार=जोराचा पाऊस]

आसार-री—असार, असारा पहा.

आसावणें—क्रि. आशा करणें; उत्कंठित होणें. आशावणें पहा. 'पाहावया घनसांवळा। कृष्णश्यामता आळी बुबुळां। आसावली दोन्ही डोळां। सबाह्यपणें देखणें॥' –एरुस्व ७.२३. 'आसावलें मन जीवनाचे ओढी। नामीं रूपीं गोडी लावियेली।'–तुगा १५२३. [सं. आशा म. आस]

आसावरी—स्त्री. (संगीत) गायन शास्त्रांतील एक रागिणी. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व निषाद वर्ज्य. जाती औडुव संपूर्ण, वादी धैवत व संवादी गांधार. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर. [सं. ?] **०थाट**–पु ज्यामधून आसावरी वगैरे राग उत्पन्न होतात त्या थाटाचें नांव. याचे सात स्वर पुढीलप्रमाणें असतात–शुद्ध षड्ज, शुद्ध ऋषभ, कोमल गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद.

आसाहेब—पु. अधिकाऱ्यास उद्देशून योजावयाचें संबोधन; आपण (तुम्हीं या अर्थी). 'आसाहेबांनीं या इलाख्यांतील ज्यूरी संबंधानें सरकारकडे जो आपला अभिप्राय पाठविला आहे...' –टि १.१५२. [फा.]

आसाळी—स्त्री. पिशाची; हडळ. असाळी पहा. 'आसाळी घोरकाळी सुरदळ विदळी कृष्ण व्याळी विशाळी।' –मुरामायण ६.६५.

आसिका-की—वि. संपूर्ण; सर्व. अस्का पहा. 'न फुटतां बीजकणिका। माजि विस्तरे वटु आसिका।' –अमृ ७.१४९.

आसिद—न. अम्ल; असिड. 'त्या पाण्याचे ठायी कांहीं आसिदपणा येतो.' –मराठी पु. ६ आवृत्ति २.१६६. [इं. ॲसिड]

आसीमांत—क्रिवि. सीमेपर्यंत; हद्दीपर्यंत. [सं.]

आसु—न. एक चांदीचें जुनें (देवगिरीकर यादवांच्या वेळचें) नाणें. 'दक्षिणेसि साठी आसु दिलें' –पाटण शिलालेख, भाअ १८३५.६३.

आसुक—न. वस्त्र; चिरगूट. [सं. अंशुक]

आसुक्त—वि. अयोग्य. असूक्त पहा. 'हे गुणपणा थोर आसुक्त कीं। याची लाज तूं तरी धरी जरा।' –होला ३७. [स.अ+सु+उक्त]

आसुड—पु. चाबूक. असुड पहा. 'तेथ जो राहे गा मागें पुढें। तो झोडिजे आसुडें।' –एभा ६.१७०.

आसुडणें—उक्रि. १ पाखडणें; कोंडा काढण्याकरितां सुपांत घालून झटकणें. 'आकाश असे आसुडत।' –ज्ञा १.१५६. २ ओढणें; हसडणें; हिसका देणें; हिसकणें; झटका देणें; आपटणें वगैरे अर्थाकरितां असडणें पहा. 'तंव गळ आसुडी। जळपारधी।'–ज्ञा १४.१४७. 'जीव्हा आसुडील ह्मणौनी।'–उषा ७२९. 'आसुडिल्या माना हात पाय नेटें। तंव भार बोटें उचलिला।' –तुगा ७१. ३ लुबाडणें; गडप्प करणें. 'क्षणेक अर्थाची अतिगोडी। क्षणेक आसुडी परद्रव्य।' –एभा २५.१४७. शिवाय असडणें पहा. [सं. आ+सट्; आ+सूद्; प्रा. आसूड]

आसुडपाखूड—स्त्री. १ धान्य निवडणें, आसडणें, पाखडणें वगैरे निरनिराळ्या कियांनां हा शब्द लावतात. २ (ल.) कसून तपासणी; उलट सुलट तपासणी. [असडणें+पाखडणें]

आसुडा—पु. हिसका; असडा पहा. 'मालविद्येच्या आसुडीं। थडक हाणोनियां गाढी।' –एभा २९.२६६.

आंसुढाळ—पु. ज्याच्या डोळ्यांतून पाणी गळत आहे असा अस्वच्छ दृष्टीचा घोडा. अंसुढाळ पहा.

आसुति—स्त्री. अर्क काढणें; मद्य गाळणें. [सं. आ+सु]

आसुदें-आसुदाय—वि. (गो.) आयता; तयार. असुदा–य पहा. 'आसुदें अन्न सेऊं नये। वडिलांचेंही।' –दा २.२.२६.

आसुपाटी—पु. घोडेस्वार. –पाटण शिलालेख [सं. अश्वपृष्ठी–अस्सपाठी–आसपाठी]

आसुमाई—वि. आश्चर्यकारक. असुमाई पहा. 'आसुमाई चिन्ह पडे दृष्टी। वाटे पोटीं नवल तेव्हां।'–निगा १८८.

आसुर-री—वि. १ असुरासंबंधी. २ (ल.) असुरी; जलाल; दुष्ट; दारुण; भयंकर; अघोर; अकालविकाळ (माणूस किंवा कृत्य). [सं.]

आसुरी-उपाय-उपचार—पु. शेवटचा, धाडसाचा उपाय; आततायीपणाचा, भयंकर उपाय. **०कर्म-कृत्य-क्रिया**–न.स्त्री. एखादें विलक्षण, भयंकर, राक्षसी काम. **०चिकित्सा**—स्त्री. भयंकर, राक्षसी उपाय; शस्त्रक्रिया. जसें–हातपाय तोडणें, डाग देणें वगैरे. **०निद्रा**–स्त्री. गाढ झोंप; वेडी झोंप. **०बुद्धि**—स्त्री. (तत्त्व) प्रकृतीचा एक भेद. प्राकृतिक बुध्दि. –गीर १७१. **०भोजन**–न.

अधाशीपणाचें जेवण; बेसुमार जेवण. **०माया**–स्त्री. चेटूक; जादू; जुन्या काळांतील राक्षसांचीं अजब कृत्यें–चेष्टा. **०विवाह**–पु. (प्र.) आसुर विवाह. कन्या विकत घेऊन करावयाचा विवाह; मुलीच्या बापास किंवा नातलगास द्रव्य देऊन केलेला विवाह. अष्टविवाह पहा. 'विवाह तंव बहुता परी । पिशाच गांधर्व आसुरी ।'–एरुस्व ४.४२. **०संपत्ति**–स्त्री. १ जुलूम जबरदस्तीनें अथवा अन्य मार्गानें जमविलेली अपार संपत्ति. २ बेसुमार फाजील चैन. ३ कामक्रोध–लोभादि विकारांचें मूळ अशी ऐहिक संपत्ति; याच्या उलट दैवी संपत्ति. [सं.]

आसुटी—स्त्री. तापट्ण्याची (कोरड्याची) लांकडी दांडी, दांडकें. –मसाप २.२५४. [असुड+काठी]

आंसू—न. अश्रु; असूं पहा. (अव.) आसुवें. ' नितंबु आलि गनीं सुखानलें । बांधितां आंसुवें गाळौ लागलें । ' –शिशु ७२१.

आमूड, आमूडगांठ—अमूडगांठ पहा.

आंसें—न. (कों.) किंकरें; अरेंद पटाशी, लांकडास चौरस भोंक, खांच पाडण्याचें साधन. [सं. असि=सुरी]

आसेवित—वि. सेवा केलेला; सहवासित; परिवेष्ठिलेला. ' गणांसेवित शिव आला । ' [सं.]

आसो—पु. (गो.) १ तांदूळ निबडतांना सांपडणारा भातगोटा. २ पंचाक्षरी प्रश्न पाहतांना जे तांदुळाचे दाणे किंवा साळ उपयोगांत आणतो ते. आंशीं पहा. [सं. अंश]

आसोंडा—पु. (ना.) हिसका; झटका. असडा पहा.

आसोल—(कों) अस्वल.

आसोंस—पु फार अतिशय. असोस पहा.

आसोंसी—असोशी पहा. 'बये वचन ऐकावें । माझी आसोशी खानाला । ' –ऐपो १८.

आस्कटी—स्त्री. (गो.) पापणीचा केश. [सं. अक्ष+कुटि १]

आस्कंद—पु. अस्कंद; अश्वगंधा पहा.

आस्कळविस्कळ—वि. (गो.) ऐसपैस.

आस्कारहुस्कार—पु (गो.) श्वासोच्छ्वास; हुंदके देऊन रडणें [ध्व. हुश्श]

आस्तर—अस्तर पहा.

आस्तरण—न. १ पसरणें; आंथरणें. २ हांतरी; पसरण्याचें वस्त्र (सतरंजी, गालिचा; चटई; आंथरूण; इ०) ' किंवा वस्त्रें सांडूनी आस्तरणें नेसल्या त्या । '–रास १.२२३. ' मळमूत्रें भरें आस्तरण । ' –यथादि १३.६२९. [सं. आ+स्तृ–आस्तरण]

आस्तरणें—उक्रि. आंथरणें; पसरणें.

आस्ता—१ आस्था पहा. ' त्या पाटीलबोवाची आस्ता नाहीं पुरली । ' –ऐपो २८७. २ (गो.) आशा; हांवरेपणा. ३ स्वार्थ.

आस्ति(स्ती)क—वि. १ ईश्वराच्या ठिकाणीं श्रद्धा ठेवणारा; ईश्वर, परलोक, पापपुण्य मानणारा, श्रद्धावान्. याच्या उलट नास्तिक. ' तया आस्तिकांचा आश्रमु । पांडवा गा । ' –ज्ञा ८. १९३. २ (गो.) खाउनपिऊन सुखी असा (मनुष्य); सुखवस्तु; ऐपतदार; मातबर. –पु एक ऋषि. यानें जनमेजयाच्या सर्पसत्रांतून तक्षकाला वांचविलें. जित्रतेगमनीं साप वगैरेंची बाधा होऊं नये म्हणून या ऋषीचें नांव दोन वेळ (आस्तिक–आस्तिक असें म्हणून) घेतात. [सं.]

आस्तिकाय—पु (गो) श्रीमंती; ऐपत. [सं. आस्तिक्य]

आस्तिक्य, आस्तिक्यबुद्धि—न स्त्री. आस्तिकपणा; परमेश्वराबद्दल विश्वास, श्रद्धा. ' आणि आस्तिक्य जाणावें । नववा गुण । ' –ज्ञा १८ ८४८ ' म्हणोनि अस्तित्याच्या ठायीं । तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं । ' –ज्ञा २.१३२. [सं]

आस्तिक्यवाद—पु परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं समर्थन; आस्तिकपणाचें समर्थन ईश्वरवाद. याच्या उलट नास्तिकवाद, [सं] **–वादी**–वि. आस्तिकवादाचा पुरस्कर्ता आस्तिकवाद मानणारा. [सं]

आस्तीर्ण—वि १ पसरलेलें; आंथरलेलें (वस्त्र वगैरे). २ आच्छादिलेलें; झांकलेलें (जमीन वगैरे). [सं. आ+स्तृ]

आस्तुरी—स्त्री. (कुण.) (काव्य) स्त्री; बायको; अस्तुरी पहा. [सं स्त्री]

आस्ते—क्रिवि हळु हळु; सावकाश. [फा. आहिस्ता] **०कदम**–हळू पाऊल टाकणें (नाटकांतून किंवा विनोदी भाषेंत योजतात) आस्ते कदम ! आस्ते कदम ! –नाकु ३.२४. २ थांबणें या अर्थी. तेंच वरील अर्थी हेतूनेंहि योजतात. [फा. आहिस्ता+अर. कदम्=पाऊल]

आस्था—स्त्री. १ कळकळ; काळजी: ' परी ते आस्थाही न धरी मानसीं ॥ ' –ज्ञा ८.१९६. २ उत्सुकता; इच्छा; उत्कंठा; पोटाग; याच्या उलट अनास्था. ३ आसक्ति; प्रेम. ' घरावरी तेतुली । आस्था नाहीं । ' –ज्ञा १३.५९४. ४ आशा; आस; अपेक्षा; (कि. करणें.) ' औंवाळणीचिया आस्था । बहुरूपी सोंग संपादितां । ' –एभा १३ ३६७ ५ विश्वास, श्रद्धा. ' पाखांडियाहि आस्था । समूळ होय । ' –ज्ञा ६.१६७. [सं. आ+स्था]

आस्थान—न. स्थान, स्थल; सभास्थान; पीठ. ' कां बहिरयांच्या आस्थानीं । कवण गीतातें मानी । ' –ज्ञा ४.२३. [सं.]

आस्थीक, आस्थेकरी, आस्थेवाईक—वि. आस्था बाळगणारा; काळजीचा; कळकळीचा; उत्सुक; उत्कंठित. [सं. आ+स्था]

आस्थीक—पु. (गो.) १ गृहस्थ. २ धनिक. [सं. अस्ति+क]

आस्पत—स्त्री. (गो.) ऐपत; शक्ति, सामर्थ्य. 'हुंडा देण्याची आस्त नाहीं.' [सं. आस्पद]

आस्पद—न. स्थान; स्थल. सामाशब्द–अहंकारास्पद=अहंकाराचें स्थान–हारीर; गुणास्पद=विद्वान; सात्विक मनुष्य; मोहास्पद=कनक, कांता इ० वस्तु; दुःखास्पद; हास्यास्पद; शोकास्पद, इ० 'जगस्पृहे आस्पद । एक सार्वभौम पद ।' –ज्ञा १६.२३१. 'हें कर्म तुम्ही करतां परंतु परिणाम दुःखास्पद होईल.' [सं.]

आस्पाव–पु. (गो.) मोठेपणा. 'मराठी भाषेचाँ आस्पाव जरी व्हडलसाँ न्हय तरी आमी तिजो अभिमान धरूंक जाय' 'विजयनगरचाँ आस्पाव पळौन तेनाचे फिरंगी थरथरतालें.'

आस्फारणें—अक्रि. वाजणें. कंप पावणें; आस्फुरणें पहा. 'तंव दळामाजि रणतुरें आस्फारिलीं.' –ज्ञा १.१३०, [सं. आ+स्फार्=स्फुरचे प्रयोजक=कंप पावणें]

आस्फालणें—अक्रि. जोरानें आदळणें; आपटणें. 'आस्फालितांही स्वकरें न राहे। चेंडू जसा तो उसळेचि पाहे।' [सं. आ+स्फालन]

आस्फुरणें—सक्रि. १ कंप पावणें. २ फुंकणें; वाजविणें. 'दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला।' –ज्ञा १.१२७. [सं. आ+स्फुर्=कंप पावणें]

आस्फोट—पु. ठोसा; तडाखा; धपका; दणका; मारण्याचा आवाज. स्फोट पहा. [सं.]

आस्मान—अस्मान पहा.

आस्य—न. मुख; तोंड. 'आस्य सरोरुह हास्यलवें अतिरम्य उपास्य मनोभ्रमरी।' –ध्यानमाला. [सं.]

आस्रा—आसरा पहा.

आस्वल—अस्वल पहा.

आस्वाद—पु. १ रुचि; चव; स्वाद. २ इच्छा; लालसा. 'तैसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफळाचा आस्वादु।' –ज्ञा १८.२०५. [सं.]

आस्वादणें—उक्रि. रुचि घेणें; चाखणें; हुंगणें; स्वाद घेणें; खाणें. [सं. आस्वादन]

आस्वादन—न. सेवन; स्वाद घेणें; रुचि घेणें 'ना तरी अमृतरसास्वादनीं। रस सकळ।' –ज्ञा १.२६. [सं.]

आस्वादित—वि. चाखलेलें; स्वाद, चव घेतलेलें. [सं.]

आहट, आहाट—पु. (व) १ आवाज; चाहूल; चहाळ. 'गाडी गेल्याचा आहाट आला.' २ हांक; हांक मारणें. (क्रि. देणें.) 'त्या शेतांत रामा आहे त्यास आहाट दे.' [हटकणें]

आहाटणें, आहाठणें—क्रि. १ घाटणें; ढवळणें. २ त्रास देणें. अहाटणें पहा.

आहाटीव, आहटीव–अहाटीव पहा.

आहणा, आहाणा—पु. १ आणा. उक्ति; म्हण; वचन; न्याय; दृष्टांत, 'एक अनी चुकी तो बारा बरसका हयात, ऐसा आहणा प्रसिद्ध आहे.' –भाव ११८. २ लग्नांत वधूवरांनीं परस्परांचीं नांवें घेणें किंवा लग्नांत बायका व शिमग्यांत पुरुष विनोदी किंवा अश्लील पद्यमय वाक्यें बोलतात तो; उखाणा. 'तो आहणी रुचिर योषुसि नाम खासें। बोले मधूर वचना रद–कांति भासे।' –विवि ५९.३४. ३ कोडें; उखाणा; अहाणा पहा. [वै. अहनस्या; सं. आख्यान; प्रा. आहाण; किंवा सं. आहन; प्रा. आहण]

आहत—वि. मारलेला; ताडलेला; ठोकलेला; आघात केलेला. 'चंडवातें ज्योति आहत जैशी॥' –ज्ञा २.३२३. [सं. आ+हन्]

आहाति—क्रि. आहेत. 'एसें बहुतीं परी अलेंग। जे सांगितले तुज कां याग। ते विस्तारूनि वेदेंचि चांग। स्मृतिंतले आहाति॥' –ज्ञा ४.१५६. [तु. पु. अव. सं. अस्]

आहत्य, आहत्यभेव–क्रिवि. खरोखर; खात्रीनें; अगत्यपूर्वक. [सं.]

आहरण—न. आणणें; बोलावणें; आनयन. [सं.]

आहरा, आहारा—पु. मडकें, भांडें डळमळूं नये म्हणून त्याखालीं ठेवावयाचें गवताचें निवणें, चुंबळ; आरा पहा. [सं. हार]

आहर्ता–वि. आणणारा; आहरण करणारा. [सं.]

आहव—पु. युद्ध; लढाई. 'मग मथिले द्रौणीचे द्रुपदसुतें करुनि आहवा वाजी।' –मोभीष्म ३.४३. [सं.]

आहवन—न. यजन; याग; होम; हवन. [सं. आ+हवन]

आहवनीय—वि.अग्निहोत्र्यानें धारण करावयाच्या (गार्हपत्य, दक्षिणाग्नि, आहवनीय या) तीन किंवा पांच अग्नींपैकीं पूर्व बाजूचा अग्नि; इष्टींत व नित्यहोमांत मुख्य याग या अग्नींत करावयाचा असतो. पंचाग्नी पहा. 'आहवनीयादि वन्ही। निक्षेपरूपी हवनीं।' –ज्ञा १७.३६१. [सं.]

आहसी, आहास, आहासी—क्रि. आहेस; आहांत. 'तूंच आहसी आमुची गती।' मराठी ३रें पु. पृ. १० आ. ४थी (१८७३). 'अर्जुना तूं कवण आहसी। काय हा करिताशि।' –गीतार्णवटिका ६५. 'गवसोन पुसिलें आहास सुखी।' –दावि १८८. [सं. अस्, द्वितीय पुरुष ए. व. असि]

आहळ, आहळी—स्त्री. अग्नीची ज्वाळा. अंहळी पहा. हा शब्द आहळी किंवा आहळ्या अशा अनेक वचनांत उपयोगिला जातो. **आहळींत असणें**–धाकांत, जरबेंत असणें.

आहळणें—स्त्री. जळणें; अहाळणें पहा. 'त्या संतापें चराचर। आहळो लागे।' –निगमसार ६.२७.

आहळ, आहाळ—ओहळ पहा. (व.) गुराकरितां पाणी सांठविण्याची जागा; (खानदेशी–हाळ) पावसाळ्यांतील पाण्याचा खड्डा.

आहा-हे—स्त्री. ज्वाला; आंच; उपताप; उपसर्ग; पीडा. 'लागे सोकामिची न या आहे.' –मोरोल्य १.२८. आही पहा.

आहा—क्रि. (कातवडी) आहे. 'माझा लहान बाळ आहा, मला मारसा नको' –मसाप २.३१. [सं. अस्ति; म. आहे]

आहा, आहाहा—उद्गा. आश्चर्य, दुःख इ० उद्गार; अरेरे; आहा. 'आहा वृथा उतरलों भिजलों विलोकीं.' –नल ७८.

आहाकटा—उद्गा. पु. हाकाटी; ओरड; आक्रोश; हाय हाय. 'आहाकटा मग करिती गेलिया। आधीं ठावा तयां नाहीं कोणा।' –तुगा ५४. [अहा+कटकटा]

आहाकाप्या जाणें—क्रि. (व.) गर्भगलित होणें; घाबरणें; धीर सुटणें. 'तोफ पाहूनच तो आहाकाप्या गेला.' [अहा+हिं. काप्या=कापलें]

आहाकार—पु. ओरड, हाकाटी; अहः+कार पहा. 'गोफणीसी गुंडा घाली पागोऱ्याच्या नेटें। पळती आहाकारे अवघीं पाखरांचीं थाटें., –तुगा ३५९. [सं. अहह+कृ; हा.+कार]

आहाच, आहाचवाहाच, आहाचवाणा—क्रिवि. अहाच वहाच पहा. १ वरवर; सरासरी; 'अग्नि ऐसें आहाच। तेजा नामाचें आहे कवच।'–ज्ञा ७.३६. 'तेथ अचेत चित्ताचा सांगातु। आहाचवाणा दिसे मांडतु।'–ज्ञा ८.९५. 'आहाच पाहतां कळेना।'–दा २०.३.१४. 'नव्हे करणीचा आहाच। जीवें पायीं जडली साच।'–ब ५२३. २ सहज; सहजगत्या; उगींच. 'आहाच सांपडतां धन। त्याग करणें मूर्खपण।'–दा ७.१.३५. 'पहिलेचि आहाचवाहाच उठलिया।'–रामा १०.१७१. ३ खोटें; व्यर्थ. 'तैसें असतेपणें आहाच।'–ज्ञा ८.३१. 'मी प्रकटलों हें ऐसें। बोलणें तें आहाच दिसे।'–एभा १४.८९. 'तरी हे गोष्टी आहाच दिसे।'–यथादी ४.६५६.

आहाडून पाहाडून—क्रिवि. आडूनपाडून. अहाडूनपहाडून पहा. 'आहाडे पाहाडिगे वायुगेचि झगडे।'–निगा ७६.

आहाण—वि. १ उक्त; उचित. 'यज्ञहवि यागादिकीं क्रिया।' आहाण तेचि धनंजया।'–राज्ञा १६.३७४. [सं. आहूतस्या; आख्यात; आह्=बोलणें]

आहाणा—वि. आत्मघातकी; हानि करणारा. 'आतां हा ऐसा अळेहरिजे। मग नाथिलें शोचूं बैसिजे। तरी आपण आहाणा होईजे। मागपेयीं।'–ज्ञा २.१९६. [सं. आ+हन्; प्रा. आहाण]

आहाणा—पु. १ म्हण; उक्ति; उखाणा. अहाणा, आहणा पहा. 'म्हणोनि खाण तैसी माती। आहाणा लोकीं प्रसिद्ध।'–सुआदि १६.१७४. 'पुण्य करितां ऊन लागत। हा आहाणा बोलती जनांत।' –मक ७.१०७.

आहार—पु. १ अन्न; शरीरपोषकद्रव्य; खाद्यपदार्थ. 'आहार तरीं सेविजे।'–ज्ञा ६.३४९. २ खाणें; जेवणें; भोजन करणें. सामासशब्द–फलाहार; दुग्धाहार; धान्याहार; इ० म्ह० 'आहारीं व्यवहारीं भीड नसावी.' 'माझा आहार तुटला.' ३ नेहमीं खाण्याचें प्रमाण; शेर. 'त्याचा दोन शेराचा आहार आहे.' ४ अन्न खाण्याची विशिष्ट शक्ति; मुखानें जेवढें अन्न पचतें तें. 'जसा आहार वाढवावा तसा वाढतो.' **आहारीं असणें**–ताब्यांत, आटोक्यांत असणें. **आहारीं पडणें-जाणें**–ताब्यांत, वचस्वाखालीं जाणें. 'बरवें झालें आजीवरी। नाहीं पडलों मृत्याचे आहारीं।'–तुगा ७१७. **आहाराखालीं, आहारीं आणणें**–ताब्यांत आणणें; कह्यांत आणणें. [सं.]

आहार—पु. १ (व. ना.) निखारा; विस्तव; फोपाटा; 'चुलींतून आहार काढ व हातपाय शेक.' २ स्त्री; कपडे कडक करणें; (क्रि. देणें.) [सं. आ+हृ]

आहार—अजगर. अहार आर पहा.

आहारणें—१ आरणें; अहारणें पहा. २ खाऊन, गिळून टाकणें. 'मासाचे लचके तोडून या पिशाचानें आहारून टाकले आहेत' –एकचप्याला नाटक.

आहारपानगा—पु. निखाऱ्यांवर भाजलेली लहान भाकरी; पानगा; आहारोळी; रोट; खाकरा; गाखर. [आहार=निखारा+पानगा=पोळी]

आहारी—वि. उपजीविका करणारा; खाणारा; खाऊन राहणारा. सामाशब्द दुग्धाहारी; फलाहारी; मत्स्याहारी; शाकाहारी.

आहारोळी—स्त्री. निखाऱ्यावर भाजलेली पोळी. अहारोळी पहा.

आहार्य—वि. बळेंच अंगीकारलेलें; अनुमानिलेलें, कल्पिलेलें, (चुकीनें, किंवा मुद्दाम) आरोपिलेलें; कृत्रिम. **०निश्चय**–पु. भलता ग्रह; चुकीची, खोटी समजूत, कल्पना. **आहार्यारोप**–पु. चुकीचा ग्रह धरून चालणें; बुद्धया वेगळी समजूत घेऊन व्यवहार करणें जसें:–एखाद्या मनुष्यानें राक्षसाचें सोंग घेतलें आहे असें समजले असतांहि आहार्यारोपानें त्यास राक्षस समजून त्या भावनेनें त्याशीं वागणें.

आहाव—पु. (श्रौतकर्म) यज्ञांत होता शंसन (शस्त्र पठण) करतो त्यामध्यें 'शोंसावो' असा मंत्र म्हणतो त्यास आहाव म्हणतात. [सं.]

आहाळ—पु. १ खळगा; कुंडी. आहळ पहा. २ (चांभार धंदा,) कातडी टांगण्याचें कुंड, खळगा.

आहाळ—पु. १ आहार; विस्तव; आग. आहार पहा. 'गुंफिला ज्वाळांचिया माळा। लेयिलियाही अवळा। भेदाचिया आहाळां। काय पडणें आहे।'–अमृ ७.१३६. २ (ल.) दुःख.

आहाळणी, आहाळणें—क्रि. १ भाजणें; पोळणें. अहाळ्णी, अहाळणें पहा. 'जेवि तीव्र अग्नींत शिरतां तेथें । आहाळेना कैसें म्हणावें ।' –नव १५.६६. २ (ल.) ताप; दुःख; त्रास. 'आहाळण्या किती सोसुं या च्यारी ।' –पला ८२.

आहाळणें—क्रि. (व.) अटणें अळणें पहा. 'दूध आहाळलें आहे.'

आहाळणें—अक्रि. हालणें. 'पाठी निवृत्ति कंठीतळें। आहाळी ते पूजा विधुळे ।' –ज्ञा १७.७. [सं. आ+हल=लोळणें, हालणें; म. हलणें]

आहाळबाहाळ—१ अहाळबाहाळ पहा. २ संपूर्ण; विस्तीर्ण; पुरेपूर. 'जेहीं आपुला संभोगकाळी। परब्रह्म भोगिलें आहाळबाहाळीं ।' –शिशु ७४५. 'दृश्य दृश्यपणें जें जें उठी। तें ते निजात्मता पाठीं पोटी। तेणें अन्वयें देवो देखे दृष्टी। आहाळबाहाळ सृष्टि दुमदुमित ।' –एभा ३.४८०.

आहाळीव—अहळींव पहा.

आहिक्य—न इहलोक; ऐहिकता 'तुका म्हणे आम्हा आहिक्य परत्रीं। नाहीं कुळगोत्री तुजवीण ।'–तुगा ५०० [सं. ऐहिक अप.]

आहित—वि. ठेवलेलें; स्थापित केलेलें, बसविलेलें; आधान केलेलें. [सं. आ+धा–हित]

आहिताग्नि—पु. ज्यानें अग्न्याधान केलें आहे तो; अग्निहोत्री. –वि. अग्निहोत्र्यास लावावयाची पदवी. [सं.]

आहिर मासा—पु. (माण) अंगाला चिकट बळस असणारा मासा. अहीर अर्थ २ पहा

आहिर्णी—स्त्री. ऐरणी, वंशपात्र; लग्नांतील झाल. 'तंव ते आहिर्णीचा समय ।' –वेसीस्व १३.६ [सं. ऐरिणी अप.]

आही—स्त्री. उन्हाची झळ; तिरीप. अही पहा.

आही–ही—स्त्री. (काव्य) १ ज्वाला; आग. अही पहा. (अव.) आह्या. 'येती उष्णाच्या आह्या । पार्थी लाह्या भाजती ।' –अमृत ध्रुवच ५. 'वियोगाची कोण भोगील आहे ।' –नरहरि दानव्रत ९८. २ कांति; शोभा. 'रूपाचेनि आहे । ऐसावतु पाणि वाहे ।' –शिशु ५०८. [सं. अहि=सूर्य, सं. आभाः प्रा. आहा=कांति]

आहुति–ती—स्त्री. आहुत (विप्र) १ देवतेप्रीत्यर्थ अग्नींत हवन करावयाचें किंवा जळांत, भूमीवर टाकावयाचें द्रव्य (चरु, घृत, तीळ इ.); अवदान २ बळी; भक्ष्य. 'आहुत देऊं पंचवीस माणसांची' –ऐपो ६०. 'ज्या कोणावर माझी नजर जाई त्याची आहुती मी स्वतः घेत असे.' –विवि (१८७६) ८.१५५. ३ (ल.) समूळ नाश; नायनाट; सप्पा; धव्वा. 'प्लेग, दुष्काळ वगैरेनीं त्याच्या सर्व घराद्राची आहुति घेतली.' ०घेऊन उभा असणें–राहणें–नाश करण्यासाठीं टपणें; नाश करण्याची वाट पाहणें. 'तो त्यासाठीं आहुति घेऊन उभा आहे.' ०देणें–१ बली देणें; बलिदान करणें; २ अग्निकुंडांत अवदान टाकणें; यज्ञ करणें. ३ (ल.) नाश करणें; बुडविणें; संकटांत टाकणें; नुकसान करणें. 'त्यानें तिची आहुति दिली.' [सं. आ+हू]

आहूत—वि. १ बोलाविलेला; आमंत्रिलेला; आव्हान केलेला. [सं. आ+व्हे] –स्त्री. आहुति (अप.)

आहृत—वि. आणिलेला; हरण केलेला. [सं. आ+हृ]

आहे—क्रि. (अस्तित्व दर्शविणारें) असणें या क्रियापदाचें वर्तमानकाळाचें रूप. **आहेआहे नाहीनाही**–एखाद्या गोष्टीचें अस्तित्व किंवा व्यवहार ज्या वेळीं क्वचितच असतो किंवा असून नसल्यासारखा असतो त्या वेळीं हा वाक्प्रचार योजितात. 'तो आहेआहे नाहींनाहीं' =त्याचें अस्तित्वच भासत नाहीं, त्याला कोण विचारतो?' 'अशौचामध्यें स्नानसंध्या म्हणजे काय, आहेआहे नाहींनाहीं.' [सं. अस्ति; प्रा. अत्थि, आथि]

आहेत, आहेता–ती—क्रि. असणें या क्रियापदाचें वर्तमान काळीं तृतीयपुरुषीं अनेकवचन. 'आहेता सरिता उदंड सरितानाथासि कांता प्रिया ।' –निमा (भागीरथीस्तोत्र) १.२८. 'हंस आहेती ऐकिलें तुंवा हि ।' –नल ११०.

आहेपण–णा—न पु. १ अस्तित्व. २ तथ्य; सत्य. 'वल्गालंकार दोनी । नसोनि भासती आहेपणीं ।' –निमा (आत्मचरित्र १०५) पृ. ९७.

आहेर—पु. १ अहेर पहा. २ (व.) कुणबी लोकांत श्राद्धपक्षाच्या दिवशीं देवस्थानीं ज्या ब्राह्मणास बसवितात त्यास म्हणतात. याचा बाप जिवंत असावा लागतो.

आहेव—वि. सधवा. अहेव पहा. 'आहेव मीं गर्भीणपणें । हें सांगणें का लागे ।' –तुगा १२७. ०**तंतु–दोरा–मणि**–पु. मंगळसूत्र. 'कीं अजय झालें रणीं । सखे साजणी । आहेवमणी तुटून पडला ।' –पला ४९. ०**पण**–न. सौभाग्य.

आहो—अहो पहा.

आह्निक—न. १ ब्राह्मणाचें रोजचें (स्नानसंध्यादि) धार्मिक कृत्य; नित्यकर्म; उपासना. २ सामान्यतः नित्यकृत्य; रोजचा उद्योग. [सं. अहन्=दिवस]

आह्लाद—पु. आनंद; संतोष; उल्हास; हर्ष. [सं. आ+ह्लाद्]

आह्लादक—वि. आह्लाद–आनंद देणारा; आनंददायक; उत्साहदायक; उत्साहकारक. [सं.]

आह्लादणें—उक्रि. (काव्य) आनंदणें; संतोष पावणें; उल्हासणें. 'संफुल्लसारसमुखीसखीसंघ नयनकल्हारीं आह्लादला ।' –आसी ६०. [सं. आह्लाद्]

आह्लादन—न. आह्लादणें; आनंदणें; उल्हास; आनंद; संतोष. [सं. आह्लाद]

आह्लादित—वि. आनंदित; उल्हासित; हर्ष पावलेला.

आह्वाता—वि. बोलावणारा, हांक मारणारा. 'माझ्या सज्जनेंसि मातें। पैशुन्याचेनि आह्वाते।' –ज्ञा १८.१४९९. [सं. आ+ह्वे=बोलाविणें]

आह्वान—न. १ आमंत्रण; बोलावणें; पाचारणें; आमंत्रणें. २ सामन्यास, वादविवादास, युद्धास, निमंत्रण; (इं.) चॅलेंज. 'मी त्यांस आह्वान करून सांगतों कीं जी काय माझी निंदा करावयाची असेल ती घारपुरे यांनीं खुशाल करून घ्यावी.' –केले १ ३६३. ३ नांव; संज्ञा; नाव देणें. [सं. आ+ह्वे]

आह्वानणें—उक्रि. १ (काव्य) बोलावणें, हांक मारणें. पाचारण करणें. 'इंद्रादि अष्टो लोकपाळ। आह्वानूनियां सकळ।' –एभा २७.२६७. २ युद्धास–सामन्यास वगैरे आमंत्रण देणें. ३ नांव देणें; नांव ठेवणें; संज्ञा देणें.

आळ—पु.स्त्री. १ आरोप; कुभांड, दोषारोप; अपवाद (क्रि० घेणें; घालणें; येणें). 'तो आळु नोहे अनुरोधी। बोलतया।' –ज्ञा १५.२३०. 'वरी न असदुक्तिहे रविसखोत्पिता आळखी।' –केका ८. म्ह० एक आळ आणि एक महाआळ=एखादा खोटा दोषारोप आला कीं त्याच्या पाठोपाठ मोठी नुकसानी आलीच म्हणून समजावें. २ (ल) केवळ बाह्य स्वरूप; सोंग; छाया, सादृश्य; निमित्त; नांव. 'नैवेद्याचा आळ। वेचे ठाकणीं सकळ।' –तुगा १३९९. ३ आभास, जसें– पुरुषाचा आळ मात्र; ब्राह्मणाचा आळ; शिपायाचा किंवा शिपाईगिरीचा आळ इ०. [सं. अलीक=असत्य; सं. आल=लबाडी]

आळ—पु.स्त्री. १ हांव; इच्छा; आवड; छंद; लट्ट. 'बालकें अघटित घेतां आळ। माता पुरवी तत्काळ।'–भरि १.१३. 'आळ घेतली न राहे।' –पाळणे (जोगी) १९. (क्रि० घेणें; पाळणें; पुरविणें) [का. अळु=रडणें]

आळ—पु. (राजा.) बांधण्याची वस्तु. आळा पहा.

आळ—स्त्री. गद्दी; रांग; ओळ. अळी, आळी पहा

आळ—स्त्री. (गो.) रोपटें (फणसाचें वगैरे)

आळ—पु. १ मजूर; गर्डी. २ मजुरी. [का.]

आळ—न. किंमत, वजन, माप दर्शक चिन्ह. अळें पहा. [का. आळि=वर्तुळ]

आळई—स्त्री. अळी; कीड; अळई पहा. 'लहान पराई उंबर कवळी वर्षे बारा तेराची। प्रत्यक्ष आळई बोराची।' –पला ४.४१.

आळका—अळका पहा.

आळकेपण—अळकेपण पहा. 'गोडप्रासीं आळकेपण। अत्यादरे पिंडपोषण।' –दा २.५.३१.

आळंगणें—सक्रि. आलिंगन देणें; मिठी मारणें. 'घेतां स्पर्श सुखाची गोडी। तेवें श्रीकृष्ण आळंगिला भुजादंडीं।' –शिशु ६०. [सं. आलिंगन]

आळंगेविळंगें—अळंगेविळंगे पहा.

आळंच—पु. आळस; अळंटळं. 'आळंच न करावा।' –सूत्रपाठ आचार उत्तरार्ध १६६. [सं. अलं+च]

आळंच—स्त्री. मसलत; खल; विचारविनिमय. 'मेळउनि सकळाप्रती। राजा करी आळंचु।' –खिपु १.१५.४.

आळण, आळणी, आळणें—अ मध्यें पहा. 'वडपापड आळणें। वर वाढिलीं सुवर्ण वरणें।' –वसा २७.

आळणा—पु. (कु) पंखा. 'आळणा आहे तर द्या! वारा सुटीच नाहीं [अळणें]

आळणी—स्त्री. वाळणें, सुकणें (अन्नपाण्यावांचून). 'अन्नवर्जवीण आळणी। या नांव आदिसूतिक।'–दा ३.७.२४. [अळणें]

आळणी—वि. बेचव. निरस (भाषण, मत). अळणी पहा. 'लोकमताचा आळणीपणा कसा घालवावा हा महत्त्वाचा प्रश्न आहे' –टि ३.४.

आळणें—सक्रि. आळा घालणें, ताब्यांत ठेवणें, आकलन करणें. आळा पहा. 'मनुष्यें सकळांस आळिलें।' –दा २०.५.२४.

आळणें—घट्ट, दाट होणें; आटणें. अळणें पहा. 'ऊंस गाळिलिया रस होये। तो ठेवितां बहुकाळ न राहे। त्याचा आळूनिया पाहे। गूळ होये सर्पिंड।' –एभा १६.१८. दुधें आळूनि केलीं दाटें।' –सुवन ११.

आळता-ती—वि. आळविणारा; आलाप घेणारा (गाणें म्हणून वगैरे). 'आळती गानी सरस्वती। गंधर्वराऊ।' –शिशु ५१. [आळविणें, का. आळती=गाणें; सं. आलापन, प्रा. आलावण]

आळपणें—सक्रि. आवळणें, अळपणें पहा. 'दुर्मोच्च मोहपाशें आळपिली घट्ट केधरा ज्याची।' –मोवन ३.८२.

आळपे—पु (व.) १ अंतर, फट. २ (अव) अन्नाचे मोठाले व गडबडीनें घेतलेले घांस. [सं. आ+लप्–लृ?]

आळमाळ—वि. अल्प. अळुमाळु पहा. 'एकादिया आळमाळा। श्रीगुरुचिया खेळा।' –ज्ञा १३.४४१.

आळमेळे—न (गो.) अपशकून. खोडमेळ पहा

आळवण-णी—स्त्री. १ हांक; बोलावणें. २ विनवणी; प्रार्थना. 'त्याची आळवण केल्याशिवाय मी केव्हांहि पुढें पाऊल टाकलेलें नाहीं।' –तोवं १३८. 'मागतिया भांडवल आळवण। नामासी जतन दातियासि।' –तुगा १०९३. –न. (व.) अळविण्याचें गाणें; स्तोत्र. अळवण पहा. [अळवणे]

आळवण—न. पदार्थ घट्ट होण्यासाठीं लावलेलें पीठ. अळवण पहा.

आळवणें, आळविणें—सक्रि. अळविणें पहा. 'जयातें आळविजे स्वभावें।' –ज्ञा ८.३६.

आळवणें—क्रि. १ अळविणें, आळणें पहा. 'सुंदर आळविल्या खिरी।' –वसा २७.२ कंठणें; घालविणें. 'कांहीं दिवस दुःखांत आळविले।' –ऐपो २०९.

आळवा—वि. (राजा.) लहान; कोवळें; लाड करण्याजोगें; आळविण्या–आळ पुरविण्या–जोगें (मूल). [अळविणें]

आळवातीप्र—स्त्री. (गो.) अशक्तीण; हडळ. अळवंत पहा.

आळवा वेंठ—स्त्री. (गो.) गलितगात्र; निष्प्राण; अशक्त. [अळवा=अळू+वेंठ=वेठ]

आळवार—पु. दक्षिण हिंदुस्थानांतील प्राचीन वैष्णव संतकवी. हे १२ असून त्यांच्यांत नम्माळवार हा प्रमुख होय. [का. आळ्वर=दीन; क्षुद्र; नम्र]

आळवाळ—न. अळें. आलवाल पहा. 'अथवा विनाशाचें फळ। दुसरें एक नाशाचें मूळ। विशेषनाशाचें आळवाळ। स्त्री केवळ ओळख पा॥' –एभा ८.११८.

आळशी—स्त्री. जवस. अळशी पहा.

आळशी–सी—वि. सुस्त; निरुद्योगी; मंद; मट्ट; आलस्ययुक्त; कामचुकार; ऐदी. [सं. आलस्य] **म्ह**० १ आळशा दुणें काम, लोभ्या दुणा खर्च. २ आळशास त्रिलोकांचें ज्ञान. **आळशाघर गंगा येणें**–(शब्दशः) गंगास्नानानें प्राप्त होणाऱ्या पुण्यप्राप्तीसाठीं लोक गंगास्नानास दूरवर जातात परंतु एखाद्या आळशाच्या जवळ गंगेचें पात्र येणें आणि त्यास स्नान घडणें. (ल.) एखाद्या नालायक मनुष्यास नसतें महत्त्व येऊन चांगल्या मनुष्यास त्याच्या (नालायकाच्या) कल्याणासाठीं त्याच्याजवळ जावें लागणें वा अशी ही म्हण योजतात. किंवा त्याची लायकी नाहीं अशास अनायासें चांगली संधि येणें या अर्थी. 'गंगा आली आळशाघरीं। आळशी देखोनि पळे दुरि।' –तुगा. ३ आळशाला गंगा, पाण्याला पंढरपूर=प्रयत्न न करणाऱ्यास अनायासें एखादा लाभ होणें. **आळशांचा मायबाप-राजा**–अत्यंत आळशी मनुष्यास म्हणतात. (स्त्री. रूप) आळसिणी. 'एकी ओंगळा आळसिणी। एकी त्या महा डाकिणी।'–एभा ७.६५. अळसिणी पहा.

आळस—पु. १ केवळ सुख असलें म्हणजे झालें, त्याबद्दल वेळेचा विचार नसणें, दुःख देहासंबंधीं विशेष आतुरता नसणें व काम करण्याची अंगांत धमक असून तें करण्याविषयीं मन प्रसन्न नसणें या अवस्थेस आळस म्हणतात; सुस्तपणा; उद्योगाविषयीं कंटाळा, नावड; मंदपणा; मट्टपणा; थिल्लरपणा. **म्ह**० १ आळस भिकारी, कुटुंबाचा नाश करी. २ आळसें काम नासतें। हें तों प्रत्ययास येतें. –दा १८.७.४. २ हगवण; दुर्लक्ष; अळंटळं; टंगळमंगळ. [सं. आलस्य प्रा. आलस्स]

आळसट—वि. आळशी; मंद; सुस्त; मट्ट. **०पणा**–पु. आळस; सुस्तपणा. –पपे २४८. [आळस]

आळसडा—वि. आळशी; आळसट; निरुद्योगी.

आळसणें—अक्रि. १ आळशी होणें; आळसावणें; आळसानें युक्त होणें. २ (व.) खिन्न होणें; मलूल होणें. 'आईबापांचें मूल आळसलें.' [आळस]

आळसभोंडारा—वि. आळशी; मंद; मट्ट; जड; विशेषेंकरून हा शब्द वयामुळें जड, आळशी झालेल्या माणसास लावतात. [आळस+भोंडारा=म्हातारा]

आळसमळस—क्रिवि. (गो.) ऐसपैस.

आळसाई—स्त्री. १ आळशीपणा; आळस; हयगय; ढिलेपणा; निरुत्साह. (गो. रूप आळसाय) कसर येणें; ताप येण्यापूर्वीची अवस्था. (डोकें जड होणें इ.)

आळसावणें—अक्रि. आळसणें; आळशी, मंद, सुस्त होणें, बनणें. 'गोदी आळसावून खोबाजवळ उभी होती.' –मोरप्रहसन ३३.

आळसुंदा—स्त्री. मोठी चवळी. अळसंदा पहा.

आळा—१ बंधन; बांधण्याची, आवळण्याची, बांधणारी वस्तु. नियंत्रण करणारी गोष्ट; दोर; बंद, जसें–केळीच्या पानांस बांधण्याचा सोपटाचा बंद; गवताचा भारा बांधण्याची गवताची दोरी. 'हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें। काय तेथें गोडें निवडावीं।' –तुगा २८०२. २ (ल.) नियंत्रण; बंधन; संयमन; दाब; मर्यादा; भाडकाठी; धरबंध. (क्रि० घालणें; तुटणें). 'एकीचा धंदा दुसरी जात करणार नाहीं असा आळा पडला' –गागा २६. ३ (व.) एकी; जूट. 'कुणब्यांचा आळा'. [सं. आलान (धातु ली)=सांखळी, बंधन, किंवा म. अळणें] **०घालणें**–मर्यादा, नियम, बंधन घालणें; आटोकयांत ठेवणें; व्यवस्था लावणें. 'घालील महाराष्ट्राला निरभिलाष आळा कोण–यापुढें।' –विक ९. **०पिळणें**–गाडीची आखरी आणि साटा यांना बांधणाऱ्या आळ्याला आळेदांडीनें पीळ घालणें. **आळ्यांत असणें–घागणें–राहणें–चालणें**–धाकांत, कह्यांत, ताब्यांत असणें. 'ती भाषा व्याकरणाच्या आळ्यांत राहण्यास विशेष योग्य असते.' मराठी व्याकरणावरील निबंध (कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत) १०. **आळ्यांत आणणें**–ताब्यांत, कह्यांत ठेवणें. नियमन करणें; नियम व्यवस्था लावणें. 'जॉन्सन यानें कोशरचना करून तीस (इंग्रजी भाषेस) आळ्यांत आणण्याचा प्रचंड उद्योग आरंभून तो एकटयानें शेवटास नेला.' –नि ५५६.

आळाटाळी—स्त्री. ढिलाई; वेंगटपणा; बेफिकिरी; अळंटळं. [अळंटळं–आळा टाळणें]

आळाटोळा—पु. आटोका; अंदाज; पकड; आवांका. 'ही गोष्ट माझ्या आळ्याटोळ्यास आली असती मी करीन.' [आळा द्वि.]

आळाबांधा, (क्रं.) **आळेबंध**, (गो.) **आळाबंद**—पुंकी. आटोका; अधिकार; ताबा; मर्यादा; नियंत्रण; शासन; अंमल;

व्यवस्था. (क्रि० येणें; आणणें; चालणें.). ' हें आतां आळाबांधा येणें कठिण दिसलें.' **आळाबांधा कहाडप**–(गो.) १ (एखादें काम) उस्कीत आणणें. २ (पातळ पदार्थे) घट्ट करीत आणणें; आटविणें; आळावप. [आळा+बंध]

आळाशी—(व.) अळशी, अळाशी पहा.

आळास—पु. (गो.)मोठ्यानें रडतांना कोंडून धरलेला श्वास. **०परतणें** (पतुंवप)–रडतांना श्वास कोंडून धरला असतां होणारी अवस्था. [का. आळु=रडणें; आळु कूसु=रडणें रडका (मुलगा); किंवा आळा+श्वास ?]

आळिक—वि. क्षुल्लक. ' हें अवघेच विचारितां आळिक.' –भाए ७०. [सं. अलीक=थोडें]

आळिका—स्त्री. (अव.) अळी; कृमि; कीटक. अळिकां पहा. ' आळिका म्हणती आमुचें घर । काष्ठामधें । ' –दा १.१०.३८. [सं. अलीक=क्षुद्र; का. आळि=वतुंळ; तुल० सं. अलि=विंचु]

आळिका—वि हट्टी; हांवरा. अळका पहा. ' अधीर आळिका अनाचारी, अंध पंगु खोंकलेकरी । '–दा २.३.३३. ' बालक देखोनियां आळिकें । कीर्तनाचिया कौतुकें । ' –अमृत ध्रुवच १४. [अळका]

आळिता—अळता पहा.

आळियाडें—न. हट्ट; छंद; अळि, अळका. ' पाहां पां माते तुम्हांसांगडें । माहेर तेथें सुरवाडें । ग्रंथाचें आळियाडें । सिद्धी गेलें ।' –ज्ञा १८.१७७५. [अळि]

आळी—स्त्री. गल्ली, ओळ. अळी पहा. **०कर**–अळीकर पहा.

आळी—स्त्री. कीड. अळी पहा. ' कीं अधर्माची आळी वाढे । पीक बुंडे तेणेंही । ' –एभा १०.५१५.

आळि–ळी–ळु—स्त्री. १ हट्ट; छंद; रळी; (लहान मुलांची) तीव्र इच्छा, हेतु, मनीषा, लाड. ' तें आळि करौनि मागे जेवण । '–दाव २९६. ' आळी घेऊन जन्मा आले. किरे एक प्राणी । '–दा ९.८.२३. ' एके दिवसीं प्रातःकाळीं । कृष्ण घेऊन बैसला आळी । '–ह ६.६. २ लडिवाळपणाचें, हट्टाचें भाषण. ' आळि बोलैति धातुटें विदावंतीसी । ' –शिशु ३५३. [का. आळु=रडणें] **०कर**–वि. १ हट्टी; छांदिष्ट; हेकेखोर (लहानमूल). ' आळिकर त्याचें कृपिसी समाधान । अभयाचें दान देवोनिया । ' –तुगा ५२१. [आळ=हट्ट]

आळीपाळीनें—क्रिवि. एकामागून एक; आलटून पालटून; आवदून बदलून. [आळी=रांग; किंवा पाळी, छि.]

आळींव—अहळींव पहा.

आळुकणें—क्रि. तीव्र इच्छा असणें; हपापणें. ' जिहीं आपपणें नाहीं देखिलें । तेचि इहीं इंद्रियार्थी रंजले । जैसें रंक का आळुकलें । तुषालें सेवी । ' –ज्ञा ५.१९०४ [अळकणें पहा.]

आळुका–की—वि. अळका पहा. ' कैसी स्वसुखार्थी आळुकी । जे दोनीपणें भिडोनि एकीं । ' –अमृ १.५. ' म्हणे पतीं भुंकेची आळुका फार । यासि न होय निराहार ।' –महिकथा ३३.१५३. ' परी क्षुधेचा आळुका बहुत म्हणवोनें । नये घडोनि सर्वथा । ' –महि कथा ३५.१६९.

आळुकेपण—न. आसक्ति; हांव; हांवरेपणा; छंद; लोभ. ' ते आळुकेपणें जडली । अति संत्वर श्रीकृष्णि । ' –रास ४.७२. ' तेवं आळुकेपण ब्राह्मणें । जैसें कीजे । ' –गीता १.४९३. [अळका]

आळुकेपिळुके, आळेपिळे, आळोके पिळोके—अळेपिळे पहा.

आळुबाय—पु. (गो.) लाडिकपणा. अरवळ, अवैळ पहा.

आळुमाळ, आळुमाळु—अळुमाळ पहा. ' वांचे आलया आळुमाळ । ' –गीता २.१५८९.

आळू—न. एक माजी. अळू पहा.

आळू—स्त्री. उंसावरील कीड. ' उंसास मुख्य उपद्रव वाळवी, आळू आणि हमनी या सूक्ष्म प्राण्यांपासून फार होतो. ' –कृषि ४६३. [अळी]

आळू—न. एक जंगली कांटेरी झाड व त्याचें फळ. हें तांबड्या मातींत होतें. फळ सुमारें पेरूयेवढें अधुम पिकल्यावर तपकिरी रंगाचें होतें. त्यास एक प्रकारचा वास येतो. अळू पहा.

आळें—अळें पहा. ' शरीर विटाळाचें आळें । मायामोहपाश जाळें । ' –तुगा ७३९.

आळेण—न.(गो.) आमटी वगैरे कालवण घट्ट होण्यासाठीं लावावयाचें पीठ. अळण पहा.

आळेपिळे—पु.अव. अळेपिळे पहा. ' अभिमानाचे आळेपिळे। महत्त्व उमासे वेती बळें । ' –एभा ८.२१२.

आळेवणें—अकि. (गो.) (अळणामुळें आमटी) दाट होणें. [अळणें]

आळोंच—स्त्री. कानगोष्ट; कानमात. ' बहि–यांचा घरी कवण कवणा आळोंचु सांगे । ' –भाए ५५४. [सं. आ+लोच्]

आळोंचणें—अकि. हळूच कानांत सांगणें, बोलणें; कानगोष्टी करणें. ' हितगुज आळोंचासी । हृदयींचें गोड सांगावयासी । ' –एभा २४.३०१. ' तो मेणो काइ आळोंचोनि गेला । ' –भाए ६२. [सं. आ+लोच्]

आक्षिप्त—वि. १ आक्षेप केलेला, घेतलेला; नामंजुर केलेला; अडथळा–हरकत आणलेला (वादविवादांत प्रतिपक्ष्यानें अडवलेला). २ अमान्य. [सं.]

आक्षिप्त–अंगहार—न. (नृत्य) तूयुरकरण करून विक्षिप्तकरण करणें, मात्र या करणांत हातपाय सारखे पुढेंच फेंकणें; व अलाता, विक्षिप्त, उरोमंडल, नितंब, करिहस्त, व कटिच्छिन्न हीं कामलें करणें. [सं.]

आक्षिप्त(करण)—न (नृत्य) हात व पाय भराभर पुढच्या बाजूस फेकणें. [सं.]

आक्षिप्तरेचित(अंगहार)—न. (नृत्य) हात पाय रेचित करून स्वस्तिकें करणें, मग तीं स्वस्तिकें मोडून पुन्हां रेचित व स्वस्तिक करून हात, पाय पुन्हां रेचित करणें. नंतर रेचितावर येत असणारे पाय उडी मारल्यासारखें करणें, नंतर उद्धत, आक्षिप्त, उरोमंडल, नितंब, करिहस्त व कटिच्छिन्न करणें हीं क्रमानें करणें. [सं.]

आक्षिप्तरेचित(करण)—न (नृत्य) डावा हात हृदयावर ठेवून उजवा हात दूर करून रेचित करणें, नंतर तो रेचितहस्त तोंडासमोरून डोक्यावर नेऊन उचलून धरणें. [सं.]

अक्षिप्तिका—स्त्री. (संगीत) स्वरांत, तालांत लिहिलेली चीज; (इं.) नोटेशन. [सं आ+क्षिप्]

आक्षेप—पु. १ ओढणें; खेंचणें; आकर्षणें. 'लगाम हातीं असला म्हणजे घोड्याचा पाहिजे तेव्हां आक्षेप करावयास सांपडतो.' २ (ल.) मोहित करणें; आकर्षिलेली किंवा मोहित अवस्था. 'त्याचें चित्त परमार्थाकडे लागलें आहे, त्यास विषयाच्या गोष्टी सांगून त्याचे चित्ताचा आक्षेप करूं नका!' २ ओढून धरणें; मागें घेणें, आढेवेढे घेणें; शंकाकुशंका काढणें; आवश्यक म्हणून वाट पाहणें; खोळंबून राहणें (एखादा माणूस किंवा वस्तु नाहीं म्हणून); अडून बसणें. (क्रि० घेणें, धरणें). 'कोणाचा आक्षेप न घेतां स्वतः फडशा करीन.' 'हा माल गिऱ्हाईक आला म्हणजे विकून टाका, माझा आक्षेप धरूं नका.' ३ (ल.) अनुमान निघणें; मोबत, बरोबर येणें; बरोबरच बोध होणें; ध्वनित, गर्भित असणें; गर्भितावस्था. 'माझें ऋण घेतलेंस तें दे—या वाक्यांत ऋणानें व्याजाचा आक्षेप होतो.' ४ हरकत; आडखाटी; विरोध. (वादांत प्रतिपक्ष्याचा मुद्दा किंवा बाजू). 'त्यांनीं घेतलेले आक्षेप धडधडीत खोटे आहेत.'—केले १.३६१. ५ शंका; संशय; शंकाप्रश्न. 'श्रोतयांनीं आक्षेप केला.'—रावि ३. ६ आग्रह; हट्ट; सूचना. 'नाहीं ग्रंथारंभसंकल्प। नव्हता श्रोतयांचा आक्षेप। ग्रंथीं उजळला कृष्णदीप। मुखरूप हरिकथा॥' —एरुस्व १८ ६९. 'दुर्योधनेंही आक्षेप। केला असे भेटीचा।' —मुसभा १३.४९. ७ निंदा; कुटाळी; दूषण; टपका. ८ एक अलंकार (व्याजोक्ति—व्यंजोक्तीप्रमाणें); एखादा आक्षेप घेऊन तो खोडून टाकण्याचें वर्णन असतें तेथें आक्षेप अलंकार होतो. बोलावयाचें तें अर्धवट बोलून एखादा विशेष अभिप्राय व्यक्त केला असतो तेथेंहि हा अलंकार होतो. जसें—नसेन दिसलो कसा नयनसवैसाक्षी रवी। विषाद धरिला म्हणो न सुरभी विषक्षीर वी।' —केका ४. [सं. आ+क्षिप् = फेकणें]

आक्षेपक—वि. आक्षेप घेणारा, काढणारा. —पु. वातरोग; मज्जातंतूंचा रोग; आंचके; आंकडी; (इं.) कन्व्हल्शन; [सं.]

आक्षेपणें—उक्रि. (काव्य) ओढून घेणें; आकर्षणें; चटक ढावणें. २ हरकत घेणें; नामंजूर करणें; अमान्य करणें; ३ शंका काढणें. 'मागां श्रोतीं आक्षेपिलें। जी ये ग्रंथीं काय बोलिलें। ते सकळही निरोपिलें। संकलीत मागें॥' —दा १.१.२७. [आक्षेप]

आक्षेपार्ह—वि. दोषार्ह; आक्षेप घेण्याजोगें. [सं.]

आक्षेपून—क्रिवि. (काव्य) निक्षून; प्रत्यक्ष बजावून; बुद्धिपुरःसर; मुद्दाम; जाणून बुजून; आवर्जून. [आक्षेप]

आक्षै—क्रिवि. अक्षय (अप.) 'कीं हें सुखाचीं तारुवें लोटलीं। आक्षै आनंदें उतटलीं।' —दा १.७.३१.

आज्ञप्त—वि. आज्ञापिलेला; हुकूम केलेला; सांगितलेला. [सं. आ+ज्ञा]

आज्ञप्ति—स्त्री. आज्ञा पहा. 'आमात्यराज, ही विज्ञप्ति कां? आज्ञप्तीच मी समजेन' —चंद्रगुप्त २०१.

आज्ञा—स्त्री. १ हुकूम; आदेश; ताकीद. सामाशब्द—राजाज्ञा; शास्त्राज्ञा; वेदाज्ञा इ० २ वेद, शास्त्र इत्यादिकांना म्हणतात. —मनको. ३ होय, बरें, इच्छेप्रमाणें करतों या अर्थी. वरिष्ठांनी आज्ञा केली असतां सेवकजन 'आज्ञा' या शब्दानें उत्तर देतात; ४ तंत्रशास्त्रांतील षट्चक्रांपैकीं एक. योगशास्त्रांतील एक भुकुटीस्थ चक्र. 'आधारादि भेदुनि। आज्ञावरी॥' —ज्ञा १८.१०३८. **०वंदणें–नमस्करणें–पाळणें**—आज्ञा शिरसामान्य करणें. 'आज्ञा वंदोनि निघाला तेव्हां' 'तयातें वोळखावया हेचि संज्ञा। जे जगें नमस्करिजे आज्ञा॥' —ज्ञा १०.३११. **०देणें**—१ कामावरून दूर करणें; बडतर्फ करणें. २ निरोप देणें. **०मागणें**(जाण्यास)—परवानगी घेणें; निरोप घेणें. **०दशक**—न. (ख्रिस्ती) दशाज्ञा; परमेश्वरानें मोशाला सीनायपर्वतावर ज्या दोन दगडी पाट्या दिल्या होत्या त्यांवरील लेखाचें नांव. पहिल्या चार आज्ञांमध्यें मनुष्याचीं देवाशीं आणि बाकीच्या आज्ञांत मनुष्याचीं मनुष्यांशीं कर्तव्यें सांगितलीं आहेत) —अनु ८.१३; १०.४. 'आणि पाटयांवर त्यानें (मोशयानें) कराराचीं वचनें म्हणजे दहा आज्ञा लिहून काढिल्या' —निगं ३४.२८.

आज्ञाकर–कर्ता–कारी, आज्ञांकित, आज्ञाधारक–धारी, आज्ञाधीन, आज्ञानुसारी–वर्ती—वि. आज्ञा पाळणारा; आज्ञेप्रमाणें वागणारा; अंकित; आश्रित; आज्ञाधारक. हा शब्द पत्राच्या शेवटीं आपली आज्ञा पाळणारा सेवक (इं. युवर मोस्ट ओबिडियंट सर्व्हंट) या अर्थी लिहितात. [सं.]

आज्ञाचक्र—न. भ्रूमध्यस्थानीं असणारें चक्र; आज्ञा अर्थ ४ पहा. 'नाकाचें अग्रसांडुनि दूरी। दृष्टी ठेवावी नासाग्रीं। ते ठायीं बैसें आज्ञाचक्रीं। योगगंभीरीं योग्यता॥' —एभा १४.४१२. [सं.]

आज्ञातिक्रम–ण—पु. आज्ञा मोडणें; आज्ञेचें उल्लंघन; हुकुमाच्या विरुद्ध जाणें. [सं. आज्ञा+अतिक्रम]

आज्ञापणें–पिणें—उक्रि. आज्ञा करणें; हुकूम करणें; ताकीद करणें; सूचना करणें. 'आज्ञापिला निजपिता वसुदेव देवें।' 'आणीक कथा राहिल्या अपार। मग रुक्मिणीवर आज्ञापी।' 'प्रियाहि

अशि जाहली तुज कुकार्य आज्ञापिती।' –केका ८३. २ सोंपविणें; स्वाधीन करणें; ताब्यांत देणें. 'प्रधानास राज्यकर्म आज्ञापून राजा आपण ईश्वराचें ध्यान करीत बसला.' [आज्ञापन]

आज्ञापक—वि. आज्ञा करणारा; हुकूम करणारा (धनी इ०)· 'वाचासिद्धि पावाल। आज्ञापक होआल।' –ज्ञा ३.९९. [सं.]

आज्ञापत्र—न. १ सरकारचें हुकूमाचें पत्र; सरकारी हुकूम; मराठी राज्यांत छत्रपतींच्या खुद्द पत्रास आज्ञापत्र म्हणत. २ (सामा.) मोठ्याकडून लहानास गेलेलें पत्र. ३ लेखी हुकूम; शासनपत्र. ४ (क्ति.) राजा, विशप वगैरे अधिकारी वर्गाकडून एक्लेसियेला अथवा मंडळीला आलेला हुकूम. 'त्याच वेळेस.....आज्ञापत्रें, आवाहनपत्रें असल्यास वाचावीं' –साप्रा ७०. (इं.) ब्रीफ. [सं.]

आज्ञापत्रिका—स्त्री. (बडोदें) सरकारी हुकूमाचें प्रसिद्धी पत्रक; सरकारी वार्तापत्रक; सरकारी गॅझेट. [सं.]

आज्ञापन—न. हुकूम करणें; आज्ञा करणें; सूचना करणें; सम जावून सांगणें; ताकीद; आदेश. [सं.]

आज्ञापनीय—वि. आज्ञा करण्यायोग्य. [सं.]

आज्ञापालक—वि. आज्ञांकित; आज्ञाधारक; आज्ञा पालन करणारा; अंकित; सेवक; अनुचर; प्रजा. [सं.]

आज्ञापालन—न. आज्ञा पाळणें; हुकूम मानणें; आज्ञांकितता [सं.]

आज्ञापित—आज्ञप्त पहा.

आज्ञाप्य—वि. आज्ञापनीय पहा.

आज्ञाभंग, आज्ञोल्लंघ, आज्ञोल्लंघन—पुन. आज्ञा मोडणें; हुकूम तोडणें; आज्ञेविरुद्ध वागणें.

आज्ञार्थ—पु. (व्या.) बोलणारा आज्ञा, उपदेश किंवा प्रार्थना करतो असा जो बोध क्रियापदाच्या रूपापासून होतो तो.

आज्ञार्थी—वि. (व्या.) बोलणारा आज्ञा, उपदेश किंवा प्रार्थना करतो असा जो बोध ज्या क्रियापदरूपापासून होतो तें क्रियापदाचें रूप.

आज्ञासिद्ध—वि. ज्याची आज्ञा सिद्ध झाली आहे असा; ज्याची आज्ञा सर्वत्र पाळली जाते असा (ईश्वर). 'मी मनें वाचा देहें। करी तें कैसें नोहे। कें मजवांचूनि आहे। आज्ञासिद्ध आन। –ज्ञा १६.३५५. [सं.]

इ

इ—मराठी वर्णमालेंतील तिसरें अक्षर; व स्वरमालेंतील तिसरा स्वर. अक्षरविकासः–मुख्य चार अवस्था. पहिली इ. स. तिसऱ्या शतकांतील अशोकाच्या गिरनार शिलालेखांत, दुसरी इ. स. ४९३. मधील एका दानपत्रांत, तिसरी हैहयवंशी राजा जाजल्लदेव याच्या कालांत व चवथी इ. स. १२७३ सुमारच्या लेखांत आढळते. –ओझा.

इ, इं—सना. हा, ही, हें. 'तें समस्तीं इहीं भोगावें।' –ज्ञा १. २१७. 'इं उनावेंनें वागाल ओह्वां आली.' =हें ऐकून वाघाला हंसू आलें –भिल्ली भाषा १७. [सं. एतत्, इदम्; प्रा. इम]

इ—चा, ची, चें, षष्ठीचा फारसी प्रत्यय. हा प्रत्यय मराठींत शके १४५० च्या सुमारास घुसला असें राजवाडे यांचें म्हणणें आहे. शके =सं. शक+फा. इ. शके १८४९ =शक+इ+ १८४९. =१८४९ चा शक. 'श्री कारवे व कोडिवले व वडिगाऊं राजमुद्रा मुख्य समस्त इ असिवादु' –शके १४२९ मधील एक पत्र. यांतील समस्त इ=चे समस्त. –भात्रिसंदृ १५. [फा]

इ॥—अ. इस्तिकबाल (अमुक काळापासून) चा संक्षेप. 'खर्च कापड इ॥ माहे रमजान उफे मार्गेश्वर.' –भात्रै १०. ३. ११६. [अर. इस्तिकबाल=भविष्यकाल]

इआ—मना. या, ह्या. 'भयानका इआ। एके न भिये एति भवभया।' –ऋ २४. [सं. इदम्. प्रा. ईअ]

इकडचा-ला, इकडील—वि. या ठिकाणचा, बाजूचा, दिशेचा, रस्त्याचा; इकडे असणारा. **इकडचा डांगर तिकडे करणें**–मोठें अचाट, अवघड काम करणें. **इकडला गड तिकडे नेऊन ठेवणें**–अर्थ वरील प्रमाणें, पण वायफळ बडबड करणाऱ्या-संबंधीं योजतात. **इकडला लुच्चा तिकडला चोर**–(व) दोन्ही-कडून थपडा खाणारा. [इकडे]

इकडचा तिकडचा—वि. या बाजूचा, आणि त्या बाजूचा; या ठिकाणचा व त्या ठिकाणचा; म्हणजे निरनिराळ्या ठिकाणचा, बाजूचा, विषयांचा; कोठला तरी; चार (अनेक) ठिकाणचा. [इकडेतिकडे]

इकडून—क्रिवि. या दिशेहून–ठिकाणाहून–बाजूकडून. (कुण. रूप) इकडनें [इकडे+हून] ०**तिकडून**–क्रिवि. येथूनतेथून; आजू-बाजूंनीं; कोठूनतरी; कसेंतरी.

इकडे-स—क्रिवि. १ या बाजूस, दिशेस. २ येथें, या जागीं. ३ घरीं; स्थानीं; कडे या अर्थी. 'त्याचे इकडे' 'माझे इकडे.' एथें पहा. [हा+कडे; का. ईकडे; ते. इक्कड, अक्कड]

इकडे—पु. (बायकी) पति, नवरा. बायका नवऱ्याचें नांव घेत नाहींत, तेव्हां इकडे (=आपला पति) ही मोघम संज्ञा योजितात. कधीं **इकडून** असाहि प्रयोग आढळतो. 'काय मेल्यांची छाती लागली आहे इकडच्यापुढें उभें राहाण्याची!'–पृच १३७. 'काळजी इकडची वाही.' –संग्रामगीतें ४९.

इकडेतिकडे—क्रिवि. येथें तेथें; या बाजूस त्या बाजूस; आसपास. –स्त्री. (ल.) टंगळमंगळ; कुचराई; लपंडाव. (क्रि० करणें; लावणें; मांडणें). **इकडे आड तिकडे विहीर**–दोन्हीकडे

सारख्याच अडचणी, संकटें असणें, व त्यांत सांपडणें. [इकडे + तिकडे]

इकर्णें, इकत, इकार—हे व यांसारखे शब्द विकणें, विकत, विकार या शब्दांत पहा. (कुणबाऊ बोलींत वरच्या जागीं इ योजितात).

इकरम—पु. देणगी; दया, कृपा. [अर. अक्राम = देणग्या; करीमचें अव. अप.]

इकरा—वि. (गो.) अकरा. [अकरा अप.]

इकरार—पु. १ कबुली; करार; ठराव. २ जबानी (लेखी किंवा तोंडी). ' पर जिल्ह्यांतील साक्षीचा इकरार घेऊन पाठवणें- विषयीं जडजाने जडजास लिहावें. ' –न्यासे ३४. [अर. इकार वचन, खात्री, कबूली] **०नामा**–पु लेखी ठराव, कबुली; कबुलायत. [फा.]

इकलजमकी—स्त्री. पाठपुरावा. ' तुझे कितेक मशाकती व इकलजमकी व मसलती केली .. ' –शिवचरित्रप्रदीप ८४. [अर.]

इकला—वि. (व्यापारी) अकरा भाजीपाल्याचा सौदा करतांना असे सांकेतिक शब्द वापरतात. [अकरा. गो. इकरा]

इकळी–ळूत—स्त्री. (कुण.) किळस; कळमळ; ओकारी (क्रि० येणें). [उकळी ?]

इकुडच्च–ला, इकुडील—वि. (प्र.) इकडचा पहा.

इकून तिकून—क्रिवि (कुण) इकडून तिकडून पहा. ' गाडी इकून आली व तिकून गेली. ' [इकडून, तिकडून अप.]

इक्तीदार—पु. १ अनुयायी; अनुकरण करणारा. २ (ल.) विश्वासू. [अर. इक्तिदा=अनुकरण, अनुचरण.]

इक्तो (इकतो)—वि. (राजा. कुण.) इतका (अप.) पहा.

इक्बाल—पु. नशीब; सुदैव, भरभराट. [अर. इक्बाल = भरभराट]

इक्रार—इकरार पहा.

इख—पु. (गो.) विष; विख. ' तो इख खॉन मरतोलो खै ' [सं. विष.]

इखण—न. हत्यार; साधन, उपकरण; विखण. [सं. ईषू–ईषिका= हत्यार; शस्त्र; साधन ?]

इखंनपार्खेन—न. (व.) शेतकीचें हत्यार. ' शेत वाहतो म्हण तोस कांहीं इखंनपार्खेन् आहे का ? ' [इखण द्वि.]

इखलास—पु. मैत्री; स्नेह, प्रीति; अंतःशुद्धता; मनाचा निर्मळपणा; निष्कापट्य. [अर. इख्लास् = मैत्री, प्रेम] **०नामा**–पु. स्नेहाचें पत्र; मैत्रीचें पत्र, स्नेह्यासोबत्यांमध्यें ऐकमेकांच्या पत्राला म्हणतात. [अर. इख्लास्+फा. नामा]

इखलासी—वि. स्नेहपूर्ण; प्रीतीयुक्त; चाहता; प्रेमाचा. [अर. इख्लास्]

इखळा—पु. (सुतारी धंदा) खिळे वगैरे उपटण्याचा चिमटा. [उखळणें.]

इखीति—(कुग.) यत्किंचित्. [इक्ति=इतकी; सं. इयत्तक]

इंगर्णें—अक्रि. काळजींनें, श्रमानें, आजारानें किंवा इतर कारणानें भारावून जाणें; गलित होणें; ठेंकीला येणें. [वेंग (घ)णें]

इगत–इगुत—स्त्री. (कुण.) युक्ति; उपाय. [युक्ति अप.]

इंगरेज—पु. १ इंग्रज माणूस, लोक; ब्रिटिश. २ साहेब; गोरा. [इंग्रज; इंग्लिश; पो. इंगलेज]

इंगरेजी—स्त्री. अशुद्ध अंग्रेजी. १ इंग्रजी भाषा. २ इंग्रजांचा अम्मल; ब्रिटिश अमदानी. [पो. इंगलेजी] –वि. इंग्रजांचा; इंग्रजी भाषेसंबंधी; इंग्रजी; ब्रिटिश. **०दारू**–स्त्री. १ तापट, चिडका, संतापी माणूस. २ हुषार, चलाख माणूस; तडफदार माणूस. [इंग्रजी दारू जलद पेटते यावरून]

इगर्जे—स्त्री. (गो.) ख्रिस्ती कॅथोलिक पंथीयांचें देऊळ. [पो. इगर्ज]

इंगळ–ळा, इंगोळ—पु. (व. गो) जिवंत निखारा; विस्तव; अंगार. ' कैची सुखनिद्रा आंथरुणीं। इंगळांच्या । ' –ज्ञा ९.५०१. ' आंगीं लागतांतीं कमळें । इंगळें जैसी ' –शिशु ७५७. ' संसार हाचि दुःखमूळ । लागतील दुःखाचे इंगळ । ' – दा ३.२.१. दुसऱ्याच्या घरावर असा इंगोळ ठेवणें चांगलें नाहीं. ' [सं. अंगार; प्रा. इंगाल]. **म्ह०** इंगळ हातीं धरवेल पण हा हातीं धरवणार नाहीं= एखाद्या तापट माणसास उद्देशून म्हणतात. **इंगळासारखा लाल होणें**–रागानें चेहरा तांबडा होणें, अतिशय रागावणें. **इंगळासारखे डोळे**–लाल भयंकर डोळे (अतिशय रागानें असे डोळे होतात).

इंगळा—पु. एका जातीचा मुंगळा. [सं. अंगार; प्रा. इंगाल]

इंगळी—स्त्री. १ विंचवाची एक जात; ही आकारानें विंचवापेक्षां मोठी असून काळी व अतिशय विषारी असते. २ ठिणगी; निखारा; विस्तव; इंगळ पहा. ' जेवीं वेळु वाढवी वेळुजाळी । वेळुवेळवां कांचणीमेळीं । स्वयें पाहुनि इंगळी । समूळ जाळी आपण्यातें । ' –एभा २३.६८९. ३ (सोनारी धंदा) तापलेल्या मुशींतील रस ओतण्याकरितां उपयोगांत आणावयाचा इंग्रजी साताच्या आंकडयाप्रमाणें असलेला पोलादी चिमटा; सांडशी. (इंगळीच्या नांगीच्या आकारावरून.) [सं.अंगार; प्रा. इंगाल]

इंगा—पु (चांभारी धंदा) चामडें ओढून घोट्न ताणण्याचें व मऊ करण्याचें (उलथण्यासारखें) हत्यार. **०दाखविणें**–खोड मोडणें; आपलें सामर्थ्य दाखविणें. ' तुला दाखवितो कोतवाली इंगा. ' –नामदेव नाटक ८५. **०फिरणें**–गर्वपरिहार होण्याजोग्या अडचणींत सापडणें; संकटांमुळें नरम येणें; जर्जर होणें; त्यामुळें शुद्धीवर येणें; डोळे उघडणें. **म्ह०** इंगा फिरे, मुंगा जिरे. २ नांगरलेल्या जमिनींतील ढेकळे फोडण्याचें लाकूड. [सं. ईङ्=फिरणें, हलणें]

इंगित—न. १ खूण; खुणेकरितां सूचक हावभाव किंवा मुद्रा 'या इंगितें जाणविलें कुमारा।'–आमा २.४. २ अभिप्राय; अंतस्थ हेतु; योजना. 'सोळासंस्कारांपैकीं केवळ विवाहालाच अलिकडे इतकें प्राधान्य कां आलें यांतील इंगित आमच्या मतें हिंदू लोकांची व्हारकाळीं अति वाढलेली विषयलंपटता हेंच असावे.' –टि ४. १३८. ३ (व्यंगित अप.) व्यंगोक्ति; औपरोधिक भाषण. ०ज्ञ–वि. इंगित जाणणारा; आकारावरून अभिप्राय जाणणारा. [सं.]

इग्नेशिया—स्त्री. (होमिओपाथी) प्लेगप्रतिबंधक व प्रतिहारक बी. [इं.]

इग्यारावी—वि. (भिक्षी) अकरावी. 'गोट इग्यारावी.' [हिं. इगारह]

इंग्रज, इंग्रेज—पु. १ इंगरेज पहा. 'जावी जंगी फिरंगी। इंग्रेज बहुधा रक्त रंगी। मलेबार नौकामार्गी। विन्नकेतें दंडिले।'–मुसभा ८.१२७. २ (कों.) दोन फाशांनीं व चार रंगांच्या सोंगट्यांनीं खेळण्याचा एक डाव. यांत पेशवे (पिवळ्या) आपल्या शिंदे (हिरव्या) होळकर (काळ्या) साथीदारांसह एका बाजूला व इंग्रज (तांबड्या) दुसऱ्या बाजूला असून इंग्रजांना इतरांनीं हरविलें म्हणजे 'इंग्रजांची टिमकी वजावली' असा टोमणा मारून डाव संपतो. –न. पोलाद; लोखंडाचा एक प्रकार.

इंग्रज, इंग्रेज—(गो.) इंगर्ज पहा. 'सकलिक तेंपली प्रथे सती। तेंहें देखिली इंग्रजेची आइती। पुनें शृंगार शोभती। चोडें कडां।' –शिशु १.१.१७२.

इंग्रजी, इंग्रेजी—इंगरेजी पहा. 'इंग्रजी साम्राज्य, व्यापार, राज्यपद्धति, माल इ०. ०**गहाण**—वि. (कायदा) जेथें धनकोला मिळकत तबदील करून देऊन ऋणको ठराविक मुदतींत कर्ज फेडण्याचा करार करतो व स्वतः जातींनें कर्ज फेडण्याची हमी घेतो व कर्ज फेडल्यास मिळकत धनकोनें परत करावी असें लिहून देतो त्या व्यवहारास इंग्रजी गहाण (इंग्लिश मार्टगेज) म्हणतात.

इंग्लाई—स्त्री (भिक्षी) अधाशीपणा 'खाऊची बोखत इंग्लाई केवों नेव.' –भिक्षी भाषा २५. [सं. गलगु=खाणें]

इंग्लिश—वि. १ इंगरेज, इंगरेजी पहा [इं.] २ परदेशी; विलायती. ०**कट**–वि. १ (सराफी) यूरोप अमेरिकेत कोंतून, पैलू पाडलेलें (रत्न). २ इंग्रजी पद्धतीचा (कपडा, पदार्थ इ०) ०**बॉडी**–(छाप.) एक प्रकारचा छापण्याचा, चौदा पॉईंटचा टाईप. हा पायका टाईपपेक्षां जरा मोठा व ग्रेट प्राइमरपेक्षां जरा लहान अक्षरांचा असतो. [इं.]

इंचड—पु. (कु.) बिघाड. 'तेथो इंचड जालोमा' [बिघाड]

इंच—पु. फुटाचा बारावा भाग; अंगुळ; तसू. 'दोन इंच हास' –नाकु ३.५. [इं.; लॅ. उन्सिआ=१२ वा भाग.]

इचकट, इचकटणें, इचकणें, इचका—विचकट, विचकटणें, विचकणें, विचका पहा.

इचका—पु. एका प्रकारची गोफण.

इचका—पु. १ एका प्रकारचें गवत व त्याचें बीं. तृणधान्यांत याचा समावेश होतो. २ एक झुडप. याचीं पानें खाण्यास हरकत नसते. विचका पहा.

इचका—पु. एक प्रकारचा मासा. इचना पहा.

इचकाइंधन—वि. (व.) अव्यवस्थित; मोडतोड झालेलें. [विचका+इंधन]

इचकी—स्त्री. (व.) महामारी. [सं. विषूचिका]

इचकोपा-वा—पु. नाश; विध्वंस, विचका; विचकोपा–वा पहा. (क्रि० होणें; करणें). 'चौकुन मग इचकोवा तोवा हाय सुकुन गेले ओठ।' –अफला ४१. [विचका]

इचना—पु. फक्त पावसाळी दिवसांत सांपडणारा लहान मासा. यास पुण्याकडे इचका–की म्हणतात. याच्या छातीपोटावर दोन व पाठीवर एक असे पंख असून अंगावर अनेक रंगी ठिपके असतात.

इचर—वि. (व.) विरळ. [सं. विचर] ०**कुंधा**–पु. विरळ झालेला कुंधा (एक प्रकारचें गवत).

इचा-ची—हिचा–ची (ही या सर्वनामाची षष्ठी) ०**भन**–उद्गा. मूळ अर्थ शिवीसारखा. पण पुढें आश्चर्याचा, हेटाळणीचा उद्गार झाला. 'अरे च्या!' ' **पत्नुपति**–(स्वगत) 'इचीभन हाथ समदा मान आवानांचा!' –वाय २.२. [हिंदी बहीण]

इचार-णें—विचार–विचारणें पहा

इचु, इंचु—पु विंचू [विंचु अप. सं वृश्चिक; प्रा. विच्चु]

इच्चड—वि. (व. ना.) खोडकर, खट्याळ. 'पाटील! म्हटलं तुमचं पोर तसं आहे हुशार! पण इचक मोठं!' [विचकणें] ०**दागो**–वि. (ना.) खोडकर.

इच्छा—स्त्री. १ वासना; वांछा; आशा; आकांक्षा; मनोगत, मनीषा; आवड. सामासशब्द–इच्छापूर्तिक; इच्छापुरःसर इ० २ (गणित) इच्छांक; त्रैराशिकांतील प्रमाणसजातीय राशि. आर्यक, मध्यांक व अंत्यांक किंवा इच्छांक हीं तीन पदें असतातच, चवथें इच्छाफल (उत्तर) काढावयाचें असतें. उ० पांच रुपयांस दोन मण, तेव्हां चार रुपयांस किती? येथें पांच हें प्रमाण व चार ही इच्छा. [सं इष्] ०**तृप्त**–क्रिवि. इच्छेची तृप्ति होईपावेतों, इच्छा परिपूर्ण होईपर्यंत. ०**तृप्ति**–स्त्री. मनीषा सिद्धीस जाणें; हेतु, वासना सफल होणें ०**दान**–न. इच्छिलेलें दान देणें, इच्छा पुरी करणें ०**दानी**–वि. इच्छादान करणारा; ज्याची जी इच्छा असेल ती पुरविणारा. 'तुका म्हणे इच्छा दानी। पुरवी आवडीची धनी।' ०**पूर्ति**–स्त्री. इच्छेची फलद्रुपता, पूर्तता; इच्छातृप्ति. ०**फल**–न. (गणीत) त्रैराशिकांतील चौथें पद (उत्तर). मध्यफ आणि इच्छांक यांचा गुणाकार करून त्यास

आदिपदानें भागिलें असतां इच्छाफल येतें. ०**भंग**–पु. इच्छेची पूर्ति न होणें; आशा निष्फळ होणें; निराशा. ०**भोजन**–न. १ तृप्ति होईपावेतों जेवणें. २ भरपूर जेवण. ३ इच्छित पदार्थ (ब्राह्मणांस) खाऊं घालणें. ०**मरण**–न. इच्छेस येईल तेव्हां मरण येणें, मरणें; पाहिजे तेव्हां मरण आणण्याची शक्ति. ०**मरणी–मृत्यु**–वि.पु. इच्छा होईल तेव्हां मृत्यूस निमंत्रण करणारा; इच्छामरणाचा ईश्वरी प्रसाद असणारा. 'ख्यातयशस्वी इच्छामृत्यु तुम्ही कुरु कुळांत वासवसे।' –मोउद्योग ११.८७. ०**लाभ**–पु. इच्छित वस्तूची प्राप्ति; इष्टलाभ. ०**वान्**–वि. इच्छा असणारा; इच्छायुक्त. ०**विनाश**–पु. इच्छाभंग; इच्छादमन; आत्मसंयम. ०**विलास–विहार**–पु. मानेल तेव्हां, मानेल तें खेळणें, मनसोक्त विलास, वैन करणें. ०**शक्ति**–स्त्री. इच्छेचें सामर्थ्य; संकल्पशक्ति; इच्छा हीच शक्ति; (इं.) विल्पॉवर. ०**सिद्ध**–वि. इच्छेप्रमाणें सिद्ध किंवा असिद्ध ठरवितां येण्यासारखा. ०**स्वातंत्र्य**–न. इच्छेची स्वतंत्रता; प्रवृत्तिस्वातंत्र्य. ०**क्षय**–पु. इच्छाविनाश पहा.

इच्छाधीन—वि. इच्छेप्रमाणें चालणारा. 'इच्छाधीन जे स्नायू आहेत, म्हणजे जे स्नायू मनांत आल्याबरोबर आपल्या शरीराचे अवयवांचे ठिकाणीं...गति उत्पन्न करितात.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) २६०. [सं. इच्छा+अधीन]

इच्छानधीन—वि. इच्छेबाहेरचा; स्वतंत्र. 'रक्ताशय हा एक इच्छानधीन स्नायूच आहे.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) २६०. [सं इच्छा+अनधीन]

इच्छांक—पु. (गणित) इच्छा अर्थ २ पहा.

इच्छिक—वि. इच्छा असणारा: आकांक्षी. 'पूर्वील सोयरा लग्नाचा इच्छिक।' –ब ५. [सं. इष्–च्छ्+क]

इच्छिणें—सकि. इच्छा करणें, धरणें; आकांक्षा असणें: चिंतणें; वांच्छिणें; हेतु, मनीषा असणें; लोभ धरणें. [सं. इष्–इच्छ्] **म्ह**० १ इच्छिलेलें साधेल तर दरिद्र कां वाधेल. २ इच्छी परा येई घरा= दुसऱ्याचें वाईट जें चिंतिलें असेल तें आपणांवरच येतें.

इच्छित—वि. इच्छिलेलें; चिंतिलेलें; वांछिलेलें. [सं.]

इच्छु—वि. इच्छा करणारा; इच्छक; इच्छिक पहा. सामाशब्द–विधेच्छु; द्रव्येच्छु; मोक्षेच्छु. [सं.]

इछा—स्त्री. (रामदासी वाङ्मय) इच्छा. 'मानिलें देवें हे पुरविली इछा।' –दावि २१. 'वनफळभोजनीं इछा कांहीं।' –सप्र २.४. [इच्छा अप.]

इजखीलाल—पु. घोड्याचा एक रोग. हा रोग पाटीचा असून त्यामुळें पाठ सुस्त होते व कणा फाटतो. –अश्वप २.३००. [उदूं]

इजगो—स्त्री. (व.) चिकित्सा; विचका. हा शब्द द्विरुक्तीनें वापरतात. 'याला दाखीव त्याला दाखीव असी इजगो इजगो झाली.' [विचका?]

इजट—न. (कर्ना.) इजाट; ऊद; कांडेचोर; गूळ खाणारें मांजर. (माण.) ईजाट. [का.]

इजत, इजतआसर–खाऊ, इजती—इज्जत पहा.

इंजन—न. शक्ति उत्पन्न करणारें यंत्र; चालक यंत्र; गतियंत्र; इंजनाचे स्टीम (वाष्प), ऑईल (तेल), गॅस (धूम), कॉम्प्रेस्ड एअर (पीडित वायु) वगैरे पुष्कळ प्रकार आहेत. [इं. एन्जिन]

इंजनवारा—पु. (व.) पंखा; पंख्याचा वारा. विंझणवारा पहा. 'इंजनवाऱ्यानें वारा घाल.' [विंझणा+वारा]

इजबळ—स्त्री. (व. ना.) एका जातीची पाल. विसाप? [सं. विसर्प?]

इजमायली—वि. १ कच्चा, जुजबी (हिशेब, गांवचा ताळेबंद). २ (कों.) कामचलाऊ; हंगामी; कच्चें; तात्पुरतें (इमारत, काम वगैरे). [फा. इज्माल=सारांश, तात्पर्य.]

इजलास—स्त्री. बैठक; सभा; अधिवेशन; सेशन (कोर्टाचें). [अर. इज्लास्]

इजवटा—विजवटा पहा.

इजळणें—विजळणें पहा.

इजा—स्त्री. अपाय; पीडा; त्रास; उपद्रव. 'तालुकियास इजा न लागे ऐसा बंदोबस्त होऊन तेजवंतास पत्रें यावीं.' –रा ७.११७. [अर. ईझा]

इंजाई—वि. दिसण्यांत सुरेख; चकाकित; भपकेदार; दिखाऊ पण पोकळ. [सं. इंध्=चमकणें?]

इंजाईत—वि. लुकसान, लुसकान; दिखाऊ (कापड); कमजोर, निःरसव (लांकूड, इमारत); चांगलें न बनविलेलें, तयार केलेलें (काम वगैरे) [सं. इंध्=चमकणें?]

इजाफत—स्त्री. १ (इनामदारास) वतनास कायम जोडून दिलेलें गांव; इजाफत इनाम; २ इतर राजांकडून किंवा परराष्ट्रांकडून येणाऱ्या जाणाऱ्या देणग्या किंवा नजराणे यांचा हिशेब ठेवणारें खातें; इजाफतखाना; हा जो खर्च होतो त्यास इजाफत खर्च म्हणतात. याच्या उलट मुजाफत व मुजाफतखर्च. –स्त्रीन. आधिक्य; वाढ; बढती. –वि. अधिक; जादा; जास्त. [अर. इझाफा=वाढ, आधिक्य] ०**गांव**–इजाफत अर्थ १ पहा. ०**जमा**–स्त्री. १ कर्ज, नजराण्यांची विक्री वगैरे निरनिराळ्या नवीन साधनांनीं सरकारनें गोळा केलेला पैसा; तह, तौफेर, नाणेंचढाव, वरपाडा, पारखाव, वाजगस्त, वटाव, भेटी, यादगार, उलफा, तफावत, सौकत, नालबंद, वैतें, नदीकिनाराउत्पन्न (टरबुजें वगैरे), तळ्याच्या कांठचें उत्पन्न, महालोमहालचें उत्पन्न, हुजुरून आलेली रक्कम, वैलकटी, सनदसूद, गुजारत, मूस, कवडी, कचकलबाजी, गुराची नियोजी वगैरे बावी यांत येतात. –भाअ १८३४.४४. २ एका सुभ्यांत किंवा महालांत दुसऱ्या महालाचा जमा झालेला वसूल. मुजाफतखर्च पहा. 'जल्हेरखान्यांतून एखाद्या कारखान्याकडे जिनसा दिल्या

गेल्या म्हणजे त्या कारखान्यांत जन्हेरखान्याच्या नांवानें इ० होऊन खर्च कारखान्यांत दाखल होई.' –जनि (बडोदें) ४. ३ जप्त केलेल्या एखाद्या गांवचा वसूल.

इजाफती—वि. इजाफत (जमे) संबंधी.

इजाफा—पु. १ गांव इनाम; नेमणूक; तनखा; नजराणा. २ वाढ; बढती. 'इजाफा पंचहजारीचा देणार.' –रा १.१७९. [अर. इझाफा=वाढ]

इजा, बिजा, तिजा—अ. १ एकामागून एक असें तीन वेळां; दोनदां झालें कीं तिसऱ्यांदां झालेंच पाहिजे अशा कल्पनेनें तिसऱ्या वेळीं वापरतात. –स्वप ६७. (क्रि. होणें; सांगणें) २ (ल.) वारंवार; कैक वेळां. [बीजुं, तीजुं हे दोन व तीन या अर्थी गु व बिज़ा, तिजा, हे हिंदी शब्द यांस जुळणारा असा एक इजा शब्द या अर्थी केलेला दिसतो; तुल० का. इज=दोन]

इजायली, इंजायली—वि. १ अगदीं सामान्य, जंगली, रायवळ इमारती लांकूड; इंजायली (रायवळ) विरुद्ध सागु; सागाखेरीज इतर लांकडाला हा शब्द योजतात. २ रायवळ लांकडाचें बांधकाम. [अर. अजाल=हलकें.]

इजार—स्त्री. विजार; पायजमा, सुर्वार; चोळणा; पाटलोण. 'इजारा पैजारा मुक्तलग सकळा।' –सप्र ७.११. **म्ह०** जो इजार शिवील तो भोंक ठेवील. [फा. इझार्]

इजारत, इजारा—स्त्री.पु १ खंड; मक्तेगिरी; विशिष्ट करार; भाडेपट्टा; चढलावणी (एखादें खेडें किंवा ओसाड जमीन ३०–४० वर्षांत वसाहत करण्याच्या किंवा लागवडीस आणण्याच्या करारानें देणें); धारा. 'शेरीफाकडे शायरचा इजारा असे, आणि त्यास दरवर्षी त्याजबद्दल ठराविक रक्कम सरकारांत भरावी लागत असे.' –इंमू ५४. २ (ल.) जबाबदारी. 'सर्व इजारत मन्सब्याची तुझ्यावर आहे.' –चित्रगुप्त ९२. [अर. इजारह्–इजारा]

इजारदार—पु. इजारा घेणारा; मक्तेदार; ठेकेदार; कंत्राटदार. 'त्यावेळेस इतर इजारदारांप्रमाणें यांच्याकडेस कांहीं सरकारी बाकी होती.' –विक्षिप्त १.५०. [अर. इजारा+दार्]

इजारदारी—स्त्री. मक्तेदारी.

इजारपट–पट्टा—पु. १ इजारदाराची सनद. २ गांवांतील किंवा विशिष्ट हद्दींतील शेतांची जंत्री, फेरिस्त. ३ गांवच्या मुख्य पाटलाला दिलेला वार्षिक वसुलाचा हिशेब, जमाखर्च. ४ गांवचा ठराव होऊन जो कागद पाटलास देतात तो. [अर. इजारा+पट्टा]

इजारी—वि. (जुन्नरी) गुढघ्यापर्यंत पाय पांढरी असणारी; विजारी. (मेंढी वगैरे प्राणी). 'ही मेंढी इजारी आहे.' [फा. इझार]

इजितपत्र, इजीत जाणें—अजितपत्र–अजित जाणें पहा.

इंजिनियर, इंजिनेर, इंजनेर—पु. यंत्रकाम किंवा बांधकाम जाणणारा; स्थापत्य(इंजिनियरिंग)शास्त्रज्ञ; यंत्रशास्त्रवेत्ता. 'जे प्रयोग शेकडों वर्षे बसून गेले आहेत, कीं भाषेचा आणि त्यांचा जणोंकाय एकच जीव होऊन गेला आहे, त्यांस व्याकरणानें उपटून ठाकण्याचा यत्न करणें म्हणजे इंजनेरास सडक बांधावयाची असतां त्यानें मधील डोंगर व पर्वत उपटून दूर फेंकून देण्यासारखेंच कृत्य आहे!' –नि १२४. [इं. इंजिनिअर]

इंजिनियरिंग—न. वास्तुशिल्प; स्थापत्यशास्त्र; यंत्रशास्त्र.

इजूक लागणें—क्रि. (माण.) दुखणें लागणें. [इजा]

इजोगत—स्त्री. (लु.) दुष्ट अपघात; संकट; अरिष्ट. [इजा]

इज्जत, इजत—स्त्री. १ अब्रू; प्रतिष्ठा; मान; थोरवी; कीर्ति 'हे गोष्ट थोरपणाचे इज्जतीस लायख नव्हे.' –ऐस्फुले (शिवाजीचें मालोजी घोरपड्यास पत्र). 'सरकारची इज्जत सत्याग्रह्यांनीं मीठ लुटलें तेव्हांच गेली.' –के २७.५.३०. २ पत्राच्या आरंभींचा बहुमानार्थी मायना. [अर. इझ्झत्=प्रतिष्ठा] **०खाणें, घेणें**–क्रि दुर्लौकिक करणें. **०आसार**–वि. सुप्रतिष्ठित; सन्मान्य; नामदार. फारशी पत्रांतून नांवाच्यापूर्वी हा बहुमानवाचक शब्द किंवा पदवी योजतात. –रा १८.५०; १५.२७१. [फा. इझ्झत्] **०खाऊ, घेणा**–वि. १ एखाद्याची अब्रू किंवा मान कमी करणारा; बुडविणारा; आश्रयदात्याची बेअब्रू करणारा (नोकर, वस्त्र, घोडा, इ०) २ घोंटाळा माजविणारा; कार्यनाश करणारा; मूर्खपणा पदरीं बांधणारा; अब्रू घेण्यासारखा. **०दार**–वि. प्रतिष्ठित. [फा.] **०पन्हा, –महा**–वि. सुप्रतिष्ठित; श्रेष्ठ; नामदार (एक पदवी). –रा३.४३. [फा. इझ्झत्+पनाह्, मआब्] **०लायक**–क्रिवि. प्रतिष्ठेप्रमाणें; माफक मरातीब. 'सिरुपाउ इनामत देतात ते अवघ्या सर्दारांसहि इज्जत–लायख घेणें.' –रा ६.२१०. **०हुर्मती**–स्त्री. मानपान 'पेशजी यांच्या वडिलांची इज्जत हुर्मती चालली आहे तैसी यांची चालविणें.' –वाडसनदा १६.

इज्जती, इजती, इज्जतीचा—वि. अब्रूदार; प्रतिष्ठित; सन्मान्य.

इज्जती–दस्तगाह—प्रतिष्ठा–निधी; श्रेष्ठ; सन्मान्य. –रा १८.५०. [अर. इझ्झत्+दस्तगाह]

इज्ना—पु. ताबा; सत्ता. 'जो कोणी सवाईसिंगाचे इज्न्यांत येईल त्यास राज्य द्यावें.' –जोरा १०७. [अर. इझ्न=परवानगी.]

इज्न्यांत—क्रिवि. आधीन; लगामी.

इज्हार—पु. जाहीरनामा; प्रसिद्धीकरण; ताकीदपत्र; नोटीस; समन्स. [अर. इझ्हार्=प्रसिद्धीकरण]

इंझणा—(व.) विंझणा पहा.

इझाइल–यल—इस्त्रायल पहा.

इंझाळ—पु (व.) १ पाटाच्या खालच्या बाजूस लावलेला आडवा दांडा; पाय; अडात पहा. २ कवाडाला लावलेला आडवा दांडा. इंडाळें पहा.

इझीचेअर—स्त्री. आरामखुर्ची; जीवर झोंप घेतां येईल किंवा पाय लांब करून बसतां येईल अशी एक प्रकारची खुर्ची. [इं. इझी+चेअर]

इट—स्त्री. वीट पहा. 'तिहीं गुणाचिए इटेचेनि पाडें।'–शिशु ९४. [सं. इष्टका; प्रा. इट्टा.]

इटकर-कूर—न.स्त्री विटकर पहा.

इटकुली-मिटकुली—वि. लहानशी; एवढीशी. 'इटकुली मिटकुली गोष्ट सरो तुमचें आमचें पोट भरो.' [इतुकली (सं. इयत्कल) ची द्वि.; तुल० का. इटकु=अकुंचितपणा.]

इटकोर—वि. (व.) अटकर; हट्टी; अडेल. [अटकर अप.]

इंटर, इंटरक्लास—पु. आगगाडीमधील थर्ड (तिसरा) आणि सेकंड (दुसरा) यांमधील वर्ग. [इं. इंटर=मधला]

इटा—पु. भाल्यासारखें एक शस्त्र; वीट; सांग. या भाल्याची लांबी सहा फूट असून पुन्हां त्याच्या शेवटास सहा फूट लांबीची दोरी बांधलेली असते, ती मनगटाला गुंडाळून इटा फेंकतात. म्हणजे याचा मारा बाराफुटांपर्यंत चालतो. पट्टयापेक्षांहि हा मारा जास्त असल्यामुळें 'दहा पट्टेकरी तर एक इटेकरी' अशी म्हण पडली आहे. ईट पहा. [प्रा. इट्ठि=खेंचणें (?); ते ईटि, हि. ईटि. सं. यष्टि.]

इटाळ-र्णे-सी—विटाळ पहा.

इंटाळ, इंठाळ—(कुण.) विटाळ पहा. 'आमचा इंटाळ झाला.'–के १.७.३०.

इटाळी—स्त्री. आळ; आरोप; किटाळ. 'ऐकें गे यशोदे जननी। अवघी लटकीच याची करणी। आम्हांवरी इटाळी घेऊनी। नसतीच उठतो गे॥'–ह ७.२५७. [किटाळ, विटाळ अप.]

इटाळें—विटाळें पहा.

इटी, इटीदांइ—विटी, विटीदांडू पहा.

इटीमिटी-ठी—स्त्री. (काव्य) दृष्ट लागूं नये म्हणून ओंवाळून टाकतात ती (पायाची माती ओवाळतात किंवा ती कपाळाला लावतात, किंवा मीठमिरच्या ओंवाळून टाकितात) अलायबलाय; इडापिडा, निबलोण. 'झणीं लागेल बायदृष्टी। म्हणोनि घेतली इटिमिटी। निंबलोण उठाउठी। करी गोरटी निजभावें॥'–एरुस्व १४.९१. [का. मिडी=दुःख, बोडें चाळविणें; किंवा, मिटी=हि. मट्टी, माती?; मिटी=मीठ?.]

इटेकरी, इटेबरदार—पु. १ इटा हत्यार धारण करणारा, बाळगणारा शिपाई. –भाअ १८३२ (गो.) इटेकार. [इटा+कर; इटा+फा. बर्दार=धारण करणारा]

इटेबंदी—वीटबंदी पहा.

इठाळ—स्त्री. (राजा.) ताक वगैरेंस वास, स्वाद लागावा म्हणून विटेचा किंवा चापट दगडाचा तुकडा लाल तापवून वर लोणी, मोहऱ्या इ० घालून ताकांत बुडवितात तो दगड किंवा विटकर. [इट–वीट पासून.]

इड—स्त्री. एक भूषण; अलंकार; तोरण. 'कीं आकाशां इड बांधिली। कापूरकेळीची।'–शिशु ३३३. [सं. ऋद्धि; प्रा. इड्ढि; का. इडु=दागिना]

इडकर्णे, इडकावर्णे—अक्रि. (व.) १ नखरे करणें; चेष्टा करणें. 'असा इडकाऊं नकोस.' २ नटणेंमुरडणें. ३ लाडणें. [सं. ऋद्ध; प्रा. इड्ढ; का. इडु=दागिने घालणें]

इडगंट—न. (कर्ना.) गुप्त धन. [का. इडु=टेवलेले+गंट=गांठोडें]

इडगळला—वि. (व.) घाणेरडा; ओंगळ; ओबडधोबड. [इड+गळणें?]

इडनिंबू-लिंबू—ईडनिंबू पहा.

इडपाड—पु. नेट; आवेश; जोर; श्रम. ईडेंपाडें पहा. [सं. ईर्षा; म. ईर]

इडरी-ली—स्त्री. (कर्ना.) धिरडें; उडीद व तांदूळ यांचें पीठ आंबवून त्यांत तिखटमीठ घालून गोल थापटया करून उकडतात तें खाद्य. हें सांदणासारखें असतें. 'पूर्ण चंद्राचा अनुकारी। चोखाळपणें भजिजे इडरीं।'–ऋ ८१. [प्रा. इड्डरिया=मिष्टान्न; का. इड्डरी]

इडा—पु. नाभिचक्रापासून निघून डाव्या नाकपुडींतून वाहणारी एक नाडी. ही योग व स्वर शास्त्रांत प्रसिद्ध आहे. हिला चंद्रनाडी म्हणतात. पिंगला व सुषुम्ना यांच्या बरोबर इडेचा उल्लेख येतो. 'इडा पिंगळा एकवटती।'–ज्ञा ६.२४४. 'इडेनि करावा प्राण पूर्ण।'–एभा १४.४२०. [सं.]

इडापिडा—स्त्री. (बायकी) सर्व त्रास; संकटें; अरिष्टें; दुःखें (ओवाळतांना किंवा दृष्ट काढतांना बायका म्हणतात). (कि०जाणें; नाहींशीं, दूर होणें). **म्हण** १ इडापिडा जाओ बळीचें राज्य होओ. २ इडापिडा टळो, पाप अमंगळ पळो. 'जीवभावाचें निबलोण। गुरूसी मी करीन आपण। इडापिडा मी घेईन जाण। तें लोणलक्षण मज लागो॥'–एभा १२.५५७. [पीडा द्वि.]

इंडाळें—न. (व) लाडाच्या चौकटीमधील आडवें लांकूड. इंझाळ पहा.

इंडियन—वि. हिंदुस्थानसंबंधी. –पु. १ हिंदी माणूस; हिंदुस्थानचा रहिवासी. २ अमेरिकेंतील मूळ रहिवासी; रेड इंडियन. [इं. इंडिया=हिंदुस्थान]

इडी—विडी पहा.

इडूरी—स्त्री. एक पक्वान्न; इडरी पहा. 'पूर्ण परिपूर्ण पुरिया। सबाह्य गोड गुळवरिया। क्षीरसागरींच्या क्षीरवारिया। इडूरिया सकुमारा।' –एरुस्व १४.११९. [प्रा. इड्डरिया=मिष्टान्न, का. इड्डली]

इडेंपाडें—क्रिवि. १ आवेशानें; ईर्षेनें. २ श्रमानें; कष्टानें. 'भाले त्रिशूळ इडें पाडें। घे घे म्हणोनि टाकिती।'–मुआदि ६.३९. 'परि न पाहेचि देवाकडे। तेणें देवासी परम सांकडें। मी आलों येथें इडेंपाडें। तें येणें व्यर्थ केलें।' –स्वादि ३.३.२९. [सं. ईर्षा; म. ईर; ईड द्वि.]

इर्णंग—न. (गो.) एक लहान मासा. याला फार कांटे असतात.

इर्णा, इर्णो—पु. (कु.) तंबोरा, विणा. 'इर्णाची तार तुटली.' [सं. वीणा अप.]

इत—(शाप) अम्लाचा अनाम्ल (बेस) वर परिणाम होऊन जे क्षार बनतात त्यांना हा प्रत्यय लावितात. (इं.) एट. उ० गंधकित (सल्फेट), कर्बित (कॉर्बनेट), नत्रित इ० [प्रत्यय]

इतउपर—क्रिवि. यापुढें; आतांपासून; येथून पुढें; इतःपर. [सं. इतः+उपरि.]

इतका-ला—वि. एवढा; एवढा मोठा (परिमाणाचा, मापाचा, संख्येचा) एवढा पहा. 'दर एका जिनसाला इतकाली किंमत द्यावी लागली.' मराठी सहावें पुस्तक (१८७४) १९२. [वैसं. इयत्तक; सं. इयत्; फ्रें जि. केती.; ते. इंते]

इंतकाल—पु. मृत्यु; अंतकाल. 'महमदअलीखान वालाजाह यांचा इंतकाल छ. २७ माहे रबिलावली जाल्याचें वर्तमान आहे.' –रा ५.२०३. [सं. अंतकाल; अर. इंतिकाल्=मृत्यु; गमन]

इतकावा—वि. या प्रमाणाचा, मर्यादेचा, पायरीचा, अवस्थेचा (एखाद्या मालिकेतील, आवृत्तींतील) [इतका]

इतकासा—वि. अगदीं लहान प्रमाणाचा; इवलासा; जरासा; लहान; थोडा; (व. ना.) इतकुसें. [इतका+असा]

इंतजाम—पु. १ बंदोबस्त; व्यवस्था; निकाल. 'सर्कारचे कामाचा पक्का इंतजाम.' –जोरा १२९. २ इतमाम पहा. [अर. इंतिझाम्=व्यवस्था]

इंतजारी—स्त्री. मार्गप्रतिक्षा; वाट पाहाणें. 'त्याचा जबाब केव्हां येईल याची इंतजारी आहे.' –रा ५.१२८. –वि. मार्गप्रतीक्षक; उत्सुक. 'उत्तराविषयीं लवकर आज्ञा जाली पाहिजे; नवाब फार इंतजारी आहेत.' –रा ५.१२४. [अर. इंतिझार्=अपेक्षा, प्रतीक्षा]

इतपत—वि. एवढें; या प्रमाणांत; इतकें. [सं. इयतपरिमित]

इतःपर—क्रिवि. यापुढें; यानंतर; अनंतर; अतःपर. [सं.]

इतफाक,इत्यफाक—पु. सहविचार; एकविचार; सल्लामसलत. 'याचा बंदोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पंतप्रधान याचे इतफाकानें करूं' –रा १.२६१. 'त्या गोष्टीचा इत्यफाक या शादीचे खुशीचे समारंभांत घडावा हें फार चांगलें' –रा ७.५१. [अर. इत्तिफाक्=ऐक्य]

इतबार—पु. १ विश्वास; इमान; श्रद्धा; भरंवसा. 'आतां इतबार कोणाचा येत नाहीं. –सभासद २९. २ प्रतिष्ठा; पत; मानपान. 'कोणा इतबार याचा घरीं' –सला ११. [अर. इअतिबार्=विश्वास श्रद्धा] **॰पण**–न. श्रद्धालुपणा; विश्वास; भरंवसा; खात्री. –रा १५.३७२.

इतबारात—स्त्री. मानपान; इतबार अर्थ २ पहा. 'शिवाय स्वारीखर्च व इतबारात पावती होती.' –पेदसमा ११०. [अर. इतबार्]

इतबारी—वि. विश्वासू; प्रामाणिक; भरंवशाचा; अमीन. 'म्हणे तुम्ही धन्याच्या बऱ्याबरी। पहिल्यापासूनि आहांत इतबारी।' –अफला १५. [अर. इअतिबारी]

इतमाम—पु. लवाजमा; खटला (दासदासी, पालखी, घोडा, इ०); सरंजाम; दर्जाप्रमाणें खाजगी किंवा सरकारी तैनात. 'इतमाम ज्याचा त्याला। मराठे मुसलमानांला।' –ऐपो २३२. [अर. इहतिमाम्=व्यवस्था, बंदोबस्त]

इतमामी—वि. इतमाम ठेवणारा, अरणारा; सरंजामी; लवाजमेवाला. [अर. इहतिमाम्]

इतमाम्या—पु. व्यवस्थापक; रखवालदार; नोकर. 'बाणकरी व इतमामे पुण्यास रखवालीस पाठविले.' –खरे १.४३३. [अर. इहतिमाम्]

इतर—वि.सना. अन्य; निराळा; येर; दुसरा; वेगळा. [सं.] **॰पितर काढणें**—(व.) नातलगांवरून शिव्या देणें; मायबहीण घेणें. [पितर द्वि.] **॰विशेष**–वि. उरलेले; राहिलेलें; अवशिष्ट; किरकोळ (बाबी, गोष्टी).

इतरणें—अक्रि. १ (व. ना.) १ खोड्या, चेष्टा, चाळे, नखरे करणें; उनाडणें. 'अरे! असा इतरतोस काय?' (हा अर्थ हिंदुस्थानींत आढळतो). २ अवांतर गोष्टी करणें, सांगणें; विषयांतर करणें. 'सांगशील तर सांग लवकर, इतरूं नको असा' [सं. इतर]

इतरत्र—क्रिवि. अन्यत्र; इतर ठिकाणीं; दुसरीकडे. [सं.]

इतरथा—क्रिवि. १ दुसऱ्या प्रकारें; निराळ्या रीतीनें; अन्यथा. 'नसता दासजित प्रभु, करितां सारथ्य कां इतरथा तें।' –मोभीष्म ४.२०. २ उलटपक्षीं 'कांची शोभे वदुं इतरथा भूषणें दूषणें हीं।' –कर्म २. २९. [सं.]

इतराज—वि. अप्रसन्न; रुष्ट; नाराज. 'न जावें तरी खावंद इतराज होतात.' –पारसनीस ब्रप १३८. [अर. इअतिराझ्=आक्षेप घेणारा]

इतराजी—स्त्री. अप्रसन्नता, गैरमर्जी; अवकृपा; नाराजी. 'एकीकडे सत्ताधीशांची इतराजी व यामुळें सुखाची हानि.' –सृष्टपदार्थ नियम १४४. [अर. इअतिराझी=राग; अवकृपा]

इतरायेल—वि. (खा.) वात्रट; चावट. 'तो इतरायेल पोऱ्या माह्या वाटी जातो.' [इतरणें.]

इतरेजन—पु.अव. कांहीं नात्याचा संबंध नसलेले; परके; कांहीं हितसंबंध नसलेले. 'मिष्टान्नमितरे जनाः' –सुभा. 'म्हणून इतरेजन कांहीं तरी त्यांत दोष काढीत राह्यचेच.' –विचारविलास २७०. [सं. इतरे+जनाः लॅ. इतेरम; हिब्रू इतॅर]

इतरेतर—सना.वि. परस्पर; अन्योन्य; एकमेक. [सं. इतर+इतर] –पु. (व्या.) द्वंद्व समासांतील एक भेद (समाहारद्वंद्वाच्या उलट) ज्यांतील पदें आणि किंवा व या अव्ययानें जोडलीं असून तें अव्यय अध्याहृत असतें तो इतरेतरद्वंद्वसमास. उ० हरिहर, आईबाप, इ० [सं.]

इतलतितल—वि. (गो.) चंचल; धरसोड वृत्तीचा; लहरी. –क्रिवि. लहरीपणानें; धरसोडीनें, चंचलपणें. (क्रि० करणें; बोलणें; चालणें; लावणें; मांडणें). [कुण. इतलॅं=इतकें+तितलॅं=तितकें; हिं. इधरतिधर]

इतलसार—पु. घोडयाच्या अंगावरील एक वाईट भोंवरा; हा कुल्ह्यावर असतो. ही एक घोड्याची खोड मानतात.

इतला-इतलां—वि.तैना. (खा. कों.) इतका. 'इतला मधार कथाइन उनोरे?' =इतक्यामध्यें कोणीकडून आलास रे. [इतका]

इतलाख, इतलाख नेमणूक—स्त्री. सरकारी तिजोरींतून किंवा कोठारांतून मिळालेली ठराविक नेमणूक; इनाम. 'पांचशें रुपयांचा गांव व पांचशें रुपये इत्लाख.' –वाडसमा १.३६. [अर. इत्लाक्=स्वातंत्र्य]

इतलाख-खी—वि. कधीं इतलाक-की. १ स्वतंत्र; निराळा; मोकळा. २ पगारी (गैरसरंजामी फौजेला योजितात, किंवा एका खात्यावरचा नोकर दुसऱ्या खात्यांत काम करीत असला किंवा जादा नोकर नेमला असला म्हणजेहि हा शब्द योजतात. जसें-इतलाखी फौज, नोकर वगैरे.) सात हजार फौज इत्लाख रोजमऱ्यावर ठेवावी.' –ख ८.४३२२. [अर. इत्लाक्=स्वातंत्र्य]

इतलाखी—स्त्री. सख्य; मैत्री. 'रियासतींत मोठी गोष्ट कीं वचनाची कायमी, त्यांत तलवून मिजाजी (लहरीपणा) झाल्यास व इतलाखी बातल होऊं लागल्यास लाचार.' –ख ७.३५७४. [अर. इत्लाक्]

इतल्ला—पुस्त्री. १ संबंध; हित; लक्ष, गुंता, लोभ. 'हरत-हा करोन त्याचे (शिवांचे) परिघांतून आपले पेठेंत येऊन राहिलों, त्यांचा इतल्ला आम्हांकडे नाहीं.' –ख १०.५६०६. २ वार्ता; खबर; बातमी (विशेषतः सरकारास दिलेली). (क्रि० करणें; देणें; सांगणें; लिहिणें). [अर. इत्तिलाअ=ज्ञान, समज]

इतल्लेपत्रक-रपोर्ट—नपु. सरकारी बातमीदाराचा लेखी अहवाल; वार्तापत्र; (सामा.) बातमीपत्र; अहवाल. [अर. इत्तिल्लाअ+पत्रक; इं. रिपोर्ट]

इतवा—वि. इतका, इतकावा पहा.

इतवार—पु. (हिं.) आदितवार; रविवार. [सं. आदित्य+म. वार]

इतस्ततः—क्रिवि. इकडेतिकडे; इकडूनतिकडून; अस्ताव्यस्त; अनिश्चितपणें. 'मी इतस्ततः दिवसभर भटकलों.' [सं.]

इंताजी—वि. (व.) मिजासखोर; फार नाजूक; चवढाळ; चोखंदळ. 'त्याला कांद्याचा वास नाहीं चालत, असा इंताजी आहे.' [अर. इंतिझाम्=व्यवस्था]

इति—अ. १ (या)प्रमाणें, असें, अशा तऱ्हेनें इत्यादि शब्दांप्रमाणें सारखेपणा किंवा एकरीत दाखविणारें अव्यय. २ अखेर; शेवट; समाप्ति;इतिश्री पहा. [सं.]**०कर्तव्यता-क्रिया**—स्त्री.१ पद्धत; मार्ग; रीत (एखादी गोष्ट करण्याची); कार्यक्रम; मुळापासून शेवटपर्यंत क्रमानें अनुष्ठान जींत आहे असें कार्य. २ कर्तव्य; करणीय; यापुढें करावयाची कामगिरी. ३ कर्तव्याची समाप्ति; अखेरी. **०कृति**—स्त्री. (अर्वाचीन) शिष्टसंमत आचार; वागण्याची पद्धत; (इं.) एटिकेट. (गोविंदाप्रजानें हा शब्द रूढ केला). **०श्री**—स्त्री. १शेवट; समाप्ति. इतिश्री असे शब्द पुराणांतील अध्यायांच्या शेवटीं (' इतिश्रीस्कंदपुराणे रेवाखंडे ...) येतात त्यावरून. ' 'तगटी इतिश्री कराव्या.'–दा १९.१.१९. (क्रि० करणें; होणें). २ (ल.) अखेर; मृत्यु. 'तूं आज कबूल झाला असतास म्हणजे बारभाईंची इतिश्रीच होती.' –ईप ४३. **०वृत्त**—न. अहवाल; हकीकत; इतिहास; रिपोर्ट.

इति-ती—पु. (रामदासी वाङ्मय) यति. 'इति महानुभाव गाइत्री पूजन.' –दा ४.५.४. 'ज्याचे गृहीं इति जेविला । तेथें स्वयें परमात्मा तृप्त जाला । इति आणि परमात्मयाला । वेगळिक नसे सर्वथा ।'–स्वादि ८.२.५७. 'इती भीइती भांडती दीर्घ द्वेषें.' –दावि ३९४. [सं. यति]

इतिमासांव—न. (गो.) सूचना; बोलावणें; नोटीस. [पो. इंतिमासांव; इं. इंटिमेशन]

इतिला—वि. इतका; इतला पहा. 'इतिला निश्चयो करूनि.' –गीता १.२२०८.

इतिहास—पु. १ प्राचीन काळीं घडलेल्या हकीकतींचें लेखी किंवा परंपरेनें आलेलें वर्णन; जुनी कथा; शब्दप्रमाणाला प्रतिशब्द म्हणून हा शब्द योजतात. २ (सामा.) एखाद्या गोष्टीची साग्र माहिती; इत्थंभूत हकीकत; वृत्तांत; कथा. [सं. इति+ह+आस=असें झालें, होतें.]

इतिहासणें—सक्रि. (अर्वाचीन काव्य) इतिहासांत समाविष्ट करणें, अमर करणें. ' मराठकर्तृत्वा दे संधि इतिहासाया नांव । ' –जननीजनकज (घेइ आइचें नांव).

इतिहासशास्त्र—न. अर्वाचीन पद्धतीनें संशोधन, चिकित्सा, पांडित्यपूर्वक इतिहास लिहावयाचें शास्त्र. [सं.]

इतुका–ला—सना वि. (काव्य.) इतका पहा. ' दान इतुलें या मज दीना । ' –तुगा ३४४. ' इतुक्याहि दिसांत रणीं ज्याचें बहु भय धरूनियां पोर्टी । ' –मोकर्ण ६.५३. ' हेंहि असो कीं इतुली मातु । ' –मुसभा ५.१३१. [इतका; गो. इतुलें]

इत्तदाय—पु. आरंभ. ' ज्येष्ठमास इत्तदायपासून तागायत पौषपर्यंतचा मजकूर ' –जोरा ५८. [अर. इब्तिदा=आरंभ]

इत्तिफाक—पु. १ संमति; कबुली. २ मैत्री; स्नेह. ३ दैव; योग. इत्तिहाद. [अर. इत्तिफाक=बरोबरी, मैत्री, सख्य]

इत्तिहाद, इतेहाद—पु. ऐक्य, मैत्री, दोस्ती. ' असें श्रीमंतांचे मनांत येणें हें इत्तिहादास चांगलें नाहीं. ' –रा ५. ३०. ' आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वीपासून जो आहे त्यांत खलश न यावा. ' –रा ५.३०. [अर. इत्तिहाद्=ऐक्य, मैत्री]

इत्थंभूत—वि. जशी घडली तशी; सविस्तर; तपशीलवार (गोष्ट, वर्णन, निवेदन, प्रतिपादन, विचार, प्रकार वगैरे). [सं. इत्थम्=असें+भूत=घडलेलें]

इत्यर्थ—पु. सारांश; तात्पर्य; सिद्धांतरूप अर्थ. ' तरी तूं क्रूरयार्थाचें सार । इतुलें जाण ' –ज्ञा १८.१४६. –ख ४३०४. [सं. इति+अर्थ]

इत्यादि–क—वि. वगैरे; हे व इतर. ' तत्त्वांची अभिवृद्धि कशी झाली इत्यादिक गोष्टींचा विचार वास्तविक पाहतां आमचा आम्हीच करावयास पाहिजे होता ' –टि ४. १२६. [सं. इति+आदि,+क]

इत्रावणें—क्रि. (व.) खोड्या करणें इतरणें अर्थ १ पहा.

इंत्रुज—न. (गो.) ख्रिस्ती लोकांचा शिमगा. [पोर्तु. इंत्रुडो]

इत्सा—स्त्री. (काव्य) इच्छा (वस्तु मिळण्याची). ' ते देत इत्साभोजन । दीप तरी चिंतामणिरत्न । छाये करिती चिंतितभोजन । कल्पतरूचे । ' –कथा २.१२.५७. [आदित्सा (=घेण्याची इच्छा) –आइत्सा–इत्सा. (राजवाडे) भाअ १८३४; इच्छा–इत्सा]

इथचा, इथला, इथपर्यंत, इथपावेतों, इथवर, इथून, इथें—एमध्यें पहा.

इथरणें—अक्रि. बेशिस्त, गैरसुयें वागणें; खवळणें; बिघडणें ? बिथरणें. [बिथरणें अप.]

इथिल—न. (शाप) एक रासायनिक मूलद्रव्य; सामान्य अल्कहल; इथ व दावेम्ल यांतील मूलकांस हें नांव आहे. (इं.) एथिल. **०अदिद**–न. एथिल आयोडाईड; हायड्रोऑडिक इथर; यास मधुर वास असून हें वर्णहीन व रसरूप असतें. **०अल्कहल**–न. मद्याकै. हा कित्येक फळांत सांपडतो. हा निर्गंध असून यास तिखट व दाहक अशी रुचि असते. दिव्याच्या सान्निध्यांत पेटतो व हवेंत उघडा राहिल्यास उडून जातो. **०नत्रित**–पु. नायट्रिक इथर; नत्र इथर; याचा वास मधुर असून ज्वाला पांढरी असते, उष्ण केला असतां याचा स्फोट होतो.

इथिलीन—पु. (शाप.) एक वायु. हा दगडी कोळशांत सांपडतो; हा तेलयुक्त, रंगहीन, आणि पारदर्शक असून यास मधुर पण लसणीसारखा वास येतो. [इं.]

इथुन—पु (शाप.) एक उत्कर्षे. (संतृप्तवर्ग) (इं.). इथेन.

इथ्र—पु. (शाप.) देधक; तेजोवाहक पदार्थ; सूक्ष्मवायु [इं. ईथर.]

इदगा—पु. ईदच्या प्रार्थनासमारंभाकरितां मुद्दाम तयार केलेली जागा. [फा. ईद्+गाह्]

इदंता—स्त्री. हें पणा; हें असा निर्देश. ' मग इदंतेसि वाळलें । ' –ज्ञा १५.२६७. [सं. इदम्+ता]

इदबार—पु. विश्वास. इतबार पहा ' आम्ही दुर देशी राहाणार, नाहीं इदबार कोणाचा धरीत । ' –होला १७७.

इदमपि—सना वि. हें देखील; हेंहि; हें सुद्धां. ' इदमपि धनं जितं ते शकुनि म्हणे दीप्तपावक पटानें । ' –मोसभा ४.५५. [सं. इदम्+अपि]

इदमित्थ—न. सर्व कारभार; एकंदर सर्व गोष्ट; सगळें (जाणावयाचें, सांगावयाचें, करावयाचें) [सं. इदं+इत्थं]

इदला—वि. (कुण.) इतका. इतला पहा.

इदवळा, इदवाळा—क्रिवि. (कु. गो.) यावेळीं; एव्हां; एवढया वेळीं. [सं. इयत+वेला]

इदळ—न (गो.) १ पावसाळयानंतर पेरण्यांत येणारीं धान्यें; रबीचें पीक; पाणथळ जमीनींत घ्यावयाचें पीक. २ पाणथळ जमीन.

इंदळस, इंदळसकुटा—वि. (कु.) भोळसट.

इदारणा, इदारणें—विदारणा–णें पहा.

इंद्रिन—पु. (शाप.) हा एक उत्कर्षे (हायड्रोकार्बन) आहे. दगडी कोळशाचें आंशिकपातन केलें असतां त्यांत हा सांपडतो. [इं. ईडिन]

इंदिरा—स्त्री. लक्ष्मी; विष्णुपत्नी; कमला. ' जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें । ' – नल९. [सं.] **०वर**–पु. इंदिरेचा पति; विष्णु. [सं. इंदिरा+वर]

इंदी—स्त्री. सणावारीं दिलेली मेट. [फा. ईदी]

इंदी(दि)वर—न. कमल; नील कमल; निळया कमळाचें फूल. ' फांकलिया इंदीवरा । परिवारु नाहीं धनुधैरा । ' –ज्ञा १३. ३६१. [सं.]

इंदु—पु. चंद्र. 'जो मम नयनचकोरा इंदू' –संगीत रामराज्यवियोग ५७. (समासाच्या शेवटीं) जसें–मुखेंदु; पूर्णेंदु. [सं.]

०वार-वासर–पु. सोमवार.

इंदुरी—वि. इंदूर शहरासंबंधीं (पागोटें, वस्त्र, बुका इ०).

इंदुवदना—वि. १ चंद्राप्रमाणें जिचें मुख आहे अशी (स्त्री). २ (ल.) सुंदर, रूपवती स्त्री; तरुणी; कुमारी. ३ एक समवृत्त. अक्षरें १४, गण भजसनगग; उ० कायकरि काळकलि नेलगल चित्तीं। ध्याल जरि वालभरि बैसुनि निवार्तीं। भाळशिखि बाळशशिमंडण भवारे। सांब शिव सांब शिव सांब शिव गारे ॥ ' –निमा (सांबशिवाष्टक) १. [सं. इंदु+वदन]

इद्दत—स्त्री. (मुसलमानी कायदा) घटस्फोटानंतर तीन महिन्यांची मुदत. 'ज्या स्त्रीचा नवरा मुक्तताच मयत झालेला असेल किंवा ज्या स्त्रीला तिच्या पहिल्या नवऱ्यानें काडी मोडून दिली असेल अशा स्त्रीच्या इद्दतीच्या मुदतींत तिच्यार्शी लग्न लावलें तर तें फासीद आहे परंतु रद्दबातल नाहीं ' –घरचा कायदा ७३.. [अर. इद्दत]

इंद्र—पु. १ देवांचा राजा; स्वर्गलोकचा व पूर्व दिशेचा अधिपति ; मेघ, पाऊस यांची ही अधिष्ठात्री देवता म्हणून फार प्राचीन काळापासून मानतात. 'श्रिया वाखाणिजे अमरेंद्र । कृष्ण इंद्राचाहि इंद्र । ' –एरुस्व १.७८. २ (समुदायामध्यें) राजा, श्रेष्ठ, वरिष्ठ व्यक्ति; नायक; मुख्य; पुढारी. सामाशब्द–नृपेंद्र; खगेंद्र; विप्रेंद्र; फणींद्र; पक्षींद्र. ३ गोसावी, संन्यासी, यांच्यांतील एक पंथ; या पंथांतील व्यक्ति. ४ (सामा.) राजा. [सं.] **म्ह०** इंद्रायतक्षकायस्वाहा–(जनमेजयानें सर्पसत्र केलें त्यांत सर्व सर्पकुलें अग्निकुंडांत पडलीं, परंतु तक्षक इंद्राच्या पाटीशीं दडला तेव्हां जनमेजयानें 'इंद्रायतक्षकायस्वाहा असा मंत्र म्हणून आहुति देतांच इंद्रासह तक्षक आकर्षिला जाऊं लागला. या कथेवरून)=एखाद्यानें शत्रूला चुकविण्याकरितां दुसऱ्याचा आश्रय केला असतां शत्रु प्रबल असल्यास त्या आश्रयदात्यासह आश्रिताची उचलबांगडी होणें या अर्थी ही म्हण योजितात. 'जॉनसनसारख्या रसिकांनीं.. ज्यास कवित्वसिंहासनावर आरूढ करवून सर्वांच्या अभिनंदनास पात्र करून ठेविलें होतें त्यास मेकॉलेप्रभृति अर्वाचीन निबंधकारांनीं पदच्युत करून 'इंद्रायतक्षकायस्वाहा ' या न्यायानें जॉन्सनप्रभृति मोचेंलवाल्यांसहि त्याबरोबरच खालीं ओढलें. –नि ८७६ [सं.]

इंद्रकट—न. (कों.) आढघापासून पाऱ्यापर्यंतचे खालीं असलेले वासे टेकून राहण्यासाठीं तुळयांच्या टोकावर आडवें लांकूड बसविलेलें असतें तें; भिंतींत बसविलेलें बहालाच्या खालचें आडवें लाकूड. [सं. इंद्र+काष्ठ]

इंद्रकल्याणी–वि. (माण) विद्रूप; विद्रूप स्वरूपाचा. [इंद्रा-विद्रा+कल्याणी]

इंद्रकापशी—स्त्री. कापसाच्या झाडाची एक जात. देवकापशी [सं. इंद्र+कार्पास]

इंद्रकीट, इंद्रगोप—पु. एक प्रकारचा पावसाळी तांबडा (कधीं पांढरा) किडा; कुंकवाचा किडा; सोमकिडा; मृगनक्षत्रांत हा उत्पन्न होत असून याच्या पाठीवर सहा ठिपके असतात. 'इंद्रगोप धुतले पाउसें । पद्मरागीं जडत्व असे । ' –ऋ ८६. [सं.]

इंद्रकील—पु. १ मंदराचलपर्वत; २ घोटयाचा सांधा;घोटयाची खीळ. [सं. इंद्र+कील]

इंद्रगेळ—न. १ पायाच्या घोटयाचा भाग; यद्देनें पुढील श्लोक म्हणतात. 'इंद्रगेलंच धोत्रंच '=गुडघ्यापर्यंत धोतर, पंचा. २ गुराच्या टाचेवर (खुरावर) मागील बाजूस जो वाढलेला मांसल भाग असतो तो; पायाचा एक भाग. [इंद्र+गेळ]

इंद्रचाप-धनु-धनुष्य—न. आकाशांत पावसाच्या तुषारांवर पडणाऱ्या सूर्यकिरणांच्या योगानें दिसणारी धनुष्याकृति. याचा आकार अर्धवर्तुळाकार असून वर्तुळाचा मध्यबिंदु पाहणारा मनुष्य आणि सूर्य यांस जोडणाऱ्या रेषेवर असतो. या धनुष्यांत तांबडा, नारिंगी, पिंवळा, हिरवा, निळा, पारवा व जांभळा असे सात रंग असतात. प्रकाशकिरणांचें वक्रीभवन व परावर्तन यांच्या योगानें इंद्रधनुष्य पडतें. [सं.]

इंद्रजव—पु इंद्रबीज; कुडयाचें बीं. [सं. इंद्र+यव; हिं. इंदजौ; गु. इंदर+जव.]

इंद्रजाल—न. मंत्रविद्या; जादुगिरी; जादुटोणा; गौडबंगाल; भानामती; हातचलाखी; माया. 'हें सर्व इंद्रजालच माझ्या दृष्टीस पडत आहे. ' –कमं ३. [सं. इंद्र+जाल=जाळें]

इंद्रज्योत—इंद्रजव पहा.

इंद्रधनुष्य—इंद्रचाप पहा. 'नाना रंगीं गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे । ' –ज्ञा १५.२४०. 'तेही क्षणिक जैसी रेख । व्योमीं इंद्रधनुष्याची । ' –मुरंशु २७५.

इंद्रध्वज—पु. पाडव्याच्या दिवशीं उभारतात ती गुढी. गुढी पहा. [सं. इंद्र+ध्वज=निशाण]

इंद्रनील-ळ—पु. एक रत्न; उंची नीळ. 'पिऊन इंद्रनीळ किळी। वोतली कृष्णतनू सांवळी। पाउलें सुकुमार कोंवळीं। घोटीं निळीं दोहीं भागीं।' –एरुस्व १.२३. [सं.]

इंद्रफणी—पु. १ इंद्रजाल विद्येनें दोरीचा दिसणारा साप. –मनको २ इंद्र व शेष. ३ मांजर व सर्प. 'दोघां ऐसीं तीन चालती। अवगुणी अष्टधा प्रकृती । अधोर्ध सांडून वर्तती । इंद्रफणी एसीं । ' –दा १५.५.१. [सं. इंद्र+फणि]

इंद्रबाही—स्त्री. दरवाज्याच्या फळीचे दोन बाजूचे दोन व एक मधील असे उभे तुकडे. [सं. इंद्र+बाहु]

इंद्रभुवन—न. १ इंद्राचा राजवाडा; इंद्रलोक. २ (ल.) अत्युत्कृष्ट व टोलेजंग राजवाडा. [सं. इंद्र+भुवन]

इंद्रमढें-ढें—न. अगदीं कृश, अशक्त, रोड, मढ्यासारखा मनुष्य. [सं. इंद्र+मढें]

इंद्रलोक—पु. स्वर्गांतील इंद्राची निवास भूमी; ज्या प्रदेशांत इंद्र रहातो तो स्वर्गाचा भाग. [सं. इंद्र+लोक]

इंद्रवज्रा—स्त्री. एक समवृत्त; याच्या प्रत्येक चरणांत ११ अक्षरें येत असुन प्रत्येक चरणांत त त ज ग ग अमे गण येतात. उ० 'कां टाकिलें शस्त्र रणांत तेणें।' –वेणीसंहार. [सं. इंद्र+वज्र]

इंद्रवंशा—स्त्री. एक समवृत्त. प्रत्येक चरणांत १२ अक्षरें येत असुन त त ज र असे गण येतात. उ० गोपी हरीच्या भजनांत रंगल्या. [सं. इंद्र+वंश]

इंद्रवारुणी—स्त्री कडुकवंडळ; कडुवृंदावन; इंद्रावण. [सं. इंद्र+वारुणी]

इंद्रवारूण-वरूण—न. इंद्रवारुणीचें फळ, कडुवृंदावन. इंद्रावण पहा. 'अंतर कडु वरी वरी दावी सुंदर। इंद्रवारुणफळ जैसें।' [सं.]

इंद्रसभा—स्त्री. १ इंद्राची सभा. २ (ल.) जेवणाला टाळा (विशेषतः रात्रीच्या). 'तुम्ही पडला पक्के कोंकणस्थ, पराचे पुष्टि-वर्धनं, लागलीच रात्रीची इंद्रसभा.' –खरादे १२२. [सं.]

इंद्राचीरंभा—स्त्री. इंद्राच्या समेतील अप्सरांमध्यें रंभा अति सुंदर, यावरून ल. सुंदर स्त्रीस म्हणतात. 'पैसा मिळाला कीं इंद्राची रंभा देखील आणून देईन.' –मोर २२. [सं. इंद्र, रंभा]

इंद्राठी—स्त्री. (कों.) इंद्रकट पहा.

इंद्राणी—स्त्री. १ इंद्राची स्त्री; शची. म्ह० इंद्र फिरतो (बदलतो) पण इंद्राणी फिरत नाहीं. =इंद्रपदावर कोणीहि आला तरी त्याची बायको इंद्राणी ही एकच, यावरून. २ निगुंडी. ३ इंद्रवल्ली किंवा कडु कवंडळी (इंद्रवारुणी). ४ वेलदोडयांचें झुडुप. [सं.]

इंद्रायण—न. कडुवृंदावन; कवंडल–ळ. [सं. इंद्र+वारुण]

इंद्रायणी—१ इंद्राची स्त्री. इंद्राणी पहा. 'इंद्रास इंद्रायणी कृष्णास हो रुक्मिणी।'–वसा १५. २ एक नदी. ही पुणें जिल्ह्यांत असुन हिच्या काठीं प्रसिद्ध आळंदी क्षेत्र आहे. [इंद्राणी अप.]

इंद्रायुध—इंद्रचाप पहा. [सं.]

इंद्रावण-न—न. वृंदावन. कडु कवंडळ. हें फळ दिसण्यांत सुंदर पण खाण्यास कडु असतें. यावरून सुंदर पण निरुपयोगी, बाहेरून शांत पण आंतुन क्रूर अशा माणसास म्हणतात. 'तें इंद्रावण कोणी न सेवी। अंतरस्वभावीं अति मळिण।'–एभा ३. ३९०. 'बचनागाचे झाडीं विष कोण घाली। इंद्रावनातळीं,कडुपण।'–ब ११९. 'अहो आंब्याचें कैसें गोडपण। जैसें तें प्रत्यक्ष इंद्रावण। तरि हें काय भूषण दूषण। आंब्यासी कीं आपणासी॥'–स्वादि १३. २.१०७. [सं. इंद्र+वारुण]

इंद्रावणी—स्त्री. कडु वृंदावन; ही वेल असुन हिचीं पानें कलिंगडाच्या वेलीसारखीं पण त्यापेक्षां थोडीं बारीक असतात. पिकलेल्या फळाचा रंग पिंवळा असतो. मोठें आंब्याएवढें फळ येतें त्यास घोडइंद्रावण म्हणतात, दुसऱ्या जातीचें फळ लिंबाएवढें असतें. हें तीव्र रेचक आहे. सर्पदंशावर इंद्रावणीचें मूळ विडयांत खाण्यास देतात. 'मग राजमा जिया क्रिया। तया इंद्रावणी पिकलिया। जे मुखें चितारूनियां। फळती दुःखें॥' –ज्ञा १४.२६२. इंद्रावणीचें फळ=सुंदर पण निरुपयोगी माणूस, पदार्थ. इ० [सं. इंद्रवारुणी]

इंद्राक्ष—पु. १ घोड्याचें एक लक्षण. ज्याच्या दोन्ही गंडस्थळीं भोंवरे आहेत असा घोडा. –अश्वप २५. २ ज्यास कणीमूळाचे ठिकाणीं एक व उरावर एक असे दोन भोंवरे असतात त्यासही इंद्राक्ष म्हणतात. –अश्वप ८८. [सं. इंद्र+अक्षन्]

इंद्रिय—न. १ ज्ञानाचें किंवा कर्मांचें साधन जो शरीराचा भाग तो. इंद्रियें ११ आहेत.–(अ.) पंचज्ञानेंद्रियें–डोळे, कान, नाक, रसना व त्वचा हीं अनुक्रमें रूप, शब्द, गंध, रस व स्पर्श यांचें ज्ञान करून देतात. (आ) पांच कर्मेंद्रियें–पाय, हात, मलद्वार, मूत्रद्वार व जिव्हा हीं अनुक्रमें गति, देणेंघेणें, मलोत्सर्ग, मूत्रत्याग व बोलणें हीं कर्में करतात. व (इ) मन–हें संकल्पविकल्प करतें. 'अकराही इंद्रियवृत्ती। कैशा लागती भगवद्भक्ती।' –एभा २.२९३. पंचज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें यांखेरीज पुढील चार अंतरिंद्रियें आहेत–मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार. (सामा.) इंद्रिय म्हणजे बाह्य वस्तू जाणण्याची साधनशक्ति;आरंभीं इंद्रिय शब्द येऊन होणारे सामासिक शब्द–इंद्रियदमन; इंद्रियनिग्रह; इंद्रियनियमन; इंद्रियगोचर; इंद्रियविषय; इंद्रियवश; इंद्रियाधीन; इंद्रियजेता; इंद्रियनियामक; इंद्रियनिग्रही,इंद्रियतर्पण. २ पुरुषाचें जननेंद्रिय; लिंग. [सं.] **इंद्रिय हातीं धरणें**–जार कर्मांचें अतिशय व्यसन असणें;अति विषयासक्त असणें. **०गम्य**–वि. इंद्रियांना आलकन होणारें–कळणारें; इंद्रियगोचर. **–यागम्य**–वि. इंद्रियांना आकलन न होणारें; इंद्रियागोचर; इंद्रियातीत. **०ग्राम**–पु. १ इंद्रियसमूह; सर्व इंद्रियें. २ इंद्रियांचें स्थान, शरीर, देह. **०जुलाब**–पु. १ मूत्रेचें मूत्रठाळ; मूत्राधिक्य होण्याचें औषध. २ बहुमूत्र, मूत्रवृद्धि. **०दमन**–१ इंद्रियांना कह्यांत, स्वाधीन ठेवणें. २ विषयाकडे इंद्रियांचा ओढा नाहींसा करण्याचा योगसाधनादि उपाय. **०विज्ञानशास्त्र**–न. इंद्रियांच्या रचनेची, व्यापारांची माहिती देणारें शास्त्र. (इं.) फिजिऑलॉजी.

इंद्रियार्थ—पु इंद्रियाचा विषय (रूप, रस, गंध यापैकीं), विषय. 'जो या इंद्रियार्थां। नागवेचि।'–ज्ञा २.१२४. [सं.]

इंद्रियीकरण—न. (जीवशास्त्र) इंद्रियरचना, इंद्रियविशिष्टता. (इं.) ऑर्गेनिझेशन.

इंद्रुसयारी—स्त्री. (नाविक) गलबतावरील डोलकाठी व शीड उभारण्याची दोरी, यारी.

इद्वाटो—वि. (गो.) नाश करणारा; दुष्ट. [सं. विध्वंसक; म. विझवटा]

इद्वांस—पु. (व.) नाश; विध्वंस. 'चाकूचा इद्वांस बेघाड. [सं. विध्वंस]

इंधक—पु. (पदार्थ.) इध्र; (इं.) ईथर.

इंधन—न. १ (व. खा.) सर्पण; जळण; जाळावयाचीं लाकडें; वेतण. ' जरि अमृत घालुं आंधणा । कापुरु मेळउ इंधना । ' –ऋ ५१. ' जेवीं इंधनी वाढे हुताश । '–एभा २५.७७. 'शुद्ध हें जेवितां निवे मन । अल्प त्या इंधन वुड लागे । '–तुगा २६२. [सं.]

इंधर—क्रिवि. (हिं.) इकडे; येथें. **०तिधर**–क्रिवि. चुकवा चुकवीचें, उडवाउडवीचें (भाषण); ताळतंत्र नसणारें (भाषण). (क्रि० करणें; मांडणें; लावणें). [इधर द्वि.]

इंधा—पु. (व.) स्त्री बाळंत झाल्यानंतर अस्पर्श होण्यापूर्वीच गर्भधारणा होऊन झालेला मुलगा.

इंधा—पु. (व.) चुलीसाठीं तीन धोंडे मांडतात त्यांपैकीं प्रत्येक [इंधन]

इध्मा—पु. विवक्षितसंख्याक समिधांचा समूह; श्रौतस्मात यागांत उंबर, पळस इत्यादि वृक्षांच्या सामान्यतः पंधरा समिधांचा इध्मा उपयोगांत आणतात. इध्म्यांतील समिधांची लांबी वीतभर किंवा हातभर असते. इध्म किंवा इध्मा नामक समिधांचा याग मुख्य यागापूर्वी करावयाचा असतो. [सं.]

इनइन—स्त्री. (व.) किरकीर; घासाघासी. ' मोठी इनइन करतो ' (क्रि० करणें). [ध्व.]

इनई—स्त्री. (व.) एक रोग. यांत हाताला ठणका लागून सुया बोंचल्यासारख्या वेदना होतात. [ध्व. इन्इन]

इनमीनतीन—ईनमीनतीन पहा.

इनसान—पु. माणूस; मनुष्य. ' हुजूर काय सांगूं ! तो इनसान नव्हे केवळ सैतानाची औलाद आहे. ' –इलामुंदरी (मकरंद माला) २०.१७९. [अर. इन्सान=मनुष्य]

इनसाफ—पु. १ न्याय, निर्णय. ' रीतभात इनसाफ लक्ष्य नाहीं दुधांत कालविलें –ऐपो ३०५. २ (कायदा) कोर्टांत फियादी–आरोपीसमक्ष पुरावा घेऊन न्याय देण्याचें काम. ३ वरिष्ठ अधिकाऱ्यावर वरिष्ठ कोर्टानें आरोप ठेवून खटला भरणें. (इं) इंपीचमेंट. ' त्या वेळेस त्यास कायदेमंडळाच्या मताप्रमाणें वागण्यास भाग पाडण्याकरितां दुसरा कोणताहि उपाय नसल्यामुळें; इंपीचमेंट (इन्साफ) या प्रखर शस्त्राचा उपयोग करावा लागला. ' –वस्व ५०. [अर. इन्साफ्=न्याय; निर्णय]

इनाई—स्त्री. (व.) महारांची देवी.

इनॉक्युलेशन—न. १ रोगप्रतिबंधक लस टोचून अंगांत घालणें; (सामा.) टोचणें; देवीकाढणें; २ प्लेग वगैरे होऊं नये म्हणून प्लेगाची लस टोचणें. ' इनॉक्युलेशन हा एक तोडगा आहे. यापासून आल्यास थोडाबहुत गुण येईल. ' –टि. २.१३५. [इं.]

इनम—न. (ज्यो.) (कोणत्याही) ग्रहाचें सूर्यापासून अंतर; यांमधील अंतर [सं. इन=सूर्य+अपगम=मार्गे जाणें]

इनाम—न. १ कोणत्याहि अटीशिवाय शाश्वत, वंशपरंपरेची स्थावर अशी देणगी; वृत्ति; इनामांत पुढील प्रकार आहेत.–वतनी (सनदी) व गांवनिसबत. वतनींत गैरउपयोगी (न्हावी, सुतार, चांभार, चौघुला, शेव्या, मांग, कुंभार, पोतदार, महाजन, कुडवुडे जोशी इ०) व उपयोगी (उपाध्याय, गुरव, गांवज्योतिषी, जंगम, काजी, मुलाणा, मुजावर इ०), परगणे वतनदार (देशमुख, देशपांडे, देशकुलकर्णी, नाडगौडा, नाडकर्णी, सरदेसाई, सरदेशपांडे, सरदेशमुख, सरपाटील, निरखीदार, देशगत, घाटपांडे, देसाई), गांवनोकर (पाटील, कुलकर्णी, मतादार, माधवी, महार, तराळ, बळीकर इ०), क्षेत्रोपाध्ये. गांवनिसबत (पासोडी, देवस्थान, हाडोळी, मावळी, धर्मादाय, देणगी, वतनदारी इ०). सनदी म्हणजे सरकारी करापासून मुक्त व कायमचें दिल्याबद्दल सनद मिळते तें. शराकती दुमाला म्हणजे गांवांतील उत्पन्नांतून गांवकामगाराचा खर्च वजा जातां बाकी राहणाऱ्या उत्पन्नांत सरकाराची हिस्सेरस्सी असते ती. शिवाय अग्रहार, भाकरी, चोळीबांगडी, देवस्थान, कदीम, जदीद, जात, जुडी, कोल्हाटी, मळीकी, राजकीय, साधणूक, शेतसनदी, योगक्षेम, इसाफत, नौकरी, वतनीवजीफा, आलतमघा, इ० इ० ऐन इनामतीमध्यें ब्राह्मणांचीं अग्रहारें व बादशहाचे पीर आणि थडगीं, मशिदी आणि देवस्थानें, फकीर इनाम, मोईन, काजी–मुलाणा, फकीर–तपस्वी, अग्रछत्र वगैरे बाबी येत. –भाअ १८३३.१३८. २ देव, ब्राह्मण वगैरेंना दिलेली भूमि वगैरे. ३ मालकी हक्क न देतां देणें, घेणें, खाणें, सोडणें. ' हा माड यानें इनाम खाल्ला. ' ' आम्ही गाईचें दूध काढीत नाहीं, वासरे इनाम पितात. ' ४ (सामा.) कोणतेंहि बक्षीस; नजर; देणगी. [अर. इन्आम] **०इक्राम**–पु. भेट; देणगी, बक्षीस, वृत्ति. –बाडसभा २.१९६. [अर.] **०इजाफत**–न. देणगी वाढवून देणें; देणगीची वाढ; इनामांत घातलेली भर (कांहीं कामगिरी केल्याचा मोबदला म्हणून वाढवून दिलेलें इनाम.) **०इजाफतदार**–वि. इनाम इजाफत मिळालेला; वाढलेलें इनाम उपभोगणारा. **०चिटणावळ**–स्त्री. इनामावरील सरकारी बाब किंवा कर. [हि.] **०चिट्ठी**–पु. १ वेगवेगळ्या इनामांची यादी, तपशील (जिल्ह्यातील किंवा ताल्लुक्यांतील). २ इनामपत्र; इनामपट्टा, इनामखत. **०चौकशी**—स्त्री. इनामपाहणी पहा. **०चौथाई**–स्त्री. इनामाचा चौथा हिस्सा (सरकारांत भरणा करावयाचा). **०जमीन**–स्त्री. एखाद्या मोठ्या कामगिरीबद्दल सरकारांतून बक्षीस मिळालेली सारामाफीची जमीन. **०तिजाई**–स्त्री. १ इनाम जमिनीच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा. हा कर सरकार सहा किंवा दहा वर्षांनीं वसुल करी. –शारो ४०.२ पूर्ण अथवा सर्वस्वी इनाम नसलेल्या इनामी जमिनीवरील साऱ्याचा तिसरा भाग. ' इदलशाही दिवाणांत हक्कचौथाई व इनामतिजाईच नव्हती ' –रा ३.११७. [फा.] **०दार**–पु. इनाम धारण करणारा; इनामी

जमिनीचा मालक; वतनदार. [फा. इन्+आम्+दार] **०नोकरी**–स्त्री. गांव, महाल, परगणा यांची महसुली, फौजदारीसंबंधानें गावकी, घरकी कामें करणाऱ्या गांवकामगारांनां व परगणे अमलदारांना इनाम जें देण्यांत आलें तें; काळीचें उत्पन्न, (स्वामित्व नव्हे;) म्हणजे महसुल घेण्याचा अधिकार; किंवा इनाम जमीन धारण करणाऱ्यांना महसुलाची सवैस्वीं अथवा अंशतः सूट देण्यांत आली ती. इनाम मिळकती दोन प्रकारच्या असतात. –प्रत्यक्ष (दुमाला) आणि अप्रत्यक्ष (परभारा). पहिल्या प्रकारांत इनामदारांना सर्वंध गांव, महाल किंवा गांवांतील सर्व जमीन दुमाला करून देत आणि धारा वसूल करण्याचा राजाधिकार हा त्यांना देत. दुसऱ्या प्रकारचें इनाम ऐन किंवा नक्त किंवा ऐनजिनसी अमें धारा वसूल करून आपल्या खजिन्यांतून सरकार इनामदारांना जी ठराविक नेमणूक रोकडीनें आदा करी तिला नक्त इनाम म्हणत आणि जमीन धारण करणाराकडून इनामदार परस्पर ठराविक घुगरी म्हणजे दर विघ्यास किंवा नांगरास धान्याचीं अमुक मापें घेत तीं; अथवा बाजारहाटांत विकावयास आलेल्या मालाची शेंव–फगकी किंवा वाणगी घेत ती, यांना परभाराइक किंवा ऐनजिनसी इनाम म्हणतात –गागा २९.४०. **०पट्टी ताजम**–स्त्री. पु. इनामदारावर बसविलेली पट्टी, कर. हा कर दर तीन वर्षांनीं जेवढें उत्पन्न असेल तेवढा बसवीत, जेवढें त्या वर्षाचें उत्पन्न असेल तेवढा घेत. **०पत्र**–न. इनाम दिल्यासंबंधींचें खत, सनद; इनाम दिल्याचें राजपत्र; सरकारनें कोणास इनाम दिल्यास त्याबद्दल पुढील चार सरकारी हुकूम निघत–(अ) खुद्द इनामदारास, (आ) इनाम गांव अथवा जमीन ज्या परगण्यांत आहे त्या परगण्याच्या मामलेदारास, (इ) त्याच परगण्याच्या देशमुख देशपांड्यास, (ई) इनाम असलेल्या गांवच्या पाटील–कुलकर्णी वगैरे मुकदमास. **०परभारा**–पु सरकारांतून न घेतां परभारें गांवाकडून वसूल करण्यांत येणारें इनाम **०पासोडी**–स्त्री गांवकामगारांना जी किरकोळ जमीन इनाम देतात त्याबद्दल व्यापकतेनें योजावयाचा शब्द जसें:–पाटलाग पासोडीसाठीं. कुलकर्ण्यास रुमालासाठीं, पोतदारास पोंगडीसाठीं; महारास जोड्यासाठीं; भटास धोतरासाठीं, वगैरे इनाम दिलेल्या जमिनीबद्दल. **०पाहणी**–स्त्री. दिलेल्या इनामजमिनींची पाहणी, तपासणी. **०फेजावी**–स्त्री.जमिनीवरील सरकारसाऱ्याच्या एकतृतीयांशाइतका दरसाल सरकारांत करावयाचा भरणा. [अर.]

इनामत—स्त्री. देणगी; बक्षीस; इनाम. 'कित्येकांस इनामत अजरामर गावें भूमि करून दिधली.' –चित्रगुप्त १०६. [अर. इन्+आमत् = देणगी]

इनामती, इनामी—वि. इनामतसंबंधीं; इनामासंबंधीं. इनाम मिळालेला.

इनायत—स्त्री. कृपा; बक्षीस; मेहेरबानी; वरिष्ठांकडून देणगी; दयादर्शन; कृपादर्शन. [अर. इनायत्] **०करणें**–बक्षीस देणें. **०नामा**–पु कृपापत्र, शिफारसपत्र, आज्ञापत्र (वरिष्ठांकडून येणाऱ्या पत्रास लावतात). 'यांस अजे करितां इनायतनामा यावयासी विलंब करणार नाहींत.' –रा ८.२०२. **०होणें**–बक्षीस मिळणें.

इन्कार—पु निषेध: प्रत्याहार; नाकबुली [अर. इन्कार]

इन्किलाब—स्त्री. क्रान्ति: फेरबदल; उलाढाल. [अर. इन्किलाब+क्रान्ति]

इन्फंटी—स्त्री. प्राथमिक शाळेतील अगदीं पहिला, उजळणीचा, वर्ग; बिगर इयत्ता; बालवर्ग. 'ती आतां पांच एक वर्षांची झाली होती, आणि हातांत पाटी पुस्तक घेऊन इन्फंटीच्या वर्गाला जात होती.' –सुदे २९. [इं. इन्फंट=मूल, बालक]

इन्फिसाल—पु. निकाल; फैसला. 'त्याचा हिमायाचे रुईनें इन्फिसाल करावा' –रा ७.६८. 'दिगरगांवसुद्दां बाकीसाल–मजकुरचा इन्फिसाल करून यावा.' –रा २२ ६६. [अर इन्फिसाल्]

इन्शाल्लाताला—उद्गा सर्वश्रेष्ठ प्रभु इच्छील तर. 'पृथ्वीपद इन्शा अल्लाहु तआला यांणीं अकवरासहित औरंगजेबास करार करून वक्षिसी कली आहे.' –चित्रगुप्त ४१. [अर इन्शा अल्लाहु तआला]

इन्शुअरन्स—न. विमा. 'कंपनीनें फक्त आपल्या नोकरांसाठीं प्रॉव्हिडंट किंवा इन्शुअरन्स फंड काढावा' –आगर ३.७३. [इं.]

इन्साफ—पु. १ न्याय; निर्णय. इनसाफ पहा. **०गुर्जा**–वि. इन्साफी; न्यायी. –ख ७.३५७५. [फा. इन्साफ्+गुर्जीन्]

इन्साफी—वि. १ न्यायी; न्यायानें वागणारा. 'इंग्रजी इन्साफी त्यांचे येखत्यारी हेही मुन्साफ् (न्यायी) असतील.' –ख ७.३५७०. २ इन्साफ करण्यांत चतुर. [अर. इन्साफ्]

इन्सोल—(चांभारी धंदा) (जोड्याच्या) आंतल्या बाजूस शिवण्यानें तळ (सोल) [इं. इन=आतील+सोल=तळ]

इन्स्पेक्टर—पु तपासनीस, देखरेख, तपासणी करणारा अमलदार. उदा० पोलीस इन्स्पेक्टर; सर्कल इन्स्पेक्टर; स्कूल इन्स्पेक्टर. 'इन्स्पेक्टर उभे होत हातावर.' –मापो १३ [इं]

इपट, इपतर, इपरीत, इपसळ, इपारणें, इपारा, इपितर—विभक्त्यि पहा

इफळ—न (गो) समुद्रकांठच्या खाऱ्या व भरतीच्या पाण्यानें बुडणाऱ्या जागीं होणारें झाड. हें सहा सात हात उंच असतें. याचा विस्तार मोठा असून डाहाळ्या समुद्रांत बुडालेल्या असतात, पाला गुरें खातात, लाकूड चिवट व कठिण असतें. लाकूड जाळून त्यापासून क्षार होतो त्याचा उपयोग परीट कपडे धुण्याकडे करतात. [सं. विफल]

इफाजत—स्त्री संरक्षण: आश्रय. 'रघुनाथराऊ पेशवे ईं जानबाचे इफाजतेंत आहेत.' –रा १०.१०६. [अर. हिफाझत्]

इबत्ती—स्त्री. (कर्ना) लिंगाईत लोक कपाळास लावतात तें भस्म; विभूति. [सं. विभूति.]

इबाक—क्रिवि (खा.) या बाजूस, इकडे. [इ+बाजू?]

इबाड—पु (गो.) खराबी: नासधूस; नास: बिघाड. [सं. विघात; म. बिघाड]

इबादत—स्त्री. पूजा; भक्ति; ईश्वरनिष्ठा. [अर. इबादत=पूजा]

इबादती—वि. धार्मिक. 'हे बातेचा तरस मोहीबासारखे इबादती लोकांस काहींच नये हें अज्याईब आहे.' –रा ३.९०. [अर. इबादती =पूजक; इबादत्=पूजा]

इबादीपंथ—पु. एक मुसलमानी पंथ व त्यांतील लोक. यांचा पंथ 'खवारीज' पंथाची एक शाखा आहे. या पंथाला हें नांव त्याचा संस्थापक अबदल्ला बिन इबाद याच्या नांवावरून पडलें. [अर. इबादत्]

इबारत—स्त्री १ भाषापद्धति; वाक्प्रचार; शब्दप्रयोग. 'ह्या ग्रंथाच्या बैता तीस हजार आहेत, तो पार्सी भाषेचे इबारतींत आहे.' –ऐस्फुले ४५. [अर. इबारत्=भाषाशैली, धाटणी] २ इभ्रत; प्रतिष्ठा. 'तुमची इबारत गाईकवाडांवरी चढली.' –रा ६.३२१. [अर. इब्रत्. अप.]

इबीत—(कर.) इबत्ती पहा.

इबीन, इब्न—पु. पुत्र; बिन (अमक्याचा मुलगा). 'येलोजी बिन मावजी इबीन चांदजी.' –पेदस १११ [अर. इब्न्]

इब्बी—स्त्री. (व. ना.) विटी; गिल्ली (विटीदांडूच्या खेळांतील).

इब्लाग—स्त्री. पाठवणूक; पाठवणी. 'हमेशा मोहबतनामा इब्लाग करोन मसुर (आनंदित) करीत जाणें.' –रा १०.१६४. [अर. इब्लाघ्]

इब्लिस—पु. दानव; सैतान. 'मुसलमानी कुराणांत असें सांगितलें आहे कीं इब्लिसनें अल्लाविरुद्ध बंड केलें म्हणून त्याला स्वर्गातून हांकून लावण्यांत आलें.' –ज्ञाको (इ) १७१. –वि. (व.) (ल) खोडकर; खोडसाळ; उनाड; उपद्व्यापी; वदमाष (मूल किंवा कृत्य, भाषण). 'देशपांडयांचा रामा फार इब्लिस पोरगा आहे.' [अर. इब्लीस्] **०पणा**—पु. वदमाषी; व्रात्यपणा.

इभ—पु. हत्ती. 'सरिसेपणें एकवटत इभ– । मस्तकावरि' –ज्ञा १.१७. 'द्वैत काननीचे कंठीरव । तुम्ही इभ तेथें सर्व ।' –पांप्र ३१. २१. [सं.]

इभ्रत—स्त्री. थोरवी; बळ; प्रतिष्ठा; विश्वास; वचक; दरारा; धाक; अब्रू. 'तें ठाणें इभ्रतीनें घेतलें.' –ख ६.२७२५. 'या देशींयांची इभ्रत फार बाळगितात' –ख ११ ६१५६. [अर. इब्रत्= उदाहरण; (ल.) धाक; भीति]

इमला—पु. इमारत; बांधकाम; वाडा; घर; मंदिर. 'वैकुंठीं यशाचे इमले । बांधुन मग सुरवंशीं जन्मले । , –ऐपो २६६. [अर. इम्लाक्=मालमत्ता] **०ढांसळणें**–मसलत अंगावर येणें; काम नासणें, मोडणें, बिघडणें. 'त्यांचा (मनोविकारांचा) लवकर नाश करावयाचा असेल तर त्यांना सुशिक्षणाचा किडा लावावा म्हजे थोडया वर्षांत त्यांचें पीठ होऊन त्यांचा इमला ढांसळतो.' –ट्रि ४.३७. **इमलाफैला**—अमलाफैला पहा.

इमली—स्त्री. (हिं) चिंच; अम्ली. [सं. अम्लिका; गु. अंबील]

इमाद्—पु. खांब; आधार. [अर. इमाद=खांब, आधार]

इमान—न. १ वचन; एकनिष्ठा; सचोटी; 'नवाबांनीं आपला इमान राखिला.' –पदबा १.८९. २ श्रद्धा; विश्वास. 'त्या पंज्या पासी तुमचा इमान असावा.' –मदरु १.११३. [अर. ईमान्= श्रद्धा] ३ इमानपत्र; इमानाची खूण; शपथपत्र. 'इमान पाठविलें' –९६ कलमी ७. ४ सदसद्विवेकबुद्धि; मनोदेवता; अंतर्याम. **०इतबार**–पु. एकनिष्ठा; सचोटी; प्रामाणिकपणा. **०करणें–देणें**–वचन देणें; शपथ देणें; शपथेवर सांगणें. 'द्यावी शेजेची बाईल पण इमान देऊं नये.' –इपुस्त्रीपो ४२. **०क्रिया**—स्त्री. इमान राखण्याबद्दल शपथ घेणें. **०गुंतणें**–शपथेत अडकणें; शपथ घेऊन चुकणें. **इमानास जागणें, इमान धरणें**–इमान नष्ट न होऊं देणें; इमान जागृत ठेवणें; सचोटी न सोडणें; पूर्वीचे उपकार स्मरणें. **०प्रमाण**–न. १ प्रामाणिकपणा; विश्वासूपणा; सचोटी. २ करारमदार; आणभाक; शपथक्रिया. **०भाक**–न. आणभाक; करार; अहदपैमान. –रा १५.२७३.

इमानतदार, इमानी—वि. विश्वासू; प्रामाणिक; खरा; सत्यशील.

इमानेइतबारें—क्रिवि. एकनिष्ठेनें; प्रामाणिकपणानें.

इमाम—पु. १ मुसलमानी धर्माध्यक्ष, गुरु, उपाध्याय; (विशेषतः अलीच्या वंशजापैकीं); ज्यांचें चांगलें वाईट अनुकरण करावयाचें तो पुढारी; राज्यव्यवस्थेत इमाम ही अधिकाराची जागा असून धार्मिक संस्कार करणें हें काम त्याच्याकडे असतें. 'इराणमध्यें शिया लोकांतील इमाम जास्त शुद्ध व अध्यात्मी असून सरकारच्या सत्तेखालीं ते येत नाहींत.' २ बहुमानार्थी पदवी; नायक, पुढारी, श्रेष्ठ या अर्थी. [अर. इमाम्] **०गड्डा**—पु. मुसल्मान लोक हनुवटीवर केंसाचा भाग राखतात तो. **०जयंती**—स्त्री. मोहरमचा सण; ही विचित्र अरबी–संस्कृत संज्ञा हिंदूनीं मुसलमानी सणाला पूर्वीपासून रूढ केली आहे. **०दांडगा**–वि. दांडगेश्वर; उमेट; मस्तवाल; पशुतुल्य; लठ्ठामिश्र. **०बाळी**—स्त्री. १ हत्तीच्या कानांतील एक मोठी बाळी (पूर्वी ही हत्तीच्या कानांत घालण्याची चाल असे). २ एकाच कानांत घालण्याची (मोती, लोलक वगैरे असलेली) बाळी. ही मुसलमान, भिल्ल वगैरे लोक घालतात.

इमायत, इमाईत—स्त्री. संरक्षण; आश्रय. –रा ८.१८५. [अर. हिमायत्]

इमारत—स्त्री. दगड, चुना, विटा, माती, लाकूड इ० साहित्यानें करावयाचें काम; बांधकाम; पायाच्या वरचें बांधकाम. किल्ल्याची इमारत; विहिरीची इमारत. 'गडाची इमारत मुस्तेद करावी.' –मराआ ३३. २ वाडा; हवेली; मंदिर; घर; इमला. ३ अंगकाठी; शरीरयष्टी; बांधा. –'घोडी पांच हजार रुपये किंमतीची

होती, इमारतीनेंही थोर होती.' –ख ११.५७०६. [अर. इमारत] ०खाना–पु. सरकारी इमारत बांधण्यायें (इं. पी. डब्ल्यु. डी.) खातें. –इऐ २२.२४. ०फळा येणें–१ इमारत पुरी होणें; बांधकाम पुरें होणें. २ (ल.) इच्छित कार्य सिद्धीस जाणें. 'संतकृपा झाली। इमारत फळा आली।' –ब. २२९.

इयत्—सना. इतकें; एवढें. उ० इयत्काल; इयत् परिमाण. [सं.]

इयत्ता—स्त्री. १ इतकेपणा; ठराविक, नेमून दिलेली मर्यादा, प्रमाण; दर्जा; प्रमाणाचें मापन (गुण, काल, दर्जा इ०चें); पल्ला; टप्पा. मर्यादा नेमून देणें. जसें उष्णतेची इयत्ता. 'स्फूर्तीची ज्वाला अमुकच इयत्तेपर्यंत वाढली पाहिजे ...' –टि ३.२६२. [सं.] २ शाळेंतील अभ्यासाप्रमाणें दर्जा; वर्ग. यत्ता पहा. [सं. इयत्; प्रा. इत्तिय]

इया-यी—पु.स्त्री. (खा.) विळा, विळी.

इया-ये–सना. **इयें**—(अव.) या. 'इया पाटणी जें. ...' शिलालेख शके ११२८. 'मी माणुसचि नव्हें या थरासि। कांइ नाणीतीचि इयें।' –ऋ ५५. 'म्हणोनि मी हें नकरीं। इये संग्रामीं शस्त्र न धरीं.' –ज्ञा १.२३३. 'तुजवरि मन इचें यापरी कां ध्येला।' –नल १९८. 'इज बाय इया पोयरा खेरी याहाकी हाय' =हीच बाई या मुलाची खरी आई आहे. –भिल्लीभाषा २४. सं. एषा, एतत्, इदम्]

इयींक—क्रिवि. (राजा.) विण्यास, प्रसूत होण्यास –मसाप २.३५९. [विणें]

इरकल-ली—वि. विजापूर जिल्ह्यांत, हुनगुंद तालुक्यांत इलकल नांवाचें गांव आहे, त्या गांवावरून (तेथें होणाऱ्या) लुगड्याच्या वाणास नांव पडलें आहे. या लुगडयाचा पोत कोणताही असून किनार रेशमी, त्यामध्यें नक्षी करवत व पिंवळे फुटफासे व चार गोमा असतात. [इलकल गांव]

इरगीमिरगी—स्त्री. मुलांचा एक खेळ.

इरजा—पु. इरजिकसंबंधीं कामावर येणारा मनुष्य, बैल इ० इरजिक पहा.

इरजिक-जीक, इरजे—स्त्रीन. जमिनीस द्यावयाची कुळवाची पाळी, पेरणी, पिकाची काढणी, मळणी वगैरे शेतांचें काम करण्यासाठीं जे एकाच वेळीं अनेक गडी लावतात त्यांना सकाळीं न्याहारी, दुपारीं साधारण जेवण, व संध्याकाळीं मोठें जेवण घालतात तें; अशा कामाला अन्नमय मोबदल्याला–इरजिक म्हणतात. –गागा १४५. (सामा.) शेती वगैरे कामास लागणारे बैल वगैरे यांची एकमेकांनीं एकमेकांस करावयाची मदत. (क्रि० घेणें). [सं. विरच्–इरज=व्यवस्था करणें; वैसं. इरा=अन्न]

इरड, इरवड-वाड—स्त्री. १ सकाळीं गांवदरीस पडलेलें उष्टेपाटें, विष्ठा वगैरे खाण्यासाठीं गुरांचें हिंडणें, भटकणें; (क्रि० करणें). २ विष्ठा वगैरे खाणें. (क्रि० खाणें). ३ (ल.) शेजारीपाजारीं अधाशीपणानें तोंड घालणें; परद्वार करणें. [का. एरु=शेण, गुरांची विष्ठा.]

इरड, इरवड-वाड—न. (विरू.) विरड. मुख्य धान्याबरोबर पेरलेलें धान्य; मोगण (क्रि० टाकणें).[का. एरडु=दोन]

इरड, इरवड-वाड—स्त्री. जंगलांतून आणलेला लांकडाचा किंवा गवताचा डोईभर भारा; डोईओझें; भाऱ्याकरितां जंगलांत घातलेली फेरी. [विरड, इरड करणें]

इरडणें—अक्रि. (कर.) उगवणें (रोप वगैरे). 'ऊस नुकताच इरडावयाला लागला आहे' [कर्ना. इरडा=झाड, रोप]

इरडपाळी—स्त्री. मृगाचा पाऊस पडतांच कुळवानें शेतांत घातलेली पाळी.

इरडा-इरडो—पु. (कर्ना. गो.) झाडाचें रोप, (गो.) डांबो. [कर्ना. इरडा=झाड]

इरण—न. एक वेली. अरणी पहा.

इरमणें—विरमणें पहा.

इरमार—पु. (कु.) अभिमान; गर्व; ताठा. [वैसं. इरिन्=गर्विष्ठ]

इरय—पु. (कु.हेट.) १ एक वृक्ष; देवदार. २ (गो.) गाडीचा आंस.

इरली—स्त्री. (कों.) लहान इरलें.

इरलें—न. १ पर्जन्य निवारण्यासाठीं डोकीवर घ्यावयाकरितां कामळ्यांचा (कुंचीच्या आकाराचा) केलेला सांगाडा. यावर पळस, कुंभा, साग, केतकी यांचीं पानें शिवून हा तयार करतात; नारळीच्या पातींचेंहि इरलें करितात. पानांची गांवटी छत्री. विरलें पहा. [प्रा. विराली=एक वल्ली; प्रा. इल्लीर=छत्री; सं. वल्लर=लताकुंज ?] २ (व.) (धान्याच्या) कणगीवर ठेवण्यासाठीं गवताचें केलेलें झांकण.

इरस—पु. (कु.) गाडीचा आंस. 'गाडयेचो इरस वांकलो हा.' [हिं. इरिस, इर्से=आंस]

इरसाल—वि. निवडक; वेंचक. 'मवाळपक्षांत प्रामाणिकपणाचे इरसाल कांदे कसे कसे आहेत तें पहा.'–केळ १. १३९. इर्साल पहा.

इरळ-ळा—नपु. दुसऱ्या धान्यांत पेरलेलें धान्य. उ० कपाशी पेरतांना तीत थोडे ज्वारीचे टाकलेले दाणे. [का. एरडु=दोन]

इरळणें, इरळण काढणें—क्रि. (माण.) दाट उगवलेल्या पिकांतील कांहीं मोड उपटून विरळ करणें. [विरल.]

इरा—पु. (व. कों. कुव.) पाण्याचा झरा; पऱ्हा. [सं. इरा=पाणी, पेय]

इरा—पु. (चंद्रपुरी) विळा. [विळा]

इराकत-खत-गत—स्त्री. (व. कों.) विराकत १ लघवी; लघवी करणें; लघवीस बसणें.(बऱ्हाडांत स्त्रियांना उद्देशून व इतर ठिकाणीं पुरुषांना उद्देशूनही योजतात) (क्रि० करणें) २ (ल.) तुच्छ मानणें. ' मी त्या पैशांवर इराकत करतों. [अर. इराकत्, तुल० सं. इरा=पाणी; विराकत; तुल० सं. वि+रिच्=रिकामें होणें]

इराकी—वि. इराक देशांतील (घोडा); अरबी. [इराक=एका प्रांताचें नांव]

इराडा काढणें—क्रि. (माण.) खोड मोडणें. अरड काढणें पहा.

इराणी-नी—वि. इराणांतील(घोडा, गाढव). -पया २९. -पु. १ इराणांतील मूळचे लोक; पार्शी. ' मी बाहेर इराण्याच्या दुकानांत चहा प्यायाला गेलों होतों.'-नाकु ३.३९. २ जेथें अफगाण, पठाण, बलुची यांच्या बरोबर इराण्यांचाहि उल्लेख येतो तेथें पठाणासारखे आडमुठे दरोडेखोर लोक असा अर्थ समजावा. आजचे इराणी मुसलमान आहेत. [फा. ईरान्] **०फलींग**-पु. ३½ मैल -छअं ७४.

इरादा—पु १ विचार; हेतु; बेत; संकल्प, उद्देश; इच्छा. २ योग्यता: अधिकार. ' पुरंध-यांची कदीम इरादा । तत्पर पेठे मोंगल वादा । ' -ऐपो २१९. ३ इलाखा (हक्क, पदवी या अर्थी चुकीने वापरतात). [अर. इरादत्; इरादा=इच्छा, हेतु.]

इराप—स्त्री. (सुतारकाम) (फळीच्या) कोपऱ्यास करावयाची गोलची. -मॅरट ७७. [महिराप ?]

इरिडियम—न. (शाप.) प्लॅटिनम वर्गातील एक मूलद्रव्य हें फाऊंटन पेनच्या टोंकास लावतात. ऐंद्र पहा. [इं]

इरीरी, इरिइरि करणें—क्रि. १ बैलांना हाकणें, चुचकारणें ' इरिरि पोपो (तलगु चल, चल.) दादा, झाआ. २ (ल) (कु.) शेती करणें; शेतकरी बनणें. ' तूं शिकतलय कीं इरीइरी करतलय. ' [ध्व; सं. इर्=जाणें]

इरुदी, इरोदी—(व.) विरोली, विरोदी पहा.

इरे—स्त्री. ईर्षा. ईर पहा.

इरेफ, इराव—वि.क्रिवि. (शिंपी धंदा) तिरपें, वांकडें, तिरकसपणें; वांकड्या रीतीनें (कपडा कापणें). रास किंवा कास (सरळ) याच्या उलट. (क्रि० कापणें). [सं. विरेया, विरेफ, हिं. इरेब]

इरोळी—स्त्री. गुरांच्या पायास होणारा एक रोग.

इर्तिबात—स्त्री. स्नेह; मैत्री. ' पंत साहेबांसी व आम्हांसी दोस्ती व इर्तिबात कदीम आहे. '-दिमरा १.४५. [अर. इर्तिबात्= मैत्री]

इर्मित—स्त्री. (गो.) ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा मठ. [पोर्तु. इर्मिडा]

इर्शाद—पुस्त्री. हुकूम; आज्ञा; उपदेश. ' रामाजी महादेव यास इर्शाद फर्मावून. ' -ख ७.३५६५. ' तिकडील बातमी वरचेवर आणवीत जावी, याप्रमाणें इर्शाद करून खलिता वाचून बहुत श्रमी झाले. ' -दिमरा २.१६६. [अर. इर्शाद्=आज्ञा; हुकूम]

इर्साल—-पु. १ पाठवणूक; रवानगी. ' चित्तांत आल्यास माझें विनंतीपत्र व जिन्नस इर्साल करावे. ' -रा १.१४७. २ सरकारी खजिन्यांत भरावयाचा पैसा, पाठविण्याचा पैका. ' यावर तमाम लष्करास व वाणियांस ताकीद करून इर्साल पोहोंचवून दिल्हा. ' -इम १९५. -वि. १ अगदीं उत्तम दर्जाचा; गुणानें अत्युत्कृष्ट; (आंबा, इतर फळें व त्यांचीं झाडें यांस म्हणतात, तसेंच फळें, फुलें, झाडें, बिया अत्युत्कृष्ट समजल्या जाणाऱ्या बाहेर पाठविण्या योग्य यानांही हें विशेषण लावतात). निवडक; वेचक; अस्सल; अव्वल. २ अडल, बेरकी; वस्ताद; पक्का (लबाड माणूस, चोर, भामटा, खोटा माणूस वगैरे) (अर. इर्साल=दूतमंडळ; पत्रप्रेषण] **०नामा-पट्टी**-पुस्त्री. खजिन्यांत भरावयाच्या पैशांचा तपशील; अथवा सरकारांत भरावयाच्या किंवा भरलेल्या रकमेची यादी. **०भरणा**-पु महालाकडून खजिन्यांत पाठविलेला वसूल, पैसा.

इलगार—पु. हल्ला. एल्गार पहा. [अर. इल्घार=लुटालूट; सैन्यानें केलेली नासधूस]

इलम—पु स्त्री. १ शास्त्र; विद्या; कला; हुनर. २ उपाय; साधन; प्रयत्न; युक्ति; इलाज. ३ जादूटोणा; मंत्रतंत्र; चमत्कार; इंद्रजाल [अर. इल्म्] -वि. इलमी; इलमबाज.

इलमबाज, इलमी—वि. १ इलम जाणणारा; जादूगार; मांत्रिक २ बुद्धिवान्; हुशार; हुन्नरी. [अर. इल्म]

इलस—क्रि. (कु) आलास. ' तूं केव्हां इलस. ' (कों.) इलो= आला.

इलाईत-यत—स्त्री. विलायत, प्रांत; प्रदेश; मुलूख. ' देश इलाईत । कावीज केलें तळकोंकण ' -इपुस्त्रिपो. ' विलायतिर्जनपदः । ' -राव्यको. जनपदवर्ग १. [अर. विलायत्=प्रांत; देश]

इलाकी—इराकी पहा. -मराआ ६.

इलाखा-का—पु. १ हक्क; तावा; सत्ता अवलंबन. ' रघुनाथराव इलाखा राखणार नाहीं. ' -ख७.३५७३. २ परिवार; बायकामाणसें; खटला. ' सर्व रायगडावरी संभाजीराजे यांचा इलाखा (परिवार) राहिला. ' -मराचियोशा २५; -ख ८३५. ३ संबंध. ' तुम्हांसी त्याचा इलाखा नाहीं. ' -सभासद ४२. ४ परगणा; प्रांत; शहरहद्द; राज्यकारभाराची विशिष्ट भौगोलिक मर्यादा. ' हा गांव पुणें इलाख्यांत आहे आणि तो नगर इलाख्यांत आहे. ' ' या देशांत इंग्रजांची प्राबल्यता जाहलिया अगोदरी नबाब मुहम्मद अली खानाचें इलाखेंत आम्हीं होतों. '-तरा १००. ५ पालखीच्या दांडीस लावावयाचे लहान लहान गोंडे. ६ वसुलीवर वरात; तनखा; वतन. [अर. इलाका]

इलागत—क्रिवि. (व.) क्वचित; एखादेवेळीं.

इलाचा—पु. एक प्रकारचें गभरेशभी कापड; उंची कापड. [हिं.]

इलाची, इलायची—स्त्री. वेलदोडा; वेलची; वेलचीदाणा. वेलदोडा पहा. [सं. एला; हिं. इलायची; बं. इलायची; गु. एलची; का. यालक्की; ते. एलाकी; ता. एलांची] **०केळें**–न. केळयाची एक लहान चांगली जात. **०दाणा**–पु. वेलची आंत घालून केलेला साखरफुटाणा.

इलाज—पु. उपाय; उपचार; युक्ति. [अर. इलाज्]

इलामत—स्त्री. (गो.) अबदागीर, छत्री, सूर्यपान वगैरे इत मान. [अर. अलामत् =राजचिन्हें; खूण]

इलावृत्त—न. जंबुद्वीपाच्या नऊ वर्षांतील एक वर्ष; प्राचीन जगाचा एक भाग. हें मेरु पर्वताच्या आसमंतात् भागीं अतिनिकट समचतुरस्राकृतीनें वसलेलें असून याच्या भोंवतीं नील, निषध, गाल्यवान व गंधमादन हे पर्वत आहेत. [सं.]

इलाही–-वि. ईश्वरी; ईश्वरासंबंधीं; दैवी. ' शुके इलाही ' =मी ईश्वराचे आभार मानतों. [अर. इलाह्=ईश्वर; इलाही=दैवी] **०सन**–पु. अकबर बादशहानें सुरू केलेला एक शक. हा अकबर व जहांगीर या दोनच बादशहांच्या कारकीर्दीत चालू होता. पुढें शहाजहाननें हा शक बंद केला म्हणून वरील दोन बादशहांच्या कारकीर्दीतील कागदपत्रें, नाणीं यांवर हा शक आढळतो. इलाही शकांत १५५५–५६ मिळविले असतां इसवी सनाचें वर्ष निघतें. **०गज**–पु. अकबराच्या कारकीर्दीत राजा तोडरमल यानें राज्यांतील जमीन मोजण्या करितां जी सांखळी किंवा गज उपयोगांत आणिला तो.

इलिसा, इलु, इलुसा-सी-सें—वि थोडा; थोडासा, अल्प; अगदीं लहान. इवलासा पहा. ' व्यंग इलुहि त्यांत जाण ' –दावि १९४. ' बोले ऐसें लावून शके कोणीहि दोष धीरा ज्या। राजासि विशल्य करी देउनि इलुसीच ओषधी राजा ॥ ' –मोभीष्म ८.८. [सं. अल्पीयस्]

इलेक्शन—१ निवडणूक; पर्सति. २ सभासदांची निवडणूक. ' नेहमीं नेहमीं टिळक नि गोखले, आणि धर्म नि इलेक्शन ! संसार नाहीं होत कांहीं. ' –मुदे ४८. [इं.]

इल्जाम—पु. आळ; दोष; दोषांची शाबिती; ठपका. ' मज कडे कोण काय इल्जाम सांगतील त्याचे जाबसाल मी सर्व पुरवून देईन. ' –राज १०.३४४. ' मजवर इलजाम नाहीं ऐसें समजोन आज्ञा होईल त्यास हजर. ' –रा ५.२०६. [अर. इल्जाम्]

इल्तिमास—स्त्रि. विनवणी; अर्जी. ' ये बाबें तुम्ही इलतिमास लिहिली. ' –इम ७५. [अर. इल्तिमास्]

इल्लत—वि. (व.) व्यसनी; खोडकर; द्वाड; उपद्व्यापी. ' इल्लत माणूस आहे तो. ' –स्त्री. (व.) व्यसन; खोड; दोष; रोग. ' कोणाला विडीची तर कोणाला गांजाची इल्लत असते. ' [अर. इल्हाद्=अधार्मिकता; नास्तिक्य]

इल्लत-थ—स्त्री. हत्यार; उपकरण; आउत; भोंक पाडण्याचें अणकुचिदार हत्यार. [अर. आलत्=शस्त्र; प्रा. इल्ली=एक शस्त्र; म. विळा, विळत]

इल्लम—इल्म पहा

इल्ला—पु. (कर्ना.) १ इनसाफ. २ अर्थ.

इल्ला—पु. समाप्ति; अभाव; नकार. **०बिल्ला करणें–दाखविणें**–नकार देणें; नन्नाचा पाढा वाचणें; आशाभंग करणें; आढेवेढे घेणें; कांकूं करणें. ' वळखून देवलें तुला फाकडे, किती करशी इल्लेबिल्ले. ' –पला १०९.. [का. इल्ला=नाहीं]

इल्लां—वि. (कु.) थोडें. इवलें पहा. इतर रूपें–इल्ले, इल्ले, इल्लो. **०तिल्ला**–वि. (गो.) लहानसहान.

इल्लु—न. (शिंपी धंदा) गुंडीचें भोंक: काज (इं.) होल. ' हुकाची बटणें आहेत त्यांचे इल्लु सदरहूप्रमाणें पूर्वीच करून ठेवावेत. ' –शिकशि १.१३.

इल्हण—वि (व.) विरविरीत, विरळ, पातळ, (जाळ्याप्रमाणें) ' तें कापड फार इल्हण निघालें. '

इल्हाक—पु. जोडणी; सही. ' अजमतखान यांचा इल्हाक, सवेलेंदजंग यांचे दस्खत. ' –रा ७.४५. [अर. इल्हाक्=जोड, सांधा]

इवइव करणें—क्रि. (कु.) कोंबड्यास बोलावणें [ध्व.]

इवला, इवलासा, इवलिसा—वि थोडा; एवढासा, एवढा; उलिसा; किंचित्; अल्प; मूठभर; चिमटीभर; नखभर. ' समर्थी आलिया याचक। इवली भीक न घालिती। ' –एभा ७. २८५. [सं. अल्प–अल्पीयस्]

इवशी—अवदसा. विवशी पहा. ' धाड पडो रे त्या मुलखाशीं। कुणिकुन आली इवशी। ' –ऐपो १२४. ' म्हणे राज्याला भवली इवशी। ' –गापो १०१.

इवळखोर, इवळणी, इवळणें, इवळत—विवळखोर, विवळणी, विवळणें, विवळत पहा.

इवा—पु. (व.) विळा. [इळाप्रमाणें विळा अप.]

इवाइन—न. (व.) संकट.

इवाई-य-ही, इव्हाई—पु. (कों. कु. व. ना.) व्याही. ' तो म्हातारा गृहस्थ त्याचा इवाई होय. ' [व्याही अप.]

इशर, इशरीन—अशर, अशरीन पहा.

इशाड–-न. (हेट., कु.) नांगराचा एक भाग; इसाड; नांगराचा दांडा; नांगराच्या जोखडास बांधावयाचें लांब लांकूड; (कु.) नांगर ओढला जाण्यासाठीं ज्याची एक बाजू नांगरखुंटाच्या भोंकांत बसविलेली असून दुसरी बाजू बैलांच्या मानेवरील जुवाच्या मधोमध बांधलेली असते असें लांकूड. दोरींतून निसटूं नये म्हणून याला दांते पाडलेले असतात. [सं. ईषा; प्रा. ईसा=नांगराचें एक लांकूड+दंड]

इशाड-साड—न. (गो. कों.) कलम (खुंटीचें); कलम बांधलेलें खोड. **इशाड्यांचा आंबा**–ज्या आंब्याच्या झाडावर कलम केलें आहे असा आंबा; कलमी आंब्याचें झाड. [सं. ईषा]

इशाण—न. (कु.) विसण पहा.

इशारत, इशारा—स्त्री.पु. खूण. 'तेज्या इशारती। तट्टा फोकावरी घेती।'–तुगा ३७४८. २ सूचना; ताकीद; खबर. 'इशारती'–सभासद ४२. [अर. इशारत्–रा=खूण] **म्ह०** गाढवास टोणपा, तेजीस इशारा=गाढवाला माराची जरूरी आणि अरबी घोड्याला नुसता इशारा पुरेसा होतो.

इशी—स्त्री. उद्गा. (बाल–वायकी) घाण; मलमूत्रोत्सर्ग; घाणेरडा पदार्थ. २ नकारदर्शक तिरस्कारदर्शक उद्गार. इश्श पहा. [सं. विष्–षा=विष्टा; का. इस=शी:! थू!] **०करणें**–(बाल.) शौचास बसणें; हागणें.

इशीम—स्त्री. अभिमान; भ्रूची चाड; आपल्या नांवाची, लौकिकाची, मोठेपणाची जाणीव. [अर. हशम्=वैभव]

इश्क, इशक—पु १ प्रणय; शृंगार; विलास. 'आम्ही तर दर्दी, इश्काचे भुकेले प्राणी'–प्रला. २ नाद; कल; आवड; शोक; ओढा. 'श्रीमंत राजेश्री बाजीरावसाहेब व चिमाजीआप्पा यांसी घोड्यावर बसावयाचा इशक बहुत आहे.'–ख ९.४८३३. [अर. इश्क=प्रेम] **०पेंच**–न. एक पुष्पविशेष; शोभिवंत लता. 'इश्कपेंच गुलछबू सदोदित भर शेवती सांवरी'–प्रला १५४. **०बाज**–वि. चैनी; विलासी; स्त्रीलंपट. [अर. इश्क+फा. बाज्] **०बाजी**–स्त्री प्रेमलीला; प्रणयविलास; आशकबाजी.–चित्रगुप्त १६४. २ रांडबाजी; बाहेरचा नाद. ३ चैन. [अर. इश्क+फा. बाझी] **०बाजी लावणी**–स्त्री. शृंगारपर लावणी; पद.

इश्की—वि. प्रेमाचा. [अर. इश्क]

इश्तिहार—पु. जाहिरात; प्रसिद्ध करण्याचा मजकूर; जाहिरनामा [अर. इश्तिहार=प्रसिद्धि]

इश्यो, इश्श, इश्शरे, इश्शो—उद्गा. (वायकी) लाज, नापसंती, तिरस्कार, आग्रह वगैरे दाखविण्याच्या वेळीं हा उद्गार निघतो. छीः!; छेः!; इशी पहा. 'इश्श! अग तुझं नांव तर सांगशील!–नाकु ६.२५. 'केवळ हुंड्यापायीं अनाठायीं पडणाऱ्या रत्ना! इश्श!'–प्रफुल्लता ३१.३.२३. 'इश्शरे बायको!' [विश्रं (=मांसाची घाण)–इश्शरं–इश्शरें–राजवाडे भाअ १८३४. किंवा ऱ्हीच्छ्–ईच्छ्–इश्श इशी; किंवा ध्वनि, सीत्कार]

इषक, इष्क, इष्की—इश्क पहा. 'झडं दे इष्कीनोंबद वाजिव चौघडा'–सला २. 'प्रसन्नता मजि उभयता इष्की सागरा आलें भरतें।'–सला ५.

इषनिबाह—पु. शंका; संशय; अस्पष्टता. [अर. इशिबाह्=संशय]

इष्कीबाजी—स्त्री. चैन, इश्कबाजी पहा. 'पैसा फार फार होत चालला म्हणजे ... इष्कीबाजी वाढते'–नि ५३.

इष्कल, इष्कील—स्त्री. अडचण; घोंटाळा; व्यत्यय. (क्रि० करणें; घालणें; पडणें; पाडणें). [अर. इश्काल=अडचण; संशय]

इष्ट—वि. १ इच्छिलेलें; आवडतें; पसंत केलेलें; हवें असलेलें; मानलेलें. 'तुम्हीं इष्ट अंक मनांत धरा तो मी सांगतों.' 'इष्टं धर्मेण योजयेत्. २ शुभ; हितप्रद; कल्याणप्रद. 'सहज इष्टानिष्ट करणी। दोघीचि इया कवतुकिणी।'–ज्ञा १६.६१. ३ (गणित), इच्छेनें धरलेली किंवा मानलेली; गृहीत (काल, घटि, वेळ); जसें– इष्टघटि, इष्टकाळ. –पु. मित्र; स्नेही, जसें:–इष्टदर्शन; इष्टमंडळी. –स्त्रीन. इष्टि; यज्ञयागादि कर्म; स्नान, दीक्षा इ० आवश्यक कर्म. 'जे इष्ट यज्ञ यजावे। तें हविर्मंत्रादि आघवें।'–ज्ञा ४.१२०. 'इष्ट जें कां यागादिक। वापी कूप आराम देख। गो भू रत्नदानादिक। त्याहून अधिक अन्नदान।'–एरुस्व ४. १९. **०आप्त**–पु अव. (प्र.) आप्तेष्ट, स्नेहीसोवती; नात्याचीं माणसें. **०कर्म**–न. (गणित) त्रैराशिक; त्रैराशिकाच्या रीतीनें उदाहरण सोडविण्याची क्रिया. **०कल्पना**–स्त्री. (तर्कशास्त्र किंवा गणित) गृहीत कल्पना; प्रथम खरी मानलेली गोष्ट; गृहीत कृत्य; सिद्धवत गोष्ट. कल्पित पक्ष. **०काल**–पु. (गणित) शुभ वेळा; कोणत्याहि कार्यास पाहिजे तशी वेळ; शुभ काळ. (क्रि० येणें.) **०देवता–देवत**–स्त्री.न. आपली भक्ति जीवर आहे अशी देवता; आराध्यदैवत; पालनकर्ता देव, साधु इ०. **०पंगत–भोजन**–स्त्री.न. श्राद्धाच्या दिवशीं श्राद्धीय ब्राह्मणांचें जेवण झाल्यावर यजमानानें आपल्या इष्टमित्रांसह करावयाचें भोजन किंवा त्याच्यासह जेवणाची पंगत. **०मित्र**–पु.अव. स्नेहीसोवती; सोयरेसायरे; ओळखीपाळखीचे लोक. 'इष्ट मित्र आपुले। कुमरजन देखिले।'–ज्ञा १.१८१. **०राशि–राशिक**–पु. (गणित) १ त्रिराशिक. इष्टकर्म पहा. 'इष्टराशीमध्यें एकेरी व दुहेरी असे दोन प्रकार आहेत.' २ गृहीतसंख्या; धरलेली संख्या; इष्टसंख्या. **०संख्या**–स्त्री. गृहीतसंख्या; इष्टराशि अर्थ २ पहा.

इष्टका—स्त्री. वीट. [स. इष्टका]

इष्टकी—स्त्री. (कु.) मैत्री. [सं. इष्टक]

इष्टतीं—क्रिवि. समजुतीनें; स्नेहभावानें. 'त्वां जावोनि वैरियांसी। इष्टतीं सांगा वादीयांसी।'–गुच ३५.२५६. [सं. इष्टत्व; इष्टता]

इष्टत्व—न. १ मैत्री; स्नेहभाव; समजूतदारपणा. 'इष्टत्वें मागती कितीएक।'–गुच ८.६९. २ मांगल्य; शुभदायकपणा. [सं.]

इष्टदा—वि. इच्छित वस्तु देणारी. 'इष्टदा परी अनिष्टा। हेतु होती।'–ज्ञा १६.२१९. [सं. इष्ट+दा]

इष्टांक—पु. (गणित) इष्ट संख्या; इष्टराशि; अंदाजलेली, गृहीत धरलेली रकम. 'जी किंमत इष्टांकरूपानें संकल्पिली.'–के २.८. ३०. [सं. इष्ट+अंक]

इष्टागत—स्त्री. (गो.) मैत्री. [इष्ट+आगत]

इष्टानिष्ट—वि. आवडतें नावडतें; आवडीचें नावडीचें; शुभाशुभ; मंगल अमंगल. ' इष्टानिष्ट तैसें । जगाच्या ठायीं । ' –ज्ञा १३.६००. [सं. इष्ट+अनिष्ट]

इष्टापत्ति—स्त्री. एखादी आपत्ति किंवा संकट येणार अशी भीति असतांना आपल्याला अनुकूल अशी गोष्ट घडणें; आपल्याला हवी असलेली अनुकूल अशी गोष्ट आयती घडणें; मिळणें. [सं. इष्ट+आपत्ति]

इष्टापूर्त—न. एखादें धार्मिक, दानधर्माचें मोठें कृत्य; इष्ट म्हणजे यज्ञयागादि श्रौतस्मार्त कर्में व पूर्त म्हणजे तलाव, धर्मशाळा, विहिरी वगैरे बांधून त्यांचा उत्सर्ग करणें वगैरे धार्मिक कृत्य. ' आणि सचाडाचिये परी । इष्टापूर्तें करी । ' –ज्ञा १३.५२४. –एभा ११.१५१४. [सं. इष्ट+पूर्त]

इष्टि—स्त्री. अग्निहोत्र्यानें दर महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेस करावयाचा याग; अग्निहोत्र घेतल्यापासून तें नष्ट होईपर्यंत अग्निहोत्र्यानें हा याग करावयाचा असतो. इष्टींत नित्य (दर्शपूर्णमास) नैमित्तिक (आग्रयणेष्टि; वर्धापनेष्टि इ०) व काम्य (वर्षकामेष्टि, पवित्रेष्टि इ०) आहेत. अग्निष्टोमादि यज्ञांतहि दीक्षणीया, प्रायणीया, आतिथ्या, अवभृथेष्टि, उदयनीया वगैरे इष्टी असतात. चातुर्मास्य याग हाहि अनेक इष्टींचाच समुदाय आहे. पशुयाग हीहि पश्विष्टीच आहे. सामान्यतः कोणत्याहि श्रौतयागाची इष्टि ही मूल प्रकृति आहे. ' तेंव तिये इष्टीचिया वुडीं । पशुहिंसा रोकडी । ' –ज्ञा १३.२२२. [सं. इष्=इच्छिणें]

इष्टिका—स्त्री. वीट. [शुद्ध सं. इष्टका]

इष्टीण—स्त्री. (कु.) मैत्रीण. [सं. इष्ट]

इसकणें—क्रि. (कु.) थोडें खणणें. विसकणें पहा.

इसकळ-णें—विसकळ-विसकळणें पहा.

इसकाड—न. (शेती) नांगराचा दांडा; इशाड पहा. [सं. ईषा+काष्ठ]

इसकी—स्त्री. (शेती) कोळप्याच्या दिंडांत बसविलेला (कोळपें जमिनींत दाबण्याकरितां) दांडा, लांकूड. [सं. ईषा+काष्ट]

इसन—न. (व.) विसण पहा.

इसन्ने—वि. दोन ही संख्या; अरबी वर्ष मोजतांना योजतात. [अर. इस्ना] **०अशर**–वि. बारा संख्या; याचा वर्षगणनेंत उपयोग करतात. [अर. इस्ना+अशर]

इसप-ब—पु. १ विसर्प; हातापायावर होणारा गजकर्णासारखा एक चामडीचा रोग. २ जनावराच्या अंगावरील लालसर काळा किडा; गोचिडीसारखा किडा. [सं. विसर्प; प्रा. विसप्प= फैलावणारा]

इसबगोल—पु. सफेत जिरें; एक औषधी बी; याची उत्पत्ति मिसर देशांत व इराणांत होते. हें बी आकारानें पिसूसारखें असतें• झाडाची उंची हातभर, पान बारीक असतें, झाडास गव्हासारख्या ओंब्या येऊन त्यांत बी येतें. याच्या पांढरें, तांबडें व काळें अशा जाती आहेत. पैकीं काळें औषधोपयोगी, पांढरें सर्वांत उत्तम. सोमलाच्या विषावर इसबगोल पाण्यांत कोळून त्यांत वेदाणा, दहीं, गुलाबपाणी, वगैरे घालून प्यावयास देतात. –वगु १.५६. [फा. इस्पघूल; तुल० सं. ईषत्+म. गोल; हिं. ईसबगोल; का. सबगोलु; ता. इसप्पुकोल; इं. इस्फगुल]

इसबंद—पु. मेंदीचें बीं; भुताखेतांची बाधा किंवा दृष्टिबाधा होऊं नये म्हणून विवाह, प्रसुति वगैरे प्रसंगीं जाळतात तें [फा. इस्पंद]

इसम, इसीम—न. पु. अव. असामी. १ विशेषनाम; नांव. २ मनुष्य; अदमी; असामी. –न. (हिशोबांत) नग; सदर; नगाचें वर्णन; खात्याचें नांव; वर्गाचें नांव; बाब; जात. ' माळी इसम हजीर झाले. ' ' कुंभार इसमाकडे बाकी राहिली ' –स्त्री. इशीम पहा. [अर. इस्म=नांव] **०नविशी**–स्त्री. नांवनिशी; नामावली. ' इसमनविशीची फर्दे लिहून नबाबांस अजे केली ' –रा ५.१२७. [फा. इस्मनवीसी] **०मजकूर**–वि. (सरकारी कागदपत्रांतून) वर, मागें उल्लेखिलेला; उपरिनिर्दिष्ट (मनुष्य). [फा.] **०मुबादला**–पु. १ (हजीरीपत्रकांत वगैरे) बदलून घातलेलें नांव; बदली नांव. २ बदली माणूस; दुसऱ्याबदल काम करणारा इसम. [अर.] **०वार**–क्रिवि. १ नांवाच्या अनुक्रमानें; नांवापुढें नांव असें; नांवनिशीवार. २ हिशेबाच्या सविस्तर बाबीप्रमाणें. [अर. इस्म; +फा. वार] **०वारकमजास्ती**–स्त्री. पगार नोंदीसह नांवाचा तक्ता; सामाशब्द–इसमवार–अर्जी, नांवनिशी, पट्टा, पत्रक, पाहणी, पावती, फाजील, वसुलीबाकी, सूट, हाजरी, रुजवात इ. **०वारी**–स्त्री. नांवांचा तक्ता; नांवांची यादी, हजिरीपत्रक. (इं.) मस्टर, मस्टर रोल.

इसमारी—स्त्री. (खा.) पाल; एक प्राणी.

इसर, इसरकी—इसारकी पहा.

इसरा—पुस्त्री. (व.) मालमत्ता; चीजवस्त. ' आमचा इसरा गांवींच पडला आहे. ' [अर. आसार=परंपरा, इतिहास]

इसरावाडी—स्त्री. (चंद्रपुरी) मालमत्ता; इसरा

इसवी—वि. ख्रिस्ती. –स्त्री. ख्रिस्ती शक. [अर. ईसवी ईसा=येशू; हिब्रू येशू; इं. जीझस] **०सन**–पु ख्रिस्ती शक. हा येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून धरला आहे.

इसळ-ळी, इसळा—इसाळ पहा.

इसा—स्त्री. (व.) घराच्या छपरास धूर लागून जमलेलें धुरांचें काटण. [सं. विषा=विष्ठा ?]

इसा—स्त्री. अव. (कुण.) वीस; वीस या संख्येचे (पदार्थाचे) गट. 'म्हणूनइयानी एक दोन इसा वाघासनी मारूनशानी सरस्वतीच्या आल्याड आलों.' –बाय २.२. [सं. विंशति; म. वीस]

इसाड—न. नांगराचा एक भाग. इसाड पहा. [सं. ईषा+दंड]

इसाप-ब, इसूप-ब—इसप-ब पहा.

इसापत-फत—इजाफत पहा.

इसार-रा—विसार-रा पहा.

इसारकी—स्त्री. नांगराच्या इसाडाला मागील शेवटास (नांगरांत बसविलेल्या) असलेली खीळ. [कों इसार+सं. कीलक]

इसारा—इशारा पहा.

इसाळ-ळा—पु. १ स्पर्धा; स्पर्धेचे-चढाओढीचे वारें; जुरस; चढाओढ; अहमहमिका; हेवा; खुमखुमी. (क्रि० धरणें, येणें). 'पद्मदळेंसीं इसाळें। भांडतांति जे हे डोळे।' –ज्ञा १३.५५९. 'बळ देखोनि सर्वांगळें। एक नामाच्या इसाळें। गंधर्व राजे बुद्धिकुशळें। संग्राम त्यासीं मांडिला' –मुआदि २३.९४. २ चीड; तिटकारा. 'वाचे सत्याचा विटाळ। इंद्रियनियमाचा इसाळ।' –मुआदि १.६७. [सं. ईर्षा]

इसाळा—(माण.) ऐन जिन्नसी मोबदला, शंभर पेंढघास अमुक पेंढया देण्याचें ठरून काम करणें.

इसाळा-ला, इसोळा—पु. ज्वारीवरील रोग –शे ११.१५५, ७.१९५.

इसाळाइसळीं, इसळाइसळीं, इसलाइसला—क्रिवि. स्पर्धेनें; ईर्षेनें, चढाओढीनें **म्ह०** इसळाइसळा शेजारी पिसळला.

इसाळु, इसाळ्या, इसाळा—वि. स्पर्धालु; चढाओढ करण्यास उत्सुक. [सं. ईर्षालु]

इसाळु—पु. साप; द्रव्यावर राखणीसाठीं बसलेला मूळ पुरुष; ब्रह्मराक्षस; समंध. 'आणि इसाळु जैसा घरा। कां दंदिया हतियेरा। न विसंबे भांडारा। बध्दकु जैसा।' –ज्ञा १३.५०१. [सं. ईर्षा–ईर्षालु]

इस्क—(कुण.) इश्क पहा. 'मला कसं म्हणतुया, तुझ्या इस्काच्या नादानं मी हात आलुया.' –बाय ३.२.

इस्काद—स्त्री. (गो.) जिना. [पो. इस्काड]

इस्काळ, इस्कील, इस्कीलकी—स्त्री. हरकत; अडचण; तंटा. 'चांदजीराव इस्कील करील तर त्यासही माकूल करून (समजावून) सांगणें' –रा ८.९७. 'ते विषयीं इस्कीलकी कथळा न करणें.' –रा ८ ७९. [अर. इश्काल=अडचण]

इस्टेट—स्त्री. स्थावर मालमत्ता, मिळकत; (सामा.) मालमत्ता. 'अज्ञानासंबंधानें ही इस्टेट कोर्टाच्या ताब्यांत जाऊन तिच्या व्यवस्थेकरितां रोल्ट साहेबांची नेमणूक झालेली होती.' –टि. २.५७७. [इं.]

इस्त—स्त्री. १ (गो.) इज्जत, इभ्रत. २ बेअब्रू.

इस्तक्बाल—पु. १ सामोरें जाणें. 'कोणराव निघोन येथें हैदराबादेस आला, त्यास इस्तकबाल राजाजीचे भाऊ आपाराव यांस पाठविलें होतें.'-रा ५.१४५. २ भविष्यकाल; भावी. 'कार्कुनानी हाल व इस्तकबाल ...' (हल्लींचे व भावी कार्कुन) [अर. इस्तिक्बाल्=भविष्यकाल; सामोरें जाणें]

इस्तकबील—शअ. पासुन (मागील विशिष्ट गोष्टीपासून किंवा तारखेपासून, तो दिवस धरून) पुढें; सुरवातीची मिति, एखाद्या व्यवहाराचा आरंभकाल; हा शब्द तागायत शब्दाला जोडून येतो. [अर. इस्तिक्बाल्] **०तागायत**–शअ. अमुक दिवसापासून अमुक दिवसापर्यंत (आरंभींचा व शेवटचा दिवस धरून). उ० इस्तकबील चैत्र तागायत फाल्गुन. [फा.]

इस्तक्लाल—पु. जोर; धीर, धर. 'या फौजेचा इस्तक्लाल राहिला नाहीं तेव्हां सुलूक आरंभिला' –रा ६.४४०. [अर. इस्तिक्लाल्]

इस्तंबुल-बोल—न. तुर्कस्तानची राजधानी; कॉन्स्टेंटिनोपल; स्तंबोल.

इस्तमरारी—स्त्री. कायमधारा पद्धति. [अर. इस्तिमरार=अखंडता]

इस्तमालत, इस्तमाली—स्त्री. १ दिल-दिलासा, समजावणी. २ लावणी, संचणी; कौंद, महामुरी. 'आबादीस व इस्तमालतीस कोसीस करून' –रा १५.११३. [अर. इस्तिमालत्=उत्तेजन, सान्त्वन]

इस्तमाली—वि मामुली; जुनापुराणा; वापरण्यायोग्य; –स्त्री. १ वहिवाट; परिपाठ; अभ्यास. २ 'इस्तिमालत' पहा. [अर. इस्तिअमाल=वहिवाट, परिपाठ; इस्तिमालि=वापरण्यायोग्य]

इस्तमेल—स्त्री. १ (हिशेब) जमाखर्चाची एक बाब; जमेच्या रकमा खर्ची व खर्चाच्या रकमा जमा टाकणें, मांडणें. उ० धान्य वगैरे प्रथम खर्ची टाकून, त्याचें पीठ, कोंडा वगैरे नंतर जमा करणें. –भाअ १८३३–४०; १८३४.४५. २ घालमेल; वर्गावर्गी; उलाढाली; घडामोड. [अर इस्तिकमाल=पूर्णता; पुरें करणें]

इस्तरी, इस्त्री—स्त्री. स्त्री; बायको; बाई; अस्तुरी पहा. 'मी बी पुरुषराज्यांतून इस्तरीराज्यावर एकदम हापटलों' –बाय २.२. [स्त्री अप.]

इस्तरी इस्त्री—स्त्री. धुतलेला कपडा ओलसर असतांना त्याच्यावरील सुरकुत्या जाऊन त्यास कडकपणा येण्यासाठीं त्यावर (ज्यांत विस्तव आहे असें) फिरवावयाचें यंत्र. यानें कपडा झगझगीत होतो. या यंत्राचे पोकळ व भरींव असे दोन प्रकार आहेत; अग्निपात्र; कुंदी करण्याचें यंत्र. **०करणें-मारणें**–इस्त्री करणें; अग्निपात्रानें कपडा सफाईदार करणें. 'या कोटास इस्त्री करून या.' [हि. इस्तु=विस्तव+आर–आरी; म. विस्तव]

इस्तस्बाब—पु पर्सति; सल्ला. 'त्यांचे इस्तस्बाबानें काम करावें.' –रा ७.५८ [अर इस्तिस्वाब=पर्सती, सल्ला]

इस्ताद—स्त्री. सिद्धता; तयारी. [अर. इस्तिअदाद्=सामर्थ्य तयारी]

इस्ताद—स्त्री १ चुन्याचें पक्कें बांधकाम. 'इस्तादेचीं घरें' –मराभा. २ चीजवस्त; सामानसुमान; जंगम मालमत्ता. [फा. इस्ताद=उभें, उभें केलेलें]

इस्ताफा इस्तीफा—पु नोकरीची सोडचिठ्ठी; राजीनामा. 'आम्हांस दौलत नलगे, मक्केस जावें किंवा घरी बसून राहावें या भावे आम्ही नबाबास इस्ताफाही लेहून पाठविला.' –रा ३.४११. 'यांचा इरादा आहे कीं येथील कामाचा इस्तीफा द्यावा.' –दिमरा २ १८. [अर. इस्तिअफा=क्षमेची याचना]

इस्तारी—स्त्री. (प्र.) विस्तारी. (व. राजा. कुण) पत्रावळ, 'इस्ताऱ्या मांडा.' [सं. विस्तृ–विस्तर–विस्तार, विस्तरण]

इस्तावा—पु १ नवीन जमीन कीर्दमासुरीस येते वेळीं कांहीं वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी परंतु दरसाल वाढत्या साऱ्यानें देण्याची पद्धत. २ अशा तऱ्हेनें दरसाल वाढणारा सारा. ३ (थेटनें) नास्ति; अभाव; टाळा. 'आज जेवणास इस्तावा जमला.' ४ बरोबरी; लढाईची तहकुबी करून बरोबरीच्या नात्यानें तहाचें बोलणें करणें. –शर [अर. इस्तिवा=बरोबर, समान] **०कौल**–पु. वरील प्रमाणें वाढणारा जमिनीचा सारा.

इस्तियाक मुस्ताकी—स्त्री. प्रेम, लोभ. 'ज्या ज्या प्रसंगोचित इस्तियाक–मुस्ताकीच्या गोष्टी बोलावयाच्या त्या नबाब निजामुद्दौला बहादूर यांणी बयाण केल्या.' –रा १.१८७. [अर. इस्तियाक् मुश्ताकी]

इस्तिहार, इस्तेहार—पु. जाहीरनामा, प्रसिद्धिपत्रक, इश्तिहार पहा. 'नऊ तारखेच्या होळकर सरकार गॅझेटमध्यें वाणी लोकांसंबंधीं जो इस्तिहार महाराजांनीं प्रसिद्ध केला आहे तो गमतीदार आहे.' –विक्षिप्त १.१२७. [अर. इश्तिहार]

इस्तीफस्ती—स्त्री. (गो.) वेअब्रू.

इस्तु, इस्तूव, इस्तो—पु. (कुण.) विस्तव. 'गांज्याच्या डोक्यावर इस्तूव कुठं हाय.' –बाय ८.२. (खा.) 'इस्त्याचा खेय नको करूं=विस्तवाशीं खेळूं नको

इस्तेरेत—न. (गो) लहान उंचीची साधी खाट. [इं. स्ट्रेचर]

इस्दार—बाहेर काढणें; प्रसिद्धीकरण. 'दस्तक इस्दार करून पाठविलें आहे.' –रा ३.९१. [अर इस्दार]

इस्पिक—पु. पत्त्याच्या खेळांतील एक रंग; काळा बदाम. 'इस्पिक हुकूम बोललास काय! आतां बाराच वाजवितों!' [इं. स्पेड]

इस्पिट—न. खेळावयाचे पत्ते; पत्त्यांचा डाव. [इस्पिक पहा]

इस्पिंजर—पु (स्थापत्य) दोन कमानींमधील त्रिकोणाकृति दगड. ज्या दगडापासून कमानीच्या बांधकामास सुरवात होते तो दगड. [इं. स्प्रिंजर]

इस्पितळ—न रुग्णालय; रोग्यांची राहण्याची व औषधपाण्याची तजवीज जेथें करतात असें स्थान; दवाखाना. (उप.) वेड्यांचें इस्पितळ 'एवंच राजेश्री जर घरांतील सर्व इस्पेट समुद्रांत टाकावयास निघाले तर त्याचे आप्तवर्ग त्यांस इस्पितळाचा मार्ग दाखवितील. –टि. ४ २२ [इं. हॉस्पिटल]

इस्फळ—वि. (कुण.) व्रात्य; अचपळ; त्रासदायक; खोडकर [अचपळ अप]

इस्माळां वसणें, इस्मून वसणें—(माण) विस्मरणांत असणें; विसरून बसणें [विस्मरण अप]

इस्राएल, इस्रायल—पु १ देवाशीं झगडून जय मिळविणारा; याकोबाला देवानें दिलेलें नांव; 'इत पर तुला याकोब म्हणणार नाहींत, तर तुला इस्रायल हें नांव प्राप्त होईल.' –उत्प ३५, १०, ३२.२८ निर्ग १८.१ कर्मि १०.१८ रोम ९.६ २ याकोबाचे वंशज. ज्यू लोक व त्यांचा धर्म, हे इस्रायल लोक याहवे देवतेचे उपासक आहेत या धर्माचें मूळ उत्पत्तिस्थान पॅलेस्टाईन होय, हिंदु व इस्रायल धर्माच्या वैचारिक व सामाजिक इतिहासांत अनेक सादृश्यें दृष्टीस पडतात [हिब्रू.–सारा=लढणें+एल्=परमेश्वर]

इस्राव—स्त्री. (चामारी धंदा) चपलेच्या वरच्या भागाचें नांव; भागडास लावलेली पट्टी. (कि० ओवणें) [इं. स्ट्रॅप]

इस्लाम—पु मुहंमद पैगंबरानें स्थापिलेला धर्म. मुसलमानी धर्म; मुसलमान [अर इस्लाम्]

इस्लामी—वि. इस्लाम धर्मासंबंधीं, मुसलमानी

इस्वण–न, इस्वाळ—पु. (कों.) कोंकण किनाऱ्यावर सांपडणारा एक पिवळा मासा.

इस्वाट—न. (कर.) परोटः परसूं.

इस्वार्टी—पु (कर.) परडयाचा रखवाली, राखण करणारा देव.

इह—क्रिवि. येथें, या लोकीं. 'इह भोगिली कीं पुढती.' गुच ९ ३७ [सं.] **०जन्मीं–जन्मांत**–क्रिवि या जन्मीं, या लोकीं, या आयुष्यांत. [सं इह+जन्म] **०ना पर**–क्रिवि. इकडे नाही आणि तिकडे नाहीं 'इदं च नास्ति परं च न लभ्यते.' [सं. इह+न+पर] **०पर-लोक**–पु मृत्यु लोक आणि स्वर्ग लोक [सं] **०फल**–न. या लोकचें फळ. [इह+फल] **०भोग**–पु. मृत्युलोकीचा भोग. 'अंतु कामु पसरं। अवघें येथी थारे। तेथ क्षणिकें पदांतरें। इहभोगावीं॥' –ज्ञा १५.१५८. [इह+भोग] **०लोक**–पु. मृत्यु लोक; परलोकाच्या उलट **०वृत्त**–न. (वर्तमानपत्री) स्थानिक वृत्त, बातम्या.

इहदे-इहिदे-हे—वि. एक; वाहेद. [अर. अहद्=एक]

इहसान—न. (व.) कृपा; मेहेरबानी; उपकार. ' दौलतावांचें यश आम्हांस यावें म्हणूनच स्वामींनीं रुपये जहागीर दिली, सर्कारकिफायतीकरितां न दिलें हेंही मोठे इहसान सेवकावर. ' –ख १.३९. ' आमच्यावर काय इहसान (उपकार) आहे ? ' [अर. इह्सान्]

इहा—स्त्री. इच्छा. [सं. ईहा]

इहीं—सना. अव. या; यांहीं; यांनीं; इ ची तृतीया विभक्ति. ' इहीं लक्ष्मणीं अलंकृत. ' –विपू १.५०. ' मोठा अपराध इहीं, प्रभुनीं या योग्य दंड हा केला. ' –मोमंभा ३.६८. [इ=हे]

इहीर—स्त्री. (खा.) विहीर.

इळ—पु. (व. कर. कुण.) वेळ; दिवस. [वेळ अप.] **म्ह०** (व.) इळ गेला इळाचा, माथा धुते तिळाचा=दिवस व्यर्थ घालवून रात्रीं काम करणें या अर्थी. **०भर**–क्रिवि. सारा वेळ. **०वरी**–क्रिवि. या वेळपर्यंत. भातांपर्यंत; इतका वेळ. **इळानइळ**-क्रिवि. (ना.) सारा दिवस; दिवसभर.

इळक—स्त्री. (कर्ना.) लचक.

इळत-द—स्त्री. एक शेतकी हत्यार; नांगराचा फाळ किंवा पावडें यांची माती खरडण्याचें साधन; खपतें; कंडारण्यास शेवटास बसविलेली लोखंडी शिप. हिनें फाळास लागणारी माती वगैरे खरडून काढतात. (व.) वखर किंवा डवर यांच्या पासावरील माती साफ करण्याचें हत्यार. (को.) लांकडी कुदळ्याच्या शेवटास असलेली लोखंडी अणी. [विळद, विळा; सं. इलि; अर. आलत्=हत्यार]

इळंसाट—क्रिवि. (व.) दिवसभर. ' शेतकरी इळंसाट शेतांत काम करतात. ' [वेळ]

इळा—पु. विळा पहा. ' इळे कुराडया दोरी साहित्या. ' –दावि ४४५ [सं. इलि=एक प्रकारची तरवार; का. इळगा, ईळिगे; अर. आल, आलत्] **०खिळा**–पु. १ घरांतील हलकी, भारी चीजवस्त; लहान मोठ्या वस्तू; सर्व जंगम मालमत्ता. २ किरकोळ वस्तू; सटरफटर माल. [विळा+खिळा] **अंगाचा, शरीराचा इळाखिळा करणें**–अतिशय श्रम घेणें; फार मेहनत करणें; श्रमणें. इतर वाक्प्रचाराकरितां विळा पहा.

इळी—स्त्री. विळी पहा. ' नातरी इळीपळी आडकित्ता. यासी काय तुळावी खड्गलता. चंदनकाष्ठ चंडे देवमाथा. तयासी एरंड समान काय. ' –जै ६२.२१. [इळाचें लघुत्व]

इळामिळी(चि)गुपचिळी—उद्गा. आतां चुप, गप बसा ! (मुलें गप्प रहावीं म्हणून घालावयाची शपथ). अळीमिळी गुपचिळी पहा.

इक्षु—पु. ऊंस. ' रणभूमीचा घाणा करौनि सरिसां । महाकाळु इक्षु गाळीतुसें जैसा । ' –शिशु १०४३. [सं.] **०कांड-दंड**–पु. उंसाचें पेर; कांडें; (सामा.) ऊंस. ' नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु । ' –ज्ञा १२.२००. –एरुस्व ६.८६. **०मेह**–पु. मधुमेह. **०यंत्र**–न. चरक; उसाचा रस काढण्याचें यंत्र. **०रस**–पु. उंसाचा रसं. ' नाना प्रभा व्यापे प्रकाशु । गोडिया इक्षुरसु. ' –ज्ञा १८.५०९. **०रसासव**–पु. उंसाच्या रसापासून केलेली दारू, मद्य. **०शर्करा**–स्त्री. उंसापासून होणारी साखर. (इं.) सॅकेरोज, (फलशर्करा नव्हे)

ई

ई—मराठी स्वरमालेंतील चौथा वर्ण. अक्षरविकास इ प्रमाणेंच.

ई—सना. ही; इ पहा. ' निंदा सकळ पापांचे माथा । ई परता असेना. ' –एभा ९.५०३. (खा.) ' बाय ई बोरें एहें डें काह ।? ' बाई, ही बोरें अशीं कां ? ' –भिल्लीभाषा २७. [सं. एतत्, एषा]

ई—उद्गा. उपहासात्मक अव्यय; थट्टा करण्यासाठीं, लाजविण्याकरितां योजितात. विशेषतः स्त्रियांत रूढ. ' ई ! आतां कशी म्यालीगे ? ' [सं. ईः=एक उद्गार]

ई—बहुमानार्थक; आई या शब्दाचा संक्षेप; जसें–ताराई; जिजाई इत्यादि.

ई—भावदर्शक प्रत्यय. हा नामास किंवा विशेषणास लावला असतां तद्भावदर्शक भाववाचक नामें होतात. जसें–गरीब–गरीबी; नरम–नरमाई; खुष–खुषी; एक-एकी [फा.]

ई—सना. हा, ही, हें; दरबारी पत्रांत लेखक स्वतःस या शब्दानें संबोधितो. ' ई जानब. ' [फा. ईन्]

ईचा—पु. संशय–मनको. [सं. वीचि=चंचलता ?]

ईझीचेअर—स्त्री. आराम खुर्ची; प्रशस्त रेलून बसण्याची एक खुर्ची. इझीचेअर पहा. ' ईझीचेअर आहेच ही आपल्या करितां ! ' –मोर ३२. [इं.]

ईट—स्त्री. वीट पहा. [सं. इष्टका] **०बंदी**–वि. विटांनीं बांधलेलें–ली (घर, भिंत).

ईट—न. भाल्यासारखें एक हत्यार. इटा पहा. [ते. ईटि]

ईड, ईडनिंबू-लिंबू—न. १ गधड लिंबू; लिंबासारखें परंतु थोडें मोठें असलेलें फळ; यांचें लोणचें करतात; रसाचें लेमोनेड करतात. फळाचा रंग पिंवळा असून साल खडबडीत असते. हें अंबट फळ असून शूळ, जाडय, वात व पित्त यांचा नाश करतें. हें अग्निमांद्य घालविणारें व कृमिनाशक आहे. –स्त्री. ईडलिंबाचें झाड. [का. ईळे]

ईडपीड—इडापिडा पहा.

ईड येणें—क्रि. (कर्ना.) पुरवणें; रेलचेल होणें. [का. इडिकु= घट बसणें, दाटणें; म. वीट]

ईडेपाडें—क्रिअ. नेटानें; चढाओढीनें; ईर्षेनें. ईडेपाडें पहा. 'दोही दळींचे ईडेपाडें। वाकर मांडिला चढेंनचढें।' –वेसीस्व ११.७२. [सं. ईर्षा=ईर; ईडची द्वि.]

ईडेपिडे घेणें—क्रि. दृष्ट काढणें (वोटे मोडून). इडापिडा पहा. 'किती घेती ईडपिडे.' –वेसीस्व २.१४.

ईड्य—वि. स्तुत्य; स्तुति करण्याजोगा. 'सद्गुणमंडित पंडित दंडि तपस्वीडय सद्विवेकपिता।' –मोसभा ४. ५७. [सं. ईड्= स्तुती करणें]

ईण—स्त्री. (कर.) विहीण. [विहीण अप.]

ईत, ईति—स्त्री. अतिवृष्टि, अनावृष्टि, उंदीर, टोळ, पोपट, राजकीय जुलूम (स्वचक्र) व परचक्र या सात प्रकारांनीं होणारा उपद्रव. [सं. ईति=उपद्रव]

ईथर—पु. पृथ्वीभोंवतीं ज्या वायुरूप पदार्थाचें सर्वव्यापी वेष्टण आहे तो; द्रव्य; ईथक; आकाशतत्त्व. [इं]

ईद—स्त्री. मुसलमानी सण. दोन इदा मुख्य (अ) ईदउद्जुहा; ईदुद्दुहा किंवा ईदेकुर्बाणी म्हणजे बकरईद, आणि (आ) ईदुल्फित्र म्हणजे रमजान ईद–रोजे–उपवास सोडण्याचा सण. 'नवाबाम ईदेबद्दल वस्त्रें पावलीं नव्हतीं.' –दिमरा १.१६१. –पु.स्त्री. विवाह झाल्यावर प्रथम वर्षी संक्रांत, दिवाळी, दसरा इ० सणांस वधूवराकडून एकमेकांस तिळगूळ, गांठथा वगैरे भेट, नजराणे पाठविणें तात त्यांपैकीं प्रत्येक किंवा प्रत्येक सण. [अर. ईद्]

ईदृश—वि. अशा प्रकारचा; असला. [सं.]

ईनमीनतीन, ईनमीन सवा–साडे–तीन—संख्येनें अगदीं कमी (माणसें); अगदीं अल्प; थोडी संख्या (वस्तु, माणसें इ०) 'या संस्थेच्या इन–मीन–तीन सभासदांपैकीं दोघे बाहेर जाणार, तेव्हां राहिलेल्या एका सभासदाच्या संस्थेचा कारभार एक मतानें व एकसूत्रीपणानें चालेल, यांत कोणालाच शंका नव्हती' –सुदे २६२. [इनमीन सवातीन याचा संक्षेप; ई=ही (बायको), न्=आणि, मी=स्वतः न=आणि स=तो (मुलगा अर्धा), वा=अथवा ती (मुलगी अर्धी)=मिळून तीन माणसें; किंवा ई, मिं, तिं,=मी आणि ती –भाअ १८३२]

ईप्सिणें—सक्रि इच्छिणें. 'तैसें शतक्रतु यजिलें मातें। कीं ईप्सितासि स्वर्गसुखातें। –ज्ञा ९.३१२. [सं. ईप्सा]

ईप्सित—वि. इच्छिलेलें. 'मग ते तुम्हां ईप्सिता'–ज्ञा ३.९५. भोजाचे पुरवून ईप्सित मुनी तो होय अंतर्हित।' –विक (भोज) १९. [सं.]

ईर—वि. वीर पहा. 'असे लढाई झाली पर, खवळले ईर' –ऐपो ३४४. **०पौर**–वि. धाडसी मनुष्य. 'हें पहा मिस् विलायत, मोठेमोठे ईरपीर हा गुंतागुंतीचा प्रश्न सोडवितां सोडवितां थकले'. –सु ६५. [सं. वीर अप.]

ईर—स्त्री. १ शक्ति; उत्साह; सामर्थ्य; तरतरी. २ रास्त्र; उत्कृष्टपणा; पक्केपणा व गुणक्षमता यांचा सामावेश ज्यांत आहे असें (चुना, पीठ इ०); तत्त्व. विरी पहा. [सं. वीर्य]

ईर—स्त्री. १ चढाओढ; स्पर्धा; चुरस. २ हरकत; अडथळा; तंटा. (क्रि० धरणें; येणें). –पया ३२८. 'यासि जो ईर येईल त्याचे वंशांवरि गाडव अमे.' मंगळवेढें येथील शिलालेख. ३ बुद्धिबळांत राजास दुसऱ्याच्या मोहऱ्याचा बसणारा जो शह तो लागू न पडायाजोगी मध्यें आपले मोहरें प्यादें यांची असण्याची जी स्थिति ती; यावरून पुढील वाक्प्रचार पडले आहेत. **ईरस पडणें सांपडणें**–धोक्यांत गोत्यांत सांपडणें; कठिण प्रसंगांत सांपडणें. **ईरस घालणें**–स्वतःच्या बचावासाठीं दुसऱ्यास पुढें करणें, धोक्यांत घालणें; किल्ल्याचा दरवाजा फोडतांना त्याला अमलेले लांब लांब खिळे हत्तीच्या धडकेबरोबर त्याच्या कपाळांत शिरूं नयेत म्हणून मध्यें रोडकामा उंट घालणें **ईरस पडणें–चढणें**–चुरशीनें, अभिमानानें पुढें सरसावणें; कंबर कसून उद्युक्त होणें. 'मोहरे मोहरे ईरसी पडती.' –सप्र २१.५१. 'मोहरा ईरस पडला.' –संग्रामगीतें २९. [सं. ईर्=प्रेरणा करणें]

ईरतवान—वि. (माण) हिंमतवान; ईर्षावान. [ईर]

ईरतीनें वागणें—क्रि. (माण.) हिमतीनें वागणें. [ईर]

ईरमोड—स्त्री. हिरमोड; निरुत्साह; निराशा. [ईर्ष्या–ईर+ मोडणें]

ईर्षा, ईर्ष्या—स्त्री. १ हेवा, मत्सर २ चुरस; स्पर्धा; चढाओढ. ३ संकल्पित कार्य तडीस नेण्याविषयीं अंगीं असणारा अभिनिवेश, उत्साह; अभिमान. ईर पहा. (क्रि० धरणें; येणें) 'मी ईर्षेत पडलों.' **०देणें**–एखाद्यास उत्तेजन देणें, उचलून धरणें, चढविणें.

ईर्ष्यालु—वि. (विरू.) ईर्ष्यालु. १ ईर्षा बाळगणारा; उत्साही; वीरश्रीचा. २ हेवेखोर; मत्सरी. [सं.]

ईव—पु. (व.) पाठीच्या कण्याच्या दोन्ही बाजूचे मानेपासून कमरेपर्यंतचे फुगवटे; पाठीचे सर, प्रत्येक. २ (व) पाठींत या भागांत येणारी कळ, उसण. 'ईव लागला जरा चेप.'

ईश—पु. १ ईश्वर. २ राजा; मालक; धनी; सम्राट; अधिपति. सामासशब्द–जगदीश; महेश; वंगेश; इ० 'जो प्रकाश्येवीण प्रकाशु। जो ईशितव्येवीण ईशु। –ज्ञा १५.५४५. ३ शंकर. 'राज्य त्यजिलें ईशानें.' –ज्ञा १३.२४. [सं.]

ईशान—पु. मालक; धनी; राजा, ईश पहा.

ईशानी-न्य—स्त्री. (प्र.) ऐशानी. उत्तर आणि पूर्व यांमधील दिशा; ईशान्य दिशा. [सं. ईश्, ऐशानी]

ईशिता—स्त्री. १ प्रभुत्व, वर्चस्व. २ शंकराच्या आठ स्वरूपांपैकी एक; अष्ट महासिद्धींपैकी एक. 'अष्टमहासिद्धि' पहा.

ईश्वर—पु १ परमेश्वर; जगाचा नियंता; देव. २ शंकर किंवा विष्णु ३ स्वामी; राजा; सत्ताधीश; अधिराज. ४ अवाढव्यता, विशालता दर्शविण्यासाठी हा शब्द व्यापकतेनें सामासिक शब्दांत पुढीलप्रमाणें सढळतेनें उपयोजितात. त्यामुळें हे शब्द वेडेवांकडे व कर्णकटु होतात जसें—डोंगरेश्वर; धोंडेश्वर; खांबेश्वर; वाडेश्वर; पाटेश्वर, नदीश्वर; फुलेश्वर वगैरे ५ सर्व श्रेष्ठ या अर्थी शब्दाच्या शेवटीं लावतात. जसें—कवीश्वर; योगीश्वर; पर्वतेश्वर. 'तोचि भरंवसेनिर्मी। योगीश्वर।' –ज्ञा ६ ४७. [सं.] ०**कर्तृत्व-कृति**—न.स्त्री. देवी कृति. ईश्वराची करणी. ०**कृपा**—स्त्री. परमेश्वराची कृपा. ईश्वरीकृपा. ईश्वरीप्रसाद. ०**तनुचतुष्य**—ब्रह्मांडाचीं चार अंगें—महामाया, अव्याकृति, हिरण्यगर्भ व विराट 'महामाया मूळप्रकृती। कारण ते अव्याकृती। सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती। विराट ते स्थूल।' –दा १० १०.१४. ०**दत्त**—वि ईश्वरानें दिलेली. दैवी. ०**नियमित**—वि ईश्वरानें योजिलेलें, ठरविलेलें ०**प्रणिधान**—न ईश्वराची आराधना. ०**प्रसाद**—पु देवाची कृपा; ईश्वरकृपा. ०**प्रीति**—स्त्री. १ ईश्वराची मर्जी, प्रसन्नता. २ देवाची कृपा, ईश्वरीकृपा. ०**प्रीत्यर्थ**—क्रिवि. देवास आवडीचे म्हणून; देवास प्रसन्न करण्यासाठीं (दिलेलें). ०**भक्ति**—स्त्री. ईश्वराची पूजा, उपासना, आराधना इ०. ०**भाव**—पु ईश्वरावर निष्ठा; आस्तिक्य बुद्धि; याच्या उलट अनीश्वरभाव. ०**माया-माय**—स्त्री देवाचा चमत्कार, लीला, कृत्य, देवाची करणी. 'आपण करूं जातां एक। प्रारब्ध घडवी अनेक। ईश्वरमायेचें कौतुक। ब्रह्मादिका न कळेचि (अथवा नेणवेचि) ०**सत्ता**—स्त्री देवाची नियामक सत्ता; ईश्वरी सामर्थ्य; ईश्वराचा संकल्प (कांही बरें वाईट होण्यास). ०**साक्षात्कार**—पु परमेश्वराचें दर्शन; परमेश्वरी दृष्टांत (अस्तित्वासंबंधीं). ०**सूत्र**—न १ ईश्वरी योजना; ईश्वरी घटना; योगायोग; प्रारब्ध; दैव, नशीब २ वधूवरांचा परस्पर विवाहसंबंध होण्यास कारणभूत जो ईश्वरी संकल्प तें. –**राचा(घरचा)प्राणी**—पु. देवानेंच सांभाळलेला प्राणी, जिवंत प्राणी; असहाय मनुष्य; ज्यास कोणी आप्त, मित्र नाहीं असा मनुष्य; एखाद्याची कींव किंवा दया येऊन त्यासंबंधानें हा शब्द योजितात. –**राचा लाल**—पु. देवाच्या मर्जीतल्या माणूस; ज्याची अतिशय भरभराट होत आहे असा; हरीचा लाल.

ईश्वरपरिज्ञानपाठशाला—स्त्री. (ख्रि.) थिऑलॉजिकल कॉलेज; ज्या शाळेंत मुख्यत्वेंकरून ईश्वरविषयक सिद्धांतीसिद्धांतांनें व तुलनात्मक धर्मशास्त्रांचेंहि शिक्षण दिलें जातें ती शाळा. (इं.) डिव्हिनिटी स्कूल. 'अहमदनगर येथील ईश्वरपरिज्ञानपाठशाला... महिन्यांत पुणें येथें आली.' –ज्ञानोदय १७.१.१९१८. [सं.]

ईश्वरार्पण—न. परमेश्वराला अर्पण करणें; परमेश्वरास वाहिलेली वस्तु. [सं.]

ईश्वरावतार—पु. १ देवाचा अवतार; मानवदेहधारी ईश्वर. २ (ल.) ईश्वरावतारी; ज्यामध्यें दैवी गुण आहेत असा मनुष्य; पुण्यशील, उदार पुरुष. [सं.]

ईश्वरी—स्त्री. शक्ति; दुर्गा; लक्ष्मी, सरस्वती; आदिमाया इ० देवता.–वि. १ ईश्वरासंबंधींचा. २ (काव्य) अतिशय भव्य, उदात्त, विपुल, अद्वितीय वगैरे अर्थीहि वापरतात. जसें:–ईश्वरी आनंद; ईश्वरी गाशा; ईश्वरी बल, लाभ, मोहळा. अशा तऱ्हेचा याचा उपयोग शुद्ध आणि अभिजात असून ईश्वर अर्थ ४ प्रमाणें तो सदोष नाहीं. [सं.] ०**आनंद**—पु. १ परमेश्वरस्वरूपांत मानलेला आनंद, सुख; ईश्वराच्या ठिकाणीं वाटणारा आनंद. २ परमेश्वरापासून मिळणारें सुख. ३ अत्यंत सुख, दैवी सुख; ब्रह्मानंद. ०**उत्पात**—पु दैवी आपत्ति, चमत्कार, भयंकर स्वरूपाचा सृष्टचमत्कार (वीज, धूमकेतु इ०) ०**ऋणानुबंध**—पु परमेश्वरी, दैवी घटना, ईश्वरी नेमानेम; विधिघटना ०**करणी-कृत्य-कर्तृत्व**—स्त्री न परमेश्वरी लीला, ईश्वरकृत गोष्टी ईश्वरकृति पहा. ०**कळा**—स्त्री. ईश्वरी लीला; परमेश्वरी कृत्य, देवाचें कौशल्य, चातुर्य. ०**कौतुक**—न. ईश्वरी लीला; ईश्वरानें घडवून आणलेला चमत्कार; परमेश्वराची सृष्टिरचना, नियमन व प्रारब्धाधीन गोष्टी यांना हा शब्द योजितात. ०**गादी**—स्त्री. न्यायासन; धर्मासन. ०**चेष्टा**—स्त्री. परमेश्वरी कृत्य, खेळ; ईश्वरी लीला, कला. ०**जीव-प्राणी**—पु १ सृष्टींतील प्राणी. २ योगी; तापसी. ०**तंत्र**—ईश्वरी घटना, योजना, कायदे, पद्धति; सृष्टिव्यापार चालण्यासाठीं ईश्वरानें करून ठेवलेली योजना. ०**तेज**—न. १ सत्यशील माणसाचें तेज; सात्त्विक माणसाच्या ठिकाणीं दिसून येणारी कांति, प्रभा २ (थट्टेनें) तूप; सोनें. ०**देणें-देणगी**—नस्त्री. १ ईश्वरानें दिलेली देणगी; प्रसाद. २ जन्मजात गुण; दैवी गोष्ट. ०**नाश**—पु. १ महाप्रलय; जगाच्या शेवटीं होणारा मोठा जलप्रलय. २ (ल) महासंकट; अरिष्ट; अनर्थ; दैवी आपत्ति. ०**नियम-नेम-नेमानेम**—पु. दैवी घटना; ब्रह्मलिखित; सृष्टिनियम ०**न्याय**—पु. देवाच्या घरचा न्याय; खरा, वास्तविक न्याय. ०**पराक्रम**—पु. दैवी सामर्थ्य, शक्ति. ०**पसारा**—पु. ईश्वरनिर्मित सृष्टि, जग, जगदुत्पत्ति. ०**पुरुष**—पु. १ साधु, वैराग्यशील, पुण्यपुरुष. २ भोळा, सरळ वृत्तीचा माणूस. ०**प्रसाद**—पु. (प्र.) ईश्वरप्रसाद; देवाची कृपा. ०**फळ**—न. १ देवानें दिलेली वस्तु; देवाची देणगी. २ पुत्र. ०**बल-ळ**—न. अचाट शक्ति; असाधारण बळ; ईश्वरी पराक्रम; अलौकिक, अमानुष सामर्थ्य. ०**भावना**—स्त्री. सत्प्रवृत्ति; पुण्यशीलता; साधुवृत्ति; परमार्थनिष्ठा. ०**महिमा**—पु. ईश्वराचें सामर्थ्य, श्रेष्ठत्व. ०**माया**—ईश्वरमाया पहा. ०**मुद्रा**—स्त्री. दैवी, तेजयुक्त, अत्यंत सतेज, तेजःपुंज अशी चर्या. ईश्वरी तेज

पहा. **०यंत्र**–न. १ सर्व सृष्टी; ईश्वरी तंत्र पहा. २ प्राणी, जीव, वनस्पति वगैरे ईश्वरनिर्मित वस्तुजात. **०लाभ**–पु. अकल्पित, अत्यंत मोठी प्राप्ति. **०लाल**–ईश्वराचा लाल पहा. **०लीला**–स्त्री. ईश्वरी कृति, खेळ; परमेश्वरी कृत्य. **०वाचा**–स्त्री. देववाणी; आकाशवाणी, साक्षात्कार वगैरे स्वरूपानें किंवा एखाद्या महात्म्याच्या मुखाच्या द्वारें प्रगट होणारी वाणी; ज्ञान. **०संकल्प, संकेत**–पु. विधिघटना; नेमानेम; प्रारब्ध. **०साक्षात्कार**–पु. देवाचें प्रत्यक्ष दर्शन; देवानें दाखविलेला चमत्कार; दृष्टांत. ईश्वरसाक्षात्कार पहा. **०सूत्र**–ईश्वर सूत्र पहा. **०सोहळा**–पु. १ अत्यंत थाटाचा, शोभायुक्त उत्सव; आनंददायक प्रसंग (समाराधना, खेळ, मिरवणूक वगैरे). २ कोणत्याहि देवाप्रीत्यर्थ केलेला उत्सवसमारंभ. ३ परमेश्वराच्या या सृष्टींतील घडामोडी, मनुष्याच्या आयुष्यांतील प्रकार वगैरेंच्या चिंतनानें वाटणारा आनंद. **०क्षोभ**–पु. दैवी आपत्ति; अरिष्ट.

ईश्वरेच्छा, ईश्वरी इच्छा—स्त्री. परमेश्वरी इच्छा; ईश्वर सत्ता; देवाची मर्जी. [सं.]

ईषणा—स्त्री. इच्छा; प्रेम; उत्सुकता; काळजी; आस्था; आसक्ति. सामाशब्द–लोकेषणा; पुत्रेषणा; वित्तेषणा; दारेषणा. [सं. इष्]

ईषत्—क्रिवि. थोडेसें; किंचित्. 'तरी अधिक नोहे ईषत् । मर्यादा न संडी ।' –ज्ञा २.३५८. सामाशब्द– ईषदुष्ण; ईषद्दर्शन; ईषद्दोष; ईषन्मात्र; ईषत्कर. [सं.]

ईषा—स्त्री. दांडा (गाडीचा, नांगराचा); इशाड; धुरा; ईस. 'चढला होता धांवुनि ईषेवरि नम्र करुनि तरवारी।' –मोद्रोण ११. ५०. [सं.]

ईषिका—स्त्री. कुंचली; ब्रश. 'चित्रकाराची जशी ईषिका तशी वार्णिका कवीची ॥' –टिक १२२. [सं.]

ईस, ईसाड—ईषा. इशाड पहा.

ईस—उद्गा. इश्श; छीः; शीः. इश्श पहा. –स्त्री.न. तिरस्कार; विषाद; नापसंति. **०म्हणणें**–१ तिटकारा, कंटाळा, नापसंति दाखविणें. 'ईस देखील म्हटली नाहीं' 'मनांत ईस देखील आली नाहीं.' २ एकदम दुःख वाटून हाय असें विवळणें.

ईसवी—इसवी पहा.

ईसा—पु. येशु ख्रिस्त.

ईसा—स्त्री. इर्षा. 'मारीन आपुलीया ईसा।' –उषा १०.८०. [सं. ईर्ष्या]

ईस्टर—पु. गुडफ्रायडेनंतर पहिल्याच रविवारीं होणारा ख्रिस्त पुनरुत्थापनानिमित्त वार्षिकोत्सव; एक ख्रिस्ती सण. [इं.]

ईहा—स्त्री. १ इच्छा. २ हातीं घेतलेलें काम; उद्योग; व्यापार कृत्य. 'या नांव काम जाण । कामक्रिया ते ईहा पूर्ण ।'–एभा २५. ७८. [सं.]

ईहित—वि. इच्छिलेलें. [सं.]

ईळ—पु. (कुण.) वेळ; काळ. इळ पहा. [सं. वेला] **०भर**–क्रिवि. (व.) दीर्घकाल; पुष्कळ वेळ; दिवसभर. 'एवढा ईळभर बसलों.'

ईक्षण—न. १ अवलोकन; पाहणें. २ डोळा; नयन. 'देवो उन्मेषसुक्ष्मेक्षणु । विप्रराजु ॥' –ज्ञा १. १५. [सं. ईक्ष=पाहणें] **०यंत्र**–न. एक प्रकारचा आरसा, परंतु यांत काचेच्या ऐवजीं धातूचा पत्रा असून त्यावरून किरणांचें योग्य तऱ्हेनें पृथक्करण होण्याकरितां तो घासून चांगला चकचकीत केलेला असतो. याचा उपयोग शस्त्रक्रियेच्या वेळीं आंतरिंद्रियें पाहण्यासाठीं, तसेंच परावर्तक दुर्बिणींत करतात.

ईक्षणें—सकि. पाहणें; बघणें. 'ईक्षोनि शिष्यांचा मेळा दयालु ।' –दावि ३२२. **ईक्षित**–वि. पाहिलेलें; अवलोकन केलेलें. 'पर्जन्या ! तर ये ! कृषीवल तुझ्या मार्गाप्रती ईक्षती ।' –केक ८१.

उ

उ—मराठी वर्णमालेंतील पांचवा स्वर; या अक्षराचें पहिलें स्वरूप अशोकाच्या (गिरनार) शिलालेखांत व आजचें स्वरूप इ. स. ८३७ च्या जोधपुर लेखांत आढळून येतें. –ओझा. –उपसर्ग. उलट क्रिया, विरोध, अभाव, अपकर्ष इ० अर्थी क्रियापदांस लागणारा एक उपसर्ग. उ० उसवणें, उवळणें, उलगडणें. इ० [सं. उत्, उद्] –पु विष्णु. (ओम् मधील उ म्हणजे विष्णु). 'उकार विष्णुरव्यक्त.' –गुच २.१३०.

उँ—उद्गा. अँः! काय! या अर्थी आश्चर्यार्थक किंवा प्रश्नार्थक उद्गार; यानें नाखुषीहि दाखविली जाते. [ध्व.]

उं—स्त्री. एक कृमि. केसांतील ऊ. [सं. यूका]

उ॥—उमर याचा संक्षेप.

उइला—वि. ढवांनीं भरलेला. [ऊ]

उक—स्त्री. १ झळ. 'माझिया विरहाग्नीची उक तूं कैसेनि साहसी.' –भाए ७०. 'लागे जैसी दावानळाची उक।' –ज्ञाप्र ७७०. २ उकळी; उठावा. [का. उक्कु=ऊत येणें, कड येणें]

उकट—उकड पहा.

उकटणें—उक्रि. १ जात्याला टांकी देणें; जातें पुन्हा नव्यासारखें करणें (टाकी देऊन) २ (ल.) दोंडावर देवीचे वण उठणें–पडणें. [सं. उत्+कृत्=फाडणें; तुकडे करणें; कापणें; तुल० लिथु. केर्तु; ग्री. केइरो, कर्सिस; रूॅ. कोर्जु; लॅ. कर्टस; हिब्रू. केअरतैथिम्]

उकटणें—उक्रि. १ उलथणें (तव्यावरील पोळी वगैरे) २ (राजा) उचकटणें पहा. ३ (लुप्त) उकलणें पहा. [उचकटणें, उकलणें; सं. उत्कत्थन; प्रा. उक्कत्थण=उखडणें]

उकटाई—स्त्री. १ जात्याला टांकी देण्याची मजुरी. २ टांकी देण्याचें काम. [उकटणें]

उकटी—स्त्री. १ जात्याला टांकी दिल्यावर दळण्यांत येणारें मूठभर धान्य (जात्याची रेव जावी म्हणून). २ टांकी देण्याचें हत्यार; टांकी. ३ नवीन टाकी दिलेल्या जात्यावर दळलेल्या धान्याच्या रस्त्यावर घातलेल्या फुल्या, वर्तुळें. ' कल्पतरुतळवटीं असे सूर्यकराची उकटी. ' –भाए ६१३. ४ टांकी दिल्यावर दळलेल्या रेवेच्या पिठाच्या फुल्या ओलांडल्यामुळें पायाच्या टांचेस अगर तळव्यास येणारे फोड, गळवें. [उकटणें]

उकटींव—वि. टांकी दिलेलें; नवें केलेलें, दुरुस्त केलेलें (जातें.)

उकड—क्रिवि. उकिडवा; उकिरडा; मांडी न घालतां. (क्रि० बसणें). ' म्हणौनि उकड बैसोनि. ' –पंच १.११.

उकड—स्त्री. १ मोदक वगैरे करण्याकरितां शिजवून केलेलें तांदूळ वगैरेंचें पीठ. (क्रि० तिंबणें). –वि. उकडलेला, शिजविलेला. [उकडणें; सं. उत्कथ्] **०आंबा, उकडांबा**–पु. पाडाचा आंबा उकडून तोंडीं लावण्यासाठीं करतात तो; तो बरेच दिवस टिकावा म्हणून पाणखारांत घालून ठेवितात. **०गरे**–पु अव गरे शिजवून उकडून भाजी करतात ती. फणस जून असला म्हणजे त्याची अशी भाजी करितात. –गृशि १.२०४. **०पीठ**–न. तांदळाचें वगैरे उकडलेलें पीठ. **०पेंडी**–स्त्री. (ना.) रव्याला फोडणी देऊन तयार केलेलें एक रुचकर खाद्य. [तुल० का. उप्पिट्टु=खारा सांजा] **०पोळी**–स्त्री. उकडींत गव्हाच्या सांजाचें पुरण घालून केलेली पोळी. **०रस्सा**–पु. मांस, हाडे वगैरेपासून तयार केलेला रस्सा. –गृशि २.४९. **०लोणचें**–न उकडलेल्या लिंबाचें लोणचें, मिरच्या इ० **०हंडी**–स्त्री. १ पावटे, भुई मुग वगैरेंच्या ओल्या शेंगा एका मडक्यांत घालून तें पालथें भुईवर ठेवून त्यावर विस्तव पेटवून उकडतात ती. २ स्वंपाकांत भांडें उलटें करून उकडण्याची एक पद्धत **उकडीचे मोदक**–पु अव. नारळाचा कीस काढून, त्यांत साखर घालून तें पुरण तांदळाच्या पिठाची उकड तयार करून तिच्या पापडींत घालून उकडून तयार केलेला एक पदार्थ.

उकडणें—उकि. १ शिजविणें; उष्णता लावून पदार्थ खाण्याजोगा मऊ करणें. ' तेंणें सवेंही उकडती । अस्तिमांस ॥ ' –दा ३. १.३०. २ हवेंत उष्णता भासणें; गुदमरणें. ' जळचरें उकडोनिया मरति । ' ' येथें दाटीमुळें उकडतें. ' ३ (सोनारी धंदा) (उकाड्याच्या तेलानें) मळ किंवा घाण काढून टाकणें. [सं. उत्+कथ्; का. उक्कु=उतूं येणें; शिजणें]

उकडवा, उकडा—क्रिवि. उकिडवा. उकड पहा. (गो.) उकडया.

उकडा—वि. मीठ, मिरची, मसाला न घालतां केवळ उकडून काढलेला (भाजी इ० पदार्थ) –पु (कों.) उकाडा पहा. **०तांदूळ**–पु. भात प्रथम उकडून मग कांडून तयार केलेले तांदूळ; उकडे तांदूळ. –पया ४२१. [उकडणें]

उकंडा—पु. (व. ना.) उकिरडा. ' घरापुढेंच उकंडा आहे. ' [सं. उत्+कृ=वर फेंकणें; ढीग करणें, खणणें; प्रा. उक्करड]

उकडींव—वि. १ उकडलेलें; शिजविलेलें. २ पाण्यांत घालून थोडी आंच दिलेले. (तांदूळ इ०) [उकडणें]

उकर–उकरी—पु स्त्री. उकरून काढलेली माती; उकीर पहा. [सं. उत्+कृ; प्रा. उक्कर=ढीग; रास.]

उकरड—स्त्री. (कु) नासाडी; खराबी; उकरडा. ' काय उकरड केलीस ही ' = काय नासाडी केलीस ही. [सं. उत्+कृ]

उकरडा—पु. कचऱ्याची रास; घाण, गदळ वगैरे टाकण्याची जागा. उकिरडा पहा. [सं. उत्कर=खणून काढलेली घाण; ढीग, रास; कचरा. यज्ञामध्यें वेदीच्या बाहेर उत्कर असतो; प्रा. उक्केर] **०फुंकणें**–अत्यंत दारिद्र्यावस्था प्राप्त होणें. **–ध्याची दैना फिटणें**–क्षुल्लक वस्तूचाहि केव्हांना केव्हां तरी उत्कर्ष होणें (उकिरडाहि केव्हां केव्हां स्वच्छ होतो यावरून). **–ध्याची धण करणें**–चांगल्या वस्तूंचाहि नाश, दुरुपयोग करणें. (चांगल्या वस्तूंनीं उकिरडा समृद्ध करणें). **–ध्यासारखा वाढणें**–बेसुमार वाढ होणें (संकटें, कर्जे, मूल, दुःख, रोपटा वगैरेंची) ' मुलगा उकरड्यासारखा वाढो ! '

उकरणें—उ.क्रि. १ खरवडणें; कोरणें; खणणें; पोखरणें; खवणें (उंदीर, घुशी वगैरे जमीन कोरून काढतात त्याप्रमाणें). २ जमीन किंवा एखाद्या वस्तूवर खोदणें, कोरणें; (नख, दांत, शस्त्र, इ च्या टोंकानें) कोरून काढणें; खांचा पाडणें. ३ एखादी गोष्ट मुद्दाम पुन्हां उपस्थित करणें; कलह उपस्थित करणें; भांडणाचें मूळ पुन्हां वर काढणें. ४ खुबीदार प्रश्नानें खरी हकीकत एखाद्याच्या तोंडांतून बाहेर काढणें; उकरून काढणें ही शब्दयोजना वरील अर्थ ३ व ४ यांत वापरतात. –अ.क्रि. (प्रा.) भिंतीचा गिलावा, भांड्यांचें कीट वगैरे सुटून येणें; भांड्यांना लागलेलें अन्न भिजून निघण्याजोगें सैल होणें. [सं. उत+कृ]

उकरमणें—अ.क्रि. तवा वगैरेवरील खरवड, जळका अंश, खपल्या वगैरे दूर होणें; भांडें, वस्त्र वगैरेंचे पापुद्रे, मळ वगैरे सुटून येणें. [उकरणें अप.]

उकराई—स्त्री. खोदकाम करण्यास (उकरण्यास) लागलेला खर्च; खोदकाम.

उकरी, उकरीड—उकरडा, उकिरडा पहा.

उकरींव—वि. उकरून काढलेला; ओरखाडलेला; कोरलेला; पोखरलेला; खवलेला.

उकल–ला—पु. १ उलगडा; गूढ गोष्टीचें स्पष्टीकरण. ' या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं । ' –ज्ञा ६. ३८७.

'या गोष्टीचा उकल एक हरीच जाणे.' 'मला त्याचा कांहीं उकला होत नाहीं.' –सूर्यग्रहण १९. २ उमज, खुलासा; बोध. 'इत्यादि कर्माचा उकल। होय ऐसें बोलों पाहतो बोल।'–यथा ४.४१६. [सं. उत्कल्=सोडविणें, मोकळें करणें]

उकलणें—उ.क्रि. १सैल करणें; उलगडा करणें; गुंतागुंत काढणें; मोकळा करणें. 'देव्हूडियां वेणिआं उकलिलियां। उधवटां गांठीं सूटलियां।'–शिशु ७१६. 'सावध व्हा कंठीं यमपाश केंसे घालितां अहा! उकला।'–मोसभा ५.११. २ फोडून निराळें करणें; दुफळी करणें; फोडणें; चिरणें; निराळा करणें; (गो.) उकलास पहा. ३ (ल.) विवरण करणें; स्पष्ट करणें; फोड करून सांगणें. 'उकलू जाणे अंतर। प्राणीमात्रांचें।–दा १४.७.१२. ४ सुटका करणें; मुक्त करणें. 'संसारीं गुंतोन काये। उकलवी ऐसें हृदयें। तो सत्वगुण।'–दा २.७.४३. –अक्रि. १ स्पष्ट होणें; उघडणें; मोकळी होणें; सुटणें. 'अंगीं उटी दिसे सुढाळ। कीं इंदुबिंब उकलें निर्मळ।'–ह ७.११. २ उलणें; उमलणें (जमीन, फूल, कळी, दांत वगैरे). 'उकलतेनि उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेंचि तिखें।'–ज्ञा १५. १८५. [सं. उत्कल्]

उकलणें–न. (विणकाम) रेशीम वगैरे उकलण्याची आटणी.

उकलाउकल—स्त्री. पुनःपुन्हां सोडबांध; घडामोड; विचार न करतां करणें व पुनः मोडणें. [उकल द्वि.]

उकलास—पु. (गो.) देवाच्या नांवें निराळा राखून ठेवलेला भाग; संकल्प. [उकलणें]

उकलींव—वि. १ सुटलेला; उलगडलेला; सोडविलेला; मोकळा केलेला. २ उमलेला; विकास पावलेला. ३ तडकलेला; उतटलेला. उलेलेला. ४ स्पष्ट, साफ केलेला. ५ घडी मोडलेलें (कापड वगैरे.) [उकलणें]

उकवण उकवीण—न. १ (कों.) जखमेंतील कीड (किवण) नाहींशी करणारा मंत्र. २ तो मंत्र म्हणण्याचा विधि, प्रयोग. [सं कृमि+ व्रण; म. किवण; उ+किवण]

उकवणें—उकावणें पहा.

उकशी—स्त्री. एक लहान रानझुडुप.

उकसणें—उक्रि. (राजा.) १ अस्ताव्यस्त करणें. उसकटणें पहा. २ (ना.) खरचणें. [सं. उत् +कृष्=वर ओढून काढणें ओढणें; फाडणें; प्रा. उक्करिस; प्रा. उक्स्स?]

उकसाबुकशीं-सां-सीं—क्रिवि. ओक्साबोक्शी पहा. 'प्रेमपान्हा फुटला देवकीशीं। क्षणक्षणां विलोकी हरिमुखासी। मागुती धरी हृदयासी। उकसाबुकशीं स्फुंदत॥'–ह १९.१८८. 'आसुवें सांडी उकसाबुकसा। धांव महेशा धावण्या॥'–कथा १४.८.१५६

उकळ—स्त्री. १ कढ. उकळीपहा. २ काढा; उकाळा पहा. [सं. उत्+कल्; का. उक्किसु.]

उकळणें—अक्रि. रटरटा शिजणें; अधण येणें; बुडबुडे उत्पन्न होणें; खदखदणें; गुदगुदणें; उसळणें; सळसळणें; कढणें; कढ येणें; –उक्रि. शिजविणें; कढविणें; काढा करणें; अर्क काढणें; उकाळा काढणें. [सं. उत्+कल्]

उकळणें—उक्रि. (पैसा, अन्न भिक्षा वगैरे) वसूल करणें; गोळा करणें; लुबाडणें; उपटणें. 'कवडें उकळीं भूतळीं'–शिशु १६२. **म्ह**० घुसळतीपेक्षां उकळतीचे घरीं फार. [उकळ]

उकळा—पु. १ लोकांकडून हक्कदारानें किंवा कुळांकडून सावकारानें गोळा केलेली बाकी, वसुली; उगरण. २ भीक मागून जमा केलेला संग्रह. ३ दुसऱ्याकडून उपटलेला जिन्नस, वस्तु. [उकळणें]

उकळित—उकळीत पहा.

उकळी—स्त्री. १ उकळण्याची क्रिया; कढ; अधण. (क्रि० फुटणें; येणें). २ उमाळा; उत्कट इच्छा; उत्कंठा; आंच. 'ब्रह्मा उपजला नाभिकमळीं। त्याच्या मनीं सृष्टीची उकळी। म्हणोनि प्रथम पुत्र मानस उपजले'–यथादी १०.१५७. ३ प्रेम, दुःख, राग इत्यादि मनोविकारांचा उद्रेक किंवा भरतें येणें; उमाळा (क्रि० फुटणें; येणें). 'रामकृष्णरंगीं रसना रंगली। अमृतउकळी नाम तुझें।'–तुगा २५०२. ४ वाहणारें पाणी अडलें असतां होणारी अवस्था; लाटा; पाण्याची खळबळ. 'वळणें वांकणें भोंवरे। उकळथा तरंग झरे।'–दा ११.७.३. [सं. उत्+कल्; उत्कलिका]

उकळीत—स्त्री.न. १ येणें असलेल्या पैशांची उगवणी; वसूल केलेली रक्कम. २ भीक मागून मिळविलेला जिन्नस. ३ विकावयाकरितां आणलेल्या बागाईत किंवा किराणा मालावर ऐनमालाच्या रूपानें वसूल केलेली (शेखदारानें) रक्कम; करवसुली. ४ पाटलानें रयतेकडून वसूल केलेला सरकारी सारा. ५ धारेकऱ्यांना प्रत्येक हप्त्याची जी येणें रक्कम असेल त्या बाबतींत पाठविलेला फिरता हुकूम, याद, हिशेबाचा कागद अगर स्मरण. [सं. उत्कल्]

उकळेगिरी—स्त्री. लुटालूट; लुबाडणें; दरोडा.

उका—स्त्री. १ उल्का; तुटणारा तारा. २ ठिणगी. 'नीगती अग्नीचीया उका'–उषा ११२५. [सं. उल्का; प्रा. उक्का]

उंका—वि. (कों.)(विरू.) ओंका. उघडा; नागडा; हीन.

उकाइती—स्त्री. उकळीत; लुटालूट. 'ह्या मुलखांत आपली उकाइती किफायतशीर होईल असें त्यास वाटलें.'–कोकि. १३४. [उकळणें]

उकाडा—पु. रतीब (दूध, भाजी, दळण वगैरे) रोज नियमितपणें घ्यावयाची पद्धति, रीत; नियमित वेळीं रकमा देणें, हप्ते देणें.

उकाडा—पु. १ अतिशय उष्मा, गर्मी. २ (सोनारी धंदा) भांड्यांना, अलंकारांना उजळा देण्याकरतां जे चिंच, लिंबाचा रस,

ॲसिड (तेजाप) किंवा इतर अम्ल पदार्थ आणि मीठ वगैरेंचें कढवून मिश्रण करतात तें. (क्रि० देणें; करणें). **उकाड्याचें तेल**–न. (सोनारी धंदा) सल्फ्युरिक ॲसिड उकाड्यासाठीं वापरतात म्हणून त्याचा पर्याय वाचक शब्द. [सं. उत्+क्वथ्]

उकारमात्रा—स्त्री. प्रणवाची (अ, उ, म यापैकीं) दुसरी मात्रा.

उकाल—पु.१ निवाडा.२सुटका; वेगळे होणें; निसटणें; मुक्तता ३ स्पष्टपणें दिसून येणें; बाहेर पडणें. ४ (प्र.) उकाला. आजारांतून उठणें; आराम वाटणें (क्रि० पडणें; होणें.) [उकलणें]

उकाषणें—क्रि. १ वर येंणें, चढणें; उंच होणें. 'मग मनीं उगलाचि उकावसी।' –दावि १३२. २ इरेस पेटणें; भरीस पडणें. 'बदे भट्ट नृपापुढें उकावला चढोवढें।' –बसवकृत महाबळचरित्र ६ [सं. उत्+कम्=वर चढणें; का. उक्कु=चढणें]

उकाशी—वि. (गो.) १ उपरी कूळ; स्थायिक नसलेला. २ कांहीं शिल्लक न टाकणारा; उधळ्या.

उकासु—पु. प्रवासी. -शर

उकाळ—पु. १ काढा. २ नेम चुकून फुकट गेलेला तोफेचा गोळा. [उकळणें]

उकाल—पु. १ निवाडा; निकाल. २ उखाळ पहा. [म. उकलणें]

उकाळा—पु. १ उकळी. २ काढा. ३ कांहीं अम्ल पदार्थ, क्षार किंवा मीठ, तांब्याचा तुकडा वगैरे घालून उकळलेलें पाणी; हें विष खाल्लेल्या माणसास उलटी होण्यास देतात. ४ गांवांतील हक्क दाराचा हक्क वसूल करणें. खेड्यांतील बाजारांत येणाऱ्या जिन्नसावर हक्कदारांचा (बचकभर घेण्याचा) असलेला हक्क. ५ येणें असलेल्या पैशांची उगवणी, वसुली. [उकळणें]

उकिडवा—वि. टांचा टिरीशीं व गुडघे पोटाशीं येतील अशा प्रकारें जमिनीवर पावलें टेकून बसलेला (माणूस); उकिरडा [सं. उत्कटक–उक्कडअ–उकडय–उकिडव–वा –राजवाडे, भाअ १८३४ सिं. ओकिडु]

उकिरडा—पु. १ केर टाकण्याची जागा; केराचा ढीग. २ उकिरड्यावरची राख (बागेच्या खतासाठीं). [सं. उत्+कृ, उत्किर् प्रा. उक्करड] **म्हo** कुंभाराचें गाढव उकिरड्यावर आल्यावांचून कां राहणार? **उकिरड्यावरचा शेणगोटा**–कुचकामाचा; निरुपयोगी. 'आम्ही काय उकिरडयावरचा शेणगोटा।' –इंप ६१. **०फुंकणें**–१ दारिद्र्यामुळें क्षुद्र लाभासाठीं भटकणें. 'तूं आतां विद्या करीत नाहींस! मोठेपणीं उकिरडे फुंकणार कीं काय?' २ वेश्यागमन करणें 'बाहेर जाऊन दहा उकिरडे फुंकून येतील' –बाय २.१.

उकिरडी भाजी—स्त्री. हलक्या प्रतीची (उकिरडयावर उगवणारी) माठाच्या जातीची भाजी.

उकिरवळ्या—स्त्री. अव पोपडे; उकीर पहा. 'जमीनीच्या उकिरवळ्या...' –सूर्योदय १८४. उखरवळी पहा. [उकीर+वळी]

उंकी—स्त्री. पाजणी, मागावर विणण्याकरितां खळ देऊन तयार केलेले उभे धागे. [का. उंकी, ऊंके]

उकीर—पु. १ उकरून काढलेली माती (घूस, उंदीर इ०नीं); उकरलेल्या मातीचा ढीग. 'घुसी उंदरांसी ठेउनी मंचकीं। काय उकीर शेखी काढितीना।' –ब ५३८. २ ओल्या जमिनीवर शेण वगैरे पडून त्याचे निघणारे पोपडे; उखळलेली जमीन. ३ डोळ्यांतील पू, घाण. ४ (सामा.) उकिरडा; कचरा. 'उत्पात विविध होती मणिकांचनमय समेंतहि उकीर।' –मोमौसल १. २६. [सं. उत+कृ; उत्किर्; प्रा. उक्केर]

उकुडवा—उकिडवा पहा.

उक्त—वि. बोललेलें; म्हटलेलें; सांगितलेलें. सामाशब्द–तदुक्त; मदुक्त; ईश्वरोक्त. 'तरी आतां जाण म्यांचि उक्त दोन्ही। –ज्ञा ३.३४. [सं.] २ प्रकट; व्यक्त. **०निर्वाह**–पु. बोललेलें करणें; वचन पाळणें; आपले शब्द कायम ठेवणें. **०निर्वाही**–वि. बोललेलें करणारा; वचन पाळणारा; आपलें बोलणें खरें करून दाखविणारा.

उक्ता-क्ती-क्तें—क्रिवि.वि. वजन, माप, न करतां राशीवारी (केलेली खरेदी किंवा विक्री); घाऊक; ठोकळ; मोघम (आकार). २ मक्त्यानें अगर खेपेवारी किंवा केलेल्या कामाप्रमाणें (दिलेली मजुरी); खंडानें (दिलेली जमीन). ३ सरसकट; सगळें, मोजकें. [सं. वच्–उक्त; का वट्ट; का. ता. तेलगु, तुळु, ओट्ट=रास.] **०माप**–न. ठोकळ, अंदाजी माप.

उक्ति—स्त्री. १ भाषण; वचन; वाक्य; बोलणें. [सं.] 'तैसें व्यासोक्तितेजें धवळित सकळ।' –ज्ञा १.४१. २ वचनरूप प्रमाण; म्हण; सुभाषित.

उक्ति—स्त्री. युक्ति. 'आपण होता तेथें। नेऊनि त्या प्रेमळांते। उक्ति प्रयुक्ति त्यांतें। प्रेमसंलुप्त करोनी। –रास १.३७. [युक्ति अप.]

उक्ति, ओक्ती—स्त्री (कों.) एका लांब काठीस एका बाजूस जड दगड व दुसऱ्या बाजूस भांडें लावून विहिरींतून पाणी काढण्यासाठीं केलेलें साधन. [सं. उत्क्षिप्त; प्रा. उक्खित्त=वर फेकलेलें]

उक्तें— वि. (गो.) १ उघडें; रिकामें. 'उक्त्या बैलावर गोणी' २ कापलेलें. [सं. उत्कृत्त; प्रा. उक्कित्त]

उक्रंडा—(व.) उकिरडा पहा.

उक्शा-क्सा-बुक्शी-बोक्शी—ओक्साबोक्सी पहा.

उखई—स्त्री. फजिती; उपहास; थट्टा, चेष्टा झालेली स्थिति; उघडकीस येणें; बाहेर येणें. [सं. उत्+खिद्]

उखका—पु. भावार्थ; कर्तव्यार्थ. –हंको

उखटणें—सक्रि. (माण.) ढलपे काढणें; उखडणें. [सं. उत्+कृत्=कापणें]

उखडणें—उक्रि. १ उखणणें; खणून काढणें; उखळणें; मुळासकट उपटून काढणें, २ (ल) काढून देणें; घालवून देणें; उच्चाटन करणें (कामावरून, जागेवरून). ३ रागावणें. ' तो जेव्हां असें बोलला तेव्हां मात्र मी उखडलों. ' [सं. उत्+खन्]

उखडंपट्टी—स्त्री.(व.)१ उचलबांगडी; हकालपट्टी. २ ताशेरा. पोसडपट्टी; हजेरी; रागावून बोलणें; निर्भर्त्सना. [उखडणें]

उखंडा—वि. (व.) उघडा; अनाच्छादित. ' उखंडधा बांधर बसला. ' (गो.) उक्कें.

उखडधा—पु. (जुन्नरी) माशाची एक जात; याचें शरीर लहान व डोकें मोठें असतें. हा नदी-ओढ्यांत सांपडतो. ' ओढ्यांत उखडधा मिळाला. '

उखणणें—सक्रि. खणून काढणें (तक्तपोशी, जमीन, गच्ची, जमिनीचा तुकडा इ०); उखळणें. [सं. उत्+खन्; प्रा उक्खण]

उखता-तें-उख्त्याचा—(प्र.) उक्ता पहा. ' भक्तीची जोडी ते उखत्याचिसाठीं. उणें पुरें तुटी तेथें नाहीं. ' –तुगा २०९८ 'जो वितो (जीविता) तो माझा पिता. उखता तो उखत्याचा. ' –तुगा ३८११.

उखर—वि. लागवड होत नाहीं अशी माळवट जमीन; रेताड, डोंगराळ जमीन; बरड. ' कृषीवल पेरणी करी. भूमीपाडें पिकती बुमरी. अंकुरेना क्षितितळीं उखरीं. तें बीज निर्धारी अतिशुद्ध. ' –एभा ११.१०३१. ' मेघवृष्टि येथें होते अनिवार . जिव्हाळ्या उखर लाभ नाड. ' –तुगा ३४४०. [सं. ऊषर]

उखरडें—न. १ समुदाय; सैन्य. ' तें देखौनि पातलें उखरडें. यादवांचें ' –शिशु ९६५. [सं. उत्कर प्रा. उक्कर=समूह]

उखरणें, उखरींव—उकरणें उकरींव पहा.

उखरवळी, उखरी—स्त्री. पापुद्रा; ढलपा; पोपडा; खपली; कवचीचा अलग तुकडा; कोशेटा; खवली; खरपुडी; उकीर, उकिरवळ्या पहा. [सं. उत्+कृ]

उखरवा—पु गुंताडा. ' परी अधीन कां नागवें. हेंचि कैसेनि जाणावें. गुणांचिये उखरवे. माजीं असतां. ' –ज्ञा १४. ३२५.

उखरवाखर, उखरावाखर, उखरपाखर, उखरवखर—वि. १ खालवर; खडबडीत; उंचसखल; खोल खड्डे असलेली (जमीन, पृष्ठभाग वगैरे). २ अस्ताव्यस्त; न लावलेले; चिवडलेले (कागद)

उखलणी—वखरणी, उखळणें पहा. ' सेताचे उखलणीस नांगर ३ एकूण. ' –मसाप २.६६.

उखलणें—क्रि. (खा.) वर उचलणें. [सं. उखळणें]

उखलाड—स्त्री. (कों.) उचलणें आणि ठेवणें; काढणें-घालणें; हलवाहलव; काढघाल; हलवणें आणि ठेवणें; अस्ताव्यस्त करणें. [उखलणें=उचलणें आणि बसवणें]

उखलाशी—वि. (कर.) हंगामी, कायम न टिकणारा; काढून टाकतां येण्याजोगा. [उखळणें+असा]

उखळ—न. कांडण्या-सडण्यासाठीं दगड खोदून अगर लांकडाचा ओंडा पोखरून जो खोलगट भाग करतात तो. ' पीठु करणीं एकें वेळें, उखळीं वसुंधरेचा ॥. ' –शिशु ९१४. ' उखळांत घालून करी कांडण . आपुल्या करें मज देखतां. ' ' उखळ रोंविलें धर्मशाळे. भल्ती कांडी भलत्या वेळे ॥. ' –मुरंशु ४१३. [सं. उलूखल; प्रा. उक्खल; तुल० का. होरळु-उरळु=लवंडणें+कल्लु=दगड वरकल्ल] **०पांढरें होणें**–वैभव प्राप्त होणें; नशीब उघडणें; **अमूप** द्रव्य मिळणें (गरीबाच्या घरीं उखळाला कांहीं काम नसतें तेव्हां तें पांढरें असत नाहीं यावरून) (एखाद्याच्या) **बेंबीचें उखळ होणें**– चमचमीत खाद्य पेयें मिळाल्यामुळें दोंद सुटणें, (बेंबी उखळासारखी खोल होणें); शरीर पुष्ट होणें. **०मुसळाशीं गांठ पडणें**–भांडणाऱ्या व झगडणाऱ्या माणसाचा सहवास घडणें. वाक्प्रचार– उखळांत घातला असतां सतरा घाव चुकविणारा= घालमेल, अफरातफर करणारा; कोणाच्या तावडींत न सांपडणारा, अर्थात द्वाड माणूस. **उखळांत डोकें घालणें, देणें**–जीव अतिशय धोक्यांत घालणें; संकट, अनर्थ गुदरण्याच्या स्थितींत असणें, जाणें. **म्ह०** उखळांत डोकें घातल्यावर मुसलाला कोण भितो= स्वतः पत्करलेल्या साहसाचे परिणाम भोगावयास न कचरणें.

उखळ, उखळणी—स्त्री. जमीनीची पहिली नांगरणी. फाळणी. [सं. उत्खनन, उत्स्खलन]

उखळण—स्त्री. फार वापर पडून खराब झालेली, भेगा पडलेली अशी जमीन, जागा यांची अवस्था; खडबडीत पृष्ठभाग (शेणानें सारवलेली जमीन, फरशी, तक्तपोशी वगैरे). [उखळणें]

उखळणी—स्त्री. (जमीन) उखळणें; खणून काढणें; मोडणें; तोडणें; तुकडे करणें; केलें त्याच्या उलट करणें. [सं. उखळणें]

उखळणें—उक्रि. १ पहिल्यानें शेत नांगरणें; फाळणें (जमीन); उकरणें, खणणें. २ उलगडणें; काढणें; मोडणें; निखळून टाकणें; उपटून काढणें (स्क्रू, खिळे, अडसर, पाय, हात, यंत्राचे भाग इ०). ' तों रावणाचा उखळला हस्त. शस्त्र पडिलें धरणीवरि ॥. ' ' उखळीन ईश्वराच्या हरिच्याहि महाभयावह रदासा ' –मोउद्योग ११.११७. ३ (ल) उच्चाटण करणें (स्थान, नोकरी यावरून); निर्मूलन करणें; हांकलणें; नाहींसें करणें. ' उखळा धर्मासि म्हणसि तरि म्हणसिल बालिशा नभा उखळा. ' –मोभीष्म ७.४३. ४ (ल.) उघळणें; पराभव करणें. ५ फोडणें; फाडणें; विलग करणें. ' तयानें लाखोटा उखळुनि असें जें उकलिलें. ' –सारुह ५.८३. –अक्रि. सैल होणें; तुकडे पडणें; (यंत्र वगैरेचे भाग) वेगळे होणें. [सं. उत्+स्खलन]

उखळ (ळा) बेर—स्त्री. १ पहिली व दुसरी नांगरणी; एकदां आडवें व एकदां उभें नांगरणें. २ उखाळ्यापाखाळ्या; उखळबेरीज. 'या उखळबेऱ्या काढीत बसण्यांत कांहीं अर्थ नाही.' –टि १.४१५. [उखळणें=पहिली नांगरणी करणें+बेरणें=दुसरी (आडवी) नांगरणी करणें]

उखळबेरीज, उखळापाखळ—स्त्री. एखाद्याचें दुष्कृत्य उजेडांत आणणें; एखाद्याचें दोषाविष्करण करणें; टवाळकी करणें टोमणे मारणें; उखाळी. (क्रि० काढणें).

उखळाउखळ—स्त्री. (एखाद्या यंत्राचे अवयव) विस्कटणें उलगडून टाकणें; मोकळें करणें; काढघाल करणें; मोडतोड, तुकडे करणें. [उखळ द्वि.]

उखळी—स्त्री. १ डमरूच्या आकाराचें लांकडी–दगडी उखळ (पोहे, तांदूळ इ० कांडण्यासाठीं). २ भोंवरा; आवर्त; गरगर फिरणारें पाणी. ३ उंसाच्या चरकाच्या खुंटांचे आंख ज्यांत फिरतात ती; (ओतकाम) चरकांतील नराच्या डोक्यावरील खोबळा बसविण्याचें साधन. ४ (व.) दाराचें कुसुं फिरण्यासाठीं केलेली खोबण. 'कावड (दार) उखळींतून निघालें तें बरोबर कर.' **०ध लाटसांधा**–खोबण व आंत फिरणारी लाट, अशा तऱ्हेचा सांधा उ० खांद्याचें पोकळ हाड व त्यांत दंडाचें हाड यांचा सांधा

उखळ्या—वि. (मधला टवका निघून उखळाप्रमाणें) खांचा पडलेला (नाणें, पैसा, रुपया).

उखा—स्त्री. १ प्रातःकाळ; पहाट; सकाळ; उषःकाल. 'करी साधुहृदयराउळीं । मंगळ उखा ।' -ज्ञा ५.१४२. २ उषा; बाणासुरकन्या; अनिरुद्धाची पत्नी. 'उखाहरण पुण्यपावन। ऐकावें चित्त देउन । ' –गाणें. [सं. उषस्]

उखाडपछाड—स्त्री. (हिं.) पराकाष्टेचे श्रम, मेहनत; उपद्व्याप; यातायात; दगदग. [उखडणें+पछाडणें]

उखाडे चारणें—क्रि. वडवणें; ठोकणें. 'पोतदारानें आपल्या मंडळींस त्यांना धरण्यास सांगितलें, दोघादोघांनीं एकेकास धरून उखाडे चारले.' –व्यायाम मासिक १५.१.२३.

उखाणा—पु. आहणा पहा. १ कोडें; कूटप्रश्न. उ० परडी भर फुलें तुझ्यानें मोजवेनात माझ्यानें मोजवेनात. उत्तर तारे २ गुप्त, गूढ अर्थाची म्हण; वचन. ३ बायकोचें किंवा नवऱ्याचें नांव घेतांना भाषेचा एक अलंकार योजतात तो; पद्यात्मक नांव घेणें. ४ लग्नांत वधूवरांकडील बायका परस्परांना लागतील अशी गमतीदार यमकात्मक वाक्यें रचून म्हणतात तो; (सामा.) यमकयुक्त टोमणे मारणें. नाशकास श्रावण शुद्ध षष्टीस नदीच्या दोन्ही कांठांवर जमून हातांत मुसळें वगैरे घेऊन एका कांठावरच्या बायका विरुद्ध कांठावरच्यांना शिव्या देतात. पुण्याकडे नागपंचमीस असाच कांहीं प्रघात आहे. [वै. आहनस्या; सं. आख्यान ? प्रा. आहणा; सिं ओखाण, गु. उखाणु] **०घेणें**–पतीचें नांव घेतांना त्या नांवाभोंवतीं गोड शब्दांची सजावट करणें. **०घालणें**–विचारार्थ कूट प्रश्न टाकणें; कोडें सांगणें. **०सांगणें**–उखाणा ओळखणें; जिंकणें.

उखाणा पोटरा—पु. कणसाचीं पोटें फुगून कणसें बाहेर पडण्याच्या पूर्वीची स्थिति; शेतांत कणसें येण्याची वेळ. 'शेत उखाण्यापोटऱ्यांत आलें.'

उखाणी—वि. कूट; कल्पित. –शर.

उखार—वि. उथळ; माळवट (जमीन) उखर पहा. [सं. ऊषर]

उखार—पु. कच्च्या, कोऱ्या रेशमाची खळ. **०काढणें**–(जरतारी धंदा) कच्च्या रेशमाचा कडकपणा (ते पापडखारांत शिजवून) काढून टाकणें.

उखारणें—अक्रि. खळ, खरबरीतपणा नाहींसा होणें; स्वच्छ निघणें. 'नातरी सादनिये भीतरी। वस्त्र चूरिजे गायावरी ॥ उखारेना तया बाहेरी । या हेतु ॥ ' –ज्ञाप्र ८४९. [उखार+येणें]

उखारी—स्त्री. १ उंसाचा मळा. –शर २ दुकान. –मनको; शर.

उखाळ—न (कों.) ओकारी–वांतीचें औषध; काढा; उकाळा पहा. 'तरी उखाळाची मात्रा घेणें।' –गीता २.२०९८. 'ढाळ आणी उखाळ देती। पथ्य कठीण सांगती। '–दा ३.७.३३. [सं. उत्स्खलन हिं. उखाल; उखळणें]

उखाळी, उखाळीपाखाळी, उखाळीवाखाळी—स्त्री. वर्म; वैगुण्य; दोष; व्यंग; कमीपणा बाहेर काढणें; वैगुण्य काढून केलेलें भांडण. (क्रि० काढणें.) 'उखाळ्या पाखाळ्या काढोनि भांडावें। वर्दळीस यावें काय त्यांनीं।' [उखळणें द्वि.]

उखि–खी—वि. मिथ्या; खोटा; वृथा. 'अरिसा आणि मुखीं। मी दिसें हें उखी ॥ ' –अमृ २.६५. –पु. मिथ्याभास. 'जो भवरुखु जाणें। उखि ऐसा ॥ ' –ज्ञा १५.१४३.

उखित–ता—पु. आगंतुक; वाटसरू. 'अहो जीक एथ उखिता। वस्ती करुं वाटे जातां।' –ज्ञा १३.३४. –वि. १ उदासीन. २ उपरी. 'उखिता जैसा विढारीं।' –ज्ञा १३.५९३. 'हेतू ठेवूनि परमार्था। देहीं वस्तीकरूं जवीं उखिता।' –एभा ९.२५५. [सं. उषित (वस्)=राहिलेला (तात्पुरता.)] **उखिति क्रिया**–स्त्री. उदासीनपणें (ब्रह्मार्पण बुद्धीनें) केलेली क्रिया.

उखिता–तें—क्रिवि. (प्र.) उक्ता, १ एकंदर; सगळें; अवघें; सर्व. 'तेणें मज आपुलें पोसणें केलें । कीं विकत घेतलें उखितेचि।' –एभा २३.७०८. 'उखितांच एकसरें चित्तें। मनींहूनि विटे विषयांतें।' –एभा २९.५५८. २ बक्षिस; उचित. 'दासीचा पाहुणेर उखीतें। धणी देईल अपुल्या हातें।' –तुगा ७००. [सं. उक्त (वच्)]

उखिरवाखिर, उखीरवाखीर—वि. उखरवाखर पहा.

उखिविखी—स्त्री. चर्चा; वादविवाद; ऊहापोह. 'हे बहु उखिविखी । ऋषीं केली नैमिषीं।' –ज्ञा १३.६६. 'नाग वायु राहोनि

मस्तकीं। अनाहतध्वनीची करी उखिविखी। कूर्म वायु श्रोत्रीं राहोनि सम्यकीं। करी शब्दाधिकरण।'–स्वादि ९.३.४३. [सं. उद्+चर्चा करणें]

उखी—स्त्री. १ उठवगी; मरगळ; निर्जीवपणा. २ (ल.) हकालपट्टी; नाश. 'जेथ अहंकारा उखी जाहली।' –ज्ञा १३.५३०. [सं. उद्=दुःख देणें; किंवा उत्+खिद्] ०होणें–थकणें; मरगळणें. –हंको. ०करणें–(व.) निंदा करणें; बोज उडविणें.

उखी—वि. खोटें; मिथ्या. उखि पहा. 'बेणेंही बोलें जाणावी। अज्ञान उखी।' –अमृ ७.५४.

उखीर—वरड जमीन, उखर पहा. 'जिकडील अत्यंत सुपीक देश सरासरी इकडच्या उखीर जमीनीवरोवर,...ही केवढी मौज आहे!' –नि ५८६.

उखेड—पु. (हिं.) (कुस्ती) जोडीवाल्याच्या चड्डींत जांघाडयाजवळ किंवा मांडीवर धरून आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराच्या मुंडया वर धरून आपल्या छातीच्या झोकानें जोडीदारास वर उचलून खालीं चीत पाडणें. (कुस्तींतला एक डाव) [उखडणें. उखाड]

उखेंडी—स्त्री. श्रम; कष्ट; सायास. उखाड पछाड पहा. 'भणओनि आपणेयां उखेंडी न पडे। जीतु शिशुपाळु हातां चढें।' –शिशु ४९०. [सं. उत्+खिद्]

उख्ता–ख्तें—उक्ता–उक्तें पहा.

उगऊ—पु. उगम; उगवतें स्थान. 'जे वेदाचा उगऊ।' –ऋ १. [सं. उद्गम; प्रा. उग्गम]

उगऊन देणें—सक्रि. स्पष्ट करून सांगणें. 'म्यां, काय, मातें उगऊन द्यावें।' –सारुह ७.१७२. [सं. उद्गम्]

उगटिलें—वि. नीट उघडलेलें; (साल जाऊन) स्वच्छ झालेलें (धान्य इ०). 'सुर्पी तोंचि पाहें धड उगटिलें। नव्हता नासिलें जग झोडी।' –तुगा २६१. [उघडणें; सं. उद्+घट्]

उगड, उगंड, उगंडा, उगंडु–डू—पु. उद्धार; सुटका. 'पडिलिया तिये ठायीं। मग कल्पांतींही उगंडु नाहीं।' –ज्ञा १.२६१. 'जयाचेनि संगें जन्मशतें उगंडुचि नव्हे गा।' –रास ३.४६०. 'तदपि अझुणि तूझा होत नाहीं उगंडा।' –सारुह ४.८४. [सं. उद्गम् किंवा उद्+घट्; प्रा. उग्घड; म. उघड]

उगडपें—क्रिवि, प्रसिद्धपणें; उघडपणें. 'आपण क्रिस्तु तारकु म्हणउनु उगडपें सांगितलें.' –स्रि २.३६ चा मथळा.

उगडास—स्त्री. (गो.) आठवण. 'तुवें काम सांगितल्याचो उगडास ना. =तुला काम सांगितल्याची आठवण नाहीं.' [सं. उद्+ग्रह; उग्गह= ग्रहण करणें?]

उगण—स्त्री. उगवण; फुटणें; देवी, गोंवर इ० बाहेर निघणें, पडणें. [उगवणें]

उगणा—पु. (काव्य.) बयाणा. उगाणा पहा.

उगणें—क्रि. उगी राहणें. 'तेथें कांत नसे म्हणोनि उगली पावोनिया विस्मया।' –विडलकृत २ (रसमंजरी ५४. [उगी]

उंगणें—कि. (भिल्ली) आंघोळ करणें. 'आनें उंगीनें रामाभोक्ति केतली.' =आणि अंग धुवून रामाची सेवा करी. –भिल्ली भाषा २७. [सं. अवगाह्; प्रा. उग्गाह]

उगणें—अक्रि. उगवणें; उमलणें. 'दिनमणिकिरणस्पर्शित, पंकज उगतीं स्वयेंच हो जैशीं।' –माअक १७२. [सं. उद्गम्]

उगंत—स्त्री. उत्पत्ति. –शर [सं. उद्गम]

उगम—पु. १ उत्पत्तिस्थान; जन्म; उत्पत्ति, बीज; मूळ; २ (शब्दशः व लक्षणेनें). ब्रह्म; आदितत्त्व. 'येक बळाचे निवडले। ते पोहतचि उगमास गेले।' –दा ११.७.१०. ३ नदी निघते ते ठिकाण; झरा. [सं. उद्गम]

उगमगणें उगमगणें—अक्रि. उगम पावणें. तेजाबासून आपआपापून वर पृथ्वी उगमगी।' –पला ८. [उगम]

उगमा—क्रिवि. उगा, स्वस्थपणानें; शांतपणें; कांहीं एक न बोलतां. 'पुढें चाले मागे उगमा। नाथ जातसे सवें सवें।' –नव ९.६९. [उगा]

उगरण, उगराणी, उग्राणी—स्त्री. उगवणी; पैसे वसुली; उधारी गोळा करणें. [सं. उद्+ग्रहण; प्रा. उग्गाहण = तगादा; तुल० ते. का. उग्राणी=उत्पन्न वसूल करणारा]

उगराबागरा—वि. उग्र; क्रूर; रानटी; भयानक; अकाळविकाळ; खवळलेला; आवेशलेला; भयंकर [सं. उग्र द्वि]

उगरावणें उगराविणें—सक्रि. (राजा.) (विरू.) उगारणें (काटी, छडी) पुढें करणें; दाखविणें; उगारणें पहा.

उगर्मुणें—अक्रि. (गो.) फूल अर्धवट फुलणें, उमलणें, उघडणें, मिटणें. [सं. उद्+गम्; प्रा. उग्ग+सं. मूर्च्छ, प्रा. मुच्छ]

उगला—क्रिवि. १ स्तब्ध; मुकाटशानें; उगीच; निमूट; गप्प; गुपचुप; निवांत; निमूटपणें; तटस्थपणानें 'आनंदें फुगला नसेचि उगला; गाधेय गर्जे सभे।'–आसी ५५. 'क्षत्ता म्हणे करी उगला। वाग्व्यापार ये काळीं।'–मुआदि २९.१४५. 'बसले कृष्णेसमीप ते उगले।–मोऐषिक ३.१९. २ व्यर्थ; विनाकारण. निरर्थक. 'जन्मुनी उगले कां मरती! –आप ३८. 'हा ग्रंथ म्हणाल उगलीच वाणी। तरी नोहे आहे अमृतसंजीवनी।'–नव ६.५४. [सं. उद्+भू]

उगव–पु. १ मूळ; आरंभ; उगम. 'वृथाचि झाला जीव। तयासी त्याचा उगव।' –विपू ७.१४३. २ उलगडा, निकाल 'मुख्य बिंब तो मी शिवू। विशद उगवू हा जाण।' –एभा ११. १३८. [सं. उद्गम]

उगवण–स्त्री. १ उगण; जोरानें (देवी, गोंवर वगैरे) बाहेर निघणें; उफणणें; उतणें; पुरळ; पुरळ. २ ग्रहादिकांचा उदय;

उगवणें. ३ नवरात्रांत देवापुढें रुजत घातलेलें धान्य. ४ गुंतागुंत सोडविणें (गुंतलेल्या दोऱ्याची); उलगडा; फोड. [सं. उद्+गम्; उद्गमन]

उगवण-णी-णूक—स्त्री.१ दिलेले पैसे गोळा करणें; वसुली, उगराणी. २ वसुल–गोळा केलेले पैसे. –शक १५६५ चा कल्याण ताम्रपट. [सं. उद्+ग्रहण; प्रा. उग्गाहण]

उगवणें-विणें—उक्रि. आदा होणें; वसूल होणें; वसूल करणें (पैसे वगैरे). 'मास अखेर रक्कम जवाहीरखान्यांतून उगवून घ्यावी' –गोप्रदाननियम (बडोदें) ४. [उगवण]

उगवणें–उक्रि. १ ग्रह, नक्षत्रें वगैरे क्षितिजावर येणें; उदय होणें. २ बीजापासून रोप वर येणें; अंकुर फुटणें; प्रादुर्भूत होणें. ३ गोवर, देवी वगैरे दिसूं लागणें; उफणें; उतणें. ४ नजरेस येणें; प्रकाशणें (बुद्धि, सद्गुण.); कला, विद्या,व्यवहार इ०मध्यें निष्णात होणें. 'हा लिहिण्याम्ध्यें दोन वर्षांत चांगला उगवला.' ५ उलगडणें; सुटणें; फोड होणें (गुंतावळ, गुंतलेला दोरा), उकलणें; समजाविणें; ओळखणें. 'एकाच्या कैवाडें उगवे बहुतांचे कोडें. –तुगा २७४. 'आतां हें अवघेचि उगवे. आणी मनास प्रत्यये फावे.' –दा १०.२.१५. 'पहा गे येणें नवल केलें. कृष्णदृष्टीच उगवले. ... बिरडें काढिलें निजदृष्टी.' –एरुस्व १६. ७९. ६ उमटणें; दृष्टीस पडणें. ७ प्रकट होणें; उत्पन्न होणें. 'नाना सर्पे उगवले काळ कर्कोट चालिले.' –दावि ५०१. ८ अडचणींतून मोकळें करणें. 'वाचे मंत्रजप कां अध्ययन करणें. अथवा गुंतलियासी शब्दें उगवणें.' –स्वादि ४.३.९५. ९ हिशोबांत जमेच्या व खर्चाच्या रकमांची बरोबरी होणें; तोंडमिळवणी होणें. १० गंध उगाळणें. 'केशर कस्तुरी चंदन उगवा.' –पला १०७. उगविणें पहा. [सं. उद्गमन; पं. उग्गणा; तुल० का. उक्किसु, उक्कु]

उगवणें—अक्रि. स्तब्ध होणें. 'परी बोलोनि पार्थ उगवला तेथें.' –गीताचंद्रिका ९. [उगा]

उगवत-ती—स्त्री. पूर्व दिशा; प्राची; पूर्व. –क्रिवि. पूर्वेकडे. [उगवणें]

उगवतामावळता—पु. (उगवणारा आणि मावळणारा) सूर्य. 'तुझें कृत्य उगवत्यामावळत्यास ठाऊक आहे.'

उगवतांमावळतां—क्रिवि. सकाळपासून संध्याकाळपर्यंत; दिवसभर. 'हा मुलगा उगवतांमावळतां रडतो.'

उगवला—क्रीवि. उगला; उगी; स्तब्ध. 'मग देव म्हणे राहा उगवले। या बाळें प्राण वांचविले.' –जै ८२.७९. [उगा]

उगवा, उगवील—स्त्री. १ दिलेले पैसे गोळा करणें; उगराणी. २ वसूल केलेले पैसे; वसूल. [उगवण]

उगवान—स्त्री. [हेटकरी] पूर्वदिशा (नाविक). उगवत.

उगविणें—सक्रि. १ गुंत्यांतून मोकळें करणें; स्पष्ट करणें; फोड करणें. 'सांगितलें सर्ती तुम्हां उगवुनी। गर्भासी येऊनी यमदंडा।'–तुगा १५. २ उल्लेखून दाखविणें 'हें कलम तुम्ही खरें म्हणतां परंतु तुमचे हातचें टांचण आहे त्यांत उगवलेलें नाहीं.' ३ चढून वर येणें. 'तुम्ही खोळंबा न करतां तर घाट उगवून एव्हांना पार गेलों असतों.' ४ (कों. गो.) सूड घेणें. ५ संकट निवारणें. 'उगवावया हंसगीत। सुनिश्चित सांगितलें।' –एभा १६.४२; 'असें वर्म सांगून श्रीहरीनें उगविलें सांकडें' –पला ५४. ६ (गो.) केंस विंचरणें; गुंता काढणें. 'आगो दिवो लॉच्या पयली केंस उगोंक सांग.' [सं. उद्+गम्]

उगवितपागवीत—क्रिवि. सोईसोईनें; थोडें थोडें (दिलेले पैसे हप्प्यानें गोळा करणें) [उगविणें]

उगवी—स्त्री. समजूत. 'येक सांगतां एकचि भावी। उगीच करी गथागोवी। तया वेडयाची उगवी। कोणें करावी।'–दा ९. ६.२९. [उगवणें]

उगवील—उगवणी पहा.

उगवू—पु. उलगडा; उगव पहा. 'पिंड ब्रह्मांडींचा करोनी उगवू। मग तो अनुभवू होय तुज।' –ब ३२७.

उगसाबुकसी—ओक्साबोक्सी पहा. 'स्फुंदे यशोदा उगसाबुकसी।' –निगा ३९.

उगळ—स्त्री. १ तोंडांतून टाकिलेला पदार्थ; वमन; ओक. (क्रि० टाकणें). 'म्हणतां यमासि गिळिल्या उगळ प्रभु तो कपीश्वर करी सुगळ।' –मोवरदरामायण ३२. 'सर्पानें उगळ टाकली.' २ गुरें एकदां खाल्लेला चारा रवंथ करण्याकरितां पुन्हां बाहेर काढतात तो; पायाखालीं मळलेला, खराब झालेला चारा, वैरण. ३ (व.) उंसाच्या अथवा धांडयाच्या गंडेऱ्यांतील रस चोखून घेतल्यानंतर शिल्लक राहिलेला (तोंडांतील थुंकून टाकला जाणारा) चोथा, चोयटी. [सं. उद्+गृ; उद्गिर्; प्रा. उग्गिल; बं. उगरेण; हिं. उगलना; का. उगि=थुंकणें–उगुळु=थुंकी]

उगळ—पु. पुरळ; पुरुळ; उगवण. [सं. उद्+गृ]

उगळ—वि. (कर.) मोठा. उ० उगळ अंगरखा. [सं. उद्+गल्] **०सैल**–वि. मोठा; सैल (अंगरखा).

उगळणें—उक्रि. १ उगाळणें; घोटणें. २ (ल.) झिजणें. 'ते मार्गी देह जरी उगळे' –पला ३.४. ३ शिस्तींत, ताब्यांत ठेवणें. ४ चारा पायाखालीं तुडविणें (जनावरानें). (घासण्यानें, उगाळण्यानें) नरम होणें; फुटून जाणें. ५ चुरा होणें. ६ शिस्तीनें मऊ करणें, नम्र करणें; ताळ्यावर आणणें. ७ चांगल्या रीतीनें प्रवृत्त होणें; सचोटीच्या मार्गावर येणें: सुधारणें; ताळ्यावर येणें, मार्गावर येणें; वाईट नाद सुटणें. 'उगळला तर परमेश्वर खटला तर शनैश्वर.' ८ मूळची शक्ति परत येणें (नवीन बडविलेल्या बैलाच्या वृषणाच्या शिरा पुर्तेपणीं न मळल्या गेल्यामुळें); पूर्वावस्था प्राप्त होणें. ९ रडूं कोसळणें; द्रवणें. १० अनुकूल होणें; वश

होणें; दया येणें. 'बहु दासी दासत्वें देतांहि न विप्र तो बधे नुगळे।' –मोकर्ण २९.२९. [सं. उद् +गल्=गळणें]

उगळणें—उक्रि. १ थुंकणें; ओकणें; बाहेर टाकणें; ओकून टाकणें. 'कीं मी तोंड करूनी कानवडे। उगळौनि घाली॥' –ज्ञाप्र ९६४. 'उधवणीचें जेवीं तोंड। उगळी धुंवाचे उमड।' –ज्ञा १६.२९४. 'असो मच्छशिशूनें उगळून। आणुन ठेविला पूर्वस्थळीं।' २ टाकणें; त्यागणें; सोडणें. 'उगळिसील अरुणानुजा। तरीच देह परतेल माझा।' –मुआदि ५.८५. ३ (ल.) चोरलेली, दाबलेली, अपहार केलेली, मालमत्ता परत करणें. ४ (ना.) गुप्त गोष्ट फोडणें; प्रकट करणें. 'दोन्ही विशेष गिळी। ना निर्विशेषातें उगळी॥' –अमृ ७.१८३. ५ स्वंथ करणें; चर्वण करणें. [सं. उद्+गृ–उद्गिर्; प्रा. उग्गाल=स्वंथ; उग्गिल, बं. उगरण; हिं. उगलना; का. उगि=थुंकणें]

उगळलेला गडी—पु (माण.) ब्रह्मचर्यव्रतापासून ढळलेला मनुष्य. [सं. उद्+गल्; प्रा. उग्गाल, उग्गिल; बं. उगारण; हिं. उगलना]

उगळा—पु. त्रास; चुराडा; नाश; नासधूस. 'गनिमी नव्हेनें उगळा लावावा.' –रा १.३६५७. [उगळणें]

उगा—क्रिवि. १ न बोलतां–हालतां काम करतां; स्वस्थ; गप्प; उगीच; मुकाट्यानें. 'तंव रज तम उगे। कां पां राहाती।' –ज्ञा १७.६३. 'आतां नाइकें न पाहें। म्हणोनि मी उगा राहे।' –एभा ९.४५५. 'राहे भीष्म उगा, कीं सोडी तव सुत न दुरभिमानातें।' –मोभीष्म १२.२८. 'नको छंद घेऊ उगा राहि गोपाळा।' –कृष्णाचा पाळणा १४. २ न खटपट करतां; विना धंदा किंवा उद्योग. ३ अकारण; अनिमित्त; निष्कारण; जरूरी नसतां. 'उगा लोळसा घोळ मोठा करीतो.' –राक ३६. ४ व्यर्थ; निरर्थक; वे फायदा. 'उगा भ्रमसि वाउगा कशाला युगांत खळ हा कली.' –राला १०६. उगी, उगला पहा. [ह. का. उगि=भिणें; का. उकें=गप्प ?]

उगाई—स्त्री. उगराणी पहा. 'जीवनराव व्यंकटेश यांस सरकारी घेणें असलेमुळें त्या दुकानची उगाई सक्तीनें वसूल होईल.' –विक्षिप्त ३.९३.

उगाच, उगीचचेउगीच, उगीचेउगीच—क्रिवि. उगा पहा. १ निष्कारण; जरूर नसतां; विनाकारण; व्यर्थ; निरर्थक. 'सत्य धनंजय कर्में रूपें दिसतो उगाचि वरि नरसा।' –मोभीष्म ११.७२. २ निमूटपणें; बिनतक्रार. 'घेचार तो न समजोनि उगाच घेतो.' –नल ८७.

उगाण—पु. स्पष्टीकरण. [सं. उद्गमन]

उगाणणें—सक्रि. फोड करून सांगणें; स्पष्ट करणें; उपदेश करणें. 'शास्त्रसिद्धांतु आघवा उगाणिला।' –ज्ञा १६.४१. [सं. उद्गमन]

उगाणणें—क्रि. १ हिशेब देणें; झाडा देणें. 'परी परमात्मया चक्रवर्ती। उगाणिती जंव हातीं।' –ज्ञा १८.७४३. ३ अर्पण करणें; हवालीं करणें. 'तीं गोपवत्सें उगाणलीं। गोपनाथासीं।' –कथा ४.३.२६५. ४ मुक्त करणें; सोडविणें (पाप इ०कां पासून); 'उगाणिलीं जन्ममरणें.' ४ लुटणें. 'सभेसि राजा उगाणवी। तैं मृत्यूची पदवी मस्तका आली।' –एभा १.२११. ५ शून्य होणें. 'तेथ उगाणलें क्रियाकर्म। लाजा विरालें धर्माधर्म।' –एभा २३.७००. [सं. उद्+ग्रहण; प्रा. उग्गाहण]

उगाणवा—पु. लूट; नागवण. [सं. उद्ग्रहण]

उगाणा–ना—पु. १ दातव्य; बयाणा; विसार. 'आचाराचा उगाणा जी कवणासि दिधला.' –भाए १०९. २ गणना; झाडा; परीक्षा; हिशोब. 'तेथ फलहेतूचा उगाणा। कवणु चाळी।' –ज्ञा ७.१२९. 'नाणी कांहीं मना। करूनी पापाचा उगाणा।' –तुगा ५५७. ३ मुक्तता; सोडवणूक. 'तुवावीण योगिया उगानावेढा कवण करील।' –भाए १०५. ४ कर्जाऊ रकमेची फेड; तोंडमिळवणी. 'बहिणी म्हणे मना हेतूचा उगाणा। करूनि निर्वाणा पहातसे।' –ब १२९. 'कीं होय उगाणा' –राला ३८. ५ चव; रुचि; अनुभव. 'रसवृत्तीसी उगाणे। घेऊनि जिव्हाग्र शहाणें।' –अमृ ६.९०. 'मानावमाना समदृश्य उगाणा।' –देप १६. ६ नाश; नागवण. 'कोप येतांच जाणा। करी उगाणा तपाचा।' –एभा ४.७८. २३.६५९. ०काढणें–(वायकी) कोणतेंहि धान्य कांडतांना अगर कुटतांना उखळांत खालीं राहिलेला जिन्नस वरचेवर खालचा वर व वरचा खालीं करणें. [उद्+ग्रहण]

उगाणा—पु. उपदेशपर भाषण; उलगडा; स्पष्टीकरण. 'नाना प्रमेयांचे उगाणे। काय श्रवणाचेनि आंगणें। बोलों लाहातीं।' –ज्ञा ७.१९८. [उगवणें]

उगाणा—पु. कारकून; हिशेबनीस; उघाणी करणारा. 'सरिसा उगाणा कोठी, चाटे बहुवे तैसे निगाले।' –ऋ १३२. [सं. उद्ग्रहण; प्रा. उग्गाहण=तगादा; परत मागणें]

उगामुगा—अ. (खा.) स्वस्थ; बोलल्यावांचून; गपचीप. [उगा+मुका]

उगारणी, उघाणी—स्त्री. उगराणी पहा.

उगारणें—उक्रि. १ एखाद्यास मारण्याकरितां शस्त्र, काठी, हात वगैरे उचलणें; मारण्याचें भय दाखविणें; धमकावणें. २ पैसे वसूल करणें. ३ फेकणें; झोंकणें; मारणें. ४ चाल करून जाणें. 'त्या पौरवासि सोडुनि सौभद्र जयद्रथावरि उगारे।' –मोद्रोण १.८५. [सं. उद् +ग्रहण; प्रा. उग्गाहण]

उगाल(ळ)दान—न. पीकदाणी; तस्त. 'पीकदानिस्तुगालदान' –राव्यको [सं. उद्+गृ; का. उगि=थुंकणें; उगुळु=थुंकी+फा. दान; हिं. उगाल दान; सिं. ओगर्दानी]

उगावा—उगवणी पहा.

उगावागा—पु. १ स्पष्टीकरण; सोडवणूक; निकाल; मोकळीक; तड. २ वसूल. 'एक म्हणती व्यव्हारिलें धन। त्याचा उगावागा करून येईन।' –मक ३१.५४. [उगविणें]

उंगाळ—पुं. १ तोंडांतून टाकलेला पदार्थ; वमन; थुंकी; पीक. 'हडप मी बोळगेन। मीच उगाळु घेईन।' –ज्ञा १३.४१९. २ (ल.) सरभेसळ; काला; चिवडा; खिचडी (कागद, पैसे, कपडे वगरेंची). ३ अव्यवस्थित स्थिति; पसारा. ४ (अलंकारिक) जाळें. [सं. उद्+गु; का. उगुळु=ओक, थुंकी; सिं. ओगार]

उगाळणें—क्रि. १ (चंदन वगैरे) घोटणें; घांसणें,वाटणें; बारीक पूड करणें.'परम सुवास जो मनशीळ।तो स्वकें उगाळोनि तात्काळ। निढळीं टिळक रेखिला।' २ (ल.) देह शिजविणें (सेवेंत, नोकरींत); कष्ट सोसणें. ३ शिक्षेंत धरणें; शिस्तींत, शिकवणींत ठेवणें; काचांत ठेवणें. ४ फिरून फिरून करणें (ठराव वगैरे); पुनरुच्चार करणें. तेंच तेंच करीत, घोकत राहणें. ५ बिंबविणें; भरविणें; मनावर ठसविणें. [सं. उद्+गल्]

उगाळणें—क्रि. बांति होणें; ओकणें; थुंकणें. 'तो पुन्हां उगाळी सावकाश। जैसा होता तैसाचि।' –शनि ३६२. [सं. उद्गीरण; प्रा. उग्गाल; का. उगि, उगुळु]

उगाळा-ळू—पु. १ थुंकी; पीक; चावून टाकलेला विडा. 'तांबुलांचे उगाळु पडिलें। मलपावरी।' –शिशु ७१७. 'उगाळा हातीं झेली।' –गीता २.२१६२. [सं. उद्गीरण; का. उगुळु]

उगाळा—पु. घोटलेला, वाटलेला, उगाळलेला पदार्थ; किंवा त्याचे कण. 'सुंठीचा उगाळा.' [उगाळ] –स्त्री. खडी; दगडाचे बारीक तुकडे (रस्ता करण्याकरितां गच्ची करण्याकरितां, घराच्या पायांत भरण्याकरितां). [उगाळणें]

उगिया—वि. व्यर्थ; रिकामा; फुकटचा; उगा. उगीच पहा.

उगी—क्रिवि. गुपचूप; उगला. उगा पहा. 'वयनीसाहेब, असें उगी बसून आम्ही सोडणार नाहीं.' –रत्नकांता ५.४. (व.) (गाणें) 'उगीउगी, चोळी शिवीन मुगी, लुगडं घेईन लाल सासुऱ्या जाल.' (रडत असलेल्या मुलीला थंडेनें म्हणतात.) **०करणें–होणें–रडावयाचें थांबविणें**; शांत करणें; गप्प करणें, होणें. 'काय झालें सुशिलेला? असें म्हणून तिला त्यांनीं युक्तीनें क्षणार्धांत उगी केलें.' –सुदे ७. **०राहणें**–शांत होणें. 'उगी राहें आतां बहुत वदतां ओष्ठ सुकले।' –सारुह ७.९९. [का. उके=गप्प, ह.का. उगी–भिणें]

उगीच—क्रिवि. १ गुपचिप; मुकाटयानें. 'चाल उगीच, प्रभूशीं हट करितां पाठिशीं कशा लागे।'–मोसमा ५.८.२ कारणावांचून; प्रयोजनावांचून; व्यर्थ. 'कामाशिवाय उगीच कोणाचे घरीं जाऊं नये.' [उगी]

उगीदुगी—स्त्री. आगीदुगी पहा. **०ला येणें**–(कर.) चिरडीला येणें. 'उगीच उगीदुगीला कां आलीस?' **०करणें**–१ (बायकी) मध्यें तोंड घालणें; रिकाम्या गप्पा मारणें; बाता मारणें. २ चहाडी, चुगली करणें.

उगीर—वि. (व.) १ उद्धट; रागीट; उग्र स्वरूपाचा; गर्विष्ठ; मगरूर; दिमाखाचा; उगराबागरा पहा. २ उग्र वासाचा; कडक. [सं. उग्र] **०वाटाणा**–पु. (व) उद्धट; उगीर. अर्थ १ पहा.

उगूम—पु उत्पत्ति, बीज, मूळ, उद्भवस्थान. उदय पहा. [सं. उद्गम]

उगें, उगेंच—क्रिवि. निमूटपणें; गप्प, उगी पहा. 'फुन तुमचेनि रागें। जरी अमोंची उगें। तरी आमुचें पोटु फुगें। न बोलतां।' –शिशु १२८. 'आतां आहे तसी गोठी। उगेंचि सांगा।' –गीता २.२२६१. २ व्यर्थ, विनाकारण. 'उगेंचि खावें उगेंचि असावें।' –दा २.६.२७. **०पण**–न. स्तब्धता. 'म्हणुनि करूं लाहे खंती। उगेपणाची।'–ज्ञा १८.८०.

उगेलें—क्रिवि. १निवांत; शांतपणें; आवाज, गडबड न करतां; २ आपोआप; सहज; अनायासें. 'जैसें उंचीं उदक पडिलें। तें तळवटवरी ये उगेलें।'–ज्ञा ९.२२४. [उगी]

उग्र—पु. १ शिव; रुद्र. 'अति दुःसह उग्राचें तेज सकल दुःसहींहि मदनीं कीं।' –मोभीष्म ३.२. २ भेसळ जात: क्षत्रिय बाप व शूद्र आईपासून झालेली प्रजा. –वि. १ भयानक; भीतिदायक (मनुष्य; वस्तु, स्थिति); अकाळविकाळ (चेहरा); भयासुर; भयंकर; कर्कश; कठोर (आवाज, बोलणें) घोर; राक्षसी; क्रूर; अतिदुष्ट (कृत्य); तामसी; रागीट (स्वभाव); प्रखर. उग्र सोडिले बाण।' –मोकर्ण ८.२५ ३ उग्रट; तीव्र; अतिशय दुःसह (वास), ज्याचा वास डोक्यांत भरून त्रास होतो असा. [सं. उग्र. तुल० इं. ओगर=राक्षस] **०गंध**–वि. ज्याचा वास उग्रट आहे असें.

उग्रट—वि. दुःसह, कपाळ दुखूं लागण्यासारखा (वास). 'हें पत्र माझ्या हातीं आल्यापासून या पापी जगाची आणखी उग्रट घाण येऊं लागली आहे.' –सु. ५३. [सं. उग्र]

उग्रटाण, उग्रट्टाण—स्त्री. दुर्गंधि; दुःसह वास; घाण. [उग्रट+घाण]

उग्रदंड—पु कडक शिक्षा. –वि. कडक शिक्षा करणारा; कांहीं दयामाया न दाखवितां न्याय देणारा. (न्यायाधीश, अंमलदार, राजा). [सं. उग्र+दंड]

उग्रम—पु. आरंभ; सुरवात; उद्गम; उत्पत्ति; बीज; मूळ, झरा (एखाद्या कामाचा). [सं. उद्गम],

उग्रम—पु. जोर; उठाव; झपाटा; वेग; तडाखा; (रोग, पाऊस, वारे वगैरे संबंधाचा); आवेश; क्षोभ. 'पावसाचा उग्रम

मोडल्यावांचून थंडी पडत नाहीं.' 'गळवाचा उग्रम मोडला नाहीं.' [सं. उग्र]

उग्रस—वि. उग्रट पहा.

उग्रा—स्त्री. विना. (संगीत) एकविसाव्या श्रुतीचें नांव. [सं.]

उग्राणी—पु. (दक्षिण कानडा) खेडेगांवांतील एक विशिष्ट सरकारी नोकर; पाटील. [का. उग्राण=सरकारी कोठार] –स्त्री. वसुली; वसूल करणें. उगराणी पहा

उग्राबागरा—उगराबागरा पहा.

उग्रासन—न. योगशास्त्रांतील एक आसन; पश्चिमोत्तानासनाप्रमाणें डोकें डोंपरावर न टेकतां डोंपरांत भरून शक्य तितकें जमिनीजवळ लावणें, अशा प्रकारचें आसन. –योगशास्त्र ३४९. [सं. उग्र+आसन]

उघटणें—क्रि. प्रत्यक्ष मांडलें जाणें; उघडणें पहा. 'इयां पाटणीं जें केणें उघटें।' –शके ११२८ चा पाटणचा शिलालेख. [सं. उद्+घट्=उघट्=उघट.]

उघटा—(गो.) उघडा पहा. करंडो उघटो कर.

उघड—वि. १ स्पष्ट; व्यक्त; उकलेलला 'मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें।'–ज्ञा ११.४४२. २ स्वच्छ; ढळढळीत; जाहीर; प्रकट; सार्वजनिक; महशूर; गुप्तवेषरहित. ३ दुर्लौकिक झालेलें. –स्त्री. १ निरभ्र आकाश; हवा स्वच्छ असणें; उघाडी; उघडीक; पाऊस थांबणें. २ दुर्लौकिक (एखाद्या गोष्टीचा) –क्रिवि. प्रसिद्धपणानें; जाहीर रीतीनें (फिरणें, सांगणें, बोलणें). [सं. उद्+घट्; प्रा. उग्घड] **उघडकीस येणें**–परिस्फोट होणें; गुप्त न राहणें; जाहीर होणें **उघडकीस आणणें**–परिस्फोट करणें; प्रसिद्ध करणें; जगजाहीर करणें.

उघडगांड-ड्या—वि. नेहमीं शेपटी हालविणारा (त्यामुळें ज्याची गांड उघडी पडते तो घोडा, घोड्याचें एक अशुभ लक्षण).

उघडझांक-प—स्त्री. वारंवार उघडणें–झांकणें (दार, पेटी, डोळे, पंख वगैरे), उघड्या–झांकण्याची क्रिया; आकाशांत ढग येणें–नाहींसे होणें; काढणें घालणें (पडदा वगैरे).

उघडणें—उक्रि. १ आच्छादन काढणें; खुलें, मोकळें करणें (पेटी, दार.); उकलणें. २ उघडकीस आणणें, गुप्त गोष्ट फोडणें, प्रगट करणें, प्रसिद्ध करणें. –अक्रि. १ मोकळें–खुलें होणें. २ (पाऊस) थांबणें; ढग नाहींसे होणें; आकाश निरभ्र होणें; (हवा, पाऊस) स्वच्छ होणें. ३ उत्कर्ष होणें; उदयास येणें (दैव); ऊर्जितदशा येणें. [सं. उद्घाटन; प्रा. उग्घाडण; सि. उघिडणु]

उघडदोरा—पु. जे दोर दोहींकडे धरून ओढले असतां बटवा, कसा इत्यादि उघडला जातो असे लावलेले असतात, त्यांपैकीं प्रत्येक; **ओढदोरा**. [उघड+दोरा]

उघडभावई—स्त्री. (व.) उघडपणा; कांहीं प्रतिबंध, अडोसा नाहीं अशी स्थिति. 'घर सांपडलें तें असें उघडभावईचें, मग सुरक्षितपणा कसा वाटावा.' [उघड+भाव]

उघडमराठी—उघडीमराठी पहा.

उघडमाथा—क्रिवि. १ उघडपणें; प्रसिद्धपणें; उघडउघड, निःशंकपणें; राजरोस. २ (उप.) निर्लज्जपणें (फसविणें, उघडकीस आणणें इत्यादि.)

उघडमीट—स्त्री. पुनःपुन्हां उघडणें, मिटणें (डोळे, ओठ, फुलें इ०), उघडझांक पहा.

उघडवाघड—क्रिवि. उघडपणें; प्रसिद्धपणें; उघडउघड; स्पष्टपणें. [उघड द्वि.]

उघडवासरा-वासारा—पु. उघडी, मोकळी जागा; निष्प्रतिबंध जागा किंवा स्थिति. [उघड+वास]

उघडवासऱ्यांत—क्रिवि. उघड्या-मोकळ्या जागेंत (मैदानांत, पटांगणांत); चवाठ्यावर; खुल्या हवेंत; हमरस्त्यावर. [उघड+वास]

उघडा—वि. १ मोकळा; खुला; न झांकलेला; अनाच्छादित. २ स्पष्ट; प्रगट; व्यक्त; विशद; आविर्भूत; स्वतःसिद्ध; ढळढळीत; गूढ; गुप्त नव्हे असा. ३ लोकविख्यात; प्रसिद्ध; महशूर; जगजाहीर, सर्व लोकांस माहित असणारा. ४ ज्यास सांभाळ करणारा कोणी नाहीं असा (पोर, राज्य इ०); 'आईबाप मेल्यापासून हें पोर उघडें पडलें आहे.' अरक्षित; निराश्रित (स्थळ, प्रदेश, माणूस). (क्रि० पडणें). ५ मोकळी; स्वच्छ (हवा). ६ अंगांत कपडा न घातलेला; नग्न (कमरेच्या वर); पोशाख नसलेला; फक्त धोतर नेसलेला; केवळ मध्यवेष्टित. 'वाड्यांत अंगणांत उघडा हिंडूं नको.' **म्ह०** नागड्यापाशीं उघडा (किंवा उघड्यापाशीं नागडा) गेला सारी रात्र हिवानें मेला. ७ संबंध नग्न; नागवा; अगदीं वस्त्रहीन. 'बा! ढळतां तिळहि पदर भावी व्यजनासि सांग रामा जी। ती खळसमेत उघडी पडत्ये न पडोनि सागरामाजीं।' –मोसभा ५.७७. ८ अनाच्छादित; वोडका; बुच्चा; ओका. ९ निर्भीड; स्वैर; दाही दिशा मोकळ्या असलेला. **०करणें**–१ निराश्रित करणें. २ उघडा पाडणें पहा. **०पडणें**–निराश्रित, अनाथ होणें. 'अर्थातच हरणाबाई आपल्या दोन मुलींसह उघडी पडली.' –स्वप ६५. **०पाडणें, उघड्या-वर आणणें**–निर्वंश, उपहासास पात्र करणें, एखाद्यास चवाठ्यावर आणणें; गुप्त गोष्ट फोडणें, जाहीर करणें; वोभाटा करणें. **उघड्या-डोळ्यांनीं**–जाणून बुजून; कचून सवरून. **म्ह०** १ उघड्या डोळ्यांनीं करावें आणि डोळे मिटून भरावें. २ उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहीं=भलतीच गोष्ट आपल्या देखत घडत असतां तिचा प्रतिकार

केल्यावांचून आपणास राहवत नाहीं. **०नागडा-धोत-बंब-बाग(घ)डा-बाग(घ)ड-सोट**-वि. १ वस्त्रहीन; नग्न; अंगावर मुळींच कांहीं नसलेला. २ आडोसा नसलेली (जागा). ३ आच्छादनरहित; न झांकलेला (पदार्थ, अन्न). **०बोडका**-वि. १ अंगांत व डोक्याला कांहीं न घातलेला. २ निराश्रित; निराधार. ३ कुटुंब, काळजी, धंदा नसलेला; घरदार नसलेला; ना घर ना दार असा. **०बाळसंतोष**-पु. फटिंग; सडा. **०माथा**-पु १ धाक, लाज नाहीं असा मनुष्य; निःशंक, निर्भय, निर्भीड माणूस (चांगल्या व वाईट अर्थी). 'आम्ही पिढीचे भिक्षुक, आम्हास प्रतिग्रह घेण्याविषयीं उघडा माथा आहे.' २(ल.) दोषविमोचन, निरसन; उजळमाथा-तोंड असणें; निरपराधित्व; आरोपनिराकरण. (होणें) (३ बोल, निंदा, दोष, ठपका यांपासून अलिप्तता, मुक्तता. (असणें) 'कसबिणीनें शिदळकी केली तर तिला कोण विचारतो, मूळचाच तिचा उघडा माथा.' **०माथ्यानें**-क्रिवि. न कचरतां; न लाजतां; धीटपणानें. **०हिशेब**-पु. सरळ, स्वच्छ हिशेब; लवकर समजणारा हिशेब; पाहिल्याबरोबर डोळ्यांत भरणारा, पटणारा जमाखर्च.

उघडी— स्त्री. (कों.) फांजास लावलेलें दार; बांधाच्या दाराकरितां जे उघडझांपीचे दरवाजे ठेवतात ते; (आगरी) पाणी घेण्यासोडण्यासाठीं केलेला चुन्याचा किंवा लांकडी दरवाजा. 'त्याची उघडी मोठी असल्यामुळें शेतीचें पाणी लवकर आटतें.' (इं.) फ्लडगेट, स्लूस. [उघडणें]

उघडीक-प—स्त्री. १ प्रसिद्धि; जाहीर माहिती; परिस्फुटता. 'आपलीं शास्त्रें लोकांस ठाऊक व्हावीं, कारण तेणेंकरून आपली उघडीक होते.'-नि १०१६. २ उघाड, पाऊस थांबणें; उघडावा; स्वच्छ हवा. 'पावसानें उघडीप दिली.' [उघडणें]

उघडीमराठी-मऱ्हाटी—स्त्री. सरळ, मोकळ्या मनानें केलेलें भाषण; प्रामाणिक व्यवहार; सरळ वागणूक; चोखी; स्पष्टपणा; स्पष्टवक्तेपणा. [उघडी+मराठी]

उघडी मांडी करणें-टाकणें—क्रि. (मांडी उघडी ठेवणें हें शिष्टाचारास सोडून आहे यावरून ल.) निर्लज्जपणाचे आचरण करणें; बेशरमपणानें वागणें; अश्लील प्रकार करणें; अनुचित, असभ्य आचरण करणें.

उघडें परब्रह्म—न. अगदीं स्पष्ट, उघडउघड दिसणारी गोष्ट, बाब, वस्तु. (अशा उघडपणाबद्दल जेव्हां आश्चर्य वाटतें त्यावेळीं हा शब्द वापरतात).

उघड्याघर—क्रिवि. १ मोकळ्या जागीं; उघड्या जागेंत; आंगणांत; चवाठ्यावर; रावत्याच्या जागीं. २ जाहीरपणें; प्रसिद्ध पणें.

उघराणी—(बडोदें) उगराणी पहा. 'उघराण्या वगैरे करून रक्कम वसूल करविण्याची योग्य ती तजवीज करतील.' -स्वारी नियम ३८. [सं. उद्+ग्रहण; गु. उघराणी]

उघल—स्त्री. (कों.) पहिली नांगरट; उखळ. 'जमीन उघल घ्यावयास नागर सुमार २॥ येकूण.' -मसाप २.१८०. [उखळ]

उघळ—स्त्री. १ उगळ; जात्यांत दाणे दळून झाल्यावर दळले न गेल्यामुळें खुंटयाच्या मुळाशीं राहिलेलें धान्य, घांस. २ नवीन जात्यामध्यें प्रथम दळलेलें मूठभर धान्य. [सं. उद्+ग्रह् प्रा. उग्गाल]

उघळणें—उक्रि. १ जात्यांत राहिलेला घांस, उघळ काढणें. २ नवीन जात्यांत मूठभर धान्य दळणें. [सं. उद्+ग्रह्]

उघळणें—उक्रि. उगाळणें; अतिशय बारीक पूड करणें. उगळणें पहा.

उघाइणें—सक्रि. उघडणें. 'कोणी गे निःपरंवसा । उघाइली वसंताची दिशा ।' -शिशु ८३६. [सं. उद्+घट्]

उघाड-डी—स्त्री. १ पर्जन्यकाळांत कांहीं काळ पर्जन्य पडून थोडा वेळ तो थांबला आहे अशी स्थिति; उघडीक. २ उघडी जागा. 'परातीसारखें उथळ भांडें घेऊन त्यांत चुन्याचें पाणी घालून उघाडीवर ठेवावें.' -मराठी ६ वें पुस्तक १६६. ३ परिस्फुटता; प्रगटपणा. 'मुलीला ... कांहीं खोड होती आणि ती मग उघाडीस आली.' -मोर २०. [उघड]

उघारणी, उघ्राणी—(कों.) (बडोदें) उगराणी पहा. 'जीं पत्रें येत नसतील त्याजविषयीं उघ्राणी करावी.' -राजमहाल कारकून नियम ३.

उघारणें—उगारणें पहा.

उंच—वि. (कुण.) उच. १ भुईपासून किंवा उभें राहण्याच्या स्थानापासून आकाशांत पुष्कळ अंतरावर असणारा, पोंचणारा; उन्नत; उत्तुंग; उच्च. 'चद्रमंडळापेक्षां सूर्यमंडळ उंच आहें.' २ श्रेष्ठ (गुण, पदवी, किंमत यांमध्यें); वरिष्ठ पदवीचा, योग्यतेचा; (चतुरखता, थोरपण, वर्गेरसंबंधानें); सन्मान्य. 'चातुर्येवीण उंच पदवी ।'- दा १४.६.७. उंचा, उंची पहा. ३ (संगीत) वर चढणारा (तान, स्वर,) ऊर्ध्वगामी; तीव्र; वरपर्यंत गेलेला. ४ फारच उभट चढणीचा. 'असं झालेया, कैलासावानी उच पहाडाच्या डोक्यावर पुरुस बसल्याती व्हयना ?'-बाय २.२. ५ (राजा) खोल (विहीर, खांच, चर वगैरे) ६ फार मौल्यवान्; किंमतवान. 'कष्ट करितां सेत पिकें। उंच वस्त तत्काळ पिकें।' -दा १२.७.२५. [सं. उच्च. हीब्रु उच्दन=टेंकडी; फ्रें. जि. वुच.] **०कपाळ्या**-वि. नशीबवान. **०टाचा करून वागणें**-अमंगल, अपवित्र पदार्थांवर पाऊल न पडावें म्हणून चवडयावर चालणें. (ल.) गर्वानें वागणें; तोऱ्यांत असणें. **०दरवाजा**-पु पुढील मोठा दरवाजा. 'उठल्या अबाई उंच दरवाजा लाविला ।' -ऐपो ६८. **०दर्पण**-न. सूर्यकांत. 'उंच दर्पणीं अग्नी निघतो ।' -दा १६.५.१९. **०नाक**-प्रतिष्ठा; मान्यता; प्रौढी. 'उंच नाकें श्वशुरागारीं । वागे न ऐसें करावें ॥' -जै १७.६५. **०नाक करून**-क्रिवि. १ प्रतिष्ठेनें; मान्यतेनें. २ निर्लज्जपणानें; बेशरमपणानें. **०नीच**-क्रिवि.

१ खाली वर असें; खडबडीत; उंचसखल; उत्तमाधम. २ लहानथोर; गरीबश्रीमंत. 'उंच नीच कांहीं नेणें भगवंत ।' –तुगा३६९१. **०पट**–न. चढण असलेला रस्ता; चढणीवरील जागा. –वि. किंचित् वर; थोडें उंचावर. **म्ह**०सात ताड उंच=अतिशय उंच.

उंच—क्रिवि. वर; हवेंत; उंचावर. [सं. उच्च]

उचक—वि. (बडोदें) ठोक; उक्ती; ठराविक; उचलून दिलेली (रक्कम). 'जमादारास दरमहा योग्य ती उचक रक्कम बांधून देण्याचें करावें. ' –चित्र्याची माहिती २७.

उचकटणें—उक्रि. १ जोरानें बाहेर काढणें; उपटून काढणें; ओढणें; उसकटणें (खिळा, झांकण इ०). २ नखानें वगैरे उकरणें; कुरतडणें; सोडविणें. ३ बरी झालेली जखम पुन्हां उघडी करणें; जखमेची खपली काढणें. ४ सारखी बसलेली (जमीन, केंस, वस्त्राच्या चुण्या, तृणसमुदाय) उखळणें, विस्कटणें, अस्ताव्यस्त करणें; जमीन, छप्पर उसकटणें. ५ (ल.) मिटलेला व्यवहार पुन्हां उपस्थित करणें; विसरलेली गोष्ट पुन्हां उकरून काढणें. [सं. उच्चाटन; म. उचकणें; किंवा उ+चिकटणें]

उचकटाउचकट—स्त्री. घाईघाईनें ओढणें; ओरबडणें; उलगडणें, विसकटणें.

उचकणें—उक्रि. १ उपटणें; चोरणें; उचलेगिरी करणें; फसवून घेणें. 'स्त्री सुत बंधु पैका उचकी ।' –अमृत ११२. उचकटणें पहा. [उचकटणें] २ उचलणें. ' नाहीं म्हणोनि उचकीन करें फुलाला. ' –आक २५. [सं. उच्च+कृ=उंच करणें]

उचकणें—अक्रि. बुडविण्याच्या उद्देशानें दुसऱ्याजवळून कर्ज अथवा उधार माल घेणें; वाईट उद्देशानें उधारी करणें.

उचकणें—सक्रि. १ उपटून काढणें; समूळ वर काढणें. २ (ल.) उच्चाटण करणें; हांकून, फेंकून देणें. [सं. उत्खनन; उचखणें–उचकणें]

उचकणें-नें—न. (व.) १ दाखला; उदाहरण. ' दुसऱ्याचें उचकणें मला कां देतोस ? ' २ टोमणा; छद्मी भाषण; हिणविणें. (क्रि० देणें). ' मला काय त्याचें उचकन देतां ! '

उचकळ्यावुचकळ्या—क्रिवि. १ बुडल्या माणसाच्या पाण्यांतल्या गटंगळ्या. (क्रि. देणें). –स्त्रीअव. (ल.) उपजीविकेसाठीं धडपड; नशिबाचा बरावाईट फेरा. (क्रि० देणें) [बुचकळ्या द्वि.]

उचका—स्त्री. द्रव्यादिक उपटण्याचा व्यापार; फसवेगिरी; खिसेकातरूपणा; दुकानचोरपणा; उचापत; उधारी; उसना, उधार माल. (क्रि० घेणें; काढणें; करणें). उचका या शब्दानें नेहमीं लबाडी ध्वनित होते. [उचकणें]

उचका—पु. १ काळजी, ध्यास, वेध यामुळें होणारा भास. स्वप्न. (क्रि० येणें; लागणें; पडणें). २ एखाद्या गोष्टीचें औत्सुक्य, कुतूहल; मनांत पक्कें बसलेलें भय किंवा धाक; चिंता; घोर, धोसरा. (क्रि. धरणें; लागणें; बसणें.) [वचक]

उचकाउचक—स्त्री. १ घाईनें, उतावीळपणानें ओढणें, हिसकणें. २ फसवून द्रव्यादिक उपटणें; उपटाउपट; लपवालपव; उचका पहा. (क्रि. करणें; काढणें).

उचकाना—वि. उंच कान असलेला. ' उचकाना फणेंद्रु. ' –भाए. ९.

उचकी—स्त्री. कंठामध्यें सशब्द असा आचका बसणें; गुचकी; आचकी; उंडकी; हिक्का. (क्रि० येणें.) ' उचकी उदानलिंगापासून येतसे जाणा । ' [ध्व. उच्चू !] **०लागणें**–(आजारी मनुष्यास) अत्यावस्थ होणें; शेवटल्या स्थितींत येणें; मरणोन्मुख होणें. 'उचकी लागली उसित गेला । पीत उसळें उलाट आला। ' –दा ३.६.३३.

उचक्या—वि. १ उचल्या; चोर; भामटा; खिसेकापू; उपट्या; दुकानचोर. **०म्ह.** बाजार भरला नाहीं तोंच उचक्यांनीं कमरा बांधिल्या. [उचलणें; हिं. उचक्का] २ आपलें बळ, शक्ति, ऐपत न पाहतां हवेतसे, पाहिजे त्या अटीवर पैसे काढणारा; माल उधार खरेदी करणारा; भरमसाट कंत्राटें वगैरे घेणारा. [उचकणें]

उंचखाल—क्रिवि. उंचसखल; वरखालीं; खांचखळग्यामध्यें; खांचखळग्याची. –वि. विषम; नतोन्नत; खालींवर असणारी (जमीन.) [उंच+खालीं]

उचंगणें—अक्रि. (कों.)धजावानें वाढणें; उफाडयानें वाढणें; फोंफावणें; जोरानें वाढणें; लवकर वाढणें; पुष्ट होणें (मूल, रोगी, जनावर.) [सं. उच्च+अंग]

उचट—स्त्री. उचाट पहा.

उंचट—वि. १ उंच; चढावाची (जमीन); उभट; चढणीचा. २ किंचित उंच; वाढलेला. [सं. उच्च+वत्]

उचटणें—उक्रि. चिकटलेला, जोडलेला पदार्थ वर उचलून काढणें (तव्यावरील भाकरी, खिळे मारलेलें झांकण); उचकटणें पहा. ' पत्र उचटिलें प्रयत्नें । ग्वाही करायाकारणें ॥ ' –तुगा ४१०४. [सं. उच्चाटन]

उचटणें—उचाटणें पहा.

उचटणें—न. उलथणें; कलथा; उचटण्याचें साधन. [सं. उच्चाटन]

उचंडळणें—उक्रि. हिसळणें; सांडणें; पातळ प्रवाही पदार्थ हलण्यानें हवकून बाहेर पडणें, सांडणें. [सं. उच्च+आंदोलन]

उचंबळ—स्त्री. १ कांठोकांठ भरून येणें; नदी, तळीं इत्यादि कांठोकांठ भरून येण्याची स्थिति; भांडथाबाहेर सांडेइतकी भर, वाढ, फूग. ' काय पाण्याची उचंबळ चालली हो. ' २ (गो.) तारांबळ. ' माझी उचंबळ झाली.' **०खाणें**–उठून चळवळ करणें; पुनःपुन्हां उठून गडबड करणें; एखादें काम अस्थिर वृत्तीनें चालू ठेवणें; विशेषतः पराभूत प्रतिपक्षानें पुन्हां वर डोकें काढणें या अर्थी योजतात. याच्या विरुद्ध पड खाणें. [सं. उच्च+वलन ?]

उचंबळणें, उचमळणें, उचमणें—अक्रि. १ वर येणें; भरून वाहण्याच्या स्थितीस येणें (नद्या वगैरे); डळमळणें; हेलकावणें. ' धडधडीत अंबर । उचंबळत सागर ॥ ' –ज्ञा. १.१२९. (सामा.) वाढणें; माजणें. ' आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे । तो उचंबळत भरोनि निगे ॥ ' –ज्ञा १७.१९. काम्य उचंबळे विषयाचे चाडे । तेंचि पडे निषिद्धीं । –एभा १०५०. २ आनंद वगैरे विकार मनांत न मावतां बाहेर पडणें. ' म्हणऊनि मीही तैसेंचि म्हणें । उचंबळला सांता । ' –ज्ञा ७.११७. ' येरी आनंदें उचंबळत । ' –उषा ९०४. ३ जोर करणें; उसळून वर येणें. (पित्त); पित्तानें मळमळणें; ओकारी वाटणें. [सं. उच्च+चलन ?]

उचंबळा–पु. १ उचंबळ; भरती; उकळी (हर्ष, आनंद यांची). २ (ल.) हर्ष; आनंद. [उचंबळणें]

उचमपचम—न. १ विनाकारण दुसऱ्याच्या भानगडींत पडणें; उठाठेव; उपद्व्याप; उचापत. (क्रि० करणें; उरकणें; पाहणें.) २ रिकामे दोष काढणें; कुटाळी; कुचेष्टा. ३ खोट्या सबबी; टाळाटाळ; उडवाउडव. –क्रिवि. उठाठेव, उपद्व्याप करून; रिकामपणें; कुचेष्टेनें; टाळाटाळीनें; आढेवेढे घेऊन. [ध्व.]

उचल–स्त्री. १ चाल; हल्ला; धाला. (क्रि० करणें). २ पुन्हां वर डोकें काढणें; पुन्हां जोरावणें, बळावणें (आजार, शत्रु, गोंधळ इ.). (क्रि० खाणें.) ३ उत्तेजन देणें; प्रवृत्त करणें; प्रोत्साहन देणें; मागें लागणें. (देणें) ४ पुन्हां उभें राहणें; जोडणें; स्थापना करणें; (कर्जबाजारी किंवा नादार इसम) स्थिरस्थावर होणें. (घेणें) ५ (संघटित किंवा जोराचा प्रयत्न करून) एखाद्याला वर उचलणें, आणणें. ६ (वांटपामध्यें) एखाद्याच्या हिश्शाला दिलेल्या (विहीर किंवा एखादा हक्क) वस्तूबद्दल मोबदला म्हणून दिलेला. विशिष्ट जमिनीचा तुकडा. ७ आपल्या सावकारा – पेढी–कडून किंवा कोणाकडून वेळोवेळीं काढलेल्या, उचलेल्या रकमा. (क्रि. उचलणें; फेडणें.) ८ अशा रकमा उसन्या घेणें; उधारी. (क्रि० करणें.) ९ पैशाबद्दल तगादा लावणें, करणें, छळणें, नड लावणें. १० जागृति; चळवळ; उठावणी. ' सर्व प्रांतांत एकदम उचल झाली. ' –टिळकचरित्र ३.६.३. [सं. उत्+चल] **०चावडा-रा**–वि. उच्छृंखल; अविचारी; धंद्यांत मन नसलेला; लहरी; हुक्कीबाज; अस्थिर; चंचल; तऱ्हेवाईक; छांदिष्ट. **०चावडेपणा**–पु. छांदिष्टपणा; लहरीपणा; चंचलवृत्ति. **०जागता**–(अर्वाचीन काव्य)–वि. ताजेतवानें होण्या–करण्यासाठीं तयार; हुषारी आणणारा. ' उभीं झोंपतीं झाडें, त्यांचा उचलजागता चाळा । '–कृष्णाकाठीं कुंडल (गोविंदाग्रज). **०टप्पू**–वि. १ (वाईट अर्थी) उडाणटप्पू; भटकणारा; कोठेंहि स्थिर नसणारा. २ (चांगल्या अर्थी) वाटसरू; उपऱ्या; क्रायम वस्ती न करणारा; वस्तीकऱ्या; खुंटावरचा कावळा. **०पाखल**–क्रिवि. वरखालीं; ढवळाढवळ.

उचलणी—स्त्री. उठाव; उचल; वर करणें; उचलणें. [सं. उत्+चलन]

उचलणें—अ.क्रि. १ वर येणें; वर येण्याचे प्रकार–(अ) पित्त, पुरळ, फोड, गळवें वगैरे शरीरावर उठणें, उत्पन्न होणें. ' गळूं कालच उचललें. ' (आ) पाण्यावर लाटा, बुडबुडे उत्पन्न होणें. ' जैशा उचलती लहरीवरी लहरी ' –दा ११.९.१७. (इ) जमिनीवर वारुळें, भोमे, उंचवटे तयार होणें. (ई) सारवलेल्या जागेवर खरपुडया, पोपडे येणें; ' वरचेवर सारवल्यानें जमीन लवकर उचलत नाहीं. ' (उ) आकाशांत ढग येणें. ' तेंथें प्रळये मेघ उचलले । कठिण घोषें गर्जिन्नले । '–दा १३.४.१४. २ वाढणें; लठ्ठ होणें; मोठे होणें. ' हा उकिरडा भारी लवकर उचलला ! ' ३ उठावणी करणें. ' म्हणे पांडवसैन्य उचललें । '–ज्ञा १.८८. ४ उंच होणें; वाढणें; अंकुर फुटून वर येणें. ' दोन दिवस पाऊस लागतांच झाडें उचललीं. ' ६ उचलून येणें; पोटांत अस्वस्थता वाटणें; ढवळणें; पित्त वर येणें; ओकारी येणें; मळमळणें. ' कालचे उपोषणामुळें क्षणोक्षणीं उचलतें. ' **उचलून जाणें–येणें**–वादाविषयीं, युद्धसंबंधीं आह्वान देणें; वाद उत्पन्न करणें, ओढून आणणें, सुरुवात करणें; चढाई करणें. ' जे जुंझावया उचलोनि आले असती. '–गीताचंद्रिका १.२२. **उचलून जाणें–** लमास, विवाहास वरपक्षाच्या ठिकाणीं वधूपक्षानें इष्टमित्र आणि सामान यासह जाणें. **उचलून बोलणें–गोष्ट सांगणें**–१ बढाई, बाता, झोकणें, मारणें. २ ताठ्यानें उद्दन बोलणें. ३ आपला दर्जा न ओळखतां बोलणें. [सं. उच्चलन; सिं. उछिलणु]

उचलणें—स.क्रि. १ वर करणें–धरणें; उठावणें. अंगीकारणें; स्वीकारणें; पत्करणें (काम, भाग, भूमिका, प्रांत). २ हातीं घेणें; ' यंदां पेशाचें अळमटळम दिसतें आहे, नवें घर बांधावयाचें उचलूं नका ' ' लहानपणापासून यानें संसार उचलला. ' ' पुढें मूर्तिपूजा हळुहळु आर्यांनींहि उचलली असें दिसतें. '–मसाप २.२.११६. ३ उत्तेजन देणें; उभा करणें; मनांत भरविणें; चेतविणें; चेव आणणें; इरस पेटविणें (वाद, मूल, इ. विषयीं) ' त्याचे मनांत भाऊबंदांशीं आजच कजिया सांगावा असें नव्हतें परंतु लोकांनीं त्यास उचलला. ' ४ लांबविणें; चोरणें. ५ उचल करणें; रकम घेणें. **उचलून आपटणें**–वर उचलून खालीं टाकणें; मोठ्या जोरानें आपटणें; आदळणें. **उचलून देणें**–१ (तुळशी, बेलपत्रें वगैरे वस्तू हातांत घेऊन) शपथ घेणें; कोणाच्या नांवानें) सकल्प करणें. २ स्वसंतोषानें उक्ती रकम कोणेकास देणें; ३ वेगळें काढून देणें. ' तूं आमच्यांत जेवायला आलास तर कसें तरी भागवितां येईल. तुला बोर्डिगांत रहावयासाठीं पांच रुपये उचलून देणें जड जाईल, वाटल्यास जेवणास ये. ' **उचलून धरणें**–१ सताबून सोडणें; धरणें घेऊन बसणें; खणपटीस बसणें; तगादा लावणें; ओढून धरणें (भिक्षेकरी वगैरेनीं.) २ भारी अटी लादणें; जबर किंमत, व्याज मागणें (सावकार वगैरेनीं). ३ एखाद्याचा विशिष्ट

पक्ष स्वीकारणें; जबाबदारी पत्करणें; अभिमान बाळगणें; समर्थन करणें; आधार देणें. **म्ह०** उचलली जीभ लावली टाळ्याला =विचार न करितां मनास येईल तें बोलणें; ताळतंत्र सोडून बोलणें.

उचलतां-त्या पाई—क्रिवि. अति त्वरेनें. 'तैसियां उचलतां पायीं धावती।' -शिशु ६८२. 'जावया निघाला त्वलाही। तंव शकुन जाहले दोही बाही। म्हणोनि आला उचलत्यापाई। द्वार केसी॥' –कथा ४.१६.२२. [उचलणें+पाय]

उचलनी—स्त्री. विकास; उत्थान. 'करी कमलांची उचलनी' –दाव १७९. [उचलणें]

उचलपांगडी-वांगडी—स्त्री. १ हातपाय धरून उचलणें; बलात्कारानें नेणें (लहान मुलांना शाळेत नेण्यासाठीं प्रयोग). २ बलात्कारानें घालवून देणें; हकालपट्टी करणें; उच्चाटण. 'मुधोजीची उचलवांगडी होण्याचा वेळ आला होता.' –विवि ८.६.१११. [उचल+पांग-डी=कोळ्याचें जाळें (हें मोठें असल्यास दोघे, चौघे उचलतात.)]

उचलपुची—वि. एक शिवी. ज्याची बृहती उचलेली आहे असा. 'येसूचें छंद कशी उचलपुच्चाला हुशी.' -पला ८०. ब

उचलमावंदें—न. (व) उच्चाट, हकालपट्टी. 'तेथून लवकरच त्यांचें उचलमावंदें झालें.' [उचल+मावंदें]

उचलला—वि. १ उचलेलेला; वर आलेला; निघालेला; सोडून चालेलेला. 'उचलेलया प्राणासरिसीं। इंद्रियेंही निगती जैसीं।' –ज्ञा १२.१०१. २ मर्जीनुरूप, इच्छेप्रमाणें मंजूर केलेला; नेमून दिलेला; ठराविक 'उचलला पगार, वेतन, शेर.' **०संसार**–पु. तुटपुंज्या प्राप्तीवर चालेलला संसार, कामधंदा, व्यापार. **०हात**–पु. स्वेच्छेनें व्यवयासाठीं पुढें केलेला हात; स्वसंतोषानें देणें. 'आईबाप मला जें उचलल्या हातानें देतील तें मी घेत असतों.' **उचललेलें काम**–न स्वखुषीनें पतकरलेलें काम; झेपेलसें पाहून घेतलेलें काम.

उचलसांचल—स्त्री. उचलाउचल पहा.

उचला—पु. (कों.) दुर्गा देवी किंवा इतर ग्रामदेवतेच्या देवळांत देवाजवळ एक दगड ठेविलेला असतो तो. कांहीं गोष्टींविषयीं देवाला प्रश्न करून तो उचलला असतां केव्हां जड येतो, केव्हां हलका येतो; त्यावरून त्या प्रश्नाचें उत्तर समजतें; कौलाचा दगड.

उचलाउचल—स्त्री. १ प्रापंचिक बिऱ्हाड वगैरेंचें स्थलांतर. २ अस्ताव्यस्त फेकाफेक; घाईनें जिनसा शोधणें, उलगडणें वगैरे; कोणी कांहीं उचलण्याचा व्यापार.

उचलाऊ—वि. (खा.) उचलण्यास शक्य; उचलण्यालायक; उचलावासा वाटणारा. [उचलणें]

उचलाडेवर—स्त्री. (कों.) उचलणें व टेवणें; पुन्हां पुन्हां उचलणें; उचलाउचल. [उचलणें+डेवरणें=टेवणें]

उचलाव—पु. चाल; उठाव; हल्ला; घाला. उचल अर्थ १ पहा. –शिदि ३४५. [उचलणें]

उचलासांचल—उचलाउचल पहा.

उचलेगिरी—स्त्री. भामटेगिरी; एखादी हातीं लागेल ती लहानसहान वस्तु हळूच पळवून नेण्याची, चोरण्याची क्रिया. 'सुधारणेचा जो नवा बाजार भरणार त्यांत उचलेगिरी करून कांहीं हातीं लागतें कां पहावें' –केले १.१४०. [उचल+फा. गारी]

उंचलो—वि. (गो.) वरचा. [सं. उच्च]

उचल्या—पु. १ भामटा; खिसेकापू; चोरांचा एक प्रकार; किरकोळ चोरी करणारा; पुण्याकडे यांना भामटे म्हणतात. 'मैंद उचले खाणोरी। सुवर्णपंथी भुरेकरी।' –दा ३.७.४९. **म्ह०** 'बाजार भरला नाहीं तोंच उचल्यांनीं कमरा बांधल्या. – वि. थोडा काळ एके ठिकाणीं राहणारा, उपरी; उचलट्प्पू पहा. [उचलणें]

उंचवट—वि. १ किंचित उंच. २ थोडा चढ असलेला; उंचावर असलेला; याच्या उलट बसकट. [सं. उच्च+वर्ती]

उंचवटा-ळा—पु. उंच भाग; टेकाड; उंचवाड; टेंब. २ अंगावरील, एखाद्या वस्तूवरील उंच भाग; टेंगूळ. ३ सपाट पृष्ठभागावरचा थोडा उंच भाग; ओटा. 'तो उंचवटा देखिला। नितल नीट.' –ऋ ७२.

उंचवणें—अक्रि. उंच असणें.

उंचशिरा—वि. ज्याचें शिर उंच आहे असा; उंच बांधणीचा; चांगला उंच. 'चौथा मजला उंचशिरा करी बहार आकार्सी।' –प्रला ९५. [उंच+शिर]

उंचश्रवा—पु. उच्चैःश्रवा; इंद्राचा घोडा. 'उंचश्रवा न सवरेची.' –उषा १६७९. [सं. उच्चःश्रवस्]

उंचसखल—वि. उंच व खालीं; उंचवट व वदखल; चढ उतार असलेली; खडबडीत; विषम (स्थल) [उंच+सखल]

उंचा—वि. १ उच्च प्रकारचा, महत्त्वाचा; अधिक योग्यतेचा; नामी; गुणानें श्रेष्ठ असा. 'नीचिये कुळीचा उंचा वंद्य होय।' –तुगा २४२०. २ अधिक मौल्यवान; महाग. उंच अर्थ ६ पहा. [सं. उच्च]

उचाट—पु. १ कंटाळा; उद्वेग; नाखुषी; तिटकारा. (क्रि० घेणें; खाणें). २ ध्यास; नाद; उत्कंठा; घाई; अधीरेपणा; अत्यौत्सुक्य; एखादी गोष्ट करण्याचें कार्मी भर. (क्रि० भरणें; खाणें). ३ खासगी लिलावानें विक्री. [सं. उच्चाटन; हिं. उचाट]

उचाटणें—सक्रि. तिरस्कार, वीट येणें; कंटाळा येणें; तिटकारा येणें; मन उडणें. [सं. उच्चाटन]

उचाटा—पु. १ (नाट्य.) मुखवटे तयार करण्याकरितां केलेला ठसा, आकृति; पौराणिक नाटकांतील गणपती आदिकरून मुखवटयांसाठीं मातीची आकृति प्रथम करून तिच्यावर कागदाचे थर

चिकटवून जी आकृति करून घेतात त्या आकृतीस उचाटा म्हणतात. जसें–गणपतीचा, नारसिंहाचा उचाटा. २ (मुद्रण) ज्यांतून ठसे (टाईप) गाळले जातात तो सांचा. (इं.) मेट्रिस. [सं. उच्चट्]

उंचाड––न. १ उंचवटयाची जागा; लहान टेकडी; चढणीची जागा; टेंब; टेकाड. –वि. २ उंच; उन्नत; तुंग; भव्य. उंचवट पहा. [सं. उच्च]

उचापत––स्त्री. १ माल उधार विकत घेणें; उधारी; उसनवट. ' वाण्याची उचापत देऊं कशानें मी आतां.' –पला ८०. **म्ह०** उचापतीचें पोतें, सवा हात रिते. २ उधार माल; पतीवर आणलेला माल. ' उसिणें उचापत कां देतील. ' –दावि ३०१. ३ कोणाकडून वेळोवेळीं काढलेली रक्कम; उचल. अर्थ ७–८ पहा. ४ (सामा.) कर्ज. ' झाली शुद्ध उचापत प्रभुवरें केली बिदागी दहा.' –राला १४. ५ उठाठेव; नसती उलाढाल; भानगड; विकत भांडण. [सं. उद् + आपत्] **०खाऊ**–वि. उधारीवर उपजीविका करणारा. **०खाणें**–१ चांगली गोष्ट घडून येईल – पुढें कांहीं-तरी मिळेल–या आशेवर चैन करणें. २ दुसऱ्याचें विकत भांडण घेणें; भांडण ओढून घेणें; विकत श्राद्ध घेणें; लष्करच्या भाकरी भाजणें. **०विचापत**–स्त्री. उचापत द्वि. पहा. **उचापतीचा रोजगार-व्यवहार**–पु. उधारीचा उसनवटीचा, केवळ पतीवर व्यवहार. याच्या उलट रोकडीचा व्यवहार. [हिं. उचापट]

उचापती-त्या—वि. १ उठाठेवी करणारा. २ उधार घेणारा व देणारा. [उचापत]

उंचापुरा—वि. सुदृढ; भव्य; पूर्ण वाढलेला. ' हें स्थित्यंतर युद्धकलेंत अलीकडे झाल्यामुळें... उंचापुरा जवान आणि किंचकट पोरहि सारखेंच. ' –नि ९७१. [सं. उच्च+पूर्ण]

उंचाफेर—पु. घोडयाची एक प्रकारची चाल. –अश्वप १९४. [उंच+फेर]

उचारापाचार—पु. दुष्ट लायून येणारें, नवीन किंवा उल-टणारें दुखणें. (क्रि० करणें, होणें). [पाचारा = पाचावा; पांचवा द्वि.]

उचारापाचार—पु. दुसऱ्याच्या खाजगी गोष्टी लोकांत सांगणें; बकबकणें; मुखदुस पाघळणें. (क्रि० करणें). [सं. उच्चार द्वि.]

उचारापाचार—पु. (चुकीनें) उधारपाधारबद्दल वापरतात.

उचाल, उचाल जाणें—उच्छाल, उच्छाल जाणें पहा.

उंचावणी—स्त्री. १ उठावणी. ' करोनि शब्दांची उंचावणी । मग लंवु खंडिला तिसा नाणी । '–लिपु. २.४५.३३. २ (ल.) गौरव; मोठेपणा. [सं. उच्चय; प्रा. उच्चाव]

उंचावणें—अक्रि. १ उंच होणें; वाढणें. ' एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय । '–ज्ञा १८.११४. २ वक्षस्थल उन्नत होणें. ३ उंच जाणें, उडणें; भरारी मारणें. ४ (ल.) सुस्थिति प्राप्त होणें; उत्कर्ष होणें. –सक्रि. १ चढविणें; वर उचलणें; उठविणें; उंची वाढवणें; वर करणें. ' शेष धावला तत्क्षणा । उंचावूनि फणा । ' –कृष्णाचा पाळणा १०. २ मोठेपणा आणणें. ' आम्हां मानवांतें उंचावीती मातें । ' –टिळक कविता १३५.

उचित—वि. १ देशकाल, लोक, शास्त्र, रीति इत्यादिकांना अनुसरून केलेलें; योग्य; लायक; जुळणारें; साजणारें; बरोबर; चांगलें. ' प्रमाण न म्हणों जरी उचित माझिया नीचते । ' –केका ३. २ सवर्णीचें; अभ्यासांतलें. –न. १ योग्यपणा; योग्यता. ' निळा म्हणे जागा आपुल्या उचिता । ' –निगा २३३. ' देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित । ' –दा ४.८.२२. २ (व.) पारितोषिक; बक्षीस; देणगी. ' भाटांतें उचितीं वारितु । घोडेयांचा स्कंदु थापटीतु । ' –शिशु ५२१. ' दुपदें गौरविलें उचितीं । ' –मुआदि ४५.९६. –वशाप ५०.२८३. [सं. वच्] **०ज्ञ**–वि. उचित, अनुचित ज्यास समजतें तो; व्यवहारज्ञ; शहाणा; चतुर; माहितगार. **उचितास येणें**–योग्यतेनुरूप उचित वाटणें; पसंत पडणें; योग्य दिसणें; बरोबर वाटणें.

उचिष्ट—उच्छिष्ट पहा. ' बहुतांचें उचिष्ट अंगीकारी ' –दा २.१.६०. [सं. उच्छिष्ट]

उंची—स्त्री. १ पदार्थाच्या खालच्या भागापासून वरच्या भागापर्यंतच्या व्याप्तीचें प्रमाण, माप; तळापासून शेंड्यापर्यंतचें प्रमाण. २ (राजा) (विहीर वगैरेची) खोली. –वि. अधिक चांगला; सरस; श्रेष्ठ; जास्त किंमतीचा. उंचा पहा. ' महाराष्ट्रांत ही एकच उंची संस्था होती. ' –केले १.२९८. [सं. उच्च; सिं. ऊंचो]

उंची—शअ. (राजा) वर; उंचीवर; शेंड्यावर; कळसावर; उपरि. ' पर्जन्यकाळीं मीठ चुलीउंची ठेवावें म्हणजे पाघळत नाहीं. ' [सं. उच्च]

उंची देणें—क्रि. (व.) हरभऱ्याच्या झाडावर चढविणें. हुर-ळावयास लावणें; चढविणें; गर्वानें फुगविणें; भर देणें.

उंचीदौड—स्त्री. घोडयाची एक चाल. –अश्वप १८८.

उंचीष—स्त्री. उंची; उंचपणा. ' उचिवे जैसा प्रचंड ताळ. ' –मुसभा ८.३८. [उंच]

उंचून—शअ. वरून; उंचावरून; शेंडयावरून; डोक्यावरून. (क्रि० वाढणें; टाकणें). [उंच]

उचेट—स्त्री. कोंदणांतून खडा काढल्यानंतर उचकटून काढ-लेले सोनें, रुपें इ० [सं. उच्चाटन; म. उचटणें]

उंचेला—वि. उंच; उंच असलेला; उन्नत; उत्तुंग; उंचसा; (गो.) उचोलो. [सं. उच्च; म. उंच]

उचोटा—उंचवटा पहा.

उच्च—न. १ केंद्रस्थ सूर्यापासून अति दूर असणारा ग्रहकक्षेतील बिंदु; सूर्योच्च. २ ज्या राशीमध्यें विशिष्ट ग्रह बलवान् असतो ती रास; जसें–सूर्य मेष राशींत, चंद्र वृषभ राशींत, बुध कन्या राशींत, शुक्र तूळ राशींत असल्यास त्यास उच्च मानतात. –वि. उंच; भव्य; श्रेष्ठ, उच्च प्रदेशावरील; उच्च जातीय; उच्चासनस्थित इ० 'उच्चा तेआं खजुरी पोफळी।' –दाव १३५. [सं.] **०नीच भाव**–पु. एक मोठा व एक लहान अशी भावना; द्विधा, द्वैतभाव. **०पदस्थ**–वि. मोठ्या अधिकाऱ्याच्या, सन्मानाच्या जागीं असलेला. **०शिक्षण**–न. विश्वविद्यालयीन (युनिव्हर्सिटीचें) शिक्षण; कॉलेजांतील शिक्षण. **०स्वर**–(विरू.) चढा आवाज; मोठा, स्पष्ट आवाज; तीव्र स्वर; वरचा सुर; तार सप्तकांतील आवाज.

उच्च दिवाण—वि. (गो.) खुळा; मूर्ख; दीड शहाणा. [का. हुच्चा=खुळा+फा. दिवाण]

उच्चलन, उच्चालन—न. १ उंच करणें, धरणें; उचलणें. २ उच्चाटन; हकालपट्टी. [सं. उत्+चल्]

उच्चाट—पु आतुरता; उत्कंठा. उचाट अर्थ २पहा. 'माझिया हा मनें घेतला उच्चाट। पहावें वैकुंठ पंढरी हे॥' –ब ३४६.

उच्चाट—पु. उचल्या; भामटा. [सं. उच्चाटन]

उच्चाटण-न—न. १ मंत्राच्या साहाय्यानें मनुष्यास स्वतःचें घरदार, नोकरी, उद्योग यांविषयीं तिटकारा उत्पन्न करून त्यास तें सोडावयास लावणें; जादूटोणा करून वेडापिसा करणें. २ जादूटोणा; मंत्रप्रयोग. ३ हकालपट्टी; उचलबांगडी; उखडणें; घालवून देणें; उलथून पाडणें; दूर करणें. [सं. उच्चाटन]

उच्चाटणें—उचाटण करणें.

उच्चातिउच्च—वि. श्रेष्ठांत श्रेष्ठ. 'तुमच्या मतें तुमची अनन्योपभोग्य सुधारणेचीं उच्चातिउच्च जीं तत्त्वें आहेत.' –टि. ४.७९. [सं. उच्च+अतिउच्च]

उच्चार-ण—पु.न. वाणीपासून वर्णात्मक शब्दाची होणारी स्पष्टता किंवा त्यास अनुकूल असा व्यापार; बोलण्याची क्रिया, पद्धति; बोलणें; बोलून दाखविणें; भाषा; बोल. [सं. उत्+चर्]

उच्चारणीय—वि. सांगण्याजोगा; बोलून दाखविण्याजोगा. [सं.]

उच्चारणें—उक्रि. उच्चार करणें; तोंडांतून काढणें; बोलणें; बोलून दाखविणें; स्पष्ट सांगणें. [सं. उत्+चर्; उच्चारण]

उच्चारित—वि. उच्चारलेलें; बोललेलें; सांगितलेलें; उद्गारलेलें. [सं.]

उच्चार्य—वि. उच्चारणीय; बोलण्यालायक; सांगण्याजोगें. [सं.] **०माण**–वि. उच्चार होत असलेला.

उच्चालक—पु. (यंत्र.) तरफ; जड पदार्थ उचलण्याकरितां योजलेला लांब दांडा. (इं.) लिव्हर.[सं. उत्+चल्]

उच्चावच—वि. लहानमोठा; उच्चनीच. 'ये लोकीं उच्चावचें जाण। देवासि समान निजभावें।' –एभा २७.३४०. 'सर्वत्र उच्चावच भेद आहे।' –साहह ४.१३. [सं. उच्च+अवच]

उच्चावणें—अक्रि. मोठा होणें. उंचावणें पहा. 'तपस्तेजें बहु तोचि उच्चावला.' –उचिशु ४. [सं. उच्च; प्रा. उच्चाव]

उच्ची—स्त्री. (ना.) एखाद्यास वर चढवून त्याची केलेली फजिती. **०पट्टी**–स्त्री. फजिती; उच्ची. **उच्चीत येणें**–(स्तुति केल्यामुळें) चढून जाणें; वनणें. [का. हुच्चु=मूर्खपणा]

उच्चैर्घोष–पु. मोठ्यानें जयघोष; आकांडतांडव; उदोउदो. 'स्त्री सुधारणा व स्त्रीशिक्षण यांच्या महातत्त्वांचा उच्चैर्घोष करणारांनी ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे...' –टि ४.८१. [सं. उच्चै+घोष]

उच्चैःश्रवा—पु. मोठ्यानें एकूं येणारा क्षीरसमुद्रांतून निघालेला इंद्राचा घोडा (चौदारत्नांपैकीं एक). 'तुरंगजाता प्रसिद्धा आंत उच्चैःश्रवा मी।'–ज्ञा १०.२३७. [सं.]

उच्छलन—न. १ उच्चलन पहा. २ उसळी [सं. उच्चल्]

उच्छव—उत्सव पहा.

उच्छळिंध्र—न. भूमिछत्र. अळंबे पहा. 'उच्छळिंध्र आणि पूर्णचंद्र। वत्सपदके समुद्र।' –ऋ ४७. [सं. उच्छिलींध्र]

उच्छाई—वि. उत्साही पहा. 'सांगतो सत्काराचिनियां मन उच्छाई।' –हांला ४०.

उच्छाद—पु. १ उपद्रव; त्रास; पीडा; सतावणूक; गांजणूक; पुरेपुरेसें करणें. (क्रि० देणें). २ लुटालूट; जुलूम (चोर, दरोडेखोरांचा); खोड्या (मुलांच्या.) (क्रि० आणणें; देणें; मांडणें). ३ उपद्रव झालेली स्थिति; त्रस्तता. [सं उत्सादन] **०काढणें**–त्रास सोसणें. 'या मुलांचा उच्छाद मी काढूं तरी किती!' **०येणें**–त्रासणें; कंटाळणें; पीडीत होणें. 'या धिंगामस्तीनें मला उच्छाद आला आहे!'

उच्छाप—पु. शापाची निवृत्ति; शापावर तोड, उपाय, इलाज; याकरितां असणारा वर. [सं उत्+शाप]

उच्छाल—पु. वाढ; चढ; बढती; उत्कर्ष. **०जाणें**–१ संतापणें; एखाद्यावर रागावून उठणें. २ उडी मारणें (घोडा वगैरेनीं.) [उत्+चल्]

उच्छा(च्छा)व—पु. उत्सव पहा. 'मंगळोच्छाव वाग्देवते। तां वदावें रसाल कथे। श्रोतेया वक्तयाचे माथे। आनंदें डोलवी।' –वेसीस्व. १.६.

उच्छास्त्र—वि. शास्त्राविरुद्ध; शास्त्र सोडून (भाषण, वर्तन). [सं. उत्+शास्त्र]

उच्छिन्न—वि. पूर्णपणें नाश पावलेलें; नष्ट झालेलें. [सं. उद्+छिद्]

उच्छिष्ट—वि. १ अवशेष राहिलेले; उरलेले (पदार्थ); उष्टे. ' पडिलिये ठायीं उच्छिष्ट मेवावें. ' –तुगा ६३२. २ (ल.) उपभुक्त; वापरलेलें (वस्त्र, पुष्प, स्त्री, इ०). ३ उष्टें; शिळें; नवीन नसणारें; उसनें घेतलेलें. –न. उष्टीं पात्रें; उष्टें; उच्छिष्टान्न. ' उच्छिष्टें काढी धर्माघरीं । ब्राह्मणाची भीड थोरी । ' –एरुस्व २.२६. [सं. उत्+शिष्ट] ०**कल्पना**–स्त्री. दुसऱ्यानें अगोदर व्यक्त केलेली कल्पना; शिळा, नावीन्य नसलेला विचार. ०**चांडाळी**–स्त्री. एक क्षुद्र देवता हिला प्रसन्न करण्याकरितां दोन जेवणांच्या मधील कालांत भाकरीचा तुकडा दाहेंत ठेवण्याचा एक विधि. ' कणेपिशाच भगलिनी । उच्छिष्टचांडाळी रानसटवी जखणी । वेताळ मुंज्या काळरजनी । भजिजें जनीं अतिप्रीती । '–ह १३.६८. ०**भाषण–श्लोक–वाक्य**–न.पु पूर्वी दुसऱ्यानें म्हटलेलें कवन अगर भाषण; वाङ्मयचौर्य.

उच्छिष्टणें—उक्रि. उष्टें करणें; अधेवट–कांहीं काळ–भोगून टाकून देणें; जुनें–शिळें करून टाकणें. ' येरू म्हणे गा उच्छिष्टलें. होमद्रव्य नेणती ॥ '

उच्छृंखल—वि. १ ताबा, दाब नसलेला; उतावळा; अविचारी; अविवेकी; अनियमित; गैरशिस्त. ' हें उच्छृंखल बोलणें कायसें । ' –ज्ञा ६.१६२. २ शास्त्र, राजा, वडील इत्यादिकांस न मानतां वागणारा; उद्दाम, स्वच्छंद; स्वैर; स्वेच्छाचारी. ' राहटे उच्छृंखलु. तयापरी ॥ ' –ज्ञा १८.६६९. [सं. उत्+शृंखला=सांखळी]

उच्छेद—न पु. १ समूळ नाश; नायनाट; विध्वंस; खंड. २ त्रासदायक कृत्य (शैथिल्यानें उच्छाद बहल). ' उच्छेद तो असे हा गे आरंभला. रोकडें विद्रला परचक्र ' –तुगा ६४७. [सं. उत्+छिद्=तोडणें] ०**आणणें–मांडणें**–त्रास देणें. सामाशब्द–धर्मोच्छेद; वंशोच्छेद; मृत्युच्छेद; वनोच्छेद; कुलोच्छेद; गृहोच्छेद. ०**क**–वि. नाहींसें करणारा; नायनाट करणारा; त्रास देणारा; बुडविणारा; निर्दलन करणारा.

उच्छेदणें—उक्रि. नाश करणें; नाहींसे करणें; उध्वस्त करणें; फडशा , सप्पा, नायनाट करणें.

उच्छेदित—वि. उच्छेद केलेला; नाश केलेला; उध्वस्त केलेला. [सं.]

उच्छ्वास—पु. १ नाकांतून आंत घेतलेली हवा पुन्हा बाहेर सोडणें, बाहेर सोडलेला श्वास; (विशेषतः) जोरानें श्वास टाकणें; सुस्कारा. २ हवा जाण्याकरितां ठेविलेलें भोंक; वायुमार्ग; श्वासरंध्र. ३ पाण्याचा नहर; नळ; उश्वास. ४ (विरू.) उस्वास. उंचावरून आणलेल्या पाण्याची उंची कायम रहावी व पाणी दूर अंतरावर नेतां यावें व आंतील दूषित हवा बाहेर जावी म्हणून बांधलेला हौद. ' नाना फडणिसांनीं बांधलेले पुष्कळ उछ्वास आहेत. '–अस्तभा ३. [सं.]

उच्छ्वासन—न. श्वास सोडणें; श्वासोच्छ्वास करण्याचा व्यापार. उच्छ्वास अर्थ १ पहा. [सं.]

उच्छक—वि. स्वैर. ' उछक आणि सहिष्ण । तोचि आत्मा । ' –दा १३.१.१७. उच्छृंखल पहा.

उंछवृत्ति—स्त्री. १ शेत कापून नेल्यावर राहिलेले दाणे टिपून त्यावर निर्वाह करणें. रस्ता, बाजार इ. ठिकाणीं पडलेले धान्याचे कण वेंचून त्यांवर निर्वाह करणें. ' ऐक त्यांचें जीविकावर्तन । शिल कां उंछवृत्ती जाण । ' –एभा १७.४१४. –पु. अशा प्रकारें निर्वाह करणारा उंछवृत्तीनें राहणारा तपस्वी. [सं.]

उछह—पु. उत्साह पहा. ' समर्थें रामनौमी उछह केले । ' –सप्र ४.९.

उछाडपछाड—उखाडपछाड पहा.

उछाव–ह—पु. उत्साह पहा. ' बेणीस्वामी रघुनंदन । ताटिका मारिती उछाहे । ' –वेसीस्व ११९.

उछिष्ट—उच्छिष्ट पहा. ' पुढें न शिवावें म्हणोनि उछिष्टा ॥ ' –दावि २०.

उछेद—पु. उच्छेद पहा. ' ब्रह्मवृत्तीचा उछेद. जीवमात्रास देणें खेद ॥ ' –दा २.६.१९.

उछेदणें—उच्छेदणें पहा. ' मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती । नाना ग्रंथांच्या समती । भगवद्वाक्यें ॥ ' –दा १.१.१७. ' देवां भक्तांस उछेदी ॥ ' –दा ३.३.७.

उजखुरा–खोरा—वि. उजव्या हातानें काम करणारा; याच्या उलट डावखोरा. [सं. ऋजु; प्रा. उज्जु+फा. खुदेन्; उजवा+खोर]

उजंग—पु. सुस्थिति; सुखाचा काळ. ' देशपांड्यांच्या घराला केव्हां उजंग पडेल तो पडो. ' [सं. ऋजु+अंग; उजु+अंग]

उजगरा–गारा–गिरा—पु. १ (प्र.) उजागरा. जागरण; निजावयास उशीर. ' आझुंई उजगरा किर्तीं । कराल तुम्हीं ॥ ' –शिशु २२२. ' थोडे तुज घरी होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥ –तुगा २९९३. २ (ल.) दुःख; श्रम; त्रास; कंटाळा. ' आपुला धेवोनिया चारा ॥ मग पेटती महामारा । तेणें होतसें उजगरा । ऋषीश्वरासी । ' –कथा ४.१४.१२५. सामान्यतः उजागरा पहा. ३ जागृति, आठवण. (क्रि० करणें; देणें.) [सं. उत्+जागृ, उज्जागरक; प्रा. उज्जगरय]

उजगारी—स्त्री. उत्कर्ष; प्रसिद्धि; लौकिक; भरभराट; वाढ. उजागरी पहा. ' तित्क्या उजगारीस ती (आमची भाषा) कधीं तरी पोचेल कीं नाहीं याचा संशय आहे. ' –नि २०१. [सं. उत्+जागृ]

उजड, उजडणी–णें–तां—उजेड पहा.

उजदार—न. पुढलें दार; पुढचा दरवाजा. ' निरविल तैं मग निजात्म स्वसुखें येशिल उजदारा ' –देप ६५. [सं. ऋजु+द्वार= उजु+दार–उजदार]

उजदार—वि. (गो.) प्रकाशमान. ' उजदार दिसत अशें कर ' [सं. उद्योत; प्रा. उज्जोअ+दार प्रत्यय]

उजम—पु. थोरवी; श्रेष्ठता. 'हे आपले सर्कारच्या गोष्टी उजमाच्या सांगतात.' –दिमरा १.१७. [अर. इज्म किंवा उज्म= श्रेष्ठता, वैभव]

उजर-रा—पु. (व) तक्रार; हरकत; आक्षेप; बचाव 'पुढें तुम्हीं जिवंत असला तरी तुमचा कोणताच उजर ऐकला जाणार नाहीं.' 'त्यांची स्थावर जंगम इस्टेट इन्साफावांचून, त्यांचा उजरा ऐकल्यावांचून, महाराजांच्या हुकमानें सरकारांत घेतली' –विक्षिप्त ३.१०२. [अर. उज्र=सबब]

उजर—पु. उत्कर्ष. [सं. ऊर्ज्]

उजरणें—उक्रि. १ चकाकित करणें; स्पष्ट करणें; उठावदार करणें; स्वच्छ करणें; ठळक करणें (रेषा, आकृति, खूण छाप). २ पुन्हां उच्चारून पक्कें करणें; उजळणी करणें; दृढ करणें; (पुनःपुनः उच्चार, प्रयोग इ० योगें अभ्यास, आज्ञा, शोध). [सं. उज्ज्वलन; म. उजळणें]

उजरणें—उक्रि. १ दुरुस्त, डागडुजी करणें. २ मारलेले खिळे नीट करणें; सरळ बसविणें, करणें; पोचे आलेलें भांडें नीट करणें; गोलाकार घडणें (लोखंडी काम). 'मी भक्तिवश न चुकलों त्या कुब्जेच्याहि वपुसि उजराया.' –मोशांति ७.४७. [सं. ऋजु+कृ]

उजरणें—अक्रि. १ उत्कर्ष होणें. २ शक्ति परत येणें, सुधारणें; मूळच्या स्थितीवर परत येणें; हुषारी, तजेला येणें, टवटवीत होणें (प्रकृति सुधारून). ३ मंद बुद्धीच्या मनुष्याची प्रगति होणें; बुद्धीचा विकास होणें; त्याला जास्त कळूं लागणें. 'सांग हित सुज्ञ गुरु तूं आहेशि समर्थ याशि उजराया.' –मोवन १.५२. [सं. ऊर्ज्]

उजरा—पु. १ प्रगट मार्ग; रीत; 'अनादि सिद्ध उजरा.' –ज्ञा १६.२७१. २ प्रसिद्धि; उजगरा पहा. [सं. उत्+जागृ]

उजरामऱ्हामत—अज्ञामऱ्हामत पहा.

उजरावणें—उक्रि. (गो.) स्वच्छ करणें (मासळी); उजरणें पहा. [सं. उज्ज्वलन; ऋजु+कृ; उजु+कृ]

उजरिया—स्पष्टीकरण; विवेचन; उपपत्ति. 'तंव उजरिया केले दैवाचिआ. ते परिस पां.' –ऋ १०. 'सर्व सिद्धांताचिया उजरिया. सांडुनियां निद्सुरिया.' –भमृ ५.३९. उजरी अर्थ २ पहा. [सं. उज्ज्वलन]

उजरी—स्त्री. तेज; प्रकाश; प्रभा. 'प्रभेची जैसी उजरी. ते सोहंवृत्ति अवधारीं.' –ज्ञा १४.३९१. २ स्पष्टपणा; स्वच्छता; विवरण. 'परी प्रमेयाची उजरी.' –ज्ञा १८.५५. ३ उत्कर्ष; उदय; उजळा; 'तुका म्हणे कई भाग्याची उजरी. होईल पंढरी देखावया.' –तुगा ५५८; 'असो याचि प्रकारें स्त्रियांचे शरिरीं. अनुक्रमें होय वृद्धीची उजरी.' –स्वानु ३.२.९. ४ व्यवस्थितपणा. 'तैसी आहारनिद्रेची उजरी.' –ज्ञा १३.७६७. –वि. १ स्पष्ट; उघड. 'जालया कामा नाहीं चोरी. तें कळसें होय उजरी.' –ज्ञा १८.४३. [सं. उज्ज्वलन]

उजरी—वि. सरळ. 'परि ते भजती उजरी नव्हे. विषम पडे.' –ज्ञा ९.३४५. [सं. ऋजु]

उजरी—स्त्री. सहाय्य; सामर्थ्य; आश्रय. 'वळभाचिया उजरिया. आपणया पति कुस्रिया. जोडोनि तोषिती जैसिया. अंहवपणें' –ज्ञा १६.३७७. [सं. ऊर्ज्=शक्ति; पोषण]

उजवट—वि. उजळ; गोरा. 'नवऱ्यापरीस नवरी उजवट, सोन्याचे तुला गोट साळ्वाई.' [सं. उज्ज्वल]

उजवट-ड, उजवाड—पु. (गो.) उजेड; प्रकाश. 'करतेल्याच्या तोंडाक उजवाड पडलो.' =करणाऱ्याच्या तोंडाचा प्रकाश पडला. [सं. उज्ज्वल]

उजवण-णी-णूक—स्त्री. ऊर्जितदशा (भूमि, शस्त्र, मनुष्य, इ० कांस). [सं. ऊर्ज्]

उजवण—स्त्री. १ समाप्ति, शेवट; अखेर; बोळवण 'जेथ कृष्णकीर्ति कीर्तन. तेथें कर्माकर्मांची उजवण. होय संसाराची बोळवण. जन्ममरणसमवेत.' –एभा ३०.४०. २ साफल्य. 'आजि आयुष्या उजवण जाहली.' –ज्ञा १०.१४७. ३ लग्न, मुंज इत्यादि संस्कार अवश्य ते धार्मिक विधि; (विशेषतः) विवाह. 'पुत्रांस नोवऱ्या आल्या. आतां उजवणा केल्या. पाहिजेत कीं.' –दा ३.४.७. [सं. उद्यापन; प्रा. उज्जा (ज्ज) वण]

उजवणें—अक्रि. १ विहित क्रमाप्रमाणें समाप्त होणें, पारपडणें; यथासांग तडीस जाणें (नेम, विधि, धर्मकृत्य). सफल होणें; सुपरिणामी होणें. 'मग म्हणे गा प्रज्ञाकांता. उजवली आजि वक्तृत्वता.' –ज्ञा १४.६३. २ स्वतःचा विवाह इत्यादि संस्कार होणें, 'नुजवेचि कव्हणें बोलें. आंगा आठुवर पण आलें.' –शिशु २०८. [सं. उद्यापन; प्रा. ब्जज्जावण=उजवणें]

उजवणें—अक्रि. १ आपत्ति, रोग इत्यादींतून निभावून जाणें, पार पडणें. २ चांगला निघणें; निवळणें. [सं. ऊर्ज्]

उजवरा—पु. स्पष्टार्थ. उजरी पहा. 'तये नामाचा उजवरा. धुंडुनि भक्षी चराचरा. म्हणोनिया गा नरेंद्रा. ढुंढानामा.' –कथा ६.१९.१३.

उजवा-वी-वें—वि. १ दक्षिणचा; उजवीकडचा; डावा याच्या उलट; दक्षिण. २ सरस 'मुलापेक्षां, म्हणे मुलगी उजवी' ३ सरळ. [सं. ऋजु] **०हात**—पु. ज्यावर अवलंबून आहे असा, पूर्ण विश्वासांतला मनुष्य; अव्वल मदतनीस; निकट सहकारी 'इतके झाल्यावर सोकरजी ऑलबॉश साहेबांचा अगदीं उजवा हात बनला.' –भयंकर दिव्य. **उजवी गुद्दी देणें**–संमति देणें; कबूल करणें; परवानगी देणें. गुद्दी पहा. **०घालणें**–उजवीकडे राहील अशा तऱ्हेनें भोंवती फिरणें; प्रदक्षिणा करणें. 'विनयें पुसोनि उजवें घालुनि तैं त्या सुरापगातनया.' –मोशांति ७.८१. 'उजवा घालितां अवनि देश.' –मोस्त्री ६.३७. 'देवाला उजवें घालून येतें.' 'गाईला

उजवी घाल.' **०बाजू**—स्त्री. १ राजसभेंत उजव्या बाजूस बसलेली मंडळी; मोठे मानकरी लोक. २ विश्वासुक, अतिशय उपयुक्त असा राजेलोकांचा उजवा हात असलेला माणूस. **उजवी डावी देणें**—होय–नाहीं स्पष्ट म्हणणें; होकार किंवा नकार देणें. **उजवी देणें**—१ उजव्या बाजूकडे जाऊं देणें. २ मूर्तीच्या अंगाला लावलेले तांदूळ, फुलें वगैरेपैकीं उजव्या बाजूकडील खालीं पडणें: कौल देणें. ३ संमति देणें; होकार देणें. **०जाणें**—उजवीकडून जाणें.

उजवाडणें—अक्रि. (गो.) सूर्योदय होणें. 'उजवाडलें आतां गोरांक पसरीक सोड.' [उज्ज्वलन]

उजवात—स्त्री. (गो.) उदबत्ती. 'आज उजवात देवासमोर लाव.' [ऊद+वात]

उजवारणें—क्रि. (राजा) रोगांतून बरें होणें. उजवणें पहा. [सं. ऊर्जन]

उजविणें—सक्रि. १ समाप्त करणें; उद्यापन करणें; पार पाडणें; पुरें करणें; संपविणें. 'अविनयरुचिप्रतिज्ञा उजवुनि गुरुभक्तिचा रस त्यजुनि.' –मोकर्ण १.१७. 'जें जें व्रत धरावें. त्यातें उजवावें तत्त्वतां.' –गुच ३२.३६. २ सुपरिणामी करणें. 'धन्य इहीं उजविला धनुर्वेद.' –मोकर्ण १०.१२. ३ विवाहादि संस्कार करणें. उजवूं किती होतील पोरें.' –तुगा २९४९. 'दिवसेंदिवस खर्च वाढला. याद्या होता तो खुंटोनि गेला. कन्या उपवरी जाहल्या त्याला. उजवावया द्रव्य नाहीं ॥.' –दा ३.४.३. **उजवून घेणें**—लग्न लावून घेणें. 'कन्या नृपाची उजवून घ्यावी.' –सारुह ७.९१. **दोहो अंगीं उजविणें**—लग्नामध्यें दोन्हीं पक्षाकडील खर्च करून लग्नकार्य पार पाडणें. [सं. उद्यापन; प्रा. उज्जावण]

उजविणें—सक्रि. १ व्यवस्थितपणें करणें; उत्कर्ष करणें; प्रगति करणें. 'ती आपला संसार उजवीत नाहीं हें तर ठरलें.' –निचं ९.५६. २ सजविणें; विभूषित करणें. 'चित्रें काढून चौक उजविले.' –ऐपो २११. [सं. ऊर्ज्]

उजळ—वि. १ चकचकीत; सतेज; जिल्हई दिलेली (धातु); स्वच्छ; पांढरा; निर्मळ. २ गोरा; सुंदर; सतेज (चेहरा). ३ फळ पिकतांना रंग बदलून जी सतेजता येते तशा प्रकारचें (पेरू, केळें इ० फळ). ४ शुद्ध वर्तनाचे; रावल्यांत येण्याजोगे. 'उजळ लोकांपैकीं निवडण्याचें धोरण असावें.' –जन्हेरखानानियम ९. [सं. उज्ज्वल; प्रा. उज्जल; गु. उजळु, सिं. उजलु; हिं. उजल] **०टिक्या**—वि. फासोळीवर पांढरे ठिपके असणारा (घोडा). **०ठक**—पु. १ संभावित भामटा; राजरोस भामटेगिरी करणारा. २ बाहेरून भपकेदार परंतु कवडीमोल वस्तु; आंतून सरळपणा नाहीं असा माणूस. **०तोंड–माथा होणें**—अपवाद, आरोपापासून मुक्त होणें; दोषमुक्त होणें; काळिमा जाणें. **०माथ्यानें हिंडणें**—राजरोसपणें वावरणें, वागणें; न लाजतां वागणें,

उजळणी, उजळणूक—स्त्री. १ चकचकीत करणें; स्वच्छपणा करणें; उजळा, जिल्हई देणें; पाणी देणें. २ आवृत्ति; धूळाक्षरांचें लेखन व पाठांतर. ३ (गणित) पाढे, सवाकी, दिडकी, अडीचकी, औटकी, शेर, मण, टांक, आणे वगैरे हिशेबाचा भाग; हा भाग तयार करणें. ४ (ल.) खूप शिव्या देणें. (क्रि० करणें). [सं. उज्ज्वलन; प्रा. उज्जळण; म. उजळण–णी]

उजळणें—सक्रि. १ चकचकीत करणें; जिल्हई देणें; घांसणें; निर्मळ, स्वच्छ करणें. २ दिवे लावणें; मशाल पेटविणें; प्रकाश करणें; पेटविणें; पेट देणें. 'जैसा मालवलिया दिवा। प्रभेसि जाय पांडवा। मग उजळिजे तेथ तेधवा। तैसाचि फांके ॥' –ज्ञा १५.३६९. ३ प्रकाशित करणें. 'दंत तेजें उजळोनी दिशा। हांसोनि म्हणे।'–मुआदि २२.८८. ४ स्पष्ट करणें; सुलभ करणें. 'विरक्तें परमार्थ उजळावा.' –दा २.९.१२. ५ उजळणी, आवृत्ति करणें. 'पाठ उदंडचि असावें. सर्वकाळ उजळीत जावें.' –दा १८.३.१९. –अक्रि. १ गोरें होणें; सेतेज होणें; सुंदर होणें. 'क्रमेंच तीर्चीं उजळेच अंगे.' –सारुह २.५३. 'उजळेना ना काळवंडेना.' –दा १३.२.२२. २ पाडास आलेले आंबे इ० सुंदर रंगयुक्त होणें, उजळ होणें. 'कापुरवेलीची चोखडी। उजळिली परीवडी.' –ऋ ८४. ३ (उष्णादि विकारानें लाल झालेला डोळा, अंधारी रात्र) निवळणें. ४ प्रकाशित होणें. 'जैसें त्रैलोक्य दिसे उजळलें.' –ज्ञा १.३९. 'उजळल्या दाही दिशा.' –तुगा ६७८ [सं. उज्ज्वलन; प्रा. उज्जळण; सिं. ओजारणु]

उजळपाजळ—वि. स्वच्छ; सतेज; चकचकीत; लखलखीत; तेजदार; लखपख (वस्त्र. पात्र इ.). [उजळ द्वि.]

उजळा—पु. १ तकाकी; चकाकी; लकाकी (घांसून, पुसून येणारी). २ जिल्हई; मुलामा (सोन्याचांदीचा). (क्रि० देणें). 'तैसीं चंपककुसुमें उजळा दिधलें तसेंचि गे स्वर्णे' –कमं ९२. ३ जिल्हई देण्याचा पदार्थ; उ० वाळू, तुरटी, सोरा, इ० ४ (सोनारी) सोरमीठ, नवसागर, मोरचूत, पोटॅशियय सायनाईड यांचें मिश्रण (हें मिश्रण डाग लावलेल्या जिनसास तो डाग सोन्यासारखा पिंवळा दिसावा म्हणून उजळा देण्यासाठीं तयार करतात). –वि. चकचकीत; शुद्ध पांढरा; उजळ पहा. [सं. उज्ज्वल; प्रा. उज्जल; सिं. उज्लाई]

उजळाई—स्त्री. जिल्हई देण्याची अगर घांसण्याची क्रिया; किंवा तिची मजुरी.

उजागर–रा—क्रिवि. उघडपणें; सर्व समाजासमोर; जगासमोर; अगदीं प्रसिद्धपणें. –वि. १ निर्भय; धीट. २ (व.) (उप.) संभावित; एखादें काम करून न केलें असें दाखविणारा. 'चोरी करून रामा उजागरच दिसतो.' –पु. १ जाग्रण; जागेपणा; जागृतावस्था. (क्रि० पडणें; होणें; घडणें). २ उजळमाथा; निर्भयता; धीटपणा;

शूरपणा; धिटाई; धडाडी. 'तें पुस्तक माझेंच मग त्यापासून मागून घ्यायचा मला उजागरा नाहीं काय?' ३ आठवण. ४ सावधपणा; सावधानता. [सं. उत्+जागृ; उज्जागर; गु. उज्जागरो]

उजागरी, उजागिरी—स्त्री. १ निर्भयता; मोकळीक; उघडीक; उघडपणें एखादी गोष्ट करण्यास मोकळीक; उघड व्यवहार. 'तो तुमचा दबेल होऊन तुम्हास पाहील तेव्हां त्याला मेल्याचा पाड चढेल आणि तुम्हाला उजागरी होईल'–बाळ २.१८९. [सं. ऊर्ज्] २ निर्लज्जपणा; धीटपणा; धृष्टता (तृतीया विभक्तीत प्रयोग). 'नित्य पतिदेखतां, भोगितां उजागरीनें मजा.' –प्रला २२५. ३ प्रसिद्धि; षट्कर्णी होणें. ४ दुर्लौकिक; बोभाटा. [सं. उज्जागर]

उजागरीस आणणें—क्रि. परिस्फुटता करणें; उघडकीस आणणें; प्रसिद्धीस आणणें. [उजागर]

उजागरीस येणें—क्रि. उघड होणें; उघडकीस येणें.

उजागीर—वि. १ निर्लज्ज; बेशरम; जनलज्जा नसलेला. २ धीट; निर्भय. 'ती पोरगी फारच उजागीर आहे.' ३ ज्यास विवक्षित कर्म प्रसिद्धपणे करण्यास मोकळीक झाली आहे असा; उजळमाथ्याचा. ४ उघड; जाहीर. [सं. उत+जागृ]

उजाड—वि. निर्जन; ओसाड, वस्तीरहित; निर्मनुष्य; उध्वस्त; वैराण (गांव, मुलुख इ०). 'व्यापाराच्या उत्कर्षामुळें कित्येक शहरांत लोकसंख्या अतिशय वाढली होती, तर उलट कित्येक गांवांतून वस्ती अजीबात उठल्यासारखी होऊन ते गांव उजाड झाले होते' –पालेमेंट ३४. [सं. उत्+ज्वल्]

उजाडणें—उजेडणें पहा.

उजाडतां—उजेडतां पहा.

उजाडी—स्त्री. ओसाडपणा; उध्वस्तता; निर्जनस्थिति; उजाडपणा. [उजाड]

उजान—क्रिवि. (व.) पुन्हां; आणखी.

उजाला—पु. (हिं.) चकचकाट; प्रकाश, दिवा. 'चवतर्फा लाविले गलासे जिकडे तिकडे उजाले.'–पला २७. [सं. उज्ज्वल]

उजाळ–ळू–ळें—पुन. १ तेज; प्रकाश; उजेड. 'उजाळ्‌ चंद्रादित्यमंडळा ॥' –ज्ञा ११.२१२. 'बालसूर्याचेनि उजाळें. तैसी कवळें टाचांचीं ॥'–एरुस्व १.३१ 'स्वामी पैल येक उजाळे पर्वतातळीं वाटलें.' –सप्र १५.२१. २ पांढरेपणा; स्वच्छपणा; उजळपणा. ३ शुद्धता; कीर्ति; नांवलौकिक. 'माझिया कुळाचा उजाळू ॥' –ज्ञा १६.३५८. –वि. पांढरें; स्वच्छ. उजळ पहा. 'उजाळ द्रुति मार्दव.' –अमृ ५.३. [सं. उज्ज्वल]

उजिडणें—अक्रि. वेगळें होणें. 'जीवु प्रकृती पासोनि उजिडें। जेणें भवबंधु बिघडे' –दाव ३३८. [सं. उज्झ्=टाकून देणें]

उजिती—स्त्री. आगटी. 'प्रळयाग्नीची उजिती। आंबुखलीं जैसीं' –ज्ञा ११.३४२. [सं. उद्+द्युत्=पेटणें; प्रकाशणें; प्रा. उज्जुअ]

उजितें—न. ज्वलन; पेट; पेटण्याची क्रिया. 'तै विझोनि जाय उजितें। अग्नीचें जेव्हां।' –ज्ञा ८.२१३. [सं. उद्योत]

उजियड–येड—पु. उजेड पहा. 'पडिलेआ भवतभी निबिडें। जिया प्रतिभवी उजियेडें।'–ऋ २. 'परि श्रीनिवृत्तिदीपउजियेडें। देखेन मी॥' –ज्ञा ६.३२. 'तेणें उजियड पाहता गा।' –दावि ४९९. [उजेड पहा]

उजियेरी—स्त्री. सादृश्य. 'जरि पाहतां उजियेरी न जोडे। ते न्हेळि मांडिएली।' –ऋ ३९. [सं. ऋजु]

उजिरा—पु. प्रकाश; तेज; उदय. उजरा पहा. [सं. उत्+ज्वल्; ऊर्ज्]

उजिवड–ड्डू–ड्डें—पुन. प्रकाश; उजेड पहा. 'दिवा जो उजिवडु। तो घराचाचि सुरवाडु।'–अमृ १०.४. 'ऐसेनि येणे निवाडें. जयाच्या जीवीं उजिवडे।' –ज्ञा १३.१०८२.

उजिवडणें—अक्रि. १ उजाडणें; प्रकाशमान होणें. २ (ल.) भासणें. 'तैसें लटिकें येणें रूढे। जड येणें उजिवडे।'–अमृ २.३५. 'जयाच्या जीवीं उजिवडे।' –ज्ञा १३.१०८२. [उजाडणें]

उजिवण—स्त्री. साफल्य; सार्थक; उजवण पहा. [सं. उद्यापन; प्रा. उज्जावण]

उजीयडा—पु. उजियड, उजेड पहा. 'आपणा वसतिला उजीयडा॥' –विवि ८.३.५९.

उजीर—वि. सरळ. उजू पहा. [सं. ऋजु] **०पण**—न. सरलत्व; सरळपणा.

उजु–जू—वि. १ सरळ; वांकडें नव्हे असें; समसूत्रानुवर्ती (रेषा, मार्ग इ.). 'तो उजु हातिएरूं धरो नेणें॥' –शिशु८९५. २ नीट; योग्य; अनुकूल; सीधा (स्वभावाचा). 'किंवा जैसें तें घातक। मेघां उजु करितां धोक।' –स्वादि १.२.८२. ३ सरळ; चांगलें; सन्मार्गवर्ती. 'ऋषीश्वरासि पडले सांकडें। कीं उजू करितां जाहलें वांकडें। –कथा ६.५.६९. 'स्वैरिणीचें पाऊल उजू म्हणून चुकूनहि पडायचेंच नाहीं.' –नि ७८९. ४ बरोबर; प्रमाणशीर; सरळ येणारें; योग्य; यथान्याय. 'उजु हिशेबाचे जे पैसे ते आम्ही देऊं.' –कोरकि २८०. ५ छक्केपंजे, ध्वन्यर्थ, वक्रोक्ति वगैरे नसलेलें; सहज; सोपें; सुबोध; सहज समजण्यासारखें (भाषण, वाक्य, कविता इ०). ६ प्रामाणिक; न्याय्य; निःपक्षपाती. [सं. ऋजु; प्रा. उज्जु; जिप्सी उजो] **०करणें–बडवून कामाला योग्य करणें**; पेटविणें (बैल.) –शअ. समोर; कडे. 'तंवं तो धारासिपे तिरवटें। डोळेआं उजूं॥' –शिशु ७११. 'मग आवेशें पसरी मुख। ऊर्ध्वा

उजु ॥' –ज्ञा ६.२२८. 'उभा राहिला जानकी उजू ।' –कृमुरा १०.१२. 'वीर पाहाती आकाश उजु । तों येतां देखिला तेजः पुंजु । जो ब्रह्मयाचा आत्मजु । नामें विख्यात नारद ॥' –जै ५१. १५. –क्रिवि. १ सरळपणें; बरोबर; नीट रीतीनें. २ योग्य बाजूस, दिशेस, मार्गास. 'रथियाउजू पार्थे वीर । भिमें लक्षिले गजभार ॥'

उजुं–जूं, उजु–जू–क—क्रिवि. (कुण.) अजून; पुन्हां; आणखी; माकल्यान. उजान पहा. 'रामा येतो म्हणाला पण उजुक आला नाहीं.' [हिं. अजो; म. अजून]

उजुकार—पु. सरळ रीत, मार्ग; सीधा मार्ग; सरळपणा. 'एकु षटचक्राचेनि उजुकारें.' –दाव १५१. [सं. ऋजु+कृ]

उजुवाट—स्त्री. सरळ, लांब रस्ता; उजुकार. 'धातु टेंकुळिआं तेंचि दशन। उजुवाट तेंचि रसना ॥' –दाव ९७. [सं. ऋजु+वर्ति]

उजुवाडु—पु. उजेड; प्रकाश. 'सरेल उपरा प्रतिरात्री दिनु। सकळें दिशा उजुवाडु होउनु।' –ख्रिपु. २.४४.१९४. [सं. उज्ज्वल]

उजू—स्त्री. उजूर या अर्थी चुकीनें वापरतात. 'कुळाची उजू न करतां रुपये देईन.'

उजू—न. (नमाजापूर्वीचें) हस्तपादप्रक्षालन. [अर. वुजूह= चेहेरे, वक्ष=चेहरा याचें अव.] **०तवाजू**–स्त्री. नमाज; प्रार्थना. 'तों अब्दुल अली दुराणी जुमा मशिदींस येऊन आपला स्वधर्म उजू–तवाजू करीत होता.' –भाब. २७.५२. [अर. वुझू+तवाझुअ= नम्रता] **०नमाज**–पु. प्रार्थना. 'याजबद्दल पांच वख्त उजूनमाज करून इलाही नजीक रावसाहेबांचे हकामध्यें दुवा याद करीत आहों.' –रा १.६३. [अर. वुझू+नमाझ=प्रार्थना]

उजू, उजूबुजू—स्त्री. आदर; मान; मर्यादा; सन्मान. (क्रि० ठेवणें; राहणें; उडणें). [अर. वुझू]

उजूर—पु. अरुता, आक्षेप पहा. १ सबब; सबब सांगण्याचा हक्क. 'देव मजूर देव मजूर । नाहीं उजूर मेबेपुढें ॥' –तुगा ३७००. 'बायकोला नव–न्यापुढें उजूर नाहीं.' २ तक्रार; आक्षेप. 'उजूर असेल तरी हुजूर एणें.' –रा १५.१५९. 'नाहिं उजूर आपल्याविशीं रे जिवलगा।' –प्रला १२८. ३ अडथळा; विलंब; आक्षेप अर्थ ४ पहा. 'सेवकास आज्ञा होईल त्या आज्ञेस उजूर नाहीं.' –रा १०.२२६. ४ हक; अधिकार; वाजवी काम. ५ खोळंबून रहाणें; विचार करणें; वर पाहणें. अरुता अर्थ २ पहा. 'महिना भरल्यावर माझा उजूर न धरितां तुम्ही गहाण विकून ऐवज घ्यावा.' 'कुळाचा उजूर न धरितां मी खुदनिसबत फडशा करून देईन.' [अर. उझ्र=बहाणा]

उजूरुजु— क्रि.वि. (गो.) रुजवात करून; बजावून 'त्येकां पैशे उजुरुजु करून दिले मूं.' [अर. रुजू=परत पाहणें द्वि. उजू]

उजूहातीं—क्रिवि. सरळपणानें; भानगड न करतां; ऐन जिनसीं. [उजू+हात]

उजेड—पु. १ प्रकाश. 'दाही दिशा उजेड।' –मुआदि १९. १९४. २ प्रकाश देणारी, पाडणारी वस्तु; दिवा. 'अंधार पडला कांहीं उजेड सेंगें घ्या.' [सं. उज्ज्वल किंवा उद्योत; प्रा. उज्जोअ; अथवा सं. उद्दयित–उज्जइड–उजेड. –भाअ १८३२.] **०पाडणें–लावणें–करणें**–१ (उप.) अपकीर्तिरूप कृत्यें करणें. 'म्हणती भावानें उजेड केला । कीर्तिध्वज उभारिला।' –नव १८.३९. २ शतकृत्य करणें. 'आम्ही तर हात टेकले! आतां तुम्ही काय उजेड पाडतां पाहूं.' कांहीं समानार्थी वाक्प्रचार –मशाल पाजळणें, लावणें; टेंभा पाजळणें; नगाऱ्यावर टिपरूं टाकणें, वाजविणें; दिवसां मशाल लावणें; बेचाळीस पिढ्या अथवा कुळें उद्धरणें; वडिलांचें नांव गाजविणें. **०पडणें–होणें**–१ प्रकाश पडणें. २ (उप.) अपकीर्ति होणें; छीः थूः होणें.

उजेडणी—स्त्री. (कों.) चूड; ताड, माड वगैरेंच्या सावळ्या एकत्र करून सईलशा बांधून उजेडासाठीं पेटवितात ती; टेंभा. [उजेड]

उजेडणें, उजाडणें—अकि. प्रभात होणें; सूर्योदय होणें. २ कार्यारंभ होणें. ३ अनुकूल काळ प्राप्त होणें; वेळ येणें; सुयोग येणें. ४ स्पष्ट होणें. 'म्हणोनि हें उजेडे।' –दा ६.६.२२. [सं. उद्योतन; प्रा, उज्जोअण; उज्ज्वलन]

उजेडतां–क्षणीं, उजाडतां–क्षणीं—क्रिवि. अगदीं पहाटे; दिसूं लागतांच.

उजेडता काळ—पु. १ उजाडावयाची वेळ; संधिप्रकाशाचा समय. २ (ल.) भावी भाग्याची प्रभात; चांगले दिवस येण्याचा समय. [उजेड]

उजेडाचा माणूस—(उप.) चलाख, पराक्रमी माणूस हा शब्दशः अर्थ; परंतु ध्वनि उलट होतो. [उजेड]

उजेरणें—उ.क्रि. (राजा) १ साफ करणें; गाळ, घाण वगैरे काढणें (पाटांतील) २ एखाद्याचा विशेत प्रवेश करून देणें; शिक्षित करणें. ३ (सामा.) उजरणें पहा. [उजळणें]

उजो—पु. (गो. कु.) विस्तव; आग. [सं. उद्योत; प्रा. उज्जोअ]

उज्ज, उज्जन—पु. (शाप.) वातावरणांतील एक वायु; हा अतिशय हलका व त्वरित पेट घेणारा आहे. हा वायु पाण्यांतील मुख्य घटक आहे. (इं.) हायड्रोजन [सं.] **०गंधकिद्**–पु. एक वायु. याची फार दुर्गंधि सुटते. धातूच्या गंधकिदावर अम्ल ओतलें म्हणजे हा उत्पन्न होतो. (इं.) हायड्रोजनसल्फाइड. **०प्राणिद्**–(इं.) हायड्रोऑक्साइड; हायड्रोनाइड. **उज्जित**–(इं.) हायड्रेट. **उज्जिद्**–हायड्राइड.

उज्जनचलनी—न. उज्जैन येथें चालणारें; उज्जयिनी येथील शिंदेशाई नाणें. –पया ४६९ [उज्जैन+चलन]

उज्जीवन—न. १ जागृति; प्रगटता; प्रगट होणें. 'जें उज्जीवन जहालें। ज्ञानाग्नीचें।' –ज्ञा ४.१३३. २ चेतना; उत्तेजन. 'तैसें

रायभोग समृद्धि। उज्जीवन नोहें जीवबुद्धि।' –ज्ञा २.६८. ३ भोगसाधन. –हंको. [सं. उत्+जीव्–जीवन]

उज्झड—वि. उद्धट; दांडगेश्वर; उर्मट. [सं. उत्+झट्; उद्धत; हिं. उज्झड=गांवढळ]

उज्झित—वि. टाकलेलें; सोडलेलें; त्यक्त. [सं. उज्झ्=सोडणें]

उज्वड—पु. (कों.) उजवाड पहा.

उज्वल—वि. १ सतेज; चकचकीत; प्रकाशमान. २ स्वच्छ; शुद्ध; पवित्र; उजळ पहा. [सं. उत्+ ज्वल्]

उज्वलन—न. १ जळण्याची, प्रकाशित होण्याची क्रिया; पेटविणें. २ तजेला, जिल्हई देण्याची, स्वच्छ करण्याची क्रिया; चकचकीत करणें. [सं.]

उज्वलित—वि. १ पेटविलेला. २ प्रकाशित केलेला; जिल्हई दिलेला. ३ प्रकाशमान; तेज.पुंज. [सं.]

उज्वाट्टयार—क्रि.वि. (गो.) पहाटेस. [उजेड]

उज्वाड—पु. (गो.) उजेड; प्रकाश. 'उज्वाडाक हडप' =प्रकाशांत आणणें; प्रसिद्ध करणें. [उजेड]

उज्वहलज—स्त्री. (चंद्रपुरी) बाहेरील दरवाजाला लागून आंतील दोन बाजूस असलेली बैठक; देवडी. [उज्झ्+लग ?]

उट—स्त्री. हुटहुट; कटकट. –शर (तुगा. ई. ७९.) [ध्व]

उट—स्त्री. चाकाला प्रतिबंध करण्यासाठीं लावलेली उटी; ऊट; टेंकू; दगड. [उटणें]

उट—पु. ऊत पहा ०**उतरणें**–रग जिरविणें; नक्षा उतरणें.

उंट—पु. (कुण.) उट. १ (सैन्यादिसंबंधीं) ओझें वहाणें इत्यादि उपयोगी एक पशु. अरबस्तानासारख्या वाळवंटाच्या प्रदेशांत उंट असतात व तेथें त्यांच्याशिवाय दुसरें कोणतेंहि जनावर वाहतुकीला उपयोगी नसतें. २ बुद्धिवळाच्या खेळांतील एक मोहरें. याची गति सर्व बाजूंनीं तिरपी असते व तिची मर्यादा पगाच्या अखेरपर्यंत असते. [सं. उष्ट्र; अवेस्ता उश्त्र; तुल. फा. शुतुर; प्रा. उट्ट] **उंटावरचा–शहाणा**-मूर्खपणाची मसलत देणारा. (रांजणांत रेडकाचें डोकें अडकलें असतां एका उंटावर बसून जाणाऱ्यानें प्रथम आंत येण्याकरितां घराची भिंत पाडण्यास सांगून नंतर रेडकाची मान कापून मग रांजण फोडावा अशी सल्ला दिली या गोष्टीवरून). 'तिसरे एक उंटावरील असें विचारतात' –टि ४ ४१. **उंटावरून शेळ्या हांकणें**–अतिशय आळस किंवा हलगर्जीपणा करणें. **उंटांवर बसून दक्षिण दिशेस जाणें**–एक अपशकुन: दुश्चिन्ह. 'घेऊनि उष्ट्रयानीं बैसुनि दक्षिण दिशेसि जाताहे।' –मोउद्योग १०.१७१. **उंटाचे बोथे**–न शिकविलेले उंटाचे बच्चे.

उटंक—वि. उतरणीची; उंचवटयाची; खडकाळ (जमीन) 'स्थिर होय सखोल भूमिके। येंबु न राहे उटंके। जाय निरसोनि।' विपू. १.८२. [सं. उत्+टंक=उतरण, उत्+स्था; प्रा. उट्ठ]

उटकटारी, उंटकटारी—स्त्री. एक वनस्पति; उताटी; कांटे चुवुक; हिची पानें कोपरे कातरल्यासारखीं असुन पृष्ठभागीं सफेत रंगाचे कांटे असतात. डांगया खोकल्यावर याची मुळी लहान मुलांच्या गळ्यांत बांधतात. सर्प, विंचू यांच्या विषावर हिचें मूळ उगाळून लेप देतात. मुळास ब्रह्मदंडी म्हणतात. ही उंटास प्रिय असते. [सं. उत्कट; गु. उटकटो; हिं. उटकटाव]

उटकर्णे—अक्रि. उचाटन होणें; वेगळें पाडणें, होणें; दूर करणें. 'सर्वांरंभा उटकलें।' –ज्ञा १४.३६६. [सं. उत्+टंक्–बांधणें; उत्+टंक्=खरडणें; म. ऊठ करणें ?]

उटकण—न. १ दूर होणें. २ अवर्षण. –शर.

उटकर–ळ—स्त्री. उठकळ पहा. –वि. हलणारा; डळमळणारा; सैल; खिळखिळीत झालेला (दगड). [सं. उत्थ+कृ; प्रा. उट्ठकु; म. उठकर]

उटकळी—स्त्री. (राजा.) तोंड येणें; तोंडांत खरे, पुटकळ्या येणें.

उटक्कर—वि. उर्मट; मग्रूर; उद्धट. (क्रि० येणें.) [सं. उट्=मारणें, पाडणें]

उटंगणी—स्त्री. एक वनस्पति. –मुंव्या ११२ [?]

उटंगर–ळ—न. १ उंचवटा; लहान टेकडी; टेंब. २ शरीरावर असलेलें आवाळू; गलेड; टेंगूळ. ३ एखादी जड वस्तु लोढून नेतांना खालीं जो दगड लावितात तो. –वि. १ वर खालीं झालेला; उंचसखल; उच्चनीच; खडबडीत; डळमळीत. २ उटंगळें असणारा (प्राणी, जमीन). [सं. उत्+स्था+गल्; प्रा. उट्ठगल] –क्रिवि. उंचसखलपणानें.

उटज—न. पर्णकुटी; झोंपडी; पर्णशाळा. [सं. उट=गवत, पानें+जन्–उटेभ्यो जायते इति]

उटणें—न. १ अंगास लावण्यासाठीं केलेला अगेजा इ. सुगंधी पदार्थ; उटी. 'उटणें लावूनि घातलें स्नान.'–कमं ५७. 'कां सूर्याचिया आंगा उटणें । लागत असे॥' –ज्ञा १०.१०. २ उटी; उटणें अंगाला लावणें, माखणें; मर्दन. [सं. उद्वर्तन; का. ऊटणे= अंगाला तेल, लेप लावणें]

उटणें—अक्रि. १ माखणें; चोपडणें; लावणें; चर्चिणें. 'श्रीमहादेवो कापुरें उटिला॥' –ज्ञा ११.२२२. 'हळदी भीनली हेमकळा। तेंणें उटिलें मुखकमळा।' –एरुस्व ७.३४. 'भीमकी सुकुमार गोमटी। कृष्णा इसीं हळुचि उटीं।' –एरुस्व १६.८७. २ (राख, माती इ. नीं भांडें वगैरे) घांसून साफ करणें. 'हां हो उटोनिया आरिसा।' –ज्ञा ११.१५७. 'कापुरासी काय लावुनी उटावें। काय ओवाळावें दीपकासी॥' –तुगा ४४२३. 'अन् भांडीं उटाया गेलों होतों.' –सागो प्र. १. १. ३ धुणें. 'वृद्ध परंपरा ऐसी आहे। वरचरण उटी

वोहमाये।' –एरुस्व १४.८९. 'मग तें मंगळरूप पाळलें। ते सुमेधेनें उटिलें ॥' वेसीस्व ९.२९. 'क्षणभंगुर जाउनी दुःख मायीक लोटलें। वदन उटिलें। रोमांच आंगीं उठले ॥' –पला ४५. [सं. उद्वर्तन; हिं. उवटन; गु. उटणु; सिं. उवटणु; का. उटणी–णें]

उटन—न. (खा.) घांसण्याची क्रिया. [उटणें]

उटंबर-रा—उटंगर पहा.

उंटमान्या—वि. उंटासारखी ज्याची मान आहे असा; विशोभित; उंटाड. [उंट+मान]

उंटवान—पु. (हिं.) उंट हाकणारा; सारवान. [म. उंट+सं. वत् प्रत्यय]

उटा—पु. चाकाची गति खुंटविण्यासाठीं चाकाखालीं ठेवलेला दगड; अटकण. (क्रि. देणें). ऊट पहा.

उटाउटीं—क्रिवि. (प्र.) उठाउठीं; तत्काल. 'गौरजानु पयोधरकटी। अवलोकितां उटाउटीं ॥ धैर्य पळालें वारा वाटीं। नाहींच झाला विचारु।'–मुआदि १५.१४३. [सं. उत+स्था द्वि.]

उंटाड—वि. विशोभितपणें उंच; उंटासारखा उंच. [सं. उष्ट्राढ्य=उंटाड]

उटाणटेंगळा—उटंगळ पहा. [सं. उत्थान; प्रा. उट्ठाण; म. उठाण+टेंगूळ]

उटारेटा-ठा-टी-ठी—पु.स्त्री. (प्र.) उठारेंटा. १ उठाठेव; हवळाढवळ; उपद्व्याप; नसता उद्योग, भानगडी; लुडबूड. २ (लहान मुलांची) चुळबूळ; चळवळ; वळवळ; नाचरेपणा. ३ उडदाउडव; चिवड. (अन्नाची–भूक नसतां केलेली). ४ थापेबाजी; बाप्पा. (क्रि. करणें). [उटणें+रेटणें]

उटारेंटी-टां-टीं—क्रि.वि. १ नसत्या उठाठेवींत; आळसांत; ठेवल्याबावल्या करण्यांत (कालाचा अपव्यय करणें). ०**म्ह**–दिवस गेला उटारेंटी मग दिव्यांत कापुस रेटी (किंवा बोटानें काडगाती लोटी). २ चिवडीत; उडवीत. (जेवणें).

उटारेंटीस येणें—उटारेंटा करणें. [उठणें+रेंटणें]

उटाळणी—स्त्री. १ उठावणी; प्रोत्साहन; उत्तेजन; प्रवर्तन; भरीं घालणें; चेव आणणें. २ उटाळण्याची क्रिया. [उटाळणें]

उटाळणें—उक्रि. १ (व.) स्पष्ट उच्चारला जाणें; लिहिलेलें अक्षर स्पष्ट उमगलें जाणें. 'श्वास लागल्यामुळें त्याचें बोलणें उटावत नाहीं.' २ अर्थ, हेतु, भाव स्पष्ट होणें, करणें; ३ उठविणें; उत्पन्न करणें; उच्चारणें. 'हला कसें नाम तुझें उटाळे ॥' –सारुह ३.२८. –दयाळ ९३. [सं. उत्+ताल्]

उटाळणें—उक्रि. उलथणें; हलविणें; उटाळा लावून ढकलणें. सं. उत्+तल]

उटाळा-ळी—पु.स्त्री. १ तरफ; जड पदार्थ उचलून फेंकण्यासाठीं त्याखालीं पहार वगैरे घालतात ती. (क्रि. देणें). २ अशी उचलण्याची, तरफेची क्रिया. (क्रि. करणें). ३ ढकलणें; जोर लावणें; धक्का देणें (पुढें ढकलण्यासाठीं); खांदा देणें. (क्रि. देणें). [सं. उत्+तल्=स्थापन करणें]

उटाळा—पु. १ स्पष्टोच्चार (वागिंद्रियापासून होणारा अक्षरांचा). २ स्पष्टीकरण; विशदीकरण; फोड; किल्ली (लिहिलेलें, गूढ श्लोक, इ० कांची). 'माझे या स्मरणाचे उटाळे वांचूनि आन नाहीं.'–भाए ६८३. ३ चेतणा देणें; प्रवृत्त करणें. [सं. उत् +तल्]

उटाळा—पु. (व.) उथळें; इमारतीच्या खांबास बुडांत दिलेला दगड. (इं.) बेस स्टोन. [उत्+तल]

उटाळें—न. चाकाची गति बंद करण्याकरितां, तें चंद्दं–ढंढं नये म्हणून त्याखालीं ठेवलेला दगड, अट.

उटिंगळ—(कों.) उटंगर पहा.

उटिंबर-रा—नपु. टेंगूळ; गांठ. उटंगर पहा.

उटी—स्त्री. उटणें पहा. १ सुवासिक द्रव्यापासून तयार केलेला पदार्थ (चंदनादिक). (क्रि० करणें). २ उटण्याचा लेप. (क्रि० लावणें). 'तो जैसा काळलोहें डवरिला। नातरि प्रलैभांधकार उटी ओळघेला।' –शिशु ९९९. 'उटी चंदनाची शरीरा दुपारी।' –कर्म १०२. 'आंगीं शेंदुराची उटी।' –गणपतीची भूपाळी ३. [सं उद्वर्तन–उद्वर्ति–उवट्टि–ऊट्टी–उटी. –भाअ १८३२. का. उटणी]

उटी—स्त्री. (कु.) उडवी; एक स्तंभ पुरून त्याचे भोंवतालीं तृण वगैरे वरपर्यंत येईल अशी रचना; गवताची गंजी. [सं. उट=गवत]

उटी—स्त्री. चाकाची गति बंद करण्यासाठीं जो दगड लावतात ती. उटा, ऊट पहा.

उटी—स्त्री. तेज; माहात्म्य. (क्रि० उतरणें). 'सर्वेंचि इंद्रपणाची उटी उतरे।' –ज्ञा ९.३२८. 'तीर्थांची उतरली उटी।' –एभा ११.७४५. 'उतरल्या तीर्थांचियां उटी।' –एभा १.३०८. ऊत पहा. ०**उतरणें**–महत्पदापासून भ्रष्ट होणें.

उटीजणें, उटिजणें—सक्रि. १ उटणें; उटी लावणें; माखणें. 'कापुराचेनि पराग उटीजती। मोतियांचेनि रसें न्हाणीजेती।' –शिशु २८१. २ घांसून स्वच्छ करणें 'न घडितांचि आरिसा। उटिजे काई ॥' –अमृ ७.६२. [उटणें]

उंटीण—स्त्री. उंटाची मादी; सांड. [उंट; हिं. उटान]

उटींव—वि. खरवडून काढलेलें; घांसलेलें. [उटणें]

उटें—न. (विरू.) उटें पहा. वाईट कर्मांचें प्रायश्चित्त; सुडाचें कृत्य; पारिपत्य. 'बहुत लोकांस तुवां पीडिलें। त्याचें उटें आज निघालें।' –ह ९.८१. 'पाहिजे तर त्याचें उटें त्यानें दुसरें वेळीं घ्यावें.' –बाळ २.१८५.

उटेरेटें—न. उठाठेव, उपद्याप. उटारेटा पहा. 'आतां सांडिलें उटेरेटें।' –शिशु १३६.

उट्टें—न. मोबदला; वचपा; भरपाई; तोडीस तोड; सूड; खरडपट्टी. 'पण आज येऊं दे तरी, म्हणजे त्याचं सगळं उट्टं काढतें.' –तोबं. अं. २.प्र. १. [सं. आ+वृत्त; प्रा. आउट्ट; किंवा सं. आकुट्ट; प्रा. आउट्ट=हिंसा] **०काढणें–उगवणें–घेणें**–जशास तसें करणें. 'आठवुन सगुण तिळतिळ काढीन उटे तें.' –प्रला १५७.

उठकट–र—स्त्री. हकालपट्टी. उठकळ पहा.

उठकळ–ळा—स्त्री. १ उठण्यास होणारें कारण; उठण्याची निकड, गरज. (क्रि० आणणें; लावणें; येणें). २ उठण्याची बुद्धि; हुद्दुटी; सुरसुरी (मनांतून किंवा बाहेरच्या कांहीं कारणानें येणें). (क्रि० लागणें; येणें). ३ हकालपट्टी; पराभव. ४ स्थलांतर; बाराबाटा होणें (गांव, कुटुंब इ० कांचें) **०येणें**–दुसरीकडे जाण्याचा हुकूम होणें, भाग पडणें. 'हा सुभेदार आला, त्या सुभेदारास उठकळ आली.' [उठणें+कळ]

उठकळें–लें—न. हकालपट्टी; पराभव. 'उठकळें करूनि दैत्यासी।'–भाए ४१. 'मारौनि गजरथांची दळें। वीरांचें उठकळें केलें।' –शिशु १०६१.

उठंगार, उठंगार— पु. (गो.) महापूर.

उठणें—अक्रि. १ उभें राहाणें. बसणें याच्या उलट. २ (ल.) वर येणें; आकाशांत वर जाणें (धूर, धुराळा). ३ जागें होणें; शुद्धीवर येणें (झोपेंतून, मूर्च्छेतून). ४ बरखास्त होणें, संपणें (सभा, बैठक वगैरे). 'चार वाजले म्हणजे कचेरी उठते!' ५ (सैन्य वगैरे) चालू होणें; बाहेर पडणें; सज्ज होणें; हल्ला करणें. 'भट दशसहस्र उठले जे आज्ञाकर सुयोधमाचे हो!' –मोभीष्म ६.६१. ६ उद्भव जाणें (एखाद्यावरील मन, प्रेम); उद्विग्न होणें; त्रासणें; कंटाळणें. ७ बंड करणें (एखाद्या विरुद्ध); सामना देण्यास तयार होणें. 'दुर्जन ज्याचें अन्न खातो त्याजवरच उठतो.' ८ स्पष्ट दिसणें; उमटणें. (ठसा, रंग, छाप वगैरे). 'उत्तम गुण तत्काळ उठे।' –दा १९.६.२०. ९ वर येणें; दिसावयास लागणें; बाहेर पडणें; उद्भवणें (पुरळ, सांथ, संकट, बातमी वगैरे). १० दुखावयास लागणें; (डोकें, कपाळ, मस्तक; शीर, त्याचप्रमाणें दाढ, दांत, कान, हात, पाय, या संबंधींही क्वचित उपयोग करतात). 'निघाल्या देवी आणि गोवर। उठलें कपाळ लागला ज्वर।' –दा ३.२.२६. ११ ताजेतवानें होणें; फुलणें; टवटवीत होणें; आनंदित होणें; (मनुष्य, प्राणी, वनस्पती वगैरे); खुलून दिसणें (रंग वगैरे.). १२ आकसानें आळ घेणें; कुभांड रचणें (मनुष्यावर; घराण्यावर वगैरे). १३ खुणा पडणें; उठून दिसावयास लागणें (वण, वळ, चाबकाचा मार, दांताचा चावा). १४ करवणें; उरकणें; पार पडणें (काम वगैरे). 'माझ्याच्यानें पहिल्यासारखें कामही उठत नाहीं.'–विवि ८.८.१५३. १५ वस्ती वगैरे उठून जाणें; ओसाड पडणें. १६ उत्पन्न होणें. 'उठती घनपटळें। नाना वर्णें।' –ज्ञा ८.३०. 'शब्द पडसाद उठला। म्हणे कोण रे बोलिला।' १७ (व.) खर्च होणें; खलास होणें; संपन जाणें. 'इतके तांदूळ आजच्या आज उठतील.' **म्ह०** उठणेवाल्याचें उठतें कोठीवाल्याचें पोट दुखतें.' १८ पूर येणें. 'जसें महाप्रळयीं जळ। उठलिया भरे ब्रह्मगोळ।' –विउ ११.८६. १९ वाढणें. 'चार शिंपणी लागोपाट सांपडतांच पहिल्यापेक्षां चार वोटें भाजी उठली.' २० प्रवृत्त होणें (वाईट करण्यास). 'मी इतकें बोलतांच तो जीव ध्यावयास उठला.' २१ क्षोभ होणें (पित्तादिकांचा). २२ नवीनच गोष्ट प्रसिद्ध होणें; प्रचारांत येणें. 'बारावर्षांचे मागलें देणेघेणें कोणी देऊं नये, मागूं नये असें हें अलीकडे नवेंच उठलें.' २३ एखाद्यानें लौकिकानुरूप मर्यादा सोडून वर्तन करणें. २४ उभें होणें; तयार होणें (इमारत वगैरे.) 'ते राजवाडा उठे.' –विक ११. २५ वाटणें; मनांत येणें. 'झोंबी घ्यावी ऐसें उठे।' –दा२.६.१५ [सं. उत्+स्था; प्रा. उट्ठ, सिं. उथणु; जिप्सी सीगन उष्टी; जिप्सी फ्रेंच उट्ठी] **उठून जाणें**–१ परवानगीशिवाय निघून जाणें; पळून जाणें; रागानें चालतें होणें. 'त्याची थट्टा सुरू होतांच तो मंडळींतून उठून गेला.' **माणसांतून उठून जाणें**–१ रीतभात सोडणें; अनीतीच्या मार्गाला लागणें. २ परपुरुषाबरोबर निघून जाणें (स्त्रियांच्या बाबतींत). 'खरेंच कां रूपमाया सेनापती उठून गेल्या.' –वाय ४.३. **उठून दिसणें**–स्पष्टपणें नजरेस येणें. **नित्य उठून, रोज उठून**–क्रिवि. दररोज नेमानें; नित्य; रोजच्यारोज. **उठला ठाव देखवत नाहीं**–उठून जेवावयाचें पानहि मांडतां येत नाहीं (इतक्या निर्बलतेचें द्योतक).

उठतबसत—क्रिवि. खुरडत; थोडें चालत व थोडी विश्रांति घेत; थांबून थांबून; धीरे धीर (काम करणें, जाणें). (अति अशक्ततेचें द्योतक) **उठतांबसतां–पडल्यां, उठल्याबसल्या–सुटल्या**–क्रिवि. क्षणोक्षणीं, हरघडी, सदासर्वदा; जेव्हां पहावें तेव्हां; एकसारखें; अहोरात्र. 'अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां।' 'उठतां बसतां जर असे मुलाला मारूं लागलां तर तो कोडगा होईल.' 'उठल्यासुटल्या चहा पिण्याची संवय फार अपायकारक बरें!' **उठतांबसतां उपवास–निराहार–नवरात्र**–नवरात्रांतील घटस्थापनेच्या दिवशीं व शेवटच्या दिवशीं उपास करण्याची पद्धत. **म्ह०** उठतां लाथ बसतां बुक्की=सदांसर्वदां माराचा धाक किंवा मार. 'तुला उठतां बसतां असें पाहिजे; एव्हढीं तूं ताळ्यावर येणार नाहीस!' [उठणें+बसणें]

उठपळ—स्त्री. १ एकसारखें पळून जाणें (असंतोषी नोकर किंवा सून वगैरेनें). (क्रि० लावणें). २ त्रासदायक, जुलमी वागणूक, गांजणूक, (पळून जावयास लावण्याइतकी); हाल करणें; छळ करणें. (क्रि० लावणें). ३ अस्थिरता; असंबद्ध वागणूक; चंचलता; उतावळी. (क्रि० करणें; लावणे; मांडणें). ४ जावयास निघणे. (क्रि० करणें.) –क्रिवि. एकसारखा; पुन्हांपुन्हां; अविश्रांत; उतावीळपणानें. 'हा पोर उठपळ खेळायला जातो.' [उठणें+पळणें]

उठपाय—क्रिवि. एकसारखे पुन.पुन्हां; उठपाय पहा. [ऊठ+पाय]

उठबशी-सी, उठ बैस—स्त्री. १ उठण्याबसण्याची मेहनत; पुन:पुन्हां उठणें व बसणें. २ खलबळ; चळवळ (अस्थिरता द्योतक). ३ नसता खटाटोप, उठाठेव. **म्ह०** कोणाच्या म्हशी कोणाला उठाबशी. ४ बैठका (व्यायामाचा एक प्रकार). [उठणें+बसणें]

उठबस करणें–(कों.) आदरातिथ्य करणें.

उठवण-णूक, उठवळ—स्त्री. बसलें असतां स्वत. उठवत नाहीं,दुसऱ्यानें उठवावयास लागावें अशी अवस्था (गुर्ें, घोडे इ० ची) उठून उभें राहण्याची सुद्धां शक्ति नसणें. 'उठवणें ताठा करक'–दा ३.६.४७. 'आतां सवेथा उठवण्या।' –एभा ११. १२०९. (क्रि० घेणें) २ (ल.) आपत्ति; दारिद्र्य; दैन्य; दुर्बल दशा. **०मोडणें**– १ शक्ति परत येणें. २ दारिद्र्य, निराशा यांपासून सुटका होणें; **उठवणीस येणें**–(कों.) १ अतिशय अशक्त होणें; मरावयास टेकणें; उठवण घेणें; दुसऱ्यानीं उठवावें लागणें; (सामा.) अतिशय दमणें; थकणें. 'वैरणचारा महाग याजकरितां घोडीं व उंटें उठवणीस येऊन, अस्थिचर्मे जाहालीं.' –भाब ५६. [उठविणें]

उठवण—स्त्री. (गो.) कुणबी लोकातील देवकृत्य. देवक उठविणें [उठविणें]

उठवण(णे)कर-करी-करू—वि.उठवणीस आलेला (मनुष्य, बैल); बिछान्याला खिळलेला (रोगानें, वार्धक्यानें). 'मागचे वर्षापासून तो उठवणेकरी बनला आहे.'

उठवळ—वि. १ आळशी; कामचुकार (उठवणकऱ्यापमाणे वागणारा). **म्ह०** उठवळ सासू थोंट जावई. २ चळवळ्या; उच्छृंखल. ३ बेफिकीर. 'उठवळ संसार करून कसें चालेल?' [उठविणें]

उठवळ—स्त्री. (उटकळ या अर्थी 'चुकीनें') हकालपट्टी; उच्चाटन; अवनति. **०येणें-लागणें**–उच्चाटनाची वेळ. 'फीमेल ट्रेनिंग कॉलेजला उठवळ आली आहे.' –केले १.५१.

उठविणें, उठवणें—उक्रि. उठणें प्रयोजक. १ उचलणें; वर करणें; उच्च स्थितीला नेणें; उंच करणें; उभें करणें. २ जागृत करणें;जागें करणें; उठावयास लावणें. **म्ह०** निजलेल्याला कोणी उठवील, जाग्याला कोण उठवील? ३ चेतना देणें; प्रवृत्त करणें; क्षोभविणें; उठावणी करणें. ४ दुखावयास लावणें (डोकें). ५ (कंडी) पिकविणें; जाहीर करणें (बातमी, गोष्ट). ६ उत्पन्न करणें; काढणें. 'जे उठवी शब्दांकुर। वदे वैखरी अपार।' –दा १.३.२. 'विचार न करतां वांधा उठवून ... अडथळा आणूं नये.' –स्वारीनियम (बडोदे) ४७. ७ पार पाडणें; बजावणें. 'सूचना होतील त्याप्रमाणें नोकरी उठविण्याची आहे.' –स्वारीनियम (बडोदें). २४. ८ चोरणें; लांबविणें. 'चोरट्यांनीं स्वयंपाकाचीं दोन भांडीं उठविलीं.' –विवि ८.११.२०८. ९ रक्कम कर्ज काढणें; उचल करणें; खर्च करणें. [सं. उत्थापन; प्रा. उट्ठवण] **घरांतून उठविणें**–नादीं लावून पळविणें 'त्या स्वतंत्र बायका केव्हां कोणच्या म्हाताऱ्याला घरांतून उठवतील कांहीं नेम नाहीं. –बाय २.१. **जन्मांतून उठविणें**–आयुष्याचें मातेरें करणें (जार कर्मामुळें). 'माझ्या पोरीला अशी जन्मांतनं उठवलीन्.' –निचं १२५.

उठळ—वि. (व.) निरुपयोगी; आळशी. उठवळ पहा.

उठाउं—पु. जागृति; उत्साह; उठाव. 'बोध करितांही उठाउं नेघे।' –दावि २४. [उठणें]

उठाउठी—क्रिवि. तावडतोब; त्वरेनें; लवकर; तत्काळ; लागलीच; झटकर; त्वरित; एकदम; जलदीनें. 'आतां उठाउठी। असकेयां ब्रह्मगोळकां देइनु मोठी।' –शिशु ९२१. 'वृश्चिक देखतां उठाउठी। पादरक्षा आठविजे।' –मुआदि ३४.८५. '(मी) दीऊं नेणें जडीबुटी। चमत्कार उठाउठी।' –तुगा १८१६. 'वय चालिलें कीं उठाउठी।' –दावि १५७. 'कित उठाउठी भयभीत मरण पावले।' –ऐपो ३६७. [उठणें द्वि.]

उठागीर—वि. १ (निंदा व्यंजक) प्रवासी; मुशाशर; उपऱ्या; तात्पुरती वस्ती करणारा. २ उचल्या. [उठविणें+गीर प्रत्यय]

उठाठव-ठेव—स्त्री. १ रिकामी लुडबुड, खटपट; पंचाईत; दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ (क्रि० करणें). 'पंचभूतिक उठाठेवी। न चले तेथें।' –दा १.४.३०. **म्ह०** विधवेला (बोडकीला) कुंकवाची उठाठेव कशाला पाहिजे. २ बरदास्त; सरबराई; व्यवस्था. 'घायाळ समशेर बहादर कुंभेरीस आला, तिथें सुरजमल्ल जाट यांणें त्याची बहुत उठाठेव करून घोडी व पालखी देऊन वाटेस लाविला. –भाब १६२. ३ कामाची दगदग; खटाटोप; खटपट. ४ इकडच्या तिकडच्या कुचाळक्या करणें, भलतें सलतें उठविणें. [उठविणें+ठेवणें]

उठाण-णें—न. १ उठवणी; उसळी; उमेद; तीव्र प्रवृत्ति. 'कीं ते समर्थी मनाचें उठाण।' –यथादी १०.२५८; ११.८८७. २ उन्नतता; उठावदारपणा (स्तनांचा). 'उठेत वक्षोरुह हे उठाणें।' –सारुह २.५६. ३ सूचक लक्षण; चिन्ह. 'तों देवकीस वरिती विरश्रीउठाणे।' –कृष्णजन्म (देवनाथ) २३. [सं. उत्थान; प्रा. उट्ठाण; हिं. उठाना]

उठाणूं—न. गळूं; वेंड (शरीरावर उठणारें). [उठाण]

उठा (ठो) पायीं— उठपाय पहा.

उठाबशी—उठबशी पहा.

उठारेठा-रेंठ-ठी—उटारेटा पहा.

उठाव—पु. १ वर आलेला भाग. २ शरीराची ठेवण, स्वरूप. 'आणा धरोनि मृग हा, कैसा दिसतो मनोरम उठावें।' –**मोवन** ११.१९. ३ उचल; सरसावणें. 'किंवा अमृत क्षीरसागरीं। येती लहरींवरी लहरी॥ तैसी द्रौपदी राजकुमरी। उठाव करी दुसरेनें॥' –ह ३४.२८. ४ खर्च. ५ (शिल्प) उठावाची नक्षी; उचलून

दिसणारें काम; वर दिसणारी, कोरलेली आकृति. (इं.) रिलीफ. उ० उठावाचा नकाशा. ६ पदांमध्यें बदललेल्या चालीवरून पुन्हा मूळच्या चालीवर व ध्रुवपदावर येणें (वणी येथील गोविंदकवीच्या पदांतून असे उठाव आढळतात). –स्तोत्रमाला २६८. [उठावणी]

उठावणी––स्त्री. उठविणें पहा. १ उत्तेजन; प्रोत्साहन. २ जोरानें पुढें सरसावणें; उचल करणें. ३ बंडखोरी; डोकें वर काढणें; हल्ला करणें; स्वारी करणें. 'इंग्रज लोक जितक्या वेळां उठावणी करतील तितक्या वेळां त्यांना चोपून काढायचें.' –इंप १४४. ४ उद्युक्त होणें; पुढें होणें. ५ जागृति. ६ (कों.) शिफारस; प्रशंसा. ७ उभारणी सजावट. 'अशा धर्तीवर मेनका पात्राची उठावणी खुबीदार... झाली असती' –नाकु ४७. ८ तळ हलविणें, निघण्याची तयारी करणें; कूच करणें. ९ उठविणें; दारिद्र्य, संकटें यांतून वर काढणें. १० उचलणें (ओझें वगैरे). ११ जैन किंवा वैष्णवांमध्यें मृताच्या तिसऱ्या दिवशीं करण्याचा विधि. [सं. उत्थापन; प्रा. उट्ठावण; हिं. उठावना]

उठावणें––अक्रि. १ पुढें होणें; उद्युक्त होणें; तयार होणें; सरसावणें; एखाद्या उद्योगासाठीं आवेशानें लागणें; मनापासून कामास लागणें. 'पत्रिका वाचिताचि गोपाळा । पुढें भीमकी देखे डोळां । बाह्या पसरूनि उतावेळा । आलिंगना उठावला ॥' –एरुस्व ४.६२. २ हल्ला करणें; छापा घालणें; स्वारी करणें; युद्धार्थ चालून जाण्याकरितां उठणें. 'काळरात्रीची कटकें । उठावलीं जैसीं ॥' –ज्ञा ११.१९९. 'गदा पडताळोनिया करें । उठावला संमुख ।' –मुमभा १०.१५५. 'देहसमंधावरी लोटला । संकल्पावरी उठावला ॥' –दा ५.९.४२. 'मृगेंद्रावरि जंबुक । अपार जैसे उठावले ।' [सं. उत्थापन, प्रा. उट्ठावण]

उठावणें––सक्रि. (गो.) नक्कल, तालीक करणें; उतरून घेणें.

उठावदार––वि. डोळ्यांत भरणारा; चांगला उठाव असलेला; आकर्षक; ठळक. ०**चित्र**–न. पृष्ठभागाच्या वर आलेलें चित्र; उठावाचें चित्र. [उठाव+दार प्रत्यय]

उठावा––पु. उठाव, उठावगी पहा. १ निघून जाण्याकरितां उठणे; तळ हलविणें; कूच करणें; बाहेर पडणें. 'आतां उठावा करी ताता । नातरी त्यजीन मी जीविता ।' –कथा १.५.११२. २ शत्रूविरुद्ध उठणें; हल्ला; चढाई. 'दीधला वीरभद्रें उठावा' –उषा ११५२. ३ (अज्ञात स्थितींतून, दुखण्यांतून) बाहेर येणे. ४ बहार, उत्कर्ष. 'फुल वसंताचा उठावा । तो आनूंचि दिसे ॥' –शिशु २५९. ५ विस्तार; वाढ. 'तैसें जेथूनि हा आघवा । संसारतरूचा उठावा ॥' –ज्ञा १५. २०२. ६ प्रोत्साहन; उत्तेजन. 'उल्हासु वीरांचिया चित्तां । उठावा दीधला मागुता ॥' एभा ९.१३२. ७ आवेश; वेग. 'ऐसा दृढ वैराग्यउठावा । तेणें विहितांही बोळवावा ॥' –एभा १८.६५. [सं. उत्+स्थापय्; प्रा. उट्ठाव]

उठाळणी––स्त्री. उत्तेजन; उठावणी पहा. 'चाळीस हजार घोडा मदें दिली उठाळणी ।' –ऐपो ८५. [उठविणें]

उठाळून बोलणें––क्रि. (माण.) मोठ्यानें बोलणें. [उठविणें]

उठिंगण––न. (कों.) आधार. 'सोन्याचें ताट झालें तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे.'. [उठणें]

उठित––वि. (व.) मशागत केलेली. लागवडीस आणलेली; वहित (जमीन.) [सं. वह्-ऊढ; किंवा उत्थित]

उठी––स्त्री. उठावयास लावण्याची निकड; उठण्याची, निघून जाण्याची निकड. 'तुझें स्वरूप पाहतां दृष्टी । भयानें उठी उठावें.' –नव १४.७२. [उठणें]

उठीनिळियां––क्रिवि उठले असतां; उठल्यानें 'एकीं प्रेमें उत्कंठितां । पहावियां उठीनिळियां असामिता ।' –शिशु ६००. [उठणें]

उठूठ––स्त्री. कामाची शक्ति, निकड, तगादा, लकडा. (क्रि० लावणें, मांडणें; करणें) [उठ! उठ! किंवा उठ द्वि]

उठोळ––वि. (व.) आळशी; उठवळ पहा. 'ती फार उठोळ मावशी आहे, तिच्याच्यानें तें काम होणें शक्य नाहीं.'

उंड––पु. पोटांत उठणारा वायूचा गोळा; नळाश्रित वायु. 'त्याच्या पोटांत उंड धरला आहे.' [का. उंडे=गोळा; प्रा. उंडी=गोलाकार वस्तु, पिंड]

उंड––स्त्री. उंडीण वृक्ष. याच्या फळांतील बियांचें तेल काढतात.

उडकी––स्त्री. (गो) लहान उडी [उडी]

उडकी, उंडकी––स्त्री (कों.) उचकी. (क्रि० येणें) 'डोळे झांकले जिव्हा आड पडली । नेदी हुंकारा बोळखी मोडली ॥ उडकी हृदयांतु प्रवेसली । प्राणु सांडी वेठोवेळां ॥' –विपु २.२४. ८४.

उंडकी लागणें––क्रि. गोळी मरू येणें, (शेती) पाभरीचें वेर (भोंक) माती लागून बंद होणें आणि त्यामुळें खालीं धान्य न पडणें. –मसाप २५५.

उडंग-गु––पु त्रास [का उंडिग=फटिंग]

उडगण––स्त्री. गोगलगाय. 'उडगण चढों जाय भिंतीं ! तूंग लोटितां पडे पुढती ॥' –गुचिगाट ५.३०.

उडगण––पुन. नक्षत्रे. [सं. उडु गण]

उडगणें––उक्रि. (कर्ना.) झाडणें; केर काढणें. [का उडगु=झाडणें]

उंडगणें––अक्रि. उनाडणें. 'आस्ट्रेलियांत पुष्कळदां पुरुष घरांत चुलिकाराधन करीत असून, बायका रस्त्यांतून बाजारहाट करीत उंडगत आहेत असा चमत्कार दृष्टीस पडतो.' –महाराष्ट्र २६.६.१९३०. [का. उंडिग=फटिंग]

उंडगळ, उंडगा, उडगा—वि. निरुद्योगी; कामचुकार; उद्धाणटप्पू; भटक्या (मुलगा) [का. उंडिग]

उंडगा, उंडगादगड—पु. १ ओबडधोबड, खडबडीत धोंडा; ठोकळा; ओंडा. २ दांडगा, उद्धट मुलगा. [का. उंडिग]

उंडगेमासे—पु.अव. ज्यांस पिलें झालीं नाहींत असे मासे. –मरळ माशांची पैदास (बडोदें) ७.

उंडण–णी—स्त्री. १ किडी; आळी. 'उंडणी लंघू न शके भितीसी।' –एभा ५.९३.

उंडण–णी—स्त्री. उंडी; उंडीचें झाड. हें कोंकणांत होतें. याची पानें सुरंगीच्या पानांसारखीं मोठीं, गुळगुळीत, स्वच्छ असून पत्रावळी करतां येण्यासारखीं असतात. फूल पांढरें, सुवासिक असतें. फळें सुपारी एवढीं असून बियांचें तेल जाळावयाच्या उपयोगी पडतें. त्यास उंडेल म्हणतात. हें खरजेवर औषधी आहे. –वगु १. ६०. [सं. पुन्नाग]

उंडणटप्पू—उडाणटप्पू पहा.

उंडणें—अक्रि. १ भरारी मारणें; आकाशमार्गे गमन, संचार करणें (पक्षी वगैरेंनीं). २ आघात प्रत्याघातादि कारणानें स्थान सोडणें; मूळ स्थानापासून अन्यत्र जाणें, वर बाजूस उडी मारणें. 'चेंडू जसा वेगानें आपटाल तसा वर उडेल.' 'तोंडावर वस्त्र धरून बोल, नाहीं तर हुसऱ्याचे अंगावर थुंका उडतो.' ३ उल्लंघन करणें; ओलांडून जाणें; वरून उडी मारून जाणें. 'आडमार्गे उडोनि भिती.' –मुविराट ४.२४. ४ उंचावरून खालीं उडी मारणें. ५ झडप, झेप घालणें, तुटून पडणें; रागानें, आवेशानें चालून जाणें. ६ नाहींसें होणें; निघून जाणें; संपणें. 'ते रात्री येतां सुर्यापुढें। स्वकार्यासी सगळी उडे।'–एभा २०.२८१. 'मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला।' –राम ६२. ७ एकदम अदृश्य होणें; दिसेनासें होणें. 'दिवस बुडाला, मजूर उडाला.' ८ कोमेजणें; निस्तेज होणें; रंग विटणें; अस्पष्ट होणें; फिक्का होणें. 'या चित्राचे रंग उडाले आहेत' ९ खपणें; खलास होणें; खर्च होणें (द्रव्य, जिन्नस); 'त्याचा सर्व पैसा चैनबाजींत उडाला.' '(कोशाच्या) दरवर्षी लाखों प्रती उडत असल्यामुळें ते (ठसे) झिजून जातात.' –नि ६७७. खुंटणें; (धैर्य, धीर) सुटणें; (पाणी वगैरे) आटणें. १० मन विटणें; तिटकारा येणें; प्रेम नाहींसे होणें. 'तिचा आज जीवच उडून गेला होता.' –अस्तंभा १८८. ११ दुभतें जनावर दूध देत नाहींसें होणें, कोरडें पडणें; भाकड होणे. 'हल्ली आमची गाय उडाली आहे.' १२ बंदुक, तोफ पेटणें; गोळी सुटणें; स्फोट होणें; फुटणें. १३ युद्ध, भांडण वगैरे जुंपणें. १४ मजा, गंमत, दुष्काळ, अरिष्ट, भांडणतंटा, अव्यवस्था वगैरे उत्पन्न होणें, सुरू होणें, वाढणें, माजणें. 'चालिले उडत गर्जत' –दावि २६८. १५ बळावर, आशेवर काम करणें; अवलंबून कार्य करणें (द्रव्य, सत्ता, वचन वगैरेवर). 'कशाच्या बळावर उडतोस?' १६ संभोगार्थ उडी मारणें–चढणें (पशु वगैरेंच्या बाबतींत–नर पशूनीं मादीवर) १७ (ल.) गर्व करणें; मद येणें; ताठा चढणें. 'ज्यांच्या बळें उडसि ते तिकडेचि मनेंहि तुजकडे देहें।' –मोउद्योग ४.१०९. १८ (ल.) वर मान करणें; भरभराटणें. 'सत्कीर्ति न दे उडों नवसुधेतें।' –मोमंभा २.४०. १९ भरधांव पळणें (घोडा वगैरे); वेगानें जाणें. २० एखाद्याची चाकरी, रोजगार सुटणें. २१ दोष, विरोध वगैरे दूर होणें, मावळणें; आरोप नाहींसा होणें; (शास्त्रादि विषयांवरील). २२ निसटून जाणें; पळून जाणें. 'पुढें धरितां मागे पेंचला। मागे धरितां पुढें उडाला। ऐसा सांपडतचि गेला। ठाईठाईं॥' –दा १७-४.३. २३ (शाप.) वाफ होऊन जाणें; बाष्पीभवन होणें. (इं.) व्हेपराईझ, इव्हॅपोरेट. [सं. उद्+डी, उड्डान; फ्रेंचजिप्सी उरी] **उडून चरणें**–(लु.) ऐषआरामांत, थाटामाटांत राहणें; राजदरबारीं मानसन्मानानें राहणें.

उडत जाणें–(ल.) खिजगणतींत नसणें; महत्त्व न देणें; न मानणें. 'नाहीं सांगितलेंस तर उडत गेलास!'

उडंत–स्त्री. वानरांची लढाई. –शर.

उडतउडत—क्रिवि. १ उड्या मारीत; नाचत–बागडत; एकाच क्रमानें; वेगानें नाहीं अशा प्रकारें (जाणें, येणें). २ अनिश्चितपणें; अनिर्धारकपणें; संदिग्धपणें; अस्पष्टपणें (सांगणें, बोलणें, ऐकणें). 'हें काम त्यास होणार नाहीं अशी बातमी मी उडतउडत ऐकली.' ३ कर्णोपकर्णी (एकाकडून दुसऱ्याला अशी बातमी इ० येणें). ४ संक्षेपानें; सारांशरूपानें; अधून मधून. 'सगळी कथा सांगावी तर वेळ लागेल उडतउडत सांगतों.' 'तिनें उडत उडत जबाब दिला' –विवि ८.३.८२.

उडतक––न. घोड्याच्या अंगावरील गाशाखालील वस्त्र.

उडतघुमा—वि. (भोंवऱ्याच्या खेळांत) दूर उडून तेथें फिरत राहील अशा तऱ्हेनें टाकलेला; उडून घुमतो असा टाकलेला (भोंवरा) [उडणें+घुमणें]

उडतपगडें—न. सोंगट्याच्या खेळांतील एक डाव. (क्रि० करणें) [उडत+पगडा]

उडतबातमी—स्त्री. बाजारबातमी; गप्प; भुमका; सहज समजलेलें पण संशयित वर्तमान; कर्णोपकर्णी ऐकलेली वार्ता.

उडतरुमाल—पु. १ मर्दुमकी करणाऱ्या महार वगैरे हलक्या जातीच्या लोकांसाठीं योजिलेला किताब. २ लढाई थांबविण्याची खूण. [उडणें+रुमाल]

उडतहत्यार—तोफांची मारगिरी; गोलंदाजी. –रा ३.२९३.

उडतापील—पु. उफाड्यानें वाढणारें मूल; थोराड मुलगा; धडाडीचा, पुढें नांवारूपास चढेल अशीं चिन्हें दाखविणारा तरुण; हुषार, चलाख मुलगा. [उडत+पील=पिल्लूं, छावा]

उडतीपाटी—स्त्री. बलुत्यांपैकीं एक हक्क; धान्य उफणतांना महार जें जागलें घेतात तो हक्क; धान्य उफणायला जी पाटी घेतात तिला उडती पाटी म्हणतात, अर्थात् धान्य उफणणाऱ्या महारास त्या पाटीभर धान्य देतात त्यास उडती पाटी म्हणतात. –गांगा १००.

उडती वार्ता—स्त्री. उडतबातमी पहा. 'उडती वार्ता हे निजकथा।' –दावि २८७.

उडतें ऊन—न सूर्योष्ण; सकाळचें ऊन. [सं. उदयत्–उड्अत–उडत. –भाअ १८३४]

उडतें पाखरूं—न. १ उडणारा पक्षी २ (ल.) चंचल, अस्थिर माणूस; हंगामी. **म्ह०** उडतें पांखरूं पोटभरू. –के ८.१.२९. वाक्प्रचार–उडत्या पांखराचीं पिसें (शेटें) मोजणारा–मेज करणारा=(ल.) फार चलाख, हुषार मनुष्य; पाताळयंत्री मनुष्य; नुसत्या तर्कानें एखादी गोष्ट अचुक ओळखणारा. (गो.) 'उडत्या पाखराची शेटां मोजप.'

उडंत्री—स्त्री. (कर्ना.) बैली; सुताचा ताणा मागावर चढविण्यापूर्वी पाजणी (उकी) करण्याकरितां लागणारे लाकडी घोंड. [का. हुड्ड=जोडणें+यंत्र]

उडद—स्त्री. (गु.) उडीद पहा. [का. उद्द्=उडीद]

उडद–दाण–दाण—न. उडदाची मळणी झाडल्यावर राहिलेला भुसा, भुसकट. **०णी**–वि. उडदाच्या रंगाचें, काळसर. उडदानी लुगडें; उडदानी रंग.

उडदळ—स्त्री. उडीद पेरण्यास योग्य अशी जमीन; जेथें उडीद पेरला आहे अशी जमीन. [उडीद+सं. आल=व्याप. का. आळ=व्याप्ति, भूमि]

उडदाबेगम–ण—न.स्त्री. (बुद्धिबळ खेळ). मोंगली संप्रदायी बुद्धिबळांतील एक मोहरें; यांत घोड्याच्या ऐवजीं उडदाबेगम हें मोहरें असून त्याची गति ३॥ घरें असते. या उडदाबेगणीच्या खेळांत पटावर १०० घरें असतात. [तुर्की. उर्दू=सैन्य+बेगम=राणी; उडदाबेगम=हत्यारबंद, लढाऊ बेगम; बेगणी=अमीराची स्त्री]

उडदाबेगमी–बेगी—स्त्री. (हिं.) हत्यारबंद स्त्री; उडदाबेगणी. [तुर्की. उर्दू=सैन्य, तळ, लष्कर, बाजार+बेगम=स्त्री, तरुणी, राणी, बेगणी]

उडदांमुहूर्त—पु. लग्न, मुंज वगैरे समारंभांत आरंभीं सुवासिनी उडीद दळण्याचा जो समारंभ करतात तो; उडीद भरडण्याचा मुहूर्त, काळ. [उडीद+मुहूर्त]

उडदावळ—स्त्री. १ उडीद पेरलेली जमीन; उडदाचें शेत; उडदळ पहा. २ उडदी रंगाचें लुगडें. (काळ्या अंगावर पांढऱ्या चौकटी असणारें). [उडीद+सं. आल]

उडदी—वि. उडिदाच्या रंगाचें. **०लुगडें**–न. पांढऱ्या चौकटी असलेलें काळें लुगडें.

उडदू—स्त्री. उर्दू भाषा. उर्दू पहा.

उडदे—पु.अव. (व.) उडदाच्या दाण्यासारखे कीटक. [उडीद]

उडद्यामुरुम—पु. उडदासारखा बारीक, काळा मुरूम.

उडप—न. (गो.) वाघाला मारण्याकरितां एखादें मेलेलें किंवा त्यानें मारलेलें जनावर ठेवून त्याभोंवतीं केलेलें काटद्यांचें कुंपण. [सं. उटज; प्रा. उदय–व?]

उडपाल—न. १ मोठ्या तंबूशेजारीं जो स्नान, स्वयंपाक वगैरे करण्याकरितां लहान तंबू ठोकतात तो. [आड+पाल=लहान तंबू]

उडपाल—न. कांबळ्याच्या खोळीवर (पजेन्यनिवारणार्थ) जें दुसरें वस्त्र घेतात ते. [सं. ऊर्ध्व+पक्ष्व; प्रा. उड्ढ+पाल]

उडया–यें—पु न. (व. कु.) उडवा–वी–वें पहा.

उंडरणें—अक्रि. (व.) माजणें; सैताडणें; उन्माद येणें. 'गोष्या आतांशा फार उंडरला आहे.' [का. उंडिग]

उंडल—स्त्री. उंड; उंडीणीचें झाड व तिचें फळ. उंडण पहा.

उंडलटप्पू—वि. निरुद्योगी, उडाणटप्पू पहा.

उंडली, उंडी, उलडी—स्त्री. (नाविक) होडी उलटूं नये म्हणून तोल सांभाळण्यासाठीं तिच्या बाहेरील बाजूस दोन वांकडीं लाकडें जोडून त्यांच्या शेवटाला जोडलेलें एक आडवें लांकूड. हें नेहमीं पाण्यांत असतें. [उलटणें]

उंडलीण—स्त्री. उंडीण.

उंडलेल—न. उंडीच्या बियांचें तेल; उंडेल. [उंडल+तेल]

उडवणी—स्त्री. १ पसरणें; फेंकून देणें; उधळणें. २ अवहेलना करणें; अव्हेर करणें; हेटाळणी. ३ निरास. 'ये विषयीं उडवणी पंचकांत। बोलिलेती दासानीं अभंग षट्क ते।' –दावि ३१३. [उडविणें]

उडवणें–विणें—उक्रि. १ उडणें याचें प्रयोजक; उडणें पहा. २ दूर फेंकणें; अस्ताव्यस्त करणें; विस्कळित करणें; चारी दिशांत उधळून लावणें; पळवून लावणें. 'मुकुट शिरींचा उडविला।' –मोदोहारामायण ६९. ३ उधळपट्टी करणें; बेसुमार खर्च करणें. 'आपल्या नादीं लागून हवा तेवढा पैसा उडवील असें तिला वाटलें.' –विवि १०.५–७.१२३. ४ टाळणें; अव्हेरणें; सोडणें; टाकून देणें. ५ हेटाळणें; अव्हेर करणें; झिडकारणें. ६ चोरणें; लांबविणें; नाहींसें करणें. 'हातवट्या फिर्यादीनें उडविल्या.' –विक्षिप्त ३.९५. ७ मारणें; आघात करणें; 'निर्गुणास जन्म कल्पिला। अथवा निर्गुण उडविला॥' –दा ९.३.२६. 'शत्रूवर नेम धरून सोजीर उडवितां येतील.' –इंप १५०. चाबूक उडविणें, चाबकाचे फटके मारणें. 'भटजीचे अंगावर चाबूक उडविले.' –इंप ८६. ८ चोरून नेणें; पळवून नेणें; 'तिला उडवून नेण्याचा

प्रयत्न करणें ही गोष्ट श्लाघ्य आहे.' –विवि १०.५–७.१२३. ९ आटोपणें; जलद काम करणें; त्वरित संपविणें. 'लॅटिन भाषांतर विद्यार्थ्यांस दिलें असतां तें जॉन्सननें कसें उडवून दिलें याविषयीं मागें सांगितलेंच आहे.' –नि ६५६. १० फजीत करणें. 'नका आमची जास्त उडवूं' –चंद्रग्रहण. ४०. ११ काढून, हांकून लावणें. 'आपण स्वतः टोळीचा नायक होऊन तुम्हास उडवून देणार नाहीं.' –कोरकि २७८. [सं. उद्+डी–डायय्–उड्डायन; प्रा. उड्डवण]

उडवलाउडवला, उडविलाउडविला—वि. (कों.) दूर दूर; इकडेतिकडे; मधूनमधून; विलग; तुरळकतुरळक. 'आंबे बहुतकरून आभाळानें गळाले, आतां कोठें उडवले उडवले आहेत.' [उडविणें द्वि]

उंडवळ—वि. (कों.) कामचुकार. उंडगळ पहा.

उडवा-वी-वें—पु.स्त्री.न. १ ढीग; रास; गंजी (पिकांची, गोवऱ्यांची). 'नाना निधानचि निर्दैवा । होये कोळसयाचा उडवा ॥' –ज्ञा १८.७२५. २ (व.) (गोवऱ्या वगैरेंची) रास ठेवण्यासाठीं केलेलें कूड. 'उडव्यांत कुणघी गोवऱ्या ठेवितात.' ३ कोणत्याहि धान्याच्या वाळलेल्या ताटांचा (झोडपणीसाठीं) रचलेला ढीग; बुचाड. [सं. कूट; प्रा. उड; का. उड्डी=ढीग]

उडवाउडव-वी—स्त्री. १ टाळाटाळी; कोलवाकोलव. २ हेटाळणी; अवमान. ३ उधळपट्टी; अव्यवस्थित खर्च. ४ अस्ताव्यस्त करणें (रचून ठेवलेला जिन्नस); अस्ताव्यस्तपणा; अव्यवस्था; विस्कळीत रीतीनें केलेली फेंकाफेंकी. ५ निरास करणें; लागू होऊं न देणें (दोष इ.). [उडविणें द्वि]

उडवागी—स्त्री. (प्रा.) तिरस्कारानें वागविणें; अवहेलना करणें; अनादर करणें (एखाद्या माणसाचा किंवा त्याच्या भाषणाचा). (क्रि. करणें). [उडविणें]

उडव्या—वि. १ उधळपट्टी करणारा; खर्चिक; अतिव्ययी. २ चुकारपणा करणारा; टाळाटाळ करणारा. [उडविणें]

उंडळ—स्त्री. उंडी एक झाड.

उंडा—पु. १ भिजविलेल्या पिठाचा गोळा. (भाकरी, पोळी करण्यासाठीं तयार केलेला). २ उडीद आणि तांदूळ यांच्या पिठाचे गोळे करून शिजवून एक खाद्य पदार्थ तयार करतात तो; 'खाजी करंजी, घ्याजी दाजी, आग्रह करिती, साखरमांडा, उंडा भर घृणाचा धोंडा.' –अमृत ७३. 'आमच्या आया तुमच्या माया। खातील काय दूध उंडे.' –भोंगा ३ गोळा. 'तोचि दधी घृताचा उंडा वामकरी।' –दाव ३८५. ४ (कर्ना.) लाडू; गुंडाळें उंडी=लाडू). ५ आळवाच्या पानाच्या वड्या करण्याकरतां पानांस पीठ लावून तीं गुंडाळून त्यांचे किंवा कळण्याचे वरवंट्याच्या आकाराचे गोळे करतात ते, नंतर ते शिजवून, कापून, तळून वड्या करतात. [प्रा. उंडी=गोळा, पिंड; का. उंडे=गोळा; ता. ते. तु. वगैरे द्रवि भाषांतूनहि हा शब्द आढळतो. गो. उंडो]

उडाउडी—क्रिवि. चढाओढीनें; ताबडतोब; उड्या पडून; चुरशीनें. 'हीं वांगीं उडाउडी विकलीं.' [उडी द्वि.]

उडाऊ—वि. अतिशय खर्चिक; उधळया. उडव्या पहा. [उडविणें]

उडाऊछप्पी-प्पू—वि. टाळाटाळी करणारा; चुकारतट्टू. [उडविणें+छपणें; उडाण टप्पूप्रमाणें कांहीं तरी प्रयोग.]

उडाण—पु. शेताचा, जमिनीचा एकीकडचा विस्तृत असलेला तुकडा. [उडणें]

उडाण—स्त्री. (ना.) उडी; धांव. [सं. उड्डान; प्रा. उड्डण] **०खटोले**—न. विमान.

उडाणटप्पू—वि. १ एकाच ठिकाणीं, कामांत फार वेळ न टिकणारा; भटक्या; अस्थिर; चंचल वृत्तीचा. २ खुशालचंद; रिकामा; गांवगुंड. ३ तात्पुरतें; चालचलाऊ; हंगामी (उद्योग, नोकरी.) [उडणें+टप्पू; तुल० उनाड पहा.]

उडाणवीर—पु. (कों.) कोणत्याहि अवघड कामांत भय, शंका न धरतां उडी घालण्याचा ज्याचा स्वभाव तो. [उडणें+वीर]

उडाफू—वि. १ तात्पुरतें; हंगामी; क्षणिक (काम, स्थिति). २ अस्थिर; चंचल मनाचा, वृत्तीचा; बेभरंवशाचा (माणूस).

उंडारणी—स्त्री. १ माज; मस्ती; गर्व; ताठा; ऐट; अभिमान; खुमखुमी. २ स्वैर वर्तन. ३ उनाडकी; उणगणें; खेळणें. [उंडारणें]

उंडारणें—अक्रि. १ माजणें; मस्तीला येणें; उद्धट होणें. २ स्वैर वर्तन करणें. 'छिनाल छबकडया उंडारतात.' –इंप ६२. ३ उनाडकी करणें; उडाणटप्पू बनणें. [का. उंडिग]

उडावणी—उडवणी पहा.

उडावू—वि. अति खर्चिक; उडव्या. उडाऊ पहा.

उडाळ—वि. १ अस्थिर; चंचल. २ (राजा.) लक्ष्य उडालेला, मनांतून, लोभांतून गेलेला; मन विटलेला; पराङ्मुख. 'द्रव्य मिळविण्याची आस्था लागतांच यांचें मन विद्येवरून उडाळ झालें.' [उडणें]

उडिद—उडीद पहा.

उडिया, उरिया—पु. ओरिसा प्रांतांत राहणारा.–स्त्री. ओरिसांतील प्रमुख भाषा. [सं. ओड्र; प्रा. उड्डिअ; हिं. उडिसा]

उडी—स्त्री. १ एका जाग्यावरून उडून दुसऱ्या जागीं वेगानें पडणें, जाणें; झेंप; उडणें; उड्डाण (क्रि० घालणें; मारणें; टाकणें). २ (ल.) संकल्प; इच्छेची मर्यादा. 'त्या घोडयाचे हजार रुपये घ्यावे अशी त्याची उडी आहे.' ३ (ल.) आटोका; आवांका; पल्ला; कार्यक्षमता; आकांक्षा; उमेद. ४ (राजा.) दुसऱ्याचा बैल कामाकरितां आणल्याबद्दल धान्याच्या किंवा पैशाच्या रूपानें द्यावयाचें मूल्य; भाडयानें जनावरें आणून शेती करणें. [सं. उत्+डी प्रा. उड्डी] **उड्या पडणें**–मद्दन, तुदून पडणें (मला पाहिजे,

मी करतों म्हणून); गर्दी होणें; जोराची चढाओढ लागणें; चुरस लागणें (एखाद्या गोष्टीबद्दल). 'उंच वस्त तात्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उडया पडती ।' –दा १२.७.२५. 'त्या रोजगाराविषयीं उडया पडतात.' **उडया मारणें**–१ गर्व वाहणें; ऐट करणें; फुशारकी मारणें; बढाई मारणें; उद्दामपणें वागणें. २ उनाडक्या करणें. ३ चैन करणें. ४ विवक्षित मर्यादा ओलांडून, उल्लंघून जाणें. ५ गाळणें (मुद्याचा भाग, नाटकांतील भाग, ग्रंथांतील विशिष्ट भाग). (**बळावर, जिवावर**) **उडया मारणें**–दुसऱ्याच्या आश्रयावर, आधारावर अवलंबून मोठमोठ्या गोष्टी करणें; गर्व वाहणें; मोठमोठ्या कार्यास हात घालणें. 'आजपर्यंत आम्ही तुमचे बळावर उडया मारीत होतों, परंतु तुम्ही हातचें सोडलेंत.'

उंडी—स्त्री. (कों.) उंडीण झाड व त्याचें फळ. उंडण पहा.

उंडी—स्त्री. उंडा याचें लघुत्ववाचक. उंडा पहा. १ गोळा; घांस. 'जैसी घापे लोणियाची उंडी ।' –ज्ञा ११.४५७. २ भाताची मूद; पिंड; घास. 'ना तरी भस्माग्निच्या तोंडी । न पुरे भाताची उंडी ।' –ज्ञाप्र ७०३. ३ बळी; नैवेद्य. 'नवसियां देती उंडी । बाळकांची ।' –ज्ञा १७.९७. ४ खीर करावयासाठीं तांदूळ इत्यादिकांच्या पिठाच्या गोळ्या करतात त्या प्रत्येक. ५ आमिष; पिठाची गोळी. 'उंडीस देखोनि मासा भुलला । गिळितां कंठी गळ टोचला ।'–भवि २.१६०. [प्रा. उंडी=पिंड; का. उंडे=गोळा; ते. उंड; ता. उरुंडु उरुन्डु; उंडा याचें अल्पत्वदर्शक नाम] **उंडी, उंडया उकळणें**–भिक्षा मागणें; आगंतुकी करणें (दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्याबद्दल वापरतात). **०चकाल**–वि. (राजा.) भोजनभाऊ [उंडी+चकलणें=खाणें]

उंडीण—उंडण पहा.

उडीद्—पु. एक द्विदल धान्य. याचें झुडुप अथवा वेल हात दीडहात उंच वाढतें: उडदाचा रंग काळा असून डाळ पांढरी, पौष्टिक, शीतळ असते. 'उडदांमाजी काळें गोरें । काय निवडावे निवडणारें ।' –ज्ञ्यं १४. [प्रा. हिं उडिद; का. उद्दु; गु. अडद; सं. माष]

उडु—न. नक्षत्र. [सं.] **गण**–पु. तारकापुंज. **०पति-राज**–पु. चंद्र. 'तंव उडुराज उदेला गगनीं ' –रास १.१००.

उडुप—पु. १ चंद्र. २ नौका. [सं. उडु+प=पति]

उंडूगाडा—पु. (व.) भरींव चाकाचा गाडा.

उंडेकार—वि. (गो.) पाव करणारा, विकणारा; रोटीवाला. [का. उंडे=गोळा उंडो=पाव+सं. कृ–कार]

उंडेल—न. (कों.) उंडिणीच्या फळांतील बियांचें तेल. याचा जळण्याकडे व गुरांच्या अंगावर माशा बसूं नयेत म्हणून उपयोग करितात. [उंड+तेल]

उड्डाण—न. उडी पहा. 'एकेचि उड्डाणें मातांहि सागरा । प्रदक्षिणा करी जो ।' –ज्ञा १०. २५०. [सं. उड्डान]

उड्डियान—न. हृदयस्थान; अनाहतचक्र. [सं.] **०बंध**–पु. योगांतील एक बंध; योगांतमूल, उड्डियान व जालंदर असे तीन बंधांचे प्रकार आहेत.

उडया—वि. १ उडी मारणारा. २ धमक असलेला; हुषार; चलाख. **म्ह**० उडया पुरवेल पण पडया पुरवत नाहीं.

उढा—पु. बांबूची एक जात. हा जाड असून लोंढा येथील जंगलांत होतो.

उण-खु-खूण—स्त्री. १ हेतु; मनोगत; कामना. 'नायटयांभेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥' –ज्ञा १३.८००. २ वर्म; रहस्य. 'म्हणोनि एक एकाधीन । जाणती उणखूण येरयेरां ।'–निगा १७७. ३ प्रत्यय; अनुभव. 'तें शोधितसत्याचें लक्षण । हें मी जाणें उणखूण ।' –एभा ११.७२५. ४ ओळखण्याचें लक्षण: चिन्ह; खाणाखूण. 'एकधां विभागे अंतःकरण । त्याची उणखूण निज लक्षण ।' 'ऐकोनियां उणखुणेसी । चरफडी जैसी विव्हळ ।' –एभा २३ ९७३. [उणें+खूण]

उणवट—वि. अल्प मोलाचें. [सं. ऊन+वत्; म. उणें+वट]

उणवाई—स्त्री. (कों.) उणेपणा; कमतरता; न्यूनता; कमीपणा; तोटा; टंचाई. [सं. ऊन; म. उणें+वाई प्रत्यय]

उणा—वि. १ कमी; अपुरा; नेहमीपेक्षां कमी; विवक्षित परिमाणापेक्षां कमी 'काय उणें कां करितोसि चोरी ।' –तुगा ११९. 'गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती' –केका २३. २ अपुरा; अपूर्ण, सदोष (कार्य, सामग्री); अपुरी असलेली (गोष्ट). 'देतांचा सरंजाम जमविला खरा, परंतु उणा आहे; कांकीं आंत वेल उणे आहेत म्हणून.' ३ हलका; कमी योग्यतेचा, प्रतीचा. 'म्हणौनि आसुरी उणी संपदा नव्हे ।' –ज्ञा १६.२५६. 'वैश्य जातीपेक्षां शूद्र जाति उणी.' ४ मानहानिकारक; अयोग्य; एखाद्याचें व्यंगदर्शक (शब्द, भाषण, इ०). 'बोले शब्द उणा विदेह पिसुणामध्यें तदा त्या गुणा ॥' –आसी ५.१. २ नपुंसक. 'बडील बाईल म्हणे उण्या । धाकटी बाईल म्हणे सुन्या ॥' –नामदेवनाटक १९. ६ गैरहजर; अविद्यमान; कमती. [सं. ऊन] **०अप्रा**–वि. अपुरा; विवक्षित मापाहून कमी (कापड). उणा पहा. [उणा+अपुरा] **०दुणा**–वि. १ अपमानकारक; कमी अधिक; तिरस्कारदर्शक; मर्मभेदक (शब्द, भाषण, बोलणें). 'कोणाला उणेदुणें बोलणें बोलूं नये' २ सरासरी. उणापुरा पहा. [सं. ऊन+द्विगु] **०पुरा**–वि. कमीअधिक; जवळजवळ; अजमासें, सुमारें; सरासरी. 'मला पुण्यास आल्याला उणापुरा एक महिना झाला.' [सं. ऊन+पूर्ण]

उणाक-ख—वि. हलक्या प्रतीचें; कमी किंमतीचें; (हलकें, विटणारें वस्त्र, माल वगैरे). 'त्याप्रमाणें उणाख आणि मध्यम

शालजोडया पाहून पाठवून देणें ' –पेद १८.७२. –न. हलकें वस्त्र. ' ६ाजी नारायण पुरंदरे यांना उणाखीं मिळालीं होतीं. ' –भात्रै १०.३.१२७. [उणा+आंख]

उणांग—वि. (गो.) कमी; हलका; हलक्या दर्जाचा. [सं. ऊन+अंग]

उणाव—पु. कमीपणा; कमताई. उणवाई पहा.

उणावणें—अक्रि. १ कमी होणें; न्यूनता येणें; पूर्व स्थितीपेक्षां उणा होणें (पर्जन्य, रोग इ.) ' ज्येष्ठ अंधत्वें उणाविला ॥ ' –मुआदि २५.८६. २ तीव्रता कमी होणें (दुःखाची); शिथिल होणें. ३ उतरणें; खालावणें; अवनति होणें; क्षीण होणें. [सं. ऊन; प्रा. ऊण]

उणावळ—स्त्री. कमीपणा; तूट.

उणीव—स्त्री. १ कमीपणा; न्यूनता; उणेपणा. ' परि उणिवेचा सोस नाहीं तयास । ' २ दोष; व्यंग. [सं. ऊन, सिं. ऊणी]

उणें—न. १ कमीपणा; न्यूनता; दोष; व्यंग; अपूर्णता; वैगुण्य. ' देत्यीं देवां आणिलें उणें ॥ ' –ज्ञा ९.४५०. ' तया पांडवांचें उणें । कीजेचि ना पुरणें । विश्ववंद्यें । ' –ज्ञा १५.२५. ' जें यादवां येईल उणें । ' –उषा ७८५. ' म्हणे स्वकृतिच्या उणें किमपि एकवर्णी न हो ॥ ' –केका ६१. –अश्र. वांचून; शिवाय; पण. ' जीव घेतलिया उणें चालों नेणसी साजणें ॥ ' –अमृ २.३९. ' तैसें आवडतें हिं करणें । न निफजे सीणलेयां हिं उणें । ' –राज्ञा १८.९४०. –वि. उणा पहा. [सं. ऊन; प्रा. ऊण.] ०**आणणें**–दोष लावणें; कमीपणा आणणें; लाजविणें. ' वरि झळकति दिव्य कळस । उणे आणति उडुगणास । ' ०**घेणें**–आपल्या कमीपणाबद्दल मनास लावून घेणें; दुःख पावणें; स्वतःला कमी समजणें. ०**पाहणें–काढणें**–दोष पाहणें; व्यंग काढणें; नावें ठेवणें. ०**उत्तर–भाषण**–न. अपमानकारक, तिरस्कारव्यंजक, मानभंग करणारें उत्तर. ' तें गुडघ्याएवढें पोर, पण चुलत्याला उर्णी उत्तरें करतें ! हा काय त्यांच्या घरचा मोळा तरी ! ' ०**म्ह**–(व.) उणें असे मनीं खसे नकट असे नाक परवसे=ज्याच्यांत कांहीं उणें असतें त्यास दुसरें कोणी बोलत असल्यास, तें मलाच तर उद्देशून बोलत नाहींत ना ? असें वाटतें. ०**दुर्णे–रें**–वि. अपमानकारक; निंदाव्यंजक; कमीअधिक; पाणउतारा करणारें (भाषण); घालूनपाडून बोलणें; उणादुणा पहा. ' भाऊसाहेब काकासाहेबांना उणेदुरें बोलत असलेले पाहून नमुताईना जरा राग आला. ' –हाच कां धर्म ३३. ०**पणा**–पु. कमीपणा. ०**पाणें–पाताळें**–न. दोष. ' एकमेकांची उणींपाणीं काढण्यांतच जर आपला असा वेळ जायचा तर उद्यां रणांगणावर काय होणार. ' –डावजेकला. ' त्याचें कशाला उणेपातालें काढतेस ? '–नामदेव नाटक ७६. ०**पुरें**–वि. उणापुरा पहा. १ कमीअधिक; सुमारें; सरासरी; अंदाजें; जवळजवळ. ' आपल्या मेटीला उणेपुरें वर्ष होत आलें. ' २ पूर्णअपूर्ण. ' किती अनुवाद, उण्यापुऱ्या नकला ...आढळून येतात हें लक्षांत येईल ' –गीर ५.

उत—अव. अथवा. ' अर्जुन म्हणे उभा रे सिंहत्व त्यजुनियां न कुतरा हो । उत राहो, क्षण पाहों, जा यमभट हो ! तळीं न उतरा हो ॥ ' –मोवन ९.४३. [सं. उत=वा]

उतटणें—अक्रि. १ तडकणें; उकलणें; उलणें; उसवणें; ताणून फाटणें; फुटणें; तटतटणें (ताणल्यानें, आंतून जोर झाल्यानें बंद, इ०). ' मग शिवणी जैशी उतटे ॥ ' –ज्ञा ६.२६६. ' तयेच्या चोळीचे सकळ जवदाणें उतटती । ' –सारुह ८.१६५. ' नादें उतटलें आकाश । ' –वेसीस्व २.२४. २ घट्ट होणें; दाटणें; अतिशय ताण बसून तुटणें. ' हे चोळी गेली उतटौनि । तैंचि जाणिलें मियां ॥ ' –शिशु २२५. –मक्रि उकलणें; फाडणें; ताणून तोडणें इ. [सं. उत्+तन्]

उतटणें—अक्रि. उचंबळणें; भरून येणें. ' कीं हें सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षे आनंदें उतटलीं । –दा १.७.३१ ' ऐकोनि उतटला समर्थी प्रेम । ' –दावि ३०२. [सं. उत+तट=वर येणें]

उतणजें—उक्रि. गवत काढून टाकणें; तृण झांप इत्यादिकांनीं आच्छादिलेल्या गृहावरील तृण किंवा झांप काढून टाकणें. [सं. उत्+तृण; प्रा. उत्तण]

उतणणें—अक्रि. गर्वानें फुगून जाणें; ताणणें. [सं. उत्+तन्=लांब करणें]

उतणें—अक्रि. १ उकळून वर येणें (दूध, कढी वगैरे). ' जैसें उतलें आगीं पडे । ते नलगेचि होमा । ' –ज्ञा १८.१९३. २ पू वगैरे येणें (डोळ्यांतून). ३ ओठादि अंगावर पुटकळ्या, फोड येणें (तापामुळें, वस्तरा लागून). ४ बिब्बा वगैरे लागल्यामुळें चिडणें; फुगून वर येणें. ' कोणे सवतीनें भरला भिलावा उतला । ' –निगुणाचा पाळणा १२. ५ खतखतणें; खदखद होणें (आगीवांचून शिजल्याप्रमाणें). (कांहीं चूर्णावर लिंबाचा रस घातला असतां होतें तसें). फेंस येणें. ६ भरून वाहणें. ' कोपावेशें झालें कल्पांतीचें समुद्रसें उततें ॥ ' –मोमीष्म ९.२६. ७ (ल.) गर्वानें फुगून जाणें. ' किंबहुना ऐसेंसें । उतणें जें संपत्तिमिसें । –ज्ञा १६.२२९. ' खळा ! न मदें उतरे । ' –मोरा २६. ८ उसळणें; उचंबळून वर येणें. ' तातला तेलीं सागर । उततातीं । ' ' कल्पांतींचे जसे जलधि उतते । ' –मोवन १०.३९. ९ माजणें; फुगणें; जोरानें वाढणें–(पीक, गवत, भाजी वगैरे). १० अतिशय समृद्ध होणें; कल्पनेबाहेर बहर येणें (धान्य, फळें वगैरेस). [सं. उत्+तन्; म. उत; तुल० का. उदु=फुगणें] **उतूं–जाणें–चालणें**–१ खर्च होणें; नुकसान होणें; तोटा होणें; अडणें. ' माझें काय त्यावांचून उतूं जात आहे. ' **उतूं येणें**–ऊत येणें; उतास येणें; वर येणें (दूध इ०); फेंस येणें; (ल.) रहस्य असणें; आटोकाट, अतिशय प्रेम असणें.

उततणें—अक्रि. उचंबळणें; उतणें अर्थ ८ पहा. [उत्+तन्]

उतती—स्त्री. खारीक. 'बादामें आकरोटे खिसमिस । उतत्या आणवील्या सवंगा ॥' –सारुह ३.४८. [का. उत्तत्ति=खारीक]

उतप—वि. (प्र.) उतापा. उघडें; ज्यावर चांगलें ऊन येत आहे असें; छायारहित. [सं. उत्+तप् ; उत्तप्त; प्रा. उत्तप्प]

उतफाळणें, उतफळणें—क्रि. फाडून टाकणें; फाडून तुकडे तुकडे करणें; चिंध्या करणें; वाभाडे काढणें. [सं. उत्स्फालन]

उतमात्र-ज-त—पुस्त्री. (ना.व.) १ उच्छाद; उपद्रव; उच्छृंखळपणा. २ माजोरीपणा; गर्व. 'एवढी उतमात करूं नकोस.' [ऊत+मात]

उतरंग—न. (कों.) दरवाजाच्या चौकटींचें वरील लाकूड. [सं. उत्तर+अंग; प्रा. उत्तरंग]

उतरचढ—वि. वारंवार चढण किंवा उतरण असलेलें; उंचसखल; खालवर. –स्त्री. चढण्याउतरण्याची क्रिया. [उतरणें+चढणें]

उतरट—वि. उतार असलेला; उतरता. [सं. उत्+तृ+तर्]

उतरड, उतरंड—स्त्री. निवडुंगावर वाढणारा एक तऱ्हेचा वेल. त्याच्या रसानें अगर चूर्णानें चामड्यावरील केंस निघून जातात. [का. उत्तरणी]

उतरड, उतरंड, उतरण—स्त्री. १ खालीं मोठें व वर लहान अशा रीतीनें एकावर एक भांडीं, घट ठेवून केलेली रचना. 'मनोरथांच्या उतरंडी । उतरीरची ।' –ज्ञा १३.११४. 'नाचती गोकुळींचीं मंदिरें । नाचत उतरंडी देव्हारे ।' –ह ५.८०. २ घोड्याचें एक वाईट लक्षण (कपाळावर एकावर एक असे तीन उलटे भोंवरे असणें). **उतरंडीचा वाघ**–घरांत शौर्य दाखविणारा भेकड मनुष्य. **उतरंडी उतरणें**–दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणें. **म्हण०** उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा. [सं. उत्+तृ–तर् ; उतर+हंडी]

उतरड—स्त्री. १ ढाळ; उतार. २ उंसाच्या चरकांतील नराचा आंस ज्यांत फिरतो तो आडवा दांडा; अडवट. [सं. उत्+तृ]

उतरण—स्त्री. १ उतार असलेली जमीन; उतरड; ढाळ. **म्हण० चढणीस घोडा उतरणीस रेडा.** २ उतार; उतरता रस्ता. ३ (उत्तरायणांतील) उत्तरेकडून वाहणारा वारा. ४ वय–संपत्ति वगैरेस लागलेली ओहोटी; कमी होत जाणें; अवनति; हीन स्थिति. ५ (यंत्र) क्षितिजपातळीशीं कलती अशी पातळी: तिर्यक् धरातल. (इं.) **इन्क्लाईंड प्लेन.** ६ पिकविण्याकरितां झाडावरून उतरलेले आंबे. –न. ज्या ठिकाणीं नदींतून पायानें चालत जातां येतें अशी जागा; उतार. [सं. उत्+तृ–उत्तरण]

उतरणें—सक्रि. जमिनीवर ठेवणें; वरचा पदार्थ खालीं आणणें, ठेवणें. २ मुक्कामावर ओझें वगैरे टेवणें; खालीं, रिकामें करणें; माल काढून ठेवणें (गाडींतून, गलबतांतून). ३ खालीं आणणें; खालीं येण्यास मदत करणें. ४ उंची कमी करणें; ठेंगणें करणें. ५ पलीकडे नेणें; पार करणें (नदींतून वगैरे). ६ उतरून घेणें; पाहून काढणें; नक्कल करणें; चित्र काढणें; छबी काढणें; प्रतिमा काढणें; 'चित्तें गणूच्या पाटीवरील उदाहरण उतरलें.' नमुन्याबरहुकूम करणें; कृति, हावभाव वगैरेंची नक्कल करणें. 'कोंकण्याची नकल हा हुबेहूब उतरतो.' ७ धारा, भाव, मागणी वगैरे कमी करणें; अल्प प्रमाण करणें, 'नवा राजा झाला त्यानें शेतास पीक नाहीं असें पाहून धारे उतरले' ८ अपकर्ष करणें; दर्जा, हुद्दा योग्यता कमी करणें; गर्व नाहींसा करणें (ताशेरा, इ० द्वारां). ९ तीव्रता कमी करणें, शांत करणें (विष, मादक पदार्थ वगैरेंची). १० नारळ, मीठ, मोहऱ्या वगैरे पदार्थ अंगावरून ओवाळून टाकणें. 'ज्यासी हृदयीं ध्याती पद्मजभूजेटी । त्यावरोनि यशोदा उतरी दृष्टी ।' –ह १३.१६१. 'येसूबाईनें कालसदृवरून एक कोंबडें उतरलें.' ११नाक, कान, जीभ वगैरे अवयव कापून टाकणें; 'या खड्गें हें शिर उतरीं हा देह पडूं दे रणीं ।' –विक २९. १२ (नदी, समुद्र इ०) पार जाणें; पलीकडे जाणें. 'बहु दुस्तर विपदंबुराशि उतराया ।' –मोकर्ण ७.२३. १३ अंगावरून काढणें (कपडे, दागिने. वगैरे) १४ (उतरतें छपर, पडवी, सोपा वगैरे) तयार करणें; बांधून सिद्ध करणें. १५ काढून टाकणें (घराचा वरील भाग. इ०). 'म्युनिसिपॅलिटीनें रामरावांचे घर पार उतरलें.' १६ कापून टाकणें, साफ करणें (दाढी, मिशा वगैरे) १७ (पत्र्यांच्या खेळांत) पान टाकणें. 'तुम्ही एका उतरा.' १८ झाडांवरून फळें वगैरे काढणें. 'आम्हीं आमच्या आंब्यावरील आंबे आज उतरले.' १९ वरून खालीं येणें (घाट, जिना वगैरे) [सं. उत्+तृ]

उतरणें—अक्रि. १ (जिना, घाट, पर्वत वगैरेवरून) खालीं येणें. 'उतरलें उदक पर्वत वळघे ।'–ज्ञा १०.६९. 'पुण्याचा रस्ता वाई नजीक सोनजाईच्या डोंगरावरून खालीं उतरत होता.' –विवि १०.१०.२१७. २ हिशेब, माप, भविष्य इत्यादि बरोबर जमणें, पटणें; ताळा पडणें; मूळाबरहुकूम नक्कल तयार होणें. 'आतां ग्रंथकारांच्या म्हणण्याप्रमाणें भाषांतर उतरलें आहे.' –विवि ८.८.८४. ३ मुक्काम करणें; थांबणें; वाहनांतून खालीं येणें. 'बिहारीलाल गार्डीतून उतरले.' 'आपलें सर्व खटलें बाहेरच्या देवळांत उतरा आणि तुम्ही सडे किल्ल्यांत या.' ४ भैरी, राग, भीति, ज्वर, दर, भाव इत्यादि कमी होणें. ५ कोमेजणें, निर्जीव होणें; निकृष्टावस्थेप्रत जाणें; म्लान होणें; सुकणें (चेहरा). 'करितां अधर्म सद्यः स्वपितृसुहृज्जन मुखप्रभा उतरे।'–मोआदि ९.५७. 'उतरलें पाहोनि सत्शिष्यवस्त्र ।' –दावि २६०. 'गंधर्वांकडून दुर्योधनास धर्मराजापुढें उभें केलें तेव्हां त्याचें तोंड उतरलें होतें.' ७ वयातीत होणें; प्रकृति खालावणें; वस्त्र जीर्ण होणें; शरीर, फुलें, मासे, मांस, मोत्यें वगैरेंचा तजेला नाहींसा होणें. ८ फळ वगैरे अधिकणें, अधिक पिकणें. ९ अढी वगैरे बरोबर पिकून

तयार होणें. १० योग्य रीतीनें बनणें, तयार होणें. 'एक काहीसर्‍हासाचा चार मण गूळ उतरला.' ११ व्याधि, रोग वगैरेंतून पार पडणें; 'देवीतून दोन मुलें उतरलीं, एक दगावलें.' १२ परीक्षेंत पास मिळविणें; उत्तीर्ण होणें; पास होणें. 'आमचा रामा यंदा पहिल्या वर्गाल्या रीतीनें उतरला.' १३ संकटांतून पार पडणें. 'तुम्हां सर्व अवाप्तेबी छतरितां न दासा पडे.' –केका १२१. १४ विशिष्ट हिशेबाकडे वळणें. 'महामारी तिकडे खानदेशांत उतरली.' १५ मर्जीतून जाणें; नाखुषी होणें. १६ मनास पटणें; योग्य वाटणें; पसंत होणें. 'हें नाटक लोकांच्या पसंतीस उतरलें.' –विवि ९.४.१७५. १७ मोतीं वगैरेंचें छिद्र मोठें होणें; केजी उतरणे १८ गरोदर स्त्री प्रसूतीपासून मोकळी होणें, हालींपालीं सुटणें. १९ नाहींसें होणें, फिटणें. 'ते सूतकें सूतक उतरे दोहींचेही.' –ज्ञा २१.१२५. २० (लहान मुलींच्या खेळाच्या प्रारंभीं) चकून पार पडणें. २१ लागणें; उत्पन्न होणें. 'जयाचिया दृष्टी उतरे.' –विपु ९.१६. [सं. उत्तरण] **उतरून टाकणें**–१ लवल्याबरोबर वाद्या, साज वगैरे काढून टाकणें. २ बोंकाडून टाकणें (आजारी माणसावरून खाद्य पदार्थ, प्राणी वगैरे). ३ (सामा) खालीं काढणें.

उतरता-ती—वि. १ उतरत्या असलेला; उताराचा. २ क्षीण होत चाललेला; अधोगतीस गेलेला; खालीं येणारा. ३ अदृश्य होत असलेला; मावळता. 'उतरता दिवस.' ४ क्रमानें खालीं येणारा. ५ (गंजिफा, पत्ते इ० खेळांत) दहिल्याचे मागें नवल्यानें, त्याच्या मागें आड्यानें हुकूम म्हणें अशीं उतरतीं पानें. **चढती-उतरती कमान**–स्त्री. उत्कर्षावस्था व निकृष्टावस्था; उत्कर्ष, अपकर्ष; वरेवाईट दिवस. **०पाया**–पु. अवनत स्थिति; अवनति; अधोगति; हीन स्थिति. **०कळा-दशा-पायरी**–स्त्री. विपन्नावस्था; ऱ्हास, खालावलेली स्थिति. 'उच्चावस्था प्राप्त झाली कीं त्याबरोबरच उतरती कळा लागावयाची.' –विवि ८.९.१६१. **उतरत्या पायरीस लागणें**–ऱ्हास होत जाणें. 'तो उतरत्या पायरीस लागला.' **०बाजु**–स्त्री. १ उतरण; उतरत येणारी बाजू. यांच्या उलट चढती बाजू. २ दशावतारी गंजिफांतील परशरामापासून पुढील पांच बाजू. **०भांजणी**–स्त्री. (गणित) भारी परिमाणाच्या अंकास हलक्या परिमाणाचें रूप देणें; जसें–रुपयाचे आणे करणें वगैरे. **०वेळ**–खालीं जाणारा दिवस. दोन प्रहर टळल्यानंतर सायंकाळपर्यंतचा काळ. २ खालावलेली स्थिति, वार्धक्याचा काळ. **०श्रेणी**–स्त्री. (गणित) पहांचें एक मालिका; यामध्यें संख्या क्रमाक्रमानें लहान होत जातात.

उतरंपराई—स्त्री. (प्र.) उत्तरपराई; तारुण्यानंतरचा काळ; आयुष्याचा उत्तरार्ध. [उत्तर+पराई; उतर+पराई]

उतरपेठ—स्त्री. (प्र.) उतारपेठ. मुख्य व्यापारी ठिकाण; निराळ्या ठिकाणीं पाठविले जातात अशी व्यापाराची जागा; (इं.) मार्केट. [उतार+पेठ]

उतरल-ला—दासाच्या चौकटीवरील कोनाड. [सं. उत्तर+ल प्रत्यय]

उतरवट—वि. १ किंचित उतार असलेला; उतरण; उतरता (भूमिभाग). २ अधोगतीस लागलेला. [उतार+वट प्रत्यय]

उतरवटा—पु. उतार असलेली जमीन; उतरण; उतार.

उतरवण—न. उतार; उतरण; सखलपणा. [उतार+वण प्रत्यय]

उतरवणी—स्त्री. भाताची पेज; कांजी. [उतरणें+वणी=पाणी; सं. वन=पाणी]

उतरवाट—स्त्री. उतार असलेली वाट. [उतार+वाट]

उतरविणें—सकि. उतरणें प्रयोजक. १ खालीं ओढणें, आणणें; खालीं यावयास लावणें. उतरणें पहा. 'तिरंदाजानें मल्लखांबाचें निशाण उतरावयाचा व किनाऱ्याकडे जावयाचा हुकुम सोडला.' –कोरकि ९. २ (बडोदें) तयार करून घेणें; कातरणें. 'सुपारी खरादी यांजकडून उतरविणें.' –ऐरापुप्र ४.२७४.

उतरा—पु. पडण्याची, उतरण्याची क्रिया; पडणें. 'नसतां अधिमधि उतरा। नसतींच विघ्नें येती घरा।' –नव १४.१२६.

उतराई—वि. (कृपा, कर्ज, वचन इ०) उपकारांची फेड केलेला; ऋणमुक्त; कर्जफेड केली आहे असा. 'होऊनियां उतराई। लया जाय।' –ज्ञा १५.५८५. 'मी काय होऊं उतराई। माझे सांबळे कृष्णबाई॥' –ह३४.४०. **०होणें**–उपकार फेडणें. 'गुरुसी उतराई होतां। न देखों कवणियाही पदार्था।' –एरुस्व ५.९५. 'कर्णाचा उतराई व्हाया वधिलों रिपूसि यापरता।' –मोकर्ण ४९.६७. [सं. उत्तीर्ण; प्रा. उत्तरिअ]

उतराई—स्त्री. १ गाडींतून माल उतरण्यास पडलेली मजुरी. २ (हिं.) नावेची जकात, भाडें. ३ उतरून काढण्याची (नक्कल, चित्र, आंबे, वगैरेंची) मजुरी ४ (राजा.) उतार, वयाचे दिवस. (लागणें, जडणें.) [उतरणें; हिं. उतराई]

उतराण—स्त्री. (नाविक) उतरेकडून वाहणारा वारा. उतरण पहा. [सं. उत्तरायण]

उतरायी—उतराई पहा.

उतरावारा—उतरेकडचा वारा (समुद्रावरून येणारा); उतराण.

उतरी—स्त्री. अंगवस्त्र; उपरणें; उत्तरीय. 'बरवा मिरवे उतरी जोडा॥' –उषा १८४६. [सं. उत्तरीय; प्रा. उत्तरी]

उतरींव—वि. खाली पडूं न देतां काढलेलीं (आंबे वगैरे फळें).

उतरूनसर—क्रिवि. (गंजिफांचा खेळ) आपणाजवळ हुकूम असून त्या खालील एक पान नसतां त्या खालचें एक अगर अनेक पानें हुकूम करण्याकरितां आपला हुकूम व त्याचा रंगाचें दुसरें कोणतें पान अशी दोन्ही पानें उतरणें.

उतव—पु. १ (कों.) परशावर कांबळें वगैरे सुकत घालण्यासाठीं लहान मंडपीसारख्या तीन चार काठ्या बांधून तयार करतात तो; भाळी; मंडपी. २ (हेटकरी) चुलीच्यावर स्वयंपाकाच्या वस्तू ठेवण्याची जागा. [सं. उत्+स्था, उत्थान, उत्थव]

उतव—पु. नदीस येणारा पहिला पूर; उथव. [उत]

उतवडा—पु. (कृषि.) एकाच सरींत बाजरीबरोबर अंबाडी, तूर, मूग, मटकी वगैरे धान्य मिसळून पेरणें. [का. उत =नांगरणें]

उतवणी-णें—स्त्री. न. आधणाचें पाणी; उकळी आलेलें पाणी. [सं. उत्तप्त; किंवा ऊत+वणी=पाणी]

उतवणें—अक्रि. १ पाणी वगैरेनां आधण येणें; कढ येणें. [सं. उत्तमन]

उतविणें—क्रि. रेशमी वस्त्र, तापता बंधरे तापलेल्या खापरावर पसरून शस्त्रानें, सळईनें विवक्षित घडघा पाडणें. उतू पहा. [हिं. उतू=कापडाच्या घडघा; चूण; सं. उतु]

उतवेळुपणें—क्रिवि. उतावीळपणें. ' तें उतवेळुपणें आळंगिलें ' –दाव १८९.

उतळ, उतळवट—वि. (प्र.) उथळ, उथळवट पहा. ' लक्षानलक्ष कनक पात्रें । उतळें विस्तीर्णें चित्रविचित्रें । ' –वेसीस्व ११. ७८. [सं. उत्+तल]

उत्तळणें—अक्रि. (कों.) गदरणें; पिकण्याची लक्षणें दिसूं लागणें; उजळणें. (पाडाचा अंबा वगैरे) [सं. उत्+तल]

उतळतापु—पु. (गो.) (तापानें होणारा) भडका; दाह; संताप. [सं. उत्+तल+ताप]

उतळपातळ—स्त्री. गप्पा; बाता; प्रौढी. –वि. अपुरें; थोडें; विरळ; तुरळक (पाऊस, पिकें, इमारती, झाडें वगैरे). [पातळ द्वि.]

उताट, उताटकी—स्त्री. १ फुटावयास, बाहेर पडावयास होणें. २ (ल.) उतावळी; अविचार; अस्थिरता; हांवरेपणा; वळवळ; चळवळ; चुळबूळ. (क्रि. येणें). [सं. उत्+तट]

उताटणें—अक्रि. (कों.) १ तटकन फुटणें (फळ). आंतून भरून आल्यामुळें फळाच्या बाहेरची साल फाटणें; तळतून येणें; भरगच्च होणें. २ (ल.) अतिशय औत्सुक्यपूर्ण होणें; प्रबल इच्छा होणें. ३ गर्वानें ताठणें. ' तो काय उताटलाय ! ' [उताट]

उताडा—पु. पक्वावस्था; पूर्णावस्था, तयार होणें. ' उंसाडा पिकाचा आलियावरी । ' –यथादी १८.३०६७. [उताटें]

उताणेखाट—स्त्री. १ उताणी पडलेली खाट. २ (ल.) तापट, उर्मट, मांजुरी मोंगूस. [सं. उत्तान; प्रा. उत्ताण; म. उताणा+खाट]

उताणणें—अक्रि. वर्णन करणें; जाहीर, प्रसिद्ध करणें. ' उताणिती तुझी कीर्ति । उणावे नसे आम्हांते । ' [सं. उत्+तन् उत्तान; प्रा. उत्ताण]

उताणा—वि. १ वर तोंड केलेला; उलथा; पालथा, उपडा याच्या उलट (चीत मनुष्य, पात्र, पणे इ०). २ (ल.) सुस्त; निरुद्योगी; ढिला. [सं. उत्तान] ०चालणें—गर्वानें फुगणें; ताठणें. छाती काढून, प्रौढीनें, आढ्यतेनें चालणें; (गो.) उतानें पेवप. 'तैसा विद्यावयसा माजें । उताणा चाले ॥ ' –ज्ञा १३. ७१५. ०पडणें—१ उताणा होऊन पडणें; तोंडघशीं पडणें; खालीं येणें. (श्रीमंत, सावकार इ० नीं दिवाळें काढलें असतां म्हणतात). २ दरिद्री होणें; हीन स्थितीस येणें. ३ आजारी होणें. ४ रिकामे पडणें; निरुपयोगी होणें; पालथें पडणें यांप्रमाणेंच (तुलसी, पात्र, भांडें इ०). ५ अप्रयोग पाघणें; पराभूत होणें; कोणतेंहि काम अंगावर येणें. ०पाताणा—क्रिवि. खालीवर; उलथापालथें; पोटाकडून-पाठीवर; गडबडा फिरवून अगदीं चीत. (क्रि० करणें; पाडणें; होणें). [उताणा द्वि.]

उताने, उत्ताने—वि. १ उताणा. ' महीस पाडिला करींद्र हो उताने यदेतुके ॥ ' –गजगौरी (बस्वकृत) ५६. २ आढ्यतेचा; गर्विष्ठ. ' बहु फुरकटलासे बोल बोले उताने । ' –कृष्णचरितुक. १७. [सं. उत्तान]

उताव-ना-पातांना-खाट—उताणा वगैरे पहा.

उतावी-ही—स्त्री. इच्छा; आवड; एखाँ जिये हातीं ; मुमीश्वरांसी उतावी । ' –ज्ञा १३.१६६. [सं उत्+तृष्णा; प्रा. तण्हा; म. तहान]

उताप—वि. उन्हातील; सावली बसलेला; उघडा. [सं. उत्+तप्+तप्]

उतापती—स्त्री. उलहन हाक; फार हाक. [सं. उत्+तप्+क्ति] **०काटमारी**—स्त्री. लांडगेसोंड; कत्तल.

उतार—पु. १ पलीकडील तीरास चालत जातां येण्यासारखी पाण्यामधील वाट. ' तो पल्ह्यांहूनि पायउतारां ॥ ' –ज्ञा ७.१६५. २ एखाद्या औषधाची तीव्रता, जोर कमी करण्याकरितां दिलेलें औषध. ३ विषावरील वगैरे औषध, मंत्र, उपाय, इलाज, प्रतिकार. ' जेणें विष पाजिलें दुधर । तोचि करूं धावे उतार । ' –ह १४.१६२. ४ सन्मान, सेलोप दाखविण्याच्या वेळीं अंगावरील पोषाखावरचा दागिने वगैरेस देणें. अंगावरीळ उतरून देणें. ५ कमी होणें; ओसरणें. (नदीचा पूर, रोगाची तीव्रता, दुःख, वैभव, कीर्ति, संपत्ति वगैरे). ६ शांति; शमन. ६ जमिनीचा उतरतेपणा; ढाळ; छतरण. ७ यौवनाच्या अखेरीस याजविण्याची जलद गति; चाला. ८ होडीमें, तरीचें झाडें; होडींतून पलीकडे जाण्याचे झाडें; नोर. ९ नकल. ' उतार ग्रंथाचा ऐसे लिहिवेगीं ॥ ' –दाबि २.५०. १० उतारा; एका ग्रंथांतील दुसऱ्या ग्रंथांत घेतलेला भाग. ' त्याचि कथेचा जाला काहीसा या उतार कवनांतरीं ' –मोअनुशासनें ८.६८. ११ पालट होणें; बदलणें; तीव्रता कमी होणें. ' परंतु ममत्वोजी शिवे यांचे बुद्धीसें उतार पडेना. ' –भाव १५. [सं. उत्+तॄ] **-उतारें**]—वि.

१ उतार वय होण्याच्या मार्गास लागलेला; वृद्धत्व आलेला. २ हीण; हिणकस; दुय्यम प्रतीचा; चढ याच्या उलट. ३ नाशाच्या पंथास लागलेला; मोडकळीस आलेला; ऱ्हास होण्याच्या मार्गास लागलेला; मंदीचा; तोटयांत चाललेला. सामाशब्द–उतार खर्चे–पत्रपान–औषध–गोळी–पुडी–मात्रा– मोल·–मोली–डाव–वाट–रंग–काळ–चावडी–मंत्र–मार्ग–मसलत–बेत. •**खालीं असणें–पडणें**–अपकर्षास लागणें; निकृष्ट स्थिति प्राप्त होत जाणें; ओहोटी लागणें; उतरती कळा लागणें; मंदी येणें. •**खालीं चालणें**–गति कमी करणें. •**करी–करू**–पु. १ मुशाफर; प्रवासी; पांथस्थ; तात्पुरता मुक्काम करणारा–केलेला. २ द्रव्य वगैरे देऊन नदीपार जाणारा. •**घाट**–पु. नदीवरील पायऱ्यांचा रस्ता. •**घात**–पु. (गो.) विश्वासघात. [उत्तर+घात] •**चढ**–स्त्री. १ खालीं वर होण्याची क्रिया; कमी अधिक होण्याची क्रिया (आजार, माणूस वगैरेंची); क्षयवृद्धि; उत्कर्षापकर्षे. २ एखाद्या प्रदेशाचा उंचसखलपणा. ३ किंमतीमध्यें कमीजास्तपणा होणें; भावांत बदल. ४ ताप कमीअधिक होणें. •**चावडी**–स्त्री. १ खेडयांतील पांथस्थ वगैरे जींत उतरतात ती चावडी; डाक–बंगला; धर्मशाळा. २ (ल.) पाहुणे उतरण्याची जागा; अतिथिघर. •**चिठी**–स्त्री. १ जलमार्गावरून प्रवास करण्याचा परवाना. २ नक्कल; रद्द केलेलें खत–पत्र (पूर्वी वरील श्रीकार खोडून, फाडून खत रद्द करण्याची पद्धत असे). ३ विष वगैरे उतरावें म्हणून बांधलेली–मंतरलेली चिठी, कागद. ४ कोणत्याहि लेखाची नक्कल. ५ (थट्टेनें) बडतर्फीचा हुकूम. •**जमीन**–स्त्री. सखल होत जाणारी जमीन; उतरण. •**तसरीफ**–स्त्री. एखाद्याचा सन्मान करण्याकरितां स्वतःच्या अंगावरून काढून दिलेलीं वस्त्रें. उतार अर्थ ४ पहा. [अर. तसरीफ्=सन्मान; बहुमानाचीं वस्त्रें देणें] •**तळ**–पु. माणसें, गाडया उतरण्याची गांवाबाहेरील जागा; अड्डा, गाडीतळ; वाटेंतील मुक्कामाची जागा. •**तेज**–वि. १ ज्याचें तेज कमी झालें आहे असा. २ क्षीण; निस्तेज; निःसत्त्व; निःशक्त. •**तांड**–न. ज्यापासून घाट उतरण्यास सुरवात होते ती डोंगरांतील जागा; उतरणीचा आरंभ. •**दिवस**–पु. १ आयुष्याचे अखेरचे दिवस; वार्धक्य. २ आपत्काळ. •**पातार–बितार**–पु. १ सर्वसामान्य प्रवासखर्च. २ तरीचें भाडें; वाहनाचें भाडें; उतार. ३ मार्गावरील कर, जकात वगैरे. •**पान**–न. १ (गंजीफा–पत्र्यांतील खेळांत) खेळलेलें, खेळावयाचें पान. २ हिशेब पुढें चालू केलेलें, करावयाचें पान. •**पेठ**–स्त्री. १ ज्या ठिकाणीं निरनिराळया ठिकाणचा माल विकावयाकरितां येतो व खरेदी केला जातो असें शहर, बंदर, व्यापारी शहर. उतरपेठ पहा. 'आचाराचें मूल पीठ। वेदांची उतारपेठ।' –ज्ञा १७.२७४. २ उतारतळ पहा. •**पोशाख**–पु. १ अंगावरून उतरून बक्षीस दिलेलीं वस्त्रें. २ अंगावरून काढून टाकलेलीं जुनीं वस्त्रें. उतार अर्थ ४ पहा. [फा. पोशाक्=वस्त्रें] •**बंद**–पु. ज्या कागदावर कोणत्याहि गोष्टीची नक्कल काढली आहे असा कागद. –वि. १ उतारावर असलेली, उताराची. २ अपकर्षाप्रत जाणारी. [फा. बन्द्] •**बंदर**–न. १ जलमार्गावरील प्रवासी व माल उतरण्याचें ठिकाण. २ जलमार्गांत लागणारें ओरवा करण्यांचें–नांगर टाकण्याचे स्थल. बंदर पहा. [फा. बंदर्] •**बाजी**–स्त्री. १ परयाच्या डावांतील दहिल्यापासून खालचे पत्ते. २ अंगावर येणारा, हार येत असलेला खेळ. ३ चौघडयाच्या अखेरीस जलद वाजविण्याची गत; बाजा. उतार अर्थ ७ पहा. •**बाजू**–स्त्री. (पत्यांच्या खेळांत) ज्या बाजूनें प्रथम पान खालीं टाकावयाचें, उतरावयाचें ती बाजू. •**मणी, मोहरा**–पु. विष उतरविणारें रत्न. •**मान**–पु. १ पाणउतारा; अपमान; अप्रतिष्ठा; अवहेलना. २ वृद्धावस्था; आयुष्याची उत्तरावस्था. –वि. (व्यापक) अवमानित; अपमानित; मानखंडना केलेला. •**माल**–पु. होडींतून पलीकडे पाठवावयाचा माल. •**वय**–न. म्हातारपण; वृद्धावस्था. [सं. उत्तरवयः] •**वस्त्र**–न. १ जीर्णवस्त्र; फाटलेले कपडे. २ दुसऱ्यानें अंगावरून काढलेलीं किंवा टाकून दिलेलीं वस्त्रें. 'उमदीं तरी ते उतार वस्त्रें। घालूं नये रे अंगावर।' –दावि ४३९. •**वेळ**–स्त्री. दोन प्रहर दिवस टळल्यावरची वेळ; संध्यासमय.

उतार—न. (गो.) उत्तर पहा. १ प्रतिध्वनि. २ उत्तर; वचन. 'त्येणें माकां उतार दिलें.'

उतारा—पु. १ एखादी क्रिया केल्यानंतर उत्पन्न होणारें फल, निष्पत्ति, पदार्थ, द्रव्य इ० अखेर परिणाम; राहिलेलें उत्पन्न. 'पंधरा शेर लोणी कढविलें त्याचा बारा शेर उतारा आला.' २ जम; मेळ, ताळा (निरनिराळीं मापें वगैरेंचा). ३ अंगावरून ओवाळून काढलेला पदार्थ (भूतबाधा निवारणार्थ) व ती क्रिया. 'ज्या महद्भुत संचरलें अंगीं। त्यासि पंचाक्षरी नसे जगीं। भगवंत भेटी वांचून वेगीं। उतारा त्यासी असेचिना॥'–जै ८१.५८. 'त्वरित उतारे करुन देती लोह उडीद डोंबाला।' –ऐपो ३०७. (क्रि० करणें). ४ विष वगैरेवरील औषधें, उपाय, इलाज; रोगउपशम. ५ एखादा उखाणा, कोडें यांचें उत्तर, किल्ली. ६ रचना, धाटी व सदृश शब्द असलेले परंतु विरुद्ध अर्थी श्लोक, पद्य वगैरे; किंवा समानार्थक परंतु भिन्न शब्द व रचना असलेलें पद्य. ७ नक्कल; प्रत; प्रतिमा; उतरून घेतलेला ग्रंथाचा किंवा भाषणाचा भाग. (क्रि० करणें). ८ तरीचें भाडें ९ नदी वगैरेंतून पार जाण्याजोगा रस्ता. उतार अर्थ १ पहा. १० पाणउतारा याचा संक्षेप; अपमान; अप्रतिष्ठा, मानहानि. ११ अंगावरून काढून टाकलेलीं वस्त्रें; जीर्ण वस्त्रें; अगर सन्मानाकरितां अंगारून काढून दिलेलीं वस्त्रें. १२ झाडावरील फळें उतरण्याकरितां द्यावयाची मजुरी; उतरणावळ. १३ हुंडी वगैरे कागदपत्रांची नक्कल उतरून घ्यावयाची वही. १४ बडतर्फी. उतार पहा.

उतारावाग—क्रिवि. (व.) उताराच्या अनुरोधानें. [उतार+बाजू?]

उतारी—स्त्री. १ (गंजिफांचा खेळ) आपले सर्व हुकुम एकदम खेळून घेणें; वेणीघेणी संपल्यावर जर तिगस्त झाली नसेल किंवा तिगस्त होऊनहि खेळण्यास वाट नसेल तर उतारी करावी लागते. (क्रि० करणें). (पत्यांचा खेळ) पान टाकण्याची क्रिया; उतरणें; उतरावयाचें, उतरलेलें पान. ' उतारी तुमच्यापासून होऊं द्या. ' २ (ल.) उतरती कळा. ३ उतारू; प्रवासी; तात्पुरता मुक्काम करणारा. ४ सर्प, विंचू यांच्या विषावर उपाय करणारा; मांत्रिक. ५ होडीवाला; तरवाला; नावाडी. [उतार, उतरणें]

उतारी—वि. (गो.) प्रत्युत्तर करणारा. [सं. उत्तर]

उतारू—वि. उतारकरी; प्रवासी; तात्पुरता वस्ती करणारा. [उतरणें] **०पातारू**—पु. प्रवासी, वाटसरू. [उतारू द्वि.] **०होणें**—(माळवी) उद्युक्त होणें; तयार होणें.

उताऱ्या—वि. १ नदीवरून लोकांस उतरून नेणारा; नावाडी; होडीवाला. २ झाडावरून आंबे उतरणारा. [उतरणें]

उतावळ-ळी—स्त्री. १ घाई; गडबड; आतुरता; अति उत्कंठा;त्वरा; अधीरपणा. २ (विशेषतः) उतावळी नांवाची हळव्या जोंधळ्याची एक जात. [प्रा. उत्तावल; का. ओत्तर=घाई· धातु ओत्तु; हिं. उतावल; तुल० सं. उताप किंवा उद्+त्वर]

उतावळा, उचाविळा, उतावीळ-वेळ—वि. अधीर; बडबड्या; घाई करणारा; उत्सुक; उत्कंठित; विलंब न खपणारा. ' नगरा आला श्रीकृष्ण । नगरनागरिक जन । उतावेळ कृष्णदर्शन । करावया धावित्रले ।। ' –एरुस्व ६.१६. ' प्रभात होतां उतावेळ ' कद्रु बोले विनतेसी । ' –मुआदि ५.१८. ' म्हणा मज उताविळा गुणचि घेतला घाबरें । ' –केका ४५. ' मदन जाहला उतावीळ । जावयासी । ' –कथा १.४.१४०. **म्ह०** उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग (उतावेळपणानें कोणी अयोग्य वर्तन करतो तेव्हां उपहासानें म्हणतात). [उतावळ]

उती—स्त्री. उद्भव; उठाण. ऊत, उतणें पहा. ' ऐसा न धटे विषयाची उती । ' –भाए ७३३.

उतींव—वि. उकळणारें; उकळून वर येणारे. उतणें पहा.

उतुतणें—अक्रि. १ अंगावर पुरळ उठणें. उतणें पहा. २ (ल.) घाईत असणें; धांदलींत असणें.

उतू—पु. अंगरखा इत्यादि शिवावयाच्या कापडास जसजसे दोरे घातलेले असतात तसतशी घडी घालून मोड पाडण्याची क्रिया. उतविणें पहा. [हिं. उत्तू]

उतें—न. (कों) जमीन भाजल्याशिवाय तींत भाताचा रोह टाकून काढलेलें पीक. नुसती नांगरट करून भाताचें केलेलें रोप. ' आपण उतें पेरलें काय ? ' **उत्याचें भात**–न. वरील जमिनींत काढलेलें भात. [का. उतू=नांगरणें ?]

उतों—अ. आणखी. –शर (नामदेवगाथा) २३६. [सं. उत]

उतोटी—स्त्री. भातार्चीं रोपें उगवलेली उतार जमीन; ज्या जमिनीवर उतें करतात ती जमीन.

उतोति-ती—स्त्री. खारीक. उतती पहा. ' अशोक वृक्ष उतोतिया ' –ह १०.१५७. ' तेथें पोफळी असती सतरा । उतोतीया लागल्या अपारा । कवीठ आणि चिंचा समग्रा । मिळोनि छत्तीस ।' –स्वादि ९.५.४१. [का. उत्तत्ति, उत्तोत्ति=खारीक]

उतोंब, उतघ—पु. (गो.) चुडत्याचा वगैरे जाळ केल्यामुळें भांडयांतील पदार्थांस धुरासारखा येणारा वास. [सं. उत्तप्]

उत्कट—वि. १ अतिशयित; प्रचंड; जोरदार; अधिक; पुष्कळ; फार. ' आपपृथ्वीउत्कटें । ' –ज्ञा १४.१०१. २ चोंगळें; सुरेख; उत्कृष्ट. ' उत्कट भव्य तेंचि ध्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । ' –दा १९.६.१५. [सं.]

उत्कटासन—न. योगासनाचा एक प्रकार. पायांच्या बोटांवर भार सांभाळून दोन्ही टांचावर दोन्ही कुल्ले ठेवून बसणें व दोन्ही हात जोडणें. –संयोग ३३४. [सं.]

उत्कंठा—स्त्री. उत्कट इच्छा; आशा; उत्सुकता; आवड; अतिशय आकांक्षा; आतुरता; अधीरता; हपापणें; वखवखणें; धाधावणें. ' ग्रंथु दावी उत्कंठा । भंगों नेदीं ॥ ' –ज्ञा १४.३६. [सं.]

उत्कंठित—वि. उत्कंठा लागलेला; उत्सुक; आतुर; अधीरा; धाधावलेला. [सं.]

उत्कड—(कों.) कुदळीचें पातें पुढें बसविलेलें मुसळासारखें हत्यार. याचा उपयोग खांब पुरण्याकरितां जमिनींत खड्डा करण्याकरितां, खोदण्याकरितां किंवा उलटें पुरून नारळ सोलण्याकरितां करतात. [सं. उत्+कट्; प्रा. कड=काठी]

उत्कथित—(अप.) शिजविलेलें; उकडलेलें; कढविलेलें. [सं. उत्कथित]

उत्कर्ष—पु. (शाप.) कर्ब आणि उज्ज यांच्या रासायनिक संयोगानें झालेलें संयुक्त द्रव्य. (इं.) हायड्रोकार्बन. तेल, तूप, लोणी, चरबी इ. स्निग्ध पदार्थ उत्कर्ष आहेत. **०नव्राम्ल**–न. कर्बनत्रवायु व उज्जवायु यांच्या मिश्रणानें तयार झालेलें अम्ल. (इं.) हायड्रोसायनिक ॲसिड.

उत्कर्ष—पु. भरभराट; चलती; चलचलाट; वाढ; भर; मोठेपणा; श्रीमंती; समृद्धि; संपन्नता. ' भक्तीच्या उत्कर्षें। नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥ ' –तुगा ५४७. [सं. उत्+कृष्-कर्ष]

उत्कलिका—स्त्री. उकळी; एकाएकीं उत्पन्न होणारी तीव्र इच्छा. [सं.]

उत्कळ—स्त्री उत्कंठा; उतावीळ; अधीरपणा. उत्कलिका पहा. [सं. उत्+कल्]

उत्कलित—न. युद्ध; कलह. 'उदयलेसे जें उत्कलित।' –ज्ञा १८.१६२७. [सं. उत्+कल्]

उत्काडे—क्रिवि. (यो.) परसाकडे. [का. उक्कड=गोवाची कड]

उत्कीरक—पु. ओरखडणाऱ्या पक्ष्यांचा एक वर्ग; या पक्ष्यांना अंगुलीस तीक्ष्ण नख्या असतात व त्यायोगें त्यांस ओरखडतां येतें. –प्राणिमो ६०. [सं. उत्+कृ]

उत्कीलन—न. १ गुंतागुंत सोडवणें; मोकळें करणें. २ (बंधनापासून) मोकळें करणें; सोडविणें, सोडणें. ३ फुलणें; उमलणें; पसरणें; उघडणें; विस्तृत करणें. [सं. उत् +कील्]

उत्कुण—पु. (हिं.) ढेकूण. [सं. मत्कुण]

उत्कृष्ट—वि. १ अत्यंत सुंदर; चांगलें, फार उत्तम; नामी; २ अत्युत्कट. 'मनुष्यानें उत्कृष्ट उडी मारिली तर पांच हात मारील, आणिक किती मारील!' [सं. उत्+कृष]

उत्क्रम—पु. १ उलटी व्यवस्था, क्रम, पद्धत; व्युत्क्रम. २ (ल.) अव्यवस्था; अनियमितता; पद्धतशीरपणाचा अभाव. [सं.]

उत्क्रमण—न. खालून वर जाणें; बाहेर निघणें, पडणें, उडणें; वर चढणें; निघून जाणें. उ० प्राणोत्क्रमण=मरण. 'कीं बिबीं ऐक्यपण। तैंचि ज्ञानियाच्या चिर्दशींचें उत्क्रमण।' –यथादी ३.७६०. [सं. उत्+क्रम्]

उत्क्रांत—वि. उत्क्रमण केलेला; वर किंवा बाहेर चालेलला; निघून गेलेला; वर उडून चालेलला. [सं.] **०मति**–वि. व्यापक बुद्धीचा; ज्ञानी. –स्त्री. व्यापक, अफाट बुद्धि. 'नाहीं पोरें गुरुभक्ती। परी गा उत्क्रांतमती।' –ज्ञा १३.४५१. [सं.उत्+क्रम्–क्रान्त]

उत्क्रांति—स्त्री. १ ऊर्ध्वगति; मरण. २ (चुकीनें सध्यां रूढ) विकास; उन्नति(इं.) इव्होल्यूशन. [सं.] **०धेनु**–स्त्री. मरणसमयीं सुखानें मृत्यु यावा व पापक्षालन व्हावें म्हणून ब्राह्मणास अर्पण केलेली गाय. [सं.] **०वाद**–पु. विकासवाद; मूळ द्रव्यांतील शक्तीची क्रमाक्रमानें वाढ झालेली आहे व हा पूर्वापरक्रम किंवा संरणी सोडून मध्येंच उपटसुळासारखें कांहीं निर्माण झालें नाहीं असें मत. –गीर १६८. [सं. उत्+क्रम्–क्रान्ति]

उत्क्लेदनांक—पु. (शाप.) द्रवरूप पदार्थाचें वाष्पांत रूपांतर होण्याचें उष्णमान. (इं.) बॉयलिंग पॉईंट. [सं. उत्+क्लेदन+अंक]

उत्खती—स्त्री. लग्नाचा एक प्रकार. –अश्वप १४५.

उत्खात—वि. उखडलेला; नष्ट केलेला; मोडीनाट केलेला; मूळासकट उपटलेला; खणलेला. [सं. उद्+खन्]

उत्छाह—पु. उत्सव; उत्साह पहा. 'श्रीरामनौमी उत्छाह आला।' –दावि १४.

उत्तप्त—वि. उघडा; प्रकाश असलेला; मोकळा; छायारहित; सर्वस्वं सूर्यकिरणांनीं तापत असणारा. –न. उघडी व पूर्ण प्रकाश असणारी अशी जागा. [सं. उत्+तप्]

उत्तप्त—वि. अतिशय तापलेलें. [सं.]

उत्तंभित—वि. १ वर उचललेलें; सरळ उभें केलेलें. २ पुढें आलेलें; उन्नत (स्त्रियांचे स्तन). ३ उभारलेले, वर केलेले (कान). [सं. उत्+स्तंभित]

उत्तम—वि. १ अतिशय चांगलें; उत्कृष्ट. २ प्रथम; मुख्य; वरिष्ठ. **०स्वर्ग**–न. (व.) हातघाई; निकर 'तेव्हांच उत्तमस्वर्गावर येतो.' [खजें?] **०गति**–स्त्री. १ मोक्ष; निर्वाणपदप्राप्ति. २ चांगलें मरण (क्षेत्र, तीर्थ वगैर ठिकाणीं). क्षुभकाळीं –मरण येणें. ३ चांगली प्रगति (शास्त्र वगैरेमध्यें.) **०द्रव्य**–न. १ (धर्मशास्त्र) उच्च वर्णाचें (चोरलेलें) धन, संपत्ति. २ सुवासिक औषधी पदार्थ. **०पुरुष**–पु. १ चांगला, श्रेष्ठ पुरुष; परमेश्वर; पुरुषोत्तम. (व्याकरण) प्रथम पुरुष. **०श्लोक**–वि. पुण्यकीर्ति; विख्यात; कीर्ति पसरलेली आहे असा; पुण्य श्लोक. **०साहस**–न. (धर्म शास्त्र) १ सर्वांत मोठा दंड; ३००० किंवा १०८० पण. २ देहांतशिक्षा; सर्वांत मोठी शिक्षा, (डाग देणें, हद्दपारी, मालमत्तेची जप्ती, अवयवच्छेदन व मृत्यु या मुख्य शिक्षा होत.) ३ देहांतशासनार्ह गुन्हा; सर्वांत मोठा गुन्हा. ४ अतिशय कष्टाचें काम; अत्यंत धाडसाचें काम.

उत्तमर्ण—पु. १ धनको; सावकार. याच्या उलट अधमर्ण. २ पदीवाला; हुंडीवाला. [सं. उत्तम+ऋण]

उत्तमांग—न. डोकें; मस्तक. 'इयें उत्तमांगें होतीं फुडीं।' –ज्ञा ११.४१८. [सं. उत्तम+अंग]

उत्तमोत्तम—वि. अतिशय उत्तम; उत्कृष्ट; फारच चांगला. [सं. उत्तम द्वि.]

उत्तर—न. १ प्रतिवचन; जबाब. 'तो किमपि न दे उत्तर उत्तरदिशेसि सोडूनी।' –मोविराट ३.५९. २ वाक्यरूप, पदरूप शब्द; भाषण. 'मी एक उत्तरही बोललों नाहीं आणि हा मला उगीच शिव्या देतो.'; 'उत्तरास प्रत्युत्तर करतो.'; 'उणें उत्तरानें बोलतो.' ३ (वाक्यों) गाणें किंवा एखादा हलका प्रबंध जातीचे एकेकवार घोकावियाजोगे लहान लहान विभाग असतात त्यांपैकीं प्रत्येक. 'साठा उत्तराची काहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.' ४ (गणित) गणितश्रेढींत ज्या अंतरानें संख्या एकापुढें एक चढत किंवा उतरत जातात तें अंतर; दोन पदांतील अंतर. ५ (कायदा) प्रतिवादीचा वादीस जबाब; समर्थन, साक्षी वगैरेचा जबाब. ह्याचे चार प्रकार आहेत–असंदिग्ध (स्पष्ट), अनाकुल (सुसंबद्ध), अव्याख्यागम्य (सुबोध–सुलभ), न्याय्य (योग्य); प्रतिवादीच्या उत्तराचे चार प्रकार आहेत–सत्योत्तर (कबुली जबाब), मिथ्योत्तर (नाकबुली), कारणोत्तर (कबूल करून त्यांस कारण दाखविणें), प्राङ्न्यायोत्तर

(पूर्वीच वादीविरुद्ध न्याय झाला आहे अशा जबाब). १ उलट जबाब; हाजीर जवाब. –स्त्री. ७ दक्षिणेच्या समोरची दिशा. 'पूर्वकडे तोंड करून उभें राहिलें असतां डाव्या हाताकडची उत्तरदिशा.' –न. ८ उदाहरणाचें इष्ट फल. –पु. ९ एक अलंकार, जेव्हां वक्ता प्रश्नोत्तरासह आपल्या मनांतील भाव, वृत्ति व्यक्त करतो तेव्हां हा अलंकार होतो. यांत विचारलेले प्रश्न किंवा उत्तरें अनुमानितां येतात. उ० 'हस्तिदंत व्याघ्रचर्म कैसे येथ मिळे तुला। सुबत्ते जोंवरी रम्य विलास दिसती मुला' ॥ यावरून प्रश्न तर्कितां येतो. व 'काय कठिन ? दैवगती, सुख काय ? प्रेमळा अशी पत्नी ॥' यांत प्रश्न अप्रिय-उत्तर हीं दोन्हीं आहेत. –न. १० अग्रहार इनाम जमीन; मालकीची जमीन. यमासांत उत्तरपदीं जसें–देवोत्तर; ब्रह्मोत्तर. 'ब्रह्मोत्तरतें ब्राह्मणीं दिन्हलें.' –शके ११२८ चा पाटणशिलालेख. –पु. ११ उंबरा. 'कांतार्ये कांतीला। उत्तर जडीला।' –स्त्रीगीतमाला २०. –क्रि. १ पेक्षां अधिक, जास्त. याअर्थी– एकोत्तर, एकोत्रा, त्रिंशोत्रा, चोशोत्रा, पंचहोत्रा, पंचोत्तरशत, कोशोत्तर योजन, अंगुलोत्तरहस्त २ पुढील; नंतरचा; दुसरा; पूर्वीच्या उलट; दुसरा. याअर्थी–इतरार्थ, उत्तरश्लोक, उत्तररात्र. ३ श्रेष्ठ; वरचढ; अधिक चांगला, याअर्थी– राजोत्तरप्रधान; नरोत्तरनारी; गुरूत्तरशिष्य; स्वाम्युत्तर सेवक; शास्त्रोत्तर बेद, ज्ञानोत्तर भक्ति. ४ नंतरचा; याअर्थी–उत्तर काळ; उत्तर व्यथा-यातना–व्यय–आयुष्य–वय. –अभ. नंतर; मागाहून. उ० इतउत्तर; तदुत्तर. 'ज्येष्ठोत्तर लग्न होत नाहींत.' [सं. उत्तर] ०अक्षांश–पु.जी स्थळें विषुववृत्ताच्या उत्तरेस असतात त्यांचे अक्षांश ०कथा-भाग–भीपु. एखाद्या गोष्टीचा, व्याख्यानाचा शेवटचा भाग; उपसंहार. ०कंदंब–न (ज्यो.) क्रांतिवृत्ताचें उत्तरेकडील केंद्र. ०कर्म-कार्य-क्रिया–नस्त्री. और्ध्वदेहिक; प्रेतसंस्कार. 'माझें उत्तरकार्य मी आपल्या हातून आटोपणार.' –विवि १४.१०.२१९. ०काल–पु. १ भविष्यकाळ. २ मृत्युकाळ; अखेरचे दिवस; वृद्धावस्था. ३ नंतरचा, मागाहूनचा, पुढील काळ. ०कुरु–पु. १ पृथ्वीच्या नवखंडांपैकीं एक खंड; उत्तरेकडील, उत्तरध्रुवाजवळचा प्रदेश. २ उत्तरध्रुववृत्त. ०कोन–पु. उत्तरेकडील कोपरा; दिशा. ०खंड–न. १ आर्यावर्त; उत्तर देश पहा. २ पुढील; उत्तर भाग (ग्रंथ, प्रदेश, शहर वगैरेंचा). ०गति–स्त्री. १ सुटका; मुक्तता. २ मोक्ष ०गोल–पु. क्रांतिवृत्ताचा उत्तरेकडील भाग; यांत मेषापासून कन्येपर्यंतच्या राशींचा अंतर्भाव होतो. ०गोलार्ध–पु. भूमध्यरेखेनें पृथ्वीचे दोन भाग पडतात त्यांपैकीं उत्तरेकडील भाग. ०ज्या–स्त्री. (गणित.) त्रिज्येतून भुजज्या वजा केली असतां येणारें अंतर; धनु व ज्या यांची मध्यरेषा. (इं.) व्हर्सेड् साईन. ०दशा–स्त्री. १ पुढें येणारी स्थिति; नंतरची स्थिति. २ उतार वय; वार्धक्य. ०दिवस–पु. १ पुढील दिवस; नंतरचा दिवस. २ उद्यांचा दिवस; भविष्यकाळ. 'पूर्व दिवस गेला, उत्तर दिवस कसा येईल तसा येवो.' ०देश–पु. आर्यावर्त; उत्तरेस हिमालयापर्यंत व दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत आणि पूर्व-पश्चिम दिशांस समुद्रांनीं मर्यादित असलेला प्रदेश. ०ध्रुव–पु. १ उत्तर ध्रुवाचा तारा. २ पृथ्वीचा सर्वांत उत्तरेकडील बिंदु. ०ध्रुववृत्त–न. उत्तरध्रुवबिंदुपासून २३॥ अंशावरून जें अक्षवृत्त जातें तें. ०पंथ–पु. १ संसारापासून विरक्त होऊन परलोकसाधनार्थ तीर्थयात्रा, अरण्यवास, तप. श्रर्या इत्यादि करावें म्हणून अवलंबन करावयाचा मार्ग. 'श्रीपादश्रीवल्लभ नाम घेतें। झालें त्रिमूर्ति कैसे। पितयातें म्हणतसे। जाऊं उत्तरपंथासि॥' –गुच ५.५६. २ हिमालयांत बद्रिकाश्रमाजवळ एक स्थान आहे तें. हा मार्ग स्वर्गारोहणाकडे जातो व माणसातला दुर्बध्य आहे अशी समजूत आहे. यावरून ०पंथास लागणें–मरणोन्मुख होणें. ०पंथी सरदार–शिंदे होळकर. कारण पेशवाईंत हे उत्तरेकडे असत. –ख ३२४१. ०पद–न. (ज्या.) समासांतील दुसरें शब्दरूप. पद. ०पराई, पन्हाई–स्त्री. उतार वय; वृध्दावस्था. ०पक्ष–पु. (कायदा) प्रतिवादी; त्याची बाजू. २ (भांडणतंटयांत) विरुद्ध कज्जा व तिचे जबाब–समर्थन, आरोपांचें निरसन; खंडन; 'पूर्वपक्ष याच्या उलट. ३ (न्याय–तर्क.) उपप्रमेय; 'गौणप्रमेय; उपनय (प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय व निगमन या न्यायशास्त्राच्या पांच अंगांपैकीं चौथें) ४ महिन्यांतील दुसरा पंधरवडा; कृष्णपक्ष; वद्यपक्ष. ५ (सामा.) प्रत्युत्तर; पूर्वपक्षखंडन; शंकांचें समाधान. ०पाल्ली–स्त्री. (कों.) ज्या ठिकाणाहून उत्तरेकडील भाग दूरवर दिसूं आहे व दक्षिणेकडील बाजू टेंकडी झाडें वगैरेंनीं संरक्षित आहे, अशी जागा; उत्तराभिमुख अशी; दक्षिण पालवीच्या उलट. ०पूजा–स्त्री. १ पूजेचा शेवटचा भाग. २ एखाद्या तात्पुरत्या स्थापून केलेल्या देवतेचें विसर्जन करतेवेळीं करावयाची पूजा; विसर्जनविधि. ०प्रत्युत्तर–न. उत्तरावर पुन्हां उत्तर, जबाब, याप्रमाणें चाललेला वाद; वाद-प्रतिवाद. ०भाग–पु. पुढील, दुसरा भाग. ०भोजन–न. रात्रीचें जेवण. 'उत्तर भोजन अगत्य करावें.' –सप्र. १५.२. ०मात्रां-त्रीं–क्रिवि. प्रत्येक शब्दागणिक; प्रतिक्षणीं; प्रतिव्यवहारीं. 'तुला उत्तरमात्रां शिकविलें पाहिजे.' –शाको. ०मीमांसा–स्त्री. बादरायणाचीं ब्रह्मसूत्रें; षड्दर्शनांतील एक दर्शन; वेदांत. ०राग, रागिणी–पु.स्त्री. उत्तररात्रीं (रात्र संपावयाच्या वेळीं) गावयाचे मालकौंस, वसंत, सोहनी इत्यादि राग, रागिणी. ०रात्र–स्त्री. मध्यरात्रीनंतरचा काल, विभाग; पहाटेचा कालभाग; मध्यरात्र व सूर्योदय यांमधील वेळ. ०लोक–पु. वरचा लोक; देव, ऋषि व साधु यांचें निवासस्थान. ०वय–न. वृद्धावस्था; म्हातारपण; उत्तरपराई. ०वयस्क–वि. वृद्ध; म्हातारा; वयातीत. ०वादी–पु. (कायदा) प्रतिवादी. ०वेंड–स्त्री. उतारपेठ पहा. 'कीं धर्माची उतरवेंठ। कीं सिद्धीची ओळगवट।' –ज्ञ ११. 'तें वसंताचें मूळ पीठ। कीं परिमळाची उत्तरवेंठ।' –शिशु ६१६. ०वेदी–स्त्री. यज्ञामध्यें ज्या वेदीवर मुख्य सोमादि द्रव्यांचें हवन होतें ती वेदी.

०व्यवस्था-स्त्री. १ भविष्यकाळची तजवीज; पुढील तरतूद. २ मृत्युपत्र. ३ उत्तरक्रिया; और्ध्वदेहिक किंवा त्यासंबंधी तजवीज. **०संगीतपद्धति**-स्त्री. हिंदुस्थानी संगीतपद्धति. **०साक्षी**-पु. प्रतिवादीपक्षातर्फे आलेला साक्षीदार. **०हीन**-वि. निरुत्तर; उत्तर देतां येत नाहीं असा.

उत्तरण—न. १ उतरणें; वरून खालीं येणें. २ नदीच्या पलीकडे जाणें; नदी वलांडणें; पैलतीरीं जाणें. [सं.]

उत्तरणें—अक्रि. उत्तर देणें. ' चंद्रिका खालच्या मानेनें उत्तरली. ' –निचं ९ [उत्तर]

उत्तरत्र—क्रिवि. १ नंतर; मागाहून; पुढें. २ पलीकडे. ३ भविष्यकाळांत. [सं.]

उत्तरा—स्त्री. १ बारावें नक्षत्र; उत्तराफाल्गुनी. २ उत्तर दिशा.

उत्तरांग—पु. १ शेवटचा भाग, अंग; उपसंहार; कोणत्याहि कामाच्या प्रधानभागानंतरचा भाग. ' पूर्वांग पुरवतें, उत्तरांग पुरवत नांहीं. ' २ (संगीत) रागाच्या प, ध, नी, सा, ह्या चार स्वरांचा समुदाय. [सं. उत्तर+अंग] **०वादी राग**-पु. (संगीत) ज्या रागाचा वादी स्वर त्याच्या उत्तरांगामध्यें असतो असा राग. ह्या वर्गांत येणाऱ्या रागाचा गानसमय रात्रीं बारा वाजल्यापासून दिवसाचे बारावाजेपर्यंत असतो.

उत्तराण—उतरण, उतराण पहा.

उत्तराणी—पु. आधाडा. [का. उत्तरणी]

उत्तराधिकारी—पु. वारस; मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जिंदगीचें स्वामित्व ज्याच्याकडे जातें तो. [सं.]

उत्तराफ(फा)ल्गुनी—स्त्री. बारावें नक्षत्र; उत्तरा. [सं.]

उत्तराभाद्रपदा-–स्त्री. सव्वीसावें नक्षत्र. [सं.]

उत्तराभास—पु. (कायदा) अप्रस्तुत; असंबद्ध; टाळाटाळीनें दिलेलें उत्तर; खोटा जाब. [सं. उत्तर+आभास]

उत्तराभिमुख—वि. ज्याचें तोंड उत्तरेकडे आहे असा. 'बाहेरी पद्मासन रचुनी । उत्तराभिमुख बैसोनि ॥ ' –ज्ञा ८.९२. [सं.]

उत्तरायण—न. (ज्यो.) सूर्य किंवा इतर ग्रहनक्षत्रें यांचें उतरेकडे जाणें; दुसरें अयन; हा अयनकाल; मकरवृत्तापासून कर्कवृत्तापर्यंत सूर्याच्याक्रांतीस जो सहा महिन्यांचा काळ (डिसेंबर २२ ते जून २२ किंवा माघ ते आषाढ) लागतो तो. ' आणि सामासांमाजीं मासु । उत्तरायण ॥ ' –ज्ञा ८.२२०. [सं. उत्तर+अयन] **०पात, बिंदु**-पु. क्रांतिवृत्तापासून फिरणारा सूर्य ज्या संपातांतून विषुवाचे उत्तरेस जातो तो पात किंवा बिंदु; वसंतारंभपात; याच्या उलट दक्षिणायनपात किंवा शारदारंभपात. **०मार्ग**-पु. १ सूर्य **मकरवृत्ता**पासून कर्कवृत्ताकडे जातो तो क्रांतिवृत्तांतील मार्ग. २ ब्रह्मलोकाचा मार्ग. अर्चिरादि मार्ग पहा.

उत्तरारणी—स्त्री. अभिमंथन करण्याची वरची अरणी. खालचीस अधरारणी म्हणतात. [सं. उत्तर+अरणी]

उत्तरार्ध—पु. दोन अर्धांपैकीं दुसरा अर्धे; ग्रंथादिकांचे जे दोन भाग त्यांतील दुसरा भाग [सं. उत्तर+अर्ध]

उत्तरावस्था—स्त्री. अखेरची अवस्था; वार्धक्य; ऱ्हास; नाश. ' क्षीणपणाचा मुमुहूर्त । काळ आरंभ करी जेथ । ते हे उत्तरावस्था येथ । ' –एभा २२.५२४. [सं. उत्तर+अवस्था]

उत्तराषाढा—स्त्री. एकविसावें नक्षत्र. [सं.]

उत्तरी—स्त्री. १ उत्तरक्रिया करतेसमयीं गळ्यांत जानव्यासारखें एक फडकें बांधतातर्ते. २ अंगवस्त्र; उपरणें; ओढणी; उत्तरीय. ' तिनें फाडून। आभरणें टाकिलीं बांधोनि. ' ३ स्नानसंध्यादि कर्मसमयीं उत्तरीयवस्त्र रामनामांकित पट्टयासारखे कोणी गळ्यांत घालतात ती. [सं. उत्तरीय]

उत्तरीय—न. १ उपरणें; ओढणी; शेला; उपवस्त्र; अंगवस्त्र. ' बहु विस्मित नृप मुनि सुर म्हणती उडवूनि उत्तरीयातें ॥ ' –मोभीष्म १२.१४. ' स्व उत्तरीयावर त्या समार्जी । बांधोनिया चाप त्यास माजीं ॥ ' २ उत्तरी पहा. [सं.]

उत्तरेकडील ढोंग—(ऐति.) तोतया(सदाशिवराव भाऊसाहेव)चें सांकेतिक नांव. –खरे १०२६.

उत्तरोत्तर—क्रिवि. १ हळु हळु; दिवसानुदिवस; क्रमाक्रमानें; पुढें पुढें. 'उत्तरोत्तर विद्या कमी होत चालली. ' २ अधिकाधिक. ' ऐसा हा उत्तरोत्तरु । ज्ञानबीजाचा विस्तारु ॥ ' –ज्ञा ४.१९२. [सं. उत्तर द्वि.]

उत्तंस—वि. भूषण; अलंकार; तुरा. सामासशब्द–कुलोत्तंस = कुलाचा भूषण; राजोत्तंस=राजेश्रेष्ठ. [सं. उत्+तंस्=शोभविणें]

उत्तान—वि. १ उताणा, तोंड वर केलेला. २ उथळ. ३ सरळ; स्पष्ट; गूढ नव्हे असा (श्लोकार्थ; अभिप्राय इ०) [सं.] **०चरण**-पु. उत्तानपाद याचा प्रतिशब्द; ध्रुवाचा बाप. 'आणि उत्तानचरणाचिया बाळा ॥'–ज्ञा ११.१०२. **०कूर्मासन**–न कुक्कुटासन घालून दोन्ही हाताची मिठी मानेंत घातली असतां होणारें आसन. –संयोग ३४४. **०मंडूकासन**–न. बेडकाप्रमाणें केलेलें आसन. –संयोग ३३८. **०वंचित (संयुतहस्त)**–न. (नृत्य) कोंपरें व खांदे थोडे वांकडे करून होन्ही हात त्रिपताक करणें, मग त्यांचे तळहात तिरकस दिसतील अशा रीतीनें ते ठेवणें.

उत्तानार्थ—पु. १ सरळ, सहज समजणारा अर्थ; सोपा अर्थ. –वि. २ गूढ नसलेला; उवड; स्पष्ट.(अर्थ इ०). [सं. उत्तान+अर्थ]

उत्ताप—न. उजेडाची व उघडी जागा. –वि. उघडी; उजेडाची; छायारहित; मोकळी; उन्हाची (जागा). [सं. उत्+ताप]

उत्तीर्ण—वि. १ उतरून पार गेलेला (नदी, घाट, संकट इ०); कार्यांतून पार पडलेला. ' जें शतमखोत्तीर्ण करा । आरुढोनि असे ॥ ' –ज्ञा १०.२४०. २ पास झालेला (परीक्षेत); जय मिळालेला; विजयी. ' उत्तीर्ण होण्यास अवश्यक गुणसंख्या ... एकंदरींत शेकडा ६० ' –कलावंत खातें ४८. ३ उतराई; ऋणमुक्त.

'देवूनि मज उत्तीर्णें । जालीं आजी ।' –ज्ञा १६.३३. 'परम सात्त्विक ब्राह्मण । रुक्मिणी धरी त्याचे चरण । म्हणे जगी कृष्ण येशील घेऊन । तरी मी उत्तीर्ण नव्हे तूंतें ॥' –ह २३.८५. 'त्वां केलें उपकारांसी । उत्तीर्ण नव्हे वंशोवंशीं ॥' –गुच ३०.६. [सं.] **०होणें**– १ विजयी होणें; पास होणें. २ मरणें. 'तेथ उत्तीर्ण होईल प्राणें ॥' –ज्ञा १.२०२. ३ उतराई होणें. 'उपासनेचें उत्तीर्ण व्हावें।' –दा १५.१०.३३. **०ता–त्व**–स्त्री.न. ऋणमुक्त होणें; कर्जाची फेड. 'मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं।'–ज्ञा ८ ११९. 'आलीं मुखावाटें अमृतवचनें। उत्तीर्णता येणें नव्हे जन्में ॥'–तुगा २१८७. [सं.]

उत्तुंग—वि. फार उंच. [सं.]

उत्तू—उतू पहा.

उत्तेजक—वि चेतना, उत्तेजन देणारें. हुरूप आणणारें; प्रोत्साहक; चेव, क्षोभ, कोप आणणारें; हुषारी, तरतरी देणारें (भाषण, पेय, प्रसग इ०).[सं. उत्+तिज्=तीक्ष्ण करणें] **०पदार्थ**–पु. तरतरी, हुशारी आणणारे पदार्थ; द्रव्य. (चहा, कॉफी, दारू इ०).

उत्तेजन—न १ उत्थान. जागृति; चेतना: प्रोत्साहन, उद्दीपन; स्फूर्ति; आवेश, चेव, क्षोभ येणे २ प्रलोभन: आकर्षण; उत्थानसाधन. [सं.]

उत्तेजित—वि. १ उत्तेजन दिलेला; आवेश, चेतना आणलेला; हुरूप, स्फूर्ति मिळालेला. २ प्रवर्तित; प्रवर्धित; गति वाढविणारा. [सं.]

उत्था—स्त्री उत्पत्ति; जन्म, उठावणी; समासांत उपयोग. उ० –मायोत्थसंसार (मायेपासून ज्याची उत्था झाली आहे तो); ज्वरोत्थ; अज्ञानोत्थ. [सं. उत्+स्थाः उत्थ=उत्पन्न]

उत्थान—न. १ उभें राहणें; उठणें. २ उदय पुनरुत्थान= पुन्हां उठणें. [सं.]

उत्थापक—वि. १ उभा करणारा; संस्थापन करणारा, प्रवृत्त करणारा; संस्थापक; उत्पादक. २ उठविणारा. उत्थापन पहा. [सं. उत्+स्था, उत्था, उत्थापक]

उत्थापणें—अक्रि. स्थानभ्रष्ट करणें; उठवून लावणें. या व इतर अर्थी उत्थापन पहा. 'असुर सुरां ते उत्थापिती।ते गाऱ्हाणें हरिशीं देती। इंद्र चंद्र प्रजापती। तेही चरफडती हरिपदा॥'–एरुस्व १.७९. [सं. उत्थापय्]

उत्थापन—न. १ उठविणें; उभें करणें. २ (ल.) मोठेपणास आणणें. ३ देव, मूर्ति इ०चें विसर्जन करणें; देवकोत्थापन. ४ उत्तेजन; उठावणी. ५ खडी ताजीम; स्वागतार्थ उभें राहणें; सामोरें जाणें. (क्रि० देणें; घेणें). ६ उठविणें; अभ्युत्थान; स्थानभ्रष्ट करणें; काढून टाकणें (राज्य, नोकरी इ० कां वरून). उत्थापणें पहा. ७ (गणित) एका पदाऐवजीं दुसरें पद, अंकाबद्दल अक्षर घालणें; बदली ठेवणें, आणणें. [सं.]

उत्थापित—वि. १ उभा राहिलेला; उभारलेला; उठविलेला; स्थापलेला; कायम केलेला २ काढून टाकलेला; दूर केलेला. [सं.]

उत्थित—वि. उठलेला; उभा राहिलेला; वर आलेला. [सं.] **०पद्मासन**–न. पद्मासन घालून नंतर दोन्ही हात व हाताचीं बोटें साफ उघडून जमिनीवर टेकून, हाताच्या बोटांवर व तळहातावर सर्व भार देऊन आसन उचलून धरण्याची क्रिया.– संयोग ३१८.

उत्थिति–स्त्री. १ उत्थान; उभें राहणें; वर येणें २ उभें राहण्याची, वर येण्याची स्थिति; उत्थितपणा. [सं.]

उत्थितोर्ध्वपद्मासन–न. शीर्षासन करून उभ्या पायांची हळू हळू एकेक मांडी घालून तशाच स्थितींत पद्मासन करणें. यानें मान, डोकें, कोपर यांवर ताण बसतो व डोक्याचे पांढरे झालेले केस काळे होतात संयोग ३४०. [सं उत्थित+ऊर्ध्व+पद्मासन]

उत्पत्ति–१ स्त्री जन्म: संभव; उद्भव २ प्रादुर्भाव; उत्थान; उदय. सामाशब्द–बीजोत्पत्ति, रोगोत्पत्ति. **म्ह०** एकाची उत्पत्ति तीच दुसऱ्याची आपत्ति. उत्पत्ति, स्थिति व संहार (लय) या तीन अवस्था प्रत्येक प्राण्याला असतात ब्रह्मा, विष्णु व महेश (शिव) या अनुक्रमें वरील तीन अवस्थांच्या अधिष्ठात्री देवता आहेत. [सं. उत्+पद्]

उत्पन्न—वि. जन्मलेलें; उत्पत्ति पावलेलें; उद्भूत; तयार झालेले. –न. १ फल, मिळकत, प्राप्ति (शेतकी, नोकरी, धंदा, व्यवसाय यापासून). २ नफा; खर्च वजा जाऊन शिल्लक; लाभ. ३ मूळ ठिकाण; मूळ कारण [सं. उत+पद्–पन्न] **उत्पन्नास येणें**– प्राप्ति होण्याच्या अवस्थेस पोंचणे; नफा, फायदा मिळूं लागणें. फलदायक होणें **०भक्षी**–वि. हातातोंडाशीं गांठ असलेला, रोजच्यारोज मिळवून खाणारा; आलेलें उत्पन्न लागलीच खाणारा; कांहीं शिल्लक न टाकणारा किंवा टाकण्यास असमर्थ. **म्ह०** उत्पन्नभक्षी मध्यान्ह दरिद्री. **०भोक्ता**–वि. १ वडिलोपार्जित संपत्तीवर निर्वाह करणारा २ हातातोंडाशीं गांठ असलेला; उत्पन्नभक्षी. **०विनष्ट, विनाशी**–वि. १ उत्पन्न झालेल्याबरोबर नष्ट होणारा; लागलीच नाश, मृत्यु पावणारा २ क्षणभंगुर: अल्पायुषी. ३ निर्जीव; नि.सत्त्व.

उत्पन्नणें—अक्रि. उत्पन्न होणें; उदय पावणें. 'उत्पन्नली नदी जेथें अमृतोदकें प्रवाह।' [उत्पन्न]

उत्परका—स्त्री. (गो.) उत्कट इच्छा.

उत्पल–ळ—न. १ कमळ; राजीव; पंकज. 'पूजीजसी नीलोत्पळीं। जीवभृंगाच्या।' –ज्ञा १७.६. शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा' –मोसभा ४.७३. २ एक उपरत्न. हें नील वर्णाचें असून सुंदर, स्वच्छ, पारदर्शक आणि कठिण असतें. [सं. उत्+पल (पत्)].

उत्पाटणें—सक्रि. नाहींसें करणें, नाश करणें; उपटून टाकणें. 'जे येवढें झाड उत्पाटी। ऐसें कायि असे।' –ज्ञा १५.२१०. [सं. उत्+पट्–उत्पटय्]

उत्पाटन—न. उच्चाटण; उपटणें; खणून काढणें; निर्मूलन करणें. सामाशब्द–वृक्षोत्पाटन; केशोत्पाटन; वासोत्पाटन. [सं.]

उत्पाटित—वि. उपटलेलें.

उत्पात—न. १ भयसूचक चिन्ह, खूण, अपशकुन; भावी अरिष्टांचे सूचक चिन्ह. 'पाहुनि उत्पातांतें बहु तज्ज्ञ सकंपकाय होतात।' –मोभीष्म १.६. 'झाले उत्पात बहुत तेव्हां चळचळ वसुंधरा हाले।' –मोभीष्म १०.३८. उत्पातांचे कांहीं प्रकार–भूकंप, उल्कापात, तडित्पतन, अशनिव्यवन, वृक्षोन्मूलन वगैरे. २ अनर्थ; संकट. ३ खोड्या; दंगे; पीडा; त्रास (राजा, चोर, बंड इ० चा); उचल –पया ७२. [सं. उत्+पत्=पडणें] ०प्रलय–पु. प्रलयकालचा, जगाच्या अखेरीचा अनर्थ; भयंकर, सर्वव्यापी संकट [सं.]

उत्पाती—वि. १ क्रात्य; खोडकर; द्वाड (मूल.). २ साहसी; मोठा उद्योगी; हिंम्मेदार; उलाढाली करणारा (चांगल्या व वाईट अर्थी) [उत्पात]

उत्पादक—पु. १ पिता; निर्माणकर्ता; उत्पन्न करणारा. २ संस्थापक; कांहीं कार्य, गोष्ट मूळ, काढणारा, आरंभ करणारा. 'ही गोष्ट चालकांनीं व उत्पादकांनीं विसरतां कामा नये.' –वि. फलदायक. [सं. उत्+पद् =उत्पन्न करणे]

उत्पादणें—सक्रि. १ घडविणें; जन्मास आणणें; उत्पन्न करणें; तयार करणें; बनविणें. २ प्रकट करणें. 'शिकल्या शब्दांचें उत्पादितों ज्ञान। दर्पणींचें धन उपरवायां।' –तुगा १५५९. [सं. उत्पादन]

उत्पादन—न. १ उत्पत्ति; उत्पन्न करण्याचा व्यापार, क्रिया. २ (अर्थशास्त्र) उत्पन्न केलेला माल (कारखाने, व्यापार, शेतकी यांपासून) [सं.]

उत्पादित—वि. उत्पन्न केलेला; उत्पादिलेला; जन्मास आणलेला. [सं.]

उत्पाद्य—वि. उत्पन्न करण्यास योग्य; उत्पन्न करावयाचें तें. [सं.]

उत्प्राणिद्—न. (शाप.) उज्ज व प्राण यांचा संयोग. (इं.) हायड्रॉक्साइड.

उत्प्रेक्षण—न. दृष्टांत, उदाहरण देणें; दाखला देणें. [सं. उत्+प्र+ईक्ष=पाहणें]

उत्प्रेक्षणें—सक्रि. (कांहीं एक गोष्ट) उत्प्रेक्षाविषय करणें; एखाद्या गोष्टीचा दाखला, उदाहरण देणें. [उत्प्रेक्षा]

उत्प्रेक्षा—स्त्री. १ (साहित्य) एक अर्थालंकार. उपमेयावर जणों हें उपमानच आहे अशी संभावना ज्यांत केली असते तो अलंकार. स्वरूप (उत्प्रेक्षित वस्तु पदार्थ असेल तर), हेतु (क्रियेचें कारण असेल तर), व फळ (क्रियेचें फळ असेल तर), असे उत्प्रेक्षेचे तीन प्रकार आहेत. उ० 'मुलांचीं अक्षरें जणूं काय मुक्ताफळेंच.'' असें बोलोनी नळें रंजवीला। अंजुळीमाजी हंस बैसवीला। गमे चंपककुसुमींच हार झेला। पाठवाया युवतीस सिद्ध केला।' –नल ८१. २ उपमा; दृष्टांत, तुलना, दाखला देणें; कोटी करणें. 'त्या हरदासानें एका अभंगावर किती हो उत्प्रेक्षा घेतल्या? फार चांगला वक्ता तो!' ३ कल्पना; तर्क; युक्ति. 'आइकतयां उत्प्रेक्षे सद्धु चढे॥' –ज्ञा १०.२६८. [सं. उत्+प्र+ईक्ष्=पाहणें]

उत्प्रेक्षित—वि. उत्प्रेक्षा दिलेलें; तुलना केलेलें; दाखला देऊन स्पष्ट केलेलें. [सं.]

उत्प्लवन—न. उड्डाण; उडी. 'देखें उत्प्लवनासारिसा। पक्षी फळासि झोंवे जैसा॥' –ज्ञा ३.४१. [सं. उत्+प्लव्=उडणें]

उत्फालन—न. उडया मारण्याची क्रिया. 'मारी मूषक थोर कोण कुहरी राहोन ते मांजरी। उत्फालेन करी करून मजला पीडा शरीरी करी॥' –विद्रलकृत रसमंजरी २. [सं. उत्+फल्]

उत्फुल्ल-ल्लित—वि. उलगडलेलें; विस्तारलेलें; उघडलेलें; विकासलेलें; उमललेलें (पुष्प, नेत्र). [सं. उत्+फुल्ल्]

उत्फुल्लिका—स्त्री. मुलींचा एक प्रकारचा खेळ; बसफुगडी. 'पादोपविष्टानां मुहुः पतनोत्पतनरूपा क्रीडा उत्फुल्लिका इति उच्यते॥' –हाल–गाथासप्तशती (मसाप २.२४२). [सं.]

उत्रापावलाक—क्रिवि. (गो.) प्रत्येक शब्दागणिक व पावलागणिक; हरघडी. [सं. उत्तर+पद; प्रा. प्राउल्ल; म. पाउल]

उत्संकळ-खळ-गळ—वि. (प्र.) उच्छृंखल. उतावळा; अमर्याद; अप्रतिबद्ध; स्वैरवर्तनी (पोर, सासुरवाशीण इ.) 'तैंव कृष्ण म्हणती ऐसें। हें उत्संखळ बोलणें कायसें॥' –ज्ञा ६.१६२. [सं. उत्+शृंखला]

उत्संग—पु. १ मांडी. 'संतोषा उत्संगीं। दिधलें घर।' –ज्ञा १२.१५०. २ सान्निध्य. 'जयांचियें दिठीचिया उत्संगीं।' –ज्ञा ९.४७६. [सं.]

उत्संग(संयुत हस्त)—पु. (नृत्य) अराल हात. उताणे करून बाहू वाकविणें व उजवा अराल हात डावीकडे व डावा हात उजवीकडे ठेवणें.

उत्सन्न—वि. मृत; नष्ट. 'कुलघातकांच्या या वर्णसंकरकारक दोषांनीं पुरातन ज्ञातिधर्म व कुलधर्म उत्सन्न होतात.' –गीर ६१०. [सं. उत्+सद्]

उत्सर्ग—पु. १ बाहेर टाकणे; टाकून देणें; त्याग; दान; अर्पण. सामाशब्द–मलोत्सर्ग; मूत्रोत्सर्ग; वृषोत्सर्ग वगैरे. 'संक्रमण उत्सर्ग। विण्मूत्राचा।' –ज्ञा १३.११९. २ नियम; विधि; रीत. उ० उत्सर्गशास्त्र; 'मनुष्यानें सत्य बोलावें या उत्सर्गाचा कोणेकाचा प्राणरक्षणार्थ

असल्यहि बोलावें या विशेष वचनानें बाध होतो.' ३ धर्म करणें विहीर, धर्मशाळा इ० देवास अर्पण करणें. [सं. उत्+सृज् =टाकणें]

उत्सर्गतः—क्रिवि. १ सामान्यतः; साधारण मानानें, 'उत्सर्गतः पाहिलें असतां अहिंसारूप धर्म निर्दुष्ट आहे.' २ नियमानुसार [सं.]

उत्सर्जन—न. १ टाकणें; त्याग करणें; सोडून देणें. उत्सर्ग अर्थ १ पहा. २ वेदाध्ययन थांबविण्याच्या वेळीं करावयाचें कर्म; यज्ञोपवीत धारण करणारांचें एक प्रातिवार्षिक कर्म; श्रावणींतील एक कर्म. [सं.]

उत्सर्जित—वि. उत्सर्जन केलेला; त्याग केलेला; टाकून दिलेला. [सं.]

उत्सव, उत्साध—पु. १ आनंद; आह्लाद. उत्साह पहा. 'या ब्राह्मणांसि आम्हां सुहृदांसि पदीं बसोनि उत्सव दे.' –मोशांति ४.६६. २ आनंदाचा दिवस; समारंभ; सण. उत्साह अर्थ ३ पहा. 'आणिखी होतसे रिणदार तंटा । उत्साव भारी कारणें.' –दावि ४१४. ३ नाचरंग; खेळ; विलास. [सं. उत् + सु] **०मूर्ति**–स्त्री. १ मिरवणुकींत न्यावयाची देवाची प्रतिमा; भोगमूर्ति. २ केवळ शोभेचा, दिखाऊ माणूस, वस्तु. ३ –वि. (थट्टेनें) नेहमीं नटून थटून असणारा; उत्सववाला, मानाला मात्र पुढें असणारा.

उत्सादन—न १ पतंग उडविणें (६४ कलांपैकीं एक). २ नाश करणें. ३ वर जाणें, चढणें. ४ नांगरणें दोन–तीनदां किंवा पुरें (शेत). [सं उत्+सद्]

उत्सार, उत्सारण—पु न. (गणित) भाज्य संख्येपैकीं जेथपर्यंत भागाकार झालेला आहे त्यापुढील आंकडे; पुढें भागावयाचा प्रत्येक आंकडा, पद [सं. उत+सृ]

उत्साह—पु. १ अनुकूल भाव; उल्हास; उत्सुकता. २ आनंद: संतोष; समाधान. सामाशब्द–रणोत्साह; दानोत्साह; पुत्रोत्साह, धनोत्साह; मानोत्साह. ३ सण; सोहळा; आनंदाचा समारंभ, मंगलप्रसंग; आनंददायक कार्यक्रम (रामनवमी, शिवरात्र वगैरे प्रसंगीं करावयाचें अनुष्ठान, कथाकीर्तन, ब्राह्मण भोजन इ०), वसंतोत्साह 'करिती उत्साह बारशा ब्राह्मण । करूनी ब्राह्मण घरां गेले.' –ब ८. 'असो गोकुळीं झाला आनंद । उत्साह करिती परमानंद.' –ह १२.१४४. ४ उमेद; हिंमत; नेट; निकर; धैर्य. 'धर्म म्हणे, आजोबा उत्साहें कौरवांशि भांडावें.' –मोभीष्म १.७४. ५ वेग; जोर; आवेश. 'तो उत्साहो न संवरे । इंद्रिय ओघां.' –ऋ ६३. [सं. उत्+सह्] **०बुद्धि**–स्त्री. मनाची उमेद; ईर्षा; उत्सुकता; तत्परता; काम करण्याची आवड. 'उत्साहबुद्धि न मनाप्रति दे उठाया.' [सं.] **०भंग, नाश**–पु. १ आनंदाचा विरस; निराशा. २ आनंददायक कार्यक्रमाचा बिघाड; त्यांत आलेलें विघ्न. **०मूर्ति**–उत्सवमूर्ति पहा. १ व्यवहारांत पुढें असणारा; ज्याला नेहमीं पुढें करण्यांत येतें असा माणूस; कारभारी; फिरता व्यापारी, प्रचारक, प्रतिनिधि. **०शक्ति**–स्त्री. उमेद; आत्मविश्वास; धमक; जयाबद्दलची खात्री; युद्धोपयोगी तीन शक्ती पैकीं एक. (दुसऱ्या दोन म्हणजे प्रभुशक्ति आणि मंत्रशक्ति). [सं.]

उत्साहवान, उत्साही—वि. १ उमेद असलेला; आनंदी; उत्साहानें काम करणारा. २ तत्पर; उत्सुक; दीर्घोद्योगी. [सं.]

उत्साहित—वि. १ उत्साही; आनंदित; प्रमुदित; उत्साह पावलेला, आणलेला. २ संतोषितः खूष झालेला; समाधान पावलेला.

उत्सिक्त—वि. उतूं गेलेला; वाहून गेलेला, भरून गेलेला. [सं. उत् + सिच्]

उत्सुक—वि. १ उत्कंठित; आतुर. २ अधीर, उतावीळ. **–ता**–स्त्री. उत्कट इच्छा.

उत्सृष्ट—वि. टाकलेलें; सोडून दिलेलें; त्यक्त, उत्सर्जन केलेलें. **०पशु**–पु. देवतेप्रीत्यर्थ सोडलेला, अर्पण केलेला बैल. [स. उत्+सृज्]

उत्सेक—पु. १ उकळून वर येणें; ऊत. २ भर; वाढ. ३ गर्व; ताठा. [सं. उत्+सिच्]

उत्सेदणें—सकि. नाश करणें; मोडणें; विध्वंस करणें. 'कोणी एक ज्ञानी म्हणविती । अहंब्रह्म पूर्ण जाणती । आणि सगुणभक्ती उत्सेदिती । ते तरलेचि न तरती अभिमानें ।' –संवि २२.७८. [सं. उत्सादन]

उत्स्पंदित(भौमिचारी)—न. (नृत्य) पाय पुढें टाकतांना पायाच्या कनिष्ठिकेच्या बाजूनें बाह्यवर्तुळ करणें म्हणजे मागच्या बाजूनें पाय वाटोळा फिरवून पुढें टाकणें, व आंगठ्याच्या बाजूस आंतरवर्तुळ करणें म्हणजे बाहेरच्या बाजूनें पाय फिरवून मग मागें टाकणें. [सं.]

उत्क्षिप्त—वि. टाकून दिलेलें; फेकलेलें. [सं. उत्+क्षिप्]

उत्क्षिप्तशीर्ष—न. (नृत्य) डोकें वर करून खूप उंच पाहणें, हा अभिनय उंच गोष्टी पाहण्याच्या वेळीं करतात. [सं.]

उत्क्षेप-ण—पुन. वर उडविण्याची क्रिया; वर फेकणें. [सं. उत्+क्षिप्]

उत्क्षेपणें—उकि. दूर फेंकून देणें; वर उडविणें. [सं. उत्+क्षिप्]

उत्क्षेपभुंवई—स्त्री. (नृत्य) नृत्यांत एकाच वेळीं एक किंवा दोन्हीहि भुंवया वर चढविणें. रागावणें, तर्क करणें, पाहणें, हेलालीला वगैरेंच्या वेळीं हा अभिनय करितात. [सं.]

उथव—स्त्री. भरती; पूर. 'आतां उथव आल्यामुळें एक होऊं पाहात नाहीं काय?' –मुदे ८४. [सं. उत्+स्था–उत्थायिन्; प्रा. उत्थाइ]

उथळ—वि. १ साधारण सखल; कमी खोल; फार खोल नसलेलें (पात्र, नदी, तळें इ०). २ (ल.) साधाभोळा; मोकळ्या मनाचा; निष्कपटी; भाबडा. ०**बुडाचा**—वि. हुरळून जाणारा; अल्पसंतुष्ट; भोळसर. 'आमच्यांतही उथळ बुडाची कांहीं मंडळी आहे.' –टि १.३९७. **म्ह**० उथळ पाण्याला खळखळ (खळखळाट) फार=ज्याच्या अंगीं गुण थोडा त्याला आळ्या जास्त असते. [सं. उत्+तल् किंवा स्थल; प्रा. उत्थल]

उथळणें—अक्रि. उसळणें; उचंबळून येणें; जोरानें वर येणें; उत्पन्न होणें. 'अथवा उथळोनि प्रेमा । कृष्णि मिळाल्या त्या रामा ।' –रास १.१२२७. मज अवास कामासि सुख । त्यांचे पूजेनीं देख उथळलें ।' –एभा १३.७४८. 'तेणें शांतिगंगेची स्थिती। भरूनि उथळे अतिउन्नती ।' –एभा २३.६९. [उथळ]

उथळपातळ—क्रिवि. थोडेथोडें. [उथळ]

उथळवट—वि. साधारण उथळ, सखल; फार खोल नसलेलें (पाणी, जमीन) [उथळ]

उथळा—पु. (कों.) वृक्षावर पर्जन्य पडला असतां त्यावरून जे त्या पाण्याचे थेंब खालीं पडतात ते प्रत्येक.

उथळा-ळी-ळें—पुस्त्रीन. १ खांबाच्या वर व खालीं बसविण्याकरितां तयार केलेला चौकोनी लहान व उंच दगड किंवा लांकूड; खांबाचा तळखडा, बैठक. 'टेबलांत बसविलेल्या उस्या फिरत्या दांडयाच्या खालच्या बाजूस टोंक असून तें उथळ्यांत फिरतें.' –पदार्थवर्णन १.४३. २ (बांधकाम) दगडी किंवा कांकरीटचा चाफा. [उत्तल किंवा उत्स्थल]

उथळापाठ—वि. उथळी किंवा गोडी भातजमीन जेथें आहे असें खेडें. [उथळ+सं. पट]

उथळी—स्त्री. (कों.) विशिष्ट प्रकारचें भात पिकणारी गोडी जमीन. [उथळ]

उथळी—स्त्री. १ उथळा पहा. २ (माण.) रुंद तोंडाची लहान पाटी; उपणपाटी. [उथळ]

उथाण—न. १ हवेचा कोंदटपणा; अभ्रें आलीं असतां जी हवा होते ती; गदमद; उकाडा. (क्रि० येणें). २ भाद्रपद महिन्यांतील ऊन. –शिदि ७४. [सं. उत्+स्थान]

उथाळा-ळी-ळें—पुस्त्रीन. उथळा पहा. खांबाच्या खालचा व वरचा दगड, लांकूड; खांबाची बैठक; तोळंबा. 'गोरियां सोनेकेळीं। कामौनि कीजेति खांब–उथाळीं ॥'–शिशु ७६४. 'उथाळीं बैसला इन्द्रनीळे ॥' –मुआदि ३१.१५. 'पद्मरागाचे तोळंब स्वयंभ। वरी दिव्य हिऱ्यांचे खांब। निळयांचीं उथाळीं सुप्रभ । उपमा नाहीं तयातें ॥' –ह २.१७. [सं. उत्+तल]

उथ्थान—न. परावर्तन; उठावणी; पतन; उत्थान पहा. [सं.]

उथ्थापना—स्त्री. उचाटण; उत्थापन पहा. 'आमुची उथ्थापना न करावी ॥' –सप्र ५.८ [उत्थापन]

उद्-त्—एक उपसर्ग अर्थ–१ वरचढपणा; श्रेष्ठत्व; वर्चस्व. उ० उत्तर; उद्वाहन; उद्गार; उद्दिष्ट २ वियोग, विभाजन; विघाड; दूरीकरण; अपसारण; (पासून–मधून). उ० उत्सर्जन; उत्क्षेपण. ३ वर; ऊर्ध्व; उंच. उ० उत्थान; उत्तिष्ठ. [सं. उद्; तुल. झें. उश; हि. उअस–ओस–ओइस]

उद्—न. पाणी (फक्त समासाच्या आरंभीं). [सं.]

उदई, उदय—स्त्री. वाळवी. उधई पहा.

उदईक—क्रिवि. उद्यां. [सं. उदय]

उदक्—क्रिवि. उत्तरेकडे; उ० उदङ्मुख; उदगयन. [सं.]

उदक—न. पाणी; जळ; नीर: अंबु; गोव्याकडे पाणी या अर्थी हाच शब्द रूढ आहे. 'बरें उदक आण.' 'करूं जातां उदकपान। घोटासवें आठवे कृष्ण।'–एसस्व ५.६२. सामाशब्द–गंगोदक; तीर्थोदक; पर्जन्योदक; संचितोदक इ० [सं. उद्=वर येणें; ओलें करणें; तुल. ग्री. ऊदोर्; लॅ. उन्द; गॉ. वतो; लिथु. वन्दु. ०**येणें (डोळ्यांत, नेत्रांत, नयनांत**)–दुःख होणें; वाईट वाटून रडणें; अश्रू येणें. 'दर्भनिर्मित तया शयनातें। देखतां उदक ये नयनातें।' ०**सोडणें-देणें**–१ मालकी सोडणें; त्याग करणें; सोडून देणें; टाकून देणें. 'गोप्रदानांबद्दल सोळा रुपयांच्या रकमेचें उदक सोडलें जाईल.' –गोप्रदानाचे नियम (बडोदें) २. २ कोणत्याहि गोष्टीचा संकल्प केल्याचें द्योतक म्हणून मंत्रपूर्वक पाणी सोडणें; संकल्प करणें. ३ संकल्पाचें उदक सोडून जेवण्यास आरंभ करणें. ०**हातावर घालणें**–एखाद्यास दान करणें; अर्पण करणें; दुसऱ्यास देऊन टाकणें. **उदकापाण्यानं करून टाकणें**–एखादें कार्य, समारंभ, उत्तरक्रिया अतिशय थोड्या खर्चांत व गाजावाजा न करतां फक्त विधीस बाध येऊं न देतां उरकून टाकणें. ०**घेऊन वचप**–(गो.) निघून जाणें. [वचणें=जाणें] ०**क्रिया**–स्त्री उत्तरक्रिया; तिलांजलि; तर्पण. ०**घात**–पु. बंधारे घालून पाणी अडवणें व अशा रीतीनें जोर उत्पन्न करून योग्य वेळीं योग्य प्रमाणांत वाटेल तेथें पाणी सोडणें यासंबंधींचे ज्ञान, विद्या; ६४ कलांतील एक कला. ०**दान**–न. १ उत्तरक्रिया; तिलांजलि, तर्पण; उदकक्रिया. २ पाण्याची सोय करणें (विहीर, तळें इ० बांधून). ०**मेह**–पु एक रोग; यांत पाण्यासारखी पुष्कळ लघवी होते. ०**वाद्य**–न. १ जलतरंग; जलतरंगाकरितां वापरावयाची भांडीं. २ जलतरंग तयार करणें किंवा तें वाजविण्याची कला. ०**शांत-शांति**–स्त्री घरांत कोणी आजारी असल्यास अथवा कांहीं अरिष्ट घडल्यास त्याच्या शांत्यर्थ चार ब्राह्मण बोलावून त्यांकरवीं कांहीं विशिष्ट (बौधायनसूत्रांत सांगितल्याप्रमाणें) सूक्तें पठण करावयाचा व जलसिंचन करावयाचा विधि.

उदकप्रक्रिया—स्त्री. (शाप) पाण्याच्या साहाय्यानें विशिष्ट संयुक्त द्रव्यांतील मूलद्रव्यें वेगळीं करणें. (इं.) हायड्रॉलिसिस. [सं.]

उदकाकडे—क्रिवि. (अप. रूपें) उदकडे-उदकाडे-उत्काडे. (गो.) बहिर्दिशेकडे; परसाकडे; शौचास (पाणी पाहून त्या ठिकाणीं शौचास बसतात म्हणून प्रयोग). [उदक+कडे]

उदकाडी—स्त्री. उदवत्ती; अगरबत्ती. [ऊद+काडी]

उदकुंभ—पु पाणी भरलेला घट; पाण्याचा घडा, कळशी (धार्मिक विधींत उपयोग). ' आली घरासि युवती उदकुंभ ठेवी ' –आकु १०. [सं. उद+कुंभ] **०दान-श्राद्ध**–न. मृताच्या अकराव्या दिवसापासून एक संवत्सरपर्यंत (अब्दपूरित श्राद्धापर्यंत) मृतास उद्देशून दररोज करावयाचें श्राद्ध यांत ब्राह्मणास उदकुंभाचें दान करितात. हें श्राद्ध रोज करणें शक्य नसल्यास एकच दिवस श्राद्ध करून दररोज नुसतें उदकदान व आमान्न (किंवा धान्य) दान करतात· अथवा वर्षाचें धान्य एकदमच देतात. [सं]

उदगयन—न. सूर्याचें उत्तरदिशेकडे जाणें. उत्तरायण पहा. ' उदगयन होय तोंवरि मीं शरतल्पीं असाचि राहेन ' –मोभीष्म ११.१२४. [सं उदक्+अयन]

उदगा, उदगामादगा—वि रागीट. मग्रूर: माजोरी. [उतणें+मातणें; किंवा मातगा द्वि.]

उदगिर—१ निजाम इलाख्यांतील एक गांव. २ लुगड्यांची एक पेठ; तेथील लुगडीं. ' अक्कलकोट सोलापुर उदगिर बाशिक येती त्या घनवेली । ' –अमृत ४९.

उदगिरि—स्त्री. एक क्षुद्र देवता. ' उदगिरि देवी म्हणे स्वामीसी । देवा तूं उदयगिरिवरि पावलागी । आमुचा पूजामान चालवी जनासी । तुझ्या भजनामी विश्व लाऊं ॥ '–सप्र ५ २३. [उदयगिरि]

उदग्गोल—पु. क्रांतिवृत्ताचा उत्तरेकडील अर्धा भाग. [सं. उदक्+गोल]

उदंड—वि.क्रिवि. पुष्कळ; अनेक; असंख्य; फार (संख्या, परिमाणवाचक). ' तयाच्या ठायीं उदंड । अज्ञान असे वितंड । ' –ज्ञा १३.६९१. ' विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला । ' –दा १.२.१०. ' कैवल्याच्या तुम्हां घरीं । रासी हरी उदंडा । ' –तुगा १४११. ' लोकांनीं त्याला उदंड सांगितलें...'–बाळ २ ८७. [सं. उद्+दंड, उदंड]

उदणां घालप—क्रि. (गो.) केळीं वगैरे फळें पिकविण्याकरितां मडक्यांत ठेवून तोंडावर दुसरें लहान मडकें घालून लिंपून व ४।५ दिवस विस्तवाची आंच देऊन पिकत घालणें. [उद्+दहन? दे. उद्दाण=चुला, स्वयंपाकाची शेगडी]

उदंत—पु. १ इत्थंभूत वार्ता: सारांश वृत्तांत, हकीकत. ' आईकिजे सर्व उदंत कानीं । ' –सारुह ६.८. सांगे तदा त्या सकळा उदंता । ' –वीरेश्वरकृत सोमवारचरित्र ३७. २ शुद्ध अंत:करणाचा मनुष्य. ३ उद्योग करून पोट भरणारा माणूस. [सं. उद्+अंत, उदंत]

उदधि—पु. समुद्र; सागर. ' जैसा गंगेसी उदधि । निरंतर । ' –ज्ञा २.२४१. सामाशब्द–कालोदधि; महोदधि; क्षीरोदधि इ०. [सं. उद+धि]

उदनी—स्त्री. (कों.) उडवीमध्यें पाणी जाऊं नये म्हणून तीवर निमुळती करीत नेतात आणि गवत किंवा पेंढा यांनीं ती शिवतात असा केलेला उडवीचा निमुळता भाग. ' पाऊस पडण्याची भीति असल्यामुळें उडवीला उदनी चांगली घेतली पाहिजे. ' [सं. उद्+नी]

उदप—पु. पाण्यांतील जीवजंतु; पाण्यांत वास करणारा प्राणी. ' मग उदपासि म्हणे उदधी । तुम्ही मीत कोरावें स्वबुद्धि ॥ ' –कथा २.१४.११६. [सं. उद+प]

उदफाळणें—उक्रि. फाडून तुकडे करणें; चिरून, फाडून टाकणें; धुव्वा उडविणें. [सं. उत्स्फालन]

उदफूल—न. उदाचें फूल; उदाची लाही; लोह उदासलोखंडी तव्यावर आंच देऊन त्याची पंचपात्रांत धरलेली वाफ ही वाफ तुंब्याच्या फलासारखी व शुभ्र असते. –वगु १.७४. [अर. ऊद=लाकूड+फूल]

उदबत्ती—स्त्री. उदकाडी; अगरबत्ती; ऊद; धूप व इतर कांहीं सुगंधी पदार्थ वाटून त्यांचा लेप एका काडीस देतात, ही पेटविली म्हणजे सुगंधी धूर हवेंत पसरतो. [उद्+वर्ती=वात; ऊद+बत्ती]

उदंबर—पु. उंबर; औदुंबर. ' वाढितां उदंबरें सरिसें । पूरिकांमी ॥ ' –ऋ ८२. [सं. उदुंबर=उंबर]

उदमस्त-मात—वि. (कों. गो.) उन्मत्त; बेफिकीर; गर्विष्ठ; अवहेलना करणारा; माजोरी. [सं. उन्मत्त]

उदमी—पु. १ उदीम करणारा; व्यापारी; क्रयविक्य करणारा; दुकानदार. २ उथमी, उद्योगी; पुढारी. ' ब्राह्मणांनींच उदमी व्हावें असें आम्हीं म्हणत नाहीं ' –टि ४.२२८. [सं. उद्यम]

०चाल–स्त्री १ व्यापारी पद्धति २ व्यापारी लोकांची राहाणी, चालीरीती वगैरे.

उदमुक—वि (गो.) उन्मत्त.

उदमेख—पु (कों.) उद्योगीपणा; आवड, हौस; तत्परता, उत्सुकता; आतुरता. (क्रि. करणें). [सं. उन्मिष्=डोळे उघडणें; उन्मेष=जागृतता] **–खी**–वि. उत्सुक; आतुर; आवड असलेला वगैरे. **–खून**–क्रिवि. १ मुद्दाम; निक्षून; आवर्जून. २ मनाचा पूर्ण निश्चय करून; स्वत:च्या आवडीनें; पूर्ण कल्पना येऊन; सहज किंवा यदृच्छेनें याच्या उलट

उदम्ल—न. (शाप.) ज्या अम्लांत प्राणवायु नसतो तें अम्ल. (इं०) हायड्रॅसिड्स. [उद+अम्ल]

उदय—पु. १ उगवणें; क्षितिजावर येणें; दिसणें (सूर्य, तारे, इ०) ' अस्तास जाई उदयास येई ॥ ' ' पूर्व दिशे उदयाला भानू

आला उदयाचळा।' –पला २२. २ दृश्य होणें; दिसूं लागणें (शुक्र, बुध, इत्यादि ग्रह सूर्यापासून दूर झाल्यामुळें). ३ उत्पन्न होणें; प्रादुर्भाव; उद्गम; उद्भव; वर येणें; फुटणें (फुलें, अंकूर, विकार वगैरे जसें–पुष्पोदय; कामोदय; क्रोधोदय इ०). ४ उठणें; बाहेर येणें; फुटणें (केस, घाम, इत्यादि शरीरावर जसें–घर्मोदय). ५ उत्कर्ष; भरभराट; महत्पद प्राप्त होणें; वर डोकें काढणें. 'सांदीपनीनें आपल्या शिष्याचे भावी गुण व उदय जाणून त्यास ठेवून घेतलें.'[सं. उद्+इ=जाणें] **उदयास येणें**–प्रसिद्धीला येणें; अभ्युदय होणें.

उदयगिरि, उदयाचल-ळ––पु. ज्या पर्वताच्या आड़ून सूर्य–चंद्राचा उदय झालेला दिसतो तो (काल्पनिक) पर्वत; ज्या भागांतून उदय होतो तो भाग, प्रदेश. 'कां उदयाचळकुळीं। झळकतां अंशुमाळी॥' –ज्ञा १८.१५३१. 'उठि लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला।'–होला १६. [सं. उदय+गिरि, अचल=पर्वत]

उदयलग्न—न. (ज्यो.) उदय पावत असलेला राशि, राशीचा उदय; लग्न पहा. [सं.]

उदयीक—क्रिवि. उद्यां. [सं. उदय]

उदर—न. १ पोट, कोठा; जठर. 'उकार उदर विशाल.' –ज्ञा १.१९. २ पोटफुगी; विकारानें फुगलेलें पोट; पोटांतील एक रोग. उ० जलोदर; वातोदर; सर्पोदर, वगैरे. ३ (कृषि) (पाण्याचें अजीर्ण) कादे, वटाटे इत्यादि भूमिगत पिकास पाणी फार झालेंतर सूज येते व तो भाग कुजतो त्यास म्हणतात. –कृषि १८८ ४ गर्भाशय; कूस; कुक्षि. 'अगा वसुदेवाचिये तपप्राप्तीं। श्रीकृष्ण देवकीउदरा येती।' –एरुस्व ११०. 'धन्य धन्य ते कौसल्या सती। उदरासि आला त्रैलोक्यपति।' –संवि १८.५. [सं. उदर; सि. जलेंधरु] **–राची खांच**–स्त्री. पोट. 'आपुली खांच उदराची.' –संग्रामगीतें १३३. **–रीं येणें**–(एखादा ग्रह जन्मराशीस येणें); यथेच्छ खाण्यापिण्यास, उपभोग घेण्यास मिळण्याजोगी दशा येणें (निंदाबोधक). **उदरीं शनी, शनैश्चर येणें**–(ज्यो.) शनी जन्मराशीस येणें. म्हणजे चांगली दशा प्राप्त होणें; ऐश्वर्य मिळणें. **०तलघमनी**–स्त्री. (शारीर.) पोटाजवळची घमनी. **०तलपाद**–(प्राणि.) गोगलगाय इत्यादि पोटानें सरपटणारे प्राणी. [इ. गॅस्ट्रोपोडा; ग्री. गॅस्टर=पोट; तुल० सं. जठर]. **०दरी**–स्त्री. पोट; पोटाची खांच. **०निर्वाह–पूर्ति–पोषण–प्रवृत्ति–वृत्ति**–पुस्त्रीन. १ चरितार्थ; उपजीविका, पोषण; उदरंभरण; क्षुधाशांति. 'भिक्षा मागुनी क्षेत्रामाजीतरीं। उदरनिर्वाह करितसे॥'–नव १३.६०. 'उदर प्रवृत्तिकारणें। मोळया आणून विकीतसे॥' –संवि २१.१४. २ उपजीविकेचें, चरितार्थाचें साधन; जीवन; पोटापाण्याची सोय. ३ पोट भरणें; केवळ जगणें; जीव जगविणें; पोट चालविणें (सामा. निंदाव्यंजक). **०पिशाच्च**–पु. अतिशय खादाड; अधाशी; खाबू. **उदरंभर-री**—वि. १ पोटभरू; पोटार्थी; खादाड. 'पीतां मरंद उदरंभर बंभरायें।' –नल ३८. 'गोसावी लोक ईश्वरप्राप्तीचे नुसतें सोंग आणतात, पण उदरंभर मात्र असतात.' २ स्वार्थसाधु; आपमतलबी. 'बरेच प्रोफेसर...उदरंभरी लोक आहेत'–टि २.५१४. ३ पोट भरण्याखेरीज कांहीं न करणारा; स्वत.च्या निर्वाहाखेरीज अन्यत्र न पहाणारा (देश–समाजसेवा इ० इतर कांहीं न करण्यास म्हणतात). **०भरण**–न. अन्न खाणें; जेवणें; भोजन. उदरनिर्वाह पहा. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म।'

उदर—(नाविक) उत्तर दिशा; ध्रुव–दिशा. [सं. उत्तर]

उदर—न. (नृत्य) पोटानें केलेले निरनिराळे अभिनय. नृत्यामध्यें उदराच्या चार प्रकारच्या अवस्था होतात–क्षाम; खल्ल; पूर्ण व सम. [सं.]

उदरणें––क्रि. ओकणें. 'दुदाची बालके मारिती। तीं रक्तासवें दुद उदरती।' –खिपु २.१३.३०. [सं. उद्–गृ]

उंदरनळी—स्त्री. (माण.) मेटाच्या वरच्या बाजूस असणाऱ्या नळयांपैकीं प्रत्येक. [उंदीर+नळी]

उदराडकान—स्त्री. (गो.) वनस्पतिविशेष. उंदीरकानी पहा.

उदरसूत्र—न. (गणित) (वर्तुळाचा) व्यास; वर्तुळाच्या मध्यबिंदूंतून जाणारी परिघमर्यादित रेषा. [सं.]

उदरी—वि. १ ज्यास उदररोग झाला आहे असा; पोट फुगलेला. २ अतिशय लठ; दोंदील; पोट पुढें आलेला. ३ उदराचा; उदरा–पोटासंबंधीचा. [सं.]

उंदरी—स्त्री ज्यांत डोक्यावरील केस गळून पडतात असा रोग; चाई; कातरी. मनुष्येतर प्राण्यासहि हा रोग होतो (लोंकर गळून पडते); मूळच्या केसांचा भाग उंदरानें चावल्या–कुरतडल्याप्रमाणें दिसतो म्हणून हें नांव पडलें. [उंदीर]

उंदरी—स्त्री. एक परोपजीवी वनस्पति.

उदर्क—पु. पुढें होणारी गोष्ट; भवितव्य; भविष्य. सामाशब्द–उदर्क–कार्य–वचन–सुखदुःख इ०. [उद्+अर्क=सूर्य] **०काळ**–पु. भविष्यकाळ. **०फल**–न. परिणाम; पर्यवसान; निष्पत्ति; शेवट. **०चिंतन**–न पुढें होणाऱ्या गोष्टीबद्दलचा विचार.

उदर्गत—स्त्री. (गो.) उपाय; इलाज. [सं. उद्धार+गति]

उंदऱ्या—स्त्री.अव. १ विशाखा नक्षत्र. २ त्यांत पडणारा पाऊस. विशाखा नक्षत्राजवळ सूर्य असतां पडणाऱ्या पावसामुळें उंदीर साप, वगैरे विषारी प्राणी व वनस्पती उत्पन्न होतात अशी समजूत आहे. 'उंदऱ्या लागल्या–पडल्या.' 'यंदा उंदऱ्या कोरड्या गेल्या.' **०मांजऱ्या**–स्त्री.अव. १ विशाखा व अनुराधा हीं दोन नक्षत्रें. २ त्यांत पडणारा पाऊस; विशाखा नक्षत्रामुळें जे विनाशक प्राणी, वनस्पती उत्पन्न होतात ते अनुराधा नक्षत्रानें नाहींसे होतात म्हणून एकाला उंदऱ्या व दुसऱ्याला मांजऱ्या म्हणतात. [उंदीर+मांजर]

उदव—उद्गा. उदो पहा. १ देवीचे भक्त भिक्षेस निघाले म्हणजे देवीपुढें 'ऊठ! तुझा जय होवो' अशा अर्थाचा हा शब्द उच्चारतात. [सं. उदय, उदयोस्तु; तुल० का. उदु=पहा या अर्थी उद्गार (देवीला नैवेद्य दाखवितांना म्हणतात)] २ उजेड याअर्थी निंदाव्यंजक उद्गार. 'मोठा उदव (उजेड)!' **०करणें-लावणें**-(उप.) उजेड पाडणें; पराक्रम करणें; महत्कृत्य करणें.

उदवणें—अक्रि. (उप.) उदव करणें पहा.

उदवणें-विणें—उक्रि. उदाच्या धुरानें सुगंधित करणें; ऊद जाळणें; उदाचा वास लावणें, धुरी देणें (केस, ताईत, पाणी वगैरेस). 'उंच लुगडीं नेसायाची, घमेंड मोठी न्हायाची, केस पसरून उदवायाची।' –प्रला २१७. 'चंदनी चोखण्या करिती विहिणीशी उदवीती।' –वसा ५३. [अर ऊद]

उदवात—स्त्री. (गो.) उदबत्ती पहा. [ऊद+वर्ति]

उदश्रु—वि. (ना.) निळसर; उदी रंगाचा. उदी पहा.

उदाण—स्त्री. (कों) उधाण पहा.

उदाणू-नू—वि. (नंदभाषा) तीन; व्यापारी भाषेंतील सांकेतिक संख्यावाचक शब्द. 'मुळुवदनें जया कारण। उदानु नेत्र देदीप्यमान।'–भवि १८.८९. 'मुळु उदानु अंगुळु ऐसी। नंदभाषा सांगितली त्यासी।' –भवि ४२.४५.

उदात्त—वि. उच्च; श्रेष्ठ; मोठा; दाता; उदार; स्पष्ट, व्यक्त (स्वर); तीव्र, तीक्ष्ण (आघात); उंच, मोठा कर्कश (आवाज) [सं.]

उदान—पु. १ पंचप्राणव्यायूंपैकीं एक वायु. हा कंठांतून मस्तकांत चढतो. 'कंठीं उदान गुदीं अपान।' –दा १७.८.१२. 'ऊर्ध्वमुखें कंठाकडे फुगारा। जो धरी पोटांत वारा। त्या प्राणाचिया प्रकारा। उदान नामें जाणावें॥' –यथादि १७.१००२. २ मृत्युसमयींचा श्वास, धाप; ऊर्ध्वे. **०लागणें-फार** खालच्यामुळें, रोगामुळें श्वारोच्छ्वास मोकळेपणानें करतां न येणें; दम लागणें; श्वास कोंडणें. [सं. उद्=वर+अन्=श्वास घेणें]

उदानका—पु. (नंदभाषा; कर.) पैसा. 'पांगळ्याला आवारु (दोन) उदानके दिले.' उदाणू पहा. [उदान=तीन+रुका=पैसा]

उदार—वि. १ मोठ्या मनाचा; कनवाळू; थोर मनाचा; धर्मात्मा. २ मोकळा; धीट; प्रशस्त; उघड्या मनाचा; संकोचित, कुळ्या, कृपण, कंजूष, अरुंद याच्या उलट (माणूस, भाषण, स्वभाव, होडी, जागा, गाडी, खोली वगैरे). ३ सढळ; दाता; खर्चिक; दानशील; चिक्कू, कृपण याच्या उलट. 'उदार तोच श्रीमंत कृपण तोच दरिद्री.' **म्ह०** आईजीच्या जिवावर बाईजी उदार. **०कर्ण**-वि. १ कर्णासारखा उदार; दानशूर; मोठा दाता. २ (उप.) कृपण व कंजुष (मनुष्य). **०धोरण**-न. खुल्या दिलाचें, प्रतिपक्षावर अधिक विश्वास ठेवण्याचें, मोठ्या मनाचें धोरण. 'लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचें धोरण रिपन साहेबांच्या उदार धोरणाच्या अगदीं उलट झालें आहे.' –टि ३.४०. **०पक्ष**-पु. (राज.) व्यापक विचारांच्या लोकांचें (लिबरल) मंडळ, पक्ष; प्रागतिक पक्ष; हुजूर (कॉन्झर्व्हेटिव्ह) पक्षाच्या उलट. **०मतवादी**-वि. सुधारणाप्रिय लोक; प्रागतिक; (इं.) लिबरल. 'सर्व प्रकारची चौकशी करण्याकरितां लॉर्ड डरहॅम या उदारमतवादी मुत्सद्द्याची खानगी करण्यांत आली.' –वस्व ६४. **०लक्षण**-वि. १ उठावदार; रुबाबदार; मर्दानी (चेहरा, लक्षणें). २ भाग्यशाली; मोठेपणाचीं (लक्षणें, चिन्हें). **०शिक्षण**-न. उदारपणाचें शिक्षण; ज्यामुळें मनाचा विशेष विकास होतो व बुद्धि व्यापक होते असें शिक्षण.

उदारांग—वि. (उप.) प्रशस्त शरीराचा; तुंदिलतनु; लठ्ठ; भव्य शरीराचा. [उदार+अंग]

उदाराचें पोतें—न. दुसऱ्याची मालमत्ता चैनीनें व सढळ हातानें खर्च करणारा मनुष्य; हलवायाच्या घरावर तुळसीपत्र ठेवणारा.

उदारीव—न. उदारपणा. –तुगा २२७४ (–शर)

उदावर्त—पु. एक आंतड्याचा रोग; पोटांतील आंतड्यांमध्यें निरोध झाल्यामुळें होण्याऱ्या वेदना, रोग (वाईट प्रकारचें अन्न सेवन केल्यामुळें हा रोग होतो.). [सं.]

उदावादा—पु. पूर्णत्व, प्रकटपणा. 'पैं ग्रासुनि आपली मर्यादा। एक करीत नदीनदां। उठी कल्पांतीं उदावादा। एकार्णवाचा॥'–ज्ञा १५.५३२. 'तैशा चहूंभुजीं उदावादा सगुण देखोनि गोविंदा' –एभा ११.१४७५. –क्रिवि. सढळपणें; उघडउघड. 'म्हणोनि इंद्रियें तेचि संपदा। वेचितांही उदावादा।' –ज्ञा १३.३०५. [सं. उदयवादित्व ?]

उदास—वि. १ दुःखी; खिन्न; निरुत्साही; कष्टी. 'झाला कंठस्फोट आळवितां। उदास आतां न करावें।' –तुगा ७०९. २ वेपर्वा; निष्काळजी; बेफिकीर; तटस्थ. 'तरि जो या देहावरी। उदासु ऐसिया परी।' –ज्ञा १३.५९३. 'कां अदृष्ट जालिया उदासु।' –ज्ञा १८.४९६. ३ निस्पृह; उपेक्षाबुद्धि; निरपेक्ष. ४ विरक्त; निःसंग; निर्विकार. 'केवळ पापीहि प्रस्तावले। उदासपंथ देखोनिया।' –सप्र १२.१४. ५ व्यर्थ; फुकट. 'तुका म्हणे माझी पुरवावी आस। विनंति उदास करूं नये।' –तुगा८२८. ६ ओसाड; निस्तेज; निरानंद; भयप्रद; (भयाण जागा, गांव, घर). –पु. एक गोसाव्यांचा पंथ. उदासी पहा. [सं. उद्+आस्=बसणें. **०वचन**-न. खिन्न मनानें केलेलें भाषण. 'उदासवचनें ऐकोनि सत्वरी। अश्रुपात नेत्रीं वाहती॥' **०स्थिति**-स्त्री. निष्काळजीपणाची वृत्ति; बेफिकिरी; खिन्नता.

उदासणें—अक्रि. उदास, खिन्न होणें. 'खेडीं पाडीं भलताच लुटितो कुणब्याचा जीव उदासला.' -अफला ६८.

उदासन—न. उदासीनता; वेपर्वाई. 'जेतुकें कष्ट मज भोगले। जे इजिप्तांतु साहिले ॥ तेया होउनि अधिक जाहाले। उदासन तुझें ॥' -खिपु १.१४.११२.

उदासनी—स्त्री. उदासपणा. 'चटपटी लागली उदासनी मना ॥' -दावि २३६.

उदासी—वि. निराश; खिन्न; निष्काळजी; बेफिकीर. उदास पहा. 'तप करिती अरण्यवासी। त्यासी करितोसी उदासी ॥' -गुच २.१३६.-पु. १ एक गोसाव्यांचा पंथ; या पंथांतील गोसावी, वैरागी. २ शीखांचा एक प्रमुख पंथ. नानकपुत्र असेंहि यास नांव आहे. याचे चार भेद आहेत- बाबाहसन, फूल, गोंदा व अल्मस्त. सर्वांची एक सभा असून तीस बडा आखाडा असें नांव आहे. हे लोक ब्रह्मचर्य पाळतात. [उदास]

उदासीन—वि. १ विरक्त; वीतरागी. 'उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥' -राम ५०. २ खिन्न; दुःखी. ३ निष्काळजी; बेपर्वा. तंव नोहावें यागादिकीं। उदासीन ॥' -ज्ञा १८.१५२. ४ तटस्थ, ज्यास कोणी शत्रु किंवा मित्रहि नाहीं असा; मध्यवर्ती; मध्यस्थ. 'तये देहबुद्धीचें लक्षण। सुहृददुर्हृद उदासीन। त्रिविध त्रिगुण करी मन। देहाभिमान उपजवी ॥' -एरुस्व १३.५१. [सं.]

उदासीनता—स्त्री. वैराग्य; विरक्ति. 'उदासीनता तत्त्वता सार आहे. ॥' -राम ५७.

उदाहरण—१ दाखला; दृष्टांत. 'अक्षरें तिसऱ्या पादीं। उदाहरण शेवटीं।'-वृत्तदर्पण ११. २ नमुना; कित्ता. ३ (गणित) सोडविण्याचा प्रश्न; (सामा.) प्रश्न. [सं. उद्+आ+हृ]

उदाहृत—वि. उदाहरण, दृष्टांत देऊन सिध्द केलेलें. समजावलेलें, सांगितलेलें. [सं.]

उदाळणें—अक्रि. उसळणें; उडणें; वर येणें. उधळणें पहा. 'जैसी खळाळीचिया उदका। सरसीं उदाळे चंद्रिका।' -ज्ञा १५. ४९८. [सं. उद्+दल्]

उदित—वि. १ उदय पावलेला; वर आलेला (ग्रह, तारा इ०). 'नाना उदितें शिवाकरें।'-ज्ञा १७.१७८. २ फुगलेला; मोठा झालेला. ३ (नशीब) उघडलेला; उत्कर्ष पावलेला; अनुकूल (दैव, भाग्य) 'कोण्या काळें होईल नेणों भाग्य उदित वो।'-तुगा ११७. ४ (मनोविकार) उत्पन्न झालेला; उठलेला; प्रबल झालेला 'परि साचोकारें उदितें। प्रेमभावें।' -ज्ञा १०.११५. ५ कृत्य करावयास निघालेला; सज्ज; उद्युक्त; तयार; तत्पर. 'युद्धा येईल विराटदळ। म्हणोनि योद्धे उदित सकळ।'-मुविराट ६.४४. ६ कथित; सांगितलें; बोललेलें (भाषण); 'घालविलें मज रायें मानुनिया मतुदितें हितें अहितें।' -मोवन १.२०. [सं. उद्+इ] **॰कार्य**—न. आकस्मिक उद्भवलेलें, अंगावर पडलेलें कार्य. **॰काळ**—पु. भाग्याचा काळ; उत्कर्ष; भरभराट.

उदिदिन—न. (शाप.) एक रासायनिक द्रव्य. (इं.) बेंझिडाईन यापासून रंग काढतात.

उदिन—न. (शाप.) (इं.) वेझिन उज्ज (हायड्रोजन) व कर्ब (कॉर्बन) यांचा संयुक्त पदार्थ.

उदिपणें—अक्रि. उगवणें; उदयास येणें; निघणें; उत्पन्न होणें. 'सूर्यापासूनि प्रभा उदिपे। ते प्रभाचि सूर्य केवि म्हणिपे।' -स्वादि १४.१.५. [सं. उद्+दीप]

उदिमदार—पु उदमी. व्यापारी. 'तों सन्निधीं येऊनि उदिमदार।' -दावि ४२९. [सं उद्यम+ फा. दार्]

उदिमी—पु व्यापारी; उदमी पहा. 'वेदशास्त्रसंपन्न झाला। त्यावरि पोट भरूं लागला। तरी तो उदिमी थोर झाला।' -एभा ११.५४८. [सं. उद्यम]

उदिया—क्रिवि. उद्यां. 'आज उदिया राहूनि येथें'-दावि ३८५.

उंदिरकानी-किनी—उंदीरकानी पहा

उंदिरी, उंद्री—उंदरी पहा.

उदी—वि. उदाच्या रंगाचा; पिंगट; तपकिरी. 'तेथील खडक चमत्कारीक उदी रंगाचा असे.' -पाव्ह ४१. -स्त्री. १ उदाची राख; पिराजवळ जाळलेल्या उदाची राख प्रसाद म्हणून घेतात. 'वानुनि प्रताप श्रद्धाउदी देऊं।'-दावि ३५३. २ उदाच्या राखेची शपथ (मुसलमान लोक घेतात). ३ उदी रंगाचें वस्त्र. [अर. ऊद; म. ऊद.]

उदीची—स्त्री. उत्तरदिशा 'उदीची प्रतीची तथा मुख्य प्राची। दिसे दक्षिणेमाजि विश्रांति ज्याची।' [सं.]

उदीचीन, उदीच्य—वि. उत्तरेकडील [सं.]

उदीत—वि उद्युक्त; उदित पहा 'मैत्री करून कौरवांसी। वियाभ्यामीं उदीतू।' -मुआदि ३०.१४९. [उदित]

उदीम—पु १ कामधंदा; व्यापार, व्यवहार; उद्योग. 'तुम्हि कांहिं उदीम न करा.'-पंच १.३५. **म्ह॰** उदीम करितां सोळाबारा शेत करतां डोईवर भारा=व्यापारांत तोटयाला तयार असलें पाहिजे, पण शेतकीच जर केली तर डोक्यावरचा भारा खालीं उतरणार नाहीं (त्याला तयार असा). २ (व्यापक) शेतीचें उत्पन्न, पीक; बागाईत; मळा. ३ (व.) उपद्व्याप; भानगड. ४ (सामा.) व्यवहार; काम; योजना. 'मग रामासि म्हणे नारद। हा उदीम जाहला फलद। जंबुद्वीपाचा तुटला कंद। भूपाळांचा।' -कथा २.१४.३७. [सं. उद्यम] **॰करणें**-१ व्यापार, उद्योगधंदा करणें. २ (ल.) व्यापारांत खोट येणें, नुकसान येणें; व्यापारांत फसणें. **॰पट्टी**—स्त्री. व्यापारावरील सरकारी कर. **॰धंदा-व्यवसाय-व्यापार-पादीम**—पु. (सामा.) धंदा; व्यवहार; व्यापार. 'उदीमधंद्याचें शिक्षण' =व्यापार-उद्योगधंद्याचें शिक्षण.

उदीमी—पु. व्यापारी. 'हें टाकूनि उदिम्या तोंडावरी।' –दावि २६२. –वि. व्यापारधंद्यासंबंधी (जिन्नस, माल, व्यवहार इ०) [उदीम]

उंदीर—पु. चोहींकडे आढळणारा व सर्व पिकांना त्रास देणारा एक लहान प्राणी, आखु; मूषक. प्राचीन भारतीय ग्रंथकारांनीं उल्लेखिलेल्या उंदराच्या जाती–लालन; पुत्रक; कृष्ण; हंसिर; चुछुंदर; अलस;कषायदंत; कलिंग;अजित; कपिल;कोकिल इ० घरगुती, रानटी व पिकाच्या हंगामाच्या वेळीं उत्पन्न होणारे असे उंदराचे तीन प्रकार आधुनिक प्राणिशास्त्रज्ञांनीं केलेले आहेत. **रूह०** १ उंदरास मांजर साक्ष=शत्रूची मदत घेणें धोक्याचें असतें, तेव्हां अशी साक्ष घेणें व्यर्थ आहे. २ डोंगर खणून–पोखरून–उंदीर काढणें=मोठे प्रयास करून फार थोडी कार्यनिष्पत्ति होणें, अचाट परिश्रमाचें अल्प फळ. ३ उंदीर गेला मस्कतास पण सावकार नाहीं झाला.=मोठ्या ठिकाणीं गेला म्हणून क्षुद्र माणूस काय मोठा बनतो? **०कानी**–स्त्री. लहान वेल. हिचीं फुलें गुलाबी रंगाचीं असून पानें उंदराच्या कानासारखीं असतात. ही फार उष्ण असून चीक पाचक आहे. सर्पदंशावर व पुरुषत्व येण्यास फारच गुणकारी. उंदराच्या विषावर ह्या वनस्पतीचा रस पोटांत घेतात. [सं. आखु–मूषाकर्णी; गु. उंदरकानी; बं. इंदुरकाणी] **०खाद**–स्त्री. १ उंदराचा शेतास उपद्रव. 'कीडखाद टोळखाद व उंदीरखाद आसमानी मुल्तानी जाहाली असता व स्वारीमुळें नुकसानी जाहाली असतां चौकसी करून मजुरा द्यावयाची चाल आहे' –हकिकत तर्फे नाते ताल्लुके रायगड (मसाप २.१८३.) २ एक सरकारी कर. हा सरकारी कोठारांतील धान्य उंदीर खात तेवढें नुकसान भरून काढण्याकरितां म्हणून बसवीत. **०खुरी–नखी–गेळ**–स्त्री.न. १ जनावरांच्या खुरांच्या वर पाठीमागें जो पुढें आलेला मांसल भाग असतो तो. २ (कांहीं ठिकाणीं) खुरांचीं दोन गेळें. **०धाड**–स्त्री. उंदरांचा उपद्रव; उंदिरखाद. **०बिडबी**–कर्नाटकांत गणेशचतुर्थीच्या दुसऱ्या दिवशीं येणारा शूद्रांचा सण. या दिवशीं लेंडया (गोड कडबोळीं) तळून नैवेद्य दाखवितात व तो दुसऱ्या दिवशीं पहांटे शेताच्या सीमेवर नेऊन ठेवतात. उंदरानीं शेताची नासाडी करूं नये म्हणून हा सण पाळतात. **०वासा**–पु. घरांतील भितीच्या वरील भाग आंतील बाजूस उतरता असल्यामुळें छप्पर व वासा यांमध्यें उंदरास फिरावयास जागा राहाते म्हणून तेथें असणाऱ्या वाशास हा शब्द लावितात. ही जागा बहुधा उंदरांचा त्रास बांचविण्यासाठीं चुन्यानें भरून काढितात. **०सांध**–स्त्री. उंदीरवाशामुळें उंदरांना वावरण्यास असलेली मोकळी जागा.

उदींसर—वि. उदी, तपकिरी रंगाचें. [अर. अद+सं. सदृश]

उदुंबर—पु. औदुंबर; उंबर; एक वृक्ष. [सं.] **०मशक**–पु.अव. उंबरातील किडे. –वि. या किड्यांप्रमाणें गर्दी असलेलें; थवे असलेलें; बुजबुजलेलें; भरलेलें.

उदें—न. (राजा.) पाण्यांतील एक जनावर. ऊद पहा.

उदेउदे—उद्गा. उदोउदो करणें; अतिशय स्तुति करणें; जयजयकार करणें. उदो व उदव पहा. 'उदेउदे शब्द आरोळी हो करि कृपा।'–भजनी बोधपर पदसंग्रह ३९. [सं. उदय; म. उदो]

उदेग—पु. उद्वेग पहा. 'राजिक देविक उदेग चिंता। अन्न वस्त्र देहममता॥'–दा ११.३.५. 'तया सांगता थोर उदेग जीवा।' –राक १.१८. [सं. उद्वेग अप.]

उदेजणें—अक्रि. १ उदय पावणें; उगवणें. 'जमा अनेक डोळियां दिनेश हो उदेजुनी। प्रकाशनी पदार्थ ही अपार रश्मिच्या गणीं।'–हस्तामलक ९. (शिवरामकृत) २ उत्पन्न होणें. 'अशिष्टें उदयिजेती काळें।' –मुआदि २६.९८. [सं. उद्+इ–उदय]

उदेणें—अक्रि (काव्य) १ उगवणें; उदय पावणें. 'जो उदेला गांवेंसीं खाये। दोहींतें यया॥' –ज्ञा १५.४७३. २ उत्पन्न होणें; बाहेर निघणें. 'अहा हो हें पाहा, अमृत मथिता ते विष महा, उदेलें।' 'हाणीतसें फडफडा ध्वनि हो उदेला।' –नल ९०. ३ नशीब फळफळणें; उत्कर्ष पावणें. 'अघटितघटणेनें दैव किंवा उदेलें।' –सारुह २.११२. [सं. उद्+इ]

उदेंती—स्त्री. (गो) उगवती; पूर्व दिशा. [उदित]

उदेयांचा—क्रिवि. १ उजाडतांचा; सकाळचा. **०विधि**–पु. प्रातर्विधी. 'उदेयांचा विधी सारोनी।' –शिशु २३०. [उदय]

उदेल—न. उदाचें तेल, अर्क. [ऊद+एल=तेल]

उदेव–वो—पु. (गो.) उदय पहा. 'सुयें उदेवो करी तेथोनि।' –ख्रिपु. १.१.८५.

उदेवणें—अक्रि. (गो.) उदय पावणें; उगवणें पहा. [उदय]

उदेसलिफ—पु. मुईकोहळा. –मुंव्या ११३. [अर.]

उदें—क्रिवि. उद्यां. 'उदै करील अयोध्याप्रवेशु।' –कृमुरा ७३.९०. [उदय]

उदेजणें—अक्रि. उगवणें, उदय पावणें, उदेजणे पहा. 'उदेजणें केतूचें जैसें।' –ज्ञा १६.३१९. 'कां विजूचे उदेजणें। तोचि असतु।' –अमृ ४.९. [सं. उद्+इ–अय–उदय]

उदेणें—अक्रि. १ उदेणें; उगवणें. 'तंवं उदेला दिनकरू।' –दाव ३१६. २ उत्पन्न होणें. 'कांई सांघांल उदेलें। तें जाणवेना॥' –शिशु ११५. [उदेणे]

उदो—पु. १ उदय. 'तवं उदो जाला दीनकरू।' –उषा २८.१२. २ प्रादुर्भाव; उत्पत्ति. ३ विजय; उदयोस्तु, जागी हो! असा शब्द; आनंदाची आरोळी. उदव, उदे उदे पहा. 'प्रपंचगोंधळांचेनि हरिखे। उदो म्हणोनी नाचती॥' –एरुस्व ११.६०. 'नाहीं जाळीत भणदीं। उदो म्हणोनि आनंदी।' –तुगा १८१६. **०उदो करणें**–टिमकी वाजविणें; खुशामत करणें; मोठेपणा देणें; स्तुति करणें. [सं. उदय; का. उदु–जागी हो याअर्थी नैवेद्याच्या-वेळची हांक]

उदो—पु. नाश. 'सुकृताचा उदो केला। गोंधळ घाला इंद्रियें ॥ '–तुगा ४०९. गोंधळ घालावयाच्या वेळीं दिवटी पाजळून तेल वगैरे जाळतात व उदो उदो म्हणतात या क्रियेस उद्देशून पेट विणें, जाळणें, नाश करणें असा अर्थ झाला असावा. [उदय]

उद्गत—वि. १ उगवलेला; उत्पन्न झालेला; निघालेला; उद्भूत. २ वर गेलेला, चढलेला. [सं. उद्+गम्=जाणें]

उद्गदणें—क्रि. खवळणें; उसळणें; आवाज करणें. [सं. उद्+गद्=आवाज करणें]

उद्गम—पु. उगम; मूळ; प्रारंभ; प्रादुर्भाव; जन्म; झरा. (लक्षणेनें व शब्दशः–नदी, चाल, भांडण, रूढी, भाषा इ. चा) २ वर जाणें, चढणें, उडणें. [सं. उद+गम्=जाणें]

उद्गाता—पु यज्ञांतील सामगान करणारा ऋत्विज. 'उद्गाता कौत्समुनी पिंगळ अध्वर्यु त्या मखी होता। '–मोआदि ७४. [सं. उद्+गै=गाणें]

उद्गामी—वि. वर जाणारा, चढणारा, निघणारा. –स्त्री. अनुमानशक्तीचा एक भेद; दुसरा भेद अवगामी –अध्यापन १. [सं.]

उद्गार—पु. १ उच्चार; बोलणें; तोंडांतून निघालेला ध्वनि, शब्द. 'साधूचे जे उद्गार त्यांची शकुनगांठ बांधावी '. २ विकार प्रदर्शन उ० कोधोद्गार; आनंदोद्गार; आश्चर्योद्गार वगैरे; अहाहा ! वाहवा इ. तोंडांतून निघणारे विकाराचे ध्वनी. ३ तोंडांतून असंकल्पित असा निघालेला ध्वनि, उच्चार, सहज, चुकून तोंडावाटे निघालेला विशिष्ट गोष्टींचा ज्ञापक शब्द. ४ ढेंकर; ओकारी; वमन. [सं. उत् + गृ]

उद्गारणें—अक्रि. १ उच्चारणें; बोलणें. २ आवेशानें, जोरानें बोलणें, कोधानें बोलणें, शब्द करणें; विकारवश होऊन उद्गार काढणें. [उद्गार]

उद्गारवाची—वि. मनांतील निरनिराळे भाव व्यक्त करण्याकरितां उच्चारलेलीं अव्ययें; केवलप्रयोगी अव्ययें. उ० अहाहा ! अबब ! अरेरे ! वगैरे. [सं. उद्गार+वच=बोलणें]

उद्गीरण—न. वमन; ओक; ओकारी. [सं. उद्+गृ]

उद्गीर्ण—वि. ओकलेलें; तोंडांतून बाहेर पडलेलें. [सं. उत+गृ]

उद्घाटन-न—न. १ उघडणें; खोलणें; उलगडणें; (कपाट, झांकण, तसबीर, इ०). २ फोडणें; उघडकीस आणणें; प्रसिद्ध करणें. उ० मर्माद्घाटन; गुह्योद्घाटन इ०. ३ स्पष्ट करणें; विवरण करणें; चर्चा करणें. [सं. उद्+घट्]

उद्घाटित—वि. १ उघडलेला, उघड केलेला; उलगडून दाखविलेला; उद्घाटण केलेला. २ स्पष्ट केलेला; विवेचिलेला. [सं.]

उद्घृष्टता—स्त्री. (संगीत) नीरस उद्घोष करणें. [सं. उद्+घृष्ट]

उद्घोष—पु. घोकणें; पुनःपुनः म्हणणें (स्मरणांत राहाण्याकरितां, पाठ करण्याकरतां). २ (ल.) तीच तीच गोष्ट पुनःपुन्हा सांगणें; एकाच विषयावर एकसारखें बोलत राहणें. ३ लोकवार्ता वदंता; लोकोक्ति; वातमी. ४ दवंडी; जाहीर करणें; गर्जना. ' घोष; घोसरा; उत्कंठा. [सं. उत्+घुष्=घोष]

उद्दाम—वि. १ धीट; धारिष्टवान; दांडगा; साहसी. २ गर्विष्ट उन्मत्त; मस्त; बेफाम. ३ जोराचा; मजबूत; टवटवीत; जोमदार (अंकुर, कलिका, पुष्प वगैरे). ४ मोठा; ठसठशीत; ठळक (दागिना रत्न वगैरे). ५ अतिशय गहिरा; तजेलेदार; चकचकीत (रंग.) । उग्र; तीव्र (वास). ७ मोठा; पहाडी; भरदार; गंभीर; सुस्वर (आवाज, ध्वनि). [सं. उद्+दम्] ०पणा–पु. दांडगेपणा उन्मत्तपणा. ' पण आमच्या मतें तें निर्भिड आहे. असें म्हणण्यापेक्षां तें उद्दामपणाचें आहे...असें म्हणणें अधिक योग्य...होईल. –टि. ३,३५४.

उद्दित—वि. उदित; उल्हसित; शोभिवंत. ' हर्षें निर्भ उद्दित। सुप्रसन्नवदनु। ' –दा १.२.९. [सं. उदित]

उद्दिष्ट—वि. १ योजलेलें; संकल्पिलेलें; मनांत ठरविलेलें विचार करून ठाम बनविलेलें; अभिप्रेत. २ विवक्षित; निर्दिष्ट उल्लेखित; दिग्दर्शित; वर्णन केलेलें. [सं. उत्+दिश्]

उद्दिष्ट—न. (संगीत) इच्छित स्वरांच्या प्रस्तारांतील अमुक स्वरूपाच्या स्वररचनेचा प्रकार कितवा हें सांगणें. [सं. उत+दिश्]

उद्दीपक—वि. १ पेटविणारें; चेतना देणारें; प्रवर्तक; प्रोत्साहन देणारें; जागृत करणारें; मनोवृत्ति उत्तेजक बळविणारें; स्फुरण देणारें २ (वैद्यक) उत्तेजक (द्रव्य, औषध इ०). ' रक्तचंदनादिक पदार्थ कामोद्दीपक आहेत. ' (इं.) रिटम्युलेटिव्ह [सं. उत्+दीप्]

उद्दीपणें—अक्रि. चेतना होणें; प्रवर्तन होणें; प्रकाशणें. ' क जागृती जंव जंव उद्दीपे । '–ज्ञा १८.११०४. [सं. उद्दीपन]

उद्दीपन—न. १ प्रज्ज्वलन; चेतविणें; पेटविणें. २ प्रकाशन प्रकाश; उजेड. ३ (ल.) प्रवर्तन करणें; जागृत करणें (क्रोध, लोभ इ० विकार) ' या चूर्णानें क्षुधेचें उद्दीपन होतें. ' ४ (ल.) ज्यामुळें चेतना, जागृति होते असा उत्तेजक पदार्थ; उ० कोधोद्दीपन; कामोद्दीपन; हर्षोद्दीपन इ० ०**विभाव**–पु (साहित्य) साहित्यशास्त्रांतील शृंगाररसाचा एक विभाव विशेष. –शर

उद्देश—पु १ प्रयोजन; हेतु; इच्छा; मनांतील कार्य; अभिप्राय; आशय; मतलब. ' ऐसा योगयुक्तीचा उद्देशु । '–ज्ञा ५.१६१. ' तो उद्देशु तूं नेणसीचि । '–ज्ञा ३.२४. २ दिग्दर्शन; वर्णन; प्रकटीकरण. ' उद्देशें एक दोनि । जायिजती बोलोनी । ' –ज्ञा १.१०४. ३ सारांश. ' म्हणोनि मागां भाव जैसे । आपुले सांगितले तुवां उद्देशें । '–ज्ञा१०.१८८. [सं. उद् +दिश्] ०**कारण**–न.(न्याय) हेतु; प्रयोजन; न्यायशास्त्रांतील कारणांतील एक प्रकार. (इं.) फायनल कॉझ. ' प्रक्षालन हें (साबणाचें) उद्देशकारण होय. ' –न्यायप ५८.

उद्देशणें–उक्रि. १ मनांत योजणें; विचार करून ठरविणें; संकल्प करणें. २ नांव घेऊन किंवा उल्लेख करून उच्चारणें, बोलणें. ३ प्रयोजन, हेतु असणें; बेत असणें, ठरविणें. [सं. उद्देश]

उद्देश्य––न. १ संकल्पित कार्य, बेत, मनांतील हेतु. २ ज्या विषयीं संकल्प करावयाचा तें ३ (व्या.) वाक्याचा एक भाग; वाक्यांत ज्या अर्थाला उद्देशून विधान केलेलें असतें किंवा ज्या विषयीं वक्ता बोलतो तें; वाक्याचा दुसरा भाग विधेय होय. [सं.] **०वाचक**–पु. (व्या.) कर्तृबोधक, उद्देश्य, हेतु दाखविणारा (शब्द) **०विधेयभाव**–पु. कर्तृपद आणि क्रियापद उद्देश्य आणि विधेय यांमधील संबंध. **०विस्तार**–पु. कर्तृपदाचीं विशेषणें किंवा तत्संबद्ध शब्द वगैरे. 'उद्देशविस्तार व विधेयविस्तार हे पाठ सुलांनां फार मनोरंजक वाटतात.' –अध्यापन ९७. [सं.]

उद्धट––वि. १ उर्मट; दांडगा; उद्दाम; असभ्य; बेपर्वा; अविनयशील. 'पहिलेच श्रीमदें उद्धट। त्यावरी मांडिलें कपट।' –एभा १.३४६. २ उद्धट; पाणीदार; बलवान. 'अतिरथि उद्धटवीर। पाठीसीं चालती कृष्णकुमर।' –ह ३३.११८. [सं. उध्दत, उद्+हन्–हत]

उद्धटाई–स्त्री. धिटाईची, बेपर्वाईची वागणूक; दांडगेपणा; बेपर्वाई, मग्रूरी. [उद्धट]

उद्धट्टित (अंगहार)––पु. (नृत्य) उजवा हात आधीं उद्वेष्टित करून मग अपविद्ध करणें, मग उजवा पाय निकुट्टित करून हीच सर्व क्रिया डाव्या हातानें व पायानें करणें, मग उरोमंडल हात करून निर्तव, करिहस्त व कटिच्छिन्न ही करणें क्रमानें करणें. [सं.]

उद्धट्टित (करण)––न. (नृत्य) पाय उद्धट्टित करून तळहात एकाशीं एक जुळवून नंतर डावा हात डाव्या निर्तबावर व उजवा हात उजव्या निर्तबावर ठेवणें.

उद्धट्टित (पाद)––पु. (नृत्य) चवडयावर उभें राहून टांच वर उचलून पुन्हा टांच जमीनीवर टेकणें. [सं.]

उद्धड––न. मस्तकविरहित धड. –शिदि ३४८. [सं. उद्+म. धड] **०करणें**–ठार करणें.

उद्धत––वि. १ मस्त, गर्विष्ठ; उर्मट; उद्धट; 'उद्धत त्या जाती। द्रव्यें रंगल्या उद्धती।'–तुगा ३११८. 'नव्हेचि न विचारिले बुधजनांसि म्यां उद्धतें।'–केका ५९. २ साहसी; धीट. 'हे संग्रामीं अति उद्धत।' –ज्ञा १.१९४. –न. उपमर्द. 'सख्यांचें उद्धत। सखा साहे निवांत।' –ज्ञा ११.५७४. [सं. उद्+हन्–हत]

उद्धरगत––उद्धारगत पहा

उद्धरण–णी––नस्त्री. १ बाहेर काढणें; वर काढणें (खालीं पडलेला पदार्थ). २ उपटून, निखळून काढणें (वृक्ष इ०). ३ अग्निहोत्र्यानें कुंडांत पुरून ठेवलेला अग्नि बाहेर काढणें; सकाळ-संध्याकाळ कुंडांतील अग्नि प्रज्ज्वलित करणें. ४ सुटका करणें; बचाव करणें; अधोगतीपासून सोडविणें; संरक्षण करणें. ५ शापापासून बचाव करणें; (उःशाप देऊन) उद्धार करणें; पुनः योग्यतेस चढविणें; मुक्ति देणें. ६ देऊळ वगैरेंची दुरुस्ती करणें. ७ चालू करणें; पुनरुज्जीवित करणें; पुनरुध्दार करणें (वृत्ति, धर्म, हक, मालमत्ता इ०चा). [सं. उद्+हृ]

उद्धरणें––उक्रि. १ सोडविणें; सुटका करणें; वर काढणें; मुक्त करणें. 'भक्त उद्धरावेअां अपारु।'–दाव ४ 'उत्तरगर्जेद्रउद्धरण। गर्भसंरक्षण परीक्षितीचे।' –एभा २.३०५. २ वैभवाच्या स्थितीस नेणें; स्वर्गादि उत्कृष्ट लोकीं पोहोचणें; मुक्त करणें. 'राम उद्धरुनि गौतमजाया।' 'भगीरथानें आपल्या भस्मीभूत पीतरांना स्वर्गीय गंगा पाताळांत आणून उद्धरिलें.' ३ (विपरीत लक्षणा) शिव्या देणें (वडील माणसांना). (एखाद्याचे) **पितर उद्धरणें**–बाड-वडिलांना, पितरांना शिव्या देणें. [सं. उद्+हृ; उद्धरण]

उद्धरामल––न. (शाप.) एक प्रकारचें अम्ल-घटक उज्ज व हर. (इं.) हायड्रोक्लोरिक असिड.

उद्धर्ता, उद्धारक––वि. सुटका करणारा, मुक्त करणारा. [सं.]

उद्धव––पु. उत्साह; आनंद. 'निजतत्त्व कथुनि ब्रह्मादि सुरासि निपुण उद्धव दे।' –वि. माहा ३.३९. [सं. उद्+हु]

उद्धवणें––क्रि. प्रज्ज्वलित करणें. 'अनुतापु वैश्वानरा। उद्धवतु इंद्रिण जोहरा। आंतु कवण वाचे।' –ऋ ५६. [सं. उद्+धू]

उद्धळण––न. फांसणें; चोपडणें, उडवणें; उधळणें. 'भस्म उद्धळण लक्ष्मीचा भोग। शंकर श्रीरंग उभयरूपीं॥' –तुगा २०५०. [सं. उद्+धूल्]

उद्धाट––पु. १ घर्षण २ (ल.) घोष. 'तें कळिमळार्ची मळगटें। नामोच्चारें नासती॥' –एभा ४.२५३. [सं. उद्+हन्–हत]

उद्धात––वि. फांकलेला; पसरलेला. 'उध्दातया रंगाचा हीरा ते मानकुलाचि।' –भाए ६४५. [सं. उद्+हा=ओडणें]

उद्धार––पु उध्दरण पहा. १ वर, बाहेर काढणें. २ मुक्ति; मोक्ष; सुटका; सोडवणूक, हीन जातींतून वर आणणें; गर्भवास चुकविणें. ३ पुनरुज्जीवन; पुनर्जन्म; (इं.) रेनासन्स; उध्दारकालीन=रेनासन्स काळातील (यूरोपांतील १५ वें शतक). ४ आलापन (राग, रागिणी वगैरे). 'रागोध्दार करितां प्रत्यक्ष। दीप लागले लक्षानुलक्ष।'–शनि २२८. ५ वेंचा; अवतरण (एखाद्या ग्रंथातील). [सं. उद+हृ किंवा धृ] **०करणें**–(उप)शिव्या देणें, पितर उध्दरणें.

उद्धारक––वि. १ वर काढणारा; उध्दार करणारा; उध्दर्ता. २ (सामाजिक). जुन्या मताचा; दुधारक; सुधारक या संज्ञेविरुध्द. [सं]

उद्धारगत––स्त्री. उध्दार. १ चांगली स्थिति प्राप्त होणे. २ मुक्ति मिळणें; सुटका होणें. [सं. उध्दार+गति]

उद्धारण–णें––उध्दरण, उद्धरणें पहा.

उद्धूलन––न. १ उधळणें; इतस्ततः फेकणे; पसरणें; (माती, राख, भस्म, गुलाल, बुक्का इ०). २ (ल.) उधळपट्टी करणें; बेसुमार खर्चणें. [सं. उद्+धूल्]

उद्धृत—वि. १ मुक्त केलेला; मुक्त केलेला; रक्षिलेला; वर चढविलेला; उत्कर्ष केलेला, उध्दरण पहा. २ अवतरून, उतरून घेतलेलें (वाक्य वगैरे). [सं.]

उद्बंध-न—न. टांगून ठेवणें; लोंबकळत ठेवणें. [सं. उद+बंध्]

उद्बीज—वि. एकदम उत्पन्न झालेले, आलेलें (टोळ, टोळधाड, मुंग्यांचा थवा, ढेकूण वगैरे). –न एकदम येणारा, दिसूं लागणारा घोळका; पुंज (मुंग्या, ढेकूण इ० चा). [सं. उद्भिज्ज]

उद्बुद्ध—वि. १ माहिती करून दिलेला; जाणीव असलेला, ज्ञान झालेला. २ जागृत; उज्जीवित; चेतना दिलेला; उत्तेजित. ३ ताकीद दिलेला; पूर्वसूचित; आठवण, समजावणी मिळालेला. [सं.]

उद्बोध-न—पु.न. १ शिकवण; शिक्षण; समजावणी. २ सूचना; ताकीद. ३ जागृति; निजून उठणें; चेतना. ' खिळळ उद्बोधाचेंचि आपणपें घडे ॥ '–ज्ञा ९.९६. ' आषाढ मासीं शयन, भाद्रपदमासीं अंगपरिवर्तन, कार्तिकीं उद्बोधन । (असें विष्णु करतो). ' ४ (विशेषतः उद्बोध). ज्ञान, माहिती, समज; जाणीव. [सं उद्+बुध्]

उद्बोधक—वि. १ सूचक; द्योतक; गमक; ज्ञापक. उ० शरण आल्याचें–दातीं धरलेलें तृण; अनर्थाचें–उल्कापात वगैरे, राजत्वाचें छत्र, ध्वज वगैरे: ताप आल्याचें– अंग ऊन होणें वगैरे; मृत्यु जवळ आल्याचें– वृद्धत्व अशक्तता इ० हीं त्या त्या स्थितीचीं उद्बोधक लक्षणें होत. २ उत्तेजक, मादक; दाहक. उ० –अम्ल (जिभेचें), सौंदर्य (इच्छेनें, कामाचें). यावरून (सामा.) प्रवर्तक; उद्दीपक; उत्तेजक: चैतन्यदायक. [सं. उद्+बुध् = जाणणें]

उद्भट—वि. १ शूर; धाडसी; बलवान्; धारिष्ठवान; धैर्याचा. ' राजकुमर वीर उद्भट । –मुआदि ३१.२९. २ प्रचंड; अफाट; मोठा; विस्तृत. ' आंसडोनि बळउद्भटें । मधे उघडिला तडतडाटे । ' –मुसभा ७.५५. ३ श्रेष्ठ; उत्कृष्ट; थोर; प्रख्यात. ' जे स्वगुणीं उद्भट । घेऊनि सत्व चोखट ॥ ' –ज्ञा १४.२१८. ४ कठिण; कठोर: खडतर. ' पुराणीं उपदेश साधन उद्भट । आम्हां सोपी वाट वैकुंठीची ॥ ' –तुगा २११९. ५ उन्मत्त; उद्धट पहा. [सं. उद्+भट]

उद्भव—पु १ उत्पत्ति; प्रादुर्भाव; प्रारंभ; जन्म 'भुवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ॥ ' –ज्ञा १८.५. २ प्रकट होणें; बाहेर पडणें. ३ उत्पत्ति; हेतु. [सं. उद् +भू]

उद्भवणें—अक्रि. १ उत्पन्न होणें, प्रारंभ होणें, निर्माण होणें; जन्म पावणें २ प्रकट होणें. (क्वचित् सकर्मक प्रयोग) [सं उद्+भू]

उद्भावन—न. १ विचार; बोलणें, सांगणें २ उत्पत्ति; जन्म, उत्पादन. ३ प्रकट करणें; उपस्थित करणें; प्रदर्शन. ४ अनवधान; असावधान; अनास्था. [सं. उद्+भू–भाव–भावन]

उद्भावणें-विणें—क्रि. १ उत्पन्न करणें; अस्तित्वांत आणणें; जन्माला घालणें २ प्रकट करणें; उघड करणें. [उद्+भू–भव–भाव, उद्भावन]

उद्भिज-ज्ज-द्—न. वृक्ष, वनस्पति इ० सृष्टि. ' जैसी मही हे उद्भिजें । ' -ज्ञा ६.४४. –वि. जमीनींत उगवणारे; जमीनींतून वर येणारे; अंकुर फुटणारे; बाहेर पडणारे (वृक्ष, वनस्पति, इ०) [सं. उद्+भिद्] **०कटिबंध**–पु. पृथ्वीच्या ज्या भागांत वनस्पती वाढतात तो प्रदेश. **०कोटि**–स्त्री. वनस्पतिवर्ग; प्राणिवर्गाच्या उलट. ' सेंद्रियरसायनशास्त्रांत उद्भिज्ज व प्राणिज या सेंद्रियकोटींतील यच्चयावत् पदार्थांचा समावेश होतो. ' –सेंपू प्रस्तावना १.

उद्भूत—वि. १ उत्पन्न झालेला; जन्मलेला. २ प्रगट झालेला; निघालेला; बाहेर पडलेला, आविर्भूत. [सं उद्+भू–भूत] **०उष्णता**–स्त्री. आपल्या त्वचेस समजणारी उष्णता. –भूवर्णन ३१.

उद्भेद—पु १ फुटून बाहेर पडण्याची क्रिया (जमिनींतून अंकुर येतात त्याप्रमाणें). ' पर्जन्य पडला म्हणजे भूमींतील बीजें सूमीचा उद्भेद करून बाहेर येतात. ' २ विकसन; उमलणें; फुलणें; दृश्य होणें. [सं. उद्+भिद्]

उद्भ्रांत—वि. मनस्ताप पावलेला. विव्हळ; बावरलेला; गोंधळलेला; गडबडलेला. [सं. उद्+भ्रम्]

उद्यत—(लुप्त) उन्मत पहा. [सं. उन्मत्त अप.]

उद्यत—वि. १ तयार; तत्पर; उत्सुक; उद्युक्त; सिद्ध. ' जे जाहले असती उद्यत झुंजावया । ' –ज्ञा १ २१९. २ उगवलेला, वर आलेला (सूर्य वगैरे) [सं. उद्+यम्–यत] **०दंड-बाहु**–वि. हात वर केलेला; हात उगारलेला; कडक; शिस्तीचा; कठोर (राजा, न्यायाधीश). [सं.]

उद्यम—पु उद्योग; उद्योगधंदा; व्यापार. उदीम पहा. ' जैसें भाग्याचिये भडसे । उद्यमाचेनि मिसे । ' –ज्ञा ६.३५४. [सं. उद्+यम्=प्रयत्न करणें] **०शील**–वि. उद्योगी, मेहनती; परिश्रम करणारा; कष्टाळू: उत्साही. [सं.]

उद्यमी—वि. उद्योगी, नेहमीं कामांत असलेला; मेहनती; कष्टाळू. [सं.]

उद्यां—क्रिवि. उद्यीक; दुसऱ्या दिवशीं. [सं. उद्+इ; उद्ये–उद्यां–उद्यां–राजवाडे–ग्रंथमाला] **०कडे**–क्रिवि. उद्यां; उद्यांपर्यंत. ' म्हातारंबुवा, बादशहाचा एक सरदार आपल्या लष्कराह आज–उद्यांकडे ह्या बाजूनें जाणार असल्याची सेनापतीसाहेबांना खबर लागली आहे. ' –स्वप १९०. **–चा आदितवार**–कधीं न येणारा दिवस=एखादी गोष्ट करावयाचें मनांत नसलें म्हणजे उद्यांच्या आदितवारीं करूं असें उत्तर द्यावयाचें.

उद्यान—न. बाग; बगीचा; उपवन. ' नातरि उद्यानिचेआ फळां । च्युत द्राक्षादि रसाळा । ' –ऋ ५४. ' कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचे ' –ज्ञा १.२८. [सं. उद्+या = जाणें] **०भोजन–न.** वनभोजन. (इं.) पिकनिक्. 'तथापि चार सहा महिन्यांतून एखादें

वेळेस तरी त्यांना शिष्टसंप्रदायाप्रमाणें उद्यानभोजन, खाना, चहापार्टी वगैरे द्यावी लागत असेच. '–नपुक २६.

उद्यापन—न. १ एखादें आरंभिलेलें व्रत संपल्यावर त्या व्रताची समाप्ति करणें; त्यासंबंधीं विधि, कर्म. २ धर्मशाळा, सरोवर, अश्वत्थ इत्यादिकांचा उपयोग करावयाच्या पूर्वी करावयाचा विधि. ३ (ल) गाशा गुंडाळणें; कार्यसमाप्ति, हानि; आपत्ति; अरिष्ट; संकट; कार्यनाश. [सं. उद्+या=जाणें–यापन]

उद्यापित—वि. योग्य विधीनें विसर्जन केलेला, विधिपूर्वक उपयोगांत आणलेला (तळें, धर्मशाळा वगैरे) [सं]

उद्युक्त—वि. १ तयार; सिद्ध; सज्ज २ गढलेला; गुंतलेला. [सं. उद्+युज्=जोडणें]

उद्युत्कार—वि. उदय, प्रकाश करणारा उद्योतकर पहा [सं. उद् +द्युत्=प्रकाशणें]

उद्येल—(कुण.) उदेल पहा.

उद्योग—पु १ काम; धंदा, नोकरी, रोजगार. २ कार्य; व्यवसाय ३ खटपट; प्रयत्न; मेहनत; श्रम [सं उद्+युज्=जोडणें–योग] **०चालविणें–करणें**–काम हातीं घेणें; कामधंदा चालविणें, सुरू करणें **०वेळ–वेळा**–पुस्त्री. दिनमानाचे आठ भाग धरून पाडलेला एक भाग. हा ३॥ घटिकांचा असतो. **म्ह०** १ उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी=उद्योगी मनुष्यांस धनप्राप्ति वगैरे होते. २ (कों.) ये उद्योगा आणि बैस माझ्या खांद्यावर=रिकामा उद्योग उकरून काढणें.

उद्योगी—वि. १ नेहमीं कामांत गुंतलेला, गर्क असलेला २ मेहनती; कष्टाळु. ३ ज्याला कामधंदा आहे असा. आळशी याच्या उलट. ४ (उप.) उपद्यापी, नसते लचांड उपस्थित करणारा. ' उद्योगी बाळ '

उद्योतकर–कार–कारु—वि पु उदयकर्ता; प्रकाशक; दीपक. ' बडिला अव्यक्ताचिया वेशा । उद्योतकारु सूर्यु जैसा ॥ '–अमृ ६.३. [सं. उद्योत+कृ]

उद्र—पु. ऊद; पाणमांजर; जलनकुल. [सं.]

उद्रस—वि. वेचव; नीरस, शुष्क; शिळे; वाळलेलें [सं. उद्+रस]

उद्राण—न. मुक्ति. उद्गरण पहा. ' पोवाडा गाल्याला उद्राण । ऐकल्याला घडो पुण्य ! ' –नपो ६३. [उद्गरण अप.]

उद्रिक्त—वि. अतिशय समृद्ध असलेलें; रगड, वाजवीपेक्षां जास्त; गडगंज. [सं. उद्+रिच्=अधिक असणें]

उद्रेक—पु. १ वृद्धि; अतिशयपणा, वैपुल्य; अतिरेक. २ वेग; वेदना; यातना, कळ, मुरडा (पोटांतील विकारामुळें मलमूत्रविसर्जना पूर्वी होणारा). ३ आकस्मिक प्रेरणा; लहर; उमाळा (पोटांतून येणें या बरोबर प्रयोग). [सं उद्+रिच्]

उद्वर्तन—न. अप. रूप–उद्वत्तन. १ सुगंधि द्रव्ये लावून स्वच्छ करणें; उटणे लावणें (देवमूर्ति, शरीर इ०स), प्रक्षालन. उ० करोद्वर्तन. ' निर्मळा आंगोद्वर्तनें । कळाकौशल्यें रसाएनें ॥ ' –ऋ ७५. ' कितिएक गोपस्त्रिया । विलेपन करित होतिया । उद्वर्तनादि क्रिया । संपादितां । ' –रास १.२१४. २ कामावरून हांकून देणें; उच्चाटण. [सं. उद्+वृत्]

उद्वर्तन (ऊरु)—न. (नृत्य) नृत्यांत सूचीपाद करून मांडी वर उचलणें. [सं.]

उद्वर्तनफलक—पु तार किंवा सुत ओढण्याची पट्टी, जंत्री.

उद्वस, उद्वसु-सें, उद्वस्त—वि. १ ओस; शून्य; उजाड; निर्जन; ओसाड; उध्वस्त, रिकामा. ' यायापरी उद्वस समस्त । पांढरी पडली । '–गीता २.२२७१. ' नाना उद्वसें जे वनें । '–दा ८.५.८. ' वसुंधरा उद्वस आजि झाली । ' –सारुह ३.२५. २ (राजा.) अस्ताव्यस्त; अव्यवस्थित; घोटाळ्याचा; गोंधळ झालेला (व्यवहार, काम). ३ व्यर्थ, फुकट. ' नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु । तेव्हढाही उद्वसु । उयमु पडे ॥ ' –अमृ ६.२९. ' शेषसभा नेत्रीं देखिली । त्यापुढें सुरधामें उद्वस वाटलीं । ' –ज ३९.९०. [सं. उद्+वस्–व्यस्त]

उद्वस्कंध—पु सप्तस्कंधांतील सूर्यमंडळापासून चंद्रमंडळापर्यंत ज्याची मर्यादा असा तिसरा स्कंध. –हंको. [सं.]

उद्वाचेन–उद्वार्जन—उद्वर्तन पहा.

उद्वासन—न. १ मूर्तीत स्थापित केलेल्या देवतेचें विसर्जन; उत्थापन. २ काढून टाकणें (अधिकारापासून), उच्चाटण. [सं. उद्+वस् प्रयोजक]

उद्वाह—पु. विवाह; लग्न. [सं. उद्+वह्=नेणें]

उद्वाहित—वि विवाहित. [सं.]

उद्वाहित(कटि)—स्त्री. (नृत्य) नृत्यामध्यें दोन्ही पायांच्या चवड्यावर उभें राहिल्यानें वर उचललेली कंबरेची स्थिति; लट्ट माणसाचें चालणें दाखविणें व नाचण्याचा भाव दाखविणे, अशा वेळीं हा अभिनय करतात. [सं.]

उद्वाहित(जंघा)—स्त्री. (नृत्य) नृत्याच्या वेळीं सूचीपाद केला म्हणजे जंघा वर उचलली जाते ती स्थिति.

उद्वाहित(वक्षःस्थल)—न. (नृत्य) नृत्यामध्यें दोन्ही पायांचे चवड्यावर उभें राहिलें असता सर्व शरीराचा भार उचलून धरावा लागतो तेव्हां साहजिकच वक्षःस्थळहि उचललें जातें ती स्थिति; जांभई देणे, विव्वोकाचा भाव वगैरेच्या वेळीं हा अभिनय करतात. [सं.]

उद्विग्न—वि. उदास; खिन्न; अस्वस्थ; दुःख–संकट–भयग्रस्त; काळजीनें व्याप्तः चिंताक्रांत; विषण्ण; व्यग्र; त्रस्त; उद्वेग पावलेला. [सं. उद्+विज्=भय पावणें]

उद्वृत्त—वि. धर्मबाह्य, अशास्त्र वर्तन करणारा; बहकलेला; उच्छृंखल; चैनी; अविचारी; स्वैरवर्तनाचा; निसवलेला; अवग लेला. [सं. उद्+वृत्त]

उद्वृत्त, उद्वृत्तशंकु—उन्मंडलशंकु पहा.

उद्वृत्त (आकाशचारी)—न. (नृत्य) पाय अंचित करून दुसऱ्या पायांत अडकवून घेऊन मग मांडीला टांच लागेल अशा प्रकारें दुसऱ्या मांडीला त्या पायानें विळखा घालणें, अशा स्थितींत शरीर वर उचलून वरच्यावर गिरकी मारणें व तो पाय खालीं टेकणें (म्हणजे दुसरा पाय गिरकी घेतांना फिरेल).

उद्वृत्त (करण)—न. (नृत्य) हातांपायांसकट सर्व शरीर पुढें फेकून उडी मारतां मारतां वरच्यावर सर्व शरीरास गिरकी देणें. [सं.]

उद्वृत्त (संयुत हस्त)—न. (नृत्य) हात हंसपक्ष करून कनिष्ठिकेपासून आंतील बाजूनें आरंभ करून एकमेकांस वेढा घालणें.

उद्वृत्तक (अंगहार)—पु. (नृत्य) उजवा पाय नूपर करणें व हात मकराख्य करून दोन्ही बाजूंस लोंबत सोडणें, नंतर दोन हातांनीं विक्षिप्तकरण करून तें सूचीहस्त करणें व त्रिक फिरविणें शेवटीं त्रताहात करून कटिच्छिन्नकरण करणें.

उद्वेग—पु. उद्विग्नपणा; खेद; अस्वस्थता, खिन्नता; कंटाळा; काळजी, भीति, दुःख यापासून त्रास. 'जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं।' –ज्ञा २.२९४. 'विसरु कामाचा तुका म्हणे झाला। उद्वेग राहिला। जावें यावें॥' –तुगा ७५. [सं. उद्+विज्=दुःखी होणें]

उद्वेगणें—अक्रि. उद्विग्न होणें; खिन्न होणें; अस्वस्थ होणें. 'येरी म्हणे नुद्वेगीजे। आश्रयो कांहीं दिसतांहे।' –मुआदि ९ ७५. 'मज हांसतील ते संत। जिहीं देखिलेति मूर्तिमंत। म्हणोनि उद्वेगलें चित्त। अहाच भक्त ऐसा दिसे॥' –तुगा ७१६. [सं. उद्+विज्]

उद्वेप—पु. उपव्याप. 'देहींचा सोडोनि खटाटोप। शिवें धरिला दारुण कोप। केला मल्लयुद्ध उद्वेप। जाज्वल्यमान।' –कथा ७.८.५.

उद्वेष्टित(अंगुलि)—स्त्री (नृत्य) एका हातानें दुसऱ्या हाताच्या तर्जनीपासून आरंभ करून त्या हाताच्या बाहेरील बाजूनें तर्जनीच्या तळहाताकडील बाजूपर्यंत हात आणणें. [सं.]

उद्वेष्टित(बाहु)—पु (नृत्य) बाहूचें मनगट वाटोळें फिरविणें म्हणजे सर्व बाहु फिरला जातो अशी स्थिति.

उद्स्तेभाम्ल—न. (शाप.) (इं.) हायड्रोब्रोमिक ॲसिड.

उधई—स्त्री. पांढरी मुंगी; वाळवी. या मुंग्या जमिनींत वारुळें तयार करून किंवा भिंती तुळयांवर घरें करून राहतात. 'उधयानीं खादलें शरीर। वरते उगवले तरुवर। तेव्हां अस्थिमय प्राण साचार यास्तव न मरे सर्वथा।' –संवि १०.११६. [सं. उद्=वर+इ=जाणें; सिं. उडोही; गु. उधाई]

उधट, उधंट—वि. उद्धट पहा. 'उधटेआं देवां जगझंपू।' –शिशु १५४. 'ज्या सासुरां वर्तति गे उधंटा।' –सारुह ७.१२८. [सं. उद्धत]

उधड-डा—वि. उक्ता; बिन हिशोबी; अंदाजानें. 'जमादारास लागवड खर्चाबद्दल दरमहा १ रुपयाप्रमाणें उधड देण्यांत यावा.' (बडोदें) पहिलवान कुस्ती नियम ८.

उधड—पु. (व.) ठेका; मक्ता. **०घेणें**–मक्त्यानें घेणें. **०माप**–न. अंदाजी वजन, माप, हिशेब; उक्तें माप. [सं. उद्+भृत; प्रा. उब्भड?]

उधडणें—उक्रि. १ उसवणें; उकलणें; फोडणें. २ (साल, कांठ वगैरे) फाडणें; चिंधडया, चिरफळया करणें. 'मंथे उधडिला तडतडाटें।' –मुसभा ७.५५. ३ (ल.) धुडकावणें; हांकलेणें; उच्चाटन करणें. 'उधडिला सिंह कोल्ह्यांनीं।' –संग्रामगीतें ८१. ४ (व.) (चांभारी) मेलेल्या जनावराचें कातडें काढणें. 'महारांनीं तें जनावर उधडलें.' [सं. उद्+धृ–प्रा उब्भडन; म. उ+धड; हि. उधडना; म. उद्धरण=उधडणें]

उधणी, उधवणी—स्त्री. गवाक्ष; द्वार; धारें; धुराडें. [सं. उद्+धू]

उधम—न. (माळवी) गडबड; कल्ला, दंगा. [हि. ऊधम]

उधमणें—अक्रि. उकळी येणें; बुडबुडे येणें. [सं. उद्+ध्मा]

उधर—क्रिवि. (खा.) सरसकट; उघड. –भाबें ७.१.४.

उधरण—न. भेट; भांडार. 'उधरण रंगीं आणि द्राक्ष फळें बहुता प्रकारें। रामापुढें ठेवितांती सकळिक पक्वानें सारें।' –ब ६२९. [सं. उद्+हृ; उब्दरण]

उधरण—उक्रि. ओकणें; ओकारी येणें. 'मला उधरतें.' २ उच्चार करणें. 'जना उधरी नाथ लोकत्रयाचा।' –राम २५. [सं. उद्+हृ–उब्दरण]

उधरागति—स्त्री. उद्धारगति; मोक्ष; मुक्ति. 'नरदेही येऊन सकळ। उधरागती पावले केवळ। येथें रांशयाचें मूळ। खंडोन गेलें॥' –दा १.१०.२०. **०जाणें**–मोक्षाप्रत जाणें; मुक्त होणें. [सं. उद्+धृ–उब्दार+गति]

उधर्ता—वि. उब्दरता; उब्दारकर्ता. 'भूतें भूत धर्ताचि धर्ता उधर्ता।' –राक १.१. [सं. उद्धृ]

उधवटां—वि. कठिण; उघट पहा. 'देव्हूडियां। वेणिआं उकलैलियां। उधवटां गांठीं सुटलियां॥' –शिशु ७१६. [सं. उब्दत, म. उघट]

उधवणी—उधणी पहा. 'उधवणीचें जेवीं तोंड। उगळी धुंवाचें उभड।' –ज्ञा १६.२९३.

उधवणें-विणें—उक्रि. १ उसळणें; वर येणें, जाणें, होणें, करणें. 'नेदिजेचि संसृती। माथां उध।' –ज्ञा १४.४९. 'नातरी

वडवानलु सांदुकला । प्रलयवातें पोखला । सागर शोषूनि उधवला । अंबरासी ॥ ' –ज्ञा १.९०. –एभा ५.३०६. २ वाढणें. ' मग तो न सांवरे जैसा उधवला । ' –ज्ञा ३.२०४. ३ उद्भवणें. ' तैसिया सर्वांगीं उधवती अणिया । रोमांचिया । ' –ज्ञा ६.२६४. ४ वर जाणें; उठणें; पसरणें. ' सांगे भुवनत्रया काजळी । जे गगनामाजि उधवली । ' –ज्ञा ४.१७६. ५ उभें करणें; उचलून ठेवणें (जातण, पाटी इ०); नीट ठेवणें. [सं. उद्+धू–धव]

उधवणें—उद्धवणें पहा.

उधळ—स्त्री. अवास्तव खर्च; वेसुमार खर्च; उधळपट्टी. [सं. उद्+धूल] **०खोर–पट्टया–पांड्या–माणक्या–माधळ्या–वाढ्या**–वि. अति खर्च करणारा; उधळ्या; वेसुमार, बेहद, शक्तीबाहेर, निष्कारण खर्च करणारा. **०ठक**- पु. (चुकीनें) उजळठक पहा. **०पट्टी**–स्त्री.१ मनस्वी खर्च; फाजील, निष्कारण व्यय. २ (चुकीनें) खरडपट्टी पहा. (क्रि० काढणें). **०भवानी–मावशी**–स्त्री. खर्चिक स्त्री; उधळी. **०माणकी–माधळ**–स्त्री. उधळ; उधळपट्टी. **म्ह०** उधळमाधळ घाल गोंधळ.

उधळण–णी—नस्त्री. उधळणें, वर फेंकणें, टाकणें; उडविणें. ' जटाधारी लीळा उधळण चिताभस्म शयनीं । ' –दावि २२४. ' विभूतीचे उधळण शितिकंठ नीला । ' –शंकराची आरती. [सं. उद्+पूलन]

उधळणें—सक्रि. १ वर फेंकणें; उडवणें; पसरणें (धूळ, गुलाल, राख वगैरे). २ वारवणें; वारा घालणें. ३ (ल.) पळवून लावणें, दाणादाण करणें; दशदिशां करणें; हांकून लावणें; पिटाळून देणें (सैन्य, गर्दी वगैरे). ४ अतिशय खर्च करणें; उधळपट्टी करणें. ' हा काय पैसा उधळतोस ! ' ५ (सामा.) नाहींसें होणें, जाणें. ' अहो या लोहाचा जिनस परिसेसीं जरि मिळे । तयाच्या संसर्गें अखिल मग लोहत्व उधळे । ' –सारुह ५.६२. –अक्रि. १ दशदिशां पळणें (सैन्य, समाज वगैरे). ' शिकारीला गेलेलें स्त्रीसैन्य उधळलेलें दिसतें. ' –चाय ४.२.२ अनावर होणें; बुजून पळणें (म्यालेला घोडा, बैल वगैरे). ' घोडा मोकळा सुटला कीं सारखा उधळतो. ' ३ उनाडणें; भटकणें; फिरणें (मूल वगैरेसें). ' हा दिवसभर गांवांत उधळतो व रात्रीं घरीं येतो. ' ४ आवेशानें एखादी क्रिया करणें (मारणें, शिव्या देणें वगैरे). ५ जोरानें बाहेर पडणें, बळावणें (एखादा रोग). ६ वुडणें; अजिबात नाश होणें (पीक वगैरे). ७ पळून जाणें; नाहींसें होणें (एखादें कूळ, भाडेकरी वगैरे). [सं. उद्+धूल्; उध्दूलन] **उधळा घालणें**–१ उड्या मारणें; हैदोस घालणें; दांडगाई मांडणें. २ पळवून लावणें, (मंत्रानें, जादूनें वगैरे).

उधळवाफ—स्त्री. १ ओल कमी झाल्यामुळें पेरण्यास अयोग्य अशी जमीनीची स्थिति; किंचित कोरडेपणा. २ पेरणीचा हंगाम गेल्यानंतरचा काळ; ऐनवाफ, घातवाफ याच्या उलट. [उधळणें+वाफ]

उधळा—पु. उधळण पहा. ' कनककमळांचां कचोळा । कीजे परागाचा उधळा ॥ ' –शिशु ७८१:

उधळा–ळ्या—वि. पुष्कळ खर्च करणारा; उडव्या पहा. ' धर्म करी त्याला उधळा म्हणती । न केल्या बोलती पोटपोशा ॥ ' **म्ह०** (व.) उधळ्याचा माऊ दिघडा.

उधाइणें—न. प्रकट होणें. उधवणें पहा. ' म्हणोनि आळविला नंव वोखटा । उधाइला हा ॥ ' –ज्ञा ११.४५२. [सं. उद्+धू]

उधांग—न. (व.) उसंत; अवकाश. ' जरा उधांग पहूं दे. '

उधाण–न—न. १ अमावास्या–पौर्णिमेला येणारी मोठी भरती; पूर्ण भरती; समा. ' भरलें रत्नसागरीं विषय उधान । करूं कुठवर करीं अपिधान ॥ –प्रला १३९. २ (सामा.) भर; ऊत. ' बादशहाचा हा गळेकापू प्रकार पाहून माझ्या देहांतल्या एकूणएक धमन्यांतील रक्त सारखें उधाण पावत आहे. ' –स्वप ७६. ३ पशूंच्या ठिकाणीं दिसून येणारें कामोद्दीपन. ४ तारुण्याचा भर. ५ भरभराट: उत्कर्ष वगैरे. [सं. उत्थान; प्रा. उट्ठाण; सिं. उधणु] **उधानाचें पाणी**–न. पौर्णिमा–अमावस्येस येणारी मोठी भरती.

उधाणें—क्रि. बहरणें; प्रफुल्ल होणें, विकसणें; बहर येणें. ' जेथ पद्मेंप्रेमा मोददती । आनंदमकरंद उधाती ॥ ' –ज्ञाप्र ४१२. [उधाण]

उधानणें—अक्रि. १ तारुण्याच्या भरांत येणें. २ भरती येणें. [उधान]

उधानु—वि (नंदभाषा) तीन उदानु पहा. ' उधानु काटीवरी चोपइची आग । नवरा राजस मिरवतसे ॥ –तुगा ४४५९. [नंदभाषा]

उधार—पु. १ पतीवर किंवा खात्यावर आणणें; आणलेला जिन्नस. ' मज उधार न घालावा संनिधानाचा । ' –भाए १४५. २ ऋण, कर्ज; पतीवर आणलेल्या मालावद्दलचे येणें–देणें. ' याचा घरी नियत इंदु उधार साचा. ' –सारुह ८.१३१. ३ विन व्याजी कर्ज; उसनी आणलेली रक्कम, वस्तु. –वि. अवकाशाचा; वायद्याचा; विलंबाचा ' तारीन म्हणतां उधारू । वोलीं दिसताहे उशिरू ॥ ' –एभा २३.९२८. ' संसार म्हणजे सवेच स्वार । नाहीं मरणास उधार ॥ ' –दा ३.९.१. –क्रिवि. पतीवर; जबाबदारीवर (देणें, घेणें, आणणें, नेणें वगैरे). [सं. उद्+आ+हृ; किंवा उद्+धृ] **म्ह०** १ उधाराचे पोतें सव्वा हात रितें. २ उधार आणि अंधार. (उधारीनें घेण्यांत मनुष्य फसतो याअर्थी). ३ (व.) उधाऱ्याचा पुधार खाटल्याखालीं अंधार (कोणी औदार्याच्या मोठमोठ्या बाता मारीत असल्यास त्याला म्हणतात.) **०पट**–पु. पतीवर माल घेतलेल्या गिऱ्हाइकांची नोंद; उधारीची यादी. **०पाधार**–पु. पतीवर माल आणि कर्जे देणें, घेणें; उधारीचा व्यवहार. [उधार द्वि.] **०बोलणें**–न. वर वर बोलणें. ' कांहीं कल्पिसी संदेहो । उधार बोलणें कृत्रिम स्नेहो ॥ ' –मुरंशु १२९.

उधारा—वि. उताणा; तोंड वर केलेला.

उधारा—(गो.) उतारा.

उधारी—स्त्री. कांही मुदतीनें पैसे देऊं करून माल नेणें; उधार व्यवहार; उधार; उचल; उचापत; ऋण. [उधार]

उधावणें—उक्रि. उद्भवणें; वाढणें; जोर येणें. उधवणें पहा. ' अधिकांचि विरहोज्वरूं । उधावतु दिसे ॥ –शिशु ८३२. [सं. उद्+धू–धाव्]

उधाळा—पु. १ डोळ्यांत कांहीं उधळून गेलें असतां होणारी स्थिति; उधळणें; धुंदी. ' मज कैसा पडला मोहाचा उधाळा ॥ ' –भाए ३८८. २ भुकटी; रक्षा; भस्म. ' घाली रूपाचा उधाळा । ' –भाए ३६२. [सं. उद्धूलि]

उधाळी—स्त्री. उडी. (क्रि० मारणें).

उधी—स्त्री. निर्णय. –शर.

उधृता—स्त्री. वर धरलेली; एक लगामाचा प्रकार. –अश्व १८५ [उद्+धृता, अप]

उधेल—वि. खवले, वण असलेला. **०तोंड**–न. देवीचे वण असलेलें तोंड

उधोपानस्य—पु. कोठीवाला. ' कारकून उधोपानस्या आणोन । ' –रामदासी २.३२.

उध्वस्त—वि. अस्ताव्यस्त, उधळलेला; इकडेतिकडे करून टाकलेला, नाश केलेला. [सं.]

उनंत—वि. थोर; मोठा; उन्नत. ' जुंझा लागोनी उनंत । ' -उषा ८२७ [सं. उन्नत]

उननी—न.(व.) आधण आलेलें पाणी [सं. उष्ण+वन–वणी]

उना–नी—क्रि. (खा.) आला–ली. [हिं. आना]

उनाइनें—(भिल्ली) ऐकून. ' तियांस बेनीहीं आखूलों उनाइनें शेपायाल आरूयोके ...त्यानें दोघींचें म्हणणें ऐकून शिपायास सांगितलें कीं...'

उनाड—वि. १ अनिर्बंध; भटक्या; मोकळा सुटलेला; स्वैर मनुष्य, मूल). २ जंगली; रानटी (बैल, वनस्पति वगैरे). ३ कों.) आळा नसलेली; स्वैर; व्यभिचारी (स्त्री). –क्रिवि. १ बैरतेनें, अनिर्बंधपणें; स्वच्छंदपणें (भटकणें). २ आपोआप; न सावतां (उगवणें). [सं. उद्+नट्, नाट्; प्रा. उन्नाडिय=हपैयोतक सावाज. उद्नाडि; का. उंडिग=आईबापाविरहित मुलगा] **०चाळा**–. स्वैरवर्तन; खोडकरपणा; व्रात्यपणा; उनाडकी. **०झाड**–न. नटी, जंगली झाड; तण. **०बाहुला**–वि. भटक्या; उनाडक्या रीत फिरणारा; स्वैर; स्वच्छंदी. **०भाजी**–स्त्री. जंगली माठ. **मैना**–स्त्री. स्वैरिणी स्त्री.

उनाडकी—स्त्री. उनाडचाळा; उडाणटप्पूपणा.

उनाडणें—अक्रि. स्वैरपणानें फिरणें; भटक्या मारणें; खोड्या करीत फिरणें; उनाडक्या करीत राहणें. [उनाड]

उनारणें—अक्रि. (व.) भाजलेल्या कणसांतील दाणे चोळून काढणें.

उनारी—स्त्री. (व) पेरण्याच्या वेळीं गव्हाचे किंवा ज्वारीचे दाणे चाड्यांत एका विवक्षित क्रमानें सोडण्याची क्रिया.

उनिंदिया—वि. जागृत. ' उनींदियाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें ॥ ' –राजा १२ ६४. उन्निद्रा पहा. [सं. उन्निद्र]

उनून—वि. गरम; पुष्कळ ऊन; खूप तापलेलें; उन्हून पहा. [ऊन+ऊन] **म्हण०** उनून पाण्यानें घर जळत नाहीं=निंदा, अपशब्द, धाक हीं कितीहि वाईट असलीं तरी त्यामुळें कोणी मरत नाहीं.

उन्नत—वि. उंच; उच्च; श्रेष्ठ [सं. उद्+नम्]

उन्नत(पार्श्व)—पु. (नृत्य) नृत्यामध्यें सूचीपाद करीत असतां जो पार्श्वभाग वर जातो तो.

उन्नत(मान)—न. (नृत्य) उंचावरील पदार्थ पहात असतां होणारी मानेची स्थिति.

उन्नत, उन्नतांश—नपु (ज्यो.) खस्थ पदार्थांचें क्षितिजापासून होणारें जें कोनात्मक अंतर तें. [सं.]

उन्नति-ती—स्त्री. १ उंची. २ श्रेष्ठपणा, मोठेपणा; अधिकार. ३ उत्साह. ' कां परिसु जालिया हातीं । लोहालागीं सवेंसंपत्ति । वेंचितां ये उन्नती ॥ ' –ज्ञा १८.६००. ४ उदय. ' दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ॥ ' –ज्ञा १७.१३३. ५ वृद्धि; उत्कर्ष; आधिक्य. ' ते कथेची संगति । भावाची संपत्ति । रसाची उन्नति । म्हणिपेल पुढां ' –ज्ञा ४.२१२. ' तेथही दोन गुण खांचती । मग एकधरी उन्नती ॥ ' –ज्ञा १७.५७. ६ (ज्यो.) उन्नतांश पहा. ७ उद्धटपणा. [सं. उद्+नम्–नति]

उन्नत्र—न. उज्ज व नत्र यांचें संयुक्त द्रव्य. (इं.) हायड्रोजोन.

उन्नद्ध—वि. गर्वाने फुगलेला. ' वक्रदंत जरासंध । शाल्वपौंड्रक उन्नद्ध ॥ ' –एरुव ५.३७. [सं. उद्+नह्–उन्नद्ध]

उन्नयन—न. वर नेणें, उचलणें; दूर नेणें; लांबविणें. [सं. उद्+नी]

उन्नावो, उन्नाह, उन्नाहो—पु. वृद्धि, वाढ; भरती. ' काय प्रलयांबूचा उन्नाहो । वोधु मानी ॥ ' –ज्ञा १८.४१३. [सं. उद्+नी–नय; उन्नाह=उंची]

उन्निद्रा—स्त्री. जागृति. [सं. उद्+निद्रा] **उन्निद्र**–वि. जागा. ' उन्निद्रेयाचे पहुडणें । ' –ज्ञा १२.६४. **उन्निद्रित**–वि. जागृत. ' उन्निद्रितें एकें निद्रितें । ' –ज्ञा ११.१२८.

उन्फा—पु. रोजचा शिधा; भत्ता; अडेश्री; रोजमुरा. ' तितक्यांस चार मास मिष्टान्न उन्फे चालविले. ' –चित्रगुप्त [अर. उलफा=शिधा, भत्ता.]

उन्मंडल—न. विवक्षित स्थलींच्या मध्यान्हरेखापातांचे क्षितिजाला त्या स्थलांचें उन्मंडल म्हणतात. –सूर्य १६. [सं.] **०शंकु**–पु. सकाळीं सहा वाजतां सूर्याच्या उन्नतांशाची भुजज्या.

उन्मत्त—वि. १ गर्विष्ठ; उद्धट; मस्त; माजलेला; दांडगा; रागीट. २ धुंदींत असलेला; निशा चढलेला; झिंगलेला; शुद्धि गेलेला (मद्य इ०च्या सेवनानें) [सं.] **०द्रव्य**–न. मद्यादि मादक पदार्थ. 'कां उन्मत्तद्रव्य सेविलें. तेणें अनेक भासों लागले ॥' –दा १०.६.१५. **०भैरव**–पु. एक मात्रा, रसायन. **०वायु**–पु. भ्रम; उन्मादवायु; वेड; बडबड; एक वातविकार.

उन्मत्त(करण)—न. (नृत्य) उजव्या पायाचीं बोटें आकुंचित करून तो टांचेवर उभा करणें, हंसपक्ष हात फिरवून उताणे करून व बाहू पसरून ठेवणें. [सं.]

उन्मन—वि. १ लीन: परमेश्वरचिंतनांत निमग्न; उन्मनी अवस्थेंत असलेला. 'तुका म्हणे मन उन्मन जों होय। तोंवरि हे सोय विधि पाळीं।' –तुगा २७६८. २ विरक्त. [सं. उद्+मनस्]

उन्मनी—स्त्री. जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीया याहून पलीकडील जी पांचवी अवस्था ती, ह्या अवस्थेंत वृत्ति मायेच्या उपाधीपासून मुक्त होऊन ब्रह्माच्या ठिकाणीं लीन होत; परमेश्वराच्या ठिकाणीं लय, तंद्री. 'उन्मनी ते निवृत्ति जाण। जेथ विरे जाणपण। विज्ञान तें।' –दा ७.४.५०. 'कल्पनेची लहरी नाहीं। मन निमग्न चैतन्यडोहीं। स्वरूपावांचूनी नाठवे काहीं। तेचि उन्मनी॥' –निगमसार ८.२६. [सं. उद्+मनस्]

उन्मळण—न. उपटून पडणें; उन्मूलन. 'अंगवायो सुटला तेणें द्रुमां। मागीं उन्मळणें जालीं।' –कुमुरा १४ १. [सं. उद्+मूलन]

उन्मळणें—अक्रि. १ उपटणें; समूळ उच्छेद करणें. 'गळा बांधूनियां उखळासी दावें। उन्मळीं त्या भावें विमळार्जुन।' –तुगा २०. २ भडभडून येणें; कळमळणें; मळमळणें. [सं. उन्मूलन]

उन्मळणें—कि. उमलणें; उघडणें; विकासणें; फुलणें. उन्मिळणें पहा. 'तिये उन्मळितां मावळे। नवलावो।' –अमृ ७.१८४.

उन्मळित—वि. उघडलेलें; विकासलेलें. 'पाहिलें तादृस्थ उन्मळित लोचन।' –तुगा ११७. [सं. उन्मील्; उद्+मील्+इत]

उन्माद—पु. १ गर्व; ताठरपणा; उद्धटपणा; माज. (विद्या, संपत्ति इ० योगें). २ धुंदी; बेशुद्धि; कैफ. (मादक पदार्थामुळें येणारा) ३ भ्रम; वेड; वातविकार. [सं. उद्+मद्=माजणें] **०वायु**–पु. उन्मत्तवायु पहा.

उन्मादक—वि. कैफ आणणारें; गुंगी आणणारें; मादक. [सं.]

उन्मादणें—क्रि. उसळणें, वर येणें; वाढणें. 'रांधवणी चुलीपुढें। पन्हे उन्मादती खातवडे।'–ज्ञा १३.५६२. २ उन्माद येणें. [सं. उन्माद]

उन्मान—न. १ वजन करण्याची क्रिया; वजन करणें. २ वजन; भार (वस्तूचें); माप. ३ वजन करण्याचें प्रमाण; माप; वजनें (मण, शेर, तोळा, इ०) ४ वजन करण्याचें साधन (तराजू, कांटा). [सं. उद्+मा=मापणें]

उन्मिळणें—अक्रि. विकासणें; उघडणें; फुलणें. उन्मळित पहा. [सं. उन्मीलन]

उन्मीलन—न. १ उघडणें; उमलणें; विकासणें; फुलणें. 'जेथ उन्मीलन होत आहे। दिठी।' –ज्ञा ११ १४१. २ प्रगट करणें; दाखविणें; व्यक्त करणें; अनाच्छादित करणें. 'जगदुन्मीलनाविरलकेलिप्रिया।' –ज्ञा १८.६. ३ ग्रहण सुटणें. ४ डोळ्यांची उघडझांप; लिकलिक, लुरूलुक. [सं. उद्+मील्=मीलन=मिटणें]

उन्मीलित—वि. १ उन्मीलन झालें आहे असें; विकासलेलें; फुलेलेलें (फूल) २ उघडलेले (डोळे). ३ सुटलेलें (ग्रहण). [सं.]

उन्मुख—वि. सज्ज; तत्पर; प्रवृत्त झालेला; तयार झालेला. उ० मरणोन्मुख, विषयोन्मुख. [सं उद्+मुख]

उन्मूलन—न. उपटणें; उच्छेद; नाश. [सं.]

उन्मूलित—वि. उपटलेलें; नाश केलेलें. [सं.]

उन्मूळणें—सक्रि. मुळासकट उपटून टाकणें. 'जें संसारातें उन्मूळी।' –ज्ञा १३.१७२. 'जसा उन्मुळी चंडवायू वनातें।' –किंकर, शुकरंभासंवाद ३. [सं. उद्+मूल्]

उन्मेख, उन्मेष—पु. १ डोळ्यांची उघडझांप; उघडण्याची क्रिया; निमेष (मिटणें) याच्या उलट. २ उघडणें; फुलणें; विकासणें (डोळे, फूल वगैरे) ३ बुद्धीचा विकास; ज्ञानप्राप्ति; ज्ञानसंपादन. 'तऱ्ही उन्मेखाचिये पेठे। गुणा अवंकणी भरीन बुद्धीचि साटे।' –ऋ १४. 'मग नवी विरूढी फुटेल। उन्मेषाची।' –ज्ञा २.७९. ४ ज्ञान; बुद्धि; प्रकाश; जागृति. 'जयाचेनि विवेक किरणसंगें। उन्मेखसूर्यकांत फुगगे।'–ज्ञा १६.८. ५ तेज; चमक. ६ प्रकटपणा; उघडपणा. 'जे किरीटी तुज निकें। तें पूसपां उन्मेखें। मनाचेनि॥'–ज्ञा २ २८६. 'अविद्या नाशी उन्मेखु।' –अमृ ६.६० **उन्मेखें**–क्रिवि. स्पष्टपणें; उघडपणें. 'आतां असोत हीं वाक्यें। सिधु केवीं उपसूं नखें। हें सांगितलें उन्मेखें। तुज प्रतीं।' –कथा १.१४ ८९. उन्मेखून=मुद्दाम, दादून; बुद्ध्या; जाणून बुजून. [सं. उन्मेष]

उन्मेष(पुट)—न. (नृत्य) नृत्यामध्यें खालच्या वरच्या पापण्या एकमेकींपासून फार दूर ठेवणें, हा अभिनय राग आला आहे असें दर्शवितो. [सं.]

उन्मेषलता—स्त्री. ज्ञानवल्ली; ज्ञानरूपी वेल. 'परी हे बोलों काय गीता। जे हे माझी उन्मेषलता।' –ज्ञा १५.५८२. [सं.]

उन्ह—न. (प्र.) ऊन–न्ह. सूर्यप्रकाश; ऊन पहा. [सं. उष्ण] **म्ह० उन्हांत गेल्याशिवाय सावलीचें सुख कळत नाहीं. उन्हांत**

ठेवणें–उन्हांत तापत ठेवणें. **उन्हांतील पाला होणें**–कोमेजणें; म्लान होणें; जीव सुकणें. ' जाहला उन्हांतील पाला.' –संग्रामगीतें ११८. **०उन्हीत**–वि. (गो.) उनून; ऊन; गरम; तापलेलें; तप्त. ' गिरिजाबाई नवऱ्यास म्हणाली कीं ताजें उन्हउन्हीत थालीपीट तयार आहे तें वेळ का? ' –कोरकि ६७. **उन्हाचा कढ**–पु. सूर्याची प्रखर उष्णता. **उन्हूं देणें**–तापूं देणें.

उन्हणें—अक्रि. उन्हांत तापणें; ऊन होणें; उन्हत ठेवणें; उन्हूं देणें या रूपांतच क्वचित हें क्रियापद आढळलें. [सं. उष्ण; म. ऊन]

उन्हन, उन्हून—वि. कढत; वाफ येत असलेला; उनून. ' मेक्सिको थेथील लोकांच्या देवता मांसभक्षक असल्यामुळें तेथील लोक उन्हन उन्हन ताजें मांस आणि रक्त त्यांच्या तोंडांत कोंबतात. ' –आगर ३.१५. [सं. उष्ण]

उन्हवणी, उन्हाणी—स्त्री. १ ऊन पाणी. ' कुंथावयाची आवडी ओवा । उन्हवणी रडवी बाळें ॥ ' –तुगा ३२५७. २ सूर्यप्रकाशांत तापविलेंल पाणी. ' मोहरिया वाटुनि उन्हाणियासि दिधलिया तुं मरसिल । ' –पंच ३.१८ [सं. उष्ण+वन=पाणी]

उन्हसाण—न. (गो) गरमपणा.

उन्हळ—स्त्री. उन्हानें लांकडांत पडलेली भेग. [उन्हाळणें]

उन्हाटणें—क्रि. उन्हानें करपणें; सुकून जाणें (फळें वगैरे).

उन्हातान्हाचा—क्रिवि. भर दोन प्रहरीं; माध्यान्हीं; ऊन कडक असतां. ' एव्हां उन्हातान्हाचा जाऊं नको, अंमळ शिळोपा पडला म्हणजे जा. ' [ऊन्ह द्वि.]

उन्हाळ-ऊंस-वांगीं—पु उन्हाळ्याच्या दिवसांत होणारा ऊंस–वांगीं वगैरे माल.

उन्हाळणें—अक्रि. १ उन्हापासून त्रास होणें. २ ऊन लागून तडकणें (लांकूड) ३ उन्हाळे लागणें; उन्हापासून एक विकार होणें [सं. उष्णकाळ; प्रा. उन्हाल.]

उन्हाळपावसाळ—क्रिवि. (राजा.) उन्हाळ्यांत आणि पावसाळ्यांत; बारमाही; सबंध वर्षभर. ' या विहिरीस उन्हाळपावसाळ पाणी एकसारखें असतें. '

उन्हाळभावई–ळी, उन्हाळभावी—स्त्री. (व.) वैशाख वद्य अमावास्या. [सं उष्णकाल+भू–भावी]

उन्हाळमैत्री—स्त्री. (व.) उन्हाळ्यापुरेशी, चालत्या काळापुरती मैत्री; हंगामी मित्रत्व.

उन्हाळसावली—स्त्री. १ उन्हाळ्यांत राहण्याकरितां बांधलेलें घर; उन्हाळी बंगला; बाराद्वारी. २ (थट्टेनें) छप्पर; झोंपडी. ३ उष्णतेपासून बचाव; आसरा.

उन्हाळा—पु. १ ज्या दिवसांत ऊन्ह कडक असतें ते दिवस; फाल्गुनापासून ज्येष्ठापर्यंतचे चार महिने. २ ऊष्मा; उकाडा. ३ वारंवार मूत्रविसर्जन करावें अशी भावना.(क्रि०लागणें.उन्हाळे; एक रोग).

४ आईबापांचांचून उघडें पडणें; निराश्रितपणा; पोरकेपणा. ' पोराबाळांचा उन्हाळा झाला. ' ५ नाहींसें होणें; नाश पावणें; अभाव; करपणें; जळणें; खराब होणें (शेत, बाग, मळा वगैरे). ' प्रीतीचा उन्हाळा राया । ' –संग्रामगीतें ८१. ६ (सामा.) विनपावसाळ्याचे दिवस (आठ महिने.) [सं. उष्णकाळ; प्रा. उन्हाल; सिं. उन्हारो] **०करणें**–नाश करणें; उजाड करणें. ' मी म्हणतें नुसते दागिने नेले असते तरी बरें. पण घराचा उन्हाळा केला. '–नामदेव नाटक ७६.

उन्हाळी—स्त्री. १ हवेंतील उष्णता; उन्हाळ्यांतील उष्णता; उकाडा. २ एक मूत्रविकार; उन्हाळे. (क्रि. लागणें, होणें.) ' मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे । ' –दा ३.६.३०. ३ एक वनस्पति; रानटी तीळ; हिचीं फुलें लाल व पांढऱ्या रंगाचीं असून शेंगा चपट्या व पानें लहान व लांबट असतात. काडाचा सर्पणाकडे उपयोग होतो. शिवाय व्रण, खोकला, विष, दमा, अर्श, ज्वर, वायुनाशक वगैरे गुण यामध्यें आहेत. ४ (कों.) उन्हाळा पहा. **०पावसाळी**–स्त्री. खेळांतील दोन पक्षांपैकीं कोणी डावाला सुरवात करावयाची हें ठरविण्यासाठीं खापरी किंवा पैसा यांस एका बाजूनें थुंकी लावून तो वर फेकतात. त्या खापरीचें किंवा पैशाचें कोरडें अंग ती उन्हाळी व थुंकी लागलेलें अंग ती पावसाळी. त्यापैकीं एकानें कोणतें तरी अंग मागावयाचें व मागितलेलें अंग वर आल्यास त्यानें प्रथम खेळावयाचें असतें. **०भात**–न. वायंगणें भात.

उन्हाळू—न. (माळवी) उन्हाळ्यांतील पीक.

उन्हाळे—पुअव. उष्णतेचा, लघ्वीचा विकार; उन्हाळी. ' मुरडा हागवण उन्हाळे । ' –दा ३.६.३०. [उन्हाळा]

उन्हाळें, उन्हेरें—न. उष्ण पाण्याचा झरा. [सं. उष्ण+आलय]

उन्हून—उन्हन पहा.

उन्हेत—न. (गो.) सूर्याची उष्णता; उन्ह.

उन्होटी—स्त्री. उबारा. –शर.

उप—अ. एक उपसर्ग–अर्थः १ अनुगमन. उ० उपदेश, उपालेभ. २ अधिकपणा. उ० उपपराधे. ३ हीनपणा; गौणत्व. उ० उपत्नी, उपपत्नी, उपपुराण. ४ कमी प्रतीचा, तीव्रतेचा, गुणाचा. (इं.) हायपो; हा अम्लांत किंवा त्या रसायनांत (प्राणवायूचा) कमीपणा आहे असें दाखवितो. उ० नत्रस अम्ल (नायट्रस ॲसिड) पेक्षां उपनत्रस अम्ल (हायपोनायट्रस ॲसिड) हें कमी अम्लजन असतें. ५ समीपता; सान्निध्य. उ० उपकंठ, उपनदी, उपांत्य. ६ पहिलेपगा. उ० उपक्रम. ७ दाक्षिण्य; आदर. उ० उपचर्या. ८ साम्य. उ० उपधातु, उपव्याघ्र. ९ शेवट; नाश. उ० उपरति. १० विकार. उ० उपलेप. ११ स्वीकार. उ० उपागम, उपाकर्म. १२ व्यापणें. उ० उपहास. १३ समूहत्व; संमेलन; संकलन. उ०उपार्जन. १४ शक्ति. १५अध्ययन; अध्यापन; उ० उपाध्याय. १६ उद्योग. १७ कडे; वर; खालीं. उ० उपनयन. १८ निरर्थक म्हणूनहि कधीं हा उपसर्ग लागतो. अप या उपसर्गाचे कांहीं अर्थ याचेहि आहेत.

उपकंठ—क्रिवि. गळ्यापर्यंत; आकंठ (खाणें, वर जीव येणें). –शअ. जवळ; शेजारीं. ' तरि अस्तुगिरिचिया उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं ॥ ' –ज्ञा १२.३५. ' उभ्या राहोनि उपकंठीं । तंव धूम्र देखिला दृष्टीं । ' –कथा ३.३.१८. [सं. उप + कंठ = कांठ]

उपकण—पु. नाडेचा आंतील कण.

उपकरण—न. १ साधन; हत्यार. २ साहित्य; सामग्री; परिवार; घटकावयव; घटकद्रव्य. ' हें यज्ञोपकरण सकळ । ' –ज्ञा ३. १२८ ३ देवांच्या पूजेचीं भांडीं (घंटा, तबकडी, धूपार्ती इ०). ' आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं । –ज्ञा १३. ४०६. ४ (अव.) पंचांग तयार करतांना केलेलीं निरनिराळीं गणितें, फलें (तिथिशुद्धि, अब्दप इ०). ५ राजभूषणें; राजचिन्हें (छत्र, चामर इ०). ६ शास्त्रीय प्रयोगसाहित्य. (इं.) ॲपॅरेटस. [सं. उप+कृ] **०सामग्री**–स्त्री. अनुष्ठानास अगर देवपूजेस लागणारें साहित्य किंवा भांडीं. ' माता निरोपी कैकेयीतें ॥ उपकरणसामग्री लागेल येथें ॥ सिध्द करूनि ते देईं ॥ ' –रावि ३.९८.

उपकरणें—अक्रि. १ उपकार करणें; उपयोगी पडणें; कामास येणें. ' आपुला अथवा परावा । ठायीं उपकरसी पांडवा । ' –ज्ञा १८. १३५९. २ सेवा करणें. [सं. उप+कृ]

उपकर्ता—वि. उपकार, कल्याण करणारा; मदत करणारा; उत्कर्ष करणारा; उपयोगी पडणारा; उपकारकर्ता. [सं. उप+कृ]

उपकंस—पु. (गणित) लहान कंस; कंसांतील कंस. [सं.]

उपकार—पु. १मदत; साहाय्य; साहित्य. २ कृपा; दया; आभार; मेहेरबानी. ३ हित; कल्याण; फायदा; बरें. **म्ह०** उपकारानें उपकार फेडावा. [सं. उप+कृ; उपकार] **०ठेवणें**–उपकाराची फेड न करणें. **०बाळगणें–मानणें–न विसरणें–स्मरणें**–उपकाराबद्दल कृतज्ञ असणें. ' तेल आणुनि द्यावें घरा । तुमच्या उपकारा न विसरूं । ' **उपकारांनीं बांधणें**–दुसऱ्यास ऋणी करून ठेवणें. **उपकारांनीं मारणें**–१ अतिशय उपकार करणें; न फिटेसे उपकार करणें. २ उपकार करून एखाद्यास वश करून घेणें; मिंधा करून ठेवणें. **०स्तुति**–स्त्री. (अर्वाचीन) उपकार केल्याबद्दल आभार मानणें; कृतज्ञता व्यक्त करणें. (इं.) थँक्स गिव्हिंग. **०स्मृति–स्मरण**–स्त्री.न. (अर्वाचीन) उपकाराची जाणीव; उपकार स्मरणें.

उपकारक—वि. १ साहाय्यकारी; अनुकूल; मदत करणारा; उपकर्ता. २ हितकारक; कल्याणप्रद (औषध, क्रिया इ०). [सं. उप+कृ]

उपकारी—वि. १ दुसऱ्याचा फायदा, बरें करणारा; उपकार करणारा; उपकर्ता; उपकारक; उपकार करण्याचा स्वभाव असलेला; परोपकारी. २ आभारी; कृतज्ञ. ३ साहाय्यक; साहाय्यकारी, हात भार लावणारा. [उपकार]

उपकार्य—वि. ज्याला मदत करावयाची, ज्यावर उपकार करावयाचा असा. [सं. उप+कृ]

उपकृत—वि. मदत, उपकार केलेलें; ज्यावर कृपा, दया केली आहे असा; ऋणी; आभारी. [सं.]

उपकेशगच्छ––पु. जैन धर्मांतील एक संप्रदाय; असे एकंदर गच्छ (संप्रदाय) ८४ आहेत. श्रीमालच्या उहडानें ओस नगरी स्थापिली तेव्हांपासून त्या ठिकाणच्या जैन समाजाला उपकेश हें नांव पडलें. ओसवाल जैन या गच्छाचे आहेत. [सं.]

उपक्रम—पु. १ आरंभ; सुरवात; हातीं घेणें. ' प्रकृतिपरिहार उपक्रमी ॥ ' –ज्ञा १०.२८. उपक्रमाच्या उलट उपसंहार (शेवट). ' उपक्रमोपसंहारौ ' –गीर २१. २ प्रवेश; शिरकाव (एखाद्या विषयांत), प्राथमिक अवस्था; सुतोवाच. ३ ओघ, संदर्भ. ' उपक्रमें वंदे । तुका वर्मासी तें भेदे ॥ ' –तुगा ३५१५. ४ उद्योग करणें; उपाय करणें; चालविणें. [सं. उप+क्रम्=जाणें]

उपक्रमणें—उक्रि. उपक्रम, आरंभ करणें, हातीं घेणें. 'ऐसेसां अफाटीं कर्मीं । समारंभु उपक्रमीं ॥ ' –ज्ञा १४.२३४. [उपक्रम]

उपक्रांत—वि. १ आरंभिलेलें; सुरवात केलेलें; उपक्रमिलेलें. २ चालू; सुरू. [सं.]

उपखणें—अक्रि. १ नाश पावणें; क्षय पावणें. 'पै जगीं जीवनासारिखें । वस्तु अंग वरी उपखें ॥ परी जातें जीवित राखे. तृणाचेंही ॥ ' –ज्ञा १६.१५६. ' फळनाशे रस फांके । तोही रस उपखे । तृप्तिदानीं ॥ ' –अमृ ५.२२. २ व्यर्थ होणें. ' परि जहालीही वृष्टि उपखे ॥ ' –ज्ञा ११.९५. ३ खर्चिणें ' आणि आपण जालिये जोडी । उपखों नेदी कवडी ॥ ' –ज्ञा १८ ६५३. [सं. उप+क्षि–क्षय्]

उपखर्च—पु. किरकोळ, बारीकसारीक, अवांतर खर्च. [सं. उप+फा. खर्च]

उपखा—स्त्री. १ उपेक्षा; उणीव. ' गृहीं उपखा न पडी । ' –भाए ३५०. २ खंड; खळ ' तव माझिया श्रवणसुखा । मध्येंचि पडेल भीं उपखा ॥ ' –स्वादि १२.२.६८. [सं. उपेक्षा]

उपखा—पु. १ श्रम. ' तेथ चंद्रासि काय किरीटी । उपखा पडे ॥ ' –ज्ञा १.११५. २ क्षय; नाश; खर्च ' किंबहुना इया भाखा । द्वैताचा जेथ उपखा ॥ ' –अमृ २.५४. –वि. व्यर्थ; निरर्थक. [सं. उप+क्षि–क्षय्=ऱ्हास होणें]

उपखा—पु सहवास; वस्ती; अधिवास; उपवास. ' पडिला चारि देहाचा उपखा । चुकला परमार्थसुखा ॥ ' –ऋ ८. [सं. उपक्षि= जवळ राहणें; क्षेति, क्षियति=जवळ राहतो]

उपगण—पु. उपवर्ग; पोटवर्ग; गौण प्रकार; भाग. [उप+गण]

उपगणें—क्रि. कंटाळणें; उबगणें पहा.

उपगत—वि. लब्ध; प्राप्त; सफल. 'तेथें कष्ट केले बहुत । न होयचि काय उपगत ॥ ' –गुच ४५–४४. [सं. उप+गम्]

उपगुरु—पु. गुरूस मदत करणारा; त्याच्या हाताखालचा; दुय्यम शिक्षक; मालचाळ्या. [सं.]

उपग्रह—पु (ज्यो.) १ मोठ्या ग्रहाभोंवतीं फिरणारा लहान ग्रह; दुय्यम ग्रह; चंद्र. २ राहु; केतु. (इं.) सॅटेलाईट.

उपघात—पु. दुर्दैवाचा फेरा; संकट; आपत्ति; अपघात. 'तूं सुमुहूर्तावर नीघ म्हणजे घात उपघात सारे वारले.' [सं उप+हन्–घात]

उपचडा—पु. उमाळा; आवेग. 'उपचडे सुटती तिजला बहु ।' –सारुह ६.१२८. [उप+चढणें]

उपचय—पु १ सांठा; संचय. २ वाढ; वृद्धि. [सं. उप+चि= गोळा करणें; उपचय]

उपचार—पु. १ श्रम, उपाय; प्रयत्न. 'मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । ' –ज्ञा ४.७१. २ पूजेंतील प्रकार. उ० षोडशोपचार पहा. 'देवांगणमिरवणियां । आंगोपचार पुरवणियां ।' –ज्ञा १७.२०३. ३ चिकित्सापद्धतींतील प्रकार; सप्तोपचार पहा. ४ वैद्यकीय चिकित्सा; औषधीयोजना; इलाज; उपाय. 'तें उपचारा वेया रसु पाहे । देतु वैद्यनाथू । ' –ऋ २२. ५ गौरव; आदरसत्कार; आतिथ्य; संभावना; सेवा. 'उपचार करोनि मग राजाला ।' –दावि ३९२. ६ रूढी; रिवाज; चाल. उ० लोकोपचार; शिष्टोपचार. 'मरों टेंकला विप्र पुत्रोपचारें । हरीच वदे नाम लोकोपचारें । ' –नामसुधा ५९. ७ शब्दाचा वाच्यार्थापासून दूरान्वय; उपमा, रूपक इ० वापरणें; लाक्षणिक भाषण; अलंकारिक भाषण. ८ सामग्री, साधनें; साहित्य. 'कां वर्मंतीं बरवा आरामु । आरामींही प्रियसंगमु । संगमीं आगमु । उपचारांचा ॥ ' –ज्ञा १८.३४५. [सं. उप+चर्] ०**बोल**–पु. अव. निरर्थक भाषण, औपचारिक, तोंड देखलें बोलणें; शिष्टाचार म्हणून वरवरचें, मनापासून नसलेलें भाषण 'उपचारबोल हा कासया वृथा।'–दावि २८६. ०**भरण**–न. साधनसामग्री. 'हेचि यज्ञोपचारभरण । अज्ञानघृत ।' –ज्ञा ९.२४०. ०**विरुद्ध**–क्रिवि. शिष्टाचाराविरुद्ध; रूढीविरुद्ध. –नीतिशास्त्र १४७. ०**हांडें**–वि. क्षणिक. –मनको

उपचारणें—सक्रि. उपचार करणें. 'तो तुवां उपचारिलों ।' –विपू २.२२.

उपचारिक नांव—न. व्यावहारिक नांव; टोपण नांव.

उपचित—वि. गोळा केलेलें; जमविलेलें; हीग घातलेलें; संगृहीत; संकलित. [सं. उप+चि]

उपज—पु. १ उत्पन्न; निपज; पैदास; नफा; फायदा; प्राप्ति. २ उत्पत्ति; जन्म; मूळ; उगम. (निपजबरोबर बहुधा प्रयोग). 'त्याचा उपजनिपज सगळा ठाऊक आहे.' ३ (संगीत) आपल्या कल्पनाबळानें नवीनच चमत्कारिक वेतलेली तान. ४ शास्त्रादिव्यवहारांत आपल्या बुद्धीनें शंका, समाधान इत्यादि काढणें; नवीन कल्पना; शोध; शोधन. [सं. उप+जन्, उपज=वाढलेलें; किंवा सं. उत्+पद् प्रा. उप्पज्ज]

उपजंघा—पु. घोड्याच्या पायाचा रोग. –अश्वप २.३८.

उपजणें—अक्रि. १ उत्पन्न होणें; जन्मणें; उद्भवणें. 'ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोहि आपणपांचि ।' –ज्ञा ६.६९. 'पर्दी उपजती नदी कशि कशी त्रिलोकीसती ।' –केका ७७. २ पासून निघणें; मिळणें; प्राप्त होणें 'श्रीरामभजनीं बैसली प्रीत । तेजोमय शरीर दिसत । तेणें इंद्रासि भय उपजलें बहुत । म्हणे पद निश्चित घेईल हा ।' –संवि २.१८२. **म्हण** उपजल्या प्राण्यास मरण हें लागलेलेंच आहे. ' [उपज पहा]

उपजत—क्रिवि. १ जन्मतः, जन्मापासून; उ० उपजत आंधळा रोगी–मुका–शहाणा लंगडा वगैरे. 'मांजर...यासि भय मुलांमध्यें जसें स्वाभाविक, उपजत असतें. '–नीति २६४ –वि. स्वाभाविक; जातीची; निसर्गतः प्राप्त; उ० उपजत बुद्धि–खोड–स्वभाव. ०**रांगणें**–१ उपजल्यापासूनच रांगणें २ एखाद्या वस्तूची एकदम भारी किंमत सांगणें. ३ एखाद्या अडचणीला तोंड देण्याची आपली लायकी एकदम हमखास सांगणें. ०**खोड**–स्त्री. जन्मल्यापासून असलेला दुर्गुण खोड–व्यंग (शारीरिक, मानसिक). ०**गुण**–पु स्वाभाविक, अंगचा, जातीचा धर्म; जन्मापासूनचा गुण. ०**बागी**–वि. मूळचाच, जातीचाच घोडयावर बसण्यांत पटाईत. [उपजत + हिं. बाग=लगाम, बागी=स्वार; सं. वाजी = घोडा] ०**स्वभाव, अंगस्वभाव**–पु. जन्मतः असलेले गुणधर्म–स्वभाव; स्वाभाविक प्रवृत्ति.

उपजनिपज—स्त्री. १ जन्म आणि वाढ; उदय आणि प्रगति (व्यक्तीसंबंधीं) २ आरंभ आणि शेवट; उत्पत्ति आणि लय (एखाद्या गोष्टीचा). ३ (संगीत) एक तानेचा प्रकार [उपज+निपज]

उपजविणें—सक्रि उत्पन्न करणें; जन्म देणें. 'उपजविला कवणा काजा ।' –उषा ३०. 'बीयेदानें उपजविता । अन्नदानें प्रतिपालिता । संकटीं प्राणरक्षिता । तिचे पिते बोलिजेती ।' –मुआदि १५.१५४. [उपज प्रयोजक]

उपजा—उबजा पहा.

उपजाऊ—वि. सुपीक; पिकाऊ. [उपज]

उपजाति—स्त्री. एक वृत्त. हें इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा या दोन वृत्तांच्या मिश्रणानें झालेलें आहे. याच्या प्रत्येक चरणांत अकरा अक्षरें असुन यति पादांतीं असतो. उ० 'हा बाण गेला वरती मण्याला । धरून पृथ्वीवर आणण्याला ।' [सं. उप+जाति]

उपजाति—स्त्री. पोटजाति; उपवर्ग; पोटवर्ग. [सं.]

उपजापक—वि. चुगल्या करणारा; मागें निंदा करणारा; लावालावी करणारा. [सं. उप+जल्प्]

उपजारीस येणें—भरास येणें. –शिल्प. वि. ६८१. (नमको.)

उपजीवक-जीवी—वि. १ (एखाद्यावर) उपजीविका करणारा; पोट भरणारा; अवलंबून असणारा. उ०कृष्योपजीवी; विद्योपजीवी. 'आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजये । होआवें जी । ' –ज्ञा १८.१८००. २ निर्वाहाचें साधन असलेलें. 'ते दैवी सुखसंभवी । तेथ दैवां गुणां येकोपजीवी ॥ ' –ज्ञा १६. ६७. [सं. उप+जीव्]

उपजीवन, उपजीविका—नस्त्री. १ निर्वाह, पोषण; उदरनिर्वाह. २ जगण्याचें साधन, पोट भरण्याचा उपाय (अन्न, भक्ष्य). ३ आश्रय; आधार; रक्षण; पालन, धारण (शरीराचें) ४ रक्षणाचें साधन (शक्ति, अन्न इ०) [सं. उप+जीव्]

उपजीव्य—न. निर्वाहाचें साधन; आश्रय; पोषक द्रव्य, जीवन, जीवाचा आधार [सं] ०**विरोध**–पु १ आश्रयदात्याशीं विरोध; पालनकर्त्याशीं वैर २ उपजीविकेचे साधन सुटणें.

उपट—स्त्री. १ अन्नाची रेलचेल; समृद्धि. २ वीट; शिसारी; आकंठतृप्ति. (क्रि० घेणें). ३ पुनरुत्थान, उठाव, वर डोकें काढणें 'उपट खाल्ली पतीच्या दैवानें ॥ ' –मसाप १ १. २. ४ दोन्ही हातांत धरलेल्या सोटयाचा मार, आघात; हल्ला. (क्रि० खाणे). (क्रि० घालणें) ' तीं बजिराचें सामान थोडकें, त्यास यांची उपट सोसेनाशी जाली ॥ ' –भाब ४९. ५ उसळी, उशी (चेंडूची). [सं. उत्+पत्; प्रा उप्पड] ०**खाणें**–१ उलटणें (रोग इ०); जोरावणे; उलटून पुन्हां हल्ला करणें (शत्रूनें). २ चेंडू पुन्हां उडणें, उशी घेणें. ०**घेणें-जेवणें**–ओ येइतों खाणें; आधाशीपणे खाणें

उपटखुंटा—पु उपटजात्याचा खुंटा.

उपटजातें—न. कोठेहि हालवितां-नेतां येण्यासारखे जातें, जमीनींत कायम न पुरलेलें जातें.

उपटणी—स्त्री. उपटणें, वेचणे; वर काढणें (शेत, तृण, केश इ०) [उपटणे]

उपटणें—सक्रि. १ उपटून काढणें; मूळासकट वर काढणें. 'रंगूने ती खुंटी सकाळीं उपटली. ' २ (एखाद्यापासून द्रव्य वगैरे) कपटानें, युक्तीनें काढणें; लाटणें; लुबाडणें. ' माझी खुशामत करून तुला पैसा उपटणें जमेल ' –विवि ८.२.४०. ३ हिसकून घेणें; लांबविणें; चोरणें; न कळत घेणें; पळविणें. ' उंटावरील हमिणी या मामटयानें उपटली तर नवल ? ' ४ आपटून मारणें. ' जें पाखिरू एकु चांचुवाडा । धरोनि उपटिलें ॥ ' –शिशु ८६७. [सं. उत्+पत्–पात, उत्पाटन] –अक्रि. १ (खिळा खुंटी झाड वगैरे भिंतीतून) बाहेर येणें, वर येणें. २ प्रगट होणें, उजेडात येणें; दिसूं लागणें; (अंमल) सुरू होणें. ' अरे बापरे ! घातवार, व्यतिपात, संक्रांत, किंक्रांत, मरीआई, बारावा बृहस्पति, साडेसाती सारीं एकदम उपटलीं । '–भाव८९. ३ उत्पन्न होणें; प्रादुर्भाव होणें (एखादी सांथ वगैरेचा); पुनः उद्भवणें (रोग).' त्याला कालपासुन मूळव्याध उपटली आहे ' ४ उडणें; आपटून वर येणें. ' आपणचि चेंडू सुटे । मग आपणयां उपटे ॥ ' –अमृ ९.५७. ५ एखाद्यावर तुटून पडणें, रागावणें ' रथें रथूं दाटी । गजें गजां उपटी । ' –शिशु ८८१. ' अन्याय केला कोणी आणि मजवर कां उगीच उपटतोस ! '. [सं. उत्+पत्]

उपटसरी-ळी-सुरी-ळी—स्त्री. (कों) एक वेल; उपळसरी; अनंतमूळ; श्यामा.

उपटसुंभ-भा-वा-ड्या—वि. १ उडाणटप्पू; कामधंदा नसलेला. २ तात्पुरता; उपरि. ३ हक्क नसतां अधिकाराच्या जागेवर आलेला; तोतया. ' नुकतेच परलोकवासी झालेले सातारचे जंगली महाराज यांना सरकार ५०० रुपये माहेवारी पेन्शन देत होते. तेव्हां तर ते उपटसुभ नव्हते ना ? ' –केसरी. ४ (उप.) अविवाहित, ब्रह्मचारी. [उपट+सुंभ=शंभु अप]

उपटसूळ—वि १ आकस्मिक; क्रम सोडून असा. ' मध्येंच उपटसुळासारखें कांहीं निर्माण झालेलें नाहीं. ' –गीर १६८. २ विघातक. मध्येंच लुडबुड करणारा, भांडखोर. उडाणटप्पू. ढवळाढवळ करणारा. ३ उपटसुंभ; अलबत्यागलबत्या. ' मरतेवेळीं एखाद्या उपटसूळास विनाकारण आपली दौलतहि त्यास देतां येणार नाहीं. ' –टि ४.२७. ०**खांद्यावर घेणें**–मूर्खपणानें भानगडी, त्रास, लचांडें पाठीमागें लावून घेणें; नसतें डेंगट मागें लावून घेणें. **म्ह०** उपटसूळ (की) घे खांद्यावर=नसतें लचांड मागें लावून घेणें. [उपटणें+सूळ]

उपटा, उपाटा—पु १ उंचल; दुसऱ्यास फसवून पैसे उपटणें, लबाडीनें कर्ज उभारणें; ठकबाजी करून पैसा काढणें. (क्रि० मारणें). २ लुबाडणें; लांबविणें; उचलेगिरी करणें; पळविणें. (क्रि० देणें). [उपट]

उपटाउपट-टी—स्त्री. १ युक्तीनें, जबरीने अथवा फसवेगिरीनें द्रव्यादि काढणें, उपटण्याचा व्यापार. [उपट द्वि.]

उपटी—स्त्री प्रहार; घाव. ' कोपें इंद्रु आला हातुपीटीं । तो खांडेयाचा उपटीं । ' –शिशु ४५२ [उपटणें]

उपटींव—वि उपटून काढलेले (तोडून किंवा कापून न काढतां काढलेलें पीक, केस वगैरे). उन्मळून पडलेलें; उपटलेलें (झाड).

उपटून खांद्यावर घेणें—उपटसूळ पहा.

उपट्ट—क्रिवि. (गों.) काठापर्यंत भरलेला.

उपट्या—वि फसव्या, खिसेकापू; उचल्या, भामटा; अटल सोदा. [उपटणें]

उपडणें—सक्रि. उपटणें पहा. १ उपटणें. ' आरेरे टाकौनि घोडा । भणती याचिआ जटे उपडा । ' –शिशु १४१. ' रोंवोनि उपडितां दाभणा । ' –मुआदि १३.१६. २ आपटून मारणें. ' मग उपडिला खडकीं । हंसु जैसा । ' –ज्ञा १८.७९८ –अक्रि. बाहेर,

वर येणें; उन्मळून पडणें; मुळासकट उपटून पडणें. ' उत्तम अधर्मी संचरती । ऐसे वर्णावर्ण मिसळती । तेथ समूळ उपडती । जातिधर्म ।' –ज्ञा १.२५०. [सं. उत+पत्; प्रा. उप्पड]

उपडथवी—स्त्री. भोंवरा; लाटा एकमेकांवर उलथून पडणें; खळबळ. ' कीं वुडतां भवार्णवीं । वरि एतां उपडथवी । तेवींचि काकुळती दावी । कृपावंतापुढें ॥ ' –ऋ १०१. ' संसाराचे या डोहांत उपडथवी असे ... ... ।' –भा १०४. [सं. उत्+पत्+स्था; उपडणें+ठाव]

उपडहंडी-हांडी—स्त्री. १ (ना.) पाणी गार करण्याकरितां फडकें बांधून उलटें टांगलेलें भांडें. २ उकडहंडी पहा. [उपडी+हंडी]

उपडा-डी—वि. तोंड खालीं केलेला; पालथा; अधोमुख; उताणा याच्या उलट; (गो. कु) उपडी. **म्ह०** उपड्या घागरीवर पाणी व बहिऱ्याजवळ कहाणी (व्यर्थ). [सं. उत्पाटित–उप्पाडिअ; प्रा. उप्पाड=उपड=उपडा.]

उपडा तांब्या—पु. पालथा तांब्या; स्त्री रजस्वला, विटाळशी असल्याचें द्योतक.

उपडी मांडी—स्त्री. लिहिण्याकरितां मांडी दुमडून घातलेली बैठक.

उपडु—न. जागरण. –शर.

उपंदर—वि. १ पांढरा; फिका. ' तौहि उपंदरु ऐसा । मज वाटतुसे ॥ ' –ऋ ८६. २ उघडें. ' झांकिलें तरि उपंदर पडे । दुर्गंधी सुटे जिकडेतिकडे ॥ ' –दा १५.९.३९. –पु. १ दंभ; ढोंग. ' ना ते आनुरागेवीण । उपंदर श्रीचरणध्यान ।' –ज्ञाप्र ४११. २ दंभस्फोट; ढोंगाची उघडकी. ' लोकांपासीं भावार्थ कैचा । आपण जगवावा तयाचा । सेवट उपंदर कोणाचा । पडोंचि नये ॥ ' –दा १९.८.२३. [सं. उद् + पंडुर = पांढरा]

उपणणी—स्त्री. धान्यांतील भुसा, टरफलें काढण्याकरितां धान्य वारवणें; वाऱ्यानें उडविणें; वरून खालीं ओतणें. [सं. उद्+पवन]

उपणणें—उक्रि. १ टरफल, घाण वगैरे काढण्यासाठीं धान्य वारवणें (सुपानें पाखडणें, उभळणें; झडपणें किंवा फटकणें नव्हे). ' कीं भूस बीज एकवट । उपणितां राहे घनवट ॥ ' –ज्ञा २.१३०. ' भूस उपणुनि केलें काय । हारपले दोन्ही ठाय ॥ '–तुगा २९२४. ' आज सर्व धान्य उपणलें पाहिजे. ' २ क्षुद्र, तुच्छ लेखणें; कस्पटाप्रमाणें मानणें. ३ विवरण; फोड करून सांगणें. ' हे कथा उपणितां तुज नारे । जाण कीं अखमसेतुजनारे ॥ ' –वामनविराट ६. ८५. [सं. उत्+पू–पवन, प्रा. उप्पणण=वरून वारा देणें; सिं. उपिणणु; गु. उपिणवुं]

उपणणें—अक्रि. उत्पन्न होणें. ' निगालेआं चैतन्यनाथां । अंतौरां उपणलीं अवस्था ।' –शिशु ७४३. [सं. उत्पन्न; प्रा. उप्पण्ण]

उपणवटी-पाटी-वाटी—स्त्री. उथळ बुरडी, पाटी (धान्य उपणण्याकरितां घेतात ती). [उपणणें+पाटी]

उपणा—पु. १ वातविकारानें हातापायांस विकृति झाली असतां शेकण्याकरतां वाफवलेला निरगुडी वगैरे वनस्पतींचा पाला; नारळाचा कीस वगैरेचा पेंड. (कि० शिजवणें; करणें; लावणें; बांधणें). २ बरोबर न शिजलेला भात (हेटाळणीकरितां वापरतात). ' भाताचा उपणा वाढला.' [सं. उत्+पू; प्रा. उप्पण; किंवा सं. उत्+पर्ण; प्रा. उप्पण्ण ?]

उपणी, उंपणी—स्त्री. पेरणी. [सं. वप्]

उपणें, उंपणें—उक्रि. पेरणें; पेरणी करणें. [सं. वपन]

उपणें—न. वारवलेलें, उपणलेलें धान्य. [उपणणें]

उपतप्त—वि. तापलेला; तापविलेला. [सं. उप+तप्]

उपतरणें—(प्र.) उबतरणें पहा.

उपताप—पु त्रास; दगदग; काळजी; जिकीर. [सं. उप+ताप]

उपतिष्ठणें—अक्रि. १ मनांत बिंबणें; परिणामकारक होणें; वजन पडणें (उपदेशाचें); संस्कार होणें. २ उपस्थित होणें; समोर येणें; हजर असणें; प्रकट होणें. ' इंद्रादि देवता घरीं पुरवती वस्तुजात ॥ उपतिष्ठति न चिंततां ऋद्धिसिद्ध ॥ ' ३ उभें राहणें (पाप१०). प्राप्त, साध्य होणें; फलास येणें; सत्कृत्याचें अथवा दुष्कृत्याचें फल प्राप्त होणें. ' तुका म्हणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्व पुण्यें ॥ ' –तुगा २२७७. [सं. उप+स्था–तिष्ठ्]

उपतिष्ठित—वि. मनांत भरलेला; बिंबलेला; ठसलेला; रुचलेला, मनावर परिणाम झालेला (उपदेश, बोलणें, शिक्षा). [सं.]

उपदंश—पु. गर्मीचा विकार; एक गुह्येंद्रियाचा रोग. [सं. उप+दश्] **-शी**—वि. ज्यास उपदंश झाला आहे तो.

उपदानें—न.अव. आमान्न; उदकुंभ; वस्त्र; छत्र; उपानह; कमंडलु; यष्टि; लोहदंड; दीप; तांबूल; चंदन; माला; तिल; सिद्धस्थाली; ऊर्णावस्त्र; व्यंजन; धेनु हीं उपदानें और्ध्वदेहिक कर्मांत थावयाचीं असतात. [सं.]

उपदिशा—स्त्री. पोटदिशा; मुख्य चार, आठ किंवा दहा दिशा धरून शिवाय राहिलेल्या इतर दिशा; अवांतर दिशा. [सं.]

उपदिष्ट—वि. १ शिकविलेलें; सांगितलेलें, उपदेशिलेलें (कर्म, मंत्र इ०). २ ज्यास उपदेश दिला आहे किंवा शिकविलें आहे तो (शिष्य इ०). –न. शिकविलेलें ज्ञान; उपदेश दिलेला मंत्र. [सं.]

उपदेव—पु. मुख्य देवतांहून ज्या इतर गंधर्व, विद्याधर, अप्सरा इत्यादि देवता त्या; किरकोळ, गौण देवता. [सं.]

उपदेश—पु. १ शिक्षण; ज्ञान; शिकवण, पाठ; बोध. २ सल्ला; मसलत; युक्ति; सूचना; निर्देश. ३ गुरुमंत्र; मंत्रदान. सामाशब्द–मंत्रोपदेश; हितोपदेश; गुरूपदेश इ०. [सं. उप+दिश्=दाखविणें]

उपदेशक, उपदेष्टा—वि. उपदेश करणारा; शिकविणारा; मंत्र देणारा, सांगणारा; सल्लामसलत देणारा (शिक्षक, गुरु, मित्र). २ (ख्रि.) प्रीचर या इंग्रजी शब्दाचा पर्याय; ख्रिस्ती धर्माचा उपदेश करणारा; (स्त्री.) उपदेशिका. 'त्यांना दिसुन आलें कीं हा परदेशीय उपदेशक जें सांगतो तें आपल्या पवित्र ग्रंथामध्यें सांपडतें.' –ज्ञानोदय ७.५.१९१८; २१.२.१९१८. [स. उप+दिश्]

उपदेशणें—उक्रि. १ ज्ञान, मंत्र, शिकविणें, सांगणें. 'मज निजज्ञान सर्वेशा। कृपा करुनि उपदेशी॥' 'जेणें उपदेशिला रघुनाथ। तो बृहद्ग्रासिष्ठ श्रेष्ठ ग्रंथ।' –ह १.१००. २ (सामा.) माहिती, ओळख करून देणें; पढविणें. 'केवळ जें वेदांत ज्ञान। रामासि उपदेशिला ब्रह्मानंदन।' ३ सल्लामसलत देणें, सूचना; कानउघडणी करणें. [उपदेश]

उपदेशी—वि. १ शिकविलेला; पढविलेला. २ सल्ला दिलेला; हिताहित सांगितलेला. ३ मंत्र सांगितलेला, उपदेश घेतलेला. 'संतसंग करितां म्हणती हा उपदेशी! येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं॥' –तुगा ३३४९. [उपदेश]

उपद्रव—पु. १ पीडा; त्रास; दु.ख; जाच; छळ. 'त्रिविध मुख्य आघवे। उपद्रवांचे मेळावे।' –ज्ञा १३.३४३. २ बाधा (पिशाच्चादिक); संचार. 'या औषधानें जेव्हां गुण पडत नाहीं तेव्हां हा अंगरोग नव्हे, कांहीं उपद्रव आहे.' ३ (कायदा) अपकार, नुकसान; घाण; अडथळा (इं.) नुइसन्स. ४ रोग; शारीरदोष. [सं. उप+द्रु]

उपद्रवी-क—वि. १ पिशाच्चबाधेसंबंधी (पीडा, रोग) २ रोगकारक (अन्न); अपथ्य; शरीरांत बिघाड करणारें; न पचणारें. ३ त्रासदायक; पीडाकारक; कंटाळवाणा. ४ अनर्थकारक; भयोत्पादक; संकटें उत्पन्न करणारी (सत्ता, व्यवस्था, राज्यपद्धति, कारभार). ५ (उपद्रवी) ज्याला पिशाच्चबाधा झाली आहे असा.

उपद्रवी जीव—पु. उपद्रव देणारा, त्रासदायक प्राणी (ढेकूण, पिसा वगैरे)

उपद्रष्टा—पु. १ यज्ञादि कर्मांमध्यें न्यूनाधिक कांहीं कर्म होईल तें पाहून जेथील तेथें यथास्थित करवावें म्हणून एक ऋत्विज असतो तो; यज्ञांत व्यवस्था पाहणारा ऋत्विज. २ (सामा.) व्यवस्थापक; चौकसनीस. [सं. उप+दृश्=पाहणें]

उपद्रुत—वि. उपद्रव पावलेला. [सं.]

उपद्वीप—न. १ द्वीपकल्प; बेटासारखा भाग २ लहान बेट. ३ सप्तद्वीपांविरहित जीं द्वीपें सांगितलीं आहेत तीं. अष्टोपद्वीप पहा. [सं.]

उपद्व्याप—पु. १ अतिशय त्रास, कष्ट; परिश्रमपूर्वक प्रयत्न; खटपट; रक्षाचें पाणी करणें. 'सरकारदरबार, पंचाइती इतका जेव्हां उपद्व्याप केला तेव्हां त्याजकडील रुपये उगविले.' २ पीडा; जिकीर; त्रास; छळ. (क्रि० देणें). ३ व्याप; खटाटोप; पसारा; सिद्धता; तयारी (धंदा, समारंभ, कारभार इ०ची). ४ रिकामा उद्योग; उलाढाल; उचापत. [सं. उप+उद्+व्याप]

उपद्व्यापी—वि. १ मेहनती; कष्टाळू; अतिशय काम करणारा; फार खटपटी. २ व्यर्थ; खोडकर; त्रासदायक: उचापत्या; भानगडया (मूल, माणूस).

उपधातु—पु. १ तांबें, सोनें, रुपें इत्यादि मुख्य सात धातूंखेरीज इतर धातु–स्वर्णमाक्षिक, तारमाक्षिक; मोरचूत; कासें; पितळ; शेंदूर; शिलाजित. २ अश्मीभूत, प्रस्तरीभूत पदार्थ; खनिज द्रव्य. ३ शरीरांतील मुख्य धातूशिवाय बाहेर पडणारे सात धातू–दूध, रज, वसा, घाम, दांत, केश, ओजस्. [सं. उप+धातु]

उपधान—न. १ अर्पण करणें; देणें; पोंचविणें; नेणें (गुणधर्म स्वभाव इ.) 'साधुसमागम अंतःकरणांत विनयाचें उपधान करितो.' २ (सामा.) उपाधि, सान्निध्य यायोगें एका व्यक्तीचे गुणधर्म दुसऱ्या व्यक्तीस प्राप्त होणें; गुणधर्माची देवघेव; एखाद्याचे स्वभावगुणधर्म यांची छाया दुसऱ्यावर पडणें; गुणपरावर्तन. [सं. उप=जवळ; धा=ठेवणें]

उपधानासन—न. एक पाय लांब करून दुसरा पाय उशीसारखा मानेखालीं घालून निजणें. –संयोग ३४७. [सं. उपधान=उशी+आसन]

उपधान्य—न. किरकोळ व कमी महत्वाचें धान्य; गौणधान्य. अठरा उपधान्यें पहा.

उपधायक—वि. देणारा; उपधान करणारा; पोंचविणारा. उ० गुणोपधायक; फलोपधायक; हितोपधायक. [सं.]

उपध्मानीय—पु. अर्धविसर्गपूर्वक पकार आणि फकार; प आणि फ यापूर्वी येणारा विसर्ग. [सं. उप+ध्मा]

उपध्वनि—पु. प्रतिध्वनि; मुख्य आवाजामागून निघणारा बारीक आवाज; प्रतिशब्द; पडसाद. [सं. उप+ध्वनि]

उपनगर—न. शहरालगतची वसाहत; शहराच्या आसपासचा भाग. (इं.) सबबे. उ० मुंबई उपनगर (व्हिलेपार्ले, अंधेरी इ० भाग). [सं. उप+नगर]

उपनणें—अक्रि. उपणणें पहा. १ उपजणें; जन्मास येणें; उत्पन्न होणें. 'तंव कृपा उपनली जगन्नाथा। तें परिएसा पां।'–ऋ ३६. 'तो आतां दमघोषाचां घरी। उपनलासें।'–शिशु १६३. 'बायांचि धिंवसा उपनला चित्ता।' –ज्ञा १.६७. २ झडप घालणें, पडणें. 'जेयावरी दृष्टी उपनली। चैतन्यनाथाची।'–शिशु ५८३. [सं. उद्+पद्; उत्पन्न; प्रा. उप्पण]

उपनणें—सक्रि. (कृषि) वारवणें. उपणणें पहा.

उपनयन—न (गुरू) जवळ नेणें, व्रतबंध; प्रथम यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि; मौजीबंधन; जानवें घालणें; मुंज; त्रैवर्णिकांस

आठव्यावर्षी वेदाधिकारास योग्य करण्यासाठीं हा संस्कार करतात; सोळा संस्कारांपैकीं एक. 'या उपरी उपनयन। गुरुद्वारां गायत्री-ग्रहण।' –एभा १७.२७१. [सं. उप=जवळ+नी=नेणें]

उपनाम-नांव—न. कुळाचें नांव; आडनांव; टोपणनाव; गोत्रनाम. [सं.]

उपनामक—वि. उपनांवाचा; टोपणनांवाचा; आडनांवाचा. उ० 'वेशंपायनोपनामक; पंडितोपनामक; एतदुपनामक. [सं.]

उपनांवाचा—अडनांवाचा पहा.

उपनाह—न. १ पोटीस. –योर २.८१. २ मलम; औषध; [सं.]

उपनिधि—पु. ठेव; दुसऱ्याजवळ विश्वासानें ठेविलेली वस्तु, संपत्ति; अनामत वस्तु. [सं. उप+निधि]

उपनिषद्—न. १ गुरुचरणाजवळ बसून मिळविलेलें ज्ञान; गूढज्ञान. २ वेदांच्या ब्राह्मण ग्रंथांना जोडून असणारा वेदांतपर भाग; वेदसारांश भसणारा ग्रंथ; वेदज्ञानकाण्डात्मक भाग. एकंदर १०८ उपनिषदें मानितात. पैकीं पुढील दहा उपनिषदें मुख्य आहेत. –ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तित्तिर, ऐतरेय, छांदोग्य व बृहदारण्यक. 'अतिगुह्य ज्ञान परात्पर। जें उपनिषदांचें भांडार।' –एभा १३.७१२. 'कुंडलें जाहलीं कृष्णश्रवणीं। तीं उपनिषदार्थ किरणीं। झळकताती सतेज।' –एरुस्व १.५२. [सं. उप+नि+सद्=जवळ बसणें]

उपनीत—वि. व्रतबंध, मुंज झालेला; वेदाधिकारी. [सं.]

उपनेत्र—पु. चष्मा; दृष्टिदोष दूर करण्यासाठीं कांच किंवा गार यांचा उपयोग करून हा तयार करतात; चाळिशी; डोळ्याची आरशी. 'जें न देखती नेत्र। तें देखती उपनेत्र।'–यथा ४.३३२. 'होय भला इष्टार्थग्रह उपनेत्रेंचि कीं भला बुबळें।' –मोउद्योग ३.१३. [सं.]

उपन्यसनीय—वि. प्रतिपाद्य; पुढें मांडावयाचा; विचार करावयाचा (विषय, मुद्दा वगैरे). [सं. उप+न्यस्]

उपन्यस्त—वि. १ पुढें मांडलेला; दाखविलेला; उघड केलेला; प्रतिपाद्य. २ जवळ ठेवलेला. [सं.]

उपन्यास—पु. १ वस्तु, मुद्दा व्यवस्थित रीतीनें पुढें ठेवणें, मांडणें; विशद करणें; प्रतिपादन; स्पष्टीकरण; समोरासमोर ठेवणें, मांडणें. २ प्रस्तावना करणें; विषयप्रवेश करणें; आरंभ; सुरुवात; उपक्रम. 'या वादाचा आज येथें उपन्यास करण्याचें कारण इतकेंच कीं ... ...' –टि ४.८३. ३ सान्निध्य; निकटता; जवळ असणें. [सं.]

उपपति—पु. यार; जार; धगड; सग्या; राखा; पतीखेरीज दुसरा उपभोक्ता; व्यभिचारिणीशीं संबंध असलेला पुरुष. [सं. उप+पति]

उपपत्ति—स्त्री. १ पुरावा; कार्यकारणभाव; संबंध; विषयसिद्धता; सिद्धतेचीं प्रमाणें; युक्तिवाद. 'अंगाचिया अनुपपत्ति। आटलिया उपपत्ति।' –अमृ ५.५५. 'हे केली विवंचना। उपपत्तीसीं।' –ज्ञा १८.६२७. २ सिद्धांत; तत्त्वांचें प्रतिपादन; विशदीकरण; मीमांसा; विवेचन; शिस्तवार मांडणी; योग्य समजूत. 'शिस्तवार जी मांडणी करितात तिला उपपत्ति किंवा उपपादन असें म्हणतात.' –गीर २३. ३ सिद्ध करून दाखविलेली गोष्ट; सप्रमाण, सयुक्तिक सिद्धि. 'सुईचे वेजांतून हत्ती पार गेला म्हणतां हें घडेल कसें याची उपपत्ति करून द्या.' ४ (गणित) उदाहरण सोडविण्याच्या रीतींचें स्पष्टीकरण. ५ (भूमिति). प्रमेयसिद्धता. ६ साधनें; सामग्री; साहित्य (निर्वाह, कारभार इ० चें) ७ युक्ति; कल्पना. 'उपपत्ती शाहेंगी। दाविता जाहला।' –ज्ञा ११.७०४. 'तेही अर्थींची उपपत्ती। ऐक निश्चिती शुक सांगे।' –एभा २.१२५ (इं.) थिअरी–पकोघे (टीका–कोल्हटकरकृत) ६१. [सं. उप+पद्] ०येणें–पटणें; मान्य होणें प्रतीति; अनुभव. 'मज नये हे उपपत्ति। याचिलागीं।' –ज्ञा २.४९.

उपपत्नी—स्त्री. राख; अंगवस्त्र; पत्नीखेरीज दुसरी उपभोग्य स्त्री. [सं. उप+पत्नी]

उपपद—न. १ गौणपद (सामासिक शब्दांतील). उपपद-समास व उपशब्द पहा. २ कोणत्याहि विद्येमध्यें किंवा कलेमध्यें प्रावीण्यदर्शक संज्ञा. बी. ए. एम्. ए. काव्यतीर्थ, पुराणरत्न इ० ३ पदवी; बिरुद; बहुमानदर्शक किंवा पराक्रम, विशेष कृत्यदर्शक उपनाम, टोपण नांव. विक्रमादित्य; आहवमल्ल; इ० 'विलियम जो विजयी या उपपदानें प्रसिद्ध आहे ...'–नि १५२. ४ इंग्रजींत नामापाठीमागें लागणारें पद. उ० ए, ॲन, दि. (इं) आर्टिकल. ०तत्पुरुष–पु. १ जेव्हां तत्पुरुषसमासांतील दुसरें पद धातुसाधित असतें तेव्हां त्यास उपपदतत्पुरुष म्हणतात. उ० कुंभकार, ग्रंथकार, गृहस्थ इ० ०धारी–वि. पदवीधर; ग्रॅज्युएट. 'सदरहू कालेजांत चालू असणारा शिक्षणक्रम किंवा त्यांतून तयार झालेले उपपदधारी लोक यांपैकी कोणीहि अद्याप आपल्या गुणांनीं विशेष लोकमान्य झालेले आमच्या ऐकिवांत नाहीं.' –टि २.२३३. ०समास–पु. शब्दाची द्विरावृत्ति करून किंवा कांहीं एक साहाय्यक शब्द घेऊन जो समास बनवितात तो. उ० दगडधोंडे; भाकरी तुकडा; पुस्तक-बिस्तरा; उपशब्द पहा.

उपपद्मक(हस्त)—पु. (नृत्य) आंगठ्यासह सर्व बोटें पद्मकोशापेक्षां जास्त विरळ व जास्त वांकडीं करणें. [सं.]

उपपन्न—वि. १ सिद्ध केलेलें; स्पष्ट केलेलें; ज्याची उपपत्ति आहे असें. २ साधनांनीं युक्त; समृध्द; संपन्न; श्रीमंत; सधन. [सं.]

उपपातक—न. दुय्यम, तिय्यम प्रतीचें पातक; गोवध, कन्याविक्रय, नास्तिक्य इत्यादि पापें; हीं एकंदर ४९ आहेत. महत्पातक पहा. [सं.]

उपपात्र—न. पाणी पिण्याचें लहान भांडें; पंचपात्री; फुल पात्र, पेला इ० [सं.]

उपपादक—वि. सांगणारा; दाखविणारा, सिध्द करणारा; उघड करून देणारा; स्पष्ट दर्शविणारा. [सं.]

उपपादणें—उक्रि. १ उल्लेखिणें; मांडणें; विवरण करून सांगणें; स्पष्ट करणें; विवेचन करणें; शिकविणें. ' भक्ति ज्ञान विरक्ति । जिये शास्त्रें उपपादति । तियें बोलावि महति । यथार्थवादें ॥ ' २ सिध्द करणें; स्थापित करणें. [सं. उप+पद्=जाणें, उपपादन]

उपपादन—न. १ मांडणी; उल्लेख; विवेचन; प्रतिपादन; उपपत्ति. ' शिस्तवार जी मांडणी करितात तिला उपपत्ति किंवा उपपादन म्हणतात. '—गीर २३. २ सप्रमाणसिध्दता, स्थापना. [सं.]

उपपादित—वि. १ उपपादिलेलें; सांगितलेलें; विवेचन केलेलें; स्पष्टीकरण केलेलें. २ सिद्ध केलेलें. [सं.]

उपपाद्य—वि. सांगावयाचा, मांडावयाचा, स्पष्ट करावयाचा; विवेचन करावयाचा (विषय, मुद्दा). [सं.]

उपपुराण—न मुख्य अठरा पुराणांशिवाय इतर जीं गौण पुराणें त्यांपैकीं प्रत्येक. लघुकालिका, बृहत्कालिका, पराशर, सिंह, नारद, सनत्कुमार, सौर, दुर्वास, कपिल, मानव, विष्णुधर्मोत्तर, शैवधर्म, माहेश्वर, नंदी, कुमार, औशनस, देवी, वरुण. याहून वेगळ्याहि कांहीं याद्या सांपडतात. अठरा उपपुराणें पहा.

उपपुर—न. उपनगर; शहराबाहेरची लहान वस्ती. ' भवति उपपुरें । गुढया गोपुरें । ' —आसु १३. [सं. उप+पुर]

उपप्राण—पु. शरीरांतील पंचप्राणांहून भिन्न असे दुय्यम प्रतीचे जे वायू त्यांपैकीं प्रत्येक. हे पांच आहेत—नाग, कूर्म, कृकल, धनंजय, देवदत्त. ' प्राणचि जाहले उपप्राण । ' —अपरोक्षानुभव ४६. [सं.]

उपप्लव—पु. १ हाणामार, लुटालूट; जाळपोळ (शत्रु, लुटारू वगैरेकडून होणारा). २ जुलूम; जबरदस्ती; अन्याय (जुलमी राजा, निर्दय माणूस यांजकडून). ३ (सामा.) पीडा, उपद्रव, त्रास. [सं.]

उपबर्हे—स्त्री. (प्र.) उपबर्हे; उशी. ' बाहू हे उपबर्हे काय करणें ऊंशा अम्हां सद्गुणा ॥ ' —निमा—सुभद्राचंपु ४.२०. [सं. उपबर्हे=उशी]

उपबाधक—वि. पीडाकारक. ' याचि कारणें उपबाधका । होती तुज अनेका ॥ ' —गुच ३.२०. [सं. उप+बाध्]

उपबाधा—स्त्री. पीडा; दु.ख.

उपभुक्त—वि. १ उपभोग घेतलेलें, वापरलेलें; आस्वाद घेतलेलें. २ अनुभवलेलें; मनांत उमजलेलें; स्वतःस माहीत असलेलें. [सं. उप+भुज्]

उपभोक्ता—वि. १ उपभोग घेणारा; वापरणारा; मालकी हक्क गाजविणारा; २ अनुभव घेणारा; स्वतःच्या अनुभवानें जाणणारा. [सं.]

उपभोग—पु. १ आस्वाद; विलास; सुख भोगण्याची क्रिया; उपयोग; भोग; भोगवटा. २ अनुभव; स्वत: अनुभवानें मिळविलेलें ज्ञान (सुखदु.खाचें). ३ रतिसुख; संभोग. ४ (अर्थशास्त्र) मालाचा खप, उठाव ' उत्पादन व उपभोग यांमध्यें मोठी खिड पाडतां कामा नये. ' —ज्ञको (उ.) १९. [सं. उपभुज्]

उपभोगणें—उक्रि. १ आस्वाद घेणें; वापरणें; उपयोग करणें; उपभोग घेणें. २ अनुभव घेणें; पडताळून पहाणें; अनुभविणें. ३ रतिसुख घेणें; संग करणें; संभोगणें. [उपभोग]

उपभोगी—वि. उपभोग घेतलेलें; आस्वाद घेतलेलें; अनुभवलेलें.

उपभोग्य—वि. १ उपभोगावयाचें; वापरावयाचें; उपभोग करावयाचें. २ अनुभव घ्यावयाचें; उपभोगास योग्य असें. [सं.]

उपम—न. उपमा पहा. ' तयाचें उपम दिल्हें त्यानें ॥ '—रामदासी ८३. [सं. उपमा]

उपमणें-मिणें—सक्रि. उपमा देणें; तुलना करणें; सारखेपणा दाखविणें. ' अगा तुझेनि देवें । कवणासि उपमावें ॥ ' —विपू ७.१०४. ' तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेंसींचि ॥ ' —ज्ञा ४.१८३. ' त्यासीं उच्चैःश्रव उपमणें ॥ ' —वेसीस्व ८.११२. —अक्रि. सारखें असणें, दिसणें; जुळणें; बरोबरी करणें. [सं. उप+मा=मोजणें]

उपमर्णे—मिर्णे—क्रि उडणें; अंतरिक्षांत वर जाणें. ' तेंचि होमधूम्र प्रगटला । तो गगनमार्गेसीं उपमला ॥ जैसा जणउ (जाणो) निघाला । महादेवासी ॥ ' ' अंतरिक्षीं बीज लवे तैशी गगनीं उपमिलीं ॥ ' —वसा २४. ' इतकें बोलुनि नारद तत्क्षणीं गगनीं उपमला ॥ ' —वसा ४३. [सं. उत्+पत्; प्रा. उप्पय]

उपमर्द-न—पु न. १ अंग चोळणें, रगडणें, दाबणें. २ तुडविणें; पिळणें; त्रास देणें; पीडा करणें; जुलूम करणें. ३ मानखंडना; अपमान; इज्जत घेणें. ४ (व्यापक.) आडदांड, बेमुर्वत कृत्य; अविचारी आचरण. [सं. उप+मृद्]

उपमर्दणें—अक्रि. नाश पावणें. ' तेंसा माझेनि प्रसादें । जीवकणु जयाचा उपमर्दे ॥ ' —ज्ञा १८.१२७२. —सक्रि. १ अंग चेपणें, रगडणें. २ तुडविणें; पिळणें; त्रास देणें; पीडा करणें. ३ अपमान करणें, इज्जत, अब्रू घेणें. [सं. उप+मृद्]

उपमा—स्त्री. १ दृष्टांत; उदाहरण; तुलना; दाखला. २ सादृश्य; सारखेपणा, (प्रतिमा, चित्र, मूर्ति, यांतील). ३ उपमान; तुलनेकरितां घेतलेली वस्तु. ४ एक अर्थालंकार—दोन वस्तूंचें साम्य—साधर्म्य जेथें वर्णिलेलें असतें तेथें हा अलंकार होतो. याचे अनेक प्रकार आहेत. हा अलंकार सर्व अलंकारांच्या बुडाशीं आहे. ' ' जो धैर्यें धरसा सहस्रकरसा तेजें तमा दूर सा । '—नल १७. [सं.]

उपमातर्णे—न. उपमा देणें; सदृश्य दाखविणें. ' भणओनि उपमातु कमठ । जगामाजी ॥ ' —शिशु ३९१. [सं. उप+मा]

उपमाता—स्त्री. १ दाई; अंगावर पाजणारी बाई; धात्री. ' सदरील अडचण असल्यास मूल पाजण्यास उपमाता ठेवावी. '

–बालरोग चिकित्सा ४. २ संगोपन करणारी (मातेशिवाय) दुसरी-बाई; ३ सावत्र आई; मानलेली आई; पालनकर्ती. [सं.]

. उपमान—न. १ ज्याशीं तुलना करावयाची तें; दृष्टांत, उदाहरणादाखल घेतलेली वस्तु; तोंडाला चंद्राची उपमा देतात तेथें चंद्र हें उपमान असतें. २ अनुमानाचा एक प्रकार, सादृश्य अनुमान. (इं.) ॲनॉलॉजी. [सं.] **०गम्य**–वि. सादृश्यानें प्रतीत होणारी, समजणारी; तुलनेनें समजणारी. **०सिद्ध**–वि. सादृश्य दाखवून, तुलना करून सिध्द केलेलें. [सं.]

उपमानोपमेयभाव—पु. उपमान आणि उपमेय यांचा परस्पर संबंध; दोन तुल्य वस्तूंमधील परस्परसंबंध. [सं.]

उपमित—वि. उपमा दिलेले; उदाहरण दिलेले, तुलना केलेलें; दृष्टांत दिलेलें [सं.]

उपमिति—स्त्री १ तुलनेनें, प्राप्त झालेलें ज्ञान; दृष्टांतानें झालेली सिध्दि. २ सारखेपणा; सादृश्य. ३ प्रतिकृति, प्रतिमा; सारखी वस्तु (चित्र, मूर्ति वगैरेची). [सं.]

उपमीजणें—उक्रि सदृश समजणें; उपमा देणें; तुलना करणें. ' क्षीरसागराचा पाढ्या. जमुने जलां होतां गोढ्या. तरी उपमीजतां दानवशिरसाढ्या. नारदें आळंगितां ।। ' –शिशु ६१. [सं. उप+मा=माजणें]

उपमेय—न. ज्याचे साम्य, तुलना वगैरे दाखवावयाचें तें; उपमानाची उपमा ज्यास द्यावयाची ते. तोंडाची चंद्राशीं तुलना करतांना तोंड हें उपमेय असतें [सं.]

उपयम—पु विवाह; लग्न. [सं. उप+यम्]

उपयुक्त—वि. उपयोगी; कामाचें; वापरण्यालायक; साहाय्यक; सोयीचें; लाभाचें; उपकारक. [सं. उप+युज्]

उपयोग—पु. १ उपयुक्तता; योजना; साहाय्यकता; फलदायकता; उपकारकता; मदत. २ गरज; जरूरी; प्रयोजन; सापेक्षता. [उप+युज्]

उपयोगणें, उपयोजणें—उक्रि. उपयोग करणें; वापरणें. ' तैंच योग्य प्रकारें उपयोगिल्यानें पाटलिपुत्रांतहि त्यास उपयोगी पडलें ' –चंद्रगुप्त १८३. [सं. उप+युज्, उपयोग]

उपयोगी—वि. १ साहाय्यक; उपयुक्त; उपयोग होईल असें. २ जरूरीचें; गरजेचें. [सं.]

उपर—पु. १ वजन, छाप, श्रेष्ठत्व ठेवणें; वचस्व; वरचढपणा. ' जयाचेनि सावायें. जीव ब्रह्मउपर लाहे ।। ' –अमृ २.१६. ' हा जिकडे जातो तिकडे आपला उपर लोकांवर ठेवितो. २ (नाविक) उत्तर दिशा [सं. उपरि; झेंद उपैरि, उपर; ग्री. हुपर; लॅ. सुपर; जुनें जर्मन ओबर; इं. ओव्हर; हिं. गु. उपर] –क्रिवि. १ नंतर; मागाहून; तदुत्तर; उपरांत. ' त्यजिल गुरुभजन कसें हें आयकिल्याहि उपर माणूस । ' –मोवन १०.६७. २ कांठापर्यंत. ३ उत्तर दिशेस. –शअ. १ वर; ऊर्ध्व; उंच. **म्ह०** तेरा उपर मेरा. २ आणखी; पलीकडे; अधिक; पेक्षां. ' उपरमला भीष्म, विदुर कृष्णहि कथितां अशाहि उपर मला ।। ' –मोउद्योग ९.६७. ' ह्याउपर तुला कांहीं मिळणार नाहीं. ' ३ नंतर. उ० याउपर; त्याउपर वगैरे. ' सरैल उपरा प्रतिरात्रि दिनु । सकलै दिशां उजुवाडु होउनु । ' –स्त्रि २.४४. १९४. **उपरांत असणें** (सोंगटी)–तिफाशी सोंगटयांच्या खेळांत सोंगटी लागण्यापुरेसें दान पडून वर उरणाऱ्या दानामध्यें मारतां येण्यासारखी दुसऱ्या बाजूची सोंगटी बसलेली असणें. हीं दानें सर्व दसऱ्यादापासून पुढें येतात.

उपरकाठी—स्त्री. अनवाणी चालतांना काहींएक लहान काठीवर पाय पडला असतां तिचें अग्र तटकर उडोन पायाचे तळास आघात करितें तेणेंकरून विषारासारिखें मोठें दुखणें होतें तें झालें असतां त्या आघातास म्हणतात. [उपर+काठी]

उपरखणा—स्त्री घराची माडी, मजला. [उपर+खण]

उपरगुढी—वर, उच उभारलेली गुढी. ' फडफडिती उपरगूढिआं । फूजितीं वाघवडाइआं ।। ' –शिशु ५२७. [उपर+गुढी]

उपरचा वारा—पु (नाविक) उलटेकडून येणारा वारा. [उपर=उत्तर]

उपरछक्का—पु. तिफाशी सोंगटयांच्या खेळांतील एक शब्द. सोंगटी लागावयास पुरेसें दान असून अधिक सहा पडल्यास त्यास म्हणतात. उ० १६, १७, १८. इ० तील सहा. [उपर+छक्का]

उपरछडी—स्त्री. (विशेषतः पाण्यांत) उलटी उडी; खालीं डोकें वर पाय करून मारलेली उडी. [उपर+छडी]

उपरटपका-टप्पा-ठपका—पु दुसऱ्यावर उपकार केले असतां आभाराऐवजीं मिळालेला दोष, निंदा, दूषण वगैरे; अयोग्य, अस्थानीं, दोषारोपण. [उपर+टपका]

उपरटप्पी-टप्प्याचा—वि.पोकळ;वायफळ;वरवरचें (भाषण, गप्पा, वादविवाद). [उपर+टप्पा]

उपरडकवळ—स्त्री. उत्कर्षयुक्त आलिंगन. (टीपग्रंथ) 'ना तरि घेतांए । उपरडकवळीं । मकरध्वजु ।। '–शिशु ५९७. [उपरड=वर+कवळ]

उपरंडणें—उक्रि. पालथें करणें; उपडणें; उपडें करणें. उपरांडणें पहा.

उपरणा–णें—पुन. एकेरी पांघरावयाचें, अंगावर घेण्याचें वस्त्र; अंगवस्त्र. [सं. उपावरण–उपावरणें–उपरणें किंवा उपाभरण–उपाहरण–उपारण; –भाअ १८३२; हिं. उपरना] **०झाडून निघणें**–१ मोकळें होणें; एखाद्या गोष्टीपासून संबंध तोडणें. २ रागानें निघून जाणें.

उपरत—वि. पराङ्मुख; परावृत्त (रणापासून, भांडणापासून). ' धांवुनि कर्ण म्हणे रे दावुं नये पृष्ठ संगरोपरतें । ' –मोद्रोण १२.३३. [सं. उप+रम्]

उपरतणें—क्रि. थांबणें; शांत होणें; स्थिर होणें. 'तया सुखासी दृष्टांत । देतां सरलें वस्तुजात । उपरतलें चित्त । ठाईंचा ठाईं ॥ ' –स्वादि १.२.५६. [सं. उप+रम्]

उपरतविणें—क्रि. उफराटें फिरविणें. ' यालागीं त्याग संन्यास । पुसावेयाचें घेउनि मीस ॥ उपरतविलें दूस । गीतेचें तें ॥ ' –राज्ञा १८.८२. [सं. उत्+परा+वृत्–वर्त]

उपरता—वि.क्रिवि. १ वरचा; वरला; वरील. ' आणीकही शाखा उपरता । जिया सनकादिकनामें विख्याता । ' –ज्ञा १५.२०५. २ उलट; उफराटें; विपरीत. ' तें विसरलासि हें उपरतें । संहारूं आदरिलें ॥ ' –ज्ञा ११.३८४. [सं. उपरि+तः]

उपरति—स्त्री. १ थांबणें; बंद होणें; शांत होणें, खळ; खंड; उपरम. २ विरक्ति; वैराग्य; विषयापासून निवृत्ति; सुखाविषयीं उदासीनता. ' उपरति होऊनि चित्ता । निरवधि तळीनता । निरंतर ॥ ' –ज्ञा २.१७३. [सं. उप+रम्]

उपरत्न—न. मुख्य नऊ महारत्नांशिवाय इतर कांहीं रत्नें. उ० तोरमली, स्फटिक कांचमणि, भीष्ममणि, मुक्ता–ज्योतिरस, राजवर्ते, राजमय, ब्रह्ममय, जलकांत, हंसगर्भ, विभवकर, सौभाग्यकर, विषहर, श्रीकांत, हंसमाली, कौस्तुभ, चिंतामणि, राजमणि, धूलीमरकत, भुजगेशमणि, खेज, सीमंतमणि, स्पर्शमणि, तित्तिर, शिला, कर्पूराश्मा, शक्तिचूर्णक, नीलकंठ, गरुड, परीस, केदार, स्यमंतकमणि, केयूर इ० २५ मुख्य उपरत्नें व १०० किरकोळ रत्नें आहेत. –रत्नपरीक्षा (खांबेटकृत). एकंदर ८४ रत्नांपैकीं ९ महारत्नें आणि बाकीचीं ७५ उपरत्नें समजतात. –जव्हेरखाना (बडोदें) १. [सं]

उपरदवडा—पु १ वाजवीपेक्षां जास्त मागणी; फाजील हांव. २ वरचढपणा; वरचष्मा; वर्चस्व. ' उगिच गाल फुगवून रुसावें, आला दिवस उपरदवडा । ' –प्रला १६२. ३ अधिकार; सत्ता; प्रभुत्व. (क्रि० करणें; घेणें; चढवणें, चालविणें; होणें; चढणें; चालणें). ४ वाजवीपेक्षां जास्त मोबदला, मागणी; थोडें देऊन फार काढण्याची प्रवृत्ति. अंदाज देऊन कोहळा काढणें. (क्रि० करणें) ५ एखाद्याचें बरें करूं गेल्यास त्यांत यश न येऊन, यानें माझें वाईट केलें असा दोष (ठपका) येणें. –मनको [उपर+दवडणें] म्ह० उपरदवडा खांद्यावर ×××. = वरचढपणा करणारा नेहमीं आपली मिजास चालवितो याअर्थी.

उपरदुवा, उपरपगडा, उपरपव, उपरपंजा—पु. तिफाशी सोंगट्यांच्या खेळांत मेलेली सोंगटी लागण्यापुरेशा दानावर उरणारें दान. उ० पववारांमधील पव किंवा पगडा, दसदोबारामधील दोन किंवा दुवा, पंधरा, सोळा किंवा सतरामधील पंजा म्हणजे पांच, किंवा सहा इत्यादि; दुवा,पगडा, पव, पंजा हीं खेळांतील दोन, एक, एक, पांच हीं दानें आहेत.

उपरप्यादी—स्त्री. बुद्धिबळांत एका प्याद्यानें शत्रूच्या राजास शह देऊन लागलीच दुसऱ्या प्याद्यानें प्यादेमात करणें. प्यादी पहा. [उपर+प्यादी]

उपरबाहेरचा वारा—पु. (नाविक) वायव्यदिशेकडून येणारा वारा.

उपरम—१ थांबणें, बंद होणें, शेवट; विश्रांति; विराम. ' कासया जयो उपरमु । ' –गीता १.२३४२. ' अहो ज्या सद्भावें जनन मरणाचा उपरम ' २ शांति; विरक्ति; वैराग्य. ' केले होती वृथा श्रम । चित्ता उपरम न होतां ॥ ' –तुगा ३३१६. ३ आनंद; संतोष ' ऐसा ज्याच्या नामाचा महिमा । वर्णितां देव पावले उपरमा ॥ ' –ह १६.८. ' असो आतां यशोदे माय । गोष्टी याच्या सांगों काय । ऐकतां चित्तां उपरम होय । प्रेम सये नावरे मज ॥ ' –ह ७.२३७. [सं. उप+रम्]

उपरमणें—क्रि. १ थांबणें; शांत होणें; बंद होणें; स्थिर होणें. २ रममाण होणें, आनंद पावणें, संतुष्ट होणें; उपक्रीडणें; प्रफुल्लित, ताजातवाना होणें. ' उपरमोनि पाहे सुंदरी । तंव अंगीं आदळला श्रीहरी ॥ ' –एरुस्व ७.६३. ३ विसांवणें, विरमणें. ' शिव आणि श्रीधर । ह्यांचे भक्तीस उपरमति तत्पर ॥ '. ४ मरणें; मृत्यु पावणें. [सं. उप+रम्]

उपरमाडी—स्त्री. घराचा वरचा मजला, माडी, उपरखण; माडीवरची माडी. ' पहाया वैदर्भी मग उपरमाडीवरि चढे. ' –सारुह ७.८४. [उपर+माडी]

उपरवळ्या-वाळ्या—क्रिवि. १ वरून; उंच ठिकाणाहून; उंचावरून. ' सफेलीवरून उपरवळ्या खंदकांत उडी टाकली. ' २ वर, उंच; डोक्यावर. [उपरि+वलणें] ०**अंवट मागणें**–कारणाशिवाय दुसऱ्याच्या भानगडींत पडणें; खांद्यावर उपटसुळ घेणें; विकत श्राद्ध घेणें.

उपरवांयां—क्रिवि. कारणाशिवाय, जरूरीशिवाय. [सं.उपरि+वि+इ.; म. उपर+वायां=व्यर्थ] ०**अंवट घेणें**–कारणाशिवाय भांडणें.

उपरसाल—स्त्री बाहेरची साल, कातडी, चामडी; अंतरसालेच्या विरुद्ध. [सं. उपरि+छाल]

उपरसाळ—स्त्री. एक प्रकारचें भात. [सं. उपरि+शालि; प्रा. सालि, म. साळि]

उपरा—पु. (राजा.) बहार; मोसम; बहर

उपर, उपरी—क्रिवि. तांतडीनें, लागलीच, तावडतोब ' सिंहनाद केला वीरीं । उपराउपरी धांविन्नले । '–एरुस्व ८.२०, ' निष्काम उपवनें चौफेरीं । तीं जाल्लीं उपराउपरीं ॥ ' –एभा २३.३१९. [सं. उपरि+उपरि]

उपराग—पु. ग्रहण. ' चंद्रासि लागति कळा उपराग येतो । ' –नळ ५. [सं. उप+रंज्]

उपराग, उपरागिणी—पुस्त्री. गौण राग, रागिणी. 'राग उपराग भार्यासहित । सामगान एक करिती ।' –रावि ३६ ६९ [सं.]

उपराठणें, उपराठा—उफराटणें–उफराटा पहा (गोमांतकी रूपे–उपराटें, उफाटें, उफराटें.) 'उपराठतां गेलीं प्राणें ।' –गीता २.१२६०. 'तो उपराठा गमे ।' –गीता १२.१३७.

उपरांडणें—उक्रि. पालथें करणें; सांडणें; पाडणें; उलथून पाडणें (गाडा, गलवत इ०). [सं. उपरि+छर्द–छड्ड–छंड–छांड–सांड–रांडणें=ओकणें वगैरे]

उपरांत, उपरांतिक—क्रिवि. १ नंतर; मागाहून. 'उपरांत नर्मदाकांठीं, सार्थकासाठीं, मोक्षकार्यार्थीं' –ऐपो ४१६. 'तो मजकूर बाचल्याच्या उपरांतही त्याची बरील रंगेल वृत्ति जर तशीच कायम राहिली तर या गोष्टीबद्दल त्याची मोठी तारीफ करणें रास्त होईल.' –नि ६२४. –शअ. शिवाय; आणखी; वर. 'बस्स ! उपरांत नाहीं. अगदीं हरा शिवा !' –भा ४. [सं उपरि. अपरांत–तिक यात्रमाणें प्रयोग, गु. गो. उपरांत; हिं. उप्रांत.]

उपराम—पु. थांबणें, बंद होणें; विराम, विश्राम. उपरम पहा. [सं.]

उपराळ—वि. अधिक; फाजील, वाजवीपेक्षां जास्त. [सं. उपरि+आलु; हिं. उप्राल=आणखी, वर]

उपराळ—स्त्री. (क.) ओहाळाकांठची स्मशानभूमि.

उपराळणें—अक्रि. भरून वाहणें (भांडें, नदी) उ० **उपराळून येणें, भरणें, चालणें**. [सं. उपरि+आलु, हिं. उप्राल–वरून]

उपराळा—पु. १ दोहों बाजूंस सारखें ओझें करण्याकरितां जनावराच्या पाठीवरील एका बाजूस घातलेलें (लांकडें इ० चें) वजन. २ वाजवीपेक्षां अधिक सामग्री, संग्रह (माल, द्रव्य वगैरेचा), राखून ठेवलेला जिन्नस; खर्च भागवून उरलेला माल, द्रव्य, पदार्थ इत्यादि; जरूर लागल्यास उपयोग करतां येईल अशी तरतूद (दारूगोळा, सैन्य इ०). ३ ठराविक वजनापेक्षां अधिक असलेला माल. ४ वर्चस्व; वरचढपणा (वादांत, भांडणांत). ५ विकत घेतलेल्या मालावर ठरलेल्या वजनापेक्षां थोडा अधिक मिळणारा माल (गुळाची ढेप, लांकडाचा गठ्ठा इ०चे तोललेल्या वजनापेक्षां ओझ्यांत अधिक वजन भरतें तें वाणी काहीं न आकारतां देतात). ६ जनावराच्या ओझ्यावर टाकलेले किरकोळ जिन्नस (काटक्या इ०); किरकोळ भरती. ७ भरपाई; वजावाट; मोबदला. (क्रि. करणें) 'कच्च्या गडद्यास कांहीं टोल्यांचा किंवा बद्यांचा उपराळा द्यावा.' कुबडी चेंडू –(बडोदें) १७ (ई) हँडीकॅप ८ एखादा जिन्नस वजन करतांना दुसऱ्या पारडयांत घातलेलें वजन, दडपण. ९ (ल.) आढापीट; खटाटोप. 'ब्रह्मसूत्राची भार-दोरी गळां । मंत्रोपदेश भिक्षेचा सोहळा । लेहण्यावाचण्याचा उपराळा । पोट भरावयाकारणें ॥' –स्वादि ३.३.१०. [चि. उपराळो=प्रत्युपकार] [सं. उपरि+आलुच्; हिं उप्राल=वर, अधिक]

उपराळा—पु १ आरोप; आळ; खोटी सबब. २ कुरापत; आगळिक; निमित्त (कज्जा, युद्ध इ० स). 'आम्ही केल्या नियमास टळलों नाहीं, परंतु तुमचेकडूनच उपराळा झाला तेव्हां अम्हाला उठणें प्राप्त.' ३ (गो.) तक्रार. **०घेवप**–नांव ठेवणें, आळ घेणें. [उपर+आळ]

उपराळा—पु. साहाय्य; मदत; कुमक. 'आणि स्वामीसही परम असाध्य होऊनु त्याचा उपराळा ताम्राकडून होणार ।' –मराआ [सं. उपरि+आलुच्, हिं. उप्राला=मदत; चित्पा. उपराळो]

उपरि—शअ. उपर, उपरी पहा. १ वरती; वरच्या बाजूस. 'उपरि सकंटक साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे ।' –नल ३५. २ वर ३ यानंतर; यावर; अधिक; याशिवाय; जास्त; पुढील; विशेषतः एतत् किंवा तत् लागून प्रयोग. उ० एतदुपरि; तदुपरि. –वि. उत्तर, पुढील 'यज्ञवैभव खंडाच्या उपरिभागांत आरंभींचे अध्याय एक ते बारापर्यंत ब्रह्मगीता.' –गीर ४. [सं.]

उपरितन—वि. वरचा [सं.]

उपरिप्रवाहीचक्र—न. (यंत्र) वरून पाण्याचा लोंढा चाकावर पडून फिरणारें चक्र (इं.) ओव्हरशॉट व्हील. –ज्ञाको ए १४. [सं.]

उपरिभाग—पु. वर आलेला भाग; वरचा भाग, बाजू. [सं.]

उपरिभूमि—स्त्री. १ उंचावर असलेली जागा, जमीन (माडीवरील, डोंगरावरील). २ वरची खोली, उपरि. [सं.]

उपरी—वि. १ गांवांत जमीन, वतन नाहीं असा; मिरासदार नसणारा; तात्पुरता राहणारा, स्वत:ची मालकी नाहीं अशा जागीं राहणारा २ (ल) उडाणटप्पू; आगापिछा नसलेला. 'एखादा उपरी पोर धरून आणून स्वर्गाचे दरवाजे मोकळे करून घेतल्याचें सुख मानून घ्यावयाचें' –टि ४.१८. **म्ह०** उपरे आले आणि धनी झाले. ३ खंडाने, कौलानें जमीन करणारा; खंडकरी; खेइत; थलकरी याच्या उलट, ४ बरिष्ठ; वरचा. 'चित्त्यास शिकारीचे सवईसाठीं उपरी अधिकाऱ्याच्या परवानगीनें नेणें.' –चिमा. (बडोदें) २८. –क्रिवि. नंतर, पुढें, वर उपरि पहा. 'उपरी बोले रामललना ।' –रावि २०.१३९. (पत्रातून) आशीर्वाद उपरी; विनंती उपरी, इ० –स्त्री. माडी 'मग ते सप्तवर्णांची उपरी । तेथें ठेविली राये कुमरी ॥' –कथा १.६.३५. –पु. उंचवटा. 'स्वामिपूजेसि ते अवसरीं । स्थळ केलें उपरीवरी ।' –संवि १३.१३८. (गो.) [सं. उपरि; मि. ओपिरो; गु उपरी, हिं. उपर]

उपरुद्ध—वि. अडथळा केलेला; प्रतिबंध केलेला; अडविलेला. [सं. उप+रुध्]

उपरू—वि उपरी; श्रेष्ठ; 'तो गोडिया घे उपरू ब्रह्मविद्येतें ।' भाए ७९५.

उपरें—क्रिवि. आधिक्यानें. 'एऱ्हवीं देत्यकुळ साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरें । ' –ज्ञा ९.४५२. –न (कासार घेंदा) जोडाच्या भांड्याचा वरचा भाग [सं. उपरि]

उपरोध—पु. १ प्रतिबंध, अडथळा; अडचण; जुलूम, त्रास. 'हेंही उपरोधें करणें । तरी आतिभय हरणें । '–ज्ञा १३ २८८. 'गांवाजवळ जर तुम्ही सैन्य उतरलें तर ग्रामस्थांस उपरोध होईल. ' २ भीड, संकोच; शंका; चोरी. 'तुका म्हणे अहो रखुमाईच्या वरा । उपरोध कां धरा माझा आतां । ' –तुगा १२४३. 'जें काम पडेल तें मला सांगीत जा, हे थोर यांस कधीं सांगावें, असा उपरोध बाळगूं नका. ' ३ आग्रह; हट्ट. 'बाळक स्तनपानीं उपरोधु करी ' –ज्ञा ११.७९. ४ व्याजोक्तीचें, छद्मी भाषण; मर्मी लागेल असें भाषण; टोचून बोलणें; आडून, घालून पाडून बोलणें. 'उपरोधु जी सन्मुख । तुजसीं करूं । ' –ज्ञा ११.५४३.

उपरोधाचा, उपरोधी-क—वि. छद्मी; व्याजोक्तीचें; निंदागर्भ; उपरोधपूर्ण; वरमण्यासारखें (भाषण, लेख). 'साळेंत पोर वेळ चुकवून उशीर करून गेला म्हणजे त्याप्रति पंतोजी अहो यावे महाराज, बसावें, अरे कोणी आसन द्यारे, इ जें करितो तें उपरोधिक. ' –शास्त्रीको.

उपर्जन-ना—स्त्री. (कों.) जमिनीची, संपत्तीची, मालमत्तेची वाढ; उत्कर्ष; भरभराट. 'पंच विषयवासना । अनुक्रमें वर्ते नाना । तेथें स्थूल देह उपजेना । कारण होय । '–सिसं १.१५६. [सं. उप+अर्जन]

उपल—पु. दगड; उत्पल. ०**प्रक्षेप**—पु. १ दगडमार; धोंडमार. २ (ल.) प्रतिपक्षावर मुद्दे अथवा प्रमेयांचा भडिमार करून त्यास गोंधळून टाकणें· कांहीं बऱ्याबाईट युक्त्यांनीं खंडन करणें. ३ आपला पराभव होत असतां प्रतिपक्षावर जोरजोरानें तुटून पडून, असंबद्ध भाषणें करून आपला पराभव लपविण्याचा प्रयत्न करणें. ४ खोटा आरोप करणें; आळ घालणें; अपशब्द बोलणें. [सं. उत्पल=दगड+प्रक्षेप=मारा]

उपलग—वि. उपयोगी. [सं. उप+लग्]

उपलट—न. (राजा.) १ घाई; गडबड. 'आजपर्यंत अशी लग्नं झालेलीं असतील पण तीं इतक्या उपलटानं झालेलीं नाहींत. ' –झांकली मूठ ६०. २ उपद्व्याप, भानगड.

उपलब्ध—वि. सांपडलेले; मिळालेले, प्राप्त; अर्जित. [सं. उप+लभ्]

उपलब्धि—स्त्री १ प्राप्ति; अर्जन, हस्तगत होणें; स्वाधीन होणें. २ ज्ञान; ज्ञातता; गोचरता. 'शब्दाची उपलब्धि श्रोत्रेंद्रियाबांचून होत नाहीं. ' ३ अस्तित्व, प्रत्यक्षता. 'रसायनशास्त्राची उपलब्धि ज्या देशांत नाहीं. '

उपलभणें, उपलंभणें—अक्रि. प्राप्त होणें; मिळणें. 'परी देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उपलभे । '–ज्ञा १५.३७३. [सं. उप+लभ्]

उपलभ्य-मान—वि १ उपलब्ध असलेलें; प्राप्त होण्यासारखें; जिवंत; हयात; ज्ञात; चालू. २ सांठणारें; लाभणारें; प्राप्त होणारें; फायदा-नफ्यासारखें मिळणारें. [सं.]

उपलषण-णी—नस्त्री. १ मिष्ट, रुचकर पदार्थ; पक्वान्न. 'नव रसांची उपलवण । '–विपू १.१६. २ विस्तार, वर्णन. 'उमटती जीवे श्वरांच्या श्रेणी । तेथींचीं करावी उपलवणी । स्वानुभवें कीं । '–विपू ३.२. 'म्हणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी । '–ज्ञा १३. ८५२. [उप+लवण]

उपलवणें-विणें—उक्रि. १ प्रसार; विस्तार. 'मौक्तिकां चिआं वेर्लीं फुललिया । कीं क्षीरसागरां लहरी उपलवलिया । '–शिशु ५९२. २ विवेचन, विस्तार, व्याख्यान, वर्णन करणें. 'हेंचि आनि भांती । प्रमेय उपलवूं पुढतीं । परी तूं प्रतीती । याचि घे पां । '–ज्ञा १४ ८६. २ फुलणें; उकलणें; फुलविणें; विकास करणें. 'साहित्याचिए सेजें । बोलांचा रंगु उपलविजे । '–शिशु २४. 'जैसी चंद्रमयाची घडी । उपलविली । '–ज्ञा १९.२२३. ३ व्यक्त होणें. 'तेथें जाणो कोटी सूर्य घडीं उपलविली चोखडी । तैसी तेजपर वडी । श्यामांग चतुर्भुज । '–स्वादि १०.३.१३. ४ प्रसन्न होणें. 'तेणें हरिखें आतां उपलवला निरूपील । '–ज्ञा ६.४८८. [सं. उत्+प्लु; उप+प्लु; उत्प्लवन किंवा उपप्लवन]

उपलक्षण—न १ (साहित्य) लक्षणा; अंशावरून संपूर्णाचा, व्यक्तीवरून वर्गाचा व वर्गावरून जातीचा निर्देश करणें उ० सोंगटी खेळूं नये. ' येथें सोंगटी हें उपलक्षण, कांहींच खेळूं नये असा अर्थ; 'तुम्ही माझे घरीं चोरी केली असतां मीं तुम्हांस शिक्षा करावी कीं नाहीं ? ' या ठिकाणीं तुम्ही म्हणजे कोणीहि. २ रूपकात्मक व दृष्टांतपर भाषण, उपमा. 'तें दीपाचें उपलक्षण । निर्वातींचिया । '–ज्ञा ६.३५८. ३ एका वस्तूचा, त्या वस्तूशीं तात्पुरत्या संबद्ध असलेल्या दुसऱ्या वस्तूवरून निर्देश. उ० ज्यावर कावळा बसला आहे तें रामाचें घर, येथें कावळा हें घराचें उपलक्षण. [सं.]

उपलक्षणें—उक्रि मनांत धरून, हेतु-उद्देश धरून बोलणें; रोख ठेवून बोलणें, अर्थ असणें.

उपलक्षित—वि. अप्रत्यक्ष कथित, संकल्पित, रूपकानें किंवा उपलक्षणानें सांगितलेला. [सं.]

उपलक्ष्य—वि. अनुमेय; संकल्पित; गर्भितार्थ काढण्याजोगें; गृहीत मानण्यासारखें. [सं.]

उपला-ळी—पुस्त्री. (हिं.) गोवरी. [सं. उप+लिप्]

उपलाण-णा-णी-णू—वि. खोगीर, जीन न घातलेला (घोडा). 'कीं जीव नृपाचे वारु उपलाणें । '–ज्ञा १८.४६४. 'जैसा वारु

उपलाणी। वश्य करी अश्वसाहणी।'–एभा २०.२१६ [सं.उत्+पर्याण=घोड्याचा साज, खोगीर; प्रा. उप्पाळाण] **०बसणें**–जिनाखेरीज घोडयावर बसणें. 'एक उपलाणी बैसले। पायबंद सोडूं विसरले। तेणें गुंतोनि खालीं पडिलें। पायबंद बसती पाठीवरी ॥ ' –जै ७६.६०.

उपलाणी—वि. १ उपरी; बाहेरचा; थोडा वेळ राहणारा. 'तो मनुष्य आपल्यायेथील नाहीं, उपलाणी आहे.' २ (व.) बिन आधारी.

उपलाणें, उपलानें—न. विनीचें घोडदळ; घोडेस्वार; विनी हुलसार–स्वार पहा. 'उपलानें निगालें बरवंतु। हाटांमाजि।'–शिशु ५०३;५५१;२६९. 'धाडुनी इंद्रियांचें उपलाणें। विषयाचें घाली घालणें। होंठेशी ब्रह्मचर्यातें जिणें। पाचारूनि ॥ ' –ज्ञाप्र ७३७. [सं. उत्+पर्याण=खोगीर; प्रा. उप्पाळाण]

उपलाशें—वि. (गो.) उपरी, पूर्ण लाभ न मिळणारें.

उपलिप्त—वि. लेप केलेला, लावलेला; फांसलेला; माखलेला; सारवलेला; लपेटलेला. [सं. उप+लिप्]

उपलेप-न—पुन. १ चोळणें; माखणें; लावणें; फांसणें, लेप करणें. २ लेप; गिलावा; गिलाव्याचा पदार्थ; (इं.) प्लॅस्टर. [सं.]

उपवड-ढ—स्त्री. जागृति. 'नाना उपवड होतां खेंवो। नुरे स्वप्नसंश्रमाचा ठावो।' –ज्ञा १५.२६४. उपवडणें पहा.

उपवढणें—अक्रि. जागृत, जागें होणें. 'नोहे हर्षशोकासी कारण। उपवढलिया जाण। जिया परी।' –ज्ञा १५.२९४. [सं. उप+बृध् ?; का. उप्पवडिसु=जागें होणें, उप्पवड=जागें करण्याचें गीत]

उपवर्णें—अक्रि. (व.) नाहींसा होणें; गुप्त होणें. 'तेथल्या तेथें चाकू उपवला.' [सं उत्+प्लु=उडणें; प्रा. उप्पव ?]

उपवन—न. १ बाग; उद्यान; बगीचा; २ (ल.) रमणीय स्थान; वन याच्या उलट. [सं. उप+वन]

उपवर—वि. १ लग्नास योग्य वयाची; विवाहास योग्य (मुलगी, मुलगा). 'उपवर परी उपायचि नाहीं।' –रामदासी २.१३६. २ विवाहाचा सामान्य काल अतिक्रमून विवाह न होतां राहिलेला (मुलगा, मुलगी). ३ ऋतुप्राप्त झालेली. 'पैठणांत पत्नी जाली उपवर.' –रामदासी २.७४. ४ संभोगक्षम. 'राधिकेचा मानस जाणून उपवर झाला सखा।' –पला २. [सं. उप+वृ]

उपवस्त्र—न. १ उत्तरीय; अंगवस्त्र; उपरणें; पांघरावयाचें वस्त्र. २ (ल.) रखेली; राख. [सं. उप+वस्=आच्छादन करणें]

उपवारा—पु उकाडा; उवारा. 'रंगमाहालीं होतो उपवारा। कोणी प्रियकर आणवा राजेंद्राचा थारा।' –पला ४.२६. [उवारा]

उपवास—पु. सर्वथा दिवस (अहोरात्र) भोजन न करणें; उपोषण; लंघन; अन्ननिवृत्ति; भोजनाभाव; निरशन; अर्ध्या दिवसाच्या निरशनालाहि हा शब्द लावितात. उ० सोमवार–शनवारचा उपवास. [सं. उप+वस् (यज्ञ भूमीजवळ, यज्ञारंभाच्या पूर्वीच्या दिवशीं सायंकाळीं जाऊन व्रतस्थ राहणें हा मूळ अर्थ)]

उपवासी—वि. १ उपास केलेला; उपोषण केलेला. २ भोजन न केलेला; उपाशी राहिलेला. **०मरणें**–भुकेनें व्याकुळ होणें; भुकेनें आसन्न मरण होणें. 'वाटे जातां घडी घडी। पाहे पोट्यांची गांठोडी। मनांत म्हणे घरीं बाळें रोकडीं। उपवासी मरतील ॥ ' –ह २९.६१.

उपवासु—न. सानिध्य; जवळ राहाणें. 'उपवासु जालेया जागरु। नाहीं तया।' –ऋ ८८. [सं. उप+वस्]

उपविद्या—स्त्री. ब्रह्मज्ञानविरहित इतर भौतिक विद्या, ज्ञान; भौतिक शास्त्र; ईश्वर, धर्मशास्त्र या विरहित अभ्यास; व्यावहारिक ज्ञान. [सं.]

उपविष—न. विषाचा एक गौण प्रकार, रुईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा चीक, कळलावी, कण्हेर, गुंज, अफू, धोतरा, या सात उपविषाच्या जाती होत. [सं.]

उपविष्ट—वि. १ (सामा.) बसलेला; स्थापन झालेला; आलेला; दाखल झालेला. २ जवळ, शेजारीं बसलेला. [सं. उप+विश्]

उपवीत—न. त्रैवर्णिकानें वापरावयाचें यज्ञोपवीत; जानवें. [सं. उप+वे=विणणें]

उपवृत्त—न १ समवृत्तार्शी म्हणजे कोणत्याहि स्थलाचे पूर्व आणि पश्चिम बिंदु व खस्वस्तिक यांमधून जाणारें जें त्रिज्यावृत्त त्यार्शी समांतर अर्से जें लहान वृत्त तें; पूर्वापरवृत्तार्शी समांतर लहान वृत्त, वर्तुळ. २ कोणतेंहि दुय्यम वृत्त, वर्तुळ [सं. उप+वृत्]

उपवेद—पु. मुख्य चार वेदांशिवाय इतर वेद; जसे–ऋग्वेदाचा आयुर्वेद (कोणच्या मतें हा अथर्ववेदाचा उपवेद आहे); यजुर्वेदाचा धनुर्वेद; सामवेदाचा गांधर्ववेद, अथर्ववेदाचा स्थापत्यवेद, शिल्पशास्त्र; गौणवेद. 'आयुर्वेद धनुर्वेद गांधर्व वेदमात्मनः। स्थापत्यंचासृजद्वेदं क्रमात्पूर्वादिभिर्मुखैः।' –भागवत ३.१२.३८. [सं.]

उपवेश-न—पु १ (सामा.) बसणें, बसलेपणाची स्थिति. २ जवळ बसणें. [सं. उप+विश्]

उपशब्द—पु. शब्दाचा अर्थ विशद, विस्तृत करण्याकरितां तत्सदृश किंवा त्याच अर्थी जो दुसरा शब्द, प्रतिशब्द जोडतात तो. उ० पोथी–पुस्तक; लाकूड–फांटा; गवत–काडी; दगड–गिगड; भाकरी–बिकरी वगैरे. [सं.]

उपशम-शांति—पुस्त्री. १ शांति; निग्रह; लय; शेवट. 'जितया मान मोडिली। उपशमाची।'–ज्ञा ३.२५२. २ विराम; थांबणें. 'मागेन उपशम व्याधीचा.' –गुच २.२१३. 'मायेशीं होय उपशांति। केवळ उरे ज्ञानि।' ३ नाश. 'आपणावर येणाऱ्या संकटांचा उपशम केवळ स्वतंत्रतेनें होत नाहीं...' –इंसु ३१०. [सं. उप+शम्]

उपशमणें—अक्रि. नाहींसें होणें. 'जो शरीरभावातें उपशमी। तो अधियज्ञु एथ गा मी।'–ज्ञा ८.३७. 'कठिण काळ तुझा उपशमला।' –किंकरकृत द्रौपदीवस्त्रहरण २१. [उप+शम्]

उपशमन—न. १ शांति; उतार; कमी होणें; उपशम. उपशम पहा. 'दावितसे स्फोटकासी। म्हणे उपशमन केवी होय।' –गुच ५०.५५. २ उतार पाडणारें, शांत करणारें औषध; उतारा; इलाज; तोडगा. 'महादेव तमोगुण। त्या तमासि उपशमन। तुझीये चरणींचें रज जाण॥' –एरुस्व ४.५३. [सं.]

उपशस्त्र—न. गौण हत्यार; मारण्याचें किरकोळ साधन. 'हे उपाय केवळ उपशस्त्रवत् होत.' –व्यनि ५६. [सं.]

उपशाखा—स्त्री. लहान फांदी; फांदीला फुटणारी खांदी, दुय्यम, गौण शाखा. 'वीज जळाची जवळीक लाहे। आणि तेंचि शाखोपशाखीं होये।' –ज्ञा ९.१०९. २ एखाद्या मुख्य खोडापासून फुटणारा अंकुर, फांदी. [सं.]

उपशांत—वि. शांत झालेला; थंड झालेला. 'तया स्वांत.करणजिता। सकळकामोपशांता।' –ज्ञा ६.८१ [सं.]

उपशांति—उपशम पहा.

उपशास्त्र—न. न्याय–मीमांसादि षट्शास्त्राहून इतर दुय्यम दर्जाचीं गायन, वैद्यक, वगैरे शास्त्रें किंवा त्यांवरील ग्रंथ प्रत्येक. [सं.]

उपशिक्षक—पु. १ शिक्षकानें आपल्या साहाय्याकरितां, शिक्षणाचें काम करण्याकरितां अगर विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्याकरतां हाताशीं घेतलेला वरच्या वर्गांतील हुशार विद्यार्थी; उपगुरु; मालचाट्या; (इं.) मॉनिटर. २ दुय्यम शिक्षक; मदतशिक्षक. [सं.]

उपश्रुति—स्त्री. १ परोक्ष किंवा भवितव्य गोष्टीविषयीं प्रश्न पाहाण्याकरितां रात्रीं हीन वर्गाच्या (चांभार, परीट इ०) घरा जवळ जाऊन उभें राहिले असतां आंतून साहाजिक निघालेला बरावाईट शब्द; असा शब्द आपल्या गोष्टीवर प्रकाश पाडतो अशी मानण्याची पद्धति; पडताळा. २ आपल्या प्रस्तुत गोष्टीसंबंधी कोणेक अप्रस्तुत व्यक्तिमुखानें सहज निघणारा बरा–वाईट शब्द आपल्याकडे लावून घेणें. 'मी लग्नाचा विचार करीत बसलों होतों तों मरशीलरे, मरशीलरे अशी तिकडून उपश्रुति झाली; तस्मात् यंदां लग्न करूं नये.' ३ सांगोवांगी, कर्णोपकर्णी आलेली देशांतराची अनिष्ट बातमी (भविष्यकालीन किंवा वर्तमानकालीन वाईट गोष्टीची). ४ जनवार्ता; वर्दता; भुमका. [सं. उप+श्रु=ऐकणें]

उपश्लिष्ट—वि. १ शेजारीं ठेवलेला; जवळ असलेला; संसर्ग असलेला; चिकटलेला; उपश्लेष असलेला. [सं. उप+श्लिष]

उपश्लेष—पु. सान्निध्य; जवळ असण्याची स्थिति; जवळपणा. [सं.]

उपष्टंभ—पु. पाया; आधार; निमित्त; आश्रय. [सं. उप+स्तभ्]

उपष्टंभक—पु. आधार, धीर देणारा; आश्रय देणारा; साहाय्य करणारा, सांवरणारा, हात देणारा. [सं.]

उपस्टीव—क्रिवि. (व.) विनाकारण; बिन आधारी. [सं. उप+स्था?]

उपसण–णी–णें, उपसा, उपसाभर—क्रिवि. उपसाउपसी वगैरे वर्णव्यत्ययानें उसपण इत्यादि शब्दापासून हे शब्द साधिले आहेत. उसपणें पहा.

उपसभापति—पु. सभापतीच्या गैर हजेरींत काम करणारा; उपाध्यक्ष. –सभा ७१ [सं. उप+सभा+पति]

उपसमीप—क्रिवि जवळ; सन्निध, शेजारीं. 'चित्त जो उपसमीपचि वासी। राघवीं करील तो उपवासी।' [सं. उप+समीप]

उपसरण—न जवळ येणें; शेजारीं येणें; पुढें सरणें. [सं. उप+सृ]

उपसर्ग—पु. १ (व्या.) धातूंच्या मागें लागणारें अव्यय, उपपद. उ० अति; अनु; उप; परा; प्रति. सम् इ०. २ उपद्रव; त्रास; पीडा; विघ्न. 'तेथे दत्तीं उपसर्ग केला लोकां। रचिली द्वारका तुका म्हणे।' –तुगा ९९. ३ दुश्चिन्ह; अनिष्टसूचक गोष्ट (उत्पात, उल्कापात इ०). [सं. उप+सृज्=उत्पन्न करणें]

उपसर्पण—न. जवळ येणें, जाणें; सान्निध्य, आगमन. 'धनालागी नीचसेवन। उपसर्पण हीनाचे॥' –एरुस्व १३ ३१. [सं. उप+सृप्]

उपसवें—क्रिवि. जवळ; सन्निध. 'आपण वैसे उपसवें नेटी॥' –नव १६.४०. [सं. उप+वस् वर्णव्यत्यय]

उपसंहरणें—अक्रि. शांत होणें; लोपणें; नाश पावणें; संपणें. 'तो घोष तरी उपसंहरला॥' –ज्ञा १.१६१. 'जै उपसंहरूनि कीजेल गोठी। तै मीचि आहे॥' –ज्ञा ७.३०. [सं. उप+सम्+हृ]

उपसंहार—पु. १ संकोच; एकत्रीकरण; गुंडाळणें; आटपणें; आवरणें 'प्रपंचाचा उपसंहार होय तेथें आत्मेंतिक।' २ सारांश; शेवट; समाप्ति. ३ ग्रंथाचा अखेरचा भाग; शेवटचे शब्द; सिंहावलोकन 'ग्रंथाचे तात्पर्य काढणें असल्यास (एकंदर) सांत गोष्टी साधनभत असून .. पैकीं उपक्रमोपसंहारी म्हणजे ग्रंथाचा आरंभ आणि शेवट या पहिल्या दोन गोष्टी होत॥' –मीर २१. [सं.]

उपसंहृत—वि. १ गुंडाळलेला; एकत्र केलेला. २ समाप्त केलेला; शेवट केलेला. [सं. उप+सम+हृ]

उपसळा—वि. खोडकर; त्रासदायक; उपद्रव देणारें; वाईट वर्तनाचें (मूल वगैरे). [सं. उप+शल्य]

उपसळो—पु. १ उपसर्ग; त्रास; उपद्रव; उद्वेग (उंदीर, मांजर, कुत्रा वगैरेपासून होणारा). २ कटकट; त्रास (मुलें वगैरेंचा); छळवाद; सतावणी; (क्रि० आणणें; देणें). [सं. उप+शल्य]

उपसागर—पु. समुद्राचा जमिनींत शिरलेला मोठा व रुंद भाग; लहान समुद्र. उ० बंगालचा उपसागर. [सं. उप+सागर]

उप(ब)साण—स्त्री. (कों.) कुबट वास; कुजकी घाण. (क्रि० येणें; पडणें). [का उब्बे=वाफ, उष्णता]

उपसातुपसी—स्त्री. १ वरेळीवर येऊन आवेशानें म्यानांतून तरवारी बाहेर काढणें; वरेळीवर येणें. २ रिकामें करणें; बाहेर काढणें. [उपसणें द्वि]

उपसामग्री-साहित्य—स्त्रीन. किरकोळ उपकरणें; सामान; साहित्य; सामग्री; द्रव्यें वगैरे. 'करावया वैसला हवन। तेथें उप सामग्री आणून। जगन्माता देत असे॥' स्वयंपाकांतील उपसाहित्य म्हणजे तांदूळ, कणीक मोडून मीठ, मिरची, हिंग इ० साहित्य. [सं]

उपसामी—वि. साधु; विरक्त. 'येरु उपसामीयांचा रावो॥' –उषा १४३५. [सं. उपशमी]

उपसारा—पु. १ वाटेल तिकडे संचार; मोकळें, स्वैर वावरणें. 'या घरांत उपसाऱ्याला जागा नाहीं.' २ प्रशस्त जागा; मोकळी जागा. 'ह्या घरांत उपसाऱ्याची जागा नाहीं.' [सं. उप+सृ–सर]

उपसारा—पु. १ घरांतील किरकोळ सामान; प्रवासाची सामग्री, जिन्नस. २ किरकोळ कामें; बारीकसारीक कामें; अडकामें. [स. उप+म. पसारा]

उपसावणें, उपसाहणें—उक्रि. सोसणें; सहन करणें; पोटांत घालणें; क्षमा करणें. 'परि जाणतां उपसाहावे। बोलांचे पाणिपद निहाळावें॥'–शिशु ३६५. 'आतां म्हणे तयाचें वचन। उपसाहों आम्ही॥' –अमृ ७.२६९. 'ते उपसाहावा जी मुरारी।'–दाव ३८०. 'तैसें मियां सद्गुरूसीं काटाळें। श्रीरामचंद्राचें योजिलें बळें। ते उपसाहिजो सद्गुरुदयाळें। कृपा सागरें॥'–स्वादि १०. १.२४. [सं. उप+सह]

उपसाहो—पु. उपसाह; सहन करण्याची क्रिया. –क्रिवि. सहज. –शर.

उपसूचक—पु. सभेपुढें आणलेल्या ठरावामध्यें कांहीं फेरफार सुचविणारा; उपसूचना मांडणारा; किरकोळ सूचना करणारा. [सं.]

उपसूचना—स्त्री. सभेमध्यें चर्चा चाललेल्या विषयावरील मूळ ठरावांत दुरुस्ती, फेरफार किंवा तो बाजूस ठेवावा इत्यादि प्रकारची मांडलेली कल्पना. [सं. उप+सूच्]

उपसृतक—न. (नृत्य) पाय पुढें फेकणें व हातहि पुढें फेकणें व सर्व गात्रें मागच्या बाजूस वांकविणें. [सं.]

उपसेचन—न. तोंडीलावणें; तोंडीलावण्याचें साधन; पक्वान्न रुचकर करणारी वस्तु (चटणी, मसाला वगैरे). 'उपसेचन म्हणिजे साधन॥ तें तोंडीं लावितां अन्न गिळे॥'–यथा ११.४१८. [सं. उप+सिच्]

उपस्कर—पु. १ एखादें कार्य पूर्ण करण्याकरितां लागणारें साहित्य, वस्तु, पदार्थ; साधन; बाब; अवश्य नसलेली पण उपयोगी अगर शोभा, सौंदर्य वाढविणारी वस्तु. २ तोंडीं लावण्याचा पदार्थ; मसाला; मिसळण; व्यंजन. ३ गृहकृत्यास उपयोगी पडणारी कोणतीहि वस्तु (सूप, केरसुणी, गुसळ इ०). साधन; साहित्य. [सं.]

उपस्तरण—न. (याज्ञिक) खुब्यांत किंवा हवन करावयाच्या पात्रांत होमद्रव्य घेण्यापूर्वी त्या पात्रांत दर्वीनें तूप घालणें. [सं.]

उपस्त्री—स्त्री. रखेली; राख; अंगवस्त्र. [सं.]

उपस्थ—पु.न. १ स्त्री किंवा पुरुष यांचें जननेंद्रिय; लिंग; योनि; मैथुनेंद्रिय; पंचकर्मेंद्रियांपैकीं एक. २ रथामध्यें सारथ्यानें बसावयाची जागा; गाडीवान वसण्याची जागा. [सं. उप+स्था] **०निग्रह**-पु. संभोग, मैथुन न करणें; विषयोपभोगापासून अलिप्तता; ब्रह्मचर्य; विषयनिवृत्ति; असिधाराव्रत.

उपस्थान—न. १ उठणें; वर येणें; उद्भवणें; उत्पन्न होणें. २ घडून येणें; घडणें (कर्म, व्यवहार इ०). ३ एक प्रार्थनेचा प्रकार; गूढार्थक मंत्रानें उपासना, प्रार्थना. ४ असे गूढ मंत्र; स्तोत्र. ५ उभें राहून हात जोडून, मंत्र पठण करून देवतांची स्तुति करणें. [सं. उप+स्था]

उपस्थापन—न. १ उपस्थित करणें; जवळ आणणें; उभें करणें; घडवून आणणें; उत्पन्न करणें; बनाव बनविणें. २ पूजा; सेवा. [सं. उप+स्था प्रयोजक]

उपस्थापित—वि. घडलेलें; झालेलें; स्थापन केलेलें. [सं. उप+स्था प्रयोजक]

उपस्थित—वि. १ उद्भवलेला; उत्पन्न झालेला; प्राप्त झालेला; पोंचलेला; घडलेला (प्रसंग, गोष्ट, कर्म इ०). 'आमच्या देशांत हजारों सभा दरवर्षी उपस्थित होतात...'–नि २७५. २ ज्ञात; माहीत असलेला; हयात, ताजा असलेला; मलिन न झालेला; रूढ; चालू (अभ्यास, विधि). ३ प्रत्यक्ष असलेला, आलेला; हजर. –स्त्री. उपस्थिति पहा. [सं. उप+स्था] **०होणें**–हजर असणें, येणें. (सभा इ० ला)

उपस्थिति—स्त्री. १ जवळ असणें; हातार्शी असणें; ताजें असणें; स्मरणांत असणें; तयार असणें; ताजेपणा; नवेपणा; स्मरण (विद्येंचें, अभ्यासाचें, शास्त्राचें). 'वाचलेल्या ग्रंथांची उपस्थिति चांगली राहण्यास त्याचा (ग्रंथसंग्रहाचा) किती उपयोग आहे हेंही सर्वांच्या सहज लक्षांत येणार आहे.' –नि ५१५. २ उद्भव; विद्यमानता; अस्तित्व; उपस्थितपणा; हजर असणें; उत्पन्न होणें; चालू असणें (प्रसंग, कार्य वगैरे). 'माझे घरीं लग्नाची उपस्थिति झाली.' ३ मनांत येणें; स्मरण होणें. 'रोग म्हटला म्हणजे वैद्याची उपस्थिति होती.' [सं. उप+स्था]

उपहत—वि. १ मारलेला; इजा, जखम झालेला; नाश, नष्ट केलेला; उध्वस्त; ताडित. २ निस्तेज; हतवीर्य; पीडित; दुःखी. 'जैसा राजकुमरु पदच्युतु। सर्वथा होय उपहतु।' –ज्ञा १.२७०. [सं. उप+हन्]

उपहति, उपहंती—स्त्री. (काव्य.) १ निस्तेजता; अपमान; अनादर; मानहानि. 'जैसी भातारेंहीन वनिता । उपहति पावे सर्वथा ।' –ज्ञा २.१९९. २ नाश; खालावलेली, दुःखित स्थिति [सं. उप+हन्]

उपहसित—वि. ज्याचें हंसें, उपहास, थट्टा, फजिती झाली आहे असा; अपमानित, अनादत; छीः थूः झालेला. [सं. उप+हस्]

उपहार—पु. १ (उपाहार अप) फराळाचें सामान; फराळ; भक्ष्य. 'मीचि होईन सुआरु । वोगरीन उपहारु ।'–ज्ञा १३.४२१. 'उपहार कांहीं करावा ।'–गुच ५३.९२. २ देणगी; नजराणा; वक्षीस. भेट; अहेर. ' वस्त्रें अलंकार सुमनें । नाना उपहार बलिदानें ।' –एरुस्व ६.८४. [सं. उप+आहार]

उपहारणें—उक्रि अर्पण करणें; देणें. ' तेंचि भस्म ईश्वरासि । उपहारावें तुम्ही हर्षी ।'–गुच ४० ८१. [स उप+आ+हृ]

उपहास—पु. १ थट्टा; चेष्टा; फजिती. छीः थूः ; निंदा; अपमान; निर्भर्त्सना. ' उरोधु वादुवछु । प्राणितापदाळु । उपहासु चाढु । वमेस्पर्शु ।' –ज्ञा १३.२७०. २ उपहास होतो अशी स्थिति; उपहासक्षम अवस्था, योग्यता. [स उप+हस्]

उपहासक—वि. उपहास, थट्टा करणारा; नांवें ठेवणारा; निंदा करणारा. [सं. उप+हस्]

उपहासणें—अक्रि. थट्टा, चेष्टा, निंदा, फजिती, इ० करणें; हंसणें; अनादर, अपमान करणें. [उपहास]

उपहासास्पद—वि. थट्टेचा विषय झालेला; थट्टेस पात्र. [सं. उपहास+आस्पद]

उपहास्य—वि. थट्टा करण्यास योग्य, पात्र; चेष्टा करण्यालायक; उपहासास्पद; निंद्य; तिरस्कार्य; त्याज्य. –न. थट्टा (उपहास अप). ' उपहास्य केंले समर्थांचे ।' –रामदासी २.३. [सं.]

उपहास्यता—स्त्री. १ (उपहास या अर्थी चुकीनें) थट्टा; चेष्टा २ (वास्तविक अर्थे) उपहासाहेता; निंदास्पदता. [सं.]

उपहित—वि. १ जवळ असलेलें; जवळ ठेवलेलें (पदार्थ, भक्ष्य, इ०). ' जैसें कां उपहिता(अंवोण)म्हैसी खाय ।' –ज्ञा १७.१५४. २ संसर्गयुक्त; आरोपित. ' तैसें उपाधी उपहित । थोकोनि ठाके जेथ ।' –ज्ञा १५.५११. ३ उपाधियुक्त, उपाधिबद्ध; सामाशब्द-मायोपहित (चैतन्य); घटोपहित (आकाश) ' आणि कूटस्थु जो अक्षरु । दाविला पुरुष प्रकारु । तेणें उपहिताही आकारु चैतन्या केला ।' –ज्ञा १६.४३. [सं. उप+धा=ठेवणें]

उपहुडणें, उपहौडणें—अक्रि. झोंपेतून जागें होणें; उठणें ' पाहातेआं पाहारां दधिमंथनीं । गौळनी गातीं श्रीचक्रपाणीं । तो ध्वनि आयकौनि श्रवणी । देओ उपहौडले ॥ ' –दाव ३११. [उ+पहुडणें]

उपळ—पु पाषाण; दगड. उपल पहा 'जडा उपळा अवचटे । लागती श्रीचरणेशीं झटे ।' –ज्ञाप्र ४०५. [सं. उत्पल]

उपळ–ळी, उपळण—स्त्री. १ फार पाऊस पडल्यानें जागोजाग झरे फुटून पाणी बाहेर यावें अशी भूमीस अवस्था होते ती. २ –पु. असे जमिनींतून बाहेर येणारे झरे, प्रत्येक. ३ (ल.) घोणस किंवा फुरसें चावल्यामुळें शरीरांतून रक्त वाहूं लागतें ती अवस्था. ४ (व्यापक.) (स्त्रियांस) विटाळ अतिशय होण्याची अवस्था; धुपणी. ५ जोरानें उठणें, उत्पन्न होणें; जोर करणें (दमा, खोकला, ताप, दुखणें, रोग, इ०) [सं. उत्+प्लु]

उपळ जमीन—स्त्री. ज्या जमिनींत पावसाचें पाणी अतिशय जिरल्यामुळें जिला पाझर फुटले आहेत अशी जमीन.

उपळणे—अक्रि १ पाणी जिरून साचल्यामुळें (जमीनींतून) पाझर फुटणें, उपळी होणें. २ शरीराच्या छिद्रांतून किंवा हिरड्यांतून वगैरे रक्त वाहूं लागणें. ३ जमीन भिजून सैल झाल्यामुळें वर उपदून येणें; उफळणें, उपडले जाणें (झाड वगैरे). [उपळ]

उपळवट–टा—स्त्री १ पाणी फार जिरल्यामुळें पाझर फुटलेली जमीन: उपळ जमीन; भिजलेली, मुरलेली जमीन. २ (ल) (विशेषतः उपळवट) चंगळ; गडगंज; समृद्धि (कि० करणें; येणें; होणें).–वि. १ उपळ असणारी; ओलाव्याची; मुरलेली (जमीन). २ नेहमीं पाझर असलेली (जमीन). [उपळ]

उपळवणी—न १ जमीनींतून वाहणाऱ्या पाझराचें, उपळीचें पाणी. २ (ल.) संपत्ति; मान; सन्मान; सुख इ० (क्षणिकत्व दर्शविण्यासाठीं). [सं. उत्+प्लु. वन=पाणी; उपळ+वणी]

उपळसरी, उपरसाळ—स्त्री. अनंतमूळ पहा. श्यामा; इंडियन सार्सापरेला; दुद्धोळी; उपरसाळ (चुकीनें) आस्वली; हिच्या दोन जाती आहेत–एक पांढरी व दुसरी काळी. वेल काळसर तांबूस रंगाचा असून पानें तरवारीच्या आकाराचीं, अर्धवेट रुंद व तीन अंगुळें लांब असतात. ही रक्तशोधक आहे. हिला उपटसुटी; लहान कावळी; शेत कावळी; शेंवेवेल अशींहि नांवें आहेत. [सं. उत्पल=दगड+सू=सरणें]

उपळी—स्त्री झरा; पाझर. उपळ पहा. [सं. उत्+प्लु]

उपळी—वि. पाषाणमय; दगडी. उपळ पहा. ' असो हे सोमकांत उपळी । जेवि द्विजे नंदकळी ।' –ऋ २४. [सं. उत्पल]

उपळी—स्त्री. (खा) गाडीच्या साटीच्या दोन्हीं बाजूंस समांतर असणाऱ्या सहा पट्ट्यांपैकीं प्रत्येक.

उपज्ञा—स्त्री. मूळचें ज्ञान; उपजत बुद्धि; आद्यज्ञान [सं. उप+ज्ञा]

उपाइणें—उक्रि. १ आरंभ होणें; आरंभणें; उत्पादणें; पातणें; जवळ येणें. ' आता उत्पत्तीचें उपाइलें । ग्रंथाचें ऐका ॥' –ज्ञा १०.४०.

१ उपन्न होणें; मिळणें; प्राप्त होणें. 'तेचि आमुचें देणें उपाइलें।' –ज्ञा १०.१३२. ३ विस्तार करणें, पावणें. 'तेंचि येक बेगळालें। येथ चिन्हीं अळंकारलें॥ सांगिजेल उपाइलें। भेदलेपणें॥' –ज्ञा १८.६९५. [सं. उप+इ=जवळ जाणें]

उपाइलें—वि. १ उत्कृष्ट; आवडतें; 'तैसें आत्ममुख उपाइलें। जयासि आपणपांचि फावलें॥' –ज्ञा ५.१०८. २ प्रशस्त; मोठें.

उपाईं येणें—क्रि. १ घोडा वगैरे जनावरानें पुढील पाय उभारून मागील पायांवर उभें राहणें. २ क्रोधावेशानें दुसऱ्यावर चालून जाणें; निकरावर येणें. [सं. उत्+पद्–पाद; प्रा. उप्पाय]

उपाओ—पु. इलाज; उपचार. उपाय पहा. 'तंव भणे यादवराओ। एठ हाचि उपाओ।' –शिशु ७४१. [सं. उपाय]

उपाकरण, उपाकर्म—न. १ प्रतिवर्षी यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि; श्रावणी. २ वेदाध्ययनास आरंभ करतेवेळीं करावयाचें कर्म; वेदाध्ययनास आरंभ. [सं. उप+आ+कृ]

उपाख्यान—न. लहान कथा; गोष्टींत गोष्ट, लहान गोष्ट. आख्यानांतर्गत उपकथा; दृष्टांतकथा; एखादी मोठी गोष्ट सांगतांना मध्येंच प्रसंगानें सांगावयाची लहान गोष्ट. [सं. उप+आ+ख्या=सांगणें]

उपांग—न. १ गौण अंग; भाग; लहान अवयव; भेद; प्रकार; शाखा; मोठ्या कार्यास साहाय्यभूत करावयाचें लहान कार्य; आनुषंगिक विधि. 'मोहरी पांवे मृदंग। डफर्डी सनया उपांग। मिरवत जातसे श्रीरंग। नंदयशोदेसहित पै।'–ह ११.२२२. 'कारागिरास... धंदा मुख्य व शिक्षण हें उपांग असतें.'–टि ४.७८. २ साधन,साहित्य, सामग्री यांपैकीं गौण वस्तु; उपसाहित्य. 'कां गीत राहतां उपांगा। वोहटु पडे।'–ज्ञा १८.१०९३. ३ उपशास्त्र,मुख्य शास्त्राची, विद्येची पुरवणी. जसें–वेदांचें उपांग, पुराण; न्याय, मीमांसा व धर्मशास्त्र [सं.उप+अंग] ०राग–पु. (संगीत) मूळचा जो राग असेल त्याच्या स्वरांमध्यें थोडा बदल करून जो रागाचा पोटभेद तयार होतो तो. ०ललिता–स्त्री. आश्विन शुद्ध पंचमीस (ललितापंचमीस) पूजन करावयाची एक देवता. ०वियोग–पु. एखाद्या वस्तूचे भाग निरनिराळे करणे, मोकळे करणें, उलगडणें; पृथक्करण

उपाग्रसर—पु (गणित) प्रमाणांत असलेल्या दोन संख्यां पैकीं (युग्मापैकीं) दुसरी संख्या; पहिलीस अग्रसर म्हणतात. –ज्ञ १०४. अग्रसर पहा. [सं. उप+अग्र+सृ–सर]

उपाट—क्रिवि. तोंडोतोंड; साडेपर्यंत; गच्च; वाहण्यासारखें (पाण्याचें भांडें भरणें, सपत्ति). उपट अर्थ १ पहा. [सं. उत्+पत्–पात]

उपाड—न. १ (बडोदें) उचल; उचापत; उधार. 'वर्षप्रतिपदेनिमित्त व्यापारीवार होणाऱ्या उपाडाचीं रीतसर बिलें तयार होऊन...' –ऐरापु २.४७. २ खप; विक्री; उठाव (मालाचा). 'कमी उपाड झाल्यास त्याजबद्दल सरकारांतून नुकसान मिळणार नाहीं अशी शर्त ठेवावी.' –स्वारी नियम (बडोदें) ९६. [सं. उत्+पत्; गु. उपाडवु=उचलणें]

उपाडा—पु. उच्छेद; पराभव, पाडाव. 'आवडी नावडीचा उपाडा। करूनि निधडा भोजनीं॥' –एभा ११.९३६. [सं. उत्+पत्=पडणें]

उपाणणें—उपणणें पहा.

उपाणें—न. उखाणा; कोडें. –शर.

उपांत—पु १ सींव; कांठ; कड; शेवट. २ डोळ्याचा कोपरा; अपांग [सं उप+अंत]

उपांत-तिक—वि. जवळचा; शेजारचा; शेवटाजवळील; कांठावरचा. [सं. उप+अंत]

उपांतिम-उपांत्य—वि शेवटच्या जवळचें; अखेरीच्या अलीकडचें; अंत्याच्या मागचा; उपांत्य (वर्ण, स्वर). 'अंतिम तो अंतिम, तो उपांतिम होऊं शकत नाहीं, किंवा अंतिमाच्या खालच्या पायरीचाही असणें शक्य नाहीं.'–टि ३ २४८. [सं.उप+अंतिम]

उपात्त—वि. गृहीत; स्वीकृत; स्वीकारलेलें; कबूल केलेलें. 'उपात्तविद्यो गुरुदक्षिणार्थी।' –रघुवंश ५.१. [सं]

उपादान—न. १ ग्रहण; स्वीकार; घेणें; कबूल करणें; मान्य करणें; मान्यता; मंजुरी. २ प्राप्ति; संपादन. 'एथ अविद्यानाशु हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ।' –ज्ञा १८.१२४३. ३ साक्षात् कारण; समवायिकारण. उपादानकारण पहा. (जसें– घटास माती). 'येर आत्मतत्त्व उदासीन। तें नाहे तुना उपादान।' –ज्ञा १८.३०६. [सं. उप+आ+दा] ०कारण–न. (तत्त्व) समवायिकारण; घटकद्रव्य. 'कार्याचें उत्पत्तीस ज्या जड द्रव्याची आवश्यकता असते त्यास उपादानकारण म्हणतात. पुस्तकाचें कागद, शाई, दोरा हें; मेजाचें लांकूड, खिळे हें उपादानकारण होय.' –न्यायप २६. ०लक्षणा–स्त्री. ज्या लक्षणेनें वाक्यार्थाचा अन्वयबोध व्हावा म्हणून शब्दांच्या मुख्यार्थासह त्या मुख्यार्थानें सूचित केलेला इतर अर्थ यांचें ग्रहण करितात तिला उपादानलक्षणा म्हणतात.' अजहत्स्वार्थलक्षणा पहा. 'शोकीं बुडवूं पाहे स्वावासा पर जसा परावासा।' (स्वावासा=आपल्या घरांतील मनुष्यास) –मोभीष्म ३.४८. 'तो चमत्कार पाहण्यास पांचशें गाडी लोटली होती.' येथें गाडी या शब्दांत त्यांतील मनुष्यें अंतर्भूत होतात.

उपादेय—वि. स्वीकार करण्यास योग्य; मान्य करण्यालायक; स्वीकाराहं; ग्रहणार्ह; ग्रहण करण्यास योग्य. [सं. उप+आ+दा]

उपाद्धीक—न. (कुण.) उपाध्यायपण; जोसकी; भिक्षुकी; उपाधपण पहा. [सं. उपाध्याय]

उपाध—स्त्री. त्रास;पीडा;दुःख. उपाधि पहा. 'जाणतियां पाठीं लागला उपाध। नेणता तो सिद्ध भोजनासी॥' –तुगा ३५०६. [सं. उपाधि]

उपाधपण, उपाध्यपण, उपाधीक—नस्त्री. १ उपाध्यायाची वृत्ति, काम; पौरोहित्य; जोसकी; भिक्षुकी. २ उपाध्यायास मिळणारी बिदागी, वेतन, प्राप्ति, दक्षणा. ३ उपाध्यायास असणारें वतन. [सं. उपाध्याय]

उपाधपेठ, उपाधपेठीचें—वि. १ उपाध्यायास लग्न, मुंज वगैरे प्रसंगीं देतात तसें (सणंग, पागोटें वगैरे). २ हलक्या प्रतीचें; कमी किमतीचें; अगदीं साधें; क्षुल्लक; टाकाऊ [सं. उपाध्याय+पेठ]

उपाधि—पुस्त्री. १ शुद्धस्वरूप पदार्थावर अन्यरूपता भासविण्यास कारणीभूत असणारें पदार्थांतर. उ० रंग द्रव्यानें पाण्यास रंगीत स्वरूप येतें, येथें रंगद्रव्य हा उपाधि होय. 'आकारविशेषरूप उपाधि झाला म्हणजे सुवर्ण अलंकारादि व्यपदेश पावतें.' २ कोणेका पदार्थापासून विलक्षण कार्य उत्पन्न होण्यास प्रयोजक असें कांहीं एक; (सामा.) कारण, उत्पादक, प्रवर्तक, परिणामकारक, कार्यकारक गोष्ट. उ० अग्नीपासून धूर होतो त्यास आंद्रेंधनसंयोग उपाधि होय. ३ प्रसंग; कारण; निमित्त; प्रयोजन. ४ विशेष गुणधर्म; गुणविशेष. ५ पदवी; टोपण नांव, अन्वर्थक नांव; विशेषण (आवडीनें किंवा उपहासानें दिलेलें). ६ (वेदांत) जग; माया; बाह्यपाश; संग. 'करिती नावडतेयां त्याग. उपाधींचे.'–ज्ञा १७. ३६२. ७ प्रपंच; संसार. 'जीवु तैसा उपाधि. आवडे लोकां.'–ज्ञा ४.२१. ८ विकार; विचार. –आगमसार पंचिका १.२.५०. ९ त्रास; अडथळा; उपसर्ग; अडचण; आपत्ति; संकट; भानगड; लचांड; लिगाड. 'रायाच्या मनीं नव्हतें, पडूं नये उपाधीला.' –ऐपो ४१०. 'राजकीय बाबतींत अशा उपाधी म्हणजे लोकांचा असंतोष, आग्रह...ह्याच होत.'–टि ३.२५९. १० (रामदासी) चलवळ; खटपट. 'उपाधीसी विस्तारावें. उपाधींत न सांपडावें.' –दा ११.५.९. 'सांकडीमधें वर्तो जाणे. उपाधीमधें मिळों जाणे॥' –दा ११.६.१३ [सं.] **०निरास**–पु उपाधि नाहींशी करणें.

उपाधीक—वि. (प्र.) औपाधिक; उपाधि असलेलें; उपाधी संबंधीं. [सं. उपाधि]

उपाध्यक्ष—पु. अध्यक्षास मदत म्हणून किंवा त्याच्या गैरहजेरींत काम करण्यास घेतलेला किंवा निवडलेला मनुष्य. [सं. उप+अध्यक्ष]

उपाध्या-य—पु. १ पुरोहित; भटजी; भिक्षुक; धार्मिक कृत्य चालविणारा; तीर्थक्षेत्रादि स्थळीं यात्रा व इतर धर्मकृत्यें यथासांग घडविणारा; कुलोपाध्याय; ग्रामोपाध्याय; तीर्थोपाध्याय. 'सांगे उपाध्या सेध्यावंदन.' –दावि २१. २ (ल.) भामटया; –मनको. ३ वेदादि विद्या शिकविणारा गुरु. [सं. उपाध्याय] (कोणेक वस्तूस) **उपाध्या भेटणें**–वस्तु चोरीस जाणें. **–चें सणंग, पागोटें**–उपाधपेठ पहा. म्ह० नवरा मरो कीं नवरी मरो उपाध्याला दक्षिणेशीं कारण=मतलबाशीं गांठ घालणा=याबद्दल वापरतात.

उपाध्येपणा—पु. भिक्षुकी; उपाध्यायाची वृत्ति. उपाधपण पहा.

उपानयन—न. घोडयावर स्वार बसला असतां घोड्यानें पुढचे दोन्ही पाय वर करणें ही खोडी. उपाई येणें पहा.–अश्वप १०१. [सं.]

उपानह—पु. पादत्राण; पायतण; जोडा. 'जेआं हृदए उपानहों सदैवीं. मैळविजति॥' –ऋ ३५. [सं. उपानह्; हिं उपानत; गु. उपान]

उपाय—पु. १ युक्ति; योजना; इलाज; तजवीज; साधन; उपयुक्तक्रियाविनियोग. 'तूतें करूनि पुढें. जे उपायें घेती दवडे. तयां ठाकसी बहुवें पाडें. मागांचि तूं॥' –ज्ञा १७.१२. २ साम, दाम, दंड, भेद यांपैकीं प्रत्येक. [सं. उप+इ, उपाय] **०चतुष्टय**–न. साम, दाम, दंड, भेद हे युद्धशास्त्र किंवा राजनीतींतील चार उपाय.

उपायन—न. १ देणगी; भेट; नजराणा; उपहार. 'समर्पिलि उपायनें. राया कृष्णजीतें॥' –रास १.११९; 'समर्पितों याच उपायनाहीं.' –सारुह १.३४. २ वायन; वाण. [सं. उप+इ]

उपायिणें-लें—उपाइणें–लें पहा.

उपायीं, उपायीं येणें—उपाई येणें पहा. १ पुढील पाय उचलणें. 'उडी मारून त्याजवर बसतेवेळीं तो उपायी (दोन पायांवर) उभा राहील.'–अश्वप २२६. २ निकरावर येणें. 'चिनी सरकार विशेष उपायीं न येतां सामोपचारानें, शिस्तीनें झगडत आहे.' –के १६.४.३०.

उपायी—वि. उपाय योजणारा; युक्त्या काढण्यांत तरबेज; कल्पक बुद्धीचा; युक्तिबाज; प्रयत्न करणारा. [सं. उप+इ]

उपाये—पु. उपाय पहा. 'जेथें श्रवणाचा उपाये. आणि परमार्थसमुदाये.' –दा १.८.२१. [सं, उप+इ]

उपायेण—न. उपायन पहा. 'नातरी तेणें आणिलें. उपायेण श्रीकृष्णजीतें.' –रास १.१२.

उपार—पु. उपहार; उतारा; देवांदिकांस किंवा भूतपिशाचादिकांस तांदूळ, साखर वगैरे अर्पण केलेले पदार्थ. [सं. उप+आहार]

उपार्जणें-र्जिणें—१ क्रि. मिळविणें; संपादन करणें. 'जेणें प्रकृतीचें भोगिजे. उपार्जिलें.' –ज्ञा ८.३३. २ आजिब करणें; खुशामत करणें. [सं. उप+अर्ज्]

उपार्जन—न. संपादन; मिळविणें; प्राप्त करून घेणें. 'जया राज्य द्रव्य करणें उपार्जना. वश दंभमाना इच्छे जाले॥' –तुगा १०६५. [सं. उप+अर्ज्] **०पट**–पु. वृत्तिपत्र; इनामपत्र.

उपार्जना—स्त्री. १ आजिव; खुशामत; खुषमस्करी; याचना; नीचसेवा. २ मिळविणें; संपादन करणें. [सं. उप+अर्ज्]

उपार्जित—वि. संपादिलेलें; मिळविलेलें. 'उत्पन्न झालेले उपार्जित गुण' –नीतिशास्त्र प्रवेश ३२१ सामाशब्द-पूर्वोपार्जित; आत्मोपार्जित. [सं. उप+अर्ज्]

उपाव-वो—पु. युक्ति; इलाज. उपाय पहा. 'येविषईं असे उपावो.' –विपु २.४८. 'आतां हें न चले कांहीं. उपाव सांगतां देंही ॥' –ब ६१३. 'तुटली आयुष्याची दोरी नाहीं उपाव.' –ऐपो १५४. [उपाय अप.]

उपावणें—अक्रि. १ पायांच्या टांचा वर करून आंगठ्यावर भार देऊन उभें राहणें; पायाच्या बोटांवर उभें राहणें. २ मागल्या पायांवर उभें राहणें (घोड्यानें); उपाई येणें पहा.

उपाशी, उपाशीपोटीं, उपाशेपोटीं, उपाशीतापाशी, उपाशी वनवाशी—वि. क्रिवि. न जेवलेला; शिकाम्या पोटीं; अन्न विरहित; न जेवतां, न खातां, अनशवे पोटीं. उपाशी पहा. [उप+वस्] 'हिंदुस्थानची स्थिति कशी आहे हें उपाशी पोटी आम्हास जितकें समजतें तितकें ... समजणें कठिण आहे.' –टि २.३९९. **म्हण** १ उपाशी मागती भाकर शिळी, देव देतो साखरपोळी. २ (क.) ब्राह्मणाला उपाशी ठेवूं नये आणि मुसलमानाला जेवायला घालूं नये. ३ (गो.) उपाशी असलेल्याक उश्टयाचो कंटाळो ना. =उपाशी माणसास कांहींहि चालतें. ४ उपासाला केळें आणि वनवासाला सिताफळें.

उपांशु—क्रिवि. हळू, हलक्या आवाजांत; शब्द बाहेर न उमटतां [सं.]

उपास—पु. उपवास पहा. [सं. उपवास; प्रा. उआस.] **उपासाची चूल करणें**—जेवणाचा स्वयंपाक झाल्यावर निराहाराचे पदार्थ शिजविण्यासाठीं पोतेरें घालून चूल सोंवळी करणें.

उपासआनास-तापास—पु. १ उपवासादि व्रतनियम; कडक व्रत. २ (ल.) देहदंडन; कष्ट. [उपास द्वि; उपास+तपस्] **उपासीं तापासीं बसणें**—कांहीं न खातां राहणें; जिवाचे हाल करून घेणें.

उपासक—पु. उपासना, पूजा करणारा; भक्त, सेवेकरी. [सं. उप+आस्=बसणें] **०बंधुत्व**—न उपासकांमधील बंधुभाव. 'त्यांच्या मध्यें (उपासकांमध्यें) उपासक बंधुत्वाची बुद्धि जागृत होते.' –टि १.४८७.

उपासकर-री—पु. उपास करणारा.

उपासंग—पु बाण ठेवण्याचा भाता. 'या सैन्याबरोबर... उपासंग...इ० साधनें होतीं' हिंलइ. २२. [सं.]

उपासणें—क्रि. उपासना, आराधना करणें; प्रार्थणें; पूजा करणें; भक्ति करणें. 'आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे. यातें उपासा मग आपैसे. पुरती काम.' –ज्ञा ३.८८. 'कवण उपासूं गे देवता. कवणकवण्या जाऊं तीर्था. कवण नवस नवसूं आतां. कृष्णनाथ प्राप्तीसी.' –एरुस्व २.४२. [सं. उप+आस्]

उपासतान—स्त्री. १ उपास आणि तहान. २ (ल.) कष्ट; देहदंडन. [उपास+तहान] **०काढणें**—अन्नपाण्याशिवाय काळजीनें, कष्टानें, दुःखानें दिवस काढणें. **०पाहणें**—एखाद्याची काळजी वाहणें; त्याच्या अन्नपाण्याची तजवीज करणें.

उपासन—न उपासना, पूजा; पूजन; अर्चन; आराधना; होम हवन इत्यादि. उपासना पहा. 'मग उपासन जिहीं आणिलें. योगाग्नीचें.' –ज्ञा ४.१२२. 'वेदभूषणा वरदराजा. उपासन करावें. –वेसीस्व १२.४४. [सं. उप+आसन]

उपासना—स्त्री. १ भक्ति; पूजा; अर्चा; सेवा; आराधना. 'मुख्य उपासनालक्षण. नाना कवित्वलक्षण. नाना चातुर्यलक्षण. बोलिले असे.' –दा १.१.१०. २ सेवा; नेमधर्म; (गुरुमंत्र जपण्याचा इ०) सामाशब्द–आत्मोपासना; ज्ञानोपासना; कर्मोपासना. ३ (रामदासी) उपास्यदैवत 'उपासना तेथ उभी आहे.' –रामदासी २.७९. [सं. उप+आस्] **०कांड**—न. वेदाच्या तीन कांडापैकीं ज्यामध्यें उपासना सांगितली जाहे तो भाग; यजुर्वेद. **०निरूपण**—न. केलेल्या कर्माचें अखेरीस जें देवतेला समर्पण करितात तें. **०मार्ग**—पु ईश्वराचें चिंतन, मनन, ध्यान इत्यादींचें आचरण. 'उपासनामार्गानें जाणाऱ्या भक्तांना भक्तिमार्गी म्हणतात.'–टिसु ३८. **०यंत्र**—न. ग्रह व देवता यांची उपासना करण्यासाठीं धातूवर किंवा कागदावर काढलेली विशिष्ट आकृति. 'ना तरी उपासनायंत्र. तैसें दिमे सैन्यसूत्र. भीमकी मध्यपीठ पवित्र. कृष्णक्षेत्र निजबीज.' –एरुस्व ६.५५.

उपासपारणें—न. उपास करणें व सोडणें; उपासतापास. (क्रि० करणें; धरणें; मांडणें; लागणें) [उपास+पारणें]

उपासमर-मार-मारा—स्त्रीपु १ अन्नावांचून मरणें किंवा मारणें; अन्नान्नदशा. २ अधेपोटीं ठेवणें; कंजूषपणा करणें; एखाद्यास कोणतीहि वस्तु पुरेशी न देणें. [उपास+मरणें]

उपासमाजगा-माजरू—वि. (माण. व.) उपाशी राहून सुद्धा कामधंदा न करणारा; अन्नान्नदशा असूनहि माजलेला. [उपास+माजणें]

उपासित—वि. ज्याची पूजा, भक्ति, अर्चा इ० केली आहे असा, सेवा केली आहे असा; आदरिलेला; पूजिलेला. [सं.]

उपासी—वि. १ उपास केलेला; अन्न न खाल्ला; उपवासी. 'तीन दिवसांचा उपासी अंतेज.'–रामदासी २.१५८. २ भुकेलेला; भूक लागली आहे असा. [उपास] **०मरणें**—भुकेमुळें व्याकुळ होणें; खायाप्यायास न मिळून मृतप्राय होणें. **म्हण** फिकल्या झाडाखालीं उपासी मरणें (अगदीं ऐदी, आळशी माणसाला लावितात). **०अनासी-तापासी-कराडी-पोटी**—वि.क्रिवि. १ अन्नाशिवाय.

भुकेलेला; अन्नावांचून असलेला. २ उपवासी; उपास केलेला. **उपासी पोटीं अन्न ठेवणें**–आपण उपाशी राहून दुसऱ्यास अन्न ठेवणें (शुद्ध सेवेचा एक प्रकार).

उपास्ति—स्त्री. १ उपासना; भक्ति; पूजा; अर्चा; आराधना; सेवा. 'उपास्तिवेऱ्ही राबतया। उपायफळि येती मोडोनियां।' –अमृ २.१७. 'तैसी दोनी ये मर्तें। सूचिती एका कारणातें। परी उपास्ति ते योग्यते। आधीन असे।' –ज्ञा ३.४०. 'त्या मज सूर्याची उपास्ती। सौरसूक्तीं त्रैविद्या।' –एभा ११.१३३२. [सं. उप+आस्]

उपास्य—न. ज्याची उपासना करावयाची ती देवता, दैवत, आराध्य दैवत. –वि. पूजा करण्यास योग्य; पूजनीय. ०**दैवत**–न. १ उपासनेची देवता. २ पूज्य व्यक्ति. [सं.]

उपाहार—पु १ फराळ; जेवणांतील मुख्य पदार्थां (भाता) शिवाय इतर पदार्थ; अल्पाहार. २ फराळ करणें [सं. उप+आहार]

उपाळा—पु. १ उमाळा; उपळी, आवेग; उकळी. 'फुटला शरिरांत त्या काम उपाळा। कर शांत नृपाळा।' –प्रला १२७ २ अश्रू; पाणी. उपळ पहा 'आम्हांस टाकून जाशी कृपाळा। पशुपक्षांच्या नेत्रीं उपाळा।' –प्रला २५९. [सं. उत्+प्लु]

उपाळी—स्त्री. उपहास; थट्टा; निंदा; चेष्टा; टवाळी; मस्करी [प्रा. उप्फाल=खल, दुर्जन ?]

उपिकणें—अक्रि. अविकणें; पिकून अधिक होणें; वाजवीपेक्षा अधिक पक्व होणें. [सं. उत्+पच]

उपिट, उप्पिट्टु—न १ (क) तिखटमीठ घालून ओलें करून वाफ दिलेलें लाह्यांचें पीठ २ तिखटमिठाचा सांजा. [का. उप्पु=मीठ+इट्टु=पीठ]

उपिठणें—अक्रि आर्द्रता कमी झाल्यामुळें किंवा सारखें भाजलें न गेल्यामुळें भाकरी वगैरस भेगा पडणें; पिठुळणें. [सं. उत्+पिष्ट]

उपीठ—वि उपिठलेली (भाकरी, खापरपोळी इ०) [सं. उत्+पिष्ट; म. पीठ]

उपीत घेणें-पिणें—अक्रि १ उच्छृंखलपणें, अविचारानें वागणें. २ अतिशय घाईत असणें. [सं. उत्+पत्]

उपीवणें—अक्रि. (व.) गुप्त होणें; नाहींसें होणें. [सं. उत्+पत्]

उपेखणें—उपेक्षणें पहा. 'तरि कैसें तिये वरि स्वामियान। उपेखतु बोलिलें।' –ख्रिपु २.३६.३७. [सं. उप+ईक्ष्]

उपेग—पु. उपयोग; प्रयोजन; जरूरी; गरज; फळ. 'एरी भणे जरि तिएचा अनुरागु। तरी एथ आलिआ कवण उपेगु।' –शिशु १८२. 'एथ एकचि उपेगा जायें। परमामृत।' –ज्ञा २.६७. [उपयोग]

उपेगा-गी—वि. उपयोगी. 'येऱ्हवीं पराद्विका चौथी। जीव मोक्षाच्या उपेगीं।' –अमृ ३.२. ०**येणें**–उपयोगी पडणें. 'यये येतां न भागा त्वरित हरजगा तीर्थे आलें उपेगा।'–ब ६८७. [उपयोग]

उपेड–वि (राजा.) जेथून दूरवरचें दृश्य दिसेल अशी उंचावर असलेली; उंचाड, उंचवट (जमीन) [सं. उत्+पीठ]

उपेर्णा-र्णें—स्त्रीन १ वस्ती, वास; विश्रांतिस्थान; राहण्याची जागा, राहावा 'नानारुची कली उपेगी। कीं पाचि प्रभेची वाणी।' –ऋ ८३ 'स्वर्गा करौनि उपेर्णें। मागिजे सुखाचें कर्णें।' –शिशु ८५८. 'तैसेनि आइतेपणें। कवित्व जालें हें उपेर्णें।' –ज्ञा १८. १७४६ २ जवळ जाणें, येणें. 'उपेर्णे करितां कुसुमाकरां। झाडे वेधिति शृंगारा। तेथ कोकिळांची पाति दर्दुरा। केवि लाभे।' –ऋ ५२. 'उपेर्णें पावला चकोरु।' –कृमुरा ३५.४७ [सं. उप+इ=जाणें]

उपेत—वि जवळ गेलेला [सं उप+इत]

उपेंद्र—पु इंद्राचा धाकटा भाऊ, विष्णु 'उपेक्षिसी तूं मज कां उपेंद्रा।' –सारुह १९. [सं उप+इंद्र]

उपेंद्रवज्रा—स्त्री. एक समचरण वृत्त. याच्या प्रत्येक चरणांत ११ अक्षरे असून ज, त, ज, ग, ग असे गण येतात उ० चले वंदेही वर दान देही। तथापि हा राघव दान देही। न देह हा भाग्य अहो जनाचें। विचित्र कर्तव्य निरंजनाचें॥' [सं. उप+इंद्र+वज्र]

उपेय—वि उपायानें प्राप्त करून घेण्यासारखी; साध्य (गोष्ट). 'म्हणौनि उपेयही हातीं। जालया उपायस्थिती।' –ज्ञा १८. १२४५ [सं. उप+इ]

उपेक्षक—वि उपेक्षा, अव्हेर करणारा; दुर्लक्ष, टाळाटाळी करणारा. [सं उप+ईक्ष्]

उपेक्षणीय-क्ष्य—वि उपेक्षा करण्यास योग्य, कानाडोळा करण्यासारखा, लक्ष न देण्यासारखा. [सं.]

उपेक्षणें—उक्रि. १ उपेक्षा करणें, दुर्लक्ष करणें, अव्हेर करणें; 'जेवीं नव्हे या बुद्धी। उपेक्षिला।' –ज्ञा १० १६१. २ त्याग करणें; सोडणें. 'नाहीं आइकिली मागें ऐसी मात। जे त्वां शरणागत उपेक्षिले।' –तुगा १६३३. 'उपेक्षूं नको गुणवंता अनंता। रघूनायका मागणें हेंचि आतां।' –राक. [सं. उप+ईक्ष्]

उपेक्षा—स्त्री. १ हयगय, दुर्लक्ष, अनादर; अव्हेर. 'किंवा उपेक्षेवरी। वाढनि साडिले।' –ज्ञा १८ १५४२. २ चालढकल; कानाडोळा, डोळेझांक (गुन्ह्याकडे, दोषांकडे). ३ त्याग, सोडणें. [सं. उप+ईक्ष्]

उपेक्षित—वि. उपेक्षा केलेला, अव्हेरलेला; त्याग केलेला. [सं.]

उपोद्घात—पु. १ आरंभ; सुरुवात; प्रस्तावना. २ परिचय; विषयप्रवेश. ३ (न्याय) ग्रंथांतील प्रतिपाद्य विषयाला अनुरूप असें ग्रंथ-प्रकरणनाम; अवतरणप्राय ग्रंथांश. ४ उदाहरण; दृष्टांत. –अमरकोश. ५ पृथक्करण; विवरण; स्पष्टीकरण; तत्त्वशोधन. [सं. उप+उद्+हन्]

उपोषण—न. उपास; उपवास; निराहार; निरशन. [सं. उप+वस्] **०मंडळ**–न. (स्त्रि.) पुनरुत्थानाच्या सणाच्या पूर्वी करावयाचें चाळीस दिवसांचें उपोषण; लेन्ट या सॅक्सन शब्दाचा पर्याय. लेन्ट म्हणजे वसंत. हे उपवास वसंतांत येतात म्हणून यांना वसंतोपवास असेंहि म्हणतात. 'उपोषणमंडळाचा आरंभ ॲश वेन्स्डे (राखेचा बुधवार) या दिवशीं होतो.' –उमं ५.

उपोषित—वि. १ उपवास केलेला. २ उपाशी. [उप+उषित]

उपौडु—जागृति; उपवड–ढ पहा.

उप्तरणें—अकि. (व.) फुगणें; सुजणें; उनगें. 'त्याचें तोंड उप्तरलें आहे.' उबतरणें पहा.

उप्परमाडी—स्त्री. दुसरा मजला; दुमजली घर; वरची माडी. उपरमाडी पहा. 'ईश्वर त्याची मस्ती मोडी, आतां कैची उप्परमाडी.' –अमृत ५२. [सं. उपरि; हिं. उप्पर+माडी]

उप्पुपिंडी (शिरा)—पु. (तेलगु) तिखटमिठाचा सांजा; उपिट पहा. –गृशि ४४५. [का. उप्पु=मीठ]

उप्रांत—अ. नंतर; मागाहून; उपरांत पहा.

उफका–खा—पु. नाश. उपखा पहा. [सं. उप+क्षि]

उफखणें–उफगणें—अकि. उपखणें पहा. रिकामा होणें; रिक्त होणें; संकोच पावणें. 'आणि फुंकें भाता फुगे। रेचिलिया सवेंचि उफगे।' –ज्ञा १३ ६६४. [सं. उप+क्षि]

उफट—वि. १ निस्तेज; फिकट; फिका (रक्तनाशामुळें). २ रोगट; आजारी. [सं. उत+स्फट=तुरटी]

उफटणें–डणें, उफंडणें—अकि. फिकें पडणें; निस्तेज होणें, पांढरें पडणें. –ज्ञा १७.१५६ [उफट]

उफणणें—उकि. उपणणें; वारवणें, वाऱ्यानें भूस उडविणें. पाखडणें. [उत्+पवन; प्रा. उप्पण]

उफणणें—अकि. १ जोरानें वर येणें; वाढणें (पीक, झाड, मूल वगैरे). २ उतणें; अंगावर उठणें (पुरळ, फोड, बिबा, शेर, ज्वर. वरून इ० उठणें, उतणें). ३ कुजणें; नासणें (फळें वगैरे); नासणें; आंबणें; फुटणें (दूध वगैरे). ४ फुगणें; ताठणें (गर्वानें). ५ उफटणें; तोडणें. 'नमोजी स्वच्छंदा सकल भवबंधा उफणिता॥'–वामन (व्याधाख्यान) २३. उपणणें पहा. [सं. उत्पन्न; प्रा. उप्पण्ण]

उफर–रा—पु. (राजा. कु.) बाज; बार; बहर; पीक (वृक्ष, लता, शेत इ० स येणारा). [सं. उत्+भृ–भर; किंवा पूर]

उफर–रा—पु. (राजा. कु.) उपणणें; वारवणें. [सं. उपरि; हिं. उप्पर]

उफरणें—उकि. (राजा. कु.) उपणणें; वारवणें; वाढवणें. [उफर]

उफराटणें, उफरांडणें—कि. १ उलटें होणें; अंग, तोंड विरुद्ध दिशेस फिरणें; उरफाटें होणें; उलट बाजूस जाणें; विपरीत होणें. २ डोळे चढले जाणें, फिरणें (मृत्युसमयीं किंवा बेशुद्धीनें); डोळे या शब्दाबरोबर किंवा नुसता प्रयोग. –सकि. उफराटा, उलटासुलटा करणें; वरचें अंग खालीं व खालचें वर असें करणें (धक्का इ० नें). 'त्या गड्यास या म्हशीनें उफराटून पाडलें.' [सं. उत्+परावृत्]

उफराटसुफराट, उफराटासुफराटा—वि. उलटासुलटा; वरील बाजू खालीं व खालील बाजू वर असा; आंतील बाजू बाहेर व बाहेरील बाजू आंत असा; पुढील बाजू मागें व मागील बाजू पुढें असा; व्यस्त; व्युत्क्रम. [सं. उत्+परावृत्; सु+परावृत्]

उफराटा—वि क्रिवि. १ उलटा; विपरीत; परावृत्त; मागें; विरुद्ध; 'अहा कटा हें बोखटें। मृत्युलोकींचें उफराटें॥' –ज्ञा ९.५१५. 'उफराटें नम्रदेही। अधो पाहात होते मही।' –नव १३. १३. २ (ल) चुकीचा ३ उलट; प्रत्युत्तरदर्शक. 'बरेपणें मोठी। होतें लक्ष्मीचे पोटीं। कृष्ण देखोनियां दृष्टी। तेही उफराटी लाजली।' –एरुस्व १.७३. [सं. उत्+परावृत्] **०न्याय**–पु. विचित्र, विपरीत न्याय; अन्याय. **म्ह०** उफराटा न्याय गालगुंडे खाय. **–टी गंगा**–स्त्री. उलट दिशेनें वाहणारी गंगा; संसाररहाटी, माया यांस उपमा देतात. 'उफराटीगंगा पाहतां मिळणें। सकळांस तेथें॥' –दा ११. ७ ११. **–टी दुनिया**–स्त्री. उलटें जग; अव्यवस्था; बेबंदशाही; अनियंत्रितता; अन्याय्याचरण **–टी बाहुली**–स्त्री. अगदीं डोळ्यांजवळ धरल्याशिवाय दिसत नाहीं अशी दृष्टि; अधुदृष्टि; मंददृष्टि; दूरचें दिसत नाहीं अशी नजर **–ट्या काळजाचा**–वि. निष्ठुर; निर्दय; कृतघ्न, अति धाडशी, अविचारी (मनुष्य). **–टें भांडण**–न. कृतघ्नतेचें भांडण; उपकार विसरून केलेलें भांडण; अन्यायाचें भांडण, उपकार, प्रेम करणाऱ्याशीं विनुष्ट. **–टें शहाणपण**–न, मूर्खपणा

उफलणें—अकि. १ फुलणें; विकासणें; उमलणें. २ (ल.) उघडणें, विस्तीर्ण होणें, उलणें. ३ पाझर फुटणें; द्रव येणें (हृदयास). ४ उदयास येणें, उघडणें; अनुकूल होणें (दैव); [सं. उत्+फल्]

उफळणें—अकि. १ वर उडणें; जोरानें जाणें; वर जाणें. 'जो अंबरीं उफळता खुर लागलाहे.' –नळ ३१. 'उफळाया बघती वेगें.' –संग्रामगीतें १७. २ फाळानें उकरली जाणें (जमीन). उपळणें पहा. [सं. उत्+फल्, किंवा सं. उत्पाटय्; प्रा. उप्फाल=उठवणें, उखडणें]

उंफा—स्त्री. (व.) अफवा; वदंता; ऐकीव बातमी; **अवाई.** [फा. अफवा]

उफाट-ड-डा—पु जोर; वेग; शीघ्रगति. 'उफाड जोड करीतु। पांचविजें धारें वावडतु ॥ ' –शिशु ५३४. 'ते व्याघीचिया उफाडा। देतां सत्कथा काढा ॥ ' –एभा १०.१५. [सं. उत्+फल्]

उफाट्टें—वि. (गो.) उफराटा पहा. –पु. जोर; आवेग.

उफाडणें—अक्रि. उडणें; उफळणें. 'व्याघ्र निज छायेसि उफाडे ॥ ' –विपू ७.४६. [उफाट]

उफाड्याचा—वि १ लवकर वाढणारा; जोराचा. २ भरदार; सुदृढ बांध्याचा; दणगट; फार सशक्त (वृक्ष, मनुष्य, पीक, मूलद्रव्य). 'कशी उफाड्याची पोर आहे ती.'–मोर ११ **–चें हाड**–न. सशक्त, जोरानें वाढणारें शरीर. **–नें वाढणें, वाढींस येणें**–क्रि. लवकर, जोरानें वाढणें. **–ची जमीन–शेत**–स्त्री न लवकर व जोरदार पीक येणारें शेत.

उफाणणें—क्रि सुजणें. उफणणें पहा. 'त्याचें सर्वांग उफाणलें आहे. '

उफाणा, उफान—न.पु १ उकळी; कढ; ऊत. (क्रि० येणें) २ उतूं जाणें; कढ वर येणें (क्रि० जाणें). –वि उधळ्या. [उत्+पवन] **०गिरी**–स्त्री. १ चंगळ; समृद्धि; गडगंज. २ (ल.) उधळपट्टी; उधळेपणा; एखादी गोष्ट वाजवीपेक्षां जास्त असणें, ऊत येणें.

उफार—पु. (गो.) उपहार; फराळ. [सं. उप+आहार]

उफारटा—उफराटा पहा

उफारशेट्या—पु. कृतघ्न, उपकार कर्त्यावर उलटणारा, मित्रावर उलटणारा मनुष्य. [उफराटा+शेटया]

उफाळ-ळा—वि. अधिक, वाजवीपेक्षां जास्त; पुरून उरलेलें; शिलकी ठेवलेलें [सं. उत्+फल्] –पु. १ उकळी; ऊत; उत्साह; जोर; आवेश; उफाड पहा. ' उफाळेचि जाती मुजा फुकुरीती । ' –राक. ' पुण्याच्या पुण्यप्रदेशांत उफाळ्याला आलेला तो एरंड... ' **–इंप** ८९. २ एकदम वर येणें; जोरानें उठणें; जोरानें बाहेर येणें; उसळी; ऊत (पाणी वगैरेस); (क्रि० निघणें; येणें). ' आगें घेतुसे उफाळा। सिगेवरि ॥ ' –ऋ ८१. ' नंदाचें मूल काळें। त्यासि नेलें काळें। कोण्हीयेका काळे। चालिलें उफाळें ॥ ' –दावि २४१. ' नाना तीर्थांचीं कारंजीं बहुत। घरोघरीं उफाळत। '–राबि ३६. १७२. ३ शिलक; वाढ.

उफाळणें—अक्रि. उफळणें पहा. १ उकळी येणें, ऊत येणें. २ वर येणें; वर चढणें (जाळ वगैरे). ' केला जरी पोत बळेंचि खालें। ज्वाला तरी ते वरती उफाळे। ' –वामन ३ उसळणें; वर उडणें (पाणी वगैरे). ' कोठें गुप्त कोठें प्रगटे। जैसें जीवन उफाळे आटे। ' –दा ९.८.२७. ' अभ्रीं उंच उफाळला । क्षितीतळी तो येथ आंदोलतां । ' –आक २१. ४ गर्वानें फुगणें, ताठणें. ५ फार वाढणें; वाजवीपेक्षां जास्त होणें. ६ नांगरणें; उकरणें. ७ उधळणें; धांवणें. ' जैसा सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासुनी '–आसी ६३. [सं. उत्+फल्, फाल प्रा. उप्फाल]

उफाळणें—उपणणें पहा.

उफिटणें—उपिळणें पहा.

उफेणणें, उफिणणें—अक्रि. (कों.) अधिक होणें; कुजणें; नासणें: अविकणें (फळ वगैरे). इतर अर्थी उफणणें पहा.

उफेवणें, उफेणें—अक्रि. (गो. कु. राजा) वर येणें; (पाण्यांतून) पृष्ठभागावर येणें, तरंगणें, उसळणें. उफणणें पहा.

उंब—पु. एक मोठा वृक्ष.

उंबई—स्त्री. (ना.) ओंबी पहा. [सं. उंबी, उंबिका=ओंबी]

उबक-ग—पु (काव्य) १ वांती; ओकारी; उमळ. २ (ल.) उमाळा; दुःखाचा आवेग; दयेचा पाझर; कींव. ३ कंटाळा; त्रास, वीट; उद्वेग. ' लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरी उबगु । ' **–ज्ञा** १३.१९२. ' उबग मानूनी तो वना जाय । मार्गी येऊनि त्या बोभाये । ' **–मुआदि** २.४४. ' भागलिया आला उबग सहज । न धरितां काज आलें मनीं । '–तुगा १८५५. [सं. उत्+पच्; का. उब्बु; उब्बिके=उमाळा; वर येणें; गु. उबक=वांती; हिं. उवकना=ओकणें]

उबगट—उबट पहा.

उबगणें—अक्रि. गुदमरणें; दरदरून घाम येणें; गदमदणें; उष्णता व गर्दी यांमुळें घाबरणें; गदगदणें. [का. उब्बे=उष्णता, वाफ]

उबगणें—अक्रि. कंटाळणें; त्रासणें; वीट येणें; ओकारी येणें. ' भणौनि उबगेलासि पोसु। जीवजातां । ' –ऋ ३२. ' एथ अर्जुन म्हणे कटकटा। उबगिलों मागिल्या संकटा।' –ज्ञा ११.४५२. ' गगन शून्यत्वा उबगलें। कृष्णभेटींसी उदित जाहलें । '–एरुस्व ७७. –उक्रि. १ उपेक्षा करणें; तिरस्कार करणें; हयगय करणें; आबाळ करणें. ' उगें किमपि भाविका उबगशील तूं देव कां । ' –केका २०. ' कदाचित तृणांकुरां उबगिजेल दिग्वारणी । ' –आशिवी १४. २ टाकणें; त्याग करणें. ' मग उबगून विषयांसीं । ' –पांप्र ५.२७१. [उबक]

उबगणें—उक्रि. शोधून काढणें; ओळखणें. उमगणें पहा. ' सापत्नभावाचें जणो उबगोनि चित्तीं । '–विवि ८.७.१२३. [सं. उपगमन –उबगअण–उबगण–उबगणें. –राज. भाअ १८३२.]

उबगबटु—पु. कंटाळा. –शर (ज्ञायो २.७७.)

उबगवाणें—वि. कंटाळवाणें. –शर (भावार्थ रामायण १. २.५२.)

उबजणें—उमजणें पहा.

उबजणें—उक्रि. (क.) भातावर आधण घालून त्याचे उबजे करणें. उबजा पहा.

उबजणें—(व.) उभरणें पहा.

उबजत—उपजत पहा.

उबजरणें—अक्रि. क्षीण झालेली शक्ति पुन्हां येणें; पुनरुज्जीवन होणें; नवीन उत्साह धारण करणें; टवटवीत होणें (प्राणी, वनस्पती). [सं. उत्+जृ]

उंबजरा—पु. टवटवी; ताकद; उत्साह परत येणें. (क्रि० येणें; आणणें). **उंबजऱ्यास येणें**–क्रि. पुनरुज्जीवन होणें.

उंबजळणें—अकि. कंटाळणें, त्रासणें; वीट येणें. ' उंबजळली बाळा । गेली सवतीच्या माहेरां. '[का. उब्बे; तुल. सं. उत्+ज्वल्]

उंबजळा—पु. कंटाळा; त्रास; वीट; कंटाळणें; डोकें उठणें; त्रासणें. (क्रि० देणें; आणणें; लावणें; लागणें)

उंबजा—पु. भातावर आधण घालून तें भात खापरांत भाजून निवडून कांडिलें असतां जो तांदूळ होतो तो. (अव.) उंबजे. [का. उब्बे=उष्णता, वाफ]

उंबजें—न उंबजे करण्यासाठीं आधणाचें पाणी घालून ठेवलेलें भात. [का. उब्बे]

उंबट—वि. १ किंचित उष्ण; कोंबट २ घाण, दुर्गंधी येणारा (अर्धवट कुजल्यामुळें, धान्य वगैरे पदार्थ). ३ चांगलें जून होण्यापूर्वी पिकविल्यामुळें नासलेलें (फळ वगैरे). [का. उब्बे=उष्णता]

उंबटणें—१ नासणें, कुजणें; बुरसणें व त्यामुळें दुर्गंधियुक्त होणें (फळें वगैरे). २ जून होण्यापूर्वी पिकविल्यामुळें खराब होणें. ३ पिकण्यापूर्वी नासणें (फळ वगैरे). उबट होणें. [का उब्बे]

उंबटाण-ठाण-साण—स्त्री. १ कुजलेल्या वस्तूची दुर्गंधी. २ ओलसर, उष्ण व बंद जागेस येणारी दुर्गंधी. [का. उब्बे]

उंबडण—न. उद्भव. [सं. उद्भवन]

उंबडणें—अकि. १ उद्भवणें; उत्पन्न होणें. ' कीं उबडला देखौनि सोच्यु । काळवंडैला । '–ऋ ४०७. ' शीतकाळरूपें आळस उबडे । शरीरामाजीं देवाच्या । ' –स्वादि ७.४.२८. २ प्रकाशणें. ' जयाचे उजियेडें । तारागण उबडें ॥ ' –ज्ञा १३.९२७. [सं. उद्भवन]

उंबडणें—उक्रि. विरमणें; घालविणें; नाश करणें. ' दोरीचें अज्ञान तरी गेलें । सर्पबुद्धीसि ही उबडलें । परी भयकंपादि राहिले । संस्कारें भले दृढ असती ॥ ' –रंयोवा ९.२३६.

उंबडहांडी—स्त्री. (ना.) उपडहंडी अर्थ १ पहा.

उंबडा—वि. उपडा; पालथा; अधोमुख. ' तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उबडें । ' –ज्ञा १६. ४५२. ' सांडिलीं पुरुषार्थळुगडीं । केवळ नागवीं उघडीं । विन्मुख पडती उबडीं । मेलीं मढीं होऊनि ठेलीं ॥ ' –एरुस्व १२.५६.

उंबणें—अकि. १ उकाडा होणें; तापणें; गरम असणें, होणें; उष्णता पावणें. २ गुदमरणें; गदमदणें; कोंडल्यासारखें वाटणें; खतखतणें. ३ (ल.) त्रासणें; अस्वस्थ होणें. ४ उष्णता व ओलसरपणा यामुळें खराब होणें; कुजणें; नासणें (फळें वगैरे) ५ कुबटणें; उबटणें; बुरसणें (धान्य वगैरे); उबेनें विकृत होणें. ६ पिकणें; पुवळणें (गळूं वगैरे). [का. उब्बे] **उंबत ठेवणें**–पिकण्यासाठीं उबेंत ठेवणें; वाफ-ऊब देणें (तंबाकू, गळूं वगैरेस).

उंबणें—अकि. (कों.) थांबणें; ओसरणें; उघडणें (पाऊस वगैरे). (प्र.) उभणें पहा. ' पाऊस उबाला. '

उंबत्रा—पु. उंबरा; उंबरठा; दाराच्या चौकटीचें खालचें किंवा वरचें लांकूड. [सं. उंबर=दरवाजाच्या चौकटीचें वरचें लांकूड]

उंबदरणें—अकि. (प्रा.) १ गुदमरणें; गदमदणें. २ (ल.) त्रास, हाल सोसणें. ३ (गळूं वगैरे) पिकावयास तयार होणें. [का. उब्बे]

उंबदार—वि. गरम; उष्ण; उष्णता उत्पन्न करणारें (कापड वगैरे) [का. उब्बे]

उंबर—पुन. १ एक वृक्ष; हें झाड सर्वत्र होतें. यास अंजिरासारखीं फळें येतात. हिरव्या फळांची भाजी करतात. याचें लांकूड चिकट असतें सालीचा रस औषधी आहे. [सं उदुंबर; प्रा. उंबर; गु. उंबरो] २ उंबरवडा; वायनासाठीं भोंक न पाडितां करतात तो वडा. **म्हo** (कों.) १ भटो तुमचें पोट हो कां वांकडें तर म्हणाला उंबर राहिले म्हणजे झाले ! २ भरलेपोटा उंबर कडू=पोटभर जेवण झालें असतां गोड पदार्थहि कडू लागतो. –न. १ उंबराचें फळ. **म्हo** उंबर फोडून केंबरें काढणें=स्वतःच्या थोड्या लाभाकरितां दुसऱ्याचें मोठें नुकसान करणें. २ एक पक्वान्न; पिकलेलें केळें तांदुळाचे पिठांत कुसकरून आंत साखर घालून त्याच्या गोळया करून त्या भजांप्रमाणें तुपांत तळतात. –गृशि ४५८. ३ बरक्या फणसाचे गरे कुसकरून त्यांत तांदुळाचें पीठ भिजवून तें पुरीप्रमाणें थापून तेलांत अथवा तुपांत वारण्यांप्रमाणें तळतात. ' पुरिया उंबरवाणें तळिती. ' –वसा ८. **–राचें फूल**–न. (ल.)(उंबराचें फूल अदृश्य असल्यावरून) दुष्प्राप्य, दुर्मिळ वस्तु; क्वचित भेटणारा मनुष्य. ' आतांशा अगदीं उंबराचंच फूल झालं आहे. ' –सागोप्र ३ १. [तुल० प्रा. उंबर पुप्फ=अद्भुत गोष्ट]

उंबर—वि (राजा.) दमट; ओलसर; पावसाळ्यांत बहुतेक पाणी सांचणारी, पाणथळ (जमीन); अशा जमिनीत पावसाळी पीक होत नाहीं, उन्हाळी (रब्बी) पीक मात्र होतें. [का. उब्बे]

उंबर—स्त्री. उमर (अप). वय. ' येवढी उंबर झाली भेट दिली नाहीं कोणाला. '–ऐपो १८. ' चुकी नसतां गांजिल्यामुळें खरें बसली कंबर । त्यांत बहरांत ऐन उंबर । ' –प्रला १६९. [अर. उम्र; म. उमर]

उंबरघाट—पु. (उंबरा हाच कोणी घाट यावरून) पुढील दाराच्या चौकटीचें खालचें लांकूड. [उंबर+घाट] **०ओलांडणें-सुटणें**–(उप.) घरांतून बाहेर पडणें; घरांतून क्वचित बाहेर पडणाऱ्या व्यक्तीस योजतात. ' उंबरघाट सुटणें हें महा कठीण. '

उंबरठा-डा—पु. १ घराच्या पुढच्या दाराच्या चौकटीचें खालचें लांकूड; उंबरा. २ उंबऱ्याच्या आसपासचा प्रदेश. ३ (व्यापक) घर. [सं. उंबर+स्था] **०चढणें**–शिरणें; प्रवेश करणें.

' चांगला सुतार सुद्धां ... शाळेचा उंबरठा न चढतां वीस पंचवीस रुपेय सहज मिळवितो. '

उंबरणें—अक्रि. १ (खरूज, जखम, गळूं वगैरेतून) पाणी बाहेर येणें; चिघळणें; वाहूंगें; पिकणें; वाहायास लागणें; पूर्ण फुलणें (देवी, गोवर, इ०); दाटरणें. [ऊब] २ आकारास येणें; वाढणें; वर व्यवस्थित दिसूं लागणें (मुडी, इ०) [सं. उद्+भृ–भर् ; तुल. का. उब्बे]

उंबरवट—पु. उंबरा, घराच्या दाराच्या चौकटीचें खालचें लांकूड. ' ते राजद्वार नमस्करौनि । देखे उंबर वटु । ' –रु ६०. [उंबरा]

उंबरा—पु (धों) ओढ्याच्या किंवा नदीच्या काठीं पाण्यासाठीं खणलेला झरा. [सं. उद्+भृ]

उंबरा—वि. (राजा.) जो पदार्थ खाल्ला असतां अंगावरील जखमेंत पू वगैरे वाढतो, जखम उबरते असा (पावटा, भोंपळा, वगैरे पदार्थ). [उंबरणें]

उंबरा, उमरा—पु. १ दाराच्या चौकटीचें खालचें लांकूड. २ (ल.) घर; वस्ती. ' या गांवांत शंभर उंबरा आहे. ' ' या शहरांत लाख उंबरा आहे. ' [सं. उंबर=दाराच्या चौकटीचें वरचें लांकूड; ' उम्बरोगृहदेहलिः ' –हेमचंद्र प्रा. उंबर; दे. उम्मर.] **०उंबरपट्टी**–स्त्री. घरपट्टी. –ख ३९४. **०चढणें**–घरांत जाणें; उंबरठा चढणें पहा. **–न्याची साल काढणें, –माती राहूं न देणें, उंबरा झिजविणें**–एखाद्याच्या घरीं एकसारख्या येरझारा घालणें, वरचेवर जाणें. **वरचा उंबरा**–पु. दाराच्या चौकटीची वरची बाजू. **खालचा उंबरा**–पु. दाराच्या चौकटीची खालची बाजू. दरवाजाच्या बाहेरच्या चौकटीच्या लांकडास उंबरा म्हणतात व आतील चौकटीच्या लांकडास लतकोरा म्हणतात.

उंबराव—पु. उमराव (अप.) पहा. ' बावीस उंबराव मिळून आले बाच्छाय समेला. ' –ह्युश्रीपो ६.

उंबरेड—पु. (व.) उंबरठा.

उंबऱ्या—वि. उंबरासारखा लाल रंगाचा (घोडा). [उंबर]

उंबलक–ख, उंबलंग—वि.क्रिवि. १ असंख्य; मुबलक; फार समृद्ध. २ बेहिशेबी; बेअंदाजी; मोघम. ३ अनिश्चितपणें; मोघमपणें. [अर. अबुलह्=अज्ञानी]

उंबलणें—सक्रि.(सोनारी धंदा) सोन्याचे बारीक तुकडे करून ते एकमेकांवर ठेवून त्यास मोरचूद वगैरे लावून ते शेगडींत तापवून त्यांचा आकार न बदलतां एकजीव होतील असे करणें. [उंबाळा]

उंबला, ओंबील, वाळंबा—पु. (झाडावर वगैरे आढळणारा) तांबडा मुंगळा, मुंगी.

उंबली—स्त्री. (कु.) दरवाज्यावर अमलेली छावणी; दरवाज्यावरील कोनाडा, वस्तु ठेवण्यासाठीं दरवाज्यावर मारलेली फळी; दारस्ती. [सं. उंबर=उंबरा]

उंबलें—न. पोहे किंवा लाह्या करण्यासाठीं आधण घालून ठेवलेले भात. [का. उब्बे]

उंबलें—न. (कु.) दाराची चौकट; दरवाजा. [सं. उंबर]

उंबवण—न. (कु.) आबे वगैरेची आढी घालण्याकरितां वापरण्यांत येणारें गवत. [का. उब्बे; म. उंबवणें]

उंबवणें, उंबविणें, उंबावणें—सक्रि. १ ऊब देणें; उष्णता देणें. २ गुदमरविणें; गदमदविणें. ३ उष्णता देऊन पिकविणें (आंबे अढींत घालून वगैरे). ४ उष्णता देऊन वाढविणें (अंडीं वगैरे). ५ पिकविणें (गळूं वगैरे). –अक्रि. उंबणें पहा. [का. उब्बे]

उंबवरा—वि. पुरेशी ऊब न जिरल्यामुळें चिकट, चबचबीत झालेला (भात, खिचडी). [का. उब्बे]

उंबवलें—न. अतिशय उष्मा होत असलेली, हवा येत नाहीं अशी, बंद जागा.

उंबशी—वि. (गो.) दमेकरी. [उंबस]

उंबस—स्त्री.(गो) दमा. ' उंबस मारता. ' [का. उब्बस=दमा]

उंबसळ—स्त्री. भाडयांना झिलई देण्याचें गोल रंध्यासारखें हत्यार.

उंबसाण—स्त्री. उंबट किंवा कुजट धाण; उंबटाण. [ऊब–उंबस+धाण]

उंबळ—स्त्री. खोकल्याची उसळी, ढांस [का. उब्बल, (धातु उब्बळिसु=ओकारी देणें)] ' प्रत्येक खोकल्याची उंबळ येण्यापूर्वी मुलास सूचना होऊन तें साठ्यासाठीं आईकडे पळतें. '–गृहवैद्य ४४.

उंबळ—(गो.) पावसाळ्यांत जमिनींतून झर वाहू लागणें; उपळ पहा.

उंबळक—उंबलक अर्थ १ व २ पहा.

उंबळणें—क्रि. (गो.) १ साबण वगैरे लावून (घरींच) कपडे धुणें. २ सुपानें विशिष्ट प्रकारें हालवून कण्या व पीठ किंवा कोंडा वेगळा करणें. उंबळणें पहा. [का. उब्बळ=कोंडा]

उंबळणें—अक्रि. १ अतिशय उष्णतेमुळें (फळ वगैरे) कुजणें, नासणें. २ गर्भ नासवणें; गर्भस्राव होणें. [का. उब्बे]

उंबळा—पु (क.) उचला, तात्पुरता, आटोपशीर संसार. ' आमच्या सासुबाईचा उंबळा संसार असतो. '

उंबळी—एक झाड.

उंबळी—स्त्री. (गो.) उपळ पहा. [सं. उत्+प्लवन]

उंबळें—वि. (गो.) धुतलेलें (वस्त्र). [उंबळणें]

उंबा—स्त्री. उष्णता. ऊब पहा. ' तेवींचि वन्हित्व आंगीं । आणि उबे उबगणें आगी । '–ज्ञा १८.२२०. ' कां गजबजिला उबा । पांधुरणें केळीचा गाभा ॥ ' –अमृ ५.६०. [का. उब्बे]

उबागळी—स्त्री. (व.) समृद्धि; रेलचेल; आधिक्य. 'पैशाची उबागळी असली म्हणजे सर्व कांहीं सुचतें.' [ऊब+आगळी]

उबागी—पु. ताठा; गर्व. 'तुम्हां चढलासे उबागी। हरिदास गाय रंगीं॥' –ब ६११. उबगणें पहा. [का. उब्बु=सुजणें, फुगणें]

उबाणा—पु. (व.) खटाटोप. 'कामाचा उबाणा फारझाला.' –जनाबाई (नित्यपाठ) २. [का. उब्बण=अडसर?]

उबार—स्त्री. १ (जमाखर्चे) रोजखर्ड्यावर पूर्वदिवशीं निघालेली शिलक दुसऱ्या दिवशीं जमा धरतात ती; हातांतील शिलक. –वि. (व.) फाजील; जास्त; अधिक. 'उबार बोलशील तर थुत्तरींत देईन.' २ बाकी; उधारी. 'गिऱ्हाइकाकडे दुकानदारांची बरीच उबार निघते.' ३ हातांतील शिलकेसंबंधीं. [हिं. उबारना=शिलक ठेवणें. तुल० सं. उत्+भृ; का. उब्बर = आधिक्य]

उबार—वि. (गो.) उंच. [सं. उपरि]

उबार-डेंग—वि. (ना.) (ग्राम्य) ऐतखाऊ; उनाड; भटक्या. [स. उद्+भृ]

उबारणें—सक्रि. १ उबवणें (अंडीं वगैरे). २ पिकविणें; भट्टी लावणें (फळें वगैरेची) –अक्रि. १ उष्णता व आर्द्रता यांच्या योगानें नासणें, कुजणें (फळें किंवा इतर पदार्थ). २ उष्मा होणें; गदमदणें. 'ग्रीष्मकाळ दाखवी उष्णा। उबारोनि माझिया प्राणा। कासावीस करीतसे।' –मुआदि ४८.७५. ३ खरूज, जखम, पुटकुळ्या वगैरेंतून पू वाहणें. [का. उब्बे; म. उबारा]

उबारणें—उक्रि. उभारणें पहा. १ (राजा. कु.) आकारांत आणणें; तयार करणें (वाफा वगैरे). २ (राजा. कु.) अस्ताव्यस्त करणें; विसकटणें; अव्यवस्थित करणें (केस किंवा कांहीं वस्तु). ३ (प्र.) उभारणें; शिवावयाच्या कपड्याचे भाग एकत्र करून दोरा घालणें. [सं. उद्+भृ; का. उब्बर=आधिक्य; म. उभारणें]

उबारा—पु. १ उष्णता; उष्मा; उन्हाळा; उकाडा. 'तेंव यरीकडे धनुर्धरा आसनाचा उबारा॥' –ज्ञा ६.२२१. 'नका कांहीं उपचार माझ्या शरीरा। करूं न साहावे मज बहु होतो उबारा॥' –तुगा ११७. २ (ल.) संपत्ति; द्रव्य; मालमत्ता. 'त्याजपासीं कांहीं उबारा आहे.' ३ (ल.) पराक्रम; तेज. 'तो माझेआ भुजांचा उबारा। कांई साहिल॥' –शिशु. ८९३. ४ (सामा.) ऊब पहा. ५ (ल.) आश्रय. 'मातें तुझाचि उबारा.' –रामदासी २.१७२. [का. उब्बे; सं. उष्मतर–उब्बअर–उबार–उबारा–राज. भाअ १८३३] ०देणें-उन करणें; तापविणें; उष्णता देणें.

उबारा—पु. आधिक्य; समृद्धि. 'जैसा कस्तूरियेचा निकरा। तेथें परिमळाचा उबारा।' –विपु ७.१०६. [सं. उद्+भृ; का. उब्बर=आधिक्य]

उबारी—स्त्री. (गो.) उंचवटा. [सं. उपरि]

उबाल, उबाला, उंबाळ—न.पु. विस्तार; फोंफावणें; अतिशय दाट माजणें (तण, झाडझुडप). 'महा मोहाचें उंबाळ.' –भाए ३०७. [का. उब्बर=आधिक्य; फुगणें; माजणें]

उबावणें—अक्रि. उबणें. १ उकाडा होणें; उष्मा होणें; गदमदणें. २ उष्णतेनें किंवा उबेनें नासणें, कुजणें (फळें वगैरे). [का. उब्बे]

उबाळ—पु.स्त्री. १ (गो.) उन्हाळा [का. उब्बे] २ आकाशाची अभ्राच्छादित स्थिति. 'आज पावसान् उबाळ धल्या.'=आज पावसानें काळोखी धरली आहे; उबाळा पहा.

उबाळ—स्त्री. दांस; खोकल्याची उबळ पहा.

उबाळणें—अक्रि. १ उकळणें; शिजणें. २ उष्णतेनें नासणें, कुजणें (फळें वगैरे). [का. उब्बे]

उबाळा—पु. १ हवेंतील उष्णता; उष्मा; गर्मी. २ उन्हाळा. [का. उब्बे=उष्णता]

उबाळा—पु १ पाण्याचा कढ, ऊत, उकळी. (क्रि० येणें). २ उमाळा; आवेग (सुख, दुःख, करुणा इ०). (क्रि० येणें). ३ (व.) जाळ; ज्वाळा उठणें, उसळणें (विस्तवाची). 'उठती वन्हीचे उबाळे.' –दा १६.६.८. 'संध्याकाळीं सूर्य उबाळ्यासारखा दिसतो.' [का. उब्बु=वर उडणें; फुगणें; (तुल० गु. उबाळो=सर्पण)]

उबाळा—पु. १ (कांसारी धंदा); भांडयांच्या बुडास आकार देण्याचें हत्यार, हें जमिनींत उभें पुरून त्याच्या माथ्यावर भांडें ठेवून हातोडयानें ठोकतात. २ (कों.) (सोनारी धंदा) आंगठी, जोडवें वगैरेस वाटोळा आकार देण्याचें हत्यार. [सं. ऊर्ध्व; प्रा. उब्भ; म. उभा+ला]

उंबाळा—पु. (कु.) फेस. [उमाळा]

उबाळू—न.उन्हाळ्यांत उष्णतेमुळें होणारें गळूं. [उब+आबाळू]

उंबी—स्त्री. धान्याचें (गहूं वगैरेचें) ओलें कणीस; ओंबी. [सं. उंबी]

उबीन—स्त्री. (सोनारी धंदा) चांदी.

उबीर—(गो.) बांधकामाकरितां किंवा गिलाव्याकरितां केलेला चिखल. [सं. उद्+भृ]

उंबील—पु उंबला पहा.

उंबूर—पु. (व.) बाजरीचा हुरडा; निंबूर; लिंबूर. [सं. उंबी=हुरडा]

उबेजणें-उद्देणें—अक्रि. उबणें; उकडूं लागणें. 'अथवा पक्वान्नें भुकेलि। गंगेसि तृशा उपजलि। काइ चंद्रकळा उबेजली। व्यजनातें इच्छिल॥' –रास ५.८०८. [का. उब्बे]

उबो—वि. १ (गो.) उभा. २ (ल.) उभें गंध लावणारा (वैष्णव). [सं. ऊर्ध्व; प्रा. उब्भ; म. उभा]

उब्या—पु. (व. ना.) विस्तव; जाळ. [का. उब्बे]

उच्छृतमंझिलत—वि. वैभवसंपन्न. –राज ७.१७२. [अर. उच्छृत्=वैभव]

उभ—स्त्री. उभारणी; उत्पत्ति. [सं. ऊर्ध्व; प्रा. उब्भ; किंवा सं. उद्भव; प्रा. उब्भव] –वि. उभय; दोघे. [सं. उभय]

उभउभ्या—क्रिवि. उभाउभीं; तत्काळ. ' अविश्वासें कवळिल्या चित्ता । अभिमानें म्हणे मी ज्ञाता । तेव्हां उभउभ्या पळे आस्तिकता । देखे नास्तिकता सर्वत्र ॥ ' –एभा २३.३१०. [उभ द्वि]

उभक—न. (कों.) बैल किंवा रेडा ज्याभोंवतीं फिरतो तें रहाटगाडग्याचें उभें लाकूड. [सं. ऊर्ध्व+काष्ठ; म. उभकट ?]

उभकुडी—स्त्री. पांढरी माती पाण्यांत कालवून तिनें भिंतीस दिलेलें सारवण. [उभा+कूड]

उभग— उबग पहा.

उभगणें—उबगणें पहा. ' एक भागली, एक उभगली अशी व्यवस्था उभयतास जांहली होती. ' –भाब २०. (पाठभेद)

उभगात—न. खाटेच्या चौकटीचीं जीं दोन उभीं गातें (लांकडें) त्यांपैकीं प्रत्येक. याच्या उलट आडगात. [उभें+गात्र]

उभजणें—क्रि. कंटाळणें; त्रासणें; खेद पावणें. ' ते सुविद्यता तोखें । उभेजहीना । ' –ज्ञा १४.३२९. ' जो गुरुभक्ती उभजे । ' –ज्ञा १३.६७२. [सं. उद्+भज्]

उभट, उभंड—वि. १ उभा. २ उंच; उंचवट (भांडें, पगडी). ३ उभ्या अंगाचा; उंचेला; उभ्या ठेवणीचा. ४ उघड; वर; स्पष्ट; जाहीर. ' उभंड निंदा धरिली मुखीं । ' –दावि १६४. [उभा]

उभड–डा, उभंड—पु. (क्र.) उभड. १ उमाळा; उसळी; गहिंवर; आवेग. ' त्याचेनि दुःखें उभड आला । ' –मुवन ८.८१. ' गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंठित हे वाचा जाली त्यांची । ' –तुगा ४५. ' तेणें बहुत दुःखी जाला । देखोनियां उभड आला । ' –दा ३.५.६. ' स्मशान वैराग्य दुसरियास सांगावें परंतु ज्याचा उभड तोच जाणत असेल. ' –भाब ९४. २ खालून वर उसळणारा प्रवाह (पाणी, रक्त इ० चा) झरा; लोट; पूर. ' जैसा प्रळयांबूचा उभडु । ' –ज्ञा १६.१३८. ' पहिलिया संकल्पजळाचा उभडा ' –ज्ञा ७.६९. [सं. उद्+भूत; किंवा सं. उद्भट; प्रा. उब्भड=प्रबल, प्रचंड ?]

उभंड—उभट, उभड पहा.

उभडणें—१ उत्पन्न होणें; प्रादुर्भूत होणें. २ उमाळा; पूर येणें; उसळी येणें; वाढणें. ' देहीं शीतळता उभडे । कां उष्णता अत्यंत चढे । ' –एभा २८.५९९. [उभड]

उभणी–नी—स्त्री. उभार; उभारणी; प्रसंग; हकीगत; बनाव. ' तन्हीं आइकतु रसाळ । उभणी ते । ' –शिशु ७६०. ' तेथां भीतरी उभनी गोमटी । ' –शिशु ५६९. [उभा, उभणें]

उभणें—उक्रि. १ उभारणें; उभारलें जाणें; रचणें; रचलें जाणें; तयार होणें; करणें. ' तेव्हेळीं मायाभूमिकेचेनि पसारें । उभिली लिंगदेहांचीं धवळारें । ' –शिशु ९३. ' तैसियां गुढियां उभिलियां । घरोघरीं । ' –शिशु ५९२. ' कां प्रभेचा उभला । दीपप्रकाश संचला । ' –अमृ ७.१७०. ' उभिला जैसा देउळीं । जाणोनि कुंचा । ' –ज्ञा १३.६५८. [सं. उद्+भवन; प्रा. उब्भवण]

उभणें—अक्रि. थांबणें; ओसरणें (पाऊस वगैरे). [उभा]

उभय—सना. दोघे; दोन; द्वय; दुकल; जोडी; जुळें. याचा उत्तरपदाशीं समास होतो. उ० उभयब्राह्मण (दोन जे ब्राह्मण); दोन स्वामी ज्याचे तो उभयस्वामिक; उभयसत्ताक; इ० [सं.] **०कुल**–न. शरीरसंबंधामुळें जोडलेलीं दोन्ही कुळें, माहेर व सासर. ' उभय कुलाला वंद्य न देई असा मुलगा असावा ! ' ' उभय कुलानंददायिनी ' ' उभयकुलोद्धार ' [सं.] **०खुरी–मुखी**–वि. गाय वितांना वासरूं बाहेर पडतेवेळीं दोन्ही बाजूस दोन (गाईचे व वासराचे) खूर किंवा तोंडें दिसतात म्हणून त्या स्थितींत असलेली (गाय). ' तंव पुढें देखे कामधेनु । उभयखुरी प्रसवतां अर्धक्षणु । राहिला तेथें । '–कथा ३.६.८३. **०गामी**–वि. दोन्ही (दिशां बाजूं) कडे जाणारा. **०चर**–वि. जलस्थलवासी; पाण्यांत व जमिनीवर किंवा हवेंत राहणारा. **०दर्शी**–वि. दोन्ही बाजू पाहणारा, लक्षांत घेणारा; दोन्ही बाजूंचा विचार करणारा. **०द्वारें**–न. अव. शरीरांचीं मलमूत्रोत्सर्गांचीं दोन गुह्यद्वारें. ' राजसेवक फिरती नम्र । उभयद्वारें मुक्त सांडोन । ' **०निष्ठ**–वि. दोन्ही बाजूंविषयीं प्रेम, अगत्य असणारा; दोन्ही पक्षांना सांभाळणारा. **०पण**–न. द्वैत. **०पराङ्मुख**–वि. दोहोंपैकीं कोणतीहि गोष्ट न स्वीकारणारा, रुचणारा; दुराग्रही; हट्टी. **०पक्ष**–पु. दोन्ही बाजू, पक्ष, तट. –क्रिवि. दोहोंकडे; दोहींकडे; इह आणि परलोकीं. ' तयांसी लाभे प्रत्यक्ष । महा आनंद उभयपक्ष । ' –गुच ५१.६५. **०पक्षींसमान**–वि. १ दोहोंबाजूंनीं, दोन्ही दृष्टींनी सारखा; दोहोंबाजूस चालण्यासारखा; दोन्ही बाजूंसंबंधीं अगत्य बाळगणारा. २ निःपक्षपाती, पूर्वग्रह विरहित; निःस्पृह; निर्विकल्प. ३ दुतोंड्या; वेळ पाहून वागणारा; दोन्ही डगरींवर हात ठेवणारा; सव्यसाची. **०लिंगी**–वि. १ ज्या प्राणी–वनस्पति–जातींत स्त्री व पुरुषजननेंद्रियें एकाच शरीरांत असतात असे (प्राणी, वनस्पती). (इं.) हर्माफ्रोडाईट. २ संशयित लिंगी; हिजडा; हवा. **०लोक**–पु स्वर्गलोक व मृत्युलोक; इहपर लोक. ' जेणें करितां उभयलोक । संतुष्ट होती । ' –दा ११.३.२. **०विध**–वि १ दोन प्रकारचा, तऱ्हेचा, स्वभावाचा वगैरे. २ (ल.) स्त्री–पुरुषयुक्त; उभयलिंगी पहा. ३ सकर्मक व अकर्मक दोन्ही जातींचें (क्रियापद). ४ दुतोंड्या; आंत–बाहेर वेगळें असणारा; दोन दगडींवर हात ठेवणारा; एकनिष्ठ नसणारा. **०शौच**–न. मन व शरीर या दोहोंची शुद्धि. ' गृहस्थें व्हावया निष्पाप । ठाके तो

करावा जपतप । उभयशौचांचें स्वरूप । अति साटोप करावें ॥ ' –एभा १८.३१८. **°साधारण–सामान्य**–उभयपक्षींसमान पहा. ' कांहीं व्रतें स्मार्तांचीं, कांहीं वैष्णवांचीं आहेत, कांहीं उभय साधारण आहेत. ' **°स्वामिक–सत्ताक**–वि. दोन धनी असलेला; दोघांच्या सत्तेखालीं असलेला.

उभयतः—क्रिवि. दोहीकडे; दोन्ही बाजूंनी, दोहोंकडून [सं.] **°पाशरज्जु**–स्त्री. (ल.) दोहोंबाजूंनीं येणारी अडचण; कात्री, इकडे नई इकडे वई अशी स्थिति; शृंगापत्ति; (सामा.) पेंच; पंचाईत. (इं.) डायलेमा.

उभयतां—सना. दोघेजण, दोन्ही; उभय; द्वय. [सं. उभयतः] **°सरदार**–(सांकेतिक) शिवे–होळकर. ' उभयतां सरदारांत पेंच दिसतो. ' –राज ३.१३९.

उभयतोमुख—वि. दोन्ही दिशांनीं पाहणारा, द्विमुखी; दोन दर्शनी बाजू असलेला; दुतोंड्या [सं.]

उभयतोमुखी—स्त्री. १ उभयखुरी पहा. २ दोन प्रवाहांनीं वाहणारी नदी, झरा. [सं.]

उभयतोवाही–वाहिनी—वि. दोन प्रवाहांनीं वाहणारा (प्रवाह, नदी); उभयतोमुखी. [सं.]

उभयत्र—क्रिवि. दोन्ही बाजूंनीं; दोन्ही ठिकाणीं; दोन्हीकडे; इकडे आणि तिकडे. [सं.]

उभयां—क्रिवि. उभाउभीं; उभ्याउभ्या. ' एकां उभयांचि प्राण गेले. ' –ज्ञा १.१३५. [उभा]

उभयान्वयी—वि. १ दोघांस जोडणारा; दोहोंबाजूंचा; उभयपक्ष–निष्ठ; दोन्ही पक्षांशीं संबंध ठेवणारा; दुतोंड्या. ' उत्तर हिंदुस्थानांतले उपद्व्यापी ... संस्थानिक, कर्नेल हस्करासारखे त्यांचे हस्तक व प्रो. रशब्रुक वुल्यम्ससारखे उभयान्वयी स्वार्थसाधक त्यांचे स्तोम माजणार कसें ? ' –केसासं २.१९३. **°अव्यय**–न. (व्या.) दोन शब्द किंवा वाक्यें जोडणारा शब्द. उ० आणि, व, जर, तर, परंतु इ०.

उभयान्वित—वि. १ दोन्हीं बाजूंनीं जोडलेला; दोन्ही बाजूंशीं संबंध असलेला. २ उभयान्वयी (अव्यय) पहा. [सं.]

उभयार्थ—वि. १ ज्याचे दोन अर्थ होतात असा. व्यर्थी, दोन तऱ्हांनीं लावतां येईल असें; ' हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी ' –नळ १२२. २ (ल.) अनिश्चितार्थ; संशयितार्थी; दुटप्पी; दुरोखी (वचन, भाषण, वक्तृत्व, श्लेष इ०). [सं.]

उभयालंकार—पु. मिश्र अलंकार; शब्दालंकार आणि अर्थालंकार यांचें मिश्रण. उ० ' शृंगार शृंगाळय केसरी हो । सांगा अनंगा नटकेसरी हो । कासे विकासे पट केसरी हो । श्रीशंकली पंकजकेसरी हो ॥ ', –वामन.

उभरंग—पु. फिक्का, फिकट रंग; अस्पष्ट, विटलेला रंग. –वि. फिकट रंगाचें; विटलेलें; विटलेल्या रंगाचें (वस्त्र). [सं. उद्+भर+रंग. उभरा+रंग]

उभरणी—स्त्री. उभणी, उभारणी पहा.

उभरणें—उक्रि. १ उफणणें; वारवणें. उफणणें पहा. २ (व.) उतणें (बिब्बा वगैरे). ' बिब्बा उभरला म्हणजे खोबरेल तेल लावतात. ' ३ (धान्य, वाळू वगैरे) ओतणें; रिकामें करणें. [उद्+भृ; खा. उभरवणें; हिं. उभरा=रिकामें करणें]

उभरा—वि. फिक्का; फिकट; विटलेला.

उभवण—न. पाऊस निवारण करण्याचें साधन; छत्री; इरलें; वगैरे. [उभवणें; तुल० का. उब्बे=पाऊस+सं. आवरण]

उभवण, उभवीण—स्त्री. (विणकाम) ताणा; उभे दोरे; याच्या उलट आडवण. [उभी+वीण]

उभराभरी—स्त्री. (भरीवर भर) गर्दी; दाटी; रांग; पंक्ति. ' आतां काय करूं या वरि । रिगेन परमेश्वराचां मेळिरीं । दोघांची उच्चारीन उभराभरि । सासवेंती फुडां ॥ ' –ख्रिपु २.३७.६४. [सं. उद्+भर+भर]

उभला–ळें—पु.न. उंबरठा; उंबरा; दारखठा. ' बाणसियेचे उभळें । कोण न रिगे । ' –ज्ञा १३.७००. [उंबरा पहा]

उभवट—स्त्री. उभारणी; बांधा; ठेवण. ' म्हणे धाकटी उभवट माझी नवी तरणी माती । ' –पला ७६. [उभा+वट प्रत्यय]

उभवणी—स्त्री. १ उभारणी; उठावणी; रचना; स्थापना; बांधणी; उभणी पहा. ' जेवीं कां नटाची रावोरावणी । दोघें खेळती लटिकेपणीं । तेवीं प्रकृतिपुरुषउभवणी । मिथ्यापणीं जो जाणें ॥ ' –एभा १९ २७. २ (ल.) (दारिद्र्य, आजार वगैरेपासून) मुक्तता; उर्जितावस्था, वर डोकें काढणें, उठणें, उठवणें; पायावर उभें करणें. ३ धंदा, व्यापार वगैरेची स्थापना, उभारणी. ४ पसारा; ज्याची उभारणी केली आहे ती वस्तु, गोष्ट. ' असो हे उभवणी मायामय । जेणें रचिली ॥ ' –विपू ४ ७९. [उभा, उद्भवन]

उभवण–णें, उभविणें—सक्रि. १ उभारणें, उभें करणें; रचणें; स्थापन करणें. ' गगनावरी उभवावें । घेऊं केवी ॥ ' –ज्ञा १.१२. ' मठ मंडप उभविले । ' –मुआदि २७.५२. २ थांबविणें; उभें रहावयास लावणें. ३ पाऊस थांबेपर्यंत आश्रय घेणें, थांबणें; पर्जन्य टाळणें. ' म्यां पाऊस उभविला, मग निघालों. ' ४ उपयोगानंतर उभें करणें, जागेवर ठेवणें (जातें वगैरे). ५ विस्कटणें; उभें करणें; विखुरणें (केस वगैरे) [सं. ऊर्ध्व+भू–भवन; किंवा उद्+भवन]

उभवणें—अक्रि. १ उभें राहणें; ताठ, सरळ होणें; स्थापित होणें; रचलें जाणें. २ (ल.) आजारांतून उठणें; गरीबींतून किंवा अज्ञात स्थितींतून वर येणें; स्वतःच्या पायावर उभें राहणें. ३ बंद होणें; थांबणें (पाऊस). [उभा; सं. ऊर्ध्व; प्रा. उब्भ+सं. भू, भव ?]

उभविता—वि. उभवणी, उभारणी करणारा. 'याचा प्रभु तोचि उभविता तनया।' –मोमंभा २.२६. [उभविणें]

उभस्वना—स्त्री. (कों.) निर्भत्सेना; चारचौघांत फटफजिती; उपहास. [सं. उद्+भर्त्सन]

उभळ—स्त्री. कोंडयांतून उभळून वेगळी काढलेली कणी. [सं. उद्+भल्ल; प्रा. उब्भालण=सुपानें पाखडणें]

उभळ-ळी—स्त्री. १ खोकल्याची ढांस. उबळ पहा. 'उभळीचा उजगारा। उबगु मेजारिल्या घरा॥' –एभा ९.२७०. २ तीव्र उत्कंठा; उत्सुकता; उतावळी [का.]

उभळणें—उक्रि. १ सुपानें कोंडा वगैरेंतून कणी वेगळी करणें, पाखडणें. २ नवीन जात्यांत थोडें धान्य दळून तें चालू करणें व तें कसें चालतें तें पाहणें; जात्यांतील घास काढून टाकणें. [प्रा. उब्भालण; तु० सं. उद्+भल्ल्; का. उब्बलु=कोंडा]

उभळणें—उक्रि. (प्रा.) उकळणें (मद्य वगैरे). [का. उब्बे]

उभळणें, उभळेणें—अक्रि. (राजा.) उत्कंठित होणें; अधीर होणें; उतावीळ होणें. [उबळ]

उभळा—वि. उभारलेला. [उभा]

उभा—वि. १ ताठ; वर; खडा; आडवा नसलेला, न वांकलेला; न बसलेला. 'उभा राहून किती वेळ बोलशील' रे, इथें झोपाळयावर बैस.' २ सरळ दिशेत असलेला, लांबीच्या अनुषंगानें सरळ रेषेंत असणारा (रस्ता). याच्या उलट आडवा (रस्ता). ३ चालू; सुरू असलेला (धंदा वगैरे). 'माझें घर बांधण्याचें काम उभें आहे.' ४ न कापलेलें, शेतांत उभें असलेलें (पीक वगैरे). 'शेतांतील उभें पीक शत्रूनें कापून नेलें.'. ५ तयार; उत्सुक; पुढें आलेला; सिद्ध. 'त्याचें घर विकत घेण्यास कोणी उभा रहात नाहीं.' ६ सतत; अढळ; जागृत; पक्का; तीव्र (द्वेष, दावा वगैरे). 'त्या दोघांमध्यें उभा दावा आहे'. ७ संपूर्ण, सर्व; अथपासुन इतिपर्यंत (संवत्सर, साल, वर्ष वगैरे). 'उभ्या वर्षांत धंद्यामध्यें कांहीं फायदा झाला नाहीं'. ८ सारखा; चालू असलेला. खळ न पडणारा; फार वेळ टिकणारा, अविरत (पाऊस, वारा वगैरे). 'उभ्या पावसांत शेतलावणीचें काम चालू होतें.' ९ सरळ धारा पडत आहेत असा (पाऊस). १० थेट समोरून येणारा; तोंडावर येणारा; विरुद्ध दिशेकडून येणारा (वारा वगैरे). 'वारा उभा असल्यामुळें गलबताची गति खुंटली, मंद झाली.' ११ गति नसलेला; थांबलेला; स्थिर [सं. ऊर्ध्व; प्रा. उब्भ; सिं. उभो; बं. उबु] **०करणें**-क्रि. १ थांबविणें; गति बंद करणें: स्तब्ध करणें 'गाडी उभी कर.'. २ बंद करणें; तात्पुरता थांबविणें; कांहीं काळ थोपविणें (धंदा, काम वगैरे) 'मंदीमुळें सध्यां धंदा उभा केला आहे.' ३ रचणें; उभारणें: तयार करणें. 'पोलिसांनीं खोटा खटला उभा केला.' ४ (बायकी) धुतांना लांब वस्त्र एका पदरापासून दुसऱ्या पदरापर्यंत सारखें करून घेणें. ५ उत्पन्न करणें, आणणें. 'शिवाजीमहाराजांच्या नेत्रांतून देखील अश्रू उभे केले.'–इंप १०६. ६ आडवी पडलेली वस्तु लंबरेषेंत ठेवणें. 'समई आडवी पडली आहे ती उभी कर पाहूं!' **०होणें**-थांबणें; तात्पुरता बंद होणें; विश्रांति घेणें. **०धरणें**-निर्बंधांत ठेवणें; कडक शिस्तींत वागविणें; जांचणूक करणें; त्रास देणें (धनकोनें रिणकोस, मुलानें आईस वगैरे)' 'केव्हांपासून यानें मला अगदीं उभें धरिलें आहे, जरा पे तरी!'. **०जाळणें**-अत्यंत हाल करणें; अतिशय त्रास देणें; छळणें. **०ठाकणें**-उत्पन्न होणें; समोर येणें. 'संगतीच्या लोकांचा भोग। उभा ठेला।'–दा१२.९.२४. **०नाहणें**-सर्वांग भरून येणें, पाझरणें, निथळणें (घाम, रक्त वगैरेनीं) **०राहणें**-१ मिळणें; प्राप्त होणें; लाभणें (फायदा, नफा वगैरे); परत मिळविणें; **वसूल** होणें; संपादन करणें 'व्यापारांत घातलेलें माझें भांडवल अद्यापि सारें उभें राहिलें नाहीं.'. २ घडणें; जवळ येणें; निकट येणें (एखादी गोष्ट किंवा कृत्य); प्राप्त होणें; आवश्यक होणें. ३ साहाय्य करण्यास पुढें येणें, तयार होणें, सिद्ध होणें. 'बहुत जन वास पाहे। वेळेसी तत्काळ उभा राहे॥' –दा १९.४.११ ४ एखाद्या संकटांतून वर येणें; नशीब काढणें. ५ पोटांत गोळा उभा राहणें; संकट येणें, उपस्थित होणें. ६ आड येणें; अडचण, प्रतिबंध होणें; पुढें येणें. 'त्यावेळीं एक गोष्ट उभी राहिली, तेणेंकरून माझा बेत जागच्याजागींच राहिला.' 'माझ्या मुलीचें लग्न उभें राहिलें आहे, तुम्हाला द्यावयाला मजजवळ पैसे नाहींत.' ७ उत्पन्न होणें; मिळणें, प्राप्त होणें (किंमत वगैरे). 'या मालाचे रुपये पांच हजार उभे राहिले कीं, माझे वडील भाग्योदय मानतील' –विवि. १०.५.१९७. ८ अनुकूल होणें. 'उभे राहिलें भाग्य विभीषणाचें।' –राक १ ७१. **०इंद्र करणें**-पुन्हां सुरुवात करणें; नव्यानें आरंभ करणें (काम, धंदा वगैरेस). **०छेद**-पु. (गणित, स्थापत्य, चित्रकला) एखादी वस्तु उभी (ओळंब्यांत) वरपासून खालपर्यंत कापली असतां दिसणारें दृश्य. **०तांब्या**-पु. राजापुराकडील उभट आकाराचा पितळेचा किंवा तांब्याचा लोटा. **०दांडा**-पु. १ उभा, सरळ खांब. २ (ल.) सरळ व्यवहार; सरळ वर्तन. युक्तीचें, कुशलतेचें वर्तन. [उभा+दंड] **०दावा**-पु. हाडवैर: अक्षय, कायमचें वैर. **म्ह०** जावा जावा, उभा दावा. (**उभे**) **दोन प्रहर**-पु उभीदुपार पहा. 'आपल्या झोपडयांवर उभ्या दोन प्रहरीं चांगलें ऊन पडतें.' –पाव्ह २७. **०दोरा**-पु. धांवदोरा; कच्ची शिवण; टीप याच्या उलट. **०नासणें**-सर्वनाश होणें; तात्काळ नासणें. 'जे शब्दीं बदोनि उभा। संसार-नासी॥' –दा १.२.९. **०पाहारा**-पु १ खडा पाहारा; अत्यंत काळजीपूर्वक, डोळ्यांत तेल घालून केलेली राखण. २ सारखें उभें रहाणें, बसावयास फुरसत न मिळणें; एकसारखे कष्ट; विश्रांतीचा

अभाव. 'दिवसभऱ्याच्या उभ्या पाहाऱ्यांत अंग भरून येऊन रात्रीं मेलं केव्हां एकदां आडवी होईन असं होऊन गेलं.' –नाटथछटा (फाटक) २. ३ (ल.) एकसारखी केलेली चाकरी, सेवा; एखाद्या आजाऱ्याची एकसारखी केलेली सारखी शुश्रूषा. **०पाऊस**–पु मोठा, सरळ धारांनीं पडणारा पाऊस; न खळणारा पाऊस **०बाजार**–पु. १ या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व बाजार सगळी बाजारपेठ. 'तूं दिलेल्या रंगाची लोंकर उभ्या बाजारांत मिळत नाहीं.'. २ भरबाजार; बाजाराचा मध्य भाग; चव्हाटा. 'उभ्या बाजारांत कथा। हें तों नावडे पंढरीनाथा ॥.' **०मार्ग**–पु. १ राजरस्ता; सार्वजनिक रस्ता; रहदारीचा रस्ता; मोठा रस्ता; हमरस्ता. २ या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व, सगळा रस्ता. ३ सरळ रस्ता; आडवा नसलेला, वांकडातिकडा नसलेला रस्ता. ४ (ल.) सरळ, प्रामाणिकपणाचें वर्तन, शहाजोग व्यवहार. **उभ्यामार्गानें जाणें, येणें**–न. सरळ मार्गानें, न थांबतां, वांकडे तिकडें न जातां जाणें. **०माल**–पु. तयार झालेलें, पण न कापलेलें शेतांतील पीक. **उभ्या मालाची पाहाणी**–स्त्री. शेतांतील पिकाचा अंदाज. **म्ह०** उभ्यानें यावें ओणव्यानें जावें=वेळ प्रसंग पाहून वर्तन करावें, नम्रतेनें वागावें.

उभाईत—वि. (कों.) समाईक; दोघांच्या मालकीचा. उभागत पहा. [सं. उभयतां]

उभाउभी—क्रिवि. त्वरेनें; घाईघाईनें; लवकर; तात्काळ; ताबडतोब. 'उभाउभी फळ। अंगीं मंत्राचिया बळ ॥.' –तुगा २४.७२. [उभा द्वि] **०घाईघाईनें**–वरील अर्थ पहा.

उभा खडपा-सूळ—पु सरळ, लंबरेषेंत असलेला, डोंगराचा खडपा, कडा, सुळका. [उभा+खडपा, सूळ]

उभांग—वि. उंचट; सामान्यापेक्षां अधिक उंची असलेला; उंचेला; उभार; अंगापिंडानें चांगला [उभा+अंग]

उभागत—वि समाईक; वाटण्या न केलेलें; दोन मालकांचें (शेतांतील उभें पीक इ०). उभाईत पहा. [उभय+गत]

उभाट-ड—वि. उंच; उंच बांध्याचा (मनुष्य वगैरे), सरळ, वर वाढणारें, न पसरणारें (झाड वगैरे). [उभा]

उभाड, उभाडांग, उभाड्याचा, उभाटा—वि वयाच्या मानानें अधिक उंच; विशेष वाढ झालेला; जोमदार; चांगला तयार; सशक्त; (मुलगा, झाड इ०).

उभार—स्त्री. १ उंची; उभट, उंचट आकार, डौल (पात्र, पागोटें इ०चा). २ उभारणी; रचना. 'ब्रह्मांडपिंडउभार। पिंडब्रह्मांड संव्हार।'–दा १२५.१४. ३ बायकांच्या चोळीचे पुढील दोन तुकडे. –पु. १ उत्साह. २ गर्व; ताठा.–वि. १ उंच, वर आलेलें, भरलेलें. 'उभार छाती तरतरित। सुरुप गुणानें अशी जी कांता ती पाणी करते झरझरित।' –प्रला १६८. २ आडवें नसलेलें; सरळ; उंचवट (पात्र, पागोटें इ.) [सं. उद्+भृ-भर; उभा+आकार]

उभार—पु. १ उवार; ऊर; पुरेसा होऊन अधिक राहिलेला, अवशिष्ट पदार्थ. २ घोड्याच्या तोबऱ्यांतील घोडयानें खाऊन उरलेले दाणे; चारण्याच्या दाण्यांतून पुढें दुसऱ्या वेळीं चारावयाकरितां काढून ठेवितात तो दाणा. [उवार पहा]

उभारणी—स्त्री. १ मांडणी; रचना; बांधणी; पसारा; विस्तार. उभवणी पहा. 'ऐसी जाली उभारणी। आतां ऐका संव्हारणी।' –दा ११ १.११. 'विश्वाची उभारणी व संहारणी हा क्षराक्षरविचाराचाच प्रमुख भाग आहे.' –गीर १६६. २ उभें राहण्याची क्रिया. 'कठ दाटला दोघांचा। उभारणी जाहली रोमांचा।' [उभारणें]

उभारणी—स्त्री. उंसाचा रस कढवितांना त्याला येणारी उकळी. [सं. उद्+भृ] **उभारणीस येणें**–तयार होण्यापर्यंत पोचणें; सिद्धसमीपावस्थेस येणें.

उभारणें—उक्रि. १ उभें करणें; रचणें; स्थापन करणें; सरळ, लंबरेषेंत बसविणें. 'परी महाभूतांचें दळवाडे। उभारी भलें।'–ज्ञा ५.७८. २ चालू करणें; सुरू करणें; गति देणें (धंदा, काम वगैरे) स्थापना करणें. 'लॉर्ड रेडिंग यांनीं लष्करी कोर्टें उभारण्याची चुकी केली.' –के १०.६.३०. ३ वर आणणें; ऊर्जितावस्थेस आणणें; पुढें आणणें (व्यापार, धंदा). ४ प्रवृत्त करणें; पुढें करणें. ५ वर उचलणें; उंची वाढविणें (ठेंगण्या वस्तूची किंवा इमारतीची). ६ उत्पन्न करणें; कल्पिणें; मनाशीं बांधणें (तर्क, कल्पना, पद्धति वगैरे). 'म्हणुनी तर्क उभारिती कामिनी।' ७ (शिवण) एखादें शिवावयाचें वस्त्र तुकडे जोडून व धांवदोरा घालून एकत्र करणें; कच्चें काम करणें; एखादा सांगाडा वगैरे तात्पुरता रचणें. –अक्रि. १ उठणें; उभें राहणें; ताठ, खडा होणें; सरळ होणें. 'पालवितो करीं उभारूनि बाहे। कृपावंत पाहे मजकडे।' २ उभें राहणें; सरळ होणें (केस वगैरे). ३ वर येणें; उठणें; उत्पन्न होणें; बाहेर पडणें (पुळी, गळूं वगैरे). 'तो तसा गिळितसा न उभारे'–गजेंद्रमोक्ष (रघुनाथ पंडित) ३७. [उभा, उभार]

उभारत—क्रिवि १ समाधिक मालमत्ता, भांडवल, मालकीची वस्तु वगैरेचे निरनिराळे मालकीचे विशिष्ट भाग प्रत्यक्ष न पाडतां; एकत्रित रीतीनें. २ अनिर्णित; विचार चालू असतांना; शेवटास गेलें नसतांना; निकालांत न निघतां. 'माझी पंचाईत उभारत राहिली आहे.' ३ सामान्यतः विशिष्टव्यक्तीस उद्देशून नसलेलें; सर्वसाधारण (भाषण). 'या गांवचे लोक फार लबाड असें मी उभारत बोललों आणि तुलाच कां राग आला?' ४ पक्का ठरलेला नसतांना (पगार वगैरे); दोन्ही बाजूंनीं निश्चितपणें मान्य केलेली नसतांना (किंमत, अट वगैरे); नक्की न तोलतां; अमोज; अमाप (धान्य वगैरे). 'त्या शेतांचें धान्य म्या उभारत त्याचे स्वाधीन ठेवलें.' **उभाईत, उभागत** पहा. [उभार?] **०पणा**–पु. निःपक्षपातीपणा; निस्पृहता.

उभारस्ता—उभामार्ग पहा.

उभारा—पु. १ उभारणी; रचना; विस्तार, मांडणी. 'तरी सत्यचि गा धनुर्धरा । सर्व कर्मांचा उभारा ।' –ज्ञा १८ ३०४. २ स्थिति; अस्तित्व; 'शीत उष्ण पंजैन्यधारा । अगीं न लागती अंबरा । तेवीं साधूचा उभारा । द्वंद्वसंभारानिर्द्वंद्व ।' –एभा ११. ९४७. ३ शरीराची ठेवण, बांधा. 'अंगें सर्वांग सुकुमार । मनोहर उभारा ।' –एहस्व १५ ५०. [उभा+कृ] ४ पोकळ अवसान; उठाबणी; आकार; डौल. 'तुका म्हणे उभाऱ्यानें । खरे कोण मानितसे ।' –तुगा ३१८६. ५ फैलाव; दरवळणें; पसरणें; प्रसार, विस्तार. 'जैसा कस्तुरीचा निकरा । तेवें परिमळाचा उभारा । तैसा ज्ञानें शिष्यवरा । जन्मलासि तूं ।' ६ चालू स्थिति; स्थिरता, अस्तित्व. 'ऐश्वर्यासी ईश्वरा । जियेचे आंग संसारा । आपलाही उभारा । आपणचि जे ॥' –अमृ १.२९. [सं. उद्+भृ, उभार]

उभारा—पु. १ इच्छा; प्रवृत्ति; उमाळा 'वनि व्याघ्र वृका दिक सारे हिंसेचा त्यजति उभारा ।' –देप ८८ ४. २ उसाचा रस कढवितांना त्यास येणारी उकळी, ऊत. (क्रि० येणें). 'रसास उभारा येतो म्हणजे...रस उतूं जाऊं लागतो.' –कृषि ४७२. **उभारा धरणें**–पुढाकार घेणें; उद्युक्त होणें. 'परित्राणाय साधूंच्या उभारा, धरी निवटाया सर्व भूमिभारा ।' –कृष्णजन्म (देवनाथ) ३८. [उद्+भृ–भर]

उभारा-ळा—पु. नालबंदाची ऐरण, ठोकळा. [उभार]

उभारिणें—उभारणें पहा.

उभारी—स्त्री. (व.) बैलगाडींत भरती जास्ती व्हावी म्हणून उभी लावलेली काठी. खुंटाचे खाचरांत कापूस वगैरे भरण्याचे वेळीं खाचराच्या टोंकावर भोंवतालीं दोन हात लांबीचीं उभीं दांडकीं लावतात तीं. [सं. उद्+भृ–भर]

उभारी—स्त्री. उत्साह; नेट; जोर. (क्रि० धरणें) 'अरी भारी भारी अवघड उभारी धरितसे ।' –द्रौपदीवस्त्रहरण (किकर) ४३. [उद्+भृ–भर]

उभारू—पु. (काव्य.) १ ताठा; दांडगेपणा; मगरूरी. २ उभार, उभारणी, उभवणी पहा.

उभा लगाम—पु. कमानदार लगाम. [उभा+लगाम]

उभावणें—उभणें, उभविणें पहा. 'नीलाकुरोद्रेक मध्यें उभावे –मुद्गलार्या भाषांतर (हरिराज) ८७.

उभा शिवार—पुन. न कापलेलें, उभें पीक. **०टाकून जाणें–पळणें**–परचक्र वगैरे आलें असतां पीक काढून न घेतां, कांहीं बरोबर न घेतां पळून जाणें. [उभा+शिवार]

उभासणें—अक्रि. भास होणें; दिसणें. –शर (वामन–चित्सुधा १) [सं. उद्+भास्]

उभासूळ—उभा खडपा, कडा पहा.

उभासोट—वि.क्रिवि. अगदीं सडक उभा; उभाच्या उभा. [उभा+सोट]

उभाळ—पु (व.) ज्वाळा. उबाळा अर्थ ३ पहा.

उभाळा—पु. उबाळा, उमडा पहा. 'दुःखाचे डोंगर उभाळा सुटला.' –ऐपो ३३६.

उभी—उभा पहा. **०कुडी**—स्त्री. उंच, सडपातळ बांधा; उभी ठेवण. 'ही गाय उभ्याकुडीची आहे.' [उभा] **०चाकरी**–स्त्री. त्रासदायक, जिकिरीची चाकरी, सेवा. **०चतुर्थी–चौथ**–स्त्री. वद्यपक्षांतील चतुर्थी; संकट चतुर्थी. या दिवशीं सकाळपासून चंद्र उगवेपर्यंत उभें राहण्याचें कांहीं व्रत असतें. [उभी+चतुर्थी, चौथ] **०दुपार**–स्त्री. भर दोन प्रहर; ऐन दुपारची वेळ; ऐन माध्यान्ह. **०धांव**–स्त्री. सरळ, वर, डोंगरावर चढणें. 'उभी धांव घ्यावी गिरी तो चढावा.' –दावि १४५. **०पेठ**–स्त्री. या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचें सर्व शहर, बाजार; उभा बाजार पहा. **०रास**–स्त्री. १ मोज–माप न करितां, न विभागतां जशीच्या तशीच ठेवलेली धान्याची रास, शेतांतून आणलेलें धान्य प्रथम नुसतें ढीग करून ठेविलेलें असतें त्यास म्हणतात. २ (ल.) सर्व मालमत्ता; कुटुंबाची अविभक्त व मोल न केलेली मालमत्ता, संपत्ति, जिंदगी. **अज-मास उभी रास–गल्ला**–पिकाचा किंवा धान्याचा अंदाज. **०विळी**–स्त्री. ज्या विळीचें पातें मोडतां येत नाहीं किंवा मिटतां येत नाहीं अशी विळी.

उभीं—क्रिवि. उभ्याउभ्या; घाईनें. 'मनादिकें व्यापारु । सांडिती उभीं ।' –ज्ञा १८.७३७. [उभा]

उभें—१ उभारणी; मांडणी. 'म्हणोनि समभागें शुभाशुभें । मिळोनि अनुष्ठानाचें उभें ।' –ज्ञा १८.२४७. २ वस्त्र सरासरी नुसतें गुंडाळून घ्यावें असा स्त्रियांचा वस्त्र नेसण्याचा प्रकार.

उभें—वि. उभा पहा. **०काम**–न. जरूरीचें, अगत्याचें, निकडीचें काम. 'माझीं अगदीं उभीं कामें तीन आहेत, तेव्हां मला तुमच्या बरोबर यावयास फुरसत नाहीं.' **०कुंकू**–न. वैष्णव स्त्रिया लावतात त्या पद्धतीचें, उभ्या गंधासारखें (बदामी आकाराचें) लावलेलें कुंकू. **०कुंड**–न. (चांभारी धंदा) चामडें भिजत ठेवण्याकरितां लागणारें रांजणाच्या आकाराचें खापराचें कुंड. **०खाणें**–क्रि. सर्वसमूळ नाहींसें करणें. 'लोह उभें खाय माती । तें परिसाचिये संगती । सोनें जालया पुढतीं । न शिविजे मळें ।'–ज्ञा १८.१४०७. **०नेसणें–घेणें–लावून घेणें–लावणें**–(लुगडें, पडदणी, धोतर वगैरे)=तात्पुरतें (सरासरी दहा–अकरा हात) वस्त्र, प्रथम पदर घेऊन बाकीच्या वस्त्राच्या निऱ्या करून पोटावर मधोमध धरून उजवी कडील पदराचें आणि डावीकडील पदराचें अशीं दोन टोकें घेऊन त्यांस निऱ्यांवर घट्ट गांठ मारल्यावर शेवटच्या पदराचें टोंक धरून कासोटा घालणें; कसें तरी एखादें वस्त्र नेसणें; स्नान करण्याकरितां

लहानसें वस्त्र नेसणें; आडवें नेसणें याच्या उलट. या दोन वाक्प्रचारांचे अर्थ कोंकण व देश या प्रांतांत परस्परविरुद्ध आहेत. कोंकण प्रांतांत आडवें नेसणें याचा अर्थ व्यवस्थितपणानें व पद्धतशीरपणानें नेसणें असा होतो, तर देशावर, आडवें नेसणें याचा अर्थ आड लावून घेणें, तात्पुरतें किंवा लहान वस्त्र नेसणें असा होतो. **०पीक**–न. शेतांत तयार झालेलें पण न कापलेलें पीक. 'या जागेंत उभीं पिकें असून...' –डुकराची शिकार (बडोदें) २०. **०वर्ष**–न सबंध वर्ष; आरंभापासून अखेरपर्यंत वर्ष. 'उभ्या वर्षांत मी आईबापांना भेटलों नाहीं.' **०दुखणें**–न. आंथरुणास न खिळविणारें, सार्वे दुखणें; किरकोळ दुखणें. **०पण**–न. १ उभा असलेली स्थिति. २ (ल.) जिवंतपणा. 'आतां उभयां उभेपण नाहीं जयाचें। मा पडिलिया गहन कवण तयाचें।'–ज्ञा ८.६३. **०पळणें**–क्रि. उभ्याउभ्या, न थांबतां एकसारखें पळत जाणें. **०वारें**–न १ गडबड; गोंधळ; धांदल; त्रेधा. २ उदासीनता; औदासिन्य. (क्रि० सुटणें). **०वैर**–उभादावा पहा **०सुकणें**–१ झाड उभ्या स्थितींत असतांच वाळणें.२ सर्व शरीर दुःखानें, काळजीनें कृश होणें, वाळणें. 'लेकरूंवाचेनि दुःखें। जेवि माउली उभी सुके।' –ऋ ४६.

उभेआं—क्रिवि. उभें; उभ्यानें. 'तुआं लग्न लावावें श्रीचक्रधरा। उभेआं ठाकौनि।' –शिशु ७२७. [उभा]

उभेउभ्या, उभेउभ्यांनीं—क्रिवि. ताबडतोब; घाईनें; तत्परतेनें; तत्क्षणीं; तेथ्हांच. [उभा]

उभेंटा—वि. उभंट, उभट पहा.

उभेंट्या—क्रिवि. (गो.) उभ्यानीं; उभ्यानें. [उभा]

उभेणें—अक्रि. १ उभें राहणें; उभणें. 'उठोनि उभेला सन्मुखी.' –दावि ४०१. २ उभारणें. 'रामराज्याची उभेली गुढी.' –दावि १६७. [उभा]

उभेया—क्रिवि. १ उभ्या; उभ्या स्थितींत. २ (ल.) जिवंतपणीं. 'उभेयां उभेपण नाहिं जयाचें। पडिलेयां गहन कवण तेयाचें॥' –ज्ञा ८.६२.

उभैता—वि. दोघे; दोन्हीं; उभयतां पहा. [सं. उभयतः]

उभौ—वि. दोन; दोघे. 'कां उभौ येकत्वीं वर्णितां॥ –दावि २५७. [सं.]

उभ्यां उभ्यां, उभ्यां उभ्यांनीं—उभेउभ्यां, उभ्याघाईं पहा. 'तूं जरा बैस, मी उभ्यां उभ्यां जाऊन येतों.' [उभा]

उभ्यांघाईं—क्रिवि. १ उतावीळपणानें; अतिशय घाईनें; उत्सुकतेनें; उत्कंठेनें (हांक मारणें, ओरडणें इ०) (क्रि. करणें). २ मोठ्या कळकळीनें; आग्रहानें; जोरानें (धांवणें, विनविणें इ०). [उभा]

उभ्या जन्मांत—क्रिवि. सबंध आयुष्यांत, कारकीर्दीत. 'धृतराष्ट्रानें ही करामत उभ्या जन्मांत एकदांच केली.' –भा ३९.

उभ्यानें—क्रिवि. १ उभें राहून; ताठपणानें. २ अविनयानें; मग्रूरीनें. **ग्रह०** उभ्यानें मुतावयाचें मग गुरूला काय विचारावें=जाणून बुजून करावयाच्या गैरशिस्त गोष्टीबद्दल सल्ला विचारणें हें मूर्खपण.

उभ्या पायानें—क्रिवि. अतिशय तत्परतेनें 'शंकरजी व परशुराम हे दोन महत्त्वाकांक्षी ब्राह्मण नेहमीं बाईसाहेबांच्या तैनातींत उभ्या पायानें असतात.' –स्वप १३१.

उमकळणें—सक्रि. (गो.कु) लोंबकळत ठेवणें, टांगणें. [उत्+कलन=धरणें]

उमका-खा—स्त्री. उत्कट इच्छा; प्रवृत्ति; आवेग. 'बोलण्याची मला उमका नव्हती.' कोरकि ४६३. [सं. उद्+मनीषा]

उमग—पु १ आढळ; शोध (लपलेली, हरवलेली गोष्ट); ठावठिकाणाचें ज्ञान (क्रि. पडणें; पाडणें) 'कुंतीचा भाउ मग स्थिर राहे चित्त आसलाभा उमग।' –मोकृष्ण ४९ ६. २ समज; समजूत. उमज पहा. [उद्+मज्ज्; प्रा. उम्मग्ग=वर येणे, तरंगणें]

उमगणें, उमंगणें—अक्रि. १ आढळणें, दिसणें. सापडणें; शोध लागणें. २ शोधणें; धुंडाळणें; ओलखणें; समजणें. 'काळातें दमणार मी उमगिते धुंडोनियां बाळ जी॥'–आपु ९. 'हें अक्षर अमक्याचें असें मी उमगीन.' 'समुद्रावरील वाळवंटातला एखादा खडा नाहींसा झाला असतां कुणाला उमगला जाणार नाहीं ...' –नि २४४. –अक्रि. उघडकीस येणें; जाहीर होणें; गुप्त न राहणें; उलगडा होणें; प्रकाशांत येणें. [सं. उद्+मज्ज्; प्रा. उम्मग्ग]

उमगा—वि. (कर्ना.) उमगावयाची; गुपित; गुप्त (गोष्ट). [उमग]

उमग्या—वि. उमगून काढणारा; शोधून काढणारा; धुंडाळणारा. [उमग]

उमच—स्त्री. उपकारांची परत फेड; प्रत्युपकार. [सं. उद्+मज्जन; प्रा. उम्मज्ज]

उमचणें—अक्रि. उपकारांतून बाहेर पडणें; उपकाराची फेड करणें; उसनें फेडणें. 'हारी उमचावया। जुंवारी जैसा ये डावा॥' –ज्ञा १३.५४१. 'आणि दान जया द्यावें। तयातें ऐसेया पाहावें। जया घेतलें नुमचवें। कायसेनहीं॥' –ज्ञा १७.२७८. [सं. उद्+मज्जन]

उमचळणें—क्रि. उन्मळणें; उपदून येणें; उलथून पडणें (झाड वगैरे); उमचून पडणें असा सामान्यतः प्रयोग. [सं. उत्+चलन]

उमज—पु. १ समज; समजूत; बोध; ज्ञान; उमग. 'तुम्ही बहु भले मला उमज होय ऐसें कथा.' –केका १००. 'उमज पडला भीमसेना॥' –मुआदि २९.१०५. 'पाप करूं नये म्हणून म्हटलें तस्मात् पापानें नाश होतो असा उमज पडतो.' २ आकलनशक्ति; शहाणपणा; अक्कल 'कासवीचे परी पाहें दृष्टीं मज। विज्ञानी उमज दावुनियां॥' –तुगा १०८०. (क्रि० दाखविणें; दावणें;

देणें). ३ (कु.) पहिली नांगरणी; नांगरणीचे जे उमज, दुरो, तास, अडास हे चार प्रकार त्यांपैकीं पहिला प्रकार. [सं. उद्+मज्ज्] ०समज–स्त्री. वरवर; सामान्य समजूत, ज्ञान (पक्कें नव्हे).

उमजणें––उक्रि. १ समजणें; लक्षांत येणें; समजूत पडणें; माहीत होणें; 'असें उमजतां भलेन गुरुभाव तो टाकिती.' –केका ९७. उमजणें व समजणें यांमध्यें असा फरक आहे कीं समजणें यानें केवळ सामान्य ज्ञान होतें, परंतु उमजणें म्हणजे पूर्णपणें समजणें; आंतील रहस्य माहीत होणें असा बोध होतो. उ० हा मघासीं समजला होता परंतु उमजला नव्हता. २ आजारांतून उठणें; टवटवीत होणें. ३ जागृत होणें; सावध होणें. 'जया दोघांमाजि येखादें। विषाये उमजलें होय निर्दे ॥' –अमृ १.१४. ४ (गो.) मापाचा उतार पहाणें; उमुंचें. [सं. उन्मज्जन]

उमजीक––वि. १ तत्काल उमजणारा. २ (ल.) बुद्धिवान; हुषार; चलाख; तीक्ष्ण, तीव्र बुद्धीचा. [उमज]

उमट––१ आढळ; शोध; थांग; प्रकटता; परिस्फुटता. (क्रि० पडणें). २ स्पष्ट; ठळक; प्रामुख्यानें पुढें येणें, दिसणें (अज्ञात गोष्ट). ३ निश्चित; पूर्ण कल्पना; ज्ञान; समज (क्रि. पडणें; होणें). ४ उबळ; मळमळ, उवक; आवेग (ओकारीचा वगैरे). [सं. उन्मथ–उम्मट]

उमटणें–उमंटणें––अक्रि. १ दिसणें; आढळणें; प्रकट होणें; जाहीर होणें; उघडकीस ये. 'हा राजकुमरु उमंटला.' –उषा ४८. ४२. २ स्पष्ट होणें; स्वच्छ होणें; पूर्ण होणें (ध्वनि, आवाज वगैरे). 'शब्द ना उमटती पुढती.' –संग्रामगीतें ७२. ३ वर येणें; उठून दिसणें; स्पष्ट होणें. 'तैसें अवयेवु उमटलें। वालिपें आडोनी।' –शिशु ७२०. 'उमटती अंगावरी कांटे।' –गीतार्चंद्रिका २९. ४ उत्पन्न, उद्भूत होणें; उपजणें. 'ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ। कांहो कळवळ तुम्हां उमटेचि ना।' –तुगा ४५२. 'ऐसा हा सत्त्व गुण। देहीं उमटतां आपण॥ –दा २.७.८. ५ (ठसा, चित्र, प्रतिबिंब इ०) वठणें; स्पष्ट दिसणें; स्वच्छ, अंकित होणें. 'जेथ हें संसार–चित्र उमटे.' –ज्ञा ५.१५६. ६ बाहेर पडणें, येणें. 'वरुणावती बाहेर सप्तयोजन, द्वार केलें उमटावया।' –पांप्र १०.१४७.७ (गा.) उपटणें; उपदून काढणें. [सं. उन्मथ्–उम्मट]

उमटणें––उवटणें पहा.

उमटा––पु. (व.) आवड; नाद. (किंचित तिरस्कारव्यंजक). 'तिला खाण्याचा मोठा उमटा आहे.' [सं. उद्+मन्–मत; प्रा. उम्मत=उत्कंठा]

उमठणें––उमटणें पहा.

उमंडणें––क्रि. उमटणें; उत्पन्न होणें; सांपडणें. उमटणें पहा. 'मृगजळ जेथें उमंडे। तेथें असे पां कोरडें।' –अमृ ६.३४. [उमटणें]

उमण––(गो.) ओमण पहा.

उमणणें––क्रि. मापणें, भोजणें; उमाणणें पहा. [सं. उद्+मा]

उमतणें––उक्रि. (माण.) ओतणें. [सं. उद्+मथ्]

उमती––स्त्री. उमेदी; ज्वानी; तारुण्य. 'छान छवेली सुरत फाकडी पुढें उमतीमधें येणारू।' –पला ४.४०. [सं. उद्+मद्–मत्त; प्रा. उम्मत्त]

उमथा––वि. (गो.) पालथा; उपडा. 'उमथ्या कळशार पाणी.' =पालथ्या घागरीवर पाणी. [सं. उद्+मथ्; प्रा. उम्मत्थ=अधोमुख]

उमदगी––स्त्री मोठेपणा; थोरवी; मातब्बरी; संपन्नता. [अर. उम्दगी]

उमदळणें––अक्रि. उमळणें; मळमळणें; काल्वाकालव होणें; ढवळणें (पोटांत). 'मला उमदळतें.' 'पोटांत उमदळतें.' [सं. उद्+मूलन] –सक्रि. कालवणें; ढवळणें; गढूळ करणें (पाणी इ०). [सं. उद्+मूलन किंवा उन्मदन; प्रा. उम्मलण]

उमदा––वि १ थोर; श्रेष्ठ; शूर; पराक्रमी; विश्वासु; मोठ्या मनाचा २ भव्य; सुंदर; देखणा; पाणीदार (माणूस, वस्तू) [अर. उम्दा

उमदा––पु (व.) जागरण; श्रम. [सं. उद्+मद्]

उमन––स्त्री. (कु.) पहिली नांगरणी. उमज पहा. [सं. उद्+मथ्]

उमन––पु. (सोला. माण.) उखाणा. [सं. उद्+मन्]

उमप, उमाप––वि. पुष्कळ; अतिशय; खूब; अमोज; अगणित; 'जें एकें वळें फेडावा भारू। उमपपणाचा॥' –शिशु ७५. 'डाहाळिया जाती उमपा। ऊर्ध्वाही उजू॥' –ज्ञा १५.१४४. [सं. उद्+मा]

उमपणें––उक्रि. वर येणें; उडणें. 'मग ते निघाली तेथोन। तत्काळ उमपली गगन॥' –कथा १.६.१५९ [सं. उद्+मा]

उमर––उंबर पहा.

उमर, उम्मर––स्त्री वय, आयुष्य. 'विसां आंत उम्मर, नरम कंवर, पितांवर पेंठणचे नेसल्यें!' –प्रला २२९. [अर. उम्र]

उमरठ–ठा––पु दाराच्या चौकटीची खालची बाजू; उंबरठा. उंबरा पहा. [सं. उंबर; प्रा. उम्मर]

उमरडणें––क्रि. १ ओलांडणें; उल्लंघन करणें; सोडणें; त्याग करणें. 'स्वर्गाची आडवंगी। उमरडुनि॥'–ज्ञा १३.१६२. –एभा १०.४. [सं. उद्+मृद्; म. उमरा+सोडणें]

उमरदराज––पु. चिरंजीव; पुत्र; मुलगा. [अर. उम्र]

उमरा––पु. उंबरठा. उंबरा पहा. [सं. उंबर; प्रा. उम्मर]

उमराव––पु. सरदार; मानकरी; श्रेष्ठ जन; अमीर; खासा. 'राजे बाहादर रंगराव होळकर स्वतां आदि उमराव.'–ऐपो २६७. [अर. अमीर अव.] ०जादा–दी–पु. सरदाराचा मुलगा, मुलगी.

उमलणें—अक्रि. १ विकासणें; फुलणें. 'तें उमललें अष्टदळ। ठेऊं वरी॥' –ज्ञा १५.६. २ भेग पडणें; फुटणें; उकलणें. ३ सैल होणें; विरघळणें (कपड्यावरचा मळ, चुन्याची कळी, मातीचें ढेंकूळ वगैरे). 'वरचें खरकटें उमललें म्हणजे मग भांडें घांस.' ४ फुगणें; लाही व्हावयाजोगें फुलणें. (भिजत घातलेलें धान्य वगैरे); ५ प्रफुल्लित होणें; उल्हासयुक्त होणें (मन वगैरे). ६ प्रकट होणें; उत्पन्न होणें. 'परी येकी केधवां गेली। शाखाकोडी केधवां जाली। हें नेणवे जेवीं उमलणें। आषाढअभ्रें।' –ज्ञा १५.१२५. –उक्रि. १ उचलणें; उखळणें (वाकवून घट्ट बसविलेलें खिळघाचें टोंक वगैरे). २ सुटें करणें; उघडणें, खोलणें (कोंबडघाचीं मिळविलेलीं दोन टोकें वगैरे). ३ क्षार लावून तापवून सांधणें, एकत्र करणें (सोन्याच्या दागिन्यांचीं टोकें) ४ सोलणें; मोकळें करणें; काढून टाकणें (धान्य भिजवून त्यांचीं सालें वगैरे). [सं. उद्+मील-उन्मीलन; प्रा. उम्मीलण]

उमला—उबला पहा. 'उमले व डोंगळे यांचें विष जालीम असतें.' –प्राणिमो ११८

उमलें—न. १ आधण घालून भिजत ठेवलेलें भात, जोंधळे वगैरे (लाह्या वगैरे करण्याकरितां). २ (व.) सपीट, रवा वगैरे काढण्याकरितां भिजत ठेवलेले गहूं. 'रव्यासाठीं उमलें कालच केलें, आज तें दळून द्या.' [सं. उद्+मील्]

उमलें—न. मळमळ; उमळ पहा.

उमस—पु. १ श्वास; दम, उमास–सा. २ उसंत; विसावा, विश्रांति; अवकाश, स्वस्थता; स्वास्थ्य. 'सत्व उर्मी भेत-करणासही। उमस घेवो नेदी।' –ज्ञाप्र १३५. 'मागें असतासी कळला। उमस घेऊं नसता दिला।' –तुगा ४०९६. ३ स्फूर्ति; उद्भव; विस्तार. 'वाग्देवतेची स्तुति। वाचाचि जाहली वदती। तेंयें दैतासाचिये संपत्ती। उमस चित्तीं उमसेना॥' –एभा १.२८. [सं उद्+मिष्]

उमस—पु. उमज; समज, जाणीव. 'म्हणोनि आत्मा आत्मलाभें। नांदऊनि शब्द शोभे। येईल ऐसा न लभे। उमसु घेवों॥' –अमृ ६.९४. [उमज]

उमसणें—उक्रि. १ सांगणें; उघड करणें; प्रकट करणें. 'जीवु जावो परि तुमसे। ठेविला ठावो॥' –ज्ञा १३.२०२. २ प्रकट होणें; दिसणें; माहीत होणें. 'एवं द्वैतासीं उमसों। नेदुनि ऐक्यासि विसकुतों॥' –अमृ २.६९. [उमज]

उमसु-सो—पु. विसावा. उमस पहा. 'उमसु नाहीं युद्ध सप्त अहोरात्रें' –कुमुरा ६९.२८.

उमळ—स्त्री. १ मळमळ; ओकारी वाटणें. २ उमाळा पहा. [सं. उद्+मूल]

उमळ-ट—स्त्री. उपळ पहा. १ पावसाचें पाणी जिरून जमिनींतून झरे वाहूं लागण्याची स्थिति; उपळ. २ फुरसें, घोणस वगैरे चावलें असतां अंगांतून रक्त वाहूं लागण्याची स्थिति. ३ अकालीं गर्भस्राव होणें. ४ उष्णता व आर्द्रता यांमुळें फळें कुजून त्यांतून रस वहावयास लागणें अशी स्थिति. ५ मऊ होणें (कळीचा चुना, मातीचें ढेंकूळ इ.). [सं उद्+मूल्] **॰पडणें**–अतिशय पाऊस पडल्यामुळें पीक कुजावयास लागणें.

उमळणें—क्रि. उमळ यापासून क्रियापद. उपळींनें विशिष्ट होणें. उमळ, उमळणें, उबटणें पहा.

उमळणें—क्रि. फुलणें; उमलणें (कळी वगैरे). [सं. उद्+मील्]

उमळणें—उक्रि. (कु. गो.) धुणें; खळबळणें (वस्त्रें, भांडीं वगैरे) [सं. उत्+मल्]

उमळणें—अक्रि. १ पोटांतील कोंवळ्या गर्भास उष्णविकृति झाल्यामुळें तो खवणें, पडणें. २ उलथणें; उपटून येणें 'इया उमळती दाढा। दांतांसहित।' –ज्ञा १३.५६४. 'पदस्पर्शें ज्याच्या तरुयुगुल तत्काळ उमळें।' –सारुह १.५७. [सं. उद+मूल]

उमळशीक—स्त्री. (गो.) उत्कंठा; आतुरता; औत्सुक्य. [उमाळा; प्रा. उम्मला=तृष्णा]

उमळा—वि. (राजा.) बुळबुळीत; मळमळीत; गळगळीत; लिबलिबीत (पातळसर अन्न, ज्यांतून रस पाघळत आहे असें फळ, वगैरे). [उमळ]

उमळावण—स्त्री. (राजा.) मळमळ; पोटांत ढवळण्याची क्रिया; तोंडास ओकारीपूर्वी पाणी सुटतें ती स्थिति. (क्रि० सुटणें; येणें.) [उमळ+पाणी; उमळणें प्रयोजक]

उमळी—वि. स्वतंत्र; निर्बंध. –ख ९३१.

उमळी—स्त्री. एक झुडुप. उंवली पहा.

उमा—स्त्री. पार्वती; गौरी; दुर्गा. **॰कांत-वर**—पु. उमेचा पति; शंकर, शिव 'तांडव विसरले उमाकांत। अति अद्भुत हरिलीला।' –एरुस्व ३.१०. [सं. उमा=पार्वती+कांत, वर=नवरा]

उमा—पु. (गो.) मुका; चुंबन. –क्रिवि [ध्व. का. उम्मु=चुंबन]

उमा—वि. (व.) खेडवळ; अडाणी; साधा; भोळा; अशिक्षित. 'आपण मराठी उमें माणूस, आपणाजवळ दाखला नाहीं.' [सं. उन्मत्त? दे. उम्मइय=मूढ; अर. उम्मी=अशिक्षित]

उमाडा—पु. उमाठा पहा. 'अवनीचे उमटे उलले।' –कुमुरा ४१.२५.

उमाड, उमेठ—वि. उंच; उंचवट; वर आलेलीं; फुगलेलीं. (जमीन) (पाणथळच्या उलट). [सं. उद्+मस्त(क)]

उमाठा—पु. १ उंचवटा; उंच जागा; डोंगराचा माथा. 'उमठथावरी येतसे सूर्य जेव्हां।' 'एके उमाठथाचे जाग्यावर उभी राहून... तिनें तिला हाका मारल्या.' –बाळ २.१६६. २ द्वार; उंबरठा. 'एक

श्रवणाच्या राजबिदीस आले। तेथून हरिरूप निर्धारिलें। एक कीर्तनाच्या उमाठीं ठाकले। प्रेमें हरिरूप विलोकिती॥'–ह २३.२२६. **३** (ल.) प्रसिद्धि; (विशेषतः) कुप्रसिद्धि; बोभाटा; बभ्रा; एखादी गोष्ट उघडकीस येणें. (क्रि० होणें). (विरू.) **उमाळ्यास येणें.** स्पष्ट, ठळक दिसूं लागणें. (क्रि० पडणें; होणें). [सं. उद्+मस्त(क); प्रा. उम्मत्थ–उम्माथा; म. उमाठा]

उमाड—स्त्री. (कों.) तुफान, वादळ; खवळणें; क्षुब्धपणा (समुद्राचा) [सं. उद्+मद्, उन्माद]

उमाडा—पु. उमाळा. उबळ पहा. १ मळमळ, खळबळ (पोटांतील); पोटांत ढवळणें. २ जोराची उकळी; ऊत; उडणें (पाणी). ३ (ल.) हुंदका; आवेग, उमाळा (दुःख इ० विकारांचा) [सं. उद्+मद्]

उमाणणें—उक्रि १ मोजणें, मापणें 'हा संसार उमाणितें माप। कां अष्टांगसामग्रीचे दीप।'–ज्ञा ६.४६३. 'वारा उमाणावा वावें।'–एभा ११.१४६०. 'व्यास वाल्मीकि व्यापारी। कीर्तन केलें उमाणिती।'–भवि २९.५५. २ (ल.) हिशोब देणें; झाडा देणें. ३ ताडून पाहणें; तुलना करणें. 'तयांची उमाणितां कीर्ति। उणीव दिसे आपाडे।'–मुआदि ११.९३. ४ (ल.) अटकळ करणें; अजमास करणें. 'करीं गिरि धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा।'–ज्ञा १०.२८९. [सं. उद्+मा–मान; प्रा. उम्माण]

उमाणा—पु. १ माप. 'उमाणा घेऊनि परेशीं। सुखाडिजे।'–ज्ञा १८.५२२. २ तुलना; बरोबरी. 'चंद्रासि घे उमाणे। रसरंगीं भुलवणें।'–ज्ञा १३.११५७. [सं. उद्+मा–मान; प्रा. उम्माण]

उमाणा–णें—पुन. उखाणा; हुमाणा; कोडें; कूट प्रश्न. 'पुरुषेवाचुनी जाली। आपणा आपण व्याली। पोटीचे घेउनि गेली। उमाणें माझें।'–दावि ५०२. 'आतां मी पुसेन तें सांगावें उमाणें.'–निगा ९७. [हुमाणा]

उमाणी–णें—स्त्रीन. माप; मोजणी; झडती; अटकळ; अनुमान. 'कर्ता कर्तव्या घे उमाणें।'–ज्ञा १८.५००. [सं. उद्+मा]

उमानणें—उक्रि. मापणें; मोजणें; उमाणणें पहा. 'आगाधा जाणिवांतें उमानी'–ऋ ३. 'तेथ मापें उमानीति खरे। खोटें म्हणति'–ऋ १२१. 'तेयां रुखांचे उमानें। कवन घे।'–शिशु ६१९. [सं. उद्+मा]

उमाप—वि. अमूप; अमोज; अगणित; अतिशय. 'ब्रह्मांड भरुनि उरलें ऐसें सौभाग्य तें उमाप तिचें।'–मोभीष्म ५ २६. [सं. उद्+मा; म. माप] **म्ह०** उमाप लगीन सावधान=द्रव्याचा अतिव्यय अगर उधळेपणा या अर्थी ही म्हण योजतात.

उमापणें—उमाणणें पहा.

उमास–सा—पु. १ मळमळ; पोटांतील खळबळ; पोटांत ढवळणें. कालवणें (क्रि० येणें) २ उमाळा; आवेग; उकळी; लाट (हर्ष, शोक वगैरेचा). 'अभिमानाचे आळेपिळे। महत्त्वउमासे येती बळे।'–एभा ८.२१२. ३ उद्भवण्याची स्थिति, तयारी (वादळ, रोग, गर्दी वगैरेची). धुमसणें; पिकणें; तयार होणें. ४ खोकल्याची उबळ. ५ जंत वगैरे झाल्यामुळें होणारा अन्नद्वेष वगैरे (क्रि० येणें) [सं. उद्+मथ्; दे. उम्मच्छिअ=व्याकुळ]

उमास–सा—१ श्वास; उच्छ्वास; उसासा. (क्रि. टाकणें). 'अपरिमित तियेला येति तेणें उमासे'–सारुह ३.६३. 'मला उमासा टाकायाला फावत नाहीं.' २ विश्रांति; उसंत; विसावा. 'सैन्य पळालें दशदिशा। म्हणती त्राहें त्राहें जगदिशा भीमें आकांत मांडिला कैसा। पळतां उमासा घेऊं नेदी॥'–जै १३ ६३. ३ घेरी; बेशुद्धि. 'उमासा येऊनि पडिला वनीं। परी दृष्टीसि कोठें न दिसे पाणी॥'–महिपतिकथासारामृत २४.१९०. [सं. उद्+मिष्. प्रा. उम्मिस] **उमस, उमास खाणें**–विश्रांति घेणें; दम टाकणें.

उमाळ—क्रिवि. अतिशय; अमोघ, अगणित; अलोट. 'याजवर मागून उमाळ गोळ्या पडूं लागल्या.'–भाब १३८ [सं. उद्+मा]

उमाळा–ळी—पुस्त्री. १ मळमळ; पोटांतील खळबळ; कळमळ; उमळ. २ हुंदका; उकळी; आवेग, उसळी; लहर (राग, प्रेम, दुःख, शोक वगैरे विकारांची). 'स्वानंदाचे उमाळे देती। सारासार विचारें तळपति।' ३ तीव्र इच्छा. 'देहे खंगतां सर्व जाळी उमाळी.'–दावि १७८. ४ उकळी; कढ; ऊत (पाणी, दूध वगैरे पदार्थांचा). ५ सुटका; सोडवणूक; मुक्तता; मोकळीक (एखादा धंदा, कार्य वगैरेतून). (क्रि० पडणें). ६ लोट; गर्दी; हल्ला; उठाव. 'तो देखौनि यादवांचा उमाळा। एरी सिंहनादु दीन्हला॥'–शिशु १०४१; 'तैसे द्रव्याचे डाखळे। नाना दृष्टीचे उमाळे।'–अमृ ७.१४३. ७ उद्भव; जोर; प्रभाव. 'जेयांचा देखौनि उमाळा। पळे महामोहाचा पाळा।'–शिशु ३८४. 'भंगोनि विघ्नांचा उमाळा.'–मुआदि ३५. १०२. [सं. उद् + मूल; तुल० का. उम्मळु=श्वास घेण्यास येणारी अडचण, कफ] ७ (काव्य.) ज्वाला; झोत; लोळ; तरंग (आग, वीज वगैरेचा). 'कोटी रविशशि तेज उमाळा॥'–दावि ३३५. 'जैसे कल्पांतविजूंचे उमाळे।'–रावि ११ १२. [का. उम्मळ=उष्णता] **०पडणें**–अतिशय पाऊस झाल्यामुळें पिकें कुजावयास लागणें. उमळ पडणें पहा. **उमाळीं–उमाळीस–उमाळ्यां–उमाळ्यास पडणें–येणें**–उघडकीस येणें; माहीत होणें; दिसणें; आढळणें; बभ्रा होणें.

उमाळा—वि. (ना.) ओंगळ; मळका; घाणेरडा. [सं. उद्+मल्]

उमेठा—पु. १ समुदाय; मेळावा. 'उमेठेयां देवां निचनवा। आठाइतेआं देवां बंबाळु दीवा॥'–शिशु १५३. –वि. १ सामुदायिक; एकगट. २ अतिशय; पुष्कळ; उमाप. 'किंबहुना सात्विका आठां। चाचरु मांडतां उमेठा॥'–ज्ञा १८.१६०६. [सं. उद्+मित]

उमेद—स्त्री. १ आशा; धीर; भरंवसा; खात्री; विश्वास. 'त्याची उमेद अशी होती कीं,' २ आकांक्षा; हिंमत; उत्साह; धैर्य; हौस; अवसान; ईर्षा. 'अब्दालीचीं बोलावणीं बहुत उमेद लावून गेलीं.' –ख १.३४. ३ तारुण्य; ज्वानी; वय. 'आबाजी आपले उमेदींत आलियावरी त॥ म॥ देशमुखी कराव्यास आले.' –रा १७.५. [फा उमैद, उमीद्, उमेद] **उमेदीस येणें**–१ वयांत येणें; पणांत येणें (स्त्री वगैरे). २ जोमांत, भरभराटीस येणें (कार्य वगैरे). ३ बहार येणें (झाडास वगैरे).

उमेदगी—स्त्री उमेदवारी. 'हे उमेदगीची व रयासतीची कोण वजे (तऱ्हा) ते दर्यास करावी.' –ख ७.३५७ [फा. उमैद्, उमेद्]

उमेदणी-नी—स्त्री. (कों.) मळणी झाल्यावरचीं खळ्यांतील कामें (वारवणी, मापणी, साठवणी वगैरे). [सं उद+मथ; किंवा उद्+मर्दन]

उमेदवार-द्वार—वि.पु १ धीट; आशापूर्ण; हिंमतवान; निश्चयी; धीराचा. २ वयांत आलेला; तरुण; पूर्ण वाढ झालेला (मनुष्य, पशु, झाड वगैरे). 'गडी पडला उमेदवार!'–मोर ९. ३ इच्छू; गरजू; पदान्वेषी. 'तुम्ही इकडील लक्ष्यांत राहून कल्याणचे उमेद्वार (हितेच्छु) असावें.' –रा ८.५. ४ अर्जदार; नोकरी मिळण्याकरितां खटपट करणारा. ५ काम शिकण्यासाठीं राहिलेला; पसंतवारीचा; कच्चा (नोकर). ६ परीक्षा देण्यास आलेला. ७ नवशिक्या. [फा. उमीद्वार; उमैद्, उमेद्+वार]

उमेदवारी-द्वारी—स्त्री. १ आशावादीपणा; आकांक्षा; खात्री; निश्चय; दृढता; हिंमत; विश्वास. 'त्यांची उमेदवारी पेशवे सर करूं सहजांत.'–ऐपो २७७. 'त्यास स्वारी निघावयाचा मार्ग पहात आम्हीं उमेदवारीनें बैसलो आहोंत.' –ख ८.४६६०. २ तारुण्य; ज्वानी; पूर्ण वाढ; जोम; जोर. 'हे आपले उमेद्वारींत आल्यानंतर त्यांचें लग्न केलें.' –मदर १.११. ३ उमेदवारपणा; कच्ची, पसंतीच्या अटीची नोकरी; उमेदवार बनून राहणें. [फा. उमीद्वार]

उमेदी—स्त्री. ज्वानीचा, मनोविकाराचा भर. 'शृंगार घालितां उमेदी चढे ग। खेळतां गंजिफा येतें रडें ग॥'–प्रला १४६. उमेद पहा.

उमेराघामेरा—वि. घामानें थबथबलेला, भरलेला, डबडबलेला, डवडवलेला; घामाघूम. [घामेरा द्वि]

उमेळा—वि. (ना.) ओंगळ; मळका; घाणेरडा. [सं. उद्+मल्]

उमोप—वि. अतिशय; पुष्कळ; अगणित; अमोज. उमाप पहा. 'तुझेचि करुणागेवा मन धरी उमोप द्रवा.'–केका २०. [सं. उद्+मा]

उम्दगी—स्त्री. थोरवी; मातब्बरी; श्रेष्ठपण. उमदगी पहा. 'जमियतच्या सर्दारास दोनी सर्कारच्या बुजुर्गी व उम्दगीवर प्रतेष्टतेचे व इज्जतीचें रस्म अमलांत येतील.'–पेश ५८. [अर. उम्दगी]

उम्दा—वि. १ थोर; विश्वासु; उत्कृष्ट. उमदा पहा. 'दोन उम्दे मनुष्य दिली दोस्ती जाहीर करावयास रवाना करीत आहों.' –पेश ६५. २ भारी; किंमतवान; बहुमोल. 'तलफ चुकऊन पोशाख दिधला खूप उम्दा भर्जरी.' –पला ८९. [अर. उम्दा]

उम्दान—वि. (ना.) उत्तम; फक्कड. [अर. उम्दा]

उम्देतुल्मुल्क—पु. दौलती (राज्या)चा खांब. विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांना दिल्लीच्या बादशहानें ही पदवी दिली होती. [फा उम्दत्=स्तंभ, आधार+उल्+मुल्क=राज्य]

उम्मस—वि. (ना.) ढूड; आडदांड.

उम्मस—पु उसंत; विश्रांति. उमासा पहा. 'स स सपना सारिखा परी नाहीं कीं उम्मस।' –दावि २१४.

उम्हळ, उम्हळणें, उम्हास-ळा—उमळ, उमळणें, उमाळ वगैरे पहा. 'हळींच्या तापाचीं मुख्य लक्षणें.. वांत्या व उम्हासे... हीं होत.' –टि १.५७५ 'विरह दुःखाचे कितीदा उम्हाळे।' –टिक ५९.

उम्हाट—(ना.) उमाठा पहा. 'तें घर उम्हाटावर आहे.'

उयला—पु. (कों.) पावटयाचा सोलाणा. [सं. उद्+वलन; तुल० का. उय=धान्याचें टरफल]

उर—स्त्री. हौस. –शर (सोहि महदनु). [का. उर=उतावळेपणा]

उर—ऊर पहा.

उरउरीत—क्रिवि. उरलेला; वेगवेगळेपणानें; अलग. 'सांगायासी लोकां। उरउरीत उरला तुका॥'–तुगा ३८०७. [सं. उर्वरित]

उरउळी—स्त्री. १ (कु.) रोवळी (तांदूळ धुण्याची); दुरडी. २. तेल घालण्याचें नरसाळें [का. उरळि=वाटोळें भांडें]

उरक, उरका—पु. काम त्वरित करण्याचें सामर्थ्य, कौशल्य, उत्साह; आटोप; आवरशक्ति. 'ज्याला ज्या कामाचा उरका असेल त्याला तें काम सांगावें.' [दे. उर=आरंभ; का. उर=उतावळेपणा; तात्रखपणा, प्रयत्न, किंवा का. उर्कु=शक्ति, पराक्रम] **०उरकणें**–१ काम पार पाडणें, पुरें करणें. २ दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणें. **०पडणें**–(कामाचा) संपविण्याची जबाबदारी अंगावर घेणें, पडणें.

उरक—पु. जोर; उत्कर्ष; जोम; उत्साह; उल्हास. 'भीतरिं अवस्था व्यापिलें। उरकें वागिंद्रिय कोंदलें॥'–ऋ ४३. 'तें उरके आली फळां।' –भाए ३१४. [का. उर्कु=पराक्रम]

उरकणें—सक्रि. १ पुरें करणें; पार पडणें; संपविणें; शेवटास नेणें; तडीस नेणें. २ भानगडींत पडणें; ढवळाढवळ करणें. 'आपण आपल्या कामांत असावें, लोकांची कुचंबिदा उरकूं नये.' –अक्रि. १ आटपणें; संपणें; शेवट होणें; खलास होणें; नाहींसें होणें. २ (ल.) मरणें. ३ आटोक्यांत येणें; पसंतीस येणें: यथायोग्य होणें; सोपें होणें. [उरक]

उरकता मार्ग-रस्ता, उरकती वाट–पु.स्त्री. लवकर संपणारी वाट (सरळ, छाया असलेली, जवळची, सोपी म्हणून).

उरकमणें—सक्रि. स्वच्छ करणें; घासून-पुसून काढणें; निर्मळ करणें (भांड्याचें खरकटें, कपड्याची घाण वगैरे). –अक्रि. विलग होणें; सुटणें; निघून येणें (भांडयास, वस्त्रास लागलेली, खरवड, कपड्या, घाण, मळ वगैरे).

उरकाउरक—स्त्री. घाईघाईनें, गर्दीनें, काम संपविण्याची, आवरण्याची क्रिया; आटपाआटप; आवराआवर. [उरक द्वि.]

उरकुडा—पु. (व.) उकिरडा पहा. [उत्+कृ]

उरग—पु. सर्प; साप; नाग 'तरी सरोवर तरंगीं। सांडिलें आकाश मेघीं। का चंदनाचें उरगीं। उद्यान जैसें ॥' -ज्ञा १७.२२५. [सं. उरस्=छाती+गम्=जाणें]

उरंग-गु—वि. १ विटलेल्या रंगाचा; हीन रंगाचा. २ शिळा; नावडीचा. 'ते आवडी कां उरंगु। आतां जाली' –भाए १४०. [सं. उद्+रंग]

उरंगणें—अक्रि. विटणें; हीनरंग होणें. 'उरंगे ना साडेपन्हर सोनें' –दाव २९

उरगळी—वि. ज्याच्या डोळ्यावर, उरावर व गळ्यावर मण्यासारखें चिन्ह आहे असा (घोडा). हें घोडयाचें अशुभ लक्षण होय. [ऊर+गळा]

उरगुडें-डें—न. (का.) खेडयांतलें देऊळ. 'जेणें कैलासदुर्गा पाडिलें। सत्यलोकीं ठाणें घातलें। सोनकानें उरगुडें घेतलें। वैकुंठींचें ॥ ' –शिशु १६०. [का. ऊर=गांव + गुडि = देऊळ]

उरजणें—अक्रि. बलवान् होणें; बलिष्ठ होणें; सुस्थितींत येणें; उत्कर्ष होणें. [सं. ऊर्ज्]

उरजा—स्त्री. जोपासना; निगा; काळजी; सुव्यवस्था. (क्रि० राखणें). [सं. ऊर्जा]

उरंडा—पु. वरवंडा; ढीग. 'पाथरांचे उरंडे यापरी। जाहाले येरुसालेआंतु।' स्त्रिपु २.४२.१३०. [सं. वरंड = ढीग, समूह]

उरण—पु. मेंढा; बकरा. 'तैं उमजसील न उरे व्याघ्र रवें वीर्ये लेशहि उरणीं' -मोकर्ण २८.८३. [वै सं. उरा = मेंढी; सं. उरण = मेंढा, ऊर्णा=लोंकर]

उरणी—स्त्री. एक वृक्ष, वेल. 'केळी कल्हार निंबुणी। मालती मोगरे उरणी ॥' –कथा २.१५.१४२.

उरणें—अक्रि. १ शिल्लक, बाकी राहणें, मागें राहणें; पुरून राहणें; अवशिष्ट राहणें; जास्त होणें. 'तेथें लोक कैचे उरती' –उषा १७६७. २ शक्य होणें; परवडणें; पुरणें. 'ज्या इंद्रियांस जो भोग। तो तो करी येथासांग। ईश्वराचे केलें जग। मोडितां उरेना ॥' –दा १७.५.२८. [सं. उत्+पृ = उत्पूर; प्रा. उव्वर–उवैर किंवा ऋ=जाणें] **उरता करणें**–क्रि. बाकी ठेवणें; अंशतः फेड करणें.

उरता—स्त्री. बाकी; शिल्लक; अवशिष्ट; अंश (क्रि० राहणें; देणें; राखणें; ठेवणें; धरणें; बाळगणें). [उरणें]

उरता—स्त्री. अरुता (अप.) १ भीड; मुरवत; आक्षेप. 'मी कोणाशीं कांहीं पण बोलें लागलों तर कोणाची उरता ठेवणार नाहीं.' २ खोळंबा मानणें; उणीव भासणें. 'तूं माझी उरता धरूं नको.' =माझ्यासाठीं खोळंबूं नकोस. ३ अरुता; सबब. 'त्यांच्याकडून तो माल न आल्यामुळें येणाऱ्याची उरता न सांगतां बाजारांत जसा भाव असेल त्याप्रमाणें घेऊन बाबा लागतो.' –मुंव्या २५१. [अरुता] **०न धरणें**–क्रि. मान न राखणें; भीड न धरणें; वाट न पाहणें.

उरदाणा—पु घोडयाच्या तोबऱ्यांतील शिल्लक राहिलेला हरभरा, घांस. [उरणें+दाणा]

उरपणें, उरवणें, उरंवणें, उरमणें—अक्रि. उरीं फुटणें; उरीं भरणें; अति श्रम केल्यामुळे छातींत दुःख उत्पन्न होणें. (घोडा, बैल वगैरेस). [ऊर]

उरःपार्श्वांधर्मंडल (संयुनहस्त)—न. (नृत्य) उजवा हात अगाल व डावा हात पल्लव करून दोन्ही हात उराच्या जवळ आणणें व मग उजवा हात उजव्या बाजूस व डावा हात डाव्या बाजूस वर्तुलाकार करणें.

उरफाटणें, उरफाटफारफाट, उरफाटसुरफाट, उरफाटा, उरफाटासुरफाटा—उफराटा इ० पहा.

उरफोड—स्त्री. अतिशय श्रम; अतिशय कष्ट; उरस्फोट-ड पहा. [सं. उरस्+स्फुट्; म. ऊर+फोडणें]

उरबंद—पु. गोरबंद, घोडयाच्या गळ्यांत बांधण्यासाठीं खोगिरास लावलेला पट्टा. [ऊर+बंद]

उरमोडा—पु. (माण.) जनावरास होणारा एक रोग; यानें जनावर छातींत आखडतें [सं. उरस्+मोटनं; म. ऊर+मोडणें]

उरम—न. उमर ? एक पक्वान्न. उंबर ? पहा. कदाचित चुरमावहल मुद्रणदोष असावा ! 'मालपुव्यादी सकुपमार (सकुरपार ?= साखरपारा ?). उरम मृदु भक्षितो।' –नव ९.११६.

उरमट-ठ—वि. उद्दाम; दांडगा; माजोरी, उद्धट; मस्त. [सं. उन्मत्त]

उरमटणें—क्रि उरमट, मगरूर होणें; अरेरावी दाखविणें; दिमाख मिरविणें.

उरमटाई-ठाई—स्त्री. उरमटपणा; मगरूरी; बेपर्वाई; उद्धटपणा.

उरमाल—पु. (कों. गो.) रुमाल (अप.) पहा.

उरलासुरला, उरमूर, उरलापुरला—वि. अवशिष्ट राहिलेला; शिल्लक; शेष. [उरणें द्वि.]

उरले गड्डे—पुअव. (तं) बटाटे. [का. उरलि; ता. उरुळै=गोल]

उरवई—स्त्री. शिल्लक; बाकी; अवशेष. [सं. उर्वरित]

उरवणें-विणें—अक्रि. बाकी ठेवणें, राहूं देणें; शिल्लक ठेवणें; मागें टाकणें; बाकी राखणें; राखून ठेवणें. 'तच्हि कुरुपांडवयुद्धारंभसमय यश तिचें न तें उर्वी ॥ ' –मोकर्ण ८.१५. ' सर्व तूप वाढूं नको, थोडेंस उरव '. [सं. उर्वरित; तुल० का. उर्विसु=वाढविणें]

उरवळी, उरोळी—स्त्री. रोवळी; तांदूळ वगैरे धान्य धुण्याकरितां बांबूचें किंवा धातूचें केलेलें सच्छिद्र पात्र; दुरडी. [का. उरळि=वाटोळें भांडें.]

उरवी—स्त्री. पृथ्वी. [सं. उर्वी]

उरशी—स्त्री. स्तनांचा प्रादुर्भाव झाला आहे अशी स्त्री; वयांत आलेली स्त्री; तरुणी. [सं. उरस्]

उरसिज—न स्तन; उरोज. 'येइल बहुपचारें वंध्योरसिजासि काय ओलावा.' [सं. उरस्–सप्तमी एकवचन उरसि+ज]

उरःसर—पु. उरानें सरपटणारा प्राणी; सर्प; नाग; साप. उरग पहा. [सं. उरस्+सृ]

उरःस्थल—न. वक्षःस्थल; वक्षप्रदेश; छाती. [सं. उरस्+स्थल]

उरस्फोट-ड—स्त्री. १ अतिशय श्रम, कष्ट; जिवापाड मेहनत; अत्यंत नेटाचा प्रयत्न; रक्त आटविणें; आंतडीं तोडणें (एखादा विषय फोडून सांगतांना); माथेफोड. २ अत्यंत कळकळीची विनंति. 'पदरीं धरिसी। किति करिसी उरस्फोड '. [सं. उरस्+स्फोट] ०करून घेणें–जीव तोडून सांगणें; जिवापाड मेहनत करणें.

उरःक्षत—पु. छातींत होणारा एक रोग; एक प्रकारचा क्षयरोग; यामुळें छातींत व कुर्शीत पीडा होते. [सं. उरस्+क्षत]

उरा—पु. नदीच्या पात्रांतील कमी पाणी असलेली किंवा उघडी पडलेली जमीन; उतार; भाट. [सं. उर्वरित]

उराउरी—क्रिवि. (छातीला छाती लावून) झटपट; झट्कन; झडकर; एकदम; ताबडतोब; तत्काल. ' चांग तें उराउरीं मागों। ' –ज्ञा ११.५४९. [उर द्वि.]

उराक, उन्हाक—स्त्री. (गो.) स्वाद नसलेली दारू. [पो. उन्हाक; इं. अरॅक; अर. अरक]

उराचा तख्ता-पांजरा-शिंप-शिंपी—पुस्त्री. भरदार, विस्तीर्ण छाती; बरबडया. ऊर पहा.

उराझुरा—वि. अल्प राहणारा; दूरदूर असणारा; मनमोकळा न वागणारा; कुढा; आंतल्या गांठीचा. (क्रि० वागणें) [उरणें द्वि; किंवा ऊर+झुरणें ?]

उराटी-ठी—स्त्री.१(घोडयाच्या) उराला बांधावयाचा खोगिराचा बंद, गांठ (बांडगें याच्या उलट). [ऊर+अठी=गांठ]. २ उंच, उभी चढण. ३ एका जातीचा साप चावला असतां येणारी रक्ताची गुळणी; झेंह. [सं. उरस्]

उराड—न. १ अतिशय वर आलेली छाती. २ ऊर यालाच हीनार्थक शब्द; छाताड. ३ छातीवर येणारें वजन किंवा दाब. (क्रि० लागणें). ०काढून चालणें–छाती पुढें करून गर्वानें चालणें.

उराडी—स्त्री. १ भरलेली, प्रशस्त छाती; रुंद, विशाल उरोभाग. २ (खाटिक) उरांचें हाड; जनावराचें ऊर. **उराडी-भरणें**–इ० वाक्प्रचार ऊर शब्दापुढें पहावे. [सं. उरस्]

उराळणें, उराळ होणें–अक्रि. १ गाडींत मागें अतिशय भार झाल्यामुळें जूं बैलांच्या मानेवरून वर तरंगणें. २ गाडींत मागें फार भार होणें. उलाड पहा. ' बाळासाहेबांची गाडी वाटेंत उराळली.'

उराळा—पु. (व.) खांबाशिवाय तयार केलेला मंडप. [सं. ऊर्ध्व+आलय]

उरी—स्त्री. १ बाकी; अवशेष; शिल्लक; शेष. ' जंव भरली आथी उरी । बळाची ते। ' –ज्ञा १८.४२६. ' नायकसी माझें सांगितलें जरी। शरिराची उरी उरों नेदी। ' –ब १३४. २ आश्रय; ठाव; ठिकाण; जागा. ' तैसे तातलीये लोही। तुषारां उरी नाहीं।' –ज्ञाप्र ७०२. ' आम्हां अनाथा कैची उरी ' –दावि १०. ३ भीड; मर्यादा, मुरवत ' आपणांस जें मानेना। तेथें कदापि राहावेना। उरी तोडून जावेना । कोणीएकें। ' –दा १२.२.१४. ' आम्हापासीं असत्य बोलतां । उरी सर्वथा न ठेवीं।' –भवि ८.१५८. ४ अवसान; ठिकाव; धडगत; स्थिति. ' एरिकेच्या निजघार्यी । यादवांसि उरी नाहीं। दुधड तोडूनियां पाही। पडती ठायीं परस्परें।' –एभा ३०.१४९ ५ इच्छा; हेतु. ' भक्तां श्रुतेयां जिविची उरी । पुरविल स्वामी । ' –खिपु १.१.१४९. [सं. उर्वरित; म. उरणें]

उरु—ऊरु पहा.

उरु—वि. मोठा; थोर; विशाल. ' हरणार कसें म्हणशी तूं हितकर या अशाहि उवरितें । '

उरुद्रोणी—पु. घोडयाचा एक रोग; यानें घोडयाच्या दोन्हीं पायांमध्यें सूज येते. –अश्वप २.२८३. [सं. ऊरु+द्रोणि:, द्रोणी]

उरुळी—स्त्री. रोवळी. उरवळी पहा

उरूकें—न. वेल, वेलीचा धुमारा, अंकूर. ' मौक्तिकांचे झुलुंबकें। तेजाचेनि उरूकें '–शिशु ४२४. [सं. उलुप=एक गवत; का. उर्कु=पगकम]

उरूज—पु. (माळवी) उन्नति; बढती; महत्त्व. [सं. ऊर्ज्]

उरूफ—वि. उफे; दुसऱ्या नांवानें माहीत असलेला; टोपण नांव असलेला; उपनांवाचा. ' अफ़जलपूर महमूदशाही उरूफ करा बावधन ' –इम ४८. ' नहीसादुर्ग उरूफ पन्हाळा ' –रा ३.५४. [अर. उर्फ=विख्यात, माहीत असलेला.]

उरूबरू, उरूबुरू—क्रिवि. समक्ष; प्रत्यक्ष. ' उरुबरु येऊन विनंती करीन। '–रा ३.१२३. ' उरूबुरू स्वामींच्या समक्ष मनचेमनीं कुरबुरतों आम्हीं ' –होला ९७.१३४. –स्त्री. उपस्थिति; हजीरी; प्रत्यक्षत्व; समक्षता. [फा. रूबरू=प्रत्यक्ष]

उरूस—पु. १ पिराचा उत्सव; (सामा.) पुण्यतिथि; जत्रा. २ लग्नांतील मेजवानी. **म्ह०** आलें उरूस तें चुकवूं नये गुरुस [अर. उर्स=१ देवतेस उपचारसमर्पण. २ लग्नाची मेजवानी]

उरूसा-उरोसा—पु. (ना. व.) पडसें, सर्दी;

उरेबकसोटा—पु. (हिं.) (मल्लविद्या). १ कुस्तींतील एक डाव. जोडीदाराच्या एका हाताचा पंजा धरून तो झिटकून देऊन जोडीदाराच्या गळ्याच्या घाटीवर मूठ वळवून मारणें. २ जोडीदाराचा एक हात आपण आपल्या हातांत धरून तोच हात आपल्या हातानें जोरानें झिटकून देऊन कसोटा मारल्यासारखी हूल दाखवून जोडीदाराच्या दुसऱ्या बाजूच्या गळ्यावर आपली मूठ वळवून मारणें. [अरेब=कुशल ? + कसोटा; अर. अरबद=युद्ध ?]

उरेबधोबीपछाड—(हिं.) (मल्लविद्या) जोडीदाराचा एक हात आपल्या खांद्यावर असतांना धरून आपण गुडघा देऊन ऊर्स मोडतों त्याप्रमाणें जोडीदाराच्या कोंपराच्या खालीं आपला खांदा देऊन धुतांना परीट ज्याप्रमाणें वस्त्र फिरवून टाकतो त्याप्रमाणें जोडीदाराला फिरवून टाकणें. [अरेब=कुशल, अक्लवान+धोबी+पछाड=हापटी]

उरोगामी—पु. सरपटणारा प्राणी (साप, वंगरे). अशा प्राण्यांचा वर्ग. [सं. उरस्+गम्]

उरोग्रह—पु. एक रोग; यकृतांतील रक्त दूषित झाल्यामुळें हा होतो. [सं. उरस्+ग्रह]

उरोज—पु. स्तन. ' पुढें होउनी तत्करांभोरुहातें । उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें । ' –राधाभुजंग (वामन) ३२. [सं. उरस्+ज]

उरोटा—पु. १ विहिरीजवळचें पाण्याचें टाकें, द्रोण, कुंडी. २ अवशिष्ट; शिळक; बाकी राहिलेलें. [सं. उर्वरित; म. उरणें]

॰पुरोटा–पु. (उरोटथाला पुरोटा) उणें पडेल तें पुरें करणें. [सं. उर्वरित+पृ]

उरोध—पु. उपरोध; औपरोधिक भाषण: व्याजोक्ति. 'उरोधु वादुबलु । प्राणितापढाळु । उपहासु चालु । वर्मस्पर्शु ॥ ' –ज्ञा १३. २७०. [उपरोध अप.]

उरोमंडलकरण—न. (नृत्य) पाय स्वस्तिकाकार ठेवून नंतर एकमेकांत गुंतविणें, मग हात छातीसमोर आणून उद्घिष्ठित करणें. [सं. उरस्+मंडल]

उरोमंडल(संयुतहस्त)—पु. (नृत्य) दोन्हीं हात छातीसमोर आणून एका हातानें दुसऱ्या हातास तर्जनीच्या बाजूनें आरंभ करून तळहाताच्या बाहेरच्या बाजूनें आंतील बाजूस विळखा घालणें व काढणें. [सं. उरस्+मंडल]

उरोमुरो—वि.(बायकी) उरलेसुरलेलें. 'उरोमुरो बाळापोटीं दूध जिरो. '=मुलाला पाजतांना असें अंगाईगीत म्हणतात. [उरणें+मुरणें] –न. १ अपहार; खाणें; चापणें; लांबविणें. (क्रि० करणें). ' या वस्तूचें यानें उरोमुरो केलें. ' [सं. उर्वरित; उरो द्वि.]

उरोळी—स्त्री. शेताची हद्द दाखविण्याकरितां सरकारी अधिकाऱ्यानें शेताच्या सीमेवर घातलेला मातीचा बांध; वरंबा; वरुळी.

उरोळी—स्त्री. रोवळी. उरवळी, उरूळी पहा.

उर्जा—स्त्री. (प्र.) ऊर्जा; सतेजता; निगा; तजेला (क्रि० ठेवणें; राखणें). [सं. ऊर्जस्]

उर्जित—वि. (प्र.) ऊर्जित. बलिष्ठ; मोठा. [सं. ऊर्जित]

उर्जी—पु. (क.) शेतीसंबंधीं खर्च; मशागतीचा खर्च. ' जमिनीबद्दल किती उर्जी आला ? ' [सं. ऊर्ज्]

उर्णनाभ (हस्त)—पु. (नृत्य) आंगठ्यासह सर्व बोटें विरळ ठेवून पहिल्या पेरांत वांकवून तीं सर्व तळहाताकडे वाकडीं करणें. [सं. ऊर्णनाभ=कोळी]

उर्णनाभि–का—पु. कोळी; ज्याच्या वेबींतून तंतु निघतो असा प्राणी. ' नातरी उर्णनाभिका जैसा । ऊर्णा वमूनि करी फांसा । ' –ज्ञा १०.३४६. [सं. ऊर्णा+नाभि]

उर्णपट—पु. लोंकरीचें वस्त्र; बुरणूस. ' आसन सोरठा उर्णपटीं । पुढां माचळी चौपुटी. ' –ऋ ८०. [सं. ऊर्णा+पट]

उर्णा—स्त्री. लोंकर. [सं. ऊर्णा]

उर्ता—स्त्री. (क.) काळजी. [सं. आर्तिः]

उर्दाबेगनी—स्त्री. (हिं.) जनानखान्यांतील सशस्त्र अंगरक्षक स्त्री; (सामा.) दासी; परिचारिका; बटीक. [तु. उर्दू=सैन्य, तळ, लष्कर, बाजार+बेगम=स्त्री, तरुणी]

उर्दू—१ सैन्याचा तळ; लष्कर. २ एक देशी भाषा; ही मूळ लष्करांतील भाषा असून हिच्यांत हिंदी, फारसी इ० अनेक भाषांचें मिश्रण आहे हिला हिंदुस्थानी भाषा असेंहि नांव आहे. ३ बाजार. [तु. उर्दू=सैन्य, छावणी]

उर्फ—अ. उपनांव; टोपण नांव; प्रसिद्धीचें नांव; अमक्या नांवानें महशूर; म्हणजे. ' रघुनाथ बाजीराव उर्फ दादासाहेब. ' उरूफ पहा. [अर उर्फ्]

उर्फाटा—उफराटा पहा.

उर्बुद रोग—पु. शरीरावर उत्पन्न होणारी गांठ, गळूं; आवाळूं. [सं. अर्बुद]

उर्मट—वि. उद्धट; उरमट पहा. **॰पणा**–पु. उद्धटपणा; अरेरावी. ' सरकारी अधिकाऱ्यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस कांहीं फायदा होईल. ' –टि १.५८९.

उर्मल—पु. (कु.) रुमाल; उरमाल पहा. ' माथ्याक उर्मल बांद. ' [रुमाल, अप.]

उर्मी—स्त्री. ऊर्मी; उमाळा; उठाव; लहर; तरंग; लाट; निकराचा जोर. ऊर्मी पहा. ' भीतरिं भरलिया उर्मी । भणें आहोजी स्वामी ॥ ' –ऋ ४३. ' जेथ विषयोर्मीच्या आकळिया । उल्हाळे घेती ॥ ' –ज्ञा ७.७५. ' आली उर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ॥ ' –तुगा ३३४०. [सं. ऊर्मि=लाट]

उर्वरित—वि. बाकी; अवशिष्ट; शिल्लक राहिलेलें; मागें टाकलेलें. 'आहाराच्या घांसें पचोनियां जिरे। वासनाहीं उरे उर्वरित ॥' –तुगा १२२०. [सं.]

उर्वी–उर्वीमंडल—स्त्री.न. पृथ्वी; धरित्री; जमीन. 'मग वज्रासन तेचि उर्वी.' –ज्ञा ८.४९. 'नातरी घ्यावया उर्वीचा भार । यास्तव अवतरला फणिवर ॥' –संवि १७.२. 'दणाणीत उर्वीमंडल।' [सं. उर्वी]

उऱ्हाई—स्त्री. (ना. व.) पडसें.

उल—(गो.) लघुत्वदर्शक प्रत्यय. उ० –कोयती–कोयतूल, [कोयती+उल–कोयतुल=लहान कोयती.]

उल–ळ—पु. (कों. कुलाबा.) कांदा; पाती असलेला ओला कांदा (अव.) उली. [का. उळ्ळि=कांदा, लसूण वगैरे]

उलकटणें—सक्रि. १ उलथणें; उलथेंपालथें करणें; उलगडणें; अस्ताव्यस्त करणें; उचकटणें; विस्कटणें; उलटापालट करणें (एखाद्या पेटीचें झांकण, बैठक वगैरे). २ उकलणें; मोकळें करणें; वेगळेवेगळे करणें; सोडविणें (एखाद्या वस्तूचे भाग) ३ संपविणें; उलगडणें. [सं. उत्+कल्=फेंकणें; म. कलथणें]

उलखणें—अक्रि. १ (सोन्याच्या दागिन्याची) झिजून लाख बाहेर दिसूं लागणें; माशी लागणें (लाखेच्या दागिन्याला). २ (व्यापक.) लाख निघून जाणें; निखळणें; सांधा सुटणें (कडी, फांसा, खीळ, जोड वगैरेचा). [सं. उद्+लाक्षा; म. लाख]

उलग—उळीग पहा. **०वारणें, वारून टाकणें**–उळीग पहा.

उलगडणें—सक्रि. १ सोडविणें; मुक्त करणें; मोकळें करणें. **उलकटणें**. 'संकटपाशनिबद्ध प्राणिगणाला त्वदन्ये न उलगडी।' –मोकर्ण ४२.११. २ एखाद्या वस्तूचे भाग सोडविणें, अलग करणें (यंत्र इ०). ३ उघडणें (घडी केलेलें वस्त्र, पुस्तकाचें पान वगैरे) ४ व्यवस्थितपणें लावून ठेवलेला वस्तूंचा ढीग किंवा साठा सोडवून पृथक् करणें; एखादी विशिष्ट रचना मोडणें. ५ संपविणें; शेवटास नेणें; पार पाडणें; तडीस नेणें (एखादें कार्य वगैरे). –अक्रि. १ सुटणें; मोकळें होणें. २ मोडणें; भाग वेगळे वेगळे होणें. ३ बंधन सुटणें; विसकटणें. ४ एखादा मोसम वगैरे संपणें, आटोपणें. [सं. उद्+लग्]

उलगडा—पु. १ उलगडणें; सोडवणूक; मोकळीक (कर्ज वगैरेची); सुटण्याची किंवा मुक्त होण्याची क्रिया (एखादें संकट किंवा कोडें वगैरेंतून). २ निकाल; शेवट; व्यवस्था (प्रश्नाचा, कामाचा, वादाचा वगैरे). ३ फेड; मुक्तता (कर्ज वगैरेची). [सं. उद्+लग्]

उलगणें—अक्रि. संपणें; निघून जाणें; बंद होणें; थांबणें (हंगाम, तारुण्य इ०). 'पर्जन्याचे दिवस उलगले.' –केक १३१. 'काजूचे दिवस उलगले.' [सं. उद्+लग्] –सक्रि. १ मोकळें, रिकामें करणें (शत, वाग, कोठार इ० कांतील पीक, जिन्नस इ० काढून घेऊन). २ खलास करणें; नेणें (पीक; जिन्नस, वस्तू, साहित्य इ०). ३ आटोपणें; संपविणें; पुरें करणें (काम, चाकरी, समारंभ इ०).

उलगवाडी—स्त्री. उलगणें; अखेर; समाप्ति (हंगाम वगैरेची). 'विषयाचिया उलगवाडी।' –भाए १८२. [सं. उद्+लग्]

उलगाउलग, उलगामालगी—स्त्री. १ आवराआवर; आटोपाआटोप; निरवानिरव (एखादें कार्य उरकल्यानंतर सामानाची, सर्व गोष्टींची). २ समाप्ति; अखेर; उपसंहार. [उलग द्वि.]

उलगाघाल—स्त्री. १ घालमेल; मोडतोड; उलथापालथ. २ खटाटोप; उठाठेव; भानगड; उलाढाल. [उलगणें+घालणें.]

उलघाल—स्त्री. १ अस्वस्थता; बेचैन; असमाधान; (ताप, तहान, भूक, पित्त, मृत्युसमय इ. वेळीं होणारी शरीराची स्थिति). २ उलगाघाल; भानगडीचा व्यवहार; घालमेलीचा, उलाढालीचा धंदा [उलगडणें+घालणें.]

उलझा—पु. (व.) १ अनिर्णित गोष्ट; वांधा; गुंता. २ निर्णय लावणें. [अर. उल्झन्=गुंतागुंत; हिं. उलझाव]

उलट—पुस्त्री. परावर्तन; परतणें (चेंडू वगैरे). २ ओहोटी (समुद्राची) ओसर. ३ पुनरुत्थान; फेर उचल; पुनरुज्जीवन (पराजित शत्रु वगैरेचें). ४ माघार; परत, मागें आणणें; विरुद्ध गति (चाक, त्यावरचा दोर वगैरेची). ५ पुनरागमन; प्रत्यावर्तन; प्रत्यागमन (ताप, साथ, दुष्काळ वगैरेचे). ६ माघार; विन्मुखता; भंग (वचन वगैरेचा). ७ पराङ्मुखता; सोडून जाणें; विमुखता; त्याग (एखादें काम किंवा गोष्टीपासून). (क्रि० करणें). ८ ओकारी; वमन; वांती. ९ प्रत्यावर्तन; बदल देणें; फेड; परत करणें; (उपकार, अपकार, आदर, सन्मान वगैरेचा). [सं. उद्+लट्; दे. उल्लट] –वि. उफराटें; प्रतिकूल. –क्रिवि. परत; मागें; विरुद्ध दिशेनें; विरुद्ध मार्गानें, रीतीनें. 'त्यानें तिकडून दगड मारितांच मीं इकडून उलट दगड मारिला.' **०अहेर**–एखाद्या कार्यांत मिळालेली देणगी, अहेर (वस्त्र, वगैरे) याबद्दल दुसरा आपला अहेर देणें; परत अहेर. **०इन्साफ**–पु. एखाद्या दिलेल्या निकालाचा विचार करून पुन्हां दिलेला निकाल, निवाडा; दुसरा, फेर निवाडा. **०उत्तर**–न. प्रत्युत्तर; जवाब. २ विरुद्ध भाषण. **०करार**–पु. केलेल्या कराराच्या प्रतिपालनार्थ प्रतिपक्ष्यानें केलेला दुसरा करार; एका कराराच्या विरुद्ध दुसरा करार. **०करारानें गहाण**–न. बाह्यतः खरेदी केलेली मिळकत तत्त्वतः गहाण समजून किंमत परत दिल्यास मूळ मालकास परत द्यावयाच्या अटीवर केलेला व्यवहार. **०घेणें**–हरकत घेणें; प्रतिकार करणें. **०गोष्ट**–स्त्री. प्रत्युत्तर; फेर जबाब; उद्दामपणानें दिलेलें उत्तर. **०ढाल–ढाला**–स्त्री. १ स्वारी परत फिरविण; सैन्याचा मोर्चा विरुद्ध दिशेला (कूच करण्यासाठीं)

वळविणें. (क्रि० देणें) उलटी ढाल पहा. २ स्वपक्ष सोडून प्रतिपक्षास जाऊन मिळणें; वचनभंग करणें शब्द मोडणें; फितूर होणें; बंड करणें. **०पालट-सुलट**–स्त्री. उलटापालट. उलटासुलटा पहा. **०पुलट**–स्त्री. उलथापालथ; फिरवाफिरव; खालींवर, इकडेतिकडे करण्याची क्रिया. **०बाजी**–स्त्री. प्रतिकार; परत फिरविलेला डाव. **०मजकूर**–पु. प्रत्युत्तर; परत जबाब; फेर निरोप; उलट उत्तर. **०पत्र**–न. उत्तरादाखल लिहिलेलें पत्र. **०भेट**–स्त्री. आपल्या भेटीस आलेल्या गृहस्थाच्या घरीं भेटावयास जाणें; भेट परत करणें; परत भेट. **०मान**–पु आपला ज्यानें सन्मान केला त्याचा आपण उलट सन्मान करणें; उलट मेजवानी, उलट जाबसाल–जबाब वगैरे वाक्प्रचारांत परत फेड असा अर्थ होतो. उलट अहेर पहा. **०तपासणी**–स्त्री.१ एखादी गोष्ट पुन्हां शोधून किंवा तपासून पाहणें; विचार करणें; २ साक्षीदारास प्रतिपक्षानें विचारलेले प्रश्न. **०मनसुबी**–स्त्री. दिलेला न्याय किंवा निकाल फिरविणें; उलट इन्साफ पहा. **०लढाई**–स्त्री. फेर हल्ला; पराजित झाल्यावर पुन्हां केलेली उठाबणी; पुनरुत्थान (पराभवानंतरचें). **०वारा**–पु. विरुद्ध दिशेकडून येणारा वारा. (क्रि० येणें; लागणें). **०सनद**–स्त्री. जुन्या सनदेवरून कायम करून पुन्हां दिलेली सनद. **०हुकूम**–पु. १ पुन्हां केलेला पहिलाच हुकूम. २ विरुद्ध हुकूम; पहिला हुकूम रद्द करणारा दुसरा हुकूम; दुसरा हुकूम. **०हुंडा**–पु. वधूपित्यानें वराकडून घ्यावयाचें द्रव्य, शुल्क. ' माझा उलटहुंडा घेण्यासाठीं बडिलांनीं मला मुद्दाम बिन लग्नाची वाढविली. '–सासं २.४१५. [उलट द्वि]

उलटकर—वि. उलटण्यासारखा; डळमळीत; अस्थिर; कच्चा आधार असलेला (दगड, लांकूड इ.). [उलट]

उलटणी—स्त्री. पुन्हां, परत क्रिया (करणें); फेरतपासणी; फेर मोजणी; फेर पाहणी; उजळणी (करणें.) [उलटणें]

उलटणें—सक्रि. १ पालथें करणें; उलथणें; उपडें करणें. २ (वस्त्राची) आंतील बाजू बाहेर करणें; वळविणें; उरफाटें करणें. ३ एखादी गोष्ट पुन्हां करणें; पुनरावृत्ति, उजळणी करणें; तपासणें. (धान्य वगैरे पुन्हां मोजणें, लेखन तपासून पाहणें, ज्ञानाची, अभ्यासाची उजळणी करणें).४ पार पाडणें; पुरें करणें; संपविणें (एखादें काम, भानगडीचा हिशोब वगैरे). ' हें सारें लिहिणें पडलें आहे, हें उलटावयास मला दोन महिने पाहिजेत. ' ५ उलगडणें; सोडविणें; स्पष्ट करणें; अर्थ सांगणें(एखादा प्रश्न, कोडें, स्वप्न, भास वगैरेचा). –अक्रि. १ उलंडणें; पालथें होणें. २ मागें फिरणें; विरुद्ध दिशेनें जाणें. ३ पुन्हां उचल खाणें; पुन्हां सुरू होणें (रोग, सांथ वगैरे). ४ संपणें; निघून जाणें; मागें पडणें (हंगाम, काल, वय वगैरे). उ० तिशी, चाळिशी, साठी उलटणें. **उलटून गोष्टी सांगणें**–जाबसाल करणें; उलट उत्तर करणें; उद्धटपणें बोलणें. **उलटून बोलणें**–१ पुन्हां बोलणें; परत म्हणणें. २ प्रत्युत्तर करणें; उर्मटपणानें उत्तर देणें.

उलटणें—न. (कों.) खळ्यावर तुकट्याच मळलेल्या धान्याचें अंदाजानें माप करण्याकरितां योजतात ती टोपली. [उलट]

उलटा—वि. विपरीत; विपर्यस्त; परिवर्तित; उपडा; पालथा; विरुद्ध दिशेचा, बाजूचा; वरची बाजू खालीं असलेला; आंतील बाजू बाहेर आलेला; मागील बाजू पुढें असलेला; उलट पहा. –क्रिवि विरुद्ध; परत. ' म्यां त्याला रुपया दिल्हा त्यानें माझा उपकार मानावा परंतु तो उलटा मला मारायाला पाहतो. ' –मोल –पु. १ तोड; किंमत; उत्तर (एखाद्या कोड्याचें); एखाद्या श्लोकास परत समानार्थक किंवा विरुद्ध अर्थी प्रतिश्लोक, वचन; नक्कल; प्रतिमा २ प्रत्युत्तरादाखल किंवा परतफेडीदाखल दिलेलें उत्तर, वस्तु वगैरे. सामाशब्द–उलटा अहेर; उलटा दगड; उलटा निकाल; उलटा हल्ला. उलट पहा. ३ विष वगैरेवरील उपाय. उतारा अर्थ ४ पहा. [उलट] **०खप्पा**–पु. (मल्लविद्या) आपल्या एका हातानें जोडीदारावर तो उभा किंवा बसलेला असतांना त्याच्या खांद्यावरून आपला हात आणून आपल्या हाताच्या पोटरीनें जोडीदाराच्या गळ्याची घाटी दाबून ज्या हातानें जोडीदाराच्या गळ्याची घाटी दाबतों त्या आपल्या हाताचा पंजा आपल्या दुसऱ्या हाताच्या कोपराच्या लवर्णीत घालून व आपल्या दुसऱ्या हाताची पोटरी जोडीदाराच्या मानेवर वसवून त्याला घुसमटून मारणें. [उलट+फा. खुफ्तन्=निजणें, खफाह=(कुस्तींत) गळा दाबणें] **०गिरा**–पु. (मल्लविद्या) आपला एक हात जोडीदाराच्या बगलेंतून बरगडीवर ठेवून बरगडीवर ठेवलेल्या हाताच्याच बाजूचा आपला पाय जोडीदाराच्या पायाच्या ढोणशिरेवर दाबून ठेवावा व आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराच्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवर्णीत घालून पाय वर उचलावा म्हणजे जोडीदार चीत होतो. [उलटा+हि. गिराना=पाडणें] **०पट**–पु. (मल्लविद्या) जोडीदारानें आपल्यास उभ्यानें खालीं धरलें असल्यास आपल्या आंतील हातानें आपल्या पुढील जोडीदाराच्या पायांतून गुडघ्याच्या लवर्णीत बाहेरून हात घालून व आपला आंतील पाय जोडीदाराच्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवर्णीत बाहेरून घालून आपला गुडघा जोडीदाराच्या गुडघ्याच्या लवर्णीत टेकून गुडघ्यानें त्याच्या पायाच्या लवर्णीत जोरानें धक्का देऊन व हातानें जोडीदाराचा पाय वर उचलून त्यास चीत करणें. [उलटा+सं. पत्; हिं. पटकना=पाडणें] **०पहारा**–पु. विपरीत काळ; फिरलेला काळ. ' कलीयुगाचा उलटा पहारा जाहल्या या चाली. ' –गापो १०२. [उलट+सं. प्रहर, म. पहारा] **०पालट**–स्त्री.१ विपरीत रचना; उलथापालथ; उलटसुलट करणें; अव्यवस्था. २ (ल.) परस्पर प्रश्नोत्तरें; उत्तरप्रत्युत्तर. [उलटा द्वि]. ३ दुनियेची उलटापालट=जगांतील, संसारांतील घडामोड; मोठा खटाटोप; धांदस; (व्यापारांत) रुपयांची, पैशांची उलाढाल; पैशांची मोड; चलनी अदलाबदल. –क्रिवि. अव्यवस्थित

रीतीनें. [तुल० सं. उपर्यस्त+पर्यस्त; प्रा. उवरित्थ-ड्ड+पल्लत्थ-ड्ड] **०पींलटा-सुलटा**-वि. वरची बाजू खालीं व खालची बाजू वर असा; आंतील बाजू बाहेर व बाहेरील बाजू आंत असा, मागील बाजू पुढें व पुढील बाजू मागें असा; विरुद्ध मार्गाचा किंवा दिशेचा; अस्वाभाविक; उ-ट्या क्रमाचा; व्युत्क्रम; वेडावांकडा; विलोमअनुलोम. **०सुलटा उभा राहणें**-क्रि. विरुद्ध दिशेस तोंड करून उभें राहणें. **०सुलटा पहारा**-पु. दोन पहारेकरी विरुद्ध दिशांस तोंडें करून उभे राहून करीत असलेला पहारा.

उलटी—स्त्री. १ वांती; ओकारी; वमन. २ विरुद्ध गति; प्रत्यावर्तन; उरफाटा प्रकार, स्थिति (क्रि० देणें; घेणें; मारणें) ३ कोलांटी उडी; उलटी उडी. 'आनंदें कळोळा बाळा खेळती सकळा। देती उलटिया चपळा एकी एकीहुनी॥'-तुगा १३३. ४ (ल.) करारभंग; वचनभंग; तत्त्वाविरुद्ध आचरण; विपरीत वर्तन (क्रि० मारणें, करणें). 'म्हणुनी फिरून नानांनीं उलटी मारुनी केली गछत.' -ऐपो ३९५. [उलट] **०अंबारी**-स्त्री. भिक्षेची झोळी. (अंबारी उलटी केली असतां झोळीसारखी दिसते यावरून). **उलट्या अंबारींत बसणें**-भिकेस लागणें; दरिद्री होणें. 'घरचा सुखी होतों पण नशिबानें उलट्या अंबारींत बसविलें.' **०उडी**-उलटी अर्थ ३ पहा. **०ढाल**-उल्टढाल पहा. **०दुनिया**-स्त्री. सार्वत्रिक अव्यवस्था; अराजकता; गोंधळ; बेबंदशाही; न्यायाच्या विरुद्ध पद्धति. **०पूजा**-स्त्री. अपमान; मानहानि; मानखंडना; उपहास. **०बाहुली**-स्त्री. अदूरदृष्टिदोष; लांबचें न पाहतां येणें; डोळ्यांतील एक खोड. **०बुकी**-स्त्री. ठोशासठोसा; आघातास प्रत्याघात; उसनें फेडणें. **०शिवी**-स्त्री. अपशब्दास प्रति अपशब्द; शिवीस शिवी; उत्तरास प्रत्युत्तर; शब्दास शब्द; खरडपट्टीची, शिवीगाळीची परत फेड **०सुलटी, उलटीसुलटी हजामत**-स्त्री. १ (शब्दशः) केसांच्या विरुद्ध दिशेनें, खालून वर केलेली हजामत. २ (ल.) खरडपट्टी; ताशेरा; रागानें शिवीगाळ करणें; तासडपट्टी; भोसडपट्टी; अपशब्दांनीं संभावना. **०सूज**-स्त्री. शरीराच्या खालच्या बाजूकडून वरच्या बाजूस वाढत जाणारी सूज; पायाकडून वर चढणारी सूज.

उलटून—क्रिवि. १ परत; प्रत्युत्तरादाखल; विरुद्ध दिशेनें. २ अनादर करून; फाजीलपणें.

उलटें—वि. उलट पहा. **०दर्शन**—न. १ परत आल्यावर घेतलेली भेट; परतभेट. २ श्रेष्ठ मनुष्यानें कनिष्ठ प्रतीच्या मनुष्याच्या घरीं जाऊन त्याची घेतलेली भेट. **०दान**-न. परत भेट; परत अहेर, देणगी; आपणास भेट, नजर, बक्षीस, म्हणून मिळालेल्या वस्तुबद्दल परत दिलेली भेट, बक्षीस, देणगी. **०शहाणपण**-न. शहाणपणाच्या उलट वावगा सल्ला; मूर्खपणाचा सल्ला. (क्रि० शिकविणें).

उलठणी—स्त्री. १ (शब्दशः) कलाटणी; उलटणें. २ (ल.) टोमणा; टोला; खोंचदार उत्तर. 'ऐसीं देतां उलठणी। अनुराग रोपाची लावणी॥'-शिशु ६८१. [उलटणें]

उलंडणें—उक्रि. १ कलेडणें; लवंडणें; पालथें करणें; सांडणें 'दिव्य रत्न गोफणिलें। अहा अमृतपात्र उलंडिलें॥' -ह ३० १९. 'तों पितर क्रोधें पाहती। याणें अन्याय केला म्हणती दुग्ध उलंडिलें क्षितीं। निष्क्रोध पुत्र देखोनी॥' -जै ९६.१५ २ उलटून पडणें, उन्मळून पडणें; उपटून येणें. 'जें तुटलिया मुळा पाशीं। उलंडेल कां शाखांशीं॥' -ज्ञा १५.५०. 'तंव देखिले सहोदर। जेंमे उलंडले तरुवर॥' -कथा २.१२.८४. ३ उसळून येणें. ४ भरून वाहणें; तुडुंब भरणें. 'दुराशेनें हृदय उलंडी.'-दावि २८४ ५ (लवंडणें या अर्थी) खालीं पडणें, निजणें. 'भूमीवरी उलंडली।' -रावि ३८ ६. 'मूर्छना येऊनि उलंडला।' -सप्र १२ २४ ६ त्याग करणें; सांडणें; टाकणें. 'भले अवघेचि सोडा आधी देवाला धुंडा। आशा ममता उलंडा। ज्ञानें काळाला दंडा॥ -दावि ४८० ७ ओलांडणें पहा. [सं. उत्+डुंड्; प्रा. उल्लुंड किंवा सं. उत्+डुड्; प्रा. उल्लुड]

उलंडा—वि. (नाविक) कलथा; कलंडा; एकदम उलथणारा (इं) क्रॅंक.

उलंडी—स्त्री. (नाविक) होडी स्थिर राहावी म्हणून तिला दोन आडवीं व एक उभें (पाण्यातलें) अशीं लाकडें लावलेलीं तीं; होडीच्या एका अंगास ती उलटूं नये म्हणून बावखंडाच्या टोंकास जें पाण्यांत एक लांकूड बांधतात तें. (इं) आऊटरिगर. उडली पहा. [उलंडणें]

उलडू—उगव. -शर.

उलढाल—उलाढाल पहा.

उलणें—अक्रि. १ (शब्दशः व ल.) उकलणें; दुभंगणें; फांकणें; उतटणें; भेगा पडणें; भेगळणें; आंतील नेटानें फाटणें (जमीन, शरीर, फळ इ०). 'वसंतें उल्हास तरुवरां। उलोनि लागल्या स्वानंदधारा।'-एभा १२.१५. 'तरि इष्टव्यसनघना घातशतें तूं नृपा न उलतास।'-मोकर्ण ३.४६. 'पिता सांगे हितावबोध। म्हणे हा सन्निपातला वृद्ध। हृदय उले ऐसा बोले शब्द। त्याच्या भारें दुःखी धरा॥'-ह २७.१३२. २ (ल.) उचंबळून येणें; पाझर फुटणें; सद्गदित होणें. 'श्रीकृष्ण मथुरेसी जाईल। प्रेमाचा सागर उचंबळेल। ते कथा ऐकतां हृदय उलेल। प्रेमळ सद्भाविकांचें।'-ह १७.२१६. [सं. उत्+लू=कांपणें; दे. उल्लक=भग्न, फुटलेलें].

उलथ—उलथी पहा.

उलथ—वि. स्पष्ट; उलथा अर्थ ५ पहा. 'जाग्रती उलथ नव्हे स्वप्न। साक्षात्कारचि तो परिपूर्ण।'-दावि १८६.

उलथ—पुस्त्री. एखाद्या टेकडीची, गांवाची दूरची बाजू, सीमा, टोंक; दूरचा, अखेरचा, शेवटचा भाग.

उलथणी—स्त्री. उलथ, कलाटणी; उलथी पहा.

उलथणें—क्रि फाटणें; दुभंग होणें. 'तो शोक सांगतां उलथे धरणी।' –रावि २४.४०. [सं. उद+तल]

उलथणें—न. १ सराटा; कलथा; भाकरी वगैरे परतविण्यासाठीं, आटवण्याचें दूध ढवळण्यासाठीं, केलेला पितळ किंवा लोखंडाचा पसरट तोंडाचा दांडा; उलथा. (व.) उलथन. २ (चांभारी धंदा) जोडण्याचीं ढोंपरें व्यवस्थित करण्यासाठीं उपयोगात आणावयाचें लांकूड. उलथा पहा. [सं. उत्+तल; प्रा. उत्थल]

उलथणें—सक्रि. १ उलटें करणें; उतणें करणें; खालची बाजू वर करणें. उलटणें. 'आकाश पडावया गडाडी। पृथ्वी उलथावया हडबडी॥' –एभा १७१४२. २ आंतील बाजू बाहेर करणें; फिरविणें (अंगरखा, पागोटें इ०). ३ पुरी व्यवस्था लावणें; उरकणें; पुरें करणें; पार पाडणें; तडीस नेणें (एखादें भानगडीचें काम किंवा प्रश्न) ४ उलपेपालथें करणें, चाळविणें; खालींवर करणें; हुडकणें (एखाद्या राशींतून वगैरे); धुंडाळणें ५ उत्पन्न होणें, प्रादुर्भूत होणें. 'परमतृप्ती उलथल्या पोटीं। अमृतही न लावी ओंटीं।' –एभा १२.५९१. ६ पुन्हां करणें; परत करणें. 'तेंचि उलथोनि ज्ञान कथा। उद्धवासि होय सांगता।'–एभा ११.२५५. ७ खालवरकरणें (उखळांतील धान्य) –अक्रि. १ उलटें होणें, दुसरी बाजू वर येणें २ परतणें; पुन्हां येणें. ३ (ल.) आकस्मिक मृत्यु येणे; तटकर मरणें; मरून पडणें (सामा. शिवी देतांना वापरतात) 'एवढा बाप्या पण पटकीनें हां हां म्हणतां उलथला.' 'उलथत नाहीं मेला एकदांचा!' ४ उठणें; लोटणें 'घननीळें सांवळा। परब्रह्माचा पुतळा। पाहावेया गाओं आला। उलथौनियां॥'–शिशु ५३५. [सं. उद्+तल्; प्रा. उत्थल; म. उथळ वर्णव्यत्यास] **०जाणें**–क्रि. मरणें. 'त्याचे म्हातारडे आईबाप तिकडे उलथून गेले.' –नामना ११४.

उलथा—वि. उताणा; तोंड वर असलेला; पाठीवर पडलेला. पालथा याच्या उलट. –पु. १ कलथा; सराटा; उलथणें पहा. २ उलट विरुद्ध, (बाजूचा मनुष्य) प्रतिपक्षी. ३ कांडतांना उखळींच्या तळाशीं राहिलेलें धान्य उखळून वर काढण्याची क्रिया. ४ (ल.) ठसा; संस्कार. 'निद्राकाळीं बुद्धीचा माथां। बैसे जागृतीचा उलथा॥' –विउ २.५२. ५ (ग्राम्य) उत्तर; जबाब; टोमणा. (क्रि० देणें.) ६ उलट व्यत्यास; स्थिति. प्रतिपक्ष; विरुद्ध गोष्ट, अर्थ, वस्तु. 'तूं म्हणसी जे स्वप्नावस्था। ते तंव जागृतीचा उलथा। तरी जागृती तत्कार्य व्यवस्था। केवीं घडे।'–विउ ९.३१. 'स्वप्न जागृतीचा पै उलथा। जागृतीमाजी इंद्रियें करिती ज्या ज्या अवस्था। तदनुसार नाना परी व्यवस्था। मनकरी स्व न मार्जी।' –स्वादि ५.२.४४. [सं. उत्+तल्] **०जमान**–स्त्री. १ (कों.) एकाच शेताचा किंवा मळ्याचा थोडा दूर असलेला भाग, पुरवणी भाग; मुख्य शेतास राब, कवळ वगैरेचा पुरवठा करणारी पड जमीन किंवा सामान्य पडीत जमीन. 'माझी उलथा जमीन येथून कोसभर आहे.' २ (सामा) पडीत जमीन. **०पसा**–पु. उताणा हात; भिक्षा मागण्याकरितां पुढें पसरलेला हात. **०पालथ–था**–स्त्री.वि. वरखालीं करणें; उलटापालट. उलटापालटा पहा. [सं. उद्+तल्; प्रा. उत्थल्ल+पत्थल्ल; हि उथलपाथल]

उलथी—स्त्री. उलटी; कलाटणी; परिवर्तन; उलटण्याची क्रिया. (क्रि. खाणें; घेणें; देणे).

उलपा–फा, उलपो—पु. (राजा. क.) शिधा. 'भटजींना उलपा व दक्षणा दिली.' [अर. उलफा=रोजमुरा]

उलफुली—स्त्री. (गो.) टाकळ्यासारखें एक झाड; याची भाजी करतात. [सं. उत्+पुष्प]

उलमत—वि. उन्मत्त. 'आजळ कापी जळ सारसत, अंगरख चरख उलमत कस्तुरीमृग कस्तुरी नाभित लागला पगला.'–ऐपो २४३. 'साठ कोट उलमत्त डुलतात कुंजर.'–ऐपो २४३. (टीप शितूत ३३१.) [सं उद्+मत्त]

उलमा—पु. विद्वान. [अर उलमा, अलीम अव.]

उलमी—स्त्री. (कों.) एक प्रकारची होडी.

उलव— स्त्री. (कर्ना.) चाहूल; हालचाल; जाग (माणसाची वगैरे). [का. उल्लवु–उल्लिवु=आवाज]

उलवण—न (विणकाम) कापड विणल्यानंतर फर्गीत राहिलेले धागे, दोर. [सं. उद्+वलन]

उलवणें, उलैणें, उलौणें—(गो.) बोलणें. [सं. उद्+लप्; प्रा. उल्लव=सांगणें. किंवा सं. उल्लपन, प्रा. उल्लवण=कथन]

उलसमार—स्त्री. (गो.) जेवणानंतर येणारा आळस. [सं. लस्=काम करणें, किंवा सं. अलस=आळस]

उलसा, उलिसा, उलुसा—वि. थोडा; किंचित्; इवला; इवलासा पहा. 'उलुसि साखर खजुंर खोबरें।' –मेराधा २३. [सं अल्पीयस्]

उला—पु. (व.) वैल; अवेल (चुलीचा). वेल पहा. [दे. उल्ली=चुला]

उलागीर—वि १ प्रवासी. उपऱ्या, तात्पुरता राहणारा. २ अनाहूत. आगंतुक. ३ मंत्रानें उटविल्याशिवाय किंवा बोलाविल्याशिवाय अचानकपणें येणारें, प्रकट होणारें (भूत, पिशाच्च वगैरे) ४ विन जरूरीचें; फालतू; फाजील (सामान, वगैरे). [सं. उद्+लग्]

उलाघाल–ढाल—स्त्री. १ अस्वस्थता; बेचैन (तापानें वगैरे होणारी). २ भानगड; चळवळ; खटपट; धडपड (कामधंद्याची

वगैरे). ३ खळबळ; घालमेल; क्रांति. 'सातव्या–आठव्या शतकांतील मोठी उलाढाल म्हटली म्हणजे बुद्धधर्माचा ऱ्हास' –टि ४. ११५. या व इतर अर्थी उलगाघाल, उलेंढालें पहा. [सं. उद्+घात (धातु–हन्)]

उलाघाली–ल्या, उलाढाल्या—वि. उलाघाल करणारा; चळवळ्या; गडबड्या; खटपट्या; नसत्या उठाठेवी करणारा. [सं. उद्+घात–धातु–हन्)]

उलाट—पु. १ उलटी; वांती. 'पीत्त उसळलें उलाट जाला।' –दा ३.६.३३. २ उडी. 'दाटे थाट उलाट घेति गगनीं थोडी तयां वाट ते.' –आसे ३७. [सं. उद्+लुंठ्; प्रा. उल्लट्ठ]

उलाटयंत्र—न. तोफ उल्हाटयंत्र पहा. 'भांडयादि बंदुखा उलाटर्यत्र।' –दावि ३६३. [सं. उल्हाटयंत्र]

उलाड—वि. उलार; उलट्ण्यासारखी; मागच्या बाजूस अधिक वजन असलेली (गाडी.) [उलठणें; सं. उद् +लुंठ्; प्रा. उल्लालिअ= वर फेंकलेली]

उलांडणें—उक्रि. ओलांडणें; उल्लंघणें; पलीकडे जाणें. 'रामराम जप जपोनि दोष खाणिला। हा महाभवांबुनिधी बा उलांडिला।' –आप ८. [ओलांडणें]

उलांडी—उलंडी पहा. **०बाजू**—स्त्री. उलांडीकडील होडीची बाजू.

उलार—(ना.) उलाड पहा.

उलाळ—पु. मोठा आवाज; उल्होल. 'खणण खणण खणखणिती ताळ गणिती मस्त दस्त कीं हस्ती ताळ उलाळ उफाळती नेमे पाळिती जाणिजेत समस्ती' –दावि ४१७. –वि. उंच; वर. 'आतां कोण्या नृपाळें धनु करकमळें ऊचलीजे उलाळे।' –सीतास्वयंवर (अनंत) ७८. [ध्व; उद्+लल्]

उलाळ—न. उडी. 'परतिला पाचारौनी। उलाळें घालितु।' –शिशु १०७६. [सं. उद्+लुठ्; प्रा. उल्लाल=उंच, वर फेंकणें]

उलाळणें—क्रि. उडया मारणें. 'काळ चळाळ उलाळत आहे जेर सकळ जन रे।' –दावि १२३. [सं. उद्+लुठ्, प्रा. उल्लाल=वर फेंकणें हिं; उलालना]

उलिग–गें—न. १ नियमित काम, नेमलेलें काम, सेवा, चाकरी. 'वृत्ति जाणौनि उलींगें। वोळगवीति।' –ऋ ३४. २ वेठकाम, बिगार. –वि. नियमित; ठराविक. [का. ऊळिग=सेवा, चाकरी]

उलिगवाडी—स्त्री. चोरी; लुटालूट; वाटमारी. 'करित उलिगवाडी तिये तपोवनीं.' –भाए ४३४. [का. उळि=चोर]

उलिगी—पु. चाकर; नोकर; सेवक. 'कीं आरोगितां परमानंदु। उलिगिए लाहाति प्रसादु।' –ऋ ७८. [का. ऊळिग=सेवा, चाकरी]

उलु–लू–क—पु. घुबड; दिवाभीत. [सं.]

उलूक—पु. घोडयाच्या पायास होणारा एक रोग.

उलूखल—न. उखळ. 'उलूखलीं दाटुनि सत्वर। तप्त मुसळें वेंचिती।' [वैसं. उलूखल; तुल० का. उरूकल; उरुकु=स्थिर+कल्लु=दगड]

उलेंढालें—न. उलाढाल; मोठमोठे बेत; मोठया प्रमाणावर खटपट, धडपड; द्रव्यार्जनार्थ केलेले अनेक तऱ्हेचे प्रयत्न, उद्योग, भानगडी, धडामोडी; उपद्व्याप; संसारांतील दगदग. [उलाढाल]

उलेमा—पु इस्लामी पंडित, धर्मवेत्ता, आचार्य. [अर. उलमा, अलीम अव.]

उलो—स्त्री. (गो.) हाक. [सं. वल्ग्=बोलणें; किंवा सं. उद्+लप्; प्रा. उल्लव] **०भर**–क्रिवि. हांकेवर.

उल्का—स्त्री. १ एकाएकीं तुटणारा, तुटलेला तारा; अशनि; आकाशांतून पडणारा तारा. २ चुडी; पलिता; कोलीत. 'वीरांसि आज्ञा दिधली म्हणे घ्या रे उल्का।' –कृमुरा ३६.१२. [सं.] **०पात**- पु. १ उल्कांचा, ताऱ्यांचा वर्षाव; तारे निखळून पडणें. २ (ल.) अनर्थ; संकट. (जाळपोळ, लुटालूट इ०). [सं.]

उल्फा—१ उलफा पहा. 'सिधे उल्फे' –मदरु १.८१.

उल्फा भोजन—न. लग्नानंतरचें जेवण. 'लग्नानंतर उल्फाभोजनाचें आमंत्रण येतें' –ऐरापुविवि १९१. [अर. उल्फत्=मैत्री]

उल्ब—न. गर्भावरील वेष्टण; गर्भाच्छादन. 'नातरी उल्बाची खोळी। गर्भस्थासी' –ज्ञा ३.२६०. [सं.]

उल्बण, उल्बाण—न. १ वातपित्तादिकांचा अतिशय क्षोभ. २ (ल.) भयंकर संकट, आपत्ति; अनर्थ (दुष्काळ, रोग, लुटालूट, परचक्र वगैरे). 'काळक्षोभाचिये दृष्टी, शतवर्षें अनावृष्टी। तेणें अत्युल्बणें आटे सृष्टी। पृथ्वीच्या पोटीं कांहीं नुरे।' –एभा ३. १५८. ३ सार्वत्रिक पीडा; त्रास; दुःख; आकांत. [सं. उल्बण]

उल्बण (संयुतहस्त)—पु (नृत्य) हात उपपद्मक करून त्यांच्या अग्रभागास तर्जनीपासून बाहेरून आंत विळखा घालणें व मग ते हात एकमेकांत गुंतवून तसेच गुंतलेले हात डोक्यावर नेणें. [सं.]

उल्मुक—न. कोलीत; पलिता; मशाल; पेटलेली चूड, लांकूड, गोंवरी इ०. [सं.]

उल्लंघ, उल्लुंघन—न. १ अतिक्रम; ओलांडणें; पार जाणें; पलीकडे जाणें. २ नियमभंग; मर्यादातिक्रम; आज्ञाभंग. [सं. उद्+लंघ्]

उल्लंघणें—उक्रि. १ ओलांडणें; पलीकडे जाणें; पार होणें. २ मर्यादा सोडणें; अतिक्रमण करणें (मर्यादा, रीत इ०). 'उल्लंघेली लाज। तेणें साधियेले काज॥ –तुगा १९८८. [सं. उद्+लंघ्]

उल्लंघित—वि. १ ओलांडिलेलें; पलीकडे गेलेलें; अतिक्रांत. २ मर्यादा सोडलेला; आज्ञाभंग केलेला; नियम मोडलेला.

उल्लसणें—क्रि. १ विलसणें; प्रकाशित होणें; तेजयुक्त होणें; प्रकट होणें. 'समुद्र कां वायुवशे । तरंगाकार उल्लसे ॥ ' –ज्ञा १५. ३४४. २ आनंदित होणें; प्रसन्न होणें; संतुष्ट होणें. [सं. उद्+लस्=प्रकाशणें, खेळणें]

उल्लसित—वि. १ प्रफुल्लित; आनंदित; संतुष्ट; हर्षयुक्त. २ सुशोभित; सतेज; प्रकाशित. [सं. उद्+लस्]

उल्लाट—वि. उप्र. –शर. [सं. उद्+लट्]

उल्लास—पु. (विरू.) उल्हास. १ उत्साह; आनंद: प्रसन्नता; संतोष; सुस्वभाव. 'भाग्य तेथ विलासु। सुख तेथें उल्लासु ॥ ' –ज्ञा १८.१६३७. २ हौस; आनंद वाटणें; आवड असणें; गोडी लागणें. ' आधींच शंखाचा उल्लास । त्यांत पातला फाल्गुनमास ॥ ' [सं. उद्+लस्]

उल्लासणें—अक्रि. आनंदित होणें; संतोषणें; उल्लासयुक्त होणें. ' आला नीरधराभिराम निकटीं हस्तींद्र उल्लासला ॥ ' –गजेंद्रमोक्ष (रघुनाथपंडित) ४९. [सं. उद्+लस्]

उल्लासी, उल्हासी—वि. आनंदी; उत्साही; प्रसन्न.

उल्लाळ-ळा, उल्हाळा—पु. १ उडी उलाळ पहा. ' आढाळें ऊंठिलें उल्लाळे घालितु । धनुवाडेयां पुढां ॥ ' –शिशु ९५२. 'उल्लाळ देत कवणे परी । वैकुंठ कैलासाहूनि वरी ॥ '–एरुस्व १७.२६. ' लवणाची मासोळी । जीवनीं घेत्ये उल्हाळा ॥ ' २ उसळी; ऊर्मी; उमाळा. ' जेथ विषयोर्मीच्या आकलिया । उल्हाळे घेती ॥ ' –ज्ञा ७.७५. ' एवं इंद्रियवृत्तिउल्हाळे । मोडिले गुरुवाक्य प्रतीतिबळे । निजाधिष्ठानमेळें । कळसले एकेवेळें अभंड कुलुपे ॥ ' –एभा २.५१४. ' कर्कश शब्दाचे उल्हाळ । नादें नभ दणदणी ॥ ' –केसीस्व १४.११९. ३ आनंद; उत्साह. ' वत्सें आणि गोवळे । जाती परम उल्हाळें ॥ ' –ह १०.२६५. [सं. उल्लोल=लाट. प्रा. उल्लाल=वर फेंकणें]

उल्लाळणें, उल्हाळणें—अक्रि. १ उड्या मारणें; उड्या मारून वर, बाहेर येणें (पाण्यांतून मासा इ०). २ नाचणें; बागडणें; आनंदित होणें. ' ती माहेरीं जायला मोठी उल्हाळली. ' –उक्रि. वर उचलले जाणें; उलटणें (मागच्या बाजूस अधिक ओझें झाल्यामुळें गाडी वगैरे). **उल्लाळ जाणें**–असाहि प्रयोग होतो. [उल्लाळ]

उल्लाळणें—उक्रि माखणे; लेप करणें, लावणें; ' चंदनें श्रीकर उल्हाळिले । वरि उष्णोदकें प्रक्षाळिले ॥ ' –ऋ ५३९. [सं. उद्+लालय्; प्रा. उल्लाल=पीडणें, ताडणें]

उल्लिंग—वि. नग्न. [सं. उद्+लिंग]

उल्लू—न. घुबड. –वि. १ (ल.) मूर्ख; अविचारी; मंद; खराब; टोणपा. २ धुंद; गुंगींत असलेला; कैफांत असलेला. ३ उतावीळ; हांवरा. ' उल्लू आहे बेटा ! ' [सं. उलूक=घुबड, हिं. उल्लू] **०पणा**–पु. अविचार. ' हा आपला केवढा उल्लूपणा. ' –चंद्रगुप्त १६९. **०बनणें**–अविचारी,वेडा होणें. **०मशालजी**–वि.उतावीळ; मूर्ख; अविचारी (मनुष्य). ' परिघवेस जाण्याकरतां हपापलेल्या उल्लूमशालजींना नाचवून भागावयाचें नाहीं. ' –के १९.७.३०. **म्ह**० उल्लूकाभाई मशालजी=घुबडाला उजेड सहन होत नाहीं तेव्हां त्याच्याशीं स्नेह अशक्य.

उल्लेख—पु. १ उच्चार; निर्देश; दिग्दर्शन; प्रस्ताव. २ (लेखामध्यें) समावेश; निर्देश करणें; लिहून व्यक्त करणें. [सं. उद्+लिख्]

उल्लोकित (दर्शन)—वि. (नृत्य) नृत्यामध्यें उंचावरचे पाहणें. [सं. उद्+लोक]

उल्लोच—पु. चांदवा; छत; पाल; मंडप. [सं.]

उल्हा, उल्हाणें—पु.न. (व.) वैल; अवेल, वैल पहा. 'उल्हाण्यावर भाजी शिजते. ' [दे. उल्ही=चुला]

उल्हाट-टी—पु.स्त्री. (व.) उलटी; ओकारी; वांती. 'मघाशीं त्याला एक उल्हाट झाला त्यांत अन्नच पडलें.' [सं उत्+लट्; म. उलटी]

उल्हाटयंत्र—न. तोफ; गरनाळ. ' उल्हाटयंत्राचेनि मेळें । षट्चक्रपाळें भेदिलें ॥ ' –एभा ९.१२३. ' लघु उल्हाटयंत्रें आधीं। घेऊन पुढें धावती खांदी ॥ ' –ह २२.३३. [सं.]

उल्हाटशक्ति—स्त्री. कुंडलिनी. ' तेथ उल्हाट शक्तीचेनि उजिवडें. ' –ज्ञा ९.२१४. [सं.]

उल्हास, उल्हासणें, उल्हासी—उल्लास, उल्लासणें, उल्लासी पहा. ' आलिंगनास ते पाणी । उल्हासती पै माझे ॥ ' –मुसभा ८.९८. [सं.] **म्ह**० आधींच उल्हास त्यांत फाल्गुनमास.

उल्हाळ—उल्लाळ पहा. १ वर उडी. ' मज जीवनीं मासोळी उल्हाळ घेती प्रीती करून ॥ ' –सला ३. २ उमाळा. ' त्या मुलाला पाहतांच प्रेमाचा उल्हाळा आला. '

उल्हाळें—(विणकाम) हातमागाची ओवी एके जागीं बसविण्याची खुंटी; खिटी.

उवगा—पु. बांबू; वेळू.

उवणें—अक्रि. उद्भवणें. ' ऐसें बोलें सनानिली । तंवेंकें बैठी ठेली । जैसी शृंगाराची दाटि उविली । मदनमंत्रें ॥ ' –शिशु १८६.

उवला—वि. उवा असलेला. [सं. यूका; दे. ऊआ]

उंवला—पु (राजा.) हरभरे, पावटे वगैरेचा सोलाणा. [सं. उद्+वल्]

उवस—(गो.) दमा; उबस पहा.

उवळ, उंवळ, उंवीळ—वि. धुरेसा पीळ नसलेलें; पीळ उडालेली, सुटलेली (दोरी, सुंभ इ०). [सं. उद्+वल्]

उवळणें, उंवळणें—क्रि. पीळ सुटणें; उलगडणें; पीळ सैल होणें (दोरीचा वगैरे). [सं. उद्+वल्]

उवळणें—क्रि. उपळणें, उबळणें पहा. १ उष्णतेनें पिकावयाच्या आधीं कुजावयास लागणें (फळ वगैरे). २ फुरसें किंवा

घोणस चावल्यामुळें शरीराच्या छिद्रांतून रक्त वहावयास लागणें. ३ अर्धवट वडवलेला बैल पुन्हां वीर्ययुक्त होणें. ४ उघडणें; द्रव येणें; पाझर फुटणें (हृदयास) [उबळणें]

उघळा—वि. १ उष्णतेमुळें जून होण्याच्या पूर्वीच पिकलेलें (फळ); मिळमिळीत, लिबलिबित; बिलबिलित २ निस्तेज; दुबळा निरुत्साही; मंद (भाषण, चेहरा). [उबळणें]

उघळा, उंघळा—वि. (राजा) पुरेसा पीळ नसलेला (दोर वगैरे) [सं. उद्+वल्]

उघाइणें, उघायिणें—क्रि. १ प्रसन्न होणें; संतोषित होणें; आनंद पावणें. 'देखें कूर्म जियापरी। उघाइला अवयव पसरी।' –ज्ञा २.३५२. 'ते काई पां चित्त उघाइलें। इये बोलीं तुझें।' –ज्ञा ५.१६२. २ शांत होणें. 'क्षोभलेपणें माजे। उघाइला ठायीं गाजे।' –ज्ञा ६ २१५ ३ स्पष्ट करणें. विस्तारानें सांगणें. 'जो सांख्यशास्त्रीं आहे। उघाइला।' –ज्ञा १८ ५१९. 'तोचि सामग्रीनें उघाइला।' –रंयोवा १.७६७. [सं. उप+दिश्; प्रा. उवइस] ४ स्थापन करणें; उभारणें. 'मी कळसु याचि कारणें। अठरावा अध्यायो म्हणें। उघायिला बादरायणें। गीताप्रासादा।'–ज्ञा १८.३३ [सं. उप+इ=जाणें, उपाहित–उघाइअ+ल=उघाइल –भाअ १८३५.]

उघाइला-यिला—पु अभिप्राय. 'ऐसा श्रीगुरुचा उघायिला। निवृत्तिदासासी पातला।' –ज्ञा ५ १४३. –वि. प्रशस्त; मोठा; विस्तीर्ण; 'वरि आपुलिया स्मरणाची उघाइणी। हींव ऐसीं करी साउली।'–ज्ञा ८ १३३ [सं उप+इ]

उघाय—पु १ सुख; आनंद. उघाव पहा. 'जो बहुवे विषयविलासें गुंफे। तो म्हणती उघायें पडिला सापे।'–ज्ञा ९.५०९. 'होऊनि यावें उघाया। कैवल्याचिया।' –ज्ञा १६.२७०. २ उत्कर्ष; भर; विकास. 'वयसेचेनि उघाये। संपत्तीचेनि सावायें।'–ज्ञा १३.७७१. 'आंगाचिया आटणिया। कांत उदाया आणिला जिया। स्वसंकोचें प्रिया। रूढविली जेंगें।' –अमृ १.३२.

उघार—पु (गो.) पूर, ओघ (नदीचा वगैरे). 'पावसाचो उघार आयला=पावसाचा पूर आला.' [सं. आ+पूर]

उघारीस येणें, उघाऱ्यास येणें—क्रि. अधिक होणें; उरणें; वांड्यास रहाणें, पुरून उरणें, वारीस येणें पहा. [उरणें+येणें]

उघाव—पु १ आनंद, उत्साह 'फेडितां बंधनाचा ठावो। तूं जगद्बंधु ऐसा भावो। धरूं वोळगे उघावो। तुझाचि आंगीं।'–ज्ञा १७.१०. २ उत्कर्ष; प्रसार; भर, उसळी 'जें निरोधिले घे उघावो। जया संयमुचि होय सावावो।–ज्ञा ६.४१६ ३ विस्तार; सामर्थ्य. 'केवढा माझा उघावा। करिता कोण प्रस्तावो।' –ज्ञा १८.६२२. 'आणि सुखाचें घेणें देणें। निकें उघाया ये येणें।'–ज्ञा १७.१३६. [सं. उप+इ किंवा या]

उघाव—पु अवकाश; वाव. 'तेथ साउमा घेयावा उघावो। तंव वोडवला आन प्रस्तावो।' –ज्ञा १६.६२. [उ+वाव]

उंघाळ्ळॅलॅ—वि. (गो.) १ ओंवाळलेला. २(ल.) वाईट स्वभावाचा; कोणास नको असा. [ओंवाळणें]

उघीळ—उवळ पहा.

उघेड-ढ—वि. १ उलगडा करणारा. २ वेढा उठविणारा. [सं. उद्+वेष्ट्; म. वेढणें]

उघेडा-ढा—पु. १ वेढा उठविणें. 'जै अमरावतीये आला धाडा। तै म्यां एकलेनि केला उघेडा।' –ज्ञा ११.३८७. 'न करितां रे उंवढा। केवी जाऊं पाहसी पुढां।' –एरुस्व ८.२८. २ (ल.) उलगडा; मोकळीक. [सं. उद्+वेष्ट्; म वेढा]

उघेर-री—स्त्री. अवशिष्ट भाग, अवशेष, ऊर; राहिलेला भाग. [सं. उत्+पृ–पूर; प्रा. उव्वर; उर्वरित]

उघेरा-ला—वि. उघा असलेला (माणूस, डोकें). [सं. यूका; प्रा. ऊआ]

उशना—पु. शुक्राचार्य; दैत्यगुरु. 'कवि आंतु धेर्या ठाओ। उशनाकवि तो मी।' –राज्ञा १०.२७१; –एभा १.११६. [सं.]

उशागति, उशेगत—स्त्री. १ बिछान्याची किंवा पलंगाची डोक्याकडची बाजू. २ शेताची, मैदानाची वरची बाजू. [सं. उत्+शीर्ष; प्रा. उस्सीस+गात्र, गत]

उःशाप, उश्शाप, उश्राप, उच्छाप—पु शापनिवृत्ति; शापमोचन; शापाची तीव्रता कमी करणारें वचन, वर. [सं. उत्+शप्]

उशाळ—पु (कर्ना) उसाच्या मळ्यांतील आठ इसमांवरील मुख्य. [सं. इक्षु; म. ऊंस]

उशिटणें—उक्रि. उष्टें करणें, होणें. 'एसें उपाधी उशिटलें। काय वर्णूं।' –ज्ञा १८.२२. [सं. उच्छिष्ट]

उशि(सि)टा—वि. उष्टा; उच्छिष्ट. 'जैं काळाचा खिच उशिटा। जैं आशेचा आंगवठा। जन्ममरणाचा वोलिवटा। स्वभावें जें॥' –ज्ञा ८.१४४ 'तऱ्ही नव्हचि उमटी। दिठी जयाची।' –अमृ २.१५. [सं. उच्छिष्ट]

उशिर्णी—स्त्री. उसनवारी: कर्ज देणें. 'परि अनारिसें पद्मपुराणीं। कीं दहा अवतारांची उशिणी। ते भाष फेडाया लागुनि। केलें पेणें॥' –कथा ७.५.१२८. [उसनें अप]

उशिरां—क्रिवि. विलंबानें, दिरंगाईनें, अतिकाळीं. [उशीर]

उशिशी—स्त्री. उशी पहा. 'करोनी अशिधाराची उशिशी। शरपंजरीं निजविली जैसी। नेतवट शय्यारूपें तैसी। वल्लभेवीण॥' –ज्ञाप्र ७७२. [सं. उत्+शीर्ष]

उशी, उंशी—स्त्री. डोक्याखाली घ्यावयाची लहान गादी, गिरदी; उसें [सं. उत्+शीर्ष. प्रा. उस्सीस] **०उशापायतीं असणें, उभा राहणें, बसणें, लागणें**–१ नेहमीं जवळ असणें;

संन्निध असणें (पुढील गोष्टीसाठीं). २ (ल.) संरक्षण करणें; मदत करणें; साहाय्य करणें; सेवा करणें. ३ (ल.) त्रास देणें; उपद्रव देणें; वाटेंत येणें; आड येणें. **०उशापायतीं रडणें**–एकसारखी तक्रार करणें; सतत कटकट करणें; किरकीर लावणें; त्रास देणें.

उशी––स्त्री. उसळी; उडी; चेंडू आपटला असतां वर येतो ती क्रिया. 'लागोनि अधोदेशीं ते घेउनियां सुमित्रेतेषु उशी।' –मोभीष्म ११.१४१. [सं. उत्+स्पृ–शी]

उशी––स्त्री. (गो.) ऊंस. [सं. इक्षु]

उशीकांडो, उशेकांडो––न. (गो.) उसाचें कांडें.

उशीर––पु. १ अतिकाल; बराच वेळ २ विलंब. दिरंगाई; खोळंबा; वेळ टळणें. 'भोजनासी उशीर जाले तुम्हा।' –सप्र १४.५. ३ अवकाश; अवनि. 'अरे, अर्जुन भोजनास किती उशीर आहे?' [सं. उत्+चिर] **०धरणें**–क्रि. थांबणें, वाट पाहणें. **उशीरावर येणें–धरणें**–क्रि. दिरंगाई करणें; विलंब करणें; वाट पहावयास लावणें; ताटकळत ठेवणें.

उशीर––पु. एक जातीचें सुगंधी गवत (वाळा, इ०) [सं.]

उंशील, उशेल––न. (राजा. गो.) उसाचें शेत. उसाची लागवड. [सं. इक्षु; गो. उशी; म. ऊंस]

उष्टर––पु (प्र.) उष्ट्र पहा.

उश्रम-मा––पु. १ उसासा; जोराचा श्वास; दम. (क्रि० घेणें; टाकणें). २ विसावा, विश्रांति. (क्रि० घेणें). [सं. उत्+श्रम्]

उश्रमा––१ पृच्छा; प्रत्युत्तर. 'त्यावर बावांनीं (महादजी शिंदे यांनीं) उश्रमा केली कीं' –मरिउ २.४५. २ याचना; मागणी. 'उश्रमा न करी कवणापुढें' –दावि ४५६. [सं. उत्+स्मृ]

उश्रमा––पु (व.) राग; रुसवा; गाऱ्हाणें. 'तुम्हीं लग्नाला आले नाहीं याबद्दल बंडूचा तुमचेवर उश्रमा आहे.'

उश्रामा––पु. केलेल्या उपकाराची स्मृति; आठवण [सं. उत्+स्मृ]

उश्राप––पु. उःशाप पहा. 'उश्राप काळीं पुन्हां आले। पूर्वदेहीं' –दा ९.८.९. 'मागुता उश्राप दिधला' –वसीस्व ३.३०.

उश्वास––पु. उच्छ्वास. बाहेर टाकलला श्वास; जोराचा श्वास; उसासा. 'उश्वास टाकोनि दुस्तरी। मंचकीं बैसे॥' –कथा १.८.७३. 'भरोसा नाहीं वाचेल ऐसा। म्हणोनि उश्वास टाकीत।' [सं. उत्+श्वस्]

उषःकाल––पु. पहांट; प्रभात; सूर्योदयापूर्वीच्या दोन घटका. 'पंचपंच उषःकालीं रविचक्र निघो आलें।'–होला १७. [सं. उषस्+काल]

उषःपान––न. उषःकालीं करावयाचें उदकपान; रात्रीं निजतांना उशाशीं झांकून ठेवलेलें पाणी पहाटेस पिणें; असें पाणी नाकानें पिणें हितावह समजतात यापासून मलशुद्धि होते. हें पाणी प्याल्यावर एक झोंप घ्यावयाची असते. [सं. उषस्+पान]

उषा––स्त्री. १ संधिप्रकाश २ उष काल; प्रभात; पहांट 'उघडि नयन रम्य उषा, हंसत हंसत भाली।' –रेंदाळकर [सं.]

उषा––उशी अने० पहा. 'खाशा वैऱ्यावाणी पाठि लागते आणखी उषा उसोशा।' –सला ८५.

उष्टणें––क्रि अलग करणें; सोडविणें; उचकणें; **उचकटणें; उपटणें**; बाहेर काढणें. [सं. उत्+स्थूत]

उष्टर––पु उंट. 'उष्ट्रें डगोन उचलिती' –दा १.१०.५८. [सं. उष्ट्र. फा शुतुर किंवा उश्तुर] **०खाना**–पु उंटांची पागा, शाला; उंटखाने किंवा कारखाना; अट्टा कारखान्यांपैकीं एक. 'मागें उतरला उष्टखाना' –ऐपे २.१५. –इतिहास ऐतिहासिक २२.२४.

उष्टवड-ळ––स्त्री. उष्टावळ पहा

उष्टवण, उष्टावण––न १ लहान मुलास प्रथम अन्नप्राशन करावयाचा विधि, संस्कार (मामाकडून सोन्याच्या अंगठीनें खीर मुलाच्या तोंडास लावून हा संस्कार करितात).(गो.) उष्टवणी. २ उष्टें खाणें. 'भीमक करिताहे विनंती। अवघ्या झाली परमतृप्ती। उष्टावलालागीं श्रीपती। टाकीं टेविती निजमुद्रा।'–एरुस्व १५.५ [सं. उच्छिष्ट+वृत्]

उष्टवणी––न उष्टें केलेलें पाणी, ज्यामध्यें उष्टीं–खरकटीं भांडीं वगैरे धुतात असें पाणी. शिळें, वापरलेलें पाणी, वखट, ओखट वगैरे [सं. उच्छिष्ट+वन=पाणी]

उष्टा––वि. १ टाकलेला; सोडलेला; त्यक्त (अन्न, भक्ष्य, इ०). २ खाल्लेल्या अन्नांतील अवशिष्ट राहिलेला भाग; पानांत टाकलेलें (अन्न वगैरे). 'ही उष्टी भाकरी भिकाऱ्याला दे.' ३ जेवण झाल्यावर हात, तोंड धुतल्याशिवाय असलेला, खरकटया हाताचा, तोंडाचा. ३ (ल.) अशुद्ध; विटाळ झालेला. 'मी उष्टा आहे, आंचवून आल्यावर हीं मोतीं पाहीन' ४ (ल.) वापरलेलें; उपयोग केलेलें; उपभुक्त (वस्त्र, वस्तु इ०). 'तें खोबरें त्यानें उष्टें केलेलें आहे, तूं तें खाऊं नकोस.' ५ दुसऱ्यानें पूर्वी उपयोग केलेलें, वापरलेलें, लिहिलेलें, बोलेलेलें (भाषण, वचन वगैरे). **जसें–उष्टें भाषण**; उष्टा बोल. [सं. उच्छिष्ट] **०होणें**–क्रि घाईघाईनें थोडेसें खाणें; पोटभर न जेवणें. **म्ह०** उष्ट्या हातानें कावळा हांकीत–मारीत नाहीं=कंजूष मनुष्याबद्दल वापरतात. **०उपास**–पु. जेवणांत अडथळा आल्यामुळें थोडेसें खाऊन उठणें; उपास मोडून पोटभर जेवणहि न मिळणें; नांवाला जेवणें;पानावर बसणें. **०नवरा**–पु. बिजवर. 'इतके दिवस मुलीला स्थळ पाहतां पाहतां शेवटीं उष्टा नवरा

पथकरावा लागला.' **०पाष्टा-माष्टा**–वि. खाल्लेल्या अन्नांतील राहिलेला अवशिष्ट भाग; पानांत टाकलेलें (अन्न वगैरे). उष्टा पहा. [उष्टा द्वि.] **०विटाळ**–पु. उष्टया अन्नाचा किंवा उष्टया मनुष्याचा विटाळ; उष्टयामुळें आलेली अशुद्धता, अपवित्रता. 'उष्टया विटाळानें मला किंवा ह्या पाण्याच्या हंडयाला शिवूं नको.'

उष्टावणें, उष्टाविणें––उक्रि. १ उष्टें करणें; चाखून पाहणें; उष्टावण करणें. २ विटाळणें.

उष्टावळ—स्त्री. पंगत जेवून उठल्यावर जें उष्टें राहतें तें; उष्टें अन्न; उष्टेंखरकटें. 'जेविले ते संत मागें उष्टावळी। अवघ्या पत्रावळी करुनी झाडा॥' –तुगा २०३०. 'हा प्रभाकर म्हणजे धुंडिराजपंतांच्या घरच्या उष्टावळीवर वाढलेला तुम्हां सर्वांचा एक जन्माचा गुलाम आहे.' –भा ८२. [सं. उच्छिष्ट+आवलि=पंगत]

उष्टी—वि. उष्टा पहा. **०कल्पना**–स्त्री. नवीन नसणारी, पूर्वी कोणी काढलेली कल्पना; उष्टा विचार. उष्टा अर्थ ५ पहा. **०पत्रावळ**–स्त्री. (ल.) अनेकांनीं उपभोगिलेली स्त्री; व्यभिचारी स्त्री; वेश्या. **०स्त्री**–स्त्री. उपभोगिलेली स्त्री; कौमार्य नष्ट झालेली स्त्री; क्षतयोनि स्त्री. **०हळद**–स्त्री. लग्नांत वधूच्या अंगास लाविल्यानंतर राहिलेली हळद; ही नेतर वराच्या अंगास लावावयास नेतात.

उष्टें—न. १ जेवून राहिलेलें अवशिष्ट अन्न; पानांत, पात्रांत उरलेलें अन्न; खरकटें. २ ज्यांत भोजन केलें आहे असें पात्र. 'सांवडीन मी उर्शी.' –मोसभा २.११. **म्ह०** तुपाच्या आशेनें उष्टें खाणें=कांहीं लाभ होईल या आशेनें वाईट काम करणें. **०खरकटें**–न. उष्टें; उर्शी पानें; उष्टावळ. **०खरकटें करणें**–क्रि. जेवणानंतर उर्शी भांडीं, पात्रें, जमीन इ० स्वच्छ करण्याचें काम करणें. **०खळी**–स्त्री. उष्टें–खरकटें, उष्टया पत्रावळी टाकण्याची जागा; उकिरडा; कचरा टाकण्याची जागा.

उष्टेघारो—पु. (गो.) उकिरडा; उष्टेखळी; केरकचरा टाकण्याची जागा. [सं. उच्छिष्ट+गृ]

उष्ट्र—पु. उंट. 'वन्हाड सिद्ध जाहलें फार। लागले वाद्यांचे गजर। उष्ट्रें घोडे रहंवर। चालिले फार तेधवां॥' –संवि १.१५८. [सं. उष्ट्र, फा. शुतुर किंवा उश्तुर] **०सेना**–स्त्री. सांडणीस्वार; उंटांचें सैन्य. **०लगुडन्याय**–उंटाला मारावयाची काठी, तो स्वतःच आपल्या पाठीवर वाहून नेत असतो, यावरून ज्याचें त्याच्याच हातून शासन करविणें.

उष्ट्रासन—न. (योग.) जमिनीवर उपडें निजून दोन्ही पाय ढोपरांत मोडून मांडीला मांडी लावून खोटा कुल्ल्यांना लागतील असें करणें व दोन्ही हातांच्या चिमटीनें दोन्ही पायांचे आंगठे धरणें व खांदे जमिनीला लावून मान उचलवेल तितकी वर उचलणें. –संयोग ३४८. [सं. उष्ट्र+आसन]

उष्ट्री—वि. उंटाची; उंटासंबंधीं (गति इ०). 'तो निघाल्या अश्वरत्नांच्या हारी। दाखविती गती नानापरी। उष्ट्री नाकुली हंसी मयूरी। पांचवी नीरी बोलिजे॥' –जै ४.२२. [सं. उष्ट्र]

उष्ण—वि. १ तप्त; गरम; दाहयुक्त. २ ऊन; थंड न झालेला; न निवेलेला (अन्न वगैरे पदार्थ). ३ (ल.) रागीट; आवेशयुक्त; तडफदार; उतावळा; प्रखर. ४ शरीरांत उष्णता उत्पन्न करणारा (सुंठ, मिरीं इ० पदार्थ). ५ तिखट; जालीम; कडक (पदार्थ). –न. १ ऊन, गरम हवा; ताप. २ उष्ण विकृति; शरीरांतील उष्णता, दाह, गरमी; याविरुद्ध शैत्य. [सं. उषृ=जाळणें] **०कटिबंध**–पु. पृथ्वीच्या दोन्ही अयनवृत्तांमधील भाग; भूमध्यरेषेपासून दक्षिणोत्तर २३॥ अंशांपर्यंतचा प्रदेश. 'उष्णकटिबंधावर सूर्याचे किरण लंबरूपानें पडतात.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) २९७. **०काल**–पु. उन्हाळा. **०दर्शक**–वि. उष्णता दाखविणारा (इं.) थर्मोस्कोप. [सं. उष्ण+दृश्] **०मान**–न. उष्णतेची तीव्रता, प्रमाण, माप (इं.) टेंपरेचर. **०मापक**–न. उष्णतेची तीव्रता मोजण्याचें (उष्णतामापक) यंत्र. (इं.) थर्मामीटर. **०वात, वायु**–पु. १ उष्णतेनें पोटांत गुबारा धरणें. २ अंबट, करपट, ढेंकरा येणें. **०वास**–पु. पंचाग्निसाधन. 'उष्णवास जळेंवास। शीतवास अरण्यवास॥' –दा ४.१.१२. [सं. उष्ण+वस्] **०वीर्य**–वि. शरीरांत उष्णता उत्पन्न करणारें, उष्ण परिणामकारक (औषध). [सं. उष्ण+वीर्य]

उष्णता, उष्णत्व––स्त्रीन. १ तप्तता; गरमपणा; उष्णपण. उष्ण पहा. 'उष्ण प्रकाश तो सूर्याचा। शीत प्रकाश तो चंद्राचा। उष्णत्व नस्तां देखाचा। घात होये॥' –दा १६.२.१०. २ उष्ण विकृति (शरीराची). [सं. उषृ=जाळणें] **०गतिशास्त्र**–न. उष्णता आणि यंत्रसिद्ध काम यांमधील संबंध दाखविणारें शास्त्र. (इं.) थर्मोडायनॅमिक्स. **०जन्यविद्युत्**–स्त्री. उष्णतेपासून उत्पन्न होणारी वीज; (इं.) थर्मो इलेक्ट्रिसिटी. **–तेचें यांत्रिक सममूल्य**–न. एक भाग उष्णता उत्पन्न करावयास करावें लागणारें काम किंवा श्रम; (इं.) मेकॅनिकल इक्विव्हॅलंट ऑफ हीट. **०द्रव**–पु. द्रवरूप उष्णता, (इं.) कॅलोरिक फ्लुइड. **०धारणशक्ति**–स्त्री. उष्णता टिकून राहण्याची शक्ति. **०परिमाण**–न. उष्णतेचें माप; (इं.) क्वांटिटी ऑफ हीट. **०मान, उष्णमान**–न. उष्णतेची तीव्रता; (इं.) टेंपरेचर. **०मापक**–न. पदार्थांतील उष्णता मोजण्याचें यंत्र; (इं.) कॅलोरीमीटर. **०मापन**–न. पदार्थांतील उष्णता मोजण्याची क्रिया; (इं.) कॅलोरीमिट्री. **०यंत्र**–न. उष्णतेनें चालणारें इंजिन; (इं.) हीट इंजिन. **०वहन**–न. एका परमाणूची उष्णता त्याच्या अतिनिकट परमाणूस मिळण्याची क्रिया; (इं.) कंडक्शन. **०विसर्जन**–न. उष्ण पदार्थांतून उष्णता बाहेर पडून जाण्याची क्रिया; (इं.) रेडिएशन. **०विस्तृति**–स्त्री. उष्णता सर्वत्र पसरण्याची क्रिया; (इं.) डिफ्यूजन ऑफ हीट. **उष्णतोत्पादक**–वि. उष्णता उत्पन्न करणारा; (इं.) एक्सोथर्मिक.

उष्णा, उष्णेवाण—वि. उसना, उसनें वाण पहा. [उसना अप.]

उष्णावणें—अक्रि. तापणें; गरम होणें. 'ऐसेंचि बोलतां उष्णावले.' –दावि ४०८. [सं. उष्ण]

उष्णांशु—पु. ज्याचे किरण उष्ण आहेत असा; सूर्य. [सं. उष्ण+अंशु=किरण]

उष्णीष—न. पागोटें; शिरोवेष्टण; रुमाल; मंदील. [सं.]

उष्णेवाण—न. उसनें वाण पहा.

उष्णोदक—न. तापलेलें पाणी; ऊन पाणी; गरम पाणी. [सं. उष्ण+उदक]

उष्मज—वि. उष्म्यापासून उत्पन्न झालेला (जंतु, प्राणिवर्ग).

उष्मा—पु. १ उष्ण; उष्णता. 'कां कस्तुरीसगट परिमळ। उष्मेसगट अनळ॥' –अमृ १.४२. २ उकाडा; दाह; गरमी. [सं. उष्ष्=जाळणें]

उस—उद्गा. हाय! दुःखोद्गार; एकाएकीं दुःख झाल्यामुळें किंवा कळ वगैरे निघाल्यामुळें निघणारा उद्गार. (क्रि० म्हणणें; करणें). [ध्व.; सं. उत्+श्वस्; तुल० का. उस=हुश्श]

उसउस, उसउसो—पु. (गो.) अस्वस्थता; गडबड; धांदल. –वि. अस्वस्थ; अस्थिर. [सं. उत+श्वस्]

उसकटणी—स्त्री. उसकटाउसकट; उचकाउचक; उसकटणें पहा.

उसकटणें—क्रि. १ अव्यवस्थित करणें; इकडेतिकडे टाकणें; विस्कटणें; उचकटणें (व्यवस्थित रचलेल्या वस्तू); अस्ताव्यस्त करणें; बिघडविणें (घडी वगैरे). २ उलगडणें (भाग); मोकळें करणें (एखादें यंत्र, घडघाळ वगैरे). ३ (विंचरलेले केंस, गवताची गंजी) विस्कटणें; इकडेतिकडे पसरणें. [सं. उत्+शकल]

उसकटाउसकट—स्त्री. अव्यवस्था; घडामोड; बिघाड; मोडतोड; उसकटणें पहा.

उसकणें—क्रि. विसकटणें; अव्यवस्थित करणें. 'जैसा उदक कुंभ साचार येथें। तो मळ उसके जेथें तेथें।' –नव १२.९. [सं. उत्+ष्वक्=जाणें, हालणें; प्रा. उस्सक; उत्+शकल]

उसकी—स्त्री. (गो.) उचकी. [ध्व.]

उसको, हुसको—पु. (गो.) हुरहूर; काळजी. [सं. उत्+ष्वक्क्; प्रा. उस्सक्क=उत्कंठित होणें.]

उसंग—स्त्री. (प्र.) उत्संग, मांडी. 'जननीयां घेतला उसंगा' –उषा ७.६३. 'उल्हासचंद्रिका सावध केली। मृणाळिका उसंगिअें घेतिली।'–शिशु ७५९. 'घेउनि अज्ञानें उसंगिए। आर्ती लाल्हाति जिये।' –ऋ ५. [सं. उत्संग]

उसण, उसणव?, उसणावळ, उसन—स्त्री. कमरेंत किंवा पाठींत उठणारी कळ, लचक, तिडीक. (क्रि० भरणें; निघणें; चालणें).

[प्रा. ऊसण=गतिभंग] **उसण उतरणें**–१ मंत्र वगैरे टाकून पाठींत भरलेली लचक उतरणें. २ (ल.) एखाद्याचा दिमाख उतरणें; ऐट उतरणें, जिरविणें. **०मारणें**–(गो.) लचकणें; वातानें कळ येणें. [सं. उत्+सद्]

उसण, उसणवार, उसणवारी, उसणा, उसणें, उसणेवाण—उसना, उसनेंवाण पहा. 'मुष्टिभर पोहे उसणे आणूनि। विप्रा हातीं देतसे।' –ह २९.४९. 'तुह्मया पुत्राचा नंदन। त्यासी मारिलें जैसा मत्कुण। तुजलागीं सांगतां न घेसी उसण। तरी मग आजा कायसा॥' –जै ८७.४६.

उसणून उठणें, उसणावणें—अक्रि. (माण. व.) झोपेंतून ओरडत उठणें. [उसण+उठणें]

उसंत, उसंथ, उसंधि—स्त्री. १ विसांवा; विश्रांति; आराम. (क्रि० खाणें; घेणें) 'म्हणौनि व्यापाराहातीं। उसंतु देहा ना राती।' –ज्ञा १४.२४१. २ फुरसत; रिकामा वेळ. 'कदां उसंत नाहीं।' –ज्ञाप्र १४२. 'त्यास बहूत रात्रीं झोप नव्हती, दिवसां उसंत नाहीं.' –भाव ११२. [सं. विश्रांत; प्रा. वीसंत; सं. उत्+संधि]

उसंतणें—उक्रि. आक्रमण करणें; उल्लंघन करणें; पलीकडे जाणें. 'चाले झडझडां उसंतूनी वाट। पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो।' –तुगा ११२. २ दूर करणें. 'परी नोसंतितां विवसी। भेटी नाहीं निधीसी॥' –ज्ञा १७.३११. ३ थांबणें; बंद होणें. 'आंग मोडामोडी। कार्यजातां अनावडी। नुसंतें परिवडी। जांभैयांची॥'–राज्ञा १४.१७९. ४ विसांवा घेणें. ५ आश्रय करणें. 'भार्या म्हणे प्राणेश्वरा। उसंतूं नको शोकसागरा। मीं सांगेन त्या विचारा। अत्यादरे अनुष्ठी॥'–मुआदि ३८.२२. ६ शेवटास नेणें; पुरें करणें; निस्तरणें. 'तुका म्हणे आपुलालें। उसंतिलें ज्यांणीं तें॥'–तुगा २२०८. 'योगी उसंतिती योगपंथा।' –रास ५.९३. [सं. विश्रांत; प्रा. वीसंत; सं. उत्+संधि]

उसती—स्त्री. (व.) उशी. 'उसती अंथरुणांत आहे.' [सं. उत्+शीर्ष]

उसनवट, उसनवारी—स्त्री. उधारी; कर्ज; ऋण. –वि. उसनवार; उसना दिला-घेतलेला; कर्जाऊ; उधार. **उसनवट, उसनवार, उसनवारी**–वि. क्रिवि. उधारीनें; परत बोलीनें; कर्जाऊ; भाडयानें (आणणें, देणें, घेणें वगैरे). **उसणाघाई, उसिणाघायी, उसिणेघाई**–क्रिवि. घावाला घाव किंवा मार्‍यास मारा देऊन; समोरासमोर; उसनें न ठेवतां. 'निष्कपटा होआवें। उसिणाघाई जुंझावें।' –ज्ञा २.१९०. 'उसणें घाई वीर सकळ। हाणताती परस्परें।' –ह २४. १४. **उसनी गोष्ट सांगणें**–आपल्याला जी गोष्ट करतां येणें शक्य आहे ती दुसऱ्यास करावयास सांगणें.

उसना—वि. १ परत देण्याच्या बोलीनें आणलेला (पदार्थ, वस्तु). 'म्हणे उसनें आणितें मेळऊनि '–कचेसुदा ४. २ कर्जाऊ; उधार (व्यवहार, व्यापार). ३ (ल.) उदासीन; लक्ष, मन लावून काम न करणारा; उपरा; चुकार; हलगर्जी (नोकर, नातेवाईक वगैरे). ४ हलगर्जीचें; बेफिकिरीचें (काम). ५ वरवर; दिखाऊ-पणाचें; मायावी (भाषण). [सं. वस्न = मूल्य]

उसनें—न. सूड; बदला. 'उसनें संभाजीचें घ्यावें '–ऐपो १८. **उसनें घेणें, उगविणें, फेडणें**–सूड घेणें, बदला घेणें; परत करणें; फेड करणें. **उसनेंपासनें**-वि. उधार; कर्जाऊ; मागून आणलेलें; परत बोलीचें; उसनवार. (उसनें द्वि.) **उसनें वाण**–न. १ कोणी कांहीं जें केलें असेल त्याचा मोबदला देणें; प्रत्युपकार; परत भेट; परत फेड. २ सूड; बदला. **म्ह०** उसन्यापार्यी फांसण्या= उसनें काढण्यापासून होणारा त्रास, जिकीर.

उसपण–णी, उसपा—स्त्रीपु. १ काढून टाकणें; बाहेर काढणें उपसणी, उपसा. (होडींतील, डबक्यांतील पाणी, भांड्यांतील दूध, तूप, तेल वगैरे). २ कोरडें, रिकामें करणें (बालडी, चमचा, पळी, टोपली, हात वगैरेच्या साहाय्यानें). ३ बाहेर काढणें, वर काढणें; मोकळे करणें; उघडें करणें. (म्यानांतून तरवार, गवसणींतून, आच्छादनांतून वस्तु वगैरे). [सं. उत्+सृप्] वाक्प्रचार–१ अंगावर उसपणें=रागावून टाकून बोलणें, धावून जाणें. २ काम–धंदा उसपणें=काम धंदा उरकणें, पार पडणें, संपविणें. ३ शिंग उसपणें= शिंगें उगारणें, शिंगें उगारून मारावयास धावणें.

उसपणें—सक्रि. उसपाउपस करणें; काढून टाकणें; बाहेर काढणें (भांडें वगैरेंतून वस्तु इ०)

उसपाउसपी—स्त्री. एकदम जोरानें बाहेर काढण्याची क्रिया (पाणी, म्यानांतून तरवारी वगैरे). [सं. उत्+सृप्; म. उसप द्वि.] . **उसपाभर**—क्रिवि. १ निष्कारण किंवा व्यर्थ वरचेवर बाहेर काढणें व पुन्हां भरणें. २ (ल.) उठाठेव; रिकामी दगदग; त्रास. [उसपणें+भरणें]

उसबकी—स्त्री. एक प्रकारचा रस्सा करण्याचा मसाला. –गृशि २.५२. | उसबक=एक अफगाणी जात]

उसंबर्णे—क्रि. स्फुंदणें; हुंदके देणें; हुंदके देऊन रडणें. [सं. उत्+स्फुंदन]

उसबु—स्त्री. वाळू. ' लाज्या लाह्या कीं लेण्या लालु । कानुडे तयासी बदती आरळु । सिकता वालु उस्क्या उसबु वाळु । नदीतीर खडया म्हणणें कीं ॥ ' –दावि ५४. [का. उसुबु=वाळु]

उसमट—पु. (गो.) घुसमट पहा. [उस+मर प्रत्यय]

उसमटणें—क्रि. (गो.) गुदमरणें; घुसमटणें पहा. [का. उस्स, उस्सने=कष्टानें श्वास घेणें; म. उस=दीर्घश्वास]

उसर–री—१ स्त्री. वाळविलेली भाजी; सुकविलेली भाजी (अळूं, मेथी, गाजरें इ०). सुकलेल्या आंब्याच्या फोडी; वाळवलेल्या पालेभाजीस पळवा म्हणतात. ' या आंब्याच्या उसऱ्या आहेत. ' २ (ल.) कृश; वाळलेलें शरीर. ' तत्सुख हे मत्सुख तनु होतचि होती तदाधिनें उसरी. ' –मोआदि ३५.४. ' रोग न ये हा भोग लागला देह वाळून उसरी ।' –पला ७६. **उसर करणें**–क्रि. वाळविणें; कृश करणें; निगा न राखून, श्रास देऊन किंवा छळ करून (जनावर, मनुष्य यास) कृश करणें; हयगय करणें. [सं. उष्=उष्णता देणें, जाळणें.]

उसरत, उसरपत—स्त्री. (गो.) उसंत; विश्रांति; रिकामपण; फुरसत. ' तारामती भावें काम करी । उसरत नाहीं दिवस रातीं. ' ' ऐशा करितां येरझारा । उसरपत नाहीं भवसागरा । मार्जी बुचकळ्या देत असे ॥ ' [सं. उत्+सृ]

उसरमा—पु. उश्रमा पहा. ' उसरमा मनींचा वदतां नये। ' –विठ्ठलकृत रसमंजरी ५०.

उसराण—न. ऊंसाचें शेत; ऊंस लावण्याची जमीन. [ऊंस+रान]

उसरीं—उशिरां पहा.

उसल—पु. (कर्ना.) श्वास. [का. उसलु=श्वास]

उसल, उंसल—स्त्री. (प्रा.) उंसाची जमीन; उंसाचें शेत. [सं. इक्षु+आलय]

उसवण—उसण पहा.

उसवणी—स्त्री. शिवण काढून टाकणें; टाके उलगडणें, उसवणें. [उसवणें]

उसवणें, उसविणें—उक्रि. १ शिवण काढून टाकणें; टाके उलगडणें; दोरा काढणें; उधडणें (शिवण्याच्या उलट क्रिया) २ (कों.) घरावरील शिवलेलें गवत काढून टाकणें. [सं. उत्+सिव्=शिवणें] **म्ह०** १ उसवलें त्यास शिवील पण निसवलें त्यास काय करील. २ उसवल्याला दोरा, निसवल्याला वारा.

उसवणें—क्रि. (राजा.) सुज उतरणें, ओसरणें. [सं. उत्+श्वि= सुजणें, वाढणें]

उसवास—उच्छ्वास पहा.

उससणें—अक्रि. १ उसासा टाकणें; श्वास टाकणें. ' मग उससौनि किरीटी । वास पाहिली ॥ ' –ज्ञा ११.२५३. २ वाढणें; उत्पन्न होणें; जिवंत होणें; जीवन पावणें; प्रकट होणें. ' तंव आयुष्यनदी उससे । देहाचि देहा ॥ ' –ज्ञा १७.१३२. 'परी तें असो हें ऐसें । कावरें झाड उससे । यया महदादि आरवसें । अधोशाखा ॥ ' –ज्ञा १५. १०९. [सं. उत्+श्वस्; प्रा. उस्सस]

उससा—पु. उच्छ्वास; सुस्कारा; उसासा. ' वागर्था पडत मिठी । उससांचिया ॥ ' –ज्ञा १८.१६०५. [सं. उत्+श्वस्; प्रा. उस्सस]

उसळ—स्त्री. कोणतेंहि कडधान्य (प्रथम भिजत ठेवून) शिजवून मसाला घालून तयार केलेलें भाजीसारखें खाद्य. [का. उसळि= उसळ]

उसळणें—उक्रि. उसळ करणें. [उसळ]

उसळणें—क्रि. १ वर उडणें (तुषार, लाटा, कण); वर जाणें. 'जैसीं प्रळयाचेनि समीरें । वृक्षपर्णें उसळती ॥ ' –मुवन १०. १०६. २ वर उडी मारणें; उंच जाणें. 'स्वरथावरूनि बाणाघातें उसळोनि पावती पतन।' –मोउद्योग १३.११३. 'दक्षशिर गगनीं उसळलें । वीरभद्रें पायातळीं रगडिलें ॥ ' –शिवलीलामृत १३.५८. ३ क्रोधानें अंगावर धावून जाणें; फार रागावणें; उखडणें. 'हाक देओनि उसळिला।' –शिशु १०६७. ४ जोरानें, जलद वाढणें (मूल, शेत, झाड वगैरे). ५ एकदम बाहेर, वर येणें. (पाण्यांतून, गर्दीतून). ६ वर उशी घेणें; आपटला असतां जमीनीवरून वर उडणें(चेंडू वगैरेनीं). ७ निघणें; उत्पन्न होणें; वाहणें. 'हालविशी कर्णयुगुळें । तेथूनि जो कां वारा उसळे ॥ '–गुच १.२. [सं. उत्+शल्=वर उडणें]

उसळणी—स्त्री. उसळणें; उसळी पहा. [उत्+शल्]

उसळपा—पु. १ (राजा.) सर्पणाचा ओंडा; फोडलेलें जळाऊ लांकूड. २ (सामा.) ओंडा; ओंडका. 'लांकडाचा मोठा उसळपा पर्वतावरून कोसळला. ' [सं. उत+सृप्]

उसळवट—वि. झरे, पाझर असलेली जमीन; उपळीची जमीन. [सं. उत +शल्+वत्]

उसळवाटीं—क्रिवि. सळसळ आवाज करीत. 'कांई सांगौ या परौती । उदकें उसळवाटीं कढती ॥ ' –शिशु ७४९. [सं. उत्+ शल्+वत्]

उसळा—(राजा.) उसळ पहा.

उसळी—स्त्री. १ पाण्याचे तुषार, लाटा वगैरे हवेंत उडणें. २ उडी; उशी (पाण्यांतून वगैरे). (क्रि० खाणें; मारणें). ३ (ल.) बंधनांतून जोरानें बाहेर पडण्याची किया. ४ (ल.) क्रोधाची लहर; रागाचा आवेश; प्रेम वगैरे विकारांची लाट; आवेग. ५ जोरानें वर येण्याची किंवा उडण्याची किया. (क्रि० खाणें). उसळणें, उसाळी पहा. [सं. उत+शल्]

उसां—क्रिवि. उशाला. 'मौनेंच येऊनि मोक्षदानी । सत्यभामेचे शिर उचलूनी । उसां आपुली मांडी देऊनी । चक्रपाणि बैसला।' –ह २६.११३. –स्त्री (कु.) उशी; उसें; उशास घ्यावयाची वस्तु. [सं. उत्+शीर्ष]

उसाण—न. १ (कों.) उधान; पौर्णिमेची भरती अमा वास्येची समुद्रास येणारी अतिशय मोठी भरती. २ महापूर (नदीस येणारा). [सं. उत्+धि; उच्छ्=वर येणें, उच्छ्रयण; प्रा. उस्सयण.]

उसाबर-भर— (कर्ना.) धंदा; काम; संबंध; भानगड; उठाठेव. 'त्याच्या उसाभरीला जाऊं नको.'=त्याच्यासीं संबंध ठेवूं नको ' [अर. इस्तिग्रा=संबंध तोडणें; मोकळें होणें.] **०करणें**– (माण.) व्यवस्था ठेवणें.

उसार—पु. रिकामी जागा; मोकळी जागा (गलबत, घर यांमध्यें) [हिं. उसारा=देवघरी]

उसास—उच्छ्वास पहा.

उसासणें—क्रि. १ उसासा टाकणें; दम घेणें. 'मग देओ भणे हो हो कां उसाससी। राहे राहे कां पळिसी।'–शिशु १०६८. २ उसळणें; वर येणें. 'सागरीं लहरी उसासे। उसासली ते सवेंचि नासे।' –एभा २८.२८६. ३ उमटणें; उन्नत होणें; ज्वानींत येणें; फुलणें; भरणें (स्त्रीचे स्तन). 'संगीन कुच भरदार सजिव सजदार गुलगेंद उसासले।' –प्रला ११३. ४ टाकणें; त्याग करणें. 'लक्ष्मी उसासिली।' –भाए १११. [सं. उत्+श्वस्=उल्लसित होणें; श्वास टाकणें; प्रा. उस्सास]

उसासा—पु १ दीर्घ श्वास, सुस्कारा. २ विसावा; विश्रांति. 'पार्थी व्याघ्रादि तामसा । योनी तो अळुमाळु ऐसा । देहाधाराचा उसासा । आथी जोही।' –ज्ञा १६.४१५. ३ पाण्याच्या नळांत हवा येण्याकरिता ठेवलेलें उंच छिद्र. उच्छ्वास पहा. [सं. उत्+श्वस्; प्रा. उस्सास] **०असासा**–पु. जोराचा सुस्कारा, श्वास. (क्रि० टाकणें). [उसासा द्वि.]

उसासी—स्त्री उशी. [सं. उत्+शीर्ष; हिं. उसीसा]

उसाळणें—सक्रि. हर्षविणें; आनंदित करणें. [उसळणें सं. उत्+शल्]

उसाळा—पु. उल्हास; उत्साह; आवेश; जोर; उमाळा. उसळी पहा. 'तेथें ऋषिकुळ सकळ नाचती निर्मळ उछायाचेनि उसाळे' –दा ४८९. 'सद्गुरु कृपेचेनि बळें । परोक्षज्ञानाचेनि उसाळें।' –दा ५ ३.४८. 'उसाळें नभामाजि दारू निघाली' –राक १.८८. [सं. उत्+शल्]

उसाळी—स्त्री. उडी; उसळी पहा. 'रोधिलें चित्त घे उसाळी। कथा संपतां अवलोकीं।' –मुआदि १३.१७. 'वाम हस्त ग्रीवेतळीं। दुजा सुदला पादमूळीं । गगनीं देऊनि उसाळी । धरातळीं टाकिला ॥ '–मुआदि ४१.१३७.

उसिटें—न. उठें पहा. 'उसिटें लाहावेआचे सायासु। तेथ सेवेंची करणी आसु।' –दाव २५३. 'तऱ्ही नव्हेचि उसिटी। दिठी जयाची।' –अमृ २.१५.

उसित—वशांत घास अडकणें; अमूत, उशीत पहा. (क्रि० जाणें) 'उचकी लागली उसित गेला। पींत उसळलें उलाट जाला।' –दा ३.६.३३. [सं. उत+सिक्थ्]

उसिणें—न. उठें; उसनें पहा. 'उसिणें घेतलें देवांचें। मूळ शोधिलें राक्षसांचें।' –दा १६.६.३१.

उसीर, उसीरु—उशीर पहा. 'आतां उसीरूं होईलु अपडे।' –शिशु १८५. 'आतां न लावावा उसीर' –वेसीस्व ३.५.

उसीसें—न. उसासा; श्वास; दमा. 'कीं संसाराचेनि त्रासें। जे करौनि होते उसीसें।' –ऋ ६०. [सं. उत्+श्वस]

उसुलवार—वि. (कों.) जोरानें वाढणारा; वर येणारा; वाढाळ (झाड, मूल वगैरे). [सं. उत्+शल्]

उसू—वि. (कों.) सैल; फट राहिलेला; घट्ट न बसलेला; शिथिल; पोकळ (खुंटी, दादरा, दार वगैरे). [सं. उत्+सिव्–स्यूत]

उसूल—पु. वसुल; जमा; उत्पन्न. [अर. वुसूल]

उसें—न. १ बिछान्याची डोक्याकडची बाजू; उशागत पहा. २ उशी; गिरदी; निजतांना डोक्याखालीं घेतलेला आधार ३ निजलेल्या स्थितींत ठेवलेलें डोकें 'उसें भुईवर ठेवूं नको, उशीवर ठेव.' 'उशाखालीं हात सांपडला.' [सं. उत्+शीर्ष; प्रा. उस्सीस; उच्छीर्षक–ऊसीसं–उसँ–उसें–रा. ग्रंथमाला] (कोणेकाचें) **मांडीचें उसें करणें**–आपल्या संरक्षणासंबंधीं सर्वस्वी एखाद्यावर विश्वास ठेवणें. **०गत**–उशागत पहा.

उसेती—स्त्री. (नाविक) भरतीची वेळ. [उस+येणें]

उस्करणें—उक्रि. (प्र.) उस्तरणें; विसकटणें; अस्ताव्यस्त करणें; विखरणें. 'वीण रेसभरही उस्करली नाहीं.' –झांकली मूठ (हडप) १९. [सं. उत्+शकल]

उस्कारा, उस्कारासस्कारा—पु. उसासा; सुस्कारा; जोराचा श्वास; दम. (क्रि० टाकणें) [सं. उत्+श्वास; हुश्श+सं. कृ]

उस्क्या—स्त्री. वालु; रेती. उसवु पहा. 'लाज्या लाह्या कीं लेप्या लालु। कानुडे तयासी वदती आरळु। सिकता वालु उस्क्या उसवु वालु। नदीतीरखड्या म्हणणें कीं॥' –दावि ५४. [का. उसुकु=वालु]

उस्तरणें—क्रि. १ घरावरील कवलें, गवत वगैरे आच्छादन काढणें; छपरावरील ओमण वगैरे काढणें. २ विस्कटणें; उलगडणें; उघडें करणें. ३ उसवणें; वीण काढून टाकणें; दोरा काढणें. ४ नासधूस करणें; मोकळें करणें; अलग करणें; भाग वेगळे वेगळे करणें. 'सारी पोथी उस्तरली पण तें पत्र कोठें सांपडलें नाहीं.' [सं. उत्+स्तृ]

उस्तराउस्तर—स्त्री. मोठ्या प्रमाणावर व सर्वत्र उस्तरण्याची क्रिया; उलगडणें; उस्कटणें; मोकळें करणें; उघडें करणें वगैरे. उलथापालथ, उस्तरणें पहा. [सं. उत्+स्तृ]

उस्तरें—न. (गो.) ठसका; उशीत; असुत–द पहा. (क्रि० जाणें). [सं. उत्+सिक्थ–उसित; उस्त+र]

उस्तवारी—स्त्री. १ डागडुजी; दुरुस्ती; व्यवस्था; मजबुती; पुनर्घटना. 'लोकांचे कर्जाचा मार्ग होऊन आपली उस्तवारी होईल.' –रा १३.९१. २ उपचार; तैनात; शुश्रूषा. 'जखमांची वगैरे पथ्यपाण्याची उस्तवारी बरीच आहे.' –ख ११.६०१७. 'राजाराणीची उस्तवारी करितात.' –प्राणिमो ११०. ३ मशागत; लागवड (शेत, जमीन वगैरेची). 'जमिनीची नीट उस्तवारी ठेविल्यास ती सुधारते.' –शे ३.२. ४ (माण.) उठाठेव; चौकशी. [फा. उस्तुवारी]

उस्ताद, उस्तादगिरी, उस्तारी—(हिं. गु.) वस्ताद पहा.

उस्तें—न. (कों.) पहाटेचा किंवा सकाळचा संधिप्रकाश; झुंजुकमुंजुक. [सं. उषा; प्रा. उसा]

उस्मरणें—अक्रि. १ सुस्कारा टाकणें; श्वास टाकणें. २ हुंदके देणें; स्फुंदणें. ३ धापा टाकणें. [सं. उत्+स्मृ–स्मृणोति]

उस्मरणें, उस्मारणें—उक्रि. १ आठवणें; आठवण करणें; स्मरण करणें; पुन्हां पुन्हां पुढें आणणें. २ उल्लेख करणें; सांगणें; दिग्दर्शित करणें. [सं. उत्+स्मृ–स्मरति]

उस्मरा—पु. १ विश्रांति; दम; श्रमानंतरचा विसांवा. (क्रि० घेणें). २ दीर्घ श्वास सोडणें; सुस्कारा टाकणें. (क्रि० टाकणें). [सं. उत्+स्मि–स्मेर?]

उस्मस्थड—न.(गो.) बागाईत जमिनीशेजारची पडीत जमीन.

उस्मारा, उस्मा—पु. १ उपकाराचें किंवा अपकाराचें स्मरण, आठवण, जाणीव, दिग्दर्शन. उ० उस्मारा टाकणें; उस्मा करणें. २ (सामा.) उल्लेख; कथन; दिग्दर्शन. [सं. उत्+स्मृ]

उस्मा—उश्मा पहा.

उस्रा—स्त्री. गाय. 'राखिता कळप या वनि उस्रा.' –वामन विराट ८.४८. [सं.]

उस्राप—(कुण.) उःशाप पहा.

उस्वास–सा—पु. उश्वास पहा. 'स्वास उस्वास कोंडला। तेणें प्राणी जाजावला॥' –दा ३.१.३९.

उहापोह—ऊहापोह पहा.

उंहुं–हूं—उद्गा. नव्हे, नाहीं, नको या अर्थी; नकारार्थी अव्यय. 'उपसी परि गांभीर्यें आपण न उहूं म्हणोनि त्या विटवी.' –मोसभा ५.८६. [ध्व.; सं. उत्+हुम्=संमति; म. हूं]

उहू—पु. १ व्यूह; विभू; कटं; युक्ति; बेत; तर्क; कल्पना. (क्रि० रचणें). 'रात्रीं जाऊन घर वेढून त्याला धरावें असा उहू रचला.' २ परिस्थितीप्रमाणें मूळ सामान्य रीतीच्या वाक्यांत विशेषानुरोधानें केलेला फरक. (उ० एकवचनाच्या ठिकाणीं अनेकवचन, पुल्लिंगाच्या ठिकाणीं स्त्रीलिंग, अमुक शब्दाबद्दल विष्णु इ. नांव). 'यज्ञोपवीत धारण करावें हें सामान्यवचन, येथें दोन यज्ञोपवीतें धारण करावीं असा उहू केला पाहिजे.' हेतु कायम ठेवून शाब्दवचनांत जरूर तो बदल करणें. ३ प्रथम उल्लेख; प्रस्तावना; परिस्फोट; विषयाची मांडणी (क्रि. काढणें). 'मी आपण होऊन उहू काढणार नाहीं, तुम्हीं उहू काढा म्हणजे मी मध्यस्थपणें बोलेन.' [सं. ऊह, ऊहा, व्यूह]

उहू—स्त्री. (खा.) (१) सून. (२) धाकटी भावजय. [सं. वधू–वहू–उहू–भात्रै ७.१–४]

उळ—न. फूल. 'उठणें कीं पडणें। कुचभारांचें कोण जाणें। फांकणें कीं सुकणें। जाउळा(जातीपुष्प)चें ॥' –अमृ ४.८. [सं. पुष्प–फुल्ल–उल्ल–उळ]

उळउळी, उरउळी—स्त्री. अव. (गो.) पिसा; पिसवा. [का. हुळु=किडा, जंतु; हुळि=किड्यांनीं खाणें]

उळउळीत—वि. (गो.) किंचित तापलेलें; कोंवट. [का. उळगु=जाळणें ?]

उळकेवणें, उळकुंवणें, उळकंवा, उळकुंवा—ओळकंवणें; ओळकुंवणें. ओळकंवा पहा.

उळग—उळीग पहा.

उळगाऊ, उळगी—वि. उलिगाकरितां योग्य; अहेर किंवा इतर देणगी देण्यासारखें (वस्त्र वगैरे). [का. उळ=उंची वस्त्र]

उळगी, उळिगी—स्त्री. १ एखाद्या कामाचें ओझें, भार; एखाद्याचे उपकार फेडण्याचें ओझें. २ बिगार. 'तरी कर्मप्रवृत्तीही लागीं। तया आयासु नाहीं आंगीं। जे प्रवृत्तीचेही उळिगीं। लोकुचि आथी ॥' –ज्ञा १८.४५८. [का. ऊळिग=सेवा]

उळंवणें—उक्रि. अवलंबणें; आश्रय करणें; प्राप्त होणें. 'भगवंताचियें भक्ति। स्वर्गसुखातें उळंबिति ॥' –रास १.६३२. [सं. अवलंब्]

उळंबळणें—अक्रि. तुडुंब भरणें (भांडें, नदीचें पात्र वगैरे). [सं. उत्+लंब]

उळपात—कांद्याची पात. [ता. ते. तुळु का. उळ्लि=कंद, कांदा]

उळघई-यी—स्त्री. (कर्ना.) गाडीच्या चाकांच्या तुंब्यांतील (ज्यांत कणा असतो तें) लोखंडी कडें, वसवी, आवण.

उळा—पु. हवळा; हुळा; भाजलेला हरभरा. [का. उळगु=जाळणें; म. हुळा]

उळिग—स्त्री. भोंवरा. 'आठहि पाहार जैसें पायां। उळिग घापे ॥' –ज्ञा १७.२०२. [का. उळ्ळु=वाटोळें फिरणें, गुंडाळणें]

उळिग, उळीग—स्त्री. १ सेवा; चाकरी. उळगी पहा. 'उळिग मी करीन। आंघोळीचें ॥' –ज्ञा १३.४१९. २ काम; व्यवसाय; धंदा. 'चतुर्वर्णा धातली। सिनानीं उळिगे ॥' –ज्ञा १८.८१७. ३ बिगार; पडलेलें काम. ४ उपकाराचें ओझें. (क्रि० वारणें). 'तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं। तया आयासु नाहीं आंगीं। जे प्रवृत्तीचेही उळिगी। लोकुचि आथी ॥' –ज्ञा १८.४५८. ५ (चि.) सण; श्राद्धपक्ष इ० नैमित्तिक विशेष. [का. ऊळिग=सेवा, चाकरी, काम]

उळी—स्त्री. (व.) (सुतारी धंदा) किकरें; पटाशी. [का. उळि]

उळोगार—पु. (गो.) ओघळ.

उळ्ळा—पु. (कर्ना.) एक प्रकारचें गवत.

उक्षण—न. (गो.) नांगरणी. [सं. उत्+खन्]

उक्षण—न. सिंचन; औक्षण. अवोक्षण पहा. [सं. उक्ष्=शिंपडणें]

उक्षतरण—विना. ऑक्सफोर्ड; इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड शहर. 'वर्तमानकाळीं उक्षतरणनगरीं वास करणाऱ्या महा वैदिकांची माहिती ... ...' –नि ४२४. [सं. उक्ष=बैल+तरण]

उक्षित—वि. सिंचित; भिजविलेलें; ओलें केलेलें. 'स्वपरक्षतजोक्षित ते जेवि वसंतीं पलाशतरु फुल्ले।' –मोभीष्म २.९. [सं. उक्ष्=शिंपडणें]

उक्षी—स्त्री. एक वनस्पति. हीं झाडें डोंगराळ जमिनींत होतात, याच्या फळांचें चूर्ण पत्री, जायफळ इ० पदार्थांच्या चूर्णाबरोबर पंडुरोगावर देतात. –वगु १.७२. –शे ६.२८७.

ऊ

ऊ—१ मराठी वर्णमालेंतील सहावा स्वर. अक्षर विकास उ प्रमाणेंच. २ शंकर–चंद्रवाचक शब्द.

ऊ, ऊं—स्त्री. केंसांत किंवा मलीन वस्त्रांत घाणींत उत्पन्न होणारा व चावणारा एक प्रकारचा लहानसा सहा पायांचा व कांटयांची सोंड असलेला किडा. (अव.) उवां–वा. 'अरिकरिघटा पहातां तुज नरसिंहा विमूढगति हो ऊ।' –मोकर्ण ७.१७. [सं. यूका; प्रा. जूआ; दे. ऊआ; मि. जुंअ; पं. हि. गु. जू; फ्रेंजि. जुव; आर्मेजि. झीऊ] ०टिचणें–ऊ मारणें.

ऊं—उद्गा. १ (प्रश्नार्थी) काय ? असें कसें ? २ (असंमतिदर्शक) अं ! ३ (अवमानार्थी) थूः हट् ! वा ! शुः ! 'ऊं: ? तो काय मूर्ख आहे.' –मृ २० ४ असें ? अॅं ! असावधपणामुळें गोष्ट घडल्यानंतर ती स्पष्ट ध्यानांत आली असतां निघणारा उद्गार. [हिं. पं. गु. जू; जि. जुव]

ऊ—सना. (तृतीयपुरुषीं एकवचनी सर्वनाम). तो, ती, तें. 'बाद ऊ (=त्याच्या मागून) अवलाद व अहफाद त्यासी रवा करणे.' –रा १५ ३६४. [अर.ऊ=तो]

ऊख—पु. (हिं.) ऊस. [सं. इक्षु; प्रा. इक्खु]

ऊखर—उखर पहा.

ऊचवड—उंचवट पहा. 'जे अवरां पैलीकडे। ब्रह्मस्वरूप ऊचवडें।' –ज्ञाप्र ५३५.

ऊट—स्त्री. १ गाडीच्या चाकाला गतिरोध करण्यासाठीं आडवा लावलेला दगड; ठेपा; टेका; आधार. (हा शब्द वऱ्हाडांत पुल्लिंगी वापरतात.) (क्रि० देणें) उटी पहा. २ चाकाला येणारा अडथळा

(दगड, उंचवटा, बांध यांचा). (क्रि० लागणें). **०उतरणें**–१ ताठा, गर्व नाहींसा करणें; नम्र करणें; वठणीस आणणें. २ भिकेस लावणें; धुळीला मिळविणें; नाश करणें. ३ (संकट, अपमान इ० च्या). उतारास लागणें. ४ चीर; भेग.

ऊंट—पुन. १ उंट पहा. –वि. २ (ल.) लांबटांग्या; बारिकमान्या उंच व किरकोळ (माणूस). **म्ह०** ऊंट कोण्या कानीं बसेल कोण जाणें?=दुसऱ्याच्या संकटाला कोणी हंसूं नये (केव्हां हसणाऱ्यावर आपत्ति कोसळेल याचा नेम नाहीं; कदाचित् ऊट=अडथळा याबरून). [सं. उष्ट्र]

ऊठउठीं—क्रिवि. उठाउठी पहा. 'एक म्हणती ऊठउठीं। चला घेऊं हरीची भेटी। घालूं हरिचरणीं दृढ मिठी। प्रेम पोटीं न समाये।' –ह १६.१८८.

ऊठ-ड—पु. जोंधळ्यावरील एक रोग. –शे ७.३२.

ऊठकळा—उठकळा पहा.

ऊठनाउबड—स्त्री. (व.) पुरून उरण्याइतका जिनसांचा पुरवठा. 'शंभर आंब्यानें ऊठनाउबड होते.'

ऊठपाय—क्रिवि. १ एका पायावर तयार (जाण्यास, करण्यास); सदां उभा. २ (ल.) उठल्याबसल्या; सदांनकदां; सारखें तेंच; फिरून फिरून. 'तूं ऊठपाय त्याचे घरीं कां जातोस?' [उठणें+पाय]

ऊठबशी, ऊठबस, ऊठाबशी—स्त्री. उठणें व बसणें; वारंवार उठण्याबसण्याचा व्यापार. ऊठबैस पहा. (अव.) **उठाबशा**–१ शाळेंतील शिक्षेचा एक प्रकार. २ (तालीम) व्यायामाचा एक प्रकार; बैठका मारणें. (क्रि० काढणें). [उठणें+बसणें]

ऊठबैस––स्त्री. १ ऊठबशी पहा. २ अस्थिरता; चंचलता.

ऊठी—स्त्री. बाकी; उचल; उचापत. –शर.

ऊड—स्त्री. (कों.) भिंतींतील लहान खिडकीच्या आंतील भिंतीच्या रुंदीपर्यंतचा उतरता व पसरट होत जाणारा भाग (जास्त उजेड येण्यासाठीं ठेवलेला).

ऊड—स्त्री. माया; कपट; दगा; धोका. 'प्रभु सुड घेइल पुढती अति ऊड करिन।' –आप ६२. [सं. कूट–कूड; प्रा. ऊड?]

ऊडवें—न. (कों.) भाताच्या पेंढया झोडून भात काढून घेतल्यावर पेंढया पुन्हां रचून ठेवतात तें; गंजी. (अव.) उडवी. उडवें पहा. [सं. उटज; प्रा. उडव; प्रा. उड=समूह, रास; सं. कूट; प्रा. उड, का. उड्डी=ढीग]

ऊणखूण—स्त्री. १ वर्म; रहस्य. उणखूण पहा. 'हे जिव्हारींची ऊणखूण। तुज संपूर्ण सांगीतली।' –एभा ११.१५६०. २ प्रचीति; वाटाघाट; चर्चा. 'रिघोनि सद्गुरूस शरण। काढून शुद्ध निरूपण। याची करिसी ऊणखूण। प्रत्यक्ष आनां।' –दा ६.१०.५२. उणखूण पहा.

ऊत—पु. उतणें पहा. १ पदार्थ कढूं लागला म्हणजे त्यांतील पाण्याचा अंश, फेंस वगैरे वाफेच्या जोरानें वर उचलला जाण्याची क्रिया; उकळी. 'भीमाचें यश लाजवि सुरभिक्षीराचियाहि ऊतातें।' –मोकर्ण ३८.२६. २ (ल.) फणफणाट; क्षणका; ताठा; डौल; उन्माद. (क्रि० येणें; जिरणें; जिरविणें). ३ उत्कर्ष; भरभराट; मर्यादेबाहेरची स्थिति; अतिशयपणा; (तारुण्याचा, संपत्तीचा, चिलटांचा इ०). 'यंदा आंब्यांना ऊत आला आहे.' ४ उसळी; आंतून वर येणें. 'यमुनेच्या डोहावरी आला ऊत। काळया कृतांत धुधुकारे।' –तुगा ५१. ५ (ल.) समुद्राची भरती. 'ये धर्मचमू भासे क्षुब्धाब्धीच्या उतासमा, राया।' –मोभीष्म ९.१४. ६ उचबळलेली मनोवृत्ति; गर्हिवर; आवेग. [सं. उत्; तुल० का. ऊदु=फुगणें; वर येणें] **०मारणें**–चेव नाहींसा करणें, मोडणें; फुगवटा (दुधावर आलेला) पाणी घालून नाहींसा करणें. **०येणें**–आंत न मावण्याइतकें पुष्कळ वाढणें. 'रूसो–जपानी युद्धाचे वेळी जपानांतल्या आबालवृद्धांच्या देशाभिमानाला खरोखरीच ऊत आलेला दिसला.' –के **०मात**–पु. उन्माद; माज; उद्धटपणा; बेफिकीरी; रागीटपणाचें कृत्य; धुंदी; उमेदपणा. (क्रि० करणें; मांडणें; उतरणें; जिरणें; जिरवणें. [उतणें+मातणें]

ऊद—पु. १ एका वृक्षाचा सुगंधी चीक. (धूपासाठीं जाळतात तो) विस्तवावर टाकला असतां सुवास देणारा; लोबाण; धूप. तुर्कस्थान, पूर्व आफ्रिका, जावा, सुमात्रा या देशांत यांचीं झाडें होतात. हा वात, कफ, कंडुनाशक आहे. याच्या उदबत्त्या करितात. उदाचे प्रकार–१ भीमसेनी. २ जनादेनी. ३ लोहबंदी. ४ कवड्या. [अर. उद] **०काडी–बत्ती**–स्त्री. १ उदानें माखलेली काडी. उदबत्ती पहा. २ (उप.) बोंबील. (बोंबील भाजला असतां घाण सुटते म्हणून). **उदेल, उदाचा अर्क**–न.पु. उदाचें तेल; हें पांढऱ्या व कवडश्या उदाच्या भरड कुटीपासून तयार करतात. **ऊदफूल**–न. उदाचें फूल; मडक्यांत ऊद जाळतात व त्याच्या धुरापासून घनीकरण कियेनें हें तयार करितात.

ऊद—पु. एक वृक्ष. [अर.]

ऊद—न. कांडेचोर; मांजराच्या जातीचा एक प्राणी. हा रात्रीं हिंडतो व तान्ह्या मुलास उचलून नेतो असा समज आहे. इतर हिंस्र पशूंप्रमाणें याच्या तोंडाच्या लाळेपासून जखम दूषित होण्याचा संभव असतो. [सं. उद्र]

ऊदाईन—न. (शाप.) (इं.) बेंझाईन. हा वर्णहीन स्फटिकरूप घन असून अल्कहल किंवा ईथर यांत विरघळतो. याचा धूपाकडे फार उपयोग होतो. [अर. ऊद]

ऊदाम्ल—न. (रसा.) (इं.) बेंझाइक ॲसिड. हें मोठें शक्तिमान आहे. हें पोटांत गेलें असतां मूत्रमार्गाच्या अंतस्त्वचेंतील श्लेष्ममय पदार्थास रोगबीजरहित करून उत्तेजित करतें.

ऊदिन—न. (शाप.) (इं.) बेंझिन; हें दगडी कोळशाच्या डांबरांत सांपडतें. त्याचा डांबरी रंग करण्याच्या कामीं उपयोग होतो.

ऊदिल अल्कहल—न. (रसा.) (इं.) बेंझिल अल्कोहोल. हा जाई, मोगरा इ०च्या अत्तरांत सांपडतो. यास सौम्य सुगंध येतो. भानिल कर्बिनल (फेनिल कर्बिनोल).

ऊदिल प्रायोज्जित—न. (इं.) बेंझाल्डिहाइड. वर्णहीन सुगंधि द्रव्य; कडू बदामाचें तेल.

ऊंधा—वि. (खा.) उलटा; विरुद्ध. [गु. सिं. ऊंधो]

ऊन—स्त्री. लोंकर. ' दुलया उनाच्या, शाल्नामाच्या संजाप-दार. ' –प्रसुतिकृत्यादर्श १. [सं. ऊर्णा]

ऊन—वि. कमी; उणें; अपुरें; थोडें; न्यून. उ० एकोन, अर्धोन, पाऊण. [सं.]

ऊन-न्ह—न. सूर्याचा ताप, तेज; किरणांचा प्रकाश; ओप; ओपाळी. ' सभ्य जनीं हित पृच्छक, सीतातेहि कोण गा ! नये ऊनीं ' –मोसभा ४.१०८. –वि. गरम; कढत; उष्ण. [सं. उष्ण; प्रा. उण्ह; गु उन्हु] **०ऊन-आग**–वि. १ जळजळीत; कडक; होरपळण्यासारखें; चटका बसण्यासारखें. २ (ल.) ताजें; गरम; ऊण; नवें कोरें; नुकतेंच केलेलें. **०खाणें**–उनांत बसणें. **०तावणें**–सूर्यकिरण जास्त प्रखर होणें. **०ताहान म्हणणें-पहाणें, मानणें**–(नकारार्थी प्रयोग) कांहीं संकटांची वगैरे पर्वा न करतां कामास लागणें; कांहीं सबबी न सांगतां ताबडतोब निघणें. **०पाऊस**–पु. ऊन आणि पाऊस; नागवा पाऊस; सूर्याचें ऊन पडलें असतांना पडणारा पाऊस. **०पारखा**–वि. आयुष्यांतील अडचणींचा अनुभव नसणारा; नाजुक; श्रीमंतींत लोळणारा. **०वारा**–पु. झळई; अहळी; ऊन, दाह करणारा वारा. **०वारा लागणें, सोसणें**–१ (नकारार्थी प्रयोग) संसारांतील अडीअडचणींना पारखा असणें. २ (होकारार्थी प्रयोग) सर्व संकटांना तयार असणें; सर्व प्रकारच्या हवा, परिस्थिती सहन करणें. **०परतणें**–ऊन कमी–खालीं होणें.

ऊपाळणें—सक्रि. उपाळणें; उपटणें. ' किती येक ऊपाळती लाग वेगें ' –राक २५. [उत्पाटनं]

ऊब—स्त्री. १ निर्वातस्थळाची, कोंदटपणामुळें उद्भवणारी उष्णता; गरमपणा. २ शिजणाऱ्या पदार्थापासून निघणारी वाफ. ३ विस्तवाची अथवा तापवलेल्या पदार्थांची उष्णता, धग. ' तेवींचि वन्हित्व आंगीं. आणि उबे उबगणें आगी. ' –ज्ञा १८.२२०. ४ प्राण्याच्या आंगची उष्णता. ५ उष्ण हवा; गरमी; उकाडा. ६ (ल.) विद्या, संपत्ति इ०चा गर्व, ताठा; त्यामुळें अंगीं असलेला आत्मविश्वास, धमक, भरंवसा. ७ सुख; साधन; आधार. ' त्याच्या जवळ पैशाची ऊब आहे. ' **०जिकणें**–भीड किंवा दरारा चेपणें; भीति नाहींशी होणें; परिचय, स्नेह होणें. **०जिरविणें**–रग उतरविणें; नांगी तोडणें; हुडडी नरम करणें. [का. उब्बे=उष्णता, वाफ. तुल० सं. उत्तप–उप्पअ–उब्बअ–ऊब]

ऊर—पु. १ पोटावरचा आणि गळ्याखालचा पुढल्या अंगाचा भाग; छाती. ' उरु कुहिजेल जळें । आसुवांचेनी ॥ ' –ज्ञा १३. ५६०. ' किंवा व्याघ्र व्याघ्रा भेदी प्रखरें शिलीमुखें उर गा. ' –मोभीष्म ९.२४. २ (स्त्रियांचे) स्तन; वक्षःस्थल. ' तों तों तिचा उर भरींव दिसोनि येतो. ' –नळ ७०. [सं. उरस्; प्रा. उर] **म्ह०** ऊरीं केश माथां टक्कल=एका बाजूनें मिळविणें व दुसऱ्या बाजूनें गमावणें. **०उलणें**–अतिशय दुःख होणें. ' परतेल काय ऐकुनि हें साध्वीचीं उरेंचि उलतिल कीं. ' –मोवन १२.९८. **०काढून चालणें**–ऐटींत चालणें; बेमुर्वत वागणें. **०दडपणें**–भय, लाज, मत्सर वगैरेनीं धैर्य नाहींसें होणें; उत्साह नष्ट होणें; छातीस धक्का बसणें; निराशा वाटणें. **०दबणें-बसणें**–गांगरून जाणें; भयचकित होणें. ऊर उलणें पहा. **०दाटणें-भरणें**–(दुःख, प्रीति यामुळें) गहिंवरून येणें; छाती भरून येणें; बांध बसणें. **०पिकणें**–१ कफ दाटणें व त्यामुळें घसा बंद होणें; अति श्रमानें छातीस ताण बसणें. २ (ल.) त्रास, छळ होणें. **०पिकवि णें**–त्रास देणें. ' पदोपदीं येउनि शीकवीला । तथापि तेणें उर पीकवीला ॥ ' –सारुह २.१४. **०फाटणें**–अतिशय दुःख होणें; ऊर उलणें–दबणें पहा. ' फाटे उर शोकानें बहु नित्य क्षत्रधर्म त्या वाटे ॥ ' –मोअश्व ५.३९. **०फुटणें**–१ (स्त्रियांना उद्देशून). स्तनांचा उदय होण्याच्या वयास येणें ' ती ऊर फुटण्याच्या वयांत आली आहे. ' २ हृदयविकार होणें; छाती फुटून निकामी होणें (घोडा). ३ शोकानें, काळजीनें व्याकुळ होणें; उरीं फुटणें. ४ (व.) हिंमत चालणें. ' पुरांत उडी टाकून धारेपर्यंत पोहत आला पण पुढें ऊर फुटेना. ' **०फोडणें**–१ अतिशय श्रम करणें. २ आहाराबाहेर काम करून गळाठणें; मेटाशास येणें. **०बडविणें**–दुःख–शोकप्रदर्शनार्थ छातीवर हात मारणें. **उरस्फोड करणें**–ऊर फोडणें; अतिशय श्रम करणें. **उरापोटीं करणें, धरणें, उरापोटावर उचलणें**–अतिशय श्रम करून काम करणें; चालविणें, उचलणें; ऊर फोडणें. ' अहो ! उरापोटीं करीन कसें तरी झालं ! '–एकच्याला. ' ती आपल्या मुलांना उरींपोटीं धरते. ' **उरावर घालणें**–(शिवी) इच्छा नसतांना एखाद्यास देणें, द्याव्यास भाग पडणें; ' गोणीभर होन ब्राह्मणांच्या उरावर घातले. ' –नामदेव नाटक १०५. **उरावर असणें**–एखाद्यावर अधिकार चालवणें–सत्ता असणें; एखाद्याच्या डोक्यावर असणें. **उरावर घेणें**–१ अतिशय कठिण काम पार पाडण्यासाठीं अंगावर घेणें, स्वीकारणें. २(ल.)(शिवी–स्त्रियांच्या बाबतींत) संभोग देणें. **उरावर धोंडा ठेवणें**–१ स्वतःचे मनोविकार दाबून धरणें; **स्वतःवर जोर** चालविणें. २ एखाद्यास अतिशय कठिण काम करावयास सांगणें (पूर्वी

मोंगलाईत सरकारी वसूल करण्यासाठी शेतकऱ्याच्या उरावर धोंडा ठेवीत असत यावरून). सक्ति करणें; 'कोणी तुमच्या उरावर धोंड ठेवली होती ? '—नाकु ३.१५. **उरावर बसणें**–१ छातीवर बसणें. २ (ल.) टाळतां न येणारें काम अंगावर येऊन पडणें; त्यामुळें असह्यव्यता येणें. ३ मागें लागून निकडीनें काम करून घेणें. ४ पुरुषानें एखाद्या स्त्रीवर बलात्कार करणें; स्त्रीसंभोग करणें. **उरावर हात ठेवणें–लावणें, ठेवून–लावून–सांगणें–बोलणें**–जोरानें वचन देणें; एखाद्याबद्दल खात्रीनें सांगणें. 'या श्लोकाचा अर्थ मला समजला आहे, असें मी उराला हात लावून तुला सांगतों' **उराशीं धरणें**–१ आलिंगन देणें. २ नम्रपणानें प्रार्थणें. ३ कांहीं झालें तरी (हातीं घेतलेलें काम) शेवटास नेण्याचा निश्चय करणें; सतत (गोष्ट) स्मरणांत ठेवणें. ४ स्वीकारणें; पतकरणें; आपलें म्हणणें; न सोडणें. **उरावर शेगडी**–अतिशय दुःख; विवंचना; त्रास. **उराला हात लावणें**–सत्यता, आत्मविश्वास, निश्चय, धमक दाखविण्यासाठी छातीस हात लावणें. **उरास लावणें–उरीं पोटीं धरणें**–दादाबाबा करणें; मन वळविणें. उराशीं धरणें पहा. **उराची–शिप–शिपी**–स्त्री. (निंदाव्यंजक) खोल छाती; छातीचा खळगा. **उराचा तख्ता**–पु. भरदार छाती. **उराचा पांजरा-पिंजरा**–पु. क्षीणतेमुळें छाती वरील सर्व हाडें दिसणें; छातीचा सांपळा. **उराचरचा गोहो–धगड**–पु. १ ज्या व्यक्ती–अगर वस्तूविषयीं एखाद्यास सतत भीति वाटते ती वस्तु; उरावरील दडपण; धोंड. २ नवरा; जार. [कों. गोहो=नवरा] **उरीं डांगर घेणें**–कठीण काम स्वीकारणें; अतिशय दगदग करणें. **उरीं डांगर पुरीं काट्या घेणें**–(छातीवर पर्वत घेणें व नदीच्या पुरांतून काटेकुटे ओढून काढणें) पोटासाठीं अतिशय दगदगीचे काबाडकष्ट करून सर्व तऱ्हेचे उपाय करून पाहाणें. **उरीं पोटीं करणें**–अतिशय श्रम करणें उरापोटीं करणें पहा. **उरीं फुटणें**–ऊर फुटणें पहा. 'इतका अभ्यास करून उरीं फुटायचं आहे का काय ? '–मी (आपटे). **उरीं भरणें**–१ दमणें. 'उरीं भरली ऊरपोट । केली चळवळ झाली घाबरी ॥ '–पला २. 'तो सक्तमजुरी करून उरीं भरला. ' २ स्त्रियांच्या स्तनांचा उद्गम होणें; ऊर भरणें. **०तूट**–स्त्री. (उराशीं धरण्यांत, मिठी मारण्यात अडथळा, प्रतिबंध, व्यत्यय यावरून) वियोग; विरह. (क्रि० करणें; होणें). **०दुखी**–स्त्री. १ उरांतील दुःख. २ (ल) मत्सर; हेवा. **०पाकीट**–न. (क. शिवण) छातीवरचा खिसा. [ऊर+इं. पॉकेट=खिसा] **०फोड**–स्त्री. उरस्फोड; अतिशय दगदगीचें व संकटमय काम; श्रम; उद्योग. –वि. असे श्रम पडणारें, फार मेहनतीचें (काम) **०भेट**–स्त्री. छातीस छाती लावणें; मिठी मारून भेटणें.

ऊर—स्त्री. १ उरलेलें; जास्त झालेलें काम, पदार्थ, गोष्ट; बाकी; शिल्लक; शेष. 'इतकें आवण एवढ्या खांचरास पुरणार नाहीं असें वाटत होतें; परंतु पुरून ऊर आली. ' 'या उरींत (उरलेल्या कापडांत) एक जाकीट बसेल. ' २ तूट; उणीव; उरता या अर्थी. [उर्वरित सं. उत्+ऋ] **०न पूर**–स्त्री. उरणें न पुरणें; प्रसंगीं कामाला न पुरण्यासारखें किंवा पूरून न उरण्यासारखें सामान, सामग्री; उणीव, तूट कमतरता. **०पूर**–स्त्री. पुरून उरण्याइतकी सामग्री; भरपूर; समृद्धि; आधिक्य. [उरणें+पुरणें] **०सूर**–स्त्री. १ शिल्लक; बाकी; अवशेष [ऊर द्वि.] –वि. शिलकी; उरलेलें; राहिलेलें.

ऊर—न पु. ऊत; और; नदीचा पूर. [सं. पृ–पूर् ; प्रा. ऊर]

ऊरु, ऊर—न. खेडेंगांव. ग्रामनामवाचक सामासिक शब्दांतील अन्त्य भाग म्हणून येतें. उ० जसें देव+ऊर=देवूर, चंद्र+ऊर=चंदूर. [सं. पुर, प्रा. ऊर; का. ऊरु]

ऊरु—पु.स्त्री. गुदघ्याच्या वरचा भाग; मांडी. 'तरी ऊरु या जघनासी । जडोनि घाली ॥ '–ज्ञा ६.१९२. [सं.] **०कर्म**–(नृत्य.) मांडयांनीं केलेले अभिनय; नृत्यामध्यें ऊरुकर्में पांच आहेत–स्तंभन, कंपन, वलन, विवर्तन, उद्वर्तन. **०उद्वृत्त भौमिचारी**–१ (नृत्य) टांच बाहेरच्या बाजूस येईल असें चवडयावर उभें राहून व जंघा वांकडी करून वरचेवर फिरविणें. २ (करण) उजवा हात फिरवून मांडीच्या मागें वांकडा करून ठेवणें व पोटरी वांकडी करून वर उचलून बाजूस वळविणें, म्हणजे मांडी वर होऊन जरा वळली जाते. **०मूल–संधि**–न.पु. १ मांडीचा कमरेशीं संलग्न असलेला भाग. २ जांघ; वंक्षण; कटिसंधि; आडसंधि. **०स्तंभ**–पु. एक वातरोग; वातानें खालचें अंग जाणें; पुष्कळ दिवसांचा मांड्यांचा पक्षघात.

ऊरूफ—ऊर्फ पहा.

ऊरूबरू—क्रिवि. समक्ष; समोर. उरुबुरु पहा. [फा. रूबरू]

ऊर्ज—पु. हिंमत; शक्ति; ताकद; तेज. [सं. ऊर्जस्]

ऊर्जा—स्त्री. उस्तवारी; संरक्षण. 'उरजा ' पहा. [सं. ऊर्जस्]

ऊर्जित—न. उत्कर्षाचा काळ; चढती कळा; बढती; भरभराट; कल्याण. [सं.] –वि. शक्तिमान्; चढता; उत्कर्षाचा. **०कळा–काल**–स्त्री.पु. भरभराटीचे दिवस.

ऊर्ण—न. लोंकर; तंतू; धागा. [सं.] **०तंत**–पु. कोळ्याच्या (किड्याच्या) जाळ्याचा धागा; 'हस्त (हत्ती) बांधीजे ऊर्णेतंतें । लोभें मृत्य भ्रमराते. '–दा २.१०.१५. **०नाभी**–पु. कोळी; किडा (याच्या शरिरांतून लोकरीसारखा धागा निघतो). उर्णनाभी पहा. 'ऊर्णनाभीचा तंतूसूत्रीं । जरि उचलिजेल धरित्री ॥ ' [सं.]

ऊर्णा—स्त्री. १ लोंकर (मेंढी, ससा, उंट इ० चे केस). २ लोंकरीचें कापड. (शाल, घोंगडी). ३ दोन भुवयांमधील नाकाच्या मुळाशीं असलेले केस. या ठिकाणीं भोंवरा असणें हें सार्वभौमत्वाचें लक्षण समजतात. [सं. ऊर्ण]

ऊर्ता—स्त्री. (व.) वाट पाहणें, थांबणें. अरुता पहा. ' माझी ऊर्ता नको, तुम्ही लग्न जुळवा. ' [अरुता]

ऊर्ध्व, ऊर्ध्व—क्रिवि. वरती; उंच; वर. –वि. १ वरील; उंचावरचा. २ (गणित) उभा; लंब. (इं.) व्हर्टिकल. [सं. ऊर्ध्व] **ऊर्ध्वगति**–स्त्री. वर चढणें; उंच उडणें, जाणें; आकाशांत भराऱ्या मारण. 'अविचारें ऊर्ध्व चढती । तयासीच ऊर्ध्वगति ॥ ' –दा १७ ३. २२. **०मुख**–वि. वर तोंड करून पहाणारा. –क्रिवि. वर तोंड करून ' ऊर्ध्वमुखें भेद तुटतो. ' –दा २०.३.२२. ' चिंतूनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळिक पाहतचि ॥ ' –तुगा ४२.

ऊर्ध्व—पु. १ मरण्यापूर्वी लागलेला श्वास; घरघर. २ एक रोग; श्वास; दमा; छाती भरून येणें. ३ खस्वस्तिक. [सं.] **०गति**–वि. उंच जाणारा, उडणारा. **०जानु (आकाशीचारी)**–(नृत्य.) एक पाय आकुंचित करून गुडघा वक्षस्थळाइतका उंच करणें व दुसरा पाय तसाच ठेवणें. **०जानु करण**–न. (नृत्य) उजवा पाय कुंचित करून गुडघा उंच करणें, डावा हात वक्षस्थळावर व उजवा हात उजव्या पायाप्रमाणें कुंचित करून वर उचलणें. **०दृष्टि**–वि. वर किंवा आकाशाकडे, वरच्या दिशेकडे नजर लावलेला (माणूस); वरडोळ्या; दूर दृष्टीचा; उदात्त हेतूचा; गर्विष्ठ; महत्त्वाकांक्षी; थोर मनाचा. –स्त्री. १ आकाशाकडे असलेली नजर. २ (ल.) कपट; महत्त्वाकांक्षा; अभिमान; उच्च हेतु. **०देह**–पु. मरणोत्तर आत्म्याला प्राप्त होणारा देह. **०दैहिक**–न. उत्तरक्रिया. और्ध्वदेहिक पहा. **०नाडी**–स्त्री. वर जाणारी नाडी; सुषुम्ना. इडा पहा. **०पंथ**–पु. (काव्य) वरचा मार्ग; वरची दिशा; स्वर्गास किंवा आकाशांत जाण्याचा रस्ता. ' जों जों वाढे पर्वत । मेनाक नामें अद्‌भुत । तों ऊर्ध्वपंथ आडवा येत । हनुमंतासी ते काळीं ॥ ' **०पातन**–न. पाणी अथवा इतर द्रव पदार्थ यांची आंच लावून वाफ करणें व त्या वाफेचें पुन्हां द्रवपदार्थांत रूपांतर करणें, या सर्व क्रियेस ऊर्ध्वपातन क्रिया म्हणतात. (इं.) डिस्टिलेशन. ह्या क्रियेनें पदार्थांचा अर्क काढणें. **०पान**–न. (सांकेतिक) दारू पिणें अथवा मादक पदार्थ सेवन करणें. **०पुंड्र**–पु.कपाळीं लाविलेला चंदनाचा उभा टिळा; उर्ध्व गंध. 'ऊर्ध्वपुंड्र भाळ । कंठीं शोभे माळ । कांपिजे कळिकाळ तया भेणें ॥ ' –तुगा २२१४. **०बाहु**–पु. सतत वर हात ठेवणाऱ्या वैराग्यांचा एक पंथ. **०मस्तक**–न. डोक्यावरची कवटी. **०मुखी गोम**–स्त्री. (घोडघाच्या अंगावरील) गोमेसारखा केसांच्या अग्रांचा वर वळलेला झुबका. हा अशुभकारक समजतात; याच्या उलट अधोमुखी गोम. **०मूळ**–वि. वर मुळें असलेला; उल्टा १ (ल.) देह; शरीर. २ प्रपंच जगत्. **०मंडल**–न. (नृत्य) दोन्ही हात वर करून वाटोळें फिरणें. **०रेखा–धा**–स्त्री. १ तळहातावरील किंवा तळपायावरील वर जाणारी सरळ रेघ. 'ऊर्ध्वरेषा पाया असली म्हणजे राज्य किंवा तीर्थयात्रा.' २(गणित) लंब रेषा; उभी रेषा. **०रेतस्क**–वि. नैष्ठिक; आमरण ब्रह्मचारी; ज्याचा कधींहि वीर्यपात होत नाहीं असा. 'तेथ वसती सनकादिक । ऊर्ध्वरेते देख महायोगी ॥ ' –एभा २४.२१७. ' तो राघवप्रिय विरक्त । ऊर्ध्वरेतस्क वज्रदेही ॥ ' ' ऊर्ध्वरेत मुनीश्वरांसी ॥ ' –गुच १३.६९. **०लोक**–पु. १ स्वर्ग; इंद्रलोक. २ स्वर्गांतील अनेक लोक (चंद्रलोक, ब्रह्मलोक इ०). **०वात–वायु**–ऊर्ध्व अर्थ १ व २ पहा. **०वाट**–स्त्री. स्वर्गाची वाट; ऊर्ध्वपंथ. ' प्राणाशीं दुजार्यीच्या दाउन ऊर्ध्ववाट माघारे फिरती.'–ऐपो २६९. **०स्वस्तिक**–न. खस्वस्तिक. **०संस्थ (बाहु)**–(नृत्य) पाहणाराच्या मुखाआड न येतां, लोंबत सोडलेले बाहू वर नेणें.

ऊर्ध्वाधर—वि. खस्वस्तिक व अधःस्वस्तिक यांच्याकडे टोकें असलेला; लंब, सरळ रेषेंत उभा. [ऊर्ध्व+अधर]

ऊर्ध्वासन—न. (योग.) चौऱ्यायशीं आसनांपैकीं ताठ उभें राहणें हें एक आसन. [सं. ऊर्ध्व + आसन]

ऊर्ध्वी—स्त्री. ऊर्ध्वनाडी पहा. ' मग ऊर्ध्वीचिया रिगालिगा । पुढती तेचि शक्ति पै गा । ' –ज्ञा १८.३३७. [सं. ऊर्ध्व]

ऊर्फ—वि. नांवानें लोकांमध्यें माहीत असलेला; प्रसिद्ध नांवाचा; सामान्यतः; दुसऱ्या नांवाचा; टोपण नांवाचा; अथवा; म्हणजे. उर्फ पहा. ' माहे मोहरम ऊर्फ चैत्र. ' –मोल. ' बाळाजी जनार्दन, ऊर्फ नाना फडनीस. ' [अर. उर्फ्=नांवाचा; प्रख्यात.]

ऊर्मि–र्मी—पुस्त्री. १ लाट; उसळी; उकळी; तरंग; लहर (पाण्याची). ' तुका म्हणे गंगासागरसंगमीं । अवघ्या झाल्या ऊर्मी एकमय । ' –तुगा ४०१६. ' आली ऊर्मी साहे । ' –तुगा. २ वेग; प्रवाह. ३ (ल.) आकस्मिक उत्कंठा; इच्छा; आग; वृत्ति (मनाची). ' कि क्रोधऊर्मी दारुण । सद्विवेकें आवरिजे । ' [सं. ऊर्मि]

ऊर्मिका—स्त्री. (लहरीप्रमाणें चमकणारी) अंगठी. ' उद्योत तो उत्कट ऊर्मिकांचा । ' –सारुह ८.१५२. [सं. ऊर्मि = लाट]

ऊर्वी—उर्वी पहा.

ऊषर—स्त्री. खाजण; खारी जमीन. [सं.]

ऊष्मवर्ण, ऊष्मा—पु. (व्या.) श, ष, स, या अक्षरांस ही संज्ञा त्यांच्या उच्चारावरून लावतात. हे उष्म म्हणजे उष्णता उत्पन्न करणारे अथवा प्रखर उच्चाराचे म्हणून यांना हें नांव आहे. कोणी ऊष्मवर्णांत ' ह ' चाहि समावेश करतात. [सं.]

ऊष्मा—उष्मा पहा.

ऊस, ऊंस—पु. साखर, काकवी, खडीसाखर, गूळ इ. ज्याच्या रसापासून तयार होतात अशी एक ५–६ हात उंचीची वनस्पती; ऊंस हिंदुस्थानांत सर्वत्र होतो. याचे पांढरा, तांबडा, काळा, पुंड्या, पटरी वगैरे प्रकार आहेत. तसेंच १ साल्या=दरसाल गाळला जाणारा; याच्या गुळाचा उतार कमी असतो. २ आड(ड)साल्या=दीड वर्षानें गाळला

जाणारा; याचा गूळ कसदार व रुचकर असतो. ३ खोडवा=जमिनी पासून वीतभर वुंधा राखून तोडतात व त्यास धुमारे फुटून होणारा; याचा गूळ चिकीचा असतो. उसाचा कोणताहि भाग फुकट जात नाहीं. हा समशीतोष्ण आहे. रस थंड असतो. वेडा ऊस म्हणून एक औषधोपयोगी प्रकार आहे. २ उंसाचा फड; उभें पीक. 'उसांत जाऊन वाढें शोध किंवा आण.' [सं. इक्षु; प्रा. इक्खु, उच्छु; हिं. ऊख.] **०मह** १ ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खावा? ; =एखादी गोष्ट सांगली असली म्हणून आपल्या फायद्याकरितां तिचा हवा तसा उपयोग करावा काय? ऊस गोड पण मुळया खोड=एखादा उदार भेटला म्हणून आपण त्याला साराच लुबाडूं नये. ऊस मुळासकट खाल्ला तर मुळापासून दातांना त्रास होऊन रक्त येतें, त्याप्रमाणें एखादा देणारा भेटला व त्याचा फार फायदा घेतला तर तोही त्रासतो. २ (व.) उसापोटीं काऊस=सूर्यापोटीं शनैश्चर ३ उसांत जाऊन वाढें शोधी, किंवा आणणें. **उंसांतलें वाड**–१ उसाचा शेंडा, वाढें. २ (ल.) हुषार, होतकरू मुलगा. **०खतविणें**–उसास खत घालणें. **०साळणें–सोजळणें**–उसाचीं पानें-पाती सोलणें.

ऊस—स्त्री. एक प्रकारची खारी माती [सं. ऊष–र.प्रा. ऊस=खारी माती]

ऊसदार—न. पुढील दार; त्याच्या आसपासची जागा; शेजारचा प्रदेश. परुसदार याच्या उलट. [उजूदार]

ऊह-हु—पु. १ तर्क; अजमास; अंदाज; तर्कज्ञान. २ परिस्थित्यनुरूप बदल केलेला (शास्त्रवचनांत वगैरे). उहू अर्थ १ पहा. [सं.] **०चाळणें**–प्रतिपादन करणें. 'अर्थी असत्याचा बडिवारू। सद्भावें केला जो सद्गुरु। त्यासि मिथ्या नास्तिक विचारू। एकांतीं नरू ऊहु चाळी।' –एभा २३.२२७.

ऊहापोह—पु वाटाघाट; साधकबाधक विचार; शहानिशा; विचारपूर्वक करावयाची योजना; काळजीपूर्वक चर्चा, विवरण. 'ला तत्त्वांचा पूर्ण ऊहापोह करून आमच्या ऋषींनीं मागेच निर्णय केला आहे.'–टि ४.१२५. [सं. ऊह=तर्करूप ज्ञान+अपोह=विपरीत तर्क.]

ऊहापोहणें—क्रि. चर्चा करणें; वाटाघाट करणें. 'आतां व्यापकु कीं एक देशी। हे ऊहापोही जे ऐसी।' –ज्ञा ६.८९.

ऊंहूं—उद्गा. छे! नव्हे! नको (असंमतिदर्शक). [ध्व.; ऊं+हुं=हुंकार.]

ऊळ—स्त्री. कांद्याचें रोप; पातीच्या कांद्याची गड्डी. [का. उळ्ळि=कांदा]

ऋ

ऋ—मराठी वर्णमालेंतील सातवें अक्षर. हें अक्षर इ. स. च्या ६ व्या शतकांत उष्णीषविजयधारणीच्या ताडपत्रांत प्रथम आढळतें. वर्तमान नागरी ऋ याचा आकृतीपासून बनला आहे. यानंतर १० व्या शतकांतील एका नेपाळी हस्तलिखित पुस्तकांत व ११ व्या शतकांतील कांहीं लेखांत ऋ दिसतो.

ऋक्—पु. चार वेदांपैकीं पहिला वेद; ऋग्वेद. –स्त्री. ऋग्वेदांतील ऋचा, मंत्र; सूक्तांतील एक भाग. **०संहिता**–स्त्री. ऋग्वेद-संहिता; ऋग्वेद ग्रंथ; ऋग्वेद पहा. [सं.]

ऋग्वेद—पु. चार वेदांपैकीं पहिला वेद. या वेदाचीं १० मंडलें असून तीं निरनिराळया ऋषींच्या नांवांवर आहेत. कांहीं ऋचांचें एक सूक्त व कांहीं सूक्तांचें एक मंडल अशी याची गणना आहे. याची दुसरी गणना म्हणजे आठ अष्टक व ६४ अध्याय ही होय. कांहीं ऋचांचा एक वर्ग, कांहीं वर्गांचा एक अध्याय, आठ अध्यायांचा एक अष्टक व असे आठ अष्टक म्हणजे ऋग्वेद. ही विभागणी अलीकडील आहे. ऋग्वेदाचीं एकंदर सूक्तें १०२८ असून एकंदर ऋचा १०५८०॥ व अक्षरसंख्या ४३२००० आहे. चारी वेदांत ऋग्वेद मोठा आहे. ऋग्वेद हा होत्रवेद असून यज्ञांतील होता नामक ऋत्विजानें यांतील मंत्र म्हणावयाचे असतात [सं.]

ऋग्वेदी—पु. ऋग्वेदास अनुसरणारा ब्राह्मण; ज्याच्या कुलपरंपरेंत-उपनयन, विवाहादि संस्कार ऋग्वेदांतील मंत्रांनीं होतात असा ब्राह्मण; ब्राह्मणवर्गांतील एक शाखा. [सं.]

ऋचा—स्त्री. १ ऋग्वेदसूक्तांतील एक मंत्र, श्लोक. 'बोलती निषेधनियमें। जिया ऋचा यजुःसामें।' –ज्ञा १५.१६६. २ वेदांतील मंत्र. 'ऋचा श्रुति स्मृति। अधेय स्वर्गे स्तवक जाती।' –दा १२.५.४. 'ऋचेतल्यां...स्वरांची संथा घेत स्टेजवर नाच करतो.' –नाकु ३.१२. [सं.]

ऋजु—वि. १ सरळ; प्रत्यक्ष; उजू. २ (ल.) प्रामाणिक; निष्कपटी; साधा; अकृत्रिम; सच्चा. [सं.]

ऋजुभुजक्षेत्र—न. (गणित) बहुकोणाकृति; सरळरेषाकृति. [सं. ऋजु+भुज+क्षेत्र]

ऋण—१ कर्ज; देणें; रीण; परत द्यावयाच्या बोलीनें (सव्याज किंवा तसेंच) घेतलेलें द्रव्य, इ०. २ (ल.) उपकार; माणसाला पुढील तीन ऋणें असतात असें समजलें जातें–देवऋण; ऋषिऋण; पितृऋण; कोणी मनुष्यऋण असें चौथें ऋण मानितात. ऋणत्रय पहा. 'हें माझें पूर्वील जुनें ऋण। देवापाशीं जाण ठेविलें होतें।' –एभा २३.४५२. 'ऋण फेडावया अवतार केला। अविनाश आला आकारासी।' –तुगा १०. २ (अंकगणित) बाद किंवा वजा करावयाचा अंक, रकम. ३ (बीजगणित) वजाबाकीचें चिन्ह; उणें चिन्ह; उणी संख्या; वजा करावयाची संख्या; याच्या उलट धन. ४ (पदार्थविज्ञान) विजेचा एक प्रकार; (इं.) (निगेटिव्ह) अपसारक विद्युत्; धनविद्युत्च्या उलट ऋणविद्युत्; जवळ असलेल्या दोन पदार्थांपैकीं एकावर ऋणवीज असेल तर दुसऱ्यावर धनवीज उत्पन्न

होते. [सं.] **०करणें**–१ कर्ज काढणें. २ कर्ज करणें. **०काढणें**–कर्ज काढणें. **०फिटणें**–कर्जमुक्त होणें; उपकाराची फेड होणें. 'मेलों रणांत म्हणजे तुमचें यांचेंहि सर्व ऋण फिटलें.' –मोभीष्म ११. ७४. **म्ह०** १ ऋण काढून सण करणें=अनुकूलता नसतांहि उसन्या पैशांवर लौकिक, हौस संभाळणें. २ ऋणं कृत्वा घृतं पिबेत्=प्रसिद्ध नास्तिकाग्रणी चार्वाक याच्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पुढील श्लोकांत हा चरण आहे. 'यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत्. भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।' (अर्थ–जीवांत जीव आहे तोंपर्यंत चैन करावी ऋण काढून तूप प्यावें. कारण या देहाचा भरंवसा काय? जळून गेलेला देह पुन्हां मिळत नाहीं). **०करी**–वि. १ कर्ज देणारा; सावकार; उत्तमर्ण. २ कर्ज घेणारा; देणेदार: ऋणको; अधमर्ण. ३ ज्यापासून कांहीं उपयोग नाहीं पण ज्याला उगीच पोसावें लागतें असा, कुचकामाचा माणूस; आळशी, आयत खाऊ अशास निंदेनें म्हणतात. ४ ज्याच्याकडून आपल्याला नेहमीं मदत होते व जो सारखा आपल्यावर कृपा करीत असतो अशा माणसास कृतज्ञतादर्शक बुद्धीनें म्हणतात. **०ग्रस्त**–वि. कर्जबाजारी; कर्जात बुडालेला **०घातकी**–वि. (ना.) अवसानघातकी; ऐन वेळेवर मागें घेणारा. **०चिन्ह**–न. (गणित) उणें चिन्ह, (–) ऋण अर्थ ३ पहा. **०त्रय**–न. देवऋण, पितृऋण, ऋषिऋण; ऋण अर्थ १ पहा. 'मी ऋणत्रयापासून त्रिशुद्धि। मुक्त झालों भगवंता।' 'प्राचीन ग्रंथांतून ऋणत्रयाची कल्पना आढळते.' –टि ४.१४८. **०दार**–वि. देणेदार; ऋणकरी; ऋणकरी अर्थ २ व ३ पहा. **०धन**–न.१ कर्जाऊ, उसना घेतलेला पैसा. २ उणें अधिक चिन्ह. **०ध्रुव**–पु. (पदार्थविज्ञान.) (चुंबकाच्या किंवा विजेच्या) दोन टोकापैकीं एक टोंक. (इं.) निगेटिव्ह पोल; कॅथोड याच्या उलट. **०पद**–न. वजा करावयाचा राशि, पद; ऋण अर्थ ३ पहा. **०बंध–बंधन**–पुन. कर्जाचें बंधन; कर्जाची अटक; कर्जाचा जाच. **०बद्ध**–वि. कर्जानें बांधला गेलेला; ऋणग्रस्त. **०मुक्त**–वि. कर्जमुक्त झालेला; अऋणी. **०मुक्ति–मोक्ष–मोचन–शोधन**–स्त्री. पुन. कर्जाची फेड; कर्जाचें वारण; कर्ज देऊन टाकणें. **०मोचित**–वि. १ ऋणमुक्त. २ (कायदा) धनकोनें कर्ज निवारिलें असतां जो धनकोचा नोकर होतो तो. **०वई–पणा**–वि.पु. ऋणी; ऋणीपणा. 'निळा म्हणे ऋणवईपणा। होतसां नारायणा उत्तीर्ण।' –निगा १९०. –नागा ६३५. **०विद्युत्**–स्त्री. विजेचा एक प्रकार. (इं.) निगेटिव्ह इलेक्ट्रिसिटी; ऋण अर्थ ४ पहा. याच्या उलट धनविद्युत्. **०हर्ता**–वि. (ऋण फेडणारा.) परमेश्वराचें एक विशेषण. खिस्ती वाङ्मयांत प्रयोग.

ऋणको–पु. कर्ज असलेला; कूळ; अधमर्ण; ऋणकरी; धनकोच्या उलट. [ऋण]

ऋणवैपण–न. ऋणवईपणा पहा. 'तें ऋणवैपण देखोनि अंगीं। मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं।' –ज्ञा ८.१३१. [ऋण]

ऋणाईत, ऋणाईतस्वरूपी, ऋणायतस्वरूपी, ऋणायीतस्वरूपी–पु. १ (सामा.) ऋणकरी. २ कांहीं उपयोग नसतां पोसावा लागणारा ऋणकरी. 'उगीच ऋणायतस्वरूप्यासारखें डोक्याला हात टेकून चार चौघे येथें येतात तेथें बसुं नका.' –मोर ४. ३ देणेदार; कर्जदार. 'एक म्हणे हा माझा ऋणायित। भला सांपडला येथ।'–एभा २३.५२१. **म्ह०** सगळी साळ्याची, अर्धी माळ्याची धनीण तेल्याची अन् ऋणाईत ब्राह्मणाची (बायको).

ऋणादान–न. १ सावकारीचा धंदा; पैसे उसने देण्याचा व्यवसाय. २ कर्जवसुली; उग्राणी. ३ कर्जफेड. [सं. ऋण+आदान]

ऋणानुबंध–पु. १ चालू सुखदुःखाचा पूर्वे जन्मार्शी ऋणसंबंध; इष्टानिष्ट फल देणारा पूर्वसंबंध; प्राक्तन; योगायोग; ईश्वरीसूत्र. 'हा परमेश्वराच्या घरचा ऋणानुबंध.' २ स्नेहसंबंध; घरोबा; मैत्री. 'जन हो! मजपासुनिया सुखदुःखाशा मुळींच वर्जावी। सरला ऋणानुबंधचि ईशस्मरणींच वेळ योजावी॥' –वनवासी फूल–टिक. [सं. ऋण+अनुबंध]

ऋणिया–वि. १ कर्जदार; देणेकरी; ऋणको. 'परी मेचु ये होइजेल। ऋणिया तुज॥' –ज्ञा १८.३०१. २ धनको; सावकार. 'जैसा समर्थु आणि ऋणिया। मागों आला बाइणिया। न लोटे तैसा प्राणिया। पडे तो भोगु॥' –ज्ञा १८.२५२. [ऋण]

ऋणी–वि. १ ऋणासंबंधी. २ देणेदार; ऋणको. 'आमुचा तू ऋणी टार्यीचाचि देवा। मागावया ठेवा आलों दारा॥' –तुगा १२१९. ३ (ल.) उपकारबद्ध; उपकृत. 'त्याचे आपण ऋणी नाहीं काय?' –टि ४.१४८.

ऋत–न. सत्य; खरेपणा. [सं.]

ऋतु–पु. १ विशिष्ट कालावधि, हवामानाप्रमाणें मानलेला वर्षाचा एक भाग; हवामानांत नियमानें होणारा फरक; भारतीयकालगणनेप्रमाणें दोन महिन्यांचा काळ. हे वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर असे सहा ऋतु कल्पिले आहेत. यूरोपांत वसंत, ग्रीष्म, वर्षा व शरद असे चारच मानतात. 'ते ऋतुकाळींचा मारुतू। ज्ञानवनांतू जे रिघे॥' –एभा १२.१. २ स्त्रियांचा मासिक पाळीचा काल; स्त्रियांचा रजोदर्शन काल. ३ (ल.) हंगाम; मोसम (झाडावरील फुलां–फळांचा). ४ गर्भधारणेचा काळ फळण्याचा काल (पशुपक्ष्यांचा); ज्वानी. ५ सहा संख्येचा गट, ह्यापरून (ल.) सहा ही संख्या. [सं.] **०काल**–१ गर्भधारणेचा काल हा रजोदर्शनापासून १६ दिवस असल्यामुळें संभोगास व सुप्रजाजननास योग्य समजला जातो. 'हेंही वेदें नेमिलें जाण। स्वदारागमन ऋतुकाळीं।' –एभा २१.१९६. २ ऋतुपरत्वें येणारा काल; ऋतु चालू असलेली वेळ; हंगाम; मोसम. 'ऋतुकाळें फळें येती पूर्ण। त्यासि दृष्टिभेटी हाटी जाण।' –एभा २३.९८. 'ऋतुकालोद्भव पुष्प–फळ।' **०गण**–पु. ऋतूंचा समुदाय; सारे ऋतू. **०त्रय**–न. तीन ऋतू;

उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा. 'पैं ऋतुत्रय आकाशें । धरुनियाही जैसे ॥' –ज्ञा १४.२९१. [सं.] **०दर्शन**–न. रजोदर्शन; स्त्रियांस प्रथम प्राप्त होणारा ऋतु, विटाळ; नहाण; ऋतुप्राप्ति. **०दान**–न. संभोग; स्त्रीसमागम. 'अधेरात्रीनंतर भार्येस ऋतुदान करावें.' –सुमु १७. **०पति**–पु. वसंतऋतु. 'जैसें ऋतुपतीचें द्वार । वनश्री निरंतर । वोळगे फळभार । लावण्येसी ।' –ज्ञा ३.१००. (जुनें अप. रूप ऋतिपति. 'फुल्लवडवा ऋतिपति । बोलिका बृहस्पती ॥' –शिशु ५१. **०पर्याय**–पु. ऋतूंचें परिवर्तन; अनुक्रम; ऋतूंचें पुन्हां-पुन्हां येणें; ऋतूंत बदल. **०प्राप्ति**–स्त्री. रजोदर्शन, ऋतु प्राप्त होणें; नहाण; विटाळशेपण. 'मुख्य मुख्य स्मृती आणि सूत्रें हुएनसांगच्या वेळीं प्रचारांत असुन पूज्य मानीत असत. या ग्रंथांतून मुलीचा लग्नाचा काळ आठ वर्षापासुन ऋतुप्राप्तीपर्यंत सांगितला आहे.' –टि ४.११५. **०मती**–स्त्री. (अप. रूपें–ऋतुवंती–वंता–वती.) १ विटाळशी; प्रथम ऋतु प्राप्त झालेली कन्या: न्हाणोली. २ विटाळ प्राप्त झाल्यापासून १६ दिवसपर्यंत गर्भसंभव होण्यास किंवा गर्भधारणेस योग्य स्त्री; विशेषत: चवथ्या दिवशीं ती अशी अवश्य भोग्य समजतात. 'व्रत व श्राद्ध सांग होऊन ऋतुमतीची इच्छाही पूर्ण होईल.' –सुमु १७. **०शांति-शांत**–स्त्री. प्रथम रजोदर्शनसमयीं अनिष्ट मासादिकांचें दूषित फलनाशार्थ करावयाची शांति; गर्भाधानविधि. 'कारण पुढें शुक्राचा अस्त आहे म्हणून कुर्‍हाडबाची ऋतुशांति करून घ्या.'–कफा ९. **०संपादणें**–ऋतुदान करणें; संभोग गणें. 'दिवस पांचवा ऋतु संपादून मग जा गुणराशी।' –पला ९२. **०स्नाता-त**–वि. १ विटाळशेपणानंतर स्नान करून शुद्ध झालेली. २ (चुकीनें) विटाळशी; ऋतुमती; रजस्वला. 'ऋतुस्नात भार्या, जिला चतुर्थ दिवस त्याच दिवशीं एकादशी ..... आली असेल तर ...' –सुमु १६. ३ संभोगयोग्य; उपभोग्य. 'कां शुनी जैशी ऋतुस्नात। तिसीं भोगूं यती श्वान बहुत.' –एभा १०.५२२. [सं. ऋतु+स्नाता; ऋतुस्नात चुकीचा प्रयोग]

ऋतूद्भव-द्रावक–वि. आतवजनक; ऋतु प्राप्त करून देणारें (औषध वगैरे). [सं. ऋतु+उद्भव]

ऋत्विज–पु. यज्ञयाग, होमहवन इ० कर्म करणारा, त्यांत भाग घेणारा; यजमानानें याची योजना करावयाची असते. यज्ञ-यागांत व होमहवनांत ऋत्विग्वरण नांवाचा एक विधि असतो. यांत यजमानानें आपल्या घरीं करावयाच्या यज्ञकर्मांत विशिष्टकार्यी त्या त्या ऋत्विजाची योजना करून त्यांचें पूजन करावयाचें असतें. ऋत्विज अव्यंग, तरुण असावा वगैरे लक्षणें सूत्रग्रंथांतून (आश्वलायन गृह्यसूत्र १.२३.) दिलीं आहेत. [सं. ऋतु+इज्=पूजा करणें]

ऋद्धि–स्त्री. १ ऐश्वर्य; संपत्ति; भरभराट; समृद्धि; लक्ष्मी. 'का तपोबळें ऋद्धी। पातलिया भ्रंशे बुद्धी ॥' –ज्ञा १.१८८. २ ऐश्वर्याचा, भरभराटीचा काळ. [सं.] **०सिद्धी**–स्त्री.अव. १ गणपतीच्या दोन दासी, परिचारिका; सामान्यतः ऋद्धि. 'ऋद्धिसिद्धिसहित महागणपतिभ्यो नमः।' (विरू.) रुद्धिसिद्धि पहा. २ ऋद्धि आणि सिद्धी (अष्टमहासिद्धी): संपत्ति आणि यश.

ऋषभ–१ बैल; पोळ; **वसु.** २ (संगीत) (शुद्ध) सात स्वरांपैकीं दुसरा स्वर; सा, रे, ग, पैकीं रे हा स्वर. स्वरसप्तक पहा. –वि. श्रेष्ठ. उ० पुरुषर्षभ. 'व्यथा न देती पुरुषा हे जया पुरुषर्षभा।' –गीता २.१५. [सं.]

ऋषि–पु. १ तपश्चर्यादि पुण्यकर्मांचे ठिकाणीं ज्याची सतत पूर्ण निष्ठा असुन ज्यांचीं वचनें ईश्वरवचनाप्रमाणें लोक मानतात असा साधु; ऋषींमध्यें कश्यप, अत्रि इत्यादि सात ऋषी प्रसिद्ध आहेत. ऋषींमध्यें कांहीं वेदमंत्रद्रष्टे (मंत्ररचना करणारे) आहेत. ऋषींचे पुढील सात प्रकार आढळतात–देवर्षि, ब्रह्मर्षि, राजर्षि हे तीन मुख्य आहेत. महर्षि परमर्षि, श्रुतर्षि व कांडऋषि हे चार कोणी मानतात. (सामा.) तपस्वी; मुनि; योगी. २ सात्त्विक माणूस; देवमाणूस; शुद्ध आचरणाचा, धार्मिक माणूस. [सं.] **म्हण** नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ पाहूं नये (केवढीहि मोठी नदी असली तरी तिचा उगम एखाद्या ओहोळापासून झालेला असतो, तसेंच पुष्कळ ऋषींचा जन्म जारज किंवा हीन कुळांत झाला असल्याच्या महाभारत वगैरे ग्रंथांतून कथा आहेत, म्हणून त्यांचें मूळ शोधूं नये, कारण तें अनादरास कारण होतें). एखाद्या गोष्टीचा अधिक छडा लावीत न बसतां चालू गोष्टीकडे लक्ष द्यावें या अर्थी उपयोग. **०ऋण**–न. मनुष्यप्राण्याला असलेल्या ऋण-त्रयांपैकीं एक ऋण; दुसरीं देव–देवऋण व पितृऋण होत. ऋषितर्पण व वेदाध्ययन यांनीं ऋषिऋण फिटतें. **०धान्य**–न. मुख्य अठराधान्यें खेरीज करून सावे, वरी, देवभात वगैरे किरकोळ धान्यांपैकीं धान्य. **०पंचमी**–स्त्री. भाद्रपद शुद्ध पंचमी; या दिवशीं अरुधतीसह सप्त-ऋषींची पूजा करतात. हें व्रत सर्व स्त्रियांनीं, विटाळशी असतांना चुकून घरांत कांहीं वस्तूस स्पर्श झाल्यास तो दोष नाहींसा होण्यासाठीं करावयाचें असतें. या दिवशीं स्त्रियांनीं बैलाच्या कष्टानें तयार झालेला कोणताहि पदार्थ खावयाचा नसतो **०मार्ग**–पु. शास्त्रविहित आचार, वर्तन; शुद्ध, सात्त्विक वर्तन; निषिध्द, अन्याय्य कर्म लाभ होत असतांहि सर्वथा न करणें. **०मार्गी**–वि शुद्ध वर्तन ठेवणारा; ऋषि-मार्गानें जाणारा. **०यज्ञ**–पु. पंचमहायज्ञांपैकीं एक यज्ञ; ब्रह्मयज्ञ. इतर यज्ञांमध्यें प्रत्यक्ष अवदान किंवा बलिदान असतें परंतु या यज्ञांत ऋषिप्रीत्यर्थ वेदाध्ययन करणें हेंच हवन होय. **०संख्या, संख्याक**–वि. सात ही संख्या, सात ऋषींवरून ही संज्ञा पडली आहे. 'खदिरवृक्षांचे शास्त्रसंख्याक। पळसांचे ऋषिसंख्याक। ऐसियापरि सम्यक। यज्ञक्रिया अवलंबिली ॥' –जै ९२.४९.

ऋषेश्वराचा कारभार–पु दिरंगाईचा, सावकाशीचा, अव्यवस्थित चालणारा कारभार. [शुध्दरूप ऋषीश्वर]

ऋष्टि–स्त्री. लढाईचें एक शस्त्र; तलवार किंवा भाला. –हिंलह २२. [सं.]

ऋक्ष–पु. अस्वल; रीस. –न. एक तारकापुंज. [सं.]

ऋ, ऌ, ॡ.

हे तीन स्वर आरंभीं असलेले शब्द मराठी भाषेंत येत नाहींत, संस्कृतमध्यें येतात.

ए

ए—मराठी वर्णमालेंतील अकरावें अक्षर. अक्षरविकास–याच्या पांच अवस्था आहेत १ गिरनार शिलालेख; २–३ सहाव्या शतकांतील ताडपत्री ग्रंथ व बुद्धगयेचा लेख; ४ धार शिलालेखांतील काव्य (११ वें शतक). शेवटची पांचवी अवस्था त्यानंतर लवकरच प्रचारांत आली. –ओझा १.

ए—उद्गा. परिचयांतील माणसास हाक मारण्यासाठीं योजावयाचें संबोधन; अरे! अग! 'ए रामा, इकडे ये.' [सं.]

ए—सना. हा, ही, हें, या. 'जो मजशीं जुंझे अे भूतळीं। रायां माजी॥'–शिशु ८९०. 'तरि तेंही ए सुंदरी। मुखस्थंभु केला॥' –शिशु ८०३. (कातवडी भाषा) 'ए बालानी सोय किशी करावा.' –मसाप २.३१. [सं. एतत्; प्रा. एअ]

ए—क्रि.(द्वितीय–तृतीयपुरुषी एकवचनी) ये, येते, येतो. ये पहा. 'वैरी सरिसा जीअे। तरि निद्रा कैसेनि अे॥' –शिशु ४७०. क्रियापदांतील व त्याच्या रूपांतील ये बद्दल ए येतो. उ० एओ, एओनी अशा तऱ्हेचीं येवो, येवून वगैरेचीं रूपें होतात. 'अवदशा यां पांडवा। एओ नेदावी॥'–शिशु ४९१. 'वेषें एओनि वृंदावनां.' –दाव १६५. [सं. आ+इ; प्रा. ए; म. येणें]

एं–(अें)—तृतीयेचा एकवचनी प्रत्यय; नें; एं; शीं यांपैकीं दुसरा. 'परागें धुळवाडी खेळिजे। जाउडे याचेनि पाणिअें सिंपिजे॥' –शिशु २७५. [प्रत्यय]

ए॥—(संक्षेप) एकूण.

एअर—स्त्री. (इं.) हवा; वायु; वारा. [इं.] **०गन**—स्त्री. वात–नलिका; हवेच्या दाबानें उडणारी बंदूक. **०टाइट**—वि. वातप्रतिबंधक; बाहेरून हवेचा प्रवेश न होणारा. **०पंप**–पु (पदार्थविज्ञान) वाताकर्षक यंत्र; वारा काढून घेण्याचा पंप. [इं.]

एउतें—क्रिवि. इकडे. 'आतांची भणतु होतें। सापें नारद न एति एउतें॥' –शिशु ११६. [सं. अत्र, प्रा. एत्थ]

एक—वि. १ आद्यसंख्यावाचक; सर्व संख्यांमध्यें पहिली संख्या. २ एकटा; अद्वितीय; कोणी बरोबरीचा नसणारा. 'ब्रह्म जें आहे तें एक आहे.' ३ कोणी तरी; अमूक; एखादा. ४ विवक्षित एक; सर्वांत वरचढ. उ० एक शहाणा; एक लबाड; एक शिनळ. 'तो एक उभें राहावें. –संव्या ५. वीर आहे.' ५ सारखें; एकरूप; एकच. **म्ह**० 'तुम्हीं आम्ही एक कंठाळीस मेख. ६ अतिशय किंवा एकसारखा; अव्याहत. जसें–एक पाऊस=न थांबणारा, एकसारखा पडणारा पाऊस; एक घोळ; एक गोंधळ; एक गहबज; एक अनर्थ; एक रड वगैरे. ७ (संख्यावाचक अथवा प्रमाणवाचक शब्दाबरोबर योजतात) अजमासें; जवळजवळ; सुमारें; कमजास्त. जसें–येथून कोसएकभर समुद्र आहे; शंभरएक रुपये शिल्लक असतील; पांच एक; वीस एक इ०. ८ न फिरणारें; अन्यथा न होणारें; सतत एक. 'तुम्ही थोर तुमचें वचन एक असावें.' उ. एकवचनी; एकवाणी; एकपत्नी. ९ दुसरा; निराळा; वेगळा; भिन्न; एक नव्हे असा. 'हें औषध एक तें एक, एकसारखा गुण कसा येईल!' 'केलें एक आणि झालें एक.' [सं. एक; प्रा. एक; फा. यक्; लॅ. एकअस; फ्रेंजि. येक; हिं. एक, यक; सिं. एकु, दिकु, हकु; पं. इक्क; पर्प. हेक्क, हिक्क] एक या शब्दाशीं दुसरे अनेक शब्द जोडून वाटेल तसे वाक्प्रचार करतात त्यांतील कांहीं पुढें दिले आहेत (आपल्या टिकाणीं) **०म्हणविणें**–स्वतः बद्दलचा अभिमान किंवा मोठेपणा राखणें, प्रस्थापित करणें; आपण कोणी मोठे आहोंत असें मानणें. **०असणें–होणें–पडणें**–एकजूट करणें; एकत्र असणें; एकी असणें. **०धरून बसणें**–विशिष्ट गोष्टी संबंधीं हेका धरून बसणें; हट्ट धरणें. **एक करतां बेक होणें**–इच्छित न घडतां भलतेंच होणें, एक करावयास जातां दुसरें कांहीं तरी होणें. **एकाचे दोन करणें**–एकाचे बेक करून सांगणें. **एकाचे एकवीस पांचाचे पंचवीस करणें**–फुगवून सांगणें; पदरचें घालून सांगणें; तंतोतंत खरें न सांगणें. **एक नाहीं दोन नाहीं**–मौन स्वीकारणें; कोणाच्या अध्यामध्यांत नसणें, तुल० हरा नाहीं शिवा नाहीं. (तटस्थवृत्ति स्वीकारलेल्या माणसाबद्दल योजितात.)

एकउंटी—वि. (बुद्धिबळ क्रीडा) आपला एक उंट शिल्लक ठेवून प्रतिपक्ष्यावर प्यादेमात करणें; जसें–एक उंटी हुचमाती (उंटमात).

एकएक, एकक—वि. प्रत्येकजण; एकएकटा; एकामागून एक; एकेकजण; निरनिराळा; स्वतंत्र; वेगळा. **म्ह**० एकएक बात सव्वा सव्वा (नऊ नऊ) हात=लांबलचक गप्पा; भरमसाट, अवाच्या सवा बोलणें.

एकएकटा, एकएकला, एककटा, एककला—वि. १ एकएक पहा. २ एकला; स्वतःच एकटा; बरोबर कोणी नसलेला; सोबत–मदत पाहिजे असलेला; दुसऱ्याची जरूर असलेला.

एककट–ट्ट, एककूट–ट्ट—क्रिवि. एकगट पहा.

एककतार—उद्गा. कवाइतीमधील एक हुकूम, बोल (इं. फॉल इन् यास प्रतिशब्द). हा हुकूम मिळाल्यावर सर्वांनीं एका सरळ रेषेंत एकमेकापासून ६ इंच अंतरावर आणि सर्वांत उंच मनुष्याच्या डाव्या हाताला, उंचीच्या प्रमाणांत एकाखालीं एक असें

एककरपद्धति—स्त्री. (अर्थशास्त्र) सर्व कर काढून टाकून फक्त जमिनीच्या उत्पन्नावरच कर बसविण्याचें तत्त्व, म्हणजे सर्व करांचें एकीकरण; (इं.) सिंगल टॅक्स. या तत्त्वाचा हेन्री जॉर्ज (१८४९–९३) या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञानें प्रथम पुरस्कार केला.

एककली-ल्ली—वि. १ हेकेखोर; संकुचित मनाचा; एकाच ठराविक मतांना, संवर्यींना, पद्धतींना किंवा गोष्टींना अगदीं हट्टानें चिकटून राहणारा; प्रसंगानुसार वागण्याचें ज्ञान नसलेला; कोत्या मनाचा. २ (पाठ करणें, तर्के करणें, हिशेब करणें. कवन करणें इ० पैकीं) एकाच विषयाकडे स्वाभाविक कल किंवा बुद्धि असलेला; एकांगी; एकदेशीय. [एक+कल]

एककांद्यालसूण—पु.स्त्री. एकच कुडी असलेला; एक प्रकारचा लसूण. (हींत निरनिराळया कुड्या, बिया नसून, एकच गड्डा असतो) [एक+कांदा+लसूण]

एककानीं—वि. एक काना असलेली (वंदूक). [एक+काना]

एककामी—वि. एकच काम करण्यास लायक; हरकामीच्या उलट.

एकंकार—पु. १ जुळणी; जोडणी; मिसळणी. २ गर्दी; गुंतागुंत; गोंधळ; गोलंकार. एकाकार पहा. –वि. एकरूप; समान; एकसारखा; एकाकार. 'राव रंक समसमान उंचनीच एकंकारी.' –पला ६५. [शुध्द रूप एकाकार]

एककालिक, एककालीन—वि. समकालीन; एकाच वेळचें; एका वेळीं झालेलें, आलेलें; समवयस्क; समशिक्षित; (इं.) कॉटेम्पोररी. [सं.]

एकखटा—क्रिवि. (नागपुरीरूप एकखट्टा) एकत्र; एका ठिकाणीं करून; आखबंद; घाऊक; ठोक; वट. [सं. एक+कृत–त्त]

एकखती-खेंती—वि. दुसऱ्या, विजातीय रंगाची एकेरी छडी, रेघ, सळई उठविलेला (रेशमी खण, लुगडें). [म. एक+अर. खत=रेषा, रेघ.]

एकखांबी—वि. १ एकाच खांबावर उभा असलेला (तंबू, घर वगैरे). २ (ल.) एकटाच कर्ता पुरुष असलेलें (कुटुंब, घर). [एक+खांब] **म्ह०** एका खांबावर द्वारका=ज्या कुटुंबांत फक्त एकच कर्ता माणूस राहिला आहे त्यास लावतात.

एकखेप—क्रिवि. एकपाळी; एकवार; पुन्हां एकदां. [एक+खेप]

एकंग—पु. काठीचा खेळ. 'एकंग लकडी, फरीगदका, लाठीचे हात व कवाईत ... (विद्यार्थ्यांकडून) करवून घ्यावी.' –संव्या ५२.

एकगजब—पु. एकगर्दी; गोंधळ; हळकल्लोळ. गजब पहा. [एक+अर. घझब्]

एकगजर—स्त्री. एकत्रित जोराचा आवाज, ओरड; आरडाओरड; कल्ला; गलका. [एक+गजर]

एकगट-गट्ट—क्रिवि. १ एकत्र; एका ठिकाणीं; सर्व मिळून. २ एक जुटीनें; सर्व एकत्रित होऊन; संघ करून. [एक+गट]

एकगेळी—वि. अखंडखुरी; खूर विभागले नाहींत असा (घोडा) 'त्याच्या (घोड्याच्या) पायाचा आकार मूळचाच चांगला असून एकगेळी पसरट खुराच्या योगानें पाय फार सुंदर दिसतात.' –मराठी तिसरें पुस्तक (१८७३) १०६. [एक+गेळ]

एकगोत्री—वि. सगोत्री; एकच गोत्र असलेले; परस्पर. [एक+गोत्र]

एकचएक—वि. केवळ एक; अगदीं एक; निव्वळ एक; दुसरें जोडीला नाहीं असें. 'माझें एकचएक पागोटें तें तुला देऊन काय करूं?' [एक द्वि.]

एकचढ—वि. वरचढ; एकाहून एक श्रेष्ठ. **०एक**–एकावर एक ताण. 'काय एकाचढीं एक कारटीं निपजलीं आहेत.' –भा ४४. [एक+चढणें]

एकचर—वि. एकलकोंडा; एकटा फिरणारा; तुटक राहणारा; याच्या उलट अनेकचर. [सं. एक+चर]

एकचाकी गाडी—स्त्री. एक चाक असलेली गाडी; ढकलगाडी; रस्त्यांतून माल विकणारांची गाडी.

एकचार—पु. १ (गो.) एकी. २ (गु.) संकर; मिश्रण. [एक+आचार]

एकचाल-ली—वि. १ एका चालीचा; संवयीचा; रागाचा (गाण्यांत). धाटणीचा. २ एकमार्गी; एखाद्या ठराविक मतांना, संवर्यींना, पद्धतींना चिकटून वसणारा; एककल्ली. ३ सरळ; प्रामाणिक; छक्केंपंजे माहीत नसणारा. [एक+चाल]

एकचित्त—वि. १ एक मतांचें; एकमेकांशीं जुळणारें; सर्वसंमत. २ एकाग्र; सावधान; लक्षपूर्वक. –न. १ एकाग्र असणारें चित्त; ऐकमत्य; सर्वांची एकदम तयारी. २ (ल.) जेवणास बसलेली मंडळी उठतांना सर्व एकदम जेऊन उठतात त्यावेळीं सर्वांचें जेवण झालें काय या अर्थी एकचित्त झालें काय? असें विचारतात. 'सर्वांचें भोजन संपलें असें पाहून नैमित्तिक गोठणस्ते कामदार यांनीं एकचित्त जाहल्याबद्दल हात जोडून श्रीमंतांस कळविलें म्हणजे श्रीमंत खाशा स्वाऱ्या हात धुऊन ऐनेमहालाच्या बाहेर जातात –ऐरापु २.१७. [सं. एक+चित्त]

एकछत्री—वि. एकाच राजाच्या किंवा मालकाच्या ताब्यांतील, अधिकारांतील; एकतंत्री, एकसत्ताक (कारभार, राज्य इ०) **०राज्य**–न. १ एका सार्वभौमाच्या सत्तेखालचा अंमल, प्रदेश; ज्या प्रदेशावर दुसऱ्या कोणाची सत्ता नाहीं असा प्रदेश. 'हें भरतखंड इंग्लिश लोकांच्या एकछत्री राज्याखालीं आहे.' –के. २ (ल.) एकजण करील ती पूर्वदिशा. [सं. एक+छत्र]

एकजती एकमती—स्त्री. एकमत; एकी; एकोपा (अनेक व्यक्तींमध्यें); पूर्ण मतैक्य; अविभक्तता. 'एकमती असल्यावांचून

आम्ही गहाण ठेवणार नाहीं.' –क्रिवि. एकमतानें; एकजुटीनें. 'हा रोखा एकमतीं लिहून दिला सही.' जतीमती पहा. [एक+जथणें;+मत]

एकजथा—पु. एकत्व; संहति; एकोपा (जातीचा किंवा कुळाचा); एककुटुंब; एकजात. –क्रिवि. (गु. एकजथे) एक गट्टा; घाऊक; ठोक. [एक+जथा]

एकजन्मी—वि. १ सबंध आयुष्यभर पुरणारें; अतिशय टिकाऊ; पुष्कळ काळ चालणारें. २ आयुष्यांत एकदांच केलेलें; ज्याची जन्मांत पुनरावृत्ति होत नाहीं असें. ३ जें करण्याला, पार पाडण्याला सबंध आयुष्य लागतें असें. [सं. एक+जन्म]

एकजरा—क्रिवि. अणुमात्रहि; यत्किंचितसुद्धां. 'यास तफावत एकजरा न करणें. –रा ८.१५९. [फा. यक्+झर्रा]

एकजात—वि. १ एकाच जातीचा, नमुन्याचा; एकसारखा. 'एकजात पक्षीं पानें घेऊन ये, म्हणजे हिरवें एकहि नसावें.' २ (ल.) सजातीयांत निर्भेळ; चांगलें; 'अरे वाण्या! हें तूप वाईट दिसतें? नाहीं महाराज एकजात तूप आहे.' ३ सुंदर. 'मुलगी मात्र एकजात आहे.' ४ सजातीय; एकापासून उत्पन्न झालेलें (बंधु, बांधव). –क्रिवि. निव्वळ; केवळ; सर्व एकच. [सं. एक+जाति]

एकजातीय—वि. एक प्रकारचें, तऱ्हेचें, जातीचें, वर्णनाचें. एकजात अर्थ १ पहा.

एकजिन्नस-सी—वि. एकाच प्रकारचा, तऱ्हेचा; एकजात. (माल, वस्तु वगैरे). [एक+जिन्नस]

एकजीव—वि. पूर्ण मिसळलेलें; पूर्ण एक झालेलें. (क्रि० होणें). 'नारळाचा चहू उकळत्या दुधांत घातला म्हणजे त्या दोहोंचा एक जीव होऊन जातो.' [एक+जीव]

एकजूट—स्त्री. एकी; मिश्रण; एकोपा; एकजथा. –क्रिवि. एकमतानें; एकोप्यानें. [एक+जूट]

एकझडपी—वि. एकच फळी किंवा झडप आहे असें (दार, खिडकी). [एक+झडप]

एकट-एकटका—क्रिवि. एकटा; दुसरा कोणी बरोबर नसतांना; एकला. 'झालिया राज्यलोट । चोराकुळित होईल वाट । कोणी नवजावें एकट । अवघी एकवाट करावी ।' –एभा ३०.३५९. 'सदनीं एकट कनकलता । राघवराणी ते सीता ।' –निमा (निर्वोष्टराघव) १.४. 'हिंडे मागें भ्रमोनि एकटका ।' –मोआदि ३१.३६. [एक+ट प्रत्यय]

एकटक-एकटंक—क्रिवि. सतत; एकसारखें; खळ न पडतां (पाहणें, रडणें, वर्षणें). टक पहा. [एक+टक]

एकटणें—उक्रि. १ एकवटणें; एकत्र करणें; वेंचणें; गोळा करणें; (फुलें, धान्य इ.). २ (व.) जीव एकटणें (एकाद्दन येणें); कासावीस होणें; गुदमरून येणें. एकाटणें पहा. ३ गर्दी होणें; एकत्र होणें; सरभेसळ होणें; मिसळणें. [एक+ट]

एकटदुकट—क्रिवि. एकटाच (बहुतेक एकटा, क्वचित् दुकटा); एखाददुसरा. 'या वाटेनें एकटदुकट चोर फिरतात–फिरतो.' [एकटा+दुकटा]

एकटप्पी-प्या—वि. एक टपाचा; आंतील किंवा खालचा टप (कलेंद्रा) आणि वरील टप यांपैकीं कोणता तरी एक टप असलेला (तंबू). [एक+टप]

एकटा—वि. एकला; दुसरा कोणी बरोबर नाही असा; सोबत नाही असा. **म्ह०** एकटयाची एकवाट=एकटा असला म्हणजे चाहील तो किंवा एकचएक मार्ग राहतो; एकटा कांहींहि करण्यास स्वतंत्र असतो अशा अर्थानें. [एक+ट प्रत्यय.]

एकटाकी—वि. १ एका आकाराचा, घाटाचा, रंगाचा; (सामा.) एका स्वरूपाचा. २ एकाच मनुष्यानें एकाच टाकानें लिहिलें असतां सारख्या वळणाचें दिसणारें (अक्षर); किंवा अशा अक्षरांचा (लेख, पुस्तक). ३ एकच टाका दिलेला (द्रोण इ.) [एक+टंक] **०मोतेब**–पु. हात न उचलतां लिहिलेला मोतेब. 'हा शब्द एकटाकी मोतेबानें लिही.'

एकटांग्या—वि. (व.) १ एक पाय असलेला; एका दिशेनें जाणारा. २ (ल.) एककल्ली (मनुष्य.) [एक+टांग=पाय]

एकटादुकटा—क्रिवि. एकटयादुकटयाचा, एकटयादुकटयानें अर्थी रूपें आढळतात. एकटदुकट पहा.

एकटा टिकोजी, एकटा प्राणी, एकटा एकसुरा—पु. १ फटिंग; एकलकोंडा; एककल्ली; माणूसघाण्या. २ ब्रह्मचारी; प्रपंच नसणारा मनुष्य.

एकटिका—क्रिवि. एकट, एकटका पहा. 'तो गातां तरि एकटिका। परि स्वरें पुरतां नीका ॥' –शिशु १६८. [एक+ट+क]

एकठय, एकठांय, एकठावण, एकठे—क्रिवि. (हेट. कु.गो.) एकाच ठिकाणीं; एका स्थळीं; एकत्र (क्रि० करणें). [एक+ठाय–व; गु. एकठूं; हिं. एकठा]

एकठोक—क्रिवि. १ सर्व एकत्र; सरसकट; एकदम. २घाऊक; एकसट्टा; ठोकळ; किरकोळ नव्हे असें. [एक+ठोक]

एकडकाठी—स्त्री. (विणकाम) हातमागावरील ओव्या किंवा वह्या ज्याला टांगावयाच्या अशी धनुकली किंवा गज; ढेंकणी; कपाळ काठी. [एक+ट+काठी]

एकडा—पु. एक; एकाचा आंकडा. [एक]

एकडाल तान—स्त्री. (संगीत) स्वरक्रमांत बदल न करतां मंद्र अथवा मध्य सप्तकांतील स्वरापासून आरंभ करून निदान सात स्वरांची घेतलेली तान. [एक+डाल+तान]

एकडोळसां—न. (कु.) एक जातीचा मासा. [एक+डोळा]

एकडोळा—पु. १ एक डोळा. २ (ल.) एकुलता एक मुलगा. **म्ह०** 'एक डोळा तो कां डोळा म्हणावा?'=एकच मुलगा असला तर त्याला संतति म्हणतां येईल काय? –वि. एकच डोळा असलेला,

एकडोळी करोटी-करवंटी—स्त्री. एक डोळा (भोंक) असलेली, शेंडीकडील बाजूची, करवंटी, नरोटी.

एकतंड—क्रिवि. (व.) एकसारखा; सतत. एकतंत पहा. 'एकतंड पंधरा दिवस ताप आला.' [सं. एक+तन्]

एकतंत—क्रिवि. अखंड; एकसारखा; सतत (वेळ, जागा, क्रिया इ०) [एक+तन्-तंतु]

एकतंत्र—क्रिवि. एकदम; एका वेळीं; एकाच साधनानें; एकसूत्री; एकसाधनी (अनेक गोष्टी करणें). -वि. एकसत्ताक; एकसूत्री; एकमुखी. एकतंत्री पहा. 'सर्व कारभार एकतंत्र करण्याची जी इंग्रजी कामगारांची हौस आहे...' -टि १.१२२. [सं. एक+तंत्र]

एकतंत्री—वि. १ एकाच सत्तेनें, साधनानें अनेक कामें पार पाडणारें; एकाच तंत्रानें चालणारें; एका हातीं; एक मार्गी; एकतंत्र. २ (ल.) (चांगल्या अर्थी) सुरळीत; व्यवस्थित. ३ (ल.) (वाईट अर्थी) अनियंत्रित; स्वैर; जुलुमी. [एक+तंत्र]

एकतत्त्ववाद—पु. अद्वैत; जगांत एकच सत्य स्वरूप आहे, मग तें भौतिक असो अगर आध्यात्मिक असो असा सिद्धांत; प्लोटिनस, स्पिनोझा, शॉपेनहार हे एकतत्त्ववादाचे पुरस्कर्ते आहेत, याच्या विरुद्ध द्वितत्त्व-बहुतत्त्ववाद. [सं. एक+तत्त्व+वाद]

एकतत्त्वीं—क्रिवि. एका बाबतींत; एका गोष्टींत; एका ठिकाणीं; एका मुद्यावर (जीव धरणें, मन लावणें, अनुसंधान धरणें, चित्त देणें इ०). [एक+तत्त्व]

एकतया—क्रिवि. एकाग्रपणें; एकचित्तानें. 'त्यांचीं नामें कोण कोण। तेंही ऐके एकतया।' -मुआदि १४.३५. [सं.]

एकतरफा—वि. १ एक धन्याचा, राजाचा (प्रदेश). २ एका बाजूचा; पक्षपाती; एकदेशीय (विधान). -क्रिवि. १ एका बाजूस, एका भागीं. 'एकतरफा वस्ती आहे.' 'एकतरफा फौज उभी आहे.' २ एक बाजूचा; प्रतिपक्षी हजर नसतांना (न्याय). [सं. एक+अर. तर्फ=तालुका, पेटा; फा. तरफ=बाजू, दिशा.]

एकतरफी, एकतर्फी—वि. एका बाजूचा; पक्षपातीपणाचा; एकतरफा पहा. ०**इन्साफ-निकाल**-पु. प्रतिपक्षी हजर नसतां किंवा त्याची बाजू पुढें न येतां एका बाजूनें दिलेला निकाल. सामाशब्द- एकतरफी कज्जा-चौकशी-जामीन-पंच-पंचाईत-पाटिलकी-पुरावा फैसला-बोलणें-मजकूर-मोकद्दमा-वाद-साक्ष-साक्षी-हिस्सा-इ० 'या दुसऱ्या मुद्याकडे प्रकृत निबंधांत फारसें लक्ष दिलें नाहीं त्यासुळें हल्लींचा लेख जरा एकतर्फी झाला आहे.' -टि ४.११७. [एक+अर. तर्फ]

एकतऱ्हा—स्त्री. एक (विचित्र, चमत्कारिक, नवीन) प्रकार, रीत, धाटणी, पद्धत. 'बोलण्याची एक तऱ्हा आहे.' [सं. एक+अर. तर्ह; फा. तऱ्हा.]

एकतऱ्हेचा—वि. वेगळया प्रकारचा; चमत्कारिक; विचित्र; विक्षिप्त. [एक+तऱ्हा]

एकता—स्त्री. एकोपा; एकी; ऐक्य; एकरूपता; सारूप्य. 'न भिन्न तनु त्या भले भजति एकता पाहुनी.' -केका १०८. [सं.]

एकताटी-टथा—वि. १ एकाच ताटांतील; एकाच ताटांत जेवणारे. २ (ल.) एकाच जातीचे; समानधर्मी; समान आचाराचे. **एकताटीं जेवणें**-क्रि. १ एकाच ताटांत जेवणें; एका ठिकाणीं जेवणें. २ (ल.) अगदीं सलोख्यानें असणें; भेदभाव न ठेवणें. **म्ह०** एक ताटीं जेवणें आणि घांस मोजणें=वरवर प्रेम दाखवून आंतून मत्सर करणें. [एक+ताट]

एकतान—वि. एकाग्र; लक्षपूर्वक; एकाच गोष्टीकडे मन लागून असलेलें. जसें-गायनैकतान; शृंगारैकतान; भजनैकतान; अध्ययनैकतान; विषयैकतान; परमार्थैकतान; सत्कर्मैकतान. [एक+तान]

एकतानता, एकतानपणा—स्त्रीपु. एकाग्रता; अनन्यवृत्ति. 'वेळ आपल्या गतीनें एकसारखा एकतानपणें जातच असतो.' -वज्राघात २१३.

एकतार, एकतारा-री—वि. १ एका-एकेरी तारेचा; एकधाग्याचा; दोन धागे पिळून दुहेरी न केलेल्या धाग्याचा (विणलेला पितांबर, वस्त्र वगैरे). २ एका नमुन्याचें, फर्म्याचें, मजकुराचें; एकसारखें; एकाच प्रकारचें. 'मग केसा केला विचार। पत्रें लिहिलीं एकच तार।'-ऐपो १०६. ३ **एकचएक; तेंचतेंच; कंठाळवाणें.** [एक+तार]

एकतारा-री—पुस्त्री. विण्यासारखें एक तंतुवाद्य. याचा भोपळा गोल व चापट असतो, दांडी कळकाची असुन इंच-सव्वा इंच व्यासाची व दोन तीन फूट लांबीचा गोल असते. भोपळा एका बाजूनें कातडयानें मढविलेला असतो. घोडी भोंपळ्याच्या मध्यभागीं लावतात. दांडीला एक खुंटी लावून तिला एक तार गुंडाळलेली असून ती षड्जांत लावलेली असते. ती घोडीवरून भोपळ्याच्या बुडाशीं जो दांडीचा भाग असतो त्यास लावलेल्या बारीक खुंटीस खिळवितात. भजनी लोक, गोसावी, भिकारी, वगैरे गातांना या वाद्याचा उपयोग करतात. [सं. एक+तार; गु. एकताऱ]

एकताल—पु. एका तालाचें नांव; यांत मात्रा बारा व विभाग सहा आहेत. 'मंगलाचरणाला एक जीवाचा एकताल आणि भरतवाक्याला रुद्रताल हा ठरलेला.' -भा ३८. [सं. एक+ताल]

एकताल-ली—वि. १ (संगीत) एक तालाचा (ध्रुपद इ०). २ ज्यांतून एकच नाद निघतो असें वाद्य. (तास, झंगट इ०).

एकताळामण—पु. (व्यापार) एक माप; या मणाचें वजन सुतीं १५४० रुपये भार असतें. -मुंब्या ६. [एक+ताला+मण]

एकताळीस—(हिं.) ऐकेचाळीस पहा.

एकतीस—वि. ३१ संख्या. [सं. एकत्रिंशत्; प्रा. एकतीस, एक+तीस. तुल० सिं. एकतिह]

एकतुक—वि. एकटा; एकला; एकाकी. 'अशीग मी संसारी एक तुका। खर्च नाहीं केला रुका।'—पला ४.२०. [एकटका अप.]

एकतुका—वि. सारखें; समान; सदृश. 'ऐसें एकतुकें पांचभौतिक। पडती बहुवस टांक।' —ज्ञा ७.२५. [एक+तुकणें]

एकतोंडी—वि. एका बाजूस तोंड असलेला, मोकळा असलेला. दुतोंडीच्या उलट. —क्रिवि. एका बाजूनें; विरुद्ध बाजूस कोणी नसतांना; एकांगीं (वाद, तकार, पुरावा, कैफीयत). **एकतोंड करणें**–तोंड देणें; समोर होणें; रुजवात करणें.

एकत्र—क्रिवि. १ एका जागीं; एका ठिकाणीं, मिळून. २ अविभक्त (बंधु इ० नीं संसारांत); भागीदारीनें. ३ एकीकडे, एकाबाजूस. 'एकत्र केशव वसे अपरत्र वैरी। अन्यत्र पर्वत शतक्रतु भीत भारी।'—नीतिशतक १८. [सं.] **०कुटुंब**–न. (कायदा) मूळ एखाद्या पुरुषापासून जो वंशविस्तार झालेला असतो त्या वंशांतील पुरुष, त्यांच्या बायका व अविवाहित मुली असें सर्व मिळून एक बनलेलें कुटुंब. **०कुटुंबपद्धति**–स्त्री. वांटणी वगैरे न करतां सर्वांनीं एकत्र राहण्याची पद्धति.

एकथाट—पु. सारखी, एक प्रकारची व्यवस्था, चाल, रीत, मांडणी. [एक+थाट]

एकथोक-प—क्रिवि १ एकदम एका वेळीं सर्व (घेणें, थोडें थोडें अनेक वार न घेतां); एक रास. २ घाऊक; सरसकट; उक्ता; एकठोक. [एक+ठोक; एक+थाप–थोप]

एकदट—क्रिवि. एकदम; एकमेकांस लागून; एका ओळीनें, एकत्र. 'तेंव डींडीची वीरघंटा। सनसनिती जेंगटा। वाजितांती एकदटां। एके वेळें।' —शिशु ५२२. [एक+दाटणें]

एकदंत—पु. गणपति; गजानन; विनायक. 'नमन श्री एकदंता। एकपणें तूंचि आतां।' —एभा १.२. 'प्रथम नमन तुज एकदंता। रंगीं रसाळ वोढवीं कथा।'—तुगा ४१९३. [सं. एक+दन्त]

एकदम—क्रिवि. १ ताबडतोब; तत्क्षणीं; अकस्मात; थेट: विलंब न लावतां; न थांबतां; विसांवा न घेतां. २ एका पर्यायांत; एका दमांत; एका सपाटयांत, खेपेंत. 'मला त्यांणीं एकदम लाख रुपये दिले.' ३ एका वेळीं; एकसमयावच्छेदेंकरून. 'एकदम हजार गोळा उडतो असें एक यंत्र करावयाचें आहे.' [एक+दम; फा. यक्+दम्=क्षणैक; तुल० सं. एकपदम्]

एकंदर—स्त्रीन. १ एकत्र करणें; एकवट करणें; एके ठिकाणीं आणणें; बेरीज; मिळवणी. २ स्नेह; सोबत; संगत; मैत्री. —वि. क्रिवि. १ एकत्र; जुटींत; सहवासांत; मिश्रणांत. 'तरी वैराग्याचेनि आधारें। जिहीं विषय दवडूनि बाहिरें। शरीरीं एकंदरें। केलें मन।'—ज्ञा ५.१५१. 'तांदूळ आणि डाळ एकंदर केली म्हणजे खिचडी होते.' २ एक रकमी सर्व; एकत्र करून; एकदम. जसें–एकंदर जमा - आकार–ताळा–पत्रक–पट्टी; एकंदरीचा हिशोब–वेरीज–वही. ३ सर्वांनीं मिळून; एका संघानें; एका ताफ्यांत; एकवट. 'सारीं औषधें एकंदर कुटून मग बांधा.' ४ ठोक; एकूण; एक गठ्ठी; एक गोळा. ५ पुन्हां पुन्हां करण्याचें कारण न ठेवितां; एकवार, एकदांच (ताकीद, इशारा वगैरे). 'याप्रमाणें वर्तावें म्हणून त्यास एकंदर तावीद केली आहे.' ६ (नकारात्मक) कधींहि नाहीं; बिलकूल; केव्हांहि अशक्य या अर्थानें. 'तूं माझ्या घरीं एकंदर येऊं नको.' =कधींहि, केव्हांहि येऊं नको. –पया ४८५. –ख ११७६. [सं. एकत्र] **०गट**–क्रिवि. सर्व मिळून एकत्र; एकरकमी; एकजिनसी सर्व; एक जुटीनें, मेळयानें, समूहानें. **०ची सरासरी**–स्त्री. वेरजांची सरासरी (एखाद्या मोठ्या हिशोबाच्या). **०भाव**–पु सरासरी दर; किंमत. **०विक्री**–स्त्री. घाऊक, ठोक, एकदम, एकजिनसी विक्री.

एकंदर—न प्रत्यक्ष न होतां परंपरेनें झालेला, अप्रत्यक्ष संबंध, स्पर्श, विटाळ. 'या सुतक्याचें मला एकंदर झालें म्हणून मी स्नान करतों.' [सं. एक+अंतर, हिं. अंदर]

एकंदरी—स्त्री. १ एकूण; बेरीज; सर्व मिळवणी; हांशील. २ (गो.) सारांश, तात्पर्य.

एकंदरींत—क्रिवि. शेवटीं, अखेरीस; थोडक्यांत; सारांश.

एकदल—वि. (विरू.) एकदळ. एकपानाचें; एक पाकळीचें (झाड, फूल इ०). [सं. एक+दल]

एकदशांश मीटर—पु. मीटरचा दहावा हिस्सा (मीटर= $\frac{39}{2}$ इंच); (इं.) डेसीमीटर. [सं. एकदशांश+इं. मीटर]

एकदा-दां—क्रिवि. १ एकेकाळीं; एकेवेळीं. २ एकदम; एकसमयावच्छेदेंकरून; युगपत. ३ एकवार; एकवेळ; पुन्हां नाहीं अशा रीतीनें. [सं.] **एकदांचा**–कसेंतरी, कसेंबसें, सायासानें; एकवार; फक्त एकवेळ (पुन्हां कधींहि नाहीं); (क्रि० होणें; करणें, इ०). 'एकदांचें लग्न झालें म्हणजे सुटलें.' 'तो एकदांचा तेथें पावला म्हणजे झालें.' 'हें काम एकदांचें संपलें म्हणजे जन्माचें सार्थक झालें.' 'एकदांची ढाळी वाजली.' [सं. एकधा]

एकदाणा—पु. (तंजावर) एक खड्याची नाकांतील चमकी; मुगबटु [एक+दाणा]

एकदाणी—वि.सर्व दाणे एकसारखे असलेलें (धान्य). 'कुणब्याजवळील दाणा एकदाणी असतो.' –गांगा १४६. –स्त्री. सोन्याचे साधारणतः चाळीस मणी सोन्याच्या कडयांनीं माळरूपानें गुंफून त्या माळेच्या दोन्ही टोंकांस गोफाचे तुकडे लावलेले असतात व त्यांच्या शेवटीं सोन्याचे फांसे असतात अशी माळ; एकेरी मण्यांची माळ. एक पोतीचा व एक सोन्याचा मणि ओवलेली माळ. [एक+दाणा]

एकदाणें—न एकदाणी माळ; एक प्रकारची माळ; यांत कांचेच्या पोतींमध्यें मधोमध एक सोन्याचा मणी असतो. 'एकदाण्याची खरबुजी तन्हा सादर।' –अफला ५५. [एक+दाणा]

एकदिग्गत—वि. एकाच दिशेनें गेलेला. [सं. एक+दिक्+गत] **०समांतर रेषा**–स्त्री. एका बाजूकडे जाणाऱ्या समांतर रेषा.

एकदिग्गामी—वि. एकाच दिशेनें जाणारा. [सं.] **०प्रेरणा**–स्त्री. (यंत्र.) एकाच दिशेकडे कार्य करणारी प्रेरणा, शक्ति; सरूप प्रेरणा. (इं) लाइक फोर्सेस; याच्या उलट भिन्नदिग्गामी किंवा विरूप प्रेरणा. –यंस्थि ३८. [सं. एक+दिक्+गम्]

एकदिन-दिवस—क्रिवि. एके दिवशीं; कधीं तरी. 'एकदिन जानारे भाई। सबसे राम भजन करलेना ॥।' [एक+दिन, दिवस]

एकदिल-दील—वि. एक मतांचा, एक विचारांचा (स्नेही); एकचित्त; एकनिष्ठ. 'श्रीमंत व नबाब एकदील, तेव्हां हैदरखानाचा मज्कूर किती आहे.' –ख ६.२८९८. 'नऊ लाख सैन्य एकदिल घोडा शिरा। तीस हजार अबदागिरी बरोबर चाले ढिगारा ॥' –ऐपो १११. –पु. स्नेह; ऐकमत्य; संतोष. 'फौजेचा एकदील करून ... पत्राचें उत्तर जरबेचें आलें असतां इकडूनहि सरन्जाम जावयास दिवसगत लागणार नाहीं.' –ख ११.२१०२. [फा. यक्+दिल्]

एकदिली—स्त्री. स्नेह; ऐकमत्य; एकदिल पहा. 'सलूख एक दिली आहे.' –दिमरा १.१२३. [फा. यक्+दिली]

एकदीं—क्रिवि. (व.) परवां; नुकतेंच; एक दिवस. [एक+दिन, दिवस अप.]

एकदीस—क्रिवि. (कुण. गो.) एके दिवशीं. 'एकदीस मेल्यार कोणतरी रडतलो, सदा मेल्यार कोण रडतां.' =कोणतीहि गोष्ट नेहमींचीच झाली म्हणजे कोणी काळजी करीत नाहीं. [एक+दिवस अप.]

एकदुःखसुख—वि. सुखदुःखांत वांटेकरी असणारे; समसुखदुःखी; ज्यांचें सुखदुःख एक आहे असे [सं. एक+दुःख+सुख]

एकदुःखी—वि. समदुःखी. [एक+दुःख]

एकदेश—पु. एक अंश; एक पक्ष; एक भाग. 'गळां पडति ज्यांचिया तवगुणैकदेश भ्रमें। तिहीं तुजचि दावितां भजति बा! तुला संभ्रमें।' –केका ३२. [एक+देश]

एकदेशतः—क्रिवि. एकपक्षीं. 'वरील निरूपण केवळ ऐकदेशतः झालें.' –नि ५२. [सं.]

एकदेशित्व—न. मर्यादित्व; संकुचितता. 'तो मी हृदयामाजीं असे। हेंही एकदेशित्व मज नसे। जगदाकारें मीचि भासें। जेवी कल्लोळें विलासे सागरू ॥।'–एभा २१.२८६.

एकदेशी—वि. १ एकाच देशाचे; समदेशी. २ पूर्णपणें लागू न पडणारें; एकांगी; मर्यादित; एकपक्षी (दृष्टांत, उपमा, तर्क इ०). 'अगा एकदेशी दृष्टांत। दृष्टीत कीर असे वर्तत ॥।' –विपू ७.३८. ३ एकाच बाजूचें; एकपक्षीय (विचार, विधान इ०). ४ आपल्या विरुद्ध बाजूचें मत खोडून टाकण्याकरितां प्रथम गृहीत धरून नंतर आपलें मत सिद्ध करणारा; किंवा तें त्याचें अवलंबिलेलें (मत). ५ एककल्ली; संकुचित विचाराचा; कोणाशीं न पटणारा. (माणूस, विचार, मत). 'ऐसा अहंकाराधिरूढ। एकदेशी मूढ ॥।' –ज्ञा ३.१७९. 'एकदेशी होतों अहंकारें आथिला। त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ॥।' –तुगा ४०४६. ६ सार्वत्रिक, सार्वदेशीय नव्हे असा; एकाच जागेला चिकटून असलेला; अल्पव्यापी. 'सर्वव्यापक अयोध्यावासी। किंवा आहे एकदेशी। सांगे मजपासी निश्चयें ॥।' [सं.]

एकदेशीय—वि. एकदेशी असणारा.

एकदोरी—स्त्री. १ एकसूत्र; एकओळ. २ (ल.) एकराज्य; एकअम्मल; एकसत्ता. 'राज्यांत एकदोरी हलती' –वि सरळ; सारखें. [एक+दोरी]

एकधा—क्रिवि. एके वेळीं; एक प्रकारानें, मार्गानें. 'एकधा दशधा विभागता। ऐक नृपनाथा सांगेन ॥।' –एभा ३ १०६. [सं.]

एकधातुचलनपद्धति—स्त्री. (अर्थशास्त्र) नाणीं पाडण्याच्या कामीं जींत एकाच धातूचा उपयोग होत असतो ती पद्धति. केवळ सोनें किंवा रुपें यांचें चलन असून सोनें व रुपें यांचें एकसमयावच्छेदें चलन नसणें. [सं. एक+धातु+चलन+पद्धति]

एकधान्य—न. ज्यामध्यें एकाच जातीचें धान्य खाऊन रहावयाचें असें चातुर्मासांत आचरावयाचें व्रत; एकाच प्रकारच्या धान्यावर निर्वाह. [सं. एक+धान्य]

एकधारी—वि. एका बाजूला धार असलेलें; एका बाजूनें चालणारें (हत्यार, तलवार वगैरे). **०रोखण**–न. (कु.) सुतारांचें एक हत्यार; रंधा. [एक+धार]

एकधाऱ्या—पु. (खा.) एक प्रकारचा रंधा. यांत पातें डाव्याकडेस खेंदून असतें. त्यामुळें एका बाजूस खांच पाडतां येते.

एकधोतरी—वि. एकच वस्त्र असलेला; वस्त्रांचें दारिद्र्य असलेला. **म्ह०** एक धोत्री आणि महा क्षेत्री=गरीब पण फार लबाड. (उप.) गरीबाचा शिरकाव अनेक ठिकाणीं असतो, त्याला पुष्कळ गोष्टी साध्य असतात. [एक+धोतर]

एकधोरणी—वि. एकच हेतु, उद्देश, धोरण असलेला. [एक+धोरण]

एकनळा—क्रिवि. १ लागोपाठ; खंड न पडतां; एकामागून एक (मुलगे किंवा मुली होणें). लग्नाआधींच मी गर्भिण। एकनळा तीन मुलगे झाले तीन।' –पला ४.१९. 'एकनळ्या तीन मुली झाल्या.' २ एक नाळ असलेलें जुळें (मूल) [एक+नाळ]

एकनाड-डी—स्त्री. मुलगा किंवा मुलगी यांच्या जन्मनक्षत्रावरून आद्य, मध्य व अंत्य अशा तीन नाडी ठरलेल्या असतात. ज्या मुलामुलींची वरीलप्रमाणें एकच नाडी असेल त्यांचा विवाह

ात नाहीं; त्यास एकनाड म्हणतात. 'जुळत नाहीं, एकनाड ाली.' [एक+नाडी]

एकनाळ—वि. १ एकनाळ असलेलें जुळें (मूल). २ (ल.) काच आवडीनिवडीचे, मताचे, कलाचे. [एक+नाळ]

एकनिक—वि. एकट; एकटा. [एक+नि+एक; एक द्वि.]

एकनिकी—स्त्री. जूट; एकी.

एकनिरवडी—वि. एकाच वेळीं, एकाच कामांत, एकाच टकयांत निरवलेलें; संपविलेलें; उरकलेलें. [एक+निरवणें]

एकनिश्चय—पु. दृढनिश्चय; निर्धार; दृढश्रद्धा; विश्वास. –वि. निश्चयी; करारी. [एक+निश्चय]

एकनिष्ठ—वि. १ एका वस्तूवर मन बसलेला; एकावरच दृढ ाष्ठा ठेवून चालणारा; अढळ श्रध्दावान्. 'श्रीकृष्णा बोलावें तुवां ईं। एकनिष्ठ ॥' –ज्ञा ३.१८. २ (उप) अढल; पक्का; पुरा. जसें कनिष्ठ लबाड–सोदा–शिनळ–लुच्चा–खोटा–मात्रागमनी इ० सं.] **०काशीकर**–पुरा लबाड; मात्रागमनी; बेविश्वासू.

एकनिष्ठता, एकनिष्ठा—स्त्री. १ एकनिष्ठ असण्याचा गुण, ी श्रध्दा; मनःपूर्वकता. २ एकरिथति; अचंचल्य. 'जयां विष ांच्या ठायीं। एकनिष्ठता कहीं नाहीं ॥' –ज्ञा २.११३. [सं.]

एकपंगत—स्त्री. एके ठिकाणीं, एका पंक्तीला बसून जेवणें. त्र भोजन. [सं. एक+पंक्ति]

एकपट—वि. एकदां घेतलेलें; एक या प्रमाणांत. [एक+प्रति] इ० एकपट रूप दुप्पट पोशाख.

एकपणा—पु. एकी.

एकपत्नी—वि. १ एकच बायको असणारा; दुसरें लग्न न कर ाचा बाणा बाळगणारा; एक बायको असतांना दुसरी न करणारा विवाहित स्त्री (धर्मपत्नी) वांचून इतर स्त्रियांशीं संबंध न ठेवणारा; भिचारी नसणारा. [एक+पत्नी] **०व्रत**–न. १ सर्व आयुष्यांत काच स्त्रीशीं विवाह करावयाचा असें व्रत, एकभार्याव्रत, एकविवाह ा. २ फक्त लग्नाच्या स्त्रीशींच संबंध ठेवावयाचा असा बाणा. 'तूं ी एकपत्नीव्रती। दुसरी वरिली कां अपकीर्ति ॥' 'एकबाण वचन। एकपत्नीव्रत पूर्ण। चौदा वर्षे भरल्याविण। कदापि आग ा घडेना ॥' –रावि १२.११२.

एकपंथी—वि. एकमार्गी; एककल्ली; धोपटमार्गी; एका पद्ध चा; एकच क्रम आचरणारा. [एक+पंथ]

एकपद—न. (बीजगणित) ज्या पदांत एकच रकम असते ते ; याच्या उलट संयुक्तपद. जसें– ३ अ, ५ अब, ६ अबक एकपदें होत. परंतु (अ+ब) हें संयुक्तपद होय. [एक+पद]

एकपदरी—वि. १ एका बाजूचा पदर चांगल्या प्रकारचा ून दुसऱ्या बाजूचा पदर साधा असणारें (लुगडें, पागोटें इ०). एकेरी; एका घडीचें (वस्त्र). ३ एकच सर, पदर असलेला (गोफ, माळ इ०). ४ एकेरी; अरे तुरे असें (बोलणें). [एक+पदर]

एकपदरीघर येणें–(एखाद्याशीं बोलतांना) एकेरीवर येणें; अरेतुरे करणें.

एकपदीमार्ग—पु. एकाच माणसास जातां येण्यासारखी वाट; पाऊलवाट; एका ओळीनें जाण्यासारखा मार्ग; एक कतार; (सैन्याचा रस्ता). [सं. एक+पद+मार्ग]

एकपक्षी—वि. विशिष्ट; एकजातीय; एका बाजूचें. –क्रिवि एका अर्थी; एका बाजूनें; एका दृष्टीनें; कोणा एका पक्षास अवलंबून (बोलणें, असणें इ०). [एक+पक्ष]

एकपांकळी-पाकळी—वि. ज्या फुलाच्या पांकळ्या अगदीं जुळलेल्या, एकमेकांना चिकटलेल्या अशा असतात असें (फूल). उ० गोकर्णी. –मराठी ६ वें पुस्तक. (१८७५) पृ २४०. [एक+ पांकळी]

एकपांक्त—वि. एका जातीचा; ज्याच्याशीं सहभोजन होतें असा. एका पंक्तींत बसून भोजन करण्यास योग्य. [सं. एक+पंक्ति]

एकपाखी—वि. एकच पाखें असणारें; ज्याच्या छपरास एकच बाजू आहे असें (घर). **०घर**–न. एकाच बाजूला पाखें असणारें पडवीसारखें घर. (इं.) पेंट हाऊस. [एक+पाखें]

एकपाठी—वि. १ एक वेळ वाचून किंवा ऐकून पाठ म्हण णारा. २ (ल.) दृढ बुध्दिवान; मोठ्या स्मरणशक्तीचा. [सं एक+पठ्–पाठ=पठण]

एकपाठी-ठ्या—वि. १ लागोपाठ, एकामागून एक, पाठो पाठ जन्मास येणारीं (भावंडें, एखाद्या कुटुंबांतील मुलें). [एक+ पृष्ठ–पाठ=शरीराचा मागचा भाग]

एकपाणी—न. पाण्याचें एकच साधन (विहीर, तलाव इ०) असणें. **रूह०** एकपाणी नरकवाणी (एकपाणी पण ते सुध्दां नरका प्रमाणें) एकूलता पण उनाड अशा मुलाबद्दल वापरतात.

एकपात्र—न. जेवणाचें पान आणि द्रोण एकाच जातीच्या पानाचें असण्याचें व्रत; याच्या उलट भिन्नपात्र. [एक+पात्र]

एकपादशिरासन—न. (योग) उजवी मांडी मोडून बसावें, नंतर डाव्या पायाच्या खालून डावा हात घालून तो पाय हळू हळू मानेवर चढवावा. –संयोग ३३०. [सं. एक+पाद+शिर+आसन]

एकपावटीं—क्रिवि. एक वेळां; एकदां. [एक+पावट=पाय]

एकपावलीवाट—एकपदी मार्ग पहा.

एकपिकी—वि. वर्षांतून एक वेळ पीक, बहर येणारी (जमीन, झाड); एकप्रसू. [एक+पीक]

एकपुट—क्रिवि. (ना.) सबंध; एकदम; एक वेळ; एकठोक. [एक+पुट]

एकपुटी—वि. एकच पुट देऊन तयार केलेलें (रसायन इ०). [एक+पुट]

एकपुठा—पु. एक जमाव; एक संघ; एक संस्थेची, कामाची, विचाराची मंडळी. 'सगळया माणसांचा एकपुठा जमला आहे.' [एक+पृष्ठ; म. पुठा]

एकपुडी—वि. एकपूड (कातडी आच्छादन); एकेरी कातडें असलेला (मृदंग, पखवाज). [सं. एक+पुट-पूड]

एकपुती—वि. एकच मुलगा असलेली (स्त्री). [एक+पुत्र-पूत] **म्ह०** एक पुती रडे आणि सात पुती रडे (जिला एक मुलगा आहे तीहि रडते व सात मुलें असणारीहि रडते); कोठल्याहि चांगल्या वाईट स्थितींत् समाधान नसणें याअर्थी योजतात.

एकपुरू—वि. (नेदभाषा) अकरा. 'मिरजेहून कोल्हापूरचें भाडें एकपुरू आणे आहे.' 'शिवणावळ एकपुरू आणे दिली.' [सांकेतिक]

एकपेडी—स्त्री.(कु.) एक दाणी, एकसर. (कु. अव. एकपेडयो). –वि. एकच पेड असलेली (वेणी, दोरी). [एक+पेड=पदर]

एकपेशी-य—वि. (प्राणि) एक पेशी असणारें; एकपेशीमय (प्राणी). (इं.) युनिसेल्युलर. [एक+पेशी]

एकप्रकार-चा—वि. निराळ्या प्रकारचा: निराळ्या वर्गाचा विलक्षण; विचित्र; अनन्यसामान्य; एकाच-त-हेचा. –ख २४७६, ३१३९, ४१२८. 'लौकिक एक प्रकारें जालिया उत्तम नाहीं.' –मरि २.९५. [एक+प्रकार]

एकफणी—वि. एका विणीचा; एका बाण्याचा; एका त-हेचा (कपडा). [एक+फणी (विणकामांतील)]

एकफरमा—वि एका आकाराचा, ठेवणीचा, जातीचा, स्वरूपाचा (संन्याच्या रांगा, लिहिण्यांतील अक्षरें वगैरे) –पु. आकृति; आकार यांत ऐक्यता; एक स्वरूप; एक आकार. [एक+इं. फॉर्म-फरमा]

एकफसली—वि. वर्षाला एक पीक देणारी (जमीन): एकपिकी. [एक+फसली]

एकफावट—क्रिवि. (गो.) एकदांचा; एकदां. एकपावटीं पहा. [एक+पद-पाय-पावट]

एक-ब-एक-येक—क्रिवि. १ एकूणएक; सर्व. 'एक-ब-एक हुजूर मालूम जाहलीं.' –रा १५.३१ २ एकाएकीं; एकदम. 'त्यांनी मीरइमाम यास जठचरक येथें एक-ब-येक येऊन गांठलें.' –रा ५.११४. [फा. यक व यक्]

एकबगीं—क्रिवि. एक प्रकारें 'परि तें एकबगीं थोडें। केलिया प्रतिकारामाजि वडें॥' –ज्ञा ११.४०४. [एक+बगा=प्रकार]

एकबरी—वि. एकेरी पन्ह्याचें, रुंदीचें, डबल पन्ह्याचें नव्हे असें (कापड). [एक+वार-बार=वेळ; तुल० इं. ब्रेड्थ]

एकबागी—वि. मानेवर एका बाजूस भोवरा असणारा (घोडा); हें घोडयाचें अशुभ लक्षण किंवा खोड म्हणून समजतात. [एक+बाजू]

एकबाट—पु. सकर; सरमेसळ; जमाव; गोकुळ; गोलंकार; खिचडी. –क्रिवि. सरमेसळींनें भेदविचाररहित; सर्व **एकत्र** अन्यस्थितपणें. [एक+बाट]

एकबारी—वि. १ एकदांच बार, आव्राज करणारा, वाजणारा (फटाका, बंदूक इ०). २ वर्षास एकच बहर किंवा बार येणारें (फळझाड). ३ एका बारांचें काढलेलें (गुलाबपाणी इ०). ४ सर्व एक रुंदीचा. एकबरी पहा. (दुपेटा इ०) ५ एका दमांत गांठावयाचा, करावयाचा (पल्ला, दौड इ०). 'बंडखोरांपैकीं घोडदळाची तुकडी ३६ मैलांचा एकबारी पल्ला मारून दिल्लीजवळ येऊन थडकली.' '–सन १८५७.१९७. [एक+बार]

एकबाल—इक्बाल पहा.

एकबीच—वि. एक टाकून एक, सम. उ० २,४,६,८. –संख्या ३९. **०हात**-पु (कवाईत) सम अंक म्हटलेल्यांनीं (२, ४,६) आपला उजवा हात ताठ, जमिनीशीं समांतर करून खांद्याच्या पातळींत समोर,बोटें एकमेकांशीं लागलेलीं, आंगठयाचा अग्रभाग वर आणि करंगळी जमिनीकडे अशा स्थितींत न्यावा. –संख्या ४. [एक+हिं. बीच]

एकबुंदकी, एकबुंदी—वि. एका जुन्या चलनी रुपयाचें नांव; या रुपयाच्या पृष्ठभागावर एक बुंद (ठिपका) असतो. [एक+बुंद]

एकबुरजी—वि. १ एक खांबी (राहुटी, तंबू). २ (ल.) एकाच माणसावर अवलंबून असणारें (काम, कारस्थान). [एक+बुरूज]

एकबेक—वि. सम-विषम (रंग, परें). [एक=विषम+बेक=सम]

एकबेरजी—स्त्री. १ (हिशोब) जमाखर्चाची पहिली नोंद; याच्या उलट दुबेरजी; या नोंदीवरून पुढें खातेवारी दुबेरजी, तिबेरजी केली जाते. उ० एकबेरजी कलम-कारकून-रकम-लिहिणें-हिशोब. २ एकनोंदी हिशेब; बारनिशी. याच्या उलट दुबेरजी. ३ सर्व रकमांची एकूण बेरीज. –वि. अशा प्रकारें ठेवलेला (हिशेब, प्रकरण इ०). **०दप्तर**-न. १ निरनिराळ्या खात्यांचा जमाखर्च, हिशोब व नोंदणी एकत्र ठेवणारी कचेरी, खातें. २ खातावणी; निरनिराळ्या खात्यांच्या खतावण्यांच्या रकमांचें हिशेबी दप्तर. यावरून एकंदर सरकारी जमाखर्चाच्या हिशोबाचें पत्रक तयार करतां येत असें.

एकबोटीगंध—न. एका बोटानें कपाळास लावलेलें आडवें किंवा उभें गंध; याच्या उलट दुबोटी गंध. [एक+बोट+गंध]

एकभक्त—वि. १ एकाच देवाची भक्ति करणारा. २ (ल.) एकाच धन्याची सेवा करून राहणारा; एकाचीच मनधरणी करणारा. ३ एकभुक्त पहा. [एक+भक्त]

एकभाज—वि. एकदांच भाजलेलें. [एक+भाजणें]

एकभाव—पु. १ मनाची एकाग्रता; एक विचार; ठाम मत. २ एक दर; एक ठराविक किंमत. [एक+भाव]

एकभुक्त-क्ति—न.स्त्री. अहोरात्रांत एकदांच किंवा माध्याह्नीं एकदांच जेवून राहण्याचें व्रत. 'दशमीव्रत एकभुक्त साचार। एकादशी उपोषण हरीजागर ॥' –वि. दिवसांतून एकदां जेवणारा; एकभुक्त आचरणारा. [सं.]

एकमंगल-ळ—न. अनेक जातींचे लोक एकत्र येणें; सब गोलेकार; संकर; काला. [एक+मंगल (उप.)]

एकमजला-ली—वि. १ एकच मजला असलेलें (घर) २ एकच पदर असणारें (पातळ, लुगडें, पागोटें इ०). [एक+मजला]

एकमजली—क्रिवि. मध्यें न उतरतां एकदम मुक्कामापर्यंत (जाणें, चालणें इ०). [एक+मजल]

एकमत—न. मतैक्य; सर्वांचीं मतें जुळणें; अविरोध; एक विचार; अभिन्नता; एकजूट. –वि एकमताचे, विचाराचे. [एक+मत]

एकमध्य—वि. (गणित) समकेंद्र; एक केंद्र; मध्यबिंदु एक असणारें. (इं.) कॉन्सेंट्रिक. [एक+मध्य]

एकमय—वि. १ सर्वव्यापी; सर्वाधिष्ठित. 'ब्रह्म एकमय आहे.' २ एकरूप. 'तुका म्हणे गंगासागरसंगमीं। अवघ्या झाल्या ऊर्मि एकमय ॥' -तुगा ४०१६. ३ सर्व एक, समान (जातीचे-प्रकारचे-गुणाचे). जसें-एकमयधर्म-आचार-स्थिति-प्रकार. –क्रिवि. एकत्र, सब मिळून; एकजुटीनें. [सं.]

एकमसूंदी—वि. धोर; अद्वितीय मुत्सद्दी; धोरणी; ज्याबद्दल दुमत होणार नाहीं असा सर्वमान्य; अद्वितीय. 'नानाफडनवीस एक मसूदी तर्क त्यानें काढिला.' –ऐपो २७६. [एक+मुत्सद्दी, अप; एक+मसुदा]

एकमानपद्धति—स्त्री. (गणित) त्रैराशिकाऐवजीं एक रीत. या रीतींत प्रथम दिलेल्या प्रमाणावरून एका वस्तूची किंमत काढून नंतर त्यावरून इष्ट राशीची किंमत काढतात; यास एकमानगणित असेंहि म्हणतात.

एकमार्गी—वि. एकाच मार्गानें, रीतीनें जाणारा; केवळ आपल्या मताप्रमाणें चालणारा; एककल्ली; एकरोखी. [एक+मार्ग]

एकमांस-एकहाड—वि. एका हाडामासांचा; एका रक्ताचा; एका कुटुंबांतील; एकपिंड; सपिंड, सगोत्र. [एक+मांस, हाड]

एकमाही—वि. एक महिन्याचा (हिशोब, वसूल, रोजमुरा, बेगमी इ०). [एक+माहे=महिना]

एकमुख—क्रिवि. १ सन्मुख. 'तेंगें एकांती नेऊनि देख। व्यासासि केंगें एकमुख.' –एभा १.१५३. २ तत्पर. 'माझ्या भजनीं एकमुख। माझिया निजभावें अतिभाविक ॥' –एभा १३.७४८ –वि. एक विचाराचे; एक जुटीचे; एक [एक+मुख]

एकमुखी—वि. १ एका तोंडाचा; एका चेहऱ्याचा, रूपाचा, बाजूचा (देवमूर्ति, मुखवटा, रुद्राक्ष वगैरे). २ एकस्वरूपी; एक जातीय. ३ एकतंत्री; एकाच अधिकाऱ्याच्या हातीं असणारी (सत्ता.) 'सध्यां हिंदुस्थानांत एकमुखीराज्यपद्धति प्रचलित आहे.' –के २.१२.३०. ४ एकाच्याच तंत्रानें चालणारा; ज्याला एकच वरिष्ठ आहे असा. [एक+मुख] ०**रुद्राक्ष**–पु. १ ज्यांस एकच तोंड आहे असा रुद्राक्ष. २ (ल.) एकतंत्री; जो एकाकडून माहिती, सूचना, सल्ला वगैरे घेतो असा माणूस, राजा, न्यायाधीश, अधिकारी वगैरे. 'सरकारी शाळांच्या एकमुखी रुद्राक्षानें सर्व शिक्षणक्रम सुरू ठेवणें बरोबर नाहीं.' –टि ३.३९.

एकमुठाण—न. एकी; जूट, कट, संघ. [एक+मुठाण]

एकमुठी-मूठ-मुठीचा—वि १ एकाच्याच मतलबाची असणारा (राजाच्या, मंत्र्याच्या, मालकाच्या वगैरे); एकमुखी २ एका विचाराचे-पक्षाचे; एकमत जालेले. **एकमुठी चालणें**–क्रि. एक मतानें, एकत्र जाणें, वागणें [एक+मुष्टि-मूठ]

एकमुठी-मूठ––क्रिवि. १ एका मुठीनें; एका हातानें; एका वेळीं. 'एका मुठीनें म्यां हजार रुपये दिल्हे.' –मोल. २ कामाच्या किंवा व्यवहाराच्या एका वेळीं; एका उरकांत; एका झटक्यांत. [एक+मूठ]

एकमुळा—वि. (गो.) एकुलता; एकलकोंडा, एकटा. 'एकमुळो आस दुसरो कोणीच नाका'=एक मुळा आहे, दुसरा कोणीच नको. [एक+मूल]

एकमुळी—स्त्री. १ एकच मुळी, एकच रोपटें; कुटुंबांत एकच मूल जिवंत राहिलें म्हणजे त्यास म्हणतात. (कि० राहणें) २ (शेतकरी लोकांत) गावांतील एक धान्याचें पीक, शेत, लागवड; शेतकीचा एकच उद्योग. 'एकमुळी बुडाली म्हणजे गांव उजाड झाला.' –वि. आपल्याखेरीज दुसऱ्या धान्याला जमिनींत जागा न देणारें (जोंधळा, गहूं इ० पीक) [एक+मुळी]

एकमूल्य—वि. (रसायन.) संतृप्त उत्कर्षांतून एक उज्ज परमाणु निःसारित केल्यानंतर राहणारा संयुक्तमूलक. (इं.) मोनोव्हॅलंट मोनाड. 'संतृप्त उत्कर्षांतून उज्जाचा एक परमाणु काढला असल्यास त्याचा एक अवयव असंतृप्त राहील व त्यास एकमूल्य म्हणतां येईल' –ज्ञाको. क १३०.

एकमेक—वि. परस्पर; अन्योन्य. 'एकमेकांतें साटोपें लवूनियां विधिती.' –सुवन ४.१९१ [एक द्वि: प्रा एक्कमेक]

एकमेक, एकमेकाशीं, एकमेकांत—क्रिवि. परस्परांमध्यें; एकमेकांबरोबर; आपआपसांत; आपणांमध्यें, तुम्हांमध्यें, त्यांच्यामध्यें.

एकमेकी—स्त्री (गो.) मेळ; जम. [एक+एक]

एकमेव—वि. एकच एक; केवळ एक. [सं.]

एक-येकमेळ—पु. मिळणी; ऐक्य; संघ; एकत्रपणा. –वि. एकवट; एकत्र. 'प्रळय वन्हिहुळ तेजाळ। कीं द्वादशादित्य येकमेळ।' –मुआदि ५.२५. [एक+मेळ]

एकमेळणी, एकमळीं—क्रिवि. सर्व मिळून; एकत्र; एकजुटीनें; समुदायानें. 'सच्चिदानंद एकमेळीं। तेचि त्रिवळीं ललाटीं।' –एरुस्व १.६१. [एक+मेळ–णी]

एकमेळी—वि. (गो.) एकतर्फी; एककल्ली. [एक+मेळ]

एकमोडी—वि. एकमार्गी, एककल्ली; एका प्रकारचा; एका स्वरूपाचा, जातीचा. [एक+मोड]

एकमोल—न. (कों.) एकमंगल, संकर; गोतमकाला. [एक+मोळा]

एकमोली—वि. एकसारखी किंमत असणारा (पदार्थ) [एक+मोल; सं. मूल्य]

एकयोनि—वि. एकाच आईपासुन जन्मलेले; सहोदर; सोदर सख्खे भाऊ. [सं. एक+योनि]

एकर—पु. (गणित) जमीन मोजण्याचें एक विशिष्ट माप इंग्रजी मापानें ४८४० चौरस यार्ड म्हणजे एक एकर, ८५ एकर म्हणजे १०० बिघे जमीन. –राको २२. १ आणा = ७·५६२६ चौरस यार्ड, १२१ चौरस यार्ड किंवा सोळा आणे=एक गुंठा, ४० गुंठे किंवा ६४० आणे = एक एकर. [सं. अजस्र = अंगण, परसूं. आवार, प्राकार; प्री. अग्रॉस; लॅ. अगेर; जुनें इं. अकेर; जुनें फ्रें एकर]

एकरकम—स्त्री. निरनिराळ्या बाबींची एकत्र बेरीज. [एक+रकम]

एकरकम-रकमी—क्रिवि. एकदम; एका रकमेनें; एकमुठी; एकठोक. 'एकरकमी पुष्कळ पैसा मिळण्यास देशांतरीं फिरल्याशिवाय इलाज नाहीं.' –माप्र ९. [एक+रकम]

एकरंग-रंगी—वि. १ एकाच रंगाचा; सर्वत्र, दोहों अंगांस एक रंग असणारा (पागोटें, सखलाद इ०). २ अंगावर एकच रंग असलेला; दुसऱ्या कोणत्याहि रंगाचे ठिपके वगैर नसलेला; निर्भेळ रंगाचा (घोडा); असा घोडा कुलक्षणी, अशुभलक्षणी समजतात. **॰पाठीवर शुभ्र**–रंग कोणता तरी एक असुन पाठीवर मात्र पांढरा रंग असणारा (घोडा); हें अशुभ लक्षण होय. –स्त्री. १ सोंगटयांच्या तिफाशी खेळांतील डाव. प्रतिपक्ष्याची सही होण्यापूर्वी आपली सही होऊन डाव बसुन पक्ष्याची सोंगटया उठून गेल्या व नंतर कच्च्या सोंगटया उठून जाण्यापूर्वी प्रतिपक्ष्याची सही झाल्यास त्यास एकरंगी असें म्हणतात. २ सख्य; स्नेह; अविरोध; 'नवाब मवसुफ व रावपंतप्रधान यांची करीमापायोन दोस्ती व एकरंगी, जुदागी नाहीं.' –रा १९ ८. 'पुत्रपौत्रपर्यंत एकरंग केलें.' –एटि २.८०. [एक+रंग; फा. यक्+रंगी]

एकरदन—पु. (एकदांत असलेला) एकदंत; गणपति. 'उठोनि वेगी एकरदन। दिधलें सकळांसीं दर्शन।' –गणपतीची भूपाळी ६. [सं. एक+रदन=दांत]

एकरस—वि. एकाच गोष्टींत सुख मानणारें, पावणारें; एका विकाराचें; एका भावनेचें; समरस. –पु. १ एकात्मता. २ (ल.) परब्रह्म. 'भेदु लाजोनि आवडी। एकरसीं देत बुडी।' –अमृ १.९. [एक+रस]

एकराजक—वि. एकराज्य; एकतंत्री, एकाच्याच सत्तेखालीं असणारें; स्वसत्ताक (राज्यपद्धति) (इं.) ऑटॉक्सी. 'सर्वांच्या तोंडीं लोकसत्ताक संस्थान चांगलें कीं एकराजक चांगलें हा वाद झाला.' –नि ८३. [सं.]

एकराज्य—न. एकसत्ता; एकतंत्री-मुखी कारभार; एकाच्या हातीं असलेली अनियंत्रित सत्ता; एकछत्री राज्य. 'जाहालें सकळीक एकराज्य.' [एक+राज्य]

एकरात्र—क्रिवि. १ एका रात्रीचा काल; चार प्रहर; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत. २ सबंध दिवस, अहोरात्र, चोवीस तास व्यापून. [एक+रात्र]

एकराशि-रास—वि. १ एक राशि ज्यांची आहे ते. २ (ल.) एका गुणाचे, जातीचे व पक्षाचे; सारख्या मानाचे; एकसारखे. 'बायकोपासन नमीपर्यंत एकरास.' –फाटक, नाटचछटा ३. ३ एकाच राशींतील, संघांतील, समूहांतील (धान्य, पदार्थ, इ०); एकजात. [सं. एक+राशि]

एकराष्ट्र—न. लोकांत एकी, एकोपा असलेलें राष्ट्र, देश; अनेक विभाग मिळून झालेला देश, राष्ट्र. 'इंग्रजी राज्याखालीं हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न जाती एकवट करून त्यांस एकराष्ट्राचें स्वरूप आणण्यास ज्या कल्पनांची आणि साधनांची आवश्यकता आहे ...' –टि १.२५१. 'छप्पन देश मोडून त्यांचा एकजीव अथवा एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे.' –टि १.४७५. [एक+राष्ट्र]

एकराष्ट्रीयत्व—न. सर्व राष्ट्र (त्यांतील सर्व लोक) एक आहे अशी भावना, राष्ट्राभिमान; राष्ट्रभक्ति; (इं.) नॅशनॅलिटी. 'एकराष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रांत निर्माण झाल्यास स्वातंत्र्य काय लांब आहे?' –दिसू ३८. [एक+राष्ट्र]

एकरूप—वि. एका रूपाचें, आकाराचें; सदृश; समरूप; अविभक्त; न बदलणारें; अविकारी. 'जयजय देवैकरूप। अतिक्रुत कंदर्पसपैदर्प।' –ज्ञा १८.८. –क्रिवि. १ एकसारख्या पद्धतीनें; बदल न करितां; सारखें. 'मी एकरूप दहा रोज अनुष्ठानाला बसलों.' २ (नकारात्मक प्रयोग) केव्हांहि नाहीं.; कधींहि नाहीं; कोणत्याहि प्रकारें नाहीं. 'तूं एकरूप त्याच्या घरीं जाऊं नको.' 'मी एकरूप यावयाचा नाहीं.' [एक+रूप]

एकरोखी—वि. (अप. रूप) एकरोहकीं. १ एककल्ली; एकमार्गी; एकाच विषयाकडे चित्ताचा, मनाचा कल असणारा. २ एकाच (वरच्या) बाजूला वेलबुट्ट्या वगैरे भरतकाम केलेलें

आहे असें (चीट, वस्त्र). **०शिवार**–न. गांवाच्या एकाच बाजूस असलेल्या जमिनी. [एक+रोंख]

एकल—नि १ एकला; एकटा. 'एथ एकलेआ चालतां। भय नाहीं सर्वथा।'–ऋ ७. २ (बैदुलाचा खेळ) एक या अर्थानें. [सं.] **०काजा, कांजा-खाजी**–पु. एक (गोटया–बैदुलाचा खेळ) एक गोटी दुसरीस मारतांना मोजण्याच्या कामीं एक या संख्येबद्दल योजतात. [एकल+खाजा ?]

एकलकांडा–कांग्या, –कोट–टिका–टुका–टुरा–निपशा—वि. एकांतप्रिय; माणूसघाण्या; समाजांत न मिसळणारा; मनमिळाऊ नसणारा. (हा शब्द निंदाव्यंजक असा वापरतात). **म्ह०** एकलकोंडा बारा रांड्या.

एकलग—वि क्रिवि. १ एकीकडे, बाजूला असणारें; सलग याच्या उलट (घर, झाड इ०) [एकल+ग] २ सलग; एकासएक चिकटून असाहि अर्थ होतो. [एक+लागणें]

एकलगी—वि. एका लगीवर उभारलेलें; एकपाखी (घर); याच्या उलट दुलगी, दुपाखी. [एक+लग]

एकलंगी (पैंच)—स्त्री. (मल्लविद्या) जोडीदाराच्या दंडावरून आपला हात घालून जोडीवाल्याचा हात आपल्या पाठीवर दाबून धरून जोडीवाल्याचा हात ज्या बाजूनें दाबून धरला असेल त्याच आपल्या पायानें जोडीदाराच्या पिंडरीस आपल्या पिंडरीनें व पायाच्या चौड्यानें धरून आपली मान जोडीदाराकडे वळवून त्याला चीत करणें. फारसी भाषेंत पिंडरीला लंग म्हणतात व हा डाव पिंडरीनें करावयाचा असल्यानें यास एकलंगी हें नांव पडलें आहे. [एक+फा. लंग=पिंडरी.] **०ची सवारी, एकलंगी**–स्त्री. (मल्लविद्या) आपल्या एका पायानें जोडीदाराच्या पायांत बाहेरून पाय घालून जोडीदाराच्या गुडघ्याच्या वाटीजवळ मांडीकडील बाजूस पाय घालून तोच आपला पाय आपल्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवणींत घालून ज्या आपल्या गुडघ्याच्या लवणींत आपल्या पायाचा पंजा घातला आहे, त्या आपल्या पायाचा पंजा जोडीदाराच्या डोणशिरेवर टाचेकडील बाजूस घालून जोडीदारास चीत करणें.

एकलपायी—वि. जोडीदार, मदतनीस नसलेला; एकटा. [एकल+पाय]

एकलहरी—वि. एक विशिष्ट सापाची जात; हा चावल्यानें फक्त एक लहर येऊन मृत्यु येतो. 'मेघ कुंजर जटिल एकलहरी। आज्ञा होतां घेती झुंझारी। टाळ मृदंग वाजतां कुसरी। रागोध्दार करिती पैं।'–ह ३४.१४९. [एक+लहर]

एकलक्षी—वि. ज्यासबंधीं आदर किंवा कांहीं हेतु आहे अशी एकच वस्तु डोळ्यापुढें ठेवणारा; एकघोरणी; एकमार्गी. [एक+लक्ष्य]

एकला—वि. एकटा; एकल पहा. [सं. एकल; प्रा. एगल्ल] **म्ह०** 'एकल्याची एक वाट.'

एकलाधी—स्त्री. ऐक्य; एकमत; एकबुद्धि. 'मग अहंकारासि एकलाधी। करूनि जीवितावधी। वहाविले बुद्धि। चराचर।' –ज्ञा १३.४९. [एकला+धी; किंवा एक+लाधेंगे]

एकलिंग—न. भोंवतालीं पांच कोसांच्या मर्यादेंत कोठेंहि दुसरें शिवस्थान नाहीं असें शिवस्थान; हें विशेषप्रतीचें सिद्धिस्थान समजलें जातें. [एक+लिंग] **०जी**–पु मेवाडांत उदेपूर शहरापासून एक मैलावर असलेलें एक देवस्थान; हें देवस्थान मेवाडांत फार प्रसिद्ध आहे. रजपूत लोक भेटीच्या वेळीं. 'जय एकलिंगजी.' म्हणून रामराम करतात.

एकलांड्या—वि. एकच लोंबी असलेला (एक भाताचा, साळीचा प्रकार). [एक+लोंबी]

एकलौता–ती—वि. १ एकुलता–ती. 'कां एकलौतिया बाळ का–। वरि पडौनि ठाके अंबिका॥' –ज्ञा १३.५०२. २ एकपुती; एक पोर असलेली. 'गुरु बहुतांची माये। परि एकलौति होऊनि ठाये॥' –ज्ञा. १३.४०९. [एक+ल+ता, हि. एकलौता]

एकवंक—न. एकनिश्चय, एकवाक्यता. 'याचेनि एकवंके। जगासि वादु॥' –ज्ञा १३.१६. [एक+वच्–वाक्]

एकवंकी—स्त्री. एकरूपता; भेदरहितता; सारखेपणा; एकत्व; तादात्म्य. 'मज एकवंकी याची स्थिति। आवडतु असे॥' –ज्ञा ४.१२. 'न साहे वियोग तुम्हां उभयतां। देवां आणि भक्तां एकवंकी॥' –निगा १८०.

एकवंकी—स्त्री. पायांतील एक दागिना. 'निजपदिचेनि ओलें। तोनें पीका निगाले। तें एकवंकीं सामिनलें। श्रीचरण क्षेत्रीं॥' –ऋ ८७. [एक+वांक=वाकी; सं. वक्र; प्रा. वंक]

एकवचन––न. १ एकच बोलणें; न फिरणारें वचन. २ (व्या.) नामाच्या ज्या रूपावरून त्याच्या एकत्वाचा बोध होतो किंवा ज्या नामावरून एकच वस्तूचा बोध होतो तें. **एकवचनांत बोलणें**–अनादरानें, एकेरी बोलणें; अरेतुरे करणें, म्हणणें. [सं.]

एकवचन–नी—वि. १ (व्या.) पदार्थाचें एकत्व दाखविणारा; एकवचनांत असणारा. २ वचनाचा धड; बोलल्याप्रमाणें करणारा; सत्यप्रतिज्ञ. 'राम एकवचनी, एकबाणी होता.' [एक+वचन]

एकवट—क्रिवि. एकत्र; एका ठिकाणीं; संयुक्त; सर्व मिळून; संमिश्र; एकंदर. 'रथ जोडिले एकवट। वरि चढले वीर उद्भट।' –एरुस्व ८.१४. 'तिसऱ्या हेनरी राजाच्या कारकीर्दीच्या अखेरीपासून सुमारें वरील दोन भाषा एकवट होऊन हल्लीं जीस इंग्रेजी म्हणतात ती बनत चालली.' –नि ५५२. [सं. एक+वृत्त; प्रा. वट्ट; तुल० का. ओट्टु=मिळणी] **एकवटणें**–अक्रि. एकत्र होणें; गोळा होणें; मिसळणें; मिळणें. 'हे तिन्ही (अकार, उकार, मकार) एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें॥' –ज्ञा १.२०. 'दीपीं दीपू एकवटला। मिळणीं एकचि होऊनि ठेला॥' –एभा १०.३६३.

'सप्तकोटि मंत्र पाहीं । एकवटले बाणाचे ठायीं ॥' –सकि. १ गोळा करणें; एकत्र करणें; जमविणें. २ मिसळणें; काला करणें. [सं. एकवृत्–वर्त्=होणें]

एकवटा—पु. १ एकवटलेली स्थिति, अवस्था; संयुक्तपणा. २ एकजूट; संघ; एकोपा, एकी; मिलाफ. ३ (विरू.) एकटयाचा जिन्नस, माल; घाऊक घेतलेला माल; एकवटयाचा जिन्नस; ठोक घेतले ला जिन्नस. [एकवट]

एकवडा–ढा—वि. १ एकटा; एकला. 'मग नेणें बहु थोडे । न पाहे मागें पुढें । मार्गामार्गे येकवढें । करीत चाले ॥' –ज्ञा १८ ६२५. २ (गो.) एकेरी. ३ एकत्र केलेला. एकवट पहा.

एकवत—न. (वायकी) एकभुक्त; उपवास. 'भूक नाहीं म्हणून एकवत.' [सं. एकव्रत, अप.]

एकवत—क्रिवि. एकत्र. 'कोठे नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोवतीं बहुत । दोघे एकवत बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥' –तुगा १११. [सं. एक+वृत; म. एकवट]

एकवद्—न. एकवाक्यता; ऐक्यता; एकवत्. 'एऱ्हवी मध्य ऊर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासि एकवद । जया ठायीं ॥' –ज्ञा १५.७३. [सं. एक+वृत; एकवत्]

एकवर्ण—पु. वर्णसंकर; जातिभेद न पाळणें; सवर्गोलंकार [सं.]

एकवर्ण–र्णी—वि. एकरंगी; एकरंगाचा (बैल, गाय, पक्षी वगैरे). [सं.]

एकवर्णसमीकरण—न. १ (बीजगणित). ज्या समीकरणांत एक अव्यक्त पद असतें तें. जसें–क्ष+अ=३ व. याच्या उलट अनेकवर्णसमीकरण. –समी. प्रस्तावना ३. २ ज्यांत अव्यक्त पदांचे प्रथमघात मात्र येतात तें. –बीजगणित (जर्व्हिसकृत आ. २) १४४. (इं.) सिंपल इक्वेशन. [सं.]

एकवंशता—स्त्री. सपिंडता; सहजातसंबंध. [एक+वंश]

एकवशीं–वशास—एकोशी, एकोशास पहा.

एकवसा—पु. १ एकीकडील जागा; एकांत स्थळ; आड जागा. २ एकोसा पहा. [सं. एक+वस्]

एकवस्त्र,एकवस्त्रपरिधान,एकवस्त्रस्नान—न. तीर्थाच्या ठिकाणीं नवरा व बायको यांनीं एकच वस्त्र नेसून किंवा दोवांनीं तेंच तेंच वस्त्र नेसून करावयाचें स्नान. हें फक्त तीर्थाच्या ठिकाणी पुण्यकारक आहे, इतर ठिकाणीं पाप होय. [सं.]

एकवळा—पु. १ एकोपा; ऐक्य; संघ; जमाव. 'ना तरी अंबसेच्या दिवसीं । भेटली बिबें दोनी जैशीं । तेवीं एकवळा रसीं । केला एथ ।' –ज्ञा ११.५. 'बोधचंद्राचिया कळा । विखुरलिया येकवळा । कृपापुनीव लीळा । करी जयाची ॥' –अमृ २.७. २ मैत्री; स्नेह. [एक+वळणें]

एकवाक्यता—स्त्री. १ एकमत; एकार्थ; एक निष्कर्ष (निरनिराळ्या पुस्तकांचा, वचनांचा, विधानांचा); ऐकमत्य. 'तुम्ही बोलतां एक आणि तुमचा वकील बोलतो एक, तें तें मिळत नाहीं, याजकरितां तुमची व त्याची एकवाक्यता करून मग बोला म्हणजे काय तें सांगेन.' २ ऐक्य; मेळ; जूट. 'सर्व लोकांची सर्व बाबतींत, सर्व विचारांची एकवाक्यता होणें कधींहि शक्य नाहीं.' –टि ३. २४६. 'त्या...निर्देशांची...एकवाक्यता करून काय निष्पन्न होतें हें पाहणें अगत्याचें आहे.' –मसाप २.१२२. [सं.]

एकवाट–वाटी—वि.क्रि. १ एकवट; एकत्र; संयुक्त; समरस. 'तयांमार्गे कुंजरथाट । गळां सांखळ्या एकवाट ॥' –एरुस्व ६. ५३. 'दृश्य द्रष्टा आणि दृष्टी । देखतां तिन्ही एकवाटी ॥' –एभा २.३५८. २ एकदम. 'तैसें तें (सैन्य) घनदाट । उठावलें एकवाट ॥' –ज्ञा १.८९. [एकवट]

एकवाढ—स्त्री. जेवणाम पुरेसें अन्न जेवणाराच्या पानांत एकदम वाढून ठेवणें. [एक+वाढणें]

एकवार—क्रिवि. एकदां; एक वेळ. [सं. एक+वार]

एकवार्षिक—वि. वर्षांतून एकदांच होणारी (वनस्पति, पीक, वस्तु इ०). [सं. एक+वर्ष]

एकविचार—पु. एकमत; ठाम, निश्चित मत; निश्चय. [सं. एक+विचार]

एकविध—क्रिवि. १ एकाच तऱ्हेचा; एकाच प्रकारचा. २ (ल.) एकनिष्ठ (भक्त); सरळ; राधा. 'एकविध आम्ही न धरूं पालट । न सडूं हे वाट सापडली ।' –तुगा ७५३. ०भाव–पु. (काव्य) एकमत; एक विचार; एकभाव; ऐक्य; एकोपा. [सं. एक+विधा]

एकविधा—क्रिवि. एका प्रकारानें; एका रीतीनें. [सं. एक+विधा]

एकविधाभक्ति—स्त्री. एकाच देवतेवर असलेली श्रद्धा, भक्ति; एकाच ईश्वराची पूजा. [सं. एक+विधा+भक्ति]

एकविसणी—वि. एकदांच तापवून निवविलेलें; चुलीवरून खालीं काढून निवूं दिलेलें. (पाणी). [एक+विसण]

एकवीस—वि. २१ संख्या. [सं. एकविंशति; प्रा. एगवीसा; हिं. एक्कीस.]

एकवृंतगतफलद्वयन्याय—पु. (एका देंठास दोन फळें) एका योंड्यानें दोन पक्षी मारणें या अर्थी, किंवा एका प्रयत्नांत दोन कार्यें करणें या अर्थी योजतात. [सं. एक+वृंत=देंठ+गत+फल+न्याय]

एकवेळ–ळां—क्रिवि. १ एकदां; एकवार. २ एकदम; एकाच वेळीं. [सं. एक+वेला]

एकवेळ—स्त्री. दिवसाच्या दोन (सकाळ, दुपार) भागांपैकीं एक. सकाळ किंवा दुपार. [सं. एक+वेला]

एकव्यसनी—वि. एक मताचे; सारख्याच संवयी असलेले; एक राहणीचे (लोक वगैरे). [सं. एक+व्यसन]

एकशाक—वि. अखंडखुरी; एकगेळी; खुराला भेग नसलेला (घोडा, गाढव इ०). [एक+शफ]

एकशय्या—स्त्री. १ एकाच अंथरुणावर निजणें, इतका परिचय. २ (ल.) अति स्नेह; दाट मैत्री; प्रेमाचें संघटन. [एक+शय्या]

एकशरीर—वि. एका रक्ताचा, मांसाचा, हाडाचा, सर्पिंड; सगोत्र. [एक+शरीर]

एकशिंगी—वि. (गो.) एक शिंग असलेला (पशु.) [सं. एक+शृंग]

एकशिवडा—वि. (गो.) काटकुळा. सडपातळ, किडकिडीत (मनुष्य) 'तें चेडु वरें दिसना, एकशिवडें आस '=ती मुलगी चांगली दिसत नाहीं, किडकिडीत आहे. [एक+शिवडा=नदींतील एक मासा.

एकशिसाल—स्त्री. (गो.) डोक्याचा एक भाग दुखणें; अर्धशिशी. [सं. एक+शीर्ष+ल]

एकशीरफाल्त—वि. (गो.) शीघ्रकोपी. [एक+शिर+पो. फाल्त=उर्णे; इं. फॉल्ट=दोष]

एकशेंगकापशी—स्त्री. देवकापशीचें झाड; याच्या बोंडांत एकच बी असते.

एकशेज—क्रिवि. एका ओळीनें, रांगेनें; एक दंडाळी (वसणें, मांडणें, वगैरे) [एक+शेज]

एकशेवडी—वि. (कों.) सरळ मोट; विन फांद्यांचें (झाड). [एक+शिवडा]

एकशौक्तिक—न. मोतीं तयार करणारें एकशिपली कालव; हीं गोडया पाण्यांत असतात [सं. एक+शुक्ति=शिप]

एकश्चित्त—वि. एकचित्त; सावधान; एकाग्र. [सं. एक+चित्त]

एकसडी—वि. एकदांच सडलेले, कांडलेले (तांदूळ.) [एक+सडणें]

एकसडी—वि. एकदेंठी; एकच टाहाळा, खांदी असणारा (हरभरा, तूर, मेथीची भाजी वगैरे). [एक+सं. सट्=पृथक करणें; सट; प्रा. सड]

एकसत्ताक—वि. एकाच्याच हातीं सर्व सत्ता असलेलें(राज्य); **एकराज्य; एकराजक**; याच्या उलट लोकसत्ताक. 'एकसत्ताक राज्य असल्यास अप्रिय कायद्याच्या योगानें असंतोषजन्य बंड उत्पन्न होण्याचा संभव असतो. ' –टि ४.९३. [सं.]

एकसंध-संधी—वि. जोड किंवा सांधा नसणारें; तुकडा नसलेलें; अखंड; बिनजोडी (भांडें, नाव, दगड, फळी, वस्त्र इ०). [एक+संधि]

शको. १. ५८

एकसंबा—विना.पु. रविवार. [फा. यक्+शंब; तुल० सं. एक+शंपा=वीज; एक+क्षपा=रात्र, पहिली रात्र.]

एकसमयावच्छेंकरून—क्रिवि. एकदम; एकाकाळीं, एकाच वेळीं; युगपत्. (इं. सायमल्टेनियसली यास प्रतिशब्द म्हणून अलीकडे रूढ आहे). [एक+समय+अवच्छेद+करून]

एकसर—पु. (वायकी) एकदाणी; एकावली; एक पदरी माळ. एकदाणें पहा. [सं.]

एकसर-रां-रीं-रें—क्रिवि. १ एका ओळींत, रांगेंत, ओघांत; 'पळते जाहले एकसरे । ' –रावि २७.९७. २ (ल.) एकदम; एकवेळीं; एकाएकीं. 'हांक दिधली महावीरीं । बाण सुटले एकसरी । यादव सैन्याचा महाशिरी । शरधारीं झाकोळला । ' –एरुस्व ८ ४९. 'तुटे संशयाचें मूळ । येकसरां । ' –दा ११ २८. 'लालसेचेनि भरें । चोरिलीं तिहि अंतरें । कां जें आपणपें जावें एकसरें । साधेल कृष्ण । ' –रास १.१७८ –वि. एकसारखा; निव्वळ; निर्भेळ. 'तें ब्राह्मण एकसर साबडें । माणुस लेणें फुडे । ' –शिशु २०४. 'होती देहबुद्धी एकसारी । ' –ज्ञा १०.२१. 'स्थावरीं बहु भरु । तेवींचि नाहीं एकसरु । निवाहो जया । ' –ज्ञा १३ ८१३. [सं. एक+सृ–सर; प्रा. एक्कसरिअ; तुल०फा. यक्+सर्]

एकसरणें—अकि. १ अनुसरणें; निष्ठा ठेवणें. 'रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तियें कांतेचेनि पाडें । एकसरला जो । ' –ज्ञा १३.६०६. २ एकवटणें; एकत्र होणें. 'वाराया धांवे प्रभु तों एकसरोनि सर्व कोपानें । भोजांधक सात्यकिला वेष्टिति अत्यंत मत्त जो पानें । ' –मोमौसल १.५० ३ एकीकडे सरणें; पाठीमागें पळणें; पाय काढणें. –शिदि २७२. [एकसर]

एकसष्ट, एकसट—वि ६१ संख्या [सं. एकषष्टि; प्रा. एगसट्ठी]

एकसहा, एकसा, एकसाहा—क्रिवि. एकसारखा, अखंड; सर्रास. 'सुर्पी तोंचि संग घेई धडफुडी । एकसा गधडी नाम केला । ' –तुगा २६१. –वि. समान; सारखा; एकाच प्रकारचा, जातीचा. [सं. एक+सह; फा. यक्साह; हिं. ब. एकसा]

एकसांगी—स्त्री. एकदां, फक्त एक वेळ सांगणें, आज्ञा करणें. [एक+सांगणें]

एकसांज—क्रिवि. एकवेळ; एकदां (दिवसांतून). 'मी एकसांज जेवतों–फराळ करतों. –स्त्री. एकवेळ दूध देणें (गायीनें). 'गायीनें एकसांज धरली. ' किंवा 'गाय एक सांजेवर आली. ' [एक+सांज]

एकसाथ—क्रिवि. (कवाईत) एकदम; एकदम काम करण्याकरितां हा हुकूम आहे. 'एकसाथ नमस्तेका काम. ' –संव्य १८. [हिं. एक+साथ]

एका ताटांतला—वि. एकाच ताटांत बसुन जेवणारा; एकाच अन्नाचा (मित्र, सोबती). एका ताटीं जेवणें; एकताटी पहा. [एक+ताट]

एकांतिक—वि. परब्रह्मीं लीन; ब्रह्मरत. [सं. एक+अंतिक] **०धर्म**—पु. भागवत धर्म. 'हा भागवत किंवा नारायणीय धर्म त्यासच सात्वत किंवा एकांतिक धर्म अशीं दुसरीं नावें आहेत.' –गीर १०.

एकांतींलोकांतीं—क्रिवि. खाजगी व सार्वजनिक रीतीनें; गुप्त आणि प्रकट; क्वचित् एकांतलोकांत असाहि प्रयोग करतात. **०सांगणें**–एकीकडे व प्रसिद्धपणें, चारचौघांत सांगणें. [एकांत+लोकांत]

एकात्मता—स्त्री. एकपणा; एकरूपता; तादात्म्य. 'उदकपणें पांडुसुता । तरंगाची एकात्मता । न सोडेचि जेवीं ॥' –ज्ञा १८ ११७१. [सं. एक+आत्मता]

एकात्मवाद, एकात्मकेश्वरवाद—पु. एका परमात्म्यानेंच सर्व विश्व व्यापिलें आहे त्यावांचून अन्य कांहीं नाहीं असें मत; अद्वैतवाद; (इं.) युनिटेरिआनिझम्. [सं. एक+आत्मन्+वाद]

एकांत्रा-तरा—वि. एकदिवसाआड येणारा (ज्वर). एकांतर पहा. [सं. एकांतर] –क्रिवि. एकदिवसाआड. **०आड–एकांत्राड**–क्रिवि. एक दिवस आड; एक दिवस सोडून. [एकांतर+आड]

एकाद-दा—वि. एखाद–दा पहा. **०दुकलो**–(गो.) एखादा-दुसरा. [एकाद+दुकल]

एकादश—वि. १ अकरा (११) संख्या. २ अकरावा. 'आतां यावरी एकादशी। कथा आहे दोन्ही रसीं।' –ज्ञा ११.१. ३ भागवताचा अकरावा स्कंध 'करतलामळ जेवीं एकादश केला।' –मुक्तेश्वरकृत एकनाथाची आरती ३. [सं.] **०स्थानीं असणें**–अतिशय स्नेहभावानें असणें. जीवश्वकंठश्व असणें. अकरावा पहा. **०रुद्र**–पु. शिवस्वरूप अकरा देव. अकरा रुद्र पहा. या अकरा रुद्रदेवतांचीं साधारण नांवें अशीं–वीरभद्र, शंभु, गिरीश, अजेकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली, स्थाणु व भव.

एकादशी—स्त्री. दर पंधरवड्यांतील प्रतिपदेपासून अकरावी तिथि. हिचे स्मार्त आणि भागवत असे दोन प्रकार आहेत. ज्यावेळीं दोन दिवस एकादशी असते त्यावेळीं पहिली स्मार्त व दुसरी भागवत असें धरितात. दर महिन्यांतील शुक्ल आणि कृष्ण पक्षांतील एकादशींचीं जीं निरनिराळीं नांवें आहेत तीं अनुक्रम पुढीलप्रमाणें–चैत्र–कामदा, पापमोचनी; वैशाख–मोहिनी, वरूथिनी; ज्येष्ठ–निर्जला, अपरा; आषाढ–शयनी, योगिनी; श्रावण–पुत्रदा, कामिका; भाद्रपद–परिवर्तिनी, अजा; अश्विन–पाशांकुशा, इंदिरा; कार्तिक–प्रबोधिनी, रमा; मार्गशीर्ष–मोक्षदा, फलदा; पौष–प्रजावर्धिनी, सफला; माघ जयदा, पट्तिला; फाल्गुन–आमलकी, विजया. [सं.] **म्ह० एकादशीच्या घरीं शिवरात्र**–जेव्हां एका संकटामागून दुसरें येतें, किंवा एका कंगालजवळ दुसरा कंगाल भिक्षा मागतो तेव्हां ही म्हण योजतात. **०वात**–स्त्री. चार वोटांच्या रुंदीवर २५० फेरे घेऊन (५०० सुतांची) कापसाची एक वात तयार करतात. अशा दोन वाती आषाढी एकादशीपासून एक वर्षभर दर एकादशीस लावतात.

एकानएक-नेक—क्रिवि. झाडून सर्व. एकुनएक पहा.

एकानुसंधानी—वि. एक अनुसंधान, ध्येय, उद्देश असणारा; एकावधानी; एकदृष्टी; एकदेशी [सं. एक+अनु+संधान]

एकान्न—न. १ एक जेवण, दिवसांतून एकच वेळ जेवून राहणें. 'मला आज पंधरा दिवस एकान्न चाललें आहे त्यामुळें उष्ण झालें.' २ एक धान्य, कोणता तरी एका धान्यावर राहणें. ३ (क.) एकत्र जेवणखाण करणें. [सं. एक+अन्न]

एकापक्ष-पक्षीं—क्रिवि. एका अर्धी, एकपक्षीं पहा [एकपक्षीं अप]

एकापा(फा)सोळीचा—वि. लुकडा, रोडा; अशक्त. याच्या उलट दुहिरी हाडाचा, लंगरहाडाचा. [एक+पा(फा)सोळी]

एकामी-में—क्रिवि. १ विराम न घेतां; इतर कांहीं न करितां; सर्व उरकून; आटपून; एका अटकर्यांत; दुसरीकडे न वळतां (उरकणें, सुरू करणें, करणें). 'भोजन आटोपून एकामींच निघावें म्हणजे वाटेनें मध्ये उतारावयास नलगे.' २ एकदांच; पुनरावृत्तीची वेळ येणार नाहीं अशाप्रकारें (जाणें, करणें). ३ एकदम; सर्व मिळून; एकत्र; एकेवेळीं; युगपत्; (येणें, जाणें, करणें). 'वर्धति एकामेचि प्राणहर प्रखरसैकशस्त्र गर्मी।' –मोकर्ण (पराडकर प्रत) १९.२१. [एक+काम]

एकायतन—न. १ एक स्थान; एक ठिकाण, अधिष्ठान; आश्रयस्थान. (ल.) ब्रह्म. 'जे सर्वतेजाचिया राशी। कां एकायतन ज्ञानासी।' –ज्ञा ४.६२ [सं. एक+आयतन]

एकार—पु. (व) रस्त्याची (दुरारीपेक्षा) उंच असणारी बाजू; एका बाजूस उंचवटा असणारा असा रस्ता. 'एकारावर गाडी कलंडेल बघ!' –वि. (व.) १ (ओझ्यामुळें) एका बाजूस कललेला, खचलेला. २ एकबाजी (माणूस). [सं. एकीकृ, एक+कार] **०जाणें–होणें–कलणें** एकीकडे खचणें, खालीं येणें (जनावराच्या पाठीवरील ओझें गलबत, होडी); झोंक जाणें; पुढें येणें. **०बसणें**–१ कलून, रेलून बसणें. २ (ल.) अलग राहणें; बाजूस राहणें; एकीकडे बसणें.

एकारणें—अक्रि. १ (ओझें अधिक झाल्यामुळें) एकीकडे झुकणें, कलणें, दबणें; एक अंग खालीं येणें (गोणी, पडशी, गलबत यांचें) २ गुंतागुंत होणें; सर्व एक होणें; एकवटणें (दोरी इ०). ३ एकीकडे फुगणें, खालीं येणें, लोंबणें, मोठें होणें (वृषण इ०). –सक्रि. एकत्र करणें; रास करणें; गोळा करणें. [एकार]

एकारत-थ—(गो.) एकारती पहा.

एकारती—स्त्री.एका वातीचें, आरतीचें निरांजन. याच्या उलट पंचारती. [सं. एक+आरति]

एकारी—स्त्री. (व.) एक चाकोरी खोल असलेला रस्ता. एकार पहा.

एकार्णव—पु. (एक समुद्र) कल्पांतीचा जलप्रलय, प्रलयकाळी सर्वत्र पाणीचपाणी होऊन झालेला महासमुद्र 'जो एकार्णवातेंही जिरवी । जेथिचा तेथें ।' –ज्ञा १०.२७१ 'जेवीं त्या एकार्णव जीवनीं । क्रीडे हरि मीन होऊनी । तेवीं तूं निगमागम जीवनीं । मत्स्य होऊनी पोहसी ।' –जे १.३९. [सं.]

एकावन-वन्न—वि. ५१ संख्या. [सं. एकपंचाशत्; प्रा. एगपन्नास]

एकावली—स्त्री. १ एक अर्थालंकार. पदांची श्रेणी. यांत पहिल्या वस्तूचीं दुसऱ्या वस्तूचा, दुसरीचीं तिसरीचा असा सांखळीप्रमाणें विशेषणरूप संबंध असतो. 'राज्यांत समृद्ध पुरें उंच पुरांतिल गूढें, गृहांत जन–। उद्योगशील सारे, उद्योग स्तुत्य दाति विपुल धन ॥' (यांत राज्य, पुरें, गूढें, जन, उद्योग आणि धन अशा सहा पदार्थांची एक श्रेणी रचिते). –अर्थालंकारांचें निरूपण १७९. २ एकावळी पहा. 'नवरत्नांचें देवाचें पदक आणखी एकावली कोठें आहेत ?' –नाना ८३. [सं.]

एकावळी—स्त्री. एक गळ्यांतील अलंकार एकपदरी माळ, कंठा, हार. 'जेथ अहंकारा उखी जाहली । एकावळीची काढली । दोरी जैसी ।' –ज्ञा १३.५३०. 'वरी पीतवर्णाची चोळी । त्या वरी रत्नहार एकावळी ।' –कथा २.११.९८ [सं. एक+आवलि]

एकांशिक, एकांशी—वि. एका भागासंबंधी, एकांगी. मर्यादित स्वरूपाचा; विशिष्ट विषयापुरता; संकुचित [सं एक+अंश]

एकांशीं—क्रिवि. कांहींसें; एका तऱ्हेनें; एका बाजूनें. एका बाबतींत. [एक+अंश]

एकासरें—क्रिवि. एका पद्धतीनें, वृत्तीनें. एकसरें पहा. 'तुका म्हणे तरे । भवसिंधु एकासरें ।' –तुगा १२०० [एक+सर]

एकाह—पु एक संबंध दिवस; चोवीस तास [सं. एक+अहन्]

एकाहत्तर—वि. ७१ संख्या; एकसत्तर. [सं. एकसप्तति, पा एकसत्तरि, एहत्तरि; सिं. एकहतरि]

एकाहार—पु. एक ओळ, पंक्ति; एक्य. 'उगला गार्दी एकाहारा । येवों पाहें ।' –ज्ञा १८.२९१. 'चारुस्वळी एका हारी । एकांगाचा ।' –अमृ १.२. [एक+हार]

एकाहिक—वि. ऐकाहिक पहा. [सं. ऐकाहिक]

एकाहिशेवीं—क्रिवि. एका शर्थी; एका प्रकारें; एकांशीं.

एकाक्ष—वि. एक डोळ्याचा; एकडोळ्या; एका डोळ्यानें आंधळा. –पु. कावळा; शुक्राचार्य. [सं.]

एकाक्षर-री—वि. एका अक्षराचा; एक अक्षर असलेला; उ० एकाक्षरी कोश. [सं.]

एकिहेळां—क्रिवि. १ एक वेळ; एकदां. 'तें एकिहेळां घे पां आघवें ।' –ज्ञा ९.२९९. २ एकदम; अकस्मात्. 'हें लटिकें केवीं म्हणिजे । एकिहेळां ।' –ज्ञा ८.३९. [एक+हेळा; तुल० प्रा. हेला= शीघ्रता]

एकी—स्त्री १ ऐक्य; सख्य; मैत्री; स्नेह; गट्टी; एकमेळ; एकदिल २ अभेद; अद्वैत, अविभक्तता (हेतु, भाव, हित, उद्योग यांमधील) ३ (एकींची खेळात) विषम संख्या. 'एकी कां बेकी ?' ४ लव्वी, सुतणें, लघुशंका; शाळांतून विद्यार्थी लघ्वीला जातांना परवानगी मागतांना (एकबोट दाखवून) म्हणतात. गुजरातेंतहि या व वरील अर्थानें रूढ आहे [तुल० का. एक्कु=घर न राहणें, वारंवार लघ्वी-परमाकडेस होणें] ५ एक याचें अनेक वचन 'एकी म्हणती काय जाणे ?' –राजवाडे ध्येयमाला. [सं. एक; फा यकी]

एकीं—क्रिवि. एकानें गुणून, उ० एक एकीं एक, पांच एकीं पांच, अशा पाढ्यांत म्हणतात.

एकीकडचा-कडील—वि. एका बाजूचा, दिशेचा, भागाचा बनें [एक+कड]

एकीकडून-कडणे-कडने—क्रिवि. १ एका बाजूनें, दिशेनें, भागानें, एका बाजूस, अंगास, भागास 'यंदा एकीकडून आवे आले' २ एकदम सर्व मिळून; एकंदर सगळे. 'तुम्ही सगळे एकीकडून शिव्या देऊं लागलां तर...' [एक+कड+हून]

एकीकडे-कडेस—क्रिवि. १ अनेक कडा, बाजू यांतून एका ठायीं, एका अंगीं. २ एका बाजूस; एकीकडून अर्थ १ पहा. ३ बाजूला, बहिवाटीच्या रस्त्यापासून दूर; लांब; पलीकडे. ४ (ल) प्रस्तुत भाषणापेंचा प्रस्तावक्रम, त्यापासून अलग, दूर. 'मी बोलतों तें एकीकेंच राहिलें, आपलेंच तेवढें पुढें आणतो.'

एकीकरण—न. १ मिश्रण; संकलन, मिश्रण; एक करणें; मिलाफ करणें. २ अभेद; अद्वैत. एकाकार; एकरूप; ऐक्य. [सं.]

एकीपाठ्या—क्रिवि. एकत्वानें, तौलनिक पद्धतीनें विचार करून; पराकाष्ठेनें विचारदृष्ट्या. तात्त्विकदृष्ट्या 'तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांसरा । पाहतां एकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ।' –अमृ ७.२४८. [सं एक+काष्ठा =दिशा, सीमा]

एकीन—स्त्री. खात्री; हमत. 'व–वाजिबी ताकीद होईल हे एकीन समजोन... ।' –रा १५.१५२. [अर. यकीन]

एकीबेकी—स्त्री १ बायका–मुलांचा एक समविषम ओळखण्याचा खेळ; यात मुठींत पैसे वगैरे घेऊन दुसऱ्यास ते सम आहेत कीं विषम आहेत असें विचारतात त्याने सांगितलेलें (मोजून पाहतां) खरें ठरलें तर मुठींतील सर्व पैसे इ० त्यात द्यावयाचे, खोटें झाल्यास दुसऱ्यापासून तितके आपण घ्यावयाचे; गुजरायेतहि हा

खेळ आहे. 'एकीबेकी पोरा सांग झडकरी.' –भज ११४. २ जूटफूट; समेट आणि भांडण. [एक+बेक=दोन] **म्ह०** एकींत जय, बेकींत क्षय.

एकीभवन—न. संकलन; संमिश्रण; एकीकरण. [सं. एक+भवन]

एकीय—वि. एकटा; एकला; एकासंबंधी. [सं.]

एकीसवा—क्रिवि. १ एकसारखा; एकत्र. २ एकेबाजूस; एकीकडे. 'सकळही तुम्हीं व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ।' –तुगा २ [एक+सह; म. सवें]

एकुण, एकुणएक—एकूण, एकूण एक पहा.

एकुणअशीं-ऐशीं—वि. ७९ संख्या. [सं. एकोनाशीति; प्रा. एगूणासी; म. एक+उणा+ऐशीं]

एकुणचाळीस—वि. ३९ संख्या. [सं. एकोनचत्वारिंशत्; प्रा. एगूणचत्ताल; म. एक+उणा+चाळीस]

एकुणतीस—वि. २९ संख्या. [सं. एकोनत्रिंशत्; प्रा. एगूणतीस; एक+उणा+तीस]

एकुणनव्वद—वि. ८९ संख्या. [सं. एकोननवति; प्रा. एगूणणउइ; गो. एकुणनय; एक+उणा+नव्वद]

एकुणपन्नास-वन्नास—वि. ४९ संख्या. [सं. एकोनपंचाशत्; प्रा. एगूणपन्नास; म. एक+उणा+पन्नास]

एकुणवीस, एकुणीस, एकोणीस—वि. १९ संख्या. [सं. एकोनविंशति; प्रा, एगूणवीस; म. एक+उणा+वीस]

एकुणशंभर—वि. (क्व.) ९९ संख्या. [एक+उणा+शंभर]

एकुणसत्तर, एकुणहत्तर—वि. ६९. संख्या; एकुणसत्तर. [सं एकोनसप्तति; प्रा. एगूणसत्तर; म. एक+उणा+सत्तर]

एकुणसाठ—वि. ५९ संख्या. [सं. एकोनषष्टि; प्रा. एगूणसट्ठ; म. एक+उणा+साठ]

एकुणात-नात, एकुणहात—स्त्री. १ हिशेब पुरा केल्यावरची, अखेरची एकूण रकम, हिशेबी अखेरी रक्कम, शिल्लक. 'शेवटीं एकुणात देत जावी.' –खानगी खातें अंमलदाराचे अधिकार (बडोदे) १८५. २ या पुऱ्या केलेल्या रकमेवर मालकानें करावयाची सही किंवा रेघ, लेख. ३ या सहीवर एक विशिष्ट खूण म्हणून काढतात ती U — अशी रेघ. रेघ पहा. ४ (ल.) भाषणांतील प्रमाणभूत सार; सारसिद्धांत; तात्पर्य. [एकूण]

एकुणेर—एकुनएर पहा.

एकुणैशी—एकुणअशी पहा.

एकु(कू)न(ण)एक—क्रिवि. १ एकच; तेंच तें; सर्व, सारें एकच. २ प्रत्येक; कोणी न वगळतां; सर्वजण. [एकुण+एक; एक+अनु+एक ?]

एकुनएर-येर, एकुनेर—क्रिवि. १ (कुण.) परस्पर; एकमेक. 'लोक पुसती एकुनेराला ।' –ऐपो १३०. २ एकुनएक पहा. [एक+अन्+येर; एकूण]

एकुलता, एकुलताएक—वि. एकटाच; एकचएक; जो नाहींसा झाला असतां दुसरा मुळींच नाहीं असा. [एकल+एक]

एकूण-न—क्रिवि. १ तर मग; असें आहे तर; सारांश; एकंदरींत. 'एकूण त्या वृषलीच्या भाऱ्याला राज्यावर वसविण्याकरितां तूं असला नीचपणा केलास काय ?' –चंद्रगुप्त १७९. २ सर्व मिळून एकंदर संख्या किंवा बेरीज. 'पांचा जणांनी पांच पांच रुपये दिल्हे एकूण पंचवीस झाले.' –मोल. ३ अष्टल (बोलण्याचा निष्कर्ष काढून आलेलें मत म्हणून); पक्का; वस्तुतः; उ० एकूण लबाड–लुच्चा–सोदा–हरामी–मूर्ख. [सं. एक+अनु] **०एक**–क्रिवि. एकुनएक पहा. **०जमा-बेरीज**–स्त्री. (अनेक रकमांची) एकंदर बेरीज; एकंदर रकम. वाक्प्रचार–एकूण क्षेत्रफळ सारखेंच (लांबी कमी करून रुंदी त्यामानानें वाढविली किंवा रुंदी कमी करून लांबी त्यामानानें वाढविली तरी क्षेत्रफळ सारखेंच राहणार यावरून)=एकूण-एकच–एकीकडे कमी तर दुसरीकडे जास्त तेव्हां एकंदर बरोबरी.

एकें—अ. एकवेळां; एकानें गुणावयाचें असतांना योजावयाचें अव्यय. उ० तीन एकें तीन.

एके—एकचें अनेकवचन; एकी अर्थ ५ पहा.

एकेक—एकएक पहा. [सं.]

एकेचाळ-चाळीस,एकेताळ-ताळीस—वि. ४१ संख्या. [सं. एकचत्वारिंशत्; प्रा एगचत्ताल; हिं. एकतालीस]

एकेठाय—क्रि.वि. (कु.) एका ठिकाणीं; एके जागीं; एकत्र; एकाठायीं [एक+ठाय]

एकेरा-री— वि. १ दुहेरी, घडीचा किंवा पिळलेला नव्हे असा; एकपदरी (कापड, कागद, सूत वगैरेला लाविताते); विरळ विणीचें (सणंग). उ० 'एकेरी फुलें गुंफून केलेली माळ ती एकेरी माळ.' २ कोता; बारीक; दुबळा. (गाण्याच्या कार्मी गळा, आवाज वगैरे). ३ एकवचनी; अरेतुरे असा (उल्लेख, संबोधन). 'तूं मला शिवकुमारी या एकेरी नांवानें हांक मार गडे !' –विवि ८.२.३०. 'थोरास एकेरी शब्द बोलूं नये.' ४ एकएक; स्वतंत्र. दोन दोन, तीन तीन अशा प्रकारें संबद्ध नव्हे असा. **एकेरीवर येणें**–१ अरेतुरे म्हणणें; एकेरी नांवानें संबोधणें (अनादरयुक्त). २ (ल.) चिरडीस जाणें; चिडणें.

एकेरापट—पु. (मल्लविद्या) एक पेंच; जोडीदाराच्या एका पायास गुढघ्याच्या लवणींत हात घालून उचलून आपलें डोकें जोडीदाराच्या बगलेजवळ छातीस दाबून जोडीदारास चीत करणें. [हिं. पटकना=जमिनीवर जोरानें आपटणें.]

एकेराहुलकस—पु. (मल्लविद्या) एक पेंच; आपण आपल्या जोडीदारास खालीं आणून त्याची मान आपल्या छातीनें दाबून

आपला एक हात जोडीदाराच्या बगलेंत घालून आपल्या दुसऱ्या हाताचें कोपर जोडीदाराच्या बाहेरील मुंढयावर ठेवून आपल्या दोन्ही हातांस मिठी घालावी व ज्या बाजूचा आपला हात जोडीदाराच्या मुंढयावर ठेविला असेल त्या बाजूचा आपला पाय जोडीदाराच्या गुढघ्यापासून घोटयापर्यंत तटवावा व जोडीदाराच्या बगलेंतून घातलेल्या हातानें झटका देऊन जोडीदारास चीत करावा. [हिं. हूल=धक्का+कस=जोर; हूलकस=जोरानें धक्का देणें]

एकेरी इंजन—न. (यंत्र.) एक पंचपात्र असलेलें वाफेचें इंजन. [इं. सिंगल सिलेंडर एन्जिन]

एकेरी इष्टराशि-राशिक—पु.स्त्री.न. इष्टराशि, इष्टकर्म पहा.

एकेरी कारकून—पु.हलक्या दर्जाचा कारकून; याला शिपाई, प्यादे इ० नेमणूक नसते; याचें काम निव्वळ कारकूनीपलीकडे कांहीं नसतें; (निदाव्यंजक) धोपटमार्गी. [एक+कारकून]

एकेरी वहिवाट—स्त्री. (जमाखर्च) एकदांच बार करणें. दुबेरजीच्या उलट. [एकेरी+वहिवाट]

एकेरीसरकत—स्त्री. (अंकगणित) एकपाती; एकभागी; एकेरी प्रमाणभाग, वांटणी; दुहेरीसरकतच्या उलट. (इं) सिंगल फेलोशिप. [एकेरी+सरकत]

एकेरी होन—पु. एक नाणें; होनाचा एक प्रकार. होन पहा.

एकेहत्तर-हात्तर—एकाहत्तर पहा.

एकैक—वि. एकएक; एकेक. ' एकैकें वेळें जालें दुखणें. तैं आम्ही केलें पुसवणें ॥ ' –शिशु ८१६. [सं.]

एकोएकी—क्रिवि. एकाएकी पहा.

एकोटणें—उ.क्रि. एकवटणें पहा.

एकोटा—अ.क्रि. एकवटा पहा.

एकोटी—स्त्री. (खा.) भाकरी भाजण्यासाठीं तव्याप्रमाणें उपयोगांत आणावयाची बाटोळी मातीची खापरी. [एकवर्ती]

एकोत्तरा—पु. एकोत्रा पहा. ' जे एकोत्तरेयाचिया वाढी. वळतिये आगीं घालिती उडी. ' –ज्ञा ९.५४. [सं. एक+उत्तर]

एकोत्तराधा—वि. एक अधिक; भिन्न; वेगळा. ' सहस्रवरी गाहिया. आहाति सहस्राजुना राया. तरी तो काय तिया. । एकोत्तराधा. ' –अमृ ७.१४०. [सं. एक+उत्तर]

एकोत्रा—पु. दर महा दर शेंकडा एक रुपया व्याज असा व्याजाचा दर. [सं. एक+उत्तर; सिं. एकोतर; म. एकोत्तरा]

एकोत्री-एकोत्रें—स्त्रीन. उजळणीचा एक प्रकार, संख्यांच्या गांठीचा पाडा. उ० अकरे अकरें एकवीसाशें. [एकोत्तर]

एकोदर—वि. सोदर; एका आईचीं; एकाच उदरांतून उत्पन्न झालेलीं (मुलें). ' कच बोले आदरें . तुम्ही आम्ही एकोदरें. ' –पांप्र ५.९९. [एक+उदर]

एकोदरशें, एकोहरशें, एकोहर्शें—वि. एकशें एक (१०१); हुंडी लेख वगैरेंतून हा शब्द येतो. ' अश्वपति नरपति राजे होती । एकोदर्शें राणी तया वर्णू नाहीं मिती. ' –वसा १३. ' त्याचे एकोदरशें झालेच ! ' –भा १०. [सं. एक+उत्तर+शत; एकोत्तरशें]

एकोद्दिष्ट—न. १ मृताच्या उत्तरक्रियेंत सपिंडी (त्रयीस उद्देशून) श्राद्ध होण्यापूर्वी अकराव्या दिवशीं करावयाचें श्राद्ध. २ चुलता, भाऊ इ० निपुत्रिक मृत झाले असल्यास केवळ त्यांनाच उद्देशून (म्हणजे त्रयीचा उल्लेख न करतां) हें श्राद्ध केलें जातें म्हणून एकोद्दिष्ट हें नांव यास आहे. –धर्मसिंधु. एकोत्तिष्ठ असाहि शब्द रूढ आहे. [सं. एक+उद्दिष्ट]

एकोपा-बा—पु. एकी; एकमत; जूट; संघटना. ' राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां एकोप्यानें प्रयत्न करण्याची जरूरी आहे. ' –टि ३.२४६. [एक+उप ?; सं. एकात्मता-एकाप्पआं–एकापा–एकोपा. –भाअ १८३४.]

एकोशास, एकोशीं, एकोस—क्रिवि. (कों.) एकीकडे; आडवळणीं; एकांतीं; रस्त्यापासून बाजूला (गांव वगैरे). [सं. एक+वस्]

एकोसा—पु. जनावरांच्या आंचळास होणारा एक रोग.

एंकोळ—पुस्त्री. एक मोठें सरळ वाढणारें झुडप.

एकोळा—वि. एकसमूह; एकवट. ' एकोळा करौनि लागु वळावीला. ' –भात्रै १०.३.११४. [एक+काला; एक+वळणें]

एक्कडेन—क्रिवि. (गो.) एकीकडे; एकत्र. [एकीकडे; का. ईकडे; म. इकडे; एकवट]

एक्कलकोंडा—एकलकोंडा पहा.

एक्का—पु. (कों) तबल्यावरील एक ठेका.

एक्का—पु. १ (व. ना.) एक दिवस अहोरात्र भजन; भजनसप्ता; खळ न पाडतां एक दिवस अहोरात्र करावयाचें नामस्मरण, भजन. ' काल एक्क्याची समाप्ति झाली. ' २ एकी; जूट; एकमत; एकविचार. ' पुढें स्वराज्यामधीं असून एक्का नसून बेबंदी झाली होती. ' –गापो ९४. [सं. एक; प्रा. एक्क]

एक्का, एक्या—पु. १ पत्त्यांतील पानांपैकीं ज्यावर एक चिन्ह आहे असें पान. (पत्ते–गंजिफांत प्रत्येक रंगाचा एक एक्का असतो). हें पान सर्वांत भारी मानण्यांत येतें. एका पहा. ' एक्का म्हणे राजालाही मारतो ! ' –के २६.७.३०. २ (ल.) अद्वितीय; श्रेष्ठ माणूस. [सं. एक; प्रा. एक्क]

एक्का, यक्का, येक्का—पु. एक बैलाची (क्वचित् घोड्याची) गाडी; बैलगाडी; छकडा. ' (दिल्ली येथील) श्रीमंत लोक प्रातःकाळीं मोठाले बैलाचे रथ किंवा येक्के यांत बसून यमुना स्नानास जातात. ' –तीर्थयात्राप्रबंध ६९. [सं. एक; प्रा. एक्क; फा. यक्का; बं. एक्का; गु. एक्को]

एक्झेक्यूटर—पु. (कायदा) मयतानें आपल्या मृत्युपत्राप्रमाणें आपल्या इस्टेटीची व्यवस्था करण्याकरतां नेमलेला व्यवस्थापक; बजावणीकामगार (कोर्टाकडून नेमल्या जाणाऱ्या व्यवस्थापकाला ॲडमिनिस्ट्रेटर म्हणतात) [इं]

एक्झेक्युटिव्ह—त्रिवि. कार्यकारी; विधायक; शासनासंबंधीं. **॰इंजिनिअर**–पु. सडका; इमारती, पाटबंधारे, वगैरे (पी. डब्ल्यु. डी.) कामावरचा एक वरिष्ठ अधिकारी. **॰कौन्सिल**–न. कार्यकारीमंडळ; कारभारीमंडळ. [इं.]

एक्वार—स्त्री. वार्तमीपत्र; अखबार पहा. –दिमरा १.१६४. [फा. अख्बार.]

एक्वालपन्हा—वि. दैववान; नशीबवान. [फा. इक्बाल्+पनाह्]

एक्याएशीं, एक्यायशी—वि. ८१ संख्या. [सं. एकाशीति; प्रा. एक्कासीअ; सिं. एकासी]

एक्याण्णव—वि ९१ संख्या. [सं. एकनवति: प्रा. एक्काणउय; सिं. एकानवे]

एक्या माळेचे मणी—वाक्प्र. (शब्दशः एका माळेंतील एकसारखे मणी). एका जातीचे, धर्माचे, स्वभावाचे, पेशाचे वगैरे सदृश अशा अनेक व्यक्ती; **समानधर्मी. म्ह०** एक्या माळेचे मणी ओवायला नाहीं कोणी.

एक्रार—पु. करार; कबुली; इकरार. 'ऐसें स्पष्टवादें पुसतां मुल्जीम होऊन एकार केला. ' –रा २०.६५. [अर. इकार.]

एक्लेसिया—स्त्री. (ख्रि.) समूह अथवा संघ (इस्राएल अथवा ख्रिस्ती लोकांचा) ; (अ.) उपासनेची बैठक. (आ) स्थानिक संघ; (इ) ख्रिस्ती महामंडळ; सार्वत्रिक ख्रिस्तीमंडळी. 'ख्रिस्तानें जर ऐक्लेसिया स्थापिली तर ख्रिस्तापूर्वी एक्लेसिया नव्हती काय? –ईवि १२५.१२३. साप्रा १०२.११८. [इं. एक्लेसिया; ग्री. एक्=बाहेर+कॅलेओ=मी बाहेर बोलावतों]

एक्स-ऑफिशिओ—विक्रि. अधिकारपरत्वें; हुद्याच्या नात्यानें; (सभासद, एखाद्या कमिटीचा). [इं.]

एक्सप्रेस—वि. ताबडतोबीचा; घाईचा; निकडीचा. उ० एक्सप्रेस टेलेग्रॅम=जरूरीची तार; एक्सप्रेस ट्रेन=दौडगाडी; जलद गाडी (मधील थोड्या स्टेशनांवर थांबून लवकर पोंचणारी आगगाडी); याच्या उलट पॅसेंजर ट्रेन). [इं.]

एक्सरसाईझ—पु. १ धडा; पाठ; अभ्यास. २ व्यायाम; कसरत; मेहनत. ३ अभ्यासाची वही; टिपणवही; एक्सरसाईज बुक. [इं.]

एक्स-रे—पु. (पदार्थ) क्ष-किरण; रॉन्टजेन किरण (प्रो. रॉन्टजेननें १८९५ त हे शोधून काढले); विद्युज्जन्य प्रकाशकिरण. या किरणांमुळें अपारदर्शक वस्तूंतील अंतर्भाग दिसतात. रोग्याच्या शरीरांतील विघाड यांनीं अचुक कळतो. [इं. एक्स=क्ष अक्षर+रे=किरण]

एक्साईज—पु. १ देशांतील मालावर, तो तयार होत असतांना किंवा तयार होऊन देशांत विक्रीपूर्वी बसविलेला सरकारी कर, जकात; असल्या जकातीचें खातें. २ अबकारी खातें. [इं.]

एकसान, एकसा, एकसू—वि. एकनिष्ठ; एकसारखा. 'धन्याची एकसान चाकरी केली हें सुकृत पदरीं आहे. ' –ख १. ४०९. 'जमाना एकसा नाहीं. ' –रा ५ ८५. 'खानाजाद नौकर एकसू. ' [फा. यकसान. फा. यक्+सु=बाजू]

एकस्यार-री—अख्त्यार-री पहा.

एकस्रा—पु. कोळिस्त्र्याचें वीं; तालीमखाना.

एखाद-दा—वि. १ कोणीतरी; कोणीएक; अमुक; विशिष्ट नव्हे तो; एकादा–घा. 'तुजपासीं एखादा रुपया असला तर दे. ' 'अपथ्य करितोस पर एखादें दुखणें येईल ' २ (अभ्याहार होऊन) एखाद्या वेळीं; एखाद्या प्रकारें. 'पाण्यांत जाऊं नको, एखादा बुडशील. ' [सं. एक+अर्ध: हिं एक+आधा; तुल० बं. एकआध]

एखाद्दुसरा–वि. कोणी एखादा (क्वचित आढळला तर); एकदोघे आणखी; कदाचित एक जास्त (आतांपावेतों सांगितल्यापेक्षां) [एखादा+दुसरा]

एखुलास-सी—पु.स्त्री. स्नेह; आदर; यगानगत; चेहा; मैत्री. इख्लास पहा. –तरिका एखलासीचा. –रा १०.१६५. [फा. येख्लास; अर. इख्लास.]

एंगणें—उ कि. वेंगणें पहा.

एंगरट—वि. (व.) अकलशून्य. [एंगर+ट, वेंगळ–वेंधळ]

एगान—स्त्री. (जरतार घंदा) एकेरी तार; एकाच तारेस पीळ दिलेला असल्यास तीस म्हणतात; [फा. यगान=एकी; तुल० सं. एक]

एगानगत—स्त्री. ऐक्य; स्नेह. 'दुनियाईत दोंही दौलतींची एगानगत मषहूर. ' –रा ५.३१. [फा. यगानगत्]

एंगेजमेंट—स्त्री. १ संकेत; बोली; ठराव; वायदा. २ लग्न करण्याचें वचन; लग्नाचा ठराव. [इं.]

एग्झिबिशन—न. प्रदर्शन; देखावा; मांडणी (वस्तूंची इ०) [इं.]

एग्यु, एग्यु-फीव्हर—पु. (इं.) मलेरियाचा ताप; हिवताप; हुडहुडी; थंडी. [इं. एग्यु=हींव+फीव्हर=ताप] **एग्युमिक्श्चर**–न. (मिक्श्चर=मिश्रण–औषध) हिवतापावरचें औषध.

एजंट—पु. (इं.) १ (व्यापार) गुमास्ता; अडत्या. २ (कायदा) प्रतिनिधि; मुखत्यार; वकील; गुमास्ता; मुनीम ३ (राजकीय) पोलिटिकल एजंट; संस्थानांवर देखरेख ठेवणारा (वरिष्ठ सरकारचा) अधिकारी. उ० मध्यहिंदुस्थानांतील संस्थानांचा एजंट, राजपुताना संस्थानांचा एजंट.

एजंटी—स्त्री. १ (इं.) एजन्सी याला प्रतिशब्द; एजंटपणा; गुमास्तेगिरी; वकिलात. २ एजंटाची कचेरी, हद्द. 'जाय एजंटित दाद मागण्या तों घर मागें पडे. –विक्षिप्त १.१३५. ३ अडतीचें काम; असें काम करणारी संस्था. ४ मध्यस्थी; दलाली. [इं. एजंट]

एजन्सी—स्त्री. (इं.) एजंटी पहा.

एजा करणें—अक्रि. १ ये जा म्हणणें; अरेतुरे असें एकवचनी संबोधणें. 'घरांतील कर्ती माणसें सोडून बाकीच्यांना होतां होईल तों एजा करण्याचाहि मोरभटांचा परिपाठ होता.' –हाकांघ ३४. [ये+जा] २ हेलपाटे घालणें; जाणें येणें ठेवणें. [येणें+जाणें]

एंजिन, एंजिनियर, एंजिनियरिंग—इंजन, इंजिनियर, इंजिनियरिंग पहा.

एजोब—पु. (स्त्रि.) वनस्पतिविशेष; जुन्या करारांच्या काळीं याच्या डाहाळ्यांचा उपयोग शुद्धीकरणाच्या विधीमध्यें रक्त किंवा पाणी शिंपडण्याकरितां करीत असत (इं) हिसप. 'एजोबानें स्वच्छ करा मज निर्मल नै मी होईन हो.' –उमं १८४. [हिब्रू]

एट–ठ, एटण–ठण, एट(ठ)णें, एटाळी, एटाळणें इ०—वेट–ठ, वेटण=वेठण, वेटणे–ठणें, वेटाळी, वेटाळणें पहा.

एटक—न. गाडीची साटी आणि बुटें यांना जोडणारा दांडा

एटोळ—क्रिवि. (व.) इतका वेळ; वाढूळ. एढवळ, एढोळ पहा. 'एटोळ तूं कोठें होतास ?' [सं. इयत्वेला; म. एवढा+वेळ, वाढूळ]

एठ–ठां, यठ—क्रिवि. (कों. कुण.) येथें; या ठिकाणीं. 'तेंव भणे यादवराओ । एठ हाचि उपाओ ॥.' –शिशु ७४१. [सं. इत्थ; प्रा. एत्थ; कुण. हथ; म. येथें]

एड—स्त्री. टांचः मंत्रेज; घोड्याला मारण्याकरितां टांचेच्या मागच्या बाजूस लावलेली दांतेरी. (क्रि. देणें). [हिं. एडी=टांच; तुल० सिं. अडी हणणु=टाच मारणें]

एडका—पु. १ मेंढ्याची एक जात; याला शिंगें येतात तीं मजबूत असून त्यास टक्कर देऊन लढण्याला शिकवितात. 'एडका मदन तो केवळ पंचानन ॥.' –भज ११२. 'हजारों एडके दवाला देऊन तो संतोष पावेल काय ?' –बालाक १४. २ मुंग्या पकडण्यासाठीं धुळींत वाटोळी खळी करून तींत बसणारा किडा; याला मोर असेंहि म्हणतात. [सं. एडक; द्रा. आडु=शेळी]

एडगुळबेडगुळ—वि. (व.) ओबडधोबड. 'हें चित्र एडगुळबेडगुळ दिसतें.' [बेडगुळ द्वि.; बेडगुळ–बेंगरुळ–बेढब ?]

एडला—क्रिवि. (चि.) इतक्यांत; एव्हांना; एवढ्या वेळांत. [सं. इयत्वेला; म. इतला, एतला]

एडिटर—पु. (इं.) संपादक; संपादकीय मजकूर तयार करणारा; छापावयाचे लेख तपासून प्रसिद्ध करणारा; वर्तमानपत्र आणि मासिक किंवा एखादें नियतकालिक यांतील मजकूर तपासून प्रसिद्ध करणारा; त्यांतील लेखांची जबाबदारी घेणारा. [इं. एडिटर]

एडी—स्त्री. (व.) टांच. एड पहा. 'बूट एडीवर फाटला.' [हिं. एडी; सिं. अडी]

एंडी—स्त्री. (गो) पोत्यासारखें एक मासे धरण्याचें जाळें.

ए. डी. सी—वरिष्ठाच्या (विशेषतः राजे, गव्हर्नर वगैरेंच्या) तैनातीस असणारा लष्करी अधिकारी (हा अधिकारी खाशांच्या सर्व सुखसोयींकडे लक्ष देऊन त्यांची बडदास्त ठेवितो); शरीर-संरक्षक; अंगरक्षक. [संज्ञा; इं. एड–डी–कॅंपचा संक्षेप]

एडु(डू)क—पु. हाडें, दांत, केंस वगैरे कांहीं स्मारक पुरून झाल्यावर त्यावर उभारलेला मनोरा किंवा इमारत; स्तूप; डागोबा. बुद्धाच्या अवशेषांचीं अशीं एडुकस्थानें असतात. 'एडुकचिन्हा पृथिवी न देवगृहभूषिता.' –गीर ५५६. (महाभारत वनपर्व १९०-६७.) [सं ; लॅ. ईडिस=देवस्थान, इं. एडिफिस]

एढवळ, एढोळ, एढोळां—क्रिवि. आतांपावेतों; एवढा वेळ. वाढूळ एटोळ पहा. [एवढा+वेळ, वाढूळ; सं. इयत्वेला]

एढा—क्रिवि. (राजा.) येथें एठ–ठां पहा.

एढाढी—क्रिवि. (राजा.) येथून.

एण–र्णी—पु स्त्री. हरिण; मृग. [सं.]

एणांक—पु चंद्र; ज्यावर हरिणाचें चिन्ह आहे तो; मृगलांछन. 'होता द्रोण कृपाख्ययुक्त सह तो एणांक तारांगणीं.' –वामन-विराट ५.१३. [सं. एण=हरिण+अंक=चिन्ह]

एणाक्षी—स्त्री. मृगनयना; हरणासारखे डोळे असणारी सुंदर स्त्री. [सं. एणा+अक्षिन]

एणें—सना. तृतीया ? येणें; यानें. 'तें अेणें घरांतु मारिली. पूतना भणौनि ॥.' –शिशु ८६६. 'कथितों सर्वार्थपद जप्य महामंत्र मी तुला एणें. वश होइजेल देवें जेविं मधुरगीत मोहितें एणें. –मोअनुशासन ५.१३. २ या; अशा उ० एणेंकरून; एणेंपरी; एणेंप्रमाणें वगैरे रूपें होतात. 'एणेंपरी परिसतांच तया अनन्या ।.' –नल १२१. [जुनें रूप]

एतत्–एतद्—सना. हा, ही, हें. पुढीलप्रमाणें समासांत हा शब्द येतो. एतदतिरिक्त (एतत्+अतिरिक्त)=याहून वेगळा, याहून वरचढ. एतदंतर्गत=यांत समाविष्ट झालेलें; यांतील; यांचें. एतत्कृत=यानें केलेलें. एतदर्थ=याकरितां; म्हणून. एतदर्थक=या अर्थाचा. एतदनंतर=यानंतर. एतदनुरूप=याप्रकारें; याप्रमाणें. एतदवधि=येथपर्यंत; इतकें. एतदारभ्य=यापुढें वगैरे. [सं.]

एतद्देशीय—वि. या देशांतील; या देशांत, येथील लोकांकडून होणारीं (पुस्तकें, इतर कामें वगैरे). 'एतद्देशीय ग्रंथावर साहेबमजकुरांनीं जो टीकालेख लिहिला ...' –टि २.१९३. –पु. युरोपियनेतर; नेटिव्ह्; देशी लोक; हिंदी लोक. 'त्यांची (एल्फिन्स्टन साहेबांची) अशी खात्री होती कीं एतद्देशीयांचीं मनें

सुशिक्षित झाल्यामुळें इंग्लंडास आपला गाशा गुंडाळावा लागला तर ज्यांचा देश त्यांस परत झाल्याम इंग्लंडची कीर्ती व होणारी आहे.' –टि १.४४०. [सं. एतत्+देशीय]

एतपर्यंत, एतपावेतों––एथपर्यंत; एथपावेतों पहा.

एतां––क्रिवि. येतां; येतांना. 'तुमतें एतां देखिलें।' –शिशु १२५. [येणें याचें एणें असें जुनें रूप]

एतां––क्रिवि. (राजा.) आतां.

एतादृश––वि यासारखा; असा. [सं.]

एतावत्––वि. इतका; एवढा. उ० एतावत्काल; एतावत्प्रमाण. [सं.]

एतावता––क्रिवि. १ म्हणून; एकंदरींत; यामुळें; इतक्यानें; येवढ्यानें. 'एतावता निष्पन्न काय होतें कीं, औरस पुत्र नसल्यास स्वर्गप्राप्तीसाठीं दत्तकपुत्र घेण्याची जरूर नाहीं.' –टि ४.१५. २ तथापि; असें आहे तरी; अद्याप. 'त्यानें आदरातिथ्य केलें, गोड बोलला, एतावता त्याचे मनांतील द्वेष गेला असें म्हणूं नका.' [सं. एतावत्]

एतावधि––क्रिवि. एथपर्यंत; एथपावेतों; होताहोईतों; एवढा; इतका. [सं. एतदवधि अप.]

एतुला––वि. इतला; एवढा; इतका; असा. 'लाडका करिसि यास एतुला।' –आक्ष २८. [सं. इयत्, एतावत्+ल; प्रा. एतुल]

एथचा-ला, एथील––वि. या जागेचा, भागाचा, प्रांताचा, दिशेचा वगैरे; येथील. [सं. अत्र; प्रा. एत्थ; गो. एथ]

एथपर्यंत-पावेतों-वर-वरी, एथोर––क्रिवि. हा पावेतों; या(वेळ किंवा जागे)पर्यंत; हा काळ पावेतों; एवढा वेळ; एढोळ. [एथ यास प्रत्यय लागून]

एथून, एथोन––क्रिवि. या पुढें; या स्थळापासून किंवा ळाकापासून पुढें; अशिष्ट रूप एथने. [एथ+हून; प्रा. एत्तहि]

एथें––क्रिवि. १ या ठिकाणीं; या जागीं. येथें पहा. 'महाराजांनीं आतां एथेंच बसून राहावें.'–कमं ४.१११. २ (एखाद्याच्या) घरीं, राहण्याच्या जागेत. जसें–त्याच्या एथें, माझ्या एथें. वाक्प्रचार–(गो.) एथनानी तेथना=इकडेहि नाहीं व तिकडेहि नाहीं [सं. अत्र; प्रा. एत्थ; बं. एथा]

एदगिरी––वि. एदगीर गांवचें (शेला, धोतरजोडा इ० वस्त्र). [एदगीर=नागपुर जवळचें एक गांव. –मोल. उदगीर?]

एदेन, आदान(बाग)––पु. (ख्रि.) पवित्र शास्त्रांत वर्णिल्याप्रमाणें मानवांचे मूळ पूर्वज आदाम व हव्वा यांस ज्या बागांत ठेविलें होतें त्या बागेचें नांव; आनंदोद्यान; नंदनवन. '...परमेश्वर देवानें त्यांस एदन बागांतून काढून लाविलें.'–उत्प २.२३. [हिब्रू एदेम=आनंद किंवा सुख; इं. ईडन]

एदो––वि. (गो.) एवढा. °वेळ–एदोळ–एदोघ–क्रिवि. (गो.) एवढावेळ; मघां. एवां सकाळीं=एवढ्या सकाळीं. [सं. इयत्+वेला; म. एवढा+वेळ]

एधवळा, एधोळ, एधोळां––क्रिवि. (कुण. वऱ्हाडी रूपें **एधाळा, एधाळून**) एव्हांना; इतका वेळ; एवढा वेळपर्यंत, एढवळ एढोळ; यावेळीं; एवढयावेळीं. 'एधाळून त(तर) आमचा सैंपाकय (स्वयंपाकही) होत असते (असतो).' 'एधाळा काय काम आहे गा तुह (तुझें)?' [एवढा+वेळ]

एधवां––क्रिवि. (काव्य) आतां; यावेळीं. [सं. अद्य; प्रा. एत्थ; म. तेधवा–तदा]

एधष्ट––क्रिवि. पाहिजे तितकें; यथेष्ट; भरपूर; पुरेपूर. [सं. यथेष्ट अप]

एनकेनप्रकारें, एनतेनप्रकारें––क्रिवि. कोणच्यातरी प्रकारानें; कशामुळें तरी; कसेंतरी; कसेंहि. [सं. यनकेनप्रकारेण]

एनमल––न. कांचमिना; धातूवर कांचेचा मुलामा देण्याची क्रिया; कांचवण; कांचमिन्याप्रमाणें चकाकणारा पृष्ठभाग. [इं.]

एनार्तामामूल––स्त्री. ठराविक देणगी. इनायत पहा. [फा. अर. इनायत्+मामुल]

एनिमा––पु. बस्ती; बस्तीचें औषध किंवा पिचकारी; शौचविधीचें एक साधन. [इं.]

एन्ना––क्रिवि. (गो.) एव्हां; इतक्यांत. [एव्हांना? सं. एना=नंतर, त्यावेळीं.]

एन्काबूचान––पु. रत्नाला कांतून बहिर्वेक्र आकार देतात तो. (बहिर्वक्र रत्नांचा आकार हा शब्द काबूचानला प्रतिशब्द म्हणून वापरला आहे.–खांबेटे) [इं. एन्+फ्रें. काबूचान=न कांतलेला हिरा]

एन्सायक्लोपीडिया––पु. ज्ञानकोश; विश्वकोश; विश्वज्ञानसंग्रह. यांत जगांतील ज्ञानाच्या सर्व शाखांची माहिती अकारविल्यानें दिलेली असते. [इं.]

एन्हा घेणें––अक्रि. (व.) हिसका घेणें; व्यर्थ त्रास घेणें. [सं. एनस्=दुःख]

एपिफनी––स्त्री. (ख्रि.) १ (विदेशी लोकांसमोर) ख्रिस्ताचें प्रकट होणें; आविर्भवन. २ ख्रिस्त दशेनोत्सव; हा जानेवारीच्या ६ व्या तारखेला करतात. 'वरील सार प्रार्थना, पत्र व शुभवर्तमान हीं एपिफनीपर्यंत प्रतिदिवशीं वाचावीं.'–साप्रा ४२. [इं. प्री. एपि=वर+फायनो=मी प्रगट करतों.]

एप्रिल––पु. इंग्रजी वर्षाचा चवथा महिना (हा मराठी चैत्र–वैशाखाच्या सुमारास येतो.) [इं.]

एबनी––न. आबनूस पहा. [इं.]

एम्––पु. छापील मजकुराची ओळ मोजण्याचें प्रमाण (इंग्रजी एम् अक्षरास जी समचौरस जागा लागते त्या जागेचें माप कल्पून,

एम्नें ओळ मोजण्यांत येते). एका इंचांत पायका टाइपाचे सहा एम् बसतात, मजकूर (टाइप) जुळण्याचा भावहि एम्वरच ठरलेला असतो. एका रुपयास १४००–२४०० एम् (लहानमोठ्या टाईपाप्रमाणें) पर्यंत दर असतो. [इं.]

एर—वि. १ येर; बाकीचे; दुसरे; इतर (विशिष्ट सांगितल्यानंतर राहिलेले); अन्य; भिन्न. ' एर परिवारू अपारू। तो कवनु जाणे।' –शिशु ५२. २ (ल.) गौण; किरकोळ; सटरफटर. [सं. अपर, अवर; प्रा. येर]

एर-री-रू—सना. तो; ती; हा; ही. ' मग एरी कानिआं पर तली ' –शिशु १७५. ' सीता म्हणे लक्ष्मणा धांव। एरू म्हणे राक्षसी माव।' [सं. अपर; प्रा. येर]

एरक—स्त्री. (खान.) तंबाखूची जुडी. –भाइसं ७.१.४. [सं. एरका=तृणविशेष, मोथा]

एरका, एरिका—स्त्री. एक प्रकारचें गवत; लव्हाळा; मोथा. ' ब्रह्मशापाची एरिका। तीरीं निघाली होती देखा। ते मुष्टीं घेऊनि क्रोधतवका। एकमेकां हाणिती।' –एभा ३०.१४६. [सं. एरक–का]

एरकान—पु. घोडयाचा एक रोग; यास पिळा असेंहि म्हणतात; हा रोग खोकल्यापासुन होत असुन यानें शरीर पिवळें होतें. –अश्व २.३३०.

एरजार-झार-धार—स्त्री. येरझार पहा.

एरंड—पु. एक औषधी झाड; याच्या मोगली व सुरती (तांबडा व पांढरा) अशा दोन जाती आहेत. सुरती एरंडाच्या बियांचें (एरंडयांचें) तेल काढितात. तें उत्तम रेचक असुन बहुतेक रोगांवर आरंभीं रेचक म्हणून देतात. सर्पदंशावर पानांचा चार चमचे रस, चमचाभर पाणी घालून द्यावा व दंशावर पाला वाटून लावावा. –वगु १.७६. मोगली एरंड शेताच्या कुंपणास लावतात त्याच्या बियांतहि तेल असतें पण त्याचा फारसा उपयोग करीत नाहींत. **म्ह०** १ ओसाड गांवीं एरंड बळी. २ थोर (उंच) वाढला एरंड तर काय होईल इक्षुदंड. ३ एरंडाचें गुऱ्हाळ=निरर्थक, कंटाळवाणें भाषण, निष्फळ उद्योग. (ऊंस चरकांत घातला तर गोड रस तरी मिळतो पण एरंडापासून न पिण्याजोगा निरुपयोगी पदार्थ निघेल, ऊंस आणि एरंड दिसण्यांत सारखे म्हणून ही तुलना). ४ निरस्त पादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते=(झाड नसणाऱ्या प्रदेशांत एरंडच श्रेष्ठ). गांवढ्या गावांत गाढवी सवाष्ण याप्रमाणें अर्थ. [सं. एरंड; गु. एरडो; हिं. अरंड; बं. भेरांडा; का. एरडु आंडलके] **०मूळ**–न. सुरती एरंडाचें मूळ, मुळी; ही औषधी असते. **०काकडी**–स्त्री. (माळवी) पोपई. नागपुराकडे एरणपपई असें पपईला नांव आहे.

एरडबेरड—वि. (ना.) बेडौल; प्रमाणशीर नसणारा. [बेरड द्वि.]

एरडां—नअ. (कु.) एका जातीचे मासे.

एरंडी—स्त्री. १ सुरती एरंडाचें झाड; एरंडाची एक वेगळी जात. २ एरंडाची बी. हें एक गळिताच्या मुख्य धान्यांपकीं आहे. याच्या तेलाचा उपयोग दिव्याकडे व औषधाकडे आहेच पण त्यापेक्षा यंत्रांना ओंगण म्हणून विशेष होतो. [सं. एरंड]

एरंडें–न. एक हलकें रेशीम (सोंबळयाच्या वस्त्रासाठीं); टसर रेशीम. [सं. एरंड] (रेशमाचे किडे एरंडाचीं पानें खातात यावरून).

एरंडेल—न. एरंडयांपासून काढलेलें तेल. [एरंड+तेल]

एरंड्यासाप—पु सापाची एक जात. एरंडीच्या बीवर जसे ठिपके असतात तसे ठिपके या सापावर असतात म्हणून यास हें नांव आहे.

एरमीठ—न. नेहमीचें खाण्याचें मीठ; समुद्रमीठ (शेंदेलोण वगैरे खनिज नव्हे). [एर=इतर, एरवीचें+मीठ]

एरवण—स्त्री. (प्रभु लोकांत) वरातींत लागणारी रोवळी; झाल. [ऐरणी]

एरवां-व्हां–क्रिवि. तेरवां किंवा तेरवांच्या पुढचा दिवस; चालू दिवसापासून मागें किंवा पुढें चवथ्या दिवशीं (कोणी पांचवा दिवस समजतात); कोणी तेरवां म्हणजेच एरवां मानतात (परवां याप्रमाणेंच हें रूप बनलेलें आहे). [सं. अपरश्वस्; गो. एरवां=तेरवां]

एरवीं, एरव्हीं, एरीं, एन्हवीं, एन्हीं—क्रिवि. १ उगीच; सहज; कारणाशिवाय. २ सहजासहजीं; अचानक; श्रमाविना. ३ नाहीतर; किंवा. ' ऐसें वदतां कोपाल। एन्हवीं पुढें पळाल.' –शिशु ४८४. ' माझा पैका दे एरवीं मी तुझे घराहून जाणार नाही.' ४ इतर बाबतींत; हें सोडून. ' त्या पंडितास वक्तृत्व मात्र नाहीं एरवीं बरा आहे.' [सं. एर+वा, वी, प्रत्यय] **म्ह०** एरव्ही करिपेंचे= विनाकारण, व्यर्थ, फुकट केलेली (खटपट, काम.)

एरशेर–वि. असातसा, फालतू; निरुपयोगी, सामान्य (माणुस; गोष्ट). [एर द्वि.]

एरांस–पु. (गो.) दाय; रिक्थ; वारसा; जमीनजुमला. ' जाव्याक एरांस दिला ' =जावयाला जमीन–जुमला दिला. [गो. वरीस=वारसा; इं. इन्हेरिटन्स]

एरिंग–स्त्री. कानातील एक लोलकासारखा दागिना, डूल; कर्णभूषण; (अव. एरिंग्या). [इं. इअर=कान+रिंग=भंगटी, वेढें]

एरीकडे—क्रिवि. इकडे; तिकडे; दुसरीकडे. ' एरीकडे श्रीचक्रपाणी। कांई करितें जालें. ' –शिशु ८५२. [एरी+कडे=दुसरीकडे]

एरीमोहरें–क्रिवि. उलट बाजूस; दुसऱ्या तोंडाकडे. ' जसी ते शुकाचेनि आंगभारें। नळिका भोवित्रली एरी मोहरें।' –ज्ञा ६.७६. [एरी+मोहरा=मुख]

एरू—एर पहा. ' एरूं भगें कांईं तूं जालासी। मातें देखत खेओ पळतीं कैसी।' –शिशु ८८९. ' सीता म्हणे लक्ष्मणा धांव। एरू म्हणे राक्षसी माव।'

एरुणेर—एकुनएर पहा. [एकुणेर अप.]

एल—पु. एक जातीचा मासा; याला वाम किंवा वांव असें आपल्या इकडील नांव आहे. पण एल हा वामप्रमाणें गोडया पाण्यांत अंडी घालीत नाही. हा सर्पाकृति असतो. [इं ईल]

एलकाक्रीडित(भौमिचारी)—न. (नृत्य.) पायाच्या अग्रतलावर नीट उभें राहून व उंच उडी मारून पुन्हां जमेंच्या तमें उभें राहणें; अशी क्रिया वारंवार करणें. [सं एलका=एडका, मेंढा]

एलकाविगें—उक्रि. शेंदणें; वर घेणें; ओढणें (विहिरीतून किंवा खडयांतून पाणी वगैरे). [हेलकावणें]

एलकी—स्त्री. (प्रा.) चमक; उसण. (क्रि० भरणें).

एलगार—पु. निकराचा हल्ला; निश्चयपूर्वक जोराचा प्रयत्न; चढाई; दौड. ' दर्यातून आरमार व खुष्कीनें लश्कर घालून चौतर्फा एलगार करून अवकाश घेऊं न देतां त्याणें आक्रमिली स्थळें ... ' –मराआ ६. [फा. येल्गार, एल्गार, इल्गार=मोहीम; तुर्की ईल्घार]

एलची, एलाची—स्त्री. वेलची; वेलदोडयाचे दाणे, वेलदोडा. [सं. एला, एलीका; गु. एलची· ते. एलकि; का. यालक्कि; बं इलायच; हिं. इलायची]

एलची, येलची—वि. (व. ना.) व्रात्य; खोडकर; फाजील; पाणचट. [सं. एला–(एलायति)=विलास, क्रीडा करणें; खोडयाळ असणें; गु. एलफेल=शिवराळ, असभ्य]

एलटी, एलाटी—स्त्री. (विणकाम) चाळयाच्या (वहीच्या) खालच्या दोन पट्टया. (या चाळयांतून ताण्याचे दोरे जातात). [वेळटी, वेळ–काठी]

एलणें, एलावणें—अक्रि. (व.) १ चेष्टा करणें; नखरे करणें. ' तो एलायला लागला. ' २ स्वैर वागणें. ' कामून एल्ते '=कां म्हणून स्वैर वागतोस ? [सं. एलायति]

एलदोडा—पु. एलची पहा. [एल+दोडा]

एलपाड्या—वि. (ना.) नाना तऱ्हा करणारा; नकल्या; चेष्टा करणारा. [एलणें]

एला—स्त्री. वेलदोडा; वेलदोडयाचा दाणा किंवा झाड; वेलदोडयांत एला आणि एलची असे दोन किरकोळ भेद आहेत. एला म्हणजे मोठया बीचा वेलदोडा. [सं. एला; गो. एळ]

एला—पु. एक झाड; लॅ. टर्मिनालिया निटिडा.

एलापॉ, एलाफा—पु. (गो.) एक तांदुळाचें पक्वान्न; घारगा.

एलें—न. (नांगर, कुळव किंवा पाभर यांची) दांडी व जोखड यांना एकत्र बांधावयाची कातडयाची वादी. ही कोंडकांतून ओंवलेली असते. [सं. वल्ली; प्रा. वेली, वेल.]

एल्ची—पु. वकील; हेजीब. ' शाहमजकुरास तोफा–तायफ देऊन एल्चीची रुखसत करणार आहे. '–दिमरा २.५. [तुर्की ईल्ची]

एवं—उअ. याप्रमाणें; याप्रकारें; असें. ' एवं थितिया मातें चुकले । ' –ज्ञा ९.३३०. [सं.] **०गुणविशिष्ट**–वि. अशा गुणांचा; अशा गुणांनी भरलेला (निंदाव्यंजक) **०विध**–वि. या प्रकारचा ' जी एवंविधा तूंतें । मी देखतसें हें निरुतें । '–ज्ञा ११.३१२. [सं.]

एवंच—क्रिवि. सारांश; एकूण; तात्पर्य; मथितार्थ असा कीं; मिळून; एकंदरींत. [सं. एवम+च]

एवढा—वि. १ इतका मोठा; इतक्या आकाराचा, परिमाणाचा. २ इतका पहा. (एवढा, जेवढा, तेवढा, केवढा, वगैरे शब्दांचा वर्ग आणि इतका, जितका, तितका, कितका वगैरे शब्दांचा वर्ग यांत फरक असा कीं पहिला आकार, गुण, परिमाण दाखवितो, तर दुसरा रोख्यापरिमाण दर्शवितो. तथापि बोलण्यांत इतर शब्दांप्रमाणें या संबंधांतहि शैथिल्यानें हा भेद पाळला जात नाही.) (वाप्र.) एवढयाचें एवढें करून सांगणें=फुगवून, तिखटमीठ लावून सांगणें. एवढयानंदां=इतक्या मोठ्यानें, जोरानें किंवा मोठा आवाज करून; दणदिशी. [सं. इयत; प्रा. एवड; मि. उहडो] **०वळ–वेळ**–क्रिवि. हा वेळ पावेतों, हा सारा वेळ; इतक्या उशीरां. [एवढा+वेळ]

एवढी—वि. एका पायास अधिक (पांचवा) पाय फुटला आहे असा (घोडा) हें घोड्याचें अशुभ लक्षण आहे. [एक–एव]

एवाळें—न. (गो.) पाणसापः वयाळें: हेंवाळें. [सं. व्याल; प्रा. वयाळें]

एवं–वीं—क्रिवि. असें: याप्रमाणें. ' मार्कंडराय ऋषि एविं बोलती । '–वसा ११. [सं एवम] **०तेवीं**–क्रिवि. कोणत्याहि प्रकारें; कसेहि झालें तरी; कांहीं असलें तरी (होऊं नये झालें, आतां जसें होईल तरें होऊं दे असा भाव). ' एवीतेवी वाघ खातो मग पळून फळ काय, त्याचे अंगावर जावें. ' **म्ह०** एवीतेवी भर गो देवी= कसेहिकरून हे देवी पुरी कर (आस, इच्छा, काम, इ.); याचना; प्रार्थना. [सं. एव तु एव]

एवीच, एव्याच—क्रिवि. (कों.) मुकाटयानें; स्तब्धतेनें; उग्याच; उगीच (पाहणें, लक्ष देणें.) ' आपुलाले तुम्ही पुसा । सेवा एव्याच सरिसा । स्थिरावल्या कैसा । काय जाणों विचार ॥ ' –तुगा ३३६१. [सं. एवम्]

एव्हडा—एवढा पहा.

एव्हां—क्रिवि. आतांच्या आतांच; आतां; यावेळीं; तूर्त; यासमयीं (आतां पेक्षां हा शब्द जोरदार आहे). **०एव्हां**–क्रिवि. (राजा.) सुमार हा वेळ; या घटकेला (मानें). ' काल आपण तेथून एव्हांएव्हां निघालों नाहीं बरें ? '

एव्हांला—क्रिवि. हा वेळ पावेतों; आतांपावेतों.

एव्हांशीं—क्रिवि.एव्हां;आतां; या घटकेला; आतांच; इतक्यांत. ' खबरदार मला एव्हांशींच आपली म्हणाल तर ! ' –बाय ४.३.

एशेल—न. (व. ना.) खाण्याचें तेल; गोडें तेल. (अळशी+तेल)

एषादिक—सना. विशिष्ट लोक दर्शविण्यासाठीं व्याजोक्तीनें हे सर्व लोक, हे मोठे लोक, शिष्ट, अस्मादिक प्रमाणें रूप. (सं. एषः+आदि+क]

एष्य—वि. १ आगामी; भावी. २ (ज्यो.) अनुपभुक्त, जींतून अद्यापि ग्रह गेला नाहीं अशी (रास). याच्या उलट गत [सं. इ=जाणें]

एस, एसकर—वेस, वेसकर पहा.

एसणा-ना—वि. असा; असला; इतका; एवढा. ' तंव बलिभद्रु बोलिला । एसना तुं जूंझारूं भला ॥ ' –शिशु ९१९. ' आपुलेआं पाडांचें पातिजे । तेनेंसीं एसनें कीजे । ' –शिशु ६७३. ' एसणी आंगीं असतां प्रौढी । ' –गीता १.१४७२. [सं. अदस्–एष]

एसवा—वेसवा पहा.

एसूर—स्त्री. (माण.) मिरच्यांची कांदा घालून केलेली पूड; काळें तिखट. [का. एसर=शिजणाऱ्या भाजी–आमटींतील पाणी, मिरच्यांचें पाणी]

एहंकी, एहेंकी—क्रिवि. (भिल्ली) असें; याप्रमाणें. ' लोक मान आलस्यो साम्यो एहंकी आखताहा ! ' =लोक मला आळशी शाम्या असें म्हणतात) –भिल्लीभाषा ३०. [सं. एवं+कीं; किंवा एतत्–एष प्रा. एह+कीं तुल०– का. एहेंग=कसें, कोणत्या प्रकारें;]

एहसान—स्त्री. १ कृपा, उपकार, इहसान पहा. ' इतके दिवस परभारें दौलतीवर एहसान होत गेली ' –रा ५.३१. ' लुगडें आणलें तर आपल्या बायकोला आणलें, त्यांचें माझ्यावर काय एहसान केलें ? ' २ (व.) साऱ्याची माफी. [फा.; अर. इहसान] **०मंद**–वि. कृतज्ञ; आभारी. ' पातशाहा आपला एहसान्मंद होऊन पात शाहीचा बंदोबस्त आपले हातून करून घेई ऐशी कारस्ती जी होईल ती करावीच करावी ' –ऐच ११५. [फा.]

एहीं—सना.–तृअव. यांनीं; ह्यांनीं. ' एहीं रंजओं सकळेंकु लोक । ' –दाव १४. [' ए' ला विभक्तिप्रत्यय लागून]

एहेंडें—क्रिवि. (भिल्ली.) याप्रमाणें, अशी. एहंकी पहा. ' वाय इं बोरें एहेंडें काहा ? ' =बाई, हीं बोरें अशी कां ? –भिल्ली भाषा २७.

एहेंतेहें—क्रिवि. (भिल्ली) इकडेतिकडे; येथें तेथें. ' आन एहेंतेहें फिरतलो ' आणि इकडे तिकडे भटकलो=भिल्ली भाषा ३६.

एळ—वेळ पहा.

एळ—स्त्री. (गो.) समुद्रकांठ. [सं. वेला=समुद्रकिनारा]

एळ—(गो.) वेलदोडा एला, एला पहा.

एळकोट, एळकोटभर—पु. १ (खंडोबाचे भक्त देवापुढची तळी उचलतांना किंवा भिक्षा मागतांना एळकोट किंवा एळकोट-मल्हार असें ओरडतात, त्यावरून) एक जुटीनें प्रयत्न; निकराचा प्रयत्न. ' आधीं होता वाघ्या । देवयोगें झाला पाग्या । त्याचा एळकोट राहीना मूळस्वभाव जाईना. ' २ (निंदाव्यंजक) गोंधळ; गडबड; अव्यवस्था ' दहा घरचीं दहा माणसें आलीं तेव्हां त्यांनीं साऱ्याच कामाचा एळकोट करून टाकला. ' [का. एळु (=सात)+कोट (=कोट संख्या किंवा तट. खंडोबाचें सैन्य सात कोटी असेल किंवा त्याच्या किल्ल्याचे सात तट असतील.]

एळकोटमल्हार—पु नाश; उचलबांगडी. ' मी इकडे जयवंतरावाचा एळकोट मल्हार करतो. ' –चंद्रग्रहण नाटक ६१.

एळणी—स्त्री. (व.) मातीचें भांडें (थाळी, वाटीसारखें) ' एळणींत तूप घ्यावें. ' [वेळणी]

एळव—उद्गा. (तंजावरी) कंटाळा, नापसंति दर्शविणारा उद्गार. –पु. अमंगळ काम. [तामीळ एळवु]

एळवणी—स्त्री. (माण.) आमटी. अळवणी पहा.

एळा—एला पहा.

एळिया, एळ्या (वोळ)—पु. एक औषध, बोळाचा एक प्रकार; काळावोळ. [सं. एलीयक; हिं. एलवा, एलुआ.]

ऐ

ऐ—मराठी वर्णमालेंतील बारावा स्वर. अक्षरविकास– ' ए 'च्या डोक्यावर आडवी रेघ प्रथम इ. सनाच्या २ ऱ्या शतकांतील लेखांत दिसून येते. ' ए' ला दिलेली मात्रा प्रथम बरीच मोठी असे. पुढें दहाव्या शतकानंतर हल्लींचा ऐ तयार झाला. –ओझा.

ऐ—उद्गा. अगबाई! दुःख, शोक याचा उद्गार. अइ पहा. ' मज हररिपु ऐ जहर कदर करी लहर आलि बाई धराधरा । ' –राला ! –नामजोशीकोश.

ऐकणा—वि. ऐकणारा; ज्यास चांगलें ऐकूं येते असा; कानाचा धड. ' कान वचन मीचि श्रोता । मीचि जाण शब्दार्थता । ऐकणाहि मज परता । नाहीं तत्त्वतां श्रवणाचा ॥ ' –एभा १३.३४५. [ऐकणें]

ऐकणें—उक्रि. १ कानांनीं शब्द, ध्वनि जाणणें, समजणें; कान देणें; श्रवण करणें. आइकणें पहा. २ लक्षपूर्वक ऐकणें; काळजीनें श्रवण करणें; अवधान ठेवणें. ३ लक्ष देणें; मान्य करणें (एखादी सांगितलेली गोष्ट); ध्यान ठेवणें; नीट चित्त देणें; बरहुकूम वागणें; आज्ञा पाळणें. [सं. आकर्णन; म. आइकणें, आयकणें] **म्ह०** ऐकावें जनाचें करावें मनाचें=कोणतीहि गोष्ट करण्यापूर्वी सर्वांचा विचार अवश्य घ्यावा, मग आपणांस योग्य वाटेल तें करावें.

ऐकतखेंवो—क्रिवि. ऐकण्याबरोबर; ऐकतांक्षणीं. ' जयाची गोठीचि ऐकतखेंवो । आघवा संसारु होय वावो ॥ ' –ज्ञा १०.१९७. [ऐकत+खेंवो; सं. क्षण.]

ऐकभट्टी—स्त्री. (विनोदानें) ऐकण्याचें काम; कर्णद्वारें ग्रहण करणें (याच्या उलट अभ्यासानें ग्रहण करणें); ऐकण्याचा अभ्यास; ऐकीव अभ्यास. ' कोण्ही उपजत गवई असतो कोण्ही सहज्ञायासें शिकून असतो, कोणी अयत्नतः ऐकभट्टीचा गवई असतो ' [ऐकणें+ भट्टी]

ऐकमत्य—न. सर्वांचें एक मत असणें; मतांचें,विचारांचें,आवडीनावडीचें एकरूपत; एकीकरण; एकवाक्यता; एकी; एकोपा. 'राष्ट्रीय समेंत ऐकमत्य होण्यापूर्वी प्रत्येक प्रांतांत, प्रत्येक जिल्ह्यांत, प्रत्येक खेडयांत तें झालें पाहिजे. ' –टिसु ४०. [सं.]

ऐकवणी—स्त्री. १ ऐकायला लावणें; कबूल करावयास लावणें. २ विवरण; विवेचन; फोड (क्रि० करणें) [ऐकविणें]

ऐकविणें—उक्रि. (ऐकणें प्रयोजक) ऐकावयास लावणें.

ऐकाहिक—वि. १ एका दिवसाचें; उरकण्यास एक दिवस लागणारें (काम). २ एकच दिवस पाळावयाचा (उपास वगैरे). ३ एकच दिवस टिकणारें; क्षणिक; क्षणभंगुर. ४ दररोज येणारा; रोज थोडाबहुत असणारा, सान्निपातिक (ज्वर, वगैरे) [सं. एक+आहिक (अहन्)]

ऐकीव—वि. १ ऐकलेलें; ऐकून माहीत झालेलें; दुसऱ्याकडून समजलेलें. २ (ल.) प्रत्यक्ष पुरावा, साधन नसणारें; कमी विश्वासार्ह. [ऐकणें]

ऐक्य—न. १ एकरूपता; एकपणा; एकी; अद्वैत. २ एकदिल; एकचित्त; एकभाव; मिलाफ; जूट (उद्देश, स्वभाव, इच्छा वगैरेचा.) ऐकमत्य. ३ (तत्त्व.) ऐक्यमत; ऐक्यज्ञान; जीवात्मा व परमात्मा यांचें अद्वैत असतें असें मत; सृष्टि व परमेश्वर यांची एकरूपता; ईश्वरमयत्ववाद. ४ (वेदांत) ब्रह्म; अद्वैत. 'ऐक्य जीव तो ब्रह्मांश। जेथें पिंडब्रह्मांड निरास। '–दा ११.१.३५. ५ (गणित) वेरीज; जमा; रास.[सं.] **ऐक्यास येणें**–एकत्र होणें; संमीलन होणें; परस्पर जुळणें. ' कीं वेदांतशास्त्रींच्या श्रुती । ऐक्यास येती परस्परें ॥ ' ०**भाव**–पु. एकरूपता; अद्वैतता; ब्रह्मस्वरूपता. ' अथवा ऐक्यभावाचेनि पैसें । दुजे मानूनि आत्मा ऐसें ॥ ' –ज्ञा १६.७१.

ऐक्यता—स्त्री. ऐक्य अर्थ १,२. पहा. ' ऐक्यता नाहीं म्हणजे इंग्रजी राज्यास त्यापासून कांहीं भय नाही. ' –टि २.१५.

ऐक्याकार—वि. एकाकार; एकंकार पहा. ' दुजे शिळेवरी रेखीं मकार दोहीस करी ऐक्याकार। ' –रावि २३.१५६.१

ऐगुबैगू—पु. अव. अलबतेगलबते; ऐबतेगैबते; कोणी तरी माणसें.

ऐचण, ऐंचण, ऐतण—स्त्री. (व. ऐचण) १ पडझड; अडचण; २ खेंचाखेंच; गर्दी. ३ अडचणीची, गर्दीची अवस्था, जागा. ४ गवत, रान, झाडझुडुप माजलेली जागा. ' त्या पडक्या जागेवर ऐचण फार आहे ' [अडचण–अइचण; आड+तृण–अइतण–ऐतण]

ऐचेआ—वि. (गो.) आजचा; वियमान; चालू. ' जें येती वर्षसैवेरी । यवेया आठविलें संसारी । ते ऐचेआ दिवसा भितुरी । दाविले तुवां ' –ज्ञिपु २.२.१५९. [आजच्या अप.]

ऐच्छिक—वि. १ इच्छिलेलें; इष्ट. 'ऐच्छिक पदार्थ मिळाला म्हणजे फार संतोष होतो. ' २ मर्जीवर ठेवलेलें; पाहिजे तें; मर्जीनुसार. ' साधूची ऐच्छिक प्रवृत्ति ऐच्छिक निवृत्ति.' ३ स्वच्छंदी; अविचारी; बेलगाम; उच्छृंखल. ' ऐच्छिक व्यवहार करूं नये शास्त्रानुरूप वर्तावें. ' ४ नियमबद्ध नसलेलें; मर्जीनुरूप; वाटेल तसें; कांहीं तरी; लहरी; अशास्त्रीय. ' हा ऐच्छिक प्रयोग आहे यास शास्त्रप्रमाण कोठें. ' ५ हेतुपुरःसर, बुद्धिपुरःसर केलेलें; पूर्वयोजनेनुसार, योजून केलेलें; जाणूनबुजून केलेलें. ' ऐच्छिक पापाचें प्रायश्चित मोठें.' [सं.] ०**विषय**–पु. परीक्षेकरितां नेमिलेल्या दोन किंवा अधिक विषयांपैकीं इच्छेनें घेतलेला विषय. ' एम. ए. च्या परीक्षेस देशी भाषा या विषयाची निदान ऐच्छिक म्हणून तरी गणना करण्यांत आली ' –केले १.९२

ऐट–टा–टी, ऐटबाज, ऐटबाजी–अयट–टा–टी, अयटबाज–बाजी पहा. [हिं. ऐठ=अक्कड]

ऐणी—आयणी पहा. ' कामधेनु आणि चिंतामणी । हींही पुरवू न सकती ऐणी । ' –विपु १.७८.

ऐणुतें—वि. (गो.) किंचित् अळणी [अळणट अप.]

ऐतखाऊ, ऐतगब्बू–मारा, ऐता, ऐतोजी, ऐतोळा—आयतोजी, आयतगब्बू, आयतमार, आयतोबा, आयतोळा पहा.

ऐतरेय—पु. एक वैदिक ऋषि; इतरा नांवाच्या स्त्रीचा मुलगा. ०**आरण्यक**–न. ऋग्वेदाच्या शाकल शाखेचें आरण्यक. याचे पांच भाग असून यांत कांहीं अध्यात्म व बराचसा हौत्रविषय आहे. ०**उपनिषद्**–न. ऐतरेय आरण्यकाच्या दुसऱ्या भागांतील कांहीं भाग. यांत अध्यात्मविषयाचें विवेचन आहे. ०**ब्राह्मण**–न. ऋग्वेदाचा ब्राह्मण ग्रंथ. याचे ४० अध्याय असून पांच पांच अध्यायांची एक अशा आठ पंचिका आहेत. यज्ञांत होता नामक ऋत्विजानें करावयाच्या हौत्रकर्माविषयींचें विवेचन यांत आलें आहे. या ग्रंथाचें कर्तृत्व ऐतरेय ऋषीकडे आहे.

ऐतवार—पु. आदितवार; रविवार; सूर्याचा वार. [सं. आदित्य+वार]

ऐता–ती–तें, ऐतोजी—आयता पहा.

ऐता—सना. (कुण.) तो–ती–तें; हा–ही–हें; हा येथें! हा एक! इथें (तो–ती–तें) आहे! [आहे+तो; हा+तो; सं. आ+इतः ?]

ऐतिह्य—न. लोकपरंपरेचा प्रवाह; परंपरा; परंपरागत गोष्ट; लोककथा; दंतकथा. ' या वडाच्या झाडावर ब्रह्मराक्षस आहे असें ऐतिह्य ऐकतों. ' [सं.]

ऐती, ऐतिका—(गो.) तयारी. आयती पहा. 'तेथें होमांची ऐती करिती।'–वसा २१. 'प्रधानेसी म्हणे इओसे। यांथे मंधिरी नेइजे। भोजनाची ऐतिका करविजे। तेयां कारणें' –ज्ञिपु १.१४. ११.

ऐतुलें—वि. इतुकें; एवढें. इतका, इतुला पहा. 'ऐतुलें आइकौनि नीगालें, –उषा ५७.४८. [सं. एतावत्]

ऐदान, आयदान—न. (कर्ना.) भांडें; आयदाण पहा.

ऐदी—वि. आळशी; जड; मंद; सुस्त; अजागळ; अव्यवस्थित; जडभरत; खुशालचेंडू. 'ऐदी होण्याची चटक मलाही थोडीशी लावशील तर बरें होईल.' –बाय २.१. [सं. अ+यत्=प्रयत्न करणें]

ऐंद्र—पु. १ (ज्यो.) सत्तावीस योगांपैकीं सव्वीसावा योग. २ (रासायनिक) एक मूलद्रव्य (इं.) इरिडियम. –वि. इंद्रासंबंधी (आयुध, अस्त्र इ०). [सं.] **०जाल**–न. इंद्रजाल; जादुगिरी. **०जालिक**–पु. जादूचे खेळ करणारा; गारुडी.–वि. जादूसंबंधी; इंद्रजालासंबंधी. [सं.]

ऐंद्रस्थान—न. (नृत्य) दोन्ही पाय वांकडे करून आडवे ठेवणें, व यांत अंतर चार ताल ठेवणें, कंबर गुडघ्यांच्या रेषेंत येईल इतकी वाकविणें, हत्तीसारख्या प्राण्यावर चढणें वगैरे गोष्टींची सूचना या स्थानांत उभें राहण्यानें होते.

ऐंद्राग्न—वि. (इंद्र व अग्नि, इंद्राग्नी) देवतांसंबंधी (हवि, पुरोडाश, ऋचा इ.) [सं.]

ऐंद्रीयक—वि. इंद्रियग्राह्य; इंद्रियांनीं जाणण्याजोगा; इंद्रिय संवेद्य; इंद्रियांसंबंधी. [सं.]

ऐन—१ एक वृक्ष, झाड. अइन पहा. २ चांगली वर्तणुक. अइन पहा.

ऐन—अ. (दुसरें रूप यैन) १ जोर दाखविण्यासाठीं या उपपदाचा उपयोग करितात. अचुकपणा; पूर्णता; अतिशयितता वगैरे अर्थ हा शब्द लागल्यापासून होतात. जसें. **०उन्हाळा-पावसाळा-हिवाळा**–पु. उन्हाळ्या पावसाळ्याचा अगदीं भर. **०दोन प्रहर**–पु. अगदीं दुपार. **०वेळ**–स्त्री. अगदीं बरोबर; योग्य वेळ. **०सोदा**–अइल लुच्चा, लबाड, हरामी; ऐन अइल. **०भर**–पु. मध्य; मध्यावस्था; अगदीं भरभराटीची अवस्था (ऐश्वर्य, आरोग्य, तारुण्य, कीर्ति इ० जसें –ऐन दौलत, ऐन जवानी, ऐन ऐश्वर्य, ऐन अमदानी, ऐग हंगाम). **०घाई**–स्त्री. घाईचा, गडबडीचा कळस, परमावस्था. **०मारामारी**–लढायाचा अतिशय जोर किंवा 'लढाईचा अतिशय भर.

ऐन—भ. प्रधान, मुख्य, मूळ, आरंभींचें–मूलभूत वगैरे अर्थ ऐन हें उपपद शब्दास लावल्यास होतात. जसें– **०कर्जे**–न. 'ऐन कर्जे हजार रुपये व्याज शंभर रुपये मिळून अकराशें रुपये.' 'या शेतांत ऐन पीक दोन खंडी पिकतें, त्यांत खर्च जाऊन एक खंडी पदरीं पडतें.' **०कारभारी**–पु. वरिष्ठ (व्यवस्थापक, मंत्री, कोठारी, घटक इ०). **०किंमत**–स्त्री. मूळ किंमत. **०खर्च**–पु. मुख्य खर्च, अवांतर सोडून (जसें–घोड्याचा सामान वगैरे शिवाय खर्च; मेजवानीचा ऐन खर्च म्हणजे फक्त खाण्यापिण्याचा खर्च–रोषनाई वगैरे शिवाय). **०गल्ला**–पु. १ पाहणी करून ठरविलेला धान्याचा गल्ला; अंदाजी पीक. २ पाहणी करून ठरविलेला सारा. **०जमा**–स्त्री. १ ठरलेला किंवा नेहमींचा वसूल, सारा; अवांतर सोडून मुख्य वसूल; याच्या उलट खेरीज जमा; शिवाय जमा; कमाविस जमा. २ मूळचा, नेहमींचा वसूल (एखाद्या वर्षी कमजास्त झालेला नव्हे असा). **०दस्त**–मुख्य, नेहमींचा सारा (शेतावरचा वगैरे) याच्या उलट सवाई; वर्ताळा; वावती वगैरे. **०नकद् (नकद, नगद, नक्त)**–स्त्री. पैशाच्या रूपानें येणारा सारा किंवा ऐनजिन्नसी सान्याची पैशांत किंमत. **०काळी**–स्त्री. जमिनीवरील सारा, कर. [ऐन+काळी=शेत जमीन] **०जिन्नस**–पु. १ जमिनींचें धान्यादि उत्पन्न; याच्या उलट नक्त सारा, उत्पन्न विकून पैसा केलेला नव्हे तर जसाच्या तसाच सरकारांत भरावयाचा शेतांतील माल. सामासांत–ऐन जिन्नस धारा; ऐन जिन्नस वसूल. २ (ल.) खुद; जातीनें. 'तरी ऐन जिन्नस पदाजी यादवाचे दोघे बेटे एकोजी व कुसाजी गनिमाकडे आहेती' –रा १५.१. **०जिन्नसी**–वि. १ प्रत्यक्ष मालाच्या रूपांत ऐन जिनसासंबंधीं (धारा, वसूल, जकात वगैरे). 'स्वराज्यांतील नेमणुकीचा बहुतेक भाग ऐनजिन्नसी मिळत असल्यामुळें .....' –गांगा १४३. २ त्याच जातीचें, प्रकारचें (धान्य, कापड, दागिना वगैरे शब्दाबरोबर योजतात). ३ खुद; ऐनजिन्नस अर्थ २ पहा. –क्रिवि. मुद्देमालासह; प्रत्यक्ष कृति करीत असतां. 'ऐनजिन्नसी चोर पकडला' **०फाजील**–जमाबंदी हिशोबांतील एक सदर. यांत शेतकी किंवा बागाईत खेरीज येणारें जादा उत्पन्न येतें. जसें–आंबराई, टरबुज वाडी, पाणभरा जमीन, कुरण वगैरेचें उत्पन्न. **०मोकासा**–चौथाईतील सरदारांची नेमणूकबाब. चौथ पहा. **०वसुली**–स्त्री. रोख वसुली; निव्वळ–ठाम–रोख उत्पन्न.

ऐन—न. (जुनें रूप यैन) १ (कर्ना.कों.) मुद्दल; मूळरकम; भांडवल. म्हण० व्याजास सोकला, ऐनास मुकला. २ मूळचा ठरलेला शेतसारा 'साठ लाखांची वेरीज यैन व इजाफा मिळोन सिद्ध केली.' –रा ७.५३. [ऐन]

ऐनक—पु. चष्मा; डोळ्यास लावावयाची आरशी [अर.ऐनक]

ऐनपैन, ऐणपैण—स्त्री. निर्वाळा देणें; खात्रीपूर्वक सांगणें. (क्रि० करणें; घालणें; पडणें) [ऐन+पैन]

ऐनवाफ—स्त्री. पेरणीचा हंगाम; ऐनवेळ; पेरणीचा नक्की हंगाम–भर.

ऐनवेळ—स्त्री. अगदीं आणीबाणीचा प्रसंग; मोक्याची वेळ. **ऐनवेळीं**–क्रिवि. अगदीं वेळेवर; अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं.

ऐनसादडा—पु. एक झाड. अइन पहा.

ऐना—पु. १ आयना; आरसा. 'ऐना निंदितसे निर्नासिक.' –दावि २६३. २ (ल.) शोभादायक वस्तु; अलंकरण; भूषण. 'कम्बरवस्ता करून निघे निज मंदिरचा ऐना.' –प्रला १२३. ३ विशेषतः अव.–ऐने; चष्मा; उपनेत्र; डोळ्याची आरशी. [फा.]

ऐनाती—स्त्री. मूळ ठरविलेल्या शेतसाऱ्याचा प्रकार; ऐनजैन आकार. [फा.]

ऐने(ना)महाल—पु. आरसेमहाल; आंतून सर्व बाजूंनीं आरशांनीं मढविलेला दिवाणखाना. 'ऐनामाहल जो रत्नखचित.' –दावि ३५८. 'त्याचप्रमाणें ती सुभानजीबरोबर नागोजीच्या गर्दीत त्याच्या खास ऐनेमहालांत आली.' –स्वप ३९३. [फा.]

ऐनेर–रें—न. एक लहान मुलांचा रोग; यानें गर्भिणी आईचें स्तनपान करणाऱ्या मुलाला श्वास, अग्निमांद्य, ओकारी, ग्लानी, खोकला, अरुचि, घेरी येणें हीं लक्षणें होतात, पोट मोठें होतें. याला वैद्यकांत पारिगर्भिक असें म्हणतात, यावर अग्निदीपकक्रिया करावी. आयनेरें पहा. [आई+न्यारें]

ऐनेरणें, ऐनरणें—आयनेरणें पहा.

ऐनेराजमेहेल—पु. (बडोदें) राजवाडादर्पण; या नांवाच्या पुस्तकांत बडोदें राजघराण्यांत होणाऱ्या सर्व प्रकारच्या नैमित्तिक कृत्यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. [ऐने+राजमहाल]

ऐपत—स्त्री. संपन्नता; आर्थिक सामर्थ्य, शक्ति, योग्यता, साधन; मालमत्ता; पैसाअडका. [अर. आफियत्] **०दार, ऐपती**—वि. ऐपत असणारा; सांपत्तिकदृष्ट्या समर्थ; पैसेवाला.

ऐपत—स्त्री. (गो.) टांक.

ऐब—पु. व्यंग; दोष; चूक; खोड; अपूर्णता. अयब पहा. 'नाक लागलें तर फारसा ऐब दिसणार नाहीं.' –ख ४.१५०५. 'त्याच्या चेहऱ्यांत कांहीं ऐब नव्हता.' –कोरकि ३१. [अर. अयब, आइब] **०लागणें**—क्रि. कमीपणा येणें. **०दार**–वि. चुकीचा; दोषी; उणीव असणारा; दोषसंबंधीं.

ऐबतेगैबते, ऐबूगैबू, ऐबोगैबो—वि. साळकोजी माळकोजी; सटरफटर; कोणीतरी; ज्यांचा कांहीं संबंध नाहीं असे. ऐगूबैगू पहा.

ऐबी—वि. १ (ना.) खोडकर; व्रात्य. २ (कु.) ओशाळा; भिंधा. [ऐब; हिं. ऐबी; अर. अयब, आइब्]

ऐयट, ऐयटबाज, ऐटबाजी—अयट पहा.

ऐयाल–ळ—अयाल पहा.

ऐय्या—स्त्री. अया पहा. [तुल० हिं. अय्या=आजी, म्हातारी स्त्री]

ऐरण—स्त्री. सोनार, लोहार वगैरेंचें एक हत्यार; घडकाम करण्याचें साधन. यावर धातूचे जिनस ठोकून त्यांस पाहिजे तो आकार देतात. सामान्यतः आठ ते दहा शेर वजनाचा व पांच इंच लांबीरुंदीचा, वर रुंद व चौकोनी असून खालीं निमुळता असलेला लोखंडी ठोकळा एका लाकडी लांबट ठोकळ्यांत बसविलेला असतो. यास वरच्या बाजूस एक इंच जाडीचा पोलादी भाग असतो. 'जैसे ऐरणीवरी घण । तैसे हाणिती उसणपण ॥' –कथा १.१३.९८. [सं. अरणि, अधरिणी; प्रा. अहिरिणी; सिं. अहरणी, तुल० सं. अधरारणी] **०गारणें**—क्रि. (सोनारी) ऐरणीला ठोकून ठोकून गुळगुळीतपणा आलेला असतो तो घालविण्यासाठीं कुरुंदाचा चुरा हातोडयानें ऐरणीवर घासणें.

ऐरण—स्त्री. (बांई) शेताच्या बांधावर असणारा, हद्द दाखविणारा मातीचा ढीग. अरणी पहा.

ऐरण, ऐरीण—स्त्री. १ हरण; नरवेल. २ आयरणी; सोनामुखीची एक जात. [सं. अरणि; हिं. अरणि; गु. अरणि]

ऐरणमैरण—स्त्री. एक वनस्पति; हिचीं पानें यकृताच्या आकाराचीं असून त्यांचा यकृतविकारावर उपयोग होतो.

ऐरणी—स्त्री. ऐरण पहा. 'सर्पाची जे वाकली फणी । तेचि पिटावया ऐरणी । कातरी केलिया जोडोनि । सर्पाच्याच ॥' –कथा ३.१७.९२.

ऐरणी, ऐरिणी—स्त्री. लग्नांत वरातीच्या पूर्वी वेळूच्या परडींत (झालींत) कणकीचे दिवे लावून त्यांत उमामहेश्वराची पूजा करून तें पात्र वरमातेस दान करतात. 'भीमकें मांडिलें विंदान। भव ऐरणी संपादन। कृष्णासी वंशपात्रदान। विधिविधान वेदोक्त ॥' –एरुस्व १६.१५८. २ अग्निपात्र. 'विरहा नलें तातली। चंद्रकळा होअे चुळचुळी। ते ऐरणी करतळी। घईन मी ॥' –शिशु १९६. [सं. अरणि] **०दान**–न. लग्नांत वंशवृद्धीसाठीं वधूपक्षाकडून वरमातेस वंशपात्राचें (झालीचें) जें दान देतात तें. **०पूजन**–न. ऐरणीदान करण्यापूर्वी वंशपात्राचें (झालीचें) करावयाचें पूजन.

ऐरा—अहिरा पहा.

ऐराण—हैराण पहा.

ऐरावण—पु. इंद्राचा हत्ती, ऐरावत. [सं.]–वि. (गो.) (ल.) अतिशय मोठा; अगडबंब.

ऐरावत—पु. (विरू.) ऐरावती; इंद्राचा हत्ती; समुद्रमंथनापासून काढलेल्या चौदा रत्नांपैकीं एक. 'अजुना मी गा ऐरावतु। पयोराशी सुरमथितु ॥' –ज्ञा १०.२३८. [सं.] **म्ह० कोठें इंद्राचा ऐरावत कोठें शामभटाची तट्टाणी**=एक अतिशय थोर आणि दुसरी अतिशय क्षुद्र अशा दोन गोष्टींचा विरोध दाखवावयाचा असल्यास या म्हणीचा उपयोग करतात. **ऐरावतीलक्ष्मी**—स्त्री. गजांत लक्ष्मी; हत्ती बाळगण्याइतकी श्रीमंती. 'मदमत्त झालेल्या द्वीपेंद्रानें एखादे वेळीं क्रुचित प्राणनाश केला म्हणून ... ऐरावती लक्ष्मीचा अनादर करणें योग्य नाहीं.' किरकोळ लेख संग्रह (विष्णु शास्त्री चिपळूणकर).

ऐरीगैरी—वि. १ अशक्त; मूर्ख; मंद; जड (माणूस); हलकी; क्षुद्र; (वस्तू). २ अलबल्यागलबल्या; क्षुल्लक; कोणीतरी. 'कीर्तीचे चौघडे पोवाडे ऐऱ्यागैऱ्यांचें नाहीं केले.' –गापो ७६. [गैरी–द्वि.]

ऐरिणी, ऐरीण—स्त्रीन. ऐरणी पहा.

ऐल, ऐला, ऐलाड, ऐलाडी, ऐली—वि. अलीकडचा; पलीकडला. 'उताराचिये सांगडी । ठाके ते ऐलीच थडी ॥ ' –ज्ञा १.८.२५५. 'पाहेचि ना तो नाहीं बुडाला । कोरडा आला ऐल तीरा ।' –एभा २८.३२५. क्रिवि. १ या बाजूला; अलीकडे. ' प्रवृत्ति माघौतिले तोहरे । समाधि ऐलाडी उतरे । ' –ज्ञा ६.१९१. २ आधीं; अगोदर; पूर्वी. ' तेवि तो उडुनाथ । केवल श्रीकृष्णप्रीत्यर्थ । सांडुनि काळ नेयत । ऐलाडचि उदैला ॥ ' –रास १.१०७. [सं. आदिम; प्रा. आइल्ल] **ऐलकांठ, ऐलतीर, ऐलथड**–पु.न.स्त्री. अलीकडचा कांठ; पलीकडचा कांठ; पैलथडी याच्या उलट. 'शोभा समुद्र हेलावे पोटीं । लक्षू पोहणार उठाउठी । ऐलकांठीं चुबकले ॥ ' –मुसभा २.७७. असो आतां त्या अवसरीं । क्षीरसागरीच्या ऐलतीरी । बध्दांजलि करूनि निर्धारी । सुरवर उभे ठाकले ॥ ' –ह २.६०.

ऐलपैल—क्रिवि. या व ल्या बाजूस; जवळच्या व दूरच्या दोन्ही कांठावर; अलीकडे पलीकडे. ' या नदीचे ऐलपैल वस्ती आहे.'[ऐल+पैल] –वि. (अलीकडचा व पलीकडचा) इतर; अवांतर; केरकोळ; मिश्र; सटरफटर; क्षुल्लक (वस्तु, काम, शब्द, मनुष्य इ०). आम्हास संसारखर्चापेक्षां ऐलपैल खर्च फार लागतो. '

ऐलपैल–स्त्री. १ बंड; उठाव; बेभानपणाचें, आज्ञा मोडण्याचें कृत्य. २ खोडया; उपद्याप; बेमुर्वत वर्तन; उद्दाम भाषण. (क्रि० करणें; बोलणें). [फैल द्वि; अर. फियल=कर्म]

ऐलान—पु. (माळवी) शासन; कायदा; वटहुकूम. (इं.) प्रॉर्डिनन्स. [हिं.]

ऐलीकडचा, ऐलीकडला, ऐलीकडून, ऐलीकडे—अलीकडचा, अलीकडील पहा. ' जेवीं वसंता ऐलीकडी । वृक्षासि होय पानझडी ॥ '–एभा ३.१५५. ' नाणावें पैलाड येतां हि जीव । ऐलिकडे उठतां न्यावें घरा । ' –दावि १४८.

ऐवज—पु. १ मालमत्ता; संपत्ति; इस्टेट; रोकड किंवा माल. पांडुरंग आणितां ध्यानांत । तों ऐवज आठविला मनांत । ' २ स्थिति; टिकाऊपणा; भक्कमपणा; दमदारपणा. ३ तत्त्वांश; सामर्थ्य; उत्साह; उमेद; पाणी. ४ किंमत; मूल्य (कोणत्याहि वस्तूची पैशाच्या रूपांत). ५ रोख वसुली; रोख उत्पन्न; जमा. फा. इवज्=बदला] **०दार-शीर**–वि. समर्थ; उपयुक्त; चांगल्या स्थितींत असणारा; कार्योपयोगी (वस्तु, पदार्थ, पशु वगैरे). **०मोबदला**–पु. १ एखाद्याच्या मालकीची वस्तु दुसऱ्याच्या ताब्यांत त्याच्या वस्तूबद्दल असणें; ऐवजाची अदलाबदल असणें. २ देवघेव; मोबदला देणें. (क्रि० करणें). ३ठेवीवर पैसा उसनवार काढणें; गहाणकर्ज. (क्रि० करणें; देणें; ठेवणें; याच्या उलट हातावर आणणें; काढणें; येणें). **०मोबदल्याचें लिहिणें**–हिशेबाचें एक खातें; ठेवी ठेवल्याचें व पैसे उसने आणल्याचे हिशेब ठेवणें; निरनिराळ्या प्रकारच्या वसुलीपोटीं, ठेवपोटीं, कर्जपोटीं दिल्याघेतल्या रकमांचा हिशेब ठेवणें; निरनिराळ्या प्रकारच्या सारावसुलीचा रीतसर हिशेब ठेवणें. ' ऐवजमोबदल्याचें लिहिणें महाकठीण यांत जो कारकून पार पडेल तो लेखणीचा धड. '

ऐवजी—शअ. बदली; जागीं; मोबदला. ' हे रुपये मुद्दलांत धरूं कीं व्याजाऐवजीं धरूं ? ' [फा. इव; सिं. एवजी]

ऐवट—वि. १ भरींव, जड (दागिने वगैरे); अवजड; मोठा अवाढव्य; अजस्र (झाड, खांब, इमारत वगैरे); जाड; दणकट; ओबडधोबड (कापड वगैरे). हा शब्द पुष्कळ वेळां फार व्यापक अर्थानेहि योजलेला दिसून येतो. जसें– अगडबंड, थोराड माणसांना; असभ्य, ग्राम्य, असंस्कृत भाषणाला; विविध प्रकारच्या व्यापक कामाला; दिखाऊ मोठ्या वस्तूंना हें विशेषण लावलेलें आढळतें. २ जड; मंद; मूर्ख; बेडौल; ओबडधोबड (माणूस). [अर. बेबट ?]

ऐश—न. (गो.) आमिष. ' ऐंशाचेया आसा । मिनु झोंबिनला जैसा । ' –त्रिपु १.१७.३७. [सं. आमिष.]

ऐशानी—स्त्री. ईशान्य दिशा. [सं.]

ऐशआराम-ऐशाराम-मी—पुस्त्री. चैन; सुख आणि स्वास्थ्य; वैषयिक सुखोपभोग; कर्मणूक; विलास; मनोरंजन. [अर. ऐश्+फा. आराम्]

ऐशी—उद्गा. आनंदोद्गार. भले शाबास ! वाहवा ! छान ! [अशी, असा.]

ऐशी—वि. १ अशी; यासारखी. २ (ल.) अतिशय; फार (निंदाव्यंजक). ' तो येऊं दे तर खरा, त्याची ऐशी पूजा करतों !' [अशी]

ऐशीं—वि. ८० संख्या. [सं. अंशीति; प्रा. असीइ; सिं. असी] **०म्ह** १ ऐशीं तेथें पंचायशी=थोडें आस्त झालें तरी हरकत नाहीं या अर्थी. २ ऐशीं तेथें पंच्यायशी, कर ग रांडे पुरणपोळ्या–उधळ्या माणसास लावतात.

ऐश्वर—वि. ईश्वरी; दैवी; ईश्वरसंबंधी. ' ऐश्वरकळा साजती । पाहून शत्रु लाजती । '–ऐपो ३१८. [सं.]

ऐश्वर्य—न. वैभव; प्रतिष्ठा; सत्ता; इच्छित प्राप्तीचें सामर्थ्य, ' आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।'–ज्ञा ६.३७. 'ऐश्वर्य म्हणजे जें जें इच्छील तें तें प्राप्त करून घेण्याचें योग-सामर्थ्य. ' –गीर १६४. २ प्रभुपणा; प्रभुत्व; वर्चस्व. ' तुज ईश्वरेश्वराचिया ठायीं । ऐश्वर्य केलें । ' –ज्ञा ११.५६९. ३ ईश्वरी अंश, गुण, सामर्थ्य. ' हा आमुचा ऐश्वर्य योगु । तुवां देखिला की चांगु ।' –ज्ञा ९.८७. ४ (सामा.) समृद्धि; श्रीमंती. [सं.] **०पीठ**–न. ऐश्वर्यस्थान; संपत्तीचें, वैभवाचें माहेरघर. ' की ऐश्वर्यपिठींची देवी सुंदर. ' **०योग**–पु. ईश्वरी सामर्थ्य; वैभव. ऐश्वर्य अर्थ ३ पहा.

०वान—वि. १ मोठा; विख्यात; प्रतिष्ठित. २ संपत्तिमान; मरमराटींत असणारा. ३ भाग्यशाली; सुदैवी. **ऐश्वर्याचा प्राणी**—पु. ज्याची सदोदित भरभराट असते अशास म्हणतात; नशीबवान; देवाची कृपा असणारा; भाग्याचा पुतळा; दैवाचा भोपळा.

ऐषआराम—ऐशआराम पहा.

ऐषमहाल—पु. करमणुकीच्या व चैनीच्या साधनांनीं सज्ज ठेविलेला महाल. [अर. ऐशमहाल]

ऐष्टिक—वि. यज्ञिय; हव्य; इष्टीसंबंधीं (कर्म वगैरे) [सं.]

ऐस—(कु.) आमिष, ऐश पहा.

ऐसपैस—क्रिवि. १ विस्तीर्ण; प्रशस्त; अमर्याद; मोकळाधाकळा. २ आसमंतात्, आसपास, पहा [आसपास]

ऐसा, ऐसें—वि.क्रिवि. (काव्य) १ असा; असें. 'ऐसेआ आपदा अनिर्वाच्या। भोगितां तेआ सोच्या' –ऋ १०. २ सारखा. 'लोकबंधू जो होय खवीऐसा' –नल ७. [सं. ईदृश; प्रा. ईदिस; अपभ्रंश अइस.] **ऐसेनी**–अशा प्रकारें; याप्रमाणें. **ऐसीयासी**–अशाला. 'बोले तैसा चाले तो प्रिये देवासी। भीम ऐसियासी गाये सदां।' –रामदासी २.१६६. **ऐसैसें**–क्रिवि. असें असें. 'किंबहुना ऐसैसें। मुक्तकैवल्य सुदिवसें'। –ज्ञा १६.१३. [ऐसें+ऐसें]

ऐसांत येणें—क्रि. (कु.) कोणतीहि (अयोग्य) गोष्ट करण्याच्या भरांत, जोरांत, आवेशांत येणें. [आवेशांत अप. ?]

ऐहिक, ऐहलौकिक—वि. या लोकांतील; इहलोकसंबंधीं (सुख, भोग इ.) पारलौकिक याच्या उलट. 'तैसें ऐहिक तरी न नशे।' –ज्ञा २.२३३. [सं. इह–ऐहिक]

महाराष्ट्र शब्दकोश

ग्रंथसंक्षेप सूची

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्यांचा खुलासा
अकक	अनेककविकृत कवितासंग्रह	काव्येतिहाससंग्रह	भाग, कविता
अनु	अनुवाद	पवित्रशास्त्र–जुना करार. बायबल सोसायटी, इ. स. १९२४	अध्याय, वचन
अफला	अनंतफंदीकृत कविता अथवा लावण्या	प्रका. चित्रशाळा, आवृत्ति ४, सन १९२१	भाग, पृष्ठ
अभं	अभंगांजलि	संपा. ना. वा. टिळक, १९१९	पृष्ठ
अमृ	श्रीअमृतानुभव	संपा. बाबा गर्दे, प्रकाशक के. भि. ढवळे, १९२९	प्रकरण, ओंवी,
अमृत	अमृतरायकृत कवितासंग्रह	काव्यसंग्रह २६. संपा. वा. दा. ओक, निर्णयसागर १८९६	पृष्ठ
अमृतबाल	अमृतरायकृत बालक्रीडा	,, ,, ,,	कविता
अमृतध्रुव	,, ध्रुवचरित्र	,, ,, ,,	,,
अरु	अरुणोदय	संपा. बाबा पदमनजी. आवृत्ति २. सन १९०८	पृष्ठ
अश्वप	अश्वपरीक्षा	संपा रा ग गुप्ते, ज्ञानचक्षु पुणें, १८८५	भाग, पृष्ठ.
अस्तंभा	अस्तंगतभानु	संपा. द. वि. परांजपे, प्रका. मोदवृत्त, वांई, १९२६	पृष्ठ
अज्ञाअ	अज्ञानदासकृत अफझलखानवध	(ऐतिहासिक पोवाडे)	चौक.
आकं	आनंदतनय–कंदुकाख्यान	आनंदतनयकृत कवितासंग्रह, संपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर १८९१	कविता
आकृ	आनंदतनय–कृष्णचरित्र	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर १८९१	कविता
आगर	आगरकर–निबंधसंग्रह	प्रका. सुधारक प्रिंटिंग ब्युरो, पुणें	भाग पृष्ठ
आगो	आनंदतनय–गोरसक्रीडा	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक. निर्णयसागर १८९१	कविता
आता	आनंदतनय–ताटकावध	,, ,, ,,	,,
आप, आपद	आनंदतनय–पदें	,, ,, ,,	पद
आपू	आनंदतनय–पूतनावध	,, ,, ,,	कविता
आमंस	आत्मनियंत्रण मंडळ्यांची समाजपद्धति	प्रका. अमेरिकन मिशन सोसायटी, मुंबई १८९६	पृष्ठ
आमा	आनंदतनय–मार्कंडेयाख्यान	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर १८९१	कविता
आय	आनंदतनय–यज्ञरक्षण	,, ,, ,,	,,
आरोशा	आरोग्यशास्त्र	संपा. बा. प्र. मोडक, निर्णयसागर सन १८९३	भाग, पृष्ठ
आशिबि	आनंदतनय–शिबिचक्रवर्त्याख्यान	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर १८९१	कविता

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्यांचा खुलासा
आश्व्गृसू	आश्वलायन गृह्यसूत्र	... ...	अध्याय, खंड
आसी	आनंदतनय–सीतास्वयंवर	आनंदतनयकृत कवितासंग्रह. संपा. ज. बा. मोडक, वा. दा.ओक,निर्णयसागर१८९१	कविता
आसु	आनंदतनय–सुदामचरित्र	,, ,, ,,	,,
इऐ	इतिहास व ऐतिहासिक	नियतकालिक. प्रका. चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा, धुळें	वर्ष (अंक), पृष्ठ
इति	इतिहास	प. शा. जु. क. बायबल सोसायटी, १९२४	अध्याय, वचन
इनाम	मुंबई इलाख्यांतील इनामकमिशनखालें–यांतील गैर इनसाफ	(शिळाप्रत) ज्ञानप्रकाश सन १८५९	पृष्ठ
इंप	इंग्रजांचा पराभव	संपा. अ. ब. कोल्हटकर, प्रका. भावे आणि मंडळी, मुंबई शके १८४८.	पृष्ठ
इपुस्त्रिपो	इतिहासप्रसिद्ध पुरुष व स्त्रिया यांचे पोवाडे	संपा. आकर्थे व शंकर तुकाराम शाळिग्राम, निर्णयसागर १८९१	पृष्ठ
इफि	इफिसकरांस पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
इब्री	इब्री यांस पत्र	,, ,, ,,	,,
इमं	इतिहासमंजरी	संपा. द. वि. आपटे, शके १८४५, चित्रशाळा पुणें	पृष्ठ
इंमू	इंग्लंडच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासाचीं मूलतत्त्वें	संपा. शि. गो. फाळके, विद्याखातें, बडोदें १९१४	पृष्ठ
ईवि	ईश्वरी विद्या	संपा. सी. एस्. रिविंग्टन, १९२६	पृष्ठ
उचिशु	उद्धवचिद्घनकृत शुकरंभासंवाद	काव्यसंग्रह, महाराष्ट्र कवि भाग २	कविता
उत्प	उत्पत्ति	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
उदा	उघडलेलें दार	संपा. दि. शं. सावरकर, १९२४	पृष्ठ
उपा	उपासनापद्धति	संपा. ना. वा. टिळक, १९२९	पृष्ठ
उमं	उपोषणमंडळ	,, ,, १९१४	,,
उषा	उषाहरण	चोभाकृत, प्रका. भा. इ. सं. मं. अहवाल, शके १८३३	पोथीपृष्ठ,ओंवी
उसं	उपासनासंगित	ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, सन १९२३	पृष्ठ
ऋ	ऋद्धिपूरवर्णन	नारायणव्यास बहाळियेकृत (महानुभाव), प्रका. य. खु. देशपांडे, यवतमाळ, सन १९२९	पृष्ठ
ऋग्	ऋग्वेदसंहिता	... ...	मंडळ, सूक्त, ऋचा
ए	एज्रा	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
एभा	एकनाथी भागवत	(विष्णुबोवा जोग संप्रदायी) संपा. मा. कृ. देशमुख, आवृ. २. शके १८४९	अध्याय, ओंवी
एरुस्व	एकनाथ–रुक्मिणीस्वयंवर	प्रका. मा. कृ. देशमुख, चित्रशाळा, शके १८४७	,,
ऐकिप्र	ऐतिहासिक किरकोळ प्रकरणें	इतिहाससंग्रह विविध१.संपा.द. ब. पारसनीस	पृष्ठ
ऐच	ऐतिहासिक चर्चा	,, ,, ,,	,,
ऐटि	ऐतिहासिक टिपणें	,, ,, ,,	भाग, पृष्ठ
ऐपो, ऐतिपो	ऐतिहासिक पोवाडे	संपा. य. न. केळकर, १९२८	पृष्ठ
ऐरा	ऐनेराजमेहेल, अथवा राजवाडादर्पण	आवृ. २, इंदुप्रकाश मुंबई, सन १९१२	,,
ऐरापु	ऐनेराजमेहेल–पुरवणी	बडोदें १९२२	पृष्ठ
ऐरापुप्र	पुरवणी–ऐनेराजमेहेल प्रकरण	बडोदें	प्रकरण, पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्यांचा खुलासा
ऐरापुविवि	ऐनेराजमेहेल–पुरवणी, विवाहविधि	बडोदें १९२८	पृष्ठ
ऐस्फुले, ऐस्फु	ऐतिहासिक स्फुटलेख	इतिहाससंग्रह विविध १, संपा.द.ब.पारसनीस	भाग, पृष्ठ
ओझा	प्राचीन भारतीय लिपिमाला	संपा. गौरीशंकर ओझा, अजमेर	
कचेसुच	कचेश्वरकविकृत सुदामचरित्र	(शिळाप्रत) प्रका. कृ. ब. ठाकूर, मुंबई शके १८०९	पृष्ठ
कथा	कथाकल्पतरु	कृष्णयाज्ञवल्किकृत	स्तबक, अध्याय, ओंवी
कफा	करंजांचा मनोरंजक फार्स (प्रहसन)	संपा. का. म. थत्ते, दत्तप्रसारक छापखाना, पुणें १८८८	पृष्ठ
कमं	कर्पूरमंजरी–सट्टक (मराठी भाषांतर)	संपा. स. प. पंडित, मुंबई, इंदुप्रकाश १८७७	जवनिका, पृष्ठ
करिं	करिंथकरांस पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	पत्र, अध्याय, वचन
कलस्सै	कलस्सैकरांस पत्र	,, ,, ,,	अध्याय, वचन
काप्र	काकडे प्रश्नमाला	शिवणकला त्रैमासिक, मॅनेजर, टेलरिंग ॲंड कटिंग कॉलेज, कोल्हापूर	पृष्ठ
काप्रइसा	कायस्थप्रभूंच्या इतिहासाचीं साधनें	व्यवस्थापक, कायस्थ प्रभु ऐतिहासिकमंडळ, निर्णयसागर प्रेस	पृष्ठ
किंगवि	किंकरकृत गरुडगर्वविमोचन	अनेककवि भाग २	कविता
किंद्रौपदी	किंकरकृत द्रौपदीचरित्र	,, ,, ,,	,,
किंसुदा, किंसुदाम	किंकरकृत सुदामचरित्र	,, ,, ,,	,,
कुअक	कुरुंदवाडकर कविता	अर्वाचीनकविता (पूर्वार्ध) संपा. चं. शि. गोऱ्हे प्रका. दामोदर सांवळाराम मंडळी, मुंबई १९०३	पृष्ठ
के	केसरी वर्तमानपत्र	... ...	तारीख, माहे, सन
केक	केशवसुत यांची कविता	प्रका. हरि नारायण आपटे, आर्यभूषण प्रेस, पुणें	पृष्ठ
केका	मोरोपंतकृत केकावली	केकादर्श, संपा. परशुरामताल्या गोडबोले, आवृ. ४, सन १९१७. प्रका. गजानन चिंतामण देव	श्लोक
केले, केळ	केळकरांचे लेख	प्रका. शि. वा. आवटी, विजय प्रेस, १९२५	खंड, पृष्ठ
कोको	ए कॉपेंडियम ऑफ मराठी-मराठी ॲंड इंग्लिश डिक्शनरी	अंबाजी कोन्हेरेकृत मराठी–मराठी व इंग्रजी कोश, सन १८९६	
कोरकि	कोरलईचा किल्लेदार	संपा. वि. वा. भिडे, प्रका. भारतगौरवग्रंथमाला, मुंबई १९२५	पृष्ठ
कौंघवनि	कौन्सिल घटना व नियम	प्रका. युनायटेड चर्च ऑफ नॉर्दर्न इंडिया	पृष्ठ
कृमुरा	कृष्णदासमुद्गल रामायण	प्रका. महाराष्ट्रकवि	प्रसंग, ओंवी
कृषि, कृषिवि	कृषिकर्मविद्या	संपा. रा. आ. राजे, व रा. स. गुप्ते आवृ. १	पृष्ठ
ख	ऐतिहासिक लेखसंग्रह	संपा. वा. वा. खरे, सन १८९७–१९२६.	भाग, पृष्ठ; पृष्ठ
खपो	खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा	... ...	चौक
खरादे	खरा देशभक्त	संपा. वा. कृ. भावे, भारतगौरवग्रंथमाला	पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकडयांचा खुलासा
खलप	खडर्याच्या लठाईचा पत्रव्यवहार	राजवाडेसंपादित मराठयांच्या इतिहासाची साधनें, खंड ७	भाग, पृष्ठ
खस्वाब	खडर्याच्या स्वारीची बखर	संपा. का. ना. साने	पृष्ठ
ख्रिधमू	ख्रिस्तीधर्माचें मूलतत्त्वज्ञान	संपा. पंडिता रमाबाई, सन १९१५	पृष्ठ
ख्रि, ख्रिपु	ख्रिस्तिपुराण	फादर स्टीफन्सकृत, संपा. जोसेफ सालढाणा मंगळूर १९०७	पुराण, अवस्वर, ओंवी
ख्रिस्ता	ख्रिस्तायन	संपा. ना. वा. टिळक १९२१	अध्याय, ओंवी
गगवि	गरुडगर्वविमोचन	किंकर, अनेककवि भाग २	कविता
गण	गणना	प. शा. जु. क. बा. सो. सन १९२४	अध्याय, वचन
गल	गलतीकरांस पत्र	प. शा. नं. क. बा. सो. १९२४	,,
गांगा, गांव	गांवगाडा	संपा. त्रिं. ना. अत्रे. १९१५	पृष्ठ
गापो	गायकवाड घराण्याचे व इतर पोवाडे	संपा. गो. स. सरदेसाई, बडोदावत्सल छापखाना, १९२४	पृष्ठ
गीता	गीतार्णव	दासोपंतकृत	अध्याय, ओंवी
गीर, गी	गीतारहस्य	संपा. बा. गं. टिळक, चित्रशाळा, १९१५	पृष्ठ
गीस	गीता–समश्लोकी	वामनकृत	अध्याय, ओंवी
गुच	गुरुचरित्र	सरस्वतीगंगाधरकृत. यशवंत प्रेस, पुणें	,, ,,
गोइसा	गोमंतकाच्या इतिहासाचीं साधनें	संपा. विनायक रामचंद्र सरज्योतिषी, १९१४	पृष्ठ
गोखंचिशाब	शाहूमहाराजांची बखर	गो. खं. चिटणीसकृत	पृष्ठ
गृशि	गृहिणीशिक्षक	संपा. सौ. सावित्रीबाई जोशी व ल. ना. जोशी, मुंबई १९२९	भाग, पृष्ठ
घका	घरचा कायदा	संपा. सी. के. दामले, प्रका. लॉ प्रिंटिंग प्रेस, पुणें, १९२७	पृष्ठ
घाको	घाशीराम कोतवाल	मोरोबा कान्होबाकृत, सन १८६३	पृष्ठ
चं, चंद्र	चंद्रगुप्त	संपा. ह. ना. आपटे, आर्यभूषण प्रेस, पुणें.	पृष्ठ
चंद्रचूड	चंद्रचूड दफ्तर, कला १	संपा. द. वि. आपटे, प्रका. भा. इ. सं. मंडळ, पुणें	पृष्ठ
चसवृ	चतुर्थसंमेलनवृत्त	भा. इ. सं. मंडळ, शके १८३८	,,
चिज	चित्रमयजगत	नियतकालिक, चित्रशाळा प्रेस, पुणें	वर्ष. अं. पृष्ठ
चित्रगुप्त	शिवाजीमहाराजांची बखर	चित्रगुप्तविरचित	पृष्ठ
चिमा	चित्र्यासंबंधीं सामान्य माहिती	बडोदें १९२६	,,
चिरा	चिनापट्टण येथील राजकारणें	इतिहाससंग्रह. संपा. द. ब. पारसनीस	,,
छअं	छत्रेकृत अंकगणित	संपा. के. ल. छत्रे, आवृ. १०, मुंबई, सन १८७९	पृष्ठ
छंर	छंदोरचना	संपा. प्रो. मा. त्रिं. पटवर्धन आर्यसंस्कृति-मुद्रणालय, पुणें सन १९२७.	पृष्ठ
जनि	जब्तेरखान्याच्या अंतर्व्यवस्थेचे नियम	बडोदें १९१९	पृष्ठ
जुऐगो	जुन्या ऐतिहासिक गोष्टी	इतिहाससंग्रह. संपा. द. ब. पारसनीस	पृष्ठ
जुक	जुना करार	प. शा. बा. सो. १९२४	विषय, अध्याय,
जुले	जुने लेख	इतिहाससंग्रह. संपा. द. ब. पारसनीस, १९१५	पृष्ठ
जै, जैअ	जैमिनि अश्वमेध	श्रीधरस्वामीकृत चित्रशाळा प्रत	अध्याय, ओंवी
जोरा	जोधपूर येथील राजकारणें	इतिहाससंग्रह, संपा. द. ब. पारसनीस, १९१५	पृष्ठ
झांमू	झांकली मूठ	संपा. वि. वा. हडप	पृष्ठ
टि, टिले	लो. टिळकांचे केसरींतील लेख भाग १–४	प्रका. केसरी-मराठा, संस्था, पुणें १९२२–३०	भाग, पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकडयांचा खुलासा
टिक	टिळकांची कविता	रे. ना. वा. टिळक यांच्या कवितांचा संग्रह, प्रका. भा. कृ. उजगरे, १९१४	पृष्ठ
टिव्या	लो. टिळक यांचीं व्याख्यानें	संपा. स. ह. भावे, १९०८	पृष्ठ
टिसु	टिळकसूक्तिसंग्रह	संपा. स. वा बापट, विजय प्रेस, १९२६	,,
तंरा	तंजावरचें राजघराणें	इतिहाससंग्रह, संपा. द. ब. पारसनीस १९०२	,,
तृसंवृ	तृतीयसंमेलनवृत्त	भा. इ. सं. मंडळ, शके १८३७	,,
तीता	तीताला पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
तीम	तीमथ्याला पहिलें पत्र	,, ,, ,,	,, ,,
तुगा	तुकाराममहाराजांची गाथा	संपा. मा. कृ. देशमुख, शं. वा. दांडेकर, चित्रशाळा १९२५	अभंग
तैसं	तैत्तिरीय संहिता	... ...	कांड,प्रपा.अनु.
तोबं, तोबंड	तोतयाचें बंड	संपा. न. चिं. केळकर, प्रका. भट आणि मंडळी, पुणें १९१३	पृष्ठ
थेस्स	थेस्सलनीकेकरांस पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
थोमारो	थोरले माधवराव रोजनिशी	संपा. ग. चि. वाड	भाग, पृष्ठ
दयाळ	दयाळनाथांची कविता	अ. सी. साठे, पांडे, अग्निहोत्री यांची प्रत	
दा, दास	श्रीमत्दासबोध	रामदासस्वामीकृत, प्रका. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें, आवृ. ५, शके १८४४	दशक, समास, ओंवी
दानी	दानीएल	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
दाव	बच्छहरण	दामोदरकविविरचित (महानुभावपंथीय), प्रका. द. सी. पंगु, १९२७	ओंवी
दावि	दासविश्रामधाम	आत्मारामस्वामीकृत, प्रका. सत्का. सभा, धुळें, रामदास आणि रामदासीग्रंथमाला, भाग ७ वा	पृष्ठ
दिमरा	दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें	संपा. द. ब. पारसनीस १९१३	भाग, पृष्ठ
द्विसंवृ	द्वितीयसंमेलनवृत्त	भा. इ. सं. मंडळ, शके १८३६	पृष्ठ
देप	देवनाथमहाराजकृत पदसंग्रह	संपा. वा. दा. ओक, निर्णयसागर, १८९६	कविता
देवसंत	देवदासकृत संतमालिका	संपा. द. वा, पोतदार, वैद्यकपत्रिका छापखाना, पुणें	ओंवी
धर्माजी	धर्माजीरावाचें कुटुंब	संपा. बळवंत मनोहर पंडित, जगद्धितेच्छु १८९६	पृष्ठ
धसिं	धर्मसिंधु	... ...	परिच्छेद
ध्यानमा	ध्यानमाला	वामनपंडितकृत	कविता
नक	नवा करार	प. शा. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
नकआ	नवा करार	संपा. बा. ना. आठवले, १९२९	अध्याय, वचन
नकपं	नवा करार	संपा. पंडिता रमाबाई, १९१२	,,
नकपुप्र	नव्या करारांतील पुस्तकांची प्रस्तावना	लिटरेचर कमेटी, १९२५	पृष्ठ
नदा	नरहरीकृत दानव्रत	महाराष्ट्र कवि, अनेककविकृत कवितासंग्रह भाग २	कविता
नपुक	नवपुष्पकरंडक	संपा. वा. म. जोशी, मनोरंजन, मुंबई.	पृष्ठ
नल, नळ	नलदमयंतीस्वयंवराख्यान	रघुनाथपंडिताचे काव्यग्रंथ प्रका. ह. त्रिं. बापट, १९०९	कविता
नव	नवनाथ भक्तिसार	धुंडिराजसुतमालोकृत, प्रका. बा. ल. पाठक, जगदीश्वर प्रेस, १८९६	अध्याय, ओंवी

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकडयांचा खुलासा
नहे	नहेम्या	प. शा. जु क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
नाकु	नाटयकलाकुठार मात्रा	संपा. स. ना. ठोसर, १९२६	वळसा, पृष्ठ
नागा	नामदेवगाथा	इंदिराप्रेस.	अभंग
नाना,नाम, नामना	नामदेवनाटक	संपा. वा. रं. शिरवळकर, आर्यभूषण, १९०४	पृष्ठ
नि	निबंधमाला	संपा. विष्णुशास्त्री चिपळुणकर, चित्रशाळा १९१७	पृष्ठ
निचं	निरभ्रचंद्र	संपा. वि. बा. हडप १९२०	पृष्ठ
निगा	श्रीनिळोबामहाराज यांच्या अभंगांची गाथा	नानामहाराज साखरे संप्रदायी, प्रका. त्रिं. ह. आवटे, शके १८३०	पृष्ठ
निमा	निरंजनमाधवाची कविता	प्रका. ल. रा. पांगारकर, शके १८४१–४७	भाग, पृष्ठ
निगं	निर्गम	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
नीति	नीतिशास्त्रप्रवेश	संपा. वा. म. जोशी, मनोरंजन, १९०९	पृष्ठ
नीतिसू	नीतिसूत्रें	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
न्यायप	न्यायपद्धति	न्यायशास्त्र–मोरो केशव दामले	पृष्ठ
न्यासे	न्यायाब्धिसेतु	(शिळाप्रत)मो. श्री. चितळेकृत, रत्नागिरी, १८५६	,,
पकोधे	पण लक्षांत कोण घेतो ?	संपा. ह. ना. आपटे,	पृष्ठ
पंच	पंचतंत्र (मराठी भाषांतर)	प्रका. महाराष्ट्रकवि, शके १८२९	पृष्ठ
पदमव	परकीय दरबारीं मराठयांचे वकील	इतिहाससंग्रह संपा. द. ब. पारसनीस	,,
पदाव	पदार्थवर्णन	संपा. वा. प्र. मोडक, निर्णयसागर	भाग, पृष्ठ
पपप्रे, पप्रे	पतिपत्नीप्रेम	संपा. वा. रा. कोठारी, प्रका. सुरस ग्रंथमाला आवृ. २ री.	पृष्ठ
पया	पत्र्यादी वगैरे	काव्येतिहास संग्रह.	पृष्ठ
परमा	परमामृत	मुकुंदराजकृत	प्रकरण, ओंवी
पला	परशुरामकृत लावण्या	प्रका. चित्रशाळा, १९२०	पृष्ठ; प्रकरण, पृष्ठ
पवि, पलोवि	परलोकविद्या	प्रका. रा. ना. कार्लेकर, आवृ. ३, सन १९१८	पृष्ठ
पशागी	पवित्रशास्त्रांतील गीतें	संपा. पंडिता रमाबाई, १९१९	,,
पाइ	पाइअसद्दमहाण्णव	प्राकृत–हिंदीकोश. संपा. पंडित हरिगोविंद-दास त्रिकमचंद शेठ, कलकत्ता १९२८	पृष्ठ
पाट	पाट नांवाचा पत्त्यांचा खेळ	बडोदावत्सल छापखाना, सन १८८९ .	पृष्ठ
पांप्र	पांडवप्रताप	श्रीधरस्वामीकृत	अध्याय, ओंवी
पाव	पानपत बखर	रघुनाथ यादवकृत, संपा. का. ना. साने	पृष्ठ
पारिभौ	पारिजातभौमासुर नाटक	संपा. नारायण आनंदराव पै, प्रका. नारायण-भिकशेट खातू, शके १८१३ (शिळाप्रत)	पृष्ठ
पार्ले	पार्लमेंट	संपा. दा. ना. आपटे, सयाजीसाहित्यमाला ८३, बडोदें, १९२४	पृष्ठ
पाव्ह	पाल व व्हर्जिनिया	संपा. गो. शं. वापट, प्रका. गव्ह. सें. बुकडेपो १८७५	पृष्ठ
पृच	पृथ्वीराज चव्हाण	(खरा रजपूत वीर) लोकहितवादी	पृष्ठ
पेब	पेशवाईची अखेर	संपा. गो. का. चांदोरकर, इतिहास–ऐतिहासिक मासिक, प्रका. सत्कार्योत्तेजक सभा धुळे	पृष्ठ
पेद	पेशवे दप्तरांतील निवडक पत्रें,	संपा. गो. स. सरदेसाई	भाग, पत्र

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकडथांचा खुलासा
पेत्र	पेत्राचें पहिलें पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
पेदसमा	पेशवेदप्तरांतील सनदापत्रांतील माहिती	संपा. ग. चि. वाड व द. ब. पारसनीस, १९१७	पृष्ठ
प्रक	प्रकटीकरण	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
प्रयेच	प्रभु येशूचें चरित्र	संपा. पंडिता रमाबाई, १९१३	पृष्ठ
प्रला	प्रभाकरकृत लावण्या	प्रका. चित्रशाळा, १९२०	पृष्ठ
प्रसंइ	प्रथमसंमेलनवृत्त	भा.इ.सं. मंडळ. शके १८३५	,,
प्राणिमो	प्राणिशास्त्र (मूलतत्त्वें)	संपा. बा. प्र. मोडक, निर्णयसागर, १९२३	पृष्ठ
प्रेकृ	प्रेषितांचीं कृत्यें	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
ब	बहिणाबाईचा गाथा	प्रका. वि. ना. कोल्हारकर, शके १४४८	अभंग
बंज्ञा	सार्थ ज्ञानेश्वरी	संपा. वेंकटस्वामी, शके १८४९	अध्याय, ओंवी
बाय	बायकांचे बंड (नाटक)	संपा. कृ. प्र खाडिलकर, चित्रशाळा, १९०२	अंक, प्रवेश
बाळ	बाळमित्र .	संपा. वि. कों. ओक, आवृ. २, निर्णयसागर १८९०	भाग, पृष्ठ
ब्रच	ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र	संपा. द. ब. पारसनीस	पृष्ठ
ब्रप	ब्रह्मेंद्रस्वामी पत्रव्यवहार	,, ,, ,,	पृष्ठ
ब्राचि	ब्राह्मण आणि त्यांची विद्या	संपा. म. शि. गोळे, आर्यभूषण, १८९५	पृष्ठ
भज	(नानारूपी संतखेळ आणि) भजनी बोधपर पदसंग्रह	प्रका. शं ग. चिंचळकर, निर्णयसागर, मुंबई	पृष्ठ
भत	भजनतरंगिणी	संपा. ल. पां. नागवेकर, तत्त्वविवेचक छापखाना, मुंबई १८९१	पृष्ठ
भवि	भक्तविजय	महिपतिकृत. प्रका. जगदीश्वर प्रेस, मुंबई	अध्याय, ओंवी
भा	भावबंधन	संपा. रा. ग. गडकरी, चित्रशाळा प्रेस १९२०	पृष्ठ
भाअ	भारत इ. सं. मंडळ अहवाल	प्रका. चिटणीस, भा. इ. सं. मं.	,,
भाइ	भारत इ. सं. मंडळ इतिवृत्त	,, ,, ,,	,,
भाए	भास्कर-एकादशस्कंद (उध्दवगीता)	भास्कर कवीश्वर व्यासकृत (महानुभावी)	ओंवी
भाएपयाव	भारतवर्ष-ऐतिहासिक पत्रें, यादी, वगैर	संपा. ज. बा. मोडक, व का. ना. साने	पृष्ठ
भाकै	भाऊसाहेबांची कैफियत	काव्येतिहाससंग्रह. संपा. का. ना. साने, शके १८०९	,,
भाजुऐगो	भारतवर्ष-जुन्या ऐतिहासिक गोष्टी	संपा. द. ब. पारसनीस व ह. ना. आपटे	,,
भात्रै	भारत इ. सं. मं. त्रैमासिक	प्रका. चिटणीस भा. इ. सं. मं. पुणें	वर्ष, अंक, पृष्ठ
भाद्विसंइ	भा. इ. सं. मं, द्वितीयसंमेलनवृत्त	,, ,, ,,	पृष्ठ
भाब	भाऊसाहेबांची बखर	काव्येतिहाससंग्रह. संपा का. ना. साने, शके १८४४	पृष्ठ
भि, भिक्षी	भिक्षी भाषेंतील सोप्या व मनोरंजक गोष्टी, भाग १	संपा. धों. स. सानफ व त्र्यं. रा. विंगळे, आवृ. ३, १९२८	पृष्ठ
भू	भूशास्त्र	संपा. का. बा. मराठे, ग. में. बुकडेपो. मुंबई १८८६	पृष्ठ
भूव	भूवर्णन	संपा. का. बा. मराठे, मुंबई १८८०	पृष्ठ
भोंकु	भोंसल्यांचे कुलाचार	संपा. द. ब. पारसनीस, १९१५	पृष्ठ
मक	महिपति-कथासारामृत	महिपतिकृत	अध्याय, ओंवी
मत्त	मत्तयकृत शुभवर्तमान	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
मदबा	महेश्वरदरबारचीं बातमीपत्रें	संपा. द. ब. पारसनीस, १९१०	भाग, पृष्ठ
मदमं	मदनमंजरी	संपा. अण्णाजी गोविंद इनामदार	पृष्ठ
मदरु	मराठी दफ्तर रुमाल	संपा वि. ल. भावे	भाग, पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्यांचा खुलासा
मनको	मराठी भाषेचा नवीन कोश	संपा. रघुनाथ भास्कर गोडबोले, मुंबई, ग. सें. बुकडेपो, १८७०	
मब	महिकावतीची बखर	केशवाचार्यकृत. संपा. वि. का. राजवाडे, चित्रशाळा, पुणें १९२४	पृष्ठ
मनु	मनुस्मृति	... ...	अध्याय, श्लोक
मभा	महाभारत	... ...	
मंमं	मंदारमंजरी	रेंदाळकरांचा कवितासंग्रह, कोल्हापूर १९१०	पृष्ठ
ममंब	महाराष्ट्र मंडळाची बखर	भारतवर्ष. संपा. द. ब. पारसनीस	पृष्ठ
मंराधा मंराधा-मक	मंगीश–राधाविलास	महाराष्ट्रकवि, भाग २	कविता
मराआ	मराठ्यांची राजनीति–आज्ञापत्रें	विविधज्ञानविस्तार	पृष्ठ
मराचिथोशा	म. रा. चिटणीस–थोरले शाहूमहाराज	संपा. का. ना. साने	,,
मराचिधाशा	म. रा. चिटणीस–धाकटे शाहूमहाराज	संपा. का. ना. साने, शके १८०६	,,
मराचिरा	म. रा. चिटणीस–धाकटे राजारामम्हाराज	,, ,, ,,	,,
मराचिस	म. रा. चिटणीस–संभाजीमहाराज	,, ,, ,, सन १८८२	,,
मला	मलाखी	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
मरि	मराठी रियासत	संपा. गो. स. सरदेसाई	भाग, पृष्ठ
मसाप	महाराष्ट्र साहित्यपत्रिका (त्रैमासिक)	प्रका. महाराष्ट्रसाहित्यपरिषद	वर्ष, पृष्ठ;किंवा वर्ष, अंक, पृष्ठ
महमा, ममा	महत्त्वमापन	संपा. रा. मो. देवकुळे, आवृ. २, सन १८८७	पृष्ठ
मृ	संगीत मृच्छकटिक नाटक	संपा. गो. ब. देवल	पृष्ठ
मॅरट, मॅरटतप	मॅरट–तपशीलपत्रें	कर्नेल म्यारियटच्या पुस्तकाचें भाषांतर, आवृ. २, पुणें ज्ञानप्रकाश १८९४	पृष्ठ
माअक	माधवराव (सर टी.) यांची कविता	अर्वाचीन कविता (पूर्वार्ध). प्रका. दा. सां. यंदे आणि मंडळी, मुंबई १९०३	पृष्ठ
माप्र	माझा प्रवास	गोडशेशास्त्रीकृत बखर. प्रका. दा. सां. यंदे आणि मंडळी, मुंबई	पृष्ठ
मार्क	मार्केकृत शुभवर्तमान	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
माशेको	माझा शेजारी कोण	लिटरेचर कमिटी, १९२९	पृष्ठ
मु	मुक्तेश्वरकविकृत काव्यरचना		
मुआ, मुआदि	मुक्तेश्वर–महाभारत–आदिपर्व	मुक्तेश्वरकविकृत	अध्याय, ओंवी
मुमा	मुहूर्तमार्तंड	... ...	
मुरंशु	मुक्तेश्वर–रंभाशुकसंवाद	मुक्तेश्वरकविकृत	ओंवी
मुरामा	मुक्तेश्वर–रामायण	,, ,,	अध्याय, ओंवी
मुवन	मुक्तेश्वर–महाभारत–वनपर्व	,, ,,	,, ,,
मुंब, मुंब्या	मुंबईचा व्यापार	संपा. भीमराव सी. शाल्मिग्राम, इंदुप्रकाश, १८९२	पृष्ठ
मुसभा	मुक्तेश्वर महाभारत–सभापर्व	मुक्तेश्वरकविकृत	अध्याय, ओंवी
मो, मोरो	मोरोपंतकविकृत काव्यरचना		
मोअनु	मोरोपंत–आर्याभारत–अनुशासनपर्व	मोरोपंतकृत	अध्याय, आर्या
मोआश्व	,, ,, आश्वमेधिकपर्व	,,	,, ,,
मोआश्रम, मोआ	,, ,, आश्रमवासीपर्व	,,	,, ,,
मो उद्योग	,, ,, उद्योगपर्व	,,	,, ,,
मोऐषिक,मोऐषि	,, ,, ऐषिकपर्व	,,	,, ,,

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकडयांचा खुलासा
मोकॅ	मोल्स्वर्थ कॅंडीकोश	मोल्स्वर्थ-कॅंडी कोश (इंग्रजी-मराठी) बॉंबे ए. सो. १८४७	
मोकर्ण	मोरोपंत-आर्याभारत-कर्णपर्व	मोरोपंतकृत	अध्याय, आर्या
मोकृष्णवि, मोकृष्ण	,, ,, कृष्णविजय	,,	,, ,,
मोप्र, मोर	मोर, एल् एल्. बी. (प्रहसन)	संपा. नारायण हरि भागवत, नेटिव ओपिनियन प्रेस, १८८२	पृष्ठ
मोभीष्म, मोभी	मोरोपंत-आर्याभारत-भीष्मपर्व	मोरोपंतकृत	अध्याय, आर्या
मोमंभा	मोरोपंत-मंत्रभागवत	,,	स्कंध, आर्या
मोमौसल	मोरोपंत-आर्याभारत-मौसलपर्व	,,	अध्याय, आर्या
मोरा	मोरोपंत-रामायण	,,	अध्याय, आर्या
मोशल्य	मोरोपंत-आर्याभारत-शल्यपर्व	,,	अध्याय, आर्या
मोशांति	मोरोपंत-आर्याभारत-शांतिपर्व	,,	अध्याय, आर्या
मोल, मोको	मोल्स्वर्थ-कॅंडीकोश	प्रका. बॉंबे ए. सो. आवृ. १, १८३१, आवृ. २, १८५७	
मोसमा	मोरोपंत-आर्याभारत-समापर्व	मोरोपंतकृत	अध्याय, आर्या
मोस्त्री	,, ,, स्त्रीपर्व	,,	,, ,,
यथादी	यथार्थदीपिका	वामनपंडितकृत, प्रका. काव्यसंग्रह १९०८-१९१७	अध्याय, ओंवी
यंमू	यंत्रशास्त्राचीं मूळें	संपा. गो. गं. फडके, १८५३	पृष्ठ
यश	यशया	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
यशस्व	यशवंतराव खरे	संपा. हरि नारायण आपटे	
यंस्थि	यंत्रस्थितिशास्त्र	संपा. बा प्र. मोडक, आवृ. १, १८९७, कोल्हापूर	पृष्ठ
यहे	यहेज्केल	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
याको	याकोबाचें पत्र	प. शा. न. क. बा. सो. १९२४	,, ,,
यो	रंयोवा पहा		
योर, योगर	साधे योगरत्नाकर	प्रका. य. गो. दीक्षित, आवृ. २, सन १९२३	भाग, पृष्ठ
योहा	योहानकृत शुभवर्तमान	प. शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
र	रघुनाथपंडित-काव्यग्रंथ	प्रका. ह. त्रि. बापट, सन १९०९	पृष्ठ
रत्न	रत्नकांता नाटक	संपा. सी. ना. परुळेकर, माल्वणसमाचार छापखाना १८९०	अंक, प्रवेश
रंयोवा, योवा	रंगनाथी योगवासिष्ठ	संपा. गो. ना. शास्त्री दातार, प्रका. ग. चि. देव १९०५	प्रकरण, ओंवी
रसामू	रसायनशास्त्राचीं मूलतत्त्वें	संपा. बा. प्र. मोडक	
रसापू	,, ,, पूर्वार्ध	,, ,,	पृष्ठ
रसाउ	,, ,, उत्तरार्ध	,, ,,	,,
रा, राज	मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें	संपा. वि. का. राजवाडे	खंड, पृष्ठ
राअ	रामायण अयोध्याकांड	माधवकृत. प्रका. महाराष्ट्रकवि	अध्याय, ओंवी
राक	रामदासकविता	रामदास-रामदासी; भाग ३	कविता
राको	रानडेकृत इंग्रजी-मराठी कोश	संपा. प्रो. एन् बी. रानडे, १९०३-१६	
राज-भाअ	राजवाडे यांचा लेख	भा इ. सं मंडळ अहवाल	शक
राजे	राजे १, २	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकड्यांचा खुलासा
राधा	मंगीशकृत राधाविलास	महाराष्ट्रकवि भाग ३,	कविता
रापुपो	राजकीय पुरुषांचे पोवाडे	... ...	पृष्ठ
राम, रा	रामदासी मनाचे श्लोक	प्रका. आत्माराम प्रेस, धुळें, शके १८३२	श्लोक
रामा	रामायण	कृष्णदास मुद्गलकृत. प्रका. महाराष्ट्रकवि	प्रसंग, ओंवी,
राला	रामजोशीकृत लावण्या	चित्रशाळा प्रेस, १९०८ आवृ. ३	पृष्ठ
रावि	रामविजय	श्रीधरकृत. प्रका. बा. ल. पाठक, शके १८२८	अध्याय, ओंवी
राव्यको	राजव्यवहार कोश	रघुनाथपंत हणमंतेकृत.	वर्ग, श्लोक
रास, रासपं	रासपंचाध्यायी	शिवकल्याणकृत. प्रका. ग. बा. मोडक, शके १८२६	अध्याय, ओंवी
राज्ञा	राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरी	संपा वि. का राजवाडे	अध्याय, ओंवी
रुह	सारुह पहा		
रोज्यू	रोमिओ आणि ज्यूलियट	शेक्सपियर नाटयमाला	पृष्ठ
रोम	रोमकरांस पत्र	प शा. न. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
लूक	लूककृत शुभवर्तमान	प शा. न. क बा. सो. १९२४	,, ,,
लेवी	लेवीय	प. शा. जु. क बा सो. १९२४	,, ,,
लोक, लोककथा	लोककथा	संपा. शं ग. दाते, पुस्तक १, २. प्रका. गणेश सदाशिव, पुणें. १९२९–३०	भाग, पृष्ठ
लोधी	लोकधीवर	संपा. भा. कृ. उजगरे, १९१९	पृष्ठ
लोप्रयेख्रि	लोकबंधु प्रभु येशुख्रिस्त	संपा. ना. वा. टिळक, १९१८	,,
वगु	वनौषधिगुणादर्श	संपा. शंकरशास्त्री पदे, प्रका. य. गो. दीक्षित, पुणें १९२०	भाग, पृष्ठ
वत्स	वत्सलाहरण	कृष्णदास–कीर्तनतरंगिणी १	
वशाप	वऱ्हाडशालापत्रक	उमरावती (वऱ्हाड)	वर्ष, अंक, पृष्ठ
वसा	वटसावित्रीचें गाणें	प्रका. के. सी. कुलकर्णी, सुवर्ण प्रिं. प्रेस, मुंबई, १८८२	पृष्ठ
वस्व	वसाहतीचें स्वराज्य	संपा. वि. अ. ठोंबरे, मुंबई १९२०	पृष्ठ
वाड–मा	वाड–थोरले माधवराव रोजनिशी	संपा. ग चि. वाड	भाग, पृष्ठ
वाड–बाबा	वाड–बाळाजी बाजीराव रोजनिशी	संपा. ग. चि. वाड व द. ब. पारसनीस	भाग, पृष्ठ
वाड–समा	वाड–सवाई माधवराव रोजनिशी	,, ,, ,, ,,	भाग, पृष्ठ
वाड–शाछ	वाड–शाहू छत्रपति रोजनिशी	,, ,, ,, ,,	पृष्ठ
वामन	वामनी स्फुटश्लोक	वामनकृत	
वामनरु, वारु	वामन–रुक्मिणीविलास	,,	श्लोक
विक	विनायकाची कविता	संपा. द. अ. आपटे, चित्रशाळा प्रेस, शके १८४२	पृष्ठ
विचावि	विचारविलास	संपा. वा. म. जोशी, लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९२७	पृष्ठ
विसि	विवेकसिंधु	मुकुंदराजकृत	
विपु–उ	विवेकसिंधु–पूर्वार्ध, उत्तरार्ध	मुकुंदराजकृत प्रका. ग. चिं. देव, शके १८३३	प्रकरण, ओंवी
विवि	विविधज्ञानविस्तार	नियतकालिक, मुंबई	वर्ष, अंक, पृष्ठ
विविभामिनी	विविधज्ञानविस्तार–भामिनीविलास	,, ,, ,,	,, ,, ,,
विक्षिप्त	विक्षिप्त–इंदूरसस्थान	संपा. व्ही. एन्. भाटे, मुंबई न्यूज प्रेस, १८९५–९६, भाग १–३	भाग, पृष्ठ
वेसीस्व, वेणासीस्व	वेणा–सीतास्वयंवर	वेणाबाईकृत. प्रका. सत्का. सभा, धुळें, शके १८३५	समास, ओंवी.

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक इ०	आंकडयांचा खुलासा
वैद्यक	वैद्यकबाड	भा. इ. सं. मंडळ, अहवाल शके १८३३	पृष्ठ
व्यं	व्यंकटेश स्तोत्र	देवीदासकृत	ओंवी
व्यनि	व्यभिचारनिषेध	संपा. बाबा पदमनजी, प्रका. अमेरिकन मिशन सोसायटी, मुंबई १८५४	पृष्ठ
शनि	शनिमाहात्म्य	... .	ओंवी
शर	शब्दरत्नाकर	संपा. वा. गो. आपटे, आवृ. १, १९२२	
शारो	शाहूमहाराज यांची रोजनिशी	संपा. ग. चि. वाड	पृष्ठ
शासंको	शास्त्रसंबंधी कोश	संपा. का. म. ढालवाणी, १८८५	,,
शास्त्रीको, शाको	महाराष्ट्र भाषेचा कोश	क्रमवंत, जांभेकर इ० शास्त्री मंडळींनीं मुंबई शिक्षामंडळाकरितां रचलेला, १८२९	
शिक	शिवकथामृत	शिवरामकृत. महाराष्ट्रकवि अंक ५१, शके १८२९	कविता
शिकशि	शिवणकलाशिक्षक	संपा. रा. ना. पराडकर	भाग, पृष्ठ
शिगीता	शिवगीतांचंद्रिका	शिवरामकृत	पृष्ठ
शिचप्र	शिवचरित्रप्रदीप	संपा. द वि. आपटे व स. म. दिवेकर, शके १८४७	,,
शिदि, शिवदि, शिवदिग्वि	शिवदिग्विजय	संपा पां. रा. नंदुरबारकर व ल. का. दांडेकर	,,
शिली	शिवलीलामृत	श्रीधरकृत	अध्याय, ओंवी
शिल्पवि	शिल्पविद्या	... ...	पृष्ठ
शिशु	शिशुपालवध	भास्कर कविकृत (महानुभावी). प्रका. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, शके १८४४	ओंवी
शे	शेतकरी मासिक	सन १८८३, वर्ष १-१३	वर्ष, अंक, पृष्ठ
श्रीखृवि	श्रीखृष्टविजय	संपा. ग. र. नवलकर, १९०६	पृष्ठ
संग्राम, संग्रामगी, संग्रामगीतें	मराठ्यांचीं संग्रामगीतें	संपा. दु. आ. तिवारी	पृष्ठ
सप्र, स	समर्थप्रताप	गिरिधरस्वामीकृत. प्रका. सत्का. सभा, धुळे, शके १८३४	समास, ओंवी
संप्राको	संस्कृत प्राकृत शब्दकोश	अनंतशास्त्री, तळेकर, आवृ.१ सन १८५३	
सभा	सभाप्रदीप	संपा. गजानन, प्रका. द. वि. आपटे, पुणें.	पृष्ठ
समारो	सवाईमाधवराव यांची रोजनिशी	संपा. ग. चि. वाड, प्रका. डे. व्ह. ट्रा सो. सन १९०८	भाग, पृष्ठ
समीपृ	समीकरणपृथक्करण	संपा.ना.र.मोहोळकर,पुणें,१८६६(शिळाप्रत)	पृष्ठ
संयोग	संपूर्णयोगशास्त्र	संपा. पां. गो. महाजन, आवृ. ३, १९२१	,,
सला	सगनभाऊकृत लावण्या	प्रका. जहागिरदार व अधिकारी. १९२४	,,
संवि	संतविजय	महिपतिकृत	अध्याय, ओंवी
संव्या	संघव्यायाम (मराठी स्पष्टीकरण)	संपा. प्रो. माणिकराव, आरोग्यग्रंथमाला, पु. ९, सन १९२७	पृष्ठ
सशिच	सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र	प्रका. का. ना. साने	,,
ससंवृ	सप्तमसंम्मेलनवृत्त	भा.इ.सं. मंडळ शके १८४१	,,
साक्रिसं	साक्रेटिसाचे संवाद	संपा.वा.म.जोशी,कर्नाटक प्रेस, धारवाड १९२२	,,
सागोप्र	सावित्री आणि गोपाळ, प्रहसन	पंपा. रा. चि. करमरकर, वीरक्षेत्र मुद्रणालय बडोदें,' १८९०	अंक, प्रवेश
साचं	साहित्यचंद्रिका	सपा. हरि माधव समर्थ, जळगांव, सन १९२४	पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक, प्रकाशक, इ०	आंकड्यांचा खुलासा
साप्रा	साधारण प्रार्थना	संक्षिप्त आवृत्ति,कोल्हापूर मिशन छापखाना, १९०८	पृष्ठ
सारुह, सारु	सामराज–रुक्मिणीहरण	सामराजकविविरचित. प्रका. गो. वि. तुळपुळे,पुणें	सर्ग, श्लोक
सारं	सारसंग्रह	(केसरीचें छोटें फाईल). प्रका. केसरी कचेरी.	क्रमांक, पृष्ठ
सासंइ	सावंतवाडी संस्थानचा इतिहास	संपा. वि. पु. पिंगुळकर	पृष्ठ
सिव	सिंहासनबत्तिशी	प्रका. वि. स. अग्निहोत्री, मुंबई, १८५७	,,
सिसं	सिद्धांतसंहिता	सोहिरोबानाथकृत, पैप्रत,	अध्याय, ओंवी
सीतालोपा	सीतालोपामुद्रासंवादांतील वेंचे	वामनपंडितकृत. नवनीत, प्रका. मंगळदास आणि सन्स, सुरत, आवृ. ८. १९२३	कविता
सीस्व	सीतास्वयंवर	वामनकृत.	,,
सु	सुदर्शन नाटक	संपा. कृ. ह. दीक्षित, चित्रशाळा,पुणें,१९१७	पृष्ठ
सुकौ	सुशिक्षणकौमुदी	संपा. गु ना. मुजुमदार, प्रका. विद्याविलास कोल्हापूर १८९०	,,
सुच	सुरसुंदरीचरित्र	(प्राकृतग्रंथ) जैनविविधसाहित्य शास्त्र–माला, बनारस १९१६	
सुदा	सुदामचरित्र	अमृतरायकविकृत	कविता
सुवे	सुशिलेचा देव	संपा. वा. म. जोशी, विजयप्रेस, पुणें	पृष्ठ
सुसु	सुरतसुधन्वा नाटक	प्रका पुरंदरे आणि कंपनी	,,
सूयं	सूर्यमाला	संपा. धारप, ग. से. बुकडेपो, १८८९	,,
सूयंग्र	सूर्यग्रहण	संपा. ह. ना. आपटे, आर्यभूषण	,,
सेंपू–उ	सेंद्रियरसायनशास्त्र–पूर्वार्ध–उत्तरार्ध	संपा. बा. प्र. मोडक, निर्णयसागर, मुंबई १९००	,,
सोहिमह	सोहिरोबा महदनुभवेश्वरी	सोहिरोबानाथ आंबिये	
स्त्रीगीत	स्त्रीगीतमाला	प्रका. गो. मो. कार्लेकर, मुंबई, १८८२	,,
स्तोसं	स्तोत्रसंहिता	प. शा. जु. क. बा. सो. १९२४	अध्याय, वचन
स्वप, स्वरापरि	स्वराज्याचें परिवर्तन	संपा. नाथमाधव, प्रका. गणेश महादेव आणि कंपनी १९२५	पृष्ठ
स्वादि, स्वानुदिन	स्वानुभवदिनकर	दिनकर रामदासीकृत,रामदास–रामदासी भाग ६, शके १८२३ सत्का. सभा धुळें	कलाप, किरण, ओंवी
ह, हरि	हरिविजय	श्रीधरकृत प्रका. जगदीश्वर प्रेस मुंबई,	अध्याय, ओंवी
हंको	हंसकोश	संपा. र. भा. गोडबोले, आवृ. १ शके १७८५.	
हव	हरिवंशाची बखर	संपा. बा. वा. खरे	पृष्ठ
हाकांध	हाच कां धर्म	संपा. सौ. शांताबाई(भिडे) नाशिककर, प्रका. मनोरमा कार्यालय, अधिकारी आणि मंडळी पुणें	,,
हिब	हिम्मतबहादर	संपा. आ. स. बर्वे, बडोदें	,,
हिंलई	हिंदुस्थानचा लष्करी इतिहास	संपा.ज. नानासाहेब. शिंदे, श्रीसयाजीसाहित्य माला ३९, बडोदें, १९२१	,,
हो, होला	होनाजीबाळाकृत लावण्या	प्रका. चित्रशाळा, १९२४	,,
होकै	होळकरांची कैफियत	संपा. का. ना. साने	,,
होपो	होळकरशाहींतील पोवाडे	संपा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते	,,
ज्ञा	ज्ञानेश्वरी	प्रका. वेंकटस्वामी, शके १८४९	अध्याय, ओंवी
ज्ञाको	ज्ञानकोश	संपा. डॉ. श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञान-कोशमंडळ, पुणें	भाग, पृष्ठ किंवा अक्षर, पृष्ठ
ज्ञान	ज्ञानप्रकाश	दैनिक वर्तमानपत्र, पुणें	ता., मासे, सन
ज्ञानो	ज्ञानोदय	साप्ताहिक.	,, ,, ,,
ज्ञाप्र	ज्ञानप्रबोध	विष्णनाथकृत (महानुभावी)	ओंवी
ज्ञायो	ज्ञानेश्वर–योगवासिष्ठ	... ...	,,

व्याकरण, भाषा, शास्त्र, प्रांत इत्यादि विषयक

संक्षेपांची सूची

संक्षेप	स्पष्टीकरण
	अव्यय.
के.	अकर्मक क्रियापद.
अप.	अपभ्रंश, अपभ्रष्टरूप.
मा.	अर्धमागधी.
अ.	अरबी भाषा.
ॲरे.	ॲरेमाईक भाषा.
अव.	अनेकवचन.
आइं.	आंग्लो इंडियन.
आद.	आदरार्थी.
इ.	इत्यादि.
इं.	इंग्रजी भाषा.
उ०	उदाहरण, उदाहरणार्थ.
उ. उरि.	उरियाभाषा.
उअ.	उभयान्वयी अव्यय.
उक्रि.	उभयविध (सकर्मक–अकर्मक) क्रियापद
उद्गा.	उद्गारवाचक अव्यय.
उप.	उपरोधिक.
उर्दू, ऊ.	उर्दू भाषा.
एव.	एकवचन.
क., कर.	करवीरप्रांतीय भाषा.
कर्ना.	कर्नाटकप्रांतांतील (दक्षिण महाराष्ट्रांतील) भाषा
कवि.	कवितेंत.
का.	कानडी भाषा.
काश्मी.	काश्मीरी भाषा.
क्रि.	क्रियापद.
क्रिवि.	क्रियाविशेषण.
क्रिविअ.	क्रियाविशेषण अव्यय.
कु.	कुडाळप्रांतीय भाषा.
कुण.	कुणबाऊ भाषा.
कों.	कोंकणी (ठाणें, कुलाबा, रत्नागिरी प्रांतीय)
क्व.	क्वचित् प्रयोग.
खा.	खानदेशी भाषा (अहिराणी).

संक्षेप	स्पष्टीकरण
खि.	खिस्ती.
ग, गणित	गणिती परिभाषा.
गॉ.	गॉथिक भाषा.
ग्री.	ग्रीक भाषा.
गु, गुज.	गुजराथी भाषा.
गो.	गोमंतकप्रांतीय भाषा.
चि.	चित्पावनी भाषा.
छाप.	छापखानाविषयक.
ज.	जनभाषा.
जि.	जिप्सी.
ज्यो.	ज्योतिषशास्त्र.
तत्त्व.	तत्त्वज्ञान.
तर्क.	तर्कशास्त्र.
ता.	तामिळभाषा.
तु.	तुर्की.
तु०, तुल.	तुलनार्थी, तुलना करा.
ते.	तेलगू भाषा.
द्रा.	द्राविडी भाषा.
द्वि.	द्विरुक्ति.
दे., देभा.	देशी (संस्कृत प्राकृत खेरीज) भाषा.
ध्व.	ध्वन्यनुकारी; ध्वनिवाचक.
न.	नपुंसकलिंगी.
ना.	नागपुरी भाषा.
न्याय.	न्यायशास्त्र.
पं.	पंजाबी भाषा.
पदा, पदार्थ.	पदार्थविज्ञान.
प्र.	प्रशस्त.
पा.	पालीभाषा.
प्रा.	प्राकृत भाषा.
प्रां.	प्रांतिक (Provincial).
प्राणि.	प्राणिशास्त्र.
पु.	पुल्लिंगी.

संक्षेप	स्पष्टीकरण	संक्षेप	स्पष्टीकरण
पेरु.	पेरुव्हिअन भाषा.	वाप्र.	वाक्प्रचार.
पोर्तु.	पोर्तुगीज भाषा.	वास्तु.	वास्तुशास्त्र.
फा.	फारसी भाषा.	वि.	विशेषण.
फ्रें.	फ्रेंच भाषा.	विना.	विशेषनाम.
बं.	बंगाली भाषा.	विप्र.	विशेष प्रचार.
बा.	बागलाणी (नामपुर, नासिक प्रांतीय) भाषा.	विरू.	विशेष रूढ.
बीज.	बीजगणित.	वै.	वैदिक भाषा.
बे.	बेळगांवी.	व्या.	व्याकरण.
भा.	भाग.	व्यापक	व्यापक अर्थी.
भाइसंमं.	भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें.	शअ.	शब्दयोगी अव्यय.
भि.	भिल्लीभाषा.	शाप.	शास्त्रीय परिभाषा.
म.	मराठी भाषा.	सं.	संस्कृतभाषा.
म्ह०	म्हण.	सकि.	सकर्मक क्रियापद.
म्है.	म्हैसूर प्रांतीय.	सना.	सर्वनाम.
मा.	मावळी भाषा.	सामा.	सामान्य अर्थी.
माण.	माणदेशी भाषा	सामाशब्द	सामासिक शब्द.
रसा.	रसायनशास्त्र.	सिं.	सिंधीभाषा.
राजा.	राजापुरी भाषा.	सिंह.	सिंहली भाषा.
रू.	रूढ.	सुभा.	सुभाषित.
ल.	लक्षणेनें, लक्षणार्थी, लाक्षणिक.	स्था.	स्थापत्यशास्त्र.
लॅ.	लॅटिन भाषा.	स्त्री.	स्त्रीलिंग.
लु.	लुप्त.	हिं.	हिंदीभाषा.
व.	वऱ्हाडी भाषा.	हेट.	हेटकरी भाषा.